विक्रीत तयार !]–विवेकानंदजीवन–[विक्रीस तयार !!

किंमत चार आणे. **'बंगालचे रामदास !'** व्ही.पी.नें चौदा आणे.

लेखक—'महाराष्ट्रभाषाचित्रमयूर' श्रीयुत कृष्णाजी नारायण आठल्ये, एडिटर केरळकोकिळ· वेदांतरहस्यनैपुण्य; कडकडीत ब्रह्मचर्य; निस्सीम विद्वत्ता; अलोट धैर्य; अचाट कल्पना व निरुपम वक्तृत्व इत्यादि अद्वितीय गुणांनीं ज्या विभूतीनें सारें जग हालवून सातासमुद्रांपलीकडे आपल्या वैदिक धर्माचा झेंडा उभारला, आणि आपल्या यशोदुंदुभीनें सारे पाश्चात्य देश दुमदुमून सोडले, त्या **श्रीविवेकानंदस्वामींचें** हें अथपासून इतिपर्यंत **विस्तृत जीवनचरित्र अत्यंत मनोरंजक व बोधप्रद** झालें आहे. शिवाय, त्यांचीं भक्तियोग, कर्मयोग व इतर व्याख्यानें, यांतील अगदीं निवडक 'उपदेशामृताचा'हि समावेश याच पुस्तकांत केला असल्यामुळें, हें **पुस्तक अत्यंत सुबोध व संग्राह्य** झालें आहे. आरंभी स्वामींचा सर्वोत्कृष्ट फोटोहि दिला आहे. शिवाय (१) **धि सेल्फ मेसेरिझम टीचर** अर्थात् **मोहनी विद्येचा शिक्षक**—मोहिनी विद्येच्या संपूर्ण माहितीचें उपयुक्त पुस्तक, किं. १। रु.; (२) **मानसशास्त्र**–मनाचे धर्म व त्याची व्याप्ति ह्या संबंधाची उत्कृष्ट माहिती, किं ८४ आणे; (३) **सचित्र गिलीट**–गिलीट करण्यासंबंधानें सविस्तर माहितीचें पुस्तक, किं. ८८ आणे; (४) **जेव्हां सूर्योदय होईल!** अत्यंत चटकदार मनोरंजक कादंबरी, किं ८१२ आणे; (५) **प्राकृत हंसगीता**–भगवान् श्रीकृष्णानें हंसरूपानें केलेला उत्कृष्ट उपदेश यांत वर्णिला आहे, किं. १॥ आणा. ट. स. शिवाय. यांशिवाय सर्व तऱ्हेचीं पुस्तकें आमचेकडे विकत मिळतील.

प्रोपायटर हरिहर प्रेस, शनवार पेठ, पुणें–सिटी. [1–1]

[1–6]



ग्यारंटी पक्का रंगाची [1–12]

इनाम रंग विटला असें दाखविणारांस.

अमदाबादी पक्का रंगांचीं छुगडीं, खण, चिरड्या, पितांबर, कद, धोतरजोडे, उपरणीं इत्यादि कोणत्याहि प्रकारचा माल. कॅटलाग फुकट. तिकीट पाठवा.

धि गुजरात कंपनी, रायपुर-अमदावाद.

सार्थ पितृगीता. [1–1]

श्रीवेदव्यासांनीं केलेल्या पितृगीतेचें मूळासह

मराठी भाषांतर.

किं. १ आणा. ट. हं ५ प्रतींपर्यंत अर्धा आणा.

मनमोहन मोरेश्वर जोशी,
काळकादेवी तारऑफिसच्या शेजारी—मुंबई.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

योग, मेस्मेरीझम आणि विद्युन्मानसशास्त्राच्या आधारानें तयार केलेला, आणि पृथ्वीच्या चाऱ्ही खंडांत मान पावलेला, त्रिकालदर्शी

आरसा !!

फक्त एकदांच अनुभव घेऊन पहा, कीं, भूत, भविष्य आणि वर्तमान जाणणें कठीण आहे कीं कसें ? अनुभव घेईपर्यंत आपल्याला कल्पना देखील करतां येणार नाहीं, कीं, हें ज्ञान कसें होत असेल ? प्राणिमात्र जो जो विचार करतें, त्याचें चित्र आकाशांत चित्रगुप्त देव अदृश्य रीतीनें काढून घेतो. तें चित्र आणि त्याचे परिणाम, समाधी आणि मृत्युकाळाशिवाय दुसऱ्या वेळीं मनुष्य साधारण दृष्टीनें पाहूं शकत नाहीं. तसे विचार आणि त्याच्या परिणामाचा अमुक विभाग पाहूं शकण्याची अद्भुत क्रिया एका महात्म्याच्या कृपेनें साध्य झाली आहे. श्रद्धाळु मुलें, पुरुष व स्त्रिया स्वतःचे विचार आणि त्यांचे परिणाम पाहूं शकतात, आणि त्या आधारानें भूत, भविष्य आणि वर्तमान हकीकत सांगूं शकतात. शिवाय, हिस्टिरिआ व भूतप्रेतबाधा इत्यादि मानसिक रोगांकरितां हा एक चमत्कारिक उपाय आहे. या आरशानें तसे रोग निर्मूल होतात. एकदां अनुभव घेऊन पहा. देवांच्या साहाय्यतेनें काम केल्यानें एकदम रोगी खडखडीत बरा होतो, हें अद्भुत नव्हे काय ?

आपण औषधोपचारांत पैसे खर्च करतां, आणि त्यांत आपल्याला बिलकूल यश मिळत नाहीं; परंतु एकदां हा उपाय योजून पहा. भविष्य जाणण्याकरितां आपण पुष्कळ पैसे खर्च करतां, परंतु या आरशानें आपण एकदां भविष्य जाणून घ्या व खात्री करून घ्या. आपले पैसे वांचतील आणि आपल्याला लाभ होईल. आपण स्वतःच भविष्यवादी होऊं शकाल. फक्त एक आरसा विकत घ्या, आणि स्वस्तें ज्ञान संपादन करा. अशा स्वस्त्या किंमतींत असा लाभ होतो तो जाऊं देणें हें अगदीं अयोग्य आहे. हा आरसा एकदां विकत घेतल्यानंतर नेहमीं उपयोगास पडतो. गांव, परगांव, देशांतर आणि दूर असणारे मित्र सोयरेसंबंधी यांनां या आरशाच्या साहाय्यानें आपण भेटूं शकाल. अमुक काम होईल कीं कसें ? अमुक बाबतींचे परिणाम काय होतील ? वगैरे जे जे आपल्या मनाचे खुलासे करणें असतील ते सगळे होऊं शकतील. विद्वानांनीं पुष्कळ सरटिफिकिटें धाडलीं आहेत व धाडीत आहेत, हेच त्या आरशाच्या उपयुक्ततेचे पुरावे होत. हा आरसा वापरण्याचें युक्त ज्या भाषेंत पाहिजे असेल त्या भाषेचें नांव स्पष्ट लिहावें.

आरशाची किंमत—रु. २-९-० आरसा साध्या कांचेचा. आणि बिल्लोर कांचेच्या मजबूत आरशाची किंमत रु. ३-८-०. पोस्टेजसहित. हिन्दुस्थानाबाहेरच्या गृहस्थांकरितां वरील किंमतीपेक्षां एक रुपया जास्त.

गर्भश्रीमंत आणि राजेरजवाड्यांकरितां मुद्दाम मोठे आरसे केले असून त्यांची किंमत रु. १३-०-० पोस्ट व्ही. पी. खर्चासह ठेविली आहे.

सूचना:—सदर आरसा पसंत न पडल्यास आरसा पोहोंचल्यापासून २४ तासांच्या आंत व्ही. पी. करून परत पाठवावा, ह्मणजे अनुक्रमें रु. २-०-० व रु. २-८-० परत देण्यांत येतील.

पत्रव्यवहार बालबोध लिपींत करावा.

आशाभाई वाघजीभाई पटेल,
[2-12] मु. करमसद, पोस्ट आनंद, जिल्हा खेडा, प्रांत गुजराथ.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

मेसर्स बाळकृष्ण साजवा आणि कंपनी,

सदाशिवस्ट्रीट, गिरगांव—मुंबई.

छापखान्यास लागणारे—

प्रिंटिंग पेपर्स—रॉयल, अनरूलेड, फुलस्कॅप, कव्हर, कलर इ. इ. सर्व वजनाचे; ब्रासरुली—सर्वजातींच्या; शाई—टाइपाची, लिथोची, काळी किंवा रंगीत, हलकी व भारी, सर्व जातीची व सर्व दराची; अन्टिमनी—S. C. मार्काची; लिथोस्टोन—"१८×२४" अगर हव्या त्या आकाराचे; मेसीस—मशीन्स, केसीस, घोडे वगैरे सर्व लांकडी सामान.

छापखान्यास लागणारा हरएक माल आम्ही थेट विलायतेहून मागवीत असल्यामुळें तो आमच्यामार्फत मागविल्यानें फार फायदेशीर पडतो. केसरी, मनोरंजन, निर्णयसागर, आर्यभूषण इत्यादि महाराष्ट्रांतील प्रसिद्ध प्रकाशक आणि छापखानेवाले आमच्याचकडून बहुतेक माल घेत असतात.

विलायतेंतील प्रसिद्ध मिलर आणि रिचर्ड मेकरचे मुक, न्यूज, हेडिंग व आर्नमेंटल टाईप मागवून देऊं. या कंपनीचे आम्ही सोल एजंट आहों. [2-12]

वनौषधि सारसापरिला.

हा सारसापरिला कोणीहि सेवन केल्यास त्यापासून रक्तशुद्धि व रक्तवृद्धि होऊन शरीर पुष्ट व सतेज होतें. स्मरणशक्ति वाढून मेंदूला बळकटी येते, आणि शक्ति वाढते. बा. कि. रु. १।.

महाकुष्ठ व पांढरें कोड

यांवर दोन अत्युत्तम गुणदायक औषधें.

१ भारतमधुवल्ली—खाण्यासाठीं. कि. रु. १।.
२ नागवल्लीतेल—लावण्यासाठी. कि. रु. २.

मधुवल्ली सेवन केल्यानें व नागवल्ली तेल लाविल्यानें अठरा प्रकारचीं कुष्ठें खात्रीनें बरीं होतात. साधारण गुण दिसण्यास पंधरा दिवस लागतात.

[2-12] डॉ. धाकजी भानजी सावंत,
फणसवाडी, कोळ्याची चाळ, नं. २, मुंबई.

[2-12] **क्लिडायन्स छापचीं**

प्रोफेसर गजर यांचीं
शास्त्रीय रीत्या तयार केलेलीं औषधें.

फिवर ड्राप्स (ज्वरबिंदु) सर्व प्रकारच्या तापांवर जालीम. कि. ८४

ब्लडप्युरिफाईंग सोल्युशन (रक्तशोधक) उपदंशापासून होणाऱ्या रोगांवर फारच गुणकारी ठरलेलें. कि. रु. १

टॉनिक सोल्युशन—अपचन, अग्निमांद्य, जीर्णज्वर वगैरे विकार या औषधाच्या सेवनानें नाहींसे होऊन शारीरिक व मानसिक शक्ति वृद्धिंगत होते. कि. रु. २

प्लेगसोल्युशन—प्लेगवर रामबाण. कि. ८८

जर्मिसाईड—प्लेग, कॉलरा, वगैरे जंतुजन्य रोगप्रतिबंधक. कि. ८८.

कॉलरा सोल्युशन, गजकर्णाचें मलम, दंतमंजन वगैरे संपूर्ण औषधांची यादी मागवा.

आर्योनिक फार्मसी, गिरगांव, मुंबई.

[2-12] अचूक

शक्ति देणाऱ्या
आतंकनिग्रह गोळ्या.

रक्तसंबंधी सर्व प्रकारचे विकार व अशक्तता यांचा नाश करणाऱ्या सुप्रसिद्ध पौष्टिक गोळ्या. किंमत ३२ गोळ्यांच्या डबीचा १ रुपया.

वैद्यशास्त्री मणिशंकर गोविंदजी,
मालक-आतंकनिग्रह औषधालय.

हेड ऑफिस—जामनगर—काठेवाड.
शाखा नं. १ काळबादेवी रोड, मुंबई.
शाखा नं. ३ बुधवार पेठ, पुणें शहर.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

[2–12] **जारा लांकूड.**

वाफेच्या यंत्रांनीं कापलेलें **वेस्ट्रेलिअन जारा लांकडाचें** स्कॅन्टलिंगचा तक्तपोशी, दांडे, बडोद, सांब, चौकटी, ऑफिस पार्टिशन्स, छपरें, खिडक्या पॉलिश केलेलें लांकडी सामान, फ्रेमवर्क, कापसाच्या गठ्ठांस मारण्याच्या पट्टया इत्यादि कामांकडे उत्तम उपयोग होतो.

जारा लांकडाची किंमत सागवानाच्या **जवळ जवळ निम्मे आहे.**

निरनिराळ्या आकाराचे व लांबीचे स्कॅन्टलिंग मुंबई, कलकत्ता, मद्रास व कराची येथें असलेल्या आमच्या वखारींत नेहमीं मिळतात. पत्र पाठविलें असतां क्याटलाग व नमुने फुकट पाठवूं.

मिलर्स कारी जारा कंपनी, १९०२ लि.
यॉर्क बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई.
एजन्टस—
कलकत्ता—गिलॅन्डर्स अर्बथ्नोट आणि कंपनी.
मद्रास—बीनी ॲण्ड कंपनी.
कराची—मॅक्किनॉन मॅकेन्झी आणि कंपनी.

विक्रीस तयार ! विक्रीस तयार !!

मुद्दाम चातुर्मास्याकरितां.

मोठ्या टाईपांत छापलेला सचित्र.

हरिविजय ग्रंथ.

वि. सू.—सर्व लोकांस घेण्यास सुलभ पडावें म्हणून ग्रंथाची किंमत मुद्दाम कमी ठेविली आहे. [2–3]

किंमत ग्लेजप्रतीस रु. १–१२–०
रफ— " १–४–०
टपाल व व्ही. पी. खर्च ०—८—०

ग्रंथ व्ही. पी. नें पाठविला जाईल.

पत्ता—**बाळकृष्ण साजवा आणि कंपनी, पेपर मर्चेंट,**
सदाशिव स्ट्रीट, गिरगांव–मुंबई.

तर मग आजच मागवा !

"कायम कमला, आह्मी पुष्कळ वेळां आंबोळ्या केल्या असतील, पण तुझ्यासारख्या पातळ व दिसण्यास सुरेख अशा आंबोळ्या मला करितां येत नाहींत; इतकेंच नव्हे, तर माझ्या आईलासुद्धां अशा साधत नाहींत !"

"तुह्मी ज्या आंबोळ्या करितां त्या कशावर करितां ?"

"उथळशा तव्यांत." [2–12]

"तरीच त्या जशा साधाव्या तशा साधत नाहींत !"

"मग तुह्मीं त्याकरितां कांहीं युक्ति काढली आहे?"

"युक्तीबिक्ती कांहीं नाहीं. *किर्लोस्कर बंधूंची* आंबोळ्यांच्या तव्याची जाहिरात पाहून त्यांचेकडून एक तवा आणविला. या तव्यावर केलेल्या त्या आंबोळ्या."

"हे तवे कोठें मिळतात ?"

"ते खालील पत्त्यावर मिळतात. शिवाय, पाणी ओढण्याचे अगदी हलके जाणारे लोखंडी रहाट व चाकेंहि त्यांचेकडे मिळतात."

किर्लोस्कर बंधु,
पोष्ट किर्लोस्कर वाडी, (जिल्हा सातारा, सं. औंध.)

आंबोळ्यांचा तवा. रु. १. पाणी ओढण्याचें चाक. रु.५
पाणी ओढण्याचा रहाट. रु. १५

श्वासनाशकगुटिका.—दमा, खोकला, व त्यापासून कफ, घरघर, ज्वर, मलावरोध वगैरे विकारांवर तावडतोब गुण देतात. २० गोळ्यांच्या वाटलीस ८१०. ४० गो. १ रु. ट. हं. शिवाय. [2–3]

पत्ता:—जी. डी. भावे, पुणें शहर.

हिंवताप मलेरिया पाळीचे वगैरे

तापावर

कार्णिक ब्रदर्स यांचें **एग्युमिक्श्चर** खस व खात्रीलायक उपाय. कि. ८८. सहा वाटल्या व्ही. पी.-नें मागविणारास तारीख बदलण्याचें **परमनंट** कॅलेन्डर फुकट !

[2–12] कार्णिक ब्रदर्स, दादर—मुंबई.


या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

अजब ! आबालवृद्ध तरुणांची करमणूक ! अजब !!

[अद्भुतक्रीडाकौशल्य.]

WONDERFUL CARD TRICKS. [1-1]

अपूर्वकौतुकसंग्रह.



अर्थात्

बावन (५२) पत्ते गंजिफाच्या बंडलांवर होणारे

अद्भुत चमत्कारिक खेळ.



अलीकडे जादूचे खेळ करण्याविषयीं बऱ्याच लोकांची उत्सुकता पाहून, तशा लोकांत खासगी मित्रमंडळींत, लग्नप्रयोजनादि समारंभांत आणि मुख्यत्वेंकरून स्टेजवर अद्भुत जादूचा खेळ करणारांस अत्यंत उपयोगी पडावें म्हणून हें " अपूर्वकौतुकसंग्रह" पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. यांत एकंदर ४१ खेळांची कृतींसह माहिती दिली आहे. यांत ४१ खेळांतील विशेष महत्त्वाच्या बऱ्याच चित्राकृति काढल्या आहेत. यांतील सर्व खेळ साधारण हुषार मनुष्यास देखील फारसे परिश्रम न करितां सहज रीतीनें करतां येतील.

या पुस्तकांत सांगितलेले खेळ कसे करावयाचे व ते करीत असतां प्रेक्षकांपुढें कोणत्या तऱ्हेचें भाषण करावें तें सुद्धां यांत दिलें आहे.

यांतील खेळ येणेंप्रमाणें-प्रेक्षकांनीं बंडलांतून काढून घेतलेलें पान कोणतें आहे तें बंडल कानास लावून सांगणें ! रुमालाखालीं झांकून ठेवलेल्या बंडलांतून काढून घेतलेलें पान सांगणें ! पाहिलेलें पान बंडलाच्या मधोमध ठेवून तळहातानें बंडल दाबला असतांहि, तेंच पान एकदम वर आणणें ! एकाच्या हातांत धरलेलें पान दुसऱ्याच्या हातीं जाणें ! पाहून मिळविलेलें पान टेबलावर बंडल आपटून तावडतोब काढणें ! प्रेक्षक बंडलांतील ज्या पानास बोट लावील तेंच पान त्याचें प्रथम पाहिलेलें होणें ! पाहून ठेवलेलें पान प्रेक्षक बंडलांतून ज्या नंबरावर मागतील त्याच नंबरावर काढून देणें ! बंडल डोळ्यांसमोर आरशाप्रमाणें धरून प्रेक्षकांनीं पाहून ठेवलेलें पान कोणत्या नंबरावर आहे तें बिनचूक सांगणें ! आपण सांगूं तेंच पान बंडलांतून घेणाराच्या हातीं वारंवार येणें ! बंडलांतून एकेक पान उचलीत असतां, ज्या पानावर पान पहाणारा थांबवील तेंच त्याचें प्रथम पाहिलेलें पान होणें ! बंडलांतून काढून घेतलेलें पान आपल्या पाठीवर चोळल्यानें त्या पानावरील ठिपके व रंग सांगणें ! प्रेक्षक बंडलांतून कोणतीं पानें काढतील त्यांचीं नांवें अगोदरच कागदावर लिहून ठेवणें ! कित्येक जणांनीं पान पाहिल्यावर एकच पान घेऊन आपल्या दंडावर चोळून प्रत्येकास दाखविल्यानें तें प्रत्येकाचें पान होणें ! खोलीच्या बाहेर जाऊन बंडलांतून पाहिलेलें पान आपण मंडळींतच बसून सांगणें ! प्रेक्षकांनीं काढून घेतलेल्या पानाचें नांव खोलींत बंद केलेल्या मनुष्याकडून सांगविणें ! बंडल डोळ्यांसमोर आरशाप्रमाणें धरून प्रेक्षकांनीं कोणतीं पानें काढून घेतलीं आहेत तें सांगणें ! उपड्या धरलेल्या बंडलांतील ज्या पानाला प्रेक्षक बोट लावतील त्या पानाचें नांव बिनचूक सांगणें ! पहिल्यानें पाहून मिळविलेलें पान दुसऱ्याच्या हातीं जाणें, व दुसऱ्यानें पाहून मिळविलेलें पान पहिल्याच्या हातीं येणें ! दोघांनीं बंडलांतून दोन पानें काढल्यानंतर टेबलावर बंडलाच्या दोन राशी करून त्या दोघांत त्यापाशीं उभें करावें व दोघांस तीं पानें आपापल्या राशीच्या मधोमध ठेवून रास दाबण्यास सांगावें म्हणजे पहिल्याचें पान दुसऱ्याच्या राशीवर येणें व दुसऱ्याचें पान पहिल्याच्या राशीच्या तळाशी जाणें ! बंडलावर फुंक मारतांच प्रेक्षकांनीं पाहून ठेवलेलें पान एकदम बंडलाच्या वर येणें ! प्रेक्षकांनीं काढलेलीं पानें आपल्या दोन हातांच्या मणगटांवर चोळतांच त्यांचीं नांवें सांगणें ! कोऱ्या कागदाचा तुकडा दिव्यावर गरम करतांच त्यावर प्रेक्षकांनीं प्रथम काढलेल्या पानांचीं नांवें उमटणें ! बंडलांत पाहून मिळविलेलें पान बंडल दाबून धरला असतांहि दुस-

न्याच्या हातांतील पुस्तकांत लिहणें ! प्रेक्षकांनीं पाहून मिळविलेलें पान सहा हारींपैकीं कोणत्या हारींत कितवें आहे तें फांसे टाकून सांगणें ! तिघांनीं एकेक पान पाहून मिळविल्यानंतर जो ज्या पानावर थांबवील तेंच त्याचें पान होणें ! आपणास न दाखवितां दुसरा इसम जें पान प्रेक्षकांस दाखवील त्याचें नांव आपण सांगणें ! दुसऱ्यानें पिसून दिलेल्या बंडलांतून बऱ्याच पानांचीं नांवें आपण न पहातां सांगणें ! दोन राशींतून कोणत्या राशीला प्रेक्षक बोट लावतील तें प्रथमच कागदावर लिहून ठेवणें ! मंडळीनें नाहीं झटलेल्या दोन पानांतूनच त्यांचें प्रथम पाहिलेलें पान काढून देणें ! हे व इतर, रंग, ठिपके, चित्रें बदलणारे असे एकंदर ४१ खेळ या पुस्तकांत चित्राकृतींसह दिले आहेत.

वरील सर्व खेळ खरे व अनुभवसिद्ध आहेत. यांतील एकहि खेळ खोटा नाहीं. हें पुस्तक घेणारानें जर हे खेळ मंडळीपुढें करून दाखविले तर प्रेक्षक निःसंशय आश्चर्यचकित होऊन जातील.

इतकें असूनहि अशा या अमोलिक पुस्तकाची किंमत फक्त १॥ रु. व टपाल खर्च २ आणे पडेल. ही १॥ रु. किं. केवळ या पुस्तकाचीच आहे असें समजूं नये. तर ही विद्या ह्मणजे यांतील खेळांच्या कृति व क्रिया हें पुस्तक विकत घेणारांस आह्मी शिकवीत आहों ह्मणजे त्यांजपुढें उघड करीत आहों त्यावद्दलचीच असें समजावें.

अपूर्वकौतुकसंग्रहाची प्रथमावृत्ति. सुमारें २० वर्षांपूर्वी आह्मीं छापिली होती. तिच्या सर्व प्रति संपून पुष्कळ लोकांच्या अद्याप मागण्या येत असल्यामुळें ह्मीं ही नवीन सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति छापिली आहे. पहिल्या आवृत्तींत यांतील भैरवी व कालभैरवी बंडल कसे तयार करावे हें लिहिलें नव्हतें; आह्मी तयार देत होतों. पण या आवृत्तींत त्या बंडलांची रचना कशी असते हें स्पष्ट लिहून शिवाय कृतींच्या पत्त्यांचे जे ६ खेळ ह्मीं वाढविले आहेत ते पत्ते कसे करावे याची माहिती १८ चित्राकृतींसह दिली आहे, ती पुस्तक वाचल्यानें समजेल; त्यावरून ज्यांचे त्यांनीं तयार करावे. तथापि यांतील भैरवी, कालभैरवी व सार्वजनिक हे बावन पत्त्यांचे ३ आखे बंडल व कृतीच्या फुटकळ पत्त्यांचे ६ बंडल हे आमच्याकडूनच तयार मागविल्यास त्या सर्वांची किंमत दोन रुपये वेगळी पडेल. ह्मणजे पुस्तकाची किंमत १॥ रुपया, व या बंडल पत्त्यांची किंमत २ रुपये, मिळून एकंदर ३॥ रुपये पडतील. तरी ३ महिन्यांचे आंत घेणारांस व्ही. पी. सह ३ रुपयांत देऊं. घेणारांनीं फक्त पुस्तक पाहिजे, किंवा बंडल पत्त्यांसह पुस्तक पाहिजे, तें स्पष्ट कळवावें. पुस्तकाबरोबर हे ३ बंडल व कृतीचे पत्ते मागविल्यास मग यांतील खेळांसाठीं दुसरें कोणतेंहि सामान तयार करण्याची जरूरी नाहीं. वरील पुस्तक व बंडल फक्त आमचेकडे खालील पत्त्यावर विकत मिळतातः—

मॅजिक प्रोफेसर जी. एम्. कार्लेकर,
पत्ता—डंकनरोडनजीक दुर्गादेवीच्या देवळाशेजारील घर, मुंबई, पोष्ट नं. ४

गृहिणीभूषण.

[1–6] दुसरी आवृत्ती.

लेखक-श्रीमती सौ. गिरिजाबाई केळकर.

सदर पुस्तक लोकांस पसंत पडून लवकर खपल्यामुळें त्याची दुसरी आवृत्ति काढण्यांत आली आहे. पुस्तकांत अनेक सुधारणा केल्या आहेत. किंमत पांच आणे.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः-मनोरंजन ऑफिस, गिरगांव—मुंबई.

[1–1] CLERKS' HANDBOOK.

THIRD EDITION, REVISED AND ENLARGED, pages 295, cloth bound, contains 387 complete specimen Letters for Private and Commercial Correspondence, Book-Keeping, Ready Reckoner, Proof Correcting, and several other Subjects very useful for Students fresh from Schools and Colleges seeking employment and Clerks wishing to rise in Government or Mercantile Offices. Price by V. P. P. Re. 1-8. Apply to:—
DUBHASHI & Co.
1st Bhatwadi, Girgaum, Bombay.

[2-12] सर्वांत जुनी व नांवाजलेली

बी. सखारामजी आणि कंपनी.

हॉउस ऍण्ड इस्टेट एजंटस्.

मुख्य ऑफिस १८ हमाम स्ट्रीट, कोट, मुंबई. (टेलिफोन नं. ३९०.)
ब्रँच ऑफिस भरुचा बिल्डिंगज, काळबादेवी, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई. (टेलिफोन नं. २१४४.)

आम्ही मुंबई व इतर ठिकाणीं असलेल्या उत्तम व प्रसिद्ध अशा घरांचे व मालमत्तेचे मुख्य एजंटस् आहोंत व त्यामुळें मालकांनां व गिऱ्हाईकांनां आमचे मार्फत काय फायदा झाला व होत आहे याचा खुलासा गरजूंनीं अवश्य मागवावा.

उत्तम शृंगारलेलें (फर्निश्ड) अथवा विनशृंगारलेले बंगले, घर, मजले, ऑफिसांकरितां व पेढ्यांकरितां लहान व मोठ्या जागा, दुकानांकरितां जागा, मुंबईतील कोणत्याहि भागांमध्ये आमच्या मार्फत पाहिजे तेव्हां मिळतील.

घरें व इतर जमीनजुमले यांची खरेदी व विक्री मुंबई, माथेरान, लोनावळा, खंडाळा, महाबळेश्वर, पुणें, पंचगणी, देवळाली, दिल्ली, कराची, इत्यादि ठिकाणी आमचे मार्फत उत्तम तऱ्हेनें होते.

हवाशीर घरांमध्यें राहिल्यानें प्रकृति उत्तम रहाते; व उत्तम प्रकृति हें सर्व सुखाचें साधन आहे; आणि असलीं साधनें आमच्या वतीनें सुलभ रीतीनें उपलब्ध होतात.

रिकामीं असलेलीं घरें व विक्रीची मालमत्ता यांची माहिती पत्रद्वारें मागविली असतांहि देण्यांत येते. घरांचीं भाडीं मालकांकरितां फार सवलतीनें वसूल करण्यांत येतील. लायक गहाणांवर अल्प गरजा भागविण्यापासून मोठे धंदे उभारण्यास लागतील अशा रकमा, बिनबोभाट थोड्या मुदतींत, मरंबसेशीर रीतीनें व्याजीं लावून दिल्या जातात; आणि गरजूंच्या गरजा भागविल्या जातात. अनुभवानें खात्री.

विशेष माहिती पत्रद्वारें अगर समक्ष विचारिली असतां खुलासेवार देण्यांत येईल.

हिल्स्टेशन्सकडील लोकांची होत असलेली मोठी गैरसोय दूर करण्यासाठीं आम्हीं आमच्या कंपनीची शाखा पुण्यासहि स्थापन केली आहे. तरी तिचा फायदा लोक घेतील, अशी उमेद आहे.

आम्हीं इंडिया इक्विटेबल इन्शुअरन्स् कंपनी लिमिटेडची मुंबई इलाख्याची चीफ एजन्सी घेतली आहे. हेड ऑफिस—कलकत्ता. प्रॉस्पेक्टस् व इतर माहिती मागविली असतां देण्यांत येईल. हुषार व प्रामाणिक एजंटस् पाहिजेत.

पुण्याचा पत्ता:—
बी. सखारामजी आणि कंपनी,
हाऊस ऍण्ड इस्टेट एजंटस्,
ईस्ट स्ट्रीट, पुणें.

प्रोप्रायटर,
वसंतराव सदाशिव घोत्रे.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि माहिती मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.



" त्यां ह्मणतों हें पहा जरा ! ह्मणा तुच्छ मग वसुंधरा !
दृष्टीस ह्या ह्मणो कुणी । मी तर या उत्कर्ष गणीं !"

चित्रकार—श्रीयुत अ. म. माळी, मुंबई.]

'सत्यसंकल्पाचा दाता भगवान्। सर्व करी पूर्ण मनोरथ ॥'

माहे आगष्ट, १९१२. वर्ष १८ वें, पूर्वार्ध, भाग २ रा.

मासिक मनोरंजन.

वर्ष १८ वें, अंक २०६ वा.

आयुष्यांतील एक बहारीचा प्रसंग.

कवि—श्रीयुत दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

सुरललना ज्या सुमकलिका । धरिति शिरीं अभिनव रसिका,
तेथुनि देवें त्या गळुनी । ठेल्या का या मम नयनीं ?
स्पर्श सुधेचा हा अथवा । चंद्रखंड गळलें किंवा !
सुख-सिंधूच्या वा लहरी । चढल्या अवचित येथवरी !
भान मला माझेंच नसे । मग सुख हें मी वर्णु कसें !
जिकडे तिकडे आनंद । जग ह्मणजे ब्रह्मानंद !

याहुनि हतविधि
कसला साधी
अन्य समाधि

सेवुनि योगी वनवास । नच जेथें ललनावास !
थांब ! कृपा कर, थांब जरा ! । नच तेथुनि हालवीं करा !
नंदनवनिंच्या रसिक सुरा ! । हांक मारितों थांब जरा !
थांब ! कृपा कर, थांब जरा ! । नच तेथुनि हालवीं करा !
त्यां ह्मणतों हें पहा जरा ! । ह्मणा तुच्छ मग वसुंधरा !
दृष्टि-रोध हा ह्मणो कुणी । मी तर या उत्कर्ष गणीं !
जेथें सोज्ज्वल अत्यंत । वदनचंद्र विलसे शांत.

होउनि अवनत
मधुरस्मितयुत
मजशीं निरखित

रम्य अशी दावी सृष्टि । दिव्य नसे का ती दृष्टि ?

डॉ० गोपाळ विनायक देशमुख.

महाराष्ट्रास ललामभूत असलेल्या डॉ. राव, डॉ. भाजेकर, डॉ. शिरगांवकर, डॉ. ह्यसकर प्रभृति इंग्लंडांत जाऊन वैद्यकशास्त्रांत मोठमोठ्या पदव्या संपादन केलेल्या भिषग्वरांचा थोडाबहुत परिचय महाराष्ट्र वाचकांस झालेलाच आहे. आमच्या वाचकांनां फारकरून अपरिचित असलेल्या व इंग्लंडांत जाऊन वैद्यक विषयांत अपूर्व विद्वत्ता आणि कीर्ति संपादन केलेल्या एका तरुण महाराष्ट्रीय भिषग्वराचा परिचय या लेखांत करून देण्याचा आमचा मानस आहे. डॉ. गोपाळराव देशमुख एम्. डी., (लंडन); एफ्. आर्. सी. एस्. हे च ते भिषग्वर होत.



डा. गोपाळ विनायक देशमुख.

डॉ. गोपाळराव देशमुख यांचा जन्म वर्धा जिल्ह्यांतील वाढोणागांवीं पौष शुद्ध४,शके १८०५, ता. २ जाने.१८८४रोजीं झाला. गोपाळराव हे आपल्या वडिलांचे तिसरे चिरंजीव होत. यांचे वडील श्रीयुत विनायकरावजी देशमुख, हे वर्धा जिल्ह्यांतील एक प्रसिद्ध जमीनदार व सावकार आहेत. देशमुखांचें घराणें वरेंच पिढीजाद, कुलीन आणि मोठें असून नागपुरच्या भोंसल्यांकडून या घराण्यास जहागीर मिळाली आहे, ती त्यांजकडे वंशपरंपरा चालत आली आहे. श्रीयुत विनायकरावजींचा स्वभाव फार बाणेदार, करारी व उमदा असून जुन्या व नव्या मतांतून उत्तम तेवढेंच स्वीकारण्याचा त्यांचा कल आहे. त्यांनां विद्येची फार आवड आहे. डॉ. देशमुखांच्या मातुःश्रीहि कुलीन व श्रीमंत घराण्यांतील होत्या. मुलांनीं खोटें बोलणें, चहाड्या करणें, वगैरे गोष्टी त्यांनां बिलकूल आवडत नसत. त्या मोठ्या कर्तव्यपरायण साध्वी होत्या. या मातापित्यांची चांगली कदर, शिस्त, व सुशिक्षण यांमुळें त्यांचीं सर्व मुलें निर्व्यसनी, हुषार, विद्वान् व काटकसरी निघालीं आहेत.

डॉ. गोपाळरावजींचें बाळपण बाल्योचित खोड्या व दांडगाई करण्यांत आपल्या खेडेगांवांतच गेलें. पुढें मुलांच्या शिक्षणाची तजवीज व्हावी म्हणून त्यांचे वडील गोपाळरावांसहवर्तमान वर्धा मुक्कामीं रहावयास गेले. आईबापांच्या वळणामुळें लहानपणापासून गोपाळरावजी हे मोठे तेजस्वी, सत्यवचनी, निःस्पृह व स्पष्टवक्ते निपजले आहेत. लहानपणापासून यांनां नानाप्रकारचे मर्दुमकीचे खेळ खेळण्याची मोठी आवड आहे.

आपल्या बयाच्या बाराव्या वर्षी मिड्ल स्कूलचा अभ्यास संपवून गोपाळरावजी नागपुरला आपल्या बंधूंकडे गेले व तेथें नील सिटि हायस्कूलमध्यें अभ्यास करूं लागले. नागपुरला असतांना यांनी शारीरिक खेळांकडे विशेष लक्ष्य दिलें व मलखांब, दांडपट्टा, क्रिकेट वगैरेमध्यें हे वरेच प्रवीण झाले. नखानें व पेन्सलीनें चित्रें काढणें, रांगोळ्या काढणें, कॅनव्हासवर लोकरीचें काम करणें, वगैरे कलांत यांनीं चांगलेंच पटुत्व संपादन केलें आहे. ड्रॉइंगमध्यें एकदां यांनां बक्षीसहि मिळालें आहे. यांचा आवाज मधुर असून यांनां चांगलें गातां येतें.

बयाच्या पंधराव्या वर्षी गोपाळरावजी प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावर नागपुरच्या मॉरिस कॉलेजांतून ते दोन वर्षांनीं कलकत्ता युनिव्हर्सिटीची एफ्. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. गोपाळरावांनीं बी. ए. होऊन सिव्हिल सर्व्हिसकरतां इंग्लंडला जावें, असा त्यांच्या वडिलांचा फार मनोदय होता; परंतु आपली

लंडन येथील क्विन्स हॉस्पिटलमध्ये डॉ. देशमुख हाउससर्जन असतांना घेतलेला नर्सेस व सर्जनचा फोटो. मध्यभागी डॉ. जॉर्डन लॉईड बसले असून त्यांच्या डाव्या हाताजवळ काळ्या पोषाखांत बसलेल्या हेड नर्सच्या मागें डॉ. देशमुख उभे आहेत.

[from a 'Friend.'

Photo]

डॉक्टर होण्याची अत्युत्कट इच्छा गोपाळरावजींनीं आपल्या वडिलांच्या कानांवर घातल्यामुळें त्यांनीं या शिक्षणाकडे बळजबरी आपल्या मुलाला आनंदानें वळवून दिला नंतर हे मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें अभ्यास करूं लागले. तेथून मुंबई युनिव्हर्सिटीच्या वेळोवेळच्या प्रत्येक परीक्षेंत हे पहिल्या वर्गांत पहिले येत गेले. या कॉलेजांत यांनां स्कॉलरशिपहि मिळत असे. सन. १९०४ साली ते एल्. एम् अण्ड एम्. परीक्षेत पहिल्या वर्गांत पहिले आले.

यानंतर वैद्यकशास्त्राचा अधिक अभ्यास करण्याकरतां डॉ. गव प्रभृति स्नेहवर्धक लोक करणाऱ्या मित्रांनीं आग्रहाची गळ घातल्यावरून गोपाळराव सा. ५ मे, १९०५ रोजी इंग्लंडास गेले. तिकडे जावयास त्यांच्या विचारशील व दूरदर्शी मातापितरांनी यांनां पूर्ण अनुमति दीली. सन १९०९ च्या मे महिन्यांत गोपाळराव लंडन एम्. बी., ची परीक्षा पसार झाले व त्याच साली नव्हेंबर महिन्यांत ते लंडन येथील एफ्. आर्. सी. एस्. परीक्षा उत्तीर्ण झाले.

ही परीक्षा पसार झाल्यानंतर 'किन्स हॉस्पिटल मध्यें हाऊस-सर्जनच्या जागेकरतां गोपाळरावांनं अर्ज केला. 'किन्स हॉस्पिटल' मध्यें कोणाहि हिंदु मनुष्याला जागा द्यावयाची नाहीं, असा सिंडिकेटनें ठराव केला असतांहि, डॉ. गोपाळरावांची विशेष योग्यता जाणून त्यांनां ती जागा देण्यांत आली. डॉ. जॉर्डन लॉइड नांवाच्या इंग्लंडांतील सुप्रसिद्ध शस्त्रवैद्यांनीं त्यांनां ही जागा मिळवून देण्याविषयीं फार खटपट केली. डॉ. जॉर्डन लॉइड यांच्याही जिभेच्या शस्त्रक्रियेसंबंधी डॉ. देशमुख यांनां एकदा वादविवाद करण्याचा प्रसंग आला होता. त्या वेळीं डॉ. गोपाळरावांच्या विद्वत्तेविषयीं डॉ. जॉर्डन लॉइड यांच्या

किन्स हॉस्पिटलमधील हाउस सर्जन्स.



डॉ. जॉर्डन लॉइड. डॉ. देशमुख.

Photo] [from a 'Friend.'

मनावर फार परिणाम झाला होता. 'किन्स हॉस्पिटल' मध्यें गोपाळरावांनीं एक वर्षपर्यंत काम केलें. या अवधींत कित्येक कठिण शस्त्रप्रयोग त्यांच्या हातून उत्तम तऱ्हेनें झाले. तेथील शस्त्रवैद्य व अधिकारी यांनां डॉ. देशमुख यांच्याविषयीं फार आदर वाटे. गोपाळरावजी रोग्यांशीं फार ममतेनें वागत असल्यामुळें त्यांनां हे अत्यंत प्रिय असतात.

सन १९११ च्या डिसेंबर महिन्यांत डॉ. गोपाळराव लंडनची एम्. डी., परीक्षा उत्तीर्ण झाले. लंडनच्या एम्. डी. व एफ्. आर्. सी. एस्. या परीक्षा पसार झालेले असे हे पहिलेच हिंदु भिषग्वर होत.

डॉ. देशमुख यांनां फ्रेंच भाषेचें चांगलें ज्ञान आहे. इंग्लंडांत असतां ते मधून मधून पॅरिसला जाऊन रहात असत. यूरोपांतील फ्रान्स, स्विट्झरलंड, जर्मनी, इटली, ऑस्ट्रिया वगैरे देशांत यांनीं प्रवास केला असून त्या देशांतील रुग्णालयांचें यांनीं सूक्ष्मपणें निरीक्षण केलें आहे.

डॉ. देशमुख हे उद्योगशील, बुद्धिमान् व कर्तव्यतत्पर असून परोपकार करण्यांत फार दक्ष आहेत. यांची मुद्रा नेहमीं आनंदी व प्रफुल्ल असते. यांनां वाचनाचा फार नाद असून यांचें सर्व विषयांचें ज्ञान फार दांडगें आहे. हे इतक्यांतच हिंदुस्थानांत परत येणार आहेत, असें समजतें.

डॉ. गोपाळरावजींनां परमेश्वर शतायु करो व त्यांच्या उत्कृष्ट ज्ञानाचा लाभ हिंदुस्थानास दीर्घ काल मिळून हिंदुस्थानचें हित होवो, असें आह्मी इच्छितों.

वेडा.

कवि- 'गोविंदाग्रज.'

(कोणाला कशाचें वेड लागेल आणि त्याचा शेवट कशांत होईल, हें कोणीं सांगावें ?)

वेडा कोणि जगास सोडुनि पळे बाहेर गांवाचिया,
मैदानांत भयाण जाउनि उभा राही; न कांहीं बघे
संध्यारंग नभःपटांत रमती; गांवीं न ते त्याचिया
वेडाचे नवरंग चित्तफलका रंगाविती; तेच घे.
त्याचें वेड कशांतुनी उपजलें कोणास हें नाकळे-
त्याचें त्यासहि नाकळे, मज गमे देवाहि ना ठाउकें !
त्याची ती विमनस्कता नच वदे कांहीं जरी आगळें,
वेड्याच्या हृदयास आपण तरी कैसें हाणावें मुकें ?
व्हावें काय तयास हें समजण्या रस्ता न कांहीं उरे,
शून्या दृष्टी गमे तिच्यांत दिसलें कोणाविशीं प्रेम न !
तोंडाचा पडदा विकार विसरे; बेरंग सारा स्फुरे;
होतें का मग भावशून्य नुसतें ओसाड त्याचें मन ?
छेः ! मैदान उजाडतें; तरि तिथें हा वायु आहेचना ?
वारें कांहितरी तसें घुमवितें ओसाड वेड्या मना !

[२]

तारा एक तशांत पश्चिमदिशा फोडून बाहेरली
संध्या कुंकुमि दिग्वधूच टिकली लावी रुपेरी जणूं !
वेड्यानें तिजला भकास नयनीं येतांक्षणीं हेरली;
हांसे भेसुर तो; सवेंच अपुलें हृद्गान लागे हणूं !
वाटे कीं पटली तिला बघुनियां त्या खूण कांहीं तरी;
तोंडाच्या पडद्यावरी उमटले चित्तांतले खेळ ते !
कांहीं वेळ तसाच पाहि तिजला; एकाग्रता ती खरी
आशा, प्रीति तसेंच वेड असलें, यांनांच ती साधते !
तारा आड ढगां-जरा क्षणभरी झांकून राहे जर
वेड्याच्याहि तरी विपण्ण वदनीं काळीच छाया दिसे !
केला कांहिं विचार-निश्चय; वटे तच्चित्र तोंडावर,
भासे दीपसम स्मशानतिमिरीं तें निश्चयाचें पिसें !
नैराश्यादि विकार तीव्र करिती हा खेळ ऐसा पहा-
आश्चर्यें बघती तयास थिजले डोळे दिशांचे दहा !

[३]

किंचित् मस्तक हालवी; पुटपुटे तोंडांतची कांहिंसें
तारास्थानपथें सवेग मग तो चालावया लागला;
हातीं तीस धरीन-निश्चय दिसे; धांवे पुढें तें पिसें !
टाकी सारखिं पावलें झपझपां; नाहीं मुळीं भागला !
काळी घोर निशा; उदास हृदयीं तैशी निराशा जडे-
तारा तारक ला तमीं; मनिं तसा तो एक आशाकण,
पायांखालुनि जाति डोंगर नद्या-पाही न मागें पुढें;
वर्षे कैक असाच चालत तरी लाभे न तारांगण !
वेडा यापरि जातजात पुढतीं झाला कुठें नाहिंसा !
तारा ती दिसते अजून ! परि हो पत्ता तयाचा कसा ?
काळाच्या उदरीं कधीं भटकतां कोणा कुठेंही कसा
वेडा सांपडतां, कथा मज-पुढें झालें तयाचें कसें ?
त्याचें वेड तरी कुणास मिळतां द्या तें मला आणुनी;
माझ्या जी मनिं चांदणी चमकते, जाईन तीमागुनी !

[Photo] [From a 'Friend.'

कोचीन संस्थानची राजधानी एर्णाकोलम् येथील नायर विद्यार्थिनींची इंग्रजी नाट्य.

प्रासंगिक विचार.

गेल्या मे महिन्यांत मद्रास इलाख्यामध्यें दोन स्मरणीय विवाह झाले. मंगळूर येथील प्रसिद्ध समाजसुधारक व अस्पृश्यवर्गाचे कैवारी श्रीयुत के. रंगराव यांची कन्या श्रीमती कुमारी राधाबाई यांचा विवाह सालेम जिल्ह्यांतील कुमारमंगलम् येथील जमीनदार श्रीयुत पी. सुब्बारायन्, बी. ए., यांच्याशीं झाला. वधू सारस्तब्राह्मणज्ञातींतील असून वराचें घराणें ब्राह्मणेतर ज्ञातींतील आहे. श्रीमती सौ. राधाबाई या चांगल्या शिकलेल्या असून, बी. ए. च्या परीक्षेस बसल्या आहेत. विवाहसमारंभ मंगळूर येथें मद्रास कायदेकौन्सिलमधील एक सभासद ना. श्रीयुत सुब्बाराव यांच्या बंगल्यावर ब्राह्मपद्धतीनें झाला. श्रीयुत सुधीरचंद्र बानर्जी हे उपाध्याय होते. या विवाहास वर व वधू या उभयतांची नातलग मंडळी हजर होती. सालेमचे डेप्युटी कलेक्टर रावबहादुर शिवज्ञानम् पिले, श्रीयुत राजगोपालाचारियर, मद्रासचे दिवाणबहादुर के. नारायणराव वगैरे गृहस्थ विवाहास सहानुभूति दाखविण्यास हजर होते. हें जोडपें सुखी व दीर्घायु असो, असें आम्ही इच्छितों. दुसरा विवाह याच्या उलट स्वरूपाचा झाला व तो रावबहादुर प्रो. रंगाचार्य यांच्या द्वितीय कन्येचा होय. गेल्या एप्रिलमध्यें कांजीवरम् येथें भरलेल्या पंडितपरिषदेचें अध्यक्षस्थान प्रो. रंगाचार्य यांनीं सुशोभित केलें होतें व या परिषदेंत पंडितांनीं प्रौढ विवाहास—ऋतुप्राप्तीनंतर कन्येच्या विवाहास-शास्त्रवचनांच्या आधारें संमति दिली होती, हें वाचकांच्या लक्ष्यांत असेलच. परंतु पंडितपरिषदेचा प्रतिध्वनि थांबण्यापूर्वीच प्रोफेसर साहेबांनीं आपल्या कन्येस आठव्या वर्षीच गृहिणीपदवीस चढविलें! प्रोफेसरसाहेबांच्या प्रथम कन्येचा विवाह सातव्या वर्षी झाला होता, त्या अर्थी सुधारणेचें एक पाऊल पुढेंच पडलें, असें ह्मटलें पाहिजे! 'समाजसुधारणा पाहिजे, परंतु ती राष्ट्रीय धोरणावर पाहिजे,' असा वाद एकदां प्रोफेसर मजकुरांनीं उपस्थित केला होता व त्यानंतर लगेच योज्या दिवसांनीं त्यांनीं आपल्या प्रथम कन्येचा विवाह केला होता. असो. तात्पर्य एवढेंच, कीं, शास्त्रीपंडितांनीं सामाजिक सुधारणेच्या कांहीं बाबींस संमति दिली व युक्तिवाददृष्ट्या ला सुधारणेचें महत्त्व लोकांनां पटलें, तरी त्या सुधारणा अमलांत आणण्याचें मनोधैर्य दासविण्यास कांहीं लोकांनीं तयार झाल्याखेरीज शास्त्रीपंडितांच्या संमतीचा व चर्चेचा तादृश उपयोग व्हावयाचा नाहीं!

दोन स्मरणीय विवाह.

परम पूज्य बादशहांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या पदवीदानांत आकोल्याचे श्रीयुत विष्णु मोरेश्वर महाजनि, एम् ए., व मुंबईचे रावसाहेब पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी, यांनां 'रावबहादुर' ही पदवी मिळाली आणि राजकोटचे सुप्रसिद्ध दानशूर बॅरिस्टर श्रीयुत सीताराम नारायण पंडित व पुण्याचे श्रीयुत प्रो. धोंडो केशव कर्वे, बी. ए., यांनां कैसरे हिंदची अनुक्रमें सुवर्ण व रौप्य पदकें मिळालीं, हें पाहून आह्माला संतोष वाटतो. रावबहादुर महाजनि यांनीं सरकारच्या विद्याखात्यांत मोठ्या हुद्यावर काम केलें असून आपलें सर्व आयुष्य विद्याव्यासंगांत घालविलें आहे. सामाजिक व धार्मिक बाबतींत त्यांचे विचार उदार असून महाराष्ट्र वाङ्मयाची उत्कृष्ट सेवा त्यांनीं बजाविली आहे. आजकाल हाताच्या बोटांवर मोजण्याइतके मराठी भाषेचे जे पंडित हयात आहेत, त्यांत अग्रपूजेचा मान रावबहादुर महाजनि यांचाच आहे. त्यांनीं आजपर्यंत सरकार व लोक यांची आणि आपल्या मातृभाषेची जी सेवा केली आहे, तिच्या मानानें पाहतां, 'रावबहादुर' पदवीनें त्यांनां मोठेपणा आला असें ह्मणण्यापेक्षां त्यांच्यामुळें त्या पदवीसच थोरवी आली, असें ह्मटलें पाहिजे. थोड्याच मातृभाषासेवकांच्या वांट्यास सरकारी पदव्या येतात, या दृष्टीनें पाहिलें असतां, उशिरां कां होईना, महाजनींसारख्या वाङ्मयभक्ताचा गौरव केला, याबद्दल सरकारचें अभिनंदन केलें पाहिजे. रावबहादुर महाजनि यांची विद्वत्ता, मनाची समता, न्यायप्रियता व साधुवृत्ति यांमुळें ते आबालवृद्धांस अत्यंत प्रिय व पूज्य आहेत,



श्रीमती सौ. राधाबाई. श्रीयुत पी. सुब्बारायन्.

Photo] [from a 'Friend.'

आणि त्यामुळें अखिल महाराष्ट्रास त्यांच्या गौरवानें स्वतःचा गौरव झाल्यासारखें वाटत आहे. रावबहादुर महाजनि हे प. वा. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे सहाध्यायी व प. वा. गोपाळराव आगरकर यांचे गुरु असून आधुनिक महाराष्ट्रीयांच्या विचारांस उदार व उज्ज्वल मतांचें वळण लावण्यास त्यांनीं पुष्कळ हातभार लायलेला आहे. रावबहादुर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी हेहि मराठी भाषेंतील एक चांगले कवि असून मानववंशशास्त्र हा त्यांच्या खास व्यासंगाचा विषय आहे. अशा वाङ्मयभक्ताचा सरकाराकडून गौरव झाला ही समाधानाची गोष्ट होय. बॅरिस्टर पंडित यांचा उदार हस्त परोपकाराच्या कार्यास नेहमीं पुढें असतो. महाराष्ट्रांतील व अन्य प्रांतांतीलहि अनेक उपयुक्त संस्थांस त्यांनीं द्रव्यसाहाय्य केलें असून, दुष्काळाच्या वेळीं गोरगुरिबांचे प्राण वांचविण्यासाठीं हजारों रुपये खर्चिले आहेत. सत्पात्रीं विद्यादान व अन्नदान करणारे बॅरिस्टर पंडितांसारखे उदारधी पुरुष महाराष्ट्रांत तरी फारच थोडे सांपडतील. प्रो. कर्वे यांचें नांव तर साऱ्या हिंदुस्थानांत दुमदुमत आहे. त्यांचा उदाहरणीय स्वार्थत्याग, अनाथ विधवांची स्थिति सुधारण्याविषयींची तळमळ आणि दीर्घोद्योग यांमुळें 'अनाथबालिकाश्रम' ही नमुनेदार संस्था अस्तित्वांत आली. 'महिलाविद्यालया' सारखी उपयुक्त संस्था त्यांच्याच प्रयत्नांमुळें अस्तित्वांत येत आहे. कर्तृत्वसंपन्न समाजसुधारक या नात्यानें प्रो. कर्वे यांची योग्यता फारच मोठी असून त्यांचा आयुःक्रम इतर समाजसुधारकांनां आदर्शवत् झाला आहे. ह्या दोन्ही थोर पुरुषांच्या गौरवाबद्दल महाराष्ट्रास अत्यंत समाधान वाटेल, अशी आमची खात्री आहे. हे सर्व सन्मान्य गृहस्थ आपापल्या पदव्यांचा दीर्घकाल उपभोग घेवोत, आणि त्यांच्या हातून अधिकाधिक लोककल्याण होऊन त्यांचा अधिकाधिक गौरव होवो, असें आम्ही इच्छितों.

डॉ. कुमारी यामिनी सेन.

बंगालमधील डॉ. कुमारी यामिनी सेन या ग्लासगो युनिव्हर्सिटीची परीक्षा पास झाल्या असून त्यांनां सदर्हू युनिव्हर्सिटीच्या रॉयल फॅकल्टी ऑफ फिजिशियन्स अँड सर्जन्सच्या फेलो नेमण्यांत आलें आहे. हा मान आजपर्यंत कोणत्याहि हिंदी स्त्रीला मिळाला नव्हता. कुमारी यामिनी सेन या कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या एल. एम्. अँड एस्. असून नेपाळमध्यें नोकरीवर होत्या. तेथें असतांना वैद्यकीय कुशलता व सुखभाव यांमुळें त्या अत्यंत लोकप्रिय झाल्या होत्या. त्यांचें सर्व घराणें विद्येच्या बाबतींत सुप्रसिद्ध आहे. त्यांचे वडील प. वा. बाबु चंडीचरण सेन हे बंगाली भाषेंतले नामांकित कादंबरीकार होते. श्रीमती कामिनी राय ह्या बंगाली कवयित्री डॉ. यामिनी सेन यांच्या भगिनी असून त्यांचे कनिष्ठ बंधु श्रीयुत निशीथ सेन हे कलकत्ता हायकोर्टाचे अॅडव्होकेट आहेत. डॉ. कुमारी यामिनी सेन यांनीं परदेशांत जाऊन जो थोर मान मिळविला, त्याबद्दल त्यांच्या सर्व देशबंधुभगिनींस साभिमान आनंद वाटणें स्वाभाविक होय. आपल्या देशांत एतद्देशीय स्त्रीडॉक्टरांची फार जरूरी असून डॉ. कुमारी यामिनी सेन यांच्यासारख्या विदुषींच्या उदाहरणांनीं आमच्या भगिनींस उत्तेजन येणार आहे. डॉ. यामिनी सेन यांच्यासारख्या अनेक विदुषी आमच्या देशांत निर्माण होवोत, व हिंदी स्त्रियांचा मागसलेपणा दूर होवो, असें आम्ही इच्छितों.

पुणें सेवासदन फॅन्सीबझार.

पुणें येथें श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांच्या प्रमुखत्वाखालीं चाललेल्या सेवासदनाचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडत आहे, ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय. या संस्थेमार्फत स्त्रियांनां लिहिण्यावाचण्याचें व शिवणकामाचें शिक्षण देण्याचे वर्ग चालू असून त्यांचा उपयोग करून घेणाऱ्या भगिनींची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. सहकारित्वाच्या तत्त्वाला अनुसरून आधुनिक पद्धतीनें परोपकाराची कामें करण्याचा मार्ग सेवासदन चालविणाऱ्या भगिनी इतरांनां दाखवीत आहेत. गरीब, अनाथ, दुःखपीडित लोकांचा परामर्ष घेणें; निराधार भगिनींनां अन्नवस्त्रें स्वतःचा चरितार्थ चालवितांयावा म्हणून त्यांनां लिहिण्यावाचण्याचें व धंद्याचें शिक्षण देणें, आणि दुर्दैवानें संसारसुखाची हानि झाली असतां दुःखी कष्टी होऊन कोंपऱ्यांत न बसतां दुसऱ्यांच्या उपयोगीं पडून व मानवजातीविषयीं अंतःकरणांत प्रेम आणि मातृभाव ठेवून परमार्थसंपादनाचा राजमार्ग इतरांनां दाखविणें, हा सेवासदनाचा हेतु आहे. पाश्चात्य देशांतील साध्वी स्त्रिया निरनिराळ्या दिशांनीं परोपकाराची

वालवून मानवी दुःखाचा परिहार करण्यासाठीं झटत असतात. आपल्या देशांत तशा सुसंघटित संस्था हल्लीं अस्तित्वांत येऊं लागल्या आहेत. त्यांनां यथाशक्ति उत्तेजन देऊन व साहाय्य करून त्यांच्या कार्यक्षेत्राचा विस्तार वाढविणें, हें प्रत्येक समाजहितचिंतक बंधूचें व भगिनीचें कर्तव्य आहे. पुण्याच्या सेवासदनास सुदैवानें श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांच्यासारख्या शक्त व उदार विचारांच्या बाई प्रमुखस्थानीं मिळाल्या असून, श्रीमती अन्नपूर्णाबाई आपटे, श्रीमती यमुनाबाई भट, श्रीमती जानकीबाई भट, श्रीमती सीताबाई डुकले, श्रीमती सौ. सीताबाई भांडारकर यांच्यासारख्या *उत्साही व उद्योगी भगिनी सतःच्या श्रमांकडे* न पाहतां संस्थेची उपयुक्तता वाढविण्यासाठीं कायावाचामनेंकरून झटत असतात. सर्व्हन्ट्स् ऑफ् इंडिया सोसायटीचे सभासद श्रीयुत गोपाळ कृष्ण देवधर हे या भगिनींस जरूर पडेल तेव्हां सल्ला देण्यास व साहाय्य करण्यास तत्पर असतात. येत्या सप्तंवर महिन्यांत, स्त्रियांनीं केलेल्या कलाकौशल्याच्या निरनिराळ्या कामांचा एक फॅन्सी बझार पुणें येथें भरविण्याचें सेवासदनाच्या व्यवस्थापक मंडळीनें ठरविलें असून, आपले लोकप्रिय गव्हर्नरसाहेब सर जॉर्ज क्लार्क यांच्या पत्नी लेडी क्लार्क यांनीं तो फॅन्सी बझार उघडण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें आहे. या स्त्रीकलाकौशल्यप्रदर्शनांत निरनिराळ्या प्रकारचें साधें व कलाकुसरीचें शिवणकाम, कशिदे, रेशमाचीं कामें, लोकरीचीं कामें, जरीचीं व कलाबतूचीं कामें (टोप्या, ब्रुशन्स, फीत इत्यादि), रुमाल वगैरेचीं विणकामें, पायमोजे, लहान मुलांचे शोभिवंत कपडे, पुरुषांचे नेकटाय, कपडे चढविलेलीं चित्रें, लहान मुलींनीं केलेलीं कामें वगैरे वस्तु मांडण्यांत येतील. पुण्यांतील स्त्रीसमाजांत वरील तऱ्हेच्या कलाकौशल्याच्या ज्ञानाचा प्रसार व्हावा, आणि गरीब स्त्रियांस निर्वाहाचें एक अल्पस्वल्प साधन करून यावें, या हेतूनें, आणि सेवासदन ही संस्था धर्मार्थ काम करणारी असल्याकारणानें तिला निरनिराळ्या लोकसंमत मार्गांनीं द्रव्याचें साहाय्य मिळवावें लागतें व त्या दृष्टीनें कांहीं द्रव्यसाहाय्य मिळेल तर पहावें म्हणून, फॅन्सीबझार भरविण्याची योजना करण्यांत आली आहे. (१) द्रव्यसाहाय्य देणें; (२) निरनिराळ्या कामांकरितां वस्तिसें देणें; (३) स्वतः केलेला माल सेवासदनाच्या मदतीकरितां म्हणून पाठविणें; (४) माल धर्मार्थ देतां येत नसल्यास विक्रीचें अर्धें उत्पन्न देणें; आणि (५) इतरांकडून माल मिळवून पाठविणें, अशा प्रकारांनीं या कामीं सेवासदनाला स्त्रीपुरुषमंडळीकडून मदत होण्यासारखी आहे. या फॅन्सी बझाराचे कामीं पुण्यांतील कित्येक बड्या बड्या यूरोपीयन स्त्रियांनीं व पारशी स्त्रियांनींहि अनेक प्रकारची मदत देण्याचें मोठ्या संतोषानें कबूल केलें आहे. महाराष्ट्रीय बंधुभगिनींहि असेंच साहाय्य करितील, अशी आम्हाला आशा आहे. या संबंधाचा पत्रव्यवहार "सेक्रेटरीज, सेवासदन फॅन्सी बझार कमिटी, शुक्रवार पेठ, पुणें सिटी." या पत्त्यावर करावा.

तात्कालिक उपाय.

एकाएकीं एकादा अपघात झाला असतां, किंवा कोणी मनुष्य अकस्मात् आजारी झाला असतां, डॉक्टर येऊन पद्धतशीर उपाय सुरू होण्यापूर्वी पुष्कळ वेळां कांहीं तरी तात्कालिक इलाज करणें अवश्य असतें. आयुष्यामध्यें अशा प्रकारचे प्रसंग अनेक वेळां येत असतात; परंतु तात्कालिक उपाय काय करावे हेंच माहीत नसल्यामुळें उपाययोजनेची इच्छा असली तरी स्वस्थ बसावें लागतें. हे तात्कालिक उपाय समजणें सर्वांनांच उपयुक्त आहे. अशी ज्याला माहिती असते असा एकादा जरी मनुष्य असला तरी आजुबाजूच्या कितीतरी माणसांनां त्याचा उपयोग होतो. पुरुषांप्रमाणें स्त्रियांवरहि असे प्रसंग येतात. अर्थात्, तात्कालिक उपायांची माहिती पुरुषांप्रमाणें स्त्रियांनांहि अत्यंत उपयोगाची आहे. किंबहुना मुलांबाळांच्या बाबतींत अपघाताचे प्रसंग वरचेवर येत असल्यामुळें स्त्रियांनां हें ज्ञान विशेषच उपयोगाचें आहे, असें म्हटलें तरी चालेल. ज्या एकाद्या बाईला तात्कालिक उपायांची योजना करण्याची माहिती असेल तिचा उपयोग खुद्द तिच्या घरांतीलच मंडळीस नव्हे, तर शेजाऱ्यापाजाऱ्यांनांहि होईल, व त्यामुळें अडचणीच्या वेळीं घाबरून जाण्याचें कारण उरणार नाहीं. 'सेंट जॉन्स अँब्युलन्स असोसिएशन' नांवाची एक संस्था असून तिच्या विद्यमानें 'फर्स्ट एड-First aid' किंवा तात्कालिक उपाय, या विषयाची परीक्षा घेऊन पास झालेल्यांस सर्टिफिकेटें देण्यांत येतात. मुंबई येथें ना. न्या. सर नारायण चंदावरकर

यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या 'सोशल सर्व्हिस लीग' या संस्थेनें ज्या कित्येक उपयुक्त बाबी हातीं घेतल्या आहेत, त्यांत 'फर्स्ट एड'च्या ज्ञानाचा प्रसार करणें, ही एक आहे. या विषयाची माहिती देण्यासाठीं गेल्या वर्षांत 'लीग'नें दोन वेळां क्लास उघडले, व त्यांची परीक्षा 'सेंट जॉन्स अँब्युलन्स'मार्फत घेण्यांत आली. गेल्या जुलईपासून स्त्रियांकरितां 'लीग'नें 'फर्स्ट एड'चा एक वर्ग सुरू केला असून त्यामध्यें शिकविण्याचें काम डॉ. कुमारी काशीबाई नवरंगे, बी. ए., एल्. एम्. अँड एस्., यांनीं पतकरिलें आहे. कांहीं वर्षांपूर्वी मुंबईत प. वा. डॉ. काशीनाथ नारायण गोखले यांनीं, स्त्रियांसाठीं 'फर्स्ट एड'चा वर्ग सुरू केला होता, व त्यांत कित्येक विद्यार्थिनी शिकतहि होत्या. त्यानंतर 'सोशल सर्व्हिस लीग'नें हें काम हातीं घेतलें, ही आनंदाची गोष्ट होय. या विषयाप्रमाणेंच स्त्रियांना आरोग्यरक्षण, विशेषतः आरोग्यशास्त्राच्या नियमांनां अनुसरून असलेली गृहव्यवस्था आणि बालसंगोपन, या विषयाचेंहि ज्ञान असणें अत्यंत अवश्य आहे. शहरांत राहणाऱ्या स्त्रियांनां तर हे विषय जरूर समजले पाहिजेत. तरी डॉ. कुमारी काशीबाई नवरंगे यांच्यासारख्या तज्ज्ञ स्त्रिया आपल्या भगिनींस अशा ज्ञानाची प्राप्ति करून देण्यास आनंदानें पुढें सरसावतील, व 'लीग'च्या मार्फत 'फर्स्ट एड'प्रमाणें वरील विषय शिकविण्याचेहि वर्ग निघतील, अशी आम्ही उमेद बाळगितों. स्त्रीडॉक्टरांची संख्या अगदीं थेताची असल्यामुळें वरीलसारखे वर्ग चालविण्यास एक मोठी अडचण आहे. तथापि त्यांतल्यात्यांत मार्ग काढल्यावांचून आज गत्यंतर नाहीं. 'लीग'च्या मार्फत आरोग्यरक्षण (Hygiene) या विषयाची माहिती देण्याचाहि एक वर्ग पुरुषांकरितां सुरू झाला असून त्यांत डॉ. विनायक शांताराम संझगिरी, एल्. आर्. सी. पी., एल्. आर. सी. एस्., हे शिकवीत असतात. अशा प्रकारच्या माहितीचा प्रसार गिरणीकामगार वगैरे वर्गाच्या लोकांतहि होणें जरूर आहे. क्षय, मलेरिया वगैरे रोगांचा प्रसार वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें आरोग्यरक्षणाच्या बाबतींत कोणकोणत्या प्रकारची खबरदारी घेतली पाहिजे, हें पांढरपेशा वर्गांतील लोकांप्रमाणें, कामकरी वगैरे वर्गांतील लोकांनांहि कळलें पाहिजे. त्याचप्रमाणें गिरण्या, कारखाने यांमध्यें अपघाताचे प्रसंग वरचेवर येत असल्यामुळें 'फर्स्ट एड' (तात्कालिक उपायां) च्या माहितीचाहि कामकरीवर्गास फार उपयोग आहे. डॉ. संझगिरी यांच्याप्रमाणें दुसरे डॉक्टर 'लीग'ला साहाय्य करितील, तर असे वर्ग निघणें कठीण नाहीं.

कर्नाटक कॉलेज.

कर्नाटक प्रांतांत आर्ट्स् कॉलेजाची उणीव आज पुष्कळ वर्षे भासत आहे. उच्च शिक्षणाच्या प्राप्तीची लालसा बाळगणाऱ्या कर्नाटकप्रांतस्थ विद्यार्थ्यांनां पुणें किंवा मुंबई येथें येऊन रहावें लागतें; परंतु सर्वच विद्यार्थ्यांनां पुण्यामुंबईचा खर्च सोसण्याची ताकद असते, असें नाहीं. अर्थात्, आर्ट्स् कॉलेजची उणीव हें कर्नाटकाच्या मागासलेपणाचें एक कारण आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. ही उणीव दूर करण्याच्या हेतूनें कर्नाटकांतील कित्येक पुढारी मंडळीनें चळवळ चालविली आहे. कर्नाटक कॉलेज स्थापण्यासाठीं पैसा जमविण्याची खटपट सध्यां चालू असून त्या बाबतींत धारवाडचे ना. श्रीयुत रोद्द, बेळगांवचे रा. व. देसाई व ना. श्रीयुत बेळवी, शिरसीचे रावसाहेब पुंडलिकराव पंडित, तसेच कित्येक लिंगायत व जैन गृहस्थ यांनीं पुढाकार घेतला आहे. या चळवळीस यश येऊन कर्नाटककॉलेजाची लवकरच स्थापना होवो, असें आम्ही इच्छितों. धनिक महाराष्ट्रीयांनीं ह्या कॉलेजच्या फंडास उदार हस्तानें मदत करणें हें त्यांचें कर्तव्य असून तें ते योग्य प्रकारें बजावतील, अशी आम्ही उमेद बाळगितों.

नांवांत काय आहे?

कवि—' Bee. '

[चाल—भूपती खरे ते वैभवसुख.]

कां आग्रह ? रसिका ! नांव सांग मज ह्मणसी,
नांवांत मोहिनी भासो सामान्यासी !

घन—नीलमणि—प्रासाद—चंद्रशालांत,
ते असंख्य सुंदर तारे चम्चमतात,
अनिवार इंद्रजालातें—टाकिती,
वसुधेस मुग्ध श्यामेतें—भ्रमविती,
संगूढ नेत्रसंकेतें—वाहती,
हे विलास हरिती वस्तुजातहृदयासी,
वद ! त्यांचीं नांवें काय पुसाया जाशी ?

[२]

तरुलता प्रसूनान्विता राहती रानीं,
संपूर्ण भारिती वनश्रेणि गंधांनीं,
ह्या प्रमदवनांतरिं शिरले— जे जन,
तरुलताचि अंगें झाले—आपण,
निज नामरूपही गेले—विसरुन,
आनंद—समीरण डोल देतसे त्यांसी,
टप टपा पडति खालतीं पेंच कुसुमांसी !

आणि त्यामुळें अखिल महाराष्ट्रास त्यांच्या गौरवानें स्वतःचा गौरव झाल्यासारखें वाटत आहे. रावबहादुर महाजनि हे प. वा. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे सहाध्यायी व प. वा. गोपाळराव आगरकर यांचे गुरु असून आधुनिक महाराष्ट्रीयांच्या विचारांस उदार व उज्ज्वल मतांचें वळण लावण्यास त्यांनीं पुष्कळ हातभार लावलेला आहे. रावबहादुर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी हेहि मराठी भाषेंतील एक चांगले कवि असून मानववंशशास्त्र हा त्यांच्या खास व्यासंगाचा विषय आहे. अशा वाङ्मयभक्ताचा सरकाराकडून गौरव झाला ही समाधानाची गोष्ट होय. बॅरिस्टर पंडित यांचा उदार हस्त परोपकाराच्या कार्यास नेहमीं पुढें असतो. महाराष्ट्रांतील व अन्य प्रांतांतीलहि अनेक उपयुक्त संस्थांस त्यांनीं द्रव्यसाहाय्य केलें असून, दुष्काळाच्या वेळीं गोरगुरिबांचे प्राण वांचविण्यासाठीं हजारों रुपये खर्चिले आहेत. सत्पात्रीं विद्यादान व अन्नदान करणारे बॅरिस्टर पंडितांसारखे उदारधी पुरुष महाराष्ट्रांत तरी फारच थोडे सांपडतील. प्रो. कर्वे यांचें नांव तर साऱ्या हिंदुस्थानांत दुमदुमत आहे. त्यांचा उदाहरणीय स्वार्थत्याग, अनाथ विधवांची स्थिति सुधारण्याविषयींची तळमळ आणि दीर्घोद्योग यांमुळें 'अनाथबालिकाश्रम' ही नमुनेदार संस्था अस्तित्वांत आली. 'महिलाविद्यालया' सारखी उपयुक्त संस्था त्यांच्याच प्रयत्नांमुळें अस्तित्वांत येत आहे. कर्तृत्वसंपन्न समाजसुधारक या नात्यानें प्रो. कर्वे यांची योग्यता फारच मोठी असून त्यांचा आयुःक्रम इतर समाजसुधारकांनां आदर्शवत् झाला आहे. ह्या दोन्ही थोर पुरुषांच्या गौरवाबद्दल महाराष्ट्रास अत्यंत समाधान वाटेल, अशी आमची खात्री आहे. हे सर्व सन्मान्य गृहस्थ आपापल्या पदव्यांचा दीर्घकाल उपभोग घेवोत, आणि त्यांच्या हातून अधिकाधिक लोककल्याण होऊन त्यांचा अधिकाधिक गौरव होवो, असें आम्ही इच्छितों.

डॉ. कुमारी यामिनी सेन.

बंगालमधील डॉ. कुमारी यामिनी सेन या ग्लासगो युनिव्हर्सिटीची परीक्षा पास झाल्या असून त्यांनां सदर्हू युनिव्हर्सिटीच्या रॉयल फॅकल्टी ऑफ फिजिशियन्स अँड सर्जन्सच्या फेलो नेमण्यांत आलें आहे. हा मान आजपर्यंत कोणत्याहि हिंदी स्त्रीला मिळाला नव्हता. कुमारी यामिनी सेन या कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या एल. एम्. अँड एस्. असून नेपाळमध्यें नोकरीवर होत्या. तेथें असतांना वैद्यकीय कुशलता व मुखभाव यांमुळें त्या अत्यंत लोकप्रिय झाल्या होत्या. त्यांचें सर्व घराणें विद्येच्या बाबतींत सुप्रसिद्ध आहे. त्यांचे वडील प. वा. बाबु चंद्रीचरण सेन हे बंगाली भाषेंतले नामांकित कादंबरीकार होते. श्रीमती कामिनी राय ह्या बंगाली कवयित्री डॉ. यामिनी सेन यांच्या भगिनी असून त्यांचे कनिष्ठ बंधु श्रीयुत निशीथ सेन हे कलकत्ता हायकोर्टाचे ॲडव्होकेट आहेत. डॉ. कुमारी यामिनी सेन यांनीं परदेशांत जाऊन जो थोर मान मिळविला, त्याबद्दल त्यांच्या सर्व देशबंधुभगिनींस साभिमान आनंद वाटणें स्वाभाविक होय. आपल्या देशांत एतद्देशीय स्त्रीडॉक्टरांची फार जरूरी असून डॉ. कुमारी यामिनी सेन यांच्यासारख्या विदुषींच्या उदाहरणांनीं आमच्या भगिनींस उत्तेजन येणार आहे. डॉ. यामिनी सेन यांच्यासारख्या अनेक विदुषी आमच्या देशांत निर्माण होवोत, व हिंदी स्त्रियांचा मागसलेपणा दूर होवो, असें आम्ही इच्छितों.

पुणें सेवासदन फॅन्सीबझार.

पुणें येथें श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांच्या प्रमुखत्वाखालीं चाललेल्या सेवासदनाचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडत आहे, ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय. या संस्थेमार्फत स्त्रियांनां लिहिण्यावाचण्याचें व शिवणकामाचें शिक्षण देण्याचे वर्ग चालू असून त्यांचा उपयोग करून घेणाऱ्या भगिनींची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. सहकारितत्त्वाच्या तत्त्वाला अनुसरून आधुनिक पद्धतीनें परोपकाराचीं कामें करण्याचा मार्ग सेवासदन चालविणाऱ्या भगिनी इतरांनां दाखवीत आहेत. गरीब, अनाथ, दुःखपीडित लोकांचा परामर्ष घेणें; निराधार भगिनींनां अन्नूनें स्वतःचा चरितार्थ चालवितांयावा म्हणून त्यांनां लिहिण्यावाचण्याचें व धंद्याचें शिक्षण देणें, आणि दुर्दैवानें संसारसुखाची हानि झाली असतां दुःखी कष्टी होऊन कोपऱ्यांत न बसतां दुसऱ्यांच्या उपयोगीं पडून व मानवजातीविषयीं अंतःकरणांत प्रेम आणि मातृभाव ठेवून परमार्थसंपादनाचा राजमार्ग इतरांनां दाखविणें, हा सेवासदनाचा हेतु आहे. पाश्चात्य देशांतील साध्वी स्त्रिया निरनिराळ्या दिशांनीं परोपकाराचीं कामें

चालवून मानवी दुःखाचा परिहार करण्यासाठीं झटत असतात. आपल्या देशांत तशा सुसंघटित संस्था हल्लीं अस्तित्वांत येऊं लागल्या आहेत. त्यांनां यथाशक्ति उत्तेजन देऊन व साहाय्य करून त्यांच्या कार्यक्षेत्राचा विस्तार वाढविणें, हें प्रत्येक समाजहितचिंतक बंधूचें व भगिनीचें कर्तव्य आहे. पुण्याच्या सेवासदनास सुदैवानें श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांच्यासारख्या पोक्त व उदार विचारांच्या बाई प्रमुखस्थानीं मिळाल्या असून, श्रीमती अन्नपूर्णाबाई आपटे, श्रीमती यमुनाबाई भट, श्रीमती जानकीबाई भट, श्रीमती सीताबाई डुकले, श्रीमती सौ. सीताबाई भांडारकर यांच्यासारख्या उत्साही व उद्योगी भगिनी स्वतःच्या श्रमांकडे न पाहतां संस्थेची उपयुक्तता वाढविण्यासाठीं कायावाचामनेंकरून झटत असतात. सर्व्हेन्ट्स् ऑफ् इंडिया सोसायटीचे समासद श्रीयुत गोपाळ कृष्ण देवधर हे या भगिनींस जरूर पडेल तेव्हां सल्ला देण्यास व साहाय्य करण्यास तत्पर असतात. येत्या सप्टेंबर महिन्यांत, स्त्रियांनीं केलेल्या कलाकौशल्याच्या निरनिराळ्या कामांचा एक फॅन्सी बझार पुणें येथें भरविण्याचें सेवासदनाच्या व्यवस्थापक मंडळीनें ठरविलें असून, आपले लोकप्रिय गव्हर्नरसाहेब सर जॉर्ज क्लार्क यांच्या पत्नी लेडी क्लार्क यांनीं तो फॅन्सी बझार उघडण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें आहे. या स्त्रीकलाकौशल्यप्रदर्शनांत निरनिराळ्या प्रकारचें सार्वे व कलाकुसरीचें शिवणकाम, कशिदे, रेशमाचीं कामें, लोकरीचीं कामें, जरीचीं व कलाबतूचीं कामें (टोप्या, कुशन्स, फीत इत्यादि), रुमाल वगैरेचीं विणकामें, पायमोजे, लहान मुलांचे शोभिवंत कपडे, पुरुषांचे नेकटाय, कपडे चढविलेलीं चित्रें, लहान मुलींनीं केलेलीं कामें वगैरे वस्तु मांडण्यांत येतील. पुण्यांतील स्त्रीसमाजांत वरील तऱ्हेच्या कलाकौशल्याच्या ज्ञानाचा प्रसार व्हावा, आणि गरीब स्त्रियांस निर्वाहाचें एक अल्पस्वल्प साधन करून द्यावें, या हेतूनें, आणि सेवासदन ही संस्था धर्मार्थ काम करणारी असल्याकारणानें तिला निरनिराळ्या लोकसंमत मार्गांनीं द्रव्याचें साहाय्य मिळावें लागतें व या दृष्टीनें कांहीं द्रव्यसाहाय्य मिळेल तर पहावें झणून, फॅन्सीबझार भरविण्याची योजना करण्यांत आली आहे. (१) द्रव्यसाहाय्य देणें; (२) निरनिराळ्या कामांकरितां वस्तिसें देणें; (३) स्वतः केलेला माल सेवासदनाच्या मदतीकरितां झणून पाठविणें; (४) माल धर्मार्थ देतां येत नसल्यास विक्रीचें अर्धे उत्पन्न देणें; आणि (५) इतरांकडून माल मिळवून पाठविणें, अशा प्रकारांनीं या कामीं सेवासदनाला स्त्रीपुरुषमंडळीकडून मदत होण्यासारखी आहे. या फॅन्सी बझाराचे कामीं पुण्यांतील कित्येक बड्या बड्या यूरोपीयन स्त्रियांनीं व पारशी स्त्रियांनींहि अनेक प्रकारची मदत देण्याचें मोठ्या संतोषानें कबूल केलें आहे. महाराष्ट्रीय बंधुभगिनीहि असेंच साहाय्य करितील, अशी आह्माला आशा आहे. या संबंधाचा पत्रव्यवहार "सेक्रेटरीज, सेवासदन फॅन्सी बझार कमिटी, शुक्रवार पेठ, पुणेंसिटी." या पत्त्यावर करावा.

तात्कालिक उपाय.

एकाएकीं एकादा अपघात झाला असतां, किंवा कोणी मनुष्य अकस्मात् आजारी झाला असतां, डॉक्टर येऊन पद्धतशीर उपाय सुरू होण्यापूर्वी पुष्कळ वेळां कांहीं तरी तात्कालिक इलाज करणें अवश्य असतें. आयुष्यामध्यें अशा प्रकारचे प्रसंग अनेक वेळां येत असतात; परंतु तात्कालिक उपाय काय करावे हेंच माहीत नसल्यामुळें उपाययोजनेची इच्छा असली तरी स्वस्थ बसावें लागतें. हे तात्कालिक उपाय समजणें सर्वांनांच उपयुक्त आहे. अशी ज्याला माहिती असते असा एकादा जरी मनुष्य असला तरी आजुबाजूच्या कितीतरी माणसांनां त्याचा उपयोग होतो. पुरुषांप्रमाणें स्त्रियांवरहि असे प्रसंग येतात. अर्थात्, तात्कालिक उपायांची माहिती पुरुषांप्रमाणें स्त्रियांनांहि अत्यंत उपयोगाची आहे. किंबहुना मुलांबाळांच्या बाबतींत अपघाताचे प्रसंग वरचेवर येत असल्यामुळें स्त्रियांनां हें ज्ञान विशेषच उपयोगाचें आहे, असें झटलें तरी चालेल. ज्या एकाद्या बाईला तात्कालिक उपायांची योजना करण्याची माहिती असेल तिचा उपयोग खुद्द तिच्या घरांतीलच मंडळीस नव्हे, तर शेजाऱ्यापाजाऱ्यांनांहि होईल, व त्यामुळें अडचणीच्या वेळीं धावरून जाण्याचें कारण उरणार नाहीं. 'सेंट जॉन्स अँब्युलन्स असोसिएशन' नांवाची एक संस्था असून तिच्या विद्यमानें 'फर्स्ट एड- First aid' किंवा तात्कालिक उपाय, या विषयाची परीक्षा घेऊन पास झालेल्यांस सर्टिफिकेटें देण्यांत येतात. मुंबई येथें ना. न्या. सर नारायण चंदावरकर

यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या 'सोशल सर्व्हिस लीग' या संस्थेनें ज्या कित्येक उपयुक्त बाबी हातीं घेतल्या आहेत, त्यांत 'फर्स्ट एड'च्या ज्ञानाचा प्रसार करणें, ही एक आहे. या विषयाची माहिती देण्यासाठीं गेल्या वर्षांत 'लीग'नें दोन वेळां क्लास उघडले, व त्यांची परीक्षा 'सेंट जॉन्स अँब्युलन्स'मार्फत घेण्यांत आली. गेल्या जुलईपासून स्त्रियांकरितां 'लीग'नें 'फर्स्ट एड'चा एक वर्ग सुरू केला असून त्यामध्यें शिकविण्याचें काम डॉ. कुमारी काशीबाई नवरंगे, बी. ए., एल्. एम्. ॲंड एस्., यांनीं पतकरिलें आहे. कांहीं वर्षांपूर्वी मुंबईत प. वा. डॉ. काशीनाथ नारायण गोखले यांनीं, स्त्रियांसाठीं 'फर्स्ट एड'चा वर्ग सुरू केला होता, व त्यांत कित्येक विद्यार्थिनी शिकतहि होत्या. त्यानंतर 'सोशल सर्व्हिस लीग'नें हें काम हातीं घेतलें, ही आनंदाची गोष्ट होय. या विषयाप्रमाणेंच स्त्रियांनां आरोग्यरक्षण, विशेषतः आरोग्यशास्त्राच्या नियमांनां अनुसरून असलेली गृहव्यवस्था आणि बालसंगोपन, या विषयाचेंहि ज्ञान असणें अत्यंत अवश्य आहे. शहरांत राहणाऱ्या स्त्रियांनां तर हे विषय जरूर समजले पाहिजेत. तरी डॉ. कुमारी काशीबाई नवरंगे यांच्यासारख्या तज्ज्ञ स्त्रिया आपल्या भगिनींस अशा ज्ञानाची प्राप्ति सरून देण्यास आनंदानें पुढें सरसावतील, व 'लीग'च्या मार्फत 'फर्स्ट एड'प्रमाणें वरील विषय शिकविण्याचेहि वर्ग निघतील, अशी आह्मी उमेद बाळगितों. स्त्रीडॉक्टरांची संख्या अगदीं थेटाची असल्यामुळें वरीलसारखे वर्ग चालविण्यास एक मोठी अडचण आहे. तथापि त्यांतल्यात्यांत मार्ग काढल्यावांचून आज गत्यंतर नाहीं. 'लीग'च्या मार्फत आरोग्यरक्षण (Hygiene) या विषयाची माहिती देण्याचाहि एक वर्ग पुरुषांकरितां सुरू झाला असून त्यांत डॉ. विनायक शांताराम संझगिरी, एल्. आर्. सी. पी., एल्. आर. सी. एस्., हे शिकवीत असतात. अशा प्रकारच्या माहितीचा प्रसार गिरणीकामगार वगैरे वर्गांच्या लोकांतहि होणें जरूर आहे. क्षय, मलेरिया वगैरे रोगांचा प्रसार वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें आरोग्यरक्षणाच्या बाबतींत कोणकोणत्या प्रकारची खबरदारी घेतली पाहिजे, हें पांढरपेशा वर्गांतील लोकांप्रमाणें कामकरी वगैरे वर्गांतील लोकांनांहि कळलें पाहिजे. त्याचप्रमाणें गिरण्या, कारखाने यांमध्यें अपघाताचे प्रसंग वरचेवर येत असल्यामुळें 'फर्स्ट एड' (तात्कालिक उपायां) च्या माहितीचाहि कामकरीवर्गास फार उपयोग आहे. डॉ. संझगिरी यांच्याप्रमाणें दुसरे डॉक्टर 'लीग'ला साहाय्य करितील, तर असे वर्ग निघणें कठीण नाहीं.

कर्नाटक कॉलेज.

कर्नाटक प्रांतांत आर्ट्स् कॉलेजाची उणीव आज पुष्कळ वर्षे भासत आहे. उच्च शिक्षणाच्या प्राप्तीची लालसा बाळगणाऱ्या कर्नाटकप्रांतस्थ विद्यार्थ्यांनां पुणें किंवा मुंबई येथें येऊन रहावें लागतें; परंतु सर्वच विद्यार्थ्यांनां पुण्यामुंबईचा खर्च सोसण्याची ताकद असते, असें नाहीं. अर्थात्, आर्ट्स् कॉलेजची उणीव हें कर्नाटकाच्या मागसलेपणाचें एक कारण आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. ही उणीव दूर करण्याच्या हेतूनें कर्नाटकांतील कित्येक पुढारी मंडळींनें चळवळ चालविली आहे. कर्नाटक कॉलेज स्थापण्यासाठीं पैसा जमविण्याची खटपट सध्यां चालू असून त्या बाबतींत धारवाडचे ना. श्रीयुत रोद्द, बेळगांवचे रा. ब. देसाई व ना. श्रीयुत बेळवी, शिरसीचे रावसाहेब पुंडलिकराव पंडित, तसेच कित्येक लिंगायत व जैन गृहस्थ यांनीं पुढाकार घेतला आहे. या चळवळीस यश येऊन कर्नाटककॉलेजाची लवकरच स्थापना होवो, असें आह्मी इच्छितों. धनिक महाराष्ट्रीयांनीं ह्या कॉलेजच्या फंडास उदार हस्तानें मदत करणें हें त्यांचें कर्तव्य असून तें ते योग्य प्रकारें बजावतील, अशी आह्मी उमेद बाळगितों.

शांताबाईचा चेहरा आतां फारच म्लान दिसत होता. त्यांनीं आपले डोळे शांतपणें रामरावांच्या डोळ्यांकडे लाविले होते खरे, तथापि पूर्वीप्रमाणें आतां राहणें अगदीं अशक्य आहे या विचाराने त्यांच्या अंतःकरणांत कालवाकालव चालविली होती.

" पूर्वीप्रमाणें आपलें मित्रत्व कायम राहीलना ? " शेवटीं रामरावांनीं विचारिलें.

" अलबत् ! कां नाहीं राहणार ? " किंचित् हंसून शांताबाईनीं उत्तर दिलें. थोड्या वेळानें शांताबाई म्हणाल्या "आतां मला आपला निरोप घेतला पाहिजे, आणि पूर्वीप्रमाणेंच आपण मला ' सिस्टर ' म्हटलेलें बरें. बरें तर, येतें डाक्टरसाहेब ! "

रामरावांना यावेळीं अत्यंत वाईट वाटलें. कालच संध्याकाळीं शांताबाईनीं त्यांच्याकडे पाहून सलज्ज मधुर स्मित केलें होतें. रामराव रमणीय सुखस्वप्नांत दंग झाले होते. आणि आज !—तेथून जातांना ' जळो हा पैसा ! ' असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले.

शांताबाई जरी तेथून अर्धीच निघून गेल्या होत्या, तरी त्यांनां हे उद्गार ऐकूं गेले व लगेच रामरावांनां कांहीं सांगावें, असें त्यांच्या मनांत आलें; परंतु हा विचार क्षणिकच होता. मनांत आलेली गोष्ट सांगण्यापासून आतां कांहीं उपयोग नाहीं, असें शेवटीं ठरवून शांताबाई आपल्या कामाला गेल्या.

दुसरे दिवशीं रोग्यांजवळ जाऊन काम करीत असतां शांताबाईचे ओठ कांपत होते. डोळ्यांत अश्रू आल्यामुळें व बाहेर तर ते दाखवितां येत नसल्यामुळें त्यांची दृष्टि अधुक झाली होती. तथापि थोड्याच वेळानें त्यांच्या चेहऱ्यावर पूर्ववत् आनंदाची झांक मारूं लागली.

कांहीं दिवस तसेच गेले. रामरावांचें शस्त्रकर्मातील नैपुण्य पाहून त्यांचे वरिष्ठहि आश्चर्य मानूं लागले होते. तरी पण रामरावांची मनस्थिति नेहमीं एखाद्या मानसिक मनुष्याप्रमाणें दिसत असे व शांताबाईचे डोळे पण हळुहळू खोलांत गेल्यासारखे दिसत होते.

[२]

आज एका लहान मुलावर हास्पिटलांत शस्त्रक्रिया चालली होती. डा. रामराव व दुसरे दोन डाक्टर तेथें हजर होते. शांताबाई एकट्याच दाई म्हणून उभ्या होत्या, व त्या मुलाच्या निस्तेज व फिकट ओंटाबाहेर येणारा फेस हळूच पुसून काढीत होत्या.

शस्त्रक्रिया आटोपल्यानंतर त्या जागीं आंत नळी घातली होती; तथापि तें मूल तसेंच निर्जीवसें पडून राहिलें होतें.

" नळींत कांहीं अडकलें तर नाहीं ? " रामरावांनीं विचारिलें.

डॉ. शहाणे म्हणाले "थोडाहि आवाज येत नाहीं ! "

त्यांनीं ती नळी बाहेर काढिली व तपासून पाहून तशीच परत पूर्वीच्या जागीं घातली. नळींत कांहींहि अडकलें नव्हतें. त्यांनीं आपली स्टीथास्कोप लावून पाहिली. त्यांच्या चेहऱ्यावर निराशा दिसूं लागली. त्यावेळीं त्यांची व डॉ. रामराव यांची दृष्टादृष्ट झाली. ते सूचक आवाजानें म्हणाले "छे ! तसें करणें बरें नव्हे ! "

डॉक्टर रामरावांनीं उत्तर दिलें "होय, मला माहीत आहे. पण—"

शांताबाई लक्षपूर्वक रामरावांकडे पाहूं लागल्या व त्यांची भीति हळुहळू जास्तच वाढूं लागली.

"यांत धोका आहे खरा, पण माझ्या इच्छेप्रमाणें करण्यास मला कोणाची हरकत आहे ? या लहानम्यासाठीं मी तो शेवटचा उपाय करणारच ! " असें आपल्याशींच पुटपुटत डॉक्टर रामरावांनीं एकदम आपलें तोंड खालीं वांकविलें.

जो एकच उपाय रामरावांनां सुचला होता तो त्या नळीतून तोंडानें वायू ओढणें हाच होय. अर्थात् ओढणाराला तसें करण्यापासून फारच धोका होता. डॉ. रामरावांनीं जलदीनें आपलें तोंड खालीं वांकविलें खरें, परंतु शांताबाई त्या मुलाच्या अगदीं जवळ होत्या त्यांनीं डॉ. रामराव काय करणार तें ओळखून एकदम आपलें तोंड मुलाच्या घशाशीं लाविलें. डॉक्टर पुढें सरले, परंतु शांताबाईनीं अगोदरच आपले ओंठ त्या नळीला लाविले होते ! बाकीच्यांनां दूर होण्याला त्यांनीं हातानें खुणाविलें, व ते सर्व पुरुष निराश होऊन वेड्यासारखे उभे राहिले !

डॉ. रामरावच प्रथम भानावर आले व घाईघाईनें त्या मुलाला टोंचण्याकरितां आणिलेल्या सामुग्रीतून त्यांनीं एक बारीक नळी काढिली व ती ते दिव्यावर तापवूं लागले.

शांताबाईनीं डोकें वर करून पाहिलें तेव्हां डॉक्टर रामरावांच्या हातांत टोंचण्याची पिचकारी तयार होतीच. त्याचा अर्थ शांताबाईच्या लक्ष्यांत आला. ती नळी ओढल्यापासून वाईट परिणाम होऊं नये यासाठीं

तो उपचार होता. लगेच शांताबाईनीं आपला हात पुढें केला. टोंचण्याचें काम काळजीपूर्वक केल्यानंतर कोठें रामरावांच्या जिवांत जीव आला. तरीपण त्यांचा चेहरा अद्यापिहि म्लान दिसत होता. स्वतःपेक्षांसुद्धां ज्यांच्यावर ते अधिक प्रेम करीत होते अशा शांताबाईनीं आपला जीव अशा तऱ्हेनें धोक्यांत घातला, याबद्दल त्यांनां अतिशय खेद वाटत होता.

तें मूल आतां किंचित् सुधारल्यासारखें दिसत होतें. त्याच्या तोंडावरील पूर्वीची प्रेतकळा आतां नाहींशी होऊन त्या घातलेल्या नळींतून थोडथोडी हवाहि येत जात होती.

शस्त्रक्रिया ज्या ठिकाणीं झाली होती तेथून बाहेर जातांना दुसरे डाक्टर म्हणाले "ह्या मुलाला आतां भीति नाहीं; पण, मिस्टर! तुम्हीं तसें करावयाचें नव्हतें! तुम्ही तसें कराल ही कल्पनाहि माझे मनांत आली नाहीं!"

शांताबाईनीं मान खालीं घातली व झाल्या गोष्टीबद्दल कोणापाशींहि न बोलण्याचें त्यांजकडून अभिवचन घेतलें.

[३]

नंतर सातआठ दिवसपर्यंत शांताबाईच्या प्रकृतीबद्दल डॉक्टर रामरावांच्या मनाला जी काळजी लागून राहिली होती, तिचें वर्णन करणें अशक्य आहे! शांताबाई ज्या ठिकाणीं काम करीत असत, तेथें सकारण किंवा विनाकारणसुद्धां रामरावांनीं जावें, व शांताबाई नित्याप्रमाणें आपल्या कामांत गुंतलेल्या त्यांनां दिसल्या म्हणजेच त्यांनां जरा स्वस्थता वाटावी. दुसरे डाक्टरसुद्धां शांताबाईच्या प्रकृतीबद्दल विशेष काळजी घेत असत, व त्यांच्या घशाला कांहीं त्रास होतो की काय याजबद्दल विशेष तपासणी करीत.

एके दिवशीं शांताबाईचें डोकें फार दुखत असल्यामुळें त्या आपल्या कामावर आल्या नाहींत. तो दिवस रामरावांनां अत्यंत दीर्घ व दुःखदायक वाटला. काय झालें असेल व काय नाहीं, या विचारांत त्यांचा जीव खालींवर होऊं लागला. जरा कोणाचीं पावलें वाजलीं कीं त्यांनां वाटावें की हा मनुष्य दुःखवार्ता घेऊनच आला असावा! त्यानंतर शांताबाई जेव्हां पुन्हां आपल्या कामावर आलेल्या त्यांनीं पाहिल्या, तेव्हां परमेश्वराचे त्यांनीं शतशः गुणानुवाद गाइले. आठ दिवसांनीं शांताबाईनां आतां कांहीं भीति नाहीं असें जेव्हां तेथील डाक्टरांनीं सांगितलें, तेव्हां रामराव आपल्याशींच कांहीं वेळ विचार करीत बसले. त्यांचा कांहीं तरी निश्चय झाला असावा, असें दिसलें. तडक तेथून ते उठले आणि शांताबाई एकट्याच आहेत असें पाहून त्यांनां म्हणाले "हें पहा, त्या दिवशीं मी केवढा वेडेपणा करीत होतों, हें मला आतां नीट समजून आलें आहे. तुमची हरकत नसेल तर लवकरच आपण विवाह करून एक व्हावें, अशी माझी उत्कट इच्छा आहे. आपला अनुग्रह असल्यास अल्पशी खूण म्हणून ही आंगठी मला तुमच्या बोटांत घालूं द्या."

असें म्हणून रामरावांनीं शांताबाईचा हात आपल्या हातांत घेऊन आपल्या बोटांतील आंगठी त्यांच्या बोटांत घातली.

शांताबाई लाजून म्हणाल्या " तर मग मला आतां येथील काम सोडून गेलें पाहिजे! "

" अर्थात! लग्नापूर्वी हें सोडलेंच पाहिजे. त्यापूर्वी मी कोठें तरी आपल्याला रहावयास जागा पहातों."

शांताबाई गांभीर्याचा आव आणून बोलूं लागल्या. परंतु पुढील प्रश्न विचारतांना त्यांच्या आवाजांत थोडें हंसणेंहि असल्यासारखें दिसत होतें. " पण डाक्टर साहेब! आपण आपली पूर्वीची हरकत विसरलां वाटतें? आपला संसार चालायचा तरी कशावर? "

रामरावांनीं लगेच उत्तर दिलें " आपलें एकमेकांवरील प्रेम आणि सुखवातीला दरमहा शंभरसव्वाशें रुपये यांच्यावर! हें पहा, आपलें सर्व ठीक चालेल. पैसा लवकरच घरांत येऊन पडूं लागेल व लहान मुलांप्रमाणें आपण आनंदानें राहूं. "

शांताबाईचे काळेभोर डोळे रामरावांकडे सप्रेम लागले होते. " आणि तुमच्या सर्व महत्त्वाकांक्षा, तुमचा भावी मोठेपणा व प्रसिद्धि, व तुमचें हें येथील आवडतें काम या सर्वांवर पाणी सोडणार! आणि हें सगळें माझ्याकरितां ना? " शांताबाईच्या डोळ्यांत अश्रू चमकूं लागले.

" राहूंद्या तें सर्व! मी केवढा वेडेपणा करीत होतों याची आतां आठवणसुद्धां नको! तुमच्याशिवाय ह्या सर्व गोष्टींची कितीशी किंमत असेल असें तुम्हाला वाटतें? "

शांताबाई कंपित आवाजानें म्हणाल्या " बरें तर, आपल्या इच्छेप्रमाणेंच होऊं द्या! पण ही हकीकत माझ्या घरच्या मंडळीला सांगितली पाहिजे. बाबांनां तर ती अगोदर कळविली पाहिजे! "

" तुमच्या-घरची-मंडळी-हो खरेंच ! तुमच्या घरचीं वडील माणसें वगैरे असतीलच; पण खरोखरच त्यांच्याविषयीं माझ्या मनांत आतांपर्यंत मुळींच विचार आला नाहीं, हें आश्चर्य नव्हे का ? प्रेमांकित मनुष्याला प्रथम बाहेरील इतर गोष्टींचा अगदीं विसर पडून जातो ! बरें, तुमचीं मंडळी राहतात कोठें ? मी त्यांना जाऊन भेटूं, का पत्र लिहूं-कसें बरें ?"

" मला वाटतें, आपल्याला मीच माझ्या हृदयाचे स्वामी म्हणून घरीं गेलेलें बरें ! पण बाबांनां त्या मुलाच्यासंबंधानें कांहीं सांगूं नका हं—तें ऐकून त्यांनां फार अस्वस्थता वाटेल. "

" पण त्या दिवशीं तुम्हीं खरोखरच तसें करायला नको होतें—त्यावेळीं मला काय वाटत होतें याची तुम्हाला कल्पना तरी होती काय ? "

शांताबाई चमत्कारिक रीतीनें रामरावांकडे पाहूं लागल्या. चांगल्या शहाण्या पुरुषांनांसुद्धां या गोष्टी नीट समजत नाहींत, असें त्यांनां वाटलें व त्या मोठ्यानें म्हणाल्या " त्या शस्त्रक्रियेच्या दिवशीं आपल्याकडे पहात असतां मला काय वाटत होतें याचा विचार आपण नाहीं केला तो ! "

[४]

ठरल्याप्रमाणें दोघें भाड्याचे गाडींतून शांताबाईंच्या वडिलांच्या बिऱ्हाडाकडे जाऊं लागलीं. कोठें जावयाचें याची रामरावांनां मुळींच कल्पना नव्हती. ' हिच्याबद्दल-हिच्या घरच्या मंडळीबद्दल मला अगदींच माहिती नाहीं खरी ! ' असा विचार त्यांच्या मनांत आला.

कोठें जावयाचें तें शांताबाईंनीं गाडीवाल्याला अगोदरच सांगून ठेविलें होतें, व वडिलांस आपण भेटावयास येत असल्याचेंहि पत्रानें कळविलें होतें. जातांजातां गाडी जेव्हां एका भव्य व सुंदर बंगल्यापाशीं जाऊन उभी राहिली, तेव्हां खरोखरच येथेंच उतरावयाचें कीं काय, अशी रामरावांनां शंका आली.

परंतु शांताबाईंनीं त्यांनां प्रश्न विचारण्यास वेळच दिला नाहीं. घाईघाईनें जिना चढून त्यांनीं रामरावांनां एका भव्य दिवाणखान्यांत नेलें. तेथें टेबलापाशीं खुर्चीवर बसून काम करीत असलेल्या साधारण उतारवयाचे गृहस्थांनीं तोंड वळवून जेव्हां त्यांचेकडे पाहिलें, तेव्हां तर त्यांनां फारच अचंबा वाटला. हे गृहस्थ दुसरे कोणी नसून कायदेकौन्सिलचे लोकनियुक्त सभासद नामदार सरदार गोपाळराव हेच होते. थोड्या दिवसांपूर्वी त्यांची कौन्सिलचे मेंबर म्हणून निवडणूक झाली त्यावेळीं पुष्कळ वर्तमानपत्रांतून आणि मासिकांतून त्यांचा फोटो प्रसिद्ध झाला होता. नामदार सरदार गोपाळराव हल्लीं कांहीं दिवस रहावयासाठीं म्हणून इकडे आले होते व एक सुंदर बंगला भाड्यानें घेऊन तेथें मोठ्या थाटानें ते रहात होते.

शांताबाईंनीं क्षणमात्र त्या दोघां पुरुषांकडे अभिमानपूर्वक पाहिलें व नंतर म्हटलें "बाबा, डाक्टर रामराव तुम्हाला भेटायला आले आहेत ! " पुढें तिच्यानें बोलवेना. ती तशीच खालीं आपल्या आईला भेटायला गेली.

नामदार सरदार गोपाळरावांनीं आपले तीक्ष्ण व शोधक डोळे रामरावांकडे फिरविले. त्यांनां माणसाची चांगली पारख असे. कांहीं वेळ रामरावांकडे पाहिल्यानंतर त्यांनां बरें वाटल्यासारखें दिसलें.

बराच वेळ त्या दोघांचें संभाषण झालें. शेवटीं नामदार सरदार गोपाळराव म्हणाले " एकूण, तुम्ही त्या हेकेखोर पोरीला घेऊन जाणार म्हणतां ? पण मला म्हाताऱ्याला तिचा विरह किती दुःसह होईल, याचा तुम्हीं विचार तरी केला आहे काय ? पण त्या म्हाताऱ्या हाडांचें आतां काय म्हणा ! सृष्टिनियमाप्रमाणें त्या सर्व गोष्टी अशाच घडून यावयाच्या. ईश्वर तुम्हां उभयतांनां निरंतर सुखी ठेवो ! त्या पोरीनें इतके दिवस आपलाच हेका चालविला आहे. "

नंतर जेवणखाण आटोपल्यावर गाडींतून परतें जात असतां रामरावांनीं शांताबाईंनां विचारलें " मला असें तुमच्यानें फसवलें तरी कसें ? "

शांताबाईंनीं जसें कांहीं आपल्याला कांहीं माहीतच नाहीं अशा रीतीनें विचारिलें " कोणीं-मीं-मीं फसविलें-अन् तें कसें काय ? "

" तुम्हाला ठाऊक आहेच कसें तें ! तुम्ही अगदीं गरीब असून जवळ एक पैसाहि नाहीं असें मला वाटायला लावलें, आणि इकडे तर वडील असे आहेत कीं मुलीला सोनें खायला पाहिजे असलें तरी चारूं शकतील ! "

शांताबाईला हसूं आलें. " मी गरीब आहें असें मीं कधीं बोलून दाखविलें नाहीं. तुम्हींच जर तसा आपला ग्रह करून घेतला असला तर माझा काय वांरें त्याला इलाज ? "

नंतर आनंदोत्फुल्ल असें आपलें सुंदर मुखकमल रामरावांकडे वळवून शांताबाई म्हणाल्या " कसेंहि असो ! तुम्हाला मी गरीब आहें असें वाटलें म्हणूनच मला फार आनंद होत आहे ! माझ्याकरितां सगळें कांहीं टाकून यायला तुम्ही तयार आहांत हें समजल्यामुळें आतां मी पूर्वापेक्षांहि सहस्रपट तुमच्यावर प्रेम करीत आहें ! "

हें ऐकून रामरावांनां झालेल्या आनंदाचें वर्णन करणें अशक्य आहे. किंचित् डोळे मिचकावून ते म्हणाले " पण पैशाशीं मी लग्न करणार नाहीं असें मीं म्हटलें होतें, तें तुम्ही विसरलां वाटतें ! "

विश्रब्धांतःकरणानें शांताबाईनीं उत्तर दिलें " माझ्याशीं आपल्याला लग्न करितां येणार नाहीं असेंहि आणखी आपण म्हणालां होतां नव्हे का ? पण माझी खात्री आहे कीं, त्या दोन्ही गोष्टी आपण आतां करणार आहां ! "

[५]

त्या दिवशीं संध्याकाळीं हास्पिटलांत रोग्यांच्या वार्डांतून फिरत असतां ज्या मुलावर शस्त्रक्रिया झाली होती त्या मुलाच्या बिछान्यापाशीं तीं दोघें थांबलीं. शांताबाई जवळ आलेल्या पाहून तो मुलगा त्यांनां अगदीं बिलगला. शांताबाईनीं त्याला जवळ घेतलें तेव्हां रामराव त्या दोघांकडे कांहींसे क्षुधार्ताप्रमाणें पाहूं लागले. ते म्हणाले " पहा कसें आहे तें ! हा मुलगा पुढें मोठा झाल्यावर याला यांचविण्याकरितां तुम्हीं आपला जीव धोक्यांत घातला होता याची त्याला स्मृतिहि राहणार नाहीं. कोणीं तरी त्याला तें सांगितलें पाहिजे; तें समजल्यावर तो खचीत पुढें चांगला निपजेल ! "

शांताबाईनीं लगेच उत्तर दिलें " हं, इथंच आपलें चुकतें तें ! मीं कांहीं या मुलाकरितां तसें केलें नाहीं ! इतकी मी थोर अंतःकरणाची नाहीं ! "

रामरावांकडे साभिमान पाहून शांताबाई पुढें म्हणाल्या " मला ठाऊक आहे, आपण मात्र तसें केलें असतें; पण मी—"

आपलें सलज्ज मुख त्यांनीं यावेळीं त्या मुलाच्या कुरळ्या केसांवर ठेविलें होतें. "—मी फक्त आपल्याविषयींच विचार करीत होतें–"

नंतर थोडा विचार करून शांताबाई पुन्हा म्हणाल्या " हं, हाच फरक ! स्त्रिया प्रेमामुळेंच फक्त करायला प्रवृत्त होतील अशा गोष्टी पुरुष केवळ कर्तव्य म्हणून करितील ! " असें म्हणून शांताबाईनीं आपलें तोंड वर करून रामरावांकडे सतेज नयनांनीं पाहिलें.

रामरावांच्याहि डोळ्यांत यावेळीं तेंच गाढ प्रेम विलसत होतें. त्यांनीं आपले बाहू पसरले.. दुसऱ्यादिनीं त्या लहान मुलानें त्यांत उडी घेतली. रामरावांनां तो मुलगा अतिशय आवडत असे, परंतु यावेळीं त्यांनां त्याची गरज नव्हती !

दुसऱ्याचें बरें करतो तो सज्जन. दुसऱ्याचें बरें केल्याबद्दल ज्याला दुःख भोगावें लागतें तो त्याहूनहि श्रेष्ठ, व ज्यांचें तो बरें करतो, त्यांच्यापासूनच जर त्याला दुःख सहन करावें लागेल तर त्याच्या श्रेष्ठपणाची सीमाच झाली, असें म्हटलें पाहिजे.

आपल्या मुखांतून एकदां शब्द बाहेर गेला म्हणजे तो परत येत नाहीं. अविचारानें उच्चारलेल्या एका शब्दानें केव्हां केव्हां एखाद्याच्या जन्माचें मातेरें होऊन जातें !

सत्य, सौंदर्य आणि प्रेम ह्या तीन गोष्टींसाठीं प्रत्येक थोर मनुष्याची धडपड चाललेली असते. ह्या वस्तु प्राप्त झाल्याशिवाय त्याच्या चित्ताला शांति लाभणार नाहीं.

ह्या जगांत अशी एक वस्तु आहे कीं, द्रव्यापेक्षांहि ती मोलवान् आहे. ही वस्तु गरीबांजवळ असली तर ते श्रीमंतापेक्षांहि भाग्यवान् व श्रीमंताजवळ नसली तर ते दुर्दैवी, असें म्हटलें पाहिजे. पैसे देऊनहि ही वस्तु मिळूं शकत नाहीं. ही वस्तु म्हणजे प्रेम होय !

आपल्या मनाप्रमाणें परिस्थिति मिळणें दुर्घट आहे. असेल त्या स्थितींत उद्योग करून आपला इष्ट हेतु साध्य केला पाहिजे.

देव आकाशांत वास करीत असतो, त्याप्रमाणें भक्तांच्या हृदयांतहि वास करीत असतो. भक्ताच्या हृदयासारखें दुसरें पवित्र देऊळ नाहीं.

फ्रेंच भाषेंतील विनोद.

—लेखक—
श्रीयुत व्ही. एं. केसकर.

—१—

पोलिसच्या दोन शिपायांनीं दारूनें धुंद झालेल्या एका माणसाला पकडून न्यायाधिशापुढें उभें केलें.

न्यायाधीश—तुला कोणीं पकडलें ?

दारुबाज—दोन शिपायांनीं—सरकार !

न्यायाधिश—दारूमुळें ?

दारुबाज—होय सरकार, दोघेहि दारु प्यालेले होते !

—२—

एक लोभी गृहस्थ आपल्या एका मित्राच्या घरीं फराळाला गेले. राहिलेलें फराळाचें सामान त्यांनीं खिशांत घातलें, इतक्यांत त्यांच्या खिशांतून तांबडें कढत पाणी गळूं लागलें. स्वारी मागें वळून पाहते तों एक आचारी हातांत चहाचें भांडें घेऊन आहे !

पाहुणा—कायरे हें ?

आचारी—क्षमा करा महाराज ! आपण आपलें सर्व राळाचें साहित्य घरीं नेतां, म्हणून मला वाटलें हाहि न्यावा !

—३—

पोर्तुगालच्या राजानें लॅन्डसीर नांवाच्या प्रख्यात चित्रकाराचा दरबारांत मोठा सत्कार केला. लॅन्डसीर हा प्राण्यांचीं चित्रें काढण्यांत फार कुशल होता. राजानें पाहुण्याची फार तारीफ केली व म्हटलें "आपल्या अलभ्य लाभानें मी आज धन्य झालों आहें. मला जनावरांची फार आवड आहे !"

—४—

एक गृहस्थ स्त्रियांचे फार चहाते होते. सर्व स्त्रिया चांगल्या, त्यांचे गुण चांगले, असें त्यांनां वाटे. एक दिवस या विषयावर संभाषण चालू असतां ते म्हणाले "अजून मला कुरूप स्त्री कांहीं दिसली नाहीं !"

एक म्हातारी नकटी बाई म्हणाली "माझ्या नाकाकडे पहा व सांगा मी कुरूप आहें कीं नाहीं ?"

गृहस्थ म्हणाला "आपण इतर स्त्रियांप्रमाणेंच देवांगना आहांत ! पण स्वर्गांतून खालीं येतांना आपण नाकावर पडलांत."

—५—

वैद्य—मुला, तुझी जीभ दाखीव पाहूं ?

मुलगा—माफ करा ! आज सकाळीं मीं जीभ काढली म्हणून बाबांनीं माझे कान पिरगाळले; दुपारीं शाळेंत जीभ दाखवली म्हणून शिक्षकांनीं शंभर ओळी लिहून आणायाची शिक्षा केली; अन् आतांहि जर मीं पुनः जीभ दाखविली तर तुझी काय कराल हें कांहीं सांगवत नाहीं !

—६—

एका वैद्यानें रोग्याच्या नोकराला ताकीद दिली कीं, मालक आजारी असल्यामुळें त्रासिक झाले आहेत, तेव्हां ते म्हणतील त्याला होय म्हणत जा, म्हणजे झालें.

त्याप्रमाणें धन्यानें कांहींहि विचारलें तरी नोकर 'होय सरकार !' म्हणून जवाब देई.

एकदां दुःखाच्या वेगांत धनी म्हणाला "सर्वांनां माझा त्रास आला आहे—मी मेलों तर सर्वांनां बरें वाटेल !"

प्रामाणिकपणें नोकर म्हणतो "होय, सरकार ! आपण म्हणतां हेंच खरें !"

—७—

'घर माझ्यानें देणें आहे' अशी पाटी पाहून एक गृहस्थ घरांत शिरले व व्यवस्थापकाला विचारूं लागले "आपल्या पाटीवर लिहिलें आहे कीं, 'राजधानी व आसपासचा प्रदेश यांचा उत्तम देखावा दिसतो.' पण खिडक्यांतून तर एक घाणेरडा बोळच दिसतो !"

"होय महाराज ! आपण कवलारुवर चढलांत म्हणजे सर्व रमणीय प्रदेश दृष्टीस पडतो."

—८—

एका खेड्यांतील शाळेंत एक पाद्री गेला. मुलांची परीक्षा घेतांना त्यानें एका विद्यार्थ्याला विचारलें "आईबापांनीं तुम्हाला मोकळें सोडलें म्हणजे तुमची काळजी कोण घेतो ?"

विद्यार्थी चटकन् म्हणाला "पोलीस !"

—९—

गाडीतून एक गृहस्थ खालीं पडला. पण त्यानें गाडीचा हात सोडला नाहीं. गाडी चालूहोती.

हाकणारा ह्मणतो "हात सोडा महाराज, कृपा करून हात सोडा !"

"माझी मोड मला दिल्याशिवाय मी हात सोडणार नाहीं !"

—१०—

मंडळी बसली असतां भूकंपावर वाद चालला होता. एक गृहस्थ दुसऱ्याला विचारतो "तुझी फार घाबरलां असाल त्यावेळीं, नाहीं बरें ?"

"घाबरलों ह्मणजे काय विचारतां ? सारखा थरथर कांपत होतों ! पण माझ्याहि पेक्षां जमीन जास्त कांपत होती !"

—११—

एक बाई एका सुंदर मुलीची तसबीर पहात उभी होती. एकदम तिच्या तोंडून पुटील उद्गार निघाले "किती मनोहर चित्र हें ! किती सुबक हें काम ! चितारी किती उत्तम असला पाहिजे ! तो भेटला तर बरें होईल."

ज्यानें ती तसबीर काढली होती तो गृहस्थ जवळच होता. त्यानें हें आत्मगत भाषण ऐकलें व ही बाई तसबीर विकत घेणार असें वाटून तो पुढें होऊन ह्मणाला "बाईसाहेब ! मीच याचा चितारी आहें. काय लागेल ती माहिती मी आपल्याला देतों !"

ती बाई ह्मणाली "आपण फार भले गृहस्थ आहां ! ज्या मुलीची ही तसबीर आहे ती मुलगी कोठें राहते हें जर कळवाल तर आपले आभार होतील."

—१२—

सैन्यांतील एक नाईक आपल्या शिपायांनां ह्मणाला "गड्यांनों ! एकमेकांनां मदत करणारे तेच खरे मित्र, हें तुम्ही जाणतां. तर मग समजा कीं, तुमच्यापैकीं एकजण कामावर निघाला, पण त्याचें जेवण झालेलें नाहीं व त्याचे बूटहि साफ नाहींत. मग अशा वेळेला तुम्ही त्याच्याकरतां काय कराल ?"

एक शिपाई ह्मणतो " मी त्याच्याकरतां जेवीन, ह्मणजे त्याला बूट साफ करायला वेळ सांपडेल."

—१३—

पाहुणा—रावसाहेब घरीं आहेत कां ?

गडी—नाहीं महाराज.

पाहुणा—अरे, मीं त्यांनां घरांत जातांना पाहिलें, आणि नाहीं ह्मणतोस ?

गडी—त्यांनींहि आपल्याला पाहिलें महाराज !

—१४—

बाईसाहेब—अग सारजे, माझ्या गंगावनांत घालायाचीं फुलें आणलींस का ?

सारजा—होय, बाईसाहेब ! पण आपलं गंगावन कशांत घातलं, हें आठवत नाहीं.

—१५—

एक गृहस्थ—अरे राम्या, लेका खिडकी कां उघडलीस ? तुला चांगलं ठाऊक आहे कीं आज पारा चाळीसच्या वर नाहीं !

चाकर—माळीदादा ह्मणाला, बागेंत फक्त वीसच पारा आहे. तेव्हां मला वाटलें, जर आपण खिडकी उघडली, तर हे वीस खोलींत शिरतील व मग तुमच्या इच्छेप्रमाणें खोलींत पारा ४० व २० साठ होईल.

—१६—

एक गृहस्थ आपल्या मित्राला ह्मणतो "रामराव, ते रस्त्यानें चालणारे गृहस्थ ओळखीचे आहेत का ?"

"नाहीं. पण यांचे-त्यांचा पोषाख माझ्या चुलत्याचा आहे, त्यांची छत्री माझ्या बाबूची आहे, मात्र चेहरा गोपू आचाऱ्याचा आहे !"

—१७—

एक आसन्नमरण गृहस्थ मृत्युपत्र करीत बसले. कारकुनाला ह्मणतात "लिहा, माझ्या मिळकतीचा कोणताहि भाग माझ्या बडील बहिणीला मिळूं नये—"

कारकून—ठीक आहे. इतर बहिणींनां व भावांनां ?

गृहस्थ—कांहींएक नाहीं !

कारकून—खरेंच ! त्यांनीं आपलें काय केलें ?

गृहस्थ—अलबत कांहीं केलें नाहीं. पण मजजवळ द्यायलाच कांहीं नाहीं !

—१८—

डाक्टर रोग्याला प्रश्न करतात "आपल्याला झोंप चांगली येते का ?"

"अगदीं कुंभकर्णासारखी !"

"बरें भूक ?

"जें खाईन तें फस्त !"

"पाणी फार पितां ?"

"तांबेच्या तांबे !"

"मग यांवा, घोड्याचा डाक्टर घाडून देतों."



हिंदूंच्या शास्त्रांतील कांहीं अन्यायांचा खुलासा.

लेखांक पहिला.

—लेखक—
श्रीयुत **परशुराम दिनकर चित्रे**, बी. ए.

"I fully agree wrth the educated classes in India that a thorough overhauling of society is necessary,
—Swami Vivekananda.

धार्मिक व सामाजिक सुधारणांसंबंधानें लोकांबरोबर बोलण्याचा प्रसंग आला असतां प्रचलित धर्मविधींतील व सामाजिक चालीरीतींतील दोष त्यांनां कबूल करावे लागले म्हणजे पुष्कळ वेळां त्यांच्या तोंडून असे उद्गार निघतात कीं, "आपले शास्त्रकर्ते ऋषिमुनी जर सर्वज्ञ व सर्वांचें सारखेंच हित चिंतणारे होते, तर त्यांच्याकडून अशीं शास्त्रें निर्माण झालीं कशीं?"

जुन्या शास्त्रांचा ऐतिहासिकदृष्ट्या विचार करून तीं कशा परिस्थितींत, कोणाकडून व कां निर्माण झालीं, त्याची वाढ कशी होत गेली, व त्यांनां प्रचलित स्वरूप कसें प्राप्त झालें, हें अशा लोकांनां दाखवून दिल्यास सुधारणेचें कार्य थोडें तरी अधिक सुलभ होऊन त्वरित साधेल. जेथें जेथें सुधारणेचा जोरानें प्रवेश व्हावा असें वाटेल तेथें तेथें संस्कृतज्ञ व संस्कृतानभिज्ञ जनसमूहांत हें ज्ञान सर्वत्र पसरेपर्यंत ह्या प्रश्नांचा ऊहापोह करणें अवश्य आहे.

सदोष अन्यायाचीं शास्त्रें निर्माण कशीं झालीं? या प्रश्नाचें उत्तर देण्याकरतां शास्त्रें ज्या परिस्थितींत उत्पन्न झालीं तिचा प्रथम विचार करण्याचें योजिलें आहे. ह्या परिस्थितीचा अत्यंत पुरातन इतिहास ऋग्वेदांत आहे. ऋग्वेदकाळीं हिंदूंच्या पूर्वजांच्या विचारास जी दिशा प्रथम मिळाली ती आज हजारों वर्षांतहि सर्वथैव बदलली नाहीं. पुढें नवीन विचार सुरू झाले, वाढीस लागले व पूर्णता पावले, सर्व कांहीं झालें; परंतु जुन्या विचारांनां जी दिशा मिळाली तिचा छाप हिंदूंच्या पुढील सर्व विचारांवर व हरएक संस्थेवर बसलेला अजून स्पष्ट दिसत आहे. अर्थात्, हिंदु शास्त्रांतील अन्यायांचें कारण देखील ऋग्वेदकाळच्या परिस्थितींत आहे. ऋग्वेदांतील ऋषींच्याच वचनांच्या द्वारें हें स्पष्ट होईल असें वाटतें; म्हणून, अर्थासह कांहीं पुढें दिलीं आहेत:—

(१)

पराशरऋषि म्हणतात:—

विपृक्षो अग्ने मघवा नो अद्युर्विसूरयो ददतो विश्वमायुः । सनेमवाजं समिथेष्वर्यो भागं देवेषु श्रवसे दधानाः ॥ (१-७३-५)

"हे अग्ने! हवीरूप धनानें युक्त असलेल्या यजमानांनां सर्व प्रकारचीं अन्नें तुझ्या अनुग्रहानें प्राप्त होवोत. जे विद्वान् तुझें स्तवन करितात आणि जे तुला हवी अर्पण करितात त्या सर्वांनां पूर्ण आयुष्य प्राप्त होवो. **तुझ्या अनुग्रहामुळें आह्मांला संग्रामामध्यें शत्रूंचें अन्न मिळो.** देवांनां यशाकरितां आमच्या हातून हविर्भाग प्राप्त होवोत."

(२)

वसिष्ठऋषि म्हणतात:—

भवा वरूथं मघवन्मघोनां यत्समजासि शर्धतः । विश्वाहतस्य वेदनं भजेमहि आदूणाशो भरा गयम् ॥ (७-३२-७)

"हे धनवान् इंद्रा! उत्साह धरणारांनां प्रेरणा करणारा तूं हविष्मान् यजमानांच्या उपद्रवाचा वारणकर्ता हो. **त्वां मारलेल्या शत्रूचें धन आह्मीं सेवावें.** आह्मांला नाश न पावणारें घर दे."

(३)

आंगिरसकुत्स म्हणतात:—

प्र मंदिने पितुमदर्चता वचो यः कृष्णगर्भा निरहन्नृजिश्वना । अवस्यवो वृषणं वज्रदक्षिणं मरुत्वंतं सख्याय हवामहे ॥ १ ॥ यो विश्वस्य जगतः प्राणतस्पतिर्यो ब्रह्मणे प्रथमो गा अविन्दत् । इंद्र यो दस्यूनधरानवातिरन्मरुत्वं इ० ॥ ५ ॥ यः शूरेभिर्हव्यो यश्च भीरुभिर्यो धावद्भिर्हूयते यश्च जिग्युभिः । इंद्रं यं विश्वा भुवनाभिसंदधुर्मरुत्वंतं इ० ॥ ६ ॥

(म. १ सू. १०१)

"(१) (हे ऋत्विज हो!) स्तुतीस पात्र अशा इंद्राला उद्देशून हवीरूप अन्नांनीं युक्त अशा स्तुतिरूप वचनांचा तुह्मी उच्चार करा. त्या इंद्रानें ऋजिश्वराजाच्या जोडीनें कृष्णगर्भांचा वध केला. (कृष्णनामक कोणी असुर होता, त्यानें गर्भस्थापना केलेल्या त्याच्या भार्या इंद्रानें मारिल्या. सारांश, **कृष्ण नामक असुराचा वध करून त्याला पुत्रहि उत्पन्न होऊं नयेत एतदर्थ त्याच्या गर्भिणी स्त्रियांचा इंद्रानें वध केला.**) मनोरथ पूर्ण करणाऱ्या वज्रयुक्त दक्षिण हस्तानें संपन्न व मरुद्गणांनीं युक्त असलेल्या इंद्राशीं सख्य करण्याकरतां आह्मी रणेच्छु त्याला आव्हान करीत आहों. (५) जो इंद्र श्वासोच्छ्वास करणाऱ्या सर्व जंगम प्राण्यांचा अधिपति आहे, ब्राह्मण-जाति जे अंगिरस त्यांच्याहि पूर्वी ज्यानें नेलेल्या गाई मिळविल्या, आणि **ज्यानें अधम दस्यूंना ठार केलें,** त्या मरुद्गणांनीं इ० (६) **शूरांनीं आणि भ्याडांनीं** ज्या इंद्राला आव्हान करणें योग्य आहे, **पराजित होऊन पळत सुटणारे व विजयी होणारेहि ज्याला आव्हान करतात,** आणि भूतसमुदाय स्वकीय कार्योविषयीं ज्या इंद्राची मुख्यतः स्थापना करितात त्या मरुत्वान् इ०."

(४)

१०४ सूक्तांत कुत्सऋषि ह्मणतातः-

अवत्मना भरते केतवेदा अवत्मना भरते फेन मुदन्, क्षीरेण स्नातः कुयवस्य योषे हते ते स्यातां प्रवणे शिफायाः ॥ ३ ॥

"इतरांचें धन ठाऊक असलेला कुयव नामक असुर स्वतःच ठाऊक असलेल्या दुसऱ्यांच्या धनाचा अपहार करितो. शिवाय, तो फेनयुक्त उदकाचा स्वतःच अपहार करितो. हरण केलेल्या त्या प्रवाही उदकानें कुयवाच्या दोन भार्या स्नान करीत असतात. **तशा प्रकारच्या त्या स्त्रिया शिफा नदीच्या अगाध प्रदेशांत नष्ट होवोत.**" हे इंद्रा, दुसऱ्यांच्या धनाचा अपहार करून इतरांचा प्रवेश होण्यासहि अशक्य अशा **अगाध उदकामध्यें रहात असलेल्या कुयवाचा सकुटुंब वध कर,** हें तात्पर्य होय.

(५)

सख्य ऋषि इंद्राला ह्मणतातः—

त्वं करंजमुत पर्णयं वधीस्तेजिष्ठयातिथिग्वस्य वर्तनी, त्वं शता वंगृदस्या भिनत्पुरो नानुदः परि पूता ऋजिश्वना (१-५३-८)

"(हे इंद्रा) तूं करंज संज्ञक असुराचा, व पर्णय असुराचा अतिथिग्व संज्ञक राजाकरितां अति तेजस्वी शक्तीनें वध केला आहेस, आणि अनुचररहित अशा तूं एकट्यानेंच ऋजिश्व संज्ञक राजानें सर्व बाजूंनीं वेढिलेलीं वंगृदनामक **असुराचीं शेंकडों नगरें नाहींशीं केलीं आहेस.**"

(६)

१०३ सूक्तांत कुत्स ऋषि ह्मणतातः—

स जातुभर्मा श्रद्दधान ओजः पुरो विभिन्दन्नचर द्विदासीः विद्वान् वज्रिन् दस्यवे हेतिमस्यार्य सहो वर्धया द्युम्नमिंद्र ॥ ३ ॥ मं. १

"अशनिरूप आयुध धारण करून बलाची इच्छा करणाऱ्या **ह्या इंद्रानें दस्यूंचीं पुरें विदारीत नाना प्रकारांनीं संचारें केला.** हे वज्रसंपन्न प्राज्ञ इंद्रा! ह्या लोळ्याच्या शत्रूंवर तूं आयुध सोड, **आर्यांचें बल तूं अतिशय वृद्धिंगत कर आणि त्यांचें यशहि वृद्धिंगत कर.**"

(७)

५१ सूक्तांत सख्य ऋषि ह्मणतातः—

विजानी ह्यार्यान्येच दस्यवो बर्हिष्मते रन्धया शासद व्रतान्, शाकी भव यजमानस्य चोदिता विश्वेत्ताते सधमादेषु चाकन् ॥ ८ ॥ मं. १

"**दस्यु (अनार्य) कोण व आर्य कोण हें तूं जाण. दुष्टांनां शासन करणारा तूं यज्ञ करणाऱ्या यजमानाकरतां कर्मविरोधी दस्यूंची हिंसा कर.** शक्तियुक्त तूं यजमानाचा प्रेरक हो. स्तवन करणारा मीहि तुझ्या त्या पूर्वोक्तकर्मांचें यज्ञांमध्यें वर्णन करण्याची इच्छा करीत आहें."

(८)

त्याच सूक्ताच्या सहाव्या ऋचेंत ते ह्मणतातः—

त्वं कुत्सं शुष्णहत्येष्वाविथा रन्धयोतिथिग्वाय शंबरम्, महान्तं चिदर्बुदं नित्रमीः पदा सनादेव दस्युहत्याय जज्ञिषे ॥

"हे इंद्रा! तूं शुष्णनामक असुराच्या संग्रामांमध्यें कुत्सऋषीचें रक्षण केलें आहेस त्याचप्रमाणें अतिथिग्वाकरितां शंबरनामक असुराचा तूं वध केला आहेस. अति प्रचंड अर्बुद नांवाच्या असुराला तूं पादाक्रांत केलें आहेस. **प्राचीन कालापासूनच तूं दस्यूंचें हनन करण्याकरितां उत्पन्न झाला आहेस.**

(सर्वदा दस्यूंचें हनन करणें हें तुझें शीलच झालेलें आहे.)

अनार्यांनां जिंकण्याचें काम बरेच दिवस चाललें होतें, असें ह्यावरून दिसतें. अनार्यांच्या वायकांचा किंवा कुटुंबांचाहि आर्य नाश करीत असत, असें वरील उताऱ्यांवरून वाटतें.

पुढें दिलेल्या उताऱ्यांवरून अनार्यांची कत्तल किती होत होती, ह्याची कल्पना होईल.

(१)

वामदेव ऋषि ह्मणतातः-

अस्वाप यद्दभीतये सहस्रा विंशत हथैः, दासानामिन्द्रो मायया ॥ (४-३०-२१)

"इंद्रानें स्वसामर्थ्यानें दभीतीकरतां तीस हजार दस्यु घातक आयुधांनीं ठार केले."

उत दासस्य वर्चिनः सहस्राणि शता वधीः (४-३०-१५)

"आणि वर्चि नामक अनार्यांचे लाख (किंवा लाखों, अनुचर (हे इन्द्रा) तूं मारले आहेस."

(२)

त्याच मंडलाच्या सोळाव्या सूक्तांत ते ह्मणतातः-

त्वं पिप्रुं मृगयं शुशुवांसं गृजिश्वने वैदथिनाय पञ्चाशत्कृष्णा निवपः सहस्रात्कं न पुरो जरिमा विदर्दः ॥ १३ ॥

"तूं पाठलाग करणाऱ्या व वृद्धि पावलेल्या पिप्रला विदथिपुत्र गृजिश्वनाकरितां ठार केलास. पन्नास हजार काळे (अनार्य) लोक मारलेस, व जरा ज्याप्रमाणें रूपाचा नाश करते त्याप्रमाणें तूं त्यांच्या पुरांचा फडशा पाडलास."

(३)

अनार्यांना जिंकण्याच्या कामांत इंद्राशिवाय आणखी त्याहिपेक्षां भयंकर देवांचें आर्यांनां साहाय्य होतें. वामदेवऋषि ह्मणतातः-

अहन्निन्द्रो अदहदग्निरिन्दो पुरादस्यून्मध्यं दिना दभीके, दुर्गे दुरोणे क्रत्वा यातां पुरू सहस्रा शर्वा निबर्हीत् ॥ (४-२८-३)

"हे सोमा, मध्यान्हापूर्वी संग्रामांत इंद्रानें अनार्यांनां मारिलें व अग्नीनें जाळिलें. रक्षण्यास अशक्य व संचार करण्यास कठीण अशा देशांत कार्योद्देशानें जाणाऱ्या मार्गस्थांनां धनलोभी चोर ठार करतो त्याप्रमाणें जाणाऱ्या अनार्यांची पुष्कळ हजार सेना, इंद्रानें निःशेष ठार केली."

ह्या अग्निनारायणाच्या साहाय्यानें आर्य अनार्यांचा कसा संहार करीत होते त्याची कल्पना पुढील उताऱ्यावरून होईल.

(४)

गोतमऋषि अग्नीला ह्मणतातः-

क्षपो राजन् उतत्मना अग्ने वस्तो रुतोषसः, सहिष्ठजम्भ रक्षसो दह प्रति ॥ (१-७९-६)

"हे तेजस्वी अग्ने ! स्वकीय पुरुषांच्या योगानें तूं रक्षसांचा नाश कर. दिवस, रात्र्या नाशासंबंधानें तूं इतरांवर अवलंबून न राहतां स्वतःच त्यांचा सर्व दिवसा व सर्व रात्रीं नाश कर. हे तीक्ष्णमुख अग्ने ! अशा रीतीनें राक्षसांनां पीडा दिल्यानंतर तूं त्यांपैकीं प्रत्येकाला दग्ध करून टाक. (सारांश, दग्ध करण्याला कांहीं नाहीं अशा समजुतीनें तूं स्वस्थ बसूं नकोस.)

(५)

आंगिरस कुत्सऋषि ह्मणतातः-

वधै दुःशंसानप दूढ्यो जहि
दूरे वाये अन्ति वा केचिदत्रिणः
अथ यज्ञाय गृणते सुगं कृध्य-
ग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥ (१-९४-९)

" हे अग्ने ! दूर अथवा जवळ असणाऱ्या दुष्कीर्ति व दुर्बुद्धि राक्षसांचा घातक आयुधांनीं तूं वध कर आणि स्तवन करणाऱ्या यागकर्त्यांचा मार्ग तूं सुगम कर. हे अग्ने ! तुझ्याशीं सख्य केल्यास आमचा नाश न होवो. "

(६)

पायुऋषि अग्नीला ह्मणतातः—

विषेण भङ्गुरावतः प्रतिष्म रक्षसो दह ।
अग्ने तिग्मेन शोचिषा तपुरग्राभिर्ऋष्टिभिः ॥
(१०-८७-२३)

" हे अग्ने ! आड येणाऱ्या राक्षसांनां व्यापक अशा तीक्ष्ण तेजानें व ज्यांचीं टोंकें ताप देणारीं आहेत अशा ऋष्टिनामक आयुधांनीं जाळून खाक कर ! "

आर्यअनार्यांमधील झगड्याचें स्वरूप स्पष्ट करण्याला हें सूक्त फारच उपयुक्त आहे. ह्या सूक्ताची देवता 'रक्षोहा' अग्नी आहे. हें संपूर्ण सूक्त वाचण्यासारखें आहे. येथें आणखी दोनच ऋचा देतों.

(७)

अग्ने त्वचं यातुधानस्य भिन्धि
हिंस्रा अशनिर्हरसा हन्तु एनम् ।
प्र पर्वाणि जातवेदः शृणीहि
क्रव्यात्कविष्णुर्विचिनोतु वृक्णम् ॥ ५ ॥

" हे अग्ने ! यातुधानाची त्वचा विदारून टाक. त्वचा विदारल्यावर त्याला तुझें हिंसक वज्र जाळून भस्म करो. ठार केल्यावर त्याच्या शरीराचे सांधे छेदून टाक. सांधे छेदून झाल्यावर च्छिन्नविच्छिन्न झालेल्या त्याला मांसाची इच्छा करणाऱ्या (वृकादि) मांसभक्षकांच्या भक्षस्थानीं पाड. "

यत्रेदानीं पश्यसि जातवेदस्तिष्ठंतमप्रभृत वा चरंतम् ।
यद्वांतरिक्षे पंथिभिः पततं तमस्ता विध्यशर्वा शिशानः ॥ ६ ॥

" हे सर्वज्ञ अग्ने ! आतां जेथें जेथें म्हणून जमिनीवर स्वस्थ उभा असलेला किंवा फिरत असलेला किंवा अंतरिक्षांतील मार्गांनीं जात असलेला राक्षस तूं पहाशील, तेथें तेथें त्याला (आमचे) बाण सोडणारा व तीक्ष्ण करणारा तूं बाणानें विंध ! "

इंद्र अनार्यांनां मारण्याचें काम इतका काळ करीत होता कीं, दस्युहनन त्याचें शीलच बनून गेलें होतें ! अग्निनारायणहि तें काम बरेच दिवस करीत होते, असें पायुऋषींच्या पुढील वचनावरून दिसतें.

(८)

अथर्ववज्ज्योतिषा दैव्येन सत्यधूर्वन्तमचितंन्योप १२

" अथर्व ऋषि राक्षसांचा नाश करीत होते त्याप्रमाणेंच आपल्या दिव्य तेजानें तूं सत्याची हिंसा करणाऱ्या अज्ञान राक्षसाला नीट जाळून टाक. "

सनादग्ने मृणसि यातुधानान्
न त्वा रक्षांसि पृतनासु जिग्युः
अनुदह सहमूरान् क्रव्यादो
मासे हेत्या मुक्षत दैव्यायाः ॥

१०-८७-१९

" हे अग्ने ! **दीर्घकालापासून तूं राक्षसांनां बाधा करीत आहेस.** (तरी) राक्षसांनीं तुला संग्रामांत जिंकिलें नाहीं. (आणखी **आतांहि**) तूं मारक व्यापारानें युक्त अशा मांसभक्षक **राक्षसांनां भस्म कर.** तुझ्या दिव्य आयुधाच्या तडाक्यांतून ते न सुटोत. "

इंद्र आर्यांचें रक्षण करून अनार्यांचा संहार करीत होता. **(हत्वी दस्यून् प्र आर्यवर्णं आवत १-३४-९)** आणि अनार्यांनां–अर्थात्च नीच अनार्यांनां–गुहेंत टाकीत होता. **(यः दासं वर्णं अधरं गुहाकः २-१२-४)** जो दस्यूंनां मारणारा तो इन्द्र **(यो दस्योर्हता स इन्द्रः)** अशी इंद्राची ख्याति होती, व **' रक्षोहन्ता '** अग्नि एका सूक्ताची देवताच आहे.

अशा रीतीनें अनार्यांनां जिंकण्याचें काम पांडवकाळापर्यंत चाललें होतेंच. अनार्य शूर होते. त्यांची वसतीहि फार होती. ते निकरानें लढत होते. कांहीं शरण आले तरी झगडा चालू ठेवणारे कांहीं होतेच. तरी आर्यांची कायमची सरसी होऊन अनार्यांपासून जिंकलेल्या भागासुद्धां सर्व आर्यसत्तेखालीं आलेल्या प्रदेशाला आर्यावर्त नांव मिळालें. अमेरिकेंत रेड इंडियन व यूरोपियन ह्यांमध्यें जो संबंध होता, किंवा आफ्रिकेंत गोऱ्या जाती व मुळचे आफ्रिकन ह्यांत जो संबंध आज आहे, तशाचसारखा संबंध प्राचीन काळीं आर्य व अनार्य ह्यांच्यामध्यें होता, असें दिसतें. त्याकाळीं गुलामगिरी (slavery) सशास्त्र मानली जात होती. लढाईंत जिंकलेला मनुष्य 'दास' (गुलाम) बनत असे, असें मनुस्मृतींत ८।४१५ येथें सांगितलें आहे. द्रौपदी हरण करून नेणाऱ्या जयद्रथाला जिंकल्यावर भीम म्हणतो " अरे मूर्खा ! जर तुला जीवंत रहावें अशी इच्छा असेल, तर त्याचा उपाय मी तुला सांगतों तो ऐक. **' मी एक तुमचा दास आहें. '** असें चार मंडळींत आणि सभांत तूं म्हटलें पाहिजेस; म्हणजे मी तुला जीवदान देईन. कारण, **हा युद्धांत जय मिळविलेल्या लोकांपुढें त्यांच्या शत्रूंनीं करण्याचा विधि आहे.** " नंतर दयाशील राजा युधिष्ठिर " तूं दास्यमुक्त झाला आहेस, " इत्यादि त्याला म्हणाला. (महाभारत. वनपर्व अ. २७२) ह्या भारतांतील कथाभागावरून लक्षांत येतें कीं, पांडवकाळीं जित 'दास' बनत, किंवा मारले जात.

अनार्यांचीं घरेंदारें, राज्यें वगैरे सर्व कांहीं आर्य तरवारीच्या जोरावर हिसकून घेत होते. प्रसंगविशेषीं ते त्यांच्या बायकापोरांचीहि कत्तल करीत, व अरण्यांनां आग लावून देऊन आपला मार्ग निष्कंटक

करीत. अनार्यहि आर्यांनां शक्य तेवढा व शक्य त्या रीतीनें अडथळा करीत होते व त्रास देत होते. "मारूं किंवा मरूं!" असा निर्धार करणारे अनार्य घोर प्रकार करीत होते. अशा काळीं आर्य व अनार्य यांनीं परस्परांस शत्रुभावानेंच पहाणें अगदीं स्वाभाविक होतें. अमेरिकेंत व आफ्रिकेंत चाललेला प्रकार ह्या सुधारणेच्या युगांतला. भग हजारों वर्षांपूर्वीचें लढालढीचें तें युग. तेव्हां त्या वेळीं असेच प्रकार झाल्यास विशेष आश्चर्याची गोष्ट नाहीं. आर्यांच्या त्या वेळच्या दृष्टींत राजकीय, सामाजिक व धार्मिक वावी 'धर्म' सदरांतच येत. अशा काळीं व अशा परिस्थितींत आर्य-अनार्य संबंधी **शास्त्रें** अस्तित्वांत आलीं. पाण्डवकाळापर्यंतहि हा झगडा व हें वैर चालू होतेंच. तोंपर्यंत त्या शास्त्रांची वाढहि झाली असली पाहिजे.

आर्य-अनार्य वैर दीर्घकाळ चालल्यामुळें अनार्यांची स्थिति जास्तच वाईट झाली असावी. पुढें आर्य अनार्य भेद पूर्वीप्रमाणें राहिला नाहीं. एक जेता व दुसरा जित ही कल्पना कालावधीनें नष्ट होऊन सर्वांचा एक समाज बनला व हितसंबंध एकच झाले, त्यावेळीं हिंदुसमाजाची पुनर्घटना करून सर्वांचा एक जीव करण्याची संधि प्राप्त झाली. जुन्या शास्त्रांचीं तत्त्वें व त्यांच्या आज्ञा त्यांत कालानुसार फेरफार करणें शक्य व अवश्य झालें. ते फेरफार अगदींच झाले नाहींत असें नाहीं; परंतु व्हावयास पाहिजे होते तेवढे ते झाले नाहींत. त्यामुळें हिंदुसमाज अंतर्भेदाला बळी पडण्याला पात्र व कमकुवत राहिला.

जुन्या परिस्थितींत जुनीं शास्त्रेंच शक्य होतीं, व आर्यांच्या रक्षणाला अवश्य होतीं. नव्या परिस्थितींत नवीं शास्त्रें शक्य आहेत व पाहिजेहि आहेत. इतिहासाचा जर कांहीं आम्हांला उपयोग करून घ्यावयाचा असेल तर जुनें चांगलें किंवा त्रिकालाबाधित असलेंच पाहिजे असें म्हणणें योग्य होणार नाहीं, हें वरील अल्प इतिहासावरूनहि कळण्यासारखें आहे.

बदललेल्या परिस्थितीस व गरजेस अनुलक्षूनच श्रीमत्स्वामी विवेकानंदासारख्यांनीं शिरोभागीं दिलेले उद्गार काढिले आहेत. हिंदुबंधूहो! हिंदुसमाजाच्या रक्षणाकरतां अवश्य व शक्य झालेलीं शास्त्रें आपण अस्तित्वांत आणावयाचीं ना?

* या संबंधानें श्रीयुत वि. चि. वैद्य यांचें म्हणणें मनन करण्यासारखें आहे. पहा Mahabharata, Criticism. पृ. १२४-१२६.

...चें मुख्य लक्षण हें कीं, त्याला दुसऱ्याचे दोष ...न दिसून येतात व स्वतःच्या दोषांकडे त्याची ... होते.

लिहिणारे पुष्कळ असतात पण लिहिण्यासारखें ... लोक्यांत कांहीं आहे असे थोडेच आढळतात.

सर्व इतिहासाचा व ज्ञानाचा निष्कर्ष हाच आहे कीं मनुष्यजातीची उत्तरोत्तर सुधारणा होत आहे.

ह्या जगांत अशी गोष्ट कोणती आहे कीं जी दुसऱ्याला देण्याला आपण तयार असतों, परंतु स्वतः घेण्याला तयार नसतों? उपदेश!

तुझे खिसे गच्च भरले तरी देवाच्या चरणीं लीन होण्याला विसरूं नको.

गुलाला नांवावर जाऊन फसूं नको!

नीति ही सुखांची धात्री आहे.

आपल्या अंगीं कोणकोणते दोष आहेत हें जर आधीं कळलें तर ते काढून टाकण्याचा इलाज करतां येईल.

मन स्वाधीन ठेवणें ह्यासारखा दुसरा पराक्रम नाहीं.

डोंगर चढतांना नजर नेहमीं वर असावी; परंतु ऐश्वर्यशिखरावर चढत असतां ती खालींच असावी!

खऱ्या गुलामापेक्षां संपत्तीचे गुलाम अगदीं वाईट!

पडलेलें लोखंड कीट खात असतें, आणि निरुद्योगी माणसाचें शरीर जीर्ण होत असतें!

बोलण्यापेक्षां ऐकणें चांगलें; पण थोडेंच प्रसंगोचित बोलणें उत्तम!

बायको कीं विडी ?

संध्याकाळची वेळ. टोलेजंग इमारतींच्या शिखरांस सायंकाळच्या कोमलकरांनीं कुरवाळून रवि मुकताच क्षितिजाआड झाला होता. शुक्राची चांदणी आपल्या सौंदर्याचा विकास होण्याची वेळ आली असें पाहून आनंदयुक्त होत्साती आकाशभागास लावण्यानें शोभा देत होती. सायंकालचा गार वारा श्रांत मनांस आल्हादवीत होता. दिवसभर कचेरींत कामकाज करून घरीं येणाऱ्या मुंबईतील हपिसर आणि कारकून मंडळींचा प्रवाह कोटांतून शहराकडे अव्याहत चालला होता. कोणाच्या हातांत घरीं काम पाहण्यासाठीं आणलेले कागदाचे पुडके होते, तर कोणाच्या हातांत रस्त्यांत खरेदी केलेली भाजी होती, आणि कित्येक तुरळक गुलजार तरुणांच्या हातांत फुलांचे गजरे होते. ट्रामगाड्या, मोटार, घोड्यांच्या गाड्या व सायकल्स ह्या पादचारी जनांची धांदल उडवीत होत्या !

अशा वेळीं वासुदेवराव आपली तुंदिल तनु संभाळीत संभाळीत गर्दीतून चालले होते. चालण्याच्या श्रमानें, देवीच्या वर्णांनीं खडबडीत झालेल्या त्यांच्या चेहऱ्यावर घर्मबिंदु चमकत होते. राहून राहून गाडीवाल्या लोकांस व साधारणतः लक्ष्मीपुत्रांस शेलक्या विशेषणांची लाखोली वहात ते मार्ग क्रमीत होते. वासुदेवराव तसेच पालवरोडवरील एका टुमदार बंगलींत जाऊन दुसऱ्या मजल्यावरील एका प्रशस्त खोलींत शिरले. तेथें एक लहानसें पण सुंदर मेज होतें. मेजाच्या एका बाजूस रॉकिंगचेअरमध्यें बसून प्रभाकरपंत झोंके घेत होते. त्यांनीं डोकीवर ठेवलेले केश, एका बाजूस भांग पाडून सुव्यवस्थित रीतीनें विचरलेले होते. खुर्चीपुढेंच त्यांच्या पायांतील सपातें पडलेलीं होतीं. मेजाच्या समोर असलेल्या खुर्चीत दिवाकरपंत बसलेले होते. त्यांनीं टोपी जरा मागें टाकली होती तींतून त्यांचे केश आडवे तिडवे पुढें आलेले होते. त्यांच्या भालप्रदेशाच्या मध्यभागीं विराजमान होणारा केशरी गंधाचा टिळा, आधुनिक स्त्रियांच्या ललाटपट्टावरील अति क्षीण कुंकुमतिलकाचा जणुं काय उपहास करीत होता! सुवर्णाच्या चवकटींत बसविलेले उपनेत्र त्यांच्या निरीक्षणशक्तीस साह्य आणि मुखश्रीस शोभा देत होते. त्यांच्या छातीवरील खिशांतून रुमालाचा बराच भाग बाहेर डोकावून पहात होता. त्यांच्यासमोर आगकाड्यांची पेटी व सिगारेट्सचें बाक्स पडलेलें होतें. मधून मधून सिगारेट्सचे झुरके घेऊन ते हवेंत धुराचे लोट सोडीत व समोर असलेल्या आरशांत आपल्या ऐटबाज चेहऱ्याचें प्रतिबिंब पहात.

ह्याप्रमाणें ही मंडळी बसली असतां त्यांच्यांत वासुदेवरावांची स्वारी येऊन धडकली. वासुदेवरावांस पाहून प्रभाकरपंत "यावें वासुदेवराव! इतका उशीर?" असें जागेवरूनच ह्मणाले.

वासुदेवरावांनीं हुश्श हुश्श करीत आपलें अवजड शरीर मेजाच्या दुसऱ्या बाजूस असणाऱ्या इझिचेअरमध्यें टाकलें व उपरण्यानें घाम पुशीत पुशीत ते ह्मणतात "अहो चाललें आहे! उशीर काय आणि काय काय? एकेक दिवस कसातरी लोटला ह्मणजे झालें. आज येतां येतां वाटेंत देव्हारे आणि कंपनीचा मनुष्य भेटला. तो तुमचा फोटो घेऊन येत होता त्याच्याजवळून फोटो आणला—"

"पाहूं, फोटो पाहूं कसा काय आहे तो" दिवाकरपंत उत्सुकतेनें हात पुढें करून ह्मणाले.

"जरा दम धरा, दम धरा." फोटोवरील कागद दूर करीत वासुदेवराव ह्मणाले. "आधीं आमच्या नेत्रांचें पारणें फिटूं द्या, मग तुमचें आहेच! बा, काम तर फारच सुरेख आहे युवा! देव्हाऱ्यांचें काम नेहमींच सुबक असतें. अगदीं युरोपिअनांच्या तोडीचें काम करतात." फोटो मांडीवर ठेवून त्याकडे पाहत वासुदेवरावांनीं डाव्या हातांत तपकिरीची डबी धरली व उजव्या हातानें चिमूट भरून नाकपुड्यांत बार भरण्याचा सपाटा चालविला.

दिवाकरपंतांनीं त्यांच्या फेंदारलेल्या नाकाकडे अधीरतेनें पाहिलें व पुनः हात पुढें करून झटलें "आणा, इकडे आणा तो फोटो, नाहीं तर त्याला तपकिरीचा थोडासा प्रसाद द्याल!" चेहऱ्याकडे नीट पाहून दिवाकरपंत पुढें ह्मणतात "आहे खरें कसब! पण काय हो, हा बैलोबा एथें कोण बसला आहे?"

वासुदेवराव आश्चर्यानें उद्गारले "काय बैल! आणि मला तो कसा दिसला नाहीं? पाहूं पाहूं कोठें आहे तो?"

दिवाकरपंत फोटो न देतां उत्तर करतात "तुह्माला कसा दिसेल हो? त्याला निराळी दृष्टि लागते! अहो,

हा बैल नाहीं तर काय ! स्वतःलेक खुर्चीवर बसला आहे अन् वायकोला बाजूस उभें केलें आहे. काय रानटी आणि अशिक्षित प्राणी हा !"

" तुमची तरी कमाल आहे बुवा !" वासुदेवराव म्हणतात. "अहो, खुर्चीवर आमचे प्रभाकर बसले आहेत. तुम्हाला काय वाटतें कीं त्यांनीं बाजूला उभें रहावें व आपल्या अर्धांगीस लेडी करून कोचावर बसवावें ? दोंहि कांहीं वाईट नाहीं म्हणा ! दिवसेंदिवस तसेच दिवस यावयाचे आहेत ! परंतु आपल्या रीतरिवाजास अनुसरून ते आज जर बसले, तर तेवढ्यावरूनच त्यांना अगदीं बैल करून नका सोडूं !"

" मुसता बैल नाहीं परंतु रानटी व अशिक्षित बैल !" दिवाकरपंत म्हणाले.

प्रभाकरपंत हांसत हांसत म्हणतात "सभ्य व सुशिक्षित बैल कोठें असतील तर ते पाहण्याची माझी फार इच्छा आहे !"

" शिकलेल्या लोकांनीं शिष्टाचाराचें व नागरिकतेचें उल्लंघन करणें हें अगदींच गर्हणीय आहे." दिवाकरपंतांनीं उत्तर दिलें. "आपल्या शिक्षणाचा फायदा तो मग काय ?"

" परंतु हें पहा," वासुदेवराव नाकांत तपकीर कोंबीत म्हणाले " मनुष्यानें आपलें मूळपद केव्हांहि विसरूं नये ! आपण आपला मूळचा आचार जो कांहीं आहे तो कां सोडावा ? त्यांत कांहीं गैरशिस्त भाग असेल तर हवी असल्यास तुम्ही सुधारणा करा, तुम्हांला नको कोण म्हणतो आहे ? पण सुधारणा करण्यासाठी वायकांनीं भीडमर्यादा सोडली पाहिजे, असें थोडेंच आहे ! "

यावर प्रभाकरपंतांनीं उत्तर केलें "दास्यांतून स्त्रियांची सोडवणूक करावयाचा ज्यांनीं विडा उचलला आहे ते ही गोष्ट कधींहि कबूल करणार नाहींत ! माझ्याविषयीं म्हणाल, तर ह्या बाबतींत माझा आग्रह असा मुळींच नाहीं. ज्यानें त्यानें आपापल्या सोईप्रमाणें घ्यावें."

" हा प्रश्न सोईचा नाहीं, तत्वाचा आहे महाराज !" दिवाकरपंत म्हणाले. "संसाररूप गाड्याचीं स्त्री व पुरुष अशीं दोन चाकें आहेत, व त्या दोन्ही चाकांचें महत्त्व सारखेंच आहे. त्यांपैकी एका चाकानें अरेराव होऊन बसावें व दुसऱ्या चाकास दासीप्रमाणें राबवावें, हें मला मुळींच रुचणार नाहीं !"

" तुम्ही भाषण तर फार चांगलें केलें !" वासुदेवराव म्हणतात. "असें जोरदार भाषण—पण तें राहो म्हणा, तुम्ही हें पहा, पोट आणि अवयव ही गोष्ट तुम्हाला माहित आहे ना ?"

प्रभाकरपंत म्हणाले "त्या गोष्टीच्या मदतीनें मुख्य प्रश्न टाळणें हें नामर्दपणाचें काम आहे, असें मी समजतों. दिवाकरपंतांचा दृष्टांत अगदींच समर्पक आहे, असें नाहीं. ह्या दोन्ही चाकांची योग्यता जरी एक असली, तथापि त्यांचीं कामें भिन्न भिन्न आहेत व तीं भिन्न परिस्थितींत त्यांना करावीं लागतात."

" शिवाय, माझें आणखीहि एक म्हणणें आहे," वासुदेवराव म्हणाले "कीं, त्यांची योग्यता तात्पुरती दृष्ट्या जरी कदाचित् एक असली, तरी व्यवहारांत ह्या दोन्ही चाकांच्या योग्यतेंत जमीनअस्मानाचें अंतर असलेलें आपण पाहतों. स्त्रियांना स्वातंत्र्य पाहिजे, तर आधीं त्यांना शिक्षण द्या. स्वतंत्र होण्याची योग्यता आल्याशिवाय स्वातंत्र्य देणें अनर्थावह आहे."

दिवाकरपंत म्हणाले "आपल्या देशांत स्त्रिया पुरुषांस फाजील मान देतात, त्यामुळें पुरुष चढेल होऊन बसले आहेत व म्हणूनच आपल्या समाजाचें नुकसान होत आहे."

प्रभाकरपंत म्हणाले "आपल्या देशांत स्त्रिया पुरुषांस मान देतात ही गोष्ट मला कबूल आहे—"

" व तो मान फाजील असतो ही गोष्ट मला सर्वथैव नाकबूल आहे !" वासुदेवराव जोरानें म्हणाले.

" त्या मानानें सरसकट पुरुष चढेल झाले आहेत असें मला म्हणवत नाहीं—" प्रभाकरपंत म्हणाले.

" व त्यामुळें समाजाचें मुळींच नुकसान झालें नाहीं असें माझें ठाम मत आहे !" वासुदेवराव म्हणाले. "स्त्रियांनीं आपल्या मर्यादेंत असणें त्यांतच त्यांचें व समाजाचें हित आहे !"

"पूज्यबुद्धि ही मनाची एक उच्च वृत्ति आहे." प्रभाकरपंत म्हणाले. "तुम्हांला समान स्थिति हवी असेल तर दोघांनांहि उच्च पदावर नेऊन बसवा; परंतु एकाला वरच्या पदावरून ओढून खालीं आणूं नका. स्त्रियांच्या मनांत पुरुषांविषयीं पूज्यभाव असेल तर त्याची वृद्धि करा, आणि पुरुषांच्या मनांत स्त्रियांविषयीं पूज्यभाव नसेल तर तो उत्पन्न करून वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करा—"

" म्हणजे पुरुष लवकरच बाइलबुद्धे होऊन जातील !" वासुदेवराव म्हणाले. "साहेबांची रीत निराळी अन् आपली रीत निराळी. त्यांचे चाळे आपणां गरीबांला कशाला हवेत ? आपल्यांत अविभक्त कुटुंबपद्धति प्रचारांत आहे. बायकांचें प्रस्थ वाढलें, कीं, कुटुंबाची फाटाफूट होण्यास वेळ लागणार नाहीं, यासाठींच आमच्या पूर्वजांनीं दूरदृष्टीनें बायकांना जरबेंत ठेवण्याची

युक्ति काढली. साहेबलोकांत नवराबायको मिळून दोघांचाच संसार असतो म्हणून बायकांचें प्रस्थ माजविण्यास हरकत नसते. शिवाय, त्यांच्या स्त्रियाहि शिकलेल्या असतात."

" निरनिराळ्या स्वभावाच्या शेंकडों माणसांनां एकाद्या खोपट्यांत कोंडून ठेवतां यावें म्हणून स्त्रियांच्या सर्व मनोवृत्तींचा उच्छेद करून त्यांनां गुलाम बनवून टाकावें, हेंच कीं नाहीं तुमचें म्हणणें ?" दिवाकरपंत रागानें विचारतात.

" हें पहा दिवाकरपंत !" वासुदेवराव उपरण्याच्या पदरानें आपल्या नाकपुड्या साफ करीत शांतपणानें म्हणतात "तुम्ही स्त्रियांनां गुलाम म्हटलेंत म्हणजे त्या गुलाम होतात, असें कांहीं नाहीं. अहो त्या तुमच्या-आमच्यासारख्यांस गुलाम करतील व करतातहि ! त्या आईबापांचें घर सोडून येतात व तुमचें घर कायीज करतात ! तुह्मांला घरांत कांहीं लागलें तर त्यांच्या तोंडाकडे पाहिलें पाहिजे ! घर त्यांचें ! तुह्मी कामकाज करून घरीं आलांत तर विश्रांति घेऊन पुनः ताजेतवाने होईपर्यंत घरीं रहाल. ताजेतवाने झालां कीं कामावर जाल. त्या नवपणा स्वीकारतात व एकाद्या सुसरीप्रमाणें तुह्मांला संबंधच्या संबंध घशासाठीं उतरतात !"

" तुह्मी ज्याप्रमाणें त्यांच्याशीं वर्तन ठेवाल त्याप्रमाणें तुमच्यापाशीं त्या वागतील !" दिवाकरपंत म्हणाले. "तुह्मी त्यांनां आपल्या कह्यांत ठेवूं जाल तर त्या तुह्मांला आपल्या कह्यांत आणूं पहातील. त्यांनां कमी लेखून आपला तोरा चालविण्याचा प्रयत्न करीत असतां त्यांच्या अंगच्या तेजस्वी गुणास बळी पडून आपण त्यांच्या मुठीत वागूं लागलों तर आपण यथार्थ बाइल-बुदे होऊं. परंतु त्यांचे समान हक्क आधींच कबूल केले व दोघांचीहि मर्यादा आधींच आंखून ठेवून त्याप्रमाणें आपण वागत गेलों, तर त्यांत आपणांकडे कमीपणा न येतां दोघांचेंहि कल्याण होईल."

" तराजूचें कोणतें पारडें किती जड आहे हें तुह्मांला आधीं समजणार कसें !" वासुदेवराव म्हणाले. "आधीं कांहीं चेंडाताण होऊन नंतर दोनहि पारड्यांतील वजनाच्या मानानें तराजू स्थिरावेल. असें होईपर्यंत प्रत्येकानें आपापल्या मर्जीप्रमाणें आपापल्या मर्यादा आंखून घेण्यापेक्षां वडिलांनीं जी मर्यादा घालून दिली आहे तीप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करण्यांत काय नुकसान आहे ?"

" अलबत नुकसान आहे !" दिवाकरपंत म्हणाले. "चालू असलेली रीत अन्यायाची आहे असें जर आपणांस धडधडीत दिसत आहे—"

" आपणांस म्हणजे इंग्रजी शिक्षणानें हुरळून गेलेल्या कित्येक शहाण्यांस, असेंच कीं नाहीं ? प्रत्यक्ष इंग्लंडांत फाजील स्त्रीस्वातंत्र्याचे काय परिणाम होताहेत ते पहा, व मग त्यांचें इकडे अनुसरण करा—"

" तुह्मी जसे इंग्लंडांतील स्थिति प्रत्यक्ष पाहूनच आलां आहां !" दिवाकरपंत म्हणतात. "तेथील एकदोन दुराग्रही व लब्धप्रतिष्ठ लेखकांवरच तुमची भिस्त आहे कीं नाहीं ? त्यांच्यावर विश्वास ठेवूनच तुह्मी आमच्यांतील दुष्ट चालीस चिकटून राहणार कीं नाहीं ? त्यांच्या वचनावरच तुह्मी स्त्रीजातीचें अहित करण्यास तयार होणार कीं नाहीं?"

" मला वाटतें, दोघांचेंहि हित एकच आहे," प्रभाकरपंत म्हणाले.

" स्त्रीपुरुषांत दुजाभाव मानणें म्हणजे चूक आहे ! स्त्रियांनां स्वातंत्र्य किती द्यावें ह्यासंबंधानें सरसकट नियम सांगतां येणार नाहीं. स्वभाव, शिक्षण व परस्थिति ह्या मानानें ज्याला त्याला स्वातंत्र्य मिळणार. आपलें काम इतकेंच, कीं, त्यांनां शिक्षण द्यावें. ज्या दुष्ट रीतीपासून त्यांनां त्रास होत असेल त्या रीती सुधाराव्या, व त्यांच्या संबंधानें पुरुषांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होईल असें करावें."

" स्त्रियांनां आपण समान हक्क जर देऊं लागलों," वासुदेवराव म्हणाले "तर त्यांनांहि सिगारेट ओढण्यास हरकत असूं नये !"


" किंवा नाकांत तपकीर कोंबण्यास प्रत्यवाय असूं नये !" दिवाकरपंत म्हणाले.

" आपण ज्याप्रमाणें स्त्रियांची मर्यादा ठरविण्यांत गुंतलों आहों," प्रभाकरपंत म्हणाले "त्याप्रमाणें जर पुरुषांची मर्यादा ठरविण्यास स्त्रिया जमूं लागल्या, तर दिवाकरपंतांच्या विडी पिण्याच्या हक्काला जबरदस्त धक्का बसेल, व वासुदेवरावांची तपकिरीची डबीहि नाहींशी होईल !"

" तेवढ्यासाठींच तर वासुदेवराव बायकांनां वर डोकें काढूं देत नाहींत !" दिवाकरपंत म्हणाले.

" तुमची सिगारेट सोडून देण्याची अगदीं तयारीच आहे वाटतें ?" वासुदेवरावांनीं विचारलें.

"माझें लग्न होईल तेव्हां मी त्याचा विचार करीन !" दिवाकरपंत म्हणाले. "बायको पाहिजे कीं विडी पाहिजे हा प्रश्न आला म्हणजे त्याचें आपाप उत्तर सुचेल !"



या कादंबरीच्या मागील प्रकरणांचा सारांश.—(१) मंदाकिनीच्या तीरावरील एकान्त वनांत एक तरुणी एका दोन वर्षांच्या बालिकेस एका प्रौढ योग्याच्या स्वाधीन करते. (२) पांडोबातात्यांच्या शाळेंतील मुलांच्या चेष्टा. गदाधर फरारी हंबीराच्या शोधास जातो.

प्रकरण तिसरें.

माला—स्खलन.

पांडोबातात्या भोळे ऊर्फ तात्यापंतोजी हे तुमच्या आमच्यासारखे धडधडीत जीवंत असतां त्यांच्या पालखीची मिरवणूक काढण्याचा विचार त्यांच्या पाठशाळेंतील मुलांनीं ज्या वेळीं चालविला होता, त्याच वेळीं गदाधराचा परम मित्र हंबीर—जो फरारी झाला असें समजून त्याला गिरफदार करून आणावयासाठीं मुलांची लहानशी फौज पाठविण्याचा तात्यांनीं बेत केला होता तो—एका महत्त्वाच्या कामांत अगदीं गढून गेला होता. त्या दिवशीं सकाळी सरस्वतीपूजन करण्याकरतां जहागीरदारसाहेबांची मुलगी शारदा ही पाठशाळेंत यावयाची असून खुद्द नानासाहेबच तिला घेऊन तेथें यावयाचे होते, ही बातमी तात्यापंतोजींनीं शाळेंतील मुलांना आदल्या दिवशींच सांगून दुसऱ्या दिवशीं अगदीं सकाळीं शाळेंत हजर रहावयास त्यांनां कडकडीत ताकीद देऊन ठेविली होती, या गोष्टीचा आधीं मागील प्रकरणांत उल्लेख केलाच आहे. गुरुजींच्या ताकिदीप्रमाणें हंबीर आज लवकर उठून शाळेंत जावयास निघाला होता; परंतु शाळेंत जावयास निघतांना-अगदीं आयत्या वेळीं-त्याच्या मनांत अशी पोक्तपणाची कल्पना आली, कीं, शाळेंत लवकर जाऊन तरी काय करावयाचें आहे? शारदा आज शाळेंत यावयाचीच आहे; तिच्यावरोबर तिकडे गेलें तरी चालण्यासारखें आहे. कारण, या आनंदाच्या प्रसंगीं तात्या कांहीं आपले धडे अगोदर खास घेत नाहींत-मग उगीच शाळेंत जाऊन या आडदांड पोरांशी धिंगामस्ती करीत खडत बसा कशाला? असा विचार करून स्वारीनें शाळेऐवजी जहागीरदारांच्या वाड्याकडेच आपला मोर्चा फिरविला. जहागीरदारांची कन्या शारदा व हंबीर या उभयतांमध्यें गाढ मैत्री होती, हें एथें सांगणें अवश्य आहे.

वाड्याकडे जात असतां, इतक्या सकाळीं शारदा निजून तरी उठली असेल काय,- अशी हंबीराच्या मनांत शंका आली. हो, जहागीरदारांची एकुलती एक मुलगी, अन् त्यांतून त्यांची अतिशय लाडकी! मग सूर्य मध्यान्हीस येईपर्यंत ताईसाहेबांची पहांट होते आहे कशाला? आपण शाळेंत न जातां इकडे आलों खरे, परंतु आज शाळेंत जाण्याची शारदेची तब्येत, लागली नाहीं, तर शाळेंत न जाण्याबद्दल तात्या आपणाला शिक्षा मात्र करतील, असा विचार करीत हंबीर नानासाहेबांच्या वाड्याशीं येऊन पोहोंचला.

सुदैवानें हंबीराच्या सर्व शंका खोट्या ठरल्या. सरस्वतीपूजन करण्यासाठीं आज पाठशाळेंत जावयाचें आहे असें शारदेला तिच्या पित्याकडून कळलें असल्यामुळें ती आज नेहमींपेक्षां पुष्कळच लवकर उठली होती, व वेणीफणी वगैरे प्रसाधनकृत्यें अटोपून ती नानासाहेबांबरोबर जावयास तयार होऊन राहिली होती. हंबीराला शारदा आपल्या खोलींत बसलेली आढळली.

हंबीराला आलेला पहातांच शारदेला मोठा आनंद झाला. ती हंसत हंसत त्याला म्हणते "कां? अगदीं सकाळींच कुठं इकडे आपली स्वारी?"

हंबीरानें हंसून उत्तर दिलें "कां म्हणजे? शारदादेवीच्या पूजनाला!"

"चल, तुझं आपलं कांहींतरीच!"

"कां बरें? तूं आज आमच्या शाळेंत सरस्वतीपूजन करणारच आहेस-आम्हांला कांहीं तिथें तें करायला सांपडायचें नाहीं. तेव्हां म्हटलें, वाड्यांत जाऊन प्रत्यक्ष शारदादेवीचेंच पूजन करून मग शाळेंत

जावें. शारदे, आजपासून तूं आमच्या शाळेंत शिकायला येणार ना ? "

किंचित् भृकुटीभंग करून शारदा म्हणाली " मी काय एकटीच येणार आहें शाळेंत शिकायला ? माझ्यावरोबर इंदिरा, तारा अन् यमुना या दिसील यायच्या आहेत हो ! बाबांनीं सांगितलं हें मला. या साऱ्या जणी शाळेंत नाहीं आल्या तर याई मी कांहीं एकटी, शाळेंत नाहीं जायची ! साऱ्या मुलांत मीं एकटीनंच रे कसं यावं ? "

" बरें तर, मी जाऊन त्यांनां आतां घेऊन येतों पहा. "

असें म्हणून हंबीर धांवतच तेथून निघून गेला. शारदेनें आपल्याबरोबर शाळेंत यावें, असा त्याचा अत्युत्कट हेतु होता. शारदेच्या सुमधुर संगतीचा जितका अधिक वेळ लाभ होईल तितका त्याला पाहिजेच होता. तिच्या संगतीसारखी प्रियकर गोष्ट या जगांत त्याला एकहि नव्हती. शारदा आजपासून आपल्याबरोबर शाळेंत शिकायला येणार, सर्व दिवस-भर आतां तिच्या सहवासाचा आपणाला लाभ होईल, या विचारानें हंबीराचा आनंद आज गगनांत मावत नव्हता. अहाहा ! आज केवढा सुखाचा दिवस उगवला ! आपल्या पाठशाळेला आजचा दिवस म्हणजे केवळ अपूर्व होय ! साक्षात् यमधर्माप्रमाणें शोभणाऱ्या दंडधारी पांडोबातात्यांची ती विद्यार्थिगणाच्या रडण्या-ओरडण्याच्या आर्तध्वनीनें हृदयाला भय उत्पन्न करणारी पाठशाळा, शारदादेवीची केवळ मूर्तिच अशा शारदेच्या आगमनानें आज किती अपूर्व शोभा धारण करील ! आणि तिच्या रोजच्या सहवासानें शाळेचें कारागृहस्वरूप नाहींसें होऊन ती आपणाला स्वर्गाप्रमाणें वाटूं लागेल ! अहाहा, केवढ्या भाग्याचा आजचा दिवस ! तात्यांच्या पाठशाळेंत दररोज घड्याळांनां प्रारंभ होण्यापूर्वी सर्व मुलें

' ये शारदे ! सकलदेवनुते ! अहांतें ।
विद्यागुणान्वित करीं, करं वंदनातें ॥ "

या श्लोकानें ज्या शारदादेवीचें स्तवन करीत, तीच शारदादेवी आज जणूंकाय मनुष्यरूपानें अवतीर्ण होऊन पाठशाळेला आपल्या दिव्य दर्शनानें अपूर्व शोभा अर्पण करणार होती !

आज हंबीरानें सकाळीं उठतांच कोणाचें तोंड पाहिलें होतें कोणास ठाऊक ? त्याचें प्रत्येक काम आज फत्ते होत चाललें होतें. पहिल्यानें तो तारेच्या घरीं गेला, तों तिची सर्व तयारी झाली असून इंदिरा व यमुना तिच्याकडेच आहेत, असें त्याला आढळून आलें.

हंबीर येतांच तारेनें धावरून विचारलें " कांरे हंबीर ! सकाळींच कुठं तूं इकडे ? "

" इतकें कांहीं घाबरून नको जायला ताराताई, मी इकडे आलों म्हणून ! तुम्हांला आणायला मला शारदेनें पाठविलें आहे. चला लवकर, ती तुमची अगदीं वाट पहात बसली आहे ! "

एकदाचा तारेच्या जीवांत जीव आला. इंदिरा म्हणाली "इतकंच ना ? या आम्ही निघालोंच. तिच्याकडे मिळून जाण्यासाठींच आम्ही दोघी तारेकडे आलों आहों. "

थोड्याच अवकाशांत शारदेच्या तिघी मैत्रिणींनां घेऊन हंबीर घाड्यांत आला.

"यावं यावं बाईसाहेब ! म्हटलं येतां आहां कीं नाहीं तुम्ही साऱ्या जणी ! मी अगदीं तुमचीं वाट पहात बसल्यें होतें. "

हंबीराकडे वांकड्या नजरेनें पहात इंदिरा म्हणते " आमची ग कशाला तूं वाट पहात होतीस ? तुझ्या प्रेमाचं अन् काळजीचं मनुष्य तर पहांटेपासूनच इथं येऊन बसलं आहे ! "

" कोण बाई तें ? " यमुनेनें मुद्दाम विचारलें.

" अशी वेड घेऊन पेडगांवाला कां जातेस यमुने ? शारदेच्या प्रेमाचं माणूस कोण तें साऱ्या जगाला ठाऊक आहे ! "

किंचित् लाजून शारदा म्हणाली " तुमच्या तोंडाला का बाई हाड आहे ? म्हणाना काय वाटेल तें ! "

इतका वेळ हंबीर मुलींपासून कांहीं अंतरावर होता, तो शारदेजवळ येऊन म्हणाला "शारदे ! चल, आपण अगोदर बागेंत जाऊं या. तिथें फुलांचे हार बनवून त्यांनीं मी तुला चांगली सजवतों. साऱ्या शारदेप्रमाणें फुलांच्या हारानें सजून मग तूं आमच्याबरोबर पाठ-शाळेंत चल. "

यमुना व तारा यांनां डोळ्यानें खूण करून इंदिरा शारदेच्या कानांत हळूच म्हणते " पाहिलंस शारदे ! मीं मघाशीं म्हटलं तें खरं का खोटं तें ? हंबीर आज तुझ्या गळ्यांत माळ घालणार आहे हो गडे ! "

"चल, चहाटळ कुठची ! "

हंबीर पुनः म्हणाला "चल शारदे, येतेस ना बागेंत ? "

शारदा खालीं मान घालून म्हणाली "मी नाहीं येत बागेंत—"

"कां बरें?" हंबीर वाईट वाटून विचारतो.

"मी आल्यें असतें तुम्यावरोबर बागेंत—पण ही इंदु माझी भारीच थट्टा करते बाई! मग कसं यावं?"

यमुना हंसत म्हणाली "त्यांत तुझी थट्टा करायला काय झालें? हंबीरानें तर चांगलीच गोष्ट सुचवली आहे-त्यांत थट्टा कसली करायची ती? ही इंदु तरी गेली भारीच चव्हाटळ आहे-तिचं तूं काय मनावर घेतेस शारदे?"

हंबीर गंभीरपणानें म्हणाला "आज तात्यांनीं आम्हां रावांनां लवकर शाळेंत बोलावलें होतें; पण आज शारदा अन् तुम्हीहि शाळेंत जायच्याच आहां, तेव्हां तुमच्यायरोवरच शाळेंत जावें असा विचार करून मी इकडे आलों. मी तुमच्यावरोबर गेलों तरी उशीरां शाळेंत आल्याबद्दल ताात्या मला छड्या मारतीलच. शारदेला चांगली सजवून मी तिच्यावरोबर शाळेंत गेलों म्हणजे तात्या कदाचित् मजवर भारी रागे होतील अन् मला छड्या राव्या लागणार नाहींत."

यावर शारदेच्या मैत्रिणी कांहींच बोलल्या नाहींत. इंदिरा मात्र हंबीर व शारदा यांजकडे पाहून गालांतल्या गालांत हसत होती.

हंबीराकडे पाहून शारदा म्हणाली "असं असेल तर मी येतें बागेंत."

असें म्हणून आपल्या तिघी मैत्रिणी व हंबीर यांसह ती बाड्याच्या बागेंत गेली.

कुंदपुरचे जहागीरदार नानासाहेब घोरपडे यांचा बाडा फार विस्तीर्ण असून तो फार सुंदर असल्यामुळे त्याची चहूंकडे ख्याति होती. जहागीरदारसाहेबांच्या प्रशस्त व विशाल बाड्याच्या पुढें व मागें दोन्ही बाजूंला मोठे बगीचे होते; परंतु हा लागलेला सुंदर बाग त्यांच्या बाड्याच्या पिछाडीला होता. बाड्यापुढील बगीचा या बागेपेक्षां बराच लहान असून शोभेंतहि पिछाडीच्या बागेशी याची तुलना होण्यासारखी नव्हती. जहागीरदारसाहेबांच्या प्रशस्त बाड्यापासून कांहीं अंतरावर पिछाडीच्या फुलबागेला वळसा घालून सरस्वती नदी वहात होती. जिचे सुंदर काळेभोर केश इकडे तिकडे रुळत आहेत अशा कृष्णवर्ण, परंतु ठसकेदार युवतीप्रमाणें शोभणारी ती सरस्वती नदी आपली मनोहर नील तरंगमाला हलुहलू मागेंपुढें करीत मोठ्या मौजेनें हलतडुलत बाड्याच्या समोरच्या उद्यानाचेंहि चुंबन घेऊन गात गात जात असे. बाड्याच्या पिछाडीच्या व पुढच्या-दोन्हीहि बागांनां सरस्वती नदी वेढून जात असल्यामुळें त्यांच्या-विशेषतः मागच्या उद्यानाच्या-शोभेला विलक्षण भर पडली होती! हें उद्यान विस्तृत असून त्याची रचना फार सुंदर होती. खुद्द नानासाहेबांच्या देखरेखीखालीं ही बाग तयार झाली असून तींत त्यांचें रचनाचातुर्य चांगलेंच दृष्टोत्पत्तीस येत होतें. ही बाग त्यांच्या अत्यंत आवडीची असल्यामुळें तिची सौंदर्यवृद्धि करण्यासाठीं त्यांनीं पैसा व श्रम यांजकडे पाहिलें नव्हतें. अतिशय व्यवस्थितपणा व प्रमाण हीं तर या उद्यानांत मूर्तिमंत दिसून येत होतीं. नानासाहेबांच्या पूर्वजांच्या हातचीं कांहीं महत्त्वाचीं झाडें त्यांचें स्मरण म्हणून नानासाहेबांनीं राखून ठेविलीं होतीं; त्यांतहि होतां होईल तों व्यवस्थितपणा व प्रमाण साधण्याचा प्रयत्न केल्याचें दिसून येत होतें. या विशाल उद्यानाच्या मध्यभागीं एक बराच मोठा अष्टकोनी तलाव असून तो संगमरवरी दगडांनीं बांधलेला होता. त्यांत उतरण्यासाठीं आठहि बाजूंला पायऱ्या होत्या असून त्यांच्या कठड्यावर सुंदर सुंदर फुलझाडांच्या कुंड्या ठेविल्या होत्या. तलावाच्या सभोवतीं दगडाचीं मनोहर आसनें ठेविलीं असून त्यांपैकीं कित्येकांवर नाना तऱ्हांच्या वेलींचे कुंज तयार करण्यांत आले होते. तलावाच्या सभोंवार पऱ्याच दूरपर्यंत अनेक तऱ्हेच्या फुलझाडांची दाट राई तयार करण्यांत आली होती. त्या फुलझाडांवर नाना प्रकारच्या वासांचीं व रंगांचीं फुलें येत असत. वर्षांतील कोणताहि ऋतु चालू असो, जहागीरदारसाहेबांच्या बागेंतील या फुलराईंत फुलांची सदोदित विपुलता असावयाची. या राईंतील बहुतेक फुलझाडें खुद्द नानासाहेबांच्या हातचीं होतीं. सर्व बागेंत हीच जागा त्यांची अत्यंत आवडती असून या राईवर त्यांची चांगली देखरेख असे. नानासाहेब जहागीरदारासारख्या मोठ्या मनुष्याची ती खासगी बाग-वास्तविक झटलें तर इतर मनुष्यांनां तींत जावयाला मज्जाव असावयाचा; परंतु खरी स्थिति तशी नव्हती. नानासाहेब फार उदार दिलाचे गृहस्थ होते. आपल्या खासगी बागीच्यांत इतरांनीं येऊं नये ही कल्पनाहि त्यांनां कधीं शिवली नाहीं. त्यांच्या या बागेंत वाटेल त्याला

यावयाला परवानगी असे. प्रत्येक दिवशीं सकाळीं त्यांच्या बागेंत कुंदपुरच्या लोकांची गर्दी दृष्टीस पडे. कांहीं लोक त्या उद्यानाच्या सौंदर्याचा उपभोग घ्यावयासाठीं येत, तर कांहीं सरस्वती नदीच्या तीरावर सहल करावयास येत. दोन घटकांच्या सुमारास मात्र बागेंतील सर्व लोक निघून जात; त्या वेळीं नानासाहेब किंवा शारदा वगैरे वाड्यांतील खाशी मंडळी बागेंत सहल करावयास येत असे. गांवांतील बहुतेक घरीं पूजेला लागणाऱ्या फुलांचा पुरवठा लोकांनां बहुधा नानासाहेबांच्या या फुलराईतूनच होत असे. ज्याला जितक्या फुलांची आवश्यकता असे, तितकीं फुलें तो नानासाहेबांच्या या फुलराईतून बेलाशक घेऊन जात असे. कोणताहि ऋतु असो, किंवा कोणताहि प्रसंग असो, कुंदपुरच्या लोकांनां नानासाहेबांच्या बागेंतून फुलांच्या पुरवठ्याला कधींच तोटा पडला नाहीं. फुलांच्या बाबतींतच काय, नानासाहेब प्रत्येक बाबतींत अतिशय उदार असत. त्यांच्या हातून अनाथ अपंग वगैरे लोकांनां बरीच खैरात होत असे. अमुक प्रसंगीं जहागीरदार-साहेबांनीं आंखडता हात धरला आहे, असें कोणाच्याच कधीं नजरेस आलें नाहीं. कुंदपुर गांवचे व आसपासच्या पंचक्रोशींतले लोक तर सदासर्वदा असें म्हणत, कीं, नानासाहेबांनीं मुक्तहस्तानें सदोदित चालविलेल्या दानप्रवाहाप्रमाणें किंवा त्यांच्या दिग्दिगंतराला व्यापून राहणाऱ्या यशःसौरभाप्रमाणें त्यांच्या उद्यानांतील पुष्पवाटिकेच्या फुलांचा सुगंधहि नेहमीं अक्षयच रहावयाचा ! पुष्पकुलाचा अधिदेव जो वसन्त त्याची नानासाहेबांच्या पुष्पवाटिकेवर जणूंकाय सदा कृपेची अमृतपूर्ण दृष्टिच होती !

अशा या मनोहर दिव्य उद्यानांत रम्य प्रभातकालीं शारदा व तिच्या तिघी मैत्रिणी यांनां घेऊन हंबीर प्रफुल्ल अंतःकरणानें आला. पुष्पांनीं गजबजून गेलेल्या फुलराईतून सर्व जणांनीं बरींच फुलें गोळा केलीं व तीं घेऊन तो बालकबालिकावृंद पुष्पवाटिकेंतील पुष्करणीच्या पायऱ्यांवर येऊन बसला. थोड्याच अवकाशांत त्यांनीं निरनिराळ्या तऱ्हेचे बरेच पुष्पालंकार तयार केले.

कांहीं वेळानें हंबीराकडे पहात इंदिरा हंसून म्हणते " हंबीर ! कशाला तूं उगीच मेहनत घेतो आहेस ?"

" कां बरें इंदुताई ? "

" अरे बाबा, फुलांसारख्या नाजुक पदार्थांचे दागिने करायचं काम आमचं-तें तुझ्यासारख्या पुरुषमाणसाला नीट साधणार कसं ? "

" बरें मग ? तसें असलें तर माझ्या हातून तुझ्यासारखे नाजूक हार व्हायचे नाहींत, इतकेंचना ? " हंबीर किंचित् हंसून म्हणाला.

" म्हणून म्हणत्यें, हा हार करायचा नाद तूं सोड आतां-मी तुला हार करून देत्यें. हंबीर ! पहात्यें आतां या हारांनीं तूं तुझ्या शारदेला कशी काय सजवितोस तें ! " आपल्या मैत्रिणीकडे डोळे मिचकावीत इंदिरा म्हणते.

शारदा किंचित् चिडून यमुनेला उद्देशून म्हणाली, " पाहिलंस हें यमुने ? झाली पुनः इंदूची भलतीच् सलती थट्टा सुरू ! "

शारदेचा कोमल हस्त आपल्या हातांत घेऊन इंदिरा म्हणाली " यांत कसली ग आली आहे थट्टा शारदे ? "

इंदिरेचा हात हिसडून शारदा म्हणते " तें बाई तुझं तुलाच ठाऊक ! मीच कशाला तें तुला सांगायला हवं ? "

" अंः ! आतां आलं सारं माझ्या ध्यानांत ! मीं हंबीराला ' तुझी शारदा ' असं झटलं म्हणून का इतकी फुणफुणलीस ? "

शारदेकडून उत्तर नाहीं !

" मग त्यांत मी खोटं काय बोलल्यें बाई ? यमुने, गडे तूंच खरं सांग आतां-हंबीराचं या शारदेवर प्रेम आहे कीं नाहीं ? " शारदेच्या गालावर हळूच चापट मारून इंदिरेनें हंसत हंसत विचारलें.

"अग, हंबीराचं प्रेम कुणावर नाहीं इंदु ? " यमुना म्हणाली.

टाळ्या वाजवून शारदा हंसून म्हणते " भली खोड मोडली एका माणसाची ! सोनारानं परस्पर कान टोंचला, तेव्हां आतां कसं वाटलं इंदु ? "

शारदेकडे विशेष लक्ष्य न देतां इंदिरा म्हणाली " अग, प्रेमाप्रेमांत कांहींच का अंतर नाहीं यमुने ? हंबीराचं प्रेम सर्वांवर असलं, तरी शारदेवर जसं त्याचं प्रेम आहे, तसं कांहीं तुझ्यावर किंवा माझ्यावर त्याचं प्रेम नाहीं, हें खास ! "

झणाली "हं, घाल तो हार तिच्या गळ्यांत. असा वेड्या-सारखा बघत काय उभा राहिला आहेस? हा हार तूं शारदेच्या गळ्यांत घातलास झणजे तिच्याशीं तुझं खरोखरच लग्न झालं असं का वाटतं तुला? वेडा कुठला! अरे, हें सारं खेळांतलं!"

इंदिरेनें हंबीराला हात धरून ओढतांच शारदा चमकून मागें सरली. हंबीर लाजेनें खालीं पहात होता. इंदिरेच्या टोंचणीमुळें तो शारदेच्या गळ्यांत माला घालावयास गेला, तों ती चटकन् मागें सरल्यामुळें माला तिच्या गळ्यांत पडण्या ऐवजीं तिच्या पायांवर मात्र पडली! बालिका हंसून टाळ्या पिटूं लागल्या.

इंदिरा हंबीरापुढें हात ओवाळून झणाली "अहाहारे भागुबाई! इतकं कामदिखील हातून नीट होईना अन् स्वारी शारदेला सजविणार होती!"

तारा हंसून झणाली "अग, त्याला कां रागावलेस तूं इंदु? मला वाटतं, शारदेच्या पायांची पूजा करायची हंबीराला इच्छा झाली असेल झणून त्यानं असं केलं असेल. बरं तर—आतां मीच तो हार शारदेच्या गळ्यांत घालतें."

इतक्यांत दुरून कोणी उंच स्वरानें हांक मारली "हंबीर—अरे हंबीर!"

सर्वजणी चमकून मागें पाहूं लागल्या.

" हंबीर—अरे हंबीर!"

हंबीरानें तत्क्षणीं ती हांक ओळखून प्रत्युत्तर दिलें "कोण? दादा तर नव्हे?"

हंबीराचा तर्क चुकीचा नव्हता. तात्यांच्या हुकुमानें पाठशाळेंतून निघालेला गदाधर यावेळीं जहागीरदारांच्या बगीच्यांत येऊन पोंचला होता. यावेळीं आपल्या परम मित्राची स्वारी फोठें असेल हें त्याला चांगलें ठाऊक होतें.

हंबीराजवळ जाऊन त्याला लीलेनें मागेंपुढें हालवून गदाधर हंसत झणतो " शाबासरे शाबास बहादर! तूं इथें येऊन ताईसाहेबांच्या पायांची फुलांच्या हारांनीं पूजा करतो आहेस खरा, परंतु यावेळीं तुझ्यावर केवढें मोठें संकट आलें आहे, आहे का ठाऊक?"

हंबीर भयभीत होऊन विचारतो "काय तें दादा?"

" इकडे जितकी तूं चैन करतो आहेस, तितकीच शाळेंत आतां तुझ्या पाठीचीहि चैन उडणार आहे! तूं आज वेळेवर शाळेंत आला नाहींस झणून तुला कोलदांडा द्यायला अन् तुझ्या पाठीचें धिरडें करायला वाघोबा तात्या आपली ती लांब छडी घेऊन तयार आहेत. तुला इकडे खेळणें अन् ताईसाहेबांची पूजा सुचते तरी कशी?"

इंदिरा गदाधराला उद्देशून हंसत हंसत झणाली "हें बघ गदाधर! मी जर तुमची वाघोबातात्या असत्यें तर आज या हंबीराच्या पाठीवर चांगल्या शेंदोनशें छड्या लगावल्या असत्या! अरे, यानं शारदेच्या गळ्यांत हार घालायच्या ऐवजीं तिच्या पायांवर आपलाहार घातलान्! इतकं याचं लक्ष्य ठिकाणावर नाहीं! गदाधर, आतां तूं तात्यांना असं सांग. झणावं, कीं, या हंबीराला आज चांगला चोप द्या. आज यानं आमच्या शारदेचा चांगलाच अपराध केला आहे.—"

शारदा किंचित् भयप्रदर्शक स्वरानें झणाली "नाहीं रे नाहीं—गदाधर! हंबीरानं माझा कांहींदिखील अपराध केला नाहीं. आम्ही सारींजणं इथं खेळत बसलों होतों, तेव्हां या इंदूनंच हंबीराला माझ्या गळ्यांत हार घालायला सांगितलं. त्याप्रमाणं तो माझ्या गळ्यांत हार घालायला आला तों हिनंच याचा हात धरून त्याला मागं ओढलं अन् त्यामुळं तो हार माझ्या गळ्यांत न पडतां माझ्या पायांवरच पडला! यांत हंबीराचा मुळींच दोष नाहींरे! या इंदूचाच सारा अपराध आहे. अन् उलट हीच त्याला शिक्षा करायला सांगते आहे."

इतक्यांत मागून कोणाच्या प्रचंड हास्याचा शब्द ऐकूं आला! तो हास्यध्वनि एका निराळ्याच आगंतुक व्यक्तीचा होता. सर्वांनीं वळून मागें पाहिलें तों बाज्या-तील मंजुळा दासी हंसत हंसत त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली.

" काय ग मेले मंजुळे! इतक्या मोठ्यानं हंसायला तुला वेड लागलं कीं काय?" इंदिरा रागाच्या स्वरांत झणाली.

" मला वेडच लागलं आहे हो!" मंजुळा अधिकच हंसत झणाली.

शारदा झणाली "मंजुळे! तूं खरोखर भारी चहाटळ आहेस."

" बाई बाई बाई! शर्थ झाली तुमच्यापुढं ताईसाहेब! हंसतां हसतां माझं पोट दुखायला लागलं—"

" मेले, पण तूं हंसलेस कां?"

" पुनः मलाच विचारतां उलट? इतकी मिटकुली एवढीं मुलं, पण एकएक कृत्यें पहावीं तर विलक्षणच!

मला अगदीं बोलवेनासंच झालं आहे बाई !" मंजुळेचें हास्य पुनः जोरानें चालू झालें.

इंदिरा त्रासून ह्मणाली "तूं मर जा एकदाची मंजुळे ! मंजुळा कसली मेली-राक्षसीण आहे राक्षसीण ! नांव मंजुळा पण बोलणं अन् हंसणं किती कर्कश मेलीचं ! जणूं गळ्यांत ब्रह्मदेवानं मुसळच सारून ठेवलं आहे ! केव्हांपासून ती हंसते आहे अन् केव्हांपासून आम्ही तिला या राक्षसी हंसण्याचं कारण विचारतों आहों. पण एका शब्दानं चांडाळीण सांगेल तर शपथ आहे ! सारखं तिचं हंसणं चालूच आहे !"

इंदिरेच्या दबकावणीनेंहि मंजुळेचें विकट हास्य थांबलें नाहीं ! ती उलट अधिकच हंसूं लागली. इंदिरा व इतर मुली जसजशा तिच्या हंशानें त्रासूं लागल्या, तसतसें तिचें हंसें वाढतच गेलें. आपणाशीं कोणीच बोलत नाहींत असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां ती आपलें हंसें किंचित् आवरून ह्मणते "बाईसाहेब हंसूं नको, तर करूं तरी काय ? मी ती गोष्ट सांगूं तरी कशी अन् कुणाला ? छे बाई, आतां पहातें हो हंसं दाबायचा प्रयत्न करून ! हंसतां हंसतां मेलं पोट दुखायला लागलं !"

" मेले, हंसून चे किती हंसायचं असेल तें, नाहीं तर शिल्लक राहील थोडं अन् त्यामुळें पोट फुटून मरशील बिरशील एखादी !" इंदिरा ह्मणाली.

" अन् शपथ आहे तुला, हंसायचं कारण सांगशील तर–" यमुना ह्मणते.

" साऱ्या वाड्याभर तुमचा शोध करकरून नानासाहेब थकले, अन् तुम्ही इकडे फुलराईत येऊन या मिटकुल्या पोराशीं ताईसाहेबांचं लगिन लावीत बसलां आहां, नाहीं का साऱ्याजणी ? मोठी मौजच आहे ही सारी. ही सांगूं तरी कुणाला आतां ?"

आतां सर्व मुलींचा जीव थाऱ्यावर आला. मंजुळेच्या हाताला एक चारीकसा चिमटा घेऊन इंदिरा ह्मणाली "हेंच का तुझं त्या राक्षसी हंशाचं कारण ? आमच्या खेळाचं तुला इतकं हंसूं येतं अन् इतक्या थेरड्या वयांत मारे नटापटा करून आपलं दांत नसलेलं तोंडाचं बोळकं लुबलुबु हलवीत तूं जी घरोघर फिरत असतेस त्याचं तुला नाहीं का कधींच हंसूं येत ?"

इंदिरेचें हें भाषण मंजुळेला लागलें असावें असें दिसलें. ती गंभीरपणानें ह्मणाली "बाईसाहेब ! तुमचं माझ्याइतकं वय होऊं द्या. मी कांहीं तोंपर्यंत जगत नाहीं हें खास-पण त्या वयांत तरी आपल्या जिभेला कांहीं आळा बसला आहे कीं नाहीं हें तेव्हां माझी आठवण काढून एखादे वेळीं पहा ह्मणजे झालं. अहो, एकदा जीभ मोकळी सुटली कीं ती ताब्यांत ठेवणं कुणालाहि कठीण पडतं-बरं चला ताईसाहेब ! नानासाहेब केव्हांपासून आपली वाट पहात आहेत."

बालबालिकांची ती मनोहर निष्पाप बाल्यलीला त्या दिवसापुरती तरी पूर्ण झाली. या जगांत बालकांचा आवडता शैशवाभिनय याप्रमाणेंच पहातां पहातां नाहींसा होऊन जातो, ही उद्वेगजनक गोष्ट कोणाला ठाऊक नाहीं ?

प्रकरण चवथें.

कुंदपुर.

कुंदपुर हें नानासाहेब घोरपड्यांच्या जहागिरीचें मुख्य ठिकाण होतें. त्यांच्या जहागिरींत आसपासच्या कांहीं गांवांचा जरी समावेश होत असे, तरी घोरपड्यांच्या गादीचें मुख्य ठिकाण कुंदपुर हेंच समजलें जात असे. धड शहरहि नव्हे, व धड खेडेंहि नव्हे, अशा तऱ्हेचें कुंदपुर हें गांव होतें. त्याचा विस्तार बराच दूरवर पसरलेला असून त्याची रचनाहि मोठी सुबक होती. कुंदपुर हें स्थल खेडेगांवची शांतता, निर्मलता, रमणीयता आणि शहरचा व्यवस्थितपणा, व्यवहारविपुलता, सौंदर्य इत्यादि गुणांनीं युक्त होतें. त्याला मोठेंसें खेडें असें जरी ह्मणतां येण्यासारखें होतें, तरी लहानशा नगरांत त्याची गणना व्हावयास कोणत्याहि प्रकारानें बाधा येण्यासारखी नव्हती; इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं मोठ्या शहरांपेक्षां कुंदपुरालाच 'शहर' ही संज्ञा विशेष शोभण्यासारखी होती. विस्तारांत तर बऱ्याच शहरांला त्यानें मागें टाकिलें होतें.

ज्या काळची कथा आम्ही लिहीत आहों, त्या काळीं कुंदपुरांत, हल्लींच्यापेक्षां कमी खरी, परंतु इतर लहान शहरांच्या मानानें लोकसंख्या बरीच होती. त्यापैकीं मुख्य वस्ती ब्राह्मण व मराठे यांची असून, इतर जातींचाहि भरणा कमी अधिक प्रमाणानें बराच होता. कुंदपुर हें जरी एका मराठे जातीच्या सरदाराच्या जहागिरीचें मुख्य ठिकाण होतें, तरी तेथें मराठ्यांपेक्षां ब्राह्मणांचीच वस्ती थोडीशी अधिक होती. या दोन मुख्य जातींत बिलकूल वैमनस्य नसून सख्या

सहोदर बंधूंप्रमाणें दोघांचेंहि एकमेकांशीं मोठ्या प्रेमाचें वर्तन असे. 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' या वचनाला आमच्या कथानकाच्या काळीं बराच मान होता, व ब्राह्मणहि इतर वर्णांनां आपल्या पाठच्या भावांप्रमाणें निःस्वार्थतेनें कृतज्ञतेला स्मरून ममतेनें वागवीत असत.

कुंदपुर हें खेडेवजा शहर सरस्वती नदीच्या तीरावर वसलेलें होतें, हें वाचकांनां ठाऊकच आहे. तें नदीच्या कांठचें सोईवार बंदर असल्यामुळें तेथें व्यापाराची धडामोडहि बरीच चालत असे. तेथें कांहीं स्थानिक व्यापाऱ्यांच्या पेढ्या व दुकानें होतींच; परंतु इतर देशांतील कित्येक व्यापाऱ्यांनींहि कुंदपुरांत दुकानें व पेढ्या स्थापन केल्या होत्या. त्या व्यापारानिमित्त दूरदूरच्या व्यापाऱ्यांची व लोकांची कुंदपुरास सारखी येजा चाललेली असे.

सरस्वती नदीच्या सान्निध्यानें कुंदपुरास विशेष शोभा व एका प्रकारचें व्यापारी महत्त्व प्राप्त झालें होतें. सरस्वतीच्या अनेक घाटांवर दररोज निरनिराळ्या ठिकाणांहून व्यापारी माल किंवा उतारू घेऊन आलेल्या नौका कितीतरी लागत असत. परंतु त्या वेळची सरस्वती नदी व आजकालची सरस्वती नदी यांच्या स्वरूपांत मात्र जमीनअस्मानाचें अंतर दिसून येतें ! कोठें त्यावेळची ती विपुलकाय सरस्वती आणि कोठें आजची ही शीर्णदेह ओढ्याप्रमाणें दिसणारी सरस्वती ! एकाद्या बलवान, धिप्पाड मल्लाला क्षयरोग होऊन त्याचा केवळ अस्थिपंजर उरला झणजे त्याच्या देहाच्या पूर्वापर स्थितींत जें अंतर दिसून येतें तेंच अंतर सरस्वती नदीच्याहि पूर्वापार अवस्थांत दिसून येत आहे. ज्यांनीं सुमारें चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी पंचवेणीसंगमावरची सरस्वती नदी पाहिली असेल त्यांनां आजकालच्या कृशदेह सरस्वतीचा निर्जीव व मलिन प्रवाह पाहून फारच विस्मय व खेद वाटेल, यांत शंका नाहीं. आजकालच्या सरस्वतीनदीच्या पात्रांत ती आनंदानें नाचतबागडत फिरणारी मृदु मनोहर तरंगमाला दिसून येत नाहीं. तिच्या त्या स्वच्छ जलावर वायूच्या लहरीमुळें उत्पन्न होणारें असंख्य विशाल कमलांचें तें हृदयंगम नृत्य आतां फारसें कोठें आढळून येत नाहीं. तिच्या त्या क्षुद्र क्षुद्र तरंगमालिकांसहवर्तमान कोमल दलांची मृदुलक्रीडा आतां कोठेंहि दृगोचर होत नाहीं. सरस्वतीच्या दोन्ही तटांवर पूर्वी रसिकांच्या हृदयांचें हरण करणारी ती तरुवरांच्या रांगेची नैसर्गिक सुंदर शोभा आतां कोठें अदृश्यच होऊन गेली आहे. पूर्वीची सरस्वती नदी ज्यांनीं पाहिली आहे, त्यांनीं प्रस्तुतची सरस्वती पाहिली, कीं, ही सरस्वती नसून केवळ तिच्या हाडांचा सांपळा किंवा तिचें भयंकर पिशाच असावें, असाच त्याला भास होण्यासारखा होता. हाय ! प्रत्यक्ष हरिपाद-पद्मापासून निघालेल्या पवित्र गंगा, यमुना अथवा गोदावरी अशांसारख्या मोठमोठ्या नद्यांचीं पूर्वस्वरूपें तरी आतां कोठें कायम आहेत ? मग सरस्वतीसारख्या मध्यमशा नदीचा पाड काय ? कालाच्या अघटित घटनेपुढें कोणाला नम्र व्हावें लागत नाहीं ?

कुंदपुरचा बाजार बराच मोठा असल्यामुळें आस-पासच्या गांवांतून व खेड्यांतून दररोज कितीतरी लोक तेथें अन्नसामुग्री व इतर जिन्नस खरेदीविक्री करण्या-साठीं येत असत. त्या काळीं मिळणाऱ्या बहुतेक जिन्न-सांची खरेदी व विक्री कुंदपुरच्या बाजारांत होत असे. स्वतः जहागीरदारसाहेबांनां आपल्या शहरचा बाजार भरभराटींत असावा अशी फार इच्छा असे; त्यामुळें त्यांच्याकडून बाजारांतील क्रयविक्रयास परोक्षापरोक्ष बरेंच उत्तेजन मिळत असे.

दुसऱ्याहि अनेक कारणांमुळें कुंदपुराला महत्त्व प्राप्त झालें होतें. कुंदपुराचें हवापाणी मोठें मजेदार असून प्रकृतीच्या स्वास्थ्याला फार अनुकूल होतें. त्यामुळें श्रीमंत किंवा मध्यम स्थितींतील मंडळीची तब्येत बिघडली व ती सुधारण्यास स्थलांतराची आवश्यकता असली झणजे आसपासच्या वीसवीस पंचवीसपंचवीस कोसांवरचे लोकहि तनदुरुस्तीकरतां मुद्दाम कुंदपुरास येत असत. तेथें दोनचार नामांकित पिढीजाद वैद्यहि असत. लुंगेसुंगे नामधारी वैद्य तेथें किती असत व ते लोकांनां चुचाडून आपली तुमडी कशी भरीत, याची कल्पना हल्लींच्या एकाद्या लहानसर शहरांतील वैद्य वगैरे लोकांच्या स्थितीवरून वाचकांस सहज होण्या-सारखी आहे.

कुंदपुर हें विद्यास्थान या नात्यानेंहि फार प्रसिद्ध असे. तेथील महामहोपाध्याय वेदवेदांगपारंगत नील-कंठ दीक्षितांच्या संस्कृत पाठशालेची चहूंकडे मोठी कीर्ति दुमदुमून राहिली होती.. नीलकंठ दीक्षित हे जहागीरदारसाहेबांचे प्रमुख आश्रित असून त्यांचा कुलपुरोहितपणा त्यांजकडेच होता. दीक्षित झणजे सामान्य व्यक्ति नव्हती. तें मोठें जाडेंच प्रस्थ होतें. त्यांचें सर्व अध्ययन श्रीकाशीक्षेत्रांत प्रसिद्ध

पंडितप्रवर हयग्रीवाचार्य व्रजेंद्रगडकर यांच्या हाताखालीं झालें असून वेदशास्त्रचर्चेत त्यांचा हात धरणारा त्या काळीं सर्व भरतखंडांत क्वचित्च आढळून आला असता, असें म्हणतात. वेद व शास्त्रें यांच्या निरनिराळ्या शाखांत त्यांची अप्रतिहत गति असे. कर्मठपणांत व आचारव्यवहारांत तर नीलकंठ दीक्षित म्हणजे प्रतिसूर्य होते. असल्य किंवा कपट याचा तर दीक्षितांच्या ठिकाणीं मागमूसहि नव्हता ! धर्माचरणांत दीक्षित प्रतिसूर्य होते; तरी ते मायेफिरू नसून पूर्ण विचारशील होते. कोणतीहि एकादी गोष्ट त्यांच्या अन्तःकरणास पटली, कीं, तावडतोब त्यांची तिला अनुकूलता मिळे. ती गोष्ट केवळ नवी म्हणून तिचा कधीं विचारहि करावयाचा नाहीं, तिच्यावर नुसत्या शिव्यांची लाखोली वहावयाची, ही विचारसरणी नीलकंठ दीक्षितांस कधींच पटली नाहीं. खुद्द जहागीरदारसाहेबांचा कल जरा नव्या विचारांकडेच झुकता असे. दीक्षितहि कूपमंडूकवृत्तीचे नसल्यामुळें विचार, धर्म, युक्ति व सोय या चौरंगाच्या पायांवर ज्यांची उभारणी झाली आहे अशा किल्येक नवीन नवीन गोष्टी प्रचारांत आणावयासंबंधानें दीक्षितांकडून नानासाहेबांस प्रोत्साहनच मिळत असे. एखादे वेळीं अमुक एका गोष्टीसंबंधानें जहागीरदारसाहेबांचे विचार दीक्षितांस कांहीं कारणांमुळें रुचले नाहींत, तर ते नानासाहेबांपाशीं तिच्याविषयीं स्पष्टपणें आपली नापसंती दर्शवीत व नानासाहेबहि त्यांचें मन व्यर्थ दुखवीत नसत. नीलकंठ दीक्षित निर्भीड असत खरे, परंतु त्यांच्या वर्तनांत हेकेखोरपणा कधींच दिसून आला नाहीं; किंवा निस्पृहपणाच्या सबबीवर त्यांनीं कोणावर यथेच्छ तोंडसुखहि घेतलें नाहीं. वेद-वेदांगांत व शास्त्रांत नीलकंठ दीक्षित प्रतिसूर्य असत हें नर सांगितलेंच आहे. त्यांच्या पाठशालेंत दूरदूरच्या प्रदेशांतून ज्ञानसंपादनार्थ अनेक विद्यार्थी येत असत व योग्यवेळीं विद्या संपादन करून व खस्थानीं जाऊन ते आपल्या व्यासतुल्य गुरूंची-दीक्षितांची कीर्ति चारहि दिशांस पसरीत असत.

नानासाहेबांचे वेळीं कुंदपुर हें रामराजाची अयोध्या होती, असें अजूनहि तेथील व कुंदपुरच्या आसपासच्या गांवांतील लोक म्हणत असतात व त्यांत पूर्णपणें सत्य भरून राहिलें आहे. त्यावेळी नानासाहेबांच्या सर्व जहागिरींत चहूंकडे आबादीआबाद असे. त्यांच्या जहागिरीचें उत्पन्न वर्षेन मोठें होतें; परंतु तें सर्व ते आपल्या कुळांकडून गोडीगुलाबीनें, त्यांना त्रास न देतां युक्तीनें वसूल करीत असत. कांहीं प्रसंगीं कुळाकडून वसूलबाकी थकली तर त्याच्या सोईसोईप्रमाणें ते ती काढून घेत. दुष्काळासारख्या कधीं काळीं येणाऱ्या राष्ट्रीय संकटाच्या वेळीं ते आपल्या कुळांशीं अत्यंत ममतेनें व पूर्ण सहानुभूतीनें वागत असत. अशा वेळीं आपल्या कुळांला ते साऱ्याची तहकुबी किंवा सूट तर देतच; परंतु त्यांच्या सुखासाठीं आपल्या खजिन्यालाहि ते वरीच चाट लावून घ्यावयास कमी करीत नसत. एकाद्या प्रेमळ पित्याचें आपल्या अपत्यांशीं जसें अत्यंत ममतेचें वर्तन असतें त्याप्रमाणेंच नानासाहेबांचेंहि आपल्या कुळांशीं असे.

नानासाहेब स्वभावानें अत्यंत उदार असत. त्यांच्या उदारपणाला चैन किंवा उधळेपणा ही संज्ञा जरी कधींहि देतां यावयाची नाहीं, तरी त्यांच्या उत्पन्नाच्या मानानें दानधर्मांत त्यांचा खर्च बराच होत असे. इतर पुष्कळ बाबतींत नानासाहेबांचे विचार जरी नवीन तऱ्हेचे असत, तरी दानधर्माचे बाबतींत त्यांचें वळण बऱ्याच अंशीं जुन्या तऱ्हेचें असे. दानधर्माचे कामीं ते पात्रापात्रतेचा तादृश विचारच करीत नसत, असें म्हटलें तरी चालेल. अनाथ व अपंग अशा लोकांकडे नानासाहेब अत्यंत सदयतेच्या दृष्टीनेंच पहात असत हें खरें; परंतु त्यांच्या दानधर्माचा कांहीं भाग गलेलठ्ठ, निरुद्योगी व आळशी अशा याचकांकडेहि खर्च होत असे. हव्यकव्यें, ब्राह्मणभोजनें, संतर्पणें वगैरे खर्चांतहि त्यांच्या उदारपणाचा भिक्षुकवर्ग बराच फायदा करून घेत असे. नानासाहेबांची अतिथिशाला सदासर्वदा दूरदूरच्या प्रदेशांहून आलेल्या अतिथींच्या समूहानें भरलेली असे. जहागिरदारसाहेबांच्या खाशा पंक्तीला पंचवीसतीस अतिथी नाहींत, असा कधीं एक दिवसहि गेला नाहीं. याशिवाय नानासाहेबांच्या आश्रितांपैकी बरीच मंडळी त्यांच्या आतिथ्याचें ग्रहण करावयास चहूंचा आंकडा ठोकून नेहमीं तयार असे. जहागिरदारसाहेबांकडे नित्यनैमित्तिकें बरींच असत. देवीचीं नवरात्रें, रामाचीं नवरात्रें, गणेशोत्सवाचे दहा दिवस व कृष्णजन्माष्टमी हे नानासाहेबांच्या वाड्यांतील मुख्य उत्सवाचे दिवस असून इतर किरकोळ उत्सवांचे व सणांचे दिवसहि

कि तीतरी असत. आपल्या पितृमातृश्राद्धाचे दिवस नानासाहेब मोठ्या आदरानें पाळीत. या सर्व दिवशीं ब्राह्मणभोजनें, गरीबांना अन्नदान, कीर्तनें, पुराणें, जागरणें वगैरे प्रकार बरेच होत असत. मार्गशीर्षाच्या महिन्यांत नानासाहेबांची कन्या शारदा हिचा वाढदिवस पडत असून तोहि मोठ्या थाटाचा होत असे. त्या दिवशीं हजारों गोरगरिबांनां अन्नदान होऊन, शिवाय प्रत्येकाला पांघरण्यास एकएक कांबळी देण्यांत येत असे. या नित्यनैमित्तिक प्रसंगांशिवाय हरिदास, शाखी, पुराणीक, वैदिक, गवई, नाटकी, अवधानी वगैरे गुणीमंडळी नानासाहेबांच्या औदार्यानें आकर्षित होऊन कुंदपुरास येत, त्या त्या वेळीं वाड्यांत त्यांच्या हजेऱ्या लागून जहागिरदारसाहेबांकडून ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांची भरपूर संभावना करण्यांत येत असे.

कुंदपुर शहराची रचना फार मनोरम व डुमदार असून त्यांतील वाडे, घरें, देवळें व इतर जागा फार सुंदर होत्या. खुद्द जहागीरदारांचा वाडा विशाल व भव्य होता. त्याचा एकंदर देखावा फार रमणीय होता. त्याचें बांधकाम जुन्या पद्धतीचें मजबूत व नव्या पद्धतीचें नीटनेटकें आणि व्यवस्थित होतें. नानासाहेबांच्या वाड्यासारखा सुंदर वाडा जवळपास कुठेहि नसून मनोहर शिल्पाचा एक नमुना म्हणून त्याची चहूंकडे ख्याती होती. हा वाडा नानासाहेबांच्या पित्यानीं बांधविला असून त्यांत खुद्द नानासाहेबांनीं त्याची बरीच डागडुजी केली होती. या प्रासादाच्या पुढें व मागें प्रशस्त व रम्य बगीचे होते. त्यांचा विषय मागील प्रकरणांत वाचकांनां झालाच आहे. मुख्य वाड्याच्या पश्चिमभागीं एक लहानशी जुन्या पद्धतीची, पण डुमदार इमारत होती. ही इमारत 'कौतुकागार' या नांवानें कुंदपुरांत प्रख्यात होती. या कौतुकागारापासून पांचसहाशें हात अंतरावर कुंदेश्वराचें देवालय, अतिथिशाला व नाट्यमंदिर असे. या लहान लहान इमारतींपासून थोड्याशा अंतरावर नीलकंठ दीक्षितांची वेदशास्त्रपाठशाला होती. वाड्याच्या दुसऱ्या बाजूला घोड्यांचा तबेला, जहागीरदारसाहेबांचे दोन हत्ती बांधण्याची जागा-पीलखाना व पांखरखाना अशा क्षुद्र इमारती होत्या. याच बाजूला, परंतु गांवाकडे बऱ्याच अंतरावर, जहागीरदारसाहेबांच्या आश्रयाखालीं असलेल्या, आमच्या पूर्ण परिचयाचे झालेले राजमान्य राजश्री पांडोबातात्या भोळे उर्फ तात्यापंतोजी यांच्या मराठी शाळेची इमारत होती. पांडोबातात्या हे कोणी विचित्र व जहागीरदारांनीं संग्रहीं बाळगण्यास योग्य असे प्राणी आहेत, हें सिद्ध करण्याकरितांच जणूंकाय गांवांतील कांहीं थेट्टोर रसिक मंडळीनें तात्यांच्या या शाळेला 'पांडोबाखाना' असें मजेदार नांव दिलें होतें! आमचे पांडोबातात्या खरोखरच जहागीरदारसाहेबांसारख्या श्रीमंत मनुष्यांनीं संग्रहीं ठेवण्यासारखेच होते. हत्ती, घोडे वगैरे श्रीमंतांच्या संग्रहीं असलेल्या प्राण्यांकरतां बांधलेल्या इमारतींनां पीलखाना, घोडेखाना अशीं जर स्वतंत्र नांवें असतात, तर जहागीरदारसाहेबांच्या संग्रहीं असलेल्या पांडोबातात्यांसाठीं बांधलेल्या इमारतीला 'पांडोबाखाना' असें स्वतंत्र नांव कां असूं नये? तात्यांच्या शाळेला हें सुंदर व योग्य नामाभिधान देणाऱ्या व्यक्तींच्या रसिकतेची कोण तारीफ करणार नाहीं?

गिऱ्हाईक—काय हो शेटजी, ही टोपी किती दिवस टिकेल?

दुकानदार—ही का? फाटे तोंपर्यंत.

मास्तर—(एका विद्यार्थ्याकडे छडी दाखवून) माझ्या छडीच्या एका टोकाला एक मूर्ख बसला आहे.

चलाख विद्यार्थी—कोणत्या टोकाला मास्तर?

एक—काय हो, हा निबंध कोठून घेतलात? निबंधमालेंतून चोरलात वाटतें!

दुसरा—छे, तो तर त्यांतच आहे.

बाईसाहेबांनीं स्वयंपाक्यास नोकरीवर ठेवितांना बजाविलें "हें पहा, मला विचारल्याशिवाय घरांत कोणतीहि गोष्ट करायची नाहीं. मग ती कितीहि क्षुल्लक असो."

आचारीबोवांनीं ही अट कबूल केली. कांहीं वेळानें ते बाईसाहेबांकडे येऊन सांगूं लागले "बाईसाहेब, मांजर दुध पीत आहे, त्याला हांकूं का?"

"अरे मेल्या-तुझं जळलं लक्षण-" बाईसाहेब रागानें धांवतच गेल्या.

प्रार्थना.

एक गाडीवाला गाडी हांकीत असतां चिखलांत गाडीचीं चाकें रुतलीं व गाडी तेथेंच अडकून राहिली. गाडीवानानें बसल्या बसल्या आपणांस मदत करण्यासाठीं देवाची प्रार्थना केली. देव प्रकट होऊन गाडीवानास ह्मणाला "आळशासारखा करुणा भाकीत काय बसला आहेस ? बैलांनां उत्तेजन दे, आपला खांदा चाकाला लावून देवाचें नांव घे आणि गाडी पुढें ढकल, ह्मणजे चाकें बाहेर निघतील."

सर्व भार देवावर टाकून आपण स्वस्थ बसणें बरोबर नाहीं; परंतु आपणांकडून उद्योग करीत असतां मदतीसाठीं देवाचा धांवा करणें यांत कांहीं गैरवाजवी नाहीं. आपण योग्य रीतीनें देवाचा धांवा केला तर देव आपणांस अंतर देत नाहीं, असा साधुसंतांचा अनुभव आहे. हाच अनुभव आपणालाहि येणें कठिण नाहीं.

देवाचा धांवा किंवा मदतीसाठीं देवाची प्रार्थना करण्याची रीत कोणती तें आतां पाहूं. जी गोष्ट घडवून आणण्यासाठीं आपण देवाची प्रार्थना करतों, ती गोष्ट त्याच्या इच्छेविरुद्ध नसली पाहिजे. आपली इच्छा जर मलिन आहे, पापमूलक आहे, तर तत्प्रीत्यर्थ देवाची प्रार्थना करणें बरोबर होईल काय ? देवाच्या इच्छेविरुद्ध देवास वागण्यास सांगणें हा मूर्खपणा नाहीं काय ? यासाठीं प्रथम आपली वासना ईश्वरचरणीं अर्पण केली पाहिजे व देवाला मान्य होण्यासारख्या कार्यासाठींच त्याची प्रार्थना केली पाहिजे.

आडमार्गानें जाणाऱ्या मुलास ताळ्यावर आणणें, पत्नीनें पतीचें किंवा पतीनें पत्नीचें प्रेम आपणावर यसण्याविषयीं इच्छा धरणें, वैद्यानें अनेकांचे रोग आपल्या हातून बरे होण्याविषयीं इच्छा करणें, हे सर्व हेतु चांगले आहेत; व यासाठीं योग्य रीतीनें प्रार्थना केल्यास यश आल्यावांचून राहणार नाहीं.

मुलाला ताळ्यावर आणावयाचें असेल तर त्याच्याशीं निष्ठुरपणानें वागूं नये किंवा नेहमीं कानीं कपाळीं ओरडून त्याला त्रास देऊ नये. जे दुर्गुण त्यानें टाकावे अशी आपली इच्छा असेल, ते आधीं अपण आपल्या अंगांतून दूर करावे. नंतर इष्ट हेतु साधण्याकरितां मनोभावानें देवाची प्रार्थना करावी. प्रार्थना करतांना हें लक्ष्यांत असूं द्यावें, कीं, तुमच्या व तुमच्या मुलाच्या सभोंवार असणाऱ्या वातावरणांत एक प्रकारची अनिर्वचनीय शक्ति आहे. तुमच्या प्रार्थनेच्या योगानें ही शक्ति तुमच्या हस्तगत होईल व तिच्या द्वारें तुह्मांला इष्ट गोष्ट साध्य करून घेतां येईल. एकाग्र मनानें व चित्त शांत आणि स्वस्थ ठेवून प्रार्थना केली तर ती सफल होईल. मुलावर तुमचें अधिकाधिक वजन पडूं लागेल व तो तुमचा आज्ञांकित होईल.

पतिपत्नीच्या प्रेमाची गोष्टहि अशीच आहे. मात्र या बाबतींत आधीं एका गोष्टीकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे. आपणावर कोणाचें प्रेम बसण्यास अगर स्थिर राहण्यास आपल्या अंगीं कांहीं विशेष गुण असावयास पाहिजेत, आपलें वर्तन कांहीं विशेष प्रकारचें असलें पाहिजे. मंत्रतंत्र करून किंवा जादूटोणा करून प्रेम बसवूं पाहणें वेडेपणा आहे. ज्याचें प्रेम आपणावर बसावें अशी इच्छा असेल, त्याच्या मनाप्रमाणें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. या संबंधानें द्रौपदी व सत्यभामा यांचा संवाद प्रसिद्धच आहे.

वर सांगितल्याप्रमाणें पूर्व तयारी झाल्यावर देवाची प्रार्थना करून शांतीच्या व प्रेमाच्या वातावरणानें घर भरून काढलें, कीं, इच्छित हेतु सफल झाल्याशिवाय राहणार नाहीं.

कोणत्याहि चांगल्या कामासाठीं देवाचें साहाय्य मागायला हरकत नाहीं व तें अंतःकरणपूर्वक प्रार्थना करून मागितलें तर सत्यसंकल्पाचा दाता भगवान कधींहि दिल्याशिवाय राहणार नाहीं.

मद्देशीय दंतकथा.

कर्जाची फेड.

एका खेडेगांवांत एक वाणी रहात होता. एके दिवशीं आपल्या दुकानाकरितां कांहीं माल खरेदी करण्यासाठीं तो शेजारच्या गांवीं जात असतां, त्याच गांवाला जाणारा एक कुणबी त्याला वाटेंत भेटला. तो कुणबी आपल्या सावकाराच्या कर्जाचा हप्ता भरण्यासाठीं जात होता. त्याच्या आज्यानें आपल्या बापाच्या अंत्यविधीसाठीं म्हणून तें कर्ज काढलें होतें. सावकाराकडून कर्ज १०० रुपयेच घेतलें होतें; परंतु व्याज, चक्रवाढ व्याज, अतिवाढ व्याज अशा रीतीनें वाटत वाढत आज मुद्दलाच्या बीसपट रकम तो त्या सावकाराचें देणें लागत होता. बिचारा कुणबी सावकाराच्या दाढेंतून आपली जमीन कशा रीतीनें सोडवावी याचा विचार करीत चालला आहे, इतक्यात वाणी त्याला म्हणतो "कसें काय सोनवा, काळजींत अगदीं चूरसा दिसतोस? त्या गढेकापू सावकाराकडेच चाललास कीं काय? जमीन मोकळी करण्याचा कांहींच नाहीं का उपाय चालत?"

सोनवा म्हणाला "काय सांगू वाणीदादा, सगळी कर्मकथा दुःखकारक! आजोबानें मुलते १०० रुपये कर्जाऊ घेतले, पण आज माझ्या डोक्यावर २००० रुपये कर्जाचा बोजा चढलेला आहे! माझ्या थोड्याशा उत्पन्नांतून ही एवढी मोठी रकम मी कशी फेडूं, आणि पोटाला काय खाऊं?"

"सोनवा, असा रडूं नकोस बाबा! ललाटलिखित कोणाला टाळतां येतें का? आणि ही रडकथा गाऊन काय मिळणार? आतां हें बघ, आपणाला जायचें आहे लांबच्या गांवाला, आणि तोंड मिटून चालूं लागलों तर येईल कंटाळा; म्हणून एकमेकांला गोष्टी सांगून तरी तेवढा वेळ घालवूं या—"

"होय वाणीदादा, तुम्ही म्हणतां तें अगदीं खरें. आपल्या नशिबांत असेल तसें होणार. मग उगाच रडून जिवाला त्रास कां म्हणून करून घ्या? तुम्ही सांगतां ती युक्ति बरी आहे. पण माझी अट आहे ती ही कीं, गोष्ट कितीही खोटी व विभाग न टेबण्या-सारखी असली, तरी कोणींहि ती खोटी आहे असें म्हणतां कामा नये, व जो असें म्हणेल त्यानें दुसऱ्याला २००० रुपये द्यावे!"

वाण्यानें ही अट कबूल केली, व "मी पहिल्यांदां गोष्ट सांगतों," असें म्हणून त्यानें आपल्या गोष्टीस सुरुवात केली. वाणी म्हणाला "हें बघ, माझे पणजोबा फार वजनदार व अतिशय श्रीमंत गृहस्थ होते—"

"खरें, वाणीदादा, अगदीं खरें!"

"त्यांनीं एकदां रत्नें, हिरे वगैरेंनीं ४० गलबतें भरलीं व ते चीनला व्यापार करण्याकरितां निघाले—"

"होय वाणीदादा, अगदीं खरें!"

"नंतर तिकडे बरेच दिवस राहिल्यावर ते घरीं येण्याकरितां निघाले, व येतांना पुष्कळ चमत्कारिक व कारागिरीच्या वस्तु त्यांनीं बरोबर घेतल्या. त्या वस्तु आणतांना त्यांनीं एक मजेचा सोनेरी पुतळा आणला होता. कसाहि जरी प्रश्न विचारला तरी तो पुतळा त्याचें उत्तर देत असे—"

"होय, वाणीदादा, अगदीं खरें!"

"त्या पुतळ्याला पुष्कळ लोक आपल्या मुलां-बाळासंबंधी, दैवासंबंधी, व्यापारासंबंधी वगैरे प्रश्न विचारीत व तो त्यांना योग्य उत्तरें देई. एके दिवशीं तुझा पणजा प्रश्न विचारण्याकरितां आला व त्यानें विचारलें 'सर्वांत जास्त शहाणीं माणसें कुठच्या जातीचीं?' त्या पुतळ्यानें उत्तर दिलें 'वाणीलोक!' त्यानें पुन्हा विचारलें 'सर्वांत जास्त मूर्ख कोणती जात?' पुतळ्यानें सांगितलें 'कुणबी लोक!' तुझ्या पणज्यानें शेवटचा प्रश्न विचारला 'माझ्या कुळांत शुद्ध दगड असा कोण होईल? पुतळ्यानें उत्तर दिलें 'तुझा पणतु सोनवा—"

कुणबी म्हणाला "अगदीं खरी गोष्ट! वाणीदादा, अगदीं खरी गोष्ट!"

वाण्याच्या बोलण्याला कुणबी वरवर दुजोरा देत होता खरा, पण मनांत मात्र त्यानें त्याचा पक्का सूड

उगविण्याचा निश्चय केला व 'होय होय' करीत तो त्याचा गोष्ट ऐकत राहिला. वाणी आपल्या गोष्टीस सुरुवात करून पुढें ह्मणाला "ह्या पुतळ्याची बातमी हळूहळू पसरत चालली व शेवटीं ती राजाच्या कानांपर्यंत जाऊन पोहोंचली. एके दिवशीं राजानें माझ्या पणजोवांनां बोलावून नेऊन त्यांच्याकडून तो पुतळा मागून घेतला व त्यांनां प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं—"

" खरें, वाणीदादा, अगदीं खरें!"

"माझ्या पणजोवांनीं तें काम मरेपर्यंत अत्यंत दक्षतेनें चालविलें. त्यांच्या मरणानंतर ती जागा माझ्या आजोवांनां मिळाली. त्यांचीसुद्धां पणजोवांप्रमाणें भरभराट होत गेली; परंतु त्यांनीं आपल्या कामाकडे बारिक लक्ष दिलें नाहीं ह्मणून राजा त्यांच्यावर रागावला, व त्यांनां खवळलेल्या हत्तीच्या पायाखालीं तुडवून मारावें, असा त्या दुष्ट राजानें आपल्या चाकरांस हुकूम दिला. चाकरांनीं राजाच्या हुकुमाप्रमाणें आजोवांनां हत्तीपुढें नेऊन ठेवलें; पण त्यांनां पाहिल्याबरोबर हत्ती अगदीं शांत झाला व त्यानें आपल्या सोंडेनें उचलून त्यांनां पाठीवर बसविलें.—"

" होय, वाणीदादा, अगदीं खरें!"

"बरें मग, हत्ती आजोवांनां मारीत नाहीं असें समजल्याबरोबर राजाचा राग निवाला व पुन्हा त्यांनां त्यानें प्रधान नेमिलें. आजोवांच्या मरणानंतर बाबांनां ती जागा मिळाली; पण ते जरा साहसी स्वभावाचे असल्यामुळें त्यांनीं ती सोडून दिली व प्रवासाला निघाले. प्रवासांत असतांना एकच डोळा असलेले, एकच पाय असून तो झाडाला टांगून लोंबकळत असलेले लोक, राक्षस अशा तऱ्हेचे पुष्कळ चमत्कार त्यांनीं पाहिले. अशा रीतीनें प्रवास करीत असतां एकेदिवशीं बाबांनां चावण्याकरितां त्यांच्या डोक्याभोंवतीं एक माशी फिरूं लागली. हें बाबांवर मोठेंच संकट येऊन पडलें. तिला मारून टाकावी तरी पंचाईत, बरें न मारावी तरी पंचाईत; बाबांनां इकडे आड व तिकडे विहीर असें होऊन गेलें; कारण कोणत्याहि जिवंत प्राण्याला जरासुद्धां त्रास द्यायाचा नाहीं हें आमचें ब्रीदच आहे—"

"होय, वाणीदादा, अगदीं खरें!"

"शेवटीं बाबा अगदीं गोंधळून जाऊन त्यांनीं तिला साष्टांग नमस्कार घातला व तिची करुणा भाकूं लागले. ती माशीहि पण अशा रीतीनें विनवणी केल्यामुळें संतुष्ट झाली आणि म्हणाली, 'हे उदार पुरुषा, तूं थोर मनाचा प्राणी आहेस, आणि ह्यामुळेंच मी तुझ्यावर संतुष्ट होऊन तुझ्या फायद्यानी गोष्ट करतें ती पहा' असें बोलून लगेच तिनें आपलें तोंड उघडलें. तिच्या तोंडांत पुष्कळ दरवाजे व खिडक्या असलेला असा एक सोनेरी राजवाडा माझ्या बाबांनां दिसला. त्या राजवाड्याच्या एका खिडकींत एक सुंदर स्त्री उभी होती, आणि तिच्याजवळच्याच दरवाज्यावर एक शेतकरी तिच्यावर हल्ला करण्याच्या बेतांत होता. माझे बाबा दिलदार स्वभावाचे असल्यामुळें त्यांनां हा अन्याय पहावेना. त्यांनीं एकदम त्या माशीच्या तोंडांत उडी मारली आणि ते तिच्या पोटांत शिरले. परंतु तेथें पूर्ण काळोख असल्यामुळें त्यांनां चांचपटत रहावें लागलें—"

"खरें, वाणीदादा, अगदीं खरें!"

" कांहीं वेळानें तो अंधकार एकदम नाहींसा झाला व पुन्हा तो राजवाडा, राजकन्या व शेतकरी हीं दिसूं लागलीं. माझे बाबा साहसी व शूर होते हें पूर्वी मी सांगितलेंच आहे. त्यांनीं त्या शेतकऱ्यावर ह्मणजे तुझ्या बापावर हल्ला केला—कारण तो तुझा बापच होता—व त्या दोघांचें तेथें युद्ध सुरु झालें; परंतु शेवटीं तुझ्या बापाचाच पराभव झाला. नंतर बाबांचें त्या राजकन्येशीं लग्न झालें, व तीं दोघें सुखानें त्या राजवाड्यांत राहिलीं. त्याच राजवाड्यांत माझा जन्म झाला. तुझा बाप तेथेंच द्वारपालाची जागा पत्करून अहोरात्र पहारा करीत राहिला. अशा रीतीनें कांहीं दिवस लोटल्यावर मी पंधरा वर्षांचा असतांना एकदां कडत पाण्याच्या पावसाच्या सरी पडूं लागल्या, व आमचा राजवाडा वितळून जाऊन उकळणाऱ्या समुद्रामध्यें आम्ही पडलों. त्यावेळीं आम्ही पूर्ण शुद्धीत नव्हतों. नंतर शुद्धीत आल्यावर पाहतों तों काय चमत्कार सांगावा! आम्ही एका स्वयंपाकघरांत पडलों आहोंत व तिथल्या स्वयंपाकीणबाईची आम्हांला पाहून पांचावर धारण बसली आहे, असा देखावा आमच्या दृष्टीस पडला. पण 'आम्ही मनुष्यें आहोंत, भुतें, समंध वगैरे कोणी नाहींत, तूं मुळींच घाबरूं नको!' अशा तऱ्हेनें समाधान केल्यावर तिची भीति अंमळ कमी झाली आणि ती ह्मणाली, 'तुम्ही बरे चळवळे प्राणी दिसतां! त्या उकळणाऱ्या आमटींत आंघोळ करून माझी आमटी कां ह्मणून बिघडवली? तुम्हांला इकडे येण्याचें कारण काय?' आम्हीं तिची क्षमा मागितली आणि ह्मणालों,

'बाई, ही गोष्ट चुकून घडली. कारण जवळ जवळ १५ वर्षे आम्ही एका मावशीच्या पोटांत राहून आतांच बाहेर आलों.' त्या बाईनें उत्तर दिलें 'हो, आतां मला आठवतें. चुकतीच १५ मिनिटांपूर्वी मला एक मावशी येऊन डसली. हा बघाहो, हात कसा सुजला आहे तो! मला वाटतें, तिनें तुम्हांला चावलेल्या जखमेंत ओकून टाकलें. कारण, ती डसली त्या ठिकाणी वेदना होऊन हात जड वाटूं लागला. यावरितां मीं ती जखम दाबली, तोंच त्यांतून राई येवढा धेंब बाहेर निघाला; पण तो लगेच या आमटीच्या भांड्यांत पडला. खरें म्हणाल तर, तुम्ही त्या धेंबांत असाल असें मला त्यावेळी वाटलें नाहीं.' यावांनीं उत्तर दिलें, 'बाई, आम्ही या भांड्यांत पडण्याचें कारण तूं सांगतेस तेंच असलें पाहिजे व तुम्ही १५ मिनिटें म्हणजे आमची १५ वर्षे होत.' खरोखर सांगायाचें म्हणजे जरी मी शक्तीच्या मानानें व बाटीवरून १५ वर्षांचा दिसत होतों, तरी जन्मून मला त्यावेळी जुमती १५ मिनिटेंच झाली होतीं. चमत्कार हा कीं, मी १५ वर्षांचा दिसणें किंवा माझ्या बाबांच्या व तुझ्या बापाच्या वयांत १५ वर्षांची भर पडून ते म्हातारे दिसणें, या सगळ्याला कारण आमचा त्या मावशीच्या पोटांतील वास हें होतें; आणि आज जरी मी २५ वर्षांचा दिसत आहें, तरी जन्मून खरोखर मला १० वर्षेच झालीं आहेत.—"

"अगदी खरी गोष्ट, बाणीदादा, अगदीं खरी!"

"नंतर त्या स्वयंपाकघरांतून बाहेर येऊन पहातों तों आम्ही दुसऱ्याच देशांत म्हणजे आमच्या सध्यांच्या गोड्यांत आहोंत, असें आढळून आलें. बाबा आतां प्रधान नसल्यामुळें त्यांनां बाप्याचा धंदा करावा लागला, व मी त्या कामांत मदत करूं लागलों. ती राजकन्या परवां वारली हें तुला माहित आहेच—"

"खरें, बाणीदादा, अगदीं खरें!"

"सोनबा, मला हीच गोष्ट सांगावयाची होती. आतां तूं काय सांगतोस तें ऐकूं दे." इतकें बोलून बाणी स्वस्थपणें चालूं लागला.

कुणबी म्हणाला "बाणीदादा, तुम्ही सांगितलेली गोष्ट अगदी खरी आहे, त्यांत एक अक्षरमुद्धां खोटें नाहीं! आतां माझी गोष्ट खोटी आहे असें नाहीं, तीहि शब्दानुशब्द खरी आहे, पण अशा तऱ्हेनें मनाला चकविणारी मात्र नाहीं. आणि मला तर ती सांगितलीच पाहिजे म्हणून मी सुरवात करतों:—माझा पणजा या सबंध गांवांत श्रीमंत व खाऊनपिऊन सुखी मनुष्य होता. तो दिसण्यांत घडघाकट व रागीट असा होता, तरी उदारपणाची वागणूक व शहाणपण यावद्दल प्रत्येकजण त्याची स्तुतीच करीत असे. ह्या खेड्याचा तो पाटील असल्यामुळें त्याला जिकडे तिकडे मान मिळत असे, व गरीब लोकांचा तो पाठीराखा असल्यामुळें ते त्याचा शब्द झेलण्यास तत्पर असत. देवळांत काय किंवा चवाट्यावर काय, कुठेंहि गेला तरी गुडगुडीचा त्याचा मान पहिला होता. तो तरी यावद्दल लोकांवर थोडी प्रीति करीत होता असें नाहीं. कोणताहि मनुष्य संकटांत आहे असें समजलें कीं, त्याला पैसे उसने देऊन, त्याचें शेत नांगरण्यास आपले बैल देऊन, किंवा शेताची कापणी करण्यास कोणाला मनुष्यें मिळत नसलीं तर तीं देऊन, तो त्यांनां मदत करीत असे; व ते लोकसुद्धां त्याच्या उपकारांची थोडीशी तरी फेड व्हावी म्हणून त्याला दूधदुभतें आणून देत, किंवा शेताची कापणी झाल्यावरोबर भातदाणा वगैरे आणून देत. तो लोकांमधील तंटे भांडणें वगैरे मिटवीत असे, व लोकहि त्याचा शब्द राजाच्या शब्दाप्रमाणें किंवा ब्राह्मणाच्या शब्दांप्रमाणें मानीत. भीमासारखा बळकट असल्यामुळें, तो जणूंकाय काळच असें लोकांनां वाटत असे, आणि म्हणूनच ते लोक धर्मसंबंधी नियम किंवा राजाचा कायदा मोडण्यास धजत नव्हत—"

बाणी म्हणाला "अगदीं खरें, सोनबा, अगदीं खरें!"

"एकदा, या खेड्यांत मोठा दुष्काळ पडला. पाऊस मुळींच पडला नाहीं; नद्या, विहिरी, तळीं वगैरे सर्व आटून गेलीं. गुरांनां खाण्यास गवत मिळेना, पशुपक्षी मरूं लागले व झाडेंझुडपें सुकून गेलीं. मागच्या वर्षांचा राखून ठेवलेला सगळा दाणा संपला व आतां लोक मरणार असें माझ्या पणज्यानें पाहिलें. तेव्हां त्यानें सगळ्या लोकांनां एकेठिकाणीं जमविलें आणि झटलें, 'गड्यांनो! खरोखर इन्द्रदेव आमच्यावर कोपला आहे आणि म्हणूनच त्यानें पाऊस बंद केला; परंतु तुम्ही जर माझ्या म्हणण्याप्रमाणें चालाल, तर मी तुम्हांला हा दुष्काळ असेपर्यंत धान्य पुरवितों. फक्त तुमच्या शेतांवर सहा महिनेपर्यंत माझा ताबा असला पाहिजे. हें त्याचें म्हणणें ला शेतकरी बाप्यांनीं मान्य केलें; —मी बाप्यांना शेतकरी म्हणतों याचें कारण ते त्यावेळीं शेतकीचा धंदा करीत होते—आणि माझ्या पणज्यानें कंबर बांधली व ती सर्व १००० विघे जमीन आपल्या डोक्यावर उचलून घेतली.—"

"खरें, सोनबा, अगदीं खरें !"

"माझ्या पणज्यानें ती जमीन डोक्यावर घेतली, आणि जेथें जेथें पाऊस पडण्याचें चिन्ह दिसलें त्या त्या ठिकाणीं तो ती घेऊन गेला; व अशा रीतीनें शेतांनां पाणी मिळालें, आणि तळीं विहिरीं वगैरे पाण्यानें तुडुंब भरून गेलीं. नंतर त्यानें बाण्यांला शेतें नांगरण्यास आज्ञा दिली. ह्याप्रमाणें जिकडे मेघ दिसत व पाणी मिळेल असें वाटे, त्या बाजूला तो ती जमीन डोक्यावर घेऊन नेत असे. अशा रीतीनें फिरत असतांना बाण्यांनीं शेतें नांगरून बीं पेरलें. तें घबघबून इतकें वर आलें कीं, त्यांतील एकएक वाड आकाशाला जाऊन लागलें—"

"खरें, सोनबा, अगदीं खरें !"

"माझ्या पणज्यानें तो गांव डोक्यावर घेऊन सगळ्या जगाभोंवतीं प्रदक्षिणा केली, आणि मुळच्या जाग्यावर आणून ठेवला. त्या वर्षी पीक अतिशय आलें. परंतु त्याच्यावर माझ्या पणज्याचीच मालकी होती. मक्याची आणि गव्हांची वाढ तर विचारूंच नका. एक एक दाणा तुमच्या डोक्याएवढा मोठा होता.—"

"खरें, सोनबा, अगदीं खरें !"

"त्या वर्षी पीक इतकें मिळालें, कीं, तें सांठवून ठेवण्यास तो गांव पुरेना. चाऱ्ही बाजूंकडून दूरदूरच्या देशांतून लोक येऊन दाणा खरेदी करूं लागले, व त्यामुळें माझ्या पणज्याला अतोनात पैसा मिळाला. त्यानें लाखों रुपये गरिबांनां वांटून टाकले, पुष्कळांनां धान्यसुद्धां फुकट वाटलें; परंतु जे लोक दाणा विकत घेण्यास समर्थ होते, त्यांनां योग्य किंमत घेऊन त्यानें तो विकला.—"

एवढी गोष्ट सांगून झाली तेव्हां ते दोघे शहरांत शिरले होते, तरी सोनबानें आपली गोष्ट सुरूच ठेवली. तो पुढें म्हणाला "त्यावेळीं तुमचे पणजोबा अगदीं दरिद्री होते, म्हणून माझ्या पणज्याला त्यांची दया येऊन त्यानें त्यांनां दाणा मापण्याच्या कामावर नेमिलें—"

"खरें, सोनबा, अगदीं खरें !"

"तुमचे पणजोबा दिवसरात्र एकसारखे मापाऱ्याचें काम करीत असल्यामुळें अगदीं दमून जात. इतकेंच नाहीं, तर मठ्ठ डोक्याचे असल्यामुळें मापण्यांत चुकत असत, व त्यामुळें त्यांनां चांगलाच झोड मिळे—"

"खरें, सोनबा, अगदीं खरें !"

ह्या वेळीं ते दोघे सावकाराच्या दारांत येऊन पोहोंचले. सावकार दुकानाच्या दारांतच उभा होता. परस्परांचा रामराम वगैरे झाल्यावर ते दुकानांत जाऊन बसले. परंतु कुणब्यानें सावकाराशी न बोलतां आपल्या गोष्टीलाच सुरुवात केली. तो बाण्याला म्हणाला, "जेव्हां माझ्या पणज्याचा सगळा दाणा विकून झाला, तेव्हां तुमच्या पणजोबांची गरज नसल्यामुळें त्यांनां कामावरून काढण्यांत आलें; पण जाण्यापूर्वी त्यांनीं १००० रुपये कर्ज मागितलें व माझा पणजा उदार स्वभावाचा असल्यामुळें त्यानें तें दिलें.—"

"खरें, सोनबा, अगदीं खरें !"

आपला आवाज त्या सावकाराला ऐकूं जाईल इतका मोठा करून तो शेतकरी गंभीर मुद्रेनें म्हणाला, "तुमच्या पणजोबांनीं ते पैसे परत दिले नाहींत—"

"खरें, सोनबा, अगदीं खरें !"

"मग तुमच्या आजोबांनीं किंवा तुमच्या वडिलांनींहि तो पैसा परत केला नाहीं, किंवा तुह्मीसुद्धां अझूनपर्यंत दिला नाहीं.—"

"खरें, सोनबा, अगदीं खरें !"

"आतां त्या रकमेचें व्याज व ती रक्कम मिळून २००० रुपये तुह्मी माझें देणें लागतां.—"

"खरें, सोनबा, अगदीं खरें !"

"मग मी ह्या सावकाराचे २००० रुपये देणें आहें व तुह्मीं मला २००० रुपये दिले पाहिजेत; म्हणून ते मला न देतां या सावकारालाच देऊन टाका म्हणजे माझी जमीन मोकळी होईल.—"

हें शेवटचें वाक्य ऐकण्याबरोबर बाण्याची झालेली स्थिति व चेहरा हीं पहाण्यालायक होतीं ! कुठचा आपण मूर्खपणा केला व ह्याच्या नादीं लागलों, असें त्याला वाटलें. आपण तुझें कर्ज लागतों अशी कबुली तिसऱ्या मनुष्यासमोर त्यानें दिली होती. जर गोष्ट खोटी आहे असें म्हणावें, तर अटीप्रमाणें पैसे दिले पाहिजेत. खरी म्हणावें, तर कर्ज कबूल केल्याप्रमाणें २००० रुपये दिले पाहिजेतच. मिळून दोन्ही बाजूंनीं पंचाईत होऊन तो अगदीं गोंधळून गेला ! शेवटीं त्यानें त्या सावकारास २००० रुपये दिले, व आपल्या मूर्खपणाबद्दल जन्मभर दुःख करीत बसला !

उपयुक्त माहिती.

दहीं कसें विरजावें ?

—लेखक—
श्रीयुत डॉ० हरि भास्कर पंडित, स. अ. सरजन.

महत्त्वाच्या सूचना.

सर्वांस दहीं हा पदार्थ फार दिवसांपासून माहीत असावा. कारण, त्याचा उपयोग व गुणदोष प्राचीन चरकादि व वायबल इत्यादि ग्रंथांमध्यें दिलेले आढळतात. दुधाच्या उपयोगाबरोबरच दह्याचाहि उपयोग माहीत झाला असावा. कारण, दूध खाण्याच्या स्थितींत फार वेळ राहूं शकत नाहीं; परंतु त्याचें दहीं करून ठेविल्यानें तें एकदोन दिवस जास्त टिकतें. हिंदुस्थानासारख्या उष्ण प्रदेशांत, व विशेषतः उन्हाळ्यांत, दूध विघडून जाण्याचे प्रसंग जास्त असतात. ह्मणून दह्याचा उपयोग विशेष प्रचारांत आला असावा. क्षाराच्या (Acids) अंगीं खाद्य पदार्थ सुरक्षित ठेवण्याचा गुण असतो. ह्मिनिगरमध्यें कित्येक पदार्थ चांगले टिकतात हें आपण पाहतोंच. दुधांतील साखर (Sugar of Milk) व दह्यांतील (Lactic Acid) लॅक्टिक ॲसिड ह्या दोघांच्या साह्यानें दहीं बनतें. तेणेंकरून दुधाचा उपयोग जास्त काल होऊं शकतो. ह्याच गुणामुळें कित्येक जिन्नस दह्यांत मिसळून वाळवून ठेविल्या असतां त्या नासत नाहींत.

सूक्ष्मदर्शक यंत्रानें दह्याचें निरीक्षण केलें असतां दिसून येईल, कीं त्यांत एका प्रकारचे सूक्ष्म दोऱ्यासारखे (Lactic Acid Bacilli) जंतु आहेत. हे जंतु दुधांत टाकले ह्मणजे ते वाढत जातात; आणि वर सांगितलेला Lactic Acid क्षार ह्या जंतूंपासूनच होतो. दूध दोन प्रकारानें घट्ट होतें. एक नासलें ह्मणजे, व दुसरे वर सांगितलेले जंतु ज्यांत आहेत असें विरजण घातलें म्हणजे खाण्यास योग्य दूध घट्ट होतें. तें जंतूमय विरजणानेंच होतें. म्हणून त्याबद्दल येथें जास्त माहिती देणें जरूर आहे.

दह्याचे जंतु इतर जंतूंप्रमाणें फार सूक्ष्म असल्यानें त्यांस शुद्ध ठेवण्यास फार काळजी घ्यावी लागते. सहज निष्काळजीनें म्हणजे भांड्याच्या अस्वच्छतेमुळें, दूध पाहिजे तितकें न तापल्यानें, त्यांतील नैसर्गिक दोषांमुळें, किंवा अयोग्य विरजणाच्या मिश्रणानें, अथवा इतर अनिष्ट जंतु आंत शिरल्यानें, दह्याच्या शुद्ध जंतूंस पाहिजे तशी वाढ मिळत नाहीं; आणि अनिष्ट व अयोग्य जंतु पोटांत गेल्या कारणानें दह्यापासून होणारे इष्ट परिणाम होत नाहींत. वर सांगितलेलीं कारणें लक्ष्यांत घेतां, दूध विकणारांच्या घरचें विरजण घेऊन दहीं विरजणें चांगलें नाहीं.

चांगलें दहीं विरजण्यास दह्याचे शुद्ध जंतूच घेतले पाहिजेत. तशा प्रकारचे शुद्ध जंतु हिंदुस्थानांत माझ्या माहितीप्रमाणें अद्याप दोनच ठिकाणीं मिळत आहेत. (१) सेंट्रल इंडिया मेडिकल स्कूल लेबोरेटरी, इंदूर; (२) डॉ० बोसची लेबोरेटरी, ४५, आमहर्स्ट स्ट्रीट, कलकत्ता.—इंदूर, लेबोरेटरीमधील शुद्ध जंतु (Emulsion of Bacillus Trilacticus) इंग्लिश पद्धतीच्या जंतूंपासून बनविले आहेत. त्यांत तीन प्रकारचे जंतु मिश्र झालेले असतात. एका प्रकारच्या जंतूंनीं खाण्यास योग्य चांगलें दहीं होत नसल्यानें दुसऱ्या प्रकारच्या जंतूंची मदत घ्यावी लागते. ह्या जंतूंची विरजणांत चांगली वाढ होण्यास विलंब लागतो, आणि हें दहीं खाण्यास बरेंच फिकट लागतें, व आपल्या दह्यासारखें अगदीं घट्ट बनत नाहीं. डॉ० बोसच्या लेबोरेटरींतील जंतु आपल्या देशी दह्याचे असतात. त्यांत एकच प्रकारचा जंतु असतो. त्याचें नांव स्ट्रेप्टोथ्रिक्स दधि (Streptothrix Dadhi). ह्याचा शोध कलकत्ता मेडिकल कॉलेजांतील प्रो. गोपाळचंद्र चतरजी ह्यांनी केला आहे. ह्या जंतूंच्या विरजणानें प्रथम दिवसापासून चांगलें घट्ट दहीं होतें; आणि स्वादांत आपल्या दह्यासारखेंच तें आंबट असतें. ह्या विरजणाच्या ४ C. C. च्या ६ कुप्यांस १॥ रु. किंमत पडते. एक कुपी एक ड्रामची असते. एका कुपीनें शेर दहीं विरजतें.

दहीं बनविण्यासाठीं जें दूध घ्यावयाचें तें चांगलें उकळलें पाहिजे. कच्चें दूध, धारोष्ण अथवा कोणत्याहि प्रकारचें, तसेंच कधींहि पिऊं नये. कारण जसे माणसांत रोग असतात, तसे जनावरांतहि असतात; आणि तशा जनावराचें दूध पिण्यांत आल्यानें तो रोग जडण्याची भीति असते. दूध काढणाराचे हात व भांडीं पाहिजे तशीं स्वच्छ नसतात; आणि दुधाचें स्थानहि अगदीं आंतड्यानजीक असल्यानें शेणाचा अंश दुधांत येण्याचा संभव असतो; वरील कारणामुळें कच्चें दूध कधींहि पिऊं नये.

आतां दहीं कसें विरजवावें हें सांगतों. एक शेर दूध राहील असे ॲल्युमिनमचे दोन डबे झांकण असलेले घ्यावे. ते सन्लाइट साबणानें स्वच्छ धुऊन ठेवावे. ॲल्युमिनमचें भांडें पसंत करण्याचा हेतु हा कीं, तें भांडें विस्तवावर अथवा दिव्यावर लवकर गरम होतें. रस्त्यांतील धुळीनें भांडें घांसणें हें फार हानिकारक आहे. कारण, तसल्या धुळींत अनेक व्याधींचे जंतु अगोदरच मिसळलेले असतात. तसेंच कोणत्याहि मातीनें भांडें घांसणें हेंहि हानिकारकच आहे. चुलीतली चांगली राख भांडें घांसण्यास घेणें, हें जास्त चांगलें. परंतु असल्या पदार्थांनीं ॲल्युमिनम सारख्या भांड्यांची झिलई जाते; आणि राख किंवा माती आंत कोठें राहण्याचा संभव असतो. सन्लाइट सोप वापरल्यानें तसें कांहीं होत नाहीं. भांड्यांची झिलई कायम राहून, अल्प श्रमानें भांड्याचा चिकटपणा जाऊन तें स्वच्छ होतें. ह्यास्तव वर सांगितलेल्या साबणाचा उपयोग करणें चांगलें.

ह्याप्रमाणें स्वच्छ केलेल्या भांड्यांपैकीं एक डबा घेऊन, तो विस्तवावर अगर घासलेटाच्या मोठ्या दिव्यावर उपडा करून हात भाजेपर्यंत गरम करावा. असें केल्यानें त्या भांड्यांतील हवा जंतूरहित होते. तें भांडें कोमट झालें ह्मणजे त्यांत वर दर्शविल्याप्रमाणें उकळलेलें दूध कोमट झाल्यानंतर ओतावें. त्या पूर्वी दुधावरची साय काढून घेत जावी. सायींत तुपाचा भाग असल्याकारणानें दहीं लवकर विघडून, वास मारावयास लागतो. तुपासारख्या स्निग्ध पदार्थांत जंतु चांगले वाढत नाहींत. नंतर त्या कोमट दुधांत वर सांगितलेल्या जंतूंची शिशी लवकर ओतावी;आणि मिश्रण चांगलें व्हावें ह्मणून तें चमच्यानें सारखें ढवळावें. हा चमचाहि प्रथम चांगला गरम करावा, आणि कोमट झाला ह्मणजे त्यानें सर्व दूध ढवळावें. नंतर डब्याचें झांकण पूर्ववत् गरम करून, डबा बंद करावा.

हा डबा लोखंडी चिपळ्यांच्या तिवईवर ठेवावा. लांकडाची तिवई असल्यास वरच्या फळीस भोंक असावें. त्या भोंकाखालीं रात्रीं लावण्याचा बारका दिवा (Night lamp) पेटवून, भांड्याच्या बुडाला किंचित् त्याची आंच द्यावी. त्या उष्णतेनें आंतील जंतु लवकर वाढतात. मात्र आंच बेताची असली पाहिजे. १०४ F डिग्रीपेक्षां ती कधींहि जास्त असूं नये. कारण, तसल्या उष्णतेंत जंतु जगावयाचे नाहींत. अगदीं कमी ह्मणजे १०० डिग्रीपेक्षां कमी उष्णता झाली असतां, त्यांतहि जंतु पाहिजे तसे वाढत नाहींत. ह्मणून मध्यम उष्णता पाहिजे. तिवई उंच असल्याकारणानें डब्याला बरोबर उष्णता पोंचत नसल्यास दिव्याच्या खालीं लांकडाचे लहान लहान ठोकळे घालून त्याला उंच करावा. तसेंच उलट पक्षीं जर उष्णता जास्त लागत असली व ती कमी करावयाची असली, तर त्या डब्या खालचे ठोकळे कमी करावे. सारांश, डब्याची उष्णता कायम राखिली पाहिजे. ही सर्व कृति बिनचूक तडीस जाण्यासाठीं उष्णता मापक यंत्रासह सर्व उपकरणी रु० ४ पर्यंत,(डॉ० बोसच्या लेबोरेटरींत (४५, आमहर्स्ट स्ट्रीट, कलकत्ता) मिळतात, तीं जवळ ठेवावी. तीं उपकरणी न वापरतां, अनुभवानेंहि हें काम नीट करितां येईल. दुधाचा डबा किंचित् कोमट राहतो, असें रात्रींतून एक दोन वेळां पाहून, उष्णतेचें प्रमाण अनुभवावरून नक्की ठरवावें. घावळीचा तुकडा अगर टॉवेल भांड्याभोंवतीं गुंडाळावा, असें जें सांगितलेलें आहे, त्याचें कारण असें कीं, भांड्याची उष्णता कमी होऊं नये; परंतु तसल्या कपड्यांनीं कित्येक प्रसंगीं जशी पाहिजे तशी उष्णता कायम ठेवितां येत नाहीं. तोच डबा चुलीच्या आंचेजवळ अगर पेटीसारख्या बंदोबस्ताच्या जागीं ठेविला असतां, त्याची उष्णता बरीच राहून, आपला कार्यभाग वेळाच अंशीं सिद्धीस जाईल. अशी उष्णता एकसारखी कायम राहिली, तर दहापासून बारा तासपर्यंत उत्तम दहीं विरजलें जाईल. रात्रीं निजावयाच्या वेळीं दहीं विरजलें तर सकाळीं तें उत्तम खाण्यायोग्य होईल.

दहीं बनविण्याची एक अशी पद्धत आहे, कीं, एक शेर दूध चांगलें पांचदहा मिनिटें उकळवावें, म्हणजे त्यांतील अपायकारक जंतु मरून जातील. नंतर तें निवूं द्यावें व त्याची उष्णता (१०४) अंशाइतकी झाली

म्हणजे तें तीन किंवा चार प्याल्यांत ओतून प्यावें; आणि प्रत्येकांत थोडे विरजणाचे जंतु टाकावे. ते सर्व प्याले आंत मावतील असा एक मोठा डबा घेऊन, त्यांत १०४ अंश उष्णतेचें गरम पाणी घालावें. उष्णतामापक यंत्र नसलें तरी अदमासानें पाहतां येईल. फार गरम अगर फार थंड नसलें म्हणजे झालें. त्या पाण्यांत दुधाचे सर्व पेले ठेवावे, आणि डबा बंद करावा. डब्याच्या खाली पाण्याची उष्णता कायम राखण्यासाठी एक बारीक दिवा ठेवावा म्हणजे १०-१२ तासांत उत्तम दही बनेल.

याप्रमाणें तयार झालेलें दही वापरण्यापूर्वी दुसऱ्या दिवसाच्या विरजणासाठी, त्यांतील थोडा भाग निराळा दुसरा ॲल्युमिनमचा डबा वर सांगितल्याप्रमाणें गरम करून त्यांत गरम केलेल्या चमच्यानें विरजण टाकून, गरम केलेल्या झांकणानें डबा झांकावा. त्यांतच रात्री जें दूध विरजण्याचें असेल, तें हलकेच डब्याचें झांकण उघडून त्यांत ओतावें; आणि फक्त झांकण गरम करून, त्यावर झांकावें. याप्रमाणें एक दिवसानें विरजण दुसऱ्या दिवशी, असें बरेच दिवस चालेल. एक दोन महिन्यांनी पुनः नवीन जंतु मागवून दही करण्याचा रिवाज ठेविल्यास चांगलें. कारण, ताजे जंतु हमेश चांगले जोरानें वाढतात.

विशेष महत्त्वाची गोष्ट ही आहे की, दही विरजतेवेळी हालूं नये, अगर हांलूं नये. कारण, त्याप्रमाणें आपला डबा अगर तोंडांतली वाफ दुधावर पडून, त्यांतील जंतु त्यांत शिरतील.

दही विरजण्याचें काम होतां होईल तोंपर्यंत नोकरावर एकदूं नये. कारण, असली कामें नोकराच्या हातांनी काळजीपूर्वक होत नाहींत; आणि त्यांच्या निष्काळजीपणामुळें एकादा अनिष्ट जंतु दह्यांत शिरल्यावर त्याच दह्यांतून दुसऱ्या दिवसासाठी विरजण काढून ठेवावयाचें असल्यामुळें, अनिष्ट जंतूंचीही वृद्धि त्याजबरोबरच होते. वरीलप्रमाणें सुधार मनुष्यानें हें काम काळजीपूर्वक केल्यास योग्यरीत्या चांगलें साधल्यासारखें आहे.

प्रत्येक इसमानें दही अधूंमधून एक दोन महिने खावें. ते सकाळी नुसतें साखर घालून खावें तरी चालेल. दह्याचा पट व पातळ अंश हे दोन्हीहि चमचानें एकत्र करून नंतर त्यांत साखर घालावी. दह्यांतून मीठ काढून खाण्याचा प्रघात सुधारलेला आहे. कारण, असें केल्यानें त्याचा आंबटपणा कमी होतो. आंबटपणा हा जंतूंच्या अंगचा गुण आहे; आणि त्याचा आपल्या शरीरांत चांगला उपयोग होण्यासारखा आहे; आणि बाहेरची साखर दुधांतल्या साखरेंत मिळून, जंतूंच्या वाढीस मदत करते. म्हणून मीठ न घालतां साखर घालावी. दही आंबट असल्यास त्यांत दूध मिश्र करून खाण्याचा रिवाज चांगला आहे. कारण, या दुधाचा शरीरांत दही होण्यास उपयोग होतो.

दह्यांत घालावयाची साखर अगदी स्वच्छ असावी. गांड्याच्या येथील साखर बहुधा वाईट असते. साखरे-सारखी उपयुक्त व मुंग्या, माशा, वगैरे कीटकांची आवडती वस्तु, ते लोक बंदोबस्तानें ठेवीत नाहींत. हे पदार्थ स्वच्छ ठेवण्याबद्दल यांजवर सक्ती करविली पाहिजे. असें न करतील तर त्यांचा माल कोणी घेऊं नये, असें ठरविलें पाहिजे. असले कडक उपाय योजिल्याखेरीज त्यांचा पूर्वापार चालत आलेला निष्काळजीपणा ते सोडावयाचे नाहींत. साखरेंत मुंगळ्यांचे किंवा माशांचे छिन्नविच्छिन्न अवयव असून, ते अपाय तर करतीलच; परंतु या कीटकांच्या विसर्गापासून किती अपाय होईल, याचा सर्वांनी विचार करावा. जेथें देशी दुकानदारांकडून स्वास्थ्यदायक स्वच्छ साखर मिळण्याचा संभव नाहीं, तेथें विलायती कॅस्टर शुगर (Caster Sugar) अथवा लोफ शुगर (Loaf Sugar) वापरावी.

ग्लासगोमधील पाश्चुअर इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर प्रो. मॅकनीकॉफ यांनी दह्यासंबंधी फार बारकाईनें अभ्यास केला आहे. त्यांचें असें म्हणणें आहे की, मनुष्याग जरेची चिन्हें व तदंगभूत दौर्बल्य हे स्वतःच्या दोषानें (Auto-Intoxication) येत असतें. मनुष्याच्या पोटांत मोठें आंतडें (large intestines) हें निरुपयोगी आहे. चतुष्पाद जनावरांना हिंस्र पशूंपासून बचावासाठी बराच वेळ लांब दचकतां येण्यासाठी त्याचा उपयोग चांगला होतो; आणि त्यामुळें साखेलें तसेंच परसाकडेवाटे पडत नसून, मोठ्या आंतड्यांत तें बराच वेळ राहूं शकतें. या प्राण्यांचा उत्क्रांतीच्या नियमानें आपल्याबरोबर बराच संबंध असल्यानें आपल्यांतहि मोठें आंतडें आहे. मात्र जनावरासारखें तें आपल्याला उपयोगी नाहीं. उलट अहितकारक आहे. भाकड्या आंतड्याचा उपयोग अन्न पचविण्याकडे होतो; मोठ्या आंत-

ह्यांत मलाचा पातळपणा कमती होऊन घट्टपणा येतो. हें सर्व कार्य होण्यास फार वेळ लागत असल्यामुळें, तेथें पक्व अन्न जसें बाहेर राहिल्यानें कुजतें, तसें तें मोठ्या आंतड्यांतहि कुजतें; आणि ती कूज तेथील खास जंतूंच्या योगानें तेथें होत असते. दुर्गंधयुक्त अपानवायु सरतो, त्यावरून अनुमान होईल कीं, कांहीं तरी कूज आंत होत असली पाहिजे. नाहीं तर वायु असा दुर्गंधिमय कां यावा? ह्या कुजेच्या जंतूंपासून दोषमय पदार्थ निघून तो पुनः आपल्या रक्तांत मिश्र होतो, व त्यामुळेंच वर सांगितलेली जरेची चिन्हें व तदंगभूत दौर्बल्य येतें. मोठें आंतडें हें जसें गांवाला गटार असतें, तसें मनुष्यदेहांत गटारासारखेंच आहे. ह्या गटाराला साफ ठेवणें ह्मणजे कूज उत्पन्न करणाऱ्या जंतूंचा नाश करणें, हें आपलें कर्तव्य आहे. जंतुहारक औषधांचा, पोटांतल्या रसांत विकार होत असल्याकारणानें, त्याचा पाहिजे तसा उपयोग होत नाहीं. ह्या दह्याचा उपयोग केला असतां, त्यांतील जंतु मोठ्या आंतड्यांत सहवासानें राहूं शकतात. हे जंतु अपायकारक जंतूंचा नाश करितात; आणि ह्या जंतूंच्या आंगचा आंबटपणा आंतड्यांत असल्याकारणानें कुजेचे जंतु आंत वाढूं शकत नाहींत. अर्थात्, शरीरसंपत्ति चांगली राहते. मुरडा, महामारी, टायफॉइड वगैरे आंतड्यांच्या विकारांत हें दही चांगलें गुण करितें. कारण, त्या रोगाचे जंतु त्यानें मरतात.

आंबट दही किंवा ताक प्याल्यानें कित्येकांचे ताप गेलेले आहेत. तेहि दह्याच्या आंगच्या जंतूंच्या, अपायकारक जंतूंचा नाश करणाऱ्या गुणामुळेंच असावे. शेतकरी लोक ह्यातारे झाले असतां त्यांच्यांत एक प्रकारचा टणकपणा दृष्टीस पडतो. तो त्यांच्या दहीं अगर ताकाचा चांगला उपयोग करण्याच्या गुणामुळेंच असावा. जे लोक ताकाचा व दह्याचा उपयोग अक्षय करीत असतात, त्यांच्या आयुष्यमर्यादेंतहि बराच फरक दिसून येईल; आणि जरी वार्धक्य आलें तरी काम करण्याची ताकद शेवटपर्यंत कायम राहील.

वरील शास्त्रीयपद्धतीनें तयार केलेल्या दह्याचें सेवन केल्यास त्याचे गुण अधिक उत्तम आहेत; परंतु हें ज्यास अनुकूल नसेल त्यांनीं आपल्या जुन्या पद्धतीनें बनविलेलें दहीं किंवा ताक ह्यांचें सेवन करण्यास कांहीं हरकत नाहीं.

नोकरलोकांसाठीं नियम.

श्रीयुत व्ही. एस्. केसकर.

लंडन शहरांतील एका कारखान्यामध्यें कामगार लोकांकरितां पुढील नियम छापून लावलेले आहेत; ते हिंदुस्थानांतील लोकांनींहि लक्ष्यांत बाळगिल्याजोगे असल्यामुळें मुद्दाम येथें देत आहों.

खोटें बोलूं नका! खरा प्रकार आमच्या लक्ष्यांत केव्हांतरी येणारच. मग अशा तऱ्हेनें तुमचें व आमचें नुकसान करण्यांत काय अर्थ?

चोरी करूं नका! जो मनुष्य दुसऱ्याची चोरी करतो तो पुढें मागें आमची चोरी करण्यास भिणार नाहीं. अशा माणसाला या कारखान्यांत जागा मिळणार नाहीं.

घड्याळाकडे पाहूं नका, कामाकडे पहा. तुसती तासांची जो भरती करील, त्याचा खिसा भरणार नाहीं! जो दिवसाची रात्र व रात्रीचा दिवस करील त्याचा चेहरा रात्रंदिवस आनंदी राहील असें करूं. तुम्हाला तुमचें स्वतःचें कल्याण करून घेणें असेल तर अगोदर आमच्या कल्याणाचा विचार करा. तुमचा पगार वाढला पाहिजे तर अगोदर आमचा नफा वाढला पाहिजे हें लक्षांत ठेवा.

तुम्ही रात्रीं काय करतां हें पाहण्याचें आमचें काम नाहीं. पण रात्रीच्या उच्छृंखलपणामुळें दुसरे दिवशीं कामाची अव्यवस्था झाली तर आमच्या नुकसानामुळें तुमचें जें नुकसान होणारच तें न होणें तुमच्याचकडे असल्यामुळें तुम्हाला जबाबदार धरूं.

कारखाना हा तुमचा आहे, पण तुम्ही मात्र आमचे आहांत. कारखान्याचें झालेलें नुकसान हें तुमचें नुकसान असें समजा. नाहींतर तुमचें नुकसान करायला आम्ही चुकणार नाहीं.

संपूर्ण गोष्ट.

रजपूत स्त्रीचा स्वाभिमान.

—लेखक—
श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.



रजपुताना ही क्षात्रतेजाची खरोखर खाण आहे. या प्रदेशांत अरवली पर्वताच्या एका खोऱ्यांत वीरपूर नांवाचें एक लहानसें शहर होतें. या शहराला मिळालेलें नांव अगदीं सार्थ होतें. कारण की राजपुताऱ्याच्या इतिहासांत वीर्य, शौर्य, तेजस्विता इत्यादि गुणांमुळें ज्यांनीं आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे अशा अनेक स्त्रीपुरुषांचें हें जन्मस्थान होतें. हें शहर पूर्वी एका स्वतंत्र राज्याच्या राजधानीचें ठिकाण होतें; पण सर्वभक्षक कालानें त्याच्या वैभवाचा ग्रास करून त्याला सांप्रत हीन स्थितीला आणून सोडिलें होतें. तथापि क्षात्रतेजाचा या ठिकाणापासून अजिबात लोप झाला होता, असें नाही.

या शहरांत वीरसिंह नांवाचा एक वृद्ध रजपूत राहत होता. वीरपूरचें स्वातंत्र्य नष्ट करून तें राज्य बिकानेरनें आपल्या राज्याला जोडण्यापूर्वी या वीरसिंहानें आपल्या समशेरीच्या अंगचें पाणी युद्धांत अनेक वेळां शत्रूला उत्तम प्रकारें दाखविलें होतें. बिकानेरच्या राजानें त्याला आपल्या सैन्यांत मोठी हुद्याची जागा देऊं केली होती; पण ज्याच्यासमोर समरभूमींवर एकदां दोन हात केले, त्याचा नोकर होऊन राहणें त्या मानी पुरुषाला न आवडल्यामुळें तो आतां शेतीभाती करून राहिला होता. त्याच्या कुटुंबांत तो स्वतः, बायको, व एक उपवर मुलगी पद्मा, अशीं तीनच माणसें होतीं.

आज वीराष्टमीच्या जत्रेमुळें वीरपुरांत घरींच धामधूम होती. या जत्रेसाठीं राजपुताऱ्यांतल्या दूरदूरच्या ठिकाणांहून लोक आले होते. ही जत्रा वीरपूरचा महापराक्रमी राजा सुमेरसिंह यानें पन्नास वर्षांपूर्वी सुरू केली होती, आणि आतां जरी वीरपूरचें वैभव नष्ट झालें होतें, तरी ती नेमानें भरत असे. ही जत्रा इतर जत्रांसारखी नव्हती. या जत्रेंत कापडाचोपडाचीं, मेवामिठाईचीं किंवा दुसरीं दुकानें नव्हतीं. ही जत्रा रजपूत वीरांच्या अंगच्या पौरुषत्वाचें प्रदर्शन करण्यासाठीं भरत असे. वीरपुरची ग्रामदेवता अंबाभवानी हिच्या मंदिरापुढल्या विस्तीर्ण पटांगणांत सगळे वीर जमत, आणि कोणी गदायुद्धांत, कोणी मल्लयुद्धांत, कोणी असियुद्धांत, तर कोणी भाला फेंकण्यांत, सारांश, जो कोणी ज्या कलेंत प्रवीण असे, तो त्या त्या कलेंत आपलें नैपुण्य या ठिकाणी प्रगट करी. ही जत्रा व वीरपुरुषांच्या कर्तृत्त्वाचें हें प्रदर्शन पहाण्यासाठीं राजघराण्यांतील व इतर स्त्रियाहि येत, आणि युद्धांत विजयी झालेल्या पुरुषांच्या अंगावर पुष्पवृष्टि करून आपली गुणाभिज्ञता व्यक्त करीत असत. स्त्रियांनांहि आपल्या अंगचें बल, व शस्त्रास्त्रनैपुण्य दाखवितां यावें म्हणून त्यांच्यासाठीं वेगळें क्रीडांगण केलें होतें. तेथें पुरुषांना जाण्यांची मनाई असे.

आजची जत्रा फारच मोठी होती. सुदैवानें चांगली सुयत्ता झाल्यामुळें सर्वांचीं मनें प्रसन्न होतीं. लोकांत चांगला उत्साह दिसत होता. सालाबादप्रमाणें पटांगणांत खेळ व्हावयाचे ते झाले. पण संध्याकाळची वेळ होण्यापूर्वीच आभाळांत ढग दाटूं लागले. संध्याकाळ सुरू झाला, घुडीनें दशदिशा व्यापल्या, जत्रेसाठीं जमा झालेले लोक फांकले आणि आश्रयासाठीं सैरावैरा धावूं लागले. छत्री उघडण्याची सोय नव्हती. इतका सोसाट्याचा वारा सुटला. हां हां म्हणतां सगळें आकाश ढगांनीं व्याप्त झालें.

पद्मा फार हिरमुसली मुद्रा करून परत जात होती. तिचा बाप वीरसिंह याच्यापासून तिला मल्लयुद्ध, धनुर्वेद इत्यादि विद्यांचें जें शिक्षण मिळालें होतें त्याचा मागला जत्रेसाठीं जमलेल्या स्त्रीप्रेक्षकांपुढें मांडण्याविषयींची तिची फार उत्सुकता होती. पण जत्रा तुफानामुळें लवकर बरखास्त झाल्यामुळें तिला संधी मिळाली

नाहीं. ती निसर्गदेवतेला दोष देत देत धीर गंभीर पावलांनीं रस्ता आक्रमीत होती, आणि तुफानाला भिऊन पळणाऱ्या पुरुषांकडे तिरस्कारयुक्त नजरेनें पाहून मनांत म्हणत होती कीं "कसले हे भ्याड पुरुष! यःकश्चित् तुफानाला भिऊन पळणारे हे वीरयहादर समरांगणांत होणाऱ्या तीरांच्या वर्षावापुढें कसा टिकाव धरतील?"

पन्ना याप्रमाणें लोकांची गंमत पाहत पाहत जात असतां एकाएकी कोणाचा तरी करुणस्वर तिच्या कानीं आला. "आंधळ्यावर कोणी दया करारे! या आंधळ्याला कोणी हात यारे!" असें कोणी म्हणत आहे, असे शब्द ऐकल्यावरोबर ती थांबली आणि सभोंवार पाहूं लागली, तों एक आंधळा मोठ्या कष्टानें काठी टेकीत टेकीत रस्ता काढीत चालला होता, असें दिसलें. त्याबरोबर करुणा येऊन ती त्याचेजवळ गेली, आणि त्याला म्हणाली "भिऊं नका! मी तुम्हाला सुरक्षित जागा नेऊन पोंचवितें."

हा आंधळा माणूस वयानें तरुण असून त्याच्या शरीराची कांति प्रेक्षणीय होती. त्यानें डोक्याला भरजरी मंदिल बांधला होता, आणि त्याच्या अंगावरचा पोषाखहि बहुमोल होता. पन्नेच्या भाषणानें त्याच्या मनाला पुष्कळ धीर आला आणि तो म्हणाला "मला तर डोळ्यानें दिसत नाहीं, आणि या तुफानाच्या गर्दीत माझ्यावरोबरचे सोबती कोणीकडे फांकले त्यांचा मला पत्ता लागत नाहीं. अशावेळीं मला साह्य करण्याची बुद्धि तुम्हाला त्या दयाळु परमेश्वरानेंच दिली म्हणायची! नाहीं तर या गर्दीत कोण कोणाला साह्य करतो!"

पन्ना त्याचा हात धरून रस्त्यानें गर्दीतून वाट काढीत काढीत जाऊं लागली. ती म्हणाली "आतां तुम्ही स्वस्थ असा. माझें घर येथून जवळच आहे. तेथें माझ्याबरोबर चला."

आंधळ्या माणसाला दृष्टीचें तेवढें व्यंग असतें; पण तें व्यंग इतर इंद्रियांच्या तीव्रतेनें भरून काढलेलें असतें. त्याचे कान तिखट असतात; स्मृति जागृत असते; स्पर्श-ज्ञान तीव्र असतें. पन्नेच्या आवाजावरून व तिच्या कोमल हस्तस्पर्शावरून त्यानें आपणास साह्य करणारी स्त्री आहे हें तर ओळखलेंच, पण तिच्यासंबंधानें कांहीं अधिक ज्ञान होऊन त्याच्या शरीरांत जणूं काय विद्युत्संचार व्हावा तसा एक प्रकारचा संचार झाला. इकडे पन्नेचीहि तशीच स्थिति झाली. बापाखेरीज दुसऱ्या कोणत्याहि पुरुषाचा स्पर्श तिला झाला नव्हता. तो आतां झाल्यावरोबर तिच्या हाताला कंप सुटला. पन्ना मर्यादशील तथापि फार चौकस असे. तिनें युक्तियुक्तीनें त्या आंधळ्यामाणसाची हकीकत ऐकण्याला आपण उत्सुक आहों असें दाखविलें. तेव्हां तो म्हणाला "माझा पिता अंबर देशांत (सध्यांच्या जयपुर संस्थानांत) एक मोठा श्रीमंत वीर पुरुष होता. मी त्याचा एकटाच मुलगा. अर्थात् आईबाप मला जीव कीं प्राण करीत. घरांत संपत्ति असल्यामुळें नोकरचाकर, गाड्याघोडे, सर्व गोष्टींची अनुकूलता होती. यामुळें बालवयांत जेवढें म्हणून सुख लागणें शक्य आहे तेवढें मला लागलें. पण पुढें दुर्दैवाच्यानें तें माझें सुख पाहवलें नाहीं. गांवांत देवीची भयंकर सांथ उद्भवली. हजारों अभींकें पटापट मरण पावलीं. शेंकडों तरुण पुरुष जन्माचे विद्रूप होऊन बसले. त्या देवीनीं माझ्याहि डोळ्यांच्या खोंचा झाल्या आहेत. माझी स्थिति पाहून माझ्या आईबापांनां अत्यंत दुःख होतें; तथापि माझे प्राण तरी वचावले येवढेंच समाधान मानून ते दिवस काढीत आहेत. माझें नांव अमरसिंह."

ती त्याची हकीकत ऐकून पन्नेचें अंतःकरण करुणेनें द्रवलें. त्याला तिनें ओळखलें; पण मुद्दामच त्याला ओळख दिली नाहीं. ती म्हणाली "तर मग आपली आज गांठ पडली हें फार चांगलें झालें. आमच्या घराजवळ एक संन्याशाची मठी आहे. त्या मठींत एक संन्यासी राहत असतो. त्याला वनस्पतींची फार चांगली माहिती आहे. तो नेहमीं लोकांनां मुळ्या वगैरे वनस्पतींचीं औषधें देत असतो. त्याच्या हाताला यशहि चांगलें आहे. त्याचें औषध घेऊन शेंकडों लोक वरे झाले आहेत. येथवर आल्यासारखे त्याला भेटून जा. योगायोग असला तर अजूनहि आपली गेलेली दृष्टि परत येईल. वरें पण, मी विचारतें कीं, आपणारा दोन्हीं डोळ्यांनीं दिसत नाहीं, असें असून आपण ही जत्रा बघण्यास आलां, हें कसें?"

पन्नेचा हा प्रश्न ऐकून आंधळ्याला मोठें कौतुक वाटलें आणि तो म्हणाला "तुमचा प्रश्न अगदीं वरोबर आहे. आंधळ्या माणसानें जत्रा बघण्याकरितां यावयाचें हें मुळीं सृष्टिनियमाच्या विरुद्ध आहे. पण मी आलों तो कांहीं जत्रा बघण्यासाठी नव्हे, तर येथें सगळ्या राजपुतान्यांतले वीरपुरुष जमा होतात, त्यांचा अनायासें समागम घडतो व त्यांच्यांतले कोण कोण आपल्या देशाच्या उपयोगीं पडण्यासारखे आहेत, क्षात्रतेज कोणकोणत्या कुलांनीं राखलें आहे, कोण-कोणते पराक्रमी पुरुष नांवारूपाला चढण्यासारखे

आहेत इत्यादि गोष्टींची माहिती मिळते, म्हणून आलों आहें. शिवाय, मी जरी अंध आहें तरी या देहांत क्षत्रियाचें रक्त खेळत आहे. दुंदुभीचा ध्वनि ऐकला किंवा क्षात्रतेजाच्या गोष्टी निघाल्या कीं तें रक्त उचंबळूं लागतें. त्यावेळीं शरीराच्या एकूणएक शिरा ताठतात, आणि मनांत नानाप्रकारचे कल्लोळ उठतात. मग स्वस्थ बसवतच नाहीं! धडपड करीत वीरपुरुषांच्या समागमांत पडण्याची अनिवार बुद्धि होते. आजचा वीराष्टमीचा दिवस कधीं येईल आणि आपण वीरपुराला जाऊन तेथें जमलेल्या वीरांच्या पराक्रमाच्या कथा कधीं श्रवण करूं, असें होतें. ही मनाची उत्कंठा तृप्त करण्यासाठीं मी दरसाल या जत्रेला येत असतों."

हें उत्तर ऐकून पन्ना विनयानें म्हणाली "माझ्यासारख्या गरीब मुलीच्या ध्यानांत ही गोष्ट कोठून येणार?"

आंधळा म्हणाला "तुमच्या निर्भीडपणाच्या गतीवरून असें वाटतें कीं, हा रस्ता तुमच्या चांगला परिचयाचा आहे. असो. पण माझ्याविषयींची हकीकत जशी तुम्ही ऐकली तशी तुमची हकीकत मला ऐकवाल तर मी कृतार्थ होईन."

पन्ना म्हणाली "माझ्या हकीकतींत ऐकण्यासारखें काय आहे? माझा पिता एक वृद्ध व दरिद्री माणूस आहे. माझे बाबा इतके दिवस शेतीचें काम पहात असत, पण अलीकडे वार्धक्यामुळें तें काम त्यांच्यानें पूर्वीसारखें होत नाहीं. त्यांनी मला थोडीशी चित्रकला शिकविली आहे. तीच आमच्या निर्वाहाचें मुख्य साधन सध्यां झाली आहे. मी बाजारांत तसबिरी विकून चार पैसे आणतें आणि अशा रीतीनें आम्ही हा संसाराचा गाडा ढकलीत नेतों. याहून आणखी काय सांगावयाचें आहे?"

अशा गोष्टी बोलतां बोलतां तीं दोघेंहि पन्नेच्या घरापाशीं येऊन पोहोंचलीं. हें घर शहरापासून कांहीं अंतरावर एखाद्या तपस्व्याच्या मठीसारखें झोंपडीवजा होतें. घराभोंवतीं लहानसें अंगण असून त्यांत कांहीं फुलझाडें लाविलीं होतीं. पन्नेनें अंगणांत प्रवेश करतांच तिनें पाळलेली हरणाचीं पाडसें धांवत आलीं व तिच्याभोंवतीं आनंदानें नाचूं लागलीं. पन्नेनें प्रेमानें सर्वांचें चुंबन घेईपर्यंत तीं सारखीं तिच्या अंगावर उड्या घेत होतीं.

[२]

पन्नेनें त्या आंधळ्याला अंगणांत उभें राहण्यास सांगून, आपण घरांत जाऊन बापाला अतिथि आल्याचें कळविलें. वीरसिंह वार्धक्यानें जर्जर झाला होता, तरी तो काठी टेकीत टेकीत अतिथीचें स्वागत करण्यासाठीं बाहेर दारापर्यंत आला, आणि आंधळ्याचा हात धरून त्याला घरांत घेऊन गेला. तेथें घटकाभर त्याच्याशीं बोलणेंचालणें झालें. त्यांत म्हाताऱ्या वीरसिंहानें त्याची सारी कुळकथा विचारून घेतली. पन्नेनें वीरसिंहाला सांगितलेल्या हकीकतीशीं ती तंतोतंत जुळल्यावर त्याला समाधान वाटलें. त्यानेंहि अमरसिंहाला ओळखलें. तथापि अशावेळीं मागची ओळख देणें त्याला प्रशस्त वाटलें नाहीं. मग त्याला उपहारासाठीं साखर घातलेलें थोडेंसें दूध देऊन वीरसिंहानें शेजारच्या झोंपडींत त्याची राहण्याची सोय करून दिली. त्या अतिथीला जर दृष्टि असती तर ती गरिबाचीच झोंपडी पण पन्नेनें स्वतः आपल्या हातानें काढलेल्या सुंदर तसविरींनी किती उत्तम प्रकारें शृंगारली होती, आणि त्या झोंपडीचा स्वच्छपणा व नीटनेटकेपणा किती वर्णनीय होता, तें पाहून त्याला खचितच फार संतोष झाला असता. ही झोंपडी म्हणजे पन्नेची नुसती चित्रशालाच होती असें नाहीं, तर वीरसिंहाचें शस्त्रागारहि होतें. वीरसिंहानें आपल्या तलवारी, ढाली, संजीर, जंबिये वगैरे शस्त्रें अशा रीतीनें भितीला टांगून ठेविलीं होतीं कीं, त्यांच्या चित्रविचित्र भूमितींच्या मनोहर आकृती बनल्या होत्या. वीरसिंहाला या शस्त्रांविषयीं मोठा अभिमान वाटत असे.

वीरसिंहानें आपल्या शक्त्यनुरूप अतिथीचा उत्तम सत्कार केला. जेवणखाण आटोपल्यावर रात्रीं पन्ना वीणा घेऊन देवाच्या स्तुतिपर आणि राजपुतान्यांतील प्रसिद्ध क्षत्रिय वीरांच्या पराक्रमांच्या वर्णनपर पदें गाऊं लागली. शेवटीं तिनें एक स्वदेशपर गीत गाइलें. तीं पदें ऐकून आंधळ्याचें मन अतिशय प्रसन्न झालें आणि तो आपल्या मनाशीं म्हणाला, "जिचें हृदय इतकें प्रेमळ, जिचा कंठ इतका मधुर, आणि जिचें मन इतकें सुसंस्कृत आहे ती रूपानें देखील किती सुंदर असेल!"

दुसरे दिवशीं सकाळीं वीरसिंहाच्या आज्ञेनें पन्ना त्या आंधळ्याला संन्याशाकडे घेऊन गेली. संन्याशानें त्याचे दोन्ही डोळे बारकाईनें पाहून सांगितलें कीं, "ही मुळी उगाळून तिचें अंजन डोळ्यांत घाला म्हणजे

दृष्टी फिरून येईल. मात्र अंधारांत बसून रहा. सूर्यप्रकाशाकडे पहाण्याचा यत्किंचित्सुद्धां यत्न करूं नका."

आंधळा अतिथि वीरसिंहाच्या घरीं राहून नेमानें औषध घालूं लागला. पन्ना अतिथीची योग्य तजवीज ठेवण्यांत कधीं चुकत नसे. असे कित्येक दिवस गेल्यावर त्याला हळूहळू दिसूं लागलें. इतके दिवस केलेल्या श्रमांचें चीज होत आहेसें पाहून वीरसिंहाला व पन्नेला समाधान वाटूं लागलें.

होतां होतां एके दिवशीं अमरसिंहाला उत्कृष्ट दिसूं लागलें. पन्ना हीच प्रथम त्याच्या दृष्टीस पडली; आणि त्यानें तर्क केल्याप्रमाणें खरोखर तिचें स्वरूप अत्यंत मोहक पाहून त्याचें मन तिच्याठायीं जडलें. वीरसिंहाशीं बोलतां बोलतां त्यानें पन्नेशीं विवाह करण्याविषयींची आपली इच्छा प्रदर्शित केली. पण पन्ना चांगली जाणती मुलगी आहे, तिची संमति तुह्मी प्रथम मिळवा, आणि मग मला विचारण्यास या, असें वीरसिंहानें त्याला उत्तर दिलें. योग्य संधी पाहून अमरसिंहानें तिच्यापाशीं लग्नाची गोष्ट काढली, आणि मला तुह्मीं दृष्टिदान दिलें तसें आतां माझ्या प्राणाची स्वामिनी होऊन प्राणदान द्या, असें तो ह्मणूं लागला. अमरसिंह ही भलतीच मागणी करील असें पन्नेला कधीं वाटलें नव्हतें. त्यामुळें त्याच्या तोंडून हे अनपेक्षित शब्द निघतांच पन्नेच्या अंगांत विद्युत्संचार झाल्यासारखें होऊन ती मानी मुलगी तडाक्यानें उठली, आणि त्याच्यापासून दूर सरून ह्मणाली "तुह्मीं मला कोण समजतां? आमच्या हातून तुमची थोडी-बहुत सेवा घडली आणि तिचें सार्थक झालें-तुह्मांला दृष्टि आली-येवढें समाधान आह्मांला बस्स आहे! तुह्माला दृष्टि देणारीं आह्मी कोण? तथापि तुमच्या या कृतज्ञतेच्या शब्दांनां भुलून आह्मी स्वाभिमान सोडण्यास तयार होऊं, असें तुह्माला वाटलें तरी कसें? अमरसिंहजी! मी व माझे पिताजी यांची ओळख तुह्मी विसरलां आहां; पण तुमची ओळख आह्मी विसरलों नाहीं, व पुढेंहि विसरणार नाहीं! माझ्या पित्याला स्वाभिमानाच्या पायीं हे वाईट दिवस आले तेव्हांच माझा आपल्याशीं विवाह करावा अशा विचारानें माझ्या पिताजीनें आपल्या वडिलांकडे बोलणें लाविलें होतें. पण त्यावेळीं आमचें स्थळ आपल्या तोलाचें नाहीं, ह्मणून आपल्या वडिलांनीं व आपणहि माझ्या पिताजीस झिडकारलें होतें, त्याची आठवण आपणास नसेल, पण आह्मांला पुरतेपणीं आहे! माझे पिताजीस ही दशा येण्याला कारणहि तुह्मीच झालां आहां. माझ्या पिताजीचा असा अपमान त्यांनीं त्यावेळीं मुकाट्यानें गिळला, पण त्या अपमानाचें शल्य त्यांच्या हृदयाला लागलें. त्यापासून त्यांनां किती मानसिक यातना झाल्या व होत आहेत याची कल्पना तुह्माला करतां यावयाची नाहीं. मला स्वतःला असा अपमान सहन करून राहण्यापेक्षां एकदम मृत्यूची गांठ घेऊन मोकळें व्हावें, असें कितीकदांतरी वाटलें. रजपूत स्त्रियांनां मृत्यूचें भय मुळींच वाटत नाहीं हें तुह्माला ठाऊक आहेच. मी आत्महत्या करून केव्हांच मोकळी झाल्यें असत्यें; पण मी मेल्यावर मागें माझ्या वृद्ध आईबापांची काय दशा होईल, त्यांची सेवा कोण करील, त्यांच्या मनाचें समाधान कोण करील, या विचारानेंच मीं आपले प्राणांचा नाश केला नाहीं. नाहीं तर या कट्यारीनें—"

असें ह्मणून तिनें आपल्या कमरेची कट्यार बाहेर काढली. ती पाहतांच अमरसिंह चपापला, आणि दोन्ही हात जोडून ह्मणाला "पन्ने! क्षमा कर. तुझ्या व तुझ्या पिताजींच्या खऱ्या योग्यतेची आह्मांला तेव्हां परीक्षा झाली नाहीं. आतां माझे डोळे उघडले आहेत. आतां माझ्यावर दया कर. विवाहाला तूं संमति दिलीस तर हा सेवक तुझा चिरकाल ऋणी होईल!"

पण पन्नेचें आपलें एक उत्तर "कृतज्ञतेच्या शब्दाला भुलून स्वाभिमान सोडण्याला रजपूत स्त्रिया तयार होत नसतात!"

अमरसिंह आणखी दोनचार दिवस राहिला; पण पुनः पन्नेजवळ लग्नाची गोष्ट काढण्यास त्याची छाती झाली नाहीं. शेवटीं निराश होऊन त्यानें वीरसिंहाचा निरोप घेतला. पन्नाहि त्याला रस्त्यापर्यंत पोंचविण्यास गेली. शेवटीं रस्त्याला लागतांना पुनः एकदां पन्नेकडे सस्नेह दृष्टीनें त्यानें पाहिलें आणि ह्मटलें "ईश्वराची इच्छा असली तर पुनः आपल्या भेटी होतील!"

पन्ना कांहीं बोलली नाहीं. बोलण्यासारखी तिच्या मनाची स्थितीच नव्हती. तिच्या शब्दांनीं जें उत्तर द्यावयाचें तें तिच्या नेत्रांतल्या तेजानें दिलें!

अमेरिकेंतील प्रसिद्ध व्यायामशास्त्रज्ञ बरनार मॅकफेडन.

लेखक—श्रीयुत गोपाळ महादेव चिपळूणकर, बी. ए.

अमेरिका, इंग्लंड व इतर पाश्चात्य देशांत, इतर अनेक उपयुक्त चळवळींप्रमाणें व्यायामशास्त्र व शरीरसंवर्धन (Physical Culture) यांसंबंधी एक अत्यंत उपयुक्त चळवळ सध्यां मोठ्या जोरानें चालू आहे. आजपर्यंत मानसिक व बौद्धिक प्रगतीकडेच सर्वांचें लक्ष लागलेलें असल्यानें, शरीरसंवर्धनाकडे साहजिकच दुर्लक्ष होत असे. इतकेंच नव्हे, तर शरीर मर्त्य व ऐहिक समजलें जाऊन, शारीरिक उन्नतीकडे दुर्लक्ष करून, त्या गोष्टीची अवहेलना करणें हा मोठा अपराध आहे असें कोणीहि समजत नसत. अशा रीतीनें शारीरिक उन्नतीची सर्व बाजूंनी हेळसांड झाल्यानें त्याचा परिणाम हा झाला आहे की, रोग, दुःख, अल्पायुषत्व, इत्यादि अनेक आपत्ति मानवजातीच्या हात धुऊन पाठीमागें लागलेल्या आहेत.

शारीरिक उन्नति, मानसिक व आध्यात्मिक उन्नतीचा पाया आहे, हें सनातन तत्त्व शिकवणारी '**शरीरमाद्यं खलु धर्म साधनं**' आणि "Body is the temple of the soul—शरीर हें आत्म्याचें घर आहे" इत्यादि सूत्रमय वाक्यें बऱ्याच धर्मग्रंथांतून सांपडतात. शारीरिक उन्नतीची मानसिक व आध्यात्मिक उन्नतीस किती आवश्यकता आहे, ह्या गोष्टीच्या अज्ञानामुळे व इतर अनेक कारणांमुळें वर दिलेल्या सनातन तत्त्वाकडे मानवजातीचें जितकें लक्ष लागावें तितकें लागलें नव्हतें. व्यायामशास्त्र व शरीरवर्धन ह्या गोष्टींचा शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करून व त्यांत अत्यंत परिश्रम घेऊन, ज्यांनी ह्या विद्या अत्यंत लोकोपयोगी केल्या, व त्या संबंधी जगांत पवित्र मोहिम चालू ठेविली आहे, अशा व्यायामशास्त्रज्ञ बरनार मॅकफेडन व प्रसिद्ध मल्ल सँडो यांनी मानवजातीवर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत यांत शंका नाही. ह्यांतील बरनार मॅकफेडन ह्यांची, व त्यांनी अमेरिकेंत चालविलेल्या अत्यंत उपयुक्त कामाची थोडक्त माहिती मनोरंजनाच्या वाचकांस करून देण्याचें प्रस्तुत लेखांत योजिलें आहे.

प्रसिद्ध मल्ल सँडो व त्यांची कामगिरी आपल्या इकडे बरीच प्रसिद्ध आहे; परंतु व्यायामशास्त्रविशारद बरनार मॅकफेडन यांचें नांव आपल्या देशांत फारच थोड्या लोकांनां ठाऊक असेल. लहानपणींच आईबाप मरून पोरक्या झालेल्या मॅकफेडन ह्या लहान मुलास अमेरिकेंतील एका गरीब शेतकऱ्यानें दत्तक घेतलें. तेथें त्याला अतिशय कडकरीतीनें वागवीत असल्यामुळें, आपल्या वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत त्यानें आपलें आयुष्य अत्यंत हालांत व कष्टांत घालविलें. पुढें मिसोटरी संस्थानांतील सेंट लुइस या गांवी जाऊन तेथें कांहीं नातेवाईकांच्या साहाय्यानें त्यानें एका ऑफिसांत निरोप पोंचविण्याच्या मुलाची नोकरी पतकरली. तेथें त्यानें तीन वर्षें नोकरी केली. लहानपणापासून आलेल्या अनेक आपत्तींनीं त्याची शरीरप्रकृति इतकी बिघडली कीं, त्याला पुढें नोकरी सोडून द्यावी लागली. पुढें मॅकफेडन हे इतके अशक्त झाले कीं, ते लवकरच क्षयरोगास बळी पडतील, असें त्यांच्या नातेवाईकांस व डॉक्टरास वाटूं लागलें.

तरुण मॅकफेडन यांनी आपली शरीरप्रकृति सुधारण्याचे सारखे प्रयत्न चालू ठेविले. त्यांनी अनेक डॉक्टरांस आपली प्रकृति दाखवून, त्यांनी सांगितलेली अनेक पेटंट औषधें घेण्याचा सारखा क्रम चालू ठेवला. परंतु ह्या सर्व प्रयत्नांस कांहींहि यश न येतां त्यांची प्रकृति दिवसेंदिवस खालावतच चालली. इतर सर्व प्रयत्न फुकट गेल्यामुळें, व्यायामानें तरी आपली प्रकृति सुधरेल ह्या विचारानें, त्यांनी दररोज नियमित व्यायाम घेण्यास सुरुवात केली. नियमित शारीरिक व्यायाम केल्यानें आपली प्रकृति फारच आश्चर्यकारकरीतीनें सुधारत चालली आहे हें पाहून, त्यांनी त्यावेळीं प्रचलित असलेल्या सर्व व्यायामपद्धतींचा शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करण्यास सुरुवात केली. अशा रीतीनें व्यायामशास्त्राचा कांहीं दिवस अभ्यास करून, व व्यायाम-

मानेंच आपल्या आरोग्यांत झालेली क्रांति पाहून, त्यांनी व्यायामासंबंधी उपयुक्त माहिती दुसऱ्या मंडळीस देण्याची सुरुवात केली. सेंट लुईस ह्या शहरांतून मॅकफेडन हे न्युयॉर्क शहरी गेले, व तेथें आपली व्यायाम पद्धति लोकांनां शिकविण्यांत, व स्वतः काढलेल्या व्यायामासंबंधी एका उपकरणाचा (Exerciser) लोकांत प्रसार करण्यांत, त्यांचे कांहीं दिवस गेले. पुढें इंग्लंडमधें जाऊन निरनिराळ्या ठिकाणी शरीरवर्धन या विषयावर त्यांनीं व्याख्यानें दिलीं. त्यावेळीं हीं व्याख्यानें लोकांनां फारच आवडूं लागलीं होतीं. तेथें असतांना मॅकफेडन यांनां आपल्या सर्व व्यायाम-विषयक चळवळीस एका मासिकाची फार जरूर वाटूं लागली, व त्याप्रमाणें त्यांनीं न्युयॉर्क शहरी येऊन 'Physical Culture—' शरीरवर्धन नांवाचें एक मासिक पुस्तक छापण्याची सुरुवात केली. एक लहान जागा भाड्यानें घेऊन त्यांनी हें मासिक पहिल्यानें अगदी अल्प प्रमाणावर काढण्यास सुरुवात केली; परंतु हेंच मासिक पुढें इतकें लोकप्रिय झालें कीं, तें छापणें, प्रसिद्ध करणें, व त्यासंबंधी इतर काम चालविणें, ह्यासाठीं सध्यां मॅकफेडन यांनां न्युयॉर्क शहरांतील एक मोठी इमारत देखील पुरेनाशी झाली आहे. सध्यां या मासिकाचे वर्गणीदार जगाच्या सर्व भागांत आढळून येतात. या मासिकांत दर महिन्यास तज्ञ मंडळीकडून व्यायामशास्त्र व शरीरवर्धन यासंबंधी अत्यंत उपयुक्त लेख प्रसिद्ध होत असतात. वर्गणीदारांनीं व्यायामा-संबंधी विचारलेल्या सर्व प्रश्नांस मॅकफेडन हे ह्या मासि-कांत दर महिन्यास सविस्तर उत्तरें प्रसिद्ध करीत असतात. ह्या मासिकांत, सर्व रोग केवळ व्यायामानें व इतर नैसर्गिक उपचारांनीं अगदीं कमी खर्चांत औषधावांचून कसे बरे करावे, ह्याविषयीं आणि आरोग्य-वर्धनाविषयीं अत्यंत उपयुक्त माहिती, कसलेल्या व अनुभविक लेखकांकडून प्रसिद्ध होत असते. ह्या मासि-काची वार्षिक वर्गणी दोन डॉलर (सहा रुपये) आहे. ज्यांनां व्यायामशास्त्र व शरीरवर्धन ह्या गोष्टींविषयीं खरी कळकळ वाटत असेल, त्यांनां हें बिनमोल मासिक पुस्तक दरमहिन्यास वाचल्यावांचून राहूं नये, अशी आमहाची सूचना आहे.

अनेक रोग नाहींसे करून बहुजनसमाजांत आरोग्याची स्थापना करण्यास केवळ शास्त्रीय व्यायाम पद्धतीचा लोकांत प्रसार करणें पुरेसें नसून, त्यावरोबर लोकांस थोड्या खर्चांत सात्त्विक व पोषक अन्नाचा पुरवठा करणें अत्यंत आवश्यक आहे, असें त्यांनां आढळून आलें. स्वतःच्या व इतर मंडळींच्या शरीरावर अनेक प्रयोग करून सात्त्विक व पोषक अन्नें कोणतीं हें त्यांनीं ठरविलें, व ह्या अन्नांचा लोकांस अगदीं थोड्या खर्चांत पुरवठा करण्याकरतां त्यांनीं आपलें पहिलें "Physical Culture Restaurant—आरोग्य-वर्धक-उपाहार-गृह" उघडलें. हें पहिलें उपाहारगृह इतकें लोकप्रिय झालें कीं, अशींच अनेक उपाहारगृहें बोस्टन, फिलाडेलफिया, पिट्सबर्ग, चिकागो व बफेलो या शहरीं उघडण्यांत आलीं. पुढें मॅकफेडन यांनीं अशीं उपाहारगृहें उघडण्याकरतां एक लिमिटेड कंपनी काढून हें आरोग्यवर्धनाचें काम अमेरिकेंतील इतर शहरांतून चालू ठेवलें आहे.

आरोग्यवर्धनाकरतां मासिकें व पुस्तकें छापणें, व्याख्यानें देणें, उपाहारगृहें काढणें, इत्यादि कामें उद्योगप्रिय मॅकफेडन यांनां पुरेशीं न वाटून, ह्यासाठीं आदर्शभूत होईल असें एक लहान सुंदर शहर बांधण्याचें त्यांच्या मनानें घेतलें. सध्यांच्या शहरांची रचना आरोग्यवर्धनास अगदीं हानिकारक असते, व अशा शहरांत नैसर्गिक नियमानें रहाण्यास फार जड जातें. असें पाहून, आरोग्यवर्धनास व नैसर्गिक रहाणीस अगदीं योग्य असें एक नमुनेदार शहर वसविण्याचा आपला निश्चय मॅकफेडन यांनीं कायम केला. न्युजर्से शहरा-जवळ दोन हजार एकर जमीन त्यांनीं विकत घेतली, व त्या जमिनीवर आरोग्यवर्धनाच्या अटीप्रमाणें वसा-हत करण्यास सर्व लोकांस बोलाविलें. ह्या नवीन वसा-हतीजवळ सरकारानें नवीन रेलवे स्टेशन व पोष्ट ऑफिस काढल्यानें, ही नवीन विचारांची वसाहत सर्वस्वीं विजयी होईल असें सर्व लोकांनां वाटूं लागलें. इतक्यांत मॅक-फेडन ह्यांच्यावर पोस्टांतून अश्लील मजकूर पाठविला म्हणून अमेरिकन सरकारांतून खटला करण्यांत आल्यानें, ही नवीन वसाहत काढण्याचा बेत त्यांनां रहित करावा लागला. इंद्रियविषयक शास्त्रीय माहितीसंबंधी बहुतेक स्त्री व पुरुष पूर्ण अज्ञानी असल्यामुळें त्यांनां अनेक रोग व दुःखें सोसावीं लागतात, असा मॅकफेडन यांचा पूर्ण समज झाल्यामुळें, त्यांनीं आपल्या मासिकांत, स्पष्ट व जोरदार भाषेंत ह्या वर सांगितलेल्या अज्ञात विषयावर कांहीं उपयुक्त माहिती प्रसिद्ध केली. मॅक-फेडन यांच्या लोकोपयोगी कामामुळें व त्यांच्या अचाट

सत्यप्रियतेमुळें जसे त्यांनां पुष्कळ मित्र उत्पन्न झाले होते, त्याप्रमाणेंच, कांहीं शत्रूहि उत्पन्न झाले होते. ह्या शत्रूंनीं केवळ स्वार्थासाठीं मॅकफेडन यांच्यावर वर सांगितल्याप्रमाणें कधींहि उपयोगांत आणल्या न जाणाऱ्या कायद्याचें संकट आणलें. ह्या खटल्यांत न्याय मिळविण्याकरतां, मॅकफेडन यांनां बरीच खटपट आणि खर्च करावा लागला. शेवटीं खुद्द प्रेसिडेंट टॅफ्ट यांच्या मध्यस्थीनें मॅकफेडन हे सर्वस्वीं निर्दोषी ठरले. ह्या नवीन खटल्यांत त्यांनां त्यांनीं आतांपर्यंत मिळविलेले सर्व पैसे खर्च करावे लागल्याकारणानें, नवीन आरोग्यदायक वसाहत स्थापण्याचा त्यांचा बेत तसाच मागें पडला.

आतांपर्यंत मॅकफेडन यांनीं आपल्या व्यायामशास्त्राचा उपयोग लोकांच्या शरीरवर्धनाकडेच केला होता; परंतु व्यायामशास्त्राचें त्यांनां खरें रहस्य समजल्यानें, त्यांनीं त्या शास्त्राचा उपयोग रोगनिवारणाकडे करण्यास सुरुवात केली. व्यायामशास्त्राच्या विद्यार्थ्यास कायमचे निरोगी होऊन रोग होण्याची कधींच वेळ येणार नाहीं, असा त्यांचा दृढ समज असे, व रोगी मनुष्यानेंहि व्यायामशास्त्राचे नियम पाळल्यास त्याचे सर्व रोग केवळ नैसर्गिक राहणीनें व व्यायामानें औषधें घेतल्यावांचून बरे करतां येतात, हें दाखविण्याकरतां मॅकफेडन यांनीं चिकागो शहरीं एक मोठें आरोग्यालय स्थापन केलें. या आरोग्यालयास 'Bernar Macfedan Healthatorium' असें नांव दिलें आहे. येथें तीनशेंपासून चारशें रोग्यांची एकदम रहाण्याची व्यवस्था केली आहे. ह्या आरोग्यालयांत पुष्कळ असाध्य म्हणून मानलेले रोगी औषधावांचून बरे केले गेले आहेत.

व्यायामशास्त्राचा अभ्यास करणारा विद्यार्थी रोगापासून कायमचा मुक्त झाला पाहिजे, ह्याच तत्त्वावर मॅकफेडन यांच्या व्यायामशास्त्र अथवा शरीरवर्धन विद्या यांची उभारणी झाली आहे. या आरोग्यालयाची सर्व व्यवस्था मॅकफेडन यांच्या देखरेखीखाली चालते; परंतु इतर महत्त्वाच्या व्यवसायांमुळें त्यांनां नेहमीं या आरोग्यालयांत राहतां येत नाहीं. या कारणामुळें हें आरोग्यालय सध्यां मॅकफेडन यांच्या तालमींत वाढलेल्या इतर मंडळीकडून चालविलें जातें, व मॅकफेडन हे व्यायामशास्त्राचा सर्व जगांत प्रसार करण्याकरतां केल्या जाणाऱ्या चळवळींत आपलें सर्व लक्ष घालींत असतात. आपलें मासिक व्यायामशास्त्राचा आदर्श करणें, व्यायामशास्त्राच्या प्रचारार्थ लहानमोठीं पुस्तकें छापून लोकांत खऱ्या आरोग्यदायक ज्ञानाचा प्रसार करणें, व अमेरिकेंतील सर्व मोठमोठ्या शहरीं व्यायामशास्त्रावर व्याख्यानें देत हिंडणें, अशा उपयुक्त गोष्टी करण्यांत मॅकफेडन आपलें शरीर, मन, आणि धन ह्यांचा अत्यंत कळकळीनें व्यय करीत असतात. मॅकफेडन यांनीं शरीरवर्धन व व्यायामशास्त्र या विषयावर पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत; परंतु सध्यां त्यांनीं 'Encyclopedia of Physical Culture' या नांवाखालीं चार मोठीं पुस्तकें प्रसिद्ध करून सर्व जगावर अत्यंत उपकार करून ठेवले आहेत. ह्या ग्रंथांत व्यायामशास्त्रासंबंधी आजपर्यंत उपलब्ध असलेली सर्व माहिती असून, शिवाय सर्व रोग अगदीं कमी खर्चांत घरच्याघरीं केवळ नैसर्गिक उपायांनीं औषधावांचून कसे बरे करावे, ह्यासंबंधी अत्यंत व्यवहारिक माहिती स्वानुभव देऊन प्रसिद्ध केली आहे. हे मॅकफेडन यांचे चारहि ग्रंथ कोणत्याहि सार्वजनिक लायब्ररींत ठेवण्यालायक असून त्यांची किंमतहि फार नसल्यानें, मध्यम स्थितींतील मनुष्यासहि ह्या पुस्तकांचा फायदा घेतां येण्यासारखा आहे. मॅकफेडन हे व्यायामशास्त्राचे चालतेबोलते आदर्श आहेत, व ज्या गोष्टींचा आधीं स्वतः अनुभव घेऊन पाहिला नाहीं अशी एकहि गोष्ट मॅकफेडन यांनीं आपल्या पुस्तकांत प्रसिद्ध केली नाहीं, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

बरनार मॅकफेडन यांनीं अमेरिकेंत आरोग्यवर्धनाकरतां जी पवित्र मोहिम चालविली आहे, तिचा रॉस मुख्यत्वेंकरून खालीं लिहिलेल्या गोष्टींवर आहे:-

(१) प्रत्येक मनुष्यानें रोगमुक्त होण्याकरतां, नैसर्गिक नियमांचेंच अवलंबन केलें पाहिजे. रोगमुक्त होण्यास औषधें घेत गेल्यानें सर्व मानवजातीस दिवसेंदिवस अनेक रोग जडत चालले आहेत, व या गोष्टीनेंच मानवजातीची अवनति होत चालली आहे.

(२) समाजाची सुधारणा व्यक्तीच्या सुधारणेवर अवलंबून आहे, व व्यक्तीची सुधारणा व्यायामशास्त्राच्या आरोग्यदायक नियमानें चालण्यावरच अवलंबून आहे. ह्यासाठीं व्यायामशास्त्र व शरीरवर्धन या गोष्टींच्या शिक्षणाचा समावेश प्राथमिक शिक्षणांत करून, हें आरोग्यदायक शिक्षण प्रत्येक व्यक्तीस देणें, हें राष्ट्राचें त्याप्रमाणेंच समाजाचें एक कर्तव्य आहे. आपलें शरीर सुदृढ कसें ठेवावें, निरोगी कसें रहावें, यासंबंधी शिक्षण व्यक्तीस अगोदर न देतां दुसरें शिक्षण दिल्यास, सुधारणेचा पाया घातल्यावांचून सुधारणेची इमारत

बांधण्यासारखें होणार आहे. व्यायामशास्त्र व आरोग्यवर्धनाचें शिक्षण हें सर्व शिक्षणाचा पाया होय, व हें शिक्षण मिळविण्याचा व्यक्तिमात्राचा जन्मसिद्ध हक्क आहे.

(३) समाजांतील दारूसारखी अनेक व्यसनें काढून टाकण्यास, आरोग्यदायक सात्त्विक अन्नापासून काय फायदे होतात ह्या संबंधाच्या ज्ञानाचा लोकांत प्रसार झाला पाहिजे. मानवजातीनें नैसर्गिक अन्न खावयाचें सोडल्यानें, व आपल्या आहारांत मांसादिक अनेक उत्तेजक अन्नांचा समावेश केल्यानेंच, दारूसारखीं व्यसनें समाजास जडत आहेत. दारू हें व्यसन कार्य आहे; ह्याच्या कारणांचें ज्ञान करून घेऊन, ही कारणेंच काढून टाकलीं असतां, कार्य आपोआप निघून जाईल. अन्नशास्त्राच्या रासायनिक दृष्ट्या अभ्यासास सुरुवात झाली पाहिजे, व इतर अनेक भौतिक व आधिभौतिक शास्त्रांप्रमाणें अन्नशास्त्राचें महत्त्व असून, त्या शास्त्राकडे कानाडोळा करणें म्हणजे आपलें आपण नुकसान करून घेण्यासारखें आहे.

(४) देवी, प्लेग इत्यादि रोगांची लस अगदीं कमी प्रमाणांत देखील आपल्या शरीरांत टोंचून घेतल्यानें, त्या रोगापासून आपला कायमचा बचाव होणें शक्य नाहीं. **नैसर्गिक नियमानें राहून आपल्या आरोग्याची वृद्धि करून, आपणा स्वतःस शक्तीचे व सामर्थ्याचे आदर्श करूनच, आपणांस कायमचें रोगमुक्त होतां येईल.** सहज स्थितींत राहणारा मानव प्राणि व जनावरें ह्यांनां ह्या रोगांपासून मुळींच भय नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. औषधें घेऊन किंवा रोगाचीं विषें शरीरांत अगदीं कमी प्रमाणांत टोंचून घेऊन, रोगमुक्त कधींच होतां येणार नाहीं. **रोग मुक्त होण्यास नैसर्गिक नियमानें राहून आरोग्यवर्धन करीत राहणें हाच एक उपाय आहे.**

वर थोडक्यांत सांगितलेल्या चार तत्त्वांबर मॅकफेडन यांनीं व जगांतील सर्व भागांत असणाऱ्या त्यांच्या एक लक्ष अनुयायांनीं रोग, दुःख व शारीरिक दुर्बलता, यांवर पवित्र मोहिम चालविली आहे, ही अत्यंत शुभ आशा उत्पन्न करणारी गोष्ट आहे, असें कोण ह्मणणार नाहीं ? मॅकफेडन ह्यांचें नांव व त्यांची कामगिरी, जगांतील सर्व सुधारलेल्या भागांत ठाऊक आहे. त्यांचें 'Physical Culture' हें मासिक पुस्तक आपल्या देशांतील प्रत्येक तालमींत, खेळण्याच्या क्लबांत, लायब्ररींत, व प्रागतिक डाक्टरानें अवश्य मागविण्यासारखें आहे. आपल्या देशांत बरेच नांवाजलेले मल्ल आहेत, परंतु व्यायामशास्त्राची शास्त्रीय पायावर उभारणी न झाल्यानें, सुशिक्षित लोकांत या शास्त्राचा प्रसार बराच कमी आहे. ही उणीव, मॅकफेडन यांचें आरोग्यदायक तत्त्वज्ञान लवकरच भरून काढील, अशी आशा आहे.

मॅकफेडन यांचा अमेरिकेंतील पत्ता पुढील प्रमाणें:-

Physical Culture Publishing Company, Flatirm Building, New York, N. Y., U. S. A.

या मासिकाचा नमुन्याचा अंक मागविल्यास फुकट मिळतो.

ओढ.

अनंत अवकाशीं-उंच भरारी खाशी-घेऊंद्या मजला !
कठोर कांद्यांत-कुचंबणें दैवांत-कीटकवृत्तीस !
झाडुनी मातीला-आकळण्या ज्योतीला-उसळुंद्या मजला !
सुटल्याविण 'माझें'-चुकतें कसलें ओझें-पुढती अंधेर !
दृढपण स्वार्थाचें-ज्योती मालविण्याचें-फेकूंद्या दूर !
उधळुन अवकाशीं-टाकिन मागें राशी-प्रचंड कनकाच्या !
रसाळ स्तुतिपत्रें-इतरांची नक्षत्रें-भिरकाविन दूर !
मग अरांतुनी-रवि चक्रांच्या झडतां-दिसतील स्फुलिंग !
नव कलिकांचे-शाप भाजिती कोणा-भयाण तेंहि दिसे !
यावरि वृत्तींची-खळखळ उरते कैंची-आंतिल हें दिसतां !
मग शाळूचीं-शेतें भर सौख्याचीं-सहजपणें पिकती !
आंतरज्योतीला-ओढ लागली उचला-करवा भेट कुणी !
क्षणैक आकाशीं-उंच भरारी खाशी-झोकूंद्या मजला !

तीन महत्त्वाचे प्रश्न.

लेखक—श्रीयुत विश्वनाथ नारायण देव.

विवेकबुद्धि नांवाचा एक राजा होता. त्यानें अजाणतेपणीं एका गृहस्थास देहांत प्रायश्चित्त दिलें. राजाला जेव्हां आपली चूक कळली, तेव्हां त्याला फार अनुताप झाला. अशा चुका वारंवार होऊं नये यासाठीं काय करावें, याचा त्यानें पुष्कळ विचार केला; पण त्याला कांहीं उपाय सुचेना. शेवटीं त्याला वाटलें कीं, (१) प्रत्येक कार्य करावयास योग्य वेळ कोणती? (२) कोणाचीं सल्लामसलत ऐकावी व कोणाचीं ऐकूं नये? आणि (३) सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती? या तीन प्रश्नांचीं उत्तरें जर आपणास मिळालीं, तर आपला हेतु बराच सिद्धीला जाईल. व आपण जें जें कार्य हातीं घेऊं त्यांत आपल्याला हटकून यश येईल. हा विचार मनांत येतांच त्यानें आपल्या सर्व राज्यांत द्वाही फिरविली कीं, जो कोणी मनुष्य (१) प्रत्येक कार्य हातीं घ्यावयास योग्य वेळ कोणती? (२) अत्यंत आवश्यक व उपयुक्त लोक कोणते? आणि (३) सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती? या तीन प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें देईल, त्याला फार मोठें पारितोषक दिलें जाईल.

ही वार्ता चोहोंकडे प्रसार पावतांच विवेकबुद्धीच्या राजधानींत विद्वान लोक येऊं लागले. राजा त्यांचीं उत्तरें ऐकूं लागला. प्रत्येक मनुष्य या प्रश्नांचीं उत्तरें निरनिराळ्या तऱ्हेनें देई. त्यांत कोणाचा कशालाच मेळ बसेना. पहिल्या प्रश्नाचें उत्तर देतांना एक पंडित ह्मणाले "प्रत्येक कार्य हातीं घ्यावयास योग्य वेळ कळावयाची तर महिन्याचें अथवा वर्षाचें—जसा प्रसंग असेल तसें—वेळापत्रक तयार करावें. त्या वेळापत्रकांत कोणच्या वेळीं कोणचें कार्य करावयाचें, हें लिहून ठेवावें, व त्याप्रमाणें वागावें. याप्रयाणें आचरण केलें, ह्मणजे योग्य वेळीं प्रत्येक कार्य केलें असें होईल."

दुसरे पंडित ह्मणाले "प्रत्येक कार्याची योग्य वेळ आधीं ठरविणें अशक्य आहे; पण आपण आळसांत वेळ दवडूं नये असें वाटत असेल तर चोहोंकडे लक्ष पुरवावें, व नंतर सर्वांत अवश्य असें जें विचारांतीं वाटेल तें कार्य करावें."

तिसरे पंडित ह्मणाले "आपल्या राज्यांत जे जे कांहीं प्रकार चालले आहेत तिकडे राजानें कितीहि लक्ष पुरविलें, तरी एका मनुष्यास प्रत्येक कार्य करावयाची योग्य संधी कोणची, हें कळणें अशक्य आहे. ह्मणून त्यानें शहाण्या लोकांची सभा भरवींत जावी. ही सभा त्याला योग्य वेळ कोणची हें सांगत जाईल. पुनः अशा गोष्टी कांहीं असतात कीं, त्या सभेपुढें आणतां येत नाहींत, व त्यावरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, त्या गोष्टी करणें तर आवश्यक असतें. अर्थात्, हें कार्य करावयाच्या आधीं, पुढें काय होणार हेंहि त्याला कळलें पाहिजे, व हें कळावयास महाराजास ज्योतिषी लोकांचें साह्य घेतलें पाहिजे. ह्मणून योग्य कार्य करावयास योग्य वेळ कोणती हें कळावयास महाराजांनीं ज्योतिषी ठेवावेत."

दुसऱ्या प्रश्नावर अशीच निरनिराळी उत्तरें मिळालीं. एक ह्मणाला "अत्यंत उपयुक्त लोक ह्मणजे शहाणे सभासद होत."

दुसरा ह्मणाला "भटजीलोक किंवा धर्मोपदेशक हे अत्यंत उपयुक्त असतात."

तिसरा ह्मणाला "मांत्रिक लोक उपयुक्त असतात."

चवथ्यानें उत्तर केलें "योद्धे सर्वांत उपयुक्त होत."

तिसऱ्या प्रश्नाचीहि हीच तऱ्हा. एक ह्मणाला "सर्वांत महत्त्वाची गोष्ट ह्मणजे पदार्थविज्ञानशास्त्राचा अभ्यास होय."

दुसरा ह्मणाला "युद्धकौशल्य"

"देवावर अभिषेक चालू करावे, पूजा चालवाव्यात, अनुष्ठानें बसवावींत, दक्षिणा वांटाव्यात," असें तिसऱ्यानें सांगितलें व चवथ्यानें तर "मांत्रिक व्हावें, ह्मणजे मंत्राच्यायोगानें वाटेल तें साध्य करतां येईल," अशी सल्ला दिली.

राजानें हीं सर्व उत्तरें ऐकलीं, पण त्यापासून त्याचें मुळींच समाधान झालें नाहीं. ह्मणून त्यानें कोणासच पारितोषक दिलें नाहीं. याप्रमाणें राजानें पंडित लोकांची रवानगी केली खरी, पण आपल्या प्रश्नांचीं उत्तरें जाणण्याची त्याची जिज्ञासा तिळमात्र कमी झाली नाहीं. त्याच्या राजधानीजवळ एक महान् तपस्वी रहात असे. त्याच्या निरिच्छपणाची व शहाणपणाची दूरवर ख्याति पसरली होती. हा तपस्वी कदाचित् आपल्या प्रश्नांचीं उत्तरें बहुतेक देईल असें राजास वाटल्याकारणानें त्यानें त्याच्याकडे जाण्याचें ठरविलें.

हा तपस्वी राजधानीपासून चार योजनांवर एक दाट अरण्य होतें त्यांत रहात होता. तेथून त्यानें आपलें प्रस्थान कोणच्याहि कारणानें केव्हांहि हालविलें नाहीं. तो साधारण लोकांशिवाय इतर लोकांशीं कधीं भाषण करीत नसे. ह्मणून राजानें दहाजणांसारखे कपडे घालून दहावारा स्वारांसह त्याच्याकडे प्रयाण केलें. त्याचा आश्रम जसा दिसूं लागला, तसे राजानें आपले लोक मागें ठेविले व आपण पायींच त्याच्या आश्रमाकडे जावयास निघाला.

राजा तेथें जाऊन पहातो तों तपस्वी आश्रमाबाहेर जमीन खणीत होता. राजानें त्याला प्रणिपात करतांच तपस्व्यानें त्याला आशीर्वाद दिला, पण हातांतील खोरें खालीं ठेविलें नाहीं; त्याचें काम चालूच होतें. तपस्वी फारच अशक्त होता. त्यानें जेव्हां मोठ्यानें खोरें जमीनीवर हाणावें तेव्हां कोठें थोडीशी माती निघे. प्रत्येक हात मारतांना त्यानें दम घ्यावा, तेव्हां कोठें त्याला दुसऱ्यांदा तें खोरें हाणतां येई. राजा त्याच्यासन्निध गेला व त्याला ह्मणाला "साधुमहाराज ! मी आपल्याकडे कांहीं प्रश्न विचारण्यास आलों आहें, तर आपण त्यांचीं उत्तरें देण्याचा अनुग्रह करावा."

तपस्व्यानें राजाचें समग्र भाषण ऐकून घेतलें, पण तोंडांतून चकारशब्द काढला नाहीं. पुनः पूर्ववत् त्यानें खणावयास प्रारंभ केला. त्या अशक्त तपस्व्याला खणतांना पाहून राजाला त्याची दया आली. तो ह्मणाला " आपण या खणण्याच्या परिश्रमानें कसे श्रांत झालेले दिसतां. तर कृपा करून मला जरा तें खोरें द्या, मी कांहीं वेळ खणतों. "

" तुझे हे मजवर महदुपकार आहेत, हें घे खोरें !" असें ह्मणून त्यानें राजास खोरें दिलें व आपण जवळ जमीनीवर बसला.

राजानें कांहीं वेळ खणलें व आपलें काम थांबवून त्याला पुनः ते प्रश्न विचारले. तपस्व्यानें प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें टाळून तो उठला आणि खोरें मागावयासाठीं राजाकडे हात करून ह्मणाला "आता तूं जरा विश्रांती घे, व मला जरा आपलें काम करूंदे. तूं बराच दमलेला दिसतोस. "

राजानें त्याला खोरें न देतां आपलें काम पुनः सुरू केलें. एक घटका, दोन घटका असा वेळ जाऊं लागला. सूर्य क्षितिजासमीप जाऊन पोहोंचला. शेवटी राजानें खोरें जमीनीतच रोंवलेलें ठेविलें व म्हटलें " महाराज, मी आपल्याकडे प्रश्नांचीं उत्तरें मागावयास आलों आहें. आपणाला जर त्यांचीं उत्तरें देतां येत नसलीं तर तसें कळवा, ह्मणजे मी घरी जातों. "

इतक्यांत तपस्वी म्हणाला "हा इकडे कोण पळत येत आहे पहा ! चला, तो कोण आहे हें आपण पाहूं या."

राजानें मागें वळून पाहिलें, तों त्याला दिसलें, कीं, झाडीतून एक दाढीवाला गृहस्थ पोटास हात लावून आपणाकडे धूम पळत येत आहे, व त्याच्या पोटांतून रक्तस्राव सारखा चालला आहे. तो जसा राजाजवळ आला, तसा घेरी येऊन त्याच्या पायाशीं कुंथत कुंथत पडला. राजानें व त्या तपस्व्यानें त्याच्या अंगांतले कपडे काढिले. पहातात तों त्याच्या पोटांत मोठी जखम झालेली. राजानें ती अत्यंत काळजीपूर्वक धुऊन काढली आणि ती आपल्या शेल्यानें पुसली. तथापि तींतून रक्तस्राव कांहीं बंद होईना. राजानें त्या रक्तानें भिजलेलीं फडकीं वारंवार काढलीं आणि जखम बांधली. सरतेशेवटीं रक्तस्राव थांबला व तो मनुष्यहि शुद्धीवर आला. शुद्धीवर येतांच प्रथम तो ' पाणी ' असें म्हणाला. राजानें लागलेंच त्याच्यासाठीं स्वच्छ पाणी आणलें, व हळुहळू त्याच्या तोंडांत घातलें.

इतक्यांत सूर्य मावळला आणि गार व मंद वारा वाहूं लागला. तो त्याचे जखमेस लागूं नये ह्मणून त्या दोघांनीं त्याला आश्रमांत नेलें आणि तेथील एका दर्भासनावर निजविलें. तेथें पडतांच त्या गृहस्थाला गाढ झोंप लागली. राजालाहि दिवसभराच्या यकव्यामुळें निजावेंसें वाटत होतें. तो तेथेंच पाय पसरून निजला व लवकरच गाढ झोंपीं गेला. सकाळीं उठला तेव्हां त्याला वाटलें, आपण आपल्या राजवाड्यांतच निजलों आहों. आपण कोठें आहों, व आपणाकडे सारखा पहात असलेला तो समोर निजलेला दाढीवाला

कोण आहे, हें कळावयास त्याला बराच वेळ लागला. राजा त्या गृहस्थाकडे निरखून पहात असतां तो राजाला खोल आवाजांत म्हणाला "महाराज, मला क्षमा करा!"

" तुम्हाला कशाची क्षमा करावयाची? तुम्ही माझा अपराध थोडाच केला आहे? मग क्षमा कशाची मागतां?"

"महाराज, आपण मला ओळखलें नाही. मी आपला शत्रू आ-होतों. आपण माझ्या भावाला देहांत शिक्षा केली, ह्मणून मी आपला सूड घेणार होतों. मी आपल्या पाळतीवर तेव्हांपासून होतों; पण मला चांगलीशी संधीच मिळाली नाहीं. आपण या तपस्व्यास भेटावयास एकटे आलांत हें मला माहित होतें. आपण येथून परत जातांना मी आपणास ठार मारणार होतों. यासाठींच मी येथील झाडींत लपून बसलों होतों. दिवस मावळावयास आला, तरी आपण कां परत येत नाहीं, हें पहावयास मी इकडे आलों. इतक्यांत आपल्या सेवकांची माझ्यावर दृष्टि गेली. त्यांनीं मला ओळखिलें आणि माझा दुष्ट हेतू ताडून मजवर चाल केली. तींत मी जखमी झालों. त्यांच्या हातून एकदाचा निसटून इकडे पळत आलों व आपल्या पायापाशीं मूर्च्छा येऊन पडलों. आपण मला जीवदान दिलेंत. नाहीं तर मला कालच इहलोक सोडावा लागता! पण मजवरचा तो प्रसंग टळला. आतां, आपली परवानगी असली तर आपल्या सेवेंत हा देह झिजवावा इतकेंच नव्हे, तर मुलांनांहि तेंच करावयास लावावें, अशी माझी उत्कट इच्छा आहे. झालेल्या अपराधांची क्षमा असावी, महाराज."

इतक्या लौकर व सुलभ रीतीनें आपल्या शत्रूशीं साह्य करतां येतें हें पाहून राजाला परमानंद झाला. त्यानें त्याला नुसतीच क्षमा केली नाहीं, तर त्याच्या मदतीस कांहीं सेवक देऊन त्याच्या औषधपाण्याचीहि व्यवस्था केली.

यावेळीं तपस्वी बाहेरच्या बाजूस होता. तो आदल्या दिवशीं खणलेल्या भूमींत विया पेरीत होता. तो आपलें काम गुडघे जमीनीवर टेंकून करीत असतां राजा त्याच्याकडे आला, व त्यानें त्याला आपल्या प्रश्नांची पुनः विनंति केली. राजा म्हणाला " महाराज, मी आतां आपल्याला माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याबद्दल शेवटचीच विनंती करतों."

त्यानें रांगत रांगत पण राजाकडे पहात उत्तर केलें "तुझ्या प्रश्नांचीं उत्तरें तुला पूर्वीच मिळालीं आहेत!"

" आपल्या ह्मणण्याचा मला भावार्थ कळला नाहीं! माझ्या प्रश्नांचीं मला केव्हां उत्तरें मिळालीं तें कृपाकरून सांगावें. " राजा ह्मणाला.


"अरे, तुला नाहींका उमजत, कीं, माझ्या अशक्ततेची तुला दया न येती व तूं आल्या वाटेनें परत गेला असतास, तर त्या दाढीवाल्या गृहस्थानें तुला ठार केलें असतें!"

" होय, केलें असतें! " राजा ह्मणाला.


" त्यावेळीं-मृत्युसमयीं-'मी त्या तपस्व्याला मदत केली नाहीं. इतकें करावयाचें राहिलें!' असा विचार तुझ्या मनांत येऊन तुला त्या समयीं पश्चात्ताप झाला असता, नाहीं काय?"

" होय, झाला असता. "

" ह्मणून या प्रकरणांत अत्यंत महत्त्वाची ही गोष्ट होती कीं, माझी दया येऊन ज्यावेळीं तूं माझ्या हातांतलें खोरें घेतलेंस, व काम करावयास प्रारंभ केलास, त्यावेळीं मी सर्वांत महत्त्वाचा मनुष्य होतों, आणि मला साह्य करणें ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट होती! पुढें ज्यावेळीं तो मनुष्य आपणाकडे पळत आला, तेव्हां सर्वांत महत्त्वाची वेळ ह्मणजे ज्यावेळीं तूं त्याला मदत करीत होतास ती! त्या प्रसंगीं जर तूं त्याच्या जखमा बांधल्या नसत्यास, तर तो तुझ्याशीं सख्य न करितांच मेला असता व कदाचित् तो जर न मरता, तर तो व त्याची मंडळी तुझें आज शत्रुत्वच करिते. ह्मणून, ज्या वेळीं तूं त्याची शुश्रूषा करीत होतास, ती सर्वांत महत्त्वाची वेळ, तो सर्वांत महत्त्वाचा मनुष्य, व त्याची शुश्रूषा करणें हें तुझें अत्यंत महत्त्वाचें-आदिकर्तव्य-होतें! तर आतां लक्षांत ठेव. एकच वेळ अत्यंत उपयोगी व महत्त्वाची आहे, व ती **'आतां'** ही होय! ही सर्वांत महत्त्वाची वेळ-याचें कारण असें आहे कीं, एकदां ती वेळ निघून गेली-एकदां **'आतां'** गेला-ह्मणजे ती पुनः येत नसते! भूतकाळावर कोणालाहि आपला अधिकार चालवितां येत नसल्यानें, गेलेला काळ कालत्रयीं पुनः आणतां येत नाहीं! ह्मणून त्याचें महत्त्व फार आहे. सर्वांत महत्त्वाचा व उपयोगी मनुष्य तोच कीं, जो तुमच्यावरोबर असतो. कारण, आपणाला दुसऱ्या कोणाशीं काम पडेल किंवा नाहीं, हें कळत नाहीं. आणि सर्वांत महत्त्वाचें कर्तव्य ह्मणजे त्याचें कल्याण करणें हें होय. कारण, त्यासाठींच आपणाला मनुष्य-जन्म मिळाला आहे. "



हिंदुस्थानची औद्योगिक उन्नति.



—लेखक—
श्रीयुत दत्तात्रय वासुदेव निमकर.

निरनिराळ्या राष्ट्रांच्या सांपत्तिक व औद्योगिक प्रगतीचें मूळ तेथील लोकांच्या मानसिक वृत्तीवर नेहमीं अवलंबून असतें. तेथूनच त्याचा उगम असतो. ही वृत्ति शरीराकडून निरनिराळीं कामें करून घेत असते. ही वृत्ति नेहमीं प्रगतिपर असावयास लागते. ह्या वृत्तीला ऐहिक मानमरातब, सुखलालसा, द्रव्यसंचयादि आवडींची गोडी असली ह्मणजे ती मानवी शक्तीला प्रबळ करून तिजकडून अचाट व आश्चर्यमूढ बनविणारीं कामें करून घेत असते. समशेरीची आवड असणारास ती समशेरबहादूर बनविते, राज्यविस्ताराची गोडी असणारास चक्रवर्ति राजा बनविते व द्रव्योपार्जनाची चटक असणारास नवकोट नारायण बनविते!

हें ऐहिक गोष्टींसंबंधानें झालें. पारमार्थिक गोष्टींसंबंधानें पाहतां, ईश्वरभक्तीची आवड असणारास ईश्वरभक्त, परोपकाराची गोडी असणारास परोपकारी, व संसार असार समजणारास विरक्त बनविते. एवंच काय, तर मनुष्याची मानसिक वृत्ति–इच्छा हीच सर्व तऱ्हेच्या प्रगतींत प्रमुखत्वानें वावरत असते. अखिल जगाचें चालकत्व, सर्व मानवीकृतींचें सूत्रधारत्व हिच्याकडेच असतें. उत्कट इच्छा असल्यावर तिच्या सावलीप्रमाणें वावरणारी कर्तृत्वशक्तिहि आपोआप येत असते. एका थोर हिंदी पुरुषाच्या **'नर करणी करे तो नरका नारायण होय'** व (necessity is the mother of invention)—'शोधाची माता गरज' वगैरे दाखल्यांतील सार हेंच होय.

ह्या दृष्टीनें पाहतां हल्ली गोष्टींपासून सुख प्राप्त करून घेण्याची पाश्चात्यांची मनीषा प्रबल असल्यामुळें राजकीय, औद्योगिक वगैरे बाबतींत त्यांचें पाऊल सारखें पुढें पडत आहे, व आह्मां पौर्वात्यांची-हिंदुस्थानची हल्ली गोष्टी क्षणभंगुर असून त्यांपासून सुखाऐवजी क्लेश व दुःख मात्र मिळतें ह्या दृढ समजुतीनें राजकीय, औद्योगिक वगैरे बाबींत सारखी पिछेहाट होत असून आधिभौतिक उन्नतीस विरोध करणाऱ्या निवृत्तीमार्गांत आह्मीं आपली उन्नति करून घेतली आहे. ही आमची पारमार्थिक उन्नति कित्येकांनां श्रेयस्कर वाटत असेल; परंतु समाज व राष्ट्र (यांतील व्यक्तिविषयक घटकावयव जरी क्षणभंगुर आहेत तरी त्यांतच कर्तव्यगारीनें जीवनमात्रा कंठावयाची असल्यामुळें) यांच्या हिताकडे पाहतां ही उन्नति एकांगी असून श्रेयस्कर व सुखकर होण्याऐवजी अनिष्ट व त्रासदायक होत आहे.

एके काळीं येथें तयार होणाऱ्या कापड, साखर, लोखंड वगैरे हजारों जिन्नसांसाठीं बाहेरच्या लोकांनां हिंदुस्थानाकडे यावयास लागत असे, तर आज येथील लोकांनां, तयार करण्याचीं सर्व ईश्वरीसाधनें अनुकूल असतांना कर्तृत्वशक्त्याभावीं,वरील पदार्थांसाठीं बाहेरच्या देशांकडे तोंड पसरावयास लागत आहे. ह्या स्थितीचीं जरी अनेक कारणें असलीं, तरी लोकांची कर्तृत्वशक्ति नष्ट करणारी, व आहे त्यांत समाधान मानून राहण्याची वरील तऱ्हेची त्यांची धर्मसमजूत हें मुख्य व प्रधान कारण होय.

प्राचीनकाळीं हिंदुस्थानांत समाजाची स्थिति सुस्थितिमय प्रगतिकारक असावी ह्मणून ज्या पहिल्या चार वर्णव्यवस्था अमलांत आणल्या होत्या त्यांतील पहिल्या तीन (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य) वर्णांचे लोक एकाच आर्यवर्गातील असून ते सर्व एकाच दर्जाचे लेखले जात असत; परंतु कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडून वरील तीन वर्णांतसुद्धां कमी अधिक पवित्रतेचा दर्जा मानण्यांत येऊं लागून, सर्वांत श्रेष्ठ ब्राह्मण, त्यांचे खालीं क्षत्रिय, व नंतर वैश्य, अशा पायऱ्या लागल्या व राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीचा भार असलेल्या वैश्यवृत्तीस त्यांतील कनिष्ठ. राष्ट्रास स्थिरता देऊन त्याच्या संरक्षणाची जबाबदारी असणाऱ्या क्षत्रियांस दुसरी, व ब्रह्मविद्या (जी त्याकाळीं निवृत्तिमार्गपर झाली होती) जाणणाऱ्या

ब्राह्मणास सर्वांत श्रेष्ठ व पहिली जागा मिळून आधिभौतिक मार्गापासून हिंदुस्थान पारमार्थिक मार्गाकडे खेंचले गेले. राष्ट्राच्या संपत्तीस, तलवारीस व वेदमंत्रांस सारखीच थोरवी देणाऱ्या विचारीपणाचें स्थित्यंतर एकाच विशिष्ट वृत्तीस जास्ती महत्त्व देणाऱ्या अविचारीपणांत झालें, व ह्या वेळेपासूनच हिंदुस्थानच्या अवनतीस प्रारंभ झाला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

समाजधुरीणत्वाचें काम ब्राह्मणवर्णाकडे आल्यानंतर त्यांचा समाजांतील दर्जा श्रेष्ठ होऊन राष्ट्रांतील सर्व विचार न कर्तृत्वशक्ति हीं निवृत्तिमार्गाच्या खोल डोहांत गटंगळ्या खाऊं लागलीं. त्यांच्या उपदेशानें कारागीर वर्गांतील व वैश्यवृत्तींतील लोकांची आधिभौतिक प्रगति बुजावयास लागली. त्यांचें आपल्या धंद्यावरील प्रेम कमी व्हावयास लागलें, व शरीररक्षणापुर्तीच मालाची उपज व्हावयास लागून जास्ती उपजेनें फुगणाऱ्या मालाच्या सांठ्यास परराष्ट्रीय गिऱ्हाईक पाहण्याची जरूर राहिली नाहीं. आपल्या आवडीप्रमाणें वर्णांतर करणें जनतेस अशक्य झाल्यामुळें ब्राह्मणत्वाची आवड नसणारांस ब्राह्मणत्व, क्षत्रियत्वाची आवड नसणाऱ्यांस क्षत्रियत्व, वैश्यवृत्तीची आवड नसणारांस वैश्यत्व व कृषीकर्माची गोडी नसणारांस शेतकी अदृश्य जुलमानें स्वीकारावी लागली, व ह्या कारणानें स्वैरसंचार करावयास न मिळाल्यानें राष्ट्रांतील बुद्धीचा व्हावा तसा विकास न होऊन बोटावर मोजण्या इतकेच बुद्धिवैभवाचे दाखले दृष्टीस पडावयास लागले, आणि पुराणप्रियता वाढली. धंदेविषयक जातींची चाल प्रचारांत आल्यामुळें धंदा व कारागिरी पिढीजाद होऊन बसली. लिहितांवाचतां येण्याचें काम शिक्षणविशिष्ट लोकांकडे–बहुधा ब्राह्मण व कायस्थ वर्गांकडे–गेल्यामुळें देशांतील कारागीर व कसबी लोक अशिक्षित राहून प्राचीन ग्रंथावलोकनानें आपल्या विचारशक्तीस चलन देण्याचें त्यांना दुर्घट झालें. कारागिरांचा अशिक्षितपणा, कारागिरीचें पिढीजादस्वरूप, त्यांची प्रगतीविषयीं अनास्था, याला पुराणप्रियतेची जोड मिळाल्यावर कारागीर वर्गाची व त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या व्यापारी वर्गांची उन्नति कशी व्हावी ? त्या कालीं परदेशगमनाच्या मजावाचें स्वरूप फार तीव्रतर असल्यामुळें येथील व्यापारी वर्गाची धाडशी वृत्ति लोपून जाऊन परदेशीय व्यापाराच्या हिकमती वगैरेबद्दल इकडील व्यापारी वर्ग नेहमीं कोरडाच राहिला. आपल्या मालास तिकडील पेठांत मागणी व भाव कसा असतो हें समजण्याचें खास साधन नव्हतें. परकीय लोक देतील ती किंमत घेऊन त्यांनां स्वस्थ बसावें लागत असे.

परदेशाशीं होणारा व्यापार समुद्रकांठच्या बंदरांतून चालत असे, परंतु ह्या बंदरांस राजकीयदृष्ट्या महत्त्व नसे. राज्याचे राजधानीस तें महत्व असे व ह्या राजधान्या बहुतेक समुद्रकांठापासून लांब अशाच असत. त्यांचे आसपास कुशल कारागिरांची वस्ती असे, व तेथील माल राजधानीच्या शहरी विकावयास येत असून देशांतल्यादेशांतच त्याचा खप होत असल्यामुळें त्यांनां परराष्ट्रचें गिऱ्हाईक मिळत नसे. मालाचें स्थलांतर करण्याचीं साधनें सोईस्कर नसून रस्त्याची सुरक्षितता नसल्याकारणानें परराष्ट्रीय व्यापारी, देशाच्या आंत माल खरेदी करण्यास येत नसत. ह्यामुळें चांगल्या मालास परराष्ट्रचें गिऱ्हाईक मिळून तिकडील संपत्तीचा ओघ आपल्या राष्ट्राकडे वळून कुशल कारागिरांस दुहेरी गिऱ्हाईक मिळण्यानें व्हावी तशी मालाची उपज झपाटयानें न होतां कारागिरीची भरभराट वाढत नव्हती.

राजकीय विजयांमुळें उसळणाऱ्या ताज्या रक्ताच्या मुसलमानांचीं इकडे राज्यें झाल्यापासून त्यांच्या चैनी व आनंदीवृत्तीमुळें इकडील कारागिरीस थोडाबहुत पाठिंबा मिळाला खरा, पण ह्यांच्या राज्यव्यवस्थेंतसुद्धां निगेत व्यापार चालणाऱ्या बंदरांचा व्हावा तसा उदय होऊन व्यापारास राजकीय महत्त्व असें कधींच मिळालें नाहीं. देशांतील कारागिरीस राजकीय सत्तेचा पाठिंबा देऊन तीस व्यापारीदृष्टीनें चिरस्थायित्व देण्याचा यांचेपैकीं कोणींहि प्रयत्न केला नाहीं. अकबर बादशहानें मात्र कारागिरीस उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला होता, पण त्याचें स्वरूप राष्ट्रीय सांपत्तिक स्थितीचें असें कधींच नव्हतें. देशाची स्थिति व त्यावरोवर समाजाची स्थिति सुधारून राज्यास चिरस्थायित्व देण्यासारख्या अपरिहार्य व वाजवी गोष्टींपेक्षां धर्मांतरासारख्या अप्रबुद्ध गोष्टींकडे त्यांचें लक्ष विशेष असून कित्येकांनां त्यांत जन्मसार्थकता वाटत असे. ह्या तऱ्हेची पूर्वीच्या राजांची मानसिक वृत्ति असण्यास त्यांचे हातीं अनियंत्रित राज्यसत्ता असून त्यांच्या सत्तेचें अस्तित्व त्यांच्या सेनाबलांत असे. राजा ह्मणजे समाजानें नेमलेला पुढारी, व समाजाच्या कल्याणाची काळजी सर्वपरीनें शिरावर घेणारा कर्तबगार मनुष्य, ही समजूत

लावेळीं अमलांत आलेली नव्हती. राज्यव्यवस्थेचें धोरण प्रजेच्या फायद्यासाठीं तिच्या तंत्रानें ठरविलेलें असावें ह्या भरभक्कम पायावर हिंदुस्थानांतील राज्यांची उभारणी झालेली नसल्यामुळें, राज्यमदानें सौभाग्याच्या तोऱ्यांत असणाऱ्या त्यांच्या राज्यलक्ष्मीचें सौभाग्य क्षणेक होऊन तीस अपक्वकालींच वैधव्यपंकजांत रुतावें लागलें. राष्ट्राच्या ह्या राज्यलक्ष्मीच्या सौभाग्यावर जशी गदा आली, तशीच उद्योगलक्ष्मीवरहि गदा येऊन औद्योगिक दृष्टीनेंहि हिंदुस्थानचा सारखा ऱ्हास व्हावयास लागला.

मोंगलांनंतर हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाचा मान फार थोडा वेळपर्यंत मराठ्यांकडे आलेला होता. त्यांचे अमदानींतसुद्धां लढाया, लुटालूट, राजकीय उलाढाल्या, ह्यां व्यतिरिक्त दुसरें कांहीं नसून राष्ट्राच्या व्यापारीवर्गाची उन्नति होईल असें कांहींच घडलें नाहीं. मोंगल व मराठे यांच्या अमदानींत व्यापार हें राष्ट्राचें एक प्रधान अंग आहे व त्याची वाढ होण्यासाठीं राजानें योग्य खटपट केली पाहिजे, ह्या राजकारणांतील तत्वाचा कोठें मागमूसहि दृष्टीस पडत नाहीं.

मोंगलांचे अमदानींत डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज वगैरे व्यापारी मंडळ्या हिंदुस्थानांत आल्या, व येथील सर्वतोपरी विघडलेल्या परिस्थितीचा फायदा त्यांपैकीं एकीस मिळून तिच्या हातांतील तागडी जाऊन तेथें तलवार व नंतर राजदंड झळकूं लागला. हिंदुस्थानच्या भावी उन्नतीचें शुभसूचक ह्मणूनच कीं काय, दोन शतकांपूर्वी येथील लोकांशीं कोणत्याहि तऱ्हेचा संबंध नसणाऱ्या हजारों मैल दूर असणाऱ्या चिमुकल्या प्रदेशांतील मुठभर लोकांकडे ह्या अवाढव्य हिंदुस्थानच्या साम्राज्यत्वाचा मान येऊन हिंदुस्थानावर प्रगतिस्फूर्तीचे तेजस्वी सूर्यकिरण पडण्यास सुरुवात व्हावी, हा ईश्वरी नेमानेमच ह्मटला पाहिजे!

हिंदुस्थानचा फायदेशीर व्यापार आपल्या हातांत यावा या हेतूनेंच पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच वगैरे व्यापारी मंडळ्या अस्तित्वांत आल्या. ह्या वेळेपर्यंतचा हिंदुस्थानचा-पूर्वेकडील- व्यापार भूमध्य समुद्रामार्फत सर्व युरोपभर चालत असे. इकडील माल तिकडे नेण्याचें काम मूर, इराणी, इजिप्शिअन वगैरे व्यापारी करीत असत, व पुढचा व्यापार व्हेनीस वगैरे बंदरांतील लोकांच्या हातीं असे. ह्या व्यापारांत फायदा फार असून व्यापार विशिष्ट लोकांच्याच हातांत असल्यामुळें युरोपांतील दुसऱ्या देशाच्या लोकांचा त्यांत शिरकाव होणें शक्य नव्हतें. हा व्यापार आपल्या हातांत यावा, अशी निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांनां इच्छा उत्पन्न झाली, व ते सर्व हिंदुस्थानास जाण्याचा समुद्रमार्ग शोधून काढण्याच्या तयारीस लागले.

जलमार्गानें हिंदुस्थानाचा तपास लावण्याचा प्रयत्न तिकडील लोकांनीं सर्व बाजूंनीं केला. १४९२ सालीं हिंदुस्थानचा शोध लावण्यास निघालेल्या प्रख्यात कोलंबसानें हिंदुस्थानाऐवजी अमेरिकेचा शोध लावला. उत्तर समुद्राच्या मार्गानें शोध लावण्याचा प्रयत्न विल्यम बेरेट ह्या डच गृहस्थानें तीनदां केला, व त्यांतच विचाऱ्याचा अंतहि झाला. डेव्हीस, हडसन, बाफीन, फ्रोबीशर वगैरे पाश्चात्य गृहस्थांचे प्रयत्न नकाशांत स्थलनिदर्शन करणाऱ्या त्यांच्या नामाभिधानानें नेहमीं जनतेच्या डोळ्यांसमोर राहणारे आहेत. १४९६ त सातव्या हेन्रीच्या राजाज्ञा पत्रिका घेऊन जॉन कॅबेट व त्याचे तीन मुलगे हिंदुस्थानचा तपास लावण्यासाठीं निघाले असतां,त्यांनां न्युफाउंडलंड बेट सांपडलें, व लब्रॅडोर ते व्हरजिनियापर्यंतच्या अमेरिकन किनाऱ्याचा तपास लागला. १४९७ सालांत वास्कोडिगामा हा हिंदुस्थानचा शोध लावण्यास निघून त्यानें मात्र अखेर त्याचा शोध लावला, व मलबार किनाऱ्यावरील कालिकत बंदराजवळ १४९८ च्या मे महिन्याच्या २० तारखेस नांगर टाकून त्यानें हिंदुस्थानचें व्यापारीद्वार सर्व युरोपियन राष्ट्रांस खुलें करून दिलें.

पोर्तुगीजलोक व्यापारासाठी हिंदुस्थानांत आल्यापासून सुमारें एक शतकभर मूळच्या अरब, मूर, इजिप्शियन व्यापाऱ्यांशिवाय त्यांनां दुसरा प्रतिस्पर्धी असा कोणी नव्हता, व ह्या शंभर वर्षांच्या आघाडीचा फायदा, व्यापाराशिवाय इतर उलाढाली केल्या नसत्या तर,त्यांनां चांगलाच मिळाला असता.त्यांचे व्यापाराची सर्व मालकी त्यांचे राजाची होती. त्याचें स्वरूप जनतेच्या फायद्याचें व्यक्तिविषयक जर असतें तर कदाचित् व्यापारी ह्या दृष्टीनें त्यांचें हिंदुस्थानांत पाऊल चांगलेंच स्थिर होऊन हिंदुस्थानचा इतिहास निराळ्या तऱ्हेचा झाला असता. ह्या लोकांनीं हिंदुस्थानांत आल्यावर राज्य कमावण्याच्या व धर्मविस्तारासाठीं जुलमी वर्तणुकीच्या भरीस पडून येथील राजांशीं व लोकांशीं आंतल्या बाजूनें, आणि व्यापारी दृष्टीनें मूर, अरब वगैरे लोकांशीं बाहेरच्या बाजूनें, वैरसंपादन करून ठेविलें होतें. ह्यामुळें ह्यांनां शांतता अशी

कधींच मिळाली नाहीं, व त्यांचा व्यापारहि वळावला नाहीं. मध्यंतरी पोर्तुगाल व स्पेनचे एका राजामुळें एकमेकांशीं हितसंबंध संलग्न झाल्यानें ह्यांचे इकडील कारस्थानांस व व्यापारास बराच धक्का बसला. ह्यांची ही शंभर वर्षांची अमदानी अंतीं त्यांनां जरी फायदेशीर झाली नाहीं, तरी हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं ह्यांनीं आपल्या वखारी घालून, आपल्या मागून येणाऱ्या इतर लोकांनां येथील व्यापाराचा मार्ग सुलभ करून ठेविला होता.

पोर्तुगीजांनंतर डच, इंग्रज, फ्रेंच, जर्मन वगैरे अनेक लोकांच्या व्यापारी टोळ्या इकडे आल्या. ह्या सर्व व्यापारी मंडळ्या, पोर्तुगालप्रमाणें राजाचे मालकीच्या नसून जनतेच्या होत्या, व त्यांचें भांडवल सहकारित्वाच्या तत्वावर संकलित झालेलें होतें. व्यापार करण्याच्या सनदा तेथील राजांकडून त्यांनां मिळालेल्या असून, व्यापार सुधारणेसाठीं व संरक्षणासाठीं राजकीय सत्तेचें त्यांनां पाठबळ होतें. ह्या सर्वांनीं समुद्रकिनाऱ्याच्या कांठीं आपल्या वखारी घातल्या होत्या, व अंतर्भागांत कोठकोठें शाखा किंवा अडतपेढ्या उघडल्या होत्या.

पोर्तुगीजांनंतर भरभराटीस आलेली डच लोकांची व्यापारी मंडळी The United East India Company of Netherlands ही होय. हालंडमधील पूर्वीच्या सर्व लहानमोठ्या मंडळ्या मोडून त्यांची वरील मंडळी तेथील सरकारनें बनविली होती. ह्या मंडळीचें भांडवल जवळ जवळ साडेपांच लाख पौंडांचें असून तिच्या व्यापारी मक्तयाची मुदत २१ वर्षांची होती. व्यापार हा राज्यव्यवस्थेचें एक अंग आहे, ही समजूत हालंडमध्यें प्रचलित असल्यामुळें ह्या प्रचंड व्यापारी मंडळाचा वरील राज्यव्यवस्थापकांशीं निकट संबंध असे. पूर्वेकडे —हिंदुस्थानाकडे येण्याच्या वाटेवर केप ऑफ गुड होप येथें त्यांनीं वसाहत केली होती, व लवकरच पोर्तुगालचे सामन्यास उतरून त्यांचा पूर्वेकडील मुलुख व व्यापार त्यांनीं काबीज केला. हिंदुस्थानांतील मलबारकिनाऱ्यावरील त्यांचीं व्यापाराचीं बहुतेक नाकीं स्वाधीन करून घेतलीं. १६६४ सालांत कारोमांडल किनाऱ्यावरील बहुतेक बंदरीं व मच्छलीपट्टण, हुगळी, कासिमबझार, पाटणा, ढाका, सुरत, अमदाबाद, आग्रा, व मलबार किनाऱ्यावरील सात बंदरीं ह्यांच्या वखारी होत्या. ह्यांच्या राष्ट्राच्या युरोप मधील धुमश्चक्रीनें, यांचे व्यापारास चांगला धोका बसला. मसाल्याचे पदार्थांचा व्यापार दुसऱ्या कोणींहि करूं नये अशा तऱ्हेचें ह्यांचें व्यापारी धोरण होतें. मलाया द्वीपकल्प वगैरे सारख्या ठिकाणीं जरी डच लोकांनां तें शक्य होतें, तरी हिंदुस्थानासारख्या प्रचंड देशांत, दुसरे व्यापारी प्रतिस्पर्धी असतांना, ही गोष्ट शक्य नव्हती.

डच लोकांनीं पोर्तुगीज लोकांचा पाडाव करून आपला व्यापार सुधारला व फ्रेंचांच्या पहिल्या वसाहतीवर जोराचे हल्ले करून इंग्रजांस येथील मार्ग सुलभ करून ठेविला. डचांनंतर इंग्रजांची भरभराट झाली. इलिझाबेथ राणीनें इसवी सन १६०० त सनद दिलेली व पुढें हिंदुस्थानचें *राज्य कमावणारी ईस्ट इंडिया कंपनी* ही इंग्रजांची व्यापारी मंडळी होती. ह्या कंपनीस सनद मिळाली तेव्हां तिचें भांडवल जवळ जवळ ७० हजार पौंडांचें असून तिचे २१७ भागीदार होते. ईस्ट इंडिया कंपनी व्यापार करावयास लागल्यापासून तीस चांगला फायदा मिळावयास लागला, व ह्या कंपनीशिवाय पूर्वेकडे व्यापार करावयाची दुसऱ्या कोणास परवानगी नव्हती. ह्यामुळें तिकडील इतर व्यापारी व धाडशी लोक ह्यांचे पोटांत दुखावयास लागून व्यापाराची परवानगी आपणांसहि मिळावी असें त्यांनां वाटूं लागलें, व प्रसंगीं लांचलुचपतीसारख्या मार्गांचेंसुद्धां अवलंबन करून त्यांनीं आपले हेतू तडीस नेले. ह्यानंतर हिंदुस्थानाशीं व पूर्वेशीं व्यापार करणाऱ्या बऱ्याच मंडळ्या अस्तित्वांत आल्या. अशी जरी स्थिति होती, तरी इकडील व्यापारापैकीं मुख्य भाग कंपनीच्या हातीं असे, व तीस चांगला फायदाहि मिळत असे. ह्या फायद्याचें मान १६८२ सालांत एवढें वाढलें होतें कीं, त्या वर्षी १०० वर १५० ह्याप्रमाणें भागीदारांस फायदा मिळाला, व कंपनीचें नंतर भांडवल वाढविण्यांत आलें. इकडील व्यापाराचें मान सारखें वाढीवर होतें व सन १८१३ त जेव्हां कंपनीच्या व्यापारविषयक सनदेचा विचार चालला होता, तेव्हां त्याची किंमत जवळ जवळ ४ कोटि रुपये होती.

हिंदुस्थानांतील इंग्रजांची पहिली वखार सुरतेस १६१२ सालीं घालण्यांत आली, व पुष्कळ दिवसपर्यंत हिंदुस्थानांतील त्यांच्या व्यापाराचें हें नाकें होतें. सुरतेस वखार घातल्यानंतर अमदाबाद, बऱ्हाणपुर, अजमीर, आग्रा येथें त्यांनीं अडती सुरू केल्या. पश्चिम किनाऱ्यावर—कारोमंडल किनाऱ्यावर—मच्छलीपट्टण, पट्टापोली, मद्रास, आणि बंगालमध्यें पहिल्यानदां

हरिहरपुर व बालासोर येथें वखारी घातल्या. हुगली येथील वखार १६५१ त घालण्यांत आली.

पूर्वेशीं व्यापार करणारी फ्रेंच मंडळी फ्रान्सचा राजा १४ वा लुई व कालबर्ट ह्यांच्या परिश्रमानें सन १६६४ सालीं स्थापन झाली. ह्या व्यापारीमंडळीकडे १४ वा लुई ह्याचें लक्ष फार असे. हिंदुस्थानांत ह्यांनी आपली पहिली वखार १६६८ सालीं घातली. १६७४ सालांत पांडिचरी व लागलीच चंद्रनगर येथें त्यांनीं वसाहती केल्या. फ्रान्स व इंग्लंड ह्यांच्यांतील नेहमींच्या लढायांनीं त्यांच्या पूर्वेकडील व्यापारास बराच धोका बसला, व ह्या स्थितींतून निघून शांततेचा थोडाबहुत परिणाम होत आहे तोंच हिंदुस्थानांतील राजकीय उलाढाल्या करण्यांत फ्रेंच पडूं लागले. ह्यावेळीं मूळ कंपनी डबघाईस येऊन तिची मालकी सेंटमॅलो येथील कांहीं घाडशी व्यापाऱ्यांकडे गेलेली होती, व पुढें देशांतील योग्य आश्रयाभावीं व त्यांचेकडील राजकीय उलाढालींनें, त्यांनां इंग्रजांस वाट द्यावी लागली.

यानंतर इंग्रजांस किंवहुना सर्व युरोपास क्षणभर भयचकित करणारी ऑस्टेंड कंपनी नांवाची व्यापारी मंडळी अस्तित्वांत आली. हिची स्थापना करण्याचा पुढाकार आस्ट्रिआच्या छत्राखालील जर्मन राष्ट्राकडे असून तिचें भांडवल ६० लक्ष फ्लॉरिनचें होतें. हिच्या पहिल्या अमदानींतील व्यापाराचें स्वरूप चांगलेंच फायदेशीर होतें. १७२६ सालीं हिनें आपल्या भागीदारांस ३३॥ टक्केप्रमाणें फायदा दिला होता. मालाची नेआण करण्यासाठीं ही कंपनी नुसतीं आपलीं जहाजेंच पाठवीत नसे, तर हिंदुस्थानांत तिनें दोन वसाहतीहि केल्या होत्या व त्या कावरम व बंकिबझार येथें होत्या; परंतु ही कंपनी स्थापण्यांत व्यापाराशिवाय राजकीय हेतू असल्याचें बाकीच्या राष्ट्रांस दिसल्यावरून ही कंपनी बंद करण्यांत आली.

ऑस्टेंड कंपनीची इतिश्री झाल्यावर जर्मन बादशहा फ्रेडरिक दि ग्रेट ह्यानें काढलेली हाब्डेन कंपनी विशेष महत्त्वाची होती. परंतु ह्या कंपनीचा बळि त्याला आपल्या राजकीय उलाढालींत लवकरच द्यावा लागला.

पहिल्या अरब, तुर्क वगैरे मुसलमान लोकांच्या हातांतला युरोपचा व्यापार युरोपियन व्यापाऱ्यांच्या हातांत गेल्यापासून कांहीं कालपर्यंत हिंदुस्थानच्या तयार निर्गत व्यापाराला तेजी होती. त्या वेळच्या व्यापाराच्या पदार्थांत मसाल्याचे पदार्थ, हस्तिदंत, नील वगैरे कच्च्या द्रव्यांचा, आणि सुती व रेशमीकापड, साखर, धातूंचे कुसराईचे पदार्थ यांचा समावेश पक्क्या-तयार मालांत होत असे. सुती कापडांत ढाक्याची प्रसिद्ध मलमल, मच्छलीपट्टणचीं रंगीत चिटें, व कालिकत बंदरामुळें नांव मिळालेलें कॅलीको कापड हीं प्रख्यात होतीं. रेशमी व जरतारी कापड मुख्यत्वेंकरून बंगाल, उत्तर हिंदुस्थान, अहमदाबाद, बऱ्हाणपुर, येथून जात असे. साखरेचा पुरवठा मुख्यतः बंगाल मधूनच होत असे. युरोपांत औद्योगिकक्रांतीची लाट उसळण्याचे पूर्वी ह्या मालास चांगली मागणी असे, व तिकडील सरकारांनीं आपल्या देशी धंद्यांची वाढ करण्यासाठीं संरक्षक जकात पद्धतीचा अंगिकार करून इकडील मालावर कायद्यानें बहिष्कार घालीपर्यंत मच्छलीपट्टणचीं रंगीत चिटें, ढाक्याची खुमासदार मलमल, तलम रेशमी वस्त्रें, अगर इतर भरजरीचें किंवा किनखापी कापड तिकडील जनवर्ग-मुख्यत्वें श्रीवर्ग-हौसेनें भारी किंमत देऊनहि घेत असे.

कापसापासून कापड तयार करण्याचा युरोपांतील पहिला प्रयत्न इटलींत १३ वे शतकांत सुरू झाला, व ही कला तेथून पसरत पसरत इंग्लंडमध्यें १७ वे शतकांत गेली. 'मांचेस्टरचा सुती कपडा' ह्मणून प्रख्यातीस आलेलें कापड यानंतरचें होय. कारण, १६४१ पर्यंत तेथील सुती कापड नांवाचेंच सुती असून तें लोकरीपासून तयार होत असे. यानंतर विलायतेंत कापडाची पैदास जरी पुष्कळ व्हावयास लागली, तरी खुल्या व्यापारपद्धतीच्या त्या वेळच्या जकात स्वरूपानें त्याचा बाजारांत टिकाव लागत नसे, व लोकाश्रयाचे अभावीं तेथील कापडाचें झपाट्याची विक्री होत नसे. स्थानिक निपजेच्या लोंकरीच्या व तागाच्या कापडापेक्षां इकडील चीट व कॅलीको वगैरे कापडाची विक्री झपाट्यानें होत असे. देशी माल मिळत असूनहि परकी मालापुढें त्याला कोणी विचारीत नाहीं, व त्यामुळें स्थानिक उद्योगधंद्यास मिळावा तसा जोर मिळत नाहीं, ह्या स्थितीनें तिकडील विशिष्ट जनतेचें मन क्षुब्ध होऊन त्यांनीं हिंदी मालाविरुद्ध हाकाटी सुरू केली. अखेरीस सरकारानें १७०० मध्यें हिंदी कापड वापरणारास कायद्यानें दंडाची योजना केली व पुढें १७२१ मध्यें चिटाच्या आयातीची अजीबात बंदी केली. पुढें १७३६ त या कायद्याचें स्वरूप बदलून तागाचा ताणा असलेलीं चिटें वापरण्याची मोकळीक मिळाली.

दुःसह विरहें फिकट जाहले
त्या कोमलमधुकपोलभागीं
स्मितच्छटा झळकतां अकस्मात्
बघसी प्रियसंदेशहारका! तूंच; तूंच त्या कारणही!
गभीर सरिता, प्रचंड पर्वत,
कितिक योजनें माळ आडवा!—
तरीहि सखया पत्रवाहका!
वियुक्तहृदयां एक कराया समर्थ भुवनीं तूं एक!

सुखदुःखांचीं सूत्रें हातीं
धरुनी विश्वाला चाळविसी!
काय थोरवी तुझी वदावी?
धन्य अससि तूं कीं निंद्य पुरा, हें कांहिं न पण मज कथवे!
धन्यच अथवा! कीं प्रियसखिचीं
लिहिलेलीं मधुमृदुलकरांनीं
पवित्र पत्रें तुवां आणिलीं
तीं स्पर्शाया भाग्य कुणाचें या जगतावर मजवीण!

व्यवसायीं यां कितीहि पातक
असो, घाल तें माझ्या माथीं
परंतु दे दे नित्य आणुनी
गोड सखीच्या गोड हातचीं गोड गोड पत्रें मजला!

मीं लग्न कां केलें ?

मीं लग्न कां केलें, त्याच्याशीं लोकांचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं ! माझ्या खासगी गोष्टी मीं चव्हाट्यावर कां आणाव्या ? परंतु लग्नाची गोष्ट जरी खासगी आहे, तथापि लग्न करण्याचीं कारणें लोकांनां सांगण्याची पूर्वापार वहिवाट आहे. मींच ह्या वहिवाटीस सोडून कां वागावें ?

आमच्या अण्णांनीं द्वितीय संबंध केला, तेव्हां ते ह्मणाले "काय करावें, पोटीं मूलबाळ नाहीं. तेवढा एकादा मुलगा असता तर ह्या भानगडींत पडण्याचें कारण नव्हतें. कोठेंतरी हरिहरि करीत स्वस्थ बसलों असतों; परंतु वडिलांचें नांव राहण्यासाठीं पुनः संसार थाटावा लागतो, इलाज नाहीं."

कांहीं वर्षांनीं त्यांचें द्वितीय कुटुंब वारलें तेव्हां ईश्वरकृपेनें त्यांनां एक लहान मूल होतें. ते पुनः ह्मणाले "मुलाची काळजी घेण्यासाठीं घरांत दुसरें कोणी माणूस पाहिजे. हें काम पुरुषांच्या हातून काय होतें ? बरें, चाकरमाणसांवर मूल सोंपवावें ह्मटलें तर तीं बोलूनचालून पैशासाठीं काम करणार, त्यांनां काय माया आहे ? आईची गोष्टच निराळी." असा तर्कवाद लढवून त्यांनीं मुलाला दुसरी आई करून आणली.

नानासाहेबांचा विचार निराळाच होता. ते ह्मणाले "घरांत वृद्ध आई आहे, तिची सेवा करायला कोणीतरी माणूस पाहिजे. नाहींतर मला आतां संसाराची यातायात कशाला हवी होती ? परंतु आईकडे कांहीं पाहिलें पाहिजे." असा पोक्त विचार करून ह्या मातृभक्त गृहस्थानें सेवेसाठीं नवी सून आणून मातेस अर्पण केली.

दादासाहेबांस आई नव्हती; परंतु ते कर्मनिष्ठ गृहस्थ ! "गृहस्थाश्रमाचा धर्म आचरण्यासाठीं धर्मपत्नीची आवश्यकता आहे. माझ्याविषयीं ह्मणाल तर माझें वय झालें आहे; आपण काय पिकलें पान, आज आहों उद्यां नाहीं; परंतु जीव आहे तोंपर्यंत धर्मकर्में केलीं पाहिजेत. आचारभ्रष्टी तो सदा कष्टी. आचार आपण कधीं सोडणार नाहीं. धर्माचार पाळण्यासाठीं लग्न करणें भाग आहे."

मनुष्यप्राणी किती परार्थपर आहे पहा ! स्वार्थाची कल्पना कोणाच्या मनाला स्पर्शहि करीत नाहीं ! कोणी कुलाचार रक्षण करण्यासाठीं लग्न करतो, कोणी मुलाची चांगल्या रीतीनें जोपासना व्हावी ह्मणून, कोणी आईची नीट तरतूद व्हावी ह्मणून, तर कोणी गृहस्थधर्म पाळतां यावा ह्मणून लग्न करतो. कलियुगांत जर स्वार्थाचा लोकांस गंधहि नाहीं, तर सत्ययुगांत मनुष्यजातीची काय स्थिति असेल बरें ?

द्वितीय संबंध करणारांत ही परार्थता जितकी दिसून येते, तितकी प्रथम संबंध करणारांत दिसून येत नाहीं. भाऊसाहेबांनीं लग्न केलें तेव्हां ते ह्मणाले " खाणावळीच्या जेवणाचा फारच कंटाळा आला बुवा ! आजारी पडण्याची पाळी आली तेव्हां विचार केला, कीं, आतां लग्न केल्याशिवाय इलाज नाहीं ! "

अण्णासाहेबांची आई असल्यामुळें त्यांनां खाणावळींत जाण्याची कांहीं जरूरी नव्हती; परंतु त्यांच्या आईनें आग्रह केल्यावरून त्यांनां लग्न करावें लागलें. आणि आतां सुनेबरोबर न पटल्यामुळें त्यांची आई नाशकास जाऊन राहिली आहे व ते सुखानें संसार करीत आहेत !

इतक्या लोकांचीं लग्न करण्याचीं कारणें दाखल केलीं, तर आतां माझेंहि लग्न करण्याचें कारण कां नमूद करूं नये ? परंतु आधीं सांगितलें पाहिजे, कीं, मी ह्मणजे कांहीं मोठा धार्मिक, साधु, अथवा परोपकारी मनुष्य आहें, असें नाहीं. मी माझ्या स्वतःच्या सुखाकडे पाहणारा एक गरीब मनुष्य आहें; माझे हेतुहि माझ्या स्वार्थपर स्वभावास अनुसरून असेच खालच्या दर्जाचे आहेत.

परमेश्वरानें मनुष्यजातीस उत्पन्न केलें तें अधिकार चालविण्यासाठीं उत्पन्न केलें. मनुष्यानें कोणावर तरी सत्ता चालवावी, हुकूम चालवावा, हाच देवाचा उद्देश दिसतो. परंतु माझ्यासारखा गरीब मनुष्य कोणावर अधिकार गिरविणार ? माझ्या सत्तेला जुमानतो कोण ? ज्यावर आपणाला सत्ता चालवितां येईल, असें एक तरी मनुष्य असावें, ह्मणून मीं लग्न केलें ! बाहेर

माझा कोणी कितीहि अपमान केला, तरी घरांत त्याचा वचपा मला काढतां येतो. नवरेपणाचा हक्क पाहिजे तसा बजावण्यास मी मुरब्बार आहें.

मला ज्ञान नसलें, तर लोक माझी अवहेलना करतील; शहाणपण नसलें तर मला हांसतील; परंतु ह्या जगांत असें एक मनुष्य आहे, कीं, ज्याला माझ्या ज्ञानाचा व शहाणपणाचा बचक आहे ! शहाणपणांत माझी बायको कमी आहे असें नाहीं; परंतु सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं ! नवरेपणाची सत्ता माझ्या हातीं आहे, तेव्हां माझ्यापुढें तिचें शहाणपण कसें चालणार ?

मी साधु ह्मणजे दुसऱ्याच्या सुखाकडे लक्ष देणारा नाहीं, हें वर सांगितलेंच आहे. अशा परोपकारी गृहस्थांपेक्षां माझी योग्यता कमी आहे, हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे; परंतु खाणावळीला त्रासून लग्न करणारांपेक्षां मी अधिक श्रेष्ठ आहें, असें मला वाटतें.

तहान, भूक हीं पशु व मनुष्यें ह्यांस समान आहे परंतु महत्त्वाकांक्षा, अधिकार चालविण्याची उत्कट इच्छा, ही मनुष्यांतच दृष्टीस पडते. तेव्हां क्षुधेची शांति करण्याकरितां लग्नाचा होम करणारांपेक्षां माझी योग्यता उघड बरच्या प्रतीची आहे !

लग्न करण्यांत माझे व माझ्या बांधवांचे साधारणतः काय हेतु असतात, त्यांचें वर दिग्दर्शन केलें. सध्यांच्या पद्धतीप्रमाणें लग्न करण्यांत आर्यभगिनींचे हेतु काय असतात, हा प्रश्न बहुधा उद्भवणारच नाहीं ! तथापि ह्या संबंधीं त्यांची अपेक्षा काय असते हें विचारावयास हरकत नाहीं. लग्नापासून कोणकोणत्या गोष्टींची आपणास अपेक्षा असते हें माझ्या भगिनींनीं प्रांजलपणें प्रसिद्ध केल्यास त्यांची अपेक्षा तृप्त करण्याकडे थोडी तरी पुरुषवर्गाची प्रवृत्ति होईल असें मला वाटतें.

विरहीं सहवास.

—कवि— 'भालचंद्र.'

गाणें प्रेमाचें होतों,
कंठीं तरि तुझिया रमतों !
अधरामृत संतत पीतों,
विरहा ऐसें फसवीतों !

वीणा सुस्वर वा होतो,
हातीं तरि तुझिया वसतों !
प्रेमस्पर्शामृत पीतों,
विरहा ऐसें फसवीतों !

वेणी पुष्पांची होतों,
केशीं तरि तुझिया सजतों !
सहवासी संतत होतों,
विरहा ऐसें फसवीतों !

सायंतारा वा होतों,
नेत्रीं तुझिया विंबित तो !
दृष्टिसुखा संतत पीतों,
विरहा ऐसें फसवीतों !

लहरी वायूची होतों,
वसनपल्लवीं तरि रमतों !
आलिंगन संतत घेतों,
विरहा ऐसें फसवीतों !

शक्य नव्हे परि हें होणें,
विरहा ऐसें फसवीणें !
एक उपायीं मात्र गडे,
नित्यहि त्वत्सहवास घडे !

हृदयीं या संतत वससी,
प्रेमाच्या हृदयींच जशी !
याचमुळें हृत्ताप जळे,
विरहीही सहवास मिळे !

पारिशयन आख्यायिका.

—लेखक—
श्रीयुत प्रभाकर अनंत माळवे, एम्. ए.

हिंदुस्थानावर अनेक स्वाऱ्या करून दिग्विजय संपादन केल्यावर प्रसिद्ध महमूद गिझनवी यास अशी इच्छा झाली कीं, त्या वेळच्या खलीफकडून आपल्या मोठेपणास अनुरूप असा एकादा किताब मिळवावा. ह्मणून त्यानें इमाम अबू मनसूर नांवाच्या विद्वानास खलीफकडे रवाना केलें. इमाम जवळजवळ एक वर्ष पर्यंत खलीफच्या दरबारीं राहिला; पण त्याच्या कार्याची सिद्धी होण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. शेवटीं त्यानें खलीफास विनंती केली कीं, "महमूदानें इस्लामी धर्माच्या प्रसारार्थ जे परिश्रम केले आहेत, त्याच्या मोबदला ह्मणून त्यास एकादा किताब देणें आवश्यक व न्यायाचें आहे."

खलीफानें विचार केला, महमूद हा गुलामाचा मुलगा. त्याला बादशाही किताब देणें बरोबर नाहीं. वरें न द्यावा, तर तो सामर्थ्यवान् असल्यामुळें कदाचित् आपल्यावरच स्वारी करावयाचा. तेव्हां खलीफानें आपल्या मंत्रीमंडळाशीं खलबत करून असें ठरविलें कीं, ज्याचे दोन अर्थ होऊं शकतील असा किताब महमूदास द्यावा. सरळ अर्थानें महमूदास आपला सन्मान झाला, असें वाटावें, व गर्भित अर्थानें त्याचें नीच कुल ध्वनित करावें. त्याप्रमाणें त्यानीं महमूदास 'यमीन उद् दौला, वलीय्यो अमीर उल् मौमनीन' असा किताब दिला. यमीन उद् दौला ह्मणजे राज्याचा उजवा हात, व वलीय्यो अमीर उल् मौमनीन ह्मणजे अमीर उल् मौमनीनचा (खलीफचा) वली ह्मणजे मित्र. अरबी भाषेंत वलीचा दुसरा अर्थ बंधमुक्त केलेला गुलाम असा होतो. या दुसऱ्या अर्थानें महमूद हा गुलामाचा मुलगा होता असें दर्शविलें.

पदवीची सनद महमूदाच्या हातांत पडल्याबरोबर हा दुसरा अर्थ त्याच्या लक्षांत आला. त्यानें तावडतोब एक लाख दिरम खलीफकडे पाठविले व लिहिलें कीं "मी तीस वर्षें काफारांशीं लढून मुहम्मद पैगंबराच्या वंशजांची (ह्मणजे खलीफांची) कीर्ति वाढविली. आतां माझी अशी इच्छा आहे कीं, या कामगिरीबद्दल खलीफांनीं एक लाख दिरम घेऊन मला एकच अक्षर द्यावें. आपण एक लाख दिरमास एक अक्षर विकत देत नसाल तर आपल्या उदारपणास वट्टा लागेल!"

खलीफास कांहीं याचा अर्थ कळेना. तेव्हां त्याच्या मंत्र्यांपैकीं जे चाणाक्ष होते त्यांनीं सांगितलें कीं "महमूद जें एक अक्षर मागत आहे तें 'अलेफ' होय. 'वलीय्यो अमीर उल् मौमनीन' यांत एक 'अलेफ' घातला असतां 'वालीय्यो अमीर उल् मौमनीन' होतें, व 'वाली' शब्दाचा मित्र असा एकच अर्थ होतो. 'वली'चा बंधमुक्त गुलाम असा जो दुसरा अर्थ होतो तो 'वाली'चा होत नाहीं."

महमूदाचें चातुर्य पाहून खलीफ खूष झाले व त्यांनीं महमूदास 'यमीन उद् दौला, वालीय्यो अमीर उल् मौमनीन' हाच किताब दिला.

—ताज उस् शयूख.

—१—

सुप्रसिद्ध कवि हाफेझ शीराझी यानें आपल्या काव्यांत एके ठिकाणीं लिहिलें होतें:—

अगर आन् तुर्के शीराझी बदस्त आरद् दिले मारा।
बखाले हिंदुयश् बख्शम् समरकन्दो बुखारारा॥

ह्मणजे, ती शीराझची सुंदरी जर माझ्या हृदयाचा स्वीकार करील तर तिच्या गालावरील एका काळ्या तिळासाठीं मी समरकंद आणि बुखारा हीं शहरें बक्षीस देईन."

पुढें वृद्धावस्थेत हाफेझची सांपत्तिक स्थिति फारच वाईट झाली. त्याच वेळीं अमीर तैमूरानें फार्स देश काबीज केला व त्या देशाची राजधानी शीराझ येथें त्याचा मुकाम असतांना त्यानें हाफेझास आपल्या समोर बोलावून रागानें झटलें "मीं अनेक शहरें उध्वस्त केलीं, हजारों लोकांच्या कत्तली केल्या, त्या फक्त एवढ्याच साठीं कीं माझीं राजधानीचीं शहरें जीं समरकन्द आणि बुखारा त्यांचें वैभव व संपत्ति वाढावी; आणि तूं एका तरुणीच्या गालावरील तिळासाठीं हीं शहरें बक्षीस द्यावयास तयार झाला होतास! एवढा तूं उदार असून तुझी आज अशी स्थिति कां?"

हाफेझनें मुजरा करून उत्तर दिलें "महाराज, इतक्या उदारपणानें वागल्यामुळेंच आज माझी अशी निकृष्ट अवस्था झाली आहे!"

हें उत्तर ऐकून तैमूराचा राग शांत झाला आणि त्यानें हाफेझला चांगलेंच बक्षीस दिलें.

—तझकरत् उम् शुअरा.

—३—

आपल्याकडील कर्णप्रमाणें मुसलमानी राष्ट्रांत हातमताई व त्याच्या खालोखाल मअ्न इब्ने झायदे या दोघां पुरुषांची दातृत्वाबद्दल ख्याति आहे. यांपैकी मअ्नबद्दल अशी आख्यायिका सांगतात कीं, एके वेळीं त्याचा द्वेष करणाऱ्या एका पुरुषाची खलीफाच्या गादीवर योजना झाली. त्यानें गादीवर येतांच मअ्नला पकडून कैदेंत टाकण्याचा निश्चय केला. याची गुणगुण मअ्नला लागतांच त्यानें दाढीमिशा काढून वेषांतर केलें व आपल्या खजीन्यांतील एक अत्यंत मौल्यवान हिऱ्याचा कंठा घेऊन तो गांव सोडून निघाला. वाटेंत त्याला एक भिकारी भेटला त्यानें त्यास तावडतोब ओळखून हाटलें "सलाम अलयू कुम, मअ्न इब्ने झायदे!"

आपलें नांव ऐकतांच मअ्न चपापला. तरी त्यानें आश्चर्याचा आविर्भाव आणून झटलें "तूं मअ्न कोणाला झणतोस? मी कांहीं मअ्न नव्हें! मी आपला एक गरीब फकीर आहें."

भिकारी झणाला "तूं कसेंहि वेषांतर केलेंस री तुला ओळखणार नाहीं असा कोण आहे?"

मअ्न रागानें झणाला "तूं मला पक्का वेडगळ दिसतोस! अरे, कोट्यधीश मअ्न कोठें आणि मी गरीब फकीर कोठें!"

भिकाऱ्यानें उत्तर दिलें "तूं कांहींहि झण. पण तूं मअ्न इब्ने झायदे खास!"

मअ्नची खात्री झाली कीं, यानें आपणास पक्कें ओळखलें. आतां लपविण्यांत कांहीं शहाणपणा नाहीं, म्हणून त्यानें भिकाऱ्यास जवळ बोलावून झटलें "तुझें अनुमान बरोबर आहे. मीच मअ्न. पण आतां माझी तुला विनंती आहे कीं तूं यावद्दल कोणाजवळ एक अक्षरहि बोलूं नकोस. कारण ही बातमी खलीफास लागली तर मला प्राणासच मुकावें लागेल. या उपकाराची फेड झणून हा हिऱ्याचा कंठा घे. याची किंमत सर्व जगाला माहीत आहेच."

भिकाऱ्यानें कंठा घेऊन विचारलें "मअ्न, तूं कधीं आपली सर्व संपत्ति कोणाला दिली होतीस काय?"

मअ्ननें उत्तर दिलें "नाहीं."

"बरें आपली अर्धी संपत्ति कोणास दिली होतीस काय?"

"नाहीं."

"बरें चौथा हिस्सा तरी?"

"नाहीं."

"आठवा हिस्सा?"

आतां मात्र मअ्न मनांत लाजला. दानशूर झणून माझी देशोदेशीं ख्याति आहे; पण मी अजून कोणाहि याचकास एकदम माझ्या संपत्तीचा आठवा हिस्साहि दिला नाहीं! मग मी दानशूर कसला? भिकाऱ्यानें मअ्नच्या मनाची स्थिति ओळखून झटलें "मअ्न इब्ने झायदे, तूं जगद्विख्यात दाता, पण तूं अजून कोणास आपल्या संपत्तीचा आठवा हिस्सासुद्धां एकदम दिला नाहींस. आज माझी सर्व संपत्ति झणजे हा हिऱ्याचा कंठा आहे. एकादें राज्यहि यानें विकत घेतां येईल इतकी याची किंमत आहे. पण माझी ही सर्व संपत्ति मी तुला एकदम देऊन टाकतों! हा घे कंठा, मला तो नको. तुझ्या संबंधानें मी कोणाजवळ अवाक्षरहि बोलणार नाहीं याची खात्री असूं दे."

भिकाऱ्याच्या मनाचा हा मोठेपणा पाहून मअ्नचा कंठ दाटून आला.

—४—

युसफ आणि झुलयखा, फरहाद आणि शिरीन, लयला आणि मजनून वगैरे प्रणयियुग्में पर्शियन वाङ्मयांत प्रसिद्धच आहेत. अनेक कवींनीं त्यांच्यावर काव्यें लिहिलीं आहेत, व त्यांचा इतिहासहि फार मनोरंजक आहे. लयला व मजनून जिवंत असतांनाच त्यांची कीर्ति दूरवर पसरली होती. तेव्हां जिच्यासाठीं मजनून इतका वेडा झाला, ती लयला आहे तरी कशी, तें पाहण्याची त्याच्या प्रांताच्या सुभेदाराला इच्छा झाली. त्यावरून त्यानें लयलेला बोलावून घेतलें व पाहिलें तों ती साधारण श्यामवर्ण असून तिचें सौंदर्यहि कांहीं अप्रतिम नव्हतें. नंतर सुभेदारानें मजनूनला बोलावून झटलें "अरे, लयला तर चारचौघी स्त्रियांसारखी आहे. तिच्यांत विशेष असें मला कांहींच दिसत नाहीं—आणि तूं तर तिच्यासाठीं शुद्ध वेडा बनलास हें काय?"

मजनूननें उत्तर दिलें "लयला बनमे मजनून बायद दीद—लयलेला पाहावयाची ती मजनूनच्या डोळ्यांनींच पाहिली पाहिजे!"

आपली उन्नति करण्यास स्त्रियांनीं काय केलें पाहिजे ?

—लेखक—श्रीमती कुमारी सोकरीबाई शामराव मानकर, बी. ए.

आज आमच्या हिंदुसमाजाकडे बारकाईनें जर कोणीं पाहिलें, तर त्यांस असें आढळून येईल, कीं, आमचा समाज बराच सुधारत चाललेला आहे. वीस वर्षांपूर्वी आमच्या स्त्रियांमध्यें जो एक प्रकारचा कोतेपणा असे, तो आतां बराच कमी झालेला आहे. शिक्षण हें मुलींनां आवश्यक होऊन बसलें आहे, व त्या योगानें आमच्या बहुतेक वेडगळ चालीरीतींनां अजिबात फांटा मिळत चालला आहे. बडिलांची आज्ञा पाळावी, त्यांनां मान द्यावा, लवाडी करूं नये, विश्वासघात करूं नये, वगैरे सर्व नीतीच्या गोष्टी मुलींच्या मनांत लहानपणापासूनच बिंबविण्याचे प्रयत्न सर्वत्र चालू आहेतच. त्याप्रमाणेंच मुलांचें संगोपन कसें करावें, स्वच्छतेपासून काय फायदे आहेत, व्यवस्थेशीरपणामुळें कितीतरी श्रम वांचतात, हें मुलींस नीट शिकविण्यासाठीं सर्वत्र चळवळ सुरु आहे.

इतके सर्व आमच्या उन्नतीचे प्रयत्न होत असतां आमची व्हावी तितकी उन्नति झालेली दिसत नाहीं. याचें कारण काय, असा प्रश्न सहजच येतो. याचीं कारणें अनेक असतील. त्यांचें योग्य विवेचन करणें म्हणजे मोठें धाडसाचें व जबाबदारीचें काम आहे व तें योग्य अधिकारी मनुष्यांच्या हातूनच झालें पाहिजे. तथापि, आमच्या उन्नतीच्या आड येणारीं कांहीं कारणें दिसण्यांत इतकीं क्षुल्लक व नेहमींचीं आहेत, कीं, तीं टाळणें हें सर्वस्वी आम्हां स्वतःवरच अवलंबून आहे. म्हणून आमच्या उन्नतीस हरकत आणणाऱ्या अशा कांहीं लहानसहान बाबींसंबंधानें दोन शब्द लिहिण्याचा या लहानशा लेखांत यत्न केला आहे.

आमच्या रोजच्या व्यवहारांमध्यें आमच्या हातून दिसण्यांत क्षुल्लक, परंतु ज्यांचा परिणाम फारच भयंकर, अशा कितीतरी चुका घडत असतात. 'वायफळ बोलणें.' त्यांत आम्हांला कांहींच विशेष वाटत नाहीं. ज्या बाबतींत आपणांस कांहींच समजत नाहीं, त्यांतसुद्धां दोन वरेवाईट शब्द बोलल्याशिवाय आम्हांला चैन पडत नाहीं. निरर्थक बोलणें ही एक अगदींच क्षुल्लक बाबत आहे, अगर दुर्लक्ष करण्यासारखी गोष्ट आहे, असें पुष्कळांनां वाटतें; परंतु, या लहान चुकीचेच भयंकर परिणाम होतात. एक लहानसें छिद्र असलें तरी त्याच्या योगानें मोठें गलबतसुद्धां बुडून जातें, त्याप्रमाणेंच निरर्थक शब्द वापरल्यानें कधीं कधीं आपण फारच अडचणींत पडतों व नंतर पश्चात्ताप करावा लागतो. आपलें भाषण आपल्या ताब्यांत ठेवणें ही एक कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं. कारण, त्यामुळें आपण आपलें मन स्वाधीन ठेवण्याचा यत्न करतों.

दुसरी एक आमच्या अंगवळणीं पडलेली चूक ही आहे, कीं, नेहमीं आम्ही दोन्ही बाजू पाहिल्याशिवाय मत देतों. या आमच्या अन्यायी वर्तनानें कोणाचें नुकसान होवो अगर कोणास वाईट वाटो, त्याबद्दल आम्ही पर्वा करीतच नाहीं. ज्या कोणाविषयीं बोलणें चाललें असेल त्याची आपल्यास माहिती असो वा नसो, त्यासंबंधीं हव्या त्या गप्पा ठोकून देण्यांत आम्ही स्वतःस कृतकृत्य समजतों. खरें मत देण्यास आपल्यापाशीं योग्य पुरावा आहे किंवा नाहीं, हा विचार आमच्या मनांत येतच नाहीं. त्याचप्रमाणें आमच्या अशा या गैरवाजवी मत देण्यानें कोणावर कसा परिणाम होईल, किंवा कोणाचें कसें नुकसान होईल, येथवर आमच्या विचारांची मजल जातच नाहीं. प्रत्येक विषयावर कांहींतरी बोलणें व दुसऱ्यांच्या गोष्टींत संबंध असल्याशिवाय विनाकारण ढवळाढवळ करणें, हा एक आमचा हक्कच आहे, अशी आमची दृढ समजूत झालेली असते. बरें, अशा रीतीनें वागण्यांत नेहमीं आम्हांला कांहीं स्वार्थ साधावयाचा असतो, असेंहि नाहीं. ज्यांत स्वार्थहि नाहीं व परमार्थतर नाहींच अशा गोष्टींत विनाकारण असल्याचरण करून आम्हीं आमची स्थिति कींव येण्यासारखी करावी, याला काय म्हणावें ?

'परनिंदे'सारखें दुसरें पाप नाहीं, असें साधुसंत आम्हांला सांगत आले आहेत. परंतु तिकडे लक्ष असतें कुणाचें ? आपल्या समाजांत अशा किती स्त्रिया आहेत, कीं, ज्या स्वतःविषयींच बोलून स्वस्थ बसत असतील ? दुसऱ्याच्या उठाठेवी करणाऱ्या व नसते तर्ककुतर्क करणाऱ्याच पुष्कळ सांपडतील, असें

मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. शिक्षणाच्या प्रसाराच्या मानानें आमच्यांत अशा स्त्रिया पुष्कळ असाव्या, ही किती शोचनीय स्थिति आहे बरें ? शिक्षणाचा अर्थ नीटसा कळत नसल्यामुळें हें असें होत असल्यास नकळे ! अन्य देशांतील आमच्या भगिनी आमच्यापुढें कितीतरी गेल्या आहेत व आमचा समाज इतर सुधारलेल्या समाजांच्या जोडीस नेऊन बसविण्यास–अर्थात् ज्या कांहीं अनुकरण करण्यासारख्या गोष्टी आहेत त्यांतच आम्हांस कितीतरी कामें करावयाचीं आहेत. असें असतां, एकमेकींची वर्मे काढण्यांत आम्हीं आपलें आयुष्य वेंचावें, हा निव्वळ वेडेपणा आहे. आम्हां स्त्रियांस जर आपली उन्नति करून घ्यावयाची आहे, तर आम्हीं आपल्यांतील कुत्सित बुद्धि अवश्य काढून टाकिली पाहिजे. कारण, त्याशिवाय चांगल्या विचारांस वाव मिळणें शक्य नाहीं.

आपली उत्तरोत्तर उन्नति व्हावी, आपल्या कर्तव्यांस आपण चुकूं नये व थोर स्त्रियांचें अनुकरण करण्याचा आपण यत्न करावा, या इच्छा कानवी नाहींत असें कोण म्हणेल ? पण अशा इच्छा आमच्यापैकीं कितीजणींच्या मनांत येतात बरें ? आपल्या शेजारणींपेक्षां आपलें वैभव व आपला डामडौल जास्त असावा, अशा तऱ्हेच्या विचारांत आम्ही बहुतेक सदा असतों. म्हणजे खऱ्या मोठेपणाला सोडून 'खोट्या मोठेपणा'कडे आमचें मन लवकर धांव घेतें. ईश्वरानें ज्या स्थितींत आपणांस ठेविलें आहे, तींत आपलें कर्तव्य नीटपणें करून राहणें, हा राजमार्ग आहे; परंतु हा राजमार्ग सोडून आम्ही आडमार्गास वळतों, व शेवटीं अहंकार आणि द्वेष यांनां बळी पडतों. कारण, आमच्यापेक्षां ज्या कोणी श्रीमंत असतील त्यांचा आम्ही सदोदित हेवा करतों व ईश्वरकृपेनें आमची स्थिति जर का साधनतेची असली, तर आमच्या गरीब भगिनींची आम्हांला आठवण देखील होत नाहीं ! आम्हांला मोठेपणा पाहिजे असतो तो इतक्यासाठींच, कीं, इतरांनीं आम्हांला धन्य म्हणावें व आमचें ऐश्वर्य पाहून थक्क व्हावें ! पण मोठेपणावरोबरच ज्या जबाबदाऱ्या आमच्यावर येतात, त्या थोड्याबहुत मानानें तरी पूर्ण करण्याची आमच्यांत जाणीव असली, तरच त्या मोठेपणास आम्ही लायक होऊं, हें आम्ही सदोदित ध्यानांत ठेविलें पाहिजे. आपल्या हातीं जें करण्यासारखें आहे तें सोडून देऊन पोकळ डामडौलाची इच्छा सदैव करण्यांतच सर्वच आयुष्य खर्च केलें, तर आमची उन्नति कधींतरी होईल काय ?

'वेळाचा दुरुपयोग' करणें ही एक अतिशय खेदजनक गोष्ट आहे. आपला अमोलिक वेळ आळशांत, निरर्थक गप्पांत, उठाठेवी करण्यांत, किंवा दुसऱ्यांच्या कुचेष्टा करण्यांत दवडणें ही फारच निंद्य गोष्ट आहे. या बाबतींत आमच्या पाश्चिमात्य भगिनींकडून खरेंच शिकण्यासारखें आहे. त्या रिकाम्या क्षणून कधीं दिसावयाच्याच नाहींत. प्रत्येक तासास त्यांचें नेमलेलें काम असावयाचेंच. नेहमीं कांहींतरी उद्योग केल्यापासून अनेक फायदे आहेत. उद्योगी मनुष्य उत्साही व तरतरीत दिसतो. तेंच रिकाम्या मनुष्याकडे पहा. जीवित हें एक लादलेलें ओझें आहे व तें एकदा कसें तरी वाहून नेलें पाहिजे, ही त्याची ठाम समजूत असते. अशा तऱ्हेचें ध्येय आपणांपुढें सदा ठेविलें तर आम्ही कधींतरी सुखी होऊं काय ? अगोदर मनुष्यमात्राची वयोमर्यादा दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. असें असतां, जो वेळ आम्हांला सांपडतो त्याचा आपण दुरुपयोग करूं लागलों, तर ईश्वराच्या दृष्टीनें आम्ही अन्यायी व कृतघ्न नाहीं का होणार ?

वर लिहिलेल्या आमच्या चुका दिसण्यांत इतक्या क्षुल्लक आहेत, कीं, त्यांना कोणीहि अपराध म्हणत नाहींत व त्यांनां अपराध ही संज्ञा देत नाहींत, म्हणूनच त्यांचें गंभीर स्वरूप आमच्या ध्यानांत येत नाहीं. आमचें मन कुजक्या विचारांनीं सदोदित भरून ठेवलें तर उच्च विचार आमच्या डोक्यांत कधींहि शिरणार नाहींत. पोकळ डामडौलापासून अहंकार व दांभिकपणा वाढतो व खऱ्या सुखास आम्ही कायमच्या मुकतों. दुसऱ्यांच्या रिकाम्या उठाठेवींनें मनाची शांति बिघडते व मनास स्वस्थता नसली तर समाधान व सुख कसें लाभणार ? वेळाचा दुरुपयोग केल्यानें कर्तव्याची दिशा चुकते. सर्व स्त्रियांनीं, विशेषतः ज्यांनां थोडेंबहुत तरी सारासारविचार करण्यापुरतें शिक्षण मिळालें आहे अशांनीं, आपल्या उन्नतीस घातक होणाऱ्या ज्या अशा कांहीं क्षुद्रक बाबी आहेत त्या टाळण्याचा यत्न केला पाहिजे. भावी पिढीस उत्तम वळण लागलें पाहिजे, स्त्रियांचा दर्जा आहे त्यापेक्षां उच्च झाला पाहिजे, सुशिक्षित कन्या, सुशिक्षित भगिनी, सुशिक्षित पत्नी व सुशिक्षित माता या नात्यानें आपलीं कर्तव्यें चांगल्या रीतीनें बजावतां आलीं पाहिजेत, अशी इच्छा ज्या स्त्रियांनां असेल त्यांनीं या गैरवाजवी गोष्टींपासून आपणांस होतां होईतों दूर ठेवलें पाहिजे. कारण, त्याशिवाय आम्ही उन्नतीच्या पंथास लागणें अगदींच अशक्य आहे !

आमचा जातिभेद.

कांहीं महाराष्ट्रीय पुढाऱ्यांचीं मतें.

[७]

[श्रीयुत प्रो. धर्मानंद कोसंबी, पुणें.]

१. (क.) वैदिक काळीं ह्या देशांत आलेल्या आर्यांचा येथील मूळ रहिवाशांशीं संबंध आला, तेव्हां वर्णभेदाचा उगम झाला असला पाहिजे. (ख.) बुद्धकालीं ह्मणजे इसवी सनापूर्वी ६०० वर्षे वर्णभेदाचें बंड बळावत चाललें होतें. क्षत्रिय आणि ब्राह्मण यांजमध्यें श्रेष्ठ कोण ? याजबद्दल बराच वाद माजला होता; परंतु आजला जी जातिभेदाची स्थिति आहे, ती ह्या वर्णभेदाची नव्हती. क्षत्रिय आणि ब्राह्मण यांजमध्यें शरीरसंबंध घडत असत. पण पुढें पौराणिक काळांत चातुर्वर्ण्याला आजचें स्वरूप येत गेलें. चातुर्वर्ण्य व जातिभेद हीं एक नव्हत. पण चातुर्वर्ण्यबीजापासून जातिभेद वृक्ष झाला आहे. (ग.) वर्णभेद गुणकर्मानुसार मानावा किंवा कुलपरंपरेनें मानावा याजबद्दल ह्या काळच्या ब्राह्मणांत देखील मतभेद होता, तथापि बहुमत कुलपरंपरेलाच अनुकूल होतें.

२. जातिभेद हें सध्यांच्या हिंदुधर्माचें आवश्यक अंग होऊन बसलें आहे. माझा समज असा आहे, कीं, पौराणिक हिंदूंनीं बौद्धधर्माचा जो इतका विरोध केला, तो बौद्धधर्म जातीविरुद्ध होता ह्मणून होय. सांख्यमत वेदप्रामाण्य मानीत नाहीं, तथापि त्याचा समावेश अर्वाचीन हिंदुधर्मांत झाला आहे. वर्णसंकर होऊं न देणें हेंच पौराणिक हिंदु पुढाऱ्यांचें कर्तव्य झालें होतें, असें ह्या कालच्या उपलब्ध वाङ्मयावरून दिसून येतें.

३. ऐतिहासिक दृष्ट्या पाहिलें असतां जातिभेदाचा हिंदु समाजावर अत्यंत अनिष्ट परिणाम झाला आहे. बौद्धधर्माच्या उदयानंतर जेव्हां हिंदुस्थानांत जातिभेदाचें महत्त्व कमी झालें, त्याच वेळीं जगाच्या इतिहासांत उदयचित्तानें नमूद करण्यासारखीं कृत्यें हिंदेच्या हातून घडलीं. ज्या मगध देशांत जातिभेदाचें बंड प्रथमतः माजलें, त्यांतच चंद्रगुप्त आणि अशोक यांसारखे कर्तृत्ववान् शूद्र राजे उदयास आले. ब्राह्मणांनीं जातिमत्सर झुगारून देऊन व बौद्धमताचा अंगीकार करून चीनसारख्या दूरदूरच्या प्रदेशांत हिंदूंच्या बुद्धिमत्तेची आणि सदाचारसंपन्नतेची पताका फडकाविली. हिंदु व्यापारी सिलोन, ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा इत्यादि प्रदेशांच्या किनाऱ्यांवर आपलीं भव्य जहाजें नांगरून तेथील रहिवाशांस थक्क करून सोडूं लागले. राजनीति, धर्म आणि व्यापार यांहींकरून त्या कालच्या हिंदूंनीं ज्ञात जगावर आपलें वर्चस्व स्थापित केलें. पण पुढें पौराणिक हिंदूंनीं जातिभेदास फार महत्त्व दिल्यामुळें त्या सर्व गुणांचा ऱ्हास होत गेला. समुद्रयानास बहिष्कार पडला; जातिबंधनें अधिकाधिक दृढ होत गेलीं; आचारच धर्म बनला; सर्वत्र एकलकोंडेपणा वाटत गेला. मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या ह्या देशावर जेव्हां झाल्या, तेव्हां रजपुतांसारख्या शूर जाती ह्या देशांत असूनहि त्यांचा टिकाव मुसलमानांपुढें लागला नाहीं, याचें कारण, त्या काळीं आमच्या लोकांत वेडगळ धर्मकल्पनेनें आलेला एकलकोंडेपणा हेंच असलें पाहिजे.

४. जातिभेद इतका दृढमूल झाला, याचीं कारणें दोनः—अज्ञान आणि अभिमान. समाजशास्त्राचें सूक्ष्मपणें अवलोकन करणारे बुद्धासारखे महात्मे पौराणिक कालांत झाले नाहींत. ब्राह्मण पुढाऱ्यांनीं आपल्या जातीचेंच वर्चस्व स्थापण्याचे प्रयत्न केले. इतर जातींची त्यांनीं उपेक्षा केली, येवढेंच नव्हे, तर ब्राह्मणेतरांनीं आपल्या जातीशीं स्पर्धा करूं नये अशाबद्दलहि त्यांनीं खबरदारी घेतली. शंबुकाला रामानें ठार मारलें, वैगरे गोष्टी रामायणासारख्या ग्रंथांत ह्याच वेळीं शिरल्या असाव्या. ब्राह्मण जातीचा अभिमान व इतर जातींचें अज्ञान हीं जातिभेद स्थिर होण्यास कारणें झालीं. अलीकडे हा अभिमान महारांमांगांपर्यंत पसरला आहे; पण पौराणिक कालीं त्याची मर्यादा इतकी दूर गेली नसावी, असें मला वाटतें.

५. जातिभेद सामाजिक, नैतिक, इत्यादि सर्व प्रगतींच्या आड आला आहे आणि येत आहे. (क.) समाजोन्नतीला समाजांतील व्यक्तींचें परस्परांवर प्रेम असावें लागतें. जातिभेद ह्या प्रेमाच्या आड येत आहे. आपल्या जातीपलीकडे फार थोड्यांची दृष्टि जाते; व ज्यांची जाते ते बहुधा जातिभेदाच्या विरुद्ध असतात. (ख.) मद्रास शहरांत कांहीं वर्षांमागें एक पारावा

जातीची बाई उन्हाच्या तापानें रस्त्यांत घेरी येऊन पडली. त्या रस्त्यानें कित्येक ब्राह्मण जात होते, त्यांनीं तिला पाहिलें; पण ती हीनजातीची असें दिसून आल्यामुळें ते तिला शिवले नाहींत! पुढें कांहीं मुसलमानांनीं त्या बाईस पाहिलें, व तिला उचलून हॉस्पिटलांत नेऊन पोंचविलें. जो जातिभेद गांजलेल्या माणसास मदत करूं देत नाहीं, तो नीतीच्या आड येतो, हें निराळें सांगणें नकोच! (ग.) भाटे, मारवाडी वगैरे व्यापारी जाति परदेशगमनाला किती भितात, व त्यामुळें आमच्या व्यापारधंद्याची व्हावी तशी प्रगति होत नाहीं, हें सर्वविश्रुतच आहे. हिंदु व्यापाऱ्यांनीं युरोप, अमेरिका वगैरे देशांतून प्रवास केला असता तर त्यांतहि कित्येक टाटा निपजले असते. (घ.) जातिभेदाला महत्त्व दिल्यामुळें पेशवाईची काय गत झाली हें इतिहासज्ञांस ठाऊक आहेच. सध्यांच्या काळींहि कित्येक म्युनिसिपालिट्यांत व इतर राजकीय बाबतींत जातिभेदाचें बंड शिरलें आहे व त्यामुळें सार्वजनिक कामांत अडथळे येत आहेत. सारांश, जातिभेद नष्ट झाल्याखेरीज सामाजिक, नैतिक, औद्योगिक किंवा राजकीय प्रगति होणार नाहीं.

६. जातिभेद कायम ठेऊन जातिमत्सर कमी करणें ह्या काळीं तरी शक्य दिसत नाहीं. ब्राह्मणेतरांनां शिक्षणाचा अधिकार ठेवला नाहीं, तर ही गोष्ट कदाचित् शक्य होईल; पण त्यांनां शिक्षणापासून पराङ्मुख करणें आतां शक्य नाहीं, व शिक्षण मिळाल्यावरोबर ते ब्राह्मणांशीं स्पर्धा केल्यावांचून राहणार नाहींत! वेदोक्तासारखीं प्रकरणें सुशिक्षित मराठ्यांकडून उपस्थित होतात, अशिक्षितांकडून होत नाहींत, हें लक्षांत ठेवलें ह्मणजे माझें ह्मणणें बरोबर समजेल.

पुणें, १७-६-१२.

७. पोटभेद आधीं मोडावे कीं मोठे भेद आधीं मोडावे, हा वाद निरर्थक आहे. घरास आग लागली आहे, अशा प्रसंगीं मोठीं मांडीं आधीं काढावीं, कीं, लहान भांडीं आधीं काढावीं, हा वाद माजविण्यांत अर्थ नाहीं. ज्याच्या हातास जें लागेल, व ज्याला जें उचलण्याचें सामर्थ्य असेल त्यानें तें काढावें. पोटभेद किंवा मोठा भेद ज्याला जो मोडतां येईल त्यानें तो मोडावा; सभा भरवून वाद करीत बसूं नये!

८. नुसत्या रोटीव्यवहारानें जातिभेदाचा अनिष्ट परिणाम नष्ट होणार नाहीं. गोव्यांतील सर्व जातींच्या किती लोकांत आज चारशें वर्षें रोटीव्यवहार चालू आहे; पण जातिमत्सर कमी झाला नाहीं! राजकीय बाबतींत सुशिक्षित किती ब्राह्मणांचें आणि किती मराठ्यांचें बहुधा पटत नाहीं. गोव्यांतील तीन प्रांतांत किती धर्मांचें प्राबल्य असतांहि तेथील किती लोकांत एकराष्ट्रीयत्वाची कल्पना मुळींच आली नाहीं. याचें कारण जातिभेदाचें मूळ बीज–आपल्या जातीबाहेर बेटीव्यवहार न करणें–तें त्यांनीं उराशीं बाळगिलें आहे.

९. जातिभेद आपोआप मोडण्यास इतका काळ लागेल, कीं, त्यामुळें समाजावर कांहीं इष्ट परिणाम होईल कीं नाहीं याची मला शंका आहे. जपानच्या पुढाऱ्यांनीं जातिभेद मोडण्याचें काम जर निसर्गावर सोंपविलें असतें तर तेथें एकराष्ट्रीयत्वाला पुष्कळ विघ्नें आलीं असतीं, व इतक्या अल्पावकाशांत त्या देशाची सुधारलेल्या राष्ट्रांत गणना झाली नसती.

१०. जातीमध्यें राहून जातिभेद कसा मोडतां येईल याची मला बरोबर कल्पना करितां येत नाहीं. मोडक्या घरांत राहून तें हळुहळू मोडून टाकण्यास सुरुवात केली, तर त्यांत राहणाऱ्या माणसांचा फायदा होईल असें वाटत नाहीं. जातिबंधनें तोडून टाकल्याशिवाय जातिभेद नष्ट होणार नाहीं!

---

[८]

[श्रीयुत बाळकृष्ण सावळाराम बारटक्के, बी. ए., एल् एल् बी., असि. सर्वे सुपरिन्टेन्डन्ट, बडोदें.]

समाजसंस्था अस्तित्वांत आल्यानंतर ती सुव्यस्थित राहून तिचें अस्तित्व कायम राहावें एतदर्थ समाजोत्पादकांनीं त्या वेळची परिस्थिति लक्षांत घेऊन समाजरचना केली असावी. चातुर्वर्ण्य अथवा समाजाचे चार भाग वरील रचनेसच अनुलक्षून असावेत. हे चार भाग राजकीय दृष्ट्या (Political divisions) झालेले असावेत.

समाजाच्या अंतर्व्यवस्थेतील कृत्यें त्यांतील व्यक्तींनीं आपापल्या कर्तृत्वशक्तीच्या मानाप्रमाणें वांटून घेतलीं असावींत. हीं कृत्यें एक एकाच घराण्यांत बरींच वर्षें होत गेल्यामुळें पिढीजाद बनून त्या त्या घराण्यांचे ते ते धंदेच होऊन बसले. हेच धंदे ज्ञाति अस्तित्वांत येण्यास कारणीभूत झाले असावेत. समाजप्रगतीप्रमाणें पूर्वीच्या धंद्यांत फरक पडूं लागला व त्या फरकांमुळें

जातिभेद व पोटजाति उत्पन्न होऊन आज आपल्या देशांत शेंकडों जाति दृष्टीस पडत आहेत.

जातिभेद व चातुर्वर्ण्य हीं एकच नव्हत. चातुर्वर्ण्य राजकीय दृष्ट्या व जातिभेद सामाजिक व औद्योगिक दृष्ट्या अस्तित्वांत आले असावेत. पण हे दोन्ही भेद गुणकर्मानुसारच मानिले पाहिजेत.

पूर्वकालीन स्थितनुरूप अर्थशास्त्रदृष्ट्या हे सामाजिक व औद्योगिक विभाग समाजहितास अनुकूल असतील; पण ज्याप्रमाणें हिंदुधर्माचें खरें उज्वल स्वरूप जाऊन बाह्याचारासच धर्म गणण्यांत येतें, त्याप्रमाणेंच ह्या विभागांचें खरें स्वरूप व मूळहेतु बाजूस राहून आजची ही दुःस्थिति प्राप्त झाली आहे. इतर राष्ट्रांकडे व इतर धर्मांकडे पाहिलें असतां चटकन लक्षांत येण्याजोगें आहे, कीं, प्रचलित जातिभेद हा हिंदुधर्माचें महत्त्वाचें आणि आवश्यक अंग नाहीं. उलट पक्षीं ह्या जातिभेदामुळें अनिष्ट परिणाम घडून आलेले आहेत. किंबहुना, हिंदुस्थानास परतंत्रता प्राप्त होण्यास जातिभेद हा बऱ्याच अंशीं कारणीभूत झाला आहे, असें हिंदुस्थानच्या इतिहासाचें सूक्ष्म अवलोकन केल्यास तेव्हांच लक्षांत येईल. सामाजिक व औद्योगिक प्रगतीच्या आड तर हा भेद पावलोपावलीं येत आहे, असें प्रत्येक सुशिक्षित माणसाची मनोदेवता क्षणोक्षणीं त्याला निक्षून सांगत असलीच पाहिजे. विशिष्ट देशकार्यासाठीं मधून मधून एकादे वेळीं हा भेद एकीकडे ठेवून कित्येक जाति एकवटल्या असतील; पण ही एकी तात्पुरतीच होती. जातिभेद नसलेल्या धर्मामध्यें अगर राष्ट्रांमध्यें जी एकजूट दिसून येते ती जूट हिंदुधर्मामध्यें केव्हांहि दिसून आलेली नाहीं, व जातिभेद गेल्याशिवाय ही जूट दिसून येणें शक्य नाहीं. धर्माभिमानी लोक जातिभेदाचें कितीहि समर्थन करोत, पण विचारी माणसास हिंदुधर्मास हा एक महारोगच लागला आहे असें वाटल्यावांचून राहणें शक्यच नाहीं. असें असून हा जातिभेद हिंदुसमाजांत दृढमूल होऊन इतके दिवस टिकला कसा, हें एक मोठें गूढ आहे! माझ्या मतें याचीं कांहीं कारणें खालीलप्रमाणें असावींतः—

(१) हिंदुलोकांची पुराणप्रियता व अंधश्रद्धा.

(२) एकादी गोष्ट खरी आहे अशी खात्री झाली असतांहि तिच्या तलाप्रमाणें मागण्यास मनोधैर्याची उणीव.

(३) कनिष्ठ मानलेल्या जातींमध्यें उच्च शिक्षणाचा अभाव.

(४) श्रेष्ठ जातींचें दडपशाही वर्तणुकीचें धोरण.

(५) विचारस्वातंत्र्य व कृतिस्वातंत्र्य यांचा अभाव.

जातिभेद कायम ठेवून जातिमत्सर नाहींसा करणें हें हल्लींच्या मनूंत शक्य दिसत नाहीं. जोंपर्यंत शिक्षणाचा गंध इतर जातींस नव्हता, तोंपर्यंत अडाणी लोकांच्या अंधश्रद्धेचा लाभ घेऊन तसें करणें शक्य झालें असेल; परंतु शिक्षणाच्या तेजामुळें वस्तुस्थितीचा लख्ख प्रकाश कनिष्ठ जातींच्याहि हृदयामध्यें पडूं लागल्यानें त्यांनां आपल्या माणुसकीची आठवण होऊं लागली आहे, व इतक्या दिवस राखेमध्यें दडपून पुरून ठेविलेल्या अग्निकणाप्रमाणें त्यांचीं हृदयें धुमसूं लागण्यास सुरुवात झाली आहे, असें वरवर पहाणारास देखील दिसून येईल. तेव्हां अशा स्थितींत चालढकल करण्यांत अर्थ नाहीं. कारण, थोड्याच काळांत 'बाप दाखवा नाहींतर श्राद्ध करा!' अशी वेळ आल्याशिवाय राहणार नाहीं.

मुख्य मुख्य जातींतील पोटभेद इतके प्रबळ झालेले आहेत, कीं, एकादे वेळीं मुख्य जातिभेद पुरवतील, पण हे पोटभेद फारच असह्य झाले आहेत. भिन्नजातींमध्यें रोटीव्यवहार असूं शकेल, पण एकाच जातीच्या पोटभेदांमध्यें रोटीव्यवहार तर एकीकडेच राहिला, पण नुसती पानसुपारीहि होऊं शकत नाहीं! कदाचित् पांडरपेशे लोकांतील पोटभेद इतके तीव्र नसतील, व त्यामुळें पोटभेद मोडून टाकणें शक्य असेल; परंतु कनिष्ठ वर्गांमध्यें असें करणें फारच दुरापास्त आहे. शिक्षणप्रसार होऊन यांच्यातील निदान कांहीं मंडळींचीं मनें प्रगल्भ झाल्याखेरीज अशी सुधारणा होणें फार मुष्किलीचें आहे. म्हणून अशिक्षित अथवा मागसलेल्या जातींत मोठ्या प्रमाणावर शिक्षणप्रसार करण्याची समाजहितचिंतकांनीं प्रथम खबरदारी घेतली पाहिजे.

नुसता रोटीव्यवहार सुरू केल्यानें जातीमध्यें असणारास जो एक आपलेपणा वाटत असतो तो येणें शक्य नाहीं; पण दगडापेक्षां वीट मऊ या न्यायानें तूर्त निदान रोटीव्यवहार सुरू होईल तर कांहीं वाईट नाहीं. पण इतक्यातरी धाडसाची मंडळी आहेत कोठें?

कोणतीहि गोष्ट साधण्यास प्रयत्न हा केलाच पाहिजे. **'दैवेन देयमिति कापुरुषा वदन्ति'** दैवावर भरंवसा ठेऊन स्वस्थ बसणें म्हणजे आपली सदसद्विवेक-

बुद्धि आपल्यास निक्षून सांगत असतां आपण आपलें कर्तव्य न बजावण्यासारखें होय. ह्मणून जातिभेद हा महारोग काढून टाकण्यास आपापल्या परीनें प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे. प्रयत्नानें परिस्थिति प्राप्त होईल, व मग आपले प्रयत्नहि सफल होतील.

जातिभेद ज्यांनां खरोखरच अनिष्ट वाटत असेल, जातिबंध तोडून टाकणें हें श्रेयस्कर आहे असें ज्यांची मनोदेवता सांगत असेल, व तसें करण्याइतकें ज्यांचें मनोधैर्य दृढ असेल, त्यांनीं जातीचीं बंधनें झुगारून देऊन लोकांस उदाहरण घालून द्यावें. परंतु येवढ्यानेंच त्यांचें कर्तव्य संपलें असें होत नाहीं; तर आत्मयाग करून ज्ञात्युत्कर्षार्थ आपला देह झिजविला पाहिजे.

वडोदें, १७-६-१२.

---

[९]

[श्रीयुत सीताराम केशव बोले, जे. पी; विद्येत मागसलेल्या वर्गाचे एक पुढारी, मुंबई.]

१. समाजव्यवस्था सुकर व्हावी, व श्रमविभाग होऊन समाजसंबंधीं कर्तव्यें करण्यास सोईवार पडावें, या हेतूनें प्राचीनकाळच्या समाजाग्रणींकडून वर्णभेदाची उत्पत्ति करण्यांत आली. त्यालाच चातुर्वर्ण्याची व्यवस्था ह्मणतात. जातिभेद ही चातुर्वर्ण्याची फारच कुधारणा करून वाढविलेली आवृत्ति आहे! जातिभेद हा, त्यांचें जें मूळ चातुर्वर्ण्य, त्यास अगदींच सोडून आहे. चातुर्वर्ण्यांत रोटीबेटी व्यवहार चालत असे, अशीं पुराणांत अनेक उदाहरणें आहेत. जातिभेदांत हें कांहींच चालत नाहीं. चातुर्वर्ण्य व जातिभेद हीं कुलपरंपरेनें मानावयाचीं नसून गुणकर्मानुसार मानलीं पाहिजेत, या संबंधानेंहि पुराणांत आधार आहेत.

२. वर्णव्यवस्थेखेरीज जातिभेदाचा व हिंदुधर्माचा कांहींच संबंध नाहीं. कारण, हिंदुधर्म सनातन असून जातिभेद अर्वाचीन आहे. प्राचीन ग्रंथांत हल्लींच्या जातिभेदाचा उल्लेख नाहीं.

३. ऐतिहासिक दृष्ट्या जातिभेदाचा समाजहितावर फारच अनिष्ट परिणाम झाला आहे. यासहि ऐतिहासिक ग्रंथांत अनेक उदाहरणें आहेत.

४. जातिभेद हिंदुसमाजांत दृढमूल होऊन टिकला याचीं कारणें ज्यांच्या हातीं विद्येचीं सर्व सूत्रें होतीं त्यांनीं इतरांस अज्ञानदशेंत ठेवून जातिभेद हा हिंदुधर्माचें एक आवश्यक अंग आहे अशी त्यांची खोटी समजूत करून दिली, व कालांतरानें ती दृढमूल झाली.

५. जातिभेद हा सर्व प्रगतीच्या आड येत आहे, यांत संशय नाहीं.

६. जातिभेद कायम ठेवून जातिमत्सर नाहींसा करणें दुरापास्त आहे.

७. मुख्य मुख्य ज्ञातींतील पोटभेद मोडून नंतर मग क्रमानें मुख्य भेद मोडण्यास सुरवात करणें, हाहि मार्ग बराच यशस्वी होईल; पण त्यासहि पुष्कळ कालावधि लागेल. ह्मणून ज्यांचे आचार विचार सुधारले आहेत, अशांनीं तरी प्रथम आपसांत रोटीव्यवहार सुरू ठेविल्यास मुख्य भेद मोडण्याचें कार्य बरेंच सुलभ होईल.

८. रोटीव्यवहार सुरू होऊन जातिभेदाचा अनिष्टपणा बराच नाहींसा होईल, व बेटीव्यवहार सुरू झाल्यास तो अगदींच नष्ट होईल.

९. जातिभेद हा परिस्थितीच्या जोरानें मोडेलच; पण त्याला पुष्कळ कालावधि लागेल व जाणूनबुजून प्रयत्न केल्यास हा कालावधि निदान दृष्टीच्या टप्यांत तरी येईल.

१०. जातिभेद ज्यांनां अनिष्ट वाटत आहे त्यांनीं एकदम जातिबंधनें तोडून टाकणें चांगलेंच; पण अशांची संख्या थोडी निघाल्यास कदाचित् त्यांची एक निराळी जातच होईल. ह्मणून अशांनीं जातीमध्येंच राहून तो कमी करण्याचा मार्ग स्वीकारल्यासहि कांहीं वाईट नाहीं. शिक्षणप्रसार, हिंदुधर्माची खरी माहिती,

स्वच्छता, आचार व राहणी यांत सुधारणा व निरनिराळ्या जातींच्या लोकांत सहभोजनाचे योग वगैरे बाबींचें मान जसजसें वाटत जाईल, तसतसा जातिभेद कमी होत जाईल. करितां, ज्यांना जातिभेद अनिष्ट वाटत असेल त्यांनीं वरील दिशेनें तरी सध्यां प्रयत्न करण्याचें सुरू केल्यास त्याचा पुष्कळ इष्ट परिणाम होईल असें मला वाटतें.

दादर, मुंबई, २०-६-१२.

---

[१०]

[श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए., एल्एल्. बी., पुणें.]

'जन्मसिद्ध अशा प्रकारचें चातुर्वर्ण्य जगाच्या उत्पत्तीपासून परमेश्वरानें उत्पन्न केलें,' हें मत मला ग्राह्य वाटत नाहीं. जातिभेद उत्पन्न होण्याला मुख्य दोन कारणें आहेत. एक मनुष्यमात्राची आत्मप्रीति, अभिमान, गर्व, शुद्धिप्रियता वगैरे आत्मस्थ गुणदोष; व दुसरें, हीन मानिलेल्या जातींच्या ठिकाणीं असलेली अस्वच्छता, रक्ताच्या भेसळीमुळें झालेले दुष्परिणाम, अशुद्ध आचार, संवयी, चालीरीति वगैरे परस्थ दोष.

हीन जाति बनण्याला मूळारंभीं वरील दोषांपैकीं एक अगर अनेक दोषच प्रायः कारणीभूत झालेले असतात, आणि निदान त्या वेळेपुरता तरी त्यांजवर पडलेला बहिष्कार व त्यांच्याशीं दुसऱ्यांचें तुटकपणाचें वागणें योग्य असतें. पण कालांतरानें केव्हांहि हे दोष निघून जाऊं शकत नाहींत ही समजूत खोटी असून, तिनेंच जातिभेदास स्थाइकपणा येतो. गीतेंतील 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' हे शब्द जन्मसिद्ध जातिभेदाशीं विरोधी आहेत, असें मला वाटतें. तसें नसलें तरी, विशेष गुणांनीं आणि कर्मांनींच हीन जाति बनतात, व म्हणूनच तद्विरुद्ध गुण आणि कर्में यांच्या योगानें हीन जातींनां फिरून उन्नयनाची पात्रता आली पाहिजे, हें म्हणणें सयुक्तिक आहे असें मला वाटतें.

आतां प्रत्यक्ष व्यवहारांत वाद राहतो, याचें कारण असें, कीं, हीन जातींनां आपल्याहून वरिष्ठ जातींत समाविष्ट होण्याची महत्त्वाकांक्षा असली तरी, हीनतर जातींनां आपणांत घेऊन त्यांनां बरोबरीचे हक देण्याइतका उदारपणा फार थोड्यांमध्यें असतो. जातिभेदासंबंधानें जो काय अन्याय होत आहे तो फक्त आपल्या स्वतःसंबंधानें मात्र होतो, असें ज्या त्या हीनजातीस वाटतें. आपण वरिष्ठ जातींत एकदां समाविष्ट झालों म्हणजे मग तिचीं कवाडें लावून घेऊन सर्व जगास बाहेर कोंडण्यास हरकत नाहीं, असें त्यांनां वाटतें.

ज्यांच्या मनांत खरोखर समताबुद्धि उदित झाली आहे, अशांच्याहि हातून जातिभेद पाळला गेल्यासारखा दिसतो. त्यास दोन कारणें आहेत. एक, चिर पूर्वसंस्कार. याच्या योगानें विचारास प्रत्यक्ष आचाराचें स्वरूप देणें अवघड जातें. दुसरें, आचारवैषम्य आणि मनानें मानिलेल्या शुचिभूततेची आवड. अर्थात्, जातिभेद सहसा सर्वस्वी मोडणार नाहीं. ज्या ठिकाणीं तो मोडला असें वाटत असेल, त्या ठिकाणीं असें हटकून आढळून येईल, कीं, हीन मानिलेल्या जातींमध्यें वरिष्ठ जातींस आकर्षक असे कांहीं चांगले गुण—म्हणजे उदाहरणार्थ, सत्ता, सामर्थ्य, बुद्धितेज, नीतितेज, अंतर्बाह्य शुद्धि वगैरे सन्निकर्षोत्तेजक व प्रेमोत्पादक गुण—उदित झालेले होते. यांपैकीं वरेच गुण शिक्षणानें —शिक्षण हा शब्द मी व्यापक अर्थानें योजीत आहें —अथवा कोणत्याहि सात्विक संस्कारानें व्यक्तिमात्रांत उदित होऊं शकतात. आणि केवळ परंपराहि जशी अधोगतीला, तशीच उन्नतीलाहि अधिकाधिक कारणीभूत होऊं शकते. तात्पर्य, सर्व जातींविषयीं समताबुद्धि मनाला पटण्यासारखी असली, तरी तिचा वाटेल तसल्या परिस्थितींत हुकमी अम्मल होणें फार कठिण आहे. केवळ पैजेखातर, किंवा चमत्कारादाखल म्हणून अटीस पडलेला मनुष्य आपणांमध्यें जातिभेदबुद्धि नाहीं अशा प्रकारचें आचरण प्रसंगविशेषीं करून दाखवूं शकेल. परंतु अर्थात्च असल्या एकट्यादुकट्याच्या कृत्यानें जातिभेदाचा प्रश्न सुटला, असें होणार नाहीं. अथापि, प्रसंग येईल त्या ठिकाणीं तरी, आपलें तात्त्विक कां होईना, पण मत स्वच्छ सांगितल्यानें लोकमत बनण्यास चांगला उपयोग होतो.

केसरी आफिस, पुणें, २०-६-१२.

[११]

[रा. सा. मानाजी राजजी, विचेंत मागसलेल्या वर्गांचे एक पुढारी, मुंबई.]

१. प्रथम वर्णभेदाची उत्पत्ति गुणकर्मानुसार झाली असली पाहिजे. केवळ जगाच्या उत्पत्तीपासून जातिभेद असेल, असें संभवत नाहीं. जातिभेद गुणपरंपरेनें झाले असले पाहिजेत. कुलपरंपरेनें जातिभेद मानणें वेडेपणाचें होईल.

२. जातिभेद हिंदुधर्माचें महत्त्वाचें अंग असावें, असें माझे समजुतीप्रमाणें मला वाटत नाहीं. धर्म अमुक जातीकरितां आहे, असें नाहीं. धर्म म्हणजे समाजाला नीतीनें घातलेलें बंधन होय. धर्माचा जातीशीं कोणच्याहि प्रकारचा संबंध येऊं शकत नाहीं.

३. जातिभेदानें ऐतिहासिक दृष्ट्या समाजहितावर बराच अनिष्ट परिणाम झाला आहे. उच्च व नीच असा जातीचा अभिमान असल्यामुळें, ऐक्य न राहून, समाजांत प्रत्येक जात एकमेकांचा हेवा करीत असते, अशीं वरींच उदाहरणें इतिहासांत सांपडतील.

४. जातिभेद टिकून राहण्याचीं कारणें खालील-प्रमाणें असावींत, असें मला वाटतें:—

१. हिंदुसमाजाचें गाढ अज्ञान.
२. दांभिक धर्माची विशेष आवड.
३. उच्च म्हणजे ज्ञानी म्हणविणारांनीं धार्मिक व सामाजिक बाबतींत इतर समाजास अज्ञानांधकारांत ठेवणें.

५. जातिभेद हा सामाजिक उन्नतीस जरूर आडवा आला पाहिजे. जोंपर्यंत जातिभेद आहे, तोंपर्यंत समाजाची उन्नति कधींच होणार नाहीं! कारण, उच्च व नीच हा भेद साहजिक मनांत आल्यावांचून राहत नाहीं. आपण सर्व एकाच आईबापांचीं लेंकरें आहोंत, असें ज्या वेळेस धरून चालूं, त्या वेळेस हा मत्सर नाहींसा होईल. नैतिकदृष्ट्या जातिभेद समाजोन्नतीचे आड येतो, असें वाटत नाहीं; तरी मनुष्यस्वभावांत मत्सर उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं. उदाहरणार्थ, कोणत्याहि वर्णाचा एकादा मनुष्य नीतिमान् असला, तथापि वेळ पडल्यास न्याय देतेवेळीं त्याचा कल कांहीं अंशानें तरी, आपले जातीकडेसच वळेल. तसेंच उच्च वर्गांतील लोकांचा नीच वर्गांतील लोकांशीं व्यवहारांत फारच थोडा संबंध येत असल्यामुळें, त्यांनां नीतीचे मार्ग आपोआपच बंद होतात. धंदेरोजगारांत सुद्धां वरील अडचण अनुभवास येते. हल्लींच्या व्यवहारांत असेंच आढळून येईल, कीं, एकादा नोकर ठेविणें असल्यास, आपलेच जातीचा मनुष्य मिळविण्याकडे प्रवृत्ति होते, व इतर जातींपेक्षां स्वतःचे जातीचा मनुष्य मिळाल्यास त्यालाच पहिल्यानें पसंती मिळते.

आतां सामाजिक उन्नति झाल्याशिवाय राजकीय उन्नति होणें दुरापास्त आहे, अशी माझी तरी निदान ठाम समजूत आहे. कारण, जातिभेद आहे, तोंपर्यंत दुसऱ्या जातीची निंदा करून, आपल्या जातीचें वर्चस्व वाढविण्याकडे मनुष्याचा कल होतो. साधारण अनुभव असा आहे, कीं, एकाद्या खात्यामध्यें, वरिष्ठ कामदार ज्या जातीचा असतो, त्याच्याच जातीची मंडळी बहुतेक त्या खात्यांत भरलेली आढळते. राजकीय बाबतींत जास्त अधिकार मिळाल्यास मग पहावयासच नको!

६. जातिभेद कायम ठेवून जातिमत्सर नाहींसा करणें अगदीं दुरापास्त आहे. कारण, झाडाचीं मुळें कायम ठेवून जर वरच्या फांद्या तोडल्या, तर, पुनः त्या झाडास फांद्या व पालवी फुटेल. म्हणून झाड मुळापासून उपटून काढिलें पाहिजे.

७. माझे मताप्रमाणें, हा उपाय यशस्वी होईल असें वाटत नाहीं. कारण, प्रथम जातिभेदाला जीं कारणें होत गेलीं तींच कारणें पोटभेद उत्पन्न करण्यास झालीं असलीं पाहिजेत. खरें झटलें असतां जातिभेद व पोटभेद यांचा परिणाम कांहीं अंशानें समाजस्थितीवर एकसारखाच होतो.

८. माझ्या मतें, निरनिराळ्या जातींत बेटीव्यवहार न होतां रोटीव्यवहार होणें अशक्यच आहे. ज्या वेळेस रोटीव्यवहाराची उघडपणें सुरुवात होईल, त्या वेळीं बेटीव्यवहाराचे प्रश्नाची अडचणच राहणार नाहीं. कदाचित् असा आक्षेप येईल, कीं, कांहीं कांहीं जातींमध्यें रोटीव्यवहार आहे, पण बेटीव्यवहार नाहीं; परंतु त्या लोकांचा असाच समज आहे कीं, रोटीव्यवहाराची धर्मदृष्ट्या व रूढिदृष्ट्या मनाई नाहीं; परंतु, ज्या वेळेस जातिभेदाचा अंकुर त्यांचे मनांतून नाहींसा होईल, त्या वेळेसच बेटीव्यवहार आपोआप सुरू होईल.

९. शिक्षणाचे योगानें परिस्थिति बदलतच आहे, व जसजसा शिक्षणप्रसार जास्त होईल, तसतशी परिस्थितिहि बदलत जाईल. परंतु केवळ परिस्थितीवर अवलंबून राहिल्यास फार काळ लागेल. परिस्थितीवरोवर प्रयत्नहि झाले पाहिजेत. वाफेच्या तारवांसुद्धां, वारा अनुकूल करून घेण्याकरितां शीड लावतात. प्रयत्नानें फलप्राप्ति लवकर होण्याचा संभव आहे.

कामाठीपुरा, मुंबई, २१-६-१२.

१०. सध्यांची स्थिति पाहतां, जातीच्या समंजस पुढाऱ्यांनीं, म्हणजे ज्यांनां जातिभेद अनिष्ट वाटत आहे अशा लोकांनीं, जातीमध्यें राहूनच, जातींतील इतर मंडळीची परिस्थिति सुधारली पाहिजे व हेंच मला सयुक्तिक दिसतें. आणि अशा रीतीनें एका जातींतील मोठा समुदाय तयार होऊन बाहेर पडल्यास, कांहीं अडचण पडणार नाहीं व त्यांनां दुसरेहि अनुयायी मिळतील.

---

[१२]

[श्रीमंत सरदार वि. ना. मुतालीक, बी. ए., सातारा.]

या जगांत प्रत्येक समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींकडे जर आपण पाहिलें, तर त्यांची बुद्धिमत्ता, आचार, आवड, राहणी वगैरेमध्यें भिन्नत्व दिसून येतें. या भिन्नत्वाचें मूळ कारण शोधणें फार कठीण आहे. पुनर्जन्माची कल्पना आपण जर ग्राह्य धरली, तर कांहीं व्यक्तींचे आत्मे जास्त जन्म भोगून आल्यामुळें जास्त अनुभवलेले असतात, व त्या कारणानें ते पूर्णत्वाच्या जवळ एकेका पायरीनें अधिक असतात. जन्म हें अनुभवाचें स्थान, व पुष्कळ जन्मांच्या अनुभवानें आत्मा ज्ञानवान् होतो, या कल्पनेमध्यें वर्णभेदाची उत्पत्ति असावी, असें दिसतें. मूळ तीन गुण प्रधान धरून, ज्याप्रमाणें सप्तरंगाच्या मिश्रणापासून हजारों रंग उत्पन्न होतात, त्याप्रमाणें या तीन गुणांच्या मिश्रणापासून अनेक गुणांच्या व्यक्ती उत्पन्न होतात, अशी कल्पना झाली. या सिद्धांतावर प्रारंभीं गुणकर्मानुसार जाति ठरविल्या गेल्या असतील. दुसरें असें कीं, या जगांत प्रत्येक वस्तुमात्राची उत्पत्ति नियंत्याच्या इच्छेमुळें होते; विशिष्ट वस्तु अमक्या स्थळीं, अमक्या कालीं उत्पन्न करण्यांत त्याचा कांहींना कांहीं हेतु असतो; व ज्या कार्याकरितां उत्पत्ति, तें कार्य योग्य रीतीनें साध्य झाल्यास त्या वस्तूचें जन्मसाफल्य झालें; हा दुसरा सिद्धांत जातिभेदाच्या मूळांत असावा. प्रत्येक व्यक्ति उत्पन्न झाल्यानंतर तिची जाति ठरविणें हें दुर्घट व अशक्य कर्म झालें असतें. कोणत्याहि कुलांत, म्हणजे विशिष्ट परिस्थितींत, जन्म होणें हें ईश्वराच्या इच्छेनुरूप होतें हें गृहीत धरून कुलपरंपरेनें जाति ठरविण्यांत आल्या.

आर्य लोकांची सुधारणा ही आद्य सुधारणा होय. आर्यांनां अंधतमामध्यें उजेड पाडावयाचा होता, त्यांनां अरण्यें तोडून वस्ति करावयाची होती, व यामुळें प्रत्येक गांव सर्व सोयीच्या दृष्टीनें पूर्ण करणें जरूर होतें. याकरितां तेथें प्रत्येक धंद्याचा मनुष्य कायम कसा रहावा, हा प्रश्न प्रधान होता. त्याकरितां कुलपरंपरेनें जाति, व जातीला कायमचा धंदा, यांची नियमबद्ध आंखणी करणें जरूर होतें. आज हजारों वर्षांपासून चालत आलेली ग्रामव्यवस्था, जर जातिभेद कायम केला नसता तर, केव्हांच लयास गेली असती. प्रत्येक जातीस गांवोंगांव जमीन वगैरे देऊन त्या जातींतील व्यक्तीस त्यांच्या धंद्यांस जखडून टाकण्याची व्यवस्था केली नसती, तर हल्लींच्या इतक्या जाति झाल्या नसत्या व शिल्लकहि राहिल्या नसत्या.

तिसरें, आनुवंशिक संस्कारामुळें मनुष्यास धंद्यांतील नैपुण्य व चातुर्य स्वभावतःच प्राप्त होतें. जात्यनुसार धंदा असल्यामुळें लहानपणापासून कायमच्या धंद्याची आवड उत्पन्न होते, व त्यांतील सर्व वर्मे कळूं लागतात. या आनुवंशिक कल्पनेमुळेंच जातिभेदाची कल्पना जास्त दृढ होत गेली.

प्रत्येक सुधारणेच्या कालीं एक एक लाट असते, व त्या लाटेच्या अनुरोधानें ती सुधारणा बनत जाते. आर्यांच्या सुधारणेच्या कालीं धर्माची लाट होती. त्या कालीं प्रत्येक गोष्टीस धार्मिक स्वरूप देण्यांत आलें होतें व त्यामुळें या सामाजिक व्यवस्थेस धर्माचें आच्छादन घालून ती कल्पना आज शेंकडों वर्षें आमच्या मनांत खिळून टाकण्यांत आली. आज जातिभेद धर्माचें मुख्य व आवश्यक अंग होऊन बसला आहे; परंतु बारकाईनें धर्मशास्त्रदृष्टीनें जर पाहिलें तर मुख्य जाति थोड्या दिसतात. बाकीच्या जाति निव्वळ सामाजिक स्वरूपाच्या आहेत.

पूर्वकाळीं जातिभेदाचा परिणाम इष्टच झाला. जातिभेदाच्या तत्वावर राष्ट्राची उभारणी केली. राष्ट्रोन्नतीला अगर धर्मोन्नतीला जातिभेदाची आडकाठी आली, असें दिसत नाहीं. ज्या वेळीं जातिभेदामुळें नुकसान झाल्यासारखें दिसतें, त्या वेळीं वास्तविक, अवनत कालीं येणारे दोष, म्हणजे व्यक्तिद्वेष, स्वार्थपरायणता व राष्ट्रकल्याणाची व लोकहिताची अनास्था, हेच मुळाशीं आहेत, असें दिसून येईल.

राजकीय, सामाजिक, औद्योगिक, अगर नैतिक प्रगतीच्या आड आह्मां हिंदूंचा जातिभेद फारसा येतो, असें मला वाटत नाहीं. आमची प्रगति अल्प असण्याचें कारण आमची परिस्थिति व आमचें अज्ञान. खरोखर जातिभेदाचा दोष असेल तर फार थोडा. खरी प्रगति होत चालली असल्याची खूण म्हणजे तेथें जातिमत्सराचें वारेंसुद्धां राहतां कामाचें नाहीं, व राहणारहि नाहीं. मी हिंदुस्थानवासी ही कल्पना मुख्य, व माझी जात अमकी ही कल्पना गौण राहत गेली, तरच आह्मी खरे पुढें चाललों, नाहींतर आमची प्रगति वाळूच्या पायावर आहे. जातिभेद राहून जातिमत्सर नाहींसा होण्यास हरकत नाहीं, व सर्व जबाबदार पुढाऱ्यांनीं हाच इष्ट परिणाम घडवून आणण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे.

हल्लींचा काळ जात्यनुरूप धंद्याचा नाहीं. पूर्वी ज्या कारणांकरितां जातिभेद उत्पन्न झाला तीं कारणें आतां नाहींशीं होत चालली आहेत. कोणत्याहि समाजांत जातिभेद कांहींतरी स्वरूपानें राहणारच; परंतु आतांच्या परिस्थितीला पोटजाती विशेष काळजी घेऊन राखणें, हें वेडेपणाचें म्हणण्याचें नसलें तरी निदान अगदींच अनवश्यक आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आज आह्मांला सबगोलंकार नको. पोटजाति नाहींशा होऊन जातिभेदाची तीव्रता कमी झाली म्हणजे हल्लीं आमचें मोठें काम झालें.

जातिभेद मोडण्यास पोटजातींमध्यें प्रथम रोटीव्यवहार व नंतर बेटीव्यवहार करण्यास प्रारंभ केला पाहिजे, व हाच क्रम सोपा व सहजसाध्य आहे. याला धर्मशास्त्राची अडचण आहे असें नाहीं. हा फक्त व्यावहारिक रूढीचा होऊन बसला आहे. आपले लोक अद्यापि फार अज्ञानी व पुराणमताभिमानी आहेत. त्यांत खालचे वर्ग तर फारच तसे आहेत. यास्तव प्रथम पोटजातींमध्यें सुरुवात करणें सोपें होईल. हल्लीं जातिभेद मोडण्यास अनुकूल परिस्थिति येत चालली आहे, परंतु पाहिजे तशी व लवकर परिस्थिति येण्यास प्रयत्न जरूर आहे. वेळ येणें निराळें, व वेळेचा फायदा करून घेतां येणें निराळें, वेळेचा उपयोग करून घेण्याची जबाबदारी पुढाऱ्यांवर आहे.

प्रथम निरनिराळ्या जातींमध्यें प्रेम उत्पन्न झालें पाहिजे. हल्लीं प्रत्येक जात निराळी करण्याचा चाललेला प्रयत्न फारसा स्तुत्य नाहीं. परंतु हल्लीं चालू असलेल्या प्रयत्नास निराळें स्वरूप दिल्यास पुढील इमारतीचा पाया बसेल. प्रथम एकेका जातीचें ऐक्य व एक जूट, व नंतर एकमेकांमध्यें संधि, हा क्रम झाला तरी इष्ट परिणाम लवकर होईल.

ज्यांनां हा प्रयत्न करणें असेल त्यांनीं जातीमध्यें राहून सर्वांनां बरोबर घेऊन पुढें जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकदा मनुष्य जातिबाह्य झाला तर त्याची वाग्णूक उपाहासास्पद मात्र होते; परंतु त्यापासून इष्ट परिणाम घडत नाहीं. उलट, कांहींतरी अनिष्टच होतें. सुधारणा करणारे कांहीं पुढें असणारच; परंतु मध्यंतरीं अंतर फार राहतां कामा नये, हें सुधारणावाद्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

सातारा, २३-६-१२.

---

[१३]

[श्रीयुत गोविंद बळाळ देवल, हरिपुर, सांगली.]

एका जातींतील पोटजातींत एकी करण्याच्या प्रश्नांत मुख्यतः खाण्यापिण्याचा प्रश्न उत्पन्न होतो. याच्या अंगभूत प्रश्न म्हणजे रीतिरिवाज, धर्माचार वगैरे. परंतु मी स्वतः धर्म व त्याचें आचरण, या गोष्टीस फार महत्त्व देतों. कारण, मनुष्यजातीचें ध्येय ठरविणें हें धर्माचें काम आहे. तेव्हां धर्मदृष्टीनें मनुष्यध्येय ठरल्यावर त्या धोरणानें हे प्रश्न सोडविणें श्रेयस्कर होईल. सर्वसाधारण हाच नियम सर्व सामाजिक गोष्टींत लागू आहे.

सांगली, २३-६-१२.

श्रीमंत सौ. महाराणी चिमणाबाईसाहेब गायकवाड यांचे विचार.

हिंदी समाजांत स्त्रियांची स्थिति.

-लेखक-
श्रीयुत वा. रा. गुत्तीकर बी. ए.,
एलएल्. बी.

लेखांक ४ था. स्त्रियांसाठीं उद्योग.

"धंदा ही एक दौलत आहे. उद्योग, प्रतिष्ठा व पैसा दोन्ही मिळवून देतो. उद्योगी नांगऱ्या निरुद्योगी सरदारापेक्षां श्रेष्ठ होय!" —स्मायल्स्.

हल्लीं स्त्रियांचें लक्ष्य पुष्कळ धंद्यांकडे लागत चाललें आहे. यांमध्यें कित्येक धंदे अगदीं नवीन आहेत. या नवीन धंद्यांचा बारकाईनें विचार करण्यापूर्वी ज्या धंद्यांत आतांपर्यंत बायका पडल्या आहेत, त्यांमध्यें त्यांनां यश कितपत आलें, याचा विचार करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

पहिली गोष्ट ही लक्षांत ठेविली पाहिजे, कीं, स्त्रियांची उन्नति त्यांची त्यांनींच केली पाहिजे. हल्लींपेक्षां जास्त मानाची व जास्त निश्चित स्थिति प्राप्त करून घेणें त्यांच्याच हातीं आहे. आपल्याला योग्य असे नवे नवे धंदे शोधून काढण्यांत पाश्चिमात्य स्त्रियांनीं देखील कांहीं कल्पकता दाखविलेली नाहीं. सगळ्याजणी एकाच मार्गानें चालल्या आहेत. त्यामुळें तिकडे स्वस्त्या गवर्नेसेस (मुलें संभाळावयास व त्यांनां शिक्षण देण्यास मास्तरणीबजा ठेविलेल्या बाया) व अर्धवट शिकलेल्या स्वीकारकुनांची गर्दी झाली आहे. कल्पकता नसणें हा कांहीं अंशीं शिक्षणाचा दोष होय. त्यांचें शिक्षण केवळ बौद्धिक व व्यवहाराला सुटून असतें. सर्वांनां सरसकट एकच शिक्षण देण्यांत येतें. कांहीं मुलींचा कल हस्तकौशल्याच्या कामांकडेच असतो, कोणाचा ललितकलांकडे असतो, कोणाचा केवळ आधिभौतिक गोष्टींकडेच असतो व त्यांच्या त्यांच्या कलाप्रमाणें त्यांनां शिक्षण दिलें तर त्यांच्या विशेष गुणांचा विकास होईल, इकडे लक्ष दिलें जात नाहीं. एकाद्या नव्या गोष्टीकडे तिच्या नवीनपणामुळेंच कां होईना, मनाची धांव फार जोरानी असते व या उत्साहासाठींच पुष्कळदा एकादा नवा उद्योग काढणें इष्ट असतें. म्हणून निरनिराळ्या धंद्यांचें वर्णन करितांना, हिंदी स्त्रियांनां निर्वाहाचे जे ठरीव मार्ग खुले आहेत, त्यांचा त्याही उद्देश करणार नाहीं; तर अनेकांनीं मिळून काम करण्याच्या पद्धतीनें जे नवे धंदे केले असतां त्यांनां फायदा होईल अशा धंद्यांचें वर्णन देणार आहों.

स्त्रियांच्या कामाला मदत करण्याला एक मध्यवर्ती सभा किंवा मंडळी असावी. त्यांनीं निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या धंद्यांत मागणी व पुरवठा कसा आहे, याचा शोध ठेवावा. स्त्रियांनां योग्य असे नवीन व फायदेशीर उद्योग कोणते आहेत याची माहिती मिळवावी व ज्यांनां एकाद्या धंद्याची माहिती हवी असेल ती द्यावी व ज्यांनां एकाद्या धंद्याचें शिक्षण हवें असेल त्यांनां तें मिळविण्याचा मार्ग सांगून द्यावा. अशा संस्थेपासून दुसरेहि फायदे होतील. धनी व नोकर किंवा कारागीर व सावकार यांची एकमेकांनां माहिती होण्यास ही संस्था उपयोगी पडेल. शिवाय, या संस्थेमार्फत आलेलीं माणसें एवढ्यानेंच, त्या माणसांच्या लायकीबद्दल खात्री वाटून त्यामुळें अशा माणसांची किंमत म्हणजे मजुरी किंवा पगार सहजच वाढेल.

लंडन शहरीं कांहीं संस्था स्त्रियांच्या कामाबद्दल मोफत माहिती देतात व होतकरू स्त्रियांनां काम किंवा धंदा शिकण्याबद्दल पैशाचीहि मदत करितात. हे पैसे पुढें काम मिळाल्यावर हप्त्याहप्त्यांनीं फेडावयाचे असतात. दुसरी एक संस्था अशी आहे, कीं, तिजमध्यें उमेदवारांची व गिऱ्हाइकांची नांवनिशी ठेविली असून त्या संस्थेमार्फत वरच्या वर्गातील स्त्रियांनां कशिद्यांचें वगैरे काम, भाजीपाला, दुगतें किंवा पाक, वड्या, मुरंबे वगैरे जिन्नस विकतां येतात.

तिकडे अशी एक गमतीची म्हण आहे, कीं 'धंदा मूर्ख नाहीं, लोकच मूर्ख आहेत!' ही म्हण सर्व देशांनां व स्त्रीपुरुषांनां सर्व काळीं सारखीच लागू आहे. तेव्हां

ज्या अनेक धंद्यांत स्त्रिया पडल्या आहेत त्या धंद्यांना त्या कितपत लायक आहेत, हा प्रश्न ओघानेंच आला. आजपर्यंत ज्या ज्या धंद्यांत स्त्रिया पडल्या त्यांत त्या नालायकच ठरल्या. हा दोष केवळ त्यांचाच आहे, असें म्हणतां येत नाहीं. कारण, अमुक एका धंद्याला लायक व्हावें, ह्या हेतूनें त्यांचें शिक्षणच मुळीं झालेलें नसतें व त्यांच्या शिक्षणांत स्वतः पोटास मिळविण्याचा हेतु मुळांतच नसतो. हिंदुस्थानांत सगळ्यांची नजर घरावर असते व यासाठीं कांहीं विशेष तयारी केली पाहिजे अशी समजूत नाहीं. तिकडे देखील स्वतः एकादा स्वतंत्र उद्योग करावयाचा या बुद्धीनें झटून शिकणारांची संख्या फारच थोडी. विशिष्ट हेतु मनांत धरून शिक्षण न झाल्यामुळें स्त्रियांची कर्तबगारी निष्फळ झाली आहे. हा दोष नाहींसा करण्यासाठीं व त्यांच्या त्यांच्या स्थितीप्रमाणें त्यांना कार्यक्षम करण्यासाठीं इंग्लंडांत अनेक उपाय योजिले जात आहेत. उदाहरणार्थ, शास्त्रें व कला यांचे वर्ग आहेत. धंदेशिक्षणाच्या शाळा आहेत. कारागिरी (हस्तकौशल्याची कामें) शिकविण्यासाठीं वर्ग आहेत. स्वयंपाक, शिवणकाम, कपडे बेतणें, वेतांचें वेळ्याचें वगैरे विणकाम, गालिचा, फळझाडें फुलझाडें लावणें, कांतीव काम, थोडेंसें तांवटकाम, अशा अनेक विद्या शिकविण्याच्या सोई आहेत. सधमाशा पाळणें, कोंबड्या पाळणें, यांची माहिती देण्याची योजना आहे. संसारोपयोगी गृहशिक्षणाची व्यवस्था आहे. याप्रमाणें अनेक उपयुक्त विद्या, कला, धंदे व उद्योग शिकविण्याबद्दल पद्धतशीर व्यवस्था आहेत. कांहीं शाळांतून हुषार विद्यार्थिनींना स्कॉलरशिपा (छात्रवृत्ति) हि देतात. या शिक्षणापासून विषयाचें ज्ञान थोड्या काळांत फारच सुगम व शास्त्रोक्त पद्धतीनें मिळतें.

स्त्रियांचा पगार, किंवा मुशाहिऱ्याचा प्रश्न बराच विकट आहे. त्यांना पुरुषांपेक्षां मजुरी कमी मिळते, ही गोष्ट सर्वांना कबूल आहे.

पद्धतशीर शिक्षणानें कार्यक्षमता वाढून व जुटीनें काम करण्याची पद्धत स्वीकारून मुशाहिरा वाढविणें शक्य आहे. जुटीनें काम करण्याची पद्धत अजून त्यांच्या अंगवळणीं पडलेली नाहीं. एकेकटी स्वतंत्रपणेंच आपला उद्योग करिते व जुटीनें काम केलें तर आपल्या प्रस्तुत स्थितींत बराच इष्ट फरक पडेल, ही गोष्ट कधीं त्यांच्या मनांतहि येत नाहीं.

हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या निशाणावर तीन मंत्र असले पाहिजेत. शिक्षण, सहकारित्व व एकविषयनैपुण्य. हे महामंत्र सिद्ध झाले म्हणजे स्त्रियांची खरी खरी उन्नति होईल.

मी.

मी हीन, दीन, दुर्बल, पापी आहें, असें साधुलोक वारंवार म्हणतात; परंतु हें त्यांचें म्हणणें सापेक्ष असतें. सर्वगुणसंपन्न, सर्व शक्तिमान्, शुद्धबुद्ध अशा परमेश्वरासमोर उभें राहून त्याला शरण जात असतांना वर दिलेले उद्गार त्यांच्या मुखांतून येतात. वस्तुतः मनुष्य हा हीन, दीन, दुर्बल व पापी नसून तो सामर्थ्यवान्, सशक्त व शुद्ध आहे. आपल्या स्वरूपाची ओळख तो जेव्हां विसरतो व इंद्रियांच्या स्वाधीन होतो. तेव्हां दुर्बलतेचा व पापाचा त्याला संपर्क होतो, यासाठीं मी कोण आहें याची ओळख प्रत्येकानें करून घेतली पाहिजे.

मनुष्य कितीहि हीन व दुर्बल दिसत असला तरी त्याच्यांत थोरपणाचें बीज असतें. दगडांत सुंदर देवाची मूर्ति असते, कुशल मूर्तिकार ती प्रगट करतो. त्याचप्रमाणें प्रत्येक मनुष्यांत देव गुप्तरूपानें वास करीत आहे. या देवाच्या रूपावर आवरण असल्यामुळें त्याचें सामर्थ्य, तेज व शुद्ध स्वरूप दृग्गोचर होत नाहीं. हें आवरण दूर केलें, कीं, तो सर्वांना पूज्य होतो. ज्ञानानें हें आवरण दूर होतें.

मी पापी आहें, दुर्बल आहें, असा जप करीत बसल्यानें कोणाचा उद्धार होत नाहीं! त्यापेक्षां मी निष्पाप, विशुद्ध व सशक्त आहें, अशी भावना ठेवून, जें पाप आपल्या ठायीं दिसत असेल तें आपलें नाहीं, आपल्या विशुद्ध स्वरूपास त्यापासून बाधा होते असें जाणून, तें आपणापासून दूर करावें.

तर मग मी कोण आहें, या प्रश्नाचें उत्तर काय द्यावें? मी एकादा क्षुद्र किंवा नीच प्राणी नाहीं. माझ्या अंगांत देवपण आहे. दुराचरण किंवा पाप यानें माझें देवपण झांकून जातें, माझी शक्ति अन्तर्हित होते. अज्ञानानें माझी शक्ति मला कळून येत नाहीं, माझा मला विसर पडतो. अज्ञान, दुराचरण व पाप हे माझे गुण नाहींत. या बाहेरच्या उपाधि आहेत. या उपाधींना जसजसा मी दूर सारतों, तसतसें माझें सामर्थ्य मला कळून येतें. आत्मस्वरूपाचें मला ज्ञान होतें. मी नित्य, शुद्ध, शक्तिमान् व ज्ञानी आहें. माझा उद्धार करून इतरांचा उद्धार करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं आहे.

साहित्यसमालोचन.

बंगाली.

बंगदर्शन—(वैशाख) प्रस्तुत मासिक ऐतिहासिक महत्त्वाचें आहे. महाराष्ट्र वाचकांनांहि ज्यांच्या मनोमोहक कादंबऱ्यांचा चटका लागून राहिला आहे, ते बंगसाहित्यसम्राट् ब. वा. राय बंकीमचंद्र चतर्जी, सी. आय्. ई. हे आधुनिक बंग वाङ्मयाचे, तसेच या मासिक पुस्तकाचेहि जनक होत. बंकीमचंद्रांच्या बहुतेक सर्व कादंबऱ्या, धार्मिक, वेदान्तपर, वाङ्मयात्मक व इतर लेख याच मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. कांहीं वर्षांपूर्वी सदरहू मासिक बंद झालें होतें; परंतु सुमारें अकरा वर्षांपूर्वी याचें पुनरुज्जीवन झालें. बंकीमचंद्रांच्या काळीं या मासिकाला बंगालमध्यें विलक्षण मान होता. सांप्रतहि हें वाङ्मयदृष्ट्या चांगलें चाललें आहे. प्रस्तुत अंक याच्या बाराव्या वर्षाचा पहिला आहे. 'चरित-चित्र' या सदराखालीं बंगदर्शनांत थोर पुरुषांचीं चरित्रें प्रसिद्ध होतात. या अंकांत श्रीयुत विपिनचंद्र पाल यांनीं कलकत्ता हायकोर्टचे भूतपूर्व न्यायाधीश, विद्वच्छिरोमणि सर गुरुदास बंद्योपाध्याय यांच्या चरित्राचें व मतामतांचें सूक्ष्म पर्यालोचन केलें आहे. लॉर्ड कर्झन यांच्या 'युनिव्हर्सिटी कमिशन'चे एक समासद या नात्यानें गुरुदास बाबू आमच्या वाचकांनां परिचित आहेत. प्रस्तुत अंकांत या विषयानें जवळजवळ निम्मे पृष्ठें व्यापिलीं असून त्यांत गुरुदास बाबूंच्या सामान्य चरित्रापेक्षां त्यांची सामाजिक योग्यता व मतें यांचीच विशेष चर्चा केली आहे. 'बंगालच्या इतिहासांत गुरुदासबाबूंचें स्थान, ऐतिहासिक कीर्तीचें विशेषत्व, समाजजीवनाचे तीन पंथ, सर गुरुदास आणि आधुनिक सुशिक्षित लोक, सुधारक व सुधारणाविरोधी, गुरुदासबाबूंचा मध्यपथ, हिंदूंची समाजानुगति, त्यांचें समाजतत्त्व, हिंदुसमाजतत्त्वांत गति-शक्तीचें स्थान, 'महाजन' पंथाची पद्धति, गुरुदासबाबू व महाजनपंथ, गुरुदास व लौकिक व्यवहार, त्यांचे सामाजिक सिद्धान्त,' इतक्या पोटविषयांचें या चरितचित्रांत अतिशय विस्तृत रीतीनें विवेचन केलें असून त्याचा पोटक्यांत सारांश देणें अशक्य आहे. 'सामयिक प्रसंग' या सदराखालीं 'ढाका विश्वविद्यालय' या विषयावर संपादकीय विचार प्रगट झाले असून ते मननीय आहेत. नूतनप्रस्तावित 'ढाका युनिव्हर्सिटी'ला बंगालच्या सुशिक्षित लोकांचें मत सामान्यतः विरुद्ध आहे; परंतु राजकीय व इतर दृष्टीनीं विचार करतां या युनिव्हर्सिटीविरुद्ध झालेली ओरड ही अविचारमूलक व नुकीची असून ही युनिव्हर्सिटी होणेंच सर्वस्वी इष्ट आहे, असें संपादकांनीं आपलें मत दिलें आहे. श्रीयुत चंद्रशेखर मुखोपाध्याय एम्. ए., बी. एल., यांनीं 'व्हिक्टर ह्युगोर कथा' या चरित्रात्मक निबंधांत फ्रान्सचा शेक्सपियर, सुप्रसिद्ध पंडित व्हिक्टर ह्युगो याचें बालपण, शिक्षण व साहित्य-जीवन यासंबंधाची त्रोटक, परंतु अत्यंत मनोरंजक माहिती दिली आहे. 'हर्नानी' (जयध्वज) रुइब्ला (रायबा) व इतर नाटकें यांचा व्हिक्टर ह्युगो हा कर्ता असून त्याच्या मनोहर भव्य कृतींचा महाराष्ट्र वाचकांनां परिचय झालाच आहे. प्रस्तुत लेखांत दिलेल्या त्याच्या आख्यायिका अत्यंत चटकदार व मनोरंजक आहेत. श्रीयुत हरिदास भारती यांचा 'वर्णाश्रमधर्म' हा निबंध वाचनीय आहे. ते ह्मणतात "वर्णाश्रमधर्म ही भारतीय सभ्यते (Civilization) ची विशिष्ट संपत्ति आहे. वर्णभेद किंवा जातिभेद ह्मणजे वर्णाश्रमधर्म नव्हे. वर्ण आणि आश्रम यांचा धर्म तो वर्णाश्रमधर्म. वर्ण व आश्रम हीं एकमेकांशीं पूर्णपणें बद्ध आहेत. वर्णापासून आश्रम पृथक् झाला, कीं, वर्ण अवशिष्ट रहातो; त्यावर वर्णभेद किंवा जातिभेद यांची स्थापना होते. परंतु वर्णाश्रमधर्म राहूं शकत नाहीं. आधुनिक काळीं वर्ण आहे परंतु आश्रम नाहीं. अर्थात् भरतखंडांत हल्लीं वर्णाश्रम नाहीं; वर्णाश्रमधर्महि नाहीं! केवळ जातिभेद मात्र आहे. परंतु आर्य संस्कृतींत जातिभेदाला स्थान नाहीं! वर्णाश्रमधर्म जगांत भरतखंडाव्यतिरिक्त कोठेंहि सांपडणार नाहीं. वर्णभेद किंवा श्रेणीभेद अनेक देशांत होता व हल्लींहि आहे. अमेरिकेंत जातिभेद नाहीं, परंतु भरतखंडांत कधींहि नसलेला भयंकर वर्णभेद आहे. यूरोपांत जातिभेद नाहीं, ह्मणून तेथें मनुष्यत्वाचा समान अधिक आहे, असें नाहीं. भरतखंडांत जातिभेद असतांहि मनुष्यत्वाविषयीं अत्यंत श्रद्धा प्रत्येक हृदयाच्या ठिकाणीं अद्यापि वास करीत आहे. अशी श्रद्धा, साम्य-मैत्री-स्वातंत्र्य यांच्या ध्वजा फडकावणाऱ्या यूरोपांत व अमेरिकेंतहि आढळून येत नाहीं. तेथें श्रीमंत गरीबांकडे व श्वेतांग इतर वर्णांकडे ज्या दृष्टीनें पहातात, तीवरून हा सिद्धान्त पटण्यासारखा आहे. भरतखंडांतील जातिभेद काय, किंवा यूरोपांतील वर्णभेद काय हे दोन्हीहि मनुष्यत्वविकासाला भयंकर अडथळेच होत दोन्ही अनिष्टच, परंतु त्यांतल्या त्यांत वर्णभेदापेक्षां जातिभेद बरा. आमच्या जातिभेदाचा मुख्य दोष हा आहे, कीं, त्यामुळें मनुष्याला आपल्या जन्माचें बंधन तोडतां येत नाहीं. नीच जातींत ज्याचा जन्म झाला त्याला उच्च जातींशीं व्यवहार करतां येत नाहीं. श्रेणीभेदाचा प्रधान गुण हा, कीं, अंगीं गुण असला ह्मणजे वाटेल त्याला जन्माचें बंधन तोडतां येतें. नीचजातीय मनुष्यानें गुणाचें विपुल प्रमाण दाखविलें ह्मणजे त्याला स्वल्पायासानें श्रेष्ठ जातींत मिसळतां येतें. याच गोष्टीबरोबर हेंहि ध्यानांत येतलें पाहिजे, कीं, भरतखंडांतील जातिभेद अगदीं अनतिक्रमणीय असा कधींच

नव्हता व अद्यापि नाहीं. पुराणेतिहासांत खालच्या जातींतील साधुसिद्धांना ब्राह्मणत्वप्राप्ति झाल्याचे दृष्टांत विरळ, पण आहेत. अंत्यजांतील साधु ब्राह्मणांचेहि गुरुपद घेऊं शकतात. यूरोपांत नीच श्रेणीपासून श्रेष्ठ श्रेणीला जावयाचा मुख्य मार्ग झटला म्हणजे पैसा हाच होय. परंतु भरतखंडांत केवळ पैशानें हें साध्य होत नाहीं. येथें अर्थापेक्षां परमार्थाचें प्रयोजन लागतें. अर्थात्, अर्थापेक्षां परमार्थ जितका श्रेष्ठ तितकाच वर्णभेदापेक्षां जातिभेद श्रेष्ठ होय." श्रीयुत अक्षयकुमार मैत्रेय, एम्. ए., बी. एल्. यांच्या 'नवयुगेर नववर्ष' या लेखांत सम्राट् पंचम जॉर्ज महाराज यांच्या कृपेमुळें बंगदेशाला संयोजन, नूतन गव्हर्नर, वगैरे लाभांनीं युक्त असें जें नववर्ष उगवलें आहे, त्याची यथोचित स्तुति केली आहे. श्रीयुत हरिचरण गंगोपाध्याय शास्त्री एम्. ए., बी. एल्., यांच्या क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या 'महाभारतेर ऐतिहासिकता' या लेखमालेचा पहिला हप्ता या अंकांत आला असून त्यांत 'मुखबंध, महाभारताच्या ऐतिहासिकतेविषयीं संशय, प्राचीन भरतखंडांत इतिहासज्ञान, इतिहासाचें लक्षण, इंग्रजी 'History' शब्दाचा अर्थ, ऐतिहासिक सत्यतेच्या निर्णयाचा उपाय, महाभारतांत इतिहासचें गौण लक्षण, महाभारतीय समाज काल्पनिक कीं सत्य?' इतके पोटविषय आले आहेत. यांशिवाय दोन लहान निबंध, एक कविता व एक गोष्ट इतके विषयहि या अंकांत प्रसिद्ध झाले आहेत.

भारती—(आषाढ) बंगालचे श्रेष्ठ चित्रकार श्रीयुत अवनीन्द्रनाथ ठाकूर यांनीं तयार केलेलें 'नलिनीदलगत' हें बहुवर्णात्मक चित्र दर्शनीं दिलें आहे. 'गुजरात-पल्ली-हइते नगरे' हा श्रीयुत रवीन्द्रनाथ सेन यांचा वर्णनात्मक निबंध वाचनीय असून त्यांत गुजराथ देशांतील खेडेगांव व शहरें यांचें सुंदर वर्णन केलें आहे. खेड्यांतील भोळेभाबडे लोक, त्यांचीं तीं कोदट घरें, गांवांतील बाजार, यात्रा व 'उजानी' (वनभोजन), त्याप्रमाणेंच शहरवासी लोक, त्यांचा भपकेदार पोषाक, शहरांतील गिरण्या व इतर कारखाने, मजुरदार व त्यांच्या चालीरीति, श्रीमंत लोक व त्यांच्या बाळशी बायका, देवमंदिरें, जैन व त्यांच्या चालीरीति, लग्नकार्यांत गुजराथी लोकांची रस्त्यावरच भोजन करण्याची घाणेरडी चाल वगैरेसंबंधानें लेखकानें विस्तृत, सूक्ष्म व मजेदार माहिती दिली आहे. श्रीयुत ब्रजेन्द्रनाथ बंद्योपाध्याय यांचा 'मणिबेगम' हा लेख चरित्रात्मक आहे. सैयद अहंमद नजफीचा द्वितीय पुत्र मुर्शिदाबादचा मिरजाफर, ही व्यक्ति इतिहासप्रसिद्धच आहे. मणिबेगम ही त्याची पत्नी होय. मिरजाफर याच्या जीवनक्रमांत मणिबेगमेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. त्याच्या सुखदुःखाची ती चिरसंगिनी होती. मणिबेगम ही मूळची नर्तकी असून आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर राज्ञीपदाप्रत पावली होती. प्रस्तुत लेखाला जोडलेलें मणिबेगमेच्या कबरीचें चित्र फार सुंदर आहे. श्रीयुत प्रो. द्विजदास दत्त, एम्. ए., यांच्या 'शंकराचार्यांच्या दार्शनिक सिद्धान्ता'चा एक लहानसा हप्ता या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. या हप्त्याचा विषय 'जीवाचा पुरुषकार व ईश्वराचें वैषम्य व निर्घृणता' असा आहे. शंकराचार्यांनीं केवळ व्यावहारिक द्वैताचेंच समर्थन केलें आहे असें नाहीं; तर जीवाच्या पुरुषकाराचेंहि समर्थन केलें आहे. आमच्या देशांत अद्वैतवादाचें नांव घेतांच अनेक लोक काष्ठलोष्टाप्रमाणें अदृष्टवादी होऊन बसतात व स्वतःच्या आणि इतरांच्या प्रयत्नांवरहल त्यांची सर्व आस्था नाहींशी होते. शंकराचार्य या लोकांप्रमाणें काष्ठलोष्टवत् उद्योगशून्य अदृष्टवादी नव्हते. वेदान्तदर्शनांत त्यांनीं ज्याप्रमाणें पौरुषाचा स्वीकार केला आहे, त्याप्रमाणेंच आपल्या आयुष्यांतहि जीवाच्या हितासाठीं आपल्या विक्रमशाली पौरुषाचें त्यांनीं प्रदर्शन केलें आहे. या पौरुषसाधनाचा अभाव हेंच सर्व भरतखंडाच्या अधःपतनाचें एक कारण आहे. जगतांतील सुखदुःखांचें वैषम्य हें प्राणिवर्गाच्या स्वकृत कर्मांचें फल आहे. ईश्वराचें पक्षपातित्व अथवा निष्ठुरता यांचें हें फल नव्हे, असें शंकराचार्य सांगतात. ईश्वराच्या ठिकाणीं पक्षपातित्व व निष्ठुरता यांचा आरोप करतां येत नाहीं. कारण, ईश्वर जें करतो तें सापेक्ष असतें. तें कसली अपेक्षा करतें? सृज्यमान प्राण्यांनें केलेल्या धर्माधर्मांची तें अपेक्षा करतें. ईश्वराला पर्जन्याप्रमाणें पाहिलें पाहिजे. तांदूळ व यव यांच्या उत्पत्तीसंबंधीं पर्जन्य ज्याप्रमाणें साधारण कारण, परंतु त्यांच्या वैषम्यासंबंधीं त्याचें स्वतःचें बीजगत सामर्थ्यच कारण असतें, त्याप्रमाणेंच देवमनुष्यपश्वादिकांच्या उत्पत्तीविषयीं ईश्वर साधारण कारण, परंतु त्यांच्या भिन्नभिन्न कर्मामुळेंच संसारांतील वैषम्य उत्पन्न होतें. 'पुण्यो वै पुण्येन कर्मणा भवति, पापः पापेन।' सू० ३४. प्रो. दत्त म्हणतात, यांत इतरेतराश्रय दोष (arguing in a circle) उत्पन्न होत आहे. 'सृष्टीच्यापूर्वी एकमात्र सत्स्वरूप होतें' असें पुढीलच सूत्र आहे. सृष्टीपूर्वी कर्महि नव्हतें, मग 'कर्मानुसारी शरीर' हें कसें म्हणतां येतें? शिवाय या सूत्रानें सृष्टीचें अनादित्व श्रुतिविरुद्ध होत आहे. वास्तविक पाहूं गेलें तर शंकराचार्यांसारख्या शुद्ध अद्वैतवाद्याच्या मतें परमेश्वराच्या वैषम्य-निर्घृणतेचा प्रश्नच उद्भवूं नये. कारण सर्व कांहीं परमेश्वरच आहे! 'यत्र नान्यत् पश्यति' तेथें हा प्रश्नच उद्भवणार कसा? असा प्रो. दत्त यांचा प्रश्न आहे. राय चुनिलाल बोस बहादुर, एम्. बी., एफ्. सी. एस्. यांच्या 'शारीर-स्वास्थ्य-विधान' या चालू लेखमालेचा एक हप्ता या अंकांत आला असून 'आहार' हा त्याचा विषय आहे. मांस, तैल, शर्करा व लवण या चार उपकरणांनीं युक्त असें अन्न मनुष्याच्या क्षयपूरणार्थ त्याच्या पोटांत गेलें पाहिजे. या चारहि उपकरणांनीं युक्त असें दूध हा पदार्थ असून त्याला 'पूर्णखाद्य' अशी संज्ञा देतां येईल. लहान मुलांना तर यासारखें अन्नच नाहीं. परंतु भिन्नभिन्न कारणांस्तव प्राप्तवयस्क मनुष्यांचा नुसत्या दुधावरच निर्वाह होणें शक्य नाहीं. म्हणून त्यांनीं नाना जातींच्या खाद्यसामग्रीच्या मिश्रणाचा (mixed diet) स्वीकार केला पाहिजे. नुसत्या भातापेक्षां भाकर व मांस, डाळ वगैरे नायट्रोजनघटित पदार्थांचा उपयोग करणें स्वास्थ्यकर विशेषतः विद्यार्थिवर्गाला आहे असें डॉक्टरसाहेबांचें आग्रहपूर्वक सांगणें आहे. प्रो.

पंचनान नियोगी एम्. ए., यांनीं 'वैज्ञानिक जीवनी' या सदराखालीं चालू केलेल्या चरित्रात्मक लेखमालेंतील 'लॅव्होयासिये' या फ्रेंच शास्त्रज्ञाचें चरित्र या अंकांत पूर्ण झालें आहे. या इसमांत अम्लज (oxygen) चा शोधक प्रीस्टले व इंग्लिश रासायनिक कॅव्हेन्डिस यांच्या प्रतिकृतिहि दिल्या आहेत. प्रयागांतील 'खुसरुबाग' या प्रसिद्ध स्थलाचें पांच सुंदर चित्रांसह दिलेलें वर्णन गोड आहे. 'चयन' या विभागांत 'भारतीय नाट्यैर उपर ग्रीसीय प्रभाव' या श्रीयुत ज्योतिरिन्द्रनाथ ठाकूर यांच्या लेखमालेचा एक हप्ता, श्रीयुत दीनबंधु सेन, बी. एल्. यांचा 'विभिन्न ग्रहे जीव-चिन्ह', प्रो. योगीन्द्रनाथ समदार बी.ए.; एफ्. आर्. एच्. एस्. यांचा 'हूएनसंगचा प्रवास' हे विषय उल्लेखयोग्य आहेत. श्रीयुत सत्येन्द्रनाथ ठाकूर आय्. सी. एस्. यांनीं 'आमार बाल्यकथा' या सदराखालीं आपल्या शैशवांतील कांहीं आठवणी दिल्या असून त्यांत आपले आजे प्रिन्स द्वारकानाथ यांची त्रोटक माहिती दिली आहे. यांशिवाय दोनतीन निबंध, दोन कविता, तीन गोष्टी, दोन कादंबऱ्या, सामजिक प्रसंग, समालोचना वगैरे विषयहि मनोरंजक आहेत.

साहित्य—(आषाढ) मुरीलो या सुप्रसिद्ध पाश्चात्य चित्रकाराचें दर्शनी दिलेलें 'म्याडोना व शिशु' हें रंगी चित्र सुंदर आहे. श्रीयुत अक्षयकुमार मैत्रेय एम्. ए., बी.एल्., यांचा 'गौडराजमाला' हा विषय ऐतिहासिक संशोधनाचा असून त्यांत गौड राजांविषयीं नवीन शोधांवरून मिळालेली माहिती दिली आहे. या लेखाला जोडलेलीं 'गरुडस्तंभ', 'दिनाजपुरस्तंभ', व 'कैवर्तराजाचा प्रतिष्ठास्तंभ' हीं तीन चित्रें प्रेक्षणीय आहेत. श्रीयुत शिशिरकुमार सेन बी. ए., यांच्या 'कीटतत्त्व' या शास्त्रीय विषयांत कीटांच्या इतिहासांतील अनेक कुतूहलोद्दीपक गोष्टी दिल्या आहेत. श्रीयुत पंचकौरी बंधोपाध्याय बी. ए., यांनीं 'आधुनिक बौद्धधर्म' या निबंधांत प्राच्यविद्यामहार्णव श्रीयुत नगेन्द्रनाथ बसू, बी. ए., यांच्या नूतनप्रकाशित 'Modern Budhism' या पुस्तकाचें विस्तृत परीक्षण केलें आहे. वंग व कलिंग देशांत बुद्धप्रणीत धर्म अजूनहि प्रच्छन्नभावानें विद्यमान आहे, इतकेंच नव्हे, तर ठिकठिकाणीं त्याचा थोडा थोडा विस्तारहि होत आहे, हें सिद्ध करण्यासाठींच श्रीयुत बसू यांनीं प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे. या पुस्तकाला महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री एम्. ए., यांनीं प्रस्तावना लिहिली असून तींत राढ प्रदेशांत अजूनहि बौद्धधर्म सजीव आहे, तेथें प्रचलित असलेली धर्मराजाची पूजा हा बौद्ध पूजेचा अन्य प्रकार होय, असें विस्तृत रीतीनें त्यांनीं सिद्ध केलें आहे. 'सहयोगी साहित्य' या सदराखालीं 'चीने प्रजातंत्र,' 'भौतिक तत्त्व,', 'रंगमंचे शेक्सपियर,' 'गटे ओ ताँहार बान्धवीगण' व 'इंग्रजी साहित्येर नूतन इतिहास' या नूतन प्रकाशित झालेल्या वाङ्मयविषयक पुस्तकांचा सारांशरूपानें श्रीयुत पंचकौरी बंधोपाध्याय बी. ए., यांनीं वाचकांस परिचय करून दिला आहे. स्वामी शारदानन्द यांनीं परलोकवासी भगिनी निवेदिता यांचा सचित्र परिचय करून दिला आहे तो हृदयाला चटका लावून सोडणारा आहे. 'इतिहासे रवीन्द्रनाथ' हा श्रीयुत शशिभूषण मुखोपाध्याय यांनीं लिहिलेल्या चालू लेखमालेचा दुसरा हप्ता असून त्यांत वंगसाहित्य-सम्राट् कवि रवीन्द्रनाथ यांच्या ग्रंथांतील एकदोन ऐतिहासिक पात्रांची चर्चा केली आहे. यांशिवाय दोनतीन छोटे निबंध, एक कविता, दोन गोष्टी, समालोचन वगैरे विषयहि बरे आहेत.

हिंदी.

सरस्वती—(जून) या अंकांत प्रारंभीं प्रसिद्ध जैनधर्मी पंडित व महात्मा 'हीरविजयसूरि' यांचें त्रोटक चरित्र देऊन त्यांतच अकबर बादशहाची जैन धर्माविषयीं असलेली सहानुभूति व जैन पंडितांचा परामर्ष घेण्याची त्याची तऱ्हा यासंबंधानें बरीच माहिती दिली आहे. हीरविजय यांचा जन्म पालनपुर येथें झाला होता. त्यांच्या वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचीं मातापितरें निवर्तलीं. तेव्हां ते निराश्रित होऊन पाटणा येथें आपल्या बहिणीकडे गेले. तेथें विजयदानसूरि नामक एका विद्वान् धर्मात्म्याची व त्यांची गांठ पडली. त्यांच्या उपदेशाचा यांच्या मनावर परिणाम होऊन ते तत्काल विरक्त बनले व त्यांनीं शास्त्राभ्यास सुरू केला. नंतर देवगिरीचे धर्मसागर उपाध्याय यांच्यापाशीं तेऱ्यायशास्त्र शिकले व तेथून गुजराथेंत परत आले. त्यांनां १५५३ इसवींत 'सूरि' हा विद्वत्तादर्शक किताब मिळाला. यांच्या विद्वत्तेची कीर्ति अकबर बादशहाच्या कानावर गेली, तेव्हां अकबरानें त्यांनां सन्मानपुरःसर आमंत्रण करून त्यांचा मोठा गौरव केला व त्यांस जवळ ठेवून घेतलें. अकबराच्या पदरीं जे पंडित होते त्यांचे पांच वर्ग होते. हीरविजय हे त्यांपैकीं पहिल्या वर्गांत मोडत. त्यांनां हत्ती घोडे वगैरे वैभव बादशहानें देऊं केलें, पण त्यांनीं त्याचा स्वीकार केला नाहीं. इतकेंच नव्हे, तर बादशहाला भेटण्याकरतां ते अमदाबादेहून कोणत्याहि वाहनाचा उपयोग न करतां पायानें आले. या गोष्टीचें अकबरास मोठेंच आश्चर्य वाटलें व त्यायोगानें त्याच्या मनांत त्यांच्या संबंधानें विलक्षण पूज्यभाव उत्पन्न झाला. अकबरानें त्यांच्यांशीं धार्मिक चर्चा सुरू केली तेव्हां त्यांनीं धर्म, परमेश्वर, सद्गुरु इत्यादि विषयांवर उत्तम प्रकारचें निरूपण केलें. त्या योगानें अकबर बहुत खुष झाला व त्यांस नाना प्रकारचीं पारितोषिकें देऊं लागला; परंतु त्यांनीं तीं नाकारून 'बोधन' महिन्यांतील पर्य्यूषणाचे वेळीं ८ दिवस प्राणिहिंसा बंद करण्याची बादशहास विनंति केली. तेव्हां अकबरानें त्यांच्या विनंतीस मान देऊन ८ दिवसांऐवजीं १२ दिवस हिंसा बंद करण्याचें फरमान काढलें. हें फरमान या लेखांत इंग्रजी व हिंदी भाषेंत दिलें आहे. अकबरानें याशिवाय सदर पंडितास 'जगद्गुरु' ही पदवी देऊन त्यांच्याविषयींचा आपला आदर व्यक्त केला. कांहीं दिवस अकबराच्या पदरीं राहिल्यानंतर हीरविजय यांनीं शान्तिचंद्र नामक एका पंडितास अकबराच्या दरबारीं ठेवून आपण परत गुजरेस व धर्मप्रचारार्थ

निघून गेले. इ. स. १५९० त त्यांनीं शत्रुंजयतीर्थाचे ठिकाणीं आदीश्वरच्या देवालयाचा अनावरणविधि केला व नंतर दोनचार तीर्थे फिरल्यावर इ. स. १५९२ त त्यांचे देहावसान झालें. त्यांच्या पश्चात् त्यांनीं पाडिलेल्या परंपरेनुसार अनेक जैन पंडित अकबराच्या दरबारीं मान्यता पावत गेले, त्यांपैकीं कित्येकांची माहिती ह्या लेखांत दिली आहे. हीरसौभाग्य व विजयप्रशस्ति ह्या दोन ग्रंथांची माहितीहि लेखांत आली आहे. पैकीं दुसऱ्याची गणना महाकाव्यांत असून त्याचे २१ सर्ग आहेत. हें काव्य हेमविजयगणिनामक कवीनें लिहिण्यास सुरूवात केल्यावर १६ सर्ग पूर्ण होतांच तो मृत्यु पावला. तेव्हां त्याचा गुरु-बंधु 'गुणविजय' यानें शेवटचे ५ सर्ग पुरे केले. या दुसऱ्या ग्रंथकारानें ह्या काव्यावर एक टीकाहि लिहिली आहे. या (मूळ) ग्रंथाची रचना सरस असून ऐतिहासिक दृष्ट्या त्याचें महत्त्व विशेष आहे असें लेखकाचें म्हणणें आहे. यानंतर 'भूगोल-विद्या' व 'मनुष्य क्या चीज है' हे दोन शास्त्रीय लेख आहेत. पैकीं दुसऱ्या लेखांत डार्विनच्या एतद्विषयक सिद्धांताचा अनुवाद केलेला दिसत आहे. त्यानंतर 'हिन्दी की वर्तमान दशा' या लेखांत हिंदी भाषेची हलीची स्थिति सांगून ती सर्व हिंदुस्थानची एकभाषा होण्यास पात्र आहे असें प्रस्तापित करण्याचा लेखकाचा रोख आहे. हिंदी भाषेंत नांव घेण्यासारखे गद्यात्मक ग्रंथ फार थोडे आहेत ही खंत या लेखकानें कबूल केली असून ती भरून काढण्याबद्दल व सामान्य व्यवहारांत, कचेरींत आणि उद्योगधंद्यांचे बाबींत हिंदी भाषेचा विशेष उपयोग करण्याबद्दल त्यानें आपल्या बांधवांस सूचना केलेली आहे. हें सर्व अंमलांत आल्यानंतर हिंदी भाषा सर्व हिंदुस्थानची एक भाषा होण्यास पात्र आहे कीं नाहीं, ह्या गोष्टीची चर्चा करणें योग्य होईल असें आम्हाला वाटतें. यापुढें तुलसीदासाच्या रामायणांत 'सतीमोह' नामक जें प्रकरण आहे त्याच्या इष्टानिष्टतेबद्दल चर्चात्मक लेख आहे तो वाचनीय आहे. त्यानंतर 'गुहबंधु' या सदराखालीं अमेरिकेंत शिक्षणसंपादनार्थ गेलेल्या सुरेंद्रनारायण व देवेंद्रनारायण गुह या बंधुद्वयाचें थोडक चरित्र व देवेंद्रनारायण यांच्या मृत्यूची करुणास्पद हकीकत दिली आहे. ह्या दोघांहि बंधूंनीं अमेरिकेंतील विद्यालयांत उत्कृष्ट लौकिक संपादन केला होता. देवेंद्राच्या सशानयात्रेस, ते ज्या विद्यालयांत शिकत होते तेथील अध्यापक व विद्यार्थिसमूह आला होता. त्यांच्या सन्मानार्थ एक दिवस विद्यालय बंद ठेवण्यांत आलें होतें व विद्यालयाच्या नियमानुसार विद्यालयावर फडकत असलेलें राष्ट्रीय निशाण अर्धे खालीं करण्यांत आलें होतें. अमेरिकेंतील कोणत्याहि विद्यालयांतला विद्यार्थी अथवा शिक्षक मरण पावल्यास याप्रमाणें निशाण खालीं करण्याचा नियम आहे. यावरून विद्येला अमेरिकेंत केवढा मान आहे व काला-गोरा हा भेदभाव तेथें मुळींच कसा मानला जात नाहीं, याची वाचकांस चांगली कल्पना होणार आहे. या बाबतींत दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, देवेंद्राचा दहनविधि एका दक्षिणी ब्राह्मणानें शास्त्रोक्त विधीनें केला ! ही गोष्ट एकराष्ट्रीयत्वास पोषक असल्यामुळें येथें नमुद करून ठेवणें जरूर आहे. या लेखानंतर 'खडी बोली की काव्य-स्वतंत्रता' ह्या विषयांवर एक मार्मिक लेख आलेला आहे. इंग्रजींतील ब्लँक व्हर्सच्या धर्तीवर हिंदी भाषेंत बरीच कविता अलून आधुनिक कवींचा तिकडेच फार ओढा आहे. अशा कवितेतील गुणदोषांची या लेखांत चिकित्सा केली आहे. यानंतर तुलसीदासाच्या रामायणांतील कित्येक सुंदर उपमांविषयीं विवेचन केलेलें आहे, तें मार्मिक व सहृदय वाचकांस आनंद प्राप्त करून देणारें आहे. पुढें 'नीर-नारी' हा लहानसा लोकोत्तर चमत्कार-दर्शक लेख आहे. इ. स. १८१० मध्यें अमेरिकेच्या पूर्वभागांतील समुद्रांत नौकेवरील लोकांस एक स्त्री समुद्रांत तरत असलेली दिसली. ते तिच्याजवळ गेले व त्यांनीं तिला बाहेर काढली, तों कंबरेपासून खालीं तिला माशाचा आकार होता. तिला लोकांनीं गांवांत आणून पाण्याच्या हौदांत ठेवली व तिच्याकरतां कांहीं दायांची योजना केली. थोड्या दिवसांत ती स्त्री मनुष्याचे सर्व व्यवहार शिकली, मात्र तिला बोलतां तेवढें येत नसे. ती रोटी खाऊं लागली, वस्त्रें नेसूं लागली, फार काय, पण थोडेबहुत शिवणकामहि करूं लागली ! व ख्रिस्तीधर्माचें चिन्ह क्रॉस पहातांच त्याला नमस्कार करूं लागली. न्यूयार्क शहरांत ही स्त्री १६ वर्षे जिवंत होती. यानंतर इ. स. १८७० त कप्तान रिचर्ड व्हाइट वारनर याला सेंट हारबरजवळ एक अशीच मत्स्यनारी दिसली. पण ती त्याच्या हातीं येऊं शकली नाहीं. आमच्याकडील मत्स्यपुराणांत व इंग्रजी भाषेंतील कित्येक ग्रंथांत अशा स्त्रियांचें वर्णन आहे. तें केवळ काल्पनिक नसावें, असें वरील अनुभविक गोष्टीवरून ठरतें. इंग्रजी भाषेंतील एका पुस्तकांत या विषयासंबंधानें असें म्हटलें आहे कीं, 'पाण्यांत सुंदर स्त्रिया वसत असतात व त्या आपलें मुखकमल बाहेर काढून प्रायः मधुर गान करितात. त्यांचा मधुर ध्वनि ऐकणारा मनुष्य उन्मत्त होऊन त्यांच्याजवळ जातो पण एकदां तो तेथें पोंचला म्हणजे फिरून तो परत येत नाहीं !' वगैरे माहिती ह्या लेखांत आहे. यापुढें मि. स्टेड यांचा जीवनवृत्तांत आहे व तदनंतर 'जर्मनीके आधुनिक विद्यार्थियोंका जीवन' हा छोटासा पण सुंदर लेख आहे. ह्या लेखांत, जर्मनींतील आधुनिक विद्यार्थ्यांचा जीवनक्रम कसा असतो तें सांगितलें आहे. सर्व जगांत जर्मनींतील शिक्षणपद्धति श्रेष्ठ गणलेली आहे व उत्तम प्रकारचे शोधक, विद्वान् व तत्त्ववेत्ते लोक जर्मनींतच फार निपजले आहेत म्हणून ह्या शिक्षणपद्धतीचें स्वरूप काय आहे तें थोडक्यांत येथें देतों. जर्मनींतील शिक्षणाचे मुख्यतः दोन भाग आहेत. एक स्कूल (शाळा) व दुसरा कॉलेजें. ह्या दोन ठिकाणच्या व्यवस्थेंत मात्र फार अंतर आहे. शाळांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा प्रधान उद्देश मुलांच्या बुद्धीचा विकास करून त्यांना योग्य प्रकारचें मानसिक व शारीरिक शिक्षण देण्याचा आहे. म्हणून जोंपर्यंत विद्यार्थी या शाळेंत असतो तोंपर्यंत सर्व बाबतींत त्याच्यावर शिक्षकांची देखरेख व अधिकार असतो. त्याला शहरांत हवें तिकडे मोकळें

फिरण्याची मनाई असते, व शिक्षकानें नियत केलेल्या पुस्तकांवांचून इतर पुस्तकें वाचतां येत नाहींत. शिक्षकांचें सर्व लक्ष त्यांचें शील बनविण्याकडे, त्यांच्या बुद्धीचा विकास करण्याकडे, व त्यांचें शरीरसामर्थ्य वाढविण्याकडे असतें. या अवस्थेंत नियमित काल घालविल्यानंतर म्हणजे त्यांस पन्नासचें सर्टिफिकीट मिळाल्यानंतर त्यांच्या पूर्वीच्या व प्रस्तुतच्या स्थितींत फार मोठें अंतर पडतें. हें सर्टिफिकीट नुसत्या विद्वत्तेचें दर्शक नसून तें स्वतःच्या पायावर उभें राहण्यास पात्र असल्याचें दर्शक असतें. ज्यांनां हें सर्टिफिकीट मिळतें त्यांच्यावर यापुढें आईबापांचा किंवा शिक्षकांचा ताबा नसतो. अशा विद्यार्थ्यांस सबंध देशांतील पाहिजे त्या कॉलेजांत आपलें नांव नोंदवितां येतें व त्यांस पाहिजे तो अभ्यासक्रम घेतां येतो. जेथें नांव नोंदलें असेल तेथें वार्षिक फी अदमासें ४०० रुपये भरावी लागते. ही भरली म्हणजे विद्यार्थ्यानें पाहिजे तेव्हां पाहिजे त्या कॉलेजांत पाहिजे त्या विषयाच्या लेक्चरास जावें! एकाच कॉलेजमध्यें त्यास बांधून टाकण्यांत येत नाहीं व अमुक दिवस कॉलेजांत असलेंच पाहिजे, अशी अट नाहीं. निरनिराळ्या कॉलेजांत जाण्याची सवट मुद्दाम अशाकरतां ठेवण्यांत आली आहे कीं, निरनिराळ्या विषयांतील अत्यंत प्रवीण अशा अध्यापकांचे विचारांचा विद्यार्थ्यांस लाभ व्हावा. या पद्धतीस कॉलेजाच्या अधिकाऱ्यांकडून विशेष उत्तेजन दिलें जातें. कॉलेजांत बोर्डिंग वगैरे कांहींएक व्यवस्था नाहीं. ज्यानें त्यानें आपापल्या सोयीप्रमाणें व्यवस्था करावी. प्रत्येक विद्यार्थ्यास जेवणाखाणाप्रीत्यर्थ सालीना सुमारें ५०० रुपये खर्च येतो. या कामाकरतां तेथील विद्यार्थ्यांनीं मोठमोठे क्लब स्थापन केलेले आहेत. कांहीं दिवसापूर्वी हे क्लब देशांतील राजकीय चळवळींचीं केंद्रें असत. पण देशांत सध्यां सुराज्य असल्यामुळें आतां मनोरंजन, विद्याविषयक चर्चा व परस्पर सामाजिक दळणवळण या गोष्टीस हे क्लब वाहिलेले आहे. द्वंद्वयुद्धाचा खेळहि या क्लबांतून चालू असतो. या खेळास जर्मनींत फार उत्तेजन दिलें जातें. जर्मनीचे प्रस्तुत बादशहांनांहि हा खेळ फार पसंत आहे. या खेळाच्या योगानें तरुणांच्या अंगीं शौर्य, वीर्य व धाडस इत्यादि गुणांचा प्रकर्ष होऊन त्यांच्या शरीरसामर्थ्याच्या वाढीसहि तो फार उपयोगी आहे असें बादशहा उर्फ कैसरचें मत आहे. या लहानशा देशांत २१ विश्वविद्यालयें (Universities) आहेत! येथें ठरीव पुस्तकांचा अभ्यास करून डिग्री मिळत नाहीं. विचार-स्वातंत्र्य व प्रतिभा यांच्या योगानें परीक्षकांस जेव्हां संतुष्ट करावें तेव्हां डिग्री मिळते. 'आमची एन्ट्रन्स ही इंग्लंडच्या बी. ए., बरोबर आहे,' असें तेथील लोक म्हणतात. तेथील LL. D. ची पदवी सर्वांत मोठी मान्यतेची असून जो कोणी दुसऱ्याच्या विचाराची बिलकुल मदत न घेतां स्वतंत्र विचाराचा नवीन ग्रंथ लिहील त्यासच ती मिळते. स्वतंत्रपणें विचार करण्याची सवय विद्यार्थ्यास शाळा सोडल्यापासून लागत जाते. यापुढें 'राजा और रानी' ही बोधपर गोष्ट, विविध विषय वगैरे किरकोळ लेख आहेत. या अंकांत एकंदर ९ सुंदर चित्रें आहेत.

मर्यादा—(ज्येष्ठ) प्रारंभीं शेखर कवि नामक एका हिंदी कवीचें त्रोटक चरित्र दिलें आहे. हा कवि संवत् १८५५त जन्मला व १९३२ त निवर्तला. या कवीनें पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत, पण त्यांपैकीं महत्त्वाचे असे बरेच ग्रंथ अद्याप अप्रकाशित आहेत. ह्या कवीचें समग्र नांव चंद्रशेखर वाजपेई असें होतें. हा पिढीजाद कवि होता. यास जोधपूरच्या मानसिंह राज्यानें आश्रय दिला होता; परंतु तो निवर्तल्यावर त्याच्या राज्यांत बखेडा माजल्यामुळें हा कवि पंजाबचा सिंह रणजितसिंह याकडे जावयास निघाला; परंतु वाटेंत पतियाला संस्थानचे महाराज कर्मसिंह यांनीं त्याचा आदरसत्कार करून त्यास आपल्या पदरीं ठेवून घेतलें. ह्या कवीचे वंशज अद्याप पतियाळा येथें आहेत. ह्या कवीची कविता मुख्यतः वीररसात्मक आहे. तथापि शृंगार-श्रेष्ठ दर्जाचा शृंगार—व भक्तिरस हेहि याच्या काव्यांत चांगले उतरले आहेत. या लेखांत प्रस्तुत कवीच्या गुणांची इतर हिंदी कवींच्या काव्यगुणांशीं तुलना करून लेखकानें या कवीस दुय्यम प्रतीच्या कवींत अग्रस्थान दिलें आहे. हें तुलनात्मक विवेचन फार मार्मिक आहे. या लेखानंतर रणजितसिंहाचे पुत्र व पंजाबचे शेवटचे राजपुरुष महाराजा धुलिपसिंह यांचें त्रोटक चरित्र दिलें आहे. या दुर्दैवी राजपुत्राचें हें चरित्र वाचून कोणाहि सहृदय माणसाचें हृदय भरून आल्यावांचून राहणार नाहीं. यानंतर नौकायानासंबंधीं एक ऐतिहासिक लेख आहे. त्यांत पाश्चात्य देशांत आजपर्यंत जे मोठमोठे नाविक होऊन गेले त्यांची व त्यांच्या साहसाची माहिती दिली आहे ती वाचनीय आहे. नौकायानापासून मनुष्याचे अंगीं धैर्य, शौर्य, मानसिक औदार्य, पराक्रम, सावधानता इत्यादि गुणांचा कसा प्रकर्ष होतो, हें या लेखांत विशद करून सांगितलें आहे. त्यानंतर 'शरीरमें गडबड' ह्या नांवाचें एक छोटेसें मनोरंजक व बोधपर काव्य आहे. 'पोट आणि अवयव' ह्या गोष्टीसारखीच कथा या काव्यांत आहे. नंतर चंद्रलाल गुप्त बी. ए., यांचा 'नैनीताल-यात्रा' नांवाचा सचित्र प्रवासवर्णनात्मक लेख आहे. त्यांत, नैनीतालची पुराणांतर्गत उत्पत्तिकथा, त्यास इंग्रजांच्या अमदानींत प्राप्त झालेलें नवीन स्वरूप, तेथें आर्यसमाजानें नामक जातींतील स्त्रियांच्या स्थितींत केलेली इष्ट सुधारणा, तेथें स्थापन झालेला इंडियन क्लब, वगैरे संबंधानें उपयुक्त माहिती सांगितली आहे. यानंतर हिंदी-नवरत्न या महत्त्वाच्या पुस्तकाचें परीक्षण आहे. ह्या पुस्तकांत १ तुलसीदास, २ सूरदास, ३ देव, ४ बिहारी, ५ भूषण, ६ केशवदास, ६ मतिराम, ८ चन्द व ९ हरिश्चन्द्र या प्रख्यात हिंदी कवींचीं चरित्रें व त्यांच्या ग्रंथांचें मार्मिक समालोचन केलेलें आहे. हा लेख विचिकित्सात्मक असून वाचनीय आहे. त्यानंतर साहित्यविषयक चर्चा आहे. त्यांत भवभूतीच्या उत्तररामचरितावर सार व विचार प्रकट करणारांनीं श्रीरामचंद्राच्या हातून झालेला शूद्र-वध व सीता-त्याग यासंबंधानें वाद उपस्थित केलेला आहे. एका पक्षाच्या विवेचनांतील मुख्य मुद्दा असा आहे कीं, सीता शूद्र आहे असें

रामास माहित होतें व लोकांची खात्री पटविण्याकरतां त्यानें तिची अग्निद्वारा शुद्धीहि केली होती. असें असतां त्यानें केवल एका रजकाच्या बोलण्यावरून तिचा त्याग केला हें अनुचित होय. त्याचप्रमाणें ज्या वर्णाचें रक्षण करण्याचा क्षत्रियांचा धर्म, त्या वर्णापैकीं एका व्यक्तीस केवल तो आचारभ्रष्ट झाला म्हणून ठार मारणें, हेंहि रामचंद्रासारख्या व्यक्तीस उचित नव्हे. ह्या मुद्यांचें खंडन करतांना दुसऱ्या पक्षाच्या लेखकानें असा मुद्दा काढला आहे, कीं, सीता शुद्ध होती हें जरी रामास माहित होतें तरी त्यानें जर रजकाचें मत झुगारून सीतेस घरीं ठेवली असती तर भावी पिढीस तें एक वाईट उदाहरण घालून दिल्याप्रमाणें झालें असतें. कारण, सीता विशेष थोर होती, ती निष्कलंक होती, या गोष्टी तत्कालीन पिढीच्या पुढें जरी होत्या, तरी भावी पिढीस त्या गोष्टींची विस्मृति पडण्याचा बळकट संभव होता व परक्याच्या घरीं राहिलेल्या आपल्या बायकोस रामासारख्यानें घरीं घेतलें येवढी गोष्ट मात्र त्यांच्या लक्षांत राहून ते प्रसंगविशेषीं त्याचें अनुकरण करण्यास तयार होते व त्यामुळें सामाजिक नीतीवर आघात होण्याचा संभव होता, म्हणून रामचंद्रानें केलें तें बरोबर होतें. शूद्रवधासंबंधानें हा लेखक म्हणतो कीं, वर्णाश्रमधर्मांचें उल्लंघन झाल्यास समाजरचना विस्खलित होण्याचा संभव होता, म्हणून इतका कठोर दंड रामचंद्रास करावा लागला व समाजशास्त्राच्या दृष्टीनें पहातां तो योग्य होता, असें म्हटलें पाहिजे. एकंदरींत हा वाद मोठा मौजेचा असून त्यांत विकारवशतेचा गंधहि नसल्यामुळें वाचनीय झालेला आहे. त्यानंतर 'टिटॅनिक का सर्व्हनाश' हा लेख आहे. या लेखांतील वर्णनशैली चांगली आहे. त्यापुढें साहित्यसमालोचन व संपादकीय टिपणें वगैरे किरकोळ लेख आहेत.



एडिटरचें टेबल.



संगीत सुदामनाटक—लेखक श्रीयुत अनंत वामन वर्वे, प्रकाशक श्रीयुत शामराव आप्पाजी शिरगुप्पीकर, कोल्हापुरकर संगीत नाटक मंडळी, किंमत ८ आणे. नाटक भक्तिपर आहे. गद्यांत शब्दालंकार साधण्याच्या फाजील हौसेमुळें भाषणांत भारदस्तपणा रहात नाहीं.

सावंतवाडी संस्थानचा इतिहास—हें पुस्तक श्रीयुत विठ्ठल पुरुषोत्तम पिंगुळकर यांनीं लिहिलें व सावंतवाडी येथें लक्ष्मीविलास छापखान्यांत छापिलें, किंमत २ रुपये. यांत सावंतवाडीचा इतिहास सविस्तर देऊन पूर्वीची जमाबंदी ठरविण्याची रीत, वसुलाची पद्धत, इत्यादि माहितीहि दिली आहे. परिशिष्टांत जुने लेख, पोवाडे, जुनीं पत्रें वगैरे दिलीं आहेत. माहिती फार परिश्रमानें मिळवून तिचा उपयोग चांगल्या रीतीनें केलेला आहे. पुस्तक संग्रह करण्यासारखें आहे.

श्रीमत्परमहंस सिद्धारूढ स्वामी महाराज वास्तव्य हुबळी यांचें चरित्र—श्रीयुत वामन परशराम फणसळकर यांनीं लिहिलें व बेळगांव येथें श्रीरामतत्त्वप्रकाश छापखान्यांत छापिलें. किंमत १० आणे. श्रीयुत फणसळकर हे प्रस्तावनेंत लिहितातच कीं, ते आधुनिक विद्वान् नाहींत किंवा पुराणपद्धतीचे पण्डितहि नाहींत. त्यांनीं भाविक अंतःकरणानें आपल्या गुरूचें चरित्र वेड्यावांकड्या भाषेंत स्वसंतोषाकरितां लिहून तो ग्रंथ श्रीसद्गुरूच्या चरणकमलीं अर्पण केला आहे. अशा ग्रंथांतील दोषांकडे वाचकाईनें पाहणें योग्य होणार नाहीं.

अक्कल—हें पुस्तक श्रीयुत त्रिंबकराव अनंत साठे, एम्.ए., हायकोर्ट प्लीडर, सेशन्स जज्ज, उज्जैन, संस्थान ग्वाल्हेर, यांनीं प्रसिद्ध केलें आहे. किंमत ४ आणे. हें पुस्तक प्रश्नोत्तररूपानें असून त्यांत अनेक विषयांवर ग्रंथकारानें आपले अभिप्राय नमूद केले आहेत. अक्कल या शब्दाचा साधारणतः व्यवहारज्ञान किंवा चातुर्य असा अर्थ समजतात. तेव्हां या पुस्तकास अक्कल हें नांव न देतां सारासार विचार असें नांव दिलें असतें, तर तें विशेष शोभलें असतें. प्रस्तुत पुस्तकाची रचना थोडी विलक्षण असल्यामुळें ग्रंथकाराचा उद्देश व ग्रंथाची व्याप्ति समजावून देणारी प्रस्तावना आधीं द्यावयाला पाहिजे होती. पुस्तक विचारपूर्वक लिहिलें असून वाचण्यासारखें आहे.

सावित्री गीत—लेखक आणि प्रकाशक श्रीयुत नारायण विंदाचार्य कट्टी अ. मास्तर, ए. व्ही. स्कूल, खानगांव, बन्हाड. किंमत २ आणे. ह्यांत पुण्यश्लोक साध्वी सावित्री हिचें पद्यात्मक चरित्र आहे. शब्दरचना सुलभ असून पद्यांच्या चाली स्त्रियांच्या नेहमींच्या परिपाठांतील आहेत.

ग्रह आणि ग्रहांचा परिणाम—हा निबंध श्रीयुत अब्दुल अजीजखान, मुंबई यांनीं लिहिला व श्रीयुत पंडित श्रीनिवास महादेवजी शर्मा यांनीं श्रीभुवनेश्वरी प्रिंटिंग प्रेस रतलाममध्यें छापून प्रसिद्ध केला. ह्यांत ग्रह काय पदार्थ आहे, ग्रहांत परिणाम कसा होतो, इत्यादि विषयांचें विवेचन केलें आहे. पृथ्वीवरील प्राण्यांच्या स्थितीवर ग्रहांचा परिणाम कां होतो हें भौतिक शास्त्राच्या सध्यांच्या ज्ञानावरून सांगूं जाणें बहुतेक अशक्य आहे. निदान समाधानकारक रीतीनें ही उपपत्ति इतक्यांत लावतां येईल, असें आम्हाला वाटत नाहीं. तथापि ग्रंथकर्त्यानें विषयविवेचन चांगलें केलें आहे. पुस्तकांत अशुद्धें पुष्कळच राहिलीं आहेत. पुस्तकाच्या आकाराच्या मानानें आठ आणे किंमत जास्त दिसते.

निष्काम-कर्म-मठ.

पूर्व इतिहास.

अनाथबालिकाश्रमाची संस्था १९१८ सालीं नोंदविण्यांत आली त्या वेळीं आश्रमाचे उद्देश स्पष्टपणें लिहिण्यांत आले. त्यांत हिंदी सिस्टर्स तयार करणें हा एक आहे. नंतर १९०१ सालीं आश्रमाची माहिती लोकांस कळविण्याकरितां एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें, त्यांत आश्रमाचा उद्देश शिक्षकिणी व सुइणी तयार करणें एवढाच नसून आपलें आयुष्य लोकसेवेला अर्पण करणाऱ्या स्त्रिया आश्रमांतून निघाव्या हा आहे असा स्पष्ट उल्लेख आहे, तो त्यावेळीं योजिलेल्या शब्दांनींच देणें बरें. "सारांश, आश्रमांतील विद्यार्थिनींनी विद्या संपादन करून नीतीनें आपला चरितार्थ चालवावा एवढाच केवळ आश्रमाचा हेतु नाहीं. तर त्यांनीं तसें करून शिवाय आपल्या देशभगिनींच्या उपयोगीं पडावें व त्यांच्या उन्नतीला सहाय्य करावें हा आश्रमाचा हेतु आहे. याशिवाय विद्या संपादन करून द्रव्याची अपेक्षा न करतां, संपादित विद्येचा उपयोग केवळ परोपकारार्थ करणाऱ्या व आश्रमासारख्या संस्था आपल्या सामर्थ्यावर चालविणाऱ्या कांही स्त्रिया आश्रमांतून तयार होतील अशी आश्रमास फार उमेद आहे."

पुढें हे विचार केव्हां जोरावले हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं पण या विचारांना मूर्तस्वरूप देण्याला क्षेत्र न मिळाल्यामुळें ते गुप्त स्वरूपांतच राहिले. नंतर चार वर्षांपूर्वी त्याचा पुन्हां उदय होऊन १९०८ च्या नवंबर महिन्यांत दोन मनोभूमिकांत ह्या विचाराचें बीजारोपण झालें व ह्या नव्या संस्थेला वाहून घेण्याबद्दल परमात्मस्वरूपाचें स्मरण करून तीन मनुष्यांनीं प्रतिज्ञा केल्या. तेव्हांपासून हें बीज कांहीं मनोभूमिकांत पेरण्याचें काम सुरू झालें. कांहीं ठिकाणीं तें उगवलें व कांहीं ठिकाणीं करपून गेलें. १९०८ च्या नवंबरपासून ह्या संस्थेचें रोप वाढीस लागलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं, वर्षांतून दोन तीन वेळां तरी अशा प्रतिज्ञा केलेल्या मनुष्यांनीं एकत्र जमावें व सहविचारांनीं एकमेकांच्या निश्चयांस बळकटी आणावी असा क्रम चालला होता. ह्या सभा बहुतकरून आश्रमांत अगर महिलाविद्यालयांत होत असत. ह्या सर्व सभांची नोंद एका प्रोसीडिंग बुकांत केलेली आहे. आरंभापासूनच ही संस्था स्त्रियांची असावी असा कटाक्ष आहे. व नांवाची योजना करतांना स्त्री ह्या अर्थाचा सूचक शब्द आरंभीं लावलेला अशीं वरींच नांवें विचारांत घेतली होतीं. जरी ही संस्था स्त्रियांची असावी असें वाटत होतें तरी आणखी एक पिढी पुरुषांच्या साह्यावांचून केवल स्त्रियांनीं संस्था चालविणें कठिण ह्मणून कांही पुरुषमंडळी संस्थेचे घटक ह्या नात्यानें दाखल करण्याचें ठरविलें होतें. नंतर रा. रा. बाळाजी विनायक कौलगेकर आश्रमांत शिक्षकाचें काम करावयास आले. आपल्या मुलींना दीर्घकाळपर्यंत अविवाहित ठेवून त्यांस चांगलें शिक्षण द्यावयाचें ह्या संकल्पानेंच ते आश्रमांत आले होते. असले विचार लहानपणापासूनच त्याचें मनांत येत असत; परंतु प्रत्यक्ष कृतीला संधि आली नव्हती. त्यांनीं मठाच्या कल्पनेचें एकदम ग्रहण केलें. ह्यांचे आधीं जी मंडळी ह्या कल्पनेला अनुकूल झालेली होती ती सर्व विद्यार्थि-दशेंतील असल्यामुळें प्रत्यक्ष काम सुरू होणें शक्य नव्हतें. परंतु रा. कौलगेकर ह्यांचें साह्य मिळाल्यामुळें प्रत्यक्ष काम सुरू होण्याची आशा वाटूं लागली. इतक्यांत रा. रा. महादेव केशव गाडगीळ ह्यांचेंही साह्य मिळालें. आश्रमाची मोठी इमारत बांधण्यासंबंधाचा विचार करण्याकरितां १९०६ सालीं कमिटीची सभा आश्रमासमोर उघड्या जागेवर भरली होती त्यावेळीं रा. गाडगीळ हजर होते, व आपण आश्रमांत काम करण्यास यावें असा त्यांचा विचार त्यांनीं कमिटीसही कळविला होता. त्यावेळीं थोडासा पत्रव्यवहार होऊन तें प्रकरण तसेंच मागें पडलें. पुढें १९१० सालीं ते सहज पुण्यास आलेअसतां त्यांची गांठ पडली व अद्यापही आपला विचार कायम आहे असें त्यांनीं सांगितलें. तेव्हां अर्थात् मठाची नवी कल्पना जी जीव धरूं लागली होती तीसंबंधानेंही बोलणें होऊन त्यांनीं एक वर्षाची रजा घेऊन येण्याचें ठरलें. ह्या उभयतांच्या बायकाही ह्या विचारांना पूर्णपणें अनुकूल होत्या व ह्या उभयतांसही मुलगे नसल्यामुळें त्यांच्या कुटुंबाचा मठाशीं एकजीव होणें सुलभ झालें. ह्याच सुमारास मीही डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नोकरींतून मोकळा झालों. आतां लोकांपुढें येऊन मठाचें काम करण्यास थोडीं तरी माणसें आहेत तेव्हां उघडपणें कामास सुरवात करण्याचा विचार ठरून ता. ६ डिसेंबर १९१० रोजीं मठाच्या सर्व सेवकसेविकांची सभा महिलाविद्यालयांत झाली ह्या सभेंत मिस्तर व मिसेस गाडगीळ आणि मिस्तर व मिसेस कौलगेकर ह्यांस सर्वानुमतें सेवकसेविका करून घेण्यांत आलें. हें बंधन एक वर्षापुरतेंच होतें. वाटल्यास त्यांना सोडून जाण्याला हरकत नव्हता अगर मठाच्या इतर सेवकसेविकांनी बहुमतानें त्यांना "जा" ह्मणून सांगण्यास हरकत नव्हती. ह्याच सभेंत महिलाविद्यालयाची सर्व जबाबदारी मठानें आपणावर घ्यावी असा ठराव झाला. हें वर्ष पुरें झाल्यावर ता. २८ जानेवारी १९१२ रोजीं राहीं हिंगणें येथें महिलाविद्यालयाची नवीन इमारत चालली

रामास माहित होतें व लोकांची खात्री पटविण्याकरतां त्यानें तिची अग्निद्वारा शुद्धीहि केली होती. असें असतां त्यानें केवळ एका रजकाच्या बोलण्यावरून तिचा त्याग केला हें अनुचित होय. त्याचप्रमाणें ज्या वर्णाचें रक्षण करण्याचा क्षत्रियांचा धर्म, त्या वर्णापैकीं एका व्यक्तीस केवळ तो आचारभ्रष्ट झाला म्हणून ठार मारणें, हेंहि रामचंद्रासारख्या व्यक्तीस उचित नव्हे. ह्या मुद्यांचें खंडन करतांना दुसऱ्या पक्षाच्या लेखकानें असा मुद्दा काढला आहे, कीं, सीता शुद्ध होती हें जरी रामास माहित होतें तरी त्यानें जर रजकाचें मत झुगारून सीतेस घरीं ठेवली असती तर भावी पिढीस तें एक वाईट उदाहरण घालून दिल्याप्रमाणें झालें असतें. कारण, सीता विशेष थोर होती, ती निष्कलंक होती, या गोष्टी तत्कालीन पिढीच्या पुढें जरी होत्या, तरी भावी पिढीस त्या गोष्टींची विस्मृति पडण्याचा बळकट संभव होता व परक्याच्या घरीं राहिलेल्या आपल्या बायकोस रामासारख्यानें घरीं घेतलें येवढी गोष्ट मात्र त्यांच्या लक्षांत राहून ते प्रसंगविशेषीं त्याचें अनुकरण करण्यास तयार होते व त्यामुळें सामाजिक नीतीवर आघात होण्याचा संभव होता, म्हणून रामचंद्रानें केलें तें बरोबर होतें. शूद्रवधासंबंधानें हा लेखक म्हणतो कीं, वर्णाश्रमधर्मांचें उल्लंघन झाल्यास समाजरचना विस्खलित होण्याचा संभव होता, म्हणून इतका कठोर दंड रामचंद्रास करावा लागला व समाजशास्त्राच्या दृष्टीनें पहातां तो योग्य होता, असें म्हटलें पाहिजे. एकंदरींत हा वाद मोठा मौजेचा असून त्यांत विकारवशतेचा गंधहि नसल्यामुळें वाचनीय झालेला आहे. त्यानंतर 'टिटैनिक का सर्व्वनाश' हा लेख आहे. या लेखांतील वर्णनशैली चांगली आहे. त्यापुढें साहित्यसमालोचन व संपादकीय टिपणें वगैरे किरकोळ लेख आहेत.



एडिटरचें टेबल.



संगीत सुदामनाटक—लेखक श्रीयुत अनंत वामन वर्वे, प्रकाशक श्रीयुत शामराव आप्पाजी शिरगुप्पीकर, कोल्हापुरकर संगीत नाटक मंडळी, किंमत ८ आणे. नाटक भक्तिपर आहे. गद्यांत शब्दालंकार साधण्याच्या फाजील हौसेमुळें भाषणांत भारदस्तपणा रहात नाहीं.

सावंतवाडी संस्थानचा इतिहास—हें पुस्तक श्रीयुत विठ्ठल पुरुषोत्तम पिंगुळकर यांनीं लिहिलें व सावंतवाडी येथें लक्ष्मीविलास छापखान्यांत छापिलें, किंमत २ रुपये. यांत सावंतवाडीचा इतिहास सविस्तर देऊन पूर्वीची जमाबंदी ठरविण्याची रीत, वसुलाची पद्धत, इत्यादि माहितीहि दिली आहे. परिशिष्टांत जुने लेख, पोवाडे, जुनीं पत्रकें वगैरे दिलीं आहेत. माहिती फार परिश्रमाने मिळवून तिचा उपयोग चांगल्या रीतीनें केलेला आहे. पुस्तक संग्रह करण्यासारखें आहे.

श्रीमत्परमहंस सिद्धारूढ स्वामी महाराज वास्तव्य हुबळी यांचें चरित्र-श्रीयुत वामन परशराम फणसळकर यांनीं लिहिलें व बेळगांव येथें श्रीरामतत्त्वप्रकाश छापखान्यांत छापिलें. किंमत १० आणे. श्रीयुत फणसळकर हे प्रस्तावनेंत लिहितातच कीं, ते आधुनिक विद्वान् नाहींत किंवा पुराणपद्धतीचे पण्डितहि नाहींत. त्यांनीं भाविक अंतःकरणानें आपल्या गुरूचें चरित्र वेड्यावांकड्या भाषेंत स्वसंतोषाकरितां लिहून तो ग्रंथ श्रीसद्गुरूच्या चरणकमलीं अर्पण केला आहे. अशा ग्रंथांतील दोषांकडे बारकाईनें पाहणें योग्य होणार नाहीं.

अकल—हें पुस्तक श्रीयुत त्रिंबकराव अनंत साठे, एम्.ए., हायकोर्ट प्लीडर, सेशन्स जज्ज, उज्जैन, संस्थान ग्वाल्हेर, यांनीं प्रसिद्ध केलें आहे. किंमत ४ आणे. हें पुस्तक प्रश्नोत्तररूपानें असून त्यांत अनेक विषयांवर ग्रंथकारानें आपले अभिप्राय नमूद केले आहेत. अक्कल या शब्दाचा साधारणतः व्यवहारज्ञान किंवा चातुर्य असा अर्थ समजतात. तेव्हां या पुस्तकास अक्कल हें नांव न देतां सारासार विचार असें नांव दिलें असतें, तर तें विशेष-शोभलें असतें. प्रस्तुत पुस्तकाची रचना थोडी विलक्षण असल्यामुळें ग्रंथकाराचा उद्देश व ग्रंथाची व्याप्ति समजावून देणारी प्रस्तावना आधीं द्यावयाला पाहिजे होती. पुस्तक विचारपूर्वक लिहिलें असून वाचण्यासारखें आहे.

सावित्री गीत—लेखक आणि प्रकाशक श्रीयुत नारायण विंदाचार्य कट्टी अ. मास्तर, ए. व्ही. स्कूल, खानगांव, बन्हाड. किंमत २ आणे. ह्यांत पुण्यश्लोक साध्वी सावित्री हिचें पद्यात्मक चरित्र आहे. शब्दरचना सुलभ असून पद्यांच्या चाली स्त्रियांच्या नेहमींच्या परिपाठांतील आहेत.

ग्रह आणि ग्रहांचा परिणाम—हा निबंध श्रीयुत अब्दुल अजीजखान, मुबई यांनीं लिहिला व श्रीयुत पंडित श्रीनिवास महादेवजी शर्मा यांनीं श्रीभुवनेश्वरी प्रिंटिंग प्रेस रतलाममध्यें छापून प्रसिद्ध केला. ह्यांत ग्रह काय पदार्थ आहे, ग्रहांत परिणाम कसा होतो, इत्यादि विषयांचें विवेचन केलें आहे. पृथ्वीवरील प्राण्यांच्या स्थितीवर ग्रहांचा परिणाम कां होतो हें भौतिक शास्त्राच्या सध्यांच्या ज्ञानावरून सांगूं जाणें बहुतेक अशक्य आहे. निदान समाधानकारक रीतीनें ही उपपत्ति इतक्यांत लावतां येईल, असें आम्हाला वाटत नाहीं. तथापि ग्रंथकर्त्यानें विषयविवेचन चांगलें केलें आहे. पुस्तकांत अशुद्धें पुष्कळच राहिलीं आहेत. पुस्तकाच्या आकाराच्या मानानें आठ आणे किंमत जास्त दिसते.

निष्काम-कर्म-मठ.

पूर्व इतिहास.

अनाथबालिकाश्रमाची संस्था १९१८ साली नोंदविण्यांत आली त्या वेळीं आश्रमाचे उद्देश स्पष्टपणें लिहिण्यांत आले. त्यांत हिंदी सिस्टर्स तयार करणें हा एक आहे. नंतर १९०१ सालीं आश्रमाची माहिती लोकांस कळविण्याकरितां एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें, त्यांत आश्रमाचा उद्देश शिक्षकिणी व सुइणी तयार करणें एवढाच नसून आपलें आयुष्य लोकसेवेला अर्पण करणाऱ्या स्त्रिया आश्रमांतून निघाव्या हा आहे असा स्पष्ट उल्लेख आहे, तो त्यावेळीं योजिलेल्या शब्दांनींच देणें बरें. "सारांश, आश्रमांतील विद्यार्थिनींनी विद्या संपादन करून नीतीनें आपला चरितार्थ चालवावा एवढाच केवळ आश्रमाचा हेतु नाहीं. तर त्यांनीं तसें करून शिवाय आपल्या देशभगिनींच्या उपयोगीं पडावें व त्यांच्या उन्नतीला सहाय्य करावें हा आश्रमाचा हेतु आहे. याशिवाय विद्या संपादन करून द्रव्याची अपेक्षा न करतां, संपादित विद्येचा उपयोग केवळ परोपकारार्थ करणाऱ्या व आश्रमासारख्या संस्था आपल्या सामर्थ्यावर चालविणाऱ्या कांहीं स्त्रिया आश्रमांतून तयार होतील अशी आश्रमास फार उमेद आहे."

पुढें हे विचार केव्हां जोरावले हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं पण या विचारांना मूर्तस्वरूप देण्याला क्षेत्र न मिळाल्यामुळें ते गुप्त स्वरूपांतच राहिले. नंतर चार वर्षांपूर्वी त्याचा पुन्हां उदय होऊन १९०८ च्या नवंबर महिन्यांत दोन मनोभूमिकांत ह्या विचारांचें बीजारोपण झालें व ह्या नव्या संस्थेला वाहून घेण्याबद्दल परमात्मस्वरूपाचें स्मरण करून तीन मनुष्यांनीं प्रतिज्ञा केल्या. तेव्हांपासून हें बीज कांहीं मनोभूमिकांत पेरण्याचें काम सुरू झालें. कांहीं ठिकाणीं तें उगवलें व कांहीं ठिकाणीं करपून गेलें. १९०८ च्या नवंबरपासून ह्या संस्थेचें रोप वाढीस लागलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं, वर्षांतून दोन तीन वेळां तरी अशा प्रतिज्ञा केलेल्या मनुष्यांनीं एकत्र जमावें व सहविचारांनीं एकमेकांच्या निश्चयांस बळकटी आणावी असा क्रम चालला होता. ह्या सभा बहुतकरून आश्रमांत अगर महिलाविद्यालयांत होत असत. ह्या सर्व सभांची नोंद एका प्रोसीडिंग बुकांत केलेली आहे. आरंभापासूनच ही संस्था स्त्रियांची असावी असा कटाक्ष आहे, व नांवाची योजना करतांना स्त्री ह्या अर्थाचा सूचक शब्द आरंभीं लावलेला अशीं वरींच नांवें विचारांत घेतली होतीं. जरी ही संस्था स्त्रियांची असावी असें वाटत होतें तरी आपली एक पिढी पुरुषांच्या साह्याशिवांचून केवल स्त्रियांनीं संस्था चालविणें कठिण ह्मणून कांहीं पुरुषमंडळी संस्थेचे घटक ह्या नात्यानें दाखल करण्याचें ठरविलें होतें. नंतर रा. रा. बाळाजी विनायक कौलगेकर आश्रमांत शिक्षकाचें काम करावयास आले. आपल्या मुलींना दीर्घकाळपर्यंत अविवाहित ठेवून त्यांस चांगलें शिक्षण द्यावयाचें ह्या संकल्पानेंच ते आश्रमांत आले होते. असले विचार लहानपणापासूनच त्यांचे मनांत येत असत; परंतु प्रत्यक्ष कृतीला संधि आली नव्हती. त्यांनीं मठाच्या कल्पनेचें एकदम ग्रहण केलें. त्यांचे आधीं जी मंडळी ह्या कल्पनेला अनुकूल झालेली होती ती सर्व विद्यार्थि-दशेंतील असल्यामुळें प्रत्यक्ष काम सुरू होणें शक्य नव्हतें. परंतु रा. कौलगेकर ह्यांचें साह्य मिळाल्यामुळें प्रत्यक्ष काम सुरू होण्याची आशा वाटूं लागली. इतक्यांत रा. रा. महादेव केशव गाडगीळ ह्यांचेंही साह्य मिळालें. आश्रमाची मोठी इमारत बांधण्यासंबंधाचा विचार करण्याकरितां १९०६ सालीं कमिटीची सभा आश्रमासमोर उघड्या जागेवर भरली होती त्यावेळी रा. गाडगीळ हजर होते, व आपण आश्रमांत काम करण्यास यावें असा त्यांचा विचार त्यांनीं कमिटीसही कळविला होता. त्यावेळीं थोडासा पत्रव्यवहार होऊन तें प्रकरण तसेंच मागें पडलें. पुढें १९१० सालीं ते सहज पुण्यास आलेअसतां त्यांची गांठ पडली व अद्यापही आपला विचार कायम आहे असें त्यांनीं सांगितलें. तेव्हां अर्थात् मठाची नवी कल्पना जी जीव धरू लागली होती तीसंबंधानेंही बोलणें होऊन त्यांनीं एक वर्षाची रजा घेऊन येण्याचें ठरलें. ह्या उभयतांच्या वायकाही ह्या विचारांना पूर्णपणें अनुकूल होत्या व ह्या उभयतांसही मुलगे नसल्यामुळें त्यांच्या कुटुंबाचा मठाशीं एकजीव होणें सुलभ झालें. ह्याच सुमारास मीही डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नोकरींतून मोकळा झालों. आतां लोकांपुढें येऊन मठाचें काम करण्यास थोडीं तरी माणसें आहेत तेव्हां उघडपणें कामास सुरुवात करण्याचा विचार ठरून ता. ६ डिसेंबर १९१० रोजीं मठाच्या सर्व सेवकसेविकांची सभा महिलाविद्यालयांत झाली ह्या सभेंत मिस्तर व मिसेस गाडगीळ आणि मिस्तर व मिसेस कौलगेकर ह्यांस सर्वानुमतें सेवकसेविका करून घेण्यांत आलें. हें बंधन एक वर्षापुरतेंच होतें. वाटल्यास त्यांना सोडून जाण्याला हरकत नव्हता अगर मठाच्या इतर सेवकसेविकांनीं बहुमतानें त्यांना "जा" ह्मणून सांगण्यास हरकत नव्हती. ह्याच सभेंत महिलाविद्यालयाची सर्व जबाबदारी मठानें आपणावर घ्यावी असा ठराव झाला. हें वर्ष पुरें झाल्यावर ता. २८ जानेवारी १९१२ रोजीं रात्रीं हिंगणें येथें महिलाविद्यालयाची नवीन इमारत चालली

आहे तिच्या चौकांत सेवकसेविकांची सभा झाली. तींत सर्वानुमतें ह्या चौघांस मठाच्या सेवकसेविका करून घेण्याचें ठरलें व नियमांचा वगैरे विचार करण्यांत आला.

अशा रीतीनें निष्काम-कर्म-मठाचा पाया घातला गेला आहे. ह्यावर सुंदर व भव्य इमारत उठते अगर ह्याचाच एकेक दगड कोसळून ती जमीनदोस्त होते हें भविष्यकाळीं ठरावयाचें आहे. असल्या संस्था सुरळीत चालण्यास केवळ पैशाचा स्वार्थत्याग करून भागत नाहीं. अहंकार, स्वतांच्या मताचा फाजील अभिमान परमतासहिष्णुता वगैरे अनेक मनोवृत्ति सहकार्याच्या आड येतात. कार्यकारी माणसें असल्या मनोवृत्तींच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें संस्था लयास गेल्याचीं उदाहरणें आपल्या देशांत सध्यांच्या काळीं हवीं तेवढीं सांपडतील. अशी स्थिति, आहे तरी " प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः " ह्या कव्युक्तीप्रमाणें "मध्य" पदाला तरी पात्र व्हावें ह्या बुद्धीनें हा आरंभ केला आहे. हें नाटक शोकपर्यवसायी व्हावयाचें असलें तरी त्यांतील जीं पात्रें आपापलीं कामें मनःपूर्वक करतील त्यांना विषाद वाटण्याचें कारण नाहीं.

सामान्य माहिती.

श्रीमद्भगवद्गीतेंतील निष्कामकर्माचें तत्त्व मनांत बाणवून नेहमींचीं कौटुंबिक व सार्वजनिक कामें केलीं असतां तीं किती सुकर होतात व 'लाभालाभौ जयाजयौ' ह्याविषयीं मनाची समता राखल्यानें मनुष्य खिन्न न होतां त्याची उमेद कशी कायम राहूं शकते हें थोड्याशा तरी अनुभवावांचून कळावयाचें नाहीं. आपलें आयुष्य लोकसेवेला अर्पण करणारीं, फळावर आसक्ति न ठेवतां सार्वजनिक कामांत देहभान विसरून जाणारीं पुष्कळशीं माणसें समाजांत उत्पन्न झाल्यावांचून खाला फर्यादी जिवंतपणा यावयाचा नाहीं. मठ शब्द ऐकल्याबरोबर, स्वतांचा व जगाचा संसार सोडून भगवें धारण करून जे भजनपूजनाला लागतात व इतरांना लावूं पाहतात अशांची संस्था, ही कल्पना कितीएकाच्या मनांत येते. यासाठीं आह्मी 'मठ' शब्द कोणत्या अर्थानें योजीत आहों ह्याचें स्पष्टीकरण होणें जरूर आहे. स्वतांच्या सांसारिक हिताला बरेंच गौणस्थान देऊन समाजाच्या ऐहिक हितासाठीं तळमळीनें झटणें किंवहुना समाजदेवतेचें अशा रीतीनें आराधन करणें हीच परमात्मस्वरूपाची पूजाअर्चा होय अशी श्रद्धा बाळगणें व इतरांत ती उत्पन्न करणें ही एक कल्पना आमच्या मठाच्या मुळाशीं आहे. 'मठश्छात्रादिनिलयः' असा मठ शब्दाचा अर्थ एका प्राचीन कोशकारानें दिला आहे. मठानें महिलाविद्यालयाचें जें पहिलेंच काम हातीं घेतलें आहे तें ह्या अर्थाला अगदीं अनुरूप आहे. पवित्र आचरण ठेवून व्यक्तिहित समाजहितांत लक्षपूर्वक करावयास शिकणें हें ह्या मठाचें ध्येय आहे, जपतपानें परमार्थ साधणें हें नव्हे. हे विचार आणखी स्पष्ट होण्यासाठीं एवढेंच लिहिणें जरूर आहे कीं जपतप व भजनपूजन ह्या मार्गांचा हा मठ विरोध करीत नाहीं. सेवकसेविकांपैकीं कोणास ह्या मार्गांचें मठांत आचरण करण्यास कोणताही प्रतिबंध नाहीं, परंतु हा संप्रदाय उत्पन्न करून वाढवावा हा मठाचा हेतु नाहीं. साधल्यास लोकसेवेसाठीं निष्काम बुद्धीनें आपलें तन, मन, धन, अर्पण करणाऱ्यांचा संघ उत्पन्न करून त्याचा विस्तार करावा हें ह्या मठाचें ब्रीद आहे.

२ मठाची संस्था कायदेशीर रीतीनें नोंदावयाची आहे. हें करण्यास कांहीं काळ लागेल परंतु मठाचे उद्देश व नियम ठरून मठाच्या कामास सुरुवात झालेली आहे. संस्थेची बरोबर कल्पना व्हावी ह्मणून त्यांपैकीं कांहीं येथें दिले. आहेत.

निष्काम-कर्म-मठाचे नियम.

१. ह्या संस्थेचें नांव 'निष्काम-कर्म-मठ' हें असावें.

२. मठाचे उद्देश येणेंप्रमाणेः—

(अ) समाजहितासाठीं झटणाऱ्या हिंदी सेविकांचा संघ उत्पन्न करणें.

(ब) संस्थेची सर्व जबाबदारी संभाळण्याचें सामर्थ्य सेविकांमध्यें येईपर्यंत कांहीं पुरुष सेवक घेऊन मठाचें काम सुरू करणें व तसें सामर्थ्य आल्यानंतर नवीन सेवक घेण्याचें बंद करून पूर्वी घेतलेल्या सेवकांनी त्यांची इच्छा असल्यास मठांत आजन्म काम करणें.

(क) स्त्रियांसाठीं बोर्डिंगशाळा व इतर शाळा चालविणें, व सामान्यतः शिक्षणाचीं व दयाधर्माचीं कामें करणें.

(ड) वरील कलमांत दाखल केलेलीं कामें करणाऱ्या संस्थांस शक्त्यनुसार द्रव्याचें अगर मनुष्यांचें साह्य देणें.

३. मठाच्या सेवकसेविकांनीं पुढील व्रतांचें पालन करण्याविषयीं प्रतिज्ञा केली पाहिजे.

(अ) मीं आपलें जीवित आजपासून संस्थेच्या कार्यासाठी पूर्णपणें अर्पण केलें आहे.

(ब) माझें सर्व सामर्थ्य मी संस्थेच्या कार्याकडे खर्च करीन व संस्थेचें कार्य करीत असतां खासगी फायदा करून घेण्याची इच्छा धारणार नाहीं.

(क) संस्थेच्या नियमांप्रमाणें जें ठरेल तें मी निमूटपणें मान्य करीन.

(ड) मजकरितां व मजवर अवलंबून राहणाऱ्या मनुष्यांकरितां जी व्यवस्था संस्था बहुमतानें करील तींत मी संतुष्ट राहीन.

(इ) माझें खासगी वर्तन मी शुद्ध ठेवीन.

(फ) माझी राहणी व पोषाख ही साधी ठेवीन.

(ग) मी इतरांच्या धार्मिक समजुतींबद्दल उदार मन करीन व इतरांच्या धार्मिक समजुतींस धक्का बसेल असें वर्तन मी करणार नाहीं.

(ह) मी कोणाचाही द्वेष करणार नाहीं.

४. मठाचे नियम पाळण्यास तयार असलेल्या कोणत्याही स्त्रीला सेविका होतां येईल. मात्र तिनें कांहीं मुदतपर्यंत मठांत प्रोबेशनर राहून काम केलें पाहिजे व तिला घेण्याबद्दल मठाच्या कौन्सिलाची व तीनचतुर्थांश सेवकसेविकांची संमति पाहिजे.

५. सेवकसेविकांचा मठाशीं संबंध आजन्म राहील.

६. नवीन होणाऱ्या सेवक-सेविकांचें वय निदान पूर्ण २१ वर्षांचें असलें पाहिजे व प्रोबेशनर होण्यापूर्वी निदान पूर्ण १८ वर्षांचें असलें पाहिजे.

७. इच्छित शिक्षण पुरें होण्यापूर्वी कोणास प्रोबेशनर करून घेणें असेल तर त्यांच्या शिक्षणास मुदत किती द्यावयाची व शिक्षणाचा खर्च कोणीं करावयाचा ह्यासंबंधी कौन्सिलचा स्पष्ट ठराव अगोदर झाला पाहिजे व त्यास प्रोबेशनराची संमति पाहिजे.

८. अक्षम्य गैरवर्तना वांचून कोणाही सेवकसेविकेस मठांतून काढून टाकतां येणार नाहीं. अक्षम्य गैरवर्तनामुळें कोणास काढून टाकणें झाल्यास तसें करण्यास कौन्सिलची व $\frac{3}{4}$ सेवकसेविकांची संमति पाहिजे.

९. कुटुंबी पुरुषांशिवाय इतरांस सेवक म्हणून संस्थेंत घेतलें जाणार नाहीं.

१०. तरुण कुटुंबी पुरुष सेवक होण्यास तो ग्रॅजुएट अगर त्याच्या योग्यतेचा असला पाहिजे.

११. मध्यम वयाच्या अगर त्याहून अधिक वयाच्या गृहस्थांस सेवक करण्यास वरील शिक्षणाची अट नसावी. परंतु त्यांचें मठावर फारसें ओझें पडूं नये ह्या गोष्टीकडे लक्ष असावें व त्यांस मठाकडून कांहीं देणें जरूर असल्यास तें किती व किती मुदतीपर्यंत द्यावयाचें ह्याबद्दल कौन्सिलचा स्पष्ट ठराव अगोदर व्हावा.

१२. संस्थेच्या कामाची मुख्य जबाबदारी कौन्सिलवर राहील. पहिलीं पांच वर्षें कौन्सिलचे सर्व अधिकार प्रो. कर्वे हे चालवितील.

१३. सेवकसेविकांनीं चरितार्थासाठीं मिळणाऱ्या मासिक वृत्तींतून जरूर तो खर्च करावा. परंतु तींतून शिल्लक राहिल्यास तिचा खासगी संग्रह करण्याचा त्यांस अधिकार नाहीं. राहिलेली शिल्लक परत मठाकडे दिली पाहिजे.

१४. सेवकसेविकांचा पूर्वीचा कांहीं द्रव्यसंग्रह अगर जर्मानजुमला वगैरे असल्यास त्याची त्यांनीं मर्जीप्रमाणें व्यवस्था करावी; परंतु मठांत आल्यावर शारीरिक अगर बौद्धिक श्रमानें मिळणाऱ्या सर्व पैशावर मठाची मालकी राहील.

१५. ही संस्था राजकीय कामांत बिलकुल पडणार नाहीं.

१६. ही संस्था मोडल्यास अगर कांहीं कारणानें बंद पडल्यास तिचें सर्व कर्जबाम वारून कांहीं शिल्लक राहिल्यास ती स्त्रियांच्या हितासाठीं एका अगर अनेक संस्थास वांटून द्यावी. अशा वेळीं कोणत्या संस्थेस किती मदत द्यावयाची हें त्या वेळीं हयात असलेल्या सेवकसेविकांनीं अगर त्यांच्या अभावीं ज्या न्यायाच्या कोर्टाकडे हा अधिकार असेल त्या कोर्टानें ठरवावें.

धोंडो केशव कर्वे.

निष्काम-कर्म-मठ, पहिला वार्षिक रिपोर्ट.

१९११ सालावद्दल.

मठाचा पूर्व इतिहास देतांना ह्या वर्षांत घडलेल्या कांहीं गोष्टींचा उल्लेख झालेला आहे. आतां ह्या रिपोर्टांत लिहिण्यासारख्या थोड्याच गोष्टी आहेत.

२. आज मठाचें काम करूं लागलेल्या सेवकसेविकांचीं नावें येणेंप्रमाणें:-धों. के. कर्वे, म. के. गाडगीळ, वा. वि. कौलगेकर, यमूबाई टेंबे, पार्वतीबाई गाडगीळ, हरणाबाई कौलगेकर, बालूबाई धर्माधिकारी व यमुनाबाई रिवलकर. आणखी सहा सात अजून विद्यार्जन करीत आहेत. अभ्यासक्रम संपल्यावर ती मंडळी मठाचें काम करूं लागेल. ह्यापैकीं कोणीही वीस वर्षांचे आंतील वयाचीं नाहीं.

३. ह्या वर्षी राजश्री गाडगीळ व त्यांच्या पत्नी ह्यांनीं आश्रमांत काम केलें आणि रा. कौलगेकर व त्यांच्या पत्नी ह्यांजकडे महिलाविद्यालयाची व्यवस्था होती. शिवाय रा. कौलगेकर हे विद्यालयासाठीं पुण्यांत मासिक वर्गणी मिळविण्याचें काम करित असत. रा. कर्वे पहिले आठ महिने आश्रमाचें काम करीत होते व शेवटचे चार महिने विद्यालयाच्या इमारतफंडासाठीं काम करीत होते.

४. मठाच्या सेवकसेविकांनीं प्रसंग पडला असतां धान्यभिक्षेवर आपला चरितार्थ चालवून लोकसेवा करण्यास तयार असलें पाहिजे अशी मठाच्या चालकांची इच्छा आहे. "भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें" ही तुकारामबुवांची उक्ति स्वार्थासाठीं भिक्षा मागणाऱ्यांस लागूं आहे. परंतु लोककार्यांला वाहिलेल्या माणसानीं ह्यासंबंधाची आपली लाज काढून टाकिली पाहिजे. ह्या उद्देशानें व मठाला आणि विद्यालयाला कांहीं मदत व्हावी म्हणून वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तानें ह्या कामाचा पहिला धडा घेण्यांत आला. जसे विद्यार्थ्यांना वार देतात तसा आठवड्यांतून एका वाराचा सिधा द्यावा व ज्यांना तेवढें सामर्थ्य नसेल त्यांनीं शक्त्यनुसार मूठपना दाणे द्यावे अशी विनंति करण्यांत आली व ती पुष्कळांनीं मान्य केली. हें काम सहा महिने चांगल्या रीतीनें चाललें व सुमारें ६ पोतें तांदूळ व ६ पोतें इतर धान्य जमलें. ह्या सर्व धान्याचा उपयोग सेवकसेविकांच्या व विद्यार्थिनींच्या अन्नासाठीं करण्यांत आला. पुढें प्लेग सुरू झाल्यामुळें हें काम बंद पडलें. याकामीं श्रीमती गोपिकाबाई लेले, बडोद्याच्या श्रीमती काशीबाई बेडे व श्रीमती आनंदीबाई कर्वे यांनीं पुष्कळ खटपट केली. धान्याचें वार कबूल केलेल्या बऱ्याच मंडळींनीं द्रव्याच्या रूपानें मासिक वर्गणी देण्याचें कबूल केलें व त्यांनी तशी सुरुवातही केली आहे.

५. मेजर हंटर स्टीन ह्यांची सामाजिक सुधारणा व स्त्रीशिक्षण ह्या कार्यासंबंधानें मोठी सहानुभूति आहे. त्यांनीं हायस्कुलांतील वरच्या इयत्ता व कॉलेजचें शिक्षण ह्यांच्यासाठीं दरमहा ११ रुपयांची एक स्कालरशिप ठेविली आहे. ह्या स्कॉलरशिपेला किंग एडवर्ड मेमोरिअल स्कॉलरशिप असें नांव दिलें आहे व रा. कर्वे ह्यांनीं विद्यार्थिणी पसंत करावी असें ठरविलें आहें. ही स्कॉलरशिप एका सेविकेला देण्यांत आली आहे. सदर स्कॉलरशिपची वर्षांची रक्कम दरसाल जानेवारी महिन्यांत मिळत जावी अशी व्यवस्था मेजर स्टीन ह्यांनीं करून ठेविली आहे.

६ मठाच्या स्वरूपाची संस्था पुढें मागें काढावयाची असा मनाचा निश्चय झाल्यानंतर त्यासाठीं साधेल तसा तसा द्रव्यसंचय करण्यास सुरवात झाली. पूर्वी पोष्टाचीं व पार्वतीचीं टिकिटें पोस्ट ऑफिसांतून विकीत, त्यावर पोष्ट मास्तरास कमिशन मिळे, हिंगण्याच्या पोष्टांतून अशीं टिकिटें खपवून त्यांवर मिळणारें कमिशन पोष्ट मास्तरणीच्या इच्छेनें ह्या संस्थेसाठीं जमविण्यांत आलें. ह्याशिवाय क्वचित् प्रसंगीं चारीकसारीक देणग्या ह्या संस्थेकडे जमा झाल्या. ह्या संस्थेचा आरंभापासून जमाखर्च येणेंप्रमाणें:—

जमाखर्चाचा गोषवारा.

तारीख १ जानेवारी १९०७ पासून ता. ३१ डिसेंबर १९१० पर्यंत.

जमा

८४०१४०३	टिकिटांचें कमिशन व किरकोळ जमा सव्याज.	
	वर्गण्यांची जमा.	
५१०१५	श्रीमती गंगुबाई गोडे.	
४०	श्रीमती सईबाई चावरेकर.	
३५	मेजर स्टीन, एका सेविकेचे शिक्षणासाठीं.	
१४	श्रीमती शांताबाई लेले.	
२०	रा. भोगले.	
३	मि. जी. व्ही. मोमे.	
१	श्रीमती रमाबाई ठाकूर.	
२४९०१३०३		

खर्च

३९०१२०३	चार वर्षांतील प्रवासासंबंधाचा व इतर किरकोळ खर्च.	
२१००१	शिलक १९१० अखेर.	
२४९०१३०३		

१९११ सालांतील जमाखर्चाचा गोषवारा.

जमा

२१०८१	शिल्लक १९१० अखेर.
१८७	सेविकांसाठीं स्कॉलरशिपा.†
१४२	वर्गण्या*
२९७८१५८४	विद्यालय व मठ यांसाठीं मिळविलेल्या मासिक वर्गण्यापैकीं निमे.
१३८८	व्याज.
८५०८८४	

खर्च

४२८८३८६	सेवक व सेविकांच्या खर्चासाठीं विद्यालयाच्या पालक खातीं जमा होण्यासाठीं दिले.
२९८१३	प्रवासखर्च.
३८५८६	छापणावळ.
८१२८६	टपालखर्च.
७८१३८१	किरकोळ खर्च.
४७०८८३	
३८०८८८१	शिल्लक वर्षअखेर.
८५०८८८४	

एकूण आठशें पन्नास रुपये आठ आणे चार पै.

७. ह्या मठाची सर्व भिस्त संघशक्तीवर आहे. आह्मी सर्व मनुष्यें निर्धन आहों व आह्मांपैकीं पुष्कळांना शिक्षण अगदींच बेतायें आहे. परंतु महत्कार्य घडून येण्यास शिक्षणापेक्षां मनोवृत्तींच्या उदारपणाचा अधिक उपयोग होतो व संघशक्ति उत्पन्न करण्यास ह्या वृत्ति फार उपयोगी आहेत अशी आह्मा सर्वांची समजूत आहे. अधिक शिकलेल्या व कमी शिकलेल्या सेवकसेविकांनीं एकमेकांस कमी अधिक न लेखितां समभावानें वागून आपल्या अंगच्या गुणांचा संस्थेस फायदा करून द्यावा ही इच्छा आहे. बुद्धीचें शिक्षण अगदींच नसून चालणार नाहीं ही गोष्ट खरी आहे. परंतु मनुष्याची किंमत करतांना त्याच्या बुद्धीच्या शिक्षणाला वाजवीपेक्षां किती तरी अधिक महत्व दिलें जातें, व अंतःकरणाच्या उदार वृत्तींना किती तरी कमी किंमत मिळते हें खोटें नाहीं. कोणत्याही कार्यास अनेकांची जरूरी लागते व आपलेपणा उत्पन्न झाल्याशिवाय मनुष्याचे हातून खुल्या दिलानें काम होत नाहीं. ह्मणून आह्मी लहान मोठीं व कमी अधिक शिकलेलीं माणसें एकत्र झालों आहों. आम्हीं फार मोठें ध्येय आपल्या दृष्टीपुढें ठेविलें आहे, पण तें साध्य होण्यास लागणाऱ्या अनेक गुणांचा मात्र आह्मांमध्यें अभाव आहे, ही गोष्ट आह्मी जाणून आहों. मतभेद झाला तरी कार्यासाठीं तो विसरून मिलाफानें काम करणें फार कठिण आहे, व ह्या खडकावरच आमचीं पुष्कळ तारवें फुटलीं आहेत, आह्मांसही ह्या खडकाची मोठी भीति वाटत आहे. तथापि "काशीस जावें नित्य वदावें" ह्या ह्मणीप्रमाणें उच्च ध्येयाचा उच्चार करण्यास आह्मी तयार झालों आहों, अल्पांशानें तरी आमचे विचार कृतींत उतरोत एवढें देवाजवळ मागावयाचें आहे.

धोंडो केशव कर्वे,
महादेव केशव गाडगीळ,
बाळाजी विनायक कोलगेकर
निष्काम-कर्म-मठाचे नम्र सेवक.

† मेजर स्टीन १३२ व मि. आर. आर. बंबेवाले ५५.

* कलकर्त्यांतील एक दक्षिणी स्त्री ७५, डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थी २०, श्रीमती सईबाई चाफेरेकर १२, रा. रा. दे. भोल्ले १०, मि. एम. व्ही. टिळक १०, युइल्सन् कॉलेज कानडी क्लब ८, रा. रा. ब. लि. उचगांवकर ५, श्रीमती शांताबाई लेले २.

उपयुक्तता दृष्टीनें ठरविला जाईल व पुढील क्रम परीक्षेच्या धोरणावर ठरेल.

१० विद्यालयाचा चालू खर्च मासिक व वार्षिक वर्गण्यांतून भागवितां आला पाहिजे. ह्या कामीं रा. कौलगेकर ह्यांनीं मनापासून खटपट केली व त्यांस यशही चांगलें आलें. दरमहा आठ आणे व रुपया देणारे पुष्कळ वर्गणीदार त्यांनीं पुण्यांत मिळविले आहेत व अशा रीतीनें दरमहाची वर्गणीची रक्कम ऐशीं रुपये पर्यंत गेली होती, परंतु प्लेगमुळें सर्व विस्कळित झालें आहे. गेल्या वर्षांतील अनुभवावरून पुण्यांतील लोकांक. डून ह्या कामीं चांगलें साह्य होईल असा भरंवसा वाटत आहे. ह्या वर्षी मासिक वर्गण्यांचें एकंदर उत्पन्न सहाशें रुपये झालें, पैकीं तीनशें रुपये विद्यालयांत जमा केले व बाकींचे तीनशें रुपये स्त्रीशिक्षणाकरितां आपलें आयुष्य अर्पण करणाऱ्या विद्यालयातील सेविकाविद्यार्थिनींचा खर्च ह्मणून जमा करण्यांत आले.

१९११ सालांतील जमाखर्चाचा गोषवारा.

जमा

४२५२८१४८९	शिल्लक १९१० अखेर.
५४७	ब्रह्मचर्यफंडाची जमा.
६६९८१२	जनरल फंडाची जमा.
२५	स्थायिक फंड.
१२८८८१०८८	मुलींच्या पालकांकडून वगैरे.
५५३५८१५८६	इमारत फंड.
१८६	किरकोळ.
५२८११८४	व्याज.

१२३७३८६८३

खर्च

१९३७८११	भोजन खर्च.
२०९८१४८९	मुलींचा इतर खर्च.
१८५८५	शाळेची फी.
१४०	पगार.
८५८९८९	डेडस्टॉक.
६३८१८९	किरकोळ.
९२८१२८३	पुस्तकें.
८३८३८९	स्टेशनरी.
१६१८९८९	रिपेअर वगैरे.
१५८१०८९	टपालखर्च.
१६५५८६	जमीन खरेदीसाठीं खर्च एकंदर.
२२८८	छापणावळ.
१८०७८१	झोंपड्या, आउट-हाऊस वगैरेसंबंधीं खर्च.
१८८७८९	प्रवास.
३००२८१०	प्रॉमिसरी नोटा ८०० रुपयांच्या विकल्या त्यांतील कसर.

६५८८८८४

५७८४८१३८११ शिल्लक वर्ष अखेर.

१२३७३८६८३

एकूण बारा हजार तीनशें त्र्याहत्तर रुपये सहा आणे तीन पै.

१४. हल्ली चोहोंकडे मुलींच्या शाळा पुष्कळ झाल्या आहेत व खुद्द पुण्यांत फीमेल हायस्कूल आहे असें असतां आणखी महिलाविद्यालयाची जरूरी काय होती, असा प्रश्न पुष्कळांकडून विचारण्यांत येतो, त्याचें उत्तर थोडक्यांत दिलें पाहिजे. जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणीं व कांहीं मोठ्या गांवांतून हल्लीं मुलींच्या शाळा आहेत पण त्यांत मराठी चौथ्या इयत्तेपलीकडे शिकण्याची सोय नसते. ज्या शाळेला बोर्डिंग जोडलेलें आहे अशी महाराष्ट्रांतील लोकांच्या उपयोगी पडण्यासारखी काय ती एकच शाळा, ह्मणजे पुण्यांतील फीमेल हायस्कूल आहे. ह्या एका शाळेनें आतां लोकांची गरज भागेनाशी झाली आहे. ह्या शाळेचें बोर्डिंग कित्येक वेळां भरलेलें असतें व नवीन अर्जांना नकाराचा जवाब मिळतो. आजच सुमारें ४५ कुमारिका व सुवासिनी विद्यार्थिनी, महिलाविद्यालय व अनाथबालिकाश्रम ह्या दोन शाळांत शिकत आहेत, ह्यावरून अशा शाळेची अवश्यकता सिद्ध होत आहे. शिवाय स्त्रीशिक्षणाच्यासंबंधानें कांहीं नवीन अनुभव घेऊन पाहणें झाल्यास तें अशा खासगी शाळांत शक्य असतें. अशा प्रकारचे कांहीं अनुभव अनाथ बालिकाश्रमांत घेतले गेले आहेत व महिलाविद्यालयांत घ्यावयाचे आहेत. मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतच्या शिक्षणावर तृप्त न राहतां अधिक दर्ज्याचें शिक्षण आपल्या मुलींस द्यावें ही इच्छा लोकांमध्यें प्रबल होत चालली आहे व आमचा असा अंदाज आहे कीं, लवकरच ह्या शाळेनेंही लोकांची गरज भागेनाशी होईल. आणखी एक महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, मुलींच्या अगर मुलांच्या बोर्डिंगशाळा शहरापासून दूर अशा एकांत व हवाशीर ठिकाणीं असल्या तर अनेक दृष्टींनीं फार उपयोगाचें आहे. आज अनाथबालिकाश्रमाच्या उपयुक्ततेसंबंधानें जसा प्रश्न उरला नाहीं तसाच तो महिला विद्यालयासंबंधानेंही उरणार नाहीं अशी आम्हांस खात्री वाटते.

१५. महिलाविद्यालयाचे उद्देशांप्रमाणें आजपर्यंत त्यांचे हातून कांहीं कार्य घडलें कीं नाहीं ह्या प्रश्नाचा

घोड्यांत उलगडा केला पाहिजे. विद्यालयाचे उद्देश येणेप्रमाणें आहेतः—

(अ) अनाथबालिकाश्रमांत ज्या स्त्रियांच्या शिक्षणाची सोय होऊं शकत नाहीं त्यांची सोय करणें.

(ब) मुलांप्रमाणेंच मुलींच्याही ब्रह्मचर्यव्रताची मुदत आठ वर्षांचे वयानंतर पुढें बारा वर्षांची व्हावी हें अन्तिम साध्य शक्य होण्यासाठीं यत्न करणें.

१६. आज पांच वर्षे विद्यालय प्रसिद्धपणें काम करीत आहे, पण त्यापूर्वीही विद्यालयाचे हेतूप्रमाणें खासगी रीतीनें काम होऊन कांहीं कुमारिकांस शिक्षण्याचे कामी मदत होत असे. आरंभापासून आतांपर्यंत विद्यालयाच्या पटावर ५२ कुमारिका मुलींचीं नांवें पडलीं आहेत. ह्यांपैकीं २८ अजून विद्यालयांत शिकत आहेत व २४ विद्यालय सोडून गेल्या आहेत. विद्यालयांत असलेल्या मुलींची शिक्षणविषयक स्थिति मागील कोष्टकावरून लक्षांत येईल. विद्यालय सोडून गेलेल्या मुलींची स्थिति पुढील कोष्टकावरून कळेल.

स्थिति	संख्या
मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या	२
इंग्रजी सातव्या इयत्तेंत असणाऱ्या	२
इंग्रजी साहव्या इयत्तेंत असणाऱ्या	२
इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत असणाऱ्या	२
ट्रेनिंग कॉलेजांत असलेल्या	१
मराठी पांचव्या इयत्तेपर्यंत शिकलेल्या	४
मराठी पांचव्या इयत्तेंत येण्यापूर्वी शिक्षण सोडलेल्या	११
	एकूण २४

१७. शिक्षणासंबंधानें संस्थेचा किती उपयोग झाला ह्याचा विचार वर झाला. आतां मुलींच्या लग्नाच्या वयाची मर्यादा पुढें ढकलण्याच्या कामीं विद्यालयाचा किती उपयोग झाला व पुढें किती होण्यासारखा आहे हें पाहिलें पाहिजे. ह्यासंबंधानें अनुकूल लोकमत बरेंच तयार होत आहे, पण तें कृतींत उतरविण्याचें धैर्य क्वचित् आढळून येतें. व्यक्तिविषयक उदाहरणांची संख्या पुष्कळशी झाल्यावांचून सामान्य लोकांना हें धैर्य येणार नाहीं विद्यालयाच्या नव्या-जुन्या मुलींची एकंदर संख्या ५२ आहे. तीपैकीं ५ मुलींचे विवाह प्रौढ वयांत आल्यानंतर झाले आहेत व १८ मुली प्रौढ वयांत आल्या असून त्यांचे विवाह ह्यापुढें व्हावयाचे आहेत. या उदाहरणांचा परिणाम समाजावर झाल्यावांचून राहणार नाहीं. आजपर्यंत मुलींच्यासंबंधाचें आईबापांचें कर्तव्य त्यांस समजूं लागण्यापूर्वीच त्यांचें लग्न करून देणें हें समजलें जात असे. ह्यापुढें मुलीला योग्य शिक्षण देऊन तिला चांगलें समजूं लागल्यानंतर योग्य वराशीं तिचा विवाह करून द्यावयाचा व तसा वर न मिळेल तर आजन्म ब्रह्मचर्यानें राहून लोकसेवा करण्यास तिला तयार करावयाचें हें आईबापांचें कर्तव्य समजलें जाणार आहे. ह्या कर्तव्यांत आईबापांस मदत करण्याची पात्रता ह्या संस्थेच्या अंगीं यावी ही चालकांची इच्छा आहे.

१८. आतां हा रिपोर्ट पुरा केला पाहिजे. ह्या टिकाणीं लिहावयाच्या गोष्टींचा उल्लेख " शेवटचे चार शब्द " ह्यांत केला आहे. येथें एवढेंच लिहिणें पुरें आहे कीं, आमची यथाशक्ति घडणारी अल्पसेवा परमेश्वरस्वरूपी समाजानें गोड करून घ्यावी.

महिलाविद्यालय, हिंगणें बुद्रुक, पुणें सिटी, तारीख १ जुलै १९१२. } धोंडो केशव कर्वे, म. के. गाडगीळ, वा. वि. कौलगेकर.

विद्यालयाच्या स्थावर इस्टेटीची व भागील जमाखर्चांत दाखल न झालेल्या महत्त्वाच्या जंगम इस्टेटीची यादी.

१. विद्यालयासाठीं विकत घेतलेली १६५० रुपयांची सुमारें पांच एकर जमीन.

२. सदर जमिनीवरील इमारती व विहीर. इमारतीसाठीं जें कर्ज काढलें आहे व पुढें काढावें लागेल त्याचा बोजा इमारतीवर राहील.

३. डॉ. टी. सी. खांडवाला यांनीं दिलेले तापी-व्हॅली रेल्वेचे प्रत्येकीं पांचशें रुपयांचे दोन शेअर. ह्यांचें व्याज " कान्तिलाल खांडवाला स्कॉलरशिप " ह्या नांवानें ब्रह्मचर्यफंडांत दाखल व्हावयाचें.

४. श्रीमती लक्ष्मीबाई भिडे यांची एक हजार रुपयांची ठेव. सदर रकमेचें व्याज मिसेस भिडे यांस त्यांच्या हयातींत मिळावयाचें. नंतर रक्कम कायम राहून व्याजाचा उपयोग ब्रह्मचर्यफंडाकडे व्हावयाचा.

१९१२ सालांतील पहिल्या सहामाहींत घडलेल्या गोष्टींची संक्षिप्त माहिती.

एकंदरींत हे सहा महिने विद्यालयाला चांगले गेले. विद्यालय इमारतीशेजारीं बांधलेल्या झोपड्या व आउट हाऊस यांत नेल्यामुळें व इमारतीला अजमासाबाहेर वेळ लागत असल्यामुळें बराच त्रास झाला. सर्व गोष्टी नवीन व पुऱ्या नसल्यामुळें आणखी चार महिने सर्व गोष्टींचा जम नीट बसणार नाहीं. पण पुढें सर्व सुयंत्र चालेल असा भरंवसा वाटत आहे.

२. ह्या सहामाहींत विद्यालयाच्या इमारतीसाठीं फारच चांगल्या देणग्या मिळाल्या व आमच्या शिरावरील ओझें पुष्कळ हलकें झालें. सर्वांत मोठी देणगी प. वा. एन. एम. वाटिया यांच्या प्रचंड धर्मफंडांतील होय. इमारतीसाठीं खर्च होणाऱ्या पंचवीस हजारांचा एकतृतीयांश ह्या फंडांतून देण्याचा ट्रस्टींनीं ठराव केला आहे. इमारतीला एन. एम. वाडिया यांच्या मातुश्री बाई मोटलाबाई वाडिया यांचें नांव द्यावयाचें आहे. देणगीची अर्धी रक्कम मिळाली आहे व राहिलेली अर्धी ऑक्टोबरमध्यें मिळावयाची आहे. दुसरी देणगी सर भालचंद्र कृष्ण यांची. ह्यांनीं आपल्या पत्नी प. वा. लेडी सावित्रीबाई यांचे स्मरणार्थ आजाऱ्यांचे खोलीसाठीं एक हजार रुपये दिले आहेत. तिसरी देणगी मुंबईचे कॉन्ट्रॅक्टर रा. रा. व्यंकय्या रामय्या स्वामी यांच्या मातुश्री श्रीमती रत्नम्माबाई यांनीं दिली आहे. एकंदर एक हजार रुपये देण्याचा त्यांचा मानस आहे. पैकीं पांचशें रुपये दिले आहेत व पांचशें एक दोन महिन्यात देतील. ह्या रकमेतून बांधावयाच्या खोल्या स्व. गं. लक्ष्मीबाई रंगय्या स्वामी व स्व. रामय्या व्यंकय्या स्वामी ह्यांच्या स्मरणार्थ बांधावयाच्या आहेत. रा. रा. व्यंकय्या रामय्या हे स्वतः आजाऱ्यांचे खोलीशेजारची औषधें ठेवण्याची अगदी लहान खोली बांधलेली आहे तिची किंमत देणार आहेत. सदर खोलीही रामय्या व्यंकय्या स्वामी यांचे स्मरणार्थ ह्यावयाची आहे. पुण्याच्या श्रीमती जानकीबाई गोखले यांनीं पांचशें रुपये दिले आहेत व एका खोलीस त्यांचे प. वा. भ्रतार काशिनाथ बळवंत गोखले ह्यांचें नांव द्यावयाचें आहे. मुंबईच्या एक सन्मान्य गृहस्थानें देवघरासाठीं अडीचशें रुपये दिले आहेत. इमारतफंडासाठीं मुंबईच्या गांधर्व-महाविद्यालयानें फ्रामजी कावसजी हॉलांत एक जलसा केला त्याचें निवळ उत्पन्न दोनशें सवासोळा रुपये झालें. ह्याशिवाय पुढील स्त्रीपुरुषांकडून प्रत्येकी शंभर रुपयांची देणगी मिळाली आहे. मुंबईचे डॉ. त्रिं. दि. वेलणकर, रा. रा. नाना राजुजी, रा. रा. रा. त्रिं. कीर्तने, श्रीमती कुसाताई पंडित व रा. रा. बंडोपंत भाजेकर, ठाण्याचे शेठ रतनसी प्रेमजी; राजकोटचे रा. सा. ल. वि. साठये, जळगांवचे रा. रा. ना. ह. लिमये, अकलूजचे वकील रा. रा. कृ. ब. घडफळे व रा. रा. अ. ना. कौलेगेकर; व कोल्हापुरच्या डॉ. कृष्णाबाई केलवकर.

वरील देणग्या इमारतफंडासाठीं मिळाल्या. ह्याशिवाय संस्थेला स्थायिकपणा आणण्याचे कामीं उपयोगी अशा दोन ठळक देणग्या मिळाल्या आहेत. पाकशास्त्राचे शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठीं ह्या संस्थांच्या एका हितचिंतकानें दोन हजार रुपयांच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा दिल्या आहेत. त्यांच्या व्याजांतून चांगला स्वयंपाक करणाऱ्या विद्यार्थिनींना बक्षिसें द्यावयाची आहेत व कधीं कधीं एखादें थोड्या खर्चाचें रुचिकर पक्वान्न शोधून काढण्यासाठीं बक्षिसेंही लावावयाची आहेत. ह्या बक्षिसांस प. वा. बाबाजी गणेश देशपांडे ह्यांचें नांव द्यावयाचें आहे. दुसरी देणगी पुण्याचे प्रसिद्ध प. वा. डॉ. नायडू यांचे चिरंजीव रा. रा. रामदास कृष्ण नायडू यांनीं आपले मातोश्रीचे स्मरणार्थ दिली आहे. त्यांचे एक हजारांचे व्याजांतून ब्रह्मचर्यफंडाची अर्धी स्कॉलरशिप जातिधर्मांचा विचार न करतां द्यावयाची आहे. ह्या तीनही हजारांचा उपयोग तूर्त इमारतीचे कामीं करण्यास परवानगी आहे. मागाहून ह्या रकमा स्थायिक फंडांत टाकावयाच्या आहेत. ह्या सर्व मंडळीचे विद्यालयावर मोठे उपकार आहेत.

३ ह्या ठिकाणीं एक शोचनीय गोष्टीचा उल्लेख करावा लागत आहे. विद्यालयांतच जिचें सर्व शिक्षण झालें अशी अठरा वर्षांच्या वयाची एक सुदृढ मुलगी आठ दिवसांच्या दोषी तापाला बळी पडली. ही इंग्रजी सहाव्या इयत्तेंत होती. विद्यालयाला भूषणभूत असणाऱ्या ह्या मुलीच्या मृत्यूनें विद्यालयाची मोठी हानि झाली आहे. परंतु 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' हें लक्षांत आणून जगाच्या रहाटीप्रमाणें पुढील कर्तव्यास लागलें पाहिजे.

४ था सहामाहींतील जमाखर्च येणेंप्रमाणें.—

१९१२ सालांतील पहिल्या सहामाहीच्या जमाखर्चाचा गोषवारा.

५७८४०१३०११	शिल्लक १९११ अखेर.
२५३	ब्रह्मचर्य फंड.
२४६०८	जनरल फंड:
३०००	स्थायिक फंड.
२६४०२	मुलींच्या पालकांडून.
८४८८०६०९	इमारत फंड.
२५३०१०३	मासिक वर्गण्यांचें उत्पन्न.
११७०४०६	व्याज.
०६०९	किरकोळ.
६१२०१२०७	कर्ज
२४५२८०७०९	
१३६२५०९०८	इमारतीवर खर्च.
३७७२०७०६	इमारतींचें सामानासाठीं वगैरे आगाऊ.
११२८०३०५	भोजनखर्च.
२८६०३	मुलींचा इतर खर्च.
१०३०५	इतर शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थिनींची फी.
२७०११०९	स्टेशनरी.
५५००३	पुस्तकें.
१८०३०६	टपालखर्च.
५१०११	डेडस्टॉक.
१७०	पगार.
७०	छापणावळ.
१४०१४	किरकोळ.
३९०९०३	प्रवासखर्च.
११६६१०१४०४	
४८५८०९०५	शिल्लक जून १९१२ अखेर.
२४५२८०७०९	

शेवटचे चार शब्द.

गेल्या वर्षाच्या जुलई महिन्यांत विद्यालयाकरितां नवीन इमारत बांधण्याचा निश्चय होऊन एका प्रसिद्ध पत्रकाच्या द्वारें हितचिंतकांस विनंति करण्यांत आली. त्यावेळीं इमारतफंडासाठीं सहाशें रुपये जमले होते. प्रथम पंधरा हजारांत इमारत आटपावी असा बेत होता. परन्तु होतां होतां मुख्य इमारत व इतर सोयीसाठीं जवळचीं घरें वगैरे मिळून एकंदर खर्च २७००० होईल असा सुमार दिसूं लागला आहे. "आधीं कळस मग पायरे" ह्या न्यायानें परमेश्वरावर भरंवसा टाकून इमारतीस सुरुवात करण्यांत आली. इमारतीस लागणारा पैसा कसा कोठून येणार ह्याची आह्मांस कांहीं कल्पना नव्हती. कोणी कर्ज दिल्यास तें काढावयाचें असा बेत होता. पण त्याविषयीं कोणालाही विचारण्यांत आलें नव्हतें. आह्मीं तिघांनीं मात्र आपल्या पश्चात् राहणाऱ्या कुटुंबांतील मनुष्यांची तरतूद ह्मणून करून ठेविलेला अल्प संचय ह्या कामीं कर्जाऊ द्यावा असा निश्चय केला होता व तो अद्याप कायम आहे. अशा रीतीनें नऊ हजारांची तात्पुरती सोय झाली तरी आणखी सतरा अठरा हजारांचा प्रश्न होता व आह्मां निष्कांचन लोकांस कर्ज द्यावयाला तरी उभा राहतो कोण, ही मोठी काळजी होती. पण ईश्वरी कृपेनें ती सर्व आज दूर झालेली आहे. ज्या थोर अंतःकरणाच्या स्त्रीपुरुषांनीं ह्या कामीं उदार मनानें साह्य केलें त्यांचे आह्मी अत्यंत ऋणी आहों. ह्या संबंधांतील आमच्या *मनोवृत्ति शब्दांनीं व्यक्त करणें शक्य नाहीं.* त्यांची मनोमय साक्षच पटली पाहिजे. आतां कर्ज मिळून इमारत पुरी होण्याची काळजी उरली नाहीं ही गोष्ट खरी आहे, तथापि इमारतीच्या कर्जांतून मुक्त होण्यास आणखी नऊ हजारांची जरूरी आहे. ह्याशिवाय चालू खर्चासाठींही बरीच मोठी रक्कम सालोसाल जमा झाली पाहिजे. ही संस्था यशस्वी व्हावी ह्या साठीं तनुमनानें झटून आपली शिकस्त करावी असा आमचा निश्चय आहे. धनाच्या बाजूनें अशा प्रकारचा निश्चय करणारी कांहीं मंडळी संस्थेला लाभावी व उभयपक्षीं हे निश्चय दीर्घकाळ टिकावे एवढेंच जगदीशाजवळ मागावयाचें आहे.

धोंडो केशव कर्वे,
महादेव केशव गाडगीळ,
बाळाजी विनायक कौलगकर.

ज्यांनीं आजपर्यंत महिलाविद्यालयाला पन्नास रुपये अगर त्याहून अधिक मदत केली आहे त्यांची यादी.

रा. रा. अ. ना. कौलगेकर
,, अ. ना. पंडित
,, का. ना. देवल
डॉ. काशीबाई नवरंगे
मिसेस कुसाबाई पंडित
रा. रा. कृ. ब. घडफळे
,, कृ. सा. देसाई.
मेजर कृ. वि. कुकडे.
डॉ. कृष्णाबाई केलवकर
मिसेस क्षमाबाई राव
रा. रा. ग. वा. साने
नामदार गो. कृ. गोखले
,, गो. क. पारख
मिसेस गंगाबाई गोखले
गांधर्व महाविद्यालय
मि. चंद्रया हणमय्या
शेट चेलाराम धलूमल
रा. रा. ज. र. घारपुरे
मिसेस जानकीबाई गोखले
मि. जी. सी. व्हिटवर्थ
मि. जी. के. काळे
बाबू जयकृष्ण, पाटणा
डॉ. त्रिं. दि. चेलणकर
डॉ. टी. सी. खांडवाला
लेडी टी. मूर म्याकेंझी
मि. डी. जी. दाणी
,, डॉ. आर. वागळे

कर्नल डी. वरलीकर
रा. रा. द. आ. तुळजापुरकर
,, द. ल. वैद्य
,, दा. के. परशरामी
भाई दयाळदास मुळचंद
राजा एन. व्ही. रंगराव बहादूर
रा. रा. ना. ह. लिमये
रा. ब. प. कृ. चितळे
रा. रा. पा. लाड.
मि. बालकराम
मिसेस बी. एन्. भाजेकर
मि. बी. एस. वाकडे
एक ब्रह्मचारी, राजकोट
मिसेस भद्राबाई माडगांवकर
सर भालचंद्र कृष्ण
एक हितचिंतक मुंबई
दुसरे एक हितचिंतक, मुंबई
श्रीमंत माधवराव बावासाहेब
मिरजमळा संस्थान
डा. मुक्ताबाई के चव्हाण
डॉ. मो. गो. देशमुख
श्रीमंत राजेबहादरसाहेब, सांवतवाडी
मिसेस रत्नम्माबाई रामय्या स्वामी
मिसेस रमाबाई रानडे
शेठ रतनसी प्रेमजी

मि. आर. एच. शिंगी
रा. रा. रा. मि. गोखले
रा. रा. रा. का. भिडे
रा. रा. रा. त्रिं. आचार्य
रा. रा. रा. त्रिं. कीर्तने
रा. रा. रा. वि. महाजनी
रा. रा. रा. वि. माडगांवकर
रा. ब. ल. वि. साठये
मिसेस लक्ष्मीबाई भिडे
रा. ब. वा. म. कोल्हटकर
वाडिया धर्मफंड
डॉ. वा. का. किर्लोस्कर
रा. रा. वा. प. केतकर
दि. ब. वा. मा. समर्थ
डॉ. वा रा. भट
रा. रा. वि. वा. दाते
रा. रा. वि. ल. भावे
श्री. शां. ना. दाभोळकर
रा. रा. शि. सी. वागळे
श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड
रा. रा. स. के. भागवत
रा. रा. सी. ना. पंडित
रा. रा. ह. ग. घारपुरे
रा. रा. ह. ल. पाटील
रा. रा. ह. श्री. देव
मेजर हंटर स्टीन

हा रिपोर्ट, मुंबईंत कांदेवाडी, सदाशिव स्ट्रीट, घर नंबर १ येथें "मुंबईवैभव" छापखान्यांत चिंतामण सखाराम देवळे यांनीं छापिला, व प्रो. धोंडो केशव कर्वे यांच्याकरितां का. र. मित्र यांनीं 2 A., चर्नीरोड, गिरगांव येथें प्रसिद्ध केला.


2-12]

GOOD POSITIONS

Can only be obtained by trained men. The I. C. Schools of London teach employed persons the science of their trades and professions; they prepare misplaced and dissatisfied people for congenial or better paying work; they give young unemployed persons the training necessary to enable them to start at good salaries in chosen vocations; in other words, they help the men or women to advance in life. All professions taught. Do not lose your opportunity but write now for full particulars to:—

The General Manager for India,
I. C. Schools of London, Dept; I. G.
Industrial Building, II, Hamam Street, fort Bombay.

नानूज ब्रास वर्क्स महमदी महाल, काळबादेवी रोड, मुंबई.



लोखंडी पाळणा किं. रु. १५
" स्विंगिंग चेअर " १०
" चेअरबेड (पाहिजे तेव्हां पलंग व खुर्ची बनते.)" ८
" घडीच्या खुर्च्या " २।
" घडीच्या खुंट्या " ।॥
" घडीची खाट " ८
" बाबाकॉट (मच्छरदाणीच्या चौकटीसह ४×२।) " २०
" बेडस्टेड (मच्छरदाणीच्या चौकटीसह ४×३) " २०
लोखंडी बेडस्टेड्स (वायर मेट्रेससह) किं. रु. २२
" घडीचे बांक " ५॥
" आरामखुर्ची " ९
" टॉवेलस्टँड " ४
" वॉशस्टँड (भांड्यांसह) " ३
" शेल्व्हज किं. रु. ३ पासून १० पर्यंत.
" घडीचें टेबल किं. रु. ५

[फॅक्टरी-खेतवाडी मेनरोड, गिरगांव-मुंबई.]

यांशिवाय दुसरें पुष्कळ तऱ्हेचें पितळेचें, लोखंडी व इतर धातूंचें उपयोगी सामान तयार होतें. किंमतीची अर्धी रक्कम आगाऊ पाठविल्यास माल व्ही. पी. नें पाठवूं. व्यापाऱ्यांस भरपुर सवलती. [2-12]

गोपाळ नारायण कंपनी, बुकसेलर्स, कालकादेवीरोड-मुंबई. [2-12]

प्राकृत ग्रंथ (मोठ्या टायपाचे.)

रामविजय	रु. १-४	भक्तलीलामृत	रु. ४-०
हरिविजय	१-४	नाथलीलामृत	२-०
भक्तविजय	२-०	संतलीलामृत	१-१२
पांडवप्रताप	२-८	एकनाथी भागवत	४-८
कथासारामृत	२-८	नवनाथभक्तिसार	२-०
काशीखंड	३-०	गणेशप्रताप	३-०
जैमिनि अश्वमेध	३-०	उपयुक्त सर्वसंग्रह	१-४
दासबोध	१-४	गुरुचरित्र	२-०

संस्कृत ग्रंथ.

भागवत, श्रीधरी.	रु. ५	अध्यात्मरामायण सटीक.	२
भागवत, विजयध्वजी.	८	महाभारत सटीक.	२५
भागवत टीका चूर्णिका.	१०	आत्मपुराण सटीक.	१२
वाल्मिकी रामा. सटीक.	७	नारायणभट्टी समंत्रक.	२
हरिवंश सटीक.	४	योगवासिष्ठ सटीक.	२०
विष्णुपुराण सटीक.	३	सुभाषितरत्नाकर.	२
गणेशपुराण.	६	कृष्णयजुर्वेत्ति. ब्राह्मण.	२॥
कृष्णयजुर्वेत्ति. संहिता.	३	आनंदरामायण.	५

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

2 आग.

फक्त कानाच्या रोग्यांकरिता डॉ. गाडगीळ यांचें

ऑरीनचा मोठा साठा तयार आहे.

व्यापाऱ्यांनीं ऑरीन विक्रीस ठेवावें.

ऑरीन

कान फुटणें, पू व रक्त येणें, ठणका लागणें, आवाज होणें, कमी ऐकूं येणें, सुजणें, कंड सुटणें वगैरे विकार खात्रीनें बरे होतात. कान तपासवून **कर्णरोगप्रतिबंधक** उपाय सर्वांनीं करावा. कानाला ठणका केव्हां लागेल याचा नेम नसतो, ह्मणून 'ऑरीन' (किं. रु. १) नेहमीं जवळ ठेवावें. रोगाच्या मानानें १० दिवस पुरणाऱ्या औषधाला किं. व ट.ख. रु. २. महिन्याच्या औषधाला रु. ५. [2–12]

डॉ. गाडगीळ यांचा कानाचा दवाखाना, भीमराव आत्माराम यांची वाडी, ठाकुरद्वार—मुंबई.

धी कृष्णा डाइंग्, वीव्हिंग्, ॲण्ड् ट्रेडिंग् कंपनी, लिमिटेड्, वाई.

शाखा—बनहट्टी.

स्थापना १९०६.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केलेली आहे.

भांडवल रु. ५०,०००.

प्रत्येक भाग रु. २५ चा, याप्रमाणें एकंदर भाग २०००. ह्या कंपनीचे भाग घेऊं इच्छिणारांनीं अर्जासोबत प्रत्येक भागास रु. ५, भाग दिल्यानंतर रु. १०, व नंतर रु. ५ द्यावे लागतात. भागीदारांस व्याज ६ टक्क्यांखालीं दिलें गेलें नाहीं. ऑईल् इंजिनच्या शक्तीवर धान्य दळण्याचीं, गळित धान्यापासून तेल काढण्याचीं व भातापासून तांदूळ तयार करण्याचीं व हळद स्वच्छ करण्याचीं यंत्रें सुरू केलीं आहेत. बनहट्टी येथील शाखेंत रंगाचें व रेशमी कद विणण्याचें काम केलें जातें. विशेष माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

मेसर्स कोठावळे ब्रदर्स आणि कंपनी,
वाई, जि. सातारा.

[2–12]

ह्या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

जाहीर नोटीस.

सर्व लोकांस माहीत होण्याकरितां प्रसिद्ध करीत आहों, कीं, श्रीक्षेत्र काशी येथील श्रीरामसमर्थ कंपनीकडून हातमागावर तयार केलेला फरमाइषी स्वदेशी माल व्ही. पी. नें पाठविला जातो; त्याचा तपशील खालीलप्रमाणें:-

१. हे कद जांभळा, तांबडा आणि केसरी ह्या तिन्ही पक्क्या रंगांचे, रेशीम पिळदार, पोत जाड आणि मजबूत, फार दिवस टिकणारे, रंग खात्रीचा असून किंमत माफक आणि माल चांगला, असे कद तयार केले आहेत.

मालाचा तपशील.	लांब.	रुंद.	कि. रु. पा. कि. रु. प.	व्ही. पी. ख. आ.	मालाचा तपशील.	लांब.	रुंद.	कि. रु. पा. कि. रु. प.	व्ही.पी. ख. आ.
कद बिनकांठी ...	१०	२॥	१० १३	८१०	पामरी रुईफुली ...	४	१॥॥	४ ७	८४
कद रुईफुली ...	१०	२॥	११ १५	८१०	गोमकांठी पितांबर	१०	२॥	१२ १५	८१०
कद बिनकांठी ...	११	२॥॥	१२ १६	८१०	पितांबर जरीकांठी...	१०	२॥	२२ २५	८१२
कद रुईफुली ...	१०	२॥॥	१२ १४	८१०	कद जरीकांठी ...	१०	२॥	२० २३	८१२
,, ,, ...	११	२॥॥	१३ १६	८१०	,, ,, ...	८	१॥॥	१० १४	८८
कद जनानी वि. कां.	१६	२॥	१७ २०	८१२	कद साधेकांठी ...	८	१॥॥	५ ७	८६
,, ,, रुईफुली	१७	२॥	१९ २६	८१२	,, ,, ...	६	१॥	४ ६	८६
,, ,, ,,	१७	२॥॥	२१ ३०	८१२	लुगडी रेशीमकांठी...	१६	२॥	४ ८	८१०
पामरी रुईफुठी ...	६	२॥	६ १०	८६	,, ,, ...	१७	२॥	६ १०	८१०

२. याशिवाय हलके कदपीतांबर लांब १० × २॥ चे किंमत ७॥-९-१० पर्यंत सर्व रंगांचे तयार आहेत. शिवाय काशीचा हरएक प्रकारचा माल सुती-रेशीमकांठी-लुगडी; खण सुती-रेशमी व जरीचे चोळखण; सुती-रेशमी कांठाचे धोतरजोडे; उपर्णे-जोड्या; शेले; दुपेटे; पैठण्या; गंगावन; तंबाखूच्या सुगंधी गोळ्या; कस्तुरी उंची दर तोळा २७, ५० रु. पावेतों; रेशमी जनानी-मर्दानी मुकटे वगैरे माल माफक किंमत घेऊन पाठवूं.

३. अत्तरें—(१८३। रु. भाराचा तोळा) गुलाब, केवडा, मोतिया, वाळा, पानडी, हिना, दवना, बकुळ, चंपा, इ० दरतोळ्यास ८८, १, २, १० रु. पर्यंत. गुलाब, केवडापाणी दर शेरीं ८१२, २ रुपयेपर्यंत. चंदनी तेल दरशेरीं २५ रुपये.

४. सुगंधी तेलें—(११२ रु. भाराचा शेर) बेलिया, चमेली, केवडा, हिना, दर शे. ३, ६ रु. पावेतों.

५. अत्तरांच्या पेट्या—नंबर १ शिशा ८. अत्तरें तोळे ४. किंमत रु. ४॥. नं. २ शिशा ६. अत्तर १॥ तो. किंमत रु. २। टपालखर्च माफ.

६. श्रीराम-उपासनाग्रंथ—किंमत १ रुपया. ह्यांत रामदासी संप्रदायी लोकांस अवश्य लागणारे सर्व विषय आहेत. तसेंच—

७. रुद्राक्ष-माळा, मणी—(१०८) बोराएवढ्या दाण्यापासून मोठ्या हरभऱ्यापर्यंत एका माळेस किं. रु. ८१२ पासून ३ पावेतों. हरबऱ्यापासून तों सिऱ्यांपर्यंत एक माळेची किंमत रु. ४ ते रु. २० पावेतों. गौरी शंकर रुद्राक्ष लहान मोठी प्रत्येकीं दाण्यास किंमत रु. ३ ते १० रु. पर्यंत. रुद्राक्ष कंठा मणी (३२) किंमत ८१२ ते रु. १० पर्यंत. स्फटिक माळ मणी (१०८) १॥ रु. ते १० रुपये.

८. सरबताची पावडर—आह्मीं मुद्दाम बनविलेलें सोडावाटर, लेमोनेड व जिंजरपावडर हें पाव तोळा ३० तोळे पाण्यांत बर्फाबरोबर टाकिलें असतां उत्तम रुचकर असें सरबत तयार होतें. याचे गुणाची अनुभवाअंतीं खात्री होईल. बाटली खुराक ६ मध्यें पावडर १॥ तोळा, किंमत ८५.

,, ,, १२ ,, ३ तोळे, किंमत ८९.

पोस्टेज व पॅकिंग खर्च निराळा पडेल. व्यापाऱ्यांना भरपूर कमिशन.

९. ग्राहकांनीं आमचेकडून २५ रुपयांचे वर माल मागविल्यास कमिशन दर रुपयास ८॥. प्रमाणें देऊं. टपालखर्चास अर्धा आणा आल्यास सर्व माहितीचा कॅटलाग फुकट पाठवूं.

ग्राहकांनीं आपला पत्ता, नांव, पोस्ट, जिल्हा, वगैरे स्वच्छ लिहिणें.

पत्ता-नारायण गणेश रिसबूड, दुर्गाघाट, बनारस सिटी.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

The Bombay Banking Co. Ltd.,

GIRGAON-BOMBAY. [2-12]

धि बॉम्बे बँकिंग कंपनी, लिमिटेड,

गिरगांव—मुंबई.

सेक्रेटरी, ट्रेझरर्स आणि एजंटस्:—

मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी.

स्थापना १८९८.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केली आहे.

भांडवल ५,००,००० रुपये. शेअरची किंमत ५० रुपये. शेअर १०,०००.

प्रत्येक भागाचे ५० रुपयांपैकीं फक्त ४० रुपये घेतले जातात.

अर्जासोबत रुपये २॥, व अलॉटमेंटनंतर रु. २॥, व पुढें एकदम रुपये ३५ अगर प्रत्येक महिन्याच्या अंतरानें प्रत्येक कॉलबद्दल रुपये ५ भरावे लागतात. डिव्हिडेंट आतांपर्यंत केव्हांहि ६ टक्क्यांचे खालीं दिलें नाहीं. गेल्या चार सालीं तर ९ टके-प्रमाणें दिलें आहे.

तारणावर रकमा देणें, ठेवी ठेवणें, सरकारी प्रामिसरी नोटा, इतर कंपन्यांचे शेअर्स, त्याचप्रमाणें सोनें, चांदी, मोलें वगैरे मूल्यवान् जिनसांची खरेदीविक्री करणें, व्याज वसूल करणें, हुंड्यांचा व्यवहार करणें, वगैरे सर्व कामें चालतात.

सेव्हिंगब्यांकेंत ३॥॥ रु. व्याजानें रकमा ठेवण्यांत येतात. हंगामाचे दिवसांत ह्मणजे नोव्हेंबर ते जून अखेरपर्यंत जास्त व्याजानें ठेवी ठेवून घेण्यांत येतात. कमिशनाचे दर फार माफक ठेविले आहेत.

मुदतीच्या ठेवीचे व्याजाचे दर:—

६ महिन्यांचे मुदतीचे:-	९ महिन्यांचे:-	१२ महिन्यांचे:-	२४ महिन्यांचे:-
दरसाल दर शेंकडा ४ रु.	४॥ रु.	५ रु.	५॥.

करंट अकौंट ठेवण्यांत येतात. व्याज २॥ रु.

मुख्य मुख्य शहरीं हुंड्यांचा व्यवहार केला जातो.

ब्रँच आफिसें:—

१ पुणें; २ सातारा; ३ सांगली; ४ बेळगांव; ५ सोलापुर; ६ उमरावती; ७ नागपुर.

विशेष माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी,

सेक्रेटरी, ट्रेझरर्स व एजंटस्,

धि बॉम्बे बँकिंग कंपनी, गिरगांव—मुंबई.


[2-12] सतत पन्नास वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

डॉ. वामन गोपाळ यांचा

दूषित रक्त शुद्ध करणारा

आयोडाईज्ड

सार्सापरिला.



देहाचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय! तेंच एकदा बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करितात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगांमुळें अर्धांगवायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व इतर कारणांनीं रक्त बिघडून होणाऱ्या त्वग्रोगांवरहि हाच सार्सापरिला उत्तम ठरला आहे. आमच्या सार्सापरिल्याचा पुष्कळ खप पाहून बऱ्याच लोकांनीं त्याची हुबेहुब नकल केली आहे.

मालक:—

गौतमराव केशव,
ठाकुरद्वार, मुंबई.

करितां घेतांना बाजूला दाखविल्याप्रमाणें बाटलीवरील लेबल पाहून आणि तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घ्यावा.

बाटलीची किं. १।. रु. पो. खर्च ५ आणे. उत्तम गुणास ४ बाटल्या. ४ बाटल्यांस टपालखर्चासह ४॥-. विशेष माहितीकरितां कॅटलॉग मागवा.

आमच्याकडे डॉ. काळोखे यांचीं वैद्यकीय पुस्तकें विकत मिळतील.

एजंट्स:—

हिंदु-युरोपियन फार्मसी, पणजी-गोवा. नारायण रामचंद्र जोशी, उमरावती.
कृष्णराव गोपाळ शौचे, इंदूर. एस्. जी. येवलेकर, पुणें-सिटी.

शिवाय मोठमोठ्या शहरीं प्रसिद्ध दुकानदारांकडेहि मिळेल.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीनें [2-12]

प्रसिद्ध केलेलीं कांहीं पुस्तकें.

कादंबऱ्या.

१	रमामाधव.	०–४–०
२	मुरारराव.	०–४–०
३	भयंकर सूड.	०–४–०
४	संसारांतीलगोष्टी.	०–६–०
५	अमृतपुलिन.	०–६–०
६	भयंकर ग्रहदशा.	०–६–०
७	प्रेमविजय.	०–६–०
८	धाकट्या सूनबाई.	०–८–०
९	प्रियंवदा.	०–८–०
१०	मृणालिनी.	०–८–०
११	परिणामीं हेंच !	०–८–०
१२	भोळा बाळू.	०–८–०
१३	मूर्तिमंत देशाभि०	०–८–०
१४	सरस्वती.	०–१०–०
१५	सुशिक्षित स्त्री.	०–१०–०
१६	नवयुग.	०–१२–०
१७	जीवनसंध्या.	०–१२–०
१८	लीला.	०–१२–०
१९	बकुलमाला.	०–१२–०
२०	राजा तोडरमल.	०–१२–०
२१	सुधा.	१–०–०
२२	रामाची अयोध्या.	१–०–०
२३	माणिकबाग.	१–४–०
२४	दुःखा अंतीं सुख.	१–४–०
२५	शिवाची परीक्षा.	१–४–०

नाटकें व प्रहसनें.

१	वेड्यांचें इस्पितळ.	०–३–०
२	नीलांबरी.	०–३–०
३	पन्हाळगड किल्ले०	०–४–०
४	राववहादुरपर्वत्या.	०–६–०
५	चतुरविनोदी स्त्रि.	०–६–०
६	द्रोणसंकोप.	०–६–०
७	भ्रमनिरसन.	०–६–०
८	मुद्राराक्षस.	०–८–०
९	मालतीमाधव.	०–८–०
१०	संग्रामसिंह.	०–८–०
११	गौप्यगोपन.	०–८–०
१२	सुंदरमाधव.	०–१०–०

व्यवहार कविता.

१	हंसदूत.	०–२–०
२	मोहनतारा.	०–२–०
३	कुसुमगुच्छ.	०–४–०
४	उपदेशपाठ.	०–४–०
५	काव्यकुञ्ज.	०–४–०

चरित्रें वगैरे.

१ रा. व. वारद. ०—४—०
२ ऐतिहासिकस्त्रिया. ०—८—०
३ आमच्या आठवणी १—४—०

धार्मिक आणि उपदेशपर.

१ विवेकानंदाचीं पत्रें. ०—४—०
२ स्वामी रामतीर्थ. १—४—०
३ रानडे—व्याख्यानें. १—८—०

विनोदपर.

१ भद्रंभद्र. ०—१०—०
२ सुदाम्याचे पोहे. ०—१२—०

इंग्रजी.

Indian Worthies. 1—0—0
Chandavarkr's Speches. 2—8—0

मनोरंजनाच्या मागील वर्षांच्या पुस्तकांबद्दलची जाहिरात पुढील पृष्ठावर प्रसिद्ध झाली आहे ती पहा.

वरील सर्व पुस्तकांस टपालहंशील निराळें पडेल. जीं थोडींशीं कापडी बांधणीचीं पुस्तकें आहेत त्यांबद्दल बांधणीप्रमाणें २ आणे अगर ४ आणे जास्त किंमत पडेल.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

मनोरंजनाचे जाहिरातीचे दर.

१० तारखेच्या आंत आमच्या हातीं येणाऱ्या जाहिरातीच पुढील महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध होऊं शकतील. जाहिरातीच्या मजकुरासोबत पुढील आकार आगाऊ आला पाहिजे.

	एक वेळ
एक पृष्ठ	रु. २०—०—०
अर्धें पृष्ठ (अगर एक कालम)	" १२—०—०
पाव पृष्ठ (अगर अर्धा कालम)	" ७—०—०
⅛ पृष्ठ (अगर पाव कालम)	" ४—०—०

६ वेळेची आगाऊ रक्कम पाठविल्यास शेंकडा ७॥ टके, आणि १२ वेळेची आगाऊ रकम पाठविल्यास शेंकडा १२॥ टके, वरील दरांत डिस्काउंट देण्यांत येईल.

पुरवणी वांटण्याचा दर ६० रुपये.

काशीनाथ रघुनाथ मित्र,
मालक—मासिक मनोरंजन, गिरगांव-मुंबई.

Terms for Advertisements.

Advertisements for the Masik Manoranjan should reach the office not later than the 10th of a month, to appear in the next number. The scale of charges to be remitted in full with the Advertisements is as follows:—

	Single insertion.
Per Page	Rs. 20-0-0
" Half page or 1 Column	12-0-0
" Quarter page or ¼ Column	7-0-0
" One eighth page or ⅛ Column	4-0-0

If payment be made in full in advance a discount of 7½ per cent. for 6 insertions, and 12½ per cent. for 12 insertions, is allowed on these rates.

Foreign Advertisements.

One page £ 2 per insertion.
Half page £ 1. 5s. " "
Quarter page 15 s. " "

Cheques are not received in payment.

Proprietor—Masik Manoranjan,
Girgaon—Bombay.

मनोरंजनाचीं मागील वर्षांचीं पुस्तकें. [2-12]

खालीं दिलेल्या, मनोरंजनाच्या मागील वर्षीच्या पुस्तकांच्या, थोडथोड्या प्रती शिलक आहेत. हीं पुस्तकें सर्वांनां फारच सवलतीनें, अति स्वल्प किंमतींत मिळण्याची व्यवस्था केली आहे.

मनोरंजन पुस्तक ६ वें. (पृष्ठें २९२.)
मूळ किंमत १-१२-०. सवलतीची किंमत ०-१२-०.

मनोरंजन पुस्तक ९ वें. (पृष्ठें ४८०.)
मूळ किंमत २-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १० वें. (पृष्ठें ५८४.)
मूळ किंमत२-८-० सवलतीची किंमत ०-१२-०.

मनोरंजन पुस्तक ११ वें. (पृष्ठें ४००.)
मूळ किंमत२-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १२ वें. (पृष्ठें ५५२.)
मूळ किंमत २-८-०. सवलतीची किंमत१-४-०.

मनोरंजन पुस्तक १३ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १४ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १४ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत१-८-०. सवलतीची किंमत ०-१२-०

मनोरंजन पुस्तक १५ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत १-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १६ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १६ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत१-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १७ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत २-०-० सवलतीची किंमत १-८-०.

मनोरंजन पुस्तक १७ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत२-०-०. सवलतीची किंमत १-८-०.

दोन घटका मनोरंजन. (पृष्ठें ३९२.)
मनोरंजन वर्ष १, २ व ३ यांतील गोष्टी.
किंमत १-४-०.

दोन घटका मनोरंजन. (पृष्ठें ४००.)
मनोरंजन वर्ष ४ व ५ यांतील गोष्टी.
किंमत १-४-०.

संसाररंजन. (पृष्ठें ३१४.)
मनोरंजन वर्ष ९, १० यांतील गोष्टी.
किंमत १-०-०.

मनोरंजनचा दिवाळीचा अंक
अंक १ ला, (पृष्ठें १९२.)
किंमत ०-१२-०.

मनोरंजनाचा दिवाळीचा अंक.
अंक २ रा. (पृष्ठें २२४.)
किंमत ०-१२-०.

मनोरंजनाचा दिल्लीदरबारचा अंक.
(पृष्ठें २८०.) किंमत १-०-०.

महाराष्ट्रमहिला, पुस्तक १ लें. (उत्तरार्ध)
पृष्ठें ३८०. किंमत १-०-०.

महाराष्ट्रमहिला, पुस्तक २रें. (पूर्वार्ध.)
पृष्ठें २४०. किंमत०-१२-०.

विशेष सवलती.

१. वरील २१ पुस्तकांपैकीं कोणतींहि ४ पुस्तकें मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{1}{4}$ किंमतीस देण्यांत येतील.

२. वरील पुस्तकांपैकीं कोणतींहि ८ पुस्तकें मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{1}{2}$ किंमतीस देण्यांत येतील

३. वरील पुस्तकांपैकीं कोणतींहि १२ अगर जास्त मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{3}{4}$ किंमतीस देण्यांत येतील.

मनोरंजक ग्रंथ प्रसारक मंडळी, गिरगांव, मुंबई.

☞ This page is to let from the next month.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी.

१. वाचकांस स्वल्प किंमतींत सुंदर पुस्तकें मिळावीं, ग्रंथकारांस ग्रंथलेखनाच्या कामीं उत्साह वाटावा, आणि मराठी भाषेंत मनोरंजक आणि उपयुक्त अशा उत्कृष्ट पुस्तकांची भर पडावी, या उद्देशानें **मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीनें** या वर्षापासून पुढील योजनेप्रमाणें प्रयत्न करण्याचें निश्चित केलें आहे.

२. मंडळीमार्फत दरसाल सहा, अगर सवडीप्रमाणें त्याहूनहि जास्त पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत येतील. या सर्व पुस्तकांचें अंतर्बहिरंग अत्यंत सुंदर करण्यांत येऊन त्यांच्या किंमती अतिशय स्वल्प ठेवण्यांत येतील.

३. मंडळीमार्फत दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांपैकीं सर्व, अगर आपल्या आवडीप्रमाणें कोणतींहि **कमींत कमी तीन रुपये** किंमतीचीं पुस्तकें विकत घेण्याचें आश्वासन देऊन, आणि **एक रुपया प्रवेशफी** भरून, मंडळीच्या आश्रयदात्यांच्या पटांत नांवें नोंदविणारांस मंडळीचे आश्रयदाते समजण्यांत येईल, व त्यांनां मंडळीच्या पुस्तकमालेपैकीं आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ६० पुस्तकांपैकीं कोणतेंहि पुस्तक, त्याचप्रमाणें मंडळीच्या पुस्तकमालेपैकीं पुढें प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांपैकीं कोणतेंहि पुस्तक (फक्त एक प्रत) **पाऊणपट किंमतीस** देण्यांत येईल.

४. प्रत्येक पुस्तक तयार होतांच कार्ड पाठवून आश्रयदात्यांस आगाऊ सूचना देण्यांत येईल. हें पुस्तक घ्यावयाचें नसल्यास आश्रयदात्यानें १५ दिवसांच्या आंत तसें स्पष्ट कळविलें पाहिजे. आपल्याला सदर्हु पुस्तक नको असल्याचें जे स्पष्ट कळवितील त्यांच्या शिवाय बाकीच्या सर्व आश्रयदात्यांकडे तें पुस्तक पाऊणपट किंमत आकारून व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल.

५. याप्रमाणें व्ही. पी. नें पुस्तक पाठविलें असतां जे तें परत करतील, किंवा आश्वासनाप्रमाणें वर्षांत **कमींत कमी तीन रुपये** किंमतीचीं पुस्तकें जे मागविणार नाहींत; त्यांनां व्ही. पी. चा खर्च देण्याबद्दल आणि आश्वासनाप्रमाणें तीन रुपयेपर्यंत किंमतीचीं पुस्तकें घेण्याबद्दल सूचना दिली जाईल. परंतु जे एक महिन्याच्या आंत त्याप्रमाणें करणार नाहींत; त्यांचीं नांवें आश्रयदात्यांच्या पटांतून सालअखेर कमी केलीं जातील. पुनः एक रुपया प्रवेशफी भरल्यास त्यांचीं नांवें आश्रयदात्यांच्या पटांत नोंदलीं जातील, व त्यांनां पुनः सवलतीचा लाभ मिळूं शकेल.

मंडळीच्या या नवीन योजनेला साहाय्य करून स्वल्प किंमतींत उत्कृष्ट पुस्तकें अधिकाधिक प्रसिद्ध करण्याच्या कामीं, व ग्रंथकारांचा उत्साह वाढविण्याच्या कामीं मंडळीला उत्तेजन द्यावें, अशी सर्व महाराष्ट्र बंधुभगिनींस आग्रहाची विनंति आहे.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव—मुंबई.

स्त्रीचें शिरोभूषण ! ! !



मृदु, कुरळ, काळाभोर, चकचकीत असा केशकलाप कोणत्या स्त्रीस आवडणार नाहीं ? असा सुंदर केशकलाप प्राप्त करून देणारें

'कामीनिया ऑईल'

हें एकच तेल असून ते प्रत्येक स्त्रीचा जसा सौभाग्यालंकार आहे, त्याचप्रमाणें तें मानसिक श्रम पडणाऱ्या पुरुषासाठीं व विद्यार्थ्यांसाठीं फारच जरूरीचे आहे हें तेल लावताच सतप्त असलेलें डोकें शांत होऊन मेंदूस थंडावा येतो, मन उत्तेजित होतें, डोक्यातील सर्वडे वगैरे साफ बरे होऊन केश बिलकुल गळून न पडतां ते सुंदर रीतीनें व पुष्कळसे वाढतात याचा सुवास अत्यंत मधुर व मोहक आहे अर्धा आण्याचें तिकिट पाठवून नमुना मागवा.

१ बाटलीस १ रु ट स ८४ ३ बाटल्यास २।१० ट. स ८७

अवश्य संग्राह्य औषधें



श्वास, दमा, खोकला, वगैरेवर वस्ताद ऑड मन्स कफ एलिक्झिर

फुप्फुसाच्या सर्व रोगावर, घशात दुखणें, छातींतून रक्त पडणें, श्वास लागणें व शीतोष्णापासून होणाऱ्या खोकल्यावर हें अत्यंत गुणकारी आहे अनुभवानेंच राजा होईल सर्व देशभर याचा जारीनें खप होत आहे त्यात रसायन वगैरे कांहीं नसल्यामुळें लहानापासून थोरापर्यंत सर्वांस याचा उपयोग होतो. किं १। रु ट ख. ८५

सर्व प्रकारच्या कपाळदुखीवर देशी टेबलेट्स (दशो-वड्या)

अर्धशिशी, मस्तकशूळ-सर्दी गर्मी, कमजोरीमुळें अगर इतर कोणत्याहि कारणामुळे कपाळ किंतीहि दुपट्या, ट्रेनोच्या दोन वड्या पाण्याचे घोटाबरोबर पोटांत घेतांच कपाळ दुखण्याचा मागमूसहि लागणार नाहीं वापरण्यानेच खरा प्रकार कळून येणार आहे. कि २० वड्याचे बाटलीस ।।१२ आणे ट. स. ८४ निराळा.



सर्व प्रकारचे सधिवातावर



आडमन्स सायप्रस साल्व्ह.

वातामुळें शरीराचा कोणताहि भाग दुखणें, श्वासोच्छ्वास करतांना छातींत दुखणें, सांधे धरणें, कमर दुखणें, हातपाय वळणें, वगैरेवर हा मलम जरासें चोळताच लगेच आराम पडतो. थकवा आलेल्या स्नायूंस हें चोळल्यास थकवा जाऊन ते जास्त बळकट होतात हें सुंदरशा चिनी भाष्यात येत असून वर 'Odman's cypres salve' असें लिहिलेलें असते कि १ रु ट० ख० ८४ निराळा.

सर्व माल मिळण्याचा पत्ता—

थि अँग्लो इंडियन ड्रग अँड केमीकल कंपनी, सर्वत्र हेचीं औषधें विकणार, जुम्मामशिद-मुंबई.

Supplement printed at the 'Bombay Vaibhav' Press, Pages 133 to 156 printed at the Karnat Press. 7 Girgaom Back Rd by C N Kulkarni and all the remaining pages, printed at the Nirnaya-Sagar Press, 23 Kolbhat lane Bombay, by B B Ghaneskar and published at 2 A, Chanpy Rd Girgaon Bombay, by K R. Mitra.

मासिक मनोरंजन



वर्ष १८ वे, अंक ३ रा.

सिल्व्हर वॉच.

गॅरंटी पांच वर्षांची हें घड्याळ असल चांदीचं असून याचें नक्षीदार सुंदर झाकण च ६ रुपयांतून जास्त किमतीच आहे! हें घड्याळ अत्यंत मोहक तसेंच मजबूत आहे वेळ अगदी बरोबर देत पूर्वी ह ११ रुपयांवाली सिल्वर मध्ये परंतु या सुंदर घड्याळाचा प्रसार व्हावा, म्हणून ह मुद्दाम ६ र किमतींत देण्याची व्यवस्था केली आहे



एम्पायर एजन्सी,
काळबादेवी रोड, मुंबई

Vol XVIII] सपादक—काशीनाथ रघुनाथ मित्र, [No 207
गिरगांव-मुंबई.
वार्षिक वर्गणी ८ ह सह ४-०-०] [किरकोळ अंकाचा किमत ०-८-०

रजिस्टर्ड.

अमृतांजन

अचुक गुणकारी !
Indian Pain Balm



पुष्कळ नामांकित डाक्टरांनी व सद्गृहस्थांनी ठरविलेलें. मस्तकशूल, संधिवात, विंचवाचा दंश, घाव, ज्ञानतंतुगत पीडा यावर रामबाण. फक्त तीन वेळ लाविल्य गुण येतो. हजारों शिफारसपत्रे व नागपुरच्या प्रदर्श पदक मिळालें आहे. दुःखग्रस्तांचा हा एकच उपाय अ

५. सोबत एक छापील कार्ड पाठवीत आहों मनोरंजनाच्या प्रयत्नांची आपल्या मित्रांना ओळ करून देऊन त्याच्याकडून हें कार्ड भरून पाठवून मनोरंजनाला आश्रय देवविण्याचा मनोरंजनाचे हितचिंत प्रयत्न करतील, अशी उमेद बाळगितों.

काशीनाथ रघुनाथ मित्र, संपादक मनोरंज

मनोरंजनाबद्दल पाश्चिमात्यांचे उद्गार.

" ❀ ❀ हिंदुस्थानातील साहसाचे हें मोठें प्रशंसनीय उदाहरण आहे ❀ ❀ "

१६।३।१२. — विल्यम् टॉमस् स्टेड,
रिव्ह्यु ऑफ रिव्ह्यूजचे संपादक, (लंडन)

" ❀ ❀ या मासिकाचा अंक पाहून आमाला फार समाधान होतें "

२८।२।१२. — धि वेस्टमिनिस्टर गॅझेट, (लंडन)

" ❀ ❀ युरोपांतील कोणत्याहि देशातील उत्तम मासिक पुस्तकाच्या जोडीस या मासिक पुस्तकास बसविता ल ❀ ❀ "

२८।३।१२. — धि ईव्हिनिंग टाइम्स, (ग्लासगो).

" ❀ ❀ पश्चिम हिंदुस्थानात नियतकालिकाच्या बाबतींत झालेल्या प्रगतीचें मूर्तस्वरूप म्हणून आपलं मासिक तक मी या देशात (अमेरिकेंत) पुष्कळांनां दाखवीत आहें ❀ ❀ "

२४।६।१२. — एमिली आर्. विसेल,
सॅन लोरेन्सो, कॅलिफोर्निया, अमेरिका.

दिक छापखाना, मुंबई.

ती इतकी हुबेहुब होते, कीं, त्यामुळें नीट पाहिल्याशिवाय डॉगरे याच्याच बाला-मृताची बाटली ओळखण्यास अडचण पडते. तरी डॉगरे यांचें बालामृत घेणारांनी ते आमचेंच आहे याबद्दल खात्री करून घ्यावी. बाटलीची किंमत १२ आणे, ट रु. ४ आणे. के. टी. डॉगरे कंपनी, गिरगांव—मुंबई. [3-12]

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागविताना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

पुस्तक १८ वें, माहे सप्टेंबर १९१२, अंक २०७.

विषयानुक्रम.

१	मुरली. (कविता.) श्रीयुत 'गोविंदाग्रज.'	१८१
२	शारदा. (चाल कादंबरी.)	१८५
३	आमचा जातिभेद. (महाराष्ट्रातील काहीं पुढाऱ्यांची मतें.)	१८९
४	शीघ्रमॅच्. (संपूर्ण गोष्ट.) श्रीयुत वामन कृष्ण देशपांडे.	१९४
५	काम करण्याची रीत.	२०४
६	उत्तर हिंदुस्थानांतील प्रवास. (हरिद्वार.) श्रीयुत प्रो. गोविंद त्रिमणाजी भाटे, एम्. ए.	२०५
७	पैशाची शेती. (संपूर्ण गोष्ट.) श्रीयुत पुरुषोत्तम विष्णु गोगटे, बी. एस् सी.	२१२
८	विचाराचा आरोग्यावर होणारा परिणाम. श्रीयुत गोपाळ महादेव विपळूणकर, बी. ए.	२१८
९	प्रणयविजय. (संपूर्ण प्रहसन.) श्रीयुत लक्ष्मण विनायक परळकर बी. ए., एल् एल् बी.	२२१
१०	वायुलता. (कविता.) श्रीयुत 'इंदुकांत.'	२३७
११	हिंदी समाजांत स्त्रियांची स्थिति. श्रीयुत बाजीराव रामराव गुत्तीकर, बी. ए., एल् एल्. बी.	२४०
१२	विल्यम टॉमस स्टेड.	२४४
१३	विचारतरंग. (कविता.) 'Bee.'	२५०
१४	एक संवाद.	२५२
१५	गृहसौख्य.	२५४
१६	एक पत्र.	२५६
१७	फ्रेंच भाषेतील विनोद. श्रीयुत व्ही. ए. केसकर.	२५९
१८	स्वयंपाकघरांतील गोष्टी.	२६१
१९	प्रासंगिक विचार.	२६५
२०	एडिटरचें टेबल.	२६७

मनोरंजनाचा दिवाळीचा अंक.

मनोरंजनाचा या वर्षाचा दिवाळीचा अंक छापावयास सुरुवात झाली असून तो सर्व प्रकारें अतर्वाह्य चित्ताकर्षक, वाचनीय व सुंदर करण्याविषयींचे शिकस्तीनें प्रयत्न करण्यात येत आहेत. हा अंक वरोवर दिवाळीचे दिवशीं वाचकाच्या हातीं पडावा, अशी व्यवस्था करीत आहों. या अंकासंबंधाची विस्तृत जाहिरात अक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध होईल. या अंकात प्रसिद्ध करण्याकरतां सुंदर फोटो व चित्रें हीं पाठविण्याची ज्या फोटोग्राफर्सची, चित्रकाराची किंवा इतराची इच्छा असेल, त्यांनी तीं तारीख ३० सप्टेंबरपर्यंत आमचे ऑफिसात पाठविण्याची कृपा करावी. फोटोग्राफ्स् सिल्व्हर प्रिंटचे, फुल साईजचे, स्पष्ट व उठावदार असले पाहिजेत. चित्रें ब्लॅक-अँड व्हाइटचीं ८×१२ अगर १०×१५ साईजचीं असावीं. चित्रें व फोटो कोणत्याहि रमणीय स्थलाचे किंवा प्रसंगाचे असले तरी चालतील.

संपादक-मनोरंजन.

मेसर्स वाळकृष्ण साजवा आणि कंपनी,

सदाशिवस्ट्रीट, गिरगांव—मुंबई.

छापखान्यास लागणारे—

प्रिंटिंग पेपर्स—ग्लेज्ड, अनग्लेज्ड, फुलस्कॅप, कव्हर, कलर इ. इ. सर्व वजनाचे; बासरळी—सर्वजातींच्या; शाई—टाइपाची, लिथोची, काळी किंवा रंगीत, हलकी व भारी, सर्व जातीची व सर्व दराची; आन्टिमनी—S. C. मार्काची; लिथोस्टोन—"१८×२४" अगर हव्या त्या आकाराचे; प्रेसीस—मशीन्स, केसीस, घोडे वगैरे सर्व लांकडी सामान.

छापखान्यास लागणारा हरएक माल आह्मी घेट विलायतेहून मागवीत असल्यामुळें तो आमच्यामार्फत मागविल्यानें फार फायदेशीर पडतो. केसरी, मनोरंजन, निर्णयसागर, आर्यभूषण इत्यादि महाराष्ट्रांतील प्रसिद्ध प्रकाशक आणि छापखानेवाले आमच्याचकडून बहुतेक माल घेत असतात.

विलायतेंतील प्रसिद्ध मिलर आणि रिचर्ड मेकरचे बुक, न्यूज, हेडिंग व आर्नमेंटल टाईप मागवून देऊं. या कंपनीचे आह्मी सोल एजंट आहों. [3–12]

वनौषधि सारसापरिला.

हा सारसापरिला कोणीहि सेवन केल्यास लागलीच रक्तशुद्धि व रक्तवृद्धि होऊन शरीर पुष्ट व सतेज होतें. स्मरणशक्ति वाढून मेंदूला बळकटी येते, आणि शक्ति वाढते. बा. कि. रु. १।.

महाकुष्ट व पांढरें कोड

यांवर दोन अत्युत्तम गुणदायक औषधें.

१ भारतमधुवल्ली—खाण्यासाठीं. कि. रु. १।.
२ नागवल्लीतेल—लावण्यासाठीं. कि. रु. २.

मधुवल्ली सेवन केल्यानें व नागवल्ली तेल लाविल्यानें अठरा प्रकारचीं कुष्ठें खात्रीनें बरीं होतात. साधारण गुण दिसण्यास पंधरा दिवस लागतात.

[3–12] डॉ. धाकजी भानजी सावंत,
फणसवाडी, कोळ्याची चाळ, नं. २, मुंबई.

[3–12] **क्लिडायन्स छापचीं**

प्रोफेसर गजर यांचीं

शास्त्रीय रीत्या तयार केलेलीं औषधें.

फिवर ड्राप्स (ज्वरबिंदु) सर्व प्रकारच्या तापांवर जालीम. कि. ८४

ब्लडप्युरिफाईंग सोल्युशन (रक्तशोधक) उपदंशापासून होणाऱ्या रोगांवर फारच गुणकारी ठरलेलें. कि. रु. १

टॉनिक सोल्युशन—अपचन, अग्निमांद्य, जीर्णज्वर वगैरे विकार या औषधाच्या सेवनानें नाहींसे होऊन शारीरिक व मानसिक शक्ति वृद्धिंगत होते. कि. रु. २

प्लेगसोल्युशन—प्लेगवर रामबाण. कि. ८८

जर्मिसाईड—प्लेग, कॉलरा, वगैरे जंतुजन्य रोगप्रतिबंधक. कि. ८८.

कॉलरा सोल्युशन, गजकर्णाचें मलम, दंतमंजन वगैरे संपूर्ण औषधांची यादी मागवा.

आर्योनिक फार्मसी, गिरगांव, मुंबई.

अचूक [3–12]

शक्ति देणाऱ्या
आतंकनिग्रह गोळ्या.

रक्तसंबंधीं सर्व प्रकारचे विकार व अशक्तता यांचा नाश करणाऱ्या सुप्रसिद्ध पौष्टिक गोळ्या. किंमत ३२ गोळ्यांच्या डबीचा १ रुपया.

वैद्यशास्त्री मणिशंकर गोविंदजी,
मालक–आतंकनिग्रह औषधालय.


हेड ऑफिस–जामनगर–काठेवाड.
शाखा नं. १ काळबादेवी रोड, मुंबई.
शाखा नं. २ बुधवार पेठ, पुणें शहर.

WHAT HAVE YOU DONE [2–12]

this year to better your position? How much spare time have you given to developing your earning powers? Six months cannot go by without bringing home to every young man those vital questions. Each hour of study *now* means weeks, months and years of *increased earnings in the future*. Each I. C. S. instruction paper mastered means a net gain to the student in *marketable* knowledge. Write to us *now* mentioning vocation about which free particulars are required.

International Correspondence Schools of London.
Dept. 51-T, 11, Hamam Street, Fort, Bombay.
Goldmedal award, Bombay Exhibition.

नानूज ब्रास वर्क्स महमदी महाल, काळबादेवी रोड, मुंबई.



लोखंडी पाळणा किं. रु. १५
" स्विंगिंग चेअर " १०
" चेअरबेड (पाहिजे तेव्हां पलंग व खुर्ची बनते.)" ८
" घडीच्या खुर्च्या " २।
" घडीच्या खुंट्या " ॥•
" घडीची खाट " ८
" बाबाकॉट (मच्छर-दाणीच्या चौकटीसह ४×२।) " २०
" बेडस्टेड (मच्छर-दाणीच्या चौकटीसह ४×३) " २०

लोखंडी बेडस्टेड्स (वायर मेट्रेससह) किं. रु. २२
" घडीचे बांक " ५॥
" आरामखुर्ची " ९
" टॉवेलस्टँड " ४
" वॉशस्टँड (भांड्यांसह) " ३
" शेल्व्हज किं. रु. ३ पासून १० पर्यंत.
" घडीचें टेबल किं. रु. ५

[फॅक्टरी–खेतवाडी मेनरोड, गिरगांव–मुंबई.]

यांशिवाय दुसरें पुष्कळ तऱ्हेचें पितळेचें, लोखंडी व इतर धातूंचें उपयोगी सामान तयार होतें. किंमतीची अर्धी रक्कम आगाऊ पाठविल्यास माल व्ही. पी. नें पाठवूं. व्यापाऱ्यांस भरपूर सवलती. [3–12]

गोपाळ नारायण कंपनी, बुकसेलर्स, कालकादेवीरोड–मुंबई. [3–12]

प्राकृत ग्रंथ (मोठ्या टायपाचे.)

	रु.		रु.
रामविजय	१–४	भक्तलीलामृत	४–०
हरिविजय	१–०	नाथलीलामृत	२–०
भक्तविजय	२–०	संतलीलामृत	१–१२
पांडवप्रताप	२–८	एकनाथी भागवत	४–८
कथासारामृत	२–८	नवनाथभक्तिसार	२–०
काशीखंड	३–०	गणेशप्रताप	३–०
जैमिनी अश्वमेध	३–०	उपयुक्त सर्वसंग्रह	१–४
दासबोध	१–०	गुरुचरित्र	२–०

संस्कृत ग्रंथ.

	रु.		रु.
भागवत, श्रीधरी.	रु. ५	अध्यात्मरामायण सटीक.	२
भागवत, विजयध्वजी.	८	महाभारत सटीक.	२५
भागवत टीका चूर्णिका.	१०	आत्मपुराण सटीक.	१२
वाल्मीकि रामा. सटीक.	७	नारायणभट्टी समंत्रक.	२
हरिवंश सटीक.	४	योगवासिष्ठ सटीक.	२०
विष्णुपुराण सटीक.	३	सुभाषितरत्नाकर.	२
गणेशपुराण.	६	कृष्णयजुर्वेदीय. ब्राह्मण.	२॥
कृष्णयजुर्वेदीय. संहिता.	३	आनंदरामायण.	५

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

[3–12] **जारा लांकूड.**

वाफेच्या यंत्रांनीं कापलेलें **वेस्ट्रेलिअन जारा लांकडाचें** स्कॅन्टलिंगचा, तक्तपोशी, दांडे, बडोद, खांब, चौकटी, ऑफिस पार्टिशन्स, छपरें, खिडक्या पॉलिश केलेलें लांकडी सामान, फ्रेमवर्क, कापसाच्या गठ्ठयांस मारण्याच्या पट्टया इत्यादि कामांकडे उत्तम उपयोग होतो.

जारा लांकडाची किंमत सागवानाच्या **जवळ जवळ निम्मे आहे.**

निरनिराळ्या आकाराचे व लांबीचे स्कॅन्टलिंग मुंबई, कलकत्ता, मद्रास व कराची येथें असलेल्या आमच्या वखारींत नेहमीं मिळतात. पत्र पाठविलें असतां क्याटलाग व नमुने फुकट पाठवूं.

मिलर्स कारी जारा कंपनी, १९०२ लि.
यॉर्क बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई.
एजन्टस—
कलकत्ता—गिलॅन्डर्स अर्बथ्नोट आणि कंपनी.
मद्रास—बीनी ॲण्ड कंपनी.
कराची—मॅकिकनॉन मॅकेन्झी आणि कंपनी.

प्रत्येक साक्षर कुटुंबांत अवश्य संग्रहणीय नवीन पुस्तक !

हिंदुस्थानांतील यात्रेच्या सर्व पवित्र क्षेत्रांची, मोठमोठ्या व्यापारी व इतिहासप्रसिद्ध शहरांची, निसर्गसुंदर देसाव्यांची आणि प्रेक्षणीय स्थळांची वगैरे बरीच उपयुक्त विश्वसनीय आणि मनोरंजक माहिती सुंदर चित्रांसहित एके ठिकाणीं देणारें मराठींतील पहिलेंच पुस्तक,

प. वा. श्रीयुत बी. एल्. घोरपडे यांचें

सचित्र भारत-प्रवास-वर्णन.

आकार सध्याच्या 'मनोरंजना'एवढा. पृष्ठसंख्या २६०. आर्ट पेपरवर सुबक छापलेलीं हाफटोनचीं चित्रें ९०. किंमत रुपये २. पोष्ट व्ही. पी. खर्च निराळा.

याशिवाय सुप्रसिद्ध **ए. एल्. घोरपडे** यांच्या शाईच्या कारखान्यांतील सर्व प्रकारच्या नामांकित शाई आह्मांकडे मिळतील.व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन मिळेल.

राधाबाई अण्णासाहेब घोरपडे,
चालक, ए. एल्. घोरपडे, यांची इंक फॅक्टरी
[1–12] २२, सोमवार पेठ पुणें.

तर मग आजच मागवा !

"कायग कमला, आह्मीं पुष्कळ वेळां आंबोळ्या केल्या असतील, पण तुझ्यासारख्या पातळ व दिसण्यास सुरेख अशा आंबोळ्या मला करितां येत नाहींत; इतकेंच नव्हे, तर माझ्या आईलासुद्धां अशा साधत नाहींत !"

"तुह्मी ज्या आंबोळ्या करितां त्या कशावर करितां ?"

"उघळशा तव्यांत." [3–12]

"तरीच त्या जशा साधाव्या तशा साधत नाहींत !"

"मग तुह्मीं त्याकरितां कांहीं युक्ति काटली आहे ?"

"युक्तीबिक्ती कांहीं नाहीं. **किर्लोस्कर बंधूंची** आंबोळ्यांच्या तव्याची जाहिरात पाहून त्यांचेकडून एक तवा आणविला. या तव्यावर केलेल्या त्या आंबोळ्या."

"हे तवे कोठें मिळतात ?"

"ते खालील पत्त्यावर मिळतात. शिवाय, पाणी ओढण्याचे अगदीं हलके जाणारे लोखंडी रहाट व चाकेंहि त्यांचेकडे मिळतात."

किर्लोस्कर बंधु,
पोष्ट किर्लोस्कर वाडी, (जिल्हा सातारा, सं. औंध.)
आंबोळ्यांचा तवा. रु. १. पाणी ओढण्याचें चाक. रु.५
पाणी ओढण्याचा रहाट. रु. १५

श्वासनाशकगुटिका.—दमा, खोकला, व त्यापासून कफ, घरघर, ज्वर, मलावरोध वगैरे विकारांवर तावडतोब गुण देतात. २० गोळ्यांच्या बाटलीस ८१०. ४० गो. १ रु.ट. हं. शिवाय. [3–3]

पत्ता:—**जी. डी. भाचे, पुणें शहर.**

हिंवताप मलेरिया पाळीचे वगैरे

तापावर

कर्णिक ब्रदर्स यांचें **एग्युमिक्श्चर** खस्त व खात्रीलायक उपाय. कि. ८८. सहा बाटल्या व्ही. पी.नें मागविणारास तारीख बदलण्याचें **परमनंट कॅलेन्डर फुकट !**

[3–12] **कर्णिक ब्रदर्स, दादर—मुंबई.**

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

फक्त कानाच्या रोग्यांकरिता डॉ. गाडगीळ यांचें

ऑरीनचा मोठा सांठा तयार आहे.

व्यापाऱ्यांनीं ऑरीन विक्रीस ठेवावें.

ऑरीन

कान फुटणें, पू व रक्त येणें, ठणका लागणें, आवाज होणें, कमी ऐकूं येणें, सुजणें, कंड सुटणें वगैरे विकार खात्रीनें बरे होतात. कान तपासून कर्णरोगप्रतिबंधक उपाय सर्वांनीं करावा. कानाला ठणका केव्हां लागेल याचा नेम नसतो, म्हणून 'ऑरीन' (किं. रु. १) नेहमीं जवळ ठेवावें. रोगाच्या मानानें १० दिवस पुरणाऱ्या औषधाला किं. व ट. ख. रु. २. महिन्याच्या औषधाला रु. ५. [3–12]

डॉ. गाडगीळ यांचा कानाचा दवाखाना, भीमराव आत्माराम यांची वाडी, ठाकुरद्वार—मुंबई.

धी कृष्णा डाइंग्, वीव्हिंग्, ॲण्ड् ट्रेडिंग् कंपनी, लिमिटेड्, वाई.

शाखा—वनहट्टी.

स्थापना १९०६.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केलेली आहे.

भांडवल रु. ५०,०००.


प्रत्येक भाग रु. २५ चा, याप्रमाणें एकंदर भाग २०००. या कंपनीचे भाग घेऊं इच्छिणारांनीं अर्जासोबत प्रत्येक भागास रु. ५, भाग दिल्यानंतर रु. १०, व नंतर रु. ५ द्यावे लागतात. भागीदारांस व्याज ६ टक्यांखालीं दिलें गेलें नाहीं. ऑईल् इंजिनच्या शक्तीवर धान्य दळण्याचीं, गळित धान्यापासून तेल काढण्याचीं व भातापासून तांदूळ तयार करण्याचीं व हळद स्वच्छ करण्याचीं यंत्रें सुरू केलीं आहेत. वनहट्टी येथील शाखेंत रेंगाचें व रेशमी कद विणण्याचें काम केलें जातें. विशेष माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

मेसर्स कोठावळे ब्रदर्स आणि कंपनी,
वाई, जि. सातारा.

[3–12]

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

[3-12] सतत पन्नास वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला



डॉ. वामन गोपाळ यांचा

दूषित रक्त शुद्ध करणारा

आयोडाईज्ड

सार्सापरिला.

देहाचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय! तेंच एकदा बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करितात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगांमुळें अर्धांगवायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व इतर कारणांनीं रक्त बिघडून होणाऱ्या त्वग्रोगांवरहि हाच सार्सापरिला उत्तम ठरला आहे. आमच्या सार्सापरिल्याचा पुष्कळ खप पाहून बऱ्याच लोकांनीं त्याची हुबेहुब नक्कल केली आहे.

मालकः—

गौतमराव केशव,
ठाकुरद्वार, मुंबई.

करितां घेतांना बाजूला दाखविल्याप्रमाणें बाटलीवरील लेबल पाहून आणि तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घ्यावा.

बाटलीची किं. १।- रु. पो. खर्च ५ आणे. उत्तम गुणास ४ बाटल्या. ४ बाटल्यांस टपालखर्चासह ४॥-. विशेष माहितीकरितां कॅटलॉग मागवा.

आमच्याकडे डॉ. काळोखे यांचीं वैद्यकीय पुस्तकें विक्रत मिळतील.

एजंट्सः—

हिंदु-युरोपियन फार्मसी, पणजी–गोवा. नारायण रामचंद्र जोशी, उमरावती.
कृष्णराव गोपाळ शौचे, इंदूर. एस्. जी. येवलेकर, पुणें–सिटी.
शिवाय मोठमोठ्या शहरीं प्रसिद्ध दुकानदारांकडेहि मिळेल.

The Bombay Banking Co. Ltd.,
GIRGAON-BOMBAY. [3-12]

धि बॉम्बे बँकिंग कंपनी, लिमिटेड,

गिरगांव—मुंबई.

सेक्रेटरी, ट्रेझरर्स आणि एजंटस्:—

मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी.

स्थापना १८९८.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केली आहे.

भांडवल ५,००,००० रुपये. शेअरची किंमत ५० रुपये. शेअर १०,०००.

प्रत्येक भागाचे ५० रुपयांपैकीं फक्त ४० रुपये घेतले जातात.

अर्जासोबत रुपये २॥, व अलॉटमेंटनंतर रु. २॥, व पुढें एकदम रुपये ३५ अगर प्रत्येक महिन्याच्या अंतरानें प्रत्येक कॉलबद्दल रुपये ५ भरावे लागतात. डिव्हिडेंट आतांपर्यंत केव्हांहि ६ टक्क्यांचे खालीं दिलें नाहीं. गेल्या चार सालीं तर ९ टके-प्रमाणें दिलें आहे.

तारणावर रकमा देणें, ठेवी ठेवणें, सरकारी प्रामिसरी नोटा, इतर कंपन्यांचे शेअर्स, लाबप्रमाणें सोनें, चांदी, मोलें वगैरे मूल्यवान् जिनसांची खरेदीविक्री करणें, व्याज वसूल करणें, हुंड्यांचा व्यवहार करणें, वगैरे सर्व कामें चालतात.

सेव्हिंगब्यांकेंत ३॥। रु. व्याजानें रकमा ठेवण्यांत येतात. हंगामाचे दिवसांत ह्मणजे नोव्हेंबर ते जून अखेरपर्यंत जास्त व्याजानें ठेवी ठेवून घेण्यांत येतात. कमिशनाचे दर फार माफक ठेविले आहेत.

मुदतीच्या ठेवीचे व्याजाचे दर:—

६ महिन्यांचे मुदतीचे:-	९ महिन्यांचे:-	१२ महिन्यांचे:-	२४ महिन्यांचे:-
दरसाल दर शेंकडा ४ रु.	४॥ रु.	५ रु.	५॥.

करंट अकौंट ठेवण्यांत येतात. व्याज २॥ रु.

मुख्य मुख्य शहरीं हुंड्यांचा व्यवहार केला जातो.

ब्रँच आफिसें:—

१ पुणें; २ सातारा; ३ सांगली; ४ बेळगांव; ५ सोलापुर; ६ अमरावती; ७ नागपुर.

विशेष माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी,
सेक्रेटरी, ट्रेझरर्स व एजंटस्,
धि बॉम्बे बँकिंग कंपनी, गिरगांव—मुंबई.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

[3-12] सर्वांत जुनी व नांवाजलेली

बी. सखारामजी आणि कंपनी.

हॉउस ऍण्ड इस्टेट एजंटस्.

मुख्य ऑफिस, १८ हमाम स्ट्रीट, कोट, मुंबई. (टेलिफोन नं. ३९०.)
ब्रँच ऑफिस, भरुचा बिल्डिंग्ज, काळबादेवी, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई. (टेलिफोन नं. २१४४.)

आह्मी मुंबई व इतर ठिकाणीं असलेल्या उत्तम व प्रसिद्ध अशा घरांचे व मालमत्तेचे मुख्य एजंटस् आहोंत व त्यामुळें मालकांनां व गिऱ्हाइकांनां आमचे मार्फत काय फायदा झाला व होत आहे याचा खुलासा गरजूंनीं अवश्य मागवावा.

उत्तम शृंगारलेले (फर्निश्ड) अथवा विनशृंगारलेले बंगले, घरें, मजले, ऑफिसांकरितां व पेढ्यांकरितां लहान व मोठ्या जागा, दुकानांकरितां जागा, मुंबईंतील कोणत्याहि भागांमध्यें आमच्या मार्फत पाहिजे तेव्हां मिळतील.

घरें व इतर जमीनजुमले यांची खरेदी व विक्री मुंबई, माथेरान, लोनावळा, खंडाळा, महाबळेश्वर, पुणें, पंचगणी, देवळाली, दिल्ली, कराची, इत्यादि ठिकाणी आमचे मार्फत उत्तम तऱ्हेनें होते.

हवाशीर घरांमध्यें राहिल्यानें प्रकृति उत्तम रहाते; व उत्तम प्रकृति हें सर्व सुखाचें साधन आहे; आणि असलीं साधनें आमच्या मतीनें सुलभ रीतीनें उपलब्ध होतात.

रिकामीं असलेलीं घरें व विक्रीचीं मालमत्ता यांची माहिती पत्रद्वारें मागविली असतांहि देण्यांत येते. घरांचीं भाडीं मालकांकरितां फार सवलतीनें वसूल करण्यांत येतील. लायक गहाणांवर अल्प गरजा भागविण्यापासून मोठे धंदे उभारण्यास लागतील अशा रकमा, विनबोभाट थोड्या मुदतींत, भरंवसेशीर रीतीनें व्याजीं लावून दिल्या जातात; आणि गरजूंच्या गरजा भागविल्या जातात. अनुभवानें खात्री.

विशेष माहिती पत्रद्वारें अगर समक्ष विचारिली असतां खुलासेवार देण्यांत येईल.

हिल्स्टेशन्सकडील लोकांची होत असलेली मोठी गैरसोय दूर करण्यासाठीं आह्मीं आमच्या कंपनीची शाखा पुण्यासहि स्थापन केली आहे. तरी तिचा फायदा लोक घेतील, अशी उमेद आहे.

आह्मीं इंडिया इक्विटेबल इन्शुअरन्स् कंपनी लिमिटेडची मुंबई इलाख्याची चीफ एजन्सी घेतली आहे. हेड ऑफिस—कलकत्ता. प्रॉस्पेक्टस् व इतर माहिती मागविली असतां देण्यांत येईल. हुषार व प्रामाणिक एजंटस् पाहिजेत.

पुण्याचा पत्ता:—
बी. सखारामजी आणि कंपनी,
हाऊस ऍण्ड इस्टेट एजंटस्,
ईस्ट स्ट्रीट, पुणें.

प्रोप्रायटर,
वसंतराव सदाशिव धोत्रे.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि माहिती मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.



बेलभंडार.

चित्रकार—श्रीयुत एम्. व्ही. धुरंधर, मुंबई.]

'सत्यसंकल्पाचा दाता भगवान्। सर्व करी पूर्ण मनोरथ ॥'

माहे सप्टेंबर, १९१२ वर्ष १८ वें, पूर्वार्ध, भाग ३ रा.



मुरली.

कवि- 'गोविंदाग्रज.'

[प्रीति, भक्ति आणि मुक्ति या भावयोगाच्या तीन पायऱ्या आहेत प्रीतीच्या परमोच्च स्थितीवरच भक्तीचें पहिलें पाऊल उमटून, भक्तीच्या मोकळ्या भरारींत भक्तभगवंताचें पूर्णैक्य होत असतं, हें दाखविण्यासाठीं, स्त्रीहृदयाचें प्रेमळ रहस्य ओळखून भागवतकवीनें 'राधागौरव' कृष्णपरमात्म्याममोर उभी केलेली आहे. जगाच्या भूतकाळात, भोळ्याभाबड्या भक्ति-प्रीतीच्या सुयोगाचें इतकें ठसक चित्र याव्यतिरिक्त इतरत्र सापडणार नाहीं. म्हणून या गीतात भक्तजीवात्मा राधारूपानें दाखवून प्रीतिभक्तीच्या बदल्या सीमारेषेवर त्याची स्थापना केली आहे. मनुष्याच्या आयुष्यात असा एक काळ एकदातरी येतोच, कीं, ज्या वेळीं ईश्वराचें अस्तित्व **भावपूर्ण हृदयाला पटतें** आणि तेव्हा मात्र, **बुद्धिप्रधान मस्तकाचें समाधान** करण्यासाठीं तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षात्काराची—प्रत्युत्तराची याचना करीत असतो. हें दैवी प्रत्युत्तर त्या योग्य वेळीं मिळालें नाहीं म्हणजे मानव मनुष्य पुन्हां भोंवऱ्यात गुरफटतो. या गाण्यात अशा ईश्वरी उत्तराला 'मुरलीध्वनि' कल्पून त्यासाठीं झुरणाऱ्या राधेच्या पांच चढत्या स्थिति (कडवीं १४।१८।२१।३२।३७) दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'गोविंदाग्रज.']

ही एक आस मनिं उरलि ॥ कन्हय्या ! वजाव वजाव मुरली ! ॥ ध्रु० ॥
जरि फुटले दोन्ही कान ॥ नच राही मूक तहान ॥
तिळभरही नुरलें भान ॥ वघ वृत्ति वृत्तिमधिं मुरलि ॥ कन्हय्या ! वजाव० १
का गाणें मजला व्हावे ॥ चित्तासहि नाहीं ठावें ॥
दृष्टीला केविं दिसावें ॥ मम आस नसे परि पुरलि ॥ कन्हय्या ! वजाव० ॥ २
मी अगदीं भोळी राधा । तू माधवजी नच साधा ॥
मोहनी करी सुखबाधा ॥ तुज दासी विनवुनि झुरलि ॥ कन्हय्या ! वजाव० ॥ ३
चादणें चहुंकडे खुललें ॥ फत्तरही सारे फुलले ॥
आनदें विश्वहि झुललें ॥ स्फूर्तीच त्यात तव शिरलि ॥ कन्हय्या ! वजाव० ॥ ४

तीनेंच शब्द मम निघती ॥ जग फिरुनि, फिरुनि मनिं रिघती ॥
मज आतां दुसरी न गति ॥ जगतीच सारि जणुं जिरलि ॥ कन्हय्या ! व० ॥५

अणुरेणुहि देहीं सैर ॥ भिन्नता विसरली वैर ॥
अब नंदलाल ! कर खैर ॥ प्रेमाची दुनिया उरलि ॥ कन्हय्या ! बनाव० ॥६

बुद्धीचा तुटला धीर ॥ आशामय होय शरीर ॥
जलिं बुडे जलधिचें तीर ॥ बघ, बघतां दृष्टिहि विरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ७

कधुं काय, काय मज वाटे ॥ आनंद मात्र मनिं दाटे ॥
तरुशिरीं बीज उफराटें ॥ शून्यांत परार्धे भरलिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ८

जन्माचें झालें चीज ॥ कायमची मेली नीज ॥
विश्वाचें गवसे बीज ॥ चिद्वृत्ति त्यांत अवतरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ९

मायेची मेली विजली ॥ परि खन्या जलीं ती विझली ॥
तीव्रता तियेची थिजली ॥ सुकलेलीं विश्वें भिजलिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥१०

कोसळति सरीवर सरी ॥ लहरीवर उठती लहरी ॥
अश्रूंची गरदी भारी ॥ अवकाशें तुडुंब सगळिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥११

पुष्पाविण येई वास ॥ वान्याविण चाले श्वास ! ॥
हर्षाविण आतां हास ॥ मरणाविण सुटका झालि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥१२

ब्रह्मगोल त्वन्मय झाला ॥ चहुंकडेच मुरलीवाला ॥
त्वद्रूप गोपिकाबाला ॥ मी मला शून्य या कालिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १३

सांवळ्या ! यशोदाबाळा ! ॥ बंधाला पडला आळा ॥
सैराचा वाढे चाळा ॥ बावरी राधिका बनलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥१४

किति करूं कन्हय्या ! धांवा ॥ गा, नाच, वाजवीं पांवा ॥
त्यांतच हा जीव विरावा ॥ यावांचुनि इच्छा नुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥१५

एकेक ऐकुनी सूर ॥ दुःखाचा हो जरि चूर ॥
सारखी तरी हुरहूर ॥ न कळे ही लागे कसलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥१६

तूं मनांतला चंडोल ॥ मग माझ्या मनिंचे बोल ॥
जरि हृदयीं लपले खोल ॥ तरि खोल हृदय या कालिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥१७

बोल बोल तव विनमोल ॥ जीवाचें देइन मोल ॥
परि बोल एकदां बोल ॥ नातरी राधिका मुकलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥१८

फिर विश्वाचा हा गोल ॥ सांभाळुनि माझा तोल ॥
प्रेमाचा धरुनी सोल ॥ वघ मागुनि राधा आलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥१९

मुरलीची प्यालें भांग ॥ घडिघडी थरारे अंग ॥
या लहरि उठति कां सांग ॥ आनंदवृत्ति पाझरलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥२०

उलगडति पीळ हृदयाचे ॥ जणुं सुटति बंध देहाचे ॥
कीं जीव देहभर नाचे ॥ कुणिकडे राधिका भकलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥२१

ही लहर अशा देहाची ॥ हालचाल आनंदाची ॥
चेतनाच कीं जीवाची ॥ तुज भेटाया जणुं आलि ॥ कन्हय्या ! ब० ॥२२

तिजमुळें होउनी दंग ॥ वाऱ्यांत तरंगे अंग ॥
अणुअणुही होति दुभंग ॥ त्यांमाजि नादवीं मुरलि ॥ कन्हय्या !बजाव०॥२३

हृदयाचे ठोके पडती ॥ अवकाश त्यांत जे उरती ॥
करि मुरलिरवाची भरती ॥ मग एकच धडकी सगळि ॥ कन्हय्या ! ब०॥२४

मुरलीचा मंजुळ नाद ॥ हृदयांत खुलवि पडसाद ॥
मम जीवाची ही साद ॥ तुज हांका मारित सुटलि ॥ कन्हय्या ! ब० ॥२५

सारखा मुरलि वाजीव ॥ अणुअणुसि देहिं दे जीव ॥
त्यांमाजि नाद गाजीव ॥ हृदयाचे पडदे उकलिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥२६

जीवाच्या कमळा मुलवीं ॥ निजगुंजारविं त्या डुलवीं ॥
पाकळी पाकळी खुलवीं ॥ डुलवीं त्या पाडुनि भुरळि ॥ कन्हय्या ! ब० ॥२७

कृष्णजी ! त्यांत तूं भृंग ॥ त्यांतच रे होई गुंग ॥
गुंजारव करिं उत्तुंग ॥ ही मोहरात्र ओसरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥२८

चांदणें खुले दिलरंगीं ॥ हो एक नादरसरंगीं ॥
पोहत मी खैर तरंगीं ॥ वघ शुद्धबुद्ध ममहरलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥२९

या रसीं देहकण न्हाले ॥ जो तो निजनादीं डोले ॥
क्षणभरांत सारे फुलले ॥ वघ फुलें तयांचीं झालिं ॥ कन्हय्या ! ब० ॥३०

करुनि त्या फुलांचा झेला ॥ जीवाचा छेलछबेला ॥
नटवीन कधीं अलबेला ॥ झेला मज, आलें जवळिं ॥ कन्हय्या !बजाव० ॥३१

शृंगाररसानें नटली ॥ तुज राधा रमवूं झटली ॥
जन्मांची ओळख पटली ॥ कृष्णांत राधिका रमलि ॥ कन्हय्या !ब०॥ ३२

वांकड्या अधरिं हा पांवा ॥ वांकडाच डोळा डावा ॥
किति वेळ असाच पहावा ॥ अव खेल करो वनमालि ! ॥ कन्हय्या ! ब०॥३३

श्वासें मज हृदयीं भरवी ॥ नादें कीं ओढुनि नेई ॥
चुंबनेंच कीं मज बनवी ॥ तव ओंठावरली लालि ॥ कन्हय्या ! बजाव०॥३४

दृढ आलिंगन दे अथवा ॥ अवकाश न त्यांत असावा ॥
एकरूप जीवाभावां ॥ तव देहिं देह मम जिरविं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥३५

वघ आतां घटका भरली ॥ बोलाची बोली सरली ॥
जीवाची भाषा हरली ॥ ठायींच वृत्तिही हरलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥३६

जीवाचा पंची प्यारा ॥ मज आतां दिससी न्यारा ॥
मुरलीचा पिउनी वारा ॥ चहुंकडेच राधा झुकलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥३७

उरलें न शीत वा उष्ण ॥ कांहीं न शुभ्र वा कृष्ण ॥
एकरूप राधाकृष्ण ॥ जयनाद गात ही मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥३८

चहुंकडेच आतां शांत ॥ विश्व शांत आत्मा शांत ॥
कृष्ण शांत राधा शांत ॥ मुरलींत शांतता भरलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥३९

भोगुनी तापमय उष्णा ॥ मुरलिची लागतां तृष्णा ॥
जग गाइल राधाकृष्णा ॥ ही साक्ष मनोमन मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥४०

ही अखंड मुरली वाजे ॥ सर्वांच्या हृदयीं गाजे ॥
मग कोण वदाया लाजे ॥ कीं धन्य धन्य ही मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥४१


त्या नादरसाचे प्याले ॥ मनिं 'गोविंदाग्रज' प्याले ॥
शाहीर मुरलिचे बनले ॥ मग गानिं वाजविति मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव०॥४२





" गोधनीं बहु पुढें नच जावें । ठाय एकचि धरूनि धिजावें ॥
वाजवी श्रवणीं जो निजपांवा । कृष्ण तोचि हृदयांत जपावा ॥ "

चित्रकार—श्रीयुत अ. म. माळी, मुंबई.]



या कादंबरीच्या मागील प्रकरणांचा सारांश.—(१) मंदाकिनीच्या तीरावरील एकान्त वनांत एक तरुणी एका दोन वर्षांच्या बालिकेस एका प्रौढ योग्याच्या स्वाधीन करते. (२) पांडोबातात्यांच्या शाळेतील मुलांच्या चेष्टा. गदाधर फरारी हंबीराच्या शोधास जातो. (३) नानासाहेब जहागीरदारांच्या बागेंत हंबीर, शारदा व तिच्या मैत्रिणी यांच्या बाल्यलीला. शारदेला तिच्या मैत्रिणींनीं पुष्पालंकारांनीं सजविल्यावर त्यांच्या आग्रहानें हंबीर तिच्या गळ्यांत हार घालीत असतां तो गळ्यांत न पडतां चुकून तिच्या पायांवर पडतो. (४) नानासाहेबांची राजधानी कुंदपुर.

प्रकरण पांचवें.

नानासाहेबांवरील कलंक.

गेल्याच्या मागील प्रकरणांत वाचकांनां जिचा आह्मीं अल्प परिचय करून दिला आहे, ती आमच्या कादंबरीची नायिका शारदा, ही कुंदपुरचे जहागिरदार नानासाहेब धोरपडे, यांची एकुलती एक कन्या होय. शारदा एका श्रीमंत जहागीरदार सरदाराची मुलगी, तेव्हां ती महाभाग्यशाली असेलच, अशी साधारणतः वाचकांची कल्पना झाली असेल—आणि ती कल्पना सत्यापासून फारशी दूरहि नाहीं, असें आह्माला झणतां येईल—पण—या विधानांत एक लहानसा 'पण' आहे.

आमची भाग्यशाली नायिका इतर सर्व बाबींत दैवाच्या कितीहि मर्जीतली असली, अगदीं लहानपणापासून ती कितीहि श्रीमंतीच्या सुखसोहाळ्यांत वाढली असली, कितीहि दासदासी तिच्या तैनातींत हजर असल्या, पृथ्वीतल्या सर्व सुखांचा तिजवर जरी अविरत वर्षाव होत असला, तरी एका महत्त्वाच्या बाबतींत ती पूर्ण अभागी होती! एकाद्या गरीब अनाथी मुलीलाहि त्या बाबतींत जें अवर्णनीय सुख मिळत असतें, त्या सुखापासून शारदा अगदीं लहानपणापासून वंचित झाली होती. शारदा दोन वर्षांची होते न होते तों त्या अर्भकाला व आपल्या प्रियपतीला दुःखार्णवांत लोटून सकवारबाई-नानासाहेबांच्या प्रिय पत्नी-स्वर्गवासी झाल्या. सकवारबाई झणजे कोमल फूल. पहिल्यापासून त्यांची प्रकृति अतिशय नाजूक. शारदेच्या अवताराच्या प्रारंभालाच त्यांच्या अवताराची परिसमाप्ति व्हावयाची. परंतु धात्रीची कुशलता व परमेश्वराची कृपा, यांमुळें तो प्रसंग कसातरी निभावला; परंतु त्या वेळच्या प्रसूतिक्लेशांचा परिणाम सकवारबाईंवर फार झाला. तेव्हांपासून त्यांच्या प्रकृतीला जबरदस्त धका बसला. हळुहळू त्यांची प्रकृति अधिकाधिक क्षीण होत चालली. शेवटीं परमेश्वरी कृपा नसल्यामुळें राजवैद्यांचे सर्व प्रयत्न विफल झाले! नानासाहेबांनीं आपल्या प्रिय अर्धांगीच्या प्राणरक्षणाविषयीं शिकस्तीचे प्रयत्न केले. पैसा व श्रम यांकडे बिलकूल पाहिलें नाहीं; परंतु परमेश्वराच्या इच्छेपुढें मानवी प्रयत्नांचें काय चालणार? सकवारबाईंनीं वैद्यांच्या आटोकाट प्रयत्नांमुळें कशींतरी दोन वर्षे शिकस्तीनें काढलीं व वर सांगितल्याप्रमाणें आपल्या प्राणप्रिय पतीला व कन्येला विरहांत लोटून त्या स्वर्गाला निघून गेल्या.

सकवारबाई परलोकवासी झाल्याला आमच्या कथानकाच्या आरंभकालीं सरासरी आठ साडेआठ वर्षे झालीं होतीं. त्यांच्या पाठीमागें नानासाहेबच शारदेला माता व पिता या उभयतांच्या ठिकाणीं होते. सकवारबाईंच्या ठिकाणीं त्यांचें जें निःसीम प्रेम होतें, त्याचा सर्व ओघ आतां त्यांच्या मातृहीन कन्येकडे वळला. शारदा झणजे नानासाहेबांनां आपलें दुसरें हृदयच वाटूं लागली. कन्येवरील त्यांचें प्रेम केवळ अवर्णनीय होतें. पित्याचें निःसीम प्रेम व अतुलनीय स्नेह या उभयगुणांचा नानासाहेब झणजे मूर्तिमंत अवतार होते. शारदेची माता परलोकवासी झाल्यापासून आज आठ वर्षे शारदा अशा मधुर पितृप्रेमाच्या छायेखालीं वाढली होती. परंतु हाय! मातृप्रेम तें मातृप्रेम! पितृप्रेम कितीहि उच्च दर्जाचें असलें, तरी त्याला स्वर्गीय मातृप्रेमाची सर कशी येणार? अशा दिव्य मातृप्रेमाला शारदा बालपणापासून आंचवली होती!

नानासाहेबांची सकवारबाईवर अत्यंत प्रीति होती, ही गोष्ट आह्मी वाचकांस येथें मुद्दाम सांगणें ह्मणजे त्यांच्या तर्कशक्तीस कमी लेखण्यासारखें होईल. ज्याचें आपल्या कन्येवर इतकें निरतिशय प्रेम, त्याचें आपल्या पत्नीवर किती विलक्षण प्रेम असेल, याची वाचकांनां सहज कल्पना होण्यासारखी आहे. आपल्या सद्गुणी, रूपशाली, समानशील, प्रिय अर्धांगीच्या मृत्यूनें नानासाहेबांवर केवढा भयंकर व असह्य दुःखांचा डोंगर कोसळला असेल, याची यथार्थ कल्पना ज्यांच्यावर दैवाच्या निष्ठुर विलसितामुळें तसा प्रसंग आला असेल, त्या अभागी लोकांनांच होईल. पत्नीच्या मृत्यूनें त्यांनां सर्व जग शून्य वाटूं लागलें. कोणत्याहि विषयांत त्यांनां गोडी लागेना. कोणत्याहि गोष्टींत त्यांचें मन रमेना ! सारा वेळ मृतपत्नीचा ध्यास. तिच्या गुणरूपचिंतनांतच त्यांनां दुःखांत सुख वाटूं लागलें. आपली पत्नी स्वर्गलोकीं किती सौख्यांत असेल, या एकाच गोष्टीच्या विचारानें त्यांच्या तप्त हृदयाला शांति वाटूं लागली. अवशिष्ट जीवनयात्रा कशीतरी कंठून आपण जेव्हां स्वर्गी जाऊं, त्या वेळीं आपल्या प्रियतमेशीं आपलें अगदी अक्षय्य मीलन होईल; दुष्ट मृत्यूला मग आपणां उभयतांचा कधींहि वियोग करतां यावयाचा नाहीं; स्वर्गलोकीं दुःख, विरह, यातना वगैरे उपाधि आपणांला शिवणारहि नाहींत; अनंत काल आपण एकमेकांच्या संगमसुखांत घालवूं, वगैरे विचारलहरी नानासाहेबांच्या हृदयसागरावर उठूं लागल्या, ह्मणजे त्यांनां दुःखांतहि अत्यंत सुख वाटत असे.

नानासाहेब फार विचारी पुरुष होते. प्रिय पत्नीच्या निधनानें त्यांनां अपार दुःख झालें हें खरें, परंतु त्या दुःखांतच चूर राहून जहागिरीच्या कारभारांत त्यांनीं ढिलाई होऊं दिली नाहीं. या वेळीं महत्त्वाकांक्षी, दुष्टजनांनां आपल्या कारभारांत ढवळाढवळ करून तळिराम गार करण्यास चांगली संधि सांपडेल, असा पोक्त विचार करून, नानासाहेब हृदयांतील तीव्र शोकाचा शक्य तो निरोध करून जहागिरीचा कारभार पाहूं लागले. पत्नीनिधनाच्या शोकानें ते गाफील राहिले नाहींत.

सकवारबाईनां परलोवासी होऊन दोनतीन दिवस झाले नाहींत, तों आपणावर दुसरेंच एक भयंकर संकट वेगानें चाल करून येत आहे, असें नानासाहेबांनां आढळून आलें. आपला समाज प्रसंगीं किती निर्घृण होऊं शकतो, याचें प्रत्यंतर त्यांनां लवकरच पहावयास सांपडलें. हृदय हा पदार्थ काय आहे, याची समाजाला कल्पनाहि नसते; शुद्ध, विमल प्रेम ह्मणजे काय, याची त्याला ओळखहि नसते! या गोष्टींची साक्ष नानासाहेबांनां सकवारबाईंच्या सुतकांतच हळुहळू पटूं लागली. सकवारबाईंच्या चितेचा अग्निहि पुरता शांत झाला नसेल, त्यांची पवित्र रक्षा सरस्वतीनदीच्या पवित्र जलाशीं एकरूप झाली नसेल, तोंच द्वितीयदारपरिग्रह करण्याविषयींच्या कुजबुजीच्या सूचना नानासाहेबांच्या आप्तमित्रांकडून त्यांनां हळुहळू होऊं लागल्या ! कोणी आडून आडून सूचना करूं लागले, तर कोणी उघडपणें नानासाहेबांनां स्पष्ट सांगू लागले. नानासाहेबांच्या हृदयाला या निर्घृण प्रस्तावानें अनंत वृश्चिकदंशांच्या यातना होत; परंतु ते विलक्षण शांत प्रकृतीचे असल्यामुळें मनाच्या संतापाकडे दुर्लक्ष्य करून ते कोणालाहि वाचेनें दुखवीत नसत. द्वितीय विवाह न करण्याबद्दल त्यांचा दृढ निश्चय झाला होता. त्याच्या केवळ कल्पनेनेंच त्यांचें हृदय थरारत असे. आपलें निधन झालें असतां आपली अर्धांगी ज्या संन्यस्तवृत्तीनें राहिली असती, त्याच वृत्तीनें, पत्नी मृत झाली असतां पुरुषानें कां राहूं नये, हें त्यांनां कळेना व द्वितीयदारपरिग्रह करण्याविषयीं जी आप्तेष्ट मंडळी त्यांनां इतका आग्रह करीत होती, त्यांनाहि तें सयुक्तिक रीतीनें सांगतां येईना! 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' किंवा "आह्मी पुरुष आहों, आह्मांला उजळ माथ्यानें वाटेल तें करतां येईल; स्त्रियांची व आमची कोणत्याहि बाबतींत बरोबरी कशी होणार?" या ठराविक मुद्यांशिवाय दुसरा जोरदार असा मुद्दाहि त्यांनां नानासाहेबांपुढें ठेवतां येईना.

आप्तमित्र व आश्रितवर्ग यांनीं पुनः पुनः कितीहि आग्रह केला तरी नानासाहेब आपल्या दृढ व्रतापासून तिळमात्र ढळले नाहींत. सकवारबाईंच्या मृत्यूला महिना झाला, दोन महिने झाले; नानासाहेबांच्या आप्तेष्टांची दुसरें लग्न करण्याबद्दल त्यांच्यामागें सारखी टोंचणी सुरूच होती. त्यांच्या जागीं दुसरा एकादा कोणी असता तर त्यानें आपल्या मागची ही पिरपिर केव्हांच नाहींशी करून टाकली असती. त्यांच्या टोंचणीप्रमाणें त्यानें एक स्वतःचें लग्न तरी करून घेतलें असतें, किंवा तो तितकाच दृढ

निश्चयाचा असता तर निदान दडपशाहीनें तरी त्यानें सर्वांस गप्प बसवून आपल्या मागची पिरपीर कायमची नाहींशी केली असती; परंतु आमचे नानासाहेब खरोखरच विलक्षण प्रकृतीचे मनुष्य! द्वितीयदारपरिग्रह करण्याच्या आपल्या दृढ निश्चयांत ते यत्किंचितहि ढिलाई दाखवीनात, किंवा आपल्या अधिकाराच्या जोरावर 'इतरेजनां'ची आपल्या मागची पिरपीरहि बंद करीनात! नानासाहेबांच्या स्वभावाचा हा फायदा घेऊन त्या मंडळीनेंहि आपलें तुणतुणें त्यांच्या मागें सुरूच ठेविलें होतें. अशा स्थितींत तीनचार महिने गेले.

नानासाहेबांच्या मनावर पत्नीच्या निधनाचा फार परिणाम झाला आहे खरा, परंतु तो कालान्तरानें कमी होऊं लागून ते आपल्या प्रस्तावाला कबूल होतील, अशी त्यांच्या आप्तमित्रांनां व आश्रितवर्गाला फार आशा होती. पहिल्या तीनचार महिन्यांच्या मोहिमेंत जरी आपणांला यश आलें नाहीं, तरी आणखी कांहीं दिवस गेल्यावर नानासाहेबांचा दुःखावेग शांत होऊन ते द्वितीय विवाह करावयास तयार होतील, अशी त्यांची खात्री होती. परंतु तीहि व्यर्थ होणार, अशीं अलीकडे स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. सकवारबाईच्या मृत्यूला जवळ जवळ एक वर्ष झालें, त्यांचें वर्षश्राद्ध वगैरे धार्मिक विधिहि मोठ्या थाटानें व नानासाहेबांसारख्या जहागिरदारांच्या इतमामास शोभतील अशा रीतीनें उरकण्यांत आले; परंतु नानासाहेबांचा द्वितीयदारपरिग्रह न करण्याचा दृढ पहिल्या दिवशीं होता तसाच एक वर्षाचा अवधि गेला तरीहि कायम आहे, असें वरील 'इतरेजनां'नां आढळून आलें व या गोष्टीमुळें त्यांनां अपार दुःख झालें. नानासाहेबांनां द्वितीय विवाह करावयाला इतका विलक्षण आग्रह करण्यांत या मंडळींचा कांहीं आपमतलबी हेतु होता, असें नाहीं. यांत कदाचित् कांहीं अपवादात्मक मंडळीहि असेल—नाहीं असें नाहीं; परंतु पत्नीनिधनानें उघड्या पडलेल्या आपल्या धन्याचा सर्व जन्म शून्य होऊं नये, त्यानें थोडेंबहुत तरी शांतिसौख्यांत नांदावें, या हेतूनेंच या मंडळीपैकीं बहुतेकांचा त्यांनां इतका निकडीचा आग्रह चालला होता. परंतु त्यांची सुखशांतीची कल्पना नानासाहेबांच्या कल्पनेहून अत्यंत भिन्न होती. द्वितीयभार्यापरिग्रह न करतां आपल्या परलोकवासी पत्नीच्या रूपगुणांचें अविरत चिंतन करणें, ती परलोकीं मोठ्या सौख्यांत असेल, इहजीवनाचा अंत झाल्यावर स्वर्गलोकीं आपलें तिच्याशीं अक्षय्य मीलन होईल, या भावना सदासर्वदा उत्कटरूपानें अन्तःकरणांत वागविणें, आपल्या प्रियतमेची दुसरी प्रतिमाच अशी आपली सद्गुणशालिनी कन्या शारदा, हिच्यावरच आपल्या हृदयांतील सर्व प्रेमाचा वर्षाव करणें, या गोष्टींतच आपल्या सर्व जन्माचें सौख्य व शांति सांठून राहिलीं आहेत; दुसरा विवाह करण्यानें मात्र आपणाला अशांतीच्या व दुःखाच्या इंगळ्या सर्व जन्मभर लागून रहातील, अशी नानासाहेबांची 'सुखशांती'ची कल्पना होती. या दोन परस्परविरोधी कल्पनांची एकवाक्यता होणें अर्थातच शक्य नव्हतें.

एक वर्षाच्या दीर्घ अवधीतहि नानासाहेब आपल्या दृढ निश्चयापासून ढळले नाहींत, असें पाहून त्यांचे आप्तेष्ट व आश्रितवर्ग यांच्या आशा हळुहळू नष्ट होऊं लागल्या. इतर बाबतींत ज्याप्रमाणें नानासाहेबांची श्रीरामचंद्राशीं तुलना होत असे, त्याप्रमाणेंच या बाबतींतहि ते आपल्या जीवनान्तापर्यंत रामचंद्राप्रमाणें एकपत्नीच राहणार, अशी हळुहळू त्यांची व नानासाहेबांच्या प्रजेची खात्री होऊं लागली. सकवारबाई निधन पावल्या त्या वेळीं कुंदपुरच्या सर्व लोकांनां आपली प्रत्यक्ष मातुःश्री जावी, त्याप्रमाणें अपार दुःख झालें. आणि असें व्हावें हें अगदीं साहजिक होतें. कारण, आपल्या प्रजेवर सकवारबाईचें पोटच्या मुलांप्रमाणें अत्यंत प्रेम असे. त्यांच्या मरणानें मृतप्राय झालेले जहागीरदारसाहेब पुनर्दारपरिग्रह करून आपणांला दुसरी माता आणून देतील व आपल्या जीवनांत दिव्य अमृताचा प्रवाह आणून सोडतील, अशी त्यांनां फार आशा होती. परंतु त्या आशेची निराशा करावयास नानासाहेबांनीं मनांत यत्किंचितहि किंतु कसा आणला नाहीं, हें वाचकांनां ठाऊकच आहे.

हळुहळू नानासाहेबांच्या दृढ निश्चयाविषयीं कुंदपुर व त्याच्या आसपासचे गांव, यांतील लोकांची खात्री झाल्यावर त्यांनीं नानासाहेबांचें मन वळविण्याचा उपक्रमहि सोडून दिला. ते म्हणत "नानासाहेबांच्या अंगीं एकूणएक सद्गुण वास करीत आहेत. सुस्वभाव आहे, दानशीलता आहे; नम्रता, गुणग्राहकता वगैरे असंख्य गुण जणूंकाय त्यांच्यावर अगदीं भाळून गेले आहेत.

शोधूं जातां एक मात्र दुर्गुण त्यांच्या अंगीं विशेषेंकरून वास करीत आहे. तो हाच, कीं, एकदा नानासाहेबांनीं आपल्या मनाशीं कसला संकल्प केला, कीं तो वज्रलेप! मग इकडची पृथ्वी तिकडे होईल, परंतु ते आपल्या संकल्पापासून तिळमात्र ढळायचे नाहींत. प्रत्यक्ष ब्रह्मदेव आला, तरी नानासाहेबांनां त्यांच्या निश्चयापासून परावृत्त करणें त्याला साध्य व्हावयाचें नाहीं! "

नानासाहेबांनीं पुनः विवाह करून सुखी व्हावें, ह्मणून सर्वांनीं त्यांचें मन वळविण्याविषयीं शिकस्तीचे प्रयत्न करून पाहिले–परंतु आश्चर्याची गोष्ट ही, कीं, त्यांचे कुलपुरोहित नीलकंठ दीक्षित यांनीं या विषया-संबंधानें त्यांच्यापाशीं एक शब्दहि कधीं काढला नाहीं! दीक्षितांचें नानासाहेबांवर इतकें विलक्षण वजन होतें, कीं, त्यांनीं त्यांजपाशीं कोणता शब्द टाकण्याचा अवकाश, त्याप्रमाणें झालेंच ह्मणून समजावें! द्वितीय-दारपरिग्रहाच्या बाबतींत दीक्षितांनीं नानासाहेबांपाशीं शब्द टाकला असता, तर कदाचित् त्यांनां यश आलें असतें, असा पुष्कळांचा समज होता; परंतु कांहींहि कारण असो, नीलकंठ दीक्षितांनीं नानासाहेबांपाशीं या बाबतींत एक चकार शब्दहि काढला नाहीं, हें खरें!

नीलकंठ दीक्षितांकडून नानासाहेबांनां द्वितीय विवाहासंबंधानें शब्द टाकवावा, अशी कल्पना मात्र पुष्कळांच्या डोक्यांत आली होती. सकवारबाईंचें वर्षश्राद्ध झालें, तरीहि नानासाहेब दुसऱ्या विवाहाची गोष्ट मनावर घेत नाहींत असें पाहून त्यांच्या आश्रित-वर्गांपैकीं मुख्य मुख्य शिष्ट-विशिष्ट लोक दीक्षितांकडे जाऊन त्यांनां ह्मणाले " गुरुमहाराज! आतां आह्मां सर्वांची भिस्त केवळ आपणावर आहे. आमच्या परम-पूज्य यजमानांचें सर्व जीवन स्मशानवत् व्हावें ही कल्पनाहि आह्मांला सहन होत नाहीं. नानासाहेबांनीं पुनः विवाह करून, पुत्रपौत्रमुखदर्शनानें धन्य व्हावें व आह्मीं त्यांनां चिरकाल सुखी पहावें, एवढीच आमची इच्छा. आह्मां सर्वांचे या विषयींचे प्रयत्न थकले आहेत. आपण जर नानासाहेबांनां नीट समजावून सांगाल, तर आपणाला या बाबतींत पूर्ण यश येईल, अशी आमची खात्री आहे. आपण नानासाहेबांपाशीं अगदीं आग्रह धरा, ह्मणजे काम फत्ते झालेंच पाहिजे. आपल्या आज्ञेची त्यांच्याकडून कधीं अवहेलना होणें शक्य आहे का? बाकी कारणें कांहींहि असोत, निदान पुत्रप्राप्तीसाठीं तरी यजमानसाहेबांनीं पुनः विवाह करणें अवश्य आहे. निरनिराळ्या धर्मग्रंथांतून वचनें काढून आपण त्यांनां हें समजावून सांगा. ते स्वर्गाला गेल्यानंतर जहागिरीला वारस कोण? त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्याला पिंडदान देऊन कोण तृप्त करणार? घरें, त्यांचें वय काय साठपाऊणशें झालें आहे, तर त्यांनीं पुनः लग्न करावयाचें नाहीं? वय सारें चाळीशीच्या आंतबाहेर. या वयांत पुष्कळांचे प्रथम विवाहसुद्धां होत नाहींत. नानासाहेबांनां आज काय कमी आहे ह्मणून त्यांनीं पुनः लग्न करायचें नाहीं? एकाद्या राजासारखी गजांत लक्ष्मी–तिचा उपभोग घ्यायला तरी कोणी मालकीण हवी ना? माईसाहेब भरल्या चुड्यांनीं गेल्या–त्यांनीं जिकलें–त्यांचें सोनें झालें. त्यांच्यासाठीं यजमानसाहेब शोक किती दिवस करणार? किती शोक केला ह्मणून त्या का कधीं परत येणार आहेत? गुरुमहाराज! आपण खुद्द मनावर घेतल्याखेरीज ही गोष्ट आतां होणें शक्य नाहीं. यजमानसाहेबांनां अन् त्यांच्यावरोवर त्यांच्या अन्नावर वाढलेल्या आह्मां सर्वांनां सुखी करणें केवळ आपणा-कडे आहे. "

नीलकंठ दीक्षितांनीं या लांबलचक व्याख्यानावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. ते या मंडळीकडे पाहून किंचित् हंसले मात्र.

आलेल्या मंडळीला दीक्षितांच्या या वर्तनाचा अर्थ कळेना. त्यांनीं पुनः नम्रपणें त्यांना तीच विनंति केली.

दीक्षित या वेळीं ह्मणाले " यजमानसाहेबांचा हा अक्षम्य दोष आहे खरा; परंतु मी ह्मणतों—

'एकोहि दोषो गुणसन्निपाते
निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः'

या बाबतींत यजमानांनां मी कांहीं सांगणार नाहीं, यांत कायतें आपण समजा—"

याउपर दीक्षितांनां मंडळीनीं आग्रह केला नाहीं. आपल्या कर्तव्यसाधनाच्या संकल्पापासून कोणाच्याहि आग्रहानें नानासाहेब कधीं ढळावयाचे नाहींत, असा कलंक नानासाहेबांच्या विमल कीर्तीला या वेळेपासून अक्षय्य लागला!

आमचा जातिभेद.

कांही महाराष्ट्रीय पुढाऱ्यांचीं मतें.

[१४]

[श्रीयुत प्रिन्सिपाल रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे, एम्. ए., बी. एस् सी. फर्ग्युसन कॉलेज, पुणें.]

ज्या ज्या समाजांत मनुष्यमात्रांमध्यें नैसर्गिक कारणांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि आनुषंगिक कारणांमुळें भेद पाडिलेले असतात, तो तो समाज तेवढ्या बाबींपुरता तरी खऱ्या तत्त्वांवर रचलेला नाहीं, असें समजावें. खरी सुधारणा, असले सर्व भेद नाहींसे करून समाजाचा पाया पूर्ण समतेच्या तत्त्वावर आणणें यांतच आहे. प्रत्येक माणसास त्याच्या नैसर्गिक गुणांचा विकास करून घेण्यास वाटेल तेवढी सवलत देणें हें सुधारणेचें ध्येय आहे. यामुळें जातिभेद, वर्णभेद धर्मभेद, स्त्रियांच्या वाटेंतील नैसर्गिक कारणांशिवाय दुसऱ्या कारणांमुळें उत्पन्न झालेल्या अडचणी, या सर्वांचा नाश करणें हेंच खरोखर सर्व सुधारकांचें कर्तव्य आहे. आमच्या देशामध्यें या सर्व प्रकारच्या विषमतांचा अगदीं कडकडीत अंमल सुरू आहे आणि जोंपर्यंत यामध्यें आळा पडणार नाहीं, तोंपर्यंत राष्ट्रोन्नतीबद्दलची आपली बडबड अगदीं वायफळ आहे! मनुष्यजातिशास्त्र (Ethnology) यासारख्या अनिश्चित शास्त्रांतल्या अनिश्चित तर्कांवर भिस्त ठेवून जातिभेदाचें समर्थन करणें हें शुद्ध वेडेपण आहे. हल्लींच्या काळांत कोणत्याहि मनुष्यास, नीतिबाह्य नाहीं अशा गोष्टी करितांना समाजानें हरकत करणें म्हणजे आपल्या मार्गांत आणखी धोंडे टाकणें होय. याकरितां जातिभेदाचें निर्मूलन करणें अगदीं अवश्य होय.

फर्ग्युसन कॉलेज पुणें, २३-६-१२.

---

[१५]

[श्रीयुत प्रिन्सिपाल दामोदर गणेश पाध्ये, एम्. ए., मुंबई.]

१. हिंदुस्थानांत येऊन घरालेल्या आर्यांच्या मनांत वर्णभेदाची कल्पना वर्णाच्या (रंगाच्या) भेदानें उत्पन्न झाली. आर्य गोरे होते. देशांतील पूर्वीचे रहिवासी-अनार्य-हे प्रायः काळेसांवळे होते. आर्य व अनार्य यांमध्यें अर्थातच प्रचंड कलह सुरू होऊन तो बहुत काल टिकला. शेवटीं आर्यांचा जय होऊन त्यांनीं अनार्यांचाही राष्ट्रीय समाजांत समावेश केला. आर्यांच्या समाजाचें वर्गीकरण प्रथमतः केवळ गुणकर्मानुसार होतें तेव्हां त्यांत अनार्यांचा समावेश प्रथमतः त्याच तत्त्वावर केला जाई. योग्यतेनुरूप अनार्यांचा क्षत्रियांत व ब्राह्मणांतहि समावेश होई, आणि दक्षिणेकडील पुष्कळ अनार्य ब्राह्मण व उत्तर व मध्य हिंदुस्थानांतील आर्य ब्राह्मण यांच्यांत पूर्वी घडून आलेलें एकीकरण अद्यापि कायम आहे. गुणकर्मानुसार झालेल्या वर्णभेदास प्रथमतः जातिभेदाचें स्वरूप नव्हतें. अन्नव्यवहार होताच, बेटीव्यवहार निषिद्ध मानला जात नसे, व एका वर्णांत जन्मलेल्या व्यक्तीस स्वपराक्रमानें वरिष्ठ वर्णांत प्रवेश करितां येत असे; परंतु उत्तरोत्तर-समाजांतील जोम व प्रागतिकपणा नाहींसा होत चालला व परंपरेचें प्राबल्य वाढलें तसतसें-जातिभेदगत तीन निर्बंध (अन्न व बेटीव्यवहाराची बंदी आणि जन्मानेंच निर्णीत होणारा वर्णभेद) प्रबल होऊन अनुल्लंघनीय झाले, व अनेक कारणांनीं चार वर्णांच्या अनेक जाति झाल्या व अजूनहि नव्या नव्या जाति होत आहेत. तेव्हां पहिल्या प्रश्नाचें उत्तर असें कीं चातुर्वर्ण्य आणि जातिभेद हीं एक नव्हेतच. चातुर्वर्ण्य गुणकर्मानुसार असे व त्याला जातिभेदाचे उपरिनिर्दिष्ट तीन निर्बंध लागू नव्हते. सांप्रत 'चातुर्वर्ण्य' लुप्तप्राय आहे. सध्यांचा जातिभेद कुलपरंपरेवर बसला आहे.

२. पूर्वीच्या आर्यांत-वेदकालीन आर्यांत प्रस्तुत नसलेला जातिभेद हिंदुधर्माचें महत्त्वाचें किंवा आवश्यक अंग होऊं शकणारच नाहीं. सांप्रतच्या हिंदुसमाजांत जातिभेद खिळलेला आहे खरा; पण

तो काढल्यास तेवढ्यानेंच हिंदुच नष्ट होऊं शकत नाहीं. जो जातिबहिष्कृत तो हिंदु-धर्मबहिष्कृत असलाच पाहिजे, अशीहि समजूत नाहीं. बहुसंख्याक बहिष्कृतांची नवी जात होऊन ती हिंदुधर्मांत समाविष्ट झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत.

३. जातिभेदानें कांहीं इष्ट गोष्टी साधल्या हें मान्य केलें पाहिजे. वरिष्ठ जातींनीं आपापले विशेष गुण त्या योगें राखिले, व प्रथम प्रथम वाढविले. राजकीय अवनति झाल्यावर देशास पादाक्रांत करणाऱ्या परकीय राज्यकर्त्यांचे हातून समाज पूर्णपणें विध्वस्त न होऊं देण्याचें श्रेय जातिभेदासच दिलें पाहिजे. परंतु प्रश्न १ चे उत्तरांत सांगितल्याप्रमाणें जातिभेद बळावून वज्रसम दृढ होण्यास मुख्य कारण समाजावर आलेली निर्जीवता व अप्रागतिकता हेंच झालें, व तशी अवनतीची स्थिति झाली नसती तर समाजाची वाताहात न होऊं देण्यास जातिभेदाचें साह्य घेण्याची आवश्यकताच उत्पन्न झाली नसती. शिवाय, जातिभेदानें वरिष्ठ जातींचे गुण कायम ठेवण्यास मदत केली, तर दुसऱ्या दिशेनें कनिष्ठ जातींचे अवगुण दृढ केले व त्यांच्या सुधारणेस प्रचंड प्रतिरोध आणून ठेवला. जातिभेदानें समाजांत दुही केली. एकराष्ट्रीय कल्पनेशीं जातिभेदाचा एकंदर विरोधच येतो. जातिभेद कायम आहे तोंपर्यंत हिंदुसमाज एक दिलानें व जुटीनें कोणतेंहि महत्कृत्य करूं शकेल, असें वाटत नाहीं.

४. ह्या प्रश्नाचें उत्तर वर दिलें आहे.

५. होय. एकाच समाजांत केवळ जन्मानेंच मनुष्य वरिष्ठ किंवा कनिष्ठ होतो, किंवा त्यांचा धंदा, राहणी व कर्तव्य आणि शिक्षणादि स्वोन्नतीचे मार्ग निर्णीत होतात, ही कल्पना प्रगतीच्या तत्त्वांशीं व उदात्त नीतिमत्तेशीं अगदीं विरोधी आहे.

मुंबई, २५-६-१९१२.

६. जातिभेद आहे तोंवर जातिमत्सर कमी अधिक प्रमाणानें राहणारच. वरिष्ठकनिष्ठत्वाची कल्पना जातिभेदाशीं खिळलेली आहे व तिच्या योगानें गर्व व मत्सर हीं पोषण पावणारच.

७. जातींतील पोटभेद मोडण्याचा क्रम सुकर होय; परंतु निरनिराळ्या जातींची एकी करण्याच्या प्रयत्नाचा अव्हेर करूं नये. मांसमत्स्याहार विवर्जन केल्यास दुसऱ्या मार्गानेंच लौकर जातिभेद विनष्ट होईलसें वाटतें. तसें न झाल्यास दोन कायमच्या जाति होणार. एक शाकाहारी यांची व दुसरी मत्स्यमांसाहारी यांची.

८. रोटीव्यवहार तर सर्वत्र प्रस्तुत झालाच पाहिजे. त्याला मांसमत्स्याहारविवर्जन अमलांत आणणें इष्ट आहे. बेटीव्यवहार सुरू होण्यास कालावधि लागणार. सध्यां त्यास कोणताहि प्रतिरोध नसावा.

९. जातिभेद मोडण्यास सुसता प्रयत्न नव्हे तर भगीरथप्रयत्न अवश्य आहे! केवळ परिस्थितीच्या जोरावर जी बंधनशिथिलता होईल तीस सुधारणा म्हणण्यापेक्षां वल्गुंखलता म्हणणें अधिक योग्य होईल.

१०. कोणत्या मार्गानें पुढें जावें हें सूत्रात्मक रीतीनें सांगणें कठीण आहे. एकदम जातिबंधनें तोडून टाकण्याचा मार्ग समाजदृष्टीनें सध्यां यशस्वी होईलसें दिसत नाहीं. कदाचित् परिणामीं आपल्या अधिक जाति मात्र अस्तित्वांत येतील.

निरनिराळ्या जातींतून जातिभेदास झुगारणाऱ्या ज्या ज्या म्हणून व्यक्ति येतील त्या सर्वांचा एक दिलाचा व हिंदुधर्माचें इतर रीतीनें अवलंबन करीत आहों असें प्राधान्येंकरून दाखविणारा समाज रचिला जाण्याची योग्य व्यवस्था प्रथमतः झाली पाहिजे, हें उघड आहे.

---

[१६]

[श्रीयुत माधवराव व्यंकटेश लेले, बी. ए., एल्. सी. ई., एक्झिक्यूटिव्ह इंजिनीयर, रायपुर.]

१. वर्णभेद व जातिभेद हे मनुष्यमात्र एकत्र राहूं लागल्यापासून मनुष्यस्वभावास अनुसरून निरनिराळ्या माणसांच्या किंवा माणसांच्या कुटुंबांच्या, स्थल, वर्ण, व्यवसाय, बल, बुद्धि आणि सांपत्तिक स्थिति, यांच्या अनुरोधानें निसर्गतः अस्तित्वांत आले. मूळचे हे दोन्ही भेद एकच प्रकारचे. पुढें पुढें असलेली मनुष्यस्थिति पाहून, तत्कालीन शहाण्या मानलेल्या लोकांनीं प्रथम त्याचें कांहीं यथार्थ व कांहीं अलंकारिक वर्णन केलें. तेंच पुढें कालांतरानें अनुज्ञात्मक मानलें जाऊं लागलें. मूळच्या चातुर्वर्ण्यापासून जाति व त्यांचे भेद

अस्तित्वांत आले. ते मूळचे गुणकर्मानुसारच मानीत होते, व पुढें कुलपरंपराहि त्यालाच अनुसरून राहात गेल्यानें, ते कुलपरंपरेनें मानले जाऊं लागले. आतां ते कुलपरंपरेनेंच मानले जातात. ते कसे मानावयाचे हा प्रश्नच नाहीं. कारण, त्या प्रश्नाच्या निकालाप्रमाणें ते इतउत्तर मानले जातील, असा संभव नाहीं.

२. अलीकडे जातिभेद हा हिंदुधर्माचें महत्त्वाचें व आवश्यक अंग मानला जात आहे. प्राचीन काळीं तो तसा नव्हता. निदान तितक्या जोरानें मानला जात नव्हता. आतांहि तो तसा मानला जाणें अवश्यच आहे, असें नाहीं.

३. ऐतिहासिक दृष्ट्या जातिभेदाचा समाजहितावर अनिष्ट परिणाम झालेला आहे किंवा कांहीं इष्ट परिणाम झालेला आहे, असें म्हणतां येत नाहीं. कांहीं कांहीं प्रसंगीं, क्वचित्स्थळीं, कांहीं विवक्षित जातींच्या किंवा पंथांच्या लोकांनीं, स्वार्थी दृष्टीनें, आपलें अधिक हित व इतर लोकांचें तितकें कमी हित करण्याचा प्रयत्न केल्याचीं उदाहरणें आहेत; पण त्याचा एकंदर हिंदुसमाजावर विशेष इष्टानिष्ट परिणाम घडलेला नाहीं. या गोष्टी नैसर्गिक मनुष्यधर्मांप्रमाणेंच होत आल्या, होताहेत, व होतील.

४. जातिभेद हिंदुसमाजांत दृढमूल होऊन आजपर्यंत टिकलेला दिसतो आहे. याचीं मुख्य कारणें, हिंदुसमाजांतील बहुतेक लोकांची पूर्वापार चालत आलेल्या गोष्टींवरील श्रद्धा, व्यावहारिक गोष्टींबद्दल विचार करून तदनुरूप इष्ट फेरफार नेटानें अमलांत आणण्याविषयीं निरुत्साहबुद्धि, व्यक्तिस्वातंत्र्य व राजकीय स्वातंत्र्य यांची उणीव, आणि वेदांतपर विचाराचा प्रादुर्भाव व त्यामुळें लोकांच्या मनावर 'आहे तेंच बरें' असें मानीत राहण्याचा झालेला संस्कार, इत्यादि असावींत, असें दिसतें.

५. नीट व्यवहारी व विचारी दृष्टीनें पाहिलें तर जातिभेद सामाजिक, नैतिक, औद्योगिक व राजकीय प्रगतीच्या आड आलेला आहे, किंवा यावा, किंवा येईल, असें नाहीं. जेथें जेथें या संबंधीं प्रगतीचा हा वेग सरा जोराचा व विशेष कळकळीचा होता, किंवा आहे, त्या ठिकाणीं हा जातिभेद त्याला मुळींच आड येत नाहीं, असें नेहमीं अनुभवास येत गेलें आहे.

६. जातिभेद कायम ठेवूनहि जातिमत्सर कमी करितां येईल. तो अगदी नाहींसा होणें किंवा करितां येणें, शक्य नाहीं. जातिभेद समूळ मोडला तरी दुसऱ्या कोणच्या तरी रूपानें-ख्रिस्ती व मुसलमान यांच्यामधील पंथमत्सराच्या रूपानें प्रगट होत जाऊन, कायम राहील.

७. मुख्य मुख्य जातींतील पोटभेदच मोडले जाणें कठिण आहे. ते कालांतरानें मोडले गेलेसे दिसले तरी अन्य नव्या नव्या पोटशाखांच्या द्वारानें, कमीजास्ती जोरानें, कायमच राहणार. मुख्य जातिभेद मोडला जाणें शक्य किंवा अवश्यहि नाहीं. त्यांच्यांत स्थित्यंतराच्या मानानें फरक मात्र होत जाईल. कारण, जे लोक यावद्दल चर्चा किंवा खटपट करीत असतात त्यांचा रोख, मुख्यतः हीन मानलेल्या जातींच्या लोकांमध्यें वरिष्ठ मानले गेलेल्या जातींच्या लोकांच्या अंगचे मानीव चांगले गुण उत्पन्न करून, त्यांनां वरिष्ठपणा आणून देण्याच्याऐवजीं, वरिष्ठ मानले गेलेल्या जातींच्या लोकांनीं त्या लोकांच्या बरोबरीला खालीं यावें, किंवा त्यांनां खालीं आणलें जावें, याकडे असतो व तो अर्थात्च अनिष्ट आहे.

८. रोटीव्यवहारामध्यें अलीकडे स्थित्यंतराच्या मानानें पुष्कळशा जातींतील बऱ्याच व्यक्ति चांगलाच फरक करूं लागल्या आहेत, व तो हळूहळू वाढतहि जाईल. पण तो बिलकुल एकंकार होईल किंवा नाहीं, याची शंकाच आहे. सुधारलेल्या मानले गेलेल्या युरोपीयन व अमेरिकन ख्रिस्ती लोकांमध्येंहि तो तसा एक झालेला अनुभवास येत नाहीं. या मानानें बेटीव्यवहार सरासर सर्व जातींमध्यें सुरू होणें इष्ट, किंवा शक्य आणि अवश्यहि नाहीं. विशिष्टगुणधर्मयुक्त व्यक्तींच्या संबंधानें, ही बेटीव्यवहाराची आडकाठी, प्राचीन ऋषिकाळांतहि नव्हती आणि ती आतांहि नाहीं. बाकी, त्याचे परिणाम कितपत इष्ट झाले होते, किंवा होत आहेत, अथवा होतील, हा प्रश्नच आहे.

९. जातिभेदामुळें येणाऱ्या नडी वस्तुस्थितीच्या मानानें, कालगतीनें, आपोआप पुष्कळशा नाहींशा होतील. त्याविषयीं विशेष प्रयत्न असा करावयास नको, आणि आजकाल करून फायदाहि होईलसें दिसत नाहीं.

१०. ज्यांनां जातिभेद अनिष्ट वाटतो, त्यांनीं आपल्या मनोधर्माप्रमाणें व विचाराप्रमाणें वागणें झटलें म्हणजे, जातिबंधनें पार तोडून मोकळें व्हावें, व सर्वांशीं राजपुरुषांपासून तों अंत्यजांशीं एक मार्गानें व मोकळेपणीं वागावें हा उत्तम मार्ग, व हें खरें

नीतिधैर्य. पण असें धैर्य दाखविण्याची ज्यांना सवड, संवय किंवा पात्रता नाहीं, त्यांनीं, त्यांना खुद्द जातिभेद अनिष्ट व अनवश्यक वाटत असला तरी निरुपायानें आपल्या कुटुंबाच्या किंवा ज्ञातिबांधवांच्या दृष्टीनें, होईल तेथवर, नांवें ठेवण्यास जागा राहणार नाहीं अशा बेतानें, हीं जातिबंधनें तोडीत जाण्याची तजवीज केली तरी चालेल, व त्याचा परिणामहि हलुहलू इष्ट व अधिक हितकर होईल.

गदवाल, रायचुर, २३-६-१२.

---

[१७]

[श्रीयुत डा. संतुजी रामजी लाड, 'सत्यशोधकसमाजा'चे एक पुढारी, ठाणें.]

१. वर्णभेदाची उत्पत्ति केव्हां व कशी झाली हें सांगणें कठीण आहे; परंतु ती वेदकालानंतर झाली असावी. चातुर्वर्ण्य व जातिभेद हीं एक नसतीं पाहिजेत. तीं व्यक्तीच्या गुणकर्मानुसार मानिलीं पाहिजेत, कुलपरंपरेनें मानतां कामा नये.

२. जातिभेदाला हिंदुधर्मानें महत्त्व देतां कामा नये; आणि तो हिंदुधर्माचें आवश्यक अंग आहे असें समजूं नये.

३. ऐतिहासिक दृष्ट्या जातिभेदाचा समाजहितावर अनिष्ट परिणाम झाला आहे. त्यामुळें सदाचारी वर्तन सर्वांस सारखें सुलभ होत नाहीं. परमार्थाकडे सर्वांचें सारखें लक्ष लागत नाहीं. कारण, एकाचा जन्म उच्च जातींत व दुसऱ्याचा जन्म नीच जातींत झालेला असतो. या कारणानें जातिभेदापासून समाधान राहत नाहीं. ज्या कालीं जातिभेद उपयोगांत आणिला, त्या कालची तशी स्थिति आज कायम नाहीं. हल्लीचा मनु बदलला आहे. देशामध्यें लोकसंख्या अनेक पटीनें वाढली आहे. त्याचप्रमाणें लोकांच्या गरजाहि वाढल्या आहेत. हिंदुस्थान देश दुष्काळ व दारिद्र्य यांचें माहेर-घर बनलें आहे. अत्यंत कष्ट करूनहि दुपारची पंचाईत, अशी लोकांची स्थिति झाली आहे. हल्लीं जिकडे पहावें तिकडे जीवनार्थ कलह चाललेला दिसतो. असा प्रकार झाल्याकारणानें वरिष्ठ म्हणवून घेणाऱ्या जातींचा ओढा अत्यंत नीच मानलेल्या चांभाराच्या धंद्यापर्यंत जाऊन पोंहचला आहे. त्यामुळें जातिभेद समाजास घातक झाला आहे.

४. कर्मविपाक:—उच्च नीच कुलांत जन्मास येण्याचें तत्त्व; या समजुतीप्रमाणें त्याचा जन्म उच्च जातींत झाला, तो पुण्यवान समजला जातो, आणि हें तो पूर्वपुण्याचें फळ समजतो. यामुळें हिंदुधर्माची व्यापकता समाजावर इतकी प्रबल झाली आहे, कीं, जणूं काय उच्च जातीला नीच जातीवर पगडा बसविण्याचा अधिकार त्यांनां उपजतच देवाकडून मिळालेला आहे, असें मानिलें जातें. अशी देवाकडून मिळालेली समजली जाणारी सत्ता किंवा अधिकार याच्याविरुद्ध कोण जाणार? हा देवाचा नियम मोडण्यास कोण धजणार? ह्या नियमबाह्य आचरण केल्यास त्या व्यक्तीस, त्याच्या कुटुंबास, जातीस, इतकेंच नव्हे पण त्याला त्याच्या सर्वस्वी जीविताच्या साधनालाहि मुकावें लागतें! त्याला पतित म्हणतात, व त्याचा लोकांकडून अपमान व छळ होतो. हा अपमान त्याला सोसवेनासा झाला म्हणजे, त्याला घरदार, कुटुंब, गांव सर्व सोडून देऊन परागंदा व्हावें लागतें.

५. (अ) जातिभेदामुळें समाजांत फाटाफूट झाली आहे. समाजाचे तुकडे तुकडे झाले आहेत. (ब) नीतीचा तर ऱ्हासच झाला आहे. यामुळें समाजांत धर्म कशाला म्हणावें हें समजण्याचें ज्ञान नाहींसें झालें आहे. धर्माचा मूळ पायाच सर्व डळमळित झाला आहे. पृथ्वीत धर्म म्हणून जेवढे आहेत त्या प्रत्येक धर्माचा पाया नीतीवर रचिला आहे. त्याप्रमाणें हिंदुधर्मांत जातीची स्थापना झाल्यापासून, धर्माला ओहोटीच लागली आहे. ही स्थिति सुधारण्यास किती तरी धार्मिक लोक व साधुसंत यांनीं प्रयत्न केले आहेत. पण त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले आहेत. कारण, एवढ्या मोठ्या अफाट देशांत एकादुसरी व्यक्ति जातीच्याविरुद्ध प्रयत्न करूं लागली कीं त्या व्यक्तीचा छळ होतो, व त्याच्या प्रयत्नास यावें तसें यश येत नाहीं. कित्येक उदाहरणें त्याचीं डळडळीत साक्ष देत आहेत. (क) औद्योगिक प्रगतीचाहि ऱ्हासच होत गेला

आहे. या जातिभेदामुळें आळसाचें प्राबल्य या देशांत वाढलें आहे. जातिभेद धर्माचें एक अंग असल्या कारणानें, देशांत धर्माचे नांवावर उद्योग केल्याशिवाय आयतें खायाला मिळतें, व निर्बल लोकांनां सबळ लोकांनां पोसावें लागतें. देशांत उद्योगधंदे करणारे तेवढे अशक्त व निर्बल तुह्मांला सांपडतील; व धेडेकुटे, धटिंगण, आईतखाऊ तेवढ्यांनां निर्बल गरीब लोकांनीं पोसावें, असें झालें आहे. हा आईतखाऊ वर्ग तेवढा धर्माच्या नांवावर पोसला जातो. (ड) राजकीय प्रगतीसहि हा जातिभेद पूर्वीपासून आड आला आहे व ह्याचें उदाहरण सध्यां देशांत जी अस्वस्थता झाली हें होय.

६. जोंपर्यंत जातिभेद या देशांत आहे तोंपर्यंत जातिमत्सर नाहींसा होणार नाहीं. कारण, जातिभेद हें पुटारी ह्मणविणाऱ्या जातींनां एक मोठें भूषणच वाटत आहे ! जातिभेद हा आमच्या देशांतील लोकांनां देवानें लावून दिलेला मोठा दैविक अलंकार आहे !

७. ह्यावरून, प्रथमतः मुख्य मुख्य जातींतील पोटभेद जरी मोडण्याचे प्रयत्न केले, एका जातींतील उच्च ह्मणविणारा कनिष्ठ मानलेल्यास आपल्यांत सामील करून घेण्यास जरी राजी झाला, तरी मत्सर ह्मणून जो आहे तो त्यांत राहणारच. यास लांब जाण्यास नको. आमच्या देशांत मुसलमान आले व नंतर पोर्तुगीज आले. ह्या दोन्ही राजांच्या अमलांत धर्मक्रांति झाली. या धर्मक्रांतींत जे लोक वाटवले गेले त्या लोकांनां पाहून आज कित्येक पिढ्या झाल्या, पण त्यांच्यांतील मुळचा हिंदुधर्मांत असतांना जो जातिमत्सर वास करीत होता, तो या लोकांचें धर्मांतर जरी झालें, व यांच्या धर्मांत रोटीव्यवहार व बेटीव्यवहार होण्यास मोकळीक आहे, तरी नाहींसा झाला नाहीं ! या धर्मांचे लोकांत ' आपल्या धर्मांत जात नाहीं ' असा उघड उघड उपदेशहि केलेला असतो. तरी ते मुळचा जातींचा उच्चनीचपणा पहात असतात. जेथवर होईल तेथवर बेटीव्यवहारामध्यें भेद ठेवितात. याकरितां आमच्या देशांतील जातिभेद अजिबाद कधींहि मोडणार नाहीं. हा जातिभेदाचा प्रकार हिंदुधर्मानें हिंदुस्थानांत लावला तसा तो हिंदुस्थानच्या बाहेरच्या देशांतील धर्मांत मुळींच नसल्यामुळें त्या धर्मांतील लोकांत जातिमत्सर मुळींच नाहीं.

८. नुसता रोटीव्यवहार सुरू होऊनच निरनिराळ्या जातींमधील अगर पोटभेदांमधील जातिभेदाचा अनिष्टपणा नाहींसा होणार नाहीं. जर रोटीव्यवहार एकमेकांत होत नाहीं, तर बेटीव्यवहार होणें फारच कठीण आहे.

९. हल्लीं जो निरनिराळ्या जातींमध्यें व्यवहार आपणांस दिसतो, तसा व्यवहार शंभर वर्षांपूर्वी नव्हता. तरी हा हल्लींचा दळणवळणाचा व्यवहारहि, जसजशी देशाच्या निर्वाहाच्या साधनांची, प्रवासाच्या साधनांची स्थिति बदलत गेली, तिचा प्रकार आहे. पण अशा प्रमाणाच्या फेरबदलीच्या योगानें हिंदुधर्मांतील जातिभेद मोडायाचा नाहीं; उलट त्याला आणखी निराळेंच स्वरूप येईल.

१०. ज्यांनां जातिभेद अनिष्ट वाटत आहे, त्यांनीं हिंदुधर्मांत सुधारणा करण्याचा प्रकार हातीं घेतला पाहिजे. या प्रकारची सुधारणा करण्याचा प्रयत्न पूर्वी बऱ्याच साधुसंतांनीं हातीं घेऊन आपलें सर्व आयुष्य घालविलें, पण त्याचा चांगला परिणाम कांहीं झाला नाहीं. आतां जर कोणी एकादा महात्मा किंवा थोर पुरुष निघेल व तो जर प्रथमतः आमची हल्लींची धर्मशास्त्राची सुधारणा करून हल्लींच्या काळाला जेवढें जरूर तेवढेंच ठेवून बाकीचें रद्द करील व नवीन धर्म काढील तर कांहीं तरी होईल. यास उदाहरण ख्रिस्ती धर्माची सुधारणा-नवा करार, व मुसलमान धर्म हा जुन्या हिब्रू धर्माची सुधारणा होय. याप्रमाणें हिंदुधर्माची सुधारणा करणें इष्ट आहे, व असें झालें तर जातिभेदाचें खुळसट प्रकरण कांहींसें कमी होईल. पण हा सर्व प्रकार करण्यास पुढें सरसावण्यास सुशिक्षित व उच्च जातीचे ह्मणविणारांनींच अंगावर घेतलें पाहिजे. पण हल्ली आह्मी आमच्या देशांत तोंडानें अघळपघळ बोलणारे, लांबलांब लेख लिहिणारे पाहतों. स्वतःच्या बोलण्याप्रमाणें त्यांच्यानें कांहींच होत नाहीं. यामुळें देशांतील अशिक्षित लोक या पुढारी ह्मणविणाऱ्या लोकांचें वर्तन पाहून जुन्या चालीला अधिक घट्ट धरून बसतात.

ठाणें, मुंबई रस्ता, २४-६-१२.

संपूर्ण गोष्ट.

शील्डमॅच्.

लेखक—श्रीयुत वासुदेव कृष्ण देशपांडे.



इसवी सन १९०—साल, डेक्कन् कॉलेज् जिमखान्याच्या इतिहासांत मोठें अपूर्व होय, यांत शंका नाहीं. या वर्षी डेक्कन् कॉलेजला जशी क्रिकेट-खेळाडूंची टीम लाभली होती, तशी पूर्वी कधींहि मिळाली नव्हती. आतांपर्यंत, डेक्कन् कॉलेजला मिळणाऱ्या जयाचें प्रमाण फार झालें तर शेंकडा दोन किंवा तीन असेंच असे आणि खेळण्यापेक्षां नखरा अधिक करणारी डेक्कन् कॉलेजची टीम इतर कॉलेजांच्या थट्टेचा एक विषयच होऊन बसली होती. पण या सालीं हें सर्व पारडें फिरलें. या वर्षी डेक्कन् कॉलेजला एकहि अपजय आला नाहीं; आणि कोणाला तीन वुइकेट्सनीं, तर कोणाला चार वुइकेट्सनीं, आणि कोणा कोणाला एका इनिंगनेंसुद्धां या टीमनें मार दिला. यंदां या टीमचा हा अपूर्व पराक्रम पाहून सर्व कॉलेजला अत्यंत हर्ष झाला; आणि जसजसे शील्ड्मॅचचे दिवस जवळ येत चालले, तसतसा त्यांचा आनंद गगनांत मावेना! इतके दिवस, डेक्कन् कॉलेज् आणि शील्ड (विजयाची ढाल) या दोन गोष्टी 'निसर्गभिन्नास्पद' आहेत, असा लोकांचा दृढ समज होता. पण या वर्षी आपण त्याला हरताळ लावूं, अशी सर्व कॉलेजच्या मनांत मोठी आशा उत्पन्न झाली होती. या वर्षी आजपर्यंत शील्डसाठीं झालेल्या सर्व सामन्यांत डेक्कन् कॉलेज् विजयी झालें होतें. आतां फक्त फर्ग्युसन् आणि झेवियर या दोन कॉलेजांशीं सामने झाले, कीं, कॉलेजला शील्ड मिळालेंच!

हां हां म्हणतां फर्ग्युसन कॉलेजशीं होणाऱ्या सामन्याचा दिवस उद्यांवर येऊन ठेपला.

[२]

संध्याकाळीं घंटा झाल्याबरोबर फर्ग्युसन कॉलेजच्या प्रीव्हियस वर्गामधून प्रोफेसरांच्या मागोमाग पांचसहा मुलींचा घोळका बाहेर पडला. प्रोफेसर जरा दूर गेले असें पाहून एक मुलगी म्हणते "झालं बाई, सुटल्यें एकदाची या आलजिब्र्यां-(बीजगणितां)तून! या तासाचा तर असा कंटाळा येतो, कीं, कांहीं बोलायची सोय नाहीं!"

"खरंच हो!" दुसरी म्हणाली. "तुम्हाला मुसता कंटाळाच येतो, पण मला तर बाई झोंपच येते!"

तिसरी मुलगी यावर हंसत म्हणते "तर मग बाईसाहेब! उद्यां अन् परवां तरी निदान तुम्हाला क्लासांत झोंप घ्यायला नको, एवढं बरं आहे—"

"कां—कां बरं? उद्यांदिखील आलजिब्र्याचा तास आहेच की!"

"वा, तुम्ही चुकतांहां! अद्याप तुम्हाला ठाऊकच नाहीं वाटतं! उद्यां अन् परवां दोन दिवस कॉलेजला सुट्टी आहे. मघांशींच ती 'नोटीस' (सूचना) लागली आहे."

"सुट्टी! अन् ती कसली बाई?" पहिल्या मुलीनें विचारलें.

"अहो, उद्यां आपली अन् डेक्कनची शील्ड्मॅच आहे ना?"

"खरंच हो खरंच! कुठं आहे ती?"

"आपल्या 'थंग क्रिकेटर्स'च्या ग्राऊंड (मैदाना)वर."

"मग अगदींच जवळ आहे तर! तुम्ही सर्वजणी येणार का पहायला?"

पहिली मुलगी म्हणाली "छे, आपण तर कांहीं बाई येणार नाहीं!"

"कां हो? गणिताची स्कॉलरशिप मारायचा आहे वाटतं बेत?"

"छे—तसं नव्हे; उगीच कशाला या आपलाच डिफीट (पराजय) झालेला पाहायला?"

"Nonsense! Shame! Shame!–धिक्कार! धिक्कार!" सगळ्या मुली एकदम उद्गारल्या. "असं तुझ्याला म्हणवतं तरी कसं? शील्ड मॅच (सामन्या)ला आरंभ व्हायच्या आधींच तुझी हातपाय गाळतां? आपली टीम काय अगदींच गचाळ आहे असं वाटतं तुझ्याला? अन् डेक्कन् का आमचा डिफीट करणार? Impossible! अशक्य-अगदीं अशक्य!"

"अहो! पण यंदां डेक्कनची टीम किती स्ट्रॉंग (मजबूत) आहे, तुम्हांला ठाऊक नाहीं! त्यांनीं सायन्स् कॉलेज्ला परवां सात बुइकेट्सनीं डिफीट दिला! त्यांच्याकडे यंदां दोघेतिघे प्लेअर्स् (खेळगडी) फारच.चांगले आहेत!"

"कोणते ते?"

"त्या सर्वांचीं नांवं मला माहिती नाहींत; पण एक प्रिन्स् शिवाजीराव अन् दुसरा देशमुख, अन् दुसरेहि एकदोघे आहेत. शिवाय, यंदां त्यांची बोलिंग भयंकर आहे."

"शिवाजीरावाचं नांव आह्मीं ऐकलंय्. पण तो दुसरा कोण देशमुख आहे, तो इतका का चांगला प्लेअर आहे?"

"होय, तो प्लेअर तर फर्स्टक्लासच (उत्तम) आहे; पण फिल्डरहि तसाच चांगला आहे. त्यानं परवां एका मॅचमध्यें तीनदां बौंडरी (सीमे) वर चेंडू कॅच करून (झेलून) मॅच जिंकलीन्! त्याच्यामुळंच तर यंदां डेक्कन् कॉलेजला विशेष जोर आहे."

"हो, खरंच बाई! परवां डेक्कन् कॉलेज्ची आणि 'यंग क्रिकेटर्स'ची मॅच झाली, त्यांत त्या देशमुखानं, रानड्यांच्या बोलिंगचा पार धुव्वा उडवून दिला! रानडे म्हणजे कसला भयंकर बोलर, पण त्यानं म्हणे किती सत्तर का ऐशीं स्कोअर केलं (धांवा काढल्या)! पण तें कांहीं असो. त्यांच्या टीममधें जर इतके चांगले प्लेअर्स आहेत, तर त्यांचाहि खेळ आपणांला पहायला सांपडेल अन् शिवाय, आपल्याकडूनहि कांहीं वाईट मंडळी नाहींत. पटवर्धन बॅट्समन् आणि रानडे बोलर, हे दोघेजण जोंपर्यंत आपल्याकडे आहेत, तोंपर्यंत आपलाहि शो (देखावा) अगदींच रिडीक्युलस (हास्यास्पद) खास होणार नाहीं."

सुशीला–दुसरी मुलगी–म्हणते "अहो, पण तुम्हांला आपला डिफीट होण्याचं जें भय आहे, तें त्या देशमुखांच्यामुळं ना? मग त्यांत हो काय आहे? त्यांची किल्ली तर आपल्याच हातांत आहे!"

"म्हणजे?" बाकीच्या मुलींनीं कुतूहलपूर्वक विचारिलें.

"सांगत्यें. तुम्हांला पण एक गम्मत ठाऊक आहे का? ते देशमुख किंनई आतां एका माणसाचे लबकरच—"

इतका वेळपर्यंत एक मुलगी या बोलण्यांत कांहींच भाग न घेतां स्वस्थ राहिली होती. तिचें तोंड या उद्गारांमुळें एकदम गोरेमोरे होउन ती चिडल्यासारखें करून एकदम सुशीलेस म्हणते "हें ग काय हें? या गोष्टी अशा मंडळींत बोलायच्या वाटतं! मला नव्हतं वाटलं तूं इतकी अचरट असशीलसं!"

"अस्सं!" साऱ्या मुली हंसत हंसत म्हणाल्या. "तरीच मघांशीं इंदिराबाईंचं झटलं देशमुखांच्या गुणवर्णनाकडे इतकं लक्ष कां लागलं होतं! आह्मांला नव्हतं बाई हें ठाऊक! पण देशमुखांचं भय घालवायला या काय करणार बाई?"

"सांगत्यें काय तें. जर इंदिरेला आपल्या कॉलेज्चा खरा अभिमान असेल, आपला जय व्हावा अशी जर तिची अंतःकरणापासून इच्छा असेल, तर तिनं देशमुखांनां असं वळिवलं पाहिजे, कीं, त्यांनीं उद्यां एक गैरहजर तरी रहावं, किंवा नीट खेळूं तरी नये!"

"वा वा! अगदीं खाशी युक्ति! पहा हो इंदिराबाई! आतां कॉलेज्चा सगळा ऑनर् (मान) तुमच्या हातांत आहे. सांगा देशमुखांनां-म्हणावं, कीं, जर तुम्हीं माझं ऐकलं नाहीं तर मी तुमच्याशीं लग्नच करणार नाहीं! मग पहा ते तेव्हांच कबूल होतात कीं नाहीं तें!"

इंदिरा ह्मणाली "ह्मणजे! तुह्मी ह्मणतां काय हें? तुह्मांला असं वाटतं काय, कीं, ते माझ्यासाठीं आपल्या कर्तव्यावर पाणी सोडून आपल्या कॉलेजशीं बेमान होतील? मीं जर असं तिकडे मय घातलं तर माझा त्याग करणं होईल, पण आपल्या कॉलेजशीं असं विश्वासघाताचं वर्तन होणार नाहीं!"

"त्या कशाला गोष्टी इंदिराबाई? आपल्या प्रेमाची स्त्री आपल्या हातून जाते असं पाहिल्यावर पुरुष काय हवं तें करायला तयार होतील! तुह्मी सांगून तर पहा त्यांनां!"

"नको ग बाई! तिकडे तसं सांगायचं ह्मणजे माझं जन्माचं नुकसान करून घ्यायचं! तुह्मांला काय? माझं जन्माचं नुकसान झालं तर आहांत तुह्मी त्याला जबाबदार?"

"हो आहोंत! झालं आतां? जर तसाच प्रसंग आला, तर आह्मी जाऊन देशमुखांनां आज घडलेली हकीकत सांगूं; आणि तुह्मीं त्यांची फार स्तुति केलीत, पण आह्मींच तुह्मांला त्यांनां तसं सांगायला आग्रह केला, हें सर्व त्यांनां कळवून ह्माला संकटांतून मुक्त करूं! इतकंहि करून जर ह्मी आमच्या ह्मणण्याप्रमाणं करायला कबूल नसाल, र मग तुह्मांला देशमुखांच्या कर्तव्यनिष्ठेबद्दल इतका दृढ विश्वास नाहीं, असंच ह्मटलं पाहिजे."

"बरं तर मग," इंदिरा आवेशानें ह्मणाली. "जर तुह्मांला त्यांच्या कर्तव्यनिष्ठेची परीक्षाच पहायची असेल, तर होऊंद्या तुह्मी ह्मणतां तसं. पण हें पहा, तुह्मी त्यांच्या कॉलेजच्या पत्त्यावर आत्तांच्या आत्तां आपल्या सह्मांनिशीं सर्व कथ्या हकीकतीचं पत्र पाठवा, अन् त्याच्या पाकिटावर, 'मॅच् संपल्यावर उघडावं' अशी डायरेक्शन् (सूचना) लिहा. ह्मणजे मग मला पुढं कांहीं अडचण पडणार नाहीं."

"कबूल-पण तुह्मी मात्र आपलं काम चोख बजावा, ह्मणजे ह्मालं. ते भेटले ह्मणजे असं सोंग आणा, कीं वा!"

[३]

थोड्याच वेळानें इन्दिरा आपल्या मैत्रिणींस सोडून कॉलेजच्या पोर्चमध्यें आपली गाडी उभी होती, तिकडे वळली. तिच्या नोकरानें पुढें येऊन तिच्या हातांतलीं पुस्तकें घेऊन गाडींत नेऊन ठेविलीं व ती गाडींत येऊनं बसली. मघांशीं मैत्रिणींचीं उद्यांच्या मॅचूसंबंधाचीं भाषणें ऐकिल्यापासून व त्यांच्याजवळ विलक्षण करार केल्यापासून, तिचें चित्त बरेंच व्यग्र झाल्यासारखें दिसत होतें. तिला ह्मणजे आपल्या भावी पतीच्या कर्तव्यनिष्ठेबद्दल संशय होता, असें नाहीं; पण या सर्वांचा शेवटीं परिणाम कसा होईल, याची तिला कांहींच अटकळ होईना. ती आपल्याशींच ह्मणाली "आपण मघांशीं तिथं तसं बोलून गेलों खरं, पण अगोदर आज आपली अन् गोपाळरावांची गांठ पडणार कशी? जर ते प्रॅक्टिस् (खेळण्या)मध्यें गुंतले असले, तर इकडे येणार कसे? पण काल दोन दिवसांत ते आपल्याकडे मुळींच आले नाहींत; तेव्हां कदाचित् ते आज येण्याचा संभव आहे. पण जरी ते आले, तरी त्यांच्याजवळ ही गोष्ट काढायची कशी? आपण त्यांनां आज असं लटकं मय घातलं आणि जर खरोखरीच ते उद्यां माझ्या ह्मणण्याप्रमाणं वागले, तर आज जी मीं मुलींत फुशारकी मारिली, तिची काय वाट? पण नाहींच-तिकडून असा अविचार नाहींच व्हायचा! माझ्या प्रेमावर एक वेळ लाथ मारणं होईल, पण आपल्या कर्तव्याला कधीं विसरणं व्हायचं नाहीं! पण, परवां मॅच संपल्यावर पुन्हां तिकडची मी क्षमा कशी मागूं? कोणीकडून मी या पंचाइतींत पडल्यें, असं आतां वाटूं लागलं आहे मला. त्या साऱ्याजणी आतां तिकडे एक पत्र लिहिणार आहेत, हेंहि बरंच आहे. मॅचनंतर तें वाचलं ह्मणजे सारं आपोआप समजेलच. पण तोंवर मात्र असं सोंग आणलं पाहिजे, कीं, जसं कांहीं खरंच!"

याप्रमाणें तिचे आत्मगत विचार चालले आहेत, तोंच गाडी तिच्या बंगल्यांत येऊन थडकली.

कोचमननें चहूंदिशीं तिच्याजवळचीं पुस्तकें उचललीं, तेव्हां मागावर येऊन घरीं पोंचल्याचें तिला स्मरण झालें. ती लागलीच गडबडीनें खालीं उतरून व्हरांड्यांत येते, तोंच तिचे वडील व मातुःश्री दोघेंहि पोषाख करून बाहेर येत असलेलीं तिनें पाहिलीं. ही त्यांनां कांहीं विचारणार तोंच माईसाहेब म्हणाल्या "इंदु! भास्करला तुझ्या चहाची व्यवस्था करायला सांगून आतांच मी आल्यें आहें. जा, आंत जाऊन चहा घे जा. गोपाळहि तुझीच चहासाठीं वाट पहात आहे."

गोपाळरावांचें नांव ऐकितांच इंदिरा एकदम म्हणते "आं, गोपाळराव आले आहेत? अन् केव्हां आले ते?"

नानासाहेब म्हणाले "तो येऊन झालीं पंधरा एक मिनिटें. आज सेवासदनाचा वक्षीससमारंभ आहे, तिकडे आम्ही चाललों आहोंत. आम्ही परत येईपर्यंत तुला एकटें वाटूं नये म्हणून त्याला तोंवर तुजजवळ रहायाला सांगितलें आहे." असें म्हणून तीं दोघेंहि व्हरांड्याच्या पायऱ्या उतरून गाडींत जाऊन बसलीं. इन्दिरेनें मागें वळून पाहिलें तों गाडी कम्पौंडाच्या बाहेर गेली होती.

[४]

गोपाळरावांच्या भेटीची जी इंदिरेला मुख्य काळजी होती, ती ते आल्यामुळें अनायासेंच दूर झाली. आतां त्यांचेजवळ आपल्या मनांतली गोष्ट कशी काढावयाची व त्या गोष्टीला त्यांचेकडून संमति मिळेल कीं नाहीं, हींच तिला मोठी अडचण वाटत होती. आपल्या भावी पतीला आपण किती महत्त्वाची भलतीच गळ घालीत आहोंत, याची तिला जाणीव नव्हती असें नाहीं. आपण त्यांनां आतां जें करावयास सांगणार तें चांगलें नव्हे, इतकेंच नव्हे, तर अत्यंत विश्वासघातकीपणाचें कृत्य आहे, हेंहि तिला माहित होतें; आणि म्हणूनच गोपाळरावांच्या कबुलीबद्दल तिला इतकी शंका वाटत होती.

गोपाळराव—हेच ते डेक्कन् कॉलेज्चे देशमुख, हें वाचकांनीं ताडलें असेलच—इंदिरेचा आवाज ऐकून बाहेर आले. तिला पाहतांच ते म्हणतात "आलांत वाटतें आपण? मी मॅचच्या घांदलींत गुंतल्यामुळें गेल्या दोनतीन दिवसांत मला इकडे यायला झालेंच नाहीं. तूं माझी खूप वाट पाहिली असशील, नाहीं इंदु?"

इंदिरेनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

गोपाळराव पुनः हंसत हंसत इंदिरेला विचारतात "कां? इतका कसला विचार चालला आहे? आज अगदीं बोलायला देखील जड जातें आहे आमच्याशीं—"

गोपाळराव इंदिरेशीं हे प्रेमोद्गार काढीत असतां इंदिरेच्या मनांत निराळेच विचार चालले होते. तिला त्यांचें हें भाषण ऐकूंच गेलें नाहीं, झटलें तरी चालेल. गोपाळरावांच्या या उद्गारांनीं शुद्धीवर आलेली इंदिरा त्यांनां त्रासिकपणानें इंग्रजींत म्हणाली "आतां कृपा करून मला त्रास देऊं नका!"

इंदिरेच्या वर्तणुकींतला हा थंडपणा पाहून गोपाळराव चकितच झाले! जी इंदिरा दोन दिवसांपूर्वीपर्यंत आपल्याशीं इतक्या प्रेमळपणानें वागत होती, इतकेंच नव्हे, तर एकादे दिवस तिच्या घरची आपली फेरी चुकली तर जी अगदीं घावरी होऊन जात असे, तीच इंदिरा, आज आपल्याशीं अशी कां वागते, याचें त्यांनां मोठें गूढ पडलें. आज कशी तरी सबब काढून आपण इतक्या प्रेमानें तिला मुद्दाम भेटण्यास आलों असतां तिनें आपला असा अव्हेर करावा, यावद्दल त्यांनां फार वाईट वाटलें.

गोपाळराव इंदिरेला तिच्या या तुटक वागण्याचें कारण विचारणार, तोंच भास्करनें चहा तयार झाल्याची वर्दी दिली. अर्थात् दोघांनांहि उठून आंत जावें लागलें. चहाचे वेळेस तरी इंदिरा आपल्याशीं कांहीं बोलेल, अशी गोपाळरावांनां आशा होती; पण तीहि सफल होण्याचा कांहीं रंग दिसेना. ते खालीं पाहत असतांना हिनें त्यांजकडे टक लावावी; पण त्यांनीं वर तोंड

करितांच हिनें चहाच्या कपाकडे नजर द्यावी, असा प्रकार बराच वेळ चालला होता. रोज चहाचे वेळेस ह्मणजे गप्पागोष्टींनां, हास्यविनोदाला जणूं कांहीं ऊत येत असे; पण आज जिकडे तिकडे अगदीं स्तब्ध!

गोपाळरावांनां आतां तेथें बसवेना. त्यांचें चहा पिणें झाल्यावर ते उठले आणि ह्मणाले "इंदु! मी जातों आतां!"

इंदिरेला आतां आपल्या कठोर वर्तनाचा एकाएकीं पश्चात्ताप वाटूं लागला. ती खुर्चीवरून एकदम उठली आणि गोपाळरावांजवळ जाऊन काकुळतीच्या स्वरानें ह्मणते "इतक्यांत जाणार? जरा बागेंत फिरायला नाहीं का येत?"

"आज तुझें मन स्वस्थ नाहींसें दिसतें. मी जातों आतां; एकटें राहिल्यानें तुला अमळ बरें वाटेल."

इंदु काकुळतीच्या स्वरानें ह्मणाली "अंहं—जाऊं नये—जाऊं नये! कांहीं वेळतरी रहायचं इथं. मला आज आपल्याजवळ एक मागणं मागायचं आहे—"

"इंदु, आज तूं माझ्याशीं इतकी परक्यासारखी कां वागतेस बरें? मीं तुला कधीं कांहीं नाहीं ह्मटलें आहे काय? मग आजच तूं अशी विलक्षण प्रस्तावना कां करतेस? जर तुझ्या मनाला एकादी दुःख देणारी गोष्ट घडली असेल, तर चल बागेंत, तेथें मला ती सांग. मी त्याचें शक्य तितकें परिमार्जन करीन."

इंदिरा व गोपाळराव कांहींहि न बोलतां बंगल्यामागील बागेंत गेलीं व एका झाडाखालच्या हिरवळीवर एकमेकांपासून बऱ्याच अंतरावर बसलीं.

कांही वेळानें गोपाळरावांनीं विचारलें "तूं काय ह्मणत होतीस इंदु?"

इंदिरा स्निग्ध दृष्टीनें त्यांजकडे पाहून ह्मणते "आपलं माझ्यावर खरं प्रेम आहेना?"

इंदिरा आज असें कां विचारिते, याचा गोपाळरावांनां उलगडाच होईना. त्यांनीं मृदु स्वरानें तिला विचारलें "इंदु! आज तूं हें कां विचारतेस? अद्यापि तुला त्याची शंका का वाटते?"

"शंका नाहीं वाटत—पण विचारलें—माझ्यासाठीं आपण एकादी गोष्ट कराल का?"

गोपाळराव गंभीरपणानें ह्मणाले "इंदिरे! तुझ्या सुखासाठीं मी वाटेल तें करीन!"

"पहा बरं, नाहीं तर मग मागं घ्यायला होईल!"

"त्याबद्दल शंका देखील नको! माझ्या हातून मात्र गोष्ट घडण्यासारखी पाहिजे."

"अगदीं आपल्याच हातून ती होण्यासारखी आहे. एवढंच नव्हे, तर ती आपल्याचसंबंधीं आहे! मग काय ह्मणायचं?"

"मग काय! त्याबद्दल मीं मघाशींच सांगितलें आहे."

"पण आपण रागावणार नाहींना मजवर?"

"तुझ्यावर आणि मी रागावूं?"

इंदिरेला आतां गोपाळरावांकडे पहावेना! जमिनीकडे दृष्टि लावून ती ह्मणते "उद्यां आमच्या कॉलेजची आणि आपल्या कॉलेजची शील्डमॅच आहे—"

"बरें मग?"

"त्यांत डेक्कनच्या बाजूनं आपण खेळायचं होईलच. आणि लोकं असं ह्मणतात, कीं, ज्या अर्थी आपण तिकडे आहांत त्या अर्थी आह्मांला जय मिळणं कठिण आहे. आपल्याला माझी विनंति येवढीच आहे, कीं, उद्यांला आपण मॅचमधें एक गैरहजर तरी रहावं, किंवा नीट खेळूं तरी नये—"

गोपाळराव स्तंभितच झाले! आपल्या कानांवरहि त्यांचा विश्वास बसेना. ते एकदम ह्मणाले "तूं हें काय ह्मणतेस? मीं असें केलें ह्मणजे काय होईल?"

"आमचा जय होईल!"

आतां मात्र गोपाळरावांनां संताप आल्यासारखें दिसूं लागलें. ते बसल्या जागेवरून एकदम उभे राहिले व निश्चयपूर्ण स्वरानें ह्मणाले "इंदु! तूं काय ह्मणतेस याचा पूर्ण विचार केला आहेस काय? अशा क्षुल्लक मॅचमध्यें तुमच्या कॉलेजचा जय व्हावा ह्मणून मीं माझ्या पक्षाला असा आयत्या वेळेस दगा देऊं काय? माझें माझ्या कॉलेजा-

विषयीं जें कर्तव्य आहे, त्याला, माझ्या प्रेमाचा असा फायदा घेऊन विमुख व्हावयास तूं मला भाग पाडतेस काय? इंदु! तूं मजपाशीं किती अयोग्य मागणें मागत आहेस याचा पुनः नीट विचार कर, आणि आपल्या भावी पतीला, आपल्या मातेशीं—माझ्या कॉलेजला मी माताच म्हणतों—असा विश्वासघात करायला सांगूं नकोस!"

इंदिरा निश्चयदर्शक स्वरानें म्हणाली "मीं नीट विचार करूनच आपणाजवळ हें मागितलं आहे. आपलं जर मजवर खरं—अंतःकरणापासून प्रेम असेल, मीं आपली पत्नी व्हावें अशी जर आपली खरोखर इच्छा असेल, तर माझ्या म्हणण्याप्रमाणं आपणाला वागलंच पाहिजे! नाहीं तर, आपलं मजवर खरं प्रेमच नाहीं, असं मला म्हणावं लागेल! आजपर्यंत खोटं आणि बरकरणी प्रेम दाखवून आपण मला केवळ फसविलं, असंच मला वाटेल. आपलं जर मजवर खरं प्रेम असतं, तर एवढीशी क्षुल्लक गोष्ट माझ्यासाठीं करायला आपल्याला इतका विचार कां पडता? आपण उद्यां पहिल्या बॉलला औट झालां, अथवा आपल्या हातून दोनतीन कॅचेस सुटले (चेंडू झेलतांना खालीं पडले) म्हणून आपण आपल्या कॉलेजशीं विश्वासघात केला असं होऊन आपली अब्रू जाणार आहे थोडीच! हा केवळ चान्स् (बोलाफुलास गांठ) असंच लोकं म्हणतील. पण कशाला मी आपणाला हें सांगूं? ठीक आहे. आपल्या प्रेमाचा खरेपणा मला आज समजून चुकला. अजून बराच अवकाश आहे. आपल्याला—नव्हे, आपल्या कॉलेजला शील्ड पाहिजे, का आपणाला इंदु पाहिजे, याचा नीट विचार करावा. उद्यां आपली भेट ग्राउंड(मैदान)वर होईलच. जातें मी आतां."

असें म्हणून इंदिरा फणकाऱ्यानें झटकन् घरांत निघून गेली. बिचारे गोपाळराव इतके विचारमग्न झाले होते, कीं, ती तेथून गेल्याचें त्यांनां बराच वेळ समजलेंहि नाहीं!

[५]

ती रात्र गोपाळरावांनां फारच कष्टाची गेली. उद्यांच्या मॅचबद्दल जो त्यांनां मोठा हुरूप होता, तो या घडलेल्या प्रकारानें क्षणांत पार मावळून गेला. इंदिरा जरा लहरी व हट्टी होती, हें त्यांनां ठाऊक होतें; पण तिच्या लहरीची आणि हट्टाची मजल येथपर्यंत जाईल, असें त्यांनां कधींहि वाटलें नाहीं. गोपाळरावांचें इंदिरेवर निरतिशय प्रेम होतें. अर्थात्, ती आपल्या हातची जाणें ही कल्पनाहि त्यांनां अगदीं दुःसह झाली, त्यांत नवल तें काय? ती आज जें बोलली, त्याप्रमाणें करण्यास ती कधींहि चुकणार नाहीं, अशी त्यांची पक्की खात्री होती आणि म्हणूनच त्यांचें मन असें द्विधा झालें होतें. त्यांनां एकदा वाटे "काय हरकत आहे? जर इंदूला वाटतें, कीं, उद्यां आपल्याला जय मिळावा, तर तिच्या म्हणण्याप्रमाणें आपण वागलों तर त्यांत मोठेंसें काय नुकसान आहे? शेवियरच्या मॅचमध्यें तरी आपला जय होईल कशावरून? आपण जर उद्यां इंदूच्या म्हणण्याप्रमाणें वागलों नाहीं, तर कॉलेजचा फायदा होईल खरा; पण त्यामुळें आपल्या साऱ्या जन्माचें नुकसान नाहीं का होणार? आपण जिला आपलें प्रेमसर्वस्व वाहिलें आहे आणि जिच्यावांचून आपलें जीवित केवळ अरण्यवत् नीरस व रूक्ष होईल, अशा गुणरूपशाली पत्नीला आपण भलताच अभिमान धरून अंतरावें काय?"

याप्रमाणें स्वार्थाच्या बाजूला जों विचारांचा ओघ वळतो, तोंच पुनः त्याच्या विरुद्ध दिशेचे विचार त्यांच्या डोक्यांत येऊन स्वार्थदृष्टीचा लोप होई. "काय? सर्व कॉलेजच्या आशा केवळ माझ्यावर एकवटल्या असतां, कधींहि न मिळालेलें शील्ड यंदा कॉलेजला मिळण्याचा दृढ संभव असतां, माझ्या एकट्याच्या फायद्यासाठीं या सर्वांचा मी नाश करूं काय? छेः, अशक्य—अशक्य! ज्या पोरीला माझ्या अगाध प्रेमाची किंमत नाहीं, अशा लहरी पोरीसाठीं मी माझ्या

कर्तव्यापासून पराङ्मुख होऊं काय? माझें माझ्या कॉलेज्संबंधानें जें कर्तव्य आहे, त्याच्या आड आज ही हट्टी पोरगी आली; उद्यां यापेक्षांहि श्रेष्ठतर कर्तव्याच्या आड ही येणार नाहीं कशावरून? तें कांहीं नाहीं, हा मोह मला आंवरलाच पाहिजे! आज जर मी या मोहाला बळी पडलों, तर उद्यां यापेक्षांहि अधिक अधोगतीला जाईन."

विचारांच्या भरांत मध्यरात्र उलटून गेल्यानंतर गोपाळरावांनां किंचित् झोंप लागली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांनां उठावयास बराच उशीर झाला. पण उठल्यावर लागलीच चहा वगैरे घेऊन त्यांनीं स्नानहि आटोपलें.

[६]

आज कॉलेज्मध्यें अपूर्व उत्साह पसरलेला दिसत होता; प्रत्येक खोलींत, बाथरूममध्यें, कुवांत, सर्वत्र मॅच्वरूलच गोष्टी चालल्या होत्या. परंतु खुद्द गोपाळरावांनां आज काय वाटत होतें? जो जो त्यांनां आज भेटला, त्यानें त्यानें त्यांचें अभिनंदन करून "Buck up, Deshmukh! You are the hero of the day!–चालूंद्या देशमुख, आजचे वीर तुम्हीच आहां!" असें म्हणावें. यामुळें गेल्या रात्रीचे सर्व त्रासदायक विचार त्यांच्या डोक्यांतून पार निघून जाऊन त्यांनांहि आज अपूर्व हुरूप वाटूं लागला.

मॅच् बरोबर १२ वाजतां सुरू होणार होती. मैदानावर गर्दी होऊं लागली. मॅचच्या वेळीं तर लोकांचा चहूंकडे नुसता तोबा उडाला! पिच् (क्रीडांगणा)ची सर्व तयारी होती. स्टंप्स् वगैरे ठोकून दोन्ही बाजूंची मंडळी आपापल्या तंबूंत घंटेची वाट पहात बसली होती. डेक्कन कॉलेज्नें फील्डिंग घेतलें आणि फर्ग्युसन् कॉलेज् खेळणार होतें. सर्व मंडळी वेळेची वाट पहात अगदीं उत्सुक आहे, इतक्यांत पॅव्हिलियन् (क्रीडागृहा)मधील मोठ्या घड्याळाचा कांटा बारांवर गेला, त्यावरोबर "खेळ सुरू करा," अशा अर्थाची मोठी घंटा झाली आणि डेक्कन् कॉलेज्चे फील्डर्स पिचूवर धांवत गेले.

फर्ग्युसनच्या टीममधेंसुद्धां तिघेचौघे खेळणारे चांगले पटाईत होते. त्या सर्वांत पटवर्धन हे फारच उत्तम होते. त्यांनीं त्या चौघांपैकीं आधीं दिवेकर आणि कुळकर्णी ही जोडी पाठवून दिली व पटवर्धन–देसाई ही जोडी पुढें पाठविण्यासाठीं राखून ठेविली. पहिले ब्रेअर्स टाळ्यांच्या गजरांत पिचूवर येऊन दाखल झाले आणि मॅच सुरू झाली. डेक्कनची बोलिंग यंदा भयंकर होती, हें वर सांगितलेंच आहे. तथापि बराच वेळपर्यंत पहिल्या जोडीनें त्याला दाद दिली नाहीं. स्कोअर (धांवा) वाढत चाललें. डेक्कनने फील्डिंगची पराकाष्ठा केली; पण स्कोअर सारखा चढत चढत पन्नासापर्यंत गेलाच. इतक्यांत थोड्याच वेळांत दिवेकर हे कॉट्ट आउट झाले.(५२–१–३०). दिवेकर यांचा कॅच् होतांच डेक्कन् कॉलेज्च्या तंबूंतून एकदम टाळ्यांचा प्रचंड गजर झाला. थोड्याच वेळांत पटवर्धन हे आपल्या तंबूंतून बाहेर पडतांना दिसूं लागले. त्यावरोबर पुनः त्यांचेंहि सर्वत्र टाळ्यांनीं स्वागत करण्यांत आलें. डेक्कनच्या खेळगड्यांस व विद्यार्थ्यांस पटवर्धन काय करितात याची फार धास्ती वाटत होती. यांच्या बरचेवर बौंड्या जात म्हणून तेथें देशमुखांची स्थापना केली. याप्रमाणें सर्व बंदोबस्त झाल्यावर पुनः खेळास आरंभ झाला.

आतांहि खेळ जोरांत चालू झाला. पटवर्धन यांनीं कॅच् मुळींच न देतां, जमिनीसरपटच खेळणें सुरू ठेविलें. त्यांनीं दोनतीन बौंड्या छान मारिल्या. इतक्यांत कुळकर्णी हे लेग् आउट झाले! (७४–२–३६). पण त्यांचे जागीं आलेले गृहस्थहि चांगलेच होते. पटवर्धनसुद्धां आतां जरा कायम होऊं लागले होते. म्हणून पटवर्धनांनां काढण्यासाठीं बोलर्सनीं आपली पराकाष्ठा केली, पण ते आउट होईनात. स्कोअर तर चढत चाललें. इतक्यांत सुदैवानें म्हणा, कीं दुर्दैवानें म्हणा, पटवर्धनांनीं बौंडरीसाठीं जो एक टोला मारला, त्यावरोबर चेंडू आकाशांत खूप उंच गेला. ज्या बाजूला हा चेंडू उडाला त्याच बाजूला देशमुख उभे होते; आणि त्यांच्याचसमोर इंदिरा आपल्या मैत्रिणीसह बसली

होती. हा चेंडू देशमुख आतां खास झेलणार व पटवर्धन औट होणार, याबद्दल कोणालाच शंका नव्हती. फर्ग्युसनच्या विद्यार्थ्यांचीं तोंडें अगदीं लहान होऊन गेलीं! डेक्कनचे विद्यार्थी, मोठमोठ्यानें टाळ्या वाजवून "कॅच् इट्, कॅच् इट् चेंडू झेला." असें ओरडत होते. चेंडू आकाशांत जो उंच उडाला तो बौंडरीजवळ देशमुखांच्याकडेच येत होता. त्यांनीं त्याच्या अनुरोधानें आपले हात धरले आणि ते चेंडू झेलणार इतक्यांत इंदिरेच्या "नको" असें सुचविणाऱ्या दृष्टीची आणि त्यांच्या दृष्टीची भेट झाली! ते क्षणमात्र गोंधळले आणि चेंडू त्यांच्या हाताला चाटून दाणदिशीं खालीं त्यांच्या पायांजवळ आपटला!

फर्ग्युसनच्या तंबूंतून बराच वेळ अविरल टाळ्यांचा वर्षाव आणि "Well Saved!" या शब्दांच्या आरोळ्या, यांशिवाय कांहीं ऐकूं येत नव्हतें. डेक्कनची मंडळी मात्र फारच निराश झाली! या वेळेस देशमुखांच्या मनांत काय विचार चालले होते, हें सांगणें फार कठिण आहे. पण ती पहा त्यांची मुद्रा किती दुःखी आणि उद्वेगपूर्ण दिसत आहे ती! या ज्या टाळ्या मिळाल्या त्या पटवर्धन बांचले म्हणून नव्हे, तर आपण आपलें कर्तव्य चुकलों, इंदिरेच्या दृष्टिजालांत सांपडून आपण आपल्या कॉलेजशीं विश्वासघात केला, म्हणून जणूं कांहीं आपली फजिती करण्यासाठींच आहेत, असें त्यांनां वाटत होतें!

देशमुखांच्या हातून बांचलेल्या पटवर्धनांनीं त्या दिवशीं फारच पराक्रम केला. दुपारीं सव्वातीन वाजतां फर्ग्युसनच्या सर्व गड्यांचा खेळ आटोपला; तेव्हां एकंदर दोनशेंचार धांवांपैकीं, पटवर्धनांच्या एकट्यांच्या पंचाण्णव धांवा होत्या!

डेक्कन् कॉलेजला आतां बऱ्याच धांवा कराव्यास हव्या होत्या. त्यांच्याकडेहि पांचसहा उत्तम उत्तम बॅट्समेन असल्यामुळें त्यांनां हा स्कोअर तेव्हांच मरून काढूं, अशी उमेद होती. परंतु ती फारशी सफल होण्याचें चिन्ह दिसेना! पंचवीस धांवा व्हावयाच्या आंतच त्यांच्यापैकीं दोन गडी औट झाले. डेक्कनच्या मंडळीला भय वाटूं लागलें. चौथे प्रिन्स् शिवाजीराव आले. पांचवा नंबर देशमुखांचा होता. त्यांची व शिवाजीरावांची जोडी जमल्यावर मग काय हां हां म्हणतां स्कोअर मरून काढूं, अशी डेक्कन् कॉलेजला फार उमेद होती. शिवाजीरावांनीं पांचसहा धांवा काढल्या नाहींत.तोंच पहिला गडी रन् औट झाला. आतां देशमुखांची पाळी आली. त्यांनीं तंबूच्या बाहेर पाय टाकिला नाहीं, तोंच जिकडून तिकडून टाळ्यांचा वर्षाव सुरू झाला. क्रीडांगणावर शिवाजीरावांनीं सुद्धां त्यांनां धीर दिला. पण मघांशीं पटवर्धनांचा कॅच् सुटल्यापासून त्यांचा उत्साह आणि आनंद यांचा पूर्ण लोप झाला होता. कर्मधर्मसंयोग तरी असा चमत्कारिक आला, कीं, हे ज्या बाजूला उभे होते, त्याच्यासमोर नेमकी इंदिरा बसली होती! देशमुखांनीं तिच्याकडे आतां पाहावयाचें नाहीं, असा निश्चय केला. थोड्या वेळापूर्वी आपल्या हातून जें पातक घडलें त्याचें आतां पूर्ण क्षालन करावयाचें, असा त्यांनीं विचार केला. बोलरनें चेंडू फेंकण्यासाठीं हात वर नेला आणि देशमुखांनीं बॅट वर उचलून चेंडूची दिशा पाहण्यासाठीं डोळे वर केले–समोरच इंदिरा बसली होती; ती आपणाकडे क्रुद्ध दृष्टीनें पाहत आहे, असा त्यांनां भास झाला. तिच्याकडे त्यांचें क्षणमात्र लक्ष्य गेलें. त्यांच्या मनांत विचारांनीं एकच गर्दी उसळून दिली. आपण खेळतों आहोंत याचें त्यांनां भानहि राहिलें नाहीं. इतक्यांत बोलरच्या हातून चेंडू सुटला आणि सूं सूं करीत यांच्या बॅटीखालून जाऊन स्टंपला जोरानें आघात करून पुढें पार चालता झाला! स्टंप मागें उलथून पडली आणि फर्ग्युसन् कॉलेजचे विद्यार्थी आनंदानें उभे राहून "बेल बोल्ड" असें मोठमोठ्यानें ओरडून टाळ्या पिटूं लागले! त्यांचे प्रतिपक्षी, आपला आधारस्तंभ असा एकाएकीं तुटला हें पाहून अत्यंत भयभीत व निराश झाले! या प्रसंगीं देशमुखांच्या मनाची

स्थिति काय होती, याचें वर्णन आम्ही करूं शकत नाहीं. सर्वांनीं आपल्यावर इतकी भिस्त ठेवून आपण त्यांनां फसविलें, हा विचार त्यांच्या मनाला अपार दुःख देत होता!

आतां डेक्कनची सर्व भिस्त कांयती शिवाजीरावांवर होती आणि त्यांनींहि आपली कामगिरी त्या दिवशीं चांगलीच बजाविली. त्या दिवशीं डेक्कन् कॉलेज्च्या ज्या एकशेंपंचायशीं धांवा झाल्या, त्या केवळ शिवाजीरावांच्याच पराक्रमामुळें, यांत संशय नाहीं!

त्या दिवशीं देशमुखांचें चित्त इतकें उद्विग्न आणि खिन्न झालें होतें, कीं, इंदिरेच्या घरीं संध्याकाळीं जाण्याचा विचारच त्यांच्या डोक्यांत आला नाहीं. इंदिरेचा आज त्यांनां अतोनात संताप आला होता. आतां उद्यां मात्र आजच्या पापाचें योग्य प्रकारें क्षालन करावयाचें, उद्यां इंदिरेला आपल्या विचारांत येवढासुद्धां थारा द्यावयाचा नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला होता.

[७]

मॅच् संपल्यावर ते कॉलेज्मध्यें सायकलवरून १५० जावयास निघाले. वाटेतच नानासाहेबांचा–इंदिरेच्या वडिलांचा–बंगला होता, तेथें फाटकांत माईसाहेब उभ्या होत्या; त्यांनीं हटकल्यामुळें गोपाळरावांनां खालीं उतरावेंच लागलें. "आजच्या मॅचचें काय झालें?" याबद्दल माईसाहेबांनीं त्यांच्याशीं चौकशी केली. तेव्हां तर गोपाळरावांनां अधिकच दुःख झालें. तथापि त्यांनीं त्यांनां मॅच्ची थोटक हकीकत सांगितली.

त्या म्हणाल्या "आतां तूं चहा नाहीं का घेऊन जात?"

"नको. थँक्स्! (मी आपला आभारी आहें.) आज मला अगदी इच्छा नाहीं."

"छे! आज तूं फारच थकल्यासारखा दिसतोस. तुझें तोंड किती उतरलें आहे हें! चल ये आंत. चहा घेतल्यावर तुला अगदीं बरं वाटेल. इंदूहि [redacted] आतां इतक्यांतच येईल." असें म्हणून त्या त्यांनां घरांत घेऊन गेल्या.

इंदिरा घरांत नाहीं हें ऐकून गोपाळरावांनां जरा बरें वाटलें. आपण येथून जाण्याच्या अगोदर ती न येईल तर बरें होईल, असाहि विचार त्यांच्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं; पण तसें घडणें शक्य होतें थोडेंच? तीं दोघेंहि बंगल्यांत जाऊन वसतात न वसतात तोंच इंदिराहि आली. तिनें आल्याबरोबर गोपाळरावांकडे पाहून स्मितमुख केलें; पण त्यांनीं तिच्याकडे पाहिलेंहि नाहीं! इतकेंच नव्हे, तर त्या वेळीं ते तिच्याशीं एकहि शब्द बोलले नाहींत! फराळ चालला असतां इंदिरेनें मॅच्ची सविस्तर हकीकत आईला सांगितली आणि अर्थात्च त्यांत, गोपाळरावांनीं कॅच् कसा सोडला आणि ते पहिल्याच बॉलला कसे औट झाले, हेंहि सांगितलें.

फराळ आटपल्यावर ते उठले, आणि माईसाहेबांनां म्हणाले "जातों मी आतां."

"अरे, आतां बरीच संध्याकाळ झाली. आतां कशाला जातोस? उद्यां सकाळीं जेवून इथूनच मॅचला दोघंजणं जा झालं!"

"छे, मला गेलंच पाहिजे. जरूरीचं काम आहे तिथं."

"इतकं का जरूरीचं आहे? मग जा तर."

भाईसाहेबांची परवानगी मिळतांच गोपाळराव एकदम उठले आणि तडक पोर्चच्या पायऱ्या उतरून खालीं आले. इंदिराहि त्यांनां फाटकापर्यंत पोंचविण्यास त्यांचेबरोबर आली. गोपाळरावांची ती मुद्रा आणि त्यांनीं धारण केलेलें मौनव्रत पाहून तिलाहि आज मघांपासून कसेसेंच वाटत होतें.

बागेंत येतांच इंदिरा भीत भीत विचारते "आज आपण माझ्याशीं बोलायचं कां बरं नाहीं?"

गोपाळरावांनीं तिच्याकडे एकदा तुच्छतेनें पाहिलें आणि म्हटलें "इंदिरे! आजपासून तुझा आणि माझा कांहींएक संबंध नाहीं असें समज! तुझ्या

वाटलें असेल, कीं, तुझ्या कालच्या सांगण्यामुळेंच मीं आज कॅच् सोडला अन् पहिल्या बॉलला औट झालों; पण तसें मुळींच नाहीं! माझ्या प्रेमाचा असा नीचपणानें फायदा घेऊन तूं मला जें विश्वासघाताचें कृत्य करावयास सांगत होतीस, तें करायचें नाहीं असें मीं कालच ठरविलें होतें. आज जो प्रकार झाला, तो त्या वेळेस मीं चुकून तुझ्याकडे पाहिलें अन् त्यामुळें जरा गोंधळून गेलों, म्हणून झाला. पण इंदिरे! उद्यां याचा पूर्ण बचपा निघालेला तूं पाहशील! कर्तव्यापुढें मी तुझा अन् तुझ्या प्रेमाचा त्याग तुच्छ मानतों! माझें प्रेमसर्वस्व मीं तुला वाहिलें होतें; पण तें मात्र परत घ्यायला माझें दुबळें मन समर्थ नाहीं. या प्रसंगीं माझ्या मनाला किती यातना होत आहेत, हें एकट्या त्या ईश्वरालाच ठाऊक—"

यावर इंदिरा कांहीं बोलणार, तों तिच्याकडे दृष्टिहि न फेंकतां गोपाळरावांनीं सायकलवर चटदिशीं उडी टाकिली आणि त्या अंधकारांत ते लवकरच दिसेनासे झाले!

[८]

दुसरे दिवशीं मॅच् बरोबर बारा वाजतां सुरू झाली. आज देशमुखांची चर्या उदास किंवा खिन्न न दिसतां, निश्चयी दिसत होती. त्यांच्या हातून आज एकहि कॅच् सुटला नाहीं.

फर्ग्युसन् कॉलेज्च्या टीमला आज नशीब अनुकूल नव्हतें असें दिसलें. थोड्याच वेळांत त्यांची सर्व टीम एकशेंतेवीस धांवांत निघाली!

डेक्कन् कॉलेज्चे प्लेअर्स आजहि कालच्या अनुक्रमानेंच खेळावयास गेले. काल पडलेला एकोणीस धांवांचा फरक व आजच्या एकशेंतेवीस मिळून एकशेंबेचाळीस धांवा त्यांनां भरून काढावयाच्या होत्या. पहिले दोनतीन गडी तीसपस्तीस धांवांतच जाऊन पुनः प्रिन्स् शिवाजीराव व देशमुख यांचीच जोडी आजहि जमली. दोघेहि उत्तम खेळणारे आणि दोघांनांहि सपाटून आवेश चढलेला. आज दोघांनीं—विशेषतः देशमुखांनीं—प्रतिपक्षाच्या बोलिंगचा पार धुव्वा उडवून दिला! बौंडरीज् मागून बौंडरीज् सुरू होऊन रन्सवर रन्स् चढूं लागल्या! जों जों धांवांचा आंकडा एकशेंचाळीसांजवळ जाऊं लागला, तों तों डेक्कन्च्या मंडळींचा आनंद अधिकाधिक वाढूं लागला! त्यांचा तंबू टाळ्यांच्या गजरांनीं अगदीं दुमदुमून गेला. थोड्याच वेळांत देशमुखांच्या एका बाउंडरीनें स्कोअरचा आंकडा एकशेंत्रेचाळीस झाला. आणि डेक्कन् कॉलेज्च्या सर्व मंडळींनीं आनंदातिशयानें, Hip, Hip, Hurrah! अशी एकच आरोळी ठोकली!

[९]

गोपाळरावांनीं आपल्या पातकाचें आज पूर्ण क्षालन केलें!

नानासाहेब-इंदिरेचे बडील-आज मॅच् पहावयास आले होते. मॅच् आटोपल्यावर त्यांनीं गोपाळरावांजवळ येऊन आज त्यांनीं दाखविलेल्या क्रीडापटुत्वाबद्दल त्यांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन केलें आणि आज त्यांचे बंगल्यावर जाण्याची गोपाळरावांची अल्पसुद्धां इच्छा नसतांना, नानासाहेब त्यांनां आपल्यावरोबर तिकडे घेऊन गेले.

वऱ्हाडांतील कोणी रावबहादुर भेटावयास आल्यामुळें नानासाहेब बाहेर थोरल्या दिवाणखान्यांत त्यांच्याशीं बोलत बसले होते. माईसाहेबहि थोड्याच वेळानें घरांत कांहींशा कामाला गेल्या. तेव्हां छोट्या दिवाणखान्यांत गोपाळराव आणि इंदिरा हीं दोघेंच राहिलीं. माईसाहेब खोलीच्या बाहेर जातांच गोपाळरावहि उठले आणि खोलीच्या बाहेर जाण्यासाठीं दाराकडे वळले. आतां मात्र इंदिरेला दुःखाचा उमाळा आवरेना. ती गोपाळरावांच्या वाटेंत आड येऊन, दोन्ही हातांनीं चेहरा झांकून, मुसमुसून रडूं लागली.

"आपण मला क्षमा नाहीं का करणार?"

इंदिरेच्या अश्रूंनीं गोपाळरावांचें हृदय विरघळून गेलें. ते करुणापूर्ण स्वरानें म्हणाले "इंदिरे! तुला इतक्या लवकर पश्चात्ताप झाला, हें मी माझें भाग्य

समजतों. रडूं नकोस–मी तुला केव्हांच पूर्ण क्षमा केली आहे—"

आजचा सायंकाळ त्या भावी दंपतीला फारच मधुर व आनंदाचा वाटला.

कांहीं वेळानें आठवण झाल्यासारखें करून इंदिरेनें गोपाळरावांनां विचारिलें "हो खरंच गडे, काल आपल्याला एकादं चमत्कारिक पत्र नाहीं का मिळालं?"

"हो, तूं म्हणतेस तसं एक पत्र काल मला आलें होतें खरें. त्यावर 'मॅच् संपल्यानंतर उघडावें,' अशी सूचना लिहिली होती; पण त्याबद्दल विचार करण्याजोगी काल माझी मनःस्थितिच नव्हती. अन् खरं विचारशील, तरहा वेळपर्यंत मला त्याची आठवणच झाली नाहीं!"

"मग तें जवळ असलं तर आतां तरी वाचून पहायचं."

गोपाळरावांनीं आपले खिसे चांचपून तें पत्र हुडकून काढिलें आणि मोठ्या जिज्ञासेनें वाचलें. पत्र वाचून झाल्यावर गोपाळराव उद्गारले "अस्सें! एकंदरींत, आपल्या मागणीच्या धुडाशीं हें गुपित होतें? तरी मला वाटलेंच! इंदिरे, तर मग खरोखरच मी तुझा मोठा अपराधी आहें. मी तुला काल इतका टाकून बोललों, याबद्दल मी तुझी अंतःकरणपूर्वक कितीहि क्षमा मागितली, तरी ती थोडीच होणार आहे!"

इंदिरेचा गळा दाटून आला. ती गद्गदस्वरानें म्हणते "त्यांत आपला काय अपराध आहे? इकडून असंच वर्तन होईल, अशी माझी खात्री होती. अन् शेवटीं त्याप्रमाणंच घडलं—"

गोपाळरावांनीं इंदिरेकडे पाहून प्रेमानें गोड हास्य मात्र केलें!

काम करण्याची रीत.

आपणाला जें कांहीं करावयाचें असेल तें मन लावून करावें.

काम कितीहि क्षुल्लक असेना, तें एकदां हातीं घेतलें तर आपला हातून होईल तितक्या चांगल्या रीतीनें करण्याचा प्रयत्न करावा.

निष्काळजीपणानें काम केल्यानें त्यापासून आपल्या मनावर अनिष्ट परिणाम घडतो. काम निष्काळजीपणानें करण्याबद्दलीं तें न बोलतें घरें निष्काळजीपणाची सवय एकदा लागली म्हणजे त्या मनुष्याचा कधीहि उदयकाल देखवत नाहीं.

कर्म आपलें असो किंवा दुसऱ्याचें असो, क्षुल्लक असो किंवा महत्त्वाचें असो, तें चांगल्या रीतीनें करावें. कामाविषयीं काम करण्याची रीत आपणाला अधिक महत्त्वाची आहे.

स्नानसंध्या परमेश्वराची कामें—केर काढणें, कपडेलत्ते धुणें, भांडीं घांसणें, घर स्वच्छ ठेवणें हीं देखील काळजीपूर्वक व आपलीशीं करीत जावीं. मनुष्यावर मोठा प्रसंग पडला म्हणजेच त्याची परीक्षा होते, असें नाहीं. एकाद्या क्षुल्लक कामावरूनहि त्याची परीक्षा होते.

कामाकडून मोबदला कधींहि मिळत नाहीं, या सबबीवर कामाची हेळसांड करणें हा पैशाचा आहे. निष्काळजीपणानें काम करणारा आपलें स्वतःचें अहितच नुकसान करतो

वर्गात गुरूने आपल्या परीने विषय समजावून दिल्यावर एका शिष्याने उठून असा विचारण्यास आरंभ केला. गुरूने त्याला उत्तर दिलें 'बाबारे, मला माहित्याचे दोन शब्द सिद्धान्त पक्ष स्पष्टीकरण मला तें कांहीं शिकावयाचें तें मी शिकविलें. तुला कांहीं अधिक शिकायचें असेल तर माझा पगार वाढवण्याचा सांग. पगार वाढविला म्हणजे त्या वेळचे मी अधिक शिकवीन"

मोबदल्याच्या मानानें काम कमी अधिक मोठ्या प्रमाणावर पाडावयाचें, याबाबतींत भयंकर गड़बड़ माजली. मनुष्याची योग्यता त्याला मिळणाऱ्या पैशानें मोजतां येत नाहीं; तर तो काम करतो त्यावरून मोजतां येते. काम करावयाचें तें आपलें कर्तव्य म्हणून करावें, म्हणजे त्यापासून आपली उन्नति होऊन समाजाला लाभ होतो.

निष्काळजीपणाची सवय ही मोठ्या जड बेडीसारखी आहे. ती एकदा जडली, म्हणजे ती त्याग केल्याशिवाय सुटत नाहीं.

पैशासाठीं काम करणाऱ्याला पुरुषार्थाचें सत्त्वच कळलें नाहीं. कामाच्या मोबदल्याने म्हणजे कर्तव्य म्हणून काम करणारा खरा मनुष्य मारला जातो आणि यंत्रमात्र होतो.



हरिद्वारचा सामान्य देखावा.

Photo] [L. Chunilal & Co., Muttra.

माझा उत्तरहिंदुस्थानांतील प्रवास.

—लेखक—
श्रीयुत प्रो. गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.

लेखांक २
हरिद्वार
किंवा
गंगाद्वार.

"शिरः शार्वं स्वर्गात्पशुपतिशिरस्तः क्षितिधरम्!"
"महीध्रादुत्तुंगादवनिमवनेश्चापि जलधिम्।"
"अधो गंगा सेयं पदमुपगता लोकविमुदे!"

पहिल्या लेखाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें आम्ही मुरादाबादेस पांचसहा दिवस मुक्काम केला. मुरादाबाद हें बऱ्याच मोठ्या वस्तीचें शहर असून तें तीन चार रेलवेंचें जंक्शन स्टेशन आहे. तेथूनच नैनितालकडे जाणारा रेलवेचा एक फांटा निघतो. दुसरा फांटा मुसलमान लोकांच्या कॉलेजामुळें प्रसिद्धीस आलेल्या अलीगड शहराकडे जातो. ओंदरोहिलखंडरेलवेची एक मोठी शाखा—सहारणपुर ते मोगलसराई—इजवर मुरादाबाद आहे. येथून लक्सरपर्यंत या मुख्य शाखेनें हरिद्वारला जाण्याकरितां जावें लागतें. लक्सरपासून डेहराडून या शीतळ निवासस्थानापर्यंत एक रेलवेची शाखा जाते. तिच्यावरच हरिद्वार आहे. लक्सरपासून प्रथमतः हरिद्वारपर्यंत रेलवेचा फाटा तयार केला गेला. तो १८८६ मध्यें पुरा झाला, व तोच पुढें १९०० सालीं डेहराडूनपर्यंत नेण्यांत आला. डेहराडूनहून मसुरीला (हिमालयांतील दुसरें उंच ठिकाण) वाट जाते. मुरादाबादेपासून हरिद्वार शंभर मैल लांब आहे. सोईस्कर गाडी मुरादाबादेहून रात्रीं निघून हरिद्वारास सकाळीं पोहोंचते. लक्सर जंक्शनला दोन तीन तास थांबावें लागतें.

आम्ही हरिद्वारास जाण्याकरितां रात्रीं अकरा वाजतां निघालों तों लक्सरला सुमारें ४ वाजतां येऊन पोहोंचलों. तेथें दोन अडीच तास थांबावें लागलें. परंतु पुढल्या प्रवासास अर्धा तास सुद्धां लागत नाहीं. प्रवास रात्रीचाच असल्यामुळें मुरादाबादेपासून लक्सरपर्यंतचा प्रदेश दिसला नाहीं. परंतु राहूनराहून मनाला एक प्रकारचा संतोष वाटत होता. हरिद्वार, गंगोत्री, बदरिकेदार हीं उत्तरेकडील अत्यंत पवित्र स्थानें. यांचीं नांवें मीं लहानपणीं आमच्या वडील मंडळीच्या तोंडून ऐकलीं होतीं. या यात्रा घडण्यास फारच मोठी पूर्वपुण्याई लागते, अशा प्रकारचे उद्गार मीं ऐकलेले होते. त्यांचें मला आतां स्मरण झालें. या पूर्वकाळीं अत्यंत बिकट अशा यात्रांपैकीं हरिद्वार तरी अर्वाचीनकाळीं थोडें जास्त सुलभ झालें आहे. तरीपण असें पवित्र स्थान एका दीड्यर्षाच्या आंत मला दोनदां पाहावयास मिळालें, हें पाहून माझी पूर्वपुण्याई खरीच फार मोठी असली पाहिजे, असें वाटून मला एक प्रकारचा आनंद झाला. कारण, मी हरिद्वारला दोन वेळां गेलों. पहिल्यांदां गेलों तो १९१० च्या आक्टोबरमध्यें गेलों होतों. त्या वेळीं फक्त दोन दिवसच मीं तेथें वास केला होता. या खेपेला आम्ही तेथें सुमारें एक आठवडा काढला. यामुळें या सुंदर व पवित्र स्थानाची निरनिराळ्या ऋतूंतील शोभा मला पाहण्यास मिळाली. या लेखांत माझ्या पहाण्यांत आलेल्या दोन्ही स्थितींचें मी वर्णन देणार आहें.

वर लिहिलेंच आहे कीं, आम्ही लक्सरला सुमारें चार वाजतांच येऊन पोंचलों. या दिवसांत इकडे संधिप्रकाश फार वेळ असल्यामुळें चार साडेचार वाजतांच वांगलें दिसूं लागतें. या ठिकाणापासूनच हरिद्वारचे पंडे दृष्टीस पडूं लागतात. यात्रेकरूंच्या शोधार्थ ते प्लॅटफार्मावर सारखे हिंडत असतात; व भेटेल त्याला "हरिद्वारला जायचें आहे? कोठें उतरणार? तुमचें नांव काय? तुमचा येथें पंड्या आहे?" वगैरे प्रश्न विचारण्याचा सपाटा लावतात. मी पहिल्या खेपेला हरिद्वारला गेलों होतों, तेव्हां एका पंड्याचें घरींच उतरलों होतों. परंतु तेथली जागा फार कोंदट व गैरसोईची होती. म्हणून या खेपेला आम्ही मुरादाबादेहून, गांवाबाहेरील एका चांगल्या धर्मशाळेच्या व्यवस्थापकाला पत्र घेतलें होतें. म्हणून आम्हांला पंड्याची जरूरी नव्हती.

लक्सरपासून वऱ्याच झाडीच्या प्रदेशाला सुरवात होते व उत्तरेच्या बाजूला टेकड्याटेकड्या दिसूं लागतात. जो हिमालय पर्वत सर्व जगांत उंच आहे, ज्याचा विस्तार 'पूर्वापरौ तोयनिधीवगाह्य' असा आहे, त्या पर्वताच्याच पायथ्याशीं आपण चाललों आहों, असें या लहानशा टेकड्या पाहून वाटत नाहीं. ज्याप्रमाणें नदीच्या उगमाशीं नदी लहानशा झऱ्यासारखी असते, व त्याचाच पुढें प्रचंड नद बनतो, तशांतली या टेकड्यांची स्थिति आहे. डेंगभर वाटणाऱ्या या थोड्या टेकड्यांचाच वर जातां जातां अलंघ्य पर्वत बनून, त्यांचीच कांचनगंगा धवलगिरी वगैरे सारखीं अठ्ठावीस एकुणतीस हजार फूट उंचीचीं शिखरें झालेलीं आहेत, हें मनांत आलें म्हणजे सृष्टिकर्त्याचें कौतुक केल्यावांचून रहावत नाहीं.

याप्रमाणें विचार मनांत येत आहेत नाहींत तोंच हरिद्वारचें स्टेशन आलें व आमची उतरण्याची घाई झाली. स्टेशनवर तर काय पंड्यांची गर्दीचगर्दी होऊन गेली. या पंड्यांचा पोशाख अगदीं साधा असतो. नेसूं धोतर, अंगांत एक शुभ्र तालिमबाजी सदरा व डोक्यास पांढऱ्या विरविरीत कापडाची तीनचार पैशांची टोपी. कांहींजणांजवळ वह्यांचीं पुडकीं असतात. हे लोक [illegible] आपल्या घरीं येण्याबद्दल सारखा लकडा [illegible] असतात. स्टेशनच्याबाहेर आल्यावर पंड्यांच्या झुंडीच्या झुंडी दृष्टीस पडतात. प्रत्येक यात्रेकरूगणिक येथें पंड्ये आहेत की काय, असा भास होतो व एका दृष्टीनें हे खरेंहि आहे. या गांवची वस्ती म्हणजे मुख्यतः पंड्यांचीच आहे. पेंडे, यात्रेकरूंना लागणारे मिठाई व इतर जिन्नस विकणारे पुरभय्ये, व परान्नपुष्ट बैरागी आणि याचक या त्रिवर्गानें या गांवची सर्व वस्ती भरलेली आहे. या प्रत्येकाचा धंदा म्हणजे यात्रेकरूंना लुटण्याचा ! प्रत्येक पंड्याला असें वाटतें, कीं, आपण यात्रेकरूजवळ किती मागूं आणि किती नाहीं. बाकी या पंड्यांमध्यें बरेच लोक चांगले सधन असतात. कांहींतर फारच श्रीमान झालेले आहेत. तरी यांचा धनलोभ मात्र कमी झालेला नाहीं. बैरागी व तपस्व्यांची तर गोष्टच बोलूं नका. हे लोक यात्रेकरूंच्या पैशावर सारखी चैन करीत असतात. बाजारांतून आपण जाऊं लागलों म्हणजे हे तुंदिलतनु लोक सारखे पाठीस लागतात. एक म्हणतो "बाबूजी हमकू दूध लाव !" दुसरा म्हणतो "बाबूजी हम मलई चाहते हमकू मलई देव !" तिसरा तिसरेंच कांहीं मागतो ! सारांश, या लोकांनां याचना व भोजन याखेरीज दुसरा विषयच ठाऊक नाहीं. याप्रमाणें येथले लोक पाहून व त्यांची दिनचर्या व एकंदर वृत्ति आणि वागणूक पाहून मनुष्याला एक प्रकारचा खेदच होतो. काय या लोकांचें जीवित ! 'काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुंक्ते' अशी यांची वृत्ति व कृति ! अशा माणसांबद्दल आदर उत्पन्न होण्याऐवजीं तिरस्कार मात्र उत्पन्न होतो. याप्रमाणें येथल्या वस्तीकडे पाहिलें म्हणजे धर्मप्रवृत्ति जागृत होण्याऐवजीं उलट मावळूनच जाते. तरी या ठिकाणचें सृष्टिसौंदर्य पाहिलें म्हणजे मात्र याच्या अगदीं उलट परिणाम होतो व या स्थानाचें इतकें माहात्म्य व पावित्र्य सतत कायम कां राहणार हें ध्यानांत येतें. असो.

वर सांगितलेंच आहे, कीं, आम्हांला या खेपेला पंड्याच्या साहाय्याची जरूरी नव्हती. म्हणून आम्हीं एक दोन घोड्यांची गाडी करून त्यांत सर्व सामान भरलें व आमच्या ठरलेल्या ठिकाणीं जाण्यास निघालों. तरी एक पंड्या आमच्या गाडीच्या बॉक्सवर बसलाच ! गांव लहानच असल्यामुळें आमची धर्मशाळा आम्हांला तेव्हांच सांपडली. अर्थात्, आम्हांला पंड्याची मुळींच गरज लागली नाहीं. तरीपण आम्हीं हरिद्वाराहून निघण्याचे आधीं, आमचेबरोबर आलेल्या पंड्यास एक रुपया दिला !

आम्ही ज्या धर्मशाळेंत उतरण्यास गेलों होतों, ती धर्मशाळा साधारण गांवाबाहेर असून चांगली प्रशस्त व स्वच्छ होती; व तेथील व्यवस्थापकहि फार चांगला माणूस असल्यामुळें व त्याला थोडें फार इंग्रजी येत असल्यामुळें आम्हांला भाषाव्यवहाराची अडचण भासली नाहीं व आमची सर्व सोय उत्तम झाली. प्रथमतः जेव्हां मी हरिद्वारास आलों होतों तेव्हां जेवणाखाणाचे बरेच हाल झाले. म्हणून या खेपेला आम्हीं बरोबर 'कुकर' घेतला होता. प्रवासांत या 'कुकर'पासून फारच सोय व सुख होतें. आपण प्रवासांत आहों असेंसुद्धां वाटत नाहीं. शिवाय, कुकरमध्यें अन्न ठेवून फिरावयास जावयास सांपडतें, व परत यावें तों सुग्रास अन्न तयार! या कुकरनें आम्हांला पुराणांतरींच्या द्रौपदीच्या स्थालीचीच आठवण झाली. त्या स्थालींत ज्याप्रमाणें इच्छेप्रमाणें आपोआप अन्न तयार होत असे, तसाच येथेंहि प्रकार होतो. भाजी, भात, वरण हे पदार्थ 'कुकर'मध्यें घालून 'कुकर' स्टोववर ठेवून खुशाल बाहेर जावें व तास दीड तासानें परत यावें, तों स्वयंपाक्यानें


तयार केल्याप्रमाणें सुंदर अन्न तयार होतें. अशी आमची व्यवस्था असल्यामुळें आमचा हरिद्वार येथील आठवडा फारच सुखानें व आनंदानें गेला; व तो इतक्या जलद गेला, कीं, आमचें हरिद्वारचें राहणें स्वप्नांतील तर नव्हे, असें आह्मांला केव्हां केव्हां वाटे.

हरिद्वार या पवित्र स्थानाचा विशेष ह्मणजे तेथली गंगा होय. बाकी, हें गांव काशी, प्रयाग किंवा मथुरा, द्वारका यांप्रमाणें मोठें नाहीं. येथली वस्ती अवघी चार हजार आहे. येथें मोठमोठ्या इमारती नाहींत. येथें भव्य देवळें नाहींत. येथें मोठा व्यापार आहे असाहि प्रकार नाहीं. प्रत्यक्ष गांव मोठ्याशा खेड्यासारखें आहे. घरेंहि सामान्यच आहेत. परंतु या गांवची रचना, ठेवण व येथली गंगा हीं मात्र अप्रतिम आहेत. ह्मणूनच या गांवाला फार प्राचीन काळापासून इतकें पावित्र्य आलेलें आहे.

हें पवित्रस्थान निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या नांवानें प्रसिद्ध होतें. प्रथमतः शिवभक्त व विष्णुभक्त यांचेमध्यें या गांवाच्या नांवासंबंधानें मोठा वाद आहे. शिवभक्त ह्मणतात या गांवाचें नांव हरद्वार. विष्णुभक्त ह्मणतात या गांवाचें खरें नांव हरिद्वार. या दोन पंथांच्या लोकांमध्यें मोठमोठ्या मारामाऱ्या या स्थळीं होत व त्या अगदीं अव्वल इंग्रजीपर्यंत चालू होत्या. या गांवाचें फार जुनें नांव कपिल हें होय व अजूनहि कपिलस्थान ह्मणून एक जागा दाखविण्यांत येते. कपिल हा एक फार प्रख्यात तपस्वी होता. या कपिल शहरालाच तैमुरलंगानें आपल्या इतिहासांत कुटिल ह्मटलें आहे असें ह्मणतात. प्रसिद्ध चिनी प्रवासी हुएनसंग हा या ठिकाणीं आला होता. त्यानें या गांवाचें नांव मोयुलो असें दिलें आहे. मोयुलो ह्मणजे मयापुर किंवा मयूर असावें. मयापुर या नांवाचें फार जुनें ठिकाण हरिद्वारच्या दक्षिणेस फारच जवळ आहे. अकबराच्या कारकीर्दीतील प्रसिद्ध इतिहासकार अबुल फाजल यानें या गांवाला मय अथवा हरिद्वार असें ह्मटलें आहे. अकबराच्या काळीं येथें तांब्याच्या नाण्यांची एक टांकसाळ होती व अकबर आपल्याला प्यावयाला पाणी नेहेमीं या ठिकाणाहून नेत असे, असें ह्मणतात. या ठिकाणाला गंगाद्वार असेंहि नांव आहे व मुसलमान इतिहासकार या स्थलाचा निर्देश गंगाद्वार ह्मणूनच करतात; व पुढील वर्णनावरून हेंच नांव अन्वर्थक आहे असें दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं.


या पवित्र स्थानाचें येवढें पूर्वचरित्र बस्स आहे. आतां आपण त्याच्या सांप्रतच्या स्वरूपाकडे वळूं. हरिद्वार हें गांव गंगेच्या दक्षिण तीरावर शिवालिक नांवाच्या हिमालयाच्या पायथ्याच्या पायथ्याशीं असलेल्या टेकड्यांच्या बाजूला वसलेलें आहे व गंगानदी येट गांवाला व टेकड्यांनां लागून गेली आहे. नदीच्या दोन्ही तीरांस टेकड्याची रांग आहे व मध्यें एक दरी झाली आहे. यामुळें हिमालयानें जणूं काय आपल्या लहान लहान टेकड्यांचें एक दार बनवून त्यांतून गंगेला जाण्यास वाट दिली आहे की काय, असा भास होतो. कारण, दोन टेकड्यांमधला भाग खिंड किंवा द्वार यासारखाच खरोखरी दिसतो व ह्मणून गंगाद्वार हें नांव जास्त अन्वर्थक आहे असें आह्मीं वर ह्मटलें आहे. गांवच्या वरच्या बाजूला नदीकिनाऱ्यावर उभें राहून उत्तर दिशेकडे दृष्टि फेंकली ह्मणजे अद्वितीय देखावा दिसतो. दृष्टि पोंचत नाहीं येथपर्यंत सारखी टेकड्यांची रांगची रांग लागलेली दिसते. या टेकड्या एकावर एक अशा सारख्या चढत चढत गेलेल्या आहेत. व आपण दृष्टि कितीहि उंच केली तरी या टेकड्या ह्मणून संपत नाहींत. अगदी दूरवर डोळे ताणून ताणून पाहिलें ह्मणजे पांढऱ्या शुभ्र रंगाची पर्वतराजि दिसूं लागते. ही पर्वतराजि आहे किंवा पांढऱ्या ढगाचा समुदाय आहे, याबद्दल भ्रांति उत्पन्न होते. परंतु वर्फाच्छादित ह्मणूनच सदा धवल अशा हिमवानाचा हा धवलगिरी होय, अशी खात्री झाली ह्मणजे मन सानंदाश्चर्यांत निमग्न होतें. या पर्वतराजीच्या खालीं पाहिलें ह्मणजे स्फटिकाप्रमाणें शुभ्र असा गंगाप्रवाह दूरपर्यंत दिसतो. गंगेच्या पाण्याइतकें शुभ्र व निर्मल पाणी दुसऱ्या कोणत्याहि नदीचें नसेल. मी पहिल्यानें हरिद्वारास गेलों तो आक्टोबरमध्यें. तो ऋतु हरिद्वारास जाण्यास फारच उत्तम. त्या ऋतूंत येथील हवा फारच चांगली असते. फार थंडीहि नाहीं, फार उष्णताहि नाहीं. पाणी तर इतकें निर्मळ व स्वच्छ असतें, कीं, गळाभर खोल पाण्यांतसुद्धां एकादी सुई किंवा टांचणी स्पष्टपणें दिसते. या नदीच्या प्रसन्न पाण्याकडे पाहून प्राण्याचें मन प्रसन्न झाल्याखेरीज राहतच नाहीं. एकीकडे त्या हिरव्यागार टेकड्या, व त्यांचेच पायथ्याशीं शुभ्र दगड, व तो स्फटिकाप्रमाणें शुभ्र पाण्याचा प्रवाह, हा देखावा एकसमयावच्छेदेंकरून पाहिला ह्मणजे कसाहि मनुष्य असो, त्याचा

अंतरात्मा गारीगार झाल्याखेरीज रहात नाहीं. त्या पवित्र स्थानीं क्षणभर उभें राहिल्यावर आमचीहि तीच अवस्था झाली. हिमालयाचा शुभ्र विस्तार, जणूं कांहीं स्वर्गापर्यंत पोंचलेला दिसत होता व त्याची एक सोपानपरंपरा झाली आहे, असा भास होई. गंगा स्वर्गातून आली ती याच सोपानपरंपरेनें आली. ती प्रथम स्वर्गातून शंकराच्या डोक्यावर पडली, तेथून हिमवानाच्या माथ्यावर पडली व तेथून अवनितलाला पोंचून खालीं खालीं जात शेवटीं सागराला मिळाली, असें भर्तृहरीनें वर्णन केलें आहे तें अत्यंत यथार्थ आहे असें मला वाटलें. तसेंच, सृष्टिदेवीचे अद्वितीय देखावे पाहिल्यावर त्यांचें रूपकात्मक वर्णन करण्याची कवीला स्फूर्ति होऊन त्या रूपकात्मक वर्णनाच्याच पुढें पुराणांतील कथा होतात असें जें ह्मणतात, त्याचीहि सत्यता माझे डोळ्यापुढें उभी राहिली. व असलाच एकादा गंगेचा देखावा पाहून महाभारतांतील किंवा रामायणांतील गंगावतरणाची कथा एकाद्या कवीच्या डोक्यांत आली असावी, असें मला त्या वेळीं वाटलें व त्या देखाव्यानें मला माझ्या लहानपणच्या एका अदृष्टपूर्व अनुभवाचें स्मरण झालें. मी लहानपणीं इंग्रजी शिकण्यास होतों, त्या वेळीं आह्मांला कोंकणांतून येण्याजाण्यास बैलगाडीच्या रस्त्यानें जावें लागत असे. एका मे महिन्यांत आह्मी पुण्याहून निघून आमच्या गांवीं जात होतों. वाटेंत आह्मांला प्रचंड सह्याद्रि ओलांडावा लागतो. आह्मी पहांटेच्या सुमारास सह्याद्रीच्या पुष्कळ उंच उंच टेकड्या उतरून एका पर्वताच्या शेवटाला आलों, तों तेथें मीं एक अनुपमेय देखावा पाहिला. त्या दिवशीं धुकें फार आलें होतें. आह्मी समोर दिसणारे डोंगर ओलांडून कोंकणाच्या बाजूकडील डोंगरांच्या माथ्यावर आलों मात्र, तों आमच्यापुढें एक अफाट समुद्र पसरला आहे असें आह्मांला वाटलें! तें सर्व जग व्यापणारें धुकें घेट समुद्राप्रमाणें भासत होतें. ज्या ठिकाणीं धुकें किंचित् कमी दाट होतें तेथें थोडा भूमिभाग दृगोचर होत होता. असे भूमिभागाचे लहान लहान तुकडे समुद्रांतील लहान लहान बेटांप्रमाणें दिसत होते. हा विलक्षण देखावा पहात आह्मी किती वेळ तरी उभे होतों. इतक्यांत आमच्यामागें पूर्व दिशेला सूर्यानें आपलें डोकें उदयाचलाच्या माथ्यावर काढल्यावरोबर त्याचे किरण त्या हिमतुषारमय समुद्रावर पडूं लागले, तसतसें तें धुकें वितळून आह्मांला समुद्राच्या ठिकाणीं जमीन दिसूं लागली, व या समुद्राचा हा पालट एका क्षणांत झाला. हा विलक्षण देखावा पाहून कोंकणप्रांत निर्माण झाल्याची कथा कशी उत्पन्न झाली असेल, याची मला उत्तम कल्पना आली. पूर्वी सह्यादि समुद्र होता, ह्मणजे सर्व कोंकणाचा भाग जलमय होता. पुढें परशुरामानें आपल्या बाणानें समुद्राचें पाणी मागें हटवून कोंकणाचा भूमिभाग निर्माण केला, अशी दंतकथा आहे. ही दंतकथा मीं पाहिलेल्या देखाव्यावर उत्तम रूपक आहे. तेव्हां माझ्यासारख्या प्रत्यक्ष अनुभव आलेल्या एकाद्या कवीनें ही दंतकथा रचली असावी, असें मला त्या वेळीं वाटलें. हरिद्वारच्या गंगाकिनाऱ्यावरील अलौकिक देखावा अवलोकन करून गंगावतरणाची कथा अशीच रूपकानें निर्माण झाली असावी, असें मला वाटतें. ही कथा रामायणांत व महाभारतांत बहुतेक सारखीच आहे. महाभारतांत गंगावतरणाचा अगस्त्य ऋषीनें समुद्र प्राशन करून टाकल्याचा कथेशीं संबंध जोडला आहे. इक्ष्वाकु वंशांत फार प्राचीन काळीं सगर ह्मणून फार मोठा राजा होऊन गेला. त्याला दोन बायका होत्या. एकीपासून त्याला असमंज ह्मणून चिरकालिक कीर्ति मिळविणारा मुलगा झाला व दुसरीपासून साठ सहस्र मुलगे झाले. सगरानें एकदां अश्वयज्ञास प्रारंभ केला. परंतु त्याचा अश्व असूयाप्रेरित इंद्रानें पळवून नेऊन पाताळांत कपिल-महामुनि तप करीत होते तेथें नेऊन ठेवला. सगरानें आपल्या साठ सहस्र मुलांनां अश्वशोधार्थ पाठविलें. त्यांनीं अश्वाचा दशदिशा शोध केला. तरी त्याचा मुगावा लागला नाहीं. तेव्हां त्यांनीं पित्राज्ञेनें पृथ्वी खणण्यास प्रारंभ करून ते पाताळापर्यंत खणीत गेले. तेथें त्यांनीं कपिल महामुनि व त्यांचे शेजारीं आपला यज्ञाश्व पाहिला. हाच चोर समजून ते त्यांच्या अंगावर धांवले. कपिल महामुनींनां राग येऊन त्यांनीं या साठसहस्र सगरपुत्रांनां भस्मसात् करून टाकिलें. इकडे सगर आपले मुलगे अजून कां येत नाहींत अशा विवंचनेंत होता. शेवटीं फार काळ लोटला ह्मणून त्यानें आपला नातू अंशुमान याला त्यांचे शोधार्थ पाठविलें. तो शोध करीत करीत कपिल महामुनि ज्या ठिकाणीं होते त्या ठिकाणीं आला व त्यानें त्या मुनीला प्रणाम करून त्यांनां कुशल प्रश्न केले व आपल्या चुलत्यांची माहिती विचारली.



कनखल तीर्थ.

Phcto] [L. Chunilal & Co., Muttra.



हरीची पायरी.

Photo] [L. Chunilal & Co, Muttra.

तेव्हां कपिल महामुनि संतुष्ट होऊन त्यांनीं त्याला अश्व परत दिला व सगराच्या भस्मसात् झालेल्या मुलांच्या उद्धाराकरितां गंगा पातालाप्रत आणण्यास सांगितलें. अश्व परत आल्यावर सगरानें आपला यज्ञ पुरा केला. अंशुमानाला गंगा खालीं कशी आणावी हें समजलें नाहीं. पुढें त्याला दिलीप झणून मुलगा झाला, त्यानें ही गंगा आणण्याची खटपट केली, परंतु त्याचेहि हातून सगरपुत्रांचा उद्धार झाला नाहीं. परंतु दिलीपाचा मुलगा भगीरथ झणून होता. हा फार धार्मिक व दृढनिश्चयी होता. त्यानें आपल्या पूर्वजांचा उद्धार करण्याचा निश्चय केला व त्याकरितां त्यानें घोर तप आरंभलें. त्या तपानें प्रसन्न होऊन गंगेनें पातालावर येण्याचें कबूल केलें. परंतु "स्वर्गाहून खालीं पडतांना माझा वेग पृथ्वीला सहन होणार नाहीं. तरी तूं शंकराची आराधना करून त्यांनां आपल्या डोक्यावर मला घेण्यास विनंति कर," असें गंगेनें सांगितलें. गंगेच्या सांगण्याप्रमाणें भगीरथानें पुनः तप करून शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकरहि त्याच्या तपानें प्रसन्न होऊन त्यानीं गंगेला धारण करण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें प्रथमतः गंगा स्वर्गातून शंकराच्या डोक्यावर पडली, तेथून हिमालयाच्या माथ्यावर पडली, तेथून जमिनीवर फार वेगानें आली व पुढें भगीरथाच्या रथाचे मागोमाग समुद्रापर्यंत जाऊन पुढें पाताळांत गेली. तेथें भगीरथानें आपल्या पूर्वजांच्या भस्मावर गंगाजल शिंपडलें व त्यांना जलदान केलें व त्या योगानें ते सर्व स्वर्गाप्रत गेले. गंगावतरणाची ही कथा झणजे स्वाभाविक दिसण्याच्या सृष्टीच्या देखाव्यावर एक प्रकारचें कविकृत रूपक आहे असें कोणास वाटणार नाहीं! असो.

आतां आपण हरिद्वारच्या प्रेक्षणीय स्थळांकडे वळूं. येथलें पहिलें प्रेक्षणीय स्थळ व अत्यंत पवित्र स्थान झणजे 'हरीकी पायरी.' होय. हा स्नानाचा घाट आहे व याच्या एका भिंतीच्या एका कोनाड्यांत विष्णूच्या पादुका असलेला एक दगड बसविलेला आहे. हा घाट पूर्वी फार लहान होता. त्याला ३९ पायऱ्या होत्या व तो ३४ फूट लांब होता. सर्व यात्रेकरूंची इच्छा या घाटावर येऊन स्नान करण्याची असते. यामुळें येथें अत्यंत गर्दी होते. १८२० मध्यें मोठ्या यात्रेच्या प्रसंगीं अत्यंत गर्दीनें ४३० माणसें मेलीं. तसेंच पुष्कळ माणसें वारंवार चेंगरून मरत; झणून सरकारनें हा घाट साठ पायऱ्यांचा व शंभर फूट लांबीचा केला. १८९२ मध्यें येथें कालराहि फार झाला होता. याकरितां हरिद्वार इंप्रुव्हमेंट सोसायटी काढण्यांत आली व तिनें पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. सर्व नदीकिनारा व नदीचा तळ फरसबंदी केला. या घाटावर नेहमीं पाण्याचा सारखा व बेताचा प्रवाह येईल, अशी तजवीज केली. गंगानदी पर्वत सोडून मैदानावर या ठिकाणीं एकदम पसरते त्यामुळें तिचे येथें पुष्कळ फाटे झालेले आहेत. पश्चिमेकडच्या फाट्यावर हरिद्वार आहे. आक्टोबरमध्यें जेव्हां मी हरिद्वारास गेलों होतों तेव्हां या घाटाजवळ मुळींच पाणी नव्हतें. हा सर्व भाग पोंढऱ्या दगडांनीं युक्त दिसत होता. नदीचा प्रवाह या ऋतूंत अत्यंत कमी होतो. पण या दिवसांत गंगेचें पाणी फारच सुंदर दिसतें. या ऋतूंत स्नान करण्याकरितां घाटाजवळचा किनारा सोडून जरा पलीकडच्या प्रवाहाकडे जावें लागतें. परंतु या खेपेला जेव्हां मी हरिद्वारास आलों तेव्हां सर्व फाटा तुडुंब भरून चालला होता. ज्याप्रमाणें वर्षाकालांत आपल्या इकडे नद्या दुथडी भरून वेगानें जातात, तशी या वेळीं गंगानदी भरून चालली होती. हा देखावा पाहून मला विलक्षण आश्चर्य व कौतुक वाटलें. ज्या वेळीं सर्व ठिकाणीं पाण्याची टंचाई होते, ज्या कालांत सर्व नद्यांनां पाण्याचें दारिद्र येतें, त्याच भर उन्हाळ्याच्या दिवसांत नदीला मोठा पूर आलेला पाहून प्रथमच उत्तर हिंदुस्थानांत जाणाराला फारच आश्चर्य वाटतें. पण या पुराचें कारण उघड आहे. उष्णतेमुळें हिमालयावरील बर्फ भराभर वितळूं लागतें व यामुळें या नदीला मोठा पूर येतो. हिमालयांतून निघणाऱ्या सर्व नद्यांचा हाच विशेष आहे. हरिद्वारच्या ऋतुभेदामुळें झालेल्या विपर्यासाकडे पाहून मला सानंद आश्चर्य वाटलें व उत्तररामचरित्रांतील 'पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिताम्' या श्लोकाची आठवण झाली. मात्र या ठिकाणीं 'पुरा यत्रारोधः सलिलमधुना तत्र सरिताम्' असा प्रकार झाला होता. हरिद्वारच्या देवळामधील सर्वांत मोठें व महत्त्वाचें देऊळ गंगाद्वार हें याशेजारींच आहे. हरीकी पायरीचा देखावा खरोखरीच अवर्णनीय आहे. प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज त्याच्या सौंदर्याची कल्पना करतां येणार नाहीं. या देखाव्याचें छायाचित्र सोबत दिलें आहे त्यावरून वाचकांस सामान्य कल्पना येईल अशी आशा आहे.

याच्या दक्षिणेस सारखा विटांची फरशी केलेला अर्वाचीन तऱ्हेचा प्लॅटफार्मसारखा घाट आहे व त्याचे एका बाजूला नदीचा प्रवाह व एका बाजूला धर्मशाळा व देवळें लागतात. काशी किंवा मथुरा या ठिकाणीं देखावा असाच आहे खरा, तरीपण तेथें घाटा-घाटाचा संबंध नाहीं, यामुळें नदीकिनाऱ्याला सारखें फिरतां येत नाहीं. हरिद्वारचा हा एक विशेष आहे. या ठिकाणीं सायंकाळीं फिरावयास येण्याची फार मौज वाटते. आमचा येथें मुक्काम असेपर्यंत रोज सायंकाळीं येथें सहल करण्यास येण्याचा आमचा परिपाठ असे. एकीकडे तुडुंब भरून वेगानें धावणारी प्रचंड नदी व दुसऱ्या बाजूला निरनिराळ्या तऱ्हेच्या सारख्या लागलेल्या इमारतींचा देखावा व उत्तरेस तो हिमाच्छादित धवलगिरी हा देखावा अद्वितीय दिसतो, व या ठिकाणापासून केव्हांहि हलूं नये असें वाटतें. इतर सर्व पवित्र स्थानांपेक्षां हरिद्वारचा हाच विशेष आहे कीं, या ठिकाणीं धार्मिक पावित्र्य व सृष्टिसौंदर्य यांचा पूर्ण मिलाफ झालेला आहे व यामुळें हें स्थान केवळ धर्मश्रद्ध माणसास प्रिय होतें असें नाहीं, तर आमच्यासारख्या माणसासहि अत्यंत प्रिय वाटतें; व अशा ठिकाणीं वर्षाचे कांहीं दिवस घालवितां आले तर ती महद्भाग्याची गोष्ट होय, असें वाटूं लागतें. असो.

हरिद्वारमधलें दुसरें प्रेक्षणीय स्थळ ह्मणजे गांवावरून उत्तरेच्या बाजूला जाणारा रस्ता व तेथील सृष्टिसौंदर्य हें होय. हाहि देखावा अवर्णनीय आहे. गांवाला लागूनच टेकड्या आहेत हें वर सांगितलेंच आहे, या टेकड्यांला लागूनच केव्हां केव्हां टेकड्यांचा भेद करून व केव्हां केव्हां बोगदा पाडूनच डेहराडूनचा रस्ता गेला आहे. एकीकडे हा नागमोडीचा रस्ता व त्याच्या पलीकडे प्रचंड टेकड्या, आणि दुसऱ्या बाजूला गांव व दुथडी भरून वाहत जाणारी नदी हा देखावा प्रेक्षणीय आहे. गांवाजवळ रेलवेचा एक लहानसा बोगदा आहे. त्यामुळें रस्ता सुंदर दिसतो. टेकड्या सर्व खडकाच्या आहेत. या सर्व डोंगरांत लहान लहान गुहा व पर्णकुटिका बांधलेल्या आहेत. या ठिकाणीं वैरागी व तपस्वी लोक राहतात. हा देखावा पाहून पुराणांतरींच्या ऋषींची व त्यांच्या पर्णकुटींची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं व या ऋषींची पूर्वीची राहणी किती साधी असे याची थोडीशी कल्पना येते. जरा पुढें गेलें ह्मणजे रेलवेचा एक पूल लागतो व या पुलाखालून गेलें ह्मणजे भीमगोडा तलाव लागतो, येथें टेकड्या जरा आंत गेल्यासारख्या आहेत व त्या पोकळींत हा तलाव व जवळचीं देवळें बांधलेलीं आहेत. दंतकथा अशी आहे, कीं, पांडवांपैकीं भीमाला गंगावतरणाचे वेळीं येथें घोड्यावर उभें राहण्यास सांगितलें होतें. त्याच्या घोड्याची लाथ टेकड्यांला लागून तेथें पोकळी झाली व त्याचा तलाव झाला. या दंतकथेला महाभारतांत किंवा रामायणांत मुळींच आधार नाहीं. आपल्या लोकांनां निवळ नांवावरून दंतकथा बनविण्याची फार संवय आहे त्याचेंच हें उदाहरण आहे. हा रस्ता आगगाडीच्या रस्त्याच्या बाजूनें डेहराडूनपर्यंत गेला आहे. याच रस्त्यानें बदरीकेदारला जातात. हरिद्वारहून बदरीकेदारास जाण्यास सुमारें दहा दिवस लागतात. प्रवास पायीं करावा लागतो. या रस्त्यानें मैल सवा मैल गेल्यावर गंगेच्या कालव्याचें काम लागतें. तेथें मोठें धरण वगैरे आहे अशांतला प्रकार नाहीं. गंगेचे दोन तीन फांटे होतात त्या निरनिराळ्या फांट्यांत पाणी विभागून न जातां एकाच पश्चिमेच्या फांट्याकडे ओघ वळावा अशी तजवीज केलेली आहे. नदीचें पाणी आणखी उंच व्हावें ह्मणून सध्या कांहीं बांधकाम चाललें आहे तें आह्मीं पाहिलें. याप्रमाणें पाण्याचा ओघ हरिद्वारच्या फांट्यांत आणून हरिद्वारच्या खालीं नदीच्यापासून कालवा वेगळा करून घेतला आहे. असो.

परंतु हरिद्वारचें सर्वांत प्रेक्षणीय स्थळ ह्मणजे कनखल तीर्थ हें होय. कनखल हें गांव हरिद्वारपासून दीड मैलावर आहे. या गांवांत दगडाची फरशी आहे. घरें बऱ्या प्रकारचीं आहेत. बाजारहि मोठा असून दिसण्यांत बरा आहे. हरिद्वारपासून कनखलास जाण्यास एक्के मिळतात. माणशीं एक एक आणा घेतात. येथें दक्षप्रजापतीचें मोठें देऊळ आहे व नदीच्या तीराला एक लहानसा घाट आहे. किनाऱ्यावर मोठमोठे वडाचे वृक्ष आहेत. या घाटाच्या पायथ्याशींच प्रसिद्ध कनखल तीर्थ आहे. येथल्या गंगेचा देखावा हरिद्वारपेक्षां फारच निराळा आहे. येथें नदीचें पात्र फारच रुंद झालेलें आहे व त्याचे निरनिराळे प्रवाह बनलेले दिसतात. येथून टेकड्या बऱ्याच दूर अंतरावर गेल्या आहेत. व हरिद्वारप्रमाणें येथें नदीच्या किनाऱ्याला भिडलेलीं अशीं देवळें किंवा घरें नाहींत. मी पहिल्यांदां या क्षेत्रीं जेव्हां आलों त्या वेळचा देखावा मी आजन्मांत

विसरणार नाहीं. नदीच्या घाटाला लागून प्रवाह जोरानें वाहत होता व त्यामुळें पाण्याला फेंस येत होता. आधींच गंगेचें पाणी शुभ्र. त्यांतच तो फेंस मिसळलेला. वरें किनाऱ्याच्या बाजूला असलेले दगड व गोटेहि शुभ्रच. या प्रवाहाच्या समोर व आम्ही ज्या घाटावर बसलों होतों त्याच्या समोरच नदीला एक उंचवटा होता. तो उंचवटा सर्व शुभ्र दगडांनीं व गोट्यांनीं भरलेला होता व त्यामधून सारख्या शुभ्र पाण्याच्या हजारों धारा खालीं कनखल तीर्थांत सळसळ करीत पडत होत्या. यामुळें त्या प्रवाहाला विशेषच शोभा आली होती. सर्व पाण्याकडे नजर ठरत नव्हती. ते हजारों झरे किंवा धारा तर इतक्या वेगानें मुख्य प्रवाहांत पडत होत्या कीं त्या ठिकाणीं लहरींचा भास होत होता. हें स्थान पाहून माझें मन थक्क होऊन गेलें. या ठिकाणीं गडबड किंवा मनुष्यवस्तीचा गंधहि दिसून येत नाहीं. सर्व ठिकाण शांततामय भासतें. अशा प्रकारचें ठिकाण समाधीला व मनाच्या एकाग्रतेला फार उत्तम असें वाटतें. आम्ही घाटावर गेलों तेव्हां तेथें कोणीहि माणूस नव्हतें. आम्ही त्या देखाव्याकडे किती वेळ पहात होतों याचें आम्हांला भानच राहिलें नाहीं. इतक्यांत आमचा गाडीवाला फार उशीर झाला म्हणून आमचा शोध करीत आला व मग आम्हांला निरुपाय म्हणून तेथून पाय काढावा लागला. परंतु तें ठिकाण सोडतांना प्रियजनाचा वियोग होतांना ज्या प्रकारची मनाची स्थिति होते तशी आमच्या मनाची स्थिति झाली. दुसऱ्या खेपेला जेव्हां आम्ही कनखल तीर्थाला आलों तेव्हां तो पूर्वीचा देखावा गुप्त झाला होता. आक्टोबरमध्यें 'हरिकी पायरी' चा घाट शुष्क व जलविहीन होता, तर कनखल तीर्थ जलपूर्ण व आपल्या पूर्ण वैभवांत होतें. मेमध्यें आम्ही गेलों तों 'हरीकी पायरी' जलमय झालेली व आपल्या पूर्ण वैभवांत होती, तर कनखल तीर्थ अगदीं शुष्क व जलहीन होतें. तेव्हां या असल्या पवित्र स्थानालासुद्धां 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण' याप्रमाणें वागविणाऱ्या दैवाच्या फेऱ्यानें सोडिलें नाहीं, हें पाहून एक प्रकारचा खेद वाटला व ऋतुमानानें या प्रेक्षणीय स्थळांत होणाऱ्या विपर्यासाचें सखेदाश्चर्य वाटलें. तरी पण कनखल तीर्थाचें ठिकाणीं गेलें म्हणजे आपण मूर्तिमंत शांततेच्या ठिकाणीं आलों आहोंत, असें वाटल्याखेरीज रहात नाहीं.

येथील तिसरें पाहण्यासारखें ठिकाण म्हणजे मयापुर हें होय. येथें एकदोन फार जुनीं देवळें आहेत. एक देऊळ बुद्धदेवाचें स्थान म्हणून सांगतात. हें दुसऱ्या एका बाजूनें येणाऱ्या मोठ्या ओढ्याच्या कांठीं आहे व येथला देखावा बरा आहे. परंतु फारसें जुनें आहे असें आम्हांला वाटलें नाहीं. असो.

अशीं निरनिराळीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्यांत व रोज सायंकाळीं गंगेच्या किनारीं सहल करण्यांत आमचा आठवडा मोठ्या आनंदानें गेला. येथें आमची जेवणाची सोय उत्तम जमत असे हें वर सांगितलेंच आहे. येथला बाजार बराच मोठा आहे व सर्व जिन्नस येथें चांगले मिळतात. दूधदहीं तर फारच चांगलें असतें. दक्षिणेंतून इकडे प्रथमच येणाराला येथल्या बाजारांतील एका चालीचें आश्चर्य वाटतें. येथें सर्व जिनसा वजनी मापानें विकतात. तांदुळ तोलून घ्यावे लागतात ! दाळ तोलून घ्यावी लागते ! आटा तोलून घ्यावा लागतो ! हिरवे अंबेसुद्धां तोलून घ्यावे लागतात ! सारांश, या बाजारांत मापीवजन किंवा संख्यामोजणी ठाऊकच नाहीं, असें वाटतें. या ठिकाणीं साधुसंत असल्यामुळें म्हणा किंवा प्रघात आहे म्हणून म्हणा, येथें खडावा फार चांगल्या मिळतात. एका पांढरट तांबूस दगडाच्या दगड्या वगैरे पदार्थहि पुष्कळ मिळतात. बाकी म्हणण्यासारखा व्यापार या गांवाला नाहीं.

कनखल, हरिद्वार व ज्वालापुर हीं तीन गांवें मिळून 'हरिद्वार युनियन' म्हणून एक म्युनिसिपालिटी आहे. हीं दोन्ही गांवें आरोग्याच्या दृष्टीनें फार चांगलीं आहेत. मथुरा किंवा काशीसारखी येथें घाण किंवा दुर्गंधी मुळींच नाहीं. सर्व घरें अगदीं स्वच्छ आहेत व गांवांत किंवा नदींत कोठेंहि घाण नाहीं. येथें नदीचा प्रवाह जोराचा असल्यामुळें नदींत घाण राहूं शकत नाहीं. बारा वर्षांनीं येथें मोठा कुंभमेळा भरतो, त्या वेळीं फार मोठी यात्रा भरते. बाकी या ठिकाणीं बाराहि महिन्यांत निरनिराळ्या प्रांतींचे यात्रेकरू दृष्टीस पडतात. उत्तर हिंदस्थानांत सर्व पवित्र स्थानांत स्वच्छता व सृष्टिसौंदर्य या बाबतींत या क्षेत्राचा पहिला नंबर लागेल, असें मला वाटतें.

झालें. आमचें गंगाद्वारवर्णन संपलें. या ठिकाणाचें शब्दांनीं यथार्थ वर्णन करणें अशक्य आहे. हें ठिकाण प्रत्यक्ष पाहिल्यावांचून त्याचें महत्त्व कधींहि कळावयाचें नाहीं. तरी मनोरंजनाच्या वाचकांनां अशा पवित्र स्थानाचें दर्शन पूर्वचयांत घेण्याची बुद्धि होवो अशी इच्छा प्रदर्शित करून सध्यां वाचकांची रजा घेतों.

संपूर्ण गोष्ट.

पैशाची शेती.

—लेखक—

श्रीयुत पुरुषोत्तम विष्णु गोगटे, बी. एस्. सी.

एके दिवशीं आमच्या घराच्या माळकाशीं बोलत असतां मीं सहज विचारिलें "कां हो शेटजी! हे मारवाडी लोक आपल्या देशांतून अगदीं गरीब अवस्थेंत येतात व इकडे आल्यावर श्रीमंत बनतात, हें सरें आहे काय? मला वाटतें, कांहींतरी लबाड्या करून ते पैसे कमावीत असतील, नाहींतर इतका पैसा येणार कोठून?"

मला त्या वेळीं शंका देखील आली नाहीं कीं, माझ्या समोरचे शेटजी हे देखील पूर्वी अगदीं गरीब अवस्थेंत असतील. माझें बोलणें ऐकून शेटजी जरा हंसले व म्हणाले "दुसऱ्यांबद्दल तर मला माहित नाहीं! परंतु मी माझी स्वतःचीच हकीकत सांगतों, त्यावरून तुह्माला दिसेल कीं, केवळ प्रामाणिकपणानें सुद्धां पैसे जमा करितां येतात."

ती त्यांची गोष्ट मला बोधपर वाटल्यामुळें मनोरंजनाच्या वाचकांसाठीं येथें देत आहें.

शेटजी म्हणाले "मी राहणार जोधपूरचा. तेथील रीतरिवाजांप्रमाणें माझें लग्न आठव्या वर्षीच झालें होतें. माझे वडील निवर्तल्यानंतर माझें पालनपोषण माझ्या चुलत्यानें केलें. जसजसा मी मोठा झालों, तसतसा माझ्या पाठीमागें त्यानें द्रव्यार्जनाविषयीं तगादा सुरू केला. माझें विद्याध्ययन फार झालें नव्हतें. फक्त मारवाडी लिहितां वाचतां येत असे. अशा स्थितींत कोठें मोठी नोकरी मिळणें शक्य नव्हतें. दोन तीन महिने एका व्यापाऱ्याच्या येथें नोकरी केली, परंतु महिन्याकांठीं आठ रुपयांपलीकडे कांहींएक मिळत नसे. एके दिवशीं काका मला फार लागून बोलले. मला पराकाष्ठेचा संताप आला व त्या संतापाच्या भरांत मीं जोधपूर सोडण्याचा निश्चय केला.

"माझ्या पगाराचे आठ रुपये मुक्तेच आले होते ते घेऊन मी स्टेशनावर आलों. तपास करतां, जबलपुरचें तिकीट आठ रुपयांत मिळूं शकेल, असें समजलें. तिकीट घेऊन मी गाडींत बसलों. बरोबर एक लोटा, तवा व पितळी ताणि अंगावरचे कपडे, यांपलीकडे कांहीं नव्हतें. जोधपूर सोडतांनां तर कांहीं वाटलें नाहीं; पण नंतर मात्र आतां काय करावें, ह्याबद्दल विचार येऊन पडला. आमच्या काकांची शेती होती. दोन मण गहूं पेरला तर त्याचें पीक जवळ जवळ सवाशें मण येत असे, हें मीं पाहिलें होतें. जर गव्हांचा एक दाणा रोपून त्याचा साठपटीनें गहूं तयार होतो, तर अशाच रीतीनें पैशाची वाढ कां होऊं शकणार नाहीं? मीं पुष्कळ वेळ विचार केला. मला व्यापाराचें तत्व माहित होतें. पैशाची वाढ करण्याचीं साधनें मला अवगत होतीं. व्यापारांत नफा, रोख किंमत दिल्यामुळें कापून दिली जाणारी कसर, व्याज व व्याजाचें व्याज, ह्या बहुतेक चार गोष्टीच वाढीस कारणीभूत होतात. गव्हांची वाढ फक्त चारच महिने होते; परंतु पैशाची वाढ बारा महिने होणें शक्य आहे. काका जर गव्हांची शेती करीत आहेत, तर मी पैशाची शेती करीन. त्यांचा गहूं साठपटीनें वाढतो तर माझा पैसा त्यापेक्षांहि जास्त वाढवीन. असे अनेक तऱ्हेचे विचार मी मनाशीं करीत होतों. माझ्या डब्यांत बसलेले लोक मला असा विचारमग्न पाहून वेडा समजत असतील; परंतु त्यांच्या समजुतीची मला पर्वा नव्हती. मध्यंतरी लागणारीं जंक्शनें मीं केव्हां बदललीं हें देखील माझें मला आठवत नव्हतें. तिसऱ्या दिवशीं पहांटे मीं जबलपुरला पोहोंचलों.

"खिशांत अवघा एक आणा होता. माझ्या सोबतीचे उतारू भराभर तांग्यांत व गाड्यांत बसून चालते झाले. ईश्वराच्या अवकृपेला पात्र झालेला असा काय तो मीच तेथें होतों! तीन दिवसांच्या प्रवासामुळें थकूनभागून गेल्यामुळें मी तेथेंच एका मोठ्या घराच्या ओट्यावर बसलों. तें घर म्हणजे तांबें पितळ गाळण्याची भट्टी होती. एका बाजूला बरेचसे थैले, फुटकी भांडीं व तांब्यापितळेचे तुकडे यांनीं तें भरलें होतें. कांहीं मुलें या थैल्यांतील वस्तु तांब्याच्या व पितळेच्या अशा निरनिराळ्या करीत होतीं. दुसऱ्या बाजूला

हे निरनिराळे केलेले तुकडे गाळण्यासाठीं भट्ट्या पेटविल्या होत्या. तपासाअंतीं मला समजलें कीं, कांहीं लोक रेवड्या, फुटाणे मोडीच्या भारोभार विकतात, व हे भट्टीवाले ती मोड त्यांच्याजवळून विकत घेतात. मीं ह्या कारखान्यांत दोन दिवस काम केलें. रात्रीचा तेथेंच कारखान्याच्या ओट्यावर निजून राहीं. या दोन दिवसांत फेरीवाले कशा तऱ्हेनें मोड जमा करितात, व कारखानदार काय भावानें ती विकत घेतात, हें समजलें. तिसरे दिवशी मी स्वतःच फेरीवाला बनलों. माझ्याजवळ सहा आणे जमले होते, त्याच्या रेवड्या, फुटाणे वगैरे घेऊन गल्लोगल्लीं "तांबा पितळ भारोभार" ह्मणत हिंडलों. जवळचा माल विकला गेला कीं पुन्हा नवीन माल विकत घ्यावा, याप्रमाणें संध्याकाळपावेतों फिरत राहिलों. दुसरे दिवशीं सकाळीं जमा केलेले तुकडे कारखान्यांत दिल्यावर अवघा चार आणे नफा राहिला. चारपांच दिवस अशा तऱ्हेनें रेवड्या विकण्यांत काढले; परंतु रोजचा चारपांच आण्यांपलीकडे जास्त फायदा झाला नाहीं.

"आतां मीं निराळाच विचार केला. गांवांत घासलेटाचा खप जास्त असून फेरीवाल्यास वरीच प्राप्ति होते, असें ऐकिलें होतें. माझ्याजवळ असलेल्या पैशांचें घासलेट विकत घेऊन मी फेरी करावयास गेलों. पैसे जमले कीं पुन्हां घासलेट घ्यावें. याप्रमाणें संध्याकाळपर्यंत सहा पैशांला एक बाटलीप्रमाणें विकतां निवळ नफा सहा आणे राहिला. कधीं संचय नसल्यामुळें व आजच एवढा थोरला बोजा डोक्यावर घेऊन फिरल्यामुळें अगदीं थकून गेलों होतों.

"ज्या व्यापाऱ्याजवळून मीं घासलेट विकत घेतलें होतें, त्याच्याचजवळ एक ठकलगाडी होती. ती जर मिळाली तर बराच त्रास वांचेल, असें मनांत येऊन मीं त्याला दुसऱ्या दिवशीं त्याबद्दल विचारिलें व तो दोन आणे रोजानें ती देण्यास कबूल झाला. या गाडीमुळें एक तर थकवा आला नाहीं, व बऱ्याच दूर दूरच्या फेऱ्याकरितां आल्या. या दिवशीं माझे दोन डबे विकले गेल्यामुळें गाडीखर्च वजा जातां दहा आणे नफा मिळाला. हा माझा कार्यक्रम अजमासें एक महिना चालला असेल.गांवांत चारपांच धर्मशाळा होत्या. तेथें तीन दिवसांपेक्षां जास्त दिवस राहूं देत नसत. तेव्हां आळीपाळीनें तेथें राहून मीं दिवस काटले.

"माझें भांडवल हळू हळू वाढत चाललें. जर मीं स्वतःची टकलगाडी घेतली तर घेतांना दहा रुपये पडतील, परंतु रोजचे दोन आणे वांचतील. दहा रुपये नुसते बांधून ठेवण्यापेक्षां ह्या रीतीनें वापरले तर दोनतीन महिन्यांत तिची किंमत वसूल होऊन शिवाय गाडी आपल्या मालकीची होईल. हा सर्व विचार करून मी एक ठकलगाडी विकत घेतली.

"घासलेटाचा खप बहुतेक संध्याकाळी होत असे. सकाळचा वेळ माझा फुकटांत जात असे. स्टेशनावरच्या दरारींत बाजारभावापेक्षां दोन आणे कमी किमतीनें डबे मिळत. सकाळीं नुसतें जें बसून राहावयाचें त्यापेक्षां जो मिळेल तोच नफा खरा ह्मणून रोज सकाळीं मी स्टेशनावरून डबे विकत घेऊन येत असें व संध्याकाळीं विकीत असें. माझी गिऱ्हाईकी बांधली गेली होती व विक्री जास्त होत असे. पुष्कळ लोक आगबंद डबे जर थोडासा नफा घेऊन त्यांच्या घरीं नेऊन दिले तर मोठ्या खुषीनें घेत असत.

"मी आलों त्या दिवसापासून दोन महिन्यांत माझी एकंदर प्राप्ति ९१ रुपये झाली. दहा रुपयांची गाडी व आठ रुपये भोजनखर्च वजा जातां सध्यां मजजवळ रोख शिल्लक ७३ रुपये होती. मीं आतां माझा व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढविण्याचा विचार केला. कमी भाड्यांत मिळेल ह्मणून एका आडवाटेला एक छोटेंसें दुकान घेतलें व एकदम पंचवीस घासलेटाचे डबे खरीद करून त्यांत भरले. इतर व्यापारी साधारणतः तीन महिन्यांच्या उधारीनें माल विकत घेतात; परंतु मी रोख पैसे दिले. ह्यावद्दल बखारवाल्यानें पांच टक्के कसर कापून दिली. हाहि एकप्रकारें रोख पैसे दिल्यामुळें नफा झाला. तीन महिन्यांची कसर पांच टक्के ह्मणजे वर्षाला २० टक्के झाले. माझे पैसे अशा तऱ्हेनें निरुद्योगी न राहातां बीस टक्क्यांच्या हिशोबानें व्याजीं लागले. मीं कोणच्याहि तऱ्हेची मेहनत न करतां मला हा नफा मिळाला.

"दुकान ठेवल्यामुळें रोज स्टेशनावर जाण्याचा त्रास चुकला. सकाळचें व दुपारचें दुकान उघडें रहात असे. त्यांत जी कांहीं विक्री होईल ती खरी. संध्याकाळीं एक फेरी फिरून येत असें. तिसऱ्या महिन्याचा जमाखर्च पहातां माझें भांडवल दीडशेंच्या जवळ गेलें होतें. माझे रुपये माझ्या व्यापाराला लागणाऱ्या

जवळ गुंतलें जाऊन त्याला नवीन माल घेण्यास रोख-पैसा मिळत नाहीं, व रोख पैसे देऊन कसरीचा फायदा त्याला घेतां येत नाहीं. या व अशा पुष्कळ बाबतींचा विचार करून उधार देणारे व्यापारी मालाची किंमत जास्त ठेवतात. शिवाय, रोख पैसा देऊन माल घेणारास दोनचार दुकानें फिरून आपल्या आवडी-प्रमाणें माल घेतां येतो. तसा उधार माल घेणारास घेतां येत नाहीं. त्याचें दुकान ठरलेलें असतें. त्यांत जो माल असेल त्यांतूनच निवड करावी लागते. हा सर्व विचार करून मीं कोणाजवळून उधारीनें माल घेत नसें व कोणाला उधारीनें देत नसें. माझें भांडवल जसजसें वाढत जाईल तसतसाच व्यापार वाढविण्याचा मीं निश्चय केला होता. मला वारंवार वाटे कीं, आपण कापडाचें दुकान घालावें; परंतु त्याला पुरेसें भांडवल अजून तयार झालें नव्हतें. दोन वर्षांच्या शेवटीं माझ्या-जवळ दोन हजार रुपये रोख जमेल. "

मीं थोडेंसें आश्चर्य दाखविल्यामुळें शेटजी म्हणाले " तुह्माला माझ्या म्हणण्याची शंका वाटते? ज्याच्या जवळ प्रारंभीं एक आणा होता त्याच्याजवळ दोन वर्षांत दोन हजार रुपये झाले कसे? पण मी सांगतों तें खोटें नाहीं!" असें म्हणून माझ्या शंकेच्या निवारणार्थ त्यांनीं त्या सालची हिशोबाची वही काढून दाखविली. त्यांत खरोखरच दोन हजार एकशेंवीस रुपये पांच आणे शिल्लक होती.

शेटजींनीं आपली गोष्ट पुढें सुरू केली. ते म्हणाले " कांहीं कांहीं गोष्टी प्रसंगामुळें होत असतात. एरवीं कोणीं कितीहि म्हटलें तरी आपण त्यांकडे दुर्लक्ष करीतों. मीं जरी आपला गांव व बायकामुलें सोडून येथें आलों होतों, तरी त्यांच्याविषयीं कळकळ माझ्या मनांत होतीच. मुलाचें विद्याध्ययन व्हावयाचें होतें. माझ्या देखत काका त्यांना तोडून बोलत असत, माझ्या बायकोला मोलकरिणीप्रमाणें राबवीत असत, व माझ्या मुलाचे लाड करणें तर दूरच पण प्रेमाचा शब्द देखील ते बोलत नसत. असें जर माझ्या देखत होत असे तर माझ्या पश्चात् त्यांची अवस्था काय असेल त्याचें भीषण चित्र माझ्या डोळ्यापुढें उभें राही. घराबाहेर हांकून दिलें तर बिचारीं अज्ञान होऊन उपाशीं मरतील. माझी सध्यां ऐपत दोन हजार रुपयांची झाली होती. मी जर एकाएकीं गत झालों तर ते दोन हजार रुपये त्यांना किती दिवस पुरणार? तेव्हां त्यांच्यासाठीं अधिक व्यवस्था करून ठेवणें जरूर होतें. हे विचार येण्यास या ओळींत एका गृहस्थाचा मृत्यु कारणीभूत झाला. चांगला पगारदार, परंतु वारला तेव्हां उसने पैसे काढून त्याचा दहनविधि केला! तारुण्याच्या भरांत दूरवर विचार त्यानें केला नव्हतासें दिसतें. एवढ्या मोठ्या पगाराचा मनुष्य, पण आज त्याची बायको लोकांच्या येथें कामें करते व मुलगा पैशाच्या अभावीं कांहींएक न शिकतां कोठें तरी भटकत असतो. मी असाच एकाएकीं निवर्तलों, तर माझ्या बायकामुलांची अशीच स्थिति होईल, ही भीति मनांत वाटूं लागली, व माझ्या आयुष्याचा विमा उतरण्याचा मीं निश्चय केला. विम्यानें जरी मृत्यूचा प्रतिबंध होत नाहीं, तरी पण कुटुंबास पैशाची मदत होऊन होणाऱ्या अपरिहार्य दुःखांत बरेंच समाधान होतें. सध्यांचाच धंदा मीं सुरू ठेविला तरी मला वर्षाचे कांहीं आठशें नऊशें रुपये फायदा पडेल, अशी खात्री होती. यांतून पांच हजार रुपयांचा हयातींत मिळणारा विमा उतरण्यासाठीं लागणारी वार्षिक रक्कम देणें शक्य होतें. कदाचित् तुह्माला वाटेल कीं " हा मारवाडी! याच्या मनांत विम्यासारख्या कल्पना कशा आल्या? आम्ही मारवाडी म्हणजे निवळ पांचापांचा तीस मोजून लोकांनां लुबाडणारे. लोकांनां नानातऱ्हेच्या फांसांत पकडून त्यांच्या जवळून पैसा काढणारे. पैशा-पुढें स्वतःच्या जीवाची देखील आम्ही पर्वा करणार नाहीं, मग मुलांबाळांची कसली व्यवस्था करणार? आम्हां-विषयीं हा अगदीं चुकीचा समज आहे. सर्वसाधारण समजुतीस निदान मी तरी अपवाद आहें, असें मी समजतों. मीं कधीं कोणाला फसविलें नाहीं व कोणाला त्रास देऊन पैसा कमविला नाहीं. माझ्या व्यापाररूपी शेताची योग्य मशागत करून मीं पैसा मिळविला, हें आपण पाहिलेंच. माझ्या शेजारीं ' हिंदसमाचार ' वर्तमान-पत्र येत असे. तें मीं टफ करून वाची.. हळुहळू मला चांगलें वाचतां येऊं लागलें. हिंदुस्थानच्या निरनि-राळ्या भागांतील समाचार कळूं लागला. इतकेंच नाहीं, तर तो वाचण्यांत मला गोडी वाटूं लागली. व्यापारी बातम्या कळूं लागल्या. मुंबई, कलकत्ता वगैरे मोठमोठ्या शहरच्या व्यापाऱ्यांशीं माझा पत्रव्यवहार होऊं लागला. विमाकंपन्यांचीं प्रसिद्धिपत्रें वाचून त्यांचे नियम व विमा उतरविण्यापासून होणारा लाभ मला समजला होता. मुंबईच्या सुप्रसिद्ध ओरिएंटल

लाईफ कंपनींत मीं माझ्या आयुष्याचा पांच हजार रुपयांचा विमा उतरला.

"माझ्या व्यापारांत नंतर कांहीं वर्षे जास्त उलाढाली झाल्या नाहींत. पांच वर्षांनंतर मी जेव्हां जोधपुरला गेलों त्या वेळेस माझें भांडवल ५००० रुपये झालें होतें. घरीं गेलों त्या वेळेस माझा मुलगा फाटका सदरा घालून बाहेर फिरत होता व बायको फाटका लहंगा नेसून घरचाकरासारखी रावत होती. काका मुखमार्जनविधि आटोपून नुकतेच सतरंजीवर पानतंबाखु खात बसले होते. माझ्याकडे पाहून त्यांनीं तिरस्कारयुक्त मुद्रा केली; परंतु मीं तिकडे दुर्लक्ष्य करून माझी सर्व हकीगत त्यांनां निवेदन केली. माझें स्थित्यंतर झालेलें पाहून त्यांनीं आनंद व्यक्त केला. मी तेथें एक महिना राहिलों तरी 'कांहींच राहिला नाहींस, आणखी रहा' असें काका प्रेमानें म्हणूं लागले. माझी मित्रमंडळी देखील माझें वियोगदुःख प्रदर्शित करीत होती. ह्या सर्व फेराफारांचें कारण पैसाच आहे, खरें प्रेम असें फार थोडें असतें, हें आतां मला चांगलें समजलें होतें.

"कुटुंबास जबलपुरला आणल्यावर मीं फेरीचा धंदा सोडला. कापडाचें दुकान काढण्यास आतां भांडवल पण पुरेसें होतें. मीं दोन गिरण्यांच्या कापडांची आडत ठेविली. मधून मधून सोनें रुपें अशा तारणावर पैसा पण देत असें.

"वरील धंद्यांत मला बरीच किफायत होऊं लागली. माझी आतां श्रीमंत लोकांत गणना होत असे. कमिट्या, मंडळ्या वगैरेसाठीं मला आमंत्रणें येत व तेथें मला सन्माननीय जागा मिळे. वकील लोक माझी मैत्री करण्यासाठीं 'सहज आलों' असें म्हणून माझ्या दुकानावर येऊन बसत असत. मोठमोठे अधिकारी कांहीं सार्वजनिक कामें करावयाची असलीं म्हणजे माझी सल्ला घेत. कोणी मला परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याचा आग्रह करीत, तर कोणी मला त्यांच्या कंपनीचे डायरेक्टर होण्याबद्दल विनंति करीत. परंतु या सर्वांचें हुद्दत मी जाणून होतों. माझ्याकडून कोणच्या तऱ्हेनें जास्त पैसा निघूं शकेल, हाच त्यांचा नेहमीं प्रयत्न असे. मला नानातऱ्हेनें मान देऊन, माझा गौरव करून, व मी मोठा उदार आहें, नेहमीं परोपकारदक्ष असतों, अशा तऱ्हेनें मला संबोधून आपापल्या कामाला माझ्या उदार आश्रयाची याचना करीत. परंतु मी कोणाच्या भुलवणीला भुललों नाहीं. पैशाची किंमत मला चांगली माहित होती. तो जमवायला किती श्रम करावे लागतात, किती प्रयास पडतो, हें मला स्वानुभवावरून चांगलें कळून आलें होतें. तेव्हां योग्यायोग्य कामें पाहूनच मी मदत करीत असें व ती देखील माझ्या शक्त्यनुरूपच. मागणारे पुष्कळ असतात पण देणारा एकच असतो!

"आजमितीस मला बावीस वर्षे झालीं. विम्याचे पैसे माझ्या हयातींत मिळाले. फायदेशीर वेळ पाहून मीं घरींच घरें व दुकानें विकत घेतलीं होतीं. एकंदरींत माझी मिळकत सध्यां ५०,००० रुपयांची आहे. गव्हांची व पैशांची तुलना मीं पूर्वी केली होती त्याचें रहस्य आतां तुह्माला पूर्णपणें कळलें असेल. समाज ही एक जमीन आहे व व्यापार हें त्यांतील एक शेत आहे. सुरुवातीचें भांडवल हें बीज आहे. लोकांच्या मागण्या त्याचें जल आहे. ह्या जलाचें सिंचन होऊन माझ्या आण्यारूपी बियांचा रोपा झाला. त्याला आलेल्या फळांची पुनः लागवड केली. अशा तऱ्हेनें माझी लागवड चांगली यशस्वी होत जाऊन आज त्याच्या पिकाचा मोठा ढीग झाला आहे. मी खोटें सांगत असेन तर या माझ्या चोपड्या पहा व आपली खात्री करा. एकनिष्ठा, धीर व व्ययावद्दल आत्मनियमन, ह्याच गोष्टी पैशाच्या वाढीस प्रधान आहेत."

एक गमती गृहस्थ—(अंधारांत जोडा शोधणारास) दिवा दाखवूं काय हो?

जोडा शोधणार—होय, दाखवाल तर बरें होईल.

गमती गृहस्थ—(दिव्याकडे बोट दाखवून) हा पहा!

कूळ—आपल्याला पाहिलें की रामभाऊंची आठवण होते!

सावकार—कां बरें?. मी गोरा व ते तर कोळशांतले माणिक होते!

कूळ—पण दोघांची काळिजें उफराटी!

वाचा !
वांचा !

विचाराचा आरोग्यावर होणारा परिणाम.

—लेखक—
श्रीयुत गोपाळ महादेव चिपळूणकर, बी. ए.

सूचनांच्या द्वारें विचाराचा सार्वत्रिक होणारा दुरुपयोग—शक्ति, सामर्थ्य, व पूर्ण निरोगीपणाचें ध्येय यासंबंधी विचार नेहमीं मनांत आणणें, हेंच आरोग्य मिळविण्यास एक सोपें साधन आहे—सामर्थ्यवान व शक्तिदायक विचार—अमेरिकेंतील प्रो. वेल व प्रो. एल्मर गेटस् यांचे, शरीरावरील मानसिक तावा सिद्ध करणारे मनोरंजक प्रयोग—आशावादी, उत्साहवर्धक व शक्तिदायक विचारांनींच सर्वांस नवचैतन्याचा प्राप्ति होणार आहे.

विचार व आरोग्य यांचा परस्पर संबंध किती आहे, व शक्ति, शांतता व आनंदमय विचारांनीं आरोग्य किती लवकर मिळवितां येईल, यासंबंधी शास्त्रीय माहिती कळल्यास कोणासहि आनंद झाल्यावांचून राहाणार नाहीं. इतर अनेक शास्त्रांप्रमाणें मानसिक शास्त्रहि मानवजातीस अत्यंत उपयुक्त शास्त्र आहे. ह्या नवीन मानसिक शास्त्राची फारच थोड्यांनां माहिती असते; परंतु ह्या शास्त्राचा अभ्यास, मनन, अनुभव, शोध, अलीकडे अमेरिका, जर्मनी इत्यादि पाश्चात्य देशांत फार जारीनें चालू आहे. मनाचा तावा शरीरावर किती चालतो, हें खालीं दिलेल्या प्रयोगावरून सहज दिसून येणार आहे.

टेलिफोन शोधून काढणारे प्रो. बेल हे एकदा, अतिशय थंड प्रदेशांतून गाडीनें प्रवास करीत होते. त्यावेळीं तेथें थंडी इतकी पडली होती, कीं पायांतील रक्त थंडीनें अगदीं गोठून जाण्याची त्यांनां भीति वाटूं लागली. परंतु आपल्या पायावर मानसिक विचारांची एकतानता करून, पायास नवीन रक्ताचा पुरवठा केल्यानें पायांवर होणारा थंडीचा दुष्परिणाम पार नाहींसा झाला, असा त्यांनां अनुभव आला. शरिराच्या कोणत्याहि भागावर मानसिक विचार लावल्यास, त्या भागाला नवीन रक्ताचा पुरवठा करतां येतो असा त्यांचा अनुभव आहे. अशा भागावर मनाची एकाग्रता मात्र पूर्ण झाली पाहिजे. एकाच आकाराचीं दोन निरनिराळीं भांडीं पाण्यानें पूर्ण भरून, त्या भांड्यांत, प्रो. एल्मर गेटस् यांनीं आपले दोन्ही हात कोंपरापर्यंत बुडविले. नंतर एका हातासंबंधी सर्व विचार करण्याचें सोडून देऊन, फक्त दुसऱ्या हातावरच आपलें मन पूर्ण एकाग्र करून, त्यासंबंधीच विचार चालू ठेविले. हे विचार म्हणजे, त्या विशिष्ट हातास नवीन जास्त रक्ताचा पुरवठा होवो अशा संबंधी असत. अशा रीतीनें एकाच विशिष्ट हातावर इष्ट विचारांची एकाग्रता कांहीं वेळ केल्यावर, हातास नवीन जास्त रक्ताचा पुरवठा सुरू झाला व त्या योगें हातांतील शिरा जास्त फुगून, ज्या भांड्यांत तो हात होता त्या भांड्यांतील पाणी हळूहळू भांड्यावाहेर येऊं लागलें. नंतर ह्या हातावरील मनाची एकाग्रता काढून घेऊन, त्याचप्रमाणें दुसऱ्या हातावर सुरू केल्यावर दुसऱ्या भांड्यांतील पाणीहि हळुहळू बाहेर येतें असा अनुभव आला आहे. ह्या प्रयोगावरून मानसिक विचारांचा शरीरावर किती परिणाम होत असतो, हें कोणालाहि दिसून येणार आहे. ज्याप्रमाणें मनुष्य विचार करतो त्याप्रमाणें तो होतो, ह्या जुन्या तत्त्वास, अलीकडील शास्त्रीय प्रयोगहि खरे ठरवीत आहेत.

रोगावर जय मिळविण्यास धडपड करणाऱ्या मनुष्यास त्याच्या रोगाचें वर्णन व परिणाम सांगितल्यानें व त्याची प्रकृति दिवसेंदिवस अशक्त होत चालली आहे हें सांगितल्यानें, आपण त्या मनुष्याच्या विचाराची एकाग्रता दुसऱ्या शक्तिदायक गोष्टीवर लावण्याच्या ऐवजीं दुःखावर लावून त्याचें दुःख व

रोग मात्र वाढवीत असतों. रोगांतून बरें होणाऱ्या मनुष्याजवळ, त्याच्या रोगाशिवाय इतर कोणत्याहि गोष्टीसंबंधी बोलल्यास, त्या मनुष्यास आपण किती तरी मदत केल्यासारखें होणार आहे. रोग्यास इतर औषधांप्रमाणें सामर्थ्यवान् व शक्तिदायक विचारांचें, व शारीरिक व मानसिक शांततादायक विचारांचें दिव्यौषध मिळाल्यास कितीतरी चांगलें होणार आहे. जर आपण रोगाचे विचार, अशक्तपणाचे विचार, त्रासाचे विचार मनांत आणण्याचें नाकारलें आणि त्या जागीं, आरोग्याचे, शक्तीचे व शांततेचे विचार आणण्याचा निश्चयपूर्वक यत्न केला तर किती फायदा होईल त्याची फारच थोड्यांनां कल्पना आहे. शक्तिदायक विचार हेच शारीरिक शक्तीचे उगमस्थान होत. आजारीपणाचे व अशक्तपणाचे विचार हे शारीरिक शक्तीचे मोठे शत्रु होत. शरीरांतील कोणत्याहि भागांतील दुःख व सूज, त्यावर मनाची एकाग्रता केल्यास जास्त वाढते, हें पुष्कळांच्या अनुभवास आलेंच असेल.

डाक्टर व वैद्य यांच्या "आपलें दुखणें बरें होईल, काळजी करूं नका!" ह्या अमृतमय वाक्यानें कितीतरी रोग्यांस आराम वाटला आहे. उलट, "आतां आशा नाहीं, रोग असाध्य आहे!" ह्याच त्यांच्या विषतुल्य वाक्यांनीं, कितीतरी रोग्यांचें मरण अकाली ओढवलें आहे. परिचारिकांच्या व वैद्यांच्या उत्साही, आशाजनक व संजीवक विचारांचा जितका रोग्याच्या मनावर सुपरिणाम होतो, तितका दुसऱ्या गोष्टींचा होत नाहीं. **मानसिक आरोग्य हेंच शारीरिक आरोग्याचा पाया आहे**, व मानसिक आरोग्य प्राप्त करून घेण्यास मनांत सतत आनंददायक, उत्साहजनक व सामर्थ्यवान् विचार आणणें हेंच एक सोपें साधन आहे. आनुवंशिक क्षयरोग असणाऱ्या कुटुंबांत जन्मलेल्या एखाद्या मुलीस, तिला पुढें क्षय होईल म्हणून तिनें थंडीस व जास्त श्रम करण्यास जपावें असें नेहमीं सांगण्यांत आल्यास, तिच्या कोवळ्या मनावर ह्या गोष्टीचा दुष्परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं. अशा रीतीनें लहानपणापासूनच तिचें क्षयरोगाकडे मन लागतें व कारणपरत्वें थोडी थंडी व सोकला झाल्यास तिला ह्या क्षयरोगाच्याच भावना आहेत असें वाटावयास लागतें. ह्या भावनेस पुढें खरोखरीच मूर्तस्वरूप आलेलें दिसतें. आपल्या शारीरिक दुःखासंबंधी त्रास व चिंता बाळगण्यानें आपल्या अन्नपचनावर आणि रक्ताभिसरणावर वाईट परिणाम झाल्यावांचून राहाणार नाहीं. दुःख व रोग त्यासंबंधी सारखा विचार करण्यानें वाढत मात्र असतात. दुःख व रोग नाहींसे करण्याची इच्छा असेल तर, सुख व आरोग्य यांसंबंधी विचार मनांत आणल्यानेंच नाहींसे होणार आहेत.

शरीरांतील शारीरिक व मानसिक कियांवर मानसिक सूचनांचा फार परिणाम होत असतो. प्रत्येक मनुष्य साधारणपणें आपल्या आरोग्यासंबंधी विचारांचें फार लौकर ग्रहण करीत असतो. आपण आपल्या भोंवतालच्या लोकांस अशक्तपणाच्या सारख्या सूचना देत राहिल्यास त्यांच्या शरीरावर त्याचा वाईट परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं. पुष्कळ लोकांची अशी कल्पना झालेली असते कीं, आपल्या शरीरांत कांहीं आनुवंशिक रोगबीजें वसत असून त्यानेंच शेवटीं आपला अंत होणार आहे. असे विचार मनांत ठेवून सर्व आयुष्य घालविणें किती दुःखदायक व हानिकारक आहे! ह्याऐवजीं ज्या अर्थी सर्वशक्ति चिरंजीव पूर्णारोग्यस्वरूपी परमेश्वरानें आपणांस उत्पन्न केलें आहे, त्याअर्थी आपल्या शरीरांत, सर्व शक्तींचीं चिरंजीवित्वाचीं, व पूर्णारोग्याचीं बीजें सदैव वसत आहेत, व ह्या बीजांस आनंदमय, शक्तिदायक व शांततामय विचारांची परिस्थिति उत्पन्न केल्यास आपण सर्वशक्ति, चिरंजीव, आरोग्याचे आदर्श होऊं, असा विचार मनांत आणल्यास आपल्या जीवितास किती बरें सुख होणार आहे! आनुवंशिक रोगाचीं बीजें आपणांत आहेत असा आपला समज करून घेण्याऐवजीं, ज्या शक्तिमय, आनंदमय व ज्ञानमय परमेश्वराच्या वंशांत आपण उत्पन्न झालों, त्या आपणांत शक्तीचीं, आनंदाचीं व ज्ञानाचीं बीजें सदैव वसत आहेत, असा आपला समज करून घेतल्यास आपल्या शरीरावर काय हितकर परिणाम होईल, याचा प्रत्येकानें अनुभव घेऊन पाहण्यासारखा आहे. ज्या गोष्टी आपण इच्छितों, ज्या गोष्टीसंबंधी आपली सारखी खटपट चालली असते, त्या गोष्टीसंबंधी विचार आपण आपल्या मनांत आणीत गेल्यास, त्या गोष्टी आपोआपच आपणास मिळतील

असें कांहीं दिवसांनीं आपणांस आढळून येईल. आरोग्य हा आपणां सर्वांचा जन्मसिद्ध हक्क आहे, पण रोग ही ईश्वरनिर्मित गोष्ट नसून मनुष्यनिर्मितच गोष्ट आहे. आरोग्यदायक, शांतमय व शक्तिदायक विचार नेहमीं मनांत आणल्यास त्यांची सरशी रोगावर, दुःखावर झालीच पाहिजे ! अशा रीतीनें सरशी होण्यास, केवळ दिवसांतून एकदादोनदा चांगले विचार मनांत आणण्यानें इष्टपरिणाम होणार नाहीं. आपल्या मूळस्वरूपांत आपण शक्तिमय आहों, आनंदमय आहों, पूर्ण निरोगी आहों, अशा विचारावर दिवसांतून अनेकवेळां, मनाची पूर्ण एकाग्रता झाल्या-खेरीज, शारीरिक स्थिति विचाराप्रमाणें बदललेली दिसणार नाहीं. आधीं विचार मग आचार, हा नियम येथेंहि लागू पडतो. आपल्या शक्तिमय, आनंदमय, पूर्ण आरोग्यमय मूलस्वरूपाचा जेव्हां आपणास विसर पडतो, तेव्हांच शारीरिक रोगमय स्थितीवर आपला अम्मल चालत नाहीं; परंतु आत्मस्वरूपाची जाणीव ज्या वेळीं उत्पन्न होते त्या वेळीं, ह्या मानसिक जाणिवेचा शारीरिक रोगमय स्थिति आरोग्यमय करण्यास मदत झाल्यावांचून रहात नाहीं.

आपल्या शक्तिमय, आनंदमय मूलस्वरूपावर व आपणांत असलेल्या सुप्त शक्तीवर आपला विश्वास नाहीं म्हणूनच आपणांस अनेक दुःखें भोगावीं लागत आहेत. अनेक कोत्या धर्मसमजुतींनीं व भोंवतालच्या अनेक विघातक विचारांनीं आपणांस इतकें गुलाम बनवलें आहे कीं, आपण आपणांस सर्व आयुष्यभर, रोगाचें माहेरघर, अशक्ततेचें व दुःखाचें चालतें बोलतें चित्र, व मृत्यूचें भक्ष्य समजत असतों. या गुलामगिरींतून मोकळें व्हावयाचें असल्यास, आपण स्वतः कोते विचार, वेडगळ समजुती व विचारांत परावलंबन ह्या गोष्टी पार सोडून दिल्या पाहिजेत. आपले विचार आपण उत्पन्न केले पाहिजेत, व लोकांचे विचार आपल्या विचारास पसंत पडल्यासच ते ग्रहण केले पाहिजेत. लहान मूल आपली आई ज्याप्रमाणें भरवील त्याप्रमाणें जेवीत असतें, त्याप्रमाणें मोठी सज्ञान व विचारवंत मंडळीहि दुसऱ्यांचे अशक्तिमय व दुःखमय विचार आपल्या मनांत स्वतः कांहींहि विचार न करतां सारखे भरीत असतात. चितारी व शिल्पकार हातीं घेतलेल्या कार्याचें बरोबर मानसिक चित्र आधीं तयार करण्यांत आपलें सर्वस्व खर्च करीत असतात. चित्रांचें व इमारतीचें चित्र बरोबर मनांत उठल्यासच त्याची बरोबर प्रतिकृति जडसृष्टींत आणतां येते. निरोगी व सदृढ होणारांनीं, याप्रमाणेंच, आपल्या निरोगीपणाचें व सदृढपणाचें बरोबर मानसिक चित्र तयार करण्यांत आपली सर्व शक्ति खर्च केल्यास, तेंच निरोगीपणाचें व सदृढतेचें मानसिक चित्र, कांहीं दिवसांनीं त्यांनां शरीररूपी जड सृष्टींत आलेलें दिसेल. जेथें निरोगीपणाचें व सदृढतेचें मानसिक चित्रच नाहीं, तेथें शरीररूपी चित्र, ओबड-धोबड, कमकुवत व हिडिस दिसल्यास खांत नवल वाटण्याचें कारण नाहीं. जोंपर्यंत आपण अशक्त आहों, आपणांमध्यें आनुवंशिक अशक्तपणा आहे, आपल्या शक्ति मर्यादित आहेत, रोगानें मरणें हें आपलें नशीब आहे असे दुःखमय विचार आपण मनांत आणीत असतों, तोंपर्यंत आपण रोग, दुःख व दारिद्र्य ह्या त्रयीपासून मोकळे होणार नाहीं.

शक्ति, शांतता व समृद्धि हे आपले जन्मसिद्ध हक्क आहेत. ते आपण शक्तिमय, शांततामय व समृद्धिमय विचारांनींच मिळविले पाहिजेत. सर्वशक्ति परमेश्वरानें हें आनंदमय व सुखमय जग उत्पन्न केलें आहे; पण त्याबरोबर त्यानें रोग, दुःख, दारिद्र्य ह्या गोष्टी कांहीं निर्माण केल्या नाहींत. उलट, मनुष्यमात्रानें आपल्या सर्व शक्तींचा उपयोग करून शक्ति, शांतता व समृद्धि मिळवून पूर्ण विजयी व्हावें, अशी व्यवस्था या जगांत सर्व ठिकाणीं करून ठेविली आहे, असें सूक्ष्म दृष्टीनें पाहाणारास सहज दिसून येणार आहे. रोग, दुःख, दारिद्र्य व अशक्तपणा यांची मानसिक गुलामगिरी आपणच पतकरिली आहे, ती आपणच सोडून दिली पाहिजे. प्रत्येक मनुष्यमात्र दैवी वंशांत उत्पन्न झालेला आहे. शक्ति, सामर्थ्य व ज्ञान या गोष्टींचीं आनुवंशिक बीजें त्यामध्यें वसत आहेत. विचाराच्या साहाय्यानें त्यांनीं जगांतील आपत्तीवर जय मिळवून, आपणास ईश्वरानें निर्माण केलें आहे हें सिद्ध करून दाखविलें पाहिजे.

तीन अंकी प्रहसन.

प्रणयविजय.

ले. ल. वि. परळकर, बी. ए., एल् एल्. बी.

मॉलिएरच्या आधारें.

पात्रें.

रावजी ऊर्फ प्रभाकर—एक वृद्ध गृहस्थ.
मल्हारराव—रावजीचा मित्र.
दत्तोजी—मल्हारराव‌ाचा मेहुणा.
पांडुरंगराव—रावजीचा मित्र, व विश्वासराव‌ाचा बाप.
विश्वासराव—कमळेचा प्रियकर.
कमळा—रावजीनें वाढविलेली एक मुलगी.
म्हाळसा—रावजीची कुळंबीण.
गडी, दाई, जोशीबुवा इत्यादि.

अंक पहिला.

प्रवेश पहिला.

[स्थळ-वसंतपुर. कुबेरवाडीकडे जाणारा रस्ता. मल्हारराव व रावजी बोलत चालले आहेत, असा प्रवेश.]

मल्हारराव—आतां या वयांत अन् तुमच्या मनांतून लग्न करायाचें आहे म्हणतां?

रावजी—होय, याआठवड्यांतच लग्न उरकून घ्यावयाचा माझा मानस आहे !

मल्हारराव—आपण येथें एकटेच आहों, तेव्हां अमळ मन मोकळें करून बोलायला कांहीं हरकत नाहीं. मी तुझाला लेह्याच्या नात्यानें माझें मत स्पष्ट सांगूं का? तुमचा हा लग्नाचा विचार मला कांहीं बोवा मुळींच पसंत नाहीं! तुमचा स्वभाव व वय ह्यांचा विचार केला तर तुह्मीं आतां या लग्नाच्या भानगडींत पडणें ह्यांत शहाणपण नाहीं !

रावजी—तुह्मी आपल्या स्वतःच्या अनुभवावरून सांगत असाल-तुमच्या घरांत तसेंच कांहीं असेल-तुह्माला लग्नापासून सुख नसेल—

मल्हारराव—तुमच्या तर्कांची धांव फारच जबर आहे! लोकांचीं खरींखोटीं गृहछिद्रें काढण्यांत तुह्माला मोठा आनंद होतो. तुमच्या टीकेच्या तडाक्यांतून सुटलें असें एकहि घराणें नाहीं.लोकांच्या गृहछिद्रांचें तिखटमीठ लावून वर्णन करण्यांतच तुह्माला एक प्रकारची मौज वाटते. तुह्मी ह्या वयांत आतां एखाद्या कोवळ्या पोरीबरोबर लग्न केलेत आणि कांहीं कमीजास्ती झालें, तर लोक तुमचीं गृहछिद्रें चव्हाट्यावर आणण्यास कमी करणार नाहींत, हें खूब समजा !

रावजी—त्याची तुह्माला नको चिंता ! मी कांहीं कच्चा नाहीं. ह्या कामांत मी पुरा वाकबगार आहें ! पूर्वीपासूनच करायची ती तजवीज मीं करून ठेविलेली आहे. मी एखाद्या शिकलेल्या नखरेबाज पोरीबरोबर लग्न लावणार नाहीं. मीं बायको पसंत केली आहे ती अगदीं साधी व जिला कांहीं डावपेंच माहित नाहींत अशीच आहे—

मल्हारराव—तुह्माला असें वाटतें काय, कीं अडाणी व अशिक्षित मुलगी असली तर—

रावजी—अडाणी बायकोबरोबर लग्न लावलें ह्मणजे आपण कांहीं अडाणी होत नाहीं ! तुमची बायको चतुर असेल; परंतु बायको फार चतुर असणें हें कांहीं चांगलें नाहीं. नवऱ्याला बायकोच्या चातुर्याबद्दल प्रायश्चित्त भोगावें लागतें. बायको शिकलेली असली तर ती नेहमीं आपल्या पुस्तकांत, समांत व व्याख्यानांत चूर झालेली असते; वर्तमानपत्रांतून व मासिकांतून लेख लिहिते; पुरुषांत धीटपणानें मिसळते; भीडमर्यादा सोडून देते. जो तो बायकोला विचारतो,आपल्याला कोणी विचारीत नाहींत, व विचारलेंच तर अमकीतमकीचा नवरा ह्मणून तिरस्कारानें विचारतात! बायका शिकलेल्या असल्या ह्मणजे नवऱ्याचें पुरें दुर्भाग्य ! सगळे दुर्गुण ह्या शिक्षणामुळें उत्पन्न झालेले आहेत ! छे छे, शिकलेली बायको आपल्या कामाची नाहीं बुवा ! माझ्या आजीपणजीला तुमच्या त्या सभा अन् व्याख्यानें माहित नव्हतीं ! माझी आजीपणजी तुमच्या त्या मासिक पुस्तकांतून अन् वर्तमानपत्रांतून कविता नि गोष्टी लिहीतहि नव्हती नि वाचीतहि पण नव्हती ! आणि असें होतें ह्मणूनच त्यांचें वर्तन किती चोख होतें ! माझ्या बायकोला घरगुती शिवणकाम आलें, हिशोब ठेवतां आला, व देवांचीं गाणीं ह्मणतां आलीं—

मल्हारराव—एकंदरींत तुह्माला वेडगळ व मूर्ख बायको पाहिजे, असेंच कीं नाहीं ?

रावजी—एखादी सुंदर बायको शिकलेली असली तर मी तिचा अव्हेर करीन, व एखादी अशिक्षित बायको कुरूप असली तथापि मी तिचा स्वीकार करीन—

मल्हारराव—सौंदर्य आणि शहाणपण—

रावजी—बायकांच्या अंगीं पातिव्रत्य असलें ह्मणजे पुरे !

मल्हारराव—तें खरें, परंतु अडाणी व वेडगळ बायकोला खरें पातिव्रत्य ह्मणजे काय तें तरी कसें समजावें? आणि मला आपलें वाटतें कीं, पुरुषाला अगदीं मूर्ख माणसाचा-मूर्ख स्त्रीचा-सहवास आनंदकारक वाटणार नाहीं. बायको मूर्ख असली ह्मणजे ती पतिव्रता होते, असें का तुह्माला वाटतें? शहाणी बायको असली तर कोणतेंहि काम करण्यापूर्वी तें चांगलें आहे कीं वाईट आहे हें तरी तिला कळेल; पण तीच मूर्ख असली तर नकळत तिच्या हातून—

रावजी—तुह्मी, आणखी कितीहि कंठशोष केला, कितीहि व्याख्यानें झोडलीं, तरी मी अडाणी बायकोच पसंत करीन!

मल्हारराव—मग माझें कांहींएक बोलणें नाहीं!

रावजी—माणसामाणसाची आवड वेगवेगळी असते. मी माझ्या आवडीप्रमाणें वागणार, माझ्या आवडीप्रमाणें लग्न लावणार. संपत्तीला माझ्याजवळ कांहीं कमताई नाहीं, तेव्हां बायको गरीबस्थितींतील असली ह्मणजे माझ्यामुळेंच तिला वैभव प्राप्त झाल्याकारणानें ती सर्वस्वी माझ्या आधीन राहील. मीं जी बायको पसंत केली आहे ती लहान-चार वर्षांची-होती तेव्हांच तिचें मुख शांत व गंभीर दिसत असल्यामुळें तिजवर मी प्रेम करूं लागलों. तिची आई अगदीं गरीब होती. मीं तिच्यापासून कमळेला मागून घेतलें. गरीब स्थितीमुळें तिलाहि आपल्यावरचें ओझें हलकें झाल्यासारखें झालें. मीं एका खेडेगांवांतच कमळेला वाढविण्याची तजवीज केली. तिच्या शिक्षणाची सोयहि माझ्या मनाप्रमाणेंच केली. म्हणजे मीं तिला अगदीं अशिक्षित व अडाणी अशी ठेवली आहे. तिला कामापुरतें लिहितां वाचतां व शिवण शिवतां येतें, इतकेंच. माझ्या मेहनतीला यशहि चांगलें आलें. कमळेला डावपेंच कसे ते मुळींच माहित नाहींत. ती अगदीं साधीभोळी मुलगी आहे. मीं आतां तिला इकडे आणली आहे; परंतु माझ्या घरीं नानातऱ्हेचे लोक येणार, तेव्हां कमळेच्या मनाला वाईट गोष्टींचा संसर्गहि लागूं नये ह्मणोन माझ्या कुबेरवाडी येथील बंगलींत एकांत जागीं मीं तिला मोठ्या बंदोबस्तांत ठेविलें आहे. माझीं दोन विश्वासांतलीं माणसें तिच्यासारखींच साधीभोळीं आहेत. त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाचाहि तेथें प्रवेश होणें शक्य नाहीं. तुह्मी ह्मणाल, ही भाकडकथा ऐकून काय करायचें आहे? पण ह्मावरून आपल्या मनाप्रमाणें बायकोचें मन बनविण्यासाठीं मीं किती मेहनत घेतली आहे, तें तुह्माला कळेल. मल्हारराव! तुह्मी माझे विश्वासांतले मित्र आहां, तर आज रात्रीं आमच्या बंगलींत जेवायला या, ह्मणजे मीं पसंत केलेली बायको कशी काय आहे, माझी आवड बरोबर आहे कीं नाहीं, हें तुह्माला कळून येईल.

मल्हारराव—ठीक आहे, मी मोठ्या आनंदानें येईन.

रावजी—तिला पाहिल्यावर ती किती साधी व सरळ अंतःकरणाची आहे तें तुह्माला समजेल.

मल्हारराव—तुह्मीं हकीगत सांगितली ह्मावरून—

रावजी—मीं सांगितलें हें कांहींच नाहीं! तिचें मन इतकें पवित्र, इतकें प्रेमळ, इतकें—

मल्हारराव—पण, रावजी—

रावजी—तुह्मी मला त्या जुन्या नांवानें आतां हांक मारीत जाऊं नका बुवा!

मल्हारराव—पण तें तर अगदीं तोंडांतच बसून गेलें आहे! तुमचें नवें नांव 'प्रभाकर' हें एकदम मुखांतून निघत नाहीं. आतां तुह्माला चोपन्नपंचावन वर्षें होत आलीं, अन् ह्या वयांत जुनें नांव टाकून नवीन नांव घेण्याचें काय वेड तुमच्या डोक्यांत शिरलें आहे हें?

रावजी—मला हें नांव आवडतें अन् दुसरें आवडत नाहीं. 'रावजी' ह्मणून कोणीं मला हांक मारली तर मला फार राग येतो.

मल्हारराव—पण हें नवीन नांव एकदम प्रचारांत कसें येईल? अजून तुह्माला जुन्या नांवावरच पत्रें येतात—

रावजी—ज्यांना माहित नाहीं त्यांनीं तें वापरलें तर हरकत नाहीं; परंतु तुह्मी—

मल्हारराव—तसें कां होईना, मी देखील तुह्माला 'प्रभाकर' ह्मणूनच हांक मारीत जाईन.

रावजी—बरें, या आतां, रामराम.

मल्हारराव—(स्वगत) अगदींच खुळा आहे बेटा!

[जातात.

प्रवेश दुसरा.

[स्थळ—कुबेरवाडींतील बंगली. दाराजवळ रावजी उभा आहे, असा प्रवेश.]

रावजी—(स्वगत) मल्हारराव्याचीं किल्लेक मतें वेडगळ आहेत, बाकी मनुष्य भला आहे! (दरवाजा ठोठावून) कोण आहे रे आंत?

रामा—(आंतून) दार कोन् ठोकतुया?

रावजी—दरवाजा उघड! (स्वगत) दहा दिवसांनंतर आज मी या बंगलींत आलों, तेव्हां मला पाहून त्यांना मोठा आनंद होईल.

रामा—(आंतून) अरे, पन् हे कोन?

रावजी—मी मी आहें! (स्वगत) कमळा तर अगदीं गहिंवरून जाईल—

रामा—झालसे-

झाळसा—जी व्हय-

रामा—दार उगड पघू!

झाळसा—तुमीच उगडा!

रामा—तूंच जाउनशान् उगड!

झाळसा—तुमीच जाउनशानी उगडा!

रावजी—चा! मला बाहेर उभें ठेवलें आहे अन् हीं आंत मांडत बसलीं आहेत! (दार ठोठावून) अरे, दार उघडा दार-

झाळसा—अरे पन तूं हाएस कोन?

रावजी—तुझा धनी आहें! अरे गुलामांनो!

झाळसा—रामा-

रामा—काय म्हंगतीस म्हालसा-

झाळसा—भाईर धनी आल्याती धनी, विगि जाउनशानी दार उगडा!

रामा—धनी आल्याती, मंग तूं का न्हाइ दार उगडीत?

झाळसा—मी चूल फुंकतिया-

रामा—आन् मी पोपटाली दानापानी देतुया-

रावजी—अरे हरामखोरांनों! दम धरा, जो आतां दरवाजा उघडणार नाहीं त्याला चार दिवस उपाशींच ठेवितों!

(दोघेंहि दाराकडे धांवत येतात.)

झाळसा—आतां मी जातिया आन् तुमी कशापाई-

रामा—आन् मी येतोय् तवा तु कशापाई आलीस?

झाळसा—बाजू व्हा की—

रामा—तूच बाजू हो की—

झाळसा—मी दार उघडतिया—

रामा—आन् मी पर दार उगडतुया—

झाळसा—तुमास्नी न्हाइ उगडु देनार—

रामा—आन् तुला पर न्हाइ उगडु देनार—

रावजी—माणसानें धीर तरी केवढा बेळ धरावा! हरामखोरांनों, उघडतां कीं नाहीं दार, कीं आणूं कोतवालाला?

रामा—(एकदम दरवाजा उघडून) म-म-मी दरवाजा उगडला धनिसाब—

झाळसा—(त्याला लोटून) धनिसाब ह्यान न्हाइ म-म-मींच उगडलाजी!

रामा—आता धनी हैत ह्यातुन्, न्हैतर-(गडबडींत रामाचा रावजीस धक्का लागतो.)

रावजी—काय तमाशा मांडला आहे रे हरामखोरांनों?

रामा—धनीसाब माफ करा जी—

रावजी—काय गधडा आहे! चूप रहा, गाढव नाहींतर! मी विचारतों त्याचें आधीं उत्तर द्या. कायरे, घरांतलीं सर्व माणसें सुशाल आहेतना?

रामा—(कंबरेवर दोन्ही हात ठेवून) धनीसाब, आमी पघा (रावजी एका हातावर फटका मारून तो हात खालीं करतो.) आमी-(रावजी दुसऱ्या हातावर फटका मारून तो हात खालीं करतो.)

रावजी—गुलामा, कंबरेवर हात ठेवून माझ्यासमोर उभा राहतोस?

रामा—चुकलों धनी!

रावजी—जा आणि कमळेला इकडे पाठवून दे. (रामा जातो.) कायग झाळसे, मी गेल्यावर ती अगदीं उदास आणि कष्टी असेल नाहीं?

झाळसा—न्हाइ बा!

रावजी—नाहीं?

झाळसा—व्हय व्हय—

रावजी—मग नाहीं कसें झणतेस?

झाळसा—धनीसाब आपुन गेल्यापून अक्षी कवा परत याल अस त्याना झाल व्हत, आन् दारावरून कोनचाबी बैल की गाढव चालला की तुमीच आल्यावी अस वाटून दचकूनशान् विगिविगि दारावर धावून येन व्हत्या.

(कमळा हातांत शिवणकाम घेऊन येते. मागून रामा येतो.)

रावजी—वा कमळे, तुझें शिवणकाम चालूच आहे! ठीक ठीक बरें कमळे, मी आतां परत आलों. तुला त्याबद्दल आनंद वाटतोना?

कमळा—होय, तुझी आलां, तें बरें झालें!

रावजी—मला देखील तुला पाहून फार आनंद होतो! तुझी प्रकृति चांगली दिसते. सगळें यथास्थित होतें ना?

कमळा—होय, पण रात्रीं मात्र मुरकुंडें फार त्रास देत!

रावजी—बरें, तें आतां काय करीत आहेस?

कमळा—मी माझ्यासाठीं कांहीं चोळ्या तयार करीत आहें. तुमचे सदरे व टोप्या तयार झाल्या.

रावजी—वा फार चांगलें! बरें तर, वर जा. फारसें काम करूं नको. तुला कांहीं महत्त्वाची गोष्ट सांगावयाची आहे, ती मग सांगेन. [जातात.

प्रवेश तिसरा.

[स्थळ—कुबेरनाडी. नदीकांठची आमराई. रावजी आमराईत हिंडत आहे, असा प्रवेश.]

रावजी—(स्वगत) आतांच्या शिकलेल्या मुली पहा, अन् ही अशिक्षित मुलगी पहा! कविता आणि प्रणयपत्रिका लिहिणाऱ्या, कादंबऱ्या वाचणाऱ्या आणि शास्त्राच्या गोष्टी सांगणाऱ्या मुलींस हिच्या नखाची तरी सर येणार आहे काय? संपत्तीला आपण व्यर्थ भुलून जाऊं नये! सद्गुणांची किंमत-(विश्वासराव येतो त्यास पाहून) अरे हा कोण? हा आमच्या पांडुरंगरावांचा विश्वास तर नव्हे? पण नाहीं-होय-तोच-विश्वास—

विश्वासराव—रावजीकाका!

रावजी—काय आनंदाचा दिवस! येथें केव्हां आलास?

विश्वास—नऊ दिवस झाले.

रावजी—खरें कीं काय?

विश्वासराव—मी आल्यावरोबर तुमच्या घरीं गेलों; परंतु तुझी घरीं नव्हतां.

रावजी—मी बाहेरगांवीं गेलों होतों.

विश्वासराव—होय, तुझाला जाऊन दहा दिवस झाले.

रावजी—(स्वगत) वा, हीं मुलें थोड्याशा वर्षांत कितीतरी वाढतात! मीं ह्याला मागें पाहिलें तेव्हां हा एवढासा होता, आणि आतां एवढा उंच झाला आहे! (उघड) पण तुझा बाप सुशाल आहेना? त्याची माझी कितीतरी मैत्री. आम्ही अगदीं जीवाला जीव टाकणारे! आज चार वर्षांत त्याची माझी भेट नाहीं. आश्चर्याची गोष्ट कीं, एकमेकांचें पत्रहि एकमेकांला नाहीं—

विश्वासराव—बाबा सुशाल आहेत. त्यांचें हें तुम्हाला पत्र आणलें आहे; आणि कालपरवां त्यांचें मला पत्र आलें त्यांत ते येथें येणार, म्हणून त्यांनीं लिहिलें आहे. चवदा वर्षे आफ्रिकेंत राहून पुष्कल संपत्ति मिळवून जे परत आले आहेत ते गृहस्थ कोण, तुम्हाला कांहीं ठाऊक आहे काका?

रावजी—त्यांचें नांव काय बरें?

विश्वासराव—दत्तोजी.

रावजी—मला माहित नाहीं.

विश्वासराव—बाबांच्या पत्रांत त्यांच्याविषयीं उल्लेख आहे, आणि त्यांच्याशीं त्यांचें कांहीं काम आहे असें दिसतें; पण काय काम आहे त्याचा कांहीं खुलासा केला नाहीं. तुझाला देण्याला त्यांनीं पत्र दिलें होतें, तें हें. (पत्र देतो.)

रावजी—माझा मित्र येथें येत आहे हें ऐकून मला फार आनंद होतो! (पत्र वाचून) जिवलग मित्रांनां अशीं पत्रें लिहिण्याची गरजच नाहीं! माझ्या मित्रानें तुला पैसे देण्याविषयीं लिहिलें नसतें तरी तुला वाटेल तें मजपासून हक्कानें मागून घेण्यास कोणतीच हरकत नव्हती!

विश्वासराव—काकासाहेब, सध्यां मला हजार रुपयांची गरज आहे.

रावजी—माझ्याशीं तूं कोणत्याहि रीतीनें परकेपणा बाळगूं नकोस! मी खेड्यांत वसुलास गेलों होतों, अन् तिकडूनच परत येत आहें. (त्याला पैसे मोजून देतो) तुला कांहीं देखील लागलें तरी मजजवळ येत जा बरें, तुला आमचें गांव कसें काय आवडलें?

विश्वासराव—येथें लोक पुष्कळ आहेत, घरेंदारें चांगलीं आहेत, आणि मला वाटतें कीं, मजा करायला देखील हें गांव चांगलें आहे.

रावजी—एकेकाची आवड असते. त्यांत तुझ्यासारख्या तरण्या बांडाची तर ह्या गांवांत चैनच आहे. येथील तरुण पोरी म्हणजे काय विचारूं नको! त्यांचा पोषाख काय आणि नखरा काय पाहून घ्यावा! तुझ्यासारख्या रूपवान् तरुणाची तर काय मजा आहे. (हांसत) येथें आल्यापासून कांहीं—

विश्वासराव—तुझी तरी काकासाहेब लहानांत लहान आणि थोरांत थोर असे आहां! तुमच्यापासून मी कांहीं लपवूं इच्छित नाहीं. येथें आल्यावर मी एका प्रेमपाशांत सांपडलों आहें. पण ही गोष्ट घटकणीं होऊ देऊं नकादो!

रावजी—तें काय सांगायला पाहिजे!

विश्वासराव—अशा बाबतींत गोष्ट एकदां बाहेर फुटली कीं काम साधत नाहीं! तुमच्याजवळ मन मोकळें करून सांगायला कांहीं हरकत नाहीं म्हणा. या गांवांत एक सुंदर मुलगी राहते. मुलगी पण अशी आहे कीं, लाखांतून निवडून काढावी! त्यांत विशेष हें कीं, मला पहिल्यापासूनच त्या कामीं यश मिळत गेलें—

रावजी—(हांसत) अरे वा! पण ती सुंदरी कोण—

विश्वासराव—(रावजीच्या बंगलीकडे बोट दाखवून) ती समोर लाल रंग दिलेली बंगली दिसते ती, तेथें ती राहते. मुलगी अगदीं साधीभोळी आहे. एका मूर्ख घेरड्यानें लहानपणापासून तिला कोंडून ठेविल्यामुळें जगाचा अनुभव कसा तो तिला मुळींच नाहीं. पण जगाचें तिला अज्ञान असतांहि तिचें मुग्ध सौंदर्य व मनाची सरलता इतकी कांहीं मोहक आहेत कीं, सांगतां येत नाहींत! कदाचित् तुझीं तिला पाहिलीहि असेल! तिचें नांव कमळा.

रावजी—(स्वगत) अरे कारट्या! बरें आहे! तुझी खोडच मोडतों!

विश्वासराव—त्या घेरड्याचें नांव प्रभाकर कीं कांहींसें आहे. बेटा श्रीमंत तर खूब दिसतो, पण गुलामाला कवडीची अक्कल नाहीं! असें म्हणतात कीं—

रावजी—(स्वगत) हें सर्व मला निमूटपणें ऐकावें लागेंत ना?

विश्वासराव—कां काका, तुझी कांहींच बोलत नाहीं?

रावजी—अं-होय—

विश्वासराव—तो अगदींच मूर्ख आहे—

रावजी—आं-हां!

विश्वासराव—काय म्हणतां? आं-हां ह्याचा अर्थ काय? तुझी त्याला ओळखीतच असाल. तो घेरडा संशयखोर व मत्सरी आहे असें तुमचें म्हणणें, कीं मूर्ख आहे असें तुम्हाला वाटतें? मला देखील लोकांनीं असेंच कांहीं सांगितलें. ह्या कमळेचें मला अगदीं वेड लागून राहिलेलें आहे. ती एक रत्नच आहे! असें रत्न ह्या विक्षिप्त माकडाच्या हातीं राहूं देणें म्हणजे वेडेपणा आहे. माझ्याविषयीं म्हणाल, तर ह्या मत्सरी घेरड्याच्या हातावर तुरी देऊन कमळेशीं लग्न लावण्याचा माझा ठाम निश्चय झाला आहे! मी तुमच्यापासून पैसे उसने घेतले ते तरी ह्याच कामासाठीं! आपण कांहीं देखील करायला घेतलें तरी पैशाची गरज प्रथम लागते, हें तुम्हाला ठाऊकच आहे. द्रव्येण सर्वे वशाः. काय, तुम्हाला माझ्या बोलण्याचा कंटाळा आला? बरें तर मग, रामराम! मी लवकरच तुझाला पुनः भेटेन.

रावजी—(स्वगत) काय करावें आतां?—

विश्वासराव—(परत येऊन) माझीं गुप्त गोष्ट कोणाला समजूं देऊं नका बरें काका!

रावजी—(स्वगत) मला असें झालें आहे—

विश्वासराव—(पुनः परत येऊन) त्यांत बाबांनां तर मुळींच कळवूं नका! नाहीं तर ते रागावतील. [जातो.

रावजी—(स्वगत) माझ्या अंगाची कशी लाही लाही होत आहे! माझ्यासारखा प्रसंग कोणावर तरी आला असेल काय? काय वेड्यासारखा मागलापुढला विचार न करतां सर्व कांहीं मला सांगत सुटला! माझ्या दुसऱ्या नांवानें तो फसला, पण किती अविचारानें सर्व गोष्टी मडाभर मजजवळ ओकला. पण मीं तरी इतकें आत्मसंयमन केलें, त्याअर्थी त्याचे काय काय बेत झाले आहेत ते त्याच्याजवळून काढून घ्यावयास पाहिजे होतें. तो दूर गेला नसेल. त्याला गांठून त्याजवळून सर्व हकीकत काढून घ्यावी. माझे पाय तर लटलटायला लागले. [जातो.

प्रवेश चवथा.

[स्थळ—कुबेरवाडी. रावजीची बंगली.]

रावजी—(स्वगत) हा गेला तरी कोठें! एका अर्थी तो आतां गेला हेंच बरें झालें! तो भेटला असता तर माझ्या मनाची स्थिति त्याच्यापासून लपविता आली नसती. माझ्या हृदयांत चाललेलें काहूर त्याच्या लक्ष्यांत आलें असतें. माझ्या मनांतून खरी स्थिति त्याला कळवायची नाहीं, पण आपण माघार खाऊन ह्या कालच्या पोराला पाहिजे तसें नाचूं

देणारा मी नाहीं ! त्यांचे बेत तर मी ढांसकून पाडणारच ! हा माझ्या लौकिकाचा प्रश्न आहे ! कारण, मी तिला बायको-प्रमाणेंच मानतों. तिच्या हातून कांहीं कमीजास्ती झालें तर त्यांत माझा लौकिक तो काय राहिला ? मी बाहेरगांवीं गेलों हीच आधीं चूक झाली-(दार ठोठावतो.)

रामा—(दार उघडून) धनीसाहेब हे वखत—

रावजी—चूप रहा ! दोघेंहि आधीं माझ्यासमोर या पाहूं, चला जलदी करा.

झाळसा—मला अगदीं थावरबूनशानी सोडल. माझे हातपाय लटलटाया लागले—

रावजी—माझ्या गैरहजिरींत तुम्ही असेंच वागतां काय? तुम्हीं दोघें एकमत होऊन माझा गळा कापायला—

झाळसा—(रावजीचे पाय धरून) माझ्यावर दया करा, मला साउनशानी टाकूं नका !

रामा—(स्वगत) धनीसायबाला भुताम् तर पछाडल न्हाई !

रावजी—(स्वगत) रागाच्या भरांत काय बोलूं अन् काय नाहीं, असें मला झालें आहे. (उघड) हरामखोरांनों ! तुम्हीं परक्या माणसाला घरांत घेतलें ! (रामा पहूं पाहतो त्यास) चोरा, आतां पळतोस काय? (झाळसेस) सटवे ! या क्षणीं इकडून हाललीस तर खबरदार ! सांग पाहूं मला आतां-(दोघेंहि पुनः पहूं पाहतात !) खबरदार पळाल तर, एकेकाला जमीनदोस्त करून सोडीन ! तो मनुष्य माझ्या घरांत कसा घुसला ? सांगा, बोला, एकदम, लवकर, जलदी करा, विचार नाहीं करायचा-बोलतां कीं नाहीं ?

दोघें—अरे बापरे !

झाळसा—(त्याचे पाय धरून) माझी छाती धडाडते की-

रामा—(त्याच्या पायां पडून) माझा परान चालला-

रावजी—(आत्मगत) मला घाम कसा पण सपाटून आला ! थोडा दम धरला पाहिजे. जरा वारा घेतों व इकडून तिकडे फिरतों, म्हणजे बरें वाटेल. विश्वासास मीं लहान असतांना पाहिला, तेव्हां मोठा झाल्यावर त्याच्या हातून असें काम घडेल असें माझ्या स्वप्नीं तरी आलें काय ? काय ही माझी दशा झाली ! मला वाटतें, कमळेच्या तोंडूनच बेता-बातानें सगळी हकीगत काढून घ्यावी. माझा राग जरा शांत केला पाहिजे, डोकें थंड ठेविलें पाहिजे. (रामास व झाळसेस) उठा आणि कमळेला येथें पाठवून द्या.-पण, थांबा, तिला जाऊन मी रागावलों हें सांगाल गुलामांनों, मीच जाऊन तिला घेऊन येतों. येथें माझी वाट पाहत बसा. [जातो.

झाळसा—आकाशच कडाडल जनूं ! कसा बाघावानी चवताळलाय पन—

रामा—हा मानुस हतं येतोय त्यान धनी सापवाला राग आनलान, बीज काय न्हे !

झाळसा—पन कमळाबायला घरामंदी कोंडुनशानी कशा-पायी ठेवतो ? तिला अक्षी पडघामंदी लपवुन कशापायी ठेवतो ?

रामा—कशापायी काय-हा मच्छर !-मच्छर-अदेखाई बोलल्यात ती ही !

झाळसा—पन इवती अदेखाई कशापाई ?

रामा—कारन पघ, त्याला मच्छर हाय !

झाळसा—पन मच्छर तरी कशापाई ? इवता राग कशा-पाई ?

रामा—कारण पघ-मच्छर जो हाय तो-तो मानसाला डंवचतो-राग आनतो. आतां हे पघ, कुत्र्याला हाडूक गवसल तर तो आन कुत्र्यावर भुंकल.

झाळसा—व्हय, ते तर खरच.

रामा—तसच हे. बायको हाय ते मानसाला हाडका-वानी हाय. त्येच्यापाई तो ओरडल-नाचल-भुंकल काय पायजेल ते करील !

झाळसा—पण ते पघ धनीसाब आल्येच—

रामा—चला पला— [जातात.

प्रवेश पांचवा.

[स्थळ-कुबेरवाडींतील बंगलीच्या भोंवतालचा बगीचा. रावजी व कमळा प्रवेश करितात.]

रावजी—(स्वगत) असें सांगतात कीं, राग आला म्हणजे शंभर थंक मोजावे, व मग काय करायचें तें करावें, म्हणजे तितक्या वेळांत राग शांत होईल व आपल्या हातून अविचाराचें काम होणार नाहीं. मी देखील आतां असेंच करीत आहें. या बगीचांत फिरायला म्हणून तिला येथें आणली आणि आतां हळुहळू तिच्याजवळून खरी बातमी काय ती काढून घेतों. (उघड) ही बगीचांतील वाट फार रमणीय आहे.

कमळा—होय, फारच रमणीय.

रावजी—आज कसा थंड वारा सुटला आहे.

कमळा—फारच गजेदार गार वारा आहे आज.

रावजी—कांहीं नवीजुनी बातमी ?

कमळा—तें मांजराचं पिलूं मेलं-

रावजी—मरूं दे शिंचें ! मी बाहेरगांवीं होतों तेव्हां हवा अशीच चांगली होती का ?

कमळा—होय.

रावजी—तुला एकटीला कंटाळा आला असेल, नाहीं ?

कमळा—मला कंटाळा केव्हांच येत नाहीं.

रावजी—मग या नऊदहा दिवसांत तूं काय काय करीत होतीस, सांग पाहूं.

कमळा—सदरे मला वाटतं मीं सहा शिवले, अन् सहा टोप्या केल्या.

रावजी—(विचार करीत) कमळे, हें जग मोठें चम-त्कारिक आहे. लोकांना परनिंदा केल्याशिवाय दुसरा कांहीं उद्योगच नाहीं. निंदा करण्याच्या कामांत जो तो गढून गेलेला असतो. मला कांहीं शेजाऱ्यांनीं सांगितलें कीं, मी येथें नसतांना एक परका तरुण मनुष्य आपल्या घरीं येत असे, व तूं त्याच्याबरोबर बोलत असस. माझा कांहीं या बोलण्यावर विश्वास नाहीं, व मी त्यांच्याजवळ पैजहि मारण्या—

कमळा—अगबाई ! पैज मारूं नका ! तुम्ही पैजेंत हराल-

रावजी—काय ! तर मग परका मनुष्य—

कमळा—अगदीं खरी गोष्ट ! ते किनई, दररोज कितीतरी वेळ इथं असत.

रावजी—(स्वगत) ही मोकळेपणानें कबूल करीत आहे, यावरून ही पूर्वीप्रमाणेंच साधी व निष्पाप आहे, असें दिसतें. (उघड) पण कमळे, मला आठवतें कीं, येथें कोणालाहि येऊं देऊं नको, व कोणा परक्या पुरुषाशीं भाषण करूंनको, असें मीं तुला सांगितलें होतें—

कमळा—होय, पण मीं त्यांच्याशीं कां भाषण केलें हें तुम्हाला माहित नाहीं! तुम्ही असतां तर तुम्हीं दिखील तसंच केलं असतंत!

रावजी—असेल कदाचित्. पण काय झालें तें तर मला समजूं दे.

कमळा—ती अगदीं चमत्कारिक गोष्ट आहे! कुणाला खरी दिखील वाटणार नाहीं! मी गच्चीत शिवण शिवीत होतें तेव्हां रस्त्यांतून एक सुंदर तरुण मनुष्य जात होता, त्यानं मजकडे पाहिलं व त्याची माझी दृष्टादृष्ट झाली. कांहीं वेळानं तो पुनः परत गेला व पुनः त्याची माझी दृष्टादृष्ट झाली. तो तिसरून गेला तेव्हां मजकडे पाहून हंसला. मीहि सभ्यपणाचं लक्षण म्हणून त्याच्याकडे पाहून हंसलें—

रावजी—(स्वगत) सभ्यपणा कीं असभ्यपणा! अगदींच भोळी व अजाण!

कमळा—तो आणखी कितीक वेळां असाच गेला अन् मजकडे पाहून हंसला. मी अगदींच गांवढळ व असभ्य आहें असं त्याला वाटूं नये म्हणून त्याच्याकडे पाहून हंसलें.

रावजी—बरें पुढें!

कमळा—दुसऱ्या दिवशीं मी दारांत उभी असतांना माझी आई तेथें आली—

रावजी—तुझी आई?

कमळा—असं तो म्हणाली व तिनं जुनी सर्व हकीगत मला सांगितली. आणि तिच्यासंबंधानं तुमच्याजवळ मी कांहीं बोललें तर तुम्ही रागवाल, असंहि ती म्हणाली.

रावजी—अगदीं खोटी गोष्ट! तिच्यावर तू अगदीं विश्वास ठेवूं नकोस! तुझी आई मागेंच मेली. बरें ती आणखी काय म्हणाली?

कमळा—तिच्या बोलण्यावरून ती माझी आईच असेल, असं मला वाटलं. ती आणखी मला म्हणाली कीं, 'देवानं तुला चांगलं रूप दिलं आहे, त्याचा वाईट उपयोग करूं नकोस. तूं एका मनुष्याचं अंतःकरण जखमी केलं आहेस—'

रावजी—(स्वगत) अग सटवे! म्हातारपणीं असे धंदे मांडले आहेस काय?

कमळा—मला नवल वाटलं व मीं विचारलं कीं 'माझ्या हातून कुणाला जखम झाली काय?' ती म्हणाली 'होय. काल ज्या तरुण मनुष्याला तूं गच्चीतून पाहिलेंस त्याला 'तूं घायाळ केलं आहेस.' मी घाबरून गेलें व तिला विचारलें 'न जाणतां माझ्या हातून त्याच्या अंगावर कांहीं पडलं कीं काय?' तिनं उत्तर केलं 'तसं नाहीं. तुझ्या डोळ्यांनीं तो घायाळ झाला. डोळ्यापासून त्याला इजा झाली.' मला मोठं नवल वाटलं. मीं तिला विचारलें 'माझ्या डोळ्यांत असं कसलं विष भरलं आहे कीं त्याच्यापासून लोकांना इजा होते?' ती म्हणाली 'तुझ्या डोळ्यांत तसंच विष आहे! तुला माहित नाहीं; परंतु लोकांना त्यापासून इजा होते.' त्या भल्या बाईला त्या तरुण गृहस्थाची फार दया आली व ती म्हणाली 'तो बिचारा झुरून मरत आहे. तूं त्याच्यावर दया करणार नाहींस तर दोनतीन दिवसांतच तो मरेल!' हें ऐकून मला फार वाईट वाटलं व मीं त्याच्यावर कशी दया करावी तें मीं तिला विचारलें. ती म्हणाली 'मुली, त्याच्या मनांतून तुला भेटून तुझ्याशीं दोन गोष्टी कराव्या, इतकंच आहे. तुझ्या डोळ्यांनीं त्याला घायाळ केलं तर तुझे डोळेच त्याला बरं करतील.' हें ऐकून मला मोठा आनंद झाला व 'त्याला वाटेल तेव्हां येथें येऊं दे,' असं मीं सांगितलं.

रावजी—(स्वगत) अग सटवे! माझ्यापासून एकदां पैसे घेऊन पोरीला पुनः फितवायला आलीस काय?

कमळा—ह्याप्रमाणं ते मला भेटायला आले व बरे झाले. आतां सांगा पाहूं, मीं केलं तें बरोबर केलं कीं नाहीं तें? ते गृहस्थ धडधडीत मरत असतां त्यांना मरूंद्यायचं हें बरं का? असं कुणीतरी करील का? एखादं कुत्रं मेलं तर आपल्याला इतकं वाईट वाटतं, मग माणसाला कुणी असं मरूं देईल का?

रावजी—(स्वगत) ही अगदीं भोळी व अजाण पोर आहे. डावपेंच हिला कांहींच ठाऊक नाहींत, म्हणून हें असें होतें. मी हिच्यापासून दूर गेलों हीच चूक केली. लबाड लोकांपासून हिचें रक्षण करण्याला कोणीतरी जाणतें मनुष्य हिच्याजवळ पाहिजे. त्या गुलामानें कोठपर्यंत मजल मारली कोणाला ठाऊक?

कमळा—तुम्ही असे कष्टी कां दिसतां? तुम्हाला राग तर नाहीं आला? माझ्या हातून कांहीं अपराध झाला नाहींना?

रावजी—नाहीं. पण तो मनुष्य येथें आल्यावर कसा वागत असे, काय करीत असे, सांग पाहूं.

कमळा—त्यांना इकडे आल्यावर किती बरं वाटत असे हें तुम्हाला समजेल तर तुम्हालाहि आनंद वाटेल! मला पाहिल्याबरोबर त्यांचं दुखणं कोठच्या कोठं जात असे! मला त्यांनीं काय काय सुंदर भेटी दिल्या अन् रामाला व झाळसेला किती बक्षिसं दिलीं, तें तुम्हाला समजलं तर तुम्ही दिखील त्यांच्यावर प्रेम करायला लागाल. त्यांचा फारच ममताळु अन् गोड स्वभाव—

रावजी—तें खरें, पण तो तुझ्याजवळ एकटाच असला म्हणजे काय बोले, काय मागे?

कमळा—त्यांचे एकेक बोल काय सांगावे! ते ऐकून मन विरघळूनच जातं अन् कितीहि ऐकलं तरी ऐकावंसंच वाटतं. किती प्रेमळ नी गोड भाषण? त्यांनीं मला शपथपूर्वक सांगितलं कीं, माझ्याएवढं त्यांचं साऱ्या जगांत दुसऱ्या कुणा-कुणाचरचं प्रेम नाहीं! त्यांचं बोलणं अगदीं अंतःकरणांतच शिरतं.

रावजी—(स्वगत) मी चौकशी करतों अन् तीपासून मलाच दुःख होतें. (उघड) बरें आणखी—

कमळा—आणखी काय?

रावजी—त्यानें आणखी कांहीं केलें नाहीं! (कमळा गोंधळते.) सांग, खरें काय तें सांग!

कमळा—त्यांनी—

रावजी—होय! त्यांनीं तुझ्याजवळून—

कमळा—माझ्याजवळून—

रावजी—बोल, बोल लवकर काय तें!

कमळा—तुझी रागवाल—

रावजी—नाहीं रागावणार, सांग कायतें!

कमळा—छे, पण तुझी रागवाल—

रावजी—नाहीं, खरेंच नाहीं—

कमळा—शपथ घेऊन सांगा नाहीं रागावणार म्हणून!

रावजी—खरेंच नाहीं रागावणार, सांग कायतें!

कमळा—त्यांनीं माझ्याजवळून-पण तुम्ही रागवाल—

रावजी—नाहीं-नाहीं-नाहीं! काय आहे काय तें बोल एकदां—

कमळा—त्यांनीं—

रावजी—(स्वगत) माझ्या अंगाचा कसा भडका होऊन गेला आहे! (उघड) बोल, बोल एकदां काय आहे तें!

कमळा—तुझी मला गळपट्टा दिला होता किनै तो त्यांनीं मजजवळून घेतला. माझ्यानं त्यांना मना करवलं नाहीं!

रावजी—(जरा स्वस्थ होऊन) गळपट्टा घेतला तर घेऊं दे, पण त्यानें आणखी कांहीं केलें नाहींना?

कमळा—आणखी? आणखी काय करतात?

रावजी—कांहीं नाहीं. पण त्याला दुखापत झाली आहे म्हणून त्यानें सांगितलें तर ती दुखापत बरी करण्याकरितां त्यानें आणखी कांहीं केलें नाहीं ना?

कमळा—नाहीं. पण त्यांना बरं करण्यासाठीं त्यांनीं मला कांहीं करायला सांगितलं असतं तर मीं केलं असतं.

रावजी—(स्वगत) परमेश्वरकृपेनें थोडक्यांतच निभावलों! आतां झापुदें मात्र फार सावध राहिलें पाहिजे. (उघड) कमळे, तूं अगदी अजाण आहेस, म्हणून तुला तसें वाटतें. झाली गोष्ट झाली. त्याच्या मनांतून तुझ्याशीं गोडगोड बोलून तुला फसवायचें आणि मग तोंडघशीं पाडायचें होतें-

कमळा—छे छे, त्यांच्या मनांतून असं कांहीं दिसेल नव्हतं! त्यांनीं मला शपथपूर्वक सांगितलं—

रावजी—त्या लुच्चाच्या शब्दावर तूं मुळीं देखील विश्वास ठेवूं नकोस! अशा लोकांपासून भेटी घेणें, त्यांच्या गोड गोड थापा ऐकणें, व त्यांच्यावरोबर बोलणेंचालणें हें पाप आहे, फारच मोठें पाप आहे, समजलीस!

कमळा—अग बाई! खरेंच कीं काय? पाप आहे, अन् तें कां बरं?

रावजी—कां? कारण त्या योगानें देवाला राग येतो.

कमळा—राग येतो! पण देवाला राग कां यावा? त्यांचं बोलणं मला कितीतरी गोड लागतं! ते जवळ असले म्हणजे मला कितीतरी बरं वाटतं. सदोदित त्यांच्याशीं बोलावंचालावं, त्यांचं मन जेणेंकरून प्रसन्न होईल असं वागावं, असं मला फारच वाटतं. ते मला फार आवडतात. मला त्यांचं अगदीं वेडच लागलं आहे. माझं त्यांचेवर प्रेम जडलं आहे.

रावजी—प्रेम हें गोड व सुखकारक आहे; पण तें शुद्ध प्रेम असलें पाहिजे. त्यांतील पापाचा भाग काढून टाकला पाहिजे. लग्न लागलें म्हणजे प्रेमांतील पापाचा भाग निघून जातो व शुद्ध प्रेम राहतें.

कमळा—तर मग लग्न लागलं म्हणजे प्रेम करणं कांहीं पाप नाहीं!

रावजी—अर्थात् नाहीं!

कमळा—मग माझं लवकरच लग्न करून टाका ना?

रावजी—तुझी इच्छा असेल तर माझ्याहि मनांतून तेंच आहे. मी येथें लवकर परत आलों तो लग्न करण्यासाठींच!

कमळा—खरंच कीं काय?

रावजी—होय.

कमळा—मग तुझी मला खरोखरच सुखी कराल?

रावजी—होय, लग्न केलें म्हणजे तुला सुख होईल.

कमळा—आणि मग आम्ही दोघेंजण—

रावजी—होय मग दोघांनां सुखानें नांदायला कांहींच हरकत नाहीं.

कमळा—असं होईल तर मी तुमची कितीतरी आभारी होईन! पण तुझी थट्टा तर करीत नाहीं ना?

रावजी—थट्टा नाहीं करीत, मी खरेंच सांगतों.

कमळा—आणि आमचं दोघांचं लग्न होईल?

रावजी—होय.

कमळा—केव्हां?

रावजी—उद्यां संध्याकाळीं.

कमळा—(आनंदानें) उद्यां संध्याकाळीं?

रावजी—उद्यां संध्याकाळीं. आतां तुला आनंद झालाना-तुला सुख झालें ना?

कमळा—होय, खरंच मला अतिशय आनंद मी सुख वाटेल.

रावजी—तुला सुख व्यावें हीच माझी इच्छा आहे.

कमळा—मी तुमची कितीतरी आभारी आहें! त्यांच्याबरोबर माझं लग्न झाल्यास मला कितीतरी सुख होईल—

रावजी—कोणाबरोबर?

कमळा—त्यांच्याबरोबर—

रावजी—त्यांच्याबरोबर! मी त्या हरामखोराची नाहीं गोष्ट बोलत! तूं मलताच नवरा पसंत करूं नकोस. तुझें दुसऱ्याशींच लग्न लावायचें आहे. त्या लवाड मनुष्याशीं संबंधानें म्हणशील तर आजपासून त्याच्याशीं कांहीं देखील संबंध ठेवूं नकोस! मग तो आजारी पडो कीं मरो! तो घरीं आला तर बेलाशक दार बंद करून घेत जा. तो दार ठोठावायला लागला तर खिडकींतून त्याला दगड मार. मीं काय सांगितलें तें ऐकलेंस ना नीट? मीं सांगितल्याप्रमाणें तूं वागतेस कीं नाहीं हें मी आडून पहात जाईन, समजलीस?

कमळा—असं काय बरं! ते किती सुंदर आहेत—

रावजी—काय भलतेंसलतें बोलतेस हें?

कमळा—असं निष्ठुरपणानं मला कसं बरं—

रावजी—बटबट लावूं नको, जा घरांत जाऊन बस!

कमळा—पण—

रावजी—चूप! मीं सांगितल्याप्रमाणें वाग. [जातात.

[पडदा पडतो.]

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

[स्थळ—कुबेरवाडी. रावजीची बंगली, रावजी, कमळा, रामा व झाळसा बसली आहेत, असा प्रवेश.]

रावजी—होय, अजूनपर्यंत सर्व ठीक चालले आहे. तुझी माझ्या हुकमाप्रमाणें वागलां व त्या लवाड मनुष्याची चांगली फजिती केली. पहा, शहाण्या माणसाचें ऐकलें म्हणजे असा चांगला परिणाम होतो. कमळे! अजाणपणामुळें तूं अगदीं तोंडघशीं पडण्याच्या बेतांत होतीस. तुला शहाणपणाची सल्लामसलत देण्याला मी जवळ नव्हतों, त्यामुळें तूं आपलें जन्माचें नुकसान करून घेण्याच्या बेतांत होतीस. हे रंगेल तरुण सर्व सारखेच! त्यांचा पेटबाज पोषाख आणि वळवलेले केस तेवढे पाहून ध्यावे! तुझ्या सारख्या भोळ्याभाबड्या मुलींनां त्यांचीं मनें त्यांच्या काळ्या-केशांहूनहि किती काळीं कुट्ट असतात तें समजत नाहीं! तुझ्यासारख्या पोरींचा घात करणें हाच त्यांचा धंदा! ह्या प्रसंगीं मी वेळींच खबरदारी घेतली व शहाणपणा दाखविला, म्हणून तूं अग्नि शीं सुटलीस! तुला त्यांच्याकडे दगड फेंकतांना पाहून मला फारच आनंद वाटला. त्याची आतां खात्री झालीच पाहिजे कीं, आपलें येथें कांहीं चळत नाहीं. असो. आतां आपलें लग्न लवकरच उरकून घेतलें पाहिजे. पण आधीं तुला तुझ्या हिताच्या कांहीं गोष्टी सांगितल्या पाहिजेत. (झालसेस) एक खुर्ची आणून व्हरँड्यांत ठेव व (रामास) जोशीबुवांच्या घरीं जाऊन मी त्यांनां उद्यां सकाळीं बोलाविलें आहे म्हणून सांग. बरोबर पंचांगहि आणावयास सांग.

[रामा व झाळसा जातात.

रावजी—कमळे, क्षणभर तुझें शिवणकाम राहूं दे, आणि मी सांगतों तें नीट लक्ष्य लावून ऐक. मान जरा वर कर व इकडे तोंड फिरीव पाहूं. (उजव्या हाताची तर्जनी डोकीवर ठेवून) कमळे, मी तुझ्यार्शी लग्न लावीत आहें. तुझें हें मोठें भाग्य आहे कीं, माझ्यासारख्या प्रतिष्ठित व अमूदार गृहस्थाबरोबर तुझें लग्न होत आहे. तुझी पूर्वीची स्थिति अगदीं गरीबीची व हीन अशी होती. माझ्यार्शी लग्न झाल्यानें तुला प्रतिष्ठा व वैभव प्राप्त होत आहे. मला मोठमोठ्या चांगल्या घराण्यांतल्या व सुंदर मुली सांगून येत होत्या; परंतु माझी बायको होण्याचा मान मी तुलाच देत आहें. मजबरोबर तुझें लग्न न झालें तर तूं अगदीं गरीब राहून तुला कोणी विचारणार नाहीं. कमळे! लग्न म्हणजे कांहीं थट्टा नाहीं. पत्नीचीं कर्तव्यें विशेष असतात तीं चांगल्या रीतीनें बजावण्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे. स्त्रियांनीं नेहमीं पुरुषांच्या आज्ञेंत वागलें पाहिजे. स्वतंत्रता ही फक्त पुरुषांसाठींच आहे. संसाररूप गाड्याचीं स्त्री व पुरुष अशीं दोन चाकें आहेत खरीं, परंतु हीं दोन चाकें सारख्या दर्जाचीं नाहींत. स्त्रियांनीं प्रत्येक गोष्टींत पुरुषांची आज्ञा, पुरुषांचे हुकूम शिरसा वंद्य मानिले पाहिजेत. पति हा स्त्रियांचा गुरु, स्वामी, राजा—केवळ परमेश्वर आहे! नवऱ्यानें बायकोकडे पाहिलें कीं बायकोनें वर पाहतां कामा नये. त्याच्यापुढें चकार शब्द उच्चारतां कामा नये. आतांच्या मुलींनां हें समजत नाहीं; परंतु त्यांचें पाहून तूं भलतेसलते चाळे करूं नकोस. पतीची अवज्ञा करणारी बायको नरकांत जाते. मी सांगतों ह्या माकडकथा नाहींत, अगदीं खऱ्या गोष्टी आहेत. (खिशांतून एक पुस्तक काढून) तुझ्यासाठीं मी हें एक पुस्तक आणिलें आहे. ह्यांत स्त्रियांचीं कर्तव्यें काय आहेत, त्यांच्यावर जबाबदारी काय येते, हें सर्व दिलें आहे. (पुस्तक तिला देतो) हें पुस्तक काळजीपूर्वक वाच, अगदीं तोंडपाठ कर, त्याचा अर्थ मी तुला समजावून देईन. आतां आंत जा.

[कमळा जाते.

रावजी—(स्वगत) हिला माझी सहधर्मचारिणी केली पाहिजे. हिचें मन कोवळें आहे. मला वाटेल त्याप्रमाणें त्याला वळवितां येईल. ओल्या मातीला पाहिजे तसा आकार देतां येतो, त्याचप्रमाणें माझ्या आवडीप्रमाणें हिचें मन मी बनवून टाकीन. ही पोर अगदीं अजाण असल्यामुळें त्या गुलामानें तिला फशीं पाडिलें असतें; परंतु माझें तर मत असेंच आहे कीं, स्त्रिया अजाण असलेल्याच बऱ्या. त्यांचें रक्षण करण्याचें काम पुरुषांचें आहे. पुरुषांनीं त्यासंबंधानें सावधगिरी मात्र ठेवली पाहिजे. तशांतूनहि फसगत होण्याची वेळ आली असतां त्या अजाण असल्या तर एकदोन शब्द सांगून त्यांनां ताळ्यावर आणतां येतें. पण शिकलेल्या बायकांची गोष्ट निराळी. तुम्हीं कांहीं केलें तरी त्या म्हणून ऐकणार नाहींत. तुम्ही त्यांनां बोध करूं लागलां तर तुमच्याबरोबर त्या वादविवाद करून त्या तुमची मति कुंठित करून टाकतील. तुमचें ऐकण्याऐवजीं तुम्हालाच दोन गोष्टी सांगण्यास तयार होतील. शिकलेल्या बायकोला दुरूनच नमस्कार असो! शिकलेल्या बायकांविषयीं सर्वांचाच असा अनुभव आहे. ह्या विश्वासाची तरी भलीच उडाली! गुलामाचें तोंड स्वाधीन नाहीं, कोणती गोष्ट गुप्त ठेवावी तें कळत नाहीं. जिकडे तिकडे बढाई मारायला पाहिजे, त्यामुळें अशी फजीति होते. चला, आतां जरा शहरांत जाऊन येऊं.

[जातो.

प्रवेश दुसरा.

[स्थळ—कुबेरवाडीहून वसंतपुराकडे जाणारा रस्ता. रावजी व विश्वासराव, समोरासमोर भेटतात, असा प्रवेश.]

रावजी—(स्वगत) त्या विश्वासाची आठवण झाली म्हणजे कसेंसेंच होतें—अरे पण हा इकडेसच आला! आतां स्वारीची कशी मानखंडना झाली तें त्याच्याच तोंडून काढून घेतों.

(विश्वासराव येतो.)

विश्वासराव—हा मी तुमच्या घरूनच आलों. तुमच्या घरीं तुमची भेटच होत नाहीं!

रावजी—घरीं भेट झाली नाहीं तर येथें झाली, त्यांत

विशेष तें काय आहे? जेथें आपण तेथें आपलें घर! पण काय हो राव, तुमच्या त्या प्रेमपात्राची गोष्ट कोठवर आली आहे? मध्यंतरी मला कांहीं काम असल्यामुळें त्यांत माझें मन गुंतून राहिलें होतें. आतां तें काम आटोपलें. तुझी एकंदर हकीगत ऐकून व तुला इतक्या लवकर यश येत गेलें हें पाहून मला फार समाधान होत आहे, व त्याचा शेवट कसा काय होतो हें जाणण्याची मोठी उत्कंठा लागून राहिली आहे.

विश्वासराव—खरें म्हणाल, तर मीं तुम्हाला हकीगत सांगितली तेव्हांपासून माझ्या मार्गांत विघ्नेच येत गेलीं—

रावजी—खरें कीं काय! तीं कशीं काय बुवा!

विश्वासराव—तिचा पालक तो घेरडा परत आला आहे.

रावजी—अरेरे फारच वाईट!

विश्वासराव—आणि त्यांत विशेष हें,कीं, त्या गुलामाला सर्व हकीगत कळली—

रावजी—इतक्या लवकर त्याला कशी बरें हकीगत कळली!

विश्वासराव—तें कांहीं समजत नाहीं! मी नेहमीप्रमाणें तिला भेटायला जात होतों, तितक्यांत त्याच्या दोघां नोकरांनीं दरवाजा बंद करून टाकला व मला उद्धटपणानें सांगितलें, कीं 'इथून चालते व्हा, तुमचें इथें कांहीं काम नाहीं!'

रावजी—तुझ्यासमक्ष दरवाजा बंद केला आं!

विश्वासराव—माझ्यासमक्ष बंद केला—

रावजी—हें फारच वाईट बुवा!

विश्वासराव—दरवाजाच्या फटींतून त्यांच्याशीं बोलण्याचा मीं प्रयत्न केला, परंतु त्यांनीं मला इतकाच जबाब दिला, कीं 'धनीसाहेबांनीं हुकूम दिला आहे तुह्माला आंत घेऊं नको म्हणून!'

रावजी—मग त्यांनीं दरवाजा उघडला नाहीं तर मग!

विश्वासराव—नाहीं. आणि त्यांचा धनीहि तितक्यांत आल्याचें मला कळलें. कारण, कमळेनें खिडकींतून रागानें मला चालतें होण्यास सांगितलें व माझ्याकडे एक दगड फेंकला.

रावजी—आं-काय म्हणतोस? दगड फेंकला?

विश्वासराव—लहानसहान नाहीं, चांगला मोठा दगड फेंकला-मी तिला भेटायला गेलों म्हणून मला इनामच दिलें जणूं!

रावजी—अरेरे फारच वाईट! मला वाटतें तुझें काम फिसकटतें—

विश्वासराव—हा घेरडा गुलाम परत आल्यानें सगळा घोंटाळा होत आहे—

रावजी—तुझ्याबद्दल मला फार वाईट वाटतें—

विश्वासराव—ह्या घेरड्यानें सर्व घाण केली!

रावजी—असें खरें. पण तूं कांहीं तरी युक्ति काढली असशीलच.

विश्वासराव—हा घेरडा डोळ्यांत तेल घालून जागत बसतो! ह्याच्या डोळ्यांत धूळ टाकली पाहिजे!

रावजी—तें तर खरें, पण त्या मुलीचें तुझ्यावर प्रेम असलें तर इतकें केल्याचा कांहीं उपयोग!

विश्वासराव—प्रेम तर आहेच! त्याबद्दल संशयच नको!

रावजी—तिनें तुझ्यावर दगडाचा मारा केला तरी तुला असें वाटतें?

विश्वासराव—तिनें दगड फेंकला त्यावरून मी समजलों कीं माझा प्रतिस्पर्धी आला! त्या दगडांतच काय ती खुबी होती. त्या साध्या भोळ्या कमळेच्या अंगीं इतकें चातुर्य आणि साहस असेल,असें मला वाटलें नव्हतें; परंतु प्रेमाची शिकवणूकच तशी असते! प्रेमामुळें एका क्षणांत आपली रीतभात बदलते, आपला सर्व स्वभाव बदलतो. प्रेमामुळें कृपण मनुष्य उदार होतो, मित्रा मनुष्य धीट होतो, गांवढळ मनुष्य सभ्य होतो. एखाद्या अडाणी व बावळट मनुष्याला प्रेम चतुर करून सोडतें. कमळेच्या स्वभावांत प्रेमानें चमत्कारिक पालट करून टाकला. कारण, दगड फेंकतांना ती म्हणाली 'इथून चालते व्हा. मी तुह्माला पुरी ओळखतें. तुझी मला काय सांगणार तें सर्व मला माहित आहे. त्याला माझें हें उत्तर आहे!' हा दगड माझ्या पायाशीं पडला व त्याबरोबर एक पत्र होतें. मला ही युक्ति फारच आवडली. प्रेमानें माणसाच्या अंगीं कसें चातुर्य येतें पहा. तुह्माला ह्या युक्तीसंबंधानें कसें काय वाटतें? तिच्या चातुर्याचें तुम्हाला कौतुक वाटत नाहीं? त्या घेरड्याला तिनें कसें पण फसवलें!

रावजी—मोठी वहार केली! (स्वगत) अरे हरामखोरा!

विश्वासराव—या टाळी तर मग! (रावजी टाळी देतो.) त्या घेरड्यानें कमळेला मोठ्या बंदोबस्तांत ठेविली आहे आणि मला मारायासाठीं दगडांचीहि तजवीज करून ठेवली आहे; परंतु त्याच्या डोळ्यादेखत त्याला कसें फसवलें! हा घेरडा परत आल्यानें माझ्या मार्गांत आडकाठी आली खरी, परंतु आतां एकेक अशी काय मजा उडते,कीं, मला मोठें हंसूं येतें. तुह्माला नाहीं हंसूं येत?

रावजी—(हांसून) हो हो येतें तर! (स्वगत) अरे कारट्या!

विश्वासराव—पण तिचें पत्र तर पहा किती प्रेमळ, सरळ, आणि साधें आहे तें!

रावजी—(स्वगत) अग सटवे! लिहायला शिकून अशीं पत्रें लिहायचीं काय? तरी मला वाटलेंच, कीं, हिला लिहायला शिकवूं नये!

विश्वासराव—(वाचतो) 'मीं पत्र लिहायला घेतलं आहे परंतु त्याला आरंभ कसा करावा तेंच मला कळत नाहीं! माझ्या मनांतून तुह्माला कांहीं कळवायाचं आहे; परंतु तें कसं कळवावं हेंच समजत नाहीं. मी अजाण असल्यामुळं भलतंच कांहींतरी लिहीन, अशी मला भीति वाटत आहे. तुह्मीं माझ्यावर काय जादू केली आहे तें मला कळत नाहीं; परंतु माझं मन एकसारखं तुमच्याकडे ओढ घेत आहे व माझ्या पालकाच्या हुकमाप्रमाणं तुमच्या विरुद्ध वागणं हें माझ्या जिवावर येत आहे. असं म्हणणं बरोबर नसेल, परंतु मला असं म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. माझ्या हातून कांहीं वाईट वर्तन होऊं नये, अशी माझी इच्छा आहे. माझी

पालक मला सांगतात, कीं, सर्व तरुण माणसं लवाड असतात, त्यांचं बोलणं मीं ऐकूं नये, व तुम्हीं मला जें जें सांगितलं तें तें सर्व मला फसवायला सांगितलं. तुमच्यासंबंधानं अशी विपरीत कल्पना कांहीं केल्या मला खरी वाटत नाहीं. तुमचं बोलणं मला खरंच वाटतं. तें खोटं असेल तर मला तसं स्पष्ट सांगा. माझ्या मनांत पाप नाहीं, वाईट विचार नाहींत, व माझ्यासारख्या सरळ मुलीला फसविणं हें फारच दुष्टपणाचं काम आहे.'

रावजी—(स्वगत) काय लबाट पोर!

विश्वासराव—तुझी असें काय करतां? काय झालें?

रावजी—नाहीं, कांहीं नाहीं—

विश्वासराव—हें पत्र किती पण प्रेमळ आहे! ह्या मत्सरी थेरड्यानें तिच्या शिक्षणांत विघाट केला, तरी तिचा स्वभाव कसा शुद्ध राहिला आहे पहा! अशा हुशार मुलीला अडाणी व मूर्ख ठेवण्याचा प्रयत्न करणें म्हणजे अधमपणा नाहीं काय? प्रेमानें आपलें काम करावयाला आरंभ केला आहे, आणि मला जर यश आलें तर ह्या थेरड्याला, ह्या पशूला, ह्या हरामखोराला—

रावजी—बरें, मला जरा निकडीचें काम आहे, मी जातों आतां, रामराम—

विश्वासराव—कां, इतकी घाई कां करतां?

रावजी—मला आतांच एका जरूरीच्या कामाची [illegible] झाली—

विश्वासराव—बरें तर येतों मी, रामराम! मला ह्या कामीं तुमच्या मदतीची जरूर लागली तर मी हक्कानें मागेन.

[जातो.

रावजी—गेली एकदांची ब्याद! ह्याच्यासमोर आपल्या मनाची स्थिति लपविणें म्हणजे किती कठिण? आणि ही पोर इतकी साधीभोळी दिसत असून इतकी लबाड असावीना! काय पण मला फसविलें! ह्या पत्रानें तर मला ठारच केलें! ह्या गुलामानें तिचें मन अगदींच भारून टाकलें आहे. माझी अगदींच निराशा झाली. मी इतका शहाणा असून ह्या कालच्या पोरानें माझ्या हातावर तुरी घाव्या काय! मीं इतक्या शहाणपणानें बायको निवटली असतां माझी अशी अवस्था व्हावी काय! तिचे कोणी नातलग नाहींत, मित्र नाहींत, जवळ पैसे नाहींत. नाहीं म्हणायला आई आहे, पण तिच्याजवळ कवडी नाहीं. आणि त्या सटवीनें पैसे घेऊन तिला माझ्या स्वाधीन केलें आहे. आतां हिच्यावर माझा सर्व प्रकारचा हक्क आहे. मीं तिची इतकी काळजी घेतली, तिच्यावर एवढें प्रेम केलें, आणि त्याचा हा असा मोबदला? इतकें असूनहि माझें तिच्यावर प्रेम आहेच! किती मूर्ख आणि बेशरम मनुष्य मी! एकदां जाऊन तिची भेट घेतोच. प्रेमानें मनुष्य अगदीं वेडा होतो.

[जातो.

प्रवेश तिसरा.

[स्थळ—कुबेरवाडी. रावजी आपल्या बंगलींत एकटाच विचार करीत बसला आहे, असा प्रवेश.]

रावजी—(स्वगत) मला चैन कसें तें पडत नाहीं. ह्या चोराचे बेत कसे ढांसळून पाडावे, ह्या विवंचनेंत मी आहें. ही पोर तरी माझ्यासमोर किती धिटाईनें उभी राहिली? इतकें करूनसवरून पुनः आपली नांवानिराळी आहे ती आहेच! मला तिचा इतका संताप आला—पण माझें प्रेम आपलें आहे तें आहेच! ती कितीतरी सुंदर दिसत होती! तिच्या नेत्रांत तेज किती चमकत होतें! तिला मी लहानाची मोठी केली, इतक्या प्रेमानें, दूरदर्शीपणानें वाढविली, ती ह्या उपटसुंभानें येऊन पळवून न्यावी म्हणून काय? हा खुळ्या विश्वासा! माझ्यासारख्याला तूं तोंडघशी पाडणार काय?

(जोशीबुवा येतात.)

जोशीबुवा—(स्वगत) हे एथें आहेत. (उघड) आपण बोलावल्याप्रमाणें मी आलों आहें. आपल्या मर्जीप्रमाणें लग्न उरकून टाकूं.

रावजी—(त्याला न पाहतां स्वगत) हें कसें करावें?

जोशीबुवा—रीतीप्रमाणें लग्न लावूं.

रावजी—(त्याला न पाहून स्वगत) मोठी काळजी घेतली पाहिजे.

जोशीबुवा—आपल्या मर्जीप्रमाणें सर्व घडवून आणतों.

रावजी—(त्याला न पाहून स्वगत) फसगत होणार नाहीं, अशी सावधगिरी घेतली पाहिजे.

जोशीबुवा—तें तुमचें देण्याघेण्यासंबंधानें कांहीं असेल तें तुमचें तुम्ही पाहून घ्या.

रावजी—(त्याला न पाहून स्वगत) बातमी बाहेर फुटूं देतां कामा नये!

जोशीबुवा—आपली तशी इच्छा असेल तर माझ्याकडून ह्या गोष्टीचा बाहेर उच्चार होणार नाहीं!

रावजी—(त्याला पाहून) काय! काय म्हटलेंत?

जोशीबुवा—मी आपल्या म्हणण्याबाहेर नाहीं. परंतु एकदां लग्न उरकल्यावर मग—

रावजी—लग्नाचें तुम्हाला कोणीं सांगितलें?

जोशीबुवा—आपण! आपल्याला वाटतें हा भट वेडाच आहे! माझ्याकडे पाठ काय करतां आणि वेडेवांकडें तोंट काय करतां?

रावजी—काय मूर्ख मनुष्य आहे हा! चल, चालता हो इथून.

जोशीबुवा—चालता होऊं? आणि लग्न लावण्यासाठीं मला आपणच बोलावून आणविलें ना?

रावजी—होय, पण सध्यां लग्न राहिलें. जरूर तेव्हां तुम्हाला बोलवायला पाठवीन. काय रिकामी वटवट लावली आहे वेड्यानें!

जोशीबुवा—(स्वगत) ह्याला वेड लागलें आहे, दुसरें कांहीं नाहीं! [जातो.

प्रवेश चवथा.

[स्थळ—तेच. रावजी, रामा व झाळसा प्रवेश करितात.]

रावजी—रामा, म्हाळसा, इकडे या. तुम्ही विश्वासू माणसें आहां, नेहमीं माझें हित पाहतां. ह्या गुलामानें माझा नाश करण्यासाठीं एक कृष्णकारस्थान रचलें आहे. माझी गांवांत नाचकी झालेली तुम्हांलाहि पाहवणार नाहीं. तेंसें झालें तर तुमचीहि छिथू होईल. तेव्हां हें कारस्थान ढांसडून पाडण्याला तुम्हीं मनापासून मला मदत केली पाहिजे.

झाळसा—नुकतच आमच काम आमाली शिकवलच.

रावजी—होय, परंतु त्याच्या थापांनां भुलून जाऊं नका!

झाळसा—लेला साफ न्हाई म्हून सांगू?

रावजी—समज, तो आतां आला आणि झणाला 'रामा, मल्या माणसा, मला थोडीशी मदत कर—'

रामा—तूं गळा हाएस!

रावजी—बरोबर झणालास! (म्हाळसेकडे वळून) 'म्हाळसे, तूं मायाळु आहेस. तूं माझं म्हणणें ऐकशील?'

झाळसा—तूं चोर हाएस!

रावजी—बरोबर, अगदीं बरोबर म्हणालीस! (रामाकडे वळून) 'मी कांहीं कोणाचें बाईट करीत नाहीं.'

रामा—तूं रामोशी हाएस!

रावजी—शाबास! (म्हाळसेकडे वळून) 'तूं माझ्यावर दया केली नाहींस तर खचित मी मरून जाईन!'

झाळसा—तूं बेशरम हाएस, दगड हाएस, धोंडा हाएस!

रावजी—ठीक ठीक! (रामाकडे वळून) 'मी उगाच कोणाला कांहीं काम सांगणारा नाहीं. माझें काम करतात त्यांनां मी चांगलें इनाम देतों. रामा, सध्यां हें तमाखूला घे. म्हाळसे, तुला हें खणासाठीं घे. (दोघेंहि हात पुढें करून पैसे घेतात.) माझें काम झालें झणजे मग मी आणखी देईन. मी दुसरें कांहीं मागत नाहीं, तुमच्या धनिनीची आणि माझी एकदां भेट करून द्या, म्हणजे झालें.'

झाळसा—(त्याला ढकलून) चल काळतोंड्या चालता हो इतन!

रावजी—ठीक!

रामा—(त्याला धक्के देऊन) चल भाईर निघ!

रावजी—फार चांगलें!

झाळसा—(त्याच्या मुसकटांत लगावून) चल काळं कर इतन!

रावजी—बस बस पुरे!

झाळसा—मी अक्षी बरोबर केल कीं न्हाई?

रामा—धनी, असच करायचना?

रावजी—बरोबर, अगदीं बरोबर! पण तुम्ही पैसे घ्यायचे नव्हते!

झाळसा—ल्यें आमच्या ध्येनात न्हाइ आल पगा!

रामा—आतां पुन्हा करू का?

रावजी—नको, बस्स आतां. तुम्ही आतां आंत जा, अन् अगदीं पाळतीवर रहा कसे!

[जातात.

प्रवेश पांचवा.

[स्थळ—वसंतपुर. रस्ता. रावजी शहरात चालला आहे, असा प्रवेश.]

रावजी—(स्वगत) ह्या नाक्यावर मोची वसतो त्याला मी पाळत राखायला सांगतों. हिला आतां घरांत कोंडून ठेवून वर सक्त पाहरा ठेवला पाहिजे. आंत कोणाचाहि प्रवेश होऊं देतां कामा नये. मला व्यवहाराची पुरी माहिती आहे. मला फसवणारा तसाच बिलंदर असला पाहिजे!

(विश्वासराव येतो.)

विश्वासराव—तुम्ही भेटलां, बरें झालें. नुकतीच आतां मोठी मौज झाली! तुमची माझी काल भेट झाल्यावर मी कुबेरवाडीला गेलों. कमळा खिडकींत उभी असलेली अकस्मात् माझ्या दृष्टीस पडली. तिनें मला खूण केली आणि हळूच बागेंत येऊन दरवाजा उघडला. मी तिच्या मागोमाग आंत गेलों; पण मी वर गेलों नाहीं इतक्यांत त्या घेरड्याचीं पावलें जिन्यावर ऐकूं येऊं लागलीं. कमळेनें धांदलीधांदलीनें मला एका हडप्यांत घालून बंद करून टाकलें. इतक्यांत तो घेरडा तेथें आला. मीं कांहीं त्याला पाहिलें नाहीं; परंतु तो कांहीं न बोलतां इकडून तिकडे खेपा घालीत होता, उसासे टाकीत होता, मेजावर हात आपटीत होता, व वाटेत जें सांपडेल तें वेड्यासारखें बाजूला उडवीत होता. रागाच्या भरांत त्यानें एकदोन सुजे फोडले. त्या हरामखोराच्या कानावर आणखी कांहीं गोष्ट गेली असावी. शेवटीं ज्या त्या वस्तूवर राग काढून त्या घेरड्याची स्वारी चालती झाली. मी हडप्याच्या बाहेर आलों, पण त्या घेरड्याच्या भीतीस्तव मला तेथून तावडतोब यावें लागलें; परंतु आतां आमचा दुसराच बेत झाला आहे. कमळेची आई जिवंत आहे, ती ह्या बेताला अनुकूल आहे. कमळा लहान असतांना ह्या घेरड्यानें तिच्या आईला पैसे देऊन तिच्याजवळून कमळेला घेतलें होतें. आतां तिच्या आईच्या सल्ल्यानें आम्हीं असें ठरविलें आहे, कीं, आज रात्रीं मीं कमळेच्या घरीं जावें. मी तीनदां खोकलों झणजे कमळा खिडकी उघडील व शिडीच्या साह्यानें मी वर जाऊन तिला खालीं घेऊन येईन आणि तिच्या आईच्या स्वाधीन करीन. पुढें लवकरच आमचें लग्न उरकून टाकूं. तुम्ही ह्या कामीं माझे सल्लागार असल्यामुळें तुम्हाला सर्व बेत सांगतों. आपलें सुख दुसऱ्याला सांगितलें झणजे वाढतें. बरें, आतां पुढली तयारी करायला जातों. रामराम. [जातो.

रावजी—(स्वगत) काय पण नशीब आहे! घटकाभर झणून मला चैन पडूं देत नाहीं. मी इतका शहाणा, इतका हुशार, पण मला हीं फसवतात काय? ह्या वयांत एखाद्या लहान पोरीनें व खुळ्या पोरानें माझ्या

हातावर तुरी घाव्या काय? तीस वर्षे झालीं, बायका नवऱ्याला कसें फसवतात हें मी लक्ष्य लावून पाहत आहें आणि त्यापायून शहाणपण शिकत आहें, तें सर्व स्वतः फसण्यासाठींच काय? इतक्या दिवसांचा अनुभव घेऊन मी माझ्या लग्नाची तयारी चालविली. सर्व बाजूंनीं सावधगिरी राखिली; पण शेवटीं व्हायचें तें झालेंच! कांहीं चिंता नाहीं, अजून ती माझ्या ताब्यांत आहे. तिचें मन जाणें चोरलें असेल; पण त्याच्या पलीकडे त्याच्या हातीं कांहीं लागूं देत नाहीं! गुलामानें जाळें पसरून मला दिसं बातमी सांगितली, हें तरी परें केलें.

(मल्हारराव येतो.)

मल्हारराव—कसें काय, आधीं फिरायला येतां कीं जेवणाचा बेत आधीं करतां?

रावजी—मी आज उपोषण करणार आहें!

मल्हारराव—ही काय लहर लागली आज?

रावजी—माफ करा, त्याला तसेंच कारण आहे.

मल्हारराव—तुमचें लग्न होणार होतें त्याचें कसें काय?

रावजी—दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करायची तुम्हाला फार संवय दुबा!

मल्हारराव—कां, इतके चिरडीवरसे येतां? कांहीं विशेष तर नाहीं! तुमच्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे कांहीं विशेष प्रकार झाला असावा, असें वाटतें.

रावजी—कांहीं देखील झालें तरी मी दुसऱ्या लोकांसारखा नाहीं. माझ्या बायकोला मी चांगल्या रीतीनें संभाळीन!

मल्हारराव—ज्याला बायकोच्या वर्तनाविषयीं इतकी भीति वाटते त्यानें लग्न तरी कशाला करावें?

रावजी—तें कसेंहि असो, सध्यां माझें मन ठिकाणावर नाहीं. दोन गोष्टी ऐकून घेण्याजोगी माझी आतां स्थिति नाहीं.

मल्हारराव—चिंता नाहीं, मी जातों. पुढें केव्हां या संबंधानें आपण बोलूं. रामराम. [जातात.

प्रवेश सहावा.

[स्थळ—कुबेरवाडी. रावजीची बंगली. रावजी, रामा व हाळसा प्रवेश करितात.]

रावजी—माझ्या मित्रांनों, आणीबाणीची वेळ ती हीच आहे! तुमचा इमानीपणा कसोटीला लावण्याचा समय आला आहे. या वेळीं मला चांगली मदत करा म्हणजे तुमच्या श्रमाचें मी चीज करीन. तो हरामखोर एका शिडीच्या साह्यानें आज रात्रीं कमळेच्या खोलींत शिरणार आहे; पण आपण तिघेजणांनीं त्याला तोडघशीं पाडलें पाहिजे. मी खिडकी उघडीन, तुम्ही एकेक बडगा घ्या आणि तो हरामखोर शिडीवर चढून आला म्हणजे त्याच्या पाठीचा असा खरपूस समाचार घ्या, कीं, पुनः कधीं अशा धंद्यांत पडणार नाहीं! पण सेभाळा बरें, त्यांत माझें अंग आहे, किंवा मी मागें आहें, हें त्याला समजूं देऊं नका! होईल कीं नाहीं हें तुमच्या हातून?

रामा—येची कनीक मऊ करायची असल तर ये माज काम!

हाळसा—अन् माज बी! असा रपाटा देईन की याद राकील!

रावजी—बरें तर, गडबड करूं नका आणि आंत जाऊन बसा. [जातात.

[पडदा पडतो.]

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

[स्थळ—कुबेरवाडीतील रावजीची बंगली. रावजी, रामा, हाळसा, प्रवेश करितात.]

रावजी—हा करंट्यांनों, काय केलेंत हें?

रामा—तुमि सागतल्यापरमान केल की!

रावजी—हा मूर्खांनों! मी त्याला ठार मारायला सांगितलें नव्हतें. मी पाठीवर मारा म्हणून सांगितलें होतें, डोकीवर मारा म्हणून सांगितलें नव्हतें. हा मेला, आतां माझी काय अवस्था होईल? जा, घरांत जा, आणि मी तुम्हांला मारायला सांगितलें, असें बोलूं नका. [जातात.

प्रवेश दुसरा.

[स्थळ—वसंतपुराकडे जाण्याचा रस्ता.]

रावजी—(स्वगत) माझ्यावर खुनाचा आरोप येईल म्हणून मी मोठ्या पहाटेच पळून पसार होत आहें खरा, परंतु अशानें मी सुटेन का? सर्वत्र माझी नेबभ्र होईल. आतां काय करावें? लवकरच सकाळ झाली म्हणजे गांवभर बोभाटा होईल व चौकशी होईल. त्याच्या बापाला हें समजेल तेव्हां तो तरी काय म्हणेल? (विश्वासराव येतो त्याला न पाहून) कोणाच्या ध्यानीं मनीं तरी होतें—(विश्वासरावाचा धक्का लागतो.)

विश्वासराव—कोण रावजी?

रावजी—होय, पण तुम्ही कोण?

विश्वासराव—विश्वास! मी तुमच्याच घरीं चाललों होतों! माझें एक काम कराल का? इतक्या पहाटेच कोठें निघालां?

रावजी—(स्वगत) हा मोठाच चमत्कार! मी स्वप्नांत तर नाहींना?

विश्वासराव—मी जरा अडचणींत आहें. माझें काम तर फत्ते झालें आणि तेंहि अगदीं अकल्पित रीतीनें! कमळेची आई आयत्या वेळीं कोठें नाहींशी झाल्यामुळें मी एकटाच कमळेच्या घरीं गेलों. काय झालें कुणाला ठाऊक, पण आमचा बेत त्या भेरड्याला आधींच कळला. मी शिडीवर

चढलों, तेव्हां एकदोघांनां माझ्यावर काळ्या उगारतांनां पाहिलें. धांदलींत पाय निसटून मी खालीं पडलों. माझ्यावर हल्ला करणारांनां वाटलें, कीं, आपल्या मारामुळेंच हा खालीं पडला. थोडा वेळ मी निचेष्ट पडल्यामुळें मी मेलों असें वाटून त्यांची पांचावर धारण बसली व ते एकमेकांवर माझ्या मरणाचा दोष लादूं लागले. तो थेरडाहि, मला वाटतें, त्यांतच असला पाहिजे. त्यांची गडबड ऐकून मीहि मेल्याचें सोंग घेतलें. ते अगदीं घाबरून तेथून निघून गेले. ते गेल्यावर मी उठून तेथून निसटण्याच्या विचारांत होतों, इतक्यांत तेथें कमळा आली. त्यांची कुजबूज ऐकून ती घाबरून गेली होती व गडबडींत तिला तेथें यावयाला मिळालें. मला कांहीं इजा झाली नाहीं हें पाहून तिला जो आनंद झाला आहे, तो काय सांगूं! त्यानंतर पुनः घरांत जायाला ती कबूल होईना. ह्या मत्सरी थेरड्याच्या जुलमाला ती अगदीं कंटाळून गेली आहे. वायकांनां कटकपणानें वागविलें, त्यांचा कोंडमारा केला, त्यामुळे किती वाईट परिणाम होतो पहा. आज माझ्याजागीं दुसरा कोणी लफंग्या असता, तर त्यानें तिला तोंडघशीं पाडून तिचें जन्माचें नुकसान केलें असतें; परंतु माझें प्रेम पवित्र आहे. माझा प्राण गेला तरी बेहत्तर, पण मी तिचें वांकडें होऊन कधीं करणार नाहीं! तिची आई सध्यां येथें नाहीं. दोनतीन दिवस मेहरबानी करून तुमच्या घरीं तिला आश्रय द्या. माझ्यासाठीं एवढें कराच! अशी सुंदर तरुण मुलगी लग्नापूर्वी माझ्यासारख्या तरुणाजवळ राहणें लौकिक-दृष्टीनें बरोबर होणार नाहीं. एकदां तिचें माझ्याशीं लग्न लागलें म्हणजे सर्व काळजी दूर झाली. मग फक्त बाबांचा राग शांत केला म्हणजे झालें. तर सध्यां माझ्यासाठीं एवढें काम कराच!

रावजी—तूं सांगशील तें करायला माझी तयारी आहे!

विश्वासराव—माझ्यावर तुमचे मोठे उपकार होतील!

रावजी—मोठ्या खुषीनें मी हें तुझें काम करीन. तुला मदत करण्याची संधी मला मिळाली हें मी माझें मोठें भाग्य समजतों.

विश्वासराव—मी तुमचा आभारी आहें. मला वाटलें, तुम्ही कांहीं ओढेवेढे घ्याल. ह्या रस्त्याच्या नाक्यावर माझ्या एका नोकरावरोबर ती उभी आहे.

रावजी—पण आतां उजाडत आहे. इकडे आणून तिला माझ्या स्वाधीन करशील तर कोणी पाहील. घरीं आणशील तर चाकरमाणसें गडबड करतील. तूं असें कर. ह्या शेजारच्या गलींत तिला घेऊन ये. तेथें अंधार आहे. मी तुझी तेथें वाट पाहतों.

विश्वासराव—ह्या कामीं जेवढी सावधगिरी ध्यावी तेवढी थोडीच. मी तिला तुमच्या स्वाधीन करून तावडतोब घरीं निघून जाईन.

रावजी—कांहीं चिंता नाहीं! मी अंगाभोवतीं धोंगडी गुंडाळून तेथें उभा राहतों. [जातात.

प्रवेश दुसरा.

[स्थळ—कुबेरवाडी. आडोशाची जागा. कमळा, विश्वासराव व अंगाभोंवतीं धोंगडी पांघरलेला रावजी, प्रवेश करितात.]

विश्वासराव—(कमळेस) तूं कांहीं घाबरूं नको! सध्यां तूं माझ्याजवळ राहणें हें चांगलें नाहीं, ह्यासाठीं तुला सुरक्षित स्थळीं नेऊन ठेवतों. ह्या गृहस्थांबरोबर जा.

कमळा—आणि तुम्ही चाललां कीं काय?

विश्वासराव—होय, आतां मला गेलें पाहिजे.

कमळा—पण लवकर परत याल ना?

विश्वासराव—मलाहि फार वेळ दूर राहवणार नाहीं!

कमळा—तुम्ही जवळ नसलां तर मला सुख वाटत नाहीं!

विश्वासराव—आणि मलाहि तुझ्याशिवाय सुख वाटणार नाहीं.

कमळा—तसें असतें तर तुम्ही इकडेच राहिलां असतां.

विश्वासराव—माझ्यावर तुझा इतका देखील विश्वास नाहींना?

कमळा—(रावजी तिला ओढून नेऊं लागतो) आईग! हे कितीतरी जोरानें ओढतात.

विश्वासराव—कमळे, इकडे आणखी राहण्यांत धोका आहे. ते आपल्या वऱ्याचेंच करतात आणि आपलें हित चिंतितात.

कमळा—पण अगदीं अनोळखी मनुष्या—

विश्वासराव—तूं मुळीं देखील घाबरूं नको! त्यांच्याजवळ तूं अगदीं सुरक्षित असशील.

कमळा—पण मला वाटतं (रावजी पुनः ओढूं लागतो त्यास) जरा थांबाना?

विश्वासराव—सकाळ होत चालली, आतां येतों मी.

कमळा—पण तुम्ही पुनः केव्हां याल?

विश्वासराव—लवकर, अगदीं लवकर येईन. (जातां जातां) आतां मी निश्चिंत झालों. [जातो.

रावजी—(आवाज बदलून) ये, तुझ्यासाठीं मीं चांगली सुरक्षित जागा पाहून ठेविली आहे. (धोंगडी दूर करून) मला ओळखलेंस?

कमळा—हा!

रावजी—माझें तोंड पाहून तुला भीति वाटते काय? मी तुझ्या प्रेमाच्या आड येतों नाहीं? (कमळा विश्वासराव गेला त्या वाटेकडे पाहते.) गेला, तो हरामखोर गेला! आतां कांहीं तो परत येत नाहीं. असें, असें! इतक्या लहान वयांत तुझ्या अंगांत इतक्या लबाड्या भरल्या आहेत काय! तूं अगदीं साधी भोळी पोर होतीस नाहीं? अन् रात्रीं पळून जायाला कोठें शिकलीस? त्या हरामखोराजवळ जीम कधीं चुरचुरू चालली होती? हें इतकें तुला एकदम शिकवलें कोणी? तुझ्या अंगीं इतकें धैर्य कुठून आलें? मी तुझ्यावर इतकी दयामाया करीत असतां मला असें फसवायचें काय? सापाला दूध पाजलें तरी तो चावायलाच उठायचा!

कमळा—तुझी माझ्यावर इतके रागावतां कां पण ?

रावजी—खरेंच, मी मोठा गुन्हाच करतों !

कमळा—मीं केलं त्यांत कांहीं गैरशिस्त केलं, असं मला वाटत नाहीं.

रावजी—त्या लफंग्याच्या नादीं लागून पडून जाणें हें बाईट नाहीं ?

कमळा—त्यांच्या मनांतून माझ्याशीं लग्न लावायचं आहे. तुझींच मला सांगितलं, कीं, आपल्या हातून पाप होऊं नये ह्मणून लग्न लावावं. लग्न लावलं ह्मणजे पाप नाहीं. मी तुमच्या ह्मण्याप्रमाणंच वागतें.

रावजी—होय, पण लग्न माझ्याशीं लावायचें ! माझ्या मनांतून तुझ्याशीं लग्न लावायचें आहे. मी तुला हें आधींच कळवलें कीं नाहीं ?

कमळा—तुझीं कळवलं, पण मला त्यांच्याशीं लग्न लावावंसं वाटतं. तुमच्यावरोबर लग्न लावायची मला भीति वाटते ! तुझीं लग्नाची जबाबदारी अन् पत्नीचीं कर्तव्यं ह्यांचं असं कांहीं भयंकर चित्र काढलं—तेंच त्यांनीं इतकं आनंदकारक काढलं, कीं, मला त्यांच्याबरोबरच लग्न लावावं असं वाटतं.

रावजी—चल, लबाड कोठली ! तुझें त्याच्यावर प्रेम आहे ह्मणून तुला त्याच्याशीं लग्न लावावें असें वाटतें.

कमळा—होय, माझं त्यांच्यावर प्रेम आहेच !

रावजी—आणि पुनः उद्धटपणानें मला असें सांगतेस ?

कमळा—तें खरं असलं तर कां सांगूं नये ?

रावजी—तूं त्याच्यावर प्रेम करावेंस कां ?

कमळा—ती का माझ्या हातांतली गोष्ट आहे ? त्यांचे गुणच तसे ह्मणून प्रेम जडलं. तें केव्हां जडलं तें मला समजलं दिसील नाहीं !

रावजी—पण ही वाईट वासना तूं मनांतून काढून टाकायला पाहिजे होतीस.

कमळा—तें कसं बरं मला करतां आलं असतं ? अन् ह्या प्रेमामुळं मला सुख तरी किती होत होतं !

रावजी—मला हें आवडणार नाहीं, ह्याचा राग येईल, हें तुला माहित नव्हतें ?

कमळा—मला ? मुळींच नाहीं ! मला सुख झालं तर तुम्हाला कां आवडूं नये, तुम्हाला त्याचा कां राग यावा ?

रावजी—खरेंच, मला त्यांत आनंदच वाटावा ! तुझें माझ्यावर मग प्रेम नाहीं तर ?

कमळा—तुमच्यावर ?

रावजी—होय माझ्यावर !

कमळा—बायकोचें नवऱ्यावर असतं तसं ?

रावजी—होय तसंच !

कमळा—मुळींच नाहीं !

रावजी—काय ! नाहीं ह्मणतेस ?

कमळा—मग मी खोटं बोलूं ?

रावजी—उद्धट पोरी ! माझ्यावर कां प्रेम नाहीं !

कमळा—तुझी मला दोष कां देतां ? त्यांनीं प्रेम लावून घेतलं तसं तुझीं कां केलं नाहीं ? मीं कांहीं तुम्हाला मना केलं नव्हतं !

रावजी—प्रेम जोडून घेण्यासाठीं मी होईल तेवढा प्रयत्न केला, पण तो सारा फुकट गेला !

कमळा—तर मग त्यांनां प्रेम संपादन करतां येतं तसं तुम्हाला येत नाहीं. त्यांनां कांहींच श्रम पडले नाहींत.

रावजी—(स्वगत) पहा, ही एकेक जवाब कसा देते ! शिकलेल्या बायकांनांहि असे जबाब देतां येणार नाहींत ! कितीतरी मी वेडा ! बायकांनां अशिक्षित ठेवलें ह्मणून ह्या गोष्टी काय त्यांनां समजायाच्या राहतात ! मोठ्या शहाण्या पंडितापेक्षांहि रानाच्या अजाण मुलीला अधिक अक्कल असते. (कमळेला) पंडिताबाई ! तुझी एवढा शहाणपणा दाखवितां, तर सांगा पाहूं, इतके दिवस मीं तुमचें पालनपोषण केलें तें त्या हरामखोरासाठींच का ?

कमळा—नाहीं. त्याचा काय खर्च झाला असेल तो ते तुम्हाला सगळा देऊन टाकतील.

रावजी—(स्वगत) हिचें एकेक उत्तर ऐकून माझा राग वाढतच जातो. (उघड) आणि माझे तुझ्यावर जे उपकार झाले आहेत ते देखील तो फेडणार वाटतें ?

कमळा—तुम्हाला वाटतं तितके कांहीं उपकार झाले नाहींत !

रावजी—कृतघ्न पोरी ! तुला मीं लहानाचें मोठें केलें, शिकवलें, त्याचें कांहींच नाहीं वाटतें ?

कमळा—तुझीं लहानाचं मोठं केलं खरं, पण शिकवण्याबद्दल ह्मणाल तर मी अगदींच अजाण आहें, मला कांहीं दिसील येत नाहीं, हें मला समजूं लागलं आहे. मला शिकविण्याऐवजीं तुम्हीं जाणूनबुजून मला अडाणीच ठेवलं असं मला वाटूं लागलं आहे. माझं इतकं वय झालं असतां मी इतकी अडाणी व वेडगळ आहें ह्याची माझी मलाच शरम वाटते !

रावजी—तुला अजाणपणाची शरम वाटते तेव्हां त्या हरामखोरापासून कांहीं शिकावें असें वाटत असेलच !

कमळा—खरेंच, त्यांच्यापासून मी कितीतरी शिकलें ! शिकवण्याबद्दल मला वाटतं तुमच्यापेक्षां त्यांचेच माझ्यावर अधिक उपकार आहेत !

रावजी—ह्या उद्धटपणाबद्दल कान उपटूं कीं धोबाडींत देऊं ?

कमळा—तुम्हाला मारावसं वाटलं तर कोण मना करील ?

रावजी—(स्वगत) ह्या बोलण्यानें आणि हिच्या गोड चेहऱ्यानें माझा राग शांत झाला ! प्रेमानें मनुष्य किती वेडे होतें पहा ! बायकांच्या अंगचे दोष सर्वांनां माहित आहेत. त्या उधळ्या, दिवाळखोर व अविचारी असतात; त्यांची बुद्धि अपरिपक्व असते, मन दुष्ट असतें; त्या अशक्त, दुर्बळ, विश्वासघातकी असतात; पण इतकें असूनहि त्यांच्यासाठीं आपण सर्व कांहीं करतों ! (कमळेला) बरें, झाली गोष्ट झाली, आतां आपण पुनः गट्टी करूं. तुझे सर्व अपराध मी क्षमा करतों, व तुजवर पूर्वीप्रमाणें प्रेम करतों. ह्यांत मीं किती थोरपणा दाखविला तें पहा आणि माझ्यावर प्रेम करायला लाग.

कमळा—प्रेम करणं ही गोष्ट माझ्या हातांतली असती तर मी मोठ्या आनंदान तुमच्या ह्मण्याप्रमाणं केलं असतं !

रावजी—माझे लाडके! तुझ्या मनांत आलें तर तुला माझ्यावर प्रेम करतां येईल. तुझ्यावरील प्रेमानें माझी काय स्थिति झाली आहे पहा! माझे डोळे खोल गेले आहेत, गाल फिके पडले आहेत, हातापायांच्या काड्या झाल्या आहेत. माझ्या ह्या स्थितीकडे पाहून त्या तरण्या छचोर माणसाचा नाद सोडून दे. त्याच्यापेक्षां मी तुला अधिक सुख देईन. तुला नवे नवे कपडे घालावे, डागडागिने घालावे, आणि मजा करावी असें वाटत असलें तर माझी कांहीं मनाई नाहीं. मी अगदीं तुझ्या मनाप्रमाणें वागेन, तुझ्या अर्ध्या वचनांत राहीन. ह्याशिवाय आणखी तें काय सांगूं? (स्वगत) प्रेमानें मला अगदींच बेडें करून सोडलें आहे! (उघड) माझ्या प्रेमाला कांहीं सीमाच नाहीं! निष्ठुर पोरी, तूं आणखी माझा किती अंत पाहणार? माझें प्रेम तुला कसें दाखवूं! रडून दाखवूं, कीं थोबाडींत मारून घेऊं, कीं केस उपटून घेऊं, कीं तुझ्यापुढें डोकें फोडून घेऊं? होय हाणजे मी तसें करून दाखवितों!

कमळा—थांवा, तुम्हीं इतकें ओरडलें पण माझ्या मनावर त्याचा कांहींच परिणाम होत नाहीं. एकदोन शब्दांतच त्यांनां माझें मन विरघळून टाकतां आलं असतं!

रावजी—भलतेंच बोलून माझा अपमान करतेस व मला चिडवतेस? तें कांहीं नाहीं, तूं अशी ताळ्यावर येणार नाहींस. तुला एथून बंदोबस्तानें कोठें तरी दूर नेऊन कोंडून ठेवलें पाहिजे.

रामा व म्हाळसा—(घाईघाईनें येऊन) धनीसाव, ल्ये मढं आन् कमळाबाय दोघंबी कुठं पळुनशान् गेल्याती!

रावजी—कमळा एथें आहे. तिला नेऊन शहरांतील आमच्या वाड्यांत कोंडून ठेव. (स्वगत) विश्वास इकडे कांहीं येणार नाहीं. तशांत अर्ध्या तासांत मी सर्व बंदोबस्त करून टाकतों. (उघड) म्हाळसे, तूं हिला धरून रहा, अन् रामा, तूं लवकर गाडी घेऊन ये. जा, लवकर जा. हिला कोंडून ठेवलें हाणजे कदाचित् हिचें मन ठिकाणावर येईल. [जातात.

प्रवेश तिसरा.

[स्थळ—वसंतपुर. रावजीचें घर. रावजी व विश्वासराव प्रवेश करितात.]

विश्वासराव—काय माझें नशीब फिरलें आहे सांगूं रावजीकाका! ज्या त्या कामांत कांहीं तरी अडथळा येतोच! कमळेचा आणि माझा वियोग होण्याचा आतां योग घडून आला आहे. बाबा आतांच आले. त्यांनीं आपल्या येण्याचें कारण हा वेळपर्यंत कळवलें नव्हतें, तें आतां बाहेर आलें. त्यांच्या मनांतून माझें लग्न लावायाचें आहे. मीं तुह्माला दत्तोजीसंबंधानें विचारलें होतें तोच माझ्या दुःखाचें कारण आहे. तो बाबांच्या बरोबर आला आहे अन् त्याच्या मनांतून माझा नाश करायचा आहे. त्याला म्हणे एक पकुलती एक मुलगी आहे, अन् तिच्याबरोबर माझें लग्न लावायचा त्यांचा विचार आहे. त्यांनीं मला प्रथम हें सांगितलें, तेव्हां मला कसेंसेंच झालें. बाबा तुह्माला भेटायला येणार आहेत, असें ऐकून मीं आधीं एथें पांव ठोकली. ह्या प्रसंगीं मला मदत करणारा तुमच्याशिवाय दुसरा कोणी नाहीं. कृपा करून कमळेसंबंधानें एव्हांच त्यांच्याजवळ गोष्ट काढूं नका, आणि ह्या लग्नापासून त्यांचें मन परावृत्त करण्याचा यत्न करा. तुम्हीं आतांपर्यंत ह्या कामीं मला पुष्कळ मदत केली. तुमच्याशिवाय माझ्या विश्वासाचें एथें दुसरें कोणी नाहीं.

रावजी—खरी गोष्ट.

विश्वासराव—लग्नाची गोष्ट लांबणीवर टाकायला त्यांनां सांगा, हाणजे तितक्या वेळांत मी माझें काम साधून घेतों.

रावजी—असा धावरूं नकोस!

विश्वासराव—माझा सर्व भार तुमच्यावरच आहे.

रावजी—आणि मी तुझें काम अगदीं बरोबर करून देतों.

विश्वासराव—तुम्ही मला बापाच्याच ठिकाणीं आहां. त्यांनां सांगा कीं—पण तेच येत आहेत, आधीं त्यांनां काय सांगायचें तें नीटचेनीट ऐकून घ्या. (एकीकडे जाऊन हळूहळू बोलत राहतात.)

[दत्तोजी, पांडुरंगराव, मल्हारराव व तुरुंग घेतलेली कमळेची दाई, येतात.]

दत्तोजी—(मल्हारारावास) तुमची वहीण आज हयात असती तर आपल्या नातलगांस व जुन्या माणसांस पाहून तिला कितीतरी आनंद झाला असता. ती माझ्या दुःखाची वांटेकरीण होती. माझ्यावर आलेलीं सर्व संकटें तिनें शांतपणानें आणि धैर्यानें सोसलीं, आणि त्यांतच बिचारीचा अंत झाला! हे चांगले दिवस पाह्याला ती नाहीं, हाणून माझें कालीज तिळतिळ तुटतें. परंतु होणारापुढें इलाज नाहीं! परमेश्वराच्या इच्छेपुढें मान लवविली पाहिजे, व पुढील कार्यभागास लागलें पाहिजे. तुमच्या भाचीला माझी सून करण्याचा माझा मानस आहे. तुमचें अनुमत असल्याशिवाय हें कार्य मला करतां येत नाहीं. कारण ती तुमच्या वहिणीची मुलगी. तिला पांडुरंगरावांच्या मुलास देण्याचें मीं योजिलें आहे. हें स्थल मला बरें दिसतें; परंतु तुमचा विचार घेतल्याशिवाय मला कांहींच करतां येत नाहीं.

मल्हारराव—तुमची योजना इतकी चांगली आहे, कीं, तेथें नांव ठेवण्याला जागाच नाहीं.

रावजी—(एकीकडे विश्वासरावास) तूं कांहीं काळजी करूं नको, मी तुझें काम अगदीं बेमालुम करून देतों.

विश्वासराव—पण पहा, नीट संभाळा—

रावजी—तूं अगदीं स्वस्थ ऐस!

पांडुरंगराव—ओहो! रावजी! (पांडुरंगराव व रावजी दोघे एकमेकांस भेटतात.)

रावजी—तुम्हाला पाहून मला कितीतरी आनंद झाला!

पांडुरंगराव—आपली आज अनेक वर्षांनीं गांठ पडली आणि त्यांतहि मला कामामुळें एथें यावें लागलें हाणून मी एथें आलों. हाकामाठीं कीं—

रावजी—तें सर्व मला ठाऊक आहे.

पांडुरंगराव—तुमच्या कानीं आलें तर मग?

रावजी—होय आलें.

पांडुरंगराव—मग बरेंच झालें तर.

रावजी—त्यांत थोडी अडचण आहे. तुमच्या मुलाचें मन दुसरीकडे लागलेलें आहे. तुमचा बेत त्याच्या कांहीं मनास येत नाहीं व तो मोडून टाकण्यासाठीं विश्वास मला सांगत होता. मला वाटतें तुम्ही ह्या कामीं दोरी ढिली सोडूं नये. हें लग्न लवकर उरकून घ्यावें. ह्या पोरांचे फाजील लाड चालू दिले म्हणजे तीं वेताल होतात.

विश्वासराव—(स्वगत) काय विश्वासघातकी मनुष्य!

मल्हारराव—त्याच्या मनांत नसेल तर जुलूम करण्यांत कांहिंच नाहीं. कां दत्तोजीराव, तुम्हाला कसें काय वाटतें?

रावजी—काय, माझ्या मित्रानें मुलाच्या ओंजळीनें पाणी प्यावें? मुलाच्या आहेंत रहावें? हें मी आज उलटच ऐकलें! बापानें मुलाचें ऐकावें कीं मुलानें बापाचें ऐकावें? छे छे! पांडुरंगराव माझे मित्र आहेत. त्यांनीं एकदां शब्द देऊन टाकला आहे आणि आपला शब्द ते अशा क्षुल्लक कारणासाठीं परत घेणार नाहींत. ते मनाचे खंबीर आहेत. मुलाला आपल्या म्हणण्याप्रमाणें ते वागण्यास लावतील—

पांडुरंगराव—तुमचें म्हणणें बरोबर आहे. माझा मुलगा माझें ऐकेलच.

मल्हारराव—(रावजीस) हें लग्न उरकून घेण्यासाठीं तुम्ही इतके उत्सुक आहां हें पाहून मला मोठें आश्चर्य वाटतें. ह्यांत तुमचा हेतु काय असावा तें मला कांहीं समजत नाहीं.

रावजी—मी चांगला शुद्धीवर आहें आणि काय बोलावें तें माझें मला चांगलें समजतें!

पांडुरंगराव—रावजी, तुमचें—

मल्हारराव—त्यांनां ला नांवाचा राग येतो. मी तुम्हांला मघांच सांगितलें, कीं, त्यांनीं 'प्रभाकर' असें नवीन नांव घेतलें आहे—

पांडुरंगराव—त्यांत कांहीं विशेष नाहीं.

विश्वासराव—(स्वगत)अं? प्रभाकर तो हाच का बेरड?

रावजी—(विश्वासरावाकडे वळून) ह्या कोळ्याचा तुला आतां उलगडा झालाच असेल! मी केलें तें बरोबर कीं नाहीं हें तुला आतां समजेल!

विश्वासराव—मी कसा पण गोत्यांत आलों!

(म्हाळसा येते.)

म्हाळसा—शेट अगुदर धावा! कमळाबाय अक्षी ऐकत न्हाई आन् खिडकीवाट उडी टाकाया मांगते.

रावजी—तिला पर्थे घेऊन ये. आतां तिला दूर नेऊन ठेविलें पाहिजे. (म्हाळसा जाते.) तुम्ही हें लग्न लवकरच उरकून घ्या. मी बोलावण्याची वाट पाहणार नाहीं. हजार कामें एकीकडे ठेवून लग्नाला येईन.

(कमळा, म्हाळसा व रामा येतात.)

रावजी—(कमळेस) इकडे ये. आतां मी सर्व गोष्टींचा तावडतोब बंदोबस्त करून टाकतों व हे पोरखेळ बंद होतील अशी व्यवस्था करतों. चल माझ्याबरोबर ये.

कमळा—(विश्वासरावांकडे पाहून) असें मला बळजबरीनं नेऊं देतांना?

विश्वासराव—मी अगदीं गोंधळून गेलों आहें. काय करावें तें मला सुचत नाहीं!

रावजी—चल चल!

कमळा—मी एथून हालणार नाहीं!

पांडुरंगराव—हें काय प्रकरण आहे, आम्हांला कांहींच कळत नाहीं!

रावजी—मग फुरसदीअंतीं तुम्हांला सर्व सांगेन. सध्यां वेळ नाहीं.

पांडुरंगराव—तुम्ही चाललां कोठें? जरा नीट रीतीनें बोलाल तर खरें?

रावजी—मीं सांगितल्याप्रमाणें एकदां लग्न उरकून घ्या.

पांडुरंगराव—तें खरें, पण तुम्हाला अजून सर्व हकीगत सांगितली नाहीं, असें दिसतें—

कमळेची दाई—(बुरखा दूर करून) आणि ती मी सांगतें. ही कमळा दत्तोजीरावांची मुलगी अन् मल्हाररावांची भाची. हिची आई मेल्यावर दत्तोजीरावांनीं वैतागून हिला माझ्या स्वाधीन केली अन् आपण कोठें निघून गेले.पुढं दुष्काळांत ही माझी मुलगी आहे असें सांगून हिला मीं(रावजी कडे बोट करून) त्यांनां विकली. उपासमारामुळं प्राण जायाची वेळ होती तेव्हां मला तसं करावं लागलं.

मल्हारराव—मला वाटलें त्यांनां खरी हकीगत माहीत आहे म्हणून यांच्या वर्तनाचें मला आश्चर्य वाटलें.

रावजी—काय?

मल्हारराव—माझ्या बहिणीला मुलगी होती ती हीच. लावेळीं दत्तोजीरावांवर एकामागून एक संकटें येत गेलीं त्यामुळें वैतागून मुलीला दाईच्या स्वाधीन करून त्यांनीं देशत्याग केला. बाबाचें आणि त्यांचें फार वांकडें असल्यामुळें आणि हें भांडण सरकारदरबारापर्यंत गेलें असल्यामुळें त्यांनीं ही गोष्ट ला वेळीं आम्हांला कळविली नाहीं.

पांडुरंगराव—परदेशांत जाऊन व्यापारांत यांनीं अपार संपत्ति मिळविली आणि आतां हे परत आले.

मल्हारराव—ह्या दाईनें एकंदर हकीगत यांच्याजवळ कबूल केली व पैशासाठीं मुलीला तुमच्या स्वाधीन केल्याचें सांगितलें. तुम्हाला आतां इतकें दुःख कां वाटतें तें मी समजलों. परंतु झाली तीं गोष्ट तुमच्या फायद्याचीच झाली, असें समजा. तुमच्यासारख्यांनीं ह्या वयांत लग्नाच्या भानगडींत पडणें हें कांहीं चांगलें नाहीं.

रावजी—हा-हा-हा-(रागानें हातपाय आपटीत जातो.)

पांडुरंगराव—कांहीं बोलल्याशिवाय जातो, हें काय!

विश्वासराव—तें तुम्हाला लवकरच कळेल! तुम्ही जी सून पसंत केली होती तिच्याबरोबर माझ्या मनांतून लग्न लावायचें होतें. ईश्वरकृपेनें सर्व गोष्टी आपल्या मनाप्रमाणें घडून आल्या.

दत्तोजी—हिला पाहिल्यावरोबर माझ्या हृदयाला पाझर सुटला.

मल्हारराव—आधीं आपण आंत जाऊन सर्व गोष्टींचा उलगडा करून घेऊं, आपल्या मित्राचें शांतवन करूं आणि हा दिवस दाखविल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानूं.

[शेवटचा पडदा पडतो.]



वायुलता.

अथवा

'व्हॉयोलेट्'

—कवि—'इन्दुकान्त.'



अभिनव 'वायुलता' कुसुमा! बा! शिशिरप्रांतनिवासी!
ही तव सुंदर, सुनील सुषमा मोहुनि टाकी मजसी!

कांति तुझी ही नयनमनोहर आनंदाची खाणी,
शरत्कालिंच्या प्रसन्न गगना गौणताच कीं आणी!

असती सुंदर कुसुमें नानापरिचीं तीं उद्यानीं,
तैशीं मनुजालागीं न कळत असंख्य फुलती रानीं.

एकहि नाहीं त्यांमाजी परि, साम्य तुझें ज्या येई,
सुवर्ण, तैसा सुगंध तव तो मिळे न एका ठायीं!

गंधहीन कुणि, वर्णहीन कुणि, ऐशीं बहु आढळती;
परि नच सुमनें, जयांमाजिं हे दोन्ही गुण तव वसती.

गुलाब, चंपक परिमलविभवें ख्यात असति या देशीं,
योग्य न असती परी तुझे ते व्हाया प्रत्यादेशी.

दिसे न कोठें महीतलीं उपमान तुझ्या कांतीचें;
परी आढळे एकच गगनीं इंद्रचापिं तें साचें.

स्वातीच्या त्या सरस घनाला रंगवि सुरकार्मुक जें,
तज्जिर्गतजलबिंदु होउनी कुसुम काय तव राजे!

महासागरीं स्वातिसलिलकण शुक्तिगर्भि जरि पडती,
मूल्यवंत अति विमल तयांच्या मुक्ता सुंदर बनती.

स्वगर्भ त्या मेघाचे जे बिंदु वनांतरिं गळले,
इंद्रनीलमणि तव रूपीं हे काय होउनी ठेले!

वनदेवीचा अलंकार तूं मनोज्ञ गमसी खासा,
गर्वहीन झणिं करिसी शारद धवलकांति त्या काशा!

कुसुमें तव या वनदेवीचीं काय चामरें असती!
सम्राटाच्या रत्नखचितशा चामरांस लघु करिती!

मयूर नाचे निजवर्णांच्या गर्वानें आनंदें,
तुला पाहतां विरमुनि परि तो ढाळि अश्रुजल खेदें!

प्रातःकालीं तुहिनबिंदु जैं चमकति तुझिया कोषीं,
विरहकातरा कांता मम तैं येइ मनीं सजलाक्षी.

प्रेमोष्मा विरहिणीनयनजल सुकवि कांतकरपार्शी
भानुकरांचा स्पर्श तसा तव हिमकण ने विलयासी.

रविचें दर्शन होतां, सुस्मित खुलवी तुझिया वदना,
मोद कुणाला जगीं न होई मित्र आलिया सदना?

घनपटलें जशि झांकुनि टाकिति गगनीं सोज्ज्वल तारा,
तेविं रोधिती घनपल्लव तव रुचिरकांतिविस्तारा.

विघ्नसहस्रा सारुनि येई उदया जसा प्रतापी,
किसलयबंधा छेदुनि तूंही विहरसि रवि-प्रतापीं.

निराश होतां नच, जो धैर्या तुझ्यापरी अवलंबी,
सुखप्राप्ति त्या निश्चित अंतीं, विघ्नें जरि आरंभीं.

निजपर्णांतुनि रविमुख बघसी हांसत डोकावूनी,
बुरख्यांतुनि जणुं निरखी पतितें विनयवती नव तरुणी.

प्रातःकाळीं खेळे तुझिया संगें मारुतलहरी,
हरण करोनी गंध मधुर तव दूर दिगंतीं विखरी.

मधुलोलुपशा मधुपावलितें स्वदीय परिमल मिळतां,
तुला सेवण्या धांवे सोडुनि इतर लता सुमखचिता.

अदृश्य राहुनि करिसी सुरभित मधुगंधें आरामा,
प्रणयसुवासित कांतमना करि वियोगिनी जशि रामा.

तुझी माधुरी कुसुमा! भूतलिं अतुल खरोखर गमते,
नंदनांतुनी कल्पलतासुम अवतरलें कीं येथें!

अथवा कमलोद्भवा इंदिरा प्रसन्न तुजवर झाली,
अर्धोन्मीलित कलिका तव बा! काय तिनें चुंबियली!

प्रेमानंदीं दंग करी मज हा तव सुगंध खासा,
युवतिललाम प्रिय दयितेचा मुखोच्छ्वासमधु जैसा.

दिव्य सुखप्रद कोमलता अति वसे तुझ्या आमोदीं,
जेविं अभिनवप्राप्तयौवन-प्रमदा-प्रणयास्वादीं.

चिरकालें तव विकास होतां सुमना! सुखद वसंतीं,
उसळति लाटा आनंदाच्या रसिकजनांच्या चित्तीं.

सुहास्य-मुख तुज पाहुनि तैसी प्रफुल्ल होई सृष्टि,
आत्मविकासें वाढे करिसी दिव्य सुखाची वृष्टि !

मोदभरानें डोलति तरुवर मित्र तुझे प्रेमाचे,
विलोकुनी तव ऐश्वर्यातें लतिका भगिनी नाचे.

मंजुल कंठें तुझीं विहंगम गाती वैभवगीतें,
त्याहिं टाकिती दुमदुमुनी ते सकलहि दिग्भागांतें.

सौंदर्याचा निधि केवळ जो त्या तुज विकसित बघुनी
सृष्टीची चित्कला सहजचि प्रेमें ये उसळोनी !

सौंदर्याचें सार अशी जी विलसे भुवनीं वस्तु,
सर्वकालिं ती होइ चिरंतन आनंदाचा हेतु.

विकास ऐशा सुंदरतेचा कोणाला नच रुचवी ?
प्रेम जडे नच सहज कुणाचें सुंदरतेच्या विभवीं ?

* * * * *

स्वतंत्रतेची सुविख्यात जी लोकीं विलासभूमी,
जन्म घेसि तूं देशीं ऐशा तुहिनाच्छादित नामी.

जन्मभूमिच्या अंकावरि तूं वाढसि अपुल्या छंदें,
विहार करिसी वनिं उद्यानीं निर्झरतटिं वा मोदें.

हंससी रवितें देखुनि गगनीं, नाचसि पवनासंगें,
तरंगिणीच्या संगीतीं तव अंतर तेथें रंगे.

शिशिरकालिं जरि सेथिल,कुसुमा ! शीर्णदेह तूं होसी;
जन्मभूमिच्या सहज आपदा सकल सुखानें सहसी.

जिकडे तिकडे हर्षें फुलसी तेथें रानोमाळीं,
नयनमनोहर भूपृष्ठातें करिसी वसंतकाळीं.

मुग्धबालिका चंचलचित्ता प्रेमाच्या जणुं कलिका,
धुंडिति तुज तैं नदीतटाकीं गिरिकंदरिं निःशंका.

स्वतंत्रतेच्या विमल पताका गमति तुज्या त्या बाला !
अथवा त्वत्सौरभमोहित कीं अप्सराच अवतरल्या !

जमवुनि कुसुमें तुझीं मनोहर गुंफिति त्यांच्या माला,
कंठिं घालिती कोणी त्याहीं भूषविती अलकाला.

प्रकाश रविचा, मारुत-लहरी, संगति नव बालांची,
निवास विपिनीं,सकलहि अभिरुचि तुज दे स्वातंत्र्याची

प्रीतीचें तुज पुष्प मानिती प्रणयी जन जगिं सारे,
त्वत्सहवासें मनीं संचरे अनुरागाचें वारें.

तव कुसुमांहीं प्रणयपत्रिका करिति सुगंधित कोणी,
प्रियेसि कुणि तव गुच्छ अर्पिती प्रेमचिन्ह निज म्हणुनी.

हिमविमलांगी प्रणयवती त्या पीनपयोधर युवती,
अर्धप्रकटित निजकुचगुच्छीं तव गुच्छा स्थापीती.

शोभसि तेथें हिमनगशृंगीं श्याम पयोधर जैसा,
धवल विधूच्या बिंबाधरिंच्या विलससि अंकासरिसा !

विहार करि ही नौका अथवा क्षीरोदधिच्या फेनीं !
सुधापूर्ण वा रजतकलशि हे भ्रमर लुब्ध रसपानीं !

स्फटिकविनिर्मित मदननृपाच्या सिंहासनिं कीं राही
क्रीडाकंदुक रतिदेवीचा विश्वातें जो मोही !

प्रीतिदेवतानिवासमंदिर सुविख्यात जें भुवनीं,
सौंदर्याचें निधान अथवा एकचि ये जें दिसुनी;

कल्पलतेच्या सुमनांचा मधुमधुर गुच्छ जो साचा,
कनककलश वा भरिलेला जो दिव्य प्रेमरसाचा.

ह्यां सकलांचें भूषण होउनि सुखनगशृंगीं रमसी,
जीवित तेथें तुझें खरोखर धन्य गमे अति मजसी !

* * * * *

गौरांगी त्या विलासिनीसह येउनि भारतवर्षी,
जिंकिलेंसि तूं सहज अहातें पुष्पा ! हृदयाकर्षी.

लाविपलें जरि तुजला येथें सुंदरशा उद्यानीं,
विकास पावसि नच तूं जैसा जन्मभूमिच्या रानीं.

लालनपालन केलें जरि तव येथें सुप्रीतीनें,
सौख्य अल्पही कां न गमे तुज तैशा उपचारानें ?

सुनील पुष्पा ! आनंदें तूं हांससि नच या देशीं,
गिरिकुहरीं वा निर्झरतीरीं स्वैर विहार न करिसी.

केवळ कृत्रिम उपवनिं दिससी मृत्पात्रीं एकांतीं,
विशाल तरुच्या छायेखालीं प्रकाशरहित प्रांतीं.

* * * * *

स्वदेशिं तुजला विचारिती नच, नच कोणी बहुमानी
वाढसि फुलसी अंत पावसी यदृच्छया वनिं विजनीं.

स्थापिति कोणी तुज नच तेथें नेउनियां उद्यानीं,
शिशिरीं बर्फामध्यें पडसी मृतप्राय होवोनी !

येथ आलिया तुला लाविती उपवनिं सुंदर पात्रीं,
तुझी काळजी निशिदिनिं घेतां ललना कोमलगात्री.

प्रखर रवीचा ताप न व्हावा शैत्याचा तुज तैसा,
उचलुनि तुजला ठेविति वरिवरि सुखस्थलींप्रियशिशुसा

सकल जनांच्या चित्तांलागीं खुलवी निज मधुगंधें,
गुलाब तोही ऐशा प्रेमळ उपचारांसि न लाधे.

वेधुनि टाकी नयनां जरि तो अपुल्या विचित्र रंगें,
तरिही तुझिया ठायिंच पटुमति रसिकवरांची रंगे.

सुवर्ण-परिमल-युक्त सुमें जीं अनुपम वैभवशाली,
वर्णनिं कविजनपंक्ति जयांच्या सदैव दंग जहाली.

उपवनिं वससी येथ अशा तूं सुमनांच्या सहवासीं,
प्राप्त होइ ही गुणाढ्यसंगति काय तुला निज देशीं ?

श्रेष्ठपदातें पावसि येथें सकलां कुसुमांमाजी,
इच्छिसि मग कां निजदेशींची हिममय ती वनराजी ?

देशीं अपुल्या वैपुल्यानें चहूंकडे आढळसी,
आयासाविण तव संगतिसुख लाभे तेथ जनांसी.

गौरव ह्मणुनिच तुझा न करिती स्वदेशबांधव तेथें,
दुर्लभता तव विदेशिं बनवी परि त्यां तुझे चहाते.

दुर्मिळ होतां वस्तु तियेची महती कळुनी येई,
विपुल जरी ती मिळे तरी तिज मान कुणी नच देई !

अतितर परिचय, तशी विपुलता, प्राप्ति सहज, वस्तूची
तदीय अवमानातें कारण जनांत होई साची !

तत्त्व अबाधित दिसुनि येइ हें सर्वकालिं या भुवनीं,
अनुभव त्याचा असेल आला तुज इकडे येवोनी !

कठोरता ती सरुनि काय निज अरसिक आप्तजनांची
खिन्नवदन तूं दिससी? किंवा अन्य दुःख तुज जाची?

स्वसुखपरायण बांधव तव जरि आदर बहु नच करिती,
अपूर्व माना लाधशील या विदेशिं रसिकांहातीं.

गुणी जनांची पारख कधिंही होइ न तेहिंशि खरी,
मलयचंदना इंधनकार्या योजिति तेथिल नारी !

उदासीन जन गुणग्रहणिं जरि समकालीन गुणींच्या
महती त्यांची खरी कळुनियां येइ अभावीं त्यांच्या.

सर्वच देशीं समान दिसुनी येई ही जनरीती,
ह्मणुनी गुणिजन रसिकप्रेमां विदेशिं संपादीती.

वाहतील तुज ईशमस्तकीं भक्त इथें प्रीतीनें,
वंद्य होउनी जीवित होइल धन्य तुझें बा ! तेणें.

सुविख्यात जगिं असे जयांचा कुसुमाविषयीं प्रेमा,
आर्यबालिका कोमलहृदया गातिल तव गुणमहिमा.

एकनिष्ठता वसे जयांच्या प्रेमीं ऐशा आर्या
चंचलचित्तें त्यागितील कां तुजला कधिं ? सुमवर्या !

स्थापितील तव गुच्छ आपुल्या केशपाशिं नव बाला,
जणों हराया निज कुटिलालकनीलकांति गर्वाला !

विमलचरित्रा पतिव्रता तुज शीर्षीं धारण करितां,
खचितचि होइल जगांत या तव जीवाची सार्थकता.

प्रीतिपात्र तूं होशिल येथिल झडकरि सकल कवींचें,
मधुरगानिं ते अपुल्या करितिल अमरकीर्ति तुज साचे.

वाग्देवीचे कंठमणि श्रीकालिदास, भवभूती,
ह्यांहि गाइली तुझ्यासारिख्या कुसुमवरांची भूती.

बकुल, मालती, कमल, केतकी, गुलाब, चंपक, जाती,
भारतवासी कविजन केवळ ह्यांचा महिमा गाती.

असशि विदेशी ह्मणुनि तुझा ते गौरव करण्या भीती,
शंका ऐसी येउं न देईं कधिंही अपुल्या चित्तीं !

होतां महिमा विदित तुझा त्यां, गातिल ते तव गीतें,
निजपरभेदा देति न थारा, असति गुणांचे भोक्ते !

सरस्वतीसौभाग्यतिलक जो कुसुमगानिं आनंदे,
कविवर ऐसा महाराष्ट्रिं या तव दैवें अजि नांदे.

पूर्ण रंगुनी वृत्ति तयाची जाइल तुजला बघतां,
गाइल वैभव तुझें सदोदित त्याची कविता ललिता !

भूषविती जे रसिकशिरोमणि अन्य सुकवि देशा या,
त्यांचीहि प्रिय कन्या कविता येइल तुजसि वराया.

यास्तव कुसुमा ! उद्वेगातें सकल मनांतिल टाकीं,
प्रफुल्लवदनें भारतवासी रसिकां सतत विलोकीं !

श्रीमंत सौ. महाराणी चिमणाबाईसाहेब गायकवाड यांचे विचार.

हिंदी समाजांत स्त्रियांची स्थिति.

—लेखक—
श्रीयुत वा. रा. गुप्तीकर बी. ए., एलएल. बी.

लेखांक ५ वा. स्त्रियांसाठीं उद्योग.

"त्याचें असें मत असे, कीं, जेथें आतां धान्याचें एकच धाट उगवतें तेथें जो एकाचीं दोन उगवतील असें करील, त्याचे मनुष्यजातीवर फार उपकार होतील. तोच खरा देशभक्त व त्याच्या कार्याची योग्यता सगळ्या मुत्सद्यांच्या खटपटीपेक्षां फारच जास्त आहे." —स्विफ्ट.

हिंदुस्थानांत शेंकडा सत्तर लोक शेतकीवर निर्वाह करून राहणारे असल्यामुळें आम्हीं ह्या उद्योगाचा विचार प्रथम करण्याचें ठरविलें आहे. आतां सहजच असा प्रश्न येणार, कीं, बायकांचा उपयोग शेतकींत होईल कीं काय? ह्याला उत्तर असें आहे, कीं, शेतकीमध्यें फार मेहनतीचीं कामें पुरुषांप्रमाणें बायकांकडून होणार नाहींत; जनावरांची जोपासना पुरुषांप्रमाणें त्यांनां करितां येणार नाहीं; तरी शास्त्रोक्त पद्धतीनें स्त्रियांचें शिक्षण झाल्यास शेतकीमध्यें बायकांचा अनेक रीतींनीं उपयोग होण्यासारखा आहे. एकतर स्त्रियांनां 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' याप्रमाणें नवीन कल्पना किंवा योजना सुचवितां येतील. वेळीं प्रसंगीं त्या सल्लामसलत देतील, व जर व्यवस्थित व कार्यक्षम असतील तर त्यांनीं देखरेख करण्यास व हिशेब ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं.

ज्या स्त्रियांच्या मनाचा कल दुकानदारीकडे आहे, अशांनां त्या कलाला व्यक्त स्वरूप देण्यास शेतकीसारखा दुसरा उद्योग नाहीं.

स्त्रियांसाठीं धंदा या दृष्टीनें शेतकीचे फायदे मुख्य दोन आहेत.

(१) तो व्यवसाय फार आरोग्यदायक आहे,

आणि

(२) शेतकीच्या उद्योगानें पत्नी किंवा आई या नात्याच्या कर्तव्यांनां कांहीं अडचण किंवा अडथळा होत नाहीं.

इतर उद्योगांप्रमाणें या उद्योगांतहि कार्यक्षमता पद्धतशीर शिक्षणावर अवलंबून असते. हें शिक्षण शास्त्रोक्त व सप्रयोग असलें पाहिजे, व असें शिक्षण शहरांत राहणाऱ्या स्त्रियांपेक्षां खेड्यांत राहणाऱ्या स्त्रियांनां जास्त फायद्याचें होणार हें उघड आहे.

अशा प्रकारचें शिक्षण देण्यासाठीं इंग्लंडांत शेतकीच्या शाळा आहेत. या शाळांतून विविध विषयांचें शिक्षण देण्यांत येतें. उदाहरणार्थ, जनावरांची जोपासना, दुभत्याची व्यवस्था, पशुवैद्यक, जमीनीचे गुणधर्म, फळझाडांची लागवड व गृहव्यवस्था, इत्यादि. कोंबड्यांची निपज व मधमाशा पाळणें यावद्दलहि माहिती देण्यांत येते, व अशा प्रकारच्या शिक्षणापासून फार फायदा झाल्याचें आढळून आलें आहे. परंतु या शाळांत येणाऱ्या मुली बहुतकरून प्रौढ वयाच्या असतात. सबब खर पाहिलें असतां, कृषिविद्येची गोडी अगदीं लहान वयापासूनच त्यांच्या अंगीं उपजली पाहिजे, म्हणजे त्यांचें शिक्षण केवळ मानसिकच न होतां त्याला व्यावहारिक स्वरूप येईल, व कृषिविद्या म्हणजे केवळ निर्बुद्ध माणसांचा धंदा आहे ही कल्पना नष्ट होईल. हा हेतु साध्य होण्याला क्रमिक पुस्तकांतील धडे शेतकीसंबंधींच असावे, म्हणजे मुलींनां सहजगत्या मानसिक शिक्षणाबरोबरच शेतकीची माहिती होईल. इंग्लंडांत पुष्कळ शाळांतून मुलींनां फळझाडें व भाजीपाल्याची लागवड शिकविण्याची व्यवस्था असते. प्रत्येक मुलीला एक लहानसा जमिनीचा तुकडा आखून देतात. या तुकड्यांत तिनें आपल्यास हवीं तीं फळझाडें, फुलझाडें, किंवा भाजीपाला शिक्षकाच्या देखरेखीखालीं लावावा. दरवर्षी एकदां मुलींनीं लाविलेल्या फळांफुलांचें प्रदर्शन भरवितात, व पसंत ठरतील त्यांनां बक्षिसें देतात.

आपल्या इकडे मध्यप्रांतांत (Central Provinces) एक उत्कृष्ट योजना चालू करण्यांत आली आहे. त्या प्रांतांत खेडेगांवांतील शाळांमध्यें विद्यार्थ्यांनां सकाळचे सातपासून दहा वाजेपावेतों मात्र

शिक्षण देण्यांत येतें. मग दिवसभर त्यांनीं आपल्या आईबापांस शेतांत काम करण्यास मदत करावी. अभ्यासाचे विषय लेखन, वाचन, गणित, हिशेब, भूगोल, जमीनीची साधी मोजणी व शेतकी असे असतात. भूगोल शिकविण्याची पद्धति सुलभ व सुगम असते. प्रथम शाळेचा म्हणजे शाळागृहाचा, मग आपल्या गांवाचा व नंतर तालुक्याचा भूगोल शिकवितात. प्रत्येक शाळेला एक मळा जोडलेला असतो, व क्रमिक पुस्तकांतील धडे शेतकीची माहिती देणारे असतात.

या पद्धतीचें अनुकरण करून सर्व हिंदुस्थानभर मुलींसाठीं शेतकीच्या शाळा निघण्यास हरकत दिसत नाहीं. या शाळांत अभ्यासाचा क्रम असा असावा:-

पुस्तकी विद्या—व्याख्यानें, शुद्धलेखन व मुख्य विषयांवर लहान लहान निबंध. हे मुख्य विषय निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे असणार हें उघडच आहे. उदाहरणार्थ, ज्या ठिकाणीं गोरसाची पैदास जास्त तेथें दुभत्याचें शिक्षण महत्त्वाचें वाटणार, व जेथें द्राक्षांची पैदास जास्त तेथें द्राक्षांच्या लागवडीचें शिक्षण विशेष महत्त्वाचें वाटणार.

दुसरा विषय.—सप्रयोग शिक्षण. म्हणजे नाना प्रकारच्या शाकभाज्यांची लागवड, रासायनिक खतें वगैरे.

तिसरा विषय—हिशेब ठेवणें. शेतकीच्या काय, किंवा इतर धंद्यांत काय, हिशेबी दृष्टि असल्याशिवाय *नफ्यातोट्याचा आंकडा नक्की समजत नाहीं. अजमा-*सानें काम करणें पुष्कळदां अंगाशीं येतें. साधारण प्रौढ वयाच्या मुलींनीं जमाखर्चाची माहिती करून घ्यावी व एकेका तिमाहीचा किंवा सहामाहीचा हिशेब ठेवून नफातोटा दाखवावा. हिशेबाची माहिती असणें शेतकऱ्यांनां अत्यंत फायद्याचें आहे.

फ्रान्स देशांत बियारिझ् गांवाजवळ कांहीं मोठमोठे मळे केवळ स्त्रियांनीं चालविले आहेत, व ते फायदेशीरहि झाले आहेत. कांहीं मळ्यांत धर्मादाय संस्थांतील मुलींनां उमेदवार म्हणून कामावर घेतात व काम शिकवितात. या योजनेनें त्या मुलींच्या शीलावर नैतिक दृष्ट्या फार उत्तम परिणाम घडतो, असें पाहण्यांत आलें आहे.

ज्या स्त्रियांनां स्वतंत्र मुखत्यारीनें एकादा मोठा मळा किंवा बाग करणें असेल त्यांनां विशेष शिक्षणाची जरूर आहे. अशा स्त्रीला शेतकीची, दुभत्याची, इत्यादि माहिती तर हवीच; पण शिवाय आपल्या हाताखालील माणसांकडून काम घेण्याची कला तिला अवगत पाहिजे, व हिशेबाची माहिती पाहिजे. याखेरीज तिला थोडीशी औषधोपचाराची माहिती अवश्य पाहिजे. औषधोपायाबरोबरच किंबहुना त्याहून अधिक महत्त्वाचा विषय म्हटला म्हणजे स्वच्छता होय.

कांहीं कांहीं वर्गांनां स्वच्छतेची कल्पनासुद्धां नसते. सुसती स्वच्छता राखल्यानेंच मोठमोठे रोग उद्भवत नाहींत, ही गोष्ट पुष्कळांनां माहीत देखील नाहीं. आपलीं व आपल्या परिवाराचीं घरें, शरीरें, कपडेलत्ते व अन्न आणि पाणी हीं राखवतील तितकीं स्वच्छ राखावयाचीं असा वरच्या व्यवस्थापकांचा कटाक्ष असावा.

दुभत्याचा उद्योग तर सर्वस्वीं बायकांच्याच हातीं आहे. दूध काढण्याला पुरुषांची मदत घ्यावी लागते खरी, पण त्यानंतरच्या सर्व क्रिया म्हणजे दूध तापविणें, विरजण लावणें, ताक करणें, लोणी काढणें व कढवून तूप करणें या क्रिया बायकाच करितात.

इंग्लंड किंवा डेन्मार्क या देशांप्रमाणे लोणी करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर केल्यास फायदेशीर होईल. डेन्मार्क देशांत हा धंदा बहुतेक बायकांच्याच हातीं आहे.

हा धंदा किती व्यवस्थितपणें चालला आहे हें पाहण्याची खरी परीक्षा म्हटली म्हणजे तयार झालेला माल गिऱ्हाईकाला किती बंदोबस्तानें व किती लवकर *मिळतो, ही होय. म्हाल्युपेक्षा पोष्टानें गवळ्याला* व गिऱ्हाईकाला दोघांनांहि इकडे मोठी सोय झाली आहे. एकाद्या मोठ्या शहराजवळ राहून हा उद्योग करावा, व पोष्टामार्फत ताजें खात्रीचें लोणी, तूप व मध गिऱ्हाईकांनां मिळेल अशी व्यवस्था केल्यास फार फायदेशीर होणार आहे.

हाच उद्योग एकाद्या मुसलमान स्त्रीनें केल्यास तिनें आपल्या गिऱ्हाइकांनां कोंबडी व अंडीं विकावीं. लहान प्रमाणावर धंदा करून एकट्या दुकट्याचें पोट बाहेर पडेल खरें, पण पैसे मिळविण्याला धंदा मोठ्याच प्रमाणावर केला पाहिजे.

लहान प्रमाणावर उद्योग करणारांनीं आपला माल गिऱ्हाइकाला पोंचता करण्यासाठीं सहकारी पद्धतीची सुरुवात करून पाहणें फार उपयोगाचें होईल. ही योजना मोठ्या प्रमाणावर चालली म्हणजे फायदेशीर

श्रीमंत सौ. महाराणी चिमणाबाईसाहेब गायकवाड यांचे विचार.

हिंदी समाजांत स्त्रियांची स्थिति.

—लेखक—
श्रीयुत वा. रा. गुप्तीकर बी. ए., एलएल. बी.

लेखांक ५ वा. स्त्रियांसाठीं उद्योग.

"त्याचें असें मत असे, कीं, जेथें आतां धान्याचें एकच धाट उगवतें तेथें जो एकाचीं दोन उगवतील असें करील, त्याचे मनुष्यजातीवर फार उपकार होतील. तोच खरा देशभक्त व त्याच्या कार्याची योग्यता सगळ्या मुत्सद्यांच्या खटपटीपेक्षां फारच जास्त आहे." —स्विफ्ट.

हिंदुस्थानांत शेंकडा सत्तर लोक शेतकीवर निर्वाह करून राहणारे असल्यामुळें आम्ही ह्या उद्योगाचा विचार प्रथम करण्याचें ठरविलें आहे. आतां सहजच असा प्रश्न येणार, कीं, बायकांचा उपयोग शेतकींत होईल कीं काय? ह्याला उत्तर असें आहे, कीं, शेतकीमधील फार मेहनतीचीं कामें पुरुषांप्रमाणें बायकांकडून हो. ं नाहींत; जनावरांची जोपासना पुरुषांप्रमाणें त्यांनां करितां येणार नाहीं; तरी शास्त्रोक्त पद्धतीनें स्त्रियांचें शिक्षण झाल्यास शेतकीमध्यें बायकांचा अनेक रीतींनीं उपयोग होण्यासारखा आहे. एकतर स्त्रियांनां 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' याप्रमाणें नवीन कल्पना किंवा योजना सुचवितां येतील. वेळीं प्रसंगीं त्या सल्लामसलत देतील, व जर व्यवस्थित व कार्यक्षम असतील तर त्यांनीं देखरेख करण्यास व हिशेब ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं.

ज्या स्त्रियांच्या मनाचा कल दुकानदारीकडे आहे, अशांनां त्या कलाला व्यक्त स्वरूप देण्यास शेतकीसारखा दुसरा उद्योग नाहीं.

स्त्रियांसाठीं धंदा या दृष्टीनें शेतकीचे फायदे मुख्य दोन आहेत.

(१) तो व्यवसाय फार आरोग्यदायक आहे,

आणि

(२) शेतकीच्या उद्योगानें पत्नी किंवा आई या नात्याच्या कर्तव्यांनां कांहीं अडचण किंवा अडथळा होत नाहीं.

इतर उद्योगांप्रमाणें या उद्योगांतहि कार्यक्षमता पद्धतशीर शिक्षणावर अवलंबून असते. हें शिक्षण शास्त्रोक्त व सप्रयोग असलें पाहिजे, व असें शिक्षण शहरांत राहणाऱ्या स्त्रियांपेक्षां खेड्यांत राहणाऱ्या स्त्रियांनां जास्त फायद्याचें होणार हें उघड आहे.

अशा प्रकारचें शिक्षण देण्यासाठीं इंग्लंडांत शेतकीच्या शाळा आहेत. या शाळांतून विविध विषयांचें शिक्षण देण्यांत येतें. उदाहरणार्थ, जनावरांची जोपासना, दुभत्याची व्यवस्था, पशुवैद्यक, जमीनीचे गुणधर्म, फळझाडांची लागवड व गृहव्यवस्था, इत्यादि. कोंबड्यांची निपज व मधमाशा पाळणें यावद्दलहि माहिती देण्यांत येते, व अशा प्रकारच्या शिक्षणापासून फार फायदा झाल्याचें आढळून आलें आहे. परंतु या शाळांत येणाऱ्या मुली बहुतकरून प्रौढ वयाच्या असतात. खरोखर पाहिलें असतां, कृषिविद्येची गोडी अगदीं लहान वयापासूनच त्यांच्या अंगीं उपजली पाहिजे, ह्मणजे त्यांचें शिक्षण केवळ मानसिकच न होतां त्याला व्यावहारिक स्वरूप येईल, व कृषिविद्या ह्मणजे केवळ निर्बुद्ध माणसांचा धंदा आहे ही कल्पना नष्ट होईल. हा हेतु साध्य होण्याला क्रमिक पुस्तकांतील धडे शेतकीसंबंधींच असावे, ह्मणजे मुलींनां सहजगत्या मानसिक शिक्षणाबरोबरच शेतकीची माहिती होईल. इंग्लंडांत पुष्कळ शाळांतून मुलींनां फळझाडें व भाजीपाल्याची लागवड शिकविण्याची व्यवस्था असते. प्रत्येक मुलीला एक लहानसा जमिनीचा तुकडा आंखून देतात. या तुकड्यांत तिनें आपल्यास हवीं तीं फळझाडें, फुलझाडें, किंवा भाजीपाला शिक्षकाच्या देखरेखीखालीं लावावा. दरवर्षीं एकदां मुलींनीं लाविलेल्या फळांफुलांचें प्रदर्शन भरवितात, व पसंत ठरतील त्यांनां बक्षिसें देतात.

आपल्या इकडे मध्यप्रांतांत (Central Provinces) एक उत्कृष्ट योजना चालू करण्यांत आली आहे. त्या प्रांतांत खेडेगांवांतील शाळांमध्यें विद्यार्थ्यांनां सकाळचे सातपासून दहा वाजेपावेतों मात्र

शिक्षण देण्यांत येतें. मग दिवसभर त्यांनीं आपल्या आईबापांस शेतांत काम करण्यास मदत करावी. अभ्यासाचे विषय लेखन, वाचन, गणित, हिशेब, भूगोल, जमीनीची साधी मोजणी व शेतकी असे शसतात. भूगोल शिकविण्याची पद्धति सुलभ व सुगम असते. प्रथम शाळेचा म्हणजे शाळागृहाचा, मग आपल्या गांवाचा व नंतर तालुक्याचा भूगोल शिकवितात. प्रत्येक शाळेला एक मळा जोडलेला असतो, व क्रमिक पुस्तकांतील धडे शेतकीची माहिती देणारे असतात.

या पद्धतीचें अनुकरण करून सर्व हिंदुस्थानभर मुलींसाठीं शेतकीच्या शाळा निघण्यास हरकत दिसत नाहीं. या शाळांत अभ्यासाचा क्रम असा असावा:-

पुस्तकी विद्या—व्याख्यानें, शुद्धलेखन व मुख्य विषयांवर लहान लहान निबंध. हे मुख्य विषय निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे असणार हें उघडच आहे. उदाहरणार्थ, ज्या ठिकाणीं गोरसाची पैदास जास्त तेथें दुभत्याचें शिक्षण महत्त्वाचें वाटणार, व जेथें द्राक्षांची पैदास जास्त तेथें द्राक्षांच्या लागवडीचें शिक्षण विशेष महत्त्वाचें वाटणार.

दुसरा विषय.—सप्रयोग शिक्षण. म्हणजे नाना प्रकारच्या शाकभाज्यांची लागवड, रासायनिक खतें वगैरे.

तिसरा विषय—हिशेब ठेवणें. शेतकीच्या काय, किंवा इतर धंद्यांत काय, हिशेबी दृष्टि असल्याशिवाय नफ्यातोट्याचा आंकडा नक्की समजत नाहीं. अजमासानें काम करणें पुष्कळदां अंगाशीं येतें. साधारण प्रौढ वयाच्या मुलींनीं जमाखर्चाची माहिती करून घ्यावी व एकेका तिमाहीचा किंवा सहामाहीचा हिशेब ठेवून नफातोटा दाखवावा. हिशेबाचीं माहिती असणें शेतकऱ्यांनां अत्यंत फायद्याचें आहे.

फ्रान्स देशांत बियारिझ् गांवाजवळ कांहीं मोठमोठे मळे केवळ स्त्रियांनीं चालविले आहेत, व ते फायदेशीरहि झाले आहेत. कांहीं मळ्यांत धर्मादाय संस्थांतील मुलींनां उमेदवार म्हणून कामावर घेतात व काम शिकवितात. या योजनेनें त्या मुलींच्या शीलावर नैतिक दृष्ट्या फार उत्तम परिणाम घडतो, असें पाहण्यांत आलें आहे.

ज्या स्त्रियांनां स्वतंत्र मुखत्यारीनें एकादा मोठा मळा किंवा बाग करणें असेल त्यांनां विशेष शिक्षणाची जरूर आहे. अशा स्त्रीला शेतकीची, दुभत्याची, इत्यादि माहिती तर हवीच; पण शिवाय आपल्या हाताखालील माणसांकडून काम घेण्याची कला तिला अवगत पाहिजे, व हिशेबाची माहिती पाहिजे. याखेरीज तिला थोडीशी औषधोपचाराची माहिती अवश्य पाहिजे. औषधोपायाबरोबरच किंबहुना त्याहून अधिक महत्त्वाचा विषय म्हटला म्हणजे स्वच्छता होय.

कांहीं कांहीं वर्गांनां स्वच्छतेची कल्पनासुद्धां नसते. नुसती स्वच्छता राखल्यानेंच मोठमोठे रोग उद्भवत नाहींत, ही गोष्ट पुष्कळांनां माहीत देखील नाहीं. आपलीं व आपल्या परिवाराचीं घरें, शरीरें, कपडेलत्ते व अन्न आणि पाणी हीं राखवतील तितकीं स्वच्छ राखावयाचीं असा वरच्या व्यवस्थापकांचा कटाक्ष असावा.

दुभत्याचा उद्योग तर सर्वस्वी बायकांच्याच हातीं आहे. दूध काढण्याला पुरुषांची मदत घ्यावी लागते खरी, पण त्यानंतरच्या सर्व क्रिया म्हणजे दूध तापविणें, विरजण लावणें, ताक करणें, लोणी काढणें व कढवून तूप करणें या क्रिया बायकाच करितात.

इंग्लंड किंवा डेन्मार्क या देशांप्रमाणें लोणी करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर केल्यास फायदेशीर होईल. डेन्मार्क देशांत हा धंदा बहुतेक बायकांच्याच हातीं आहे.

हा धंदा किती व्यवस्थितपणें चालला आहे हें पाहण्याची खरी परीक्षा म्हटली म्हणजे तयार झालेला माल गिऱ्हाईकाला किती बंदोबस्तानें व किती लवकर मिळतो, ही होय. व्हाल्युपेबल पोष्टानें गबळ्याला व गिऱ्हाईकाला दोघांनांहि इकडे मोठी सोय झाली आहे. एकाद्या मोठ्या शहराजवळ राहून हा उद्योग करावा, व पोष्टामार्फत ताजें खात्रीचें लोणी, तूप व मध गिऱ्हाईकांनां मिळेल अशी व्यवस्था केल्यास फार फायदेशीर होणार आहे.

हाच उद्योग एकाद्या मुसलमान स्त्रीनें केल्यास तिनें आपल्या गिऱ्हाइकांनां कोंबडी व अंडीं विकावीं. लहान प्रमाणावर धंदा करून एकट्या दुकट्याचें पोट बाहेर पडेल खरें, पण पैसे मिळविण्याला धंदा मोठ्याच प्रमाणावर केला पाहिजे.

लहान प्रमाणावर उद्योग करणारांनीं आपला माल गिऱ्हाइकाला पोंचता करण्यासाठीं सहकारी पद्धतीची मुखात करून पाहणें फार उपयोगाचें होईल. ही योजना मोठ्या प्रमाणावर चालली म्हणजे फायदेशीर

होईल. पण या योगानें थोड्यासाच माल तयार करणारांनां मोठी सोय होईल, यांत संशय नाहीं.

इंग्लंडांत कौन्टिकौन्सिलें (आपल्या इकडील लोकलबोर्डासारख्या संस्था) फिरते शिक्षक ठेवून वायकांनां लोणी काढण्याच्या नवीन फायदेशीर पद्धतींची माहिती फुकट देण्याची व्यवस्था करितात, व उत्तम काम दाखविणारांनां बक्षिसें देतात.

इंग्लंडांत दुभत्याची विद्या शिकविण्यासाठीं पुष्कळ शाळा आहेत. त्यांत दुभत्याची सर्व विद्या शिकवितात. रीडिंग येथील युनिव्हर्सिटी कॉलेज, हें शेतकीचें कॉलेज आहे, व याला जोडूनच ब्रिटिश डेअरी इन्स्टिट्यूट नांवाची संस्था आहे. या संस्थेंत तिमाही, सहामाही, एक वर्ष व दोन वर्षेपर्यंत चालणारे निरनिराळे अभ्यासाचे क्रम आहेत. त्यांमध्यें पायरीप्रमाणें अधिक अधिक शिक्षण मिळतें. दोन वर्षांचा क्रम पुरा केला ह्मणजे कॉलेजचा डिप्लोमा किंवा सर्टिफिकिट देतात. अशीं डिप्लोमा मिळालेलीं माणसें दुभत्याचें शिक्षण देणारे शिक्षक होण्याला किंवा एकाद्या दुभत्याच्या मळ्याचे किंवा दुभत्याच्या एकाद्या कारखान्याचे म्यानेजर होण्याला योग्य असतात. शेतकीच्या शिक्षणांत, शेतकी, वनस्पतिशास्त्र, रसायण, Zoology, Geology, Meteorology, Physics, Mensuration, Surveying, व Bookkeeping या विषयांचा अंतर्भाव होतो. धंद्याचें शिक्षण पुरें झाल्यावर विद्यार्थ्यांनां एकाद्या ॲग्रिकल्चरल युनियनचे मेंबर होण्यास सांगतात. या युनियनमध्यें वर्तमानपत्र ह्मणा, व्याख्यानें ह्मणा, लायब्ररी ह्मणा, कांहींना कांही सतत शिक्षणाची सोय किंवा साधन असतें, व त्याच्या योगानें अगदीं नवी माहिती मिळते. अशा प्रकारची संस्था Women's Agricultural and Horticultural International Union ही एक आहे व ही National Union of Women Workers या संस्थेला जोडली आहे. या संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणें आहेतः-

१. ज्या स्त्रिया, धंद्याखातर किंवा हौसेखातर मळे करणें, दुभतें करणें, कोंबड्या पाळणें, मधमाशा पाळणें, फुलझाडें व फळझाडें लावणें, किंवा जमीनीची सुधारणा करणें, जंगलाची देखरेख करणें किंवा आपल्या खासगी जमिनीची देखरेख करण्याच्या उद्योगांत गुंतलेल्या असतील, त्यांमध्यें ऐक्यभाव उत्पन्न करणें.

२. माहिती गोळा करून ती छापून प्रसिद्ध करणें, व निरनिराळ्या देशांतील पद्धतींचें तुलनात्मक परीक्षण करणें.

३. मालाचा खप करण्याबद्दल सल्ला देणें, व कामकरी व गिऱ्हाईक यांची एकमेकांनां माहिती करून देणें. शिवाय, सभासदांनां एकमेकांशीं पत्रव्यवहार करण्याची सोय असल्यामुळें पुष्कळदां महत्त्वाची माहिती सहज मिळून जाते.

४. या कामांत गुंतलेल्या स्त्रियांची मजूरी योग्य प्रमाणांत राखणें.

कोंबड्या पाळण्याचा धंदा शेतकीच्या धंद्यांतलाच एक भाग आहे, व व्यवस्थितपणें चालविल्यास हा धंदा पुष्कळ फायदेशीर होतो. प्रथम जाहिरातींनींच गिऱ्हाईक मिळविलें पाहिजे. एकदां जम जमल्यावर जाहिरातींचें कारण नाहीं. मग शिफारस पुरे. ह्या उद्योगांतहि वायकांनां घर टाकून जावें लागत नाहीं.

फळबाग किंवा फुलबागेचा धंदा वायकांनीं मोठ्या प्रमाणावर करण्याजोगा आहे. चांगला फायदेशीर होण्यास अनेक स्त्रियांनीं मिळून धंदा करावा.

फळबाग, भाजीपाला, बीं तयार करण्याचीं बागा, कोंबड्या पाळणें, मधमाशा पाळणें, दुभतें, चटण्या, मुरंबे, लोणचीं तयार करणें व बरण्यांत भरून पाठविणें, असले एकमेकांनां संलग्न धंदे पुष्कळ वायकांनीं मिळून चालवावे. चांगल्या सोईच्या ठिकाणीं चालविल्यास असा धंदा उत्तम चालेल, व अशा ठिकाणीं दुभतें किंवा भाजीपाला घेणारांस मोठी सोय होईल. फळबाग व फुलबागेच्या धंद्याला सर्वांगसुंदर व्यावहारिक शिक्षण दोन वर्षांचें लागतें. असें शिक्षण इंग्लंडांत 'स्वॉनले हॉर्टिकल्चरल कॉलेज, केंट' येथें मिळतें. या शाळेंत व्यापारी अंगाचें शिक्षण देऊन त्याशिवाय वनस्पतिशास्त्र, शेतकी, रसायन, भूगर्भ, फळझाडें व फुलझाडें लावणें, कोवळ्या पाळणें, मधमाशा पाळणें, दुभतें, जमीन पाहणी, कीटकशास्त्र, व हिशोब ठेवणें इतके विषय शिकवितात.

चित्रकलेची अभिरुचि असणाऱ्या स्त्रियांनीं नजरबागेची मांडणी करण्याचा धंदा करावा. या धंद्याला शिल्पाची माहिती हवी, ह्मणजे घराच्या पद्धतीला अनुरूप असा नजरबाग कसा तयार करावा हें समजेल. याशिवाय झाडें तयार करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें ह्याहि विद्यांची माहिती हवी. योग्य शिक्षण असल्यास

बागेच्या नकाशापासून तों झाडें लावून देण्यापर्यंतचें सर्व काम एकाच स्त्रीनें आपल्या जबाबदारीवर करण्यास हरकत नाहीं. घरांचे नकाशे करणारे व घरें बांधून देण्याचा धंदा करणारे जे शिल्पी आहेत, त्यांच्यांशीं ओळखीदेखी होऊन एकदां सुरुवात झाली, म्हणजे पुढें आपल्याच हाताखालीं माणसें ठेवून आपण फक्त नकाशा करून द्यावा व हाताखालील लोकांकडून काम करवून घ्यावें. ह्याहून पुढची पायरी म्हणजे अशा नजरबागेला लागणारीं झाडेंसुद्धां आपण तयार करून लावून देणें, ही होय.

फळझाडें फुलझाडें, व भाजीपाल्याच्या बागांवर देखरेख करूनहि किफायत चांगली होईल. हीं कामें हल्लींच्या मजूरांपेक्षां बायका पुष्कळ पटीनें चांगलीं करतील, यांत संशय नाहीं. झाडें तयार करण्याच्या बागेला जोडूनच माळिणीचा धंदा करावा. या उद्योगांत बायकांच्या अंगच्या अभिरुचीचें कार्य विशेष असतें व त्यांच्या नाजुक हातांत फुलाची नासधूस होत नाहीं. नुसत्या माळा किंवा हार तयार करण्यापेक्षां घरांत किंवा टेबलावर ठेवण्याचे गुच्छ व तुरे तयार करण्याचा धंदा ज्यास्त फायदेशीर होईल.

यालाच जोडून बीं विक्रीचा धंदा असावा. हा धंदा निर्मळ, निरोगी, व फार मेहनतीचा नसून बायकांना पूर्णपणें योग्य असा आहे.

हे सर्व धंदे, म्हणजे—विक्रीसाठी भाजीपाला व फळें तयार करणें, झाडें तयार करणें, नजरबागांची मांडणी, बागेवर देखरेख, माळणीचा धंदा, बीं विक्रीचा धंदा, मुरंबे, लोणचीं वगैरेचा धंदा, इत्यादि.—हे सर्व धंदे एके ठिकाणीं एकाच देखरेखीखालीं केले व प्रत्येक निराळ्या शाखेवर एकेक निष्णात स्त्रीची देखरेख असली तर हा उद्योग फायदेशीर झालाच पाहिजे.

ह्या उद्योगाला प्रथम भांडवल बरेंच लागेल. तीन चार वर्षेपर्यंत टिकाव धरितां येईल इतकें भांडवल तरी निदान हवें.

अशा उद्योगाला भांडवल कसें जमवावें, व शेतीच्या उद्योगांत सहकारी तत्वांचा कसा उपयोग होतो, हें दाखविण्यास सर थिओडोर मॉरीसन यांच्या 'इंडस्ट्रियल ऑर्ग्यानिझेशन ऑफ ॲन इंडियन प्रॉविन्स'—Industrial organization of an Indian Province' या पुस्तकांतील एक उतारा खालीं देतों:—

"सहकारी चळवळ नुकती कोठें हिंदुस्थानांत सुरू होत आहे. ज्या कामासाठीं इंग्लंडांतील शेतकरी सहकारित्वानें एक ठिकाणीं जमतात, अशा कामासाठीं आपणहि एके ठिकाणीं जमावें, ही जाणीव हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्यांनां झालेली नाहीं..... एकदां सहकारी तत्वाची ओळख झाली ह्मणजे तुपाच्या व्यापारापासून आपल्याला पुष्कळ फायदा करून घेतां येतो, हें हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांनां समजूं लागेल. शहरांत निर्भेळ तूप मिळण्याची फार मारामार पडते. त्यांत पुष्कळ निषिद्ध पदार्थ मिसळलेले असतात. सहकारी तत्वावर तुपाचा पुरवठा होईल तर येथेंहि इंग्लंडप्रमाणेंच सहकारी तत्वाचा प्रसार होऊन शेतकऱ्यांनां फायदा होईल. परंतु असा फायदा होण्यास शेतकऱ्यांनां सहकारी तत्वांची माहिती झाली पाहिजे... .....हें काम खेडेगांवांतील कोआपरेटिव्ह ब्यांकांनीं केलें पाहिजे. सर होरेस प्लंकेट असें ह्मणतात, कीं, आपल्याला आयर्लंडांतील आर्थिक घटनेचें काम पुनः करण्याचा प्रसंग आल्यास आपण खेडेगांवांतील ब्यांकांपासून सुरुवात करूं.

"हिंदुस्थानांत लहान लहान ब्यांकांची सुरुवात झालीच आहे. शेतकऱ्याला बीं, विवळा व बैल वगैरे घेण्याला भांडवल लागतें, व गांवचा सावकार तर जबर व्याज घेतो ही गोष्ट शेतकऱ्याला समजते. तेव्हां चारचौघांनीं एकत्र होऊन भांडवल एकत्र केल्यास आपल्याला पाहिजे तितकें नाहीं तरी, आपल्या ऐपतीपुरतें कर्ज आपल्यास मिळेल अशी शेतकऱ्यांची खात्री झाली ह्मणजे तो हळुहळू सहकारी तत्वांचा अंगीकार करील. या चळवळीला कायद्याची किंवा सांपत्तिक अडचण नसून नैतिक अडचण आहे, व हळुहळू जसजशी शेतकऱ्याला मितव्ययाची किंमत ज्यास्त ज्यास्त कळूं लागेल, तसतसा सहकारी तत्वाचा दुहेरी फायदा, ह्मणजे सस्तें भांडवल व मितव्ययाची संवय—त्याला मिळूं लागेल.

"प्रत्येक सांपत्तिक प्रश्नाच्या मुळाशीं एक नैतिक प्रश्न असतो, व सांपत्तिक प्रश्न सोडविण्याचा उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे ज्याच्या योगानें लोक आपली अडचण आपणच दूर करूं शकतील तो होय. युरोपच्या उदाहरणावरून कोआपरेटिव्ह ब्यांका अशा प्रकारचा उपाय आहेत असें दिसतें, व त्यांचाच प्रसार हिंदुस्थानांत करणें हें प्रत्येक देशाभिमानी माणसाचें कर्तव्य आहे."

ज्या स्त्रियांच्या मनांत शेतकीचा धंदा करावयाचा असेल त्यांनीं कोआपरेशनसंबंधीं वरील सूचना लक्षांत बाळगाव्या.


विल्यम टॉमस स्टेड.

प्रसिद्ध इंग्रज लेखक विल्यम टॉमस स्टेड ह्यांचा जन्म १८४९ सालीं झाला. स्टेडचा पिता रे. विल्यम स्टेड हा हौडन ऑन टाइन येथें धर्माधिकारी होता. स्टेड ह्याच्या अंगीं जे गुण पुढें दिसून आले त्यांचें बीजारोपण तो लहान असतांच त्याच्या आईबापांनीं केलें होतें. स्टेड ह्याचें प्राथमिक शिक्षण त्याच्या बापाजवळच झालें. त्याच्या बापाचें मुलांसंबंधानें वर्तन मासलेवाईक होतें. फुरसदीचा सर्व वेळ तो मुलांबरोबर घालवीत असे. तो मुलांचा उपदेशक, शिक्षक, मित्र आणि खेळगडी होता. मुलांचा कंटाळा असा त्यानें कधींच केला नाहीं. बाप वाचनांत गढून गेलेला असला, कामांत असला, तरी मुलें जवळच खेळत असावयाचीं.

स्टेडच्या पित्याची शिकविण्याची पद्धत फार चांगली असे. गोड बोलून, मुलाच्या हुशारीची किंवा उद्योगाची वाखाणणी करून, तो त्याला उत्तेजन देत असे. लहानपणींच त्यानें मुलांस चित्रें काढण्यास शिकविण्याचा उपक्रम केला व त्यांना एक लहानशी रंगाची पेटी आणून दिली. ह्या कुटुंबाची सांपत्तिक स्थिति समाधानकारक नव्हती, व त्या वेळीं कागद फार महाग असत म्हणून जुन्या रद्दी पत्रांच्या व लिफाफ्यांच्या मागल्या बाजूला तीं चित्रें काढूं लागलीं. हीं चित्रें तयार झालीं म्हणजे अभ्यासाच्या खोलींत भिंतीवर खिळे मारून तीं टांगून ठेवीत. ह्या रीतीनें खालपासून वरपर्यंत ह्या खोलीची भिंत चित्रविचित्र चित्रांनीं भरून जात असे. मुलांनींच काढलेलीं चित्रें तीं ! तीं वेडींविद्रीं असल्यास त्यांत नवल काय ? परंतु त्यांना त्यांचा फार अभिमान वाटे. स्टेडच्या आईला चित्रांचें फार मार्मिक ज्ञान असे. तिला हा पोरकटपणा आवडला नाहीं. एके दिवशीं हा चित्रांचा मोठा संग्रह काढून टाकून चित्रांचें जंगी प्रदर्शन तिनें बंद केलें व भिंत साफ करून टाकली. मुलांचा त्यामुळें फारच हिरमोड झाला.

स्टेडला थोडेसें वाचायला येऊं लागण्याबरोबर बापानें त्याला लॅटिन शिकवायला आरंभ केला. त्याच्या वयाला पांच वर्षें पुरी होण्यापूर्वीच बाप त्याच्याजवळून पवित्र शास्त्र वाचून घेत असे. स्टेड व त्याची वडिल बहीण ह्यांचें शिक्षण बरोबर झालें. त्यांचे विषय, पुस्तकें व धडे एकच असत. ह्या दोघांचा एक वर्ग होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्याचा पहिला नंबर असेल त्यानें बापाच्या मांडीवर बसावें, व दुसरा नंबर असेल त्यानें खुर्चीवर बसावें, अशी त्यांची पद्धत होती. पहिला नंबर पटकावण्यासाठीं त्यांची फार धडपड चाललेली असे. तीं दोघेंहि हुशार होतीं, परंतु स्वभावानें गरीब व सांगितलेलें निमूटपणें ऐकणारीं अशीं नव्हतीं. त्यांचा बाप स्वभावानें फार शांत व सहनशील असल्यामुळेंच त्यानें टिकाव धरला. मुलांच्या चौकसबुद्धीचा विकास करण्याकडे स्टेडच्या बापाचा विशेष कटाक्ष असे. कोणाचा प्रश्न कितीहि वेडगळ असो, कोणाचें मत कितीहि असमंजसपणाचें असो, कोणाचें उत्तर कितीहि चुकीचें असो, स्टेडचा बाप उपहास न करतां शांतपणें प्रश्नाचें उत्तर देई, साधकबाधक प्रमाणें पुढें आणून मताचें परीक्षण करी, व चूक कोठें आहे तें दाखवी. मुलें बापाबरोबर मोकळ्या मनानें प्रत्येक गोष्टीची चर्चा करीत व बापालाहि मुलांच्या प्रश्नांचा कधींहि राग किंवा कंटाळा आला नाहीं. रिकाम्या वेळीं केव्हां केव्हां बाप मुलांना गोष्टीच्या रूपानें निरनिराळ्या विषयांची माहिती करून देत असे. बाप एकाद्या पुस्तकांत किंवा वर्तमानपत्रांत जें जें वाची त्याची शहानिशा जेवणाच्या वेळीं किंवा फिरावयास जाण्याच्या वेळीं तो मुलांबरोबर करीत असे. कोणत्याहि विषयाची चटकदार रीतीनें माहिती करून देण्यांत त्याचा हातखंडा असे.

तारतम्यबुद्धीचा विकास करून विचारशक्ति प्रगल्भदशेस आणण्याच्या कामींहि स्टेडच्या बापाची पद्धत फार चांगली असे. तो मुलांवरोबर नेहमीं बरोबरीच्या नात्यानें वागत असे. फाजील जरब नसल्यामुळें आपलीं मतें बापासमक्ष सांगण्यास मुलांना कांहींच दिक्कत वाटत नसे. त्यांचें घर हें एक प्रजासत्ताक राज्य होतें. कोणाचें कांहींहि मत असलें तरी तेथें त्याचा शांतपणें विचार होत असे. आपलें मत मोकळ्या मनानें सांगण्यास मुलांस हुरूप यावी, अशा रीतीचें बापाचें वर्तन असे. सर्वजण मोठ्या उत्साहानें



विल्यम टामस् स्टेड.

[Impression from the Review of Reviews.]

एकमेकांच्या मतांवर टीका करीत. बापाच्या म्हणण्यांतील चुकाहि स्पष्टपणानें दाखविण्यास मुलांना कांहींच संकोच वाटत नसे. एकादें परकें मनुष्य त्यांच्यांत गेलें तर मुलें फार उद्धट आहेत असें त्यास वाटे, परंतु स्टेडच्या बापानें मुद्दाम ह्या बेमुर्वत चौकसपणाला उत्तेजन दिलें होतें व त्यामुळें त्याला कांहीं विषाद वाटत नसे.

रविवारीं प्रत्येकजण पवित्र शास्त्रांतली एकेक ओवी पाठ करीत असे. एकेकानें एकेक अध्याय निवडून घ्यावा व त्यांतील एकेक ओवी क्रमानें दर रविवारीं पाठ करावी, असा क्रम असे. न्याहारीच्या वेळीं एकानें आपली ओवी बोलून दाखवावी व नंतर प्रत्येकानें त्या ओवीचें विवरण करावें, असा क्रम चाले. ह्याप्रमाणें प्रत्येक ओवीचें सर्वांकडून स्पष्टीकरण होत असे, आणि त्यासंबंधानें त्यांच्यांत खडाजंगी उडे. ह्या योगानें आपलें मत बरोबर रीतीनें कसें मांडावें, दुसऱ्याच्या विचारसरणींत असलेली चूक कशी शोधून काढावी व वादविवाद कसा करावा, ह्या गोष्टी मुलांना सहज अवगत झाल्या.

मुलें उपासनेस किंवा दुसरे कोठें गेलीं असल्यास घरी आल्यावर आपण जें कांहीं ऐकलें असेल तें बापास येऊन सांगावें, अशी त्यांना शिस्त लावून दिली होती. तीं थोडीं मोठीं झाल्यावर भाषण श्रवण करतेवेळीं त्यांतील मुद्द्यांचें टांचण त्यांनां करावयास सांगत. ह्याप्रमाणें उपासनेचा किंवा व्याख्यानाचा थोडक्यांत गोषवारा घेण्याची त्यांना संवय लागली.

रसायनिक प्रयोग करण्यासहि त्यांचा बाप त्यांना उत्तेजन देत असे. हिवाळ्यांत फटाके वगैरे दारुकाम तीं करीत. खेळांतहि बाप त्यांनां मदत करी. बराच वेळ बापाच्या सहवासांत गेल्यामुळें मुलांचा फार फायदा झाला.

१८६१ सालीं म्हणजे आपल्या वयाच्या बाराव्या वर्षी स्टेड हा सिलकोप्स येथील शाळेंत जाऊं लागला. शाळेंत तो दोनच वर्षे होता. तेथें बीजगणित व अंकगणित ह्यांत त्याची थोडी अधिक प्रगती झाली एवढेंच. त्याशिवाय अभ्यासासंबंधानें शाळेचा त्याला विशेष फायदा झाला नाहीं. आपल्या वयाच्या चवदाव्या वर्षी (१८६३ सालीं) त्यानें शाळा सोडली व न्यूकॅसल येथील एका हिशोबाचें काम पाहणाराच्या ऑफिसांत तो उमेदवारी करूं लागला. पुढें त्याला कारकुनाची जागा मिळाली.

ह्या सुमारास 'धि बॉयीज ओन मॅगझाइन'च्या वाचकांसाठीं त्यानें कित्येक निबंध लिहिले. ह्या निबंधांपैकी ऑलिव्हर क्रामवेल वरील निबंध परीक्षकांस पसंत पडला, व स्टेड ह्याला त्या निबंधाबद्दल बक्षिस मिळालें.

स्टेडची दृष्टि अशक्त असल्यामुळें कांहीं दिवसपर्यंत त्याचा लेखनवाचनव्यवसाय बराच मंदावला. ह्या वेळीं तो दुसऱ्याकडून वाचवून आपण ऐकत असे, त्यामुळें त्याचें वाचन फारसें झालें नाहीं. ह्या अवधींत रविवारची शाळा, रस्त्यांची व गांवच्या आरोग्याची सुधारणा, इत्यादि स्थानिक कारभारांत त्यानें मन घातलें. कांहीं दिवसांनीं त्याची दृष्टि सुधारली.

स्टेड कारकून होता त्या ऑफिसांत भिकाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी येत. ह्या गोष्टीमुळें स्टेडचें त्यांच्या स्थितीकडे लक्ष गेलें. 'धि नार्दर्न डेली एक्सप्रेस'मध्यें पत्रें लिहून भिकाऱ्यांसंबंधानें एक संस्था स्थापण्याची स्टेडनें सूचना केली. लोक फसले जाऊं नयेत व याचकांची पात्रापात्रता त्यांच्या लक्षांत यावी, म्हणून ह्या संस्थेनें भिकाऱ्यांच्या खऱ्या स्थितीविषयीं चौकशी करावी, असें त्यानें प्रतिपादन केलें. ह्याविषयीं एकानें असें म्हटलें आहे कीं, भिकाऱ्यांच्या सांधावर उभे राहून स्टेडनें कीर्ति गाठली.

डार्लिंग्टन येथील 'नॉर्दर्न एको' नांवाच्या पत्राला स्टेड हे मधून मधून लेख पाठवीत असत. ह्या लेखांवरून त्यांच्याविषयीं त्या पत्राच्या मालकाचें चांगलें मत झालें. पुढें सन १८७१ सालीं स्टेड हे २२ वर्षांचे असतां त्या पत्राच्या संपादकाची जागा रिकामी झाली व ती मालकानें स्टेड ह्यांना देऊ केली. आपल्या कर्तबगारीविषयीं स्टेड ह्यांनां बहुधा संदेह वाटत नसे; परंतु ह्या प्रसंगीं हें काम आपल्या हातून चांगल्या रीतीनें होईल कीं नाहीं ह्यासंबंधानें ते साशंक झाले. शेवटीं त्यांनीं तें स्वीकारलें व त्यांत त्यांनां उत्तम रीतीचें यश मिळालें. त्यांच्या कारकीर्दीत ह्या पत्राची फारच भरभराट झाली.

ता.१४ जुलै १८७३ रोजीं हेन्री विलसन ह्यांची कन्या एमा लुसी हिच्याशीं स्टेड ह्यांनीं लग्न लावलें. स्टेडनीं आपल्या वडिल मुलाचा मृत्युलेख लिहिला आहे त्यांत लग्नापूर्वी आपल्या व आपल्या पत्नीच्या मनांत कोणते विचार घोळत होते त्याचा उल्लेख केला आहे. आईबापांच्या जबाबदारीची त्यांनां पूर्णपणें जाणीव होती. अमर आत्म्यास मनुष्यरूपानें मृत्युलोकीं जन्म

घेण्यास लावणें ह्मणजे लहानसहान गोष्ट नाहीं. जगांत असणारें दुःख व पाप ह्यांचा विचार केला तर ही जबाबदारी फारच भयंकर आहे; परंतु कर्तव्यनिष्ठ, सुशील, सद्गुणी व सशक्त मनुष्यें जन्मास आल्याशिवाय मनुष्यजातीची सुधारणा होणार नाहीं. विचारी, सद्गुणी व विद्याचारसंपन्न लोकांनीं वैराग्य धारण करून प्रजोत्पत्तीचें काम आपल्या शिरावर घेतलें नाहीं, तर अविचारी लोकांच्या हातूनच तें काम पुढें चालून मनुष्यजातीची अवनति होईल. स्टेड व त्यांची पत्नी मनःपूर्वक परमेश्वराची प्रार्थना करीत, कीं, परमेश्वराचा एकनिष्ठ सेवक असें ज्याला ह्मणतां येईल असेंच मूल व्हावें, नाहीं तर होऊं नये.

बळजेरिअन लोकांनीं बटक येथें चालविलेल्या जुलमासंबंधानें ग्लॅडस्टन साहेबांनीं चळवळ सुरू केली, तेव्हां आपलें सामर्थ्य प्रकट करण्यास स्टेड ह्यांनां संधि मिळाली. ह्या चळवळीच्या धुरीणांची गांठ घेण्यासाठीं ते लंडन येथें आले. ह्याच सुमारास कार्लाइल, कॅनॉनलिडन वगैरे व्यक्तींशीं त्यांचा संबंध जडला व त्यांच्या पत्राचें महत्त्व फारच वाढलें.

ह्या चळवळीसंबंधानें स्टेड ह्यांनीं लिबरल पार्टीस फारच मदत केली. त्यांच्या लेखनशैलीची मोठी वाहवा झाली व त्यांचें वजनहि वाढलें. १८८० सालीं मॉर्ले साहेब 'दि पॉलमॉल गॅझेट' पत्राचे संपादक झाले, त्या वेळीं स्टेड ह्यांची त्यांनीं दुय्यम संपादकाच्या जागीं नेमणूक केली. तीन वर्षेपर्यंत सदर्हु पत्र ह्या दोन नामांकित लेखकांच्या हातीं होतें. मॉर्ले साहेब राजकीय बाबतींत पत्राचें धोरण ठरवून एकंदर देखरेख ठेवीत व अग्रलेख लिहीत, आणि स्टेड साहेब दुसरीं सर्व कामें पहात. मॉर्ले हे मोठे सावध, धोरणी व दूरदर्शी असत; त्यांच्या हाताखालीं काम केल्यामुळें व त्यांच्या संसर्गानें स्टेड ह्यांच्या अंगींहि नियंत्रितपणा येऊं लागला. मॉर्ले ह्यांचे विचार व लेखनपद्धति ह्यांचाहि स्टेडसाहेबांच्या विचारांवर व लेखनपद्धतीवर बराच परिणाम झाला.

सन १८८३ सालीं मॉर्लेसाहेबांनीं संपादकाचें काम सोडून दिलें व स्टेड मुख्य संपादक झाले. ह्यापुढें सहा वर्षेपर्यंत ह्या पत्राच्या द्वारें स्टेड साहेबांनीं राज्यकारभारांत बऱ्याच घडामोडी घडवून आणल्या. जोराची चळवळ सुरू करणें, कोणत्याहि विषयावर लोकमत जागृत करणें, ह्या कामीं स्टेडचा हातखंडा असे. त्यांच्या अमदानींत राजकारणांत ह्या पत्राचें महत्त्व फारच वाढलें. गार्डन साहेबांस सौडन येथें पाठविण्याची कल्पना त्यांचीच. ह्या कामासाठीं त्यांनीं गॉर्डन साहेबांची मुलाखत घेतली व जोरदार आणि मुद्देसूद लेख लिहिले. कोणतीहि नवीन कल्पना त्यांच्या मनांत आली, कीं, तत्प्रीत्यर्थ सर्व जग उलथेंपालथें करण्यासच जणुं काय त्यांनीं लागावें, अशी त्यांची काम करण्याची पद्धत असे. ऐरिश लोकांनां होमरूल देण्यासंबंधानेंहि स्टेड ह्यांचें अनुकूल मत होतें. ऐर्लंडास होमरूल देऊन पुनः त्यांनां इम्पिरीअल पार्लमेंटमध्यें घ्यावें असें ते प्रतिपादन करीत असत. आरमारासंबंधानें त्यांच्या लेखांपासून बरीच सुधारणा झाली आहे. ह्यासंबंधानें त्यांनीं आधीं रात्रीपूर्वक माहिती जमा केली व इंग्रजी आरमाराची खरी स्थिति उघडकीस आणून आपल्या जोरदार लेखांनीं प्रधानमंडळास आरमाराची स्थिति सुधारण्यास भाग पाडलें. ह्या विषयाकडे ते पुनः एकदा वळले व इंग्रजी आरमार मजबूत राखण्याचें महत्त्व त्यांनीं लोकांच्या निदर्शनास आणून दिलें. १८८५ सालीं पॅंजडे प्रकरणासंबंधानें रशिआवरोबर लढाई करण्यास प्रवृत्त होणें बरोबर नाहीं असें त्यांनीं अनेक लेख लिहून व पुस्तकें काढून प्रतिपादन केलें.

ह्यापुढें सांसर्गिक रोगाच्या कायद्यासंबंधानें चळवळ झाली. ह्या वेळीं आपल्या एका हस्तकाच्या फाजीलपणामुळें स्टेडसाहेबांनां तोंडघशीं पडावें लागलें. पूर्वीप्रमाणें ह्या वेळीं त्यांनीं वित्तंबातमी काढण्याचा प्रयत्न केला व ही बातमी प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. ह्या वेळीं त्यांच्यावर चोहोंकडून काहूर सुरू झालें. लोक ह्मणूं लागले कीं, अशा नाजूक बाबतींत बातमी खरी असली तरी ती प्रसिद्ध करणें बरोबर नाहीं व स्टेड ह्यांच्या बातम्याच मुळीं खोट्या आहेत. स्टेड ह्यांनीं प्रसिद्ध केल्यापैकीं एक गोष्ट अशी होती, कीं, एका लहान मुलीस तिच्या बाईबापांनीं पैशासाठीं विकली. लाइट्स न्यूज नांवाच्या वर्तमानपत्राच्या संपादकानें चौकशी करतां त्याला असें आढळून आलें, कीं, सदर्हु मुलीस स्टेडच्याच हस्तकानें मिळविली होती व ह्या संबंधानें तिच्या आईबापांस कांहीं माहित नव्हतें. आपल्या हस्तकाच्या ह्या फाजीलपणामुळें स्टेड साहेबांवर मुलीस पळवून नेण्याबद्दल खटला करण्यांत आला. ह्यांत स्टेड साहेबांचा खरोखरी कांहीं दोष नव्हता,

परंतु 'शिष्यापराधाद्गुरोर्दंडः' ह्या न्यायानें १८८५ च्या नोवेंबर महिन्यांत सेंट्रल क्रिमिनल कोर्टमध्यें त्यांना तीन महिन्यांची कैदेची शिक्षा झाली.

सरळ मनाच्या मनुष्याला आपलें झटलेल्या लोकांच्या हलगर्जीपणामुळें केव्हां केव्हां कसा त्रास होतो, हें ह्यावरून दिसून येईल. ह्याचें एक चांगलें ठळक उदाहरण महाराष्ट्रीयांच्या स्मरणांत अजून असेलच. च्यांड साहेबांचा खून झाल्यानंतर ना. गोखल्यांनीं विलायतेंत जी माहिती प्रसिद्ध केली होती तिजवरून गोखल्यांवरहि गहजब करण्यांत आला, व त्यांनां खालीं ओढूं पाहणाऱ्या त्यांच्या कित्येक देशबांधवांनीं लोकनायक ह्मणवूं पाहणारांनीं अशी चूक करणें क्षम्य नाहीं ह्या अर्थाचे उद्गार काढले होते. स्टेड ह्यांच्या उदाहरणावरून असें दिसून येईल, कीं, थोर मनुष्य आपणांवरून जग ओळखायला जातात व केव्हां केव्हां साध्यांत पडतात; परंतु तेवढ्यानें त्यांचा उपहास करण्यास प्रवृत्त होणें बरोबर नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें स्टेड तोंडघशीं पडले तथापि त्यांचें इष्टकार्य सिद्धीस गेलें. ज्या अनीतीच्या प्रघातावर त्यांनीं हल्ला उचलला होता त्या प्रघातास कायद्यानें आळा घालण्यांत आला.

तुरुंगांत असतांना तेथूनच स्टेड आपलें पत्र चालवीत. तुरुंगाच्या कोठडींतून आपण राज्याच्या घडामोडी घडवून आणतों, ह्याबद्दल त्यांनां अभिमान वाटत असे. त्यांची प्रसिद्धि आतां फारच झाली. दुःखित व गांजलेले लोक आश्रयासाठीं त्यांच्याकडे येऊं लागले. १८९० सालीं 'पॉलमॉल गझेट'चें संपादकत्व त्यांनीं सोडून दिलें व 'रिव्ह्यू ऑफ् रिव्ह्यूज' हें नियतकालिक काढिलें. इंग्रजी भाषा बोलणारांची नैतिक व सांपत्तिक स्थिति सुधारावी आणि त्यांच्यांतील उत्तम गुणांचा विकास होण्यासारखी स्थिति उत्पन्न करावी, हा ह्या नियतकालिकाचा उद्देश होता. प्रचलित असणारे उत्तम उत्तम विचार व त्या वेळच्या माणसांसंबंधी स्टेड ह्यांचे विचार ह्यांचा ह्या मासिकांत समावेश होत असे. आपले इष्ट हेतु तडीस नेण्याच्या कामीं 'रिव्ह्यू ऑफ् रिव्ह्यूज' हें त्यांच्या हातीं मोठेंच साधन झालें. त्यांनी रेखाटलेलीं स्वभावचित्रें, त्यांच्या स्फुट सूचना वगैरे लोकादरास पात्र झालीं.

१८९१ सालीं त्यांनीं भूतांसंबंधी खऱ्या गोष्टी प्रसिद्ध केल्या व 'अमेरिकन रिव्ह्यू ऑफ् रिव्ह्यूज' नांवाचें आणखी एक नियतकालिक काढलें. कांहीं वर्षांनीं हें नियतकालिक त्यांनीं डॉ. ऑलबर्ट शॉ ह्यांच्या स्वाधीन केलें, परंतु त्यांत द्रव्यसंबंधानें स्टेड ह्यांचें अंग होतेंच.

१८९२ सालीं त्यांनीं 'ऑस्ट्रेलिअन रिव्ह्यू ऑफ् रिव्ह्यूज' काढलें व भूतांसंबंधी आणखी गोष्टी प्रसिद्ध केल्या. १८९३ सालीं 'बॉर्डरलँड' हें पुस्तक ते काढूं लागले. हें १८९७ सालीं बंद पडलें. १८९८ सालीं रशिया देशांत जाऊन दुसरा निकोलस ह्याची त्यांनीं दोनदां भेट घेतली. ह्याच सालीं त्यांनीं यूरोपचा प्रवास केला व शांतता राखण्याचे प्रयत्न करण्यासाठीं ते बहुतेक राजधान्यांत गेले. १८९८-९९ सालीं हेग कॉन्फरन्ससाठीं त्यांनीं अनेक सभा भरवून आणल्या व १८९९ सालीं 'लढाई विरुद्ध लढाई' नांवाचें एक साप्ताहिक पत्र काढलें. १९०४ सालीं दक्षिण आफ्रिकेंत जाऊन समेट करून शांतता स्थापण्यास बोअर लोकांचें मन वळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. १९०६ सालीं जर्मनींतील संपादकांनीं इंग्लंडांत यावें अशी त्यांनीं व्यवस्था केली व पुढील सालीं इंग्लिश संपादकांनीं जर्मनीस परत भेट दिली.

अमेरिकेंतील राजकारण व इतर गोष्टींसंबंधानें स्टेड ह्यांस फार सहानुभूति वाटत असे. त्यांनीं अमेरिकेसंबंधानें अनेक पुस्तकें लिहिलीं आहेत. न्यूयॉर्क येथें 'जगभर शांतता' ह्या विषयावर व्याख्यान देण्यासाठीं व दुसऱ्या एका चळवळीसंबंधानें काम करण्यासाठीं ते टायटॅनिक बोटींतून जात होते. ह्या प्रवासांतच त्यांचा अंत झाला! जगास आश्चर्यचकित करून टाकणारीं कृत्यें करण्यांत त्यांचा जन्म गेला व त्यांचें मरणहि त्यांच्या एकंदर जीवितक्रमास अनुरूप असेंच होतें. टायटॅनिक आगबोटीवरील कामदार लोकांचा आत्मत्याग व कर्तव्यनिष्ठा, तेथील लोकांचें धैर्य, शांतवृत्ति, अचल निश्चयानें संकटांस तोंड देण्याची प्रवृत्ति, ह्या सर्व गोष्टींनीं त्या प्रसंगास एका प्रकारचें उदात्त स्वरूप प्राप्त झालें आहे.

स्टेड हे शांततापिय होते. जगांत सर्वत्र शांतता नांदावी ह्मणून त्यांचे प्रयत्न चालू असत. राष्ट्राराष्ट्रांतील कलह तोडजोडीनें व पंचांच्या मार्फत मिटवावे, ह्यासाठीं त्यांनीं अतोनात प्रयत्न केले. सध्यांच्या मन्वंतरांत असे प्रयत्न सर्वस्वीं फलद्रूप होणें शक्य नाहीं; परंतु हेगच्या कॉन्फरन्सनें राष्ट्रीय पंचायतीचा पाया घातला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या कॉन्फरन्सिसनां स्टेड

हमेशा जात असत. बोअरयुद्धाचे वेळीं बोअरलोकांसाठीं स्टेड हे फार झटले. रशिआसंबंधानें झालेला गैरसमज दूर करण्यासाठींहि त्यांनीं फार प्रयत्न केले.

दया आणि सहानुभूति हे दोन गुण त्यांच्यांत विशेष रीतीनें वास करीत होते. जुलमानें गांजलेल्या लोकांची बाजू घ्यावी, दुःखितांस मदत करावी, निराश्रितांस जवळ ओढावें, हा त्यांचा अंगस्वभावच होता. ह्यासाठींच त्यांनीं जन्म घेतला होता, असें झटलें असतां चालेल. ह्या कामीं त्यांनीं कधींहि आळस केला नाहीं, व आपपर हा भेद ठेविला नाहीं !

'ज्यासी आपंगिता नाहीं' त्याला जवळ करणारांपैकीं स्टेड हे असल्यामुळें हिंदुस्थानाविषयीं साहजिकच त्यांनां सहानुभूति वाटे. त्यांनीं अनेक प्रसंगीं हिंदुस्थानचा व येथील लोकांचा कैवार घेतला आहे. मुद्रणकलास्वातंत्र्यासंबंधानें ते आमच्या तर्फेनें भांडत होते. ह्याशिवाय त्यांची मदत ज्या ज्या वेळेला मागण्यांत आली त्या त्या वेळीं त्यांनीं ती आनंदानें दिली. ह्याचें एक उदाहरण बाबु सुरेन्द्रनाथ बानर्जी त्यांनीं सांगितलें आहे. एका स्वदेशीवाल्यास हावऱ्याच्या कटांत सामील असल्याबद्दल पकडण्यांत आलें. हा गृहस्थ खरोखरी निरपराधी होता; परंतु चौकशी होईपर्यंत त्याला सहा महिने कैदेंत काढावे लागले. इतक्या अवधींत त्याचे फार हाल झाले. शेवटीं चौकशी पुरी होऊन न्यायाच्या कोर्टानें त्याला निरपराधी ठरवून सोडून दिलें. सुटका झाल्यानंतर तो गृहस्थ सुरेंद्रनाथ बाबूंकडे गेला व त्यांनां त्यानें आपली सर्व हकीगत सांगितली. सुरेंद्रनाथ बाबूंनीं त्याला ती हकीकत आपल्या सहीनिशीं लिहून काढण्यास सांगितलें. पुढें तो हकीगत सुरेन्द्रनाथ बाबूंनीं स्टेड साहेबांकडे पाठविली. स्टेडसाहेबांनीं तत्क्षणीं लार्ड मॉर्ले हे त्या वेळीं सेक्रेटरी आफ् स्टेट फॉर इन्डिआ होते त्यांची भेट घेतली, व त्यांच्या कानावर ती गोष्ट घालून पुनः अशी गोष्ट हिंदुस्थानांत न होऊं देण्याबद्दल त्यांच्याजवळून आश्वासन मिळविलें. अन्यायाचा प्रतिकार करण्याविषयीं त्यांची आतुरता आणि तत्परता ही किती होती, हें ह्यावरून दिसून येईल.

स्त्रियांनां राजकीय व इतर हक्क द्यावे असें त्यांचें मत होतें. स्त्रियांचें राजकारणांत अंग असलें म्हणजे राजकीय बाबतींत त्यांच्या संततीवर कोणती जबाबदारी पडणारी आहे तें त्यांनां कळून येईल आणि माता व पिता ह्या दोघांनांहि राजकीय जबाबदारीची जाणीव असली तर मुलांनां आपलीं कामें अधिक चांगल्या रीतीनें करतां येतील, असें ते प्रतिपादन करीत.

वर्तमानपत्रांत स्टेड त्यांनीं नवीन जीवित घातलें. जागृति उत्पन्न करण्याचे अनेक उपाय योजण्यांत ते मोठें चातुर्य दाखवीत असत. ते मोठमोठ्या लोकांच्या मुलाखती घेत, चित्रे देत, व जोरदार लेख लिहून चळवळ करून सोडीत. इंग्रजी भाषेवर त्यांची विलक्षण प्रभुता असे. कोणत्याहि विकट प्रश्नांत मुख्य मुद्दे कोणते आहेत हें ते नेमकें ओळखून काढीत व मनावर ठसा उमटविण्यासारखें त्याचें विवेचन करीत. त्यांची माहिती विविध असे, उपमा देण्याची शैली नांवाजण्यासारखी असे, व भाषेचा प्रवाह अस्खलित रीतीनें चाललेला असे.

कोणालाहि त्यांची भेट घेतां येत असे. लोकांबरोबर बोलण्यांत बराच वेळ गेल्यानें त्यांनां काम करावयास वेळ कसा मिळे, ह्याचें कित्येकांनां आश्चर्य वाटे; परंतु एकदां ते कामास लागले म्हणजे झपाट्यानें एकेक काम आटोपीत असत. त्यांची स्मरणशक्ति उत्तम असे. कोणाची मुलाखत घेतली असतां झालेलें भाषण त्यावेळीं कांहीं टांचण घेतल्याशिवाय ते नंतर बरोबर लिहून काढीत असत. कामाचा कंटाळा त्यांनां मुळींच नसे. ते नेहमीं उत्साहभरित असत. त्यांच्या ठायीं आत्मप्रत्यय विलक्षण असे. कोणतेंहि काम एकदां आपण हातीं घेतलें कीं तें पार पाडूंच, अशी त्यांच्या अंगीं धमक होती. हा आत्मप्रत्यय अंगीं नसता तर त्यांच्या हातून इतकीं मोठमोठीं कार्यें पार पडलीं नसतीं.

स्थूल देह धारण केल्याशिवाय आत्म्यास संचार करतां येतो, व असा आत्मा केव्हां केव्हां आपणांस गोचर होतो, असें स्टेडचें मत होतें. ह्यासंबंधानें बारीक चौकशी करून त्यांनीं पुष्कळ माहिती मिळविली होती, व अनेक पुस्तकें प्रसिद्ध केलीं होतीं. केवळ भौतिक शास्त्रांस ज्यांचा उलगडा होत नाहीं असे अनेक चमत्कार शक्य आहेत, असा त्यांचा विश्वास होता. त्यांचा स्वभाव सरळ असल्यामुळें कित्येक ढोंगी लोक त्यांनां केव्हां केव्हां फसवीतहि असत. ह्या एकंदर प्रकारामुळें ऐहिक व स्थूल वस्तूंतच ज्यांची दृष्टि मुरून गेली आहे अशा लोकांची त्यांच्याविषयींची निष्ठा बरीच कमी झाली.

स्टेड ह्यांचें घर हें प्रेम, शांति, कर्तव्यनिष्ठा आणि एकमेकांस सौख्य देण्याची उत्कट इच्छा ह्यांचें निवासस्थानच होतें. स्टेड साहेब सुमारें २४ वर्षांचे असतां ह्यांनीं लग्न केलें. ह्या पतीपत्नींचें एकमेकांवर अकृत्रिम प्रेम असे. स्टेड ह्यांनीं स्वीकारलेल्या व्रतास ह्यांची पत्नी अंतःकरणपूर्वक मदत करीत असे. आरंभीं घरांतील कामकाज पाहण्यास एक लहान मुलगी मोलकरीण ह्मणून ह्यांच्या घरीं असे, व बहुतेक काम स्टेड साहेबांच्या पत्नीवरच पडे. स्टेड 'नॉर्दर्न एको' पत्राचे संपादक असतांना डालिंग्टन गांवाबाहेर दोन मैलांवर राहत असत. ह्यांनां मुलें होऊं लागलीं तेव्हां मुलांचींहि बहुतेक कामें ह्यांच्या पत्नीसच पहावीं लागत. स्टेडची पत्नी मुलांनां घडे समजावून सांगे, ह्यांचे धडे घेई, ह्यांचे कपडे शिवी व मोलकरणीच्या साहाय्यानें स्वयंपाक करणें, धुणें वगैरे गृहकृत्यें करी. ह्याशिवाय स्टेडसाहेबांच्या कामांत तिची मदत असेच. घरीं ह्यांची पत्नीच ह्यांचा कारकून व साहाय्यक असे. ह्यांचीं मुलेंहि जसजशीं मोठीं होऊं लागलीं तसतशी आईबापांनां मदत करूं लागलीं.

ह्यांचें डालिंग्टन येथील घर गांवाबाहेर बऱ्याच अंतरावर होतें. घराला लागूनच स्टेड साहेबांची तीन एकर जागा होती. ह्यांच्याजवळ एक गाय, तट्टू, कांहीं बकरे, ससे, कुत्रीं, मांजरें वगैरे वरीच मंडळी होती. स्टेड साहेब संपादकाचें काम संभाळून बागेंत व शेतांत खपत असत. ह्यांचें घर शांत व एकांत अशा जागीं असे. शहरांतील गडबड, धूळ व धूर हीं तेथें नव्हतीं. घरासभोंवतीं फुलांनीं शोभणारीं सुंदर झुडपें होतीं. वृक्षांच्या छायेनें तें स्थान विशेष रमणीय दिसत असे. अशा ह्या रमणीय ठिकाणीं मुलें पक्ष्यांची व गुरांची काळजी घेऊन ह्यांच्याबरोबर खेळत व घरांत आईस आणि बागेंत व शेतांत बापास मदत करीत.

ह्यांचें जीवित केवळ शांततेंत गेलें असें नाहीं. ह्यांच्यावर कित्येक वावटळें येऊन गेलीं; परंतु अचल कर्तव्यनिष्ठेपासून ते तिळभरहि ढळले नाहींत. क्षुब्ध झालेल्या लोकांनां शांत करण्याचे प्रसंग ह्यांच्यावर हमेश येत. हे प्रसंग मोठे कठिण असत. अशा एके प्रसंगीं १८७६-८ मधें रशिआवरोबर युद्ध करण्यासाठीं लोकांत मोठी खळबळ उडालेली होती. ही खळबळ शांत करण्याचा स्टेडसाहेब प्रयत्न करीत होते. अशा प्रसंगीं स्टेड हे रशिआचे हेर आहेत व ह्यांनां ठार करून टाकूं, अशा धमक्या येऊं लागल्या. एकदां मध्यरात्रीच्या सुमारास घरीं परत येतांना एकटेच शेतांतून चालत असतां ह्या धमक्यांप्रमाणें खरोखरच कोणी करील कीं काय, हा विचार ह्यांच्या मनांत आला. ते घरीं पोंचले तेव्हां ह्यांची पत्नी आपल्या अर्भकास जवळ घेऊन शांतपणें निजलेली होती. स्टेडसाहेब जवळ जाऊन वांकून तिच्याकडे पाहूं लागले व मनांत विचार करूं लागले कीं माझें कांहीं बरें वाईट झालें तर माझ्या पत्नीचें व मुलांबाळांचें काय होईल? लागलाच ह्यांच्या मनांत दुसरा विचार आला कीं, जर लढाई झाली तर शेंकडों आया व मुलें अनाथ आणि निराश्रित होतील. ह्यांच्यावर असा प्रसंग येऊं नये ह्मणून माझा बळी द्यावा लागला तरी हरकत नाहीं! आपल्या कुटुंबाच्या सौख्यासाठीं सार्वजनिक कर्तव्याची ह्यांनीं कधीं हयगय केली नाहीं. ह्यांच्या पत्नीनें व मुलांनींहि ह्यांनां कर्तव्यपराङ्मुख करण्याचा कधींहि प्रयत्न केला नाहीं.

ह्यापुढें पॉल मॉल गॅझेटचे मुख्य संपादक होऊन ते मॉर्ले साहेबांस साह्य करण्यास गेले, तेव्हांहि राहण्यासाठीं विंबलडन पार्कमध्यें ह्यांनीं एक वृक्षाच्छादित घर पाहिलें. येथें ह्यांनां आणखी दोन मुलें झालीं. ह्यांची सांपत्तिक स्थिति आतां सुधारली होती व मुलांनां शिकविण्यासाठीं ह्यांनीं एका सुशीलबाईची योजना केली होती. ही बाई फार कष्टाळु, प्रेमळ व कर्तव्यदक्ष असे. मातेप्रमाणें ममतेनें ती मुलांवर देखरेख ठेवीत असे. तिच्यानंतर एकदोन शिक्षकांची योजना केली होती. हे शिक्षक देखील चांगले निवडलेले होते.

घरीं, मित्रमंडळींत किंवा सार्वजनिक पटांगणावर स्टेडच्या अंगचे गुण स्पष्टरीतीनें दिसून येत. ह्यांचें सार्वजनिक जीवन मोठमोठ्या घडामोडी करण्यांत गेल्यामुळें तें बहुतेक कलहात्मक होतें. तेथें ह्यांनां पुष्कळ शत्रु झाले. घरीं व मित्रमंडळींत स्टेड ह्यांच्या अंगचे उत्तम गुण दिसून येत व ह्यांच्याकडे सर्वांचीं मनें आकर्षण पावत असत. ह्यांचा स्वभाव फार प्रेमळ व मनमिळाऊ असे. ह्यांची भाषणशैलीहि मोहक असे. गृहस्थ ह्या नात्यानें ते सर्वांच्या आदरास व प्रेमास पात्र होत असत.

परकीयांच्या हक्कांचें रक्षण करणारा, स्वदेशाचें कल्याण चिंतून आपल्या देशबांधवांचा दर्जा वाढविण्यासाठीं अहोरात्र परिश्रम करणारा व दुःखित आणि गांजलेल्या लोकांचा कैवार घेणारा स्टेड साहेबांसारखा पुतळा रत्नप्रसविनी आंग्लभूमीतहि विरळाच आढळतो.



विचारतरंग.

कवि— [Bee.]



[चाल—गजाननाची करुनि स्तुती]

नीलप्रभ निर्मल गगनीं
विशुद्ध वाहे सुरतटिनी
पारावारीं समवटुनी
रमती विबुधरमणरमणी.

चंद्र सुधामय पुष्करिणी
गगनाला शोभा आणी
दीप्तींचीं लेवुनि दुकुलें
तारागण तेथें जमले.

क्षुब्धार्णवजलमग्नाला
दाखविती हे मार्गाला
भोगाचा कर्तव्याचा
मेळ मनोहर हा साचा !

वाटे, तारा होवोनी
विचरावें अवघ्या भुवनीं
धरणीच्या हृदयावरती
क्षेपुनि कर हंसवावी ती !

[२]

विहंगमोत्तम कीं व्हावें
आकाशीं वरवर जावें !
नूतन नूतन प्रांतातें
आक्रमुनी जावें वरतें.

उदयगिरीच्या पलीकडे
बालरवीचा किरण पडे
प्रथम करुनि त्याला प्रणती
शुभवार्ता कळवूं जगतीं—

"घोर निशा संपुन गेली !
मंगळ वेळ जवळ आली !
खंत सोडुनी कामाला
लागा, रवि उदया आला ! "

हताश जे झाले सज्जन
चैतन्याचें संचरण
करणें त्यांच्या देहांत
भाग्य हें थोड्यांना प्राप्त !

[३]

सोप्या सोप्या शब्दांनीं,
स्फूर्तिसूत्रानें गुंफोनी,
मंजुळ मंजुळशीं गाणीं
रचुनी, रसिकान्तःकरणीं—

हळू शिरावें चोरोनी,
जावें भीषण लोपोनी,
हौस मनीं ही असे परी
टीका तीतें विफल करी !

अंतःकरणपटावरती
आत्यंतिक वेगें उठती
दिव्य लेख उन्मेषाचे
धरावयातें स्मृति काचे.

बुद्धीच्या भिंगावरती
बिंबित ज्या प्रतिमा होती
शब्दचित्र त्यांचें कसलें
नकळे काढिल मन दुबळें!

[४]

सरस्वतीकंठाभरण
वाचुनि हें वरचें कवन
गद्गद वदला हांसोन
"धन्य कवी! कविता धन्य!

शब्दचमत्कृति यांत नसे,
गांभीर्याचा लेश नसे,
सत्याचाही गंध नसे
'हनुमंताचें पुच्छ जसें!'"

वानर होता नर झाला
ग्रहण लागलें ग्रहगोलां
धूमकेतु गगनीं आला
विषय असे ध्या कवनाला.

सिद्धांत घेउनी शास्त्रांचे
करा कथन त्या सत्यांचें
पुरे पुरे कल्पना पुरे
काळ मागला आज सरे.

[५]

थांबा थांबा रसिकवरा!
गिरा आपुली पुरे करा!
प्राण कल्पना काव्याला
न कळे हें मतिमंदाला.

एक न घड भाराभर ती
चिंध्यांची खोगिरभरती
तुटपुंज्या ज्ञानें फुगती
रसज्ञ अपणाला म्हणती.

पंडितपण तें रसिकपण
बहुधा असती हीं भिन्न
दोहींचा अन्वय एकीं
सांप्रत दुर्मिळ ह्या लोकीं!

महाराष्ट्रकविपरंपरा
खंड न पडला तिला जरा
उणीव रसिकांचीच परी
आज भासते खरोखरी.

भौतिक शास्त्रीं वा काव्यीं
कल्पकता वैभव मिरवी
अभेद मज दोहोंत दिसे
कोण श्रेष्ठाणें, कोण पिसें?

जें जें विश्वीं ज्ञेय असे
त्यांत कल्पना मात्र वसे
करा कल्पना वजा वरें
म्हणजे बाकी शून्य उरे!

[६]

संगम हृदयंगम साचा
म्हणाल अलि या युगुलाचा,
अथवा सज्जन रसिकाचा
सहजमनोहर कवितेचा!

एक संवाद.

उद्योगदेवता—ताई, तूं वडील आहेस, सर्वांच्या मुखीं तुझ्या योगानें अन्न पडतें ह्या सर्व गोष्टी खऱ्या; परंतु इतक्यावरून बहुतेक आर्यावर्त आपलाच भाग म्हणून तूं घेऊं पाहतेस हें ठीक नाहीं. आपल्या कनिष्ठ भगिनीची इतकी हेळसांड करणें बरोबर नाहीं.

कृषिदेवता—मी तुझी हेळसांड करीत नाहीं; पण हे लोक माझ्याच भजनीं लागतात, त्याला मी काय करूं ? आणि त्यांनीं तरी माझ्या भजनीं कां लागूं नये ? त्यांचें पालनपोषण मी करतें हें तूं पहातेसच आहेस.

उद्योग०—तुझ्या भजनीं लागल्यानें त्यांचें नुकसान किती होतें त्याचा कांहीं तरी विचार कर. शेतीवर उपजीविका करणारे लोक बहुधा बावळट असतात. त्यांचें जीवित पावसावर अवलंबून असल्यामुळें ते प्रारब्धवादी व आळशी होतात. त्यांच्यांत जूट नसते. आपलें रक्षण करण्याचें सामर्थ्य नसतें.

कृषि०—पुरे कर, पुरे कर ! तुझ्या भजनीं लागलेल्या लोकांची अवस्था मला माहित आहे. शेती करणारे लोक उघड्या हवेंत वावरत असल्यामुळें निरोगी व सुदृढ असतात. उद्योगधंद्यांच्या पाठीस लागलेले लोक शहराच्या कोंदट हवेंत राहून निःसत्व व रोगी होतात. एकादी गिरणी सुटायच्या वेळीं दरवाजावर उभें राहून बाहेर पडणारीं जिवंत प्रेतें व भूतें पाहशील तर तुझ्या भक्तांची काय स्थिति होते तें लक्षांत येईल. खाणींत काम करणाऱ्या लोकांची स्थिति तर ह्याहून वाईट असते. त्यांचा सारा जन्म कावाडकष्ट करण्यांत जाऊन मनाच्या सर्व उच्च भावनांचा नायनाट झालेला असतो.

उद्योग०—आणि तुझे भक्त सावकारांच्या कचाटींत सांपडून मरणोन्मुख झालेले असतात, त्यांचा विचार तूं कोठें करतेस ? शिवाय मुसला मजूरांचीच स्थिति तेवढी तुला दिसते, पण मोठमोठ्या कारखान्यांच्या मालकांची स्थिति तर पहा !

कृषि०—आहे माहित ! गरिबांनां चरकांत घालून पिळून काढून त्यांच्या जीवावर, श्रीमंती भोगणारांची गोष्ट मला कशाला पाहिजे ? एकानें ऐषआरामांत लोळावें व दहा हजारांनां धड अंगवस्त्र मिळूं नये, हा तुझा प्रभाव !

उद्योग०—ताई, तूं रागावूं नको. मला एकापेक्षां दहा हजारांचीच अधिक काळजी आहे. परंतु आपल्या मनाप्रमाणें गोष्टी घडून येण्यास बराच काळ जावा लागतो. ज्या माझ्या भक्तांवर लक्ष्मीची कृपा आहे, त्यांचे डोळे हळुहळू उघडत आहेत, ते मजूरांची स्थिति सुखावह करण्यास झटत आहेत, आणि जे झटत नाहींत त्यांच्या डोळ्यांत चांगलें अंजन घालण्यांत येत आहे. परंतु हा सर्व माझा प्रभाव. माझे भक्त कितीहि हलके असले तरी जुटीनें ते मोठमोठ्यांस मान वांकविण्यास भाग पाडीत आहेत. तुझ्या भक्तांची मात्र तशी स्थिति नाहीं. त्यांच्यांत जूट नाहीं, सामर्थ्य नाहीं, आत्मप्रत्यय नाहीं. त्यासाठीं तूं तुझ्या धाकट्या बहिणीचा हिस्सा आपणच बळकावूं नकोस.

उद्योग०—माझ्या भक्तांच्या अंगचे दोष जसे तुला दिसतात, तसेच तुझ्या भक्तांच्या अंगचे दिसते तर ह्या भांडणास कारणच राहिलें नसतें. तुझ्या भक्तांनां द्रव्याशिवाय कांहीं दिसतच नाहीं. एकाचे दहा, दहाचे शंभर, शंभराचे हजार, हजाराचे लाख, लाखाचे कोटी, ह्याप्रमाणें जन्मभर मोहरा वाढविण्याचाच त्यांचा उद्योग चाललेला असतो. द्रव्य मिळविणें हाच त्यांचा पुरुषार्थ, हाच त्यांचा धर्म. द्रव्याशिवाय दुसरा देव त्यांनां दिसत नाहीं. संपन्न लोकांची ही स्थिति. गरीबांनां गिरणींतील एकाद्या यंत्राप्रमाणें जन्मभर खपावें, श्रीमंत लोकांच्या चैनीसाठीं राबत रहावें, इतकेंच माहीत. श्रीमंतांनीं पैशाच्या जोरावर पशूप्रमाणें यथेच्छ वर्तन करावें व गरीबांनां जड यंत्राप्रमाणें राबवावें ही तुझ्या राज्यांतील स्थिति.

उद्योग०—कांहीं काळापूर्वी माझ्या राज्यांत अशी स्थिति होती, हें मला कबूल आहे. पण सध्याचें युग निराळें आहे. धर्मार्थ दवाखाने, रुग्णालयें, मोठमोठीं विद्यालयें, शास्त्रीय ज्ञानप्रसारासाठी काढलेल्या मोठमोठ्या संस्था, त्यांकडे जर दृष्टि देशील, तर हल्लींच्या मनुष्य



कृषिदेवता आणि उद्योगदेवता.

[चित्रकार—श्रीयुत अ. म. माळी, मुंबई.]

श्रीमंत लोकांचें ध्येय काय आहे किंवा काय होत आहे, तें तुला कळेल.

कृषि०—मीं अगदींच खेडवळ असलें, तरी तुझ्या राज्यांत कोठें काय चाललें आहे तें ऐकून तरी मला ठाऊक असेल ! तुझ्या माहेरघरीं मोठमोठे सेंप व दंगेधोपे होत आहेत, त्याची तुला कांहीं तरी शरम असायला पाहिजे होती !

उद्योग०—त्याचा मला उलट मोठा अभिमान वाटतो. माझ्या राज्यांतील अति निकृष्ट स्थितींतील लोकांच्या अंगीं इतकें सामर्थ्य आहे, एकमेकांस साह्य करण्याची इतकी उत्सुकता आहे, हें सुचिन्ह नव्हे काय ? सध्यांची माझ्या भक्तांची स्थिति समाधानकारक नाहीं; परंतु ही स्थिति सुधारत आहे. आणखी एकदोन शतकांत मोठेंच स्थित्यंतर झालेलें दृष्टीस पडेल अशी मला उमेद आहे.

कृषि०—तूं माझ्या नांवानें उगाच खडे फोडूं नको. दास्यपिशाचिकेनें ह्या हतभागी लोकांस गांजलेलें आहे. त्यामुळें त्यांची अशी अवस्था झाली आहे. ह्या पिशाचिकेच्या जाचांतून जर ते सुटतील तर त्यांची उन्नति होण्याला अवधि लागणार नाहीं. हिनें ग्रासलेल्या लोकांच्या अंगीं त्राण कसें तें मुळींच रहात नाहीं.

उद्योग०—मला वाटतें, कीं, हे लोक आधींच निःसत्व झालेले आहेत, म्हणून ह्या पिशाचिकेच्या तावडींत ते सांपडतात. ते माझ्या भजनीं लागतील तर त्यांच्या अंगीं नवीन जोम व तरतरी येईल.

कृषि०—त्याचें त्याला बरें वाटत असतें इतकेंच. तूं त्यांची तृष्णा अनिवार वाढवून कदाचित् त्यांनां अत्याचार करण्यास प्रवृत्त करशील. कोणीकडून तरी त्यांचें कल्याण व्हावें हीच माझी इच्छा आहे. सध्यांची स्थिति तुझ्या मनास येत नसेल तर आपण तुझ्या म्हणण्याप्रमाणें कांहीं फेरफार करूं, म्हणजे तर झालें ?

उद्योग०—माझें म्हणणें कांहीं फार नाहीं. ह्या आर्यावर्तांतील बहुतेक सर्व लोकांनां तूं आपल्या भजनीं लावतेस, त्या योगानें त्यांचें फार नुकसान होतें, तर आपण पुनः वांटणी करूं व माझ्या योग्यतेप्रमाणें *मला हिस्सा मिळेल अशी व्यवस्था करूं.*

कृषि०—त्यापासून लोकांचें कल्याण होईल असें तुला वाटतें ? मला तर वाटतें कीं शेतकरी लोकांनां अधिक शिक्षण मिळूं लागलें, ते शास्त्रीय ज्ञानाचा व नवीन शास्त्रीय शोधांचा शेतीच्या कामीं उपयोग करूं लागले, तर ह्या देशाची स्थिति ताबडतोब सुधारेल. 'उत्तम शेती' म्हणतात तें तुला माहित आहे ना?

उद्योग०—मला माहित आहे. परंतु वडील बहीण कितीहि शहाणी झाली, तरी तिनेंच सर्व हिस्सा घेणें बरोबर नाहीं. इतकीं वर्षे तूं माझ्या हिश्शाचा उपभोग घेतलास; आतां कांहीं वेळ आपण न्यायानें वांटणी करून पाहूं. त्यापासून हित झालें तर ठीकच, नाहीं तर पुनः ही स्थिति आहेच. इतक्यांत तुझ्या मुलांनां–शेतकऱ्यांनां शिक्षण देऊन पहा. तें देखील कांहीं वाईट नाहीं. आपल्या हातून होतील तितके प्रयत्न करून पहावें. यश देणार परमेश्वर आहे.

उपयोगी वस्तूंपेक्षां निरुपयोगी वस्तूस विशेष महत्त्व देऊं नये; तथापि तिचा उपहास करणें मूर्खपणा होय !

दुर्बलांनीं बलिष्ठांशीं संग करूं नये; जलप्रवाहांतील मातीचें भांडें व धातूचें भांडें यांच्या संगतीचा परिणाम दोघांपैकीं कोणावर घडेल ?

दुसऱ्याची थट्टा करण्यांत समाधान मानणें भलेपणा नव्हे; मात्र हा नियम थट्टा सहन न होणारासच लागू होईल !

सद्यःस्थितीचा अनादर करून दुसरीची इच्छा धरूं नये; कारण दुसरी सुसावह होईलच हें कशावरून ?

वाईट गोष्टीपासून जरी आपणास फायदा असला तरी वाईट ती वाईटच !

जसें लहानसेंहि भोंक असलेलें भांडें निरुपयोगी होय, तसेंच ज्याच्या मनांत लहानशीहि गोष्ट रहात नाहीं तो मनुष्य निरुपयोगी समजावा.

दुसऱ्याचें दुर्गुण शोधीत बसण्यापेक्षां स्वतःच्या चुका सुधारण्यांत वेळ घालविणें जास्त चांगलें !

फळें व छाया असलेल्या वृक्षाखालीं बसणें जास्त चांगलें. कारण निदान फळें मिळालीं नाहींत तरी छाया मिळेल.

गृहसौख्य.

जगांत अशा तऱ्हेचीं माणसें आहेत, कीं, तीं कुठेंहि असलीं किंवा कोणत्याहि स्थितींत असलीं, तरी सोबतीच्या मनुष्यास सुख देतात, व स्वतःहि आनंदांत असतात. ही गोष्ट स्त्रियांनां तर विशेष लागू पडते. अशा स्त्रीचे हातीं चार जरी भांडीं मिळालीं, व एकाद्या चाळींतील एकाच खोलींत रहाण्यास जागा मिळाली, तरी तशा स्थितींतहि ती आपल्या पतीस खरें खरें गृहसौख्य देते, व तिलाच 'गृहिणी' हें उभपद पूर्णपणें शोभतें. पण याच्या उलट गोष्ट मात्र पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडते. केवढाहि मोठा टोलेजंग वाडा असला, पैशानें मिळणाऱ्या सर्व सुखांचे आनुकूल्य असलें, चाकरमाणसें हुकुमासारखीं 'जी' करण्यास तयार असलीं, तरी खरें म्हणून जें गृहसौख्य, जें आपणास नेहमीं हवें असतें, व ज्याची कल्पना पुष्कळांस मनांतले मनांत करून खिन्न होऊन रहाणें भाग पडतें, तें नेहमींच तेथें आढळेल असें नाहीं.

गृह हेंच खऱ्या सुखाचें साधन आहे, मग आपला संसार कितीहि गरिबीचा असूं द्या. दारांत पाय ठेवण्याबरोबर आपण भाडोत्री बिऱ्हाडांत शिरतों, कीं सौख्यशिखराबर बसविणाऱ्या 'गृहांत' शिरतों, हें तावडतोब कळून आल्याशिवाय राहणार नाहीं.

दोन घरांत अगदीं त्याच तऱ्हेचें सामान आणून ठेविलें, आणि तीं दोन निरनिराळ्या कुटुंबाच्या स्वाधीन केलीं, तर एकाला 'गृह' ही संज्ञा पूर्णपणें लागू पडेल, व दुसऱ्यास 'बिऱ्हाड' म्हणणें अतिशयोक्ति होणार नाहीं. या दोन ठिकाणीं इतका फेरफार दिसून येईल.

मग 'गृह' याची कल्पना तरी काय ? तेथें घरांतील सर्व माणसें गुण्यागोविंदानें रहातात व संगतीच्या मनुष्यांवर मायेचें पांघरूण घालतात. बाकी इतर ठिकाणीं ही सुजनता तर आढळत नाहींच; पण उलट बाजारांत बड्या बड्या दुकानांत ज्या तऱ्हेचा दिखाऊपणा आढळतो, तशा तऱ्हेचा भपका व दिखाऊपणा, किंवा निष्कारण धुसफूस यांचा मात्र पूर्ण अंमल असतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, गृहांमध्यें प्रेम व आस्था यांचें साम्राज्य चालत असतें. पण सध्यां आपण पाहूं लागलों तर बहुतेक ठिकाणीं उपेक्षा व बेपर्वाई हींच दिसून येतात; मग ती बेपर्वाई दुसऱ्याच्या विचारासंबंधीं असो, कीं मनोवृत्तींसंबंधीं असो.

ह्या गृहामध्यें शिरण्याबरोबर तुमचें मन आनंदित व उल्हासित होतें. कारण सर्व कांहीं तेथें सुसंगत लावलेलें दिसतें, व सर्वत्र शांतता नांदत असते. येथें गृहिणी प्रीतियुक्त होत्साती सुईनें काम करीत असलेली दृष्टीस पडते; ती तें काम आपल्या प्रियपतीच्या द्रव्याची काटकसर करण्याकरितां करीत असते. येथें पुनः सारा दिवसभर भाकरीसाठीं धडपडणाऱ्या आपल्या पतीच्या डोक्यावरील ओझ्याचा भार सहस्रांश तरी हलका करण्याच्या इच्छेनें ती सारखी खपत असलेली दिसते. कारण तिला माहित असतें, कीं, पतीनें सारखें खपून मिळविलेल्या भाकरीचा तुकडा त्याच्या तोंडांत

शांततेनें जाऊं देणें हें आपलें कर्तव्य आहे, व हेंच आपल्या 'अर्धांगी' नांवाला शोभतें. अशाच घरांत, दारांत पाय ठेवण्याबरोबर मधुर व गोड शब्द नवऱ्याच्या कानीं पडतात, व आपणावर मनापासून प्रेम करणारी व आईपेक्षांहि विशेष वात्सल्यानें काळजी घेणारी गृहिणी मिळाल्याबद्दल तो मनांतून परमेश्वराची स्तुति करतो, व त्याचे धन्यवाद गातो.

तुम्ही 'रामरावां'च्या दुमदार दिवाणखान्यांत शिरा व 'मधुकरा'च्या लहानशा खोलींत पाय ठेवा. पण मधुकराच्या खोलींत पाय ठेवण्याबरोबर जो तुम्हाला आनंद व उल्हास वाटेल, त्या प्रकारचा उल्हास रामरावांच्या बड्या दिवाणखान्यांत तुमच्या मनास मुळींच शिवणार नाहीं. तुम्हांला त्या खोलींतील सुव्यवस्था व सुसंगतता पाहून आश्चर्य वाटेल, व उलट त्या दिवाणखान्याच्या मालकाची त्याच्या कमनशिबाबद्दल तुम्ही कींवच कराल ! याचें कारण काय, तर मधुकराची सुगृहिणी सुशीला स्वतःघरची देखरेख पहाते, व रामरावांची पत्नीपदारूढ झालेली 'बाईसाहेब' काम करण्यास कांहींच नसल्यामुळें, व असलें तरी अंग आटोक्यांत नसून हालवत नसल्यामुळें स्वस्थपणें पलंगावर सारा दिवस आळसांत लोळत असते.

ह्मणून खऱ्या गृहसौख्याची गुरुकिल्ली येथें आपणास सांपडते. प्रेम हेंच खऱ्या सुखाचें साधन आहे, व तें पाहिजे तें करूं शकतें. प्रेम असलें ह्मणजे त्याच्या जोडीला आस्था व कळकळ हीं धांवत येऊन मिळतात. जगांतील सर्व पैशानें मिळणारें सुख प्रेमाच्या गोड व मधुर शब्दानें होणाऱ्या सुखाच्या पासंगासहि पुरणार नाहीं.

खाणावळींतील वाढप्या—महाराज जेवणाच्या पूर्वी आपण भोजनाचे पैसे द्या.

प्रवासी—कां रे बुवा. मी का पळून चाललों का ?

वाढप्या—तसं नाहीं. मागें एकदा एका मनुष्याच्या घशांत घांस अडकून तो मेला. तेव्हां मालकानें माझ्या पगारांतून त्या मनुष्याचे पैसे कापून घेतले.

एका ह्मातारीचा मुलगा लढाईंत गळ्याला गोळी लागून मारला गेला. तिला जेव्हां हें समजलें, तेव्हां ती ह्मणाली "बरं झालं डोळ्याला गोळी लागली नाहीं. नाहीं तर लोक त्याला एकाक्ष ह्मणाले असते !"

एका मनुष्यानें आपल्या चाकराला दोन पैशांचें दूध आणावयास सांगितलें. चाकरानें गवळ्याच्या येथें जाऊन दूध आणलें, पण घरीं येतांना दुधाच्या भांड्यांत माशा पडल्या !

धनी—काय रे, तुला दोन पैसे देऊन तूं या माशाच का आणल्यास ?

चाकर—महाराज, तर काय दोन पैशांत हत्तीघोडा येईल काय ?

एका शाळेंत धार्मिक शिक्षण देत असत. शिक्षकांपैकीं एकास धर्माचें ज्ञान बेताचेंच असल्यामुळें त्यानें प्रश्नोत्तरें लिहून काढलीं व दररोज क्रमानें तो मुलांस प्रश्न विचारीत असे.

"तुला कोणीं निर्माण केलें ?"

"देवानें."

"पुराणें कोणीं लिहिलीं ?"

"व्यासानें."

एके दिवशीं पहिला मुलगा गैरहजर असल्यामुळें दुसरा मुलगा त्याच्या जागेवर बसला. शिक्षकानें नेहमींप्रमाणें विचारलें "तुला कोणीं निर्माण केलें ?"

"व्यासानें."

शिक्षक—नाहीं, देवानें निर्माण केलें.

शिष्य—सर, देवानें निर्माण केलेला मुलगा आज गैरहजर असल्यामुळें मी त्याच्या जागीं बसलों आहें.

"गाडी थांबवा, एक पॅसेंजर खालीं पडला."

कंडक्टर—कांहीं चिंता नाहीं. त्यानें भाडें दिलें आहे.

एक पत्र.

"चि. सौ. कमळाबाई, हीस आशीर्वाद.

आह्मी आज सकाळीं सुखरूप घरीं पोहोंचलों. प्रवासाची फारशी दगदग झाली नाहीं. तुझे यजमान स्टेशनावर आह्मांला पोंचवायला आले होते. त्यांनीं सामानाची वगैरे नीट व्यवस्था लावून दिली.

आपण वेगळाल्या गांवीं राहत असल्यामुळें भेटीचे प्रसंग क्वचित्च येतात; परंतु भेट क्वचित् होत असल्यामुळें ती विशेष आनंदावह असते. भेट होण्यापूर्वी मनाला जी उत्सुकता वाटत असते, तिच्यापासूनच किती मजा वाटत असते ! आणि भेट होऊन गेल्यानंतर किती दिवस तरी त्या स्वल्प अवधींत घडून आलेल्या गोष्टींचें मधुर स्मरण मनांत घोळत असतें !

पुढच्या दिवाळीला तूं यजमानांनां घेऊन आमच्या घरीं येण्याचें कबूल केलें आहेस, हें लक्ष्यांत असूं दे.

एका नाजूक बाबतींत तुला दोन गोष्टी सांगाव्या, असें माझ्या मनांतं होतें; परंतु समक्ष ती गोष्ट तुझ्या जवळ काढण्याचें मला धैर्य झालें नाहीं. येथें एकटी बसून स्वस्थपणें पत्रांत ती गोष्ट लिहिणें बरें, असें वाटून आज तसेंच करीत आहे. कमी अधिक लिहिण्याचा राग मानूं नको.

घरांत नवराबायकोनें एक विचारानें चाल-ल्यापासून दोघांस सौख्य होतें. कोणत्याहि बाबतींत नवरा आपला हेका सोडीत नाहीं असें आढळून आलें, तर बायकोनें आपला हेका सोडावा. नवऱ्याचा मार्ग व बायकोचा मार्ग परस्परांच्या विरुद्ध असणें बरें नाहीं. नवऱ्याचा मार्ग आपणाला बरा दिसत नसेल तर युक्तीच्या मार्गानें त्याला दोन शब्द सांगावे, व त्याचें मन वळलें तर पहावें. हें साध्य नसेल तर बायकोनें आपला मार्ग बदलावा, व नवऱ्यास अनुसरून चालावें. ह्यासाठीं धुसपूस करूं नये, किंवा जिवाचा संताप करूं नये. नवऱ्याचें ऐकावयाचें तर तें मनापासून आनंदानें ऐकलेलें काय वाईट ?

नवऱ्याच्या तंत्रानें वागल्यापासून कदाचित् थोडें नुकसान होईल असें वाटलें, तरी हरकत नाहीं. नवराबायकोंत वितुष्ट उत्पन्न होण्या-एवढें नुकसान खचित होणार नाहीं ! नवरा-बायकोचा एक जीव आहे, तर झालेलें नुकसान भरून येण्यास वेळ लागणार नाहीं.

नवऱ्याला जुलमानें आपणाबरोबर आणण्या-पेक्षां आपण खुषीनें नवऱ्याबरोबर गेलेलें बरें.

आपण शांतपणानें व सहनशीलतेनें वागलों, तर नवऱ्याला स्वतःची चूक कळून येईल व पुढें आपोआप तो बायकोच्या ह्मणण्याला मान देऊं लागेल.

नवऱ्याची चूक पुनः पुनः दाखवून बायको त्याला हिणवूं लागली, तर मात्र तो हेकेखोर व त्रासिक होण्याचा संभव आहे.

घरांत कलह माजून राहणें हें सर्वांनांच वाईट. त्याचा परिणाम फारच भयंकर होतो. घरांत मुलें असलीं तर त्यांच्या मनावर ह्या कलहापासून फार अनिष्ट परिणाम होतो.

नम्रतेसारखें गृहिणीला भूषण नाहीं. आपलें शहाणपण स्थापित केलें, तर आपल्याला कोणी बक्षिस देत नाहीं, आपला मान वाढत नाहीं, आपल्याला एकादी पदवी मिळत नाहीं. जास्त बोलून आपला पक्ष खरा आहे असें स्थापण्याचा प्रयत्न करणें ह्यासारखा वेडेपणा नाहीं.

प्रसंगीं चूप राहिल्यानें जें काम होतें, तें तीन तेरा गोष्टी सांगितल्यानें होत नाहीं.

आपल्या हातून चुकी झाली नसतां, आपला अपराध नसतां, आपण चूप कां ह्मणून रहावें ? जास्त बोलून सत्य स्थापित होत नाहीं; जास्त बोलणाराची वाचाळता मात्र प्रगट होते. अपराधी मनुष्यानें गडबड करून अपराध लपविण्याचा पाहिजे असल्यास प्रयत्न करावा. निरपराधी मनुष्याला अधिक बोलण्याचें प्रयोजन नाहीं.

एकाद्या क्षुल्लक गोष्टींत आपलें ह्मणणें बरोबर असलें, तरी तें सिद्ध करण्यासाठीं आपल्या मायेच्या माणसांचें मन दुखविण्यास तयार होणें बरोबर होईल काय ?

मी कोणत्या गोष्टींस अनुलक्षून हें लिहिलें आहे, तें तुझ्या लक्षांत येईलच. माझें मत चुकीचें असलें तरी तूं सुखांत दिवस घालवावेस ह्या उत्कट इच्छेनेंच मोकळ्या मनानें मला सुचले ते दोन शब्द प्रांजलपणानें लिहिले आहेत. माझ्या लिहिण्याचा शांत मनानें विचार करशील, असा भरंवसा आहे.

तुझें सदैव हित चिंतणारी,

शांताबाई."

एक घाटी व एक कोकणी बाकू यांची एकदां गांठ पडली. दोघेहि आपल्या ठिकाणची बढाई सांगूं लागले. शेवटीं बाकूनें विचारलें " घांटावर ऊंस होतात काय ?"

" होय, होतात तर ! "

" ते किती उंच होतात रे ? "

" कोंकणांतील उंसापेक्षां पहा तीन हात अधिक उंच होतात ! कोंकणांत किती उंच होतात ? "

एक मुलगा फार घाणेरडा होता. तो स्नान कधींच करीत नसे. त्यामुळें त्याच्या अंगाला घाण मारी व इतर मुलें त्याला जवळ येऊं देत नसत. एके दिवशीं पंतोजीनें कंटाळून त्याला घरीं पाठवून दिलें व त्याला आंघोळ घालण्याविषयीं त्याच्या बापास निरोप पाठविला. दुसरे दिवशीं बापानें मुलाबरोबर पंतोजीस एक पत्र पाठविलें. त्यांत असें लिहिलें होतें:- " माझ्या मुलाला शाळेंत शिकण्यासाठीं पाठवीत असतों; त्याचा इतर मुलांनीं वास घ्यावा ह्मणून पाठवीत नसतों. माझा मुलगा गुलाबाचें फुल नाहीं तर त्याला चांगला वास येईल ! "

खंडो—कसें काय, तुमचें आतां बरें चाललें आहे ना ?

गुंडो—मोठी कठीण अवस्था आली आहे बुवा. उद्यां सकाळपर्यंत जर आठ आणे मिळाले नाहींत तर—प्रसंग असा कठीण आला आहे, कीं, माझ्या हातून जन्मांत जी गोष्ट होणार नाहीं असें सर्वांना वाटतें ती गोष्ट करावी लागेल !

खंडो—अरेरे, गरीब बिचारा ! हे घे आठ आणे. पण काय रे हे पैसे मिळाले नसते तर उद्यां तुझ्या हातून कोणती गोष्ट झाली असती ?

गुंडो—(पैसे नीट ठेवून) उद्यां काय—उद्यां पोटासाठीं कांहीं काम बघावें लागलें असतें.

एका मनुष्याला 'धर्म' पुस्तक पाहिजे होतें. त्यानें पुण्यांतील एका पुस्तकवाल्यास लिहिलें. त्याला जवाब आला कीं, " पुण्यांत धर्म नाहीं. मुंबईत तपास करा. "

एका शहरवासी मनुष्यानें एक शेत विकत घेतलें व विड्यांना चांगला भाव येतो हें पाहून त्यानें शेतांत विड्यांची पेरणी केली.

—३५—

बाई मोलकरणीला ह्मणते "अग गंगू, तूं पुनः काचेचा पेला फोडलास ? कितीदां सांगावं कुणाला टाऊक.

मोलकरीण—बाईसाहेब, असं झालं खरं. पण सुदैवानें त्याचे दोनच तुकडे झाले.

बाई—मग यांत सुदैवानें कसचं ?

मोलकरीण—नेहमीं तुकडे फार होतात व ते उचलायचे व गोळा करायचे ह्मणजे मोठा ताप होतो.

—३६—

एक वेडे शिकारी शिकार करण्याकरतां निघाले. निघतांना त्यांनीं बायकोजवळ प्रतिज्ञा केली, कीं, आज एक ससा आणल्याशिवाय परत येणार नाहीं. बायकोला यजमानांचा पराक्रम पूर्णपणें माहीत होता. ती ह्मणाली "तर मग लगेच एक विकत घेऊन टाका. नाहींतर आपण परत येण्यापूर्वी सर्व उत्तम ससे बाजारांत विकले जातील !"

—३७—

दासी आपल्या मालकिणीला ह्मणते "बाईसाहेब, भांड्यांच्या खोलींत एक आरसा असला तर बरें होईल."

मालकीण—अग, भांडी चक्क घांसून रांगेनें ठेवलींस ह्मणजे आरशाची गरज मुळींच नाहीं.

—३८—

गडी पायीं पायींच शेतांत आला. शेतकऱ्यानें विचारलें "गाडी व बैल कुठें आहेत ?"

गडी—मग बाबा, त्यो बैल फार बंगाळ. रस्त्यांमदी बसला. त्याला मारमार मारला पण इचभन् हालचना.

शेत—मग पुढें काय केलेंस तूं ?

गडी—त्या मुरदाड बैलास उठवावा ह्मनून काटक्या आणल्या, आन् त्याच्या पुडच्या पायामंधी ठेवून पेटवल्या. पन तो बैल लई बस्ताद. दोन पावल पुढें झाला, पण चालना. गाडी समदी जळून गेली.

—३९—

एक गृहस्थ आपल्या बायकोला ह्मणतो "आज सकाळीं फराळाला बोलावलेली मंडळी फार कुलीन घराण्यांतली आहेत. समाजांतील उच्च वर्गामधें त्यांची गणना केली पाहिजे.

बायको—हें कशावरून ? त्यांचे पोशाख तर अगदींच साधे होते.

गृहस्थ—शंभराच्यावर मंडळी आली होती, पण चांदीचा चमचा किंवा चांदीची वाटी एकसुद्धां गमावली नाहीं !

—४०—

एक भोळसट गृहस्थ नुकताच खेड्यांतून आला होता. त्यानें स्टेशनावर जाऊन तिकिट मास्तरजवळ तिसऱ्या वर्गाचें तिकिट मागितलें.

मास्तर—आपण कुठें चालला ?

गृहस्थ—कुठें चाललां ? हें विचारण्याचें काम तुमचें नाहीं. तुह्मी आपलें तिकिट देऊन पैसे घ्या.

मास्तर—आपण कुठें चाललां हें कळल्याशिवाय मला तिकिट देतां येणार नाहीं.

गृहस्थ—हा तर जुलूम झाला बुवा ! बरें आहे, मला माझ्या लाडकीकडे जायचें आहे.

—४१—

मिसोनी नांवाचा प्रसिद्ध फ्रेंच चितारी होता, त्याच्या बायकोनें एक दिवस एक डाक्तरला बोलावलें. डाक्टरसाहेब आल्यावर तिनें आजारी असलेला आपला कुत्रा दाखवला. डाक्तर कुत्र्याजवळ गेला, व औषध वगैरे दिलें. पुढें नियमाप्रमाणें बिल आलें, तेव्हां त्यांत घरीं आल्यावद्दल आकार केला नव्हता. बाई कांहीं केल्या ऐकेना.

डाक्तर ह्मणाला—मी कांहीं गुरांचा वैद्य नाहीं ! जर आपला आग्रहच असला तर माझ्या घराला रंग द्यायचा आहे. मिसोनी यांनां सामान घेऊन धाडून द्यावें.

—४२—

एक कवि आपल्या मुलीला ह्मणतो "अग गोदे, तें कुत्रें किती मोठ्यानें ओरडत आहे ! माझें लक्ष कामाकडे मुळींच लागत नाहीं.'

मुलगी—बाबा, त्या कुत्र्यानें काय करावें ? तुमच्या खुर्चीखालीं त्याची शेंपटी आडकली आहे.

—४३—

मांसाहारीबाई आपल्या नोकराला ह्मणते "महमद, खाटिकके दुकानपर जाव और उसकू मेंढीके पग हय क्या पूछो."

महमद गेला व अर्ध्या तासानें परत आला, व ह्मणाला "बाईसाब, मेंढीके पग है के नही ये मालूम होना मुष्कील है. उसके पावमे जूता है व उसे तुमान चढाया है."

स्वयंपाकघरांतील गोष्टी.

मनोरंजनांत या विषयास जागा मिळाल्यापासून, आम्हां स्त्रियांनां आपले विचार नमूद करण्यास एक स्वतंत्र साधन मिळालें आहे. या सोयीचा उपयोग थोड्या-बहुत प्रमाणानें होत आहेच; या सोयीचा उपयोग माझ्या भगिनींनी अधिक करून घेतला पाहिजे.

स्वयंपाकघर स्वच्छ व सुव्यस्थित ठेवण्याचें कर्तव्य स्त्रियांचें आहे. अर्थात्, त्यांत आपणास उपयोगी पडेल अशी सोयीवार व्यवस्था करून घेणें आमचें कर्तव्य आहे. स्वयंपाकघरांत मोरी मोठी असावी व पाटा आणि वरवंटा ठेवण्यास चुनेगचीची फरशी करून घ्यावी. पाणी जाण्याकरितां मोरीला ज्याप्रमाणें नळ असतो, त्याप्रमाणें त्या जागेला नळ काढावा, म्हणजे पाटा धुतल्यानंतर जमीन ओली रहात नाहीं. नाही तर पाणी सांडल्यामुळें जमिनीला ओलावा येऊन स्वयंपाक-घरांत वावरणारांनां त्रास होतो. स्वच्छतेकडे पूर्ण लक्ष्य ठेवावें, म्हणजे आपल्या आरोग्याला तर फायदा होतोच, पण स्वच्छतेनें तयार केलेल्या पदार्थांचीं चवसुद्धां कांहीं निराळीच लागते. याचा अनुभव बहुतेकांनां असेलच.

भाज्या व इतर पदार्थ दररोज बदलून करण्यास विशेष अडचण पडत नाहीं; परंतु दररोज नवीन चटणी करण्यांत फार अडचण पडते, असा पुष्कळ स्त्रियांनां अनुभव आला असेल. ज्या भगिनी निरनिराळ्या पदार्थांविषयीं मनोरंजनांत माहिती पाठवितील, त्यांनीं त्याबरोबर एकादुसरी चटणीची रीतहि पाठविली, तर ही अडचण नाहींशी होऊन, इतर नवीन पदार्थांबरोबर नवीन चटणीची माहिती महाराष्ट्रीय भगिनींनां अनायासें होईल.

खालीं एकदोन पदार्थ व एकदोन चटण्यांचे प्रकार देऊन मी हे दोन शब्द पुरे करितें.

पिळाच्या करंज्या.

अच्छेर रवा व अच्छेर सपीठ एके ठिकाणीं करून वाढावयाच्या चमचाभर तुपाचें मोहन घालून भिजवून ठेवावा. नंतर एक ओला नारळ खोवणीनें खवून ठेवावा. पावशेर बदाम पाण्यांत भिजवून, सोलून व त्यांच्या काचऱ्या करून ठेवाव्या. अदपाव बेदाणा व अदपाव खडीसाखर स्वच्छ करून ठेवावी. हे पदार्थ व पावशेर पिठीसाखर एकत्र करून ठेवावीं. मग भिजवून ठेविलेला रवा चांगला मळून कुटावा. त्याचा एक मोठा गोळा घेऊन चिरोट्यांस ज्याप्रमाणें तूप व तांदळाची पिठी एकत्र करून लावतात, त्याप्रमाणें सांटा लावावा. तांदळाची पिठी बत्तगाळ करून घेतलेली असावी. सांटा लाविल्यानंतर घड्या पाडून चिरोट्यां-प्रमाणें तुकडे पाडावे. नंतर एक तुकडा हातांत घेऊन 'स्कू'ला ज्याप्रमाणें पीळ असतो, त्याप्रमाणें त्याला पीळ पाडावा व तूप बाहेर न येईल अशी खबरदारी घ्यावी. मग त्याची पोळी लाटून त्यांत करून ठेवलेलें सारण भरावें व कांतणीनें कांठ कातून ती तळावी. याप्रमाणें सर्व करंज्या तळाव्या. या करंजीवर फेणी-प्रमाणें सूत दिसतें. त्यांनां पीळ पडतात म्हणून त्यांनां पिळाच्या करंज्या म्हणतात.

सुरळी होळगी.

हा पदार्थ कर्नाटकी लोकांत करण्याचा फार प्रघात आहे. अच्छेर रवा, व सपीठ थोडें मोहन घालून भिजवून ठेवावें. कोरड्या नारळाचा कीस, पावशेर पिठीसाखर व थोडे वेलदोडे कुटून हें सर्व एकत्र करून ठेवावें. भिजवून ठेवलेल्या पिठाच्या साध्या पोळ्या करून तव्यावर टाकाव्या. पोळी तयार झाली म्हणजे तिला तूप लावून सारण तीवर पसरावें. गुळाच्या पोळीचीं ज्याप्रमाणें घडी करितात, त्याप्रमाणें तिची घडी करून खालीं काढावी. या पोळ्या मधल्या वेळच्या फराळालासुद्धां उपयोगी पडतात.

चटणी–प्रकार पहिला.

ओल्या नारळाची एक वाटी, लसणाच्या सहा पाकळ्या, सुपारीयेवढें आलें, चहाचा चमचाभर तिखट, दीड चमचा मीठ, इतके जिन्नस बारीक वांटावे. एक छटाक चिंच भिजत घालून तिचा साधारण पातळ रस काढावा व दोन कांदे बारीक चिरून, वांटलेली चटणी व कांदे चिंचेच्या रसांत कालवावे व वाढण्यास द्यावी.

चटणी–प्रकार दुसरा.

दोन मोठे टमाटे व असल्यास हिरव्या मिरच्या बारीक चिरून तळून घ्याव्या. तळतांना त्यांत चहाचा चमचा धणे व तितकेंच जिरें घालावें. टमाटे तळून झाल्यावर चवीचें मीठ व चिंच घालून बारीक वांटावें. ही चटणी चांगली खमंग लागते.

सौ. त्रिवेणीबाई बक्षी, धुळें.

[२]

आपल्या जूनच्या अंकांतील, स्वयंपाकघरांतील गोष्टी, या सदराखाली 'स्त्रियांनां स्वयंपाकाचें ज्ञानच का नाहीं ?' हे उद्गार वाचून मनास वाईट वाटलें. वास्तविक पाहिलें असतां या बाबतींत आह्मां स्त्रियांची स्थिति चमत्कारिक झाली आहे. कारण, आह्मांपैकीं ज्यांनां स्वयंपाकाचें ज्ञान आहे, त्यांनां शिक्षण नसल्यामुळें आपले अनुभव दुसऱ्यांनां कळवितां येत नाहींत; आणि ज्यांनां शिक्षण मिळतें त्यांचा ओढा स्वयंपाकाकडे फारसा नाहीं ! चांगले स्वच्छ आरोग्यकारक व निरनिराळ्या प्रकारचे पदार्थ तयार करून, आपल्या घरांतील मंडळीस खाऊं घालणें, हें आमचें कर्तव्य आहे. असो. आतां इकडील दोन पदार्थांच्या रीति सांगून हा लेख पुरा करितें.

मुगाच्या वड्यांचा रस्सा.

प्रथम मुगाची डाळ पावशेर घेऊन भिजत घालावी व चांगली भिजली ह्मणजे ती स्वच्छ धुऊन वांटावी. त्यांत वेताचें तिखट, मीठ, हळद व जिऱ्याची पूड घालून ती कालवावी. मग चुलीवर कढई ठेवून व तींत तूप घालून त्या पिठाचे लहान लहान वडे किंवा भजीं तळावीं. दुसरें भांडें चुलीवर ठेवून त्यांत फोडणी करावी व ते वडे फोडणीस टाकून त्यांत थरेंच पाणी घालावें. नंतर त्या पाण्याच्या वेताचें तिखट, मीठ, मसाला, थोडी चिंच व गूळ घालावा. दोनचार कढ आले ह्मणजे हा रस्सा उतरून वाढावा.

कचोऱ्या.

कचोऱ्या पुष्कळ प्रकारच्या करितात. उडदाच्या डाळीच्या, बटाट्याच्या, ओले सोले किंवा वाटाण्याच्याहि करितात. प्रथम बटाट्याची कृति सांगतें. पहिल्यानें बटाटे घेऊन ते उकडावे व मग सोलून वांटावे. वांटतांना त्यांत वेताचें तिखट, मीठ, हळद व जिरें घालावें. मग बटाट्यांपेक्षां थोडी जास्त कणीक घेऊन, त्यांत तुपाचें मोहन घालावें, व ती साधारण घट्ट भिजवावी.

नंतर त्या बटाट्याच्या पिठाचा मोठ्या सुपारीयेवढा गोळा करावा. कणिकेचेहि दोन सुपारीयेवढाले गोळे करावे. मग जशीगुळाची पोळी करतांना त्यांत गूळ भरतात, त्याप्रमाणें त्यांत तें बटाट्याचें पुरण भरावें व पोळपाटावर लाटावें. पोळी फार मोठी लाटूं नये; पुरीसारखी लाटावी. नंतर कढईत तूप घालून त्या पुऱ्या तळाव्या. त्यांस कचोऱ्या ह्मणतात. उडदाच्या डाळीच्या कराव्याच्या असल्या, तर डाळ भिजवून वांटावी व वर सांगितल्याप्रमाणें सर्व कृति करावी. या तिखटमिठाच्या पुऱ्या ऊर्फ कचोऱ्या खाण्यास चांगल्या लागतात.

एक देशभगिनी, बाबराव्या, वाडन, (G. I. P. Ry.)

---

[३]

मैनावड्या.

या वड्या करण्याकरितां बदाम, पिस्ते, चारोळ्या, वेदाणा, तूप, साखर, केशर, वेलदोडे व जायफळ इतके जिनस घ्यावे. प्रथम बदाम व पिस्ते ऊन पाण्यांत भिजत टाकून सोलावे. दोघांचें प्रमाण सारखें असावें. कमीजास्ती घेऊं नयेत. नंतर, बदाम-किसण्याचें मशीन असेल तर त्यानें-किसावे; नाहीं तर बदाम व पिस्ते पाव्यावर साधारण बारीक, वेगवेगळे वांटावे. बदाम पावशेर असले तर चहाचे ५।६ चमचे तूप घालून, त्यांचा कीस चांगल्या कल्हईच्या भांड्यांत भाजावा, व किंचित् लाल रंग आल्यावर तो एका ताटांत काढून घ्यावा. त्याचप्रमाणें पिस्त्यांचा कीस भाजून वेगळ्या ताटांत काढून घ्यावा. बदाम व पिस्ते मिळून अच्छेर असल्यास दीडपावशेर जाड्या साखरेचा पाक करावा. तो साधारण तार येईसा झाल्यावर, दोन पातेल्यांत सारखा घ्यावा. एका पातेल्यांतील पाकांत केशर घालून त्यांत बदामाचा कीस टाकावा व तो गोळी घळेसा पका झाल्यावर, अर्धा चमचा वेलदोड्याची पूड व पाव चमचा जायफळाची पूड घालून तें मिश्रण चांगलें घाटावें. नंतर, एका ताटांत बदाम व पिस्ते यांच्या काचऱ्या, वेदाणा व चारोळ्या, थिरळ पसरून त्यावर पाकांत टाकलेला बदामाचा कीस थापावा व लागलीच बदामाप्रमाणें केशर न घालतां पिस्त्याचा कीस पाकांत टाकून बदामांचे थरावर त्याच ताटांत थापावा; सालच्याप्रमाणें वरहि मसाला घालावा आणि कालथ्यानें आपणाला पाहिजे असतील तेवढे काप काढावे. या वड्या एका बाजूनें हिरव्या व दुसऱ्या बाजूनें केशरी असतात, यामुळें फारच सुंदर दिसतात.

चैत्र मासांत गौरीच्या फराळाचे ताटांत ह्या चांगल्या शोभतात. बदाम व पिस्ते या दोन धरांचे मध्यें चांगला ताजा खवा घेऊन थोड्या पाकांत घालून थापावा. केशर घालूं नये. ह्मणजे तीन सुंदर रंग दिसतात.

बदामाचे बतासे.

हे बतासे करण्याकरितां रात्रीं थंड पाण्यांत बदाम भिजत घालावे. ऊन पाण्यानें त्यांना चिवळसर रंग येतो. नंतर सकाळीं सोलून त्यांच्या बारीक काचऱ्या करून चांगल्या खडखडीत वाळवाव्या. वाळल्यानंतर स्वच्छ दगडी खलबत्त्यांत घालून अगदीं बारीक कुटाव्या आणि पांढरें स्वच्छ फडकें चारपांच पदरी करून त्यांत कुटलेले बदाम घालावे व तें फडकें पाटावर ठेवून, वरून बत्त्यानें हळुहळू कुटावें. ह्मणजे त्यांतील तेलकट अंश निघून जातो. जागा बदलून तेलकटपणा जाईपर्यंत असें कुटावें. मग त्याला किंचित् दुधाचा हात लावून सुपारी एवढाल्या गोळ्या करून, खडी साखरेच्या पुटीवर लाटाव्या. पापडी लाटल्यावर, खडीसाखरेची पूड, वेलदोड्याची पूड, जायफळाची पूड व केशराची पूड, यांचें मिश्रण करून तें घालावें व वर पापडी घालून हळुहळू कांठ चेपावे. नंतर वरून थोडेसे लाटावे. जितके पातळ करावे तितके चांगले दिसतात; पण, फार पातळ होत नाहींत ह्मणून जपून लाटावे. याप्रमाणें सर्व तयार झाल्यावर एका ताटांत ठेवून वर एक ताट उपडें घालावें व खालीं वर साधारण मंद निखारे घालून पकें होऊं द्यावे. कांहीं वेळानें झांकण काढून पहावें. किंचित् लाल रंग दिसून फुगले ह्मणजे काढावे. यांनां जाळी सुटली ह्मणजे उत्तम झाले असें समजावें.

हे बतासे केशरी व गंगाजमनीहि (एक पापडी केशरी व दुसरी पापडी पांढरी) करितात.

बदामाची वर्फी.

वरीलप्रमाणें बदाम किसावे अगर बांटावे. पावशेर बदामाचा किस असल्यास चहाचे सहा चमचे तुपांत भाजावा व पावशेर साखरेचा पाक करून, त्यांत बदामाचा किस, अर्धा पावशेर ताजा खवा, केशर, वेलदोडे व जायफळ यांची पूड, इतके पदार्थ घालून हें मिश्रण चुलीवर घाटावें व गोळी होण्यासारखें झाल्यावर एका ताटांत थापावें. थापतांना मैनावड्यांप्रमाणेंच खालीं वर मसाला घालावा व काप पाडावे.

आंब्याची चटणी.

ही चटणी करण्यास आंबे स्वच्छ धुऊन सोलावे व किसणी धुऊन किसावे. (नाहींतर कीस काळा होतो.) नंतर वरोवरीनें साखर घालावी. दोन वाट्या कीस असला तर अर्धा चमचा मिरचीचें कूट (उपासाला खातात तें) अर्धा कमीसा चमचा पांढरेलें मीठ, दोन अडीच बोटें लांबी रुंदीचा आल्याचा तुकडा बारीक चिरून अगर किसून घालावा.

या चटणींत व्हिनिगर नांवाचें एक औषध आहे, तें घालितात. पण खेड्यापाड्यांत व्हिनिगर मिळत नाहीं; तें नसलें तरी चालतें. हें पाण्यासारखें पातळ असतें. हें दोन वाट्या किसाला अर्धी कमीशी वाटी घालावें. ह्मणजे चटणी तयार होते. ही फार रुचकर लागते. पाण्याचा अंश जाऊं न देतां नीट जपून बर्णींत घालून ठेविली तर ही महिना सवा महिनाहि टिकते.

खारकेची चटणी.

खारकेचे बारीक तुकडे करावे. त्या तुकड्यांत बदामांच्या काचऱ्या, बेदाणे, चारोळ्या व पिस्त्यांच्या काचऱ्या, इतके पदार्थ घालावे. हें मिश्रण दोन वाट्या असलें तर त्यांत अर्धी वाटी साखर, लिंबाचा रस व दोन सुपाऱ्यांयेवढें आलें किसून घालावें व चटणी कालवावी. ही चटणी आठदहा दिवसांवर टिकत नाहीं.

सौ. कमळाबाई कुळकर्णी, ठाणें.

---

[४]

तळलेलें कारलें करण्याची रीत.

आपणांत सर्व साधारण अशी एक ह्मण आहे कीं– ' कडू कारलें, तुपांत तळलें, साखरेंत घोळलें, तरी तें कडू तें कडूच ! ' तथापि, कारल्याचेहि असे कांहीं प्रकार आहेत, कीं, त्याला कडूपणा सुटीच रहात नाहीं. खालील प्रकार त्यांतलाच एक आहे:—

एक शेर कारलीं चांगलीं लांब घ्यावीं. दोन मोठे कांदे, एक लसणाचा कांदा, एक वाटी सुकें सोवरें, ८ हिरव्या मिरच्या, ३ जुड्या कोथिंबीर, चहाचा एक चमचा बडीशेप, एक चमचा धने, जिन्याचा मसाला, (धने, जिरें, हळद व हिंग एकत्र दळलेले) एक चमचा खसखस, दीड चमचा गरम मसाला, एकापासून दीड चमचा मीठ, चहाचा पाव चमचा हळद, दोन मुठी चण्याचें पिठ, व तळण्यास पुरेसें तेल,

इतके जिन्नस वरील प्रकारास पाहिजेत. कारल्यांचे देंठ कापून लांब असल्यास दोन तुकडे करावे व प्रत्येक तुकड्यास मध्यें काप द्यावे. परंतु दोन भाग निराळे न होतील, याबद्दल काळजी घ्यावी. नंतर जेवणाचा दीड चमचा जाडें मीठ सर्व फांकींत भरून, ला दोऱ्यानें गुंडाळून लांत थोडें पाणी घालून भांडें चुलीवर ठेवावें. उकडल्यावर तें काढून पितळेची चाळण पालथी घालून वर कारल्याचे तुकडे ठेवावे, व पोळपाट अथवा असेंच कांहीं दडपण लावर पंधरा मिनिटेंपर्यंत ठेवावें, म्हणजे सर्व पाणी निघून जाईल. कांदे, लसूण, मिरच्या व कोथिंबीर हे जिन्नस बारीक चिरावे. खोवरें किसावें, खडीशेप आणि खसखस पाणी न घालतां पाट्यावर वांटावी व सर्व मसाला एकत्र करून लांत दोन चहाचे चमचे तेल घालावें. कारल्याचे दोरे काढून हलक्या हातानें प्रत्येक तुकड्यांतून बिया असल्यास ला काढून आंत मसाला भरून दोरा गुंडाळावा व चण्याच्या पिठांत घोळून तेलांत तळावे. तयार झाल्यावर लांवर लिंबू पिळावें. कडूपणा रहात नाहीं.

पिकलेलीं विलायती वांगीं (टोमेटो) सबंध करण्याची रीत.

एक शेर विलायती वांगी (टोमेटो) पिकलेलीं धुऊन पुसून घ्यावीं. लावरील देंठ काढून तीं सबंध कापावीं. (उभे आडवे काप द्यावे. चार तुकडे निराळे करूं नयेत.) ४ कांदे, लसणाचा १ कांदा, पैशाएवढा आल्याचा तुकडा, ८ हिरव्या मिरच्या, २ कोथिंबीरीच्या जुड्या, इतके जिन्नस बारीक कापून घ्यावे. लांत नारळाच्या एका वाटीचा कीस, जेवणाचा एक चमचा धने, जिऱ्याचा मसाला, चहाचा दीड चमचा दळलेलें मीठ, जेवणाचा एक चमचा साखर, अथवा दोन बताशे, हें सर्व एकत्र करून ला वांग्यांत भरावें. जेवणाचे ३ चमचे तूप भांड्यांत घालून चुलीवर ठेवावें. लांत चहाचा अर्धा चमचा मोहरी व दोन पांकळ्या कापलेली लसूण टाकून-वांगीं भरून उरलेल्या मसाल्यापैकीं अर्धा मसाला टाकावा व भांडें खालीं उतरून निखाऱ्यावर ठेवावें. लांत सर्व वांगीं नीट मांडून ठेवावीं. बाकी उरलेल्या मसाल्याचा लावर थर द्यावा आणि झांकण ठेवून दहा मिनिटें भांडें निखाऱ्यावर असूं द्यावें. पाणी घालण्याची, चमच्यानें हलविण्याची, अथवा चुलीवर ठेवण्याची जरूर नाहीं.

विलायती कच्या वांग्यांचें (टोमेटोचें) सांभारें.

अर्धा शेर कच्चें वांगें व अर्धा शेर मोड आलेले वाटाणे अथवा हरभरे, पांचसहा कांदे, अर्धी वाटी सुकें खोवरें, लसणाचा एक मोठा कांदा, पैशाएवढें आलें, हरभऱ्याच्या डाळीएवढा हिंग, ८ हिरव्या मिरच्या, ३ जुड्या कोथिंबीर, जेवणाचा एक चमचा गरम मसाला, दीड चमचा धणे, जिऱ्याचा मसाला, दीड चमचा मीठ, पाव चमचा हळद, जेवणाचे दोन चमचे साखर, पैशाचे भाजलेले चणे (सोलून), एक नारळ, ३ चमचे तूप अथवा ४ चमचे तेल, इतके जिन्नस वरील प्रकारास पाहिजेत. निम्मे कांदे कापून व सुक्या खोबऱ्याचें तुकडे करून तेलांत तळावर परतावे. नंतर हिंग, एक जुडी कोथिंबीर व नारळ यांशिवाय सर्व पाट्यावर वांटावें. नारळाचा दाट रस काढून ठेवावा. नंतर वांग्यांचे चार चार्‌यावजा तुकडे करून, लांत जाडें मीठ टाकून दोनतीन वेळां चुरावें, ह्मणजे काळसर हिरव्या रंगाचें आंबट पाणी निघून जाईल. नंतर तें धुऊन टाकावें. वाटाणेहि धुवावे व तो मसाला लांनां चोळावा. भांड्यांत थोडें तेल टाकून बाकीचे कांदे कापून लांत परतावे. कांदा गुलाबी झाला, कीं, कोथिंबिरीची जुडी लांत कापून टाकावी. ती तडतडूं लागल्यावर बाकीचें तेल टाकून लांत हिंग घालून सर्व पदार्थ फोडणीस टाकावे. वाटाणे शिजण्यापुरतें पाणी घालावें. बाकी नारळाचा रस घालावा. शिजून वेताचा रस राहिला ह्मणजे उतरावें. फोडणीला तेल थोडथोडें घालण्याचें कारण, एकदम सर्व तेल घातल्यास कांदा नारिंगी रंगाचा होईं तोपर्यंत तेल जळेल व जळकट तेलाचा वास येईल. तुपाचें तसें नाहीं.

असाच प्रकार तुरट्या ओल्या अथवा भिजविलेल्या वाटाणे व हरभरे यांचा करितात. मसुरास मोड आणून वटाण्यांसह असा प्रकार चांगला होतो. मात्र लांत आंबट होण्याकरितां आमसुलें अथवा कोकम घातलें पाहिजे.

कुमारी आनंदी, मुंबई.

प्रासंगिक विचार.

वनितासमाज.

अमरावती येथें स्थापित झालेल्या वनितासमाजासंबंधानें यापूर्वी आह्मीं एकदा लिहिलेंच आहे. गेल्या ता. २५ जुलै रोजीं अमरावती येथील अह्मविद्यामंदिरांत वनितासमाजाची वार्षिक सभा भरली होती. या वार्षिक समारंभास सुमारें २५०।३०० भगिनी हजर होत्या. अध्यक्षस्थानीं श्रीमती सौ. राधाबाईसाहेब मुधोळकर यांची योजना झाली होती. श्रीमती सौ. मथुराबाई द्रविड यांनीं रिपोर्ट वाचून दाखविल्यावर श्रीमती मनुताई बापट व श्रीमती सौ. सीताबाई लांडगे यांनीं स्त्रियांना उपयुक्त अशा विषयांवर निबंध वाचले. अध्यक्षबाईंच्या भाषणांत निराशेची छटा दिसली. स्त्रियांच्या प्रगतीसंबंधानें पुरुषवर्गांत दिसून येणाऱ्या अनास्थेचा त्यांनीं निषेध केला. "स्त्रियांना सुशिक्षित व सुसंस्कृत करण्याच्या बाबतींत आपल्यावर काय जबाबदारी आहे, हें पुरुषवर्गास कळत नाहीं; ती जबाबदारी पार पाडावयास त्यांना वेळ मिळत नाहीं; मात्र टेनिस, बिलिअर्ड वगैरे खेळांत खर्च करावयास त्यांना मुबलक वेळ असतो! पुरुषांनां स्वतःवरील जबाबदारी कळत नाहीं, म्हणून स्त्रियांनीं स्वस्थ बसतां कामा नये. त्यांनीं स्वावलंबनाचें अवलंबन करून स्वतःची प्रगति केली पाहिजे. एकंदरींत स्त्रीसमाजाचें पाऊल पुढें पडावें, यासाठीं ज्यांना शक्य असेल त्या स्त्रियांनीं आपल्या भगिनींची उन्नति करण्यास झटलें पाहिजे." अशा अर्थाचे श्रीमती सौ. राधाबाईसाहेब मुधोळकर यांनीं उद्गार काढले. असे उद्गार काढण्याची त्यांजवर पाळी पावी, हें पुरुषवर्गाला खचित भूषणावह नाहीं. पुरुषवर्गाची मदत मिळाल्यावांचून चालेल, अशी आजमितीस आपल्या स्त्रीवर्गाची स्थिति नाहीं. तथापि, पुरुषवर्गाची मदत योग्य तितकी मिळत नाहीं, असें पाहून स्वावलंबनाचा मार्ग धरण्याची बुद्धि स्त्रीवर्गाच्या मनांत उत्पन्न झाल्यास आश्चर्य नाहीं. ज्या सुशिक्षित स्त्रियांना आपल्या भगिनींचा कळवळा येत असेल, त्यांनीं आत्मोन्नतीसाठीं जोराचे प्रयत्न सुरू केल्यास पुरुषवर्ग शरमून तरी त्यांच्या साहाय्यास येईल, अशी आमची खात्री आहे. शिवाय, सध्यां सर्वत्र दिसत असलेल्या जागृतीचा प्रभाव स्त्रियांच्या उन्नतीच्या बाबतींत दिसणार नाहीं, अशीहि भीति बाळगण्याचें कारण नाहीं. आपलें अर्धे अंग असेंच लुळें पडूं देऊन प्रगतीचा मार्ग क्रमण्याची हांव समाजपुरुष आणखी किती काळ बाळगील?

सहभोजन.

आकोला येथें श्रीराम थिएटरांत तारीख २१ जुलै रोजीं सहभोजनाचा समारंभ झाला. या प्रसंगीं सुमारें ७० गृहस्थ हजर होते. यांत तेथले बरेच वृद्ध, बजनदार आणि विद्वान् गृहस्थ होते. या मंडळींत कित्येक पुनर्विवाहित असून त्यांच्या पंक्तीस बाकीचे बसलेले होते आणि सर्वांनीं पुनर्विवाहितांच्या हातचें अन्न सेवन केलें. आकोल्याच्या मंडळीनें हें जें मनोधैर्य दाखविलें, त्याबद्दल ते खचित प्रशंसेस पात्र आहेत. पुष्कळ ठिकाणीं पुनर्विवाहितांसंबंधाचे निर्बंध कमी कमी होत आहेत; तथापि जाहिररीतीनें सहभोजन करणें आणि समाजाला भीत भीत चोरून पंक्तिव्यवहार करणें, यांत पुष्कळ फरक आहे, हें उघड होय! ज्या ज्या ठिकाणीं पुनर्विवाहित गृहस्थ आहेत, त्या त्या ठिकाणीं अशा प्रकारचे सहभोजनसमारंभ होणें इष्ट आहे, व या गोष्टीकडे ठिकठिकाणच्या समाजसुधारकांचें लक्ष जाईल अशी आह्माला उमेद आहे. पुनर्विवाहाच्या आड येणारा बहिष्काराचा बागुलबुवा साफ हद्दपार करण्यास अशा सहभोजनांचें पुष्कळ साहाय्य होईल.

विधवाविवाहाच्या कायद्याचा वार्षिक दिवस.

ता. २५ जुलै रोजीं विधवाविवाहाच्या संबंधाच्या कायद्याचा वार्षिक दिवस मुंबई, पुणें वगैरे शहरांत साजरा करण्यांत आला. याच दिवशीं प्रसिद्ध गुर्जर सुधारक वीर ए.ना. शेट कर्सनदास मूळजी यांची जन्मतिथि असल्याकारणानें मुंबईमध्यें साला बदा प्रमाणें त्या गृहस्थांच्या समाजसुधारणाविषयक कर्तृत्वासंबंधानेंहि भाषणें झालीं. मुंबईयेथील सभेच्या अध्यक्षस्थानीं ना. न्या. सर नारायण चंदावरकर हे होते. पूर्वीच्या पिढींतील शेट कर्सनदास, विष्णुशास्त्री पंडित प्रभृति समाजसुधारकांचा मार्ग किती अडचणीचा होता व त्या मानानें हल्लींच्या सुधारकांचा मार्ग किती सुगम आहे, हें सांगून अध्यक्षांनीं आपल्या नेहमीच्या वक्तृत्वपूर्ण वाणीनें, समाजसुधारणेचें पवित्र कार्य नेटानें पुढें चालविण्यासाठीं श्रद्धापूर्वक झटण्याचा उपदेश केला. या सभेस लोकांची पुष्कळ गर्दी झाली होती व त्यावरून विधवाविवाहाच्या सुधारणेस लोकांची दिवसेंदिवस अधिकाधिक सहानुभूति मिळत असल्याचें स्पष्टपणें दिसून येत होतें. पुणें येथें सर रामकृष्णपंत भांडारकर यांच्या अध्यक्षतेखालीं अशीच सभा भरली होती. आकोला येथेंहि विधवाविवाहाच्या कायद्याच्या वार्षिक दिवसानिमित्त तेथील सन्मान्य, ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध गृहस्थ रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली होती. विधवाविवाहाच्या मार्गातील प्रत्येक महत्त्वाच्या अडचणी ज्या कायद्याच्या योगानें दूर झाल्या, त्या कायद्याचा वार्षिक दिवस पाळण्याचे समारंभ देशभर सर्व ठिकाणीं होणें इष्ट आहे. कारण, एक तर सामाजिक बाबतींत कायद्याच्या साहाय्याची कशासाठीं व कोणत्या मर्यादेपर्यंत आवश्यकता आहे, याचें ज्ञान बहुजनसमाजास करून देण्याची संधि सांपडेल; शिवाय, लोकांत विधवा-

विवाहासंबंधानें प्रचलित असलेल्या गैरसमजुतींचें खंडन करावयास मिळेल. अशीं दोन कामें या वार्षिक दिवसाच्या समारंभांत होत असल्यामुळें जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणीं व इतर मोठ्या वस्तीच्या शहरांत दरवर्षी सभा भरविण्यासाठीं तेथील समाजसुधारणाप्रिय गृहस्थांनीं प्रयत्न केले पाहिजेत. सुधारणावादी गृहस्थांनीं थोडी तसदी घेतल्यास व गांवांतील निंदकांचे वाक्प्रहार सोसण्याची तयारी दाखविल्यास हे प्रयत्न सिद्धीस जाणें अशक्य आहे, असें नाहीं. सामाजिक परिषदेच्या जिल्हा कमिट्या अशा कामांसाठींच पाहिजेत. परंतु गेल्या प्रांतिक सामाजिक परिषदेंत, जिल्हा-निहाय कमिट्या स्थापण्याचा पहिला ठराव पास झाला, त्यास मूर्तस्वरूप देण्याचे प्रयत्न अद्यापि झालेले दिसत नाहींत; अजून आरंभहि नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट होय.

'संभावितां'ना उत्तर.

अज्ञान मुलींचें त्यांना कुमार्गास प्रवृत्त करणाऱ्या माणसांपासून संरक्षण व्हावें याकरितां, हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलांत ना. रा. ब. मुधोळकर हे एक बिल आणणार आहेत. ना. दादाभाई यांनींहि अज्ञाच प्रकारचें एक बिल कौन्सिलांत आणण्याचें ठरविलें आहे. अज्ञान मुलींच्या संरक्षणार्थ आजचा कायदा अपुरा आहे, असेंच साधारणतः सर्व समंजस लोकांचें मत आहे; परंतु नीतिसंरक्षणासारखी बाब पुढें आली असतांहि धर्माचा बागुलबुवा उभा करणारी कांहीं मंडळी आहे! डॉ. मॅन यांनीं कायद्यांत इष्ट दिशेनें दुरुस्ती करण्यास विनंति केली असतां मुंबईसरकारनें कित्येक 'संभावित,' लोक विरुद्ध आहेत, असें कळून, अनीतीच्या कुंडांत ज्यांची आहुति पडते अशा मुलींच्या कौमार्यभंगाची वयोमर्यादा वाढविण्याचें नाकारिलें होतें; परंतु ना. मुधोळकर यांच्या बिलास, ज्या विशिष्ट जातींतील मुलींना कायदा लागू व्हावयाचा त्याच जातींतील कित्येक स्त्रियांनीं वर्तमानपत्रांत पत्रें प्रसिद्ध करून संमति दिली आहे, व वयोमर्यादा कायद्यानें अवश्य वाढविली पाहिजे असें प्रतिपादिलें आहे, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी होय. मुंबईसरकारला निष्कारण भेडसावणाऱ्या भूत 'संभावितां'ना हें खासें उत्तर आहे, यांत शंका नाहीं.

दोन अत्यंत शोचनीय मृत्यु.

मि. बी. एम्. मलबारी यांच्या मृत्यूनें या देशांतील एक उत्कृष्ट लेखक, समाजसुधारक, अबलांचा कैवारी व भूतदयाशील कर्तृत्ववान् पुरुष नाहींसा झाला! मरहूम मि. मलबारी यांनीं लोकनिंदा सहन करून, आगंतुकपणाचा दोष आनंदानें पतकरून, स्वतःची जात व स्वतःचा धर्म हीं निराळीं असतांहि, हिंदुस्त्रियांची स्थिति सुधारण्याचा नेटानें प्रयत्न केला होता. मुंबईचें सेवासदन अस्तित्वांत आणण्यास त्यांचीच कल्पना कारण झाली. धरमपुरी येथें क्षयरोग्यांकरितां आरोग्यभवन बांधण्याचें अत्यंत उपयुक्त असें भूतदयेचें कार्य त्यांनीं अविश्रांत श्रम करून तडीस नेलें. यूरोपीयन व हिंदी समाजांत त्यांना फार वजन होतें व त्या वजनाचा उपयोग त्यांनीं अनेक चांगल्या कामीं केला. हिंदुसमाजसुधारणेच्या इतिहासांत भावी इतिहासकारांनां त्यांच्या नांवाचा उल्लेख अत्यंत आदरपूर्वक करावा लागेल. हिंदी राष्ट्रसभेचे जनक मि. ह्यूम यांच्या नांवाचें स्मरण कोणाहि हिंदी मनुष्यास जेव्हां जेव्हां होईल, तेव्हां तेव्हां त्याच्या अंतःकरणांत कृतज्ञतेच्या ऊर्मि उठल्याखेरीज राहणार नाहींत. इहीं बरींच वर्षें वृद्धापकाळामुळें ह्यूम साहेबांनां कोणत्याहि चळवळींत प्रत्यक्ष अंग ठेवून दगदग सोसणें शक्य नव्हतें. तथापि, त्यांच्या अंतःकरणांतील हिंदभूमीवरील प्रेमाची ज्योत पूर्वीप्रमाणेंच तेवत होती. त्यांचा स्वभाव जितका प्रेमळ तितकाच स्पष्टवादी असे. हिंदी पुढाऱ्यांनां वेळोवेळीं मार्ग दाखवून, उत्तेजन देऊन आणि राष्ट्रसभेच्या आरंभकालीं तर स्वतःच्या खिशास खार लावून घेऊन, इतकेंच नव्हे, तर हिंदी लोकांचा कैवार घेतल्याबद्दल अनेक प्रसंगीं स्वकीयांच्या रोषास पात्र होऊन, त्यांनीं सर्व हिंदी समाजास कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. ह्यूम साहेबांनां हिंदी लोकांच्या राजकीय प्रगतीबद्दलच आस्था वाटे असें नाहीं, तर त्यांच्या सामाजिक प्रगतीवरच त्यांच्या राजकीय प्रगतीचें सार्थक्य अवलंबून आहे, असें त्यांचें ठाम मत होतें. १८९४ सालीं त्यांनीं हिंदभूमीचा शेवटचा निरोप घेतांना मुंबईमध्यें जें भाषण केलें होतें, त्यांत त्यांनीं, राजकीय बाबतींत अधाशी मारूं पाहणाऱ्या, परंतु सामाजिक बाबतींत मागें मागें रेंगाळणाऱ्या लोकांची चांगलीच कानउघाडणी केली होती. या भाषणाच्यापूर्वी थोडेच दिवस मद्रास हिंदु सोशल रिफॉर्म असोसिएशनच्या मुलाखतीचे वेळीं मि. ह्यूम साहेबांनीं असें बोलून दाखविलें होतें, कीं, प्रथम कांहीं काळ जरी राजकीय सुधारणेचेंच महत्त्व वाढलें, तरी समाजसुधारणेची आवश्यकता कांहीं काळानंतर भासलीच पाहिजे! परस्परांच्या स्वभावाचें वगैरे ज्यांनां कांहींच ज्ञान नाहीं, अशा अल्पवयस्क वधुवरांची गांठ बांधण्याच्या विवाहपद्धतीचा ते निषेध करीत असत. सुशिक्षित पुरुष व अशिक्षित बायको असें जोडपें इष्ट नाहीं, असें त्यांचें मत होतें. स्वतःच्या पसंतीप्रमाणें वधुवरांचे विवाहसंबंध झाल्याखेरीज कोणतेंहि राष्ट्र पूर्ण श्रेष्ठत्वास पोंचेल असें मला वाटत नाहीं, (I don't believe in a nation ever being thoroughly great until that principle is accepted by the country—freedom of choice amongst the rising generations as to the unions that they contract.) असें ह्यूम साहेबांनीं स्पष्टपणें बोलून दाखविलें होतें. यावरून विवाहपद्धतीच्या सुधारणेविषयीं आमच्या अत्यंत निरपेक्ष व दूरदर्शी अशा हितचिंतकांचें काय मत होतें, तें दिसून येईल.



एडिटरचें टेबल.



त्रिवेणी—लेखक श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.; प्रकाशक, श्रीयुत शंकर हरि मुळे, बुधवार पेठ, पुना सिटी. श्रीयुत मुळे यांच्या स्वल्प किंमतीच्या चित्तरंजक पुस्तकमालेपैकीं हें पहिलें पुस्तक असून, डायरी आकाराच्या, पायका टाइपानें छापलेल्या या ८७ पृष्ठांच्या पुस्तकाची दोन आणे किंमत माफक आहे. बंगाली भाषेतील, प्रो. सत्यरंजन राय, एम्. ए., यांनीं लिहिलेल्या 'अवगुंठिता' नामक कादंबरीच्या कथानकांत आपल्या समाजाला साजतील असे फेरफार करून प्रस्तुत कादंबरी संक्षेपानें लिहिली आहे. "अशा कादंबऱ्या मोठ्या प्रमाणावर लिहिण्यापेक्षां अल्प मर्यादेंत लिहिण्याचें काम फार कठिण आहे," असें जें श्रीयुत आपटे यांनीं प्रस्तावनेंत झटलें आहे तें वास्तविक आहे. एकादा लहानसा प्रसंग घेऊनच श्रीयुत आपटे छोटेखानी कादंबऱ्यांची रचना करतील तर बरें, असें आमचें मत आहे.

थि क्राउन संस्कृत-इंग्लिश डिक्शनरी—लेखक, श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.; प्रकाशक, श्रीयुत केशव रावजी गोंधळेकर, पुणें. हा संस्कृत कोश श्रीयुत आपटे यांनीं हायस्कूल्स व कॉलेजिस् मधील विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं तयार केला आहे. प. वा. प्रि. वामन शिवराम आपटे व प. वा. श्रीयुत लक्ष्मण रामचंद्र वैद्य यांच्यासारख्या सर्वमान्य संस्कृत पंडितांचे कोश यापूर्वी प्रसिद्ध झाले असून आजपर्यंत त्यांचाच उपयोग संस्कृत भाषेचे विद्यार्थी करीत असत; परंतु त्यांची किंमत व आकार यांच्या मोठेपणामुळें विद्यार्थ्यांस त्यांचा व्हावा तसा उपयोग होत नसे. किंमतीनें व आकारानें लहान, परंतु बऱ्याच उपयुक्त अशा संस्कृत-इंग्रजी कोशाची विद्यार्थिवर्गास मोठी वाण भासत होती, ती श्रीयुत आपटे यांच्या प्रस्तुत कोशानें चांगली भरून निघाली आहे, असें आम्हाला वाटतें. श्रीयुत आपटे हे कलकत्ता युनिव्हर्सिटीचे उपपदधारी असून ते संस्कृतांत सन्मानासह (With Honours) बी. ए., झाले आहेत. एका मोठ्या हायस्कुलांत त्यांनीं बरींच वर्षे शिक्षकाचें काम केलें असल्यामुळें विद्यार्थ्यांच्या गरजांचें त्यांनां चांगलें ज्ञान आहे व त्या गरजा नीट लक्ष्यांत ठेवून ग्रंथकर्त्यानें प्रस्तुत कोशाची रचना केली असल्यामुळें तो सर्वतोपरी उपयुक्त झाला आहे, यांत संशय नाहीं. डेमी चारपेजी ३६६ पृष्ठांच्या व सुंदर बांधणीच्या या कोशाची किंमत दीड रुपया असून ती देतांचीच आहे.

भारतप्रवासवर्णन—लेखक व प्रकाशक प. वा. श्रीयुत बाळासाहेब लक्ष्मणराव घोरपडे, शाईचे कारखानदार, पुणें. प्रस्तुत पुस्तकांत हिंदुस्थानांतील सुमारें ५५० प्रसिद्ध स्थलांचें उपयुक्त व प्रवासाच्या दृष्टीनें सोइवार असें वर्णन असून स्थलवर्णनाची वर्णक्रमानें रचना करण्यांत आली आहे. हिंदुस्थानांतील प्रेक्षणीय अशा स्थळांचे आंत वेपरवरील हॉफटोन ब्लॉक्सचे सुमारें ९० फोटो पुस्तकाला जोडण्यांत आले असून त्यांचें काम बरें झालें आहे. श्रीयुत घोरपडे यांची लेखनाची शाई चहूंकडे प्रसिद्ध असून आजपर्यंत ग्रंथलेखनांत लोकांकडून तिचा उपयोग होत असे; प्रस्तुत प्रसंगीं हें पुस्तक लिहिण्यांत तिचा उपयोग खुद्द कारखानदारांनीं केलेला पाहून आम्हाला फार समाधान वाटतें. मराठींत स्थलवर्णनात्मक पुस्तकें फारशीं नाहींत व आहेत तीं प्रवासाच्या दृष्टीनें फारशी उपयोगी नाहींत. या पुस्तकानें अशा पुस्तकांची उणीव चांगली भरून निघाली असून प्रवास करतांना या पुस्तकाचा 'Bradshaw's Guide' वगैरे इंग्रजी पुस्तकांप्रमाणें प्रवाशी लोकांनां चांगला उपयोग होईल. किंमत दोन रुपये आहे.

गृहिणीभूषण—प्रस्तुत पुस्तक मनोरंजनाच्या वाचकांच्या परिचयाच्या श्रीमती सौ. गिरिजाबाई केळकर यांनीं लिहिलें असून त्यांनींच प्रसिद्ध केलें आहे. निरनिराळ्या वृत्तपत्रांतून व मासिकांतून निरनिराळ्या प्रसंगीं कर्त्रीचे प्रसिद्ध झालेले व दुसरे स्वतंत्र लिहिलेले असे स्त्रीशिक्षणविषयक अकरा लेख या पुस्तकांत प्रसिद्ध झाले आहेत. मराठी भाषेतील अनेक सुंदर पुस्तकांनां जो योग येत नाहीं तो द्वितीय आवृत्तीचा योग अवघ्या दीड वर्षाच्या अवकाशांत, या पुस्तकाला आलेला पाहून आम्हाला अत्यंत संतोष वाटतो. आम्ही तर हें स्त्रीशिक्षणाच्या विजयाचें व हल्लीहून विशालत्व धारण करणाऱ्या स्त्रीशिक्षणाच्या लोकप्रियतेनें स्पष्ट चिन्हच होय, असें समजतों. या पुस्तकांत ग्रथित केलेले विचार सर्वांनांच मान्य होतील असें नाहीं; इतकेंच नव्हे, तर बऱ्याच सुज्ञ व प्रागतिक मंडळीला ते रुचण्यासारखेहि नाहींत; तरी पण हे विचार म्हणजे देशांतील स्त्रीशिक्षणविषयक जागृतीचें शुभ चिन्हच होय, असें म्हणावयास हरकत नाहीं. पुस्तकास जोडलेला श्रीयुत रा. वा. उपासनी यांनीं लिहिलेला लेखिकेचा परिचय करून देणारा उपोद्घातहि वाचनीय आहे. पुस्तकाचें बाह्यांग बरें असून त्याची पांच आणे ही किंमत बेताचीच आहे.

श्रुतिबोध—गेल्या जुलै महिन्यापासून हें मासिक पुस्तक ४७, काळबादेवी रोड, मुंबई, येथें प्रसिद्ध होत असून श्रीयुत रामचंद्र विनायक पटवर्धन, बी. ए., एल् एल्. बी.; श्रीयुत अच्युत बळवंत कोल्हटकर, बी. ए., एल् एल्. बी.; व श्रीयुत दत्तो अप्पाजी तुळजापुरकर, बी. ए., एल्एल्. बी.; हे तिघे विद्वान् गृहस्थ याचे संपादक आहेत. प्रस्तुत रॉयल अष्ट पेजी ६४ पृष्ठांचें मासिक पुस्तक मराठी, हिंदी, गुजराथी व इंग्लिश या चार भाषांत निरनिराळें प्रसिद्ध होत असून त्याची वार्षिक वर्गणी अनुक्रमें २, ३, ३ व ४ रुपये आहे. हिंदु धर्माचें रहस्य ज्यांत सांठलेलें आहे व जे त्यांच्या सर्व प्रकारच्या महत्त्वामुळें व गौरवामुळें हिंदुमात्रा-

लाच नव्हत, तर अखिल जगताला परम पूज्य होऊन राहिले आहेत, अशा चारहि वेदांचा परिचय भाषांतररूपानें या मासिक पुस्तकाच्या द्वारें सर्व हिंदुस्थानांतील लोकांना करून द्यावयाचा संपादकत्रयाचा उच्च महत्त्वाकांक्षेचा स्तुत्य उद्देश आहे. मासिकाच्या चारहि भाषांतील, विशेषतः इंग्रजी आणि हिंदी भागांच्या साहाय्यानें संपादकांचा हा उद्देश पूर्णत्वानें सिद्धीस जाईल, अशी आमची खात्री आहे. संपादकांनीं पहिल्यानें ऋग्वेदास सुरुवात केली असून क्रमाक्रमानें चारहि वेद भाषान्तरासह श्रुतिबोधांतून प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. पुस्तकाच्या निम्मे भागांत ऋचा व पदपाठ यांचाच समावेश करण्यांत येत असून निम्मे भागांत त्यांचें भाषान्तर प्रसिद्ध होतें. पुस्तकांत भाष्य, टीका व त्यांचीं भाषान्तरें, व्याकरणविषयक व चर्चात्मक टीका वगैरे लटांबरास फाटा देण्यांत आलेला आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. या सर्व प्रचंड अवडंबराच्या भरीस पडल्यामुळेंच आजपर्यंत निघालेल्या अनेक वेदविषयक मासिकांचा अंत झाला आहे. संपादकांच्या या धोरणी व समंजसपणाच्या व्यवस्थेमुळेंच हें वेदाच्या व वेदार्थाच्या प्रकाशनाचें काम त्यांच्या व वाचकांच्या आटोक्यांत येण्यासारखें आहे. आमच्यापुढें 'श्रुतिबोधा'चे जे दोन अंक आहेत, त्यांवरून पहातां त्यांत देण्यांत येत असलेलें भाषान्तर सुबोध, सुगम व सुंदर होत आहे, असें म्हणावयास आम्हाला शंका वाटत नाहीं. पुस्तकांत देण्यांत येणारें भाषान्तर विवक्षित पूर्वग्रह किंवा खासगी मतें एका बाजूस ठेवून करण्यांत येईल, अशी संपादकांची प्रतिज्ञा असून तीप्रमाणें तें तंतोतंत चालतील, अशी आमची खात्री आहे. प्रस्तुत मासिक पुस्तकाचे दोन अंक निघाले नाहींत तोंच त्याला हजारों वर्गणीदार मिळून पुनः पहिल्या अंकाची द्वितीयावृत्ति काढण्याचा सुयोग आला, याबद्दल आम्ही संपादकांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. या प्रमाणेंच 'श्रुतिबोधा'ची उत्तरोत्तर भरभराट होवो व परमेश्वराच्या कृपेनें आणि हिंदुस्थानांतील वाचकवर्गाच्या आश्रयानें संपादकत्रयानें शिरावर घेतलेलें उच्चतम ध्येयाचें हें महत्कार्य सिद्धीस जावो, असें आम्ही अन्तःकरणपूर्वक इच्छितों.

सार्थ अमृतानुभव—लेखक हरिभक्तिपरायण श्रीयुत विनायकबुवा साखरे; प्रकाशक, श्रीयुत त्र्यंबक हरि आवटे, सदाशिव पेठ, पुना सिटी. किंमत दीड रुपया. प्रस्तुत ग्रंथ इंदिरा छापखान्याच्या आध्यात्मिक ग्रंथसंग्रहापैकीं पहिला असून त्यांत साधुवर्य श्रीज्ञानेश्वरांचा अमृतानुभव हा सुप्रसिद्ध आध्यात्मिक मूल ग्रंथ, त्याचा मराठी व हिंदी अनुवाद आणि कठिण स्थलांवर मराठी व हिंदी भाषांतील उपयुक्त टीपा, यांचा समावेश करण्यांत आला आहे. हरिभक्तिपरायण विनायकबुवा हे मूर्तीभूत नानामहाराज साखरे यांचे चिरंजीव असून आध्यात्मिक विषयांवरील त्यांचा व्यासंग व अधिकार सर्वश्रुतच आहे. विनायकबुवांचा अनुवाद विस्तृत असून विषयाच्या मानानें तो सुबोध व सुगमहि आहे. विनायकबुवांच्या अनुवादाचें हिंदी भाषान्तर भायानंद ब्रह्मचारी यांनीं केलें असून तेंहि चांगलें बठलें आहे. ग्रंथाला जोडलेला २०-२२ कालमांचा उपोद्घात वाचनीय आहे. त्यावरून ग्रंथविषयांत वाचकाचा चांगल्या रीतीनें प्रवेश होऊं शकेल, असें आम्हाला वाटतें. या ग्रंथाच्या उत्पन्नांतील बराच भाग पुणें येथील मराठा बोर्डिंगच्या इमारतीकडे खर्च करण्यांत येईल, असें प्रकाशकांनीं जाहीर केलें आहे. त्यांच्या विनंतीप्रमाणें या पुस्तकास आश्रय देऊन महाराष्ट्र वाचकांनीं एका मागसलेल्या जातीच्या शिक्षणास आस्थेनें हातभार लावावा, अशी सर्वांना आमची आग्रहाची सूचना आहे.

कन्यादान—लेखक गणेश; प्रकाशक श्रीयुत माधव रघुनाथ कुलकर्णी, बी. ए., एल्एल्. बी., तासगांव, सातारा. किंमत ६ आणे. हें एक सामाजिक गद्य नाटक असून त्यांत आमच्या समाजांतील विवाहविषयक कांहीं बाबींची अप्रत्यक्ष रीतीनें चर्चा केली आहे. नाटकांतील पात्रांची भाषा, त्यांतून स्त्रीपात्रांची भाषा चांगली साधली आहे. संविधानक मात्र बेढोल झालें असून त्याची वाढ उगीच झाली आहे. बहुतेक पात्रांचे स्वभावपरिपोष निसर्गाला अनुसरून नाहींत. कांहीं पात्रें नाटकांत उगीच आणलीं असून संविधानकाच्या वाढीला त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. तरी, या नाटकाच्या वाचनानें वाचकांचें घटकाभर मनोरंजन होईल यांत संशय नाहीं. पुस्तकाची किंमत सहा आणे, बेताची आहे.

पारमार्थिक बोळ—लेखक व प्रकाशक, श्रीयुत मोरो विनायक शिंगणे, गिरगांव, मुंबई. किंमत चार आणे. या लहानशा पुस्तकांत आलेले लेख माजी मुंबईवैभव पत्रांत प्रसिद्ध झाले असून ते आतां लेखकानें स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रकाशित केले आहेत. भगवान् महर्षि कपिलांनीं लिहिलेल्या सांख्य दर्शनांतील चतुर्थाध्यायाच्या सूत्रांचा सुविस्तृत अनुवाद या चिमुकल्या पुस्तकांत दिला आहे. कपिल मुनींचें सांख्य दर्शन हा तात्त्विक बोधाचा ग्रंथ असून त्याचा चवथा अध्याय आख्यायिकारूप आहे. पुस्तकाची भाषा सरळ, गोड व सुबोध आहे.

विवेकानंदजीवन—लेखक 'महाराष्ट्रभाषाचित्रमयूर' श्रीयुत कृष्णाजी नारायण आठल्ये, केरळकोकिळचे संपादक; प्रकाशक, श्रीयुत नारायण बळवंत चव्हाण, मालक, हरिहर छापखाना, पुणें. श्री रामकृष्ण परमहंसांचे पट्ट शिष्य स्वामी विवेकानंद यांची माहिती कोणत्या सुशिक्षित महाराष्ट्रीयास नसेल? हिंदुधर्माच्या व वेदान्तपंथाच्या बठलेल्या खोडांत नूतन जीवन व ओज ओतून ज्यांनीं अमेरिकेसारख्या दूरच्या प्रवृत्तिपरायण देशांतहि त्यांची विजयवैजयंती फडकूं लाविली, त्या स्वामी विवेकानंदांचें हें जीवनचरित्र आहे. स्वामींचें विस्तृत व उत्कृष्ट चरित्र मराठींत अजून व्हावयाचें आहे; कोणा प्रतिभाशाली लेखकाच्या लेखणीतून तें उतरेपर्यंत महाराष्ट्रास याच त्रोटक व सामान्य चरित्रावर निर्वाह केला पाहिजे. प्रस्तुत चरित्रांतील बहुतेक भाग पूर्वीच केरळकोकिळांत प्रसिद्ध झाला आहे. या पुस्तकाच्या उत्तरार्धांत दिलेल्या स्वामींच्या लेखांच्या विविध उताऱ्यांत मूळांतील ओजोभाग बराच कमी आहे. तरी या चरित्राच्या लेखनानें एकंदरीत श्रीयुत आठल्ये यांनीं महाराष्ट्र चरित्रग्रथांत एक चांगली भर टाकली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. पुस्तकाची किंमत १२ आणे आहे.

[2-12] CLERKS' HANDBOOK.

THIRD EDITION, REVISED AND ENLARGED, pages 285, cloth bound, contains 337 complete specimen Letters for Private and Commercial Correspondence, Book-Keeping, Ready Reckoner, Proof Correcting, and several other Subjects very useful for Students fresh from Schools and Colleges seeking employment and Clerks wishing to rise in Government or Mercantile Offices. Price by V. P. P. Re. 1-8. Apply to:—
DUBHASHI & Co.
1st Bhatwadi, Girgaum, Bombay.

कोइमतुरी जरीकांठी कापड.

रंगी बेरंगी रुमाल, फेटे, उपरणी, धोतरजोडे, खण वगैरे सर्व तऱ्हेचा उंची तलमसुती, गर्भसुती, जरीकांठी कोइमतुरी माल आमच्याकडे फारच माफक भावानें मिळेल. व्ही. पी. नें पाठवूं. कॅटलाग मागवा. [1-1]

चंदादोरे स्वामी, जरीकांठी कापडाचे कारखानदार, कोईमतूर, (मद्रास.)

गृहिणीभूषण.

[2-6] दुसरी आवृत्ती.

लेखक-श्रीमती सौ. गिरिजाबाई केळकर.

सदर पुस्तक लोकांस पसंत पडून लवकर खपल्यामुळें त्याची दुसरी आवृत्ति काढण्यांत आली आहे. पुस्तकांत अनेक सुधारणा केल्या आहेत. किंमत पांच आणे.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण:-मनोरंजन ऑफिस, गिरगांव—मुंबई.

ग्यारंटी पक्कम रंगाची [2-12]

इनाम रंग फिटला असें दाखविणारांस.

अमदाबादी पक्क्या रंगांचीं लुगडीं, खण, चिरट्या, पितांबर, कद, धोतरजोडे, उपरणी इत्यादि कोणत्याहि प्रकारचा माल. कॅटलाग फुकट. तिकीट पाठवा.

धि गुजरात कंपनी, रायपुर-अमदाबाद.

लेखक—डॉ. काळोखे, आयुर्वेदविद्यालय व हिंदु हॉस्पिटलचे माजी रेसिडेंट फिझिशियन हाऊस सर्जन व अग्निमांद्य पुस्तकाचे कर्ते.

[3-1] रोगजंतू.

बहुतेक रोग सूक्ष्म जंतूंनीं होत असल्याचें सिद्ध झाल्यामुळें व मराठींत या विषयावर स्वतंत्र असें एकहि पुस्तक नसल्यानें लोकांस रोगजंतूंची माहिती व्हावी या हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे. यांतील विषय-जंतुशास्त्राची माहिती, जंतूंचें वसतिस्थान, त्यांच्या जाती, त्यांचें खाद्य, आकार, वाढ, त्यांपासून उत्पन्न होणारीं विषें, त्यांचे शरीरांत शिरण्याचे मार्ग, रोगोत्पत्ति केव्हां व किती वेळानें होते, जंतूंमुळें होणारे रोग, जंतूंचे निरनिराळे आकार, जंतू व त्यांचीं विषें नाश करणारीं औषधें व त्यांचा उपयोग वगैरे. छपाई निर्णयसागरची. किंमत फक्त ६ आणे. ट. व व्ही. पी. खर्च २ आणे.

पत्ता-डा. ग. पां. काळोखे, गिरगांव—मुंबई.

लेखकांस विनंति.

स्वतंत्र अगर परभाषेंतील ग्रंथाधारें लिहिलेल्या कादंबऱ्या, प्रहसनें, नाटकें, उपदेशपर पुस्तकें पसंत पडल्यास सर्व हक्क विकत घेऊन प्रसिद्ध करण्यांत येतील. अवलोकनार्थ पाठवावीं. पुस्तकासोबत पत्ता आणि पुरेसें पोस्टेज असावें.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,
गिरगांव-मुंबई.

आनंद—लहान मुलांनां हंसत खेळत वाचनाची गोडी लावणारें हें मासिक पुस्तक आहे. यांत मौजेच्या गोष्टी, सोपीं गाणीं, खेळ, मुलांचे लेख, प्रश्न व त्यांचीं उत्तरें, कारागिरीचे धडे, मनोरंजक रीतीनें दिलेली शास्त्रीय माहिती व सुंदर आणि गमतीचीं चित्रें असतात. वर्षारंभ आगष्टपासून. वर्गणी ट. हं. सह १ रु.

पत्ता—व्यवस्थापक आनंद, शहर पुणें.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

आवृत्ति दुसरी ! सर्वांगसुंदर अमूल्य ग्रंथ!

डा. भांडारकर यांचे धर्मपर लेख व व्याख्यानें.

टाइप मोठा, छपाई मनोहर, बांधणी मजबूत कापडी.

पृष्ठें ६२५. किं. फक्त पावणेदोन रुपये !

या आवृत्तींत १७ नवीं व्याख्यानें असून, ७७ पृष्ठांचा बारीक टैपांत छापलेला, 'विश्वसनीय माहितीनें भरलेला' (न्या. मू. सर चंदावरकर) 'आधुनिक पद्धतीनें लिहिलेला' (ज्ञा. प्र.) 'वाचून संपवीपर्यंत खालीं ठेववत नाहीं' इतका 'हृदयंगम' (मनोरंजन) सुंदर चरित्रात्मक लेख असून ४ सुबक चित्रें आहेत. एक चित्र दोन रंगात छापलेलें आहे. न्या. मू. सर नारायण चंदावरकर यांनीं फार महत्त्वाचा उपोद्घात लिहिला आहे. असें असून किंमत फक्त पावणेदोन रुपये ! रा. सा. **महाजनीं**नां हा ग्रंथ 'डॉ. भांडारकरांच्या दैवी-संपत्तीचें भांडारच वाटला.' **मनोरंजना**च्या मतें "या ग्रंथांत जें उपदेशामृत साठविलेलें आहे त्याचें पान करून चित्त प्रसन्न होतें, मनाला अवर्णनीय समाधान वाटतें, सत्याची साक्ष पटते, खऱ्या विचारांची ओळख होते, मानसिक धैर्य प्राप्त होतें, आणि संकटांची व दुःखांची दरकार न वाटतां कर्तव्य करण्यास उमेद येऊन परमेश्वराघरचा विश्वास दुणावतो. अशा या उपदेशामृताचें पान करण्यास उत्सुक न होणें म्हणजे सुधाघटाला युद्धया दूर लोटणें होय !" असा हा बहुमोल ग्रंथ **टपा. हां. व. व्ही. पी. खर्च न धेतां १॥॥ रुपयांस** देण्याचें आम्ही ठरविलें आहे !

आतां प्रती थोड्या शिल्लक आहेत, त्या संपल्या म्हणजे मग ग्रंथ मूळ किमतीसहि मिळणार नाहीं.

पत्ता—ज्ञा. गो. वैद्य, जावजी बिल्डिंग, मुंबई. (७)

सुधासिन्धु. वीस वर्षे अनुभविलेलें, सरकारांतून रजिस्टर झालेलें, कफ, खोकला, दमा, हिंवताप, कालरा, शूल, संग्रहणी, आमांश, अतिसार, पांती, मळमळ, पोटदुखी, हात, पाय व कंबर दुखणें, लहान मुलांचे हिरवेपिंवळे जुलाब, छाती भरणें, दूध ओकणें वगैरे अनेक विकारांवर खादिष्ट, रुचकर आणि सुगंधि औषध. एका वाटलीची किंमत ८ आणे. १२ वाटल्यांस ४॥ रुपये. [2–12]

दद्रुगजकेसरी. वीस वर्षे अनुभविलेलें. हेंहि सरकारांतून रजिस्टर झालेलें औषध आहे. मुळींच न झोंबतां, अथवा यत्किंचितहि त्रास किंवा दाह न करितां गजकर्णाचा समूळ नाश करितें. १ वाटलीची किंमत ४ आणे. १२ वाटल्या घेणारांस टपा. खर्च न पडतां २। रु. किंमत पडून आणखी घर, मनुष्याच्या दशदशा ज्यांत दर्शविल्या आहेत असें एक सुंदर चित्र बक्षिस !

वरील औषधांपैकीं कोणत्याहि औषधाच्या १ डझन वाटल्या मागविणारे आमचे एजंट होऊं शकतात.

मागविण्याचा पत्ता—

क्षेत्रपालशर्मा, मालक,
सुखसंचारक कंपनी, मथुरा.

वाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या ही ज्वर आणि हिंवतापावर रामबाण आहेत. ताप आणि शीतज्वर येणारसें वाटतांच हें प्यावें. किं. १ रु.

शक्तिवर्धक गोळ्या १॥ रु.

दंतमंजन ४ आणे. [1–12]

गजकर्णावर अप्रतिम मलम १ आणा.

ही औषधें सर्व दुकानांवर व

डॉ. वाटलीवाला परळी, मुंबई,

यांजकडे मिळतील.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रह करण्यालायक नवीन उपयुक्त पुस्तक.

१. भूत-पिशाचनिर्णय.

अमदाबाद येथील प्रसिद्ध गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटी नामक संस्थेनें मुद्दाम दीडशें रुपये बक्षिस देऊन हा ग्रंथ छापविला असून तो इतका लोकप्रिय झाला, कीं, थोडक्याच वर्षांत त्याच्या गुजरातींत ५ आवृत्ति छापिल्या गेल्या. शिवाय आग्रा येथें याचें उर्दू भाषेंत भाषांतर झालें असून आलेक्झान्डर किन्लॉक फायर्स-साहेब यांनीं या पुस्तकाचें इंग्रजींत भाषांतर करून, विलायतेंत छापिलें आहे. अशा या उपयुक्त पुस्तकाचा महाराष्ट्र वाचकांस लाभ करून द्यावा या हेतूनें आह्मीं मुद्दाम गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीची परवानगी घेऊन हल्लीं हें पुस्तक मराठी भाषेंत नुकेंच छापिलें आहे. या पुस्तकांत निरनिराळ्या धर्मांतील भूत प्रेतांच्या उत्पत्तीच्या कल्पना, भूतांची स्थानें, व त्यांचे पराक्रम, व भूतांसंबंधीं अनेक दंतकथा, निरनिराळ्या धर्मांतील भूत, दृष्ट, पिशाच आदि पीडाशमनार्थ मंत्र तंत्र, यंत्र, ताईत, दोरे, तोडगे आदि उपाय, मिथ्या भूतांचा भ्रम, व तत्संबंधीं अनेक दंतकथा, वगैरे अनेक उपयुक्त विषय आहेत. यांत एकंदर चार भाग व ५५ प्रकरणें असून शेवटीं कित्येक मंत्र, तंत्र, यंत्रादिकांच्या चित्राकृति काढल्या आहेत. पुस्तकाचीं रॉयल सोळा पेजी १६४ वर पृष्ठें असून बांधणी जाड पुठ्याची आहे. हें उपयुक्त पुस्तक सर्वांस घेतां यावें ह्मणून याची कि. ८१२ आणे, अगदींच माफक ठेविली आहे. व्ही. पी. नें. ८१४ आणे पडतील.



२. अद्भुत कार्डपंचक.



कुटुंबांतील मनुष्यांस किंवा हरएक प्रसंगीं इष्ट—मित्रमंडळीस चमत्कारिक प्रयोग दाखवून त्यांचें मनरंजन करण्यासाठीं मुद्दाम हें 'अद्भुत कार्डपंचक' तयार केलें आहे. यांत पुढें लिहिल्याप्रमाणें पांच प्रकारचे मुद्दाम तयार केलेले कार्ड-बंडल आहेत.

नंबर १ देवताई-कार्ड [पत्ते ६] यायोगें कोणीहि आपल्या मनांत देवी, देवता, वार, फळ, फूल, धातु यांपैकीं कोणतेंही नांव मनांत धरिलें असतां तें आपणांस तत्काल विनचूक सांगतां येतें.

नंबर २ कर्णपिशाच-कार्ड [पत्ते ४] यायोगें गंजिफांच्या बंडलांतील कोणतेंहि मनांत धरलेलें पान बरोबर सांगतां येतें. तसेंच मंडळीपैकी एकाद्यानें कांहीं वस्तु छपविली असतां, अमक्यानेंच ती छपविली हें सांगतां येतें.

नंबर ३ मनकवडा-कार्ड [पत्ते ६] यायोगें कोणीहि आपलें वय किंवा अंक मनांत धरला असतां तत्काल सांगतां येतो.

नंबर ४ बहुरूपी-कार्ड [पत्ते ६] बादशहा व जादुगार यांचें अकस्मात् रूपांतर होणें, अर्थात् देखतां देखत तीन प्रकारें बदलणारें अपूर्व कार्ड.

नंबर ५ मायावी-कार्ड [पत्ता १] हा पत्ता हातांतल्या हातांत अकस्मात् देखतां देखत बदलला जातो.

याची किंमत १॥ रुपया आहे. तरी तूर्त फक्त १। रुपया पडेल. ट. व्ही. पी. चे ०० जास्त.

हे चमत्कार दाखविण्याच्या माहितीचें पुस्तक यासोबत असतें. वरील दोन्हीं पुस्तकें एकदम घेतल्यास ट. व्ही. पो. सह २ रुपयांत देऊं.

मॅजिक प्रोफेसर जी. एम्. कार्लेकर,

पत्ता—डंकन रोडनजीक, दुर्गादेवीच्या देवळासोजारील घर, मुंबई पोस्ट नं० ४.

मनोरंजनासंबंधीं नियम.

१. मनोरंजनाचा वर्षारंभ जुलईत आहे. वर्गणी मुंबईत आणि बाहेरगांवीं सर्वत्र सारखी ४ रुपये आहे. किरकोळ अंकाची किंमत ८ आणे.

२. नवीन वर्गणीदारांस, ते केव्हांहि वर्गणीदार झाले तरी, वर्षारंभापासूनचे सर्व अंक पाठविण्यांत येतात, व जुलै ते जूनअखेर वर्गणीचें वर्ष संपतें.

३. मनोरंजनाच्या वर्गणीदारांस या वर्षीं दोन बक्षिसपुस्तकें–एक कांहींहि किंमत न घेतां, आणि दुसरें अतिशय सवलतीनें–देण्याचें निश्चित केलें आहे. पैकीं पहिलें बक्षिस पुस्तक 'विचारविलसित' नांवाचें सुंदर नाटक असून ते सर्वांनां प्रारंभींच (पहिल्या अंकाबरोबर) देण्यांत आलें आहे. दुसरें बक्षिस पुस्तक प. वा. न्या. मू. काशीनाथ त्र्यंबक तेलंग यांचें चरित्र हें असून तें तीनचार महिन्यांनंतर प्रसिद्ध होईल. हें चरित्र अत्यंत महत्त्वाचें, सुंदर रीतीनें लिहिलेलें, आणि बरेंच मोठें असून त्याची किंमत १ रुपया आहे. मनोरंजनाच्या वर्गणीदारांस हें फक्त ४ आणे ही अल्प किंमत घेऊन सवलतीनें बक्षिसादाखल देण्यांत येईल. ज्यांनां हें नको असेल त्यांनीं तें सवलतीच्या किंमतीनेंहि घेण्याची अर्थात्च आवश्यकता नाहीं.

४. वरील दोन बक्षिसपुस्तकांशिवाय नोव्हेंबर महिन्यांत नोव्हेंबरच्या अंकाऐवजीं फार मोठा, सुंदर व सचित्र असा 'दिवाळी'चा अंक, कांहींहि किंमत घेतल्याशिवाय वर्गणीदारांकडे बुकपोस्टानें पाठविण्यांत येईल.

५. मनोरंजनाच्या वर्गणीदारांनीं आमच्याशीं पत्रव्यवहार करतांना आपला रजिस्टरनंबर अवश्य कळवावा. हा रजिस्टर नंबर प्रत्येक अंकाच्या रॅपर (वेष्टना) वर डकविलेल्या अगर लिहिलेल्या पत्त्यामध्यें वर्गणीदाराच्या नांवाच्या आरंभीं असतो.

६. मनोरंजनांत प्रसिद्धीसाठीं पाठवावयाच्या लेखांसोबत लेखकाचा संपूर्ण पत्ता आणि पुरेसें पोस्टेज असावें, ह्मणजे नापसंत अगर प्रसिद्ध करण्यास सवड नसल्यामुळें परत करावयाचे लेख ज्यांचे त्यांच्याकडे १५ दिवसांचे आंत परत पाठविण्यांत येतील. सदर्हु लेखांसोबत पत्ता व पोस्टेज नसल्यास ते निकालांत काढण्यांत येतील, मागाहून मिळूं शकणार नाहींत. मोबदल्याची अपेक्षा करणारांनीं आपली ती इच्छा प्रारंभींच स्पष्ट कळविली पाहिजे, ह्मणजे त्या बाबतींत विचार करण्यांत येईल.

मालक—मासिक मनोरंजन, गिरगांव—मुंबई.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीनें

प्रसिद्ध केलेलीं कांहीं पुस्तकें.

कादंबऱ्या.

१ रमामाधव.	०–४–०
२ मुरारराव.	०–४–०
३ भयंकर सूड.	०–४–०
४ संसारांतील गोष्टी.	०–६–०
५ अमृतपुलिन.	०–६–०
६ भयंकर ग्रहदशा.	०–६–०
७ प्रेमविजय.	०–६–०
८ धाकट्या सूनबाई.	०–८–०
९ प्रियंवदा.	०–८–०
१० मृणालिनी.	०–८–०
११ परिणामीं हेंच !	०–८–०
१२ भोळा बाळू.	०–८–०
१३ मूर्तिमंत देशाभि०	०–८–०
१४ सरस्वती.	०–१०–०
१५ सुशिक्षित स्त्री.	०–१०–०
१६ नवयुग.	०–१२–०
१७ जीवनसंध्या.	०–१२–०
१८ लीला.	०–१२–०
१९ बकुलमाला.	०–१२–०
२० राजा तोडरमल.	०–१२–०
२१ सुधा.	१–०–०
२२ रामाची अयोध्या.	१–०–०
२३ माणिकबाग.	१–४–०
२४ दुःखा अंतीं सुख.	१–४–०
२५ नशिबाची परीक्षा.	१–४–०

नाटकें व प्रहसनें.

१ वेड्यांचें इस्पितळ.	०–३–०
२ नीलांबरी.	०–३–०
३ पन्हाळगड किल्ले०	०–४–०
४ रावबहादुरपर्वत्या.	०–६–०
५ चतुरविनोदी स्त्रि.	०–६–०
६ द्रोणसंकोप.	०–६–०
७ भ्रमनिरसन.	०–६–०
८ मुद्राराक्षस.	०–८–०
९ मालतीमाधव.	०–८–०
१० संग्रामसिंह.	०–८–०
११ गौप्यगोपन.	०–८–०
१२ सुंदरमाधव.	०–१०–०

कविता.

१ हंसदूत.	०–२–०
२ मोहनतारा.	०–२–०
३ कुसुमगुच्छ.	०–४–०
४ उपदेशपाठ.	०–४–०
५ काव्यकुञ्ज.	०–४–०

चरित्रें वगैरे.

१ रा. व. वारद. ०–४–०
२ ऐतिहासिक स्त्रिया. ०–८–०
३ आमच्या आठवणी १–४–०

धार्मिक आणि उपदेशपर.

१ विवेकानंदाचीं पत्रें. ०–४–०
२ स्वामी रामतीर्थ. १–४–०
३ रानडे–व्याख्यानें. १–८–०

विनोदपर.

१ भद्रंभद्र. ०–१०–०
२ सुदाम्याचे पोहे. ०–१२–०

इंग्रजी.

Indian Worthies. 1—0—0
Chandavarkar's Speeches. 2—8—0

मनोरंजनाच्या मागील वर्षांच्या पुस्तकांबद्दलची जाहिरात पुढील पृष्ठावर प्रसिद्ध झाली आहे ती पहा.

वरील सर्व पुस्तकांस टपालहंशील निराळें पडेल. जीं थोडींशीं कापडी बांधणीचीं पुस्तकें आहेत त्यांबद्दल बांधणीप्रमाणें २ आणे अगर ४ आणे जास्त किंमत पडेल.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव–मुंबई.

मनोरंजन ऑफिसचा नवीन पत्ता.

गिरगांव—चर्नीरोड, डा. सर भालचंद्र यांचे शेजारीं, ३ रा मजला.

[1–3]

[99]

के. आर्. फाटक यांचें

बालामृत

जीर्णज्वर, श्वास, खोकला, हातपाय वारीक असणें, अन्न न पचणें इत्यादि रोग आमच्या बालामृतानें तात्काळ बरे होतात. पिंड निरोगी, सशक्त व सतेज होतो. हें गोड असल्यामुळें मुलें हौसेनें घेतात. एका बाटलीची किं. १२ आणे. टं. ख. निराळा.

के. आर्. फाटक, ठाकुरद्वार रोड, मुंबई, नं. २.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

मनोरंजनाचीं मागील वर्षांचीं पुस्तकें.

खालीं दिलेल्या, मनोरंजनाच्या मागील वर्षांच्या पुस्तकांच्या, थोडथोड्या प्रती शिल्लक आहेत. हीं पुस्तकें सर्वांनां फारच सवलतीनें, अति स्वल्प किंमतींत मिळण्याची व्यवस्था केली आहे.

मनोरंजन पुस्तक ६ वें. (पृष्ठें २९२.)
मूळ किंमत १-१२-०. सवलतीची किंमत ०-१२-०.

मनोरंजन पुस्तक ९ वें. (पृष्ठें ४८०.)
मूळ किंमत २-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १० वें. (पृष्ठें ५८४.)
मूळ किंमत२-८-० सवलतीची किंमत ०-१२-०.

मनोरंजन पुस्तक ११ वें. (पृष्ठें ४००.)
मूळ किंमत२-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १२ वें. (पृष्ठें ५५२.)
मूळ किंमत २-८-०. सवलतीची किंमत१-४-०.

मनोरंजन पुस्तक १३ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १४ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १४ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत१-८-०. सवलतीची किंमत ०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १५ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत १-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १६ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १६ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत१-८-०. सवलतीची किंमत०-१२-०.

मनोरंजन पुस्तक १७ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत २-०-० सवलतीची किंमत १-८-०.

मनोरंजन पुस्तक १७ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत२-०-०. सवलतीची किंमत १-८-०.

दोन घटका मनोरंजन. (पृष्ठें ३९२.)
मनोरंजन वर्ष १, २ व ३ यांतील गोष्टी.
किंमत १-४-०.

दोन घटका मनोरंजन. (पृष्ठें ४००.)
मनोरंजन वर्ष ४ व ५ यांतील गोष्टी.
किंमत १-४-०.

संसाररंजन. (पृष्ठें ३१४.)
मनोरंजन वर्ष ९, १० यांतील गोष्टी.
किंमत १-०-०.

मनोरंजनचा दिवाळीचा अंक.
अंक १ ला. (पृष्ठें १९२.)
किंमत ०-१२-०.

मनोरंजनाचा दिवाळीचा अंक.
अंक २ रा. (पृष्ठें २२४.)
किंमत ०-१२-०.

मनोरंजनाचा दिल्लीदरबारचा अंक.
(पृष्ठें २८०.) किंमत १-०-०.

महाराष्ट्रमहिला, पुस्तक १ लें. (उत्तरार्ध)
पृष्ठें ३८०. किंमत १-०-०.

महाराष्ट्रमहिला, पुस्तक २ रें. (पूर्वार्ध.)
पृष्ठें २४०. किंमत०-१२-०.

विशेष सवलती.

१. वरील २१ पुस्तकांपैकीं कोणतीहि ४ पुस्तकें मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{15}{16}$ किंमतीस देण्यांत येतील.

२. वरील पुस्तकांपैकीं कोणतीहि ८ पुस्तकें मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{7}{8}$ किंमतीस देण्यांत येतील

३. वरील पुस्तकांपैकीं कोणतीहि १२ अगर जास्त मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{3}{4}$ किंमतीस देण्यांत येतील.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव, मुंबई.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी.

१. वाचकांस स्वल्प किंमतींत सुंदर पुस्तकें मिळावीं, ग्रंथकारांस ग्रंथलेखनाच्या कामीं उत्साह वाटावा, आणि मराठी भाषेंत मनोरंजक आणि उपयुक्त अशा उत्कृष्ट पुस्तकांची भर पडावी, या उद्देशानें **मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीनें** या वर्षापासून पुढील योजनेप्रमाणें प्रयत्न करण्याचें निश्चित केलें आहे.

२. मंडळीमार्फत दरसाल सहा, अगर सवडीप्रमाणें त्याहूनहि जास्त पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत येतील. या सर्व पुस्तकांचें अंतर्बहिरंग अत्यंत सुंदर करण्यांत येऊन त्यांच्या किंमती अतिशय स्वल्प ठेवण्यांत येतील.

३. मंडळीमार्फत दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांपैकीं सर्व, अगर आपल्या आवडीप्रमाणें कोणतींहि **कमींत कमी तीन रुपये** किंमतीचीं पुस्तकें विकत घेण्याचें आश्वासन देऊन, आणि **एक रुपया प्रवेशफी** भरून, मंडळीच्या आश्रयदात्यांच्या पटांत नांवें नोंदविणारांस मंडळीचे आश्रयदाते समजण्यांत येईल, व त्यांनां मंडळीच्या पुस्तकमालेपैकीं आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ६० पुस्तकांपैकीं कोणतेंहि पुस्तक, त्याचप्रमाणें मंडळीच्या पुस्तकमालेपैकीं पुढें प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांपैकीं कोणतेंहि पुस्तक (फक्त एक प्रत) **पाऊणपट किंमतीस** देण्यांत येईल.

४. प्रत्येक पुस्तक तयार होतांच कार्ड पाठवून आश्रयदात्यांस आगाऊ सूचना देण्यांत येईल. हें पुस्तक घ्यावयाचें नसल्यास आश्रयदात्यानें १५ दिवसांच्या आंत तसें स्पष्ट कळविलें पाहिजे. आपल्याला सदर्हु पुस्तक नको असल्याचें जे स्पष्ट कळवितील त्यांच्या शिवाय बाकीच्या सर्व आश्रयदात्यांकडे तें पुस्तक पाऊणपट किंमत आकारून व्ही.-पी. नें पाठविण्यांत येईल.

५. याप्रमाणें व्ही. पी. नें पुस्तक पाठविलें असतां जे तें परत करतील, किंवा आश्वासनाप्रमाणें वर्षांत **कमींत कमी तीन रुपये** किंमतीचीं पुस्तकें जे मागविणार नाहींत, त्यांनां व्ही. पी. चा-खर्च देण्याबद्दल आणि आश्वासनाप्रमाणें तीन रुपयेपर्यंत किंमतीचीं पुस्तकें घेण्याबद्दल सूचना दिली जाईल. परंतु जे एक महिन्याच्या आंत त्याप्रमाणें करणार नाहींत, त्यांचीं नांवें आश्रयदात्यांच्या पटांतून सालअखेर कमी केलीं जातील. पुनः एक रुपया प्रवेशफी भरल्यास त्यांचीं नांवें आश्रयदात्यांच्या पटांत नोंदलीं जातील, व त्यांनां पुनः सवलतीचा लाभ मिळूं शकेल.

मंडळीच्या या नवीन योजनेला साहाय्य करून स्वल्प किंमतींत उत्कृष्ट पुस्तकें अधिकाधिक प्रसिद्ध करण्याच्या कामीं, व ग्रंथकारांचा उत्साह वाढविण्याच्या कामीं मंडळीला उत्तेजन द्यावें, अशी सर्व महाराष्ट्र बंधुभगिनींस आग्रहाची विनंति आहे.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव—मुंबई.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीचीं नवीन पुस्तकें.

विक्रीस तयार !

१. वकुलमाला.

सुप्रसिद्ध वंग कादंबरीकर्त्री श्रीमती स्वर्णकुमारीदेवी यांच्या एका सुंदर कादंबरीच्या आधारें हें पुस्तक लिहिलें असून यांचीं ३५ प्रकरणें आहेत. हें अँटिक पेपरवर छापलें आहे.

किंमत ०–१२–०. ट. ह. निराळे.

२. डा. आनंदीबाई जोशी यांचें चरित्र.

सुप्रसिद्ध महाराष्ट्र ग्रंथकर्त्री श्रीमती सौ. काशीबाई कानिटकर यांनीं लिहिलेल्या पुस्तकाची ही दुसरी आवृत्ति असून या पुस्तकाचीं बारीक टाइपांत छापलेलीं सुमारे ३५० पृष्ठें झालीं आहेत.

किंमत १–४–०. ट. ह. निराळे.

लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें.

१ श्रीरामकृष्णांचीं बोधवचनें. किंमत. ०–८–०.
२ श्रीरामकृष्ण. ,, १–४–०.

१ रुपया प्रवेश फी भरून मंडळीचे वर्गणीदार होणारांस हीं सर्व पुस्तकें, त्याचप्रमाणें मंडळीच्या पुस्तकमालेंत आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं ६० पुस्तकें, त्याचप्रमाणें मंडळीच्या पुस्तकमालेंत पुढें प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें, पाऊणपट किंमतींत मिळतील. विशेष माहितीसाठीं समोरील पृष्ठावरील जाहिरात पहा.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव—मुंबई.

स्त्रीचें शिरोभूषण !!!



मृदु, कुरळ, काळाभोर, चकचकीत असा केशकलाप कोणला बरें आवडणार नाहीं ? असा सुंदर केशकलाप प्राप्त करून देणारें

'कामिनीया ऑईल'

हें एकच तेल असून तें प्रत्येक स्त्रीचा जसा सौभाग्यालंकार आहे त्याचप्रमाणें तें मानसिक श्रम पडणाऱ्या पुरुषांसाठीं व विद्यार्थ्यांसाठी जरूरीचें आहे. हें तेल लावतांच संतप्त असलेले डोकें शांत होऊन थंडावा येतो, मन उल्हसित होतें, डोक्यांतील सर्व घाणेरडे कचरे साफ करे होऊन केस बिलकुल गळून न पडतां ते सुंदर रीतीनें व पुष्कळसे वाढतात. याचा सुवास अत्यंत मधुर व मोहक आहे. आजच्याच लिस्ट पाठवून नमुना मागवा.

१ बाटलीस १ रु. ट. रा. ४ आ. ३ बाटल्यांस २ रु. १० आ. ट. रा. ४ आ.

अवश्य संग्राह्य औषधें



श्वास, दमा, खोकला, घेंगरेवर घरगुती. ऑडमन्स कफ एक्सिपिरेटर.

फुप्फुसाच्या सर्व रोगांवर, पडसें दुखणें, छातींतून रक्त पडणें, श्वास लागणें व थंडी लागल्यापासून होणाऱ्या खोकल्यावर हें अत्यंत गुणकारी आहे. अनुभवानेंच खात्री होईल. सर्व देशभर याचा जारीनें खप होत आहे. सौम्य रसायन घेंगरें कांहीं नसल्यामुळें लहानापासून थोरापर्यंत सर्वांस याचा उपयोग होतो. कि. १ रु. ट. रा. ४ आ.

सर्व प्रकारच्या कपाळदुखीवर देझो टेबलेट्स (देझो-वट्या)

अर्धशिशी, मलकशूल-सर्दी गर्मी, कमजोरीमुळें अगर इतर कोणत्याहि कारणांमुळें कपाळ कितीहि दुखूं द्या, देझोच्या दोन वट्या पाण्याचे घोटाबरोबर पोटांत घेतांच कपाळ दुखण्याचा मागमूसहि राहणार नाहीं. पावरण्यानेंच सारा प्रकार कळून येणार आहे.



कि. २० वट्यांचे बाटलीस ८१२ आणे. ट. रा. ४ आ. निराळा.

सर्व प्रकारचे संधिवातावर



आडमन्स सायप्रस साल्व्ह.

वातामुळे शरीराचा कोणताहि भाग दुखणें, श्वासोच्छ्वास करतांना छातींत दुखणें, सांधे धरणें, कमर दुखणें, हातपाय बधिरणें, घेंगरेवर हें मलम जरासें चोळल्याच क्षणेंच आराम पडतो. बधिरा आलेला अवयव हें चोळल्यानें धडधडा जाऊन ते ठिकाणचे स्नायू चळवळ होतात. हें सुंदरसा टिनी भोंवतीं पेत असून वर 'Odman's cypres salve' असें लिहिलेलें असतें. कि. १ रु. ट. रा. ४ आ. निराळा.

सर्व माल मिळण्याचा पत्ता—

मि. हेरली इंडियन ड्रग [illegible] मोफत कंपनी, सर्वांत देशी औषधें निकार, जुम्मामशीद-मुंबई.

मासिक मनोरंजन

वर्ष १८ वें, अंक ४ था.



गांधर्वमहाविद्यालय.

गायनवादन शिक्षणाची उत्तम संस्था.
हेडऑफिस-गिरगांव बॅकरोड, मुंबई.
शाखा—लाहोर, पुणें, व प्रिन्सेस-स्ट्रीट, मुंबई.

GANDHARVA MAHAVIDYALAYA

१. पंडित विष्णु दिगंबर यांच्या संगीत लेखनपद्धतीवर लिहिलेलीं क्रमिक पुस्तकें विकत मिळतील. २. संगीत विषयावर स्वतंत्र मासिक पुस्तक-हिंदींत व मराठींत प्रसिद्ध होतें. ३. सर्व प्रकारचीं वाद्यें दुरुस्त केलीं जातील. व ऑर्डरीप्रमाणें नवीन विकत मिळतील. ४. मंगलप्रसंगी गायनाच्या पार्ट्या मिळूं शकतील.

Vol. XVIII.] संपादक—काशीनाथ रघुनाथ मित्र, [No 203.
गिरगांव-मुंबई.
वार्षिक वर्गणी ट. ई. सह ४-०-०.] [किरकोळ अंकाची किंमत ०-८-०.

रजिस्टर्ड.

अमृतांजन.

अचुक गुणकारी !
Indian Pain Balm.



पुष्कळ नामांकित डाक्टरांनीं व सद्गृहस्थांनीं सर्वोत्तम ठरविलेलें, मस्तकशूल, संधिवात, विंचवाचा दंश, घाव, उंब, ज्ञानतंतुगत पीडा, यांवर रामबाण. फक्त तीन वेळ लाविल्यानें गुण येतो. हजारों शिफारसपत्रें व नागपुरच्या प्रदर्शनांत पदक मिळालें आहे. दु खमस्तांचा हा एकच उपाय आहे. प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रही ठेवावें. किंमत ८ आणे. व्ही. पी. नें १२ आणे. [4–12].

गजकर्णाचें मलम.—हे लाविल्यानें नायटे, खरूज, गजकर्ण, इसब वगैरे सर्व प्रकारचे त्वचागत रोग : तासात बरे होतात. कि. १ डबीला ६ आणे. ट. स. ४ आ

दंतमंजन—दररोज सकाळीं यानें दांत घांसल्या दातांतून रक्त वाहण्याचें बंद होऊन दांत स्वच्छ होतात मुखदुर्गंधी नाहींशी होते. किंमत २ आणे.

अमृतांजन डिपो, १०९ फ्रियर रोड, मुंबई.



[1–12]

लहान मुलांसाठी डोंगरें यांचें बालामृत पेटेवेळीं तें लावींच असल्यामुळ खात्री करून घ्यावी.

बाटलीची कि. ।॥। ट. स. ।•

के. टी. डोंगरे कंपनी,
गिरगांव—मुंबई.

पुस्तक १८ वें, माहे आक्टोबर १९१२, अंक २०८.

विषयानुक्रम.

१	मंदिरांतून घराकडे. (दर्शनी चित्र.) चित्रकार श्रीयुत एम्. ए. जोशी.	२६९
२	डॉ. कुमारी नागूताई जोशी.	२६९
३	डॉ. कुमारी मुथुलक्ष्मी अम्मल.	२७८
४	जनरल विल्यम बूथ.	२७९
५	शारदा. (चालू कादंबरी.)	२८५
६	संसार असार! (कविता.) श्रीयुत विठ्ठल सीताराम गुर्जर.	३००
७	गुरुकुल. (प्रवासवर्णन.) श्रीयुत प्रो. गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.	३०१
८	व्हीनसचा पुतळा. (नाटिका.)	३११
९	आधुनिक काळांतील मुलें अशक्त कां ?	३१६
१०	आमचा जातिभेद.	३१९
११	चतुर उत्तरें.	३२०
१२	हृदयशारदेस. (कविता) श्रीयुत ' गोविंदाग्रज. '	३३२
१३	वाचन. श्रीयुत गणेश सदाशिव भाटे, एम्. ए.	३३३
१४	कांहीं डॅनिश म्हणी.	३४०
१५	लाल पायमोजे. (संपूर्ण गोष्ट.) श्रीयुत ल. वि. परळकर, बी. ए., एल् एल्. बी.	३४१
१६	संतांचा परिचय. श्रीयुत गोविंद गोपाळ टिपणीस.	३४७
१७	उपयुक्त माहिती.	३५७
१८	संतवचनें.	३५८
१९	स्वयंपाकघरांतील गोष्टी.	३६०
२०	साहित्यसमालोचन.	३६२

मनोरंजनाचा दिवाळीचा अंक.

मनोरंजनाचा येता म्हणजे दिवाळीचा खास अंक छापण्याचें काम म्हणण्यानें सुरू असून तो बरोबर दिवाळीच्याच दिवशीं वाचकांच्या हातीं पडावा, अशी व्यवस्था, चालविली आहे. या अंकाचें अंतरंग व बाह्यांग शक्य तितकें चित्ताकर्षक, मनोरंजक व बोधप्रद करावयाचे पराकाष्ठेचे प्रयत्न चालू असून, अतिशय खर्च करून हाफटोन प्रोसेसनें तीन रंगांत छापलेलें एका अत्यंत हृदयंगम प्रसंगाचें दर्शनी चित्र, व दोन रंगी मुखपृष्ठ यांनी या अंकाचें बाह्यांग अपूर्व होईल, असा भरंवसा आहे. याशिवाय महाराष्ट्रांतील प्रमुख गद्य व संगीत नाटक मंडळ्यांच्या उत्तम नाटकांतील उत्कृष्ट प्रवेशांचे फोटो, महाराष्ट्रांतील उपयुक्त संस्थांच्या कार्यकारी मंडळ्यांचे फोटो, गोष्टी, प्रवासवृत्त वगैरे लेखांतील डिझाइन्स व फोटो, व कित्येक स्वतंत्र चित्रें व फोटो यांनीं या अंकाची शोभा विशेष मनोहर होईल. याशिवाय महाराष्ट्रांतील निरनिराळ्या शंभरांवर उपयुक्त संस्थांची थोटक माहिती या अंकांत येणार असून या विशेषानें मनोरंजनानें एक उपयुक्त कार्य साधल्यासारखें होईल.

संपादक—मनोरंजक.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी.

१. वाचकांस स्वल्प किंमतींत सुंदर पुस्तकें मिळावीं, ग्रंथकारांस ग्रंथलेखनाच्या कामीं उत्साह वाटावा, आणि मराठी भाषेंत मनोरंजक आणि उपयुक्त अशा उत्कृष्ट पुस्तकांची भर पडावी, या उद्देशानें **मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीनें** या वर्षापासून पुढील योजनेप्रमाणें प्रयत्न करण्याचें निश्चित केलें आहे.

२. मंडळीमार्फत दरसाल सहा, अगर सवडीप्रमाणें त्याहूनहि जास्त पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत येतील. या सर्व पुस्तकांचें अंतर्बहिरंग अत्यंत सुंदर करण्यांत येऊन त्यांच्या किंमती अतिशय स्वल्प ठेवण्यांत येतील.

३. मंडळीमार्फत दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांपैकीं सर्व, अगर आपल्या आवडीप्रमाणें कोणतींहि **कमींत कमी तीन रुपये** किंमतीचीं पुस्तकें विकत घेण्याचें आश्वासन देऊन, आणि **एक रुपया प्रवेशफी** भरून, मंडळीच्या आश्रयदात्यांच्या पटांत नांवें नोंदविणारांस मंडळीचे आश्रयदाते समजण्यांत येईल, व त्यांनां मंडळीच्या पुस्तकमालेपैकीं आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ६० पुस्तकांपैकीं कोणतेंहि पुस्तक, त्याचप्रमाणें मंडळीच्या पुस्तकमालेपैकीं पुढें प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांपैकीं कोणतेंहि पुस्तक (फक्त एक प्रत) **पाऊणपट किंमतीस** देण्यांत येईल.

४. प्रत्येक पुस्तक तयार होतांच कार्ड पाठवून आश्रयदात्यांस आगाऊ सूचना देण्यांत येईल. हें पुस्तक व्यावयाचें नसल्यास आश्रयदात्यानें १५ दिवसांच्या आंत तसें स्पष्ट कळविलें पाहिजे. आपल्याला सदर्हु पुस्तक नको असल्याचें जे स्पष्ट कळवितील, त्यांच्याशिवाय बाकीच्या सर्व आश्रयदात्यांकडे तें पुस्तक पाऊणपट किंमत आकारून व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल.

५. याप्रमाणें व्ही. पी. नें पुस्तक पाठविलें असतां जे तें परत करतील, किंवा आश्वासनाप्रमाणें वर्षांत कमींत कमी तीन रुपये किंमतीचीं पुस्तकें जे मागविणार नाहींत, त्यांनां व्ही. पी. चा खर्च देण्याबद्दल आणि आश्वासनाप्रमाणें तीन रुपयेपर्यंत किंमतीचीं पुस्तकें घेण्याबद्दल सूचना दिली जाईल. परंतु जे एक महिन्याच्या आंत त्याप्रमाणें करणार नाहींत, त्यांचीं नांवें आश्रयदात्यांच्या पटांतून सालअखेर कमी केलीं जातील. पुनः एक रुपया प्रवेशफी भरल्यास त्यांचीं नांवें आश्रयदात्यांच्या पटांत नोंदलीं जातील, व त्यांनां पुनः सवलतीचा लाभ मिळूं शकेल.

मंडळीच्या या नवीन योजनेला साहाय्य करून स्वल्प किंमतींत उत्कृष्ट पुस्तकें अधिकाधिक प्रसिद्ध करण्याच्या कामीं, व ग्रंथकारांचा उत्साह वाढविण्याच्या कामीं मंडळीला उत्तेजन द्यावें, अशी सर्व महाराष्ट्र बंधुभगिनींस आग्रहाची विनंति आहे.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव—मुंबई.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव–मुंबई.

नवीन पुस्तकें

विक्रीस तयार !

१ वकुलमाला. (कादंबरी.)

श्रीमती स्वर्णकुमारीदेवी यांच्या बंगाली पुस्तकाचें रूपांतर. ०–१२–०.

२ डॉ. आनंदीबाई जोशी यांचें चरित्र.

श्रीमती सौ. काशीबाई कानिटकर, पुणें यांनीं लिहिलेलें. १–४–०.

३ श्रीरामकृष्ण.

श्रीयुत नागेश वासुदेव गुणाजी बी. ए., एल् एल्. बी., वेळगांव, रामतीर्थ पुस्तकाचे कर्ते यांनीं लिहिलेलें. १–४–०.

४ श्रीरामकृष्णाचीं बोधवचनें.

श्रीयुत नागेश वासुदेव गुणाजी, बी. ए., एल् एल्. बी., कृत ०–८–०.

नवीन पुस्तकें

छापत आहेत:—

५ केवळ स्वार्थापायीं ! (कादंबरी.)

श्रीयुत विनायक रामचंद्र जोशी, बी. ए., पुणें, यांनीं लिहिलेलें.

६ आजपासून पन्नास वर्षांनीं ! (कादंबरी.)

श्रीयुत कृष्णाजी केशव गोखले, न्यायाधीश, जत, यांनीं लिहिलेलें.

७ बोधपर व्याख्यानें.

श्रीयुत महादेव रामचंद्र प्रधान, नागपुर, यांनीं लिहिलेलें.

८ श्रीदयाळनाथांची कविता.

श्रीयुत अच्युत सीताराम साठे, एम्. ए., प्रभृति लेखकांनीं संपादिलेलें.

लेखकांस विनंति.

स्वतंत्र, अगर परभाषेंतील ग्रंथाधारें लिहिलेल्या कादंबऱ्या, चरित्रें, उपदेशपर पुस्तकें इत्यादि पसंत पडल्यास लेखकास योग्य मोबदला देऊन त्याच्यापासून प्रकाशना-संबंधाचे सर्व हक्क विकत घेऊन प्रसिद्ध करण्यांत येतील. पत्रव्यवहार करावा.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव—मुंबई.

[3–12] CLERKS' HANDBOOK.

THIRD EDITION, REVISED AND ENLARGED, pages 285, cloth bound, contains 387 complete specimen Letters for Private and Commercial Correspondence, Book-Keeping, Ready Reckoner, Proof Correcting, and several other Subjects very useful for Students fresh from Schools and Colleges seeking employment and Clerks wishing to rise in Government or Mercantile Offices. Price by V. P. P. Re. 1- 8. Apply to:—
DUBHASHI & Co.
1st Bhatwadi, Girgaum, Bombay.

धि बॉम्बे टाईल कंपनी,



टाइल्स,
मार्बल्स, स्टोनमर्चेंट,
[1–12] अँन्ड कॉन्ट्रॅक्टर,
१६७, डंकनरोड, मुंबई, नं. ४

गृहिणीभूषण.

[3–6] दुसरी आवृत्ती.

लेखक-श्रीमती सौ. गिरिजाबाई केळकर.

सदर पुस्तक लोकांस पसंत पडून लवकर खपल्यामुळें त्याची दुसरी आवृत्ति काढण्यांत आली आहे. पुस्तकांत अनेक सुधारणा केल्या आहेत. किंमत पांच आणे.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण:—
मनोरंजन ऑफिस, गिरगांव—मुंबई.

ग्यारंटी पक्या रंगाची! [3–12]

इनाम रंग फिटला असें दाखविणारांस!

अमदाबादी पक्या रंगाचीं लुगडीं, खण, चिरब्या, पितांबर, कद, धोतरजोडे, उपरणीं इत्यादि कोणत्याहि प्रकारचा माल. कॅटलाग फुकट. तिकीट पाठवा.

धि गुजरात कंपनी, रायपुर-अमदावाद.

लेखक—डॉ. काळोखे, आयुर्वेदविद्यालय व हिंदु हॉस्पिटलाचे माजी रेसिडेंट फिझिशियन हाऊस सर्जन व अग्निमांद्य पुस्तकाचे कर्ते.

रोगजंतू.

बहुतेक रोग सूक्ष्म जंतूंनीं होत असल्याचें सिद्ध झाल्यामुळें व मराठींत या विषयावर स्वतंत्र असें एकहि पुस्तक नसल्यानें लोकांस रोगजंतूंची माहिती व्हावी या हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे. यांतील विषय—जंतुशास्त्राची माहिती, जंतूंचें वसतिस्थान, त्यांच्या जाती, त्यांचें स्वाब, आकार, वाढ, त्यांपासून उत्पन्न होणारीं विषें, त्यांचे शरीरांत शिरण्याचे मार्ग, रोगोत्पत्ति केव्हां व किती वेळानें होते, जंतूमुळें होणारे रोग, जंतूंचे निरनिराळे आकार, जंतू व त्यांचीं विषें नाश करणारीं औषधें व त्यांचा उपयोग वगैरे. छपाई निर्णयसागरची. किंमत फक्त ६ आणे. ट. व व्ही. पी. खर्च २ आणे.

पत्ता—डॉ. ग. पां. काळोखे, गिरगांव—मुंबई.

सोन्याचे दागिने.

ठुशा, बिल्वदळी टीका, साज, तायताळी, गुलाबाचीं पागऱ्यांचीं व इतर फुलें, मुदा, ताशीव कुडीं, बुगड्या, अष्टपैलु, जोंधळे व मणी वगैरे. [1–12]

शुद्ध चांदीचीं भांडीं.

ताट, वाट्या, गडवे, पेले, ताह्मनें, कपबशी-सेट, पूजेचीं उपकरणीं, संध्येच्या पळ्या, द्रोण, करंडे, कुयऱ्या, चमचे, बोंडलीं, नक्षीचीं तबकें, अत्तर व गुलाबदाण्या, डब्या, अडकित्ते वगैरे.

चांदीचे दागिने.

तोडे, वाळे, पैंजण, गजरे किंवा रूळ जोड, मासोळ्या, कटदोरे, गंधाची साराळी, कोटाचीं व शर्टचीं बटणें वगैरे.

सूचना—मालास उत्तम सोनें व भांड्यांस शुद्ध चांदी वापरलेली असते. व्ही. पी. नें. पाठवूं.

टी. ए. पाराशर,
बुधवार पेठ, नाशिक सिटी.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

सुधासिन्धु. वीस वर्षे अनुभविलेलें, सरकारांतून रजिस्टर झालेलें, कफ, सोकला, दमा, हिंवताप, कालरा, शूल, संग्रहणी, आमांश, अतिसार, वांती, मळमळ, पोटदुखी, हात, पाय व कंबर दुखणें, लहान मुलांचे हिरवेपिंवळे जुलाब, छाती भरणें, दूध ओकणें वगैरे अनेक विकारांवर खादेष्ट, रुचकर आणि सुगंधि औषध. एका बाटलीची किंमत ८ आणे. १२ बाटल्यांस ४॥ रुपये. [3–12]

दद्रुगजकेसरी. वीस वर्षे अनुभविलेलें. हेंहि सरकारांतून रजिस्टर झालेलें औषध आहे. मुळींच न झोंबतां, अथवा यत्किंचितहि त्रास किंवा दाह न करितां गजकर्णाचा समूळ नाश करितें. १ बाटलीची किंमत ४ आणे. १२ बाटल्या घेणारांस ट. ख. न पडतां २। रु. किंमत पडून, आणखी वर मनुष्याच्या दशदशा ज्यांत दर्शविल्या आहेत असें एक सुंदर चित्र बक्षिस !

वरील औषधांपैकी कोणत्याहि औषधाच्या १ डझन बाटल्या मागविणारे गावचे एजंट होऊं शकतात.

मागविण्याचा पत्ता—

क्षेत्रपालशर्मा, मालक,
सुखसंचारक कंपनी, मथुरा.

बाहेरगांवच्या लोकांची

उत्तम सोय.

सर्व प्रकारचीं सुवासिक तेलें, अत्तरें, सेन्ट्स्, लव्हेन्डर; मेणबत्त्या, बटन्स् वगैरे सर्व प्रकारचें स्टेशनरी सामान; सर्व प्रकारचीं इंग्लिश मराठी पुस्तकें व याशिवाय मुंबईत मिळणारा इतर कोणत्याहि तऱ्हेचा माल, अगदीं कसोशीनें खरेदी करून माफक कमिशननें पाठविला जाईल. **दिवाळीकरितां** उंची कनोजी अत्तरें उटण्यांसह विक्रीस तयार.

दर पेटीस कि. रु. ५ व ३.

सुवासिक दंतमंजन. डबी. कि. ३ आणे.
सत्वर गुणकारी गजकर्णमलम. कि. ८४

जोशीब्रदर्स आणि कंपनी,
कमिशन् एजन्टस्,
[1–12] कांदेवाडी, मुंबई नं. ४.

सर्वोपयोगी **शिवणकलेचें** सोपें पुस्तक, कि. ८८
मोनोग्राम ड्राइंग पत्रक, किंमत ८२८६
यांपैकीं कोणतेंहि पुस्तक मागविणाऱ्या **मनोरंजन**चे वर्गणीदारास पाऊणपट किंमतीस विकत मिळेल.

रामचंद्र वामन सोले,
[1–1] कलाशिक्षण, अहमदनगर.

वाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या, हीं ज्वर आणि हिंवतापावर रामबाण आहेत. ताप आणि शीतज्वर येणारसें वाटतांच हें घ्यावें. कि. १ रु.

शक्तिवर्धक गोळ्या १॥· रु.
दंतमंजन ४ आणे. [2–12]
गजकर्णावर अप्रतिम मलम १ आणा.
हीं औषधें सर्व दुकानांवर व
डॉ. वाटलीवाला वरळी, मुंबई,
यांजकडे मिळतील.

खट्टेखोर तेनालीराम याच्या मनोरंजक गोष्टी. हें पोटेनें पूर्ण भरलेलें १५ गोष्टींचें पुस्तक लहानथोर सर्व दर्जाच्या स्त्रीपुरुषांनीं वाचण्यालायक असें असून, तें वाचीत असतां हंसून हंसून मुरकुंडी वळते. कि. ८२. एक प्रत मागविणारांनीं ८२८६ च्या पोस्ट तिकिटा पाठवाव्या.

ना. ल. गोवेंकर,
मु॰ आजगांव, पो॰ शिरोडा
[1–3] जि॰ रत्नागिरी.

दोन उत्कृष्ट पुस्तकें.

गोल्डन ग्यांग

अर्थात्

सोनेरी टोळीचें मोहजाल.

सोनेरी टोळीचें नांव वर्षाच पासून मुंबई शहरांतील बहुतेक लोकांच्या ऐकिवांत आहे. या सोनेरी टोळीचें एक गुप्तमंडळ असून त्यांत अनेक जातींच्या हुशार व शिक्षित लोकांचाहि समावेश असतो. या टोळींतील लोक साधारण गरिबांच्या वाटेस न जातां, श्रीमान्, शेट, सावकार, व्यापारी, दलाल, कामदार अशा हुशार लोकांनां आपल्या मोहजालांत आणून नागवितात. या टोळीचीं कारस्थानें इतकीं वेमालूम व मोहक असतात, कीं, चांगले हुशार, सुशिक्षित लोक देखील यांच्या मोहजालांत सहज सांपडत असून, या मंडळीचा मागमूसहि लागत नाहीं. मुंबईतील हुशार व गुप्त (डिटेक्टिव्ह) पोलिस खात्याचे माजी मुख्य सरदार अकबरअल्ली यांनीं आपल्या कारकीर्दीत या सोनेरी टोळीच्या गुप्त कारस्थानांची स्वानुभवानें मिळविलेली माहिती त्यांच्या जीवनचरित्रांत दिली आहे. तिच्या आधारें हें पुस्तक तयार केलें असून त्याच्या पहिल्या भागांत प्रख्यात सोनेरी टोळीसंबंधीं एकंदर ९ गोष्टी असून, त्यांत या सोनेरी टोळीचें स्वरूप व त्याच्या निरनिराळ्या कसबांची व गुप्त कारस्थानांची माहिती मनोरंजक गोष्टींच्या रूपानें दिली आहे, व दुसऱ्या भागांत मुंबई शहरांत व्यापार, उद्योगधंदे या बाबतींत ज्या अनेक तऱ्हेच्या लुबेगिऱ्या व ठकबाज्या बहुधा नेहमीं चालत असतात, त्यांची माहिती खुलासेवार दिली आहे. सबब मुंबई शहरांतील व हरएक कामानिमित्त बाहेर गांवांहून मुंबईत येणाऱ्या व इतर सर्व ठिकाणच्या प्रत्येक इसमानें हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. म्हणजे त्यांसहि या सोनेरी टोळीच्या गुप्त कारस्थानांची होऊन सावध राहतां येईल. यांचीं पृष्ठें १४४, बांधणी जाड पुठ्याची असून या दोन भागांच्या एका पुस्तकाची कि. १ रुपया. तरी तूर्त १२ आणे. टं. व्ही. पी. खर्चाचे २ आणे जास्त पडतील.

सुधारून दिढीनें जास्त वाढविलेली चार भागांची नवी आवृत्ति.

सचित्र शरीरबल विद्या.

(कसरत शाळा व तालिमखाना, १२५ चित्राकृतींसह.)

प्रत्येक मनुष्यानें आपली शरीरसंपत्ती सुधारून शरीरबल वाढविल्याखेरीज कोणताहि व्यवहार नीट चालावयाचा नाहीं. **प्रो० राममूर्ती, दोरास्वामी, सँडो** इत्यादि मल्लांच्या अतुल शरीरसामर्थ्याचे अद्भुत प्रयोग पाहून, पुष्कळ लोकांचें लक्ष्य शरीरबल वाढविण्याकडे लागलें आहे. असें पाहून याचे फक्त २ भाग असलेली आवृत्ति प्रथम छापिली होती. ती इतकी लोकप्रिय झाली, कीं, पांचसहा महिन्यांतच या आवृत्तीच्या दोन हजार प्रती संपून पुष्कळ मागण्या येत असल्यामुळें हल्ली पुढें लिहिल्याप्रमाणें चार भागांची सुधारून दिढीनें वाढविलेली ही नवी आवृत्ति छापिली आहे.

भाग पहिला. कसरतशाळा—यांत घरच्याघरीं बिछान्यावर, तसेंच सुर्ल्या, सुर्ळे, शिड्या, काठ्या, दोऱ्या व झोंपाळे, यांच्या साहाय्यानें अनेक तऱ्हेच्या कसरती कशा कराव्या, यांची माहिती ६६ चित्राकृतींसह दिली आहे.

भाग दुसरा. तालीमखाना—यांत तालमीतील जोर काढणें, जोड्या फिरविणें, मल्लखांब, व ५२ कुस्त्यांचे डावपेंच व त्यांच्या तोडी कशा कराव्या यांची माहिती ६० चित्राकृतींसह दिली आहे.

भाग तिसरा.—यांत प्रख्यात युरोपियन मल्ल **प्रो. सँडो** व आधुनिक भीमसेन **प्रो. राममूर्ती** यांचे शरीरबल वाढविण्याविषयींचे स्वानुभविक प्रयोग व क्रिया यांची माहिती दिली आहे.

भाग चौथा.—यांत शरीरबल पुष्टिवर्धक असें सुमारें ८० वर औषधि उपाय दिले आहेत.

वरील चारी भागांचें एकच पुस्तक बांधलें असून, पृष्ठें १६८ आहेत. किंमत १॥ रुपया आहे. तरी तूर्त वं. व्ही. पी. खर्चासह फक्त १ रुपया पडेल.

वरील दोन्ही पुस्तकें एकदम घेणारांस १।१० त पाठवूं.

पत्ता—प्रो. जी. एम्. कार्लेकर, दुर्गादेवीच्या देवळाजवळ डंकनरोड, मुंबई, पोष्ट नं ४.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीही वस्तु मागविताना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

डॉ० फडके
[1-12] यांचें

अर्धशिशीवरील

रामबाण
औषध!

१५मिनिटांत हटकून गुण! या औषधानें कसलेंहि डोकें दुखणें तत्काळ बंद होतें. अनुपान बाटली सोबत.कि.६आणे पॅ.व पोस्ट खर्च निराळा पडेल. पत्ता डॉ.जी.जी.फडके,मिरजफोर्ट.

कस्तुरीच्या गोळ्या या गोळ्यांच्या सेवनानें कोणताहि बारीक ताप, तसेंच अजीर्ण, वात, सरदी, पडसें व जलदोषानें उत्पन्न होणारे सर्व रोग समूळ नाहींसे होतात. शक्तिवर्धनाचे कामीं कस्तुरीसारखें दुसरें अप्रतिम औषधच नाहीं!
[1-1] २०० गोळ्यांच्या बाटलीस किंमत फक्त ४ आणे.

मेसर्स सी. प्रसन्न ॲण्ड कंपनी, गिरगांव–मुंबई.

मनोरंजन ऑफिसचा नवीन पत्ता.

गिरगांव—2 A., चर्नीरोड, डॉ. सर भालचंद्र यांच्या शेजारीं, ३ रा मजला.

[3-12] के. आर. फाटक यांचें

बालामृत

जीर्णज्वर, श्वास, खोकला, हातपाय बारीक असणें, अन्न न पचणें इत्यादि रोग आमच्या बालामृतानें तात्काळ बरे होतात. पिंड निरोगी, सशक्त व सतेज होतो. हें गोड असल्यामुळें मुलें हौसेनें घेतात. एका बाटलीची कि. १२ आणे. ट. ख. निराळा.

के. आर. फाटक, ठाकुरद्वार रोड, मुंबई, नं. २.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

जाहीर नोटीस.

सर्व लोकांस माहीत होण्याकरितां प्रसिद्ध करीत आहों, कीं, श्रीक्षेत्र काशी येथील श्रीरामसमर्थ कंपनीकडून हातमागावर तयार केलेला फरमाइषी स्वदेशी माल व्ही. पी. नें पाठविला जातो. त्याचा तपशील खालीलप्रमाणें:-

१. हे कद जांभळा, तांबडा आणि केसरी या तिन्ही पक्क्या रंगांचे, रेशीम पिळदार, पोत जाड आणि मजबूत, फार दिवस टिकणारे, रंग खात्रीचा असून किंमत माफक आणि माल चांगला, असे तयार केले आहेत.

मालाचा तपशील.	लांब.	रुंद.	कि. रु. पा. कि. रु. प.	व्ही. पी. रु. आ.	मालाचा तपशील.	लांब.	रुंद.	कि. रु. पा. कि. रु. प.	व्ही.पी. रु. आ.
कद विनकांठी ...	१०	२॥	१० १३	८१०	पामरी रुईफुली ...	४	१॥॥	४ ७	८४
कद रुईफुली ...	१०	२॥	११ १५	८१०	गोमकांठी पीतांबर	१०	२॥	१२ १५	८१०
कद विनकांठी ...	११	२॥॥	१२ १६	८१०	पीतांबर जरीकांठी...	१०	२॥	२२ २५	८१२
कद रुईफुली ...	१०	२॥॥	१२ १४	८१०	कद जरीकांठी ...	१०	२॥	२० २३	८१२
,, ,, ...	११	२॥॥	१३ १६	८१०	,, ,, ...	८	१॥॥	१० १४	८८
कद जनानी वि. कां.	१६	२॥	१७ २०	८१२	कद साधेकांठी ...	८	१॥॥	५ ७	८६
,, ,, रुईफुली	१७	२॥	१९ २६	८१२	,, ,, ...	६	१॥	४ ६	८६
,, ,, ,,	१७	२॥॥	२१ ३०	८१२	लुगडीं रेशीमकांठी...	१६	२॥	४ ८	८१०
पामरी रुईफुली ...	६	२॥	६ १०	८६	,, ,, ...	१७	२॥	६ १०	८१०

२. याशिवाय हलके कद पीतांबर लांब १० × २॥ चे किंमत ७॥-९-१० पर्यंत सर्व रंगांचे तयार आहेत. शिवाय काशीचा हरएक प्रकारचा माल मुती-रेशीमकांठी-लुगडी; खण मुती-रेशमी व जरीचे चोळखण; मुती-रेशमी कांठाचे पोतरजोडे; उपणें-जोड्या, शेले; दुपेटे; पैठण्या; गंगावन; तंबाखूच्या मुगंधी गोळ्या; कस्तुरी उंची दर तोळा २७, ५० रु. पावेतों; रेशमी जनानी-मर्दानी मुकटे वगैरे माल माफक किंमत पेऊन पाठवूं.

३. अत्तरें—(१८३। रु. भाराचा तोळा) गुलाब, केवडा, मोतिया, बाळा, पानडी, हिना, दवना, बकुळ, चंपा, इत्यादि दरतोळ्यास ८८, १, २, १० रु. पर्यंत. गुलाब, केवडापाणी दरशेरी ८१२, २ रुपयेपर्यंत. चंदनी तेल दरशेरी २५ रुपये.

४. सुगंधी तेलें—(११२ रु. भाराचा शेर) बेलिया, चमेली, केवडा, हिना, दरशेरी ३, ६ रु. पावेतों.

५. अत्तरांच्या पेट्या—नंबर १ शिशा ८. अत्तरें तोळे ४. किंमत रु. ४॥. नं. २ शिशा ६. अत्तर १॥ तो. किंमत रु. २।-, टपालखर्च माफ.

६. श्रीराम-उपासनाग्रंथ—किंमत १ रुपया. यांत रामदासी संप्रदायी लोकांस अवश्य लागणारे सर्व विषय आहेत. तसेंच—

७. रुद्राक्ष-माळा, मणी—(१०८) बोरांएवढ्या दाण्यापासून मोठ्या हरभऱ्यापर्यंत एका माळेस कि. रु. ८१२ पासून ३ पावेतों. हरभऱ्यापासून तों मिऱ्यांपर्यंत एक माळेची किंमत रु. ४ ते रु. २० पावेतों. गौरी शंकर रुद्राक्ष लहान मोठ्या प्रत्येकी दाण्यास किंमत रु. ३ ते १० रु. पर्यंत. रुद्राक्षकंठा मणी (३२) किंमत ८१२ ते रु. १० पर्यंत. स्फटिकमाळ मणी (१०८) १॥ रु. ते १० रुपये.

८. सरबताची पावडर—आग्रीं मुद्दाम बनविलेलें सोडावाटर, लेमोनेट व जिंजरपावडर हें पात तोळा ३० तोळे पाण्यांत पक्कांबरोबर टाकिलें असतां उत्तम रुचकर असें सरबत तयार होतें. याच्या गुणाची अनुभवांतीं खात्री होईल. मोठली सुराक ६ सर्वे पावडर १॥ तोळा, किंमत ८५.

,, ,, १२ ,, ३ तोळे, किंमत ८५.

पोस्टेज व पॅकिंग खर्च निराळा पडेल. व्यापाऱ्यांनां भरपूर कमिशन.

९. ग्राहकांनीं आमच्याकडून २५ रुपयांच्या वर माल मागविल्यास कमिशन दररुपयास ८॥. प्रमाणें देऊं. टपालखर्चास अर्धा आणा आल्यास सर्व माहितीचा कॅटलाग फुकट पाठवूं.

ग्राहकांनीं आपला पत्ता, नांव, पोस्ट, जिल्हा, वगैरे स्वच्छ लिहिणें.

पत्ता—नारायण गणेश रिसबूड, दुर्गाघाट, बनारस सिटी.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागविलांना कृपा करुन मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.



मंदिरांतून घराकडे.

[चित्रकार—श्रीयुत एम्. ए. जोशी, मुंबई.]

'सत्यसंकल्पाचा दाता भगवान् । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥'

माहे आक्टोबर, १९१२. वर्ष १८ वें, पूर्वार्ध, भाग ४ था.

मासिक मनोरंजन.

वर्ष १८ वें, अंक २०८ वा.

डॉ. नागूताई जोशी.



36 photo] डॉ. नागूताई जोशी. [Elliott & fry.

सुधारणांच्या सर्व बाबतींत—मुख्यतः स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत—त्यांनीं तो पूर्णपणें अमलांत आणला आहे. या पतिपत्नींनीं आपल्या सर्वहि मुलींनां उच्च शिक्षण देऊन स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत कर्त्या सुधारकांनां प्रत्यक्ष कृति काय करतां येते, हें सर्वांच्या निदर्शनास स्पष्टपणें आणून दिलेंच आहे; परंतु विशेष आनंदाची व अभिमानाची गोष्ट ही, कीं, मुलींच्या शिक्षणमार्गांत त्यांच्या लग्नाच्या वयोमर्यादेची जी मोठी थोरली धोंड आडवी पडलेली असते, व जिचा पुष्कळ सुधारक-वीरांनांहि मोठा बाऊ वाटतो, ती धोंड, या दंपतीनें अत्यंत निर्भय चित्तानें व अतुल धैर्यानें बाजूस सारून आपल्या मुलींनां हा शिक्षणमार्ग निरापद करून इतरांनां स्तुत्य उदाहरण घालून दिलें आहे. या त्यांच्या मनोधैर्याबद्दल महाराष्ट्राला अभिमान वाटला पाहिजे.



ताई (७ वर्षांची), आणि कमला (३ वर्षांची). [K.R.Kharsikar. Photo]

श्रीयुत अण्णासाहेब व श्री. सौ० अक्कासाहेब यांनीं आपल्या सर्व मुलांनां व्यावहारिक व नैतिक शिक्षण उत्तम दिलें आहे. मुलांच्या स्वभावानुरूप त्यांच्या शिक्षणाचें ध्येय ठेवावयाचें, असा या पतिपत्नींचा परिपाठ आहे.

श्रीयुत अण्णासाहेब व सौ० अक्कासाहेब यांनीं आपल्या कन्येला—डॉ. कुमारी नागूताई यांनां—उच्च वैद्यकीय शिक्षण संपादन करण्यासाठी इंग्लंडसारख्या दूर देशांत पाठविण्याचें जें अपूर्व मनोधैर्य दाखविलें, त्याबद्दल आम्ही त्यांचें अन्तःकरणपूर्वक अभिनंदन करितों.

अशा जोडप्याच्या पोटीं कुमारी नागूताई यांचा जन्म त्यांच्या आजोळीं साताऱ्यास झाला. त्या वेळीं अण्णासाहेबांच्या मित्रवर्गानें त्यांनां "काय ! शेवटीं मुलगीच झाली ना ?" असा थट्टेचा प्रश्न करतांच "जरी मुलगी झाली, तरी ती विद्येंत मुलांनां मागें सारण्यासारखीच होईल !" असें अण्णासाहेबांनीं जें उत्तर दिलें होतें म्हणतात, त्याची सार्थकता त्यांच्या उद्गारांप्रमाणें नागूताईंनीं करून दाखविली, याबद्दल त्यांनां अभिमानपूर्वक किती आनंद वाटत असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी.

'ताई'चा (नागूताईंनां घरची मंडळी 'ताई' म्हणतात.) स्वभाव लहानपणापासूनच जरा तडफदार असे. ताई आणि त्यांच्या धाकट्या भगिनी कमलाबाई (हल्लीं सांगलीच्या राणीसाहेब श्रीमंत सौ० सरस्वतीबाई पटवर्धन) या दोघी मुलींच्या शिक्षणास घरीं शिक्षक ठेवून अण्णासाहेबांनीं सुरुवात केली. मुलींनां घरींच शिक्षण दिल्यानें त्यांच्यावर अभ्यासाचा विशेष बोजा न पडतां त्यांच्या गृहशिक्षणालाहि चांगलें वळण लागतें, असा त्यांचा दृढ समज आहे, व त्याप्रमाणेंच आपल्या मुलींच्या शिक्षणाची अण्णासाहेबांनीं घरींच व्यवस्था केली.

नागूताईचें मॅट्रिक्युलेशन परीक्षेपर्यंतचें सर्व शिक्षण घरींच झालें. यांनीं प्रथम दुसरी भाषा फ्रेंच ही घेतली होती; परंतु तींत त्यांनां यश न आल्यामुळें त्यांनीं तावडतोब संस्कृत भाषा घेऊन प्रवेशपरीक्षेपर्यंतचा या भाषेचा अभ्यास केवळ आठ महिन्यांच्या अल्पावधींत पूर्ण केला, व या कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या प्रवेशपरीक्षेंत १९०२ साली उत्तीर्ण झाल्या.

वैद्यकीच्या अभ्यासक्रमाकडे वळण्यास या विषयाकडे त्यांची ओढ किंवा आवड कारण झाली, असें नाहीं.



श्रीमती सौ. यशोदाबाई ऊर्फ अक्कासाहेब जोशी.



श्रीयुत मोरो विश्वनाथ ऊर्फ अण्णासाहेब जोशी.

परंतु घरची मंडळी 'आमची ताई पुढें डॉक्टर होणार बरें का !' किंवा 'ताई डॉक्टरीण चांगली शोभेल !' असें त्यांच्या लहानपणीं ह्मणत असत, त्याचा नागूताईंच्या मनावर इष्ट परिणाम झाला असल्यामुळें प्रवेश-परीक्षा होतांच वैद्यकविषयांत पारंगतता मिळविण्याचा निश्चय करून त्या मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांत दाखल झाल्या.

मेडिकल कॉलेजमधून वैद्यकीच्या चारहि परीक्षा चांगल्या रीतीनें लागोपाठ उत्तीर्ण होऊन नागूताई सन १९०७ सालीं नोव्हेंबर महिन्यांत एल्. एम्. ॲण्ड एस्. ची परीक्षा पास झाल्या. या परीक्षेंत तर विद्यार्थिनींमध्यें त्या चांगल्याच वर आल्या होत्या. कॉलेजमध्यें त्यांनां अनेक बक्षिसें व स्कॉलरशिपा मिळाल्या आहेत. नागूताई मेडिकल कॉलेजमध्यें असतां पहिलीं चार वर्षें इतर विद्यार्थ्याप्रमाणेंच जेवणाखाण्याची व्यवस्था करून राहिल्या होत्या. स्वतःची—श्रीमंताची—मुलगी ह्मणून अण्णासाहेबांनीं नागूताईंनां कांहीं स्वतंत्र व निराळी व्यवस्था करून दिली नव्हती. कॉलेजांतील शेवटच्या ह्मणजे पांचव्या वर्षी मात्र त्यांच्यासाठीं स्वतंत्र व्यवस्था केली होती. कॉलेजमध्यें जाणाऱ्या विद्यार्थिनींनां पुरुष विद्यार्थ्यांकडून जसा सर्वसाधारणपणें त्रास होतो तसा थोड्याबहुत प्रमाणानें डॉ. नागूताईंनांहि झाला; परंतु नागपुरकडील मंडळी नागूताईंनां फार चहात असत.

सन १९०७ सालीं एल्. एम्. ॲण्ड एस्. झाल्यानंतर उच्च वैद्यकीय शिक्षण संपादन करण्यासाठीं ता. २५ एप्रिल, सन १९०८ या दिवशीं ना. श्रीयुत गोखले यांच्याबरोबर त्या इंग्लंडला निघून गेल्या. यापूर्वी बरोबर दहा वर्षें–ह्मणजे ता. २५ एप्रिल सन १८९८ या दिवशींच त्यांचे वडील अण्णासाहेब इंग्लंडला निघाले होते, हा एक कौतुकास्पद योगायोग होय, यांत शंका नाहीं.

इंग्लंडमध्यें गेल्यावर डॉ. नागूताई एकाद्या इंग्लिश कुटुंबांत वगैरे न रहातां स्वतंत्र रीतीनेंच रहात असत. तेथें त्या बंगालमधील ग्राह्म स्त्रियांप्रमाणें पोषाक करीत असत. कॉलेजला सुटी असे त्या वेळीं, व इंग्लंडांतील अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर डॉ. नागूताईंनीं सर्व यूरोपखंडामध्यें प्रवास केला. आयर्लंड, फ्रान्स इटली, स्विट्झरलंड वगैरे देशांत त्यांनीं बराच प्रवास केला असून, त्या त्या देशांतील लोकसमाज, त्यांच्या चालीरीति, तेथील संस्था वगैरेंचा डॉ. नागूताईंनीं चांगला परिचय करून घेतला आहे. बर्मिंगहॅम येथें प्रसिद्ध भिषग्वर सर जॉर्डन लॉइड, व डब्लिन येथें डॉ. जेलेट यांच्याबरोबर त्यांनीं कांहीं दिवस काम केलें आहे.

इंग्लंडमध्यें असतांना मिसेस पॅंक्हर्स्ट, वॉरिक, समरसेट प्रभृति स्त्रीकैवारी (Suffragists) इंग्लिश स्त्रियांबरोबर डॉ. नागूताईंचा चांगला परिचय झाला आहे. मिसेस समरसेट या बाई तर डॉ. नागूताईंवर केवळ आपल्या मुलीप्रमाणें प्रेम करीत असत. इंग्लंडमध्यें असतांना डॉ. नागूताईंनां कोणत्याहि तऱ्हेचा त्रास झाला नाहीं. तेथील सर्व लहानथोर मंडळी त्यांच्याशीं फार सौजन्यानें व प्रेमानें वागत असत.

इंग्लंडमधील आपला अभ्यासक्रम आटोपून, वैद्यकशास्त्रांत उच्च प्रतीचें ज्ञान संपादन करून डॉ. नागूताई ता. ११ ऑगस्ट १९१२ रोजीं हिंदुस्थानास परत आल्या. दूर देशीं जाऊन वैद्यकशास्त्रांत उच्च दर्जाचें शिक्षण संपादन करून आलेल्या पहिल्या विदुषी प. वा. श्रीमती सौ. डॉ. आनंदीबाई जोशी, एम्. डी., (फिलाडेल्फिया, अमेरिका) या होत. इंग्लंडसारख्या दूर देशांत किंवा हिंदुस्थानांत वैद्यकविषयांत प्राविण्य संपादन केलेल्या दक्षिणी स्त्रिया आमच्या माहितीप्रमाणें हल्लीं साऱ्या सातच आहेत. या विदुषी ह्मटल्या ह्मणजे डॉ. श्रीमती रखमाबाई, एम्. डी., एल्. आर्. सी. पी., एल्. आर्. सी. एस्. (एडिंबरो); डॉ. कुमारी काशीबाई नवरंगे, बी. ए., एल्. एम्. ॲण्ड एस्., (मुंबई); डॉ. कुमारी कृष्णाबाई केळवकर, एल्. एम्. ॲण्ड एस्., (मुंबई); एल्. एम्. (डब्लिन.) डॉ. सौ. द्वारकाबाई कमलाकर, एल्. एम्. ॲण्ड एस्., (मद्रास); एल्. आर्. सी. पी. ॲण्ड एस्., (एडिंबरो); एल्. एफ्. पी. ॲण्ड एस्., (ग्लॅसगो); एल्. एम्. आर्. सी. पी., (डब्लिन); डॉ. श्री. सौ. माणेकबाई बहादुरजी, एल्. एम्. ॲण्ड एस्., (मुंबई); एल्. आर. सी. पी. ॲण्ड एस्., (एडिंबरो); डॉ. श्रीमती सुंदराबाई कीर्तने, एल्. एम् ॲण्ड एस्. (मुंबई); आणि डॉ. कुमारी नागूताई जोशी, एल्. एम्. ॲंड एस्., (मुंबई); एल्. आर्. सी. पी., एम्. आर्. सी. एस्., (लंडन); एल्. एम्., (डब्लिन); या होत.



डॉ. कुमारी नागूताईंचा इंग्लंडांत जाण्याच्या वेळचा फोटो.

डॉ० कुमारी सी. एन्. मुथुलक्ष्मी अम्मल.

मनोरंजनाच्या ऑगस्ट महिन्याच्या अंकांतील प्रासंगिक विचारांत वाचकांनां आम्ही ग्लॅसगोची वरिष्ठ वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आमच्या बंगदेशीय भगिनी डॉ० कुमारी यामिनी सेन यांचा परिचय करून दिलाच आहे. या अंकांत दुसरीकडे आमच्या एका महाराष्ट्रीय भगिनीची-डॉ. कुमारी नागूताई जोशी यांची ओळख करून दिली असून येथें आमच्या मद्रदेशीय भगिनी डॉ० कुमारी मुथुलक्ष्मी अम्मल यांचा अल्प परिचय करून देतांना आम्हाला अत्यंत समाधान वाटत आहे. जवळजवळ एकाच वेळीं बंगाल, महाराष्ट्र व मद्रास या तीनहि प्रांतांतील भगिनींनीं वरिष्ठ वैद्यकीय परीक्षांत यश संपादन केलें, ही स्त्रीशिक्षणाच्या कैवाऱ्यांनां सरोसर मोठा आनंद आणि अभिमान वाटण्या-सारखी गोष्ट होय.



कुमारी मुथुलक्ष्मी अम्मल या पदुकोट्ट संस्थानच्या रहिवासी असून वयाच्या पांचव्या वर्षापासून त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. वडिलांच्या साहाय्यानें घरींच प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास करून १९०२ सालीं त्या प्रवेश परीक्षेंत उत्तीर्ण होऊन १९०५ सालीं एफ्. ए. ची परीक्षा पास झाल्या; व या वर्षी मद्रास युनिव्हर्सिटीच्या एम्. बी., व सी. एम्. या वरिष्ठ परीक्षांत उत्तीर्ण झाल्या आहेत. कॉलेजांत असतांना कुमारी मुथुलक्ष्मी यानीं कित्येक स्कालरशिपा आणि बक्षिसेंहि मिळविली होतीं. पदुकोट्ट येथील लेडी हॉस्पिटलांत त्यांची सध्यां लेडी डॉक्टरच्या जागीं नेमणूक झाली आहे.

आमच्या या मद्रदेशीय भगिनीला परमेश्वर दीर्घायु करो, व तिनें संपादन केलेल्या उच्च वैद्यकीय ज्ञानाचा तिच्या देशभगिनींनां योग्य लाभ मिळून त्यांचें हित होवो, असें आम्ही इच्छितों.

जनरल विल्यम बूथ.

"**Mukti** is my religion and everything that tries to curb it I will avoid by fight or flight. What are men? What do I care about what they talk! .. .. I will sleep without caring what will be next and may I be born again and again, and suffer thousands of miseries so that I may worship the only God I believe, the sum total of all souls and above all my God the wicked, my God the miserable, my God the poor, of all races, of all species, is the special object of my worship.

A ye fools! Neglecting the living God and His Infinite reflections with which the world is full, and running after imaginary shadows leading to quarrels and fights! Him worship—the only visible—and break all other idols!!"

—*Swami Vivekanand.*

"मुक्ति हा माझा धर्म होय, आणि त्याच्या आड जें जें कांही येईल, तें तें तोंड देऊन किंवा पाठ फिरवून मी टाळीन. लोक म्हणजे काय? त्यांच्या बोलण्याची मला काय पर्वा? ..... पुढें काय होईल याचा विचार न करितां उशाला हात घेऊन मी सुखें झोंपी जाईन. पुनः पुनः गर्भवास पतकरावा आणि दुःखें भोगावीं अशी माझी इच्छा आहे. कारण, तसें झाल्यास ज्याच्यावर माझा विश्वास आहे त्या ईश्वराची म्हणजे सर्व आत्म्यांच्या समष्टिरूप परमात्म्याची सेवा मला करितां येईल. माझा ईश्वर पतित मनुष्य, माझा ईश्वर दुःखी मनुष्य, माझा ईश्वर गरीब मनुष्य, मग तो कोणत्याहि जातीचा अगर कोणत्याहि देशांतला असो. माझ्या सेवेचा विषय तोच विशेषतः होय!

- वेड्यांनो! जीवंत देवाची व त्याची जी अपरंपार प्रतिबिंबें जगांत भरलीं आहेत, त्यांची अवहेलना करून छायातुल्य देवांच्या—कलह व रक्तपात यांनां कारण होणाऱ्या काल्पनिक देवांच्या—मागून धांवतां काय? या प्रत्यक्ष दिसणाऱ्या परमेश्वराला भजा—आणि इतर सर्व देवदेवतांच्या मूर्ति फोडून टाका!"

स्वामी विवेकानंद.

ज्या थोर पुरुषाच्या मृत्यूचें वर्तमान तडिद्वेगानें पृथ्वीच्या कोनाकोपऱ्यांतहि पोंचलें, सर्व धर्माच्या व मतांच्या लोकांनीं ज्या पुरुषाविषयीं 'धन्य! धन्य!!' असे उद्गार काढले, ज्या पुरुषाविषयीं मोठमोठ्या चक्रवर्तींनीं व इतर राजसिंहासनस्थ व्यक्तींनीं आपली मनःपूर्वक आदरबुद्धि व्यक्त केली, तो पुरुष एकाकाळीं अर्धवट वेडा व अर्धवट ढोंगी म्हणून समजला जात होता. त्याच विभूतीच्या स्तुतिस्तोत्रांनीं सांप्रत जगांतील वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें भरून जात आहेत. जनरल बूथ यांजवरील दांभिकपणाचा आरोप केव्हांच नाहींसा झाला आहे. प्रत्यक्ष सत्कर्तींनींच त्यांनीं तो आरोप खोडून काढला आहे. जनरल बूथ यांनां अजूनहि अर्धवट वेडा म्हणणारे जर कोणी असतील, तर त्यांनांहि, 'असे वेडे जगांत फार थोडे कां आढळतात, अशा वेड्यांची संख्या वाढेल तर जग किती चांगलें होईल,' असें वाटल्यावेरीज राहत नसेल. जनरल बूथ यांनीं रक्तपात न करितां, राजकारस्थानांत न पडतां, लौकिक सत्तेचा लोभ न बाळगतां, इतकेंच नव्हे, तर तात्त्विक किंवा आध्यात्मिक वादविवादांत अजिबात न पडतां, आपल्या कार्याची ध्वजा पृथ्वीवरील प्रत्येक देशांत रोंविली, दिगंत कीर्ति संपादिली. असा प्रभावशाली पुरुष एका शतकांत एकादांच होतो. जनरल बूथ हे ख्रिस्ती धर्माचे कट्टे अनुयायी होते, व त्यांनीं ख्रिस्तीधर्माच्या उन्नतीकरितांच, महानुभाव ख्रिस्तानें उपदेशिलेल्या तत्त्वांनां अनुसरून आपलें कार्य केलें. तथापि त्यांचें कार्य अन्यधर्मीय लोकांनांहि उदाहरणीय असें झालें आहे. जनरल बूथ हे 'साधु' म्हणून नांवाजले नाहींत, त्यांनीं अद्भुत दैवी चमत्कार करून दाखविले नाहींत, अथवा एकाद्या नव्या मताची स्थापना करून स्वतःचें नांव अमर करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. त्यांनीं ख्रिस्ती धर्माचा उपदेश केला खरा, परंतु तसें करितांना त्या धर्माच्या अनुयायांची केवळ संख्याच वाढवावी असें धोरण ठेवलें नाहीं. ख्रिस्ती धर्म आचरणांत दाखविला जावा, ख्रिस्ताच्या उपदेशाप्रमाणें त्याच्या अनुयायांनीं वागावें, यासाठीं त्यांनीं प्रयत्न केला; व वाचिक उपदेश करूनच ते स्वस्थ बसले नाहींत, तर बहुजनसमाजांत वावरून, पापप्रवृत्तीस बळी पडणाऱ्या लोकांनां त्यांनीं पापापासून परावृत्त केलें, त्यांनां सन्मार्गावर आणलें व महात्मा ख्रिस्ताचे अनुयायी म्हणविण्याची पात्रता त्यांच्या

कामिनीया तेलानें मस्तक थंड राहतें. डोळ्यांची जळजळ दूर होते. गळून पडणारे केश पुनः उगवतात. केसांची कीड मरून जाते व खवडे वगैरे विकार नष्ट होतात.

ठिकाणीं त्यांनीं आणून दिली. पापाबद्दल तांत्रिक प्रायश्चित्त देऊन शुद्धतेची क्षणिक भावना मनांत उत्पन्न करणें हें कठिण नाहीं. एका हातानें पाप करावयाचें व दुसऱ्या हातानें प्रायश्चित्ताचें उदक कोणाच्या तरी हातावर सोडावयाचें, हा पापाचा समूळ क्षय करण्याचा मार्ग नव्हे. पश्चात्तापानें पातकबीज दग्ध करावयाचें व त्याच्या ठिकाणीं पुण्यकृत्यांचें सुंदर वृंदावन उत्पन्न करावयाचें, हा खरा मार्ग होय. जनरल बूथ यांनीं याच मार्गाचें अवलंबन करून अनेक पतित जीवांचा उद्धार केला, धर्मच्युत झालेल्यांच्या अंतःकरणांत धर्मजागृति उत्पन्न केली, आसुर संपत्तीस वश झालेल्यांना दैवी संपत्तीचा लाभ करून दिला. उपदेशानें पापाबद्दल मनांत अनुताप उत्पन्न करितां येईल; परंतु तो अनुताप टिकला पाहिजे तर तशीच अनुकूल परिस्थिति आणून दिली पाहिजे, पापप्रवृत्तीच्या कारणांचा शोध करून तीं कारणें नाहींशीं केलीं पाहिजेत, आणि ज्याला सन्मार्गावर आणावयाचें त्याच्या परिस्थितीचा अनुकंपापूर्वक विचार करून—मानवस्वभावाचें दौर्बल्य लक्षांत आणून—त्याला साहाय्य केलें पाहिजे. दुष्काळांत घांसभर अन्न न मिळाल्यामुळें जर एकादा मनुष्य चोरीसारखें दुष्कर्म करण्यास किंवा धर्मांतर करण्यास तयार झाला, तर पोटांतली आग शमविण्यासाठीं नाइलाजानें तो तसें करीत आहे हें लक्षांत आणून, अगोदर पसाभर धान्य पुढें करून मग त्याला उपदेश केला तरच तो फलदायी होतो. त्याचप्रमाणें पापप्रवृत्तीच्या इतर बाबतींतहि कमजास्त मानानें उपदेशाला प्रत्यक्ष साहाय्याची जोड द्यावी लागते. जनरल बूथ यांच्या कार्याचें मुख्य रहस्य हेंच आहे, असें त्यांच्या चरित्रावरून दिसून येतें.

आयुष्यक्रमाचा आरंभ.

ता. १० एप्रिल सन १८२९ रोजीं नॉटिंगहॅम येथें विल्यम बूथ यांचा जन्म झाला. ते आपल्या वडिलांचे एकुलते एक पुत्र होते. त्यांच्या घरची स्थिति साधारण होती, व त्यांचें शिक्षणहि बेतांचेंच झालें होतें. त्यांना समजूं लागलें त्या काळीं इंग्लंडांत विलक्षण अस्वस्थता उत्पन्न झालेली होती. सत्ताधारी बड्या लोकांविरुद्ध बहुजनसमाजांतील बुद्धिमान् व उत्साही लोकांचीं मनें क्षुब्ध झालेलीं होतीं. विल्यम बूथ यांनां आपल्या सभोंवतालच्या लोकांची हीनदीन स्थिति पाहून फार वाईट वाटे, व त्यामुळें मोठा त्वेषहि येई. त्या काळीं बहुजनसमाजाच्या हक्कांसाठीं 'चार्टिस्ट' नांवाची एक जंगी चळवळ उपस्थित झाली होती, व विल्यम बूथ हे कांहीं काळ त्या चळवळींत सामील झाले होते. लोकसेवेला आपलें आयुष्य अर्पण करण्याचा संकल्प याच वेळीं त्यांनीं केला. नंतर धर्मपुनरुज्जीवनाची लाट इंग्लंड देशावर आली व त्या लाटेंतहि विल्यम बूथ सांपडले. या धर्मपुनरुज्जीवनाच्या चळवळींत पुढाकार घेणाऱ्या एका वक्तृत्वशाली अमेरिकन धर्मोपदेशकाच्या लोकांचें सन्मार्गाकडे मन वळविण्याच्या बाबतींतील कौशल्याचा विल्यम बूथ यांच्या मनावर फार परिणाम झाला. लोकांचीं मनें वळविण्यास नुसते शास्त्राधार किंवा नुसतीं अमूर्त प्रमेयें उपयोगाचीं नाहींत; तर व्यवहारचतुरतेला अनुसरून युक्तिवाद केला पाहिजे, कुशलतापूर्वक त्यांचीं मनें आपल्याकडे आकर्षिलीं पाहिजेत, अशी खूणगांठ, विल्यम बूथ यांनीं वरील धर्मोपदेशकाची रीत पाहून, बांधून ठेविली. १८४९ सालीं बूथ हे लंडन शहरांत गेले व त्याच ठिकाणीं त्यांच्या कार्यास प्रारंभ झाला. तेथें कांहीं वर्षें मेथॉडिस्ट नांवाच्या एका ख्रिस्ती पंथाचे उपदेशक म्हणून ते काम करीत होते; परंतु त्यांच्या उत्साहाला त्या उद्योगामध्यें भरपूर कार्यक्षेत्र सांपडलें नाहीं. १८६१ सालीं तें काम त्यांनीं सोडलें. त्यापूर्वी पांच वर्षें मिस कॅथरिन मंफर्ड नांवाच्या स्त्रीशीं त्यांचें लग्न झालें होतें. मिसेस बूथ या आपल्या पतीनें स्वीकारलेलें व्रत तेंच आपलें व्रत असें मानणाऱ्या होत्या. विल्यम बूथ यांच्या उदात्त हेतूंविषयीं त्यांची पूर्ण सहानुभूति व संमति असे, व त्यांनीं हातीं घेतलेल्या कार्यास हरएक प्रकारें त्या साहाय्य करीत असत.

मुक्तिफौजेसंबंधाची कल्पना.

धर्मोपदेशक वरिष्ठ व मध्यम वर्गांतील लोकांनांच उपदेश करितात, त्यांच्याच नैतिक वर्तनाबद्दल काळजी घेतात, परंतु अज्ञानदशेंत व दुःस्थितींत खितपत पडलेल्या कामकरी वगैरे खालील वर्गांतील लोकांकडे त्यांचें लक्ष्य जात नाहीं; वस्तुतः गरीब स्थितींतील अज्ञान लोकांकडे

तांबड्या अथवा काळ्या गजकर्णावर 'किसोलाईन' चोळा. पुन्हा गजकर्ण होणार नाहीं!
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.



photo] जनरल विल्यम बूथ. [L. Larsgon.

विशेष लक्ष्य दिलें पाहिजे. ज्याप्रमाणें वरिष्ठ व मध्यम वर्गांतील लोक, त्याचप्रमाणें निकृष्ट स्थितींतील लोकहि परमेश्वराचीं लेंकरें आहेत, व त्यांचेंहि तारण झालें पाहिजे, हा विचार विल्यम बूथ यांच्या अंतःकरणांत वरचेवर येत असे, व शेवटीं तोच विचार त्यांनीं कायम केला. वरिष्ठ वर्गाच्या व धर्मोपदेशकांच्या अवहेलनेस पात्र झालेल्या लोकांच्या सेवेकरितां आपलें तनुमनोधन अर्पण करण्याचा विल्यम बूथ यांनीं निश्चय केला. ज्या लोकांच्या बाबतींत तुरुंग दाखविण्यापलीकडे समाजांतील लोक कांहीं करीत नव्हते, त्या बदमाष म्हणून समजले जाणाऱ्या लोकांनां सुधारण्याचें काम विल्यम बूथ यांनीं प्रथम हातीं घेतलें. कॉर्नवाल, कार्डिफ वगैरे ठिकाणीं उपदेश करून व लोकांत मिळून मिसळून त्यांनीं कैक बदमाषांनां ताळ्यावर आणलें, व त्यांचा एक मेळा बनविला. १८६४ मध्यें विल्यम बूथ पुनः लंडनमध्यें आले, आणि जागजागीं तंबू उभारून व मैदानावर उभें राहून लोकांनां उपदेश करूं लागले. लंडनशहरांत ईस्टएंड नांवाचा एक भाग असून तेथें मुख्यतः गरीब लोकांची वस्ती आहे. त्या ठिकाणीं विल्यम बूथ यांनीं आपल्या कामाला नेटानें सुरुवात केली. या वस्तीकडे तोंपर्यंत फारसें कोणीं लक्ष्य दिलें नव्हतें. प्रतिष्ठित व सुस्थितींत असलेलीं माणसें त्या भागांत सहसा मुळींच जात नसत, व त्यामुळें तेथील लोक एक प्रकारें बहिष्कृतच असत. या वस्तींत गलिच्छपणा फार, दुर्व्यसनांचें प्राबल्य, व बदमाषांचा मोठा भरणा, अशी स्थिति होती. अर्थात् त्यांच्यांत धर्मोपदेश मोठ्या कुशलतेनें करावा लागे. बूथ हे त्यांच्यामध्यें मिळून मिसळून वागणारे असल्याकारणानें हातीं धरण्यास योग्य अशीं त्यांच्यांतलींच कांहीं माणसें त्यांनीं शोधून काढलीं, आणि त्यांच्या साहाय्यानें आपलें नीतिप्रसाराचें व धर्मप्रसाराचें काम त्यांनीं चालविलें. 'क्रिश्चन मिशन' या नांवानेंच हें काम प्रथम चाललें होतें. या मिशनसाठीं लोकांची मदत मागण्याच्या विनंतिपत्राचा मसुदा एकदां विल्यम बूथ हे करीत होते. आपल्या साहाय्यकर्त्यांचा या मिशनच्या कार्यकर्त्या मंडळींत समावेश करण्याच्या उद्देशानें त्यांनीं आपल्या मिशनचें नांव 'स्वयंसेवकांची सेना' (A volunteer Army) असें लिहिलें होतें. इतक्यांत त्यांच्या मनांत कांहीं विचार आला, आणि Volunteer हा शब्द खोडून त्या ठिकाणीं Salvation हा शब्द त्यांनीं घातला. तेव्हांपासून 'मुक्तिफौज' (Salvation Army) या नांवानें त्यांचें मिशन ओळखण्यांत येऊं लागलें. ही गोष्ट १८७८ सालीं घडली. रक्तपात करण्याकरितां-एकमेकांचे प्राण घेण्याकरितां सैन्यें तयार करण्यांत येतात, तर परमेश्वरप्राप्ति करून घेण्यासाठीं-एकमेकांचें पापप्रवृत्तीपासून रक्षण करण्यासाठीं व धर्मसाधनाच्या कामीं एकमेकांनां साहाय्य करण्यासाठीं एकादें सैन्य कां असूं नये, हाच, 'मुक्तिफौज' हें नांव देतांना विल्यम बूथ यांच्या हृदयांत आलेला विचार होय. फौजेची कल्पना आल्यावरोबर अर्थात्च फौजेंतल्या अधिकाऱ्यांचे हुद्दे, एका नमुन्याचे पोषाख, रणवाद्यें वगैरे प्रकार आले. या फौजेचें सूत्रचालकत्व विल्यम बूथ यांजकडे असल्यामुळें ते 'जनरल बूथ' या नांवानें ओळखले जाऊं लागले. धर्मोपदेशाच्या कामांत शिरलेला हा नवीनच प्रकार पाहून 'हें एक पाखंड आहे,' 'बंड आहे,' 'ढोंग आहे,' 'स्तोम माजविण्याचें साधन आहे,' असें लोक म्हणूं लागले. विद्वान् व विचारी म्हणून सर्वमान्य असलेल्या बऱ्याच लोकांनां मुक्तिफौजेच्या या बंडाचा तिरस्कार वाटे, व तसें त्यांनीं उघड बोलून दाखविण्यासहि कमी केलें नाहीं. परंतु जनरल बूथ यांनीं प्रतिकूल टीकांकडे लक्ष्य न देतां आपलें काम नेटानें चालविलें. त्यांचें लक्ष्य इच्छित कार्यावर होतें; अर्थात् बहुजनसमाजाचें मन वेधण्यासाठीं, बाह्यतः उपहासास्पद दिसणाऱ्या परंतु अवश्य असलेल्या साधनांचा अवलंब करणें त्यांनां भाग होतें. त्यांनां समजूतदार लोकांत काम करावयाचें नव्हतें. नाहींपेक्षां निराळींच साधनें त्यांनीं उपयोगांत आणलीं असतीं. जनरल बूथ यांचीं साधनें यशस्वी झालीं, आणि पूर्वी कोणीहि न केलेलें असें काम त्यांनीं करून दाखविलें, तेव्हां त्यांची निंद करणारे लोकच त्यांची स्तुति करूं लागले. त्यांचा सर्वत्र जयजयकार झाला. परलोकवासी सम्राट् सप्तम एडवर्ड व महाराणी अलेक्झांड्रा यांजकडून, त्याचप्रमाणें विद्यमान सम्राट् पंचम जॉर्ज व महाराज्ञी मेरी यांजकडून जनरल बूथ यांच्या कामाची प्रशंसा झाली केवळ राजे व मुत्सद्दी यांनां मिळणारा लंडनच्या 'फ्रीडम'चा मान त्यांनां देण्यांत आला. अमेरिकेंत एकदां संयुक्त संस्थानांची सेनेट त्यांच्या हस्तें उघडण्यांत आली.

कामिनीया तेल गळून पडणाऱ्या केसांस लाविल्यानें ते फारच मजबूत, भपकेदार आणि पुष्कळ वाढतात.

जपानच्या बादशहांनीं मुद्दाम त्यांची मुलाखत घेतली, आणि बंधमुक्त झालेल्या गुन्हेगार लोकांनां नीतीच्या मार्गास लावण्याचें काम मुक्तिफौजेकडे सोंपविलें. असो.

१८९० सालीं जनरल बूथ यांनीं 'In Darkest England and the Way Out' या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध करून इंग्लंडांतील गरीब निराधार लोकांच्या स्थितीची आंग्लजनतेला माहिती करून दिली. या पुस्तकाच्या योगानें सर्व देशभर मोठी चळवळ उडाली, आणि त्यांत दर्शविलेल्या रीतीनें गरीब, घरादारांवांचून असलेल्या लोकांची स्थिति सुधारण्याकरितां जनरल बूथ यांनां द्रव्यसाहाय्य झपाट्यानें मिळूं लागलें. या योजनेमुळें, हजारों निराधार स्त्रीपुरुषांनां व्यवस्थित उद्योगधंदा मिळाला, त्यांचा आयुष्यक्रम उपयुक्त व नियमित झाला, आणि धर्म व नीति यांच्याकडे त्यांची बुद्धि वळली. कैक मद्यपी मद्यपानापासून परावृत्त झाले, कैक कलहप्रिय लोक मनुष्यजातीवर प्रेम करूं लागले, कैक अप्रामाणिक लोक प्रामाणिक बनले, कुमार्गास लागून नीतिच्युत झालेल्या कैक तरुणी नीतिमार्गास लागल्या, निराधारपणीं भटकणारीं व अधोगतीस जाऊं पाहणारीं कैक मुलें सुशिक्षित व सुवृत्त झालीं, आणि आत्महत्येस प्रवृत्त झालेलीं कैक माणसें पुनरपि सुखानें आयुष्याचा उपभोग घेऊं लागलीं. ज्या लोकांनां औषधपाण्यावांचून व शुश्रूषेवांचून मरण्याचा प्रसंग आला असता, त्यांनां औषधोपचार होऊन घरच्या माणसांप्रमाणें त्यांची शुश्रूषा होऊं लागली. जनरल बूथ यांनीं या कामीं लोकांकडून द्रव्यसाहाय्य हरएक प्रकारची खटपट करून मिळविलेंच; पण विशेष हें, कीं, त्यांचें उदाहरण पाहून हजारों स्त्रीपुरुषांनीं स्वार्थत्याग करून व केवळ अन्नवस्त्रावर संतुष्ट राहून मुक्तिफौजेंत काम करण्याचें पतकरिलें. सांप्रत पृथ्वीवरील निरनिराळ्या ५९ देशांत मुक्तिफौजेचें काम चालू असून त्या संस्थेचे उपदेशी निरनिराळ्या ३०-३५ भाषांत होत असतात. नियतकालिक पत्रकें व पुस्तकें यांची संख्या सुमारें ७५ आहे. जवळ जवळ २५००० मनुष्यांचा सर्व रात्रंदिवस मुक्तिफौजेकडून होत असून त्यांनां उद्योगधंदेहि पुरविण्यांत आलेले आहेत. सामाजिक सुधारणेसाठीं जवळ जवळ एक हजार संस्था चालविल्या आहेत. अगदीं जरूरी असेल तेथेंच अन्नवस्त्रादिकांचें विनमोबदला साहाय्य देण्यांत येतें. परोपकार करावयाचा म्हणजे आळशीपणाला उत्तेजन द्यावयाचें असें नसून, दरेक व्यक्तीला समाजाचा उपयुक्त घटकावयव बनवावयाचें, नाइलाज असल्याशिवाय समाजावर कोणाचा भार पडूं द्यावयाचा नाहीं, असें धोरण असल्याकारणानें खर्चाचें काम मोठ्या कसोशीनें होतें. दुर्गुणांचा-दुष्ट प्रवृत्तींचा प्रसार कमी केला पाहिजे, तर आळसाला केव्हांच थारा देतां कामा नये, हें तत्त्व मुक्तिफौजेचे अधिकारी नेहमी लक्ष्यांत ठेवीत असतात, व त्यामुळेंच त्यांचें काम इतकें यशस्वी झालें आहे.

कार्यक्षेत्राचा विस्तार.

हिंदुस्थानांतील मुक्तिफौजेच्या शाखेचे मुख्य अधिकारी कमिशनर बूथ टकर हे असून, फौजेंत सामील होण्यापूर्वी ते पंजाबमध्यें मोठ्या हुद्दावर होते. ते आय्. सी. एस. (इंडियन सिव्हिलसर्व्हिस) ची परीक्षा पास झालेले होते; परंतु मोठ्या हुद्दाची नोकरी व बढतीची आशा हीं सोडून ते फौजेमध्यें सामील झाले. त्यांच्या हाताखालीं हिंदुस्थानांतील फौजेमध्यें २५०० अमलदार असून त्याशिवाय हजारों एतद्देशीय लोक आहेत. या देशांतील मुक्तिफौजेच्या शाळांत १०,००० मुलें प्राथमिक शिक्षण घेत असून उद्योगगृहांतील मुलांमुलींची संख्या ८०० आहे. शेतकऱ्यांकरितां पहिली पतपेढी या देशांत मुक्तिफौजेनें स्थापिली, ही गोष्टहि लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यानंतर गेल्या चौदा वर्षांत सरकार व लोक यांनीं अनेक पतपेढ्या स्थापिल्या आहेत. हातमागाच्या धंद्यास मुक्तिफौजेनें पुष्कळ हातभार लावला आहे. सुधारलेल्या पद्धतीचे जलद विणकाम करणारे सुमारें एक हजार हातमाग कोष्टी लोकांनां पुरविले असून त्या हातमागांवर काम करण्यास शिकविण्यासाठीं ठिकठिकाणीं शाळाहि स्थापिलेल्या आहेत. मुक्तिफौजेनें चालविलेलें या देशांतील विशेष महत्त्वाचें काम म्हटलें म्हणजे वंशपरंपरेनें चोरीचा व लुटालुटीचा धंदा करणाऱ्या जातींनां सुधारण्याचें होय. हे लोक दांडगट, धाडसी व क्रूर असल्याकारणानें त्यांनां ताब्यावर आणणें हें काम फारच कठिण आहे. तरी मुक्तिफौजेनें त्यांतहि यश संपादून दाखविलें आहे.

हिंदुस्थानांतील काम.

कामिनीया (रजिस्टर्ड) वेगवेगळ्या फुलांच्या मिश्रणाचें अत्तर. वासानें मन प्रफुल्ल करितें.
पाव तोळ्यास १॥. रु. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

विशेष लक्ष्य दिलें पाहिजे. ज्याप्रमाणें वरिष्ठ व मध्यम वर्गांतील लोक, त्याचप्रमाणें निकृष्ट स्थितींतील लोकहि परमेश्वराचीं लेंकरें आहेत, व त्यांचेंहि तारण झालें पाहिजे, हा विचार विल्यम बूथ यांच्या अंतःकरणांत वरचेवर येत असे, व शेवटीं तोच विचार त्यांनीं कायम केला. वरिष्ठ वर्गाच्या व धर्मोपदेशकांच्या अवहेलनेस पात्र झालेल्या लोकांच्या सेवेकरितां आपलें तनुमनोधन अर्पण करण्याचा विल्यम बूथ यांनीं निश्चय केला. ज्या लोकांच्या वाबतींत तुरुंग दाखविण्यापलीकडे समाजांतील लोक कांहीं करीत नव्हते, त्या बदमाष ह्मणून समजले जाणाऱ्या लोकांनां सुधारण्याचें काम विल्यम बूथ यांनीं प्रथम हातीं घेतलें. कॉर्नवाल, कार्डिफ वगैरे ठिकाणीं उपदेश करून व लोकांत मिळून मिसळून त्यांनीं कैक बदमाषांनां ताळ्यावर आणलें, व त्यांचा एक मेळा बनविला. १८६४ मध्यें विल्यम बूथ पुनः लंडनमध्यें आले, आणि जागजागीं तंबू उभारून व मैदानावर उभें राहून लोकांनां उपदेश करूं लागले. लंडनशहरांत ईस्टएंड नांवाचा एक भाग असून तेथें मुख्यतः गरीब लोकांची वस्ती आहे. त्या ठिकाणीं विल्यम बूथ यांनीं आपल्या कामाला नेटानें सुरुवात केली. या वस्तीकडे तोंपर्यंत फारसें कोणीं लक्ष्य दिलें नव्हतें. प्रतिष्ठित व सुस्थितींत असलेलीं माणसें त्या भागांत सहसा मुळींच जात नसत, व त्यामुळें तेथील लोक एक प्रकारें बहिष्कृतच असत. या वस्तींत गलिच्छपणा फार, दुर्व्यसनांचें प्राबल्य, व बदमाषांचा मोठा भरणा, अशी स्थिति होती. अर्थात् त्यांच्यांत धर्मोपदेश मोठ्या कुशलतेनें करावा लागे. बूथ हे त्यांच्यामध्यें मिळून मिसळून वागणारे असल्याकारणानें हातीं धरण्यास योग्य अशीं त्यांच्यांतलींच कांहीं माणसें त्यांनीं शोधून काढलीं, आणि त्यांच्या साहाय्यानें आपलें नीतिप्रसाराचें व धर्मप्रसाराचें काम त्यांनीं चालविलें. 'क्रिश्चन मिशन' या नांवानेंच हें काम प्रथम चाललें होतें. या मिशनसाठीं लोकांचीं मदत मागण्याच्या विनंतिपत्राचा मसुदा एकदां विल्यम बूथ हे करीत होते. आपल्या साहाय्यकर्त्यांचा या मिशनच्या कार्यकर्त्या मंडळींत समावेश करण्याच्या उद्देशानें त्यांनीं आपल्या मिशनचें नांव 'स्वयंसेवकांची सेना' (A volunteer Army) असें लिहिलें होतें. इतक्यांत त्यांच्या मनांत कांहीं विचार आला, आणि Volunteer हा शब्द खोडून त्या ठिकाणीं Salvation हा शब्द त्यांनीं घातला. तेव्हांपासून 'मुक्तिफौज' (Salvation Army) या नांवानें त्यांचें मिशन ओळखण्यांत येऊं लागलें. ही गोष्ट १८७८ सालीं घडली. रक्तपात करण्याकरितां-एकमेकांचे प्राण घेण्याकरितां सैन्यें तयार करण्यांत येतात, तर परमेश्वरप्राप्ति करून घेण्यासाठीं-एकमेकांचें पापप्रवृत्तीपासून रक्षण करण्यासाठीं व धर्मसाधनाच्या कामीं एकमेकांनां साहाय्य करण्यासाठीं एकादें सैन्य कां असूं नये, हाच, 'मुक्तिफौज' हें नांव देतांना विल्यम बूथ यांच्या हृदयांत आलेला विचार होय. फौजेची कल्पना आल्याबरोबर अर्थातच फौजेंतल्या अधिकाऱ्यांचे हुद्दे, एका नमुन्याचे पोषाख, रणवाद्यें वगैरे प्रकार आले. या फौजेचें सूत्रचालकत्व विल्यम बूथ यांजकडे असल्यामुळें ते 'जनरल बूथ' या नांवानें ओळखले जाऊं लागले. धर्मोपदेशाच्या कामांत शिरलेला हा नवीनच प्रकार पाहून 'हें एक पाखंड आहे,' 'बंड आहे,' 'ढोंग आहे,' 'स्तोम माजविण्याचें साधन आहे,' असें लोक ह्मणूं लागले. विद्वान् व विचारी ह्मणून सर्वमान्य असलेल्या बऱ्याच लोकांनां मुक्तिफौजेच्या या बंडाचा तिरस्कार वाटे, व तसें त्यांनीं उघड बोलून दाखविण्यासहि कमी केलें नाहीं. परंतु जनरल बूथ यांनीं प्रतिकूल टीकाकडे लक्ष्य न देतां आपलें काम नेटानें चालविलें. त्यांचें लक्ष्य इच्छित कार्यावर होतें; अर्थात् बहुजनसमाजाचें मन वेधण्यासाठीं, बाह्यतः उपहासास्पद दिसणाऱ्या परंतु अवश्य असलेल्या साधनांचा अवलंब करणें त्यांनां भाग होतें. त्यांनां समजूतदार लोकांत काम करावयाचें नव्हतें. नाहींपेक्षां निराळींच साधनें त्यांनीं उपयोगांत आणलीं असतीं. जनरल बूथ यांचीं साधनें यशस्वी झालीं, आणि पूर्वी कोणींहि न केलेलें असें काम त्यांनीं करून दाखविलें, तेव्हां त्यांची निंदा करणारे लोकच त्यांची स्तुति करूं लागले. त्यांचा सर्वत्र जयजयकार झाला. परलोकवासी सम्राट् सप्तम एडवर्ड व महाराणी अलेक्झांड्रा यांजकडून, त्याचप्रमाणें विद्यमान सम्राट् पंचम जॉर्ज व महाराज्ञी मेरी यांजकडून जनरल बूथ यांच्या कामाची प्रशंसा झाली. केवळ राजे व मुत्सद्दी यांनां मिळणारा लंडनच्या 'फ्रीडम'चा मान त्यांनां देण्यांत आला. अमेरिकेंत एकदां संयुक्त संस्थानांची सेनेट त्यांच्या हस्तें उघडण्यांत आली.

कामिनीया तेल गळून पडणाऱ्या केसांस लाविल्यानें ते फारच मजबूत, भपकेदार आणि पुष्कळ वाढतात.

जपानच्या बादशहांनीं मुद्दाम त्यांची मुलाखत घेतली, आणि बंधमुक्त झालेल्या गुन्हेगार लोकांनां नीतीच्या मार्गास लावण्याचें काम मुक्तिफौजेकडे सोंपविलें. असो.

१८९० सालीं जनरल बूथ यांनीं 'In Darkest England and the Way Out' यानांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध करून इंग्लंडांतील गरीब निराधार लोकांच्या स्थितीची आंग्लजनतेला माहिती करून दिली. या पुस्तकाच्या योगानें सर्व देशभर मोठी चळवळ उडाली, आणि त्यांत दर्शविलेल्या रीतीनें गरीब, घरादारांवांचून असलेल्या लोकांची स्थिति सुधारण्याकरितां जनरल बूथ यांनां द्रव्यसाहाय्य हपाव्यानें मिळूं लागलें. या योजनेमुळें, हजारों निराधार स्त्रीपुरुषांनां व्यवस्थित उद्योगधंदा मिळाला, त्यांचा आयुष्यक्रम उपयुक्त व नियमित झाला, आणि धर्म व नीति यांच्याकडे त्यांची बुद्धि वळली. कैक मद्यपी मद्यपानापासून परावृत्त झाले, कैक कलहप्रिय लोक मनुष्यजातीवर प्रेम करूं लागले, कैक अप्रामाणिक लोक प्रामाणिक बनले, कुमार्गास लागून नीतिच्युत झालेल्या कैक तरुणी नीतिमार्गास लागल्या, निराधारपणीं भटकणारीं व अधोगतीस जाऊं पाहणारीं कैक मुलें सुशिक्षित व सुवृत्त झालीं, आणि आत्महत्येस प्रवृत्त झालेलीं कैक माणसें पुनरपि सुखानें आयुष्याचा उपभोग घेऊं लागलीं. ज्या लोकांनां औषधपाण्यावांचून व शुश्रूषेवांचून मरण्याचा प्रसंग आला असता, त्यांनां औषधोपचार होऊन घरच्या माणसांप्रमाणें त्यांची शुश्रूषा होऊं लागली. जनरल बूथ यांनीं या कामीं लोकांकडून द्रव्यसाहाय्य हरएक प्रकारची खटपट करून मिळविलेंच; पण विशेष हें, कीं, त्यांचें उदाहरण पाहून हजारों स्त्रीपुरुषांनीं स्वार्थत्याग करून व केवळ अन्नवस्त्रावर संतुष्ट राहून मुक्तिफौजेंत काम करण्याचें पतकरिलें. सांप्रत पृथ्वीवरील निरनिराळ्या ५९ देशांत मुक्तिफौजेचें काम चालू असून त्या संस्थेचे उपदेशी निरनिराळ्या ३०-३५ भाषांत होत असतात. नियतकालिक पत्रकें व पुस्तकें यांची संख्या सुमारें ७५ आहे. जवळ जवळ २५००० मनुष्यांचा सर्व खर्च मुक्तिफौजेकडून होत असून त्यांनां उद्योगधंदेहि पुरविण्यांत आलेले आहेत. सामाजिक सुधारणेसाठीं जवळ जवळ एक हजार संस्था चाललेल्या आहेत. अगदीं जरूरी असेल तेथेंच अन्नवस्त्रादिकांचें विनमोबदला साहाय्य देण्यांत येतें. परोपकार करावयाचा म्हणजे आळशीपणाला उत्तेजन द्यावयाचें असें नसून, दरेक व्यक्तीला समाजाचा उपयुक्त घटकावयव बनवावयाचें, नाइलाज असल्याशिवाय समाजावर कोणाचा भार पडूं द्यावयाचा नाहीं, असें धोरण असल्याकारणानें खर्चाचें काम मोठ्या कसोशीनें होतें. दुर्गुणांचा-दुष्ट प्रवृत्तींचा प्रसार कमी केला पाहिजे, तर आळसाला केव्हांच थारा देतां कामा नये, हें तत्त्व मुक्तिफौजेचे अधिकारी नेहमीं लक्ष्यांत ठेवीत असतात, व त्यामुळेंच त्यांचें काम इतकें यशस्वी झालें आहे.

कार्यक्षेत्राचा विस्तार.

हिंदुस्थानांतील मुक्तिफौजेच्या शाखेचे मुख्य अधिकारी कमिशनर बूथ टकर हे असून, फौजेंत सामील होण्यापूर्वी ते पंजाबमध्यें मोठ्या हुद्यावर होते. ते आय्. सी. एस. (इंडियन सिव्हिलसर्व्हिस) ची परीक्षा पास झालेले होते; परंतु मोठ्या हुद्याची नोकरी व बढतीची आशा हीं सोडून ते फौजेमध्यें सामील झाले. त्यांच्या हाताखालीं हिंदुस्थानांतील फौजेमध्यें २५०० अमलदार असून त्याशिवाय हजारों एतद्देशीय लोक आहेत. या देशांतील मुक्तिफौजेच्या शाळांत १०,००० मुलें प्राथमिक शिक्षण घेत असून उद्योगगृहांतील मुलांमुलींची संख्या ८०० आहे. शेतकऱ्यांकरितां पहिली पतपेढी या देशांत मुक्तिफौजेनें स्थापिली, ही गोष्टहि लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यानंतर गेल्या चौदा वर्षांत सरकार व लोक यांनीं अनेक पतपेढ्या स्थापिल्या आहेत. हातमागाच्या धंद्यास मुक्तिफौजेनें पुष्कळ हातभार लावला आहे. सुधारलेल्या पद्धतीचे जलद विणकाम करणारे सुमारें एक हजार हातमाग कोष्टी लोकांनां पुरविले असून त्या हातमागांवर काम करण्यास शिकविण्यासाठीं ठिकठिकाणीं शाळाहि स्थापिलेल्या आहेत. मुक्तिफौजेनें चालविलेलें या देशांतील विशेष महत्त्वाचें काम म्हटलें म्हणजे वंशपरंपरेनें चोरीचा व लुटालुटीचा धंदा करणाऱ्या जातींनां सुधारण्याचें होय. हे लोक दांडगट, धाडसी व क्रूर असल्याकारणानें त्यांनां ताब्यावर आणणें हें काम फारच कठिण आहे. तरी मुक्तिफौजेनें त्यांतहि यश संपादन दाखविलें आहे.

सामाजिक सुधारणे-

कामिनीया (रजिस्टर्ड) वेगवेगळ्या फुलांच्या मिश्रणाचें अत्तर. वासानें मन प्रफुल्ल करितें.
पाव तोळ्यास १॥. रु. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

पंजाब व संयुक्त प्रांत या इलाख्यांत गुन्हेगार जातींच्या लोकांसाठी फौजेनें ११ वसाहती स्थापिलेल्या असून तेथें २००० माणसें आहेत.

जनरल बूथ यांचे विशेष गुण.

मुक्तिफौजेचीं माणसें सर्व पृथ्वीच्या पाठीवर पसरलेलीं असतां त्यांना एका सूत्रांत बद्ध करून सर्व व्यवस्था सुयंत्रितपणें चालविणें, हें लहानसहान काम नव्हे; परंतु विल्यम बूथ यांनीं तें काम उत्कृष्ट रीतीनें केलें. त्यांचा निश्चय दांडगा होता, अंगीकृत कार्यावर अचल विश्वास होता व त्यामुळें त्यांनीं आपल्या मार्गांतील अडचणींना केव्हांहि जुमानलें नाहीं. रोज बारापासून पंधरा तासपर्यंत त्यांचा उद्योग सतत चालत असे. बहुजनसमाजाचें मन हस्तगत करून घेण्याची खुबी त्यांना विलक्षण रीतीनें साधलेली होती. उतारवयांतहि चारपांच हजार लोकांचा श्रोतृसमाज ते झुलवीत असत, असें त्यांचें आश्चर्यकारक वक्तृत्व असे. कित्येक प्रसंगीं पांच सहा सभांत एकाच दिवशीं त्यांनीं भाषण केलें होतें, इतकी त्यांची श्रमसहिष्णुता होती. ते स्वतः अविश्रांत श्रम करीत, इतकेंच नव्हे, तर आपल्या अनुयायांनांहि सतत कार्यव्यापृत ठेवीत. त्यांची शिस्त कडक असे, व शिस्तीचा प्रश्न आला ह्मणजे ते कोणाचीहि प्रतिष्ठा ठेवीत नसत. स्वतःच्या एका मुलानें शिस्तीचें उल्लंघन केल्याबद्दल त्याला त्यांनीं फौजेतून काढून लावलें. त्यांची राहणी साधी असे. त्यांनीं मांसाहार, मद्यपान व धूम्रपान हीं पूर्ण वर्ज्य केलीं होतीं. नेहमीं साधा व मित आहारावर ते राहत असत.

कौटुंबिक दुःखप्रसंग.

मुक्तिफौजेच्या बाल्यावस्थेंत लोकांत त्यांचा उपहास झालाच; पण त्याशिवाय मरेपर्यंत कित्येक तीव्र कौटुंबिक आपत्ति त्यांना सहन कराव्या लागल्या. १८९० सालीं त्यांची प्रिय पत्नी पुष्कळ वर्षें दुखणें भोगून निवर्तली. तिचें त्यांना फार साहाय्य असे. फौजेची स्त्रीशाखा तिच्या प्रयत्नांमुळेंच अस्तित्वांत आली. तिच्यामागून, अमेरिकेंत फौजेच्या कामांवर असतां वडील मुलगी रेल्वेच्या एका अपघातांत सांपडून मरण पावली. जनरल बूथ यांचा दुसरा मुलगा फौजेंतील हुषार अमलदार होता, व त्यानें बरींच वर्षें चांगलें काम बजावलें होतें, तो वेगळा झाला व अमेरिकेंत मुक्तिफौजेशीं स्पर्धा करणारी दुसरी एक संस्था त्यानें स्थापिली. जनरल बूथ यांच्यावर आलेला सर्वांत वाईट प्रसंग. हाच होय! असे दुःखप्रसंग आले तरी धैर्य न सोडतां त्यांनीं आपलें काम चालविलें होतें. जनरल बूथ यांच्या मागून त्यांचे वडील चिरंजीव ब्रॅमवेल बूथ हे जनरल झाले असून ते चांगले लेखक, वक्ते व कार्यकर्ते आहेत. त्यांच्याविषयीं व त्यांच्या पत्नीविषयीं फौजेंतील सर्व मंडळींस अत्यंत आदर वाटतो. ३४ वर्षें मुक्तिफौजेचें काम चालवून विल्यम बूथ हे ता. २० आगस्ट १९१२ रोजीं परलोकवासी झाले.

साधुत्व व समाजसेवा.

"आपण तरला हें काय नवल ? दुजियां तारील तोचि साधु" या दृष्टीनें पाहतां विल्यम बूथ यांना थोर साधु असेंच ह्मणावें लागतें. माणुसकीला आंचवलेल्या हजारों माणसांना त्यांनीं माणुसकी प्राप्त करून दिली, अधोगतीपासून हजारों माणसांना त्यांनीं तारिलें; ज्यांना कोणी आपंगिता नाहीं, ज्यांचा जगानें धिक्कार केला, त्यांना त्यांनीं 'आपल्या हृदयीं धरिलें, 'देव देव' ह्मणत ते कोनाड्यांत बसले नाहींत, तर जगाचे आघात सोसून, देवास विसरलेल्या माणसांकडून देवाचा आश्रय त्यांनीं करविला. त्यांनीं मृत माणसें उठविलीं नाहींत; तथापि मृत्युमुखांत पडत असलेल्या व जीवंतपणीं मृततुल्य असलेल्या माणसांचा त्यांनीं बचाव केला. त्यांची बुद्धि कुशाग्र होती किंवा ते मोठे पंडित होते, असें नाहीं; परंतु त्यांचें श्रद्धाबल अप्रतिम होतें. हीनदीन झालेल्या भारतवर्षाला अशा शेकडों हजारों पुरुषांची जरूरी आहे. असे वाणेदार, धैर्यशाली व उद्योगशील पुरुष झाल्याखेरीज हिंदुधर्माचेंहि पंगुत्व दूर होणार नाहीं. सांप्रत या देशांत समाजसेवेविषयीं जागृति व आस्था उत्पन्न होत आहे; अशा वेळीं विल्यम बूथ यांचा आयुष्यक्रम व मुक्तिफौजेची कार्यपद्धति यांच्या ज्ञानाचा पुष्कळ उपयोग होईल, यांत संशय नाहीं. विल्यम बूथ यांच्यासारखे दीनांचे कैनवाड आणि नीतिभ्रष्टांचे उद्धारकर्ते असे अनेक समाजसेवक या प्राचीन भूमींत निर्माण होवोत अशी इच्छा प्रदर्शित करून हा अल्प चरित्रलेख संपवितों.

सर्वेऽस्तु दुर्गाणि सर्वो भद्राणि पश्यतु
सर्वः सुखमवाप्नोतु सर्वः सर्वत्र नंदतु ।

ओडमेन्स सायप्रस साल्व्ह—डोकें, कंबर, पाठ, छाती यांतून कळा निघूं लागल्यास हें मलम चोळावें. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कंपनी, जुम्मामशीद, मुंबई.



या कादंबरीच्या मागील प्रकरणांचा सारांश.—(१) मंदाकिनीच्या तीरावरील एकान्त वनांत एक तरुणी एका दोन वर्षांच्या बालिकेस एका प्रौढ योग्याच्या स्वाधीन करते. (२) पांडोबातात्यांच्या शाळेंतील मुलांच्या चेष्टा. गदाधर फरारी हंबीराच्या शोधास जातो. (३) नानासाहेब जहागीरदारांच्या बागेंत हंबीर, शारदा व तिच्या मैत्रिणी यांच्या बाल्यलीला. शारदेला तिच्या मैत्रिणींनी पुष्पालंकारांनी सजविल्यावर त्यांच्या आग्रहानें हंबीर तिच्या गळ्यांत हार घालीत असतां तो गळ्यांत न पडतां चुकून तिच्या पायांवर पडतो. (४) नानासाहेबांची राजधानी कुंदपुर. (५) पूर्वीची थोडी हकीगत. नानासाहेबांची पत्नी सकवारबाई परलोकवासी झाल्यावर आप्तेष्टांच्या द्वितीय विवाह करण्याच्या विलक्षण आग्रहाकडे दुर्लक्ष करून नानासाहेब पुनर्दारपरिग्रह न करण्याची आपली भीष्मप्रतिज्ञा नेटाने पार पाडतात.

प्रकरण सहावें.

स्त्रीशिक्षण इष्ट कीं अनिष्ट?

आज अगदी सकाळींच स्नानादि-प्रातःकृत्यें आटोपून नानासाहेब वाड्यांतील देवमंदिरांत येऊन बसले होते. त्यांचीं स्नानादि कृत्यें दररोजच लवकर आटोपलीं जात असत; परंतु आज पाठशाळेंत शारदेचें सरस्वतीपूजन व्हावयाचें असल्यामुळें नानासाहेबांनीं हीं कृत्यें आज नेहमींपेक्षां किंचित् लवकर उरकलीं होतीं. त्यांच्या इतर जहागीरदार बंधूप्रमाणें त्यांची पहांट इतर लोकांच्या मध्यान्हीस होत नसे. बन्याच सरदारदरकदार, जहागीरदार वगैरे गर्भश्रीमंत लोकांनां रात्रीं नाचगाणीं वगैरे पहाण्याची व ऐकण्याचीं श्रमाचीं कामें फार पडत असल्यामुळें, झालेल्या श्रमांचें पूर्ण निरसन करण्यासाठीं पहांटेपर्यंत-अर्थात् श्रीमंती पहांटेपर्यंत-त्यांनां स्वस्थ किंवा अर्धवट गुंगींत, येईल तशी झोंप काढावी लागते. ते तरी काय करतील बिचारे! रात्रभर जागरण पडत असल्यामुळें त्यांनां सर्व दिवस झोंपून काढावा लागतो व दिवसा झोंप घेतल्यामुळें बिचाऱ्यांनां रात्रीं झोंप येत नाहीं! या रहाटगाड्यामुळें 'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी' या सुप्रसिद्ध गीतावचनाप्रमाणें आमची बहुतेक गर्भश्रीमंत मंडळी योगाभ्यासाशिवाय आपोआप योगी बनतात! आमचे नानासाहेब कांहीं या योगिमंडळापैकीं नव्हते; हा त्यांचा दोष आही प्रांजलपणें अगोदरच कबूल करतों.

वर सांगितल्याप्रमाणें स्नानादि प्रातःकृत्यें आटोपून नानासाहेब देवमंदिरांत आले होते. त्यांच्या उपास्य देवपंचायतनाची शोडषोपचार पूजा तत्प्रीत्यर्थ नेमण्यांत आलेले भटजीमहाराजच दररोज उरकीत असत. त्यांनीं पूजा आटोपल्यावर खुद्द जहागीरदारसाहेब पंचायतनावर भक्तिपुरःसर पुष्पांजलि वाहून त्याचा तीर्थप्रसाद मात्र सेवन करीत असत. आज विशेष ताकीद दिलेली असल्यामुळें भटजीमहाराजांनीं पूजा दररोजच्यापेक्षां किंचित् लवकरच आटोपली असून जहागीरदारसाहेबांनां तीर्थप्रसाद देऊन स्वारी या वेळीं निघूनहि गेली होती.

नेहमींप्रमाणें तीर्थप्रसाद घेऊन नानासाहेब देवमंदिरांतून जावयास निघणार, तों त्यांचे कुलपुरोहित नीलकंठ दीक्षित तेथें येऊन ठेपले. दीक्षितांची नानासाहेबांनां भेटण्याची वेळ रोज अमूकच असे, असें नाहीं. उषःकालापासून मध्यरात्रीपर्यंत वाटेल त्या वेळीं दीक्षित यजमानसाहेबांनां भेटण्यासाठीं किंवा कोणत्याहि अन्य कार्यासाठीं वाड्यांत येत जसत व ते कोणत्याहि वेळीं आले तरी यजमानसाहेब, वेळीं इतर महत्त्वाच्या कामांकडे दुर्लक्ष्य करूनहि त्यांनां हटकून भेटत असत.

आपली स्मरणशक्ति व काम करण्याची हिंमत शाबुद आहेना? नसेल तर प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका वापरा व निरोगी व्हा.

आज अमुक एका कारणासाठीं नानासाहेबांनां भेटायला दीक्षित आले होते, असें नाहीं. नीलकंठ दीक्षित कडकडीत कर्मठ ब्राह्मण होते, हें मागें आम्ही सांगितलेंच आहे. सरासरी प्रहर सवा प्रहर रात्र उरली, कीं, ते निजून उठत असत. वर्षाचा कोणताहि काल असो, सरस्वतीच्या परम पवित्र जलाचें स्नान व तिच्या तीरावर प्रातःसंध्यादि कृत्यें दीक्षितांकडून कधींच चुकलीं नाहींत. नेहमींप्रमाणें संध्यावंदनप्रभृति कार्यें आटोपून, यजमानसाहेब आज दररोजच्यापेक्षां लवकर उठले असतील अशी अटकळ बांधून, त्यांनां सहज भेटण्याकरतां म्हणून दीक्षित आज वाड्याकडे चालले होते.

कांहीं कालपर्यंत नानासाहेब व दीक्षित यांच्या गप्पागोष्टी चालल्या होत्या. त्यांचा विषय अमुक एकच होता, असें नाहीं. राज्यकारभारापासून तों कर्मकांडापर्यंत नानाविध विषयांवर त्यांचें संभाषण चाललें होतें. शारदेच्या आजच्या सरस्वतीपूजनाचा विषयहि त्यांत निघाल्याशिवाय राहिला नाहीं. हा विषय सुरू असतां नानासाहेबांचे एक प्रमुख आश्रित व दीक्षितांचे शेजारी चिंतामणशास्त्री डोरेहि तेथें येऊन प्रविष्ट झाले व त्यांनींहि यथासाध्य व यथाशक्ति अंश उचलला.

बोलतां बोलतां चिंतामणशास्त्री म्हणाले "मी पुनः आपणाला विनंति करतों, कीं, आपण केलेल्या या संकल्पाचा आपण त्याग करावा. स्त्रियांनां शिक्षण द्यावयाची लवमात्रसुद्धां आवश्यकता नाहीं !"

नानासाहेब विरक्तीच्या स्वरानें म्हणाले "आपण हें कसें प्रतिपादन करतां शास्त्रीबुवा, तें मला कळत नाहीं. पुरुषांनां शिक्षणाची आवश्यकता आहे, हें तरी आपण कबूल करतां ?"

"अलबत् ! विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्नगुप्तं धनम्—विद्या भोगकरी यशःसुखकरी विद्या गुरूणां गुरुः असें म्हटलेंच आहे कविवर्यांनीं !"

"मग स्त्रियांनां शिक्षणाची कां आवश्यकता नाहीं?"

"त्यांनां शिक्षण देणें धर्माला, समाजाला व देशाला सर्व प्रकारें अगदीं अहितकारक आहे. कवींनीं तरी काय म्हटलें आहे ? 'विद्या नाम नरस्य रूपम् ! 'स्त्रियांचें रूप' असें त्यांनीं म्हटलें नाहीं !"

यावर दीक्षित किंचित् हंसून व किंचित् गंभीरपणें म्हणाले "शास्त्रीबुवा ! अशी लटपटपंची कां वरें! कवीनें योजलेल्या 'नर' शब्दांत पुरुष व स्त्री या दोघांचाहि अंतर्भाव होतो आहे ना !"

चिंतामणशास्त्री दीक्षितांच्या या भाषणानें किंचित् भिजल्यासारखे दिसले. एकदा खांकरून अस्पष्टपणें म्हणाले "हो, असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं; परंतु एकंदरींत स्त्रियांनां शिक्षण देणें अनिष्टच आहे !"

"कां वरें ?" नानासाहेबांनीं खिन्नपणें विचारलें.

"स्त्रीशिक्षणाचे अत्यंत अहितकारक परिणाम मी सांगूं तरी किती यजमानसाहेब ? शिक्षणानें स्त्रिया स्वच्छंदी, स्वतंत्र विचाराच्या व मनाप्रमाणें वर्तन करणाऱ्या अशा निपजतात ! त्यामुळें कुटुंब, समाज, धर्म व देश यांच्यासंबंधाची पूर्वापार चालत आलेली सुव्यवस्था मोडून चहूंकडे विशृंखल कारभार सुरू होतो. वरें खुद्द स्त्रीजातीवर तरी शिक्षणाचा परिणाम चांगला होतो आहे काय ? त्याचा त्यांच्या शरीरावर अतिशय अनिष्टकारक परिणाम होतो. त्यांच्या मनांत अविवाहित रहायची इच्छा बळावते; त्या स्वेच्छाचारी होतात व त्याचा परिणाम संततीवर, प्रजेवर व एकंदर समाजावर अत्यंत प्रतिकूल होतो !"

नानासाहेब कानांवर हात ठेवून विरक्तीनें म्हणाले "शिवशिव ! शास्त्रीबुवा, काय भयंकर तुमचे विचार हे ! ज्या शिक्षणाच्या अंगीं पुरुषांनां काय किंवा स्त्रियांना काय, स्वर्गीय देव बनविण्याची शक्ति आहे, तें स्त्रियांनांच नरकांतील क्षुद्र कीट कसें करील? एकच अमृत, पण तें पुरुषांनां तेवढें प्राणसंजीवन व स्त्रियांनां प्राणसंहारक विष कसें होईल? एकच आम्रफल, पुरुषांनां मात्र मधुर व स्त्रियांनां तेवढें कडु जहर कसें लागेल? शास्त्रीबुवा, हल्लींच्या मन्वंतरांतील गोष्ट मी तुह्माला विचारीत नाहीं. गार्गी, अरुंधती, लीलावती इत्यादि विदुषी स्त्रिया आमच्या पूर्वकालीन समाजाला भूषणस्वरूप होत्या, कीं दूषणस्वरूप होत्या ? त्यांच्या योगानें आमच्या तत्कालीन समाजाचा पुरा विध्वंस होऊन गेला, असें आपण कोणत्या शास्त्राच्या आधारानें दाखवून द्याल शास्त्रीबुवा? वरें, सद्यःकालीन समाजांत देखील एकादुसरी

प्रत्येक स्त्रीस आपले केश सुंदर असण्याबद्दल अभिमान असतोच.
कामिनीया तेल वापरल्यानें केश फारच सुंदर होतात आणि वृद्धि पावतात.

विदुषी स्त्री स्वेच्छाचारी निघाली असली तर तो दोष शिक्षणाचा कीं इतर परिस्थितीचा? तुमच्या सुशिक्षित पुरुषांत शेकड्यांनीं मोजतां येतील इतके लोक स्वेच्छाचारी सांपडणार नाहींत काय? मग त्यांच्या स्वेच्छाचाराचें खापर तुम्ही शिक्षणावर कां फोडीत नाहीं? तसेंच अनेक अशिक्षित स्त्रीपुरुषांत जो स्वेच्छाचार दिसतो किंवा दुर्गुण आढळून येतात, त्याचा दोषहि तुम्ही शिक्षणाच्याच माथीं मारतां काय? शास्त्रीबुवा! नीट विचार करा, डोळे उघडे ठेवून सभोंवतालच्या परिस्थितीकडे पहा. शेंकडों वर्षे चालत आलेल्या रूढीचा किंवा परंपरेचा चाऊ करून विचारशक्तीचा कोंडमारा करूं नका. स्त्रीशिक्षणानें तुमच्या कुटुंबाचा, समाजाचा, धर्माचा किंवा देशाचा नायनाट व्हायचा नाहीं, तर उलट या जादूच्या कांडीनें सर्वांनां दिव्यत्व प्राप्त होईल. देशांतील प्रत्येक पुरुषावरोवर प्रत्येक स्त्री सुशिक्षित झाली, कीं, पृथ्वीचा स्वर्ग व्हावयाला उशीर नाहीं, ही तुमची खात्री असूद्या!"

नानासाहेवांच्या या भाषणाचा शास्त्रीबुवांच्या मनावर तर खास वराच परिणाम झाला; त्यांच्या या युक्तिवादाचें आपल्यास सयुक्तिक खंडन करतां येईल, अशी त्यांचें मन त्यांनां ग्वाही देईना. तथापि आपला आग्रह सोडण्याचीहि त्यांच्या मनाची तयारी नव्हती. तसेंच यजमानांनां वाग्रणांत व्यर्थ दुखवावें,असेंहि त्यांनां वाटेना. तेव्हां मधल्याच एका मार्गाचा अवलंब करून शास्त्रीबुवा ह्मणतात "यजमानसाहेवांपुढें मी यःकश्चित् मनुष्य काय बोलणार आहे? स्त्रीशिक्षणसंवंधानें आपलीं मतें कोहींहि असोत, मी तूर्त आपणाला एवढेंच सांगून ठेवतों, कीं, निदान शारदाताई-साहेवांच्या शिक्षणाच्या वावतींत तरी आपण विशेष आग्रह धरूं नये."

"कां वरें शास्त्रीबुवा? माझ्या शारदेच्याच शिक्षणा-विषयीं मीं आग्रह धरूं नये, असें आपण ह्मणतां याचा अर्थ तरी काय? परस्पर दुसऱ्यांनां उपदेश करून मीं जगांत नुसता ओष्ठसुधारकपणा गाजवावा, असें आपण ह्मणतां?"

"छे-छे-तसें मी कांहीं—"

नानासाहेवांनीं मध्येंच विचारलें "तर मग दुसरी कोणती हरकत आहे?"

कनवटीस लावलेली डबी उघडून, तिच्यांतील एक चिमुटभर तपकीर आपल्या दोन्ही विस्तृत नाकपुड्यांत कोंबून शास्त्रीबुवा ह्मणतात "तशी कांहीं हरकत असल्याशिवाय का मी आपला या वावतींत वारंवार निषेध करतों आहें? यजमानसाहेवांच्या अन्नावर हा देह लहानपणापासून परिपुष्ट झाला आहे–आपलें सदासर्वदा मंगल व्हावें, या इच्छेव्यतिरिक्त आह्मी दुसरें काय चिंतन करणार? यजमानसाहेव! आपल्या भावी अमंगलाच्या आशंकेनें माझ्यासारख्या आपल्या एकनिष्ठ आश्रिताचें हृदय क्षणोक्षणीं तिळतिळ तुटतें!"

चिंतामणशास्त्र्यांच्या भाषणाच्या या शेवटच्या भागानें नानासाहेवांचें हृदय किंचित् थरारलें! ते अस्पष्ट स्वरानें शास्त्रीबुवांनां ह्मणाले "शास्त्रीबुवा! असें अस्पष्ट अन् संदिग्ध आपण कां वरें बोलतां? माझ्या लाडक्या मुलीला शिक्षण देण्यांत विशेष हरकत कसली आहे तें आपण स्पष्टपणें मला सांगा–दैवयोगानें या वेळीं दीक्षितांची स्वारीहि येथें आहे. त्या हरकतीचें युक्तीनें निरसन होण्यासारखें असल्यास दीक्षित करतील, किंवा ती खरी असल्यास तींतून सुरक्षितपणें जायला मला ते सुमार्ग दाखवून देतील."

चिंतामणशास्त्री किंचित् अडखळत ह्मणाले "तशी ह्मणजे कांहीं विशेष हरकत आहे, असें नाहीं! स्त्रीशि-क्षणाला शास्त्रांत भक्कम आधार नाहीं, अन् असला तरी तें उघड उघड लोकाचाराविरुद्ध आहे! 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धम्। ना करणीयं नाचरणीयम्!"

शास्त्रीबुवांच्या या विधानाचें नानासाहेवांनां तिर-स्काराचें हंसूं मात्र आलें. त्यांनां आपण कांहीं उत्तरच देऊं नये, असा विचार करून नीलकंठ दीक्षितांकडे वळून त्यांनीं विचारलें " आपलें काय ह्मणणें या वावतींत?"

दीक्षित शांतपणें ह्मणाले "नानासाहेव! स्त्रीशिक्षणा-संवंधानें मला जें कांहीं वाटतें, त्याचा उच्चार मीं आपणापाशीं वारंवार केलाच आहे. स्त्रीशिक्षण सर्वथा कल्याणप्रद आणि समाजाचें व देशाचें उच्चतम मंगल साधणारेंच आहे. त्याला शास्त्र विरुद्ध नाहीं–लोकाचार विरुद्ध नाहीं! अन् असला, तरी तेवढ्यापुरता त्याला वेलाशक वाजूला ठेवून प्रगतिमार्गानें अग्रेसर

केश सुंदर दिसण्यास ते रेशमासारखे मऊ, चमकणारे, नरम आणि पुष्कळ पाहिजेत.
कामिनीया तेलाचा त्यासाठीं उपयोग करा!

व्हायला कसलीहि हरकत नाहीं ! चिंतामणशास्त्री-बुवांनांहि स्त्रीशिक्षणसंबंधाचीं माझीं मतें अविदित आहेत, असें नाहीं. त्यांच्यापाशीं याविषयीं माझें अनेकवार संभाषण झालेलें आहे. मग ते या बाबतींत आजच विशेष हरकती कां उत्पन्न करीत आहेत, हें मला कळत नाहीं !" असें झणून दीक्षितांनीं शास्त्रीबुवांकडे एकवार आपल्या तीव्र व भेदक दृष्टीनें पाहिलें.

बिचारे शास्त्रीबुवा संकटांत सांपडल्यासारखे झाले. दीक्षितांच्या भेदक दृष्टीनें तर ते अगदीं स्तंभितच होऊन गेले. लज्जेनें झणा, किंवा अन्य कांहीं कारणामुळें झणा, त्यांनीं मान खालीं घातली; परंतु या प्रसंगीं कांहीं तरी बोललें हें पाहिजेच, नाहीं तर यजमानसाहेबांपुढें आपली अगदीं नाचक्की होऊन जावयाची, असा पोक्त विचार करून, खारी अस्पष्ट स्वरानें किंचित् अडखळत झणते "यासंबंधीं दोनचार वेळ आपल्याशीं भाषणाचे प्रसंग मला यापूर्वी आले होते-पण-पण-ते झणजे स्त्रीशिक्षणाला इतकें आनुकूल्य दर्शवितील, अशी माझी कल्पनाहि नव्हती ! आज झणे शारदाताईसाहेबांचें अन् इतर मुलींचें पाठशाळेंत 'सरस्वतीपूजन' व्हायचें आहे ! माझ्या कानांवर ही गोष्ट चुकतीच आली. आजपर्यंत मुलें 'सरस्वतीपूजन' करीत असतात, असें आमच्या ऐकण्यांत आहे बुवा ! परंतु मुली 'सरस्वती-पूजन' करतात, ही गोष्ट माझ्या या वृद्ध वयापर्यंत मीं कांहीं फारशी कधीं ऐकलेली नाहीं !"

तिरस्कारव्यंजक मृदुस्मित करून नीलकंठ दीक्षित झणाले "शास्त्रीबुवा ! तुमच्या या स्त्रीशिक्षणविरुद्ध कुत्स्या ऐकून मला तुमचें मोठें हंसूं येतें. एकाद्या अविचारी, शिक्षणाचा गंधहि नसलेल्या गांवढळ मनुष्यानें जो युक्तिवाद लढवावा, तो युक्तिवाद या वेळीं नानासाहेबांपुढें तुह्मी लढवीत आहां, याचें मला महदाश्चर्य वाटतें ! आजपर्यंतच्या रूढीमुळें 'सरस्वतीपूजन' हा शब्द जर मुलींच्या संबंधानें योजणें तुमच्या मनाला तितकें उचित वाटत नसेल, तर 'विद्यारंभ,' 'दीक्षादान' किंवा तुह्माला योग्य वाटेल तो दुसरा कोणताहि शब्द योजा. शब्दांत काय आहे ? चंद्राला 'चंद्र' न झणतां दुसरें कांहीं नांव दिलें, तरी त्याच्या अमृत स्रवणाऱ्या किरणांची माधुरी नाहींशी होईल का ? मुख्य तत्त्वाकडेच दृष्टी द्यावयास मनुष्यानें तत्पर असलें पाहिजे. अन् मी झणतों, मुलांच्याप्रमाणेंच मुलींच्याहि विद्यारंभाला 'सरस्वतीपूजन' असें झटलें, तर त्यांत मोठा अशुद्धतेचा प्रकार काय घडून आला, हें मला कळत नाहीं ! 'सरस्वती' ही मुलांच्या, तशीच मुलींच्याहि विद्येची देवी आहे, या लोकांच्या समजुतींत कोठें चूक तर नाहींना शास्त्रीबुवा ? "

चिंतामणशास्त्री दीक्षितांकडे पाहून आश्चर्यानें उद्गारले "तर मग शारदाताईसाहेबांनीं आजपासून खुशाल शिकायला आरंभ करावा, असें आपणांसारख्या वेदोनारायणांचेंहि मत आहे ?"

नीलकंठ दीक्षित शांतपणें झणाले "फक्त शारदाच आज शिक्षण घ्यायला आरंभ करणार आहे असें नाहीं. तिच्याबरोबर माझी तारा, विनायकरावजी देशमुखांची कन्या यमुना व तुमची कन्या इंदिरा, याहि आज सरस्वतीपूजन करून शिकायला आरंभ करणार आहेत. इंदिरेच्या शिक्षणाला तुमच्या कुटुंबाची संमति मिळालेली आहे."

किंचित् हास्य करून शास्त्रीबुवा चेष्टेच्या स्वरानें झणतात "अंः-दीक्षित ! आपण सांगतां आहां या साऱ्या मुली ब्राह्मणांच्या कुलांत उत्पन्न झालेल्या आहेत."

नानासाहेबांनां शास्त्रीबुवांच्या भाषणांतील खोंच कळली नाहीं, असें नाहीं; परंतु तीकडे तादृश लक्ष न देतां ते गंभीरतेनें झणाले "शास्त्रीबुवा ! सर्व शास्त्रांत आणि धर्म-ग्रंथांत ज्याची सर्वदा अप्रतिहत गति होती, असे वेदवेदांगपारंगत माधव दीक्षित आज जर येथें असते, तर त्यांनीं आपला हा भ्रम हां हां झणतां दूर केला असता ! शिक्षण हें एक स्वर्गीय अमृत आहे. ब्राह्मण असो कीं अतिशूद्र असो, पुरुष असो कीं स्त्री असो, सर्वांनां अमृत हें अमृतच लागावयाचें ! तें मनुष्यमात्राला संजीवनच देणार ! स्त्रीपुरुष, शूद्र-ब्राह्मण यांनां विद्या शास्त्रनिषिद्ध नाहीं, ही गोष्ट माधव दीक्षितांच्या तोंडून मीं किती वेळ तरी ऐकिली आहे. माधव दीक्षितांच्या कृपाप्रसादामुळेंच मराठ्यांच्या कुलांत जन्म घेऊनहि मला थोडीबहुत संस्कृत विद्या संपादन करतां आली. महाराष्ट्रांतील बहुतेक मोठमोठ्या पंडितांनां माधव दीक्षित हे गुरुस्थानीं आहेत. शास्त्रीबुवा ! त्याच गुरूंचे आपण शिष्य, आपण अशीं अनुदार मतें कशीं प्रतिपादन करतां ? माधव

कामिनीया तेलाचा उपयोग केल्यानें केश सुंदर, काळेभोर, रेशमाप्रमाणें नरम, दाट आणि लांब होऊन स्त्रियांच्या सौंदर्याची वृद्धि होते.

दीक्षितांसारख्या गुरूंची आपण ही एक प्रकारें अवज्ञाच नाहीं का करीत आहां ? हाय ! आमचें नशीब फुटकें म्हणून आह्मी माधव दीक्षितांसारख्या प्रतिसूर्याला अंतरलों. दीक्षितांचा सर्वगुणसंपन्न परम प्रिय पुत्र अपघातानें मरण पावल्यामुळें ते आमचा आणि कुंदपुराचा त्याग करून देशान्तराला निघून गेले, त्यावेळीं दीक्षितांनां पूर्णपणें साजणारे, प्रतिमाधव दीक्षितच असे त्यांचे कनिष्ठ बंधु पंडितश्रेष्ठ नीलकंठ दीक्षित जर येथें नसते, तर हें कुंदपुर केवळ अंधकारमयच बनलें असतें !"

नानासाहेबांच्या या भाषणाचा शेवटचा भाग ऐकतांच चिंतामणशास्त्र्यांचा चेहरा एकाएकीं काळवंडल्यासारखा झाला. ते एकदम बसल्या जागेवरून उठले व एक दीर्घ निःश्वास सोडून इकडे तिकडे येरझारा करूं लागले. फिरतां फिरतां ते खिन्न स्वरानें म्हणाले "माझे परम पूज्य गुरु माधव दीक्षित जर या वेळीं येथें असते, तर त्यांनीं शारदाताईसाहेबांच्या शिक्षणाला अनुमति दिली असती किंवा नाहीं, याबद्दल मात्र मला जबरदस्त संशय आहे !"

शास्त्रीबुवांच्या भाषणाकडे लक्ष्य न देतां नानासाहेब पुढें बोलूं लागले "शास्त्रीबुवा ! माझें म्हणणें नीट ऐकून घ्या. माझी प्रिय कन्या शारदा ही रूपानें आणि गुणांनीं केवळ लक्ष्मी आहे ! तिला उपयुक्त शिक्षण मिळालें, तर ती केवळ नांवानेंच नव्हे, तर गुणांनींहि शारदाच होईल. 'निसर्गभिन्नास्पद' असलेल्या लक्ष्मी आणि सरस्वती यांचा संयोग जर माझ्या शारदेच्या ठिकाणीं घडून येईल, तर मला तिच्यासारखी आनंदाची गोष्ट तीच ! माझ्या पश्चात् माझ्या सर्व संपत्तीची शारदाच एकटी अधिकारी होईल. बालवयापासूनच जर तिला उपयुक्त शिक्षण दिलें तर पुढें तिला मिळणाऱ्या संपत्तीचें रक्षण कसें करावें व योग्य प्रसंगी तिचा योग्य व्यय कसा करावा, या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींचें तिला चांगलें ज्ञान होईल. म्हणूनच मी माझ्या कन्येला शिक्षण द्यायचा संकल्प केला आहे. कांहीं दिवस मी तिला गांवांतील इतर मुलांबरोबरच तात्यांच्या हाताखालींच शिक्षण देणार आहें. तेथें तिला लेखनवाचनाचें व हिशेबटिशेबाचें जुजबी ज्ञान झालें, की, मी तिला नीलकंठ दीक्षितांच्या पायांशीं संस्कृत भाषेचें ज्ञान संपादन करण्यासाठीं ठेवणार आहें. माझ्या मनांत तर तिला पुढें इंग्रजी भाषेचेंहि शिक्षण द्यायचें आहे. आमच्या देशांत काय किंवा आमच्या कुलांत काय, शास्त्रीबुवा, स्त्रीशिक्षणाची पद्धति कांहीं आपण समजतां इतकी नवीन व नवलाची नाहीं ! स्त्रीशिक्षणासंबंधीं आपलें खरोखरच जर अगदीं प्रतिकूल मत असेल तर आपण आपल्या मुलीला पाठशाळेंत पाठवूं नये. माझा आपणाला खरोखर त्यासंबंधानें लवमात्र आग्रह नाहीं."

शास्त्रीबुवा किंचित् हंसून म्हणाले "आपल्या ताईसाहेब आणि दीक्षितांची तारा यांनां शाळेंत पाठवायचें आपण उभयतांनीं ठरविलेंच असेल, तर माझी इंदिराहि त्यांच्याबरोबर शाळेंत जाईल, हें ओघानेंच आलें."

नानासाहेबांनां आनंद झाल्यासारखें दिसलें. ते शास्त्रीबुवांनां म्हणाले "ठीक आहे. ठरलें तर तुमचें शारदेबरोबर इंदिरेलाहि शाळेंत पाठवायचें ! आतां या बेतांत कांहीं अडचणी मात्र उपस्थित करूं नका."

इतक्यांत मंजुळा दासी तेथें येऊन सांबाआड उभी राहिली. अजूनहि तिच्या चेहऱ्यावर हास्याची छटा दिसत होती. खालीं मान घालून ती नानासाहेबांनां उद्देशून म्हणाली "ताईसाहेब अन् त्यांच्या मैत्रिणी यांनां हुकुमाप्रमाणें घेऊन आल्यें आहें."

"कुठें होत्या त्या ?"

"मागच्या बागेंत खेळत होत्या. आतां त्या जणी ताईसाहेबांच्या खोलींत बसल्या आहेत. आपलं इथलं काम आटोपलं कीं नाहीं तें पाहून यायला ताईसाहेबांनीं मला इकडे धाडलं."

"बरें तर, मीच तिकडे येतों."

असें म्हणून नानासाहेब आपल्या कन्येकडे निघून गेले. मंजुळाहि त्यांच्या मागोमाग गेली.

आतां त्या दालनांत दीक्षित व शास्त्रीबुवा यांशिवाय कोणीच राहिलें नव्हतें. शास्त्रीबुवांकडे पाहून दीक्षित म्हणाले "शास्त्रीबुवा ! शारदेला शिक्षण देण्याला तुम्ही इतके विरुद्ध का जात आहां, हें मला कळत नाहीं. स्त्रीशिक्षणाचा प्रचार आपल्याकडे अद्यापि फारसा झालेला नाहीं, हें मी कबूल करतों; परंतु नानासाहेबांसारख्या एकाद्या सुज्ञ व विचारशील जहागीरदारानें

कामिनीया तेल प्रत्येकानें वापरून पहावें. हें तेल केसांस इतकें नरम करून सोडतें, कीं, ते वाटेल त्या रीतीनें वळूं शकतात !

आपल्या मुलीला शिक्षण द्यायचा विचार केला तर त्यांत विघडलें कुठें, हेंच मला समजत नाहीं."

चिंतामणशास्त्री दीक्षितांच्या अगदीं जवळ आले व त्यांनीं एकवार चहूंकडे पाहिलें—दरवाजाबाहेरहि दूरवर न्याहाळलें व दीक्षितांच्या अगदीं कानाशीं आपलें तोंड नेऊन ते हळूच म्हणाले "मी या गोष्टीच्या इतका विरुद्ध कां आहें, तें मी आपणाला सांगतों. त्याचें कारण इतकेंच, कीं, यजमानसाहेबांच्या हिताची इच्छा माझ्या रोमरोमीं खिळून राहिली आहे. नानासाहेब म्हणजे आह्मां आश्रितांचे मायबाप. त्यांचें सदोदित मंगल व्हावें याशिवाय आमची दुसरी कोणती इच्छा असणार? ताईसाहेबांवर पुढें मोठा अनर्थ कोसळूं नये या हेतूनेंच आज मीं त्यांच्या शिक्षणाच्या प्रश्नाला इतकी हरकत घेतली."

दीक्षित आश्चर्यप्रदर्शक स्वरानें हळूच म्हणाले "शास्त्रीबुवा, तुम्ही काय म्हणतां यांतील एक अक्षरहि मला कळलें नाहीं! यापेक्षां उघड करून बोलाल, तर तुमचें म्हणणें मला कांहीं तरी समजेल."

चिंतामणशास्त्र्यांनीं पुनः एकदा चहूंकडे न्याहाळून पाहिलें व ते खालच्या स्वरांत दीक्षितांनां म्हणाले "दीक्षित! या वाड्याच्या पश्चिमभागीं पुष्कळ दिवसांची एक लहानशी इमारत आहे, हें आपल्याला ठाऊकच आहे. तिचें नांव कौतुकागार. या 'कौतुकागारा'च्या एका भागांत एकाच बैठकींत बसविलेले सुवर्णाचे दोन दीप आहेत. या दीपांच्या जोडीला 'कनक-दीप' हेंच नांव वाड्यांत पूर्वापार चालत आलें आहे. या कनक-दीपाच्या बैठकींतील एका गुप्त कप्यांत एका स्त्रीच्या हातानें लिहिलेला एक कागद आहे—"

हे शब्द ऐकतांच दीक्षित एकदम चमकून उभे राहिले व कंपित स्वरानें ते अस्पष्टपणें म्हणाले "घात-घात झाला! हें तुह्माला कसें कळलें?"

शास्त्रीबुवांनां दीक्षितांच्या या वर्तनाचें तितकें आश्चर्य वाटलें नाहीं. ते शांतपणें म्हणाले "मी तें सारें आपल्याला सांगेन; परंतु त्याला हा प्रसंग योग्य नाहीं. वाड्यांत चहूंकडे लोक फिरताहेत. भिंतीला देखील कान असतात. कुणीं ऐकलें तर पंचाईत व्हायची! दुसऱ्या एकादेवेळीं एकाद्या एकान्त जागीं आपल्याला सर्व सांगेन. हे पहा नानासाहेब मुलींनां घेऊन आलेच."

प्रकरण सातवें.

पूर्वपरिचय.

हंबीराच्या शोधाला गदाधराला पाठविल्यानंतर ताला आपलीं प्रातःकृत्यें वगैरे आटोपून पुनः लवकरच परत शालागृहांत आले. गदाधरानें आणलेल्या चिजेचा त्यांनीं पुनः एकदा मनमुराद आस्वाद घेतला व आपलें अग्नियंत्र त्यांनीं कोणाच्याहि सहज दृष्टीस न पडेल अशा एका ठिकाणीं लपवून ठेविलें. हा सर्व बंदोबस्त केल्यानंतर गुरुजींची स्वारी जहागीरदारांची मार्गप्रतीक्षा करीत शालेच्या पडवींत येऊन बसली.

जहागीरदारसाहेबांची स्वारी कांहीं तालांनां दिसली नाहीं—पण कांहीं वेळ गेल्यानंतर गदाधर व हंबीर एकमेकांच्या हातांत हात घालून शालेकडे येत आहेत, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. हंबीर नजरेस पडतांच गदाधराला दिलेल्या वचनाचें विस्मरण पडून तात्यांचा क्रोधानल पुनः प्रज्वलित झाला. हंबीराकडे स्थिरपणें दृष्टि लावून ते आपणाशींच म्हणाले "मोठा खराच पोरगा आहे हा हंबीऱ्या! काल मीं सगळ्या पोरांनां आज सकाळीं अगदीं लवकर शाळेंत यायला बजावून सांगितलें होतें, पण हा इतका दिवस वर आल्यावर गदाचा हात धरून स्वारी कशी मजेनें हलतडुलत अन् हंसत खेळत येत आहे पहा! कारट्याला कुठें आतां शाळेची आठवण होते आहे. या पांडोबातात्याची आज्ञा अमान्य केली म्हणजे काय प्रायश्चित्त मिळतें, हें कारट्याला आतां चांगलेंच दाखवतों!"

असा विचार करून तात्या पुनः आंत आले व पेटीमागें लपवून ठेवलेली आपली लांबलचक वेताची छडी बाहेर काढून पुनः बाहेर येऊन त्या दोघां मुलांची वाट पहात गंभीरपणानें तेथेंच उभे राहिले.

अल्पक्षणांत ती मित्रांची जोडी पाठशालेजवळ येऊन ठेपली. हातांत लांब छडी धारण केलेल्या गुरुमहाराजांची ती गंभीर मूर्ति पाहून गदाधर हंबीराला म्हणाला "हंबीर-पुढें जाऊं नकोस-इथेंच उभा रहा. ते पहा तात्या तुला चोपून काढण्यासाठीं छडी हातांत घेऊन तेथें उभे राहिले आहेत. पळून जाऊं नकोस. येथें असा उभा रहा-पाहूं वरें मी इथें असतांना तात्यांची काय छाती लागली आहे तुला चोपायची!"

कामिनीया तेल सर्व सुगंधी सामानाच्या दुकानांत मिळतें. एक बाटलीस रु. १.
तीन बाटल्यांस रु. २ ८१०. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. झुम्मादीद, मुंबई.

गुरुजींनां गदाधराचें हें भाषण इत्थंभूत ऐकूं आलें. हातांतील वेत उंचावून त्यांनीं गदाधराला रागानें विचारलें "कायरे ह्मणतोस गड्या गया ? कुणाची छाती लागली आहे ह्मणतोस ? माझी ? या पांडोबातात्यांची?"

गदाधरानें भीतीचें लवमात्र चिन्ह न दाखवितां झटलें "हो हो, तात्या तुमची ! दुसऱ्या कुणाला ह्मणूं मी? हंबीराला आज मी कांहीं शिक्षा करणार नाहीं, असें मघाशीं तुम्हीं माझ्यापाशीं कबूल केलेंत अन् आतां का त्याला मारायला तयार झालांत ?"

तात्यांचा राग आतां त्यांच्या पोटांत मावेना. ते ढोळे फाडून, ओरडून ह्मणाले "अरे गुलामा ! मला अशीं उत्तरें करतोस ? दम धर तर मग-या हंबीऱ्याऐवजीं तुझीच आज काय दशा करून टाकतों ती पहा ! तूं हुषार, शहाणा, माझ्या नेहमीं उपयोगीं पडणारा ह्मणून तुला मी जों जों नांवाजतों अन् तुझी मर्जी सांभाळायला जातों, तों तों तुझी मिजास चालली आहे ! तें कांहीं नाहीं-आज तुला चांगला फोडून काढला पाहिजे. तुझ्या अंगांत अशी गुर्मी अन् जोर केती आहे, तें तरी मी आज पहातों. केशा ! वेशा ! तुम्ही दोघेजण या गद्याला चांगला धरून ठेवा पाहूं. आज पहातों मी याचा चांगला तमाशा!"

दरवाजांत येऊन मौज पहात उभे राहिलेल्या केशव व विश्वनाथ यांनां गुरुजींनीं आज्ञा केली खरी, परंतु बाहेर येऊन गदाधराला धरून ठेवावयाला त्या दोघांनां धीर होणें केवळ अशक्य होतें. ते येत नाहींत असें पाहून तात्यांनीं त्यांनां पुनः तोच हुकूम सोडला.

हुकुमाची फेरझडती होऊनहि केशव व विश्वनाथ आपल्या मदतीस येत नाहींत असें पाहून तात्यांनीं जरा पडतें घेऊन झटलें "ठीक आहे गया ! यजमानसाहेब यायची वेळ झाली आहे. आतांच मी नाहीं तुझी पाठ फोडून काढीत. पुनः कधींतरी पाहूं तुझी मौज !"

हा सर्व प्रकार मुकाट्यानें पहात उभा राहिलेल्या हंबीराकडे आतां तात्यांची दृष्टि पुनः वळली. त्याला चोपून काढण्यासाठीं त्यांचे हात पुनः वळवळूं लागले. तात्या त्याला ओरडून ह्मणाले "कायरे गाढवा ! तूं कां अजून येथें उभा ? चल आंत-माझा हुकूम मोडण्याबद्दल काय प्रायश्चित्त मिळतें तें तुला अन् तुझ्या त्या कोवळ्या तुसतुसीत पाठीला आज चांगलें प्रत्ययाला आणून देतों-" असें ह्मणून तात्यांनीं हंबीराच्या दंडाला हात घातला.

गदाधराला अर्थातच हें सहन झालें नाहीं. हंबीराच्या दंडाला धरलेला तात्यांचा हात हिसडून तो दोघांच्या मध्यें उभा राहिला व निश्चयपूर्ण स्वरानें त्याला "तात्या, कांहीं झालें तरी मी कांहीं तुझ्याला हंबीराला मारूं देणार नाहीं !"

" बरें पाहूं तर मग तूं याला माझ्या तडाक्यांतून आज कसा वांचवितोस तें !"

असें ह्मणून कंबर सांवरून तात्या एकदोन पावलें पुढें सरले व छडीचा हंबीराच्या पाठीवर जोरानें प्रहार करण्यासाठीं त्यांनीं हात खूप वर नेला. गदाधराला ही वेळ अगदीं आणीबाणीची होती. कांहीं झालें तरी तात्यांनीं दिलेलें वचन त्यांनां मोडूं द्यावयाचें नाहीं, असा त्यानें पक्का निश्चय केला होता. गुरुजींचाहि हंबीराची याच वेळीं पाठ फोडण्याचा निश्चय झालेला दिसत होता. त्यांच्या तडाक्यांतून हंबीराची सुटका करण्याकरतां गदाधरहि पुढें सरसावला. त्यानें एका हातानें तात्यांच्या कमरेला विळखा घातला व दुसऱ्या हातानें त्यांचा उंच केलेला छडीचा हात धरला. गुरुजींवर कधींहि न आलेल्या या प्रसंगांतून त्यांची मुक्तता करण्याकरितां केशवहि या धामधुमींत शिरून त्यांनां गदाधराच्या पकडींतून सोडवूं लागला. शाळेतील सर्व मुलें बाहेर येऊन त्यांच्या सभोंवतीं मौज पहात उभीं राहिलीं. बिचाऱ्या गुरुजींची त्रेधा उडाली ! ते धांपा टाकीत टाकीत ह्मणाले "गया ! सोड-माझा हात सोड-माझ्या कमरेचा विळखा काढ-बऱ्या बोलानें सोडतोस का नाहीं ?"

इतक्यांत मागाहून गंभीर स्वरांत कोणी ओरडून झटलें "रास्ता छोडो लडके ! मालिकसाहिब आते हैं !"

हे शब्द ऐकतांच सर्वांची धांदल उडाली. तात्यांनीं वर मान करून पाहिलें, तों जहागीरदार साहेबांच्या दिमतींतला लाल पगडीवाला, मोठ्या कल्यांचा पुरमय्या पोरांच्या घोळक्यामागें उभा ! त्यांनीं भीत भीत पुरमय्याला विचारलें " काय ह्मणतोस ? यजमानसाहेबांची स्वारी आली आहे ?"

कामिनीया तेल वापरल्यानें पुरातन काळापासून चालत आलेली व अतिशय मौल्यवान् समजली गेलेली अशी केसांची सुस्थिति त्वरित प्राप्त होते.

पुरभय्या हंसत हंसत ह्मणाला "हां पंडतजी ! अही देखो–लडकोंका साथ कुस्ती लढते हो ?"

गदाधरानें तात्यांच्या कमरेचा विळखा सोडला होता, तरी त्यांचा हात सोडला नव्हता. त्याला उद्देशून तात्या काकुळतीच्या स्वरानें ह्मणाले "गद्या ! अरे, नानासाहेब आले. हात सोड माझा–गद्या–गदाधर ! बेटा, असें काय करावें या वेळीं ?"

गदाधरानें हात न सोडतां विचारलें "पण तुझी हंबीराला मारणार नाहीं ना आतां तात्या ?"

बळेंच चेहऱ्यावर हास्याची छटा आणून गुरुमहाराज ह्मणाले "हा वेड्या ! तुझ्या हंबीराला मी मारणार का होतों ? अरे ती निव्वळ सारी थट्टा ! अरे, मीं तें केवळ सोंग आणलें होतें; एवढें देखील तुला समजूं नये !"

गदाधरानें हंसत हंसत शेवटीं एकदाचा गुरुमहाराजांचा हात सोडला. आपण आज एका मोठ्या प्रसंगांतून बांचलों, असें यावेळीं त्यांना वाटलें.

साऱ्या मुलांना उद्देशून नंतर तात्या ह्मणतात "अरे, तुह्मी सारे आंत जाऊन नीट ओळीनें उभे रहा अन् गदाधर ! तूं यांनां परवचा सांगायला प्रारंभ कर पाहूं. एकसष्ट अडचें साडेबावनाशें एथपासून सुरुवात होऊं दे. परवचा नीट अन् मोठ्यानें ह्मणा. मी बाहेर जहागीरदारांनां सामोरा जाऊन त्यांनां इकडे घेऊन येतों."

असें ह्मणून तात्यांनीं सर्व मुलांनां आंत घालविलें व तीं नीट रांगेंत उभीं रहात आहेत असें पाहून ते जहागीरदारसाहेबांचें स्वागत करण्याकरतां घाईघाईनें बाहेर निघून गेले. थोड्या वेळापूर्वी गदाधराशीं त्यांचें जें प्रचंड मल्लयुद्ध चाललें होतें, त्याच्या धांदलींत आज मुद्दाम नेसावयास काढलेल्या त्यांच्या रेशीमकांठी धोतराचा पुढला सोगा सुटला होता; तात्यांच्या हें या वेळेपर्यंत लक्ष्यांतहि आलें नव्हतें. ते घाईघाईनें शाळेबाहेर पडून नानासाहेबांच्या स्वागतार्थ त्यांनां सामोरे जात असतां त्यांच्या धोतराचा तो सुटलेला सोगाहि त्यांच्याबरोबरच मागेंपुढें लडबडत चालला होता. शालागृहाच्या जवळच एक बाभळीचें झाड होतें. त्याच्या खालून जात असतां तात्यांच्या सोग्याला बाभळीची एक लहानशी कांटेरी डहाळी अडकून तीहि त्यांच्याबरोबर जाऊं लागली व जातांना पांडोबातात्यांच्या दोन्ही पायांबरोबर गुलगुल गोष्टीहि सांगूं लागली ! तात्यांच्या हें अजूनहि लक्ष्यांत आलें नाहीं. त्यांना वाटलें, कीं, गदाधरच आपल्या मागें धांवत असून तोच आपल्या पायाला मधून मधून चिमटे काढीत आहे ! इतक्यांत जहागीरदारसाहेबहि आपल्या परिवारासह जवळ जवळ येत असलेले त्यांच्या दृष्टीस पडलें. मागें वळून त्या गद्या गद्याच्या दोन मुस्कुटांत द्याव्या, तर या वेळीं तें घरें दिसणार नाहीं, असा विचार करून तात्यांनीं गदाधराला लाथ मारण्याच्या उद्देशानें डावा पाय जोरानें मागें झाडला. त्यानें काल्पनिक गदाधराचें शासन तर कांहींच झालें नाहीं; उलट, त्या हिसक्याबरोबर तात्यांचा सोगा व बाभळीची ती कांटेरी डहाळी त्यांच्या दोन पायांमध्यें आडवी येऊन त्यांच्या दोन्ही पायांमध्यें बिडी पडली व तितक्यांत धोतराच्या सोग्यांत पाय अडकून गुरुमहाराजांनीं नानासाहेबांनां साष्टांग लोटांगण घातलें ! शाळेंतील मुलें गुरुजींची ही सर्व धांदल पहातच होतीं. तात्यांनीं लोटांगण घालतांच मुलांमध्यें एकच हंशा पिकला, व त्या हंशांतच गदाधर सर्व मुलांनां उद्देशून ओरडून ह्मणाला "अरे, मी सांगतों ती परवचा सारेजण ह्मणा– तात्यांनीं आपणाला परवचा ह्मणायला सांगितली आहे. हं, ह्मणारे सारेजण—

"एक औंटें औंटें—बाभळीचे कांटे !
पाय झाला लंगडा, डोकें टेंचे दगडा !"

गदाधरानें शिकविलेली ही नवीन परवाचा सर्व मुलें अगदीं उंच स्वरानें ह्मणूं लागलीं. तो परवचेचा प्रचंड घोष गडबडींनें उठलेल्या तात्यांच्या कर्णरंध्रांवर आदळल्याशिवाय राहिला नाहीं. तत्क्षणीं त्यांचे डोळे विस्तृत झाले; नाकपुड्या फेंदारल्या-रागानें लाल झालेल्या डोळ्यांनीं त्यांनीं एकवार मागें शालागृहाकडे वळून पाहिलें.

बाभळीच्या कांटेऱ्या डहाळीमुळें मोठ्या अनर्थांत सांपडलेल्या पांडोबातात्यांची नानासाहेबांनां कींव आली. त्यांनीं ती डहाळी गुरुजींच्या धोतरापासून सोडविण्यास स्वतः मदत केली. ती डहाळी सोडवून तात्यांनीं दूर फेंकून दिली. व सोगा वगैरे नीट सोडून यजमानसाहेबांपुढें ते हात जोडून उभे राहिले. गुरुजींची उडालेली धांदल पाहून नानासाहेबांबरोबर आलेल्या चौघीहि मुली तोंडांत पदर धरून हळुहळू हंसत होत्या.

शहाणे लोक कामिनीया तेलच पसंत करतात. बाटलीवर कामिनीया नांव पाहून घ्या !
कारण, कांहीं व्यापारी लोक मास्त नफ्याच्या आशेनें भलताच माल देतात !

नानासाहेब गंभीरपणानें तात्यांनां ह्मणाले " आपणाला कांहीं लागलें तर नाहीं ना तात्या ?"

बळेंच हास्य करून आपल्या पायांकडे एकवार पाहून तात्या ह्मणाले "नाहीं, तसें फारसें नाहीं लागलें."

"चला तर आंत—"

"हो चलायचें—"

गुरुजी पुढें व नानासाहेब, नीलकंठ दीक्षित, वितामण शास्त्री व चौघी मुली त्यांच्या मागें, अशा रीतीनें ही सर्व मंडळी शालागृहांत येऊन दाखल झाली. पांडोबातात्यांनीं सर्व मंडळीचें स्वागत करून त्यांनां मुद्दाम घातलेल्या बैठकीवर बसविलें व आपण स्वतः नानासाहेबांच्या बाजूला उभे राहिले.

प्रारंभींचीं कांहीं औपचारिक प्रश्नोत्तरें झाल्यावर नानासाहेबांनीं तात्यांना विचारिलें "आपल्या शाळेंत किती मुलें आहेत एकंदर?"

"एकंदर सत्तावीस मुलें आहेत, सरकार !"

"शाळेंत इतकी कमी मुलें कां बरें तात्या? गांव तर मोठा आहे." नानासाहेब आश्चर्यानें ह्मणाले.

गुरुजींचा चेहरा जरा फिका पडला.ते खिन्नपणें खालीं मान घालून ह्मणाले "हो, गांव मोठा आहे, पण जरा गांवांत हल्लीं रोगराई आहे कीं नाहीं, त्यामुळें मुलांची संख्या इतकी कमी दिसते आहे आपणाला सरकार!"

विद्यार्थिवर्गाचा पुढारी या नात्यानें गदाधरहि जवळच उभा राहिला होता, तो मध्येंच ह्मणाला "तात्यांच्या लांब छडीच्या भयामुळें पुष्कळ मुलें शाळेंत येत नाहींत सरकार."

नानासाहेबांनां त्या धीट मुलाचें मोठें कौतुक वाटलें. ते त्याच्याकडे वळून हास्यमुद्रेनें ह्मणाले "अस्सें ! शाळेंतल्या मुलांनां तात्या एकूण सपाटून मार देतात ह्मणायचे !"

नानासाहेबांकडे बिटाईनें पहात गदाधर ह्मणतो "या साऱ्या मुलांच्या पाठी जर आपण एकवार पहाल, तर सारें आपणाला नीट कळून येईल ! सांच्या शाळेंत मी दांडगा असल्यामुळें फक्त मला मात्र तात्या कधीं मारीत नाहींत, कीं फारसे बोलत नाहींत, बाकी साऱ्या जणांनां हे दररोज मारे यथास्थित तिंबून काढीत असतात. अरे, तुम्ही सारेजण एकदा आपापल्या पाठी उघड्या करून सरकारांनां दाखवा पाहूं !"

गदाधरानें खूण करतांच एकएकजण आपली पाठ उघडी करून नानासाहेबांनां दाखवूं लागला. प्रत्येकाच्या पाठीवर चारदोन हिरवे निळे झालेले वेताच्या काट्यांचे वळ दिसत होते. मुलें आपल्या पाठी नानासाहेबांनां दाखवीत असतां, या वेळीं पृथ्वी आपणाला पोटांत घेईल तर बरें, असें तात्यांनां होऊन गेलें.

हा सर्व प्रकार पाहून नानासाहेबांनां पांडोबातात्यांचा फार संताप आला. त्यांनीं तीव्र दृष्टीनें त्यांच्याकडे पाहून विचारलें "काय! हीं मुलें सांगताहेत ही गोष्ट खरी आहे कीं नाहीं ?"

पांडोबातात्या खालीं मान घालून कांपत कांपत ह्मणाले "अगदीं खोटें—हीं सारीं मुलें सपशेल खोटें बोलताहेत, सरकार!"

"तर मग या सर्वांच्या पाठीवर हे वेताच्या छडीचे वळ आले कोठून?" नानासाहेबांनीं रागानें विचारिलें.

"तें-तें-म-मी-मी स-सां-सांगतों स-स-सरकार! शाळा भरायच्या अगोदर मी इथें नाहीं असें पाहून हीं सारीं मुलें एकमेकांशीं खूब मारामाऱ्या करीत असतात—प्रसंगीं एकमेकांनां हीं छड्यांनींहि बडवून काढतात-त्यामुळें हे वळ दिसताहेत यांच्या पाठीवर—"

तात्यांच्या या धडधडीत असत्य भाषणानें नानासाहेबांनां त्यांचा अतोनात संताप आला. ते कंपित स्वरानें ओरडले "चूप रहा तात्या ! एक शब्दहि आतां बोलूं नका ! मुलांनां खोटें बोलतां येत नाहीं. तुमच्यासारख्या लोकांनां मात्र-आतां काय तुझाला नांव देऊं— वृद्ध वयांतहि याप्रमाणें सपशेल खोटें बोलायला तिळमात्रहि संकोच वाटत नाहीं ! माझ्यासमोर धडधडीत असें असत्य बोलतांना तुझाला आपल्या पांढऱ्या केंसांची कांहींतरी क्षिति वाटायला पाहिजे होती ! तुमचें हें वर्तन पाहून, तुमच्याच शिक्षेंत वाढलेलीं हीं मुलें पुढें मोठीं झाल्यावर बेधडक खोटें बोलूं लागलीं, मोठमोठ्या लांब्यालब्या चोऱ्या करूं लागलीं, तर त्यांत मोठें नवल काय? आजच्या तुमच्या या निंद्य वर्तनाबद्दल मी तुझाला एवढीच शिक्षा करतों, कीं, आजपासून कांहीं दिवस दररोज सकाळीं तुम्ही नीलकंठ दीक्षितांच्या पाठशाळेंत जाऊन बसत जा. विद्यार्थ्यांनां गोडीगुलाबीनें कसें शिकवावें,

कामिनीया तेलानें मस्तक थंड राहतें. डोळ्यांची जळजळ दूर होते. गळून पडणारे केंस पुनः उगवतात. केंसांची कीड मरून जाते व खवडे वगैरे विकार नष्ट होतात.

त्यांनां विद्येची गोडी कशी लावावी, हें तुम्हाला तेथें चांगलें कळून येईल. आणि मी तुम्हाला अशी आज्ञा करतों, कीं, आजपासून तुम्हीं एकाहि मुलाला मारतां कामा नये. काय? मी ह्मणतों हें आलें तुमच्या नीट ध्यानांत?"

तात्यांनीं एकवार आपल्या विद्यार्थिवृंदाकडे व एकदा बऱ्याच वर्षांपासून आपल्या हातांत खेळलेल्या अत्यंत प्रिय अशा छडीकडे पाहिलें व एक दीर्घ निःश्वास टाकून ह्मटलें "होय, सरकार! आपल्या आज्ञेप्रमाणें मी आजपासून वागत जाईन."

नंतर दीक्षितांकडे वळून नानासाहेब ह्मणाले "गुरु-महाराज! आतां या मुलींच्या सरस्वतीपूजनास आरंभ व्हावा."

नानासाहेबांची आज्ञा होतांच दीक्षितांनीं बरोबर आणलेल्या एका धुळीच्या पाटीवर श्रीसरस्वतीदेवीचें चित्र काढलें व प्रथम शारदेकडून व नंतर तिच्या तिघी मैत्रिणींकडून पुष्पधूप-दीपादिकांनीं त्या प्रतिमेची यथासांग पूजा करविली व त्यांजकडून पांडोबातात्यांनां प्रणिपात करविला. नंतर दीक्षितांनीं स्वतः त्या चौघांहि मुलींच्या मस्तकावर हात ठेवून त्यांनां शुभाशीर्वाद दिला. मुलींचें सरस्वतीपूजन झाल्यानंतर खुद्द जहागीरदारसाहेबांनीं शाळेंतील सर्व मुलांमुलींना बरोबर आणलेला खाऊ स्वहस्तानें वांटला. सर्व मुलांचीं आनंदानें प्रफुल्ल झालेलीं मुखकमलें पाहून नानासाहेबांनां फार समाधान वाटलें.

नंतर पांडोबातात्यांकडे वळून जहागीदारसाहेब ह्मणाले "या लहान लहान कोमल गरीब बिचाऱ्या अर्भकांना निष्ठुरपणें तुम्ही मारझोड करतां, ही गोष्ट जर आजच माझ्या कानांवर आली नसती तर तुम्हाला आजच्या मंगल प्रसंगीं मीं कांहीं तरी पारितोषक देऊन खूष केलें असतें-त्यावद्दल मी आतां तुम्हाला विशेष कांहीं बोलत नाहीं. या सर्व मुलांवरोबरच माझ्या शारदेलाहि तुमच्याकडून येथेंच शिक्षण मिळावें, अशी या क्षणापर्यंत माझी इच्छा होती-परंतु मीं तो विचार आतां बदलला आहे. तिला आतां घरींच शिक्षण द्यावें, असा मीं निश्चय केला आहे. उद्यांपासून दररोज सकाळीं वाड्यांत येऊन या मुलींनां तुम्ही दोनतीन घटका शिकवीत चला व त्यानंतर एक घटकाभर तुम्ही दीक्षितांच्या पाठशाळेंत जाऊन बसत चला. कांहीं दिवसांनंतर मीं या मुलींनां दीक्षितांकडून संस्कृत शिक्षण देण्याचा विचार केला आहे. आजच्या आनंदाच्या प्रसंगीं तुम्हाला अगदींच विरस करूं नये ह्मणून या महिन्यापासून मी तुमचा दोन रुपये पगार वाढवितों."

गुरुजींचा दुर्मुखलेला चेहरा नानासाहेबांच्या या शेवटच्या शब्दांनीं एकाएकीं प्रफुल्ल झाला. आपले अवशिष्ट दांत दिसतील न दिसतील अशा बेतानें मृदु हास्य करून तात्या हात जोडून ह्मणाले "यजमान-साहेबांनां परमेश्वर उदंड आयुष्य देवो आणि त्यांनां आमच्यासारख्या गरिबांगुरिबांचे सदोदित असेच आशीर्वाद मिळोत!"

शाळेंत आल्यापासूनच नानासाहेबांचें हंबीररावाच्या सुंदर चेहऱ्याकडे लक्ष्य वेधून राहिलें होतें. या वेळीं पुनः तो दृष्टीस पडतांच नानासाहेबांनीं तात्यांनां विचारलें "हा सुंदर मुलगा कुणाचा वरें?"

तात्या त्यांनां कांहीं उत्तर देणार, इतक्यांत चिंतामण-शास्त्री मध्येंच ह्मणाले "हा मंगलपुरच्या प्रतापराव जाधवांचा मुलगा. प्रतापराव परलोकवासी झाल्यानंतर, आज सहासात वर्षे हा कुंदपुरासच रहात आहे."

नानासाहेबांनीं आश्चर्यप्रदर्शक स्वरानें विचारलें "काय? हा प्रतापराव जाधवांचा मुलगा! मंगलपुरच्या प्रतापराव जाधवांचा?"

"होय यजमानसाहेब!"

"काय आश्चर्य आहे पहा! प्रतापराव जाधवांचा मुलगा आज सात वर्षे माझ्या कुंदपुरांत रहात आहे अन् या गोष्टीची या क्षणापर्यंत मला वार्तांहि नाहीं-हें मोठें नवल आहे बुवा! बाळा, असा इकडे माझ्या-जवळ ये पाहूं."

नानासाहेबांच्या आज्ञेप्रमाणें हंबीर त्यांच्याजवळ जाऊन अदबीनें उभा राहिला. नानासाहेबांनीं विचारिलें "तुझें नांव काय बाळ?"

"हंबीरराव जाधव."

"तुझ्या वडिलांचें नांव काय?"

"प्रतापराव जाधव."

"ते जीवंत आहेत का?"

"नाहीं सरकार!" हंबीर खालीं मान घालून खिन्न स्वरानें ह्मणाला.

कामिनीया तेलाचा वास फारच मधुर असून हें कितीहि दिवस राहिलें तरी त्याला सवट वास मुळींच येत नाहीं!

"तुम्हाला खानदेशांतून इकडे येऊन किती दिवस झाले?"

"सात वर्षें–आम्ही तिकडून इकडे आलों त्या वेळीं मी सारा चार वर्षांचा होतों."

"तुम्ही खानदेशांतून इकडे कां बरें आलां बाळ?"

"तें मला ठाऊक नाहीं सरकार!"

नानासाहेब चिंतामणशास्त्र्यांकडे वळून ह्मणाले "शास्त्रीबुवा! या मुलाच्या वडिलांचे–ह्मणजे मंगलपुरच्या प्रतापराव जाधवांचे माझ्यावर नानात-हेचे अतिशय उपकार झाले आहेत. मी लहान असतां त्यांच्याच धोरणी सल्ल्यामुळें व त्यांच्या शारीरिक आणि मानसिक परिश्रमांमुळें मी एक अतिशय भानगडीचा व गुंतागुंतीचा मोकद्मा जिंकलों. प्रतापरावांचें जर त्या प्रसंगीं मला भरपूर साहाय्य नसतें, तर माझी ही जहागिरी माझ्या हातून गेलीहि असती–निदान तिचा अर्धा भाग तरी माझ्या हातून खास निसटून गेला असता. प्रतापरावांच्या या महदुपकारांचें मजवर अजूनहि ओझें आहे. त्यांच्या अल्पांशाचीहि माझ्या हातून अद्यापि फेड झाली नाहीं. सुमारें बीस एकवीस वर्षें झालीं असतील, त्यांच्या असाधारण बुद्धीमुळें, खानदेशांत एका वरिष्ठ दर्जाच्या सरकारी जागेवर त्यांची नेमणूक होऊन ते सपरिवार तिकडे निघूनहि गेले होते. तिकडे त्यांनीं पैसाहि बराच मिळविला, असें माझ्या ऐकण्यांत आलें होतें. पहिल्या पहिल्यानें त्यांजकडून मला वारंवार पत्रें येत असत व माझींहि त्यांनां जात असत. ते खानदेशांत निघून गेल्यावर दोनतीन वर्षांनीं त्यांची पत्नी वारली आणि तिकडेच त्यांनीं पुनः विवाह केला असेंहि मला आठवतें. बाळ हंबीर, तुझी आई कुठें आहे हल्ली?"

"माझी आई स्वर्गांत आहे." गद्गद स्वरानें हंबीरानें उत्तर दिलें.

"तीहि गेली? बरें, तुझा एक वडील सावत्र भाऊ होता, तो कुठें आहे?"

"मला त्याबद्दल कांहीं माहिती नाहीं सरकार! आत्याबाईनां ठाऊक आहे."

"आत्याबाई! आत्याबाई कोण तुझ्या? प्रतापरावांनां तर सखी बहीण कोणी नव्हती, हें मला चांगलें ठाऊक आहे."

गदाधर मध्येंच ह्मणाला "हंबीराला सखी आते मुळींच नाहीं–माझ्या आईलाच तो आत्याबाई ह्मणतो."

गदाधराचा धीटपणा पाहून नानासाहेबांनां हंसूं आल्यावांचून राहिलें नाहीं. त्यानीं चिंतामणशास्त्री-बुवांनां विचारलें "हा मुलगा कोण शास्त्रीबुवा?"

"मंगलपुरास जनार्दनशास्त्री देशमुख ह्मणून माझ्या अत्यंत परिचयाचे एक विद्वान् शास्त्री होते, त्यांचा हा मुलगा. याचाहि बाप हा लहान असतांच तिकडे खानदेशांतच वारला. त्याची विधवा माता या दोघां मुलांनां घेऊन खानदेशांतून इकडे आली. मीं अतिशय आग्रह केला असतांहि माझ्या घरीं येऊन रहायला ती कबूल झाली नाहीं. कुंदपुरास आल्यापासून गांवच्या एका टोंकाला नदीच्या कांठीं एक लहानसें झोंपडें बांधून या दोघां मुलांसह ती तेथें आनंदानें रहात असते."

हंबीर व गदाधर या उभयतां मुलांचा इतिवृत्तान्त ऐकल्यावर त्यांच्याबद्दल नानासाहेबांच्या मनांत विशेषच प्रेम उत्पन्न झालें. ते हंबीराला उद्देशून प्रेमळपणें ह्मणाले "बाळ हंबीर! तुह्मी दोघेजण आजपासून आमच्या वाड्यांतच रहायला चला. अन् तुझ्या आत्याबाईनांहि सांग–ह्मणावें, तुह्मीहि आजपासून आमच्या वाड्यांतच राहून माझ्या शारदेच्या रक्षणाचा भार आपणावर घ्या. दीक्षित! आतां या दोघां मुलांनां तात्यांच्या शाळेंत शिकायची कांहीं आवश्यकता नाहीं. उद्यांपासून आपल्या पाठशाळेंत हे संस्कृत शिकतील व दामोदरपंत मास्तरांच्या घरीं इंग्रजी शिकायला जातील. शास्त्रीबुवा! आपणच जाऊन या मुलाच्या आईला घेऊन आमच्या वाड्यांत या. तिला सारी हकीगत नीट समजावून सांगा. तिला घेऊन यायला विसरूं नका हं–मी या दोघांनां आपणाबरोबरच वाड्यांत घेऊन जातों. पाहिलेंस बाळ शारदे! आज तूं शाळेंत शिकायला आलीस, पण तुला इथें खेळायलाच दोघे सोबती मिळाले."

बापाचे हे शब्द ऐकून शारदा हंसली आणि हंबीर व गदाधर यांच्याकडे पाहून ह्मणाली "वाहेवा बाबा! हे का माझे नवीन सोबती आहेत? अहो, हा आपला हंबीर अन् हा आमचा दादा गदाधर नाहीं का?"

कामिनीया (रजिस्टर्ड) वेगवेगळ्या फुलांच्या मिश्रणाचें अत्तर. वासानें मन प्रफुल्ल करितें.
पाव तोळ्यास १॥. रु. अंग्लो इंडियन ड्रग केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

"अस्सें—एकून हे तुझे सोवती तुझ्या अगोदरच्याच ओळखीचे आहेत म्हणायचे !" नानासाहेब शारदेच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाले.

थोड्याच वेळांत नानासाहेब परिवारासह तेथून निघून गेले. पांडोबाताला भोळे ऊर्फ ताला पंतोजी यांनां एकदा मनसोक्त वांकुल्या दाखवून, हंबीराच्या हातांत हात घालून गदाधरहि हंसत हंसत मुलींच्या मागून निघून गेला.

प्रकरण आठवें.

'कौतुकागारा'मधील रहस्य.

त्याच दिवशीं-घटका दोन घटका रात्र होऊन चहूंकडे बराच दाट अंधकार पसरून जिकडे तिकडे शांतीचा अधिकार, अगदीं कडक रीतीनें नव्हे, परंतु बऱ्याच प्रमाणानें स्थापित झाल्यावर चिंतामण-शास्त्री व नीलकंठ दीक्षित हे दोघे गांवापासून कांहीं अंतरावर सरस्वती नदीच्या तीराकडे चालले होते. सायंसंध्या, स्तोत्रपठण वगैरे आटोपून फराळ झाल्यानंतर दीक्षितांच्या घरीं जाऊन शास्त्रीबुवा आज मुद्दाम त्यांनां या जागेकडे घेऊन आले होते. कांहीं वेळानें ते नदी-एका एकान्त जागीं जाऊन बसले.

दीक्षितांनीं विचारलें "काय प्रकरण आहे हें शास्त्रीबुवा ?"

शास्त्रीबुवा उत्तरले "प्रकरण तर मीच आपणाला विचारणार आहें ! आज सकाळपासून मला अगदीं चैन पडलें नाहीं आहे. मनाला सारखी तळमळ लागून राहिली आहे. ती शांत करण्यासाठीं मी आपणाला यावेळीं या एकान्त जागेकडे घेऊन आलों आहें."

"आपण काय मला विचारणार आहां ?"

'कौतुकागार' हें काय आहे ? या 'कौतुकागारा'च्या आंत आहे तरी काय ? मला सारखी तळमळ लागून राहिली आहे, ती याच प्रश्नांचें मला समाधानकारक उत्तर मिळावें म्हणून. दीक्षित ! आपल्याशिवाय माझी ही तळमळ कोण शांत करील ?"

नीलकंठ दीक्षित थोडे विचारांत पडल्यासारखे दिसले. कांहीं वेळानें ते गंभीरपणानें शास्त्रीबुवांनां म्हणाले "'कौतुकागार' ही बऱ्याच पिढ्यांपूर्वी घोरपडे वंशांतील एका प्रमुख पुरुषानें बांधलेली इमारत आहे. या इमारतींत विवाहसंबंधाच्याच कांहीं वस्तूंचा संग्रह आहे. घोरपड्यांच्या कुळांत अनेक पिढ्यांमध्यें विवाहाच्या वेळीं ज्या कांहीं विचित्र वस्तु कुलधर्माप्रमाणें लागत असतात, त्या वस्तु कौतुकागारांत जपून ठेविल्या आहेत. निरनिराळ्या प्रकारचे उंची उंची पोषाक, शेले, दुपेटे, बहुमूल्य वस्त्रें, चमत्कारिक मुंडावळ्या व वाशिंगें, सुवर्ण व रौप्य कलश, वगैरे सर्व वस्तु त्या संग्रहांत आहेत. बहुमूल्य रत्नें जडविलेले दोन सुवर्णदीप ज्यांत संयुक्त झाले आहेत, असा एक सोन्याचा दिवाहि 'कौतुकागारां'त ठेविलेला आहे. हा 'कनक-दीप' केवळ कुंदपुरचे जहागीरदार घोरपडे वंशांतील मुलगे किंवा मुली यांच्या विवाहाच्या प्रसंगींच बाहेर काढतात व त्याचा उपयोग करतात. या दीपाचा अन्य कोणत्याहि प्रसंगीं उपयोग करावयाचा नाहीं, असा घोरपडे वंशांत परंपरागत कडक निर्बंध आहे. एकदा या कनक-दीपाचा उपयोग दुसऱ्या एका धनाढ्य मराठे कुलांतील जहागीरदाराच्या विवाहप्रसंगीं करण्यांत आला होता. त्यामुळें थोड्याच दिवसांनीं कुंदपुरच्या घोरपडे वंशावर वरीच अनर्थपरंपरा कोसळली, असा एक प्रवाद कांहीं ज्ञाताऱ्या मंडळीच्या तोंडून माझ्या ऐकण्यांत आला आहे. शास्त्रीबुवा ! सकाळच्या बोलण्यावरून या 'कौतुकागारा' संबंधीं आपणाला कांहीं तरी अधिक माहिती असली पाहिजे, असा माझा तर्क आहे. आपणहि ती एकान्त जागीं एकादे प्रसंगीं सांगण्याचें कबूल केलें आहे—"

"त्यासाठींच तर मी आपल्याला यावेळीं इकडे घेऊन आलों आहें."

"तर मग ती माहिती यावेळीं आपण मला सांगा."

चिंतामणशास्त्र्यांनीं एक दीर्घ निःश्वास टाकला व गंभीर स्वरानें म्हटलें "आपण माझी हकीगत लक्ष्यपूर्वक ऐका. त्यांतील गूढ रहस्याचा आपल्या-शिवाय कोणालाहि उलगडा होणें शक्य नाहीं. सुमारें आठ वर्षे झालीं असतील, आपले परम पूज्य वडील बंधु माधव दीक्षित यांचा पुत्र मधुसूदन यानें एकाएकी आत्महत्या करून घेतली, हें आपल्याला ठाऊकच आहे. त्याच्या आत्महत्येच्या कारणाविषयीं मात्र

कामिनीया तेल गळून पडणाऱ्या केंसांस लाविल्यानें ते फारच मजबूत, भपकेदार आणि पुष्कळ वाढतात.

अद्यापि गूढ आहे. मधुसूदन हा माझा परम मित्र असून माझा सहाध्यायीहि होता, हेंहि आपल्याला चांगलें आठवत असेल. माझ्या त्या परम मित्रानें आत्महत्या केलेली पाहून मला त्या वेळीं अपार दुःख झालें. परंतु माझ्यानें स्वस्थ बसवेना—मधुसूदनानें आमहत्या कां केली असावी, याचें कारण मी शोधूं लागलों. ज्यांचा ज्यांचा संबंध त्याच्या आत्महत्येकडे कसा ना कसा तरी पोंचत आहे असें मला वाटलें, त्यांच्यापाशीं मीं त्याविषयीं चौकशी चालविली. इतर ठिकाणीं व इतर लोकांपाशीहि मी मधुसूदनाच्या आत्महत्येविषयीं जारीनें तपास करीतच होतों. परंतु त्याचा समाधानकारक असा तपास मला कोठेंच लागला नाहीं. याप्रमाणें कांहीं दिवस गेले.

"एके दिवशीं वाड्यांतील गिरजा दासीशीं कांहीं प्रसंगानें बोलत असतां, तिला मधुसूदनाच्या आत्महत्येबद्दल कांहीं माहिती असावी, निदान त्याचें कारण तरी तिला पूर्ण अवगत असावें, असा मला चांगलाच संशय आला. तें कारण समजून घेण्याविषयीं माझ्या मनांत प्रखर आतुरता होतीच. गिरिजेला त्यासंबंधीं मीं अनेक तऱ्हांनीं विचारून पाहिलें–लालूचहि दाखवून पाहिली–परंतु ती कांहीं केल्या वळेना. तिच्या मनांतील गुप्त गोष्ट मला त्या प्रसंगीं कळून आली नाहीं. परंतु गिरिजेला मधुसूदनाच्या आत्महत्येबद्दल चांगली माहिती आहे, पण ती माहिती कोणालाहि ती सांगूं इच्छित नाहीं, अशी शंका मात्र माझ्या मनांत बळावली. गिरिजेनें ती माहिती मला सांगावी, म्हणून मीं नंतरहि बरीच खटपट केली–परंतु तींत मला यत्किंचित्‌हि यश आलें नाहीं.

"आणखीहि दोनतीन वर्षें गेलीं. एके दिवशीं गिरिजेनें आपण होऊनच मला बोलावणें पाठविलें. त्यावेळीं मला मोठें आश्चर्य वाटलें–परंतु तिच्या बोलावण्याप्रमाणें मी तिच्या झोंपडीकडे गेलों. गिरिजा मृत्युशय्येवर पडली असून तिच्या मृत्यूला आतां फार वेळ नाहीं, असें मला तेथें जातांच आढळून आलें.

"तिच्या कानाशीं तोंड नेऊन मीं तिला विचारलें 'गिरजे! मला कशाला बोलाविलें आहेस तूं?'

"गिरिजा क्षीण स्वरानें म्हणाली 'शास्त्रीबुवा! मी आतां थोड्या वेळाचींच सोबतीण आहें. माझी एक विनंति जर आपण ऐकाल, तर मरतांना मला यातना होणार नाहींत. मधुसूदन दीक्षितांनीं आत्महत्या कां केली, हें मला आपण आजपर्यंत पुष्कळ वेळ विचारलं असेल. ती सारी हकीगत ऐकून आपल्याला आतां कांहीं फायदा व्हायचा नाहीं, अन् ती सांगायला आतां अवकाशहि राहिला नाहीं ती हकीगत मी कुणापाशींहि सांगणार नाहीं, अशी मीं शपथ घेतली आहे. मी आतां मृत्यूच्या द्वाराशीं येऊन पडलें आहें, घटका दोन घटकांची मी आतां सोबतीण; ती शपथ या वेळीं मोडून मी व्यर्थ पाप कशाला जोडूं? पण जेवढी हकीगत सांगणं अगदीं जरूरीचं आहे, तेवढी आपल्याला सांगायलाच माझ्या कुडींत अजून प्राण घुटमळत राहिले आहेत. तो वृत्तान्त कुणाला तरी सांगणं अवश्यच आहे; पण आपल्यालाच तो सांगितलेला बरा, असं मला वाटलं अन् म्हणूनच आपणाला मीं बोलावणं धाडलं. ऐकातर शास्त्रीबुवा! पण अगोदर दरवाजामार्गं किंवा भिंतीआड कुणी माझं भाषण लपून ऐकत तर नाहींना? आपण एकदा नीट पाहून या बरं—'

"मी उठून चहूंकडे नीट न्याहाळून आलों. कोणीहि कोठें नव्हतें. नंतर मी गिरिजेजवळ येऊन म्हणालों 'मीं चहूंकडे नीट पाहिलें–कोणीहि मनुष्य आसपास नाहीं. तुला काय सांगायचं असेल तें खुशाल सांग मला.'

"गिरिजेवर मृत्यूचा अंमल हळुहळू चांगलाच बसत चालला होता. बोलण्याच्या श्रमांनीं ती अगदीं गळून गेली होती. ती खोल आवाजानें हळुहळू बोलूं लागली 'शास्त्रीबुवा! मी सांगत्यें आहें, यांतील एक अक्षरहि आपण कोणापाशीं सांगणार नाहीं अशी आपल्या जानव्याची अगोदर शपथ वहा पाहूं?'

"गिरिजेच्या सांगण्याप्रमाणें मी शपथ घेऊन म्हणालों 'हं, सांग आतां गिरिजे! मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें शपथ घेतली आहे–'

"गिरिजा क्षीण स्वरानें सांगूं लागली 'यजमानसाहेबांच्या वाड्याजवळ कौतुकागार म्हणून जी इमारत आहे, तिच्यामध्यें एका जागीं एक मध्यम आकाराची चंदनाची सुंदर संदुक आहे. त्या संदुकींत सोन्याचे दोन रत्नजडित दिवे एके ठिकाणीं जोडलेले ठेविलेले आहेत. त्या दिव्यांच्या बैठकींतील एका गुप्त कप्यांत

तांबड्या अथवा काळ्या गजकर्णावर 'किसोलाईन' चोळा. पुन्हा गजकर्ण होणार नाहीं!
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं, जुम्मामशीद, मुंबई.

कुणा तरी स्त्रीच्या हातानं लिहिलेला एक कागद आहे. मी आतां ही हकीगत अगदी थोडक्यांत सांगतें; कारण, माझे प्राण आतां घुटमळूं लागले आहेत; ते केव्हां निघून जातील याचा नेम नाहीं. कौतुकागाराची किल्ली नीलकंठ दीक्षितांजवळ आहे अन् ताईसाहेबांच्या लग्नाच्या पूर्वी तो कागद त्यांच्या हातीं देण्याविषयीं, तसंच त्यापूर्वी कौतुकागाराची किल्ली कोणत्याहि मनुष्याच्या हातीं लागूं न देण्याविषयीं नीलकंठ दीक्षितांनीं शपथ वाहिली आहे. शास्त्रीबुवा! माझी ह्यातारीची मरणकाळची प्रार्थना ऐका. कौतुकागारांत असलेल्या कनकदीपाच्या कप्प्यांत असलेला तो कागद-तो सर्वनाश करणारा सैतानी कागद—माझ्या सोन्याच्या लक्ष्मीच्या—माझ्या लाडक्या शारदाताईसाहेबांच्या हातीं कधींहि पडूं देऊं नका! त्यांच्या दृष्टीसहि तो कागद कधीं पडूं नये, अशी व्यवस्था शास्त्रीबुवा, कसेंहि करून तुम्ही करा. काय वाटेल ती युक्ति करून कनकदीपांतला तो कागद आपल्या हस्तगत करून घेऊन ताईसाहेबांच्या दृष्टीस पडण्यापूर्वी त्याच्या चिंध्या चिंध्या करून जर तुम्ही त्या जाळून टाकाल, तर शास्त्रीबुवा, तुम्हाला किती पुण्य लागेल ह्मणून सांगूं! [illegible] आहे अशावर आपला पिंड बाडला आहे, आपल्या लक्ष्यांत असूं द्या; घोरपडे घराण्याचं सदासर्वदा मंगल व्हावं, ही आपली नेहमीं इच्छा असलीच पाहिजे! ही गोष्ट जर खरी असेल, अन् आपल्या अन्तःकरणांत कृतज्ञता अन् दयामाया कांहीं असेल, तर मीं सांगितलेली ही गोष्ट ध्यानांत धरून त्याप्रमाणं जरूर करा. मी जातें आतां शास्त्रीबुवा! —आपण जा आतां. माझ्या मंजुळेला (गिरिजा ही मंजुळेची मावशी असून त्या दोघी एकत्रच रहात असत, हें वाचकांनां ठाऊकच आहे.) इकडे धाडून द्या. तो कागद फाडून टाकायला मात्र विसरूं नका—'

" त्याच रात्रीं गिरिजा मरण पावली. दीक्षित! त्या दिवसापासून या हकीगतीपैकीं एक ब्रह्मि मीं या क्षणापर्यंत कोणापाशीं काढला नाहीं. देवा नारायणा! त्या प्रसंगीं त्या मृत्युशय्येवर पडलेल्या स्त्रीपाशीं यज्ञोपवीताला स्मरून जी शपथ मी घेतली, तिचा आज माझ्या हातून भंग झाला! काय करूं दीक्षित! ही हकीगत आपल्याला सांगितल्याशिवाय आज माझ्यानें रहावेनाच! मी तरी काय करूं? या शपथभंगामुळें माझ्या हातून जें कांहीं पातक घडलें असेल, त्याबद्दल मीं काय प्रायश्चित्त घ्यावें तें दीक्षित, आपण मला सांगा—मी तें घ्यावयास तयार आहें!"

असें ह्मणून एक दीर्घ निःश्वास सोडून चिंतामणशास्त्री कपाळावर हात देऊन स्वस्थ बसले.

नीलकंठ दीक्षितहि कांहीं काल स्वस्थ होते. नंतर ते ह्मणाले "शास्त्रीबुवा! खेद करण्याचें कांहीं कारण नाहीं. मला ही सर्व हकीगत खडान् खडा ठाऊक आहे. ती मला सांगितल्यानें आपल्या हातून वस्तुतः शपथभंग होत नाहीं. आपण याबद्दल बिलकूल वाईट वाटूं देऊं नका."

दीक्षितांच्या या आश्वासनानें चिंतामणशास्त्र्यांनां किंचित् बरें वाटलें असावें, असें दिसलें. त्यांची खिन्नता पूर्णपणें नाहींशी होणें अर्थात्च शक्य नव्हतें. ते ह्मणाले "आपण ह्मणतां तें कांहीं अंशीं तरी बरोबर आहे. असो. त्या दिवसापासून गिरिजेनें सांगितलेली ती गोष्ट माझ्या मनांत रात्रंदिवस जागृत आहे. पण माझा तरी उपाय काय? तिची मरणाच्या वेळची प्रार्थना मजकडून पूर्ण कशी होणार! कौतुकागाराची चावी आपल्या हातांत! शिवाय, दुसऱ्याच्या वस्तूची मीं धडधडीत चोरी तरी कशी करावी? अशा विचारांचें त्या दिवसापासून माझ्या मनांत सारखें आंदोलन चाललें आहे. गिरिजेनें जी हकीगत मला सांगितली, तींत कांहीं तरी भयंकर रहस्य आहे, आणि त्या रहस्याचा मधुसूदनाच्या आत्महत्येशी कांहीं तरी संबंध आहे, यांत कांहीं संशय नाहीं. ही गोष्ट आपणाला कशी कळली आणि कोणाकडून कळली तें आपण मला कृपा करून सांगावें."

नीलकंठ दीक्षितांच्या अंतःकरणांतहि या प्रसंगीं कांहीं तरी विलक्षण कालवाकालव चालली असावी, असें दिसलें. दीक्षित एवढे शांत व धीर प्रकृतीचे पुरुष, पण त्यांच्याहि डोळ्यांत आज वारंवार अश्रुबिंदु उभे रहात असत.

डोळ्यांत आलेले अश्रुबिंदु पुसून नीलकंठ दीक्षित विषादपूर्ण स्वरानें ह्मणाले "हाय! शास्त्रीबुवा! आज निघालेल्या या गोष्टीमुळें माझ्या हृदयांतील पूर्वस्मृति

ओडमेन्स सायप्रस साल्व्ह—डोकें, कंबर, पाठ, छाती यांतून कळा निघूं लागल्यास हें मलम चोळावें. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कंपनी, जुम्मामशीद, मुंबई.

जागृत होऊन कांहींसा शांत झालेला शोकाग्नि आज पुनः एकाएकीं प्रदीप्त झाला आहे. अरेरे! नको त्या भयंकर दिवसाचें स्मरण! त्या दिवशीं आमच्या दीक्षितवंशाचा कुलदीपक, सर्व शास्त्रांत व विद्याकलांत विशारद, असा माझा प्रिय पुतण्या मधुसूदन आत्महत्या करून आह्मां सर्वांना दुस्तर शोकसागरांत लोटून चालता झाला. त्याचे वडील, माझे ज्येष्ठ बंधु माधव दीक्षित! हाय! त्यांनीं हा पुत्रशोकाचा प्रचंड वज्राघात हिमाचलाप्रमाणें अचल असणाऱ्या आपल्या हृदयावर कसा सहन केला असेल! खरोखर धैर्याचे अचल मेरुच ते! त्यांच्या मुखावर कधीं एक दिवसहि शोकाचें लवमात्र चिन्ह दिसलें नाहीं; कधीं एक दिवसहि त्यांच्या डोळ्यांत एकहि अश्रुबिंदु दृष्टीस पडला नाहीं. मधुसूदन निघून गेल्यावर सुमारें एक महिना झाला असेल; एके दिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास मी गाढ झोंपेत असतां माझे बंधु माझ्या निजण्याच्या खोलींत आले व त्यांनीं हांक मारून मला जागृत केलें. मी तावडतोब जागा होऊन पहातों तों माधव दीक्षितांची नेहमींपेक्षां निराळाच वेष केलेली मूर्ति माझ्या दृष्टीस पडली. त्यांनीं भगवा वेष धारण केला असून त्यांच्या कंठांत रुद्राक्षमाला होत्या. त्यांच्या विस्तृत ललाटप्रदेशाला चंदनाची उटी लाविली होती. माधवाचार्यांचा हा विलक्षण वेष पाहून मला फार विस्मयहि वाटला व अत्यंत दुःखहि झालें.

"मीं त्यांना आश्चर्यानें विचारलें 'हें काय मी पहातों आहें हें-दादा!-'

"माधवाचार्य मध्येंच मला करुणस्वरानें म्हणाले 'बाळा! मला आतां कांहीं अधिक प्रश्न करूं नकोस! मी जें कांहीं तुला आतां सांगणार आहें, तें नीट लक्ष्यपूर्वक ऐकून घे. आजच्या शुभ मुहूर्तावर मी संसाराचा त्याग केला असून वैराग्य स्वीकारलें आहे. स्वार्थशून्य वृत्तीनें हा संसाराचा गाडा आपल्या अंगावर घेऊन तूं सावधपणानें तो हांक व चिरकालपर्यंत अक्षय्य सौख्य भोग. आपल्या दीक्षितकुलाचा गौरव आतां केवळ तुझ्या हातांत आहे, तो तूं अकलंक राख-माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे.'

"माधवदीक्षितांच्या वियोगाची कल्पनाहि मला सहन होईना. माझ्या डोळ्यांतून सारखा अश्रुप्रवाह सुरू झाला. मी रडत रडत त्यांचे पाय धरून म्हणालों 'दादा! या दीन बालकावर दया करा-आपला असा अपराध तरी मीं काय केला? मला विरहांत लोटून असे आपण निष्ठुरपणानें जाऊं नका-या संकल्पाचा त्याग करा!'

"मला प्रेमभरानें हृदयाशीं धरून दादा म्हणाले 'बाळा! तुझ्यासारख्या प्रेमळ बंधूवर रागवायला मी का वेडा आहें? अरे, तुजवर रागावून मी येथून निघून जात नाहीं. संसारत्याग करण्याचा माझा निश्चय कायम झाला आहे-आतां तो ढळायचा नाहीं. मला तुला कांहीं शेवटचें सांगायचें आहे-माझ्या सांगण्याप्रमाणें तूं अक्षरशः चालशील ना?'

"मीं हात जोडून स्फुंदत म्हणालों 'सांगा दादा! आपली आज्ञा अमान्य करील असा हतभागी मनुष्य कोण आहे?'

"माधव दीक्षीत पुढें बोलूं लागले 'नानासाहेबांच्या कौतुकागारांत-'कनकदीप'-नांवाचा दोन रत्नखचित सुवर्णदीपांचा बनलेला जो एक दीप आहे, त्याच्या बैठकीच्या कप्यांत स्त्रीच्या हातानें लिहिलेला एक कागद ठेवलेला आहे. त्या दीपाच्या संदुकीची व खुद्द कौतुकागाराची अशा किल्या मी तुला देतों. एकाद्या महामूल्य रत्नांच्या खजिन्याप्रमाणें या दोन किल्या आपणापाशीं ठेवून यांचें मोठ्या सावधपणानें तूं रक्षण कर. एक महिन्यापूर्वी नानासाहेबांनां जी कन्या झाली आहे, तिचा विवाह होण्यापूर्वी कांहीं दिवस कनकदीपांतील तो कागद घेऊन, त्यांतील एक अक्षरहि आपण न वाचतां व त्यांतील एक बिंदुहि कोणाला न दाखवितां, आपल्या हातानें तो नानासाहेबांच्या पत्नीच्या-सकवारबाईच्या-हातीं अतिशय गुप्तपणें तूं नेऊन दे. जर कदाचित् दुर्दैवानें या कन्येच्या विवाहापूर्वी तिची माता परलोकवासी झाली आणि लग्नाचे वेळीं त्या कन्येचें वय दहा वर्षांहून अधिक असलें, तर तिच्या विवाहापूर्वी कांहीं दिवस तो कागद स्वतः न वाचतां किंवा दुसऱ्या कोणाला न दाखवितां तूं खुद्द अतिशय गुप्तपणें तिच्या हातीं नेऊन दे. एका गोष्टीबद्दल मात्र अतिशय सावधगिरी बाळग. नानासाहेबांच्या कन्येचा विवाह होण्यापूर्वी कौतुकागाराचें दार तुझ्याशिवाय अन्य कोणत्याहि

प्रत्येक कुटुंबांत ट्रेझोच्या वड्यांची एकतरी वाटली अवश्य पाहिजे! मस्तकशूलावर तत्काळ गुणदायक औषध ट्रेझोच्या वड्या हेच होय!

व्यक्तीनें, कोणत्याहि निमित्तानें उघडतां कामा नये, याविषयीं तूं पूर्ण सावध रहा ! माझ्या या आज्ञेप्रमाणें तूं सदोदित चालशील व जीवंत असतां ही गोष्ट कोणाच्याहि कानांवर घालणार नाहींस, अशी माझ्या पायांची या वेळीं शपथ वहा !'

"माधवदीक्षितांच्या आज्ञेप्रमाणें त्यांच्या चरणांवर हात ठेवून मी शपथ वाहिली. नंतर एक शब्दहि न बोलतां व मजकडे एकवारहि न पहातां माझे प्रिय बंधु संसाराचा व माझा त्याग करून क्षणार्धांत त्वरेनें तेथून निघून गेले. दादा कोठें गेले, हें समजून घेण्यासाठीं मीं अतिशय प्रयत्न केले-परंतु या क्षणापर्यंत मला त्यांचा पत्ता लागला नाहीं. या 'कनकदीपा'च्या अन्तर्भागीं कांहीं तरी विलक्षण रहस्य लिहून ठेविलेला कागद आहे, यांत तिळप्राय संशय नाहीं !"

चिंतामणशास्त्री म्हणाले "आणि म्हणूनच शारदाताई-साहेबांच्या शिक्षणाविरुद्ध मीं इतक्या हरकती उपस्थित केल्या. 'कनकदीपा'तील त्या कागदामध्यें ताईसाहेबांना अमंगल अशीचे कांहीं तरी गोष्ट असली पाहिजे."

दीक्षित गंभीर स्वरानें उद्गारले "मंगल कीं अमंगल तें एका त्या सर्वदर्शी परमेश्वरालाच ठाऊक ! तो परम मंगलमय आहे. सत्वांत ढवळाढवळ न करतां केवळ परमेश्वरावरच भरवंसा ठेवून आपण निर्भयतेनें राहूं या."

संसार असार !

श्रीयुत विठ्ठल सीताराम गुर्जर.

"शोकें तापद तीव्र दारुण असे संसार निःसार हा-
कोठें सौख्य मुळीं न, नारक वसे प्रत्यक्ष कीं हा महा!
येथें स्त्रीनर सर्वही मधुमुखी, सच्चेड ते अन्तरीं!"
क्रोधोद्वेगभरें हताशहृदयें उद्गारलों यापरी.

माझें गर्जन ऐकुनी परुष हें, हो जागृता सत्वरी,
दिव्या शक्ति कुणी मदीय निभृतीं हृत्कंदराभ्यन्तरीं!
हास्या चंड करी, विदूषक रसें नाट्यप्रयोगीं जसा,
सोडी नन्तर वाग्जलौघ-मजसी तेणें तरी भ्रान्तसा!


मातें वाग्बलशालिनी मधु रवें ऐसें वदे सुंदरी:-
"मूढा! बोलसि काय हें! तिरलिलें त्वां सत्य का अन्तरीं?
सारें विश्व मनोज्ञ सुंदर महा जें सुंदरें निर्मिलें,
टाकीं झाडुनि मात्र तें पटल जें नेत्रांवरी वाढलें!

हातें धूलि बहु स्वयें उडविसी, दिङ्मान्त हो!
'होई केविं घनांधकार सहसा?' तूं पृच्छसी व्याकुल!
नेत्रीं रोग तुझ्या म्हणोनि न तुला सद्वर्णविज्ञान तें;
रम्या वस्तु सुवर्ण काय करिती रुग्णा तुझ्या दृष्टितें?

रे! त्वन्मानसदर्पणीं मलिनता विश्वासि तूं पाहसी!
मूलीं दिव्य जरी, दिसेल चद कां तें दिव्य चेंड्या तुसीं?
आधीं धौत करीं मनोमुकुर तो गंगाजलीं प्रांजल,
तूतें रम्य दिसेल विश्व मग हें, याचाहि जाई मल!

पाहीं निर्मल लोचनीं भुवनिंच्या साऱ्याहि नारी-नरां,
घीयूषीं भृत तद्-हृदन्तर जणूं तूं पाहसी निर्जरां!
सौख्यामोदयुता सुरम्य जगती सत्सार संसार हा!
येथें स्वर्ग वसे, परेशहि इथें, वैकुंठ सर्वसहा!"

ट्रेझो टॅबलेट्स—दुसऱ्या कोणत्याहि औषधानें गुण न येईल तर
कसल्याहि प्रकारच्या मस्तकदुखीवर या वड्या वापरून पहा!



गुरुकुलभोजनशाला.

With Courtesy of the Vedic magazine]

माझा उत्तरहिंदुस्थानांतील प्रवास.

—लेखक—
श्रीयुत प्रो. गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.

लेखांक ३
गुरुकुल.

मी उत्तर हिंदुस्थानांतील प्रवासास सुरुवात केली तेव्हांपासून 'गुरुकुल' ही संस्था पहाण्याचा माझा मानस होता; परंतु पहिल्या प्रथम मी हरिद्वारला गेलो तेव्हां तेथें मी फक्त दोनच दिवस होतों. ते दोन दिवस तेथील अवर्णनीय सृष्टिशोभा पाहण्यात केव्हांच निघून गेले. तेव्हांसुद्धां मीं गुरुकुलाबद्दल चवकशी केली; परंतु मी एका फक्त हिंदी जाणणाऱ्या जुन्या तऱ्हेच्या पंड्याकडे उतरलों असल्यामुळें मला आधीं बरोबर माहिती मिळाली नाहीं; शिवाय, जी मिळाली त्यांत हरिद्वारपासून गुरुकुल पांच मैल आहे असें कळलें. तेव्हां इतक्या लांब जाऊन येण्यास व ती संस्था सावकाशपणें अवलोकन करण्यास सवड सांपडणार नाहीं, असें दिसून आलें. म्हणून मनांतील उत्कट दाबणें भाग पडलें; पण ती संस्था उभ्या उभ्या व अगदीं तांतडीनें पाहून जाणें बरोबर नव्हे, असेंहि मनाला वाटलें. कारण, या संस्थेबद्दल व तिच्या उत्पादकांच्या आत्मत्यागाबद्दल वर्तमानपत्रांत किती तरी वेळां मीं वाचलें होतें. शिवाय, पंजाबांतील आर्यसमाजाची ही संस्था असल्यामुळें या पंथांतील लोकामध्यें तिच्याबद्दल विलक्षण उत्साह, अभिमान व आदर वसत आहे; गुरुकुलाच्या वार्षिक उत्सवप्रसंगी हजारों स्त्रीपुरुष तेथें जमतात व दरवर्षी अर्धा अर्धा लाख रुपये रोख जमा होतात, असें मीं ऐकिलें होतें. तेव्हां अशा महत्त्वाची संस्था ज्या वेळीं मला वेळ अगदीं थोडा होता त्या वेळीं पाहिली नाहीं, हें एका अर्थी बरें झालें. कारण, दुसऱ्या खेपेस मी हरिद्वारास निदान एक आठवडा तरी राहण्याचा बेत केला होतों व गुरुकुल अवश्य पहावयाचें असें ठरविलें होतें. असो.

एके दिवशी सायंकाळीं आम्ही एक्यांत बसून कनखल तीर्थाला गेलों होतों. तेथील सर्व देवळें पाहिल्यावर आम्हीं थोडा वेळ घाटावर जाऊन बसलों, व गंगेच्या प्रचंड पात्राकडे, त्याचप्रमाणें दृष्टि पोहोंचे-पर्यंतच्या हिमालयाच्या उंचउंच पर्वतराजीकडे पाहत होतों. याप्रमाणें थोडा वेळ गेल्यावर मुक्कामाला परत फिरण्याचे आधीं आम्ही "गुरुकुल कोठें आहे, त्याला रस्ता कोणता, तेथें केव्हां जावें, गाडी वगैरे जाते किंवा नाहीं ?" वगैरे गोष्टींची चवकशी आमच्या मोडक्या-तोडक्या हिंदी भाषेंत करीत होतों, इतक्यांत एक तेथीय गृहस्थ आमच्याकडे आले व त्यांनीं "तुम्हांला गुरुकुल पहावयाचें आहे काय ?" असा इंग्रजींत प्रश्न केला.

हा प्रश्न ऐकून आम्हांला स्वाभाविकच आनंद झाला व भाषेसंबंधी अडचणहि दूर झाली. आम्हीं त्या गृहस्थाला म्हटलें कीं "आम्हांला गुरुकुलास जावयाचें आहे व आम्ही त्याबद्दलच चवकशी करीत आहों."

ते गृहस्थ म्हणाले "गुरुकुलांतील एक प्रोफेसर आतां येथेंच आहेत, व ते दक्षिणी गृहस्थ असून त्यांनी मला आपल्याला विचारण्यास पाठविलें आहे. तेच आले असते, परंतु आपल्याला बरें वाटेल किंवा नाहीं ही शंका येऊन ते आले नाहींत."

हें ऐकून आम्हांला फारच आनंद झाला. विशेषतः इतक्या दूरच्या प्रदेशांत आपली भाषा बोलणारे व आपल्याच देशांतील गृहस्थ येथें शिक्षक आहेत, हें ऐकून तर आमचा आनंद गगनांत मावेना! आतां आपल्याला गुरुकुलाची सर्व माहिती मिळून पाहण्या-संबंधीं कांहींएक अडचण राहणार नाहीं असें वाटून,

देझो टॅचलेट्स—दुसऱ्या कोणत्याहि औषधानें गुण न येईल तर कसल्याहि प्रकारच्या मस्तकदुखीवर या वड्या वापरून पहा!

आह्मी फार सुदैवी झणून सहजगत्या असा योग आला, असें आह्मीं झटलें. इतकें बोलणें झाल्यावर आह्मी त्या गृहस्थावरोबर देवळाच्या लतामंडपानें सुशोभित केलेल्या एका ओरीकडे गेलों. तेथें एका साधारण ठेंगण्या, पण तेजस्वी व पाणीदार गृहस्थाला पाहिलें. त्यांचा आमचा परिचयविधि झाला. प्रो. व्ही. जी. साठे हे मुंबईकेडील राहणारे आहेत व ते स्वतः एम्. ए., असून त्यांचे बंधु पूर्वी आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचे प्रिन्सिपाल होते व हल्ली मुंबईस वकिलीचा धंदा करतात, असें समजलें. शिवाय, प्रो. साठे यांनीं मला मुंबईस एकदोन वेळां पाहिलें होतें. याप्रमाणें ओळख निघाल्यानें विशेषच आनंद झाला, व आह्मांला सर्व गोष्टी आपल्याच भाषेच्या द्वारें ठरवितां आल्या. प्रो. साठे यांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळींच गुरुकुल पाहण्यास येण्याबद्दल, व तेथें सबंध दिवस राहून सायंकाळीं परत फिरण्याबद्दल आह्मांला सांगितलें, व सात आठांच्या सुमारास आपला मनुष्य वाटेवर ठेवतों, असें आश्वासन दिलें. इतकी आमच्याकरितां तसदी घेतल्याबद्दल, व सुदैवानें अशी अचानक गांठ पडून ओळख झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित करून व प्रो. साठे यांचेआभार मानून आह्मी प्रमुदित मनानें आमच्या निवासस्थानास परत आलों. मुक्कामाला येतांच आमच्या अर्वाचीन स्थालीची आराधना करून तींत अन्न शिजण्यास लावून दिल्या क्रमाप्रमाणें आह्मीं गंगेच्या घाटावर सहल करावयास गेलों.

या वेळची घाटाची शोभा अवर्णनीय असते. आधीं सर्व घाट माणसांनीं फुललेला असतो. निरनिराळ्या देवळांतून देवाची पूजा व आरती चालू असते. व निरनिराळ्या आवाजाच्या घंटांचा घंटानाद चालू असतो. त्या ठिकाणीं यात्रेकरूंची सारखी गर्दी असते. **'हरीकी पायरी'**च्या घाटावरील गर्दी तर विचारूंच नका! आरतीच्या दीपावलीचा प्रकाश प्रवाहावर पडून त्या प्रवाहाला जास्तच शोभा आली होती. आह्मी हरिद्वारास होतों ते दिवस चांदण्याचे नव्हते; परंतु चांदण्याच्या दिवसांत व विशेषतः पौर्णिमेच्या सुमारास नदीवरील व घाटावरील देखावा यापेक्षांहि सुंदर दिसतो, असें आह्मांला सांगण्यांत आलें व त्याचें थोडेंसें प्रत्यंतर आह्मांला आमच्या हरिद्वारच्या आठवड्यांतील शेवटच्या एकदोन दिवशीं आलें. कारण, त्या दिवसांत थोडासा चंद्रप्रकाश पडूं लागला होता. घाटावर बसून, धो धो वाहणाऱ्या गंगाप्रवाहांत पाय सोडून बसण्याची फारच मौज वाटते. ते उन्हाळ्याचे दिवस, तरी पण अशा तऱ्हेनें फार वेळ पाण्यांत पाय सोडून बसवत नाहीं. अर्धापाव तास बसलें, कीं, सर्व उष्मा नाहींसा होई व दिवसाचा सर्व थकवा जाऊन मन फार प्रसन्न होई. घाटावर इकडे तिकडे सहल करून मग थोडा वेळ पाण्यांत पाय सोडून बसण्याचा आमचा रोज परिपाठ पडला होता. अशा वेळीं नानातऱ्हेचे विचार मनांत येत व पूर्वीच्या ऋषींनीं हिमालयासारखीं ठिकाणें तपाला उत्तम झणून कां पसंत केलीं, हें सहज ध्यानांत येई. मनुष्याचें मन धर्मपरायण व ईश्वरपरायण बनण्यास, मनाची एकाग्रता साधण्यास, व आत्म्याची समाधी लागण्यास, हीं शांत, गंभीर स्थानें फारच अनुकूल होत, यांत मुळींच शंका नाहीं.

याप्रमाणें बराच वेळ गंगानदीची शोभा पाहून व तिचा सुखस्पर्श अनुभवून आह्मी परत येतों, तों आमच्या दिव्य स्थालीनें आमची पाकनिष्पत्ति उत्तम तऱ्हेची करून ठेविली होती. लवकरच भोजन आटोपून आह्मी गचीवर निजण्यास गेलों. इकडल्यातिकडल्या गोष्टी बोलत असतांना, व उद्यां आपल्याला गुरुकुल पहावयास जावयाचें आहे या आनंदमय विचारांत असतांना, आह्मांला निद्रादेवीनें मोहून टाकलें व लवकरच आह्मांला गाढ झोंप लागली.

आदल्या दिवशीं ठरल्याप्रमाणें आह्मीं पहाटेस पांच वाजतां उठलों, व गुरुकुलास जावयाचें तें स्नान करूनच जावें झणजे बरोबर कपडालत्ता नेण्याचा त्रास नको, असा विचार करून लागलीच गंगेवर स्नानास गेलों. स्वच्छ गंगास्नान करून आणि निवळ दुधाचा चहा घेऊन आह्मीं एक्यामधून सुमारें सहा साडेसहाला कनखल तीर्थाला आलों. गुरुकुलचा रस्ता या तीर्थाच्या खालच्या बाजूनेंच जातो, व तो सर्व नदीच्या वाळवंटांतून जात असल्यामुळें आह्मीं सर्व रस्ता पाहत पाहत व चालत चालत जाण्याचा बेत केला होता. झणून एक्का देवळाशींच सोडला, व आह्मी वाट चालूं लागलों.

कनखलापासून गुरुकुलाचें ठिकाण तीन मैल आहे. परंतु बहुतेक सर्व रस्ता नदीच्या पात्रांतूनच जातो. कारण, हरिद्वारच्या खालीं गंगानदीचें पात्र फारच रुंद झालेलें आहे व तिचे निरनिराळे प्रवाह बनलेले आहेत. ज्याप्रमाणें एकादी हरणी अथवा कालवड

कामिनीया तेल सर्व सुगंधी सामानाच्या दुकानांत मिळतें. एक बाटलीस रु. १.
तीन बाटल्यांस रु. २ ८१०. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद-मुंबई.

गोळ्यांतून बाहेर पडली म्हणजे सैरावैरा धावूं लागते, त्याचप्रमाणें येथें गंगेची स्थिति होते. हरिद्वारजवळ तिला दोन टेंकड्यांचा प्रतिबंध आहेसा दिसतो; परंतु हिमालयाच्या पर्वतराजींच्या कोंडवाड्यांच्या शेवटच्या दारांतून मोकळ्या मैदानावर गंगा आली म्हणजे ती सैरावैरा धांवत आहे कीं काय, असा भास होतो. कनखल तीर्थाच्या खालींच गुरुकुलची वाट नदीच्या पात्रांतून लागते. गंगेच्या पात्रांत बहुतेक दगड शुभ्र आहेत. परंतु मधून मधून निरनिराळ्या रंगांचे दगडहि दृष्टीस पडतात. तांबडा, पिंवळा, हिरवा, निळा, काळा वगैरे निरनिराळ्या रंगांच्या व त्यांच्या निरनिराळ्या छट्यांच्या गोळ्यांनीं भरलेलें पात्र पाहून प्रथमतः पहाणाराला आश्चर्य वाटतें. कारण, आपल्या इकडे सर्व नद्या एकाच काळ्याकुट्ट गोळ्यांनीं भरलेल्या असतात. त्यांत वैचित्र्य फारच क्वचित् असतें. अशा प्रकारची मौज व दगडांचें वैचित्र्य नर्मदा नदीच्या पात्रांत व विशेषतः जबलपुरानजीक मार्बल-रॉक्स म्हणून जो नर्मदेचा भाग आहे, त्यामध्यें दिसून येतें. लहान मुलांना वाळूतील शिंपा वेंचण्याची जशी हौस वाटत असते, त्याप्रमाणें गंगेच्या या पात्रांतून जातांना मोठ्या माणसांनांहि हौस वाटते. निरनिराळ्या रंगांचे गोटे गोळा करण्याची तशी हौस आह्मांलाहि वाटली, व सरोसरीच आह्मी प्रत्येकानें हातरुमालांत मावतील इतके गोटे गोळा केले. परंतु फार जड झाल्यामुळें आह्मांला त्यांतले बरेच 'समुद्रास्तृप्यंतु' नव्हे 'नद्यस्तृप्यंतु' करावे लागले. तरीपण, सरासरी हातरुमालभर गंगेंतील गोटे आह्मी पुण्यास आणलेच !

गंगेच्या पात्राची शोभा पाहात, व उत्तरेची दिशा भरून टाकणाऱ्या हिमालयाची दूरस्थित रांगची रांग निरखीत आणि नकळत भूगर्भशास्त्रज्ञाप्रमाणें निरनिराळ्या जातींचे दगड जमवीत चालल्यामुळें आमचा प्रवास फार धीरेधीरे होत होता. कनखलपासून गुरुकुलाला पोहोंचेपर्यंत वाटेंत लहानमोठे असे नदीचे पांच प्रवाह लागतात. त्या पांचांवरहि लहानमोठे पूल केलेले आहेत. पूल कच्चे आहेत. दोन पूल जरा मोठे आहेत. ते होड्यांना एकापुढें एक ठेवून, त्या होड्या दोरखंडांनीं जखडून त्यांवर लांकडाचे ओंढे टाकून, त्या ओंढ्यांवर आडव्या फळ्या व वांसे बांधून त्यांवर गवत पसरून वर मातीचा थर देऊन सरासरी गाडी जाण्यापुरते कच्चे पूल केलेले आहेत. कांहीं पूल तर दोनचार लांकडाचे ओंडे टाकूनच केलेले आहेत. कारण, प्रवाहाची धार फारच लहान आहे.

हे सर्व कच्चे पूल पाहिले म्हणजे पुढें येणाऱ्या गुरुकुलाच्या साधेपणाचीच साक्ष पटते, व आपण सृष्टिकर्त्तीत अवश्य तितक्याच भर घातलेल्या स्थळाकडे जात आहों असें वाटतें. गंगेचा सर्वांत मोठा जो प्रवाह आहे, व ज्यावर बराच लांब पण कच्चाच पूल आहे, तो ओलांडल्यावर तरीचें नाकें लागतें व तेथें दरमाणशीं एक पैसा तरभाडें द्यावें लागतें. या ठिकाणींच प्रो. साठे यांनीं वाट दाखविण्याकरितां पाठविलेला मनुष्य आह्मांला भेटला.

हा प्रवाह टाकल्यावर नदींत बनलेलें एक बेट लागतें. या बेटावर जंगल साधारणच आहे. फार उंच किंवा फार दाट झाडी नाहीं. पुढें लवकरच शेवटचा प्रवाह ओलांडून आपण गुरुकुलाच्या मर्यादेंत प्रवेश करतों. परंतु गुरुकुल जवळ आल्याचें एकहि चिन्ह दिसत नाहीं. फक्त एक दूरवर निशाण दिसतें. त्या खुणेनेंच जावयाचें असतें. थोड्याच वेळांत आपण तीनशें साडेतीनशें मनुष्यवस्तीच्या खेड्यासारख्या ठिकाणीं जात आहों असें वाटत नाहीं. कारण, आतां सर्व भाग जंगलाप्रमाणें भासतो. झाडेंहि जास्त दाट दिसूं लागतात. हा देखावा गुरुकुलाच्या अगदीं बाहेरच्या कवाडाशीं येईपर्यंत सारखा दिसतो. हें कवाड दिसलें म्हणजे आपण मनुष्यवस्तींत आलों, असा विश्वास पटतो.

आह्मी कवाडांतून आंत शिरलों तो दोन्ही बाजूला एकेरी खोल्यासोल्यांसारख्या जागा दिसल्या. याच विद्यार्थ्यांच्या जागा कीं काय, असा प्रथमतः आह्मांला संशय आला; परंतु त्या गोशाळेच्यापैकी होत, असें पुढें समजलें. हें पहिलें कवाड टाकून बरेंच आंत गेल्यावर गुरुकुलाचें दुसरें फाटक लागतें. वाटेनें जातांना संस्कृत शब्दांनीं व्यक्त केलेल्या इंग्रजी खेळाच्या निदर्शक पाट्या लागतात. या खेळण्याच्या जागा दाखविणाऱ्या पाट्या होत्या.

दुसऱ्या फाटकाच्या आंत गेल्यावरोबर गुरुकुलाची बाग लागते. ही बाग नीटनेटकी, पण अगदीं साधी दिसते. येथेंच एक मोठी विहीर असून तिला मला शोभेला एक बैलरहाट जोडलेला आहे. या रहाटाच्या योगेंच सर्व बागेला पाणी दिलें जातें व स्नानशाळेला

केश सुंदर दिसण्यास ते रेशमासारखे मऊ, चमकणारे, नरम आणि पुष्कळ पाहिजेत.
कामिनीया तेलाचा त्यासाठीं उपयोग करा।

येथूनच पाणी जातें. जरा पुढें गेलें कीं स्नानशाळा लागते. या शाळेंत लांबचलांब व अगदीं अरुंद असा मोठा थोरला हौद आहे. आपल्या इकडे गुरांनां पाणी पिण्याकरितां ज्या तऱ्हेचा लांबच लांब हौद बांधतात, तशा तऱ्हेचा हा बांधलेला आहे. येथें पन्नास मुलें एकदम स्नान करूं शकतात. बहुधा नदीवर स्नान करण्याचा परिपाठ आहे; परंतु ज्या वेळीं नदीवर जाणें शक्य नाहीं त्या वेळी या स्नानशाळेचा उपयोग करतात.

ही शाळा टाकून जरा पुढें गेलें ह्मणजे गुरुकुल महाविद्यालयाची इमारत लागते. ही दोनमजली पण अगदीं साध्या परंतु पक्क्या बांधणीची इमारत आहे. शहरांतील कॉलेजच्या इमारतींप्रमाणें भव्यता, सौंदर्य किंवा अवाढव्यपणा या इमारतींत मुळींच नाहीं. पण ही इमारत गुरुकुलासारख्या पूर्वकालीन संस्कृतीचें पुनरुज्जीवन करणाऱ्या संस्थेला साजेशीच आहे. इमारत दुमजली आहे व त्यांत २२ वर्गं बसण्याची जागा असून एक मोठा पुस्तकालयाचा दिवाणखाना आहे व दुसरा शास्त्रीय शिक्षणाचा दिवाणखाना आहे. दुसऱ्या मजल्यावर महाविद्यालयाकडील ब्रह्मचारी राहण्याची सोय केलेली आहे. या इमारतीस चाळीस हजार रुपये खर्च आलेला आहे. ही इमारत कॉलेजच्या शाखेची होय.

शाळेच्या शाखेकरितां अजून कायमच्या दुऱ्या इमारती बांधलेल्या नाहींत. सर्व ब्रह्मचारी तात्पुरत्या बांधलेल्या एका भव्य चौकांत राहतात. हा चौक फारच मोठा असून त्याचे मधोमध एक मोठी यज्ञशाळा आहे. ती शहरांतील एकाद्या उपवनांतील बँडस्टँड-सारखी हुबेहुब दिसते. मात्र ही फार मोठी आहे व मधोमध एक यज्ञकुंड आहे. यांत सकाळीं होम होतो व त्या वेळीं सर्व ब्रह्मचारी एके ठिकाणीं जमून हवन करतात. सायंकाळचा होम वर्गवारीनें व निरनिराळ्या ठिकाणीं होतो. या इमारतीला एकंदर पसतीस हजार रुपये लागले आहेत. येथें विद्यार्थ्यांच्या राहाव-याच्या खोल्या, शाळेच्या खोल्या, दवाखाना, स्वयंपाक-घर व भोजनशाळा, इतक्या इमारती आहेत. या इमारती एकमजली असून सोपा व त्याचेपुढें खुली पडवी, अशा धर्तीच्या आहेत. वर पत्रे घातलेले आहेत. भोजनशाळा फारच विस्तृत आहे. येथें अडीचशेंपासून तीनशें विद्यार्थी एकदम भोजनास बसण्याची सोय आहे. परंतु गुरुकुल विद्यालयाची ही चालचलाऊ व्यवस्था आहे. कायमची इमारत बांधण्याचा विचार आहे. त्यांत सहाशें विद्यार्थ्यांची सोय व्हावयाची आहे व त्याला पांच लाख रुपये खर्च येईल असा अंदाज केलेला आहे. गुरुकुलाच्या चालकांचा 'इमारतफंड' जमविण्याचा प्रयत्न चालू आहे.

या इमारतीपासून जरा दूर आनंदाश्रम ह्मणून एक लहानशी इमारत आहे. या ठिकाणीं अविवाहित शिक्षक राहतात. येथून थोड्या अंतरावर दिल्लीचे सुपरव्हायझर लाला परमेश्वरी दास यांनीं चार हजार रुपये खर्चून एक पक्की धर्मशाळा बांधलेली आहे. गुरुकुल पहाण्यास सहकुटुंब येणाऱ्या गृहस्थांस येथें उतरण्याची सोय आहे. शिवाय प्रोफेसर, शिक्षक, सुपरव्हायझर यांच्या कुटुंबा-करितां स्वतंत्र घरें बांधलेलीं आहेत. गुरुकुलाचे मुख्य आचार्य यांच्याकरितां एक स्वतंत्र आश्रम बांधलेला आहे.

गुरुकुलाचें आवार फारच विस्तृत आहे. हें एक लहानसें खेडेंच आहे. ही जागा पूर्वी निबड जंगल असून येथें पशूंचें वसतिस्थान होतें. परंतु या स्थळाचा देखावा मात्र सुंदर आहे. हें ठिकाण गंगेच्या डाव्या तीरावर आहे. येथें हवा फारच चांगली असून गंगेचा प्रवाह जवळच वाहत असल्यामुळें प्रवाहावरून नेहमीं गार वारा येत असतो. येथून हिमालयाच्या पर्वतराजि सारख्या दिसत असतात. जागा सर्व झाडांनीं आच्छादलेली आहे.

अशी शांत, एकीकडची आणि हवाशीर जागा पाहून महात्मा लाला मुनशीराम हे बाराचवदा वर्षांपूर्वी आपल्या दोन मुलांनां घेऊन येथें राहण्यास आले व निबड जंगलांत त्यांनीं गुरुकुलास आपल्या एकट्याच्या हिमतीवर सुरुवात केली. गुरुकुलाची ही जागा, व आपली सर्व इष्टेट श्रीमन्मुनशी अमनसिंहजी यांनीं गुरुकुलास बक्षीस दिलेली आहे. या इष्टेटीची किंमत तीस हजार रुपयांची आहे. याप्रमाणें प्रथमारंभींच या थोर गृहस्थांनीं गुरुकुल महाविद्यालयाला आपल्या विलक्षण औदार्यानें स्थैर्य व शाश्वती आणली, व त्यामुळें गुरुकुलाचे उत्पादक महात्मा मुनशीराम यांनां इतक्या थोडक्या काळांत या विद्यालयाची इतकी प्रगती करून दाखवितां आली. या गृहस्थांचा आत्मत्यागहि अलौकिक आहे. यांनीं आपली दरमहाची हजार रुपयांची प्राप्ति सोडून व आपली सर्व इष्टेट शिक्षणाला अर्पण करून

प्रत्येक स्त्रीस आपले केश सुंदर असण्याबद्दल अभिमान असतोच.
कामिनीया तेल वापरल्यानें केश फारच सुंदर होतात आणि वृद्धि पावतात.

पंडित दयानंद सरस्वतीच्या इच्छेनुरूप गुरुकुल काढण्याचा निश्चय केला, व ते आपल्या दोन लहान मुलांसह वर सांगितल्याप्रमाणें या निर्जन प्रदेशीं प्रथमतः आले; व अवघ्या एका तपामध्यें त्यांनीं तेथें मोठें अवाढव्य विद्यामंदिर निर्माण करून ज्या ठिकाणीं माणुसहि फिरकावयाचा नाहीं तेथें रात्रंदिवसची तीनचारशें माणसांची वस्ती बनविली ! बारा वर्षांतील ही कृति महान् पराक्रमासारखी आहे, यांत कांहींएक शंका नाहीं. एकंदर गुरुकुलाचा विस्तार, त्याची वाढ व त्याची सांप्रतची स्थिति पाहून आह्मांला महात्मा मुनशीराम यांचें सादर कौतुक वाटलें.

येथपर्यंत गुरुकुलाच्या पूर्वपीठिकेचें, पूर्वरंगाचें व सद्यःकालीन आणि भावी बहिरंगाचें वर्णन झालें; परंतु गुरुकुल ही एक शिक्षणसंस्था होय व या संस्थेची योग्यता तिच्या अंतरंगावर अवलंबून आहे हें उघड आहे. तेव्हां त्या अंतरंगाकडे आतां वळूं.

गुरुकुल ही आर्यसमाजपंथी लोकांची शिक्षणसंस्था आहे. लाहोर येथें त्यांचें ॲंग्लो वेदिक दयानंद सरस्वती कॉलेज आहे. परंतु त्या कॉलेजच्या चालकांत व कांहीं दुसऱ्या समाजपंथी लोकांत मतभेद झाल्यामुळें गुरुकुल ही संस्था अस्तित्वांत आली, असें आह्मांला समजलें. जरी तिला महात्मा मुनशीराम यांनीं प्रथम जन्म दिला, तरी लवकरच ही संस्था पंजाबच्या आर्यप्रतिनिधीसभेनें दत्तक घेतली, व हल्लीं तिच्यावरील सर्व देखरेख व तिची सांपत्तिक जोपासना, या प्रतिनिधिसभेनें नेमलेल्या एका बोर्ड ऑफ् कंट्रोल नांवाच्या कमिटीकडेच आहे.या ठिकाणीं दरवर्षी आर्यसमाजपंथी लोकांचें संमेलन भरतें, व या संस्थेच्या सद्यः व भावी स्थितीची वाटाघाट होते, व पुढील सालच्या खर्चाची तजवीज केली जाते. गुरुकुलाच्या आंतील व्यवस्थेकरितां अंतरंगसभा ह्मणून एक लहान कमेटी आहे, व तीच गुरुकुलाचा आचार्य व गव्हरनर यांची नेमणूक करते. सर्व रोजची व्यवस्था आचार्याकडे असते.

गुरुकुल विद्यालय ही शिक्षणसंस्था प्रायः वेदाच्या व संस्कृत भाषेच्या अध्ययनाकरितां आहे; परंतु त्यांत इंग्रजी वाङ्मय व अर्वाचीन शास्त्रें आणि तत्त्वज्ञान यांचेंहि अध्ययन केलें जातें. इंग्रजी व शास्त्रें शिकणें न शिकणें हें पालकाच्या मर्जीवर असतें. तेव्हां या तीन विषयांपैकीं वेद व वेदांग यांनांच प्राधान्य दिलेलें आहे. इंग्रजी व शास्त्रें शिकवितांना या प्रधान अध्ययनाला धोका किंवा अडचण येतां कामा नये, असा निर्बंध आहे. या शिक्षणावरोवरच शारीरशिक्षण अवश्यमेव दिलें जातें. बऱ्याच वयाच्या विद्यार्थ्यांनां कांहीं धंद्याच्या शाखांचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली जावयाची आहे. या विद्यालयांतील शिक्षकांनां दयानंद सरस्वती यांनीं स्थापन केलेल्या आर्यसमाजाचीं तत्वें मान्य असलीं पाहिजेत, व त्यांची वेदावर श्रद्धा असून वेदधर्मांतील ५१ कलमांवर त्यांचा भरंवसा पाहिजे. एकाद्या शिक्षकासंबंधीं या अटींपैकीं एकादी अगर अधिक अटी काढून टाकण्याचा अधिकार अंतरंगसभेस आहे. परंतु गुरुकुलाच्या आचार्याला मात्र सर्व अटी पूर्णपणें मान्य असल्या पाहिजेत.

ज्यांचा वेदारंभ अथवा उपनयनविधि झालेला आहे, अशा सर्व ब्रह्मचारी विद्यार्थ्यांस गुरुकुलांत घेतलें जातें. मात्र विद्यार्थ्याचें वय सहा वर्षांचे आंत व आठ वर्षांच्या वर नसावें. दहा वर्षांच्या वरचा विद्यार्थी गुरुकुलामध्यें केव्हांहि घेतला जात नाहीं. विद्यार्थी शरीर व मन यांमध्यें सुदृढ पाहिजे. विद्यार्थ्याच्या पालकानें 'मुलाचें पंचवीस वर्षेपर्यंत लग्न किंवा वाङ्निश्चय करणार नाहीं,' असा करार लिहून दिला पाहिजे. सर्व विद्यार्थ्यांनां विद्यादान फुकट दिलें जातें. सर्व ब्रह्मचाऱ्यांनां साण्यापिण्यांत, कपड्यालत्त्यांत, वसण्याउठण्यांत सारख्या तऱ्हेनें वागविलें जातें. जातीजातींमध्यें कोणताहि भेद ठेविला जात नाहीं. सर्वांनां निरामिष अथवा शाकाहार मिळतो. ब्रह्मचाऱ्यांनीं आपल्या ब्रह्मचर्यनियमाप्रमाणें राहिलें पाहिजे. सर्वांनां ब्रह्मचर्याश्रमाला योग्य असाच साधा पोषाख दिला जातो. अध्ययनास लागणारी सर्व सामुग्री गुरुकुलच पुरवितें. ब्रह्मचाऱ्यांनीं शहरांत किंवा आपल्या घरीं जाण्यास परवानगी नसते. निकट पालक विशेष आजारी असल्यास, किंवा ब्रह्मचारी स्वतःच आजारी पडल्यास, घरीं जाऊं दिलें जातें. पालकानें महिन्यांतून एक वेळेपेक्षां जास्त वेळां विद्यार्थ्यास भेटतां कामा नये. वर्षांतून एकाद्या सुटीला ब्रह्मचाऱ्यांनां जवळपासच्या यात्रांनां शिक्षकांसमवेत पाठविलें जातें. महिन्यांतून एकदा पालकास पत्र लिहिण्याची परवानगी ब्रह्मचाऱ्यास दिली जाते. ब्रह्मचर्याचे नियम मोडल्यास, किंवा दुसरें जबर गैरवर्तन झाल्यास, किंवा

कामिनीया तेल वापरल्यानें पुरातन काळापासून चालत आलेली व अतिशय मौल्यवान् समजली गेलेली अशी केसांची सुस्थिति त्वरित प्राप्त होते.

पालकांनें लेखी करार मोडल्यास, ब्रह्मचाऱ्यास विद्यालयांतून काढून टाकितात.

गुरुकुलविद्यालयाचा शिक्षणक्रम १६ वर्षांचा आहे. त्याच्या तीन पायऱ्या आहेत. पहिला क्रम दहा वर्षांचा आहे. त्याचे शेवटीं अधिकारीपरीक्षा होते. या शिक्षणक्रमानंतर महाविद्यालयांत ब्रह्मचाऱ्याला घेतलें जातें. येथें चार वर्षांचा शिक्षणक्रम आहे. याचे शेवटीं परीक्षा घेतली जाते व त्यांत पसार होणाराला 'स्नातक' ही पदवी मिळते. यापुढें आणखी दोन वर्षांचा क्रम आहे. यांत विद्यार्थ्यानें स्वतः नवीन शोध करून निबंध लिहावा लागतो. या कसोटीला जो उतरेल त्यालाच 'वाचस्पति' ही पदवी मिळते.

'अधिकारी' परीक्षेचा अभ्यासक्रम कांहींसा मॅट्रिक परीक्षेसारखा असतो. संस्कृतचा अभ्यास पुष्कळच होतो. विद्यार्थ्यांस संस्कृत व हिंदी भाषा चांगल्या येऊं लागतात. वेदांगांपैकीं व्याकरण व ऋग्वेदादि भाष्यभूमिका होते. दर्शनांपैकीं न्याय, वैशेषिक, सांख्य व योग इतकी शिकविलीं जातात, व सोपीं उपनिषदेंहि सार्थ पढविलीं जातात. पुढें हिंदुस्थानचा इतिहास, गणितशास्त्रें, व सहाव्या यत्तेचें इंग्रजी किंवा ड्रॉईंग, इतके विषय शिकविले जातात. सर्व विषय हिंदी भाषेच्या द्वारें शिकविण्यांत येतात. 'स्नातक' परीक्षेला वैदिकवाङ्मय, अर्वाचीन संस्कृत, आणि इंग्रजी वाङ्मय, हे तीन विषय आवश्यक असतात; आणि ऐच्छिक विषय एक असतो, व तो इंग्रजी तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र, इतिहास व अर्थशास्त्र, आणि रसायनशास्त्र या तिहींपैकीं विद्यार्थ्यांच्या इच्छेप्रमाणें घ्यावयाचा असतो. 'वाचस्पती'च्या पदवीला दोन निबंध लिहावे लागतात. मुख्य मोठा निबंध वेदासंबंधीं असला पाहिजे, व त्यावरून विद्यार्थ्यानें चारी वेदांचें उत्तम अध्ययन केलें आहे असें दिसून आलें पाहिजे; व दुसरा कोणत्याहि खालील एका विषयावर असला पाहिजेः— संस्कृत व्याकरण, संस्कृत वाङ्मय, महाभारताच्या पूर्वीचें तत्त्वज्ञान, महाभारतानंतरचें तत्त्वज्ञान, वेदकालीन हिंदुस्थान, बुद्धकालीन हिंदुस्थान, हिंदुस्थानचा धार्मिक इतिहास, हिंदुस्थानविषयक समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, तुलनात्मक व्याकरण, जुने कायदे, प्राचीन युरोपियन तत्त्वज्ञान, अर्वाचीन युरोपीय तत्त्वज्ञान, हिंदुस्थानच्या जमिनी, आणि आयुर्वेदिक औषधिक्रिया.

वर त्रोटक तऱ्हेनें दिलेल्या अध्ययनक्रमावरून गुरुकुलविद्यालयाचें अंतरंग दिसून येईल. या विद्यालयांत प्राधान्येंकरून संस्कृत व हिंदी भाषा, आणि विशेषतः वेद व वेदांगें यांचेवर जास्त जोर दिला जातो, हें उघड दिसतें. मात्र येथलें अध्ययन आपल्या इकडच्या जुन्या शास्त्रीवैदिकांसारखें अगदींच एकांगी व पंगू नाहीं. पूर्वीच्या वैदिकांनां फक्त वेद व वेदांगें मुखोद्गत येत असतात. शास्त्र्यांनां संस्कृत वाङ्मयाच्या एक दोन तीन शाखांचें पूर्ण ज्ञान असतें; परंतु या विद्यालयांत तसा प्रकार नाहीं. येथें जुन्या विद्यांबरोबर पाश्चिमात्य संस्कृतीचाहि थोडाफार अभ्यास विद्यार्थ्यांकडून करविला जातो. येथील अभ्यासक्रमांत जुन्यानव्याचा मिलाफ झालेला आहे. यामुळें येथील विद्यार्थी एकदेशीय, संकुचितवृत्तीचे, व अंधश्रद्धाप्रेरित न राहतां उदार विचारांचे, विस्तृत मनाचे, व सारासारविचार करणारे, असे विद्वान् निपजण्याचा जास्त संभव आहे. शिवाय, विद्यालयाचा विशेष म्हणजे येथें दानत व शरीरसामर्थ्य हीं बनविण्याकडे उत्तम लक्ष पुरविलें जातें. यामुळेंहि येथील विद्यार्थी नुसते विद्वान् न निपजतां शीलवान्, बलवान्, सद्गृहस्थ निपजतील यांतहि शंका नाहीं. कारण, या विद्यालयांत विद्याशीलबलनिर्मितीस अनुकूल परिस्थितीच आहे. आधीं कोंवळ्या वयांत व बालपणीं मुलांनां विद्यालयांत घेतलें जातें. या वयांत कोवळ्या झाडाप्रमाणें किंवा ओल्या मातीप्रमाणें जसा आकार शरीराला, मनाला, व आत्म्याला द्यावा, तसा तो सहज देतां येतो. शिवाय, मुलें बारान्बारा चोवीस तास गुरुसहवासांत असतात. शहरांतील मुलांनां मोह उत्पन्न करणाऱ्या गोष्टी येथें मुळींच नाहींत. हवापाणी व खाणेंपिणें शरीरबल वाढविण्यास योग्य असेंच असतें. शिक्षकवर्ग उत्साही, कर्तव्यदक्ष व या गुरुकुलप्रचाराचा अभिमानी असून पैशाच्या साधनाची सुबलकता आहे. इतकी अनुकूल परिस्थिति असतां या संस्थेंतून वाईट विद्यार्थी बाहेर पडले तरच आश्चर्य. उत्तम निर्माण झाले तर त्यांत विशेष नवल करण्यासारखी गोष्ट नाहीं. आतां हा अभ्यासक्रम कितपत अमलांत आलेला आहे हें दाखवून, येथल्या महाविद्यालयांतील प्रोफेसरांची थोडी ओळख करून द्यावयाचें शेवटचें व आनंदाचें काम राहिलें.

कामिनीया तेल प्रत्येकानें वापरून पहावें. हें तेल केसांस इतकें नरम करून सोडतें, कीं, ते वाटेल त्या रीतीनें वळूं शकतात!

आह्मीं मागें सांगितलेंच आहे, कीं, आह्मी गुरुकुलांत सकाळीं आठ साडेआठच्या सुमारास जाऊन पोहोंचलों. आह्मीं आल्याची वर्दी गेल्यावरोबर प्रो. साठे बाहेर आले व त्यांनीं प्रथमतः आह्मांला गुरुकुलचे असिस्टंट गव्हरनर महाशय नंदलाल यांचे कचेरींत नेलें व तेथें महाशयांशीं ओळख करून दिली. लाला नंदलाल यांनीं आमची मोठ्या प्रेमानें विचारपूस करून गुरुकुलाच्या साध्या व शुद्ध रहाणीचें पूर्वचिन्ह म्हणूनच कीं काय, एकएक पेला ताजें गाईचें दूध आणून देवविलें. दूध पिऊन नंदलालचे आभार मानून आह्मीं काय करावयाचें तें ठरविलें. उन्हाळ्यामुळें गुरुकुलांतील सर्व वर्ग सकाळींच भरत असत. तेव्हां सर्व वर्ग प्रत्यक्ष पहाण्याची संधी मिळाली. आमच्या सुदैवानें तो दिवस बुधवार होता, व तो गुरुकुलांतील वादविवाद-सभेचा दिवस असल्यामुळें त्या दिवशीं संस्कृत भाषेंत वादविवाद व्हावयाचा होता. तेव्हां सर्व वर्ग पाहून आह्मीं त्या वादविवादास हजर रहावयाचें, व अकरा साडेअकराच्या सुमारास महात्मा मुनशीराम यांचें दर्शन घेऊन प्रो. साठे यांचे घरीं भोजनास जावयाचें, असा कार्यक्रम ठरला. लागलीच आह्मीं महाविद्यालयांत आलों. तेथें प्रो. साठे यांनीं आमची प्रो. रामदेव यांच्याशीं ओळख करून दिली. प्रो. साठे यांनां दुसरें काम असल्यामुळें प्रो. रामदेवांनीं सर्व आह्मांला वर्ग दाखविण्याचें काम केलें.

प्रथमतः आह्मीं कॉलेजांतील वर्ग पाहिले. हे वर्ग अर्थातच लहान होते. एकाय्यांत पांचसात मुलें, एकाय्यांत चारपांच, तर एकाय्यांत दोनतीनच होतीं. कोठें अर्थशास्त्र हा विषय चालला होता तर कोठें पूर्वमीमांसा, कोठें इंग्रजी तर कोठें गणित. सर्व वर्गांची व्यवस्था मात्र अगदीं अर्वाचीन पद्धतीची होती. ब्रह्मचाऱ्यास बसण्याकरितां डेडले पॅटर्नसारख्या जोड डेस्काच्या खुर्च्या होत्या. वर्गाला लागणारें इतर सामानहि नवीन पद्धतीचेंच होतें.

कॉलेज क्लासेस पाहून झाल्यावर आह्मीं १० व्या वर्गापासून खालीं सारखे वर्ग पहात गेलों. या वर्गांतून मुलें जास्त होतीं. कोठें दहा, कोठें पंधरा, कोठें वीस. वीसपंचवीसच्यापेक्षां कोणत्याहि वर्गांत मुलें जास्त नव्हतीं. येथेंहि निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे विषय चालू होते. प्रो. रामदेव आमच्याकरितां हिंदी-मध्यें कांहीं प्रश्न विचारीत. मुलें चांगल्या तऱ्हेनें उत्तर देऊं शकतात, असें आमच्या दृष्टोत्पत्तीस आलें. अर्वाचीन पद्धतीला अनुसरून खालच्या वर्गांत किंडरगार्टन-पद्धतीनेंच शिक्षण चालत होतें, व प्रत्येक क्लासांत चित्रें, नकाशे व इतर शिक्षणाचीं उपकरणें नीटनेटकीं मांडलेलीं होतीं. त्यांत पुण्याच्या चित्रशाळेंतील चित्रें पाहून आह्मांला मोठें नवल वाटलें. कोठें पुणें व कोठें हरिद्वार! कोठें जुन्या विद्येच्या उद्धारार्थ काढलेलें गुरुकुल व कोठें चित्रकलेचा प्रसार करण्याकरितां काढलेली पुण्याची चित्रशाळा! परंतु अर्वाचीनकाळच्या सुलभ साधनांनीं सर्व हिंदुस्थान देश एकरूप करून टाकल्यामुळें, व सर्व देशभर पाश्चिमात्य शिक्षणानें देशाभिमान उत्पन्न केल्यामुळें, देशी धंद्यास उत्तेजन देण्याची प्रवृत्ति देशांतील कोनाकोपऱ्यांतहि दिसून येऊं लागली आहे, हें पाहून आह्मांला सानंद कौतुक वाटलें.

एकंदर विद्यालयांतील टापटीप, लहान मुलांचीं हस्तकौशल्याचीं कामें, व शिकण्याची पद्धति ही पाहून आह्मांला फार आनंद झाला व या विद्यालयांत जुन्या नव्याचा खरोखरी संगम घडवून आणलेला आहे यांत शंका नाहीं, अशी आमच्या मनाची खात्री झाली. वर्ग पाहून झाल्यावर आह्मीं वाचनालय व शास्त्रीय उपकरणगृह पाहिलें. नव्या संस्थेच्या मानानें दोन्हींचा संग्रह बरा आहे.

परंतु गुरुकुल विद्यालयांतील अध्ययनविषयक पाहिलेली शेवटची गोष्ट म्हणजे तेथील संस्कृत वादविवाद ही होय. त्या दिवशीं प्रो. साठे हे कामकरी अध्यक्ष होते. पंडित काशीनाथ शास्त्री संस्कृतचे नेहमींचे उपाध्याय हेहि अग्रस्थानीं बसले होते. परंतु त्यांनीं वादविवादाला हातभार लाविला नाहीं. 'वाद-विवादसभे'चे सेक्रेटरींनीं आदल्या वादविवादाचा वृत्तांत वाचला, व तो सर्वांनां पसंत झाल्यावर त्यावर अध्यक्षांनीं सही केली. नंतर त्या दिवशींच्या कामास सुरुवात केली. पहिल्या वक्त्यास अमुक वेळ दिला जाईल, उलट पक्षाच्या वक्त्यास इतका वेळ दिला जाईल, व पुढील प्रत्येक वक्त्यानें अमुक वेळांत आपलें भाषण


कामिनीया तेलाचा उपयोग केल्यानें केश सुंदर, काळेभोर, रेशमाप्रमाणें, नरम दाट आणि लांब होऊन स्त्रियांच्या सौंदर्याची वृद्धि होते.

आटोपलें पाहिजे, वगैरे औपचारिक निबंध सांगून झाल्यावर वादविवादास सुरुवात झाली. त्या दिवशींचा विवादविषय 'लेखनी श्रेष्ठ कीं असि श्रेष्ठ ?' हा होता. अर्थात्, शरीरबल श्रेष्ठ कीं, ज्ञानबल श्रेष्ठ हा विषय होता. विद्यार्थी संस्कृत अस्खलित बोलत तें पाहून आम्हांला फार कौतुक वाटलें. विद्यार्थी सुमारें पंचवीसतीस होते. त्यांचे ते ब्रह्मचाऱ्यास योग्य असे पिवळे पोशाख, धोतराचा उत्तरीयासारखा केलेला उपयोग, त्यांची ती सतेज, निरोगी व सुदृढ शरीरयष्टि आणि त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येणारा तेजःपुंजपणा व आनंद पाहून, आणि त्यांची ती अस्खलित संस्कृत वाणी ऐकून, क्षणभर असा भास झाला, कीं, आपण पूर्वकालच्या एकाद्या वसिष्ठवाल्मीकीच्या आश्रमाला आलों आहों कीं काय, व तेथलेच हे ऋषिकुमार बोलत आहेत कीं काय ! परंतु या ऋषिकुमारांच्या भाषणांतील शिवाजी, नेपोलियन, बुद्ध, दयानंद-सरस्वती, शंकराचार्य वगैरे ऐतिहासिक नांवें ऐकलीं, व एकंदर विचारसरणीचा झोंक पाहिला, तेव्हां मनाची खात्री झाली, कीं, जरी बाह्य देखाव्यांत हे पूर्वकालीन ऋषिकुमार दिसले, तरी अर्वाचीन कालच्या पाश्चिमात्य संस्कृतीनें ज्यांच्या मनांत देशाभिमानाची लाट उचंबळत आहे, अशा या देशातील इतर शाळांत, कॉलेजांत शिकणाऱ्या तरुण हिंदी विद्यार्थ्यांप्रमाणें हे अर्वाचीन काळचेच विद्यार्थी आहेत. वादविवादांत शरीरबलाच्या श्रेष्ठपणावद्दल बोलणारे थोडेच निघाले. बहुतेकांनीं ज्ञानबलाचेच पोवाडे गाइले. वादविवादाची मर्यादित वेळा संपल्यावर लोकमान्य टिळकांनीं दिलेले मोठें निबंध वर्दीसवर्धा असले पाहिजे, व त्यावरून विद्यार्थ्यांनें चारी वेदांचें उत्तम अध्ययन केलें आहे असें दिसून आलें पाहिजे; व दुसरा कोणत्याहि खालील एका विषयावर असला पाहिजेः— संस्कृत व्याकरण, संस्कृत वाङ्मय, महाभारताच्या पूर्वीचें तत्त्वज्ञान, महाभारतानंतरचें तत्त्वज्ञान, वेदकालीन हिंदुस्थान, बुद्धकालीन हिंदुस्थान, हिंदुस्थानचा धार्मिक इतिहास, हिंदुस्थानविषयक समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, तुलनात्मक व्याकरण, जुने कायदे, प्राचीन युरोपियन तत्त्वज्ञान, अर्वाचीन युरोपीय तत्त्वज्ञान, हिंदुस्थानच्या जमिनी, आणि आयुर्वैदिक औषधिक्रिया.

दर्शन घेऊन त्यांच्याजवळ थोडेसें संभाषण करून उशीर झाला म्हणून आम्हीं प्रो. साठे यांच्या घरीं आलों. तेथें जेवण तयार होतें. आमचें जेवण आटपतें आहे नाहीं तोंच प्रो. तुलशीराम मिश्र हे आमच्या भेटीकरितां आले. हे गृहस्थ मध्यम वयाचे असून चांगले बहुश्रुत आहेत. यांनां इंग्रजी कविता करण्याचा नाद आहे. हे पूर्वी दोनतीन कॉलेजांत इंग्रजीचे व तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर होते. यांनां आपल्या मतस्वातंत्र्याकरितां एका कॉलेजांतली जागा सोडावी लागली होती. आतां हे गुरुकुलांत तहाहयात प्रोफेसर म्हणून आले आहेत. यांचा व माझा आवडता विषय एकच असल्यामुळें यांचें आमचें लवकरच चांगलें जुळलें. प्रोफेसर मिश्र यांच्या भाषणावरून त्यांच्या मनांतील तात्त्विक भावाची चांगली कल्पना होत होती. त्यांच्या बोलण्यांत दुसऱ्याविषयीं बोलतांना बंधुभगिनी हे शब्द वापरण्याचा परिपाठ दिसला. त्यावरून मला इंग्रजी कादंबऱ्यांतील क्वेकरांची आठवण झाली. हे गृहस्थ चांगले बहुश्रुत, पोक्त, प्रेमळ व विचारी दिसले.

प्रो. मिश्र यांच्याशीं आमचें बोलणें चालले आहे, तोंच प्रो. बालकृष्ण हे प्रो. साठे याचे घरीं आम्हांला भेटण्यास आले. हे तरुण गृहस्थ एम्. ए., असून इतिहास व अर्थशास्त्राचे शिक्षक आहेत. अर्थशास्त्रावर त्यांची भक्ति दिसली व हिंदीभाषेंत एक स्वतंत्र ग्रंथ त्या विषयावर लिहिण्याचा त्यांचा मानस असल्याचें त्यांनीं मला सांगितलें. तेव्हां माझाहि तो आवडता विषय असून मीं त्या विषयावर एक पुस्तक मराठींत लिहिलें आहे असें त्यांनां सांगितलें, व माझ्या पुस्तकाची एक प्रत त्यांनां पाठवून देण्याचें कबूल केलें. त्यांनां महाराष्ट्राच्या [illegible] हें आवड असल्याचें दिसून आलें. योग्य असें [illegible] कडल्या गप्पा होत आहेत तों प्रो. रामदेव या गुरुकु[illegible] ाले. प्रो. रामदेव हे प्रथमतः दिसण्यांत साधनाची [illegible] गृहस्थासारखे वाटतात. हे गृहस्थ बी. ए., असतां या[illegible] पचे प्रोफेसर आहेत, तसेच ते 'वैदिक आदर्श. उत्त[illegible] डिटर आहेत, व शिवाय डेप्युटी गव्हर्नर करण्यासारख[illegible] े आम्हांला सर्व विद्यालय दाखविले कितपत अभ[illegible] माहिती सांगितली. हे गृहस्थ फार बोलके महाविद्यालय[illegible] दावयाचें शैलीवद्दल विलक्षण उत्साही आणि आपल्या

कामिनीया तेल प्रत्येकानें वापरून पहावें. हें तेल कॅसांसा कामिनीया नांव पाहून घ्या!
ते वाटेल त्या रीतीनें वळूं शकतें व भलताच माल देतात!



गुरुकुलांतील पहिले पदवीधर ब्रह्मचारी.

With Courtesy of the Vedic magazine]

मताबद्दल अत्यंत अभिमानी आहेत. यामुळें आह्मांला फारसे प्रश्न न विचारतां सर्व माहिती आपोआप व सहज जातां जातां मिळाली. दुसऱ्या प्रोफेसरांशीं आमचा फारसा वादविवाद झाला नाहीं. कदाचित् त्यांचीं व माझीं मतें जुळलीं असतील ह्मणा, किंवा आपल्या येथें पाहुण्यास आलेल्या पाहुण्याजवळ वाद घालीत बसणें बरें नाहीं असें त्यांना वाटल्यामुळें ह्मणा—परंतु आह्मीं आतांपर्यंत असल्या वादग्रस्त विषयांत पडलोंच नाहीं. परंतु प्रो. रामदेव आल्यापासून वादविवादास सुरुवात झाली. कारण, थोड्याच वेळांत असें दिसून आलें, कीं, प्रो. रामदेव यांच्या व माझ्या मतांत बरेंच अंतर आहे. ज्यांनां आपापल्या मताच्या खरेपणाबद्दल पूर्ण विश्वास आहे, अशीं दोन सुशिक्षित माणसें एके ठिकाणीं आल्यावर वादविवादास काय तोटा ! कोणताहि विषय असो, आमच्या वादविवादाचा शेवट एकाच गोष्टीविषयीं परस्परविरोधी अशा विधानांत होई ! ज्याप्रमाणें रेल्वेच्या लाईनीचें जाळें व अत्यंत गुंतागुंती झालेल्या स्टेशनपासून निघाल्यानंतर शेवटीं दोन लायनी परस्पर भिन्न दिशांनीं जाव्या, त्याप्रमाणें आमच्या वादविवादाचा शेवट होई. प्रारंभीं प्रारंभीं एकमेकांनां सामान्यतः पटतील अशीं विधानें व तत्वें यांनीं वादविवादास सुरुवात होई; परंतु शेवटीं परस्परविरोधी अशा प्रमेयांत वादाचा शेवट होई. आह्मीं कितीतरी निरनिराळ्या विषयांवर संभाषण केलें असेल. प्रो. रामदेवांनां दुसऱ्यानां आपल्या मतांनां आणण्याची फार हौस दिसली, व यामुळें कोणत्या तरी एका विषयांत आमचें मतैक्य होतें कीं काय हें आह्मीं पहात होतों; परंतु तसा प्रसंग आलाच नाहीं ! एकाच शिक्षणपद्धतीखालून गेलेल्या सुशिक्षितांमध्ये अशा तऱ्हेनें मतवैचित्र्य कसें उत्पन्न होतें, हा प्रश्न मनापुढें उभा राहिला, व यांचें कारण मानवी स्वभाववैचित्र्य हें होय, असें ह्मणून आह्मीं आपल्या मनाचें समाधान केलें. प्रो. रामदेव यांचा व आमचा वाद सर्व वेळभर–रात्रीं ११।१२ वाजतां निजेपर्यंत–चालला होता; परंतु तो विकोपाला न जातां आह्मी 'शिवरात्र' ह्मणून निजावयास जाऊं शकलों, हें नवल आहे.

याप्रमाणें गुरुकुलांतील प्रोफेसर मंडळीचा व आमचा थोड्या वेळांत बराच निकट परिचय झाला व सर्वांनीं आह्मांला फार प्रेमानें व आदरानें वागविलें, याबद्दल आह्मीं त्यांचे आभार मानले. पुनः सायंकाळीं आह्मीं बोर्डिंगची व्यवस्था पाहण्यास गेलों. कांहीं ठिकाणीं सायंकाळचे हवन चालले होतें. सायंकाळीं वर्गोवर्गी-प्रमाणें हवन होतें, असें मागें सांगितलेंच आहे. मध्यें एक लहानसें होमकुंड असतें व त्याशेजारीं उपाध्याय शिक्षक बसतो, व लंबचौकोनांत ब्रह्मचारी लोकरीच्या आसनावर बसतात. शिक्षक मंत्र ह्मणतो त्याचा उच्चार सर्व ब्रह्मचारी करतात, व मग शिक्षक अग्निकुंडांत आहुती टाकतो. संध्याकाळीं लहान मुलांची भोजनाची पंगत जरा आधीं दिवसाउजेडींच होतें. (तिकडे संधिप्रकाश आपल्या इकडच्यापेक्षां पुष्कळच वेळ असतो.) ब्रह्मचारी बाहेर मोकळ्या जागेंतच जेवावयास बसले होते. सर्वांचे पोशाख सारखे, सर्वांचीं भांडीं सारखीं व एकसारख्या पंक्ती बसलेल्या, हा देखावा मोठा मजेदार दिसे. ताट, वाटी व लोटा इतकींच भांडीं प्रत्येक ब्रह्मचाऱ्याला मिळतात. तेथील भोजनहि ब्रह्मचाऱ्याच्या वृत्तीला योग्य असेंच होतें. रोटी, डाळ व भजी इतकेच तीन पदार्थ भोजनास होते. या बाबतींत एकंदर उत्तर हिंदुस्थानांत फार साधेपणा आहे. मी आग्ऱ्यास एका कॉलेजच्या बोर्डिंगांत जेवावयास गेलों होतों तेथेंहि असाच प्रकार पाहिला होता. तिकडे भात नेहमीं खाण्याचा प्रघात नाहीं. तसेंच फारशा भाज्या खाण्याचाहि सराव नाहीं. रोटी, डाळ व तूप इतके पदार्थ असले ह्मणजे झालें. यामुळें तिकडे कॉलेजांत सुद्धां जेवणाचा खर्च आमच्या इकडल्यापेक्षां फारच कमी येतो. गुरुकुलांत ब्रह्मचाऱ्यांनीं व शिक्षकांनींच वाढण्याचा प्रघात आहे. फक्त जेवण करण्यास मात्र आचारी लागतात व जेवणहि फारच साधें असल्यामुळें जेवणाचा खर्च फारच कमी येतो. आपापला लोटा व वाटी प्रत्येकानें घांसून आपल्या खोलींत ठेवावयाची असते. यामुळें येथें जेवणाचा आमच्या इकडल्यासारखा रमणा पडत नाहीं. आमच्या इकडील भाज्या, दोन वेळां भात, वरण, तूप, ताक, दूध, पोळी, वरण, शिवाय आमटी व चटणी वगैरे अवश्य भासणाऱ्या पदार्थांची व ते पदार्थ वाढण्याच्या आकृतीची मोजदाद केली, व उत्तरहिंदुस्थानांतील अवश्य वस्तूंची संख्या पाहिली, ह्मणजे तिकडील साधेपणाचें कौतुक वाटतें. शिवाय, या साधेपणानें व मसाल्याच्या अभावानें तिकडील भोजन जास्त पौष्टिक

कामिनीया तेलानें मस्तक थंड राहतें. डोळ्यांची जळजळ दूर होते. गळून पडणारे केश पुनः उगवतात. केंसांची कीड मरून जाते व खवडे वगैरे विकार नष्ट होतात.

व जास्त हितावह असतें, यात शंका नाहीं. या भोजनास खर्च कमी येतो, हा आणखी एक फायदा आहे. येथील विद्यार्थ्यांचा पोशाख असाच साधा व ब्रह्मचर्याला शोभेसा असतो. एक सदरा व धोतर; धोतराचाच एक सोगा पदरासारखा अंगावर घेतलेला असतो. त्याची तऱ्हा या विद्यालयांतील पहिल्या पदवीधरांच्या चित्रावरून समजून येईल. थंडीमध्यें बनातीचा वर आणखी एक कपडा घालण्यास देतात. धोतर व सदरा प्रत्येक ब्रह्मचाऱ्यानें आपला आपणच धुवावयाचा असतो. जास्त मळल्यावर परटाकडे देऊन आणतात.

ब्रह्मचारीपंक्तीचें जेवण पाहून आह्मी थोडे फिरावयास गेलों. वाटेनें आमचा पुनः निरनिराळ्या विषयांवर वाद चाललाच होता. आठनवांचे सुमारास आह्मी प्रो. साठे यांचे पर्णकुटिकेंत आलों व तेथें जेवणें आटोपल्यावर पुनः थोडें संभाषण होऊन रात्री १२ वाजण्याच्या सुमारास, आह्मांला सर्व गुरुकुलाची एकंदर व्यवस्था दाखविल्याबद्दल, आपल्या सहवासाचा व संभाषणाचा लाभ दिल्याबद्दल सर्वांचे, व विशेषतः प्रो. साठे यांचे, आभार मानून आह्मी निद्रावश झालों, व पहाटेस उठून दिसूं लागतांच हरिद्वारची वाट चालूं लागलों.

वाटेनें माझ्या मनांत आदल्या दिवशीं पाहिलेल्या सर्व प्रकारांचें चित्र उभें राहत होतें. वहावारा वर्षांत येवढी मोठी संस्था अस्तित्वांत आणून तिची अशी भरभराट घडवून आणणें, हें कांहीं लहानसहान काम नाहीं. येथील व्यवस्था व शिस्त फार चांगली आहे हें पाहूनहि व्यवस्थापकांच्या कर्तृत्वाबद्दल सादर कौतुक वाटलें. या संस्थेमध्यें घडवून आणलेल्या दोन सुधारणांमुळें तर मला विशेषच आनंद झाला. त्या सुधारणा ह्मणजे जन्मावर जातिभेद न मानणें व ब्रह्मचर्य २४ वर्षेपर्यंत पाळणें. हल्लींच्या हिंदुस्थानच्या अवनतीच्या बुडाशीं पुष्कळ गोष्टी असतील; परंतु आमच्यांतील बालविवाह व जातिभेद या दोन गोष्टी राष्ट्रीयहानीला प्राधान्येंकरून कारणीभूत आहेत, अशी माझी ठाम समजूत असल्यामुळें, या दोन घातुक चालींचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न गुरुकुलानें चालविला आहे हें पाहून मला फारच आनंद वाटला, व येवढ्याकरितांसुद्धां गुरुकुलपद्धतीचा जितका प्रसार होईल तितका चांगला, असें मला वाटलें.

शिक्षणक्रमाबद्दल मात्र माझा तितका चांगला ग्रह झाला नाहीं, हें कबूल केलें पाहिजे. गुरुकुलविद्यालयांत जो शिक्षणक्रम आंखून दिला आहे त्याप्रमाणें तो करवून घेतला जात नाहीं असें नाहीं. तरी पण संस्कृत भाषेवर घालविलेला वेळ वाजवीपेक्षां फाजील आहे, असें मला वाटलें. गुरुकुल ही संस्था आर्यसमाजाकरितां उपाध्याय व उपदेशक तयार करण्यास फार उत्तम आहे. युरोपमध्यें पूर्वी ज्याप्रमाणें बिशप, आर्च बिशप व इतर उपाध्याय व उपदेशक तयार करणारीं कॉलेजें असत, त्या धर्तीवर हें विद्यालय जात आहे, असें मला वाटतें. या विद्यालयांत शिकलेले विद्यार्थी उदार मनाचे, सच्छीलाचे व आपल्या वाङ्मयाचें व धर्माचें पूर्णज्ञान असलेले व संस्कृत भाषेवर विशेष व्यासंग असलेले असे वंदनीय उपदेशक बनण्याचा बराच संभव आहे खरा; परंतु सर्वांसच उपदेशक केल्यावर उपदेश ऐकणारे कोण राहणार, असें माझ्या मनांत आलें. सारांश, गुरुकुलांतील पद्धति व विशेषतः संस्कृतावरील भर हीं कांहीं थोड्या लोकांकरितां इष्ट असतील; परंतु सर्व सामान्यजनांनां इतक्या संस्कृताच्या प्राचीण्याची जरूरी नाहीं; त्यांनां जास्त उपयुक्त विषयांवर परिश्रम करून देणें श्रेयस्कर आहे, असें मला वाटलें.

असे गुरुकुलाबद्दल मिश्र विचार मनांत येत असतांना आह्मी कनखलला येऊन पोंचलों, तोंच आह्मांला महात्मा मुनशीराम पायीं हरिद्वारास जातांना भेटले. त्यांचा आह्मीं पुनः निरोप घेतला, व देवकांत शिरलों. मग माझें मन तेथील सृष्टिसौंदर्यानें पुनः वेधून घेतलें व आह्मीं पुनः एकदां त्या सुंदर स्थानाचें दर्शन घेऊन हरिद्वारास परत आलों. पुढें हरिद्वारास आणखी एक दोन दिवस राहून आह्मी परत मुरादाबादेस आलों.

आतां या वेळच्या प्रवासामध्यें मीं आणखी दोनच स्थळें पाहिलीं व तीं मथुरा आणि वृंदावन हीं होत. या दोन्ही ठिकाणचें वर्णन **मनोरंजना**च्या येत्या **दिवाळी**च्या अंकांत एकाच लेखांत करण्याचें अभिवचन देऊन वाचकांची तूर्त रजा घेतों.

कामिनीया तेलाचा वास फारच मधुर असून हें कितीहि दिवस राहिलें तरी त्याला खवट वास मुळींच येत नाहीं!

व्हीनसचा पुतळा.

[नाटिका.]

अंक पहिला.

[स्थल—मूर्तिकार जॉर्जचें कार्यालय. जॉर्ज व त्याचा मित्र जॉन् बोलत बसले आहेत, असा प्रवेश.]

जॉर्ज—जॉन्! तुला खरेंच सांगतों, या जगांत माझ्यासारखा हतभागी दुसरा कोणीहि नसेल!

जॉन्—तूं अगदीं वेडा आहेस—दुसरें काय ह्मणूं तुला?

जॉर्ज—हतभागी नाहीं तर काय? माझ्या प्रियतम मेरीचे बडील मेरीविषयींची माझी मागणी आतां साफ नाकारतात! अन् याला कारण काय, तर मी एक सामान्य मूर्तिकार आहें अन् माझ्यापाशीं पैसा नाहीं! खरेंच जॉन्! माझ्यासारखा भणंगभिकारी या जगांत आहे कोण? माझ्यापाशीं आहे काय? माझ्या अविरत परिश्रमाचें व अकातर यत्नांचें हें फल—हा स्त्रीचा पुतळा, एवढीच काय ती या जगांत माझी संपत्ति! हाय! माझी कुणालाच दया येत नाहीं! ही मूर्ति मीं घडविलेली—परंतु ही तरी किती कठोर आहे पहा! थंडगार अशा शुभ्र पाषाणाची ही मूर्ति—ही स्त्रीजातीची—परंतु हिच्या मुखावर कांहींतरी सहानुभूतीचें चिन्ह आहे का पहा—अहाहा! किती सुंदर ही मूर्ति! परंतु हाय! किती निर्दय!

जॉन्—तुझ्या बहकण्याला झाली पुनः सुरवात! जॉर्ज, इतका कसा तूं पुरा पागल बनलास हा?

जॉर्ज—(निश्वास सोडून) हाय जॉन्! तूंहि असा माझ्याशीं कठोर होतोस ना?

जॉन्—जॉर्ज! शांत हो, असा वेडेपणा करूं नकोस, आणि माझें ह्मणणें शांतपणें ऐकून घे. तूंच मघाशीं मला ह्मणालास, कीं, मेरीचा बाप सहा महिने वाट पहाणार आहे—हे सहा महिने तर तुझ्या हातांत आहेत ना? एवढ्या या दीर्घ अवधींत तुला वाटतील तितके पैसे मिळवतां येतील, अन् या अवधींत तुला काय वाटेल तें करतां येईल!

जॉर्ज—जॉन्! माझी अशी मळतीसलती थट्टा करूं नकोस. सहा महिन्यांची गोष्ट तर तूं सोडूनच दे—सहा महिने काय, पण सहाशें वर्षे जरी मी धडपडलों, तरी त्याला पाहिजे आहे इतका पैसा मुसता माझ्या दृष्टीसमुद्दां पडायचा नाहीं! मला या जगांत कुणाचें साहाय्य आहे? माझ्यासारखा गरीब या जगांत कोण आहे? माझ्यासारख्या साहाय्यहीन, कीर्तिशून्य, अर्थविहीन मनुष्याला तूं ह्मणतोस हें सहा महिन्यांत—नव्हे, सहाशें वर्षांत तरी साध्य कसें होणार?

जॉन्—तूं अगदीं मूर्ख आहेस जॉर्ज! एकाद्या नेभळ्या पुरुषासारखा रडत काय बसतोस? अजून सहा महिन्यांचा अवकाश आहे—सबंध सहा महिने अद्यापि तुझ्यापुढें आहेत. इतक्या दीर्घ अवकाशांत तुला पैसा मिळवितां येणार नाहीं ह्मणजे काय? इतका अवकाश तुला पुरेसा नाहीं वाटत?

जॉर्ज—तूं हें काय ह्मणतो आहेस जॉन्? माझ्या कांहींच लक्ष्यांत येत नाहीं!

जॉन्—मी म्हणतों, कीं, तुझ्या कामाला सहा महिन्यांचा अवकाश अगदीं पुरेसा आहे. तूं आतां कसलीहि काळजी करूं नकोस, अगदीं निश्चिंत रहा. मी तितक्या अवकाशांत तुला पैसा मिळवून देतों.

जॉर्ज—असें उगीच कांहींतरी बोलण्यांत काय अर्थ आहे? मला ऐकूं दे तरी—असा कोणता उपाय तूं योजणार आहेस—कीं, सहा महिन्यांत तूं मला मेरीच्या बापाच्या ह्मणण्याप्रमाणें विपुल संपत्ति मिळवून देणार आहेस?

जॉन्—तूं माझ्यावर विश्वास ठेवून शांतपणें रहा. पण माझी एक अट आहे, ती निमूटपणें तूं मान्य करून तीप्रमाणें चाललें पाहिजेस. तुझ्या कामाचा भार पूर्णपणें मजवर संपवून, कांहींहि गडबड न करतां, धैर्य धरून सहा महिने तूं अगदीं निश्चिंतपणें रहा—मला जसें वाटेल तसें या बाबतींत मी वर्तन करीन,

गजकर्णावर—'किसोलाइन' हें अचूक गुणकारी औषध सुगंधी व थंड. किं ।।
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मा मशीद, मुंबई.

त्यांत तूं कांहींहि उवळाढवळ करतां कामा नये, किंवा त्याविरुद्ध एक शब्दहि तुला काढतां कामा नये. जरी माझें वर्तन तुझ्या अगदीं मनाविरुद्ध असलें, तरी तुला मग कांहीं बोलतां येणार नाहीं. काय, आहे तुला हें कबूल ? कबूल असेल, तर तुला तशी शपथ घेतली पाहिजे.

जॉर्ज—तूं काय ह्मणतो आहेस, यांतलें एक अक्षर देखील माझ्या ध्यानांत आलें नाहीं. पण तें कांहीं असो—माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. तूं सांगतोस त्याप्रमाणें शपथ घ्यायला मी तयार आहें.

जॉन्—ठीक आहे.

[जॉर्जनें शपथ घेतांच जॉन् एक मोठी हातोडी घेऊन जॉर्जच्या अविरत दीर्घ परिश्रमाचें फल जी ती रमणीय मूर्ति, तिच्या नाकावर एक जोरानें फटका मारून त्याचा एक तुकडा उडवितो; मूर्तीच्या हाताची दोनतीन बोटेंहि तोडून टाकतो. दुसरा एक जबरदस्त फटका मारून जॉन् मूर्तीचा डावा हात कोपरापासून उडवून टाकतो. अशाच रीतीनें त्या मूर्तीचा उजवा पायहि गुडघ्यापासून गळून पडतो. आणखीहि कांही हातोटीचे मजबूत तडाके देऊन जॉन् ती मूर्ति अगदीं छिन्नभिन्न करून टाकतो व जॉर्जकडे पहात आपली टोपी उचलून हंसत हंसत तेथून निघून जातो.

[जॉर्ज वचनबद्ध झाल्यामुळें जॉन्नें केलेला त्या मूर्तीचा सर्व नाश पहात कपाळावर हात ठेवून स्वस्थ बसतो व एक दीर्घ निश्वास सोडून उध्वस्त झालेल्या मूर्तिकडे अश्रुपूर्ण दृष्टीनें पाहून खुर्चीवर धाडकन् आंग टाकतो.

[कांहीं वेळानें जॉन् पुनः प्रवेश करतो. जॉर्जशीं एक अक्षरहि न बोलतां त्याच्याकडे पाहून हंसतो. बरोबर आणलेल्या गाडींत त्या भग्नहृदय मूर्तिकाराला व त्याच्या भग्नदेह-छिन्नविच्छिन्न मूर्तीला घालून आनंदानें शीळ घालीत घालीत जॉन् निघून जातो. जॉर्जच्या घराशीं गाडी येतांच त्याला घरांत पोंचवून ती मूर्ति बरोबर घेऊन जॉन् कोठें निघून जातो तें कोणालाहि कळत नाहीं !]

अंक दुसरा.

[स्थल—जॉर्जचें कार्यालय. जॉर्ज एकटाच विषण्ण-भावानें बसला आहे, असा प्रवेश.]

जॉर्ज—आतां कांहीं वेळानें दोन वाजतील, अन् बरोबर दोन वाजतां माझ्या प्रियतम मेरीच्या पित्यानें मला दिलेली सहा महिन्यांची मुदत पूर्ण होईल ! काय माझी शोचनीय स्थिति ही ! पुष्कळ दिवसांपासून कल्पनेच्या बळावर सुखाची जी प्रचंड इमारत मी उभी करीत आलों आहें, ती आज—आणखी कांहीं तास गेले ह्मणजे धडाधड कोसळून तिचें चूर्णविचूर्ण होऊन जाईल, अन् साऱ्या जन्मांत पुनः त्या सुखाचा नाम-निर्देशहि करायला नको, अशी माझी स्थिति होईल. हाय ! माझ्या हृदयाला होणाऱ्या या अनंत यातनांचा अंत करायला मृत्यूला एवढें भय तरी कसलें वाटत आहे ? आज कित्येक दिवसांत मला धडपणें आहार नाहीं, कीं निद्रा नाहीं ! काल रात्रीं तर अन्नाच्या एका कणालाहि मीं स्पर्श केला नाहीं, अन् साऱ्या रात्रींत डोळ्याला डोळाहि कसा तो लागला नाहीं. कसला आहार अन् कुठची झोंप ! या भयंकर संकटांत सांपडलेल्या मनुष्याची निद्रेला तरी करुणा कशी येणार ? आज माझ्या हातांत विष खायला एक पैसाहि उरलेला नाहीं ! आज माझी स्थिति इतकी वाईट झाली आहे, कीं, माझ्या नेहमींच्या बूटवाल्यापाशीं माझी एका पैचीहि पत राहिली नाहीं—माझा नेहमींचा दर्जी एक 'सूट' (पोषाकाचा संच) हि मला उधार द्यायला तयार नाहीं ! घरवाल्याचा भाड्यावद्दल तर रोजच तगादा चालू आहे. माझ्या डोळ्यांतून पाणी काढल्या-शिवाय तो एक दिवसहि रहात नाहीं. खरोखर, माझे आतां डोळे मिटतील तर बरें ! या चहूंकडच्या देख्या-मुळें मला जिकडे तिकडे भयंकर अंधकार दिसूं लागला आहे. लहानपणापासून मला अत्यंत प्रिय असलेला माझा मित्र जॉन् तर कोठें एकदम फरारीच झाला आहे. त्या दिवशीं माझा तो पुतळा घेऊन स्वारीनें जी कोठें दडी दिली ती कायमचीच ! त्या दिवसापासून निदान एक दिवस तरी गृहस्थानें मला तोंड दाखवायचें होतें ! अन् माझी प्राणप्रिया मेरी-तिची कुठें एकादे दिवशीं रस्त्यांत चुकून गांठ पडलीच, तर मजकडे

ओडमेन्स मलेरिया पिल्स—एक दिवसाआड, रोज, थंडी वाजून येणाऱ्या तापावर खात्रीदार.
अँग्लो इंडियन ड्रग ॲन्ड केमिकल कं. जुम्मा मशीद, मुंबई.

पाहून ती मृदुहास्य मात्र करते. तिच्या मोहक नेत्रांनीं तिच्या हृदयांत मजबद्दल असलेली करुणापूर्ण सहानुभूति पूर्णपणें व्यक्त होते, परंतु माझ्याशीं एक शब्दहि बोलण्याचें धाडस तिच्यानें होत नाहीं! तिच्या कठोर पित्याच्या जरबेमुळें माझ्या प्रियतमेला माझ्याशीं असें फटकून रहाणें भाग पडत आहे. (दरवाजावर कोणी थाप मारतो ती ऐकून) आः ! हे आणखी कोण आले आमचे सावकार माझें माथें उठवायला ? काय त्रास आहे शिंच्यांचा ! कोण आहे ?

[दरवाजा उघडतो, तों बूटवाला प्रवेश करितो.]

बूटवाला—हुजुरांची चहूंकडे बोलबलाय असो ! आज हुजुरांची कीर्ति जिकडेतिकडे दुमदुमून राहिली आहे. परमेश्वरकृपेनें हुजुरांची कीर्ति व संपत्ति अशीच शतपट वृद्धिंगत होवो ! हुजुरांसाठीं हा अगदीं उंची तऱ्हेचा बुटांचा जोड आज मुद्दाम बनवून आणला आहे. हुजुरांच्या पायांचा हा बंदा गुलाम आहे सरकार ! दासावर पूर्वीप्रमाणें जर कृपानुग्रह होईल, हुजुरांनां गरज पडेल तेव्हां ती पुरी करायला सेवकाला जर आज्ञा होईल, तर हुजुरांच्या चरणांचा हा बंदा गुलाम आपल्याला अगदीं कृतार्थ समजेल ! बरें येतों हुजूर ! सलाम ! बंद्याची आठवण असूं द्यावी.

[जातो.

जॉर्ज—हा काय विलक्षण चमत्कार आहे बुवा ! ज्याच्यापाशीं आजच एका पैचीहि माझी पत नव्हती, तो आतां आपण होऊन माझ्यासाठीं बूट घेऊन येतो, याचा अर्थ तरी काय ? अन् पैशांबद्दल अवाक्षर उच्चारीत नाहीं ! मी त्याचें नेहमींचें ग्राहक असावें, अशी बेब्याची मनापासून इच्छा दिसते. आणि शेवटीं मला लवून सलाम करून निघून गेला—जणूं काय कुणा धनकुबेराजवळच आला होता बेटा ! हा सर्व प्रकार आहे तरी काय ? मला तर हें सगळें—(दरवाजावर पुनः थाप पडते.) हें कोण आणखी ?

[शिंपी प्रवेश करतो.]

शिंपी—हुजुर ! भलत्याच वेळीं मी तसदी द्यायला आलों, त्याची बंद्याला क्षमा असावी सरकार !—हुजुरांसाठीं हे अगदीं नवीन फॅशनचे चार उंची 'सूट' तयार करून आणले आहेत—

[जातो.

जॉर्ज—वः ! एकेक नवीनच चमत्कार ! (दरवाजावर पुनः थाप.) आं ? कोण आहे ?

[घरवाला प्रवेश करतो.]

घरवाला—या वेळीं इथें येऊन हुजुरांला थोडीशी तसदी देणें भाग पडत आहे, त्याबद्दल हुजूरांनीं दासाला जरूर क्षमा केली पाहिजे. हुजुरांसाठीं वरच्या मजल्यावर दोन मोठे 'फ्लॅट' सजवून आतांच तयार केले आहेत. ही अंधाराची भिकार .खोली हुजुरांसारख्या बड्या लोकांनां आतां उपयोगी नाहीं —पण हें घर सोडून जायचें नाहीं हां कधीं—

[जातो.

जॉर्ज—ही खारीहि या वेडांत सामील होईल, असें नव्हतें वाटलें मला ! (पुनः थाप.) आज आहे तरी काय ? कोण येत आहे आतां ?—

[बँकेचा मॅनेजर प्रवेश करतो.]

मॅनेजर—हुजुरांकडे आमच्या बँकेचें जें येणें होतें, तें आज पैन् पै आम्हांला पोंचलें. हुजुरांचा पुढला व्यवहारहि दुसरीकडे कोठें होतां कामा नये हो—हुजुरांला कधीं कसली गरज पडली तर आहोंच आम्ही तयार—

[जातो.

जॉर्ज—आज सर्वच कसे पागल बनले हे ? (दरवाजावर थाप.) कोण आहे ?

[मेरीचा बाप येतो.]

बाप—ओ मि. आर्लेड ! मेरी आतां आपली बरें आपली ! माझ्या मागोमाग ती आपल्याला भेटायला आलीच म्हणून समजा—तिचें पाणिग्रहण करून दोघेंहि आनंदांत रहा,—एवढीच माझी म्हाताऱ्याची इच्छा—दुसरें काय ? माझी मेरी माझ्या जिवाचा कलिजा आहे बरें—तिच्यावर प्राणापलीकडे प्रेम करा—तिला पूर्ण सुखांत ठेवा—परमेश्वर तुम्हां उभयतांचें मंगल करो !

[जातो.

जॉर्ज—आतां मात्र कमाल झाली ! मला आज वेड तर नाहींना लागलें ? मी नीट शुद्धीवर आहें ना ? मी हें सारें स्वप्न तर नाहीं पहात ? (दरवाजावर थाप.) ही माझी प्रियतमाच—

[वळून घाईनें जातो, मेरी घाईनें प्रवेश करते.]

दाढेतून कळा निघत असतील तर 'डेन्टीलाईन' कापूस भिजवून लावा. तत्काळ गुण.
अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कं, जुम्मामशीद, मुंबई.

मेरी—जॉर्ज! प्रिया! आज केवढा भाग्याचा दिवस परमेश्वरानें दाखविला हा आपणांला! खरंच गडे, माझ्या कधीं स्वप्नांत दिखील नव्हतं हें आलं!

जार्ज—मेरी! प्राणाधिके! आज मात्र मी सुखाच्या शिखरावर बसलों—परमेश्वरा! दयाघना! तुझी लीला केवळ अतर्क्य आहे!

मेरी—आतां साऱ्या जन्मांत आपला कधीं वियोग व्हायचा नाहीं बरं! चलायचं आतां जरा आमच्याकडे—

[जातात.

अंक तिसरा.

[स्थल—रोम शहरांतील एक राजमार्ग. कांहीं इटालियन् एका पुलापाशीं उभे आहेत, असा प्रवेश.]

एक जण—(वर्तमानपत्र वाचतो.) "अत्यंत आश्चर्यकारक शोध—सुमारें पांचसहा महिने झाले असतील, जॉन् स्मिथ् नामक एका इंग्लिश सद्गृहस्थांनीं 'सिपिओ सॅमिटि' (Scipio Samity) नांवाच्या स्मशानभूमीजवळ कांहीं जमीन अगदीं अल्प किंमतीला विकत घेतली होती. सदर्हू जॉन् स्मिथ यांच्या तर्फेतून जॉर्ज आर्लेड नांवाच्या त्यांच्या एका परम मित्राची कांहीं दिवसांपूर्वी एक मोठी आगळीक झाली असल्यामुळें तिची भरपाई व्हावी म्हणून जॉन् स्मिथ यांनीं अत्यंत उदार अन्तःकरणानें ही जमीन मि. आर्लेड यांना बक्षीस दिली होती. इतकेंच नव्हे, तर आपल्या खर्चानें आपल्या मित्राकरतां या जमिनींत शेतकी करावयासहि स्मिथ यांनीं आरंभ केला होता. थोड्या दिवसांपूर्वी या जमिनीपैकीं एक उंचवट्याची जागा खणीत असतां मशारनिल्हे मि. स्मिथ यांनां त्या जमिनींत एक संगमरवरी दगडाचा पुतळा सांपडला! तो पुतळा अत्यंत सुंदर असून त्याचें अत्युत्कृष्ट शिल्पकौशल्य व एकंदर घडण ही, प्राचीन रोमन कलाकुशलता किती उच्च दर्जाची व अनुकरणीय होती, यांचें पूर्ण निदर्शक-स्वरूप आहेत. हा पुतळा एका स्त्रीची सुंदर मूर्ति आहे. कठोर कालाच्या दुर्दमनीय प्रभावामुळें हा पुतळा जरी ठिकठिकाणीं छिन्नविच्छिन्न व नानातऱ्हांनीं विकृत झाला आहे,—नाकाची मोठी कवची उडाली आहे, एका हाताचीं दोनतीन बोटें तुटलीं आहेत, एक हात व एक पाय अजीबातच गळून पडले आहेत व दुसरेहि कांहीं अवयव थोडेसे छिन्नभिन्न झाले आहेत, तरी तो अत्यंत सौंदर्यपूर्ण असून त्यानें प्राचीन रोमन लोकांच्या उज्ज्वल कलाकौशल्याची व परिकल्पनेची पूर्णपणें खात्री पटते. या गोष्टीची बातमी लागतांच रोमन सरकारनें एक क्षणाचाहि विलंब न करतां सदरहू मूर्ति आपल्या हस्तगत करून घेतली व या पुतळ्यासंबंधानें ऐतिहासिक शोध करण्याकरतां व त्याचें मूल्य ठरविण्याकरतां कांहीं तज्ज्ञ मंडळीचें 'कमिशन' बसविलें. या कमिशनचें काम इतके दिवस अगदीं गुप्तपणें चाललें होतें. हा पुतळा प्राचीन 'व्हीनस' देवतेचा असून या परिकल्पनेशीं ही मूर्ति पूर्णपणें जुळते, असा कमिशननें ठराव केला असून तो सरकारमार्फत कालरोजीं जाहीर करण्यांत आला आहे. खिस्ती शकापूर्वी दुसऱ्या शतकांतील कोणा अज्ञात अशा अत्यंत प्रतिभाशाली मूर्तिकारानें हा पुतळा घडविला असून शिल्पकलाविद्येचें असें निर्दोष व सुंदर फल अद्यापि पृथ्वीवर कोठेंच आढळून आलें नाहीं, असें तज्ज्ञांचें मत आहे. या निरतिशय सुंदर पुतळ्याचें मूल्य दहा कोटि स्वर्णमुद्रांपेक्षां कमी नाहीं, असें कमिशननें ठरविलें आहे. रोमन कायद्याप्रमाणें अशा तऱ्हेनें सांपडलेल्या वस्तूवर सरकारची अर्धी मालकी असून तीवर जमिनीच्या मालकाचें अर्धे स्वामित्व असतें. अर्थात्, या कायद्याप्रमाणें या जमिनीच्या सांप्रतच्या मालकांनां ही जमीन पांचकोटी स्वर्णमुद्रांनां सरकारला विकतां येईल. या जमिनीचे हल्लींचे मालक मि. जॉर्ज आर्लेड यांनां हें स्पृहणीय अर्धमूल्य—पांच कोटि स्वर्णमुद्रा—आजरोजीं सरकारकडून देण्यांत आलें आहे."

श्रोते—काय शिकंदर नशीब हें! तो आर्लेड मोठा भाग्यशाली खरा!

[जातात.

अंक चौथा.

[स्थल—रोमचें पदार्थसंग्रहालय. 'व्हीनस'च्या पुतळ्याजवळ जॉर्ज व मेरी उभीं आहेत, असा प्रवेश.]

जार्ज—मेरी! प्रियतमे! ज्याची कीर्ति आज सर्व जगावर दुमदुमून राहिली आहे, तो हा 'व्हीनस' देवीचा पुतळा! दिव्य सौंदर्य, अतुलनीय शिल्पनैपुण्य

हिवतापावर खात्रीचें औषध 'ओडमेन्स मलेरियस पिल्स', हेंच आहे.
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

व अप्रतिम कलाप्रवीण यांचा पूर्ण परिचय देणारा असा दुसरा पुतळा साऱ्या जगांत दुसरा नाहीं, असें म्हणतात ! या पुतळ्याच्या शरीराचे जे जे अवयव छिन्नभिन्न झाले होते, ते येथील विख्यात इटालियन् शिल्पकारांनीं दुरुस्त करून या मूर्तीला बेमालूम जोडून दिले आहेत. हें सामान्य काम करूनहि त्यांचें नांव आज पृथ्वीतलावर चहूंकडे गाजत आहे. दहा वर्षांपूर्वी मी याच ठिकाणीं आलों होतों-परंतु त्या वेळीं आजच्यासारखी माझी वैभवाची स्थिति नव्हती व माझी अदी त्या वेळीं कीर्तिहि नव्हती. केवळ ज्यामुळें रोम आज जगद्विख्यात झालें आहे, तो हा 'व्हीनस'चा पुतळा ! आणि या पुतळ्यासाठींच त्या कालीं मला रात्रंदिवस प्राणांपलीकडे परिश्रम करावे लागत असत!

मेरी—अगबाई! जगद्विख्यात 'व्हीनस'चा पुतळा, तो हा का? अहाहा! काय स्वर्गीय सौंदर्य हें! किती मोहक आहे-याचें मूल्य किती तरी आहे म्हणे—

जॉर्ज—होय-आज त्याचें अनंत मूल्य आहे; पण दहा वर्षांपूर्वी याची एक फुटकी कवडीहि किंमत नव्हती! आतां याच्या सौंदर्यानें सर्व जग स्तंभित होऊन गेलें आहे, पण पूर्वी याची कोणीं वास्तपुस देखील केलेली नाहीं! मेरी! या पुतळ्याच्या सौंदर्याचें व अनंत मूल्याचें कारण माझा प्रिय मित्र जॉन्! माझ्या जॉन्नें जर हा पुतळा ठिकठिकाणीं छिन्नभिन्न केला नसता, तर याच्या सौंदर्यानें आज कोण मुग्ध झालें असतें? खरोखर, जॉन् अतिशय बुद्धिवान् अन् प्रतिभाशाली म्हणायचा! त्याचे जे अनंत उपकार मजवर झाले आहेत, ते माझ्या हातून कधींहि फिटायचे नाहींत-मी त्याला येथें यायला लिहिलें आहे. चला, भारी गर्दी व्हायला लागली—चल प्रियतमे !

[पडदा पडतो.]

आगबोटीवरील प्रवासी—या प्रवासांत कांहीं धोका वगैरे नाहींना ?

कप्तान—मुळींच नाहीं ! मी लहानपणापासून आगबोटीवर नोकरी करीत आहें परंतु एकदां देखील मी बुडून मेलों नाहीं !

रावसाहेबांनीं नोकरास सांगून ठेविलें, कीं, "मला कोणी विचारावयास आला तर मी ठाण्यास गेलों आहें म्हणून सांग. "

कांहीं वेळानें गोविंदराव रावसाहेबांस भेटावयास आले व रावसाहेब कोठें आहेत म्हणून त्यांनीं नोकरास विचारलें. नोकरानें दारांत उभें राहून आंत डोकावून विचारलें " रावसाहेब, आपण ठाण्यास गेलां म्हणून सांगूं, कीं, कल्याणास गेलां म्हणून सांगूं ! "

म्याजिस्ट्रेट—तूं या शिपायास मारल्याचा तुजवर आरोप आहे.

कैदी—साहेब, तसें नाहीं. मी माझ्या हाताचीं बोटें मिटलीं असतां या शिपायानें फार जोरानें आपल्या नाकानें माझ्या हातावर फटका मारला!

"मला फार वाईट वाटतें, कीं, सध्यां आह्मांला नवीन मजूरांची गरज नाहीं. तुला देण्यासारखें सध्यां काम नाहीं."

" कांहीं चिंता नाहीं ! मला तरी कामच पाहिजे असें नाहीं. पगार या म्हणजे झालें !"

आई—चंपू, मोठी बाई तूं त्रासदायक मुलगी ! त्या मधूला काय केलंस ? तो मोठ्यामोठ्यानं कां ग रडतो आहे ?

चंपू—कांहीं नाहींग-घोडंसं त्याला एरंडेल पाजलं, कालच तूं मला म्हणालीसना तें गोड लागतं म्हणून ?

एक—अहो, तो पूर्वीचा सगळा हिशेब तुम्ही देऊन टाकावा म्हणून हिशेबाच्या कागदांसह तें पाकीट मी तुम्हाला पाठविलें, आणि तुम्हाला मुळींच पैसुद्धां खर्च पडूं नये म्हणून उत्तराकरितां तिकिटहि पाठविलें; पण शेवटीं तुम्ही उत्तर पाठविलें नाहीं तें नाहींच !

दुसरा—पण असें बघा, तुमच्याच तिकिटाचा तुमची निराशा करण्यास उपयोग केल्यास तो माझा हलकटपणा झाला असता कीं नाहीं ?

दिलयहार (रजिस्टर्ड) जाई, जुई व चमेलीच्या मिश्रणाचें अत्तर. वास अत्यंत मधुर व संतोषकारक. पाव तो. कि. १॥. अँग्लो इंडियन केमिकल कं. जुम्मा मशीद, मुंबई.



आधुनिक काळांतील मुलें अशक्त कां निपजतात ?



मथळ्यावर दिलेला प्रश्न केवळ आमच्या देशांतील लोकांपुढेंच सध्यां आहे, असें नाहीं; तर सुधारणेचें आगर जें इंग्लंड, त्या देशांतील लोकांपुढेंहि हा प्रश्न आहे. गेल्या २५ वर्षांत निपजलेली व उत्तरोत्तर निपजत जाणारी संतति ही, त्या काळाच्या पूर्वीच्या संततीपेक्षां शक्तिमानानें कमीकमी होत चालली आहे, असा बोभाटा पाश्चिमात्य देशांतहि सुरू आहे. आमच्या देशांत तर ही स्थिति अगदीं स्पष्टपणें नजरेस येण्याजोगी आहे. असें कां व्हावें ? त्याचीं कारणें काय ? पाश्चिमात्य देशांतील-विशेषतः इंग्लंडमधील-स्त्रीपुरुषांनीं या बाबतींत विचार करून कांहीं कारणें शोधून काढलीं आहेत, व पाश्चिमात्यांचें अनुकरण-सामाजिक बाबतींत व घरगुती बाबतींत, राहणींत वगैरे-करणाऱ्या आमच्या सुशिक्षित समाजासहि त्यांपैकीं कांहीं लागू पडण्यासारखीं आहेत; परंतु त्यांचा विचार करण्यापूर्वी खुद्द आमच्या देशांतील परिस्थिति, राहणी व समाजव्यवस्था यांच्यामुळें उद्भवणाऱ्या एतद्विषयक कारणांचाच प्रथम विचार करणें युक्त होईल.

या बाबतींत पहिलें व बलवत्तर असें कारण आपल्या अलीकडील विवाहपद्धतींत सांपडेल. आधुनिक काळांत मध्यम व गरीब वर्गाच्या लोकांत जे विवाह होतात, त्यांत वधूवरांचें वय परस्परांस अनुरूप असें क्वचितच असतें. वधू बहुधा वरापेक्षां अनेक पटींनें लहान असते. कुणबी व मराठे लोकांततर २०।२५ वर्षांचा नवरा मुलगा, तर ३ पासून ६-८ वर्षांची नवरी मुलगी, अशी स्थिति अलीकडे झाली आहे. पांढरपेशा वर्गांतहि १०-११ वर्षांची मुलगी व २०-२५-३० वर्षांचा नवरा मुलगा, अशी स्थिति दिवसानुदिवस जास्त होत चालली आहे.

अल्पवयी मुलांमुलींची लग्नें करण्याची पद्धत महाराष्ट्रांतील मराठे व कुणबी यांच्यांत पूर्वापार चालत आलेली आहे; मग यापूर्वी तिचे अनिष्ट परिणाम कां पहून आले नाहींत ? असा प्रश्न कोणी करील, तर त्याला असें उत्तर आहे, कीं, पूर्वी मुली जशा लहान, तसे मुलगेहि लहान असत, पण अलीकडे कुणबी लोकांत मुलीच्या बापास मुलीबद्दल शेंकड्यांनीं मोजण्याइतके रुपये देवावयास देण्याची चाल सुरू झालेली असल्यामुळें, इतके रुपये लग्नाचें सोसण्याची ऐपत मुलास अगर त्याच्या पालकांस येईपर्यंत मुलांचीं लग्नें होऊं शकत नाहींत, व इतके रुपये पोट भागून शिल्लक राहणें हल्लींच्या काळांत कठीण असल्यामुळें नवऱ्या मुलांच्या वयाचें प्रमाण वर सांगितल्याप्रमाणें वाढत आहे. बरें, त्याप्रमाणें मुलीचेंहि वाढावें झालें, तर तसें मात्र होत असलेलें दिसत नाहीं ! मग काय मुलींची संख्या मुलांपेक्षां कमी निपजते कीं काय, कोण जाणे ! एक लग्न केलें कीं कुळवाडी अगदीं घाईला येतो, त्याला कर्जबाम होतें व संसाराची काळजी त्याला परिस्थितीमुळें-बायको नीट नांदेपर्यंत तरी असत्ता अशी असते. तिचा त्याचे शरीरसामर्थ्यावर बराच अनिष्ट परिणाम पडतो.

मराठा कुणबी काय, किंवा पांढरपेशा काय, दोघांचेहि ठिकाणीं जेव्हां तारुण्य मुसमुसत असतें तेव्हां त्यांच्या स्त्रिया केवल बाल्यावस्थेंत असतात. अशा स्थितींत बरेच लोक या मुलींच्या कौमार्याचा भंग करतात. अशा स्त्रियांच्या सर्व शारीरिक अवयवांचा-गर्भाशयाचा-वगैरे पूर्ण विकास झालेला नसल्यामुळें त्यांची प्रजा खुजी, खुरटी व दुर्बल अशी निपजते. शिवाय, या सामाजिक परिस्थितीमुळें-वातावरणामुळें-मुलींनां ऋतु प्राप्त होण्याचा कालहि पुष्कळ अलीकडे आलेला आहे, हें देखील अशक्त प्रजा निपजण्याचें एक बलवत्तर कारण आहे. पूर्वी १६ वे वर्षाच्या सुमारास मुली ऋतुप्राप्त होत असत; पण अलीकडे हें प्रमाण १२।१३ वर्षांवर येऊन ठेपलेलें आहे. अर्थात्, तीन वर्षांत जी वाढ स्वाभाविकपणें व्हावयाची,

वॉटरबरीचें मेटाबोलाइज्ड कॉडलिव्हर तेल क्षयरोग व दमा यांवर गुणकारी.
इतर तेलासारखी घाण येत नाहीं. टॉमसन कं. कालबादेवी, मुंबई.

ती होण्यापूर्वीच मुलीस मातृपद प्राप्त होण्याचा प्रसंग येतो. शारीरशास्त्र व मानसशास्त्र यांच्या दृष्टीनें विचार केला असतां मुलींनां अल्पवयांत ऋतु प्राप्त होणें, व त्यांचा नवरा आणि त्या यांच्यांत वयाचें फार मोठें अंतर असणें, हें अपायकारकच आहे, असें दिसून येईल.

प्रजा अशक्त निपजण्याचें दुसरें कारण असें आहे, कीं, आधुनिक काळांतील जीवनार्थकलह दिवसानुदिवस विकट होत चालल्यामुळें प्रजोत्पादन करणाऱ्या दंपत्याचें पोषण व्हावें तसें होत नाहीं. याचा अनुभव शहरांत-विशेषतः मुंबईत राहणाऱ्या लोकांनां असेलच. मुंबईच्या गलिच्छ हवेंत ताकभात, एकादी पातळभाजी, पोळी किंवा भाकरी असली असली, नाहीं तर नाहीं, दुधतूप अनुष्टुपछंदांत, असें ज्याचें खाणें, त्याला सशक्त प्रजा व्हावी कशी ?

तिसरें कारण असें, कीं, आधुनिक कालांतील राहणी एकसारखी कृत्रिम होत चालल्यामुळें आरोग्याचें प्रमाण पूर्वीसारखें राहिलेलें नाहीं. हें विधान वाचून कित्येकांनां आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. कारण, आरोग्यार्थीलथें हल्लीं जितके सुधारलेले प्रयत्न चालू आहेत, तितके पूर्वी खास नव्हते, असें प्रतिपादन करण्यांत येतें; पण अशा समजुतीच्या लोकांनां आमचें एवढेंच सांगणें आहे, कीं, हें मत केवळ आमचें स्वतःचें नसून ज्यांच्या मताला सर्वजण मान देतात, अशा इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांतील लोकांचेंहि असेंच मत आहे. पूर्वीची राहणी साधी असल्यामुळें अलीकडच्या कित्येक आरोग्यजनक उपायांची जरूरच नव्हती. साध्या व नैसर्गिक राहणीच्या वातावरणांतून आपण हल्लीं कृत्रिम, मोहक, चैनीच्या व पुष्कळ अंशीं शरीरास अपायकारक अशा राहणीच्या वातावरणांत संचार करीत असल्यामुळें स्त्रीपुरुषांचे अंगीं असणारें पूर्वीचें स्वाभाविक सामर्थ्य नष्ट होत चाललें आहे. जेथें आईबापच धष्टपुष्ट नाहींत-रोगट, कलाहीन, रक्तहीन, अशक्त, अग्निमांद्य अथवा 'नर्व्हस डिझीज' असणारे असे आहेत, तेथें प्रजा सशक्त व निरोगी निपजण्याची आशा करणें व्यर्थ आहे. तात्पर्य, आधुनिक कालांतील लहान मुलांचा अशक्तपणा हा वरील कारणांमुळें आनुवंशिक झालेला आहे व तो काढून टाकावयाचा असेल तर वर सांगितलेल्या परिस्थितींत सुधारणा केली पाहिजे.

याशिवाय मूल निपजल्यावर त्याची जोपासना करण्याच्या कामीं ज्या चुका होतात, त्याहि या अशक्तपणास कारण आहेत. या चुकांपैकीं पहिली मोठी चूक अशी, कीं, लहान मुलांनां व बाळंतिणीस एका खोलींत अगदीं कोंडून ठेवण्यांत येतें. त्यायोगानें त्यांनां शुद्ध व स्वच्छ हवा पोटांत घेतां येत नाहीं. लहान अर्भकास तर अशा हवेची या वेळीं अत्यंत आवश्यकता असते. कित्येक आया तर आपल्या मुलांनां अशा खोलींत तोंडावर पांघरूण घालून निजवितात, हें तर फारच वाईट. त्यामुळें हृदय व फुप्फुसें यांची क्रिया मंद होण्याचा पुष्कळ संभव असतो. लहान मुलांनां उघड्यावर व थंड हवेंत ठेवणें चांगलें नाहीं, हें खरें; पण त्यांनां अगदीं चिरगुटांत गुरगुटून कोंडून ठेवणेंहि इष्ट नाहीं. स्वच्छ व ताजी हवा त्यांच्या पोटांत जाईल, अशी कांहीं तरी योजना करणें जरूर आहे. तसेंच आपल्याकडील बाळंतिणीच्या खोलींत जो एकप्रकारचा ओंगळ वास येत असतो, तोहि मुलास अपायकारकच असतो. त्यामुळें त्याच्या पोटांत श्वासोच्छ्वासाच्या द्वारें दूषित हवा जाते. कोणत्याहि प्रकारचा दुष्ट वास या खोलींत येतां कामा नये, व मुलाला तर त्याचा बिलकुल संसर्ग होऊं देतां कामा नये. लहान मुलांचें पोषण करण्याचे बाबतींतहि अशीच काळजी घेतली पाहिजे, व होतां होईल तोंपर्यंत कृत्रिम तऱ्हेचें अन्न त्यांनां देतां कामा नये. तसेंच औषधें, अफू, गुटी वगैरे उपचारहि बंद झाले पाहिजेत. शुद्ध व ताजी हवा हेंच लहान अर्भकाचें खरें व मूल्यवान् औषध असून तें त्यांनां योग्य प्रकारें मिळूं दिल्यास इतर औषधांचें कारणच उरणार नाहीं. लहान मुलांनां घालावयाच्या कपड्याच्या बाबतींतहि अलीकडे पाश्चिमात्यांचें अनुकरण बरेंच होऊं लागलें आहे, तेंहि फार घातुक आहे. या बाबतींत शहरांमधून तर फॅशनचें बंड फारच वाढलें आहे. या फॅशनच्या नादांत, मुलांच्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. तें कसें, हें एका पाश्चिमात्य बाईच्याच तोंडानें वदवितों. ही बाई म्हणतेः-

ओडमेन्स सायप्रस साल्व्ह—डोकें, कंबर, पाठ, छाती यांतून कळा निघूं लागल्यास हें मलम चोळावें. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

"Show and fashion are the demon-altars, upon which many women sacrifice their children. The mother places upon the little morsel of humanity the fashionable dresses which.....are wholly unfit for its use, if health is to be regarded of any account. The garments are made extravagantly long and in order to keep them upon the infant, its body is girded with tight bands, or waists, which hinder the free action of the heart and lungs.....they do not have free use of their muscles and limbs."

—Mrs. E. G. White.

वरील उद्गारांचा भावार्थ असा आहे:-"नखरा व दिमाख यांच्यापायीं पुष्कळ स्त्रिया आपल्या मुलांना अपाय करून घेतात. आपल्या लहानशा अर्भकाच्या अंगावर जो नखरेबाज पोषाख आपण घालीत असतात तो आरोग्याच्या दृष्टीनें त्या मुलांना अगदीं अयोग्य असतो. हे पोषाख बहुधा बेसुमार लांब असून ते मुलांच्या अंगावर रहावे म्हणून त्यांच्या छातीवर व इतर कांहीं ठिकाणीं घट्ट केलेले (बटनें वगैरेच्या साह्याच्यानें) असतात, त्यामुळें त्यांच्या हृदयाची व फुप्फुसाची क्रिया सुयंत्रित चालण्यास व्यत्यय येतो, व त्यांनां आपले हातपाय-स्नायु-देहि मोकळेपणानें हालवितां येत नाहींत."

याकरितां लहान मुलांनां घालावयाचे कपडे अगदीं साधे आणि सैल असावेत. तसेंच, लहान मूल जोंपर्यंत आईच्या अंगावर पीत असेल तोंपर्यंत तिनें आपल्या प्रकृतीची विशेष काळजी घेतली पाहिजे. कित्येक बाळंतिणी तीन महिने होतांच हवें तसें खेर वर्तन करूं लागतात व त्यांच्या खाण्यापिण्यासहि धरबंद रहात नाहीं, असें आढळून येतें. अशा आयांच्या अनियमित अथवा खेर वर्तनाचा अनिष्ट परिणाम लहान मुलांच्या प्रकृतीवर होतो. लहान मुलांच्या प्रस्तुत अशक्तपणाचें हेंहि एक कारण आहे. तीं अशक्त निपजूं नयेत म्हणून विवक्षित कालपर्यंत त्यांच्या पोषणासंबंधानेंहि विशेष दक्षता बाळगिली पाहिजे. हें पोषण कसें झालें पाहिजे, हा एक स्वतंत्रच विषय असल्यामुळें त्याचा विचार पुढें एकादे वेळेस करूं.

" तूं आणि गोविंदा शाळेंत जवळ जवळ बसतां, नाहीं रे ? "

" कांहीं वेळ जवळ जवळ बसतों. "

" कांहीं वेळच ? कां रे ?"

" गोविंदाला केव्हां केव्हां मास्तर एका कोपऱ्यांत उभा करतात. "

" असें असें; आणि त्या वेळीं तूं कोठें असतोस ?"

" मला दुसऱ्या कोपऱ्यांत उभा करतात. "

तो—या तुझ्या बोलण्यानें मला इतका संताप आला आहे, कीं, आतां जाऊन जीव द्यावा असें वाटतें. मजजवळ पैसे असते तर या क्षणीं जाऊन बंदूक विकत घेऊन गोळी घालून घेतली असती ! पण काय करूं, खिशांत एक पै देखील नाहीं !

ती—अरेरे ! मजजवळ पैसे असते तर मीं दिले असते !

लीला—(बहिणीस) मी ह्यीं यंत्रावर कपडे शिवण्यास शिकलें आहें; हा पाहिलास का तिकडचा सदरा कसा सुरेख शिवला आहे तो मीं ? पण काय ग कुसुम ! मीं तिकडे जर स्वतःच सांगितलें, कीं, हा सदरा मीं स्वतः शिवला आहे म्हणून, तर मला गर्विष्ठ अन् घमेंडखोर म्हणायला नाहींना होणार ?

कुसुम—अग तूं मुळीं भाऊजींनां सांगावलाच नको ! तो बघण्यावरोबर तो तुझ्या हातचा म्हणून ते ओळखतील. कारण, कितीहि अडाणी भावडा शिंपी असला, तरी त्याचं शिवणं यापेक्षां चांगलंच असायचं !

शिक्षक—(मुलांस) 'मनोदेवता' म्हणजे काय, सांगा बघूं.

एक हुशार मुलगा—तुझी चोरी किंवा लबाडी केली व त्यांत तुझांला धरलें, म्हणजे तुझांला वाईट वाटण्यास लावून तुमच्या मनांत पश्चात्ताप उत्पन्न करते ती, मास्तर !

तांबड्या अथवा काळ्या गजकर्णावर 'किसोलाईन' चोळा. पुन्हा गजकर्ण होणार नाहीं !
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जम्शामशीद, मुंबई.

आमचा जातिभेद.

कांहीं महाराष्ट्रीय पुढाऱ्यांचीं मतें.

[१८]

[श्रीयुत गोपाळ कृष्ण देवधर, एम्. ए., मेंबर–सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, मुंबई.]

सा. न. वि. वि.–आपण आपलें 'जातिभेदा'–संबंधाचें सर्क्युलरपत्र मजकडे पाठवून या अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाविषयींचें माझें मत देण्याची संधि दिली, याबद्दल मी आपला आभारी आहें. प्रश्नांचीं उत्तरें आपण ठरविलेल्या मर्यादेच्या बाहेर गेलीं, याबद्दल क्षमा असावी.

१. समाजांत उद्योगधंद्याच्या निमित्तानें श्रमविभाग झाला व निरनिराळे वर्ग किंवा वर्ण बनले. समाजव्यवस्थेंत जोंपर्यंत केवळ श्रमविभागाचेंच तत्त्व होतें, तोंपर्यंत एका वर्गांतील मनुष्य दुसऱ्या वर्गांत जाऊं शकत असे. पुढें, उद्योगधंदे वंशपरंपरेनें चालूं लागल्यामुळें वर्णांतराची प्रवृत्ति कमी होत जाऊन आपल्या वर्णाच्या क्षेत्रांत इतर वर्गांतील लोकांनीं येऊं नये, असें ब्राह्मणक्षत्रियादि उच्चवर्णीयांनां वाटूं लागलें. अर्थात्, खालील वर्णांतील लोकांच्या पोटीं गुणकर्मानें वरिष्ठ वर्णांत जाण्याच्या लायकीचीं मुलें निपजलीं तरी त्यांनां पुढील पायरी चढण्यास अडथळा येऊं लागला. वर्णांच्या जाती बनण्यास येथूनच सुरुवात होऊन वंशपरंपरेनें त्या हळुहळू कायमच्याच बनल्या. ब्राह्मणाच्या कुलांत जन्म पावलेला तमोगुणविशिष्ट किंवा रजोगुणविशिष्ट मनुष्यहि ब्राह्मण म्हणून समजण्यांत येऊं लागला व क्षत्रियकुलांत जन्मलेला भ्याड मनुष्यहि क्षत्रिय म्हणून गणण्यांत येऊं लागला.

चातुर्वर्ण्य व जातिभेद हीं एक नाहींत. वर्णांची संख्या मर्यादित, म्हणजे चारच आहे; परंतु सध्यां अस्तित्वांत असलेल्या जातींची व पोटजातींची संख्या तर जवळ जवळ चार हजार आहे. तत्त्वतः चातुर्वर्ण्य कुलपरंपरेनें मानावयाचें नसून भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें 'गुणकर्मविभागशः' असेंच मानिलें पाहिजे. क्षत्रियाचा मुलगा क्षात्रप्रवृत्तीचाच निपजेल किंवा ब्राह्मणाचा मुलगा ब्राह्मणवृत्तीचाच असेल, असा कांहीं नियम नाहीं. अर्थात्, गुणकर्माप्रमाणेंच वर्ण मानणें युक्त आहे. भारत व भागवत या ग्रंथांत एकाच व्यक्तीला निरनिराळ्या वर्णांची मुलें झाल्याचा उल्लेख आहे. यावरून, वर्णांचा संबंध व्यक्तीचे गुण व कर्म यांच्याशींच नियत असे, असें दिसून येतें. तसेंच, विश्वामित्रप्रभृतींच्या उदाहरणावरून गुणकर्माप्रमाणें वर्णांतर–उच्च वर्णांची प्राप्ति–होत असे, असेंहि दिसून येतें. नीच गुणांमुळें नीच वर्णाप्रत मनुष्य जातो, ही गोष्ट पुराणप्रिय हिंदुधर्माभिमान्यांस संमत आहेच.

२. जातिभेद हें हिंदुधर्माचें महत्त्वाचें अंग नाहीं, व आवश्यक अंग तर नाहींच नाहीं! हिंदुधर्मांत वर्णभेद होता व त्याचें स्वरूप केवळ सामाजिक श्रमविभागाचें होतें. आजमितीस प्रचलित असणारा जातिभेद भ्रष्ट व विकृत स्वरूपाचा असून तो आगंतुकपणें हिंदुधर्मांत शिरलेला आहे. एकाद्या मनुष्याच्या पोटांत रोगाचा गोळा उत्पन्न झाल्यास तो त्याच्या शरीराचा अंगभूत अवयव किंवा आवश्यक भाग, असें जसें म्हणतां यावयाचें नाहीं, तसेंच जातिभेद हें हिंदुधर्माचें महत्त्वाचें व आवश्यक अंग आहे, असें म्हणतां येणार नाहीं.

३. ऐतिहासिक दृष्ट्या स्थूल मानानें पाहिलें तर जातिभेदाचा समाजहितावर इष्ट परिणाम झाल्याचें दिसून येत नाहीं. उलटपक्षीं, अनिष्ट परिणाम झाल्याचींच उदाहरणें वरींच दाखवितां येतील. परधर्म्यांच्या स्वाऱ्यांवर स्वाऱ्या झाल्या तरीहि हिंदुधर्म नामशेष झाला नाहीं, याचें कारण जातिभेद, असें प्रतिपादण्यांत येतें; परंतु जातिभेदाचें या बाबतींत कसें साहाय्य झालें, हें मात्र आजपर्यंत सिद्ध झालेलें नाहीं.

डोकें फार दुखत असेल तर ट्रेझोच्या दोन वड्यांची पूड पाण्याबरोबर घ्यावी. लगेच गुण!
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

अथवा हिंदुधर्म कायम राहिला तो मूर्तिपूजेमुळें किंवा हिंदुलोकांच्या सहनशीलतेमुळें राहिला, असें जर कोणीं झटलें, तर तें जितकें सयुक्तिक दिसेल, तितकेंच जातिभेदामुळें हिंदुधर्म कायम राहिला, हें झणणें रास्त होईल ! जातिनिर्बंधामुळें सोंवळेंओंवळें, भक्ष्याभक्ष्य वगैरेसंबंधाचे कडक नियम अस्तित्वांत आले व त्याकारणानें एकदा जो परधर्मीयांच्या हातचें जेवला किंवा परधर्मीयांनीं एकदां ज्याच्या तोंडांत गोमांस कोंबलें, तो हिंदुधर्मास कायमचा मुकला, अशी समजूत असल्यामुळें, नाइलाजानें धर्मांतर पावलेले लोक कायमचे परधर्मानुयायी बनले व त्यांचें परावर्तन होण्याचा मार्ग बंद असल्यामुळें हिंदूंचें संख्याबल कमीकमी होत गेलें, समाजाच्या घटकसंघांत परस्परांविषयींची सहानुभूति वृद्धिंगत न होतां कमीकमी होत गेली, आणि त्याचें पर्यवसान एकंदर समाजाच्या अधनतींत झालें. जातिभेदानें विस्खलित व विदीर्ण झालेला हिंदुसमाज मधूनमधून बाह्य परिस्थितीची तीव्र आंच लागल्यामुळें, एकवटल्यासारखा होऊन तेवढ्याच प्रसंगापुरता भेदभावरहित असा दिसे; परंतु ती आंच कमी होतांच पुनः पूर्वीचा अंगीं मुरलेला विस्खलितपणा आपला अंमल गाजवी. महाराष्ट्रांत राज्यस्थापनेच्या वेळीं शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीत महाराष्ट्रांतील सर्व जाती एकवटलेल्या दिसत होत्या; आणि मराठे, देशस्थ व कायस्थ हे एकमेकांच्या खांद्यास खांदा लावून झटलेले दिसले; परंतु तें तात्पुरतें ऐक्य फार दिवस टिकलें नाहीं ! थोडें स्थिरस्थावर झाल्याबरोबर जातिमत्सरानें आपलें डोकें वर काढण्यास सुरवात केली. पानिपतच्या युद्धाचे वेळीं एका पक्षाकडे बळवंतराव मेहेंदळे व दुसऱ्या पक्षाकडे मल्हारराव होळकर असे ब्राह्मण व ब्राह्मणेतर या दृढमूल भेदानें तट उपस्थित होऊन त्या युद्धांत मराठ्यांनां माघार खावी लागली. नारायणराव पेशव्यांचे वेळीं कायस्थ व ब्राह्मण यांच्यामधील दूरीभाव वाढून त्याचें तीव्र द्वेषामध्यें रूपांतर झालें, आणि शेवटीं महाराष्ट्रांतील जातिद्वेष इतका बळावला, कीं, पेशवाई बुडाली तेव्हां कित्येक जातींनीं साखर वांटून आनंद प्रदर्शित केला, असें सांगतात ! जातिभेदानें उत्पन्न केलेल्या धार्मिक व जातिविषयक हक्कांसंबंधाच्या प्रश्नांमुळें जातीजातींत एकमेकांच्या द्वेषास व छळास सुरुवात झाली. तसेंच व्यावहारिक बाबतींतहि कर्तबगारीकडे न पाहतां आपापल्या जातीच्या माणसांनां पुढें आणण्याची प्रवृत्ति निरनिराळ्या जातींच्या पुढाऱ्यांत उत्पन्न झाली व याचमुळें राष्ट्रीय हितासंबंधाचे विचार आकुंचित व मंद झाले. सारांश, ऐतिहासिक दृष्ट्या जातिभेदाचा परिणाम सर्वतोपरी अनिष्ट असाच झाला आहे.

४. जातिभेद हिंदुसमाजांत दृढमूल होऊन आजपर्यंत टिकला, याचीं कांहीं ठळक कारणें झटलीं झणजे धर्माचें मुख्य अंग झणून जातिभेद समजला गेला, व वरिष्ठ समजलेल्या ब्राह्मणक्षत्रियादि जातींचीं आपसांत भांडणें झालीं, तरी त्यांनीं आपल्या खालच्या जातींनां तशाच स्थितींत ठेवण्याच्या कामीं एकोपा दाखविला, हीं होत. एका माणसाला दुसऱ्या माणसावर वर्चस्व ठेवावें असें वाटतें; तसेंच एका जातीला दुसऱ्या जातीवर वर्चस्व असावें असें वाटणें न्याय्य नसलें तरी, एका अर्थी स्वाभाविक आहे. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या अतिशूद्र वर्गांतील लोकांची उन्नति ज्यांनां असह्य वाटते, अशा लोकांत नुसते ब्राह्मण झणविणारेच नव्हत, तर क्षत्रिय, वैश्य झणविणाऱ्या लोकांपासून शूद्र समजल्या जाणाऱ्या, परंतु स्पृश्य वर्गांत मोडणाऱ्या लोकांपर्यंत सर्व जातींचे लोकहि अजून दिसून येतात. धर्माच्या नांवावर चालणारी विषमता लक्षपूर्वक ओळखतां येण्यासारखी नसल्यामुळें, आणि संवयीनें स्वाभिमानशून्यता अंगवळणीं पडल्या कारणानें, खालील जातींच्या हातून जातिभेदाच्या विषमतेचा प्रतिकार करण्याचे झणण्यासारखे प्रयत्न होणें शक्य नव्हतें. बुद्ध, नानक प्रभृति प्राचीन व ऐतिहासिक काळच्या धर्मसुधारकांचे जातिभेद मोडण्याचे प्रयत्न व्हावे तसे सफल झाले नाहींत, याचीं कारणें वरील गोष्टींशिवाय बहुजनसमाजाचें अज्ञान व एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा अभाव, हीं होत.

५. जातिभेद हा सामाजिक, नैतिक, औद्योगिक व राजकीय प्रगतीच्याच आड येतो असें नाहीं; तर, आत्मिक प्रगतीच्याहि आड येतो. जातिभेदानें भेदबुद्धीस मोठी पुष्टी मिळते व त्यामुळें आत्मिक प्रगतीस अवश्य अशी जी अभेद-बुद्धि ती मनांत बाणणें कठिण जातें.

विद्यार्थ्यांस इशारत. मस्तक मणभणूं लागलें अथवा दुखूं लागल्याबरोबर टेंझोच्या वड्यांचा उपयोग करा.

६. जातिभेद कायम ठेवून जातिमत्सर नाहींसा करितां येणें शक्य नाहीं. जोंपर्यंत रोगाचें मूळ कायम आहे, तोंपर्यंत त्याच्यापासून पीडा ही पोंचणारच. रोगाचें बीज कायम ठेवून केलेले उपचार फारतर तात्पुरते यशस्वी होतील.

७. मुख्य मुख्य जातींतील पोटभेद मोडून नंतर क्रमाक्रमानें मुख्य जातिभेद मोडण्यास सुरुवात करणें, हा मार्ग सयुक्तिक व सोपा दिसतो; परंतु त्याला दुसरी बाजू आहे. एक तर, मुख्य चारपांच जातींतील सर्व प्रांतांमधील पोटभेद मोडण्यास भाषाभिन्नत्व, स्थलाचें अंतर व आचारविचारांचें विविधत्व या मोठ्या अडचणी आहेत. तसेंच, एकमेकांच्या शुद्धत्वाबद्दल पुष्कळ पोटजातींनां जबरदस्त शंका वाटते. यामुळें एकाच जातीच्या कक्षेंत निरनिराळ्या पोटजाती आणणें मोठें मुष्किलीचें झालें आहे. दुसरी गोष्ट अशी, कीं, पोटजातींच्या एकीकरणाचें पर्यवसान मुख्य जातींच्या एकीकरणांत होईलच, अशी खात्री नाहीं. पोटजातींच्या एकीकरणापुढें धांव गेली नाहीं तर फुटकळ जमावांत सांप्रत दिसून येणारे द्वेष, मत्सर मोठमोठ्या जमावांमध्यें दिसूं लागतील. तथापि, आज ज्यांच्याकडून पोटजातींच्या एकीकरणाची चळवळ होत आहे, त्यांनां सहानुभूति दाखविण्यास हरकत नाहीं. मुख्य जातींच्या एकीकरणाचें ध्येय मात्र पोटजातींत एकीकरणारांनीं दृष्टिआड होऊं देतां कामा नये.

८. नुसत्या रोटीव्यवहारानें जातिभेदाची तीव्रता थोडीशी कमी झाली, तरी, जातिभेदाचें मूळ नष्ट होणार नाहीं. जातिभेदाचा अनिष्टपणा कायमचा नाहींसा करण्यास बेटीव्यवहारच सुरू झाला पाहिजे! जातीच्या ज्या पोटभेदांत परस्परांशीं अन्नव्यवहार होतो, परंतु विवाहसंबंध होत नाहीं, त्यांच्यांत परस्परांविषयीं बराच दूरीभाव वसत असतो, व एकमेकांचीं उणीं काढण्याकडे प्रवृत्ति असते. यावरून विवाहसंबंधाच्या योगानें घडून येणाऱ्या एकजीवपणाची आवश्यकता स्पष्टपणें सिद्ध होते.

९. नुसत्या परिस्थितीच्या जोरानें तात्पुरती तडतोड होईल व जातिविषयक निर्बंध कांहींसे शिथिल होतील; परंतु, जाणूनबुजून जोरानें प्रयत्न केल्याशिवाय जातिभेद मोडला जावयाचा नाहीं! परिस्थितीच्या जोरानें झालेली सुधारणा तो जोर कमी झाल्यावरोबर नाहींशी होण्यासहि वेळ लागणार नाहीं, हें तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरांत स्पष्ट केलेंच आहे.

१०. जातीमध्येंच राहून जातिभेद मोडतां येणें जवळजवळ अशक्य आहे! आपण होऊन जातीपासून वेगळें झालेंच पाहिजे, असें नाहीं; तरी, प्रसंग पडल्यास जातिबहिष्कृत होण्याचीहि तयारी असली पाहिजे. जातिबंधनें तोडण्यास तयार असणाऱ्या लोकांची संख्या वाढल्यास एकंदर समाजावर त्याचा कांहींनाकांहीं सुपरिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. जातिबहिष्कार पतकरण्याचें धैर्य दाखविणारे लोक थोडेच निघावयाचे. तथापि, जातिभेदाची अनिष्टता कबूल करणाऱ्या लोकांची संख्या वाढली, तर बहिष्कारांचें शस्त्र आपोआप बोथट होत जाईल.

वरील शुद्ध व तात्त्विक विचार अंमलांत आणणें ज्याच्या त्याच्या मानसिक सामर्थ्यावर व पुष्कळ अंशीं प्रापंचिक स्थितीवर अवलंबून राहील. तरीपण, ज्या क्रियावीर पुरुषांचे हातून अशा प्रकारचें वर्तन होईल, त्यांचा गौरव करणें व त्यांनां सहानुभूति दाखवून त्यांच्याशीं आदरपुरःसर व्यवहार चालविणें, सामान्य विचारवीर सुधारकांनां कठिण वाटतां कामा नये. जातिभेद नष्ट होणें ही जरी कालावधीची गोष्ट असली, तरी तो प्रश्न लांबणीवर टाकून निर्वाह लागणार नाहीं. ज्या विचारांच्या खळबळीमुळें समाजांतील कृत्रिम भेदभाव नष्ट करण्याची चळवळ सुरू झाली आहे, त्या विचारांचें उद्घाटन ज्यांत चांगलें दिसून येतें, असे एकदोन इंग्रजी उतारे त्यांच्या भाषांतरासह मी आपल्या मतांच्या पुष्ट्यर्थ खालीं देतों. हे उतारे डॉ. चॅनिंग नांवाच्या एका उदारमतवादी, विद्वान् व प्रसिद्ध अशा अमेरिकन धर्मोपदेशकाच्या व्याख्यानांतून घेतले आहेत. ज्या समाजांत हिंदुस्थानासारखा जन्ममूलक जातिभेद किंवा वर्णभेद नसून केवळ संपत्तीच्या किंवा पुरातन वैभवाच्या जोरावर वर्ग झाले आहेत, अशा समाजांतील उच्च वर्गांतील लोकांनां उद्देशून हे उद्गार काढिले आहेत. तर, ज्याची मजल कित्येक मनुष्यप्राण्यांनां जनावरांपेक्षांहि तुच्छ मानण्यापर्यंत गेली आहे, व ज्याच्या योगानें मानवी प्राण्याचा विटाळ मानण्यापर्यंत पाळी आली आहे, अशा हिंदुस्थानांतील जाति-

स्वतःचे हाल व पैशाची खराबी करूं नका! कोणत्याहि मस्तकशूलावर ट्रेड्रोच्या वड्या प्रथम वापरा. म्हणजे दुसऱ्या औषधांची मग जरूर लागणार नाहीं.

मेदामुळें विदीर्ण झालेल्या समाजाला उद्देशून बोलण्यासंबंधानें जर या उदारधी धर्मोपदेशकास आव्हान दिलें असतें, तर त्याची भाषा किती तीव्र व तिखट झाली असती, याची कल्पना वाचकांनींच करावी!

पहिला इंग्रजी उतारा.

" Allow all this, and that we have reason to look with envy on the past; one thing is plain; the past is gone, the feudal castle is dismantled, the distance between—classes greatly reduced. Unfortunate as it may be, the people have begun to think to ask reasons for what they do, and suffer, and believe, and to call the past to account. old shells are broken, old reliances gone. Men can no longer be kept down by pagentry, state-robes, forms, and shows. Allowing it to be best, that society should rest on the depression of the multitude, the multitude will no longer be quiet when they are trodden under foot, but ask impatiently why they too may not have a share in social blessings. Such is the state of things and we must make the best of what we cannot prevent. Right or wrong, the people will think; and is it not important that they should think justly? that they should be inspired with the love of truth, and instructed how to seek it? that they should be established by wise culture in the great principles on which society and religion rest, and be protected from acepticism and wild speculation by intercourse with enlightened and virtuous men? It is plain, that in the actual state of the world, nothing can avail us but a real improvement of the mass of the people. No stable foundation can be laid for us but in men's minds. Alarming as the truth is, it should be told, that outward institutions cannot now secure us. Mightier powers than institutions have come into play among us,—the judgment, the opinions, the feelings of the many; and all hopes of stability, which do not rest on the progress of the many, must perish. "

—Channing.

" गतकाल स्पृहणीय होता असें मानलें, तरी ही गोष्ट निर्विवाद आहे, कीं, तो काल आतां राहिलेला नाहीं! जातिश्रेष्ठत्वाचा तट ढांसकून पडला आहे; निरनिराळ्या वर्गांमधील अंतर पुष्कळ कमी झालें आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणावयाची असल्यास म्हणा, पण लोक विचार करूं लागले आहेत! आणि जें जें कांहीं आपण करितों, जें जें दुःख भोगतों, व जें जें कांहीं प्रमाणभूत मानतों, त्याचीं कारणें ते लोक शोधूं लागले आहेत आणि भूतकालीन गोष्टींच्या न्याय्यान्याय्यतेसंबंधानें चौकशी करूं लागले आहेत. बुद्धीला भुरळ घालणाऱ्या पूर्वीच्या कल्पनांचें प्राबल्य कमी झालें आहे व त्यावर विश्वासून राहण्याची बुद्धि नाहींशी होत चालली आहे. दरबारी थाट, दरबारी पोषाख, बडेजावीचे प्रकार, यांच्या योगानें लोकांनां दडपून टाकण्याचा काळ गेला! बहुजनसमाजास अज्ञान स्थितींत ठेविल्याशिवाय समाजव्यवस्था सुरळित चालणें शक्य नाहीं, असें जरी कित्येकांनां प्रामाणिकपणें वाटत असलें, तरी बहुजनसमाज असल्या स्थितींत राहून आपली पायमल्ली झालेली सहन करणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर, हें सर्व वैभव आपल्याहि वांट्यास कां येऊं नये, अशी अस्वस्थता त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होणारच! अर्थात्, जें टाळतां येण्यासारखें नाहीं त्यांतूनच मार्ग शोधून काढला पाहिजे. लोक जर विचार करणारच—मग ते योग्य रीतीनें विचार करोत किंवा अयोग्य रीतीनें विचार करोत—तर त्यांनां योग्य तऱ्हेचा विचार करावयास लावणें ही गोष्ट महत्त्वाची नाहीं काय? त्यांनां सत्यप्रीतीची गोडी लागावी व सत्यान्वेषणाचा मार्ग सुलभ व्हावा हें इष्ट नाहीं काय? समाज व धर्म यांचा पाया ज्या तत्त्वांवर आहे, तीं तत्त्वें त्यांच्या अंतःकरणांत सुशिक्षणानें ठसावीं आणि अश्रद्धा व अतिरिक्त तर्कटपणा यांच्यापासून ज्ञानसंपन्न व नीतिमान् माणसांच्या सहवासामुळें ते अलिप्त रहावे हें खरोखर इष्ट नाहीं काय? जगाची खरी स्थिति लक्षांत घेतां, बहुजनसमाजाची खरी सुधारणा झाल्याखेरीज आपली उन्नति होणार नाहीं, हें निर्विवाद आहे. या उन्नतीचा भरभक्कम पाया घालणें म्हणजे सामान्य जनसमूहाच्या अंतःकरणांत विचारजागृति करणें होय. आपल्या विचारास कितीं जरी धक्का बसला, तरी ही गोष्ट स्पष्टपणें सांगितली पाहिजे, कीं, आतां केवळ वरवरच्या उपायांनीं आपला निभाव लागणार नाहीं! पूर्वापार

प्रवाशाचा मित्र! ट्रेझोच्या मस्तकशूळावरील वेदना नेहमीं जवळ बाळगाव्या,
म्हणजे जरूर पडतांच उपयोग करितां येईल.

चालत आलेल्या विचारांपेक्षां कित्येक पटींनीं बलवत्तर अशा कल्पना अस्तित्वांत आल्या आहेत, व त्या कोणत्या झणाल तर सदसद्विवेक, स्वतंत्र विचार आणि बहुजन-हिताची कळकळ. सारांश, ज्या समाजांत बहुजनसमूहाच्या कल्याणाचा विचार होत नाहीं, त्या समाजाच्या स्थैर्याची आशाच नको!"

दुसरा इंग्रजी उतारा.

"I reply, then that it is a libel on social order, to suppose that it requires for its support the reduction of the multitude of human beings to ignorance and servility; and that it is a libel on the Creator, to suppose that he requires, as the foundation of communities, the systematic depression of the majority of his intelligent offspring. The supposition is too grossly unreasonable, too monstrous, to require laboured refutation. I see no need of ranks, either for social order or for any other purpose. A great veriety of pursuits and conditions is indeed to be desired. Men ought to follow their genius, and to put forth their powers in every useful and lawful way. I do not ask for a monotonous world. We are far too monotonous now. The vassalage of fashion, which is a part of rank, prevents continually the free expansion of men's powers. Let us have the greatest diversity of occupations. But this does not imply that there is a need of splitting society into castes or ranks, or that a certain number should arrogate superiority, and stand apart from the rest of men as a separate race. Men may work in different departments of life, and yet recognise their brotherly relation, and honour one another, and hold friendly communion with one another. Undoubtedly, men will prefer, as friends and common associates, those with whom they sympathise most. But this is not to form a rank for caste, for example, the intelligent seek out the intelligent; the pious, those who reverence God. But suppose the intellectual and the religious to cut themselves off by some broad, visible distinction from the rest of society, to form a clan of their own, to refuse admission into their houses to people of inferior knowledge and virtue and to diminish as far as possible the occasions of intercourse with them; would not society rise up, as one man, against this arrogant exclusiveness? And if intelligence and piety may not be the foundations of a caste, on what ground shall they, who have no distinction but wealth, superior costume, richer equipages, finer houses, draw lines around themselves and constitute themselves a higher class! That some should be richer than others is natural, and is necessary, and could only be prevented by gross violations of right. Leave men to the free use of their powers, and some will accumulate more than their neighbours. But to be prosperous is not to be superior, and should form no barrier between men."

—Channing.

"समाजांत सुव्यवस्था रहावी झणून बहुजन-समुदायास अज्ञानांत व दास्यांत ढकलणें जरूर आहे, असें प्रतिपादणें झणजे समाजव्यवस्थेचा उपहास करणें होय. तसेंच, स्वतः बुद्धि देऊन निर्माण केलेल्या बऱ्याच लेकरांना अज्ञ व निकृष्ट स्थितींतच बुद्धिपुरःसर ठेवण्याच्या प्रयत्नांवर समाजरचनेचा पाया घातला जावा, अशी परमेश्वरी सूत्राविषयीं कल्पना करणें, झणजे त्याचा उपमर्द करणेंच होय! ही कल्पना इतकी अप्रयोजक व राक्षसी आहे, कीं, तिचें खंडन करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं! समाज सुव्यवस्थित चालावा यासाठीं, किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणांकरितां, उच्चनीच दर्जाची मला मुळीं आवश्यकताच वाटत नाहीं! व्यवसायवैचित्र्य व स्थितिभिन्नता समाजांत असणें फार इष्ट आहे. मनुष्य-मात्रानें स्वभावनियत धर्माला अनुसरून निरनिराळ्या उपयुक्त व न्याय्य मार्गांनीं आपल्या अंगच्या शक्तींचा विकास केला पाहिजे. सर्व जग एकाच सांच्यांत ओतलेलें असतांच कामा नये; उलट माझी तर अशी समजूत आहे, कीं, सांच्यांच आमच्या ठिकाणीं विविधत्व फार कमी आहे. उच्चपणाचें अंग झणून समजल्या जाणाऱ्या डामडौलानें

प्रत्येक कुटुंबांत ट्रेझोच्या वड्यांची एकतरी वाटली अवश्य पाहिजे! मस्तकशूळावर तत्काळ गुणदायक औषध ट्रेझोच्या वड्या हेंच होय!

दास्य मनुष्याच्या नैसर्गिक शक्तींच्या विकासास प्रतिरोधक होतें. उद्योगधंद्यांच्या बाबतींत जितकें जास्त वैचित्र्य असेल तितकें आह्मांला पाहिजेच आहे; परंतु त्यावरून असें अनुमान काढतां कामा नये, कीं, जाति व वरिष्ठ कनिष्ठ दर्जे निर्माण करून समाजाचीं शकलें पाटलींच पाहिजेत; किंवा कांहीं लोकांनीं वरिष्ठपणाचा अधिकार आपल्याकडे ठेवून व इतर मानवी प्राण्यांहून स्वतःस श्रेष्ठ समजून अगदीं वेगळें राहिलेंच पाहिजे. निरनिराळे व्यवसाय करूनहि मनुष्यांनां परस्परांमधील बंधुत्वाच्या नात्याची जाणीव बाळगितां येईल, एकमेकांविषयीं आदरभाव दाखवितां येईल आणि एकमेकांशीं स्नेहभावानें दळणवळण ठेवितां येईल. 'समानशील-व्यसनेषु सख्यम्' या न्यायानें स्नेहसंबंध जडावयाचा ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे. तथापि समव्यवसायी मैत्री जोडावयाची झणजे स्वतंत्र जात किंवा वर्ग बनवावयाचा असा अर्थ होत नाहीं. उदाहरणार्थ, बुद्धिवान् लोक बुद्धिवान् माणसांच्याच सहवासाची किंवा मैत्रीची अपेक्षा करितील; धार्मिक प्रवृत्तीचीं माणसें भगवद्भक्तांच्या सहवासांत आपला काळ घालवितील; परंतु समजा, बुद्धिवान् व धार्मिक माणसांनीं समाजांतील इतर माणसांपेक्षां आपण भिन्न आहों असें समजून उघडपणें भेद दाखविला, आपलीच एक स्वतंत्र जात निर्माण केली, आणि आपल्यापेक्षां ज्ञानानें व गुणांनीं कमी अशा माणसांनां आपल्या घराचा उंबरठा चढण्यास मनाई केली, आणि अशा माणसांशीं दळणवळण घटण्याचे प्रसंग शक्य तितक्या रीतीनें टाळले, तर अशा उद्दाम वृत्तीनें इतरांनां बहिष्कार घालणाऱ्या या अहंमन्यांविरुद्ध सर्व समाज एकदिलानें उठणार नाहीं काय ? बुद्धिसंपन्नता व धर्मपरता यांच्या जोरावर जर निराळी जात करणें शक्य नाहीं, तर केवळ पैसा, उंची कपडे, थाटाचा लवाजमा इत्यादींच्याच पेटीवर स्वतंत्र व श्रेष्ठ जात कशी बनवितां येईल ? समाजांत कांहीं माणसें गरीब व कांहीं श्रीमंत अशीं असणारच; व हा गरीबी-श्रीमंतीचा भेद जसा अपरिहार्य आहे तसा तो एका अर्थी अवश्यहि आहे. आणि तो इतका स्वाभाविक आहे, कीं, व्यक्तिविषयक हक्कांची पायमल्ली केल्याशिवाय तो टाळतां येणार नाहीं. निष्प्रतिबंधपणें मनुष्याला आपल्या अंगच्या शक्तींचा जर उपयोग करूं दिला, तर कांहीं लोक इतरांपेक्षां अधिक श्रीमान् होतील; परंतु केवळ श्रीमंत होणें झणजे श्रेष्ठ होणें नव्हे. झणून श्रीमंती गरिबीच्या योगानें माणसा-माणसांत भेद पडतां कामा नये."

पुणें, २५-६-१२

---

[१९]

[रा. सा. डॉ. विठ्ठल पांडुरंग चव्हाण, एल्. एम्. अॅन्ड एस्., मागसलेल्या वर्गाचे एक पुढारी, मुंबई.]

आर्यधर्मांत वर्णभेद उत्पन्न होण्यास कारण, आर्यलोक प्रत्येक गांव निरनिराळा वसवूं लागले, त्या वेळीं दळणवळणाचे मार्ग मुळींच सोईचे नसल्यामुळें गांवाच्या गरजा गांवांतील लोकांवरच भागविणें भाग पडे, हें होय. त्यामुळें बारा बलुतीं व बारा अलुतीं असे चोवीस धंदे करणारे लोक प्रत्येक गांवीं निर्माण करावे लागले, व त्यांतच पुढें जातीचें स्वरूप आलें. चातुर्वर्ण्य हें आर्य-लोकांनीं धर्माचें स्वरूप देऊन विशिष्ट प्रकारानें आपणांमध्यें स्वभावांच्या गुणधर्मानुसार उत्पन्न केलें. जातिभेद व चातुर्वर्ण्य हीं एकच नव्हत. जातिभेद हा धंद्याचा प्रकार होता व चातुर्वर्ण्य हा सत्तेचा प्रकार होता. जातिभेद हा आर्यधर्माचें कधींहि महत्त्वाचें व आवश्यक अंग नव्हतें. ऐतिहासिक दृष्ट्या जातिभेदामुळेंच आह्मां लोकांची प्रत्येक गोष्टींत पिछेहाट झाली आहे.

जातिबंधनें सक्त रीतीनें अमलांत आणिलीं जात नाहींत, व तशीं आणण्याची सार्वजनिक सक्तीहि नाहीं, इतका हिंदुधर्म लवचीक आहे. कसाहि व कोणत्याहि रीतीनें वागणारा इसम हिंदुधर्मांत टिकला जातो, झणूनच जातिभेद टिकला आहे. धर्ममतें इतकीं अमर्यादित व अनियमित झालीं आहेत, कीं, कोणतीहि गोष्ट हिंदुधर्मांत खपली जाते. ब्राह्मो पद्धतीनें लग्न करावयाच्या वेळीं आपण हिंदू नाहीं, अशी शपथ घेऊनहि पुष्कळ मंडळी ब्राह्मणसमाजांत मोडली जात आहे. जातिभेद टिकावयास ह्या सर्व गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत.

ट्रेझो टॅबलेटस्—अर्धशिशी, मस्तकशूळ, व इतर कसल्याहि मस्तकदुखीवर रामबाण इलाज हाच आहे !

जातिभेद नाहींसा झाल्याशिवाय आर्यभूमीची उन्नति कोणतेहि रीतीनें होणें शक्य नाहीं. जाती ठेवून मत्सर नाहींसा होणेंहि शक्य नाहीं ! भाऊबंदकी मोडणें जेवढें अशक्य, तेवढेंच पोटभेद मोडणें अशक्य आहे. रोटीव्यवहार सार्वत्रिक करण्याचें काम चहायीं दुकानें व इराण्याचीं हॉटेलें उत्तम रीतीनें करीत आहेत. तरी रोटीव्यवहार राजरोस रीतीनें सुरू करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे जातींत अधिक बखेडे उत्पन्न करणें होईल. बेटीव्यवहार सुरू करणें म्हणजे आणखी नवीन जाती निर्माण करण्यासारखें आहे. सद्यःस्थितीकडे पाहतां, जातिभेद मोडण्यास दांडगाईचा प्रयत्न करणें शक्य नाहीं. परिस्थितीच्या जोरानें मात्र जातिबंधनें शिथिल होत आहेत व खात्रीनें होत जातील. परस्परांविषयीं माहिती व शिक्षणप्रसार जसजसा वाढत जाईल, तसतसा जातिभेदाचा तीव्रपणा कमी होईल. तर तूर्त जातींतच राहून योग्य परिस्थिति वेळचे वेळीं जुळवून आणण्याची अवश्य ती खटपट सदोदित करीत राहिलें पाहिजे.

गिरगांव-च्याकरोड, मुंबई, २-६-१२.

---

[२०]

[श्रीयुत विठ्ठल रामजी शिंदे, बी. ए., प्रार्थनासमाजाचे एक पुढारी, मुंबई.]

राजकारण किंवा समाजसुधारणा, देशाभिमान किंवा धर्मवासना, स्वार्थ-मग तो व्यक्तीचा किंवा राष्ट्राचा असो किंवा परोपकार, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें असतां, हिंदुस्थानांत हल्लीं चालू असलेला जातिभेद परिणामीं हितकर आहे, असें दिसणार नाहीं. असें असून जातिभेदाचें मंडण करणें म्हणजे नकळत देशद्रोह करणेंच होय ! इतकेंच नव्हे, तर हल्लींच्या स्थितींत जातिभेदाचें नुसतें शाब्दिक खंडन करून स्वस्थ बसणें म्हणजे दुष्काळांत 'अन्नाची आवश्यकता' या विषयावर नुसतीं व्याख्यानें देण्याप्रमाणें व्यर्थ आहे ! किंबहुना अन्नाचीं मोठीं प्रदर्शनें दाखविण्याप्रमाणें कठोरपणाचें आहे ! ज्याला जितकें शक्य आहे तितकें शांतपणानें व सात्त्विकपणानें करून पाहण्याचा हा विषय आहे.

विजापुर, २३-६-१२.

---

[२१]

[श्रीयुत प्रो. महादेव गणेश डोंगरे, बी. एस्. सी., कोल्हापुर.]

१. कोणत्याहि देशांतला लोकसमाज घेतला तरी त्यांत वर्णभेद हा असावयाचाच. कारण, वर्णभेदाची रचना मूळ श्रमविभागाच्या तत्त्वावर असते. चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः हें गीतावचन आम्हांला पूर्ण मान्य आहे. पण, तें सांगणाऱ्या श्रीकृष्णांचें, आमच्या मतें, खरें स्वरूप काय, या प्रश्नाचा ऊहापोह करण्याचें हें स्थळ नसल्याकारणानें, ती बाजू सोडून देतों.

चातुर्वर्ण्य व जातिभेद या गोष्टी अगदीं भिन्न आहेत. चातुर्वर्ण्य गुणकर्मावर सर्वस्वीं अवलंबून असून, जातिभेद मात्र कुलपरंपरेवर आहे. आनुवंशिक संस्कारास भलतीकडेच महत्त्व दिलें गेल्यापासून कुलपरंपरेचें प्रस्थ माजत जाऊन, वर्णभेदाच्या पोटीं जातिभेदाचें करंटें बालक जन्मास आलें. मनुष्यास कितीहि उत्तम प्रकारचें शिक्षण मिळालें, तरी आनुवंशिक संस्काराची त्याच्यानें कदापि बरोबरी होणार नाहीं, असा समज होत गेल्यामुळें हें जातिभेदाचें खूळ पिकलें.

२. हिंदुधर्माची मुळीं व्याख्याच करणें कठिण आहे. तथापि, आमच्या मतें, जातिभेद हा खऱ्या हिंदुधर्माचें महत्त्वाचें व आवश्यक अंग पूर्वी कधींहि नव्हतें, आतांहि नाहीं, व पुढें कधीकाळींहि असणार नाहीं.

३. ऐतिहासिक दृष्ट्या विचार करतां, जातिभेदाचा हिंदुसमाजावर भयंकर दुष्परिणाम झाला व तो अद्यापि वृद्धि पावत आहे.

४. माझ्या अल्पमतीला असें वाटतें, कीं, हिंदुस्थानांत सर्वच ठिकाणीं जातिभेद सारखाच बद्धमूल नाहीं.

कामिनीया (रजिस्टर्ड) वेगवेगळ्या फुलांच्या मिश्रणाचें अत्तर. वासानें मन प्रफुल्ल करितें.
पाव तोळ्यास १॥. रु. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.
43

काश्मीर पंजाबापेक्षां महाराष्ट्रांत त्याचें महत्त्व अधिक असून, दक्षिणेकडे म्हैसूर, तंजावर वगैरे ठिकाणीं त्याचें फारच उग्र स्वरूप दृगोचर होतें. याचें कारण असें असावें, कीं, आर्यलोकांनीं मूळच्या रानटी लोकांना जिंकून हिंदु केलें, तरी त्यांच्याशीं अन्नव्यवहार व शरीरसंबंध करण्याचा प्रघात पाडण्याची त्यांनीं इच्छा केली नाहीं. यूरोपियन ख्रिस्ती व नेटिव ख्रिस्ती यांच्यामध्यें शरीरसंबंधाच्या बाबतींत तरी असा फरक अद्यापि दिसून येतो. कारण, शरीरसंबंध वंशावर बराच अवलंबून आहे, धर्मावर नाहीं.

आर्य हिंदु एतद्देशीय हिंदूंपासून सामाजिक दृष्ट्या भिन्न राहूं लागल्यामुळेंच जातिभेदाचें तत्त्व समाजांत शिरलें असावें. आणि, आर्यलोकांच्या सहवासानें ज्या नेटिव हिंदूंची सुधारणा होत जाई, ते बाकीच्यांपासून अलग होऊन आपली निराळीच जात करीत गेले असावेत. अशी स्थिति हजारों-हजार वर्षें चालत राहिल्यानें, जातिभेदाच्या वटवृक्षास शेकडों हजारों पारंब्या फुटून त्याचा हा असा भयंकर महावृक्ष होऊन बसला आहे! तात्पर्य, या कारणांमुळेंच जातिभेद भरतखंडामध्यें इतमूल झाला आहे. तो इतका, कीं, तो उपटून टाकण्यास अहर्गणाचे अहर्गण जावे लागतील.

५. नैतिक व औद्योगिक प्रगतीला जातिभेदापासून कांहीं विघ्न येत असेल, असें वाटत नाहीं. आणि जरी कांहीं येत असलें, तरी तें जमेस धरण्यासारखें नसावें; पण सामाजिक प्रगतीच्या मार्गांत मात्र ही धोंड नव्हे, तर मोठा पर्वत आडवा येऊन पडला आहे. आणि, सामाजिक सुधारणा होऊन अनुकूल परिस्थिति आल्याशिवाय राजकीय प्रगति वास्तविक होणेंच नाहीं. कोणी होईल म्हणून म्हणतात; पण तें मला एक कोडें आहे!

६. जेथें भेदभाव तेथेंच मत्सर. तेव्हां जातिभेद असेल त्या ठिकाणीं जातिमत्सराचें वास्तव्य असलेंच पाहिजे. या उभयतांमध्यें कार्यकारणसंबंध आहे. म्हणून, जातिभेद कायम असतां जातिमत्सराला मात्र अर्धचंद्र दाखविण्याची आशा धरणें व्यर्थ होय.

७. जातिभेद ज्या पावलांनीं आला त्याच पावलांनीं मागें गेला पाहिजे. वास्तव, प्रथमतः मुख्य मुख्य जातींतील पोटभेद मोडण्याचा उपक्रम केला पाहिजे. म्हणजे हीच क्रिया चालू होऊन, कालांतरानें सर्व जाति नष्ट होऊन जाण्याचा संभव आहे. आणि, या अति दुष्कर कामांत यश येण्याचा हाच तेवढा मार्ग मला दिसतो.

८. माझ्या मतें, जातिभेदाचें इष्टानिष्टत्व $\frac{3}{4}$ अन्नव्यवहारावर व $\frac{1}{4}$ शरीरसंबंधावर अवलंबून आहे. तेव्हां, सूर्तच्या स्थितींत बेटीव्यवहारापेक्षां रोटीव्यवहाराचीच फार आवश्यकता आहे. दोन्ही व्यवहार एकदम सुरू झाल्यास दुधांत साखर पडेल.

९. जातिभेद मोडण्याची इच्छा करणारांनीं नुसत्या परिस्थितीवर सर्वस्वीं भरंवसा ठेवून बसूं नये. तर इष्ट हेतु सिद्धीस नेण्याकरितां भगीरथ प्रयत्न केले पाहिजेत. पावसाळा असला तरी पेरणीशिवाय पीक होत नाहीं.

१०. जातिभेद अनिष्ट वाटणाऱ्या लोकांपैकीं, ज्यांचें मनोधैर्य विशेषच असेल, ते इतरांची वाट पाहत न बसतां जातिबंधनें एकदम तोडून टाकतील; पण असे सिंहाच्या छातीचे लोक समाजांत फारच थोडे असतात. तथापि, इतकें साहस न दाखविणाऱ्या लोकांच्या हातून जातींतच राहून इष्ट हेतुप्रीत्यर्थ पुष्कळ काम होऊं शकतें. सारांश, दोन्ही प्रकारच्या लोकांची समाजांत आवश्यकता आहे. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे! ही गोष्ट खरी; तरी पुष्कळांनीं वाचाळता केली असतां कांहीं थोड्यांनां क्रिया करून दाखविण्याची स्फूर्ति अधिक होत असावी, असा माझा समज आहे.

कोल्हापुर, २४-६-१२.

---

[२२]

[श्रीयुत काशीनाथ वामन लेले, बार्.]

या विषयासंबंधानें अगदीं थोडक्यांत आपण माझें मत मागितलें आहे. अगदीं थोडक्यांत मत म्हणजे मनुष्यांत जातिभेद अवश्य आहे, हेंच होय. आपणाला सविस्तर मत, शास्त्र व व्यवहार यांचा विचार करून *मी दिल्यास दहावीस पृष्ठें खर्ची घालावीं लागतील,* आणि तितकीं खर्ची घालविण्याची आपल्याला सवड नाहीं. आपणाला आपल्या मासिकाच्या एका पृष्ठांत माझें मत हवें आहे; परंतु एका पृष्ठाचीहि मला

कामिनीया वेल गळून पडणाऱ्या केसांस लाविल्यानें ते फारच मजबूत, भपकेदार आणि पुष्कळ वाटतात.

आवश्यकता दिसत नाहीं. मनुष्यवर्गांमध्यें जातिभेद अवश्य आहे, हें अर्ध्या ओळींतच मीं आपलें मत पुनरपि कळवीत आहें. तथापि, आपणाला एक पृष्ठ खर्ची घालावयाचें असल्यास पुढें मी कांहीं प्यारे लिहीत आहें, त्यांपैकीं ओळीनें आपणांला जितके घेतां येतील तितके घ्यावे व बाकीचे सोडून द्यावे.

१. मनुष्यांमध्यें जातिभेद प्राचीन नाहीं, असें कांहींचें ह्मणणें आहे; परंतु, तें वेदादि शास्त्रग्रंथ व सृष्टिस्वभाव यांना जुळणारें नाहीं. ऋग्वेदादि वेदांमध्यें मनुष्यांतील शेंपन्नास जाति भिन्न भिन्न सांगितल्या आहेत. विराट् पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूंपासून क्षत्रिय, मध्यभागापासून अथवा ऊरूंपासून वैश्य व पायांपासून शूद्र असे चार भिन्न भिन्न वर्ण, भिन्न भिन्न स्थानापासून उत्पन्न झाल्याचें प्रत्येक वेदांतील पुरुषसूक्तांत सांगितलें आहे. आश्वलायन, सांख्यायन, आपस्तंब, सत्यापाढ, बौधायन, भारद्वाज, वाधूल, कात्यायन, लाट्यायन, मानव, पारस्कर इत्यादि सूत्रांचे अनुयायी हे द्विजांतील जातिभेदाचीं अतिप्राचीन उदाहरणें होत. आणि त्याचप्रमाणें जामदग्न्य, वत्स, आर्ष्टिषेण, विद, जैमिनी, भार्गव, शुनक, गौतम, कपि, भारद्वाज, कौंडिण्य, वामदेव, पृषदश्व, ऋक्ष, मुद्गल, विष्णुवृद्ध, नित्युंदन, कण्व, विश्वामित्र, कौशिक, गालव, काश्यप, शांडिल्य, वासिष्ठ, अगस्ति, गार्ग्य, अत्रि, बाभ्रव्य इत्यादि गोत्रेंहि द्विजांच्या पोटजातींचींच उदाहरणें होत. द्विजांमध्यें गोत्रप्रयुक्त व सूत्रप्रयुक्त जातिभेद न मानिला तर विवाहसंस्काराचें संस्कारत्व नाहींसें होईल, आणि शास्त्रदृष्ट्या सर्वच द्विजकुलोत्पन्न चांडाल ठरण्याचा प्रसंग येईल. कर्मानें द्विजेतराचा ब्राह्मण होतो, असें शास्त्रविरुद्ध सांगणारे पुष्कळ आहेत; परंतु या कल्पनासृष्टींतील ब्राह्मणाला शाखा, सूत्र, गोत्र व प्रवर कोणतें द्यावयाचें याचा विचार कोणींहि केलेला नाहीं. याप्रमाणें शास्त्रदृष्ट्या ठरणाऱ्या जातिभेदाचें दिग्दर्शन व तेंहि संक्षेपतः आहे.

२. आतां सृष्टिदृष्ट्या विचार करूं. जरायुज, अंडज, उद्भिज्ज व स्वेदज अशा चार प्राणिकोटि प्राचीन लोकांनीं मुख्य मानिल्या आहेत. आणि या चारी कोटींमध्यें पोटजाति शेंकडों हजारों आहेत. जरायुज ह्मणजे गर्भाशयापासून होणारे प्राणी, अंडज ह्मणजे अंड्यापासून उत्पन्न होणारे प्राणी, उद्भिज्ज ह्मणजे भूमींतून वर येणारे वृक्षादि, व स्वेदज म्हणजे उष्णतेपासून उत्पन्न होणारे. गो, महिष, अश्व, शेळी, मेंढी, श्वान, हरिण, व्याघ्र, सिंह इत्यादि जरायुजांतील प्रत्येक मुख्य जातीमध्यें अनेक पोटजाति आहेत; आणि अश्व व गर्दभ, गौ व महिष, गवा व म्हैस, शेळी व हरिण इत्यादि युग्मांमध्यें शरीरसंबंधहि घडत असतो. राघु, चिमणी, कोंबडे, सर्प, मत्स्य इत्यादि अंडजवर्गांतील प्रत्येक मुख्य जातीमध्यें अनेक पोटजाति आहेत. मोगरा, कमल, कण्हेर, जास्वंदी, गुलाब, कोरांटी, गुलबक्षी, आंबा, फणस, जांभूळ, पेरू, ज्वारी, तांदूळ, इत्यादि उद्भिज्जवर्गांतील प्रत्येक मुख्य जातीमध्यें अनेक पोटजाति आहेत, आणि स्वेदजवर्गांतीलहि गोष्ट तशीच आहे. तेव्हां, मुख्य ज्या चार प्राणिकोटि, त्यांपैकीं प्रत्येक कोटींतील मुख्य जातीमध्यें अनेक पोटजाति अनादिसिद्ध असतांना व जगतांतील व्यवहार चालण्याकरितां त्यांचा अतिशय उपयोग असतांना मनुष्यजातीमध्यें पोटजाति नाहींत किंवा अवश्य नाहींत असें ह्मणणें, हें सृष्टिस्वभावाच्या विरुद्ध आहे.

३. जातिभेदापासून देशाची हानि होत आहे असें कांहींचें ह्मणणें आहे; परंतु, जातिभेद हें हानीचें अथवा नाशाचें कारण असें जर मानिलें, तर गौ, महिष, अश्व, गर्दभ, श्वान, हरिण इत्यादि प्राण्यांमध्यें जातिभेद अनेक असतांना त्या प्राण्यांचा नाश कां होत नाहीं? गाईमध्यें सिंधी, सुरती, काठेवाडी इत्यादि अनेक जाति आहेत; परंतु, अशा रीतीनें जातिभेद गाईमध्यें असल्यामुळें गाईचा नाश होतो असें दृष्ट नाहीं. घोड्यांमध्यें काठेवाडी, नगरी, अरबी, भीमथडी इत्यादि अनेक जाति आहेत. हरिणांमध्यें शेंकडों जाति आहेत. व्याघ्रांमध्यें चित्ता, बिबट्या, पट्टयाचा, निवळ कृष्णवर्ण इत्यादि अनेक जाति आहेत. चिमण्यांमध्येंहि अनेक जाति आहेत; परंतु त्यामुळें त्या वर्गाचा नाश होत नाहीं. राघूंमध्यें पंचरंगी, शुभ्र, पिंवळ्या चोंचीचे, काळ्या चोंचीचे इत्यादि अनेक जाति आहेत; परंतु जातिभेदामुळें हा पक्षिवर्ग नाहींसा होत नाहीं. तांदुळांमध्यें हजार जाति आहेत; परंतु, इतका

अशक्त स्त्रियांस वॉटरबरीचें कॉडलिव्हर तेल घ्या. घेण्यास स्वादिष्ट.
टॉमसन कंपनी, कालबादेवी रोड, मुंबई.

जातिभेद असल्यामुळें तांदुळ या जातीला कीड लागूं लागली आहे असें नाहीं. ज्वारीमध्यें अग्रधान्य व पश्चाद्धान्य अशा मुख्य दोन जाति आहेत; आणि या दोन जातींतील प्रत्येक मुख्य जातीमध्यें अनेक पोटजाति आहेत; परंतु, हा जातिभेद त्यांच्या नाशाला कारण होत नाहीं. आम्रवृक्षांमध्यें हजारों जाति आहेत, परंतु त्या नाशाचें कारण ठरलेल्या नाहींत. सारांश, जातिभेद हा चतुर्विध भूतसृष्टींतील प्रत्येक प्राणिवर्गामध्यें असतांना जर त्या प्राणिवर्गाच्या नाशाला कारण होत नाहीं, तर मनुष्यांच्याच नाशाला तो कारण होतो, असें म्हणणें व्यर्थ आहे. जातिभेद नाशाला कारण न होतां अनेक जातींचें परस्परमिश्रण हानिकारक असतें, असा मात्र अनुभव आहे. खडकी, मांजरी वगैरे ठिकाणीं सरकारी दुभतीं गुरें आहेत, व या गुरांमध्यें सुरती, सिंधी, काठेवाडी इत्यादि जातींच्या गाई आहेत. एका जातीची गाय व एका जातीला बैल यांच्या समागमापासून उत्पन्न होणारी संतति गुणहीन निपजते, असा अनुभव आहे. इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांमध्यें मेंटरांच्या दोन वेगळ्या जाति आहेत. या दोन जातींच्या मिश्रणापासून संतति कशी काय निष्पन्न होते, याचा अनुभव तिकडे पाहण्यांत आला आहे व तोहि वरीलप्रमाणेंच ठरला आहे. मेंढरांची व्यभिचारजन्य संतति इंग्लंडांतील मेंढरांसारखी तरतरीतहि निपजत नाहीं, व फ्रान्सांतील मेंढरांसारखीं बळकटहि निपजत नाहीं. जातिभेद जर नसेल तर जगतांतील व्यवहार सुसावह होणार नाहींत. मर्कट आणि वानर यांमध्यें शरीरसंबंध होणें अशक्य नाहीं; परंतु, दोन जाति भिन्न भिन्न आहेत

वाई, २७-६-१२.

आणि म्हणूनच त्यांचें रक्षण होत आहे. तृणांचा जर भारा बांधावयाचा झाला तर वेगळ्यावेगळ्या पेंढ्या प्रथम बांधाव्या लागतात आणि नंतर त्या पेंढ्यांचा भारा बांधावा लागत असतो. लहान लहान पेंढ्या प्रथम न बांधितां जर कोणी गवताचा भारा बांधूं लागेल, तर तो बांधणें दुर्घट होईल; आणि पेंढ्या न बांधितां गवताची गंज कोणी लाविल्यास सामान्य वाऱ्यानेंहि ती उडून जाऊन त्रासोमाळ होईल. यावरून, सर्व राष्ट्रं एकत्र व्हावीं अशी इच्छा असल्यास गवताच्या गंजींतील अथवा भाऱ्यांतील वेगळ्या वेगळ्या पेंढ्याप्रमाणें पोटजातींतील वेगळ्या वेगळ्या पेंढ्या असणें अवश्य आहे.

४. जातिभेद व जातिधर्म या गोष्टी राज्यशकट चालण्याकरितां राजेलोकांनांहि कृत्रिम कराव्या लागत असतात. युरोपियन, हिंदु, मुसलमान, शीख वगैरेंच्या पलटणी वेगळ्या वेगळ्या असतात. एका पलटणींत अथवा तुकडींत सर्व जातींच्या लोकांचा समावेश नसतो. एका पलटणींत जरी हजार अकराशें लोक असले, तरी त्या हजार अकराशें लोकांमध्यें कृत्रिम जातिभेद दहापांच केलेले असतात. दहावारा लोकांची तुकडी असते व तितक्याच लोकांवर एकाचा अधिकार असतो. अशा पांचचार तुकड्यांवर दुसऱ्या एकाचा अधिकार असतो व हाच क्रम उत्तरोत्तर पांचचार पायऱ्या असतो.

एकेकर प्राणिवर्गांकडे लक्ष्य दिल्यास प्रत्येक जातीनें आपआपला वेगळा संघ करून राहणें हें रक्षणाचें मुख्य साधन दिसतें. असतु. हा विषय बराच विस्तार लिहिण्यासारखा आहे.

---

[२३]

[श्रीयुत प्रो. नीलकंठ सदाशिव ताकवाव, एम्. ए., मुंबई.]

१. अनेक द्रव्यांचे थर एकावर एक सांचून भूपृष्ठाच्या निरनिराळ्या भागांची रचना झाली, तद्वत् अनेक राष्ट्रसंघ, धर्मपंथ व मानवजातिवंश (Races) वगैरेंचा मिलाफ होऊन, आजच्या हिंदुसमाजांत त्यांचा समावेश झालेला दिसतो. आज आपणांस अशा कांहीं जाति पहावयास सांपडतील, की, त्या जातिरूपानें नव्हे, तर 'राष्ट्र' रूपानें किंवा इतर कोणत्यातरी रूपानें, स्मृतिकालीन वर्णव्यवस्था अंमलांत येण्याच्या पूर्वीपासून स्वतंत्र संघ (Tribes) करून राहात असल्या पाहिजेत. सध्यांच्या प्रत्येक जाती कालचक्रानें नामशेष झालेल्या राष्ट्रसंघांचे व विशिष्ट वंशांतील लोकसमूहांचे अवशिष्ट राहिलेले भाग आहेत. चातुर्वर्ण्य-

क्षयरोग व दमा यांवर व्हॉटरबरीचें कॉडलिव्हर तेल वलाद. पिण्यास स्वादिष्ट.
टॉमसन कंपनी. काळबादेवी रोड. मुंबई.

व्यवस्था व्यवहारांत आली त्या वेळेस व्यवसायविविधतेवर तिची घटना झाली; तरी चार जाडे वर्ग पाहून वरील प्रकारच्या निरनिराळ्या भेदांचें नियमन करण्याचा तो एक प्रकार झाला; परंतु या वर्णव्यवस्थेंतील कांहीं स्वाभाविक दोषांमुळें हें नियमनाचें काम बाजूस राहून, या व्यवस्थेनें नवीन जाति, उपजाति उत्पन्न होऊं लागल्या. एवढेंच नव्हे, तर पूर्वीचे भेदाभेद इतके वज्रलेप होऊन गेले, कीं, परस्परांतील रोटीबेटीव्यवहारासंबंधानें जी थोडीबहुत मुभा होती, ती नाहींशी झाली. व पुढें होणाऱ्या राजकीय व धार्मिक उलाढाली या हिंदुसमाजांतील असंख्य जातींची संख्या वाढविण्यास कारणीभूत झाल्या.

२. जातिभेद हा प्रचलित हिंदुधर्माचें महत्त्वाचें अंग आहे, असा साधारण समज असला, तरी अनेक तुकडे होऊन गलितगात्र झालेल्या हिंदुसमाजास एकजीव करण्याचे प्रयत्न धर्मविहित मानण्यास विचारी लोक तयार होणार नाहींत.

३. ऐतिहासिक दृष्ट्या विचार करितां, जातिभेदाचे इष्ट व अनिष्ट—दोनहि प्रकारचे—परिणाम हिंदुसमाजावर झालेले सांपडतील; परंतु एकंदरीनें अनिष्ट परिणामांचें पारडें वरेंच जड जाईल, असें मला वाटतें. एकाच गोष्टीचा मी येथें उल्लेख करितों. आपल्यांतील अतिशूद्रांची स्थिति किती हीन आहे हें आज आपणांस पक्कें कळून चुकलेंच आहे, व त्यांच्यासंबंधीं जी जुलुमगिरीची पद्धति हिंदुसमाजानें स्वीकारिली होती, तिचें समर्थन मुळींच करितां येणार नाहीं. तथापि रोमन साम्राज्यांत व इतर प्राचीन राष्ट्रांत जें गुलामगिरीचें बंड माजलें होतें व त्यापेक्षांहि कांकणभर जास्त जी अगदीं अलीकडे अमेरिकेंतील निग्रोंची छळणूक झाली, तसली भयंकर स्थिति अनेक परचक्रें आपल्या देशावर येऊनहि हिंदुसमाजांत उत्पन्न झाली नाहीं व येथील दासवर्गाला व्यक्तिस्वातंत्र्याच्या बऱ्याच हक्कांचा उपभोग मिळाला, याचें श्रेय बऱ्याच अंशीं वर्णव्यवस्थेस दिलें पाहिजे.

मुंबई, २७-६-१२.

४. आपले जातिधर्म व वडिलांपासून चालत आलेले कुळाचार हे सद्धर्मपरिपालनाचें एक मुख्य अंग आहे, या समजुतीनें जातिभेदास फार चिकाटी आली. शिवाय, बहुतेक ठिकाणच्या ग्रामसंस्था—Village Communities—ज्ञातिसंस्था किंवा पंचाइती-सारख्याच असत, निदान अडाणी लोकांत तसें बहुधा असे. परचक्रांच्या वेळीं सत्ताधाऱ्यांकडून शांतता राखण्याचें, किंवा शत्रूस तोंड देण्याचें काम होईना, तेव्हां तें ग्रामसंस्थांवर येऊन पडे. या ग्रामसंस्था व पंचाइती छोटेखानी प्रजासत्ताक राज्यासारख्या होत्या. त्यांचा आत्मसंरक्षणाच्या कामीं चांगला अनुभव आल्यानें, ग्रामभेद तसेच जातिभेद बळावत गेले.

५. विशेष व्यापक स्वरूपाची संघटनात्मक शक्ति ज्या कार्यास अवश्य आहे, तेथें निरनिराळ्या जातींनीं जरी विरोध केला नाहीं, तरी कामाची प्रगति फार मंद गतीनें होते.

६. जातिभेद कायम ठेवून जातिमत्सरास बळी न पडणें हें वरेंच आत्मसंयमनाचें काम आहे, व तसें करणें मूठभर निश्चयी व करारी बाण्याच्या व्यक्तींनां साध्य झालें, तरी मोठ्या जनसमूहास शक्य नाहीं! असंतोषाचीं कारणें जेथें आहेत, तेथें मत्सर असावयाचाच. अल्पसंख्याक व आपणांतच संतुष्टपणें रहाणाऱ्या जातींत एवढा मत्सर दिसावयाचा नाहीं.

७. पोटभेद मोडणें, व तेणेंकरून अनुकूल लोकमत व लोकाचार उत्पन्न करणें, याच राजरस्त्याचा आपणांस अवलंब केला पाहिजे; मात्र एकाच्या जागीं दोन जाति उपस्थित होणार नाहींत, याविषयीं साक्षप असलें पाहिजे.

८. रोटीव्यवहाराचा उपक्रम तर अवश्य झाला पाहिजेच; परंतु समान दर्जाच्या व सांपत्तिक स्थितीच्या जातींत बेटीव्यवहार होणेंहि इष्ट आहे.

९. प्रयत्नावांचून जातिभेद कमी होईल असें मला वाटत नाहीं.

१०. जातीमध्येंच राहून जातिभेदाचे अनिष्ट प्रकार काढून टाकण्यास झटणें श्रेयस्कर होईल.

डेन्टीलाईन—दुखत असलेल्या दांताच्या जागीं कापसांत भिजवून लावतांच दुखणें बंद.
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

चतुर उत्तरें.

संभाषणाच्या कलेची आपल्या लोकांत आजपर्यंत हेळसांडच करीत आले आहेत. त्यांत इंग्रजीचा आरंभ झाल्यापासून भाषाशुद्धीकडे दुर्लक्ष्यच होत असतें.

संभाषण करण्यांत कुशल असलेला मनुष्य आपणाकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतो. अशा मनुष्याचें भाषण ऐकत असतां वेळ कसा निघून जातो, हें समजत देखील नाहीं.

संभाषणांत चातुर्य दाखविण्याचे अनेक प्रकार आहेत. त्यांत समयोचित उत्तर देणें हा एक प्रकार आहे. समयोचित उत्तरानें ऐकणाराची करमणूक होऊन त्याला एक प्रकारचा आनंद वाटतो.

चतुर उत्तरप्रत्युत्तराचे प्रकार सभांतून व न्यायकचेऱ्यांतून वारंवार ऐकावयास मिळतात. अथेन्स, रोम किंवा इंग्लंडसारख्या देशांत लोकांच्या अगर प्रतिनिधींच्या सभेंत चतुर पुरुषांची खडाजंगी होऊन चतुर उत्तरें ऐकण्याचे प्रसंग पुष्कळ वेळ आलेले आहेत. अशीं उत्तरें नमूद करण्यांत येऊन त्यांनां ग्रंथांत स्थान मिळतें. आपल्या देशांत विरवल व नानाफडणविस यांच्या नांवावर कित्येक चतुर वाक्यें आजपर्यंत खपत आलीं आहेत.

विलायतेंत प्रतिनिधींची निवड होण्याच्या वेळीं पुष्कळ भाषणें होत असतात. ही वेळ एकमेकांस हाणून पाडावयाची असल्यामुळें आपल्या अंगचें चातुर्य दाखविण्याची संधि वक्तयांस मुबलक मिळते. अशाच एका प्रसंगीं पामर्स्टन भाषण करीत होते. हें भाषण ऐकावयास एक लहान मुलगा आला होता. तो गर्दीतून पुढें होऊन पामर्स्टन यांनां ह्मणाला " माझ्या मनांतून आपल्याला कांहीं प्रश्न विचारावयाचे आहेत. मेहरबानी करून या प्रश्नांचीं उत्तरें द्याल काय ? "

पामर्स्टननें उत्तर केलें " काय विचारावयाचें असेल तें खुशाल विचारा, माझ्या अल्प समजुतीप्रमाणें मी उत्तरें देईन. "

त्या मुलाला राजकीय विषयांचा नाद असल्यामुळें प्रचलित राजकीय बाबतींतील एकेका विषयावर पामर्स्टनचें मत काय आहे, ह्मणून तो विचारूं लागला. पामर्स्टननें आपण जणुं एकाद्या पोक्त मनुष्यानें विचारलेल्या प्रश्नांसच उत्तरें देत आहों, अशा रीतीनें त्याला जवाब दिले. मुलाचे प्रश्न संपले असें पाहून पामर्स्टननें त्याला ह्मटलें " माझ्या छोट्या मित्रा ! तूं विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचें मीं उत्तर दिलें. आतां माझ्या एका प्रश्नाचें तूं उत्तर देशील काय ? "

त्या मुलाला फार हुशारल्याप्रमाणें वाटून छाती पुढें काढून तो ह्मणाला " होय, तुह्माला काय विचारायचें असेल तें विचारा, मी आपणांस उत्तर देतों. "

पामर्स्टननें हळूच विचारलें " तर मग सांग पाहूं, तूं येथें आला आहेस हें तुझ्या आईला ठाऊक आहे काय ?"

हा प्रश्न ऐकतांच जमलेल्या मंडळींत एकच हंशा पिकला व त्या मुलाला आपण येथून केव्हां एकदां निसटून जातों, असें झालें !

प्रसिद्ध लेखक डॉक्टर जॉन्सन याची समर्पक उत्तरें देण्याविषयीं ख्याति असे.

कामिनीया बोके (रजिस्टर्ड) अतिशय टिकाऊ आणि सुवासिक पाव तोळा. बाटलीस रु. १॥. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

त्याचा भक्त बॉस्वेल यानें जॉन्सनचें चरित्र लिहिलें आहे, त्यांत अशा अनेक उत्तरांचा संग्रह केलेला आहे.

जॉन्सननें इंग्रजी भाषेचा कोश प्रसिद्ध केल्यानंतर कांहीं दिवसांनीं एक विदुषी या कोशासंबंधानें त्याजवळ बोलतांना म्हणाली "या कोशांत पुष्कळ अश्लील शब्द आहेत."

आपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ एक अश्लील शब्द कोशांतून काढून ती जॉन्सनला दाखवूं लागली.

जॉन्सन तिला म्हणाला "कोशांत जे चांगले शब्द पाहूं जातील त्यांनां चांगले शब्द मिळतील. आणि वाईट शब्द पाहूं जातील त्यांनां वाईट शब्द मिळतील. तुम्ही अश्लील शब्द शोधायला गेलां असाल, तेव्हां तुम्हांला अश्लील शब्द मिळाले !"

जॉन्सनच्या मित्रमंडळांत बर्कचीहि गणना असे. बर्क हा नामांकित वक्ता होता, परंतु थोडक्यांत खुबीदार उत्तर देण्याची कला त्याला साधलेली नव्हती. गोल्डस्मिथ हा चांगला लेखक होता, परंतु संभाषण करण्यांत त्याचें चातुर्य दिसून येत नसे. अनोळखी मनुष्यावर छाप बसविण्याची कला त्याला मुळींच साधत नसे.

न्यायकोर्टीत चातुर्य दाखविण्याचे प्रसंग तर हरघडी येत असतात, आणि वकील व न्यायाधीश यांचा जन्मच वादविवाद करण्यांत गेला असल्यामुळें तेथें चकमकी वऱ्याच दृष्टीस पडतात.

विलायतेंत एक प्रसिद्ध न्यायाधीश होऊन गेला. कायद्याच्या ज्ञानासंबंधानें त्याची फार प्रख्याती होती. हा कायदेपंडित आरंभीं बॅरिस्टर म्हणून एका कोर्टांत काम करीत असतां जमिनीच्या वतनासंबंधीं अति कठिण प्रश्नांची चर्चा करूं लागला. न्यायाधीशास या गहन विषयाचें ज्ञान तितकेंच असल्यामुळें त्या भाषणांतील मुद्दे समजेनात; परंतु आपलें श्रेष्ठत्व तर स्थापित केलें पाहिजे म्हणून मोठ्या आढ्यतेनें न्यायाधीश म्हणाला " तुम्ही म्हणतां तसा कायदा नाहीं. तसा कायदा असला तर माझीं सारीं कायद्याचीं पुस्तकें मी जाळून टाकीन. "

यावर त्या तरुण बॅरिस्टरानें शांतपणानें उत्तर दिलें "जाळून टाकण्यापूर्वी एकदां वाचून तर पहा ! "

अशीं उत्तरें नमूद करून ठेवण्याची संवय आपल्या इकडे नसल्यामुळें तीं स्मरणांतून लवकर नाहींशीं होतात. यांपैकीं एक किरकोळ भाषण येथें दिलें असतां चालेल.

एकदां एका वकीलानें कोर्टांत आपल्या शिपायास आपली चंची आणावयास सांगितलें न्यायाधिशानें तें ऐकून वकीलास म्हटलें. " तुम्ही कोर्टाची बेअदबी करतां ! कोर्टांत पान खाणें शिष्टाचाराविरुद्ध आहे. "

वकील म्हणाला "कोर्टांत पान खाण्याइतकें शिष्टाचाराविरुद्ध कृत्य मी करीन असें ध्वनित करून कोर्टच माझी बेअदबी करीत आहे ! कोर्टांत फक्त चंची आणल्यानेंच शिष्टाचाराचा भंग होत नाहीं. "

सार्वजनिक ठिकाणीं उत्तरप्रत्युत्तरांत जशी मजा पहावयास मिळते, तशी घरीं स्वयंपाकघरांतहि पहावयास मिळते; परंतु सार्वजनिक जागीं झडलेल्या चकमकी जर आपणांस पुस्तकांत नमुद केलेल्या आढळत नाहींत, तर स्वयंपाकघरांतील गोष्टी बाहेर याव्या कशा ?

स्प्रिंग जवेल (रजिस्टर्ड) वसंतऋतूंतील चांफ्याच्या फुलांपासून बनविलेलें. वास अत्यंत मधुर, अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. मुंबई.

हृदयशारदेस.

कवि—'गोविंदाग्रज.'

[कोणी कवीनें आपल्या कवितेस 'शब्दशारदा' व प्रणयिनीस 'हृदयशारदा' अशीं नांवें देऊन हें गाणें लाटलें आहे.]

हृदयशारदे ! या कवनाचे बोल ऐक माझे !
सरस्वती शब्दाची माझी तुजला जरि लाजे.
तुझ्या मनाचा, तुझ्या जिवाचा एक एक बोल,
मम कवितेच्या जादूलागीं ठरयीलच फोल !
नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी,
नाचत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हां ताजीं.
तिच्या गुणांवर कुणा कुणाचे जीव गुंग कांहीं,
तरि जादूनें जादूगारच काय फसुनि जाई ?
जरी शिरावर कुणीं बांधिला अमोल शिरपेंच,
दिसतो का तो ज्याचा त्याला ? स्तुतिचेंही हेंच !
शब्दांचा बाजार बदलतां; जीवाची चेट
नको नको हें; उघड आपुल्या प्रेमाची पेंठ !
प्रेमाचा जिवलगे ! जिव्हाळा करितां रसभरती
भिसरांगि हृत्तरंग रंगति उचंबळुनि नियती !
शब्दचित्र परि काढूं जातां त्यांचें उल्हासें,
रंग तयांचे उडुनी जाती निश्वासासरसे.
जाणें जें दिसतें, मनें जें वसतें, हृदयीं जें सलतें,
तें बोलावें तंव हें बहतें भलत्याचेंसलतें !
रस तारांचा नभीं पाझरे, भूवर नच येई;
शुष्क होउनी खालीं येतां शीतलता राही.
मूर्तरसाच्या कैक अप्सरा गगनगीत गाती;
नाद विरे परि नभींच; उतरे वारा भूवरती.
हा मोत्यांचा सडा घातला वरतीं आकाशीं,
चमक तेवढी येते त्याची या भूमीपाशीं !
आशीर्वचनीं शब्द तेवढे धांवुनि येतात;
स्फूर्तिदायिनी इच्छा उरते तशीच हृदयांत.
तींच दशा मम होते तुजला जावें जों गाया,
हृदयभावना मूर्तिमती तूं ! कविता तव छाया !
सुकला चुकला जीव आजवर तुजवांचुनि फिरतां,
हृदयशारदे ! शब्द-शारदा नको मला आतां !
धरी सांवरुनि कविता पदरा हृदयाचा तोल !
मरत्या जीवा परी बांधवी तुझा प्रणयगोल !

प्रीतीचीं पावलें उमटलीं जीं या हृदयांत,
जीवस्वामिनि ! किती दिवस वद यसूं तींच गात ?
प्रणयतटिनि ! तूं दूर न राहीं–करपलाच जीव;
हृदयसाक्षिणि ! प्राणरक्षिणी ! न का चेत कींव ?
तव वसतीच्या दिशेवरी जो तारा लखलखते,
नेत्रयुग्म हें तीवर खिळतें, नच कधिंही हलतें !
तव हास्याचा नाद नाचला ज्या वाऱ्यावरती,
जीव कोंडला वांचविण्याचें बळ त्याच्या हातीं.
अनंत तारा, अखंड वारा, नच माझ्या कामीं !
माझी तारा, माझा वारा, तुझ्या प्रेमधामीं !
वस्तुवस्तुवर नेत्र बढविती तव मूर्तिच एक !
जग तारायां जणूं प्रीतिचा स्वन्मय अभिषेक !
नामाचा जप तुझ्यासारखा; अश्रूंची रमणी–
प्रतिक्षणीं प्रतिनामें वाढे तिच्यांत एक मणी !
ध्यास मांडिला तुझा असा हा असह्य विरहानें,
कधिं येशिल, कधिं येशिल मजला हृदयीं प्रेमानें !
प्रीतीनें रंगलीं पावलें हर्षाटिं नाचीव;
प्रेमामृत पाजुनी देवते ! भक्ता वांचीव !
प्रेमदृष्टिनें प्रिये ! मिळवितां डोळ्याला डोळा,
पंचप्राणहि होतिल माझे नयनीं क्षणिं गोळा !
हृदयीं जडवीं, चरणीं तुडवीं, मग त्यां ओदुनियां,
सोक्षमोक्ष करिं, तारमार वा, प्रेमाची दुनिया !
हृदयशारदे ! दर्शन परि दे, हृदयीं दे स्थान,
वक्षःस्थलिं तव पडतां पडतां येऊं दे मरण !
या प्रेमाचीं, तुझ्या यशाचीं, गाणीं या नाहीं
गाइन, जाइन [illegible] आणीत तीं तुजसह इंद्रसदीं.
प्रीतिदेविच्या पायिं कुरवला कवि घुंगुरवाळा !
प्रीतिदेवता जरा डोलतां कवि करि गानाला !
त्या प्रीतीला कविनें पुसतां "गाऊं काय गहे ?"
प्रीति म्हणे "जा तिलाच गाई जी तव हृदयीं जडे!"
हृदया, नयनां, ध्याना, गाना जिनें जिंकिलेंस,
'गोविंदाग्रज' गाइल त्या तुज हृदयशारदेस !

लहान मुलांस अशक्ततेवर बॉटरबरीचें कॉडलिव्हर तेल उत्तम खादिष्ट आहे. मुलें हौसेनें पितील. टॉमसनकंपनी. कालबादेवी रोड, मुंबई.

वाचन.

श्रीयुत गणेश सदाशिव भाटे, एम्.ए.

लेखांक १ ला.

चोहींकडे चळवळ सुरू आहे. ज्ञातींच्या परिषदा भरत आहेत; पूर्वी कधीं लक्ष न दिलेल्या प्रश्नांचा खल होऊं लागला आहे; स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, विधवांची उन्नति, रोटीबेटीव्यवहार, अंत्यजोद्धार, परदेशगमन, संक्षेपानें सांगावयाचें म्हणजे, समता व स्वातंत्र्य या अस्पृश्य मानलेल्या कल्पना आपल्या समाजांत पुन्हां डोकावूं लागल्यामुळें भ्रष्टाचार, सबगोलंकार, इत्यादि ब्रह्मवृंदांच्या आरोळ्या फारशा ऐकूं येत नाहींत. कधीं काळीं ऐकूं आल्याच तर कलमबहादुरांचे बाहु स्फुरण पावत नाहींत. पाश्चिमात्यांच्या संसर्गामुळें शास्त्रें, पुराणें, यांचें मंथन होऊं लागलें आहे; जुनीं बंधनें शिथिल झाल्यामुळें आचारविचारांत गोंधळ माजला आहे; जो तो आपापल्यापरी उपाय योजण्याचा प्रयत्न करीत आहे व स्वतःच्या कुटुंबालाच नव्हे तर समाजाला वळण लावण्याची उमेद अथवा हांव बाळगणारे, व लिहिण्याची हौस असलेले लोक, स्वतःचे उपाय लेखांचे द्वारें प्रगट करीत आहेत; राजकारण आणि वाङ्मय यांच्याशीं असलेला लेखकांचा एकनिष्ठ संबंध सुटून नित्य व्यवहाराशीं जिव्हाळ्याचा संबंध लागल्यामुळें वाचकवर्ग वाढला आहे; उत्साह वाढला आहे; उत्साहामुळें आवड वाढली आहे व लेखकाचा एक स्वतंत्र धंदाच निघाला आहे. लेखक हे केवळ मनोरंजन करणारे समाजसेवक ही कल्पना मावळत असून ते समाजाचे शिक्षक किंबहुना धुरीण होत आहेत, व त्यांच्या रामबाण उपायांचा वर्षाव सारखा होत असल्यामुळें बावरण्याचा संभव वाढून वाचकांवर विशेष जबाबदारी पडली आहे. गहन पण व्यवहाराला उपयोगी अशा प्रश्नांचा ऊहापोह सुरू असतांना लेखकानें नेहमीं पुरता अभ्यास करून, मनन करून, जबाबदारी ओळखून, लेख लिहावेत हें सांगणें जितकें सोपें आहे, तितकें करणें सोपें नाहीं. रोज पुढें येणाऱ्या प्रश्नांवर, मग ते कितीहि कठीण असोत, लोकमताला वळण लावण्याचा धंदा करणारांनां मत देणें अवश्य आहे. पण वाचकांची अशी स्थिति नाहीं. त्यांनां विचार करण्यास अवकाश मिळतो. निरनिराळ्या विद्वानांनीं लिहिलेले लेख वाचून मग स्वतःची दिशा ठरविणें शक्य असतें. प्रयत्न मात्र केला पाहिजे व वाचन पद्धतशीर झालें पाहिजे. कारण, अव्यवस्थित वाचनापेक्षां मुळींच न वाचलें तरी एक पक्षीं पुरवलें, असें वाटण्याचा बरेच वेळां प्रसंग येतो. वेळ घालविण्याकरितां काहींतरी वाचावयाचें, इतकीच उमेद वाचकांची असली, तर लेखकहि विशेष तसदी न घेतां काहींतरी लिहील, पांढऱ्यावर काळें करील. कारण, इतर धंदेवाल्यांप्रमाणें वाचकांनां आवडेल तसें, किंवा फारतर विशेष कठिण किंवा कडू न वाटेल असें लिहिणें लेखकाला भाग आहे. पारखणारा न मिळाल्यास चांगल्या लेखांची किंमतहि बेताचीच होणार, हें उघड आहे. म्हणून वाचक चिकित्साखोर पाहिजेत, थोडक्यानें समाधान न पावणारे पाहिजेत, विषयांचा पुरा खल करविणारे, स्वतःचे विचार स्वतःचे अंतरंगांतच न सांचविणारे पाहिजेत. वाचक मार्मिक नसल्यास प्रश्नांचा खल न होतां चुथडा होतो, यांत नवल कोणतें! जसे वाचक तसे लेखक. एकांत मार्मिकपणा आला, कीं, दुसऱ्यांतहि येईल, लेखकांनां हुरूप येईल, धंद्यांत शिरण्यापूर्वी ते बरीच तयारी करतील. विशेषतः या लोकमत तयार करणाऱ्यांची व पुढाऱ्यांची, अज्ञ जनांनां उपदेशामृत पाजण्याची नेहमींची आवडती पद्धत जाऊन सर्वांनां समजेल अशी वादविवादाची पद्धत सुरू होईल. स्वतःची जबाबदारी पुढाऱ्यांच्या वारंवार प्रत्ययास येईल, विषयांचा योग्य ऊहापोह होऊन लोकशिक्षणांत भर पडेल. सारांश, कठिण विषयावर योग्य मत देण्यास, किंवा त्याविषयीं मत ठरविण्यास जी लायकी, जी पूर्वतयारी लागते, ती व्यवस्थित, कष्टमय, वाचनाशिवाय होणें अशक्य आहे. म्हणून ज्यांनां इतके कष्ट करावयाचे असतील

प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका अशक्तांस सशक्त व जबान बनवून त्यांच्या अंगांत नवीन जोर उत्पन्न करतात. वापरून पहा।

त्यांनां थोडीबहुत मदत व्हावी, पद्धतशीर वाचनाची संवय लागण्यास किती प्रयास पडतात त्याची कल्पना यावी, लेखकाच्या धंद्यास लागणाऱ्या सामुग्रीचा योग्य विचार व्हावा, या हेतूनें बऱ्याच वर्षांच्या अनुभवानें सुचलेले विचार मनोरंजनाच्या वाचकांकरितां सादर करण्याचा हा प्रयत्न आहे.

व्यासंग.

वाचन हा शब्द दोन अर्थी वापरतात. एक वाचनाची क्रिया व दुसरा विद्याव्यासंग. अमक्या गृहस्थाचें वाचन जबर आहे म्हटलें म्हणजे तो मोठ्यानें वाचतो, अशा अर्थ न होतां त्याचा परिश्रम सतत आहे, असाच होतो. या लेखांत वाचनाच्या क्रियेविषयीं, ध्वनींच्या आरोहावरोहाविषयीं लिहिण्याचा माझा उद्देश नाहीं. 'शुद्ध कसें लिहावें व शुद्ध कसें बोलावें हें व्याकरण शिकल्यानें समजतें' असें म्हणतात. तसेंच शाळेंतील पंतोजीच्या कवाइतीप्रमाणें एक सुरांत आवाज किती चढवावा व किती उतरवावा म्हणजे मस्तकशूल उत्पन्न होऊन अर्थाचा साक्षात्कार होतो, हें अचूक सांगण्यास कदाचित् गायनशास्त्राचें अंग वाढवावें लागेल. आवेश, शोक, क्षोभ, निराशा, गांभीर्य, मार्दव, प्रेम इत्यादि मनोविकार श्रोत्यांचे मनावर ठसविण्यास मानस व नाट्य या शास्त्रांशीं परिचय करण्याची पाळी येईल. कारण, समूहापुढें वाचन किंवा भाषण यांत फारसा फरक नाहीं. पण मनोरंजनांतील जागा व विशेषतः वाचकांचा धीर, यांनां मर्यादा असल्यामुळें फक्त वाचन म्हणजे विद्याव्यासंग याविषयीं लिहिण्याचा विचार आहे.

विद्येचा व्यासंग म्हणजे विषयांचा व्यासंग, ही गोष्ट उघड आहे. व्यासंगाचा विचार करितांना भाषेचा प्रश्न विशेष महत्त्वाचा नाहीं. कोणतीहि भाषा घेतली तरी अभ्यास करितांना सर्वत्र लागू पडणारी अशींच तत्त्वें अंगिकारावीं लागतात. पण आम्ही सर्वजण इंग्रजी भाषेच्या द्वारें विद्यादान घेत असल्यामुळें विशेषतः त्या वाङ्मयास अनुसरून हा लेख आहे.

परभाषेच्या द्वारें आम्ही शिकत असल्यामुळें आमच्या वाचनांत दोन निराळ्या प्रकारच्या अडचणी येतात. पहिली भाषेची. ही अडचण स्वभाषेंत नसते. जोंपर्यंत असते तोंपर्यंत विद्याव्यासंगास सुरुवात झाली, असें म्हणतां येत नाहीं. म्हणूनच विश्वविद्यालयांतील अभ्यासक्रमास भावी परिश्रमाची पूर्वतयारी समजण्यांत येते व चरितार्थासच उपयोगीं पडणाऱ्या विषयांशिवाय अन्य विषयांची ओळख करून दिली जाते. परभाषेमुळें युनिव्हर्सिटींतला अभ्यास संपला तरी भाषेची अडचण दूर होत नाहीं. इतकेंच नाहीं, तर भाषेचेंच ज्ञान अपुरें राहिल्यामुळें विचारांची योग्य वाढ होत नाहीं; ते कच्चे राहतात; एककल्लीपणाचा संभव जास्त वाढतो; व्यासंग अधिक कठीण होतो व वाचनांत येणाऱ्या दुसऱ्या अडचणींत भर पडते. ही अडचण म्हणजे निरनिराळ्या विषयांचा पूर्ण अभ्यास ही होय. स्वभाषेत जरी वाचले, तरी विषय सुगम होत नाहींत. विषय सुगम किंवा कठिण वाटणें हें ज्या त्या विषयावर अवलंबून असतें, हें जरी खरें असलें, तरी परभाषेमुळें सोपा विषय देखील कठिण वाटतो, हें बऱ्याच जणांच्या अनुभवास आलें असेल. मग नवे नवे विचार, परिचित कल्पनांनां येणारीं नवी नवीं रूपें, कधीं न ऐकिलेलीं शास्त्रें, अर्वाचीन शोधपद्धति व शास्त्रेंपुराणें, यांनीं सनातन ठरविलेल्या आचारविचारांवर त्यांचा आघात, इत्यादि गोष्टींचें वरोवर आकलन होण्यास फारच सायास पडणें साहजिकच वाटेल.

विद्याव्यासंग म्हणजे चौदा विद्या व चौसष्ट कला यांचें अध्ययन नव्हे. प्राचीन काळीं चौदा विद्या व चौसष्ट कला शिकविणारे गुरु व शिकणारे शिष्य असत, अशा कथा सांगतात. असतील कदाचित्! पण या कालांत एक विद्या व एक कला जर कोणाला पुरतेपणीं आली तर त्याचें मोठें भाग्यच समजलें पाहिजे. ज्ञानाची जुनी व नवी कल्पना यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. जुन्या समजुतीप्रमाणें ज्ञान विशिष्ट ग्रंथांत सांचविलेलें आढळतें. या ग्रंथांचें सांगोपांग अध्ययन केलें, कीं, शाला मनुष्य पारंगत. आमच्या शास्त्रीपंडितांचें शिकणें व शिकवणें यांकडे लक्ष दिल्यास वरील विधानाची खात्री होईल. पाश्चात्यांची देखील जुनी कल्पना आमच्यासारखीच होती. पण त्यांच्याकडे जुना मनु तीनशें वर्षांपासून पालटूं लागला व नव्या मनूस प्रारंभ झाला. या मन्वंतराचा पूर्ण प्रताप

ऑडमन्स कफ एलिक्झिर सर्व प्रकारचे खोकल्यावर
अचुक गुणकारी आहे. किंमत १। रु. टॅ. खं. ८५

गेल्या शतकांत जाणवूं लागला; विशिष्ट ग्रंथांचें महत्त्व कमी होऊं लागलें; ग्रंथावरोबर ग्रंथकारांचेंहि महत्त्व कमी झालें. हौदांत सांचविलेला पाण्याप्रमाणें ज्ञान मर्यादित नसून महासागराप्रमाणें अमर्याद आहे, कष्टसाध्य आहे, अशी भावना वाढूं लागली. ज्ञानसागरांत साधारण निर्भयपणें वावरण्यास, दिशाभूल न होतां उद्दिष्ट सफल होण्यास, नव्या कार्यक्षम साधनांची योजना व उपयोग सर्वत्र होऊं लागला; विषयांनां व त्यांनां लागू पडणाऱ्या पद्धतींनां योग्य मान मिळूं लागला; आणि विद्याव्यासंग म्हणजे शास्त्रीय पद्धतीनें निरनिराळ्या विषयांचें आलोचन, ही कल्पना मान्य होऊं लागली. मग ते विषय आध्यात्मिक शास्त्रें असोत, आधिभौतिक शास्त्रें असोत, कीं सामाजिक शास्त्रें असोत. शोधपद्धतीचीं अवलोकन, तुलना, प्रयोग, मापन इत्यादि जीं अंतर्भूत तत्त्वें, त्यांमध्यें विषयाला अनुसरून फेरफार जरी करावा लागला, तरी अभ्यासाचा मार्ग व दिशाहि स्पष्ट झाली.

या दिशेनें अभ्यास केल्यास विशेष काय फळ मिळतें, तें पाहणें अवश्य आहे. वाचकांमध्यें वाङ्मयावर भर असणारे लोक अधिक असल्यामुळें तोच विषय निरूपणाकरितां घेऊन पाहूं.

वाङ्मय.

वाङ्मयाचा शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास, हे शब्द पुष्कळ जणांनां चमत्कारिक लागतील, यांत शंका नाहीं. शास्त्रीय पद्धति इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र यांनां लागेल; ती वाङ्मयाला कशी लागेल ? वाङ्मय हेंहि एक शास्त्र आहे कीं काय, असें कोणी विचारल्यास यावगें होणार नाहीं. पण वाङ्मय म्हणजे काय, याचा विचार केल्यास शंकेचें बरेंच समाधान होईल. उज्ज्वल कल्पनाशक्ति असलेल्या व्यक्तींच्या चिरस्मरणीय व सुंदर शब्दकृतींचा संग्रह म्हणजे वाङ्मय, असें म्हणतां येईल. तसेंच विवक्षित समाजाचे आचार-विचार, ध्येयें, आशा, आकांक्षा, पूज्य पुरुष, विभूति, यांचा चित्रपट म्हणजे वाङ्मय असें म्हणतां येईल. पहिल्या दृष्टीनें व्यक्तीला प्राधान्य मिळतें, इतकेंच नव्हे, तर समाजाची आठवण देखील क्वचित्च होते. पण समाजाशिवाय व्यक्ति नाहीं. समाजाचें ऋण वाङ्मयांत देखील दिसून येतें. म्हणून समाजास वाजवी महत्त्व देऊन व्यक्तींचा लोप होऊं न देतां, समाजाच्या जीविताचा आरसा अशा ऐतिहासिक दृष्टीनें सारस्वताचा अभ्यास करावा लागतो. ऐतिहासिक पद्धतीनें सारस्वताचा अभ्यास ही शास्त्रीय पद्धतीची एक बाजू होय.

जगांत अनेक समाज आहेत, अनेक भाषा आहेत; पण समाज व भाषावैचित्र्य असलें तरी मनुष्यत्वामुळें जगांत एकरूपता आहे. म्हणून भिन्न सारस्वतांपैकीं एक, ही जाणीव धरून तुलनात्मक दृष्टीनें त्याचें अध्ययन ही शास्त्रीय पद्धतीची दुसरी बाजू होय.

ऐतिहासिक रीत.

आजपर्यंत सारस्वताचा अभ्यास कोणी केला नाहीं कीं काय ? ग्रंथांचें ज्ञान होण्यास परंपरेनें चालत आलेली पद्धत पुरत नाहीं कीं काय ? अशा अनेक शंका मनांत येतात. जुन्या रीतीनें ग्रंथांचें अध्ययन होत नाहीं असें नाहीं. तें पूर्ण होत नाहीं, इतकेंच. ग्रंथांचें पूर्ण ज्ञान होण्यास सारस्वताचें ज्ञान यथार्थ पाहिजे, व तें संपादन करण्यास समाजाच्या चैतन्याचें शब्दचित्र या दृष्टीनें सारस्वताचा अभ्यास करावयास पाहिजे.

केवळ स्वतःचें समाधान करण्याकरितां कोणी लिहीत नाहींत. कारण, खरोखर तसें असतें, तर त्यांच्या स्फूर्तीनां फक्त उद्गारांचें विनाशी रूपच मिळालें असतें; चिरकाळ टिकणाऱ्या कृतींचें रूप कोणी दिलें नसतें, व निरनिराळ्या काळच्या कृतींचा संग्रह होऊन वाङ्मयच अस्तित्वांत आलें नसतें. ज्या अर्थी वाङ्मय अस्तित्वांत आहे, त्या अर्थी आपले ग्रंथ इतरांनीं वाचावेत, त्यांचें मनन व्हावें, त्यांचा लोकांच्या वर्तनावर परिणाम व्हावा, निदान प्रवाहांत दीं पसरल्याप्रमाणें आपले विचार निष्फळ होऊं नयेत, अशी इच्छा किंवा उमेद धरून तेजाळ व्यक्ति लेखनाचा खटाटोप करीत असल्या पाहिजेत. तसेंच, निवळ स्वतःचेच असे विचार फार थोडे. ज्या काळीं, ज्या ठिकाणीं, जन्म झाला असेल त्या वेळच्याच कल्पनांचा नव्हे तर पूर्वी होऊन गेलेल्या महानुभावांच्या विचारांचा संस्कार लेखकाला झालेला असतो, व प्रौढवयांत हे संस्कार लुप्तप्राय होऊन परदेशी संस्कारांचा पगडा जरी त्याचे मनावर बसला, तरी त्यांच्या कृतींचें ज्ञान

फुप्फुसाचे सर्व विकारांवर—घसा दुखणें, छातींतून रक्त पडणें यावर ' ऑडमन्स कफ एलिक्झिर ' सारखा दुसरा उपायच नाहीं ! खात्री करून घ्या.

पूर्ण होण्यास वर सांगितलेल्या आनुषंगिक गोष्टींचा विचार करणें अवश्य होतें. लॉर्ड मोर्ले यांच्या प्रेरणेनें व त्यांच्या नजरेखालीं सुरू झालेल्या 'आंग्ल वाङ्मयाचे सेवक' "English men of Letters" या चरित्रमालेपैकीं कोणतेंहि पुस्तक घ्या: त्यांत पहिल्यानें पूर्वज, नंतर मातापितर, नंतर बाळपण, शिक्षण, खेळगडी, यांची हकीकत देऊन नंतर मग राजकीय व सामाजिक परिस्थिति, समकालीन लेखकांची माहिती, चरित्रनायकाचे ग्रंथ, वाङ्मयाची स्थिति, इत्यादि अप्रस्तुत भासणाऱ्या गोष्टींचा उल्लेख करून, नायकाचा वाङ्मयांतील दर्जा, याविषयीं विवेचन केलेलें असतें. याप्रमाणें पाठीमागचा, पुढचा, व समकालीन संबंध लाविल्यामुळें वेगवेगळ्या लेखकांनां योग्य सन्मान मिळण्याचा संभव जास्त होतो. 'व्रतानामुत्तमं व्रतम्' म्हणजे सर्वांच उत्तम अशी भाविकाची दृष्टि जाऊन त्याचे ऐवजीं मार्मिकपणा अंगीं बाणतो. सोनें कोणतें व वेगड कोणतें हें पारखण्याची शक्ति अंगीं येऊं लागते. सर्वच उत्कृष्ट झटल्यानें रसिकते-पेक्षां मनाचा कोमलपणा व समदृष्टीचा अतिरेक दिसतो, हें प्रत्ययास येऊं लागतें. प्रत्येक माणसांत दैविक अंश आहे, तेव्हां मोठेपणाहि प्रत्येकांत बीजरूपानें आहे, असें कोणी म्हणतील; पण वाङ्मयांत आम्हांला बीजरूपाशीं कर्तव्य नसून पक्क फळाशीं, त्याच्या आस्वादाशीं आहे, हें ध्यानांत ठेवणें जरूरीचें आहे. बीजरूप जाऊन सुंदर मोठा वृक्ष झाला, आणि फळें आलीं नाहींत, किंवा जी आलीं तीं बेचव आलीं, तर तीं त्याज्यच होत! मोठ्या भव्य वृक्षांचीं फळें म्हणून कोणी फळांची रुचि घेत नाहींत; त्याला फळांच्या अंगांत रस असावा लागतो. साध्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, अन्य व्यवसायांत नैपुण्य मिळविलें, कीं, वाङ्मयांतहि मोठेपणा येतो, असें नाहीं. सर्वांनांच चांगलें झटल्यास सरोसर प्रतिभासंपन्न लेखकांची संभावना न होतां हेळणाच होते. विद्याव्यासंगांत चिकित्साच अधिक पाहिजे. 'नात्र कार्यविचारणा' हें पुराणांचें फर्मान येथें लागू पडत नाहीं. अर्घ्यनैवेद्य हें पूजासमारंभाकरितांच आहेत.

ज्याप्रमाणें एका व्यवसायांतला मोठेपणा इतर ठिकाणीं उपयोगीं पडत नाहीं, त्याचप्रमाणें, कोणाहि व्यक्तीला मोठेपणाचा मक्ता मिळालेला नाहीं, किंवा बहुजनसमाजाला त्याची दक्षिणाहि बांटलेली नाहीं. तो दुर्लभ आहे. तो दिक्काल यांनीं मर्यादित नाहीं. एकाच देशांत भिन्नकाळीं, भिन्नभिन्न जातींत, आणि एकाच काळीं अनेक समाजांत व ज्ञातींत महात्मे उदयास येतात. विचार व कृति यांनींच उच्चनीचपणा वाङ्मयांतहि येतो. चिरायु करण्याचें सामर्थ्य काळाला नाहीं. खास्तव दोनचार शतकें अवधि गेल्यानंतरच लेखकांनां मोठेपणा प्राप्त होतो, अशी जी बऱ्याच जणांची अस्पष्ट समजूत असते, ती किती निराधार आहे, हें ऐतिहासिक पद्धतीनें सारस्वताचें अध्ययन केल्याशिवाय मनावर नीट ठसत नाहीं.

तसेंच, सौंदर्य किंवा रसमाधुर्य वाङ्मयाच्या ठराविक प्रकारांतच निष्पन्न होतें, असें नाहीं. काव्यप्रचुर, संस्मरणीय असे प्रसंग संसारांत अनेक असतात. त्यांनीं मोह पाडून त्यांस योग्य शब्दरूप देणारा, इतरांनां डोलविणारा, योजक पाहिजे असतो. जितके योजक तितक्या कृति, आणि तितकेच रसविशेष. रसविशेषांची गणना, त्यांचें वर्गीकरण, त्यांची उत्पत्ति, त्यांचें निदान ठरविण्याचा अलंकारशास्त्राचा आयास व्यर्थ आहे.

जसें शारीरिक शास्त्रांचें कितीहि अध्ययन केलें, शव फाडून आंतील रचनेचा कितीहि अभ्यास केला, किंबहुना या रचनेचा शरीराच्या क्रियेशीं असणाऱ्या संबंधाचा पक्का शोध लावला, तरी मनुष्यप्राण्याचें पूर्ण ज्ञान झालें असें कोणालाहि म्हणतां येत नाहीं, तद्वत्च, अलंकारशास्त्राच्या पठणानें काव्याचें ज्ञान होतें, असें म्हणतां येत नाहीं. इतकेंच नव्हे, तर ज्याप्रमाणें सूपशास्त्रांत निरनिराळ्या पक्कान्नांचे विधि देऊन अमुक केलें असतां अमुक पाकनिष्पत्ति होते, असें अनुभवसिद्ध आश्वासन दिलें असतें, त्याप्रमाणेंच अलंकारशास्त्राचें विवेचन म्हणजे रसनिष्पत्तीच्या विधींचा दुसरा एक अनुभवसिद्ध संग्रह, अशी समजूत होणें साहजिक नाहीं, असें कोण म्हणेल? अमुक शब्द, अमुक विशेषणें, अमुक प्रमाणांत एकत्र ठेविलीं, कीं, झाला अमुक रस तयार! सूपशास्त्राचे विधि व अलंकारशास्त्राचे विधि यांत फरक काय, असें कां वाटूं नये? तेजाळ व्यक्तींनां अलंकारशास्त्राचा उपयोग न होतां त्यांच्या नैसर्गिक

पाऊस व थंडी यांचा परिणाम शरीरावर झाल्यानें होणाऱ्या वातविकारावर
कॅपिटो याम (मलम) अगदीं बरोबर औषध आहे. कि. ८८.

स्वातंत्र्यास अडथळा येत असला पाहिजे. पद्यरचनेची हातोटी साधलेल्यांनां मात्र काव्याची टांकसाळ काटण्यास मदत होते. स्फूर्तियुक्त काव्याऐवजीं **'विटाळ्याची कविता'** जास्त प्रचारांत येते.

अलंकारशास्त्राचा निस्सीम अभ्यास प्रचारांत आल्यापासून संस्कृत काव्याला कशी समाधि मिळाली, हें नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं, तसेंच, अलीकडे प्रसिद्ध होत असलेलें मराठी काव्य वाचतांना अनेक वेळां स्फूर्तीच्या ऐवजीं रचनेचाच अनुभव जास्त येतो, असें म्हटल्यास अयोग्य होणार नाहीं. मग अलंकारशास्त्राचा कांहींच उपयोग नाहीं कीं काय, असा प्रश्न निघणें साहजिक आहे.

प्रत्येक प्रसंगांत निरनिराळे रस कमी अधिक प्रमाणानें मिसळलेले असतात, असा नेहमींचा अनुभव आहे. आणि काव्य म्हणजे जर अंतःसृष्टि किंवा बाह्यसृष्टि यांनां लेखकाच्या प्रतिभेनें मिळालेलें मनोहर रूप, तर रसांच्या शुद्ध स्वरूपाचा निर्णय करण्यांत अर्थ तो काय? शृंगार, वीर, करुण इत्यादि रसांचे निर्भेळ परिपोष करणारे संसारांतील खरेखुरे प्रसंग कुणाला दाखवितां येतील काय? उत्तररामचरितांत रामचंद्राच्या शोकाचें वर्णन केलें आहे; पण नाटकांतील प्रसंग या दृष्टीनें पाहिलें, किंवा शुद्ध करुण रसाचा परिपोष म्हणून पाहिलें, तरी विरसच होतो. शोकावेग आला असतां तो अनेक पद्यरूपानें बाहेर पडणें असंभवित आहे. रामचंद्राच्या शोकापेक्षां कवीचें अस्थानीं कौशल्यच जास्त अनुभवास येतें. कालिदासानें शुद्धरसाचें वर्णन करण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. विक्रमोर्वशीयाचा एक अंक याला अपवाद नाहीं काय? असें कोणी म्हणतील; पण राजा शोकामुळें भ्रमिष्टासारखा हिंडतो आहे व वेड्याप्रमाणें त्याचे मनोविकार कवीनें असंबद्ध दाखविले आहेत, म्हणून रसहानि होत नाहीं. हा अंक निर्दोष आहे, असें म्हणण्याचा हेतु नाहीं; थोडा लहान केला असता तर बरें झालें असतें खरें; पण हा दोष क्षुल्लक आहे. चांगल्या कृतींत देखील असे दोष सांपडतील. मिश्ररसांचा परिपोष व्हावा म्हणूनच कालिदास विदूषकाला नायकाजवळ ठेवितो. नायकाच्या उच्च मनोवृत्ति व विदूषकाची सामान्य प्रवृत्ति, यांची सांगड घातल्यामुळें प्रसंग जास्त खुलतात. [illegible] नांना सांगेल या भीतीनें, शकुंतलेवर माझी प्रीति नाहीं, मीं थट्टा केली, खरें मानूं नकोस, असें राजानें निक्षून सांगितलें, म्हणून भोळा बिचारा विदूषक तें खरें मानतो, आंतला हेतु ओळखीत नाहीं, आणि धीवराकडून अंगठी परत मिळाल्यानंतर शकुंतलेची बिलकूल आठवण न काढल्याबद्दल राजा दोष देत असतांना, *"मला कां दोष लावितोस? 'शकुंतलेवर माझें खरें प्रेम नाहीं, थट्टा केली, असें तूंच सांगितलेंसना?"* असा विदूषकाचा जवाब ऐकून स्वतः केलेली फसवणूक स्वतःलाच नडली, हें जाणून राजाचा उद्वेग वाढत नाहीं काय? शेक्सपियरचीं नाटकें घेतलीं, तरी त्यांत एकच रसाचा परिपोष आढळणार नाहीं. लियर नाटकांतील प्रसंग घ्या. लियरला वेड लागून तो वरळत फिरतो, तेव्हां राजाच्या परिवारापेक्षां खुषमस्कऱ्याच काय तो बरोबर जातो. वेडांत राजा बरळूं लागला, कीं, हा (Fool) जगाच्या रहाटीविषयीं शहाण्यासारखा बोलतो, हें पाहून राजाची दैना जास्तच भासूं लागत नाहीं काय? हॅम्लेटमधील कबर खणणारांचा प्रवेश घेतला तरी हेंच तत्त्व दिसेल. नवीन कबर खणतांना तो बिचारा गातो आहे! जुनी कवटी मातींतून निघते तेव्हां विशेष लक्ष न देतां ती तो कांठावर फेकून देतो. स्मशानांतील गांभीर्य व खिन्नता कोणीकडे व त्या खणणाराचे श्रमपरिहार होण्याकरतां गाणें कोणीकडे! कुदळीला लागलेली कवटी फेंकून देणें कोणीकडे, आणि तीच कवटी पाहून हॅम्लेटच्या अंतःकरणांत उठणारें तात्त्विक विचारांचें काहूर कोणीकडे! या विविध गोष्टींचें चित्र पाहून संसाराचा उलटेपणा मनांत बिंबत नाहीं काय? 'As you like it' हें विनोदी नाटक घेतलें, तरी त्यांत विदूषक व झाक्, धनगर व त्याची प्रियकरी, या पात्रांमुळें नाना रसांचें मिश्रण झालें आहे व तें शुद्ध हास्यरसापेक्षां आदरास अधिक योग्य झालें आहे. विनोदी नाटक म्हणजे केवळ हास्यरसाचा ठेवा नव्हे. विनोद व बाष्कळपणा यांत फरक आहे. शुद्ध हास्यरस कोठेंच आढळत नाहीं. प्रसिद्ध विनोदी नाटककारांच्या ग्रंथांतलें उदाहरण घेऊन पाहूं. इंग्रजांनां जसा शेक्सपियर, तसा फिरंग्यांनां (French)

हातपाय आंखडणें, सांधे धरणें, छातींत दुखणें, कपाळ दुखणें, कमर दुखणें वगैरे रोग
तत्काल बरे करणारा उपाय म्हणजे कॅपिटो बाम होय!

मोलियरचा 'सांरिटसे खानदानी झणवूं पाहणारा वाणी' (Le Bourgeois gentil-homme) हें नाटक घेतल्यास, साध्या भोळ्या पण महत्त्वाकांक्षी स्वभावामुळें गायनाचार्य, नृत्याचार्य, अलंकारशास्त्रप्रवीण पंडित, यांचा निवळ पैसे उकळण्याचा हेतु लक्षांत न येऊन, त्यांचें उपरोधिक भाषण न समजून, नायकाचें सरळ व विश्वासपूर्ण वर्तन पाहिलें झणजे विनोदरस उचंबळतो, यांत नवल नाहीं. पण त्याच वेळीं नायकाच्या अनायासानें फसण्याबद्दल त्याची कींव व दुसऱ्यांच्या दांभिकपणाविषयीं किंचित् तिरस्कार, हीं रसिकांच्या मनांत येत नाहींत काय ? आणि शेवटच्या प्रवेशांत स्वतःचा खुळेपणा स्वतःला पटून नायकानें केलेलें वर्तन पाहून ज्याला आपण हंसलों, त्याचेचबद्दल किंचित् आदर उत्पन्न होत नाहीं काय ? मोलियेरचें कोणतेंहि नाटक घेतलें तरी त्यांत हरदासी विनोद आढळणार नाहीं. मनुष्यमात्राची यथार्थ कल्पना यावी, एकमेकांच्या न्यूनांविषयीं सहनशीलता, सहानुभूति उत्पन्न व्हावी, जीवनांतील सुखदायक प्रसंग वाढून कष्टमय जीवयात्रा अधिक सह्य व्हावी, या उच्च हेतूनेंच मनुष्यमात्राचा विक्षिप्तपणा, किंबहुना व्यंगें दाखवून मोलियेर आम्हांला रिझवितो. त्याच्या कोणत्याहि पात्राबद्दल मनाला त्वेष येत नाहीं. सर्वांमध्यें स्खलनशील मानवांची ओळख पटते. हास्यरस गांभीर्य व खिन्नता यांनीं मिश्रित आढळतो. डॉन क्विग्झोट (Don Quixote) हा जगन्मान्य विनोदी ग्रंथ घेतला, तरी नायक व त्याचा नोकर सॅन्कोपॅन्झा यांची दुकल जोडल्यामुळें प्रत्येक प्रसंग बहारीचा झाला आहे. हा ग्रंथ कोणतेंहि पान उघडून वाचला तरी सारखाच मनोवेधक वाटेल. अगदीं अलीकडील पिक्विक् पेपर्स हा ग्रंथ घेतला, तरी नायक व त्याचे जोडीदार व प्रत्येकाचा निरनिराळा स्वभाव, यांची सांगड घातल्यामुळें त्यांनां अमरत्व प्राप्त झालें आहे, असें दिसेल. कोणतेहि सर्वमान्य विनोदी ग्रंथ घेतले, तरी त्यांत शुद्ध रसाचा परिपोष आढळणार नाहीं. भिन्न भिन्न रसांच्या ओतींव पुतळ्यांच्या ऐवजीं चालतीं बोलतीं माणसेंच आढळतील.

दृश्यादृश्य सृष्टीचें आलोडन करीत असतांना स्फुरण पावून, कल्पनासृष्टींत लीन झाल्यामुळें, कवीनें निर्माण केलेलीं, चैतन्य दिलेलीं, नाना रूपें झणजे काव्य होय. यास्तव ज्या प्रमाणांत रसविशेषांचें वस्तुतः मिश्रण झालें असेल, त्याच प्रमाणांत काव्यांतहि सांपडावयास पाहिजे. सूपशास्त्रांतील पदार्थांनां लागणाऱ्या वस्तूंमध्यें जरी अंगचा रस असला तरी शब्दामध्यें अंगचा रस नाहीं. तो योजकानें स्वतःच्या कल्पनाशक्तीनेंच ओतावयाचा असतो. निर्जीव शब्दरचना झणजे काव्य नव्हे. इतर जीवाप्रमाणें काव्यालाहि प्राण आहे. पृथक्करणावरच विसंबून राहिल्यास काव्यांतील चैतन्याची ओळख होत नाहीं. अलंकारशास्त्र झणजे पृथक्करणच नव्हे काय ?

मग, चांगलें व वाईट, स्मरणीय व विस्मरणीय, ग्राह्य व त्याज्य, यांचा वाङ्मयांत निर्णय कसा करावयाचा, हें सुचविणें भाग आहे. काव्य ही सजीव वस्तु आहे खरी, पण ती या आमच्या नीरस भासणाऱ्या सृष्टींतली नाहीं. गूढ सृष्टींतली आहे. या सृष्टींत प्रतिभेनेंच प्रवेश होतो. म्हणून काव्याची माधुरी चाखण्यास प्रतिभेचें पोषण झालें पाहिजे; आणि प्रतिभेचें पोषण म्हणजे, सर्वकाळच्या, सर्वमान्य कवींच्या कृतींचें अनेकवार वाचन, मनन, निदिध्यास, हें होय. कधीं कधीं उत्तम मानिलेल्या कृति प्रथम तशा वाटत नाहींत, हा अनुभव बरेच जणांनां येतो. झणून स्वतःला प्रत्यय येईपर्यंत, किंवा वारंवार वाचून देखील प्रत्यय न आल्यास कां येत नाहीं याचें कारण उमजेपर्यंत-प्रयत्न सुरू ठेविला पाहिजे. काव्य, कृति उत्तम असल्यावर त्याचा प्रत्येकाला प्रत्यय कां येऊं नये ? तसा आलाच पाहिजे; न आल्यास त्याचा दोष काव्याकडे नसून वाचकाच्या दूषित, किंवा निस्तेज कल्पनाशक्तीकडे आहे, असें कोणी म्हणतील. असेंहि होण्याचा संभव आहे. पण असा निष्ठुर आरोप एकदम करण्यापूर्वी काव्यकृति खरोखरच उत्कृष्ट आहेत, कीं त्यांनां आगंतुक महत्त्व आलेलें आहे, म्हणून प्रत्येकाला त्यांचा रसास्वाद मिळत नाहीं, हें पाहणें अवश्य आहे. कारण, नितांत रम्य कृतींनीं देखील न उचंबळणारे अभागी प्राणी फारच थोडे आढळतात.

संसारांत घडामोड चालू आहे, स्थिर कांहीं नाहीं, निश्चलतेचा आभास आहे. यास्तव, घटिलांनीं घालून

दूषित रक्तासंबंधाचे सर्व आणि भयंकर रोगांवर क्युरेलाइन वापरा.
कोणत्याहि बाह्योपचाराची जरूर नाहीं.

दिलेलाच कित्ता गिरविण्याचा प्रयत्न कितीहि स्तुत्य असला तरी, मनूच्या काळापासून रुळत आलेल्या मार्गांतील चाकोऱ्यांपासून बहुजनसमाजाला एक रेसभर देखील खसूं न देण्याची समाजसंरक्षकांनीं कितीहि प्रौढी मारली, कितीहि खबरदारी घेतली, तरी कालानुसार, प्रसंगानुसार, आचारविचारांत बदल पडलेला आपणांला नेहमीं दिसतो. विचार बदलले कीं रुचि बदलते, आणि रुचि बदलली कीं मनुष्यमात्रहि बदलतें. शरीररचनेंत किंवा अंतःकरण-प्रवृत्तींत युगायुगांत फरक पडत नाहींत. ह्मणून मानवजाति एकरूपहि आहे व भिन्नस्वरूपहि आहे. एकरूप नाहीं असें झटल्यास धर्म, नीति, ललितकला, सारांश, संस्कृतिच लय पावेल; मनुष्य व इतर प्राणी यांमधील भेदच नाहींसा होईल. पण भेद तर उघड आहे, ह्मणून मानवजाति एकरूप आणि भिन्नस्वरूप दोन्हीहि आहे, असें मानणें सयुक्तिक दिसतें. आतां आचारविचारांत बदल ह्मणजे ध्येयांत बदल, आणि ध्येयांचा चित्रपट ह्मणजे साहित्य. ह्मणून त्यांत या फेरफारांचें, रूपांतरांचें, प्रतिबिंब पडतें. ह्मणून प्रत्येक काळचे साहित्यसेवक, मग ते पद्यांत लिहोत कीं गद्यांत लिहोत, सर्वांनां मान्य होत नाहींत. साहित्यसेवकांच्या तीन कोटि आहेत. स्वतःच्या वेळच्या अव्यक्त, अस्पष्ट, ध्येयांस व्यक्त, सुंदर, मूर्त स्वरूप देणारांची एक कोटि. भाविसूर्योदयाचे कोंवळे किरण ज्याप्रमाणें उंच उंच पर्वतांच्या माथ्यांवर प्रथम दिसूं लागतात, त्याप्रमाणें भविष्यत्काळीं आदरास पात्र होणाऱ्या ध्येयांचा हृदयांत प्रकाश पडून त्यांनां शब्दरूप प्रथम देणारांची दुसरी कोटि, व समकालीन आचारविचारांनां सर्व काळीं रसिकांनां पटण्यासारखें अजरामर शब्दरूप देणारे, कल्पनासृष्टीचे प्रतिईश्वर, अशा महाभागांची तिसरी कोटि. पहिल्या दोन कोटींतील लेखकांचे ग्रंथ जर सर्वमान्य झाले नाहींत, तर रुचिवैचित्र्य हेंच त्याचें कारण होय. पण तिसऱ्या कोटींतल्या महाभागांच्या कृतींचा आस्वाद घेतां आला नाहीं, तर मात्र तो प्राणी खरोखर अभागी असें ह्मणणें भाग आहे. या तिसऱ्या कोटींतल्या महाभागांच्या सर्वच कृति वंदनीय असतात, असें नाहीं. दोषयुक्त कृतींचें दुराग्रहानें समर्थन न करितां त्यांच्या सर्वांशांनीं नम्र भावानें मनन करणें, हेंच सहृदयत्वाचें लक्षण आहे. देव्हारें माजविणें पुजाऱ्यांनांच शोभतें.

तीन्ही कोटींतल्या साहित्यसेवकांचे ग्रंथ लक्षपूर्वक वाचले असतां, कल्पनाशक्तीचें योग्य पोषण होऊन, रुचीला चांगलें वळण मिळेल; नव्या नव्या कृतींचा वास्तविक सन्मान करण्याची शक्ति अंगांत येईल; अपरिचित वाङ्मयविशेषांनीं सहज उत्पन्न होणारा बुजरेपणा जाऊन दृष्टि स्थिर होईल; मनाचा समतोलपणा वाढेल; गुणग्राहकता वाढेल; लेखकाला स्वातंत्र्य मिळेल; वेगवेगळ्या प्रसंगविशेषांनां कल्पनासृष्टींतले *शक्याशक्य, सौंदर्य व अनुरूप शब्दयोजना*, याविषयींचेच भिन्नभिन्न निर्बंध लागू राहतील; जिकडे पहावें तिकडे काव्य, अशी जरी कोणाची वृत्ति झाली नाहीं, तरी वाङ्मयाचें क्षेत्र चरेंच वाढेल.

परंपरेनें चालत आलेली वाचनाची पद्धत जशी विवक्षित मर्यादेंतच फलदायक होते, तशीच या ऐतिहासिक पद्धतीची गोष्ट आहे. या रीतीनें लेखक व त्यांचे ग्रंथ यांचा पूर्वापार व समकालीन संबंध जोडतां येतो व समाजाचें ऋण किती हें ठरवितां येतें. कांहीं लेखकांचा आदर कां झाला, अनादर कां झाला, क्वचित् प्रसंगीं हेळणा पण कां झाली, कांहीं लेखक खगोलांत चमकणाऱ्या तान्याप्रमाणें थोडा वेळ प्रकाश देऊन मग कायमचे पतन कां पावतात, समाजाचें चैतन्य वाढविणारे प्रतिसूर्य अशाहि महाकवींपेक्षां त्यांच्याच तेजाचें परावर्तन करणारे दीन निशापति जास्त आनंददायक कां भासतात व शीतल चंद्रप्रकाशांत इकडे तिकडे भटकल्यानंतर दिनमणींच्या प्रकाशाची थोरवी, त्यांच्या तेजाची जीवनास आवश्यकता पुन्हां कां जाणवते, इत्यादि अनेक बोधक प्रश्नांचें उत्तर या पद्धतीनें देतां येईल; पण हें सर्व नंतरचें पांडित्य आहे. विभूतींचा अवतार केव्हां, कसा व कां होतो, त्यांच्यांतील असामान्य शक्ति कशी, कोठून येते, त्यांच्या कृतींत उतरलेला विशिष्टपणा कसा उकलावयाचा, हे प्रश्न इतिहासाला सुटत नाहींत. अवतारयोग जगांत अनेक येत असले तरी, जनसमूहानें

सर्व प्रकारचे तापांवर, हिवताप, हाडीज्वर, अंगात मुरलेल्या तापामुळें अंग कसकसणें
वगैरेवर ऑडमन्स मलेरियस पिल्स फारच गुणकारी आहेत !

आकाशाकडे तुकतेन डोळे लाविले असले तरी, दैविक शक्तीचीं माणसें यदृच्छयाच जन्मास कां येतात, जितके प्रसंग तितके अवतार, असें कां होत नाहीं, हें इतिहासाला सांगतां यावयाचें नाहीं. घडलेल्या, फार झालें तर घडत असलेल्या गोष्टींचा सोपपत्तिक अभ्यास करणें, कार्यकारणसंबंध जोडणें, एवढेंच इतिहासाचें काम आहे. भविष्य वर्तविण्याचें त्याचें काम नाहीं. समाजाची, पूर्वजांची, सहाध्यायांची, संस्कारांची, किंवा संस्कृतीची देखील चिकित्सा केली, तर विभूतींच्या सामान्य गुणांचा शोध लागेल, विशिष्ट गुणांचा लागणार नाहीं. उदाहरणार्थ, सतराव्या शतकांतील वाणी ज्ञातीचा एक गृहस्थ म्हणून जे गुणदोष, जे आचारविचार, ज्या समजुती, जीं ध्येयें तुकारामाचीं असतील, त्या सर्वांचें आकलन होईल. पण साधु तुकाराम व त्याचे भक्तिरसानें ओथंबलेले अभंग इतिहासाला अज्ञेयच राहतील. व्यक्तींचें, जीवात्म्यांचें गूढ इतिहासालाच काय, पण कोणत्याहि इतर शास्त्राला पूर्णपणें सोडवितां येणें शक्य दिसत नाहीं. त्याला समानरूपच बनावयाला पाहिजे. श्रवण, मनन, निदिध्यास केला पाहिजे. जुन्या व नव्या दोन्ही पद्धतींची सांगड घातली पाहिजे. म्हणजे ग्रंथ व वाङ्मय दोहोंचेंहि ज्ञान सायंत होईल. तेजोराशी भास्कराकडे देखील डोळे न दिपतां पाहण्याचें खगेंद्राचें सामर्थ्य अंगीं येईल.

कांहीं उंनिश म्हणी.

धैर्यानें केलेला प्रयत्न म्हणजे अर्धा विजयच होय.

पडक्या भिंताडाला टेंकणे फार वाईट.

नुकसान होऊन गेल्यानंतर केलेला उपदेश मृत्यु झाल्यानंतर दिलेल्या औषधाप्रमाणें आहे.

मूर्ख मनुष्याला सदुपदेश करणे म्हणजे बदकाच्या पाठीवर पाणी ओतणेंच होय.

सर्वंग उपदेशाकडे जो दुर्लक्ष करतो, त्याला अतिशय महाग असा पश्चात्ताप विकत घेणें भाग पडतें.

भिक्षा कशी मागावी हें ज्याला कळतें, त्यानें आपली पैशाची पिशवी घरीं ठेविली तरी हरकत नाहीं.

डुकर डुरडुरूं लागलें आणि मूल रडूं लागलें म्हणजे त्यांनां इच्छित वस्तु द्यावी; म्हणजे मग डुकर चांगलें झाल्याचें व मूल विघडल्याचें तुम्हांला आढळून येईल.

जो दुसऱ्याच्या ताटावर विश्वास ठेवून राहतो, त्याला बहुधा उशिराच भोजन करावें लागतें.

स्वतः मूर्ख बनावयाचा ज्यानें निश्चय केला आहे, त्याला मदत करावयास पुष्कळ लोक तयार असतात.

नशीब दारापाशीं येतें व शहाणपण घरांत आहे किंवा नाहीं, याविषयीं चौकशी करतें.

जो मुलाला हातानें उचलून घेतो, तो त्याच्या आईचें अन्तःकरणहि काबीज करतो.

पुष्कळ प्रसंगीं संपत्ति येऊन दरवाजा खडखडावते, परंतु मूर्ख मनुष्य तिला घरांत घोलावीतच नाहीं.

मूल विहिरींत पडून बुडाल्यावर ती झाकणें, म्हणजे फाजील विलंब करण्यासारखें आहे.

शांत व निःशब्द मनुष्याचे शब्द न्यायागारापर्यंत येऊं शकत नाहींत.

घोड्याला ठाणास बांधून ठेवतां येतें, त्याप्रमाणें कालास एकाद्या खांबाला बांधून ठेवतां येणार नाहीं.

कुत्र्याला चांगलें न्हाऊं घाला, त्याचे केंस विंचरून चांगले साफसूफ करा, परंतु कुत्रा शेवटीं कुत्राच रहावयाचा !

तुमचे लेहीसोबती कोण आहेत तें मला सांगा, म्हणजे तुम्ही कोण व कसे आहां तें मी सांगतों.

दाणा घालण्याच्या कोठिंब्याकडे घोड्याला जावें लागतें; कोठिंबा घोड्याकडे धांव घेत नाहीं.

बारकीशी तडजोड ही लक्षा फिर्यादीआर्यादीपेक्षां पुष्कळ पटीनें बरी.


अंगांत ताप असो वा नसो, ऑडमन्स मलेरियस पिल्स
घेण्यास हरकत नाहीं. किंमत १ रु.

संपूर्ण गोष्ट.

लाल पायमोजे.

—लेखक—

श्रीयुत ल. वि. परळकर, बी. ए., एल् एल्. बी.



मेरवानजी शेटचा बंगला मुंबईत चर्चगेट आणि मरीन-लाइन्स या दोन स्टेशनच्यामध्यें समुद्रकिनाऱ्याजवळ होता. त्यांच्या बंगल्यांतील सामानसुमान मोलवान असून व्यवस्थेनें मांडलेलें होतें. आंतील सर्व व्यवस्था इंग्रजी तऱ्हेची होती. शेटजींची पन्नाशी उलटून गेलेली होती. त्यांचें शरीर साधारण स्थूल व भव्य असून अंगांत ताकद बरीच दिसत होती. एका आरामखुर्चीवर शेटजी पडले होते, व त्यांच्याजवळच दुसऱ्या एका आरामखुर्चीवर त्यांचा पुतण्या सोराब बसला होता. सोराबचा पोषाख नीटनेटका होता. त्याच्या बुटावरून व पाटलोणीखालून लाल पायमोजांचा सुमारें दोन तीन इंच भाग दिसून येत होता. त्याच्यादेखील हें लक्षांत आलें असावें, व म्हणूनच पाय एकमेकांवर टेवून पायमोजाचा भाग दिसूं नये अशी तो तजवीज करीत होता. शेटजींनीं एका बाटलीचा बुच काढीत विचारलें "थोडीशी ब्रॅन्डी आणि सोडा घेतोस काय?"

सोराब घड्याळांत पाहून म्हणाला "नाहीं काका, थँक यू! मला बराच वेळ झाला, आतां घरीं गेलें पाहिजे. आजचा खेळ फारच चांगला झाला बुवा!"

"अरे बसरे, जाशील!" शेटजी म्हणाले. "इतकी घाई कशाची झाली आहे तुला!"

सोराब पुनः बसला व त्यानें मोजाचा भाग पाटलोणीनें झांकण्याचा यत्न केला. शेटजींच्या लक्षांत तें आलें. त्यांनीं कपाळाला आंठ्या घातल्या व झटलें "अरे, जरा स्वस्थ तर बस. सकाळपासून काय चळवळ चालविली आहेस? आज तुला काय-झालें आहे तरी काय?"

सोराब जरा ओशाळून म्हणतो "काका, हे मोजे तुम्हीं मला घालायला लावलें हें बरें केलें; पण हे असे बाहेर दिसतात, हें मला आवडत नाहीं."

"बस बुवा, तुझ्या स्वभावाची कमाल झाली!" शेटजी म्हणाले. "तुम्हां आजकालच्या तरुण पोरांना वाटतें, कीं, सर्व कांहीं पोषाखांतच आहे, आणि सगळ्यांची दृष्टि आपल्या ऐटबाज पोषाखाकडेच लागून गेली आहे! अरे, आपल्या शरीराला सुख होण्यासाठीं पोषाख करावयाचा. लोकांनां तो कसा दिसतो त्याच्याशीं आपल्याला काय करायचें आहे?"

"बरें तें असो काका," सोराब म्हणाला. "पण तो जादुगार तुम्हाला कसा काय वाटतो? मला तर तो अगदीं पुरा चाकबगार दिसला. काय त्याची चलाखी!"

"मूर्ख आहेस!" शेटजी म्हणाले. "मला तर तो अगदींच अजागळ वाटला! त्याची प्रत्येक युक्ति माझ्या लक्षांत आली."

"माझ्या तर एक देखील लक्षांत आली नाहीं!" सोरावनें उत्तर केलें.

"नसेल आली, नसेल आली," शेटजी हंसत हंसत म्हणाले. "सगळेचजण कांहीं सारखेच हुशार नसतात? मीं तुझ्यापेक्षां कित्येक पावसाळे अधिक अनुभवलेले आहेत!"

"पण, तुम्ही इतकें कबूल कराल, कीं, त्याच्या कित्येक युक्त्या अगदीं जादूगाराप्रमाणें होत्या."

"भलतेंच कांहींतरी!"

"काका, तुमचें असें बोलायला कांहीं लागत नाहीं! पण तुम्हीच सांगा, त्यानें एका मनुष्याला पेटींत घालून पेटी बंद केली, व लगेच तो मनुष्य त्या टोपलीखालून कसा हो बाहेर निघाला?"

"त्यांत काय आहे? अरे, टोपलीखालून बाहेर निघाला तो दुसराच मनुष्य! त्यानें पोषाख मात्र पहिल्या माणसाप्रमाणें केला होता, इतकेंच!"

सोराबची खात्री होईना. तो म्हणाला "वा, मग तर त्यानें हुबेहुब पहिल्या माणसाप्रमाणें पोषाख केला होता!"

आजकाल 'बालामृता'चा जिकडे तिकडे सुळसुळाट झाला आहे. अशा वेळीं मुलांनां खात्रीचें हितकारक औषध म्हणजे बालजीवनामृतच होय! अनुभव पहा.

"साधारण लोंच्यासारखा केला होता झालें," शेटजी झणाले.

"कसेंहि असो, पण त्या पोषाखानें तुमच्याशिवाय सर्वजण फसले !"

"फसले असतील," शेटजी झणाले. "हें पहा, सर्वांची दृष्टि कांहीं सारखीच तीक्ष्ण नसते. मी कांहीं फुशारकी मारतों, अशांतली गोष्ट नाहीं; परंतु मला फसवणारा मनुष्य आजपर्यंत मला कांहीं भेटला नाहीं ! एकदां मनुष्य माझ्या नजरेखालीं आला, कीं, मग त्यानें कसाहि वेष पालटलेला असो, त्याला ओळखल्याशिवाय मी राहणार नाहीं. माझा एक फारच चाणाक्ष लेखी आहे, त्यानें एकदां प्रयत्न करून पाहिला—"

"काय, त्यानें काय केलें ?" सोरावनें आतुरतेनें विचारलें.

"वेष पालटून आणि दाढीमिशा लावून तो आमच्या आफिसांत आला. पण मी कसला वस्ताद ! त्याला तेव्हांच ओळखलें !"

"तुम्ही केव्हां गाफिल नसतां, असें दिसतें—"

"खरोखरच, मी केव्हांहि गाफिल नसतों—!"

"तरी पण मला वाटतें, कीं, तुम्हाला फसविणें अगदींच अशक्य नाहीं !"

"काय, काय झणतोस ?"

"तुम्हाला फसविणें शक्य आहे !"

"पाहिजे असेल तर कोणीं यत्न करून पहावा," शेटजी हंसत झणाले.

"तुम्हाला काय ही गोष्ट अगदीं अशक्य वाटते ?" सोरावनें विचारलें.

"अगदींच अशक्य!"

"बरें तर मग, मी यत्न करून पाहतों."

"तुला पाहिजे तेवढा यत्न कर, त्यांत यश येणार नाहीं !"

"कसें यश येत नाहीं तें पाहतों !"

"बेलाशक पहा !"

"तुमची इतकी खात्री असेल तर आपण पैज मारूं!"

"कबूल! पण यांव, मी पैज मारीत नसतों. कारण, हा एक प्रकारचा जुगार आहे.

"खरेंच, पैज मारली तर तुम्ही हराल आणि तुम्हाला पैसे द्यावे लागतील."

"तसें कांहीं नाहीं. मीच जिंकेन अशी माझी खात्री आहे."

"तसें असेल तर पैज मारायला कां घाबरतां ! पहा, एक महिन्याच्या आंत मी तुम्हाला फसवीन, आणि नाहीं फसविलें तर तुम्हाला पांचशें रुपये देईन. यांत कांहीं बावगें आहे काय ?"

"नाहीं, बावगें नाहीं !" शेटजी झणाले.

"आणि फसविलें तर तुम्हीं मला पांचशें रुपये द्यावे," सोराब झणाला.

"हें पहा, मी तुला एक गुजराथी अरेबिअन नाइट्सचें पुस्तक देईन !" शेटजी झणाले.

"असें कसें झणतां काका ?" सोराब झणाला. "दोघांनांहि एकच न्याय लागू झाला पाहिजे. त्यांत तुम्ही जिंकाल अशी तुमची खात्रीच आहे. मग आहेना कबूल!"

"मी जिंकलों तर तूं मला पांचशें रुपये द्यावेस, असेंच कीं नाहीं ?"

"होय ! आणि तुम्ही हरलां तर तुम्हीं मला पांचशें रुपये द्यावे. ही शेवटली अट मात्र विसरूं नका बरें !"

"मी हरणार तर नाहींच !" शेटजी झणाले.

"तें आपण पाहूं. मग आहेना कबूल ?"

"तुझा आग्रहच आहे तर करतों कबूल !" शेटजी थोडा वेळ विचार करून झणाले.

"ठीक आहे," सोराब झणाला. "मग वेळ व्यर्थ घालविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पुढें काय करावयाचें त्याचा मला एव्हांशींच विचार करायला लागलें पाहिजे. काका, तुम्ही आतां संभाळून मात्र असा. कारण हरत-हेनें पैज जिंकायची, असा माझा निश्चय आहे."

शेटजी हंसत झणाले "माझी कांहीं काळजी करूं नको! आतां पुनः केव्हां भेटशील ?"

"भेटेन, तुम्हाला वाटतें त्यापेक्षां कदाचित् लवकरच भेटेन !" असें झणून सोराब बाहेर पडला.

[२]

सोराब गेल्यानंतर शेटजी आरामखुर्चीवर पहुडत आपणाशींच झणाले "ये, तुला लागेल तेव्हां ये ! मी सदासर्वदां सावधच असतों."

शेटजींचा नवजी रुप्याच्या सामानाचा संच घेऊन आंत आला, त्याला त्यांनीं विचारलें "किती वाजले रे ?"

"साहेब बारा वाजले असतील !"

खाल्लेलें अन्न पचविण्यांत, पोटांतील वायु तोडण्यात 'बाळजीवनामृता'चा हातखंडा आहे. बापरण्यानेंच खात्री होणार आहे.

" बरें तर मग, कुलपें वगैरे लाव आणि घरीं जा. पण काय रे, सोराब आतां गेला त्याला बाहेर पडतांना पाहिलेंस का ?"

" होय साहेब, त्यांनां व्हिक्टोरिआ आणून मींच दिली !"

"व्हिक्टोरिआ आणून दिलीस ?" शेटजी उद्गारले. " काय पोरानें उघळपट्टी मांडली आहे !"

" होय साहेब !" बबजी म्हणाला.

शेटजी रागावून म्हणाले "होय साहेब ! काय म्हणालास ?"

" कांहीं नाहीं साहेब !"

" तूं मूर्ख आहेस !" शेटजी म्हणाले.

" होय साहेब !"

" होय साहेब याशिवाय दुसरें कांहीं तुला म्हणतां येत नाहीं काय ?"

" होय साहेब-नाहीं साहेब !"

"अर्धा झोपेंतच आहेस वाटतें ?" शेटजी म्हणाले. "या ग्लासांत माझ्यासाठीं थोडी ब्रॅन्डी आणि सोडा घाल, आणि जा."

बबजीनें सांगितल्याप्रमाणें केलें आणि तो निघून गेला.

[३]

बबजी गेल्यानंतर मेरवानजीशेट बराच वेळपर्यंत इकडून तिकडे फिरत राहिले. त्यांनीं टेबलावरचें ग्लास रिकामें केलें, एकदोन चिरूट ओढले, दुसरें एक ग्लास रिकामें केलें व नंतर ते आरामखुर्चीवर बसून राहिले. त्यांची दृष्टि सहज टेबलावर असलेल्या रुप्याच्या सिगारेट केसकडे गेली. ती केस पाहून ते आपणाशींच म्हणाले "किती विसराळू सोराब आहे ! ही केस येथेंच विसरून गेला. आज एकंदर काम तर चांगलेंच झालें. हे सोराबचे पांचशें रुपये मिळाल्यासारखेच आहेत ! त्यालाहि बरी अद्दल घडेल ! मला फसवीन म्हणतो काय ? फसव म्हणावें. मी बेफाम असलेला तुला केव्हांच सांपडणार नाहीं ! माझे डोळे नेहमीं उघडे असतात. मला फसवणार ? तुझ्यापेक्षां हुशार अशा लोकांच्या हातून अशी गोष्ट घडली नाहीं ! हे पांचशें रुपये आले म्हणजे त्याचें काय बरें करावें ? एकदां माथेरानला जाऊन यावें. (जांभई देऊन) झोप येऊं लागली, आतां थोड्या वेळानें जाऊन निजतोंच. सोराबला आतां बहुधा पैज लावल्याबद्दल पश्चात्ताप होत असेल—झोप आलीच," असें म्हणत डोळे मिटून ते झोपी गेले.

[४]

एकाएकीं खिडकीजवळ कांहीं खडखडलें. शेटजींचें पहिल्यानें तेथें लक्ष नव्हतें; परंतु तो आवाज पुनः झाला, तेव्हां ते दचकून जागे झाले. पुनः कांहीं वेळ सर्वत्र शांत होतें. आपणास स्वप्न पडलें असावें, असें वाटून शेटजींनीं पुनः डोळे मिटले. इतक्यांत पूर्वीप्रमाणेंच आवाज झाला, व खिडकींतील पडदा थोडासा हालला. शेटजींची नजर तत्क्षणीं खिडकीकडे गेली, तों पडदा एके बाजूला सारून एका मनुष्याचा पाय खिडकींतून आंत आल्याचें त्यांच्या लक्षांत आलें. शेटजींनीं खुर्चीचे हात घट्ट धरले व आतां मोठ्यानें ओरडणार, इतक्यांत आंत आलेल्या पायांत बुटावर दिसणारा लाल पायमोजा त्यांच्या दृष्टीस पडला. तावडतोब त्यांच्या मुखावर विजयानंद झळकूं लागला ! त्या पायमोजाकडे व आपल्या पायमोजाकडे पाहून शेटजींनीं स्मित केलें व हळूच "सोराब !" असें ते पुटपुटले.

इतक्या वेळांत खिडकी उघडल्याचा आवाज झाला. पडदा एकीकडे झाला व अस्लाजी हळूच आंत आला. त्यानें तोंडावर बुरखा घेतलेला होता. त्याच्या एका हातांत चोरकंदील असून दुसऱ्या हातांत एक रिकामी पिशवी होती. खिशांतून एक सोटगा डोकावीत होता. त्याची तुमान थोडी वर चढवलेली असल्यामुळें लाल पायमोजे स्पष्ट दिसून येत होते. आरामखुर्चींची पाठीमागील बाजू अस्लाजीकडे वळलेली असल्यामुळें तो आंत आला त्या वेळीं शेटजी त्याच्या दृष्टीस पडले नाहींत; परंतु तो टेबलाजवळ आल्याबरोबर शेटजी एकदम उठून उभे राहिले व म्हणाले "वा ! इतक्यांत आलास काय ?"

अस्लाजी एकदम दचकला व त्याच्या हातांतील पिशवी खालीं पडली; परंतु लगेच त्यानें खिशांतून सोडगा बाहेर काढला व तो दरडावून म्हणाला "तेथून हालालास तर खबरदार, ठारच मरशील !"

" काय ?" शेटजी उद्गारले.

" अगदीं चूप ! नाहींतर—"

पिरपिर करणारीं लहान मुलें निरोगी असावींत अशी आपली इच्छा आहेना ?
तर मग त्यांनां 'बालजीवनामृत' द्या.

" अरे यट्टा झाली तरी—"

" तोंड आवरून धर, नाहीं तर संभाळ! मी येथें कां आलों आहें तें तुला ठाऊकच आहे!" अस्लाजी झणाला.

" होय, मला ठाऊक आहे," शेटजी झणाले. "तूं येणार तें मला माहीतच होतें; पण इतक्यांतच येशील असें मात्र वाटलें नव्हतें."

" मी येणार तें तुला माहीत होतें?"

" खरोखर माहीत होतें." असें झणून शेटजींनीं डोळे मिचकावून आपल्या पायमोजाला हात लावून दाखविला.

अस्लाजी आश्चर्यानें त्याच्याकडे पाहून झणाला "तुझ्या मनांत तरी काय आहे? थोडी जास्ती घेतली आहेस वाटतें?"

"मी घेतली आहे?" शेटजींनीं विचारलें.

"नाहीं तर काय! चूप रहा, हरामखोर नाहीं तर! *या सोडग्यानें बडवून सोडीन—*"असें झणून अस्लाजीनें सोडगा उगारला.

शेटजी चूप राहिले; पण मनांत झणाले "वाहवा, सोराब, बतावणी पण बतावणी करतोस! अगदीं चोरासारखा वागत आहेस. तुझ्या मनांतून नाटकच करायचें असेल, तर मी तरी तुझ्या आड कशाला येऊं! तुझ्या तंत्राप्रमाणेंच घेतों झालें. मी तुला चोरच समजतों असें दाखवितों, झणजे यट्टा पुरी होईल." ते मोठ्यानें झणाले "तर मग आतां तुला पुढल्या कामाला लागावयाचें असेल!"

"त्यासाठींच तर मी येथें आलों आहें." अस्लाजीनें उत्तर केलें. "जागा तर चांगली दिसते, पण त्यांत नेण्यासारखें कांहीं असेल की काय कोणास ठाऊक?"

"चल तर मग, कामाला लाग," शेटजी झणाले.

"तुम्ही तरी चमत्कारिक गृहस्थ दिसतां!" अस्लाजी सभोंवतीं पाहत झणाला. "हीं भांडीं रुप्याचीं आहेत की गिल्ट्याचीं आहेत!"

शेटजी रागावून झणाले "काय भलतेंच विचारतोस! मी गिल्ट्याचें सामान कधींहि वापरीत नाहीं हें तुला माहीतच आहे."

"मला तें कांहीं माहीत नाहीं!" अस्लानी झणाला. "मला इतकेंच माहीत आहे, की, हल्ली गांवांत खोटा माल फार फैलावला आहे. असा खोटा माल घरांत भरून लोकांनां फसवायला कोणाला शरम देखील वाटत नाहीं. पण खरा असो कीं खोटा असो, हा आतां माझ्या थैलींत चालला—"

बोलतां बोलतां खिशांतून ॲसिडनें भरलेली एक कुपी काढून अस्लाजीनें एकदोन चमचे तपासले व एकामागून एक तीं सर्व भांडीं त्यानें आपल्या थैलींत घातलीं.

शेटजींनीं खुष होऊन झटलें "वाहवा, शाबास!"

अस्लाजी एकदम त्यांच्याकडे वळून झणाला "काय, शाबास काय?"

"तूं काम अगदीं हुबेहूब करीत आहेस!" शेटजी झणाले.

"हें पहा शेटजी, तुम्ही गप बसाल तर त्यांत शहाणपणा आहे. नाहीं तर मग या माझ्या सोडग्याशी गांठ आहे, समजलांत!" अस्लाजी झणाला.

आपण फारच घाबरलों असें दाखवून शेटजी झणतात "नाहीं बाबा, मी कांहीं बोलत नाहीं. माझ्या बोलण्यापासून तुझ्या कामांत व्यत्यय येत असेल तर मी आपला चूप राहतों कसा!"

"तुमची फारच कटकट बुवा!" अस्लाजी झणाला. "तुम्ही एकसारखे बटबट लावाल तर मग मी माझें काम कसें करूं? बोला आतां, आणखी तुमच्याजवळ काय काय आहे तें? येथें आल्याबरोबर सर्व निकाल लावून टाकतों."

"खरें बाबा, एकदां काम हातीं घेतलें झणजे तें पुरें केलें पाहिजे!" शेटजी झणाले.

अस्लाजी एकेक वस्तु तपासीत खोलींतून फिरत होता. त्याला विशेष कांहीं आटळलें, कीं, तो तें थैलींत टाकी. तो शेटजीस पुनः झणाला "मीं काय सांगितलें तें लक्षांत देवा आणि उगाच बटबट करूं नका!"

शेटजींची तब्येत गरम झाली; पण ते मनांत झणाले "गुलामानें थोडी जास्ती घेतली आहे, नाहीं तर हा माझ्याशीं अशा रीतीनें बोलता ना! उद्यां पोलीसची चांगली कानउघाडणी केली पाहिजे!" ते मोठ्यानें झणाले "आणखी तुला किती वेळ लागेल!"

"अगदीं कांहीं झणून विचारूं नको!" अस्लाजी झणाला.

"तूं शुद्धीवर आहेस कीं नाहींस? मला अशी बोलणी चालायचीं नाहींत!" शेटजी एकदम रागानें झणतात.

मातृपदास पोहोंचलेल्या प्रत्येक स्त्रीनें आपल्या संग्रहीं बालजीवनामृत ठेवणें
अत्यंत जरूरीचें आहे. प्रसंगी त्याचा चांगला उपयोग होतो.

अस्लाजीनें सोडगा हातांत घेतला. "आतां कमाल झाली याची! याच्या मनांतून मार खायचाच असेल— (सिगारेट केस पाहून) अरे हें काय, सिगारेट केस! रुप्याची आहे कीं इलेक्ट्रो प्लेट आहे?"

"खूब छान!" शेटजी ह्मणाले. "घे, ती केस घे."

"बरें तर, तुह्मी सांगतां तर घेतों!" अस्लाजी ह्मणाला आणि शेटजींकडे टक लावून पहात त्यानें विचारलें "तुमच्याजवळ वॉच आहे?"

"अर्थात् आहे!" शेटजी ह्मणाले.

"ठीक आहे, तर मग तें काढा पाहूं!"

"कशाला?"

"कशाला ह्मणजे? मला पाहिजे ह्मणून! चला, मला वेळ नाहीं!" अस्लाजी दरडावून ह्मणाला.

"अरे, पण तें भारी किंमतीचें आहे. तूं खराब करशील."

"आतां जास्त वेळ लावाल तर मी तुह्मालाच खराब करीन!"

शेटजी अजून कांकूं करीत होते; परंतु त्यांनीं पाहिलें, हा काहीं ऐकत नाहीं. तेव्हां वॉच काढून त्यांनीं टेबलावर ठेवलें व ते ह्मणाले "पहा, तें नीट संभाळ बरें!"

अस्लाजीनें वॉच आपल्या खिशांत ठेवलें व ह्मटलें "होय संभाळीन बरें! आतां सांखळी काढा पाहूं?"

"अरे, आतां सांखळी कशाला तुला पाहिजे?"

"पाहिजे ह्मणून तर मागतों! नाहीं तर कशाला मागितली असती? चला, मला वेळ नाहीं!"

सांखळी देऊन शेटजी ह्मणतात "बरें सोंग आणलेंस! ठीक आहे, त्याची पुरी बतावणी होऊं दे!"

अस्लाजी हंसत ह्मणाला "माझेंहि तेंच ह्मणणें आहे! काम करायचें तें पुरें करावें!"

"पण पहा, त्या वॉचची नीट काळजी घे हां!"

"कां?"

"अरे तें उंची वॉच आहे. बिघडलें तर नसती पंचाईत व्हायची!"

अस्लाजीला हंसें आवरेना. "घेईन बुवा, चांगली काळजी घेईन! माझ्या जिनसेची काळजी घ्यावयाची तशीच त्याची घेईन, मग तर झालेना? वॉचची काळजी घेईन आणि दुसऱ्या जिनसांचीहि काळजी घेईन. आतां वेळ झाली, मला गेलें पाहिजे—" असें ह्मणून त्यानें थैली खांद्यावर टाकली व तो खिडकीकडे जाऊं लागला.

शेटजी हंसून ह्मणाले "जायची इतकी घाई कां? एवढें काम केलेंस तर एकादें ग्लास घेशील की नाहीं?"

"त्या कामाला माझी कांहीं हरकत नाहीं!" अस्लाजी ह्मणाला, आणि त्यानें एक ग्लास भरून रिकामें केलें.

शेटजींनीं सिगारबॉक्स त्याच्यापुढें करून ह्मटलें "एक चिरूट तर ओढशील?"

अस्लाजीनें त्यांतील एक चिरूट पेटविली व बॉक्स आपल्या थैलींत टाकली.

"अरे बॉक्स नको घेऊं!" शेटजी ह्मणाले.

"माझें काम मला समजतें कीं तुह्माला समजतें?" असें ह्मणून त्यानें आणखी एक ग्लास झोंकलें व तो जाऊं लागला.

"तुला जें जें पाहिजे तें सर्व मिळालें ना?" शेटजींनीं हंसत हंसत विचारलें.

अस्लाजी गोंधळून त्याच्याकडे पहात ह्मणतो "तुमच्या मनांत काय आहे तें समजत नाहीं!"

थट्टाच करायची आहे तर ती शेवटपर्यंत करावी, असा विचार करून शेटजी ह्मणाले "अरे, आणखी कांहीं घेण्यासारखें असेल तर घेऊन जा, मागें ठेवूं नको. तुझ्या थैलींत अजून बरीच जागा आहे, व रुप्याचें मेणबत्तीचें स्टँड, ही सोन्याची काड्यांची पेटी, ही गुलाबदाणी, एकेक घे—" असें ह्मणून आपण होऊन त्यानीं एकेक वस्तु अस्लाजीच्या थैलींत घालण्याचा सपाटा चालविला.

अस्लाजी आश्चर्यानें त्यांच्याकडे पाहून शेवटीं ह्मणतो "मीं आजपर्यंत पुष्कळ माणसें पाहिलीं, पण तुमच्यासारखा वेडगळ कोणी पाहिला नाहीं!"

"बरें, आतां रिकामा वेळ घालवूं नको, जा लवकर!"

"तुह्मी सांगतांच जायाला, तर जातों." असें ह्मणून अस्लाजीनें एक पाय खिडकीबाहेर टाकला व तो ह्मणाला "पुनः आतां केव्हां येऊं?"

"सकाळीं जेवणखाण आटोपल्यावर ये!"

अस्लाजी इतक्यांत खिडकीबाहेर गेला होता, तिकडूनच त्यानें विचारलें "काय?"

"आणि येशील तेव्हां पांचशें रुपयांचा चेक घेऊन ये!" शेटजी ह्मणाले.

वाईट सवयीमुळें दूषित झालेला मूत्राशय शुद्ध करण्यास 'कपुरेलाईन' हा एकच उपाय आहे. कि. रु. १॥.

"पांचशे रुपये ! कशाचे ?"

"तूं माझे रुपये देणें लागतोस ते !" शेटजी म्हणाले.

दुरून हंसण्याचा ध्वनि ऐकूं आला आणि पुनः सर्वत्र स्तब्ध झालें.

[५]

कांहीं वेळ शेटजी गोंधळल्याप्रमाणें दिसले; परंतु लवकरच त्यांच्या मुखावर स्मित झळकूं लागलें. ते आपल्याशींच म्हणाले "गुलामानें काम मोठ्या शिताफीनें केलें. वा सोराब ! तूं अगदीं एकाद्या बिलंदराप्रमाणें वागलास ! एकदोनदां मलाहि संशय आला. येड्यानें वेष तरी किती शिताफीनें पालटला होता ! आणि आवाज तरी कसा बदलला होता ! पण ते पायमोजे त्यानें बदलायचे होते ! त्यांच्या योगानें मीं त्याला एकदम ओळखलें. तेवढे पायमोजे जर त्यानें बदलले असते, तर मीहि फसलों असतों आणि तो चोरच आहे असें मला वाटलें असतें. या एका चुकीसाठीं त्याला पांचशें रुपयांचा दंड पडला. आतां उद्यां येथें आला म्हणजे त्याची अशी फजीती उडवतों ! आतां किती वाजले असतील बरें ?" असें म्हणून त्यांनीं खिशाला हात लावला व आठवण होऊन थोड्या त्रासानें झटलें "गुलामानें माझें घड्याळ नेलें तें मी अगदींच विसरलों ! मस्करी करायची तरी ती इतक्या थरावर नेऊं नये ! आणि तो माझ्याशीं बोलत होता तरी किती उद्धट रीतीनें ! उद्यां आला म्हणजे त्याला चांगलें झाडलें पाहिजे. चला आतां झोंप येऊं लागली, जाऊन निजावें एकदां ! " असें म्हणून शेटजी निजण्यासाठीं म्हणून जाऊं लागले-इतक्यांत त्यांना टेलिफोनची घंटा मोठ्यानें वाजलेली ऐकूं आली.

रात्र बरीच झाली होती. इतक्या अपरात्रीं टेलिफोनमधून बोलायला कोण आलें, याचें शेटजींना आश्चर्य वाटलें. टेलिफोनजवळ जाऊन त्यांनीं नळकंडी कानाला लावली आणि "हलो ! कोण आहे ?" म्हणून विचारलें. परंतु आंतून आलेला जबाब ऐकल्याबरोबर ते चरकले. "कोण ?-सोराब ! काय म्हणतोस सोराब ? सिगारेटची केस येथें विसरलास ?-अरे ती तूं घेऊन गेलास ! ती आतांच मेलीस !-बस बस, थट्टा पुरे कर आतां !" असें म्हणून त्यांनीं नळकंडी ठेवून दिली व सोराबच्या वरोवर बोलणें बंद केलें.

टेबलाजवळ येऊन त्यांनीं पुनः एक ग्लास भरलें व ते आपणाशींच म्हणाले "पहिल्यानें मी बराच चपापलों. पण आतां हा कोठून बरें बोलत होता ? मी त्याला विचारायला विसरलों. विचारलें असतें तर बरें झालें असतें !"

असें म्हणून त्यांनीं ग्लास उचलला आणि आतां तोंडाला लावणार इतक्यांत टेलिफोनची घंटा पुनः वाजूं लागली. शेटजी चवताळून म्हणतात "काय त्रास आहे हा ! एक क्षणभर म्हणून चैन पडूं देत नाहींत ! पुनः कोण आला कोणास कळे !"

ते पुनः टेलिफोनजवळ गेले व त्यांनीं नळकंडी कानाला लावली. लवकरच त्यांचा चेहरा उतरला "काय ?-मी मंचरजीशेट आहें काय ?-होय होय, मी मंचरजी शेट आहें !-पण तूं कोण ?-सोराब ? आतां फिरून तुला काय पाहिजे ?-तूं सिगारेटची केस घेतली नाहींस ?-अरे मी सांगतों कीं तूं घेतलीस-पण तूं बोलतोस कोठून ? ऐकूं येत नाहीं, मोठ्यानें बोल ! -तूं कंबालाहिलवरील तुझ्या बंगलींतून बोलतोस ? भलतेंच !-काय तूं व्हिक्टोरिआंतून येट घरीं गेलास आणि अजून तेथेंच आहेस !-मला या गोष्टी सांगतोस ? -काय ? थट्टा नाहीं, खरेंच !"

शेटजींनीं चवताळून नळकंडी खालीं टाकली व पुनः कानाला लावून ते ओरडून म्हणाले ."ऐक,-मी काय विचारतों त्याचें उत्तर दे. दहा मिनिटांपूर्वी चोराच्या वेषानें येऊन येथून रुप्याचें सामान वगैरे घेऊन तूं गेला नाहींस काय ?-काय ? नाहीं ?-मग येथें येऊन गेला तो कोण ?-तुला माहीत नाहीं ?-अरे पण त्याच्या पायांत लाल पायमोजे होते-काय म्हणतोस ?-लाल पायमोजे जगांत तूं एकटाच घालीत नाहींस ?-मग तो खराच चोर होता ?-काय म्हणतोस ?-असलाच पाहिजे !"

शेटजींनीं रागानें नळकंडी फेकून दिली. खोलींतून इकडून तिकडे ते येरझारा घालूं लागले. नंतर खिडकीजवळ जाऊन रस्त्यांत पाहूं लागले. पुनः धांवत टेलिफोनजवळ जाऊन पोलिस स्टेशनशीं कनेक्शन करण्यास त्यांनीं सांगितलें.

आपला चेहरा फिकट व निस्तेज कां दिसतो ? रोगामुळें अशक्त झालां असाल तर
प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका वापरा.

लेखांक २ रा.

संतांचा परिचय.

लेखक–श्रीयुत गोविंद गोपाळ टिपनीस.

अवतार आणि चमत्कार.

संत कोणाला म्हणावें? याचा विचार प्रास्ताविक लेखांत केल्यानंतर, त्या लेखांत म्हटल्याप्रमाणें आज आम्ही येथें एकादें संतचरित्र देऊं, असें आमच्या वाचकांस साहजिकच वाटलें असेल; पण तसें करण्यापूर्वी संतांचीं चरित्रें, आम्ही ज्या ग्रंथांच्या आधारानें लिहिणार आहों,–त्या मूळ चरित्रग्रंथांचा आणि सर्व संतांच्या अत्यंत उज्वल, उदात्त, प्रेममय आणि सर्वतोपरि अनुकरणीय चरित्रांत आढळून येणाऱ्या अशा एकदोन विशेषांचा येथें अवश्य विचार झाला पाहिजे, असें वाटल्यावरून आज या लेखाच्या द्वारें तो करण्याचें योजिलें आहे.

आमच्यामध्यें चरित्रग्रंथांची इतकी उणीव आहे, कीं, अखिलमहाराष्ट्रास ललामभूत अशा हिंदुपदपातशाहीची सर्वांगसुंदर इमारत उभारणाऱ्या छत्रपति शिवाजी महाराजांच्या अवतारास जरी अवघीं दोन सवादोनशेंच वर्षें झालीं आहेत, तरी त्यांच्या वंशावद्दल, जन्मतिथीवद्दल आणि त्यांनीं केलेल्या विशेष महत्त्वाच्या गोष्टींवद्दल आमच्या इतिहाससंशोधकांत अद्यापि वाद चालू आहेत; आणि तानाजी मालुसरे, बाजी प्रभु व येसाजी निकम वगैरे त्यांच्या साहाय्यकर्त्यांच्या तर नांवांपलीकडे आम्हांला कांहींच माहिती नाहीं! फार काय, ते अमुक जातीचे होते, हेंहि निश्चितपणें सांगतां येत नाहीं. या चरित्रलेखनाभावाचीं जीं अनेक कारणें आहेत, त्यांत आमची स्वतःसिद्ध परमार्थविषयक आवड, आणि त्याबरोबरच आमचा ऐहिक गोष्टींसंबंधाचा विराग, हीं बऱ्याच महत्त्वाचीं कारणें असावीं; आणि म्हणूनच, लढाईच्या मैदानावर कर्दनकाळ शत्रूच्या सेनानायकांस 'दे माय धरणी ठाय' करावयास लावणाऱ्या शिवाजी, खंडो बल्लाळ, खंडेराव दाभाडे इत्यादि वीर पुरुषांच्या चरित्रलेखकांपेक्षां, संसारसमरभूमीवर कामक्रोधादि अनिवार सेनानायकांवरोवर लढून मनोजय करणाऱ्या संतांचे चरित्रलेखक आम्हांमध्यें अधिक झाले आहेत, असें आम्हाला वाटतें.

भगवद्भक्त नामदेव, हा या संतचरित्रलेखकांचा अग्रेसर होय. हा शके ११९२ मध्यें जन्मला, आणि शके १२७२ त समाधिस्थ झाला. म्हणजे हा होऊन गेल्यास आज सुमारें साडेपांचशें वर्षें झालीं. यानें आपल्या पूर्वकालीन आणि समकालीन अशा पंधरा संतांची त्रोटक चरित्रें लिहिलीं आहेत; इतकेंच नव्हे, तर एक आत्मचरित्रहि त्यानें लिहिलें आहे. याच काळांतला दुसरा चरित्रकार सच्चिदानंदबावा. यानें फक्त आपले गुरु श्रीज्ञानेश्वर महाराज यांचेंच चरित्र लिहिलें आहे. नाभाजी हा कालानुक्रमानें तिसरा चरित्रकार होय. हा होऊन गेल्यास अजमासें साडेतीनशें वर्षें झालीं. यानें 'भक्तमाल' नांवाचा हिंदी भाषेंत छप्पई छंदांत जो ग्रंथ लिहिला आहे, त्यांत बऱ्याच संतांचीं विस्तृत चरित्रें दिलीं आहेत. पण, तो म्हणतोः–

॥ ताको साधुनको कहे कहत महातम बानी ॥
॥ लई ग्रंथनी मत अधुनिक न रचे रसकी खानी ॥१॥

"थोर थोर पुरुषांच्या तोंडीं साधूंसंबंधीं ज्या ज्या दंतकथा होत्या, त्या त्या एकत्र करून मीं हा ग्रंथ लिहिला."

हा नाभाजी जन्मांध असून जातीचा डोंब होता. या ग्रंथाधारें पुढें उद्धव चिद्घनानें 'भक्तकथामृतसार' आणि 'गोरोबाचें चरित्र' हे दोन ग्रंथ लिहिले. सुप्रसिद्ध चरित्रकार महीपति ताहराबादकर यानें आपले ग्रंथ सत्राव्या शतकाच्या अखेरीस लिहिलेले असून ते–

"तरी उत्तर देशीं साचार। नाभाजी विरंचीअवतार। तेणें संतचरित्रग्रंथ थोर। ग्वाल्हेरी भाषेंत लिहिला असे॥ आणि मातदेशीं उद्धव चिद्घन॥

गुलशन (रजिस्टर्ड) शुभ्र व तांबड्या गुलाबापासून बनविलेलें. वास सौम्य व मधुर.
पाव तोळा रु. १॥. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

स्थांहीं भक्तचरित्रें वर्णिलीं जाण । दोहींचें संमत एक करून । भक्तविजय आरंभिला ॥ "

या व इतर ग्रंथांवरील त्याच्या अशाच शेऱ्यांवरून नाभाजी आणि उद्धव चिद्घन यांच्या ग्रंथांवरून, लिहिल्याचें उघड होत आहे. तसेंच तो ह्मणतो, कीं, " जेवीं दुग्धामाजीं धारवणी । उदक थोडें घालिती." भ. वि. अ. ३, ओ. ३३६.

"दुधांत धारवणी ह्मणून पाणी घालून जसें तें वाढवितात तसे आपण आपले ग्रंथ पदरची माहिती घालून थोडे वाढविले आहेत."

. महीपतीच्या या ग्रंथांवरून अठराव्या शतकांत, धुंडिराज नरहरी माळू यानें 'भक्तकथामृत,' नांवाचा ग्रंथ लिहिला. याशिवाय ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदासादि संतांचीं स्वतंत्र चरित्रें लिहिणारे कांहीं ग्रंथकार झाले आहेत, ते निराळेच ! आह्मीं या लेखमालेंत संतांचीं जीं चरित्रें देण्याचें ठरविलें आहे, त्यांचा शक्य तितका भाग, चरित्रविषयक संतांच्या ग्रंथांतून देण्याचा जरी आमचा विचार आहे, तरी निरुपायामुळें, दंतकथांच्या द्वारें लिहिलेल्या या चरित्रांचा थोडाबहुत आधार आह्माला घेतलाच पाहिजे. ह्मणून या चरित्रांत सर्वत्र दिसून येणाऱ्या महत्त्वाच्या एकदोन विशेषांबद्दल येथें थोडें विवेचन करणें अवश्य दिसतें.

हीं चरित्रें जरी केवळ ऐकीव माहितीवर लिहिलेलीं आहेत, तरी प्रस्तुत चरित्रकारांनीं आपल्या लेखांनीं महाराष्ट्र भाषेवर आणि देशावर अनंत उपकार करून ठेविले आहेत, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. या चरित्रकारांनीं, कोणाला विष्णूचा तर कोणाला ब्रह्मदेवाचा, कोणाला शंकराचा तर कोणाला मारुतीचा, अशा रीतीनें सर्व संतांनां सर्व देवांचे अवतार बनविले आहेत. त्यांच्या या ह्मणण्यांत कितपत तथ्य आहे, हें आपण आतां पाहूं. कैवल्योपनिषदांत ह्मटलें आहे, कीं:-

स ब्रह्मा स विष्णुः स रुद्रः स शिवः सोऽक्षरः स परमः स स्वराट् स इन्द्रः स कालाग्निः स चंद्रमाः ॥ ७ ॥

"ब्रह्मा, विष्णु, रुद्र, शिव, अक्षर, स्वराट्, इन्द्र, कालाग्नि आणि चन्द्र इत्यादि नांवें, त्या एकमेवाद्वितीय अशा परमेश्वराचींच आहेत."

ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायांत, ज्ञानेश्वर ह्मणतातः-

"अगा सृष्टिवेळे प्रियोत्तमा । जया नांव ह्मणती ब्रह्मा । व्याप्ति जें विष्णुनामा । पात्र जाहलें ॥ ९२४ ॥ मग आकारु हा हारपे । तेव्हां रुद्र जें ह्मणिपें । तें गुणत्रय जेव्हां लोपे । तैं जें शून्य ॥ ९२५ ॥

"ब्रह्मा, विष्णु आणि महेश किंवा रुद्र, हीं एकाच ईश्वराला निरनिराळ्या कार्यांवरून आपण दिलेलीं तीन वेगळालीं नांवें आहेत."

अर्थात् ब्रह्माविष्णुमहेशादि जीं नांवें आपण पुराणांतरीं पाहतों, त्या नांवांच्या व्यक्तींस स्वतंत्र अस्तित्व नाहीं; तर "वेवेष्टि व्याप्नोति चराचरं जगत् स विष्णुः" इत्यादि व्युत्पत्तीप्रमाणें तीं उत्पत्तिस्थितिलयकर्त्या एका ईश्वराचींच आहेत. सारांश, ब्रह्मदेवादि व्यक्तींस स्वतंत्र अस्तित्वच जर नाहीं, तर त्यांनीं मनुष्यरूपांनीं निरनिराळे अवतार घेतले असें ह्मणणें कसें बरोबर होईल?

आतां 'अवतार' या शब्दांत स्वतंत्र जन्माची जी कल्पना आहे, तशा प्रकारचा जन्म ईश्वर घेतो, असें ह्मणावें तर तेंहि संभवत नाहीं. कारण, तो नित्य, निर्विकार आणि अनाद्यनंत आहे.

स पर्यं गाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरꣳ
शुद्धमपापविद्धम् ॥ यजु० ४० । ८ ॥

अर्थात्, तो सर्वव्यापी आणि अनंतबलवान् आहे. तसाच तो शुद्ध आहे, अकाय ह्मणजे कधींहि शरीर धारण न करणारा अथवा अजन्मा आणि व्रणहीन आहे. तो केव्हांहि नाडी, शिरा आणि स्नायु यांच्या बंधनांत न पडणारा असून अपापविद्ध असा आहे. अशा परमेश्वरानें, मासा, कांसव, डुकर, सिंहमुखी मनुष्य आणि मनुष्य यांच्यासारखे क्षुद्र देह धारण करून अवतार घेतले, असें केवळ

" यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽत्मानं सृजाम्यहम् ॥ "
भ. गी. अ. ४-७

या श्रीकृष्णोक्तीचा अर्थ करून प्रतिपादन करणें, हा शुद्ध वेडेपणा आहे. या श्लोकाचा अर्थ करतेवेळीं पूर्वीचा-

" अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ "

हा श्लोक अवश्य विचारांत घेतला पाहिजे.

कामिनीया व मालती बाजारी मालाहून सर्वोत्कृष्ट, अत्यंत सुवासिक व आनंददायक. पाव तोळा कि रु. १॥. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

या श्लोकांतील 'संभवामि' या पदाचा 'मी जन्म घेतों' असा जो अर्थ करण्यांत येतो, तो बरोबर नाहीं. या पदावरील शंकराचार्यांचें भाष्य पहा.—

" देहवानिव भवामि जात इवाऽऽत्ममायया ऽऽत्मनो मायया न परमार्थतो लोकवत् "

"मी मायेला वश करून घेऊन, देहवंत झाल्यासारखा व जन्म घेणाऱ्या प्राण्यासारखा होतों. अर्थात्‌च हा माझा देह जन्म वगैरे सर्व मिथ्या-आभासरूप-आहेत."

श्रीज्ञानेश्वर आपल्या भाष्यांत ह्मणतातः—

"मीं जो देहधारण केल्यासारखा अथवा जन्म घेतल्यासारखा लोकांनां वाटतों, तो केव्हां? तरः—
तेंहि भ्रांतिबुद्धि तरी घडे । येऱ्हवीं नाहीं ॥ ४६ ॥
कीं एकचि दिसे दुसरें । तें दर्पणाचेनि आधारें ॥
येऱ्हवीं काय वस्तु विचारें । दुजें आहे ॥ ४७ ॥"

सारांश, अवतारांच्या समर्थनार्थ गीतेंतील जीं वचनें देण्यांत येतात, त्यांचा हा वरील अर्थ लक्ष्यांत घेतला असतां, ईश्वर अवतार घेतो असें जें वाटतें, तें केवळ मायेमुळें अथवा भ्रमामुळें वाटतें, हें उघड आहे. आरशांतील प्रतिबिंब अडाणी लोकच खरें मानितात; समंजस किंवा विचारी माणसें तें कधींहि खरें मानीत नाहींत. ह्मणून कोणीहि जाणूनबुजून या भ्रमांत पडण्याचें कारण नाहीं.

सत्पुरुषांचें संरक्षण करणें, दुष्टांचा संहार करणें, आणि विघडलेली धर्माची घडी नीट बसविणें, अशीं अवतारांचीं तीन कार्यें श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलीं आहेत. आणि खरोखरच तीं इतकीं महत्त्वाचीं आहेत, कीं, त्यांच्या अभावीं कोणताहि समाज सुरळीतपणें चालणें शक्य नाहीं. असें जरी आहे, तरी 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम्' शक्ति असलेल्या, किंवा इच्छामात्रेंकरून अखिल ब्रह्मांडाची घडामोड करणाऱ्या परमात्म्याला तीं करण्याकरितां अवतार घेण्याचें मुळींच कारण नाहीं. 'यस्य निश्वसितं वेदाः' या वचनाप्रमाणें, वेद हे ज्याचा केवळ श्वास, त्याला ते आणण्याकरितां मासा होण्याचें कारण काय? पृथ्वीसारखे किंवा तिच्या अनंत पटींनें प्रचंड असे कोट्यवधि गोल जो केवळ आपल्या इच्छेनें मुलाच्या भिरभिऱ्याप्रमाणें अंतरिक्षांत सहज भ्रमवीत आहे, त्याला पृथ्वीसारखा त्याच्या अवाढव्य सृष्टींतील एक भिकार रजःकण साधारण घरण्याकरितां कांसव किंवा वराह बनावें लागलें असें मानणें, ह्मणजे त्या ब्रह्मांडनायकाविषयीं गाढ अज्ञान प्रकट करणेंच आहे! निरनिराळ्या चौऱ्यायशीं लक्ष योनि निर्माण करून त्यांचे योगक्षेम चालविण्याचें प्रगाढ सामर्थ्य असलेल्या भगवंताला हिरण्यकश्यपूच्या वधाकरितां जरूर तर एकादी अधिक योनि निर्माण करितां आली नसती काय? बळीला मारण्याकरितां त्या शुद्ध आणि अपापविद्ध परमेश्वरानें वटूचें कपटरूप धारण केलें असें मानणें, ह्मणजे आपल्या अंतःकरणांचीं कपाटें खोलून तीं पापमय विचारांनीं कशीं सडून गेलीं आहेत, हें जगाच्या निदर्शनास आणून देणेंच आहे! रावण आणि कंस यांनां मारण्याकरितां ईश्वरानें रामकृष्णावतार घेतले, किंवा सहस्रार्जुनाला मारण्याकरितां तो परशुराम झाला असें मानणें, ह्मणजे हे अवतार घेते वेळीं तो सर्वसाक्षी प्रभु 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' हें त्रिकालाबाधित सत्य विसरला, आणि आमच्यासारखाच मूर्तिमंत झाला, अशी खोडसाळ कल्पना करणेंच आहे. सारांश, अवतारकार्यें जरी फार महत्त्वाचीं आणि अवघड आहेत, तरी ईश्वरी अतुल पराक्रमाचा विचार केला असतां तीं इतकीं क्षुद्र आणि सोपीं आहेत, कीं, तीं घडवून आणण्याकरितां ईश्वरानें अवतार घेतला, असें ह्मणणें ह्मणजे त्याच्याविषयीं अज्ञान प्रगट करणेंच आहे. एकंदरींत, विष्णु वगैरेंचे अवतार त्या निराळ्या व्यक्ति नसल्यामुळें जसे संभवनीय नाहींत, तसे ईश्वराचेहि अवतार संभवत नाहींत.

आतां ही अवतारमीमांसा आपण थोड्या निराळ्या तऱ्हेनें पाहूं.

" नैगमीं कुरु मर्यादामवतीर्य महीतले ।
निर्जित्य सौगतान्सर्वानाम्नायार्थविरोधिनः ॥५५॥
ब्रह्माऽपि ते सहायार्थं मंडनो नाम भूसुरः ॥
भविष्यति महेंद्रोऽपि सुधन्वा नाम भूमिपः ५६"

शं. वि. स. १ ला.

या व यापुढील श्लोकांत माधवाचार्यांनीं, बौद्ध मताचें खंडन करून वेदोक्त कर्ममार्गाची संस्थापना करण्याकरितां शंकराच्या आज्ञेप्रमाणें कार्तिकस्वामीनें कुमारिलभट्टाचा, ब्रह्मदेवानें मंडनमिश्राचा आणि

दिलबहार, कामिनीया, कामिनीयायोके, स्प्रिंग जवेल, गुलशन. मिळण्याचें ठिकाण
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

इंद्रानें सुधन्वा राजाचा अवतार घेतल्याचें सांगितलें आहे. आतां ज्या बौद्धमताच्या खंडनार्थ हे अवतार झाल्याचें माधवाचार्य सांगतात, त्याची संस्थापना करणारा हा बुद्ध तरी कोण होता, हें आपण पाहूं. आर्य-सुधाकर ग्रंथांत सांगितलें आहेः-

"श्रीविष्णोरवतार एष नवमो बुद्धाभिधानोऽभवत्"

तो श्रीविष्णूचा नववा अवतार होता. शंकराचार्य हे महादेवाचे अवतार होते ही गोष्ट जरी सर्वश्रुत आहे, तरी कूर्मपुराणाच्या ३० व्या अध्यायांतील या संबंधाचें एक वचन येथें देणें बरेः-

" कलौ रुद्रो महादेवो लोकानामीश्वरः परः ॥
करिष्यत्यवतारं स्वं शंकरो नीललोहितः ॥ १ ॥"

आतां आमच्या मोळ्या समजुतीप्रमाणें जर हीं सर्व वचनें प्रमाण मानिलीं, तर कसा घोंटाळा होतो तो पहा.

विष्णूनें स्थापिलेल्या धर्माचा उच्छेद कार्तिक, ब्रह्मदेव आणि इंद्र या तिघांनीं एकजुटीनें केला, आणि त्यांनीं स्थापिलेल्या धर्माचा उच्छेद करण्याला महादेव शंकराचार्य झाले. तेव्हां आतां 'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे' असें जें ईश्वरावताराच्या कार्याविषयींचें गीतावचन आहे, त्यांतील 'संभवामि' या पदाचा कर्ता कोण? अर्थात्, ज्याचा अवतार कृष्ण, तो विष्णुच घेतला पाहिजे. तसा घेऊन धर्मसंस्थापनेकरितां विष्णु अवतार घेतो असें मानलें, म्हणजे असा प्रश्न उत्पन्न होतो, कीं, त्यानें स्थापिलेल्या बौद्धधर्माचा उच्छेद करण्याकरितां कार्तिकादिकांनीं कशाला अवतार घेतले? आणि पुढें त्यांनीं स्थापिलेल्या धर्माचा उच्छेद करण्याकरितां जन्ममरणाच्या उपद्व्यापांत शंकर कशाला पडले? दुसरा असा एक प्रश्न उत्पन्न होतो, कीं, परमेश्वरानें जन्म घेऊन ज्या धर्माची संस्थापना करावयाची, तो धर्म तरी कोणता? ज्या अर्थी गीता कृष्णानें म्हणजे विष्णूनें सांगितली आहे, त्या अर्थी त्यानें स्थापिलेला बौद्धधर्मच घेतला पाहिजे. तसें झालें, तर आमच्या सनातन वैदिक धर्माची वाट काय? मारून मुटकून वैदिक धर्मच समजावा असें झटलें, तर तो पडला त्रिकांडात्मक-तेव्हां त्यांतलें कोणतें कांड समजावयाचें? कर्म, उपासना कीं ज्ञान? कारण, हे तीनहि मार्ग जरी वेदप्रतिपादित आहेत, तरी त्यांच्या आचार्यांचे पुष्कळ वादविवाद झाले आहेत. इतकेंच काय, पण त्यांनीं एकमेकांच्या मार्गाची भरपूर निंदाहि केलेली आहे; आणि हे सर्वच आचार्य अवतारी! फार काय, या मार्गांतले पोट-भेद काढणारे आचार्यहि अवतारीच! आणि त्यांच्या आपसांत मारामाऱ्या! असा हा सर्व प्रकार अत्यंत लज्जास्पद आणि उच्चतम वेदांततत्वांस कालिमा लावणारा असल्यामुळें अवतार कोण घेतो व कोणला धर्माच्या उद्धारार्थ घेतो हें निश्चित नसल्यामुळें, आणि ईश्वर किंवा ब्रह्माविष्णुमहेशादि देवता अवतार घेतात ही गोष्ट अशक्य असल्यामुळें, हें अवतारांचें वेड आम्ही आपल्या डोक्यांतून तावडतोब काढून टाकिलें पाहिजे.

हींच अवतारकल्पना थोडी विस्तृत करून विचाराच्या कसोटीस कितपत उतरते, हें आपण आतां पाहूं. तैत्तिरीयोपनिषदांत झटलें आहेः-

" यतो वा इमानि भूतानि जायन्ते येन जातानि जीवन्ति यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति तद् ब्रह्मेति "

"ज्यानें सृष्टि निर्माण केली, ज्याच्या आधारानें ती राहते आणि ज्यामध्यें शेवटीं ती लय पावते, तें ब्रह्म होय."

श्वेताश्वतरोपनिषदांत झटलें आहेः-

" द्यावाभूमिऽजनन् देव एकः"

"आकाश आणि पृथ्वी हीं एकाच देवानें केलीं."

तसेंचः-

"विश्वस्यैकं परिवेष्टितारं ईशं तं ज्ञात्वाऽमृता भवन्ति"

"अखिल विश्वास व्यापणाऱ्या विश्वाच्या प्रभूस जाणिल्यानें मोक्षप्राप्ति होते."

हें उपनिषत्प्रतिपादित ईश्वराचें वर्णन अगदी यांत त्याला सृष्टिनिर्माणकर्ता, सृष्टीचा आधार, विश्वव्यापक आणि विश्वनियंता असें झटलें आहे. आर्यावर्त निर्माणकर्ता, किंवा आर्यावर्ताचा आधार, अथवा आर्यावर्तव्यापक आणि आर्यावर्तनियामक, असें झटलेलें नाहीं. सारांश, पृथ्वीवरील यच्चयावत् जीवांचा जो परमेश्वर तोच आमचा परमेश्वर, आणि आमचा परमेश्वर तोच बौद्ध, जैन, मुसलमान, खिस्ती, पारशी आणि यहुदी वगैरे निरनिराळ्या धर्मांतील आणि राष्ट्रांतील लोकांचा परमेश्वर, असेंच आम्हीं मानिलें पाहिजे. आतां गीतेंतील

दिलबहार, कामिनीया, गुलशन वगैरे अत्तरें सुंदर कुपींत लोकडाच्या केसींत पंद केलेलीं असतात. अँग्लो इंडियन ड्रग ब केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

श्लोकांच्या रूढार्थाप्रमाणें हा परमेश्वर जर अवतार घेत असेल, तर तो कोणत्याहि देशांत घेत असला पाहिजे. तो हिंदुस्थानांतच अवतार घेतो असें मानणें, ह्मणजे निव्वळ वेडेपणा आहे. आणि ह्मणूनच बौद्ध, जैन, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे धर्मांच्या संस्थापकांस ज्या ज्या धर्मांचे लोक जसे अवतार समजतात, तसें आह्मींहि आपल्या धार्मिक ग्रंथांच्या आधारानें त्यांनां अवतार मानून त्यांच्या भजनीं लागलें पाहिजे, आणि त्यांनीं प्रतिपादिलेले धर्म आह्मीं आपल्या धर्माप्रमाणेंच मानून एकमेकांचा द्वेष करणें सोडून दिलें पाहिजे; पण असें होत नाहीं हें मोठें दुर्दैव होय! हें तत्व जर सर्व धर्मांच्या आणि राष्ट्रांच्या लोकांनीं मान्य केलें असतें, तर धर्मयुद्धें होऊन त्यामुळें झालेले रक्तपात कधींहि झाले नसते. प्रत्येक राष्ट्र, आपल्या धर्मसंस्थापकास मात्र ईश्वरी अवतार, आणि आपला धर्मच तेवढा मोक्षदायक असें समजून, इतर धर्मसंस्थापकांस सैतानांचे अवतार, आणि इतर धर्म नरकास पोंचविणारे, असें मानितें; हें केवढें आश्चर्य आहे! पृथ्वीवरील सर्व धर्मांचीं मूलतत्वें जरी जवळजवळ एकच आहेत, तरी कांहीं बाबतींत ते धर्म एकमेकांपासून दक्षिणोत्तर ध्रुवांप्रमाणें अगदींच भिन्न आहेत. सर्वांचा ईश्वर जर एक आहे, तर तो अवतार घेऊन भिन्नभिन्न राष्ट्रांतील लोकांनां भिन्न धर्म सांगेल, आणि त्यांनां एकमेकांशीं लढण्यास प्रवृत्त करील, हें असंभाव्य आहे. आणि ह्मणूनच या सर्व धर्मसंस्थापकांनां ईश्वरी अवतार समजणें चुकीचें आहे.

श्रीकृष्ण, शंकराचार्य, आमचें संतमंडळ, बुद्ध, झोरोआस्टर, येशूख्रिस्त, महंमद वगैरे धर्मसंस्थापक अथवा प्रचारक ईश्वरावतार होते, ही कल्पना केवळ त्यांच्या असामान्य कृतींनंतर त्यांच्या चहात्यांच्या डोक्यांत येऊन ती त्यांनीं त्यांच्या चरित्रांत घुसडून दिली असावी. अर्जुन, श्रीकृष्णांचा परम मित्र आणि रात्रंदिवस त्याच्या सहवासांत राहणारा असतांहि 'कृष्ण परमेश्वराचा अवतार आहे' ही गोष्ट, गीतेंत सांगितल्याप्रमाणें कृष्णानें आपलें विश्वरूप दाखवीपर्यंत त्याला माहीत नव्हती, असें त्याच्या 'सखेति मत्वा प्रसभं यदुक्तम्' इत्यादि उद्गारांवरून स्पष्ट दिसतें. शंकराचार्य आणि इतर संतमंडळी यांचा त्यांच्या हयातींत जो विलक्षण छळ झाला, तो, ते ईश्वराचे अवतार आहेत अशी जर तत्कालीन लोकांची समजूत असती, तर कधींहि झाला नसता; आणि या परमेश्वरांशीं समजूनउमजून वादालाहि कोणी प्रवृत्त झालें नसतें. बुद्ध परमेश्वर आहे असें माहीत असतें, तर पुष्कळ दिवस त्याच्या सहवासांत राहिलेले कौंडिन्यादि पांच भिक्षु, तो शरीररक्षणार्थ थोडें अन्न सेवन करूं लागतांच त्याला ढोंगी ह्मणून सोडून काशीस कशाला गेले असते? पारशी धर्माचा संस्थापक जो झोरोआस्टर तो ईश्वरावतार आहे अशी तत्कालीन लोकांची जर समजूत असती, तर दहा वर्षे धर्मोपदेश करून त्याला अवघा एकच अनुयायी मिळाला असता काय? तसेंच, ज्या राजानें कांहीं दिवस मोठ्या आदरानें त्याच्या सहवासांत घालविले, त्याच राजानें केवळ लोकांच्या खोट्यानाट्या आरोपांवरून त्याला कैद केलें असतें काय? येशूख्रिस्त देव-निदान देवाचा मुलगा-आहे ही गोष्ट जर तत्कालीन लोकांनां खात्रीलायक वाटती, तर त्यांनीं त्याला फांसावर चढविलें असतें काय? तो आपल्याला पुष्कळ वेळां 'son of man-मनुष्याचा मुलगा' असें ह्मणवीत असे, आणि ईश्वर सर्वांचा पिता आहे या बुद्धीनें तो केव्हां केव्हां आपणास 'son of God-देवाचा मुलगा' ह्मणवीत असे; पण त्याच्या पहिल्या वाक्याकडे दुर्लक्ष्य करून आणि दुसऱ्याचा चुकीचा अर्थ करून त्याला अवतारी कोणीं बनविलें? महंमद पैगंबराचा त्याच्या हयातींत काय थोडा छळ झाला? या सर्व हकीकतीवरून जर कांहीं सिद्ध होत असेल तर तें इतकेंच आहे, कीं, या धर्मसंस्थापकांस, धर्माचार्यांस आणि धर्मप्रचारकांस तत्कालीन लोक, ते अवतारी आहेत असें मानीत नव्हते; फार काय, पण आपण अवतारी आहों अशी खुद्द त्यांचीहि समजूत नव्हती. त्यांचा अवतारीपणा त्यांच्या असामान्य कृतींवरून त्यांच्या भक्तांनीं मागून त्यांजवर लादिलेला आहे.

अशा रीतीनें ही अवतारांची कल्पना जरी आह्माला मान्य नाहीं, तरीः—

"वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि।

केश सुंदर असावे असें वाटत असेल तर कामिनीया तेलाशिवाय बाजारांत मिळणारीं हलक्या प्रकारचीं तेलें बिलकुल वापरूं नका!

तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥ "

भ. गी. अ. २–२२.

ही भगवद्गीतेंत आणि उपनिषदादि ग्रंथांत वर्णिलेली पुनर्जन्माची आणि 'विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्' इत्यादि वचनांत सांगितलेली ईश्वराच्या सर्वव्यापित्वाची कल्पना आह्माला मान्य आहे.

या कूटस्थ आत्म्याची मनुष्यजन्मापर्यंत परिणति (evolution) झाली म्हणजे त्या पुढील उत्क्रांति, केवळ त्याच्या सद्वर्तनावर, सर्वव्यापी प्रेमावर, आत्मसंयमावर आणि ईश्वरभक्तीवर अवलंबून असते. प्रयत्नांनी हे गुण अंगी आल्यानंतर मनुष्य,

"अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्" ॥ ४५ ॥

भ. गी. अ. ६

मुक्ति मिळविण्यास समर्थ होतो. या दृष्टीनें विचार केला असतां श्रीकृष्ण, बुद्ध, ख्रिस्त वगैरे महात्म्यांच्या आत्म्याप्रमाणेंच आमच्या संतांचेहि आत्मे अत्यंत सुसंस्कृत होते, असें आह्माला वाटतें. प्रयत्न केल्यास प्रत्येक मनुष्याला आपला आत्मा आपल्या वर्तनानें अशा रीतीनें परिणत करितां येईल. संतांचीं चरित्रें याच दृष्टीनें वाचून आमच्या भावी पिढीनें आत्मसंयमनाचा प्रयत्न करून आपली वृत्ति सुधारावी, आपल्या अंगीं विश्वव्यापी प्रेमाचें वारें भरावें, आणि निष्ठापूर्वक परमेश्वराचें ध्यान करावें, हें इष्ट होय.

आमच्या संतचरित्रांतील दुसरा विशेष म्हटला म्हणजे संतांनीं केलेले अद्भुत चमत्कार! नामदेवादि चरित्रकारांनीं जीं चरित्रें लिहिलीं आहेत, तीं सर्वोतीं चमत्कारांनींच भरलेलीं आहेत, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. जनतेच्या मनांत संत आणि चमत्कार यांचें जें घूमाम्नी-प्रमाणें साहचर्य झालेलें दिसतें, त्याचें कारण तरी हीं चमत्कारपूर्ण चरित्रेंच होत. या साहचर्यानें आह्माला इतकें जबरदस्त पेरलें आहे की, त्यामुळें जो चमत्कार करून दाखवील त्याचें आचरण कसेंहि असलें तरी त्याला संत समजून आह्मी त्याच्या भजनीं लागतों; आणि संतांस अवश्य असणारे सर्व गुण अंगी असून, जो चमत्कार करून दाखविणार नाहीं, तो ढोंगी समजून त्याचा आह्मी धिक्कार करतों!

प्रत्येक संतानें शेकडों चमत्कार केल्याचें जे सांगितलें या चरित्रकारांनीं लिहिलें आहे, त्याप्रमाणें खोटा ठरवून चमत्कार सरासरच पडले असतील काय! परंपरेनें पडलेली अतिशयोक्तीची भर काढून टाकिली तर त्यांपैकीं कांहीं चमत्कार तरी खास पडले असतील, असें वाटतें.

ज्ञानेश्वर म्हणतात, यौगिक सामर्थ्य अंगी आलें असतां:—

"काय महदादि हें सकळ । आपु होये ॥"

ज्ञा. अ. ६ ओ. ४२६

"सिद्धींनें महत्तत्वादिक स्वाधीन होत नाहींत काय!"

महाराजांचें एक हिंदुस्थानी पद काव्यसंग्रहांत आहे; त्यांत ते म्हणतात:—

"कुंडलनीकू खूब चढाये, प्रहारंप्रकू जाणे,
चलता है पानीके उपर, बोलत सोई होये."

"हें सामर्थ्य अंगीं आलें असतां पाण्यावर चालतां येतें आणि तोंडांतून निघेल त्याप्रमाणें घडतें."

श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंधाच्या १५ व्या अध्यायांत श्रीकृष्णांनीं उद्धवाला आठ महासिद्धि, दहा गुणहेतु सिद्धि, आणि पांच क्षुद्र सिद्धि, अशा एकंदर तेवीस प्रकारच्या सिद्धि आणि त्या संपादण्याचीं साधनें विस्तारपूर्वक सांगितलीं आहेत. आपल्या इकडील शंकराचार्य आणि इतर संतांनीं अथवा ख्रिस्त महंमदादि महात्म्यांनीं जे चमत्कार केले असें त्यांचे चरित्रकार म्हणतात, ते चमत्कार, भागवतांतील या २३ सिद्धींच्या पोटांत येतात. या सर्व सिद्धि प्राप्त करून घेण्याचा भागवतांत एकच उपाय सांगितला आहे, तो असा:—

"जितेंद्रियस्य युक्तस्य जितश्वासस्य योगिनः
मयि धारयतश्चेत उपतिष्ठंति सिद्धयः ॥ १० ॥"

भा० ११ अ. १५

यावर श्रीएकनाथांची टीका अशी आहे:—

"प्राणापानजयो जयासी । इंद्रियजयो अरे त्यासी ।
यायरी उल्हास मज लक्षीसी । चित्त अहर्निशीं मजपाशीं ॥"

ए. भा० १५–१२

संतांना योगसाधनाची अवश्यकता नाहीं; तथापि कांहीं संत योगी होते म्हणून त्यांच्या हातून जर चमत्कार घडले असतील तर ते त्यांच्या अंगी वरील गुण होते, म्हणूनच घडले, असें मानतां येईल.

कामिनीया हें तेल उत्तम वनस्पतींपासून अगदीं नवीन शोधानें बनविलेलें आहे.
हें तेल केस गळून पडणाऱ्या जंतूंचा नाश करतें.

भागवतांत पांच क्षुद्र सिद्धि सांगितल्या असल्याचें आह्मी वर लिहिलेंच आहे; त्या सिद्धि येणेंप्रमाणें:- १ त्रिकालज्ञान अथवा दिव्यदृष्टि; २ द्वंद्वातीतता म्हणजे शीतोष्ण, सुखदुःख, मृदुकठिण इत्यादिकीं द्वंद्वें, त्यांची बाधा न होणें; ३ दुसऱ्याचें मनोगत अथवा स्वप्न सांगणें; ४ अग्नि, वायु, उदक, शस्त्र, विष आणि सूर्य यांचें स्तंभन करणें; ५ विजय संपादन करणें. या पांच सिद्धि मिळविण्यास भक्ति अथवा योग या बऱ्या साधनांची अवश्यकता नसून त्या कांहीं योज्या मांत्रिक अनुष्ठानानें साध्य होतात, असें भागवतकारांचें म्हणणें आहे. तें जर खरें मानिलें, तर असले चमत्कार करणारे लोक संत नसतात ही गोष्ट सहज समजेल. आज जर कोणी असे चमत्कार करून दाखवीत असतील, तर तेवढ्यावरून त्यांनां संत समजून फसूं नये, असें आमचें आमच्या वाचकांस सांगणें आहे.

योगादि साधनें आणि मंत्रतंत्रादि क्रिया यांच्या योगानें सिद्धि संपादिल्या असतां चमत्कार दाखवितां येतात, अशाविषयीं वर जरी आह्मीं भागवतकार, ज्ञानेश्वर आणि एकनाथ यांचे आधार दिले आहेत, तरी ते वाचून पुष्कळ वाचकांचें समाधान होणार नाहीं, म्हणून थोडा अधिक खुलासा करणें जरूर दिसतें.

शेंकडों वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या संतांच्या चरित्रांत, तीं ऐकीव माहितीवर आणि केवळ भाविकपणानें लिहिलीं असल्यामुळें पुष्कळ अतिशयोक्ति असण्याचा संभव आहे. म्हणून आपण सांप्रतकालीन सत्पुरुषांच्या चरित्रांविषयीं येथें थोडा विचार करूं.

काशीस 'त्रैलिंग स्वामी' म्हणून एक मोठे योगी रहात असत. त्यांचें चरित्र बंगाल्यांतील प्रसिद्ध ग्रंथकार बाबू गणेशचंद्र मुखोपाध्याय यांनीं बंगाली भाषेंत लिहिलें आहे. हे स्वामी मद्रासेकडे शके १५२९ च्या पौष महिन्यांत जन्मले, आणि शके १८०५ च्या पौष शुद्ध एकादशीस, एक महिना अगाऊ सूचना देऊन, त्यांनीं आपला देह काशीस ठेविला; म्हणजे आपल्या यौगिक सामर्थ्यावर मृत्यूची वंचना करून २७६ वर्षें वांचलेले हे स्वामी समाधिस्थ झाल्यास पुरीं २९ वर्षेंहि अजून झालीं नाहींत! हे त्रिकालज्ञ होते. पाण्याचें स्तंभन करून त्यावर आसन घालून हे समाधिसुखांत निमग्न होत असत, आणि मृत मनुष्याला सजीव करण्याचें सामर्थ्यहि त्यांच्या अंगीं होतें, असें त्यांचे चरित्रकार गणेशबाबू यांनीं नांवगांवासह ज्या कित्येक गोष्टी त्यांच्या चरित्रांत दिल्या आहेत त्यावरून दिसतें. मॅडम ब्लॅव्हॅट्स्की आणि कर्नल ऑलकॉट त्या वेळीं जे चमत्कार करून दाखवीत ते 'क्षुद्रसिद्धीचे अर्थात् ऐंद्रजालिक आहेत, यौगिक नाहींत व यांतील रहस्य लौकरच बाहेर पडेल' असें या स्वामींचें भविष्य होतें व तें पुढें खरें ठरलें, असें या बंगाली चरित्रकारानें लिहिलें आहे.

आपल्या महाराष्ट्रांत अक्कलकोटचे स्वामी, देवमामलेदार वगैरे कित्येक सत्पुरुष असेच अगदीं अलीकडच्या काळांत होऊन गेले, आणि त्यांचीं चरित्रेंहि अशींच अनेक चमत्कारांनीं भरलेलीं आहेत. फार कशाला, सध्यां नगराजवळ शिरडीगांवीं असलेले साईं महाराज, अनेक चमत्कार करतात, असें आमच्याप्रमाणेंच पुष्कळांनीं ऐकिलें असेल. या सर्व सत्पुरुषांनीं केलेले चमत्कार समक्ष पाहिलेलीं शेंकडों माणसें आज हयात आहेत. ब्रह्मसमाजाचे संस्थापक बाबू केशवचंद्र सेन ज्यांची सेवा करण्यांत सदा तत्पर असत, त्या परमपूज्य श्रीरामकृष्ण परमहंसांनीं समाधि घेतल्यास अवघीं २५ वर्षें झालीं. त्यांचे पट्ट शिष्य, प्रतिशंकराचार्य स्वामी विवेकानंद हे विश्वविद्यालयाचे पदवीधर होते. त्यांच्या देहावसानास अवघीं दहाच वर्षें झालीं. आणि आपल्या वेदांतज्ञानाचा झेंडा, अमेरिकेंत उभारून तेथून विजयश्री संपादन करून आलेले राम वादशहा तर केवळ सहाच वर्षांपूर्वी आपला जड देह सोडून गेले. या सर्वांनीं असले कित्येक चमत्कार करून दाखविल्याचें त्यांच्या आंग्लविद्याविभूषित चरित्रकारांनीं प्रसिद्ध केलें असून त्यांची हीं विधानें खोटीं ठरविण्याचा आजवर कोणींहि प्रयत्न केलेला नाहीं. चमत्कार म्हणजे आज माहीत असलेल्या भौतिक शास्त्रांवरून ज्यांचा कार्यकारणभाव दाखवितां येत नाहीं, अशा गोष्टी. असले चमत्कार मंत्रतंत्रानें, योगसामर्थ्यानें अथवा ईश्वरभक्तीनें, कशानें दाखवितां येतात हें अद्यापि निश्चित झालेलें नाहीं. अक्कलकोटचे स्वामी, साईंमहाराज वगैरे अलीकडील महाराष्ट्रांतील सत्पुरुष, त्रैलिंगस्वामीसारखे सांप्रतकालीन काशीकडील सत्पुरुष, आणि परमहंस श्रीरामकृष्णादि बंगाल्यां-

कामिनीया तेलाच्या बाटलीवरोवर 'केस आणि त्यांची रचना-धी हेअर अॅण्ड इटस् हेल्थ' नांवाचें पुस्तक गुंडाळलेलें असतें तें प्रत्येकास वाचण्याची आह्मी शिफारस करतों.

तील सत्पुरुष यांनीं चमत्कार दाखविल्याचें जर खरें मानावयाचें, तर ज्ञानेश्वरादि आमच्या जुन्या संतांनीं केलेले चमत्कार खरे कां मानूं नयेत ?

मालेगांव (जिल्हा नाशिक) येथें इसवी सन १९०७ सालीं एक जैन यति आले होते. त्यांनीं पाट, टेबल वगैरे निर्जीव वस्तु चालविल्या आणि चौरंगास हुकूम करून खाजकडून छत्री आणविली, हे विलक्षण चमत्कार त्या वेळीं नगरचे वकील श्रीयुत बळवंत बाबाजी देशपांडे यांनीं समक्ष पाहून ती हकीकत सुधारकांत प्रसिद्ध केली; आणि सुधारककारांनींहि नंतर आपली खात्री करून घेतली. कोल्हापुराकडील आमचे एक मित्र एका मुसलमान फकीरानें भारलेल्या अंगीवरून आपण खतः चालत गेल्याचें सांगत होते. अशा या पूर्वीच्या व हल्लींच्या चमत्कारांविषयींच्या सर्व हकीकती नीट विचारपूर्वक लक्ष्यांत घेतल्या असतां चमत्कार घडतात ही गोष्ट निर्विवाद रीतीनें सिद्ध होते.

आतां हल्लीं पाश्चिमात्य व पौर्वात्य शास्त्रज्ञ चमत्कारांविषयीं काय म्हणतात तें पाहूं. डिम्सडेल स्टॉकर नांवाच्या एका शास्त्रज्ञ इंग्रज ग्रंथकारानें यासंबंधानें अनेक ग्रंथ लिहिले आहेत. तो म्हणतोः—

"Each of us posseses at least the germ of this psychic sence, there being nothing supernatural, or abnormal about it".

"दिव्य ज्ञान म्हणजे कांहीं अलौकिक किंवा कमबाह्य गोष्ट आहे असें नाहीं. प्रत्येकाच्या ठिकाणीं तें अंशतः असतेंच."

"पेटींत बंद करून जमीनींत गाडून टाकिलेले योगी सहा महिन्यांनंतर बाहेर काढले असतां सावध होऊन आपला नित्यक्रम चालवूं लागलेले आपण पाहिले आहेत," असें सांगून स्वामी रामतीर्थ म्हणतातः—

"It is a genuine physiological and psychological process, a scientific process."

"ही एक प्राणिगुणधर्मशास्त्र आणि मानसशास्त्र यांच्या तत्त्वांवर बसविलेली शास्त्रीय पद्धति आहे."

"दिव्य दृष्टि अथवा आपल्या चर्मचक्षूंस न दिसणाऱ्या गोष्टी पहाण्याची शक्ति ! याच शक्तीच्या योगानें कुरुक्षेत्रापासून दोनशें मैलांवर राहून तेथें घडत असलेल्या गोष्टी संजयानें धृतराष्ट्रास सांगितल्या, वाल्मीकीनें रामाच्या पूर्वी रामायण लिहिलें; या गोष्टी जर खऱ्या असतील तर या दिव्य दृष्टीच्या योगानेंच त्यांनां तसें करितां आलें असें म्हटलें पाहिजे. न पाहिलेल्या अनेक राजपुत्रांच्या तसविरा चित्रकारांनें ठेपेला ज्या अगदीं हुबेहुब काढून दाखविल्या, त्या या दिव्य दृष्टीमुळेंच काढून दाखविल्या," असें सांगून सन १९०४ सालीं म्हणजे या विसाव्या शतकांत, विश्वविद्यालयाची अत्युच्च पदवी धारण करणारे व पाठशालांतून भौतिक शास्त्र शिकविणारे स्वामी रामतीर्थ अमेरिकेंतल्या आपल्या शास्त्रज्ञ श्रोत्यांनां म्हणतातः—

"Suffice it to say that there is vision and sight, rather there is an inner light, which makes us possessed of all the knowledge in this world."

या चमत्कारांतील कार्यकारणभावाचा शोध लावण्याकरितां लंडन येथें सन १८८२ सालीं 'Dialectical Society' नांवाची एक संस्था स्थापन झाली असून तिच्या पोट कमिटीनें हजारों चमत्कार समक्ष पाहून ते कसकसे घडले याची सविस्तर नोंद, सरासरी चारशें पानांचें एक, याप्रमाणें बीस पुस्तकें छापून प्रसिद्ध केली आहे. सध्यां या नोंदीच्या आणि वेळोवेळीं मिळणाऱ्या अधिक माहितीच्या आधारावर तिकडील पंडित भौतिकशास्त्रांप्रमाणेंच या अध्यात्मिक शास्त्रांच्या शोधांत गुंग झाले आहेत. या मंडळींत डा. रसेल वॉलेस, सर विल्यम क्रुक्स, सर ऑलिव्हर लॉज, प्रो. बॅरेट, प्रो. विल्यम जेम्स आणि एम्. कॅमिली फ्लॅमेरिऑन यांच्यासारखीं बडीं बडीं धेंडें आहेत. तें असें म्हणतात, कीं,:—

"Investigations into Superphysical science are not only worthy of their attention, but are likely to yield fruitful results, we may well set aside an hour or two for the purpose of asking ourselves whether such a problem as the present, is not of the greatest possible moment and the utmost use to us."

याशिवाय रामतीर्थादि वेदांतप्रमाणेंच थिऑसफिस्ट, स्पिरिच्युआलिस्ट वगैरे अलीकडील पंथाचे लोकहि या चमत्कारांवर भरंवसा ठेवणारे आहेत. Thought reading अथवा Telepathy म्हणजे दुसऱ्याच्या

कामिनीया तेल पंधरा दिवसांत लावून स्नान केल्यास अंग फुटत नाहीं व स्वच्छ आणि सजेलेदार होतें. सर्वत्र विकत मिळतें. दर बाटलीस रु. १.

मनांतील विचार सांगण्याची विद्या. या विद्येचे कांहीं प्रयोग मिसोटाइप यंत्राचे प्रसिद्ध शोधक प्रो. शंकरराव मिसे हे यौगिक सामर्थ्य अंगीं नसतां उत्तम प्रकारें करून दाखवितात.

सारांश, चमत्कार घडतात ही गोष्ट आमच्या जुन्या ग्रंथकारांप्रमाणेंच अलीकडील पुष्कळ पाश्चिमात्य पंडितांसहि मान्य झाली आहे आणि त्यांनीं चमत्कारांचा कार्यकारणभाव शोधण्याच्या इच्छेनें अध्यात्मिक शास्त्राचा अभ्यास चालविला आहे. यावरून उपरिनिर्दिष्ट भागवतवचनाप्रमाणें सिद्धीची सहज प्राप्ति होऊन संतांनीं कांहीं चमत्कार केले असतील असें मानण्यास जरी कांहीं हरकत दिसत नाहीं, तरी

"अंतरायान्वदंत्येता युंजतो योगमुत्तमम्
मया संपद्यमानस्य कालक्षपणहेतवः ॥"
भा. ११-१५-३३

त्या परमेश्वरप्राप्तींत व्यत्यय आणणाऱ्या आहेत असें जाणून ते बहुधा या सिद्धींच्या भानगडींत पडले नसावे, असें वाटतें. ज्ञानेश्वर म्हणतातः—

"कीं तपोबळें ऋद्धी । पातलिया भंवतें बुद्धी
मग तया विरक्तासि सिद्धि । आठवेना ॥ ८८ ॥
ज्ञा. अ. १

नातरी महासिद्धिसंभ्रमें । जिंतिला तापसु भ्रमे ।
मग आकळूनि कामें । दीनु कीजे ॥ २७१ ॥"
ज्ञा. अ. १

"सिद्धि या तप आणि वैराग्य यांनां विघ्न आणणाऱ्या असून त्यांच्या नादीं लागलेले पुरुष कामाला बळी पडतात आणि लोकनिंदेला पात्र होतात," आणखी "ज्ञात्याचें अंतःकरण आत्मसुखांत सदा निमग्न असल्यानें, तो या ऋद्धिसिद्धींची मुळींच पर्वा बाळगीत नाहीं. सूर्याला वातीच्या प्रकाशाची, इंद्रभुवनास लाजविणाऱ्या सुंदर मंदिरांत रहाणाराला भिल्लाच्या झोंपड्याची, अथवा अमृतालाहि तुच्छ मानणाऱ्याला कांजीची काय जरूर !" असें दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं सांगून ते पुढें म्हणतातः—

"पार्था नवल हें पाही । जेथ स्वर्गसुखा लेखणी नाहीं ।
तेथ ऋद्धि सिद्धि कायी । प्राकृता होती ॥३६५॥"
ज्ञा. अ. २

"स्वर्गसुखावर लाथ मारणारे ज्ञानी पुरुष भिकार ऋद्धिसिद्धींची कशाला पर्वा करतील ?"

एकनाथ म्हणतातः—

"ज्यासि लौकिकी अति प्रतिष्ठा । तो सिद्धींच्या सोशी खटपटा । ज्यासि मत्प्राप्तीची निष्ठा । तो वचे ना वाटा सिद्धींच्या ॥ १८८ ॥"
ए. भा. अ. १५

"ज्यांनां लौकिक प्रतिष्ठा हवी, त्यांनीं वाटल्यास सिद्धींच्या खटपटींत पडावें; परमेश्वरप्राप्तीची इच्छा करणारे त्या भानगडींत मुळीं पडत नाहींत" इतकेंच म्हणून ते थांबले नाहींत. तर ते एके ठिकाणीं म्हणतातः—

"तैसीच सिद्धींची ही कथा । माझे प्राप्तीसि प्रतिबद्धता । माझें ध्यान ज्ञान वैराग्यावस्था । नागबूनि रिता सांडिती ॥ १९४ ॥"

या उताऱ्यांवरून आमचे संत ऋद्धिसिद्धींस कस्पटाप्रमाणें लेखून त्या भगवत्प्राप्तीच्या मार्गांत अडथळा आणणाऱ्या अतएव त्याज्य आहेत असें मानीत होते, ही गोष्ट वाचकांच्या लक्ष्यांत आलीच असेल. आतां इतर धर्मांतील संतांचें या संबंधानें काय म्हणणें आहे व त्यांनां चमत्कार दाखविणें कितपत रुचतें, हें पाहूं.

अर्नेस्ट रेनन आणि काउंट कॅमिली डी रेनेसी या दोघां विद्वान् ग्रंथकारांनीं येशूख्रिस्ताचीं दोन सुंदर चरित्रें लिहिलीं आहेत. त्यांनीं ख्रिस्तानें केलेले चमत्कार म्हणून ज्या गोष्टी वाचवलांत दिल्या आहेत त्याविषयीं लिहितांना संशय व्यक्त करून 'ख्रिस्तास चमत्कार दाखविणें मुळींच पसंत नव्हतें, इतकेंच नव्हे, तर आपण चमत्कार दाखविण्यास असमर्थ आहों, असें तो सांगत असे' असें सप्रमाण सिद्ध केलें आहे. त्याला धर्मसंस्थापनेचें महत्कार्य करावयाचें होतें, व त्या कामीं त्याला लोकांच्या मदतीची फार अवश्यकता होती, म्हणून तें मिळविण्याकरितां क्वचित्प्रसंगीं तो इच्छा नसतांहि त्यांनां कांहीं गोष्टी सांगे, अथवा कांहीं रोगी लोकांनां स्पर्श करी; आणि त्याजवरील श्रद्धेमुळें लोकांनां त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी पटत, आणि त्यांचे रोग बरे होत.' असें या चरित्रकारांचें म्हणणें आहे.

बालजीवनामृत-लहान मुलांनां निरोगी करण्याचा शास्त्रोक्त
असा खात्रीचा उपाय. किं. १ रु.

एकदां बुद्ध श्रावस्तीनजीक पूर्वाराम नांवाच्या ठिकाणीं असतां आपल्या मृत पुत्रास सजीव करण्याविषयीं एका बाईनें, अत्यंत श्रद्धापूर्वक त्याची विनवणी केली. तेव्हां त्यानें तिला "ज्या घरीं कधींहि कोणी मेलें नसेल अशा घरांतून एक मूठभर मोहऱ्या घेऊन ये ह्मणजे तुझ्या मुलास जिवंत करतों," असें सांगितलें. बाईनें पुष्कळ तपास केला पण तिला तसें घरच आढळलें नाहीं; मग मोहऱ्या कोठून मिळणार? बाई तशीच रडत पुनः बुद्धाकडे आली आणि बुद्धानें तिला आपल्या धर्माची दीक्षा देऊन शोकापासून मुक्त केलें. चमत्कार दाखवून तिचा मुलगा जिवंत केला नाहीं!

एकंदरींत, आह्मीं आपल्या प्रास्ताविक लेखांत ज्यांनां संत ह्मटलें आहे, ते बुद्ध, ज्ञानेश्वर, रिस्तादि महात्मे चमत्कारांची मुळींच पर्वा करीत नव्हते. कार्यकारणभावाची सांखळी तोडून चमत्कार घडणें अशक्य आहे. सांखळी शोधून काढण्याच्या प्रयत्नास पुष्कळ विद्वान् लोक सध्यां लागलेले आहेत; ती सांखळी सांपडून संघटित रीतीनें चमत्कारांचें शास्त्र जगापुढें आलें, कीं, कोणीहि मनुष्य हे चमत्कार करूं लागेल आणि यांचें चमत्कार हें नांवच शिल्लक रहाणार नाहीं! संतपणाचा गंधहि अंगीं नसलेले लोक आजसुद्धां चमत्कार करून दाखवीत आहेत; ह्मणून, संत आणि चमत्कार यांची पुरातन सांगड आमच्या वाचकांनीं आपल्या मनांतून पार हुसकून लाविली पाहिजे. संतांनां चमत्कार दाखविण्याची आवड नव्हती; उलट ते चमत्कारांत आपल्या उपासनेंत अडथळे आणणारे अतएव शत्रुच मानीत. संतचरित्रकारांनीं, केवळ आपल्या चमत्कारपूर्ण कथांनीं संतांच्या कीर्तींत अधिक भर पडेल अशा प्रामाणिक समजुतीनें पुष्कळ चमत्कार त्यांजवर लादलेले दिसतात. एका काळीं कदाचित् या अद्भुत कथांमुळेंच ज्ञानेश्वरादि संत लोकप्रिय झाले असतील; पण आतां त्या कथा अगदीं निरुपयोगी आहेत, इतकेंच नव्हे, तर घातक आहेत असें आह्माला वाटतें. संतांचें चारित्र्य आणि त्यांचे अलौकिक ग्रंथच आज त्यांनां लोकादरास पात्र करण्यास सर्वथैव समर्थ आहेत. एक सुप्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकार ह्मणतो:—

"The time for fables and legends is passed! soon it will be impossible to govern the world except by sincerity, science, justice and truth."

"कल्पित आणि पौराणिक कथांचा काळ निघून गेला! आतां खरी कळकळ, शास्त्र, न्याय आणि सत्य यांची कसोटी लाविल्यावांचून जग कशावरहि भरंवसा ठेवणार नाहीं."

आपले पूज्यसम्राट् पंचम जॉर्ज महाराज यांची एकंदर एकेचाळीस कोटि प्रजा आहे. ही संख्या सर्व जगांतील मनुजकुलाच्या एकचतुर्थांशाइतकी आहे.

सुवेझचा कालवा नव्याण्णव मैल लांब असून त्याच्यायोगानें हिंदुस्थान व इंग्लंड यांमधील प्रवास चारहजार मैलांनीं वांचतो.

अंदमान बेटांतील मूळच्या रहिवाशांची उंची सरासरीनें तीन फूट अकरा इंच असून त्यांचें सरासरी वजन सत्तर पौंडांपेक्षां कमीच असतें!

चंद्रावरील कांहीं पर्वत छत्तीस हजार फूट उंच आहेत!

चिनी दरबारांत तीस बंधु व पांच ज्योतिषी असतात.

आजपर्यंत विमानानें सर्वांत उंच मारलेली मजल ह्मणजे २६,१६० फूट आहे. या विमानानें वर गेलेल्या तीन इसमांपैकीं दोघे अगदीं गुदमरून गेले होते!

लिपझिग शहरांतील तीन जोडपीं पृथ्वीप्रदक्षणा करावयास निघालीं असून सर्व प्रवासांत फळांवांचून दुसरा कोणताहि पदार्थ खावयाचा नाहीं, अशी त्यांची प्रतिज्ञा आहे.

अलीकडे वैद्युतिक गालिचे तयार करण्यांत आले आहेत. त्यांचा विशेष उपयोग थंड हवेंत सोलींतील उष्णता वाढविणें हा होय. प्रत्येक खासाला प्रत्येक खोलीला अर्धा आणा याप्रमाणें या गालिचांनां खर्च लागतो.

मुलांचें पोट मोठें होणें, डाळ होणें, नेहमीं पिरपिर करणें, दांत चावणें वगैरे नाहींसें करण्यास **बालजीवनामृता**सारखा दुसरा उपाय नाहीं!

उपयुक्त माहिती.

छत्रीवरील चिखलाचे डाग काढावयाचे असल्यास प्रथम ते डाग अगदीं पूर्णपणें वाळूं द्यावे व नंतर ताठ केशांच्या ब्रशानें ते झाडून टाकावे. इतकेंहि करून ते थोडे राहिले असल्यास कच्चा बटाट्याच्या लहानशा फांकीनें ते हळुहळू चोळून टाकावे.

स्वयंपाकाला अल्युमीनियम धातूचींच भांडीं चांगलीं. तीं थोडींशीं महाग पडतात हें खरें; परंतु तीं वापरल्यानें बरेच फायदे होतात. तीं वजनानें हलकीं असून दिसण्यांत स्वच्छ व सुंदर दिसतात. साबणाचा फेंस व ऊन पाणी यांनीं धुवून लख्ख कोरडीं केलीं म्हणजे तीं चांगल्या स्थितींत पुष्कळ दिवसपर्यंत टिकतात.

गालिचावर शाई सांडली तर तावडतोब तीवर मीठ आणून टाकावें व तें काळें झालें म्हणजे तें काढून टाकून पुनः त्या जागेवर दुसरें मीठ आणून घालावें; असें डाग जाईपर्यंत करावें.

हातावर पडलेले वॉर्निशचे डाग काढून टाकण्यासाठीं त्यांवर 'मेथिलेटेड स्पिरिट्' चोळावें व नंतर साबणाच्या ऊन पाण्यांत हात धुवावे.

नवीन ब्लॅकेटें धुण्यापूर्वी एक तासभर पुष्कळशा थंड पाण्यांत भिजत घालून ठेवावीं. त्यांतील लोकरींत जो गंधक घालण्यांत आलेला असतो, तो याच्या योगानें निघून जातो. जुन्या ब्लॅंकेटांपेक्षां नवीन ब्लॅंकेटें धुवावयाला 'स्टूंग' साबण व अधिक पाण्याची धुलई लागते.

मेणबत्तीचे दिवे साफ करतांना प्रथम ते ऊन करून नंतर कागदानें पुसून काढावे.

कपड्यांवरील डाग काढावयाचे असल्यास 'कारबोनेट आफ सोडा' थोड्या कोमट पाण्यांत विरवून त्या पाण्यांत कापडाचा एक लहानसा तुकडा भिजवून त्यानें ते डाग चांगले चोळावे व मागून त्यांवर इस्तरी करावी.

जीं फारशीं धुण्याचा प्रसंग येत नाहीं, अशीं चिनई मातीचीं भांडीं किंवा चिनई मातीचे पदार्थ फुटले असतां ते सांधण्यासाठीं पुढील मिश्रणाचा व रीतीचा उपयोग करावा. एक 'चहाचा चमचा' भर साखर, ती विरेल इतक्याच उकळणाऱ्या पाण्यांत विरवावी. हें मिश्रण थंड झाल्यावर त्यांत एक अंड्याचा बलब मिश्रित करावा व हें सर्व मिश्रण पळीच्या दांड्यानें चांगलें घाटावें. नंतर फुटलेल्या भांड्याचे तुकडे विस्तवावर ऊन करून त्यांनां हें मिश्रण लावावें व ते तुकडे चांगले घट्ट आंवळून टाकावे.

फ्लॅनेलचे किंवा लोकरीचे कपडे उन्हांत कधींहि वाळत घालूं नयेत. ऊन न लागेल अशा छायेच्या जागेंत ते वाळवावेत. शक्य तितक्या जलदीनें ते धुवावे व नंतर लगेच ते वाळत घालावे.

दिव्यांत मेणबत्ती बसण्यासारखी नसून ती फार जाड असली तर ती बसण्यासाठीं तासून बारीक करूं नये. अतिशय ऊन पाण्यांत मेणबत्तीचें खालचें टोंक कांहीं मिनिटेंपर्यंत बुडवून ठेवावें. या कृतीच्या योगानें मेणबत्तीचें मेण मऊ होऊन, मेणबत्ती दिव्यांत नीटपणें दाबून बसविता येईल.

प्रो० जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका या पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांचे
रोगांवर अत्यंत गुणकारी ठरल्या आहेत.

श्रीमहंमद

संतवचनें.

पैगंबर.

जे प्राणिमात्रावर दया करीत नाहींत, त्यांच्यावर परमेश्वर दया करणार नाहीं.

प्रत्येक प्राणी परमेश्वराच्या परिवारांत गणला आहे. प्राणिमात्राचें मंगल साधण्यासाठीं जो सर्वांपेक्षां अधिक प्रयत्न करतो, तोच भगवंताचा प्रियतम सेवक होय. तोच त्याचा श्रेष्ठ भक्त होय.

जो ज्ञानाची वात पाजळतो, त्याला मृत्यु नाहीं.

ज्ञानाची इच्छा ही मुसलमानाच्या दृष्टीनें भगवत्-प्रेरणाच होय. ज्ञानाची भिक्षा हा भगवंताचा आदेश होय.

जो ज्ञानमार्गाचें अवलंबन करतो, त्याला स्वतः भगवंत स्वर्गाचा मार्ग दाखवून देतो.

पौर्णिमेचा चंद्र व क्षुद्र नक्षत्र यांमध्यें जो भेद आहे, त्यापेक्षांहि ज्ञानी उपासक आणि अज्ञ उपासक यांमध्यें अधिक भेद आहे.

ज्ञानी मनुष्याच्या लेखणीच्या टोंकाशीं असलेला शाईचा बिंदु, धर्मार्थ प्राण अर्पण केलेल्या भक्ताच्या रक्तापेक्षांहि पवित्र होय !

ज्ञानसंपादनार्थ घर सोडून ज्याला बाहेर जावें लागतें, तो स्वर्गमार्गानें जाणारा प्रवासी होय.

स्त्री असो कीं पुरुष असो, प्रत्येक मुसलमानाच्या कर्तव्यांत विद्याचर्चेचा समावेश झालाच पाहिजे.

बाटेल तो प्रयत्न करून विद्येचा लाभ करून घे. न्याय व अन्याय यांतील भिन्नत्व विद्येमुळें अधिक स्पष्ट होतें. स्वर्गाचा मार्ग विद्या सुलभ करून देते. निर्जन प्रदेशांत विद्या मनुष्याची चिरसंगिनी आणि ओसाड भूमींत सहचारिणी होते. विद्या सुखाचें मूल व दुःखाचें मोठें औषध होय. बंधुबांधवांत विद्या अलंकारस्वरूप व शत्रूच्या व्यूहाचें वर्म होय.

ज्यानें ज्ञानसंपादन केलें आहे, त्याला श्रेष्ठ व सन्मान्य सहज रीतीनें होतां येतें. ज्ञानी मनुष्य दरिद्री असला, तरी त्याला इहलोकीं राजाचीहि मैत्री संपादन करतां येते आणि परलोकीं तो अनंत आनंदाचा अधिकारी होतो.

विश्वासी मनुष्याला उपासना हाच सायुज्यमुक्ति-लाभ होय.

निर्जन वनांत भगवंताचें स्मरण कर. अनाहार हाच तुझा श्रेष्ठ आहार होय; उपासना हीच तुझी श्रेष्ठ विश्रान्ति होय.

ज्या नमाजांत हृदय नम्र होत नाहीं, तो नमाज भगवंताला ग्राह्य नाहीं.

उपासनाहि ज्याला कुकर्मापासून निवृत्त करूं शकत नाहीं, तो हातांत मशाल असूनहि रस्ता चुकतो ! अशा प्रकारच्या उपासनेनें कोणाच्याहि पुण्याची वृद्धि होत नाहीं. प्रत्येक दिवशीं परमात्मा आणि त्याचा पतित आत्मा यांमधील व्यवधान मात्र वाढत जातें.

आपला क्रोध प्रगट करण्याची सुलभ संधि असतांहि जो त्याचें दमन करतो, त्याला परमेश्वर परितोषक देईलच.

जो मनुष्याला अनायासानें पाडकन् पाडूं शकतो, तो कांहीं खरा बलवान् नव्हे. जो क्रोधाचें दमन करूं शकतो तोच खरा बलवान् !

भगवंताचें स्मरण करून जो क्रोधाचा अग्नि शांतपणें गिळून टाकतो, त्याच्यासारखा भाग्यवान् तोच ! त्यानें ज्या उत्कृष्ट सरवतीचें सेवन केलें आहे तसें कोणींहि केलेलें नाहीं !

दुर्बलता, अग्निमांद्य, दमा, श्वास, क्षयादिक रोगांवर प्रो. जेम्सच्या
विद्युच्छक्तिवर्धक गुटिका हाच एक रामबाण उपाय आहे.

एका विहिरीजवळून जात असतां एका वेश्येला एक अत्यंत तहानेलेला कुत्रा दिसला. तृषेनें त्याची जीभ अगदीं सुकून गेली होती. त्या वेश्येला जवळपास कोठेंहि भांडें दिसेना, तेव्हां तिनें आपल्या अंगावरील ओढणी आपल्या पैजाराला बांधली व त्यानें विहिरींतून पाणी काढून त्या कुत्र्याची तृष्णा निवारण केली. त्या वेश्येच्या या एका कृत्यानें तिच्या आयुष्यांतील सर्व कलंक धुऊन निघून तिला सद्गति मिळाली.

परपीडनासाठीं जो दुसऱ्याची मदत मागण्याचें साहस करतो, त्याच्याशीं माझा कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं! स्वजातीचे लोक अन्यायाच्या युद्धाला प्रवृत्त झाले आहेत, हें जाणूनहि जो त्यांच्या पक्षाचें अवलंबन करतो, त्याच्याशीं माझा कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं! अन्यायाची स्थापना करीत असतां जो अधर्मयुद्धांत पतन पावतो, त्याची गणना महंमद आपल्या अनुयायांत करणार नाहीं!

तुम्ही माझ्या अनुचित गौरवाची वृद्धि करूं नका! मेरीचा पुत्र जो येशू, त्याला ख्रिश्चन ज्याप्रमाणें 'भगवंताचा एकमात्र पुत्र', फार काय? 'स्वतः भगवंतच' असें संबोधितात, त्याप्रमाणें मला संबोधूं नका. मी परमेश्वराचा केवळ सेवक आहें. मला तुम्ही त्याचा सेवक म्हणा—भगवंताचा दूत म्हणा.

तर्जनी व मध्यमा यांमध्यें ज्याप्रमाणें विशेष अंतर नाहीं, त्याप्रमाणेंच स्वर्गराज्यांत, विंध्या नेसलेली, दुःखमलिन, आपल्या अनाथ संतानांचें पालनपोषण करणारी विधवा व मी, यांमध्यें सन्मानासंबंधीं कांहीं विशेष भेद रहाणार नाहीं. ती विधवा कशी ठाऊक आहे? ती एकदां परम सुंदर होती; परंतु विधवा होतांच आपलें सर्व सुख, स्वातंत्र्य व सौंदर्य यांना तुच्छ गणून तिनें केवल संतानांच्या पालनार्थ आपला देह झिजविला!

ज्यांच्या खांद्यावर ऐश्वर्याचें जड ओझें आहे, त्यांना चढण्यास कठिण असा स्वर्गसोपान पार होणें अशक्य आहे.

व्यभिचारी मनुष्याला धर्म सोडून जातो—परंतु त्याचा धर्माचा त्याग करीत नाहीं. कुपथ सोडून तो सुपथानें चालूं लागला, तो संयमी झाला, म्हणजे धर्म त्याकडे पुनः परत येतो.

ईमानाचीं तीन लक्षणें आहेत. पहिलें, जो अद्वितीय अशा परमेश्वराचा स्वीकार करतो त्याला कष्ट न देणें; दुसरें, केवळ एकाद्या दुर्बलतेमुळेंच कोणालाहि अधार्मिक न म्हणणें; तिसरें, केवळ एकाद्या दुष्कृत्याबद्दल कोणालाहि समाज—बहिष्कृत न करणें.

जो व्यभिचार करतो, जो मद्यपान करतो, जो परस्वाचा अपहार करतो, जो चोर किंवा विश्वासघातकी आहे, तो मुमिन् (विश्वासी) या नांवाला कधींहि पात्र होऊं शकत नाहीं. सावध रहा—सावध रहा!

आत्मजयासाठीं जो युद्धाचा उद्योग, तोच या जगतावरील स्वर्ग होय.

सर्व वर्षभर नामसंकीर्तन करण्यापेक्षां एक प्रहरभर ध्यानधारणा करणेंच अधिक श्रेयस्कर होय!

जो प्राणिमात्रावर दया करतो, त्यावर परमेश्वर प्रसन्न असतो. मनुष्य चांगला असो किंवा वाईट असो, त्यावर दया करण्याविषयीं कधीं पराङ्मुख होऊं नको! वाईटाशीं सद्व्यवहार करणें हाच मनुष्याला मंगलाकडे न्यावयाला एकमात्र उपाय होय.

अनाथ मुलाला ज्या घरीं आश्रय मिळतो तें चांगल्या मुसलमानाचें घर होय. आणि जेथें अनाथाचा अनादर होतो, तें घर मुसलमानाचें असलें तरी अविश्वासी विधर्म्यांच्या परापेक्षांहि अयोग्य होय!

शिष्टाचार हाच सभ्य गृहस्थांची श्रेष्ठतम पैतृक संपत्ति होय. ज्या बापानें मुलाला शिष्टाचार शिकविले आहेत, त्यानें त्याला विशाल संपत्तीचा उत्तराधिकारी करून ठेवलें आहे, असें समजावें.

स्वर्गलोकामध्यें जो सिंहद्वारानें प्रवेश करूं इच्छितो, त्यानें आपल्या मातापितरांनां संतुष्ट केलें पाहिजे.

पिता किंवा माता यांनीं मुलाचें अहितसाधन जरी केलें असलें, तरी त्यांची सेवाशुश्रूषा करणें हेंच त्याचें अवश्य कर्तव्य होय.

पित्याच्या संतोषानें परमेश्वर संतुष्ट होतो; पित्याच्या असंतोषानें परमेश्वराच्या क्रोधाग्नींत आहुति पडते.

जो स्वतः भिक्षा मागून खातो, परंतु भिकाऱ्याला विमुख करीत नाहीं, त्याचें दान श्रेष्ठ होय.

मनुष्य मेल्यावर त्याच्या दोषांचा उल्लेख करूं नये.

मला परमज्योतीचें दर्शन झालें आहे; ज्योतींतच माझा वास आहे. —प्रवासी.

प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका वापरल्यानें पचनक्रिया वाढून भूक चरचरून लागते व शरीरांत उत्साह येतो. किं. २५ गो. १। रु. ४० गो. २ रु.

स्वयंपाकघरांतील गोष्टी.

मनोरंजनांत 'स्वयंपाकघरांतील गोष्टी' या सदराखालीं लेख येऊं लागल्यामुळें आह्मां स्त्रियांनां त्यांचा फार उपयोग होऊं लागला आहे. पण असें असतांहि या सदराखालीं अद्यापि अंदाजापेक्षांहि कमी लेख कां येतात, हा प्रश्न उद्भवतो; व त्याचें उत्तर माझ्या मतें आमच्या स्त्रियांपैकीं पुष्कळांनां अद्यापि फक्त टराविक लिहिण्यावाचण्यापेक्षां जास्त ज्ञान नाहीं, हेंच होय. तथापि, दुसऱ्या भगिनींनीं लिहिलेले लेख वाचून आह्मांला लिहिण्याचा अभ्यास नसतांहि लिहिण्याची स्फूर्ति होऊं लागली आहे, असें मला स्वानुभवावरून वाटतें. या स्फूर्तिमुळेंच मी आज माझ्या भगिनींनां खालीं लिहिलेले दोनतीन पदार्थ करण्याची पद्धति सांगत आहें:—

पुडाच्या पाटवड्या.

या पाटवड्या अर्ध्या शेराच्या करणें असल्यास खालीं लिहिल्याप्रमाणें सामान लागतें. अर्धा शेर चण्याच्या डाळीचें पीठ, एक वाटी किसलेलें खोबरें, दोन जुड्या बारीक चिरलेली कोथिंबीर, एक तोळा खसखस, एक तोळा चारोळ्या, अर्धा चमचा हळद, तितकेंच जिरें, दोन बारीक चिरून अगर किसून कांदे, सोलून बारीक चिरून एक लसणीचा कांदा, एक चमचा तिखट, दोन चमचे मीठ, चार चमचे आमटीचा गरम मसाला, एक पावशेर तेल किंवा तूप.

किसलेलें खोबरें, कांदा, लसूण, खसखस, कोथिंबीर, चारोळ्या, मीठ व तिखट इतके जिन्नस एकत्र कालवून तयार करून ठेवावे. नंतर चण्याचें पीठ अर्धा शेर घेऊन त्यांत एक चमचा मीठ, अर्धा चमचा जिऱ्याची पूड, पाव चमचा हळद व दोन चमचे तूप मोहन घालून आंवट ताकांत घट्ट भिजवून ठेवावें. मग अर्ध्या तासानें तुपाचा हात घेऊन तें पीठ मळून त्याच्या लिंबाएवढाल्या गोळ्या कराव्या. एकेका गोळ्याची पोळीप्रमाणें पिठी लावून पातळ पोळी लाटावी. नंतर आमटीचा मसाला पाणी घालून बारीक वाटून, ज्याप्रमाणें चिरोट्याचे पापडीला तूप लावतात, त्याप्रमाणें त्या पोळीला तो मसाला लावावा, व त्यावर दोनतीन चमचे खोबरें, खसखस, वगैरे मिसळून ठेवलेलें सामान घालून हातानें सारखें पोळीभर पसरावें. नंतर त्या पोळीची चिरोट्याप्रमाणें गुंडाळी करून तिच्या तीनतीन बोटें रुंदीच्या वड्या कापाव्या. चुलीवर एका पातेल्यांत आधण ठेवून त्या पातेल्याचे तोंडाला घट्ट फडकें बांधावें. मोदकपात्र असल्यास तेंच ठेवावें, म्हणजे पातेल्यास फडकें बांधून ठेवण्याची गरज नाहीं. आधण आल्यावर त्या वड्या त्या पातेल्याच्या फडक्यावर ठेवून खालीं विस्तव करावा व पातेल्यावर वाफ न जाण्याजोगें झांकण ठेवावें. दहा मिनिटांनीं वड्या शिजल्यावर त्या ताटांत काढून निवत ठेवाव्या. वड्या निवाल्यावर कढईत तूप अगर तेल एक पावशेर तापवून, त्यांत त्या वड्या तांबूस होईपर्यंत तळून काढाव्या, व वाढण्यास घ्याव्या.

वांग्यांचे काप.

हे काप करण्यास केळ्याप्रमाणें लांब असतात तीं काळीं वांगीं–विया कमी असलेलीं अशीं–घ्यावीं. प्रथम चार वांगीं घेऊन त्यांचे वाटोळे एक बोट रुंदीचे जाड काप काढून त्यांची काळी असलेली साल पातळशी काढावी. नंतर त्यांत अर्धा चमचा मीठ व पाव चमचा हळद चोळून लावून ते काप एका कल्हईचे भांड्यांत घालून, वर फडकें घालून त्यावर थोडें जड दडपण घालून ठेवावें. एका तासानें त्यांस पाणी सुटेल. तें दाबून काढून टाकावें. दोन लिंबांचा रस काढून त्यांत थोडी हळद, पाव चमचा मीठ व पावट्या-एवढा सोडा असें घालावें. नंतर दोनतीन चमचे डाळीचें पीठ, एक चमचा कणीक, एक चमचा तांदुळाचें पीठ, अशीं एकत्र करून त्यांत अर्धा चमचा मीठ, अर्धा चमचा तिखट, थोडी हिंगाची पूड व थोडीशी हळद घालावी. कोथिंबीर असल्यास एक लहानशी जुडी बारीक चिरून घालावी. मग वांग्यांचे काप या तयार केलेल्या रसांत बुडवून व तयार केलेल्या पिठांत घोळवून एक पावशेर तेल तापवून त्यांत तांबूस होईपर्यंत तळावे. यांचें पीठ कोरडेंच घ्यावें. भज्यांप्रमाणें भिजवूं नये. हे काप खुसखुशीत व रुचकर होतात.

बेसनपुऱ्या.

या पुऱ्या करण्यास हरभऱ्याचें पीठ, ओंवा, तीळ, जिरें, मिरें, तिखट, मीठ, तूप किंवा तेल इतकें सामान लागतें. हरभऱ्याचें पीठ अर्धा शेर घेऊन त्यांत एक चमचा ओंवा, एक चमचा तीळ, पाव चमचा जिऱ्याची पूड, तितकीच मिऱ्याची पूड, एक चमचा तिखट, दोन चमचे मीठ, असल्यास थोडी कोथिंबीर व दोन चमचे मोहन घालून आंवट ताकांत घट्ट भिजवून ठेवावें. पंधरा मिनिटांनीं तुपाचा हात घेऊन तें पीठ मळून त्याच्या सुपारीएवढाल्या गोळ्या करून पुरीप्रमाणें लाटाव्या. मऊ हव्या असल्यास पुरीप्रमाणें जाड लाटाव्या, व कुडकुडीत हव्या असल्यास पापडाप्रमाणें पिठी घेऊन पातळ लाटून तुपांत अगर तेलांत तळून काढाव्या. या मधल्या वेळच्या फराळासहि उपयोगी पडतात.

सौ. दुर्गाबाई गोखले, धमतरी.

---

[२]

मोपळ्याच्या बियांचे अनारसे.

पावशेर बिया सोलून अंगदीं बारीक वांटाव्या. त्यांत पंधरा रुपये भार साखर घालून, दुधाचा हात लावून खूप मळावें; नंतर त्याच्या सुपारीएवढ्या गोळ्या करून एका बाजूस खसखस लावून तुपांत पेढ्याप्रमाणें करून तळाव्या. हे मधल्या वेळेस खाण्याचे उपयोगीं येतात.

खोबऱ्याचे अनारसे.

पावशेर सुकें खोबरें, तांबडी पाठ तासून बारीक किसावें. नंतर पावशेर साखर घेऊन त्यांत अदपाव तूप घालून खूप फेंसावें. नंतर किसलेलें खोबरें घालून सारखें कालवावें. एका परातींत स्वच्छ कागद घालून एका बाजूस खसखस लावून सर्व अनारसे त्या कागदावर ठेवून वर झांकण टाकून मंद निखाऱ्यावर ठेवावे. पक्व झाले झणजे काढून घ्यावे. हे खाण्यास फारच चांगले लागतात.

खोबऱ्याच्या करंज्या.

अर्धा शेर ओलें खोबरें, पाठ तासून बारीक वांटून ठेवावें. एक शेर म्हशीचें दूध तापत ठेवावें. तें चांगलें उसळूं लागलें, झणजे त्यावर आंवट ताक वरेंच शिंपावें. तें दूध नासल्याप्रमाणें झालें झणजे स्वच्छ फडक्यांत घालून गाळावें. नंतर वांटलेलें खोबरें व दुधाचा चोथा एकत्र करून एका कल्हईच्या पातेल्यांत मंधरा रुपये भार तूप घालून चांगलें खरपूस भाजावें. नंतर वजन करून पहावें. तें एक शेर असलें तर तीन शेर स्वच्छ साखरेचा गोळी बळेतों पक्का पाक करावा, व वरील भाजलेला चोथा त्यांत घालून तें मिश्रण चांगलें कणकीप्रमाणें मळावें. पावशेर बदाम ऊन पाण्यांत भिजत घालून, सोलून त्यांच्या काचऱ्या कराव्या, व पावशेर चारोळ्या, आदपाव वेदाणा, एक रुपया भार वेलदोड्यांची पूड, पावशेर खडीसाखर भरड करून त्यांचें एकत्र सारण करावें. नंतर वरील मळून ठेवलेल्या गोळ्यांतून आंवळ्याएवढी गोळी घेऊन हळुहळू लाटावी. मग तें एकत्र केलेलें सारण त्यांत भरून मुरड घालावी. हा पदार्थ उपासाचेहि उपयोगीं येतो.

दूधाचा रस्सा.

एक शेर म्हशीचें दूध तापत ठेवावें. तें चांगलें उसळूं लागलें झणजे आंवट ताक त्यावर शिंपावें. तें दूध नासल्यासारखें झालें, झणजे फडक्यांत घालून गाळावें. जो चोथा राहील तो एका परातींत थापावा. नंतर त्याच्या लहान लहान वड्या कापून ठेवाव्या. एका कल्हईच्या पातेल्यांत मोह्या. चमच्यानें दोन चमचे तूप घालावें, व एक चहाचा चमचा तांबडें तिखट, एक चमचा हळद, एक चमचा गरम मसाला, एक चमचा धन्यांची पूड, हरभऱ्याचे डाळीयेवढा हिंग, एक कांदा बारीक किसून, एक खोबऱ्याची वाटी बारीक किसून, हे सर्व पदार्थ त्या तुपांत घालावे. नंतर त्या वड्याहि त्यांत घालून चांगलें खरपूस एकत्र भाजावें, त्यांत अर्धा शेर पाणी घालून वरून लहान चमचा अमसुलाची पूड व सुपारीयेवढा गूळ घालून सर्व पदार्थ चांगले ढवळावे. चांगले शिजले झणजे उतरून वाढण्यास घ्यावें.

श्रीमती बहीताई लघाटे, इटारा.

साहित्यसमालोचन.

बंगाली.

प्रवासी—(भाद्र) मोळाराम नामक प्राचीन चित्रकारानें तयार केलेलें 'कालीयदमन' नामक पौर्वात्य पद्धतीचें त्रिवर्ण चित्र या अंकांत दर्शनी दिलें असून, त्यांत विष्णुपुराण व श्रीमद्भागवत या ग्रथांत वर्णन केलेल्या सुप्रसिद्ध कालीयमर्दनाचा देखावा चित्रित केला आहे. श्रीयुत रवीन्द्रनाथ ठाकूर यांचा 'लन्डने' हा प्रवासविषयक निबंध यानंतर दिला आहे. रवीन्द्रनाथ हल्ली प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं व प्रतिभोद्दीपनार्थ यूरोपांत प्रवास करावयास गेले असून ते आपल्या प्रवासाचें वर्णन 'प्रवासी'त प्रसिद्ध करीत आहेत. प्रस्तुत अंकांतील प्रवासवर्णनाच्या हप्त्यांत मार्सेल्सहून पॅरिसचा प्रवास, यूरोपचें विलासभवन पॅरिस, पॅरिस ते टोव्हर, डोव्हरपासून लंडनचा प्रवास, सुद्द लंडन शहरची स्थिति, तेथील 'Nation' वर्तमानपत्राच्या संपादकमंडलानें कनीला दिलेली मेजवानी, व इंग्लंडांतील वर्तमानपत्रांची स्थिति, ध्येय, कर्तव्यदक्षता इत्यादिकांचें सरस वर्णन आलें आहे. तें वाचतांना आपणच प्रवास करीत असून ते ते देखावे प्रत्यक्ष पहात आहों कीं काय, असा वाचकांना भास होतो. 'जम्मू' या लेखांत श्रीयुत कृष्णचन्द्र कुंडु, एम्. ए., बी. एल्., यांनीं काश्मीरनजीकच्या जम्मू प्रदेशाचें, तेथील लोकांचें, त्यांच्या रीतीभातींचें, तेथील निरनिराळ्या संस्थांचें रम्य वर्णन दिलें आहे. या निबंधाला जम्मू प्रदेशांतील सुंदर देखावे, लोक, इमारती इत्यादिकांचे, खुद्द लेखकानें घेतलेल्या चार फोटोग्राफ्सच्या सुंदर प्रतिकृति जोडल्या आहेत. श्रीयुत रामलाल सरकार यांच्या 'चीनि राष्ट्रविप्लव' या लेखमालेचा एक हप्ता या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. श्रीयुत सरकार हे जबरदस्त प्रवासी असून हल्ली ते चीन देशांत प्रवास करीत आहेत. तेथें नुकतीच जी राज्यपद्धतीची उलथापालथ झाली, तिची प्रत्यक्ष हकीगत या लेखमालेंत श्रीयुत सरकार देत आहेत. प्रस्तुत हप्त्यांत 'शासनपद्धति' व 'व्यक्तींचा इतिहास' असे दोन पोटविभाग असून चिनी बंडाचा नेता चॉ-ओयेन कोयान याच्या प्रभावशालिनी मातेचा खुद्द लेखकानें घेतलेला फोटो या लेखामध्यें प्रसिद्ध झाला आहे. अमेरिकेंत असलेले श्रीयुत योगेश मित्र यांनी 'तारहीन टेलिफोन' या लेखांत ए. फ्रेडरिक कॉलिन्स (A. Frederick Collins) या पाश्चिमात्य शोधकानें अलीकडेच शोधून काढलेल्या 'तारेशिवाय टेलिफोन'ची सचित्र माहिती दिली आहे. आकाशयान, बिनतारी ध्वनिवाहक यंत्र व प्रस्तुतचें तारहीन टेलिफोन या उपयुक्त शोधांनी जगांत विलक्षण क्रान्ति होईल यांत संशय नाहीं. या शोधाची माहिती खुद्द शोधकानें 'Technical World' या मासिकाच्या अक्टोबर १९११ च्या अंकांत लिहिलेल्या लेखावरून या लेखांत संकलित केली आहे. हिंदी वैमानिक श्रीयुत सेठी यांच्या विषयींची सचित्र माहिती या अंकांत दिली आहे. या प्रसिद्ध हिंदी वैमानिकाचा परिचय मनोरंजनानें गेल्या जुलैच्या अंकांत आपल्या वाचकांना करून दिलाच आहे. श्रीयुत ज्योतिरिन्द्रनाथ ठाकूर हे नूतनप्रकाशित फ्रेंच ग्रंथावरून लिहीत असलेल्या 'मध्ययुगेर भारतीय सभ्यता' या लेखमालेचा एक हप्ता या अंकांत प्रसिद्ध झाला असून, यांत आरबी राज्यशासन व आरबांचें विद्यानुशासन याविषयीं थोडी माहिती दिली आहे. ज्योतिष, गणित, पदार्थविज्ञान, न्याय, तत्त्वज्ञान, उद्भिदविज्ञान, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, चिकित्साशास्त्र, इतिविज्ञान वगैरे विद्याशास्त्रांचें आरब लोक चांगलें परिशीलन करीत असत. बंगालचे हास्यरसात्मक लेखक प्रो. ललितकुमार बंद्योपाध्याय एम्. ए., विद्यारत्न, यांनीं 'युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट' मध्यें वाचलेल्या 'अनुप्रासेर अट्टहास' या मनोहर निबंधाचा पहिला हप्ता या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. या हप्त्यांत मनुष्याच्या सर्व प्रकाराच्या व्यवहारांतील भाषेच्या शब्दगठनांत अनुप्रासाचा प्रभाव किती प्रबल आहे, हें प्रोफेसर मजकुरांनीं अनुप्रासाच्याच मुखानें मोठ्या मौजेनें वदविलें आहे. 'मी विश्वव्यापी, जगज्जयी, शक्तिशाली, सर्वसर्वस्व' आहें, असें (अनुप्रासाच्याच भाषेनें) जे गर्वोद्धत शब्द या निबंधांत अनुप्रासाच्या तोंडी लेखकानें घातले आहेत, त्यांची सलगता हा निबंध वाचून पूर्णपणें पटते व मनाला मोठी मौज वाटते. कोणत्याहि भाषेच्या कोणत्याहि प्रकारच्या शब्दसमूहांत पहा, अनुप्रासाचें प्राबल्य आहेच! या हप्त्यांत विज्ञान (Sciences), गणितशास्त्र, चिकित्साशास्त्र, इतिहास, खगोल, भूगोल, जाति व वर्ण, आणि मनुष्यांतील परस्परसंबंध, यांमध्यें चहूंकडे अनुप्रास कसा विराणा घालीत आहे, हें अत्यंत मनोरंजक रीतीनें दाखविलें आहे; त्यावरून निबंधलेखकाची मार्मिकता, सूक्ष्म अवलोकनशक्ति व रसिकता यांचा चांगला प्रत्यय पटतो. श्रीयुत सुरेशचंद्र बंद्योपाध्याय यांनीं 'मिकादो सुमुहितो' या लहानशा लेखांत जपानचे नुकतेच परलोकवासी झालेले प्रतापशाली मिकादो यांचा थोडक्यांत, पण गोड परिचय करून दिला आहे. या लेखाला प. वा. मिकादो व जपानचे सांप्रतचे सम्राट् व सम्राज्ञी यांच्या प्रतिकृति जोडल्या आहेत. प्रो. शरच्चंद्र घोषाल, एम्. ए., बी. एल्., काव्यतीर्थ, सरस्वती, भारती, विद्याभूषण इत्यादि, या पंडितांनीं 'सांख्यदर्शनेर उपाख्यानमाला' या निबंधांत सांख्य-

दर्शनांत ज्या गोष्टींच्या रूपानें महत्तम विषयांचा उपदेश केला आहे, अशा बत्तीस छोट्या गोष्टी लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टींत एकादें तरी सुंदर तत्त्व गोवलें आहे. श्रीयुत विजयचंद्र मजूमदार, बी. एल्., यांनीं 'भारत-इतिहासेर जन्मकथा' या निबंधांत भरतखंडाच्या इतिहासाला प्रारंभ कसा झाला, याचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. यांत 'भूमीची उत्पत्ति, मनुष्याची उत्पत्ति, व भरतखंडांत मानवजातीचा प्रसार' इतके पोटविभाग आहेत. 'इंग्लंडे साहित्यसम्राट् रवीन्द्रनाथेर संवर्धना' या मनोरंजक लेखांत इंग्लंडमध्यें गेल्या जुलई महिन्याच्या वाराव्या तारखेला मोठी जाहीरसभा भरून तेथें बंगालचे साहित्यसम्राट् रवीन्द्रनाथ ठाकूर यांचा जो विलक्षण सन्मान झाला, त्याची साग्र हकीगत दिली आहे. या सभेंत इंग्लंडचे विख्यात कवि यीट्स् (Yeats) यांनीं कवि रवीन्द्रनाथ व त्यांची अनुपमेय कविता यांची अत्यंत स्तुति करून सर्व देशांत सांप्रतकालीं रवीन्द्रनाथांसारखा सर्वश्रेष्ठ कवि एकहि नाहीं, असें स्पष्टपणें सांगितलें ! रवीन्द्रनाथ यांची कविता भाषांतरित होऊन इंग्लंडांत फार विद्वन्मान्य झाली आहे. या विषयांव्यतिरिक्त दोनचार निबंध, पांच कविता, दोन वैदेशिक गोष्टी, दोन कादंबऱ्या, पुस्तकपरिचय, विविध प्रसंग वगैरे किरकोळ लेखहि वाचनीय आहेत.

आर्यावर्त—(श्रावण) प्रथम 'दिवालोकविकास' नांवाच्या, श्रीयुत हरेकृष्ण सहा या चित्रकारानें तयार केलेल्या एका सुंदर देखाव्याची तीन रंगांतील प्रतिकृति दर्शनी दिली आहे. याशिवाय 'मातृमूर्ति' नांवाचें एक पाश्चिमात्य परिकल्पनेचें पौराणिक चित्रहि स्वतंत्र दिलें आहे. 'भारतीय शिल्प' हा कोणी अज्ञात लेखकानें लिहिलेला लहानसा निबंध मननीय आहे. लेखक म्हणतो "भरतखंडाच्या शिल्पाचें समालोचन जें कांहीं थोडेंबहुत झालें आहे, तें मुख्यतः यूरोपियन पंडितांनींच केलें आहे. फर्ग्युसन् व कनिंगहॅम् साहेबांपासून तों तहत व्हिन्सेन्ट स्मिथ व हॅव्हेलसाहेबांपर्यंत अनेक यूरोपियन पंडितांनीं भारतीय शिल्पाचा इतिहास किंवा कांहीं तरी माहिती लिहिण्याविषयीं खटपट केली आहे; परंतु अत्यंत दुःखाची गोष्ट ही, कीं, इतर देशांतील संस्कृति (Civilization) व शिल्प यांपेक्षां भारतीय संस्कृति व शिल्प आधुनिक व हीन आहे, या पूर्वसंस्कारानें ग्रस्त होऊनच या सर्व पंडितांनीं भारतीय शिल्पेतिहासरचना करण्याचा प्रयत्न केला आहे, व त्याहूनहि दुःखाची गोष्ट ही आहे, कीं, हल्लीच्या शास्त्रीय पद्धतीनें जे भारतीय शिल्पेतिहास लिहूं शकतील अशा हिंदी पंडितांना या कामीं हौसच वाटत नाहीं ! अशा स्थितींत पाश्चिमात्य पंडितांच्या मताचाच अनुवाद हिंदुस्थानांतहि चहूंकडे होत आहे यांत कांहीं नवल नाहीं. भाषा, प्राचीन भाषांत संस्कृतासारखी संपन्न भाषा एकहि नाहीं, भारतीय संस्कृति प्राचीनतम असून तिच्यापासूनच हेटि, खॅल्डीय व मिसर या संस्कृति (civilizations) उत्पन्न झाल्या आहेत, सर्व सभ्यतांची जन्मभूमि भरतखंडांतच आहे, अशा तऱ्हेची उदार व सत्य मतें प्रतिपादन करणारा एकादुसरा यूरोपियन लेखक नाहीं, असें नाहीं. परंतु बहुतेक लेखकांचीं मतें वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें पूर्वग्रहग्रस्त आहेत यांत शंका नाहीं. फ्रेंच पंडित बॅबिलोन (Babelon) यानें आपल्या प्राच्य शिल्पादर्शांत (Manual of oriental Antiquities) भारतीय शिल्पांचा नामनिर्देशसुद्धां केला नाहीं ! तो म्हणतो, ग्रीस व रोमच्या प्रभावापूर्वी ज्या प्राच्य संस्कृतीचा प्रभाव जगांत गाजला होता, तिचें समालोचन केल्यास तींत शिल्पादर्शाचे केवळ दोनच प्रवाह दिसून येतात. एकाची उत्पत्ति मिसर देशांत व दुसऱ्याची असीरियांत. बाकीच्या सर्व देशांतील शिल्पादर्श या दोन प्रवाहांच्या मिश्रणांपासून उत्पन्न झाले आहेत. परंतु प्राच्य भूखंडाच्या अर्धांशांत भारतीय शिल्पानेंच अनुकरण झालें आहे, ही गोष्ट बॅबिलोन साफ विसरला आहे. चीन व जपान देशांतील संस्कृति व शिल्प यांची उत्पत्ति केवळ भारतीय आदर्शांपासूनच झाली आहे. जपाननें शिल्पापासून तों अन्नाहारापर्यंत सर्व कांहीं भरतखंडापासूनच उचललें आहे. अशा प्रभावाच्या भारतीय संस्कृतीचा किंवा शिल्पाचा उल्लेखहि न करणें हा केवळ भ्रम आहे. या शिल्पाची प्रवीण अशा भारतीयांकडूनच योग्य समालोचना झाली पाहिजे. प्राचीन भरतखंडाचा इतिहास नाहीं, असें अनेक प्राच्य व पाश्चिमात्य पंडित म्हणतात, व तें अनेकांशीं खेर आहे. भरतखंडांत विपुल रीतीनें सांपडणाऱ्या शिलांचें व शिल्पैनपुण्याचें जर सूक्ष्म समालोचन केलें तर तो इतिहास तयार होईल. अशा शिल्पाची ईश्वरकृपेनें भरतखंडांत विपुलता आहे." श्रीयुत बिपिन बिहारी गुप्त यांच्या 'ध्रुवदर्शन (Positivism) प्रसंग' या चालू लेखमालेचा तिसरा हप्ता या अंकांत प्रसिद्ध झाला असून तो मनोरंजक आहे. यांत कॉम्तच्या 'ध्रुवधर्मा'संबंधाची कांहीं लक्षणें व माहिती दिली आहे. या 'ध्रुवधर्मा'तून कॉम्तनें देवदेवींवरील अलौकिक विश्वासाला (Supernatural belief) एकदम गचांडी दिली आहे. यापूर्वीच्या कोणत्याहि धर्मांत—नास्तिकधर्म म्हणून मानल्या गेलेल्या बौद्ध धर्मांतहि—अशा अलौकिक विश्वासाला फांटा मिळालेला नाहीं. जन्मान्तर, भूतप्रेत या सर्वांनां एकदम कॉम्तनें आपल्या धर्मपर कल्पनेंतून हांकून लाविलें आहे. 'ध्रुवधर्माचीं प्रश्नोत्तरें' (Catechism of Positivism) म्हणून जो ग्रंथ कॉम्तनें लिहिला आहे, त्याच्या प्रारंभींच यासंबंधानें आपलीं मतें त्यानें सांगितलीं आहेत. कोणत्याहि धर्माचें सत्यासत्यत्व केवळ त्याच्या व्होटर्स (अनुयायी)च्या संख्येवर अवलंबून असणें शक्य नसून तें तर्कयुक्तीच्या द्वारेंच निर्णीत होतें. परंतु अलौकिक विश्वास आला, कीं, तर्कयुक्तीनें पळ काढलाच ! या विश्वासाच्या मूल कल्पनेमुळें प्रत्येक धर्मांत पोटभेद, धर्मांधर्मांत मारामाऱ्या व भयंकर कत्तली (Massacres) घडून आल्या आहेत. कॉम्तच्या ध्रुवधर्माची हीच आकांक्षा आहे, कीं, केवळ युक्तीच्या बलावर समस्त नरजातीला एकधर्मी बनविणें. याचा अर्थ पूर्वीचे सर्व धर्म अश्रद्धेय होत असा नव्हे. त्या सर्वांचा उपयोग होता व आहे. त्यांची जबरदस्तीनें उठावणी

करावी असें कांम्तनें कोठेंहि प्रतिपादन केलें नाहीं.उपचिकीर्षा हाच धर्माचा पाया असला पाहिजे,असें कॉम्तचें मत होतें. परोपकारव्रता (Universal love)ची जी वृत्ति मनुष्याच्या हृदयांत वसत आहे, तिच्या पायावर असा एक धर्म स्थापन करावा, कीं, त्याच्या योगानें मनुष्यसमाजाला सहज रीतीनें आत्मरक्षण करतां यावें. असा धर्म स्थापन करण्याचा कॉम्तचा उद्देश होता. यानंतर लेखकानें कॉम्तच्या positivist Calendarची मनोरंजक माहिती दिली आहे. हल्लींच्या खिश्चन महिन्यांचीं नांवें ग्रीक व रोमन देवतांचीं आहेत, या पद्धतीला कॉम्तनें फांटा दिला आहे. त्यानें २८ दिवसांचा एक महिना करपून वर्षाचे तेरा महिने धरिले आहेत. या गणनेनें वर्षाचे ३६४ दिवस होतात. बाकीचा एक दिवस सर्व मृत व्यक्तींच्या स्मरणार्थ कल्पिला आहे. प्रत्येक महिन्याला त्यानें नरजातीवर महदुपकार करणाऱ्या एकएका व्यक्तीचें नांव दिलें आहे. १ मोझेस, २ होमर, ३ अरिस्टॉटल, ४ आर्किमिडिस, ५ सीझर, ६ सेंट पॉल, ७ शार्लेमन, ८ दान्ते, ९ गटेनबर्ग, १० शेक्सपियर, ११ डेकार्ट (Descartes), १२ फ्रेडरिक दी ग्रेट, १३ बिशा (Bichat) याप्रमाणें कॉम्तच्या(positivist calendarच्या) महिन्यांचीं नांवें आहेत. श्रीयुत सुरेन्द्रनाथ घोष हे 'फरासी विप्लवेर इतिहास' या लेखमालेंत फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचा इतिहास देत आहेत, तिचा तिसरा हप्ता या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. 'यूरोपभ्रमण' या लेखमालेंत श्रीयुत नरेन्द्रकुमार बसु यांनी फ्लॉरेन्स शहराचें सविस्तर व सुंदर वर्णन दिलें आहे. या विषयांशिवाय दोनतीन ऐतिहासिक व शास्त्रीय निबंध,चार कविता,एक गोष्ट, एक चालू कादंबरी, समालोचना वगैरे विषयहि मनोरंजक आहेत.

साहित्य—(भाद्र) या अंकांत आलबर्ट मूर या पाश्चिमात्य चित्रकाराच्या 'मुकुल' या सुंदर चित्राची द्विवर्ण प्रतिकृति व बंगाली चित्रकार श्रीयुत भवानीचरण लाहा यांच्या 'कौतुकमयी' या चित्राची एकरंगी प्रतिकृति दिली आहे. श्रीयुत शशधर राय, एम्. ए., बी. एल्., यांच्या 'वंशानुक्रम,' या लेखमालेचा चवथा हप्ता या अंकांत प्रसिद्ध झाला असून त्यांत 'वंशानुक्रमाचें परिमाण,' 'वंशानुक्रमाची प्रक्रिया' या दोन मुद्यांचेंच लेखकानें विवेचन केलें आहे. या अंकाचा बराचसा भाग श्रीयुत राधागोविंद वसाक यांच्या 'नवाविष्कृत ताम्रशासन' या निबंधानें व्यापला आहे. 'गोनवर्मदेवा'च्या वेळच्या नुकताच शोध लागलेल्या एका ताम्रपटाची सविस्तर माहिती या लेखांत दिली आहे. या ताम्रपटाचे दोन फोटोहि या निबंधाला जोडले आहेत. श्रीयुत पंचकौरी बंद्योपाध्याय, बी. ए., यांनी 'शीखधर्मेर उन्मेष' या निबंधांत 'Transformation of Sikhism' by Dr. G. C. Narang या नूतन प्रकाशित ग्रंथावरून शीख धर्माच्या संस्थापक गुरु नानकापासून गुरु गोविंदाच्या मृत्यूपर्यंत शीख धर्माची कसकशी स्थित्यन्तरें झालीं, त्याची विस्तृत माहिती दिली आहे. सुप्रसिद्ध बंगप्रवासी श्रीयुत आशुतोष राय यांनी 'चीन-काहिनी' या सदरामाली त्या देशाची कांहीं माहिती स्वानुभवानें सांगितली आहे. 'आकबर शाहेर हिंदु सेनापति' या ऐतिहासिक निबंधांत श्रीयुत रामप्राण गुप्त यांनीं मोंगल सम्राट् अकबर याच्या कांहीं हिंदु सेनापतींची माहिती थोडक्यास सुरवात केली आहे. अकबरशहाच्या ४१५ सेनापतींपैकीं ५५ सेनापति हिंदु होते. 'ऐने अकबरी'च्या साहाय्यानें प्रस्तुत हप्त्यांत 'राजा बिहारीमल,' 'राजा भगवानदास,' 'राजा मानसिंह,' व 'राजा तोडरमल' यांची माहिती लेखकानें लिहिली आहे. क्रमाक्रमानें बाकीच्या सर्व हिंदु सेनापतींची माहिती देण्याचा श्रीयुत गुप्त यांचा विचार आहे. श्रीयुत अक्षय कुमार मैत्रेय, एम्. ए., बी. एल्.,यांनीं 'गौडलेखमाला' या निबंधांत एका प्राचीन लिपीचा परिचय करून दिला आहे 'इतिहासे रवीन्द्रनाथ' या श्रीयुत शशिभूषण मुखोपाध्याय यांच्या लेखमालेचा तिसरा हप्ता या अंकांत प्रसिद्ध झाला असून त्यांत बंगसाहित्यसम्राट् श्रीयुत रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या लेखांतील 'क्षत्रिय व ब्राह्मण यांच्या जातीसंबंधाच्या विवादाच्या उल्लेखाविषयीं खोडून प्रतिकूल टीका करण्यांत आली आहे. यांशिवाय एकदोन छोटे निबंध, एक कविता, दोन गोष्टी, वगैरे विषयहि दिले आहेत.


भारती—(भाद्र) 'वरषा' नामक एक तीन रंगी प्राचीन चित्र दर्शनीच दिलें असून तें पौर्वात्य पद्धतीचें एक सुंदर चित्र आहे. मुंबई हायकोर्टांत डिस्ट्रिक्ट जज्ज वगैरे महत्पदावर विराजमान झालेले, महर्षि देवेन्द्रनाथ ठाकूर यांचे चिरंजीव श्रीयुत सत्येन्द्रनाथ ठाकूर, आय्. सी. एस्, यांच्या 'आमार बाल्यकथा' या हृदयंगम लेखमालेचा चवथा हप्ता या अंकांत प्रसिद्ध झाला असून त्यांत लेखकाचे वडील बंधु श्रीयुत द्विजेन्द्रनाथ ठाकूर यांच्या विषयींच्या कांहीं कौतुकपूर्ण आठवणी ग्रथित केल्या आहेत. श्रीयुत द्विजेन्द्रनाथ हे बंगाली भाषेंतील एक विख्यात लेखक असून त्यांचे अध्यात्मविषयक लेख बंग मासिकांतून व स्वतंत्र रीतीनें प्रसिद्ध होत असतात. ते चांगले कवि असून चित्रकारहि आहेत. द्विजेन्द्रनाथांच्या काव्यांतील बरींच अवतरणें प्रस्तुत लेखाला जोडली असून त्यावरून त्यांच्या वर्णनीय काव्यप्रतिभेचा परिचय चांगला पटतो. या लेखाला प्रसिद्ध बंगचित्रकार श्रीयुत अवनींद्रनाथ ठाकूर यांनी काढलेल्या श्रीयुत द्विजेन्द्रनाथांच्या चित्राची प्रतिकृतिहि जोडली आहे. श्रीयुत प्रबोधचंद्र मैत्र यांचा 'हाफेजेर सहित एक दिन' हा निबंध अतिशय सुंदर असून त्यांत पर्शियन कवि हाफेज (Hafiz) याच्या उच्च काव्यप्रतिभेची वाचकबंधुंस लेखकानें चांगली ओळख करून दिली आहे. सुप्रसिद्ध स्कॉच् कवि बर्न्स (Burns) व बंगकवि चंडिदास यांच्याशीं हाफेजचें कांहींसें साम्य आहे. शिवेहि 'प्रेमा'चे कवि असून एकाचा हृदयोच्छ्वास दुसऱ्याच्या मुखानेंच बाहेर पडत आहे, असें वाचकांनां वाटतें. हाफेज कवि आनंदाचा पूर्णावतार होता. त्याच्या काव्यांत सदासर्वदा उल्हासपूर्ण हृदयाचें दिव्य गृत्यच दृष्टीस पडतें. बर्न्स कवीशीं तर हाफेजचें पूर्ण साम्य-काव्याच्या भाषेंतहि साम्य-आढळून येतें!

WHAT HAVE YOU DONE [3-12]

this year to better your position? How much spare time have you given to developing your earning powers? Six months cannot go by without bringing home to every young man those vital questions. Each hour of study *now* means weeks, months and years of *increased earnings in the future.* Each I. C. S. instruction paper mastered means a net gain to the student in *marketable* knowledge. Write to us *now* mentioning vocation about which free particulars are required.

International Correspondence Schools of London.
Dept. 51-U, 11, Hamam Street, Fort, Bombay.
Goldmedal award, Bombay Exhibition.

नानूज ब्रास वर्क्स महमदी महाल, काळबादेवी रोड, मुंबई.



लोखंडी पाळणा किं. रु. १५
" स्विंगिंग चेअर " १०
" चेअरबेड (पाहिजे तेव्हां पलंग व खुर्ची बनते.)" ८
* घडीच्या खुर्च्या " २।
" घडीच्या खुंट्या " ।॥•
" घडीची खाट " ८
" बायाकॉट (मच्छरदाणीच्या चौकटीसह ४×२।) " २०
" बेडस्टेड (मच्छरदाणीच्या चौकटीसह ४×३) " २०

लोखंडी बेडस्टेड्स (वायर मेट्रेससह) किं. रु. २२
" घडीचे बांक " ५॥
" आरामखुर्ची " ९
" टॉवेलस्टँड " ४
" वॉशस्टँड (भांड्यांसह) " ३
" शेल्व्हज किं. रु. ३ पासून १० पर्यंत.
" घडीचें टेबल किं. रु. ५

[फॅक्टरी-खेतवाडी मेनरोड, गिरगांव-मुंबई.]

यांशिवाय दुसरें पुष्कळ तऱ्हेचें पितळेचें, लोखंडी व इतर धातूंचें उपयोगी सामान तयार होतें. किंमतीची अर्धी रकम आगाऊ पाठविल्यास माल व्ही. पी. नें पाठवूं. व्यापाऱ्यांस भरपूर सवलती. [4-12]

गोपाळ नारायण कंपनी, बुकसेलर्स, कालकादेवीरोड—मुंबई. [4-12]

प्राकृत ग्रंथ (मोठ्या टायपाचे.)

	रु.		रु.
रामविजय	१-४	भक्तलीलामृत	४-०
हरिविजय	१-०	नाथलीलामृत	२-०
भक्तविजय	२-०	संतलीलामृत	१-१२
पांडवप्रताप	२-८	एकनाथी भागवत	४-८
कथासारामृत	२-८	नवनाथभक्तिसार	२-०
काशीखंड	३-०	गणेशप्रताप	३-०
जैमिनी अश्वमेध	३-०	उपयुक्त सर्वसंग्रह	१-४
दासबोध	१-०	गुरुचरित्र	२-०

संस्कृत ग्रंथ.

	रु.		रु.
भागवत, श्रीधरी.	रु. ५	अध्यात्मरामायण सटीक.	२
भागवत, विजयध्वजी.	८	महाभारत सटीक.	२५
भागवत टीका चूर्णिका.	१०	आत्मपुराण सटीक.	१२
वाल्मीकि रामा. सटीक.	७	नारायणभट्टी समंत्रक.	२
हरिवंश सटीक.	४	योगवासिष्ठ सटीक.	२०
विष्णुपुराण सटीक.	३	सुभाषितरत्नाकर.	२
गणेशपुराण.	६	कृष्णयजुर्वेदीय ब्राह्मण.	२॥
कृष्णयजुर्वेदीय संहिता.	३	आनंदरामायण.	५

योग, मेस्मेरीझम आणि विद्युन्मानसशास्त्राच्या आधारानें तयार केलेला, आणि पृथ्वीच्या चारही खंडांत मान पावलेला, त्रिकालदर्शी

आरसा!!

फक्त एकदांच अनुभव घेऊन पहा, कीं, भूत, भविष्य आणि वर्तमान जाणणें कठीण आहे कीं कसें? अनुभव घेईपर्यंत आपल्याला कल्पना देखील करतां येणार नाहीं, कीं, हें ज्ञान कसें होत असेल? प्राणिमात्र जो जो विचार करतें, त्याचें चित्र आकाशांत चित्रगुप्त देव अदृश्य रीतीनें काढून घेतो. तें चित्र आणि त्याचे परिणाम, समाधी आणि मृत्युकाळाशिवाय दुसऱ्या वेळीं मनुष्य साधारण दृष्टीनें पाहूं शकत नाहीं. तसे विचार आणि त्याच्या परिणामाचा अमुक विभाग पाहूं शकण्याची अद्भुत क्रिया एका महात्म्याच्या कृपेनें साध्य झाली आहे. श्रद्धालु मुलें, पुरुष व स्त्रिया खतःचे विचार आणि त्यांचे परिणाम पाहूं शकतात, आणि त्या आधारानें भूत, भविष्य आणि वर्तमान हकीकत सांगूं शकतात. शिवाय, हिस्टिरिआ व भूतप्रेतबाधा इत्यादि मानसिक रोगांकरितां हा एक चमत्कारिक उपाय आहे. या आरशानें तसे रोग निर्मूल होतात. एकदां अनुभव घेऊन पहा. देवांच्या साहाय्यतेनें काम केल्यानें एकदम रोगी खडखडीत बरा होतो, हें अद्भुत नव्हे काय?

आपण औषधोपचारांत पैसे खर्च करतां, आणि त्यांत आपल्याला बिलकूल यश मिळत नाहीं; परंतु एकदां हा उपाय योजून पहा. भविष्य जाणण्याकरितां आपण पुष्कळ पैसे खर्च करतां, परंतु या आरशानें आपण एकदां भविष्य जाणून घ्या व खात्री करून घ्या. आपले पैसे वांचतील आणि आपल्याला लाभ होईल. आपण खतःच भविष्यवादी होऊं शकाल. फक्त एक आरसा विकत घ्या, आणि खस्तें ज्ञान संपादन करा. अशा खस्त्या किंमतींत असा लाभ होतो तो जाऊं देणें हें अगदीं अयोग्य आहे. हा आरसा एकदां विकत घेतल्यानंतर नेहमीं उपयोगास पडतो. गांव, परगांव, देशांतर आणि दूर असणारे मित्र सोयरेसंबंधी यांनां या आरशाच्या साहाय्यानें आपण भेटूं शकाल. अमुक काम होईल कीं कसें? अमुक बाबतींचे परिणाम काय होतील? वगैरे जे जे आपल्या मनाचे खुलासे करणें असतील ते सगळे होऊं शकतील. विद्वानांनीं पुष्कळ सरटिफिकिटें धाडलीं आहेत व धाडीत आहेत, हेच ह्या आरशाच्या उपयुक्ततेचे पुरावे होत. हा आरसा वापरण्याचें बुक ज्या भाषेंत पाहिजे असेल त्या भाषेचें नांव स्पष्ट लिहावें.

आरशाची किंमत—रु. २-९-० आरसा साध्या कांचेचा. आणि बिल्लोर कांचेच्या मजबूत आरशाची किंमत रु. ३-८-०. पोस्टेजसहित. हिन्दुस्थानाबाहेरच्या गृहस्थांकरितां वरील किंमतीपेक्षां एक रुपया जास्त.

खास बिलोर कांचेचे मोठे आरसे किंमत रु. ५. ट. ख. १ रु.

सूचना:—सदर आरसा पसंत न पडल्यास आरसा पोहोंचल्यापासून २४ तासांच्या आंत व्ही. पी. करून परत पाठवावा, ह्मणजे अनुक्रमें रु. २-०-० व रु. २-८-० परत देण्यांत येतील. पत्रव्यवहार बालबोध लिपींत करावा.

आशाभाई वावजीभाई पटेल,
[2-12] मु. करमसद, पोस्ट आनंद, जिल्हा खेडा, प्रांत गुजराथ.

मेसर्स बाळकृष्ण साजबा आणि कंपनी,

सदाशिवस्ट्रीट, गिरगांव—मुंबई.

छापखान्यास लागणारे—

प्रिंटिंग पेपर्स—ग्लेझ्ड, अनग्लेझ्ड, फुलस्कॅप, कव्हर, कलर इ. इ. सर्व वजनाचे; ब्रासरुळी—सर्वजातींच्या; शाई—टाइपाची, लिथोची, काळी किंवा रंगीत, हलकी व भारी, सर्व जातीची व सर्व दराची; आन्टिमनी—S. C. मार्काची; लिथोस्टोन—"१८×२४" अगर हव्या त्या आकाराचे; प्रेसीस—मशीन्स, केसीस, घोडे वगैरे सर्व लांकडी सामान.

छापखान्यास लागणारा हरएक माल आह्मी थेट विलायतेहून मागवीत असल्यामुळें तो आमच्यामार्फत मागविल्यानें फार फायदेशीर पडतो. केसरी, मनोरंजन, निर्णयसागर, आर्यभूषण इत्यादि महाराष्ट्रांतील प्रसिद्ध प्रकाशक आणि छापखानेवाले आमच्याचकडून बहुतेक माल घेत असतात.

विलायतेंतील प्रसिद्ध मिलर आणि रिचर्ड मेकरचे बुक, न्यूज, हेडिंग व आर्नमेंटल टाईप मागवून देऊं. या कंपनीचे आह्मी सोल एजंट आहों. [4–12]

वनौषधि सारसापरिला.

हा सारसापरिला कोणीहि सेवन केल्यास लागलीच रक्तशुद्धि व रक्तवृद्धि होऊन शरीर पुष्ट व सतेज होतें. स्मरणशक्ति वाढून मेंदूला बळकटी येते, आणि शक्ति वाढते. बा. कि. रु. १।.

महाकुष्ठ व पांढरें कोड

यांवर दोन अत्युत्तम गुणदायक औषधें.

१ भारतमधुवल्ली–खाण्यासाठीं. कि. रु. १।.
२ नागवल्लीतेल–लावण्यासाठीं. कि. रु. २.

मधुवल्ली सेवन केल्यानें व नागवल्ली तेल लाविल्यानें अठरा प्रकारचीं कुष्ठें खात्रीनें बरीं होतात. साधारण गुण दिसण्यास पंधरा दिवस लागतात.

[4–12] डॉ. धाकजी भानजी सावंत,
फणसवाडी, कोळ्याची चाळ, नं. २, मुंबई.

[4–12] **क्लिडायन्स छापचीं**

प्रोफेसर गजर यांचीं

शास्त्रीय रीत्या तयार केलेलीं औषधें.

फिवर ड्राप्स (ज्वरबिंदु) सर्व प्रकारच्या तापांवर जालीम. कि. ४४

ब्लडप्युरिफाईंग सोल्युशन (रक्तशोधक) उपदंशापासून होणाऱ्या रोगांवर फारच गुणकारी ठरलेलें. कि. रु. १

टॉनिक सोल्युशन—अपचन, अग्निमांद्य, जीर्णज्वर वगैरे विकार या औषधाच्या सेवनानें नाहींसे होऊन शारीरिक व मानसिक शक्ति वृद्धिंगत होते. कि. रु. २

प्लेगसोल्युशन—प्लेगवर रामबाण. कि. ४८

जर्मिसाईड—प्लेग, कॉलरा, वगैरे जंतुजन्य रोगप्रतिबंधक. कि. ४८.

कॉलरा सोल्युशन, गजकर्णाचें मलम, दंतमंजन वगैरे संपूर्ण औषधांची यादी मागवा.

आर्योनिक फार्मसी, गिरगांव, मुंबई.

अचूक [4–12]

शक्ति देणाऱ्या

आतंकनिग्रह गोळ्या.

रक्तसंबंधी सर्व प्रकारचे विकार व अशक्तता यांचा नाश करणाऱ्या सुप्रसिद्ध पौष्टिक गोळ्या. किंमत ३२ गोळ्यांच्या डबीचा १ रुपया.

वैद्यशास्त्री मणिशंकर गोविंदजी,
मालक–आतंकनिग्रह औषधालय.

हेड ऑफिस–जामनगर–काठेवाड.
शाखा नं. १ काळबादेवी रोड, मुंबई.
शाखा नं. २ बुधवार पेठ, पुणें शहर.

[4–12] **जारा लांकूड.**

वाफेच्या यंत्रांनीं कापलेलें वेस्ट्रेलिअन **जारा लांकडाचें** स्कॅन्टलिंगचा, तक्तपोशी, दांडे, वडोद, खांब, चौकटी, ऑफिस पार्टिशन्स, छपरें, खिडक्या पॉलिश केलेलें लांकडी सामान, फ्रेमवर्क, कापसाच्या गठ्ठ्यांस मारण्याच्या पट्ट्या इत्यादि कामांकडे उत्तम उपयोग होतो.

जारा लांकडाची किंमत सागवानाच्या **जवळ जवळ निम्मे आहे.**

निरनिराळ्या आकाराचे व लांबीचे स्कॅन्टलिंग मुंबई, कलकत्ता, मद्रास व कराची येथें असलेल्या आमच्या वखारींत नेहमीं मिळतात. पत्र पाठविलें असतां क्याटलाग व नमुने फुकट पाठवूं.

मिलर्स टिंबर अॅन्ड ट्रेडिंग कंपनी, लि.
यॉर्क बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई.
एजन्टस—
कलकत्ता—गिलॅन्डर्स अर्बथ्नोट आणि कंपनी.
मद्रास—बीनी अॅण्ड कंपनी.
कराची—मॅक्किनॉन मॅकेन्झी आणि कंपनी.

आधीं हें वाचा !

या चातुर्मासांतच आंबोळ्या व पोळ्या करण्याचा प्रघात जास्त. आणि या दोन पदार्थांकरितां तुह्मांला मुद्दाम दोन तव्यांचा उपयोग करावा लागतो. या तुमच्या दोन्ही अडचणी दूर व्हाव्या अशी जर तुमची इच्छा असेल, तर एकदम आह्मांला लिहा. ह्मणजे तुह्मांला एका बाजूनें आंबोळ्या व एका बाजूनें पोळ्या करितां येतील असा तवा तात्काळ रवाना करूं.

[4–12] **किंमत १ रुपया.**

किर्लोस्कर बंधु,
पोष्ट किर्लोस्कर वाडी.
(जिल्हा सातारा, सं० औध.)

पसंत पडल्यावर याचा अनुभव आह्मांला अवश्य कळवा.

नवीन पुस्तक !

हिंदुस्थानांतील यात्रेच्या सर्व पवित्र क्षेत्रांची, मोठ-मोठ्या व्यापारी व इतिहासप्रसिद्ध शहरांची, निसर्गसुंदर देखाव्यांची आणि प्रेक्षणीय स्थळांची वगैरे बरीच उपयुक्त, विश्वसनीय आणि मनोरंजक माहिती सुंदर चित्रांसहित एके ठिकाणीं देणारें **मराठींतील पहिलेंच पुस्तक !**

प. वा. श्रीयुत वी. एल्. घोरपडे यांचें

सचित्र
भारत-प्रवास-वर्णन.

आकार सध्याच्या 'मनोरंजना'एवढा. पृष्ठसंख्या २६०. आर्ट पेपरवर सुबक छापलेलीं हाफटोनचीं चित्रें ९०. **किंमत रुपये २. पोष्ट व्ही. पी. खर्च निराळा.**

राधाबाई अण्णासाहेब घोरपडे,
चालक, ए. एल्. घोरपडे, यांची इंक फॅक्टरी,
[2–12] २२, सोमवार पेठ पुणें.

☞ हें पुस्तक **मनोरंजन** ऑफिसांतहि मिळूं शकेल.

हजारों लोकांनीं अनुभवून पसंत केलेला
स्वदेशी पवित्र साखरेचा [1–3]

शक्तिवर्धक पाक.

याचे सेवनानें शौचास साफ होऊन अग्नि प्रदीप्त होतो आणि खाल्लेल्या अन्नाचें रक्त बनून शरीर पुष्ट व सतेज बनतें. शिवाय कडकी, जीर्णज्वर, अशक्तता, व्रण, कुष्ट, भगंदर, दमा, खोकला, अरुची व सर्व प्रकारचे वातविकार वगैरे रोग दूर होऊन शक्ति चौपट वाढते. २१ दिवसांत हटकून गुण. ह्या पाक सर्व ऋतूंत स्त्रिया, पुरुष, व मुलें यांनां सारखाच गुणकारी आहे. कि. २१ तोळ्यांच्या डब्यास व्ही. पी. सुद्धां १ रुपया. अनुपान सोबत. तीन डब्यांस व्ही. पी. सुद्धां २॥ रु. विशेष माहिती केसरींत पहा.

मेसर्स वी. ए. आणि कंपनी,
पब्लिशर्स, बुकसेलर्स, केमिकल्स आणि फोटो एजन्ट्स,
मु. पो. नरसोबाची वाडी, सदर्न मराठा रेलवे.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

फक्त कानाच्या रोग्यांकरिता डॉ. गाडगीळ यांचें

ऑरीनचा मोठा सांठा तयार आहे.

व्यापाऱ्यांनीं ऑरीन विक्रीस ठेवावें.

ऑरीन

कान फुटणें, पू व रक्त येणें, ठणका लागणें, आवाज होणें, कमी ऐकूं येणें, सुजणें, कंड सुटणें वगैरे विकार खात्रीनें बरे होतात. कान तपासवून **कर्णरोगप्रतिबंधक** उपाय सर्वांनीं करावा. कानाला ठणका केव्हां लागेल याचा नेम नसतो, म्हणून 'ऑरीन' (किं. रु. १) नेहमीं जवळ ठेवावें. रोगाच्या मानानें १० दिवस पुरणाऱ्या औषधाला किं. व ट. ख. रु. २. महिन्याच्या औषधाला रु. ५. [4–12]

डॉ. गाडगीळ यांचा कानाचा दवाखाना, भीमराव आत्माराम यांची वाडी, ठाकुरद्वार—मुंबई.

धी कृष्णा डाइंग्, वीव्हिंग्, ॲण्ड् ट्रेडिंग् कंपनी, लिमिटेड्, वाई.

शाखा—घनहट्टी.

स्थापना १९०६.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केलेली आहे.

भांडवल रु. ५०,०००.

प्रत्येक भाग रु. २५ चा, याप्रमाणें एकंदर भाग २०००. या कंपनीचे भाग घेऊं इच्छिणारांनीं अर्जासोबत प्रत्येक भागास रु. ५, भाग दिल्यानंतर रु. १०, व नंतर रु. ५ याप्रमाणें लागतात. भागीदारांस व्याज ६ टक्क्यांखालीं दिलें गेलें नाहीं. ऑईल् इंजिनच्या शक्तीवर धान्य दळण्याचीं, गळित धान्यापासून तेल काढण्याचीं व भातापासून तांदूळ तयार करण्याचीं व हळद स्वच्छ करण्याचीं यंत्रें सुरू केलीं आहेत. घनहट्टी येथील शाखेंत रंगाचें व रेशमी कद विणण्याचें काम केलें जातें. विशेष माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

मेसर्स कोठावळे ब्रदर्स आणि कंपनी,
वाई, जि. सातारा.

[4–12]

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.


[4-12] सतत पन्नास वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

डॉ. वामन गोपाळ यांचा

दूषित रक्त शुद्ध करणारा

आयोडाईज्ड

सार्सापरिला.



देहाचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय! तेंच एकदा बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करितात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगांमुळें अर्धांगवायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व इतर कारणांनीं रक्त बिघडून होणाऱ्या त्वग्रोगांवरहि हाच सार्सापरिला उत्तम ठरला आहे. आमच्या सार्सापरिल्याचा पुष्कळ खप पाहून बऱ्याच लोकांनीं त्याची हुबेहुब नक्कल केली आहे.

मालकः—

गौतमराव केशव,
ठाकुरद्वार, मुंबई.

करितां घेतांना बाजूला दाखविल्याप्रमाणें बाटलीवरील लेबल पाहून आणि तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घ्यावा.

बाटलीची किं. १।· रु. पो. खर्च ५ आणे. उत्तम गुणास ४ बाटल्या. ४ बाटल्यांस टपालखर्चासह ४॥—. विशेष माहितीकरितां कॅटलॉग मागवा.

आमच्याकडे डॉ. काळोखे यांचीं वैद्यकीय पुस्तकें विकत मिळतील.

एजंट्सः—

हिंदु-युरोपियन फार्मसी, पणजी-गोवा. नारायण रामचंद्र जोशी, उमरावती.

कृष्णराव गोपाळ शौचे, इंदूर. एस्. जी. येवलेकर, पुणें-सिटी.

शिवाय मोठमोठ्या शहरीं प्रसिद्ध दुकानदारांकडेहि मिळेल.

The Bombay Banking Co. Ltd.,
GIRGAON-BOMBAY. [4-12]

धि बॉम्बे बँकिंग कंपनी, लिमिटेड,

गिरगांव—मुंबई.

सेक्रेटरी, ट्रेझरर्स आणि एजंटस्:—

मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी.

स्थापना १८९८.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केली आहे.

भांडवल ५,००,००० रुपये. शेअरची किंमत ५० रुपये. शेअर १०,०००.

प्रत्येक भागाचे ५० रुपयांपैकीं फक्त ४० रुपये घेतले जातात.

अर्जासोबत रुपये २॥, व अलॉटमेंटनंतर रु. २॥, व पुढें एकदम रुपये ३५ अगर प्रत्येक महिन्याच्या अंतरानें प्रत्येक कॉल्वद्दल रुपये ५ भरावे लागतात. डिव्हिडेंट आतांपर्यंत केव्हांहि ६ टक्क्यांचे खालीं दिलें नाहीं. गेल्या चार सालीं तर ९ टक्के-प्रमाणें दिलें आहे.

तारणावर रकमा देणें, ठेवी ठेवणें, सरकारी प्रामिसरी नोटा, इतर कंपन्यांचे शेअर्स, त्याचप्रमाणें सोनें, चांदी, मोत्यें वगैरे मूल्यवान् जिनसांची खरेदीविक्री करणें, व्याज वसूल करणें, हुंड्यांचा व्यवहार करणें, वगैरे सर्व कामें चालतात.

सेव्हिंगब्यांकेंत ३॥ रु. व्याजानें रकमा ठेवण्यांत येतात. हंगामाचे दिवसांत म्हणजे नोव्हेंबर ते जून अखेरपर्यंत जास्त व्याजानें ठेवी ठेवून घेण्यांत येतात. कमिशनाचे दर फार माफक ठेविले आहेत.

मुदतीच्या ठेवीचे व्याजाचे दर:—

६ महिन्यांचे मुदतीचे:— ९ महिन्यांचे:— १२ महिन्यांचे:— २४ महिन्यांचे:—

	दरसाल			
दर शेंकडा	४ रु.	४॥ रु.	५ रु.	५॥.

करंट अकौंट ठेवण्यांत येतात. व्याज २॥ रु.

मुख्य मुख्य शहरीं हुंड्यांचा व्यवहार केला जातो.

ब्रँच आफिसें:—

१ पुणें; २ सातारा; ३ सांगली; ४ बेळगांव; ५ सोलापुर; ६ उमरावती; ७ नागपुर.

विशेष माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी,
सेक्रेटरी, ट्रेझरर्स व एजंटस्,
धि बॉम्बे बँकिंग कंपनी, गिरगांव—मुंबई.

[4-12] सर्वांत जुनी व नांवाजलेली

बी. सखारामजी आणि कंपनी.

हॉउस इस्टेट ॲण्ड इन्शुअरन्स एजंटस्.

मुख्य ऑफिस, १८ हमाम स्ट्रीट, कोट, मुंबई. (टेलिफोन नं. ३९०.)
ब्रँच ऑफिस, भरुचा बिल्डिंगज, काळबादेवी, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई. (टेलिफोन नं. २१४४.)

आह्मी मुंबई व इतर ठिकाणीं असलेल्या उत्तम व प्रसिद्ध अशा घरांचे व मालमत्तेचे मुख्य एजंटस् आहोंत व त्यामुळें मालकानां व गिऱ्हाइकांनां आमचे मार्फत काय फायदा झाला व होत आहे याचा खुलासा गरजूंनीं अवश्य मागवावा.

उत्तम शृंगारलेले (फर्निश्ड) अथवा विनशृंगारलेले बंगले, घरें, मजले, ऑफिसाकरितां व पेढ्याकरिता लहान व मोठ्या जागा, दुकानाकरिता जागा, मुंबईतील कोणत्याहि भागामध्य आमच्या मार्फत पाहिजे तेव्हां मिळतील.

घरें व इतर जमीनजुमले याची खरेदी व विक्री मुंबई, माथेरान, लोनावळा, खंडाळा, महाबळेश्वर, पुणें, पचगणी, देवलाली, दिल्ली, कराची, इत्यादि ठिकाणी आमचे मार्फत उत्तम तऱ्हेनें होते.

हवाशीर घरांमध्यें राहिल्यानें प्रकृति उत्तम रहाते; व उत्तम प्रकृति हें सर्व सुखाचें साधन आहे; आणि असली साधनें आमच्या यतीनें सुलभ रीतीनें उपलब्ध होतात.

रिकामीं असलेलीं घरें व विक्रीची मालमत्ता यांची माहिती पत्रद्वारें मागविली असताहि देण्यांत येते. घरांचीं भाडीं मालकांकरिता फार सवलतीनें वसूल करण्यांत येतील. लायक गहाणांवर अल्प गरजा भागविण्यापासून मोठे धंदे उभारण्यास लागतील अशा रकमा, विनबोभाट थोड्या मुदतींत, भरंवसेशीर रीतीनें व्याजीं लावून दिल्या जातात; आणि गरजूंच्या गरजा भागविल्या जातात. अनुभवानें खात्री.

विशेष माहिती पत्रद्वारें अगर समक्ष विचारिली असतां खुलासेवार देण्यात येईल.

हिल्स्टेशन्सकडील लोकाची होत असलेली मोठी गैरसोय दूर करण्यासाठी आह्मीं आमच्या कंपनीची शाखा पुण्यासहि स्थापन केली आहे. तरी तिचा फायदा लोक घेतील, अशी उमेद आहे.

आह्मीं इंडिया इक्विटेबल इन्शुअरन्स् कंपनी लिमिटेडची मुंबई इलाख्याची चीफ एजन्सी घेतली आहे. हेड ऑफिस—कलकत्ता. प्रॉस्पेक्टस् व इतर माहिती मागविली असता देण्यांत येईल. हुषार व प्रामाणिक एजंटस् पाहिजेत.

पुण्याचा पत्ता:—
बी. सखारामजी आणि कंपनी,
हाऊस ॲण्ड इस्टेट एजंटस्,
ईस्ट स्ट्रीट, पुणें.

प्रोप्रायटर,
वसंतराव सदाशिव घोत्रे.

मनोरंजनाचा

दिवाळीचा अंक.

उत्कृष्ट लेख !
सुंदर चित्रें !

प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवण्यालायक!

नोव्हेंबरच्या १ ल्या आठवड्यांत प्रसिद्ध होईल.

किंमत १ रु., व्ही. पी. पोस्टेजसहित १–२–०.

मनोरंजनाच्या सर्व वर्गणीदारास हा अंक भेटीदाखल फुकट देण्यात येईल. ज्यांना या अंकाचा भेटीदाखल लाभ घ्यावयाचा असेल त्यानीं मनोरंजनाचे त्वरित वर्गणीदार व्हावें. इतरानीं १८१ ची मनीआर्डर पाठवून नावें नोंदवावीं, अगर १८२ च्या व्ही. पी ने. अंक मागवावा.

जाहिराती.

ता १५ नोव्हेंबरच्या आत जाहिरातीच्या मजकुरासोबत पुढील दरानें जे जाहिरातीची रकम पाठवितील, त्यांच्याच फक्त जाहिराती या खास अंकात प्रसिद्ध होतील

संपूर्ण पेज,	३० रुपये
अर्धा पेज,	१८ रुपये.
पाव पेज,	१० रुपये.
अष्टमांश पेज,	६ रुपये

* छोट्या जाहिराती, प्रत्येकीं २ रुपये

* छोट्या जाहिराती, आतील पृष्ठावर मजकुराच्या खालीं (या अंकात दिल्याप्रमाणें) प्रसिद्ध होतील या जाहिराती दोन ओळींत घेण्यात येतील ६० हून जास्त अक्षराच्या छोट्या जाहिराती स्वीकारल्या जाणार नाहींत

मॅनेजर, मनोरंजन,
गिरगांव-मुंबई

स्त्रीचें शिरोभूषण ! ! !



मृदु, कुरळ, काळभोर, चकचकीत असा केशकलाप कोणत्या स्त्रीस आवडणार नाहीं ? असा सुंदर केशकलाप प्राप्त करून देणारें

'कामिनीया ऑईल'

हें एकच तेल असून तें प्रत्येक स्त्रीचा जसा सौभाग्यालंकार आहे, त्याचप्रमाणें तें मानसिक श्रम पडणाऱ्या पुरुषांसाठीं व विद्यार्थ्यांसाठीं फारच जरूरीचें आहे. हें तेल लावतांच संतप्त असलेलें डोकें शांत होऊन मेंदूस थंडावा येतो, मन उल्हसित होतें, डोक्यांतील खवडे वगैरे साफ बरे होऊन केश बिलकुल गळून न पडतां ते सुंदर रीतीनें व पुष्कळसे वाढतात. याचा सुवास अत्यंत मधुरच मोहक आहे. अर्धा आण्याचें तिकिट पाठवून नमुना मागवा.

१ बाटलीस १ रु., ट. स. ८४. ३ बाटल्यांस २।१०. ट. स. ८७.

अवश्य संग्राह्य औषधें



श्वास, दमा, खोकला, वगैरेवर वस्ताद. ऑडमन्स कफ एलिक्झिर.

फुप्फुसाच्या सर्व रोगांवर, घशांत दुखणें, छातींतून रक्त पडणें, श्वास लागणें व शीतोष्णापासून होणाऱ्या खोकल्यावर हें अत्यंत गुणकारी आहे. अनुभवानेंच खात्री होईल. सर्व देशभर याचा जारीनें खप होत आहे. यांत रसायन वगैरे कांहीं नसल्यामुळें लहानापासून थोरापर्यंत सर्वांस याचा उपयोग होतो. कि. १।. रु., ट. स. ८५.

सर्व प्रकारच्या कपाळदुखीवर ट्रेझो टेबलेट्स (ट्रेझो-वड्या).

अर्धशिशी, मलकश्रृंग-सर्दी गर्मी, कमजोरीमुळें अगर इतर कोणत्याहि कारणांमुळें कपाळ कितीहि दुखूं द्या, ट्रेझोच्या दोन वड्या पाण्याचे घोटाबरोबर गोटांत घेतांच कपाळ दुखण्याचा मागमूसहि लागणार नाहीं. वापरण्यानेंच खरा प्रकार कळून येणार आहे. कि. २० वड्यांच्या बाटलीस ८।२ आणे. ट. स. ८४ निराळा.



सर्व प्रकारच्या संधिवातावर



ऑडमन्स सायप्रस साल्व्ह.

वातामुळें शरीराचा कोणताहि भाग दुखणें, श्वासोच्छ्वास करतांना छातींत दुखणें, सांधे धरणें, कमर दुखणें, हातपाय वळणें, वगैरेवर हें मलम जरासें चोळतांच लगेच आराम पडतो. थकवा आलेल्या स्नायूंस हें चोळल्यास थकवा जाऊन ते जास्त बळकट होतात. हें सुंदरशा चिनी मांड्यांत येत असून, वर 'Odman's cypres salve' असें लिहिलेलें असतें. कि. १ रु., ट० स० ८४ निराळा.

सर्व माल मिळण्याचा पत्ता:—

धि अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कंपनी, सर्व तऱ्हेचीं औषधें विकणार, जुम्मामशीद-मुंबई.

Printed at the Nirnaya-Sagar Press, 23, Kolbhat lane, Bombay, by B. B. Ghanekar, and published at 21 A., Charni Road, Girgaon, Bombay, by K. P. Mitra.



संपादक-काशिनाथ रघुनाथ मित्र.

तिजोऱ्या आगींत घालून सरकारनें केलेली परीक्षा.

हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांमधील पोस्टल सेव्हिंग बँकसकरितां नामदार सरकारला तिजोऱ्यांची जरूर असल्यामुळें त्यानीं असें ठरविलें, कीं, निरनिराळ्या कारखानदारांच्या तिजोऱ्या आगींत घालून त्यांची परीक्षा करावी, व ज्यांतील चोपडया व कागद जसेच्या तसे राहतील त्या तिजोऱ्या विकत घ्याव्या. टपालखात्याचे डेप्युटी व असिस्टंट डायरेक्टर जनरल यांच्या समक्ष गेल्या जुलै महिन्याच्या विसाव्या तारखेस कलकत्त्यांत ही तिजोऱ्यांची परीक्षा झाली व इंग्लंडांतील प्रदर्शनांत ज्यामणें काम घेण्यांत येतें, त्यामणें येथेंहि घेण्यांत आलें. आगींत टाकून तिजोऱ्या उघडून पहातां फक्त गोदरेजच्या तिजोऱ्यांतीलच कागद व चोपडया उत्तम स्थितींत राहिल्या होत्या. बाकीच्या तिजोऱ्यांतील कागद जळून खाक झाले! त्यानंतर ८५,००० रुपये किंमतीच्या ३१२ तिजोऱ्या तयार करून देण्याचा मक्ता गोदरेजला मिळाला.

गोदरेजचा कारखाना सर्व हिंदुस्थानांत सर्वांत मोठा आहे व त्यांत पांचशें मनुष्यें काम करीत आहेत.


गोदरेजच्या तिजोऱ्या ८०,००० रु. किंमतीच्या यंत्राच्या साहाय्यानें तयार होतात. हातांनीं बनविलेल्या तिजोऱ्या मजबूत होणें शक्य नाहीं. कारण, हातांनीं जाड प्लेटीचें काम होत नाहीं.

तिजोऱ्यांचें काम असें होतें कीं, बाहेरून पहातां त्या हलक्या आहेत कीं चांगल्या आहेत, याची खरी पारख कोणालाच होत नाहीं.

गोदरेजवरोवरच्या वारंवार होणाऱ्या चढाओढींत इतर तिजोऱ्यावाल्यांनां इनामें मिळालीं आहेत; परंतु गोदरेजला एकूणएक १२ प्रदर्शनांत नेहमीं पहिल्या प्रतीचीं इनामें, सोन्याचे चांद मिळाले आहेत.

नामदार सम्राट् पंचमजॉर्ज हिंदुस्थानांत आले होते, तेव्हां त्यांच्या व सम्राज्ञी मेरी यांच्या कामाकरितां गोदरेजच्या तिजोऱ्याच घेण्यांत आल्या होत्या.

गोदरेज आणि वॉइस मॅन्यु. कंपनी,
गॅसकंपनीजवळ, परळ–मुंबई.



सर्व कोर्स पत्रव्यवहारानें शिकविला जातो. क्यान्डिडेट्स लंडन चेंबर्स ऑफ् कॉमर्सचे परीक्षेस पाठविले जातात. परीक्षेस वयाची अट नाहीं, अगर एकादी विशिष्ट परीक्षाहि लागत नाहीं. परीक्षा गव्हर्मेंटचे देखरेखीखालीं होते. रिझल्ट, परीक्षेचा दिवस, वेळ, तारीख, गव्हर्मेंट ग्याझीटमध्यें येते. इंग्लिश ६ इयत्ता झालेल्या इसमास कोर्स घेतां येतो. शिक्षण इंग्लिश भाषेंत चालतें. घोकंपट्टीचा अभ्यास नाहीं. अकाउन्टसची पूर्ण माहिती होते. रेलवे, इन्शुअरन्स, ट्रॅमवे, लिमिटेड कंपनी, ब्यांकिंग इत्यादि बहुतेक सर्व खात्यांतील अकाउन्टस कोर्समध्यें येतात. अकाउन्टसचा उपयोग नाहीं, असें कोणचेंच खातें नाहीं, यामुळें नोकरी मिळविण्याचे कामीं याचा महत्त्वाचा उपयोग होतो. प्रमोशनकरितां ह्या कोर्सचें सर्टिफिकेट फार उपयोगी पडतें ह्मणून निरनिराळ्या खात्यांतील लोक आमचेकडे शिकत आहेत. १९१३ ची पहिली टर्म जानेवारी ता. १५ पासून सुरू होणार आहे. ता. १५ जानेवारीपर्यंत नांवें नोंदणारास फी रु. फक्त ३०. मागाहून फी रु. ५०. फी हप्त्यानें घेण्यांत येते. जानेवारी १५ ला कोर्स सुरू होऊन मार्च १९१४ संपेल. १९१४ एप्रिलमध्यें परीक्षेस पाठविलें जाईल. आज फक्त नांवें नोंदवा व सवलतीचा फायदा घ्या.

[1] विशेष माहितीकरितां प्रास्पेक्टस मागवा. शार्टहॅन्डहि पत्रव्यवहारानें शिकविलें जातें.

सी. सी. एज्युकेशन ऑफिस, पुणें सिटी.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि माहिती मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

फोटोग्राफीचा नवीन स्टूडियो.

ब्लॅक अँड व्हाइट आणि ऑइल व वॉटरकलरच्या तसविरी सफाईदार बनविण्यांत येतात.

लॉकेट वगैरेमध्यें ठेवण्यास लायक असें हस्तिदंतावरील पेंटिंगचें काम आमच्या स्टूडियोमध्यें फारच कुशलतेनें तयार करण्यांत येतें.

३० कोलभाट स्ट्रीट,
काळबादेवी,
मुंबई.

अमेच्युअर्सचीं कामें. मोजेखातर फोटो काढणारांस उत्तम सोय. डेव्हलपिंग, रीटचिंग, प्रिंटिंग वगैरे कामें विशेष सवलतीच्या दरानें आमच्या स्टूडियोमध्यें करून देण्यांत येतात.

त्रिलोकेकर,
आणि
कीर्तिकर,
आर्टिस्ट्स् व फोटोग्राफर्स
यांचें
चित्ताकर्षक चित्रकार्यालय.

३० कोलभाट स्ट्रीट, काळबादेवी, मुंबई.

टेलिफोन नं० २२२०.

दिपवाळीची नवीन भेट

आपला फोटोग्राफ हीच होय!

आह्मी वरील पत्त्यावर हा फोटोग्राफिक स्टूडिओ नुकताच उघडलेला असून येथें उत्तम प्रकारचे फोटो, पोर्ट्रेट वगैरे काढण्याचें काम करण्यासंबंधानें खबरदारी घेण्यांत येते. आपल्या पेशाचें बीज झालें असा ग्राहकांचा ग्रह होईल, अशाच दृष्टीनें आह्मीं त्यांचे फोटो काढून देण्याची व्यवस्था केलेली आहे. चटकदार भाषेंत लिहिलेल्या जाहिरातींचें शब्दजाल पसरण्यापेक्षां चित्रकलाप्रिय जनांनीं आमच्या स्टूडियोमधील कामाचा एक वेळ अनुभव घेऊन पहावा, इतकीच आमची विनंति आहे. आमच्या येथील सफाईदार फोटो याच आमच्या सच्या जाहिराती होत !

आपल्या सुहृज्जनांस दिपवाळीची जिन्हाळ्याची भेट म्हणून आपली स्वतःची नवीन तसवीर पाठविणें, हाच आधुनिक शिष्टसंप्रदाय प्रत्येक कुटुंबवत्सल माणसास अवश्यमेव मान्य होईल.

गणपतराव एस्. त्रिलोकेकर,
विनायक ए. जे. कीर्तिकर,
प्रोपायटर्स.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

सर्वांत जुनी व नांवाजलेली

बी. सखारामजी आणि कंपनी,

हॉउस इस्टेट ऍण्ड इन्शुअरन्स एजंटस्.

मुख्य ऑफिस, १८ हमाम स्ट्रीट, फोट, मुंबई. (टेलिफोन नं. ३९०.)

ब्रँच ऑफिस–भरुचा बिल्डिंग्ज, काळबादेवी, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई. (टेलिफोन नं. २१४४.)

आह्मी मुंबई व इतर ठिकाणीं असलेल्या उत्तम व प्रसिद्ध अशा घरांचे व मालमत्तेचे मुख्य एजंटस् आहोंत व त्यामुळें मालकांनां व गिऱ्हाइकांनां आमचे मार्फत काय फायदा झाला व होत आहे याचा खुलासा गरजूंनीं अवश्य मागवावा.

उत्तम शृंगारलेले (फर्निश्ड) अथवा विनशृंगारलेले बंगले, घरें, मजले, ऑफिसांकरितां व पेढ्यांकरितां लहान व मोठ्या जागा, दुकानांकरितां जागा, मुंबईतील कोणत्याहि भागांमध्यें आमच्या मार्फत पाहिजे तेव्हां मिळतील.

घरें व इतर जमीनजुमले यांची खरेदी व विक्री मुंबई, माथेरान, लोनावळा, खंडाळा, महाबळेश्वर, पुणें, पंचगणी, देवळाली, दिल्ली, कराची, इत्यादि ठिकाणी आमचे मार्फत उत्तम तऱ्हेनें होते.

हवाशीर घरांमध्यें राहिल्यानें प्रकृति उत्तम रहाते; व उत्तम प्रकृति हेंच सर्व सुखाचें साधन आहे; आणि असलीं साधनें आमच्या मतीनें सुलभ रीतीनें उपलब्ध होतात.

रिकामीं असलेलीं घरें व विक्रीची मालमत्ता यांची माहिती पत्रद्वारें मागविली असतांहि देण्यांत येते. घरांचीं भाडीं मालकांकरितां फार सवलतीनें वसूल करण्यांत येतील. लायक गहाणांवर अल्प गरजा भागविण्यापासून मोठे धंदे उभारण्यास लागतील अशा रकमा, बिनबोभाट थोड्या मुदतींत, भरंवसेशीर रीतीनें व्याजीं लावून दिल्या जातात, आणि गरजूंच्या गरजा भागविल्या जातात. अनुभवानें खात्री.

विशेष माहिती पत्रद्वारें अगर समक्ष विचारिली असतां खुलासेवार देण्यांत येईल.

हिल्स्टेशन्सकडील लोकांची होत असलेली मोठी गैरसोय दूर करण्यासाठीं आह्मीं आमच्या कंपनीची शाखा पुण्यासहि स्थापन केली आहे. तरी तिचा फायदा लोक घेतील, अशी उमेद आहे.


आह्मीं इंडिया इक्विटेबल इन्शुअरन्स् कंपनी लिमिटेडची मुंबई इलाख्याची चीफ एजन्सी घेतली आहे. हेड ऑफिस—कलकत्ता. प्रॉस्पेक्टस् व इतर माहिती मागविली असतां देण्यांत येईल. हुषार व प्रामाणिक एजंटस् पाहिजेत.

पुण्याचा पत्ता:—
बी. सखारामजी आणि कंपनी,
हाऊस इस्टेट ऍण्ड इन्शुरअरन्स एजंटस्,
ईस्ट स्ट्रीट, पुणें.


प्रोप्रायटर,
वसंतराव सदाशिव धोत्रे.

गोपाळ सखाराम आणि कंपनी,


जनरल मर्चंट्स व कमिशन एजंट्स, काळबादेवीरोड—मुंबई.



१. तबला खैरी, डगा तांब्याचा, उत्तम कारागिरीचा, खणखणीत आवाजाचा } जोडीस किं.रु.१०
२. तबला सिसम अगर बिबव्याचा, डगा तांब्याचा, उत्तम कारागिरीचा. } " " ९
३. तबला इतर चांगले लांकडाचा, डगा तांब्याचा, मध्यम कारागिरीचा } " " ८.
४. मृदंग भजनी, कि.रु. ६,७,८, गायकी, ८,९,१०.



५. खदेशी बाजाची हातपेटी ३सप्तकांची सिंगल, किं रु.२५,उंची ३०.
६. " " " " ,, डबल सुरांची, किं. रु.३५,उंची ४०.
७. विलायती बाजाची हातपेटी ३। सप्तक डबल, किं, रु,५०, उंची ६०.
८. खदेशी बाजाची पायपेटी ३। सप्तक डबल, किं. रु. ७०, उंची ८०.
९. " " " ३॥ " " किं. रु. ८०,उंची ८५.
१०. " " " ३॥। सप्तक " किं, रु. ९५, उंची १००.
४ सप्तक, किं. रु. ११०.सुराच्या ३रागांच्या पेट्या किं, रु १२०ते१५०.



१२. अस्सल पेटंट रास्कोप घड्याळ, किं. रु. १२ लेहान किं. रु. १३.
,,चांदीचें किं. रु. २२; सेकंडवालें चांदीचें किं. रु. २५. हंटिंग रु. २६.
१३ निकल सिस्टीम रासकोप घड्याळ, किं. रु. २॥, ३, ३॥, ५, ७.
१४ रेलवे रेग्युलेटर वॉच, किं. रु ३॥, ४॥, ५, ६, ९, १०, १२.
१५ रिस्टवॉच मेटल, किं. रु.५. चांदीचें किं. रु. ८. सोन्याचें किं. रु.१०.
१६ नकली सोन्याचें ब्रेसलेट, किं. रु. ३. ब्रेसलेट वॉच, किं. रु. ७.
१७ वेस्टंड दोस्त, किं. रु. ७. मॅचलेस, किं. रु. १० सिविल, कि. २०.
,, क्यापेन, किं. रु. २२. चांपियन, किं. रु. ३०, सेक्युलर, किं. १४.
१८ आठ दिवसांचे चावीचें वॉच निकलचें किं. रु. १०. चांदीचें, किं. १५.



१९ ग्रामोफोन, १०॥ इंची पेटीचा हार्नसुद्धां किंमत रु. २० ते ३०.
२० " " " १२ इंची पेटीचा डबल स्प्रिंगचा, किं. रु. ४०
२१ " " " १४ इंची पेटीचा सिंगल स्प्रिंगचा, किं. रु.५०
२२ " " " १५ इंची पेटीचा डबल स्प्रिंगचा, किं. रु.६०
२३ " " " १८ इंची पेटीचा डबल स्प्रिंगचा किं. रु. ७५.
२४ गाण्याच्या प्लेटी, १० इंची, सिंगल रेकार्ड, किं. रु. १॥. उंची रु २.
२५ " " " डबल, किं. रु. १॥, २. उंची रु. २॥, ३, ३॥.

☞ विशेष माहितीकरितां मोठा सचित्र, संपूर्ण माहितीचा, १६० पानांचा, क्याटलाग मागवा. फुकट मिळेल.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

योग, मेस्मेरीझम आणि विद्युन्मानसशास्त्राच्या आधारानें तयार केलेला, आणि पृथ्वीच्या चाऱ्ही खंडांत मान पावलेला, त्रिकालदर्शी

आरसा !!

फक्त एकदांच अनुभव घेऊन पहा, कीं, भूत, भविष्य आणि वर्तमान जाणणें कठीण आहे कीं कसें ? अनुभव घेईपर्यंत आपल्याला कल्पना देखील करतां येणार नाहीं, कीं, हें ज्ञान कसें होत असेल ? प्राणिमात्र जो जो विचार करतें, त्याचें चित्र आकाशांत चित्रगुप्त देव अदृश्य रीतीनें काढून घेतो. तें चित्र आणि त्याचे परिणाम, समाधी आणि मृत्युकाळाशिवाय दुसऱ्या वेळीं मनुष्य साधारण दृष्टीनें पाहूं शकत नाहीं. तसे विचार आणि त्याच्या परिणामाचा अमुक विभाग पाहूं शकण्याची अद्भुत क्रिया एका महात्म्याच्या कृपेनें साध्य झाली आहे. श्रद्धाळु मुलें, पुरुष व स्त्रिया स्वतःचे विचार आणि त्यांचे परिणाम पाहूं शकतात, आणि त्या आधारानें भूत, भविष्य आणि वर्तमान हकीकत सांगूं शकतात. शिवाय, हिस्टिरिआ व भूतप्रेतबाधा इत्यादि मानसिक रोगांकरितां हा एक चमत्कारिक उपाय आहे. या आरशानें तसे रोग निर्मूल होतात. एकदां अनुभव घेऊन पहा. देवांच्या साहाय्यतेनें काम केल्यानें एकदम रोगी खडखडीत बरा होतो, हें अद्भुत नव्हे काय ?

आपण औषधोपचारांत पैसे खर्च करतां, आणि त्यांत आपल्याला बिलकूल यश मिळत नाहीं; परंतु एकदां हा उपाय योजून पहा. भविष्य जाणण्याकरितां आपण पुष्कळ पैसे खर्च करतां, परंतु या आरशानें आपण एकदां भविष्य जाणून घ्या व खात्री करून घ्या. आपले पैसे वांचतील आणि आपल्याला लाभ होईल. आपण स्वतःच भविष्यवादी होऊं शकाल. फक्त एक आरसा विकत घ्या, आणि स्वस्तें ज्ञान संपादन करा. अशा स्वस्त्या किंमतींत असा लाभ होतो तो जाऊं देणें हें अगदीं अयोग्य आहे. हा आरसा एकदां विकत घेतल्यानंतर नेहमीं उपयोगास पडतो. गांव, परगांव, देशांतर आणि दूर असणारे मित्र सोयरेसंबंधी यांना या आरशाच्या साहाय्यानें आपण भेटूं शकाल. अमुक काम होईल कीं कसें ? अमुक बाबतींचे परिणाम काय होतील ? वगैरे जे जे आपल्या मनाचे खुलासे करणें असतील ते सगळे होऊं शकतील. विद्वानांनीं पुष्कळ सरटिफिकिटें धाडलीं आहेत व धाडीत आहेत, हेच ह्या आरशाच्या उपयुक्ततेचे पुरावे होत. हा आरसा वापरण्याचें बुक ज्या भाषेंत पाहिजे असेल त्या भाषेचें नांव स्पष्ट लिहावें.

आरशाची किंमत—रु. २-९-० आरसा साध्या कांचेचा. आणि बिल्लोर कांचेच्या मजबूत आरशाची किंमत रु. ३-८-०. पोस्टेजसहित. हिन्दुस्थानाबाहेरच्या गृहस्थांकरितां वरील किंमतीपेक्षां एक रुपया जास्त.

खास बिलोर कांचेचे मोठे आरसे किंमत रु. ५. ट. स. १ रु.

सूचना:—सदर आरसा पसंत न पडल्यास आरसा पोहोंचल्यापासून २४ तासांच्या आंत व्ही. पी. करून परत पाठवावा, ह्मणजे अनुक्रमें रु. २-०-० व रु. २-८-० परत देण्यांत येतील.

पत्रव्यवहार बालबोध लिपींत करावा.

आशाभाई वाघजीभाई पटेल,

[5] मु. करमसद, पोस्ट आनंद, जिल्हा खेडा, प्रांत गुजराथ.

The Bombay Banking Co. Ltd.,
GIRGAON-BOMBAY. [6]

धि बॉम्बे बँकिंग कंपनी, लिमिटेड,

गिरगांव—मुंबई.

सेक्रेटरी, ट्रेझरर्स आणि एजंटस्:—
मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी.

स्थापना १८९८.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केली आहे.

भांडवल ५,००,००० रुपये. शेअरची किंमत ५० रुपये. शेअर १०,०००.

प्रत्येक भागाचे ५० रुपयांपैकीं फक्त ४० रुपये घेतले जातात.

अर्जासोबत रुपये २॥, व अलॉटमेंटनंतर रु. २॥, व पुढें एकदम रुपये ३५ अगर प्रत्येक महिन्याच्या अंतरानें प्रत्येक कॉलवद्दल रुपये ५ भरावे लागतात. डिव्हिडेंट आतांपर्यंत केव्हांहि ६ टक्क्यांचे खालीं दिलें नाहीं. गेल्या चार सालीं तर ९ टके-प्रमाणें दिलें आहे.

तारणावर रकमा देणें, ठेवी ठेवणें, सरकारी प्रामिसरी नोटा, इतर कंपन्यांचे शेअर्स, त्याचप्रमाणें सोनें, चांदी, मोलें वगैरे मूल्यवान् जिनसांची खरेदीविक्री करणें, व्याज वसूल करणें, हुंड्यांचा व्यवहार करणें, वगैरे सर्व कामें चालतात.

सेव्हिंगब्यांकेंत ३॥। रु. व्याजानें रकमा ठेवण्यांत येतात. हंगामाचे दिवसांत म्हणजे नोव्हेंबर ते जून अखेरपर्यंत जास्त व्याजानें ठेवी ठेवून घेण्यांत येतात. कमिशनाचे दर फार माफक ठेविले आहेत.

मुदतीच्या ठेवीचे व्याजाचे दर:—

६ महिन्यांचे मुदतीचे:-	९ महिन्यांचे:-	१२ महिन्यांचे:-	२४ महिन्यांचे:-
दरसाल दर शेंकडा ४ रु.	४॥ रु.	५ रु.	५॥.

करंट अकौंट ठेवण्यांत येतात. व्याज २॥ रु.

मुख्य मुख्य शहरीं हुंड्यांचा व्यवहार केला जातो.

ब्रँच आफिसें:—

१ पुणें; २ सातारा; ३ सांगली; ४ बेळगांव; ५ सोलापुर; ६ उमरावती; ७ नागपुर.

विशेष माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी,
सेक्रेटरी, ट्रेझरर्स व एजंटस्,
धि बॉम्बे बँकिंग कंपनी, गिरगांव—मुंबई.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि माहिती मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.



वैद्य गोपीनाथ कृ० क्षत्रिय,

सदाशिव स्ट्रीट, कांदेवाडी, गिरगांव–मुंबई,

यांचीं विलक्षण गुणदायक औषधें.

हिंदुस्थानांत भरलेल्या निरनिराळ्या प्रदर्शनांतून आमच्या अत्युत्कृष्ट औषधांबद्दल



तीन सोन्याचीं, चार रुप्याचीं, एक ब्रांझचें अशीं मेडलें आणि आठ सर्टिफिकिटें मिळालीं आहेत.

प्रत्येक बाटलीची किं. रु. ३॥

शक्तीवरील गोळ्या, नं. १, १००.

प्रत्येक बाटलीची किंमत. ।•

दांतांचें मंजन, वायुनाशक तेल.

प्रत्येक बाटलीची किंमत ।॥•

जुलाब, पटकी (कॉलरा) वर, खोकल्यावर गोळ्या १००. खोवटि, कर्णरोगावर थेंब, विंचवाचे दंशावर, आंवरक्तावर.

प्रत्येक बाटलीची किंमत ॥=

जुलाबाच्या गोळ्या, गजकर्णावर मलम, खरजेवर मलम, कर्पुर, पेपरमींट, पुदीन्याचा व बडीशेपेचा अर्क.

प्रत्येक बाटलीची किं. रु. १।.

अन्नपाचक गोळ्या १००, कावीळीवर चूर्ण, कॅसाचा कल्प.

प्रत्येक बाटलीची किं. ॥•

सार्वजनिक मलम, चट्ट्यावर मलम, डोकें दुखीवर पुड्या.

प्रत्येक बाटलीची किं. १।.

ज्वरांकुश, ज्वरबिंदु, बालसंजीवन, बालामृत, खोकल्यावर सरबत, शक्तीवरील गोळ्या नं २, नेत्रसंजीवनी थेंब, केशवर्धक सुगंधी तेल, सारसाडाईन (रक्तशुद्धीवर), ज्वरांकुशवटि, गजकर्णावर वड्या १०, लायमचें सरबत, जंतावर पूड, पेपरमिंटचें तेल.

प्रत्येक बाटलीची किंमत रु. ३.

मुलांचे आंकडीवर वस्ताद.

प्रत्येक बाटलीची किंमत रु. ६.

रक्तपितीवर (लाल कोडावर).

प्रत्येक बाटलीची किंमत रु. १॥.

डोकेंदुखीवर औषध, सफेत कोडावर लावण्याचें व पोटांत घेण्याचें, कॉडलिव्हर तेलाचें इमलशन दूध, नारूवर चिकट्टा.

प्रत्येक बाटलीची किंमत रु. २॥

मेदोवृद्धीवर.

प्रत्येक बाटलीची किंमत रु. २.

मूळव्याधीवर चूर्ण अथवा मलम, वायुनाशक तेल, हिवतापावर सरबत, पिनस रोगावर तेल.

केशर दर तोळ्यास रु. १८=

कस्तुरी दर तोळ्यास रु. ३२ व ४०.

वरील सर्व औषधांस टपाल व बंगीखर्च निराळा पडेल.

सचित्र, औषधांचा कॅटलाग मोफत. [7]

वैद्य गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय, सदाशिव स्ट्रीट, कांदेवाडी, पोस्ट गिरगांव—मुंबई.


या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

दांताचे डाक्टर

पी. धारगळकर,

(लंडन हास्पिटल.)

नवीन दांत अगदीं अस्सल-प्रमाणें फारच कुशलतेनें बसविण्यांत येतात. [8]



एलिस बिल्डिंग्ज,
हार्नबी रोड,
कोट-मुंबई.

वनौषधी सार्सापरिला.

हा सार्सापरिला कोणींहि सेवन केल्यास त्यापासून रक्तशुद्धि व रक्तवृद्धि होऊन शरीर पुष्ट व सतेज होतें. स्मरणशक्ति वाढून मेंदूला बळकटी येते व शक्ति वाढते.

बाटलीची किंमत १। रुपया.

महाकुष्ट व (रक्तपिती) पांढरें कोड यांवर

दोन अत्युत्तम औषधें

१. भारतमधुवल्ली–खाण्यासाठीं कि. १–४–०.

२. नागवल्ली तेल–लावण्यासाठीं कि. २–०–०.

ही मधुवल्ली सेवन केल्यानें व तेल लाविल्यानें अठरा प्रकारची कुष्टें खात्रीनें बरीं होतात. साधारण गुण दिसण्यास पंधरा दिवस लागतात.

डॉ. धाकजी भानजी सावंत,

[9] फणसवाडी, कोळ्याची चाळ, नं. २, मुंबई.

लहान मुलांच्या आंकडीवर

रामबाण औषध

जयकर्स कन्व्हलशन् क्युअर.

प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रहास ठेवावें.

[10] किंमत रु० २. जयकर ब्रदर्स ६६१, गिरगांव, मुंबई.

[11]



लहान मुलांसाठीं डोंगरे यांचें बालामृत घेतेवेळीं तें त्यांचेंच असल्याबद्दल खात्री करून घ्यावी. बाटलीची किं. ॥।• ट. रु. ।•

के. टी. डोंगरे कंपनी,
गिरगांव—मुंबई.

श्रीमती स्त्रियाचे अलंकार [12]

फार मौल्यवान् असतात. ते चोरीस गेले तर फार मोठें नुकसान होतें आणि स्त्रियांच्या कोमल अंतःकरणास धक्का बसतो. ही गैरसोय दूर होण्यासाठीं सर्वतोपरी मजबूत आणि सर्वांगसुंदर अशा अजब संदुका विलायतेहून तयार करवून आणविल्या आहेत. यांत विजेच्या साह्यानें अशी गुप्त योजना केली आहे, की, अलंकाराची पेटी जरा कोणी हालविली कीं तत्काल कर्कश असा आवाज एकसारखा सुरू होतो आणि तो पेटीचीं मालकीण पेटी उघडीपर्यंत बंद पडत नाहीं. हा आवाज इतका कर्कश असतो, कीं, एकाद्या कुंभकर्णाचीहि झोंप मोडून तो चोराचा पाठलाग करील. या अपूर्व योजनेमुळें अलंकारांची पेटी उघडण्याची अगर उचलून नेण्याची कोणाची छाती नाहीं! ह्या पेट्या स्टीलच्या, मोरोक्को लेदरच्या, निकल प्लेटेड आणि आंतील बाजूनें रेशमी कापड आणि मखमलीनें मढविलेल्या आहेत. ही अजब संदूक राजेरजवाडे, जहागिरदार, इनामदार आणि श्रीमंतांच्या संग्रहीं ठेवण्यालायक असून तिची किंमत रु. ४० पासून ८५ पर्यंत आहे. जास्त खुलासा पत्रद्वारें.

तारेचा पत्ता–'लादी.'
टेलिफोन नं. १८३१.

रामदास आणि कंपनी,
जनरल मर्चंट आणि कमिशन एजंट, सॅन्डहर्स्टरोड कार्नर, मुंबई नं. ४.

जाहीर नोटीस.

सर्व लोकांस माहीत होण्याकरितां प्रसिद्ध करीत आहों, कीं, श्रीक्षेत्र काशी येथील श्रीरामसमर्थ कंपनीकडून हातमागावर तयार केलेला फरमाइषी स्वदेशी माल व्ही. पी. नें पाठविला जातो. त्याचा तपशील खालीलप्रमाणें:-

१. हे कद जांभळा, तांबडा आणि केसरी या तिन्ही पक्या रंगाचे, रेशीम पिळदार, पोत जाड आणि मजबूत, फार दिवस टिकणारे, रंग खात्रीचा असून किंमत माफक आणि माल चांगला, असे तयार केले आहेत.

मालाचा तपशील.	लांब	रुंद.	कि. रु. पा. कि. रु. प.	व्ही. पी. स. आ.	मालाचा तपशील.	लांब.	रुंद.	कि. रु. पा. कि. रु. प.	व्ही.पी. स. आ.
कद विनकांठी ...	१०	२॥	१०	१३	८१०	पामरी रुईफुली ...	४	१॥॥	४	७	८४
कद रुईफुली ...	१०	२॥	११	१५	८१०	गोमकांठी पीतांबर	१०	२॥	१२	१५	८१०
कद विनकांठी ...	११	२॥॥	१२	१६	८१०	पीतांबर जरीकांठी...	१०	२॥	२२	२५	८१२
कद रुईफुली ...	१०	२॥॥	१२	१४	८१०	कद जरीकांठी ...	१०	२॥	२०	२३	८१२
" " ...	११	२॥॥	१३	१६	८१०	" " ...	८	१॥॥	१०	१४	८८
कद जनानी वि. कां.	१६	२॥	१७	२०	८१२	कद साधेकांठी ...	८	१॥॥	५	७	८६
" " रुईफुली	१७	२॥	१९	२६	८१२	" " ...	६	१॥	४	६	८६
" " "	१७	२॥॥	२१	३०	८१२	लुगडी रेशीमकांठी...	१६	२॥	४	८	८१०
पामरी रुईफुली ...	६	२॥	६	१०	८६	" " ...	१७	२॥	६	१०	८१०

२. यांशिवाय हलके कद पीतांबर लांब १० × २॥ चे, किंमत ७॥-९-१० पर्यंत सर्व रंगांचे तयार आहेत. शिवाय काशीचा हरएक प्रकारचा माल सुती-रेशीमकांठी-लुगडी; खण सुती-रेशमी व जरीचे चोळखण; सुती-रेशमी कांठाचे घोतरजोडे; उपणे-जोड्या, शेले; दुपेटे; पैठण्या; गंगावन; तंबाखूच्या सुगंधी गोळ्या; कस्तुरी उंची दर तोळा २७, ५० रु. पावेतों; रेशमी जनानी-मर्दानी मुकटे वगैरे माल माफक किंमत घेऊन पाठवूं.

३. अत्तरें—(१८३। रु. भाराचा तोळा) गुलाब, केवडा, मोतिया, बाव्हा, पानडी, हिना, दवना, खस, चंपा, इत्यादि दरतोळ्यास ८८, १, २, १० रु. पर्यंत. गुलाब, केवडापाणी दरशेरी ८१२, २ रुपयेपर्यंत. चंदनी तेल दरशेरी २५ रुपये.

४. सुगंधी तेलें—(११२ रु. भाराचा शेर) चमेली, केवडा, हिना, दरशेरी ३, ६ रु. पावेतों.

५. अत्तरांच्या पेट्या—नंबर १ शिशा ८. अत्तरें तोळे ४. किंमत रु. ४॥. नं. २ शिशा ६. अत्तर ११॥ तो. किंमत रु. २१. टपालखर्च माफ.

६. श्रीराम-उपासनाग्रंथ—किंमत १ रुपया. यांत रामदासी संप्रदायी लोकांनां अवश्य लागणारे सर्व विषय आहेत. तसेंच—

७. रुद्राक्ष-माळा, मणी—(१०८) बोराएवढ्या दाण्यापासून मोळ्या हरभऱ्यापर्यंत. एका माळेस किं. रु. ८१२ पासून ३ पावेतों. हरभऱ्यापासून तों मिऱ्यांपर्यंत एक माळेची किंमत रु. ४ ते रु. २० पावेतों. गौरी शंकर रुद्राक्ष लहानमोठ्या प्रत्येकी दाण्यास किंमत रु. ३ ते १० रु. पर्यंत. रुद्राक्षकंठी मणी (३२) किंमत ८१२ ते रु. १० पर्यंत. स्फटिकमाळ मणी (१०८) १॥ रु. ते १० रुपये.

८. वातविध्वंस श्रीकाशीविश्वंभर तेलः—हें सर्व प्रकारचे वात, अर्धांगवायु इत्यादिकांवर तसेंच कोणत्याहि कारणानें झालेलीं क्षतें, व्रण, गंडमाळा, कुष्ठरोगांवर, कर्णरोगांवर, मस्तकशूळावर, हातपाय, अंग दुखणें किंवा वळणें यांवर, हरेक प्रकारचे फोडांवर, शस्त्राचे वगैरे घावावर, रक्तदोषजन्य सर्व विकारांवर, गरम, दाद वगैरे चर्मरोगावर, वाळंतिणीकरितां, चतुष्पाद जनावरांकरितां, इत्यादि रोगांवर खात्रीनें गुण देणारें

१ एक बाटलीची किंमत रु. २. | ६ बाटल्यांची किंमत रु. ९
३ तीन बाटल्यांची रु. ५। | १२ बाटल्यांची किंमत रु. १५

सर्वांस टपालखर्च माफ. अनुपान बाटलीसोबत राहील. गांवोगांवीं एजंट पाहिजेत. कमिशन मात्र मिळेल.

९. ग्राहकांनीं आमच्याकडून २५ रुपयांच्या वर माल मागविल्यास कमिशन दररुपयास ८॥. प्रमाणें देऊं. टपालखर्चास अर्धा आणा आल्यास सर्व माहितीचा कॅटलाग फुकट पाठवूं.

ग्राहकांनीं आपला पत्ता, नांव, पोस्ट, जिल्हा, वगैरे स्वच्छ लिहिणें.

पत्ता—नारायण गणेश रिसबूड, दुर्गाघाट, बनारस सिटी.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

रॉय आणि कंपनीचा होमिओपाथिक दवाखाना. [14]

घेण्यास सुलभ व अचुक गुणकारी होमिओपाथिक, इलेक्ट्रो-होमिओपाथिक, आणि बायोकेमिक (जीव रसायनी) खात्रीचीं औषधें व तत्संबंधीं लागणारीं पुस्तकें, पेट्या इत्यादि, अति स्वस्त भावानें आमच्याकडे मिळतात. तसेच फॉस्फराईन, गोल्डन ड्रापस्, इ. पॉटिक औषधें, दमा, क्षय, कावळ, लिवर, मधुमेह, प्रदर इ रोगांवर औषधें. एकदम घाऊक घेणारास भरपूर कमिशन देऊं. कोणी रोगाची सांगत हकीगत कळविल्यास रोगनिदान व योग्य औषधयोजनाहि करूं.


रॉय आणि कंपनी, होमिओपॅथिस्टस्, १८-२० काळबादेवी रोड, मुंबई.

गोपाळ नारायण कंपनी, बुकसेलर्स, कालकादेवीरोड-मुंबई. [15]

प्राकृत ग्रंथ (मोठ्या टायपाचे.)				संस्कृत ग्रंथ.	रु.		
रामविजय.	रु. १-४	भक्तलीलामृत.	रु. ४-०	भागवत, श्रीधरी.	रु. ५	अध्यात्मरामायण सटीक.	२
हरिविजय.	१-०	नाथलीलामृत.	२-०	भागवत, विजयध्वजी.	८	महाभारत सटीक.	२५
भक्तविजय.	२-०	संतलीलामृत.	१-१२	भागवत टीका चूर्णिका.	१०	आत्मपुराण सटीक.	१२
पांडवप्रताप.	२-८	एकनाथी भागवत.	४-८	वाल्मीकि रामा. सटीक.	७	नारायणभट्टी समंत्रक.	२
कथासारामृत.	२-८	नवनाथभक्तिसार.	२-०	हरिवंश सटीक.	४	योगवासिष्ठ सटीक.	२०
काशीखंड.	३-०	गणेशप्रताप.	३-०	विष्णुपुराण सटीक.	३	सुभाषितरत्नाकर.	२
जैमिनी अश्वमेध.	३-०	उपयुक्त सर्वसंग्रह.	१-४	गणेशपुराण.	६	कृष्णयजुर्तैत्ति. ब्राह्मण.	२॥
दासबोध.	१-०	गुरुचरित्र.	२-०	कृष्णयजुर्तैत्ति. संहिता.	३	आनंदरामायण.	५

नानूज ब्रास वर्क्स महमदी महाल, काळबादेवी रोड, मुंबई.

लोखंडी पाळणा किं. रु. १५
' स्विंगिंग चेअर " १०
' चेअरबेड (पाहिजे तेव्हां पलंग व खुर्ची बनते.)" ८
* घडीच्या खुर्च्या " २।
" घडीच्या खुंट्या " ॥।
" घडीची खाट " ८
" बाबाकॉट (मच्छरदाणीच्या चौकटीसह ४×२।) " २०
" बेडस्टेड (मच्छरदाणीच्या चौकटीसह ४×३) " २०



लोखंडी बेडस्टेड्स (वायर मेट्रेससह) किं. रु. २२
" घडीचे बांक " ५॥
" आरामखुर्ची " ९
" टॉवेलस्टँड " ४
" वॉशस्टँड (भांड्यांसह) " ३
' शेल्व्हज किं. रु. ३ पासून १० पर्यंत.
" घडीचें टेबल किं. रु. ५

[फॅक्टरी-खेतवाडी मेनरोड, गिरगांव-मुंबई.]

यांशिवाय दुसरें पुष्कळ तन्हेचें पितळेचें, लोखंडी व इतर धातूंचें उपयोगी सामान तयार होतें. किंमतीची अर्धी रक्कम आगाऊ पाठविल्यास माल व्ही. पी. नें पाठवूं. व्यापाऱ्यांस भरपूर सवलती. [16]

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

वेदांत

मापान्तर ही आजपर्यंत हिंदुस्थानांत अश्रुतपूर्व गोष्ट होती. हिंदुधर्मांत ज्यांचा ज्यांचा अंतर्भाव होतो असे कोट्यवधि लोक वेदांस प्रमाण मानीत आहेत व वेदांचा आधार ज्या मतांस, कृत्यांस अथवा संस्कारांस नाहीं, तें सर्व धर्मबाह्य असें समजण्यांत येतें. परंतु वेदांत काय आहे हें बहुजनसमाजासच काय, परंतु धार्मिक बाबतींत समाजाचे अग्रणी म्हणवून घेणाऱ्या

विद्वान् आचार्यांपैकींहि फार थोड्यांसच माहीत होतें. इतर धर्मांतील लोक आपला पूज्य धर्मग्रंथ प्रथम समजून घेतात व मग त्या धर्माचा अभिमान बाळगतात; परंतु हिंदुधर्मांतील लोक **आपल्या धर्मग्रंथाचें ज्ञान करून न घेतांच** धर्माचा अभिमान वहात आले आहेत. पण ज्या अभिमानास ज्ञानाचें पाठबळ नाहीं तो कोरडा व रूक्ष अभिमान **कोणासहि झाला तरी लांछना-स्पदच** होय आपल्या समाजावरचें हें दूषण जावें या हेतूनेंच हें वेदांचें **सरळ, सोप्या** परंतु वेदांस **साजेल अशा भारदस्त** भाषेंत भाषांतर सुरू करण्यांत आलेलें आहे. हें भाषान्तर **प्रत्येक महिन्यास श्रुतिबोध** मासिक पुस्तकाच्या रूपानें प्रसिद्ध होत असून त्यांत भाषांतरावरोबर मूळ वेदहि, त्याचे स्वर व **पदपाठ** यांसह दिला जातो. दर महिना **'मनोरंजना'च्या** या अंकाएवढ्या मोठ्या साइझचीं **चौसष्ट** पृष्ठें सुंदर टाइपांत गुळगुळीत कागदावर प्रसिद्ध होतात, व इतकें असूनहि वर्षाची वर्गणी **ट ख.** सह फक्त **दोन रुपये** आहे. मासिकास आरंभ जुलैपासून होऊन आतांपर्यंत पांच अंक निघाले आहेत, व दिवाळीच्या अंकांत **वेदकालीन** प्रसंगाचें **एक** सुंदर चित्र दिलें आहे. वेदकालीन विषयांवरील हें **सर्व हिंदुस्थानांत पहिलेंच चित्र** आहे. **मासिक मनोरंजनाच्या हजारों** ग्राहकांनों! हें वेदांचें भाषांतर कसें होत आहे, हें तुम्ही **आपल्या प्रिय मनोरंजनासच** विचारा, (मनोरंजनाच्या सप्टेंबर १९१२ च्या अंकांतील अभिप्राय वाचा,) व आपलें पुस्तकालय या मासिकानें शोभवा. दिपवाळीचा **सुप्रसंग** हा ज्ञानार्जन करण्यास अत्यंत मंगल मुहूर्त होय. गेल्या पांच महिन्यांच्या अवधींतच श्रुतिबोधाच्या १ ल्या व २ च्या अंकाची **द्वितीया-वृत्ति** काढावी लागली! व्ही.पी नें मागणी करा. श्रुतिबोध मराठीप्रमाणेंच इंग्रजी, हिंदी. व गुजराथी या भाषांतहि प्रसिद्ध होत असतो.

संपादकः—

रामचंद्र विनायक पटवर्धन, बी. ए., एल् एल्. बी.
अच्युत बळवंत कोल्हटकर, बी. ए., एल् एल्. बी.
दत्तो अप्पाजी तुळजापुरकर, बी. ए., एल् एल्. बी.

पत्ताः—

म्यानेजर, श्रुतिबोध, ४७, काळबादेवी, मुंबई.

रजिस्टर्ड.

अमृतांजन.

अचुक गुणकारी !
Indian Pain Balm.



पुष्कळ नामांकित डाक्टरांनीं व सद्गृहस्थांनीं सर्वोत्कृष्ट ठरविलेलें. मस्तकशूल, संधिवात, विंचवाचा दंश, घाव, ठेंच, ज्ञानतंतुगत पीडा, यांवर रामबाण. फक्त तीन वेळ लाविल्यानें गुण येतो. हजारों शिफारसपत्रें व नागपुरच्या प्रदर्शनांत पदक मिळालें आहे. दुःखग्रस्तांचा हा एकच उपाय आहे. प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रही ठेवावें. किंमत ८ आणे. व्ही. पी. नें १२ आणे. [18]

गजकर्णाचें मलम.—हें लाविल्यानें नायटे, कोरडी खरूज, गजकर्ण, इसब वगैरे सर्व प्रकारचे त्वचागत रोग २४ तासांत बरे होतात किं. १ डबीला ६ आणे. ट. ख. ४ आणे.

दंतमंजन—दररोज सकाळीं यानें दांत घांसल्यानें दांतांतून रक्त वाहण्याचें बंद होऊन दांत स्वच्छ होतात. मुखदुर्गंधी नाहींशी होते. किंमत २ आणे.

अमृतांजन डिपो, १०९ फ्रियर रोड, मुंबई.

गृहरंजनाचीं उपयुक्त साधनें. [19]

लादी किंवा फरशी—शहाबादी, तांदूर, नावंगी आणि संगमरवरी—सर्व मापाची.

टेबलें, चौरंग, बुद्धिबळाचे पट—वगैरे संगमरवरी अगर इंग्लिश टाइलचे—ऑर्डर येतांच तयार करून दिले जातील.

टाइल्स—दिवाणखाना, स्नानगृह, देवघर वगैरे ठिकाणीं वापरण्यालायक गुळगुळीत, ग्लेझड, रंगीबेरंगी, गालिचा फॅशन, वेलबुटी आणि उठावदार नकशी कामानें युक्त असे अनेक प्रकारचे.

कौलें—मंगलोरी—'जे. बी. रुपारेल' आणि 'रामदास' छापाचीं, सारख्या मापाचीं, पाण्यांत न भिजणारीं, खणखणीत, मजबूत आणि कोळशाच्या भट्टीत भाजलेलीं. कांचेचीं कौलें हीं मजबूत उत्तम रंगाचीं आणि सारख्या मापाचीं.

सिमेंट—अस्सल आणि सर्वांत उत्तम ठरलेलें. वरील सर्व साधनें आमच्या येथें किफायत-भावानें आणि तावडतोब मिळतील. सर्व मालाचे नमुने दाखवून कोणता माल कोठें वापरावा याची खात्री समजूत करून दिली जाईल. तसेंच हुशार कारागीर पाठवून दिले जातील.

तारेचा पत्ता 'लादी.' टेलिफोन नं. १८३१.

जीवनदास वी. रुपारेल,

लादी आणि टाइल्सचे व्यापारी,
गोलपिठ्यानजीक, सॅन्डहर्स्टरोड, मुंबई. नं. ४

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

सत्रंज्या व गालीचे याचा
मोठा नवा कारखाना.

सुशिक्षित लोकांच्या देखरेखीखालीं चालणारा हा मुंबईतील पहिलाच कारखाना होय. लांकडांच्या मागांवर शट्ल्सनीं काढलेल्या अनेक प्रकारच्या सुबक व टिकाऊ फॅन्सी सत्रंज्यांचा मोठा स्टॉक करून ठेविलेला आहे. गालीचे तयार करणारे उत्तर हिंदुस्थानांतील प्रसिद्ध कारागीर आणिले आहेत. हिंदु देवालयें, दिवाणखाने, नाटकगृहें, सकसवाले, मोठमोठ्या सभांचे हॉल्स वगैरे जागेच्या मापाप्रमाणें नकशीदार मोनोग्रॅम्स किंवा सबंध नांवें घालून जाजमें (जाड सत्रंज्या) व गालीचे सुती किंवा लोंकरीचे तयार करून देण्याची तजवीज केलेली आहे. गरजूनीं किंमतीचा खुलासा करून नांवें नोंदवावीं. [20]

एजंट्स पाहिजेत.

पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावाः—

पी. बी. रेगे, मॅनेजिंग प्रोप्रायटर,

धी इंडियन कारपेट रग्ज् ॲन्ड टेक्स्टाईल मॅ.कं.,

नं. ३, बाळाराम स्ट्रीट, ग्रांटरोड-मुंबई.

धी आर्यन हॉटेल

जेवणाची व राहण्याची

उत्तम सोय.

सर्व नवीन व्यवस्था

व

नवीन सामान. जुन्या [22]

सरदारगृहाचे जागेंत.

सीताराम बिल्डिंग्स.

क्राफर्ड मार्केट जवळ,

मुंबई.

मोठ्या टाइपांत, ग्रंथाची साईज स्पेशल करून सचित्र छापलेला

हरिविजय ग्रंथ.

ग्लेज ग्रंथास किंमत रुपये १-१२-०. व्ही. पी. खर्च ८७. [21]

रफ ग्रंथास किंमत रुपये १-०-०. व्ही. पी. खर्च ८७.

वि. सूचना—भाविक लोकांनां घेण्यास सुलभ पडावें ह्मणून ग्रंथाची किंमत कार्तिक अखेर पर्यंत मुद्दाम कमी केली आहे. पोष्ट व्ही.पी. खर्चासुद्धां ग्लेज ग्रंथ रु. १-१४-०.

व रफ ग्रंथ रु. १-७-०. या किमतीनें देऊं.

पत्ताः—

बाळकृष्ण साजबा आणि कंपनी,
पेपरमर्चंट,
सदाशिवस्ट्रीट, गिरगांव, मुंबई.

मी कोण? माझें नांव काय?

"वाटोळा, पण गाट नव्हें! काळा पण कोळसा नव्हें!
एकटा करतों दोघांचें काम ओळखा माझें काय नाम?"

माझा संचार स्वयंपाकघरांत असतो. अलीकडे मी सर्व स्त्रीजनांचा फार आवडता झालों आहें. सणावारीं व इतर दिवशीं मी त्यांच्या फारच उपयोगीं पडतों. माझा जन्म सातारा जिल्ह्यांत, किर्लोस्कर वाडींत, किर्लोस्करबंधूंचे कारखान्यांत झाला आहे. मी तावूनसुलाखून निघाल्यामुळें पक्का आहें, कच्चा नाहीं.

आतां तरी मी कोण आहें हें आपल्यास समजलें असेलच! जर अद्यापि उमगलें नसेल तर आपल्या कानांत सांगतों इतक्यांत दुसऱ्या कोणास सांगूं नका हो]

माझें नांव— [23]

आवोळ्यांचा तवा!

माझ्या जन्मदात्यास फक्त १ च.रु. पाठवा ह्मणजे मी तुमची नोकरी इमानें इतबारें जिवंत असें पर्यंत करीन.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

IMPORTANT TO STUDENTS!

The equipment for greater success in life is here, ready at hand!

Can you afford to



lose this opportunity?

Ambition you may have, making you look upwards and onwards; energy will aid you; but **The Girgaum Typewriting Company will supply the essential specialized knowledge** you need, will show you **how to direct your energy** and make the realization of your ambition fairer than your dreams!

A continuity of Successful Instruction through a decade of years has enabled this Institution to become and is one of the Leading and Substantial Institutions of the City for the learning of the Commericial Arts, viz., Shorthand, Typewriting and Book-keeping.

Every enthusiastic Student should insist on getting himself enroled in the

Girgaum Typewriting Co.'s School,
Opposite Ram-Mandir, Thakurdwar, Bombay, No. 2.


For full information, either write to or call on the

Manager.

Other Businesses:—1. Typecopying Office. 2. Typewriter Repairs. 3. Pathephone Agency. 4. Booking Agency of the Indian Co-op. Navigation Co., Ld. 5. New & Secondhand Typewriters and Accessories supplied.


Send Half-Anna Stamp for our Calendar for 1913.

जे. व्ही. नवलाखी आणि कंपनी, [25]



कांता बिल्डिंग्स, काळकादेवी रोड, मुंबई.

शाळा व ऑफिसें यांकरितां लागणारें दरएक जातीचें स्टेशनरी सामान; आर्ट व टेक्निकल शाळांकरितां ड्राइंग व पेंटींगचें सामान; सरवेअर व इंजनियर यांकरितां सर्वेइंग व इंजनियरिंग इन्स्ट्रुमेन्ट्स, किंडरगार्टनचें व रबरस्टँप करण्याचें सर्व प्रकारचें सामान; रबरांच्या इंग्रजी टाइपांच्या पेट्या—यांतील अक्षरें जुळवून कोणालाहि आपलें नांव, पत्ता वगैरे स्वतः छापतां येईल. किं. १२ आण्यांपासून १९ रुपयेपर्यंत.



आमच्याकडे रबरस्टँपहि उत्तम होतात.

[26] बाहेरगांवच्या लोकांची

उत्तम सोय.

सर्व प्रकारचीं सुवासिक तेलें, अत्तरें, सेदन्स लव्हेंडर, बदन्स वगैरे सर्व प्रकारचें स्टेशनरी सामान, सर्व प्रकारचीं इंग्लिश मराठी पुस्तकें व याशिवाय मुंबईत मिळणारा इतर कोणत्याहि तऱ्हेचा माल अगदीं कसोशीनें खरेदी करून माफक कमिशननें पाठविला जाईल. दिवाळी-करितां उंची कनोजी अत्तरें उटण्यांसह विक्रीस तयार. दरपेटीस किं. रु. ५ व ३. उत्तम सुवासिक दंतमंजन डबी किं. ३ आणे. सत्वर गुणकारी गजकर्ण मलम किं. ४ आणे. याशिवाय आमचेकडे सुप्रसिद्ध वैद्य आयुर्वेदमहोपाध्याय वासुदेवशास्त्री ऐनापुरे यांचेकडून सुद्धां तयार करविलेलीं उत्तम रात्रीचीं व अनुभवशीर औषधें मिळतील. विशेष माहिती पत्रद्वारें. उत्तराकरितां तिकिट असावें.

जोशी ब्रदर्स आणि कंपनी,
कमिशन एजन्टस,
कांदेवाडी, मुंबई, नं. ४.

वैद्य भवानी शंकर पांडुरंगजी रेळे,

भाई जिवनजीची गल्ली, [27]

ठाकूरद्वार, मुंबई.

[स्वदेशी वनस्पतींचीं पेटंन्ट औषधें.]

डोकेंदुखीकर चूर्ण ८८. जंताची भुकणी ८१२.
केंस काढण्याची भुकी ८८.
गजकर्णाच्या वड्या १ डझन १-०-०.
ज्वरांकुश (तापावर रामबाण) औषध ८१२.
कापुराचा अर्क ८५.
पेपरमिंटाचा अर्क ८५. गजकर्णाचें मलम ८५.
खरजेवर मलम ८५. दंतमंजन ८४.
बद्धिरेपणावर औषध २-०-०.
कॉलऱ्यावर औषध ८१०.
कॉडलिव्हर ईमल्शन (दूध) १८४.
हिंवतापावर रामबाण सायरप १८८.
वातहारक तेल ८४.

व्ही. पी. चा खर्च निराळा पडेल.
एजंट पाहिजेत.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

IMPORTANT TO STUDENTS!

The equipment for greater success in life is here, ready at hand!

Can you afford to



lose this opportunity?

Ambition you may have, making you look upwards and onwards; energy will aid you; but **The Girgaum Typewriting Company will supply the essential specialized knowledge** you need, will show you **how to direct your energy** and make the realization of your ambition fairer than your dreams!

A continuity of Successful Instruction through a decade of years has enabled this Institution to become and is one of the Leading and Substantial Institutions of the City for the learning of the Commericial Arts, viz., Shorthand, Typewriting and Book-keeping.

Every enthusiastic Student should insist on getting himself enroled in the

Girgaum Typewriting Co.'s School,
Opposite Ram-Mandir, Thakurdwar, Bombay, No. 2.

For full information, either write to or call on the

Manager.

Other Businesses:—1. Typecopying Office. 2. Typewriter Repairs. 3. Pathephone Agency. 4. Booking Agency of the Indian Co-op. Navigation Co., Ld. 5. New & Secondhand Typewriters and Accessories supplied.

Send Half-Anna Stamp for our Calendar for 1918.

के. व्ही. ढेंगळे अॅन्ड सन्स,

इंजिनीयर्स आणि कॉन्ट्रॅक्टर्स, आयर्न अॅं. ब्रास फाउन्डर्स,

त्रिंबक परशराम स्ट्रीट, ६ वा कुंभारवाडा, नं० ४, मुंबई.

जिनिंग-प्रेसिंग फ्याक्टरीज, स्पिनिंग मिल्स, पिठाच्या व तांदुळांच्या गिरण्या, म्युनिसिपालिट्या वगैरे ठिकाणीं लागणारें सर्व तऱ्हेचें लोखंडी व पितळाचें सामान, पुल्या, पेडस्टेल्स, ब्रासेस, कप्लिंगज, शाफटिंग, एंजिन बॉयलरला लागणारें सर्व तऱ्हेचें सामान, आईल एंजिनला लागणारें सर्व सामान, पाण्याच्या गोल चौकोनी लोखंडी टांक्या, लोखंडी कड्या, चिमण्या वगैरे, त्याचप्रमाणें सोप, कॅन्डल मशीनस्, बंडलिंग मशीनस्, स्क्रू प्रेस, रोलर्स वगैरे सर्व सामान व यंत्रें सशास्त्र रीतीनें आमच्या कारखान्यांत केलीं जातात.

हल्लीं शेतीकरितां विहिरीवर चालणारीं आईल एंजिनें व पंप खरेदी करतेवेळीं व बसवितेवेळीं आमची सल्ला घ्या. बाटेल त्या मेकरचीं आईल एंजिनें बंद पडल्यास अगर चालत नसल्यास आह्मी खात्रीपूर्वक दुरुस्त करून चालू करून देऊं.

कोणतींहि यंत्रें, कारखाने व आईल एंजिनें व पंप जागेवर बसवून देण्याचे (इरेक्शनस्) आह्मी कॉन्ट्रॅक्टस घेऊं. आमच्या उत्तम व चोकस कामाबद्दल आह्मांला प्रदर्शनांतून सुवर्ण व चांदीचीं पदकें मिळालीं आहेत. [30]



सतत पन्नास वर्षांच्या अनुभवानें उत्तम ठरलेला

(दूषित रक्त शुद्ध करणारा) [31]

डॉ. वामन गोपाळ

यांचा जगप्रसिद्ध,

आयोडाइज्ड

सार्सापरिला.



देहाचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात भयंकर अशा उपदंशजन्य विकारामुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगांमुळें अर्धांगवायु, अवयवें लुळीं पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर रोगांवर हाच सार्सापरिला देणें उत्तम होय. किंमत एक बाटली रु. १॥. ट. ख. निराळा. ४ बाटल्यांस ट. ख. सह रु. ४॥. उत्तम गुणास चार बाटल्या लागतात.

मालक—डॉ. गौतमराव केशव, ठाकुरद्वार, मुंबई, नं० २.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

धी नॅशनल इन्शुअरन्स अँड बँकिंग कं. लि०.

मुख्य ऑफिस अमृतसर. [32]

आजपर्यंत लोकांनीं पैसे घेऊन कंपनीस दुवा दिला आहे.

भांडवल रु.१०,००,०००. सबस्काइब्ड रुपये ९,००,०००, पेडप रुपये १,२०,०००.
पॉलीसीहोल्डर्सची संख्या ८०,००० वर. क्लेम दिलेली रकम ४ लाख.
नवीन आयटाप्रमाणें सरकारांत डिपॉझिट रकम ठेविली आहे.

विमा—१८ पासून ५५ वर्षेपर्यंतच्या स्त्रीपुरुषांचे विमे उतरले जातात. हप्ते सर्वांत कमी व सोईचे म्हणजे १ रुपयापासून दर असून दुप्पट नफ्याची खात्री. शिवाय कंपनीच्या प्रत्येक व्यवस्थेवर विमादारांची देखरेख आहे. शर्ती अतिशय सवलतीच्या. रकम ताबडतोब मिळते. गरज लागल्यास कर्जहि मिळतें.

प्राव्हिडंटफंड—आयुष्य, चालतपण व कमसंबंधी तरतूद. थोड्या खर्चानें जास्त फायदेशीर. बँकिंग दरांत अतोनात सवलत ठेविली आहे.

प्रास्पेक्टस् व इतर सर्व बाबींसंबंधानें पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पाहिजेत—दर जिल्ह्यांत व प्रत्येक शहरी स्वतंत्र एजंट पाहिजेत. सोईस्कर शर्ती. फक्त गरजू, होतकरू व प्रामाणिक गृहस्थांनीं अर्ज करावे.

के. अनंतराम ॲंड ब्रदर्स—मुंबईइलाख्याचे पोर्चुगीझ इंडियाचे मुख्य एजंट, २१ चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

गोपाळ व्यंकटेश आणि बंधु—डेक्कन एजंट २३६ बुधवार पेठ, पुणें.

एस. एन. बानर्जी—सी. पी. सेक्रेटरी, ५४ व्हिक्टोरिया रोड, नागपूर.

सचित्र मासिक 'उद्यान' मासिक.

हें सुंदर, सचित्र मासिक सुरस कवितांनीं, मनोवेधक गोष्टींनीं, व हास्यरस विनोदी लेखांनीं महाराष्ट्रांतील आबालवृद्धांचें आज तीन वर्षें मनोरंजन करीत आलें आहे. ह्या वर्षांची चालू कादंबरी 'घोर प्रायश्चित' ही शृंगार, करुण, व भयानक या तीन रसांनीं ओतप्रोत भरलेली असून तींत एका हुषार गुप्त-पोलिसाच्या चातुर्याची भर पडली असल्यामुळें पुढचे भाग केव्हां येतील म्हणून वाचक आतुर झालेले असतात. या मासिकावर जुलैच्या 'मनोरंजनां'त उत्तम अभिप्राय आला आहे तो अवश्य पहावा!

वर्षारंभ—जानुआरी किंवा जुलै. वार्षिक वर्गणी ट. हं. सह दोन रुपये.

पत्ता—'उद्यान' ऑफीस,

[33] ग्रांटरोड—मुंबई.

डॉ० फडके [34] यांचें **अर्धशिशीवरील** रामबाण औषध!

१५ मिनिटांत हटकून गुण! या औषधानें कसलेंहि डोकें दुखणें तत्काळ बंद होतें. अनुपान बाटलीसोबत. किं. ६ आणे. पॅ.व पो. खर्च निराळा पडेल. पत्ता डॉ.जी.जी.फडके, गिरजफोर्ट.

दुखणेकऱ्याची सोय.

सर्व प्रकारच्या रोग्यांची आजपर्यंत कोणीहि न केलेली अत्यंत खात्रीची, अनुभविक व अत्युत्तम सोय. सविस्तर माहिती पोस्टेजसाठीं अर्ध्या आण्याचें तिकीट पाठवून मागवा.

पत्ता:—डॉ० गणपत पांडुरंग काळोखे,
[35] ए. ए. एम्. एस्.,
चर्नीरोड, गिरगांव, मुंबई.

मेसर्स बाळकृष्ण साजवा आणि कंपनी,

सदाशिवस्ट्रीट, गिरगांव—मुंबई.

छापखान्यास लागणारे—

प्रिंटिंग पेपर्स—प्लेन्न, अनप्लेन्न, फुलस्कॅप, कव्हर, कलर इ. इ. सर्व वजनाचे; **ब्रासरूली**—सर्वजातींच्या; **शाई**—टाइपाची, लिथोची, काळी किंवा रंगीत, हलकी व भारी, सर्व जातींची व सर्व दराची; **आन्टिमनी**—S. C. मार्काची; **लिथोस्टोन**—"१८×२४" अगर हव्या त्या आकाराचे; **प्रेसीस**—मशीन्स, केसीस, घोडे वगैरे सर्व लांकडी सामान.

छापखान्यास लागणारा हरएक माल आम्ही थेट विलायतेहून मागवीत असल्यामुळें तो आमच्यामार्फत मागविल्यानें फार फायदेशीर पडतो. केसरी, मनोरंजन, निर्णयसागर, आर्यभूषण इत्यादि महाराष्ट्रांतील प्रसिद्ध प्रकाशक आणि छापखानेवाले आमच्याचकडून बहुतेक माल घेत असतात.

विलायतेंतील प्रसिद्ध मिलर आणि रिचर्ड मेकरचे बुक, न्यूज, हेडिंग व आर्नमेंटल टाईप मागवून देऊं. या कंपनीचे आम्ही सोल एजंट आहों. [36]

वाटलीवाला यांचें हिंवतापावरचें औषध व गोळ्या, हीं ज्वर आणि हिंवतापावर रामबाण आहेत. ताप आणि शीतज्वर येणारसें वाटतांच हें घ्यावें..किं. १ रु.

शक्तिवर्धक गोळ्या १॥· रु.

दंतमंजन ४ आणे. [37]

गजकर्णावर अप्रतिम मलम ४ आणे.

हीं औषधें सर्व दुकानांवर व

डॉ. वाटलीवाला, परळी, मुंबई,

यांजकडे मिळतील.

[38] CLERKS' HANDBOOK.

THIRD EDITION, REVISED AND ENLARGED, pages 285, cloth bound, contains 337 complete specimen Letters for Private and Commercial Correspondence, Book-Keeping, Ready Reckoner, Proof Correcting, and several other Subjects very useful for Students fresh from Schools and Colleges seeking employment and Clerks wishing to rise in Government or Mercantile Offices. Price by V. P. P. Re. 1-8. Apply to:—

DUBHASHI & Co.
1st Bhatwadi, Girgaum, Bombay.

धि बॉम्बे टाईल कंपनी,



टाइल्स,
मार्बल्स, स्टोनमर्चंट,
[39] अॅन्ड कॉन्ट्रॅक्टर,
१६७, डंकनरोड, मुंबई, नं. ४

[40] **जारा लांकूड.**

वाफेच्या यंत्रांनीं कापलेले **वेस्ट्रेलिअन जारा लांकडाचें** स्कॅन्टलिंगचा, तक्तपोशी, दांडे, बडोद, खांब, चौकटी, ऑफिस पार्टिशन्स, छपरें, खिडक्या पॉलिश केलेलें लांकडी सामान, फेमवर्क, कापसाच्या गठ्ठांस मारण्याच्या पट्टया इत्यादि कामांकडे उत्तम उपयोग होतो.

जारा लांकडाची किंमत सागवानाच्या **जवळ जवळ निम्मे आहे.**

निरनिराळ्या आकाराचे व लांबीचे स्कॅन्टलिंग मुंबई, कलकत्ता, मद्रास व कराची येथें असलेल्या आमच्या वखारींत नेहमीं मिळतात. पत्र पाठविलें असतां कॅटलाग व नमुने फुकट पाठवूं.

मिलर्स टिंबर अॅन्ड ट्रेडिंग कंपनी, लि.
यॉर्क बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई.

एजन्टस—

कलकत्ता—गिलॅन्डर्स अर्बथ्नोट आणि कंपनी.
मद्रास—बीनी अॅण्ड कंपनी.
कराची—मॅक्किनॉन मॅकेन्झी आणि कंपनी.

या पृष्ठावरिल जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

विक्रीस तयार.

१ अद्भुत जादूचा खेळ. (Wonderful-magic)—खासगी मित्रमंडळींत, समारंभांत तसेंच नाटकगृहांत खेळ करून नांव व पैसा मिळविण्यालायक असे युरोपीयन व देशी प्रोफेसर जादुगार लोक जे नानाप्रकारचे अद्भुत जादूचे खेळ करतात, अशा तऱ्हेच्या एकंदर २५ खेळांची २४ चित्राकृतीसह माहिती या पुस्तकांत दिली आहे. यांत ते खेळ मंडळीपुढें कशा रीतीनें करावे, व त्या खेळांस लागणारे डबे, करंडे, रुमाल, पेट्या, बाटल्या वगैरे सामान कशा रीतीनें करावें याची खुलासेवार माहिती दिली आहे. तसेंच हे खेळ करीत असतां मध्यंतरीं मंडळीची पोट धरधरून हंसविण्यालायक करमणूक करण्यासाठीं अत्यंत आश्चर्यभरित व चतुराईजनक असे नकली जादूचे २२ खेळ कृतीसह दिले आहेत. याची कि. रु. ३ आहे. तरी तूर्त ट. व्ही. पी. सह रु. २॥ पडतील.

२ अपूर्व कौतुकसंग्रह. (Wonderful card tricks)—शोकी व गुणग्राही लोकांस खासगी मित्रमंडळींत, लग्नप्रयोजनादि समारंभांत आणि मुद्दामबोलावून स्टेजवर अद्भुत जादूचा खेळ करणारास अत्यंत उपयोगी पडतील असे फक्त ५२ पत्ते गंजिफाचे बंडलावर होणाऱ्या फारच अद्भुत, आश्चर्यकारक व चमत्कारीक अशा एकंदर ४१ खेळांची माहिती चित्राकृतीसह दिली आहे. त्यांत या खेळांस लागणारे गंजिफाचे बंडल कशा रीतीनें तयार करावे व त्यापासून मंडळीपुढें ४१ प्रकारचे खेळ कशा रीतीनें करून दाखवावे, याची माहिती अशी स्पष्ट व खुलासेवार दिली आहे कीं, तो वाचल्यानें कोणाहि मनुष्यास हे सर्व खेळ बरोबर करतां येतील. फक्त पुस्तकाची किंमत १॥ रु. ट. व्ही. पी. चे २ आणे जास्त. आणि त्यांतील खेळांस लागणारे भैरवी, कालभैरवी व सार्वदानिक हे ५२ पत्त्याचे असे तीन बंडल व कृतींच्या नियमितपत्त्यांचे सहा बंडल मिळून ९ बंडलांसह पुस्तक मागविल्यास ट. व्ही. पी. सह तीन रुपयांत पाठवूं.

३ सचित्र हिप्नाटिझम—या पुस्तकांत ही विद्या कशी साध्य करावी; मनुष्य, पशु, पक्ष्यादि प्राण्यांवर ह्या विद्येचे प्रयोग कसे करावे, त्यांस वश करून आपल्या इच्छेप्रमाणें कसें वागवावें, अनेक प्रकारचे शारीरिक मानसिक रोग, व्यसनें व विकार औषधांशिवाय विद्येनें कसे बरे करावे, तसेंच मंडळीपुढें मनोरंजक अद्भुत व आश्चर्यकारक, असे आरसलाचा, अग्नि पेटल्याचा पाण्यांत बुडाल्याचा, विमानांत बसल्याचा हजामाचा वगैरे अनेक तऱ्हेचे चमत्कार कसे दाखवावे भूत भविष्यादि प्रकार कसे जाणावे, इच्छा व विचार शक्तिचें सामर्थ्य किती व तें कसें वाढवावें, दुसऱ्याचे मनांतील हदगत कसें जाणावें, आपले विचार दूरस्थळीं कसे पाठवावे, डोळे बांधले असतांही प्रेक्षकांनें छपविलेली वस्तु कशी शोधून काढावी, इच्छिलेलें कार्य कशीं सिद्धीस न्यावीं, करारी, बाणेदार, कर्तृत्ववान् व लोकप्रिय कसें व्हावें, इत्यादि विषयांची माहिती क्रिया, प्रयोग व १९ चित्राकृतींसह अशी स्पष्ट व खुलासेवार दिली आहे कीं, असें पुस्तक मराठी भाषेंत अद्याप मुळींच प्रसिद्ध झालें नाहीं, असें आम्ही खात्रीनें सांगतों. याची रॉयल १६ पेजी २२५ वर पृष्ठें असून बांधणी जाड पुठ्याची आहे. याची कि. २॥ रुपये आहे, तरी तूर्त ट० व्ही० पी० सह १॥। रुपयांत देऊं. शरीरबलवर्धक औषधी संग्रह हें पुस्तक वक्षीस पाठवूं.

४ भूतपिशाचनिर्णय.—अमदावाद येथील गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटीनें १५० रु. बक्षीस देऊन पसंत करून छापलेल्या गुजराती पुस्तकाचें हें मराठी भाषांतर करून छापिलें आहे. ह्या पुस्तकांत निरनिराळ्या धर्मांतील भूतप्रेतांच्या उत्पत्तीच्या कल्पना, भूतांचीं स्थानें, व त्यांचे पराक्रम, भुतासंबंधी अनेक दंतकथा, निरनिराळ्या धर्मांतील भूत-दृष्टपिशाच आदि पीडाशमनार्थ मंत्रतंत्र, यंत्र, ताईत, दोरे, तोडगे आदि उपाय, मिथ्या भूतांचा भ्रम व तत्संबंधी अनेक दंतकथा वगैरे अनेक उपयुक्त विषय आहेत. यांत एकंदर ४ विभाग असून ५५ प्रकरणें आहेत. शेवटी कित्येक मंत्र, तंत्र यंत्रादिकांच्या चित्राकृती काढल्या आहेत. पुस्तकाचीं रॉयल सोळा पेजी १६४ पृष्ठें आहेत. याची कि. ॥।। आणे. ट. व्ही.पी. चे ८

५ सचित्र शरीरबलविद्या.—या पुस्तकाची फक्त दोन भाग असलेली आवृत्ति लवकरच संपल्या-

मुळें हल्लीं चार भागांची ही दुसरी आवृत्ति छापिली आहे. भाग १ यांत अनेक तऱ्हेच्या कसरती कशा कराव्या याची माहिती ६६ चित्राकृतींसह दिली आहे. भाग २ यांत जोर काढणें, जोड्या फिरवणें, व ५२ कुस्त्यांचे डावपेच व त्यांच्या तोडी कशा कराव्या यांची माहिती ६० चित्राकृतींसह दिली आहे. भाग ३ यांत प्रख्यात **सँडो** व आधुनिक भीमसेन प्रो. **राममूर्ती** यांचे शरीरबलवर्धक स्वानुभविक प्रयोग व क्रिया यांची माहिती दिली आहे. भाग ४ यांत धातु, रक्त, व शरीरबलवर्धक ८० वर औषधी उपाय दिले आहेत. याचीं १६८ पृष्ठें असून १२५ चित्रें दिलीं आहेत. याची कि. १॥ रु. तरी तूर्त फक्त ।॥= आणे. ट. व्ही. पी. खर्च. ८=

६ **गोल्डनग्यांग** अथवा **सोनेरी टोळीचें मोहजाल**—या पुस्तकांत प्रख्यात सोनेरी टोळी-संबंधीं एकंदर ९ गोष्टी असून त्यांत या सोनेरी टोळीचें स्वरूप व तिच्या निरनिराळ्या कसबांची व गुप्त कारस्थानांची माहिती मनोरंजक गोष्टीरूपानें दिली आहे, व दुसऱ्या भागांत मुंबई शहरांत व्यापार, उद्योग, धंदे या बाबतींत ज्या अनेक तऱ्हेच्या लुचेगिऱ्या व ठकवाऱ्या, बहुधा नेहमीं चालत असतात त्यांची माहिती खुलासेवार दिली आहे. या दोन भागांच्या एकाच पुस्तकाचीं पृष्ठें १४४. कि. १ रु. आहे. तरी तूर्त फक्त ।॥।

७ **गारुड्याचा तमाशा.**—यांत गारुडी, देवऋषी, पंचाक्षरी, मांत्रिक वगैरे लोक जे अनेक प्रकारचे चमत्कार करून दाखवितात तशा एकंदर ४० खेळांची कृतीसह माहिती दिली आहे. कि. ।=

८ **वृश्चिकदंशहरण.**—यांत ठाकूर, कातकरी, वैद्य यांजकडून महत्प्रयासानें मिळविलेल्या १४२ औषधांचा संग्रह केला आहे. यांतील बरींच औषधें कोठेंहि सहज मिळण्यासारखीं असून खात्रीपूर्वक गुण देणारीं आहेत. कि. ।.

९ **भानामती तंत्र.**—मित्रमंडळीची मनोरंजक करमणूक करतां यावी म्हणून हें दोन जादूपुड्यांचें तंत्र अशा कांहीं खुबीनें तयार केलें आहे, कीं, यांत ठेवलेल्या पैशाचा रुपया होणें ! ठेवलेला पत्ता अकस्मात बदलणें ! कागद, गंजिफाचा पत्ता, किंवा दोरा याचे तुकडे करून ठेविले असतां तत्काळ आखे होणें ! कागद कपड्याचा रंग बदलणें ! कोऱ्या कागदावर अकस्मात लिहून येणें ! कागदावरील लेख किंवा चित्र अकस्मात गुप्त होणें ! यांत ठेवलेली जिन्नस तत्काळ गुप्त होणें व पुन्हा येणें इत्यादि अद्भुत चमत्कार—या एकाच तंत्रावर ३२ प्रकारें या सोबत मिळणारें पुस्तक वाचल्यानें कोणाहि मनुष्यास तत्काळ करतां येतात. पुस्तकासह तंत्राची कि. रु. १। ट. व्ही. पी. खर्च ८=

१० **अद्भुत कार्डपंचक.**—यांत नियमित कार्ड व गंजिफाच्या कृतींच्या पत्त्यांचे पांच बंडल आहेत. (१) कोणीहि—देवी, देवता, वार, फळ, फुल, धातु यांचें नांव मनांत धरलें असतां सांगतां येणारे **देवताई कार्ड** पत्ते ६; (२) गंजिफाच्या बंडलांतील कोणतें पान मनांत धरलें किंवा एकादी वस्तु मंडळीपैकीं कोणीं छपविली हें सांगतां येणारे **कर्णपिशाच्च कार्ड** पत्ते ४; (३) कोणीहि मनांत धरलेला अंक वय तत्काल सांगतां येणारे **मनकवडा** कार्ड पत्ते ६; (४) तीनप्रकारें ठिपके बदलणारे बहुरूपी कार्ड पत्ते ६; (५) हातांतल्याहातांत तत्काल बदलणारा **मायाची** कार्ड पत्ता १. या पांच बंडलांपासून चमत्कार कसे दाखवावे याच्या माहितीच्या पुस्तकासह या पांच बंडलांची कि. रु. १। ट. व्ही. पी. खर्च. ८=

११ **अद्भुत कृष्णलीला.**—हा जाड पुठ्ठ्याचा घडी होत असलेला पुतळा प्रथम **मुरलीधर** कृष्ण दिसतो, तो तत्काळ बदलून त्याची **राधागवळण** होते, तत्काळ बदलून उलट सुलट भागाचा कृष्ण होतो, तोच तत्काळ बदलून उलट सुलट भागाची **राधा** होते ! तसेंच कृष्णाच्या शरीराचे देखतां देखत तुकडे पडत जाऊन **राधागवळण** होते, व **राधेचे** तत्काल तुकडे पडत जाऊन **मुरलीधर** कृष्ण होतो ! अशीं पांचसहा प्रकारें देखतांदेखत यांचीं तत्काळ रूपांतरें होतात. हे चमत्कार करून दाखविण्याच्या माहितीच्या पुस्तकासह याची कि. ।॥। ट. व्ही. पी. खर्च ८=

वरील सर्व पुस्तकें आह्मांकडे खालील पत्त्यावर मिळतात. अर्धा आण्याचें टीकीट पाठविल्यास खुलासेवार माहितीच्या जाहिराती पाठवूं.

पत्ता—प्रो. जी. एम्. कार्लेकर, दुर्गादेवीच्या देवळाजवळ, डंकनरोड, मुंबई, पोष्टनं ४.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

आयुष्याचा विमा उतरण्यासंबंधानें
नुकसानकारक ढिलाई.

सुधारलेल्या मनुष्यांमध्यें जी सर्वांत अगत्याची गोष्ट विचारवंत मनुष्यांनां दिसून येते, ती ही कीं, आयुष्याचा विमा उतरण्याची ढिलाई.

थोडीशी लहान रक्कम भरल्याच्या योगानें कोणत्याहि चांगल्या शरीर प्रकृतीच्या आणि सुदृढ बांध्याच्या मनुष्याला त्याच्या कमनशीबानें मरण आल्यास, स्वतःच्या कुटुंबाकरितां एक मोठी रक्कम मिळूं शकते. असें होण्याकरितां स्वतःच्या जिंदगीचा विमा उतरण्यासंबंधानें केलेल्या ढिलाईमुळें पुष्कळ कुटुंबांनां हरएक प्रकारचें दुःख भोगावें लागतें. ज्यांनीं निरनिराळ्या ख्यालीखुशालीमध्यें दिवस काढिले आहेत, त्यांच्या कुटुंबास अत्यंत गरीबीमध्यें राहण्याचा प्रसंग येतो. पुष्कळ लोक आपल्या ऐपतीइतका खर्च करून टाकितात, त्यांनां आटकून येईल कीं, जर कदाचित् आपलें जीवित एकाएकीं नष्ट झालें तर कुटुंबांनां व पोराबाळांनां निर्वाहाचें साधन नसतें. त्यामुळें त्यांनां दारिद्र्यांत रखडावें लागतें. ही अडचण त्यांनीं आपल्या आयुष्याचा विमा

धी स्टँडर्ड लाईफ ॲशुअरन्स कंपनी

मध्यें उतरून दूर करून टाकल्यास त्यांच्या कुटुंबास पुढें पुष्कळ फायदा होईल !

या कंपनीची स्थापना सन १८२५ मध्यें झाली होती, आणि ती हिंदुस्थानांत सन १८४६ मध्यें स्थापण्यांत आली आहे.

भांडवल	...	...	...	१९½ कोटी रुपये.
बोनस देण्यांत आलें तें	...	...	...	१२½ ,,
वार्षिक उत्पन्न	...	...	...	२½ ,,
क्लेम्सची भरपाई करण्यांत आली	...		...	४४½ ,,

युरोपियन लोकांच्याच भावानें एतद्देशीय लोकांच्या आयुष्यावर विमा उतरला जातो.

मुंबई आणि कलकत्ता येथील शाखा ऑफिसांत पॉलिसीज दिल्या जातात, व क्लेम्स देण्यांत येतात.

हिंदुस्थानांतील जबाबदारीपुरतें भांडवल हिंदुस्थानांत खर्ची घातलें आहे.

प्रॉस्पेक्टस आणि कंपनीच्या निरनिराळ्या योजनापत्रकाच्या सविस्तर माहितीकरितां खालील पत्त्यावर अर्ज करावा.

सेक्रेटरी,
स्टँडर्ड लाईफ ऑफिस, ६ हार्नबीरोड—मुंबई.

या कंपनीशीं कोणताहि पत्रव्यवहार करतांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

मनोरंजनाचा

दिवाळीचा खास अंक.

१९१२.

विषय व चित्रें यांचा अनुक्रम.

विषय.	पृष्ठ.
१ दर्शनी चित्र. 'प्रिय-पत्रिका' चित्रकार, श्रीयुत एस्. पी. आगासकर, मुंबई.	
२ संपादकांचे दोन शब्द.	१
३ स्त्रियांचे लेख.	
१ जिव्हासंयमन. श्रीमती सौ. सुमतिबाई टिपनीस, अजमीर.	२
२ संसारसुधारणेच्या कित्येक बाबी. श्रीमती कुमारी त्रिवेणीबाई माटोडेकर, मुंबई.	५
३ डोगरा लोकांच्या लग्नरीति. श्रीमती सईबाई दामी, जम्मू.	९
४ उपकारांची फेड. (संपूर्ण गोष्ट) श्रीमती काशीबाई देवधर, पुणें.	१२
५ मी तुझी मावशी तुला न्यावया आलें! (कविता) श्रीमती सौ. लक्ष्मीबाई टिळक, अहमदनगर.	१९
६ चल भाऊ रे खेळायाला! (कविता) श्रीमती कुमारी द्वारकाबाई हिवरगांवकर, पुणें.	१९
७ भाऊबीजेची ओंवाळणी. (कविता) श्रीमती सौ. 'लक्ष्मीतनया', सांगली.	२०
८ आमच्या स्त्रियांचा पेहेराव. श्रीमती सौ. सीताबाई सामंत, पणजी.	२१
९ माझा प्रवास. (संपूर्ण गोष्ट) श्रीमती सौ. गिरिजाबाई केळकर, मुसावळ.	२३
१० व्हेनिस. (प्रवासवृत्त) श्रीमती सौ. सरस्वती भद्रा माडगांवकर, अहमदनगर.	२८
११ रंगवल्लिका. (सचित्र) श्रीमती शारदाबाई देशपांडे, मुतनाळ.	३१
४ एमर्सनचीं बोधवचनें. श्रीयुत वामन रामचंद्र जोशी, बी. ए., मुंबई.	३६
५ चित्रमाला.	
१ 'त्यांत एवढी का मौज आहे?' चित्रकार, श्रीयुत एस्. जी. मुळगांवकर, मुंबई.	३७
२ रंगपंचमी. चित्रकार, श्रीयुत एम्. व्ही. धुरंधर, मुंबई.	३८
३ बाजीराव-मस्तानी. चित्रकार, श्रीयुत एम्. ए. जोशी, घाटकूपर.	३९
४ राधाविषाद. चित्रकार, श्रीयुत एम्. व्ही. धुरंधर, मुंबई.	४०
५ चित्रकूटनिवास. चित्रकार, श्रीयुत एम्. व्ही. धुरंधर, मुंबई.	४१
६ गानमुग्धा. फोटोग्राफर्स, गिरगांव फोटोग्राफिक आर्ट स्टूडियो, मुंबई.	४२
७ तल्लीनता. फोटोग्राफर्स, गिरगांव फोटोग्राफिक आर्ट स्टूडियो, मुंबई.	४३
८ विचारतरंग. चित्रकार, श्रीयुत जी. व्ही. लाड, मुंबई.	४४
६ विनोदी लेख.	
१ यांत्रिक चमत्कार. श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए., एल्एल्. बी., खामगांव.	४५
७ सामाजिक निबंध.	
१ हिंदूंचा ऱ्हास होत आहे काय? रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि, एम्. ए., अकोला.	५२
८ काव्यगुच्छ.	
१ पुरें जागतों मीच माझें बल! श्रीयुत रे. नारायण वामन टिळक, अहमदनगर.	५६

विषय. पृष्ठ.

२ फुलपांखरूं-फुलवेली. श्रीयुत त्र्यंबक बापूजी ठोमरे, अहमदनगर. ५७
३ शिंग. श्रीयुत रेंदाळकर, मुंबई. ५८
४ चंद्रोलगायन. श्रीयुत नागेश, कोल्हापुर. ५९
५ प्रेमपाठ. श्रीयुत 'गोविंदाग्रज', पुणें. ६०

९ आरोग्यविषयक निबंध.
१ क्षयरोग व त्याचा प्रतिकार. श्रीयुत डॉ. रा. ना. परमानंद, एल्. एम्. अँड एस्., जे. पी., मुंबई. ६१

१० ग्रूप फोटो.
१ महिला-विद्यालय. ६९
२ फर्ग्युसन-मधील विद्यार्थिनी. ७०
३ स्टू. लि. सा. सोसायटी. ७१
४ आर्यमहिलासमाज. ७२
५ महिलासमाज. ७३
६ प्रभु लेडी व्हॉलंटियर्स. ७४
७ सोशल सर्व्हिस लीग. ७५
८ स्टुडंट्स् ब्रदरहुड. ७६
९ रिफॉर्म असोसिएशन. ७७
१० नूतन मराठी विद्यालय. ७८
११ मा. व. शि. मंडळी. ७९
१२ प्रार्थनासमाज. ८०
१३ आर्यसमाज. ८१
१४ अमेरिकन मिशन. ८२
१५ चर्च मिशन. ८३
१६ सारस्वत वि. सा. मंडळी. ८४
१७ तेलगू एज्युकेशन फंट. ८५
१८ गांधर्वमहाविद्यालय. ८६
१९ मराठा ऐक्येच्छु सभा. ८७
२० अस्पृश्य मंडळीचे पुढारी व कैवारी. २१ मुंबई अस्पृश्य मंडळी. ८८
२२ धर्मालय लॉज. २३ वाग्विलासी नाटकसमाज. ८९
२४ पुणें लवादकोर्ट. २५ अनाथविद्यार्थिगृह. ९०
२६ वीरशैव सभा. २७ जैन मंडळी. ९१
२८ दीनवत्सलसंघ. २९ कित्ते भंडारी मंडळी. ९२
३० कामगारसभा. ३१ त्वष्टा कासार मंडळी. ९३
३२ क्षात्रैक्यसमाज. ३३ दैवज्ञमंडळी. ९४
३४ पाठारे प्रभु. ३५ सारस्वतसमाज. ९५

११ बलिदान. (चित्र) चित्रकार, श्रीयुत एम्. व्ही. धुरंधर, मुंबई. ९६

१२ एक सामाजिक प्रश्न.
१ पतितभगिनींस विनंति. एक भगिनी. ९७

१३ प्रवासवृत्त.
१ मथुरावृंदावन. (सचित्र) श्रीयुत प्रो. गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए., पुणें.

विषय. पृष्ठ.

१४ महाराष्ट्रीय नाटकमंडळ्यांच्या नाटकांतील देखावे.
१ किर्लोस्कर संगीत मंडळी. ११९
२ नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळी. १२०
३ महाराष्ट्र नाटक मंडळी. १२१
४ राजापुरकर संगीत मंडळी. १२२
५ ललितकलादर्श संगीत मंडळी. १२३
६ भारत नाटक मंडळी. १२४
७ वाग्विलासी नाटक समाज. १२५
८ कोल्हापुरकर नाटक मंडळी. १२६
१५ कुंजविहारी. (चित्र) फोटोग्राफर, श्रीयुत के. आर्. सरसीकर, अमरावती. १२७
१६ विदूषकाचें साम्राज्य. १२८
१७ हिंदूंचे सोळा संस्कार. १२९
१८ महाराष्ट्रीय संस्था. १४१

शिक्षणसंस्था.

डेकन एज्युकेशन सोसायटी
नूतन मराठी विद्यालय
नेटिव इन्स्टिट्यूशन
एज्युकेशन सोसायटी
भंडारी हायस्कूल
गिब्ब हायस्कूल
अ. शि. देसाई हायस्कूल
आर्यन् ए. सोसायटी
व्हिलेज ए. सोसायटी
नूतन विद्यालय
मासिस ए. सोसायटी
नरे व मं. ची शाळा
अंजुमान-इ-इस्लाम
हिंदु एज्युकेशन फंड
मराठा शिक्षण परिषद्
चां. का. प्र. ए. सोसायटी
चां. विद्योत्तेजकफंड
चां. शिक्षणसंस्था
चां. शिक्षणफंड
सारस्वत वि. सा. मंडळी
चिकित्सकसमूह
दाभोळकरफंड
आनंदीबाई दाभोळकरफंड
कुडाळ गौ. सा. समाज
सारस्वत सा. समूह
तेलगू एज्युकेशनफंड
तेलगू स्कूल
तेलगू मुलींची शाळा
तेलगू पुस्तकालय
धर्मार्थ शाळा
दिगंबर पाठशाळा
जैन बोर्डिंग स्कूल
ब्राह्मण वि. सा. मंडळ
वैदिक धर्माश्रम
वेदपाठशाळा
वीरशैवसभा
नामदेव शिक्षण मंडळी
विद्याप्रसारक मंडळ
त्वष्टाकासार मंडळी
वैश्यमंडळ
माळी परिषद्
क्षत्रिय वि. मंडळी
विद्यावर्धक मंडळ
पाठशाळा, धारवाड
पाठशाळा, राजापुर
सं. पुस्तकसंग्रह
गांधर्वमहाविद्यालय
अमेरिकन मिशन
चर्चमिशन सोसायटी

स्त्रियांकरितां संस्था.

कन्याशाळा
ज. शं. कन्याशाळा
भाऊदाजी कन्याशाळा
इंग्रजी कन्याशाळा
महिलाविद्यालय
फीमेल ए. सोसायटी
चंदारामजी हायस्कूल
झनाना मिशन
अनाथबालिकाश्रम
सेवासदन, मुंबई
सेवासदन, पुणें
आर्यमहिलासमाज
लेडीज क्लब
वनितासमाज
महिलासमाज
अबलोन्नतिसमाज
प्रसूतिसहायकसंस्था

सामाजिक संस्था.

सोशलसर्व्हिसलीग
स्टूडंट्स् ब्रदरहुड
सो. रि. असोसिएशन
विधवाविवाह मंडळी
बॉ. टे. काउन्सिल
होलिकासंमेलन

राजकीय संस्था.

सार्वजनिक सभा
बॉ. प्रे. असोसिएशन

विषय.

राष्ट्रीय सेवेची संस्था.

भारतसेवक मंडळी

धर्मसंस्था.

प्रार्थनासमाज	थिऑसॉफिकल सो.	सत्यसमाज
आर्यसमाज	धर्मालयाश्रम	वैदिक असोसिएशन

वाङ्मयसंस्था.

सद्विचारिणीसभा	ग्रंथसंग्रहालय	साहित्यसंमेलन

परोपकारी संस्था.

मुक्तिफौज	हिं. अनाथालय	जैन दानशाळा
अनाथबालकाश्रम	प्राणिरक्षक संस्था	सा. दीनबंधुसंस्था
हिंदुसॅनिटोरियम	अनाथविद्यार्थिगृह	

विविध संस्था.

निष्कामकर्ममठ	हिंदुअसोसिएशन	स. वा. नाटकसमाज
पैसा फंड	एक्सलशिऑरलीग	आयडिअल सेमिनरी
लवाद कोर्ट	भारतनाट्यसमाज	
कामगारसभा	स्टूडंट्स् सो. क्लब	

व्यायामसंस्था.

हिंदु जिमखाना, पुणें	हिंदु जिमखाना, मुंबई	डेक्कन जिमखाना

जातिसंस्था.

मराठा ऐक्येच्छुसभा	कित्तेभंडारी सभा	जैनोन्नतिफंड
मराठा क्षत्रियसमाज	पाठारे प्रभु समाज	नामदेवसमाजोन्नतिपरिषद्
महाराष्ट्र क्षत्रियसभा	प्रभु लेडीज सोसायटी	वीरशैवहितैषी मंडळी
ब्राह्मणसभा	प्रभु सोशल क्लब	चौकळशी ऐक्यमंडळी
क्षात्रैक्यसमाज	प्रभु धर्मादाय	खटाकासार महाकाली सं०
सारस्वत ब्राह्मणसमाज	प्रभु सेमिनरी	हिंदु यूनियन क्लब
सोमवंशी सुधारक मंडळी	प्रभु प्रदर्शन कमिटी	
रोहिदास हितवर्धक समाज	दैवज्ञ असोसिएशन	

१९ इंग्लंडांत हिंदुस्थान.
१ इंग्लंडांतील हिंदी लोकांच्या संस्था. (सचित्र) श्रीयुत ह. आ. साळवेरकर, बी. ए., लंडन. १६९
२० संपूर्ण गोष्टी.
१ भैरवी. (सचित्र) श्रीयुत प्रभाकर अनंत माळवे, एन्. ए., अहमदनगर. १७७
२ आधीं विचार केला तर? (सचित्र) श्रीयुत कृष्णाजी केशव गोखले, जत. १९०
३ गरीब बिचारें पाडस! श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए., एल्एल्. बी., रामगांव. १९७
४ आराकानची राणी. श्रीयुत 'सरस्वतीकंठमणि'—मुंबई. २१२
५ नाटक. श्रीयुत विठ्ठल सीताराम गुर्जर, मुंबई. २२०
२१ फॅन्सी फेअर. (सचित्र) २२९

Pages 37-44, 69-96, 113 140, 169-176, 231-238 printed by G. N. Kulkarni, at his Karnatak Press, 7 Girgaon Back Road, Bombay and all the other pages printed by B. R. Ghanekar at Nirnayasagar Press, 25, Kolbhat Lane, Bombay and published by K. R. Mitra at 2 A, Charny Rd. Girgaon, Bombay.

'सत्य संकल्पाचा दाता भगवान । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥'—तुकाराम.

मनोरंजन.

दिवाळीचा खास अंक, १९१२.

संपादकांचे दोन शब्द.

प्रस्तुतचा अंक हा मनोरंजनानें आपल्या प्रिय वाचक बंधुभगिनींस प्रेमानें अर्पण केलेला दिवाळीचा चवथा खास अंक होय. सत्य संकल्पाच्या दाता भगवानाच्या कृपाप्रसादामुळें व मनोरंजनाची वेडीवांकडी वाङ्मयसेवा गोड मानून घेणाऱ्या महाराष्ट्रीय बंधुभगिनींच्या प्रेमामुळें, प्रस्तुत अंकासारखे अंक प्रसिद्ध करण्याचें अत्यंत जोखमाचें, अतोनात खर्चाचें, आणि अवर्णनीय परिश्रमांचें कार्य मनोरंजनाला करतां आलें. उत्तरोत्तर याहूनहि घाडसाचीं कामें करण्याची मनोरंजनाची अत्यंत श्लाघ्य महत्त्वाकांक्षा त्याच्या हातून निर्विघ्नपणें सुफलित व्हावयाला त्या मंगलमय दयाघन प्रभूची मनोरंजनावर सदोदित पूर्ण कृपादृष्टि असो, व वाचक बंधुभगिनींच्या प्रेमाचा ओघ नेहमीं त्याकडे वळलेला असो, एवढीच त्या उभयतांपाशीं मनोरंजनाची नम्र विनंति आहे.

महाराष्ट्र वाङ्मयाला उच्चतम स्थिति प्राप्त व्हावी, त्यानें जगांतील कोणत्याहि श्रेष्ठ साहित्याच्या जोटीला जाऊन बसावें, हाच मनोरंजनाचा हेतु असून याच ध्येयाच्या सिद्ध्यर्थ त्याचे आज सतत सतरा वर्षें अहर्निश अंतःकरणपूर्वक प्रयत्न चालू आहेत. समाज, संपत्ति, वाङ्मय वगैरे कोणत्याहि बाबतींत उच्चतम शिखराला पोंचलेल्या पाश्चिमात्य देशांशीं सर्व बाबींत आपल्या प्रिय भारतवर्षाचें साम्य असावें, अशी तळमळ लागून राहिलेल्या मनोरंजनानें इंग्लिश, अमेरिकन वगैरे मासिक पुस्तकांचा कित्ता पुढें ठेवून चालविलेले अखंड प्रयत्न महाराष्ट्रास अविदित नाहींत. कितीहि संकटें आलीं, कितीहि अडचणी उपस्थित झाल्या, तरी त्या मार्गानें निःशंक जावयाचें व आपलें परम पवित्र कर्तव्य अगदीं एकनिष्ठपणें बजाविण्याचें कार्य मनोरंजन अतिशय उत्साहानें व धैर्यानें करीत आहे; परंतु मनोरंजनाच्या या प्रयत्नांना नातुभापेक्षा प्रेम करणाऱ्या सर्व महाराष्ट्राचें पाठबळ पाहिजे. मनोरंजनानें आपलें कर्तव्य बजावलें आहे; आतां त्याला साहाय्य करण्याचें आपलें कर्तव्य करण्यास महाराष्ट्र पुढें येणार नाहीं काय?

मनोरंजनाच्या सामान्य स्वरूपासंबंधानें हें झालें; आतां प्रस्तुत अंकाला सांप्रतचें स्वरूप यावयाला ज्यांचे श्रम कारणीभूत झाले, त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानावयाचें आनंदायक काम राहिलें. या अंकांत विषयांची मांडणी नेहमींपेक्षां अगदीं निराळ्या धर्तीवर केलेली वाचकांनां आढळून येईल. 'स्त्रियांचे लेख' हें पहिलें सदर प्रस्तुत अंकाचा प्रमुख व अपूर्व विशेष होय. या सदरांतील आपल्या मनोहर व विविध लेखांनीं ज्या भगिनींनीं या अंकाला अलंकृत करून त्याची रमणीयता वाढविली, त्यांचे मनोरंजनावर अत्यंत उपकार झाले आहेत. त्याप्रमाणेंच गुरुवर्य रा. ब. महाजनि, श्रीयुत कोल्हटकर, श्री. डॉ. परमानंद, श्री. प्रो. भाटे, श्री. तालचेरकर, व रे. टिळक प्रभृति मनोरंजनावर निर्हेतुक प्रेम करणाऱ्या ज्या लेखकांनीं व श्रीयुत धुरंधर, आगासकर, मुळगांवकर, जोशी, लाड वगैरे चित्रकार व श्रीयुत कीर्तिकर, के. जे. सवनीस (बॅकहाउस) कंपनी वगैरे फोटोग्राफर यांनीं मुद्दाम विशेष परिश्रम घेऊन आपल्या शब्द व रेखाचित्रांनीं प्रस्तुत अंकाला अपूर्व शोभा आणली, त्यांचे कोणत्याहि शब्दांनीं आभार मानिले तरी मनोरंजन कधींहि ऋणमुक्त होणार नाहीं, याची त्याला चांगली जाणीव आहे. तसेंच, या अंकांतील आर्टपेपरवरील काम कर्नाटक प्रेसनें व इतर काम निर्णयसागर प्रेसनें प्रेमानें, काळजीनें, व त्वरा करून फार सुबक छापून दिलें, या बद्दल त्यांचे कितीहि आभार मानले तरी ते कमीच होणार आहेत.

'महाराष्ट्रीय संस्था' हें सदर प्रस्तुत खास अंकाचा एक अतिशय महत्त्वाचा विशेष आहे. या सदरांतील माहिती संकलित करावयास मनोरंजनाला किती त्रास सोसावा लागला, व किती परिश्रम करावे लागले, याची वाचकांनां कोणत्याहि शब्दांनीं यथार्थ कल्पना आणून देतां येणार नाहीं. परंतु अशा प्रकारची माहिती गोळा करून ती प्रसिद्ध करणें हें सामाजिक व वाङ्मय दृष्ट्या अत्यंत इष्ट आहे, अशी खात्री असल्यामुळें मनोरंजन हा सर्व त्रास सोसावयास आनंदानें तयार झालें. आमच्या विनंतीला मान देऊन ज्या संस्थांच्या चालकांनीं आपापल्या संस्थांची माहिती व कार्यकारी मंडळांचे फोटो वगैरे पाठविले, त्यांचे आमच्यावर तर अतोनात उपकार आहेतच, परंतु सर्व महाराष्ट्रीय समाजावर व साहित्यावर त्यांचे एका तऱ्हेनें फार उपकार झाले आहेत, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. या सदरांत आम्हांला माहीत असलेल्या व आमच्या आटोक्यांतील निरनिराळ्या साधनांनीं माहिती उपलब्ध करून घेतलेल्या, महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व उपयुक्त संस्थांचा समावेश झाला आहे, असें आम्हांला वाटतें. परंतु वेळेचा व माहितीचा अभाव, साधनांची कमतरता वगैरे अनेक कारणांमुळें कित्येक महत्त्वाच्या संस्थांसहि या सदरांत स्थान मिळालें नसण्याचा पुष्कळ संभव आहे. त्याप्रमाणेंच, जागेच्या संकोचामुळें प्रत्येक संस्थेची माहिती अतिशय गोटकपणानें द्यावी लागली आहे, तींत महत्त्वाची अशी कांहीं माहिती गोवण्याचें राहून गेलें असेल; याबद्दल आमच्या विकट परिस्थितीकडे लक्ष्य देऊन त्या त्या संस्थांचे चालक आम्हांला क्षमा करतील अशी आशा आहे.

शेवटीं, मनोरंजनाच्या वाचक बंधुभगिनींस हा दीपावलीचा सण अतिशय सुखाचा व आनंदाचा जावो, त्यांचा महाराष्ट्र वाङ्मयावरील प्रेमा दिवसेंदिवस वृद्धिंगत होवो, अशा आशीर्वादाची त्या परम मंगल प्रभूजवळ मनोरंजन नम्रभावानें याचना करतें. तथास्तु.

स्त्रियांचे लेख.

जिव्हासंयमन.

[श्रीमती सौ. सुमतीबाई दिघेसाहेब, अजमीर.]

"आपल्या पक्षास निष्कारण मनस्ताप भोगावयास लावणाऱ्या व तिचें जीवित निष्कारण कष्टमय होण्यास सकळत कारण होणाऱ्या पुरुषांनांहि जिव्हासंयमनाच्या उपदेशाचा घुटका लवकरच पाजण्यांत येईल." असें 'मनोरंजनच्या' गेल्या वर्षाच्या अंकांत श्रीयुत 'शारदाश्रमवासी' यांजकडून आश्वासन मिळालें असूनहि तो घुटका एक वर्ष होऊन गेलें तरी अद्याप बाहेर आला नाहीं! म्हणून मला स्वसंबंधानें स्वतः जें कांहीं थोडें सांगतां येईल, तें प्रस्तुत निबंधांत सांगावयाचा प्रयत्न करीत आहे.

घरीं उंबरठ्याच्या आंत पाऊल टाकणें होत नाहीं, तोंच आमच्या घरगुती गॅझेटच्या तारांचा रकाना फडाफड वाचून दाखविण्याचें खरें कारण कोणीच पहात नाहीं, हें मोठें नवल आहे. घरीं येणें होतें न होतें तों कांहीं मित्रमंडळी येऊन गंजीफांची अथवा गाण्यावजावण्याची बैठक सुरू होते! कांहीं ठिकाणीं तर, खुंटीवर अंगरखापागोटें टेविलें नाहीं तोंच बंडूची टोपी डोक्यावर अडकवून दुसरीकडे म्हणजे घर सांगितल्या ठिकाणीं-रोळण्याच्या अड्ड्याकडे-धावणें होतें. कांहीं ठिकाणीं लवकर परतून येणें होत नाहीं. बाहेरच मुक्कांत अगर जिमखान्यांत जाणें होतें. मग आम्ही पोट्याचा बंदोबस्त करावयाला, बाळ्याची पाटी फुटली ती आणून द्यावयाला, दुसरी मोलकरीण ठेवावी किंवा नाहीं हें विचारावयाला, परांत सामानसुमान आणलें-पण खांत तांदूळ आले ते किडी असलेले आले, तें परत करावयाला सांगावें तरी कोणाला! आज आम्हांला शिक्षणापासून मिळणारा स्वावलंबनाचा धडा हतका कांहीं अधिक प्रमाणांत मिळालेला नाहीं, की या सर्व गोष्टी आम्ही स्वतः करूं शकूं!

परंतु 'स्टर'ची सलामी अशाच मनुष्यांच्या कपाळीं येत असते, की, ज्यांनां बाहेरून घरून भागून घरीं आल्यावर रसिक मुखांतून आलेल्या मंजुळ शब्दांची व गरम चहाच्या पेल्याची किंमतच वाटत नाहीं! परी योग्य वेळीं जर सर्व सामान भरपूर आणून ठेविलें, तर घरीं येतांच तावडतोप दुकानीं जाण्याचें फर्मान आमच्याकडून कसें सुटेल! जो विचार आम्ही केला पाहिजे, तोच विचार पुरुषांनींहि केला पाहिजे. दोघांच्या साह्यानें, किती सामान किती दिवस पुरेल वगैरे जर ठरवून आणलें, तर मग आमच्या फर्मानाची चूक आमच्या पदरांत येईल सारी! पण असें किती घरी होत असेल बरें! श्रीमंतांच्या घरीं तर असें फर्मान सुटणें शक्यच नाहीं. त्यांच्या घरी तरी निदान हंसतमुखानें चहा मिळावा. पण तसें होत नाहीं! ज्या गाडीनें घरी येणें होतें, त्याच गाडीनें पुनः परभारें मुक्कांत जाणें होतें! घरीं यावयाचेंच तर पोषाख बदलण्याकरितांच काय तें येणें होतें! ज्या गृहिणीनें पतीला हंसतमुखानें गुलाबी चहा यावयाची अत्यंत उत्कंठेनें वाट पहावी, तिनेंच त्याची मुक्कांत जाण्याची लवकर तयारी करून द्यावी, हा कोणता गुलामाचा न्याय! मध्यम स्थितीतील गृहस्थांच्या घरी वर सांगितल्याप्रमाणें 'पहिला' घरीं येतांच मित्रमंडळीचा अड्डा जमतो. अर्थातच जिन्नसपात्रांच्या चौकशीला त्यांनां वेळच होत नाहीं.

कामिनीया तेलाचा उपयोग केल्याने केश सुंदर, काळेभोर, रेशमाप्रमाणें नरम, मऊ आणि लांब होऊन स्त्रियांच्या सौंदर्याची वृद्धि होते.

गरिबांकडे तर स्वतःला बाजारांत जावयाला सांगण्याखेरीज गत्यंतरच नसतें !

'बगीचा तापं' व गणूचें शाळेंतून न येणें या गोष्टी सांगणारी सांगते व न सांगणारीहि सांगते; पण याच्यावर उत्तर काय मिळतें त्याचा कोणीं विचार केला आहे काय ? " बायका तरी किती भित्र्या असतात ! काय त्यांच्यांत मोठेंसें आहे ? आत्तां तिचा ताप काढेल. गणु येईल आतां, गेला असेल कुठें खेळायला, त्याच्यांत एवढें घाबरण्यासारखें काय आहे ? डाक्टर विक्टर कशाला आणायचे ! आमच्या आजीनें कधीं आजोबांनां डाक्टर आणायला सांगितलेला नाहीं बुवा ! आपणच जरा मात्रेचे दोन वळसे द्यावे, नाहीं तर गवती चहा द्यावा. तिला जरा गरम गरम साधा चहा दे, म्हणजे घाम येईल अन् मी क्विनीनची गोळी देतों ती ताप कमी झाला म्हणजे बगीला दे. मी आतां जातों आहें क्लबांत. तिथें बाळूकाका डॉक्टर भेटतीलच त्यांनां विचारीन, नाहीं तर घेऊन येईन बरोबर. आण जरा पाहूं ती वंडूची टोपी.—गणू नाहीं आला काय करायचें ? त्याचा क्रिकेट बंद कर म्हणजे लवकर घरीं येत जाईल. साहेबांचीं अन् पारशांचीं मुलें कशीं एकटीं जातात वाटेल तिथें अन् आपलीं गेलीं कीं झाला यांचा जीव खालीं वर ! आहे काय त्यांत ? मुलांनीं जरा टक्केटोणपे खाल्लेच पाहिजेत, म्हणजे जग काय आहे तें त्यांनां कळूं लागेल. गणु काय एकटा आहे शाळेंत ? दुसरीं मुलें आहेत, मास्तर आहेत, यदाकदाचित् तसाच कांहीं प्रसंग आला तर मास्तर किंवा मुलें त्याला घरीं घेऊन नाहीं का येणार ? त्यांत भिण्यासारखें काय आहे ?" अशा तऱ्हेचीं लांबलचक व्याख्यानें झडल्यावर आम्ही तरी काय बोलणार ?

अपचनाचा अथवा अजीर्णाचा विकार घरगुती अन्नानें बोकाळेल हें शक्यच नाहीं. इतकें तर सर्वांनां कबूलच आहे, कीं, घरीं तयार झालेलें अन्न बहुधा अपरिपक्व नसतें, काळजीपूर्वक शिजविलेलें असतें. अपचनाचें जें मूळ आहे, तें धुसफूस करणें व गाऱ्हाणीं गाणें यांतच आहे. पण या दोहोंला कारण पुरुषच होत असतात ! जेवावयास बसल्यावर योग्य तोच विषय काढणें, हें काम पुरुषांकडेच असतें. त्याची खरी कसोटी येथेंच असते. जर त्यांनीं तेथेंहि कचेरींतीलच गोष्टी काढल्या, तर आम्हांला त्यांत काय कळणार ? इंग्रज लोकांची रीत अशी आहे म्हणून मीं ऐकली आहे, कीं, ज्या विषयावर सर्वांनां बोलतां येईल तोच विषय जेवतांना काढावयाचा. हा नियम जर आमचे लोक पाळतील, तर हल्लींपेक्षां अन्न दसपटीनें रुचकर लागून संसारांतील चिंता व तज्जन्य निद्रानाश व मेंदूवर पडणारा फाजील ताण हीं तेव्हांच दूर होतील. जरी एकादी गृहिणी अज्ञानपणामुळें धुसफुसणारी व गाऱ्हाणीं सांगणारी असली, तरी ती जेवतांनां चाललेल्या मजेदार गोष्टी प्रेमपूर्वक ऐकेल. आनंदी स्वभावाचा प्रतिध्वनि नेहमीं आनंदीच निघेल, हें पुरुषांनीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. आमचें ढोकें दुखणें, विसूचें कळवळणें व उमाकाकूंचें रोज मागावयास येणें या सर्वांनां आळा घालावयाचा असेल तर आम्हांला बोलावयास योग्य विषय देण्यांतच पुरुषांचें चातुर्य आहे. या गोष्टींचा आम्हीं सौम्यपणें विचार करणें म्हणजे एक आज आम्हांला पुरुषांच्या बरोबरीनें शिक्षण तरी मिळालें पाहिजे, किंवा आम्ही तरी स्वतः तें मिळविलें पाहिजे ! तें शिक्षण मिळविण्यास आम्हाला पुरुषांनीं योग्य अवकाश व अवसर दिला पाहिजे.

आमचें शिक्षण मिळविण्याचें मुख्य साधन म्हणजे मराठी मासिक पुस्तकें व दुसरीं पुस्तकें. तीं जर आम्हांला घरींच मुबलक वाचावयास मिळूं लागलीं तर आमचा मनोविकास होऊन आम्हांला नवीन नवीन गोष्टी समजूं लागतील. हीं पुस्तकें व मासिक पुस्तकें निवडून योग्य असतील तींच आमच्या हातीं पाडणें हें पुरुषांचें कर्तव्य आहे. चरित्रें व इतर ऐतिहासिक पुस्तकें यांची आम्हांला गोडी लावणें व त्यापासून तत्त्वग्रहणाचा मार्ग दाखविणें, या गोष्टी पुरुषांनीं अन्तःकरणपूर्वक केल्याशिवाय आम्हांला त्या कधींहि साध्य व्हावयाच्या नाहींत. हल्लीं आमच्याकरितां म्हणून कांहीं मंडळी पुस्तकरूपानें पोथ्या बांधून आणीत असतात. जें कांहीं आम्हीं ज्ञान मिळवावयाचें तें त्यांतून. आमची व अलीकडील कारकुनीला योग्य झालेल्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांची स्थिति सारखीच आहे. त्यांनां जितकी संस्कृत, इतिहास, वाङ्मय, भौतिक शास्त्रें वगैरे विषयांची परीक्षा उत्तीर्ण होऊन माहिती झालेली असते, तितक्याच आम्हांलाहि या पुस्तकरूपी

कामिनीया तेल प्रत्येकानें वापरून पहावें. हें तेल केंसांस इतकें नरम करून सोडतें, कीं, ते वाटेल त्या रीतीनें वळूं शकतात !

पुराणांत काय आहे, त्यांचें तात्पर्य काय, व त्यापासून आपण घडा काय घ्यावयाचा, आपले चरित्राचा पाया कसा घालावयाचा व आपल्या चरित्राचा परिणाम आपल्या मुलांवर कसा घडतो, वगैरे गोष्टी समजत असतात. ज्ञानाची गुरुकिल्ली जर पुरुषांनांच मिळत नाहीं, तर आह्मांला तरी ती कशी मिळणार. नुकत्याच माझ्या वाचनांत आलेल्या एका पुस्तकांत मी असें वाचलें आहे, कीं:—

"Before we discuss the intellectual training of the women, we may well question whether our men even are properly educated. Are not we, Indian men, a strange medley of ohds and ends, a patchwork? Are our powers of observation, judgment, and assimilation very healthy and natural, and carried on to a liberal maturity? Do we not frequently mix up unreal fancies with things observed? Has not blind prejudice, unshaken and proud, usurped half the throne of reason in our minds? Is there not an absured inconsistency always noticeable between our convictions and acts, as the result of our feele education and weak character? A terrile confusion, without order, without control signs among the thoughts, opinions, and institutions of the (Indians).

हा चुटका आमच्या पुरुषांनी मनन करण्यासारखा आहे.

" नवरा चिडखोर स्वभावाचा होऊं नये, याशी जर स्त्रियांची इच्छा असेल तर त्याला सुखानें झोंप मिळेल या गोष्टीकडे त्यांनीं लक्ष्य ठेविलें पाहिजे. " असें 'शारदाश्रमवासी' ह्मणतात. स्वस्थ झोंप मिळत नाहीं—कोणामुळें ? तर बायकोच्यामुळें ! हा आरोप तर आमच्यावर अगदीं खोटा आहे ! कांहीं ठिकाणीं रात्रीची रात्र बाहेर जाते व दिवसा कोठेंतरी पडून झोंप घेणें होतें, त्यावेळीं आह्मी रडकथा सांगून निद्राभंग खास करीत नाहीं. कोठें कोठें मुर्ली आह्मांला निजावयास बारा, साडेबारा वाजतात व कोंबडा आरविण्यापूर्वीच उठावें लागतें. त्या अल्पावधींत जर एकादी स्त्री आपल्या पतीला उठवून आपली कर्मकथा सांगूं लागली तर तें तिच्या पतिपेक्षां अपुरी झोंप मिळाल्यामुळें तिलाच बाधक होईल. 'पृथ्वीतलावर कोठें स्वर्ग असेल तर तो येथेंच आहे, ' असें वाटावयाला आल्हादकारक विषय पर्यंकपुराणांत निघेल तरी केव्हां ! पुरुषांच्या जीवितांतील काव्य नाहींसें करावयाला त्यांचें स्वतःचें जीवित काव्यमय पाहिजे; त्यांचे आचारविचार काव्यमय पाहिजेत; ते तसे आहेत काय ? याचा त्यांनीं पहिल्यानें विचार करावा व मग आमच्या एरंडाच्या गुऱ्हाळाला किंवा कंटाळवाण्या अंतःपुरप्रवचनाला अथवा रडकथांनीं भरलेल्या पर्यंकपुराणाला नांवें ठेवावीं. पुरुषांच्या निद्रानाशाच्या रोगांचीं कारणें त्यांच्या अर्धांगीच्या जिव्हेमध्यें खास नाहींत ! त्यांची चिकित्सा निदान पुरुषांनीं तरी करूं नये. कारण, ' झांकली मूठ सवा लाखाची ! '

शिक्षणाचें भांडार जोंपर्यंत आमच्याकडून मुबलक रीतीनें लुटविलें जात नाहीं, तोंपर्यंत पत्नीनें क्षुल्लक गोष्टीसुद्धां पतीच्या कानांवर घालणें इष्टच आहे. कोणत्या गोष्टीवर कितपत विश्वास ठेवावा, किंवा कोणती गोष्ट—मग ती कितीहि क्षुल्लक असेना—कशी करावी, हें स्त्रियांनां पतीशिवाय कोण सांगणार ?

मैत्रिणींच्या सुखाविषयीं व लौकिकाविषयीं जितकी कळकळ बायकांनां तितकीच त्यांच्या पतींनांहि वाटली पाहिजे. असें जर न झालें तर आमच्या पुरुषवर्गाचें शिक्षण बरेंच अपरिपक्व आहे, असेंच ह्मणावयाची पाळी येईल ! अशा ठिकाणीं बायकांनां शिक्षण तें काय मिळणार ?

असो. संसार सुखाचा करणें किंवा न करणें हें स्त्रियांवर तसेंच सुशिक्षित व समंजस पुरुषांवरहि अवलंबून आहे. सुशिक्षित पति आपल्या शिक्षणाच्या जोरावर आपल्या पत्नीस शिक्षणरूपी अमृत पाजून तिची चर्पटपंजरी बंद करितात; तर दुसरे पतिराज " चूप बस ! " अशासारख्या दरडावणीनें आपल्या पत्नीचें तोंड बंद करितात !

खरोखरच, 'नास्ति ततः सुखलेशः सत्यम् !'

केश सुंदर दिसण्यास ते रेशमासारखे मऊ, चमकणारे, नरम आणि पुष्कळ पाहिजेत.
कामिनीया तेलाचा त्याचाठीं उपयोग करा !

संसारसुधारणेच्या कित्येक बाबी.

[श्रीमती कुमारी त्रिवेणीबाई भाटोडेकर, मुंबई.]

आमचा संसार आणि आमची गृहव्यवस्था परिपूर्णावस्थेस पोहोंचलीं आहेत, असें कोणीच ह्मणणार नाहीं. मनुष्य व मानवी संस्था या कांहीं झालें तरी नेहमीं अपुऱ्याच रहाणार. तरी त्या निर्दोष करण्यासाठीं, ह्मणजे परिस्थित्यनुरूप त्यांतील आपणास दिसणारे दोष कमी करण्यासाठीं आपण झटणें, हें आपलें प्रमुख कर्तव्य आहे. ज्या वेळीं आपला संसार, आपल्या संस्था व आपलें जग हीं अगदीं निर्दोष बनतील, तो सुदिन ह्मटला पाहिजे. त्या वेळीं या मानवी जगाचें दैवी जगांत स्थित्यंतर झालें, असें ह्मणावें लागेल.

पाश्चिमात्यांच्या सहवासानें आह्मांला नवे लोक, नव्या कल्पना व नव्या चालीरीती पहावयास सांपडल्या; आमच्यांत तारतम्यबुद्धि जागृत झाली; आज हिंदुस्थानांत सर्वत्र व सर्व व्यवहारांत जी चळवळ दिसत आहे, ती त्याचेंच फळ होय. पाश्चिमात्य ज्ञानरवीचा प्रकाश हिंदुस्थानापर्यंत पोहोंचतांच, हिंदुस्थान सडवडून जागें होऊं लागलें, ही एक आनंदाचीच गोष्ट आहे. पाश्चिमात्यांचा सहवास होईंपर्यंत ऐहिक आयुष्यक्रमांतील वैचित्र्य व त्यापासून उत्पन्न होणारी रमणीयता आह्मांला कळली नव्हती. जग ह्मणजे फसविणारी माया, संसार ह्मणजे एक कांटेरी कुंपण, व देह ह्मणजे दुःख व ताप यांचें मूळ, असाच समज हिंदुस्थानांत चहूंकडे बहुतेक प्रचलित होता; आणि त्यांतून मुक्त होणें हेंच उत्तम ध्येय समजलें जात होतें. परकीयांचा व त्यांच्या ज्ञानाचा संसर्ग होतांच, हा समज, ही मायेचा भास उत्पन्न करणारी महामाया, विरघळूं लागली. मनुष्याचें सरें हित जगांतील त्याचे व्यवहार सुयंत्रित करण्यांत आहे, असा प्रकाश आमच्या विचारांत चमकूं लागला, व ऐहिक स्थिति सुधारणें हें आपलें एक कर्तव्य आहे, ही गोष्ट पटूं लागली, आणि त्याला अनुरूप असे प्रयत्नहि सुरू झाले.

समाजसुधारणा हाहि याच तऱ्हेचा एक प्रयत्न आहे; आणि संसारसुधारणेच्या प्रश्नाचा समावेश समाजसुधारणेंतच होतो. आपणाला आज संसारसुधारणेचा विचार करावयाचा आहे. संसाराला प्रारंभ गृहापासून होतो, ह्मणून पहिल्यानें आपल्याला गृह ह्मणजे काय, याची बरोबर कल्पना असली पाहिजे; व ती आहे, असेंच मी गृहीत धरून चालतें. केवळ चार पुरुष किंवा चौघी स्त्रिया एकत्र राहिल्या ह्मणजे त्याला गृह हें नांव आपणांला देतां येणार नाहीं. गृह या शब्दाबरोबर दांपत्याची कल्पना मनांत उभी रहाते. दाम्पत्यभावाशिवाय गृहाचें अस्तित्वच शक्य नाहीं. एकादी विधवाबाई आपल्या मुलांबाळांसह रहात असतां त्याला 'गृह' ही संज्ञा कशी देतां येईल, अशी शंका येण्याच कारण नाहीं. कारण, तेथें दांपत्यभाव नसतो असें नाहीं; मात्र तो पूर्वसंबंधाच्या रूपानें असतो, येथवेंच.

आतां गृह ह्मटल्याबरोबर जर दांपत्याची कल्पना पुढें येते, तर प्रथम त्या दांपत्याच्या, ह्मणजे स्त्रीपुरुषांच्या परस्परव्यवहारांत काय सुधारणा करण्याजोग्या आहेत, त्याचा विचार करणें बरें, असें मला वाटतें. विवाहपद्धतींतील पुष्कळशीं व्यंगें आमच्या समाजांत बराच कालपर्यंत मोठा धुमाकूळ उडवीत होतीं. तीं जरी अद्यापि समूळ गेलीं नाहींत, तरी त्यांनां बरीच उतरती कळा लागली आहे, हें कोणीहि कबूल करील.

बालविवाह पूर्वीप्रमाणें आतां होत नाहींत. त्याचप्रमाणें केवळ हुंड्यासाठींच वधूवरांच्या गांठी मोडल्याचीहि उदाहरणें कमीच होत चाललीं आहेत. मुलांमुलींच्या आवडीनावडीकडे पहाणारीं उदार मतांचीं वडील माणसें दिवसेंदिवस समाजांत अधिकाधिक दिसूं लागलीं आहेत. या सर्वांचा परिणाम एक मोठी इष्ट गोष्ट घडून येण्याकडे होत आहे, ती गोष्ट ह्मणजे वधूवरांतील समता ही होय. वधूवरांनां परस्परांबद्दल आदर वाटणें, एकमेकांविषयीं उच्चनीचभाव मनांत न येणें, त्यांनीं पूर्ण सलोख्यानें वागणें, या गोष्टी संसार सुखानें चालण्यास अवश्य आहेत. प्रसंगांतरीं वधूवरांच्या

आपला चेहरा फिकट व निस्तेज कां दिसतो ? रोगामुळें अशक्त झालां असाल तर
प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका. वापरा.

नाल्याचें वर्णन कसेंहि असलें तरी बहुजनसमाजाची सद्यःस्थिति पाहिली, ह्मणजे वधू व वर यांच्या पारड्यांत मोठें अंतर दिसतें. वधूला वराचा वाटणारा वागुलबोवा, व वराची वधूविषयीं क्षुद्रबुद्धि, हा आमच्या समाजव्यवस्थेंतील मोठा दोष आहे. तो नाहींसा झाला पाहिजे; ह्या परस्परांत समभाव उत्पन्न झाला पाहिजे. ह्याशिवाय संसारशकट सारखा व बिनधोक चालणें शक्य नाहीं. ही समता उत्पन्न करण्यास बालविवाहप्रतिबंध, हुंड्याच्या बाजारी चालीचा प्रतिकार व आवडीनावडीची मुभा, यांचा प्रसार समाजानें जितका होईल तितका केला पाहिजे.

आतां या गोष्टी घडवून आणण्यास दुसऱ्याहि कित्येक उणीवा भरून निघाल्या पाहिजेत. त्यांपैकीं मुख्य उणीव शिक्षणाची होय. आमच्या देशांत पुरुष आपल्या शिक्षणाची काळजी पूर्णपणें घेतच आले आहेत, असें जरी मला ह्मणवत नाहीं, तरी शास्त्रकारांनीं त्यांच्या शिक्षणाकडे थोडेंबहुत लक्ष्य दिलें आहे, एवढें खरें. पुरुषांचा शिक्षणाचा काल, त्यांनां कोणतें शिक्षण देणें योग्य, वगैरे बाबींवर विचार शास्त्रांत सांपडतात. पण स्त्रियांच्या शिक्षणाला मात्र प्रचारांत किंवा शास्त्रांत कोठेंच इयत्ता ठरविलेली दिसत नाहीं. स्त्रियांच्या आयुष्यातील इतर प्रत्येक गोष्टींची वयोमर्यादा ठरविणाऱ्या आमच्या शास्त्रकारांनीं स्त्रीशिक्षणाच्या बाबींतच मूग कां गिळले आहेत, कोण जाणे! कदाचित् स्त्रीशिक्षण तेव्हां प्रचलित असल्यामुळें त्याचा उल्लेख करण्याची त्यांनां जरूर भासली नसेल. किंवा स्त्रियांची योग्यता शिक्षण देण्यास योग्य अशा प्राण्यामध्यें करणें त्यांनां अप्रशस्त वाटलें असेल!

आतां काल बदलला आहे. स्त्रीशिक्षणाची हेळसांड करणें, ह्मणजे सगळ्या समाजाची हेळसांड करणें होय, असें समंजस लोकांनां वाटूं लागलें आहे. स्त्रियांच्या शिक्षणाची हेळसांड केल्यानें समाजाला कोणताहि सुधारणेचा अथवा उन्नतीचा प्रश्न चांगल्या प्रकारें सोडवितां येणार नाहीं. स्त्रिया अज्ञानांत राहिल्यानें पुरुषांची प्रगति न होतां त्यांच्या महत्त्वाकांक्षेंत, त्यांच्या हितसाधनांत, स्त्रियांकडून वारंवार अडथळेच उत्पन्न होतील. **'जिच्या हातीं पाळण्याची दोरी, तीच देशाला उद्धारी.'** किंवा **'गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते.'** अशीं स्त्रियांचा गौरव करणारीं कितीहि वचनें प्रचारांत असलीं, तरी त्यांचा प्रत्यक्ष आचारांत क्वचित्च उपयोग केलेला दिसतो. गृहव्यवस्था सुधारणें असेल तर प्रथम गृहिणीपद जिला यावयाचें आहे, तिला सुधारावयाला नको का? आणि शिक्षणावांचून सुधारणा शक्य आहे काय?

स्त्रियांनां शिक्षण कोणचें द्यावें, किती द्यावें, याविषयीं जरी मतभेद असला, तरी शिक्षण दिलें पाहिजे ही गोष्ट आज शिष्टसंमत झाली आहे. ही सुधारणा शक्य तितक्या प्रकारांनीं घडवून आणली पाहिजे. स्त्रीशिक्षण जसजसें सार्वत्रिक होईल, तसतशी समाजांत बरीच सुधारणा होत जाईल. शिक्षणानें स्त्रियांचीं मनें सुसंस्कृत होतील, त्यांनां आपली जबाबदारी कळूं लागेल व तेणेंकरून पुरुषांच्या शिरावरील बरेंच ओझें कमी होईल.

आतां कोणी असें ह्मणेल, कीं, शिक्षण न मिळालेल्या स्त्रियांनीं आजपर्यंत संसार केले नाहींत, किंवा त्या हल्लीहि करीत नाहींत काय? शिक्षण न मिळालेल्या स्त्रिया कदाचित् गृहकृत्यांत दक्ष असतील, रूढ आचार पाळण्यांतहि त्या चुकत नसतील; पण तीं कृत्यें केवळ एकाद्या यंत्राप्रमाणें त्यांच्या हातून घडतात यांत संशय नाहीं. उदाहरणार्थ, आपण सणाचे दिवस घेऊं. त्या वेळीं ठरीव पक्वान्नें करणें, घरची रीत पाळणें, हीं कामें त्यांच्याकडून बिनबोभाट होतात; पण त्यांत जरा कमी अधिक झालें, कीं, बिघडलें त्यांचें सारें तंत्र! त्यामुळें त्यांची विचारशक्ति, कल्पनासामर्थ्य हीं वाढण्यास जागाच रहात नाहीं, व नेहमींच्या आंखलेल्या मार्गापलीकडील एकाद्या प्रसंग ठेपला, ह्मणजे त्यांची फार धांदल उडते. सर्वच गोष्टी अनुभवानें शिकावयाच्या असल्यामुळें, लहानपणींच नव्हे, तर मध्यम वयांतदेखील संसाराचा भार अंगावर पडतांच कोणातरी वृद्ध बाईची आवश्यकता कशी भासते हें पुष्कळदां नजरेस पडतें.

या व अशाच प्रकारच्या इतर गोष्टी टाळण्यास शिक्षणाशिवाय उपाय नाहीं. करितां, पुरुषांच्या शिक्षणाविषयीं विचार करणाऱ्या माणसांचें आज स्त्रीशिक्षणाविषयीं जें मत झालें आहे, तेंच स्त्रीशिक्षणा-

वाईट सवयीमुळें दूषित झालेला मूत्राशय शुद्ध करण्यास 'कपुरलाईन'
हा एकच उपाय आहे. किं. रु. १॥.

वयानंतर स्वतःलाच आपली व्यवस्था पहावी लागणार, या कारणानें मुलगाहि आपली सांपत्तिक स्थिति तेवढ्या काळापूर्वी सुधारण्याचा उद्योग करील. निरनिराळ्या घराण्यांतून आलेल्या मुलींच्या भिन्नमतांचा कुटुंबघातक चक्रव्यूह रचला जाणार नाहीं. गृहस्थितींत सुख, शांति व एकी हीं अधिक नांदतील.

संसार-सुधारणेच्या प्रश्नावरोवर पुढें उभी रहाणारी गृहस्थितीची कल्पना, तिच्या अनुरोधानेंच शिक्षण वगैरे गोष्टी व त्यांपासून घडून येणाऱ्या इष्ट सुधारणा, यांचा विचार केल्यावर जरा पुढें नजर टाकली, ह्मणजे आणखीहि सुधारणेच्या बाबी दिसतात. मातृ-पितृपद पावल्यावर अपल्याशीं आमचें जें सध्यां वर्तन असतें, त्याहून जरा त्याच्याशीं निराळें वर्तन करणें बरें होईल. मातृभक्ति, पितृभक्ति, पुत्रवात्सल्य वगैरे गुणांची पूर्व बाढ आमच्याकडे मुळींच झाली नाहीं, असें मी ह्मणत नाहीं; पण मातांनांच शिक्षण न मिळाल्यामुळें मुलांनांहि जसें उत्तम वळण लागायला पाहिजे तसें लागत नाहीं, व मुलांचें संगोपनहि नीट होत नाहीं. कोठें फाजिल लाड, तर कोठें उठतांबसतां चोप, हीं मुलांनां निष्काळजी व निर्लज्ज वनविण्यास कारणीभूत होतात. नसती भीति मुलांनां घातली जाऊन तीं भित्रीं वनतात. हीं व्यंगें नव्हत तर काय? हीं सारीं शिक्षणाच्या अभावापासून उत्पन्न होतात, हें विधान खोटें कोण ह्मणेल?

आजकाल नीतिशिक्षणासंबंधीं वऱ्याच ठिकाणीं बरीच वाटाघाट चालू आहे. कोणी ह्मणतो, शाळांतून मुलांनां नीतिशिक्षण घरोघर मिळत नाहीं ह्मणून आमची प्रजा अनीतिमान् निघूं लागली आहे. शाळेंतून नीतिशिक्षण यावें ह्मणजे नीतीचा प्रसार झपाट्यानें होईल, अशी कांहीं लोकांची समजूत आहे. पण मुळ्ळें शाळांतूनच नीतिशिक्षण देऊन कितपत फायदा होईल, याचा संशयच आहे. ला तत्त्वानुरूप वळण जें लागावयाचें तें घरींच लागत असतें. पुष्कळ लहान मुलांनां चोरी करणें अथवा खोटें बोलणें वाईट हें ठाऊक असतें, तरी तीं खोटें बोलतात! याच्या मुळाशीं काय आहे बरें? खोटें बोलणें हें नीतिबाह्य आहे, या गोष्टीचें अज्ञान तर खास नव्हे, तर तसें वागण्याचें त्यांनां वळणच नसतें. आजूबाजूचीं वडील माणसें खोटें बोलणें अथवा तशीच एकादी गोष्ट करणें निंद्य आहे असें त्यांनां सांगत असतात, पण वेळी प्रसंगीं त्यांच्याच देखत आपणच ती गोष्ट वेलाशक करतात! यावरून लबाडी करूं नये, वगैरे तत्त्वें दुसऱ्यांनां सांगण्याचींच आहेत, आचरण्याचीं नाहींत, अथवा कधीं कधीं न आचरलीं तरी चालतें, असें मुलांनां सहजच वाटूं लागतें. त्यांत लहान मुलें फार अनुकरणप्रिय असतात, हें आपणाला ठाऊकच आहे. तेव्हां मुलें आपलें अनुकरण करणार, हें ध्यानांत धरूनच मातापितरांनीं नेहमीं वागलें पाहिजे. शाळांतून शिक्षकांनींच नीतितत्त्वें शिकविण्यापेक्षां घरींच व तींहि पुरुषांपेक्षां स्त्रियांनींच जर शिकविलीं, तर त्याचा कितीतरी सुपरिणाम घडून येईल. असा हा सुपरिणाम घडवून आणावयाचा असेल, तर मला वाटतें, आम्ही सर्व स्त्रियांनां सुशिक्षित करण्यासाठीं होतील तेवढे प्रयत्न थोडेच आहेत, असें ह्मणावें लागेल. अशिक्षित स्त्रिया आपल्या मुलांनां अनीतिमान् करतात, असें मी ह्मणत नाहीं. एवढेंच कीं, नीतिमत्ता उत्पन्न करण्याचीं अनेक साधनें व त्यांचा उपयोग हीं त्यांनां ठाऊक नसतात, ह्मणून व्हावें तसें नीट काम होत नाहीं.

जातां जातां आणखी एका गोष्टीवद्दल थोडेंसें तरी लिहावेंसें वाटतें. ऋण काढून सण करण्याची संवय आम्ही पूर्णपणें मोडून टाकली पाहिजे. रूढीला अनुसरून, बायकळ निंदेला भिऊन, कितीतरी कुटुंबें कर्जाचें लोढणें गळ्यांत घेतात; स्वातंत्र्याला मुकतात व स्वतः मुसाला आंचवून देशाला दरिद्री करतात. हें व्यंग नव्हे काय? व तें दूर करणें अवश्य नाहीं काय? असेल तर त्याला उपाय एकच आहे, व तो लग्नसमारंभासारख्या कार्यांतील मोठ्या खर्चाच्या बाबी साफ काढून टाकणें हाच होय.

आणखीहि पुष्कळ सुधारणेच्या बाबी आहेत. तरी वर दाखविल्या आहेत, तेवढ्याच जरी तूर्त पूर्णपणें घडून आल्या, तरी समाजाला बराच फायदा होईल, यांत संशय नाहीं. जगदीं निर्दोष न झाला, तरी आमचा संसार बहुतांशी सर्वांगसुंदर होईल, व त्याच्या छायेंत आम्हांला सुख व संतोष हीं अधिक प्रमाणांत लाभल्याशिवाय रहाणार नाहींत.

साडेसें अन्न पचविण्यांत, पोटांतील मांसु तोडण्यांत 'वालजीवनामृता'चा हातखंडा आहे. वापरण्यानेंच खात्री होणार आहे.

डोगरा लोकांच्या लग्नरीती.

[श्रीमती सरवाई दाणी, जम्मू—काश्मीर.]

जम्मू आणि काश्मीर हे दोन्ही प्रांत काश्मीरच्या महाराजांच्या ताब्यांत आहेत. त्यांची जम्मू येथील बरीचशी प्रजा डोगरा आहे. डोगरा लोक हे जातीनें रजपूत आहेत, व डोगरा हें त्यांच्या वर्गाचें विशेष नांव आहे. डोगरा लोकांच्या लग्नावद्दल व त्यांच्या रीतीवद्दल थोडीशी माहिती महाराष्ट्र वाचकांकरितां येथें देत आहें.

वधूवरांचा शोध करण्याची तऱ्हा इकडे पण महाराष्ट्रासारखीच आहे. माहितीं असलेल्या व एकाच जातीच्या घराण्यांतली वधू व वर यांचा शोध करतात. असें एकादे घराणें पाहण्यांत आलें, कीं, लग्नावद्दल दोहींकडचें बोलणें सुरू होतें. नवरदेव बहुतेक वधूच्या बापानें पाहिलेला असतो; परंतु वधूचा बाप जर वराच्या गांवापासून दुसऱ्या गांवीं असला, तर वराचा बाप अगर दुसरे पुरुष माणूस कोणीच वधूस पाहण्यास जात नाहींत. फक्त वधूच्या वडिलाकडे पाहून व तो सांगेल त्या माहितीवर विश्वास ठेवून लग्न जुळविण्याचें निश्चित होतें. कांहीं वेळेस वधूकडील पुरोहिताकडून वराच्या बापास माहिती मिळते; कारण त्यानें वधू पाहिलेली असते. गांवांतले गांवांत जरी वधू असली, तरी तिला सासरा, दीर वगैरे पुरुषांपैकीं कोणीच पाहण्यास जात नाहींत. असें असण्याचें मुख्य कारण झटलें झणजे इकडे पडद्याची रूढी आहे, हें होय; परंतु गांवांतच जर वधू असली, तर तिला घायका-माणसांपैकीं, सासू, जाऊ, अगर नणंद जाऊन पाहूं शकतात. पण तें वधूस पाहणें उघड उघड होत नाहीं. आपली खरी ओळख न देतां त्यांनां वधू पहावी लागते. उघड वधू पाहण्यास गेलें, तर त्या लोकांत तें फार वाईट असें समजतात, आणि वधू दाखवीत नाहींत.

एकदां पसंत झालेल्या वराबरोबर लग्न करण्याचें ठरलें, कीं, वधूचा बाप आपल्या पुरोहितास वराच्या घरीं वराला 'टीका' अथवा 'कुडमाई' करण्यास पाठवितो. त्याच्याबरोबर वरास देण्याकरितां मलमलीचें एक ठाण, डोकीचा एक पटका, आणि त्यावर दक्षणा झणून कांहीं रुपये असें देतात; परंतु श्रीमंत व गरीब हे आपल्या योग्यतेप्रमाणें त्यास कमी रुपये, रेशमी पटका, फळें वगैरे पाठवितात. वधूचा बाप अगदीं गरीब असला तरी त्यानें वरील जिन्नस दिलेच पाहिजेत.

पुरोहित ज्या दिवशीं 'टीकाविधि' करण्यास येण्याचें ठरलें असेल, त्या दिवशीं वराकडे उंबऱ्यावर तेल शिंपडतात. इकडे रांगोळी झणजे काय हें माहीत नसल्यामुळें तिचा उपयोग मंगलप्रसंगीं करीत नाहींत. पुरोहित वरगृहीं आल्यावर त्याला दूध पिण्यास देऊन त्यांत कांहीं पैसे टाकतात. व ते पैसे न्हावी अगर झीवर (भांडीं घासणार) यांनां देतात. या लोकांच्या लग्नकार्यांत न्हावी दर कामास लागतो. त्याचें येणें अशुभ असें ते समजत नाहींत. तिलकास योग्य असा वेळ पाहून, वधूकडील पुरोहित व गांवांतील कांहीं लोक, आप्तसोयरे यांनां निमंत्रण करतात. सर्व मंडळी जमली झणजे वरास वधूकडील सर्व जिन्नस देऊन त्याच्या कपाळीं कुंकवाचा तिलक लावितात. या वेळीं केशराचें एक स्वस्तिक एका थालीवर काढतात. त्यावर सुपारी व तांदूळ ठेवतात, व त्याला गणपति समजून वराकडून त्याची पूजा करवितात. या आनंदाप्रीत्यर्थ जमलेल्या सर्वांनां बत्तासे वांटण्यांत येतात. नंतर वधूकडील पुरोहितास कांहीं दक्षणा वगैरे देऊन त्याची रवानगी करतात. वधूकडील पुरोहित परत आपल्या गांवीं आला, कीं, वधूवरांची पत्रिका पाहून त्यांनां जो मुहूर्त लागेल त्या दिवशीं त्यांचें लग्न करण्याचें ठरवितात. इकडे लग्नमुहूर्त चैत्र, भाद्रपद व कार्तिक हे तीन महिने सोडून बाकीच्या सर्व महिन्यांत सांपडतात. वराचा तिलकविधि झाल्यावर वधूस पण साखरपुडा करण्याकरितां वराकडील पुरोहित जातो, व पहिल्यासारखा सर्व विधि त्याहि वेळीं होतो. मात्र वधूच्या कपाळीं तिलक लावीत नाहींत. वधूच्या तिलकविधीच्या वेळीं तिला दागिने, झणजे सरी,

आजकाल 'बालामृता'चा जिकडे तिकडे सुळसुळाट झाला आहे. अशा वेळीं मुलांनां स्त्रीचें हितकारक औषध झणजे बालजीवनामृतच होय ! अनुभव पहा.

दोन बांगड्या व डोकीवर एक चांद असे देतात. हा चांद म्हणजे विजवन्यासारखा असतो. मात्र तो मध्यम लोकांत मोतीं व माणिक यांचा न देतां सोन्याचा देतात. या लोकांत 'कुडमाई' एक दोन वर्षेसुद्धां अगोदर होते. असें असलें म्हणजे वराकडील पुरोहित लग्नाला दहा बारा दिवस बाकी राहिले, कीं, 'गंडा' म्हणजे गांठी मारलेला दोरा वरोवर घेऊन वधूगृहीं येतो. मग तिच्या अंगणांत अगर जवळपास एक मुहूर्तमेढ रोवून त्याला ती दोरी बांधतो. लग्न जितके दिवस बाकी असेल तितक्या गांठी त्याला देऊन जातो. नंतर वधूकडील पुरोहित प्रतिदिवशीं एक याप्रमाणें शेवट दिवसपर्यंत गांठी सोडीत जातो.

डोगरा लोकांत मुलीच्या लग्नाची मर्यादा म्हटली म्हणजे दहा ते बारा वर्षांपर्यंत आहे. पण अलीकडे चांगल्या घराण्यांतसुद्धां मुली मोठ्या होऊं लागल्या आहेत. त्या लग्नांत सोळा सत्रा वर्षांच्या असतात. साटे लोटे करण्याचा प्रघात इकडे पण आहे; आणि त्या मुली पण मोठ्या झालेल्या असतात. लग्नतीथ जवळ आली म्हणजे जसे ज्या सोयऱ्याला सोयीचें असेल, तसें दोघांपैकीं कोणीहि एकमेकांच्या गांवीं जातात. पण बहुतेक वराकडीलच मंडळी वधूगृहीं जातात. सोयऱ्याच्या गांवीं जाण्यापूर्वी वराचा बाप वधूच्या बापास तीथ मुकर कळवितो, व त्याच्यावरोवर किती मंडळी येणार तें पण सुचवून ठेवतो. वर व वराकडील मंडळी जेव्हां वधूचे गांवीं आलेली असतात, तेव्हां वधूच्या बापानें लग्नाचा सर्व खर्च करावयाचा असतो. मात्र वराच्या बापानें त्याच्याकडच्या न्हाव्याचा, पालखीवाल्यास, झीवर यांस आपल्याकडचे पैसे द्यावयाचे असतात. लग्नतिथीपूर्वी सहा दिवस अगोदर दोहींकडील पुरोहितांच्या बायका मातीचें लहानसें मंदिर करतात. त्यावर मातीच्या पणतीचा दिवा ठेवतात; आणि आंतल्या बाजूला तांदूळ व मुगाची डाळ मिसळून ठेवतात. त्या मंदिरावरोवरच एक चूल तयार करून ठेवतात; कारण न्हावीण लग्नदिवशीं वधूवरांच्या अंगास उटणें लावते, तेव्हां तिला त्या चुलीवर त्या लोकांच्या तऱ्हेची मिठाई करून देतात. त्या मिठाईला 'बडे' असें नांव आहे. ते घीवरासारखे असतात. हे जे पुरोहितांच्या बायका लग्नापूर्वी सहा दिवस करतात, त्याला इकडचे लोक 'गंडीपडे' असें म्हणतात.

डोगरा लोकांत वरात लग्नापूर्वीच निघते. पण त्या वेळीं वधू वरावरोबर नसते. वर वधूगृहीं जाण्यापूर्वी त्याला सर्व कपडे घालतात व त्याच्या हातांत लहान तलवार देतात. नंतर त्याला सर्व मंडळीमध्यें बसवितात. मग ती मंडळी आपल्या ऐपतीप्रमाणें वरास कांहीं रुपये भेट म्हणून देते. हातांत तलवार देण्याचा रिवाज या जातींतील ब्राह्मणांमध्यें मात्र नाहीं. डोगरा लोकांत बायकांनां व्याह्याकडे जाण्याचें काम पडत नाहीं. मात्र वर वधूगृहाहून परत घरीं येईपर्यंत गांवांतल्या बायका जमवून गाणीं म्हणण्याचें असतें. वराची आप्त मंडळी त्याला घेऊन लग्नाच्या आधले दिवशीं संध्याकाळीं मोठ्या समारंभानें वधूच्या घराशेजारीं जानोसवाडा घेतलेला असेल, त्यांत जाऊन राहतात. वधूगृहाजवळ पोंचल्यावर नवरदेव आंत जातो, व दरवाज्यांत व्याही, मामा, काका (अर्थात् दोहींकडील,) यांची भेट होते. त्याला 'मेलनी' असें म्हणतात. वर व वराकडील मंडळी वधूगृहीं तीन दिवस राहतात.तिन्ही दिवस व्याही मंडळींनां मेजवान्या देतात. मेजवानीला घीवर, मुची, (एक प्रकारची पुरी) गोड भात, वगैरे पक्कान्नें करतात. वर वधूगृहीं तीन दिवसांपेक्षां जास्त राहत नाहीं. त्या लोकांत लग्न उरकून घेण्याची मुख्य वेळ म्हटली म्हणजे संध्याकाळचे सहा ते सकाळीं सूर्योदय होईपर्यंत. लग्नदिवशीं वरासह सर्व मंडळी वधूगृहीं जातात. या वेळेस वराला वधूगृहीं घोड्यावर मिरवीत नेतात. वधूगृहीं एक 'वेदी' अगर होमकुंड केलेलें असतें, त्या होमाजवळ वधूवरांस बसवून दोहींकडील पुरोहित त्या होमामध्यें तांदूळ व तूप आपले मंत्र म्हणून टाकतात. ते झाल्यावर वधूवरांच्या पदरास गांठी देऊन त्यांच्याकडून सात प्रदक्षणा त्या होमाभोंवतीं करवितात, व कांहीं मंत्ररूपानें शपथा घेववितात. त्यानंतर त्यांनां जे आहेर करावयाचे असतात ते या वेळीं करतात. पहिला आहेर वधूच्या मामाकडील असतो.

वधूच्या मामानें तिला कांहीं द्यावें लागतें. पण जर तो तें देण्यास असमर्थ असेल, तर वधूचा बाप हें सर्व देतो. हे डाग म्हटले म्हणजे, नथ,

बालजीवनामृत मातृपदास पोहोंचलेल्या प्रत्येक स्त्रीनें आपल्या संग्रहीं ठेवणें. प्रसंगीं अत्यंत उपयोग होतो. **जीवनामृत** त्यांच्या चांगलें जरूरीचें आहे.

बुलाख, बांगड्या, पाट, चरखा, लोढणें, बिछान्यासह पलंग, कांहीं भांडीं व वधूवरास कपडे, त्यावर कांहीं दक्षणा. या लोकांत हुंडा घेत नाहींत, ह्मणून त्यांनां वरदक्षणा बरेच वेळ द्यावी लागते. नथ ह्मणजे लहान मुलाच्या हसळीयेवढी असते. ती सोन्याची केली असून तिचा दांडा नाकांत जाईल इतका बारीक असतो. तीमध्यें दोन मोतीं व एक लालडी असते, व बाजूला सोन्याची बारीक नकशी केलेली असते. बुलाख पण सोन्याचा असतो. तो मुसलमान लोकांत फार वापरतात. बांगड्या चांदीच्या, सोन्याच्या, मोत्यांच्या किंवा हिऱ्यांच्या, जसें ज्याला अनकूल असेल तशा देतात. पण हस्तिदंती दोन या अगदीं असल्याच पाहिजेत. पाट ह्मणजे लहान घाजेसारखा असतो. त्याला चार पाय चांगले रंगीत व नकशीदार असतात; मध्यें नवारीनें विणलेलें असतें. पाठीमागें टेकण्यास सिंहासनासारखी नकशीदार पाठ असते. चरखा ह्मणजे कापूस पिंजून सूत काढण्याचें एक यंत्र. मुलीनें रिकाम्या वेळीं या पाटावर बसून त्या चरखामधून सूत काटावें, असा चरखा देण्याचा उद्देश असतो. लोढणें हें कापसांतून बिया निराळें करणारें यंत्र असतें. वधूला तिचे सासरचे दागिने व कपडे असतातच. या लोकांत वधूला कपडे ह्मणजे सूतन अथवा बिजार, घागरा, समीज, जॉकीट व ओढणी, इतके असतात. सूतन ही घोट्याजवळ घट्ट असून बाकी सर्व सैल असते. डोगरा लोकांत अशी समजूत आहे, कीं, जरी घर विकण्याची पाळी आली तरी मुलीला रीतीप्रमाणें सर्व जिन्नस दिलेच पाहिजेत.

लग्न झाल्यावर तिसरे दिवशीं गृहप्रवेश करतात. त्या वेळीं वाजंत्री वगैरे असतात; आणि वधूवर यांनां वरोवर वराच्या गृहीं नेतात. वधूवर यांनां एका पालखींत बसवीत नाहींत. त्या दोघांनां निरनिराळीं बसवितात. वर उघड्या पालखींत असतो, व वधूच्या पालखीला चोहों बाजूंनीं आच्छादन घातलेलें असतें. अशा तऱ्हेनें तीं दोघें आपल्या घरीं जातात. या गृहप्रवेशाला त्या लोकांत 'पंजेखी' असें ह्मणतात. गृहांत प्रवेश करतेवेळीं पुरोहित वधूवरांची दारांत पूजा करतो. मग तीं जोडीनें सर्वांनां नमस्कार करतात.

लग्न झाल्यावर वधूचें माहेरी येणें बहुतेक फार होत नाहीं. कारण, कांहीं विशेष कारणाखेरीज त्या लोकांत माहेरीं पाठवीत नाहींत, व जर कधीं पाठविलें तर त्या वेळीं वधूच्या माहेरील मंडळीनीं वरपक्षाकडील मंडळीस, वरास व वधूस बरींचशी देणगी पुनः द्यावी लागते. मुलीचे आईबाप मुलीला येऊन भेटून जातात, पण तिच्या घरचें अन्न घेत नाहींत. त्यांच्यामध्यें मुलीला मुलगा होऊन तो मोठा झाला व स्वतः कमावूं लागला ह्मणजे मग त्याचे आजा आजी त्याची कमाई खातात. तोंपर्यंत मुलीच्या घरचें पाणीसुद्धां घेत नाहींत.

सर्व जगांत हल्लीं पोस्टाच्या तिकिटांचे एकवीस हजारांपेक्षां जास्त प्रकार आहेत.

सोनकेळें बटाट्यांपेक्षां पंचेचाळीसपट व गव्हांपेक्षां एकशेंतीसपट अधिक पौष्टिक आहे.

सर्व पृथ्वीवर जपानांत शोध लागलेल्या गुन्ह्यांची संख्या अधिक असते. तेथें दररोज ६९,०७३ गुन्हेगारांनां शिक्षा होते. युरोपियन राष्ट्रांत जर्मनींत गुन्ह्यांचा अधिक तपास लागतो. तेथें दररोज ५२,८८१ अपराध्यांनां शिक्षा होते.

सतराव्या शतकांत पुरुषानें आपल्या पत्नीचें अथवा मुलाचें चुंबन घेणें हा इंग्लंडांत शिक्षा होण्याजोगा अपराध गणला जात असे !

पूर्णवाढ झालेल्या वाघाला धरून ठेवावयाला नऊ मनुष्य लागतात, तेच सिंहाला धरून ठेवण्यास पांच मनुष्य पुरे होतात.

इंग्लिश लोकांत वधूला वर ज्याप्रमाणें वाग्निश्चयाची आंगठी (Engagement ring) अर्पण करतो, त्याप्रमाणें जपानांत वरानें वधूला एक सुंदर रेशमी कमरबंद अर्पण करण्याची चाल आहे.

पिरपिर करणारीं लहान मुलें निरोगी असावींत अशी आपली इच्छा आहेना ?
तर मग त्यांनां 'बालजीवनामृत' द्या.

असतां त्या तिला म्हणाल्या " शरयू, सुशीलेला जर मीं आणली तर तूं तिच्याशीं भांडणार नाहींसना ? "

त्यावर शरयूनें उत्तर केलें " आई मी कधीं नाहीं भांडणार ! आम्ही दोघी एकत्र खेळूं, निजूं व शिकूं. आई, तूं आणच तिला. कधीं आणशील सांग ?"

असा प्रश्न शरयूनें विचारला, तेव्हां गंगाबाईंना डळमळणारा निश्चय कायम झाला. यशोदाबाईंचा स्वभाव कठिण आहे. आयती घरांत कामाला उपयोगी पडणारी मुलगी त्या आपल्या स्वाधीन कशी करतील ? इतकी गरीबी असतांहि तिला बाळगण्याचा त्यांचा हेतु काय असावा, वगैरे विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले; परंतु प्रयत्न करून पहाण्याचा त्यांनीं निश्चय केला, व दुसरे दिवशीं सुशीलेसंबंधानें तिच्या काकाकडे युक्तीनें गोष्ट काढण्यास जनूकाकांस सांगितलें. जनूकाकांची एक मुलगी अगदीं रूपानें हुबेहूब सुशीलेसारखीच होती. सुशीलेकडे पाहून वारंवार त्यांना आपल्या मुलीची आठवण होई. जेव्हां गंगाबाईंनीं आवडती कामगिरी जनूकाकांवर सोंपविली, तेव्हां त्यांनां फारच आनंद झाल्यासारखें दिसलें.

त्यांनीं लगेच ही गोष्ट गोविंदभटांपाशीं काढण्याचा विचार केला. गोविंदभटजी अगदीं साधा व सरळ मनुष्य असल्यामुळें त्यांनीं सुशीलेच्या मातापितरांची सर्व हकीकत थोडक्यांत त्यांनां सांगितली. जनूकाकांच्या ऐकण्यांत जी हकीगत आली होती तिच्यांत व गोविंदभटजींनीं सांगितलेल्या हकीगतींत फारसा फरक पडला नाहीं.

सुशीलेच्या मातापितरांची माहिती करून घेण्याची उत्कंठा वाचकांसहि लागली असेल, म्हणून ती येथें थोडक्यांत देतें.

[३]

जी. आय्. पी. लाइनीवरील एका लहानशा स्टेशनावर रंगोपंत नांवाचे कोणी तरुण गृहस्थ तारऑफिसमध्यें नुकतेच नोकरी करूं लागले होते. त्यांनां पगार बेताचाच मिळत होता खरा, तरी रंगोपंत व सत्यभामाबाई यांनां संसाराची नवीन उमेद असल्यामुळें उभयतांनां गरीबी मुळींच भासत नव्हती. उभयतांचे हे दिवस परस्परांच्या सहवासांत आनंदांत गेले. या दिवसांत सत्यभामाबाईंनीं भावी संसारसौख्याचे कल्पनाप्रासाद किती तरी बांधले असतील! ज्या दिवशीं सर्व इस्टेटीचें वाटोळें करून आपणास देशोधडीस लावलें, त्याला आपली स्थिति सुधारल्याशिवाय तोंड दाखवावयाचें नाहीं, असा दोघांचाहि दृढ संकल्प झाला होता. आपला नवरा हुषार असल्यावर व आपण संसार काटकसरीनें केल्यास आपणांस भिण्याचें काय कारण ? आपणांस चांगले दिवस खास आल्यावांचून रहाणार नाहींत, अशी सत्यभामाबाईंनां फार आशा वाटे. पहिलें पुत्ररत्न झाल्यानें आनंद होत नाहीं, अशा स्त्रिया निदान आपल्या समाजांत तरी विरळाच सांपडतील; परंतु सत्यभामाबाईंची आवड या नियमाच्या उलट होती. कर्मधर्मसंयोगानें त्यांची इच्छा परिपूर्ण झाली, व मोठ्या आवडीनें त्यांनीं आपल्या कन्येचें नांव सुशीला ठेविलें. रंगोपंतहि मोठ्या कौतुकानें आपल्या आवडत्या कन्यारत्नास 'सुशीला' या नांवानें संबोधीत असत. सध्यां रंगोपंत व सत्यभामाबाई संसारसमुद्रांत दंग होतीं. जगांतील दुःखाची कल्पना त्यांच्या मनाला क्षणमात्रहि स्पर्श करीत नव्हती; परंतु हें सुख किती दिवस टिकणार ! एक दिवस वरिष्ठ अधिकाऱ्यानें रंगोपंतांचा कांहींएक अपराध नसतां त्यांनां दिलेला ठपका रंगोपंतांच्या बाणेदार स्वभावास सहन न होऊन त्यांनीं नोकरीचा एकदम राजीनामा दिला व ते घरीं बसले. रंगोपंतांनां बेताचाच पगार मिळत होता, तेव्हां त्यांच्यापाशीं असा केवढा मोठा संचय असणार ? सत्यभामाबाईंचे दोन दागिने तरी किती दिवस पुरणार ? पूर्वीचें कर्ज नसल्यामुळें यांच्यापाशीं जो थोडासा संचय झाला होता तो प्रथम खर्चण्यास रंगोपंतांनीं सुरुवात केली. नंतर त्यांनीं सत्यभामाबाईंच्या दागिन्यांस हात घातला. लवकरच कोठें तरी खाजगी नोकरी धरण्याच्या विचारांत रंगोपंत होते, तों इतक्यांत त्यांनां विषमानें गांठलें व त्यांतच त्यांचा अंत झाला.

आतां मात्र सत्यभामाबाईंचें धैर्य खचण्याची वेळ आली. तथापि शेजारच्या आत्याबाईंच्या उपदेशामुळें त्यांनीं न डगमगतां वैधव्यावद्दलचें प्रायश्चित्त मोठ्या धैर्यानें घेतलें. आतां त्यांजपाशीं रोख रुपये फारसे राहिले नव्हते. म्हणून त्यांनीं जवळचें खिद्रूकमिद्रूक घेऊन आपल्या सुशीलेसह नासिकक्षेत्रीं पंचवटींत

कामिनीया हें तेल उत्तम वनस्पतीपासून अगदीं नवीन शोधांनीं बनविलेलें आहे.
हें तेल केंस गळून पडणाऱ्या जंतूंचा नाश करतें.

रहात असलेले जे त्यांचे मावसदीर गोविंदभट, त्यांच्या आश्रयानें रहाण्याचा विचार केला. सत्यभामाबाईच्या स्वभावाबद्दल रंगोपंतांकडून त्यांनीं कांहीं ऐकलें होतें. तरीपण आतां आपली ही परीक्षेचीच वेळ आहे, तेव्हां धीरानें तींतून पार पडण्याचा त्यांनीं निश्चय केला. सुशीला या वेळीं अकरा महिन्यांची झाली होती. तिच्यावर आत्याबाईचा फार जीव होता, ह्मणून त्यांनीं जातांना सुशीलेला दुधाला ह्मणून तीन रुपये दिले होते, ते घेऊन त्या नाशिकास जावयास निघाल्या. गोविंदभटजींची पत्नी यशोदाबाई लोभी व कजाग होती, ह्मणून तिच्या घरीं पाहुणे वगैरे कोणी सहसा जाण्यास धजत नसत. यशोदाबाई आपल्या घरीं अशा मनुष्यांनां थाराहि द्यावयाच्या नाहींत; परंतु आज काय सत्यभामाबाईचें नशीब ह्मणा, किंवा कांहीं ह्मणा, यशोदाबाईनीं सत्यभामाबाईस ठेवून तर घेतलें. सत्यभामाबाईनां यशोदाबाईच्या घरीं येऊन आठ दिवस झाले, तरी यशोदाबाईनीं सत्यभामाबाईची विदागी कशी केली नाहीं, यावद्दल शेजारच्या स्त्रिया कुजबुजूं लागल्या. वाराणशीबाई ह्मणून एक यशोदाबाईच्या शेजारीं कोणी स्त्री रहात असे. ही फार धोरणी होती. तिनें यशोदाबाईचा स्वभाव चांगला ओळखला होता. सत्यभामाबाईनां ठेवून घेण्याचें कारण तिनें ताडलें. सध्यां यशोदाबाईस सत्यभामाबाईसारख्या मनुष्याची गरज होती. शिवाय, सुशीला मुलगी फार सुरेख होती. पुढेंमागें तिच्या सौंदर्याचा उपयोग करून घेतां येईल, असा विचार करून यशोदाबाईनीं सत्यभामाबाईस व सुशीलेस ठेवून घेतलें असलें पाहिजे.

आषाढाच्या महिन्यांत नाशिकास कोंलच्याचा प्रलय झाला. त्यांत सत्यभामाबाई सांपडून आपल्या प्रिय सुशीलेस या अफाट जगांत एकटी सोडून चालत्या झाल्या. सुशीलेला सत्यभामाबाईशिवाय दुसऱ्या कोणाहि मनुष्याची संवय नसल्यामुळें नेहमीं ती आपल्या आईच्या मागें मागें असे आणि जर यशोदाबाई तिला शिक्षा लावूं लागल्या, तर सत्यभामाबाई दूर कोठेंतरी निघून जात, व त्यांच्या नेत्रांतून अश्रु वाहण्यास सुरवात होई. परंतु आतां आपल्या मुलीस यशोदाबाई कशा वागवितात, हें पहाण्यास त्या कोठें राहिल्या होत्या! गोविंदभटजींचा सर्व विश्वास त्यांच्या मनीवर, तेव्हां त्यांनां चकारशब्दहि काढतां येत नव्हता.

ही हकीगत जेव्हां गंगाबाईच्या कानीं गेली, तेव्हां तर त्यांचें मन अगदीं कळवळलें. कांहींहि होवो, सुशीलेला आपण सोडविल्याशिवाय रहावयाचें नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला. सुशीलेला मोठी वाढवून तिचे पैसे घेण्याचा विचार यशोदाबाईनीं केला आहे, ही गोष्ट जनूकाकांस अंतस्थ रीतीनें समजली. यशोदाबाईनां खूप केल्याशिवाय सुशीला आपल्या हातीं लागणार नाहीं, असें जनूकाकांनीं गंगाबाईस सांगितलें. गंगाबाईनां दोनचारशें रुपये खर्च करणें मुळींच जीवावर येण्यासारखें नव्हतें. जेव्हां जनूकाकांनीं समक्ष यशोदाबाईजवळ वरील गोष्टीसंबंधानें बोलणें काढलें, तेव्हां प्रथम यशोदाबाई जरा संतापल्या व ह्मणाल्या "मीं जी सुशीलेला तळहाताच्या फोडाप्रमाणें वाढविली आहे, ती लोकांनां देण्याकरतां का? आज तिच्याकरतां थोडा का खर्च करावा लागला आहे आह्मांला!"

परंतु जेव्हां "खर्च भरून मिळून आणखीहि कांहीं वर मिळाल्यास तुह्मी देण्यास तयार आहां का?" असा प्रश्न जनूकाकांनीं त्यांनां केला, तेव्हां यशोदाबाईच्या तोंडाला पाणी सुटलें, व लोकांत पैसे घेतल्यावद्दल प्रसिद्धि न होतां आपणास घरांतील सुशीलेची ब्याद टाळतां येते, असें जेव्हां त्यांनीं पाहिलें, तेव्हां सुशीलेला गंगाबाईच्या स्वाधीन करण्याचें यशोदाबाईनीं कबूल केलें. गंगाबाईनीं यशोदाबाईस शुक्रवारीं सायंकाळीं बोलावून आणून त्यांची शरयूकरवीं खणानारळानें ओटी भरविली व त्यांच्या मुलीला तीनशें रुपयांचें बाळलेणें दिलें. यशोदाबाईनां मनांतून फार आनंद झाला होता; परंतु त्यांनां या वेळीं मातृवात्सल्याचें अगदीं भरतें आलें. त्यांनीं सुशीलेच्या डोक्यावरून हात फिरविला व सायंकाळ झाला ह्मणून त्या लवकर निघून गेल्या.

[४]

यशोदाबाई जातांच सुशीलेनें गंगाबाईच्या कमरेस घट्ट मिठी मारली व ह्मणूं लागली "आतां पुण्यास कधीं जायचं?"

त्यावर गंगाबाईनीं तिला जवळ बसवून घेतली व तिचे डोळे पुसले. त्या ह्मणाल्या "बाळ, रडूं नकोस. उद्यां जायचं बरं!"

दिलबहार, कामिनीया, कामिनीयावोके, स्प्रिंग जुवेल, गुलशन. मिळण्याचें ठिकाण
अंग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

असतां त्या तिला म्हणाल्या " शरयू, सुशीलेला जर मीं आणली तर तूं तिच्याशीं भांडणार नाहींसना ? "

त्यावर शरयूनें उत्तर केलें " आई मी कधीं नाहीं भांडणार ! आम्ही दोघी एकत्र खेळूं, निजूं व शिकूं. आई, तूं आणच तिला. कधीं आणशील सांग ?"

असा प्रश्न शरयूनें विचारला, तेव्हां गंगाबाईंचा डळमळणारा निश्चय कायम झाला. यशोदाबाईंचा स्वभाव कठिण आहे. आयती घरांत कामाला उपयोगी पडणारी मुलगी त्या आपल्या स्वाधीन कशी करतील? इतकी गरीबी असतांहि तिला बाळगण्याचा त्यांचा हेतु काय असावा, वगैरे विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले; परंतु प्रयत्न करून पहाण्याचा त्यांनीं निश्चय केला, व दुसरे दिवशीं सुशीलेसंबंधानें तिच्या काकाकडे युक्तीनें गोष्ट काढण्यास जनूकाकांस सांगितलें. जनूकाकांची एक मुलगी अगदीं रूपानें हुबेहूब सुशीलेसारखीच होती. सुशीलेकडे पाहून वारंवार त्यांना आपल्या मुलीची आठवण होई. जेव्हां गंगाबाईंनीं आवडती कामगिरी जनूकाकांवर सोंपविली, तेव्हां त्यांनां फारच आनंद झाल्यासारखें दिसलें.

त्यांनीं लगेच ही गोष्ट गोविंदभटांपाशीं काढण्याचा विचार केला. गोविंदभटजी अगदीं साधा व सरळ मनुष्य असल्यामुळें त्यांनीं सुशीलेच्या मातापितरांची सर्व हकीकत थोडक्यांत त्यांनां सांगितली. जनूकाकांच्या ऐकण्यांत जी हकीगत आली होती तिच्यांत व गोविंदभटजींनीं सांगितलेल्या हकीगतींत फारसा फरक पडला नाहीं.

सुशीलेच्या मातापितरांची माहिती करून घेण्याची उत्कंठा वाचकांसहि लागली असेल, म्हणून ती येथें थोडक्यांत देतें.

[३]

जी. आय्. पी. लाइनीवरील एका लहानशा स्टेशनावर रंगोपंत नांवाचे कोणी तरुण गृहस्थ तारऑफिसमध्यें नुकतेच नोकरी करूं लागले होते. त्यांनां पगार बेताचाच मिळत होता खरा, तरी रंगोपंत व सत्यभामाबाई यांनां संसाराची नवीन उमेद असल्यामुळें उभयतांनां गरीबी मुळींच भासत नव्हती. उभयतांचे हे दिवस परस्परांच्या सहवासांत आनंदांत गेले. या दिवसांत सत्यभामाबाईंनीं भावी संसारसौख्याचे कल्पनाप्रासाद किती तरी बांधले असतील! ज्या दिवशीं सर्व इस्टेटीचें वाटोळें करून आपणास देशोधडीस लावलें, त्याला आपली स्थिति सुधारल्याशिवाय तोंड दाखवावयाचें नाहीं, असा दोघांचाहि दृढ संकल्प झाला होता. आपला नवरा हुषार असल्यावर व आपण संसार काटकसरीनें केल्यास आपणांस भिण्याचें काय कारण ? आपणांस चांगले दिवस खास आल्यावांचून रहाणार नाहींत, अशी सत्यभामाबाईंनां फार आशा वाटे. पहिलें पुत्ररत्न झाल्यानें आनंद होत नाहीं, अशा स्त्रिया निदान आपल्या समाजांत तरी विरळाच सांपडतील; परंतु सत्यभामाबाईंची आवड या नियमाच्या उलट होती. कर्मधर्मसंयोगानें त्यांची इच्छा परिपूर्ण झाली, व मोठ्या आवडीनें त्यांनीं आपल्या कन्येचें नांव सुशीला ठेविलें. रंगोपंतहि मोठ्या कौतुकानें आपल्या आवडत्या कन्यारत्नास 'सुशीला' या नांवानें संबोधीत असत. सध्यां रंगोपंत व सत्यभामाबाई संसारसमुद्रांत दंग होतीं. जगांतील दुःखाची कल्पना त्यांच्या मनाला क्षणमात्रहि स्पर्श करीत नव्हती; परंतु हें सुख किती दिवस टिकणार ! एक दिवस वरिष्ठ अधिकाऱ्यानें रंगोपंतांचा कांहींएक अपराध नसतां त्यांनां दिलेला ठपका रंगोपंतांच्या बाणेदार स्वभावास सहन न होऊन त्यांनीं नोकरीचा एकदम राजीनामा दिला व ते घरीं बसले. रंगोपंतांनां बेताचाच पगार मिळत होता, तेव्हां त्यांच्यापाशीं असा केवढा मोठा संचय असणार ? सत्यभामाबाईंचे दोन दागिने तरी किती दिवस पुरणार ? पूर्वीचें कर्ज नसल्यामुळें यांच्यापाशीं जो थोडासा संचय झाला होता तो प्रथम खर्चण्यास रंगोपंतांनीं सुरुवात केली. नंतर त्यांनीं सत्यभामाबाईंच्या दागिन्यांस हात घातला. लवकरच कोठें तरी खाजगी नोकरी धरण्याच्या विचारांत रंगोपंत होते, तों इतक्यांत त्यांनां विषमानें गांठलें व त्यांतच त्यांचा अंत झाला.

आतां मात्र सत्यभामाबाईंचें धैर्य खचण्याची वेळ आली. तथापि शेजारच्या आत्याबाईंच्या उपदेशामुळें त्यांनीं न डगमगतां वैधव्याबद्दलचें प्रायश्चित्त मोठ्या धैर्यानें घेतलें. आतां त्यांजपाशीं रोख रुपये फारसे राहिले नव्हते. म्हणून त्यांनीं जवळचें खिडकमिडक घेऊन आपल्या सुशीलेसह नासिकक्षेत्रीं पंचवटींत

कामिनीया हें तेल उत्तम वनस्पतीपासून अगदीं नवीन शोधांनीं बनविलेलें आहे.
हें तेल केंस गळून पडणाऱ्या जंतूंचा नाश करतें.

रहात असलेले जे त्यांचे मावसदीर गोविंदभट, त्यांच्या आश्रयानें रहाण्याचा विचार केला. सत्यभामाबाईच्या स्वभावाबद्दल रंगोपंतांकडून त्यांनीं कांहीं ऐकलें होतें. तरीपण आतां आपली ही परीक्षेचीच वेळ आहे, तेव्हां धीरानें तींतून पार पडण्याचा त्यांनीं निश्चय केला. सुशीला या वेळीं अकरा महिन्यांची झाली होती. तिच्यावर आत्याबाईचा फार जीव होता, म्हणून त्यांनीं जातांना सुशीलेला दुधाला म्हणून तीन रुपये दिले होते, ते घेऊन त्या नाशिकास जावयास निघाल्या. गोविंदभटजींची पत्नी यशोदाबाई लोभी व कजाग होती, म्हणून तिच्या घरीं पाहुणे वगैरे कोणी सहसा जाण्यास धजत नसत. यशोदाबाई आपल्या घरीं अशा मनुष्यांनां थाराहि यावयाच्या नाहींत; परंतु आज काय सत्यभामाबाईचें नशीब म्हणा, किंवा कांहीं म्हणा, यशोदाबाईनीं सत्यभामाबाईस ठेवून तर घेतलें. सत्यभामाबाईनां यशोदाबाईच्या घरीं येऊन आठ दिवस झाले, तरी यशोदाबाईनीं सत्यभामाबाईची विदागी कशी केली नाहीं, यावद्दल शेजारच्या स्त्रिया कुजबुजूं लागल्या. वाराणशीबाई म्हणून एक यशोदाबाईच्या शेजारीं कोणी स्त्री रहात असे. ही फार घोरणी होती. तिनें यशोदाबाईचा स्वभाव चांगला ओळखला होता. सत्यभामाबाईनां ठेवून घेण्याचें कारण तिनें ताडलें. सध्यां यशोदाबाईस सत्यभामाबाईसारख्या मनुष्याची गरज होती. शिवाय, सुशीला मुलगी फार सुरेख होती. पुढेमागें तिच्या सौंदर्याचा उपयोग करून घेतां येईल, असा विचार करून यशोदाबाईनीं सत्यभामाबाईस व सुशीलेस ठेवून घेतलें असलें पाहिजे.

आषाढाच्या महिन्यांत नाशिकास कॉलऱ्याचा प्रलय झाला. त्यांत सत्यभामाबाई सांपडून आपल्या प्रिय सुशीलेस या अफाट जगांत एकटी सोडून चालत्या झाल्या. सुशीलेला सत्यभामाबाईशिवाय दुसऱ्या कोणाहि मनुष्याची संवय नसल्यामुळें नेहमी ती आपल्या आईच्या मागें मागें असे आणि जर यशोदाबाई तिला शिक्षा लावूं लागल्या, तर सत्यभामाबाई दूर कोपऱ्यांतरी निघून जात, व त्यांच्या नेत्रांतून अश्रु वाहण्यास सुरवात होई. परंतु आतां आपल्या मुलीस यशोदाबाई कशा वागवितात, हें पहाण्यास त्या कोठें राहिल्या होत्या! गोविंदभटजींचा सर्व विश्वास त्यांच्या मनीवर, तेव्हां त्यांनां चकारशब्दहि काढतां येत नव्हता.

ही हकीगत जेव्हां गंगाबाईच्या कानीं गेली, तेव्हां तर त्यांचें मन अगदीं कळवळलें. कांहींहि होवो, सुशीलेला आपण सोडविल्याशिवाय रहावयाचें नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला. सुशीलेला मोठी वाटवून तिचे पैसे घेण्याचा विचार यशोदाबाईनीं केला आहे, ही गोष्ट जनूकाकांस अंतस्थ रीतीनें समजली. यशोदाबाईनां खूप केल्याशिवाय सुशीला आपल्या हातीं लागणार नाहीं, असें जनूकाकांनीं गंगाबाईस सांगितलें. गंगाबाईनां दोनचारशें रुपये खर्च करणें मुळींच जीवावर येण्यासारखें नव्हतें. जेव्हां जनूकाकांनीं समक्ष यशोदाबाईजवळ वरील गोष्टीसंबंधानें बोलणें काढलें, तेव्हां प्रथम यशोदाबाई जरा संतापल्या व म्हणाल्या "मीं जी सुशीलेला तळहाताच्या फोडाप्रमाणें वाढविली आहे, ती लोकांनां देण्याकरतां का? आज तिच्याकरतां थोडा का खर्च करावा लागला आहे आम्हांला!"

परंतु जेव्हां "खर्च भरून मिळून आणखीहि कांहीं वर मिळाल्यास तुम्ही देण्यास तयार आहां का!" असा प्रश्न जनूकाकांनीं त्यांनां केला, तेव्हां यशोदाबाईच्या तोंडाला पाणी सुटलें, व लोकांत पैसे घेतल्यावद्दल प्रसिद्धि न होतां आपणास घरांतील सुशीलेची व्याद टाळतां येते, असें जेव्हां त्यांनीं पाहिलें, तेव्हां सुशीलेला गंगाबाईच्या स्वाधीन करण्याचें यशोदाबाईनीं कबूल केलें. गंगाबाईनीं यशोदाबाईस शुक्रवारी सायंकाळीं बोलावून आणून त्यांची शरयूकरवीं खणानारळानें ओटी भरविली व त्यांच्या मुलीला तीनशें रुपयांचें वाळलेणें दिलें. यशोदाबाईनां मनांतून फार आनंद झाला होता; परंतु त्यांनां या वेळीं मातृवात्सल्याचें अगदीं भरतें आलें. त्यांनीं सुशीलेच्या डोक्यावरून हात फिरविला व सायंकाळ झाला म्हणून त्या लवकर निघून गेल्या.

[४]

यशोदाबाई जातांच सुशीलेनें गंगाबाईच्या कमरेस घट्ट मिठी मारली व म्हणूं लागली "आतां पुण्यास कधीं जायचं?"

त्यावर गंगाबाईनीं तिला जवळ बसवून घेतलें व तिचे डोळे पुसले. त्या म्हणाल्या "वाळ, रडूं नकोस. उद्यां जायचं घरं!"

दिलबहार, कामिनीया, कामिनीयायोके, स्प्रिंग जुवेल, गुलशन. मिळण्याचें ठिकाण
अंग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

ला ला ठिला म्हणाला " बापू, गुरांलिला जर आणलं तर तू ठिच्याशी भांडणार नाहीसना ? " त्यावर बापूनें उत्तर केलें " आई मी कधी नाही भांडणार ! आम्ही दोघी एकत्र खेळूं, जेवूं व निजूं. तूं आतच ठिला. कधी आणतील सांग ?"

असा प्रश्न बापूनें विचारला, तेव्हां गंगाबाईला ढसढसून रडण्याचा विषय प्राप्त झाला. यशोदाबाईचा स्वभाव कठिण आहे. आपली परांत कामाला उपयोगी अशी गुरंही ती आपल्या स्वाधीन कधी करतील ! तरी गरीबी अवस्थेंत ठिला बालगन्धर्वाला द्यावा तर काय अडचण, असे विचार तीच्या मनांत घोळूं लागले. संसाराचे कल्पनाप्रासाद रचले तरी बापटे असतांना. असा विचार मनांत येतांच डोळ्यांतून घळघळां अश्रु वाहूं लागले, बापटे असतांना देवीपदांत असले, लाला आपली स्थिति सुधारल्या. शिवाय तोंड दाखवण्याचे नाही, असा दोघांचाही एक संकल्प झाला होता. आपला नवरा दुसरं अशा. वर व आपण संसार फाटक्यातिनें थेट्याचा आपल्यांत शिल्याचें काय कारण ! आपल्यांत चांगले दिवस राहत आल्यावांचून रहाणार नाहींत, अशी सतत्यानाबाईनें फार आशा वाटे. पहिले पुत्ररत्न झाल्याचें आनंद होत नाहीं, असा ठिचा निश्चय आपल्या तरी विरळाच सांपडतील;

तिचा आनंद दुणावे. पुस्तक मिटून एकाद्या वेळेस शरयू कांहीं विचार करीत बसलेली तिनें पाहिली म्हणजे "शनिवारची वाट पहातेस होय!" म्हणून तिनें थट्टेनें म्हणावें. सुशीला घरोघर असल्याशिवाय शरयूनें कधींहि दत्तोपंतांशी गोष्टी बोलत बसूं नये, किंवा फिरावयास जाण्याचें कबूल करूं नये. दत्तोपंतांनींहि आल्याबरोबर प्रथम सुशीलेस हांक मारावी, व तिच्याच मार्फत शरयूस निरोप पाठवावा. तिघें एकत्र जमल्यावर मनमुराद त्यांनीं गप्पा सांगाव्या. शरयू फार भिडस्त होती, तेव्हां नेहमीं आरंभ सुशीलेनेंच करावा. कधीं कधीं शरयूस बोलण्यास लावून सुशीलेनें मध्येंच तेथून निघून जावें; परंतु तसें न करण्याबद्दल शरयूनें सुशीलेस कित्येक वेळां तरी निक्षून सांगितले होतें.

[६]

सुमारें सातआठ महिने असे आनंदांत गेल्यावर दत्तोपंतांच्या मनोविकारांत कांहींसा फरक पडत चालल्याचें सुशीलेच्या लक्ष्यांत आलें. ती फार चाणाक्ष होती. आपणावर दत्तोपंतांचें प्रेम बसत चाललें आहे, ही गोष्ट तिच्या लक्ष्यांत येऊन चुकल्या दिवसापासून तिच्या चेहऱ्यावर काळजीची छटा मारूं लागली. सुशीलेची बुद्धिमत्ता, चाणाक्षपणा, मनाचा धीरपणा व इतर अशाच गुणांनीं दत्तोपंतांचें मन आकर्षून घेतलें. दत्तोपंत कांहीं कमी धोरणी नव्हते. त्यांनीं शरयूवरचें प्रेम व्यक्त करण्याचे पुष्कळ मार्ग शोधून काढावे. सुशीला निघून गेल्यावर त्यांनीं मुद्दाम शरयूपाशीं बोलत बसावें, परंतु त्यांचें सर्व चित्त सुशीलेकडे असे. "आपला दादूनिश्चयच गुंतला शरयूपाशी झाला आहे. तो मोडल्यास शरयूनें त्या दुसऱ्या कोणाशी तरी ठरल्याशिवाय रहावयाचें नाहीं;" असें त्यांना वाटे. परंतु तिच्या कोमल मनाला केवढा धक्का बसेल, ही कल्पना त्यांच्या मनांत आल्यावर त्यांचें मन अगदीं गोंधळून जाई. "आपल्यावर अनुदारपणाचा आरोप येईल-छे! अशी कल्पनासुद्धां मनांत आणणें माझ्यासारख्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या मनुष्याला शोभत नाहीं! घरीं, शरयूशीं संसार करावा, तर तेंहि आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध होणार आहे-"

असा प्रकारच्या विचारांनीं त्यांच्या मनांत अगदीं काहूर करून सोडलें. इतकी नाजूक गोष्ट ज्या मित्रापाशीं सांगतां येईल, असा त्यांना एकहि मित्र नव्हता. शेवटीं एके दिवशीं गंगाबाईनां ताप आलेला असतां शरयू आपल्या मातोश्रींची शुश्रूषा करीत बसली व सुशीला दत्तोपंतांनां कांहीं निरोप सांगण्यास आली. ही संधि साधून दत्तोपंतांनीं उघडपणें आपल्या मनांतील विचार सुशीलेला सांगितले.

सुशीलेला दत्तोपंत आवडत असत, म्हणून तिनें एकदम त्यांचा निषेध केला नाहीं. तिनें सरळ व मधुर भाषणानें दत्तोपंतांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. नंतर तीं दोघें गंगाबाई निजल्या होत्या त्या ठिकाणीं गेलीं. नेहमीं गंगाबाईनां किंवा घरांतील दुसऱ्या कोणत्या मनुष्याला कांहीं दुखणें आल्यास दुखणेकऱ्याची शुश्रूषा करण्याचें काम सुशीलेनें स्वतः करावें. तिच्यामुळें सर्व घर अगदीं गजबजलेलें आहे असें वाटे. गंगाबाईनां तर सुशीलेशिवाय दुसऱ्या कोणाकडूनहि शुश्रूषा करून घेणें आवडत नसे. जनूकाकांनां तर आपली कन्याच पुनः जन्म घेऊन आली की काय, असा भास होई!

[७]

अलीकडे दत्तोपंत कांहीं काळजींत असतात, ही गोष्ट शरयूच्या लक्षांत येऊन चुकली होती. ही गोष्ट तिनें सुशीलेपाशीं काढली तेव्हां परीक्षेची काळजी त्यांनां लागली असेल, असें सांगून सुशीलेनें तिची समजूत केली होती. बिचारी सुशीला! आपली या घरांतून आतां सुटका होईल तर बरें, असें तिला वाटूं लागलें. आपल्या उपकर्त्रींच्या प्रेमांत आपण मीठ कालवावयाचें नाहीं, असा तिनें निश्चय केला होता. यासंबंधानें तिचा व दत्तोपंतांचा गुप्त पत्रव्यवहार चालू होता. दत्तोपंतांनीं सुशीलेची पुष्कळ प्रकारें समजूत घालून पाहिली, परंतु जेव्हां सुशीलेचें मन वळत नाहीं, असें त्यांनां आढळून आलें, तेव्हां सुशीलेच्या निश्चयाची त्यांना धन्यता वाटूं लागली. "स्त्री असो वा पुरुष असो, श्रीमंत असो अथवा गरीब असो, सुशिक्षित असो किंवा अशिक्षित असो, जगांतील बहुतेक सर्व व्यक्तींची दृष्टि ऐहिक सुखाच्या आशेनें आकुंचित झालेली असते. तेव्हां सुशीलेसारख्या स्त्रीरत्नांची किंमत करणारे पुरुष किती निघणार! घरीं, कदाचित् कोणी असें

झणेल, कीं, तिच्यावरील प्रेमानें माझी दृष्टि मंद झाल्यामुळें मला तिच्यांतील दोष दिसत नाहींत; परंतु अशी गोष्ट मुळींच नाहीं. तिच्यांत जसे दोष आहेत तसे कांहीं माझ्या स्वभावांत नसतील झणून कशावरून ? मनुष्य परिपूर्ण असेल तर उन्नतीला जागा कोठें रहाते ? विवाहाचा एक मुख्य हेतु परस्परांची उन्नति करणें नव्हे काय ? प्रेमबंधानें बद्ध झालेल्या स्त्रीपुरुषांचे दोष त्यांच्या संसारसुखाचे आड कसे येऊं शकतील ? ज्या वेळीं विवाहित स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणांचें पूर्ण ऐक्य होतें, त्या वेळीं स्त्रीचे दोष ते आपलेच असें पुरुषास वाटणार; व पुरुषाचे ते आपलेच असें स्त्रीस वाटणार. तेव्हां परस्परांच्या सुखाच्या आड ते कसे येणार ?" अशा प्रकारचे विचार दत्तोपंतांच्या मनांत घोळूं लागले. आपणापेक्षांहि उत्तम पति शरयूस पाहून देण्याचाहि विचार त्यांनीं सुशीलेपुढें मांडला; परंतु आपल्या उपकर्त्यांच्या ठायीं वसत असलेल्या आपल्या कृतज्ञतावृद्धीला आपल्या दत्तोपंतांवरील प्रेमाची आहुती देण्याचा तिनें आपला निश्चय दत्तोपंतांनां कळविला, व दत्तोपंतांची निराशा केल्याबद्दल तिनें त्यांची क्षमाहि मागितली. "माझ्यावर जर तुमचें खरें प्रेम असेल तर त्या प्रेमाकरतांच शरयूवरोबर संसार सुखानें करावा, व तुमच्या माझ्यावरील प्रेमाचा मोबदला मी आजन्म अविवाहित राहून देण्याचें अभिवचन देतें." असें तिनें दत्तोपंतांनां कळविलें. आपली न्यायबुद्धि सुशीलेनें जागृत केल्याबद्दल दत्तोपंतांनीं सुशीलेचे उपकार मानले व केव्हांहि कोणत्याहि प्रकारची अडचण पडल्यास आपली मदत सुशीलेनें मागावी, अशी दत्तोपंतांनीं तिला विनंति केली. सुशीलेनें ही शेवटली विनंति मोठ्या संतोषानें मान्य केली.

अलीकडे सुशीलेच्या चित्तवृत्तींत कांहीं तरी फरक पडला आहे, ही गोष्ट जनूकाकांच्या लक्षांत आली होती. कारण, तिचा वेळ अलीकडे बराचसा एकांतांत जाऊं लागला होता. जनूकाकांनीं स्वतः न विचारतां शरयूकडून तिच्या दुःखाचें कारण विचारलें. तेव्हां आपणास कलकत्त्याच्या वेथ्यून कॉलेजांत जाबयास मिळाल्यास आनंद होईल, असें तिनें शरयूपाशीं स्पष्ट सांगि तलें; परंतु आपल्या जाण्यानें गंगाबाईंनां दुःख होईल तें कसें टाळावें, हें तिला समजेना. सुशीलेसारख्या स्थितींतील मुलीस शिक्षणाची आवश्यकता किती आहे, ही गोष्ट दत्तोपंतांनीं गंगाबाईंनां व जनूकाकांनां समजावून, सांगितली. जाण्याचें नांव काढतांच शरयूस अत्यंत वाईट वाटलें; परंतु तिची समजूत दत्तोपंतांनीं केली. गंगाबाईंनीं सुशीलेस शिक्षणाचा खर्च पुरविण्याचें आश्वासन दिलें; परंतु शरयूचा विवाह होण्याच्या अगोदर न जाण्याबद्दल आग्रह धरला व या गोष्टींत सुशीलेनेंहि त्यांचें मन मोडलें नाहीं. सुशीलेचा शिक्षणक्रम पुरा होतांच स्त्रीशिक्षणखात्यांतच तिनें नोकरी पतकरली, व त्याच देशांत स्त्रीशिक्षणाचा प्रसार करीत राहिली.

एक टन कोळशापासून दहा हजार घनफूट ग्यास तयार होतो.

एक टन कोळसा जाळला तर त्यामुळें तीन लक्ष घनफूट हवा श्वासोच्छ्वासाला निरुपयोगी होते.

जगांतील सोन्याच्या नाण्यांचें वजन नऊशें टनांपेक्षांहि कमी आहे.

पृथ्वीवरील कोणत्याहि देशापेक्षां नॉर्वेमध्यें लोकांचें आयुष्य दीर्घ असतें, असें आटकून आलें आहे.

दरसाल रेल्वेकंपन्या वीस लक्ष टन पोलादाचा उपयोग करतात. सर्व जगांत दरवर्षी याच्या दुप्पट पोलाद तयार होतें !

सर्व जगांत अत्यंत लहान अशा पूर्ण वाढीच्या पोपटाची लांबी सारी अडीच इंच आहे. हा पोपट न्यूगिनिया देशांतून ब्रिटिश म्यूझिअममध्यें आणलेला आहे.

चीन देशांतील शाळांत मुलें पंतोजीकडे पाठ करून बसतात !

मुलांचें पोट मोठें होणें, टाळ होणें, नेहमीं शिरपिर करणें, दांत चावणें वगैरे नाहींसें करण्यास बालजीवनामृतासारखा दुसरा उपाय नाहीं !

मी तुझी मावशी तुला न्यावया आलें !

[श्रीमती सौ. लक्ष्मीबाई टिळक, अहमदनगर.]

ही भरली घागर तुझ्या शिरावर बाळे !
तूं उभी; लागले कुठें कुठें तव डोळे ?

हीं गाडी वाजे खडखड खडखड दूर,
हें इकडे उडतें धडधड तवही ऊर !
तूं प्रसन्न आतां, क्षणें खिन्न तूं होशी,
मेघांत गवसला चंद्रच दुसरा दिसशी !
तूं अल्लड, साधी पोर ! लाडके,
गुरुजनें कल्पिली थोर ! लाडके,
तुज कशास हा संसार ? लाडके,
हा दोन दिवस तरि टळो, क्षणोनी झालें
मन अधीर, गेलें माहेरा तव गेलें !

माहेरीं आपण भाउबिजेला जाऊं,
येतील न्यावया बाबा अथवा भाऊ,
हें प्रौढपणाचें ओझें फेंकुन देऊं !
सुचतील तेवढे खेळ खेळुनी घेऊं !
ही मनांत तुझिया बाई ! वासना,
मीं ओळखिलें का नाहीं ? सांग ना !
भर वघूं पुन्हां अश्रूंहीं । लोचना
ये हांसत आतां आलिंगीं मज बाळे !
मी तुझी मावशी तुला न्यावया आलें !

चल भाऊ रे खेळायाला !

[कुमारी द्वारकाबाई दिवगांवकर, पुणें.]

[चाल—चंद्रकांत राजाची कन्या०]

चल भाऊ रे ! खेळायाला; कुठें तरी जावें !
पूर्वेसंगें गुलाल दिनमणि तो खेळत आहे !
आपण त्यांच्यासमान होऊं, मुदें खेळुं खेळ,
चल लवकर तर माझ्यासंगें, दवडुं नको वेळ !
नदीसैकतीं घरें बाळुचीं आपण बांधूं या ;
आंत पोखरुनि सुयार, किले, पूलहि बनवूं या !
नदीजलासह वायुहि खेळे लहरी बहु येती
आनंदाच्या; हकूच हंसते, खुलते सरिता ती.

संध्याकिरणें मित्राचीं तरुवनपत्रीं वसती,
मारुत मोदें त्यांच्यासंगें मधुगायन करिती !
तरुतलिं खुदकन्हंसतहंसत तीं किरणें वागडती
चल भाऊ! चल आपण त्यांची क्रीडा पाहूं ती.

सागरगोटे–झिम्मा–फुगडी कांहिं नको मजला;
आट्यापाट्या–खोखो यांचा वीट असो तुजला!
पूर्व पश्चिमा दोघी नारी खेळति चेंडुफळी;
दिला फेंकुनी पूर्वेनें वघ चेंडू या वेळीं!

सहज झेलुंनी त्यातें, प्राची खदखद हंसताहे!
त्या हास्याचा प्रवाह सगळ्या जगतावर वाहे!
आपणही चल ओघाला त्या आणूं या भरती
तरंगवूं विश्वाला भाऊ! हास्यलहरिवरती.

पृथ्वी अपुली रवीभोंवतीं गरगर नित्य फिरे–
लपंडाव खेळते मजेनें, वघती तें तारे!
चिंता लेश न सृष्टि सर्वदां खेळांमधिं दंग
सरित्तटाकीं वसुनि आपणहि होऊंया गुंग.

संसाराचा खेळ आपणां मुळीं नको भाऊ!
भटकत भटकत वघत सृष्टिला, कुठेंतरी जाऊं!
चल भाऊ! तर मजसंगें रे मजा पाहण्याला!
सर्वांचा प्रिय दिनमणि हा वघ जातो अस्ताला!

भाऊबीजेची ओवाळणी.

[श्रीमती सा. 'लक्ष्मीतनया.' सांगली.]

भाऊबीज असे दिन प्रमुख हा दीपावलीचा पहा,
नेती बंधु दुरी तरी भगिनिनां अत्यादरानें गृहा;
कोणी स्वर्णनगां, अमूल्य वसना, मुक्तावली, दे धन,
भ्राता निर्धनहि स्वसा परि वहू ऐकून तोषे स्वन.

बसाहें सण साजरा करिति ते नानापरी खेळुनी,
बाळा बालक योषिता युवकही मोठेपणा टाकुनी;
मार्गी उज्ज्वल रम्य शुभ्र विलसे पाहून दीपावलि,
हृत्कांतीं जणुं तारकाततिगमे ही मन्मना शोभली!

देई साक्षचि सेवकासम अहां विद्युल्लता येउनी,
होई आवड पूर्ण दिव्य क्षणुनी दीपास या लावुनी;
लोकीं गौरवलाघवा विसरुनी ती सर्वदा वर्तत,
थोरांचा सहज स्वभावगुण हा आहेच सर्वश्रुत!

नारी कुंकुम केशरी निजपथीं काढीत रंगावलि,
द्वारीं शोभत कर्दळी हरित तीं पर्णे वरी बांधिलीं;
जेथीं लग्न–गृहें सुशोभित वशीं हीं रम्य शृंगारलीं,
लोकीं शास्त्रयनुरूप सर्व सदनें त्या त्या परी आपलीं.

आहे इच्छित मागण्या उचित हा भाऊबिजेचा दिन,
सन्मान्य प्रिय देवरांपुस करी नम्र स्वसा प्रार्थनः-
"सद्विद्यामृतदान तें भगिनिनां द्यावें न संकोचुनी,
देतां शिक्षण हो अपाय हृदयीं शंका न ध्यावी मनीं.

"जाती भिन्न परी नरां शिकविते सन्मार्ग जी शारदा,
जन्मोनी ललनागणीं मग तया आणील कां दुर्मदा?
द्यावें उच्च, उदार शिक्षण तसें येईल हो सत्फल,'
आम्रा लावुनि का कधीं उगवतो तो रानटी बाभुळ?

"होती उद्धटही सुधारक अशा लोकप्रवादाप्रती
दावूनी निजवर्तना करिति त्या मिथ्या कुमारी किती;
आधीं कोमल पापभीरुहि असे आर्यस्त्रियांचें मन,
होई त्यांत सरस्वती सखि, घडे कां वाउगें वर्तन?

"विद्याभूषित होउनी उपकृती दीनां अनाथांवरी
देहा कष्टवुनी स्त्रिया करिति हो इंग्लंडदेशांतरीं;
लक्ष्मीवंत तरी गमे नच तयां न्यूनत्व त्याचें कधीं,
ज्ञानानेंच अशी पवित्र उपजे सत्प्रेरणा ती हृदीं.

"संपादून सुशिक्षणा मिळविती पूर्वी स्त्रिया मान्यता,
शास्त्रांतीहि किती प्रवीण करिती भूपाळ ते योषिता;
मध्यें ये युवनीप्रती अवनती, अज्ञानपंकांतरीं
नारीवृंद बुडे, तया सुधजनीं द्यावें प्रमोदें धरी.

"प्रेमाचे नव दीप ते उजळिले सद्भावपात्रांतुनी,
श्रद्धा वात धरी समस्त सुजना स्नेहाक्षता लावुनी;
ओवाळी भगिनी तिला मुदभरें या हीच ओवाळणी,
विद्यामौक्तिक ओवुनी निजकरें विश्वासरूपी गुणीं."

आमच्या स्त्रियांचा पेहराव.

[श्रीमती सौ. सीताबाई सामंत, पणजी.]

क्षेत्र व भाषा यांत एका बाबींत फार साम्य आहे. तें असें, कीं, परभाषेशीं परिचय झाल्यानें त्या भाषेंतील कांहीं शब्द स्वभाषेंत उतरतात, व परकीय वेषाशीं संबंध आल्यामुळें त्या वेषांतील कांहीं प्रकार आपल्या वेषांत उतरतात; आणि हे दोनहि परिणाम आपोआप घडून येतात, इतकेंच नव्हे, तर अपरिहार्य असतात. कोणीं कितीहि नियम केले, कितीहि बहिष्कार घातला, तरी ते आपला अंमल गाजविल्याशिवाय रहात नाहींत. हा नियम जसा अनादिकालापासून सर्व देशांत खरा ठरला आहे, तसा तो आजकाल आपल्या महाराष्ट्रांत खरा ठरत आहे. महाराष्ट्रभाषेचा आंग्लभाषेशीं परिचय घडतांच बरेच आंग्लशब्द महाराष्ट्रीय झाले. तसाच महाराष्ट्रवेषाचा आंग्ल वेषाशीं सहवास घडतांच बरेच आंग्ल वेषाचे प्रकार महाराष्ट्रीय झाले. असल्या महाराष्ट्रीय झालेल्या व होणाऱ्या पोषाखाच्या अल्प महत्त्वाच्या मानानें त्याचें अल्पसें विवेचन मी या अल्प लेखांत करीत आहें.

प्राचीन महाराष्ट्रीय वेष कसे काय होते, याबद्दल सविस्तर माहिती आपल्याला नाहीं; परंतु मुसलमानी रियासतींतले किंवा मराठी रियासतींतले पेहराव आम्ही अगदींच विसरलों, असें नाहीं. तरीहि आमच्या पुढील तिसऱ्या पिढींतील पणवेशास्त्री व प्रो. कुंजविहारी यांच्यामध्यें त्या पेहरावांचे आकार, व नांवें यांसंबंधानें यत्किंचित् मोठा कडाक्याचा वाद होणार, याबद्दल शंका नाहीं. कारण, ते पेहराव सराभर अदृश्य होऊं लागले आहेत, व त्यांच्याऐवजीं अर्धवट आंग्ल व अर्धवट महाराष्ट्रीय अशा प्रकारचे पोषाख प्रचारांत येत आहेत. थोड्या वर्षांमागें या पोषाखांतील फेरबदलांचा ओघ आंग्ल वळणावर जाण्याकडे फार होता; तो आतां तसा नाहीं. तर महाराष्ट्रीय व आंग्ल पोषाखांतून घेतलेल्या प्रकारांचें जें मिश्रण बनलेलें आहे, तेंच स्थायिक होण्याची चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

पोषाखासंबंधाच्या मुख्य बाबी तीन: **शरीरावरण, सभ्यता व शोभा.** यांपैकी पहिल्या बाबीसंबंधाचे नियम निसर्गमान व ऋतुमान या मानानें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या काळीं निरनिराळे असूं शकतील. बाकीच्या दोन्ही बाबी सुधारणेच्या पायऱ्यांवर अवलंबून आहेत. महाराष्ट्रीय अर्वाचीन पोषाखाचा विचारहि निसर्गमान व सुधारणामान यांच्या प्रमाणानेंच केला पाहिजे.

आह्मां स्त्रियांच्या पोषाखांतर, शरीरावरण, सभ्यता व शोभा या तिन्ही बाबी सारख्याच महत्त्वाच्या असल्यामुळें आमच्या महाराष्ट्रीय स्त्रियांच्या पोषाखासंबंधानेंच आज मी येथें विवेचन करीत आहें. सामान्यतः पहातां महाराष्ट्रीय पुरुषांच्या पोषाखांत जितके फेरबदल झाले आहेत, तितके स्त्रियांच्या पोषाखांत झालेले नाहींत. १८१२ सालच्या महाराष्ट्रीय स्त्रीच्या चित्राच्या शेजारीं जर १९१२ सालच्या अर्वाचीन महाराष्ट्रीय स्त्रीचें चित्र ठेविलें, तर कोणीहि परदेशस्थ प्रेक्षक तीं एकाच देशांतील स्त्रियांचीं चित्रें आहेत, असें झटल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु तेंच जर त्या कालच्या एकाद्या पुरुषाच्या चित्राच्या शेजारीं आजकालच्या एकाद्या सुधारलेल्या पोषाखांतल्या महाराष्ट्रीय पुरुषाचें चित्र ठेविलें, तर ते एकाच देशचे पुरुष, असें कोणी परकीय झणूं शकेल की काय, याबद्दल शंका वाटते. याचें कारण, स्त्रियांनीं आपल्या पोषाखांत फारच थोडें आंग्लस्त्रियांचें अनुकरण केलें आहे, हें होय. उदाहरणार्थ, आमची केशबंधनाची रचना पहा.

पूर्वी महाराष्ट्रीय स्त्रिया वेणी घालीत असत. आतां तिच्याऐवजीं बुचडा प्रचारांत आला आहे; परंतु आह्मीं आंग्ल पद्धतीचें केशबंधन सुरू केलेलें नाहीं. आमच्या वाङ्मयांत वेदांतशास्त्रासंबंधीं जेवढे ग्रंथ आहेत, त्यांच्यापेक्षां इंग्रजी भाषेंत केशबंधनासंबंधाचे अधिक ग्रंथ आहेत ! परंतु तितक्याहि ग्रंथांतून सुधा-

रमल किंवा ज्योतिःशास्त्राधारें प्रश्नफल ८४; जन्मपत्रिका ५ ते ५० रु; वर्षफल १ ते ५ रु. हीं सुलासेवार करून मिळतील. कृ. श्री. वाशीकर, सातारासिटी.

बंड्या विलायतेहून दोनचार वर्षांनीं परत आल्यावर त्याला पांचशें रुपये पगाराची सरकारी नोकरी मिळाली व आपल्या बायकोला घेऊन तो तावडतोब आपल्या नोकरीच्या गांवीं जाऊन जागेवर रुजू झाला. जातांना बंड्यानें आह्मां सर्वांनां आपणाकडे येऊन जावयास विनंति केली; व मुद्दाम मला एकीकडे भेटून तो आग्रहानें ह्मणाला "मामी! तुला तर माझ्याकडे कसेंहि करून जरूर आलेंच पाहिजे,—नाहीं तर मी येऊन तुला घेऊन जाईन!"

[२]

बंड्याला नोकरी लागल्यावर लवकरच आमच्या वन्सं त्याच्या गांवीं वारल्या. तोंपर्यंत निरनिराळ्या अडचणींमुळें मला त्याच्याकडे जाण्याची संधिच आली नाहीं. या प्रसंगीं बंडूच्या समाचाराकरितां मुद्दाम तिकडे जाऊन आल्यावर मला सांगावयाला झालें, कीं, "तुला बंडूनें कसेंहि करून चार दिवस तरी बोलावलें आहे."

मलाहि वाटलें, कीं, एकदां चार दिवस बंड्याकडे जाऊन यावें. माझी ही इच्छा कळवतांच तिकडे ह्मणावयाचें झालें, कीं, "तूं कांहीं तिकडे जाऊं नकोस बुवा! आपण पडलों खेडवळ माणसें—तुला कांहीं तेथें नीट वागतां येणार नाहीं." पण तिकडच्या प्रत्येक शब्दाबरोबर माझी जावयाची इच्छा अधिकाधिकच वाढूं लागली व मी बंड्याकडे जाण्याविषयीं तिकडच्यापाशीं हट्टच धरून बसलें,—तेव्हां एकदांचा कसा तरी रुकार मिळाला.

मी जावयाची तयारी करूं लागलें. भाचा श्रीमंत, तेव्हां आपणहि तेथें नीटनेटकेपणानें जावें, असा विचार करून मीं माझीं ठेवणीचीं दोन लुगडीं, पांचपांच सहासहा रुपये किमतीचीं बरोबर घेतलीं. गळ्यांत ठुशी, वीस पुतळ्यांची मध्यें कारलें घातलेली माळ, टीका, हातांत एकेक गोट वगैरे सगळे दागिनेहि बरोबर घेतले. नको नको ह्मणत असतां हट्टानें जवळून माझी थोरली दोनशें रुपयांची नथ मागून घेतली. बबीच्याहि गळ्यांत गांठलें व गोदीच्या गळ्यांत हंसळी लटकावून दिली. गोंद्या व भिकू आपला सखलादीचा अंगरखा, कानटोपी वगैरे उंची जामानिमा करून बरोबर यावयास तयार झाले. अशा रीतीनें बरोबर घरचा कारकून घेऊन आह्मी बंड्याकडे जावयाला घरांतून बाहेर पडलों.

सकाळीं नऊ वाजतां आमच्या बैलगाड्या करंडक स्टेशनावर येऊन पोंचल्या. केशवरावानें—आमच्या कारकुनानें—आह्मांला स्टेशनांत एकीकडे बसवून आमचीं तिकिटें काढलीं व आह्मी गाडीची वाट पहात बसलों.

थोड्याच अवकाशांत घंटा होऊन गाडी स्टेशनांत आली. गाडींत गर्दी ह्मणजे मी ह्मणत होती! परंतु मोठ्या शिकस्तीनें आह्मी एका डब्यांत शिरलों; गाडी सुरू झाली. आह्मांला बसावयास जागा कोणीच देईना! एका बांकावर तीनचार माणसें बसलीं होतीं. प्रत्येकानें आपल्याजवळ एकेक गांठोडें ठेविलें होतें.

मीं त्यांनां काकुळतीनें ह्मटलें "बाबांनों, मी पाहिजे तर उभी रहातें, पण तेवढं गांठोडं सालीं ठेवून मुलांनां तरी जागा करून द्या."

परंतु ते ऐकेनात. पलीकडे एक शिपाई निजला होता; त्याच्या उशागती एक जस्ताची पेटी होती. त्याला केशवराव ह्मणाले "बाबा, तेवढी पेटी उचल अन् आह्मांला जागा करून दे."

त्यावर तो नाक फेंदारून ह्मणाला "काय रे भटा! फारशी गडबड चालविली आहेस? मी कोण आहें तें तुला माहीत आहे का? अरे, मी डेंगणगांवच्या कचेरीतला नाईक आहें, समजलास?"

गाडींतील माणसें चाललेली सर्व गंमत बघून मोठमोठ्यानें हंसत होतीं आणि आह्मी सर्वजण तशींच उभीं होतों. थोडक्याच वेळानें दुसरें स्टेशन आलें. मुलें खिडकीशीं जाण्यास धडपडूं लागलीं. इतक्यांत दाराजवळचा एक मनुष्य उतरून इजार व पगडीवाले दोन थोर लोक आंत आले; गाडी पुढें चालू झाली. आह्मां सर्वांनां उभे पाहून त्यांतील एकजण ह्मणाला "बाई, तुह्मी उभ्या कां?"

केशवरावानें सारी हकीगत त्याला सांगितली. त्याबरोबर त्यानें शिपायाची खूप खरडपट्टी काढून आह्मांला बसावयास कशीतरी जागा करून दिली.

Banaji's Tutorial Commercial Class. Gowalia Tank, BOMBAY,
stood First in India in London Examinations.

[३]

बिलासपुर स्टेशन येतांच आह्मांला बराच आनंद झाला. केशवरावांनीं खालीं उतरून भराभर सामान व मुलेंबाळें खालीं घेतलीं. आह्मी गाडीतून खालीं उतरून इकडे तिकडे पाहूं लागतों तोंच एक पटेवाला शिपाई आह्मांजवळ येऊन टकमका पाहूं लागला व कांहीं वेळानें केशवरावांनां ह्मणाला "अहो, तुह्मी खणखण-पुराहून आलेत काय ?"

" कां बरं ?" मी आश्चर्यानें विचारलें.

तो शिपाई हंसून ह्मणाला "तुह्मी आमच्या साहेबां-च्या मामी असाल, तर तुह्माला आणायला मला त्यांनीं पाठविलें आहे."

"तुझे साहेब ह्मणजे आमचा बंडू कीं काय ?"

"चला तर मग. आपणासाठीं साहेबांनीं गाडी पाठविली आहे."

मी नको नको ह्मणत असतां बंड्याच्या पटेवाल्यानें स्टेशनावरचे दोन हमाल करून आमचें सामान उचलविलें, व त्याच्यावरोबर आह्मी सारीजणें चालूं लागलों. स्टेशनाबाहेर एक अगदीं लहान खोलीसारखी काळीकुळकुळीत अशी दोन घोड्यांची गाडी उभी होती. तींत मजूरांनीं सामान ठेवल्यावर मी व मुलें तींत बसलों. केशवराव व तो पटेवाला दुसऱ्याच एका टांग्यांत बसले. या लहानशा खोलींत आपल्याला कोंडलें ह्मणून बबीनें रहून गोंधळ उडविला व इतर मुलें गाडी गाडी ह्मणून नाचूं लागलीं.

[४]

एका मोठ्या घराशीं गाडी थांबतांच आह्मी खालीं उतरलों. जरा पुढें जातों तों ओटीवरच गुलाबी रंगाचें पातळ नेसून अंगांत फुल्याचें पोलकें घातलेली व केंसाचा बुचडा बांधलेली एक तरुण व सुंदर चेहऱ्याची बाई दिसली. जरा जवळ जाऊन पहातें तों ती आमची सावित्री ! तिनें उठून मला नमस्कार केला-पण बंड्या कोठें दिसेना ! मी सुनबाईला विचारलें, तों तो घर मंडळींत गुंतला आहे ह्मणून कळलें.

इतक्यांत ब्राह्मणानें स्वयंपाक तयार आहे ह्मणून सांगितलें, ह्मणून आह्मी आंत गेलों. तेथें एक पाण्याची तोटी दिसली; तें आपल्याआपण येणारें पाणी पाहून मुलांनां फार मौज वाटली. मग आह्मीं त्या तोटीखालींच गार पाण्यानें स्नान केलें व जेवावयास बसलों. इतक्यांत बंड्या तेथें आला व त्यानें मला घरची सर्व खुशाली विचारली.

ती सांगितल्यावर मीं ह्मटलें "बंड्या ! खरंच तूं मोठा दैववान आहेस. कशी रे ती तुझी गाडी-मुळींसुद्धां आह्मांला कसा तो धक्का लागला नाहीं ! आणि केवढं रे हें घर ! भाडं किती चारपांच रुपये आहे का रे याचं ?"

तो हंसून ह्मणाला "मामी ! या घराला मी दरमहा पन्नास रुपये भाडें देतों."

बंड्याचे हे शब्द ऐकून मी अगदीं थक्कच होऊन गेलें. पन्नास रुपये ह्मणजे झालें काय ? दरमहा दोन तोळे सोनें होतें ! असो. आणखीं कांहीं इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलल्यावर बंड्या निघून गेला व आह्मीहि नंतर रस्त्याचे फार श्रम झाले ह्मणून लवकरच निजलों.

[५]

मी सकाळीं दिसूं लागतांच उठलें व बाहेर येऊन पहातें, तों सोप्यावर दिवा रणरण जळतो आहे ! तेव्हां मीं तो विझवला व तोटीवर जाऊन पहिल्यानें तोंड धुऊन नंतर प्रातःकृत्यें आटोपलीं. पायबीय धुतें तों आगगाडीच्या इंजिनासारखें कायसें एक जवळच ठेविलें होतें, तेथें गडी येऊन त्याच्यावरचा एक दांडा हलवूं लागला. तो हलवितांच एक झारा बाहेर आला. त्याच्यावर थोडेसे कोळसे ठेवून त्यानें त्यावर अर्धी वाटली राकेल ओतलें ! तें पाहून मला वाटलें, कीं, इतकें तेल माझ्या घरीं स्वयंपाकघरच्या चिमणीला चार दिवस तरी खास पुरलें असतें ! नंतर त्यानें वरून एक कांकडा आंत घातला.

थोड्याच वेळांत सुनबाईहि तेथें आली व पाटावर बसून एका काठीनें साबु लावून तोंड धुवावयास लागली. कपड्यांनां साबू लावतांना मी पाहिला होता; पण दांतांला लावतांनां आजच पाहिला !

इतक्यांत बंड्याहि आला व त्यानें स्वयंपाकघरांत जाऊन ब्राह्मणाला कायसें सांगितलें. त्याच्या पाठोपाठ

Principal Mr. M. S. Banaji, F. N. F. A., (London) teaches personally. Our succesful students draw High Salaries.

व्हेनिस.

[श्रीमती सौ. सरस्वती भद्रा माडगांवकर, अहमदनगर.]

मनोरंजनाच्या वाचकांनां माहीत असेलच, कीं, व्हेनिस शहर इटली देशांत आहे.

पूर्वीच्या काळांत हा दलदलीचा प्रदेश असून कोळी लोकांची येथें वसती असे. कांहीं काळानंतर हे लोक चांचे, नाविक आणि व्यापारी असे अनुक्रमें बनून अखेरीस आपल्या अंगमेहनतीनें त्यांनीं हें एक व्यापारी शहर बनविलें. त्यामुळें सर्व देशांहून यांच्याजवळ जास्त जहाजें वगैरे झाल्यामुळें हें शहर बलवान् होऊन मेडिटरेनिअन सागरांत उच्च प्रतीचें गणिलें गेलें. परंतु जेव्हां केप ऑफ गुड होपचा शोध लागला, तेव्हां या शहराचा मान बराच कमी झाला. आणि आजपावेतों त्याच्या एकट्याच्या हातांत जो व्यापार होता तो इतर राष्ट्रांच्या हातांत गेला, आणि त्याचा व्यापाराचा मक्ताहि गमावला. कांहीं वर्षांनंतर तुर्क लोकांनीं व्हेनिसच्या आरमाराचा पराभव केला आणि खरोखर या वेळेपासून त्याचें वैभव जाऊं लागलें व बहुतेक यूरोपियन राष्ट्रांशीं लढाया झाल्यानंतर अखेरीस ऑस्ट्रियानें जिंकल्यामुळें वरींच वर्षें हें शहर त्यांच्याकडे राहिलें. सध्यां हें पुनरपि इटलीस जोडलें गेलें आहे.

या शहराच्या उदयकालांत येथील सावकारांच्या हातांत सर्व व्यापार आणि राज्यव्यवस्था असे. या सावकारांमधून कांहीं वर्षांच्या मुदतीकरितां दहा सरदार निवडले जात, व या दहांच्या कौंसिलामधून ते आपापसांत तीन अधिकारी गुप्त रीतीनें निवडीत. या दहांपैकीं 'कॅबिनेट'मध्यें तिघे कोणकोण आहेत, हें बाहेर कळत नसे. खरोखर सर्व राज्यसूत्र या तिघांच्या हातांत असे व हे जी करतील ती पूर्व दिशा असे. जरी हे सावकार अगदीं सामान्य लोकांतून उदयास आले होते, तरी सर्व मोठ्या व्यापाराचा मक्ता ते स्वतःजवळ राखून ठेवीत. बाकीच्यांनीं गॉन्डोलियर झणजे नाविक अथवा खलाशांचा, अथवा साध्या हुन्नरांचा धंदा करावा, असें त्यांनीं ठरविलें होतें. या हुकुमाचें उल्लंघन करणारास शिक्षा केली जात असे; त्यामुळें ती एक जात बनली गेली आणि आपल्या हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें सुरयातीस मात्र ब्राह्मणांत शिक्षणाचा प्रसार झाला आणि त्यांच्या समजुतीनें ब्राह्मणेतरांनां शिकावयाचा हक्क नाहीं, असें ठरवून त्यांनां शिक्षण दिले गेलें नाहीं, व त्यामुळें कांहीं काळानंतर ब्राह्मण लोकहि अशिक्षित राहूं लागले, त्याप्रमाणें व्हेनिसच्या सामान्य लोकांमध्यें भयंकर असंतोष उत्पन्न होऊन या व्हेनिशियन व्यापाऱ्यांचा धंदा बुडाला.

अशा या जुन्या व अनेक स्थित्यंतरांतून पार पडलेल्या शहरीं आम्ही सकाळच्या प्रहरीं येऊन पोहोंचलों. या वेळेस धुकें मुळींच नसल्यामुळें बऱ्याच दुरून आम्हांला व्हेनिस पहावयास मिळालें. बोटीचा नांगर पडतांक्षणीं डौलदार लांब काळ्या नौका (गॉन्डोला) बोटीच्या आजुबाजूस जमल्या. आमच्या ओळखीचे एक गृहस्थ आम्हांला घ्यावयास आले होते; त्यांच्याबरोबर आम्ही एका नौकेंत बसलों व कांहीं वेळानें होटेलमधें जाऊन उतरलों.

व्हेनिस हें लहानलहान बेटावर बांधलेलें आहे, त्यामुळें कोठेंहि जावयाचें असल्यास कालव्यांतून जावें लागतें व सर्वत्र जाण्यायेण्याकरितां नौका असतात. ज्याप्रमाणें आपण गाड्या ठेवितों, त्याप्रमाणें तेथील लोकांच्या नौका असतात व त्या आपापल्या आवडीप्रमाणें ते सजवितात. हे कालवे रुंद असतात आणि यांच्या दोन्ही बाजूंस सुरेख वाडे व इमारती बांधलेल्या आहेत. तसेंच पुष्कळ ठिकाणीं यांवर पूल बांधले आहेत. जरी मुख्य नेआण या कालव्यांतूनच होते, तरी व्हेनिसच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जावयास बारीक बोळ आणि गल्ल्या आहेत. व्हेनिसमधें वरींच वर्षें राहिल्याखेरीज व शहराची बरोबर माहिती झाल्याशिवाय मनुष्य रस्ता चुकल्याविना रहाणार नाहीं. बहुतेक रहदारी या कालव्यांतूनच होते, व कोणत्याहि घराला अंगण

आपली स्मरणशक्ति व काम करण्याची हिंमत शाबूद आहेना ? नसेल तर प्रो. जेम्सच्या
विद्युच्छक्तिवर्धक गुटिका वापरा व निरोगी व्हा.

नसल्यामुळें सर्व कचरा व घाण या कालव्यांतच टाकतात. याच सुमारास येथें कांहीं कॉलराच्या केसीस झाल्यामुळें सर्व कालवे साफ केले होते, त्यामुळें आम्हांला विशेष त्रास झाला नाहीं.

मुख्य 'ग्रँड कनाल' फार सुरेख व लांब रुंद आहे, व बहुतेक श्रीमंत लोकांचीं घरें त्याच्या किनाऱ्यानें आहेत.

डोगे (ड्युकच्या) महालांत आणि सामान्य लोकांच्या महालांत अथवा घरांत भेद दाखविण्याकरितां डोगेच्या महालासमोर निरनिराळ्या रंगांचे खांब पाण्यांत लावीत. ते अजूनहि दिसतात. व्हेनिस शहर इतकें सुंदर आहे, आणि सर्व इमारती इतक्या शिल्पकलायुक्त आहेत, कीं, एक एक इमारत घेऊन ती वर्णू गेल्यास हा लेख फार लांबेल, म्हणून फक्त दोनतीन ठिकाणांचेंच वर्णन मी येथें देतें.

जेवणानंतर आम्ही गॉन्डोलामध्यें बसून व्हेनिस शहराचें समुद्रकिनाऱ्यावर असलेलें 'लिडो' नामक शाखानगर पहावयास गेलों. रस्त्यानें एका बाजूस सुंदर महाल अथवा बगीचे व दुसऱ्या बाजूस अफाट समुद्र लागला. कांहीं वेळानें आम्ही लिडोस पोंहोचलों.

हें गांव फार डुमदार आहे. आम्हीं रस्त्यानें पुष्कळ सुरेख कपडे परिधान केलेले स्त्रीपुरुष पाहिले. सर्व संध्याकाळ गांवची शोभा पहाण्यांत घालविली. हें गांव नवीनच असल्यामुळें सर्व बंगले अगदीं नव्या धर्तीवर बांधले आहेत. त्याचप्रमाणें अनेक ठिकाणीं समुद्रकिनाऱ्यावर आंघोळीकरितां बाक्या टेकिल्या आहेत. आंत बसून बाहेरून धक्का मारला, म्हणजे गाडी समुद्रांत जाते व आंत पाणी येतें. त्यांत बसून आंघोळ केल्यानंतर गाडी परत ओढतात; नंतर कपडे बगैरे करून बाहेर यावयास ठीक पडतें.

रात्रीं परत गॉन्डोलामधें बसून आम्ही 'सरनाड' (जलसा) ऐकावयास गेलों. कांहीं गरीब स्त्रीपुरुष दिवसभर काम करून संध्याकाळीं एका नौकेंत बसतात; ही नौका जपानी रंगीबेरंगी दिव्यांनीं सजवितात व नंतर आळीपाळीनें गायनवादन करून हे लोक स्वतःचीं व लोकांचीं मनें रमवितात. या वेळीं पुष्कळ मंडळी फिरावयास जातात व त्या गाणाऱ्या मंडळीच्या नौकेजवळ जाऊन गाणें ऐकतात व आपापल्या परीनें त्यांनां पैसे देतात.

दुसरे दिवशीं आम्हीं मुख्य 'पिआझा' अथवा मांडवीच्या रस्त्याकडे गेलों. हा एक मोठा चौक असून तो अत्यंत सुंदर व्हेनीशीय शिल्पशास्त्रानुसार बांधला गेला आहे. याच्या सभोंवतीं दुकानें व उपहारगृहें आहेत. दिवसां याची शोभा निराळी व रात्रीं निराळी दिसते. दिवसां येथें बराच व्यापार होतो. कारण, सर्व मुख्य दुकानें येथेंच आहेत व व्यापाराचा सट्टासुद्धां येथेंच होतो. त्यामुळें दिवसां येथें काम करणाऱ्या लोकांची गर्दी असते व रात्रीं गाणेंबजावणें चालतें, त्या वेळीं उपहारगृहांत व बाहेर उपड्यावर लोकांची गर्दी जमते. कारण, रात्रीं जेवणानंतर येथील लोकांचा बाहेर जाऊन मौज करण्याचा प्रघात आहे. कोणी नाटकाला, तर कोणी जलशाला अथवा चौकांत जाऊन मौज मारितात. मात्र पुरुष एकटे कधीं दृष्टीस पडत नाहींत, तर त्यांच्या कुटुंबांतील स्त्रियाहि त्यांच्यावरोबर असतात.

या चौकाची लांबी ५७६ फूट, आणि रुंदी सुमारें २७० फूट आहे. याच्या पूर्वेस सेंट मार्कसूचें देवालय आहे आणि जवळच डोगेचा महाल आहे. समुद्राच्या बाजूस दोन प्रस्तर दगडी खांब आहेत. एकावर सेंट मार्कसूचा पंखाचा सिंह व दुसऱ्यावर सेंट थिओडोरचा पुतळा आहे.

सेंट मार्कसूचें देऊळ अकराव्या शतकांत पुनः बांधलें. याच ठिकाणीं पूर्वी देऊळ होतें, परंतु दहाव्या शतकांत तें जळालें. याच्या दरवाज्यावर ब्रॉंझ धातूचे मोठाले घोडे आहेत. हे घोडे कॉन्स्टंटाइननें रोमहून कॉन्स्टंटिनोपलला नेले, परंतु ते सन १२०५ मध्यें व्हेनिसला परत आणिले. नेपोलियननें ते पॅरिसला नेले, परंतु सन १८१५ मध्यें ते व्हेनिसला परत देण्यांत आले. या देवळाच्या मध्यभागीं मोठा कळस आहे. आंत 'मोझेक' (रंगीबेरंगी दगडाचे बारीक तुकडे घेऊन ते फार सफाईनें बसवून त्याचीं चित्रें करतात. हें 'मोझेक' काम आपल्या देशांत मुळेंच होऊं लागलें आहे.) चें, गिलाव्याचें आणि संगमरवरी दगडांचें काम उत्कृष्ट केलें आहे, व तें खरोखर अवर्णनीय आहे. ज्यांनीं रस्किनच्या 'Stones of Venice'

शहाणे लोक कामिनीया तेलच पसंत करतात. बाटलीवर कामिनीया नांव पाहून घ्या! कारण, कांही व्यापारी लोक जास्त नफ्याच्या आशेनें भलताच माल देतात!

या पुस्तकांत या देवळाचें वर्णन वाचलें असेल, त्यांनां त्याची कांहीं कल्पना होण्यासारखी आहे.

आह्मीं या देवळाचा खजिना जाऊन पाहिला. सेंट मार्कस् हा येशूच्या बारा शिष्यांपैकीं एक होता. त्याला या देवळांत पुरलें असल्यामुळें याला त्याचेंच नांव मिळालें आहे. त्याच्या कबरीवर जाड रत्नजडित सोन्याचा पत्रा आहे. आंत किंचित् अंधार असल्यामुळें आंत जातांना वारीक मेणबत्या देतात. दुसऱ्या एका खोलींत कलाकौशल्याचीं कामें ठेविलीं आहेत.

यांपैकीं पुष्कळ जिनसा पूर्वेकडील देशांतून आणिल्या आहेत. या खजिन्यांत एक मोठी थोरली सोन्यांत मोलें बसवून केलेली आंगठी आहे. आपल्या मध्यें जसें मंगलसूत्र असतें, तशी यूरोपांत लग्नाची आंगठी असते. पुरातनकालीं व्हेनिसचें समुद्राशीं लग्न झालें, तेव्हां ही आंगठी तिला देण्यांत आली, अशी या आंगठीविषयीं कल्पना आहे. तेव्हांपासून वर्षांतून एकदां व्हेनिस शहराचें मोठ्या थाटानें समुद्राशीं लग्न होतें व ही आंगठी समुद्रांत टाकतात ! परंतु या प्रसंगीं तेथें अनेक पाणबुड्यांनां हजर ठेवतात व ते पाण्यांत बुडी मारून ती आंगठी काढून आणतात.

ड्यूकचा राजवाडा अत्यंत भव्य आहे. त्याच्या पायऱ्या अतिशय रुंद असून वऱ्याच प्रख्यात आहेत. कौन्सिलहॉलमधें आजपर्यंत जेवढे डोगे नेमले गेले त्यांचीं चित्रें आहेत. त्यांपैकीं एका चित्राला काळा रंग दिला आहे. कारण, त्या माणसानें फितुरी केली म्हणून त्याला देहांतशिक्षा झाली होती. दुसऱ्या पुष्कळ खोल्यांतून अनेक जगत्प्रसिद्ध चित्रें लाविलीं आहेत. एका खोलीच्या छपरावर एक कांचेचा पिंजरा आहे, त्यांत एका स्वदेशभक्ताला सहासात दिवसपर्यंत उन्हांत व पावसांत ठेवून नंतर हालहाल करून मारण्यांत आलें. ज्या तळघरांत पूर्वी कैद्यांनां ठेवीत असत, तीं अतिशय कोंदट व लहान आहेत. बाहेर जरी प्रखर ऊन पडलें होतें, तरी सर्व तळघरांत विजेचे दिवे लाविले होते. पूर्वी अर्थात्च येथें विजेचे दिवे नसत; तेथें अजून देखील भिंतींत दिव्यामुळें काळे झालेले कोनाडे दिसतात.

या महालाच्या पलीकडे दुसरा एक तुरुंग आहे. या दोन इमारतींनां जोडणारा जो पूल आहे त्याला ' Bridge of sighs ' (शोकनिःश्वासांचा पूल) असें नांव आहे. कारण, पूर्वी जे कैदी या पुलावरून पलीकडे तुरुंगांत जात, ते जीवंतपणीं कधींहि बाहेर येत नसत, म्हणून या पुलाला असें नांव पडलें. हा तुरुंग अजून वापरतात.

व्हेनिस शहरामधें कांचेचें सामान फार चांगलें व सफाईदार तयार होतें. आह्मीं एक कांचेचा कारखाना जाऊन पाहिला. तेथें सर्व काम हातांनीं व फुंकून तयार करण्यांत येत होतें. आह्मांला कांहीं फुलें ठेवण्याचीं भांडी करून दाखविण्यांत आलीं. त्याचप्रमाणें या कारखान्यांत कांचेच्या पेलेवशांवर 'लेस' (पाढऱ्या रंगानें) काढतात. हें काम बायका करतात. या पेलेवशा लांबून पाहिल्या म्हणजे त्यांच्यावर लेस चिकटावली आहे कीं काय, असें वाटतें. मोठेकर्वे काम लहान लहान मुली करतात.

हें शहर पाहून मनांत अनेक प्रकारचे विचार उत्पन्न होतात. मनुष्याप्रमाणेंच शहरांनांहि उदयकाल व पतनकाल आहेत, व त्यांचा मोठेपणा त्यांच्या इमारतींवर किंवा रस्त्यांवर अवलंबून नसून त्यांच्या नागरिकांच्या उच्च मनावर असतो. आणि त्यांच्या उच्च भावना व पराक्रम नाहींसे होतात, तेव्हां या इमारतींमुळें त्यांच्या गतवैभवाची चेष्टा मात्र होते. म्हणून आपण लक्ष्यांत ठेवण्याची मुख्य गोष्ट ही आहे, कीं, आपलें ध्येय नेहमीं फार उच्च प्रकारचें असलें पाहिजे; इतकेंच नव्हे, तर आपल्या संततीचेंहि ध्येय व पराक्रम उच्च प्रतीचें राहील असें आपण सर्वदा धोरण ठेविलें पाहिजे.

—अनुभवानें होणाऱ्या प्रगतीसंबंधानें विचार केला तर व्यक्तींच्या आयुष्यांतील कित्येक तास आणि समाजाच्या आयुष्यांतील शतकें यामध्यें साद्दश्यसंबंध दिसून येतो.


—सुधारणेसंबंधानें पहातां प्रत्येक सुधारणा ही एका काळीं व्यक्तीचें खासगी मत होतें, व हळुहळू त्याला सार्वत्रिक रूप आलें, असें दिसतें.

कामिनीया तेल सर्व सुगंधी सामानाच्या दुकानांत मिळतें. एक बाटलीस रु. १.
तीन बाटल्यांस रु. २ ।।०. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.


रंगवल्लिका.

[श्रीमती शारदाबाई देशपांडे, मुतनाळ.]

रंगवल्लिका हा विषय कित्येक वाचकभगिनींना विशेष मनोरंजक वाटणार नाहीं. त्या म्हणतील, कीं, दिवाळीसारख्या सणावाराच्या प्रसंगी रांगोळी घरोघर घालितात, त्यांत विशेष काय लिहावयाचें? पण मला वाटतें, कीं, हा विषय वाटतो तितका क्षुल्लक नाहीं. आज हिंदुस्थानांत ज्या कांहीं ललितकला आहेत, त्यांत चित्रकला (ड्रॉइंग) ही वरिष्ठ दर्जाची आहे. ही कला आपणाला साध्य व्हावी म्हणून पुष्कळ लोक खटपट करितात, व पुष्कळांना हिचा विशेष शोक असतो. एकादें सुंदर चित्र दृष्टीस पडलें असतां मनाला किती आनंद होतो, याचा प्रत्येक स्त्रीपुरुषाला अनुभव असेलच. रांगोळी काढण्याच्या कलेलाहि चित्रकलेतच अंतर्भाव होतो. आतां इतर चित्रें पेन्सलीनें, शाईनें, अथवा रंगानें कागदावर किंवा पटावर काढितात, व या कलेंतील चित्रें जमिनीवर रांगोळीच्या चूर्णानें व इतर रंगांनीं काढिलीं जातात, हाच काय तो या दोन पद्धतींत फरक. कागदावरील वगैरे चित्रांत ज्याप्रमाणें पानें, फुलें, पशु, पक्षी, हुबेहूब काढितां येतात, त्याप्रमाणें हीं सारीं रांगोळीनेंहि जमिनीवर काढितां येतात.



द्राक्षाच्या वेलाच्या टिंबा.




द्राक्षाचा वेल.

मद्रास इलाख्यांतील कांहीं भागांत रांगोळी घालण्याचा शोक पराच दिसून येतो. मुंबईतहि दिवाळीच्या दिवसांत सायंकाळी कांहीं बंगल्यांपुढें चांगल्या पद्धतीनें काढिलेली सुंदर रांगोळी दृष्टीस

पडते. सुमारें तीन वर्षांपूर्वी पाठारेप्रभुज्ञातींतील स्त्रियांनीं भरविलेल्या प्रदर्शनांत फारच उत्तम तऱ्हेची रांगोळी काढलेली होती, व त्याबद्दल चित्रकार-भगिनींनां बक्षीसेंहि मिळालीं होतीं. गेल्या वर्षी आपले परमपूज्य सम्राट् पंचमजॉर्ज मुंबईस आले होते, त्यावेळीं जुन्या मुंबईच्या प्रदर्शनांत ता. १० जानेवारी सुंदर रांगोळीचा फोटो या लेखांत शेवटीं दिला आहे, त्यावरून माझ्या वाचक भगिनींची खात्री होईल.

चित्रकला प्रत्येक स्त्रीला अवगत असावी, या हेतूनेंच पूर्वी स्त्रियांनां रांगोळीच्या रूपानें चित्रकला शिकवीत असत, व अशा रीतीनेंच ही पद्धति प्रचारांत आली असावी, अशी माझी कल्पना आहे.




कालियाडोह.

रोजीं मुंबईतील पाठारेप्रभुज्ञातींतील कुमारी माणक बाई जनार्दन कोठारे आणि त्यांच्या भगिनी यांनीं जें रांगोळीचें मनोहर आणि मार्मिक चित्र काढलें होतें, तें ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें असेल त्यांनां रांगोळींत चित्रकला कशी मनोहर आणि सुंदर रीतीनें दाखवितां येते, याची खात्री पटलीच असेल. त्या

पूर्वी बहुतेक स्त्रिया सकाळीं लवकर उठून देवापुढें व अंगणांत तुळशीवृंदावनापुढें रांगोळी घालीत असत. हल्लींहि बऱ्याच घरीं सकाळीं रांगोळी घालण्याची पद्धति दिसून येते; पण अलीकडे ठसे, थाप्या वगैरे रांगोळी घालण्याचीं यांत्रिक साधनें निघाल्यापासून हातानें रांगोळी घालण्याची कला बहुतेक नष्ट

होत चालली आहे. अलीकडील सुशिक्षित मुली रांगोळी घालण्याची कला अजिबात विसरत चालल्या आहेत, असें झटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. पुष्कळ मुलींनां चित्रकलेचा नाद असतो, पण त्या आपली ही जुनी सोईची पद्धति सोडून विशेष खर्चाच्या पद्धतीनेंच चित्रें काढण्याकडे सारा भर देतात, येणें शक्य नाहीं. परंतु रांगोळीची गोष्ट तशी नाहीं. ती कला सोईची, सोपी व बहुतेक विनखर्चाची असल्यामुळें सर्वांच्या हस्तगत होण्यासारखी आहे.

आतां रांगोळीच्या कलेंत व पद्धतींत सुधारणा करणें आवश्यक आहे, हें कबूल केलेंच पाहिजे. रांगोळीची पूड किंवा खडे चहूंकडे. मिळण्यासारखे



कालियादोह.

हें बरें नव्हे. ज्यांनां चित्रें काढितां येतात, त्यांनां रांगोळी सहज काढितां येईल, व ज्यांनां उत्तम रांगोळी घालतां येते, त्यांनां चित्रें काढणेंहि जड जाणार नाहीं. नवीन पद्धतीची चित्रकला मनोहर आहे खरी, परंतु ती विशेष खर्चाची व श्रमाची असल्यामुळें ती सर्व दर्जाच्या स्त्रियांच्या आटोक्यांत असतात. ज्यांनां खडेच मिळत असतील, त्यांनीं ते खडे स्वच्छ धुवून, वाळवून त्यांची पूड करावी व नंतर दळावी, म्हणजे रांगोळी चांगली होते. ज्या ठिकाणीं पूड आयती मिळते, तेथेंहि ती दळून घ्यावी, हें बरें. शक्य असेल त्यांनीं बाजारांत मिळतात ते रंग आणून ठेवावे. रांगोळी घालण्यास जमीन सारखी




जानेवारी १९१२ मध्यें मुंबईच्या प्रदर्शनांत कुमारी माणकबाई जनार्दन कोठारे आणि त्यांच्या भगिनी यांनीं काढिलेल्या रांगोळीचे चित्राचा फोटो.


[चित्रकार—श्रीयुत वी. ए. अजिक्य.

व गुळगुळीत असावी, व ती जागा रांगोळी घालणाऱ्या स्त्रीनें स्वतः स्वच्छ सारवावी, हें बरें. जमीन सारवितांना तीवर शेण राहूं देऊं नये. सारवण पातळ व सारखें घालावें, म्हणजे रांगोळीच्या रेषा चांगल्या उठतात व त्यांत रंगहि चांगला बसतो.

ज्यांनां रांगोळी घालण्याची संवय नसेल, त्यांनीं दोन बोटें रुंद व दोन फूट लांब अशी एक लांकडी पट्टी तयार करवून घ्यावी, म्हणजे तिचा रांगोळी सरळ घालावयाला पराच उपयोग होईल. ठिपके व रेषा सरळ, सारख्या व बारीक असाव्या. ठिपके घातल्यानंतर अगर रेषा मारल्यानंतर त्या पुसूं नयेत. कारण, त्यायोगानें जमीन पांढरी होते व तीवर पुनः रांगोळी घातली असतां ती चांगली दिसत नाहीं. रांगोळी घालतांना खालीं वांकूं नये; रंग भरण्याच्या वेळींहि नीट काळजीपूर्वक कोणता रंग कोणत्या ठिकाणीं



अष्टकोनी कमळ.



हुबेहूबपणा येईल, हें नीट लक्ष्यांत घेऊन रंग भरावे. तसेंच आपणाला रांगोळी चांगली काढतां येईपर्यंत एकादें चित्र जवळ ठेवून घ्यावें, व त्या नमुन्याप्रमाणें रांगोळी काढण्याचा प्रयत्न करावा. अशा रीतीनें प्रयत्न केल्यास रांगोळी काढण्याची कला लवकरच साध्य होईल, असें मला वाटतें.


मला ज्या थोड्या आकृति काढतां येतात, त्यांपैकी दोनतीन या लेखांत दिल्या आहेत. दुसऱ्या आकृतीचें 'काळियामर्दा' असें कानडी नांव आहे. याला 'कालियाढोह' असें मराठी नांव देतां येईल. पहिली आकृति 'द्राक्षाच्या वेला'ची आहे. व तिसरी अष्टकोनी कमळाची आहे.

याप्रमाणें आमाल वृद्धांची अन्तःकरणें प्रसन्न करणाऱ्या या कलेची मला अवगत असलेली माहिती थोडक्यांत दिली आहे, तिचा दीपावलीच्या मंगल सणांत माझ्या भगिनींना कांहीं सुलेल, व कोणता रंग भरला असतां आकृतीला तरी उपयोग होवो.



एमर्सनचीं बोधवचनें.

श्रीयुत वामन रामचंद्र जोशी, बी. ए. मुंबई.



—प्रेम उत्पन्न झालें म्हणजे ज्या मनुष्याविषयीं प्रेम उत्पन्न होतें, त्याच्या सुरक्षितपणासाठीं व हितासाठी प्रेमबद्ध मनुष्य ईश्वरप्रार्थना करूं लागतो.

—दोन माणसांमधलें प्रेम जर वर्षानुवर्ष त्यांच्या बुद्धीची व अंतःकरणाची निर्मलता वाढविण्यास कारण झालें, तरच ती खरी प्रेमग्रंथि होय.

—सृष्टीमध्यें कांहीं फुकट असें नाहीं. एक द्यावें तेव्हां एक घ्यावें असा नियम दिसतो.

—जो दुसऱ्यांचें अनिष्ट चिंतितो, तो आपलाच नाश करून घेतो.

—जें मत मनुष्य प्रतिपादन करतो, त्याचा परिणाम त्याच्यावर क्रिया व प्रतिक्रिया या नियमानें अवश्य होत असतो.

—कोणी मनुष्यानें एकाद्या गोष्टीचा गर्व धरिला व ती गोष्ट खेदाला कारण झाली नाहीं, असें कधीं होत नाहीं.

—जो जगाच्या हितांत जास्तींत जास्त भर घालितो, तो सर्वांत मोठा होय.

—जो जगापासून उपकार करून घेतो, पण स्वतः जगाच्या हितासाठीं झटत नाहीं, तो निंद्य होय.

—प्रामाणिकपणानें केलेल्या श्रमांस कोणत्याना कोणत्या रूपानें तरी फल अवश्य मिळत असतें.

—आपल्या अनहिताला कारण एक आपणच होऊं शकतों.

—खरें थोरपण म्हणजे आयुष्यांत येणाऱ्या अडचणींमध्यें न डगमगतां त्या दूर करण्याची निश्चयाची वृत्ति धरून आपल्या गुणांचा त्या कामीं उपयोग करणें, हें होय.

—संकटाच्या किंवा हर्षाच्या परिस्थितींत जो मनाचा समतोलपणा संभाळतो, तो थोर होय.

—आंतून जी स्फूर्ति होते, त्या स्फूर्तीला आधारक राहून वागण्यांत व्यक्तीचें थोरपण असतें.

—आत्मविश्वास हें खऱ्या थोरपणाचें रहस्य होय.

—सुशीलपणा सर्व गोष्टींत पुरा पडेल अशा बोधानें वागणें, हें थोरपणाचें रहस्य होय.

—परमनिश्चयीपणा हें खऱ्या थोरपणाचें विशेष लक्षण होय.

—आत्मविश्वासानें वागण्याचा अभ्यास करूं लागणाराला नवीन नवीन शक्ति प्राप्त होतात.

—कांहीं विचार आपणाला निरंतर तारुण्याचा उत्साह देतात. अशा विचारांपैकींच सर्वव्यापी, शाश्वत, रम्य असें जें तत्त्व, त्याविषयींची प्रीति हा होय.

—आत्मा स्थिर दृष्टीनें पुढें पहात असतो; तो नवें जग निर्माण करीत असतो व जुनीं जगें मागें टाकीत असतो.

—आयुष्यांत एकामागून एक घडणाऱ्या गोष्टी ही आत्म्याची त्या त्या कालची वस्त्रें होत.

—मनुष्याच्या अंतःकरणाला पटेल अशा रीतीनें बोलावें, कीं, तो लागलाच सद्गुणी होतो.

—सर्वांमध्यें जो आढळणारा समानभावाचा भाग, तें ईश्वररूप होय.

—मनुष्य जेव्हां कोणतेंहि काम त्यामध्यें पूर्ण लक्ष घालून करितो, तेव्हां त्याला आनंदच होतो; परंतु अन्य रीतीनें काम केलें तर मात्र त्याला शीण होतो व त्याची तळमळ जात नाहीं.

—जो आपल्या श्रमानें भाग्य मिळवितो, त्याच्यावर जगाचा पूर्ण विश्वास बसत असतो.

—जी गोष्ट आपल्या अंतःकरणानें आपल्याला बरोबर वाटते, ती तशी मानून बोलणें व वागणें हाच पुरुषाला शोभणारा गुण होय.

—स्वतःमधून विवेकप्रेरणा घेऊन काम करणारा मनुष्य जगापुढें येतो, तो सर्व माणसें व सर्व होणाऱ्या गोष्टी यांचें यथायोग्य महत्त्व जाणतो व वागतो. तो जणूं काय त्या कालाचा आत्माच होतो.

—प्रत्येक संस्था कोणातरी निश्चयी कर्तृत्ववान् मनुष्याची सांवली होय.

—अनंत, अपरिमित-ज्ञानशक्तीचे अंकावर आपण मुलाप्रमाणें आहोंत, अशी प्रेमानें व विश्वासानें भावना केली, तर सत्यप्रेरणा व क्रियाशक्ति त्या जगदाधार शक्तीपासून आपणास प्राप्त होतात.

—जेव्हां मनुष्य आपलें हृदय ईश्वराच्या हृदयाशीं एक करून वागूं लागतो, तेव्हां त्या मनुष्याच्या मुखानें येणारे शब्द झऱ्याच्या शब्दाप्रमाणें सुखकारक व मधुर असतात.

—मनुष्याच्या आत्म्याच्या मागें सनातन सर्वात्मा आहे.

चित्रमाला.




"रात्रीं एवढी का भीति आहे ?"



एमर्सनचीं बोधवचनें.

श्रीयुत वामन रामचंद्र जोशी, बी. ए. मुंबई.



—प्रेम उत्पन्न झालें ह्मणजे ज्या मनुष्याविषयीं प्रेम उत्पन्न होतें, त्याच्या सुरक्षितपणासाठीं व हितासाठी प्रेमबद्ध मनुष्य ईश्वरप्रार्थना करूं लागतो.

—दोन माणसांमधलें प्रेम जर वर्षानुवर्ष त्यांच्या बुद्धीची व अंतःकरणाची निर्मलता वाढविण्यास कारण झालें, तरच ती खरी प्रेमग्रंथि होय.

—सृष्टीमध्यें कांहीं फुकट असें नाहीं. एक घ्यावें तेव्हां एक घ्यावें असा नियम दिसतो.

—जो दुसऱ्यांचें अनिष्ट चिंतितो, तो आपलाच नाश करून घेतो.

—जें मत मनुष्य प्रतिपादन करतो, त्याचा परिणाम त्याच्यावर क्रिया व प्रतिक्रिया या नियमानें अवश्य होत असतो.

—कोणी मनुष्यानें एकाद्या गोष्टीचा गर्व धरिला व ती गोष्ट खेदाला कारण झाली नाहीं, असें कधीं होत नाही.

—जो जगाच्या हितांत जास्तींत जास्त भर घालितो, तो सर्वांत मोठा होय.

—जो जगापासून उपकार करून घेतो, पण स्वतः जगाच्या हितासाठीं झटत नाहीं, तो निंद्य होय.

—प्रामाणिकपणानें केलेल्या श्रमांस कोणत्याना कोणत्या रूपानें तरी फल अवश्य मिळत असतें.

—आपल्या अनहिताला कारण एक आपणच होऊं शकतों.

—खरें थोरपण ह्मणजे आयुष्यांत येणाऱ्या अडचणीमध्यें न डगमगतां त्या दूर करण्याची निश्चयाची वृत्ति धरून आपल्या गुणांचा त्या कामीं उपयोग करणें, हें होय.

—संकटाच्या किंवा हर्षाच्या परिस्थितींत जो मनाचा समतोलपणा संभाळतो, तो थोर होय.

—आंतून जी स्फूर्ति होते, त्या स्फूर्तीला आज्ञाधारक राहून वागण्यांत व्यक्तीचें थोरपण असतें.

—आत्मविश्वास हें खऱ्या थोरपणाचें रहस्य होय.

—सुशीलपणा सर्व गोष्टींत पुरा पडेल अशा बोधानें वागणें, हें थोरपणाचें रहस्य होय.

—परमनिश्चयीपणा हें खऱ्या थोरपणाचें विशेष लक्षण होय.

—आत्मविश्वासानें वागण्याचा अभ्यास करूं लागणाराला नवीन नवीन शक्ति प्राप्त होतात.

—कांहीं विचार आपणाला निरंतर तारुण्याचा उत्साह देतात. अशा विचारांपैकींच सर्वव्यापी, शाश्वत, रम्य असें जें तत्त्व, त्याविषयींची प्रीति हा होय.

—आत्मा स्थिर दृष्टीनें पुढें पहात असतो; तो नवें जग निर्माण करीत असतो व जुनीं जगें मागें टाकीत असतो.

—आयुष्यांत एकामागून एक घडणाऱ्या गोष्टी हीं आत्म्याचीं त्या त्या कालचीं वस्त्रें होत.

—मनुष्याच्या अंतःकरणाला पटेल अशा रीतीनें बोलावें, कीं, तो लागलाच सद्गुणी होतो.

—सर्वांमध्यें जो आढळणारा समानभावाचा भाग, तें ईश्वररूप होय.

—मनुष्य जेव्हां कोणतेंहि काम त्यामध्यें पूर्ण लक्ष घालून करितो, तेव्हां त्याला आनंदच होतो; परंतु अन्य रीतीनें काम केलें तर मात्र त्याला शीण होतो व त्याची तळमळ जात नाहीं.

—जो आपल्या श्रमानें भाग्य मिळवितो, त्याच्यावर जगाचा पूर्ण विश्वास वसत असतो.

—जी गोष्ट आपल्या अंतःकरणानें आपल्याला बरोबर वाटते, ती तशी मानून बोलणें व वागणें हाच पुरुषाला शोभणारा गुण होय.

—स्वतःमधून विवेकप्रेरणा घेऊन काम करणारा मनुष्य जगापुढें येतो, तो सर्व माणसें व सर्व होणाऱ्या गोष्टी यांचें यथायोग्य महत्त्व जाणतो व वागतो. तो जणूं काय त्या कालाचा आत्माच होतो.

—प्रत्येक संस्था कोणातरी निश्चयी कर्तृत्ववान् मनुष्याची सांवली होय.

—अनंत, अपरिमित-ज्ञानशक्तीचे अंकावर आपण मुलाप्रमाणें आहोंत, अशी प्रेमानें व विश्वासानें भावना केली, तर सत्यप्रेरणा व क्रियाशक्ति त्या जगदाधार शक्तीपासून आपणास प्राप्त होतात.

—जेव्हां मनुष्य आपलें हृदय ईश्वराच्या हृदयाशीं एक करून वागूं लागतो, तेव्हां त्या मनुष्याच्या मुखानें येणारे शब्द झऱ्याच्या शब्दाप्रमाणें सुखकारक व मधुर असतात.

—मनुष्याच्या आत्म्याच्या मागें सनातन सर्वात्मा आहे.



बाजीराव-मस्तानी.

[मस्तानी तरुण रजपूत वीराच्या वेषानें बाजीरावाकडे येऊन त्याचा आश्रय मागते, व तो देण्याचें त्याजकडून वचन मिळतांच आपलें खरें रूप प्रगट करून त्याला आश्चर्यचकित करून टाकते.]

गेल्या बॉम्बे आर्ट सोसायटीमध्ये पहिले बक्षिस मिळालेले चित्र. चित्रकार—श्रीयुत एम्. व्ही. जोशी, घाटकुपर.



राधाविषाद.

" हरि हरि याहि माधव याहि केशव मावद कैतववादम् ।
तामनुसर सरसीरुहलोचन या तव हरति विषादम् ॥"

—गीतगोविंदम् ।

खास मनोरंजनासाठी चित्रकार-श्रीयुत एम्. व्ही. धुरंधर, मुंबई.



चित्रकूटनिवास.

स तं सैन्यसमुद्भूतं शब्दं शुश्राव राघवः ।


—रामायणम्–अयोध्याकाण्डम्. २–९६–५.

राम मनोरंजनासाठी.

चित्रकार–श्रीयुत एम्. व्ही. धरंधर, मुंबई.



खास मनोरंजनासाठी. फोटोग्राफर्स-गिरगांव फोटोग्राफिक आर्ट स्टूडियो, पाल्खरोड, मुंबई.



खरा मनोरंजनासाठी. फॅटेम्फर्स-निरांजन फॅटेम्फर्सचे आर्ट स्टूडियो, पालवशेट, मुंबई.



विचारतरंग.

खास मनोरंजनासाठी

चित्रकार—श्रीयुत जी. व्ही. लाड, मुंबई.

आहे. हें अंतर लक्ष्मी व अवलक्ष्मी या सख्ख्या बहिणींमधील अंतरासारखेंच आहे, असें झटल्यास चालेल.

प्राण्यांपेक्षां यंत्रांत केवळ सामर्थ्यच अधिक असतें, असें नाहीं; तर त्यांच्या अवयवांचें सूक्ष्म ज्ञान झाल्यास त्यांचा उपयोग योग्य दिशेनें व अचुक करितां येतो. उलटपक्षीं, मनुष्याकडून किंवा जनावराकडून काम करून घ्यावयाचें असल्यास तें काम अनेकदां त्याच्या इच्छेवर व आवडीनावडीवर अवलंबून रहातें. मालगाडींत धान्याचीं हजारों पोतीं भरलीं तरी त्यांतील एकहि पोतें डब्यानें गिळल्याचें ऐकूं येत नाहीं; पण गड्याच्या हातीं बाजारांतून चार आंबे आणविले तर त्यांपैकीं एकादा तरी हरवल्याशिवाय रहात नाहीं. ध्वन्युद्धारक यंत्र एकदां किल्ली देऊन सुरू केलें, कीं, गाणें किंवा भाषण पुरें होईपर्यंत तें झणून बंद रहावयाचें नाहीं. उलट, एकादा गवई गाण्यास बसविला, तर कांहीं वेळ तंबुऱ्याची आणि नंतर त्याची स्वतःची तारच लागत नाहीं, आणि एकादा प्रमुख नट अडून बसल्यामुळें अनेक प्रसंगीं नाटकाचा प्रयोग बंद ठेवावा लागतो. कधीं कधीं अनिच्छेमुळें असा विघाड होतो, तर कधीं कधीं फाजील कळकळीमुळेंहि होतो. एकादा वक्ता बोलावयास उभा राहिला तर आपणाशिवाय इतर वक्ते अजून बोलावयाचे आहेत, व श्रोत्यांच्या फुरसदीस किंवा सहनशीलतेस मर्यादा असते, या गोष्टी तो अजीबाद विसरून जातो; अध्यक्षांनां व श्रोत्यांनां थोपवून धरण्याकरितां तो मधूनमधून 'मला आतां फारच थोडें सांगावयाचें राहिलें आहे' 'शेवटीं सांगावयाचें झणून इतकेंच' 'आपला अमोल वेळ मी घेऊं इच्छीत नाहीं' अशा वाक्यांचें मधाचें बोट लावीत असतोच, व या आमिषास भुलून बिचारीं प्रेक्षकरूपी सावजें भाषणाच्या चन्हाटांत अधिकाधिक आवळलीं जातात. भाषण संपल्याबरोबर टाळ्यांचा मोठा गजर करण्याच्या इराद्यानें ते अनेक वेळां हातावर हात धरून बसलेले दिसतात; पण त्यांचा उपयोग हात चोळण्याच्या कामींच त्यांनां करावा लागतो. अशा तऱ्हेनें एक प्रहरभर चन्हाट वळून व कांहीं प्रेक्षकांनां अर्धमेले व इतरांनां पिसाळलेले करून वक्त्याची स्वारी खालीं बसते, तेव्हां जो टाळ्यांचा कानठाळ्या बसविणारा भडिमार होतो व 'भाषणाचा शेवट तर फारच गोड वाटला बुवा !' असे जे चहूंकडे एका दिलानें उद्गार निघूं लागतात, त्यांनीं त्याला पुढील खेपेस पुनः श्रोत्यांचा समाचार घेण्यास प्रोत्साहन मिळतें ! अशा वेळीं यंत्राच्या श्रेष्ठतेचा प्रत्यय येतो.

मनुष्याची जर ही स्थिति, तर श्वापदांची गोष्ट विचारावयासच नको ! मला एकदां एका गांवीं जावयाचें होतें. सायकल किंवा मोटार ठेवण्याची माझी ऐपत नव्हती, व त्या गांवाला आगगाडीचा रस्ताहि नव्हता. जाणारा मी एकटाच असल्यामुळें बैलाच्या गाडीचें प्रयोजन नव्हतें. झणून मीं एक भाड्याचें घोडें ठरविलें, व त्यावर स्वार झालों. मी घोड्यावर बसण्यांत अगदींच लेचापेचा होतों, असें नाहीं. घोडा साळमूद असला, तो नाकासमोर व मंदगतीनें चालला, आणि रस्ता उंचसखल नसला, तर मी घोड्यावरून खालीं येईनच, असें कोणालाहि छातीस हात लावून सांगतां आलें नसतें ! पण त्या दिवशीं मला जें जनावर मिळालें होतें, तें सगळ्या मुलखाचें खट होतें. कांहीं वेळ त्यानें इतक्या संभावितपणाची चाल ठेविली, कीं, भापेंगत गेलों तरी मुकाम गांठीन, अशी मला खात्री वाटूं लागली. त्यासरसें अंगांत जरा अवसानहि आलें, आणि पाठीवरील स्वार अगदींच कच्चा गुरूचा चेला नाहीं असें घोड्याला दाखविण्याकरितां,मीं हातांतील छडी त्याच्या अंगाला लागेल न लागेल अशा बेतानें हलकेच त्याला लगाविली. त्यावरोबर त्या कांगावखोरानें जें उड्डाण मारिलें, त्यासरशी मींहि उडी मारिली असती; पण त्याचें आयाळ हाताला लागल्यामुळें व तें मीं गच्च आंवळून धरिल्यामुळें कसातरी वरच्यावर राहिलों. पण आतां त्या तट्टाची पत मात्र माझ्यापाशीं बिलकुल राहिली नव्हती. हें चतुष्पाद मजवरच केव्हां स्वार होईल, याचा मला नेम सांगतां येईना. माझी त्रेधा पहाण्याला जवळपास कोणी आहे कीं काय, हें बघण्यास मीं एकवार दोन्ही बाजूंस घाईघाईनें दृष्टि फेंकिली, व कोणी नाहीं अशी मनाची पक्की खात्री झाल्यावर घोड्याशीं कसे काय पाचपेंच लढवावयाचे, याचा विचार करूं लागलों. पुनः छडीचा प्रयोग करून त्याच्या शांत स्वभावाची कसोटी पहाण्यांत अर्थ नाहीं, असें मीं लागलीच ठरविलें. छडीच्या पहिल्या फटकाऱ्यानें त्याला मजबद्दल दहशत उत्पन्न झाली असावी. कारण,माझ्या अश्वारोहणकौशल्याशीं सामना देण्याऐवजीं

कामिनीया तेलानें मस्तक थंड राहतें. डोळ्यांची जळजळ दूर होते. गळून पडणारे केश पुनः उगवतात. केसांची कीड मरून जाते व खवडे वगैरे विकार नष्ट होतात.

तो एकेक पाऊल मागें घेऊं लागला. ही पीछेहाट पाहून माझें धैर्य दुणावलें. पण नुसतें धैर्य दुणावून काय उपयोग होता? त्यानें त्याची वक्रगति थोडीच बंद पडणार होती! शेवटीं त्यावर जरब बसविण्याऐवजीं जरा पडतेंच घेण्याचा मीं निश्चय केला. कारण, मीं मनानें पडतें घेतलें नसतें तर शरीरानें पडतें घेण्याचा प्रसंग आला असता. असो. याप्रमाणें निश्चय झाल्यावर मीं त्याला उच्चैःश्रवा, श्यामकर्ण इत्यादि संस्कृत, व खेड्या, मोल्या, झेंड्या इत्यादि प्राकृत नांवांनीं आळविण्यास सुरुवात केली. परंतु तीं नांवें त्याच्या श्यामकर्णरंध्रांत शिरण्याचें चिन्ह दिसेना! आतां करावें तरी काय, अशी मोठी पंचाईत येऊन पडली. अशा उलट गतीनें परत घरीं जाण्यांत कांहींच हंशील नव्हतें. वरें, हें नाठाळ जनावर घरापाशींच थांबतें, याचा तरी काय नेम? त्याच्या मर्जीस आलें तर तें माझ्या गांवीं न थांबतां पुढील गांवींच मुक्काम करील, किंवा लहर लागल्यास माझी उलट धिंडका काढीत पृथ्वी-प्रदक्षिणेचें पुण्य माझ्या पदरीं बांधील. शिवाय अशा वक्र प्रवासांत आमच्या गांवांतील चव्हाट्यावरील विहीर मध्यें आल्यास ती टाळून रस्ता काढण्याइतकें शांत डोकें त्या बद्दकलेल्या प्राण्याच्या ठिकाणीं असेल, असा मला विश्वास येईना. ती विहीर आपल्या वाटेंतच आहे कीं नाहीं, हें मीं स्वतः मागें वळून पहाण्याचीहि सोय नव्हती. कारण, मान फिरविण्यास माझा एका बाजूस तोल जाण्याचा संभव—नव्हे—खात्री होती. शेवटीं, वक्रगतीनें घरीं जाण्यापेक्षां त्या गतीनें इच्छित मुक्कामास जाणें वरें, असें ठरवून मीं त्या तट्टाचें डोकें लगामाचा इशारा देऊन परत गांवाकडे वळविलें. पण तें कसलें मुर्दाड! त्याला माझी खुबी थोडीच कळणार होती! त्याला वाटलें, कीं, माझ्या मनांतून परत घरींच जावयाचें आहे! आणि म्हणून त्यानें आपली पूर्वीचीच *गति चालू ठेविली: आणि या रीतीनें मीं अखेरीस* उरफाट्या गतीनेंच कां होईना, मुक्कामाचें ठिकाण गांठलें. तेव्हांपासून जीवंत प्राण्याच्या हवालीं आपले प्राण देण्यापेक्षां सडक दाबणाऱ्या रूळाच्या इंजिनांत प्रवास करणें बरें, मग त्या इंजिनावरोबर मागें यावें लागलें तरी हरकत नाहीं, अशी मीं मनाशीं गांठ बांधून ठेविली.

केवळ पंचमहाभूतांच्या मदतीनें होणारीं कार्येंच यंत्राकडून करवितां येतात, असें नाहीं. कांहीं यंत्रें बुद्धीचेंहि काम करितात. गुणाकाराचें यंत्र पुष्कळांनीं पाहिलें असेलच. एकादे वेळीं मनुष्य गुणाकार चुकेल, पण हें यंत्र चुकणार नाहीं. याप्रमाणेंच व्यवहारी व दशांश अपूर्णांक, व्याज, ठेव, श्रेढी यांचीं उदाहरणें बिनचूक करणारीं यंत्रेंहि लवकरच निघतील, अशी माझी खात्री आहे. आवर्तदशांशाचें किंवा अनंत श्रेढीचें एकादें यंत्र निघून अखंड गती (perpetual motion) च्या प्रश्नाचाहि अनायासेंच उलगडा होईल, असा अजमास वाटतो. कांहीं दिवसांनीं जर कवितेचेंहि यंत्र निघालें, तर त्यांत मोठेंसें नवल वाटावयास नको! एका पेटींत कोशांतील सारे शब्द घालून ते एकादा दांडा फिरविल्यानें निरनिराळ्या वृत्तांच्या सांच्यांत पडावे, अशी योजना त्या यंत्रांत करावी लागेल खरी, आणि कमल, चंद्र, फुलें, मुलें, लता, प्रणय, कोकिला, वेडा, अमृत अशा कांहीं विशिष्ट शब्दांचा भरणा त्या पेटींत जरा मोठा ठेवावा लागेल, व अमक्या शब्दाचा अमुक स्थलीं नेहमींच्या परिपाठांतला अर्थ नसून निराळा अर्थ आहे, अशा जागोजाग टीपा द्याव्या लागतील, इतकेंच कायतें. पण एकदां तेवढी योजना केली, म्हणजे कवितेकडे मात्र मुळींच पहावयास नको! या योजनेनें यंत्रांतून निघणाऱ्या वाटेल त्या कवितेंतून टीकाकाराच्या मगदुराप्रमाणें वाटेल तितका मनोहर अर्थ निघूं शकेल. अशा कवितेंत, दांडा फिरविणाराच्या तोंडांतील तंबाखूच्या रसापेक्षां निराळा रस सांपडण्याचा संभव कमी आहे हें मला कबूल आहे; पण या यंत्रावरोबरच रसिकाच्या डोळ्यांतून पाणी काढणारीं व त्याच्या बरगड्या हलविणारीं यंत्रें काढून तीं अनुक्रमें त्याच्या डोळ्यांस व कानेंत अडकविल्यास ही उणीव दूर होईल, अशी खात्री आहे.

अशा यंत्रांतून कशा मासल्याचें कवन निघेल, हें थोड्क्यांत दाखवितों. 'विद्युन्माला' हें वृत्त वाचकांस *माहीत असेलच. याचें वृत्तदर्पणांत जें त्याच वृतांत* वर्णन दिलें आहे तें असें आहे:—.

विद्युन्माला ऐसें बोला।
जेथें मामा गामा आला॥

आतां या वृत्तांच्या सांच्यांत कवितायंत्रांतून काव्य काढिल्यास तें याप्रमाणें होईल:—

पाला नाला जोडा फोडा।
बाबा काका मामा आत्या॥

कामिनीया तेल लावून पडणाऱ्या केसांस लाविल्यानें ते फारच मजबूत, भपकेदार आणि पुष्कळ वाढतात.

यंत्रांतून निघालेल्या श्लोकार्धांत मूळ श्लोकार्धापेक्षां एक असा विशेष आहे, कीं, मूळांत नुस्ता मामाच आला आहे; परंतु यंत्रनिर्मित वृत्तार्धांत मामाच्या पंक्तीस बाबा, काका व आल्या हींसुद्धां बसलीं आहेत. आत्याबाईपेक्षां मामींचा सहवास मामांनां कदाचित् अधिक पसंत पडता. असो. आतां यावरील टीपा देतों, ह्मणजे अर्थ स्पष्ट होईल.

टीपा:—पाला-बागेंत; पाल्याचा बागेशीं संबंध प्रसिद्धच आहे. नाला—पुष्करिणीजवळ; येथील संबंधहि स्पष्टच आहे. जोडा—नायिका. रमणी-वल्लभाच्या जोड्यापैकीं नायिका असल्यामुळें तिला हा शब्द लाविला आहे; जोडा या शब्दाचा पादत्राण असा अर्थ आहे, अशी शंका येऊन नायक नायिकेचें चुंबन घेण्याला कदाचित् कांकूं करील; तसें होऊं नये ह्मणून खरा अर्थ येथें मुद्दाम विस्तारानें दिला आहे. फोडा—आनंदित (झाली.) असा अर्थ घेतल्यावांचून निभाव लागत नाहीं; शब्दाचा व अर्थाचा संबंध काय, तें एक यंत्रच जाणे. बाबा—नायकाच्या; येथेंहि तो संबंध फारसा स्पष्ट नाहीं. कदाचित् नायक-नायिकांच्या भावी संततीच्या दृष्टीनें हा शब्द योजिला असावा पण ही योजना नायिकेस किती पसंत पडेल, हें सांगतां येत नाहीं. काका—काळ्या; कावळ्याचा रंग काळा असतो, हें लहान मुलालाहि माहीत असतें. मामा—पाहून. आत्या—मिशा; 'आत्याबाईला मिशा असत्या तर तिला काका झटलें असतें.' या वाक्यांत आत्याबाईच्या मिशा संकेतार्थांत होत्या, त्या येथें कवीनें स्वार्थांत आणिल्या आहेत. काल्पनिक वस्तुहि कवि समोर उभ्या करितो त्या अशा!

वृत्तार्धाचा अर्थ:—"बागेंत पुष्करिणीजवळ (बसली असतां) नायिका नायकाच्या काळ्या मिशा पाहून आनंदित झाली."

येथें पुष्करिणींत मुबलक पाणी असल्यामुळें रसा-संबंधानें मनुराच्या मुखरसावरच भिस्त ठेवावयास नको!

यंत्रांनीं आजपर्यंत मोठ्या गैरसोईपैकीं बऱ्याच दूर केल्या आहेत, हें कबूल आहे. परंतु लहानसान गैरसोई-कडे कल्पकांचें अजून जावें तसें लक्ष्य गेलें नाहीं. यंत्रांचा मुख्य हेतु श्रम वांचविण्याचा असतो. आज-पर्यंतच्या यंत्रांनीं लांबचा प्रवास, मोठें वजन उचलणें, इत्यादि कृतींचे श्रम वांचतात. पण शतपावली करणें, लहान मूल कडेवर घेणें, अशा क्षुल्लक वाटणाऱ्या कृतींचे श्रम वांचविण्याकरितां आजवर एकादें तरी यंत्र निघालें आहे काय? लांबचा प्रवास वर्षांतून फारतर एकदोनदां होतो; परंतु शतपावली रोज दोनदां करावी लागते. संडोगणती ओझें उचलण्याचा प्रसंग सामान्य माणसास जन्मांत एकदांहि येत नाहीं; पण मूल उचलण्याचा पदोपदीं येतो. या गोष्टी दिसतात क्षुल्लक, पण त्या वारंवार घडल्या ह्मणजे त्यांचा परिणाम मोठा होतो. दांत घांसण्याचें यंत्र नसल्यामुळें कितीकांचे तरी दांत कुजून पडले आहेत. तेंच ओंठ ताणून धरून मंजन लाविलेला ब्रश दांतांवरून फिरविण्याचें यंत्र निघालें, तर बुरसलेला दांत ह्मणजे खरोखरीच दंतकथेप्रमाणें वाटूं लागेल! जांभई आल्याबरोबर चुटकी वाजविणें, ढेंकर येतेशी वाटल्याबरोबर तोंड एकीकडे करणें, शिंक आल्याबरोबर नाकांतील सगळा खजिना दुसऱ्यावर हजाऱ्याप्रमाणें न उडवितां नाकास पदर लावणें, इत्यादि अल्पस्वल्प गोष्टी नीट रीतीनें पार न पडल्यामुळें अनेकदां व्यवहारशून्यत्वाचा किंवा अचरटपणाचा दोष पदरीं येतो; पण यांपैकीं प्रत्येकास अनुरूप असें यंत्र जवळ बाळगीत गेलें, तर आपला व इतरांचा कितीतरी त्रास चुकणार आहे! चिमट्याहुति घालणें, जानवें कानावर चढविणें व सव्यापसव्य करणें, वैश्वदेव करणें, इत्यादि यांत्रिक विधि तर यंत्रांनींच झालेले बरे. मंत्र ह्मणण्याचें ढोंग खरें वाटावें ह्मणून तोंडानें कांहींतरी पुटपुट करावी लागते, ती पुटपुट बगलेंत विजेची पेटी ठेवून तिच्या तारा ओंठास अडकविल्यानें बेमालूम करवितां येईल. एकाद्या मोठ्या प्रयोजनाचे प्रसंगीं प्रत्येकाच्या पानासमोर उभें राहून व रडक्या सुरतेवरहि लटकें हंसूं आणून पाहुण्यांची प्रार्थना करावयाची असते, तिला या विजेच्या पेटीचा खासा उपयोग होईल. तुह्मी परगांवीं गेलां असतां एकादे वेळीं तुह्मांला रस्त्यांत जुन्या ओळखीचा मनुष्य भेटतो, तेव्हां तो आनंद झाल्याची बतावणी करून 'कोठें उतरलां आहांत?' अशी चवकशी करितो; तुमची उतरण्याची जागा कळल्यावर त्या वाजूचा रस्ता इतःपर टाळावयाचा एवढाच त्याचा ही पृच्छा करण्यांत वास्तविक हेतु असतो; तसेंच 'घरीं केव्हां भेटाल?' असा तुह्मीं सवाल केल्यावर तो तुह्मांला नकी

कामिनीया (रजिस्टर्ड) वेगवेगळ्या फुलांच्या मिश्रणाचें अत्तर. वासानें मन प्रफुल्ल करितें.
पाव तोळ्यास १॥. रु. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

ेळ कळवितो, तीहि तो त्या वेळेस सहल करावयास ाण्याच्या इराद्यानेंच कळवितो. अशा प्रसंगी त्याला ंतोषाची व आतुरतेची मुद्रा धारण करण्याच्या कामी ारील विजेच्या पेटीची खाशी मदत होईल, व 'मोलें ातलें रडाया, नाहीं असुं आणि माया' अशा ोलकऱ्यास ऊर बडविण्याचे कामींहि तिचें चांगलें ाहाय्य होईल. रस्त्यानें पायीं चालण्याचेंहि एक असें ंत्र निघालें पाहिजे, कीं, त्या यंत्राच्या रिकिबींत पाय ाकून दिले, कीं, ते त्या रिकिबीसह आपोआप वरखालीं । पुढेंमागें होतील. मात्र तें यंत्र इच्छेप्रमाणें उजवी-कडे किंवा डावीकडे फिरविण्याची कळ त्या यंत्रांत जरूर ठेवावी लागेल; नाहीं तर तें स्वतःच्या प्राणांवरोवर मालकाच्या प्राणांचीहि पर्वा न करितां वेधडक वाटे-तील विहिरीवरच चाल करून जावयाचें ! तसेंच तें यंत्र सुरू कसें करावयाचें याबरोबरच बंद करण्याचें ज्ञानहि मालकाला अगोदर प्राप्त करून घ्यावें लागेल; नाहीं तर सबंध पृथ्वीप्रदक्षिणा झाली, तरी तें थांबा-यचेंच झणून नाहीं. घरच्या घरीं व्यायाम करण्याचीं काहीं यंत्रें निघालीं आहेत; त्यांपैकीं एकहि जागच्या-जागीं चालण्याचा व्यायाम करण्याच्या उपयोगाचें नाहीं जागच्या जागीं चालणें झणजे एका जागीं उभें राहून किंवा आडवें पडून फक्त पायांनां अनुक्रमें वर-खालीं किंवा मागेंपुढें गति मिळणें. अशा व्यायामास स्वच्छ हवेची फार जरूर असते. त्याकरितां आंत उघडणारा पडदा लाविलेल्या दोन नळ्या खुल्या व स्वच्छ प्रदेशांतून, व बाहेर उघडणारा पडदा लावि-लेल्या दोन नळ्या कोंडलेल्या व गलिच्छ भागांतून आणवून प्रत्येक प्रकारची नळी प्रत्येक नाकपुडीच्या वांत्र्यास यावी अशी योजना करावी लागेल: व प्रत्येक नाकपुडीसमोरील दोन नळ्या आळीपाळीनें व नियमित वेळानें तिच्या समोर येतील अशीहि तजवीज करावी लागेल. पण त्याबरोबरच व्यायामेच्छूसहि आपला श्वास नियमित अंतरानें घेण्याची व सोडण्याची खबर-दारी घ्यावी लागेल; नाहींतर या लोकची स्वच्छ हवा मिळण्याऐवजीं परलोकची घाणेरडी हवा मिळण्याचा योग यावयाचा. या यंत्रापेक्षां असें जर कोणीं यंत्र काढिलें, कीं, एकानें व्यायाम करून दुसऱ्याचें अन्न पचावें किंवा एकानें स्वच्छ हवा घेऊन दुसऱ्याची रक्तशुद्धि व्हावी, तर त्याचे साऱ्या मानवजातीवर मोठे उपकार होतील. पण असें यंत्र आपल्या हयातींत निघण्याची आशा दिसत नाहीं.

या सगळ्यांपेक्षां जरूरीचें स्वयंपाकाचें यंत्र होय. हल्लीं स्वयंपाकी किती महाग झाले आहेत, याचा प्रत्येकाला अनुभव आहेच. दरमहा दहादहा वाराबारा रुपये दावे लागून त्यांची पायधरणी व मनधरणी करावी लागते ती निराळीच. त्यांच्या नोकरीच्या अटीहि जबर असावयाच्या. पाणी भरणार नाहीं, पानें मांडणार नाहीं, वाटणार नाहीं, उष्टींखरकटीं काढणार नाहीं, भांडीं घासणार नाहीं, केरपोतेरें करणार नाहीं, चहा करणार नाहीं, मला मात्र दोन वेळचा चहा द्यावा लागेल, बुधवारीं व शनिवारीं रात्रीं नाटकाला जावयाचें असल्यामुळें यजमानांनीं लवकर जेवणें उरकलीं पाहिजेत,व गुरुवारीं व रविवारीं दुपारीं आधल्या रात्रीच्या जाग्रणामुळें स्वयंपाक होणार नाहीं,न्हावी, धोबी वगैरेंचा खर्च यजमानांनीं सोसला पाहिजे ! इतक्या शर्तींवर मालकांची सुटका झाली तर नशीब ! प्रतिवर्षी या यादींत भर पडतच आहे. बारा रुपये पगार घेऊन गाद्यांवर लोळणाऱ्या या शिरजोरांनीं लवकरच यजमानां-कडून पाय चेपून घेण्याची अट घातली नाहीं झणजे मिळविली ! बरें, इतका खर्च व अशा अटी संभाळून थोडेंच सुटतें आहे ! येथें यजमानांच्या हालांचा नुस्ता आरंभ होतो. यानंतर आचाऱ्याच्या लहरी स्वभावाचा अनुभव यावयास लागतो. एकादे दिवशीं भात पेजे-सारखा पातळ होतो, तर दुसऱ्या दिवशीं गारगोटी-सारखा टणक होतो. एकदां तो कच्चा रहातो, तर दुसऱ्यांदां बुडीं लागतो. सकाळीं भाजी खारट होते, तर संध्याकाळीं अळणी होते. एकाद्या खेपेस पोळी हिरवी राहून पोटशूळ उत्पन्न करिते (याच पोळीला 'मुळावरची पोळी' झणतात कीं काय कोण जाणे),दुसऱ्या खेपेस ती जळून कोळसा होते, आणि त्या कोळशाचा दांतांत अडकलेल्या कणांच्या द्वारें आंचवतांना दांत स्वच्छ करण्यांत जो काय उपयोग होत असेल तितकाच कायतो. कधीं चहा खारट होतो, तर कधीं वरण गोड होतें. कधीं भाजींत केशर पडतें, तर कधीं बासुंदींत हिंग पडतो. याप्रमाणें पाकसाहित्याच्या वैचित्र्यांत वाढवाच्या कल्पकतेची भर पडून जो मासलेवाईक पदार्थ निर्माण होतो, त्यास, वर झांकण नसल्यामुळें कोळिष्टकें, झुरळें, पाली व आचाऱ्याच्या तोंडांतील

ओडमेन्स सायप्रस साल्व्ह—डोकें, कंबर, पाठ, छाती यांतून कळा निघूं लागल्यास हें मलम चोळावें. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कंपनी, जुम्मामशीद, मुंबई.

सामाजिक निबंध.

हिंदूंचा ऱ्हास होत आहे काय ?

[रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि, एम. ए., आकोला.]

सन १९११ सालीं घेतलेल्या हिंदुस्थानांतील खानेसुमारीचे आंकडे कांहीं कांहीं प्रसिद्ध होत आहेत. त्या खानेसुमारीचे मुख्य अधिकारी मि. गेट यांनीं एका लेखांत म्हटलें आहे, कीं, पूर्वीच्या दहा वर्षांत हिंदूंचें प्रमाण शेंकडा ७० ३७ होतें, तें १९११ सालीं शेंकडा ६९ झालें. म्हणजे हिंदूंची वाढ होणें एकीकडे राहून त्यांचा ऱ्हास शेंकडा १.३७ याप्रमाणें झाला. हा ऱ्हास, ते साहेब म्हणतात, कीं, हिंदूंच्या विशिष्ट सामाजिक चालीरीतींमुळें, विशेषतः विधवांचे पुनर्विवाह फारसें प्रचारांत येत नसल्यामुळें, झाला आहे. या एका कारणामुळें-कीं, जें कारण हिंदूंच्या वरिष्ठ मानलेल्या अल्पसंख्याक विशिष्ट ज्ञातींतच प्रचलित आहे त्यामुळें-ज्या इतर ज्ञातींत पुनर्विवाह प्रचलित आहे अशा ज्ञातींतील लोकसंख्या विशिष्ट ज्ञातींतल्या लोकसंख्येपेक्षां कितीतरी पटीनें अधिक असतां-एकंदर हिंदूसमाजाच्या संख्येवर एवढा मोठा परिणाम झाला असावा, असें मानण्यास मन कचरतें. हिंदूंची संख्या कमी झाली आहे, ती वस्तुतः कमी झाली आहे, कीं, केवळ सापेक्ष आहे, म्हणजे अन्य लोकांच्या संख्येच्या मानानें मात्र कमी झाली आहे,-हें अगोदर पाहिलें पाहिजे. पंजाबांतल्या लोकसंख्येचे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसतें, कीं, त्या प्रांतांत खानेसुमारीच्या पूर्वीच्या दहा सालांत हिंदूंची संख्या वस्तुतःच कमी झाली आहे, व ती थोडीथोडकी नाहीं, तर शेंकडा ६.७ नें कमी झाली आहे; व तीवरोवर मुसलमानांची संख्या शेंकडा १.१४ नें, बौद्ध, पार्शी इत्यादींची शेंकडा १०.४२ नें, व हिंदी ख्रिश्चन लोकांची तर शेंकडा ३२९.०१ नें वाढली आहे. हे आंकडे पाहिले म्हणजे हिंदूंचा ऱ्हास धर्मांतरानें प्रायः झाला असावा, म्हणजे बरेच हिंदूलोक आपला जन्मसिद्ध धर्म सोडून मुसलमान व विशेषतः ख्रिश्चन झाले असावे, असें दिसतें. कारण, एकंदर पंजाबांतील लोकसंख्या शेंकडा १.१४ नेंच कमी झाली आहे. ती कमी होण्याचें प्रत्यक्ष मुख्य कारण प्लेग, व परंपरेचें मुख्य कारण दारिद्र्य हीं असावीं, असा तर्क वहावतो. दारिद्र्य हें एक कारण असलें म्हणजे त्याला अनुषंगी इतर कारणें-गलिच्छ घरें, गलिच्छ हवा, गलिच्छ पाणी, गलिच्छ कपडे, रोग, अज्ञान-हीं असावयाचींच! त्या दारिद्र्याला पुष्टि देणारें कारण, शरीररक्षणास अवश्य लागणाऱ्या धान्यादिकांच्या वाढल्या किंमती-हें निर्दिष्ट दहा वर्षांत सरसावलें! पंजाबांतल्याप्रमाणेंच इतर प्रांतांतहि हिंदूंचा ऱ्हास व इतर धर्मांतील लोकांची वृद्धि आहे कीं काय, हें अजून समजलें नाहीं. प्रांताप्रांताचे व समग्र हिंदुस्थानाचे खानेसुमारीचे रिपोर्ट बाहेर पडतील, त्या वेळीं या गोष्टी निर्णीत होतील. तरी त्या रिपोर्टांचें सूक्ष्म रीतीनें पर्यालोचन करणें आपणां सर्वांस, विशेषतः हिंदूंस किती अवश्य आहे, हें यावरून दिसून येईल.

२. आंकड्यांचा म्हणजे निश्चित गोष्टींचा आधार न घेतां मनावर कांहीं थोड्या दृष्ट व अनुभूत, परंतु एकदेशीय गोष्टींमुळें एक प्रकारचा अनुकूल किंवा प्रतिकूल ग्रह होतो, तो ग्रह सार्वत्रिक वस्तुस्थितीशीं धरून असलाच पाहिजे, अशी समजूत करून घेऊन आपणांपैकीं बरेच लोक लेखनद्वारा किंवा भाषणद्वारा निर्बाध

केश सुंदर असावे असें वाटत असेल तर कामिनीया तेलाशिवाय बाजारांत मिळणारीं हलक्या प्रकारचीं तेलें बिलकुल वापरूं नका !

सामान्य विधानें ठोकून देतात, व त्या विधानांच्या समर्थनार्थ काल्पनिक कारणें पुढें करितात ! कांहीं सांगितलेलीं कारणें काल्पनिक नसून खरीं असलीं, तरी त्यांना वाजवीपेक्षां ते जास्त महत्त्व देतात, व कांहीं अदृष्ट कारणें असतात त्यांकडे त्यांचें लक्ष्यच जात नाहीं, असा प्रकार दिसून येतो. त्याला आतां आळा घालणें अवश्य आहे. योग्य कारणांचा सांगोपांग विचार करून, त्यांना वाजवी महत्त्व देऊन शुद्ध तर्कपद्धतीनें अनुमानें बिनचूक काढण्याचा प्रचार हल्लींपेक्षां वाढला पाहिजे, व अनुमानाचा पाया ज्या खरोखर असलेल्या किंवा घडलेल्या सजातीय, वा विजातीय–अनुकूल वा प्रतिकूल–गोष्टी असतील त्या मोठ्या प्रमाणावर सूक्ष्म अवलोकन करून राग किंवा द्वेष किंवा पूर्वग्रह-तात्पर्य अहंभाव–एकीकडे सारून निश्चित केल्या पाहिजेत. कांहीं गोष्टी सरकार निश्चित करीत आहे, पण इतर कांहीं गोष्टी विचारी पुरुषांनींच जमल्यास निश्चित केल्या पाहिजेत.

३. विचारी पुरुषांत म्युनिसिपालिटीचे अधिकारी, गिरण्यांचे मालक, डॉक्टर, प्रोफेसर, शाळामास्तर इत्यादिकांचा समावेश सहज होऊं शकेल. त्यांनीं आपापल्या टापूंतील असलेल्या व घडलेल्या गोष्टींचीं यथातथ टिपणें केलीं किंवा करविलीं, तर बऱ्याचशा गोष्टींचा त्या त्या टापूंसंबंधानें उलगडा होईल. उदाहरणार्थ प्रकृत विषय–हिंदूंच्या ऱ्हासाचीं कारणें–हा घेतला, तर म्युनिसिपालिटींत जातवार जननांचे व मरणांचे आंकडे असतात, ज्या रोगानें मरण आलें त्याचें ठोकळ स्वरूप दिलें असतें. हे आंकडे त्या त्या शहराच्या दृष्टीनें तपासले, तर कोणत्या जातींत कोणत्या महल्ल्यांत मरणसंख्या जननसंख्येपेक्षां अधिक आहे, हें सहज समजेल. मरणसंख्या अधिक असल्याखेरीज ऱ्हास व्हावयाचा नाहीं हें उघड आहे. बऱ्याच शहरांतून पांचवर्षांच्या आंतील मुलांची मरणसंख्या एकंदर मरणसंख्येच्या निमी असते असें आढळून आलें आहे. ही राष्ट्राची केवढी मोठी हानि! तीमुळें स्त्रियांच्या शक्तीचा, श्रमांचा व आयुष्याचा केवढा ऱ्हास ! शहरांमध्यें मुलांनां चांगलें दूध मिळत नाहीं, स्त्रियांची बाळंतपणांत योग्य व्यवस्था राहत नाहीं, बाळंतपणाकरितां ज्या दाया येतात, त्याच अजाणपणानें व निष्काळजीनें नाहींत ते रोग उपस्थित करितात, व मरणसंख्या वाढवितात, असें पुष्कळ शहाण्यांचें म्हणणें आहे. हा प्रश्न पुण्याच्या म्युनिसिपालिटीनें हातीं घेतला आहे. त्याचा कसा निकाल लागतो याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. मरणसंख्या कमी असली, तर लोकसंख्या वाढली ! व तेथें ऱ्हासाचा प्रश्नच नाहीं ! परगांवाला गेले परगांवाहून आले, यांची संख्या नोंदण्याची वहिवाट नाहीं, त्यामुळें कांहीं चूक राहायाचीच. पण तीबद्दल योग्य सूट देण्याचा विचार झाला पाहिजे. हा अर्थात् क्षेत्राच्या व व्यापाराच्या गांवीं अवश्य झाला पाहिजे. तसेच कोणते रोग कोणत्या जातींत व महल्ल्यांत विशेष बाधक होतात, ते रोग स्थलपरिस्थितीचे निदर्शक आहेत, कीं, जातींच्या विशिष्ट राहणीचे निदर्शक आहेत, हें डॉक्टरांच्या विचारानें ठरवितां येण्याजोगें आहे. सालोसालच्या या आंकड्यांचा पडताळा खानेसुमारीच्या आंकड्यांवरून पाहतां येतो. गिरण्याच्या मालकांनां आपल्या कामकऱ्यांच्या ताकदीचें, आजाराचें व आजारानें झालेल्या गैरहजिरीचें टिपण ठेवतां येण्याजोगें आहे. त्यावरून विशेष आजार कोणते होतात, व त्यांमुळें कितपत अपाय होतो हें समजल्यावर उपायांची योजना मागाहून करितां येईल. प्रोफेसर व शाळामास्तर यांनां निरनिराळ्या जातींतील मुलांच्या वयाच्या पंचकड्या ठरवून त्यांची उंची, वजन, छातीची रुंदी, व वजन उचलण्याची ताकद, यांसंबंधानें दरवर्षी नोंद करितां येईल. अशी नोंद सतत दहा वर्षे केली तर मुलांची वाढ योग्य होत आहे कीं नाहीं, हें डॉक्टरांस विचारून ठरवितां येईल. अशा तऱ्हेची माहिती पाश्चिमात्य सुधारलेल्या देशांत बऱ्याच शाळांत ठेविली असते. त्या माहितीशीं इकडल्या माहितीची तुलना करितां येईल तर किती बरें होईल. शाळांतील मुलें ठळक ठळक जातींचीं असतात, तेव्हां त्यांची संख्या समाजांतील एकंदर मुलांच्या संख्येहून पुष्कळ कमी असली, तरी ती, शितावरून भाताची परीक्षा करितां येते, या न्यायानें सर्व जातींची निदर्शक घेण्याला बाध येत

कामिनीया तेल थंडीच्या दिवसांत लावून स्नान केल्यास अंग फुटत नाहीं व स्वच्छ आणि तजेलेदार होतें. सर्वत्र विकत मिळतें. दर बाटलीस रु. १.

नाहीं. शाळांतील मुलें भावी पिढीचे जनक, तेव्हां त्यांची सुस्थिति राहील, तर भावी पिढी सुस्थितींत राहील ! म्हणून त्यांची स्थिति वर्षानुवर्ष सुधारत आहे, कीं खालावत आहे, हें पाहणें अवश्य आहे. तें ठरविण्याला वर सांगितलेले आंकडे तुलनात्मक रीतीनें तपासले पाहिजेत.

४. बहुतेक हायस्कुलांनां भोजनवसतिगृहें आतां जोडिलीं आहेत, व त्यांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्याकरितां विशिष्ट डॉक्टरांचीहि योजना झाली आहे. तेव्हां या वसतिगृहांतील विद्यार्थ्यांचे सामान्य रोग कोणते, कितीकांची दृष्टि कोती आहे, कितीक कमीजास्त बहिरे आहेत, कितीकांनां खरूज इत्यादि स्पर्शजन्य रोगांची पीडा आहे, कितीकांनां वाह्यदृष्टीस अदृश्य असे इतर रोग, फुप्फुस, हृदय इत्यादिकांचे विकार आहेत, हें वेळोवेळींच्या तपासणींत सहज कळून येण्यासारखें आहे. पूर्वज्ञान पुढील उपायांस अवश्य आहे; तेव्हां या कारणांनीं ऱ्हास होत असेल तर तो टाळण्याचा एक मार्ग खुला होईल.

५. हल्लीं निरनिराळ्या जातींच्या सामाजिक परिषदा भरत आहेत. त्यांत त्या त्या जातीची औद्योगिक, सांपत्तिक, नैतिक, धार्मिक इत्यादि उन्नति कशी होईल या प्रश्नांचा खल होत आहे, व त्या त्या ज्ञातीतील तरुण विद्यार्थ्यांस विद्येचा दुर्गम पंथ सुगम करण्याचे उपाय प्रचारांत येत आहेत. हें ठीकच आहे. प्रत्येक जातीची उन्नति झाली, म्हणजे सर्व जाती मिळून बनलेला जो एक समाज त्याची उन्नति आपोआपच होणार ! तेव्हां सर्व समाजांचा ऱ्हास जर एकंदरींत होत असेल तर तो कोणत्या तरी विशिष्ट जातींत होत असला पाहिजे. तेव्हां त्या त्या जातीनें आपलें क्षेत्र तपासावें. प्रत्येक ज्ञातिपरिषदेनें जर आपल्या ज्ञातीतील शंभर कुटुंबें–श्रीमंत १५, मध्यम ३५, व गरीब ५० घेऊन, त्या कुटुंबांतील स्त्रीपुरुषांच्या तीनचार पिढ्यांच्या आयुर्मितीचें टिपण करविलें, व ही सारी माहिती संगृहीत करून लिहिलेले लेख जर परिषदेंत वाचले, तर ते कितीतरी बोधप्रद होतील. अनुमानांत चुका होणार नाहींत असें नाहीं, पण परस्परविरोधी चुका एकमेकांचा विलय करितात. या अल्पसंख्याक जातींच्या परिषदा संकुचित दृष्टीचें परिपोषण करितात व एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेस विघातक होतात, असा जो एक आक्षेप कितीएक विचारी पुरुष घेतात, तो निर्बल करण्याला हा सुचविलेला मार्ग चांगला उपाय आहे असें दिसून येईल. जातिरूप एकएक ओहोळ पूर्ण भरल्याबांचून समाजरूप नदाचें पात्र भरणार नाहीं; मात्र प्रत्येक ओहोळाची प्रवणता त्या नदाकडेच असली पाहिजे. तशी प्रवणता सर्वत्र दिसून येत आहे, हें त्या त्या परिषदेंत पसंत झालेल्या ठरावांच्या साम्यावरून स्पष्ट दिसून येत आहे. तेव्हां जो प्रश्न सर्व समाजासंबंधानें सरकारास किंवा त्रयस्थांस हातीं घेणें दुष्कर आहे, तो प्रश्न प्रत्येक जातिपरिषदेनें हातीं घेतला–व तसा घेणें तीस सुकर आहे–तर त्या विशिष्ट ज्ञातीचें प्रत्यक्ष कार्य होऊन सर्व समाजाचें कार्य होण्यास तयारी केल्याचें श्रेय अनायासें त्या परिषदेस मिळेल. म्हणून या सूचनेचा विचार प्रत्येक परिषदेनें पुढील बैठकींत अवश्य करावा, अशी विनयपूर्वक प्रार्थना आहे. तिनें या कामाकरितां लहानशी रकम उभारावी. तींतून एकादा पगारी गृहस्थ नेमून, त्यानें ठिकठिकाणीं जाऊन त्या त्या जातीसंबंधानें ही माहिती मिळवावी, व ती एकत्र करून दरवर्षी सादर करावी, अशी योजना करावी. ही सुसाध्य आहे व अंतीं फलद्रूप होणारी आहे.

६. तात्पर्य, हिंदूंचा ऱ्हास खरोखर होत आहे काय हें आधीं निश्चित करणें; तो प्रांतिक आहे, कीं, सार्वत्रिक आहे हें निश्चित करणें; व नंतर त्या ऱ्हासाचीं कारणें व त्यांचें महत्त्व निश्चित करणें, हें अवश्य आहे. सुधारलेल्या पाश्चिमात्य देशांत लोकसंख्या पूर्वीइतकी आतां वाढत नाहीं, याचें कारण जननसंख्येचा कमीपणा होय. वर्षानुवर्ष तिकडे प्रत्येक कुटुंबांत कमीच मुलें उपजतात ! आपल्या इकडे जननसंख्या दर हजारीं ३० पासून ५० पर्यंत आहे ती तिकडील जननसंख्येच्या दुपटीतिपटीवर आहे, परंतु मरणसंख्या दर हजारीं २३ ते ४५ आहे व हीहि बिनचूक नाहीं ! पण ही मरणसंख्या तिकडील मरणसंख्येहून कितीतरी मोठी, व आपल्या इकडील सामान्य आयुर्मिति कितीतरी थोडी ! इकडील २५ ते ३०, तिकडील ४०–५० !

ट्रेझो टॅबलेट्स—दुसऱ्या कोणत्याहि औषधानें गुण न येईल तर कसल्याहि प्रकारच्या मस्तकदुखीवर या वड्या वापरून पहा !

या भेदाचीं कारणें इकडील हवापाणी असेंच प्रायः सांगण्यांत येतें, व तें एकच व मुख्य कारण असेल तर मग बऱ्याच अंशानें अपरिहार्य होईल. बऱ्याच अंशानें ह्मटलें याचें कारण हें, कीं, हवापाणी हेंहि कारण कृत्रिम उपायांनीं थोडेंबहुत बदलतां येतेंच !— पण हवापाणी हें एकच किंवा मुख्य कारण नव्हे. माझें अनुमान अगदीच चुकलें नसेल, तर या प्रश्नाचा खल होऊन अंतीं असें निदर्शनास येईल, कीं, ऱ्हास विशिष्ट ज्ञातींत किंवा एकंदर हिंदूंत असेलच, तर त्यांचीं बहुतेक कारणें अज्ञानजन्य परिस्थितीचीं आनुषंगिक आहेत. बरींच कारणें दारिद्र्यजनित अथवा सांपत्तिक आहेत, व कांहीं थोडीं विशिष्ट ज्ञातींतील वेड्या आचारांत विलीन आहेत. तीं तीं शोधून काढून त्यांवर यथाशक्ति व सोत्साह प्रतिकार करणें—ह्मणजे ज्ञानाचा प्रसार करणें, उद्योगधंदे वाढविणें, व आचारांत सुधारणा करणें, हें त्रिविध विचारी पुरुषांचें कर्तव्य आहे. या प्रतिकारयोजनेंत विशेष हा आहे, कीं, ऱ्हास नसला तरीहि मात्रा गुणकारीच होईल—उन्नति करील, अपाय ह्मणून व्हावयाचा नाहीं. अशा त्रिविध वा एकविध विचारी पुरुषांस या लेखानें अल्प जरी प्रोत्साहन दिलें, तरी त्याची कृतार्थता होईल. विचारी-सोत्साह-व शांत पुरुषांस हेंहि सांगणें नको, कीं, प्रत्येकाच्या प्रयत्नाला स्वतःचें गृह हेंच केंद्रभूत व्हावें; प्रयत्नाचें वर्तुळ पाण्याच्या लाटेस अनुसरून उत्तरोत्तर दीर्घ होत जावें, त्यांत प्रथम इष्टमित्र, शेजार, नंतर आळी, नंतर महल्ला, नंतर गांव, यांचा समावेश व्हावा. विचारी पुरुष म.वा. रानड्यांसारखा किंवा नामदार गोखल्यांसारखा, टाटांसारखा किंवा सर डॉ. भांडारकरांसारखा अलौकिक असेल, तर त्याच्या प्रयत्नाच्या लाटा वाढत वाढत पूर्वापर व दक्षिण तोयनिधींस गेट देऊन हिमाद्रीच्या शृंगांचाहि समाचार घेतील !

रशिया देशांत पोस्टांतून जाणाऱ्या पत्रांपैकीं सरासरी शेंकडा दहा पत्रें सरकारी हुकुमावरून अधिकाऱ्यांकडून फोडण्यांत येतात. पत्रें अचूक फोडण्याचा ज्यांनीं चांगला अभ्यासच केला आहे, असे कुशल लोक प्रत्येक शहरांत या कामासाठीं नेमलेले असतात.

एका जर्मन कारागिरानें एक विलक्षण घड्याळ शोधून काढलें असून त्याला फोनोग्राफची योजना करण्यांत आली आहे. त्यांतील फोनोग्राफ 'मधुर आवाजा' नें किती वाजले हें सांगत असतो.

एका उंदराच्या जोडप्यापासून तीन वर्षांत एक हजार प्रजा उत्पन्न होते !

नार्वे देशांत नवरांबायकोला दीडपट दरानें रेल्वेंतून प्रवास करतां येतो. हिंदुस्थानांतील रेल्वेकंपन्यांनीं ही सुधारणा अमलांत आणण्यासारखी आहे.

जगाद्रील कोणत्याहि सुधारलेल्या देशापेक्षां रशिया देशांत डॉक्टरांची संख्या कमी आहे.

सोनें ठोकून इतकें पातळ करतां येतें, कीं, एक इंच जाडीचा थर बनविण्याला त्याचे २,८२,००० पत्रे लागतात !

न्यूयॉर्कमधील एका इंजिनियरानें असा एक क्यामेरा शोधून काढला आहे, कीं, त्यानें तिजोऱ्या फोडणाऱ्या चोराचा तत्क्षणीं फोटोग्राफ निघतो !

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रांपैकीं २४६७ दैनिक आहेत, ५९ आठवड्यांतून तीनदां प्रसिद्ध होतात, ६१० आठवड्यांतून दोनदां निघतात व १६१८१ साप्ताहिक आहेत.

उसांच्या फुकट जाणाऱ्या भागापासून जगांतील अत्युत्कृष्ट कागदापैकीं बहुतेक तयार होतो.

प्रत्येक कुटुंबांत ट्रेझोच्या वड्यांची एकतरी वाटली अवश्य पाहिजे ! मस्तकशूलावर
तत्काळ गुणदायक औषध ट्रेझोच्या वड्या हेंच होय !

काव्यगुच्छ.

पुरें जाणतों मीच माझें बल !

[श्रीयुत रे. नारायण वामन टिळक, अहमदनगर.]

हा एक कक्षेंत छावा गजाचा, दुजीमाजिं हा सिंह केंकावतो !
हा जाहला अर्धमेला भयानें लपोनी महाव्याघ्र डोकावतो !
हे पर्वतांचे उभे क्षुद्र धोंडे, महासागरांचे पुढें पल्वल !
बोला हवें तें ! मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल !

भूगोल हा दोन बोटांत माझ्या, नको अंतराला तुझी थोरवी !
पाहीन एके दिनीं मीच सारे कुठें झांकलेले तुझे ते रवी !
हीं पंचभूतें मला सेविणारीं, खरें सांगतों, मी न गर्वाकुल!
बोला हवें तें ! मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल !

मी भासतों कीट, ही भूति माझी परी भेदि सूर्याचिया मंडला !
"तूं हांस काला मला ! मी तुलाही सदा हांसतों गर्विता चंचला !
हे व्याधिनों ! आधिनों ! मक्षिकांनों ! तुम्ही बापुडीं कायशीं दुर्बल !
बोला हवें तें ! मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल !

हें विश्व सारें विहारास माझ्या पुरेसें नं होईल, शंका नको !
"हा मर्त्य, हा देहकारानिवासी, बळें हीन हा," कांहिं कोणी वको !
मी मर्त्य, मी मृत्युला जिंकिणारा! जगीं धूळ, मी दिव्यता उज्ज्वल !
बोला हवें तें ! मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल !

मीं ओळखीलें मला पूर्ण ! आतां कशाला मला पाहणें आरसे ?
माझ्यापुढें नित्य आत्मानुभूती, पटावे दुजे तर्क आतां कसे ?
मी ईश्वराच्या जगत्कारणाच्या खरी हेतुची पूर्तता मंगल !
बोला हवें तें ! मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल !

फूलपांखरूं फुलवेली !

[श्रीयुत त्र्यंबक बापूजी ठोमरे, अहमदनगर.]

"हें फूल । या उडत्या स्वर्गातील !
माणिक हें । वाइ गडे झुलतें आहे !
हें तान्हें । सृष्टीचें गोजिरवाणें ! "
कौतुकली । मधुवदना हंसली वदली.

" स्वछंदी । फूलपांखरा ! आनंदी
माधविका । पाठविते तुज या लोका
ये, गाई । चुंबनमय गाणीं कांहीं.
खेळ इथें । या कोमल कलिकेवरतें.
ही बाला—। फूलपांखरा ! चुंबि हिला !"

फुलें नवीं । मुग्ध लतेवरती यावीं
त्यापरि ती । प्रेम–लता फुलली चित्तीं.
हाय ! परी । फूलपांखरूं तिचें दुरी !
नातरि तें । या सुमनीं स्वर्गच वघतें !

"थांब गडे ! । धांवुं नको इकडे तिकडे !
कलिका ही । मुग्ध हृदय उकली पाहीं !
प्राणच तूं । एक तिचा जीवनहेतु !
थांब तरी—। कठिनच गे नरजाति खरी!"

फुलवेली । क्षण रोषें रंजित झाली.
ते बाण । मदनाचे हरिते भान !
रंगहि ते । जडतेला जीवन देते !
अरसिक तें । फूलपांखरूं परि होतें.
रसिक न कां । हाय पण तिचा प्राणसखा?

हें सुमन । तुजवांचुनि चुंबिल कवण ?
"सांगतरी—" । गद्गदली फुलवेल परी !
" विरहानें । शून्य न कां गमती भुवनें?"
हृदयाला । पूर पुरा भरुनी आला !

"या आतां—। अंत किती बघतां नाथा !
मी फूल । या निर्जन रानांतील.
श्वासानें । व्यर्थ आर्द्र करितें भुवनें !"
"व्यर्थचि का ?"
"कोण !—वाइग प्राणसखा !"

सांज खुले । दिनरजनीमेलन झालें.
दंवमाला । –उपमा तरि कसली त्यांला ?
टपटपती । स्वर्भूच्या हृदयावरती !
कूजनही । मधुनि मधुनि ऐकूं येई !

सांजचि ती । वर्णावी कैशी गीतीं ?
त्या छाया । कवि होता अवलोकाया,
कौतुकला । शब्द परी न फुटे त्याला !
मूकपणीं । अक्षय गुंगे हेंच मनीं !
'गोड भली । फूलपांखरूं फुलवेली !'

ओडमेन्स मलेरिया पिल्स—एक दिवसाआड, रोज, थंडी वाजून येणाऱ्या तापावर बस्ताद.
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मा मशीद, मुंबई.

शिंग.

[श्रीयुत रेंदाळकर, मुंबई.]

तुंग गिरीची उशी करोनी
श्यामल तरुंच्या मृदु शय्येवर
पांघरुनी मधुसमीरलहरी
पडलों होतों स्वस्थ आपला सुखकर तंद्रावस्थेंत;
काय, कसें जाहलें, न ठावें!
इंद्रकार्मुक व्योमीं उठलें
गुणगुणतां मी कांहींबाहीं
टोंक तयाचें एक चिकटलें येउनि माझ्या ओष्ठाला.
एका हातें दंड धरोनी
केलें त्याचें शिंग तदा मीं
विश्वांतिल आनंदोच्छ्वास
भरुनि त्यामधें वाजविलें तें,अनंतांत तो ध्वनि शिरला!
आनंदानें वेडया होउनि
'गिरगिरमाता' तारा खेळति
ब्रह्मांडाचा गोल सर्वहि
नाचुं लागला, डोलुं लागला, शून्यहि झालें प्रत्यक्ष!
आकाशांतिल काळे डोंगर
फुटुनी फुटुनी गेले कोठें!
तारा-मंदिर झालें निर्मल
मरुभूमीवर फलपुष्पान्वित नवतरुराजी उद्भवली!
रविशशितारा उदित एकदम
होउनि भरलें तेज चहुंकडे
गडबड झाली रात्रिचरांची
फुलांतल्या कीटांचीं हृदयें विदीर्ण झालीं शतवार!
आशा, प्रीती, उत्साहाची
उषा जगावर उदया आली!
स्वर्णरसानें न्हालीं भुवनें
वियुक्त-मेलन-मधुसंगीतें दुमदुमला अंबरभाग!
निरुपचार विमल व्यवहार,
पवित्र वांछा, उन्नत जीवन,
उघडया हृदयें प्रेमभाषणें
या साम्राज्यीं गुलाब फुलला कंटक सारेही गळुनी!
वैराग्यावर गदाच पडली
प्रीतिसरिज्जलतरंग शीतल-
अशांतिवन्हिज्वाला विझविति
त्या शिंगाच्या नादरसानें सेचित झाली रुक्ष मही!
हिंसा, द्वेष, क्रोध, निमाले
बंधुत्वाचें नातें पसरे
मंगल मंगल जिकडे तिकडे
हासें मंगल, गीतें मंगल, मंगल आनंदाश्रुनदी!
क्रंदन-भीषणनाद हरपला
सर्व विश्व झालें नंदनवन
विषयेच्छा मग टिके कोठुनी
स्वर्गीसम पवित्र झाले माझ्यावरचे ओढेही!
नव कुसुमें अश्रुचीं विकसलीं
भूवर त्यांचा सडाच झाला
शिशुसम यथयथ नाचति वृक्षहि
दिव्य सौरभें एका ठायीं धावत आल्या दाही दिशा!
खालींवर हें कांहिंच नुरलें
मेघ उतरले भूवर झरझर
व्योमीं सागरवीचि उसळल्या
अनंत विश्वें गोळा झालीं एकच उज्ज्वल तेजांत!
त्या शिंगाच्या नादलहरिवर
बसुनी कुतुकें गुंगत गुंगत
हळुहळु मधुनी करित मधुस्मित
प्रणयी जन विहरती घालुनी हस्त परस्परकंठांत!
पापी हृदयें जळून गेलीं,
पवित्रतेला फुटले किसलय,
वृत्ति पालटुनि कलुषित सहसा
शुचिप्रणयरसमृदुकल्लोलीं करिती लीला नरनारी.
'तुझीच मी' 'मी तुझाच' मंगल
गान चाललें त्या शिंगावर,
जड गिरि उठले तें ऐकाया
आत्मत्वा विसरुनी रंगलीं सारीं हृदयें प्रेमांत!
त्या शिंगाच्या गभीर नादें
गेल्या बाष्कळ रूढि ध्वंसुनि;
क्षुद्र थोर हा निरसुनि भेद
एकत्वाचा समतेचा नव मधुर भाव सर्वत्र भरे!
त्या शिंगाच्या नादवायुनें
जुनें पुराणें उडून गेलें!
नावीन्याचें वर्षण झालें
पुष्पगुच्छसम विश्व सर्वही सुंदर हृदयंगम दिसलें!
उल्हासानें आवेशानें
शिंग फुंकतां मी त्या वेळीं
प्राणवायुसह शिरलों त्यांतच
तेजाचे कण सरसर उठले अनंत आकाशांत तदा!
दिव्य कांतिनें त्या, विश्वांतिल-
भीषण सारें तिमिर नाशिलें
आहे अजुनी आत्मा माझा
अनंततेजोगोलकरूपें तळपत या ब्रह्मांडांत!

चंडोलगायन.

श्रीयुत नागेश, कोल्हापुर.

आकाशाच्या उंचवट्यांत
उंच भराऱ्या मारित मारित
चंडोल द्विज नव संगीत–
असतां गात स्वच्छंद, तियें भटकत मी गेलों;
अभिनवविद्युत्स्फुरत्तरंगिणि
वहात होती त्या गीतांतुनि
त्यांतिल एकच तरंग, नूतन रसिकां दावाया आलों.

"या विश्वाच्या नव्या अंगणीं
शोभविलेल्या नव्य उद्गुणीं
नव्या जनांनों ! या या धांवुनि
नव्या जलाचीं गगनीं उडवा नूतन धुइधुइ कारंजीं!
भेदुनि अंबर तीं जावोत
कोटि स्वर्ग इथें आणोत
नंदनवनगतसुरतरुकुसुमीं मधुकरसम घाला रुंजी!

"तुमची अप्रतिहत गति ललिता
हंसवो डुलवो अवघ्या जगता
ठायीं ठायीं नव्य दिव्यता
पसरुनि सत्वर जीर्ण जगीं या नवजीवनरस उसळूंद्या!
नव्या दमाचे ते धीराचे
नवे लोट उत्साहि बलाचे
तुह्मांत मिसळुनि गोल सर्व हा तेणें व्योमीं नाचूंद्या!

"ओबडधोबड काळे पत्तर
पडुनि राहिले या माळावर,
करुनि चबुत्रे त्यांचे सुंदर
नवे तरुण हो ! ठायीं ठायीं येथें द्या ते ठेवून,
पहाडांत लपुनी बसलेले
अजुन कुणासहि नच दिसलेले
असंख्यात ते झरे मधुरतर आणा येथें शोधून !

"बघुन झरे हे चारण येतिल,
तृषा शमवुनी प्रशांत होतिल,
याच चबुत्र्यांवरि मग बसतिल
हृदयविभेदक दिव्य गायनें स्वैर इथें ते गातील !
नक्षत्रांच्या मुठी भरोनी
देतिल येथें ते फेंकोनी;
तुह्मांकडे मग 'डिरींपोटें' थक्क होउनी बघतील !

"हिरव्या कुरणांमधिं लपलेले
शून्यांतरिं भटकत असलेले
घोर गुहा घरुनी बसलेले
नव्या दमाचे जोरदार ते शब्द अतां खेंचुनि आणा!
दिव्य 'तुतारी' कवि केशवसुत
फुंकित आहे नंदनवनगत
तिच्या प्रचंड स्वरांत सत्वर द्या हो द्या फेंकुनि त्यांनां !

"हिंगणबेटाच्या त्या तेलें
चिकट होउनी थिजुनिच गेलें !
दुराग्रहानें पोसविलेलें
थिल्लर; ऐशा त्या डोक्यासहि उत्तेजित ते करितील !
मेल्याहुनिही या मेल्यांनां,
मानवांस–छे, या दगडांनां
हे नव शब्द क्षणांत नूतन आत्मे आणुनि देतील !

"नूतन सविता, नूतन तारक,
नूतन कविता, नूतन वाचक,
नूतन रसही, नूतन मुद्रक,
नूतन इन्दू, नूतन वारे, नूतन निर्मल पुष्करिणी,
नव्या उषेवर नवीं मौक्तिकें,
नव्याऽर्णविं नवकुसुमजालकें !
हे नव शब्द क्षणिंच टाकितिल सृष्टी नूतन ही करुनी!

"चित्रबंधयमकश्लेषांचे
जुन्या मोडक्या दागीन्यांचे
लंगर हे फुटक्या कवडीचे
फेंकुनि देतिल, आणितील कुलवधूपमा ते कवितेला!
नसति शब्द हे ! ही जादूची,
'तुतारि'च्या वा दिव्य सुरांची
कांडी तुमच्या हातीं देउनि केशवसुत नंदनिं गेला!

"नवतरुणांनों ! तुमच्या हातीं
चराचरावर फिरो अतां ती,
नवत्व येवो त्या सर्वांप्रति,
नूपरसिंजन, दुंदुभिघोषण एकच समयीं होऊंद्या !
पुरा, जुन्यांनीं अन्धेरिलेला
तुमच्यासाठिंच हा अडलेला
सृष्टिसतीचा निसर्ग तो वर तुमच्याच करीं येऊंद्य

"जुनेपुराणे तलाव हंसतिल,
शिव्याशाप खबदाडें देतिल,
जखड वेलिही वोटें चुरतिल,
राहोतचि तीं दूर! धीर हो! तुमचें घोषण होऊंद्य.
अहो नव्यांनों ! यसुनि नंदनीं
पहात आहे तुह्मांस कोणी,
उठा उठा ! लौकरी उठा ! तर आळस सारा फेंकुनि द्या!"

प्रेमपाठ.

[श्रीयुत 'गोविंदाग्रज,' पुणें.]

चित्तकोकिला प्रेमा ! गाया जगद्वायनाला,
पंचप्राणांचा पंचम तव लावि याच काला.
हृदयवसंतहि खुलला, भुलला जीव तुझ्या गानें,
वृत्तिलता बहरल्या; फुलांनीं विसरविलीं भानें.
प्रेमाश्रूंच्या मधुबिंदूंच्या करूं सेचनातें,
संतोषाच्या श्वासाच्या या मंदमंद वातें.
प्रेमरसाच्या या वर्षावें भूदेवीहृदयीं,
तृणांकुराच्या रोमांचांची पेरणीहि व्हावी.
चला मनाच्या मळ्यांत पेरूं प्रीतीचीं बीजें,
चित्तगीत-पुष्पें मग उधळूं; कोण उगिच लाजे?
आज जगाची लाज सोडुनी होऊंया वेडे !
प्रीतिपटाच्या खालीं दडवूं जें जें मनिं तेढें.
पहा नदीच्या जलांत संध्यारंग उडी घाली !
हृदयनदाच्या जलीं पडूं द्या प्रीतीची लाली.
दीप तटींचे जलीं करविती किरणांचा नाच,
नयनदीपकिरणांस नाचवा हृदयजलीं साच.
काळ्याकाळ्या ढगांढगांवरि संध्येची लाली,
काळीं हृदयें तशीं रंगतिल प्रेमें जरि घुतलीं.
उषा-संगमीं सप्त-करांचा रवि होई गार;
तद्विरहें तापतां जगावरि गाजवि अधिकार !
त्या मंगलसंगमीं रंगले सृष्टीचे गवई,
मंजुल गुंजारवें प्रीतिच्या गुणगुणती कांहीं !
आकाशाच्या लग्नमंडपीं लता करवल्या या,
वृक्षबालकां लाजुनि पल्लव सांवरितां दमल्या !
कळ्या कोंवळ्या, हलती कानीं डूल मजेदार;
उषा-वधूवरि कुसुमाक्षतांहि करिती भडिमार.
नवरदेव नाचरा निघाला, ती पाठोपाठ—
लाजुनि झाली उषा दूर, कुणि द्या पदरा गांठ !
नव तेजाची साखर वांटित कोडें तीं लपलीं ?
स्त्रीपुरुषांची जोडी किंवा एकरूप झाली ?
श्रीमंतांच्या घरीं चालती खेळ असे फार,
परी गरीबां प्रीतिदेवते ! तुझाच आधार !
क्षयी कलंकी चंद्रासाठीं प्रेमा ! ऊठ तरी,
वसुंधरेशीं लग्न तयाचें लावीं शीघ्र करीं.
दिशोदिशेच्या दिक्पालांनों ! सावधान सगळे !
संध्यापट-पीतांबर काढा; तारावल जमलें !
प्रेममंगलाष्टकें सारखीं जगीं गाजवा हो !
मेघांचा चौघडा गगनिंचा जगीं वाजवा हो !
नक्षत्रांच्या करा अक्षता शुभमंगल बोला !
सप्तपदीची चाल चालवा सप्त भुवनिं सकलां.
दुग्धचंद्रिका जिकडेतिकडे नवरदेव ओती !
पुष्परेणु-शर्कराकणांची पृथ्वी करि भरती !
त्रिभुवनिं साऱ्या दुग्धशर्करा वांटा ही असली,
म्हणेल जग मग दुधांत कीं या साखर कीं पडली !
हृदयदीपिके ! प्रीतिदेवते ! मार्ग असा दावीं,
जिकडे तिकडे शुभलग्नें हीं सारखींच लावीं !
चराचरांनों ! केवळ खेळा प्रेमाचे खेळ !
दुसरेंतिसरें नकोच कांहीं करा हृदय-मेळ !
दिनरजनीची जोडी एकच, चांदणें न तिसरें-
त्या दोघांचें संमीलन हें जमलें एकसरें !
एकएकट्या फिरतां कां ग तारांनों ! गगनीं ?
जमवा जोड्या प्रेमाच्या मग गा फिरतीं गाणीं !
निळ्या नभाला द्या ग उजळा शुभ्र चांदण्याचा,
प्रेमासाठीं प्रेमसागरीं खुशाल मग नाचा !
महासागरा ! उगाच लाटा उधळतोस कां रे ?
विझवीं वडवानलासि पिउनी प्रेमाचें वारें !
नदीमुखाचें चुंबन घेतां ज्या लाटा उडती,
त्याच तेवढ्या नाचूंदे; त्या प्रेमपाठ गाती !
हृदय सळसळे, फेंस उसळला, टाकुं नको खालीं,
त्या फेंसाचे गेंद रुपेरी नदीपदीं घालीं !
नदीनदीच्या पदीं बांधुनि प्रेमाचे चाळ,
नाचूंदे तुजभवतीं त्यांनां वा रानोमाळ !
वनांत लपलेल्या वेलींनों ! या ग बाहेर!
वृक्षांचे कर धरुनी द्या ग प्रेमाचे घेर !
गवताचा गालिचा कोंवळा, हळूहळू चाला,
पायघड्या पसरल्या-फुलांचा सडा वरतिं घाला !
वाऱ्यावरची वरात काढा जीवाभावांनीं,
वनदेवींच्या मुलिंनों ! या ग या लौकर नटुनी !
कुणी गुलाबी पातळ नेसा, शालु कुणी हिरवा,
कुणि मोत्यांची जाळी लेउनि हव्या तशा मिरवा!

चला चला ग फुलाफुलाला देऊंया नांव !
जसा जयाचा येइल दिसुनी प्रेमाचा भाव !

शोभापुष्पें कमलें; नुसती शोभा त्या ठायी !
काव्यपुष्पपदवीही दे त्यां सरस्वतीदेवी !

सूर्यकमल दिनपुष्प साजिरें दिवसभरीच फुले,
निशापुष्प तव बालक कुमुदिनि चंद्रा बघुनि खुले !

उषा-पुष्प जास्वंदीवरतीं तसा रंग त्याचा,
प्रथम पुष्प दिवसाचें भावहि अस्फुट वासाचा !

फुलें गुलबशींवरतिं विहरती तांबुस अंगाचीं
संध्यापुष्पें संध्यासमयीं संध्यारंगाचीं.

तीन रंग दिवसांतुनि दाविति फूल तेरड्याचें,
बालपुष्प तें बालवृत्तिचें भडक रंग त्याचे !

यौवनपुष्पाचा निशिगंधा दिधला अधिकार;
हृदय खळबळे, वास दरवळे जों अपरंपार !

सुरकुतलें कोरांटीवरि जें काव्यांतिल फूल,
जरठपुष्प तें रजःकणांची वृथा उडवि धूळ !

एकलकोंडा नीरस भावहि या धत्तूराचा,
स्मशानस्थ शिव सदा हावरा स्मशानपुष्पाचा !

घड न पांढरें, लालहि नाहीं, वासहि उग्र तसा,
गर्वपुष्प हें कण्हेर दावी, गर्वाचाच ठसा !

व्यर्थ पसारा वासावांचुनि या मखमालीचा,
दंभपुष्प-परि नको; पथ न हा प्रेमळ चालीचा !

उगाच नांवें अशीं कशाला कुणास ठेवावीं ?
मंगलकाली मंगलवदनीं मंगलताच हवी.

लीला-पुष्पें खुल्या दिलाचीं या शेवंतीचीं,
मुग्धा-पुष्पें हीं जाईचीं कोमल वृत्तीचीं !

शुभ्र मोगरा दंतनिदर्शक हंसऱ्या तोंडाचा,
हास्य-पुष्प तें शुभ्र रंग हा दावित हास्याचा.

लालि गुलाबी जी लज्जेची रमणीच्या वदनीं,
गुलाब दावी लज्जापुष्पापरि ती निजसुमनीं.

मदपुष्पें हीं आम्रावरचीं मत्त मना करिती,
पुण्यपुष्प तुलसीदलिं साधी पुण्यमंजरी ती.

श्वासानें जें सुमन करपतें पारिजातकाचें,
हृदयपुष्प अतिकोमल तें अतिकोमल वासाचें.

सुकलें तरिही सुवास राखी; दृढतेचा भाव,
प्रेमपुष्प बकुलाचें वसवी प्रेमाचा गांव !

त्या गांवाचा, त्या नांवाचा, कायमदायमचा
रहिवाशी हा जीव गातसे प्रेमपाठ तुमचा !

वनदेवींनों ! तुह्मांसाठिं हा थाट वारशाचा !
फुलाफुलाचें नांव दाखवी भाव आरशाचा !

फुलें तुह्मी घ्या, फुलें मला द्या, प्रेमाची ठेव,
कृष्ण घ्या कुणी, कृष्ण द्या कुणी, हीच देववेष !

चला लतांनों ! मुलें बसवुनी कटिखांद्यावरतीं,
लग्न निसर्गासह लावी कविहृदयस्था प्रीति !

सृष्टिदेवता माता तुमची कार्य तिच्या घरचें,
लग्न निघे माहेरघरीं मग आळस काय रुचे ?

हृदयपटावरि निजलज्जेचा लाल रंग उधळा,
प्रेमपल्लवी लिहुनी कुंकुमपत्रें द्या सकलां.

प्रीतिदेविचें आज निघालें लग्न निसर्गाशीं;
बऱ्हाड जमलें, मुहूर्त भरला, धीर न कोणाशीं !

वनदेवींच्या मुलिंनों ! या ग या लौकर ह्मणुनी,
पराग उधळित, सुवास पसरित, कोमल हातांनीं !

हिमवंतींच्या जलीं मिसळुनी मरंदमय तेला,
स्नान सुमंगल घाला कोणी प्रीतिदेवतेला !

शशिकिरणांचे तंतु भिजवुनी संध्यारंगांनीं,
अष्टपुत्रि द्या नव नवरीला कुणीतरी विणुनी.

हिमगिरिशिखरींस्फटिकशिलांतारींरविकिरणेंशिरतीं
प्रतिकिरणें पाझरती भरभर अति कोमल असतीं.

मुग्ध अधरिंच्या गुलाबि रंगीं रंगवुनी त्यांनां,
त्या सूत्रांची काचोळी कुणि नवरीला द्याना !

पराग कोळुनि करुनि हरिद्रा उटी तिला लावा,
इंद्रधनुष्यें वळवुनि हातीं वज्रचुडा भरवा.

शुभ्र फुलांचें तेज आटवुनि घडवा कुणि त्याचीं
वेढिंविरोदीं; सौभाग्याचीं लेणीं पायांचीं.

रात्रीचें तम, उषा-रक्तिमा, कांहिं नका टाकूं,
प्रीतिदेविच्या सौभाग्याचें हें काजळकुंकूं !

मणिमंगलसूत्रांत चांदण्या चंद्र चमकदार,
तिला तिच्या भाग्याचा भगवान् निसर्ग देणार !

संध्याकालीं संध्यापटिं जो असे सूर्य गगनीं,
भरा प्रीतिची ओटी असल्या खणांनारळांनीं.

मयासुराची माया शिकुनी कविकल्पकतेनें,
मंगलभूषणरचना मग ही करा शीघ्रतेनें.

मुक्या मनाचीं ह्मणा मंगलाष्टकें, जीं न सरती,
हृदयाश्रूंच्या दिव्य अक्षता वधूवरांवरती !

खुल्या दिलांचा मिलाफ घडवा; मुहूर्त हा सरतां,
अंतरंगिंचा अंतःपटही दूर करा आतां !

शुभमंगल वच तूंच बोल श्रीमन्मंगला रे !
हृदयाचा चौघडा वाजवुनि विश्व भरा सारें !

पाउल त्यांचें एक एक मग जन्माजन्मांचें,
सात पावलें सात जन्मभर सप्तपदी नाचे !

पतिव्रतांनों ! मंगल विश्वचि तुमचें माहेर,
वधूवरांनां मांगल्याचा कराच आहेर !

सकल वेलिनों ! वरात त्यांची चला चला पाहूं,
ही सोन्याची संधी ! मागें नका कुणी राहूं !

लाजाकू लाजते कुणाला ? नका तिला रुसवूं !
चला चिमुकल्या करवलीस त्या जाउनियां हंसवूं.

वंशतरुवरा ! असाच गा रे प्रेमाचे सूर !
हृदयस्था हृदयाशिं धरा कुणि; नका राहुं दूर !

जनिं कीं रानीं, जलीं स्थलीं, वा गगनीं पातालीं,
जिवाजिवाला बांधा पसरुनि प्रेमाचीं जालीं !

जलदेवींनों ! स्थलदेवींनों ! गगनदेवतांनों !
सकलां शिकवा प्रेमपाठ; गा हाच अप्सरांनों !

हृदयशारदे ! हृदयिं राहुनी करिं मज प्रेमकवि !
तुझ्या प्रीतिची स्फूर्तिच मज हा प्रेमपाठ शिकवी.

पशुस करशिल मानव ! मानव नेशिल देवपदा !
देवपणा स्थिर देवांचाही राखिसि तूंच सदा !

प्रेमतरंगें चित्त तरंगे, आत्माही रंगे !
जगत् रंगलें, विश्व रंगलें एक प्रेमरंगें !

चराचरांनों ! स्थिरास्थिरांनों ! नश्वर ईश्वर वा,
प्रेमें जिंका ईशा; साक्षात् कीं परमेश्वर व्हा !

हृदयसंपुटीं स्नेहिं पाजळुनि जीवाच्या ज्योती,
प्रीतीच्या गंगेंत सोडुनी गा मंगल आरती !

हृदयाचीं राउळें उघडुनी हृदयदेवतेला,
पंचेन्द्रियकृत प्रभावळीमधिं वरच्यावर झेला !

इतर वृत्तिंचा देवीभवतीं चालंद्या नाच;
जीवेंभावें तिच्यापुढें गा प्रेमपाठ हाच !

चित्ताच्या ताटामधिं अर्पा निजपंचप्राणां;
त्या नैवेद्यें हृदयदेवता तृप्त होत जाणा !

प्रेम नसे तर जीव नको हा ! प्रेमें जग चाले !
प्रेमावांचुनि धिग् जीवन हें असे आज झालें !

प्रेमरसावर हृदय तरंगत प्रेमपाठ बोले,
मनांतलें हें गाणें माझें जनांतलें झालें !

प्रियमित्रांनों ! प्रेमरंगणीं प्रेमानें नाचा !
मुक्या मनाला फुटली आतां प्रेमाची वाचा !

प्रेमपाठ हा सदैव गा रे प्रेमानें ताज्या,
आण घालितों अशी तुह्मांला गळ्याचीच माझ्या !

चला गड्यांनों ! या प्रेमाचीं ऋणें आधिं फेडा,
हेंच मागतों हात जोडुनी प्रेमाचा वेडा !

प्रेमपाठ हा सरसा झाला, मन हो बेताल !
प्रेमरसें गुंगलें यावरी फुकट शब्दजाल !

त्या गुंगीच्या भरांत गातों पडुनि मना भूल !
क्षमा करा हो गातांना जरि होइ चूकभूल.

प्रेमपाठ हा रुचे कुणाला, न रुचे कवणाला,
एक नसे जगिं आवडनावड; ती ज्याची त्याला !

तशांत हें तर बोलुनिचालुनि मन वेडें झालें !
बंधन कसलें मग त्या ? गाई जें सुचलें रुचलें !

परवा न तया; हंसा, रुसा, वा निंदा, कीं वंदा, !
मी प्रेमाचा बंदा ! माझा हाच असे धंदा !

स्तुतिनिंदेचा भेदचि अवघा प्रेमजलीं जिरला,
भेदाभेदचि, न परि जीवही प्रेमांतचि विरला !

हृदयशारदा हृदयमंदिरीं चित्तरंगतारा,
छेडित बसली त्या गीताचा वाहे प्रेमझरा !

देहभरीं त्या निर्झरलहरी थरथरुनी भिनल्या,
वृत्तिवृत्ति त्या गायननादें प्रेममयी बनल्या !

भाव वहिरला, जीव वहिरला, वहिरलाच आत्मा !
प्रेमरूपची, प्रेमलभ्यची, रमला परमात्मा !

त्या दोघांच्या या ऐक्याचा गाया जयवाद,
घुमत सारखा वधिर वृत्तिंतुनि प्रेमगीतनाद !

कायावाचामनसा होउनि प्रेमाचा भाट,
' गोविंदाग्रज ' आळवीत मग सदा 'प्रेमपाठ' !

आरोग्यविषयक निबंध.

क्षयरोग व त्याचा प्रतिकार.

[श्रीयुत डॉ० रामकृष्ण नारायण परमानंद, एल्. एम्. अँड एस्.
जे. पी., फिजिशन, अँडाम्स वायली हास्पिटल, मुंबई.]

आपल्यापैकीं शेंकडा नव्वदपंचाण्णव लोकांनां आमच्या आयुष्यांत कधीं ना कधीं तरी कमी-अधिक प्रमाणानें क्षयरोगाचा उपद्रव झालेला असतो, व वयाच्या अमुक एका कालीं मनुष्य या दुष्ट रोगांच्या तडाक्यांत बहुधा सांपडत नाहीं, असें जरी निश्चितपणें सांगतां येत नसलें, तरी ऐन तारुण्याच्या भरांत असलेल्या पुष्कळ मंडळीला हा रोग मृत्यूच्या मुखांत ओढून नेत असतो, हे सिद्धान्त आतां सर्वसंमत झाले आहेत. मुंबईत या रोगाचा प्रसार निःसंशय वाढत्या प्रमाणावर आहे, असें मुंबईतील प्रत्येक डॉक्टरच्या अनुभवास आलेलें दिसेल.

जगांतील प्रत्येक सुधारलेल्या देशांत क्षयरोगाविरुद्ध पद्धतशीर मोहीम चालू आहे, व तीमुळें त्याचें प्रमाण स्पष्टपणें निदर्शनास येण्याजोगें कमी झालें आहे. मुंबईतहि या पद्धतशीर मोहिमेला नुकताच प्रारंभ झाला आहे. 'पंचमजॉर्ज क्षयरोग-प्रतिबंधक संस्था–The King George V Anti-tuberculosis League—मुंबईत नुकतीच स्थापन झाली असून मुंबईचे लोकप्रिय गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क हे तिचे अध्यक्ष आहेत. मुंबईच्या नागरिकांनीं जर या संस्थेला अन्तःकरणपूर्वक पूर्ण साहाय्य केलें, तरच तिचे हेतु साध्य होणार आहेत; परंतु या रीतीनें लोकसेवा करावयास क्षयरोग म्हणजे काय, त्याचा प्रसार कसा होतो, व त्याचें निवारण कसें करतां येईल, इत्यादि गोष्टींची आपल्याला माहिती पाहिजे.

ज्याला साधारणतः 'क्षय' असें म्हणतात, त्या फुप्फुससंबंधाच्या रोगाविषयीं (Pulmonary or lung-tuberculosis)—फक्षयाविषयींच आपल्याला विशेष विचार करावयाचा आहे. हा रोग सांसर्गिक असून क्षयाच्या जंतूपासून (tubercle bacillus) याचा उद्भव होतो, व या जंतूमुळेंच त्याचा प्रसार होतो. हा क्षयरोगाचा जंतु अत्यंत सूक्ष्म असून सुमारें $\frac{1}{15000}$ ते $\frac{1}{7000}$ इंचपर्यंत त्याची लांबी असते. तो दिसण्यांत एकाद्या काडीप्रमाणें दिसतो, व कधीं त्याला किंचित् वक्रताहि असते. या जंतूला रंग चढवून (Stained) सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें हा एक हजारपट मोठा दिसावा अशी व्यवस्था केली असतां, हा जंतु $\frac{1}{15}$ ते $\frac{1}{7}$ इंच लांबीच्या लाल रंगाच्या लहानशा काटकीप्रमाणें दिसतो. क्षयरोगाचे अनेक जंतु कधीं कधीं एकत्र चिकटल्याप्रमाणें दिसतात. याच सूक्ष्म जंतूमुळें पुढें मोठमोठे अनर्थ घडून येतात! या जंतूंला योग्य परिस्थिति सांपडली तर तो बराच वेळ जीवंत रहातो.

क्षयरोगाचे जंतु जींत आहेत अशी थुंकी एकाद्या अंधाऱ्या पेटींत अथवा अंधाऱ्या फडताळांत एकशेसत्तावन दिवस ठेवून नंतर ती डुकरांच्या (Guinea pigs) अंगांत टोंचून घातली असतां

त्यांनां क्षयरोग जडतो, असें अनुभवावरून सिद्ध झालें आहे. क्षयरोगाचे जंतु पाण्यांत एक वर्षपर्यंतहि जीवन्त राहूं शकतात. शुष्क झालेल्या थुंकींत या जंतूंची तीव्रता तीन, सहा, किंवा नऊ महिनेपर्यंत टिकते, असें कांहीं शोधकांनां आढळून आलें आहे. हा कालाचा फरक थुंकीची घनता, सूर्यकिरणांशीं प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध, व आर्द्रतेचें कमीजास्त प्रमाण, या कारणांमुळें होतो. सूर्यप्रकाशाशीं या जंतूंचा संबंध न येतां सतत पांच दिवसपर्यंत जरी हे हवेंत राहिले, तरी त्यांची रोगप्रसार करण्याची शक्ति नष्ट होत नाहीं. या जंतूनां तीन दिवसपर्यंत उजेडांत ठेविलें असतां हे शक्तिहीन होतात, व शुष्क झालेली थुंकी पस्तीस तासपर्यंत जर उन्हांत ठेविली, तर तीमधील क्षयजंतूंची तीव्रता नाहींशी होते. थंड हवेंत हे जंतु अधिक वेळ टिकतात. यांनां ५५ डिग्री-सेंटिग्रेडची उष्णता चार तासपर्यंत, अथवा ६० डिग्रींची उष्णता वीस मिनिटें, किंवा ६५ डिग्रींची आंच पंधरा मिनिटें आणि ८० डिग्रींची आंच केवळ अर्धमिनिटपर्यंत दिली, तर हे जंतु मरून जातात. कठिण स्थितीला पोहोंचलेल्या क्षयरोग्याच्या थुंकीच्या एका शेंबांत शेंकडों जंतु असतात. या रोगानें पछाडलेला मनुष्य निष्काळजीपणानें कोठें तरी थुंकतो. ही थुंकी सुकून धुळींत मिसळते, व तिचे चूर्णाप्रमाणें बारीक परमाणु बनतात. वाऱ्याच्या एकाद्या झुळकीबरोबर हे परमाणु चहूंकडे पसरून इतरांच्या फुप्फुसांत किंवा तोंडावाटे पोटांत प्रवेश करतात. क्षयरोगी खोकत असतां त्याच्या थुंकीचे लहान लहान शिंतोडे चहूंकडे पसरत असतात. रोगी मनुष्याच्या किंवा जनावरांच्या मलोत्सर्गांत रोगजंतु आढळून येतात. त्याचप्रमाणें क्षयी जनावरांच्या ओटींत हे जंतु असतात व अर्थात्च त्यांच्या दुधांतहि असंख्य रोगजंतु प्रवेश करतात. असलें दूध क्षयरोगाचा प्रसार करण्यास कारणीभूत होतें. रोग्याच्या थुंकीवर बसलेल्या माशा, तिचे रोगजंतु असलेले परमाणु आपल्या बरोबर नेतात, व त्या खावयाच्या पदार्थांवर बसल्या ह्मणजे ते पदार्थ रोगदूषित होतात.

पुढें भयंकर अनर्थ करणारा क्षयरोगजंतु कशा प्रकारचा असतो, व क्षयरोगाचा प्रसार कसा होतो, हें यावरून वाचकांच्या लक्ष्यांत येईल. मनुष्याच्या देहांत एकदां त्याचा प्रवेश झाल्यावर जर त्या मनुष्याची शरीरसंपत्ति असावी तशी नसेल, व परिस्थिति रोग्याला अनुकूल नसेल, तर त्या रोगजंतूंची त्याच्या शरीरांत वाढ होऊं लागते, व पुढें त्यापासून मोठे अपायहि घडतात.

रोग्याच्या फुप्फुसांत क्षयरोगजंतु एकदां चिकटला, कीं, त्यापासून असंख्य जंतु उत्पन्न होतात. त्यांच्या भोंवतीं सांवा किंवा बाजरीच्या एका दाण्याएवढ्या गोळ्या बनतात. त्यांत जंतूंची अनेकपट वृद्धि होते. नंतर गोळ्या फुटून त्यांतील रोगजंतु मोकळे होतात, व फुप्फुसाच्या निरनिराळ्या भागांत पसरून तेथें त्यांची हीच कृति सुरू होते. या बनलेल्या रोगजंतूंच्या गोळ्यांपैकीं कांहीं गोळ्या जवळजवळ होतात व एकमेकांत मिसळून फुप्फुसाच्या कांहीं भागाचा नाश करून ती जागा पोकळ करून टाकितात. कधीं कधीं या गोळ्यांभोंवतीं बीजकोश उत्पन्न होऊन पुढें तो सुकतो; असें झालें ह्मणजे रोगजंतूंपासून तावडतोब अपाय होण्याची क्रिया बंद पडते; परंतु अशा स्थितींतहि त्या कोशांतील रोगजंतु पुष्कळ वेळपर्यंत जीवंत राहूं शकतात.

या दुष्ट रोगाचीं प्राथमिक लक्षणें, क्षुधा मंद होणें, बारीक ताप, अशक्तता, कामकाज करण्याविषयीं निरुत्साह व वजन कमी होणें, एवढींच असतात. पुढें पुढें ओला किंवा सुका खोकला सुरू होऊन तापहि किंचित् अधिक येऊं लागतो. रोगाची जसजशी प्रगति होत जाते, तसतसा रोग्याला ताप अधिकाधिक येऊं लागतो, खोकलाहि वाढतो व त्याला वारंवार घाम सुटून तो गळून गेल्यासारखा होतो. हळुहळू त्याची भूक अधिकाधिक मंद होत जाते, व रोगी सारखा वाळत जातो.

एकादे प्रसगीं रोग्याला मध्येंच अतिसार सुरू होऊन त्यांतच या हृदयद्रावक देखाव्याची समाप्ति होते ! केवळ क्षयरोगजंतूंच्या अस्तित्वामुळेंच पुढील भयंकर अनर्थ घडून येतो असें नाहीं. हें बीं रुजण्यास वर सांगितल्याप्रमाणें–क्षेत्र म्हणजे रोग्याच्या शरीराची स्थिति–तयार असलें पाहिजे. मनुष्याच्या शरीरांत रोगांनां प्रतिबंध करण्याची एक प्रकारची नैसर्गिक शक्ति असते. आपणां सर्वांवर हल्ला करूं पहाणाऱ्या रोगाचे सूक्ष्मजंतु जेव्हां आपल्या अंगांत थोडेसे शिरतात, तेव्हां या नैसर्गिक शक्तीमुळें आपल्या शरीरांतील रक्त त्यांजवर तुटून पडून त्यांचा नाश करूं लागतें. आपल्या शरीरांतील या रोगजंतूंच्या नाश करण्याच्या क्रियेंत आपल्या रक्तांतील शुभ्र परमाणुच विशेष कामगिरी बजावतात. हे परमाणुच आपली संरक्षकसेना होय. यांपासून कांहीं पदार्थ उत्पन्न होऊन रोगजंतूंच्या विषाला अगदीं हीनशक्ति व निःसत्त्व करून टाकतात व कांहीं जंतूंस गिळून टाकतात. अनेक रोगांपासून अशा रीतीनें आमचा निसर्गतःच बचाव होतो. ही निसर्गशक्ति नसती तर आह्मांवर दररोज भयंकर अनर्थच गुदरले असते ! परंतु कोणत्याहि कारणामुळें मनुष्याच्या जीवनशक्तीचा ऱ्हास होत असल्यास रोगाला त्याच्या शरीरांत अवकाश मिळण्याचा संभव असतो. मनुष्य निरोगी असूनहि त्याच्या रक्तांतील 'संरक्षकशक्ती'ला अनावर होई इतका विषार त्याच्या अंगांत एकाएकीं भिनला असतां तो या रोगाच्या तडाक्यांत सांपडतो. मनुष्याच्या शरीरांतील अति कमकुवत भागावरच या रोगाचा हल्ला होतो.

सुरुवातीचीं कारणें.

मनुष्याला क्षयरोगानें पछाडण्याचीं कारणें म्हटलीं म्हणजे गरोदरावस्था; शक्तीपलीकडे केलेलें काम व चिंता यांचा परिणाम; सूर्यप्रकाश, स्वच्छ मोकळी हवा, व्यायाम व योग्य अन्न यांचा अभाव; मद्य व विषयविलास यांचा अतिरेक, वगैरे होत. एका बालंतपणांत गेलेली शक्ति भरून येण्यापूर्वीच दुसरें प्राप्त होणें व याप्रमाणें वारंवार मुलें होणें, हें या रोगाला साहाय्य करणारें एक प्रचंड कारण आहे! गिरण्या व कारखाने यांसारख्या ठिकाणीं पुरेशी स्वच्छ हवा खेळती नसते व अशा कोंडलेल्या जागेंत पुष्कळ मनुष्यें गर्दी करून काम करीत राहिलीं असतां दूषित झालेली हवा, व वाटेल त्या जातीच्या धुळीचे किंवा कापसाचे कण श्वासावाटे शरीरांत जात असल्यामुळें अशा प्रकारचे उद्योग या रोगाच्या सुरुवातीला व प्रगतीला चांगलें साहाय्य करतात. गोंवर, डांग्या खोकला, श्वाँकायटीस (Bronchitis) इन्फ्लुएन्झा, विषमज्वर, न्युमोनिया, फुप्फुसावरणदाह (Pleurisy) यांचा वारंवार होणारा उद्भव, यांमुळें मनुष्याला क्षयरोग होऊं शकतो.

क्षयरोगी मनुष्यांची संतति क्षयरोगीच असते, असा नियम नाहीं. जन्मतःच त्यांची प्रकृति अशक्त असल्यामुळें त्यांनां हा रोग जडण्याचें विशेष भय असतें, इतकेंच.

थुंकीमधून एकाचीं रोगबीजें दुसऱ्याच्या शरीरांत शिरणें हें या रोगाच्या प्रसाराचें मुख्य कारण होय.

क्षयरोगाच्या प्रसाराचीं कारणें.

क्षयरोग झालेल्या मनुष्याचा कफ किंवा थुंकी घरावयाला किंवा त्याचें तोंड पुसावयाला फडकीं वापरतात, तीं अगदीं भिजून जाईपर्यंत रोग्याच्या जवळ ठेवून मग निष्काळजीपणानें वाटेल तिकडे फेंकून दिलीं जातात. वाईट स्थितीला पोंचलेल्या क्षयरोग्याची थुंकी त्याची नातलग मंडळी आपल्या बोटांनींच पुसून काढतात, व तीं बोटें तशींच आपल्या वस्त्रांनां पुसतात किंवा दुसऱ्या फडक्यांस तीं पुसलीं तरी त्यांचा तावडतोब नाश करून टाकीत नाहींत. येणाऱ्याजाणाऱ्या मनुष्यांकडे बिलकुल लक्ष्य न देतां थुंकीनें भरलेले कागद कित्येक वेळां लोक रस्त्यावर फेंकून देतात. कित्येक चाळींतील आणि घरांतील जिन्यांचे कोंपरे, व बाजूच्या भिंती पानसुपारी खाऊन थुंकलेल्या पिंकीनें कशा लालभडक होऊन गेलेल्या

असतात, हें पुष्कळांच्या पहाण्यांत असेल. रस्त्यांवर, तसेंच आगगाड्या, ट्रॅम्स व इतर गाड्या यांत थुंकणें तर आपल्याकडे सर्वसाधारण होऊन गेलें आहे. या थुंकणाऱ्या लोकांपैकीं कांहींजण तरी क्षयरोगी असलेच पाहिजेत. त्यांच्या थुंकीचा परिणाम काय होतो? ती सुकून तिचें चूर्ण बनतें व तें धुळीशीं मिळून जातें. रस्ते झाडतांना किंवा वाऱ्यामुळें जेव्हां धूळ उडते, तेव्हां ती नाक, फुप्फुसें यांत शिरते व तोंडावाटें पोटांतहि जाते. अशा रीतीनें क्षयरोगाचे जंतु श्वासावरोबर आंत शिरतात व मिळले जातात. या गोष्टीचा निर्देश वर केलाच आहे.

रोग झालेल्या जनावरांचें दूध हें एक या रोगाच्या प्रसाराचें कारण आहे. रोगी जनावरांच्या मलमूत्रांतहि क्षयरोगजंतु असतात.

रस्त्यावरील धूळ उडून हलवाई लोकांच्या दुकानांत उघड्या ठेवलेल्या मिठाईवर पडली, ह्मणजे तीहि रोगाच्या प्रसाराला कारणीभूत होते.

क्षयरोगजंतूंनीं दूषित झालेल्या थुंकीवर बसलेल्या माशा खाण्याच्या पदार्थांवर बसल्या, कीं, त्या पदार्थांपासूनहि क्षयरोगाचा प्रसार होतो.

जेथें सूर्यप्रकाश कधींहि प्रवेश करीत नाहीं अशा, व खेळती हवा नसलेल्या कोंदट खोल्या हा रोग पसरण्याला पुष्कळ कारणीभूत होतात. अशा तऱ्हेच्या चाळी किंवा घरें मुंबईत कांहीं कमी नाहींत.

वर लिहिलेल्या गोष्टींवरून मनुष्याला किती भयंकर संकटांशीं व अडचणींशीं झुंजावें लागतें, याची वाचकांनां कल्पना होईल. या रोगजंतूंचा शरीरांत प्रवेश झाला, तरी मनुष्याच्या ठिकाणीं वर सांगितलेली जी नैसर्गिक रोगनिरोधक शक्ति आहे, तीमुळेंच केवळ पुष्कळांचा या रोगापासून बचाव होतो. एक फ्रेंच ग्रंथकार म्हणतो, कीं, 'रोग ही एका प्रकारची लढाई होय!' तें अगदीं खरें आहे. "मनुष्याच्या अंगांतील रक्तांत त्यांतील पिंड (Cells) व अन्न, पिंड व विषार, पिंड व जंतु, आणि एक जातीचे पिंड व इतर जातीचे पिंड यांमध्यें नेहमीं तुमुल संग्राम चाललेला असतो. तेव्हां मनुष्याच्या आरोग्याची स्थिति हत्यारबंद राष्ट्रामध्यें असणाऱ्या शांततेसारखी आहे. म्हणजे गृहकलह व परचक्र यांच्या योगानें होणाऱ्या प्रकारच क्षोभ तिच्यामध्यें वारंवार उत्पन्न होतात."

प्रतिकाराचे उपाय.

क्षयरोगाच्या प्रतिकाराचा मुख्य उपाय ह्मटला ह्मणजे क्षयरोगी मनुष्यांनीं इतर कोठेंहि न थुंकतां नेहमीं पिकदाणींत थुंकावें, व ती थुंकी नाहींशी तरी करावी, किंवा तिची औषधी क्रियेनें शुद्धि (Disinfection) तरी करावी, हा होय. रोग्यासाठीं ठेवलेल्या भांड्यांत 'लायसॉल्'(Lysol) सारखें कांहीं तरी शुद्धिकारक औषधी द्रव्य नेहमीं घालावें. या द्रव्यामुळें रोग्याची थुंकी नेहमीं ओली राहून तिची शुद्धिहि होते. **थुंकी सुकल्यावरच तिचें स्वरूप भयंकर बनतें!** रोग्याच्या पिकदाण्या नेहमीं गटारांतच ओताव्या व उकळत्या पाण्यानें स्वच्छ धुवाव्या. थुंकी पुसण्याला किंवा ठेवण्याला चिंध्या किंवा फडकीं उपयोगांत आणल्यास तीं सर्व जाळून टाकावीं. थुंकी टाकण्याला वहात्या गटारांची चांगली सोय नसेल, तर ती लांकडाच्या भुशावर किंवा गवतावर ओतावी आणि त्या पदार्थांवर ग्यासलेट तेल ओतून ते जाळून टाकावे.

रोग्याचे कपडे किंवा अंथरुणें धुण्यापूर्वी तीं चांगलीं उकळून काढावीं. ज्या रोग्यांनां हिंडाफिरावें लागतें, त्यांनीं थुंकण्यासाठीं खिशांत ठेवण्याच्या लहान पिकदाण्या मिळतात त्या वाळगाव्या, किंवा पाकुळणारे कागदाचे डबे बरोबर न्यावे. पिकदाण्या शुद्धिकारक द्रव्यांनीं स्वच्छ कराव्या व कागदी डबे जाळून टाकावे. अशा रोग्यांनीं खोंकतांना वगैरे थुंकी उडूं नये ह्मणून तोंडाशीं रुमाल धरावा. रोग्याची खोली विशेष काळजीपूर्वक स्वच्छ ठेवावी, व तींत स्वच्छ हवा खेळती राहील अशी तजवीज असावी.

शुद्धिकारक (Disinfecting) द्रव्यांत भिजविलेल्या फडक्यानें त्या खोलीची जमीन स्वच्छ पुसून काढावी. शेंकडा दोन या प्रमाणांत क्लोरिनेटेड सोडा (Chlorinated Soda) घातलेल्या पाण्यानें खोलीच्या भिंती पुसून काढाव्या.

वर सांगितलेले प्रतिबंधक उपाय जर काळजीपूर्वक अमलांत आणले, तर एका क्षयरोग्यापासून दुसऱ्या मनुष्यांनां रोग होण्याची भीति सर्वस्वीं नाहींशी होऊन त्याला इतरांनीं एकाद्या महारोग्याप्रमाणें वागविण्याची किंवा त्याचा संसर्ग टाळण्याची गरज उरणार नाहीं. तसेंच, हल्लीं कांहीं कांहीं घरांचे मालक क्षयरोग असलेल्या मनुष्यांनां जागा भाड्यानें देण्याचें नाकारतात, त्याप्रमाणें घडण्याचीहि भीति रहाणार नाहीं.

'लायसॉल' (Lysol) किंवा 'फॉरमिक् आल्डिहाइड' (Formic Aldehyde) शेंकडा चार प्रमाणांत घातलेलें मिश्रण, अथवा शेंकडा चार प्रमाणांत ब्लीचिंग पावडर मिसळलेलें आम्ल मिश्रण (Acidulated Solutions), या द्रव्यांनीं रोग्याचा मलोत्सर्ग शुद्ध करणें जरूर आहे. हीं द्रव्यें जेथें मिळूं शकणार नाहींत, तेथें त्यांत भुसा किंवा गवत मिसळून, त्यावर केरोसिन तेल ओतून तें जाळून टाकावें.

ट्रॅम्स, आगगाड्या किंवा अन्य वाहनें, नाटकगृहें, सार्वजनिक उद्यानें व इतर करमणुकीच्या जागा यांमध्यें व रस्त्यांवर 'थुंकूं नये!' अशीं पत्रकें चिकटवून लोकांनां त्या ठिकाणीं न थुंकण्याबद्दल ताकीद देण्यांत यावी. आगगाडीचीं स्टेशनें व इतर सार्वजनिक स्थानीं लोकांनां थुंकण्याकरतां पिकदाण्या ठेवून 'येथें थुंकावें!' अशा अर्थाचीं पत्रकें तेथें लावण्यांत यावींत. परंतु या तजविजीवरोवर हीं सर्व भांडीं शुद्धिद्रव्यांनीं साफ धुवून स्वच्छ करण्याचीहि व्यवस्था काळजीपूर्वक झाली पाहिजे. असा बंदोबस्त कायद्यानें करणें सध्यांच इष्ट होणार नाहीं.

कच्चें, न तापविलेलें दूध कधींच उपयोगांत आणूं नये. त्याचा उपयोग करण्यापूर्वी तें चांगलें उकळून काढावें. दुभत्या गुरांवर नियमानें देखरेख असणें अवश्य आहे, व अशा गुरांचे गोठे व दुभतें तयार करण्याच्या जागा यांची नेहमीं फार कडक रीतीनें तपासणी झाली पाहिजे. रोगी जनावरांचें दूध कधींहि विकूं देऊं नये.

पिण्याचें पाणीहि चांगलें उकळावें व थंड करून प्यावें. ज्या विहिरीतलावांवर जनावरांस जावयास मार्ग असतो, व धुण्यानें वगैरे ज्यांचें पाणी दूषित होण्याचा संभव असतो, अशा विहिरीतलावांचें पाणी तापवून पिणें तर अतिशयच जरूर आहे.

सूर्यप्रकाश व स्वच्छ मोकळी हवा हीं मनुष्याच्या आरोग्याला व रोगनिरोधाला अत्यंत आवश्यक आहेत. ज्या ठिकाणीं सूर्यप्रकाश प्रवेश करीत नाहीं, अशा घाणेरड्या व कोंडलेल्या जागेंत ठेविलेल्या झाडांनां जशीं फिक्कट पानें येऊं लागतात, त्याप्रमाणेंच अशा जागेंत व्यवहार करणारे मानवी प्राणीहि निःसत्त्व व रोगी होतात. ज्यांनां कोंडलेल्या जागेंत किंवा इमारतींत काम करावें लागतें, त्यांनीं खुल्या स्वच्छ हवेंत जितका वेळ जास्त रहातां येईल तितकें रहाण्याचा प्रयत्न करावा. खरोखर पाहिलें तर प्रत्येक मनुष्यानें ही गोष्ट अवश्य अमलांत आणली पाहिजे. ताज्या मोकळ्या हवेची किंमत कितीहि मानली तरी ती कमीच आहे, व अगदीं फुकट मिळणारी अशी वस्तु बहुतेक हीच एक आहे.

निजण्याच्या खोलीच्या खिडक्या नेहमीं-विशेषतः रात्रीं उघड्या ठेवाव्या. रोग्याला हवेंतील आर्द्रतेची किंवा थंडीची बाधा होईल, या भयानें रोग्याच्या खोलीच्या खिडक्या बंद ठेवण्याच्या चालीच्या मुळाशीं असलेली कल्पना अगदीं चुकीची आहे. वस्तुतः आजारी मनुष्याला ताज्या हवेच्या मुबलक पुरवठ्याची अतिशय जरूरी असते. हवेंतील आर्द्रता किंवा थंडी यांची रोग्याला बाधा होईल, अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. वाऱ्याचा प्रत्यक्ष झोत

आजारी मनुष्याला लागूं नये, अशी तजवीज केली म्हणजे झालें. खिडक्या मोकळ्या ठेवून निजण्याच्या जागीं ताजी हवा खेळती ठेवल्यापासून किती फायदे होतात, हें या गोष्टीचा अनुभव असलेले लोकच सांगूं शकतील.

पुष्कळ मनुष्यांनीं गर्दी करून एकत्र रहाणें शक्य तितकें टाळलें पाहिजे. त्याच्या योगानें हवा दूषित होते व ही दूषित हवा श्वासोच्छ्वासानें शरीरांत गेल्यास मनुष्याचें आरोग्य व शक्ति यांचा ऱ्हास होऊन रोगाला त्याच्या शरीरांत ठाणें देण्यास संधि मिळते.

क्षयरोग्यांसाठीं–विशेषतः शेवटच्या स्थितीपर्यंत पोंचलेल्या रोग्यांसाठीं–स्वतंत्र रुग्णालयां(Hospitals)ची व्यवस्था असणें अत्यंत आवश्यक आहे.

रोग होण्यास प्रारंभ झालेल्या किंवा प्रथमावस्थेंत असलेल्या रोग्यासाठीं आरोग्यभवनें (Sanitoria) असणें जरूर आहे. सर्व रोग्यांची तजवीज ज्यांत होईल इतकीं आरोग्यभवनें बांधणें अर्थात्च अशक्य गोष्ट आहे; परंतु अशा 'भवनां'त जर पहिल्यापासूनच आरोग्यरक्षणार्थ अवश्य असलेले–विशेषतः रोग्यांच्या थुंकीसंबंधानें वर दर्शविलेले नियम कडक रीतीनें अमलांत असले, तर त्यांपासून लोकांनां रोगाविषयीं तरतूद ठेवण्याची माहिती होऊन त्यांच्या समजुतीस योग्य वळण लागेल. आपल्या शहरांतील प्रसिद्ध डॉक्टर सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या खटपटीनें काळें येथें हिंदु लोकांकरितां एक आरोग्यभवन स्थापित झालें आहे, हें वाचकांनां माहीत असेलच.

क्षयरोगाच्या दवाखान्यांचीहि मोठी उणीव आहे, ती पूर्ण झाली पाहिजे. मुंबईत लवकरच वर सांगितलेल्या लीगचा टुबरकुलीन दवाखाना उघडणार आहे. अशा दवाखान्यांत येणाऱ्या रोग्यांच्या मनावर थुंकण्याचे नियम, घरींच असलेल्या रोग्यांची थुंकी, आणि मलोत्सर्ग व कपडे शुद्ध करण्याची व रोग्याची खोली चांगली स्वच्छ ठेवून त्याच्या निजण्याच्या खोलीच्या खिडक्या नेहमीं उघड्या ठेवण्याची अत्यंत आवश्यकता, हीं चांगलीं बिंबविलीं पाहिजेत. रोग्यांनां थुंकण्यासाठीं कागदी पिकदाण्या गरिबांगुरिबांनां फुकट वांटण्यांत याव्या व मध्यम स्थितींतील लोकांनां मूळ किंमतीला देण्यांत याव्या, म्हणजे त्यांचा उपयोग प्रचारांत यावयास मदत होईल.


मुंबईत सात रस्त्यांजवळ Adams Wyllie Memorial नांवाचें एक गोरगरिबांसाठीं बांधलेलें रुग्णालय आज बरींच वर्षें चालू आहे, त्यांत वरच्या प्रतीच्या लोकांची सोय नाहीं. तें बांधण्याचा सर्व खर्च व चालू ठेवण्याचा बराचसा खर्च आजपर्यंत मिसेस अडाम्स वायली या उदारअंतकरण बाईनीं स्वतः केला आहे. सुमारें तीन वर्षें त्यांत क्षयरोगाच्या चिकित्सेसाठीं व टुबरकुलीन ट्रीटमेंटसाठीं विशेष व्यवस्था चालू आहे. अशा रोग्यांसाठीं एक निराळेंच पेटिट घराण्यानें Ward बांधिलें आहे.

अशा प्रकारच्या संस्था आणखी स्थापन होणें इष्टच आहे. परंतु तसा योग येईपर्यंत ज्या चालू आहेत त्यांनां लोकांनीं हातभार लाविला तरी पुष्कळ काम होणार आहे.

या सर्व गोष्टींनां अर्थात्च फार पैसा लागणार आहे. लोकहितार्थ तो देण्याची ज्यांनां परमेश्वराच्या कृपेनें ऐपत आहे, अशा लक्ष्मीपुत्रांनीं पुढें येऊन मदत केल्याशिवाय या बाबतींत पाऊल फारसें पुढें पडणें शक्य नाहीं.

क्षयरोगाच्या प्रतिकारार्थ जरूर असणाऱ्या गोष्टी वर सांगितल्याच आहेत. या सर्व अमलांत आणणें ज्यांनां अशक्य असेल, त्यांनीं शक्य तितक्या गोष्टी तरी अमलांत आणल्यासहि त्यांपासून फार फायदा होणार आहे. खोल्या स्वच्छ राखणें, निजण्याच्या खोलीच्या खिडक्या रात्रंदिवस उघड्या ठेवणें, व मोकळ्या ताज्या हवेंत शक्य तितका वेळ रहाणें, या गोष्टींबद्दल तरी कोणीं कांहीं निमित्तें सांगतां कामा नयेत !

ग्रूप फोटो.



पुणे—महिलाविद्यालयांतील विद्यार्थिनी.

खास मनोरंजनासाठी.


फोटोग्राफर—श्रीयुत वी. आर. गुणे, बुधवारपेठ, पुणे.



पुणें—फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी.

खास मनोरंजनासाठीं. फोटो ग्राफर—श्रीयुत वा. आर. गुण, बुधवारपेठ, पुणें.

मुंबई–स्टुडंट्स लिटररी आणि सायंटिफिक सोसाइटीच्या हायस्कुलांतील विद्यार्थिनी आणि आनररी टीचर्स व वर्कर्स.



मुंबई—आर्यमहिला समाज आणि प्रार्थनासमाजांतील कांहीं भगिनी.



यवतमाळ—महिलासमाजांतील कांहीं भगिनी.



मुंबई–पाचवे प्रभुजातींतील फुलझाडांच्या प्रदर्शनांतील लेडी व्हालंटियर्स.



मुंबई—सोशल सर्व्हिस लीगच्या मॅनेजिंग कौन्सिलचे कांही सभासद आणि वर्कर्स.

१—(उभे) मेसर्स–डॉ. रानडे; कुंटे; प्रो. सरकार; नावर; तेलंग; लाले; वाघमारे; सडवळकर; —.
२—(उभे) मेसर्स–डॉ. नगरसेट; —; रा. सा. पै; तर्खड; पैरामजी; डॉ. संजगिरी; चंदशंकर; जोशी; देसाई; दिवेटिया; गजर; नायक; पंड्या; भाऊ.
३—(बसलेले) बोले; कोरगांवकर; प्रो. काडिया; सर भालचंद्र; सर नारायण; नॉ. पारख; यंदे; देवधर; नवलकर; काणे; दळवी.
४—(बसलेले) मेसर्स–डॉ. वैद्य; लीलाधर; —; मोतीवाला; मित्र; वाघ; ठाकूर; गोठसकर.

मुंबई-स्टूडंट्स ब्रदरहुडच्या मॅनेजिंग कौन्सिलांतील कांहीं सभासद.

१-(उभे) मेसर्स के. जे. दुधाट; बी. एस. तरंडे; भगवानदास; बी. एन. मोतीवाला; एम्. विश्वेश्वरराव; डॉ. ई. मोझेस.
२-(बसलेले) मेसर्स टी. जी. दळवी; जे. जे. विमादलाल; एन्. जे. भाभा; सर नारायण; मे. पी. ए. जाडिया; सी. एन. कॉंट्रॅक्टर; मे. वेलिणकर.

मुंबई—दि योग्ये प्रेसिडेन्सी सोशल रिफार्म असोसिएशनच्या कौन्सिलचे कांहीं सभासद.

उभे—मेसर्स—बाघ; पंड्या; रा. सा. पै; भा. म. पंडित; मोतीवाला; वसंतराव राजत; कुंटे; डॉ. रानडे; लीलाधर; भगवानदास.
बसलेले—मे०—का. र. मित्र; अ. वि. साखरदांडे; द. ग. दळवी; ना. पारख; सर नारायण चंदावरकर; पाध्ये; देसाई; पाटकर; ना. म. जोशी.

फोटोग्राफर—श्रीयुत जी. एम. जयकर, गिरगांव, मुंबई.

पुणे—नूतन मराठी विद्यालयाचे कौन्सिलचे सभासद आणि लाईफ मेंबर्स.

उभे—डावीकडून—कृ. गो. लोहोकरे; रा. ज. गोखले; पं. गो. शिदोरे; वि. गो. केसकर; लक्ष्मणशास्त्री लेले; रा. मं. तेलंग; गो. स. गोडबोले; रा. गो. देव.
बसलेले—डावीकडून—वि. ग. आपटे; इ. ना. आपटे; रा. ब. गोडबोले; सर रामकृष्ण; रा. ब. मराठे; वि. ह. वांकलिस; कृ. ब. डोंगरे.

फोटोग्राफर—श्रीयुत वी. आर. गुणे, बुधवारपेठ, पुणे.

खास मनोरंजनासाठी

मुंबई–मागासलेल्या वर्गांत शिक्षणप्रसार करणाऱ्या मंडळीच्या कौन्सिलाचे सभासद.
उभे–मेसर्स–जे. बी. घाडिया; डॉ. ई. मोझेस; डी. एस्. यंदे; वाय्. टी. माणगांवकर.
बसलेले–मेसर्स–वसंतराव राऊत; डी. जी. दळवी; के. एम्. महाले; ना. फाजलभाई करीमभाई; प्रो. बेलिणकर.



मुंबई-प्रार्थनासमाजाच्या कौन्सिलांतील आणि समाजाचे कांहीं सभासद.

उभे-मेसर्स-एम्. एस्. केळकर; व्ही. एस्. सोहनी; आर्. जी. गुप्ते; जी. बी. त्रिवेदी; डॉ. श्रीधर गोविंद रानडे; जे. जी. गद्रे;
बसलेले-मेसर्स-बी. एस्. तर्खड; प्रो. एन्. जी. चंदावरकर; डॉ. काशीबाई नवरंगे; सर नारायण; बाबू अविनाशचंद्र; वाय्. व्ही. भांडारकर; डी. जी. वैद्य.

मुंबई, निर्णय-सागर छापखाना, कं. लि. यांनी छापिलें.

मुंबई–आर्यसमाजांतील कांहीं सभासद.

उभे–भाई–देवीसिंगजी; पंडित मथुरांकरजी; रतनलाल ए. शहा; कनैयालाल जी. कोठारी; गिरधरलाल जी. मेहता;. मणिलाल डी. मोदी; मेहताजी.
उभे–भाई–परशुरामजी; पंडित बालकृष्णजी; रंगीलदास; माणेकलाल; जमनादास; प्राणजी; प्राणजीवनदास; त्रिभुवनदास; केवलाल पी. जोशी.
बसलेले–भाई–डॉ. देसाई; नगीनदास; प्राणजीवनदास; **दामोदर सुंदरदास** (अध्यक्ष); रणछोडदास; देवीदास; गिरजाशंकर; मोतीलाल.

खास मनोरंजनासाठीं.

फोटोग्राफर्स–दि रायल फोटोग्राफिक कं., मुंबई.

अमेरिकन मराठी मिशनांतील कांहीं सभासद.

चर्च मिशनांतील कांहीं मिशनरी.



मुंबई-सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या व्यवस्थापकमंडळांतील कांहीं सभासद.
श्रीयुत-राजमी, बी. ए.; सबनिस, बी. ए.; ठाकुर, बी. ए.; ठेंगे, बी. ए.; प. वा. डॉ. सांवोर; मित्र; रा. सा. डुकले, बी. ए.; कानविंदे.
• श्रीयुत तेलंग, वर्दे, दिवाडकर, बी. ए.



मुंबई—तेलगू एज्युकेशन फंडाचे कांहीं स्वयंसेवक.

(उभे)—श्रीयुत—ल. म. पुलगम; न. वि. पुरा; डॉ. तु. गं. आकुला; शं. स. गांगला; शं. सा. परशा.
१—(बसलेले)—श्रीयुत—डॉ. गं. इ. गंदम; ग. स. हिंगुराव; शं. रा. जिलकर; ना. सं. गांगला; ल. व्यं. कालेवार; भु. म. आकुला.
२—(बसलेले)—श्रीयुत—वि. कृ. पुप्पाल; वि. गं. आकुला.




खास मनोरंजनासाठी. फोटोपाडार—श्रीयुत श्री. एम. जपकर, मुंबई.



मराठाऐक्येच्छुसभेंतील कांहीं सभासद.

१–(उभे) श्रीयुत—दामोदर बा. पडवळ; धोंडीबा पां. वनकर; हरिश्चंद्र वि. राजवाडकर; माधवराव म. खांडरे; हरि गं. बाघधरे.
२–(उभे) श्रीयुत—यशवंत-ता. माणगांवकर; मुकुंद मो. खांडके; काशीनाथ दे. धुरू; कृष्णाजी ना. लायले; स. वि. कीर; कृ. अ. केळुसकर.
३–(बसलेले) श्रीयुत—डॉ. लक्ष्मण ब. धारगळकर; तुकाराम जावजी; काशीनाथ रा. कोरगांवकर; सीताराम के. बोले; दामोदर सा. यंदे.



पुना कॉन्फरन्स अस्पृश्य वर्गाचे कांहीं कैवारी आणि पुढारी.



मुंबईतील अस्पृश्य मंडळींतील कांहीं गृहस्थ.

खास मनोरंजनासाठीं. फोटोग्राफर-श्रीयुत जी. एम. जगकर, गिरगांव-मुंबई.



खास मनोरंजनासाठी. धर्मालय लॉज. फोटोग्राफर्स-श्रीयुत त्रिलोकेकर आणि कीर्तिकर.

(उभे) श्रीयुत—रोहिदास हरिश्चंद्र त्रिलोकेकर; नानाभाई गणपतराव कानविंदे.
१-(बसलेले) ,, सी. गो. राजे; वा. भा. पै; डॉ. त्रिलोकेकर; हेगडे; भांडारकर.
२- ,, ,, नारायण रामचंद्र काशीकर; मार्तंड सखाराम प्रधान; वामन गणपतराव त्रिलोकेकर.



मुंबई—सत्कार्योत्तेजक वाग्विलासी नाटकसमाजा (अमेच्युअर्स) चे पुरस्कर्ते.


खास मनोरंजनासाठी. फोटोग्राफरर्स-हरपनभट्टी ब्रदर्स, ठाकुरद्वार, मुंबई.



पुणें—लवाद कोर्टाचे कांहीं लवाद.

(उभे) श्रीयुत— —; वि. वा. जोशी; किसनदास टिकमदास; चिं. ग. भिडे.
(बसलेले) श्रीयुत—कर्वे; रा. ब. जोशी; रा. के. ओंकार; सरदार ना. चिं. नातु.

खास मनोरंजनासाठीं. फोटोग्राफर—श्रीयुत बी. आर. गुणे, बुधारपेठ, पुणें.



पुणें अनाथविद्यार्थिगृहांतील विद्यार्थी.

खास मनोरंजनासाठीं. फोटोग्राफर—बी. आर. गुणे बुधारपेठ, पुणें.



सोलापुर श्रीमद्वीरशैवमहाजनसभा.

•मनोरंजनासाठीं फोटो. फोटोग्राफर्स-श्रीयुत नरसाप्पा अॅन्ड सन्स, सोलापुर.

(उभे) श्रीयुत—म. ना. वजीरकर; आ. कुर्ले; म. भातकर; शि. सि. मालगे; म. कावळे.
१-(बसलेले) ,, शेटे; पाटील; कारंजे; काडादी; मडकी; देशमुख; म सि. झुंजे.
२-(बसलेले) ,, म. व. तालिकोट; च. सा. विराजदार; ब. रे. कल्याणशेटी; क. ना. विजापुरे.



खास मनोरंजनासाठीं. सोलापुर येथील कांहीं जैन मंडळी.

(उभे) श्रीयुत रा. पा. गांधी; ना. चा. मोहोळकर; दि. वि. क्षीरसागर; रा. ई. कल्याणशेटे; मा. रा. शहा.



खास मनोरंजनासाठीं. **मुंबई—सारस्वतदीनवत्सलसंघ.** फोटोग्राफर—श्रीयुत जयकर.

१–(उभे) श्रीयुत—विनायक मंगेश रांगणेकर; दत्ताराम सीताराम हवालदार; बा. मं. रांगणेकर.
२–(उभे) ,, सुखठणकर; लाड; हेगडे; हवालदार; संजगिरी; सवनीस; पाणंदीकर.
(बसलेले) ,, कानविंदे; साखरदांडे; केरकर; सवनीस; आचार्य; पालेकर.




खास मनोरंजनासाठीं. **कित्तेभंडारीऐक्यवर्धकमंडळी.** फोटोग्राफर–श्रीयुत जयकर.

(उभे) श्रीयुत–रा. गो. कुलाबकर; वि. के. बोले; रा. रा. गांगनाईक; शां. भि. गोलतकर; स. वि. कांदळकर.
(बसलेले) श्रीयुत वि. आ. पोलेकर; ग. वि. वीर; शी. के. बोले; स. इ. गोलतकर; इ. गं. वाघधरे.



मुंबई-त्वष्टाकासार मंडळीचे कांहीं पुढारी.

श्रीयुत-आ. व. त्रिभुवने; गो. आ. एडेकर; रा. वा. शेटे; य. दा. समेळ.



मुंबई-कामगारहितवर्धकसभेचे चालक.

श्रीयुत-ह. आ. तालचेरकर, भि. रा. नेरे; सां. के. बोले, जे. पी. बी. ए.;



खास मनोरंजनासाठी. **मुंबई-क्षात्रैक्यसमाजाची चालक मंडळी.** फोटोग्राफर्स-देव्हारे अॅन्ड कंपनी.

१. श्रीयुत-राणे; सहानी; पाठारे; परळकर; डॉ. दादरकर; भट्टे; मंत्री.
२. श्रीयुत- प्रो. ताकखाव; मंत्री; राणे; चेंबुरकर (प्रेसिडेंट); वनमाळी; नावलकर; सहानी.
३. श्रीयुत-के. य. क्षात्रे; ना. रा. गोरक्ष; वि. व. परळकर; मु. ज. गोरेगांवकर; भ. गं. परळकर.



देवज्ञ असोसिएशनचे सभासद.

(उभे)-श्रीयुत-जन्हेर; के. एस. पितळे; के. एम्. पितळे; वी. डी. पितळे; वैद्य; गुहागरकर; मालनकर.
(बसलेले)-श्रीयुत-पाडवाल; दोनवलकर; डॉ. मुकुंटे; देवरखकर; प्रो. हाटे; वैद्य; धुळेकर; वगळ; पितळे.

खास मनोरंजनासाठी. फोटोग्राफर-श्रीयुत पी. एस. जोगी, मुंबई.



मुंबई-पाठारेप्रभुज्ञातींतील कांहीं गृहस्थ.



मुंबई-सारस्वतब्राह्मणसमाजाच्या व्यवस्थापक मंडळाचे कांहीं सभासद.

(उभे) श्रीयुत-पां. वि. सबनीस; द. सी. हवालदार; प. आ. घोंड, एल्. ए.; बा. ला. देसाई; बा. मं. रांगणेकर.
(बसलेले) मेसर्स-नेरूरकर; आचार्य; साखरदांडे (अध्यक्ष); दिवाडकर; सबनीस; सबनीस; कानविंदे.

खास मनोरंजनासाठीं. फोटोग्राफर-श्रीयुत जी एम्. जयकर, गिरगांव, मुंबई.



बलिदान.

"अरेरे, केवढी मी हतभागिनी !"

खास मनोरंजनासाठी. चित्रकार—श्रीयुत एम् व्ही धुरंधर, बडोदे.

एक सामाजिक प्रश्न.

पतित भगिनींस विनंति.

[एक भगिनी, मुंबई.]

पुढील चार शब्द लिहिण्यास मला आज स्फूर्ति होत आहे. तिचा उगम श्रीमती हिराबाई नागेशकर यांनीं गेल्या वर्षाच्या (१९११ च्या) जुलई महिन्याच्या मनोरंजनांत लिहिलेल्या लेखावरून झाला आहे. श्रीमती हिराबाईंचा हा लेख म्हणजे अनीतीनें जीवितक्रम चालविणाऱ्या जातींत होणाऱ्या जागृतीचा सोनामाच होय, असें म्हटलें पाहिजे.

जेथें गांव आहे तेथें महारवाडा हा असावयाचाच. त्याप्रमाणें जगाच्या पाठीवर कोणत्याहि देशांत देह-विक्रय करणाऱ्या स्त्रिया या असावयाच्याच. मला वाटत होतें, कीं, निदान आपल्या आर्यावर्तात तरी हा अपवित्र धंदा कमी प्रमाणावर असावा; परंतु गेल्या खानेसुमारीचे आंकडे पाहतां हा धंदा वाढत्या प्रमाणांत आहे, असें मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागतें. सर्व जगांतील स्त्रियांच्या गुणधर्मांचा विचार केल्यास पातिव्रत्यांत, शौर्यांत व राजकारणांत नांव मिळविलेल्या स्त्रिया आपल्या या भरतखंडांतच जास्त प्रमाणानें आढळतील, असें कांहीं थोर इंग्रज गृहस्थांनींहि प्रांजलपणें कबूल केलें आहे. हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या पातिव्रत्याची साक्ष त्यांच्या सती जाण्याच्या चालीवरून व्यक्त होत आहे. स्त्रियांच्या पवित्र व शुद्ध आचरणाची महती आपल्या धर्मपुस्तकांतून, कथापुराणांतून वगैरे थोडी का वर्णिली आहे? अशा या परमपूज्य भूमीवर वास करणाऱ्या आपणांमध्यें देहविक्रय करून चरितार्थ चालविण्याचा निंद्य व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांची संख्या एवढी मोठी असावी, हा आपल्या देशाला खरोखरच मोठा काळिमा होय. आतां नीतीचें साम्राज्य बनणें कधींहि व कोठेंहि शक्य नाहीं, हें उघड आहे; तरी पण होतां होईल तितकें करून तसें बनविण्याचा हरप्रयत्न मानवी प्राण्यानें केला पाहिजे. नीतीचे व शुद्धतेचे विचार शिक्षणाशिवाय येऊं शकतील काय? उदार ब्रिटिश सरकारच्या अंमलांत शिक्षणाची बंदी कोणा-सच नाहीं. सरस्वतीमंदिराचें द्वार पाहिजे त्याला खुलें आहे; पण दुर्दैवाची गोष्ट ही, कीं, शिक्षण मिळविण्याची इच्छा तुम्हांत फारच कमी दिसून येते, नाहीं बरें? तुम्हांला शिक्षण अगदींच मिळालें नाहीं म्हणावें, तर आज मराठी लिहितांवाचतां येत आहे अशा स्त्रियांची संख्या तुमच्यांत बरीच असून, कित्येक तर थोडेंबहुत इंग्रजी भाषेचेंहि ज्ञान संपादन केलेल्या आहेत. पूर्वी ज्याप्रमाणें मुंबई शहरांतील कांहीं शाळांत वेश्यांच्या मुलींस घेण्याची बंदी असे, व त्यांनां मिशनरी शाळां-तूनच कायतें शिक्षण मिळत असे, तशी बंदी सध्यां खासगी शाळांतून नाहीं, हें सुचिन्ह समजलें पाहिजे. नुसतें लिहितांवाचतां आल्यानें नीति सुधारत नाहीं म्हणतात, तें खोटें नव्हे. तर आचरण सुधारण्यास चांगल्या प्रतीचें नैतिक शिक्षण, उत्तम सहवास व विचार करण्याची शक्ति हीं प्राप्त झालीं पाहिजेत.

तुम्हांमध्यें धार्मिक बुद्धि किती तरी वास करीत आहे. देवधर्म, पूजनअर्चन, उपवासव्रतें, दानें, यात्रा वगैरे तुम्ही पूज्यबुद्धीनें करितां, पोथ्या-पुस्तकें वाचितां, कथापुराणें भक्तिभावानें नेहमीं ऐकत असतां, असें असून वरेंवाईट, पवित्रअपवित्र, नीतिअनीति यांतील भेदाभेद तुम्हांला कळूं नयेत, हें आश्चर्य नव्हे काय? परंतु त्यांत आश्चर्य तरी कसलें?

विद्यार्थ्यांस इशारत. मस्तक भणभणूं लागलें अथवा दुखूं लागल्यावरोबर
देझोच्या बाल्यांचा उपयोग करा.

जर प्रत्यक्ष देवादिकांतसुद्धां रंभा, उर्वशी आदिकरून अप्सरा ऊर्फ वेश्या होत्या, असें आमचीं पुराणें वर्णितात, व हा कलावंतिणींचा वर्ग फार पुरातन आहे असें ह्मणतात, तर तुह्मी त्यावर विश्वास कां न ठेवाल ? आणि तुह्मी अशा पुराणप्रसिद्ध धंद्यांत आहांत ह्मणून अभिमान कां न बाळगाल ? भगिनींनों ! काय हें तुमचें भयंकर अज्ञान ! स्वार्थी, विषयी पुराणकारांनीं आपली विषयतृष्णा शमविण्याकरितां हा वेश्यावर्ग असावा असें ठरविलें, आणि तो कथापुराणांत नोंदून त्यावर जणूं काय धार्मिक श्रद्धेचा जबरदस्त शिक्का ठोकून दिला. हा निवळ त्यांनीं स्त्रियांच्या अज्ञानाचा व अंधविश्वासाचा फायदा घेतला नाहीं काय ? चोरी, चहाडी, विश्वासघात, व्यभिचार, हत्या हे सर्व निंद्य आचरणप्रकार कोणत्याहि धर्मांत क्षम्य आहेत असें कोण ह्मणेल ? तो सच्चिदानंद मंगलमय प्रभु सद्गुणांचें केवळ आगर आहे, असें आपण वर्णन करितों व ऐकितों, त्याला हा अमंगल वेश्याधर्म कसा रुचेल बरें ? इतर कोणत्याहि धर्मांत पहा, या कलावंतिणींच्या धंद्यास कोठेंहि संमति दिलेली आढळणार नाहीं. इतर धर्मांच्या पुस्तकांतून या अमंगल वेश्यावर्गाचा कोठें नामनिर्देशहि केलेला नसतो; परंतु आपल्या पुराण-ग्रंथांत तो आहे, ह्मणूनच आज आपल्या समाजात कलावंतिणी, मुरळ्या, देवदासी, भाविणी यांच्या अनेक जाति आढळतात.

असा एक काळ होऊन गेला, कीं, जेव्हां कुमारिकांची योजना कांहीं धार्मिक कृत्यें करण्याकडे करीत, व त्यांना पवित्र समजून त्यांचें आचरण शुद्ध राखण्याविषयीं फार जपत असत. वेदकालीं यज्ञयागादि कृत्यें करण्याची चाल चोहोंकडे असे. यज्ञाला लागणारा अग्नि लांकडावर लांकूड घांसून उत्पन्न करीत असत. त्या वेळीं अग्नि उत्पन्न करण्याचें हें काम कांहीं कुमारिकांकडे सोंपविलेलें असे. त्यांजकडे वांकड्या नजरेनें पहाण्याचेंहि धाडस कोणी करीत नसत. उलट त्यांचें कौमार्य रक्षण करणें आपलें पवित्र कर्तव्य आहे, असें त्या काळचे लोक समजत असत. कालांतरानें हें पवित्रतेचें पारडें फिरलें असावें, आणि आजन्म कौमार्यावस्थेंत रहाण्याचा संकल्प केलेल्या स्त्रियांच्या पवित्र व्रताचा भंग होऊन त्या व्यभिचारास प्रवृत्त झाल्या असाव्या, व सांप्रत आढळणाऱ्या कलावंतिणी, देवदासी, मुरळ्या, भाविणी इत्यादिकांच्या रूपानें त्या आज अस्तित्वांत आहेत, असा माझा तर्क धांवतो. येथें मूळ हेतु किती पवित्र होता, याकडे आपण लक्ष्य पुरविलें पाहिजे.

शिवलीलामृताच्या अकराव्या अध्यायांत महानंदा नांवाच्या एका शिवभक्त वेश्येचें असें वर्णन आहे, कीं, ती कोणाहि पुरुषावरोबर तीन दिवस पतिव्रताधर्मानें वागत असे, व हा तिचा नियम ती मोठ्या कडकपणें पाळीत असे. शेवटीं ती एकनिष्ठ शिवभक्त असल्याकारणानें प्रत्यक्ष महादेव सौदागराच्या वेषानें तिजकडे आले, व तिजवर प्रसन्न होऊन तिचा व तिच्या नगरीचा उद्धार करून त्यांनां त्यांनीं कैलासाला नेलें ! आतां तुह्मीच विचार करा, कीं, 'वेश्या असुनि पतिव्रता' असें जें तिचें शिवलीलामृतांत वर्णन केलेलें आढळतें, तें तिच्या तीनच दिवसांच्या पातिव्रत्याचें काय ! अहाहा ! काय पण पातिव्रत्याची थोरवी गाइली ह्मणावयाची ! आणि त्याचा कळस झटला ह्मणजे प्रत्यक्ष देवालासुद्धां हें पातिव्रत्य पसंत वाटलें असें दाखविलें आहे ! स्वार्थी व सत्ताधारी माणसें आपल्या वाईट हेतूच्या समर्थनार्थ नेहमीं असेंच देवादिकांनां आपल्या पंक्तीस आणून बसवितात ! तेव्हां, अशा कथा-किंवा कल्पित गोष्टी कां ह्मणाना-जोंपर्यंत आमचे पुराणिक व हरिदास आपल्या श्रोत्यांपुढें कथन करणार, परंतु या निंद्यकर्माचा प्रतिकार ह्मणून करणार नाहींत, तोंपर्यंत तुमच्यासारख्या अज्ञ स्त्रिया त्यांवर विश्वास कां ठेवणार नाहींत ? आपले धर्मगुरुहि या बाबतींत अपराधी नाहींत, असें कोण ह्मणेल ? आज पाण्यासारखा पैसा दानधर्माच्या रूपानें तुह्मी या पुरोहितांच्या व भटभिक्षुकांच्या घशांत ओतीत असतां; परंतु तुमचा उद्धार होईल असा नीतीचा मार्ग कधींतरी त्यांनीं तुह्मांला समजून सांगितला आहे काय, कीं, जेणेंकरून तुह्मांला आपल्या जीवितक्रमाचा वीट आला असता ? बरें, धर्माची, पापपुण्याची, पुढील जन्मीं होणाऱ्या भयंकर यातनांची तरी त्यांनीं तुह्मांला कधीं ओळख करून दिली आहे ? नाहींना ? मग आजपर्यंत उत्सवांप्रीत्यर्थ देवस्थानांस मोठमोठ्या देणग्या देऊन, व देवालयें बांधून तुह्मीं काय मिळविलें ? कोणत्या देवाला

डोकें फार दुखत असेल तर ट्रेझोच्या दोन वड्यांची पूड पाण्याबरोबर खावी. लगेच गुण !
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

प्रसन्न केलें? धर्माच्या बाबतींत तुमच्यांत इतकें अज्ञान बावरत असावें, ही दुःखाची गोष्ट होय!

मुलींचीं लग्नें करून दिलीं तर कुलदेवतेचा कोप होतो व दोघांपैकीं कोणाचा तरी मृत्यु होतो, अशी तुमची ठाम समजूत होऊन बसली आहे! असे मृत्यु जगाच्या रहाटीप्रमाणें इतर जातींत नाहींत का घडत? म्हणून का मुलींचीं लग्नें कोणीं करावयाचीं सोडलीं आहेत? ती जगन्माता आदिशक्ति भवानी स्वतः अशा धंद्याची आहे काय, कीं, तिला आपल्या कन्यका अशा कुमार्गगामी असाव्या असें वाटावें? हा भयंकर अज्ञानाचा कडेलोट न म्हणावा तर काय!

आज तुह्मांमध्यें अशाहि पुष्कळ स्त्रिया आहेत, कीं, ज्यांनां या धंद्याबद्दल फार लाज वाटते. कित्येकांचें आचरण व पोषाखहि नेहमीं सभ्य व भारदस्त असतात. आपणांस कोणीं ओळखूं नये म्हणून निराळा पोषाख करून त्या बाहेर पडतात. विवाहित स्त्रीप्रमाणें राहूनहि हा कलंक सहन करणें बिचाऱ्यांनां भाग पडतें. कोणी यजमानापाठीमागें इमानानें राहून एकाद्या विधवेप्रमाणें देवधर्म, नेमनिष्ठा यांत राहिलेलें आयुष्य घालवीत असतात, हें त्यांनां खरोखरच भूषणावह होय; परंतु यापासून निष्पन्न असें कांहींच होत नाहीं. केवळ संतीण बनून जपमाळ हातीं घेण्यापेक्षां, आपल्या इतर अज्ञ भगिनींस उपदेशामृत पाजून या अपवित्र मार्गांतून काढण्याचें श्रेय जर त्या घेतील व नवीन पिढीस सन्मार्ग दाखवितील, तर तुमच्या समाजावर त्यांचे अगणित उपकार होणार आहेत. अशा कांहींजणींनीं कां पुढाकार घेऊं नये बरें? आज हिंदुस्थानांत साधुवैराग्यांचा हवा तसा सुळसुळाट आहे; परंतु या दिशेनें कोणीतरी कांहीं उद्योग करितात काय? गेले! ते भगवान् गौतमबुद्धाचे दिवस गेले! अशा हीन व पतित स्त्रियांचा वाली तोच काय तो एक होऊन गेला, कीं, ज्याचे भिक्षुक व भिक्षुकिणी अशा स्त्रियांच्या आळीआळीतून व घराघरांतून उपदेश करीत हिंडत असत!

नुकतेंच माझ्या वाचनांत आलेल्या 'The White Slave Trafic' नामक इंग्लिश पुस्तकावरून असें कळतें, कीं, खुद्द इंग्लंडांत व इतर पाश्चिमात्य देशांतहि हा अनीतिप्रवर्तक धंदा फारच जोरानें चालत आहे. तेथें गरीब व मध्यम प्रतीच्या कुटुंबांतील मुली एकदां वयांत येऊन त्यांनां कळूं लागलें म्हणजे त्या आपले आईबाप, भाऊबंद किंवा इतर कोणीहि वडील माणसें यांवर आपल्या उदरनिर्वाहाचा भार टाकीत नाहींत. त्या कांहीं तरी चरितार्थाचा धंदा पहात असतात. त्यामुळें तेथें स्त्रियांकरितां नानातऱ्हेचे धंदे उपस्थित झाले आहेत. दुष्ट व हलकट लोक अशा मुलींचा फायदा घेऊन भोळ्याभाबड्या व तरुण मुलींनां भुलथापा देऊन, किंवा जाहिरातींच्या द्वारें शिक्षकिणींच्या किंवा दाईच्या कामाचें आमिष दाखवून त्यांनां परदेशांत नेतात, आणि तेथें त्यांच्या अज्ञानाचा व गरिबीचा फायदा घेऊन त्यांच्या कौमार्यावर धाड घालितात व त्यांनां जन्मांतून उठवितात! या हतभागी अबला त्या अधमांच्या वासनेस तर बळी पडतातच; परंतु ते दुष्ट चांडाळ पुढें त्यांनां निर्वाहाकरितां उघडपणें देहविक्रय करावयास लावितात! असे किती तरी संभावितांत मोडणारे पुरुष तेथें आहेत, कीं, जे अशा स्त्रियांनीं कमाविलेल्या पैशांवर आपलें पोट जालितात. अशा अनीतिप्रवर्तक धंद्यांस आळा पडावा या हेतूनें व पतितोद्धारासारखें पवित्र कृत्य हातून घडावें या हेतूनें कांहीं उदार स्त्रीपुरुषांनीं मिळून 'The National Vigilance Association' नामक एक जंगी संस्था कांहीं वर्षांपूर्वी स्थापन केली असून तिच्या अनेक शाखा गांवोगांवीं उभारल्या आहेत. या संस्थेतर्फे काम करणारे स्त्रीपुरुष गुप्त हेरांप्रमाणें चोहोंकडे फिरत असतात. आगगाडींत, आगबोटींत, स्टेशनांवर, खाणावळींत, सार्वजनिक रस्त्यांवर, किंबहुना शहरांच्या कोनाकोपऱ्यांतूनहि ही स्वयंसेवक मंडळी डोळ्यांत तेल घालून जणूं टपत असते. एकादा संशय घेण्यासारखा पुरुष किंवा स्त्री एकाद्या अजाण तरुणीस भुलथापा देत आहे, असें पहाण्यांत आल्यास पोलिसाच्या मदतीनें त्यांनां शासन करण्यांत येतें, व त्या तरुण स्त्रीस योग्य ती मदत करण्यांत येते. अशा तऱ्हेनें कुमार्गांत पडणाऱ्या स्त्रियांनां सोडवून आपल्या आश्रमांत ते आश्रय देतात. तेथें त्यांनां अन्नवस्त्र पुरविण्यांत येऊन वारंवार नीतीचा उपदेश करण्यांत येतो. निर्वाहाचा कांहीं धंदा त्यांनां

येत नसल्यास तो शिकवितात. त्यांचे कोणी नातलग त्यांचा अंगीकार करण्यास तयार असतील तर त्यांना त्यांच्या स्वाधीन करितात. या संस्थेंत राहून सुधारलेल्या कित्येक जणी स्वतंत्र राहून आपला उदरनिर्वाह अब्रूनें करितात; आणि अशीहि कांहीं उदाहरणें आहेत, कीं, अशा रीतीनें सुधारलेल्या कांहीं बायांबरोबर कांहीं उदात्त विचारांच्या गृहस्थांनीं लग्नें केलीं असून त्या सुखानें कालक्रमणा करीत आहेत. एवंच, या आश्रमांतून बाहेर पडल्यानंतर त्यांचा पुढील आयुष्यक्रम पवित्रपणें जातो. तशांतूनहि ज्या जातीच अप्रबुद्ध व दुराचारी वर्तनाच्या असतात, त्या या आश्रमांत येऊन राहिल्या तरी पुढें त्या त्यांतून निघून जातात, व पूर्ववत् आपलें निर्लज्जपणाचें वर्तन सुरू करितात. या गोष्टीला इलाज नसतो. असें आहे, तरी ही मंडळी आपला उद्योग सहसा सोडीत नाहीं. शंभरांतून जरी पंचवीस सन्मार्गास लागल्या, तरी या संस्थेस त्यावद्दल धन्यता वाटते. या संस्थेस ख्रिस्ती देवालयाचे मुख्य अध्यापक, आर्चबिशप वगैरे मंडळीची पूर्ण सहानुभूति आहे, व ते आपल्या हाताखालील धर्मप्रचारक निरनिराळ्या ठिकाणीं उपदेश करण्यास पाठवीत असतात. आमचे धर्ममार्तंड, धर्मगुरु शंकराचार्य या बाबतींत जरा तरी हात पाय हालवितात काय? हजारों कोटिलिंगार्चनें केल्यानें जें श्रेय प्राप्त होणें नाहीं, तें अशी एकादी संस्था ते स्थापन करितील तर त्यांना प्राप्त होणार आहे. आपल्यास धर्माभिमानी म्हणविणारांनीं चालविलेली अशी, आज अभिमानानें दाखविण्यासारखी एक तरी संस्था आहे काय, कीं, जीमध्यें अनाथांस आश्रय मिळत आहे, पोरक्या लेंकरांचा संभाळ होत आहे, पतित स्त्रिया सन्मार्गी बनत आहेत, किंवा चोर, बदमाष अशा लोकांनां सद्गुणी नागरिक करीत आहे? परंतु याच्या उलट पहावें तर आज अन्नछत्रें, मठ, आश्रम यांची रेलचेल आढळते. आमचा धर्माभिमानी वर्ग आळशी, निरुद्योगी, बाजारबुणगे यांची पैदास मात्र मोठ्या जारीनें करीत आहे. आमच्या धर्माधिकाऱ्यांचें लक्ष्य पोकळ धर्माची दिशा बदलून वरीलप्रमाणें एकादी सार्वजनिक हिताची गोष्ट करण्याकडे लागूं नये, ही दुर्दैवाची गोष्ट होय! कोरडी सहानुभूति काय कामाची?

गोरक्षणप्रतिपादकांनों! ज्या गाईची तुम्ही खाटिकांपासून सुटका करितां, ज्या गाईला तुम्ही गोमाता नांवानें संबोधितां, जिला प्रदक्षिणा केली असतां पृथ्वीप्रदक्षिणेचें पुण्य लागतें, असें जिचें महात्म्य तुम्ही समजतां, जिला पवित्र समजून जिचें मलमूत्रहि तुम्ही भक्तीनें व प्रेमानें भक्षण करितां, ती गाई रानावनांत चरत असतां अज्ञानामुळें पशुस्थितींत असल्यामुळें वाटेल त्या अमंगळ पदार्थास तोंड लाविते. तिला जर कळतें, कीं, ज्या मला आर्यधर्मांत आज इतका मान मिळत आहे त्या माझें हें अपवित्र भक्ष्य असावें काय! तर ती खचित विष्ठेसारख्या पदार्थास शिवतीना. इतकें असूनहि तुम्ही तिला पवित्र समजून कसायापासून तिची सुटका करूं पहातां! याप्रमाणें त्या मुक्या जनावराची तुम्हांला कींव येते, आणि भयंकर अनीतिरूपी कसायाच्या तावडींत सांपडलेल्या दीन गाईची–तुमच्याच भगिनींची–तुम्हांला कींव येऊं नये काय? आज किती तरुणींचा हा होत असलेला संहार पाहून तुम्हांला त्याची कांहींच दिक्कत वाटूं नये, हें आश्चर्य नव्हे काय? त्यांच्याकरितां एकादें 'मुक्तिसदन' स्थापण्याचें तुम्हांला सुचूं नये, ही किती दुर्दैवाची गोष्ट आहे बरें! हजार गाई सोडविल्याचें जितकें श्रेय तुम्हांला मिळणार आहे, तितकेंच, किंबहुना शतपटीनें जास्त पुण्य पन्नास दुर्मार्गी भगिनींस सन्मार्गास लाविल्यानें तुम्हांला मिळणार आहे. त्यांच्याकरितां एकादें आश्रयस्थान स्थापा. न जाणों त्यांतील कितीतरी स्त्रिया सदाचारी गृहिणी बनण्यास व उत्तम राष्ट्रपुरुष प्रसवण्यास पात्र असतील. परंतु अशा दयार्द्रबुद्धीच्या अभावीं अनीतिरूपी सांपळ्यांत त्या अडकल्या आहेत. तुमच्या करुणेचा झरा अंमळ या बाजूनें वळूंद्या!

डॉ. मॅक्लिनिकल, डॉ. मॅन, सर रामकृष्ण भांडारकर प्रभृति कांहीं सद्गृहस्थांनीं पुण्यास एक संस्था स्थापन केली आहे. तिचा उद्देश असा आहे, कीं, अज्ञान व अनाथ मुलींनां दुर्मार्गाला लावण्याचा अधम उद्योग जे कोणी करीत असतात त्याला प्रतिबंध करून अशा मुलींनां त्यांच्या तावडींतून सोडवून त्यांनां सन्मार्गास लावावें. या उद्देशानुसार या संस्थेनें सुरुवात वगैरे देवास अर्पण करण्याची चाल बंद करावी, असें अर्ज सरकारास केले आहेत. यामुळें सरकारचें

स्वतःचे हाल व पैशाची खराबी करूं नका! कोणत्याहि मस्तकशूलावर ट्रेझोच्या वड्या प्रथम वापरा, म्हणजे दुसऱ्या औषधांची मग जरूर लागणार नाहीं.

या अत्यंत अनिष्ट चालीकडे लक्ष गेलें आहे, व कालांतरानें ही चाल बंद होईल अशी आशा वाटूं लागली आहे. या संबंधाचें बिल सध्या हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलापुढें लौकरच येईल, ना. मि. दादाभाई व ना. रा. व. मुधोळकर यांच्या बिलांतील मुद्यांचें एकीकरण करून सरकारानें एक बिल स्वतः आणण्याचें मनावर घेतलें आहे.

पंढरपुर येथील अनाथबालकाश्रम, प्रो. कर्वे यांचा अनाथबालिका-विधवा-आश्रम व आणखी कित्येक परोपकारी संस्था ज्या आज कोठें दिसत आहेत त्या सुधारणापंथाच्या लोकांनींच उभारलेल्या आहेत, हें सर्वांनां ठाऊकच आहे.

या अति पवित्र कार्यास प्रवृत्त होणारांच्या ठायीं प्रथम मनुष्यजातीविषयींचें खरें प्रेम, अंतःकरणाची खरी तळमळ, दयार्द्रबुद्धि हीं उत्पन्न झालीं पाहिजेत. या गुणांच्या साहाय्यानें दुराचारी माणसांचें मन जसें वश करून घेतां येतें, तसें कठोर शब्दांनीं किंवा तिरस्कार दर्शविल्यानें येणार नाहीं. स्वामी रामतीर्थ ह्मणतात "सज्जनहो, असे दूरदूर पळूं नका! पापी, दुराचारी माणसांची सावली तुह्मांवर पडेल ह्मणून असे भिऊन जाऊं नका, त्यांचा धिक्कार करूं नका, त्यांजवर दया करा! नकळे, कोणत्या दैवदुर्विलासानें त्यांनां ही स्थिति प्राप्त झाली असेल! तर उलट तुमच्या वाऱ्याची झुळूक त्यांचेवर वाहून जाऊं द्या, कीं, न जाणों त्या वाऱ्याच्या लहरीबरोबर तुमच्यांतील सद्गुणांचे कण, तुमच्या सद्विचारांचे तरंग त्यांच्या अंतःकरणांत प्रवेश करितील व प्रकाश पाडितील."

ज्या पुरुषांनां आपल्या भगिनी, स्त्रिया, मुली अनीतीच्या मार्गास लागल्या तर बिलकुल आवडणार नाहीं, त्यांनीं जरा उदार विचार करावा व कुमार्गास लागलेल्या स्त्रिया या पण कोणाच्या तरी मुली असतील, कोणाच्या तरी भगिनी असतील, व क्वचित् प्रसंगीं कोणाच्या तरी घर सोडून गेलेल्या पत्नीहि असतील, असें मनांत आणून पवित्र गीतेंतील 'आत्मवत् सर्वभूतानि' हें वचन लक्ष्यांत बाळगावें. सुशिक्षित पुरुषवर्ग अशा अज्ञ व पतित स्त्रीवर्गाचा पोशिंदा होण्याऐवजीं तो त्यांचा उद्धारकर्ता होईल तर एकंदर राष्ट्रावर त्याचे अगणित उपकार होणार आहेत.

भगिनींनों! आज तुह्मांकडे येणाऱ्या पुरुषवर्गापैकीं कित्येक तर चांगले शिकलेसवरलेले, नामांकित पदवीधरहि असतील; परंतु मला नाहीं वाटत, कीं, आपल्या उच्चतम शिक्षणाचा लाभ आपल्या निकट सहवासानें तुमच्यापैकीं एकाद्या हतभागी तरुणीस यांनीं कधीं दिला असेल, कीं, ज्या योगें तिला आपल्या जीवितक्रमाबद्दल पश्चात्ताप होऊन तिनें पुढें सद्धर्मानें रहाण्याचा निश्चय केला असेल. असे उदारवृत्तीचे पुरुष क्वचित् कोठें असल्यास मी त्यांनां पूज्य समजेन. जेव्हां स्त्रियांप्रमाणें पुरुषांची अब्रूसुद्धां तीव्रपणें भासूं लागेल, एकाद्या दुर्दैवी तरुणीचें पाऊल वांकडें पडल्यास ती जशी जगांतून उठते, तद्वतच, तिला त्या लज्जास्पद स्थितीस आणणारा अधमहि समाजाच्या तिरस्कारास पात्र होऊं लागेल, त्याला सभ्य लोकांत, इष्टमित्रांत मिसळण्याची जेव्हां बंदी होऊं लागेल, तेव्हां कोठें अशा अनीतीस आळा पडल्यास नकळे! कित्येक हतभागी स्त्रियांच्या जन्माची हे राखरांगोळी करून आपण सावाप्रमाणें समाजांत राजरोसपणें वावरत आहेत, मानमरातब अनुभवीत आहेत, अशा थोड्या का व्यक्ति आज शहरांतून, खेड्यापाड्यांतून वास करीत असतील? परंतु आपल्या आयुष्यांतील कधीं एक क्षण तरी हे पाषाणहृदयी आपल्या दुष्कृत्यांबद्दल अविचारी अबलांच्या केलेल्या घातांबद्दल, पश्चात्ताप करीत असतील काय?

भगिनींनों! कल्पना करा, कीं, तुह्मीं शिक्षण संपादन करून ज्ञान मिळविलें, व ज्ञानानें प्रकाशित होऊन आपलीं द्वारें जर पुरुषांनां बंद ठेविलीं, तर खचित कोणी बळजबरीनें तुमच्या घरांत आपला शिरकाव करण्यास धजणार नाहीं. तसे बेबंदशाहीचे दिवस आतां उरले नाहींत. आतां या विसाव्या शतकांतील इंग्रजी अंमलांत तुह्मांला न्याय मिळेल. तुह्मांला उपद्रव करण्याची कोणाला छाती होणार नाहीं. तुमच्या वर्तनांत हा पडलेला फरक पाहून सभ्यतेचा डौल घालणारे पुरुष लज्जेनें मागें परततील, व तुमचा लौकिक चोहोंकडे होईल. आज तुमच्या नादीं लागून ज्यांच्या संसाराची माती होत आहे, ज्यांचीं बायकामुलें, आयाबहिणी तुमच्या नांवानें हात चोळून शिव्याशापांची लाखोली तुह्मांवर वाहत आहेत, त्याच प्रेमळ माता, साध्वी स्त्रिया तुह्मांला आशीर्वाद

ट्रेझो टॅबलेटस्—अर्धशिशी, मस्तकशूल, व इतर कसल्याहि मस्तकदुखीवर रामबाण इलाज हाच आहे!

प्रवीणता दर्शवितील. सारांश, त्या इतर ज्ञातींतल्या मुलींप्रमाणें शिकूं लागल्या तर अशा विद्याकला-विभूषित, सुंदर, सुशील तरुणींबरोबर लग्नें करण्यास कोणी होतकरू धीर पुरुष पुढें येणार नाहींत, असें तुह्मांला वाटतें काय? हल्लीं आपण सुधारणेच्या मध्यकालांत आहों, व भविष्यकाळ प्रगतीचा येत आहे. जातगोत, उचनीच वगैरे बाबींकडे पुढील तरुणांचें लक्ष्य न जातां शुद्ध आचरण, विद्या, कला, सौंदर्य वगैरे सद्गुणांकडे तें वेधून विवाह होऊं लागतील. आणखी तुह्मी हें पण लक्ष्यांत ठेवा, कीं, मोठमोठ्या विभूति या हीन कुलांतच उत्पन्न झाला होत्या. पराशर, वसिष्ठ, व्यास व इतर कांहीं महर्षि हीन-कुलोत्पन्न असूनहि विद्येनें कसे थोर पदास चढले, व लोकादरास पात्र झाले, हें श्रीयुत सातवळेकर यांच्या 'स्पर्शास्पर्श' पुस्तकावरून आपल्या चांगलेंच निदर्शनास येईल.

असल्या अनाचारांनां आळा घालून स्त्रियांनां सन्मार्गास लावण्याचें कोणीं मनावर घेतलें असतां त्यास कसें यश येण्याजोगें आहे, याचा येथें एक दाखला देतें.

गेल्या मे महिन्यांतील 'इंडिअन सोशिअल रिफार्मर' नामक इंग्लिश साप्ताहिकांत एक मनन करण्याजोगा लेख प्रसिद्ध झाला होता. त्याचा थोडक्यांत गोषवारा पुढीलप्रमाणें:—

"संयुक्त प्रांतांतील कुमाव जिल्ह्यांत ही नैतिक जागृति झालेली पाहून प्रत्येक खऱ्या हिंदवासीयास आनंदाचें भरतें आल्यावांचून रहावयाचें नाहीं. नैनितालपासून सात कोसांवर रामगड ह्मणून एक खेडेगांव आहे. हें नाईक जातीच्या लोकांचें एक मुख्य ठिकाण आहे. आज कित्येक पिढ्या या जातींतील ज्या मुलींनां वर मिळत नसे त्यांनीं वेश्येचा धंदा बेधडक स्वीकारावा, अशी मोकळीक असे. हे नाईक आपणांस रजपूत क्षत्रिय ह्मणवितात. ही अपवित्र चाल या जातींत सुरू असतांहि येथील कट्टे धर्माभिमानी या लोकांबरोबर (social intercourse) रोटीबेटीव्यवहार ठेवीत आहेत. अनीति या कुमानी हिंदूंच्या इतकी हाडींमासीं खिळून गेली आहे, व पवित्र आचरणाबद्दलचे त्यांचे विचार इतके निःसत्व झाले आहेत, कीं, त्यांनां पतित व दुर्वर्तनी स्त्रियांबरोबर व्यवहार ठेवण्यास, त्यांच्यांत मिसळून मिसळून वागण्यास, कांहींच दिक्कत वाटेनाशी झाली आहे. सुदैवानें कांहीं सुशिक्षित हिंदूंच्या अटीकाट प्रयत्नानें या जातींत आतां जागृति होऊन ही अमंगल चाल अजीबात सोडून देण्याचें त्यांच्यांतील पुढाऱ्यांनीं मनावर घेऊन शपथा घेतल्या आहेत, व अतःपर अशा अनीतीनें पोट भरणाऱ्या स्त्रियांनां जातीबाहेर टाकिलें जाईल, व त्यांजबरोबर कोणत्याहि प्रकारें व्यवहार ठेविला जाणार नाहीं, अशा आशयाचे करार केले आहेत. या चळवळीमुळें रोहिलखंडांतील व आसपासच्या गांवांतील बऱ्याच संभावित घराण्यांतील तरुणांचा दुर्व्यसनापासून बचाव होईल, अशी खात्री वाटते."

लखनौ येथील 'Advocate' पत्र सरकारास अशी विनंति करितें, कीं, या नाईक पुढाऱ्यांनीं जी पवित्र कामगिरी पार पाडण्याचा विडा उचलला आहे, त्यांत दयाळू सरकारानें त्यांनां मदत करावी, व अधिक बळकटी आणावी. आपल्या राजकर्त्यांवर त्यांचा इतका विश्वास आहे, कीं, हें करारपत्र त्यांनीं स्टांप मारलेल्या कागदावर तयार केलें व सरकारी शिक्का त्यावर ठोकून घेण्याकरितां रजिष्टर कचेरींत दाखल केलें; हेतु हा, कीं, कोणीं उपद्व्यापी व्यक्तींनीं या करारपत्रावरील सरकारी शिक्का पाहून तरी ढवळाढवळ करूं नये. परंतु तेथील अधिकाऱ्यांनीं तें रजिस्टर करण्याचें या सबबीवर नाकारिलें, कीं, नाईक लोकांच्या सनातन धर्मांत ढवळाढवळ केल्यासारखें होईल! पण या नाईक मंडळीनें कसेंहि करून सरकारी शिक्कामोर्तब करून घेण्याचा दृढनिश्चय केला आहे, व हा निश्चय तडीस नेल्याशिवाय ते कदापि राहणार नाहींत. ही चळवळ सुरू झाल्यापासून जवळजवळ पंचवीस मुलींचा या धंद्यापासून बचाव करण्यांत आला व जुन्या सहवासापासून त्यांनां दूर ठेविण्यांत आलें. शिक्षण मिळविण्यास कोटेंहि जावयास त्या तयार आहेत. कांहीं प्रौढ वयाच्या मुलींनां त्यांचीं आईबापें आपल्या पहाडी वसतिस्थानांपासून दूर लग्नें करून देण्यास आज तयार आहेत. अशीं पांचसहा लग्नें झालीं तर इतर स्त्रियांनां पण आपल्या मुली चांगल्या मार्गास लाविण्याकरितां या मंडळीच्या हातीं देण्यास उमेद येईल.

तेथें सरकारानें आसपासच्या खेड्यांपाड्यांतून या लोकांच्या साहाय्यानें मुलींकरितां दोनचार शाळा स्थापून ज्या आईबापांस किंवा पालकांस आपल्या मुलींनां शिक्षण देण्याची शक्ति नसेल त्यांनां सरकारी

मदतीनें तें मिळण्याची सोय करून द्यावी, अशा सूचना तिकडील वर्तमानपत्रें सरकारास करीत आहेत.

या मंडळीनें जें करारपत्र तयार केलें आहे त्यांतील ठराव येणेंप्रमाणें आहेतः—

१. आजपासून आह्मी आपल्या वहिणी, मुली, भाच्या कोणीहि वेश्येचा धंदा करण्यास लावणार नाहीं.

२. आजतारखेपासून आमच्या मुली किंवा इतर नातेवाईक स्त्रिया वयानें केवळ्याहि असल्या, तरी त्यांनां हा धंदा चालविण्याची मोकळीक असावी ह्मणून सरकारदरबारांतून आह्मी कधींहि परवानगी मागणार नाहीं.

३. आजतारखेपासून आह्मी आमच्या किंवा इतर मुलींनां देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांजवळ जाऊं देणार नाहीं, व त्यांच्या संगतीपासून त्यांनां दूर ठेवूं.

४. आह्मी हरप्रयत्न करून हा पापमूलक धंदा सोडून देण्याविषयीं आमच्या जातींतील स्त्रियांवर आमचें वजन चालवूं.

५. ज्या अभद्र गाण्यांमुळें आमच्या स्त्रियांची व मुलींची अनीतीकडे प्रवृत्ति होईल, अशीं गाणीं गाण्यास त्यांनां उत्तेजन देणार नाहीं.

६. आह्मी कोणाहि संशयावह वर्तनाच्या व्यक्तीचा घरांत प्रवेश होऊं देणार नाहीं.

७. जे कोणी दुराचारास उत्तेजन देतील त्यांच्याबरोबर आह्मी कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवणार नाहीं.

८. आह्मी आमच्या मुलींनां गृहकृत्यांचें शिक्षण देण्याचा प्रयत्न करूं. त्यांनां मुलींच्या शाळेंत पाठवूं, सुशिक्षित करूं, संभावित घराण्यांशीं त्यांचा शरीरसंबंध करून देऊं, वराकडून हुंडा किंवा अन्यरीतीनें पैसा घेणार नाहीं, आणि धर्मशास्त्रांतील पद्धतीनें त्यांचे विवाहविधि करूं.

९. जे कोणी पवित्र शपथ घेतल्यापासून वरील ठरावाविरुद्ध सनातन धर्माच्या नांवावर आचरण करितील, त्यांनां जातीबाहेर ठेविलें जाईल.

१०. आह्मी धर्मशास्त्राच्या नियमांनुसार वारसाचा हक्क ठेवूं. स्थावरजंगम सर्व मालमत्तेवर मुलाचा हक्क असेल व वहिणींनां आणि मुलींनां जी कांहीं देणगी दिली असेल तीपलीकडे त्यांचा कशावरहि हक्क राहणार नाहीं. ज्या वहिणींनीं किंवा मुलींनीं वाईट धंद्यावर पैसे कमाविले असतील त्यांच्या संपत्तीवर आह्मी वारसा सांगणार नाहीं. कारण, ती मिळकत आह्मी धर्मविरुद्ध आहे असें समजूं.

याप्रमाणें ठराव पसार करून त्यांवर पुष्कळ प्रमुख गृहस्थांनीं सह्या केल्या आहेत, व त्याप्रमाणें वागण्याचा कृतसंकल्प केला आहे. अशा प्रकारच्या नीतिवर्धक चळवळी हिंदुस्थानाच्या इतर निरनिराळ्या भागांतून सुरू झाल्या तर नीतीचें साम्राज्य पहाण्यास कितीसा अवधि लागणार आहे ?

असो. माझ्या अल्पमतीस सुचलेले व मनांत बरेच दिवस घोळत असलेले विचार मीं आपणांपुढें मनन करण्याकरितां मांडिले आहेत. माझ्या स्पष्टोक्तीबद्दल विषाद मानूं नका. माझ्या उघड उघड लिहिण्याचा राग येऊं देऊं नका. ही एक महापर्वणीसारखी जागृतीची अमूल्य संधि आली आहे, तिचा वेळींच उपयोग करून घ्या.

तर उठा ! प्रिय भगिनींनों उठा ! दृढनिश्चयाची पताका हातीं घ्या, व पतित भगिनींच्या उन्नतीकरितां लागणाऱ्या इमारतीचा पाया घालण्याचा समारंभ लवकर घडवून आणा ! तो पतितपावन, भक्तवत्सल प्रभु तुह्मांला सद्बुद्धि देवो, व या अति पवित्र कार्यास हातभार लावण्याची तुह्मांला प्रेरणा करो, अशी मी त्याच्याजवळ करद्वय जोडून प्रार्थना करितें.

आमच्या जिवाला धोका पोहोंचविण्याचा त्याचा मानस दिसला. आह्मीं त्याच्याजवळ वादविवाद करीत असतां त्यानें गाडी चालू करण्याची शीळ फुंकली. त्याचा उद्देश आह्मीं मागें रहावें व आमचें सामान व मंडळी पुढें जावी व आह्मांला जास्त खर्चांत व त्रासांत पाडावें असा दिसला; पण शिताफी करून मी व माझे बंधू गाडी चालत असतां समोरच्याच सेकंडक्लासच्या डब्यांत वर चढलों व दार उघडून आंत जाऊन बसलों व दिल्लीस गेल्यावर याबद्दल तकरार करण्याचा विचार केला. थोड्याच वेळांत दिल्ली स्टेशन आलें. आह्मीं आपलें सामान न काढतां स्टेशनमास्तरकडे गेलों व गार्डाच्या वर्तनाबद्दल तकरार केली. आनंदाची गोष्ट हीं, कीं, स्टेशनमास्तर आमच्याशीं चांगल्या तऱ्हेनें वागला. "सरटिफिकेट नसलें तरी तुमचे पैसे तुह्मांला परत मिळतील; मात्र तुह्मीं तिसऱ्या क्लासांतच बसलां होतां याबद्दल तिकीटकलेक्टरची खातरी करा व डायरीबुकांत तुमच्या तिकिटाचे नंबर नोंदवून घ्या." स्टेशनमास्तरच्या सांगण्याप्रमाणें तिकिटकलेक्टरला आह्मीं बसलों होतों त्या डब्याशीं आणून तिसऱ्या क्लासांत बसल्याबद्दल त्याची खातरी केली व त्याच्याकडून डायरींत तशी नोंद करविली. पुण्यास परत आल्यावर ट्रॅफिक म्यानेजरकडे अर्ज केला. आमचे पैसे परत मिळाले इतकेंच नाहीं, तर त्या गार्डाची अशा गैरशिस्त वर्तनाबद्दल कानउघाडणी केली आहे, असेंहि आह्मांला लिहून आलें. ही सविस्तर हकीकत देण्याचें कारण आपल्या हक्काला जागण्याची प्रवासांत कशी जरूर लागते हें समजावें हें होय. आपण आपल्या हक्काला जागल्यास या कायद्याच्या राज्यांत त्याचा केव्हां केव्हां उपयोगहि होतो, हें वाचकांच्या ध्यानांत आणण्याकरितां वरील मजकूर लिहिला आहे. दिल्लीहून आह्मांला मथुरेस जाण्यास लागलीच गाडी होती. आतां वेळ रात्रीचीच होती. दिल्लीहून आह्मी निघालों ते दुसरे दिवशीं मथुरा स्टेशनवर येऊन दाखल झालों.

स्टेशनवर पंड्यांची पुष्कळ गर्दी होती. सामान वगैरे खालीं उतरून आह्मी स्टेशनच्या बाहेरील वेटिंगरूममध्यें आलों. मुरादाबादेहून आह्मी निघालों तेव्हां मथुरेस अहिल्याबाई होळकरीण यांची चांगली धर्मशाळा आहे, तेथें उतरण्यास जावयाचें, असा बेत केला होता. परंतु तेथें आल्यावर कळलें, कीं, ती धर्मशाळा मथुरेंत नसून वृंदावनांत आहे व स्टेशनपासून वृंदावन पांचसहा मैल दूर आहे. तेव्हां तो बेत रहित करून आह्मीं एका पंड्याचे घरींच उतरावयास जाण्याचें ठरविलें, व दिसण्यांत जरा संभावित असा एक पंड्या गांठून व यात्रेकरितां किंवा धार्मिक कृत्याकरितां आह्मांला कांहींएक त्रास देणार नाहीं असें त्याजपासून कबूल करून घेतलें व तीन एक्के करून आह्मीं पंड्याच्या बरोबर त्याचे घरीं येऊन दाखल झालों. आमच्या सुदैवानें आह्मांला जागा चांगली मिळाली. या पंड्याचें घर अगदीं यमुनेच्या कांठींच होतें. मध्यें फक्त फरसबंदी सडक होती. सडक टाकली कीं घाटच लागे. शिवाय आह्मांला राहण्यास दिलेली जागा दरवाजाच्या माडीवरच होती. यामुळें खिडकींतून यमुनेचा सर्व देखावा दिसत होता. यमुनेचा तो काळ्याभोर पाण्याचा शांत व गंभीर प्रवाह पाहून आह्मांला हरिद्वारची आठवण झाली. गंगेचें पाणी अत्यंत शुभ्र व स्फटिकवत् होतें तर यमुनेचें पाणी बरेंच काळसर निळसर रंगाचें होतें. गंगा प्रचंड वेगानें व दुथडी भरून चालली होती तर येथें यमुनेचें पाणी पुष्कळ कमी होतें व त्याचा लांबचलांब डोह बनलेला होता. गंगा व यमुना या दोन नद्यांमधील विलक्षण फरक प्रथम पाहणाराला आश्चर्यजनक वाटतो. तरीपण या दोन नद्यांच्या पाण्यांतील रंगाचा फरक व एकंदर देखाव्यांतील फरक प्रयागास फारच चांगला दृगोचर होतो. मागें मीं प्रयाग पाहिलें होतें, तेव्हां गंगा-यमुनेच्या संगमावर थेट स्नानास गेलों होतों व या दोन निरनिराळ्या रंगांच्या प्रवाहाचा संयोग खरोखर आल्हाददायक वाटला व त्या देखाव्याची या वेळीं मला आठवण झाली. बिऱ्हाडांत सामान वगैरे लावल्यावर मी व माझे बंधू बाजारांत जाऊन भाजीपाला व दूधतूप वगैरे अवश्य जिनसा आणून आमच्या कुकरच्या आराधनेस लागलों, व जेवण झाल्यावर मथुरेंतील प्रेक्षणीय स्थळें पंड्याच्या सल्ल्यानें पहावयाचा कार्यक्रम ठरवूं असा विचार करून आह्मीं यमुनेवर स्नानास गेलों. परंतु तेथें गेल्यावर आतां

प्रत्येक स्त्रीस आपले केश सुंदर असण्याबद्दल अभिमान असतोच.
कामिनीया तेल वापरल्यानें केश फारच सुंदर होतात आणि वृद्धि पावतात.

यैतचा सर्व आनंद मावळला. घांटावर गेलों तों सर्व दुर्गंधी येऊं लागली. गांवांतील सर्व नाल्यांचा निकाल येथें घाटावरून उघड्या रीतीनें केला आहे. सर्व नदी घाटानें जणूं कांहीं मढविलेली आहे. घाट उत्तम बांधलेले आहेत; परंतु जेथें तेथें मोरीचें घाणपाणी घाटावरील पायऱ्यांवरून ओघळत येतें. नदीच्या पाण्यांत पाय टाकला तों पाणीसुद्धां वाईट दुर्गंधी झालेलें दिसलें. उन्हाळ्यामध्यें यमुनेचें पाणी पुष्कळ कमी होतें व प्रवाह बहुतेक बंद झाल्यासारखा होतो. यामुळें गांवांतून मोऱ्यांमधून येणारें सर्व पाणी या संथ पाण्यांत येऊन मिळतें व यामुळें पाणी खराब होतें, असें आमच्या नजरेस आलें. यासंबंधानें हरिद्वार व मथुरा यांतील फरक आश्चर्य वाटण्यासारखा होता. हरिद्वार हें गांव लहान असल्यामुळें तेथली घाण या मोठ्या गांवाइतकी नाहीं. परंतु हरिद्वारला एकाच मोठ्या नाल्यानें गांवांतलें घाणपाणी आणून तें बंद नाल्यानें नदीच्या दूरच्या वाहत्या प्रवाहांत सोडल्यामुळें तेथें नदीमध्यें व विशेषतः स्नान करावयाच्या जागीं तर स्वच्छ पाणी असतें. शिवाय, हरिद्वारास नदी गोट्यांनीं भरलेली आहे; तर मथुरेस बारिक वाळू व काळसर माती व चिखल यांनीं नदी भरलेली असल्यामुळें नदीचें पाणी जास्तच गढूळ व घाणेरडें होतें. यामुळें घाटाकडच्या बाजूला स्नान करण्यास मन लगदीं घेत नाहीं. नदीच्या पलीकडच्या तीराला जरा बरें पाणी असतें व त्या बाजूला पाणी बेताचें गळाभर असल्यामुळें पोहण्यासहि चांगलें सांपडतें, असें समजल्यामुळें मथुरेंत आह्मीं होतों तें दोनतीन दिवस रोज आह्मी स्नानास पलीकडेच जात असूं व तेथें पोहण्याची फार मौज वाटे. नदीच्या पलीकडे जाण्यास येथें नावा हव्या तितक्या मिळतात व त्या फक्त जाण्यायेण्याचा माणशीं पैसा घेतात. यामुळें ही सोय आह्मांला फार पसंत पडली व या बाबतींत हरिद्वारपेक्षां आह्मांला बरें वाटलें. कारण हरिद्वारास गंगेच्या पाण्याला इतका विलक्षण जोर होता, कीं, मी पोहणारा आपला बेतावाताचा असल्यामुळें पाण्यांत सरळी टाकण्याचें केव्हांहि धैर्य झालें नाहीं. परंतु मथुरेस पाणी संथ असल्यामुळें व बहुतेक नदीला गळाभर पाणी असल्यामुळें पोहण्यास मुळींच भीति वाटली नाहीं. कारण दमल्याबरोबर खालीं पाय लावण्यास सोय होती व पाण्याला ओढहि मुळींच नव्हती. यामुळें माझ्यासारख्या नवशिक्या पोहणारास गंमत वाटली. नदीचें पाणी पिण्यालायक नव्हतें म्हणून आह्मीं एका जवळच्याच विहिरीचें पाणी पिण्याकरितां आणीत होतों. तरीपण त्या पाण्यांतहि फार घाण व कचरा होता. येथल्या अशा वाईट पाण्यामुळें यात्रेकरू मथुरेस आजारी पडतात.

जेवणखाण आटोपल्यावर आह्मी आपल्या यात्रेचा कार्यक्रम ठरवूं लागलों. परंतु पंड्याच्या तोंडून यात्रेचा विस्तार ऐकून रात्र थोडी सोंगें फार, अशी आमची स्थिति झाली. पंड्यानें सांगितलें "सर्व यात्रेला येथें बनजात्रा अगर बनयात्रा म्हणतात. या यात्रेमध्यें कृष्णाच्या आयुष्यांतील बहुतेक सर्व गोष्टींच्या सामक्षा पाहण्यास सांपडतात. मनुष्यानें विश्रामघाटापासून निघून प्रथमतः मधुवन पहाण्यास जावयाचें. हें मथुरेच्या दक्षिणेस चार मैल आहे, व येथें मधु राक्षसाचा शत्रुघ्नानें पराभव करून तेथें मधुपुरी स्थापिली. येथून तालवनास जावयाचें. या ठिकाणीं बलरामानें धनुक राक्षसास मारिलें. नंतर गोवर्धनास १६ मैल जावयाचें. हें मथुरेच्या बरोबर पश्चिमेस आहे. तेथून पुढें उत्तरेकडे कोटवनापर्यंत ३४ मैल जावयाचें व तेथून परतावयाचें व वृंदावनास यावयाचें. तेथें पवित्र यमुना नदी उतरून पलीकडे जाऊन कितीतरी वनें, राया, तलाव विहीरी-व या सर्वांचा कृष्णाच्या आयुष्यांतील एकाद्या गोष्टीशीं संबंध असतोच— पहावयाच्या, व शेवटीं कृष्णाचें बालवय जेथें गेलें त्या गोकुळीं जावयाचें व तेथून पुन्हां यमुना ओलांडून परत मथुरेस विश्राम घाटीं यावयाचें. येवढ्या मोठ्या विस्तीर्ण प्रदेशाची एक यात्रा आहे व ही पुरी होण्यास कितीक तरी दिवस लागणार, असें पाहून आमची प्रथम फारच निराशा झाली. परंतु विचारांतीं अंथरूण पाहून पाय पसरणें बरें असा विचार करून आह्मीं मथुरा व पांच मैलांवर असलेलें वृंदावन येवढींच पाहण्याचें ठरविलें. मला गोकुळ पाहण्याची अत्यंत इच्छा होती. परंतु वृंदावनमथुरेच्या थेट उत्तरेस तर गोकुळ थेट दक्षिणेस, अशी भूगोलविषयक परिस्थिति असल्यामुळें हीं दोन स्थानें पाहण्यास दोन निरनिराळे दिवस

कामिनीया तेल वापरल्यानें पुरातन काळापासून चालत आलेली व अतिशय मौल्यवान् समजली गेलेली अशी केसांची सुस्थिति त्वरित प्राप्त होते.

पाहिजेत असें दिसून आलें व तितके दिवस तर आह्मांला सवड नव्हती. यामुळें मथुरा व वृंदावन हीं दोन स्थळेंच पाहून त्यांत समाधान मानणें आह्मांला प्राप्त झालें.

याप्रमाणें कार्यक्रम ठरल्यावर आह्मीं पंड्यास घोड्याच्या गाड्या आणावयास सांगितलें. तो लवकरच गाड्या घेऊन आला. तेव्हां विशेष पुरातन व कृष्णाच्या जन्मासंबंधाचीं पवित्र स्थळें व चांगलीं देवळें आह्मांला दाखविण्याबद्दल त्याला सांगून आह्मी गाडींत बसलों, व मथुरेच्या मुख्य बाजाररस्त्यानेंच चाललों. या सर्व रस्त्यावर दुतर्फा दुकानेंच आहेत. रस्ता फरसबंदी आहे. घरें बरींच दगडी आहेत व कांहीं कांहीं कळाकुसरीच्या कामानें शृंगारलेलींहि आहेत. या बाजारामधून आह्मीं 'हार्डिंग गेट' ह्मणून दगडाची भव्य कमान १८७० मध्यें मथुरा म्युनिसिपालिटीनें बांधली आहे तिचे खालून बाहेर आलों. हा देखावा बराच प्रेक्षणीय आहे.

येथून आह्मांला आमच्या पंड्यानें येथील मुख्य देऊळ केशवदेव येथें नेलें. हें देऊळ साधारण चांगल्यापैकीं आहे; परंतु हें अर्वाचीन आहे. केशवदेवाचें फार प्राचीन देऊळ औरंगझेबानें नाहींसें करून त्या ठिकाणीं मोठी जुम्मा मशीद बांधली. ही मशीद अद्यूनहि जुन्या देवळाच्या चबथऱ्यावर आहे व एकंदरींत पूर्णपणें हिंदु असलेल्या या शहराच्या मध्यभागीं औरंगझेबाच्या धर्मवेडाची साक्ष सतत देत आहे. या देवळाच्या जवळच पोतारकुंड ह्मणून एक तलाव आह्मांला दाखविण्यांत आला. व पंड्यानें आह्मांला सांगितलें, कीं, या तळ्यांत कृष्णाचीं लहानपणचीं चिरगुटें धूत असत. याच्याजवळ वसुदेवदेवकीचें कारागृह व कृष्णाची जन्मभूमि दाखविण्यांत आली. परंतु ती एकंदर जागा व तिची परिस्थिति पाहून त्याचें ह्मणणें सत्य दिसलें नाहीं. पुढें तर आह्मांला असें दिसून आलें, कीं, मथुरावृंदावनांत कोठेंहि तलाव असो, तेथें कृष्णाचीं चिरगुटें धूत असत ह्मणून आपलें सांगत. कृष्ण ज्याप्रमाणें आपल्या सोळासहस्र गोपींच्या मनोरंजनाकरितां सोळा सहस्र रूपें धारण करीत असे त्याप्रमाणें भाची पिढींतील भाविक भक्तांच्या समाधानाकरितां जन्मल्यापासून त्यानें हजारों रूपें धारण केलीं होतीं व ह्मणून त्याचीं चिरगुटें धुतल्याची साक्ष पटविणारीं कुंडें मथुरावृंदावनांत असंख्य असून तीं हल्लीं पंड्यांनां दाखवितां येतात ! हें देऊळ व ही जागा मातीच्या एका उंचवट्यावर आहे. मथुरेच्या बाहेर असे मातीचे ढिगारे जागोजाग आहेत. पूर्वीच्या शहराच्या तटापैकीं हा कांहीं भाग आहे, किंवा यमुनानदीचा प्रवाह पूर्वकाळीं इकडे असून त्याच्या तीराचे हे भाग आहेत हें सांगतां येत नाहीं. हें पवित्रस्थान दाखविल्यावर पंड्यानें आह्मांला त्याच्या बुद्धीनें जास्त पवित्र व पुरातन अशा ठिकाणीं नेलें व तेथें कृष्णाचीं वडील माणसें व इतर त्याचे संबंधी दृष्टीस पडतील ह्मणून सांगितलें. आह्मी आतां आपल्याला बऱ्याच पुरातन काळच्या मूर्ति पाहण्यास सांपडतील अशा मोठ्या आशेनें व औत्सुक्यानें एका सोप्यावजा दालनांत शिरलों व तेथें आह्मांला वसुदेवदेवकी, बालकृष्ण, कंस, नंद व यशोदा बलराम वगैरे कृष्णाची सख्खी व दत्तक वडील माणसें यांचीं चित्रें दाखविण्यांत आलीं. तीं चित्रें पाहून आह्मांला भक्तीचा उमाळा येण्याऐवजीं हास्याचा मात्र उमाळा आला. आपल्याइकडे शिराळशेटाच्या सणाच्या दिवशीं किंवा नागपंचमीचे दिवशीं जशीं ओबडधोबड, अगडबंब, कुरूप व ओंगळ मातीची चित्रें करतात, तशाच तऱ्हेच्या त्या मूर्ति पाहून आशाभंग व हास्य असे मिश्र मनोविकार एकसमयावच्छेदेंकरून मनांत उद्भूत झाले. मथुरा पाहण्यास यावयाचा बेत केल्यापासून या ठिकाणच्या पुरातनपणाबद्दल व येथल्या कृष्णाच्या आयुष्याबद्दल बऱ्याच सामक्षा आपल्याला दृगोचर होतील ह्मणून मोठ्या औत्सुक्यानें आह्मी या यात्रेला आलों. परंतु आतांचा हा देखावा पाहून आमच्या मनांतील तें औत्सुक्य पार नाहींसें झालें व आमच्या लोकांच्या अंधश्रद्धेबद्दल व मूर्ख भोळसटपणाबद्दल हंसूं येऊं लागलें. आतांपर्यंत पाहिलेल्या सर्व देखाव्यावरून आमची अशी खातरी झाली, कीं, मथुरा कृष्णाचें खरें जन्मस्थान असो वा नसो, त्याच्या गोष्टी खऱ्या असोत वा नसोत, परंतु हल्लीं जीं कृष्णचरित्रांतील स्थळें ह्मणून दाखवितात तीं स्थळें कृष्णाच्या गोष्टीनंतर भाविक लोकांनां फसविण्याकरितां तयार केलेलीं आहेत. व असल्या गोष्टींबद्दल व येथल्या चित्रांबद्दल व मूर्तीबद्दल

दिलबहार (रजिस्टर्ड) जाई, जुई व चमेलीच्या मिश्रणाचें अत्तर. वास अत्यंत मधुर व संतोषकारक.
पाव सो. कि. १॥. अँग्लो इंडियन केमिकल कं. जुम्मा मशीद, मुंबई.

मनुष्यांच्या मनांत आदर तरी कसा उत्पन्न होतो, याचेंच आह्मांला गूढ पडलें. परंतु ती वेळ पंड्याजवळ वादविवाद करण्याची नव्हती. या सर्व मूर्तीजवळ एक बुवा बसला होता व तो आह्मांला पिंवळ्या मातीचा अंश प्रसाद ह्मणून देत होता. आह्मीं पंड्याच्या मर्जीखातर या सर्व विद्रूप चित्रांपुढें एकदोन आण्यांचे पैसे ठेवून तेथून पाय काढला.

पुढें आह्मांला कंसाचा वाडा व किल्ला ह्मणून एक मोडक्यातोडक्या तटांनीं व्याप्त असें एक आवार दाखविण्यांत आलें. तें जुनाट दिसत होतें. परंतु ३००० वर्षांपूर्वीचें असेल असें भासत नव्हतें. परंतु या सर्व ठिकाणच्या अर्वाचीनत्वाबद्दल एकदां जाणीव मनांत उत्पन्न झाल्यावर या असल्या भाविक लोकांनां फसविण्याकरितां ठरविलेल्या जागा व ठिकाणें पाहण्याची आमची हौस जागच्याजागींच जिरली व आह्मीं पंड्यास, आह्मांला आतां जुन्या जागा व देवळें नकोत, येथलीं उत्तम उत्तम नवीं देवळें दाखवा, ह्मणून सांगितलें. तेव्हां आह्मीं परत गांवाकडे फिरलों व येथें वरींच देवळें पाहिलीं त्यानें मात्र आमचें मन पुन्हां प्रसन्न केलें. कारण मथुरेंतील देवळें फार सुंदर आहेत. या देवळांतील दगडाचें नक्षीकाम, जाळीदार खिडक्या, कोरीव खांब व देवळाचें एकंदर अंतरंग फारच सुबक आहे, यांत शंका नाहीं. एकेक देऊळ पहावें तों मागच्यावर ताण; परंतु मथुरेंतील देवळें अगदीं दाट वस्तींत व भर बाजारांत बांधलेलीं असल्यामुळें व त्यांच्या सभोंवार खुली जागा फारच कमी असल्यामुळें हीं देवळें प्रथमतः मनांत भरत नाहींत. पहिल्या पायऱ्या चढतांना आपण एकाद्या सुंदर आणि फारच विस्तीर्ण व सुबक देवळांत शिरत आहोंत असें वाटत सुद्धां नाहीं. परंतु आंत गेल्यावर देवळाचें काम पाहून येथल्या कारागिरीबद्दल मनुष्य आश्चर्यानें तोंडांत बोटेंच घालतो. मात्र या सर्व देवळांत फारशीं जुनीं देवळें मुळींच दिसत नाहींत. बहुतेक सर्व देवळें अलीकडील तीनचारशें वर्षांतील आहेत. हें असें कां? याचा उलगडा या लेखाच्या पुढील भागावरून होईल. मथुरेंतील कांहीं देवळांचीं छायाचित्रें या लेखांत दिलीं आहेत त्यावरून मी ह्मणतों त्याची सत्यता वाचकांस पटेल असें वाटतें.

याप्रमाणें मथुरेंतील बहुतेक पाहण्यासारख्या ठिकाणांचें दर्शन घेऊन तीन चार तासांनीं आह्मी आपल्या बिऱ्हाडाला आलों व मग नित्याप्रमाणें आमच्या अर्वाचीन स्थलींची आराधना करून पाकनिष्पत्ति केली व भोजनोत्तर संध्याकाळपर्यंत विश्रांति घेतली.

वर लिहिल्याप्रमाणें मथुरेच्या प्रथमदर्शनानें जरी आमची थोडीशी निराशा झाली, तरी जी गोष्ट हरिद्वारला शक्य नव्हती ती येथें शक्य झाल्यामुळें माझें मन पुन्हां प्रसन्न झालें. हरिद्वारच्या नजिकच्या गंगाप्रवाहांत बोटींतून सहल करून सर्व शहराची शोभा पाहण्याची किती वेळां तरी इच्छा झाली असेल; परंतु इच्छेनें जर होड्या तयार होत्या तर आमची इच्छा तृप्त झाली असती! परंतु ती गोष्ट शक्य कोटींतील नसल्यामुळें मनींची इच्छा मनांत दाबावी लागली. परंतु मथुरेस ज्या बिऱ्हाडीं आह्मीं उतरलों होतों त्याच्या समोरचे घाटावरच पुष्कळ नावा दिसल्या व त्या पाहून आह्मांला आनंद झाला व येथें असेपर्यंत रोज सायंकाळीं नावेंत बसून सहल करावयास जावयाचें असा आह्मीं बेत केला होता. तदनुरूप सायंकाळ होतांच आह्मीं एका नाववाल्यास बोलावून आह्मांला सर्व नदीभर सहल करण्यास घेऊन जाण्यास फर्माविलें. माणशीं दोन पैसे आह्मांला खरतच वाटले. नावेंतून शहराचा देखावा फारच मनोहर दिसतो. गांवाच्या एका बाजूला तो रेलवेचा लांबचलांब पूल; दुसऱ्या बाजूला तो कंसाचा किल्ला; समोर सर्व शहरांतील घाटांची रांगची रांग व त्यामागें घरांच्या ओळीच्या ओळी व देवळांचीं शिखरेंच शिखरें व मागच्या बाजूला एक काळसर मृतिकामय बाळवंटचें बाळवंट हा देखावा चित्ताकर्षक आहे यांत संशय नाहीं. हा देखावा काशीसारखाच आहे. काशीमध्यें नावेंत बसून असें सर्व शहर पाहिलें ह्मणजे असाच चित्ताकर्षक देखावा दिसतो. मात्र काशीस गंगेचें पात्र फारच प्रचंड आहे व प्रवाह खोल असून शीघ्रगामी आहे. यमुनेचें पात्र त्या मानानें लहान आहे. पण यमुनेचें पाणी काळेंभोर आहे व त्याचा प्रवाह मंदगति आहे. काशीपेक्षां मथुरेचे घाट व घरें आणि एकंदर विस्तार कमी आहे. परंतु शहराची रचना अगदीं सारखीच आहे. यामुळें

दांढेतून फळा निघत असतील तर 'डेन्टीलाईन' कापूस भिजवून लावा. तत्काळ गुण.
अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कं, जुम्मामशीद, मुंबई.


यमुनेंतून नावेंत बसून कंसाच्या किल्ल्यापासून रेलवे पुलापर्यंत वल्हवीत गेलें ह्मणजे आपण छोटेखानी काशीच पहात आहों कीं काय, असा भास होतो. जरी आह्मीं पाहिली त्या वेळीं यमुना नदी आपल्या वर्षाकाळांतील पूर्ण ऐश्वर्यांत नव्हती, उलट उन्हाळ्यामुळें तिला कांहींसें जलदुर्भिक्ष आलेलें होतें, व वाळूचीं मैदानें उघडीं पडलीं होतीं, तरी सुद्धां यमुना नदी तिच्या रंगामुळें गंभीर व भव्य दिसते. नावेंतून सायंकाळीं नदींतून जात असतांना निरनिराळ्या घाटांची व त्यावरील देवळांची शोभा अवर्णनीय आहे. मथुरेंतील सर्वांत प्रेक्षणीय व पवित्र घाट ह्मणजे विश्रामघाट होय. हा शहराच्या बहुतेक मधोमध आहे. कंसाला मारल्यावर कृष्णानें याच घाटावर विश्रांति घेतली, ह्मणूनच या घाटाला विश्रामघाट ह्मणतात. सात साडेसातांच्या सुमारास या घाटावर आरती होते. तीं दीपावलीचीं पाण्यांत पडलेलीं प्रतिबिंबें, तो मंजुळ घंटानाद व ते भाविकांचे सुस्वर आलाप, वगैरे प्रकार पाहून मनाला फार आनंद होतो व नदीच्या पात्रांतून बाहेर येऊंच नये, असें वाटतें; परंतु नावाडी उशीर झाल्यामुळें परतण्याची घाई करतो व नाइलाज ह्मणून त्याच्या ह्मणण्याला रुकार देऊन परत आपल्या बिऱ्हाडीं यावें लागतें. आह्मी मथुरेस तीन दिवसच होतों. परंतु या तीन्ही दिवशीं सायंकाळीं आह्मीं नावेंतून सहल करावयास जात असूं.

दुसरे दिवशीं सकाळींच वृंदावनास जावयाचें असल्यामुळें आह्मी लवकरच उठलों व कालच्याप्रमाणें दोन घोड्यांच्या गाड्या आणवून पंड्यास बरोबर घेऊन वृंदावनास गेलों. वाटेनें जातां जातां छोट्या छोट्या बागा व बंगलेवजा लहान लहान घरें लागतात. कोठें यमुना नदी रस्त्याच्या अगदीं नजिक येते तर केव्हां दूर जाते. इकडील प्रदेश सपाटीचाच आहे. डोंगर किंवा उंचवटा फारसा दृगोचर होत नाहीं. अशी सभोंवतालची शोभा पहात पहात सुमारें तासा दीडतासानें आह्मी वृंदावनास येऊन पोहोंचलों. या गांवाला मथुरेपेक्षांहि देवळें जास्त आहेत. सर्व देवळें अर्थात् कृष्णाचींच आहेत. परंतु त्यांनां कृष्णाच्या निरनिराळ्या नांवांवरून राधारमण, मदनमोहन, राधावल्लभ, राधागोपाळ, रंगजी, गोविंदजी, गोविंददेव, गोपीनाथ, द्वारकाधीश वगैरे नांवें आहेत, किंवा बांधणारांच्या नांवावरून तरी तीं पडलेलीं आहेत. जसें 'लालाबाबूका देवल,' 'शेटसाहेबका देवल,' 'ग्वालेर महाराजका देवल,' 'राणी निकारीका देवल.' पंड्यानें आह्मांला सांगितलें, कीं, येथें हजारों देवळें आहेत. तेव्हां सगळीं देवळें पाहणें अशक्यच होतें. तरी जीं प्रख्यात देवळें आहेत तेवढीं आह्मांला दाखीव असें त्याला सांगितलें. त्यानें आह्मांस सरासरी दहाबारा देवळें दाखविलीं. तीं खरोखरीच सुंदर, भव्य व हिंदु शिल्पकलेची साक्ष पटविणारीं आहेत. या देवळांपैकीं पुष्कळशीं बंगाली बाबूंनीं बांधलेलीं आहेत, याचें प्रथमतः आह्मांला मोठें गूढ वाटलें; परंतु बंगाल्यांत चैतन्य ह्मणून जो साधु झाला, त्यानें राधाकृष्णाच्या भक्तिपंथाचा बंगाल्यांत प्रसार केला व तो वृंदावनांत शेवटीं येऊन राहिला. यामुळें बंगाल्यांतील भाविक लोकांनीं येथें कृष्णाचीं फारच सुंदर देवालयें बांधलीं आहेत. ह्मणूनच बंगश्री वृंदावनांत येऊन राहिली आहे, अशी येथें ह्मण पडली आहे. वृंदावनांतील जीं देवळें आह्मीं पाहिलीं त्यांच्या सभोंवतीं खुली जागा बरीच असल्यामुळें तीं मथुरेच्या देवळांपेक्षां जास्त उठावांत दिसतात. बाकी कलाकौशल्याच्या दृष्टीनें मथुरेंतील देवळें कांहीं कमी नाहींत. पण तीं भरवाजारांत व संकोचित जागेंत असल्यामुळें तीं तितकीं उठावांत दिसत नाहीं. येथील देवळांनां उत्पन्नें दांडगीं आहेत व भाविक लोकांकडून देणगीच्या रूपानेंहि दरसाल फार मोठी रकम मिळते. वीसवीस हजार रुपयांची मिळकत असणारीं येथें देवळें पुष्कळ आहेत. महाराष्ट्रामध्यें अशा प्रकारचीं श्रीमंत देवळें व देव फारसे नसल्यामुळें प्रथमतः इकडल्या देवळांचा थाट पाहून आह्मी अगदीं थक्क होऊन गेलों. कृष्ण हा देव विलासी असल्यामुळें त्या देवाचीं देवळेंहि एकाद्या राजविलासी राजाच्या राजवाड्याप्रमाणें, किंवा अन्तःपुराप्रमाणें शृंगारलेलीं असावीं, हें स्वाभाविक आहे. तरीपण येथल्या देवांच्या एकंदर पूजाअर्चाबद्दलच्या हकीगती पाहून व ऐकून आह्मांला लोकांच्या भाविकपणाचें हंसूंच आलें. येथल्या बहुतेक देवांची एकाद्या विलासी राजाप्रमाणें रात्रंदिवस तरतूद केली जाते. येथील देवांचे मनुष्याप्रमाणेंच

वॉटरबरीचें मेटाबोलाइज्ड कॉडलिव्हर तेल क्षयरोग व दमा यांवर बक्षाद.
इतर तेलासारखी घाण येत नाहीं. टॉमसन कं. कालबादेवी, मुंबई.


सर्व आहारविहारादि व्यवहार चालतात. आधीं देवळाच्या गाभाऱ्यांत सर्व सुखसोई व विलासांचे प्रकार असतात. प्रत्येक देवाच्या मूर्तीवर सुंदर पंखा असतो. तिकडे उन्हाळा फार असल्यामुळें देवालाहि ऊष्मा भासत असावा. या पंख्याची एक दोरी गाभाऱ्याबाहेर देवदर्शनाला येणाऱ्या भक्ताच्या उभें राहण्याच्या ठिकाणापर्यंत आणलेली असते व प्रत्येक भक्तानें दोरी दोनचार वेळ तरी हालवून देवाला वारा घालून त्याची सेवा करण्याचा परिपाठ आहे. देवळासमोर बहुधा गार पाण्याचें सुंदर कारंजें असावयाचेंच, व कारंज्यांतून उडणारे जलतुषार मूर्तीपर्यंत जावेत, अशी योजना केलेली असते. येथें देवाला, त्याच्या गाभाऱ्याला सुवासिक फुलांच्या माळा घालण्याचा फारच प्रघात दिसला. यामुळें देवळांत गाभाऱ्याजवळ गेलें, कीं, फुलांच्या सुवासानें, त्या मनोहर कारंज्याच्या फवाऱ्यानें, तसेंच चंदनाच्या उटीच्या वासानें भक्ताचें मन गारीगार होतें, यांत शंका नाहीं. येथल्या देवाचे सर्व सुखसोहाळे दररोज व विशेषतः निरनिराळ्या सणाच्या वेळीं करण्याची रीत आहे. रोज देवाचें न्हाणें न्हावयाचें; पुढें त्याचा पोषाख न्हावयाचा; नंतर त्याचें जेवणखाण न्हावयाचें; पुढें वामकुक्षी न्हावयाची; पुनः मध्यान्ह वेळचें खाणें; सायंकाळीं फिरणें; पुढें रात्रीचें जेवण व तदनंतर निद्रा वगैरे सर्व व्यवहार देवाचे होतात, यामुळें येथें गाभाऱ्यांनां पडद्याची सोयहि केलेली असते. देवाला निजावयाची इच्छा झाली, कीं, सर्व बाजूचे पडदे टाकून काळोख केला म्हणजे दिवसासुद्धां झोंप घेण्यास हरकत नाहीं! यामुळें या गांवांत सर्व देवांचें दर्शन होणें कठिण जातें. आह्मी एका देवळांत गेलों तेथें आह्मांला समजलें, कीं, देव निद्रा घेत आहेत व अर्धा तास देवाचें दर्शन किंवा भेट होणार नाहीं! त्या देवळांत तमाम लोक उभे! कारण, त्यांनां देवाचें दर्शन घेण्याची इच्छा. परंतु आह्मीं इतका वेळ तेथें उभें राहावें किंवा नाहीं हा आह्मांला विचार पडला. आह्मांला तर तिष्ठत बसण्यास सवड नव्हती. तेव्हां आह्मीं मनांत ह्मटलें, कीं, "जर येथले देव निजतात, तर ते वेळींच उठतीलसा काय नेम! तेव्हां ज्याप्रमाणें अर्वाचीन काळीं एकादे गृहस्थ घरीं भेटले नाहींत, तर आपण आपल्या नावची कार्ड ठेवून जातों, त्याप्रमाणेंच आपण करावें." असें मनांत ह्मणून आह्मीं नमस्काररूपी आमच्या नांवाची कार्ड देवाजवळ ठेवून दुसरें देऊळ पहावयास गेलों. दुसऱ्या देवळांत गेलों तों, तेथेंहि देव भोग भोगीत आहे असें समजलें! पुनः आह्मांला पंचाईत येऊन पडली. परंतु आमच्या सुदैवानें देवाचें भोग भोगणें संपलें व पडदा एकीकडे झाला व आह्मांला देवाचें दर्शन घडलें. तिसऱ्या एका देवळांत गेलों तेथें देवळाच्या प्रशस्त आवारांत पालखींत बसून देव फिरावयास निघाले आहेत, असें आमच्या दृष्टीस पडलें! याप्रमाणें वृंदावनांतील देवळांत आमच्या हिंदुसमाजांतील एक धार्मिक पंथाच्या अंधश्रद्धेबद्दलचे बरेच मासले दोनतीन तासांच्या अवधींत पाहण्यास सांपडले.

येथें सर्वांत प्रचंड, भव्य व शिल्पकलेच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीचें देऊळ ह्मणजे रंगजीचें देऊळ होय. हें देऊळ येथील शेट गोविंददास व राधाकृष्ण यांनीं रंगाचार्य नांवाच्या आपल्या गुरूच्या सांगण्यावरून बांधलेलें आहे. याला एकंदर ४५ लाख रुपये खर्च झालेला आहे. याचा बाह्य प्राकार फार विस्तीर्ण असून प्रचंड आहे. हें देऊळ मद्रासी पद्धतीवर बांधलेलें असल्यामुळें दरवाज्यांत उंच गोपुरें आहेत. ही गोपुरें प्रथमतः दृष्टीस पडलीं, तेव्हां आह्मांलाहि आश्चर्य वाटलें. परंतु तेथले ते मद्रासी पोषाखाचे पुजारी पाहून व देवळाच्या उत्पत्तीची वरील हकीगत ऐकून आमचें आश्चर्य कमी झालें. या देवळाच्या आवाराचें पश्चिम प्रवेशद्वार ९३ फूट उंच असून तें मथुरेच्या धर्तीवर आहे. हें महाद्वार फार भव्य दिसतें. यामुळें आंत जातांना देवळाच्या प्रचंडतेची साक्ष पटते. देवळाचें काम व एकंदर देखावा फारच प्रेक्षणीय आहे. देवळाच्यासमोर एक सोन्याचा ध्वजस्तंभ आहे. येथली दुसरी चांगली प्रेक्षणीय देवळें ह्मणजे लालाबाबूचें देऊळ. याचेंहि काम फारच सुबक आहे. मदनमोहन व गोपीनाथ हीं देवळेंहि चांगलीं आहेत. राधारमणाचें देऊळ अर्वाचीन आहे. तें सर्व संगमरवरी दगडाचें आहे. त्याच्या समामंडपाचे खांब पीळ दिलेल्या दोरखंडाप्रमाणें केलेले असून एकएक खांब एकएका सबंध संगमरवरी दगडाचा आहे. हें देऊळ पाहून दागदागिन्यांनीं भरगच्च भरलेल्या बायकांची आह्मांला आठवण झाली. दागिन्यांच्या अतिरिक्त हौसेनें ज्याप्रमाणें केव्हां केव्हां सौंदर्यहानि होते, तसेंच या देवळाचें झालेलें आहे. या लहानशा देवळाला दहा लाख रुपये खर्च झालेला आहे. यापेक्षां राधाइन्द्रकिशोर हें देऊळ जास्त साधें, पण अधिक सुंदर दिसतें. गिरिधारीदास या नांवाच्या आपल्या गुरूच्या देखरेखीखालीं बांधलेलें ग्वालेरच्या महाराजांचें राधागोपाळाचें देऊळहि प्रेक्षणीय आहे.



१ ग्वालेरच्या महाराजांचें राधागोपाळाचें देऊळ.
२ मथुरेचा यमुनेंतून दिसणारा देखावा.
३ मथुरेनजीकचा यमुनेवरील पूल.
४ रंगजीच्या देवळाचें आवार.

Photos] [L. Chunilal & Co., Muttra.



१ राधारमणाचें देऊळ.
२ सतीचा बुरुज.
३ रंगजीच्या देवळापुढील सोन्याचा ध्वजस्तंभ.
४ लाला व्रजकिशोरचें राधागोपाळचें देऊळ.

या देवळाला सुमारें चारपांच लाख रुपये लागलेले आहेत. यांपैकीं कांहीं देवळांचीं छायाचित्रें या लेखांत दिलीं आहेत, त्यांवरून या देवळांची कांहीशी कल्पना वाचकांस होईल.

इतकी देवळें पाहणें झाल्यावर घड्याळाकडे पाहतां फारच उशीर झाला असें दिसलें व भुकेनेंहि आपल्याकडे लक्ष्य वेधलें. तेव्हां आधीं पोटोबा, मग विठोबा या म्हणीप्रमाणें आम्हींहि वर्तन केलें, व गाडींत बसून परत आमच्या बिऱ्हाडाला येऊन पोंचलों; भोजनादि विधि उरकले व आदल्या दिवसाप्रमाणें सायंकाळपर्यंत करमणूकींत व विश्रांतींत वेळ घालवून सायंकाळीं नौकेंत बसून सहल करावयास गेलों.

तिसरे दिवशीं सकाळीं आम्ही जमनाबाग पहावयास गेलों. तेथील एका प्रसिद्ध व्यापाऱ्याचें हें राहण्याचें ठिकाण आहे. हें मथुरेच्या दक्षिणेस रेलवेपुलाच्यापलीकडे परंतु यमुनेच्या कांठींच आहे. आम्ही गेलों ते दिवस भर उन्हाळ्याचे असल्यामुळें यमुनेला पाणी फार कमी झालें होतें, व तिला मधुनमधून खांडवे पडले होते. यामुळें नावेंतून जाण्यास सवड नव्हती. बाकी इतर ऋतूंत या बागेस नावेंतून जातां येतें व तसें गेलें म्हणजे शहराची शोभा पहात पहात जातां येतें, असें आम्हांला सांगण्यांत आलें. परंतु सध्यां तें शक्य नसल्यामुळें आम्हांला गाडी करूनच जाणें भाग पडलें. हें ठिकाण यमुनेच्या अगदीं कांठीं आहे, हें वर सांगितलें आहे. आवारांत शिरण्याचा दरवाजा भव्य असून प्रेक्षणीय आहे. दरवाजापासून थोड्या अंतरावर एक कारंजें आहे व कारंजांतील पाणी लांबचलांब पाट बांधून त्यांतून बागेला जाण्याची तजवीज केली आहे. बाग बरीच विस्तीर्ण आहे, व तींत मोठमोठे वृक्ष पुष्कळ आहेत. झाडांच्या फांद्या वळवून केलेले वृक्षमंडपहि दोनतीन आहेत. यंदां आपल्या इकडील आंब्यांचें पीक फारच कमी होतें; परंतु या बागेंतील सर्व आंबे फलभारानें नम्र झालेले पाहून आम्हाला आनंद झाला. बागेच्या मध्यभागीं बंगलेवजा शेटसाहेबांची कोठी अगर राहतें घर आहे. त्यांत एक चांगला शृंगारलेला दिवाणखाना असून त्यामध्यें या घराण्यातील दोनचार पुरुषाच्या तसबिरी आहेत. बंगल्याशेजारींच व नदीच्या अगदीं कांठीं एक लहानसें देऊळ व एक छत्री आहे. या दोन्ही इमारती दगडाच्या असून त्यांचें काम सुबक आहे. एकंदर ठिकाणाची रचना व व्यवस्था पाहून आम्हांला मालकाच्या अभिरुचीचें कौतुक वाटलें. या ठिकाणचें छायाचित्र या लेखांत दिलें आहे त्यावरून या जमनाबागेची कल्पना होईल.

आमच्या मथुरावासाचा हा शेवटचाच दिवस होता. त्या दिवशीं आमच्यापैकीं कांहीं मंडळी दोनप्रहरच्या गाडीनें मुरादाबादेस जावयाची होती, व बाकीचे आम्ही परत देशीं येण्याकरितां रात्रीच्या गाडीनें निघणार होतों. यामुळें लवकरच जेवणें आटपून आम्ही स्टेशनवर गेलों व परत आल्यावर आम्हीं दिवसाउजेडींच जेवणखाण करून सामानाची बांधाबांध करून मथुरेचें शेवटचें दर्शन करण्याकरितां बाहेर पडलों. मथुरेचे पेढे फार प्रसिद्ध, म्हणून बाजारांत जाऊन पेढे घेतले. हे पेढे कांहींतरी विशेष प्रकारचे असतील, अशी आमची कल्पना होती. परंतु तेथेंहि आमची निराशाच झाली. पण या पेढ्यांचा मुख्य गुण म्हणजे त्यांचा विलक्षण टिकाऊपणा होय, असें आम्हांला सांगण्यांत आलें. नंतर आम्ही विश्रामघाटावर आलों व तेथें क्षणभर विसावा घेतला. सायंकाळीं तेथें एक मौज दिसते. घाटावरील यात्रेकरू पीठ किंवा दुसरें कांहीं खाद्य यमुनेंत टाकतात व तें खाण्याकरितां तेथें कांसवें जमतात. इतक्या कांसवांचा तांडा आम्हीं आजन्म पाहिला नव्हता. यांतील पुष्कळ कांसवें बरींच मोठीं होतीं. या ठिकाणीं माकडेंहि फार आहेत. हीं माकडेंसुद्धां येथें या वेळीं येतात. एका माकडानें तर एका कांसवाच्या पाठीवर उडी मारून त्यावर पडलेलें खाद्य पटकन् मटकावून टाकलें व न घावरतां त्या कांसवाच्या पाठीवर तें मोठ्या ऐटीनें बसलें! हा देखावा पाहून आम्हांला फारच मौज वाटली. ही जशी कांसवांची येथें मौज पहावयास सांपडते, तशीच सायंकाळीं हरिद्वारास माशांची मौज पहावयास सांपडते. यात्रेकरू भाविक लोक, दररोज सायंकाळीं पीठ विकत घेऊन त्याच्या लहानलहान गोळ्या करून गंगेत फेंकतात, व नदीच्या काठाला माशांच्या झुंडीच्याझुंडी अगदीं कडेला येतात. ही मौज आम्हीं हरिद्वार सपाहिली, त्याची आतां आम्हांला आठवण झाली.

झालें. येथें मथुरावृंदावनाचें दृष्टिगम्य वर्णन संपलें. परंतु मथुरा हें शहर फार जुनें आहे; यानें किती तरी राजकीय व धार्मिक स्थित्यंतरें पाहिलीं आहेत. अर्थात् हीं दृष्टिगम्य नाहींत, तर श्रुतिगम्य आहेत. मथुरेच्या या ऐतिहासिक भागाचें वर्णन आणखी एका लेखांत देण्याचें अभिवचन देऊन तूर्त वाचकांची रजा घेतों.

महाराष्ट्रीय नाटकमंडळ्या.

'नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाऽप्येकं समाराधनम्' किंवा "Plays are the mirrors of life," अशा तऱ्हेचीं नाट्याच्या स्तुतिपर कविवचनें प्रत्येक भाषेंत आढळून येतात. त्यांवरून पहातां नाट्यकला ही प्राचीन कालापासून ललितकलांपैकीं एक उच्च दर्जाची कला मानली गेली होती, असें दिसतें. ज्या कलेचे भरताचार्य, कालिदास, भवभूति, शूद्रक, एश्चिलीस, युरिपायडीस, मार्लो, शेक्स्पियर, बेन जॉन्सन, व्हिक्टर ह्यूगो, मोलियर, शिलर, लेसिंग, किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, इत्यादि कवि, व गॅरिक, आयर्व्हिंग, विरबोम ट्री, गोपाळराव दाते, गणपतराव जोशी, जोग भागवत, प्रधान, इ० अभिनेते, हे आधारभूत स्तंभ होते व आहेत, त्या कलेचें दिव्य, भव्य व सुंदर स्वरूप वाचकांनां निराळें वर्णन करून सांगण्याचें कारण नाहीं. त्या स्वरूपाचा प्रत्यय वाचकांपैकीं बहुधा प्रत्येकाला आयुष्यांत कधींना कधींतरी वाचनाच्या किंवा प्रेक्षणाच्या रूपानें पटला असलाच पाहिजे, असा सिद्धान्त करणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

नाट्यकलेचें उच्चतम महत्त्व, व लोकशिक्षणाची संस्था या नात्यानें तिचा थोर अधिकार, हीं जरी सर्व देशांत फार प्राचीन कालापासून बहुधा सर्वमान्य आहेत, तरी बहुतकरून प्रत्येक देशांतील नाट्यकलेच्या इतिहासांत असा एक काल आढळून येईल, कीं, ज्या कालीं बहुजनसमाजाच्या दृष्टीनें ही कला अगदीं हीन व तुच्छ समजली जात असे. शेक्स्पियरसारखे जगद्वंद्य नाट्यकवि, व गॅरिकसारखे अद्वितीय नट सुदैवानें ज्या राष्ट्राच्या वांट्यास आले, त्या इंग्लंडदेशांतहि नाट्यकलेच्या नशीबीं असा काल एके वेळीं होता. प्राच्य खंडांत सुधारणागिरीच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेल्या जपानदेशांतहि नाट्यकलेनें नुकतीच ही अनुकंपनीय स्थिति अनुभविली आहे. सर्वतोपरी मागें असणाऱ्या आमच्या महाराष्ट्रांतील नाट्यकलेच्या बोकांडीं तर हें भूत अगदीं पहिल्यापासून बसलेलें आढळून येतें.

परंतु अत्यंत सुदैवाचीं व आनंदाचीं गोष्ट ही, कीं, पाश्चिमात्य संस्कृतीच्या सुपरिणामामुळें महाराष्ट्रनाट्यकलेला छळणारें हें भूत अलीकडे पूर्णपणें गाडलें जाण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं आहेत. नटांनां व नाट्यकलेला समाजांत बराच मान मिळूं लागला आहे. ती एक शुद्ध मनोरंजनाचेंच नव्हे, तर उदात्त प्रगतिपर विचारांचा प्रसार करण्याचें व अतएव लोकशिक्षणाचें उच्च दर्जाचें साधन आहे, असें समाजाला हळुहळू वाटूं लागलें आहे. नाट्यरचना व अभिनय यांकडे सुशिक्षित व प्रागतिक लोकांचें लक्ष्य लागूं लागलें आहे. आजपर्यंत अक्षरशत्रु, उडाणटप्पु व व्यसनी लोकांच्या हातीं गेलेली ही सुंदर कला सुशिक्षित व सुशील मंडळी आपल्या हातीं घेऊं लागली आहे. या सर्व गोष्टी अत्यंत समाधानकारक नाहींत, असें कोण ह्मणेल ?

अशा या महाराष्ट्रीय नाट्यकलेचें सुसंस्कृत स्वरूप वाचकांच्या लक्ष्यांत यावें ह्मणून हल्लीं महाराष्ट्रांत ज्या संगीत व गद्य प्रमुख नाटक मंडळ्या आहेत, त्यांच्या नाट्यप्रयोगांतील उत्तम प्रसंगांचे फोटो सदरहू नाटक मंडळ्यांच्या कृपेनें आह्मांला येथें देतां आले, त्यांनीं वाचकांचें नयनमनोरंजन होईल, अशी आह्मांला उमेद आहे

किर्लोस्कर संगीत मंडळी.



मूकनायक.

विक्रांत (प. वा. श्रीयुत जोगळेकर)—
" सहज कशी खेळविते ललना !"




नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळी.

वेणीसंहार नाटकांतील देखावा.

भीम—महाराज, सोडा, मला सोडा !
कंचुकी (श्रीयुत मंत); धर्मराज (श्रीयुत केळकर); भीम (श्रीयुत जोशी); द्रौपदी (श्रीयुत 'सुवर्णमाला'); वत्सिनिका (श्रीयुत बोडे).

खास मनोरंजनासाठी फोटोग्राफर-श्रीयुत टी. डी. कवठेकर, पुणे.



प्रेमसंन्यास नाटकांतील देखावा.
गोकुळ—"श्रीमद्भी महा खरा वज्र हनुमान माझती."
मथुरा (श्रीयुत प्रभाते); गोकुळ (श्रीयुत परांजपे); विद्याधर (श्रीयुत दातार).

खास मनोरंजनासाठी. फोटोग्राफर्स-विजापुर फोटोग्राफिक कं.



संत तुकाराम नाटकांतील देखावा.

तुकाराम—देवा पढरीराया, या भयंकर मायापाशातून अर्जुन का सोडवीत नाहींस?

तुकाराम (श्रीयुत शुक्ल); जिजाई (श्रीयुत राणे).

दामिनी नाटकांतील देखावा.

इंदुमती—'हेतु हृदंतरींचा भगिनिचा पूर्ण करीं अंतिचा !'

चित्रांगदा (श्रीयुत खरे); इंदुमती (श्रीयुत केशवराव भोंसले); तारिणी (श्रीयुत रानडे).

खास मनोरंजनासाठीं. फोटोग्राफर-श्रीयुत जी. एम्. जयकर, गिरगांव, मुंबई.

भारत नाटक मंडळी.



मत्स्यगंधा नाटकांतील देखावा.

गौरी—महाराज, या गरीब गौरीला एवढी भीक घाला!

गौरी (श्रीयुत पोतनीस); शांतनु (श्रीयुत प्रधान); भीष्म (श्रीयुत टिपणीस).

खास मनोरंजनासाठी. फोटोग्राफर-श्रीयुत बी. आर. गुणे, बुधवार पेठ, पुणे.

सत्कार्योत्तेजक वाग्विलासी नाटक समाज (अमेच्युर्स).



हॅम्लेट नाटकांतील देखावा.

चंद्रसेन—(हॅम्लेट)-त्याच्याकडे, त्याच्याकडे पहातों !

चंद्रसेन (श्रीयुत हुदलीकर); मदनिका (श्रीयुत देवल).

खास मनोरंजनासाठी. फोटोग्राफर्स-श्रीयुत त्रिलोकेकर आणि कीर्तिकर, कोलभाटलेन, मुंबई.



कोल्हापुरकर संगीत मंडळी.

प्रल्हाद नाटकांतील देखावा.

खास मनोरंजनासाठीं. फोटोग्राफर्स-देसाई, ग्वाल्हेर.



कुंजविहारी.

फोटोग्राफर—श्रीयुत के. आर. सरसीकर, अमरावती.

विदूषकाचें साम्राज्य.

"एडिटरसाहेबांनीं तुमची कविता परत पाठविली ह्मणजे तुह्मी काय करतां ?"

"मी ती दुसऱ्या एडिटरांकडे पाठवितों."

"आणि एकाद्या एडिटरांनीं तुमची कविता पसंत केली तर तुह्मी काय करतां ?"

"मी त्या एडिटरांकडे दुसरी कविता पाठवितों !"

* * *

भाडोत्री—हे छप्पर येथें गळतें—

घरवाले—तुह्मी भारीच तकारी बुवा ! खालच्या मजल्यावरच्या भाडेकऱ्यांनीं माझ्याशीं अशी तकार कधींच केली नाहीं !

* * *

मॅजिस्ट्रेट—(चोरास) तूं कोर्टांत आलास तेव्हां तूं मला सलाम देखील केलास नाहींस ! तूं भारी उर्मट दिसतोस—

आरोपी चोर—नेहमीच्या परिचयाच्या माणसाला सलाम करायची जरूर नाहीं सरकार !

* * *

इंदिरा—(स्फुंदत) जाल्यें, गाडी आतां सुटेल—प्रकृतीची नीट काळजी घ्यायची बरं—

सुंदरराव—बरें, पण निदान दोन दिवसांनीं तरी तूं मला रागाचें, खडखडीत पत्र पाठवीत जा; नाहीं तर दररोजच्या सवईमुळें मला झोंप यायची नाहीं !

* * *

सैन्यांतील एका शिपायानें एका सशावर बंदूक झाडली, परंतु त्याचा नेम चुकल्यामुळें ती शिकार तर निसटलीच, परंतु त्याच्यापासून थोड्या अंतरावर असलेल्या त्याच्या वरिष्ठाजवळून गोळी सूं सूं करीत गेली. थोडक्यांत चुकलें, नाहीं तर तो ठारच व्हावयाचा. "अरे ए !" तो वरिष्ठ ओरडून ह्मणतो "तुझा सशावर रोख आहे का वढतीवर आहे ?"

* * *

लेखक—ही गोष्ट लिहावयास सुरवात करण्यापूर्वी मीं एक बाटली उघडली अन्—

सदूनाना—(मध्येंच चेष्टेच्या आवाजानें) हं हं ! पोर्टवाइनची का ब्रँडीची ?

लेखक—(शांतपणें) शाईची !

* * *

खंडो—(दहा रुपये उसने मिळाल्यावर) तुमचे हे उपकार नुसत्या शब्दांनीं कांहीं फिटण्यासारखे नाहींत.

वंडो—खरेंच नाहींत !

* * *

न्यायाधीश—नाटकवाल्यांनीं तुह्माला मारलें ह्मणतां, अन् तुह्माला मारणारा तबलजी किंवा पेटीवाला असावा असेंहि तुह्माला वाटतें; पण त्यांपैकीं कोण तें तुह्माला नक्की नाहीं का सांगतां येणार ?

फिर्यादी—(विचार करून) मला मिळालेल्या ठोक्यांवरून तो तबलजी असावा, असें वाटतें.

* * *

"अहो, तुह्माला कांहीं जळल्याचा वास नाहीं का येत ?"

"नाहीं बुवा, मला नाहीं येत !"

"मलासुद्धां नाहीं येत—पण कोणीं विचारलें, की, पुष्कळांनां तसा वास येत असतो !"

* * *

जाहिरातवाले—(रागावलेले) या असल्या जाहिरातीबद्दल मी तुह्माला कांहीं देईन असें वाटतें का तुह्माला ?

म्यानेजर—अहो, झालें तरी काय ? तुह्मी सांगितल्याप्रमाणें आह्मीं तीं जाहिरात छापली आहे.

जाहिरातवाले—तुह्मी मला त्या दिवशीं सांगितलेंत कीं, ही जाहिरात आह्मी आपल्या मासिकांत लोक नेमके वाचतील अशाच ठिकाणीं घालूं—

म्यानेजर—मग ? आह्मीं आंतल्या मजकुराजवळ ती नाहीं का छापली ?

जाहिरातवाले—पण ती एका कवितेच्या खालीं छापलीत तुह्मीं !

* * *

विद्यार्थ्यांसाठीच ट. रा. सह धारा आण्यांत उत्तम निळी काळी शाई पुड्या १५०.
एक तेळ जरूर मागवून पहा. व्ही. बी. मरदेशी, पोष्ट सिन्नर, जि. नाशिक.

हिंदूंचे सोळा संस्कार.

प्रस्तुत लेखांत दिलेलीं चित्रें हिंदूंच्या सोळा संस्कारांचीं आहेत. हे संस्कार काय आहेत, याची अंधूक तरी कल्पना आमच्या प्रत्येक हिंदु वाचकास असेल, असें गृहीत धरून चालावयास हरकत नाही. मनोरंजनाच्या हिंदेतर वाचकांनां सोबतच्या चित्रावलीवरून त्यांच्या हिंदुबांधवांनां कौटुंबिक आयुष्यांत, जन्मापासून मृत्युपर्यंत-पाळण्यापासून चितेपर्यंत-निरनिराळ्या प्रसंगीं जे जे धार्मिक विधि करावे लागतात, त्यांविषयीं बरींचशी व हिंदु वाचकांनां पूर्ण माहिती होईल, अशी आह्याला आशा आहे.

या लेखांतील फोटो मूळ मृत्तिकाचित्रांवरून घेतलेले आहेत. हीं मृत्तिकाचित्रें पुण्याचे कुशल कारागीर श्रीयुत वळवंत वामन गोडबोले, यांनीं रायपुर येथील पदार्थसंग्रहालयाकरतां तयार केलीं आहेत. अशा प्रकारचीं मृत्तिकाचित्रें तयार करण्याच्या कामांत श्रीयुत गोडबोले हे अत्यंत निष्णात असून या मनोहर कलेंतील त्यांच्या नैपुण्याबद्दल त्यांनां लंडन येथें भरलेल्या प्रदर्शनांत सन १८७५ सालीं एक पदकहि बक्षिस मिळालें आहे. इंग्लंडसारख्या चिकित्सक देशांत—ज्या देशांत पौर्वात्य चित्रकलापद्धतीशीं अत्यंत विसदृश अशी चित्रकलापद्धति चालू आहे—त्या देशांतहि ज्यांच्या शिल्पकलेचा योग्य गौरव झाला, त्यांची ही कला किती उच्च दर्जाची व हृदयंगम असेल, याची कल्पना करणें वाचकांनां फारसें कठिण जाणार नाहीं.

प्रसंगोपात्त या चित्रकलेविषयीं येथें दोन शब्द लिहिणें वावगें होणार नाहीं. असलीं चित्रें हीं निव्वळ पोरासोरांचे खेळ आहेत, या कलेंत प्रावीण्य संपादन करणें म्हणजे कालाचा व द्रव्याचा अपव्यय करणें होय, या कलेपासून देशाला किंवा व्यक्तीला तादृश फायदा नाहीं, अशा तऱ्हेचीं विधानें अनेक प्रसंगीं पुष्कळ समंजस लोकांकडूनहि करण्यांत येतात. आमच्या मतें, हीं विधानें इतकीं फोल व पोकळ आहेत, कीं, त्यांनां मुद्दाम स्वतंत्र उत्तर देण्याची जरूरच नाहीं. जोंपर्यंत 'उत्सवप्रियाः खलु मनुष्याः' या कविकुलगुरु कालिदासाच्या उक्तींत पूर्णपणें सत्य भरून राहिलें आहे. 'उदरनिमित्तं बहुकृतवेषः' अशा मनुष्याच्या शिणल्याभागल्या मनाला पुनः ताजेतवानें होण्याची आवश्यकता आहे, तोंपर्यंत गानकला, चित्रकला, नाट्यकला अशासारख्या मनोरंजक कलांची जगाच्या अंतापर्यंत आवश्यकता असणार, हें उघड आहे. एकादी कर्णमनोहर मधुर गायनाची लकेर ऐकली, एकादा सुंदर नाट्यप्रयोग पाहिला, एकादें हृदयंगम चित्र पाहिलें, तर कोणाचें शोकतापदग्ध हृदय क्षणभरतरी प्रफुल्ल होत नाहीं ? मानवी शरीराप्रमाणेंच जर मानवी मनालाहि विश्रांतीची किंवा प्रफुल्लतेची गरज आहे, तर या सर्व कलांचीहि जगांत जरूर आहे.

हिंदुस्थानांत दरवर्षीं बाहुल्या वगैरे मुलांचीं खेळणीं शेंकडों-हजारों, नव्हे लाखों रुपयांचीं खपतात. हींच खेळणीं जर हिंदुस्थानांतच सुंदर, सुबक, व स्वस्त तयार करतां आलीं, तर त्यामुळें देशाचा व व्यक्तिशः कारागिरांचा कितीतरी फायदा होईल हें निराळें सांगावयास नको. हीं सोळा संस्कारांचीं चित्रें पुण्यांत केवळ चारच दिवस लोकांनां पहाण्यासाठीं ठेवलीं होतीं. इतक्या थोड्या अवकाशांतहि पुण्यासारख्या लहान शहरीं शेंकडों लोक हीं पहाण्यास लोटले होते, या एका गोष्टीवरूनच मनुष्याची उत्सवप्रियता व अशा कलेची आवश्यकता हीं सिद्ध होत नाहींत काय ? अशा सुंदर कलेला उत्तेजन देणें हें महाराष्ट्राचें कर्तव्य आहे, असें वाटल्यावरून श्रीयुत गोडबोले यांची ही कृति वाचकांसमोर फोटोंच्या रूपानें आह्यीं आणली आहे. या चित्रमालेनें या नाजुक मनोहर कलेची वाचकांनां अल्प कल्पना आली, तरी आमचा उद्देश बराच सफल झाल्यासारखा होईल.



१ ऋतुशांतीपूर्वीचें पुण्याहवाचन. २ ऋतुशांतीचा होम.
३ ऋतुशांतीपूर्वी भरावयाची ओटी. ४ ऋतुशांतिसंस्कारांतील अभिषेचन.

खास मनोरंजनासाठीं. फोटोग्राफर—श्रीयुत वी. आर. गुणे, बुधवारपेठ, पुणें.



१ अष्टमांगल्य.

२ सूतिकागृह व पुत्रावण.

३ कर्णवेध व नामकरणविधि.

खास मनोरंजनासाठी.

फोटोग्राफर-श्रीयुत बी. आर. गुणे, बुधवारपेठ, पुणें.



१ अन्नप्राशन (उष्टावण.) २ चौल.

३ मौंजीबंधनापूर्वी अग्नि सिद्ध करण्याचा होम.


खास मनोरंजनासाठी फोटोग्राफर-श्रीयुत वी आर गुणे, बुधवारपेठ, पुणे.



१ मौंजीबंधनाची देवप्रतिष्ठा. २ मातृभोजन व अंघ्रवर्ग.

३ मौंजीबंधन.

फोटोग्राफर—श्रीयुत वी. आर गुणे, बुधवारपेठ, पुणे.



१ गायत्रीमंत्रग्रहण.
२ भिक्षा.
३ मौजीबंधनाचें उद्यापन (सोडमुंज.)
४ वरशोधन.

खास मनोरंजनासाठीं.

फोटोग्राफर—श्रीयुत वी. आर. गुणे, बुधवारपेठ, पुणें.




१ (चित्रकार श्रीयुत गोडबोले चित्राचें काम करीत आहेत.) उष्टी हळद (घाणा.)
२ सीमांतपूजन.

खास प्रसंगासाठीं. फोटोग्राफर-श्रीयुत बी. आर. गुणे, बुधवारपेठ, पुणें.



१ वाङ्निश्चय व पत्रिकापूजन. २ मधुपर्क.

३ लग्न.



१ कन्यादान. २ सप्तपदी.
३ लग्नांतील प्रयोजन. ४ स्वयंपाकप्रयोजन.

फोटोग्राफर -श्रीयुत बी. आर. गुणे, बुधवारपेठ, पुणे.



गृहप्रवेश (वरात.)

खास मनोरंजनासाठी. फोटोग्राफर-श्रीयुत बी. आर. गुणे, बुधवारपेठ, पुणे.




१ रुग्णावस्था. २ स्मशानांत नेण्याची तयारी.

३ स्मशानयात्रा.

खास मनोरंजनासाठीं.

फोटोग्राफर–श्रीयुत बी. आर. गुणे, बुधवारपेठ, पुणे.



१ मंत्राग्नि. २ तिलांजलि. ३ स्मशानश्राद्ध.

खास मनोरंजनासाठीं फोटोग्राफर—श्रीयुत बी. आर. पुणे, बुधवारपेठ, पुणें.

महाराष्ट्रीय संस्था.

शिक्षणसंस्था.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणें, १८८४.

महाराष्ट्रांत आज ज्या कांहीं शिक्षणविषयक सार्वजनिक संस्था काम करीत आहेत त्यांत डे. ए. सोसायटीस प्रमुख स्थान दिलें पाहिजे. सन १८८० सालीं जानेवारी महिन्यांत न्यू इंग्लिश स्कूल स्थापन झाल्यापासून सोसायटीच्या कामास प्रारंभ झाला, असें मानण्यास हरकत नाहीं. मात्र सर्व औपचारिक विधि होऊन सोसायटीची प्राणप्रतिष्ठा १८८४ च्या आक्टोबर महिन्यांत झाली. पुढील वर्षी सोसायटीनें फर्ग्युसन कॉलेज काढिलें आणि सन १८९२ अखेर तें सर्व अभ्यासक्रम शिकविण्यास लायक असल्याविषयीं युनिव्हर्सिटीनें आपली मान्यता दिली. सन १८९९ सालच्या जानेवारींत पुण्यास नवीन मराठी शाळा व डिसेंबरांत सातार्‍यास न्यू इंग्लिश स्कूल काढण्यांत आलें. पुणें येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांकरितां सन १८९४ सालच्या प्रारंभीं बोर्डिंगहौस काढण्यांत आलें होतें; तें ह्यामुळें कांहीं वर्षे बंद पडून सन १९०१ सालच्या अखेरीस पुनः चालू करण्यांत आलें. ह्याप्रमाणें १ पहिल्या प्रतीचें कॉलेज, २ हायस्कूलें, १ प्राथमिकशिक्षणाची शाळा, व १ विद्यार्थिगृह अशा ५ शिक्षणसंस्था डेक्कनएज्युकेशन सोसायटी चालवीत आहे. ह्या संस्थांतून ३,००० वर विद्यार्थ्यांस शिक्षण मिळत आहे. ह्या शिक्षणाप्रीत्यर्थ सोसायटी दरसाल १,२५,००० रुपयांवर रक्कम खर्च करीत आहे. विद्यार्थ्यांच्या फीचें उत्पन्न सुमारें ७२,००० रु० आहे. मुंबईसरकाराकडून ह्या संस्थांस सालोसाल सुमारें २३,००० रु. ची मदत मिळते. खेरीज हिंदुस्थान सरकाराकडून व इमारती वगैरे विशेष कामाकरितां मुंबईसरकाराकडून आजपर्यंत सुमारें १,५०,००० रु. ची विशेष मदत मिळाली आहे. संस्थानिक, सरदार, जहागीरदार व मध्यम स्थितींतील सुखवस्तु लोक ह्यांकडून वर्गण्यांच्या वगैरे रूपानें गेल्या तीस वर्षांत सुमारें ४,००,००० रु. सोसायटीला देण्यांत आले आहेत. आज रोजीं सोसायटीची जंगम मिळकत सुमारें रुपये १,५०,००० रु. किंमतीची असून एंडौमेंट फंड सुमारें १,००,००० रुपयांचा चा आहे, आणि सोसायटीच्या स्थावर मिळकतीची किंमत अदमासें ५,५०,०००-रु. होईल. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं शाळा व कॉलेजें काढून अगर जुनीं ताब्यांत घेऊन कमी खर्चानें शिक्षण देण्याची सोय करावी, असा सोसायटीचा उद्देश आहे. गरीब विद्यार्थ्यांस सोसायटीच्या संस्थांतून शेंकडा १० ते २० पर्यंत नादाच्या देण्यांत येतात. स्त्री विद्यार्थिनींकरितां फर्ग्युसन कॉलेजांत एक १०रु. दरमहाची छात्रवृत्ति असून त्यांच्यासाठीं क्वार्टर्सहि आहेत. सोसायटीच्या संस्थांमध्यें जाति, वर्ण व धर्म ह्यामुळें भेदाभेद करण्यांत येत नाहीं. मुसलमान, मराठे अगर विशेंत मागसलेल्या इतर कोणत्याहि जातीचा अगर धर्माचा गरीब विद्यार्थी सुवृत्त व अभ्यासी असला तर त्याला केव्हांहि फीची माफी देण्यांत येते. सोसायटीच्या दोन्ही शाळांत व फर्ग्युसनकॉलेजांत अस्पृश्य मानलेल्या जातींच्या विद्यार्थ्यांस घेण्यांत आलेलें आहे. "सोसायटीच्या शाळा व फर्ग्युसनकॉलेज नसतें, तर आपण उच्च शिक्षणास पारखे झालों असतों," असें मोठ्या आदरानें सांगणारे शेंकडों तरुण आज महाराष्ट्रांत सांपडतील!

नूतन मराठी विद्यालय, पुणें, १८८३.

सर्व जनतेंत शिक्षणप्रसार करावा हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. प. वा. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या स्मरणार्थ श्रीयुत कृ. गो. उकिडवे, श्रीयुत दा. स. करंबेळकर, श्रीयुत कृ. ब. डोंगरे, श्रीयुत वा. आ. सिनकर यांनीं प्रथम ही संस्था स्थापिली. प्रथम ही शाळा केवळ मराठी होती परंतु लवकरच तिला इंग्लिश वर्ग

जोडण्यांत आले. त्या वेळीं श्रीयुत हरि नारायण आपटे, प्रो. नारायणराव पानसे वगैरे मंडळी इंग्रजी शिक्षणविषयास पुढें आली. १८८७ सालीं पुण्यास मराठी शिक्षणप्रसारक मंडळी स्थापन झाली व तिनें ही संस्था आपल्या ताब्यांत घेतली.या मंडळीवर देखरेख करण्यास एक नियामकमंडळ नेमण्यांत आलें. असून त्याचे अध्यक्ष डॉ. सर रामकृष्ण भांडारकर हे आहेत. रा. व. मराठे, रा. व. गोडबोले, श्रीयुत ह. ना. आपटे व श्रीयुत दि. ह. वांकनीस हे सभासद आहेत. या संस्थेचे लाइफ मेंबर दहा आहेत. शाळेंत आज सुमारें दोन हजार विद्यार्थी शिकताहेत. शाळेचें उत्पन्न सालीना ३० हजार रुपयांचें असून खर्चहि तितकाच आहे. शाळेला सरकारी मदत ९ हजार रुपये आहे. सन १८९६ सालीं शाळेचें पूर्ण हायस्कूल झालें. शाळेंत नीतिशिक्षणाकडे विशेष लक्ष दिलें जातें. शाळेच्या चालकांनीं पंचवीस हजारांची एक मोठी जागा नुकतीच घेतली असून तेथें मराठी शाळा बांधली जाणार आहे.

पूना नेटिव इन्स्टिट्यूशन, पुणें, १८६०.

पुणें शहरांत ज्या शिक्षणविषयक संस्था आहेत, त्या सर्वांत ही संस्था फार जुनी आहे. ही संस्था म्हणजे एक अँग्लोव्हर्नाक्युलर हायस्कूल असून मध्यम व गरीब लोकांच्या आटोक्यांत येणाऱ्या अल्प खर्चानें यांत मुलांना शिक्षण दिलें जातें. हल्ली यांत ८२५ विद्यार्थी आहेत. इतर वर्गांशिवाय याला चित्रकला व गायन यांचे वर्ग जोडले आहेत. खुद्द पुणें शहरांत निरनिराळ्या ठिकाणीं या संस्थेच्या पांच प्राथमिक शाळा असून बारामतीस एक, व सासवड येथें एक, असा दोन अँग्लोव्हर्नाक्युलर शाळा आहेत. आपलें हायस्कूल व दुसऱ्या शाळा यांच्या द्वारें दोन हजारांपेक्षां अधिक विद्यार्थ्यांना ही संस्था शिक्षण देत आहे. या संस्थेकडून मागसलेल्या जातींतील विद्यार्थ्यांची अधिक सोय करण्यांत आली आहे. या संस्थेचे सर जमशेटजी जिजीभाइ बारोनेट हे अध्यक्ष, बडोदा, त्रावणकोर, इंदूर, कोल्हापुर व म्हैसूर येथील महाराज हे पेट्रन असून श्रीयुत गोळे हे सेक्रेटरी आहेत. सर डि. एम्. पेटिट व जी. बी. लिमये यांजकडून या संस्थेला चांगलें द्रव्यसाहाय्य झालें आहे.

एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर, १८८७.

धंदेशिक्षणाकडे व मजूरलोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देऊन विद्यावृद्धि करणें हा या संस्थेचा उद्देश आहे. रा. व. लालशंकर उमियाशंकर यांच्या खटपटीनें ही संस्था स्थापन झाली. त्याच वर्षी अहमदनगरांतील फर्स्टग्रेड अँ. व्ह. स्कूल, व पुन्हां १८८९ सालीं तेथील विश्रामबाग हायस्कूलहि सरकारनें या संस्थेच्या स्वाधीन केलें. शिवाय 'हिंदुस्थानी शाळा'हि या संस्थेच्या आश्रयाखालीं आली. हल्ली या सर्व शाळांतून ६५० वर विद्यार्थी शिकत आहेत. सन १८९७ त या संस्थेची पुनर्घटना झाली व तेव्हांपासून मे. डिस्ट्रिक्ट जज व डिस्ट्रिक्ट कलेक्टर हे संस्थेचे मेंबर असतात. शिमग्याच्या सणांतील अमंगल प्रकारांपासून मुलांनीं अलिप्त रहावें म्हणून १८९१ पासून प्रथम या संस्थेनेंच खटपट केली. संस्थेचे सेक्रेटरी श्रीयुत चितळे हे आहेत.

भंडारी हायस्कूल, मालवण, १८९६.

मालवण प्रांतीं शिक्षणप्रसार करण्यासाठीं प्रथम ही शाळा श्रीयुत ज. व. राणे यांनीं 'भंडारी प्रायव्हेट स्कूल' या नांवानें चालविली होती. ती पुढें मालवण एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यांत १८९६ सालीं गेली. नंतर ही शाळा श्रीयुत सखाराम विश्राम कीर वगैरे गृहस्थांनीं श्रीयुत धों. आ. कोटणीस यांच्या देखरेखीखालीं चालविली. पुढें १९०८ पासून ती सर्वस्वीं तेथील भंडारी एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यांत गेली, व सांप्रत सर्व व्यवस्था तिच्या मार्फतच होत आहे. या शाळेंत मॅट्रिकपर्यंत शिक्षण मिळतें. फी व सरकारी ग्रँट शिवाय जो अधिक खर्च शाळेस लागतो तो श्रीयुत स. वि. कीर हे स्वतः चालवितात.

गिम्ब् हायस्कूल, कुमठा, १९०८.

विद्येंत मागसलेल्या कानडा जिल्ह्यांत विद्येचा प्रसार व्हावा म्हणून 'न्यु इंग्लिशस्कूल' ही संस्था प्रथम स्थापन झाली, व पुढें तिलाच प्रस्तुतचें नांव मिळालें. शाळा स्थापण्यांत आणि तिची भरभराट करण्यांत मुख्यतः येथील सारस्वत ब्राह्मणांचाच प्रयत्न कारणीभूत झाला. शाळेला सांप्रत उपयोगांत असलेली इमारत मुंबईचे सुप्रसिद्ध युरोपिअन व्यापारी मि. किस्टल साहेब यांनीं उदारपणें देणगी म्हणून दिलेली आहे. शाळेला एक विद्यार्थिवसतिगृह असून तें तिकडील नामांकित 'पै' घराण्याकडून मिळालेल्या इमारतींत चालू आहे. शिरसीचे सुप्रसिद्ध हायकोर्ट वकील रा. सा. पुंडलिकराव नारायण पंडित यांनीं सदर वसतिगृह नवीन पद्धतीनें व सोयीवार बांधण्यासाठीं संस्थेला आठ हजार रुपये दिले आहेत. गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मदत व्हावी म्हणून शाळेच्या मार्फत एक 'गरीब विद्यार्थी फंड'हि निघाला आहे.

वर्षांत वर्गणी पन्नास हजारांवर आली असून शाळेच्या इमारती, फर्मान वगैरेंत तीस हजार रुपये खर्च झाले आहेत. संस्थेजवळ हल्लीं १७ हजार रुपये शिल्लक आहेत. वार्षिक उत्पन्न ६ हजारांवर असून खर्चहि तितकाच आहे. संस्थेची विशेष भरभराट होण्यास रा. सा. पंडित, श्रीयुत पांडुरंगराव पै प्रभृति सद्गृहस्थांचे श्रम कारण झाले आहेत.

अनंत शिवाजी देसाई हायस्कुल, मालवण, १९११.

मुंबईचे प्रसिद्ध दानशूर व्यापारी श्रीयुत अनंत शिवाजी देसाई, टोपीवाले, यांनी ही संस्था चालविण्यासाठी व गरीब होतकरू विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपा देऊन त्यांना विद्यार्जनाचे कामीं मदत करण्यासाठी दरसाल ३ हजार रुपये व्याज येईल अशी रक्कम (८६,००० रुपये) दिलेली आहे. तसेंच शाळेच्या इमारतीकरितां त्यांनीं ३० हजार रुपये दिले आहेत. सदरहू संस्थेस श्रीयुत. दादासाहेब खाडिलेकर ४,००० रु., धोंडी जनार्दन सामंत ३,००० रु., तात्यासाहेब झांट्ये व बंधु २,००० रु., मालवण येथील दोन गृहस्थ ५,००१ रु., अशा आणखीहि बऱ्याच देणग्या मिळाल्या आहेत. शाळेंत मुलांची संख्या २२५ असून शिक्षक सहा आहेत.

आर्यन् एज्युकेशन सोसायटी, मुंबई, १८९७.

द्रव्यासंबंधी सरकारची मदत न घेतां स्वतंत्रपणें सर्वत्र सामान्य शिक्षणाचा प्रसार करणें हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. संस्थेच्या दोन शाळा हल्लीं चालू असून त्यांत दीड हजारांजवळ विद्यार्थी शिकत आहेत. संस्थेचा कायम फंड ६५ हजार रु. आहे. प. वा. रा. म. रानडे व प. वा. रा. ब. वासुदेव जगन्नाथ कीर्तिकर हे संस्थेचे पुरस्कर्ते होते. संस्थेची सर्व व्यवस्था पहाणारी एक मंडळी असून तिचे अध्यक्ष सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर हे आहेत. नामदार व्रजभुवनदास आत्माराम, व सर्जन लेफ्टे. कर्नल के. आर्. कीर्तिकर हे ट्रस्टी आहेत. संस्थेचे सेक्रेटरी श्रीयुत पद्मनाभ भास्कर शिंगणे, बी. ए., एल् एल्. बी. हे असून हल्लीं शाळेचे प्रिन्सिपाल श्रीयुत व्ही. व्ही. देसाई, बी. ए. हे आहेत.

महाराष्ट्र व्हिलेज एज्युकेशन सोसायटी, बारामती, १८८९.

गरीब व मागसलेल्या लोकांत शिक्षणप्रसार करणें हा संस्थेचा प्रधान उद्देश आहे. या सोसायटीनें इंग्लिश स्कूल, फ्री इन्स्ट्रूअल स्कूल आणि फ्री प्रायमरी स्कूल अशा तीन शाखा स्थापिल्या आहेत. लाचप्रमाणें संस्थेची एक फ्री लायब्ररीहि आहे. सोसायटीला दहा गृहस्थांचें कौन्सिल आहे. कौन्सिलच्या सल्ल्याप्रमाणें संस्थेची चालना होत असते. कौन्सिलांत डॉ. सर रामकृष्ण भांडारकर; रा. ब. जोशी, सातारा; प्रो. पाटणकर, बनारस; ना. गोखले; प्रो. परचुरे, ग्वालेर; प्रो. हर्डीकर, दक्षिण हैदराबाद; बॅरिस्टर पंडित, राजकोट; प्रि मेढेकर, पुणें; रेव्ह. आलेक्झांडर रॉबर्टसन्, एम्. ए., पुणें; डॉ. तेलंग, एल्. एम्. एस्., नांदोड, हे गृहस्थ आहेत. संस्थेचा वार्षिक खर्च १२५० वर होतो, व तो सरकार आणि लोक यांच्या आश्रयानें बहुतेक भागतो. संस्थेजवळ हल्लीं शिल्लक बहुतेक नाहींच आहे. संस्थेचे सेक्रेटरी विष्णु रघुनाथ करमरकर हे आहेत.

नूतन विद्यालय, गुलबुर्गा, १९०८.

प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी व लोकांत शिक्षणप्रसार व्हावा, हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. येथें मराठी व ऊर्दू सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण देण्यांत येत आहे. संस्थेची स्थावर शिल्लक सहा हजारांची आहे. रोख रुपये नऊ हजार आहेत. दरवर्षी सरासरी दीडहजार रुपये खर्च होतो आणि तो लोकाश्रयावर भागतो. संस्थेचे उत्पादक श्रीयुत विठ्ठलराव हायकोर्ट वकील हे होत. आणि श्रीयुत केशवरावजी व श्रीयुत जनाब सज्जादे साहेब रोजा बुदरुग यांची संस्थेस विशेष प्रकारें मदत असते. संस्थेचे अध्यक्ष श्रीयुत विठ्ठलराव वकील, कोशाध्यक्ष श्रीयुत गोविंदराव रावजी हायकोर्ट वकील, जनरल सेक्रेटरी श्रीयुत गोपाळ रावजी हायकोर्ट वकील, आणि सेक्रेटरी श्रीयुत गिरिराव अण्णा वकील जहागीरदार व श्रीयुत बाळकृष्णराव वकील हे आहेत.

धि सोसायटी फॉर धि प्रमोशन ऑफ एज्युकेशन अमंग धि मासिस. (मागसलेल्या जातींत विद्याप्रसार करणारी संस्था). मुंबई, १८८९.

कामकरी वर्गांतील निराश्रित मुलांना उपयुक्त प्राथमिक शिक्षण मोफत देऊन त्यांची स्थिति सुधारावी, हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. सभासदांकडून येणारी वार्षिक वर्गणी, मधूनमधून मिळणाऱ्या देणग्या, जॉईंट स्कूल कमिटीकडून मिळणारी ग्रँट, गिरण्यांच्या मालकांच्या संस्थेकडून मिळणाऱ्या वार्षिक देणग्या व वाडिया चॅरिटीफंडाच्या ट्रस्टींकडून मिळणारी वरीच मोठी ग्रँट या सर्वांमिळून या संस्थेचा खर्च चालतो. या सोसायटीनें (१) दादाभाई नौरोजी

पुअर बॉईज सेमिनरी–चिखलवाडी; (२) दादाभाई नौरोजी फ्री रिडिंग रूम आणि लायब्ररी; (३) चिंचपोकळी येथील दिवसाच्या व रात्रीच्या मोफत शाळा; (४) चिंचपोकळी फ्री रीडिंग रूम व लायब्ररी; आणि (५) कुलाबा येथील रात्रीची मोफत शाळा, इतक्या संस्था चालविल्या आहेत. संस्थेच्या इमारती करितां सरकारांतून ३३०० वर रुपये व श्रीयुत दामोदर गोवर्धनदास मुखडवाला यांनीं ५००० रु. दिल्यामुळें संस्थेला फार मदत झाली. हल्लीं संस्थेमार्फत ५०० विद्यार्थि विद्यादान घेत असून संस्थेचा वार्षिक खर्च ५००० वर आहे. संस्थेच्या उत्कर्षास तिचे मूळ उत्पादक प्रो. एन्. जी. वेलिणकर एम्. ए. एल्एल्. बी. यांचेच परिश्रम कारण आहेत. संस्थेजवळ आज १२,५०० रु. शिल्लक आहेत. या सोसायटीचे ना. फाजलभाई हे अध्यक्ष, व श्रीयुत वसंतराव राउत हे खजीनदार, श्रीयुत महाले, श्रीयुत दळवी एम्. ए.एल्एल्. बी. हे चिटणीस असून व्यवस्थापक मंडळांत मेसर्स सी. एम्. कर्सेटजी, मुरडवाला, हरि सिताराम दीक्षित बी. ए. एल्एल्. बी., मिर्झा अली अकबरखान बी. ए.ई. डॉ, मोझेस एम्. डी., नानालाल प्रभुराम, जी. बी. वाडिया, श्रीयुत दा. सा. पंदे, यशवंतराव गाणगांवकर, बी. एन्. आठवले बी. ए. एल्एल्. बी. व जीजीभाई वाडिया हे सभासद आहेत.

नरे आणि मंडळीच्या धर्मार्थ शाळा, मुंबई-दादर, १८७४.

गिरण्यांतील व इतर मागसलेल्या लोकांनां व त्यांच्या मुलांनां फुकट शिक्षण देणें हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. या संस्थेच्या विद्यमानें दोन शाळा चालू असून तींत १०० वर मुलें शिकत आहेत. श्रीयुत भिवाजी रामजी नरे यांनीं प्रथम ही संस्था सुरू केली व अजूनहि ते संस्थेकरितां श्रम करीत आहेत.

अंजुमान इ-इस्लाम, मुंबई, १८७६.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत, हिंदुस्थानांतील इतर ज्ञातींबरोबर रहावयाचें असल्यास आपल्या ज्ञातीला पालटलेल्या परिस्थितीप्रमाणें पाश्चात्य पद्धतीचें शिक्षण दिलें पाहिजे, असें मुसलमानांसहि वाटूं लागलें. या चळवळीचे पुरस्कर्ते सर सय्यद अहमदखान हे असून १८७५ सालीं त्यांनी अलिगडला मुसलमानी शाळा स्थापन केली. मुदैवानें याच सुमारास मुंबई शहरांतहि इंग्लंडांत शिक्षण प्राप्त झालेले किंवा पाश्चिमात्य देशांत प्रवास करून ज्यांचीं मनें सुसंस्कृत झालीं आहेत, असे कांहीं मुसलमान पुढारी गृहस्थ होते. सदहू गृहस्थांच्या खटपटीनें मुंबई इलाख्यांतील मुसलमान ज्ञातीच्या नैतिक, सामाजिक व बौद्धिक उन्नतीसाठीं मुंबईची अंजुमान इ-इस्लाम ही संस्था स्थापन झाली. मुसलमान ज्ञातींतील प्रत्येक पोटजातीच्या पुढाऱ्यांचा या संस्थेंत समावेश व्हावा, असेंच हिचें पहिल्यापासून धोरण असून मुसलमानांतील उच्च दर्जाचा प्रत्येक वजनदार मनुष्य या संस्थेचा सभासद आहे. मुसलमान ज्ञातीची सर्व प्रकारची प्रगति करणें, हा जरी संस्थेचा उद्देश आहे, तरी तिची बौद्धिक व शिक्षणसंबंधी उन्नति व्हावी हें तिचें प्रथम पासूनच विशेष धोरण आहे. या अंजुमानची मदरासा-इ. अंजुमान-इ-इस्लाम या नांवाची शिक्षणविषयक संस्था असून तिच्या तीन शाखा आहेत; (१) इंग्लिश शाळेंत प्रवेशपरीक्षेपर्यंत शिक्षण दिलें जातें; (२) प्राथमिक शाळा; व (३) मिड्ल्स्कूल. 'अंजुमान इ-इस्लाम मकबा लायब्ररी' नांवाचें एक पुस्तकालय, 'अंजुमान-इ- इस्लाम करमिला लायब्ररी,' बोर्डिंग हाउस, तालिमखाना वगैरे या संस्थेचीं अंगें आहेत. या संस्थेचें सर करीमभाई इब्राहिम, बॅरोनेट हे अध्यक्ष, काजी कबरुद्दिन, ना. इब्राहिम रहिमतुल्ला, हाजी युसफ हाजी इस्माइल हे उपाध्यक्ष, व फाजल भाई करीमभाई आणि मिरझा अलिमहम्मदखान हे सेक्रेटरी आहेत. या संस्थेला मुंबई सरकाराकडून ६०००रु., मुंबई म्युनिसिपालिटीकडून५ हजार रु., व ना.आगाखान यांजकडून ५००० रु. याप्रमाणें मुख्य वार्षिक ग्रँट आहेत. या संस्थेच्या शाळेंत सर आदमजी पीरभाई, काजी कबिरुद्दिन, हाजी इसमाईल गुलमहंमद, हाजी सुलेमान अबदुल वाहेद, हाजी महम्मद, प्रो. मिरझा हैरात, हाजी हसन सिदीक, सर रसूलखानजी, सर करीमभाई इब्राहिम यांच्या नांवच्या स्कालरशिपा असून संस्थेची सांपत्तिक स्थितिहि उत्तम आहे. या संस्थेच्या शाळांत ६०० वर विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

धि हिंदु एज्युकेशन, फंड, मुंबई १९०१.

हिंदु ज्ञातींतील हुषार व होतकरू तरुणांस उच्च शिक्षण संपादन करण्यासाठीं देशांतरास जावयास साहाय्य करण्याच्या उद्देशानें अनेक हिंदु धनिक व मध्यम स्थितींतील मंडळीच्या उदारतेमुळें हा फंड स्थापन झाला. या फंडांतून साहाय्य मिळालेल्या विद्यार्थ्यांनीं त्या साहाय्याची रक्कम फंडाला परत दिली पाहिजे, या अटीवर त्यांना स्कालरशिपांच्या रूपानें मदत करण्यांत येते. या फंडांतून आजपर्यंत २३

विद्यार्थ्यांनें मदत मिळाली असून त्यांनीं इंग्लंड, अमेरिका, जर्मनी व जपान या देशांत निरनिराळ्या विद्याकलांचें शिक्षण संपादन केलें किंवा करीत आहेत. या फंडातर्फे श्रीयुत दळवे, भिडे व वेबूर हे इंडियन सिव्हिल सर्विस परीक्षा उत्तीर्ण झाले असून यांपैकी पहिले दोघे मोठ्या सरकारी हुद्यांवर आहेत. संस्थेचा एकंदर फंड १,२५,२४० रु. असून त्यांपैकी ८२,७७७ रु. विद्यार्थ्यांनां स्कालरशिपांच्या रूपानें, ते परत देण्याच्या अटीवर, देण्यांत आले आहेत. फंडाच्या नियामक मंडळांत डॉ. देशमुख, डॉ. खेर, व मेसर्स मुरारजी गोकुळदास, वा. ना. भाजेकर, म. रा. वोडस, त्रिभुवनदास माळवी, रा. व. चिं. विवैद्य, व द. व. विटणीस हे आहेत. फंडाच्या साहाय्यकर्त्यांत प. वा. श्री. बळवंतराव गोविंद महाजन यांनीं २७,७७७ रु., श्रीयुत भि. व्यं. द्रवीड यांनीं १०,००० रु., श्रीयुत त्रिभुवनदास माळवी ८५०० रु., श्रीमंत ना. बाबासाहेब घोरपडे यांनीं ३००० रु., याप्रमाणें मदत केली आहे.

मराठा शिक्षणपरिषद्, मुंबई, १९०७.

धार्मिक, सामाजिक वगैरे बाबींत सुधारणा न पडतां मराठा जातीची शिक्षणविषयक प्रगति करणें हा या परिषदेचा उद्देश आहे. ही परिषद् स्थापन होण्यास श्रीयुत बाबूराव आवटे, बी. ए., एल्. एल्. बी.; श्रीयुत साळेराव जाधव, एम्. आर्. ए. सी., एफ्. सी. एस्.; श्रीयुत गुणाजीराव निंबाळकर; श्रीयुत भास्करराव जाधव, एम्. ए., एल् एल् बी.; रावबहादुर बंडेकर; प. वा. बिर्जे वगैरे सद्गृहस्थांची खटपट विशेषतः कारणीभूत झाली आहे. परिषदेच्या तिसऱ्या बैठकीच्या वेळीं 'किंग एडवर्ड मेमोरियल मराठा एज्युकेशनल फंड' स्थापन केला आहे. परिषदेला मुखत्वीकरितां मदत करून श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं पंचवीस हजार रुपयांची मदत दिली. त्याचप्रमाणें प. वा. दिवाणबहादुर पामणस्कर यांचें कुटुंब जानकीबाई व कन्या श्रीमती सीताबाई यांनीं पाऊण लाखाची इस्टेट परिषदेस दिली आहे. ह्यी परिषदेचा फंड दीड लाखांवर गेला असून त्याच्या व्याजांतून उच्च प्रतीचें शिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांस विद्यावेतनें देण्यांत येतात. त्याचप्रमाणें परिषदेनें जागजागीं जिल्हासभा, तालुकासभा व ग्रामसभा स्थापन केल्या असून त्यांमार्फत विद्यार्थ्यांस मदत मिळते. शिक्षणाची अभिरुचि समाजांत उत्पन्न होण्यास उपदेशकांची योजना केली आहे. श्रीमन्महाराज शाहू छत्रपति, कोल्हापुर; श्रीमन्महाज सयाजीराव गायकवाड, बडोदें; श्रीमन्महाराज उदाजीराव पवार, धार; श्रीमन्महाराज बापूसाहेब पवार, देवास; श्रीमंत राजा बहादूर रघोजीराव भोसले, नागपुर; श्रीमंत राजेसाहेब आबासाहेब डफळे, जत; श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोसले; नामदार शंभुसिंहजी राजे जाधवराव; कप्तान नानासाहेब डफळे; श्रीमंत बाबासाहेब देसाई नणदीकर; श्रीमंत बाबासाहेब धुमाळ; श्रीमंत संपतराव गायकवाड; श्रीमंत बाबासाहेब घोरपडे; श्रीमंत यादवराव किल्लेदार; श्रीमंत आप्पाहेब मोरे यांसारखी मंडळी परिषदेकरितां अत्यंत खटपट करीत असते. परिषदेचा फंड मुंबई बँकेंत आहे. परिषदेचें प्रस्तुतचें कार्यकारी मंडळ अध्यक्ष, श्रीमंत राजेसाहेब रामराव आबासाहेब डफळे, जत; उपाध्यक्ष श्रीयुत खासेराव जाधव, एम्. आर्. ए. सी.; एफ्. सी. एस्.; विटणीस श्रीयुत गोपाळराव नाईक, बी. ए., एल् एल्. बी., ॲडव्होकेट हायकोर्ट; श्रीयुत नीलकंठराव देशमुख व श्रीयुत रामचंद्रराव जगताप इत्यादि.

चांद्रसेनीय कायस्थ प्रभु एज्युकेशन सोसायटी, ठाणें, १८८६.

कायस्थ प्रभु जातींत विद्याप्रसार करणें, औद्योगिक, व्यापारविषयक शिक्षणाची वाढ करणें, व ज्ञातीतील गरीब विद्यार्थ्यांनां हिंदुस्थानांत अगर परदेशांत अभ्यासास द्रव्यसाहाय्य करणें, हा या संस्थेचा उद्देश आहे. मदत घेतलेल्या विद्यार्थ्यांनीं पुढें सवडीप्रमाणें पैसे संस्थेस परत करावयाचे असतात. ही संस्था प्रथम मुंबईस स्थापन झाली होती. संस्थेचें हल्लीं आफीस ठाण्यास आहे. प्रस्तुत संस्थेकडे भांडवल २१॥ हजार रु. आहेत. या संस्थेस प. वा. दिवाणबहादूर लक्ष्मण जगन्नाथ वैद्य यांनीं शिक्षणप्रसारार्थ ११ हजार रु. देणगी दिली आहे. शिवाय आणखीहि कांहीं देणग्या मिळाल्या आहेत. गतसालअखेर एकूण १२१ विद्यार्थ्यांस सुमारें १६॥ हजार रु. ची मदत दिली असून त्यांचेकडून फेड सुमारें ८॥ हजार रुपये झाली आहे. संस्थेच्या मदतीमुळें आजपर्यंत २ एम्. ए.; ३० बी. ए.; १२ एल् एल्. बी.; ५ एल्. सी. ई.; १ बी. एस्सी; १ एल् एम् ॲंड एस्.; १ एल्. ए जी.; २ एल्. एम्. ई. ४ ग्रॅजुएट इंजिनीयरिंग व ३ सब ओव्हरसियर असे विद्यार्थी तयार झाले आहेत. संस्थेचे अध्यक्ष श्रीमंत नामदार सर गंगाधरराव माधवराव विटणीस, के. सी. आय्. ई हे आहेत. श्रीयुत वा. वा. खारकर, बी. ए.; श्रीयुत आ.

अ. चित्रे, बी. ए., एल्. एल्. बी. ॲन्होकेट; श्रीयुत वा. ध.प्रधान, बी. ए., एल् एल्. बी.; हे चिटणीस आहेत.

याशिवाय कायस्थ ज्ञातीच्या शिक्षणविषयक पुढील संस्था आहेतः—

चांद्रसेनीय कायस्थ प्रभु विद्योत्तेजक फंड, मुंबई, १९०४.

संस्थेकडे आजरोजीं शिल्लक दहा हजार रुपये आहेत. वर्षाचे कांठीं गरीब विद्यार्थ्यांस ५०० वर रक्कम मदत दिली जाते.

चांद्रसेनीय कायस्थ प्रभु प्राथमिक व मध्यम शिक्षणसंस्था, मुंबई, १९०४.

संस्थेचे वर्गणीदार ४०० वर असून संस्थेजवळ आज शिल्लक रकम सुमारें एक हजार रुपये आहे.

चांद्रसेनीय कायस्थ प्रभु प्राथमिक शिक्षणफंड, वडोदें, १८८८.

संस्थेकडे आज ३०० रुपये शिल्लक आहेत. वार्षिक प्राप्ती व खर्च दोन अडीचशें रुपये आहे.

सारस्वत विद्यार्थिसाहाय्यक मंडळी, मुंबई, १९०२.

सारस्वत ब्राह्मणज्ञातीतील सर्व पोटभेदांमधील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांनां विद्यार्जनाच्या कामीं सर्व प्रकारचें साहाय्य करण्यासाठीं ही संस्था स्थापन झाली असून आजवर ती आपली कामगिरी फारच उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहे. या संस्थेचे सुमारें एक हजारांवर सभासद असून त्यांत सर्व पोटभेदांतील सारस्वत ब्राह्मणांचा समावेश झाला आहे, व आतांपर्यंत संस्थेनें मदत केलेल्या सुमारें १०० विद्यार्थ्यांतहि सर्व पोटभेदांतील विद्यार्थ्यांचाच भरणा आहे. सारस्वत-ज्ञातींत परस्पर प्रेमभावाची वृद्धि करून अनेक दिशांनीं जागृति करण्याचें प्रशंसनीय कार्य या संस्थेनें केलें असून ही संस्था एकंदर ज्ञातीच्या अत्यंत आदरास आणि आश्रयास पात्र होऊन राहिली आहे. आतांपर्यंत सुमारें ३० हजारांवर रकम या संस्थेनें वर्गणीच्या आणि देणगीच्या रूपानें जमविली आहे. पैकीं सुमारें १२ हजार रुपये रिझर्व्ह फंडांत ठेवून बाकीचे १८ हजार रुपये विद्यार्थ्यांनां मदत करण्याच्या वगैरे कामीं खर्च केले आहेत. संस्थेचें वार्षिक उत्पन्न पांचसहा हजार रुपयांचे सुमारें असून खर्च ४ हजारांचे सुमारें आहे. राजकोटचे सुप्रसिद्ध दानशूर बॅरिस्टर पंडित यांनीं संस्थेस आजवर सुमारें ४ हजार रुपयांचें साहाय्य केलें असून प. वा. श्रीयुत ना. धों. दिवाडकर, त्याचप्रमाणें शिर्शीचे हायकोर्ट वकील रा. सा. पुं. ना. पंडित, मुंबईचे श्रीयुत दाभोळकर, डॉ. रावप्रभृति मंडळींनीं प्रत्येकी ५०० हून जास्त रकम दिली आहे. १०० हून अधिक रकम देणारांची संख्या ६० वर असून त्यांत ज्ञातीतील सर्व पोटभेदांतील पुढारी आहेत. ही संस्था स्थापन करून तिला सांप्रतचें स्पृहणीय स्वरूप आणण्यास या संस्थेच्या उत्पादकांपैकीं विशेषतः (प. वा.) डॉ. सांबारे; श्रीयुत गोविंद मल्लिनाथ ठेंगे, बी. ए; श्रीयुत काशीनाथ रघुनाथ मित्र; श्रीयुत अनंत वासुदेव सबनीस, बी. ए., प्रभृति सद्गृहस्थांचे कळकळीचे श्रम कारणीभूत झालेले आहेत. डॉ. जनार्दन शंकर नेरुरकर, बी. एस् सी., एल्. एम्. ॲंड एस्., डी. पी. एच्.; श्रीयुत पंढरीनाथ काशीनाथ तेलंग एम्. ए., एल् एल्. बी.; श्रीयुत दिनकर सखाराम वर्दे, बी. ए., एल् एल् बी; रा. सा. गोविंद माधव डुकले बी. ए., प्रभृति सद्गृहस्थांचें संस्थेच्या उत्कर्षास वरेंच साहाय्य झालें आहे.

सारस्वतज्ञातींत आणखी कित्येक शिक्षणविषयक संस्था आहेत, त्या येणेंप्रमाणेः—

चिकित्सक समूह, मुंबई, १९०६.

गौडसारस्वत ज्ञातीतील सर्व पोटभेद नाहींसे करून परस्पर प्रेमभाव वाढविणें, त्यांची धार्मिक, नैतिक बौधिक, सामाजिक वगैरे सर्व बाजूंनीं उन्नति करण्यास झटणें, व हे हेतु सिद्धीस जाण्यास शक्य ते उपाय योजणें हें संस्थेचें उद्दिष्ट आहे. संस्थेनें आजपर्यंत फी, वर्गणी, देणग्या वगैरेद्वारा सुमारें ९ हजार रु. जमविले असून ७२५० रु. खर्च केले आहेत. हल्लीं संस्थेची मालमत्ता सुमारें पावणेचार हजारांची असून संस्थेजवळ शिल्लक अडीच हजार रुपयांचे सुमारें आहे. १९०८ सालीं येथील पोतदारस्कूल संस्थेच्या ताब्यांत आलें. त्याला संस्थेनें 'चिकित्सक समूह पोतदार प्रायमरी स्कूल' असें नांव देऊन तें योग्य रीतीनें चालविलें आहे. संस्थेनें ॲंग्लोव्हर्नाक्युलर स्कूल नांवाची दुसरी एक शाळा स्थापिली असून तीहि चांगल्या प्रकारें चालली आहे. १९०८ सालीं एक ड्रायंगक्लासहि उघडण्यांत आला आहे. शिवाय अनाथ विद्यार्थ्यांनां मदत करण्याच्या हेतूनें 'चणाफंड' नांवाची आणखी एक संस्था १९०९ सालीं स्थापण्यांत आली. संस्थेनें 'स्टूडंट्स युनियन' व 'पुस्तकालय' या आणखी दोन संस्था स्थापिल्या आहेत. शिवाय संस्थेमार्फत 'बापूशर्मा स्मारकफंड' व 'दिवाडकरस्मारक फंड' हे दोन फंडहि चालू आहेत. यांचा विनियोग

विद्यार्थ्यांकडेच होतो. संस्थेच्या उत्कर्षास ज्या अनेक सद्गृहस्थांचे प्रयत्न कारणीभूत झाले त्यांत प. वा. श्रीयुत हरि शामराव सुखटणकर, बी. ए., रा. सा. गोपाळ वेंकटेश पाणंदीकर, श्रीयुत जगन्नाथ वासुदेव पिलगांवकर, श्रीयुत डॉ. वि. भा. सुखठणकर, प्रभृति सद्गृहस्थ आहेत.

श्रीयुत दाभोळकर धर्मादायफंड, मुंबई, १९१२.

श्रीयुत शांताराम नारायण दाभोळकर यांनीं सारस्वत ब्राह्मणज्ञातीच्या कल्याणार्थ एक लाख रुपये दिले असून त्या ज्ञातींतील एकूणएक पोटजातींतील विद्यार्थी व विद्यार्थिनीं यांना या फंडाच्या व्याजाच्या ३५०० रुपयांतून स्कॉलरशिपा देण्यांत येतात. श्रीयुत दाभोळकर, ना.न्या.मू. सर नारायण चंदावरकर व रा. ब. देसाई हे या फंडाचे ट्रस्टी असून रा. ब. स. त्रिं. भांडारे हे 'ॲडव्हायसरी बोर्डा'चे अध्यक्ष व श्रीयुत दि. स. वर्दे, बी. ए., एलएल. बी., हे सेक्रेटरी आहेत. या फंडाच्या ज्या भागांतून विद्यार्थिनींना स्कॉलरशिपा देण्यांत येतात, त्याला शांताबाई शांताराम दाभोळकर स्कॉलरशिप फंड असें नांव आहे.

श्रीमती आनंदीबाई रघुनाथ दाभोळकर स्कॉलरशिप्स फंड, मुंबई, १९१२.

हा फंड १० हजार रुपयांचा असून त्याची व्यवस्था वरील फंडाप्रमाणेंच आहे.

कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाज, मुंबई, १८९५.

सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील कुडाळदेशकर पोटभेदांत विद्याप्रसार करण्यासाठीं ही संस्था निघाली आहे. संस्थेचें वार्षिक उत्पन्न सुमारें बाराशें रुपये असून शिलक सुमारें २१ हजारांवर आहे. संस्थेचे सेक्रेटरी श्रीयुत प्रो. पांडुरंग भिकाजी नाईक, एम्. ए. हे आहेत.

सारस्वत सामाजिक समूह, मुंबई, १९०५.

सारस्वत ब्राह्मणांतील भालावलकर पोटभेदांत सर्व प्रकारच्या शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं हा समाज निघाला आहे. सुमारें ५०० रु. मदत होते. १५०० रु. शिलक आहे. अध्यक्ष श्रीयुत वि. पां. तेंडुलकर हे आहेत.

तेलगू एज्युकेशनफंड, मुंबई, १९०९.

मुंबई इलाख्यांतील गरीब आणि होतकरू अशा तेलगू विद्यार्थ्यांस विद्याभ्यासाकरितां स्कालरशिप्स व बक्षिसें देऊन ज्ञातींत विद्येचा प्रसार करण्याचा या फंडाचा उद्देश आहे. संस्थेजवळ सध्यां २० हजार रुपयांचा रिझर्व्ह फंड आहे. वर्गणीदारांची संख्या १०० वर आहे. फंडाच्या ट्रस्टीजमध्यें रा. ब. यल्लाप्पा बाळाराम, रा. सा मानाजी राजूजी, श्रीयुत सयाजी नागूजी, श्रीयुत राजू बाबाजी, श्रीयुत संभाजी मल्लूजी प्रभृति प्रमुख गृहस्थ असून, सेक्रेटरी श्रीयुत शंकर राजन्ना जिलकर व श्रीयुत शंकर संभाजी गांगला बी. ए., हे आहेत.

तेलगू जातीच्या आणखी शिक्षणविषयक संस्था पुढीलप्रमाणें आहेत:—

कामाठीपुरा तेलगू अँ. व्ह. स्कुल, मुंबई, १८६५.

ही शाळा तेलगू मनुरवार ज्ञातीचे प्रमुख प. वा. श्रीयुत जाया यल्लापा लिंगू व. प. वा. श्रीयुत नरसिंगराव सा. वडनाला, जे. पी. यांनीं स्थापन केली. २० हजार रु. किंमतीची शाळेची इमारत आहे.

कामाठीपुरा तेलगू मुलींची शाळा, मुंबई, १८७४.

ही शाळा प. वा. श्रीयुत जाया कराडी लिंगू व प. वा. श्रीयुत नरसिंहराव सायवू वडनाला यांनीं स्थापन केली. १० हजार रुपये इमातीसाठीं खर्च केले आहेत. सुमारें १५० विद्यार्थिनी फुकट शिकत आहेत.

तेलगू पुस्तकालय, मुंबई १८७४.

या पुस्तकालयाचा रिझर्व्ह फंड सुमारें ५ हजार रुपये आहे.

कामाठीपुरा रात्रीची धर्मार्थ शाळा, मुंबई, १९१६.

ही शाळा श्रीयुत राजू बाबाजी कांट्राक्टर यांनीं स्थापन केली असून शाळेसाठीं १०।१२ हजार रुपयांची स्वतंत्र इमारत बांधली आहे. तेथें सर्व ज्ञातींच्या विद्यार्थ्यांस फुकट शिकविण्यांत येतें व शालोपयोगी वस्तुहि फुकट देण्यांत येतात.

श्रीमान् ऐलक पन्नालाल दिगंबर पाठशाला, सोलापूर, १८८६.

प्रथम ही संस्था 'जैनपाठशाला' नांवानें स्थापन झाली होती, व १९१० सालापर्यंत तिचा प्रोव्ह्यफंड चौदा हजारांपर्यंत आला होता. नंतर श्रीमान् ऐलक पन्नालालजींचें नांव संस्थेस जोडण्यांत आलें. या संस्थेचा मुख्य उद्देश दिगंबर जैनजातींत विद्याप्रसार व्हावा हा आहे. शिवाय जैन दिगंबर पंथाचे धर्मग्रंथहि संस्था मिळवून ठेवीत असते. संस्थेकडे हल्लीं ३९ हजार रुपये शिलक आहेत. वर्गणीदारांशिवाय व्याज आणि सरकारी मदत मिळून संस्थेस ११ शेंपेक्षां थोडें अधिक उत्पन्न असून दरवर्षी एक हजारावर खर्च होतो. सेक्रेटरी हिराचंद नेमचंद दोशी हे आहेत.

गांधीनाथारंगजी दिगंबर जैन बोर्डिंग स्कूल, सोलापुर, १९०८.

दिगंबर जैन विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी ह्मणून अकलूजचे शेट नाथारंगजी यांच्या औदार्यामुळें व परिश्रमानें हें बोर्डिंग स्कूल स्थापिलें गेलें. या बोर्डिंग-करितां एक फंड उभारला असून तो ३५ हजारांवर गेला आहे व त्याच्या व्याजावर वरील संस्था चालली आहे. धार्मिक शिक्षणाकडेहि या संस्थेचें विशेष लक्ष असतें. व्यवस्थापक मंडळांत श्रीयुत गंगाराम नथुराम गांधी (चेअरमन), श्रीयुत हिराचंदनेमचंद दोशी (सेक्रेटरी), श्रीयुत स. बळवंत चाकवते (सुपरिंटेंडंट) प्रभृति मंडळी आहेत.

ब्राह्मणविद्यार्थी साहाय्यक मंडळ, मुंबई, १९०८.

ह्यांच्यांत संप्रदायानुसार प्रसिद्धपणें रोटीव्यवहार होतो अशा पंचद्रविड ब्राह्मणज्ञातींतील गरीब होतकरू विद्यार्थ्यांनां विद्यार्जनाचे कामी मदत देणें हा या संस्थेचा उद्देश आहे. मंडळाच्या मदतीनें कांहीं कॉलेज-विद्यार्थ्यांनां उच्च प्रतीचें शिक्षण घेण्यास सध्या मदत होत आहे. मंडळाच्या व्यवस्थापक मंडळीचे चेअरमन डा. विनायक नारायण भाजेकर, एफ्. आर्. सी. एस्, व चिटणीस श्रीयुत अनंत गणेश साठये, एम्. ए. एल् एम्. बी. व श्रीयुत रामचंद्रावजी गाडगीळ, बी. ए., एल् एल् बी., हे आहेत.

वैदिक धर्माश्रम, पुणें, १९०७.

शेट चतुर्भुज बालमुकुंद यांनीं पाऊण लाखाची उदार देणगी दिल्यामुळें सार्थ वैदिक ज्ञान देण्याकरितां ही संस्था निघाली आहे. संस्थेचे चालक श्रीयुत वि. ना. जोशी सासरे हे आहेत. शाळेंत आज २० विद्यार्थी आहेत.

वेदपाठशाला, पुणें, १८८२.

वेदाध्ययनाचा प्रसार करावा ह्मणून ही संस्था निघाली आहे. हल्ली संस्थेजवळ शिलक साडेसहा हजार रुपयांवर आहे. शाळेंत ७५ मुलें आहेत.

श्रीमद्वीरशैव महाजनसभा, सोलापुर, १९०९.

वीरशैव समाजांत शिक्षणाचा प्रसार करणें हा या संस्थेचा उद्देश आहे. इ. स. १९०४ सालीं श्रीयुत रावबहादुर आप्पासाहेब बारद यांनीं सोलापुरच्या पुढारी मंडळींच्या साहाय्यानें लिंगायत असोसिएशन नांवाची संस्था काढली होती; पण तिचें काम नीटसें चालेना ह्मणून ही संस्था तिची शाखा ह्मणून काढली. रा. ब. बारदांप्रमाणेंच श्रीयुत बं. आ. काडादी; श्रीयुत रे. सि. उंबरजे; श्रीयुत म. आ. लिंगाडे व श्रीयुत म. रा. जम्मा वगैरे मंडळीची संस्था काढण्यांत बरीच खटपट झाली आहे. संस्थेला श्रीमंत मल्लिकार्जुनापा चनमलप्पा लिंगाडे व श्रीमंत मल्लिकार्जुनापा रामप्पा जम्मा यांनीं प्रत्येकीं एक हजार रुपये दिले आहेत. शिवाय रा. ब. बारद देत असलेली दरमहा २५ रु. वर्गणी त्यांच्या ट्रस्टींकडून येत असते. संस्थेजवळ हल्लीं सुमारें ४ हजार रु. शिलक आहेत. संस्थेचे अध्यक्ष श्रीमंत बंड्याप्पा नागप्पा काडादी हे असून उपाध्यक्ष श्रीमंत चनवसप्पा शरणप्पा मडकी हे आहेत. श्रीयुत म. आ. पाटील, श्रीयुत म. रा. शेटे व श्रीयुत शि. आ. देशमुख हे सेक्रेटरी आहेत.

कोंकणस्थ नामदेव शिंपी शिक्षणोत्तेजक मंडळी मुंबई, १९१०.

ज्ञातींत विद्याप्रसार करणें आणि उत्तेजन देणें हा संस्थेचा उद्देश आहे. संस्थेजवळ हल्लीं ५००० रु. शिलक आहेत.

विद्याप्रसारक मंडळ, बडोदें, १९१०.

देवरुखे ज्ञातींतील गरीब विद्यार्थ्यांनां केवळ मदत करण्याकरितां ही संस्था स्थापन झाली आहे. संस्थेचें वार्षिक उत्पन्न ६०० रु. व शिलक रुपये ७०० आहेत. संस्थेचे अध्यक्ष श्रीयुत गोविंद रामचंद्र सितूत बी. ए. हे असून चिटणीस श्रीयुत कृष्णाजी मोरेश्वर सलाडकर हे आहेत.

स्वष्टकांसार विद्योत्तेजक मंडळी, मुंबई, १८८०.

ज्ञातींत विद्यावृद्धि करणें व कलाकौशल्यास उत्तेजन देणें हें संस्थेचें उद्दिष्ट आहे. रा. सा. आनंदराव वामन शेटेप्रभृति थोर गृहस्थांच्या परिश्रमानें ही संस्था अस्तित्वांत आली असून तिची भरभराट होत आहे. हल्लीं संस्थेजवळ १५०० रु. शिलक आहेत.

वैश्यमंडळ, मुंबई, १९०७.

कुडाळी वाणीवर्गांत शिक्षणप्रसार करणें व त्यांच्यांत परस्पर प्रेमभाव वाढवून ज्ञातीची एकी करणें, हा मंडळाचा उद्देश आहे. निराश्रित विद्यार्थ्यांनां द्रव्यसाहाय्य देण्यांत येतें. संस्थेजवळ शिलक एक हजाराहून अधिक असून तिचें वार्षिक उत्पन्न ३५० रु. आहे. संस्थेचे अध्यक्ष प. वां. श्रीयुत गणपतराव कृष्ण तिवरेकर जे. पी., हे होते. सेक्रेटरी श्रीयुत लक्ष्मण यशवंत पावसकर हे आहेत.

माळी-शिक्षण-परिषद्, १९१०.

माळी वर्गांत शिक्षणाचा प्रसार करून त्यांच्या सामाजिक, धार्मिक वगैरे बाबींत सुधारणा करण्यासाठीं ही परिषद् सुरू झाली आहे. गरीब विद्यार्थ्यांस मदत व्हावी म्हणून एक फंडहि उभारण्यांत आला आहे. या परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष श्रीयुत ह. वि. जगदाडे हे असून सेक्रेटरी श्रीयुत वा. बा. शिंदे व श्रीयुत भा. म. रासकर हे आहेत.

क्षत्रिय विद्योत्तेजक मंडळी, मुंबई, १९०६.

ज्ञातींत शिक्षणप्रसार करण्यासाठीं ही संस्था श्रीयुत शांताराम गणेश रेळे व डॉ. गोपिनाथ कृष्णाजी क्षत्रिय यांच्या खटपटीनें स्थापन झाली आहे. ज्ञातीची सुधारणा करण्याकरितां पूर्वी कांहीं लोकांनीं मोठमोठ्या देणग्या दिल्यामुळें या ज्ञातीच्या ताब्यांत दोन अडीच लाखांची स्थावर जंगम इस्टेट आहे. गरीब विद्यार्थ्यांनां उत्तेजन देण्याकरितां एक निराळाच फंड उभारला आहे, व त्याचीहि रकम हजारावर आहे. ज्ञातीचे अध्यक्ष श्रीयुत गंगाराम बापसोबा रेळे बी. ए., एल् एल्. बी., हे असून श्रीयुत शांताराम गणेश रेळे हे चिटणीस आहेत. या मंडळाचे अध्यक्ष श्रीयुत बाळकृष्ण बापूजी साव हे आहेत.

विद्यावर्धक मंडळ (फोंडा), गोवा.

सर्व जातींत शिक्षणप्रसार करावा हें मंडळाचें ध्येय आहे. मंडळानें आल्मेद कॉलेज नांवाचें एक कॉलेज स्थापिलें असून त्यांत पोर्तुगीज, संस्कृत, इंग्लिश, मराठी वगैरे भाषांचा अभ्यास होतो. या संस्थेस अनेक विद्वानांचा पाठिंबा आहे.

श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य संस्कृत पाठशाला, धारवाड, १८८७.

ब्रह्मवृंदांत वेदशाखाध्ययनाचा प्रसार सुलभपणें व्हावा म्हणून शृंगेरीच्या जगद्गुरूंच्या आश्रयानें ही संस्था निघाली आहे. १८९४ सालीं धारवाडास 'संस्कृत लिटररी सोसायटी' निघाली, तिच्या स्वाधीन ही शाळा झाली व आतां सर्व व्यवस्था त्या सोसायटीच्या मार्फतच चालू आहे. संस्थेनें चोवीस हजार रुपये खर्चून शाळेकरितां एक इमारत बांधिली असून आज शिलक सुमारें १५००० रुपये आहेत. या संस्थेच्या उत्कर्षास श्रीयुत गुरुनाथराव फाटक यांचे अविश्रांत श्रम पुष्कळांशीं कारणीभूत झाले आहेत.

संस्कृत पाठशाळा, राजापुर, १८८९.

प. वा. श्रीयुत अंताजी महादेव घोरवणकर यांनीं ही संस्था स्थापन केली, व त्यांच्याच खर्चानें ही चालली आहे. या पाठशाळेंत व्युत्पत्ति व व्याकरण हे विषय मुख्यतः शिकविण्यांत येतात. आजपर्यंत सुमारें १२५ विद्यार्थी अध्ययन करून या शाळेंतून बाहेर पडले आहेत. विद्यार्थ्यांनां मोफत शिक्षण दिलें जातें.

संस्कृत पुस्तकसंग्रहालय, राजापुर, १९०७.

संस्कृत भाषेंतील व तत्संबंधीं कोणत्याहि भाषेंतील पुस्तकांचा संग्रह करण्याच्या उद्देशानें हें संग्रहालय स्थापन करण्यांत आलें असून वरील पाठशाळेला हें जोडलें आहे. संस्थेजवळ ६३७२ रु. शिलक असून ८३५ पुस्तकांचा संग्रह आहे. श्रीयुत दत्तात्रेय वासुदेव शास्त्री निगुडकर, संस्कृतपाठशाळेचे अध्यापक, हे संस्थेचे चिटणीस आहेत.

गांधर्वमहाविद्यालय, मुंबई, १९०८.

संगीत विद्येचा उत्कर्ष करण्यासाठी ही संस्था पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांनीं काढिली आहे. मूळ १९०१ सालीं ही संस्था लाहोरास स्थापिली गेली, व तिचीच शाखा नंतर इकडे काढण्यांत आली. हल्लीं ही शाखाच फार भरभराटीस आल्यामुळें मुंबईस मुख्य ऑफीस केलें आहे. १९११ सालीं प्रिन्सेस स्ट्रीटवर व चालू वर्षी पुण्यासहि एक शाखा उघडण्यांत आली आहे. सर्व शाखांत मिळून आज सुमारें १२०० विद्यार्थी शिकत आहेत. विद्यालयांत स्त्रियांनांहि गायनकला शिकविण्याची व्यवस्था केली असून तिचा फायदा १०० वर स्त्रिया घेत आहेत. या विद्यालयांत एक ट्रेनिंग क्लास, एक बोर्डिंग व डॉ. झात्रे जे. पी. यांच्या देखरेखीखालीं एक दवाखाना काढला आहे. शिवाय एक छापखाना, वर्कशाप, व वाचनालयहि आहे. संस्थेकडून 'संगीतामृतप्रवाह' व 'गांधर्वमहाविद्यालय' या नांवाचीं दोन मासिकेंहि निघत असतात. संस्थेजवळ वाद्यवैचित्र्य चांगलें आहे. संस्थेचा दरसाल खर्च सुमारें २१—२२ हजारांपर्यंत आहे.

अमेरिकन मिशन, मुंबई, १८१३.

इ. सन १८१३ मुंबईस आलेल्या दोन मिशनरी गृहस्थांनीं ही संस्था स्थापन केली. पहिल्यानें आलेल्या या मिशनरींनां मुंबईस रहावयाची परवानगी मिळतांच मुलगे व मुली यांच्याकरितां शाळा स्थापन करण्याचें काम त्यांनीं सुरू केलें. १८३१ त या कामाची व्याप्ति अहमदनगरप्रांतापर्यंत पोंचली व आणखी कांहीं दिवसांनीं सातारा व सोलापुर येथेंहि असेच प्रयत्न

धि चंदारामजी हिंदु मुलींचें हायस्कूल, मुंबई, १९०८.

प. वा. श्रीयुत ठक्कर चंदारामजी यांच्या मिळकतीचे ट्रस्टी श्रीयुत नानु नारायण कोठारे, सॉलिसिटर यांनीं मुंबई हायकोर्टाच्या संमतीनें ला मिळकतीपैकीं तीन लक्ष पस्तीस हजार रुपये मुंबईत मुलींसाठीं एक हायस्कूल स्थापन करण्यासाठीं दिले, व या फंडाच्या साधनानें स्त्रीशिक्षणाची कळकळ असणाऱ्या हिंदु पुढाऱ्यांच्या साहाय्यानें श्रीयुत कोठारे यांनीं प्रस्तुत 'चंदारामजी मुलींचें हायस्कूल' अस्तित्वांत आणलें. मुलींचें प्राथमिक शाळांतील शिक्षण संपल्यावर, पुढें त्यांनां गृहकृत्यें व सामाजिक व्यवहार योग्य रीतीनें करतां यावे आणि त्यांनां सुमाता आणि सुगृहिणी या पदवीस अनुरूप असें पद्धतशीर शिक्षण देऊन तयार करावें, असा या संस्थेचा उद्देश व शिक्षणक्रमाचें धोरण आहे. या धोरणाप्रमाणें पुढील विषयांचा या हायस्कूलच्या शिक्षणक्रमांत समावेश करण्यांत आला आहे. (१) मातृधर्माचें सांगोपांग विवेचन; (२) गृहसंसार आणि सामाजिक अर्थशास्त्र व ललितकलाविज्ञान. या शाळेंत मॅट्रिक्युलेशन वर्गाशिवाय निरनिराळे विषय देशी भाषांच्याच द्वारें शिकविले जातात. प्रिपेरेटरी (प्रास्ताविक) वर्ग, व नॉर्मल होम ट्रेनिंग क्लासिस (गृहशिक्षणपद्धति वर्ग) हि या शाळेला जोडले आहेत. शिक्षणक्रमांत धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यांचाहि समावेश झाला आहे. या शाळेंत निरनिराळ्या विषयांतील प्रावीण्याबद्दल मुलींनां स्कॉलरशिप ठेवण्यांत आल्या असून त्यांत रमा माधव रानडे यांच्या नांवाची संस्कृत भाषेंतील प्रावीण्याबद्दलची स्कालरशिप प्रमुख आहे. या वृत्तीकरतां श्रीमती सौ. माणकबाई कोठारे यांनीं दोन हजार रुपयांची रकम दिली आहे या संस्थेचे सर भालचंद्र कृष्ण, ना. पारख व न्या. मू. राव हे ट्रस्टी असून व्यवस्थापक मंडळींत श्रीयुत नानू नारायण कोठारे, ना. न्या. मू. सर नारायण चंदावरकर, ले. कर्नल कीर्तीकर, प्रो. धराधर प्रभृति असून रा. ब घाकजी काशीनाथ व श्रीयुत ना. हाटे हे चिटणीस आहेत.

झनाना मिशन, मुंबई.

हिंदी स्त्रियांनां शाळांत व घरीं धार्मिक किंवा इतर शिक्षण द्यावें आणि तरुण स्त्रियांनां शिक्षणपद्धतीचेंहि शिक्षण द्यावें, या हेतूनें हें मिशन स्थापन झालेंअसून या संस्थेच्या नार्मल शाळा, व्हर्नाक्युलर शाळा, फीमेल मेडिकल मिशन, इत्यादि शाखा आहेत. हिंदी स्त्रियांच्या घरीं जाऊन या मिशनच्या उपदेशिका धर्मोपदेशहि करतात. मिशनचीं मुंबई, नाशिक, जालना, मनमाड, पंचगणी व रत्नागिरी हीं मुख्य ठाणीं आहेत.

अनाथबालिकाश्रम, हिंगणें, पुणें, १८९६.

हिंदूंच्या ज्या उच्चवर्णांत पुनर्विवाहाची चाल नाहीं, त्यांतील अल्पवयस्क गतभर्तृकांस विद्याकलादिकांचें ज्ञान देऊन नीतीनें राहून आपला चरितार्थ चालविण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं आणणें, व सामान्यतः त्यांचें मन सुसंस्कृत करणें, या उद्देशानें प्रो. धोंडो केशव कर्वे, बी. ए. यांच्या अविश्रांत श्रमानें ही महाराष्ट्रांतील अत्यंत उपयुक्त व परोपकारव्रतनिरत संस्था स्थापन झाली. प्रो. कर्वे यांच्या या कार्याला चहूंकडून सहानुभूति व साहाय्य मिळूं लागलें. संस्थेच्या प्रारंभीं प. वा. रा. ब. गणेश गोविंद गोखले, यांची या कार्याला विशेष मदत झाली. त्यांनीं ५० रु. वार्षिक वर्गणी देऊन हिंगणेंबुद्रुक येथील आपल्या मालकीची सात एकर जमीन आश्रमाला बक्षीस दिली, व सन १९०० साली येथेंच आश्रम व शाळा नेण्यांत आलीं. अनेक धनिकांच्या व उदार मंडळीच्या साहाय्यानें येथें आश्रमासाठीं इमारती बांधण्यांत आल्या. इमारतींवर आजपर्यंत सुमारें ४२००० हजार रुपये खर्च झाला आहे. या इमारतींत हल्लीं मोठ्या कष्टानें १०० विद्यार्थिनींची सोय होते. आश्रमांत मराठी सात व इंग्रजी पांच इयत्ता शिकविण्याची सोय झाली असून थोड्या वर्षांत मुलींनां मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिक्षण देण्याची सोय होईल. आश्रमांत आठ वर्ग असून दहा शिक्षक आहेत. आश्रमाचा दरसालचा नियमित खर्च सुमारें तेराचवदा हजार रुपये असून हा सर्व बहुतेक सार्वजनिक देणग्यांनीं मोठ्या कष्टानें भागतो. आश्रमाचा स्थायिक फंड ४० हजार, स्कॉलरशिपफंड १० हजार व इमारतफंड ३ हजार रुपये आहे. आश्रमाच्या प्रारंभीं कार्याचा बहुतेक भार प्रो. कर्वे यांजवरच पडला होता; परंतु पुढें श्रीमती काशीबाई देवधर, वेणुबाई नामजोशी, पार्वतीबाई आठवले, वगैरे परोपकारनिरत स्त्रियांचें व इतर मंडळीचें आश्रमाला अतिशय साहाय्य होत आहे. संस्थेच्या बाल्यावस्थेपासून राजकोटचे सुप्रसिद्ध दानशूर बॅरिस्टर श्रीयुत सीताराम नारायण पंडित, यांचें आश्रमाला

द्व्याच्या बाजूनें फारच मोठें साहाय्य झालें आहे. आश्रमाच्या जुन्या नव्या विद्यार्थिनींपैकीं ज्यांची कोणती तरी परीक्षा पास झाली असून ज्या स्वावलंबी झाल्या आहेत, अगर सहज होऊं शकतील अशांची संख्या साठ आहे. या संस्थेचे डॉ. सर रामकृष्ण भांडारकर हे अध्यक्ष; सर भालचंद्र कृष्ण, रा. ब. मराठे, श्रीमती रमाबाई रानडे, रा. ब. सीतारामपंत पटवर्धन हे उपाध्यक्ष; व श्रीमती काशीबाई देवधर, प्रो. धों. के. कर्वे हे चिटणीस आहेत.

सेवासदन, मुंबई, १९०८.

कायमच्या व फुरसदींत काम करणाऱ्या सेविकांच्या द्वारें सामाजिक, शिक्षणविषयक व औषधोपचारांची सेवा करविणें, आणि अशा सेवेच्या योगानें व तत्संबंधीं शिक्षणाच्या साहाय्यानें सेविका तयार करणें, हा या संस्थेचा उद्देश आहे. प्रेमपूर्वक व स्वार्थत्यागप्रेरित सेवा करण्यासाठीं जीवित ही एक देणगी आहे, व मतमतांतरीं भेद असला तरी अंतरीं आपण एक आहों अशी भावना धरून कार्य केलें जातें. ही संस्था निराश्रितांला आश्रय होण्याच्याच उद्देशानें स्थापन झाली असून हल्लीं हींत ४० निराश्रित आहेत. संस्थेनें चालविलेलीं कामें:—(१) निराश्रिताश्रम—या ठिकाणीं निराश्रित स्त्रियांनां व मुलांनां गृहकृत्य, शिवणकाम, यंत्रावर पायमोजे करणें व लिहिणेंवाचणें शिकविलें जातें; (२) उद्योगधंद्याची शाळा—येथें गोरगरिबांस कपडे करण्यास व छापखान्याचें काम करण्यास शिकविलें जातें; (३) स्त्रियांचें व बाळंतिणींचें रुग्णालय; (४) स्त्रिया आणि मुलें यांकरितां एक दवाखाना; (५) एक पुस्तकालय व वाचनालय; (६) आश्रम; (भगिनीमंडलें.) हिंदु, पारशी व मुसलमान स्त्रियांकरितां निरनिराळे आश्रम; (७) शिक्षणाचे वर्ग—स्त्रियांनां मोफत शिक्षण देण्याकरितां हे वर्ग काढिले आहेत. सेवासदनाकडून गरीब लोकांनां त्यांच्या घरींहि औषधोपचाराची व शुश्रूषेची तजवीज केली जाते. सेवासदनाच्या पुणें आणि अहमदाबाद येथें दोन शाखा आहेत. या संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती रमाबाईसाहेब रानडे या असून श्रीमती सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर व श्रीमती सौ. जमनाबाई सक्कई या उपाध्यक्ष आहेत. सर नारायण चंदावरकर, सर भालचंद्र, सर विठ्ठलदास ठाकरसी, श्रीयुत सुखडवाला व ना. श्रीयुत पारख हे ट्रस्टी; व रा. ब. दयाराम गिडुमल हे जनरल सेक्रेटरी आहेत. संस्थेचा ८२००० रु. एन्डौमेंट व इमारतफंड असून शिवाय कांहीं स्थावर मिळकत आहे.

सेवासदन, पुणें, १९०९.

स्त्रीवर्गांत शिक्षणाचा प्रसार व त्या शिक्षणास लोकसेवेचें वळण देणें आणि निःस्वार्थपणें आजन्म समाजसेवा पतकरणारा सेविकावर्ग तयार करणें, हें या संस्थेचें उद्दिष्ट आहे या संस्थेची स्थापना श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांनीं केली असून त्यांत त्यांनां श्रीयुत गोपाळ कृष्ण देवधर, एम्. ए., या उत्साही सद्गृहस्थांचें फार साहाय्य झालें आहे व होत आहे; व ते त्या संस्थेचे जनरल सेक्रेटरी आहेत. सामान्य शिक्षणाबरोबर रुग्णशुश्रूषा व सुईणकाम यांचीहि योग्य माहिती स्त्रियांनां दिली जाते, व त्याकरितां नांवाजलेल्या डॉक्टरांचीं व्याख्यानें वारंवार संस्थेंत करविलीं जातात. अपघात झाला असतां तावडतोब कसा इलाज करावा हें शिकविण्याचाहि एक वर्ग काढिला आहे. धार्मिक व सामाजिक प्रसंगनिमित्त स्त्रियांचीं वारंवार संमेलनें भरविण्यांत येतात. एकंदरींत विवाहित स्त्रियांनां थोड्या वेळांत आवश्यक आणि पुष्कळ ज्ञान संपादन करण्यास ही संस्था फार उपयोगी झाली आहे. संस्थेंत विणकामहि शिकविलें जातें. व या संस्थेच्या सर्व तऱ्हेच्या वर्गांत शिकणाऱ्या स्त्रियांची संख्या सुमारें १२५ आहे. संस्थेच्या तर्फे पांच नर्सेस् तयार होत आहेत सर्व कामाची व्यवस्था श्रीमती रमाबाईसाहेब रानडे या पहात असून त्यांनां श्रीमती सौ. काशीबाई कानिटकर, श्रीमती अन्नपूर्णाबाई आपटे, श्रीमती सौ. सीताबाई भांडारकर, श्रीमती यमुनाबाई भट, श्रीमती पार्वतीबाई जोशी प्रभृति स्त्रियांचें व पुण्यांतील प्रमुख नागरिकांचें फार साहाय्य आहे.

आर्यमहिलासमाज, मुंबई, १८८२.

बंगाल्यांत इंडियन रिफार्म ॲसोसिएशन नामक संस्था असे. तिच्याचसारखी येथें थीइस्टिक ॲसोसिएशन म्हणून संस्था स्थापन झाली होती. या संस्थेनें निरनिराळीं लोकोपयोगी कामें करावीं असें ठरलें होतें. त्याप्रमाणें स्त्रियांच्या सुधारणेच्या शाखेनें दर आठवड्यास स्त्रियांची सभा भरवून त्यांनां व्याख्यानद्वारा व प्रयोगद्वारा ज्ञानप्राप्ति करून देण्याचें काम १८७२ सालीं बाबू प्रतापचंद्र मुझुमदार यांनीं येथें असतां

श्रीयुत बाळकृष्ण ना. भाजेकर, बी. ए., एल् एल्. बी.; श्रीयुत गोपाळ कृष्ण देवधर, एम्. ए.; श्रीयुत भवानीदास एन. मोतीवाला, बी. ए., एल् एल्. बी., जे. पी.; मि. एच. ए. हुसेन, बॅरिस्टर-ॲट लॉ; मि. बैरामजी होर्मसजी; श्रीयुत नारायण मल्हार जोशी, बी. ए.; श्रीयुत आत्माराम सीताराम वाघ, हे सेक्रेटरी, आणि श्रीयुत रामचंद्र रावजी नावर, बी. ए., व श्रीयुत काशीनाथ रघुनाथ मित्र हे ट्रेझरर्स आहेत.

लीगचे उद्देश—समाजविषयक उपपत्ति व सामाजिक प्रश्न यांची प्रबुद्ध लोकमत तयार करण्याच्या दृष्टीनें चर्चा करणें, बहुजनसमाजाची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न करणें, आणि निरनिराळ्या मार्गांनीं समाजसेवा करणें. सध्यां प्रत्यक्ष समाजसेवेवर लीगनें जास्त भर ठेवलेला असून (१) बहुजनसमाजाचें शिक्षण; (२) आरोग्यरक्षणादि उपयुक्त बाबींच्या ज्ञानाचा प्रसार; (३) दुखणाइतांस तात्कालिक उपाय; (४) सामाजिक शुचितेची अभिवृद्धि; आणि (५) समाजसेवेच्या तत्त्वांचा प्रसार व समाजसेवेच्या निरनिराळ्या मार्गांचें दिग्दर्शन, असे आपल्या कार्याचे विभाग केलेले आहेत.

कार्में—मांडवी येथें लीगच्या मार्फत रात्रीच्या वेळीं मोफत शिक्षण देण्याची शाळा चालू आहे; मॅजिक लँटर्नच्या द्वारें विशेषतः मागसलेल्या लोकांत निरनिराळ्या माहितीची व्याख्यानें देण्यांत येतात; लोकशिक्षणाची जी विशेष महत्त्वाची बाब लीगनें हातीं घेतली आहे व जी फार लोकप्रिय होत आहे ती फिरत्या मोफत लायब्ररीसंबंधाची होय. दक्षिणी व गुजराथी मागसलेल्या लोकांच्या चाळींत तेथें वस्ती असेल त्याप्रमाणें मराठी अथवा गुजराथी पुस्तकांच्या लहान लहान (प्रत्येकी ५० पुस्तकांच्या) पेट्या ठेवण्यांत येतात. सुमारें दोन महिन्यांनीं त्या चाळींत दुसरी पेटी ठेवून ती पेटी निराळ्या चाळीमध्यें ठेवण्यांत येते. अशा रीतीनें पेट्या फिरत असतात. कित्येक ठिकाणीं निरक्षर लोकांनां आठवड्यांतून दोन-तीन वेळां पुस्तक वाचून दाखविण्याचीहि व्यवस्था केली आहे. सध्यां मराठी तिसांपेक्षां व गुजराथी विसांपेक्षां जास्त पेट्या लोकांच्या उपयोगांत आहेत. हल्लीं लायब्ररियनांचा एक क्लब सुरू करण्यांत आला असून लायब्ररी चालविण्याच्या कामांत एकमेकांच्या अडचणी सांगणें, सूचना करणें, असे या क्लबाचे उद्देश आहेत. चालू वर्षी हायस्कूलमधील गरीब विद्यार्थ्यांनां त्यांच्या कच्च्या विषयांत शिक्षण देण्यासाठीं कांहीं वर्ग चालविण्यांत आले होते. त्यांचा लाभ सुमारें पन्नास विद्यार्थ्यांनीं घेतला. लीगनें तात्कालिक मदती (First aid) च्या शिक्षणाचे वर्ग सुरू केले व त्यावरून 'सोशल सार्व्हिस लीग हिंदु डिव्हिजन ऑफ धी सेंट जॉन ॲम्ब्युलन्स ब्रिगेड' तयार करण्यांत आली. सदरील वर्ग इंग्रजी, मराठी व गुजराथी या तिन्ही भाषांत असून पुरुषांप्रमाणें स्त्रियांकरितांहि स्वतंत्र मराठी व गुजराथी वर्ग आहेत. त्याचप्रमाणें आरोग्यरक्षणाचे मराठी, गुजराथी व इंग्लिश वर्ग चालू आहेत. पुण्याजवळ साळुंब्रें येथें अग्निप्रलय झाला त्यावेळीं तेथील लोकांच्या संकट-निवारणार्थ ग्रँट मेडिकल कॉलेजमधील सुमारें वीस विद्यार्थी लीगचे स्वयंसेवक होऊन गेले होते. शिवाय त्या कामासाठीं लीगच्या कांहीं सभासदांनीं वर्गणीहि गोळा केली. गुजराथ, काठेवाड व कच्छ येथील दुष्काळाच्या निवारणार्थ लीगनें मुंबई शहरांत चाळी-चाळींत व घरोघरीं स्वयंसेवक पाठवून सुमारें २० हजार रुपये जमविले, व ते सेंट्रल फॅमिन फंडाच्या स्वाधीन केले.

धि स्टूडंटस् ब्रदरहुड, मुंबई, १८८९.

मुंबई शहरांत अत्यंत लोकोपयोगी व परोपकारनिरत ज्या कांहीं संस्था आहेत, त्यांत धि स्टूडंट्स् ब्रदरहुड, या संस्थेला उच्चस्थान दिलें पाहिजे. या संस्थेचा प्रारंभ विशेष गाजावाजा न करतां झाला. १८९० सालच्या प्रारंभीं प्रो. ना. गु. चेंबिलकर—यांनीं त्यावेळीं आपल्या अध्यापनाच्या आयुःक्रमास नुकतीच सुरवात केली होती—फ्रीजनरल असेंब्लीच्या शाळेंत शिकवीत असतां त्यांनां विद्यार्थ्यांच्या नैतिक शिक्षणाची फार आवश्यकता भासूं लागल्यामुळें त्यांनीं विद्यार्थ्यांकरतां असा एक वर्ग सुरू करून त्यांत विद्यार्थ्यांच्या नैतिक उन्नतीला उपयुक्त होईल, अशीं पुस्तकें वाचावयाचा क्रम सुरू केला. त्यांतील प्रत्येक विद्यार्थ्याला सत्य भाषण करणें, अश्लील अथवा शिवीगाळीची भाषा न वापरणें, या वर्गाची आपल्या मित्रवर्गाला माहिती करून देणें, व या नूतन संस्थेकरतां अल्पसा स्वार्थत्याग करणें, या चार साध्या तत्त्वांनीं स्वतःला बांधून घ्यावें लागे. या संस्थेला लवकरच 'स्टूडंटस् ब्रदरहुड' असें नांव देण्यांत येऊन पुस्तकालयासाठीं दर आठवड्यास वर्गणी गोळा करण्यांत येऊं लागली. हा वर्ग

दर रविवारीं अव्याहतपणानें भरत असे. पहिलीं तीन चार वर्षें या वर्गाच्या शिक्षकाचें काम एकटे प्रो. वेलिंकर यांनीं केलें व Tod's Student's manual व Blackie's Self Culture सारखीं पुस्तकें वर्गांत शिकविलीं. हळुहळू वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढूं लागल्यावरून प्रार्थनासमाजांत हा वर्ग भरूं लागला. तेव्हांपासून २० वर्षें हा वर्ग दर रविवारीं प्रार्थनासमाजमंदिरांत भरत आहे. या संस्थेचीं ध्येयें पुढील आहेत:—(१) अध्ययनाच्या सवईला उत्तेजन देणें; (२) बंधुभावाचें ध्येय नेहमीं बाळगणें; (३) उच्च आयुःक्रम अनुसरणें; व (४) या आयुःक्रमाला समाजसेवा हाच मार्ग होय अशी भावना धरणें. नवीन पिढ्यांची नैतिक स्थिति उच्च दर्जाची करण्याची उत्कट इच्छा बाळगणाऱ्या सर्व जातींतील गृहस्थांचें एकीकरण करण्याचा आपला उच्च उद्देश ही संस्था हळुहळू, पण दृढसेनें अमलांत आणीत आहे, व सर्व ज्ञातींतील प्रमुख व विख्यात गृहस्थांची सहानुभूति या संस्थेला मिळाली असून त्यांपैकीं पुष्कळांनीं या संस्थेच्या अध्यापकांचें किंवा व्याख्यात्यांचें काम केलें आहे. यांमध्यें ना. न्या. मू. सर नारायण चंदावरकर यांची प्रमुखत्वेंकरून गणना केली पाहिजे. मुंबईचे प्रख्यात दानशूर गृहस्थ मि. रतन टाटा यांच्या उदारतेमुळें या संस्थेला इमारतीची सोय झाली असून तींत या संस्थेचें वाचनगृह, पुस्तकालय व कार्यालय यांची स्थापना झाली आहे. या संस्थेच्या उद्देशांनां चहूंकडून सहानभूति मिळत असून तिच्याच धर्तीवर पुणें, अहमदाबाद, जुनागड, बडोदें व कारवार इत्यादि ठिकाणीं अशा संस्था स्थापन झाल्या आहेत. या संस्थेच्या A वर्गांत मुंबईतील अनेक उच्च दर्जाचे सुमारें २५० सभासद असून, B वर्गांत कॉलेजांत व हायस्कुलांत शिक्षण घेणारे २०० सभासद आहेत. शिक्षण, वाङ्मयात्मक किंवा व्याख्यानासाठीं भरविलेल्या सभा, आपल्या त्रैमासिकाच्या व शिक्षणविषयक साहित्याच्या द्वारें उच्च दर्जाच्या सामाजिक दळणवळणाला उत्तेजन, गरीब विद्यार्थ्यांनां प्रसंगानुसार मदत करणें, इत्यादि अनेक साधनांनीं जे पुढें नागरिक बनणार आहेत अशा विद्यार्थ्यांच्या अंतःप्रवृत्ति उदात्त, विकसित व उच्च करण्याचा ही संस्था जोरानें, उमेदीनें व नेटानें प्रयत्न करीत आहे. या संस्थेचे सर नारायण चंदावरकर हे अध्यक्ष आहेत.

धि बॉम्बे प्रेसिडेन्सी सोशल रिफॉर्म असोसिएशन, मुंबई, १९०३.

अमदाबाद येथें १९०२ सालीं भरलेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेंत पास झालेल्या एका ठरावाप्रमाणें सामाजिक सुधारणा प्रिय असलेल्या कित्येक सद्गृहस्थांच्या मंडलानें या संस्थेची १९०३ सालीं स्थापना केली. या संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणें आहेत–(१) शिक्षणानें, त्याचप्रमाणें स्त्रियांचा दर्जा ज्यांच्या योगानें हलका झाला आहे, अशा चालीरीतींचें निर्मूलन करून समाजांत स्त्रीजातीचा दर्जा वाढविणें; (२) मुलांमुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविणें, व बहुपत्नीत्वाची चाल नाहींशी करण्याचा प्रयत्न करणें, वगैरे वैवाहिक सुधारणा घडवून आणणें; (३) विधवापुनर्विवाहांत येणाऱ्या अडचणी दूर करणें; (४) भिन्न जाति व पोटजाति यांमध्यें रोटीबेटीव्यवहार वगैरे अनेक साधनांनीं अधिक प्रेमाचें दळणवळण चालू करणें; (५) परदेशगमनाला येणाऱ्या अडचणी दूर करणें; (६) मद्यपाननिषेध आणि कौटुंबिक व सामाजिक बंधनांतील शुद्धता यांनां उत्तेजन देणें. ही संस्था स्थापन झाल्यापासून गेल्या दहा वर्षांत, व्याख्यानें व सभा यांच्या द्वारें सुधारणेच्या कल्पनांचा फैलाव करणें, सामाजिक सुधारणांचीं जीं अनेक अंगें आहेत त्यांपैकीं एक अथवा अनेक अंगांचा प्रसार करणाऱ्या संस्थांनां द्रव्यद्वारा किंवा इतर रीतीनें प्रत्यक्षाप्रत्यक्ष साहाय्य करणें, इंग्रजींत किंवा देशी भाषांत सामाजिक सुधारणेसंबंधीं स्वस्त व लोकप्रिय पुस्तकें प्रसिद्ध करणें, वगैरे साधनांनीं आपले उद्देश साधण्यास ही संस्था अतिशय झटत आहे. मुलींकरतां वक्तृत्वसमारंभ करून त्यांनां बक्षिसें देणें, स्त्रियांकरितां गृहव्यवस्थेसंबंधीं व्याख्यानमाला सुरू करणें, कांहीं विधवांकरितां भाड्यानें जागा घेऊन त्यांच्या चरितार्थाची सोय करणें, निरनिराळ्या जातींत विधवापुनर्विवाह घडवून आणणें, मुंबईत व इतरत्र विधवाविवाहासंबंधीं सहानभूति मिळविण्यासाठीं सभा भरवून खटपट करणें, सहभोजनसमारंभ करून निरनिराळ्या जाति व पोटजाति यांमधील मंडळीमध्यें दळणवळण वाढविणें, मागसलेल्या अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीप्रीत्यर्थ खटपट करणें, मॅजिक लॅटर्न, व्याख्यानें वगैरे साधनांनीं मद्यपाननिषेधाविषयीं खालच्या वर्गांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न करणें वगैरे अनेक साधनांनीं

सामाजिक सुधारणेच्या प्रसाराविषयीं ही संस्था शक्य ते यत्न करीत आहे. या संस्थेचा २२००० रु. फंड असून त्यापैकीं १२००० रु. रानडे मेमोरियल फंडाकडून मिळाले आहेत. या संस्थेचे ना. न्या. मू. सर नारायण चंदावरकर हे अध्यक्ष आहेत.

विधवाविवाहमंडळी, पुणें, १८९९.

विधवाविवाहाच्या प्रसारास उत्तेजन द्यावें, त्याला अनुकूल असे लेख प्रसिद्ध करावे, व्याख्यानें द्यावीं, आणि पुनर्विवाहेच्छु स्त्रीपुरुषांच्या मार्गांतील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करून त्यांना मदत करावी, हा या संस्थेचा उद्देश आहे. प्रो. कर्वेप्रभृति सद्गृहस्थांच्या प्रयत्नानें सन १८९९ त ही मंडळी प्रथम वर्धा येथें स्थापिली व आतां तिचें ऑफिस पुणें, नारायणपेठ, घ. नं. ६, येथें आहे. संस्थेला ऊर्जितावस्था यावी म्हणून प्रो. कर्वे, प्रो. भाटे, श्रीयुत भाजेकर वकील इत्यादि सद्गृहस्थांनीं फार मेहनत घेतली आहे. ही मंडळी विवाहेच्छु विधवांस लागेल ती मदत पुरविण्यास तयार आहे. अशा विधवांस बहुजनसमाजाकडून त्रास होऊं नये म्हणून लग्न होईपर्यंत त्यांना योग्यस्थळीं ठेवण्याची तजवीजहि ही मंडळी करिते. असे विवाह यथासांग करण्यासाठीं श्रीयुत वामन विश्वनाथ जोशी हे उपाध्यायचें काम करण्यास तयार असून ते कोठेंहि जाण्यास तत्पर असतात. मंडळीचे अध्यक्ष डॉ. सर रामकृष्ण भांडारकर हे असून चिटणीस श्रीयुत रामचंद्र भिकाजी जोशी व श्री. दत्तात्रय लक्ष्मण सहस्रबुद्धे हे आहेत.

बॉम्बे टेंपरन्स काउन्सिल, मुंबई, १८९६.

(१) मुंबई इलाख्यांत ज्या मद्यपाननिषेधासंबंधी चळवळ करणाऱ्या किंवा त्याच्याशीं सहानुभूति असणाऱ्या निरनिराळ्या संस्था आहेत त्यांमध्यें एकी व सहकारिता वाढविणें, (२) या संबंधींच्या कायद्याच्या अमलबजावणीसंबंधानें सुधारणा घडवून आणून मद्यपानाच्या सवलतींना आळा घालणें व त्यावर लोकमताचा तावा राहील अशी शक्य ती तजवीज करणें, (३) मद्यपाननिषेधापासून होणाऱ्या फायद्याबद्दल लोकमत जागृत करणें, या स्तुत्य उद्देशांनीं ही संस्था स्थापन झाली असून सर भालचंद्र कृष्ण हे संस्थेचे अध्यक्ष; मि. अंडर्सन एम्. ए. जे. पी., हे उपाध्यक्ष व मेसर्स गिल्डर व फ्रिचले हे सेक्रेटरी आहेत.

होलिकासंमेलन जनरल कमिटी, मुंबई, १९११.

शिमग्याच्या सणांतील बीभत्स व अनीतिप्रवर्तक अत्याचार नाहींसे करून त्याला शुद्ध स्वरूप देणें व तद्द्वारा लोकमनःसंस्कृति साधणें हे हेतु धरून श्रीयुत भाजेकर, देवधर, कोरगांवकर, बोले, मित्र, जोशी प्रभृति सद्गृहस्थांच्या प्रयत्नानें या कमिटीची स्थापना झाली असून तिचें कार्य पुष्कळच यशस्वी होत आहे. या मंडळीचे अध्यक्ष डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर हे आहेत.

राजकीय संस्था.

धि बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन, मुंबई, १८८५.

प. वा. नौरोजी फर्दुनजी व परमपूज्य दादाभाई नौरोजी हे ज्या संस्थेचे प्रमुख चालक होते, अशा बॉम्बे असोशिएशनपासून ही संस्था अस्तित्वांत आली. प. वा. सर जमशेटजी जिजीभाई (तिसरे बॅरोनेट) हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष असून मि. (आतां सर) फेरोजशहा मेथा, प. वा. न्या. मू. तेलंग व मि. वॉचा हे पहिले सेक्रेटरी होते. सनदशीर पद्धतीनें लोकहिताची बाजू उचलून तिचा उत्कर्ष करण्याचे प्रयत्न करणें, हा या संस्थेचा उदात्त हेतु आहे. जरूर वाटेल तेव्हां जाहीरसभा भरवून सार्वजनिक कामाची चर्चा करणें, प्रांतिक व हिंदुस्थान सरकारला व ब्रिटिश पार्लमेंटला वेळोवेळीं लोकपक्षाच्या वतीनें निरनिराळ्या महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं अर्ज करणें, वगैरे अनेक साधनांनी ही संस्था आपल्या हेतूंच्या सिद्धयर्थ झटत आहे. या संस्थेनें प. वा. प्रो. फॉसेट यांच्या स्मारकाच्या विचारासाठीं जाहीरसभा भरवून, ब्रिटिश पार्लमेंटमध्यें जे कांहीं उदारधि इंग्रज मुत्सद्दी निरपेक्ष रीतीनें हिंदुस्थानची सेवा बजावीत होते, त्यांशीं आपली आभारपूर्वक सहानुभूति प्रकट केली. व १८८५

सालीं इंग्लंडांत पार्लमेंटची जी निवडणूक झाली त्या प्रसंगी मि. (आतां सर) नारायण ग. चंदावरकर यांनां हिंदीलोकांची स्थिति ब्रिटिशजनतेपुढें निवेदन करण्यासाठी आपल्या तर्फे मुद्दाम पाठविलें. मुंबईस पहिली राष्ट्रीय सभेची बैठक भरविण्याचें काम याच संस्थेनें आपल्या शिरावर घेतलें. १८८८ सालच्या म्युनिसिपल बिलांत लोकांच्या खऱ्या गरजांचा समावेश होण्यासंबंधें या संस्थेनें केलेली चळवळ चांगलीच फलद्रूप झाली. १८८८ सालीं पास झालेला हल्लींचा म्युनिसिपल ॲक्ट या संस्थेच्या घोरणी चळवळीचेंच फल होय. १८८९ सालीं ना. न्या. मू. तेलंग यांच्या जागीं श्रीयुत चंदावरकर हे संस्थेचे सेक्रेटरी झाले. याच सालीं राष्ट्रीय सभेच्या प्रसंगी असोसिएशन प. वा. मॅंडलॉ यांनां जाहीर मानपत्र दिलें. १८९२ सालीं लॉर्ड लॅन्सडौन साहेबांच्या कारकीर्दीत पास झालेल्या लेजिस्लेटीव्ह कौन्सिल ॲक्टाला अनुकूल रूप येण्यास याच संस्थेचे श्रम विशेषतः कारणीभूत झाले, असें म्हटलें पाहिजे. १८९५ सालीं पुण्यास झालेल्या जंगी काहुरांतून राष्ट्रीय सभा पार पडण्यास पुण्यांच्या कमिटीला या असोसिएशनचें चांगलेंच साहाय्य झालें. श्रीयुत चंदावरकरांची हायकोर्टात नेमणूक झाल्यावर १९०० सालीं ना. सेटलवाड यांची सेक्रेटरीच्या जागीं नेमणूक झाली. १९०२-३ सालीं बॉम्बे लँड रेव्हिन्यु कोड अमेंडमेंटचें पिंढेहाटीच्या धोरणाचें बिल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें आलें त्यावेळीं सरकारला अर्ज करून व ना. सर फेरोजशहा मेथा यांच्या अध्यक्षतेखालीं जंगी जाहीरसभा भरवून, या संस्थेनें चांगलीच चळवळ केली. १९०४ सालीं सर हेनरी कॉटन यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस भरलेल्या राष्ट्रीय सभेची बैठक व सरकाराकडूनहि पाठबळ मिळालेलें औद्योगिक प्रदर्शन अत्यंत यशस्वी होण्याला याच संस्थेचे परिश्रम कारण झाले. याच सालीं लॉर्ड कर्झन साहेबांचें युनिव्हर्सिटी ॲक्ट अमेंडमेंट बिल व ऑफिशियल सीक्रेट बिल यांविरुद्ध असोसिएशननें अर्जद्वारा सरकारला लोकमताचें दिग्दर्शन केलें. १९०५ सालीं ब्रिटिशजनतेसमोर हिंदुस्थानची खरी स्थिति निवेदन करण्यासाठीं असोसिएशननें ना. गोखले यांनां आपल्या तर्फे इंग्लंडला पाठविलें. १९०९ सालीं मोर्ले साहेबांनीं हिंदी कौन्सिलाविषयीं सुचविलेल्या सुधारणांबद्दल त्यांचें असोसिएशननें जाहीर अभिनंदन केलें. अशा रीतीनें ही अत्यंत उपयुक्त संस्था आपलें कर्तव्य निःस्वार्थतेनें व लोकहितैकदृष्टीनें चोख बजावीत आली आहे. सर. फेरोजशहा मेथा हे असोसिएशनचे अध्यक्ष असून मेसर्स वाचा, सेटलवाड, समर्थ व तय्यबजी हे सेक्रेटरी आहेत, अपोलो बंदरावर रेडिमनि बिल्डिंगमध्यें ही संस्था असून तिचें आजपर्यंतचे महत्त्वाचे राजकीय विषयांवरील बहुतेक ग्रंथ असलेलें एक मोठें पुस्तकालय आहे.

सार्वजनिक सभा, पुणें.

महाराष्ट्रांतील गेल्या दोन पिढ्यांतील ही मुख्य खासगी राजकीय संस्था होय. इंग्रजी अमलांत नवीन शिक्षणास सुरुवात झाल्यावर राजकीय व औद्योगिक अशा चळवळींचा उगम पुण्यास झाला व सार्वजनिक सभा ही महाराष्ट्रांतील या चळवळींचें आद्य अधिष्ठान होय. तिच्या पहिल्या अनेक चालकांपैकीं प. वा. श्रीयुत गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका हे प्रमुख होत. रा. ब. रानडे हे सरकारी नोकरींत होते, तरी पहिल्यापासून त्यांचें सभेच्या कामांत लक्ष्य असे, व त्यांच्याच उद्योगामुळें व उत्साहामुळें सभेचें स्थानिक व महाराष्ट्रीय स्वरूप जाऊन सर्व हिंदुस्थानांतील लोकमतास मान्य असें स्वरूप तिला आलें. महाराष्ट्रांतील राजेरजवाड्यांचाहि सार्वजनिक सभेस आश्रय होता, व तिचे अध्यक्ष व उपाध्यक्ष बहुतेक संस्थानिकांपैकींच होते. सभेच्या सेक्रेटरीचें काम प. वा. श्रीयुत शिवराम हरी साठे यांजकडे पुष्कळ वर्षे होतें. तथापि, सभेचें खरें महत्त्व तिनें चालविलेल्या त्रैमासिकामुळेंच होतें, व या त्रैमासिकाचें संपादकत्व प्रथम श्रीयुत सीताराम हरि चिपळूणकर, त्यानंतर ना. श्रीयुत गोपाल कृष्ण गोखले, सी. आय्. ई., व त्यानंतर श्रीयुत महादेव राजाराम बोडस यांजकडे होतें. सदरहू मासिक पुस्तक सन १८९७ पर्यंत चालू होतें. या त्रैमासिकांत महाराष्ट्रांतील जुन्या राजकीय विचारांचें उत्कृष्ट प्रतिबिंब दिसून येतें. सभेची सांपत्तिक स्थिति सांतल्यासांत बरी आहे. ह्मणजे सभेच्या कायमच्या फंडाचें व्याज व बंगल्याचें भाडें मिळून चांगल्या प्रकारचें ऑफीस निरंतर चालण्यास पुरेसें आहे.

राष्ट्रीयसेवेची संस्था.

सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी—भारतसेवकमंडळी, पुणें, १९०५.

गेल्या पन्नासपाऊणशें वर्षांत वाढला इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारावरोबर लोकांत सार्वजनिक हिताची आस्था उत्पन्न होऊन तें साधण्याकरितां निरनिराळ्या चळवळी चालू झाल्या; परंतु कोणतीहि चळवळ जोरानें चालण्यास व तिच्यापासून कायमचें कार्य होण्यास तिला वाहिलेली अशी सुशिक्षित, श्रद्धावंत व उत्साही तरुण पिढीतील मंडळी पुढें सरसावली पाहिजे, व तशी सत्त्वशील वृत्तीची स्वार्थत्यागी व होतकरू मंडळी मिळाल्यास सद्यःस्थितींत देशकल्याणाच्या कामास निराळें स्वरूप येऊन तें नेटानें होऊं लागेल. अशा भरंवशानें आपल्या अंगाच्या दीर्घोद्योगानें, अत्यंत उदारबुद्धीनें, उदात्त विचारांनीं, निस्सीम देशभक्तीनें, विलक्षण स्वार्थत्यागानें व हिंदी राष्ट्रांतील

मानितो, व श्राद्ध, मूर्तिपूजा वगैरेस मुळींच मानीत नाहीं. समाजास विधवाविवाह मान्य असून बालविवाहास हा निषिद्ध समजतो. हा समाज कोणत्याहि धर्मांतील लोकांनां आर्यधर्मांत समाविष्ट करून घेतो. समाजानें आजपर्यंत तीन लाख लोकांनां वैदिक धर्म मानण्यास लाविलें आहे; बीस अनाथाश्रम स्थापिले असून त्यांत तीन हजार अनाथांचें पालणपोषण होत आहे. समाजाचीं पस्तीस वर्तमानपत्रें असून पंधरा छापखाने आहेत. दहावारा गुरुकुलें असून त्यांत ८०० वर ब्रह्मचारी विद्याध्ययन करीत आहेत. सवाशेंवर विद्यालयें असून त्यांत ३००० वर विद्यार्थी व विद्यार्थिनी शिकत आहेत. यांशिवाय ८५ शाळा व एक कॉलेज फक्त मुलांकरितां असून त्यांत ३५०० मुलें शिकत आहेत. या समाजाची स्थावर मिळकत २५ लाखांची आहे, व दरवर्षी बारा लाख रुपये धर्मोदाय मिळकत आहे. अज्ञानानें धर्मांतर केलेल्या लोकांस हा समाज पवित्र करून परत हिंदु करीत आहे. मुंबई आर्यसमाजाचे अध्यक्ष श्रीयुत दामोदरदास सुंदरदास हे आहेत.

थिऑसॉफिकल सोसायटी, मुंबई, १८८०.

थिऑसॉफिकल सोसायटीची मूळ स्थापना अमेरिकेंत न्यूयॉर्क येथें सन १८७५ सालीं झाली. थिऑसॉफिकल सोसायटीची पहिली शाखा—हिलाच पुढें 'ब्लॅव्हॅट्स्की लॉज' असें नांव देण्यांत आलें—मॅडम ब्लॅव्हट्स्की व कर्नल ऑलकॉट यांनीं मुंबई येथें १८८० सालीं स्थापन केली. थिऑसॉफिकल सोसायटीप्रमाणेंच या लॉजचेहि उद्देश पुढीलप्रमाणें आहेतः—(१) ज्ञाति, धर्म, वर्ण, लिंग यांमध्यें बिलकूल भेदाभेद न करतां मानव्याच्या सार्वत्रिक बंधुलाचें -Universal brotherhood of humanity- एकीकरण करणें; (२) धर्म, तत्त्वज्ञान यांचा तुलनात्मक रीतीनें अभ्यास करण्यास उत्तेजन देणें; (३) गूढ सृष्टिधर्म व मनुष्याच्या ठायीं वसत असलेल्या गूढ शक्ति यांचा शोध करणें. हे उद्देश ज्यांनां मान्य आहेत अशा सर्व धर्मांतील (किंवा ज्यांनां कोणताहि धर्म मान्य नाहीं अशा) तत्त्वजिज्ञासुजनांची ही थिऑसॉफिकल मंडळी बनली आहे. ही सोसायटी बिलकूल ज्ञातिविषयक नसून सर्व धर्मांची व सर्व जातींची विद्वान् मंडळी एकजुटीनें केवळ सत्याच्या एकान्तिक शोधानें सोसायटीचे मुख्य उद्देश पार पाडण्यासाठीं अविरत प्रयत्न करीत असतात. मनन, निदिध्यास, जीवनशुद्धता व उच्चतम ध्येयांची भक्ति या साधनांनींच सत्याचें अन्वेषण करणें उचित आहे, असा या मंडळ्याचा दृढ विश्वास आहे. सर्व धर्मांविषयीं सहानभूति बाळगून सोसायटी अज्ञानांधकाराचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न करते. शांति हें तिचें जीवनाधार तत्त्व असून सत्य हें परम ध्येय आहे. लॉजची स्थापना झाल्यानंतर कांहीं वर्षें सोसायटीला बरीच अडचणींची गेलीं; परंतु पुढें पुढें सर्व अडचणी नाहींशा होऊन मिसेस ॲनिबेझंट या सोसायटीच्या अध्यक्ष झाल्यावर तिचे हेतु चांगले सफल होऊं लागले व थिऑसॉफिचें वाङ्मयहि पुष्कळ वाढलें. थिऑसोफीनें वेद, अवस्ता, बुद्धधर्माचे ग्रंथ इत्यादि पौर्वात्य वाङ्मयाची नूतन गोडी जगाला लावून दिली असून मानवजीविताचे अनेक चमत्कारिक प्रश्न सुटतील असें एक तत्त्वज्ञान तिनें निर्माण केलें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. जगांतील सर्व धर्मांच्या मुख्य धर्मकल्पनांत एकच तत्त्व निहित झालें आहे, हें सोसायटीनें जगाच्या चांगलें निदर्शनास आणून दिलें आहे. या लॉजचें एक वाचनालय-पुस्तकालय व पुस्तकविक्रीचें दुकानहि आहे. लॉजचे २१५ सभासद असून त्यांत ३५ स्त्रिया आहेत. थिऑसॉफिकल सोसायटीच्या मुंबईंत याशिवाय चार शाखा असून त्या सर्वां मिळून सुमारें २१० सभासद आहेत. लॉजचे मि. विमादलाल हे अध्यक्ष आहेत.

थिऑसॉफिकल सोसायटीचा धर्मालयाश्रम, मुंबई, १९१०.

कुल, धर्म, स्त्रीपुरुष, जाति व शरीरवर्ण या सर्व भेदांनां हातीं धरून मानवांच्या विश्वबंधुलाचा केंद्र निर्माण करणें, वेगवेगळे धर्म, तत्त्वविचार आणि शास्त्रें यांचें सापेक्ष अध्ययन करण्याच्या कामीं प्रोत्साहन देणें, आणि अव्यक्त सृष्टिधर्माची आणि मानवाच्या गूढ सामर्थ्याची विचारणा करणें, हे या संस्थेचे प्रधान उद्देश आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ. वि. सो. त्रिलोकेकर, एल्. एम्. एस्. व श्रीयुत पं हे असून चिटणीस श्रीयुत दि. शि. भांडारकर हे आहेत.

सत्यसमाज, पुणें, १८७३.

सर्व माणसें ईश्वराचीं लेकरें आहेत असें मानणें, ईश्वरप्राप्तीकरितां मध्यस्थ न योजणें, शिक्षणप्रसार करणें हे या संस्थेचे मुख्य उद्देश आहेत. हा समाज

प्रथम पुणें येथें प. वा. श्रीयुत जोतीराव फुले यांनीं स्थापिला, व त्याच्या शाखा आतां मुंबई, नाशिक, बनसेंदें, करजगांव वगैरे ठिकाणीं निघाल्या आहेत. प.वा. श्रीयुत भालेकर, रा. व. नारायणराव लोखंडे, श्रीयुत वासुदेवराव बिर्जे वगैरे सद्गृहस्थांनीं आरंभीं संस्थेकरितां फार श्रम केले. सांप्रतहि श्रीयुत भास्करराव जाधव, एम्. ए., एल्एल्. बी.; श्रीयुत बापुराव आवटे, बी.ए., एल्एल् बी.; प्रो. डोंगरे, बी. एस्सी.; प्रो. लेहे एम्. ए., प्रभृति थोरथोर गृहस्थ या समाजाच्या उत्कर्षाकरितां फार झटत आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ. संतुजी रामजी लाड हे असून सेक्रेटरी श्रीयुत बापूराव गायकवाड व श्रीयुत कृ. क. चौधरी हे आहेत.

धि वैदिक असोसिएशन, कोल्हापुर, १९१०.

अद्वैत, तत्त्वज्ञान व धर्म यांतील रहस्य दाखविणें, नीतितत्त्वांचा प्रसार करणें, व प्रचलित सर्व धर्मांचें ऐक्यवर्धन करणें हे या संस्थेचे उद्देश आहेत. ही संस्था श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य विद्याशंकर भारती (मठ करवीर व संकेश्वर) यांनीं स्थापिली. या संस्थेच्या शाखा हल्लीं यूरोप व अमेरिकाखंडांत, लंडन, बर्मिंगहॅम, ग्लासगो, एडिंबरो, न्यूकॅसल, लिव्हरपूल, साऊथपोर्ट, नॉटिंगहॅम, ऑक्सफर्ड, डब्लिन, बेलफास्ट, न्यूयार्क, बफेलो, रॉचेस्टर, डेनव्हर, वॉशिंगटन, मॉन्ट्रीऑल वगैरे ठिकाणीं स्थापिल्या आहेत. या संस्थेमार्फत डॉ. खेडकर आणि मिसेस खेडकर यांनीं पाश्चिमात्य राष्ट्रांत व्याख्यानें देऊन संस्थेच्या तत्त्वांचा बराच प्रसार केला आहे.

वाङ्मयसंस्था.

मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १८९८.

चांगल्या ग्रंथांचा संग्रह होऊन अगदीं सुलभ रीतीनें त्याचा वाचकवर्गास उपयोग व्हावा म्हणून ही संस्था श्रीयुत अं. गो. पुणतांबेकर; प. वा. श्रीयुत शं. ह. शेजवलकर; व प. वा. श्रीयुत श्री. बा. मोडक या गृहस्थांनीं अनेक मित्रांच्या साह्याध्यानें स्थापिली. आज या संस्थेची चांगलीच स्थिति आहे. संस्थेला मोठमोठ्या लोकांचा आश्रय असून स्वतंत्र फंड उभारून संस्थेनें आपली एक इमारतहि बांधिली आहे. इमारतीच्या कामास श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं पांच हजारांची देणगी दिली आहे. संस्थेजवळ आज दहा हजार ग्रंथसंग्रह आहे. ठाणें येथें असेंच एक ग्रंथसंग्रहालय असून पुणें येथें नवीन होत आहे.

सहविचारिणीसभा, बडोदें, १९१०.

मराठी भाषेची सेवा करणें हा या संस्थेचा उद्देश असून त्या दिशेनें तिनें बरेच प्रयत्न केले आहेत. प. वा. श्रीयुत शंकर मोरो रानडे हे या सभेचे मुख्य आधारस्तंभ होते. हल्लीं श्रीमंत संपतराव गायकवाड वगैरे बडोद्यांतील अनेक सद्गृहस्थांच्या मदतीनें सभेचें काम चाललें आहे. इ. स. १९०९ सालीं या सभेमार्फत महाराष्ट्रसाहित्यसंमेलनाची बैठक बडोद्यास झाली होती. हल्लीं सभेच्या यादीवर सुमारें ८० सभासद असून, तिचा फंड सुमारें चार हजार रुपये आहे.

साहित्यसंमेलन.

महाराष्ट्रसाहित्याची सर्व बाजूंनी प्रगति व्हावी या हेतूनें अनेक विद्वानांच्या सहानुभूतीनें आणि साह्याध्यानें ही संस्था सातारा येथें स्थापन झाली. आजपर्यंत या संस्थेमार्फत सातारा, पुणें, बडोदें व अकोलें येथें महाराष्ट्र भाषेचा उत्कर्ष इच्छिणाऱ्या विद्वानांचीं संमेलनें भरून त्यांत अनेक साहित्यविषयक निबंध वाचले गेले. संमेलनामार्फत एकदोन महत्त्वाचीं पुस्तकेंहि प्रसिद्ध झालीं आहेत. श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे, बी. ए., हे संमेलनाचे चिटणीस आहेत.

परोपकारी संस्था.

मुक्तिफौज (सालव्हेशन आर्मी.) १८७७.

मुक्तिफौजेचे उत्पादक विल्यम बूथ हे होत. मनुष्य कितीहि सदाचारभ्रष्ट व दुर्वृत्त झाला तरी त्याला सदाचाराने व योग्य उद्योगधंदा करून आयुष्य घालविण्याची संधि दिली पाहिजे, त्याला स्वतःच्या पायांवर उभें राहण्यास समर्थ केलें पाहिजे, व जरूर तितकीच विनमोबदला मदत केली पाहिजे आणि धार्मिक व नैतिक शिक्षणानें त्याच्या अंतःकरणांत आत्मोन्नतीची इच्छा जागृत करून त्याचा स्वभाव बदलला पाहिजे, असें मुक्तिफौजेचें तत्त्व असून, आजवर अनेक पतित स्त्रीपुरुषांनां या संस्थेनें सन्मार्गावर आणलें आहे. मद्यप्यांनां ताळ्यावर आणणें, कुमार्गास लागलेल्यांनां त्या मार्गापासून परावृत्त करणें, आजाऱ्यांची शुश्रूषा करणें, भुकेनें तळमळणारांनां अन्न देणें, अनाथ मुलांचें संरक्षण करणें, जीवितास कंटाळून आत्महत्येस प्रवृत्त होणारांनां पुनः सुखानें संसारयात्रा क्रमण्यास मदत करणें, ज्यांनां घरदार नसेल त्यांनां आसरा देणें, व असें करितांना त्या सर्वांच्या मनांत धर्मबुद्धि व नीतिमार्गाची आवड उत्पन्न करणें, अशीं कामें मुक्तिफौजेचे लोक पृथ्वीवरील निरनिराळ्या देशांत करीत आहेत. या देशांची व वसाहतींची संख्या ५९ असून फौचेच्या अंमलदारांची व इतरांची संख्या सुमारें २१, ४०० आहे. बिनपगारी स्थानिक अमलदार ५९ हजारांवर आणि बिनपगारी वाद्यें वाजविणारे (बँडसमेन) २३ हजारांवर आहेत. निरनिराळ्या २५ भाषांत मुक्तिफौजेचीं नियतकालिकें प्रसिद्ध होत असून साप्ताहिकें व मासिकें यांची संख्या ७७ आहे, व त्यांचा दर अंकाचा प्रसार ११ १, १२, ५९७ आहे. गरीब लोकांकरितां ९९६ संस्था असून त्यांत दररोज ३४५०० लोकांची सोय होण्यासारखी आहे. पतित व चुकीनें नीतिभ्रष्ट झालेल्या स्त्रियांकरितां उद्धारगृहें व सूतिकागृहें यांची संख्या १४० असून एका वर्षांत ६२९२ स्त्रियांनीं त्यांचा लाभ घेतला. तुरुंगांत पडलेल्या अपराधी लोकांकरितां स्थापलेल्या संस्थांचा एका वर्षांत २६५९ माणसांनीं लाभ घेतला. एका वर्षांत गरीब लोकांनां ११,८३९,४३७ जेवणें व ६,३२७, २४९ बिछाने यांचा अगदीं स्वस्त दरानें पुरवठा करण्यांत आला आणि ३७,५३८ लोकांनां काम (हंगामी व कायमचें) पुरविण्यांत आलें.

हिंदुस्थानांतील काम—हिंदुस्थानांत मुक्तिफौजेकडून चाललेलें अत्यंत महत्त्वाचें काम म्हटलें म्हणजे चोऱ्या करणें, दरवडे घालणें हाच ज्यांचा पिढीजाद धंदा आहे अशा गुन्हेगार जातींच्या लोकांनां प्रामाणिकपणें उद्योगधंदा करावयास लावणें व त्यांच्या मनांत लुटारूपणाच्या धंद्याविषयीं तिरस्कार उत्पन्न करणें, हें होय. मुक्तिफौजेनें या लोकांसाठीं उद्योगधंद्याच्या व शेतकीच्या निराळ्या वसाहती स्थापल्या असून त्यांची संख्या संयुक्तप्रांतांत ७, व पंजाबमध्यें ४ आहे. शिवाय मुलांकरितां ३ उद्योगशाळा आहेत. याखेरीज हिंदुस्थानात निरनिराळ्या ठिकाणीं शेतकऱ्यांसाठीं स्वस्त व्याजानें पैसे कर्जाऊ देण्याच्या पेढ्या, धान्याचीं कोठारें, दुष्काळात माणसें व गुरें यांनां खाण्यास उपयोगीं पडणाऱ्या कंदांची व झाडांची लागवड, मलेरियाच्या प्रतिकारार्थ 'न्यूकॅलिप्टस' झाडाची लागवड, शाळा, उद्योगगृहें वगैरे कामें मुक्तिफौजेनें चालविलीं आहेत. फौजेचे अंमलदार (हिंदी व यूरोपीयन मिळून) व इतर कामगार हिंदुस्थानांत २४९२ असून त्यांतील फक्त २०७ यूरोपीयन व अमेरिकन आणि बाकीचे सर्व हिंदी आहेत. बारा भाषांमध्यें काम चालतें. खेड्यांतील दिवसाच्या शाळा ४३५ असून त्यांत शिकणाऱ्या मुलांची संख्या १०,००० आहे. मुलांकरितां उद्योगशाळा १८ असून त्यांत ८०० मुलांची सोय आहे. गुन्हेगार जातींच्या ११ वसाहतींतील पुरुष, बायका व मुलें यांची संख्या २३०० वर आहे. शेतकीच्या वसाहती ५ असून २२५०० एकर जागा त्यांनीं व्यापिली आहे. नीतिभ्रष्ट स्त्रियांसाठीं ४ उद्धारगृहें असून त्यांत १०० जणांची सोय आहे. मागांचे कारखाने व विणकामाच्या शाळा १९ असून त्यांत १५० माग चालू असतात. रेशमाच्या लागवडीचे कारखाने, ५ हॉस्पिटलें, ३ डिस्पेन्सरीज, २० खेडेगांवांतील सेंट्रल बँकस् इतकीं कामें फौजेकडून या देशांत

चालतात. एकंदर १२४ सामाजिक संस्था असून त्यांत २५०० माणसांची काळजी घेतली जाते.

महाराष्ट्रांतील काम—खुद्द महाराष्ट्रांत ५० वर खेड्यांतील शाळा असून तेथें १००० विद्यार्थी शिकत आहेत. मुलगे व मुली यांकरितां दोन उद्योगगृहें आहेत.

मुक्तिफौजेंत शिस्त कडक असून अगदीं निर्वाहापुरत्या वेताच्या पगारावर मोठमोठ्या अंमलदारांनांहि रहावें लागतें. मुक्तिफौजेंत समाविष्ट होणाऱ्या इसमानें कोणत्याहि प्रकारच्या मादक पदार्थांचें सेवन करूं नये असा निर्बंध असून प्रत्येकाला तशी शपथ घ्यावी लागते.

अनाथबालकाश्रम आणि बालहत्या-प्रतिबंधक गृह, पंढरपुर, १८७५.

अज्ञानामुळें आणि विशेषेंकरून हिंदुसमाजांतील वरिष्ठ वर्गांत चालू असलेल्या जबरीच्या वैधव्यामुळें ज्या हतभागी बायकांचें, दुराचारी नरपशूंच्या दुष्ट वासनांनां बळी पडून वांकडें पाऊल पडतें, त्यांजवर संतति होण्याची वेळ आली असतां मोठा दुर्धर प्रसंग ओढवून व गर्भपाताच्या मार्गास लागून त्या अनेक अनर्थांत सांपडतात, व आपली आणि आपल्या कुळाची बदनामी करून घेतात. अशा अजाण विधवांच्या अब्रूचें रक्षण करून त्यांनां सदाचाराकडे वळविणें व त्यांच्या पोटीं जन्मलेल्या निरपराधी बालकांचें प्राणरक्षण करणें, हा पंढरपुर बालहत्याप्रतिबंधक गृहाचा उद्देश आहे, आणि १६ वर्षांच्या आंतील कोणत्याहि जातीच्या मुलांनां या अनाथबालकाश्रमांतून धार्मिक, औद्योगिक वगैरे शिक्षण दिलें जातें. या आश्रमांत मुलींचीहि सोय केली आहे. बालहत्याप्रतिबंधक गृहाचा आजपर्यंत ६०० वर विधवांनीं आश्रय घेतला असून, गृहामध्यें जन्मलेल्या व बाहेरून आलेल्या मुलांची संख्या सुमारें २॥ हजारांपर्यंत गेली आहे. प. वा. रा. ब. लालशंकर उमियाशंकर हे आश्रमाचे उत्पादक होत. इ. स. १८७५ च्या ग्रीष्म ऋतूंत एके दिवशीं पहाटेस चंद्रभागेच्या कांठीं फिरत असतां त्यांनां ठेंच लागली. पायास काय लागलें तें नीट न्याहाळून पहातां एक जीवंत मूल आहे असें त्यांनां आढळून आलें. त्या मुलाचें अंग रक्तानें भरलेलें असून नाळ न कापतांच एका लुगड्याच्या चिंधींत कोणीं तरी, गुंडाळून त्याला तेथें टाकिलें होतें. रा. व. लालशंकर यांनीं त्या अर्भकास मोठ्या प्रेमानें घरीं आणून त्याच्या पालनपोषणाकरितां आपल्या पत्नीच्या देखरेखीखालीं एका दाईच्या स्वाधीन केलें व अशा रीतीनें या आश्रमाची स्थापना झाली. या दोन्ही संस्थांची सर्व प्रकारची व्यवस्था मुंबईच्या प्रार्थनासमाजाकडे आहे. तरी पण पंढरपुरास एक स्थानिक कमिटी नेमलेली असते. प्रत्यक्ष काम करण्याकरितां समाजानें नेमिलेले सुपरिंटेंडेंट श्रीयुत केरो रावजी भोसले हे आहेत. या संस्थांचा कायमचा फंड ४०,००० रुपये असून त्यावरील वार्षिक व्याजाचें उत्पन्न फक्त १३०० रुपयांचें मिळतें. वार्षिक खर्च ६००० रुपयांचा आहे. मासिक व वार्षिक वर्गणीदारांची संख्या १०८ असून त्यांजकडून वार्षिक रु. ३३५ चें उत्पन्न मिळतें. बाकीची तूट भरून काढण्याकरितां या संस्थांस सार्वजनिक मदतीवर अवलंबून रहाणें भाग पडतें.

हिंदु क्षयरोग्यांकरितां काळें येथील हिंदु सॅनिटोरियम, १९११.

क्षयरोगाचा प्रसार वाढत्या प्रमाणावर असून हजारों मुलें व तरुण लोक दरवर्षी या रोगास बळी पडत आहेत. स्त्रियांनां तर या रोगाची बाधा विशेषच होते. शहरांतल्या गचडीच्या वस्तींत प्रकाश व हवा हीं भरपूर नसलेल्या जागेंत राहणाऱ्या लोकांमध्यें क्षयरोगाचा फार प्रसार दिसून येतो, आणि सांप्रत दळणवळणाचीं साधनें सुलभ झालेलीं असल्याकारणानें आणि क्षयरोग हा सांसर्गिक असल्यामुळें, लहान लहान शहरांत व गांवांत या रोगाचा प्रसार अधिकाधिक प्रमाणानें होऊं लागला आहे. क्षयरोग बरा करण्याचा मुख्य उपाय म्हणजे रोग्यास स्वच्छ, मोकळ्या व कोरड्या हवेच्या ठिकाणीं ठेवून त्याला पथ्यकारक राणेंपिणें मिळेल अशी व्यवस्था करणें व तशा स्थितींत औषधोपचार करणें हाच आहे, असें पाश्चिमात्य देशांतील सर्व प्रमुख भिषग्वर्यांचें मत आहे. इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांत लोक व सरकार यांच्यामार्फत चांगल्या हवेच्या जागीं क्षयरोग्यांकरिता आरोग्यगृहें (Sanitoria) बांधण्यांत आलेलीं आहेत, व त्यामुळें क्षयरोगापासून होणाऱ्या मृत्युसंख्येस बराच आळा पडला आहे. मुंबई इलाख्यांत पारशी लोकांसाठीं क्षयरोग्यांचें आरोग्यभवन देवळाली येथें आहे व त्याचा त्या समाजांतील लोकांनां चांगला उपयोग होतो. हिंदूंकरितां तशी सोय नव्हती. हिंदूंची संख्या जास्त असून त्यांच्यांतील क्षयरोगापासून

सी. हिंदुजिमखाना' असा नामकरणविधि करण्यांत येऊन त्याचें स्वरूप विस्तृत करण्यांत आलें आहे.

डेक्कनजिमखाना, पुणें, १९०६.

हिंदी व परदेशी खेळांनां आणि व्यायामांनां उत्तेजन देणें, सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांत ऐक्य वाढविणें, इत्यादि संस्थेचे उद्देश आहेत. लॉर्ड हॅरिस यांच्या वेळीं 'यंगमेन्स क्रिकेट क्लब' सुरू झाला होता, त्याचेंच रूपांतर होऊन हा जिमखाना निघाला आहे. या संस्थेच्या आरंभींच तिला मदत झणून श्रीमंत जमखिंडीकर यांनीं २०००, श्रीमंत शाहु छत्रपति महाराज करवीर यांनीं १५००, साठे मेमोरियल फंडापैकीं १६००, मुधोळकर यांनीं १०००, बडोदेंसरकार व करंजीकर यांजकडून प्रत्येकीं ५०० आणि रा. सीतारामपंत पटवर्धन यांनीं १००० रु. ही संस्था स्थापण्यांत डॉ. देशमुख व श्रीयुत बी. भाजेकर यांची खटपट विशेष कारणीभूत झाली संस्थेच्या उत्कर्षास बहुतांशीं प. वा. एल्. आ भाजेकर यांचें श्रम फारच कारणीभूत झाले आहे आजपर्यंत संस्थेचे अध्यक्ष नामदार गोखले हे हो हल्लीं नामदार जी. एस्. कर्टिस हे आहेत.

जातिसंस्था.

मराठा ऐक्येच्छु सभा, मुंबई, १८८७.

मागसलेल्या जातींत शिक्षण प्रसार करून त्यांची सामाजिक, धार्मिक वगैरे बाबींत उन्नति करणे, हा संस्थेचा उद्देश आहे. सभेचा फंड २००० रु. असून गरीब विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ति देण्यांत येतात. संस्थेनें आजवर पुष्कळ व्याख्यानें करविलीं असून अनेक निबंध व लेख छापून फुकट वांटले आहेत, व मागासलेल्या वर्गांत शिक्षणप्रसार करण्यास सरकारांतहि खटपट केली आहे. व्यवस्थापकमंडळांत श्रीयुत का. रा. कोरगांवकर, रा. सा. बा. भि. ता. नाखवा पाटील, श्रीयुत कृ. भि. लालये, सी. के. बोले, रा. सा. मानाजी राजूजी; श्रीयुत मुकुंद मो. खांडेके; श्रीयुत का. दे. धुरू; श्रीयुत आ. स. डोंगरे; श्रीयुत मा. म. खांडेरे; श्रीयुत धों. पा. वनकर; श्रीयुत रा. ज. आव्हाड; श्रीयुत मं. रा. झात्रे; श्रीयुत वि. वा. चिखले; श्रीयुत दा. कृ. दळवी; श्रीयुत गो. दा. नाईक, ॲडव्होकेट; श्रीयुत भि. रा. नेरे; डॉ. ल. ब. भागळकर एल्. एम्. एस्., श्रीयुत स. वि. कीर, श्रीयुत कृ. अं. केळुसकर; श्रीयुत य. ता. माणगांवकर, श्रीयुत दा. कृ. दळवी, श्रीयुत मा. पां. नागवेकर, श्रीयुत रा. वि. वेंडेकर, तुकाराम जावजी जे. पी., दा. सा. यंदे प्रभृति विविध मागसलेल्या निरनिराळ्या जातींचे प्रमुख गृहस्थ आहेत.

मराठा क्षत्रियसमाज, मुंबई, १९०८.

मराठा क्षत्रिय ज्ञातीतील गरीब होतकरू मुलांच्या शिक्षणाला स्कालरशिपा, पुस्तकें वगैरे रूपानें मदत व उत्तेजन देणें; सामाजिक नैतिक व धार्मिक सुधारणा घडवून आणणें; ज्ञातीतील थोर व विख्यात मंडळींचीं चरित्रें प्रसिद्ध करणें; ज्ञातीतील मंडळीची जंत्री तयार करणें वगैरे अनेक उद्देशांनीं हा समाज स्थापन झाला आहे. श्रीशाहुछत्रपति महाराज, कोल्हापुर; देवासचे महाराज; जतचे राजे, व ना. श्रीमंत भुसिंह राजे वगैरे राजे व अनेक सरदार या समाजाचे आश्रयदाते आहेत. डॉ. वामनराव माधवराव कदम हे अध्यक्ष व श्रीयुत यशवंत बळवंत राणे आणि श्रीधर रामचंद्र बागवे देसाई हे सेक्रेटरी आहेत.

महाराष्ट्र क्षत्रिय हितचिंतक-सभा-ग्वालेहर, १९०६.

मराठा वर्गाची सार्वत्रिक उन्नति करणें हा या संस्थेचा उद्देश आहे. ज्ञातिबांधवांनां सुलभपणें शिक्षण मिळावें झणून एक बोर्डिंगहौस उघडण्यांत येणार आहे, त्यासाठीं एक फंडहि उभारला असून त्याची रकम पन्नास हजारां पर्यंत गेली आहे. गरीबांचीं लग्नें करणें, मृतविधि, मद्यपान निषेध वगैरे बाबींतहि संस्था द्रव्यद्वारा मदत करीत असते. आज संस्थेजवळ सुमारें तीन हजार रुपये शिल्लक आहेत. संस्थेला मोठमोठे सरदार, जहागिरदार राजेरजवाडे इत्यादि थोर लोकांचा आश्रय आहे.

ब्राह्मणसभा, मुंबई, १८८८.

कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे इत्यादि ब्राह्मणांतील पोट भेदांत प्रेमैक्य वाढावें, ज्ञानप्रसार व्हावा व उन्नति व्हावी झणून हा समाज स्थापिला आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख एम्. डी., हे असून सेक्रेटरी श्रीयुत ल. चिं. गोळे बी. ए., एल्एल्. बी., व श्रीयुत म. व. जोशी हे आहेत.

क्षात्रैक्यसमाज, मुंबई, १८८५.

सोमवंशी क्षत्रिय ज्ञातीची ऐक्यवृद्धि व उन्नति करणें हा समाजाचा उद्देश आहे. त्याचप्रमाणें ज्ञातींत विद्याप्रसार, गरीब बंधुभगिनींस साहाय्य व सामाजिक सुधारणा, या कामीं समाजाकडून दरवर्षी ५०० रु. खर्च होत असतो. या समाजामार्फत पुढील फंडांची व्यवस्था होत असते:—

१. नर्मदाबाई धनमाळी फंड—स्थापना १८९१; फंडाची रकम २५०० रु.; वार्षिक उत्पन्न रु. ८७-८-०.

२. जनार्दन राघोबा वनमाळी फंड—स्थापना १८९९; रकम ६००; उत्पन्न २१०.

३. सोमवंशी क्षत्रिय पाठारे फंड—स्थापना १८९३; रकम ३३००. उत्पन्न ११५-८.

४. दैनिक फंड—वार्षिक उत्पन्न ४०० रुपये.

सर्व फंडांची मिळून रकम २५०००; व इमारतफंडाची रकम ३००० झाली आहे. श्रीयुत पांडुरंग जखंत चेंबुरकर हे समाजाचे अध्यक्ष असून श्रीयुत सदानंद कृष्णराव सहानी हे चिटणीस आहेत.

सारस्वतब्राह्मणसमाज, मुंबई, १८९६.

गौडसारस्वत ब्राह्मणांमधील सर्व पोटभेदांतील गृहस्थांत प्रेम व ऐक्य वाढविणें, नैतिक व सामाजिक सुधारणा करणें, व ज्ञानप्रसार करणें हा या संस्थेचा उद्देश आहे. संस्थेनें एक ग्रंथसंग्रहालयहि स्थापिलें आहे. संस्थेचे अध्यक्ष श्रीयुत अनंत विश्वंभर साखरदांडे, वकील व चिटणीस श्रीयुत ना. ग. कानविंदे, हे आहेत.

सारस्वत ज्ञातींत मुंबईत ह्याचप्रमाणें बाहेरगांवीहि आणखी बरेच समाज आहेत. त्यांतील बहुतेकांचे वरील सारखेच म्हणजे सर्व पोटभेदांचें एकीकरण करण्याचे उद्देश असून कित्येक समाज फक्त कांहीं विवक्षित पोटभेदांसाठींच आहेत.

सोमवंशी निराश्रित सुधारक मंडळी, मुंबई, १९०७.

महार लोकांत विद्येचा प्रसार करून मद्यपानासारख्या दुष्ट चालींचा नाश करावा म्हणून ही संस्था स्थापन झाली आहे. या धोरणानें संस्थेमार्फत एक मोफत शाळा आणि लायब्ररीहि उघडण्यांत आली आहे. संस्थेनें आजवर १७०० रु. खर्च केले आहेत. संस्थेचे अध्यक्ष श्रीयुत संभाजी संतूजी वाघमारे घोडेकर हे असून सेक्रेटरी श्रीयुत केशव बापू लादे तडसरकर हे आहेत.

महार व मांग जातीच्या आणखी संस्था आहेत त्या:—

महार जातींच्या मुलांकरितां बोर्डिंग, अकोला.

सन्मार्गबोधक निराश्रित समाज, मोहपा. नीच मानलेल्या जातींचा उद्धार करणें हा या समाजाचा उद्देश आहे. समाजातर्फे एक वाचनालय, निराश्रित हिंदनागरिक नांवाचें मासिक पुस्तक, एक छापखाना, वगैरे चालू आहेत. श्रीयुत किसन फागू महार हे या संस्थेचे चालक आहेत.

सोमवंशी महार जातीची उन्नति करणारी मंडळी, पुणें. मुरळ्यांची चाल बंद करणें व जातीची सुधारणा करणें हा इचा उद्देश आहे.

थुगांव येथेंहि एक जातीच्या उन्नतीकरितां मंडळी स्थापिली आहे. भजनसमाज, वाचनालय वगैरे मार्गांनीं खटपट चालू आहे.

मुंबई येथें श्रीयुत कोंडीबा मास्तर, श्रीयुत ह. फ. पिंपरीकर वगैरे मंडळी जातीच्या उन्नतीकरितां झटत आहेत.

कामठी येथें श्रीयुत ल. उ. वगरारे वगैरे मंडळींनीं महार लोकांकरितां एक वाचनालय स्थापिलें असून अन्य मार्गांनींहि त्यांची खटपट चालू आहे.

धापेवाडा येथें महार जातीकरितां शूद्रोन्नति नांवाचें एक वाचनालय स्थापिलें आहे.

रहाटगांव येथें **मांग** जातींच्या उन्नतीसाठीं श्रीयुत नारायण बंसी मांग प्रभृति सद्गृहस्थ खटपट करीत आहेत.

रोहिदास हितवर्धकसमाज, मुंबई.

चांभार ज्ञातीची उन्नति करणें, हा या समाजाचा उद्देश आहे.

कित्तेभंडारी ऐक्यवर्धक सभा, मुंबई, १८९०.

कित्तेभंडारी ज्ञातींत ऐक्य व विद्यावर्धन करणें हा या संस्थेचा उद्देश आहे. सभेमार्फत दोन मोफत शिक्षण देणाऱ्या शाळा चालू आहेत. गरीब विद्यार्थ्यांना मदतहि करण्यांत येते. कार्यकारी मंडळांत श्रीयुत सी. के. बोले जे. पी., श्रीयुत स. वि. कीर., डॉ. साळुंखे प्रभृति आहेत.

पाठारे प्रभु सोशल समाज, मुंबई, १८८८.

ज्ञातींत ऐक्यवृद्धि करणें, वाङ्मय व वक्तृत्वास उत्तेजन देणें, व ज्ञातीची सार्वत्रिक उन्नति करणें, हें या संस्थेचें उद्दिष्ट आहे. ना. न्या. श्रीयुत गणपत सदाशिव राव यांच्या देणगीतून या संस्थेस जोडून एक वाचनालयहि उघडलें आहे. संस्थेचे अध्यक्ष श्रीयुत नारायण गजानन जयकर, बी. ए., हे असून सेक्रेटरी श्रीयुत म. वा. कोठारे व स. ना. अजिंक्य हे आहेत.

पाठारे प्रभु ज्ञातींत आणखी पुढील संस्था आहेत:—

धि पाठारे प्रभु लेडीज फ्रेन्डली सोसायटी, मुंबई, १९१०.

ज्ञातींतील गरजू स्त्रियांना शिवणाची वगैरे कामें देऊन त्यांना साहाय्य करण्याच्या उद्देशानें ही संस्था स्थापन झाली असून श्रीयुत आनंदराव विनायक विजयकर हे अध्यक्ष व श्रीयुत रामचंद्र आर. धराधर व श्रीयुत यशवंत एम्. राणे, बी. ए. हे सेक्रेटरी आहेत.

पाठारे प्रभु सोशल क्लब, मुंबई, १८८८.

सभासदांत प्रेम व सहानुभूति वृद्धिंगत करणें व ज्ञातींत सामाजिक ऐक्य वाढविणें या उद्देशानें हा क्लब स्थापन झाला आहे. क्लबचे रा. ब. धाकजी काशीनाथ जे. पी. हे अध्यक्ष, ना. न्या. मू. ग. स. राव हे उपाध्यक्ष व डॉ० गो. भा. प्रभाकर एल्. एम्. ॲण्ड एस्. एल्. आर्. सी. पी. व श्रीयुत नानुजी हरिश्चंद्र विजयकर हे सेक्रेटरी आहेत.

पाठारे प्रभु धर्मादाय, मुंबई, १९०१.

ज्ञातींच्या धर्मादाय मिळकतींचा ताबा घेऊन त्या चालविणें हा या संस्थेचा उद्देश आहे. श्रीयुत आनंदराव हरिश्चंद्र हे संस्थेचे अध्यक्ष व श्रीयुत रामचंद्र राघोबा धराधर व श्रीयुत लक्ष्मण बाळकृष्ण नायक हे सेक्रेटरी आहेत.

प्रभु सेमिनरी, मुंबई, १८५५.

ज्ञातींतील मुलांनांच शिक्षण देण्याचा पहिल्यानें संस्थास्थापकांचा हेतु होता; परंतु त्याला पुढें विस्तृत रूप देऊन सर्व जातींच्या मुलांनां या संस्थेमार्फत शिक्षण देण्यांत येतें. ना. न्या. मृ. राव हे अध्यक्ष व श्रीयुत सुंदरराव गजानन जयकर एम्. ए., बी. एस्सी. हे संस्थेचे सेक्रेटरी आहेत.

पाठारे प्रभु ज्ञातींतील कलाकौशल्यप्रदर्शन कमिटी, मुंबई, १९०९.

ज्ञातींतील कलाकुशल स्त्रीपुरुषांस उत्तेजन देण्याचा या संस्थेचा उद्देश आहे. १९०९ सालीं मुंबईत या कमिटीमार्फत जें जगी प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें, तें फारच अपूर्व होतें. या कमिटींत डॉ. त्रिलोकेकर, चित्रकार धुरंधर प्रभृति सद्गृहस्थ असून स्त्रीसल्लागार कमिटींत मिसेस अर्जिक्य, मिसेस जयकर, मिसेस देसाई प्रभृति स्त्रिया आहेत. संस्थेजवळ १५०० रुपयांचा फंट आहे.

दैवज्ञ असोसिएशन, मुंबई, १९०३.

दैवज्ञ ब्राह्मणज्ञातीची सामाजिक, शिक्षणविषयक व सर्वसाधारण उन्नति करणें, हा या संस्थेचा उद्देश आहे. ज्ञातींतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांनां अनेक प्रकारानें ही संस्था साहाय्य देत असते. दैवज्ञ जातीची परिषद् अस्तित्वांत आणण्यास या संस्थेचे श्रम बहुतांशीं कारण झाले आहेत. स्त्रियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन भरविण्याच्या कामींहि या संस्थेनें खटपट केली आहे. स्त्रीवर्गांत जागृति व्हावी म्हणून या संस्थेनें एक स्त्रीशाखाहि स्थापिली असून त्यांतील स्त्रीसभासदांची संख्या समाधानकारक आहे. संस्थेचे अध्यक्ष प्रो. विनायकराव नानाभाई हाटे, बी. एस्सी., हे असून चिटणीस श्रीयुत शामराव नारायण धुळेकर व श्रीयुत केशव हरी पौडवाल हे आहेत.

दिगंबरजैनोन्नतिफंड, सोलापुर, १९०८.

संस्कृत व इंग्रजी शिकणाऱ्या जैन विद्यार्थ्यांस मदत करणें, दुष्काळपीडित जैनांस साहाय्य देणें, व जैनशास्त्रांचा जीर्णोद्धार करणें, यासाठीं हा फंड निघाला आहे. याची रकम ६७२५ वर आहे.

नामदेवसमाजोन्नतिपरिषद्, कोल्हापुर, १९०७.

नामदेव शिंपी समाजांत एकी वाढविणें, ज्ञानप्रसार करणें, आणि मद्यपानादि निंद्य चालींचा प्रतिकार करणें, हें या परिषदेचें उद्दिष्ट आहे. ही परिषद् अस्तित्वांत येण्यास श्रीयुत बाळकृष्ण सावळाराम वारटक्के, बी. ए., एल्एल्. बी., व श्रीयुत रामचंद्र बाळकृष्ण बोधे यांचे श्रम विशेष कारणीभूत झाले आहेत. नामदेव समाजाच्या निरनिराळ्या सभा पुष्कळ ठिकाणीं होत्या, त्यांच्या एकीकरणानें विशेष कार्य घडवून आणण्यासाठीं ही योजना केली आहे. परिषदेनें 'नामदेव शिक्षणफंड' १९०८ सालीं सुरू केला आहे, व त्यांतून गरीब विद्यार्थ्यांनां मदत होत असते. संस्थेनें एक 'नामदेव बोर्डिंग' उघडलें असून ती इमारत कोल्हापुरच्या महाराजांनीं संस्थेला बक्षीस दिली आहे. संस्थेनें 'नामदेव' नांवाचें एक मासिक पुस्तक सुरू केलें असून चालू साली 'नामदेव सहकारी मंडळी' नांवाचीहि एक संस्था स्थापिली आहे. पुण्यास एक वाचनालयहि उघडण्यांत आलें आहे. संस्थेमार्फत 'नामदेव पैसाफंड' सुरू झाला असून मुंबईस 'नामदेव सामाजिक संस्था' स्थापन झाली आहे.

श्रीमद्वीरशैवजनहितैषी मं० सोलापुर, १९०८.

वीरशैव समाजाची सार्वत्रिक उन्नति करणें हा या मंडळीचा प्रधान उद्देश आहे. श्रीयुत चनवसप्पा बसलिंगाप्पा उंबरजे यांनीं या संस्थेस १००० रु. मदत केली आहे. संस्थेच्या उत्कर्षास श्रीयुत मलप्पा हत्ती, श्रीयुत गुरुशांतप्पा अण्णा, श्रीयुत शंकरप्पा उंबरजे यांचे परिश्रम विशेषतः कारणीभूत झाले आहेत. शिलक सुमारें १७०० रुपये आहे.

चौकळशी ऐक्यवर्धक मंडळी, मुंबई, १९०२.

स्वज्ञातीची उन्नति करणें, विद्याकलाकौशल्याचा प्रसार करणें, व नैतिक धार्मिक बाबींत सुधारणा करणें, हा या संस्थेचा उद्देश आहे. प्रथम ही संस्था १८९२ सालीं कांहीं खटपटी गृहस्थांनीं स्थापिली; मध्यंतरीं बंद पडली होती ती पुनः १९०२ सालीं कांहीं तरुण व उत्साही गृहस्थांनीं सुरू केली. आज संस्थेकडे १२५० रु. शिलक आहेत. संस्थेच्या उत्कर्षास श्रीयुत स. वा. वैद्य, श्रीयुत पं. पां. क्षात्रे बी. ए., एल्. सी. ई.; डॉ शा. वा. क्षात्रे, एल्. एम्. एस्., जे. पी., श्रीयुत प. वि. क्षात्रे. बी. ए., श्रीयुत ज. गो. वैद्य इत्यादि सद्गृहस्थांचे परिश्रम व साहाय्य कारणीभूत झालीं आहेत.

त्वष्टा कासार श्रीमहाकाली संस्थान, मुंबई, १७६२.

अनाथ, पंगू लोकांनां मदत करणें, दीन लोकांचा प्रेतसंस्कार आणि संस्थानचीं इतर कार्यें या संस्थानांतून होत असतात. संस्थानचें वार्षिक उत्पन्न सुमारें ९००० रु. आहे. संस्थानांतून १५ हजार रुपये घेऊन एक बिल्डिंग फंड उभारण्यांत आला आहे.

हिंदु यूनियन क्लब, मुंबई, १८७५.

हिंदु ज्ञातींतील भिन्नभिन्न पोटजातींच्या मंडळींत एकमेकांबद्दल प्रेम व सहानुभूति वाढून सामाजिक दळणवळण वृद्धिंगत व्हावें, या उद्देशानें या क्लबाची स्थापना झाली आहे. मुंबईत व बाहेर करण्यांत येणारे सहभोजन व इतर सभारंभ, सभा, व्याख्यानें, मनोरंजनाचे नानाप्रकार वगैरे साधनांनीं हा क्लब आपला उद्देश सिद्धीस नेण्याचा यत्न करीत आहे. क्लबच्या मार्फत मुंबईस दरवर्षी हेमंतव्याख्यानमाला होत असून तींत मुंबईतील व बाहेरगांवच्या विद्वान् मंडळींचीं निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें होत असतात. क्लबमध्यें बिलियर्ड खेळण्याचीहि सोय आहे. क्लबचे अध्यक्ष सर भालचंद्र कृष्ण हे असून मुंबईतील बहुतेक पुढारी सभासद आहेत.

इंग्लंडांत हिंदुस्थान.

इंग्लंडांतील हिंदी लोकांच्या कांहीं संस्था.

[श्रीयुत हरिश्चंद्र आनंदराव ताल्चेरकर, बी. ए., लंडन.]

एका महर्षीनें झटल्याप्रमाणें 'इंग्लंड व भारतवर्ष यांचे परस्पर हितसंबंध मुदैवानें एक सूत्रानेंच बद्ध झाल्यापासून ' प्रारंभीं प्रारंभीं अनेक सामाजिक अडचणींला धैर्यानें दूर सारूनहि विद्या-कला—सं पा द ना र्थ, व्यापाराकरितां किंवा प्रवासानें मनःसंस्कृति करून घेण्यासाठीं दरसाल शेंकडों हिंदी तरुण इंग्लंडास जात असतात. ब्रिटिश साम्राज्याची राजधानी जी लंडननगरी, तिच्यामध्येंच वर निर्दिष्ट केलेल्या नानाविध हेतूंच्या संपादनार्थ गेलेल्या हिंदी तरुणांची संख्या हल्लीं दोन हजारांहून कांहीं अधिकच असेल.



श्रीयुत हरिश्चंद्र आनंदराव ताल्चेरकर, बी. ए.

ही संख्या यापेक्षांहि अधिकाधिक वाढली असती; परंतु इसवी सन १९१० सालीं अमलांत आलेल्या नवीन नियमाप्रमाणें हिंदी विश्वविद्यालयाच्या पदवीधरां (Graduates) नांच लंडनशहरांतील कायद्यांच्या पाठशाळां (Inns of Courts) त दाखल करण्यांत येत असल्यामुळें, पूर्वी हिंदी विश्वविद्यालयांत प्रवेशपरीक्षेपर्यंत कसेंबसें शिक्षण आटोपून बार—ॲट—लॉ होण्यासाठीं चैनीनें इंग्लंडास येणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची संख्या कांहींशी कमी झाली आहे; तथापि या नियमाचा व्हावा तितकामात्र हिंदी विद्यार्थ्यांवर परिणाम झाल्यासारखें दिसत नाहीं. धड प्रवेशपरीक्षेपर्यंतहि अभ्यास न झालेले बरेच हिंदी विद्यार्थी मँचेस्टर किंवा डब्लिनसारख्या युनिव्हर्सिटीची Preliminary परीक्षा सहज उत्तीर्ण होऊन Inns of Courts मध्यें दाखल झालेले दृष्टीस पडतात.

सन १९०९ सालीं कांहीं हिंदी तरुण विद्यार्थ्यांचीं डोकीं राजकीय कारणांमुळें अतिशय बहकून गेल्याचें आढळून आल्यामुळें सेक्रेटरी

ऑफ् स्टेट फॉर इंडिया यांनी हिंदी विद्यार्थी व सद्गृहस्थ यांनां रहाण्याकरितां २१ क्रॉम्वेलरोडवर एक स्वतंत्र संस्था स्थापन केली आहे. याच इमारतींत असलेल्या नॉर्थब्रूक सोसायटी व इंडियन नॅशनल असोसिएशन या संस्थाहि त्याच संस्थेला सामील झाल्या आहेत. या दोन्ही संस्था मिश्र (Cosmopolitan) स्वरूपाच्या असून त्या हिंदी विद्यार्थ्यांसून या संस्थेला एक उत्तम पुस्तकालय व वाचनालय जोडलीं आहेत.

सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांनीं स्थापन केलेल्या संस्थेंत हिंदी प्रवाशांची उत्तम सोय होते. येथें दर माणशीं दर आठवड्यास सुमारें पंचवीस शिलिंग खर्च पडतो. हिंदी प्रवाशांची दुसरीकडे कोठें उतरण्याची सोई नसल्यास २१ क्रॉम्वेल-



नॉर्थब्रूक सोसायटीचे सभासद.

च्या फार उपयोगी पडतात. इंडियन असोसिएशनच्या सेक्रेटरी मिस् इ. जे. बेक या बाई हिंदी विद्यार्थ्यांशीं अत्यंत ममतेनें वागून त्यांच्या संकटप्रसंगीं त्यांनां तनुमनोधनेंकरून अतिशय साहाय्य करतात.

नॉर्थब्रूक सोसायटी ही एका प्रकारचा क्लबच होय. तेथें टेनिस, बिलियर्ड वगैरे खेळांच्या सोई रोड, या पत्त्यावर, हिंदी विद्यार्थ्यांनां शिक्षणासंबंधीं सल्लागार ह्मणून नेमलेले प्रोफेसर आर्नोल्ड यांनां तार केली असतां त्यांच्यामार्फत सर्व सोय होते. प्रोफेसरमजकुरांचें कार्यालयहि याच इमारतींत आहे. प्रोफेसरसाहेब सदोदित हिंदी विद्यार्थ्यांनां सर्व प्रकारची माहिती व साहाय्य द्यावयास तत्पर असतात.

नॉर्थब्रूक सोसायटी व नॅशनल इंडियन असोसिएशन या संस्थांच्या विद्यमानें वारंवार निरनिराळ्या प्रकारचीं संमेलनें भरत असतात. अशा प्रसंगीं नामांकित इंग्लिश स्त्रीपुरुषांशीं हिंदी लोकांचा परिचय होऊन परस्परांचें दळणवळण वाढावयाला मदत होते. संमेलनांस हिंदी लोकांविषयीं सहानुभूति व कळकळ बाळगणारे अनेक वजनदार इंग्रज स्त्रीपुरुष बहुधा हजर असतात. या दोन्ही संस्था सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांच्या सहानुभूतीनें व मदतीनें उत्तम प्रकारें चालल्या असून दिवसेंदिवस अधिकाधिक हिंदी लोक त्यांचा लाभ घेत आहेत.

सरकारी आधकारी व इंग्रज लोक यांच्या विशेष साहाय्याशिवाय हिंदी लोकांनींच चालविलेल्या अनेक संस्था इंग्लंडांत आहेत. बहुतेक प्रत्येक प्रमुख शहरांत अशी हिंदी संस्था (Indian Association) आहेच. त्या त्या शहरीं असणारे हिंदी लोक अशा संस्थेचे सभासद असतात. अशा तऱ्हेच्या धि मँचेस्टर इंडियन असोसिएशन्, धि बर्मिंगहम् इंडियन असोसिएशन्, धि एडिंबरो इंडियन् असोसिएशन्, धि ग्लास्गो इंडियन असोसिएशन वगैरे अनेक संस्था हिंदी लोक मोठ्या उत्साहानें व एकजुटीनें चालवीत असून इंग्लिश लोकांच्या साहाय्याशिवायहि त्यांचीं संमेलनें वगैरे उत्तम रीतीनें पार पडतात; हें त्यांना खरोखर भूषणास्पद आहे.




नॉर्थब्रूक सोसायटी ॲट होम.

मिस् सिंह. मिसेस सेन. मिसेस भोलानाथ; मिस् चतरजी; मिसेस प्रसाद; मिसेस बहादुरदिन, मिसेस दुबे;—मिस् सिंह.

खुद्द लंडनशहरांत अशा प्रकारच्या धि इंडियन सोशल क्लब, व धि इंडियन यूनियन

लंडन हॉलमधें रेस्टुरांमधें विजयादशमीनिमित्त भरलेलें हिंदी लोकांचें संमेलन.



लंडन येथें मॉरिस रेस्टरांमध्यें दयानंद वैदिक कॉलेजांतील विद्यार्थ्यांचें झालेलें डिनर.

झणून चहाहि तयार नव्हता. तेव्हां उगीच एकटें बसण्यापेक्षां दाजीसाहेबांकडे तरी फेरफटका करून यावें, असा त्यानें विचार केला.

दाजीसाहेब पुढील दालनांत बाण्याचा हिशेब चुकवीत बसले होते. राजेसाहेबांची मंडळी माडीवर अजून इकडेतिकडे अस्ताव्यस्त घोरतच पडली होती. विनायक दाजीसाहेबांजवळच एका खुर्चीवर बसला आणि 'ज्ञानप्रकाशा'चा ताजा अंक पडला होता, तो घेऊन वाचूं लागला; वाचूं लागला म्हणण्यापेक्षां अक्षरांवरून आपली दृष्टि फिरवूं लागला, असें झणणेंच अधिक बरोबर होईल. त्याचे डोळे ज्या अक्षरांवरून फिरत होते, तीं अक्षरें समजून घ्यावयाचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला, पण व्यर्थ! त्याच्याविरुद्ध त्याचे नेत्र क्षणोक्षणीं इकडे तिकडे चोरून पहावयाला लागत. एकदां त्याला वाटे, कीं, धीर करून माडीवरून जाऊन यावेंच. पण कां कोण जाणे, वर जावयाला त्याला कांहीं धीर होईना. चंपूताईकडून—नव्हे राणीसाहेबांकडून —विनायकाची जिज्ञासा पूर्ण होण्याचा संभव होता; पण या वेळीं त्यांची भेट होणें शक्य नव्हतें. दाजीसाहेबांना विचारून पहावें तर—पण छे! हा काय भलताच विचार!

याप्रमाणें 'ज्ञानप्रकाशा'चीं पानें उलटसुलट करून बराच वेळ आपल्या मनाची चलबिचल झांकण्याचा प्रयत्न विनायकानें चालविला होता, इतक्यांत दारापुढें एक बैलाची गाडी येऊन उभी राहिली.

"काहुणे मंडळीपैकी आज कोणी जाणार आहे वाटतें?" विनायकानें विचारलें.

"मला कांहीं माहीत नाहीं बुवा!" असें म्हणत दाजीसाहेब चौकशी करण्याकरतां उठत आहेत, इतक्यांत माडीवरून एक शोक गृहस्थ सामानसुमान घेऊन खालीं उतरले. त्यांच्याबरोबर दोन मुलें होतीं, त्यांनीं हातांत गवसणी घातलेले तंबोरे घेतले होते. सर्वांच्या मागून हातांत डबा घेऊन एक मुलगी उतरली.

या इसमाला पहातांच दाजीसाहेबांनीं जागेवरून उठून विचारलें "काय बुवासाहेब, आजच निघालां? इतकी घाई कां? इतक्यांतच आमचा कंटाळा आला वाटतें?"

"वाहवा! असें कसें?"

"आपल्यासारख्या प्रेमळ मनुष्याचा सहवास भाग्यानेंच लाभतो. मी आणखी आनंदानें येथें राहिलों असतों; पण सासुरास जायचें आहे. तेथें माझे मोडशीलच!"

"बरें आहे, या!" [illegible] गायनानें समारंभास फार शोभा आली."

दाजीसाहेब उठले [illegible] पत्र टाकून देऊन खुर्चीवरून उठला. असलेली मुलगीच पहांटे गर्दीवर [illegible] हें चटकन् त्याच्या लक्ष्यांत आलें. आपण कांहींतरी बोलावें, असें [illegible] पण एक तर त्याला काय बोलावें हें सुचेना शिवाय ती मंडळी तितक्यांत गाडीत दाजीसाहेबांबरोबर विनायकहि त्यांनी बाहेर ओट्यावर आला. गाडी अदृश्य [illegible] दृष्टि तिकडेच लागून राहिली होती. [illegible] घेऊन जामदारसाहेब ओट्यावर येऊन बसले. पुरी गुंडाळू मिळाल्यापासून ते जरा चेतले.

विनायकानें त्यांना विचारलें "काय हो साहेब, तुमच्या गवईबुवांनां तुम्हीं जाऊं दिलें? तुम्ही आहांत तोंपर्यंत त्यांना घेतलें नाहीं?"

"जाऊंद्या कीं! त्याला काय करावयाचें?" जामदारसाहेबांनीं [illegible] "आमचे खास गवई जरा आजारी होते, या बुवासाहेबांनां मुद्दाम इंदूहून बोलावून हे कोण मिजाजखोर! म्हणे अमुक दिवस रोजचे तीस रुपयेप्रमाणेंच फी घेऊं! बरें गेली! आपल्याला असलीं कलमबहाद्दर लोकांतर साफ आवडत नाहींत! परवां रात्रीं [illegible] झालें, तेव्हां बक्षीसाहेबांनीं 'जरा बहार' म्हणायला फरमाश केली. तेव्हां हे 'हा कल्याणराग सूर्यास्ताचे सुमाराला सुरू आतां रात्रीचे बारा वाजून गेले, तेव्हां यावयाचाच नाहीं.' अशाबद्दल खालील पोटबा

'गुडेरीन' ने आजपर्यंत हजारों बायकांचे जीव काळाचे जबड्यांतून सोडविले आहेत.

अभ्यासाकडे लक्ष्य लागतें, असा त्याचा समज असल्यामुळें त्यानें प्रथम तर्कशास्त्र वाचावयास घेतलें होतें. बराच वेळ विनायक वाचनांत अगदीं गढून गेला होता. कांहीं वेळ गेल्यावर वाऱ्यानें एकाएकीं टेबलावरील मेणबत्ती विझाली. ती पुनः लावण्याकरितां तो उठला. पण काड्यांची पेटी कांहीं त्याला लवकर सांपडेना! म्हणून त्यानें टेबलाजवळची खिडकी उघडली, तों एकदम बाहेरून गायनाचा मधुर ध्वनि त्याच्या कानीं पडला. इतक्या पहांटेस कोण गात आहे, याचें आश्चर्य वाटून विनायक बाहेर पाहूं लागला व देहभान विसरून तें गाणें ऐकत राहिला.



गल्लींत चहूंकडे सामसूम होतें. गायनाचा मधुर ध्वनि येतो आहे तरी कोठून, हें विनायकाला कळेना. हळुहळू ताना उंच उंच सप्तकांत संचार करूं लागल्या, आणि त्यांची गतिहि द्रुततर होत चालली. विनायक आपला चष्मा साफ करून पुनः चोहोंकडे निरखून पाहूं लागला, तों काय आश्चर्य! पलीकडेच दाजीसाहेबांच्या गच्चीवर तेरा चौदा वर्षांची एक बालिका गायनांत अगदीं निमग्न झाली आहे, असें त्याला आढळून आलें. मंद चंद्रप्रकाशांत तिचें स्वरूप विनायकाला तितकें स्पष्टपणें दिसलें नाहीं. पण तिच्या कर्णमनोहर हृदयंगम गायनावरून तिच्या सौंदर्याची कल्पना कोणालाहि सहज करतां आली असती.

बालिका केवळ आपल्या गायनांत अगदीं तन्मय झाली होती. नाहीं तर समोरच्याच खिडकींत आपल्याकडे अचल दृष्टीनें पहात उभा असलेल्या विनायकाकडे तिचें लक्ष्य कधींतरी खास गेलें असतें. सुंदर प्रभातकालाला सर्वथा अनुरूप अशा भैरवी रागांत ती पुढील श्लोक म्हणत होतीः—

विरलविरलीभूतास्तारः कलौ सुजना इव
व्यपसरति च ध्वान्तं चित्तात्सतामिव दुर्जनः।
मन इव मुनेः सर्वत्राऽपि प्रसन्नमभून्नभो
विगलति निशां क्षिप्रं लक्ष्मीरनुद्यमिनामिव॥

विनायकानें आजपर्यंत अनेक गवयांचीं गाणीं ऐकिलीं होतीं; पण गायनांत अननुभूत अशा मनोवृत्ति खडबडून जागृत करण्याची जी विलक्षण जादू आहे, तिचा प्रत्ययत्याला आजच्याइतका कधींहि आला नव्हता!

हळुहळू अरुणोदय होऊं लागला. विनायकाचें लक्ष्य त्या बालिकेकडे अगदीं वेधून गेलें होतें. पण थोड्याच वेळांत ती हृदयहारिणी बालिका गात गात गच्चीवरून निघून गेली. विनायक मात्र होता तेथेंच निश्चल उभा राहिला. त्याचें लक्ष्य आतां गच्चीकडे नव्हतें. गच्चीवर आतां लक्ष वेधण्यासारखें होतें काय? विनायकाच्या नेत्रांत चमकणाऱ्या तेजावरून त्याच्या समोर कल्पनासृष्टीतील एक अत्यंत सुंदर असें चित्र उभें असावें, असें दिसत होतें. त्याचा मोहक चेहरा या वेळीं अधिकच मोहक दिसूं लागला. विनायक याप्रमाणें कितीतरी वेळ त्या स्थितींत वेड्यासारखा उभा होता.

शेवटीं, खिडकींतून लख्ख सूर्यप्रकाश आंत पडला, तेव्हां चमकल्यासारखें करून तो आपल्या जागेवरून हालला. तर्कशास्त्राचें पुस्तक टेबलावर तसेंच उघडें पडलें होतें. तें बंद करून विनायक खालीं आला. भाऊसाहेबांनां उठण्यास आज थोडा उशीर झाला होता,

क्रिकेट, टेनिस, हॉकें वगैरे खेळ खेळल्यानें लायूंस बरेच श्रम पडतात. अशांनीं ऑडमन्स सायप्रस साल्व्ह लायूंस चोळल्यास ते फारच बळकट होतात.

झणून चहाहि तयार नव्हता. तेव्हां उगीच एकटें बसण्यापेक्षां दाजीसाहेबांकडे तरी फेरफटका करून यावें, असा त्यानें विचार केला.

दाजीसाहेब पुढील दालनांत वाण्याचा हिशेब चुकवीत बसले होते. राजेसाहेबांची मंडळी माडीवर अजून इकडेतिकडे अस्ताव्यस्त घोरतच पडली होती. विनायक दाजीसाहेबांजवळच एका खुर्चीवर बसला आणि 'ज्ञानप्रकाशा'चा ताजा अंक पडला होता, तो घेऊन वाचूं लागला; वाचूं लागला म्हणण्यापेक्षां अक्षरांवरून आपली दृष्टि फिरवूं लागला, असें झणणेंच अधिक बरोबर होईल. त्याचे डोळे ज्या अक्षरांवरून फिरत होते, तीं अक्षरें समजून घ्यावयाचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला, पण व्यर्थ! त्याच्याविरुद्ध त्याचे नेत्र क्षणोक्षणीं इकडे तिकडे चोरून पहावयाला लागत. एकदां त्याला वाटे, कीं, धीर करून माडीवरून जाऊन यावेंच. पण कां कोण जाणे, वर जावयाला त्याला कांहीं धीर होईना. चंपूताईकडून-नव्हे राणीसाहेबांकडून —विनायकाची जिज्ञासा पूर्ण होण्याचा संभव होता; पण या वेळीं त्यांची भेट होणें शक्य नव्हतें. दाजीसाहेबांनां विचारून पहावें तर-पण छे! हा काय भलताच विचार!

याप्रमाणें 'ज्ञानप्रकाशा'चीं पानें उलटसुलट करून बराच वेळ आपल्या मनाची चलबिचल झांकण्याचा प्रयत्न विनायकानें चालविला होता, इतक्यांत दारापुढें एक बैलाची गाडी येऊन उभी राहिली.

"पाहुणे मंडळीपैकीं आज कोणी जाणार आहे वाटतें?" विनायकानें विचारलें.

"मला कांहीं माहीत नाहीं बुवा!" असें म्हणत दाजीसाहेब चौकशी करण्याकरतां उठत आहेत, इतक्यांत माडीवरून एक पोक्त गृहस्थ सामानसुमान घेऊन खालीं उतरले. त्यांच्यावरोबर दोन मुलें होतीं, त्यांनीं हातांत गवसणी घातलेले तंबोरे घेतले होते. सर्वांच्या मागून हातांत डबा घेऊन एक मुलगी उतरली.

त्या गृहस्थाला पहातांच दाजीसाहेबांनीं जागेवरून उठून विचारलें "काय बुवासाहेब, आजच निघालां? इतकी घाई कां? इतक्यांतच आमचा कंटाळा आला वाटतें?"

"वाहवा! असें कसें?" बुवासाहेब म्हणाले. "आपल्यासारख्या प्रेमळ मनुष्याचा सहवास मोठ्या भाग्यानेंच लाभतो. मी आणखी दोन दिवस मोठ्या आनंदानें येथें राहिलों असतों; पण येथून मला ह्यैसुरास जायचें आहे. तेथें माझे दोनचार दिवस मोडतीलच!"

"बरें आहे, या!" दाजीसाहेब म्हणाले. "आपल्या गायनानें समारंभास फार शोभा आली."

दाजीसाहेब उठले त्या वेळींच विनायकहि वर्तमानपत्र टाकून देऊन खुर्चीवरून उठला. गवईबुवांवरोबर असलेली मुलगीच पहाटे गच्चीवर गात होती, हें चटकन् त्याच्या लक्ष्यांत आलें. बुवासाहेबांशीं आपण कांहींतरी बोलावें, असें त्याच्या मनांत आलें; पण एक तर त्याला काय बोलावें हें सुचेना, आणि शिवाय ती मंडळी तितक्यांत गाडींत जाऊन बसलीहि. दाजीसाहेबांबरोबर विनायकहि त्यांनां पोंहचवीत बाहेर ओट्यावर आला. गाडी अदृश्य होईपर्यंत त्याची दृष्टि तिकडेच लागून राहिली होती. इतक्यांत हुक्का घेऊन जामदारसाहेब ओट्यावर येऊन बसले. वऱ्हाणपुरी गुडाखू मिळाल्यापासून ते जरा चैनींत होते.

विनायकानें त्यांनां विचारलें "काय हो जामदारसाहेब, तुमच्या गवईबुवांनां तुम्हीं इतक्यांत कां जाऊं दिलें? तुम्ही आहांत तोंपर्यंत त्यांनां ठेवून कां घेतलें नाहीं?"

"जाऊंद्या कीं! त्याला काय करावयाचें आहे?" जामदारसाहेबांनीं एक जोराचा झुरका घेऊन उत्तर दिलें. "आमचे खास गवई जरा आजारी होते, म्हणून या बुवासाहेबांनां मुद्दाम इंदूरहून आणलें; पण हे कोण मिजाजखोर! म्हणे अमुक दिवस राहूं अन् रोजचे तीस रुपयेप्रमाणेंच फी घेऊं! बरें झालें, पीडा गेली! आपल्याला असलीं कलमबंदी बोलणारीं माणसें साफ आवडत नाहींत! परवां रात्रीं बंगल्यावर गाणें झालें, तेव्हां बक्षीसाहेबांनीं 'बनरे बलैया' ही चीज म्हणायला फरमाश केली. तेव्हां हे राजश्री झणाले 'हा कल्याणराग सूर्यास्ताचे सुमारास म्हणावयाचा. आतां रात्रीचे बारा वाजून गेले, तेव्हां हा म्हणतां यावयाचाच नाहीं.' अशानें खातील पोटभर अन्न!"

'गुडेरीन' नें आजपर्यंत हजारों बायकांचे जीव काळाचे जबड्यांतून सोडविले आहेत.
किंमत रु. २॥. ट. स. ८ आणे.

जामदारसाहेबांच्या या बडबडीकडे विनायकाचें फारसें लक्ष्य नव्हतें. त्यांनीं पुनः हुक्का हातांत घेतांच तो आपल्या घरीं निघून आला.

ला दिवशीं विनायकानें पुनः तर्कशास्त्राचें पुस्तक उघडलें नाहीं. संध्याकाळीं फिरावयास जातांना त्यानें दुसऱ्या दिवशीं सकाळच्या गाडीनें मुंबईस परत जाण्याचा आपला विचार भाऊसाहेबांनां कळविला.

"अरे, सुट्टी संपेपर्यंत येथेंच राहीनास!" भाऊसाहेब म्हणाले. "थंड हवेंत अभ्यासहि चांगला होईल. मुंबईत या दिवसांत कोण भयंकर उष्मा होत असतो!"

"तें खरें, पण मीं सर्व पुस्तकें कांहीं बरोबर आणलीं नाहींत. खन् कॉलेज उघडायच्या आधीं अभ्यास तर झाला पाहिजे."

"हरकत नाहीं. आज चंपूताईचा निरोप घे, अन् उद्यां सकाळीं सातांच्या गाडीनें मुंबईस जा."

[४]

काल तरी किती लौकर निघून जातो! चंपूताईचें लग्न होऊन जवळजवळ पांच वर्षें होत आलीं आहेत. विनायक आतां बी. ए., बी. एस् सी., होऊन वेळगांवींच येऊन राहिला होता. त्याच्या मित्रांनीं त्याला पुढें वकिलीचा अभ्यास करण्याबद्दल फार आग्रह केला. पण भाऊसाहेबांची इच्छा त्यानें कोणताहि धंदा न करतां स्वतःस सर्वस्वीं समाजसेवेस वाहून घ्यावें, अशी असल्यामुळें तो बी. एस् सी., होऊन बडिलांजवळ येऊन राहिला.

भाऊसाहेबांच्या वडिलांनीं सराफीच्या धंद्यांत बराच पैसा कमावला होता. आणि भाऊसाहेबांनींहि आपल्या वीस वर्षांच्या कारकीर्दींत जवळ जवळ पाऊण लाखाची एस्टेट संपादन केली होती. त्यांचें वय हल्लीं पन्नास वर्षांचें असेल, पण ते बांगले सशक्त असल्यामुळें त्यांनां आणखी दहा पंधरा वर्षें धंदा करून आपल्या दौलतींत पांचपन्नास हजारांची भर सहज टाकतां आली असती; पण राहिलेलें आयुष्य आपल्या देशबांधवांच्या सेवेंत घालवावें, आणि विनायकासहि आपल्या देखरेखीखालीं सार्वजनिक कार्यें करण्यास तयार करावें, असा त्यांचा हेतु असल्यामुळें आपला धंदा सोडून ते आतां वेळगांवास कायमचे रहाण्यास आले होते.

भाऊसाहेब हल्लीं कॅम्पमधील आपल्या बंगल्यांत रहात असत. कारण, त्यांनीं गांवांतलें घर रावसाहेब पाटणकर नांवाच्या एका मित्रास रहाण्यास दिलें होतें. रावसाहेब सरकारी नोकरींत कारकुनीपासून मामलतीपर्यंत चाटले होते. त्यांची बहुतेक नौकरी खानदेशांतच झाली होती व तिकडेच भाऊसाहेबांशीं कांहीं वर्षांपूर्वी त्यांचा परिचय झाला होता. पेन्शन घेतल्यावर भाऊसाहेबांच्या आग्रहानें ते वेळगांवासच येऊन राहिले होते. दोघांचीं मतें जवळ जवळ सारखींच असल्यामुळें त्यांनां एकमेकांच्या सहवासापासून आनंद वाटणें साहजिक होतें. रावसाहेबांच्या मागें संसाराची फारशी दगदग नव्हती. त्यांच्या कुटुंबांत माणसें झटलीं म्हणजे त्यांचा एक लहान मुलगा व एक भाची, एवढींच कायतीं होतीं. रावसाहेबांनां पेन्शन घेतल्यावर उद्योगधंदा फारसा नव्हताच. त्यांचा बहुतेक वेळ भाऊसाहेबांबरोबर सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करण्यांत जात असे.

विनायक मुंबईहून आला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं भाऊसाहेबांनीं त्याला आपल्याबरोबर रावसाहेबांकडे नेलें. दिवाणखान्यांत रावसाहेबांची भाची त्यांनां एका इंग्रजी मासिक पुस्तकांतील लेख वाचून दाखवीत होती. भाऊसाहेब व विनायक आंत येतांच हातांतलें पुस्तक खालीं ठेवून ती विनयानें उभी राहिली.

"तारे, अशी उभी कां?" रावसाहेबांनीं आश्चर्यानें विचारलें. "हे गृहस्थ कांहीं परके नाहींत! आपल्या भाऊसाहेबांचे चिरंजीव मुंबईहून येणार होते तेच हे! तूं आपलें वाचन चालूं दे—बसा विनायकराव! ही आमची भाची तारा. गेल्याच वर्षी मॅट्रिक्युलेट झाली. आपण ऐकलेंच असेल."

"हो, यांचें नांव वर्तमानपत्रांत वाचल्यासारखें वाटतें."

भाऊसाहेबांच्या आग्रहावरून तारेनें पुनः लेख वाचून दाखविण्यास सुरुवात केली. तिचे शुद्ध इंग्रजी उच्चार ऐकून विनायकासहि बरेंच आश्चर्य वाटलें. भाऊसाहेबांचें व रावसाहेबांचें सर्व लक्ष लेखाकडेच होतें. विनायकानें मात्र लेख वाचणाऱ्या व्यक्तीचें सूक्ष्म निरीक्षण चालविलें होतें.

शरीरांत नवीन रक्त उत्पन्न करण्यांत व अशुद्ध रक्त शुद्ध करण्यांत सर्व देशांतील
विद्वान् डॉक्टर 'गुडेरीन' वापरण्याची शिफारस करितात.

लेख वाचून झाल्यावर विनायकानें विचारलें " पुढें कॉलेजांत जाण्याचा आपला विचार नाहीं वाटतें ?"

"नाहीं,तशी सवडच नाहीं.कारण,मी कॉलेजांत गेलें, तर मामांच्या मुलाला संभाळायला तरी कोण आहे ?"

" युरोपांतल्याप्रमाणें आपल्याकडे नमुनेदार बोर्डिंग स्कूल्स नाहींत, ही मोठी गैरसोय आहे. तशीं स्कूल्स असतीं तर मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न बराच सोपा झाला असता."

"होय, आईबाप अशिक्षित असले, किंवा त्यांच्या पाठीमागं महत्त्वाचे उद्योग असले, तर या बोर्डिंग स्कूल्सचा फार उपयोग होईल; पण मला वाटतं, सुशिक्षित अन् सहृदय आईबापांकडून मुलांनां जें शिक्षण मिळतं, त्याची बरोबरी कशानंच होणार नाहीं !"

विनायकाला या म्हणण्याची सत्यता कबूल करावी लागली. थोड्या वेळानें त्यानें विचारलें " आपल्याला येथें करमत नसेल ?"

" असं कांहीं नाहीं. घरांतील सर्व काम मीच पहातें. त्यामुळं वेळ केव्हांच निघून जातो. पुरुषांनां मात्र कांहीं उद्योग नसला म्हणजे वाचन किंवा खेळ यांशिवाय वेळ कसा घालवावा याची पंचाईत पडते !"

आणखी कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर विनायक घरीं जावयाला निघाला.

[५]

विनायकास वेळगांवीं येऊन पांचसहा महिने झाले. भाऊसाहेबांच्या देखरेखीखालीं त्याचा समाजशास्त्राचा अभ्यास चाललाच होता. प्रत्येक मेलनें विलायतेहून त्या विषयावरील नवीन व सर्वमान्य पुस्तकें येत, व भाऊसाहेब आणि विनायक त्यांचें एकत्र अध्ययन करीत असत.

एके दिवशीं सायंकाळीं वाचन वगैरे आटोपून पितापुत्र आपल्या बागेंत बोलत बसले होते. भाषणाच्या ओघांत सहज रावसाहेब पाटणकरांसंबंधानें बोलणें निघालें. कांहीं आठवल्यासारखें करून भाऊसाहेबांनीं एकदम विचारलें " विनायक ! तारेसंबंधानें तुझें काय मत झालें आहे ?"

विनायकास हा प्रश्न थोडासा विचित्र वाटला. तरी त्यानें उत्तर दिलें " मला वाटतें, मुलगी फारच सुशील आणि हुशार आहे. "

" तिचा स्वभाव तुला कसा काय आवडतो ?"

या प्रश्नाचा रोख विनायकाला कांहीं कळेना. म्हणून तो म्हणाला "हे प्रश्न विचारण्यांत आपला हेतु काय आहे, तें कळेल तर मला उत्तर द्यायला सोपें जाईल."

भाऊसाहेब जरा हंसले. " मी कांहीं तुझी परीक्षा घेत नाहीं. तारा आपली पत्नी व्हावी अशी तुझी इच्छा आहे कीं काय तें कळावें, म्हणूनच मीं हे प्रश्न विचारले."

विनायक थोडासा गोंधळला. बराच वेळ त्याची दृष्टि जमिनीकडे खिळून राहिली. " नाहीं–" तो शेवटीं अस्पष्ट शब्दांनीं म्हणाला. " तिच्याशीं लग्न व्हावें अशी माझी मुळींच इच्छा नाहीं !"

या उत्तरानें भाऊसाहेबांनां बरेंच आश्चर्य वाटलें असावें असें दिसलें. " तारा सुशील आणि हुशार आहे, असें तूं आतांच कबूल केलेंस. मग ती कोणत्या दृष्टीनें अयोग्य आहे तें तरी मला कळूंदे. "

" ती अयोग्य आहे असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. आणि लग्नाच्या बाबतींत मीं जो निश्चय केला आहे, तो केला नसता तर मीं तारेसच मोठ्या आनंदानें पसंत केलें असतें."

" तो कोणता निश्चय बुवा ?"

विनायक घोटाळ्यांत पडला. आतां खरी हकीगत सांगितल्याशिवाय सुटकाच नाहीं, असें पाहून तो म्हणाला " भाऊसाहेब, आपल्याला आश्चर्य वाटेल, पण मीं निश्चय केला आहे, कीं, चंपूताईच्या लग्नांत केशवबुवा इंदूरकर गवई आले होते, त्यांच्याच मुलीशीं लग्न करावयाचें !"

विनायकाच्या या भाषणानें भाऊसाहेबांनां बरेंच आश्चर्य वाटलें. तरी तें बाहेर न दाखवतां ते म्हणाले "कांहीं हरकत नाहीं, मुलगी चांगली शिकलेली असेलच ?"

" तें कांहीं मला माहीत नाहीं. "

" म्हणजे ! तिची आणि तुझी कांहीं ओळख असेलच कीं नाहीं ?"

" नाहीं—लग्नांत ती आपल्या वडिलांबरोबर येथें आली होती, त्या वेळीं सहज एकदां मीं तिचें गाणें ऐकलें होतें, एवढीच कायती तिची माझी ओळख !"

भाऊसाहेब मोठ्यानें हंसले व म्हणाले " हं ! प्रथमदर्शनी प्रेम असें जें म्हणतात, तशांतलाच कांहीं प्रकार

' गुडेरीन ' लोह व मॅंगनीस् या धातूंचे सत्वापासून बनविलें असल्यामुळें
शरीरांत रक्ताची वृद्धि करण्यास यासारखा उपयुक्त नाहीं

आहे हा वाटतें ! बरें, पण ती मुलगी हल्लीं कोठें आहे, तें तरी ठाऊक आहे कीं नाहीं तुला ?"

"नाहीं."

"मग ती अजून अविवाहित असेल कशावरून ? या वेळीं तिचें वय अंदाजानें किती असावें बरें ?"

"असेल तेरा चौदा वर्षांचें."

"विनायक ! तूं इतका विद्वान्, पण या बाबतींत मात्र तुझी बुद्धि कांहींच चालली नाहीं. अरे ! हे गवई झटले म्हणजे शास्त्री पुराणिकांसारखे जुन्या मताचे असायचे. या केशवबुवांनीं आपल्या मुलीचें लग्न नवव्या वर्षीच उरकून टाकलें असेल. बरें, तूं तिला पाहिलीस त्या वेळीं ती अविवाहित होती, असें जरी धरून चाललें, तरी तिचें लग्न पुढें लौकरच झालें नसेल कशावरून ? या गोष्टीला आज पांच वर्षें होऊन गेलीं. तेव्हां ती मुलगी आज अठरा एकोणीस वर्षांची असेल. इतकें वय होईपर्यंत ती अविवाहित का राहणार आहे ?"

भाऊसाहेबांनीं सांगितलेली ही साधी गोष्ट आपल्या लक्ष्यांत आधीच कशी आली नाहीं, याचें विनायकाला मोठें आश्चर्य वाटलें !

"शिवाय हें पहा विनायक, कांहीं चमत्कारानें तिचें लग्न अजूनपर्यंत झालें नसेल असें जरी मानलें, तरी ती कांहीं मोठी सुशिक्षित असणार नाहीं. कारण, गवयांनां स्वतःच विद्येचा गंधहि नसतो; मग ते आपल्या मुलींनां कोठून शिकविणार ? आणि अशिक्षित पत्नीच्या सहवासानें आपणाला खरें सुख लाभेल, असें तुला वाटतें काय ? तिला चांगलें गातां येत असेल, हें मी कबूल करतों. चांगले दहापंधरा राग आळवितां येत असतील, आणि पहिल्यापहिल्यानें ते तुला फार गोडहि लागतील. पण एक वर्षाच्या आंत तुला त्यांचा कंटाळा येईल. मग पुढची काय वाट ? तुला पुढें मोठीं सार्वजनिक कामें करावयाचीं आहेत. तेव्हां सुशिक्षित पत्नीची आवश्यकता तुला पदोपदीं भासणार. तुसल्या गाण्यावर कांहीं पुढील सर्व अडचणी टळणार नाहींत !"

यापैकीं एकसुद्धां विधान खोडून काढणें विनायकाला अर्थातच शक्य नव्हतें. कांहीं वेळानें भाऊसाहेब पुनः म्हणाले "इतकें आहे, तरी मी तुझ्या इच्छेच्या आड येत नाहीं. तूं इतके दिवस स्वस्थ बसलास ही माझ्या मतें तूं मोठी चूक केलीस. आतां या गोष्टींत मन घालून मलाच तिचा सर्व तपास लावला पाहिजे. इंदुरास एक पोलीस कामदार माझ्या ओळखीचे आहेत, त्यांनाच या बाबतींत चौकशी करावयास सांगतों."

भाऊसाहेब कोणतेंहि काम लांबणीवर टाकणारे नव्हते. त्यांनीं ताबडतोब "केशवबुवा गवई इंदुरासच आहेत काय, आणि त्यांच्या मुलीचें लग्न झालें किंवा नाहीं ?" अशी आपल्या इंदूरच्या मित्राला तार पाठविली. भाऊसाहेबांची ही कळकळ पाहून विनायकास अत्यंत आश्चर्य वाटलें. ते स्वतः या बाबतींत इतकी खटपट करतील, अशी त्याला कल्पनाहि नव्हती. त्याचें सारें लक्ष्य आतां तारेच्या उत्तराकडे लागलें होतें.

दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरीं भाऊसाहेबांच्या मित्राकडून उत्तर आलें, कीं, "गवईबुवा वारल्याला बरींच वर्षें झालीं. त्यांच्या कुटुंबांतील माणसें इंदुर सोडून कोठें गेलीं, तें कांहीं कळत नाहीं; पण मुलीचें लग्न बहुतकरून झालें असावें."

आतां मात्र विनायकाची अगदीं निराशा झाली. खिन्न वदनानें त्यानें ती तार भाऊसाहेबांनां परत दिली.

"विनायक, आतां पुढें काय करावयाचें तें तुझें पाहणें आहे. तूं जन्मभर अविवाहित राहिलास तरी मला मुळींच वाईट वाटणार नाहीं. मुलाचें लग्न होऊन त्याच्या पाठीमागें लेकरांबाळांचें लटंबर लागलें म्हणजे आपल्या जन्माचें सार्थक झालें, असें मानणारांपैकीं मी नाहीं. काल रावसाहेब पाटणकरांच्या तारेसंबंधानें मीं जें तुला सांगितलें, ती केवळ एक सूचना होती. तिच्याशीं तूं लग्न करावेंस, असा माझा मुळींच आग्रह नाहीं. गैरसमज होऊं देऊं नकोस. पूर्ण विचार करून या बाबतींत तुझा काय निश्चय होतो तो मला कळीव." असें म्हणून भाऊसाहेब बाहेर निघून गेले.

बिचारा विनायक मात्र विचार करीत तेथेंच बसून राहिला. पांच वर्षांपूर्वी ऐकलेले 'भैरवी'चे आलाप अजूनहि त्याच्या कानांत दुमदुमत होते. उषःकालीं गच्चीवर गात असलेल्या बालिकेची सुंदर मूर्ति अजूनहि त्याच्या नेत्रांसमोर उभी होती. पण उपयोग काय ? दुसरीकडे सुशिक्षित, विनयसंपन्न अशी तारा त्याच्या हृदयाचें आकर्षण करीत होती. असामान्य

शुद्ध रक्त हें शरीराचें जीवन होय. रक्त जर कां अशुद्ध झालें, कीं, रोगाचा शिरकाव झालाच !
अशा प्रसंगीं बायकांनीं ताबडतोब 'मुडेरीन' वापरावें.

बुद्धिमत्तेची आणि रसिकतेची साक्ष पटविणारें तिचें विस्तृत भाल आणि चंचल नेत्र हीं विनायकावर आपली जादू अजमावीत होतीं. याप्रमाणें त्याच्या हृदयावर आपलें स्वामित्व स्थापित करण्यासाठीं पांच वर्षांपूर्वी एकवारच दृष्टीस पडलेली ती मुग्ध बालिका, आणि यौवनश्रीनें विलसणारी व अलीकडे नेहमीं दृष्टीसमोर खेळणारी ती तरुणी, यांची जणूं काय चढाओढच लागून राहिली होती. वराच वेळ विनायक दोघींची तुलना करीत होता. आतां तर भाऊसाहेबांनीं काढलेल्या शंकांची सत्यता त्याला अधिकाधिक पटूं लागली. त्या बालिकेची प्राप्ति आपणाला आतां अशक्यच आहे, असें त्याला हळुहळू वाटूं लागलें. मग उगीच तारेसारख्या सर्वगुणसंपन्न तरुणीचा अव्हेर करणें शहाणपणाचें होईल काय ? आपल्या आयुष्यांतील एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींत सत्ता गाजविण्यासारखें गायनाचें एवढें काय मोठेंसें महत्त्व आहे ? लग्न झाल्यावर तारेलाच उत्तम शास्त्रोक्त गायन शिकवितां येणार नाहीं काय ? बस्, ठरलें ! हाच विचार योग्य आहे!

भाऊसाहेब घरीं परत येतांच विनायकानें त्यांना हा आपला निश्चय कळविला. त्यामुळें त्यांना समाधान वाटलें असावें, असें दिसलें.

"मी आतां रावसाहेबांकडून जाऊन येतों," भाऊसाहेब विनायकाला म्हणाले. "त्यांनीं आपण होऊन कांहीं दिवसांपूर्वी याबद्दल तारेजवळ गोष्ट काढली होती. तिचीहि या गोष्टीला पूर्ण अनुमति आहे."

[६]

वरील संभाषण झाल्यानंतर एक महिन्यानेंच विनायक आणि तारा यांचा विवाह झाला. त्यांच्या विवाहाला आतां दोन अडीच महिने झाले आहेत. विनायकानें तारेसाठीं मुद्दाम मुंबईहून हार्मोनियम मागविला असून त्याचें नुकतेंच आलेलें पार्सल तो उघडीत बसला होता. इतक्यांत तारा तेथें येऊन त्याला हंसत हंसत म्हणाली "आपणाला पेटी वाजवितां येते हें मला नव्हतं माहीत !"

"येते आपली थोडीबहुत.पण ही पेटी आणली आहे तुम्हासाठीं ! "

"माझ्यासाठीं ! ती कशाला बाई ? "

"कां वरें ? तुला कांहीं गातां येत असेलच की नाहीं ?"

हा प्रश्न ऐकून तारा फारच लाजली व खालीं पाहून तिनें फक्त नकारार्थी मान हालविली.

"म्हणजे ?" विनायकानें आश्चर्यानें विचारलें "हायस्कुलांत मुलींना गायनवादन शिकवीत असतात, हें मला माहीत आहे !"

"तें कांहीं खोटं नव्हे, पण मी कांहीं तें शिकलें नाहीं. मला त्याची फारशी आवडच नाहीं. "

"ऐकून ऐकून आवड उत्पन्न होईल ! मला तरी पूर्वी कोठें गाण्याची आवड होती ? " असें म्हणून विनायकानें हार्मोनियम बाहेर काढून त्यावर नाटकांतील एक लोकप्रिय पद वाजविण्यास सुरुवात केली. दोनतीन मिनिटें तारेनें लक्ष्य लावून विनायकाचें हार्मोनियमवादन ऐकलें, आणि नंतर किंचित् त्रासल्यासारखी मुद्रा करून ती दूर जाऊन उभी राहिली.

हें पाहून विनायकाला फार आश्चर्य वाटलें. हार्मोनियम बंद ठेवून त्यानें तारेला-पत्नीला विचारलें "कां ! आमचें वाजविणें आपल्या पसंतीला उतरत नाहीं वाटतें ?"

"इकडून उत्तम वाजविणं होत असेल, मी नाहीं म्हणत नाहीं; पण मलाच कधीं ऐकण्याची संवय नसल्यामुळं पेटीचे सूर मला कसेसेच लागतात."

"पण तूं हें शिकून तर पहा ! कालांतरानें याची आपोआप तुला गोडी लागेल. "

"अं हं ! तें आपलं मला जवळजवळ अशक्यच दिसतं! स्वभावतःच मला त्या पेटीचा तिटकारा आहे !"

विनायकाच्या चेहऱ्यावर आतां मात्र निराशेची छाया दिसूं लागली. तारा सुशिक्षित असून इतकी अरसिक कां ? आणि गायनवादन न शिकण्याचा तिचा इतका हट्ट तरी कां ? पतिपत्नींच्या रुचि इतक्या परस्परविरोधी असणें इष्ट आहे काय ? लग्नाचे आधींच या बाबतींत घुलासा झाला असता तर बरें झालें नसतें काय ? असे विचार विनायकाच्या मनांत घोळूं लागले. पांचसहा वर्षांपूर्वीच्या, पहांटेच्या त्या 'भैरवी'च्या तानां पुनः आपल्या कानीं पडत आहेत, असा या वेळीं त्याला क्षणभर भास झाला.

प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका अशक्तांस सशक्त व जवान बनवून त्यांच्या अंगांत नवीन जोर उत्पन्न करतात. वापरून पहा !



" का ? आमचें वाजविणें आपल्या पसंतीस उतरत नाहीं वाटतें ? "

आतां हे शुद्धीवर येतील, तेव्हां यांनां गरम गरम कोकोचा एक प्याला या, ह्मणजे झालें."

आणि डॉक्टरसाहेबांचा तर्क खरा ठरला. ते गेल्यानंतर थोड्याच वेळानें आमचा प्रवासी आपोआप उठून बसला. शेजारींच खुर्चीवर बसलेल्या भाऊसाहेबांनां पाहतांच त्यानें आश्चर्यचकित होऊन विचारलें "आपण —आपण येथें कोठें ?"

"तें मी मागाहून सांगतों," भाऊसाहेब हंसून ह्मणाले. "येथें गाणारें कोण आहे बुवा? कोणीच नाहीं! गेल्या सहा महिन्यांत नालगंज संस्थानांत जरा दगदगीचें काम करावें लागलें, तेव्हां कांहीं दिवस थोडी विश्रांति घ्यावी ह्मणून, वीसपंचवीस दिवस झाले, आह्मी इकडे रहायला आलों आहों."

इतक्यांत कोकोचा प्याला घेऊन तारा आंत आली. शेजारच्या खोलींतून तिनें हा संवाद ऐकलाच होता. आंत येतांच टेबलावर प्याला ठेवून अर्धस्फुट शब्दांनीं



"हो, पण आपल्याला हें कसं कळलं?"

"पण मीच आपणाला अगोदर विचारतों, कीं, आपणच येथें कोठें? सूर्योदयापूर्वी भिंतीवरून उड्या मारून गृहप्रवेश करून अशाच रीतीनें लोकस्थिति अवलोकन करीत असतां वाटतें आपण? कां विनायकराव, चांगलासा बंगला पाहून दरवडा घालण्याचा विचार होता वाटतें आपला?"

विचारा विनायक या शब्दांनीं फारच लाजला. जरा थांबून तो ह्मणाला "येथें आतां कोण गात होतें तें मला सांगा, ह्मणजे मी आपल्या प्रश्नाचें उत्तर देतों!" ती ह्मणाली "कां बरं? मीच गात होतें मघाशीं."

विनायक विस्मयानें तिच्याकडे पाहूं लागला. "काय? तूं गात होतीस—तूं? मग—मग केशवबुवा इंदूरकरांची मुलगी तूंच कीं काय?"

तारा चपापली. "हो, पण आपल्याला हें कसं कळलं?"

हर्षातिरेकानें विनायकाचे नेत्र भरून आले. "मग हें तूं मला आधींच कां नाहीं सांगितलेंस? आज सात

सर्व प्रकारचे तापांवर, हिंवताप, हाडीज्वर, अंगात मुरलेल्या तापामुळें अंग कसकसणें वगैरेवर **ऑडमन्स मलेरियस पिल्स** फारच गुणकारी आहेत!

वर्षे मी सारखा तुझाच निदिध्यास करीत आहें. लोकस्थिति अवलोकन करण्याची सवय पुढें करून आज जवळ जवळ एक वर्ष तुझ्याच शोधार्थ मी गांवोगांव फिरत आहें."

तारा विचारी बुचकळ्यांतच पडली ! पतीच्या बोलण्याचा अर्थ तिला कांहींच समजेना !

भाऊसाहेबांनीं थोड्क्यांत चंपूताईच्या लग्नाच्या वेळीं विनायकानें केलेल्या निश्चयाची हकीगत तिला सांगून झटलें "खरेंच मुली ! हें आधीं आह्मांला कळलें असतें तर किती उत्तम झालें असतें ! तुझे वडील एका संस्थानांत चाकरीस होते, एवढेंच कायतें तुझ्या वडिलांबद्दल आह्मांला रावसाहेबांनीं सांगितलें होतें !"

"हो, पण आमची आधींची थोडी हकीगत कळली झणजे आपणाला इतकं आश्चर्य वाटणार नाहीं. आह्मी बेळगांवाहून गेल्यानंतर एका वर्षाच्या आंतच बाबा वारले. माझं लग्न आपल्या देखत व्हावं, अशी त्यांची फार इच्छा होती, पण ती कांहीं पूर्ण झाली नाहीं. विचाऱ्या आईवर माझ्या लग्नाची मोठी काळजी येऊन पडली. आमच्या एका शेजाऱ्याच्या ओळखीनं ग्वाल्हेरहून दोनचार मंडळी मला पाहायला आली. बाकीचं सर्व कांहीं जुळलं, लग्नाची तिथिहि ठरली. पण जातांना मंडळींनीं मला सहज विचारलं 'मुली, तुला गायला येतं का ?' मला कांहीं त्या वेळीं विशेषसं समजत नव्हतं. लागलीच 'होय' असं झणून मीं माझ्या आवडीचा 'दिल नही लगता' हा बागेश्रीतील ख्याल झणायला सुरुवात केली. तो ऐकतांच मंडळींचीं तोंडें एकदम गोरींमोरीं झालीं ! कांहीं न बोलतां ते तसेच तेथून उठून गेले, अन् ज्याच्या त्याच्याजवळ, ही ख्यालटप्पे झणणारी मुलगी संसार का करणार आहे ? अहो, 'क्वचिन्नानी पतिव्रता !' असं झणूं लागले. असल्या बातम्या तेव्हांच गांवभर पसरत असतात ! जो तो आह्मांला नांवं ठेवूं लागला. माझं पुढं कसं होईल, याची आईला रात्रंदिवस चिंताच लागून राहिली. हें मामांनां कळतांच त्यांनीं आह्मांला बोलावून आपल्याजवळ ठेवून घेतलं व आईला सांगितलं, कीं, तूं आपल्या मुलीची तिळमात्र काळजी करूं नकोस. ही माझीच मुलगी आहे असं मी समजतों. पुढें रावसाहेबांनीं मला घरींच इंग्रजी शिकवायला सुरुवात केली. पण माझं शिक्षण संपेपर्यंत विचारी आई कांहीं वाचली नाहीं."

बोलतां बोलतां तारेचा कंठ दाटून आला. विषय बदलावा झणून ती झणाली "कोको थंड नाहीं का होत ? लौकर प्यायचा होता तेवढा !"

त्या दिवशीं रात्रीं फराळ वगैरे आटोपल्यावर भाऊसाहेब डॉक्टरसाहेबांशीं बंगल्यांत विनायक आपल्या प्रवासांतील गमतीच्या अनुभवांचें विनोदपूर्ण वर्णन करून तारेचें मनोरंजन करीत होता. रसिकांची गांठ पडली झणजे वेळ कसा निघून जातो तें समजत नाहीं. बोलतां बोलतां मध्यरात्र होत आली.

"आतां एकादी सुंदरशी चीज ऐकूं द्या, झणजे या सर्वांच्या श्रमाचें निरसन झालें, असेंच मी समजेन !" विनायक हंसत हंसत तारेला झणाला.

"माझी कांहीं हरकत नाहीं, पण—"

"पण तंबोऱ्याशिवाय गायचें नाहीं, असा संकल्प केला आहेस वाटतें ?"

"तसं कांहीं नाहीं बाई ! पण झटलं गवयाच्या मुलीचं गाणं ऐकत असतांना एकादे वेळीं एकदम रावसाहेब पटणकरांच्या सुशिक्षित भाचीचीच आठवण व्हायची आपल्याला ! अन् तिच्या शोधार्थ पुनः घरदार सोडून हिंदुस्तानभर हिंडायची लहर यायची !" तारा हंसत झणाली, व आपल्या मधुर स्वरानें पुढील चीज जयजयवंती रागांत गाऊं लागली:—

"मधेरात आई । सब सुखदाई ।
तैसोही पवन वहे सीतल सुगंध मंद ॥ध्रु०॥
प्रफुल्लीत कुंजबन । पालव नवल सघन ।
तैसोही रसिकराज राजत आनंदकंद ॥"

अंगांत ताप असो वा नसो, ऑडमन्स मलेरियस पिल्स
घेण्यास हरकत नाहीं. किंमत १ रु.

आधीं विचार केला तर ?

[श्रीयुत कृष्णाजी केशव गोखले, न्यायाधीश, जत.]

रामराव रागानें हातपाय आपटीत झणतात "छे बोवा, आतां लगदीं कडेलोट झाला ! हें कांहीं आपल्याच्यानें आतां सोसवत नाहीं ! दिवसभर दगदग सोसून घरीं यावें, तों इथेंहि जर असा त्रास होऊं लागला, तर आम्हीं आपलें हपिसांत काम तरी कसें करावें ? हा मी आतां एकदम जातों—"

सोनीबाई झणतात "हें पहा, जरा दमानं घ्या. असं तडकाफडकीं जाऊन कांहींतरी कमजास्ती बोलाल, अन् भलतंच कांहींतरी होईल !"

"दमानें घ्या ? आतां आणखी किती दम खाऊं ? या आठवड्यांत ही आजची तिसरी का चवथी पाळी ना ? रोज जर दोन दोन वाजेपर्यंत जाग्रणें व्हायला लागलीं—"

"आपण गडे अंथरुणावर पडून झोंप येते का पहायचं तरी होतं ! हीं मुलं जशीं निजलीं आहेत—"

"मुलांचें ठीकच आहे. पण आतां बारा वाजून गेले, तरी हा जर वरच्या भाडोत्र्यांचा धांगडधिंगा संपत नाहीं, तर आह्मां खालच्या लोकांनां झोंपा कशा याव्यात ? चाळवाल्याला काय लेकाला, कुठून तरी भाडें उकळलें झणजे झालें ! भाडोत्र्यांच्या सुखदुःखाची त्याला कुठली परवा ?"

"तें खरंच आहे. माझं आपलं झणणं इतकंच, कीं, नीट विचार करून कायतें करावं. ज्यानें त्यानें आपल्या घरांत हवं तें करावं, असंच असेल बहुतकरून कायद्यांत."

"मोठी मला कायदा शिकवायला आली आहे ! 'धि लॉ इज् ॲन् ॲस्' असें तर परवां टाइम्समध्येंच मीं वाचलें."

"आपणाला एकट्यालाच तर नाहींना हा धांगडधिंगा ? ते शेजारी धोंडुभाई आहेत, मंगेशराव आहेत, पिटकर आहेत, त्यांचा विचार घ्यावा अन् मग काय तें करावं, झणजे बरं नव्हे ?"

"तुह्मी बायका अशाच जिथें तिथें आक्षांत ओढण्याच्या ! पण तसें कां होईना, धोंडुभाईनां विचारतों." असें झणत रामरावांनीं धाडकन् दि खान्याचें दार उघडलें, व ते धोंडुभाईच्या गाळ्या निघाले.

रामराव, धोंडुभाई, मंगेशराव व पिटकर अशी चि विच्हाडें दुसऱ्या मजल्यावर 'सौख्याश्रम बिल्डिंग' मध्यें राहत होतीं. तळमजला सर्व एका छापखा वाल्यानें माड्यानें घेतला होता, त्यामुळें तेथें कोणीच रहात नसे. तिसऱ्या मजल्यावर फक्त दोन लहानसे गाळे होते. त्यांपैकीं एक सध्यां रिकामाच होता, व दुसरा एक महिन्यापूर्वी रामराजपंत खांडे घेतला होता. मुंबईत शेजारच्या खोलींत कोण रहातें हें देखील कितीक बिऱ्हाडकरांनां माहीत नस इतका जो तो आपापल्या उद्योगधंद्यांत गढून गेलेला असतो. पण 'सौख्याश्रम बिल्डिंग्ज' नवीन तयार झाल्यावरोबर या चौघां हपिसांतल्या लेह्यांनीं चारही गाळे घेतले होते, झणून एकमेकांनां शेजारच्या गाळ्यांतल्या बिऱ्हाडकरांची माहिती होती. रामराव धोंडुभाईकडे चालले तों बाहेर गॅलरीतच खांब धोंडुभाई व पिटकर आपल्याचकडे येतांना भेटले झणून तिघेहि परत रामरावांच्या गाळ्यांत येऊन बसले रामराव झणाले "कां, तुह्मालासुद्धां सडकून त्रास होतं आहेना ?"

धोंडुभाई झणतात "तें काय सांगायची सोय नाहीं परवां रात्रीं जाग्रण झालें मला सर्वंध रात्रभर, तें अजून मला भोंवतें आहे. अन् आज पुन्हां, म्हणजे—"

यावर पिटकर झणाले "झणजे काम, अगदीं वेजारच व्हायची पाळी झणायची !"

रामराव झणतात "कोण लेकाचा कुठला नाटकं का गवय्या आणून ठेवला आहेन् या घरवाल्यां आमच्या डोक्यावर, कोणास ठाऊक !"

हातपाय आंखडणें, सांधे धरणें, छातींत दुखणें, कपाळ दुखणें, कमर दुखणें वगैरे रोग
तत्काल बरे करणारा उपाय म्हणजे कॅपिटो बाम होय !

पिटकर झणतात " अहो, त्याचें ठीक आहे! भाडें मिळालें झणजे झालें. पण आपणाला हा 'सौख्याश्रम' तर अशानें 'दुःखाश्रम' होईल !"

धोंडुभाई झणतात " मी झणतों, आपण सारे कट करूं अन् असला भाडोत्री ठेवला झणून भाडेंच देऊं नये साफ ! झणजे घरवाला तेव्हांच नरम पडेल !"

यावर पिटकर म्हणतात " ती गोष्ट नका बोलूं! या इंप्रूव्हमेंट ट्रस्टनें इतकें कांहीं कठिण करून टाकलें आहे, कीं, आपण सोडलें तर उद्यां दुसरे भाडोत्री पैसा भरतील, जास्तीसुद्धां भाडें देतील. अहो जागा मेळताहेत कुठें ? "

रामराव झणाले "तर मग ही आजारी पडायची पाळी णार आपणांला ! मला तर बोवा रात्रीं दहा तास री शोंप मिळाली नाहीं तर दुसरे दिवशीं कांहीं सुचत नाहीं !"

धोंडुभाई झणतात " अलबत्, तसें व्हायचेंच— हें पहा, ऐका, कोण मोठ्यामोठ्यानें कोरस चालला आहे! अन् तबला तर किती कडकडीत वाजतो आहे. आज तर कमालच चालवली आहे बुवा !"

पिटकर झणतात "चला, तो मंगेशराव काय करतो आहे तें तरी पाहूंया. कांहींतरी युक्ति काढली पाहिजे. तो आहे मोठा युक्तिबाज."

सर्वांनांच ती सूचना पसंत पडली, व तिघेहि मंगेशरावांकडे गेले, मंगेशराव *दिवाणखान्यांत* येरझारा घालीतच होते. ते झणाले "अरे, तुम्ही तिघेहि जागेच आहांना अजून ? मी मघाशींच येणार होतों, पण म्हटलें, जर कदाचित् तुम्हांला झोंप लागली असली तर उगाच कशाला उठवा ?"

रामराव झणाले " छे हो, झोंप अगदीं अशक्य ! या लेकाची खोड मोडायला नाहींच का कांहीं युक्ति ? त्याला तरी सकाळीं एकदां सांगून पहावें—"

मंगेशराव झणाले " अहो, मीं तें परवांच केलें. मीं त्याला झटलें, कीं, रात्रीची अशी फार गडबड करणें ठीक नव्हे. तर तो दांत काढून म्हणाला, कीं, ' अहो सगळें जग सध्यां संगीताकरितां हपापलें आहे, पलुसकरांनीं सर्वांना नादलुब्ध बनवलें आहे अन् तुम्ही संगीताला गडबड कशी झणतां ?' "

धोंडुभाई झणतात "मग त्याचें झणणें आम्हीं त्याला थैंक्स का द्यावे ? ठीक ठीक!"

पिटकर झणतात " आतां मात्र पंचाईत आली ! घरवाल्याला बोलायला गेलों तर तो म्हणणार 'हवं तर सोडून जा' अन् हा तर रोज तबले झोडणार आमच्या डोक्यावर ! खासें खासें ! "

रामराव अतिशय संतापानें झणाले "तर मग त्याची खोड मोडण्याला नाहींच का कांहीं युक्ति ? छे बोवा, कसेंतरी करून त्याला उतरवला पाहिजे. सूड, सूड!"

कांहीं वेळ भयंतिनभवति झाली. नानाप्रकारच्या कल्पना निघाल्या; पण त्या सर्व अशक्य दिसूं लागल्या. अखेरीस मंगेशरावांच्या सुपीक डोक्यांत एक नामी कल्पना आली. खांबरोबर ते टाळी वाजवून झणाले "हां हां, कल्पना तर अत्यंत नामी आहे! पण तुम्हीं सर्वांनीं मनापासून मदत केली पाहिजे, तर जमेल!"

मंडळी मदत करण्याला अगदीं एका पायावर तयारच होती. मंगेशरावांनीं जास्त आढेवेढे न घेतां आपली युक्ति सांगितली. ते झणाले " हें पहा, 'कंटकेनैव कंटकम्' अथवा अलीकडचें हवें असलें तर 'सिमिलिया सिमिलिबस क्युरांटर' हें तत्त्व येथें लागू केलें पाहिजे. आपण एक रात्र त्याची अशीच झोंपमोड केल्याखेरीज तो वठणीला यायचा नाहीं. आतां, आपणाला एक रात्र कट्टी मेहनत करावी लागेल खरी, पण ती पतकरली !"

तिघेहि झणाले " हो हो, पतकरली ! बोला काय विचार केला आहेत तो ?"

मंगेशराव झणतात " विचार दुसरा कांहीं नाहीं. उद्यां आपण सर्वांनीं आणवतील तेवढीं वाद्यें मिळवून आणावीं. अन् अनायासानें त्याच्या शेजारचा गाळा रिकामा आहे, त्याची किल्ली मी घेतों घरवाल्यापासून उद्यांच्या दिवस मागून. अन् रात्रीं स्वारी निजली, झणजे आपण सारे त्या गाळ्यांत जमून इतका कल्लोळ करून सोडूं, कीं, रात्रभर त्याला डोळा नाहीं लागतां कामाचा! आपणाला आहे परवां सुटी, तेव्हां आपणाला कांहीं हरकत नाहीं. मग तो गयावया करूं लागला, कीं, असा त्याला उतरवूं झणतां, कीं, यंव् !"

पाऊस व थंडी यांचा परिणाम शरीरावर झाल्यानें होणाऱ्या वातविकारावर
कॅंपिटो बाम (मलम) अगदी खात्रीचा औषध आहे. किं. ८८.

रामराव म्हणाले "उत्तम, उत्तम! माझ्या जांवयानें परवां थोरला 'मॉनर्क ग्रॅमोफोन' घेतला आहे तो आणतों गाणून!"

पिटकर म्हणाले "मी ठाकूरद्वारांतून झांजा, टाळ, अन् थोरला नगारा आणतों पहा!"

धोंडुभाई म्हणाले "अन् लहानपणीं ताशा वाजवलेला मी विसरलों आहें, त्याचीहि पुन्हां उजळणी करायला ही संधि छान दिसते आहे!"

मंगेशराव म्हणाले "हां, असें जर अगदीं अंतःकरणापासून काम हातीं घेऊन केलेंत तर काय, हां हां म्हणतां शत्रु जेरीस येईल."

मंगेशरावांची युक्ति सर्वानुमतें पसंत झाली. वरच्या मजल्यावरील जलसा अजून कमी होण्याचें चिन्ह दिसत नव्हतें, त्यामुळें जास्तच दृढनिश्चय होऊन मंडळी आपापल्या बिऱ्हाडीं चालती झाली.

[२]

'सौख्याश्रम बिल्डिंग्ज'च्या तिसऱ्या मजल्यावर शामराजपंत व त्यांचें कुटुंब पद्मावतीबाई यांमध्यें संवाद चालला होता. शामराजपंतांची एका नवीनच मुंबईत आलेल्या नाटकमंडळीशीं अतिशय दाट ओळख होती. बहुतकरून ते लवकरच 'नाव्यकलाहुकुठारविध्वंसक' नाटक मंडळीचे मॅनेजरहि होण्याची दरीच बोलवा होती. मुंबईत राहून कांहीतरी उद्योग मिळवावा अशा हेतूनें ते एक महिन्यापूर्वी सौख्याश्रमामध्यें तिसऱ्या मजल्यावर पंधरा रुपये भाडें कबूल करून रहायला आले होते. त्यांचें कुटुंब कायतें बायको व एक लहान मुलगी. घरांतील सर्व कामधाम पद्मावतीबाईच करीत. आपणाला प्राप्ति कांहीं अजून सुरू झाली नाहीं, पंधरा रुपये भाड्यावारीच जाणार, म्हणून आतां कोणचेंहि काम मजुरीनें द्यायचें नाहीं, असा पद्मावतीबाईंचा हेतु सरळच होता; परंतु मुंबईत आल्यापासून पद्मावतीबाईंना हवा मानवेनाशी झाली. शामराजपंत लहानपणापासून थाटमाटानें रहाण्यास शिकलेला असा प्राणी होता. सतरा धंद्यांत गम्य असलेले, परंतु कोणत्याहि एका धंद्याची कांस बळकट न धरल्यामुळें वहावत चाललेले असे जे कित्येक हुशार लोक जगांत दृष्टीस पडतात, त्यांतलाच शामराजपंत होता. धोतरें, उपणीं उत्तम झुळझुळीत गुलाबाच्या फुलासारखीं पाहिजेत, जेवणाचे पदार्थ स्वच्छ व मिष्ट असे पाहिजेत, रहायची जागा सामानसुमानहि झकपक व्यवस्थित असलेंच पाहिजे, अशा शामराजपंतांच्या संवयी होत्या. आजपर्यंत पुण्यामध्यें दहाजणांच्या कुटुंबांत सर्वांच्यावरोबर यांचीं हीं कामें बिनबोभाट होऊन जात. दहाजणांत रहात तोंवर जेवणाखाण्याची व्यवस्थाहि करण्याला पैसा मोजावा लागत नसे; पण आतां ते एकटे मुंबईत येऊन राहिल्यावर पुण्याहून रोख पैसा कितीसा येणार? आणि आलेली रक्कम शामराजपंतांच्या ऐटबाज राहणीला कशी पुरणार? पण लवकरच आपणाला कांहींतरी दरमहा सुरू होईल आणि मग आपण नोकर ठेवूं, तोंपर्यंत आपणच सर्व काम करूं, अशी पद्मावतीबाईंनीं कंबर बांधली होती.

परंतु तोंडानें करूं म्हणणें व प्रत्यक्ष हातानें करून दाखविणें यांत किती जमीनअस्मानाचें अंतर असतें, त्याचा अनुभव पद्मावतीबाईंना लवकरच आला. पुण्यांत असतांना दहाजणींमध्यें वांटणीप्रमाणें काम करणें, आणि हल्लीं घरांतील एकूनएक काम एकटीनें करणें, यांत महदंतर पडूं लागलें. जन्मभर झुळझुळीतपणानें रहाण्याची नवरायायकोला लागलेली संवयच आतां त्यांना जास्त त्रास देऊं लागली. झाडलोट, अंथरूणपांघरूण, भांडींकुंडीं, दिवावत्ती सर्वच स्वच्छ लखलखीत ठेवणें एकटीला जड जाऊं लागलें. पण चाळढकल करून अमंगळपणानें राहणेंहि मनाला चालत नसे. त्यांतून कोणतेंहि स्वच्छतेचें काम करणें म्हणजे पाणी मुबलक पाहिजे, हें उघड आहे. पाटपाणी, धुणीं, स्नानें, स्वयंपाक, उष्टींखरकटीं, मोऱ्या स्वच्छ करणें, हीं सर्व कामें नीट होण्यास पाणी रगड असल्यावांचून कसें चालावें? नळाला पाणी आलें म्हणजे पद्मावतीबाईंनां हीं सर्व कामें करतांना तितका विशेष त्रास होत नसे; पण मुंबईत तिसऱ्या मजल्यावर पाणी रगड येणें किती दुर्घट आहे, याची कल्पना पद्मावतीबाईंनां पूर्वी कोठून असणार? नळराजाची अपेक्षा करीत बसण्यांत त्यांचा कितीक तरी वेळ व्यर्थ जाई, व अखेर पाणी न मिळालें म्हणजे खालच्या मजल्यावरून पाणी आणून तें तिसऱ्या मजल्यावर चढवितांना त्यांचा

पाऊस व थंडी यांचा परिणाम शरीरावर झाल्यानें होणाऱ्या वातविकारावर
कॅपिटो वाम (मलम) अगदीं बरोबर औषध आहे. किं. ८८.

जीव अगदीं मट्टयास येई. आधीं म्युनिसिपालिटी-कडून पाणी ठराविक तासच सुटणार, आणि त्यांतून तें दुसऱ्या मजल्यावरील माणसांच्या हातून निसटेल तर तिसऱ्या मजल्यावर पोंचणार! पद्मावतीबाईंनीं दुसऱ्या मजल्यावरील बायांमाणसांनां वारंवार विनंति करून पाहिलें होतें. "आम्ही इनमीन अडीच माणसं, आह्मांला तुम्ही फक्त एक तासभर पाणी सोडीत जा, ह्मणजे बाकी सर्व बेळ तुह्मांला वापरायला आमची हरकत नाहीं; तर मेहेरबानी करून एक अर्धा तास तरी कोणी नळ उघडूं नका," असें त्यांनीं हजार वेळां सांगितलें. पण तादृश उपयोग झाला नाहीं. खालच्या मजल्यावरचा नळ बंद करवून वर जाऊन दोन मिनिटें होतात तोंच कोणीतरी खालीं नळ सोडी, आणि पद्मावतीबाईंचें पाणी बंद होई. शेवट परिणाम असा होई, कीं, घागर घेऊन तळमजल्यावरून भरून दोन जिने त्यांनां चढवावी लागे. दुसऱ्या मजल्यावरहि नळावर नेहमीं गर्दी असल्यामुळें तेथें रीघ नसे. अशा तऱ्हेनें पाण्याची अशी ओरड, आणि पाणीतर लागणार पुष्कळ, तें सर्व आणतां आणतां पद्मावतीबाई अगदीं जेरीस येऊन गेल्या होत्या.

शामराजपंतांनां हे बायकोचे हाल पाहून फार वाईट वाटे, व ते कोणत्या उपायानें दूर करितां येतील, असा त्यांनीं पुष्कळ विचार केला होता. एकदोन वेळां जिन्यांत पिटकर भेटले होते, त्या वेळीं त्यांनां मुद्दाम त्यांनीं विनंतिहि केली होती. पिटकरांनीं तोंडानें मोठ्या सभ्यपणानें "ठीक आहे, आतां व्यवस्था करतों," असें आश्वासन दिलें; पण प्रत्यक्ष उपयोग झाल्याचें मुळींच दिसेना. या लोकांनां ताळ्यावर आणायला काय उपाय करावा, काम युक्ति केली ह्मणजे हे खालचे भाडोत्री उमजतील, हें त्यांनां आतां समजेनासें झालें होतें. दिवसेंदिवस तीन जिने चढून पाणी आणावें लागल्यानें बायको थकत चालली होती. आतां कांहीं तरी विशेष उपाय केल्याशिवाय कार्यसिद्धि होत नाहीं अशी त्यांची खात्री झाली, व अखेरीला त्यांनीं आपल्या वर्गांतली नाटकमंडळी बोलावून रात्रींच्या वेळीं नाटकाच्या तालमी आपल्या बिऱ्हाडीं करण्याची सुरवात केली होती. हपिसांतल्या लोकांची झोंपमोड होऊं लागली ह्मणजे ते होऊनच आपणाशीं बोलायला येतील, व मग आपण आपलींहि अडचण त्यांच्याकडून मिटवून घेऊं, असा शामराजपंतांचा हेतु होता; व त्याप्रमाणें त्यांनीं आज आठ दिवसांत वर्तनहि सुरू केलें होतें.

शामराजपंत व पद्मावतीबाई यांचा संवाद चालला होता, हें वर सांगितलेंच आहे. पद्मावतीबाईंच्या माहेरीं कर्जत येथें लग्न निघालें होतें, तिकडे त्यांनां बोलावल्याचें पत्र आलें होतें, त्यावरून संवादाला सुरवात झाली होती. लग्नाला गेलें हें पाहिजेच, असें एकीकडून पद्मावतीबाईंनां वाटत होतें, व दुसरीकडून यजमानांनां मुंबईत एकटें सोडणेंहि त्यांनां अवघड वाटत होतें. मुख्य गोट आज त्यांनां एवढीच दिसत होती, कीं, आठ दिवस तरी आपल्या पाठीमागची घागरीची सेवा चुकेल व तेवढीच आपणाला विश्रांति मिळेल. अखेर कसें तरी करून या पाण्याची नीट व्यवस्था लावून टाका, आणि मी आठ दिवसांनीं येईन तोंवर तासभर तरी वर पाणी येण्याची तजवीज पक्की करून ठेवा, असें त्यांनीं यजमानांनां बजाविलें, व दोन दिवसांत बायको जाणार तर आपण कशी खटपट करणार आहोंत त्याचा मासला तिला प्रत्यक्ष दिसावा ह्मणूनच शामराजपंतांनीं कडेकोट तयारी अमलांत आणली होती. या त्यांच्या तयारीचा परिणाम दुसऱ्या मजल्यावरच्या मंडळीवर कसा झाला, तो मागील प्रकरणांत वाचकांनीं पाहिलाच आहे!

[३]

दुसऱ्या मजल्यावरच्या मंडळीनें ठरविल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळपासून जय्यत तयारी चालविली. ग्रामोफोन, झांजा, टाळ, नगारा व ताशा हळुहळू येऊन एकेकाच्या बिऱ्हाडीं पडूं लागले. तोंडानें वाजविण्याचींहि दोनतीन वाद्यें रामरावांनीं एका वाद्यें विकणाऱ्या कंपनीकडून भाड्यानें आणलीं. पिटकरांचे दोघे मुलगे पंधरा व तेरा वर्षांचे होते, त्यांनांहि या कटांत सामील करून घेतलें. मंडळी वाजवून वाजवून थकली ह्मणजे मध्यंतरीं फराळाचीहि योजना ठरविण्यांत आली होती.

शामराजपंतांला अर्थातच यांतलें कांहींएक माहीत झालें नाहीं. सकाळीं नवराबायकोमध्यें ठरल्याप्रमाणें दुपारीं पांचाच्या गाडीनें पद्मावतीबाईंनां कर्जतास

प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका अशक्तांस सशक्त व जवान बनवून
त्यांच्या अंगांत नवीन जोर उत्पन्न करतात. वापरून पहा!

पोंचविण्याकरितां चार वाजतां शामराजपंत व्हिक्टोरिआ घेऊन आले, व हळुहळू एक एक सामान व्हिक्टोरिआंत ते आणून ठेवीत होते. तितक्यांत रामरावादि मंडळी शनवारचीं हपिसें लवकर बंद होऊन घरीं आली. दाराशीं व्हिक्टोरिआंत सामान भरतांना पाहून त्यांच्या पोटांत धसका बसला, कीं, सूड घेण्याकरितां आपण येवढी जय्यत तयारी करून ती अखेर व्यर्थ जाते कीं काय? "कां हो, गांवाला जातां कीं काय?" असें रामरावांनीं हंसत हंसत शामराजपंतांला विचारिलें, व त्यांनींहि तसेंच हंसत हंसत "छे, मी नाहीं जात, आमची 'वाइफ' माहेरीं जाते आहे चार दिवस," असा जवाब दिला, तेव्हां रामरावांचा जीव पुनः हुशारींत आला. तरी हा खरोखरच परत येतो आहे, अशी त्यांची पुरी खात्री होईना. पण रात्रीं आठ वाजतां शामराजपंताला जिन्यावरून येतांना रामरावांनीं प्रत्यक्ष पाहिलें, तेव्हां मात्र आतां आपला सूड खात्रीनें उगवणार, असें वाटून त्यांच्या तोंडावर एकप्रकारचें सैतानी हास्य विलसूं लागलें.



"कां हो, गांवाला जातां कीं काय?"

पिटकर म्हणाले "छे हो, त्या लेकाच्या बायकोला पोरालासुद्धां आज झोंप यायला नको होती! काय करावें? कशी निसटून गेली पहा!"

धोंडुभाई म्हणाले "जाऊंद्या हो, बायकापोरांचा काय यांत संबंध? मुख्य ऐन गड्डा तर तुमच्या तावडींत सांपडतो आहेना? झालें तर मग."

रात्रीं नऊ वाजायच्या आंत जेवणें आटोपून सर्व मंडळी रामरावांच्या बिऱ्हाडीं जमली, व हळुहळू एक एक वाद्य वरच्या मजल्यावर चढूं लागलें. घरवाल्याकडून सत्यनारायणाकरितां म्हणून रिकाम्या गाळ्याची किल्ली दुपारीं हपिसांतून येतांनाच मंडळी घेऊन आली होती. पिटकरांनीं आपला थोरला 'स्टोव्ह' वर नेऊन कॉफीची तयारी ठेविली होती, व रामरावांनीं थोड्याशा उपाहाराची तजवीज ठेवून पानसुपारी, सिगारेट्सची व्यवस्था मंगेशरावांकडे सोंपविण्यांत आली होती. धोंडुभाईंनीं बैठक, दिवाबत्ती वगैरे किरकोळ तयारी झटकन् करून टाकली. सर्वांच्या बायकामाणसांनीं जागत बसण्याचें कारण नाहीं, असें आगाऊ ठरविलें होतें; पण येवढा थोरला प्रचंड समारंभ वरच्या मजल्यावर चालू असतां बायकांनां स्वस्थतेनें झोंपा कशा लागणार? त्याहि सर्वजणी रामरावांच्या बिऱ्हाडीं जमल्या होत्या.

पिटकर मोठे युक्तिबाज होते. त्यांनीं एक लहानशी गणपतीची तसबीर भिंतीवरील खिळ्याला अडकावून दिली व तिला कागदी फुलांचा हार लटकावून दिला. बरोबर साडेनऊ वाजतां जलशाला सुरुवात झाली. प्रथम ग्रॅमोफोनचें वादन सुरू झालें व हळुहळू दहा पंधरा मिनिटांनीं एकेक नवीन वाद्य त्यांत सामील होऊं लागलें. साडे दहांच्या सुमाराला मंडळी सर्व वाद्यांच्या घणघणाटांत गर्क होऊन गेली होती. प्रत्येकानें आपणाकडून मनापासून मेहनत चालविली होती. मग तेथें किती सूर बेसूर त्रिसूर चौसुर एकमेकांशीं झगडत असतील, त्याची कल्पना सहज करतां येईल. प्रत्येक लग्नसमारंभाच्या वेळीं ताशे, नगारे, सनई, ढोल, बँड, झांजा इत्यादि वाद्यांचा कर्णमधुर मिलाफ ऐकण्याची कोणाला संवय नाहीं? त्यांतच आणखी दोनचार ग्रॅमोफोन आणून माणसाच्या डोक्यांवरून केंकाटत नेण्याची सुधारणा करण्याचें श्रेय, कोणींतरी हौशी गृहस्थानें एकाद्या मानी विहिणीचा रुसवा

प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका अशक्तांस सशक्त व जवान बनवून त्यांच्या अंगांत नवीन जोर उत्पन्न करतात. वापरून पहा!

बालविध्याकरितां तरी निदान ध्यावें, अशी आमची साग्रहपूर्वक शिफारस आहे!

[४]

दोड तास कही मेहेनत केल्यावर मंडळीला थकवा आला. शिवाय, कॉफी व फराळाच्या सामानाकडे मधून मधून लांचें लक्ष्य जाई. सबब घोंडुभाईंच्या सूचनेवरून मध्यंतरी पंधरा मिनिटें जलसा थांबविण्यांत आला. कॉफी पितां पितां रामराव म्हणाले "काय हो, पिटकर, हा लेंकाचा अजून येईना आपल्याशीं भांडायला तो?"

मंडळीनें पूर्वापेक्षां आतां दुप्पट जोरानें सुरवात केली, व हातांनीं वाद्यें वाजवून तोंडानेंहि ते भलीं मोठीं बँडचीं वाद्यें सडकून फुंकूं लागले.

'राजाधिराजाय प्रसह्य साहिनेऽऽऽ'च्याहि आरोळ्या मधून मधून सुरू झाल्या. असा धूमधडाका सुरू असतां मंडळीचे डोळे आशापूर्ण दृष्टीनें एकसारखे दरवाजाकडे लागले होते. 'राजाधिराजाय' अगदीं संपण्याच्या वेळच्या ऐन रंगांत आलें होतें, इतक्यांत दरवाजाला बाहेरून खाड्कन् कोणीं लोटलें.



" ए गद्दालोक ! तुम क्या सब दिवाने बन् गये ? चलो हमारे साथ पोलिसचौकीपर !"

मंगेशराव ह्मणतात "आपल्याच्यानें तर आतां फार वेळ टिकाव नाहीं धरवत बोवा!"

घोंडुभाई ह्मणतात " खरेंच बोवा, कितीतरी रात्र झाली असेल!"

रामराव ह्मणतात "ह्यातुमची! असे इतक्यांतच थकलां काय ? आतां जरा कॉफीबिफी घेऊन ताजेतवाने व्हा, ह्मणजे अगदीं सडकून शिकस्त करूं ह्मणजे लेंकाचा कसा चटकन् वठणीला येईल!"

पिटकर ह्मणतात "आमची युक्ति अशी फसूं नाहीं द्यायची रे बोवांनों!"

ह्यावरोबर रामराव व पिटकर विजयाच्या टाळ्या पिटूं लागले.टाळ्यांच्या भरांतच एक पुरभय्या पोलिस शिपाई आंत येऊन ह्मणाला "ए गद्दालोक ! तुम क्या सब दिवाने बन् गये ? चलो हमारे साथ पोलिसचौकीपर!"

हे शब्द ऐकतांच मंडळी घाबरून तर गेली; पण युक्तिबाज पिटकर उसनें अवसान आणून ह्मणाले " आह्मी आपल्या गणपतीची आरती करतों आहोंत ह्यांत काय गुन्हा आहे होय ?"

पोलिस शिपाई ह्मणतो "क्या ? ये आठ दिनमें पांच रात तुम लोक ऐसो बोंब पाडके सब लोगोंकु बहुत सताते हो. साब बोला के ए लोककू एकदम खेंचके लाना."

दूषित रक्तासंबंधाचे सर्व आणि भयंकर रोगांवर क्युरेलाइन वापरा.
कोणत्याहि बाह्योपचाराची जरुर नाहीं.

रामराव म्हणाले " अहो शिपाईबुवा, मागचे चार दिवस आम्ही नव्हतों ते बाजवीत ! "

" हां हां, ये तो हमेशकी आरोपी लोककी बात है–मी नाहीं मी नाहीं ! इसवास्ते हमारा ऑर्डर्स है, के, गोलमाल करनार लोककू गुन्हा करते वखत पकटके ले आव. अभी चलो तुम सब् लोक एकदम ! "

आतां मात्र सर्वांची पांचांवर धारण वसली ! सर्व गुन्ह्याच्या आयुधांनिशीं आपल्याला पोलिसनें पकडून नेलें, तर उद्यां जिकडे तिकडे आपली किती फजिती होईल, रात्रभर पोलिसचौकींत अटकेंत रहावें लागेल, व साहेबाला हपिसांत सोमवारीं ही बातमी कळली ह्मणजे किती शरमेची गोष्ट होईल, त्याचें मूर्तिमंत चित्र सर्वांच्या डोळ्यांपुढें झटकन् उभें राहिलें. रामराव व पिटकर तर अगदीं बोवडी वळण्याच्या बेतांत आले. धोंडुभाई व मंगेशरावांनीं थोडें प्रसंगावधान धरून पोलिस शिपायाला दादाबाबा करण्याचा प्रयत्न चालविला; पण तो कसला खट, कांहीं केल्या वळेना ! " साहेबाला कोणाचीशी चिठी आल्यावरून त्यानें मला मुद्दाम तुम्हांला पकडायला पाठविलें, मीं जर तुह्मांला नेलें नाहीं तर माझ्या पोटावर पाय येईल," असें शिपाईबुवा ह्मणूं लागले ! या बोलण्याचा हेतु मंडळीनें तेव्हांच ओळखला, व नाहीं होय करून मोठ्या मेहरबानीखातर ह्मणून एक पिंवळें नाणें खिशांत पाडून शिपाईबोवा चालते झाले !

पांच मिनिटें कोणीहि एकसुद्धां शब्द बोलला नाहीं. आपण करायला गेलों काय आणि हें झालें काय ? इतकें करून सूड घ्यायचा तो तरी झाला कीं नाहीं ? रामराव म्हणाले "हा लेंकाचा काय कुंभकर्ण आहे का कसें काय ? इतक्या थोरल्या गलग्यांत कसा निजला आहे बुवा ?"

पण त्यांनां उत्तर देण्याची कोणीं तसदी घेतली नाहीं. अखेर मंडळीला आशा इतकीच राहिली, कीं आपल्या बायकांनां तरी ही आपली फजिती कळूं नये. ह्मणून जणूं काय कांहीं विशेष झालें नाहीं, असा आव घालून मंडळी खालीं जाण्यास निघाली. शामराजपंतांच्या दरवाजाशीं येऊन पहातात तों काय ? दाराला बाहेरून भलें मोठें कुलूप लागलेलें दिसलें ! त्यावरोवर रामराव अगदीं खजील होऊन गेले. सूड घेण्याचा एवढा व्यूह रचून तो सगळा सपशेल आपल्याच अंगावर आला, शामराजपंत एवढा वेळ विन्हाडीं मुळींच नसून आपण मात्र सर्व विनाकारण वेड्यासारखी कष्टी मेहनत करीत राहिलों, हा आपला केवढा मूर्खपणा !

सर्व मंडळी खालीं परत रामरावाच्या दिवाणखान्यांत जमली; पण कोणीहि कांहीं बोलेना. युक्तिबाज पिटकर अखेर म्हणाले "पण काय हो, तो आलेला इसम तरी पोलिस खरा होताना ?"

धोंडुभाई ह्मणाले "कोण जाणे ! हा नाटक्या शाम्या तर दाढीमिशी लावून आला नव्हता ना ?"

मंगेशराव म्हणाले " खचित खचित तो पाजी शाम्याच असला पाहिजे ! आतां माझ्या ध्यानांत आलें ! त्याच्या पायांतील बुटावरून मी त्याला पक्कें ओळखलें. तो पोलिसचा शिपाई खास नव्हता ! पोलिसाचें सोंग घेऊन लेकानें आम्हांला भेडसावलें व आमची फजिती केली. "

असे अनेक तर्क कुतर्क सुरू झाले, व जो पहावा तो खरा असण्याचाहि त्यांनां संभव वाटूं लागला. पंधरा रुपये खिशांतले जाऊन बायकापोरांच्या देखत फटफजिती झाली, एवढा मात्र फायदा मिळाला ! पण आतां इलाज काय ? जो तो निमुटपणें आपापल्या ठिकाणीं स्वस्थ राहिला !

[५]

दुसरे दिवशीं शामराजपंतांच्या बोलण्यांत आलें, कीं, आपण आठांच्या आधींच बाहेर निघून गेलों होतों.

वास्तविक प्रकार असा होता, कीं, शेजारच्या रिकाम्या गाळ्यांत जलसा सुरू होतांच त्यानें धूर्ततेनें हा आपणाला जवाब आहे असें तेव्हांच ताडलें होतें.

दुसऱ्या मजल्यावरील मंडळीचा हा प्रशंसनीय शेजारधर्म त्याला मुळींच आवडला नाहीं, व आतां, जास्त ताणून धरण्यांत अर्थ नाहीं असें समजून तो आपणच होऊन त्यांच्याशीं मिलाफ करण्यास गेला. तीहि मंडळी एका पायावर तयार होती. अखेर एक तास दुसऱ्या मजल्यावर कोणींहि नळ सोडणार नाहीं, असें मंडळीनें कबूल केलें, व शामराजपंतांनींहि आपल्या विन्हाडीं इतःपर तालीम न करण्याचें अभिवचन दिलें.

ही तडजोड सर्वांनींच आधीं करून टाकली असती तर किती वरें त्रास व मानखंडना चुकली असती ?

' गुडेरीन ' नें आजपर्यंत हजारों बायकांचे जीव काळाच्या जबड्यांतून सोडविले आहेत.
किंमत रु. २॥. ट. स. ८ आणे.

गरीब विचारें पाउस!

[श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए., एलएल. बी., रामगांव.]

मुलांमुलींचीं लहान वयांतच लग्नें करण्याचें एक कारण असें पुढें करण्यांत येतें, कीं, त्यानें पतिपत्नींस परस्परांच्या स्वभावांचा परिचय करून घेण्यास अवसर मिळतो, ते स्वभाव संवयीनें हळुहळू एकमेकांशीं मिळते होत जातात, व याप्रमाणें स्वभावांचें बेमालूम मिश्रण झाल्यावर साहजिकच तंट्याचें मूळ नाहींसें होऊन उभयतांमध्यें निश्चल प्रेम उत्पन्न होतें. आतां बालपणींचे स्वभाव प्रौढपणींहि तसेच टिकतात कीं काय, टिकत नसल्यास बालपणींच्या स्वभावांचा परिचय करून घेतल्यानें कोणता लाभ होणार, परिचय करून घेण्याइतकी वधूवरांत त्या वयांत मार्मिकता असते काय, व असली तरी नुसता परिचय झाल्यानें स्वभावांची सांगड होणें शक्य आहे कीं काय, असे या संबंधानें अनेक प्रश्न उपस्थित होतात. वरील कारणांची व्यवहारांत सत्यता पाहूं गेल्यास मूळचीं विजोड, पण केवळ चिरसहवासाच्या जोरावर सुखासमाधानानें नांदणारीं जोडपीं विरळाच सांपडतील. स्वभावसादृश्याकडे लक्ष्य न देतां, किंबहुना ज्या वयांत स्वभावाची पारखहि होणें शक्य नाहीं, अशा वयांत विवाहग्रंथीनें बद्ध केलेल्या वधूवरांचे स्वभाव पुढें काकतालीयन्यायानें सदृश निघण्याचा संभव आहे, नाहीं असें नाहीं; परंतु बहुतेक जोडप्यांत बुद्धि, भावना, अभिरुचि इत्यादि मनोधर्मात मोठेपणींहि तीव्र भेद असलेला आपणांस दिसून येईल. दोहोंपैकीं एक शांत व विचारी असल्यामुळें व लौकिकाच्या किंवा इतर भीतीमुळें त्या गोष्टीचा पुष्कळदां बोभाटा होत नाहीं. पण ही बाह्य शांतता अंतःसृष्टीची दर्शक आहे असें समजल्यास चूक होईल. ज्याप्रमाणें घाण्यास जोडलेल्या बैलाचा चक्राकार फिरण्यांत सहल व्हावी हा हेतु नसतो, त्याप्रमाणें नशिबीं आलेल्या व जिच्यापासून सुटका होण्याची आशा करणें व्यर्थ आहे, अशा स्थितींत रूढीनें आंसून दिलेलें कर्तव्य करीत जीवितयात्रा कंठण्यांत हौसेचा किंवा हुरुपेचा भाग फार कमी असतो. ज्याप्रमाणें चोरीस गेलेला जिन्नस चोरास दान केला असें मनांत समजल्यानें पदरीं पुण्य पडत नाहीं, किंवा पळण्याच्या साऱ्या वाटा बंद झाल्यावर शत्रूच्या हातून जीवास मुकल्यानें शूर ह्मणून कीर्ति होत नाहीं, त्याप्रमाणें या जुलमाच्या रामरामांतहि कर्तव्य अंतःकरणपूर्वक बजाविल्यापासून होणारें समाधान मिळत नाहीं.

अशा विजोड जोडप्यांपैकींच संपतराव व सारजाबाई हें जोडपें होतें. संपतराव एका खानदानीच्या मराठे घराण्यांतील असून खाऊनपिऊन सुखी होते. त्यांचा स्वभाव लहानपणापासून करडा असे. त्यांच्यासमोर जीभ वर करून बोलण्याचें कोणाचेंहि सहसा धैर्य होत नसे. त्यांनां शिकारीचा नाद असून त्यांनीं मारिलेल्या सांबरांचीं शिंगें व वाघांचीं कातडीं यांनी त्यांचा दिवाणखाना भरून गेला होता. मुबलक शिकार व यथेच्छ आहारविहार ह्मणजेच आयुष्याची इतिकर्तव्यता, असें त्यांनां वाटे. ते बुद्धीनें अगदीं मंद होते असें नाहीं. परंतु त्यांनां ज्ञानसंपादनाचा मनापासून कंटाळा असे. त्यांचें शिक्षण प्रवेशपरीक्षेपर्यंत झालें असून तींत अनेक वेळां अपेश मिळाल्यामुळें त्यांनां त्याचा नाद सोडून द्यावा लागला होता. पण याबद्दल त्यांनां लाज किंवा विषाद न वाटतां उलट त्यांच्या मनांत विद्येविषयीं पूर्ण द्वेष उत्पन्न झाला होता. ज्ञानसंपन्न पुरुषांस त्यांजकडून वेदांप्रमाणेंच अपौरुषत्वाचा मान मिळत असे. अशा पुरुषांस ते नेहमीं 'तात्यापंतोजी,' 'कागदी जवान' अशा नांवांनीं हिणवीत असत. त्यांचीं धर्मसंबंधी मतें जुन्या वळणाचीं असत. धर्मविषयक किंवा इतर मतांत बदल करणें हें त्यांनां शक्य नव्हतें. कारण, त्यास लागणारा धिमेपणा व समतोलपणा त्यांच्या अंगीं नव्हता. त्यांनां राग येण्यास फार थोडें निमित्त पुरत असे, इतकेंच नाहीं, तर ते अशा निमित्ताच्या नेहमीं शोधांतच असत. रागाशिवाय दिवस सुना गेला तर त्यांनां कसेंसेंच वाटत असे, व असा संबंध दिवस सुना गेल्यावर जर निजण्याचे पूर्वी त्यांनां रागावण्यास कारण मिळालें, कीं, त्यांनां रागावरोबर मनांतल्या मनांत समाधानहि वाटत असे.

अशा स्वभावास जर तशाच तामसी स्वभावाची जोड मिळाली असती तर त्यास कांहींसा आळा बसला असता. परंतु सारजाबाईचा स्वभाव याच्या अगदीं उलट होता. त्या फार विवेकी व शांत स्वभावाच्या असत. त्यांचें वागणें, बोलणें गोड व चर्या सौम्य असे. त्यांचें मराठी सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण झालेलें असून त्यांनां वाचण्याचाहि बराच नाद होता. याशिवाय गायन, चित्र, शिवण, कशीदा इत्यादि कलांतहि त्यांची थोडीबहुत गति झाली होती. त्यांच्या माहेरचें शेजार ब्राह्मणांचें असल्यामुळें त्यांनां मांसाहाराबद्दल लहानपणापासूनच अरुचि असे; व ही अरुचि सासरीं नाहींशी किंवा कमी होण्याऐवजीं दुणावली मात्र. केवळ मनुष्याच्या जिव्हालौल्याकरितां विचाऱ्या मुक्या प्राण्यांनां काय ह्मणून जिवें मारावें, असें त्या नेहमीं

हंसदूत २ आणे; मोहनतारा २ आणे; कुसुमगुच्छ ४ आणे; उपदेशपाठ ४ आणे.
मनोहर कवितांचीं पुस्तकें. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

ह्मणत असत. या संबंधानें त्यांचे व संपतरावांचे बरेच खटके उडत. आपल्या पतीचें मन शाकाहाराकडे वळविण्याकरितां सारजाबाई आपली पराकाष्ठा करीत. परंतु संपतरावांच्या जहालपणापुढें त्यांना माघार घ्यावी लागे. क्षत्रियाच्या धर्माप्रमाणें प्राणिहिंसा व मांसाहार हीं केलींच पाहिजेत, असें संपतरावांचें आग्रहाचें ह्मणणें असे; व 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊलें' ही साधूक्ति जर खरी मानली, तर मांसाहाराच्या बाबतींत संपतरावांच्या पायांवर अखंड लोटांगणें घालावीं इतकी त्यांची योग्यता होती! मांसाहाराच्या मागोमाग मदिरापानहि आलेंच. या संबंधानेंहि ते कोणास हार जाण्यासारखे नव्हते. त्यांचा स्वभाव मानी असल्यामुळें त्यांची गटारांत पडेपर्यंत कधींच पाळी येत नसे हें खरें; पण दारूच्या निशेंत घरांतल्या घरांत चाटेल तसा धुमाकुळ घालण्याला ते कमी करीत नसत. प्रसंगीं ते बायकोच्या अंगावर हात देखील टाकीत, आणि बायकोच्या शिक्षणाबद्दल व भूतदयेबद्दल उपहासात्मक व अभद्र शब्द काढीत. परंतु सारजाबाई तें सारें निमूटपणें सहन करीत असत. दुसऱ्या दिवशीं या अत्याचाराची आठवण झालीच, तर संपतराव झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी दाखवीत असत. पण 'या दिलगिरीचें कारण नाहीं. आपणाकडून विशेष असें कांहींच झालें नाहीं,' असें उत्तर सारजाबाईकडून तावडतोब आलें नाहीं तर ते उलट सारजाबाईवरच रागावत, आणि 'उर्मट', 'डौली' अशा शेलक्या विशेषणांनीं त्यांची संभावना करीत.

सारजाबाई प्रसंग पाहून नवऱ्यास आहारपानासंबंधानें जो उपदेश करीत तो अगदींच फुकट जात असे, असें मात्र नाहीं. कारण, अशा प्रसंगीं त्यांचा मुलगा धाकटा जगू जवळ असल्यास तो एकाग्र व सतृष्ण अंतःकरणानें त्या उपदेशाचा प्रत्येक शब्द ऐकून हृदयांत साठवून ठेवीत असे. जगू ह्मणजे आपल्या आईची प्रतिमाच होता. त्याचा चेहरा चित्ताकर्षक, हंसरा, परंतु कांहींसा दीनवाणा होता. त्याच्या डोळ्यांवरून तो नेहमीं कोणत्या तरी चिंतेत मग्न आहे असा भास होई. त्याला आपल्या बापाचा इतका धाक वाटत असे, कीं, तो त्याच्या वाऱ्यासहि सहसा उभा रहात नसे. आईभोवतींच नेहमीं घोटाळावयाचा. तो जेव्हां आनंदांत येई तेव्हां तिच्या भोंवतीं उड्या मारीत असे, आणि त्याच्या मनास वाईट वाटलें, कीं, तिच्या ओच्यांत डोकें खुपसून बसत असे. आईला आनंदांत पाहिलें ह्मणजे त्याला मूठभर मांस आल्यासारखें होई, आणि तिला उदास पाहिलें ह्मणजे त्याच्या पोटांत कालवाकालव होई. संपतरावांनीं तिजवर हात उगारला ह्मणजे तो धांवत जाऊन मध्यें पडे, आणि तिच्या बांड्याचा मार आपल्या अंगावर घेई. याप्रमाणें मुलानें आईचा कैवार घेतलेला पाहून संपतरावांचा राग विकोपाला जात असे, आणि 'कारट्या, तुला मारायची हौस आहे नव्हे?' असें ह्मणून ते त्याच्या कोमल अवयवांवर निष्ठुरपणें प्रहार करीत असत. एकदां तर त्यांनीं त्याच्या पाठीवर इतकें मारिलें, कीं, तो रक्त ओकून कांहीं वेळ भुईवर निपचित पडला. सारजाबाईच्या तोंडचें पाणी पळालें. त्यांनीं त्याला सावध केलें, आणि त्या दुःखावेगानें नवऱ्यास ह्मणाल्या, "मला आणि याला एकदां मारून टाकलें ह्मणजे सुटाल!" यावर संपतरावांनीं येवढेंच उत्तर दिलें, "जशी आई तसा बेटा. पक्का कांगावखोर आहे. या खेपला तुमचा मारावरच सोडला. पुढील खेपस उपाशीच ठेवीन!" इतकें बोलून ते निघून गेले. इकडे सारजाबाई मुलाचें डोकें मांडीवर घेऊन पोटभर रडल्या; आणि पुन्हां मुलाला मार बसण्याचा प्रसंगच येऊं द्यावयाचा नाहीं असा त्यांनीं मनाचा निर्धार केला.

जगूस शिक्षणाचा ओनामा आईपासूनच मिळाला. त्याला अक्षरओळख झाल्यानंतर सारजाबाईनीं त्याला प्रत्येक शब्दाची व्युत्पत्ति समजावून देऊन त्याच्या सर्व अर्थांचा मूळ धातूशीं संबंध स्पष्ट करून सांगितला. त्यामुळें त्याच्या स्मरणशक्तीस शब्दांचे अर्थ लक्ष्यांत ठेवण्याची दगदग न पडतां त्यांची मार्मिक योजना कशी करावी याचें त्याला ज्ञान झालें. मधुर वर्ण किंवा शब्द कोणते, कठोर कोणते, हें त्यांनीं त्याला समजावून देऊन घोटाळ्याचा अर्थ सुगम रीतीनें व्यक्त करण्याची विद्याहि शिकविली. वृत्तदर्पणांतील बरींच वृत्तें त्याला आईच्या तोंडचें मधुर गाणें ऐकूनच अवगत झालीं. गणितासारखा कठिण विषय शिकवितांनां त्या तो होतां होईल तितका सागरगोट्यांच्या व पैशांच्या साह्यानें सुगम करीत. इतिहास शिकवितांना प्रसिद्ध स्त्रीपुरुषांचीं चरित्रें चटकदार शब्दांनीं त्याच्या मनावर बिंबवीत, व त्यांतील जीं प्रसिद्ध स्थलें त्यांनीं स्वतः यात्रेच्या निमित्तानें पाहिलीं होतीं, तीं त्या इतकीं हुबेहुब वर्णीत, असत कीं, तीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांसमोर आहेत असा त्याला क्षणभर भास झाल्यावांचून रहात नसे. एका घटकेस हिमालयाच्या शिखरावर, तर दुसऱ्या घटकेस काश्मीरांत झेलम नदीच्या पृष्ठभागावर; एका क्षणीं ताजमहालांत, तर दुसऱ्या क्षणीं बेरूळच्या लेण्यांसमोर; एका निमिषास वेहडाघाटाच्या स्फटिकाच्या टेकड्यांसमोर, तर दुसऱ्या निमिषास अमरकंटकाच्या धबधब्याखालीं आपण आपल्या आईचा हात धरून उभे आहोंत, असें त्याला वाटत असे. गान व चित्र या कलांवर सारजाबाईचें फार प्रेम असल्यामुळें त्या कलांतील मूलतत्त्वेहि त्यांनीं त्याला शिकविलीं. त्या गात असतां जगू चित्रासारखा स्तब्ध रहात असे, तेव्हां दोन्ही कला आपणासमोर मूर्तिमंत स्थित आहेत असें प्रेक्षकास वाटत असे. जगूनें पहिलें चित्र आपल्या आईचेंच काढिलें, व तिच्या तोंडचा रामाचा धांवा तो प्रथम गाण्यास शिकला. प्रल्हादास ज्याप्रमाणें प्रत्येक वस्तूंत नारायण दिसे, तशी जगूस प्रत्येक चिंतेत व कलेत आपली आई दिसत असे.

रा. व. पर्वेला ६ आणे; चतुरविनोदी क्रिया ६ आणे; वेड्यांचें इस्पितळ ३ आणे; विनोदप्रचुर
प्रहसनें. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

इतर धर्मांतील उदात्त तत्त्वांप्रमाणें बौद्धधर्मांतील अहिंसेचें तत्त्वहि जगूच्या आईनें त्याच्या मनावर ठसविलें होतें. लहानपणीं पुष्कळ मुलांना मुंग्यामुंगळ्यांची विनाकारण हत्या करण्यांत मोठी मौज वाटत असते. तशी मौज शिक्षणाच्या अभावीं जगूसहि वाटली असती. पण सारजाबाईनीं त्याच्या मातृप्रेमाच्या द्वारें त्याच्या मनांत तशा क्षुद्र जंतूविषयींहि दया उत्पन्न केली. त्यांनीं म्हणावें "बाळ, मी जशी तुझी आई आहें, तशी या प्राण्यालाहि एक आई आहे. ती त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली असेल. तुला घरीं यावयाला उशीर लागला तर माझा जीव कसा घाबरा होतो. तसा तिचा नसेल का होत? तिनें जर त्याला मेलेला पाहिला तर तिची काय अवस्था होईल बरें?" हें ऐकतांच जगूच्या डोळ्यांना खळकन् पाणी येई. अशा शिकवणीमुळें निरुपद्रवी कीटकांस मारण्याचें तर दूरच राहिलें, पण डेंकूण, पिस्सा वगैरे त्रासदायक प्राण्यांच्याहि जगू वाटेस जाईनासा झाला. किंवास मारण्यापेक्षां त्याची नांगी काढून त्याला जिवें सोडणें सोडणें त्याला पसंत वाटे. नोकरानें जर एकादा प्राणघातक सर्प मारिला तर तो त्याला हरकत करीत नसे खरा; पण ती गोष्ट कित्येक दिवस त्याच्या मनाला लागून राही. जों जों प्राणी निरुपद्रवी, समजदार व अंगानें विशाल, तों तों त्याजबद्दल जगूस अधिक अनुकंपा वाटे. सांधीच्या दिवसांत सांपळ्यांत उंदीर सांपडले असतां ते न मारतां जिवंतच जंगलांत सोडावे अशी जगूची नोकरांस नेहमी ताकीद असे. संपतरावांस लागणाऱ्या चमचमीत पक्वान्नांसाठीं अनेक कोंबड्यांचा व बकऱ्यांचा संहार होतांना पाहून त्याला पोटांतून भडभडून येई. आम्ही हिंदु लोकांना गाय जितकी पवित्र वाटते तितका दुसरा कोणताहि प्राणी वाटत नाहीं. ती इतकी गरीब व मायाळू असते, कीं, तिजबद्दल आम्हाला पराकाष्ठेचें प्रेम व दया वाटते. गाईचें रक्षण हें हिंदुधर्माचें महत्त्वाचें अंग असल्यामुळें त्या धर्माबद्दल जगूस अभिमान वाटे. त्यानें कसायास एकादी गाय ओढून नेतांना पाहिलें म्हणजे त्याच्या पोटांत तोडूं लागे. पेसाळलेल्या कुत्र्यास गोळी घातलेली पाहून त्याला इतक्या वेदना होत, कीं, जणूं काय ती गोळी त्याच्याच मर्मस्थानीं लागली आहे. एकदां दसऱ्याचे दिवशीं बळी द्यावयाचा रेडा मिरवत मिरवत जगूचे घरीं आला. आपली आज काय गत होणार हें त्या बिचाऱ्या पशूला आधींच कळून चुकलें असावेंसें त्याच्या दीन व काकुळतवाण्या मुद्रेवरून दिसत होतें. तें पाहून जगूस रडें आवरेना. त्याला बापाचा इतका धाक; पण तो बाजूला ठेवून तो त्याकडे रडत रडत गेला, आणि तो रेडा विकत घेऊन त्याचे प्राण वांचविण्याबद्दल त्यानें त्याच्यापाशीं करुणा भाकिली. त्यावर संपतराव खेकसून म्हणाले, 'तो रेडा तुझा बाप आहे कीं काय म्हणून तुला त्याची इतकी कींव येते!" रेडा बाप आहे असें म्हणण्यापेक्षां बाप रेडा आहे असें म्हटलें असतें तर तें विशेष शोभलें असतें! त्या रेड्यास बळी देणारे आणि आपले वडील यांपैकीं अधिक क्रूर कोण, व रेडा अधिक अनुकंपनीय किंवा आपण स्वतः, याचा जगूस निर्णय होईना. तो विषण्ण अंतःकरणानें तेथून निघून गेला, व आपल्या विश्वासाची भूमि जी आपली आई, तिच्या गळ्यास मिठी मारून मुक्त कंठानें त्यानें आपलें हृदय तिजपाशीं मोकळें केलें.

[२]

मृत्यु मनुष्याला केव्हां ओढून नेईल, याचा नेम नसतो. त्याला प्राणांचा बळी घ्यावयास थोडेंहि निमित्त पुरतें. ज्या न्यायाधीशानें अपराध्यास नुक्तीच फांशीची शिक्षा दिली, त्याला न्यायासनाच्या पायऱ्या उतरतां उतरतां ठेंच लागून त्या अपराध्याबरोबरच सर्वांत वरिष्ठ अशा न्यायाधीशापुढें आपल्या कृत्यांचा जवाब देण्यासाठीं तातडीनें जावें लागतें. ज्यानें अनेक दिवस अविश्रांत श्रम करून एका मोठ्या राष्ट्राच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक तयार केलें, त्याच्या हृदयाची क्रिया एकदम थांबून त्याला सर्व विश्वाच्या मालकापुढें आपल्या पापपुण्याचा हिशेब देण्यासाठीं धांवत जावें लागतें. अनेक भयंकर वादळांतून सुरक्षितपणें मार्ग काढून किनाऱ्यावर सुखाच उतरलेल्या व प्रवासाच्या दगदगींतून मोकळा झालेल्या खलाशावर बीज पडून त्याला पुन्हां परलोकचा प्रवास सुरू करावा लागतो. याप्रमाणें जीवित व मृत्यु यांमध्यें कधीं कधीं फारच बारीक पडदा असतो. ज्याप्रमाणें अगदीं नवीन नाटक पहाण्यास जमलेल्या उत्सुक प्रेक्षकांस पडद्यामागें किती भयंकर देखावा तयार होत आहे याची कल्पना नसते, त्याप्रमाणें आपल्या ऐन सुखाच्या घटकेस आपणांवर पुढील घटकेस केवढा भयंकर प्रसंग ओढवणार आहे याची आपणांस व आपल्या मुलाबाळांस कल्पना नसते.

मनाला थोडें दुःख झालें, कीं, तें आईपाशीं हलकें करण्याचा जगूचा परिपाठ असे. किती जरी नद्या येऊन मिळाल्या तरी समुद्र वाढत नाहीं, त्याप्रमाणें आपण कितीहि गाऱ्हाणी सांगितलीं तरी आपली आई शांतपणें तीं ऐकून घेईल, अशी त्याची खात्री असे. इतर नक्षत्रें चळलीं तरी ध्रुव ज्याप्रमाणें अढळच रहातो, त्याप्रमाणें इतर माणसें जरी आपणास सोडून गेलीं तरी आई आपणास पाठीशीं घालण्यास सदैव तत्परच असावयाची, असा त्याला भरंवसा वाटे. त्याबरोबरच आपली आई समुद्राप्रमाणें किंवा ध्रुवाप्रमाणें चिरंजीव आहे, असाहि अर्धवट समज त्यानें करून घेतला होता. इतकेंच नाहीं, तर तो कधीं आजारी पडला तर जोपर्यंत आपली आई उशाशीं आहे तोंपर्यंत ती मृत्यूला जवळ येऊं देणार नाहीं, अशी त्याला खात्री वाटे. जिचा आपल्या जन्मावर अधिकार चालला, तिचा आपल्या मृत्यूवरहि चालेलच, असा त्याचा कोटिक्रम असे. ज्या गोष्टी आपल्या जन्माच्या आधींपासून असलेल्या आपण ऐकतों त्या

अमृतपुलिन ६ आणे; रमामाधव ४ आणे; प्रेमकहाणी ४ आणे; प्रेमविषयक सुंदर कादंबऱ्या.
मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव मुंबई.

आपल्या जन्मभर आपणांस पुरणार असें साहजिकच आपणांस वाटूं लागतें. शिवाय, सारजाबाई अत्यंत धर्मनिष्ठ होत्या. ईश्वराची प्रार्थना व सरण करण्याचा त्यांचा क्रम कधींहि चुकत नसे. परोपकारांतहि त्यांची बरोबरी कोणाच्यानें करवली नसती. क्षुद्र जीवजंतुहि त्यांना पवित्र व अवध्य वाटत. अशा पुण्यवान् देवमाणसाच्या जवळ मृत्यु कसा येऊं शकेल? नाहींच यावयाचा, असें जगूचें मन त्याला सांगे. सारजाबाई सहसा त्याच्या कोवळ्या मनाला मृत्यूच्या गोष्टी काढून नसतें दुःख देत नसत. एकूण एक प्राण्यांच्या मरणावद्दल त्याला फार हळहळ वाटते, हें त्यांना ठाऊक होतें. आपलीं आवडतीं माणसें आपणांस एक दिवस सोडून जाणार आहेत, या विचारानें त्या हळहळींत भर टाकण्याची त्यांची इच्छा नसे. ऐतिहासिक किंवा इतर मनुष्यांच्या मृत्यूबद्दल तो पुस्तकांत वाचीत असे, तेव्हां त्या त्यास गतकाळच्या गोष्टी वाटत. अजून त्यानें मृत्यु झालेला समक्ष पाहिलेला नव्हता. या काळीं मृत्यु असलाच तर तो आईच्या किंवा तिच्या लाडक्या लेंकराच्या वाटेस जाणार नाहीं असें मानून तो निर्भास्त असे.

दसऱ्याच्या दुसऱ्याच दिवशीं सारजाबाईनीं अंथरूण धरिलें. अलीकडे त्यांची प्रकृति चांगली रहात नव्हती. नवऱ्याकडून होणाऱ्या गांजणुकीमुळें त्या नेहमीं मनांतल्या मनांत झुरत असत. आपल्या पतीच्या स्वभावामुळें आपणास किती त्रास होतो, हें त्यांच्यानें आपल्या मुलापाशींहि मोकळेपणानें सांगवेना. तो कसाहि असला तरी त्याजवद्दल मुलाचा आदर रहावा अशीच त्यांची इच्छा असे. या झुरण्याचा परिणाम हलके हलके त्यांच्या शरीरावर होऊं लागला होता. त्यांना अलीकडे वारीक ताप येत असे. खोकलाहि मधूनमधून डोकें वर काढीत असे. परंतु नवरा रागावेल म्हणून व मुलास वाईट वाटेल म्हणून त्यांनीं त्याबद्दल त्यांच्यापाशीं एक दिवसहि चकार शब्द काढला नाहीं. कधीं कधीं जगूची कांहीं एक चूक नसतां त्याला ठेंच लागून किंवा अन्य कारणानें जखम झाली तर संपतराव 'कशाला मरायला गेला होतास तिकडे? जपून चाललास तर बाप मरेल वाटतें?' अशा अभद्र शब्दांनीं त्याच्या अंतःकरणावरहि जखम करीत असत, हें त्यांनीं पाहिलें होतें. कधीं कधीं बालस्वभावामुळें तो खेळतांना पडला तर त्याला वर उचलण्याऐवजीं ते त्याच्या पाठीवर रपाटे मारून त्याला पुन्हां खालीं पाडीत असत, याचाहि त्यांना अनुभव आलेला होता. आपण आपल्या आजारावद्दल जर त्यांना कळविलें तर ते 'तुझ्या परांतील काम करावयाला नको म्हणून तूं मुद्दाम आजार काढिलास,' असें म्हणावयाचे. जगू तर काय बिचारा अर्भकच. त्याला खरी स्थिति सांगितली असतां त्याचें जें गोरेंमोरें तोंड होईल त्याच्या नुसत्या कल्पनेनेंच त्याच्या अंगावर शहारे येत; मग प्रत्यक्ष सांगण्याची गोष्ट दूरच राहिली. सारजाबाईनीं ही गोष्ट जशी त्या उभयतांपासून लपवून ठेविली तशी त्यांनींहि तिच्या प्रकृतीबद्दल कधीं चौकशी केली नाहीं. संपतराव त्यांच्याशीं बोलत ते बहुधा भांडण उकरून काढण्याकरितां किंवा तसल्याच महत्त्वाच्या कामाकरितां बोलत. प्रकृतीची चौकशी करणें अशा क्षुल्लक कामाकरितां ते सहसा तोंडाची वाफ फुकट दवडीत नसत. जगूचा तर आईच्या जीवितान्या शाश्वतीवर पक्का विश्वास; तेव्हां त्याला तिच्या आजाराचा संशय कां यावा? एकादे वेळीं तो तिच्या अंगाशीं बिलगून बसला असतांना त्याला तिचें अंग कढत लागे, व तो त्याचें कारणहि विचारी. पण 'कांहीं नाहीं, बाळ, चुलीशीं शेक लागून ऊन झालें आहे अंग," अशी बतावणी करून सारजाबाईनीं ती वेळ निभावून न्यावी. त्यांचा चेहरा अलीकडे काळवंडलेला असे. पण त्याचें कारण बापाचा जाच आहे असें जगूला वाटे.

परंतु घड्याळ चालावयाचें बंद केलें म्हणून सूर्यास्त व्हावयाचा थोडाच रहाणार होता! जेव्हां प्रकृति इतकी क्षीण झाली, कीं, चालतांना झोंके जाऊं लागले, आणि खोकला इतका विकोपाला गेला, कीं, कफाबरोबर रक्त पडूं लागलें, तेव्हां सारजाबाईस अंथरूण धरण्यावांचून इलाजच राहिला नाहीं. जगूनें आपल्या बापाला व डॉक्टरास घरांत जातांना पाहिलें. कांहीं वेळानें ते बाहेर आले तेव्हां त्यांचे चेहरे गंभीर असलेले त्याला दिसले. कांहीं वेळ त्या उभयतांचें एकांतांत बोलणें झाल्यावर डॉक्टर निघून गेले, आणि संपतरावांस आपणाकडे येतांना जगूनें पाहिलें. त्यांच्या नेहमींच्या वर्तनावरून ते आपणाकडे रागानें येत असावेत, अशी त्याला भीति वाटून तो कोपऱ्यांत थरथर कांपतच उभा राहिला. परंतु संपतरावांनीं त्याच्या अजमासाप्रमाणें रागावण्याऐवजीं उलट त्याला प्रेमानें जवळ घेतलें, व त्याचें तोंड कुरवाळून अश्रुपूर्ण नेत्रांनीं कांहीं वेळ त्याच्याकडे पाहिलें, आणि नंतर दीर्घ सुस्कारा टाकून ते तेथून निघून गेले. जगूला याचा कांहींच उमज पडेना. बाबांच्या चित्ताला भ्रंश झाला असून डॉक्टर त्यांना तपासण्यास आले होते कीं काय, असा त्याला संशय आला. ज्याचें वर्तन नेहमीं वेड्यासारखें असावयाचें त्यानें एकादे वेळीं शहाण्यासारखें वर्तन केल्यास तें वेड्यासारखें वाटावें, यांत विलक्षण कांहींच नाहीं. जगू आपली संशयनिवृत्ति करून घेण्याकरितां आईकडे धांवत गेला, तों त्याच्या दृष्टीस जो देखावा पडला तो पाहून तो क्षणभर जागचे जागीं खिळल्यासारखा झाला. सारजाबाई बाजेवर पडून कण्हत होत्या. खाटेजवळ तश्त ठेविलें असून त्यांत नुक्तीच रक्ताची गुळणी पडलेली दिसत होती. मोलकरीण जवळ बसून आपल्या मालकिणीचे पाय चेपीत होती. जगू धावत्या धावत्या जवळ जाऊन बाजेवर बसला, व आईच्या अंगामोंवतीं प्रेमानें हाताचा विळखा घालून म्हणाला, "आई, तुला काय होतें?"

लीला १२ आणे; सरस्वती १० आणे; प्रियवंदा १० आणे; धाकट्या सूनबाई ८ आणे; उपदेशपर सामाजिक कादंबऱ्या. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

सारजाबाईच्या डोळ्यांतून टपटप आंसवें गळूं लागलीं. त्या कांपऱ्या आवाजानें म्हणाल्या, "बाळा, घाबरूं नकोस. तो परमेश्वर सर्व कांहीं नीट करील."

मोलकरणीनें लाला अधिक न बोलण्याविषयीं सुनाविलें. जगू कांहीं वेळ अनिष्टासारखा तेथेंच बसून राहिला, आणि संपतराव खोलींत आले तेव्हां बाहेर निघून गेला. बाहेर आल्यावर प्रथम त्यानें आतांपर्यंत कष्टानें दाबिलेल्या हुंदक्यांस डोळ्यांवाटें मार्ग करून दिला. आपल्या दैवी आईस इतर मर्त्यप्रमाणें दीनवाण्या स्थितींत पहाण्याचा लाला हा पहिलाच प्रसंग. जिनें आजपर्यंत आपल्या सुखाकरितां अनेक कष्ट सोसले तिला आज उठून बसादयाचीहि शक्ति नसावीना ! आपणास किंचित् वाईट वाटलें असतां जिनें प्रेमानें आपलें सांत्वन करून अश्रु पुसावे तिला आज अशा दीनवाण्या रीतीनें स्वतःच अश्रु गाळण्याचा प्रसंग यावा ना ! जगू एका कोपऱ्यांत बसून बराच वेळ मनसोक्त रडला. लाला मायेनें पोटाशीं धरावयाला आज त्याची आई आपण होऊन थोडीच येणार होती ! त्यानें स्वतःच विवेकानें आपलें दुःख आवरलें. अशा प्रकारें हातपाय न गाळतां आपल्या आईच्या पथ्यापाण्याचें करून जेंवेकरून ती लवकरच दुखण्यांतून उठेल असें करणें आपलें कर्तव्य आहे, असें मनांत आणून तो पुनः आपल्या आईच्या बाजेपाशीं गेला. तेथें संपतराव व सारजाबाईचे बंधु बोलत बसले होते. सारजाबाईच्या बंधूंचें नांव दौलतराव होतें. ते जवळच्याच एका गांवीं डॉक्टरीचा धंदा करीत असत. संपतरावांनीं सारजाबाईच्या दुखण्याबद्दलचें वर्तमान लालाच्या हातीं कळविल्यावरून ते तांतडीनें निघून आले होते. लाच्यामध्यें खालीं लिहिल्याप्रमाणें संभाषण झालें.

दौलतराव म्हणाले "ताईनें आपलें दुखणें फार दिवस दाबून ठेविलें."

संपतराव म्हणाले "यांत ला विचाऱ्याकडे दोष नाहीं. माझें तिच्याशीं वर्तनच इतक्या दांडगाईचें होतें, कीं, गप्प रहाण्याशिवाय तिचा इलाजच नव्हता. मीं जर थोडीतरी माणुसकी दाखविली असती तर गोष्ट या थराला आलीच नसती !"

यावर सारजाबाई क्षीण आवाजानें म्हणाल्या "त्यांत आपणाकडे कांहींच दोष नाहीं. नशीबांतल्या गोष्टी कोणाच्यानें चुकवणार का आहेत ?"

दौलतराव म्हणाले "असो. थोडक्यावरच निभावलें. अजून फारसें बिघडलें नाहीं. अजून जरी औषधाची आणि पथ्यापाण्याची नीट काळजी घेतली तरी ईश्वरकृपेनें पोळ्याच महिन्यांत आराम पडेल. मी परत गेल्यावरोबर माझ्या वैद्याच्या वाड्या पाठवून देतों—"

संपतराव म्हणाले " तिथेंच तर सारी अडचण आहे !"

दौलतराव म्हणाले "म्हणजे ! अजूनहि ताईच्या डोक्यांत अहिंसेचें वेड आहे वाटतें !"

संपतराव म्हणाले "खरें म्हटलें तर वेड हा शब्द अहिंसेसंबंधानें योजण्यापेक्षां प्राणिवधासंबंधानें योजिल्यास शोभेल. हें माझें बोलणें केवळ निरर्थक नसून लाला वैद्यकांतून व इतर शास्त्रांतून आधारहि देतां येतील; उदाहरणार्थ, मनुष्याच्या दांतांची रचना पाहिल्यास तो जाला वनस्पत्याहारी आहे, मांसाहारी नाहीं. मांसाहारानें 'यूरिक ॲसिड' नांवाचें जें विषारी आम्ल पुष्कळ प्रमाणांत उत्पन्न होतें, त्याचा नाश करण्यास व्याघ्रादि हिंस्र पशूंच्या यकृताचे ठायीं जसें सामर्थ्य असतें, तसें मनुष्याच्या यकृताच्या ठायीं नसतें. या गोष्टी माझ्यापेक्षां तुम्हाला अधिक माहीत असतील."

दौलतराव थक्क झाले ! हें भाषण संपतरावच करीत आहेत कीं काय, याचा लांनां क्षणभर भ्रम पडला. सारजाबाईच्या आजारानें संपतरावांच्या हृदयांत जी खळबळ उडवून दिली होती, तिची लांनां कल्पना नव्हती. ला आजारानें त्यांच्या मनांत तिजविषयीं जें गूढ प्रेम होतें, त्याची जाणीव उत्पन्न केली होती. त्यांच्या कोपाचा विषय नेहमीं बहुधा तीच असल्यामुळें तिजवर त्यांची एक प्रकारची विरोधी भक्ति जडली होती. त्यांच्या कोपमय जीवितानें पोषण पुष्कळ अंशीं तिजकडूनच होत असल्यामुळें तिचा शाश्वत वियोग त्यांनां असह्य वाटावा, यांत नवल नाहीं. अशी सुज्ञ व सोशिक स्त्री पुनः आपणास मिळणार नाहीं असें त्यांनां वाटूं लागलें होतें. आजपर्यंत आपली करणी कसाबासारखी असतां जिनें गाईप्रमाणें निमूटपणें आपल्या मुरकुंडीलीं मान दिली, आपल्या शतपट योग्यता अंगीं असतां जी एकाद्या गुलामाप्रमाणें घरांत राबली, जिनें बालाग्रहि शांततेचा भंग होऊं न देतां आपला तापट स्वभाव सहन केला आणि आपलें लौकिकांत हंसें होऊं दिलें नाहीं, ती आपणास लवकरच अंतरणार कीं काय, अशी शंका येतांच संपतरावांचें तिजविषयीचें वर्तन पार बदलून गेलें होतें. नीच मनुष्यांचीं मनें नेहमीं जरी 'वज्रादपि कठोराणि' असतात, तरी तीं 'मृदूनि कुसुमादपि' होण्यास कधीं कधीं फार थोडें कारण पुरें होतें. जो संपतराव सारजाबाईच्या सुस्थितींत बायकासारखा गुरगुरत असे, तो तिच्या दापुडवाप्या अवस्थेंत गोगलगाय बनला होता. त्याचें मन तिच्या शरीराहूनहि क्षीण झालें होतें. आपल्या पत्नीची प्रत्येक गोष्ट लाला आवडूं लागली होती. याच आवडीच्या भरांत त्यानें जगूला पोटाशीं धरिलें होतें. सारजाबाईचे जे सुसंस्कृत विचार लाच्या कठिण मनोभूमींत आजपर्यंत दबून बसले होते, त्यांसच तीं भूमि दुर्दैवाचा नांगर फिरून मुसमुशीत होतांच अंकुर फुटला होता. दौलतरावांपाशीं आज त्यानें जी वाक्यें काढिलीं त्यांचा अर्थ त्यास स्वतःसहि कितपत समजला होता याची

महाराणा संग्रामसिंह ८ आणे; द्रौपदीकोप ६ आणे; गौप्यगोपन ८ आणे; भ्रमनिरसन ६ आणे;
चटकदार नाटकें. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

वानवाच होती; परंतु तीं वाक्यें त्यानें साऱ्जाबाईविषयींच्या कळकळीमुळें इतक्या जोरानें उच्चारिलीं, कीं, त्यास त्या विषयावद्दलच कळकळ वाटत असावी असा दौलतरावांचा समज झाला. त्या क्षणीं त्यांच्यापुढें रेड्यानें वेद झटले असते तर त्यांना इतकें आश्चर्य वाटलें असतें कीं काय, याची शंका आहे. संपतरावानें त्यांस आपल्या बोलण्यांत त्यांच्या धंद्याची आठवण करून दिली, त्यावरोबर आपणास कोणती बाजू सजवाबयाची आहे याचें भान न राहून ते झणाले "अलबत. तुम्ही म्हणतां त्या गोष्टी अक्षरशः खऱ्या आहेत. मनुष्याचें शरीर शाकाहारासच अनुरूप आहे. अलीकडे यासंबंधानें जे शास्त्रीय शोध लागले आहेत, त्यांवरून असें ठरूं पहात आहे, कीं, मांसाहाऱ्यापेक्षां शाकाहाऱ्यांतच अधिक शारीरिक व मानसिक सामर्थ्य, काटकपणा व सोशिकपणा वसत असतो, आणि त्याचें आयुर्मानहि अधिक असतें. शस्त्रक्रियेच्या प्रसंगीं तर असें दिसून आलें आहे, कीं, शाकाहाऱ्याच्या शरीरास गुंगीच्या औषधापासून झणण्यासारखा अपाय होत नाहीं, आणि मांसाहाऱ्याच्या शरीरास त्यापेक्षां पुष्कळच अधिक होतो. शाकाहारी मनुष्याची किंवा इतर प्राण्याची जखम जितकी लवकर भरून येते, तितकी मांसाहाऱ्याची भरून येत नाहीं; कांहीं प्राण्यांच्या अंगांतील रोगजंतूंच्या मांसाच्या द्वारें मनुष्याच्या शरीरांत शिरून त्याचा घात करितात. या दोषापासून शाकान्न सर्वथा मुक्त असतें. आतां अशुद्ध हवा, व्यायामाचा अभाव इत्यादि अवांतर कारणांमुळें शाकान्नाचें श्रेष्ठत्व तितकें नजरेस येत नाहीं हें खरें; पण तें श्रेष्ठत्वच नाहीं असें मात्र झणतां यावयाचें नाहीं."

संपतराव झणाले "तुमच्याच तोंडानें माझें बोलणें खरें ठरलें तर!"

दौलतराव थोडेंसें विरमून झणाले "तसें कांहींसें झालें खरें. परंतु प्रत्येक विषयाला दोन बाजू असतात. या विषयाची एक बाजू जशी मीं सजवून दाखविली तशी दुसरीहि सजा दाखवितां येईल."

"ती कशी काय!"

"पृथ्वीच्या पाठीवरील सगळींच माणसें जर आमच्या ताईसारखीं सोवळेपणानें वागूं लागलीं तर अन्न थोडें आणि खाणारीं फार असा प्रकार होऊन चोहोंकडे इतकी महागाई होईल, कीं, प्रतिक्षणीं मुक्या प्राण्यांच्या ऐवजीं मनुष्यप्राणीच शेंकड्यांनीं मरावयास लागतील. त्यापेक्षां जनावरांचा संहार झालेला शतपटीनें बरा, नाहीं का!"

"वाः! केवढी तरी तुझाला जगाच्या कल्याणाची काळजी! कोणाला वाटेल, कीं, मनुष्यांचे प्राण वांचविण्याकरितांच तुम्हाला नाइलाज झणून कोंबड्यांचा संहार करावा लागतो! पण अशा लोककल्याणकारी विभूतींच्या मनांतच आलें, तर सगळ्या मनुष्यजातीला पुरून उरण्याइतकें धान्य उत्पन्न व्हावें अशा यांत्रिक आणि रासायनिक युक्त्या नाहीं का त्यांना काढतां येणार? यदाकदाचित् काढतां आल्या नाहींत व लोकसंख्येच्या मानानें अन्नाचा पुरवठा फारच कमी पडूं लागला तर हल्लीं ज्याप्रमाणें दारिद्र्यामुळें लोकसंख्या मर्यादित होते त्याप्रमाणें त्या स्थितींतहि होईल. उपजीविकेच्या साधनांच्या विपुलतेमुळें लोकसंख्येची वृद्धि झाली काय, किंवा त्यांच्या तुटवड्यामुळें ती वृद्धि होण्याची थांबली काय, एकच. या विषयाचा विचार करितांना आपल्या धर्मांच्या दृष्टीनें आणखीहि एक गोष्ट ध्यानांत धरिली पाहिजे."

"ती कोणती?"

"पुनर्जन्माचा सिद्धांत तुम्हांला मान्य असेलच?"

"त्याचें तर आपल्याला बाळकडूच मिळालेलें असतें."

"या जन्मीं मनुष्ययोनि मिळण्याचें ज्या प्राण्याच्या नशिबीं आलें असेल त्यास पुढचा जन्म मुक्या प्राण्याचाहि मिळण्याचा संभव आहे."

"अर्थातच."

"मग जनावरांची हत्या झणजे अप्रत्यक्षपणें मनुष्यांचीच हिंसा झाली. अशा तऱ्हेनें लोकसंख्येची बाढ कायम राखण्याकरितां अप्रत्यक्ष मनुष्यवध करणें बरें, किंवा शाकाहाराच्या पुरवठ्याच्या मानानें लोकसंख्या मर्यादित राखणें बरें? पर्यायानें विचारावयाचें झणजे मनुष्यांचा वध न करितां त्यांची उत्पत्ति खुटविणें बरें किंवा त्याची संख्या बाह्यात्कारीं फुगवणें बरें? मनुष्यांचा प्राण वांचविण्याची सबब पुढें करून आपण जर मनुष्येतर प्राण्यांचा वध करूं लागलों तर उद्यां त्या प्राण्यांचा तुटवडा पडल्यावर मनुष्यवध करण्यास कोणता प्रत्यवाय आहे? व नरभक्षकांना निंद्य मानण्याचा आपणांस काय हक्क उरला?"

"हें तर्कशास्त्र थोडेंसें पुढें ढकललें झणजे वनस्पतीचा आहारहि निषिद्ध होऊन बसेल. कारण वनस्पतींनांहि प्राण आहेच."

"प्राण असला तरी संवेदना नाहीं खास. कोंबडीची मुंडी मुरगाळली तर ती जशी तडफडते, तसें गुलाबाचें फूल तोडल्यास त्याचे कांटेरी रोमांच थरथरत नाहींत. बकऱ्याच्या मानेवर सुरी चालविली झणजे तें जसें हंबरडा फोडितें तसें आंब्याच्या झाडावर कोयत्याचा प्रयोग केल्यास तें फोडीत नाहीं. ज्याप्रमाणें मृत प्राण्याच्या शवाला विजेचें यंत्र लाविलें झणजे त्यास क्षणिक चेतना येते, तशी लाजाळूसारख्या झाडालाहि स्पर्श केल्यास येते. पण तिच्यात आणि संवेदनेत अंतर आहे."

"पण प्राण्यास कष्ट न देतांच एकदम मारिलें झणजे तर हा दोष रहात नाहींना?"

"पण तो एक क्षणच दुःखाच्या तीव्रतेमुळें युगाप्रमाणें वाटत नसेल कशावरून? तुमचा युक्तिवाद खरा मानिला तर मनुष्यालाहि एका झटक्यासरसें मारण्यांत पाप रहाणार

सुदाम्याचे पोहे १२ आणे; भद्रंभद्र १० आणे; विलक्षण भोळेपणा ८ आणे; हास्यरसात्मक
पुस्तकें. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

नाहीं. उलट या संसाराच्या जंजाळांतून सोडविण्याबद्दल पुण्यच पदरी येईल."

"येवढें तरी तुह्मांला कबूल केलें पाहिजे, कीं, मांसाशनानें मनुष्याच्या अंगीं पराक्रम व तेज येतें. आजपर्यंत जगांत जे जे विजयी वीर व चक्रवर्ती राजे होऊन गेले, ते सारे मांसभक्षक होते असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं."

"असेंच केवळ नाहीं. चक्रवर्ती राजांत अशोकासारख्या अहिंसेच्या अभिमान्यांचीहि गणना आहे. पराक्रमाविषयीं म्हणाल तर मराठी राज्याच्या उत्कर्षकालीं मांसाहारी मराठ्यांनीं किंवा प्रभूंनीं जशी मर्दुमकी गाजविली, तशी मत्स्याहारी शेणव्यांनी व शाकाहारी ब्राह्मणांनींहि दाखविली आहे. पेशवाई बुडाली ती पेशव्यांनीं जनावरांस पवित्र लेखिलें म्हणून नव्हे, तर मनुष्यांस अपवित्र लेखिलें म्हणून; पर्यायानें सांगावयाचें झाल्यास ती डांसळण्यास अहिंसा कारण झाली नसून जातिद्वेष कारण झाला."

हीं वाक्यें सारजाबाईच्या मृदु भाषेचें संपतरावांच्या मर्दानी भाषेंत रूपांतर होऊन बनलीं होतीं. जीं प्रमाणें आजपर्यंत पालथ्या घागरीवरील पाण्याप्रमाणें फुकट गेल्यासारखीं वाटत होतीं, तींच आतां उतूं आलेल्या दुधाप्रमाणें संपतरावांच्या मुखावाटे अनपेक्षित जोमानें बाहेर पडत होतीं. मात्र या जोमाच्या मुळाशीं भूतदया नसून पत्नीविषयक प्रेम व अंतःकरणपूर्वक पश्चात्ताप हीं होतीं. सारजाबाईस जिवावरचें दुखणें आलें व संपतरावाचा पुनर्जन्म झाला. त्यांच्यासारखा पशु एकाच दिवसांत व एकाच जन्मांत मनुष्यकोटीस जाऊन पोहोंचला, हा चमत्कार खरोखर पुनर्जन्मापेक्षांहि विलक्षण झटला पाहिजे. संपतरावांच्या तोंडांतून मुक्या प्राण्यांची वकिली ऐकून जगू व सारजाबाई हीं प्रथम तर आश्चर्यानें स्तंभित झालीं. नंतर त्या वकिलीचें कारण जसें त्यांच्या लक्ष्यांत येऊं लागलें, तसें त्यांच्या मनांत त्याजविषयीं प्रेम व अनुकंपा उत्पन्न झाली. सारजाबाईच्या डोळ्यांत कृतज्ञतासूचक अश्रुबिंदु उभे राहिले. जो जगू आजपर्यंत बापाचें पाऊल ऐकतांच भयानें कांपत असे तोच आतां निर्भयपणें त्यांच्या अंगास बिलगून उभा राहिला. हरहर! या कुटुंबांत प्रेमाचें पूर्णबिंब प्रकाशण्यास मृत्यूची छायाच कारण व्हावी ना! पण दोन भिन्न प्रकृतींचा एकजीव होण्यास तीव्र उष्णतेची जरूर लागावयाचीच. तेथें कुरकुर करून काय उपयोग?

या दिवसापासून संपतराव व जगू या पितापुत्रांनीं सारजाबाईस मृत्यूच्या दाढेंतून ओढण्याकरितां आपली पराकाष्ठा चालविली. दोघेहि आळीपाळीनें तिच्या बाजेपाशीं वसत असत; आणि तिच्या औषधाचें आणि पथ्यापाण्याचें सांभाळीत. तिजजवळ तासचे तास घालवितांना संपतरावांस, आपण अशा सुशील पत्नीस सुख देण्याचें सोडून आयुष्य विनाकारण त्रासांत व जळफळींत घालविल्याबद्दल पश्चात्ताप होत असे; व जगूस तिजबरोबर आनंदांत घालविलेल्या अनेक दिवसांची व तिचें प्रेम व्यक्त करणाऱ्या अनेक प्रसंगांची आठवण होत असे. ही गृहलक्ष्मी आतां या घरांतून निघून गेल्यावर पुढचे दिवस कसे कंठावयाचे, हा विचारहि मधून मधून संपतरावांच्या निराश हृदयांत डोकावून पहात असे. कारण ते जीवापाड श्रम करीत असतांहि सारजाबाईची जीवनकला संपाव्यानें मावळूं लागली होती. त्यांच्या चेहऱ्यावर पांडुरता येऊन त्यांच्या खोल डोळ्यांभोवतीं कृष्ण छाया पसरली होती. शरीराचा नुसता हाडांचा सांपळा झाला होता. उठून बसावयाचें तर राहोच, पण बोलतांनाहि त्यांनां श्रम वाटूं लागले होते. नवऱ्याला व मुलाला सुख व्हावें म्हणून त्या तोंडावर लटकें हास्य आणीत असत, व त्यांच्या आग्रहावरून अळेंबळें दोन घांस खात असत. एकदां संपतरावांनीं आपलें उसनें आणिलेलें अहिंसेचें मत गुंडाळून ठेवून स्वतःआपल्या हातानें रुचकर साबुती तयार केली, व सारजाबाईनां खाऊं घातली. पण ती लागलीच जशीच्यातशी भडामड ओकून पडली, व सारजाबाईस शक्ति येण्याचें बाजूस राहून ओकण्यामुळें त्यांची निःशक्तता मात्र बाढली. जेथें आयुर्दीपाचें तेलच संपलें, तेथें वातनिवारणासारख्या बाह्य उपचारांचा काय उपयोग?

एके दिवशीं त्यांच्याजवळ संपतरावांशिवाय कोणी नव्हतें, असें पाहून त्यानीं त्यांस जवळ येण्यास डोळ्यांनीं सुचाविलें. संपतरावांनीं एक हात प्रेमानें त्यांच्या कृश अंगावर ठेवून आपलें तोंड त्यांच्या तोंडाजवळ नेलें. त्या हलक्या पण स्पष्ट स्वरानें म्हणाल्या "आपण मला एका गोष्टीबद्दल क्षमा केली पाहिजे."

संपतराव म्हणाले "मी आणि तुला क्षमा करणार? कृपा कर आणि मला लाजेनें खालीं पहावयाला लावूं नकोस. तुझ्यासारख्या देवीशीं मीं राक्षसानें लग्न केलें यावद्दल मी क्षमा मागावयाची कीं तूं?"

"मीं एकदां रागाच्या भरांत आपणास म्हटलें होतें, कीं, 'मला आणि जगूला एकदां मारून टाकलें म्हणजे आपण सुटाल.' त्या वेळीं बोलाफोलाला गांठ पडेल, असें माझ्या स्वप्नींहि आलें नाहीं; पण आतां माझा अंत झाल्यावर ती गोष्ट आपणास लागून राहील. ते शब्द मी बोललें नसतें तर किती तरी चांगलें झालें असतें, असें मला मागाहून हजारदां वाटलें असेल. पण नुसतें वाटून काय उपयोग? मीं यापूर्वीच आपली क्षमा मागावयास पाहिजे होती. आतां तरी आपण क्षमा करायला उशीर करूं नये. कारण ईश्वर मला आपणांपासून केव्हां नेईल याचा भरंवसा वाटत नाहीं."

काय! साऱ्या जन्मांत एकच कठोर वाक्य, व तेंहि नवऱ्याच्या क्रूर वर्तनामुळें निघालें असतांना त्याची या साध्वीला इतकी तळमळ लागून राहावी! उलट नवऱ्याचीं असंख्य मर्मभेदक, वाक्यें व हजारों अपराध तिनें पूर्णपणें

स्वामी रामतीर्थ, १। रुपया; विवेकानंदांचीं पत्रें ४ आणे, रानडे यांचीं व्याख्यानें, १॥ रुपया;
आत्मोन्नतिकारक ग्रंथ. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

विसरून जाऊन त्यांबद्दल एक चकार शब्दहि काढूं नये! सारजाबाई, धन्य आहे तुमच्या सुशीलतेची!

संपतरावांनां अलीकडे स्त्रीविषयीं जो आदर वाटूं लागला होता, त्याचा या क्षमायाचनेनें कळस केला. या तिच्या औदार्यानें आपण अत्यंत पापी व कृतघ्न आहोंत असें त्यांनां वाटून त्यांनीं हा वेळपर्यंत दाबिलेला हुंदका अनावर झाला व ते स्फुंदत स्फुंदत झणाले "असें रत्न पूर्व पुण्याईनें मला लाधलें असतां मी तें गारगोटी समजून पायाखालीं तुडविलें. माझ्यासारखा मूर्ख मीच! तुला घरें वाटावें, व माझ्या पातकांच्या घड्यांत एका बिंदूचीहिभर पडूं नये झणून मी तुला आश्वासन देतों, कीं, जर त्या वाक्यांत क्षमा करण्यासारखें कांहीं असेल तर मी तुला मनापासून क्षमा करितों; पण माझ्या अपराधांबद्दल क्षमा कोण करणार? ईश्वराच्या उदार हृदयांतसुद्धां त्यांबद्दल क्षमेचा बिंदु सांपडणार नाहीं. तूं जर मला क्षमा करशील तर मला ईश्वराची करुणा भाकण्याला बळ तरी येईल. क्षमेचा एकच शब्द पुरे होईल."

सारजाबाईंचा स्वर आंत ओढूं लागला होता. तथापि सारें बळ एकवटून त्या झणाल्या "देव दयाळु आहे. माझ्याप्रमाणेंच तोहि आपले काल्पनिक व खरे दोष विसरून जाईल. मी आतां जगूला आपल्या पदरांत घालतें. त्याला एकदां अखेरचा भेटवा."

संपतरावांनीं जगूला बोलावून आणिलें. एका क्षणांत मातृहीन होणारा बिचारा जगू आईला शेवटचें डोळे भरून पहाण्याकरितां डोळे पुशीत होता. शेवटीं त्याच्याकडे व नवऱ्याकडे प्रेमळदृष्टीनें पाहून सारजाबाईनीं प्राण सोडला!

यानंतर चार घटकांतच सारजाबाईंचें शरीर चितेवर जाऊन पडलें. ज्या हातानें जगूनें आजवर अनेकदां तिचे अश्रु पुसले होते त्याच हातानें त्यानें त्या शरीरास अग्नि दिला. लागलींच लांकडें पेटून ज्वाला भडकल्या. त्यांचे जगूच्या चित्तास चटके बसूं लागले. तो दोन्हीं हातांनीं डोकें गच्च दाबून व मन घट्ट करून आपल्या अत्यंत आवडत्या आईचें कलेवर धडधड जळतांना पहात होता. आणखीं दोन घटिका गेल्या, व त्या दिव्य शरीराची चिमूटभर राख झाली! उभयतां पितापुत्र शून्य हृदयानें सश्मान सोडून आपल्या सश्मानतुल्य घराकडे वळले. त्या दोघांचें नातें जिच्यामुळें उत्पन्न झालें होतें तिला त्यांनीं मागें टाकिलें होतें. घरून निघतांना तिघांचीं शरीरें बरोबर निघालीं होतीं; पण परत जातांना त्यांपैकीं दोनच उरलीं होतीं. नष्ट झालेलें शरीर सचेतन स्थितींत फिरून दिसण्याकरितां आपलें उरलेलें आयुष्य खर्ची घालण्यासहि ते तयार झाले असते. त्या उरलेल्या आयुष्याची त्यांनां मुळींच किंमत वाटत नव्हती. कारण, त्यांत मृताच्या स्मृतीवांचून सुखाचा किंवा समाधानाचा लेशहि मिळण्यासारखा नव्हता. असें असल्यामुळें घराकडे जातांना भूतकालाचेच विचार त्यांच्या डोक्यांत घोळत होते.

[३]

या गोष्टीस एक वर्ष लोटलें. जगूचा प्रतिपाल करण्याचें वचन संपतरावांनीं उत्तम रीतीनें पाळिलें होतें. तें पाळणें त्यांनां मुळींच जड गेलें नाहीं. कारण, पत्नीच्या योग्यतेबरोबर मुलाचीहि योग्यता त्यांनां कळून चुकली होती, व तिजवर तसें त्याजवरहि त्यांचें अतोनात प्रेम जडलें होतें. त्याचें आपल्या जीवाहूनहि जतन करणें, हा त्यांनां पापक्षालनाचाहि एक मार्ग वाटत होता. शिवाय त्याच्या व सारजाबाईच्या तोंडांत विलक्षण साम्य असल्यामुळें ते त्याच्या तोंडाकडे पाहून तिची आठवण ताजी करीत असत; व ज्याप्रमाणें मिसरदेशचे प्रवासी तेथील प्रचंड मनोरा पाहिल्यावर त्याचें स्मारक झणून त्याचा एकादा दगड बरोबर नेऊन त्याचें रक्षण करितात, त्याप्रमाणें आपल्या आयुष्यांतेंत दैवयोगानें दृष्टीस पडलेल्या त्या उदारधी साध्वीचा हा प्रसादच आहे असें समजून ते त्याचा मनापासून परामर्श घेत असत. त्याची कोणत्याहि वस्तूबद्दल इच्छा दिसली पुरे, ती ते त्याला तावडतोब मिळवून देत असत. सारजाबाई असतांना त्याचें गाण्याचें व चित्रकलेचें शिक्षण, शिक्षक व साधनें यांच्या साहाय्यावांचूनच चालत असे; पण आतां संपतरावांनीं त्याला त्या कलांत निष्णात करण्याकरितां गवई व चित्रकार ठेविले, व अनेक गाण्यांचीं व चित्रांचीं पुस्तकें व सतार, तबला, रंगाची पेटी इत्यादि आयुधेंहि पैदा केलीं; इतकेंच नाहीं, तर ते कधीं कधीं प्रहरन् प्रहर स्वतः जगूपाशीं बसून त्याजपासून चित्रांच्या पुस्तकांवरून चित्रकलेंतील खुब्यांची किंवा पशुपक्ष्यादि सृष्ट पदार्थांची माहिती करून घेत असत, व कधीं कधीं त्याच्या मधुर स्वरांत आपला कर्कश सूर मिळवून ओबडधोबड रीतीनें गात असत. अशा तऱ्हेनें स्वतःची करमणूक करून घेत असतां उभयतांची दृष्टि अचानक समोरील सारजाबाईंच्या तसबिरीकडे जात असे, व तिजकडे किंचित्काल निश्चल दृष्टीनें पाहून ते परस्परांचें मनोगत ताडून एकमेकांकडे पहात असत. पण अशा प्रसंगीं एक दीर्घ सुस्कारा सोडण्यापलीकडे ते आपलें मनोगत व्यक्त करीत नसत. संपतरावांनीं आपलें मांसाशन अलीकडे अजीबात टाकिलें होतें. जगूनें एकाधा प्राण्याबद्दल हट्ट दाखविली, कीं, तेहि दाखवीत असत. जगूला एकादें जनावर किंवा पांखरूं आवडलें, कीं, तें त्यांनीं घेतलेंच. अशा प्रकारें त्यांच्या घरांत एक लहानसें प्राणिसंग्रहालयच तयार झालें होतें. संपतरावांचा ताप्टपणा अजून पूर्णपणें नाहींसा झाला नव्हता; त्याचे विषय मात्र बदलले होते. ते अलीकडे आपला राग नोकरचाकरांवर काढीत असत. भातांत कॅस दिसला, कीं, आचाऱ्यावर तें इतकें तोंड सोडीत, कीं, त्याचे सारे कॅस ताठ उभे रहात. बिछान्यावर एकादी सुरकुती दिसली, कीं, त्यांच्या कपाळास आठ्या पडून ते नोकरास चांगली तंबी देत. अशा वेळीं जगू, जवळ

नशीबाची परीक्षा १। रु. दुःखाअंतीं सुख १। रु. माणिकबाग, १। रु. सुधा, १ रु.
हदयंगम कादंबऱ्या. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

असल्यास तो मध्यें पडून नोकरांची कांड घेऊन शेले. त्यावरोबर त्यांचा सगळा राग लोण्याप्रमाणें विरघळून जात असे. अलीकडे पितापुत्रांचा संबंध पूर्वीच्या संबंधाहून फार बदलला होता. जगूनें इच्छा दर्शवावयाची आणि संपतरावांनीं तिची अंमलबजावणी करावयाची, असा हल्लीं प्रकार होता.

एके दिवशीं जगूनें एका कसायास एक कालवड नेतांना पाहिलें. ती मोठ्यानें हंबरडा फोडीत होती, व कसायाच्या तावडींतून सुटून जाण्याचा प्रयत्न करीत होती. तिनें आपल्याकडे केविलवाण्या दृष्टीनें पाहिल्याचा जगूला भास झाला. त्यानें लागलीच बापाला बोलावून आणिलें, व ती कालवड विकत घेण्याची विनंति केली. संपतरावांनीं पूर्वी रेडा विकत घेण्याबद्दलच्या त्याच्या विनंतीची कशी विल्हेवाट लाविली होती, हें वाचकांना माहीत आहेच. पण या खेपेस कसायानें मागितली ती किंमत त्यांनीं तावडतोब चुकती करून ती कालवड जगूच्या स्वाधीन केली. आपला उपकारकर्ता कोण, हें त्या शहाण्या प्राण्यास कळलें असावेंसें दिसलें. कारण, कसाई निघून गेल्यावरोबर ती लडिवाळपणानें जगूचें अंग चाटूं लागली, व जगूनें तिच्याजवळ बसून तिची मान खाजवतांच ती त्याच्या खांद्यावर मान टाकून स्वस्थ उभी राहिली. दोन घटिकांतच त्यांची अगदीं गट्टी जमली; इतकी, कीं, संपतरावांनीं जगूस थट्टेनें झटलें "काय बेटी लायकी आहे पहा ! जणुं काय तिची व तुझी तुझ्या जन्मापासून ओळख !"

जगूनें कांहीं वेळ थांबून विचारिलें "बाबा, ही किती वर्षांची असेल ?"

"अशी किती वर्षांची असणार ? असेल एक वर्षांची."

"हणजे आई जाण्याला आणि ही जन्माला यावयाला एकच गांठ पडली म्हणायची !"

"होय. तसें झटलें तरी चालेल."

संध्याकाळ झाली. जगूनें गोठ्यांत जाऊन वांसरीचें चारापाणी स्वतः केलें. नंतर ती सुखावून चवंण करीत जमिनीवर पडली असतां तो तिच्याजवळ बसला, व तिचें तोंड कुरवाळून झणाला "वांसरे, मी तुला इतक्या थोड्या वेळांत कां आवडूं लागलों ? तुला पहातांच माझ्याहि मनांत एकदम प्रेमाचा उमाळा कां उत्पन्न झाला ? मीं इतकीं जनावरें आणि पांखरें पाळलीं आहेत; पण तीं सारीं जुन्या ओळखीचीं असतांहि त्यांपैकीं एकाहिबद्दल मला इतका जिव्हाळा वाटत नाहीं. तुझी माझी सोबत सारी अर्धा दिवसाची. मीं तुला पूर्वी कधींहि पाहिलेलें नाहीं; आणि तूं तरी मला कुठून पहाणार ? का मला पाहून तुला आधल्या जन्माची आठवण झाली ? त्या जन्मीं तूं माझ्यापेक्षां मोठी असली पाहिजेस; पण तुला मरण येऊन पुनः जन्म घ्यावा लागला, आणि आतां मीच तुझ्यापेक्षां बडील आहें. ज्याप्रमाणें मनुष्यास झोपेंतून उठल्यावर भोंवतालच्या पदार्थांकडे पाहून आधल्या रात्रीची आठवण होते, त्याप्रमाणें हें घर पाहून तुला मागील जन्मांतील गोष्टींची आठवण नाहींका होत ? आधल्या जन्मीचें तुझें नांव तुला आठवतें का ? त्याचें पहिलें अक्षर कोणत्या बाराखडींतलें होतें ?"

येथपर्यंत मजल आल्यावर तो तिचें डोकें आपल्या हातांनीं धरून क, ख, ग इत्यादि बाराखड्यांतील आद्याक्षरें उच्चारूं लागला. तरी वांसरीकडून मान हलविण्याचें चिन्ह दिसेना. उलट त्याच्या प्रश्नाच्या अर्थाविषयींचें आपलें अज्ञान दाखविण्याकरितांच कीं काय, ती चर्वण सोडून देऊन निश्चलपणें त्याजकडे पहात होती. म हें अक्षर होऊन य, र, ल, व हीं अक्षरेंहि झालीं. जगूची उत्कंठा वाढत चालली. वांसरीच्या निश्चल मुद्रेवरून ती पुढच्या एकाचा अक्षराची वाट पहात आहे, असें त्याला वाटलें. शेंडीफोड्या श झाला, पोटफोड्या ष हि आटपला. जगूची उत्सुकता इतकी अनावर झाली, कीं, ती पोट फोडून बाहेर पडते कीं काय, असें त्याला झालें. अखेरीस हिच्या मनांत 'स'चीच बाराखडी असली पाहिजे, अशी त्याची खात्री झाली. ही खात्री त्याच्या डोक्यांत येऊनच राहिली नाहीं. तिचा त्याच्या हातांतहि प्रवेश झाला, व 'स' हें अक्षर उच्चारल्यावरोबर त्याच्या हाताला नकळत हेलकावा मिळून त्यावरोबर वांसरीचें डोकेंहि हललें. "मला वाटलेंच होतें तसें !" असें जगू आपणाशीं पुटपुटला. नंतर जेवणाची वेळ होईपर्यंत तो तेथेंच बसून होता. जेवण चाललें असतांना तो वराच वेळ कांहीं बोलला नाहीं. नंतर तो एकदम संपतरावांस झणाला "बाबा, मनुष्य मरतांना त्याची ज्या वस्तूबद्दल वासना असते, तिच्याच जवळपास त्याचा जन्म होतो, नाहीं ?"

संपतराव पोळी कच्ची राहिल्याबद्दल आचाऱ्याचा खरपूस समाचार घेण्याच्या विचारांत होते. स्वतःच्या विचाराशी पूर्णपणें विसंगत असा हा प्रश्न ऐकून ते जरा गोंधळले; पण लागलीच सांवरून ते झणाले "बाळ, असे मरणाबद्दलचे विचार नेहमीं चालवूं नयेत. अशा विचारांनीं तूं आधींच कितीतरी वाळून गेला आहेस. कांहीं माणसें सारें आयुष्य मरणाची तयारी आहे असें समजून नेहमीं खिन्न असतात. पण अशानें ते खरोखरच आपल्या मरणाची तयारी करितात, आणि पुढें होणारें मरण अगोदरच ओढून घेतात."

जगू झणाला "बाबा, माझा तर अलीकडे याच्या अगदीं उलट विचार चालला असतो. तो हाच, कीं, मरण ही पुढील आयुष्याची तयारी आहे. हा विचार तर वेडाविद्रा नाहींना ?"

"पण त्या अमंगळ मरणाचें नांव तरी कशाला पाहिजे ?"

"त्या मरणावर जय मिळविण्याकरितां."

"मरणावर जय मिळवितां आला असता तर तुझी आई कां मेली असती ?"

"बाबा, आई मेली नाहीं, जीवंत आहे."

सुंदरमाधव १० आणे; मालतीमाधव १० आणे; मुद्राराक्षस ८ आणे; विचारविलसित ८ आणे;
मनोहर नाटकें. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

"असा सतत विचार केल्यानें खरोखरीच माणसाला वेड लागावयाचें."

"बाबा, हें वेड नाहीं. ती आपली बांसरी आहेना, तीच माझी आई!"

"होय, गाईला गोमाता म्हणतात खरीच."

"ला अर्थानें नाहीं मी बोललों. आईनें आपल्याजवळ असावें म्हणून मुद्दाम गाईचा जन्म घेतला आहे."

संपतराव चिंताकुल मुद्रेनें जगूकडे पाहूं लागले. अलीकडे जगूची प्रकृति चिंता वाटूं लागण्यासारखीच झाली होती. सारजाबाई निवर्तल्यानंतर कांहीं महिने त्यानें तिच्या नावानें हाय घेतली होती. पुढें शोकाची तीव्रता कमी झाली, परंतु त्याची गाढता त्याच मानानें वाढली. त्याच्या वयाला न शोभणारें गांभीर्य त्याच्या मुखावर दिसूं लागलें. हळुहळू शोकाचा परिणाम त्याच्या शरीरावरहि होऊं लागला. बालवयांतील स्वाभाविक प्रफुल्लता मावळून तिच्या जागीं म्लानतेनें ठाणें बसविलें. मान उंच दिसावयास लागून गाल व डोळे खोल गेले. छातीवरील हाडें एकूण एक मोजतां येऊं लागलीं, आणि मांस विरल होऊं लागलें. याप्रमाणें मानसिक विकलतेमुळें दुर्बल झालेल्या शरीराचा परत मनावर प्रत्याघात होऊन अनिष्टपणा उत्पन्न होण्यास कितीसा उशीर लागणार?

एकदां जगू आपल्या आवडत्या बांसरीस घेऊन हिंडावयास गेला होता; परत येतांना वाटेंत त्याला एक मारकी म्हैस भेटली. तिनें जगूकडे क्षणभर टंवकारून पाहिलें, आणि तो बेसावध असतांना एकदम त्याच्यावर शिंगे रोखून चाल केली. बांसरी मध्यें पडली असती तर जगू घरीं चालत गेला असता कीं काय, याची शंकाच आहे. किंबहुना त्याचा लगलीच चेंदामेंदा होऊन गेला असता. पण बांसरीनें त्याचा मार आपल्या अंगावर घेतला. तिला दूर सारून जगूला गांठण्याची त्या म्हशीनें पराकाष्ठा केली. परंतु सुरवातीच्या गडबडीत बांसरीच्या धक्क्यामुळें खालीं पडलेल्या जगूला पाठीशीं घालून त्याच्या वैरिणीपासून बांचविण्याची बांसरीनेंहि आपल्या लहान जीवाची शर्थ केली. इतक्यांत चारी बाजूंनीं लोक धांवले, आणि त्यांनीं जगूची व बांसरीची त्या संकटांतून मुक्तता केली. बांसरीला दोनचार जागीं म्हशीच्या शिंगांनीं चांगल्याच जखमा झाल्या होत्या, पण जगू एक ओरखडाहि न लागतां सुटला, या आनंदाप्रीत्यर्थ तिला आपल्या वेदना कळत नसाव्यात, असें तिच्या चर्येवरून दिसत होतें. ही आपली आई आहे, अशाविषयी जगूच्या मनांत आजपर्यंत संशयाचा लेश असल्यास त्याची या प्रसंगानें निवृत्ति झाली. सारजाबाई जगूला कसा पाठीशीं घालीत याची आठवण होऊन संपतरावांनाहि जगूच्या तर्कांत तथ्य असावेंसें वाटूं लागलें.

अलीकडे दौलतरावांचें आपल्या मेव्हण्याकडे वरचेवर येणें होत असे. सारजाबाईच्या जीवंतपणीं तिचे व जगूचे हाल पहावेनात म्हणून, व कांहीं अंशीं संपतरावांच्या उग्र स्वभावाच्या भीतीनें, ते येण्याचें होतां होईतों टाळीत असत; पण संपतरावांचें जगूशीं वर्तन बदलल्यापासून व त्यांच्या स्वभावाचा करडेपणाहि कमी झाल्यापासून त्यांना संकोच वाटेनासा झाला. पूर्वी सारजाबाईचे बंधु म्हणून त्यांना पहातांच संपतरावांना मनांतून त्रासल्यासारखें होई; पण आतां त्याच कारणामुळें त्यांच्या भेटीची ते उत्कंठेनें वाट पहात असत.

दौलतरावांचा स्वभाव मुळींच खुनशी नव्हता. उलट तो भोळा व दिलदार होता. त्यांची पोषाखांत सफाई व छानछोक इतकी असे, कीं, कोटाला एक सुरकुती पडलेली त्यांना खपत नसे; आणि रस्त्यानें चालतांना बाजूस असलेल्या एकाद्या लेह्यानें जर हांक मारिली तर गळेपट्टी बिघडेल या भीतीनें मान वळविणेहि त्यांच्या जीवावर येई! परंतु क्षुल्लक बाबतींत जरी ते इतके चोखंदळ होते, तरी इतरांच्या मोठ्या अपराधांचीहि क्षमा करण्यांत त्यांचें औदार्य वर्णनीय असे. यांचें एक कारण असें होतें, कीं, त्यांना स्वतःच्या आचरणासंबंधानें फारसा विधिनिषेध नसे. आपण व इतरांनीं आनंदांत राहून दुनियेंतील सुखाचा अनुभव घेणें यांतच धर्माचें सार आहे, असें त्यांना वाटे, व तदनुसार त्यांचें वर्तन असे. त्यांची चर्या प्रसन्न व भाषण गोड असल्यामुळें ते जात तिकडे हवेसे वाटत. या त्यांच्या गुणामुळें त्यानां त्यांच्या लेह्यांनीं 'रंगदेवता' असें टोपणनांव ठेवून दिलें होतें. ही रंगदेवता जाण्याचा अवकाश, कीं, घरांतील सगळे चेहरे प्रफुल्लित झाले म्हणून समजावें; मग तें घर त्यांच्या जाण्यापूर्वी निराशेनें व खिन्नतेनें पूर्ण कां असेना! त्यांची जगूवर फार मेहेरबानी असे. त्याला पाहिलें, कीं, त्यांना आपल्या आवडत्या मृत भगिनीची आठवण येई. अलीकडे त्यांनाहि संपतरावांप्रमाणेंच त्याच्या प्रकृतीबद्दल अस्वस्थता वाटूं लागली होती. पहिल्यापहिल्यानें हा केवळ शोकाचा परिणाम असावा, असें मानून ते मनाची समजूत करून घेत. पण शोक कमी होऊनहि क्षीणता वाढतच आहे, हें पाहून तिच्या मुळाशीं कांहीं तरी अधिक भयप्रद कारण असलें पाहिजे, अशी त्यांना वरचेवर शंका येऊं लागली. त्यांची आई क्षयानें मरण पावली होती; सारजाबाईसहि त्याच दुष्ट रोगानें भर तारुण्यांत मृत्युमुखीं पाडिलें होतें. आपल्या भाच्यासहि क्षयाची भावना झाली असावी, अशी दारुण शंका त्यांच्या मनांत येऊं लागली. सारजाबाईच्या दुखण्यांत तिच्या शुश्रूषेचा अर्धा भाग त्यानें आपल्या चिमुकल्या शिरावर घेतला होता व रोग्याच्या खोलींतील दूषित हवेंत त्यानें प्रहरन् प्रहर काढिले होते, हें त्यांना ठाऊक होतें. एकादे वेळी आईला झोप लागलेली पाहून तिच्या ओठांचें चुंबन घेण्यासहि या मातृभक्त मुलानें कमी केलें नसेल, व या रीतीनें तिच्या मुखांतून अमृत म्हणून विष शोषिलें असेल! अलेल्या संशयाचा

आमच्या आयुष्यांतील आठवणी १। रु.; सद्बोधमंदिर १२ आणे; सुशिक्षित स्त्री १० आणे;
संसारांतील गोष्टी ६ आणे. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

खरेपणा पडताळून पहाण्याकरितां जगूच्या फुप्फुसांची तपासणी करण्याचें त्यांनां प्रथम धैर्य होईना. न जाणों अशानें त्याला दहशत बाटून रोग नाहीं तेथें रोगाचा उद्भव व्हावयाचा ! शेवटीं अधिक उपेक्षा अक्षम्य आहे अशी खात्री झाल्यावर त्यांनीं त्याला तपासण्याबद्दल संपतरावांपाशीं गोष्ट काढिली.

आपल्या मेव्हण्याचीहि ही शंका ऐकून विचाऱ्या संपतरावांची कंबरच खचली. ते मटकन् खालीं बसले. त्यांच्या डोळ्यांपुढें अंधेरी आली. त्यांनां या दुष्ट रोगाच्या अचुक शरसंधानाचा कटु अनुभव एकदां आलेला होता. आपलें बापुडवाणें अर्भकहि लाला बळी पडणार, अशी त्यांनां खात्री बाटूं लागली. दौलतरावांनीं त्यांनां धीर दिला, व या रोगाने पछाटलेले सगळेच रोगी दगावत नाहींत, असें त्यांनां समजावून सांगितलें. इतकें झाल्यावर दौलतरावांनीं उत्पन्न केलेली लटकी आशा उराशीं धरून संपतराव त्यांनां घेऊन जगूच्या खोलींत गेले. जगू उभयतांचें स्वागत करण्याकरितां हंसऱ्या चेहऱ्यानें उभा राहिला. ज्या हंसण्यानें संपतरावांनां आजपर्यंत आनंद होत असे, त्यानें आज त्यांच्या हृदयाला चरका बसला. दौलतराव म्हणाले "बाळ, माणसाच्या हृदयांतील विचार ओळखण्याची मीं एक नळी आणिली आहे; ती तुझ्या छातीला लावून पाहूं का ?"

जगू जितका अज्ञानी असेल असा त्याच्या मामांचा समज होता तितका तो नव्हता. नळी पाहून त्याचें तोंड गोरेमोरें झालें. परंतु त्यालाहि आपल्या प्रकृतीबद्दल जिज्ञासा बाटून त्यानें आपली छाती उघडी केली. दौलतराव एकएक भाग नळी लावून तपासूं लागले. तपासणें चालू असतां त्याला भय बाटूं नये म्हणून व कांहींसें स्वतःच्या स्वभावास अनुसरून त्यांच्या तोंडाची टकळी चालली होतीच. "अरे बा ! तुझ्या बाबाबद्दल आणि मामाबद्दल तुझ्या हृदयांत बराच कोमल भाग आहे म्हणावयाचा ! आईबद्दलचा विचारहि तूं अजून पुरता सोडून दिला नाहींस, असें या आवाजावरून उघड दिसतें. हें ठीक नाहीं हो. अरे ! पण हीं कोण ! हं, हीं त्या बांसरीचीं शिंगें लागतात. बेटी तुझ्या हृदयाच्या एका भागांत कशीं खुपसून बसलीं आहेत पहा ! आणि या बाजूस तर तुझ्या राघूनीं आणि मैनानीं कसा धिंगाणा उडवून दिला आहे !"

हे शब्द दौलतरावांच्या तोंडांतून बाहेर पडतात न पडतात तोंच ते एकदम थांबले. त्यांच्या कपाळावर चिंतेची छाया दिसूं लागली. आपली चूक झाली असेल असें बाटून त्यांनीं पुनः पुनः नळी लावून पाहिली. पण त्या नाजुक छातीशीं मृत्यु जे कुठार मारीत होता, ते सारखे ऐकूं येतच होते. त्यांच्या कपाळास डबडबून घाम आला. तो त्यानीं पुसला, व संपतरावांस आपल्या हाताचा आश्रय देऊन ते त्यांसह बाहेर आले.

दौलतरावांची भीतिच अखेरीस खरी ठरली. जगूच्या फुप्फुसांत क्षयानें ठाणें करून बरेच दिवस झाले होते. दौलतरावांनीं लागलीच इलाज सुरू केले. त्यांनीं आपल्या वैद्यकनैपुण्याची पराकाष्ठा केली. संपतरावांनीं औषधाकरितां पाण्यासारखा पैसा खर्च केला; परंतु रोगाची पीछेहाट होईना. ज्याप्रमाणें चोरी उघडकीस येऊन मालक माग काढीत येऊं लागला म्हणजे चोर लांबविलेल्या जिनसेसह धूम ठोकतो, त्याप्रमाणें रोगाची परीक्षा झाल्यावर तो जगूच्या प्राणांसह सपाट्यानें मजला करीत चालला. इतकें हलकें ओझें घेऊन मुकाम गांठण्यास कितीसा उशीर लागणार ? थोड्याच दिवसांत जगू मरणोन्मुख होऊन पडला. त्याचे अखेरचे शब्द हे होते:—

"बाबा, मला मरणाचें मुळींच भय वाटत नाहीं. फक्त तुमच्यापासून आणि त्या बांसरीपासून दूर होण्याला वाईट वाटतें. तिला चांगली जपा. देव करील तर मी लवकर येईन जवळपासच जन्मास येईन."

जगूचें प्राणोत्क्रमण झाल्याबरोबर घरांत एकच कल्लोळ उडाला. तो नोकरमाणसांचा फार आवडता असे. त्याच्या भोवतीं सगळीं माणसें गोळा झालीं, आणि छाती पिटून रडूं लागलीं. बासरी हंबरडे फोडूं लागली, आणि प्राणिसंग्रहालयांतील स्वरांवरून त्या मुक्या प्राण्यांनांहि आपल्या लाडक्या धन्याचा अंत कळून चुकला असावा असें दिसत होतें. संपतरावांवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला. साऱ्या जगांत अगदीं जवळचें असें म्हणण्यास त्यांनां कोणीहि राहिलें नाहीं. त्यांनां दाही दिशा उदास झाल्या. ते दौलतरावांच्या गळ्यांत गळा घालून मोठमोठ्यानें रडूं लागले. चिमुकल्या जगूचें या आक्रोशाकडे मुळींच लक्ष्य नव्हतें. तो या जगांतील सुखदुःखांतून मोकळा होऊन अचेतन पडला होता !

[४]

संपतराव नेहमीं उदासपणें राहूं लागले. त्यांच्या मुद्रेवर कधींहि प्रसन्नता दिसेनाशी झाली. ते कितीक वेळ तरी एकाच वस्तूकडे पहात बसूं लागले. त्यांनीं जगूच्या आवडत्या वस्तु एकत्र केल्या. आणि त्या हातांनीं चाळवून ते मनाची करमणूक करून घेऊं लागले. त्यांनां बसावयाचें झाल्यास ते जगूच्या खुर्चीवरच बसत, आणि रात्रीं जगूच्या अंथरुणावरच निजत. जगूनें काढिलेलीं चित्रें त्यांनीं निराळीं बांधवून सतत समोर दिसण्याकरितां आपल्या टेबलावर ठेवून दिलीं. सारजाबाईचें व जगूचें छायाचित्र त्यांनीं आपल्या पलंगाच्या अलेक बाजूस ठेवून दिलें. बुडतें मनुष्य जसें काडीला गच्च धरून बसतें, त्याप्रमाणें आपल्या आवडत्या माणसांच्या निर्जीव वस्तूंचा त्यांनीं आश्रय केला. जीवंत प्राण्यांपैकीं बासरी ही जगूची अत्यंत लाडकी होती. तिजवर संपतराव जीव कीं प्राण करूं लागले. आपल्या आवडत्या जगूकरितां तिनें आपल्या अंगावर ज्या जल्मा

नवयुग १२ आणे; मृणालिनी ८ आणे; जीवनसंध्या १२ आणे; मूर्तिमंत देशाभिमान ८ आणे;
सुंदर कादंबऱ्या. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

करून घेतल्या होत्या त्यांचे व्रण अजून कायम होते, संपतराव त्या जखमांचें एकाद्या वीराच्या जखमांप्रमाणें कौतुक करीत. वांसरींचें चारापाणी अलीकडे त्यांनीं स्वतःकडेच ठेविलें होतें.

संपतराव कधीं कधीं विचारांत मग्न असतांना एकदम कांहीं आठवल्यासारखें करून घराबाहेर येत, आणि घाईघाईनें चोहोंकडे पाहून उद्विग्न मनानें परत जात. नोकरचाकरांनां याचा कांहींच अर्थ समजेना. आपले मालक नेहमीं कोणाची तरी मार्गप्रतीक्षा करीत आहेत काय, आणि करीत असल्यास कोणाची, याचा त्यांनां पत्ता लागेना. एके दिवशीं संपतराव वांसरीच्या गोठ्यांत गेले असतांना तेथें तिच्यापाशीं एक हरणाचें पाडस बसलें आहे, व ती त्याला प्रेमानें चाटीत आहे, असें त्यांच्या नजरेस पडलें. त्याबरोबर फार दिवस शोधीत असलेली वस्तु सांपडावी असें त्यांनां झाल्यासारखें त्यांच्या मुद्रेवरून दिसलें. त्यांनीं आपल्या लहानग्या पाहुण्याकरितां ताजीहरळी नोकरांकडून आणवून ती त्याला आपल्या हातांनीं चारली, व पाणीहि पाजिलें. त्याबरोबर तें हरिण त्यांच्याभोंवतीं आनंदानें उड्या मारूं लागलें. या हरिणाचीच संपतराव इतक्या आतुरतेनें वाट पहात होते काय?

संपतरावांच्या मनांत जे विचार घोळत होते त्यांचा परिणाम होऊनच कीं काय, त्यांनां त्या रात्रीं स्वप्नांत जगू दिसला. त्याचें शरीर अत्यंत क्षीण व चर्या फार दीनवाणी दिसत होती. त्यानें संपतरावांच्या गळ्यास मिठी मारून झटलें "बाबा, तुम्ही माझ्याकरितां कितीतरी दुःखीकष्टी असतां! पण आतां मुळींच दुःख करूं नका. कारण मी तुमच्यापाशीं आणि आईपाशीं नेहमीं रहाण्याकरितां आलों आहें." असें बोलून तो त्यांचे डोळे पुसतो न पुसतो तोंच त्याच्या जागीं हरिण दिसूं लागलें. 'गरीब बिचारा जगू!' असे उद्गार काढून संपतरावांनीं त्या हरिणास कवटाळावयास हात पुढें केला. तों पलंगाचा कठडा हातास लागून ते जागे झाले. त्या वेळीं पहाटेचे पांच वाजले होते. पहाटे पडलेलीं स्वप्नें खरीं ठरतात. हेंहि स्वप्न खरें असेल का?

संपतराव गोठ्यांत गेले. तेथें वांसरीच्या अंगावर मान टाकून हरिण पडलेलें दिसलें. त्यांनां पहातांच उभयतांनां हर्ष झाल्यासारखा दिसला. संपतरावांनीं हरिणास पोटाशीं धरिलें, व त्याच्या कानांत हलक्या स्वरानें झटलें "जगू, तूं कालची रात्र येथेंच काढिलीस ना? थंडीनें तुझा जीव व्याकुळ झाला असेल. आणि मी मात्र पलंगावर पोरत पडलों होतों. थांब, आजचे आज तुझ्याकरितां एक छोटेखानी गादी आणि पांघरूण तयार करवितों."

हें हरिण कोणाचें आणि हें काल गोठ्यांत आलें कसें, याचा अजून संपतरावांनीं विचारच केला नव्हता. याला देवानें आपणाकडे पाठवून दिलें, असेंच त्यांनां वाटत असावें. सकाळीं त्यांनां नोकरानें वर्दी दिली, कीं, बाहेर कोतवालसाहेब आले असून त्यांचें आपणाशी निकडीचें काम आहे. बाहेर जाऊन पहातात तों कोतवालसाहेब चिंतातुर मुद्रेनें आपली वाट पहात असून त्यांच्यापाशीं जिल्हाधिकाऱ्यांचा बक्षी दिमाखानें उभा आहे, असें त्यांनां दिसलें.

हा बक्षी हुजुरांच्या स्वारींत त्यांच्याबरोबर आला असून तो एका चपराश्याबरोबर आधले दिवशीं संपतरावांकडे इनाम मागण्याकरितां आला होता. त्या वेळीं त्यांच्यामध्यें खालीं लिहिल्याप्रमाणें संवाद झाला:—

संपतराव झणाले "तुम्हाला इनाम पाहिजे तें कशाबद्दल? असें तुम्हीं माझें कोणतें काम केलें आहे?"

बक्षी झणाला "आम्ही आपल्या पायांचे नोकर आहोंत सरकार!"

"तुम्ही माझ्या पायांच्या नखांचेहि नोकर असाल. पण ही गोष्ट या घटकेपर्यंत मला माहीत नव्हती. मला तुमचें कधीं कामहि पडलें नव्हतें. तुमच्या साहेबांनांहि मी कधीं भेटावयाला आलों नाहीं."

"आजपर्यंत काम पडलें नाहीं; पुढें पडेल."

"पडेल तेव्हां पाहून घेऊं."

"आम्ही फार गरीब आहोंत, सरकार."

"दुनियेंत तुम्ही एकटेच गरीब नाहीं. साऱ्या गरीबांचा आम्ही परामर्श घेऊं लागलों तर आम्हालाहि त्यांच्याबरोबर चौपदरी घ्यावी लागेल."

"मग इनाम देण्याचा इरादा नाहीं तर तुमचा!"

संपतराव झणाले "मीं एकदांच सांगितलें नाहीं झणून; पुनः पुनः मागायचा तुझाला कंटाळा येत नसेल, पण वारंवार नाहीं झणण्याचा मला मात्र येतो!"

यावर बक्षी दिमाखानें म्हणाला "याचा तुझाला पस्तावा होईल!"

"भिकाऱ्याला भीक न घातल्याचा पस्तावा तो काय होणार!"

बक्षीबरोबरचा चपराशी यावर झणतो "तुमची चूक आहे. आम्ही भिकारी नाहीं. तर तुमच्या सरकारचे मुखत्यार आहोंत!"

संपतराव झणाले "तुम्ही नोकराच्या जागेवरून सरकारच्या जागेवर बरीच मोठी उडी मारली झणायची!"

बक्षी म्हणाला "साहेब झाले तरी आमच्या मुठींतच असतात!"

संपतराव झणाले "राजाची शेंडी म्हाताऱ्याच्या हातीं असतेच!"

चपराशी म्हणतो "तुम्ही सारें थट्टेवर नेत आहांत, पण अशी एकादी वेळ येईल, कीं, आमच्याहि पायां तुझाला पडावें लागेल."

संपतराव झणाले "समर्थाच्या घरच्या श्वानाच्या कोण नाहीं पायां पडणार?"

यावर दोघेहि झणाले "बरें आहे, पाहून घेऊं!"

दोन घटका मनोरंजन भाग १ ला, १। रु.; दोन घटका मनोरंजन भाग २ रा, १। रु; संसाररंजन, १ रु;
चटकदार छोट्या गोष्टींचीं पुस्तकें. मनोरंजन संस्थाचालक पांचाळी शिवाजी-पंढरी

संपतराव संतापून म्हणाले "कोण आहेरे तिकडे ! यांनां घराचा दरवाजा दाखीव !"

कोतवालाच्या सांगण्यावरून असें कळलें, कीं, हुजूरच्या मालकीचें एक हरिण चोरीला गेलें असून तें संपतरावांनीं चोरून ठेविल्याबद्दल बबजींनें त्यांनां बातमी दिली, व त्यावरून साहेबांनीं संतापानें तावडतोब संपतरावांनां पकडून आणण्याबद्दल कोतवालास हुकूम केला आहे.

कोतवाल म्हणाला "मी हुकुमाचा तावेदार. मला आपणास बरोबर घेऊन गेलें पाहिजे. तें हरिणहि माझा शिपाई घेऊन येईल."

संपतराव म्हणाले "तुमच्याकडे यांत कांहींच दोष नाहीं. मात्र हें हरिण चोरण्यासारखी माझी स्थिति आहे का, हें तुह्मांला सांगावयास नको."

कोतवाल म्हणाले "त्याबद्दल सारें गांव साक्ष देईल. पण या गोष्टी साहेबांसच समक्ष सांगणें बरें नाहीं का ?"

बबजी म्हणाला "लवकर चला. उगीच बडबड नको. साहेब रागावतील."

संपतरावांनीं घाईघाईनें कपडे चढविले. कोतवालाच्या शिपायाने गोठ्यांत जाऊन हरिण आणिलें. तें बिचारें भयचकित दृष्टीनें आपल्या आश्रयदात्याच्या तोंडाकडे पाहूं लागलें. पण संपतराव तरी बिचारे काय करणार ? अगतिकत्वासंबंधानें त्यांची आणि त्या हरिणाची स्थिति सारखीच होती.

बंगल्याच्या सोप्यांत साहेब रागानें पाय झाडीत इकडून तिकडे येरझारा घालीत होते. संपतरावांनां पहातांच ते त्यांच्या अंगावर ओरडून म्हणाले "लवकर कां नाहीं आलांत ! चोरच्या चोर आणि वर शिरजोर !"

संपतराव म्हणाले "साहेब, मी शिरजोर नाहीं, आणि चोर तर नाहींच नाहीं ! मी चोर आहें असें आपणास कोणी सांगितलें ?"

साहेबांनां इतक्या धिटाईचें उत्तर ऐकण्याची संवय नव्हती. त्यांनीं संपतरावांच्या चेहऱ्याकडे बारकाईनें पाहिलें, आणि ते म्हणाले "आमच्या बबजींनें. आमचें हरिण तुह्मीं आपल्या घरांत नेऊन ठेविलें कीं नाहीं ?"

संपतराव म्हणाले "हें हरिण काल आमच्या गोठ्यांत बसलेलें सांपडलें. तें आपलें आहे ही गोष्ट मला प्रथम कोतवाल-साहेबांकडून आज सकाळींच कळली. मला आपलें हरिण नेण्याचें कारण काय ? ईशकृपेनें सात पिढ्या पुरेल येवढी दौलत मजपाशीं आहे. आपल्या बबजींला ही गोष्ट कशी कळली हें आपण त्यालाच विचारल्यास या गूढाचा उलगडा होईल."

या प्रश्नाला बबजींची तयारी नसल्यामुळें त्याचा गोंधळ उडाला. त्यानें आपल्या अंगावरील धोंगडें काढून टाकण्याकरितां "मला ही गोष्ट चपराश्याकडून कळली," असें सांगितलें. साहेबांच्या हुकमावरून चपराशी चळचळ कांपत पुढें उभा राहिला. साहेबांनीं त्याला दरडावून विचारतांच तो म्हणाला "नाहीं सरकार, माझी यांची ओळखहि नाहीं. मग मी कुठून सांगणार ?"

साहेब बरेच नरम झाले. नंतर ते संपतरावांकडे वळून म्हणाले "बबजींला तुमचेंच नांव घेण्याचें कारण काय ?"

संपतराव म्हणाले "तेंहि मीं सांगण्यापेक्षां यांच्या जबाबावरूनच उघड होईल. हा बबजी आणि हा चपराशी मजकडे इनामाकरितां आले होते कीं नाहीं, हें यांनांच विचारा."

त्या उभयतांचीं तोंडें काळीं ठिक्कर पडून गेलीं होतीं. साहेब त्यांकडे पहात संपतरावांस विचारतात "इनाम ? आणि कशाबद्दल ?'

"हाच प्रश्न मीहि त्यांनां विचारिला. त्यांच्या बोलण्याचें सार इतकेंच दिसून आलें, कीं, हुजूरच्या जोरावर माझें नुकसान करितां येण्यासारखें असून त्यांनीं केलें नाहीं."

साहेब म्हणाले "वाः ! हा खासा न्याय ! रस्त्यानें चालतांना हे लोकांनां चावीत नाहींत व त्यांजवर लाथा झाडीत नाहींत हा त्यांजवर यांचा उपकार कीं काय ? या दृष्टीनें जिल्ह्यांतील साऱ्या इसमांवर यांचा इनामाचा हकच झाला म्हणावयाचा ! आणि हा उपकार न मानितां तुह्मीं त्यांस इनाम देण्याचें नाकारिलें, त्यावरोबर यांनीं तें हरिण तुमच्या घरांत गुप्तपणें सोडून देऊन तुह्मांला आपला हात दाखविला असेंच ना ?"

संपतराव म्हणाले "साहेबच न्याय करण्यास समर्थ आहेत."

साहेब म्हणाले "आपल्यासारख्या संभावितांवर माझ्या नोकरांच्या लबाडीमुळें असा आळ यावा, याची मला फार दिलगिरी वाटते. (उभयतांकडे वळून) चोरांनों ! या भल्या माणसाची आणि तुमची योग्यता सारखीच झाली काय ? तुमच्यासारख्या गारगोट्यांस सन्या मानून मीं या रत्नाला पायाखालीं तुडवावें, असें तुमचें म्हणणें ? चला, आधीं यांच्या पायां पडून कसूर माफ करण्याबद्दल यांची विनंति करा. (ते संपतरावांच्या पायां न पडतां आपल्या पायां पडतात असें पाहून) माझ्यासमोर हजारदां नाकें घांसाल. त्यांत काय आहे ? यांच्या पायां पडा." (ते तसें करतात.)

संपतराव म्हणाले "आपली दिलसफाई झाली यांत मला सारें कांहीं पावलें. यांच्याशीं मला काय करावयाचें आहे ?"

साहेब उभयतां नोकरांस म्हणाले "यांच्यासाठीं आणि माझ्यासाठीं दोन खुर्च्या आणा."

साहेबांच्या विनंतीवरून संपतराव खुर्चीवर बसले, आणि नंतर साहेबहि बसले. कोतवालसाहेब पाऊल न वाजवितां बाहेर गेले.

संपतराव म्हणाले "साहेब, आपलें अंतःकरण फार उदार आहे !"

साहेब म्हणाले "संपतराव, असें म्हणूं नका. मी आपला सन्मान करीत आहें त्याला आपण पात्रच आहांत. आपली मानखंडना झाली ही गोष्ट मात्र फारच वाईट झाली ! बोला, या अपमानाबद्दल मीं आपली कशी मरपाई करावी ? आपण म्हणाल तर मी आपणास सरकारांतून शिफारसपत्र

तोडरमल १२ आणे; जीवनसंध्या १२ आणे; मूर्तिमंत देशाभिमान ८ आणे; बकुलमाला १२ आणे;
ऐतिहासिक कादंबऱ्या. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

करून दे
राव ल
करीत
ठेवि
ग योग्य मोबदला होईल."

संपतराव म्हणाले "या बहुमानाची योग्यता मी पूर्णपणें जाणून आहे. पण साहेब, ज्याचें मन प्रियतम माणसें मृत झाल्यामुळें संसारांतून उठलें आहे, त्याला जबाबदारीचीं कामें करण्यास हुरूप व आल्हाद कोठून वाटणार ? माझे अखेरचे दिवस स्वस्थेंत गेले म्हणजे मी मिळविली. तरी पण आपणापाशीं मला मागण्यासारखी एक वस्तु आहे."

साहेब म्हणाले "सांगा आपण कोणती ती ?"

संपतराव म्हणाले "जे हरिण माझ्या आश्रयाला येऊन बसलें तें."

हें संभाषण चाललें असतांना साहेब व संपतराव यांपैकीं जो जो भाषण करी त्याच्या त्याच्या तोंडाकडे हरिण आशाळभूतपणानें पहात होतें. त्याच्या मागोमाग वांसरीहि येऊन त्याच्याजवळच शेंपटी हलवीत उभी राहिली होती. खटल्याचा निकाल दोघांनांहि कळला असावा, असें त्यांच्या मुद्रांवरून दिसत होतें, व आतां संपतराव परत निघतेवेळीं त्यांचें स्वागत करण्याकरितां दोघेंहि बंगल्याबाहेर त्यांना दिसतील अशा ठिकाणीं उभीं होतीं.

हरिणाकडे पाहून साहेब हंसत म्हणतात "हें येवढेंसें हरिण ? याचा एक घांसहि होणार नाहीं."

शहारे आल्यासारखें करून संपतरावांनीं एक दीर्घ निःश्वास टाकला.

साहेब म्हणाले "माझ्या बोलण्यानें आपणास विशेष उद्वेग वाटलासें दिसतें. तसें असल्यास मला आपण क्षमा करावी."

संपतराव म्हणाले "आपणास माझ्या कुटुंबाचा पूर्व इतिहास माहीत नसल्यामुळें मला उद्वेग वाटण्याचीं कारणें आपल्या लक्ष्यांत आलीं नाहींत, यांत नवल नाहीं."

"पण या हरिणाचा आपल्या कुटुंबाशीं काय ऋणानुबंध असणार ?" साहेबांनीं विचारलें.

संपतराव म्हणाले "आपणास जो हरिणाचा बच्चा म्हणून दिसत आहे तो पूर्वजन्मीं माझा मुलगा जगू होता; आणि त्याला विलगून जी कालवड उभी आहे, ती पूर्वजन्मींची माझी पत्नी! आपणास हें बोलणें मायेफिरूपणाचें किंवा वेडेपणाचें वाटेल. मलाहि आपणाप्रमाणेंच प्रथम वाटत होतें. पण मला त्याबद्दल एकामागून एक इतकी प्रमाणें मिळालीं, कीं, संशयाला मुळींच जागा राहिली नाहीं. मीं आपणास सारी हकीकत सांगितली, कीं, आपलेंहि मत माझ्याप्रमाणेंच होईल, ही खात्री आहे. वरवर पहाणारासहि हें काल सांपडलेलें हरिण आणि ही कालवड यांजमध्यें इतकें प्रेम असावें याचा अचंबाच वाटेल."

साहेब बुचकळ्यांत पडले. मनुष्य, कालवड व हरिण यांचें कुटुंब त्यांनीं आजन्मांत पाहिलें नव्हतें, किंवा ऐकिलें नव्हतें ! हा चमत्कार खरा मानावयाचा, किंवा संपतरावांनां वेडें समजावयाचें ? अथवा खतःला नीट ऐकूंच आलें नाहीं म्हणून मानावयाचें ? त्यांनीं संपतरावांची संपूर्ण हकीकत शांतपणानें व सहानुभूतीनें ऐकून घेतली. नंतर डोळ्यांत उभे राहिलेले अश्रु पुशीत ते म्हणाले "संपतराव, आपणास आपल्या मृत जिवलगांबद्दल जें प्रेम वाटतें त्याबद्दल मला आदर वाटतो. माझ्या धार्मिक समजुती आपल्या समजुतींशीं जुळत्या नसल्यामुळें माझें अनुमानहि आपल्या अनुमानाशीं जुळत नाहीं, याला नाइलाज आहे. प्रिय आप्तांच्या मरणानंतर ते आप्त जिवंतच आहेत असें मानून मनाचें समाधान करून घेण्याला हिंदु धर्मांत जशी सबब आहे, तशी ती आमच्या धर्मांत नाहीं हें मी एका दृष्टीनें आपलें दुर्दैव समजतों. कारण, मलाहि आपल्या जगू सारखाच अल्पवयी व लाडका एक मुलगा होता. त्यानें मजजवळ राहणें देवाला आवडलें नाहीं, आणि तो त्याला आपल्याजवळ घेऊन गेला. तेव्हांपासून माझ्या जिवाला चैन नाहीं. असो, गत गोष्टीबद्दल शोक करून काय उपयोग? मी हें हरिण आपणाला नजर करितों. त्याची बाजारांत जरी किंमत नसली तरी आपल्या दृष्टीनें तें अमोल आहे."

संपतराव म्हणाले "यांत काय संशय? आपण मेहरबानीनें हें मला बक्षीस दिलें, तें दिलें नसतें तर त्याच्याकरितां मीं आपली सर्व जिनगी खर्ची घातली असती. मी आपल्या देणगीचा आभारपूर्वक स्वीकार करितों. देव आपणास नेहमीं सुखांत ठेवो."

संपतराव घरीं जाण्याकरितां उठले. साहेब त्यांनां पोहोंचविण्याकरितां बंगल्याच्या फाटकापर्यंत गेले. तेथें त्यांचा हात कळकळीनें दाबून ते म्हणाले. "मी आज रात्रीं हें गांव सोडून जाणार. आपल्यासारख्या सद्गृहस्थाचा परिचय झाला, हें मी आपलें सुदैव समजतों. परिचयाचें निमित्त निराळें असतें आणि माझा मुक्कामहि अधिक असता तर मला विशेष संतोष झाला असता."

तो दिवस संपतरावांस फारच आनंदाचा गेला. त्यांनीं आचाऱ्यास तऱ्हतऱ्हेचीं पक्वान्नें करावयास सांगून तीं वांसरीस व हरिणास आपल्या हातानें चारिलीं. त्या दिवशीं त्यांनीं गोठ्यातच ठाणें दिलें होतें. असा उत्सवाचा दिवस स्त्रीपुत्र हयात असतांनाहि त्यांनां कधीं गेला नव्हता. या आनंदाच्या प्रसंगीं त्यांनीं फार दिवसांचा नियम बाजूस ठेवून दारूचेंहि बरेंच सेवन केलें. नोकरचाकरांनांहि आज गांजा, भांग वगैरे अमली पदार्थ सेविण्याची पूर्ण मुभा होती; व तिचा त्यांनीं चांगलाच उपयोग करून घेतला; इतका, कीं, रात्रीं नऊ वाजण्याच्या पूर्वीच घरांतील सारीं माणसें निद्रावश होऊन घोरूं लागलीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं संपतराव नऊ वाजण्याच्या सुमारास निजून उठले. मुखमार्जनादि प्रातर्विधि चालले असतांना आपले नोकर आपसांत कांहीं कुजबुजत आहेत, असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीला आलें. शेवटीं त्यांतून जो अंमळ धीट होता तो पुढें होऊन हात जोडून म्हणाला "महाराज, हातून चूक झाली; माफी असावी."

रा. व. वारद यांचें चरित्र ४ आणे; ऐतिहासिक स्त्रिया ८ आणे; आमच्या आयुष्यांतील आठवणी १। रु.
महनीय चरित्रें. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

संपतरावांस याचा अर्थच कळेना. त्यांनीं त्या नोकरास रागावणार नाहीं असें आश्वासन दिल्यावर तो म्हणाला "आज सकाळीं आम्ही उठून पहातों तों कालवड व हरिण गोठ्यांत नाहींत. लागलींच चोहोंकडे शोधार्थ माणसें पाठविलीं. गोठे पाहिले, विहिरी पाहिल्या, पण कोठेंहि पत्ता लागला नाहीं !"

संपतराव ताडकन् उभे राहून म्हणाले "मग ही गोष्ट मला अगोदरच कां नाहीं सांगितली? मला झोपेंतून उठविलें असतें तरी चाललें असतें. तुम्हीं सारीं ठिकाणें पाहिलीं म्हणतां; पण मुद्याचें ठिकाणच सोडून दिलें. बरें असो; घोड्यावर जीन चढवावयास सांगा. मला बाहेरगांवीं गेलें पाहिजे !"

'ह्या लुच्चा बबर्जीचेंच हें काम. साहेबांचा मुकाम झाला तेव्हां त्यानें जातांना माझ्यावर सूड उगविण्याकरितां ह्या दोघांनां पळवून नेलें खास! कदाचित् वांसरी ओरटलीहि असेल..पण सारीं माणसें भांगेच्या तारेंत असल्यावर ह्या बिचारीचें ओरडणें त्यांच्या कानांवर कुठून जाणार?' असे विचार संपतरावांच्या डोक्यांत त्यांच्या प्रवासांत चालले होते. मधूनमधून ते वाटकऱ्यांनां ह्या दोघांबद्दल प्रश्न करीत. त्यांच्या उत्तरावरून त्यांच्या अनुमानांस बळकटीच येत गेली. संपतरावांनीं दिलेल्या वर्णनाचीं दोन जनावरें त्यांपैकीं कांहींजणांनीं पुढील गांवीं पाहिलीं होतीं. तीं अजून त्याच गांवीं आहेत किंवा पुढें निघून गेलीं, हें मात्र कोणी सांगेना. पुढील गांव म्हणजे दौलतरावांचेंच रहाण्याचें गांव. तेथें पोहोंचेपर्यंत त्यांनां अकरा वाजले. त्या गांवांत दौलतरावांची मानमान्यता बरीच असल्यामुळें त्यांच्यामार्फतच शोध लावणें सोपें जाईल, असा विचार करून संपतराव तडक त्यांच्याच घरीं गेले. दौलतरावांची ती जेवण्याचीच वेळ होती. त्यांनां संपतरावांनां पाहून अचंबा वाटला; पण त्यांनीं त्यांच्या येण्याचें कारण प्रथमच न विचारतां त्यांनां स्नानास उठण्याचा आग्रह केला. संपतराव स्नान उरकून पाटावर येऊन बसले. दौलतरावांपाशीं गोष्ट कशी काढावी हें त्यांच्या डोक्यांत घोळत होतें. चोरीला गेलेल्या जनावरांचें दौलतरावांनां फारसें महत्त्व नव्हतें. केवळ जनावरांसाठीं येवढा प्रवास केल्याबद्दल ते स्वतःच्या स्वभावास अनुसरून त्यांची धट्टाहि करावयाचे. शेवटीं दौलतरावांसच बोलूं द्यावें आणि मधें संधि मिळाल्यावरोबर त्यांनां आपला मनोदय कळवावा असा त्यांनीं विचार केला. दौलतरावांना बोलण्याच्या कामांत आग्रह कधींच लागत नसे. त्यांनीं थोड्याच अवकाशांत स्थानिक शिंप्यांची मुंबईच्या शिंप्यांशीं तुलना, गुंड्या कोणत्या कारखान्यांत चांगल्या होतात, कापडा कोणत्या दुकानांत सुंदर मिळतात, परदेशी चहाच्या मानानें स्वदेशी चहांत कोणतें वैगुण्य असतें, सदरे किती लांब असावेत, पारशी धर्तीचे कोट चांगले, कीं, आंखूड कोट चांगले, सोनेरी आरशीला काय पडतें, मनगटावरील लहान पट्ट्याळांचे उपयोग कोणते, पुष्पपात्रांत पुष्परचना कशी करावी, इत्यादि गहन प्रश्नांचा सांगोपांग विचार केला. इतक्यांत पानेंहि वाढून तयार झालीं. त्यावरोबर दौलतरावांनां कसलीशी आठवण झाली आणि ते म्हणाले "माझ्या वक्तृत्वाबरोबर श्रोते वहात जाण्याऐवजीं मी स्वतःच वहात जातों. आजच पहाना ! तुम्हाला मांसाचे पदार्थ चालतात. कीं, अजून तुम्ही सोवळेपणानेंच वागत आहांत ! याची चौकशी मीं अगोदर करावयास पाहिजे होती. मांसाचे पदार्थ चालत असतील तर तुम्हाला आज सकाळीं येथें येण्याला देवानेंच बुद्धि दिली, असें म्हटलें पाहिजे. आज येथील कसायानें सकाळीं एक कालवड खरेदी केली. पण तिचा आम्हांला थोडाच उपयोग होता ! मीं त्याला म्हटलें 'तुला लागेल ती किंमत देतों. पण एकादा सुंदर मासा किंवा दुसरा एकादा स्वादिष्ट मांसाचा प्राणी मिळेल तर पहा. त्यानें लागलीच जाऊन एक हरिणहि विकत घेतलें."

दौलतरावांच्या अगोदरच्या टकळीस संपतराव अगदीं कंटाळून गेले होते. पण ते कालवडीबद्दल व हरिणाबद्दल हकीगत सांगूं लागले, तेव्हां त्यांची आतुरता अनावर झाली, आणि ते मध्येंच उभे राहून ओरडले "कोणापासून विकत घेतलें ? बोला लवकर काय असेल तें."

संपतरावांचें तोंड लाल झालें होतें, व डोळे इतके बटारलेले दिसत होते, कीं, बुबुळें या क्षणीं डोळ्यांतून उडी मारून बाहेर पडतात कीं काय, असा भास होत होता. दौलतराव मनांत दचकले; पण संपतरावांच्या स्थितींत पडलेल्या अंतराचें कारण माहित नसल्यामुळें ते पुढें बोलूं लागले "तें कोणास सांगूं नका म्हणून त्या कसायानें मला बजाविलें आहे. तुम्हाला सांगण्यास हरकत नाहीं म्हणा. मात्र हें रहस्य कोणालाहि न सांगण्याबद्दल मलाहि तुम्हाला बजाविलें पाहिजे. सांगामागेंच झालें तर प्रथम तें न फोडण्याबद्दल शपथ घेण्याचें लक्ष्यांत असूंद्या."

संपतराव आपलें डोकें हातांनीं दाबून धरून म्हणतात "दौलतराव, माझें डोकें दारुण शंकेनें फुटून जाईल. लौकर सांगा तें हरिण तुम्हीं कोणापासून विकत घेतलें ?"

दौलतराव संपतरावांच्या कानाशीं तोंड नेऊन सगळ्या घरांत ऐकूं जाईल अशा आवाजानें म्हणतात "साहेबांच्या बबर्जीपासून!"

"आणि त्या हरिणानें पुढें काय झालें ?"

"त्यानेंच मांस या ताटांतून वाढलें आहे !"

"दौलतराव, केवढें हें अज्ञान ! तो हरिण नव्हता ! तो आपला बिचारा जगू आणि तुमच्या व माझ्या जिवाचा कलिजा ! बाळा, तुझें मांस माझ्यासमोर वाढून पुढें यावें ना! तूं खरा पितृभक्त, म्हणून मेल्यावरहि या रूपानें माझ्या भेटीला आलास ! थांबा, मीहि तुमच्या भेटीला येतों."

असें म्हणून संपतराव धाडदिशीं भूमीवर निपचित पडले. दौलतराव त्यांनां सांवरण्यास जातात तों काय ? संपतरावांच्या आत्म्यानें आधींच आपल्या जिवलगांस भेटण्याकरितां प्रयाण केलें होतें !

Indian Worthies, Re. 1, The Hon. Justice Sir Narayan Chandavarkar's Speeches Rs. 2-8, Manoranjak Grantha Prasark Mandali, Girgaon-Bombay.

आराकानची राणी.*

[श्रीयुत 'सरस्वतीकंठमणि.' मुंबई.]

[भूमिका—युद्धांत पराजय पावलेला शहासुजा औरंगजेबाच्या भयानें पळून जाऊन आराकानच्या राजाचा अतिथि होऊन राहिला होता. त्याच्याबरोबर त्याच्या तीन रूपवती कन्या होत्या. आपल्या युवराजाशीं त्या तीनहि राजकन्यांचा विवाह लावून द्यावा, अशी आराकानच्या राजाची इच्छा होती. आपली ही इच्छा त्यानें एकदां शहासुजापाशीं प्रगट केली. परंतु याविषयी त्याने अत्यंत असंतोष दाखविला. आराकानच्या राजाला त्याच्या या अधिक्षेपानें अर्थात्च क्रोध आला. त्यानें गुप्तपणें बेत करून एकदां शहासुजा व त्याच्या कन्या यांना नौकेंत बसवून, ती नदींत मौजेनें सोडविली व ऐन प्रवाहांत ती बुडविण्याचा घाट घातला. या विपत्प्रसंगीं आपली कनिष्ठ कन्या अमीना हिला त्यानें स्वतः नदीमध्यें लोटून दिलें. त्याची ज्येष्ठ कन्या आत्महत्या करून मरण पावली. सुजाचा अत्यंत विश्वासु सेवक रहमतअली जुलेखेला बरोबर घेऊन पोहून जाऊन त्या संकटांतून बचावून पळून गेला. खुद्द सुजा युद्ध करतां करतां वीराग्रमाणें मरण पावला.

बापानें नदींत लोटून दिलेली अमीना मेली नाहीं. नदीच्या प्रचंड प्रवाहांत सांपडून ती वहात चालली असतां दैवलीलेमुळें थोड्याच वेळानें ती एका धीवराच्या जाळ्यांत सांपडून जलसमाधीतून बचावली. त्या धीवरानेंच तिला मुलीप्रमाणें वाढवून मोठी केली व ती त्याची गृहव्यवस्था पाहूं लागली.

मध्यंतरीं आराकानचा वृद्ध राजा मरण पावून त्याचा युवराज सिंहासनावर आरूढ झाला होता.]

एके दिवशीं सकाळींच वृद्ध धीवर झोंपडींत येऊन अमीनेला रागावून तडतडां बोलूं लागला—"तिन्नी !— (धीवरानें आराकानी भाषेंत अमीनेचें हें नांव ठेविलें होतें.) तिन्नी ! आज सकाळींच तुला असें झालें आहे तरी काय ? घरांतल्या कामाकाजाला या वेळेपर्यंत तूं कसा तो हात देखील लावला नाहींस ! नवीन विणलेल्या जाळ्याला गांठी द्यायचें काम अजून तसेंच राहिलें आहे—माझी होडी आतां—"

अमीना धीवराजवळ येऊन प्रेमळ स्वरानें, परंतु आदरानें म्हणाली "बाबा ! आज कीं नाहीं माझी ताई आली आहे हो—म्हणून आज कामाला सुट्टी !"

"तुझी आणखी ताई कोण ग तिन्नी ? "

तितक्यांत जुलेखा कोठून बाहेर येऊन हंसत म्हणाली "मी हिची ताई !"

वृद्ध धीवर तर आश्चर्यानें थक्क होऊन गेला ! आश्चर्याचा भर किंचित् ओसरल्यावर तो जुलेखेच्या अगदीं जवळ गेला व अगदीं बारीक नजरेनें तिच्या चेहऱ्याकडे निरखून पाहूं लागला.

कांहीं वेळानें कांहीं आठवण झाल्यासारखें करून त्यानें विचारलें "पण तुला कांहीं कामकाज करतां येतें कीं नाहीं पोरी ? "

अमीनेनें मध्येंच उत्तर दिलें "बाबा, ताईच्या वांटणीचें काम मी करीन बरं का ? ताईला कामबीम कांहीं करतां येत नाहीं."

कांहीं वेळ विचार करून वृद्धानें विचारलें "पण तूं रहाणार तरी कुठें ? "

जुलेखेनें उत्तर केलें "अमीनेजवळ राहीन मी !"

बिचाऱ्या वृद्ध धीवराला हें मोठें संकटच वाटलें ! या संकटांतून आपली मुक्तता कशी होते, असें त्याला झालें ! किंचित् रागानें त्यानें जुलेखेला प्रश्न केला "अमीनेजवळ राहून तूं खाणार काय ? "

जुलेखा हंसत म्हणाली "त्याची पूर्ण तजवीज आहे माझ्यापाशीं ! " असें म्हणून तिनें अवज्ञतेनें धीवरापुढें एक सुवर्णमुद्रा चटकन् फेंकून दिली.

अमीनेनें ती उचलून घेऊन धीवराच्या हातीं दिली व त्याच्या कानांत ती हळूच म्हणाली "बाबा !

---

* वंगसाहित्यसम्राट् श्रीयुत रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या एका गोष्टीचा अनुवाद.

हंसदूत २ आणे; मोहनतारा २ आणे; कुसुमगुच्छ ४ आणे; उपदेशपाठ ४ आणे;
मनोहर कवितांचीं पुस्तकें, मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

आतां तुझी कांहीं बोलूं नका–तुझी आतां आपल्या कामाला जा—कामाला लागायची वेळ होऊन गेली तुमची ! "

भूमिकेंत सांगितलेल्या संकटांतून मुक्तता झाल्यावर वेष बदलून जुलेखेनें ठिकठिकाणीं प्रवास केला. शेवटीं, अमीनेचा शोध लागल्यावर ती धीवराच्या झोंपडींत कशी आली, हें विस्तृत सांगूं गेल्यास दुसरी एक स्वतंत्र कहाणीच सांगावी लागेल. जुलेखेचा रक्षणकर्ता रहमतशेख छद्मवेषानें आराकानच्या नूतन राजाच्या पदरीं राहिला होता.

[२]

एका वृक्षाच्या तलाशीं जुलेखा व अमीना या बहिणी बहिणी बसल्या होत्या. बोलतां बोलतां जुलेखा अमीनेला म्हणाली " मृत्यूच्या मुखांतून परमेश्वरानें आम्हां दोघां बहिणींना जें वांचविलें, तें केवळ बाबांच्या हलेवहल चांगला सूड घेण्याकरतांच होय, यांत संशय नाहीं. नाहींतर बाई असं व्हायला मला तर कांहीं कारण दिसत नाहीं !"

नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर सर्वांत लांब अंतरावरच्या व सर्वांत अधिक छायामय असणाऱ्या वनश्रेणीशीं आपल्या दृष्टीचा एकजीव करून अमीना हळुहळू म्हणाली " ताई ! आतां या साऱ्या गोष्टी कशाला वरं बोलतेस ? मला कीं नाहीं, हें जग आतां एक प्रकारानं फार वरं वाटूं लागलं आहे. मरायची जर कुणाला इच्छाच झाली असेल, तर निष्ठुर पुरुष-मंडळीला एकमेकांशीं झगडा करीत, एकमेकांचा प्राण घेत खुशाल मरूं दे ! मला इथं दुःखाचं वारं दिखील कसं तें माहीत नाहीं. "

जुलेखा खिन्नपणानें म्हणते " छेछे अमीने ! बाई, तूं काय म्हणतेस हें ? तूं शहाजादाच्या अन्तःपुरांतील राजकन्या ना ? कुठं दिल्लीचं सिंहासन, अन् कुठं आराकानच्या वृद्ध धीवराची भिकार झोंपडी ! "

अमीना हंसून म्हणाली " ताई ! दिल्लीच्या सिंहासनापेक्षां ला म्हाताऱ्याची ही झोंपडी अन् या शांत वनवृक्षांची छायाच जर एकाद्या बालिकेला अतिशय आवडत असली, तर त्यामुळं दिल्लीच्या सिंहासनाला एकसुद्धां अश्रुबिंदु ढाळण्याचं कांहीं कारण नाहीं. "

यावर जुलेखा कांहींशी आपणाशीं व कांहींशी अमीनेला उद्देशून म्हणाली " यावद्दल तुला कांहीं दोष देण्यांत अर्थ नाहीं. कारण, त्या वेळीं तूं अगदींच लहान होतीस. पण अमीने ! एक वेळ तूं आपणाशींच नीट विचार करून पहा. बाबांचं तुझ्यावर सर्वांपेक्षां अधिक प्रेम होतं, म्हणून त्यांनीं आपल्या हातांनीं तुला नदींत फेंकून दिलं. बाबांनीं दिलेल्या मृत्यूपेक्षां तुझ्या या हल्लींच्या आयुष्याला तूं अधिक प्रिय मानूं नकोस. तरीहि जर बाबांचा सूड घ्यायला तूं तयार होशील तर मात्र तुझं हें जीवंत रहाणं सार्थ होईल. "

अमीना कांहींच बोलली नाहीं. ती मुकाट्यानें दूर दृष्टि लावून स्वस्थ राहिली. परंतु कांहींहि असलें तरी हा बाहेरचा मोकळा शीतल वायु, ही वनवृक्षांची गोड छाया, स्वतःचें नवयौवन व कसली तरी मधुर सुखस्मृति यांमध्यें अमीना अगदीं निमग्न होऊन गेली होती, असें स्पष्टपणें दिसत होतें.

कांहीं वेळानें एक दीर्घ निःश्वास टाकून अमीना म्हणाली " ताई ! तूं जरा इथं राहातेस का ? मला आतां गेलं पाहिजे बाई ! घरातलं काम मला अजून बरंच करायचं आहे. मी जर सैंपाक केला नाहीं तर म्हाताऱ्याला उपाशीं रहावं लागेल !"

[३]

जुलेखा नदीच्या कांठीं तशीच बसून राहिली. अमीना घरांत निघून गेल्यावर तिच्या पालटलेल्या स्थितीविषयीं तिचें पुनरपि चिंतन सुरू झालें. जुलेखा या विचारांनीं अगदीं खिन्न होऊन गेली.

जुलेखा याप्रमाणें विचारांत निमग्न होऊन गेली आहे, इतक्यांत एकाएकीं कोणींतरी धपकन् उडी मारल्याचा शब्द झाला व मागाहून कोणींतरी हळूच तिचे डोळे आपल्या हातांनीं घट्ट झांकले.

जुलेखा एकाएकीं चमकून उभी राहिली. "कोण?" एवढाच शब्द तिच्या तोंडांतून कसा तरी बाहेर पडला.

तिचा तो अपरिचित स्वर ऐकून त्या तरुणानें चटकन् जुलेखेचे डोळे सोडले व तिच्यासमोर येऊन उभा राहून तो तिच्या चेहऱ्याकडे निरखून पाहूं लागला. अपरिचित तरुण स्त्रीचे डोळे झांकल्याबद्दल त्याला कांहीं लाज वाटल्याचें चिन्हहि त्याच्या तोंडावर दिसलें नाहीं.

रा. ब. पर्वत्या ६ आणे; चतुरविनोदी स्त्रिया ६ आणे; चेष्ट्यांचे इस्पितळ ३ आणे;
विनोदप्रचुर प्रहसनें. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

कांहीं वेळ याप्रमाणें तिच्या चेहऱ्याचें निरीक्षण करून तरुण हंसत हंसत ह्मणाला " अग, तूं कांहीं तिन्नी नव्हेस ! " जणूं काय आपण तिन्नीच आहों, असें जुलेखा त्याला भासविण्याचा प्रयत्न करीत होती, व या तरुणाच्या असामान्य तीक्ष्ण बुद्धीसमोर तिच्या युक्तीचें कांहीं न चालून तिची सर्व लबाडी उघडकीस आली होती !

आपलीं वस्त्रें नीट सांवरून जुलेखा गर्वभरानें त्याच्यापासून कांहीं अंतरावर जाऊन उभी राहिली. आपल्या नेत्रयुग्मांतून जणूं काय त्या तरुणावर ती अग्निशरांचा वर्षावच करीत होती !

क्रोधकंपित स्वरानें तिनें विचारलें " तूं असा आहेस तरी कोण ? "

तरुणानें सरलभावानें उत्तर दिलें " तूं मला ओळखीत नाहींस. तिन्नीला मी चांगला ठाऊक आहें. पण तिन्नी या वेळीं आहे कुठें ? "

बाहेर कांहीं गडबड चालली आहे, असें पाहून तिन्नी झटकन् झोंपडीतून बाहेर आली. जुलेखेचा भुसभुसणारा क्रोध व त्या निर्बुद्ध तरुणाचें कोमल हास्ययुक्त मुखमंडल पाहून अमीना मोठमोठ्यानें हसूं लागली. कांहीं केल्या तिला हंसें आवरेना !

जुलेखेजवळ जाऊन त्या तरुणाकडे पहात ती ह्मणाली " ताई, या पागलाच्या बोलण्याकडे तूं बिलकूल लक्ष्य देऊं नकोस ! अग हा का माणूस आहे ? या वनांतलं हें एक हरिणच आहे ह्मणेनास ! तुझी जर यानं कांहीं बेअदबी केली असली तर मला सांग, ह्मणजे मी काय ती याला शिक्षा करतें. दालिया ! तूं काय केलंस रे ? "

तरुणानें तत्क्षणीं उत्तर दिलें " दुसरें कांहीं नाहीं, मीं हिचे डोळे झांकले, इतकेंच ! मला आपलें वाटलें, कीं, ही तिन्नीच आहे;—पण पहातों तों ही कांहीं तिन्नी नव्हे ! " असें ह्मणून दालिया खदखदां हंसूं लागला.

जुलेखा त्याच्यावर अतिशयच रागावली. त्याच्यावर वसकन् ओरडून ती ह्मणाली " चल, चावट कुठचा ! दालिया, असा लहान तोंडीं मोठा घांस घ्यायला तुला लाज नाहीं वाटत ? तूं कधींकधीं तिन्नीचे असे डोळे झांकीत असतोस वाटतं ? तुझं धाडस तर मोठंच आहे ह्मणायचं ! "

दालिया हंसून ह्मणाला " तिन्नीचे डोळे झांकायला मोठ्या धाडसाची जरूरच आहे असें नाहीं. पूर्वीचा अभ्यास असल्यावर तर मग असे तिचे डोळे झांकायला मुळींच हरकत नाहीं. तिन्नी ! खरेंच सांगतों तुला—आज तर मला आतां भारीच भय वाटूं लागलें आहे. " असें ह्मणून जुलेखेकडे वोट दाखवून अमीनेच्या तोंडाकडे पाहून तो मोठमोठ्यानें हंसूं लागला !

अमीना त्याला दटावणीच्या स्वरानें गंभीरपणानें ह्मणाली " दालिया ! हद्द आहे तुझ्यापुढं ! तूं कीं नाहीं अगदींच रानवट माणूस आहेस हो ! शहाजादीच्या समोर उभं रहायचीहि तुझी योग्यता नाहीं. तुझ्या आजच्या या दांडग्या वर्तनाबद्दल तुला कांहीं तरी चांगली शिक्षाच केली पाहिजे. हं, पहा—असा सलाम कर बघूं ताईला ! "

असें ह्मणून आपली यौवनमंडित कोमल तनुलता अत्यंत हृदयंगम रीतीनें वांकवून अमीनेनें जुलेखेला हंसत हंसत सलाम केला. त्या तरुणानें गांवढळपणानें त्याचें कसेंतरी अनुकरण करून जुलेखेला वंदगी केली व पुनः तो अमीनेकडे बावळटपणानें पहात उभा राहिला.

अमीना गंभीरणानें ह्मणाली " हं, ठीक केलंस. आतां असा तीन पावलं मागे सर पाहूं. "

अमीनेनें दाखविल्याप्रमाणें दालिया तीन पावलें मागें सरला.

" पुनः ताईला सलाम कर. "

तरुणानें अमीनेची आज्ञा शिरसा वंद्य केली !

याप्रमाणें युक्तियुक्तीनें लाजकडून सलाम करवीत व पुनः मागें हटवीत अमीनेनें दालियाला झोंपडीच्या दारापर्यंत आणून ठेविलें. जुलेखा गंभीरपणानें चाललेला सारा प्रकार पहात होती.

दालिया दरवाजाशीं जातांच अमीना त्याला ह्मणाली " हं, आतां चल तसाच घरांत. "

दालिया मुकाट्यानें घरांत गेला. त्याबरोबर अमीनेनें झोंपडीचें दार बाहेरून घट्ट बंद करून घेतलें व त्याला उद्देशून ती ओरडून ह्मणाली " दालिया ! आतां थोडंसं घरांतलं माझ्या वांटचं काम कर. चुलींत विस्तव पेटवून ठेव. "

दालियाला याप्रमाणें आज्ञा करून अमीना पुनः जुलेखेपाशीं येऊन बसली व तिला उद्देशून लडिवाळ-

महाराणा संग्रामसिंह ८ आणे; द्रोणसंकोप ६ आणे; गौप्यगोपन ८ आणे;
भ्रमनिरसन ६ आणे. चटकदार नाटकें. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई,

पणानें ह्मणाली " झालेल्या प्रकारावद्दल कांहीं मनांत राग धरूं नकोस हो ताई ! इथलीं कीं नाहीं सारीं माणसं अशींच रानवट हो ! यांच्याशीं घसा फोडतांना कसे माझ्या नाकीं नव येतात ! "

अमीना असें ह्मणाली खरी, परंतु तिच्या मुखावर किंवा इतर व्यवहारांत या ' नाकीं नवा'चें कांहींच लक्षण दिसून आलें नाहीं व कधीं येतहि नसे ! इतकेंच नव्हे, तर, उलट तेथील रानटी मनुष्यांशीं अनेक बाबतींत तिचें वर्तन अत्यंत पक्षपातायेंच असे, असें ह्मणावयास हरकत नाहीं.

अमीनेला जितका राग दाखविणें शक्य होतें तितका दाखवून जुलेखा तिला ह्मणाली " अमीने ! तुला खरोखर सांगतें–तुझं सारं वर्तन पाहून मी तर बाई आश्चर्यानं अगदीं थक्कच होऊन गेल्यें आहें. ज्याचा कांहीं थांग ना दोरा, असा एक कुणी तरी तरुण पागल येऊन तुझ्या अंगाला बेलाशक स्पर्श करतो, हें त्याचं मोठंच साहस ह्मणायचं बाई ! "

भगिनीचें हें रागाचें भाषण ऐकून अमीना हंसली व तिच्या खांद्यावर हात टाकून प्रेमार्द्र स्वरानें ह्मणाली " अशी उगीच माझ्यावर रागावतेस कां बरं ताई ? एकाद्या सार्वभौम बादशहाचा किंवा नवाबाचा जर हा युवराज असता तर त्याचा अपमान करून मी त्याला हांकून लावला असता ! "

अनेक प्रयत्न करूनहि जुलेखेला आलेलें जबरदस्त हंसूं आवरेना. ती मोठ्मोठ्यानें हंसूं लागली. ती हंसत हंसत ह्मणाली " मला खरं खरं सांग पाहूं अमीने ! तूं जें मघाशीं ह्मणत होतीस, कीं, अलीकडे आपणाला हें जग फारच चांगलं बाटूं लागलं आहे, तें या रानवट तरुणामुळंच वाटतं ? "

अमीना स्निग्ध दृष्टीनें जुलेखेकडे पहात ह्मणाली " तुला खरी गोष्टच सांगतें ताई ! हा दालिया मजवर नेहमीं अतिशयच उपकार करतो. फुलं अन् फळं नेहमीं काढून हा मला आणून देतो. दूर दूर शिकारी मारून हा मला खा आणून देतो. घरांतलं काम करायला याला कधीं मीं बोलावलं, तर मोठ्या आनंदानं हा वाटेल तेव्हां उड्या मारीत येतो. याच्या खोड्यांबद्दल याला चांगलं शासन करावं, असं अनेकवार माझ्या मनांत येतं; परंतु माझा तो विचार कधींहि सिद्धीस जात नाहीं. रागानं डोळे लाल करून जर मीं त्याच्यावर ओरडून झटलं, कीं, ' दालिया ! तुझं हें करणं मला साफ आवडत नाहीं, मी तुझ्यावर भारी रागावल्यें आहें,' तर हा वेडा आपला कांहीं न बोलतां माझ्या तोंडाकडे टक लावतो अन् कौतुकानं हंसत रहातो. मला वाटतं, ताई, याच्या देशांत उपहासाची रीत हीच असावी. याच्या पाठीवर एकादेवेळीं जर मी दोन चापट्या सहज दिल्या, तर त्यामुळं हा न रागावतां उलट खूष होतो, असंहि एकदोन प्रसंगीं मीं परीक्षा करून पाहिलं आहे. हेंच आतां पहा ना, याला झोंपडींत मीं कोंडून ठेविलं आहे, पण स्वारी त्यामुळं कशी आनंदांत असेल. पाहिजे तर जरा दार उघडून पहा. डोळे अन् तोंड लाल करून स्वारी मारे आनंदानं चूल फुंकीत बिस्तव पेटवीत बसली आहे, असं तुला आढळून येईल. अशा या सदानंदी रानवटाचा अपमान तरी काय करायचा अन् याला बोलायचं काय किंवा शिक्षा तरी काय करायची, तें तूंच सांग ताई ! मला तर त्याच्यासमोर हात टेंकावे लागले आहेत बाई ! "

जुलेखा जरा कुर्त्यानें ह्मणते " तुला हात टेंकावे लागले, तर मग मी पहात्यें या बाबतींत मला कांहीं करतां येतं का ! "

मधुर हास्य करीत अमीना काकुळतीच्या स्वरानें ह्मणाली " मी तुझ्या पायां पडलें ताई ! त्याला कीं नाहीं, तूं एक शब्ददिखील बोलूं नकोस ! "

हे शब्द अमीना अशा रीतीनें बोलली, कीं, जणूंकाय दालिया तिचें अत्यंत आवडीनें पाळणपोषण केलेलें हरिण असून अद्यापि त्याचा वन्य स्वभाव नाहींसा झाला नसावा व दुसऱ्या कोणा अनोळखी माणसाची चाहूल लागतांच भय पावून तें हरिण कोठें नाहींसें होऊन जाईल, अशी तिला शंका आली असावी !

इतक्यांत वृद्ध धीवर तेथें आला. त्यानें किंचित् उत्सुकतेनें अमीनेला प्रश्न केला " आज आपला दालिया नाहीं वाटतं आला तिन्ही ? "

" आला आहे बाबा ! "

" मग तो गेला आहे कुठें ? "

" त्यानें कीं नाहीं बाबा, आह्मांला फारच सतावून सोडलं, ह्मणून त्याला मीं झोंपडींत कोंडून ठेविलं आहे. "

लीला १२ आणे; सरस्वती १० आणे; प्रियंवदा १० आणे; धाकट्या सूनबाई ८ आणे;
उपदेशपर सामाजिक कादंबऱ्या. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

धीवराला हें वरें वाटलें नसावें, असें दिसलें. किंचित् काल तो चिंतेंत पडला. थोड्या वेळानें तो अमीनेला ह्मणतो " तिन्नी ! पोरी ! त्या रानवटानं अजाणतेपणीं जर तुह्मांला थोडा त्रास दिला, तर त्याकडे विशेष लक्ष्य न देतां तो सहन करावा. तरुण वयांत सर्वजणच अशी उच्छृंखल असतात. त्याला तूं कधीं कडक शिक्षा करीत जाऊं नकोस हो तिन्नी ! काल दालियानें तीन थल् (सुवर्णमुद्रा) देऊन माझ्यापासून तीन मोठाले मासे विकत घेतलेन् !"

अमीना हंसून वृद्धाला ह्मणते " त्याबद्दल तुह्मी कांहीं काळजी करूं नका बाबा ! तुह्माला पाहिजेतर मी आज त्याच्यापासून दोन थल् घेऊन मी तुह्माला देत्यें अन् त्याबद्दल त्याला एक मासाहि द्यायला नको. मग तर झालं ?"

आपण प्रेमानें पालनपोषण करून वाढविलेली तिन्नी इतक्या लहान वयांत इतकी हुषार, चतुर, आणि लबाड निघालेली पाहून त्या वृद्ध धीवराला मोठा संतोष वाटला. प्रेमभरानें अमीनेच्या मस्तकावर हात फिरवून तो तेथून निघून गेला.

[४]

याप्रमाणें कांहीं दिवस गेले. जुलेखा ह्माताऱ्या धीवराच्या झोंपडींतच अद्यापि राहिली होती. सरलहृदय दालिया त्यांच्या झोंपडींत येऊन आपल्या निष्कपट चेष्टांनीं त्या उभय भगिनींना रिझवीत असे. आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही, कीं, दालिया तेथें येण्यासंबंधानें जुलेखेची प्रथम प्रथम जी हरकत होती, तीहि हळुहळू नाहींशी झाली ! परंतु सूक्ष्म दृष्टीनें विचार करून पाहिलें, तर यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं, असें वाचकांनां आढळून येईल.

कारण, ज्याप्रमाणें नदीच्या एका बाजूला प्रवाह व दुसऱ्या बाजूला किनारा, त्याप्रमाणेंच रमणीचीहि गोष्ट आहे. तिला एका बाजूनें हृदयावेग व दुसऱ्या बाजूनें लोकलज्जा ओढींत असतात; परंतु आराकानसारख्या सुधारलेल्या जगताच्या बाहेर असणाऱ्या प्रदेशांत लोक कोठें असणार ? मग लोकलज्जेची भीति कशाला ?

येथें केवळ निरनिराळ्या ऋतुमानाप्रमाणें तरुवर मंजरित होतात व समोरच्या ' नीला ' नदीला वर्षाकालीं पूर येतो; शरदृतूंत ती स्वच्छ होते व ग्रीष्मसमयीं ती क्षीण होते. येथील निरनिराळ्या जातींच्या पक्ष्यांच्या मंजुल व उच्छ्वसित कंठस्वरांत टीकेचा किंवा समालोचनेचा लेशहि दिसून येत नाही ! मधुनमधून दक्षिणवायु पलीकडील तीरावरच्या गांवांतील मानवचक्राचा गुंजनध्वनि येथें वाहून आणतो; परंतु दुष्ट कानगोष्टी किंवा निंदाप्रवाह तो आपणांवरोवर या पवित्र स्थलीं घेऊन येत नाहीं.

मोडक्या पडक्या इमारतींवर क्रमाक्रमानें कालान्तरानें ज्याप्रमाणें जंगल वाढतें, त्याप्रमाणें या निसर्गप्रदेशांत मनुष्य कांहीं दिवस राहिला ह्मणजे प्रकृतीच्या गुप्त अशा आक्रमणामुळें लौकिकतेची मानवनिर्मित सुदृढ भिंत क्रमाक्रमानें, अदृष्ट रीतीनें भंगून जाते व सभोवतालच्या प्राकृतिक जगताशीं त्याचा अगदीं एकजीव होऊन जातो. दोन समानशील योग्य अशा तरुणतरुणींच्या मीलनाचा देखावा पाहणें स्त्रियांनां जितकें आवडतें, तितकें दुसरें कांहींहि आवडत नाहीं. इतक्या रहस्याचा, इतक्या पूर्ण सुखाचा, इतक्या अवर्णनीय कुतूहलाचा विषय रमणींच्या दृष्टीनें अन्य कोणताहि असूं शकत नाहीं. ह्मणून जेव्हां या सरलस्वभाव रानवट मंडळीच्या या भिकार झोंपडीमध्यें दारिद्र्याच्या घन छायेंत जुलेखेचा उच्च कुलाचा गर्व व लोकमर्यादेचा भाव हीं हळुहळू आपोआपच शिथिल होऊं लागलीं, तेव्हां सहजच नदीकांठच्या त्या पुष्पमंजरींनीं डवरलेल्या तरुवरांच्या छायेखालीं अमीना व दालिया यांच्या मीलनाची क्रीडा पहाण्यांत तिला अत्यंत आनंद वाटूं लागला, यांत मोठेंसें नवल नाहीं.

आह्माला वाटतें, अशा वेळीं जुलेखेच्या तारुण्यपूर्ण हृदयांत एक अपरितृप्त आकांक्षा जागृत होऊन तिला अनेक प्रकारच्या सुखदुःखांनीं चंचल करून टाकीत असे. शेवटीं त्याचा परिणाम असा झाला, कीं, एकादे दिवशीं दालियाला झोंपडीकडे यावयाला उशीर झाला असतां अमीना ज्याप्रमाणें अत्यंत उत्कंठित होत असे, त्याप्रमाणें जुलेखाहि अतिशय उत्कंठेनें त्याची वाट पहात राही, व अमीना व दालिया एकत्र क्रीडा करूं लागलीं, ह्मणजे ज्याप्रमाणें एकादा चित्रकार आपलें नुकतेंच पूर्ण झालेलें चित्र किंचित् अंतरावरून प्रसन्न दृष्टीनें पहात असतो, त्याप्रमाणें ती त्या प्रणयियुग्माचें

अमृतपुलिन ६ आणे; रमामाधव ४ आणे; प्रेमकहाणी ४ आणे.
प्रेमविषयक सुंदर कादंबऱ्या. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

भीलन् आनंदानें व स्निग्धहृदयानें पहात उभी राही. एकादे दिवशीं जुलेखा त्यांच्यावरोवर यद्वेनें भांडत असे; कधीं ती दोघांची निर्भर्त्सना करी; एकादे प्रसंगीं अमीनेला झोंपडींत कोंडून ठेवून ती दालियाच्या तीक्ष्ण प्रणयावेगाचा अवरोध करीत असे.

सार्वभौम राजा आणि अरण्य यांमध्यें एका प्रकारचें चमत्कारिक साम्य आहे. हीं दोघेंहि नेहमीं स्वतंत्र असतात. आपापल्या राज्यांचीं दोघेंहि एकमात्र अधिकारी असतात—इतरांचा त्यांवर ताबा चालत नाहीं. कोणाचेहि अधिकार किंवा नियम मानावयाचें त्यांना कांहीं कारण नसतें. उभयतांमध्येंहि प्रकृतिदेवीचा एक प्रकारचा स्वाभाविक मोठेपणा व सरलता वास करीत असतात. या दोन टोकांमध्यें जे असतात, लोकरिवाज व शास्त्ररूढि यांची अक्षरें पाहून त्यांच्या हुकुमाप्रमाणें ज्यांनां दिवसरात्र आपलें आयुष्य कंठावें लागतें, त्यांचीच स्वाधीनतेशीं फारकत होत असते; ते वड्या लोकांपुढें गुलामाप्रमाणें व छोट्या लोकांपाशीं सत्ताधारी प्रभूप्रमाणें वागत असतात. ऐन वेळीं किंकर्तव्यमूढ होऊन असहाय स्थितींत त्यांनां संकटांनां भिऊन पळावें लागतें. आमचा रानवट दालिया प्रकृति-सम्राज्ञीचा उच्छृंखल युवराज! उभय शहाजादींवरोवर कसें वागावें, याबद्दल त्याला कधींहि संकोच वाटत नसे, व शहाजाद्याहि त्याला आपल्याबरोबरच्या योग्यतेचा व तोलाचा समजून त्याच्याशीं व्यवहार ठेवीत. दालिया नेहमीं सरलहृदय, कौतुकप्रिय व हंसतमुख असे. तो कोणत्याहि स्थितींत असो, त्याला कधींच कसलें भय वाटत नसे. संकोच तर त्याच्या कधीं गांवींहि नसे. त्याच्या वर्तनांत कधीं दीनता किंवा दारिद्र्य यांचा पत्ताहि नसे.

असा दालिया अमीनेला आवडे, यांत कांहीं नवल नाहीं. जुलेखेलाहि तो अलीकडे प्राणांपलीकडे आवडूं लागला होता. पण एवढें मात्र खरें, कीं, दालियाच्या व अमीनेच्या निष्कपट व सरल संगतींत धीवराच्या झोंपडींत ती याप्रमाणें शांतपणें दिवस कंठीत असतां जुलेखेच्या हृदयाला कधीं कधीं अगदीं हाय हाय लागून राही! दिल्ली आग्यासारख्या सम्राट्पुरींत ज्यांचें आयुष्य जावयाचें त्यांनां या निर्जन जंगलांत रानटी दालिया व धीवर यांच्या संगतींत दिवस कंठावे लागत आहेत! काय हा नशिबाचा खेळ, असें तिला वाटत असे.

एके दिवशीं सकाळीं नित्यनियमाप्रमाणें दालिया झोंपडीकडे आल्यावर जुलेखेनें बोलतां बोलतां त्याचा हात धरून विचारलें "दालिया!—"

"काय ताई?"

"दालिया! माझं एक काम करशील तूं?"

दालियानें उत्सुकतेनें विचारलें "काय ग तें!"

"मला इथला राजा दासवून देशील?"

दालिया हंसून म्हणाला "हो, देईन तर काय झालें? पण तुला राजा कशाला ग पाहिजे आहे ताई?"

"माझ्याशीं एक तीक्ष्ण धारेचा सुरा आहे, तो मी त्या मेल्याच्या छातींत खुपसणार आहें, समजलं?"

जुलेखेचे हे शब्द ऐकून दालिया किंचित् चमकल्यासारखा दिसला. परंतु तें क्षणमात्रच! सूड घ्यावयाच्या उत्कट इच्छेनें उग्र दिसणाऱ्या जुलेखेच्या मुखमंडलाकडे तो पहातच राहिला—त्याचा चेहरा मधुर स्मितानें पूर्णपणें भरून गेला. जणूं काय अशी मजेदार गोष्ट त्यानें पूर्वी कधींच ऐकली नसावी, आणि खरा परिहास ज्याला म्हणतात तो हाच असून तो राजकन्येला सर्वथा योग्य आहे, असें त्याला वाटत असावें, असें त्याच्या हास्ययुक्त चेहेऱ्यावरून दिसत होतें. अगोदर कांहीं थांग नाहीं पत्ता नाहीं, कथा नाहीं वार्ता नाहीं, अशा स्थितींत पहिल्या सपाट्यास एका जीवंत नृपतीच्या हृदयांत एका तीक्ष्ण सुऱ्याचा अर्धभाग एकदम खुपसला असतां या अत्यंत गमतीच्या शिष्टाचारानें तो राजा एकाएकी कसा यक्क व स्तब्ध होऊन जाईल, याचें चित्र दालियाच्या मनःपटावर क्रमाक्रमानें उदय पावूं लागलें व त्याचें आतांपर्यंतचें निःशब्द कौतुक व हास्य यांचें हळुहळू उच्च व उच्चतर हास्यांत व निर्व्याज चेष्टांत परिवर्तन होऊं लागलें.

[५]

वरील हकीगत घडली, त्याच्या दुसऱ्याच दिवशीं 'आराकानच्या नूतन राजाला धीवराच्या झोंपडींत तुझी दोघी बहिणी असल्याची वातमी लागली असून

सुदाम्याचे पोहे १२ आणे; भद्रंभद्र १० आणे; विलक्षण भोळेपणा, ८ आणे;
हास्यरसात्मक पुस्तकें. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

त्यानें गुप्तपणानें अमीनेला पाहिल्यामुळें तो तिच्यावर अगदीं मोहित होऊन गेला आहे. अमीनेशीं विवाह करण्यासाठीं तिला लवकरच राजवाड्यांत आणावयाची तो तजवीज करीत आहे. आपल्या वडिलांच्या मृत्यूचा सूड उगविण्याला अशी नामी संधि पुनः कधींहि येणार नाहीं.' अशा आशयाचें रहमतशेखानें अत्यंत गुप्तपणें पाठविलेलें पत्र जुलेखेच्या हातीं पडलें.

त्या वेळीं अमीना तिच्या जवळच होती. पत्र वाचून झाल्यावर तिचा हात घट्ट धरून जुलेखा म्हणाली "ईश्वराची इच्छा काय आहे, तें आतां स्पष्टपणेंच दिसतं आहे. अमीने ! तुझ्या आयुष्यांतील परमश्रेष्ठ कर्तव्य पालन करण्याची आतां वेळ आली आहे. आतां हें खेळणं अन् थट्टा बरी दिसत नाहीं."

दालियाहि त्या वेळीं त्यांच्या जवळच उभा होता. अमीनेनें त्याच्या तोंडाकडे पाहिलें. जुलेखेच्या या शब्दांचा त्याच्यावर दुसरातिसरा परिणाम कांहीं झाला नसून तो कौतुकानें खुशाल हंसत आहे, असें तिच्या दृष्टीस पडलें.

भलत्याच वेळीं दालियानें चालविलेला हा मूर्खपणा पाहून अमीनेला मनापासून वाईट वाटलें. ती खिन्नपणानें त्याला म्हणाली "समजलास दालिया ? मी आतां राणी व्हायला जातयें आहें."

दालिया हंसून म्हणाला "पण तूं कांहीं तिकडे फार वेळ रहणार नाहींस, हें मला ठाऊक आहे."

दालियाच्या या निष्कपट उत्तरानें त्या मनःस्थितींतहि अमीनेला किंचित् हंसूं आलें व तिला त्याच्या स्वभावाबद्दल विस्मयहि वाटला. ती आपल्याशींच म्हणाली "हा खरोखरीच या वनांतील एक हरिण आहे. याला मनुष्य समजून व्यवहार करणें हा वेडेपणा होय!"

दालियाला निडवण्याच्या हेतूनें अमीना किंचित् चेष्टेच्या स्वरानें त्याला म्हणाली "राजाला मारून मग मी इकडे परत येईन तरी का रे दालिया ?"

अमीनेचा हा युक्तिवाद पटून दालिया तिला म्हणाला "हो, तसें दिसतें खरें; मग इकडे परत येणें तुला कठिण जाणार आहे तिनी !"

दालियाच्या या शब्दांनीं अमीनेचा अंतरात्मा एकाएकी म्लान होऊन गेला ! कांहीं वेळ ती अगदीं स्तब्ध होती. कांहीं वेळानें जुलेखेकडे वळून, एक दीर्घ निःश्वास टाकून ती म्हणाली "ताई ! मी आतां तयार आहें तुझ्या म्हणण्याप्रमाणं करायला."

आपल्या हृदयांत चाललेली कालवाकालव महत्प्रयासानें गुप्त ठेवून दालियाकडे वळून ती थट्टेच्या स्वरानें त्याला म्हणाली "राणी झाल्यावर मी पहिल्यानं काय करीन, आहे ठाऊक दालिया ?"

"काय करशील ?"

"राजाविरुद्ध मसलत करण्याच्या कटांत शिरल्याबद्दल मी तुला जबरदस्त शिक्षा करीन अन् पुढें जसं मला करावं लागेल तसं खुशाल करीन."

अमीनेच्या या शब्दांनींहि दालियाला कौतुकच वाटलें ! जणूं काय अमीनेनें आतां सांगितल्याप्रमाणें खरोखरच ती पुढें वागली तर तो त्याला मोठा आनंदाचा व मौजेचाच विषय होणार होता !

[६]

घोडेस्वार, पायदळ, हत्ती, निशाणें, वाद्यें, मशाली इत्यादिकांच्या धामधुमीनें बिचाऱ्या धीवराची झोंपडी कोसळण्याच्याच बेताला आली. या सर्व सरंजामासह अमीनेला राजवाड्यांत नेण्याकरितां आराकानच्या नूतन राजाकडून दोन सुवर्णमंडित मेणे धीवराच्या झोंपडीकडे पाठविण्यांत आले होते.

जुलेखेच्या हातांतून अमीनेनें तो सुरा आपल्या हातीं घेतला. त्याच्या हस्तिदंती मुठीवर केलेलें सुंदर नक्षीचें काम ती किती वेळ तरी पहात होती. नंतर आपल्या वक्षःस्थलावरील वस्त्र दूर करून त्या शस्त्राची धार तिनें आपल्या छातीवर अजमावून पाहिली. जीवनमुकुलाच्या डहाळीला त्या घातक शस्त्राचा एकवार स्पर्श झाला. नंतर ती सुरी म्यानांत घालून अमीनेनें ती आपल्या वस्त्रांत लपवून ठेविली.

या मरणयात्रेला निघण्यापूर्वी आपल्या प्राणप्रिय दालियाचें एकवार शेवटचें दर्शन घ्यावें, अशी अमीनेची अतिशय-अगदीं अंतःकरणापासून इच्छा होती, पण ती सफल होणें शक्य नव्हतें. कारण, कालपासून तो जो कोठें नाहींसा झाला होता, त्याचा अद्यापि पत्ताच नव्हता ! सरलहृदय दालिया काल जो हंसत होता, त्यामध्यें अभिमानाची ज्वाला गुप्तपणें वास करीत होती काय ?

स्वामी रामतीर्थ, १। रुपया; विवेकानंदांची पत्रें ४ आणे; रानडे यांचीं व्याख्यानें १॥ रुपया; आत्मोन्नतिकारक ग्रंथ. **मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.**

मेण्यांत बसण्यापूर्वी बाल्यकालीं आपणाला आश्रयभूत झालेल्या त्या स्थलाकडे अमीनेनें अश्रुपूर्ण नेत्रांनीं एकवार पाहिलें. अश्रूंच्या विपुलतेमुळें तिला तें स्पष्टपणें दिसणें शक्य नव्हतें. हाय ! ती झोंपडी, झोंपडीजवळून झुळझुळ वहात जाणारी ती प्रेमाची नदी, नदीच्या तीरावरील ते पुष्पस्तबकांनीं ओथंबलेले वृक्ष आतां आपल्या पुनः कसचे नजरेस पडणार आहेत, या विचारानें तिच्या हृदयांत विलक्षण कालवाकालव झाली ! ज्यानें लहानपणापासून प्रेमानें वाढवून तिला लहानाची मोठी केली होती, त्या वृद्ध धीवराकडे पाहून कंपित व साद्रदित स्वरानें रडत रडत ती म्हणाली " चाललें घरं मी बाबा ! तुमची ही प्रेमाची तिन्नी गेल्यावर बाबा, तुमच्या संसाराकडे आतां कोण हो पाहील ? "

अमीनेच्या या शब्दांनीं म्हाताऱ्याच्या अंतःकरणाचे शतशः तुकडे झाले. एकांद्या अज्ञ बालकाप्रमाणें अमीनेच्या खांद्यावर मान टाकून त्यानें हंबरडा फोडला.

शेवटीं, डोळे पुसून अमीना त्याला रुद्ध स्वरानें म्हणाली "बाबा ! जर दालिया पुनः कधीं इकडे आला, तर ही आंगठी तुझी त्याला द्या. म्हणावं तुझ्या तिन्नीनं जातांना तुला ही दिली ! "

असें म्हणून अश्रूपूर्ण नेत्रांनीं अमीना झटकन् मेण्यांत जाऊन बसली. दोनहि शिबिका मोठ्या थाटानें निघाल्या. अमीना गेल्यावर तिची ती झोंपडी, नदीतीर, पुष्पित-वृक्षसमूहासहीत मुद्दाम तिनें तयार केलेल्या जागा, सर्व कांहीं अंधकारानें परिपूर्ण, जनशून्य व निस्तब्ध होऊन गेलें !

योग्य कालीं दोन्ही शिबिका राजवाड्याच्या तोरणद्वारांतून जाऊन अन्तःपुरांत पोंचल्या. मेणे खालीं उतरतांच दोघी भगिनी त्यांतून उतरून बाहेर येऊन उभ्या राहिल्या.

अमीनेच्या मुखावर हास्य नव्हतें व तिच्या डोळ्यांत अश्रूंचें चिन्हहि नव्हतें. जुलेखेचें तोंड मात्र पांढरें फटफटित होऊन गेलें होतें !

जोंपर्यंत कर्तव्य दूर होतें, तोंपर्यंत जुलेखेच्या उत्साहांत तीव्रता होती. परंतु आतां तिला कसेंसेंच होऊं लागलें. आपल्या थरथर कांपणाऱ्या हृदयानें तिनें प्रेमभरानें अमीनेला घट्ट आलिंगन दिलें. अभिनव प्रेमाच्या डहाळीवरून बलात्कारानें या कोमल पुष्पाला तोडून आपण त्याला एका भयंकर रक्तनदींत फेंकून देत आहों, असा विचार मनांत येऊन जुलेखेचें अंतःकरण थरारलें !

परंतु धनुष्यांतून बाण सुटला होता. आतां विचार करण्याचा प्रसंग नव्हता. अनेक सुंदर परिचारिकांनीं दर्शविलेल्या मार्गानें शेंकडों उज्ज्वल दीपांच्या तीव्र दृष्टीमधून जणूं काय स्वप्न पडत असल्याप्रमाणें त्या उभय भगिनी चालूं लागल्या.

शेवटीं, त्यांच्याकरितां नेमलेल्या महालांत प्रवेश करण्यापूर्वी दाराशींच किंचित् थांबून अमीनेनें जुलेखेला हांक मारली "ताई !—"

अमीनेला आपल्या बाहुद्वयानें आलिंगन देऊन जुलेखेनें प्रेमभरानें तिचें चुंबन घेतलें. नंतर दोघीजणी हळुहळू महालांत शिरल्या.

आपल्या अतुल ऐश्वर्याला व या प्रसंगाला साजेसा सुंदर राजवेष व अलंकार धारण करून महालाच्या मध्यभागीं मांडलेल्या सुवर्णमंचकावर राजा बसला होता. संकोच व लज्जा यामुळें अमीना दाराजवळच उभी राहिली.

जुलेखा मात्र पुढें सरसावली. ती राजाजवळ जाऊन पहाते तों राजा आपल्याकडे पाहून हंसत आहे, असें तिला आढळून आलें.

आणखी किंचित् पुढें सरसावतांच जुलेखा एकदम ओरडली " दालिया ! "—अमीना जागच्या जागीं मूर्छित होऊन पडली !

दालियानें उठून एकाद्या विद्ध झालेल्या पक्ष्याप्रमाणें आपल्या प्रिय तिन्नीला हृदयाशीं धरून पलंगावर आणून निजविलें. अमीना तत्क्षणीं शुद्धीवर आली. आपल्या हृदयाशीं ठेवलेला सुरा बाहेर काढून ती आपल्या ताईच्या मुखाकडे पाहूं लागली; ताई दालियाच्या मुखाकडे पाहत होती; दालिया स्तब्ध राहून हास्यमुखानें व स्निग्ध दृष्टीनें दोघांहि भगिनींकडे पहात होता. अमीनेच्या हातांतील सुराहि म्यान्यांतून आपलें तोंड किंचित् बाहेर काढून हा सर्व मजेदार देखावा पाहून आपल्या शुभ्र कांतीनें हंसूं लागला !

नशीबाची परीक्षा १। रु.; दुःखाअंतीं सुख, १। रु.; माणिकबाग १। रु.;
सुधा १ रु.; हृदयंगम कादंबऱ्या. मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

नाटक.

[श्रीयुत विठ्ठल सीताराम गुर्जर, मुंबई.]

आमच्या गोष्टीचें रहस्य वाचकांच्या चांगलें लक्ष्यांत यावें ह्मणून आमच्या गणपतरावजींच्या बाल्यकालाच्या इतिहासाच्या एका लहानशा भागाचें येथें किंचित् पर्यालोचन करणें अवश्य आहे.

गणपतरावजींचें वय त्यावेळीं सारें तेरा किंवा चौदा वर्षांचें असेल. त्यावेळीं ते इंग्रजी चवथी इयत्ता शिकत होते. त्यांचा वर्गांतील अभ्यास कसा काय चालला होता, नेमलेल्या पुस्तकांशीं त्यांचा कितपत दाट परिचय होता, याविषयीं विशेष विस्तारपूर्वक न लिहिलें तरी चालण्यासारखें आहे; परंतु त्यावेळीं मराठींतील नाटकें, कादंबऱ्या व काव्यें वाचून मनन करण्यासारखीं किंवा पाहून फेंकून देण्यासारखीं जेवढीं ह्मणून त्यांच्या हातीं लागत, तेवढीं सारीं ते एकाद्या अधाशाप्रमाणें भरभर वाचून टाकीत! घे पुस्तक कीं काढ भरकन् वाचून, असा त्यांचा बाणा असे. गणपतरावांची बुद्धि मोठी तीव्र व भावग्रहणपटु होती. ज्या कांहीं बऱ्या वाईट कल्पना त्यांनां या पुस्तकांत आढळून येत, त्या त्यांच्या मज्जाकोषांत तावडतोब संगृहीत होत असत. कादंबऱ्यापेक्षांहि त्यांनां संगीत नाटकें व मासिक पुस्तकांतून वगैरे वेळोवेळीं प्रसिद्ध होणाऱ्या स्फुट कविता फार आवडत. हळुहळू काव्यविषयाचे ते पुरेच नादी बनले! या वाचनाच्या नादाचा परिणाम सहजच असा झाला, कीं, इंग्लिश, संस्कृत वगैरे भाषाविषयांत स्वारीला जरी साधारण बऱ्यापैकीं मार्क (गुण) मिळत असत, तरी इतिहास, भूगोल, गणित इत्यादि रुक्ष विषयांत त्यांनां ठोकर बसण्याचीच पाळी येई. गणपतरावजींच्या वर्गांतील सहाध्यायी मित्र व कधींकधीं त्यांचे गुरुहि त्यांनां 'कविराज' अशी संज्ञा देत; एवढेंच नव्हे, तर सर्व शाळेंत व शाळेच्या बाहेरहि कोठेंकोठें गणपतराव 'कवि' ह्मणून प्रसिद्ध होऊं लागले होते.

शाळेच्या मधल्या सुटींत ज्या वेळीं गणपतरावजींचे सर्व बंधुबंधु चिवडा, भजीं, पेरु, कांकड्या वगैरे मिष्ट मिष्ट जिनसांचा फडशा पाडण्यांत, व आट्यापाट्या, लगोऱ्या, चेंडू इत्यादि खेळांमध्यें सारखा हुतूतू घालण्यांत सर्व जगताला पार विसरून जात असत, त्यावेळीं या सर्व कोलाहलापासून अगदीं दूर राहून आपल्या सहाध्यायी मंडळीच्या धांगडधिंग्याशीं यत्किंचितहि संपर्क न ठेवतां आमचे गणपतरावजी वर्गाच्या एका कोपऱ्यांत बसून आपली गणिताची वही उघडून तींत अपूर्वदृष्ट कल्पनामय नायिकेला उद्देशून—

'वससि कुठें मनहरणी? झडकरि ये धांवोनी!
मम जीवनपुलिना तव लावि गडे! तरणी!'

अशा तऱ्हेच्या निर्बंधकविता वाटेल तितक्या लिहून काढीत. गणपतरावजींनां अशा कविता लिहावयाचा आळसच आला, तर मग त्यांचा (कवितांचा) अगदीं नाइलाज होऊन जाई. त्यांच्या पेन्सलीचा आश्रय सोडून मग त्या कवीच्या तोंडाचाच आश्रय शोधीत! अशा प्रसंगीं

'रात्रंदिन शिणतों—
तुझ्यास्तव, अंत न मम बघतो!

अशासारखीं कितीतरी काव्यें त्यांच्या मुखावाटे गुणगुणण्याच्या रूपानें बाहेर पडत!

गणपतरावजींच्या कह्यावाहेर गेलेला काव्याचा नाद, आणि स्वप्नमय, कल्पनापूर्ण प्रेमविव्हलता, या कारणांमुळें विश्वविद्यालयाची अधिष्ठात्री देवी सरस्वती हिनें जेव्हां त्यांनां प्रवेशद्वारांतून जावयालाच पहिल्या धडाक्यास मनाई केली, तेव्हांपासून आमचे 'कविराजराजितिलक' जरा कैचींत सांपडल्यासारखे झाले! गणपतरावजींवर त्या दिवसापासून चांगलाच कडक पहारा बसला. मुलगा अभ्यासाच्या पुस्तकाशिवाय काय वाचतो, काय काय करतो, यासंबंधानें त्यांच्या वडिलांकडून वारंवार सारखी चौकशी सुरू झाली. चारदोन वेळ त्यांच्या खोलीची कसून झडती होऊन आमच्या कविवर्यांच्या कवितांच्या चोपड्या, कागदांचे तुकडे, चिटोरीं चटसारीं जप्त होऊन 'अग्नये स्वाहा' झालीं! कविता केल्याबद्दल व चोरून संगीत नाटकें वाचल्याबद्दल वडिलांकडून स्वारीला चारपांच वेळ चांगली कडक शिक्षाहि करण्यांत आली. मुलाकडून चोपून अभ्यास करून घेण्याकरतां मुद्दाम नेमण्यांत आलेले मास्तर तर

आमच्या कविराजांनां अभ्यासाव्यतिरिक्त पुस्तक वाचावयास एक क्षणाचीहि फुरसत देईनात !

शेवटीं, याप्रमाणें दोन वर्षें गेल्यावर वडिलांच्या व मास्तरांच्या अविरत श्रमांमुळें व कसून केलेल्या पहाऱ्यामुळें विश्वविद्यालयाच्या प्रवेशद्वाराची अर्गला एकदांची उघडून आमचे कविवर्य गणपतरावजी कॉलेजमध्यें प्रविष्ट झाले !

गणपतरावांच्या काव्यप्रतिभेला जागच्याजागीं चिरडून ठार करण्याची त्यांच्या वडिलांनीं जरी शिकस्त केली, तरी ती ठार न होतां आंतल्या आंत चांगलीच धुमसत राहिली. ती ठार झाली म्हणून मंडळी मारे मनांत मांडे खात होती; परंतु हा खरा प्रकार विचाऱ्यांच्या लक्ष्यांतहि आला नाहीं ! डोकीवर लांब कुरळे केश ठेवून आणि आपण जगाविषयीं बेफिकीर आहों, असें दाखविण्याकरतां ते अस्ताव्यस्त व बेफाम रहातील अशी मुद्दाम काळजी घेऊन, त्याप्रमाणेंच मार्गशीर्षपौष महिन्यांतील भयंकर थंडींतहि गुडघ्यापर्यंत लांब असा चारिक मलमलीचा, पांढराशुभ्र, 'कोदंड' फॅशनचा सदरा अंगांत लटकावून, 'इंदुप्रभा' मासिकाची संपादकगिरी गुप्त रीतीनें करून किंवा असेच कांहीं अन्य विक्षिप्तपणाचे उपाय अमलांत आणून गणपतरावजींनीं आपण 'पक्के कवि' असल्याची ख्याति आपल्या मित्रवर्गांत व कॉलेजांत चांगलीच जागृत ठेविली होती !

जसजसे याप्रमाणें दिवस जाऊं लागले, तसतसे गणपतरावजी अधिकाधिक 'काव्य-पागल' (या समासाबद्दल वैय्याकरण मला क्षमा करोत !) बनत चालले. अलीकडे त्यांच्या मनाला म्हणा किंवा डोक्याला म्हणा, एक विलक्षणच भुरळ पडत चालली होती. 'इंदुप्रभा' मासिकपुस्तकांत त्यांचीं 'वीणाकाव्यें' (Lyric poems) जारीनें सहीनिशीं प्रसिद्ध होऊं लागल्यापासून गणपतरावजी एकाद्या प्रणयव्याकुल नायिकेची आपणाला सुंदर, सुरंजित काव्यपत्रिका येईल, अशी अत्यंत उत्कंठेनें आशा करूं लागले ! आणि त्या मासिकाच्या 'वसंत' अंकांत त्यांच्या फोटोसह त्यांची 'अभिनव प्रेमास !' ही कविता प्रसिद्ध झाल्यापासून तर रस्त्यांतून चालतांनाहि त्यांनां क्षणोक्षणीं असा भास होऊं लागला, कीं, बाजूच्या इमारतीच्या—चुकलों, 'हर्म्यां'च्या-गच्चीवर उभ्या असलेल्या एकाद्या लज्जाशील प्रणयाकुल नायिकेच्या हातांतील पुष्पमाला आपल्या कंठांत पडून आपण धन्यधन्य झालों ! परंतु हायया ! भिकार महाराष्ट्रदेशांतील काव्यरसानभिज्ञ अरसिक नायिकावृंद एक दिवसहि आमच्या कविवर्यांकडे ढुंकून पाहीना !

याच वेळेच्या सुमारास, किंवा त्याच्या थोडीं आधीं गणपतरावजींच्या 'कवि' नसलेल्या मित्रांचीं लग्नें होऊं लागलीं—परंतु दुर्दैव ! आमच्या कविवर्यांचें लग्न झालें नाहीं ! परंतु यांत म्हणजे त्यांचा कांहीं अपराध होता, असें मात्र वाचकांनीं कृपा करून समजूं नये. या अनर्थाला सर्वस्वीं त्यांचे निष्ठुर वडीलच कारणीभूत झाले होते. पोरगा निदान इंटरमीजिएट झाल्याशिवाय त्याचें लग्नच करावयाचें नाहीं, अशी त्यांनीं भीष्मप्रतिज्ञाच केली होती ! सुंदराकाकूंचा (गणपतरावांच्या मातेचा) जळफळाट, अभिमान व बुडबुडलेले डोळे करून निरनिराळ्या प्रकारांनीं त्यांनीं केलेली विनवणी, अगोदर भरलेल्या हुंड्याच्या मोठमोठाल्या रकमांनीं जेरीस आलेल्या मुलींच्या बापांची हांजीहांजी, आप्तमित्रांचें लोभप्रदर्शन यांपैकीं एकाहि गोष्टीनें गणपतरावजींच्या हृदयहीन पित्याची ही प्रतिज्ञा डळमळेना !

परंतु आपल्या वडिलांनां शेवटीं आमच्या गणपतरावजींनींच जेरीस आणिलें ! दोन, तीन, चार वेळां लागोपाठ नापास होऊन त्यांनीं जेव्हां सप्रमाण सिद्ध केलें, कीं, प्रत्यक्ष ब्रह्मदेव आला तरी कांहीं आपण पी. ई. परीक्षामुद्धां पास होणार नाहीं, मग इंटरमीजिएट होण्याची गोष्ट दूरच ! तेव्हां अखेरीस त्यांच्या वडिलांची दारुण प्रतिज्ञा एकदांची भंग पावली ! नंतर थोड्याच अवकाशानें एका शुभ मुहूर्तावर तासेवाजंत्री, बॅंड, मशाली इत्यादि इत्यादि थाटांत एका सुंदर वधूला बरोबर घेऊन येऊन गणपतरावांनीं गृहप्रवेश केला.

परंतु गणपतरावजींच्या विवाहानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांचे वडिल व मातुःश्री या नश्वर मृत्युलोकाचा त्याग करून व आपल्या कविपुत्राला काव्यसमुद्रांत यथेच्छ पोहण्याला अवसर देऊन परलोकीं निघून गेलीं.

[२]

आणखीहि दोनतीन वर्षें हळुहळू निघून गेलीं. वडिलांनीं यथेच्छ संपत्ति मागें ठेविल्यामुळें आमच्या कविवर्यांनां संसाराचा गाडा हांकण्याचें काम तितकें विकट गेलें नाहीं. गणपतरावजींनां विपुल संपत्ति, सुंदर, सुखभावी तरुण पत्नी, वगैरे सर्व सुखें अनुकूल होतीं; परंतु

'जगीं सर्वसुखी असा कोण आहे ?'

कविवर्यांच्या अर्धांगी इंदिराबाई-लग्नाच्या वेळीं गणपतरावजींनीं हें काव्यगंधि नांव हट्टानें ठेविलें होतें—जरी सुंदर, तरुण, प्रेमळ व सुखभावी होत्या, तरी गणपतरावांनां त्यांच्यापासून त्यांच्या अपेक्षेइतकें सौख्य बिलकुल प्राप्त होत नसे. इंदिराबाईंचा स्वभाव, त्यांच्या दुर्दैवानें, पतीला पाहिजे होता तितका काव्यगंधि व कल्पनामोदि नव्हता! कल्पनामय मानसराज्याचा केवळ प्राण अशी भावविव्हलता व प्रणयगद्गद भाषा यांनीं आपणाला पूर्णपणें लपेटून घेऊन गणपतराव जेव्हां आपल्या काव्यकल्पना आपल्या अर्धांगीला सांगत, तेव्हां इंदिराबाई हंसून त्यांची मृदु भाषेनें अवहेलना करीत, व आमच्या कविवर्यांनां क्रोध किंवा गांभीर्य यांचें संवरण करणें अगदीं दुःसाध्य होऊन जाई! अशा प्रसंगीं अगदीं हताश होऊन ते कपाळावर हात देऊन कविजनसुलभ असे दीर्घ निःश्वास टाकीत! त्यांच्या किती—किती वेळ तरी मनांत येई, कीं, अशी ही निष्ठुर पत्नी आणि तिच्याबरोबरच सर्व संसार यांचा एकदम त्याग करून कोठें तरी निघून जावें; व भगवीं वस्त्रें परिधान करून, एकतारी बरोबर घेऊन भिक्षा मागत चहूंकडे-देशोदेशीं वणवण फिरावें; मस्तकावर अगडबंब जटाभार वाढवून, दाढीहि चांगली हातदीडहात वाढवून आपलें मूळचें स्वरूप पार बदलून टाकावें; अशा तऱ्हेनें कांहीं वर्षें देशोदेशीं भटकल्यावर एके दिवशीं मुसळधार पाऊस पडतो आहे, अशी संधि पाहून गांवांत शिरून आपल्या घरीं यावें व एकतारीवरील आपल्या कोमल मधुर संगीतानें प्रियविरहानें व दारुण पश्चात्तापानें अगोदरच भग्नहृदय झालेल्या इंदिरेचें हृदय पूर्णपणें भग्न करून टाकावें! अर्थात्च या प्रसंगीं आपली पत्नी आपणाला ओळखीलच! नंतर पुनरपि आपला स्वीकार करून घरींच रहाण्याबद्दल आपली ती नानाप्रकारची विनवणी करील-शेवटीं, अश्रुजलानें आपले पायहि भिजवून काढील—पण बस्स्, आपण म्हणून आपल्या संकल्पाचा कधींहि त्याग करायचा नाहीं! अशा विलक्षण व अद्भुत उपायानेंच इंदिरेची निष्ठुरता व अरसिकता, तिजकडून वेळोवेळीं होत असलेली आपली अवहेलना, या सर्वांबद्दलचा सूड आपण तिजवर यथेच्छ उगवूं! पण हा विलक्षण उपाय अमलांत आणावयाच्या मार्गांत अनेक-अनेक विघ्नें होतीं. इंदिरेच्या कोमल, मनोहर, सुंदर मुखकमलांत अशी कांहीं विलक्षण जादू होती, कीं, तिच्या प्रभावानें आमचे कविराज अगदीं पूर्णपणें मोहून गेले होते! त्यांच्या मनांत चाटतील त्या कल्पना येवोत, ते तोंडानें काय वाटेल तें बडबडोत, इंदिरेला सोडून गणपतरावांनां कोठें एक दिवसहि रहाणें केवळ अशक्य होतें! अशा स्थितींत गणपतरावजी काय करतात विचारे! अगदीं निरुपाय होऊन आपल्या खिन्न हृदयावर निष्ठुर इंदिरेच्या क्रूर अत्याचाराचे आघात ते मुकाट्यानें सहन करीत होते!

[३]

रविवारचा दिवस. गणपतरावजींचे परममित्र नारायणराव यांनीं लिहिलेल्या 'संगीत प्रेमजीवन' या नूतन नाटकाचा सुप्रसिद्ध 'भरतकलादर्श संगीत मंडळी'चा प्रथम प्रयोग पहावयास कर्त्यांच्या अत्यंत आग्रहानें गणपतरावजी गेले होते. नाटक फारच सुंदर बसलें. सुंदरपणाबद्दल व मधुर कंठाबद्दल चहूंकडे नांवाजलेल्या स्त्रीपुरुषपात्रांच्या मुखांतून निघालेला अमृतोपम संगीतप्रवाह, प्रणयोद्रेकानें भरलेल्या प्रसंगांनीं खचलेली रमणीय नाट्यरचना, शांत व उज्ज्वल विद्युद्दीपप्रकाश, इत्यादि मनोमादक गोष्टींमुळें आमचे कविवर्य अगदीं बेहोष होऊन गेले! उत्कट प्रणयकल्पनांच्या तरल तरंगांनीं त्यांच्या हृदयांत प्रचंड खळबळ उडवून दिली.

सुदैवानें—कीं दुर्दैवानें कोणाला ठाऊक?—त्या प्रसंगीं शीतल वायूच्या मंद लहरी कविराजांच्या अंगाला चाटून जात होत्या. ती पौर्णिमेची रात्र असल्यामुळें रम्य चंद्रप्रकाशानें सर्व कांहीं रमणीयच दिसत होतें. त्यामुळें गणपतरावजींचें हुरळलेलें कविहृदय अधिकच हुरळून गेलें! त्यांच्या बंगल्याच्या व्हरांड्याजवळ ठेवलेल्या कुंड्यांतील झाडांवर सुवासिक गुलाबपुष्पें या वेळीं त्यांच्याकडे दृष्टि लावून डोलत होतीं. घरांत शिरतां शिरतां तीं व दुसरीं कांहीं फुलें तोडून बरोबर न्यावयाला गणपतरावजी विसरले नाहींत.

गणपतराव तडक आपल्या माडीवरल्या खोलीकडेच गेले. आपली प्रिया या वेळीं आपलीच वाट पहात खोलींत बसली असेल, अशी त्यांची कल्पना होती. परंतु इंदिराबाई खोलींत नव्हत्या.

कपडे वगैरे काढून गणपतराव तेथल्या इझीचेअरवर अंग टाकतात, तों त्यांची हृदयस्वामिनी तेथें आली. तिला पहातांच त्यांचें हृदय प्रसन्न झालें.

खोलीत येतांच इंदिराबाई ह्मणाल्या "आज किती रात्र ही उगीच? मावशीला आज बराच ताप आला आहे हो!"

पत्नीच्या या शब्दांकडे लवमात्रहि लक्ष्य न देतां तिच्या सुंदर मुखकमलाकडे स्निग्ध दृष्टीनें पहात गणपतराव ह्मणाले "इंदिरे!"

"हें काय बाई असं? जरा खालीं येऊन मावशीचा समाचार घ्यायचा होता गडे! तिला भारी ताप आला आहे. मला आज सारी रात्र तिच्याजवळ राहिलं पाहिजे-ह्मणून सांगायला मी मुद्दाम इथं आल्यें."

"आला असेल ताप पडशाबिडशाचा तुझ्या मावशीला! अशी ही सुंदर चांदणी रात्र कांहीं रोग्यांच्या सेवेकरितां परमेश्वरानें निर्माण केली नाहीं, समजलीस इंदिरे? चल ये मजबरोबर—आपण दोघेजणें मागल्या बागेंत जाऊन या रमणीय चंद्रप्रकाशांत एकमेकांच्या तोंडाकडे पहात बसूं या, चल. हीं मीं मुद्दाम आणलेलीं फुलें घेऊन तूं त्यांचा हार तयार करीत बैस अन् मी तुझ्या मांडीवर डोकें टेंकून पडतों. अहाहा! या गोड प्रसंगीं तूं किती सुंदर दिसते आहेस इंदिरे!"

जरा दूर होऊन इंदिरा ह्मणाली "छे गडे! असं काय वरं ह्मणावं भलतंच यावेळीं? मावशीजवळ या वेळीं मला असलंच पाहिजे-अन् आपणदिखील तिला एकदां बघून जावं हें वरं."

"इंदिरे!—"

"काय ह्मणायचं?"

"तुला कांहीं मी जाऊं देणार नाहीं. चल ये—या फुलांची वेणी करून ती मी तुझ्या अंबाड्यांत घालतों. तुला आठवतें का माझें तें पद इंदिरे?"

"कोणतं?

"धन्य ते रमण जगतीं—
प्रियाकबरी स्वकरीं कुसुमीं खचिती!
मुखाब्जि त्या मग लावुनि दृष्टी—"

इंदिरा मध्येंच विरक्त स्वरानें ह्मणते "पुरे पुरे—मनुष्याला कांहीं काळ वेळ सुचतो का नाहीं?"

गणपतराव पुनः गाऊं लागले

"अशा या कालीं—

इतक्यांत बाहेरून सखु मोलकरणीनें हांक मारली "वहिनीसाहेब—"

"मी जातें." असें ह्मणून इंदिरा घाईघाईनें तेथून निघून गेली. परंतु त्या घाईत गणपतरावजींनीं मोठ्या प्रेमभरानें अर्पण केलेला तो प्रणयोपहार—तीं सुंदर फुलें इंदिरेच्या अंबाड्यांतून खालीं पडून कविवर्यांकडे हताश दृष्टीनें पाहूं लागलीं!

बिचारे कविराज! पत्नीच्या या वर्तनानें गणपतराव अगदीं स्तंभितच होऊन गेले! झाला हा प्रकार काय झाला, हें त्यांना कळेना! सभोंवतालचा रम्य उज्ज्वल चंद्रप्रकाश त्यांच्या दृष्टीला आतां निष्प्रभ व नीरस दिसूं लागला. एक दीर्घ निःश्वास टाकून ते पुनः खालीं व्हरांड्यांत आले. रागानें आणि अभिमानानें त्यांचें सर्व शरीर जळत होतें. तेथें असलेल्या फुलांच्या कुंड्यांपैकीं एकादी घेऊन आपल्या मस्तकावर आपटून चहूंकडे रक्तच रक्त करून सोडावें, असेंहि त्यांना एकवार वाटलें. चहूंकडे आरडाओरड झाल्यावर मग इंदिरा तेथें येईलच. आपण ज्याची उपेक्षा केली, त्या आपल्या सहृदय पतीचा अंतकाल दूर नाहीं, असें वाटून त्या निष्ठुर स्त्रीला पुरा पश्चात्ताप होऊंदे, असें त्यांना वाटलें. परंतु आपल्या मस्तकाला अशा यातना देण्यापेक्षां वरून खिडकींतून एकदम खालीं उडी टाकून आत्महत्या करावी व अशा रीतीनें आपल्या हृदयहीन पत्नीवर पुरा सूड घ्यावा, अशीहि एक कल्पना त्यांच्या डोक्यांत आली. सर्व विश्वच यावेळीं त्यांना खदिरांगाराप्रमाणें अत्यंत तापदायक वाटूं लागलें. आपल्या निर्घृण अर्धांगीचा सूड कसा घेतां येईल, या एका विचाराशिवाय या प्रसंगीं त्यांना कांहींहि सुचत नव्हतें.

बराच वेळपर्यंत गणपतराव तेथेंच उभे होते. कांहीं वेळानें पुनः ते आपल्या खोलींत जाऊन बसले. आतां तरी इंदिरा पुनः येऊन आपली क्षमा मागेल, अशी त्यांना फार आशा होती. इंदिरेचें हृदय खरोखरच निष्ठुर आहे काय? आपल्या कवि-हृदयांतील अनंत यातनांची तिला कल्पनाहि नसेल काय? किंवा कल्पना असूनहि ती मुद्दाम निष्ठुरपणानें आपली अशी हेटाळणी करीत असेल? तर मग खरोखरच आपण अशा अरसिक, हृदयशून्य राक्षसिणीच्या हातीं आत्मसमर्पण केलें आहे काय? गणपतरावजींचें मस्तक भडकून गेलें!

परंतु हाय! बिचाऱ्या कविवर्यांचे मोठेमोठे आशाप्रासाद धडधडून जमीनदोस्त होऊं लागले! निष्ठुर इंदिरा शेवटीं आली नाहीं ती नाहींच!

कविवर्यांच्या अर्धांगी इंदिराबाई-लग्नाच्या वेळीं गणपतरावजींनीं हें काव्यगंधि नांव हट्टानें ठेविलें होतें—जरी सुंदर, तरुण, प्रेमळ व सुखभावी होत्या, तरी गणपतरावांनां त्यांच्यापासून त्यांच्या अपेक्षेइतकें सौख्य बिलकुल प्राप्त होत नसे. इंदिराबाईंचा स्वभाव, त्यांच्या दुर्दैवानें, पतीला पाहिजे होता तितका काव्यगंधि व कल्पनामोदि नव्हता! कल्पनामय मानसराज्याचा केवळ प्राण अशी भावविव्हलता व प्रणयगद्गद भाषा यांनीं आपणाला पूर्णपणें लपेटून घेऊन गणपतराव जेव्हां आपल्या काव्यकल्पना आपल्या अर्धांगीला सांगत, तेव्हां इंदिराबाई हंसून त्यांची मृदु भाषेनें अवहेलना करीत, व आमच्या कविवर्यांनां क्रोध किंवा गांभीर्य यांचें संवरण करणें अगदीं दुःसाध्य होऊन जाई! अशा प्रसंगीं अगदीं हताश होऊन ते कपाळावर हात देऊन कविजनसुलभ असे दीर्घ निःश्वास टाकीत! त्यांच्या किती—किती वेळ तरी मनांत येई, कीं, अशी ही निष्ठुर पत्नी आणि तिच्याबरोबरच सर्व संसार यांचा एकदम त्याग करून कोठें तरी निघून जावें; व भगवीं वस्त्रें परिधान करून, एकतारी बरोबर घेऊन भिक्षा मागत चहूंकडे-देशोदेशीं वणवण फिरावें; मस्तकावर अगडबंब जटाभार वाढवून, दाढीहि चांगली हात दीडहात वाढवून आपलें मूळचें स्वरूप पार बदलून टाकावें; अशा तऱ्हेनें कांहीं वर्षें देशोदेशीं भटकल्यावर एके दिवशीं मुसळधार पाऊस पडतो आहे, अशी संधि पाहून गांवांत शिरून आपल्या घरीं यावें व एकतारीवरील आपल्या कोमल मधुर संगीतानें प्रियविरहानें व दारुण पश्चात्तापानें अगोदरच भग्नहृदय झालेल्या इंदिरेचें हृदय पूर्णपणें भग्न करून टाकावें! अर्थातच या प्रसंगीं आपली पत्नी आपणाला ओळखेलच! नंतर पुनरपि आपला स्वीकार करून घरींच रहाण्याबद्दल आपली ती नानाप्रकारची विनवणी करील-शेवटीं, अश्रुजलानें आपले पायहि भिजवून काढील—पण बस्स्, आपण झणून आपल्या संकल्पाचा कधींहि त्याग करायचा नाहीं! अशा विलक्षण व अद्भुत उपायानेंच इंदिरेची निष्ठुरता व अरसिकता, तिजकडून वेळोवेळीं होत असलेली आपली अवहेलना, या सर्वांबद्दलचा सूड आपण तिजवर यथेच्छ उगवूं! पण हा विलक्षण उपाय अमलांत आणावयाच्या मार्गांत अनेक-अनेक विघ्नें होतीं. इंदिरेच्या कोमल, मनोहर, सुंदर मुखकमलांत अशी कांहीं विलक्षण जादू होती, कीं, तिच्या प्रभावानें आमचे कविराज अगदीं पूर्णपणें मोहून गेले होते! त्यांच्या मनांत वाटतील त्या कल्पना येवोत, ते तोंडानें काय वाटेल तें बडबडोत, इंदिरेला सोडून गणपतरावांनां कोठें एक दिवसहि रहाणें केवळ अशक्य होतें! अशा स्थितींत गणपतरावजी काय करतात बिचारे? अगदीं निरुपाय होऊन आपल्या खिन्न हृदयावर निष्ठुर इंदिरेच्या क्रूर अत्याचाराचे आघात ते मुकाट्यानें सहन करीत होते!

[३]

रविवारचा दिवस. गणपतरावजींचे परममित्र नारायणराव यांनीं लिहिलेल्या 'संगीत प्रेमजीवन' या नूतन नाटकाचा सुप्रसिद्ध 'भरतकलादर्श संगीत मंडळी'चा प्रथम प्रयोग पहावयास कर्त्यांच्या अत्यंत आग्रहानें गणपतरावजी गेले होते. नाटक फारच सुंदर बठलें. सुंदरपणाबद्दल व मधुर कंठाबद्दल चहूंकडे नांवाजलेल्या स्त्रीपुरुषपात्रांच्या मुखांतून निघालेला अमृतोपम संगीतप्रवाह, प्रणयोद्रेकानें भरलेल्या प्रसंगांनीं खचलेली रमणीय नाट्यरचना, शांत व उज्ज्वल विद्युद्दीपप्रकाश, इत्यादि मनोमादक गोष्टीमुळें आमचे कविवर्य अगदीं बेहोष होऊन गेले! उत्कट प्रणयकल्पनांच्या तरल तरंगांनीं त्यांच्या हृदयांत प्रचंड खळबळ उडवून दिली.

सुदैवानें—कीं दुर्दैवानें कोणाला ठाऊक?—त्या प्रसंगीं शीतल वायूच्या मंद लहरी कविराजांच्या अंगाला चाटून जात होत्या. ती पौर्णिमेची रात्र असल्यामुळें रम्य चंद्रप्रकाशानें सर्व कांहीं रमणीयच दिसत होतें. त्यामुळें गणपतरावजींचें हुरळलेलें कविहृदय अधिकच हुरळून गेलें! त्यांच्या बंगल्याच्या शेजारच्याजवळ ठेवलेल्या कुंड्यांतील झाडांवर सुवासिक गुलाबपुष्पें या वेळीं त्यांच्याकडे दृष्टि लावून डोलत होतीं. घरांत शिरतां शिरतां तीं व दुसरीं कांहीं फुलें तोडून बरोबर न्यावयाला गणपतरावजी विसरले नाहींत.

गणपतराव तडक आपल्या माडीवरल्या खोलीकडेच गेले. आपली प्रिया या वेळीं आपलीच वाट पहात खोलींत बसली असेल, अशी त्यांची कल्पना होती. परंतु इंदिराबाई खोलींत नव्हत्या.

कपडे वगैरे काढून गणपतराव तेथल्या इझीचेअरवर अंग टाकतात, तों त्यांची हृदयस्वामिनी तेथें आली. तिला पहातांच त्यांचें हृदय प्रसन्न झालें.

खोलींत येतांच इंदिराबाई ह्मणाल्या "आज किती रात्र ही उगीच? मावशीला आज बराच ताप आला आहे हो!"

पत्नीच्या या शब्दांकडे लवमात्रहि लक्ष्य न देतां तिच्या सुंदर मुखकमलाकडे स्निग्ध दृष्टीनें पहात गणपतराव ह्मणाले "इंदिरे!"

"हें काय बाई असं? जरा खालीं येऊन मावशीचा समाचार घ्यायचा होता गडे! तिला भारी ताप आला आहे. मला आज सारी रात्र तिच्याजवळ राहिलं पाहिजे-ह्मणून सांगायला मी मुद्दाम इथं आल्यें."

"आला असेल ताप पडशाबिडशाचा तुझ्या मावशीला! अशी ही सुंदर चांदणी रात्र कांहीं रोग्यांच्या सेवेकरितां परमेश्वरानें निर्माण केली नाहीं, समजलीस इंदिरे? चल ये मजबरोबर—आपण दोघेजणें मागल्या बागेंत जाऊन या रमणीय चंद्रप्रकाशांत एकमेकांच्या तोंडाकडे पहात बसूं या, चल. हीं मीं मुद्दाम आणलेलीं फुलें घेऊन तूं त्यांचा हार तयार करीत बैस अन् मी तुझ्या मांडीवर डोकें टेंकून पडतों. अहाहा! या गोड प्रसंगीं तूं किती सुंदर दिसते आहेस इंदिरे!"

जरा दूर होऊन इंदिरा ह्मणाली "छे गडे! असं काय बरं ह्मणावं भलतंच यावेळीं? मावशीजवळ या वेळीं मला असलंच पाहिजे-अन् आपणदिखील तिला एकदां बघून जावं हें बरं."

"इंदिरे!—"

"काय ह्मणायचं?"

"तुला कांहीं मी जाऊं देणार नाहीं. चल ये—या फुलांची वेणी करून ती मी तुझ्या अंबाड्यांत घालतों. तुला आठवतें का माझें तें पद इंदिरे?"

"कोणतं?

"धन्य ते रमण जगतीं—
प्रियाकबरी स्वकरीं कुसुमीं खचिती!
मुखाब्जि त्या मग लावुनि दृष्टी—"

इंदिरा मध्येंच विरक्त स्वरानें ह्मणते "पुरे पुरे—मनुष्याला कांहीं काळ वेळ सुचतो का नाहीं?"

गणपतराव पुनः गाऊं लागले

"अशा या काली—

इतक्यांत बाहेरून सखु मोलकरणीनें हांक मारली "वहिनीसाहेब—"

"मी जात्यें." असें ह्मणून इंदिरा घाईघाईनें तेथून निघून गेली. परंतु त्या घाईत गणपतरावजींनीं मोठ्या प्रेमभरानें अर्पण केलेला तो प्रणयोपहार—तीं सुंदर फुलें इंदिरेच्या अंबाड्यांतून खालीं पडून कविवर्यांकडे हताश दृष्टीनें पाहूं लागलीं!

बिचारे कविराज! पत्नीच्या या वर्तनानें गणपतराव अगदीं स्तंभितच होऊन गेले! झाला हा प्रकार काय झाला, हें त्यांना कळेना! सभोंवतालचा रम्य उज्ज्वल चंद्रप्रकाश त्यांच्या दृष्टीला आतां निष्प्रभ व नीरस दिसूं लागला. एक दीर्घ निःश्वास टाकून ते पुनः खालीं व्हरांड्यांत आले. रागानें आणि अभिमानानें त्यांचें सर्व शरीर जळत होतें. तेथें असलेल्या फुलांच्या कुंड्यांपैकीं एकादी घेऊन आपल्या मस्तकावर आपटून चहूंकडे रक्तच रक्त करून सोडावें, असेंहि त्यांना एकवार वाटलें. चहूंकडे आरडाओरड झाल्यावर मग इंदिरा तेथें येईलच. आपण ज्याची उपेक्षा केली, त्या आपल्या सहृदय पतीचा अंतकाल दूर नाहीं, असें वाटून त्या निष्ठुर स्त्रीला पुरा पश्चात्ताप होऊंदे, असें त्यांना वाटलें. परंतु आपल्या मस्तकाला अशा यातना देण्यापेक्षां बरून खिडकींतून एकदम खालीं उडी टाकून आत्महत्या करावी व अशा रीतीनें आपल्या हृदयहीन पत्नीवर पुरा सूड घ्यावा, अशीहि एक कल्पना त्यांच्या डोक्यांत आली. सर्व विश्वच यावेळीं त्यांना खदिरांगाराप्रमाणें अत्यंत तापदायक वाटूं लागलें. आपल्या निर्घृण अर्धांगीचा सूड कसा घेतां येईल, या एका विचाराशिवाय या प्रसंगीं त्यांना कांहींहि सुचत नव्हतें.

बराच वेळपर्यंत गणपतराव तेथेंच उभे होते. कांहीं वेळानें पुनः ते आपल्या खोलींत जाऊन बसले. आतां तरी इंदिरा पुनः येऊन आपली क्षमा मागेल, अशी त्यांना फार आशा होती. इंदिरेचें हृदय खरोखरच निष्ठुर आहे काय? आपल्या कवि-हृदयांतील अनंत यातनांची तिला कल्पनाहि नसेल काय? किंवा कल्पना असूनहि ती मुद्दाम निष्ठुरपणानें आपली अशी हेटाळणी करीत असेल? तर मग खरोखरच आपण अशा अरसिक, हृदयशून्य राक्षसिणीच्या हातीं आत्मसमर्पण केलें आहे काय? गणपतरावजींचें मस्तक भडकून गेलें!

परंतु हाय! बिचाऱ्या कविवर्यांचे मोठेमोठे आशाप्रासाद धडधडून जमीनदोस्त होऊं लागले! निष्ठुर इंदिरा शेवटीं आली नाहीं ती नाहींच!

कविराजांनां झोंप येईना. विचारमालिका त्यांच्या डोक्यांत धिंगाणा घालीत होती. बराच वेळपर्यंत विचार करकरून शेवटीं पत्नीचा सूड उगविण्याचा एक उपाय त्यांनीं शोधून काढला व तो अमलांत आणावयाचें मुकरर ठरविलें. इंदिरेवरचें आपलें प्रेम एकनिष्ठ आहे, जों जों आपण तिच्यावर अधिकाधिक प्रेम करावें, तों तों इंदिरा आपली अवज्ञाच करते-त्याला कारण आपलें तिच्यावरचें एकनिष्ठ प्रेम ! ठीक आहे! आपणहि आजपासून इंदिरेला तुच्छ समजून तिच्या प्रेमाची अवहेलना करावयाची! एकाद्या खऱ्याखुऱ्याच काव्यनायिकेवर आपलें प्रेम जडलें, असें इंदिरेला भासवावयाचें व आपली मार्गप्रतीक्षा करीत असतां रात्रीच्या रात्री डोळ्याला डोळा न लागतांहि जेव्हां इंदिरेला आपलें दर्शनहि होणार नाहीं, त्या वेळींच तिची ही सारी निष्ठुरता, हृदयहीनता व अरसिकता याबद्दल पूर्णपणें सूड उगविल्यासारखें होईल, असें गणपतरावजींनां वाटलें.

[४]

विचारांच्या भरांत गणपतरावांनां झोंप लागली-परंतु उजेडतां उजेडतां ते जागे झाले. त्यावेळीं त्यांच्या अर्धांगीबद्दलचा त्यांचा राग बहुतेक ओसरलाच होता. ते हळूच उठून पायहि न वाजतां खालीं माजघरांत गेले व इंदिरेचा शोध घेऊं लागले.

इंदिरेची मावशी तेथेंच चौघडीवर निजली असून इंदिरा तिच्या पायथ्याशीं अस्ताव्यस्त निजली होती! हा देखावा पाहून गणपतरावांचा शांत होत आलेला क्रोधवह्नि पुनः भडकला! असें काय? आपणाशीं मोठमोठ्या बाता मारून इंदिरा मावशीची सेवा-शुश्रूषा करायला म्हणून मोठ्या दिमाखानें आली, ती अशा रीतीनें सेवा करण्याकरतांच काय? तिला झोंप लागल्यावर सखूला किंवा कोणाला तरी तिच्याजवळ ठेवून आपली क्षमा मागायला यायला इंदिरेला काय हरकत होती? फुकटंफाकट प्रौढी अन् बहादुरी मिरवायलाच इंदिरेनें काल एवढा हेकेखोर-पणा दाखविला! पतीची आज्ञा मान्य करणें, हें जणूं आपलें कर्तव्यच नव्हे असें तिला वाटलें काय? हाय! इंदिरे!—

आतां गणपतरावांनां धीर निघेना! त्यांनीं जाऊन इंदिरेचा हात खसकन् ओढून तिला उठविली. ती बिचारी उठून कांपत कांपत उभी राहिली.

पत्नीकडे कोधदृष्टीनें पहात मावशीबाई जागृत न होतील इतक्या आवाजानें गणपतराव ओरडले "ही वाटतें सेवा चालली आहे तुझी? ठीक आहे!"

या एका धक्क्याबरोबर हृदयांतील सर्व विषाचा इंदिरेवर वर्षाव करून, तिचा हात जोरानें हिसडून, तिच्या उत्तराची प्रतीक्षाहि न करतां, गणपतराव रागारागानें तेथून घाडघाड पावलें वाजवीत वर निघून गेले. तेथील इझीचेअरवर धाडकन् अंग टाकून, कपाळावर हात देऊन, दोन्ही डोळे मिटून ते कसला तरी विचार करीत पडले.

याप्रमाणें सरासरी अर्धा पाऊण तास गेला असेल. जिन्यावर कोणाचीं तरी पावलें वाजलेलीं गणपत-रावांनां ऐकूं आलीं. आपली अर्धांगी आपली क्षमा मागण्यासाठी रडत रडत येत असेल असें त्यांनां वाटलें. या वेळीं तिच्याशीं बोलावयाचें म्हणून नाहीं, असा दृढ-निश्चय करून, डोळे घट्ट मिटून गणपतराव तसेच पडून राहिले.

इतक्यांत कोणीं खोलींत येऊन म्हटलें "कांय रे ए गणपतराव! अजून झोंपच चालली आहे वाटतें?"

गणपतराव डोळे उघडून पहातात, तों त्यांचे परम मित्र रामभाऊ! रामभाऊ हंसत हंसत म्हणतात "काय रे अजून तूं निजलेलाचसा? बरें तें असो. आमच्या बाबूच्या लग्नाचें कालरात्रीं जमलें."

गणपतराव कांहींच बोलले नाहींत. रामभाऊनीं विचारलें "कांरे? बोलत कां नाहींस? अन् हे असे तुझे डोळे लाल कां दिसताहेत? काल रात्रीं झोंप नाहीं वाटतें सांपडली?"

एक दीर्घ निःश्वास टाकून गणपतराव खिन्न स्वरानें म्हणाले "मला हतभाग्याला आतां कसली झोंप!"

काय चमत्कार! कविवर्यांची कींव करण्याऐवजीं रामभाऊ हंसूंच लागले! "तुझें मस्तक बिघडलें आहे असें मला वाटतें. चल, चहा तयार करायला सांग. एकदां चहा घेतलास कीं डोकें साफ!

"चहा मस्तकं निर्विकारं करोति!"

"छेः! माझ्या अभाग्याच्या घशाखालीं आतां चहा कसचा उतरतो?"

गणपतरावांजवळ येऊन, त्यांचा हात धरून, रामभाऊ मृदु स्वरानें म्हणाले "अरे, असा अगदीं त्रागा कां चालविला आहेस बुवा? वहिनींबरोबर भांडण-बिंडण केलेंस वाटतें कांहीं जंगी!"

आतां खरा वृत्तांत सांगितल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. गद्गद कंठानें रात्रीची सर्व हकीगत रामभाऊंजवळ सांगून गणपतराव ह्मणाले "आतां कांहीं यावेळीं तिला आपण क्षमा करणार नाहीं. या प्रसंगीं तिला चांगली याद राहील, अशी कांहीं तरी शिक्षा केलीच पाहिजे -बस्स !"

किंचित् हंसून रामभाऊ ह्मणाले "उघडच आहे. आह्मीं आर्यपुत्रांनीं बायकांवर पराक्रम गाजवायचा नाहीं, तर कुठें गाजवायचा ?"

"तिलाहि कस्पटाप्रमाणें मला मानतां येतें-तिचीहि हेटाळणी मला करतां येते, हें मी इंदिरेला चांगलेंच समजावून देणार. काय समजली आहे ती ? तिनें मजवर प्रेम केलें नाहीं, तर त्यांत माझें कांहींसुद्धां नुकसान नाहीं."

रामभाऊ हंसत ह्मणाले "अरे बापरे ! तूं तर हळुहळू नाटकाचा नायकच बनत चाललास ह्मणायचा ! बस्स-सूड-सूड ! अरे बाबा, असा भडकूं नकोस-जरा माथें थंड कर-शांत हो."

"अरे, माझें डोकें अगदीं थंड-बर्फाप्रमाणें थंडगार आहे, समजलास ? इंदिरेची पक्की खोड मोडायला मी आतां काय करणार आहें, तें सारें तुला सांगतों. डाव्या हातानें मी एक प्रणयपत्रिका मलाच लिहितों-जणूं काय मजवर फिदा झालेल्या एका स्त्रीकडूनच ती मला आली आहे, असें पहाणाराला वाटावें. नंतर तें पत्र कोणत्याना कोणत्या उपायानें तरी इंदिरेच्या हातीं पडेल, अशी युक्तीनें तजवीज करतों. माझ्या त्या पत्रामुळें खारीच्या अंगाचा कसा भडका भडका उडून जाईल ! नंतर अर्थातच अगदीं निरुपाय होऊन ती माझे पाय धरील. मग ती आहे अन् मी आहें-पाहून घेतों!"

गणपतरावांची ही युक्ति ऐकून रामभाऊ मोठमोठ्यानें हंसूं लागले. ते ह्मणाले "वा वा ! युक्ति पण युक्ति आहे ! या ह्लॉट (संविधानका) वर एक सुंदर हास्यरसप्रधान नाटक लिहितां येईल ! काय करूं रे ? माझें डोकें बथ्थड पडलें ह्मणून ! नाहीं तर या नाटकावर साऱ्या नाटकमंडळ्यांनां अन् प्रेक्षकांनां झुलत ठेवलें असतें ! पण बाबा, तूं आहेस बोलून चालून पागल ! अशा कांहीं भानगडींत तूं पडूं नकोस-माझें ऐक. तुझ्या या युक्तीपासून एकादे वेळीं मोठा अनर्थ घडून यायचा ! आमच्या बायकांनां साऱ्या घट्टा, साऱ्या मस्करी सहन होतील, परंतु सवतीचें नांव ऐकलें, की, मत्सरानें त्या प्राण देतील. 'सवत असणें हें मरण बायकांनां !' माझें ऐक-वहिनींची ही थट्टा करूंनको-नाहीं तर एकादे वेळीं त्या प्राण देतील प्राण!"

माप्रमाणें गणपतरावांनीं या संकल्पाचा त्याग करावा ह्मणून रामभाऊंनीं त्यांनां पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु रामाचें नांव ! भीष्माप्रमाणें त्यांची प्रतिज्ञा शेवटीं अढळच राहिली !

त्या दिवशीं रात्रीं रामभाऊंनीं ही सारी मौजेची हकीगत आपल्या पत्नीच्या कानांवर घातली, तेव्हां जानकीबाई ह्मणाल्या "काय तरी बाई भाऊजींचं उलटं काळीज हें ? नाहीं तरी मेली पुरुषांची जातच असली निष्ठुर ! आपल्या प्रेमाच्या एका शब्दासाठीं आह्मी बायका आपले प्राणहि द्यायला तयार होतों, अन् तुह्मी पुरुष आह्मांला आपलीं खेळणीं समजून आमच्याशीं असे प्राणघातक खेळ खेळतां !"

रामभाऊ ह्मणाले "छेः ! असेंच कांहीं केवळ तूं ह्मणूं नकोस. सारेच पुरुष कांहीं तूं ह्मणतेस असे नसतात. गणपतराव काय बोलून चालून एक वेडगळ प्राणी आहे. वेड्याचें बहकणें कोणी मनावर का घेत असतो वेडे ?"

[५]

बाबूच्या विवाहाची धामधूम आटोपून स्थिरस्थावर झाल्यानंतर एके दिवशीं जानकीबाई बोलतां बोलतां रामभाऊंनां ह्मणाल्या "हो बाई ! बरी आठवण झाली -गणपतरावांच्या त्या खोट्या पत्राचं पुढं काय झालं ? पडलं का शेवटीं तें इंदिराबाईंच्या हातांत ?"

रामभाऊ हंसून ह्मणाले "अग, काय घेऊन बसली आहेस त्या वेड्याची गोष्ट ? ती सारी गणपतरावाची तोंडची बायफळ बडबड ! तें सारें प्रकरण खरी विसरून देखील गेली आहे !"

जानकीबाई मृदुहास्य करून ह्मणाल्या " तर मग आपण त्यावदल भाऊजींनां आठवण करून द्यावी ना गडे ! पाहूं तर खरी काय काय मजा होते ती त्यामुळं !"

"वा वा ! नुसती मजा पहायला तुमचें काय जातें ? नवरा मरो, नवरी मरो-भटजींची दक्षणा आपली ताजी ! होय ना ?"

"नाहीं-पण आपण आठवण करावीच गडे त्यांनां -पाहूं तर खरं काय होतं तें !"

[६]

घर सांगितलेलें संभाषण त्या पतिपत्नींत झालें, त्यानंतर तिसरेच दिवशीं दुपारीं गणपतरावांच्या खोलींत टेबलावर पडलेली, नवीनच प्रसिद्ध झालेली 'हें असेंच चालावयाचें !' ही कादंबरी सहज चाळीत

असतां तींत इंदिराबाईंनां बायकोच्या हातानें लिहिलेलें पुढील पत्र सांपडलें:-

" प्रियतमांच्या चरणसेवेशीं—

प्रिया, त्या दिवशीं पुनः लवकरच भेट द्यावयाचें मला वचन देऊन आपण निघून गेलांत ते गेलांत ! पुनः कांहीं तेव्हांपासून या दीन दासीला चरणांचें दर्शन झालें नाहीं. आज सतत तीन दिवस आपल्या विरहामुळें मनाला कशी अगदीं तळमळ लागून राहिली आहे ! आपला मुखचंद्र दृष्टीस पडेल, या आशेनें मी रोज चातकीप्रमाणें आपली वाट पहातें आणि रोज शेवटीं माझी अगदीं निराशा होऊन जाते. गणपतराव ! आपण कवि आहांत-दारुण विरह म्हणजे काय, याची आपणाला यथार्थ कल्पना नसेल असें नाहीं.

प्रिया, आजपर्यंत या दीन दासीला आपण जें प्रेम दाखविलें, ते सारें वरवरच काय ? आपलें दर्शन झालें नाहीं तर या अभागिनीच्या हृदयाला किती दारुण यातना होतात, याची आपणाला कल्पनाहि नाहीं. अहाहा ! जर माझ्या हृदयाला सांप्रत होत असलेल्या दारुण यातनांची आपणाला यथार्थ कल्पना असती, तर आपल्या या प्रिय मनो—ला भेटल्याशिवाय आपण कसे राहिलां असतां ? प्रिया ! मला जर त्या भेल्या ब्रह्मदेवानें मैनेप्रमाणें पंख दिले असते तर आकाशांतून भरकन् उडून जाऊन मीं आपल्या चरणांचें दर्शन केव्हांच घेतलें असतें. मला भीति वाटते, गणपतराव, इंदिराबाईंला हा सारा प्रकार कदाचित् कळल्यामुळें त्यांनी इकडे यावयाचा आपला मार्ग अडविला असावा. हो, कशी झाली तरी त्यांची आपणावर सत्ता आहे. आमचें काय आपलें ?

पण प्रियकरा, कांहीं झालें असलें, त्या चांडाळणीला आपलें गुपित कळलें असलें तरीहि, आज आपण इकडे येऊन-एक क्षणभरच कां होईना-आपण मला दर्शन दिलेंच पाहिजे. नाहींतर काय सांगूं ? आज रात्रीं प्रसर विपाच्या ज्वालांनीं मी आपल्या हृदयाच्या ज्वालाहि शांत करीन, ही आपली पूर्ण खात्री असूं द्यावी. मग मात्र, आपल्या मनो-नें आपणाला कळविल्यावांचून आत्मघात केला, असा आपणाला मजवर दोष ठेवतां येणार नाहीं.

काय करूं गणपतराव ? आपली ती रम्य मूर्ति डोळ्यांसमोर नेहमीं असल्यामुळें मला मरतांहि येत नाहीं. नाहींतर या दोनतीन दिवसांत मी मेल्यावांचून का राहिलें असतें ?

कळावें, पत्रदर्शनीं-निदान संध्याकाळीं-तरी यावें, ही विनंति.

आपल्या चरणांची नम्र दासी,
मनो— "

इंदिरेनें हें पत्र एकवार नव्हे, दोनवार नव्हे, तीनवार वाचून पाहिलें. इतक्यांत खोलीबाहेर गणपतरावांच्या पावलांचा शब्द ऐकूं आल्यामुळें तिनें चटकन् तें पुस्तकांत लपवून ठेविलें.

खोलींत प्रवेश करतांच गणपतराव इंदिरेकडे न पाहिल्यासारखें करून खुंटीवर ठेवलेल्या आपल्या कोटाचे खिसे, पुस्तकांच्या रॅकवरील पुस्तकें, टेबलाचे कपे घाईघाईनें शोध-शोधून पाहूं लागले. जणूं काय एक अतिशय महत्त्वाची वस्तु ते शोधीत असावे, असें त्यांच्या एकंदर वर्तनावरून व मुखचिन्हांवरून दिसत होतें.

इंदिराबाईंना आतां गप्प रहावेना ! त्यांनीं किंचित् त्रासाच्या आवाजानें विचारलें " काय शोधणं चाललं आहे ? "

जितका शक्य होता तितका आपला चेहरा पांढरा फटफटीत करून गणपतराव अस्पष्ट शब्दांनीं म्हणाले " कांहीं-नाहीं-तें आपलें-तें-एक-असेंच—"

इंदिराबाई त्यांच्या अगदीं जवळ येऊन त्यांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाल्या " काय तें-नीट सांगावं. नाहीं मला सांगायचं ? वरं हो !—"

त्रासल्यासारखें करून गणपतराव म्हणतात " काय बुवा त्रास आहे तुझा हा ? मी एक पत्र शोधतों आहें —समजलें आतां ?"

" इतकें का अगदीं महत्त्वाचें अन् कामाचें पत्र आहे तें ?"

" होय-होय. तसें तें महत्त्वाचें अन् कामाचें पत्र असल्याशिवाय का मी तें शोधून काढण्याची इतकी खटपट चालविली आहे ती ?"

" हें तर नव्हे ना तें आपलें पत्र ? " असें म्हणून इंदिराबाईनीं आपल्या पदराखालीं लपविलेल्या पुस्तकांतील ' मनो—' या सहीचें पत्र काढून गणपतरावांपुढें धरलें.

पत्नीच्या हातून खसकन् पत्र ओढून घेऊन गणपतराव घाबरल्यासारखें करून म्हणाले " होय-हें-हेंच तें-पण-पण तूं वाचलेंस तर नाहीं ना हें ? "

इंदिराबाई कांहींच उत्तर न देतां खोलीच्या कोंपऱ्यांत जाऊन, पतीकडे पाठ करून रागानें फुणफुणत उभ्या राहिल्या.

इंदिरेजवळ जाऊन तिचा हात धरून कविराजांनीं हांक मारली " इंदिरे !—"

" आहे ठाऊक मोठं प्रेम बायां चाललं आहे तें !" असें रागारागानें ह्मणून, गणपतरावांचा हात जोरानें हिसडून इंदिराबाई तेथून घाइघाईनें निघून गेल्या.

झालेला सर्व प्रकार चालू असतां गणपतरावांनां आंतून आनंदाच्या गुदगुल्या होत होत्या. इंदिरा रागानें निघून गेल्यावर आतांपर्यंत त्यांनीं मोठ्या कष्टानें दाबून ठेवलेलें हंसूं एकदम बाहेर पडलें. आपण योजल्याप्रमाणें सर्व बेत उत्तम रीतीनें पार पडला; आतां इंदिरा आपणाला शरण येईल, आपण तिला क्षमा न करतां खूब शासन करूं, इत्यादि इत्यादि अनेक गोड कल्पना त्यांच्या मनांत उद्भवून ते अगदीं आनंदानें बेहोष होऊन गेले !

[७]

'इंदुप्रभा' मासिकाच्या नवीन वर्षाच्या अंकांत प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या कवितेचें प्रुफ तपासण्याच्या इराद्यानें गणपतराव बाहेर व्हरांड्यातच झोपाळ्यावर बसत आहेत, इतक्यांत सखू मोलकरीण घाबऱ्या घाबऱ्या तेथें येऊन रडव्या स्वरानें ह्मणाली "आतां काय करूं हो नानासाहेब ! घात झाला, घात झाला !"

गणपतरावजींच्या हृदयांत भयानें धडकीच भरली ! त्यांनीं कंपित स्वरानें सखूला विचारलें "अग, असें झालें तरी काय तुला घाबरायला ? चांडाळणी, नीट सांग काय तें लवकर."

" वहिनी कसंसंच करताहेत ! डोळे काय फिरवताहेत, हातपाय काय झाडताहेत ! चला हो नानासाहेब—काय वाटेल तें करा, पण वहिनींना वांचवा. मावशीबाईहि घरीं नाहींत." असें ह्मणून सखू तडक वर माडीवर धांवतच गेली.

कांपणाऱ्या पावलांनीं गणपतरावहि तिच्या मागोमाग माडीवर गेले. तेथें इंदिरा खालीं सतरंजीवर अस्ताव्यस्त रीतीनें पडली आहे, तिचे सारे केश मोकळे सुटले असून ते इकडेतिकडे लोळत आहेत, दोन्ही डोळे झांकले असून तोंड फिक्कट होऊन गेलें आहे, असा विलक्षण देखावा त्यांच्या दृष्टीस पडला !

गणपतरावांचे हातपाय अगदीं गळून गेले. इंदिरेच्या जवळ जाऊन तिच्या अंगावरून हात फिरवीत त्यांनीं कंपित स्वरानें हांक मारली " इंदिरे !—"

इंदिरेनें मोठ्या कष्टानें डोळे उघडले. गणपतरावांनीं तिच्या कानांशीं आपलें तोंड नेऊन प्रेमभरानें तिला ह्मटलें " इंदिरे ! आज तूं असें काय वरें करते आहेस ? काय होतें आहे तुला ? "

धापा टाकीत टाकीत सखू रडत रडत ह्मणाली " मोठा घात झाला हो ! वहिनीसाहेबांनीं सर्वांच्या नकळत मधाशीं विष घेतलं ! अगबाई—चालली माझी गुणांची लक्षुमी मला सोडून !"

सखूचे हे शब्द ऐकतांच गणपतराव ताडकन् उठून उभे राहिले. यावेळीं त्यांची अगदीं अवर्णनीय स्थिति होऊन गेली होती !

" काय ह्मणतेस ? हिनें विष घेतलें ?" तत्क्षणीं त्यांनीं आपले परम मित्र डॉक्टर केशवराव मनोहर यांनां घाईघाईनें "ताबडतोब आतांच्या आतां निघून ये. भयंकर दुखणें आहे." अशी चिठ्ठी खरडून गड्याला हांक मारून ते ह्मणाले " शंभ्या, आतांच्या आतां असाच धांवत डॉक्टरसाहेबांच्या घरीं जा अन् त्यांनां असतील तसे घेऊन ये. चल निघ—गाडी करून जा—"

पुनः परत खोलींत येऊन हताशहृदयानें गणपतराव आपल्या आसन्नमरण पत्नीजवळ येऊन बसले. तिचें मस्तक हळूच आपल्या मांडीवर घेऊन आपले अश्रुपूर्ण नेत्र तिच्या मुखाकडे लावून सद्गदित कंठानें त्यांनीं हांक मारली " इंदिरे ! "

इंदिराबाईचा चेहरा अधिकाधिक फिक्कट होऊं लागला आहे, असें त्यांनां दिसलें.

अर्धवट डोळे उघडून क्षीण स्वरानें इंदिराबाई ह्मणाल्या "आपण हांक मारायची झाली मला ? कां वरें हांक मारली ?"

"इंदिरे ! हें तूं काय केलेंस ? या निष्ठुर अधमाधम चांडाळाच्या अपराधाबद्दल असें घोर शासन देणें तुला योग्य वाटलें काय इंदिरे ? " गणपतरावांच्या तोंडून आतां शब्द फुटेना !

" अहाहा ! वांचण्यांतच सुख आहे असं मला आतां वाटतं—पण आतां काय उपयोग ? मला-तें-सारें—"

कंपित स्वरानें गणपतरावांनीं विचारलें "काय ह्मणते आहेस तूं इंदिरे ? मिऊं नकोस-आतां डॉक्टर येतील." त्यांच्या डोळ्यांतून दोन अश्रुबिंदु गळून ते इंदिरेच्या गालांवर पडले.

इंदिरा कण्हत ह्मणाली "आतां मी कसची वांचल्यें ? आपण असं रडूं नये ! माझ्या हातून आपणाला कधीं तिळमात्रहि सुख झालं नाहीं, त्याचं या वेळीं मला फार वाईट वाटतं. त्याबद्दल मी आपली क्षमा मागत्यें. करायचीना मला क्षमा ?"

आपल्या मुमुर्षु प्रियेकडे एकाग्र दृष्टीनें पहात गणपतराव स्फुंदतस्फुंदत ह्मणाले "इंदिरे, मीं अधमानें चांडाळानेंच तुझ्यासारख्या देवीची क्षमा मागितली पाहिजे ! तुझ्या लाभानें मला स्वर्गसुखाचा लाभ झाला होता; परंतु मीं चांडाळानें आपण होऊन त्याचा नाश करून टाकला. इंदिरे ! माझें तुझ्यावर किती प्रेम आहे, याची तुला कल्पनाहि नसेल."

इंदिरा क्षीण स्वरानें ह्मणाली "मजवर आपलं प्रेम ? छे छे-जिच्या लाभानं आपणाला खरं खरं स्वर्गसुख मिळालं होतं, तिच्यावर—"

गणपतराव रडत रडत ह्मणाले "क्षमा कर, इंदिरे, या निष्ठुर पाषाणाला त्याबद्दल क्षमा कर. तें सारें खोटें होतें. तें पत्र मीं तुझी मौज करण्याकरितां स्वतः आपल्या डाव्या हातानें आपणालाच लिहिलें होतें. ही खरी गोष्ट फक्त एक रामभाऊलाच ठाऊक आहे. अरेरे ! काय मी नष्ट चांडाळ करून बसलों हें !"

"छे गडे ! असा शोक करणं आपणां पुरुषांनां चांगलं दिसत नाहीं. ही एक इंदिरा गेली तर आपणाला शेंकडों इंदिरा मिळतील !"

"छे छे इंदिरे ! त्या लाखों इंदिरांनां माझ्या या इंदिरेच्या नखाची सर यायची नाहीं !"

"खरं मनापासून ह्मणायचं हें ? जर मी या प्रसंगांतून वांचल्यें तर कधीं माझा अनादर करायला नाहीं होणार ?"

इंदिरेच्या मुखाकडे दृष्टी लावून गणपतराव ह्मणाले "परमेश्वराला स्मरून सांगतों, इंदिरे, या संकटांतून तुझी मुक्तता होऊन तूं जर या अभाग्याला लाभलीस, तर अतःपर या माझ्या मस्तकावर मी तुला वाहीन !"

"छे गडे, असं भलभलतंच काय बोलावं तें ? मीं वांचल्यें तर आपणाला फार सौख्य होईल, असं आपण ह्मटल्यापासून मलाहि वांचावंसं वाटूं लागलं आहे."

असें ह्मणून इंदिरा उठून बसली. तिला उठतांना पाहून गणपतराव प्रेमानें ह्मणाले "छे छे इंदिरे, उठूं नको, -नीज-नीज. उठण्यानें तुला फार यातना होतील."

"कसल्या यातना ? तें पत्र खोटं, हें आपण सारं-खरं सांगायचं ना ?"

"अगदीं अथपासून इतिपर्यंत खोटें. तुझ्याच गळ्याची शपथ घेऊन मी हें सांगतों."

"मला क्षमा करावी गडे ! मीं आपणाला व्यर्थ कष्ट दिले. मीं विष खाल्लं, ही गोष्टहि अथपासून इतिपर्यंत खोटीच !"

गणपतरावांनीं आश्चर्यानें विचारलें "ह्मणजे ?"

इंदिराबाई हंसत हंसत ह्मणाल्या "ह्मणजे काय ? जशास तसं ! रामभाऊंच्या घरीं बाबूरावांच्या लग्नाला त्या दिवशीं मी गेल्यें होतें, तेव्हां जानकीबाईनीं ही सारी गोष्ट मला सांगितली. तेव्हां मीहि ही थोडी मौज करण्याचा निश्चय केला. आपण कवि ! आपणाला हें असलं नाटक फार आवडेल, असंहि मला वाटलं. सखूला मात्र यांतली थोडी हकीगत माहीत आहे. कारण, मीं तिला आपल्या या कटांत सामील करून घेतली होती. मीं विष खाल्लं नाहीं अन् पुढं कधीं खायचीहि नाहीं, ही आपली खात्री असावी !"

भयंकर संकटांतून मुक्त झालों, असें वाटून एक दीर्घ निःश्वास सोडून गणपतराव हंसत हंसत ह्मणाले "अस्सें एकूण ! बरीच आहेस ह्मणायची तूं ! मी किती घाबरून गेलों ह्मणतेस मघाशीं !"

इतक्यांत शंभ्यानें येऊन बदीं दिली "डाक्टर-साहेब आले आहेत."

गणपतराव घाबरून इंदिरेला ह्मणाले "पाहिलेंस ? आतां अगदीं फजीतीची वेळ येऊन ठेपली. काय करावें बुवा आतां ? आतां तो ह्मणेल तरी काय ?"

इंदिरा हंसून ह्मणाली "अं:, कांहीं नाहीं ह्मणत. त्यांत एवढं भिण्याजोगं काय आहे बाई ? ह्मणावं, 'ती एक मीं मौज केली ! पुष्कळ दिवसांत तुम्ही आलां नाहीं, ह्मणून मुद्दाम अशा तऱ्हेनं बोलावलें !' आहे काय त्यांत मोठंसं ? अन् रात्रीं त्यांनां फराळालाच बोलवावं इकडे, ह्मणजे झालं ! कांहीं फजीती होत नाहीं अन् कांहीं नाहीं !"

फॅन्सी फेअर.

पुण्याचे सेवासदनानें नुकत्याच भरविलेल्या फॅन्सी फेअरचें काम मोठ्या उत्साहानें व फार चांगल्या तऱ्हेनें पार पडलें, ही आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट होय. या फेअरची सविस्तर हकीकत बोधपर होईल असें वाटल्यावरून ती येथें सचित्र देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहों.

पुणें सेवासदनानें जें कार्य आरंभिलें आहे, त्याचें स्वरूप आम्ही याच अंकांत त्रोटकपणें दुसरीकडे दिलें आहे. आमच्या मतें या संस्थेच्या कार्यक्रमांत विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट दिसून येते, ती, आपल्या समाजांतील स्त्रियांच्या अंगीं सार्वजनिक कामाची आस्था व हौस उत्पन्न करणें, आणि तीं कामें करण्यास त्यांची कार्यक्षमता वाढविणें, ही होय. पाश्चिमात्यांच्या विचारसरणीशीं ज्या मानानें दिवसेंदिवस आपला अधिकाधिक परिचय होत जाईल, त्या मानानें त्यांच्या आचारांविचारांकडे, त्यांच्यांतील संस्थांकडे, त्याचप्रमाणें त्यांच्या सार्वजनिक हितसाधनांच्या मार्गांकडे आपल्या समाजांतील स्त्रीपुरुषांचें लक्ष्य लागणें साहजिक आहे. यूरोपिअन संस्कृतीचीं तत्त्वें आपल्या लोकांनां हळुहळू संमत होत चाललीं असून त्यामुळें स्त्रीसमाजाच्या कार्याचें क्षेत्र क्रमाक्रमानें वाढविणें जरूर आहे, असें पुष्कळ देशहितचिंतकांचें मत झालें आहे. राष्ट्रीय प्रगतीच्या कामीं स्त्रियांच्या हातून घडणारा कार्यभाग फार मोठा असल्यामुळें, त्यांनां उच्च दर्जाचें व उदात्त स्वरूपाचें शिक्षण देऊन त्यांच्या अंगीं सार्वजनिक हिताची कळकळ उत्पन्न करणें फार अगत्याचें झालें आहे. अशा उद्देशानें स्त्रीसमाजसुधारणेकरितां ज्या कांहीं थोड्या संस्था आपल्या देशांत निर्माण झाल्या आहेत, त्या सर्वांमध्यें सेवासदन या संस्थेची गणना प्रामुख्यानें करितां येईल.

ज्यांनां आपल्या समाजांतील स्त्रियांच्या सांप्रतकालीन मानसिक उन्नतीचें ध्येय उच्चतर करण्याची आवश्यकता दिसत नाहीं, आणि पूर्वापार चालत आलेली मर्यादेची भ्रामक कल्पनाच ज्यांनां स्त्रियांसंबंधींचें धर्मशास्त्र वाटते, त्यांनां हा नवीन विचारांचा ओघ अप्रिय वाटावा, यांत मोठेंसें नवल नाहीं. मानसिक उन्नतीला—मग ती स्त्रियांची असो वा पुरुषांची असो, शिक्षणाची, कलांच्या ज्ञानाची, आणि आचारविचारांच्या स्वातंत्र्याची अत्यंत आवश्यकता असते. हालचाल करण्यास स्वातंत्र्य मिळालें नाहीं तर मानसिक गुणांचा विकास होण्यास फार अडथळा येतो, हा सार्वत्रिक अनुभव आहे. म्हणून व्यापक प्रकारच्या शिक्षणाच्या व जबाबदारीच्या जाणिवेच्या साहाय्यानें मनुष्यमात्राच्या मनावरचें दडपण काढणें, यापासून सामाजिक कर्तव्यास आरंभ होतो. वरील विचारसरणी लक्ष्यांत घेतली, म्हणजे सेवासदनानें फॅन्सी फेअरसारख्या एका पाश्चिमात्य संस्थेचा उपक्रम कां केला, हें नीट कळून येईल.

वरील सामान्य विचाराशिवाय या फेअरच्या कल्पनेस दुसऱ्या कित्येक गोष्टी कारणीभूत झाल्या, असें तिच्या संबंधीं जें विनंतिपत्रक वांटण्यांत आलें होतें, त्यावरून आढळून येतें. यूरोपिअन स्त्रिया व त्यांचें उदाहरण पाहून पाश्ची किंवा ख्रिस्ती स्त्रिया यांच्यामध्यें कलाकौशल्यादि कामांसंबंधानें जितकी अभिरुचि दृष्टोत्पत्तीस येते, तितकी आमच्या हिंदु स्त्रियांमध्यें दिसून येत नाहीं. चित्रकला, गायनकला, वादनकला, कलाकुसरीचीं कामें, इत्यादि उपयुक्त व मनोरंजक गोष्टी शिकण्याकडे व करण्याकडे लहानमोठ्या घराण्यांतील यूरोपिअन व पाश्ची स्त्रियांचा जितका वेळ जातो, तितका आपल्या समाजांतील स्त्रियांचा जात नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां या विधानास अपवादक अशीं कांहीं उदाहरणें पुणें, मुंबई सारख्या शहरीं सांपडतील, तो भाग निराळा.

हा फरक पडण्याचें कारण, आमच्या मतें, आमच्या हाडामासांत खिळलेल्या स्त्रियांच्या कर्तव्यासंबंधींच्या आकुंचित व अनुदार कल्पनेतच आहे. स्त्रिया म्हणजे काबाडकष्टाच्या धनी; ज्यांची गृहस्थिति चांगली असेल, त्यांनीं घरांत स्वस्थ बसून आळसांत माशा मारीत किंवा गांवांतल्या कुटाळ्या करण्यांत काळ घालवावा; त्यांनां शिक्षणाची, साहित्यसंगीतकलांची कांहीं जरूरी नाहीं, अशीच सामान्य समजूत असते. त्याच इतर सुधारलेल्या समाजांतील स्त्रिया पाहिल्या, तर त्या आपापलीं सांसारिक कामें नीट रीतीनें करून फावल्या वेळांत घरबसल्या निरनिराळीं कलाकौशल्यांचीं कामें करीत असतात. त्यायोगें त्यांचा वेळ मोठ्या मौजेनें जाऊन त्यांच्या ठिकाणीं मृदुता, सौंदर्यग्राहकता, सहृदयता, मार्मिकपणा वगैरे मानसिक गुण विकसित होऊन त्यांच्या स्वभावाला गुणांच्या परीक्षेचें वळण लागतें, सुशोभित वस्तूंचें दृश्य सगळतें, वृत्ति उल्हसित करितां येतात, अंगीं टापटीप आणि नीटनेटकेपणा येतो, गृहकृत्यांत व संसारांत व्यवस्था, हुषारी, स्वच्छता, मनोहारित्व हे गुण जास्त प्रमाणानें दाखवितां येतात. सारांश, कलाकौशल्यांचीं कामें करण्यांत स्त्रियांनां स्वाभाविक उत्साह व आह्लाद वाटतो, व त्यामुळें त्यांच्या अंगच्या नैसर्गिक गुणांस विशेष रमणीयता प्राप्त होते, आणि या सर्व गोष्टींचा परिणाम व्यक्तीच्या वर्तनावर व आचारविचारांवर जसा झालेला दृष्टीस पडतो, त्याचप्रमाणें सर्व सामाजिक व्यवहारामध्येंहि तो दृग्गोचर होऊं लागून समाजसुधारणेच्या कामीं त्यापासून फार मदत होते. तात्पर्य, कलाकौशल्याच्या ज्ञानाच्या योगानें स्त्रीसमाजाचें पाऊल बरेंच पुढें पडतें, असें म्हटलें तरी चालेल.

या दिशेनें आपल्या समाजांतील स्त्रियांना विचार करावयास लावणें फार फायद्याचें आहे, असें वाटत असणाऱ्या सेवासदनाच्या बऱ्याच सभासदांच्या मनांत फार दिवसांपासून महाराष्ट्रीय स्त्रियांनीं केलेल्या कलाकौशल्याच्या कामांचें एक प्रदर्शन भरवावें, असें होतें. परंतु तें कार्य कदाचित् आपणाला एकदम झेंपणार नाहीं, असें वाटून त्यांनीं त्या कार्याचा पहिला प्रयत्न म्हणून ही 'फॅन्सी फेअर'ची कल्पना गेल्या जानेवारी महिन्यांत पसंत केली, व सेवासदनाची मुख्य अडचण इमारतीसंबंधाची असल्यामुळें, या फेअर किंवा जत्रेपासून जें उत्पन्न होईल तें सेवासदनाच्या इमारत-फंडास द्यावें, असें ठरविलें. हा विचार कायम झाल्यावरोबर त्या फेअरची जुळवाजुळव करण्याच्या खटपटीस सेवासदनाच्या सभासद स्त्रिया लागल्या. त्यांनीं प्रथम होतां होईल तों पुण्यांतील स्त्रीवर्गाकडून जेवढा निरनिराळा उपयुक्त व नमुनेदार माल तयार होईल तेवढा करावा असें ठरविलें, व मालाला लागणाऱ्या सामानाची सिद्धता करण्याकरितां आपसांत एक हजार रुपये कर्जाऊ गोळा केले, व त्याचबरोबर पुण्यांतील यूरोपिअन, खिस्ती, पार्शी, गुजराथी व मारवाडी स्त्रियांची मदत संपादन केली. या कामांत मुंबईतील स्त्रियांनीं-व त्यांतहि विशेषतः पाठारे प्रभु आणि सारस्तबाह्मण ज्ञातीतील स्त्रियांनीं-बरेंच प्राबीण्य संपादन केलें आहे, म्हणून त्यांच्या मदतीची जोड या कामास मिळावी व दुसऱ्या समाजांतील स्त्रियांच्या सामानाची व साहाय्याची भर पडावी, या सहकारित्वाच्या बुद्धीनें मुंबईतील कित्येक प्रमुख स्त्रियांना विनंति करण्यांत आली होती.

सामानाची जसजशी जुळवाजुळव होऊं लागली, तशी या फॅन्सी फेअरची व्यवस्था पाहण्यासाठीं एक स्त्रियांची कमिटी स्थापन करण्यांत आली. या कमिटींत श्रीमती रमाबाई-साहेब रानडे, मिसेस् प्रायर, मिसेस् टर्नबुल, मिस् मुशी सोराबजी, मिसेस् हिराबाई पदमजी, मिसेस् जहांगीर इत्यादि स्त्रियांची सभासदांमध्यें निवड होऊन श्रीमती सौ. सीताबाई भांडारकर आणि श्रीमती सीताबाई डुकले यांनां या कमिटीच्या सेक्रेटरी नेमण्यांत आलें, व पुढील कामाची व्यवस्था पाहण्याकरितां श्रीयुत कामत, श्रीयुत आपटे, रा. ब. शेट रामनारायण, रा. ब. पटवर्धन, प्रो. कानिटकर, श्रीयुत देवधर, श्रीयुत वझे व श्रीयुत भावखंडे इत्यादि गृहस्थांची एक साहाय्यक कमिटी नेमण्यांत येऊन या कमिटीचे श्रीयुत देवदत्त रामकृष्ण भांडारकर, एम्. ए., यांनां सेक्रेटरी नेमण्यांत आलें. मुंबईतील प्रमुख स्त्रियांची एक कमिटी नेमण्यांत येऊन त्या कमिटींत हिंदू लेडीज् सोशल क्लब, आर्यमहिलासमाज, व गुजराथी स्त्रीमंडळ इत्यादि मुंबईतील स्त्रीसंस्थांच्या प्रमुख स्त्रियांचा समावेश केला होता. या कमिटीच्या अध्यक्ष श्रीमती सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर या असून श्रीमती सौ. माणकबाई कोठारे या सेक्रेटरी होत्या. शिवाय श्रीमती सोनाबाई जयकर, श्रीमती सौ. जमनाबाई सचदे, श्रीमती सौ. मंजुळाबाई लाड, श्रीमती सौ. रमाबाई खरे इत्यादि स्त्रिया सभासद होत्या.

मुंबईतील स्त्रियांकडून या फॅन्सी फेअरच्या कामीं फारच चांगली मदत झाली. हिंदू लेडीज् सोशल क्लबामार्फत श्रीमती सौ. माणकबाई कोठारे यांनीं दोन रुप्याचे पेले, आलेल्या सामानाची परीक्षा करून उत्तम ठरेल त्यास बक्षीस देण्याकरितां दिले. याशिवाय फॅन्सी फेअरच्या फंडास मदत म्हणून रोख ७५० वर रुपये पाठविण्यांत आले. धर्मादाय म्हणून रु. २०० किंमतीचे सुमारें १०० निरनिराळ्या प्रकारचे नग पाठविण्यांत आले, आणि त्याखेरीज सात आठशें रुपये किंमतीच्या मालाचे दोनशेअडीचशें लहान-मोठे कौशल्याचे सुंदर नग पाठविण्यांत आले होते. आणि विशेष आनंदाची गोष्ट ही कीं, समारंभास हजर राहून स्वतः स्टॉलवर विक्री करण्याचें कामहि आमच्या कित्येक मुंबईकर भगिनींनीं केलें.

पुण्यांतील स्त्रियांनीं व सेवासदनांतील विद्यार्थिनींनीं बऱ्याच मेहनतीनें ६००।७०० लहानमोठे निरनिराळ्या कामांचे जिन्नस तयार केले होते. यूरोपिअन स्त्रियांनीं स्वतंत्रपणें वर्गणी गोळा करून सामानहि गोळा केलें होतें, व तयार केलें होतें. त्या सर्वांचें निव्वळ उत्पन्न साडेपांचशें रुपये झालें. मुंबईतील स्कॉटिशमिशनच्या मिस् सदरलंड बाईनींहि सामान पाठविलें होतें. मुंबईतील स्त्रियांनीं व पुण्यांतील पार्शी व ज्यू स्त्रियांनीं चित्रकलेचें उत्कृष्ट सामान पाठविलें होतें. खुद्द लेडी क्लार्क यांनीं आपण स्वतः काढिलेलीं सात सुंदर चित्रें पाठविलीं होतीं.

ही फॅन्सी फेअर उघडण्याचा समारंभ लेडी क्लार्क, आपल्या गव्हरनर साहेबांच्या पत्नी, यांच्या हस्तें मोठ्या थाटानें सप्टेंबर ता. २६ गुरुवार रोजीं झाला. या समारंभाकरितां निरनिराळे खेळ, व घरगुती स्त्रियांच्या करमणुकीच्या खेळांचे प्रकार निरनिराळे तंबू ठोकून दाखविले होते. हा समारंभ श्रीयुत बाबासाहेब कामत यांच्या गणेशखिंडरस्त्यावरील नवीन बांधलेल्या सुंदर बंगल्यांत सीन दिवस झाला. या बंगल्याभोंवतीं एक चांगला प्रेक्षणीय बगीचा असल्यामुळें, व जिकेडतिकडे पताका, निशाणें, तोरणें, चित्रविचित्र रंगांचे दिवे लाविले असल्यामुळें तो देखावा मोठा मनोवेधक दिसत होता. बंगल्यांतील दिवाणखान्यास लतापल्लवांनीं व पुष्पांनीं विशेष शोभा आणिली होती. या फेअरकरितां गोळा केलेलें सामान दिवाणखान्यांत व बरच्या खालच्या खोल्यांत टेबलावर मोठ्या कौशल्यानें मांडिलेलें होतें. तेथें मांडलेले जिन्नस निरनिराळ्या प्रकारचे असून त्यांत तऱ्हतऱ्हेचें शिवणकाम, कशीदाचें काम, लोंकरीचें काम, कलाबतूचें काम, जाळीचें काम, वस्त्रें नेसविलेल्या चित्रांचें काम, विणीचें काम, कांचेवरील चित्रकलेचें काम, कांचेच्या रॅक्स्, कातड्यांवरील नकशीचें काम, रेशमी कापडावरील व मखमालीवरील रंगांचें काम, कुशन्स्, टोप्या, फीत, जरीचे कांठ, निरनिराळीं पक्कान्नें इत्यादि वस्तूंचा समावेश करण्यांत आला होता. एका खोलींत श्रीमंत सौभाग्यवती वाराणशीबाई विंचूरकर यांनीं केलेला हिरव्या पोतीचा एक सुंदर व प्रेक्षणीय बगीचा मांडला




श्रीमती सौ. सीताबाई भांडारकर. श्रीमती सीताबाई डुकले.

खास मनोरंजनासाठी. फॅन्सी फेअर कमिटीच्या सेक्रेटरीज. फोटोग्राफर्स—वॅनहाऊस आणि कंपनी, पुणे.




१ श्रीमती सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर. (सौ लक्ष्मीबाई रानडे, मिस लाड,) यांचा स्टॉल.
२ श्रीमती सौ. माणकबाई कोठारे (मिसेस सातपुते व एक पारशी स्त्री यांचा स्टॉल)

खास मनोरंजनासाठी. फोटोग्राफर्स—बेंकहाऊस आणि कंपनी, पुणे.



१ मिसेस थायर आणि मिसेस टर्नबुल यांची स्टॉल.
२ श्रीमती सौ. मंजुळाबाई लाड (आणि त्यांच्या कन्या) यांचा स्टॉल.


खास मनोरंजनासाठी. फोटोग्राफर्स—वेंकटेश्वर आणि कंपनी, पुणे.




फॅन्सी फेअर कमिटीतील कार्ती सभासद आणि वर्कर्स..

खास मनोरंजनासाठी.

फोटोग्राफर्स—वेंकटाकृत आणि कंपनी, पुणे.



फॅन्सी फेअरचा सर्वसाधारण देखावा.




१ उंटावरील स्वारीचा देखावा.

२ इंडियन-रिफ्रेशमेंट.

खास मनोरंजनासाठी.


फोटोग्राफर्स—वेंकटहाऊस आणि कंपनी, पुणें.



१ फिशपाड

२ श्रीमती अन्नपूर्णाबाई आपटे आणि मिसेस जोगळेकर याचे स्टॉल्स

मनोरंजन.



एस मनोरंजन डे.

भीखुल एस. के गोखले, बुधवार पेठ,

होता. या बगीच्यांचें काम इतकें सुदक आणि मनोवेधक रीतीनें करण्यांत आलें होतें, कीं, प्रेक्षक बराच वेळपावेतों तल्लीन होऊन तो पहात असे. श्रीमती सौ. बाराणशीबाई किबुकर यांनीं दाखविलेल्या या कलेंतील प्राचीण्याबद्दल आह्मी त्यांना धन्यवाद देऊन त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. याच दालनांत दुसरीकडे चैत्रांतील गौरीची आरास, गणपतीचा उत्सव, हिंदु पद्धतीचा लग्नसमारंभ, व नव्या जुन्या पद्धतीचें हिंदु कुटुंब वगैरे शोभिवंत चित्रसमुदाय मांडण्यांत आले होते. दुसऱ्या दालनांत निरनिराळ्या प्रकारचीं स्त्रीपुरुषांनीं काढिलेलीं चित्रें, तसविरा, पेंटिंग्ज् हीं मांडिलीं होतीं.

फॅन्सी फेअर ही यूरोपिअन पद्धतीची संस्था असल्यामुळें, व अशा प्रसंगीं स्त्रियाच विक्री करितात अशी पद्धत असल्याकारणानें, लाचप्रमाणें ही सर्व जुळवाजुळव मोठ्या खटपटीनें स्त्रियांनींच केली असल्यामुळें, या जत्रेंत मांडण्यांत येणारा माल स्त्रियांनींच विकावा, असें ठरविण्यांत आलें होतें. या कामासाठीं मोठमोठ्या, घरंदाज, सुशिक्षित, पोक्त व सार्वजनिक कामांसंबंधीं उत्साही अशा स्त्रियांना विनंति करण्यांत आली होती. या जत्रेंत एकंदर पंधरा स्टॉल्स होते, व त्यांवर मुंबईच्या श्रीमती सौ. लेडी चंदावरकर, श्रीमती सौ. माणकबाई कोठारे, श्रीमती सौ. मंजुळाबाई लाड व कुमारी लाड, श्रीमती सौ. लक्ष्मीबाई रानडे, व पुण्यांतील मिसेस् आजेरकर, मिसेस् अन्नपूर्णाबाई आपटे, मिसेस् रमाबाई आपटे, मिसेस् यमुनाबाई भट, मिसेस् जोगळेकर, मिसेस् शांताबाई रानडे, मिसेस् सातपुते, मिसेस् गंगाबाई रानडे, मिसेस् देव, मिसेस् भगत, मिसेस् रंगूबाई गोखले, मिसेस् शिखरे, मिसेस् गोडे, मिसेस् पार्वतीबाई रानडे, मिसेस् रमुताई भट, मिसेस् राधाबाई रानडे वगैरे स्त्रिया बसल्या होत्या. यांशिवाय एक यूरोपिअन स्त्रियांचें स्टॉल असून त्यावरील विक्रीचें काम मिसेस् प्रायर, मिस् प्रायर व मिसेस् टर्नबुल यांनी केलें. दुसऱ्या एका स्टॉलवर मिसेस् जहांगीर व मिस् जिजीमाई या बसल्या होत्या. याखेरीज एका मोठ्या दालनांत यूरोपिअन पद्धतीच्या उपाहाराचें एक स्टाल असून त्याची व्यवस्था मिसेस् स्टीव्हनसन, मिसेस हिराबाई पदमजी व आणखी एक युरोपिअन व पार्शी स्त्री यांनी उत्कृष्ट रीतिनें केली होती. मागील अंगणांत श्रीमती सोनाबाई जयकर यांच्या खटपटीनें मुंबईहून आलेल्या श्रीमती सौ. माणकबाई मेलोक्यकर व कुमारी बाबलीबाई कोठारे यांनीं अष्टमुजेचें रांगोळ्यांनीं फारच हृदयंगम चित्र काढिलें होतें. बाहेरच्या बाजूस किशपॉटचें (गळ टाकून निरनिराळ्या जिनसा एका खड्ड्यांतून वर काढणें) काम मिस नायगामवाला, मिसेस् रानडे व मिसेस् मथुराबाई गोगटे या करीत होत्या. दुसऱ्या एका तंबूंत फुगड्या वगैरे खेळ खेळणाऱ्या मुली जमविल्या होत्या, व त्या कामाची देखरेख मिसेस् गोखले, मिसेस् ठोसर, मिसेस् भट व मिसेस खरे यांच्याकडे होती. हिंदुउपहाराची व्यवस्था बाहेरच्या बगीच्यांत करण्यांत आली होती व तेथील काम सेवासदनाच्या विद्यार्थिनी व शिक्षकिणी करीत होत्या. शिवाय करमणुकीकरितां म्हणून पहिल्या दिवशीं श्रीमंत पंतसचीव यांचा हत्ती व फौजखात्याकडून दोन उंट मागविण्यांत आले होते.

अशी एकंदर तयारी असल्यानंतर हा समारंभ व ही जत्रा मोठी अपूर्व व आल्हादजनक झाली, हें सांगणें नकोच. वर नमूद केलेल्या निरनिराळ्या देखाव्यांचे व प्रसंगांचे आह्मीं या लेखांत सुंदर फोटो दिले आहेत, त्यांवरून वाचकांस या फेअरची अस्पष्ट कल्पना होईल. ही फेअर उघडण्याच्या समारंभापूर्वी बँडच्या वाद्यांचा उत्साहवर्धक आवाज सर्वांना उत्तेजन देत होता. लेडी क्लार्क या पहिल्या दिवशीं दुपारीं ४॥ वाजतां आल्या व त्यांच्या हस्तें ही जत्रा उघडण्यांत आली. या प्रसंगीं गांवांतील नामांकित स्त्रीपुरुष जमले होते. त्या सर्वांना बसण्याची व्यवस्था एका शॅमियानामध्यें केली होती. या प्रसंगास उद्देशून लेडी क्लार्क यांनीं जें भाषण केलें, तें विशेष बोधपर असून त्यांत त्यांनीं सेवासदनाच्या कामाचा गौरव केला होता, आणि कलाकौशल्याचें महत्व व उपयुक्तता यांसंबंधानें आपले विचार प्रगट करून हिंदी स्त्रियांनीं त्यांचें ज्ञान संपादन करावें असा उपदेश केला होता, व शेवटीं सेवासदनाच्या इमारतफंडास या जत्रेपासून चांगली मदत होवो, अशी इच्छा प्रदर्शित केली होती. लेडी क्लार्क यांचे आभार श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांनीं योग्य शब्दांनीं मानिले. नंतर लेडी क्लार्क जत्रा उघडण्याकरितां बंगल्याकडे गेल्या. तेथें मुलींनीं एक पद्य म्हणून त्यांचें स्वागत केलें. मग लेडी क्लार्क यांनीं विक्रीस आरंभ केला. सर्व स्टॉलवर जाऊन त्यांनीं प्रत्येक ठिकाणीं कांहींतरी जिन्नस खरेदी केला, निरनिराळे देखावे मोठ्या चौकसबुद्धीनें पाहिले, उपाहार केला, फुगड्या पाहून त्या फार खुष झाल्या, व त्यावर देखरेख करणाऱ्या स्त्रियांचें, मुलींची शिस्त व चपलता पाहून, त्यांनीं अभिनंदन केलें. अशा रीतीनें त्यांनीं या ठिकाणीं सुमारें दीड तास मोठ्या आनंदांत घालविला. त्यांनीं २७५ रु. चा माल खरेदी केला.

पहिल्या दिवशींच्या समारंभास एक हजार स्त्रीपुरुष आले असून त्यांत कौंसिलचे बहुतेक मेंबर्स, सरकारी अधिकारी, सरदार, जहागीरदार, पार्शी, युरोपिअन वगैरे प्रमुख मंडळी पुष्कळच होती. हा समारंभ अशा प्रकारचा पहिलाच होता, तरी गांवांतील लोकांनीं माल चांगला खरेदी करून सेवासदनासंबंधीं आपली सहानुभूति उत्तम तऱ्हेनें व्यक्त केली. या दिवशीं एकंदर विक्री एक हजारावर झाली. दुसऱ्या दिवशीं, तो दिवस फक्त स्त्रियांकरितांच असल्यामुळें ८००।९०० स्त्रिया जमल्या होत्या व गांवापासून फॅन्सीफेअरचें ठिकाण दोन मैलांच्या अंतरावर होतें, हें लक्ष्यांत घेतलें, म्हणजे एवढा स्त्रीसमाज जमला, हें कशाचें द्योतक आहे हें कळून येईल. या दिवशीं बाईच्या बेगमसाहेब, मानाबरच्या बेगमसाहेब, ना. आगाखानच्या कुटुंबांतील मंडळी व सरदारजहागीरदारांच्या स्त्रियाहि आल्या होत्या. या दिवशीं विक्री सुमारें ६००।७०० रुपयांची झाली. तिसरा दिवस विशेषतः विद्यार्थ्यांचा होता, तरी इतर बरेच स्त्रीपुरुष जमले होते. या दिवशीं विक्री सुमारें ४०० रुपयांची झाली.

या तिन्ही दिवशी स्त्रियांनीं आपापलीं नेमलेलीं कामें मोठ्या उत्साहानें, सौजन्यानें, शिस्तीनें, सार्वजनिक कार्यबुद्धीनें, बिनबोभाट कशीं केलीं हें ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें असेल, त्यांना, योग्य शिक्षण व सवलत मिळाल्यास आमच्या स्त्रियांच्या अंगी सार्वजनिक व सामाजिक कामांची आस्था व कार्यक्षमता किती लवकर उत्पन्न होतील, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

या फेअरमध्यें काम करणाऱ्या एका ११ वर्षांच्या मुलीनें जपानी मुलीच्या पोषाखांत आपले काढिलेले कांहीं फोटो विकले, व स्टॉलवर बसलेल्या एका उच्चकुलीन व प्रमुख स्त्रीच्या ठिकाणीं परमेश्वरकृपेनें विशेष सौंदर्य व नीटनेटकेपणा होता, एवढ्याचबद्दल, कित्येक संशयानें पछाडिलेल्या लोकांस वाईट वाटल्याचें आमच्या ऐकण्यांत आलें आहे, व 'मालाच्या किंमतीपेक्षां या मिनाबाजारांत सौंदर्याचीच किंमत अधिक होती,' असेहि क्षुद्रबुद्धीनें सांगण्यांत आलें आहे. परंतु अशा तर्कटावरून दिसणारा मनाचा कोतेपणा व वृत्तीची अनुदारता जरी विचारांत घेतलीं नाहींत, तरी त्यावरून हिंदु समाजांत दृढमूल झालेली स्त्रियांसंबंधींची संशयाची बुद्धि व त्यांना मोकळेपणानें चारचौघांत स्वतःच्या हिंमतीवर वागूं न देण्याचा मनाचा कल, हीं मात्र चांगलीं व्यक्त होतात! सुदैवानें असा संशयग्रस्त वर्ग दिवसेंदिवस कमी होत चालला आहे, व पुरुषांप्रमाणें स्त्रियांच्या ठिकाणीं स्वतंत्रपणें सार्वजनिक कामें करण्याची जी उत्कट इच्छा दिसूं लागली आहे तिला यथायोग्य वाव देण्यास बराच सुशिक्षित वर्ग आज तयार झाला आहे. ज्यांनां काल्पनिक भीतीस्तव स्वस्थ बसावेंसें वाटतें, ते निश्चेष्ट व निस्तेजच राहणार; एकंदर समाज त्यांच्याकरितां कांहीं पुढें गेल्याशिवाय राहणार नाहीं. कारण, शारीरिक बल कमावण्याकरितां जसें आखाड्यांत उतरावें लागतें, किंवा मैदानांत खेळावें लागतें, तसेंच सार्वजनिक कामें करण्यासाठीं अंगी लागणारे गुण येण्याला सार्वजनिक कामांच्या आखाड्यांतच केव्हांना केव्हांतरी आलें पाहिजे. भीतीनें हातपाय मोडतील म्हणून स्वस्थ बसणारा माणूस जसा खरा बलवान् होऊ शकत नाहीं, त्याचप्रमाणें सार्वजनिक कामांच्या आखाड्यांत किंवा पटांगणांत चारचौघांशीं वागण्याचा प्रसंग आल्याशिवाय माणसाच्या ठिकाणीं—मग पुरुष असो किंवा स्त्री असो—हें परस्परसंघट्टनानें मिळणारें शिक्षण व बल कधींहि प्राप्त व्हावयाचें नाहीं!

जातां जातां, एका आल्हादकारक गोष्टीचा येथें निर्देश करणें आह्माला आवश्यक वाटतें. सेवासदनाच्या या फॅन्सी फेअरला साहाय्य करण्यासाठीं मुंबईहून ज्या स्त्रिया मुद्दाम पुण्यास गेल्या होत्या, त्यांना श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांनीं एक खासगी मेजवानी दिली. पुण्यांतील ज्या उदार अंतःकरणाच्या सुशील यूरोपियन स्त्रिया तेथील हिंदी स्त्रियांशीं सर्व कार्यांत सहानुभूतिपूर्वक वारंवार मिसळतात, अशा कांहीं स्त्रियांनाहि या मेजवानीला मुद्दाम निमंत्रण करण्यांत आलें होतें. या स्त्रियांनां दिलेल्या हिंदुपद्धतीच्या मेजवानीचा मुद्दाम घेतलेला फोटो या लेखांत आम्हीं दुसरीकडे दिलाच आहे. हिंदु समाजाच्या प्रगतीसाठीं यूरोपियन, पार्शी, ख्रिस्ती, मुसलमान इत्यादि निरनिराळ्या जातींमध्यें असें प्रेमाचें दळणवळण सुरू होणें अत्यंत आवश्यक आहे, व समाजाविषयीं कळकळ बाळगणाऱ्या, धीराच्या अनेक पुरुषांनीं या बाबतींत कांहींशी मजलहि मारली आहे; परंतु पुरुषांप्रमाणें आमच्या स्त्रीवर्गाकडून या बाबतींत पुढें पाऊल पडणें अत्यंत इष्ट असतांहि त्यांचें इतर समाजांतील स्त्रियांशीं असें प्रेमाचें व सहानुभूतीचें दळणवळण सुरू झाल्याचें फारसें कोठें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांनीं या बाबतींत केलेला स्तुत्य उपक्रम पाहून आह्माला फार संतोष वाटतो. असेच वरचेवर प्रसंग येऊन यूरोपियन व हिंदी समाजांतील स्त्रियांमधील प्रेमभाव उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जावो, असें आम्ही इच्छितों.

या फॅन्सी फेअरपासून सेवासदनाकडे सर्व महाराष्ट्राचें लक्ष्य वेधलें गेलें, व या फेअरनें महाराष्ट्रांतील स्त्रीवर्गास स्वावलंबनाचा एक नवीन धडा घालून दिला, याबद्दल सेवासदनाच्या चालकांचें, व त्यांतहि विशेषतः हें कार्य आपल्याकडे अपूर्व, अतएव पुष्कळांशीं विकट व अतिशय अडचणीचें असतांहि अत्यंत परिश्रम घेऊन तें उत्तम प्रकारें यशस्वी करून दाखविल्याबद्दल फॅन्सीफेअरसाहाय्यक कमिटीचे सेक्रेटरी श्रीयुत देवदत्तराव भांडारकर, एम्. ए., आणि त्याचप्रमाणें स्त्रियांच्या कमिटीच्या सेक्रेटरी श्रीमती सौ. सीताबाई भांडारकर व श्रीमती सीताबाई डुकले या उभय भगिनींचें आह्मी मनःपूर्वक अभिनंदन करितों.

प्रिय वाचकहो!

महाराष्ट्रीय मासिकपुस्तकांचा व त्याबरोबरच महाराष्ट्रवाङ्मयाचा दर्जा वाढविण्यासाठीं मनोरंजनानें आज सतरा वर्षें एकनिष्ठपणानें चालविलेले अखंड प्रयत्न आपल्या दृष्टीसमोर आहेतच. प्रस्तुत अंकानें त्या प्रयत्नांचें मूर्त स्वरूप आपणांला चांगलें दिसून येईल, अशी त्याला पूर्ण उमेद आहे. मनोरंजनाचा उत्साह व हिंमत वाढवून त्याच्याकडून यापेक्षांहि अधिकाधिक साहसाचे प्रयत्न करवून घेणें, हें आपलें कर्तव्य आहे. परंतु केवळ शाब्दिक सहानुभूतीनें हें काम होणारें नसून त्याला प्रत्यक्ष साहाय्याची आवश्यकता आहे. आपण मनोरंजनाचे वर्गणीदार नसल्यास ताबडतोब वर्गणीदार होऊन व आपल्या मित्रांनां शिफारस करून त्यांचाहि मनोरंजनास आश्रय मिळवून द्या व महाराष्ट्रसारस्वताची सेवा करून त्याचें बल वृद्धिंगत करण्यास मनोरंजनाचें सामर्थ्य वाढवा, एवढीच आपणांस नम्र विनंति आहे.

स्टँडर्ड ऑईल कंपनी
आफ् न्यू यॉर्क,
वेलार्डरोड, मुंबई.

घासलेट तेलें.

घरांत वापरण्याकरितां.
रस्त्यांवरील बत्त्यांकरितां.
रेलवे स्टेशनांकरितां.
सार्वजनिक इमारतींकरितां.
दुकानांकरितां. वगैरे, वगैरे.

स्नोफ्लेक	छाप १५०°	पेट्यांत आयात होऊन पेट्यांत विकली जाणारी तेलें.
चेस्टर	„ १२५°	
मंकी (वानर)	„ १२५°	
हत्ती	„ १२५°	सुटें व टिनच्या डब्यांत.

हीं तेलें फार नांवाजलेलीं आहेत. तेलांची जात नेहमीं एकसारखीच असते.

मशीनरीकरितां तेलें.

पॅराफिन ग्यास ऑइल.

आईलएंजिनाकरितां अप्रतिम.
ग्यास उत्पन्न करण्याकरितां
फक्त हेंच अस्सल तेल आहे!

लुब्रिकेटिंग तेलें.

जिनिंग, ॲक्सलस्, शाफ्टिंग, एंजिन, सिलिंडर,
स्पिंडल वगैरे सर्व जातीचीं, आणि उंच प्रतीचीं.

प्रॅटस् मोटोर स्पिरिट.

खऱ्या उंच प्रतीचें मोटोर स्पिरिट हिंदुस्थानांत फक्त हेंच आहे!

मोटोर ऑइलस्	टरपेनटाईन
वॅक्स (खनिज मेण)	प्रॅटस प्युअर
ग्रीज	स्पिरिट.

[44]

पत्ताः—

स्टॅडर्ड ऑईल कंपनी ऑफ न्यूयॉर्क,
वेलार्डरोड—मुंबई.

घडीच्या वाजाच्या

पेट्या.

'धि महाराज'


आणि

'धि महाराणी'

टेबल हारमोनियम

किं. रु. १० पासून २००

रु. पर्यंत.



घडीच्या वाजाच्या

पेट्या.

(फोल्डिंग ऑरगन्स)

अमेरिकन पेट्या

किंमत रु. १६९ पासून

६०० रु. पर्यंत.


ग्रामोफोन आणि पाथेफोन रु. ४० पासून २७५ रु. पर्यंत.

लष्करी बँड.

संपूर्ण बँडच्या

किंमती कळवि-

ण्यांत येतील.



देशी संस्थानांत

लागणारे बँड.

प्रत्येक जातीचें वाद्य

आमच्या संग्रहांतून

पुरविलें जाईल.

रु. २० पासून २७५ रु. पर्यंत.

बँड तयार करण्यांत येतात. बँड वाजविणारे मिळवून देण्यांत येतात.

गिऱ्हाइकांच्या समाधानाबद्दल हमी.

सचित्र कॅटलाग मागतांच फुकट पाठविण्यांत येतात. [45]

साउंडी आणि कंपनी, लि., मुंबई.

(स्थापन होऊन ५२ वर वर्षें झालीं.)

[46] **THE SURE WAY TO THE BEST SITUATIONS.**

is to possess an International Correspondence Schools' introduction. It is a badge of reliability—a voucher of THOROUGH TRAINING in your particular work. The best employers everywhere know International Correspondence Schools' men are the BEST TRAINED MEN in the ranks of the ambitious—welcome them as men able to take responsible positions—men too good for MERE ROUTINE AND DRUDGERY.

Spare time study only is necessary in any of the 150 different International Correspondence Schools' Courses.

Write at once for full (free) particulars to the

INTERNATIONAL CORRESPONDENCE SCHOOLS OF LONDON,

Dept. 63-V, 11, Hamam Street, Fort, Bombay.

Gold Medal Award—Bombay Exhibition.

या कंपनीशी कोणताहि पत्रव्यवहार करताना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

डॉ. बी. आर्. गुणे यांचें

सर्व प्रकारच्या तापावर

ॲन्टीफेब्रॉईड (एग्यु) मिक्श्चर व टॅबलेट्स्.

[47] मिक्श्चर किं० १२ आणे व टॅबलेट्स् किं. १० आणे.

हें नांवाजलेलें व गुणांनीं पहिल्या नंबरचें ठरलेलें रामबाण औषध नामांकित डॉक्टरांनीं व मोठमोठ्या सद्गृहस्थांनीं वापरून उत्तम ठरविलें आहे. सर्व लोक आजकाल याचे उत्तम गुण पाहून तापावर याच औषधाचा जास्त उपयोग करीत आहेत. या औषधांत अपायकारक असें कोणतेंच द्रव्य नसल्यामुळें हें औषध सर्वांनीं निर्धास्त वापरण्यास योग्य असें जाहलें आहे. हें रामबाण औषध ताप, हिवताप, मलेरिया, एक दिवसाआड येणारा, चातुर्थिक, पित्तज्वर, विषमज्वर, आगंतुकज्वर, जीर्णज्वर वगैरे सर्व प्रकारचे ताप हटकून बरें करितें. यांत बिलकूल क्किनाईन नाहीं,

ॲन्टीफेब्रॉईडच्या उत्तम गुणावद्दल प्रख्यात डॉक्टरांच्या सर्टिफिकीटांपैकीं कांहीं खालीं दिलीं आहेत. त्यावरून वाचकांची खात्री होईलच.

डॉ. राघ. वर्मा:—'ॲन्टीफेब्रॉईड हें मला फार गुणकारी वाटलें आहे. तरी आणखी ६ बाटल्या व्ही. पी. नें पाठवा,' ह्मणून तारेनें कळवितात.

डॉ. स्मेल आर्. ए. एम्. सी., सर्जन, पुणें:—मलेरिया वगैरे सर्व प्रकारच्या तापावर चालणारें हे ॲन्टीफेब्रॉईड वापरण्याविषयीं शिफारस करण्यांत मला फार आनंद वाटतो. हें गुणकारी असल्यावद्दल माझी पूर्ण खात्री आहे.

डॉ. बी. आर. गुणे यांचा उंची मेंथा बाम. किं. ५ आणे.

हा बाम, डोकें दुखणें, डोकें जड वाटणें, सांधे ठणकणें, सूज, लचक, ठेंच, खोकला, छातींतील विकार, दंतशूल, विषारी प्राण्यांचे दंश, वगैरे दुखीवर अत्यंत गुणावह आहे. गुण तात्काळ येऊन फार आराम वाटतो. हा हजारों लोकांनीं वापरून सर्वोत्कृष्ट ठरविला आहे. शिफारसपत्रें:—

डॉ. चिंतामण राघजी पांगारकर, सब असिस्टंट सर्जन नागपूर:—डॉ. गुणे यांचा मेंथाबाम मी स्वतः व इतर रोही व रोग्यांनां वापरण्यास देऊन पाहिला, व कळविण्यास आनंद वाटतो, कीं, कितीहि व कसेंहि डोकें दुखत असल्यास तत्काळ आराम पाडून यानें हुषारी येते. मीं पुष्कळ प्रकारचे बाम वापरले पण डॉ. गुणे यांच्या बामाची बरोबरी कोणासहि करवणार नाहीं.

डॉ. गुणे यांचें नारूवर पोटांत घेण्याचें रामबाण औषध:—यानें कितीहि नारू असले तरी निःसंशय बरे होतात. किं० १ रुपया.

डॉ. गुणे यांचें डांग्या खोकल्यावर खात्रीचें औषध:—या खोकल्यावर खात्रीचा इलाज नाहीं अशी समजूत आहे. ती आमच्या औषधानें दूर केली जाते. किं० १॥ रु.

धि स्पेसिफिक होम, बुधवारपेठ सिटी,

मुंबई सोल एजंट, गोविंद यशवंतराव शिंदे, काळा चौकी रोड, पो० परळ मुंबई.


घडीच्या बाजाच्या पेट्या.

'धि महाराज'

आणि

'धि महाराणी'

टेबल हारमोनियम किं. रु. १० पासून २०० रु. पर्यंत.



घडीच्या बाजाच्या पेट्या.

(फोल्डिंग ऑरगन्स)


अमेरिकन पेट्या

किंमत रु. १६१ पासून ६०० रु. पर्यंत.

ग्रामोफोन आणि पाथेफोन रु. ४० पासून २७५ रु. पर्यंत.

लष्करी बँड.

संपूर्ण बँडच्या किंमती कळविण्यांत येतील.



देशी संस्थानांत लागणारे बँड.

प्रत्येक जातीचें वाद्य आमच्या संग्रहांतून पुरविलें जाईल.

रु. २० पासून २७५ रु. पर्यंत.

बँड तयार करण्यांत येतात. बँड वाजविणारे मिळवून देण्यांत येतात.

गिऱ्हाइकांच्या समाधानाबद्दल हमी.

सचित्र कॅटलाग मागतांच फुकट पाठविण्यांत येतात. [45]

साउंडी आणि कंपनी, लि., मुंबई.

(स्थापन होऊन ५२ वर वर्षे झालीं.)

[46] **THE SURE WAY TO THE BEST SITUATIONS.**

is to possess an International Correspondence Schools' introduction. It is a badge of reliability—a voucher of THOROUGH TRAINING in your particular work. The best employers everywhere know International Correspondence Schools' men are the BEST TRAINED MEN in the ranks of the ambitious—*welcome them* as men able to take responsible positions—men too good for MERE ROUTINE AND DRUDGERY.

Spare time study only is necessary in any of the 150 different International Correspondence Schools' Courses.

Write at once for full (free) particulars to the

INTERNATIONAL CORRESPONDENCE SCHOOLS OF LONDON,
Dept. 63-V, 11, Hamam Street, Fort, Bombay.
Gold Medal Award—Bombay Exhibition.

या कंपनीशीं कोणताहि पत्रव्यवहार करताना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

डॉ. बी. आर्. गुणे यांचें

सर्व प्रकारच्या तापावर

ॲन्टीफेब्रॉईड (एग्यु) मिक्श्चर व टॅबलेट्स्.

[47] मिक्श्चर किं० १२ आणे व टॅबलेट्स् किं. १० आणे.

हें नांवाजलेलें व गुणांनीं पहिल्या नंबरचें ठरलेलें रामबाण औषध नामांकित डॉक्टरांनीं व मोठमोठ्या सद्गृहस्थांनीं वापरून उत्तम ठरविलें आहे. सर्व लोक आजकाल याचे उत्तम गुण पाहून तापावर याच औषधाचा जास्त उपयोग करीत आहेत. या औषधांत अपायकारक असें कोणतेंच द्रव्य नसल्यामुळें हें औषध सर्वांनीं निर्धास्त वापरण्यास योग्य असें जाहलें आहे. हें रामबाण औषध ताप, हिवताप, मलेरिया, एक दिवसाआड येणारा, चातुर्थिक, पित्तज्वर, विषमज्वर, आगंतुकज्वर, जीर्णज्वर वगैरे सर्व प्रकारचे ताप हटकून बरें करितें. यांत बिलकूल किनाईन नाहीं,

ॲन्टीफेब्रॉईडच्या उत्तम गुणावद्दल प्रख्यात डॉक्टरांच्या सर्टिफिकीटांपैकीं कांहीं खालीं दिलीं आहेत. त्यावरून वाचकांची खात्री होईलच.

डॉ. राव. बर्मा:—'ॲन्टीफेब्रॉईड हें मला फार गुणकारी वाटलें आहे. तरी आणखी ६ वाटल्या व्ही. पी. नें पाठवा,' ह्मणून तारेनें कळवितात.

डॉ. स्मेल आर्. ए. एम्. सी., सर्जन, पुणें:—मलेरिया वगैरे सर्व प्रकारच्या तापावर चालणारें हे ॲन्टीफेब्रॉईड वापरण्याविषयीं शिफारस करण्यांत मला फार आनंद वाटतो. हें गुणकारी असल्याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे.

डॉ. बी. आर. गुणे यांचा उंची मेंथा बाम. किं. ५ आणे.

हा बाम, डोकें दुखणें, डोकें जड वाटणें, सांधे ठणकणें, सूज, लचक, ठेंच, खोकला, छातींतील विकार, दंतशूळ, विषारी प्राण्यांचे दंश, वगैरे दुखीवर अत्यंत गुणावह आहे. गुण तात्काळ येऊन फार आराम वाटतो. हा हजारों लोकांनी वापरून सर्वोत्कृष्ट ठरविला आहे. शिफारसपत्रें:—

डॉ. चिंतामण रावजी पांगारकर, सब असिस्टंट सर्जन नागपूर:—डॉ. गुणे यांचा मेंथाबाम मी स्वतः व इतर रोही व रोग्यांनां वापरण्यास देऊन पाहिला, व कळविण्यास आनंद वाटतो, कीं, कितीहि व कसेंहि डोकें दुखत असल्यास तत्काळ आराम पाडून यानें हुषारी येते. मीं पुष्कळ प्रकारचे बाम वापरले पण डॉ. गुणे यांच्या बामाची बरोबरी कोणासहि करवणार नाहीं.

डॉ. गुणे यांचें नारूवर पोटात घेण्याचें रामबाण औषध:—यानें कितीहि नारू असले तरी निःसंशय बरे होतात. किं० १ रुपया.

डॉ. गुणे यांचें डांग्या खोकल्यावर खात्रीचें औषध:—या खोकल्यावर खात्रीचा इलाज नाहीं अशी समजूत आहे. ती आमच्या औषधानें दूर केली जाते. किं० १॥ रु.

धि स्पेसिफिक होम, बुधवारपेठ सिटी,

मुंबई सोल एजंट, गोविंद यशवंतराव शिंदे, काळा चौकी रोड, पो० परळ मुंबई.

☞ A HELP TO THE POOR. ☜

[48] **LENTIN'S COMMERCIAL INSTITUTION.**

Opposite Whiteaway Laidlaw & Co., Above Royal Umbrella Mart.

71, HORNBY ROAD.

ESTABLISHED 1900.

The only Institution which provides "A help to the poor," where efficient, practical and quick education is imparted in all branches of Commerce, Gujarathi and English, Typewriting, Shorthand, Accountancy and School subjects taught "AT HALF RATES" by experienced teachers.

Poor Boys, girls, ladies, and orphans are admitted on special terms or free.

For further particulars apply to :—

D. R. LENTIN, *Principal.*

सारस्वत एजन्सी.

गिरगांव–मुंबई.

१. फक्त सारस्वतांनींच चालविलेली. [49]

२. हिंदुस्थानांतील सर्व सारस्वतांच्या ऐक्याचा प्रयत्न करणारी.


३. मुंबईतील हरएक जातीचा घाऊक खाचप्रमाणें किरकोळ माल कमिशननें पाठविणारी.

४. एजंटस्—लाहोर; डेराइन; अलीगड; दक्षिण हैदराबाद; भरोच इ. इ. शहरीं आहेत.

BEST and CHEAPEST

RAILWAY LEVER WATCH

WITH A NICE CHAIN



Rs 2/12

GUARANTEED FOR 5 YEARS

Price Rs. Two & as. Twelve only

Apply to:-BRIJ BASILAL VAISH,

[50] NOVELTY AGENCY.

188, Baldev Building, Jhansi, U. P.

अचूक [51]

शक्ति देणाऱ्या

आतंकनिग्रह गोळ्या.

रक्तसंबंधी सर्व प्रकारचे विकार व अशक्तता यांचा नाश करणाऱ्या सुप्रसिद्ध पौष्टिक गोळ्या. किंमत ३२ गोळ्यांच्या डबीचा १ रुपया.

वैद्यशास्त्री मणिशंकर गोविंदजी,

मालक–आतंकनिग्रह औषधालय.


हेड ऑफिस–जामनगर–काठेवाड.

शाखा नं. १ काळबादेवी रोड, मुंबई.

शाखा नं. ३ बुधवार पेठ, पुणें शहर.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

भाजेकर आणि कंपनी.



[52]

तांदुळाच्या गिरण्यांचे इंजनियर.

ब्रूसलेन—फोर्ट—मुंबई.

मेसर्स नागेल आणि केंप कंपनी (हंबर्ग)

यांच्या तांदुलाच्या गिरण्याच्या यंत्राचे

एकटे अडत्ये.

पहिल्या प्रतीचीं तेलाचीं इंजनें व दळण्याचीं यंत्रें आणविलीं जातात.


सर्व तऱ्हेच्या तांदलाच्या गिरण्या, ऑइल इंजनें व दळण्याचीं यंत्रें आमच्य वखारींत असतात.

किंमतीकरतां व विशेष माहितीकरतां पत्र पाठवा.

मेसर्स भाजेकर आणि कंपनी.
ब्रूस लेन—फोर्ट—मुंबई

Watches, Clocks,

Timepieces, &c. [53]



घड्याळावरोबर पहिल्यानें याच कंपनीचें नांव पुढें येण्याचें कारण ही कंपनी फार जुनी, सचोटीचा व्यवहार, उत्तम मालाचा मोठा संग्रह, गिऱ्हाईकास योग्य मोबदला मिळतो, हें होय. क्याटलाग मागवा.

जी. यी. नाईक कंपनी,
सीताराम बिल्डिंग, मुंबई.


अति उत्तम ! अति स्वस्त !!

अस्सल काबुली हिंग.

यांत कोणत्याहि तऱ्हेचें मिश्रण नसून हा अत्यंत सुवासिक, शुद्ध व स्वादिष्ट आहे. भोजनीय पदार्थांत याचा सदोदित उपयोग अत्यल्प प्रमाणानें केल्यास सुपास व सुवासिक भोजन तयार होऊन वायुजन्य सर्व विकारांचा नाश होतो, आणि पचनक्रिया चांगली होते. प्रत्येक घरांत एकेक डबी अवश्य असावी. १२ तोळ्यांच्या डबीस १ रुपया. ट. ख. निराळा. व्यापाऱ्यांस योग्य कमिशन मिळेल.

पत्ताः—तारीबागल आणि कंपनी,
[55] पो०—होनावर, जि०—कानडा.

डरकोपचे शिवण्याचें संचे. [54]



रोकडीनें व हप्त्यानेंमिळतील.

हीं शिवण्याचीं यंत्रें घर-कुटुंबांत हातानें, शिंप्यांस पायानें चालणारीं असून त्यास लागणारे निरनिराळे भाग, तेल, सुया वगैरे फारच स्वस्त दरानें मिळतील.


चीफ एजन्ट—एन्. के. पटेल आणि कं.,
नं. १८ कालकादेवी रोड, पोष्ट. नं० २, मुम्बई.

TYPEWRITERS [56]
All Makes As Good As New,
From Rs. 70 upwards.
Three Years' Guarantee.
REPAIRS—A Specialty.
UNVALA & CO.,
86, Churchgate St., BOMBAY.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

तारेचा पत्ता:—
फोटोहाऊस मुंबई. [57]

डब्ल्यु. डी. सामंत आणि कंपनी.
प्रिन्सेस स्ट्रीट काळबादेवी, मुंबई.२



आमच्या कंपनींत फोटोग्राफीस लागणारा सर्व माल म्हणजे निरनिराळ्या मेकरचे क्यामेरे, लेन्सीस, केमिकल्स, माउन्टस व हरएक जातीच्या बाकीच्या वस्तू फोटो पूर्ण तयार होईपर्यंत लागणाऱ्या रक्कमबंद व किरकोळ फारच स्वस्त भावानें विकल्या जातात. विलायतेहून दर मेलला माल येत असल्यामुळें अगदीं ताजा माल मिळून शिवाय गिऱ्हाइकांच्या आर्डर्स वक्तशीर पाठविण्यांत येत असतात. सर्व किंमतीचा क्याटलाग फुकट पाठविण्यांत येऊन शिवाय मालास प्याकिंग चार्ज नाहीं. नेहमींच्या गिऱ्हाइकांस उत्तम सवलती देण्यांत येतात. नवीन फोटोग्राफर होऊं इच्छिणारास शक्य तितकी माहिती समक्ष किंवा पत्रद्वारें देण्यांत येईल.

धी कृष्णा डाइंग्, वीव्हिंग्, ॲण्ड् ट्रेडिंग् कंपनी, लिमिटेड्, वाई.

[58] शाखा—बनहट्टी.

स्थापना १९०६.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केलेली आहे.

भांडवल रु. ५०,०००.

प्रत्येक भाग रु. २५ चा, याप्रमाणें एकंदर भाग २०००. या कंपनीचे भाग घेऊं इच्छिणारांनीं अर्जासोबत प्रत्येक भागास रु. ५, भाग दिल्यानंतर रु. १०, व नंतर रु. ५ द्यावे लागतात. भागीदारांस व्याज ६ टक्क्यांखालीं दिलें गेलें नाहीं. ऑईल् इंजिनूच्या शक्तीवर धान्य दळण्याचीं, गळित धान्यापासून तेल काढण्याचीं व भातापासून तांदूळ तयार करण्याचीं व हूल्लद स्वच्छ करण्याचीं यंत्रें सुरू केलीं आहेत. बनहट्टी येथील शाखेंत रंगाचें व रेशमी कद विणण्याचें काम केलें जातें. विशेष माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

मेसर्स कोठावळे ब्रदर्स आणि कंपनी,
वाई, जि. सातारा.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

चहाची वेगमी—एक मोठी सवलत ह्लांटरचा प्रसिद्ध निलगिरी चहा—पीको सूचांग.

पीको सूचांग चहा हा ह्लांटरचा अस्सल निलगिरी चहा आहे. या चहाला सुवास, रंग व रुचि हीं मोहक असल्यामुळें सर्व लोकांत, सर्व ठिकाणीं व सर्व देशांत-या देशांत व परदेशांत-हा फारच पसंत झालेला आहे. या चहाचा उपयोग करणारांस दुसरा कोणताहि चहा प्रिय होत नाहीं. असें असतां याची किंमतहि फारच कमी आहे! पांच रत्तल चहाचा सुरखे डबा फक्त साडे तीन रुपयांस. पोष्ट फ्री ४०४ शिवाय.

एक बक्षीसचिठ्ठी फुकट—प्रत्येक डब्यांत असते! ता. ३१ दिजेंबर १९१२ पर्यंत वरील डब्याची मागणी करणाऱ्या प्रत्येकास बक्षिसचिठ्ठी हजर केल्यावर महाराज टी थोर लोकांच्या आश्रयास पात्र झालेला अतिउत्तम चहा—चार पौंडांचा सर्वांग. सुंदर डबा पीको सूचांगच्याच किंमतीस ह्मणजे फक्त साडेतीन रुपयांस दिला जाईल. पोष्ट फ्री रु. ४०४.

कॉफी पाहिजे असल्यास ह्लांटरची अस्सल, निर्भेळ व पवित्र अशी काफी घ्या. एक पौंड डबा रु. १ पोष्ट फ्री १०५.

निलगिरी चहा.
पुरविणारी एकच संस्था.

ह्लांटर्स एजन्सी
डायमण्ड बिल्डिंग—
लोहार स्टीट, मुंबई.

[59]

THE COMMERCIAL
SHORTHAND & TYPEWRITING
INSTITUTION.
96, Kalbadevi Road, BOMBAY.

THE SUBJECTS TAUGHT:—
Shorhand, Type-writing, Book-keeping nnd Accountancy.

Subjects are taught by the expert and experienced teachers. Full satisfaction and passing guaranteed, *Special arrangement for Ladies.* TYPE-COPYING WORK NEATLY, PROMPTLY and with ACCURACY and STRICTEST SECRECY EXECUTED. *Typewriters for Sale.* TERMS VERY MODERATE.

TIME:—**7 a. m. to 8 p. m.**

Boarding and Lodging arrangements for Mofussil Students,

Apply to:

K. W. MARATHE,
Proprietor.

[61]

देवळांत, घरांत, आणि मशिदींत
खास वापरण्यालायक पुण्याच्या महशूर

सुगंधी उदवत्या

पानांत खाण्याचा अति खुसबोदार [60]

अमीरी कात

सर्व जातींचीं सुगंधी अत्तरें.


गुलकंद, सुवासिक तेल, मोरआवळा, आणि सरबतें. बादशाही जुलाबाच्या गोळ्या.

जास्त माहिती व भावा विषयीं प्राईस लिस्ट मागवा. मिळण्याचा ठिकाणा—

हकीम शेक आदम अबदुल अल्ली.

६२०, रविवार पेठ, पुनासिटी.

विद्युद्दीप.



कळ फिरवितांच उपयोगीं पडणारा व वरेच महिने टिकणारा विद्युद्दीप किं. रु. ७ पासून १० पर्यंत ट. हं. निराळें. सनड्राय बॅटरी, खिशांतले विद्युद्दीप, कॉलबेलस्, टेलिफोनस, वगैरे विक्रीस आहेत.

कोणताही इंग्रजी दोन अक्षरी मोनोग्राम किं. सहा आणे.



सिल्का, आंगठारवरी शिक्के, छापाचें साहित्य, धातूवरील कोरीव तारीख, महिना, काम, लाखेच्या सन वगैरे रोजच्या रोज छापण्याचे डेटर, किं. ॥।· आणे. कपड्यावर नांव घालण्याची पक्की शाई वगैरे सामान मिळतें व तें आर्डरीप्रमाणें तावडतोब व मनाजोगें तयार केलें जातें.

पी. पी. रेळे अॅण्ड कंपनी,
रबर स्टँप्स मेकर्स,
१७९ काळबादेवी रोड, मुंबई.

[62]

मनोरंजनाचीं मागील वर्षांचीं पुस्तकें.

खालीं दिलेल्या, मनोरंजनाच्या मागील वर्षांच्या पुस्तकांच्या, थोडथोड्या प्रती शिल्लक आहेत. हीं पुस्तकें सर्वांनां फारच सवलतीनें, अति स्वल्प किंमतींत मिळण्याची व्यवस्था केली आहे.

मनोरंजन पुस्तक ९ वें. (पृष्ठें ४८०.)
मूळ किंमत २–८–०. सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १० वें. (पृष्ठें ५८४.)
मूळ किंमत २–८–० सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक ११ वें. (पृष्ठें ४००.)
मूळ किंमत २–८–०. सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १२ वें. (पृष्ठें ५५२.)
मूळ किंमत २–८–०. सवलतीची किंमत १–४–०.

मनोरंजन पुस्तक १३ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १४ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १४ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १५ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १६ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १६ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १७ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत २–०–० सवलतीची किंमत १–८–०.

मनोरंजन पुस्तक १७ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत २–०–०. सवलतीची किंमत १–८–०.

दोन घटका मनोरंजन. (पृष्ठें ३९२.)
मनोरंजन वर्ष १, २ व ३ यांतील गोष्टी.
किंमत १–४–०.

दोन घटका मनोरंजन. (पृष्ठें ४००.)
मनोरंजन वर्ष ४ व ५ यांतील गोष्टी.
किंमत १–४–०.

संसाररंजन. (पृष्ठें ३१४.)
मनोरंजन वर्ष ९, १० यांतील गोष्टी.
किंमत १–०–०.

मनोरंजनचा दिवाळीचा अंक.
अंक १ ला. (पृष्ठें १९२.)
किंमत ०–१२–०.

मनोरंजनाचा दिवाळीचा अंक.
अंक २ रा. (पृष्ठें २२४.)
किंमत ०–१२–०.

मनोरंजनाचा दिल्लीदरवाज्याचा अंक.
(पृष्ठें २८०.) किंमत १–०–०.

महाराष्ट्रमहिला, पुस्तक १ लें. (उत्तरार्ध)
पृष्ठें १८०. किंमत १–०–०.

महाराष्ट्रमहिला, पुस्तक २ रें. (पूर्वार्ध.)
पृष्ठें २४०. किंमत ०–१२–०.

विशेष सवलती.

१. वरील २१ पुस्तकांपैकीं कोणतींहि ४ पुस्तकें मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{15}{16}$ किंमतीस देण्यांत येतील.

२. वरील पुस्तकांपैकीं कोणतींहि ८ पुस्तकें मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{7}{8}$ किंमतीस देण्यांत येतील

३. वरील पुस्तकांपैकीं कोणतींहि १२ अगर जास्त मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{3}{4}$ किंमतीस देण्यांत येतील.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव, मुंबई.

निवडक ग्रंथाची यादी.

ॐ

नवीन व्यवस्था ! विशेष सुधारणा ! स्वल्प किंमत !!

उपनिषत्-प्रकाश.

संपादक-प्रो० चिंतामण गंगाधर भानु, बी. ए.

श्रीमच्छंकराचार्यांचें भाष्य व भाषांतर आणि श्रीरामानुज, श्रीमाधवानुज व स्वामीदयानंद यांच्या सिद्धांतासह संपादकीय विवरण, उपसंहार, अन्वय, अर्थ, सूची इत्यादिसह.

दरमहा १०० पृष्ठें याप्रमाणें वर्षांत १२०० पृष्ठांचा ग्रंथ. वार्षिक वर्गणी ४ रुपये.

हिंदु धर्माला, आधारभूत असणारें तत्वज्ञान हें आर्ये-ऋषिप्रणीत उपनिषद्मध्यें चांगलें सांगितलें आहे. **उपनिषदें** म्हणजे तत्त्वज्ञान अथवा '**पराविद्या**' होय. ही विद्या बाकीच्या **अपराविद्यांचें** नियमन करिते. असें उद्धारक ज्ञान जर कोणत्या ग्रंथांत व्यवस्थित सांगितलें असेल, तर तें आमच्या आर्य-ऋषि-प्रणीत उपनिषदांमध्यें होय. वरील विधान करण्याला आम्हांस सकौतुक अभिमान वाटतो, व तसाच कोणाही इतर आर्यास वाटेल. 'आम्हांस जिवंतपणीं उपनिषदांचा परिचय झाला, हें आमचें महद्भाग्य होय;' असें जर्मन पंडित शोपेनहार व डॉ० मॅक्समुल्लर म्हणत असत. अशा या उपनिषदांतील तत्त्वज्ञान, सर्व बालगोपालांस सहज समजेल, अशा रीतीनें प्रकट करण्याचें अवजड काम आम्ही गुदस्तसालापासून अंगावर घेतलें आहे. दरमहा १२८ पृष्ठांचा एक अंक या हिशेबानें आक्टोबर १९१२ पर्यंत या मासिकाचे १२ अंक प्रसिद्ध झाले आहेत; व त्या १२ अंकांत **ईशावास्योपनिषद्, केनोपनिषद् व काठकोपनिषद्** अशीं तीन उपनिषदें, श्रीमत शंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य, श्रीमध्वाचार्य व स्वामी दयानंद सरस्वती यांच्या भाष्य-भाषांतरासह, आणि **प्रश्नोपनिषद्** श्रीमच्छंकराचार्यांचें भाष्य व भाष्यांतर आणि इतर आचार्यांच्या सिद्धांताचा उल्लेख यांसह पूर्ण झालें आहे. प्रत्येक उपनिषदाचे शेवटीं संपादकीय विवरण, उपसंहार व सूची देऊन माठी वाचकांकरितां तें होईल तितकें सुलभ केलें आहे.

नवीन सालापासून विशेष सुधारणा.

आरंभीं चारही आचार्यांच्या भाष्य व भाषांतरासह हें काम सुरू केलें होतें, पण तें असेंच चालू ठेवल्यास पुरें करण्यास पुष्कळ काळ लागेल आणि त्यामीत्यर्थ मोठी रक्कम अडविणें भाग पडून लोकांचीहि गैर सोय होईल, व प्रसंगीं हें महाभारतीय काम अर्ध्यावरच सोडण्याचा प्रसंग येईल, अशी भीति असल्यामुळें तूर्त श्रीमच्छंकराचार्य यांचेंच भाष्य घेऊन, भाषांतर, अन्वय, अर्थ व विवरण यांसह सर्व उपनिषदें पूर्ण करावीं, नंतर क्रमानें एकेका आचार्याचें भाष्य व भाषांतर द्यावें, अशा प्रकारची कित्येक हितचिंतक मंडळींकडून सूचना आली. ही सूचना योग्य वाटल्यावरून त्याप्रमाणें चालू सालापासून पुढील उपनिषदें श्रीमच्छंकराचार्य यांचें भाष्य व भाषांतर आणि इतर आचार्यांचा मतमतांतरांचा सिद्धांत देण्याचें ठरविलें आहे.

☞ दामोदर सांवळाराम आणि मंडळी, ठाकुरद्वार-मुंबई.

वर्गणींत फेरफार.

आरंभीं दरमहा १२८ पृष्ठें या नियमानें वर्षास १५३६ पृष्ठें प्रसिद्ध करण्याचें ठरून त्याची वर्गणी ६ रुपये ठेविली होती, व त्याप्रमाणें एक वर्षांत १५३६ पृष्ठांत वरील चार उपनिषदें पूर्ण करून दिलीं. परंतु मध्यम स्थितींतील लोकांस वर्षाचे रुपये ६ भरणें बरेंच जड जातें, असें आमच्या अनुभवास आल्यावरून, नवीन वर्षाच्या आरंभापासून दरमहा १२८ पृष्ठांचे ऐवजीं १०० पृष्ठें, या हिशेबानें वर्षांचीं १२०० पृष्ठें प्रसिद्ध करण्याची योजना केली आहे; आणि त्याची वार्षिक वर्गणी ६ रुपयांचे ऐवजीं फक्त ४ रुपये ठेविली आहे. म्हणजे हल्लीं एक रुपयास २५६ पृष्ठें देत आहोंत, त्याऐवजीं नवीन वर्षारंभापासून एक रुपयास ३०० पृष्ठें देणार आहोंत. ही केलेली नवीन सुधारणा सर्व प्रकारच्या वाचकांस विशेष सोईची होईल अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. नवीन वर्षाचा २०० पृष्ठांचा जोडअंक येत्या दिसेंबरांत तयार होईल, व त्यांत नवीन व्यवस्थेप्रमाणें **मुंडकोपनिषद्** पूर्ण करून देणार आहोंत. नवीन सालापासून ज्यांस वर्गणीदारांत क्षापलें नांव नोंदविणें असेल त्यांनीं अगाऊ वर्गणी रुपये ४ भरून नावें नोंदवावीं. बाहेर गांवचे ग्राहकांस ट. स. ६ आणे अधीक पडेल. पहिल्या वर्षाचे बाराहि अंक ६ रुपये पाठविले असतां मिळतील. परंतु कापडी पुठ्यांत बांधलेलीं स्वतंत्र उपनिषदें पाहिजे असल्यास ७॥ रु. किंमत पडेल. ट. स. वेगळा.

कांहीं अभिप्राय—रा० ब० **महाजनी** लिहितात,–दशोपनिषदांची योग्यता लहानसान नाहीं. गीता-महात्म्यांत म्हटलें आहे कीं,–'सर्व उपनिषदें या गोमाता होत. त्यांना दोहणारा गोपालनंदन होय. पार्थ हा वत्स, दूध पिणारे सुबुद्ध व गीता हें दुग्धामृत.' तात्पर्य, दशोपनिषदें हीं भगद्गीतेचें मूळ व भगवद्गीता हें दशोपनिषदांचें सार होय. तेव्हां त्यांची योग्यता अधिक आहे. प्रो० भानूचा पूर्वप्रस्तव फार चांगला आहे, तो वाचकांनीं अवश्य वाचावा. **प्रो० भडकमकर** लिहितात—हें सर्व ज्ञान व्यावहारिक भाषेंत सर्व सुलभ करून देऊन, सर्व महाराष्ट्रियांवर आपण फार उपकार केले आहेत. जिज्ञासु वर्गानें आपली ही कृति संग्रहास ठेवून तिचें परिशीलन नियमीतपणें केल्यास त्यांस सहजगत्या उपनिषद्ज्ञानाचा लाभ होईल एवढेंच नाहीं, तर मनामध्यें उदात्त विचारांचा प्रादुर्भाव होऊन उत्तरोत्तर आत्मविकास व श्रेय-प्राप्ति होईल. **केसरी**—उपनिषत्प्रकाशांत हल्लीं केलेली दुरुस्ती वाढता लोकाश्रय मिळण्यास कारणीभूत होईल असें आम्हांस वाटतें. प्रो० भानु यांचें भाषांतर बरेंच सार्थ व सोपें होत आहे. सदरहू धार्मिक मासिक पुस्तकास दिवसेंदिवस उदार लोकाश्रय मिळेल, अशी आम्हास आशा वाटते. **ज्ञानप्रकाश**—मंत्राचा अन्वय व अर्थ देऊन शेवटीं संपादकाचें विवरण देण्याची जी पद्धति प्रो० भानूनीं स्वीकारिली आहे, ती फार चांगली आहे. उद्योग मोठा, मेहनतीचा व खर्चाचा आहे. इहपर कल्याण साधूं इच्छिणाऱ्या सर्व गृहस्थांनीं या सत्कृत्यास साह्य करावें. **जगद्वृत्त**—ह्या मंडळीनें अलीकडे संस्कृत भाषेच्या अध्यात्मिक पुराण-ग्रंथांचें भाषांतर तयार करून, प्रसिद्ध करण्याचा अजस्र उद्योग चालू केला आहे; तो तर अत्यंत स्तुत्य होय. त्याला योग्य उत्तेजन देऊन त्यांचे प्रसिद्ध होणारे ग्रंथ संग्रहीं ठेवण्याचा निर्धार अवश्य करावा. आमच्या मराठीचा अभिमान बाळगणारे बरेच सुशिक्षित संस्थानिक आहेत, त्यांनीं या कामीं या मंडळीस अवश्य मदत केली पाहिजे.

याच मासिकांतून पूर्ण झालेले ग्रंथ.

१ **ईशावास्योपनिषद्**—श्रीमच्छंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य, श्रीमध्वाचार्य, व श्रीदयानंदस्वामी यांच्या भाष्य व भाषांतरासह साधा पुठ्ठ्याचें पुस्तक किं. रु. १ कापडी पुठ्ठा किं. १। रु.

२ **केनोपनिषद्**—वरप्रमाणेंच चारही आचार्यांच्या भाष्यभाषांतरासह कापडी पुठ्ठा किं. १। रु.

३ **काठकोपनिषद्**—वरप्रमाणेंच चारही आचार्यांच्या भाष्यभाषांतरासह कापडी पुठ्ठा किं. ४॥ रु.

४ **प्रश्नोपनिषद्**—श्रीमच्छंकराचार्य यांचें भाष्य व भाषांतर आणि इतर आचार्यांचा मतभेदाचा सार यासह, साधा पुठ्ठा किं. १। रु. कापडी पुठ्ठा किं. १॥ रु.

सूचना—वरील वेगवेगळीं कापडी जाड पुठ्ठ्यांत बांधलेलीं चारही उपनिषदें एकत्र घेतलीं असतां ७॥ रुपये किंमतींत मिळतील. बाहेरगांवचे ग्राहकांस टपाल व्ही. पी. सर्व वगळो पडेल.

दामोदर सावळाराम आणि मंडळी, ठाकुरद्वार–मुंबई.

स्वल्प किंमतीची

सुलभ-पुराण-ग्रंथमाला.

दरसाल १००० पृष्ठांचा ग्रंथ—किंमत २ रु.

पुस्तक १ लें-मत्स्यपुराण-ले. वासुदेव गोविंद आपटे, बी. ए, किं. ८ आणे.

हिंदु लोकांचे चार वर्ण व चार आश्रम, त्यांच्या रीतिभाति, नीति व आचारविचार या विषयांच्या माहितीचें आगर म्हणजे आपले पुराणग्रंथ होत. पुराणांत या विषयांची माहिती असून शिवाय सृष्टीची उत्पत्ति, तत्त्वज्ञान, धर्म, भारतवर्षीय भूगोल, राजवंशांचे इतिहास, भक्तांचीं चरित्रें, ऋषींचीं कुळें, वगैरे असंख्य विषय आहेत. पुराण-ग्रंथ नसते तर वेदांचा अर्थ नीट लागताना, पूर्वीच्या समाजाविषयींचें यथार्थ ज्ञान झालें नसतें, व इतिहासाविषयींचे जिज्ञासु अंधकारांत चांचपडत राहिले असते असें अनेक विद्वानांचें मत आहे. सारांश, आपल्या पुराणग्रंथांचें ज्ञान मराठी वाचकांस असणें अवश्य आहे हें निर्विवाद होय. पण सध्यां उद्योग-धंद्यांमुळें कित्येक लक्ष श्लोकात्मक पुराण-ग्रंथ विकत घेण्याचें सामर्थ्य व ते वाचण्यास लागणारी फुरसत फार थोड्यांनी असते. शिवाय संस्कृत भाषा चांगल्या प्रकारें न जाणणारास ते समजण्याचीही अडचणच. अशा अनेक कारणांमुळें त्या ग्रंथांकडे दुर्लक्ष होत आलें आहे. या सर्व अडचणींतून मार्ग काढण्यासाठीं आणि पुराण-ग्रंथांचें ज्ञान सामान्य जनतेलाही सुलभ करून देण्यासाठीं, स्वल्प किंमतीची ही **सुलभ-पुराण-ग्रंथमाला** सुरू केली आहे.

या पुराणग्रंथमालेचें प्रत्येक तीन महिन्यास (२५० पृष्ठांचें) एक पुस्तक याप्रमाणें दरसाल चार पुस्तकें (काऊन साच्यांचीं १००० पृष्ठें) प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक पुस्तकांत होतांहोईतों एकेक पुराण पूर्ण करणार आहोंत. असें करतांना कांहीं पुस्तकें मोठीं होतील व कांहीं लहान होतील. तथापि वर्षांत १००० एक हजार पृष्ठें देणार आहोंत, आणि त्याची किंमत दोन रुपये आकारणार आहोंत. पद्मपुराणासारखीं जीं मोठीं पुराणें असतील, त्यांचे मात्र एकापेक्षां अधिक भाग होतील. सारांश, एकेक पुराण हातीं घेऊन त्यांतल्या प्रत्येक अध्यायाचा सारांश व्यवस्थित रीतीनें देऊन शेवटीं वाचकांच्या सोईकरितां सूची जोडण्याची व्यवस्था केली आहे. शिवाय त्या पुराणांत कोणते महत्त्वाचे भाग आहेत, त्याचा उल्लेख प्रस्तावनेंत थोडक्यांत करण्यांत येतो. अशा पद्धतीनेंच या मालेंतील पहिलें पुस्तक **'मत्स्यपुराण'** तयार झालें आहे. तें वाचून पाहिलें असतां बरींच कल्पना करितां येईल. या मत्स्यपुराणाची पृष्ठसंख्या २७२ झाली असून त्याची किंमत वर्गणीदारास ८ आणे आहे. कापडी पुठ्ठ्याचें पुस्तक पाहिजे असल्यास दोन आणे अधिक किंमत पडते. टपा व्ही. पी० ३ आणे. दुसरें **'गणेशपुराण'** डिसेंबरांत तयार होईल. आणि **पद्मपुराण** व **स्कंदपुराण** पुढील सालांत पूर्ण करून देण्यांत येतील.

या पुराण-ग्रंथमालेस वर्गणीदार होण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं एका पोस्टकार्डावर आपलें नांव पत्त्यासह लिहून कळवावें; म्हणजे पुराण-ग्रंथांचे भाग जसजसे तयार होतील तसतसे त्यांजकडे व्ही० पी० नें पाठविण्यांत येतील. वर्गणीदारांस २५० पृष्ठांची किंमत ८ आणे या दरानें आकारण्यांत येईल. टपाल आणि व्ही० पी० खर्चाबद्दल वेगळा आकार पडेल.

दामोदर सावळाराम आणि मंडळी, ठाकुरद्वार-मुंबई.

कथाकल्पतरु.

(१४ स्तबक, २७२ अध्याय व ३८७७१ ओव्यांचें सरळ गोष्टीच्या रूपानें सुलभ मराठी भाषांतर)

(विविध पुराणें, भारत, भागवत, रामायण, यांतील निवडक हजारों कथा यांत आहेत. स्त्रीपुरुषांची करमणुक करून ज्ञान देणारा असा हा कथांचा कल्पतरु आहे)

दोन भागांत संपूर्ण ग्रंथ.

किंमत १० रुपये, परंतु दिसेंबर अखेरपर्यंत घेणारांस किंमत ५॥ रु.

मराठी वाचकांस आपणांतील विविध पुराणें, तसेंच भारत, भागवत, रामायण इत्यादि इतिहासप्रसिद्ध ग्रंथांतील रहस्य थोडक्यांत समजावून यावें, अशा उद्देशानें सुमारें ३०० वर्षांपूर्वी कृष्ण कवि व मधुकर कवि या उभयतांनीं मिळून हा ओवीबद्ध ग्रंथ तयार केला आहे. या ग्रंथाचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन मुख्य भाग असून, पूर्वार्धाचे सात स्तबक व उत्तरार्धाचे सात स्तबक मिळून १४ स्तबक ह्मणजे पोट भाग आहेत. पूर्वार्धांतील सात स्तबकांचे अध्याय १२६ असून त्यांची ओवीसंख्या २००६८ आहे, व उत्तरार्धांतील सात स्तबकांचे अध्याय १४६ असून त्यांची ओवीसंख्या १८७०३ आहे. अशा प्रकारें हा महाभारतासारखा विशाल ग्रंथ असून त्यांत हजारों कथा व उपकथा आल्या आहेत. जनमेजय राजा श्रोता, व वैशंपायन ऋषि वक्ता, याप्रमाणें श्रोतावक्त्याचा योग आणून अठरा पुराणें, श्रुति, स्मृति, भारत, भागवत, रामायण आणि इतर भाषेंतील ग्रंथ, यांतील मुख्य मुख्य महत्त्वाच्या अनेक कथा या कथाकल्पतरूंत गोंविल्या आहेत; त्यायोगें हा नांवाप्रमाणें कथांचा कल्पतरूच बनला आहे. ह्या ओवीबद्ध मूळ ग्रंथाची किंमत २० रुपये आहे. अशा ह्या अपूर्व ग्रंथाचें अबालवृद्ध स्त्रीपुरुषांचे सोईकरितां सरळ गोष्टीच्या रूपानें हें भाषांतर तयार केलें आहे. या संपूर्ण ग्रंथाची किंमत १० रुपये आहे, परंतु दिसेंबर अखेरपर्यंत घेणारांस पूर्वार्ध व उत्तरार्धासह संपूर्ण ग्रंथ ५॥ रुपयांत मिळेल.

हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास.

लेखक—श्रीयुत गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास हा विषय हल्लीं सर्व शाळांत व कॉलेजांत चालू असून; त्याची जरूर सर्व विद्यार्थ्यांस, शिक्षकांस व सामान्य वाचकांस अतिशय आहे. ह्या विषयावर इंग्रजींत व इतर भाषांत जी अनेक उपयुक्त माहिती आहे, तिचा एकत्र संग्रह करून व आजपर्यंत अनेक मासिकांतून निरनिराळ्या विषयांवर जी चर्चा झाली आहे आणि अनेक विद्वानांनीं जे शोध केले आहेत, ते सर्व जमेस धरून बडोदें येथील राजपुत्र विद्यालयाचे शिक्षक रा. गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए. यांनीं आज पुष्कळ वर्षे सतत परिश्रम करून हा हिंदुस्थानचा इतिहास तीन भागांत तयार केला आहे. तीन भागांपैकीं पहिला भाग 'मुसलमानी रियासत' ह्याची पहिली आवृत्ति संपून गेल्यानें हल्लीं दुसरी आवृत्ति छापिली आहे. ही दुसरी आवृत्ति ह्मणण्यापेक्षां पहिली सर्वच रद्द करून अलीकडील पंधरा वर्षांत जितकी नवीन माहिती बाहेर आली, तिचा समावेश करून हें पुस्तक नवीनच लिहिलें आहे. पूर्वीच्या दीडपट ह्याचा

आकार वाढला असून, त्यांत कित्येक सुंदर व अपरिचित चित्रें मुद्दाम परिश्रमानें पैदा करून घातलीं आहेत. ह्या नवीन आवृत्तींचीं बारीक टाईपचीं ९०० पृष्ठें झालीं असून, पूर्वीच्या पुस्तकाचें स्वरूप यांत सर्वथैव बदलून गेलें आहे. दुसरा भाग **मराठी रियासत** याची पहिली आवृत्ति संपली आहे, व नवीन आवृत्ति तयार होत आहे. ह्या इतिहासाचे हल्लीं साली लिहिल्याप्रमाणें दोन भाग विकत मिळतात:—

भाग १ ला—मुसलमानी रियासत. [सचित्र आवृत्ति.]

या भागांत मुसलमानी धर्माची व राज्याची स्थापना, उत्कर्ष व लय हिंदूंची स्थिति, त्यांच्या पाडावाचीं कारणें, भिन्न संस्कृतींची तुलना, मोगल बादशहांचें संकलित वृत्त, इत्यादिकांसंबंधानें विस्तृत व सोपपत्तिक माहिती आहे. हल्ली नवी आवृत्ति तयार असून तींत कलकत्ता मेमोरियल हॉलमधील योग्य प्रसंगाचीं सुंदर चित्रेंही दिलीं आहेत, कागद ग्लेज, बांधणी कापडी पुठ्याची, किंमत २॥ रुपये.

भाग २ रा—ब्रिटिश रिसायत.

ह्या भागांत इंग्रज व इतर पराष्ट्रीयांनीं व्यापाराच्या निमित्तानें हिंदुस्थानांत पाऊल ठेवल्यापासून सन १७६३ तील ब्रिटिश राज्यस्थापनेपर्यंतची, आजपर्यंत बाहेर न आलेली हकीकत साच दिलेली आहे, या भागाचीं प्रकरणें २४ असून त्यांत इंग्रजी साम्राज्याची सोपपत्तिक माहिती दिली आहे, या भागाची पृष्ठसंख्या ८०० वर असून बांधणी कापडी पुठ्याची, सोनेरी नांव एम्बासची आहे. किंमत २॥ रुपये.

सूचना—दिसेंबर अखेरपर्यंत दोन्ही भाग एकत्र घेणारास ४ रुपये किंमत पडेल. टपाल व्ही. पी.खर्च वेगळा.

बृहद्योगवासिष्ठसार.

(३२ हजार श्लोकांचें सरळ गोष्टींच्या रूपानें मराठी भाषांतर.)

चार भागांत संपूर्ण ग्रंथ.

या चार भागांची किं. १० रुपये आहे, परंतु दिसेंबरपर्यंत चारी भाग एकत्र घेतल्यास ६ रु. किंमतींत मिळतील.

'**वासिष्ठ महारामायण**' या नांवाचा वाल्मीकिमुनिप्रणीत, बत्तीस सहस्र श्लोकांचा एक सर्वोत्तम संस्कृत ग्रंथ आहे. त्यांत श्रीवसिष्ठांनीं रामास केलेला विस्तृत अध्यात्म-उपदेश ग्रथित केला आहे. वसिष्ठमुनि वक्ते व दाशरथिराम श्रोता, असा दैवीयोग यांत आलेला आहे. इतकें सांगितल्यावर त्याविषयीं अधिक लिहिण्याची गरजच राहत नाहीं. तथापि त्यांचीं सहा प्रकरणें असून, तो **बृहद्योगवासिष्ठ** अथवा **योगवासिष्ठ** या नांवानें प्रसिद्ध आहे. त्या अद्वैतवेदान्त-सिद्धान्त प्रतिपादक ग्रंथाचें मराठी भाषांतर आचार्यमक **विष्णु वामन बापट शास्त्री** यांजकडून सोप्या मराठी भाषेंत करविलें आहे. या ग्रंथाच्या प्रथम भागांत वैराग्य, मुमुक्षु, व्यवहार व उत्पत्ति या तीन प्रकरणांचें (म्हणजे बत्तीस सहस्र श्लोकांतील नऊ सहस्र श्लोकांचें) भाषांतर आलें असून, दुसऱ्या भागांत स्थिति व उपशम या चवथ्या व पांचव्या प्रकरणांचें (म्हणजे आठ हजार श्लोकांचें) भाषांतर आलें आहे; आणि तिसऱ्या व चवथ्या भागांत १५००० श्लोकांचें भाषांतर घेऊन निर्वाणप्रकरण पुरें केलें आहे. ग्रंथाचे शेवटीं,—या विस्तृत ग्रंथाचा मथितार्थ वाचकांस थोडक्यांत समजावा म्हणून त्याचें एक स्वतंत्र परिशिष्ट, आणि कठीण पारिभाषिक शब्दांचा अक्षरानुक्रमानें स्पष्टार्थ यांचें एक परिशिष्ट, याप्रमाणें—दोन परिशिष्टें जोडलीं आहेत. एकंदरींत मराठी वाचकांस हा ग्रंथ सुलभ होईल अशी व्यवस्था केली आहे. चारी भाग मिळून एकंदर पृष्ठसंख्या सुमारें १८०० च्या वर झाली असून, टाईप व कागद चांगला वापरला आहे, आणि चारी भाग कापडी जाड पुठ्यांत बांधले आहेत. प्रत्येक भागाची किंमत रु० २॥ प्रमाणें चारी भाग मिळून एकंदर किंमत १० रुपये आहे, परंतु उपनिषत्प्रकाश व पुराण-ग्रंथमालेच्या वर्गणीदारांस हे चारी भाग एकत्र मागविले असतां ६ रुपये किंमतींत मिळतील. टपाल व्ही० पी० बद्दल १। रुपया खर्च येईल.

कथासरित्सागर.

(१८ लंबक व १२४ तरंगांचें गोष्टीच्या रूपानें मराठे भाषांतर.)

चार भागांत संपूर्ण ग्रंथ.

चार भागांची किंमत ५॥ रुपये आहे, परंतु दिसेंबरपर्यंत चारही भाग एकत्र घेणारास ३ रुपये किंमतींत मिळतील.

श्रीगुणाढ्य कवीनें रचलेल्या सांत लक्ष विचित्र कथांपैकीं 'बृहत्कथा' नामक जी प्रसिद्ध एकलक्ष श्लोकात्मक कथा आहे, तिच्या आधारानें श्रीसोमदेवभट्टानें 'कथासरित्सागर' नामक सर्वोत्तम ग्रंथ रचिला आहे. या ग्रंथांत अर्जुनाच्या कुळांतील वत्सराजापासून वासवदत्तेच्या ठायीं झालेल्या नरवाहनदत्ताचें चरित्र प्रमुखत्वें उत्तम रीतीनें वर्णिलें आहे; परंतु त्यांत चित्ताकर्षक, विचित्र व उपदेशपर अशा अनेक लहान मोठ्या मनोरंजक कथा आल्या आहेत. रत्नावली, नागानंद, प्रियदर्शिका, पंचतंत्र, मालतीमाधव, मुद्राराक्षस इत्यादि अनेक लोकमान्य पुस्तकें याच ग्रंथाच्या आधारें वेगवेगळ्या कवींनीं केलीं आहेत; इतकें सांगितलें म्हणजे या ग्रंथाच्या महत्त्वाबद्दल विशेष लिहिण्याची जरूर राहत नाहीं. तात्पर्य अरेबियन नाईटमार्णे यांत अनेक मजेदार कथा आहेत. वे० शा० वामन शास्त्री इस्लामपूरकर यांनीं या ग्रंथाचें भाषांतर क्रमशः प्रसिद्ध करण्याचा उपक्रम कांहीं वर्षांपूर्वी चालविला होता; पण त्या मोठ्या ग्रंथांतील कांहीं भाग छापून निघून बाकीचा भाग तसाच अप्रसिद्ध राहिला. कै० शास्त्रीबुवांनीं जे ६ भाग प्रसिद्ध केले होते; त्यांची किंमत ९ रुपये असून आजमितीस ते सर्व भागही मिळत नाहींत. ही अडचण दूर व्हावी आणि या मनोहर ग्रंथाचा लाभ मराठी वाचकांस थोडक्यांत मिळावा, अशा हेतूनें, वे० शा० विष्णु शास्त्री बापट यांजकडून आम्ही हा ग्रंथ सरळ गोष्टीच्या रूपानें तयार करविला आहे. या प्रसिद्ध ग्रंथाचे अठरा लंबक व एकशें चोवीस तरंग असून पंचतंत्राप्रमाणें प्रत्येक तरंगांत एकांत एक अशा दोनें-दोन, चार-चार, सुंदर कथा आहेत. संग्रही ठेवण्यास योग्य व आबालवृद्ध स्त्री-पुरुषांचें हटकून मनोरंजन करणारें असें हें एक पुस्तक आहे. हा समग्र ग्रंथ चार भागांत पूर्ण केला आहे. प्रत्येक भागाची किंमत १॥ रुपया आहे, परंतु दिसेंबर पर्यंत चारही भाग एकत्र घेणारास किंमत ३ रुपये पडेल. ट० स० वेगळा.

महाराष्ट्र कविचरित्रमाला.

महाराष्ट्रांतील प्राचीन व अर्वाचीन कवींची माहिती, त्यांची योग्यता, त्यांचें कवित्व व त्यांचा जीवनक्रम मराठी वाचकांस समजावा अशा उद्देशानें ही चरित्रमाला आम्हीं सुरू केली आहे. या मालेचा पहिला भाग तयार झाला आहे. या भागांत मुकुंदराज, दासोपंत, मुकेश्वर, आनंदतनय, जयरामस्वामी, वामन, रंगनाथस्वामी, तुकारामबावा वर्दे, शेखमहंमदबावा, गोपाळनाथ मळगांवकर, देवदास, श्रीमत्कृष्णदयार्णव, अवचितमुतकोशी, प्र. शि. बढवे, अनंत बडदे, श्री रामवल्लभदास, निरंजनमाधव, मध्वमुनिस्वर, अमृतराव, सोहिरोबा आंबिये, हरि अंगापूरकर, देवनाथ, रामजोशी, रामचंद्र बढवे, दाजीबा जोशीराव, पूर्णदास, कुडचीवीर, याप्रमाणें २६ कवींचीं चरित्रें आहेत. पुढील भाग छापण्याचें काम चालू आहे. हें चरित्र लेखनाचें काम श्री. ज. र. आजगांवकर यांनीं पत्करलें आहे. हल्लीं छापलेला पहिला भाग ५०० पृष्ठांचा झाला आहे, आणि त्यांत वर लिहिल्याप्रमाणें २६ कवींचीं चरित्रें आलीं आहेत. या पहिल्या भागाची किंमत दोन रुपये आहे; परंतु या चरित्र मालेस वर्गणीदार होणारांस हा पहिला भाग फक्त १ रुपया किंमतींत मिळेल; व पुढील प्रत्येक २५० पृष्ठांचा भाग, वर्गणीदारांत फक्त ८ आणे किंमतींत मिळेल. टपाल खर्च वेगळा.

☞ दामोदर सावळाराम आणि मंडळी, ठाकुरद्वार—मुंबई.

उत्तम १३ निबंध.

साहित्य-संमेलनाची पूर्ण हकीकत.

या पुस्तकांत साहित्य-संमेलनांची पूर्ण हकिकत, अध्यक्षांसह वेगवेगळ्या विद्वान वक्त्यांची आणि विदुषी भगिनींची भाषणें दिलीं असून वेगवेगळ्या विद्वानांनीं लिहिलेले १३ निबंध आहेत:—१ तत्त्वज्ञान व त्याचा मराठीभाषेशीं संबंध, ले. प्रो. चिंतामण गंगाधर भानु; २ मराठी वाङ्मयाची वाढ, ले. प्रो. आ. बा. लट्टे; ३ चारित्र लेखनाविषयीं अनास्था, ले. रु. अ. केळूस्कर; ४ मराठी क्रमिक पुस्तकें, ले. रु. वि. किबे; ५ भारतीय साहित्यपरिषद् स्थापण्याची आवश्यकता, ले. मं. क. नाडकर्णी; ६ मराठी भाषेचा इतिहास, ले. चिंतामण वि. वैद्य; ७ मुक्तेश्वरी महाभारत, ले. अ. ना. पंडित; वाङ्मय ८ आणि स्त्रिया, ले. सौ. काशीबाई हेरलेकर; ९ पुराणान्तर्गत काव्य, ले. ना. वा. टिळक; १० महाराष्ट्र वाङ्मयाचे पर्यालोचन, ले. ग. ज. आगाशे; ११ बंगाली साहित्याविषयीं चार उद्गार, ले. वा. गो. आपटे; १२ देवगिरी यादवांचें साम्राज्य, ले. पु. बा. जोशी; १३ मराठी शब्दांचें युरोपियन शब्दांशीं साम्य, ले. प्रो. वा. कर्वे; व १४ श्रीमत्सयाजी गुणवर्णन, ले. पां. गो. शा. पारसी. याप्रमाणें स्वतंत्र लेख व कविता आहेत. किंमत १ रुपया. जानेवारीपर्यंत ८ आणे.

शास्त्रीय मराठी व्याकरण.

मराठी भाषेच्या व्याकरणावर हा एक नवीन ग्रंथ प्रो. मोरो केशव दामले एम. ए. सुपरिंटेंडेंसिटी स्कूल नागपुर यांनीं लिहिला आहे. मराठी भाषेच्या व्याकरणाचें किती महत्त्व आहे, हें कोणास नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. त्याचप्रमाणें दादोबांच्या व्याकरणानंतर जरी मराठीमध्यें दोन तीन मोठमोठे ग्रंथ या विषयावर प्रसिद्ध होऊन त्यांचा थोडाबहुत प्रसार होत आहे, तरी त्यांपैकीं एकानेंही मराठीच्या व्याकरणाची समाधानकारक रचना झाली आहे, असें दिसत नाहीं. आणि सर्व विषयाचा व्यापक व शास्त्रीय दृष्टीनें योग्य विचार करून लिहिलेल्या व्याकरण ग्रंथाची फार उणीव भासत आहे, ह्यांत शंका नाहीं. अशा वेळीं प्रस्तुत ग्रंथ तयार झाला असल्यामुळें त्याचें महत्व अधिकच वाढत आहे. या ग्रंथांत लहान मोठ्या सर्व मुद्यांचा सविस्तर ऊहापोह झाला असून, एकंदर व्याकरणाची शास्त्रीय रचना करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हायस्कुलें, ट्रेनिंग कॉलेजें, नार्मल स्कुलें व मोठमोठ्या मराठी शाळा ह्यांचे हेडमास्तरांस व त्यांतील शिक्षक वर्गास आमची अशी नम्र विनंति आहे कीं, त्यांनीं या ग्रंथाचें अवलोकन अवश्य करावें, आणि सूक्ष्म अवलोकनानीं जर हा ग्रंथ त्यांचे पसंतीस पडला;—आणि तो त्यांस पसंत पडल्याशिवाय राहणारच नाहीं अशी आमची खात्री आहे—तर त्यांनीं त्याची आपल्या शिष्यवर्गाकडे अवश्य शिफारस करावी. कंसामध्यें बारीक टरांनीं छापिलेला ऊहापोह सोडून दिला असतां, या ग्रंथांतील व्याकरणोद्घाटनाचा केवळ व्याकरणाप्रमाणें विद्यार्थ्यांसही उपयोग करितां यावा, अशा तजविजीनेंच प्रस्तुत ग्रंथ छापिला आहे. या ग्रंथाची पृष्ठसंख्या १००० वर असून, सुंदर कापडी जाड पुठ्याचें बाईंडिंग केलें आहे. किं. ४॥ रुपये. वर्गणीदारांस किं. ४ रुपये.

आर्य लोकांचें मूलस्थान.

केसरीकार श्रीयुत बाळ गंगाधर टिळक यांनीं लिहिलेल्या 'दी आर्टिक होम इन दी वेदाज' या लोकमान्य इंग्रजी ग्रंथांचें हें मराठी रूपांतर आहे. हा ग्रंथ किती महत्त्वाचा आहे, हें सांगण्याची जरूर नाहीं. ह्या मूळ इंग्रजी ग्रंथाच्या सर्व प्रती एक वर्षांतच संपल्या आणि आज १० वर्षांपासून तो दुर्मिळ झाला आहे. त्या ग्रंथाचें हें मराठी रूपांतर, श्रीयुत बळवंतराव टिळक यांच्या संमतीनें रा. रा. केशव लक्ष्मण ओगले बी. ए. वेदकालनिर्णय ह्या पुस्तकाचे कर्ते, यांनीं केलें असून तें विद्वद्वर्य रा. ब. चिंतामण विनायक वैद्य यांनीं तपासून शुद्ध केलें आहे. हें सुंदर बारीक टाईपांत ग्लेज कागदावर छापलें असून, मूळ इंग्रजी ग्रंथाप्रमाणें, विजयीवृत्र, वृत्राचा वध आणि वैदिक उषा, अशीं तीन चित्रेंही यांत दिलीं आहेत. किंमत २ रुपये.

रसतरंगिणी.

(प्राचीन व अर्वाचीन मराठी काव्यांतील २२५ निवडक वेंच्यांचें एकीकरण.) ले. सीताराम वासुदेव पेंडसे, बी. ए., यांत तुकाराम, मुक्तेश्वर, वामनपंडित, रामदास, रघुनाथपंडित, मोरोपंत, इत्यादि प्रख्यात १९ प्राचीन व रुग्णशाखी, लेलेशाखी, सरे, मोगरे, लेंभे, कानिटकर, महाजनि, टिळक, केशवसुत, चंद्रशेखर, माधवानुज, घाटे, इत्यादि वाखाणलेल्या २५ आधुनिक कवींच्या काव्यांतील विविध विषयांवरील निवडक वेंचे घेतले आहेत. एकंदर ग्रंथसंख्या सुमारें सहा हजार व पृष्ठसंख्या ५२५ वर आहे. बांधणी मजबूत पुठ्याची असून, शाळासाठ्यांत नवनीताप्रमाणें हें पुस्तक पसंत ठरलें आहे. किं. १ रुपया.

☞ दामोदर सावळाराम आणि मंडळी, ठाकुरद्वार—मुंबई.

मनोरंजक कादंबऱ्या व गोष्टी.

☞ आमच्या सर्व प्रकारच्या ग्राहकांस दिवाळीची भेट म्हणून खालील पुस्तकें निम्मे किंमतीस विकत मिळतील. मुदत दिसेंबर अखेरपर्यंत.

कालिकामूर्ति.
मनोरंजक, चटकदार सचित्र का०
किंमत ३ रुपये.

इंद्रभुवनगुहा.
मनोरंजक, बोधपर सचित्र कादंबरी
किंमत २ रुपये.

विलासमंदिर.
मनोरंजक, बोधपर सचित्र कादंबरी.
किंमत २॥ रुपये.

हीरकवलय.
हृदयंगम प्रेमकथा-कादंबरी.
किंमत ८ आणे.

अधःपात (भाग १ ला).
अद्भुतरसयुक्त मनोरंजक कादंबरी.
किंमत ८ आणे.

बंधुद्वेष (भाग १ ला).
बोधपर व मनोरंजक कादंबरी.
किंमत १ रुपया.

विषवृक्ष.
ऐतिहासिक-सामाजिक कादंबरी.
किंमत १ रुपया.

दुर्गेशनंदिनी.
ऐतिहासिक-सामाजिक कादंबरी.
किंमत १ रुपया.

देवीसत्यभामा.
ऐतिहासिक-मनोरंजक कादंबरी.
किंमत १ रुपया.

वीरमती.
ऐतिहासिक-मनोरंजक कादंबरी.
किंमत १ रुपया.

सती राणकदेवी.
ऐतिहासिक-मनोरंजक कादंबरी.
किंमत १२ आणे.

इंदिरा.
नवीन पद्धतीची सामाजिक कादंबरी
किंमत १ रुपया.

तरुण रजपूत सरदार.
ऐतिहासिक-बोधपर सचित्र कादं०
किंमत ८ आणे.

मुक्तामाला.
मनोरंजक-बोधपर कादंबरी.
किंमत १ रुपया.

कथामकरंद.
मनोरंजक व बोधपर ५ गोष्टी.
किंमत ८ आणे.

औरंगजेबाचा उदयकाल
ऐतिहासिक-मनोरंजक कादंबरी.
किंमत १ रुपया.

शेवट तर गोड झाला.
मनोरंजक-बोधपर कादंबरी.
किंमत १ रुपया.

गोपनस्फोट.
गुप्तपोलीसाचें चातुर्य, कादंबरी.
किंमत ८ आणे.

बकुलपुष्पमाला.
मौजेच्या बोधपर गोष्टी.
किंमत २ आणे.

हा कोण पाजीपणा !
एक चटकदार मनोरंजक गोष्ट.
किंमत ४ आणे.

स्वामी चिदानंद.
सद्यःस्थितीचें चित्र-नाटक.
किंमत ८ आणे.

चांईकर भटजी.
सामाजिक-बोधपर कादंबरी.
किंमत ८ आणे.

शूरस्त्रीप्रभाव.
मनोरंजक-बोधपर नाटक.
किंमत ८ आणे.

तारा नाटक.
सिंबेलाईनची सुधारलेली आवृत्ति.
किंमत १२ आणे.

सू-ना-वरील पुस्तकांस टपाल व व्ही. पी. खर्च जो लागेल, तो किंमतीवर चढविला जाईल.

☞ दामोदर सांवळाराम आणि मंडळी, ठाकुरद्वार-मुंबई. I. P. P.



गांधर्व महाविद्यालय.



गायन वादन शिक्षणाची उत्तम सोय.

हेड ऑफीस-गिरगांव बॅकरोड, मुंबई.

शाखा-लाहोर, पुणें व प्रिन्सेसस्ट्रीट मुंबई.

या विद्यालयांत गायन व सर्वतन्हेच्या वाद्यांचे—वीन, सतार, दिलरुबा, तबला, मृदंग, हार्मोनियम, जलतरंग, पियानो, फिडल, सारंगी वगैरेचें शिक्षण दिलें जातें. वेळ सकाळी ७ ते १० (सूं. टा.) याप्रमाणें असून शिवाय कुलीन स्त्रियांकरितां शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था दुपारी ३ ते ७ पर्यंत ठेविली आहे. विद्यार्थ्यांकरितां विशेष सवलत ठेविली आहे.

विद्यालयाचे वर्कशॉपमध्यें सर्व तन्हेचीं वाद्यें रिपेअर केलीं जातात, व ऑर्डरीप्रमाणें नवीन वाद्यें बनविलीं जातात.


लग्नकार्य वगैरे प्रसंगीं गायनाच्या पार्टयाही मिळूं शकतील.

विद्यालयाकडून संगीत विषयावर स्वतंत्र मासिक पुस्तकें हिंदीत व मराठींत प्रसिद्ध होतात. वार्षिक वर्गणी ट. हं. स. रु. १.

प्रि. विष्णु दिगंबर यांच्या संगीत लेखनपद्धतीवर (Notation) लिहिलेलीं क्रमिक पुस्तकें विकत मिळतात.

याशिवाय विद्यालयांत प्रत्येक शनवारीं रात्रौ व रविवारीं सकाळीं गायनवादनाचे जलसे होतात. या जलशांचें सीझन तिकीट घेणारांस विशेष सवलत दिली जाईल.

गाड्या, मोटार वगैरे तयार करण्याचा सर्वप्रसिद्ध व नांवाजलेला कारखाना.




आह्मांला १९११-१२ तील जुन्या मुंबईच्या प्रदर्शनांत सोन्याचें पदक मिळालेलें आहे. सर्वप्रकारचें रिपेअर करण्याचें व वारनिश करण्याचें वगैरे काम आमच्या खास देखरेखीखालीं करून दिलें जातें. सर्व जातीच्या गाड्या, मोटार वगैरे तयार आहेत. लोकांनीं एकवेळ अनुभव घेऊन पहावा. खालील पत्त्यावर पत्रव्यवहार केला असतां विशेष माहिती मिळेल.

मेसर्स लालजी रणछोडजी ॲण्ड सन्. २२।४ जांबूळवाडी, काळबादेवीरोड, मुंबई.

Register No B 165

केचे शिरोभूषण!!!

केश सुंदर, कुरळ, काळेभोर, रेशमाप्रमाणे मृदु आणि चकचकीत होण्यास



महाराष्ट्रांतील हजारों स्त्रिया सांप्रत

"कामिनिया ऑईल" वापरीत आहेत!

१ बाटलीस १ रु. ८. रु. १ आणे. २ बाटल्यांस २–१०–० ट. खं. ७ आणे.

मिळण्याचा पत्ता:—

दि अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कंपनी, जुम्मा मशीद, मुंबई.

Cover Printed at the Karnatak Press, Bombay.

मासिक मनोरंजन



वर्ष १८ वें, अंक ६ वा.

सुरस कवितांनीं, मनोवेधक गोष्टींनीं, व
हास्यमय विनोदी लेखांनीं स्त्रीपुरुषांचें
मनोरंजन करणारें, सचित्र

उद्यान मासिक.

महाराष्ट्राचें भूषण होऊन राहिलें आहे.
वर्षारंभ—जानुआरी किंवा जुलै.

वार्षिक वर्गणी ट. इ. सह रुपये दोन.
पत्ता—मेसर्स पाटील आणि चर्दे

उद्यान ऑफिस, ग्रँटरोड-मुंबई.

दर्शअक्षेर भेटीचीं हणून एकदोन
पुस्तकें बक्षीस देणाऱ्या या लोकप्रिय
मासिकावरील जुलै १९१२ च्या मनो-
रंजनांतील अभिप्राय पहावा.

[No 210.
Vol. XVIII.] संपादक—काशीनाथ रघुनाथ मित्र,
गिरगांव-मुंबई.
वार्षिक वर्गणी ट. इ. सह ४-०-०.] [किरकोळ अंकाची किंमत ०-८-०.

पुस्तक १८ वें, माहे डिसेंबर १९१२, अंक ३१०.

विषयानुक्रम.

१ विहंगमदूत. (दर्शनी चित्र.) चित्रकार, श्रीयुत अ. मा. माळी. ३६५
२ प्रासंगिक विचार. ३६५
३ शारदा. (चालू कादंबरी.) ३७०
४ विदूषकाचें साम्राज्य. ३८३
५ आंट घटकांचें राज्य ! (संपूर्ण गोष्ट.) ३८५
६ आमचा जातिभेद. ३९७
७ भाषा व इतिहास. (विनोदी लेख.) श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए., एल्एल्. बी. ४०६
८ उद्धार. (संपूर्ण गोष्ट.) ४१३
९ स्वयंपाकघरांतील गोष्टी. ४१६
१० काव्यकुंज.
१ मधमाशी. श्रीयुत 'नागेश'. ४२०
२ डवक्यांत पडलेलें फूल. श्रीयुत रेंदाळकर. ४२२
३ धन्य खरी ती तूं आई ! श्रीयुत दत्तात्रय भिमाजी रणदिवे. ४२३
४ प्रेममीलन. श्रीयुत के. म. सोनाळकर. ४२३
११ माझा उत्तरहिंदुस्थानांतील प्रवास. श्रीयुत श्री. गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए. ४२४
१२ तें मुख ! (गद्यकाव्य.) श्रीयुत रेंदाळकर. ४३३
१३ संवदा अंगावर आला ! (संपूर्ण गोष्ट-सचित्र.) श्रीयुत 'विनीत'. ४३८
१४ प्रसन्नवृत्ति. ४४७
१५ शब्द. ४४७
१६ अंकलीला. श्रीयुत रंगनाथ नारायण मोहोळकर. ४४८
१७ पृथ्वीवर महाभूतांची स्वारी. श्रीयुत श्रीधर अनंत भागवत, बी. एससी. ४४९
१८ कमलाबाईची गृहव्यवस्था. (संपूर्ण गोष्ट.) अ. एक भगिनी. ४५१

ताज्या पुष्पगुच्छाप्रमाणें सुवास देणारें, मगज तरतरीत ठेवून झोंप सुखानें घेऊं देणारें, केंश तुळतुळित व मृदु करून केशवृद्धि जोमानें करणारें, खात्रीचें तेल फक्त केशरमालती तेल हें एकच होय. हें रंगानें सोनेरी असून गुणानेंहि सोनेंच आहे. प्रत्येक बाटली तपासून घेतांना पुढील अक्षरें बाटलीवर असल्यास तीच बाटली अस्सल केशरमालती तेल समजावी:—

ठिकठिकाणीं एजंट्स पाहिजेत. } Bombay Sugandhi Works. Keshara Malati Oil.

(मध्यम साइज तीन औंस बाटली) तीन बाटल्यांची किंमत रु. १ व्ही. पी. पो. सह १॥=
(मोठी सहा औंस बाटली) ,, ,, ,, रु. २. व्ही. पी. पो. सह २॥=

प्रसिद्ध बंगाल ओरिएंटल साबू व जपानी डायमंड दूधपावडर } यांचे सोल एजंटस— मराठा एजन्सी स्टोअर्स, सुगंधी. इंपोर्टर्स, जनरल मर्चंटस्, गिरगांव, मुंबई.

The Bombay Banking Co. Ltd.,
GIRGAON-BOMBAY. [5-12]

धि बॉम्बे बँकिंग कंपनी, लिमिटेड,

गिरगांव–मुंबई.

सेक्रेटरी, ट्रेझरर्स आणि एजंटस्:—

मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी.

स्थापना १८९८.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केली आहे.

भांडवल ५,००,००० रुपये. शेअरची किंमत ५० रुपये. शेअर १०,०००.

प्रत्येक भागाचे ५० रुपयांपैकीं फक्त ४० रुपये घेतले जातात.

अर्जासोबत रुपये २॥, व अलॉटमेंटनंतर रु. २॥, व पुढें एकदम रुपये ३५ अगर प्रत्येक महिन्याच्या अंतरानें प्रत्येक कॉलबद्दल रुपये ५ भरावे लागतात. डिव्हिडेंट् आतांपर्यंत केव्हांहि ६ टक्क्यांचे खालीं दिलें नाहीं. गेल्या चार सालीं तर ९ टके-प्रमाणें दिलें आहे.

तारणावर रकमा देणें, ठेवी ठेवणें, सरकारी प्रामिसरी नोटा, इतर कंपन्यांचे शेअर्स, त्याचप्रमाणें सोनें, चांदी, मोलें वगैरे मूल्यवान् जिनसांची खरेदीविक्री करणें, व्याज वसूल करणें, हुंड्यांचा व्यवहार करणें, वगैरे सर्व कामें चालतात.

सेव्हिंग्ज्यांकेंत ३॥। रु. व्याजानें रकमा ठेवण्यांत येतात. हंगामाचे दिवसांत म्हणजे नोव्हेंबर व जून अखेरपर्यंत जास्त व्याजानें ठेवी ठेवून घेण्यांत येतात. कमिशनाचे दर फार माफक ठेविले आहेत.

मुदतीच्या ठेवीचे व्याजाचे दर:—

६ महिन्यांचे मुदतीचे:–	९ महिन्यांचे:–	१२ महिन्यांचे:–	२४ महिन्यांचे:–
दरसाल दर शेंकडा ४ रु.	४॥ रु.	५ रु.	५॥.

करंट अकौंट ठेवण्यांत येतात. व्याज २॥ रु.

मुख्य मुख्य शहरीं हुंड्यांचा व्यवहार केला जातो.

ब्रँच आफिसें:—

१ पुणें; २ सातारा; ३ सांगली; ४ बेळगांव; ५ सोलापुर; ६ अमरावती; ७ नागपुर.

विशेष माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मेसर्स व्ही. एन्. आपटे आणि कंपनी,
सेक्रेटरी, ट्रेझरर्स व एजंटस्,
धि बॉम्बे बँकिंग कंपनी, गिरगांव–मुंबई.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

शालजोड्या.

निरनिराळ्या सुंदर रंगांच्या, उत्तम कारागिरीच्या
रुपये १७ ते २२ आणि २३ ते ३०.

फारच उत्कृष्ट कारागिरीच्या, रुपये ३० ते ४०.

" " रुपये ४५ ते ६५.

निव्वळ काश्मिरी. रुपये ६० ते ८०.

खरें सोन्याचें काम, वाटेल तो रंग, सुंदर नकशीची,
प्रत्येकीं रुपये ३० ते ५०.

मुलांच्या शाली रुपये ७ ते १२.

स्त्रियांच्या शाली रुपये ९ ते ११ आणि ४० पर्यंत.

उत्तम कारागिरीचे चोगे, वाटेल त्या आकाराचे, रुपये १५ ते १००.

मलिदाकापड, अतिशय उवदार व नरम, २७" रुंद, वारीं रु० $2\frac{1}{2}$ ते ५.

मलिद्याच्या टोप्या (तयार केलेल्या) १२ आण्यांपासून २ रु. पर्यंत.

पश्मिना साडी, रुपये ३५. काश्मिर साडी रु० १८.

'सूटां' करितां काश्मिर कापड, २७" रुंद, वारीं रु. १–२ ते रु. २–४

महाराज्ञी व हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व महाराजे व राजे यांचा
आह्मांला आश्रय आहे.

माल पसंत न पडल्यास दोन्ही वेळच्या पोष्टखर्चासह पैसे परत देऊं.

अमीरचंद आणि सन्स,

[1–3] लाहोर.


[4–12] सतत पन्नास वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

डॉ. वामन गोपाळ यांचा

दूषित रक्त शुद्ध करणारा

आयोडाईज्ड

सार्सापरिला.



मालक:—

गौतमराव केशव
ठाकुरद्वार, मुंबई.

देहाचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय! तेंच एकदा बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करितात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगांमुळें अर्धांगवायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व इतर कारणांनीं रक्त बिघडून होणाऱ्या त्वग्रोगांवरहि हाच सार्सापरिला उत्तम ठरला आहे. आमच्या सार्सा-परिल्याचा पुष्कळ खप पाहून बऱ्याच लोकांनीं त्याची हुबेहुब नकल केली आहे. करितां घेतांना बाजूला दाखविल्याप्रमाणें बाटलीवरील लेबल पाहून आणि तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घ्यावा.

बाटलीची किं. १।· रु. पो. खर्च ५ आणे. उत्तम गुणास ४ बाटल्या. ४ बाटल्यांस टपालखर्चासह ४॥—. विशेष माहितीकरितां कॅटलॉग मागवा.

आमच्याकडे डॉ. काळोखे यांचीं वैद्यकीय पुस्तकें विकत मिळतील.

एजंट्स:—

हिंदु-युरोपियन फार्मसी, पणजी–गोवा. नारायण रामचंद्र जोशी, उमरावती.

कृष्णराव गोपाळ शौचे, इंदूर. एस्. जी. येवलेकर, पुणें–सिटी.

शिवाय मोठमोठ्या शहरीं प्रसिद्ध दुकानदारांकडेहि मिळेल.

या पृष्ठावरील जाहिरातीतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

जाहीर नोटीस. [3-12]

सर्व लोकांस माहीत होण्याकरितां प्रसिद्ध करीत आहों, कीं, श्रीक्षेत्र काशी येथील श्रीरामसमर्थ कंपनीकडून हातमागावर तयार केलेला फरमाइषी स्वदेशी माल व्ही. पी. ने पाठविला जातो. त्याचा तपशील खालीलप्रमाणें:—

१. हे कद जांभळा, तांबडा आणि केसरी या तिन्ही पक्क्या रंगांचे, रेशीम पिळदार, पोत जाड आणि मजबूत, फार दिवस टिकणारे, रंग खात्रीचा असून किंमत माफक आणि माल चांगला, असे तयार केले आहेत.

मालाचा तपशील.	लांब	रुंद.	कि. रु. पा. कि. रु. प.	व्ही. पी. ख. आ.	मालाचा तपशील.	लांब.	रुंद.	कि. रु. पा. कि. रु. प.	व्ही.पी. ख.आ.
कद विनकांठी ...	१०	२॥	१०	१३	८१०	पामरी रुईफुली ...	४	१॥।	४	७	८४
कद रुईफुली ...	१०	२॥	११	१५	८१०	गोमकांठी पीतांबर	१०	२॥	१२	१५	४१०
कद विनकांठी ...	११	२॥।	१२	१६	८१०	पीतांबर जरीकांठी...	१०	२॥	२२	२५	८१२
कद रुईफुली ...	१०	२॥।	१२	१४	८१०	कद जरीकांठी ...	१०	२॥	२०	२३	८१२
" " ...	११	२॥।	१३	१६	८१०	" " ...	८	१॥।	१०	१४	८८
कद जनानी वि. कां.	१६	२॥	१७	२०	८१२	कद साधेकांठी ...	८	१॥।	५	७	८६
" " रुईफुली	१७	२॥	१९	२६	८१२	" " ...	६	१॥	४	६	८६
" " "	१७	२॥।	२१	३०	८१२	लुगडीं रेशीमकांठी...	१६	२॥	४	८	८१०
पामरी रुईफुली ...	६	२॥	६	१०	८६	" " ...	१७	२॥	६	१०	८१०

२. यांशिवाय हलके कद पीतांबर लांब १० × २॥ चे, किंमत ७॥-९-१० पर्यंत सर्व रंगांचे तयार आहेत. शिवाय काशीचा हरएक प्रकारचा माल सुती-रेशीमकांठी-लुगडीं; खण सुती-रेशमी व जरीचे चोळखण; सुती-रेशमी कांठाचे धोतरजोडे; उपर्णे-जोड्या, शेले; दुपेटे; पैठण्या; गंगावन; लंवाखूच्या सुगंधी गोळ्या; कस्तुरी उंची दर तोळा २७, ५० रु. पावेतों; रेशमी जनानी-मर्दानी मुकटे वगैरे माल माफक किंमत घेऊन पाठवूं.

३. अत्तरें—(१८१। रु. भाराचा तोळा) गुलाब, केवडा, मोतिया, बाळा, पानडी, हिना, दवना, बकुळ, चंपा, इत्यादि दरतोळ्यास ८८, १, २, १० रु. पर्यंत. गुलाब, केवडापाणी दरशेरीं ८१२, २ रुपयेपर्यंत. चंदनी तेल दरशेरीं २५ रुपये.

४. सुगंधी तेलें—(११२ रु. भाराचा शेर) बेलिया, चमेली, केवडा, हिना, दरशेरीं ३, ६ रु. पावेतों.

५. अत्तरांच्या पेट्या—नंबर १ शिशा ८. अत्तरें तोळे ४. किंमत रु. ४॥. नं. २ शिशा ६. अत्तर १॥ तो. किंमत रु. २। टपालखर्च माफ.

६. श्रीराम-उपासनाग्रंथ—किंमत १ रुपया. यांत रामदासी संप्रदायी लोकांनां अवश्य लागणारे सर्व विषय आहेत. तसेंच—

७. रुद्राक्ष-माळा, मणी—(१०८) बोराएवढ्या दाण्यापासून मोठ्या हरभऱ्यापर्यंत. एका माळेस कि. रु. ८१२ पासून ३ पावेतों. हरबऱ्यापासून तों मिऱ्यांपर्यंत एक माळेची किंमत रु. ४ ते रु. २० पावेतों. गौरी शंकर रुद्राक्ष लहानमोठ्या प्रत्येकी दाण्यास किंमत रु. ३ ते १० रु. पर्यंत. रुद्राक्षकंठा मणी (३२) किंमत ८१२ ते रु. १० पर्यंत. स्फटिकमाळ मणी (१०८) १॥ रु. ते १० रुपये.

८. वातविध्वंस श्रीकाशीविश्वंभर तेलः—हें सर्व प्रकारचे वात, अर्धांगवायु इत्यादिकांवर तसेंच कोणत्याहि कारणानें झालेलीं क्षतें, व्रण, गंडमाळा, कुष्ठरोगांवर, कर्णरोगांवर, मस्तकशूळावर, हातपाय, अंग दुखणें किंवा वळणें यांवर, हरेक प्रकारचे फोडांवर, शस्त्राचे वगैरे घावावर, रक्तदोषजन्य सर्व विकारांवर, खरूज, दाद वगैरे चर्मरोगांवर, बाळंतिणीकरितां, चतुष्पाद जनावरांकरितां, इत्यादि रोगांवर खात्रीनें गुण देणारें.

१ एक बाटलीची किंमत रु. २. ६ बाटल्यांची किंमत रु. ९

३ तीन बाटल्यांची किंमत रु. ५। १२ बाटल्यांची किंमत रु. १५,

सवास टपालखर्च माफ. अनुपान बाटलीसोबत राहील. गांवोगांवीं एजंट पाहिजेत. कमिशन भरपूर मिळेल.

९. ग्राहकांनीं आमच्याकडून २५ रुपयांच्या वर माल मागविल्यास कमिशन दररुपयास ८॥. प्रमाणें देऊं. टपालखर्चास अर्धा आणा आल्यास सर्व माहितीचा कॅटलाग फुकट पाठवूं.

ग्राहकांनीं आपला पत्ता, नांव, पोस्ट, जिल्हा, वगैरे स्वच्छ लिहिणें.

पत्ता—नारायण गणेश रिसबूड, दुर्गाघाट, बनारस सिटी.

[4-12] CLERKS' HANDBOOK.

THIRD EDITION, REVISED AND ENLARGED, pages 285, cloth bound, contains 337 complete specimen Letters for Private and Commercial Correspondence, Book-Keeping, Ready Reckoner, Proof Correcting, and several other Subjects very useful for Students fresh from Schools and Colleges seeking employment and Clerks wishing to rise in Government or Mercantile Offices. Price by V. P. P. Re. 1-8. Apply to:—
DUBHASHI & Co.
1st Bhatwadi, Girgaum, Bombay.

धि बॉम्बे टाईल कंपनी,



टाइल्स,
मार्बल्स, स्टोनमर्चंट,
[3-12] अँन्ड कॉन्ट्रॅक्टर,
१६७, डंकनरोड, मुंबई, नं. ४

[6-12] जारा लांकूड.

वाफेच्या यंत्रांनीं कापलेले वेस्ट्रेलिअन जारा लांकडाचें स्कॅन्टलिंगचा, तक्तपोशी, दांडे, वडोद, खांब, चौकटी, ऑफिस पार्टिशन्स, छपरें, खिडक्या पॉलिश केलेलें लांकडी सामान, फ्रेमवर्क, कापसाच्या गठ्ठयांस मारण्याच्या पट्टया इत्यादि कामांकडे उत्तम उपयोग होतो.

जारा लांकडाची किंमत सागवानाच्या जवळ जवळ निम्मे आहे.

निरनिराळ्या आकाराचे व लांबीचे स्कॅन्टलिंग मुंबई, कलकत्ता, मद्रास व कराची येथें असलेल्या आमच्या वखारींत नेहमीं मिळतात. पत्र पाठविलें असतां कयाटलाग व नमुने फुकट पाठवूं.

मिलर्स टिंबर अँन्ड ट्रेडिंग कंपनी, लि.
यॉर्क बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई.

एजन्टस—
कलकत्ता—गिलॅन्डर्स अर्बथ्नोट आणि कंपनी.
मद्रास—बोनी अँन्ड कंपनी.
कराची—मॅक्किनॉन मॅकेन्झी आणि कंपनी.

मी कोण? माझें नांव काय?

"वाटोळा, पण ताट नव्हें! काळा पण कोळसा नव्हें!
एकटा करतों दोघांचें काम ओळखा माझें काय नाम?"

माझा संचार स्वयंपाकघरांत असतो. अलीकडे मी सर्व स्त्रीजनांचा फार आवडता झालों आहें. सणावारीं व इतर दिवशीं मी स्त्रांच्या फारच उपयोगी पडतों. माझा जन्म सातारा जिल्ह्यांत, किर्लोस्कर वाडींत, किर्लोस्करबंधूंचे कारखान्यांत झाला आहे. मी तावूनसुलाखून निघाल्यामुळें पक्का आहें, कच्चा नाहीं.

आतां तरी मी कोण आहें हें आपल्यास समजलें असेलच! जर अद्यापि उमगलें नसेल तर आपल्या कानांत सांगतों इतक्यांत दुसऱ्या कोणास सांगूं नका हो!

माझें नांव— [5-12]

आंबोळ्यांचा तवा!

माझ्या जन्मदात्यास फक्त १ च.रु. पाठवा म्हणजे मी तुमची नोकरी इमानें इतबारें जिवंत असें पर्यंत करीन.

भेसर्स बाळकृष्ण साजबा आणि कंपनी,

सदाशिवस्ट्रीट, गिरगांव—मुंबई.

छापखान्यास लागणारे—

प्रिंटिंग पेपर्स—ग्लेझ, अनग्लेझ, फुलस्कॅप, कव्हर, कलर इ. इ. सर्व वजनाचे; ब्रासरुळी—सर्वजातींच्या; शाई—टाइपाची, लिथोची, काळी किंवा रंगीत, हलकी व भारी, सर्व जातींची व सर्व दराची; अन्टिमनी—S. C. मार्काची; लिथोस्टोन—"१८×२४" अगर ह्या त्या आकाराचे; प्रेसीस—मशीन्स, केसीस, घोडे वगैरे सर्व लाकडी सामान.

छापखान्यास लागणारा हरएक माल आम्ही थेट विलायतेहून मागवीत असल्यामुळें तो आमच्यामार्फत मागविल्यानें फार फायदेशीर पडतो. केसरी, मनोरंजन, निर्णयसागर, आर्यभूषण इत्यादि महाराष्ट्रांतील प्रसिद्ध प्रकाशक आणि छापखानेवाले आमच्याचकडून बहुतेक माल घेत असतात.


विलायतेंतील प्रसिद्ध मिलर आणि रिचर्ड मेकरचे बुक, न्यूज, हेडिंग व आर्नमेंटल टाईप मागवून देऊं. या कंपनीचे आम्ही सोल एजंट आहों. [5-12]

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

गोपाळ नारायण कंपनी, बुकसेलर्स, कालकादेवीरोड—मुंबई. [5-12]

प्राकृत ग्रंथ (मोठ्या टायपाचे.)				संस्कृत ग्रंथ.	रु.		
रामविजय.	रु. १-४	भक्तलीलामृत.	रु. ४-०	भागवत, श्रीधरी.	रु. ५	अध्यात्मरामायण सटीक.	२
हरिविजय.	१-०	नाथलीलामृत.	२-०	भागवत, विजयध्वजी.	८	महाभारत सटीक.	२५
भक्तविजय.	२-०	संतलीलामृत.	१-१२	भागवत टीका चूर्णिका.	१०	आत्मपुराण सटीक.	१२
पांडवप्रताप.	२-८	एकनाथी भागवत.	४-८	वाल्मीकि रामा. सटीक.	७	नारायणभट्टी समंत्रक.	२
कथासारामृत.	२-८	नवनाथभक्तिसार.	२-०	हरिवंश सटीक.	४	योगवासिष्ठ सटीक.	२०
काशीखंड.	३-०	गणेशप्रताप.	३-०	विष्णुपुराण सटीक.	३	सुभाषितरत्नाकर.	२
जैमिनी अश्वमेध.	३-०	उपयुक्त सर्वसंग्रह.	१-४	गणेशपुराण.	६	कृष्णयजुर्वेत्ति. ब्राह्मण.	२॥
दासबोध.	१-०	गुरुचरित्र.	२-०	कृष्णयजुर्वेत्ति. संहिता.	३	आनंदरामायण.	५

नानूज ब्रास वर्क्स महमदी महाल, कालबादेवी रोड, मुंबई.



लोखंडी पाळणा किं. रु. १५
' स्विंगिंग चेअर " १०
' चेअरबेड (पाहिजे तेव्हां पलंग व खुर्ची बनते.)" ८
* घडीच्या खुर्च्या " २।
" घडीच्या खुंट्या " ॥•
" घडीची खाट " ८
" बाबाकॉट (मच्छरदाणीच्या चौकटीसह ४×२।) " २०
" बेडस्टेड (मच्छरदाणीच्या चौकटीसह ४×३) " २०

लोखंडी बेडस्टेड्स (वायर मेट्रेससह) किं. रु. २२
" घडीचे बांक " ५॥
" आरामखुर्ची " ९
" टॉवेलस्टँड " ४
" वॉशस्टँड (भांड्यांसह) " ३
" शेल्व्हज किं. रु. ३ पासून १० पर्यंत.
" घडीचें टेबल किं. रु. ५

[फॅक्टरी-खेतवाडी मेनरोड, गिरगांव-मुंबई.]

यांशिवाय दुसरें पुष्कळ तऱ्हेचें पितळेचें, लोखंडी व इतर धातूंचें उपयोगी सामान तयार होतें. किंमतीची अर्धी रक्कम आगाऊ पाठविल्यास माल व्ही. पी. नें पाठवूं. व्यापाऱ्यांस भरपूर सवलती. [5-12]

डॉ० फडके यांचें [2-12]

अर्धशिशीवरील

रामबाण औषध !

१५ मिनिटांत हटकून गुण ! या औषधानें कसलेंहि डोकें दुखणें तत्काळ बंद होतें. अनुपान बाटलीसोबत. किं. ६ आणे. पॅ. व पो. खर्च निराळा पडेल. पत्ता डॉ. जी. जी. फडके, मिरजफोर्ट.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

धी कृष्णा डाइंग्, वीव्हिंग्, ॲण्ड् ट्रेडिंग् कंपनी, लिमिटेड्, वाई.

[5-12] शाखा—बनहट्टी.

स्थापना १९०६.

हिंदुस्थानसरकारच्या १८८२ च्या कायद्याप्रमाणें ही कंपनी रजिस्टर केलेली आहे.

भांडवल रु. ५०,०००.

प्रत्येक भाग रु. २५ चा, याप्रमाणें एकंदर भाग २०००. या कंपनीचे भाग घेऊं इच्छिणारांनीं अर्जासोबत प्रत्येक भागास रु. ५, भाग दिल्यानंतर रु. १०, व नंतर रु. ५ द्यावे लागतात. भागीदारांस व्याज ६ टक्क्यांखालीं दिलें गेलें नाहीं. ऑईल् इंजिनच्या शक्तीवर धान्य दळण्याचीं, गळित धान्यापासून तेल काढण्याचीं व भातापासून तांदूळ तयार करण्याचीं व हळद स्वच्छ करण्याचीं यंत्रें सुरू केलीं आहेत. बनहट्टी येथील शाखेंत रंगाचें व रेशमी कद विणण्याचें काम केलें जातें. विशेष माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

मेसर्स कोठावळे ब्रदर्स आणि कंपनी,
वाई, जि. सातारा.

अचूक [5-12]

शक्ति देणाऱ्या
आतंकनिग्रह गोळ्या.

रक्तसंबंधी सर्व प्रकारचे विकार व अशक्तता यांचा नाश करणाऱ्या सुप्रसिद्ध पौष्टिक गोळ्या. किंमत ३२ गोळ्यांच्या डबीचा १ रुपया.

वैद्यशास्त्री मणिशंकर गोविंदजी,
मालक—आतंकनिग्रह औषधालय.

हेड ऑफिस—जामनगर—काठेवाड.
शाखा नं. १ काळबादेवी रोड, मुंबई.
शाखा नं. ३ बुधवार पेठ, पुणें शहर.

बाहेरगांवच्या लोकांची
उत्तम सोय.

सर्व प्रकारचीं सुवासिक तेलें, अत्तरें, सेन्दस्, लव्हेन्डर; मेणबत्त्या, बटन्स् वगैरे सर्व प्रकारचें स्टेशनरी सामान; सर्व प्रकारचीं इंग्लिश मराठी पुस्तकें व याशिवाय मुंबईत मिळणारा इतर कोणत्याहि तऱ्हेचा माल, अगदीं कसोशीनें खरेदी करून माफक कमिशननें पाठविला जाईल. दिवाळीकरितां उंची कनोजी अत्तरें उटण्यांसह विक्रीस तयार.

दर पेटीस किं रु. ५ व ३.

सुवासिक दंतमंजन. डबी. किं. ३ आणे.
सत्वर गुणकारी गजकर्णमलम. किं. ०४

जोशीब्रदर्स आणि कंपनी,
कमिशन् एजन्टस्,
[2-12] कांदेवाडी, मुंबई नं. ४.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.



विहंगमदूत.

चित्रकार—श्रीयुत अ. म. माळी, मुंबई.]



प्रासंगिक विचार.

महाराष्ट्रीय साहित्यसंमेलन.

सन १९०९ सालीं बडोदें येथें श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या महनीय आश्रयाखालीं साहित्यसंमेलनाचें अधिवेशन झालें. त्यावेळीं संमेलनास गेलेल्या पाहुण्यांचा इतका आदरसत्कार झाला, कीं, पाहुणचारानें आलेली सुस्ती मोडण्यास तीन वर्षें लागलीं ! अर्थात् या तीन वर्षांच्या लंघनानें साहित्यसेवकांस चांगली क्षुधा लागून, अकोलें येथील गेल्या संमेलनाच्या स्वागतमंडळीचे अध्यक्ष रा. ब. महाजनि यांनीं आपल्या स्वागतपर भाषणांत आशा प्रदर्शित केल्याप्रमाणें, वऱ्हाडची साधी पण प्रेमानें वाढलेली भाजीभाकर गोड लागली, यांत आश्चर्य नाहीं. विदर्भप्रांत जसा पुराणप्रसिद्ध व इतिहासप्रसिद्ध, तसाच विशिष्ट सुलभ व मधुर भाषाशैलीविषयीं संस्कृत वाङ्मयांतहि प्रसिद्ध आहे; एवंच, सरस्वतीच्या प्राचीन क्षेत्रांमध्यें त्याची गणना होते. त्या ठिकाणीं रा. ब. अण्णासाहेब महाजनींसारख्या धुरीण महाराष्ट्र पंडितांच्या प्रयत्नानें महाराष्ट्र सारस्वताच्या उपासकांचें संमेलन भरलें व अध्वर्युस्थानी श्रीयुत हरिभाऊ आपट्यांसारखे लेखनवाचनाची दीर्घ तपस्या केलेले आणि महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या साक्षर वर्गास अत्यंत प्रिय झालेले गृहस्थ लाभले, हा खचित मोठा संस्मरणीय योग होय. अकोलें येथील मंडळीनें हें संमेलन उत्कृष्ट प्रकारें यशस्वी करण्याकरितां शक्य तितके प्रयत्न केले, व त्या प्रयत्नांनां खरोखर यशहि आलें, ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय. अकोल्यासारख्या ठिकाणीं महाराष्ट्रांतील किती मंडळी जाईल याविषयीं प्रथम शंका वाटत होती; परंतु अकोलेकरांच्या निमंत्रणास मान देऊन पुणें, मुंबई, सातारा, कोल्हापुर, बडोदें, इंदुर वगैरे ठिकाणचे बरेच साहित्यसेवक गेले होते. इंदुरच्या व कोल्हापुरच्या महाराजांनीं आपल्या खर्चानें संमेलनास प्रतिनिधि पाठविले होते. बडोद्याच्या श्रीसयाजीराव महाराजांनीं पूर्ण सहानुभूति प्रदर्शित केली होती व त्यांच्या दिवाणसाहेबांनीं सहविचारिणी सभेस प्रतिनिधि पाठविण्याचें सुचवून, दहा प्रतिनिधि बडोद्याहून येतील, असें संमेलनाच्या स्वागतमंडळीस कळविलें होतें. परमपूज्य दादाभाई नौरोजी, मि. दयाराम गिडूमल, खानबहादुर खंडाळावाला वगैरे मोठमोठ्या गृहस्थांनीं, त्याचप्रमाणें निरनिराळ्या संस्थांनीं संमेलनाला सहानुभूतीचे संदेश पाठविले होते. आणि सर्वांत अभिनंदनीय व उदाहरणीय गोष्ट ही, कीं, बंगीय साहित्यपरिषदेनें दोन व हिंदी साहित्यपरिषदेनें एक असे प्रतिनिधि या संमेलनास हजर राहण्यासाठीं पाठविले होते. बंगाली, हिंदी, मराठी, गुजराथी या भाषा एकाच मायभाषेचीं लेंकरें असल्यामुळें त्यांच्यांत असें प्रेम दिसावें, हें एक प्रकारें स्वाभाविकच होय. राजकीय, सामाजिक वगैरे वावतींत जरी निरनिराळ्या प्रांतांमध्यें दळणवळण वाढत आहे, त्याचप्रमाणें भाषेच्या वावतींतहि वाढत आहे.

राज्यांत फिरत्या लायब्ऱ्या स्थापून हजारों पुस्तकें साधारण लोकांनांहि घरबसल्या वाचावयास मिळावीं, अशी सोय केली आहे. अर्थात् 'शारदामंदिर' उघडण्याचा मान त्यांनांच देण्यांत आला, हें सर्वथैव अनुरूपच झालें. मंदिर उघडल्याचें जाहीर करितांना महाराजसाहेबांनीं जें सुंदर व विचारपरिप्लुत भाषण केलें, त्यांत मराठी भाषेविषयींचा, मराठी राष्ट्राच्या परंपरेसंबंधाचा त्यांचा उत्कट अभिमान स्पष्टपणें दिसून आला. ग्रंथसंग्रहालय म्हणजे भूत व वर्तमानकालीन उज्वल विचार व कल्पना यांचें भांडार होय, व हें भांडार कितीहि लुटलें गेलें तरी तें कमी होत नाहीं, इतकेंच नव्हे, तर ज्याप्रमाणें शाळा व पाठशाला हीं शिक्षणाचीं मंदिरें होत, त्याचप्रमाणें ग्रंथसंग्रहालयें हीं विशेष व्यापक प्रमाणावरचीं आणि शाळा किंवा कॉलेज यांचा उंबरठा ओलांडल्यावरहि उपयोगीं पडणारीं अशीं लोकशिक्षणाचीं मंदिरें होत, ही गोष्ट महाराजसाहेबांनीं आपल्या भाषणांत उत्कृष्ट रीतीनें विशद करून सांगितली. ग्रंथसंग्रहालय म्हणजे The People's University—बहुजनसमुदायाचें विश्वविद्यालय—होय, असें महाराजांनीं म्हटलें तें अक्षरशः खरें आहे. या विश्वविद्यालयांचा चांगल्या रीतीनें उपयोग करावयास आह्मां हिंदी लोकांनां अद्यापि शिकावयाचें आहे. मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या पुरस्कर्त्यांनीं दीर्घ परिश्रम व निश्चय यांच्या बलावर त्या संस्थेस जें हल्लींचें स्वरूप प्राप्त करून दिलें आहे, त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होईल. ही साहित्यसेवा कोणत्याहि प्रकारें कमी महत्त्वाची नसून महाराष्ट्रीयांनीं तिकडे दुर्लक्ष्य केलें नाहीं, याबद्दल निःसंशयपणें महाराष्ट्र सारस्वताच्या प्रत्येक हितचिंतकास समाधान वाटलें पाहिजे.

जातिभेदनिषेधक परिषद्.

गेल्या दिवाळीच्या सणांत मुंबई येथें आर्यन् प्रदरहुड या संस्थेमार्फत जातिभेदनिषेधक परिषद् भरविण्यांत आली. या परिषदेला प्रतिनिधि व प्रेक्षक मिळून जो भव्य लोकसमुदाय जमला, आणि एकंदरींत सर्वत्र परिषदेसंबंधानें लोकांत जो उत्साह दिसून आला, तो खरोखरच अपेक्षेच्या बाहेर होता. अशा प्रकारें परिषदेला जी सहानुभूति व जें साहाय्य मिळालें, त्याबद्दल खुद्द परिषदेचे अध्यक्ष न्या. सर नारायण चंदावरकर यांनींहि सानंद आश्चर्य प्रदर्शित केलें. जातिभेदासंबंधानें 'मनोरंजना'त निरनिराळ्या विद्वान् व पुढारी माणसांचीं मतें प्रदर्शित होतच आहेत, व त्यावरून साधारणपणें सर्व सुशिक्षित वर्गांत जातिभेदाचें प्रचलित स्वरूप निष्कारण तीव्र व प्रगतिविरोधी आहे, याविषयीं एकवाक्यता आहे, असें कोणालाहि दिसून येणारें आहे. आर्यन् प्रदरहुडमार्फत भरलेल्या परिषदेंत गुजराथी लोकांचा बराच भरणा होता, ही विशेष समाधानाची गोष्ट होय. महाराष्ट्रापेक्षां गुजराथेमध्यें जातिभेदाचे निर्बंध फार कडक आहेत, व जातपंचायतींच्या भीतीमुळें जातिभेदाविरुद्ध बोलण्यास व जातिबंधनें शिथिल करण्यास गुर्जरबंधु सहसा धजत नाहींत, ही गोष्ट लक्ष्यांत घेतली, तर लोकमताचा ओघ समाजसुधारणेच्या दिशेनें वाहत असून तो ओघ कायमचा थांबविणें आतां जातिबहिष्कारांच्या बागुलबुवाला शक्य नाहीं, असें दिसून येतें. ना. बसु यांनीं विशिष्ट विवाहाच्या कायद्यांत सुधारणा करण्याचें बिल हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलांत आणलें होतें, परंतु त्याचा योग्य विचार न होतां तें रद्द झालें. याच बिलाच्या नमुन्यावर परंतु केवळ हिंदुहिंदूंमधील लग्नापुरती अट ठेवून या परिषदेमध्यें सरकारापाशीं कायदा मागण्याचा ठराव पास करण्यांत आला. या मागणीचा तरी योग्य अधिकाऱ्यांकडून योग्य रीतीनें विचार होईल, आणि हिंदुसमाजाच्या दृष्टीकरणाआड येणारी एक कायदेशीर अडचण दूर होईल अशी आह्मी उमेद बाळगितों. अनेक जाति व असंख्य पोटजाति यांच्यामुळें हिंदुसमाज विस्कळित झाला आहे व त्यामुळें हरएक बाबतींत कमजोरपणा आला आहे, हें तर खरेंच, पण त्याशिवाय कित्येक लहान लहान पोटजातींमध्यें मुलांमुलींचीं लग्नें होण्याच्या बाबतींत मोठी अडचण होत आहे. गुजराथेंतील कित्येक पोटजातींच्या एकंदर माणसांची (पुरुष स्त्रिया व मुलें मिळून) २०।३०।५०।८० इतकी लहान संख्या आहे. एका पोटजातींत तर अवघीं तीन कुटुंबें आहेत, असें समजतें. या पोटजातींचें दुसऱ्या मोठ्या जातींबरोबर एकीकरण होणें अत्यंत अवश्य व इष्ट आहे परंतु ज्या पोटजाति म्हणून समजल्या जातात, त

हिवतापावर खात्रीचें औषध 'ओडमेन्स मलेरियस पिल्स', हेंच आहे.
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. लिमिटेड. मुंबई.

पोटजाति नसून मुख्य जातीच आहेत, असें जातिभेदाचे पुरस्कर्ते प्रतिपादित असल्याकारणानें वरील आपत्ति दूर होण्याचा मार्ग खुंटला आहे. अशा स्थितींत जातिभेदाच्या मुळावरच कुऱ्हाड चालविण्याचा मार्ग सुधारणावादी लोकांनां पसंत पडला तर त्यांत आश्चर्य नाहीं. हल्लीं निकडेतिकडे ज्ञातिपरिषदांच्या चळवळी चालू आहेत. या चळवळींनां वेळींच योग्य दिशा मिळाली नाहीं, तर त्यांपासून एकंदर हिंदुसमाजाची प्रगति न होतां पिच्छेहाटच होईल, अशी फार भीति आहे. ह्मणून निरनिराळ्या जातिपरिषदांच्या पुरस्कर्त्यांनीं आपल्या चळवळींमध्यें सर्व हिंदुसमाजाचें एकीकरण व दृढीकरण हेंच अंतिम साध्य दृष्टीपुढें ठेविलें पाहिजे. जातिभेदाच्या व्यापक प्रश्नाचा विचार केला नाहीं, जातिभेदापासून हिंदुसमाजावर झालेले अनिष्ट परिणाम ओळखले नाहींत, तर पोटजातींच्या एकीकरणाचा प्रश्नहि सुलभपणें सुटावयाचा नाहीं, हेंहि विसरतां कामा नये. कारण, एकीकरणवादी ज्यांनां पोटजाति असें ह्मणतात, त्या पोटजाति नसून स्वतंत्र मुख्य जातीच आहेत, असें ह्मणणाऱ्या प्रतिपक्षाची एरव्हीं समजूत पडावयाची नाहीं. असो. आर्यन् ब्रदरहुडमार्फत भरलेल्या परिषदेला गुजराथी व दक्षिणी समाजांतील कांहीं भगिनीहि हजर होत्या, व परिषदेच्या कार्यास त्यांची सहानुभूति होती, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी असून, स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्यास, सामाजिक सुधारणेस स्त्रीवर्ग आड येतो ह्मणून आजमितीस जी तक्रार ऐकूं येते, ती ऐकूं येणार नाहीं, असें त्यावरून स्पष्टपणें सिद्ध होतें. परिषदेमार्फत सहभोजनाचा समारंभ झाला, व त्यावेळीं निरनिराळ्या जातींतील स्त्रीपुरुषांनीं जातिभेदानुसार पंक्तिभेद न पाळतां एकत्र धान्यशाकयुक्त भोजनाचा लाभ घेतला, व अशा मंडळींची संख्या दीडशेंपेक्षां जास्त होती, यावरून उत्तीवरोवर कृति करून दाखविण्याऱ्या समाजसुधारकांची संख्या वाढल्या प्रमाणावर आहे, असें दिसून येतें. याउप्परहि कांहीं कच्चा दिलाची मंडळी सुधारकचमूतून गळून मागें पडली, तरी जातिभेदाचें प्राबल्य कमी कमी होत जाणार, हें निःसंशय आहे! ज्या व्यक्ति मागें पडतील त्यांच्या जागा भरण्यास दुसरी मंडळी पुढें येईल व हिंदुसमाजाच्या सर्व घटकावयवांचा एकजीव होण्याचा काळ, आज नाहीं, तथापि कांहीं वर्षांनीं तरी प्राप्त होईल, याविषयीं आमची खात्री आहे. आर्यन् ब्रदरहुडचे चालक व त्यांचा साहाय्यकारीवर्ग यांचें परिषदेचें कार्य नेटानें पार पाडल्याबद्दल अभिनंदन करून, सर्व जगाचा पिता परमेश्वर वियम भेद नष्ट करून हिंदुसमाजास बलवीर्यशाली व ऐक्यतासंपन्न करो, व अखिल मानवजातीच्या हितकार्यांगधील आपल्या कामाचा वांटा उचलण्यास सामर्थ्य देवो, असें आह्मी इच्छितों.

कार्ली हिंदु सॅनिटोरियम.

सर भालचंद्र कृष्ण यांच्या प्रयत्नानें कार्ले येथें हिंदु क्षयरोग्यांकरितां एक आरोग्यभवन स्थापण्यांत आलें आहे. सध्यांच्या काळीं क्षयरोगाचा प्रसार वाढल्या प्रमाणावर असून अनेक तरुण होतकरू माणसें आणि त्यांतहि लेंकुरवाळ्या तरुण स्त्रिया त्या रोगाला प्रत्यहीं बळी पडत आहेत. क्षयरोगावर मुख्य उपाय झटला ह्मणजे रोग्याला मोकळ्या, स्वच्छ व कोरड्या हवेच्या जागीं नेऊन ठेवणें हा होय, असें आधुनिक भिषग्वर्यांचें मत आहे. यामुळेंच क्षयरोग, असें निदान ठरलें ह्मणजे डॉक्टरलोक बहुधा वरीलसारख्या हवेच्या ठिकाणीं जाऊन राहण्यास रोग्याला सांगत असतात. गरीब व मध्यम स्थितींतील लोकांनां अशा ठिकाणीं जाऊन राहण्याचा खर्च सोसणें शक्य नसतें, व त्याकरितांच वरील संस्था स्थापण्यांत आली आहे. या संस्थेसाठीं ऐशीं हजार रुपये फंड जमला होता; परंतु एक लाखावर खर्च झाला असून अद्यापि थोडें बांधकाम व्हावयाचें आहे व शिवाय संस्थेचा चालू खर्च दरमहा एक हजार रुपये आहे. तो चालण्यास कायमचा फंड पाहिजे. या फंडासाठीं वर्गणी गोळा करण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली असून या कमिटीनें गेल्या दिवाळीच्या सणांत घरोघरीं स्वयंसेवक पाठवून वर्गणी गोळा करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें सुमारें तीनशें चारशें स्वयंसेवकांनीं वर्गणी गोळा केली. कित्येक स्त्रियाहि स्वयंसेविका होत्या. या भगिनींनीं दाखविलेल्या सार्वजनिक कामाच्या आस्थेबद्दल खरोखरच कौतुक केलें पाहिजे. स्वयंसेवकांकडून वर्गणी गोळा करविण्याची व्यवस्था सोशल सर्व्हिस लीगच्या मंडळीनें उत्कृष्ट रीतीनें पार पाडली. वर्गणीची रक्कम सुमारें पांच हजार रुपये होईल, असा अंदाज आहे.

कामिनीया तेलाच्या बाटलीवरोबर 'केस आणि त्यांची रचना—धी हेअर अॅण्ड इटस् हेल्थ' नांवाचें पुस्तक गुंडाळलेलें असतें तें प्रत्येकास वाचण्याची आह्मी शिफारस करतों.



चालू कादंबरी.

शारदा

या कादंबरीच्या मागील प्रकरणांचा सारांश.—(१) मंदाकिनीच्या तीरावरील एकान्त वनांत एक तरुणी एका दोन वर्षांच्या बालिकेस एका प्रौढ योग्याच्या स्वाधीन करते. (२) पांडोबातात्यांच्या शाळेंतील मुलांच्या चेष्टा. गदाधर फरारी हंबीराच्या शोधास जातो. (३) नानासाहेब जहागीरदारांच्या बागेत हंबीर, शारदा व तिच्या मैत्रिणी यांच्या बाल्यलीला. शारदेला तिच्या मैत्रिणींनीं पुष्पालंकारांनीं सजविल्यावर त्यांच्या आग्रहानें हंबीर तिच्या गळ्यांत हार घालीत असतां तो गळ्यांत न पडतां चुकून तिच्या पायांवर पडतो. (४) नानासाहेबांची राजधानी कुंदपुर. (५) पूर्वीची थोडी हकीगत. नानासाहेबांची पत्नी सकवारबाई परलोकवासी झाल्यावर आप्तेष्टांच्या द्वितीय विवाह करण्याच्या विलक्षण आग्रहाकडे दुर्लक्ष्य करून नानासाहेब पुनर्दारपरिग्रह न करण्याची आपली भीष्मप्रतिज्ञा नेटानें पार पाडतात. (६) शारदेला शिक्षण द्यावयाच्या नानासाहेबांच्या विचाराला त्यांचे आश्रित चिंतामणशास्त्री हरकती उपस्थित करतात. (७) हंबीर हा आपले उपकारकर्ते मित्र प्रतापराव जाधव यांचा मुलगा, असें नानासाहेबांनां कळून येतें. (८) 'कौतुकागारां' तील 'कनकदीपां'त स्त्रीच्या हातानें लिहिलेल्या एका रहस्यमय कागदाबद्दल नीलकंठ दीक्षित व चिंतामणशास्त्री या उभयतांमध्यें उहापोह.

प्रकरण नववें.

दीक्षितांची मनःस्थिति.

नानासाहेबांनीं व्यवस्था केल्याप्रमाणें गदाधर व हंबीर हे दोघेहि नीलकंठ दीक्षितांच्या पाठशाळेंत संस्कृत व दामोदरपंत मास्तरांजवळ इंग्रजी शिकूं लागले. वस्तुतः पाहिलें, तर हें विधान गदाधराविषयीं तितक्या निर्भय रीतीनें करतां येत नाहीं. कारण, या दोन्ही गुरुजीकडे धडे घ्यावयाच्या वेळीं स्वारी बहुतेक गैरहजरच असे, असें झटलें तरी चालेल. या दोन्ही स्थलापेक्षां त्याला नानासाहेबांचा तालिमखाना व घोडखानाच अधिक पसंत पडे. या तालिमखान्यांत नानासाहेबांनीं बाळगिलेल्या मल्लांपाशीं कुस्तीचे पांचपेंच शिकण्यांत, दांडपट्याचे हात करण्यांत व सरकारी घोडखान्यांतील पाणीदार घोड्यांवर बसून घोडेस्वारांबरोबर दौडा मारण्यांत गदाधराचा बहुतेक काळ निघून जात असे. मधुनमधून घोडखान्यांतील सैसांच्या नकळत एकादा सुंदर घोडा लांबवून, त्याच्या तोंडांत दोरीचीच लगाम देऊन व वाड्यांतील दरवानांकडून लाडीगोडीनें हळूच ढालतरवार पैदा करून रानडुकरें व इतर पशु यांची शिकार करण्यासाठीं गदाधर कुंदपुरानजीकच्या जंगलांत खुपाल एकटादुकटाहि जात असे.

एकदां कुंदपुर व आसपासचा प्रदेश यांमध्यें एक वाघ पिसाळला होता. त्यावेळीं त्यानें बराच धुमाकूळ उडवून दिला होता. आज अमक्याचा पाळीव कुत्रा नाहींसा झाला, तर उद्यां तमक्याच्या गोठ्यांतील घांसरीच नाहींशी झाली, तीन्हीसांजा टळून गेल्यावर गांवाच्या बाहेर अमुक ठिकाणीं त्या फलाण्याला वाघानें अडविलें, अशा बातम्या हळुहळू बहुधा प्रत्येकाच्या तोंडून ऐकूं येऊं लागल्या. या वेळेच्या सुमारास आमच्या गदाधराची अगदीं धांदल उडून गेल्यासारखी दिसत होती. स्वारीला यावेळीं एका क्षणाचीहि फुरसत नव्हती. थोड्याच दिवसांनीं नानासाहेबांच्या एका दरवानानें एक भला थोरला पठाडा वाघ मारून वाड्यांत आणून नानासाहेबांनां दाखवून त्यांजपासून चांगलेंच बक्षीस मिळविलें. आतां खरी खोटी गोष्ट कोणाला ठाऊक ! परंतु गांवांत तर त्यावेळीं अशी एक दाट वातमी उठली कीं, गदाधराच्या तरवारीच्या प्रचंड प्रहारानेंच तो प्रचंड वाघ ठार झाला व जहागीरदारसाहेबांपासून बक्षीस उपटणारे शिपाईबुवा

कामिनीया तेल वापरल्यानें पुरातन काळापासून चालत आलेली व अतिशय मौल्यवान् समजली गेलेली अशी केसांची सुस्थिति त्वरित प्राप्त होते.

लावेळीं दूर उभे राहून सुरक्षितपणें चाललेला तमाशा मुकाट्यानें पहात होते. असो.

आमची नायिका शारदाहि चिंतामणशास्त्रीबुवांच्या हरकतींची विशेष परवा न करतां पांडोबातात्यांजवळ शिकूं लागली. तिची बुद्धि चांगली तीव्र असल्यामुळें थोड्याच अवकाशांत तिला अक्षरओळख होऊन ती चांगली वाचावयासहि लागली. उजळणी वगैरे 'अंकशास्त्र' तिला वरेंच अवगत झाल्यावर नानासाहेबांच्या अनुज्ञेनें शारदेनें नीलकंठ दीक्षितांजवळ मराठी व संस्कृतहि शिकण्यास सुरुवात केली.

* * *

हळुहळू तीन वर्षें शांतपणें जाऊन अनंतकालप्रवाहास मिळालीं. आमच्या कथानकांतील मुख्य मुख्य पात्रांच्या चरित्रक्रमांत विशेषसा फरक पडला नव्हता. शारदा, हंबीर व गदाधर यांचें आपापल्या परीनें शिक्षण चांगलेंच चाललें होतें. गदाधराचें दुसऱ्या बाजूचें शिक्षण जोमांत चालू होतें. नानासाहेब मात्र अलिकडे अलिकडे किंचित् चिंतामग्न झाल्यासारखे दिसत.

एके दिवशीं बोलतां बोलतां नानासाहेब नीलकंठ दीक्षितांनां म्हणाले "दीक्षित ! आज किती दिवस तरी आपणाला एक गोष्ट मी विचारीन विचारीन म्हणतों आहें-आपली अनुमति असेल तर—"

"खुपाल विचारा नानासाहेब ! कोणतीहि गोष्ट मला विचारायला आपणाला माझ्या अनुमतीची जरूर नाहीं." दीक्षित किंचित् गंभीरपणानें व कांहींसे हंसून म्हणाले.

"हंबीराची जन्मपत्रिका तयार करून घ्यायला मी आपणाला विनंति करणार आहें. त्याला कांहीं अडचण आहे का ?"

"अडचण कसली ? त्याचा जन्मशक, तिथि व वेळ हीं मला नक्की समजल्यास हंबीराची पत्रिका तयार व्हायला फारसा अवकाश लागणार नाहीं."

नानासाहेब गंभीर स्वरानें म्हणाले "ज्या ब्राह्मणाच्या बाईनें अनाथ हंबीराला वाढवून लहानाचें मोठें केलें, तिला कदाचित् याविषयीं बरोबर माहिती असण्याचा विशेष संभव आहे. तिला विचारून याविषयीं मी आपणाला नक्की माहिती देतों. माझ्या शारदेची जन्मपत्रिकाहि आपल्या हातूनच तयार झाली आणि म्हणूनच हंबीराची जन्मपत्रिकाहि आपल्या हातूनच तयार व्हावी, अशी माझी इच्छा आहे. हंबीर अनाथ असूनहि त्याची जन्मपत्रिका मीं आपणाला कां तयार करावयास सांगतों आहें, हें दीक्षित ! आपल्या लक्ष्यांत आलें नसेल असें नाहीं."

नानासाहेबांचे हे शब्द ऐकून दीक्षितांच्या मनांत कांहीं येऊन ते एकदम चमकले ! 'कौतुकागारां'तील 'कनक-दीपां'त असलेल्या, स्त्रीच्या हस्ताक्षरांनीं लिहिलेल्या त्या रहस्यपूर्ण कागदाचें त्यांनां स्मरण होऊन त्यांच्या हृदयांत कसेंसेंच होऊं लागलें ! अरेरे ! माधवाचार्यांसमोर शपथ घेऊन आपण कबूल केल्याप्रमाणें ज्या दिवशीं तो कागद शारदेच्या हातीं द्यावयाला आपण बद्ध झालों आहों, तो दिवस आतां फार दूर नाहीं ! कोमल हृदयाच्या त्या सरल बालिकेवर त्या पत्रामुळें कोणकोणते अनिष्ट व दुःखपूर्ण प्रसंग येणार आहेत कोण जाणे ! तो अनर्थाचा वृत्तान्त लिहिलेला कागद तिला स्वतः वाचतां यावा, म्हणूनच काय इतके श्रम घेऊन आपण तिला शिक्षण देत आहों ? हे व अशा तऱ्हेचे अनेक विचारतरंग दीक्षितांच्या अंतःकरणांत क्षणार्धांत विद्युल्लतेनें येऊन गेले ! नानासाहेबांच्या आपणाला कांहींहि उत्तर न देतां, गंभीरपणानें, परंतु खिन्न दृष्टीनें त्यांच्याकडे एकवार पाहून, चिंताभाराक्रान्त हृदयानें नीलकंठ दीक्षित हळुहळू तेथून निघून गेले. त्यांचें हें चमत्कारिक वर्तन पाहून त्या प्रसंगीं नानासाहेबांनांहि आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

ज्या दिवशीं आमच्या गुरुवर्य पांडोबातात्यांच्या शाळेला गदाधर व हंबीर यांनीं रामराम ठोकला, त्यानंतर एक दोन दिवसांनींच हंबीर, गदाधर व त्याची विधवा माता हीं त्रिवर्ग नानासाहेबांच्या वाड्यांत राहूं लागलीं. गदाधराच्या आईला या उभय मुलांसह वाड्यांत रहावयाला आणण्याविषयीं नानासाहेबांनीं चिंतामणशास्त्र्यांमार्फत विनंति केली होती, हें वाचकांनां स्मरत असेलच. त्यांच्या विनंतीला नर्मदाबाई पहिल्यानें कबूल झाल्या नाहींत. आपल्यासारख्या गरिबांनीं कांहीं झालें तरी असा लहान तोंडी मोठा घांस घेणें इष्ट नाहीं, असें त्यांनां वाटलें. त्यांनीं या बाबतींत चिंतामणशास्त्र्यांनां अनेक अडचणी दाखविल्या.

डोकें फार दुखत असेल तर देशोच्या दोन वड्यांची पूड पाण्याबरोबर खावी. लगेच गुण !
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

परंतु खुद्द नानासाहेबांनीं त्यांच्या झोंपडींत येऊन त्यांनां वाड्यांत येऊन रहाण्याविषयीं अतोनात आग्रह केल्यामुळें त्या पुण्यशील थोर पुरुषाच्या विनंतीचा अनादर करणें नर्मदाबाईनां अर्थातच अशक्य झालें, व शेवटीं, दोन्ही मुलांसह सरकारवाड्यांत येऊन रहाणें त्यांनां भाग पडलें.

नर्मदाबाईंचें नांव वाड्यांत फारसें कोणाला माहित-हि नव्हतें, असें झटलें तरी चालेल. हंबीर त्यांनां 'आत्याबाई' या नांवानें संबोधीत असे व त्यामुळें त्याच नांवानें वाड्यांत सर्वजण त्यांनां हांक मारीत व पुढें त्यांचें हेंच नांव कायम झालें. आपण तरी सर्वांच्या विरुद्ध उगीच कशाला जा ? नर्मदाबाईनां आपणहि 'आत्याबाई'च म्हणूं.

नानासाहेबांनीं विचारल्यावरून आत्याबाईनीं नीलकंठ दीक्षितांनां हंबीराचा जन्मशक, तिथी व जन्मवेळ हीं आठवलीं तितकीं बरोबर सांगितलीं. दीक्षितांनीं या बाबतींत आपणाकडून बरीच टाळाटाळ करून पाहिली; परंतु त्यांत त्यांनां विशेष यश येणें अगदीं असंभवनीय होतें. शेवटीं, नानासाहेबांनीं निकड लावल्यामुळें, आत्याबाईनीं दिलेल्या जन्मवेळेवरून हंबीराची जन्मपत्रिका त्यांनां बऱ्याच तांतडीनें तयार करून देणें भाग पडलें.

हंबीराची पत्रिका पूर्ण करून ज्या वेळीं दीक्षितांनीं नानासाहेबांच्या हातीं दिली, त्यावेळीं त्यांच्या विपण्ण हृदयाचें प्रतिबिंब त्यांच्या चेहेऱ्यावर इतकें स्पष्टपणें उमटलें होतें, कीं, तें दृष्टीस पडतांच नानासाहेबांनांहि कसेंसेंच वाटल्यावांचून राहिलें नाहीं. खिन्न स्वरानें त्यांनीं दीक्षितांनां विचारलें "दीक्षित ! आज आपण असे उदास कां बरें दिसतां ?"

खिन्नपणें किंचित् हंसून दीक्षितांनीं उत्तर दिलें "नाहीं बुवा ! मी कांहीं उदास नाहीं."

"दीक्षित ! अतिप्रसंग करतों याची आपण मला क्षमा करा. आपण या प्रसंगीं आपल्या मनांतील खरा भाव मजपासून लपवून ठेवित अहां, असें आपल्या मुद्रावरूनच मला स्पष्ट दिसत आहे. माझ्या पोरीच्या लग्नाची गोष्ट निघाली, कीं, आपण त्या बाबतींत अगदीं उदासीन दिसतां, त्यासंबंधीं आपण कांहींसुद्धां कधीं बोलत नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्या गोष्टीपासून आपल्या अंतःकरणाला कांहींतरी मोठें दुःख होत असावें, असेंहि कांहीं प्रसंगीं मला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. दीक्षित ! आपण माझे परम पूज्य गुरु आहांत–माझ्या व माझ्या वंशाच्या हिताहिताची काळजी आपणाला पूर्णपणें आहे. मला आपण स्पष्टपणें खरें सांगा–हंबीर व शारदा यांच्या जन्मपत्रिकांत कांहीं अशुभ लक्षणें आपणाला दिसून आलीं काय ? त्यांच्या पत्रिकांची तुलना करतां कांहीं अनिष्ट योग किंवा अमंगल ग्रह आपणाला आढळले काय ? सांगा दीक्षित ! मला काय तें स्पष्टपणें सांगा."

नीलकंठ दीक्षितांनीं खालीं मान घालून खिन्न स्वरानें विचारलें " शारदेचें लग्न आतां लवकरच करून टाकावयाचें असें आपण ठरविलें आहे काय ? "

नानासाहेबांनीं किंचित् आश्चर्यानें झटलें " या-संबंधानें आपणालातरी विशेष शंका असण्याचें कांहीं कारण नाहीं. मला वाटतें, कुंदपुरांतील प्रत्येक मनुष्याला ही गोष्ट आतां ठाऊक झाली असेल. हंबीराशीं आपलें लग्न लवकरच होणार आहे, ही गोष्ट आतां खुद्द ताईलाहि मी न बोलतां कळून चुकली आहे. आमच्या ज्ञातींतील अनेक मोठ्या सरदारांदरकदारांकडून व कुलशीलवंत श्रीमंत मंडळीकडून माझ्या पोरीला आजपर्यंत मागण्या आल्या, परंतु माझे परलोकवासी मित्र प्रतापराव यांच्या मुलाशींच माझ्या शारदेचा विवाह व्हावा, अशी माझी अतिशय इच्छा असल्यामुळें त्या सर्व मागण्या मला नाकाराव्या लागल्या. "

नीलकंठ दीक्षितांनीं गंभीरपणानें नानासाहेबांनां विचारलें " परंतु यजमानसाहेब ! मी विचारतों, शारदेचा इतक्या लवकर आपणाला विवाह करण्याचें प्रयोजन काय ? हंबीर काय किंवा शारदा काय, दोघेंहि अद्यापि लहान मुलेंच आहेत. इतक्या लहान वयांत त्यांनां विवाहाच्या शृंखलेनें बद्ध करून त्यांच्या विद्याप्रगतीच्या मार्गांत आपण होऊन अडचणी उपस्थित करणें इष्ट नाहीं, असें मला वाटतें. आपणालाहि मजप्रमाणेंच वाटत असलें पाहिजे, अशी माझी खात्री आहे. आणखी कांहीं वर्षेंतरी निदान ताईच्या लग्नाची गोष्ट लांबणीवर टाकली तर नाहीं का चालण्यासारखें ?"

स्प्रिंग जुवेल (रजिस्टर्ड) वसंतऋतूंतील चांफ्याच्या फुलांपासून बनविलेलें. वास अत्यंत मधुर. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं., मुंबई.

नानासाहेब किंचित्काल स्तब्ध होते; नंतर ते म्हणाले "माझ्या ताईला बारावें सरून हें तेरावें वर्ष लागलें आहे. हंबीरालाहि हें पंधरावें वर्ष चालू आहे. हल्लींच्या कालमानाप्रमाणें ह्या उभयतांचें लग्न केव्हांच व्हायला पाहिजे होतें. पण मुलामुलींनां दृढ विवाहपाशांत बद्ध करून लहान वयांत त्यांच्या सर्व तऱ्हेच्या प्रगतीला निरोध करणें इष्ट नाहीं, असें आपणाप्रमाणें मलाहि वाटत असल्यामुळेंच मीं अद्यापि माझ्या पोरीला विवाहरज्जूनें जखडलें नाहीं, आणि अजूनहि कांहीं वर्षे तशींच जातील तर बरें, असें एका अर्थी मलाहि वाटतें. परंतु मी आतां वृद्ध झालों आहें; हें पिकलें पान केव्हां गळून पडून त्याची माती होऊन जाईल, याचा आतां नेम राहिला नाहीं. म्हणून माझ्या पोरीला माझ्या डोळ्यांदेखत हंबीराशीं सुखानें नांदतांना पहावें, एवढीच इच्छा अलीकडे माझ्या हृदयांत अत्युत्कट रीतीनें जागृत झाली आहे. शारदेच्या विवाहाचें हें कार्य मीं स्वतः आपल्या देखत मोठ्या थाटानें उरकून टाकावें, अशी सर्व लोकांची इच्छा आहे व काय असेल तें असो, त्यांच्या इच्छेप्रमाणेंच करावें, असें अलिकडे मलाहि फार वाटूं लागलें आहे. ताईचें लग्न न करतां तिला आणखीहि शिक्षण द्यावें, ही गोष्ट इष्ट असतांहि माझ्या वृद्धत्वामुळें एकदां डोळ्यांदेखत तिला पतीशीं सुखानें संसार करतांना पहावें याच प्रबल इच्छेनें अलिकडे मला कांहीं सुचेनासें झालें आहे. आणि मीहि तिला बारा वर्षेपर्यंत अविवाहित ठेवून तिला शिक्षण दिलें, या गोष्टींत मीं माझ्या मताची पायमल्ली केली नाहीं, यावद्दल मला अभिमानच वाटतो. दीक्षित ! काय सांगूं तुह्माला ? ज्या दिवशीं हंबीराच्या हातांत माझ्या लाडक्या ताईचा हात मीं स्वतः आपल्या हातानें घालीन, तोच माझ्या आयुष्यांतील अत्यंत सुखाचा दिवस होय ! "

सुखाचा दिवस ! शारदेच्या लग्नाचा दिवस हा नानासाहेबांनां खरोखरच सुखाचा दिवस होईल काय ! नानासाहेबांच्या भाषणांतील हे शेवटचे शब्द ऐकतांच नीलकंठ दीक्षितांच्या हृदयांत कसलातरी प्रचंड आघात झाला ! त्यांच्या अंतःकरणांत विलक्षण कालवाकालव सुरू झाली ! कनकदीपांतील त्या रहस्यमय कागदाच्या तुकड्यामुळें नानासाहेबांच्या व शारदेच्या सुदैवाचे तुकडेतुकडे होऊन तो सुखाचा दिवस घोर दुःखाचा दिवस होईल काय ? शारदा व हंबीर या सरल निष्पाप मुलांच्या पवित्र विवाहाच्या दिवशीं, सुंदर मनोहर वसंतवातलहरींनीं युक्त, आनंदानें परिपूर्ण, अशा त्या जोडप्याच्या जीवनप्रभातकालीं, आपण खुद्द आपल्या हातानें अमावास्येच्या रात्रीचा घनघोर अंधकार निर्माण करणार काय ? अशा अत्यंत सुखाच्या दिवशीं आपले यजमान देवतुल्य नानासाहेब यांच्या आयुष्यांतील शेवटच्या भागांत, त्या परम सुखाच्या उत्सवप्रसंगीं, अशा स्वर्गीय, निर्मल आनंदाच्या प्रवाहांत भयंकर कालकूट विष कालविणें विधात्यानें आपल्या नशिबीं लिहिलें आहे काय ? धिक् आपलें जिणें ! तशा तऱ्हेच्या उदासीनतेच्या विचारांनीं नीलकंठ दीक्षितांचें हृदय शतशः विदीर्ण होऊं लागलें !

दीक्षित आपल्या भाषणावर कांहींच न बोलतां खिन्नपणें स्तब्ध बसले आहेत, हें पाहून नानासाहेबांच्या हृदयांत चरर झालें ! त्यांनीं करुणस्वरानें दीक्षितांनां झटलें " दीक्षित ! आपण असे स्तब्ध कां बरें राहिलांत ? आपणाला स्तब्ध पाहून माझ्या मनांत अनेक दारुण कुशंका उत्पन्न झाल्या आहेत. हंबीर व शारदा यांच्या विवाहसंबंधांत कांहीं अनिष्ट आहे, असें कांहीं लक्षण आपणाला आढळून आलें आहे काय ? मला आपण काय तें स्पष्ट सांगा. दीक्षित ! या विवाहांत कांहीं अमंगल आहे काय ? "

दीक्षित खालीं पाहून म्हणाले " अमंगल ? नाहीं-त्यांत तसें कांहीं अ-मंगल किंवा अनि-ष्ट दिसून येत आहे, असें नाहीं-तरी प-ण— "

नानासाहेबांनीं अधीरतेनें विचारलें " तर मग काय दीक्षित ? मला आपण काय तें स्पष्टपणें कां बरें सांगत नाहीं ? "

स्पष्टपणें काय सांगणार ? दीक्षित अतिशय गूढ विचारांत पडले. त्यांची या वेळीं अगदीं चमत्कारिक व अवर्णनीय स्थिति होऊन गेली. या प्रसंगीं काय करावें तें त्यांनां सुचेना ! 'कौतुकागार' उघडून 'कनकदीपां'तील तो भयंकर कागद घेऊन कोणाच्या नकळत तो जाळून पोळून त्याची आपण राख करून टाकावी काय ?

ओडमेन्स मलेरिया पिल्स—एक दिवसाआड, रोज, थंडी वाजून येणाऱ्या तापावर खात्रीचे.
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मा मशीद, मुंबई.

छे ! ही गोष्ट होणें अगदीं असंभवनीय ! आपले वडील बंधु व परमपूज्य गुरु माधवाचार्य यांच्या चरणांवर हात ठेवून तो रहस्यमय कागद शारदेच्या हातीं तिच्या लग्नापूर्वी देण्याविषयीं आपण शपथ घेतली आहे; तिचा भंग करून-भ्रातृविश्वासघात करून-अक्षय नरकाची वाट धरावयाची काय ? छे अशक्य-अगदीं अशक्य ! तर मग या वेळीं आपणांवर पूर्ण विश्वास टाकून निश्चिंत राहिलेल्या आपल्या यजमानांनां-नानासाहेबांनां-काय सांगावयाचें ? हंबीर व शारदा यांचा विवाह झाल्यास त्यापासून पुढें त्या उभयतांवर भयंकर अनर्थ गुदरतील असें त्यांनां सांगावयाचें ? असें असत्य सांगून त्या साधु पुरुषाची प्रतारणा करावयाची ? छेः-ही गोष्टहि असंभनीय ! तर मग करावयाचें काय ?

अहाहा ! हंबीर व शारदा या दोघां गोड मुलांनां शिकवीत असतां त्यांचीं तीं निष्पाप, सरल व पवित्र मुखकमलें पाहून व त्यांच्या त्या अमृतमय कंठांतून निघणारे मुमधुर शब्द ऐकून अत्यंत संतुष्ट होऊन, हीं दोघें पवित्र विवाहसूत्रानें बद्ध झाल्यास किती सुंदर होईल, असें वाटून किती तरी वेळ आपण 'या पवित्र व निष्पाप जोडप्यास परमेश्वर शतायु करो !' असें इच्छिलें असेल ! त्याच मनोहर व परम निर्मल पारिजातयुग्माला आपल्याच हातानें चुरडून टाकून क्षणस्थायि करावयास आपणच तयार व्हावें काय ? *शिवशिव ! काय भयंकर प्रसंग हा !*

तर मग या प्रसंगीं करावें काय ? काय केलें असतां आपले पुण्यशील यजमान व तें कोमल बालकुसुमयुगल यांचा नाश होणार नाहीं ? एकाएकीं दीक्षितांच्या मनांत कांहीं गोष्ट येऊन ते एकदम चमकले ! 'हें पिकलें पान केव्हां गळून पडून त्याची माती होऊन जाईल, याचा आतां नेम राहिला नाहीं,' असें नानासाहेब मुकतेच ह्मणाले होते, त्या वाक्याची दीक्षितांच्या मनांत पुनःपुनः आवृत्ति होऊं लागली. त्यांनां असें वाटूं लागलें, कीं, केवळ नानासाहेबांच्याच आयुष्याचें पिकलें पान गळून पडून त्याची माती होऊन जाईल असें नाहीं, तर आपल्याहि आयुष्याचें पिकलें पान गळून पडून त्याचीहि कधीं माती होऊन जाईल, याचाहि नेम सांगतां येणें अशक्य आहे. आपणावरहि आतां काल केव्हां झडप घालील, याचा नियम नाहीं. आपलेंहि तारुण्य व प्रौढकाल हीं नाहींशीं होऊन **'कृतांतकटक-ध्वजा'** आपल्याहि मस्तकावर शोभूं लागली आहे. वार्द्धक्यांत आपण पाय टाकला असून केव्हां आपणाला **'यमराजाचें येइल बोलावणें,'** हें सांगतां येणार नाहीं. आणखीं कांहीं दिवस कौतुकागारांतील गूढ रहस्याचा स्फोट न करतां आपण शंकावृत्तींत तसेंच स्तब्ध बसलों, तर आपणाला त्याच स्थितींत या जगांतून जावें लागेल व शारदेच्या विवाहाच्या पूर्वी आपणाला मृत्यु आल्यास तो दुष्ट अनर्थावह कागद शारदेच्या हातीं आपणाला देतां येणार नाहीं—मग काय ? तर मग या प्रसंगीं आपण करावें काय ?

दीक्षितांची ही विलक्षण स्थिति पाहून नानासाहेब अगदीं आश्चर्यचकित होऊन गेले. किंचित् उत्सुकतेनें व विरक्तीच्या स्वरानें ते त्यांनां ह्मणाले "दीक्षित ! बोलतों याची आपण मला क्षमा करा. आज आपलें हें माझ्याशीं चमत्कारिक वर्तन पाहून मी तर आश्चर्यानें अगदीं थक्कच होऊन गेलों आहें. अशी आपली स्थिति आजपर्यंत माझ्या पहाण्यांत कधींच आली नाहीं. आज आपलें असें माझ्याशीं संशयाचें किंवा शंकेचें वर्तन कां वरें ? आज आपण असे पुनः पुनः विचारांत पडल्यासारखे कां दिसतां ? आपणाला आज अशी कोणती चिंता लागून राहिली आहे ?"

दीक्षित खिन्नपणें ह्मणाले "मला कसलीहि शंका नाहीं किंवा आपणाविषयीं कसलाहि संशय नाहीं, नानासाहेब ! मी आपणाला सुचविलेंच आहे, कीं, शारदेचा विवाह इतक्यांतच न करतां आपण आणखी कांहीं दिवस वाट पाहिली पाहिजे."

नानासाहेबांनीं किंचित् अधिकारप्रदर्शक स्वरानें विचारलें "हें खुद्द आपलें मत आहे किंवा हंबीर व ताई या उभयतांच्या पत्रिका पाहून जें आपणाला इष्ट वाटतें, तेंच आपण मला सांगत आहां ?"

"शारदेची जन्मपत्रिका पुनः नीट लक्ष्यपूर्वक मीं पाहिली, शंकेच्या ठिकाणीं पुनरपि मीं गणित करून पाहिलें, त्यावरून मला असें आढळून आलें, कीं, हंबीराशीं तिचा विवाह आणखीं तीन वर्षे उलटण्यापूर्वी

डेन्टीलाईन—दुखत असलेल्या दांतांच्या जागीं कापसांत भिजवून लावतांच दुखणें बंद.
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

झाला, तर त्यापासून कांहीं अमंगल व अनिष्ट अनर्थ घडून यावयाचा फार संभव आहे. नानासाहेब ! आपली तीन वर्षे हा विवाह आपण तहकूब ठेविला पाहिजे."

ज्यांच्या तोंडून साऱ्या जन्मांत एकहि असत्य अक्षर कधीं निघालें नाहीं, असे सत्यप्रिय व स्वधर्मनिष्ठ नीलकंठ दीक्षित आज या प्रसंगीं आपल्या सर्व आयुष्यांत पहिल्यानेंच ही खोटी गोष्ट बोलले ! या प्रसंगीं त्यांची काय स्थिति झाली असेल, तें केवळ एक त्यांना किंवा परमेश्वरालाच ठाऊक !

आपल्या भेदक नेत्रांनीं दीक्षितांकडे पाहून एक दीर्घ निःश्वास टाकून नानासाहेब त्यांना म्हणाले "दीक्षित ! झालाच तर मग या गोष्टीचा निकाल ! आपण परम सत्यनिष्ठ अहांत, आपल्या मानेवर कुणी तरवार ठेवली तरी आपल्या तोंडून एकहि मिथ्या शब्द निघणार नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री आहे. ज्योतिषशास्त्रांतील आपली पारंगतता असाधारण आहे, ही गोष्टहि मला चांगली ठाऊक आहे. तर्कांतीं या विषयासंबंधानें मी आपणाला एक अक्षरहि विचारूं इच्छित नाहीं. परंतु खरी गोष्ट सांगावयाची झटली, तर आपलें जें मघापासून संभाषण चाललें आहे, त्यांत वारंवार आपलें गोंधळांत पडणें, गळा दाटून येणें, चेहेऱ्यावर फिकेपणा येणें, इत्यादि लक्षणांवरून आपण खरी गोष्ट किंवा निदान त्यांतील कांहींतरी भाग मजपासून गुप्त ठेवायला इच्छित आहां, असा मला संशय येतो. तें कांहींहि असो— आपली आज्ञा मला शिरसा प्रमाण आहे. आपल्या आज्ञेप्रमाणें ताईचा विवाह मी तहकूबच ठेवतों. हंबीररावाची अन् तिची पत्रिका पाहिजे तर पुनः एकवार नीट पाहून लवकरच त्या मजकडे पाठवून द्या !"

बिचारे दीक्षित यावर काय बोलणार ? कांहींहि न बोलतां विषण्ण मुखानें नानासाहेबांपुढून ते हळुहळू तेथून निघून गेले.

कर्मधर्मसंयोगानें नानासाहेब व दीक्षित यांमधील हें संभाषण वाड्याच्या बाहेरच्या भागातील एका दालनांत चाललें होतें. त्या दालनाच्या बाहेरच-अंगणांत-एक भिकारी हातांत एकतारी घेऊन भिक्षा मागण्याकरतां उभा राहिला होता. भिक्षा मागण्यासाठी म्हणून तो तेथें आला होता खरा, परंतु पुढें तो उद्देश त्याच्या ध्यानांतून गेल्यासारखा दिसला. नानासाहेब व दीक्षित या उभयतांमधील संभाषण तो भिकारी अगदीं लक्ष्यपूर्वक ऐकत होता.

कांहीं वेळानें दीक्षित तेथून गेल्यावर 'गरिबाला भिक्षा मिळावी सरकार !' असें म्हणून एकतारीवर त्यानें एक अभंग म्हणावयास सुरवात केली. 'अरे, याला कांहीं द्यायला सांग' असें जवळच्या चाकराला सांगून नानासाहेब खिन्न अंतःकरणानें तेथून निघून गेले.

वाड्यांतील भिक्षा मिळाल्यावर तो भिकारीहि आपल्या एकतारीवर अभंग म्हणत हंसतहंसत तेथून निघून गेला व गांवांत दुसरीकडे कोठेंहि भिक्षा मागण्याच्या भानगडींत न पडतां तो गांवापासून कांहीं अंतरावर सरस्वतीनदीच्या तीरीं एका एकान्त जागीं जाऊन उभा राहिला. त्या ठिकाणीं दोन व्यक्ति त्याच्या अगोदर तेथें येऊन त्याचीच वाट पहात राहिल्या होत्या.

त्याला आलेला पाहतांच त्या दोघांनीं त्याला झटलें "अरे, बाकीच्या गप्पा मागाहून. अगोदर कांहीं विशेष सांगण्यासारखें असेल तर सांग."

"होय-तशी सांगण्यासारखी आज एक विशेष बातमी आहे," असें म्हणून त्या भिकारी बनलेल्या हेरानें—तो कोणाचा तरी गुप्तहेर होता, हें वाचकांनीं आतापर्यंत ताडलेंच असेल—नानासाहेबांच्या वाड्यांत त्यांचें व दीक्षितांचें झालेलें संभाषण इत्थंभूत रीतीनें त्यांना सांगितलें.

तो हकीगत लक्ष्यपूर्वक ऐकून थोड्यांपैकीं एकजण म्हणाला "ऐकलेंस रे बुवा केसरीनाथ ! अशी उत्तम संधि पुनः कांहीं आपणाला मिळायची नाहीं. आतां उगीच विलंब लावणें कांहीं बरें नाहीं. आतांच्या आतां यजमानांना सारी हकीगत कळवावी, असें मला वाटतें."

'केसरीनाथ' भिकारी बनलेल्या व्यक्तीला उद्देशून म्हणाला "तर मग तूंहि आपल्या कामाला लाग आतां-आतां उगीच दिरंगाई करण्यांत अर्थ नाहीं. आतांच्या आतां तूं मुंबईकडे जायला नीघ-अन् तिथें जाऊन खारीला ही सारी झालेली हकीगत सांग.

सांवळ्या अथवा काळ्या गजकर्णावर 'किसोलाईन' चोळा. पुन्हा गजकर्ण होणार नाहीं !
अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

'मदनशास्त्री' या नांवाशिवाय दुसरें कोणतेंहि नांव त्यांनांच पसंत पडेनासें झालें! 'विश्वेश्वर' हें आपलें नांवहि तें अगदीं विसरून गेल्यासारखे झाले.

मदनशास्त्रीबुवांचें अध्ययन अकटोपासून विकटोपर्यंत असलें तरी त्यांच्या मुख्य मध्यस्तीच्या धंद्याची चांगलीच चलती होती. या कामांत त्यांचा हात धरणारा मध्यस्त मुंबईच्या जवळपास कोणीहि नव्हता. त्यांचें वय पन्नास वर्षांपेक्षांहि एकदोन वर्षांनीं अधिकच दिसत होतें. शास्त्रीबुवांच्या मस्तकावरील केश नाहींसे झाले असून त्यांच्या 'डोइस टक्कल छान' होतें! परंतु मस्तकाच्या मधोमध असलेली केशांची लहानशी बट व त्या बटेला बांधलेला एक लहानसा रुद्राक्ष हीं त्यांच्या भल्या थोरल्या प्रचंड चकाकार पागोट्यांत कुठच्या कुठें लपून जात. पागोट्यावरूनहि ते आणखी एका रेशीमकांठी धोतराची टेपशी बांधीतच! त्यांचा ललाटप्रदेश रुंद असून त्यावर श्वेतचंदनाचा ढळढळीत त्रिपुंड्र लावलेला असे. त्यांच्या दंतहीन मुखाच्या गुहेंत त्यांच्या दोन्ही गालांनीं बऱ्याच अंतरापर्यंतचा भाग आक्रमण केल्यामुळें त्यांचा तो सुंदर चेहेरा 'मदन' या नामाभिधानास अगदीं योग्य असाच दिसे! देहकांति अगदीं घोर कृष्णवर्ण व तेलिया रंगावर तकतकीत होती! पक्का काळा कोळसा उगाळून त्यांत तेलाचा चिकट गाळ मिसळून या मूर्तीसाठीं ब्रह्मदेवानें मुद्दाम निराळा रंग तयार केला असावा, असें पहाणाऱ्यास वाटल्यावांचून रहात नसे. मदनशास्त्री चांगले ताडमाड-पक्के साडेसहा फूट-उंच होते. त्यांच्या मानेवर काळ्याकुट्ट मळाचीं इतकीं पुटेंच्या पुटें सांचलीं होतीं, कीं, शास्त्रीबुवांची मान म्हणजे मुंबईतील सर्व मलाचें स्थान, असें वर्णन केलें तर त्यांत मोठीच अतिशयोक्ति केल्याचा आरोप येण्यासारखा नाहीं. त्यांचा पोषाकमात्र चांगला झकपक दिसत होता. त्यांच्या पांढऱ्या शुभ्र अंगरख्यावरूनहि त्यांच्या वक्षःस्थलावर रुद्राक्षांच्या माला विराजमान झाल्या होत्या. त्यांच्या खांद्यावर एक जुनीच, परंतु व्यवस्थेनें ठेवून दिलेली शालजोडी होती.

असे हे मध्यस्थचूडामणि मदनशास्त्री दिवाणखान्यांत येतांच यजमानसाहेब तर त्यांच्याकडे आश्चर्यानें 'आ' करून पाहूं लागले. ब्रह्मदेवाची एक विलक्षण सृष्टीच आज आपण पहात आहों, असें त्यांनां वाटलें

परंतु दादासाहेबांच्या या कृतीमुळें आमचे शास्त्री बुवा मुळींच डगमगले नाहींत. केसरीनाथ व गुंडशास्त्री यांच्या मध्यभागीं उभे राहून ते मोठमोठ्यानें हास्य करून म्हणाले "समजलों-आतां आलें सारें माझ्या लक्ष्यांत!"

"काय तें शास्त्रीबुवा?" गुंडशास्त्र्यांनीं प्रश्न केला

"देवांचा दादा जो इन्द्र आणि मानवांचे दादा जे हे दादासाहेब, त्यां उभयतांमधील विलक्षण साम्य आतांच माझ्या लक्ष्यांत आलें. आज या मदनाचें अपूर्व विलक्षण, सर्व जगताला मोह पाडणारें असें रूप पाहून दादासाहेब जे आहे ते आश्चर्यचकित होऊन अगदी वाक्शून्य झाल्यासारखे दिसतात! परंतु यांत एवढें विलक्षण काय आहे? असें होणें अगदीं साहजिक आहे प्राचीन कालीं देवाधिदेव महादेवाच्या योगाचा भंग करण्यासाठीं देवेन्द्रानें रतिपति मदनाचें स्मरण केलें व तो त्याच्यापुढें प्रगट होतांच त्या अनंगराजाचें जे आहे ते अलंत मनोहर रूप पहातांच तो अतिशय संतुष्ट होऊन आपणाशींच म्हणाला, कीं, आतां आपल्या कार्यसिद्धीला विलंब नाहीं! देवेन्द्राच्या साहाय्याला जसा तो सुंदर मदन, तसाच मनुष्यांतील या इन्द्राच्या साहाय्याला हा उंदिर मदन! कां गुंडशास्त्री! आहे कीं नाहीं जे आहे ते उभयतांमध्यें साम्य? बाकी, कलिकालांतील या मदनाला पाहून दादासाहेब मनांतल्या मनांत हंसून म्हणत असतील, कीं, या दंतहीन, गालफडे बसलेल्या, शाईच्या रंग शीं स्पर्धा करणाऱ्या, लंबोदर मदनराजांच्या हातून आपलें काम कसचें होणार आहे? काय कारभारीसाहेब? हः हः हः—"

केसरीनाथ मोठ्यानें हंसून म्हणाला "शाबास शाबास शास्त्रीबुवा! खूब कमाल आहे तुमच्या विनोदी स्वभावाची! आमच्या दादासाहेबांनां तुम्ही इतके अरसिक का समजतां शास्त्रीबुवा? बसा, बसा असे—"

दादासाहेबासमोर बसून मदनशास्त्रीबुवांनीं पुनः आपला लघळपणा सुरू केला. ते म्हणाले "खरेंच आहे तें दादासाहेब! पूर्वीचा पुराणाच्या कालांतील मदन व या कलियुगांतील मदन यांमध्यें आपण

ओडमेन्स सायप्रस साल्व्ह—डोकें, कंबर, पाठ, छाती यांतून कळा निघूं लागल्यास हें मलम चोळावें. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कंपनी, जुम्मामशीद, मुंबई.

समजतां तसला नसला, तरी दुसऱ्या प्रकारचा मोठा घोरला जे आहे ते भेद आहेच आहे. आपल्या पुष्पांच्या बनविलेल्या धनुष्याला चूताकुरांच्या बाणांची जे आहे ते योजना करून तो पुराणांतील मदन शिव आणि पार्वती यांचें मीलन करण्याच्या उद्देशानें निघाला; परंतु शेवटीं आपल्या योजिलेल्या कार्यांत पराभव पावून शिवाच्या कोपवन्हींत जे आहे ते भस्म होऊन गेला-परंतु या कलियुगांतील मदनाची गोष्ट तशी नाहीं. तो आपल्या कार्यांत कधीं हार घेऊन येईल ही गोष्ट जे आहे ते आपण मनांत देखील आणूं नका दादासाहेब ! कलियुगांतील हा मदन आपल्या रसनारूपी धनुष्याला गोडगोड अशा वाणीच्या बाणांची योजना करून संभाजीराव-म्हणजे दादासाहेब आपण-आणि शारदा यांचें प्रेममीलन करण्याच्या उद्देशानें जे आहे तें कुंदपूरचे नानासाहेब घोरपडे जहागीरदार यांजकडे मध्यस्थी करायला चालला आहे. शिवांनीं आपल्या तृतीय नेत्राच्या अग्नीनें जाळलेल्या ला पूर्वकालच्या मदनाच्या भस्म झालेल्या देहापासून जे आहे ते या मदनाची उत्पत्ति आहे, असें समजा. निजविलेल्या विस्तवाप्रमाणें या काळ्याकुट्ट देहाचें पुनरपि भस्म होण्याची जे आहे ते आतां मुळींच भीति नाहीं. पहा दादासाहेब-कुंदपुरला जातांच हा मदन आपल्या कार्यांत पूर्णपणें कसा विजय संपादन करून येतो कीं नाहीं तें ? जेव्हां पूर्वकालीं भगवान् देवेन्द्रानें मदनाचें स्मरण केलें, तेव्हां तो त्याच्यासमोर कसा प्रगट झाला, त्याचें कविकुलचूडामणि कालिदासानें कसें वर्णन केलें आहे तें आहे का ठाऊक दादासाहेब ? तुम्हाला आहे ठाऊक कारभारीसाहेब ? "

" कसें शास्त्रीबुवा ?" केसरीनाथानें हंसून विचारलें.

मदनशास्त्री आपल्या भसाड्या गळ्यानें गाऊं लागले:—

अथ स ललितयोषिद्भ्रूलताचारुशृंगम्
रतिवलयपदाङ्के चापमासज्य कण्ठे ।
सहचरमधुहस्तन्यस्तचूताङ्कुराग्रः
शतमखमुपतस्थे प्राञ्जलिः पुष्पधन्वः ॥

अन् आमच्या या दादासाहेबांनीं जेव्हां नानासाहेबांची कन्या शारदा हिच्याशीं आपला विवाह व्हावा, या उद्देशानें या कलियुगांतील मदनराजांचें स्मरण केलें, तेव्हां हा तोंडाचें घोळकें झालेला, काळाकभिन्न मदनराज त्यांच्या समोर जे आहे ते कसा आला ?

अथ स दन्तहीनमुखमध्ये नीत्वा रसनाधनुः
गृहिणी-संमार्जनीविद्धे शालजोडीच स्कन्धे ।
शिष्यगुंडशास्त्रीनिक्षिप्तं धृत्वा जालममोघं
संभाजीमुपतस्थे धूर्तो वचनायुधः ॥

कां गुंडशास्त्री ! आह्मीं नवीन बनविलेला हा श्लोक आपण जे आहे ते प्रणिधान केला काय ? हः हः हः ! श्लोकाचें वृत्तहि आह्मीं नवीनच तयार केलें आहे झटलें ! "

गुंडशास्त्री आपल्या दंतांचें प्रदर्शन करून म्हणतात " हः हः ! तें काय विचारावें शास्त्रीबुवा ! आपण या कलिकालांतले नुसते मदनच नाहीं-तर कविकुलगुरु कालिदासांचे अवतारहि आहां. आतां आमच्या दादासाहेबांची इच्छा जे आहे ते एवढीच आहे, कीं, ज्यायोगानें त्यांनीं मनांत योजलेलें कार्य लवकर सिद्धीस जाईल, अशीच कलियुगांतल्या मदनाला किंवा जे आहे ते अपर कालिदासाला अविलंबेंकरून तजवीज केली पाहिजे ! "

संभाजीराव ऊर्फ दादासाहेब गंभीर व चिंतापूर्ण स्वरानें मदनशास्त्रीबुवांस म्हणाले " शास्त्रीबुवा ! ज्याच्याशीं तुह्मांला व्यवहार करायचा आहे, तो नानासाहेब कांहीं सामान्य प्रकारचा मनुष्य नाहीं आहे, एवढें पक्कें लक्ष्यांत ठेवा. तुमच्या अंगीं असलेलें सर्व कौशल्य तुह्मीं खर्च केलें, तरी तुह्माला कितपत यश येईल याविषयीं मला शंका वाटते. आज दोन वर्षें मोठमोठे श्रीमंत सरदारदरकदार वगैरे मंडळींकडून त्यांच्या मुलीला मागण्या गेल्या होत्या. मोठमोठ्या नांवाजलेल्या मध्यस्थ मंडळीची या कामीं योजना झाली होती, परंतु आजपर्यंत या कार्यांत कुणालाहि यश आलें नाहीं. वराच्या श्रीमंतीवर किंवा वैभवावर तो म्हातारा भुलावयाचा नाहीं, अशी माझी पक्की खात्री झाली आहे. तेव्हां याव्यतिरिक्त तुह्मांला कांहीं तरी योजना केली पाहिजे. "

पुनः एकवार तपकिरीची चिमूट नाकांत कोंबून शास्त्रीबुवा किंचित् स्मित करून म्हणाले " त्याविषयीं

कामिनीया (रजिस्टर्ड) वेगवेगळ्या फुलांच्या मिश्रणाचें अत्तर. वासानें मन प्रफुल्ल करितें.
पाव तोळ्यास १॥. रु. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

आपण जे आहे ते अगदीं निश्चित असावें दादासाहेब ! नानासाहेबांविषयीं सर्व हकीगत आमच्या गुंडशास्त्र्यांनीं जे आहे ते मला इत्थंभूत कथन केलीच आहे. त्यावरून मी म्हणतों, कीं, आजपर्यंत जे जे वेटे त्यांच्याकडे खटपट करायला म्हणून गेले, ते ते ' मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति ' या वर्गातले होते, असेंच म्हटलें पाहिजे. नानासाहेबांसारख्या एका साध्याभोळ्या इनामदाराला फसवून त्याच्याकडून आपली हटकून कार्यसिद्धि करून घेण्याचें काम हा मदनशास्त्री एका चुटकीसरसें करून दाखवील. त्यांत त्याचें सारें कौशल्य खर्च घालण्याची काय जरूर आहे ? या कामांत जे आहे तें एवढें कठिण काय आहे ? येत्या महिन्याच्या शुक्लप्रतिपदेच्या आंत त्या म्हाताऱ्याला फसवून जर मी आपलें काम फटकरून आलों नाहीं-तर-तर हा मदनशास्त्री आपला धंदा सोडून संन्यास घेऊन तोंड काळें करून काशीप्रयागाकडे निघून जाईल-मग तर म्हालें ? आज कार्तिक शुद्ध चतुर्थी-गुंडशास्त्री-जरा पंचांग घ्या बरें-मार्गशीर्ष महिन्यांत विवाहाचा पहिलाच मुहूर्त कधीं आहे तें मला जरा पंचांग पाहून सांगा-मुहूर्त मात्र साधारण बरा पाहिजे-अगदींच गचाळ नाहीं उपयोगी-कारण दादासाहेबांचें खुद्द कार्य आहे तें-हः हः हः ! "

" शास्त्रीबुवा ! मुद्दाम पंचांग पहायची जरूर नाहीं. मीं मुहूर्त केव्हांच पाहून ठेवला आहे. मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी हा मुहूर्त उत्तम आहे. दादासाहेबांनां तो उत्कृष्ट तऱ्हेनें लाभतो आहे. दादासाहेबांच्या विवाहाबद्दल आम्हाला इतकी काळजी आहे, कीं, मुहूर्तविहीत मी केव्हांच निश्चित करून ठेवला आहे."

मदनशास्त्री हास्य करून म्हणाले " तें काय विचारावें गुंडशास्त्री ! श्रीमंतांचे आश्रित तुम्ही-त्यांच्या शुभकार्याची काळजी तुम्हाला असलीच पाहिजे. तर मग ठरलें-मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीच्या शुभ मुहूर्तावर दादासाहेबांचा शारदेशीं विवाह जे आहे ते व्हायचाच ! मोठ्या थाटानें त्या दिवशीं तो समारंभ व्हायला पाहिजे. त्या दिवशीं हें कार्य जर पार पडलें नाहीं तर हा मदनशास्त्री पुनः लोकांत कांहीं आपलें तोंड दाखवायचा नाहीं. या मदनाची तिसऱ्या संबंधाची रती आहे, तरी तिच्याहि अडथळ्यास किंवा अपुर्वपणास न जुमानतां, या कार्यांत यश न आल्यास, मी जे आहे ते वानप्रस्थाश्रम स्वीकारीन. ठीक आहे तर-कुंदपुरला मी उद्यांच जायला निघतों. "

संभाजीराव ऊर्फ दादासाहेब मदनशास्त्र्याच्या या भाषणानें बरेच आनंदून गेल्यासारखे दिसले. ते हंसत हंसत म्हणतात ' मी कोण, काय, वगैरेसंबंधानें सर्व गोष्टी आपणाला ठाऊक आहेत ना ? मीं मुद्दाम आपणाला बजावून सांगितलें पाहिजे असें नाहीं. आपणाला सर्व ठाऊकच आहे. मोठ्या घाडसाचें काम आरंभलेलें आहे, म्हणून मुद्दाम आपणाला सुचवावेंसें वाटतें—"

मदनशास्त्री हंसून म्हणाले " त्यासंबंधीं आपणाला बिलकूल काळजी नको. आपण कोण आहों, काय करतां वगैरेसंबंधीं खऱ्या गोष्टींचा त्या म्हातारड्याला बिलकूल मागमूस लागूं द्यायचा नाहीं, हाच आपला हेतु कीं नाहीं ? मी कांहीं तरी सांगून घोटाळा करीन, अशी का आपणाला भीति वाटते ? छे छे-त्यासंबंधानें आपण यत्किंचितहि काळजी करण्याचें कारण नाहीं. हा नांवाचा मदनशास्त्री आहे, मदनशास्त्री म्हटलें ! आपलें नांव संभाजीराव नाहीं, रंभाजीराव ! आपल्या वडिलांचें नांव दमाजीराव शिरके; ते अर्थात्च जीवंत नसून त्यांची वडी थोरली इनामदारी आपल्याच ताब्यांत आली आहे. आपलें इनामगांव मोहनपुर; इत्यादि इत्यादि अगदीं बरोबर माहिती मी नानासाहेबांनां देतों. आणखी आपल्या परिचयासंबंधीं ज्या ज्या गोष्टी मला आवश्यक वाटतील, त्यांची मी योग्य तजवीज करीन व आपणालाहि त्यासंबंधानें पुढें कांहीं घोटाळा होऊं नये म्हणून जरूर लिहून कळवीन. अहो, काय सांगूं तुम्हाला दादासाहेब ! आपण जरा आपल्या पैशांच्या थैलीचें तोंड मोकळें सोडा, कीं, हा मदनशास्त्री काय काय अजब चमत्कार करून दाखवितो, तें तुम्हांला दिसेल. आपलें नांव रंभाजीराव शिरके, आपल्या वडिलांचें नांव दमाजीराव, आपण मोहनपुरचे इनामदार असून आपली जे आहे ते गजांत संपत्ति आहे, ही बातमी या मुंबईतल्या मुंबईत आणखी दोन घटकांच्या आंत जिकडे तिकडे करून देतों; अशी या मदनशास्त्र्याची करामत आहे. तुम्ही पैसे पेरण्यास कंबर बांधा, कीं, काय वाटेल ते चमत्कार

कामिनीया तेल गळून पडणाऱ्या केसांस लाविल्यानें ते फारच मजबूत, भपकेदार आणि पुष्कळ वाढतात.

घडवून आणतों ! असो–कालातिक्रम जे आहे ते आतां बास झाला आहे–चला गुंडशास्त्री ! आपण आतां दादासाहेबांचा निरोप घेऊं या. आतां क्षणाचाहि विलंब न करतां आपल्या कार्यसिद्धीच्या उद्योगाला तावडतोब लागलें पाहिजे. "

गुंडशास्त्री मदनशास्त्र्यांकडे किंचित् डोळे मिचकावून म्हणतात " हो-निघावेंच आतां-पण शास्त्रीबुवा ! तुम्ही मघाशी रतीसंबंधी कायसेंसें म्हणत होतां-तें दादासाहेबांच्या एकदां कानांवर गेलें म्हणजे बरें ! "

गुंडशास्त्र्यांच्या पाठीवर आनंदानें थाप मारून मदनशास्त्री उद्गारले " साधु कथितं साधु गुंडशास्त्री ! योग्य प्रसंगी जे आहे ते चांगली आठवण करून दिलींत तुम्ही ! ती मुख्य व महत्त्वाची गोष्ट तर मी अजीबातच विसरून जात होतों. "

केसरीनाथानें विचारलें " अशी कोणती गोष्ट ती शास्त्रीबुवा ? "

" तशी कांहीं ती मोठीशी महत्त्वाची बाब आहे असें नाहीं. कुंदपुरला उद्यां निघायचें मी दादासाहेबांजवळ कबूल केलें आहे. तें वचन प्राण गेला तरी आतां मला पाळलेंच पाहिजे. तरी गुंडशास्त्र्यांनीं जी अडचण उपस्थित होण्याचा संभव आहे असें आपल्या भाषणांत आतांच ध्वनित केलें, ती अगदीं खरी आहे. "

" कोणती ती ? "

" माझ्या अर्धांगीची अर्थात् मदनाच्या तृतीय संबंधाच्या रतीची माझ्या गमनाला हरकत नाहीं झाली म्हणजे मी मिळविली ! "

" मदनाची जी इच्छा असणार, तिला रतीकडून हरकत येणार, असें कधीं थोडेंच होणार आहे ! "

मदनशास्त्री प्रचंड हास्य करून म्हणाले " अहो, हें घोर कलियुग आहे ! या कलियुगांत बायका, त्यांतून तिसऱ्या संबंधाच्या बायका, कशा कडकलक्ष्मी असतात, त्याची जे आहे ते आपणाला कल्पना नाहीं कारभारीसाहेब ! नाहींतर आपण असे उद्गार कधींच काढले नसते ! मी आतां आपणाला थोडक्यांत सारी हकीगतच सांगतों, म्हणजे आपल्या सारें लक्ष्यांत येईल. पुष्कळ दिवस झाले, रतीनें मदनाच्या मागें सारखी निकड लावली, कीं, दसऱ्याला आपल्या हातांत बारा तोळ्याच्या हांतरीच्या बांकी पडल्याच पाहिजेत. कांहीं अडचण आली तरी बांकी हातांत पडल्याच पाहिजेत, अशी मदनाला रतीची निक्षून ताकीद होती. करतां काय कारभारीसाहेब ! मदनाला मोठी दहशत बसली. तृतीयसंबंधाची स्त्री–त्यांतून मांजराप्रमाणें नेत्रांची, भयंकर दांतांची आणि जिच्या तोंडाला हाड नाहीं, अशी ती रती ! तिची मला दहशत बसली तर त्यांत काय नवल ? तिची अट पुरी करण्याकरतां मीं आपल्या धंद्यास नेटानें सुरवात केली. आमचे परम मित्र गुंडशास्त्री यांच्या साहाय्यानें मीं पांच सात ठिकाणीं जे आहे ते जाळें टाकलें होतें. परंतु काय माझें नशीब सवाईशिकंदर ! एका ठिकाणींहि मला यश येण्याचें चिन्ह दिसेना ! कुठें कांहीं, कुठें कांहीं अशा नसत्या अडचणी उपस्थित होऊं लागल्या ! आमच्या अर्धांगीचा आमच्या मागें दररोज बांकीचा लकडा सुरू होताच. मीहि तिला 'होय होय' म्हणून थापा देतच होतों; परंतु अंतर्यामीं मात्र माझी काय गडबड उडून गेली, ती माझी मलाच ठाऊक ! दसऱ्याला दोन दिवस राहिले आणि बांकीचें कांहींच चिन्ह नाहीं, असें पाहून आमच्या रतीनें भीषण चामुंडेचें स्वरूप धारण करण्यास जे आहे ते सुरवात केली. तिनें अत्यंत निष्ठुर हृदयानें सोडलेले वाग्बाण हृदयावर कसे तरी सहन करून, आणि तिच्या हातांतील संमार्जनीचे प्रहार कसेतरी चुकवून दसऱ्यापर्यंतचे दिवस मीं काढले. राणीसाहेबांनीं हुकूम सोडला खरा, परंतु माझ्या हातीं जर विष खायलाहि पैसा नाहीं, तर मी हांतरीच्या बांकी त्यांना देणार कुठून ? दसऱ्याच्या दिवशीं संध्याकाळीं दोनचार यजमानांकडून परत घरीं येतों तों काय ? घरांत चहूंकडे अंधकार—चहूंकडे शुक्र ! कोणी कुठें नाहीं ! रतीच्या शयनगृहाला जे आहे ते पितळेचें एक थोरलें कुलूप लटकलेलें ! त्या वेळीं माझी काय स्थिति झाली असेल याची, कारभारीसाहेब ! तुम्हीच कल्पना करा. माझी ती चामुंडास्वरूपिणी, संमार्जनीधारिणी गृहलक्ष्मी कोठें गेली असेल, तिच्या मुखरूपी तोफेंतून निघणारे कर्णमनोहर शब्दध्वनि आतां मला कोठून ऐकायला मिळतील ? असें मला होऊन गेलें ! कारभारीसाहेब ! स्त्रीविरह जे आहे ते मोठा कठिण आहे बरें ! रतीच्या विरहानें मी अगदीं वेडा होऊन गेलों. शेवटीं, शेजापाजाऱ्यांकडे

वाईट सवयीमुळें दूषित झालेला मूत्राशय शुद्ध करण्यास 'कपुरेलाईन'
हा एकच उपाय आहे. किं. रु. १॥.

शोध करतां मला असें कळून आलें, कीं, त्या दिवशीं सायंकाळीं दिवे लागायच्या सुमारास आपली प्रिय मैत्रीण शेजारची विठाबाई हिच्या हातांत हात घालून रतीबाईसाहेबांची स्वारी आमच्या घरापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या आपल्या बापाच्या घरीं जे आहे ते बेलाशक चालती झाली ! रतीच्या मागोमाग मदनहि तिकडे निघून गेला. परंतु तिची आपली एक अट–'वांकी मिळाल्याशिवाय मी कांहीं परत येणार नाहीं !' त्या दिवसापासून हा रतिविरहव्यथित मदन सारखा तळमळ तळमळ करतो आहे. इतक्यांत गुंडशास्त्र्यांनीं येऊन कुंदपुर, नानासाहेब, शारदा व दादासाहेब यांच्याविषयीं मला आद्योपान्त माहिती सांगून हें महत्कार्य हातीं घ्यायला विनंति करून या मदनाचा दारुण विरहसंताप नाहींसा करण्याची युक्ति दाखवून दिली. गुंडशास्त्री ! तुम्हीं त्या प्रसंगीं, 'आतां काय–रतीबाईच्या हातांत सोन्याच्या हांत्रीच्या वांकी खात्रीनें पडणार,' अशी माझी थट्टा केली होतीत नाहीं ? अहो, आतां तिच्या हातीं वांकीच काय, पण गळ्यांत रत्नखचित चंद्रहारहि नाहीं का पडणार ? दादासाहेबांचें आज दर्शन झालें, त्याक्षणींच मला वाटलें, कीं, तुम्हीं केलेली कांहीं निव्वळ थट्टाच नव्हती. अन् ती थट्टाच असली म्हणून काय झालें ? आज साक्षात् देवेन्द्राप्रमाणें असणाऱ्या आमच्या सकलगुणालंकृत दादासाहेबांच्या चरणांचें जे आहे ते दर्शन झालें, हाच माझा मोठा भाग्योदय झाला असें मी समजतों. महाकवि कालिदासानें तरी जे आहे ते काय झटलें आहे ? ' याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ! ' हः हः हः ! "

मदनशास्त्र्यांचें हें चऱ्हाट सुरू असतां गुंडशास्त्र्यांनीं दादासाहेबांनां कांहीं खूण केली. त्यावरोबर किंचित् हंसून त्यांनीं जवळच्या एका मोठ्या पिशवींतून रौप्यमुद्रा खालीं ओतून त्या एका नूतन शालजोडीवर ठेवून ती मदनशास्त्र्यांच्या पायांजवळ ठेवली व हंसत हंसत ते म्हणाले " शास्त्रीबुवा ! ही फुलाची पाकळी आहे. माझे हेतु पूर्ण झाल्यावर याच्या चौपट पाकळ्या तरी आपणाला पोंचवीन ! "

शास्त्रीबुवांच्या मुखावर उत्कट हर्षाचें चिन्ह प्रगट झालें. त्या चिन्हावरून इतक्या मुद्रा त्यांनीं आजपर्यंत कधीं एकत्र पाहिल्या नसाव्या असें दिसलें. त्या नूतन महावस्त्राकडे व त्या असंख्य रौप्यमुद्रांकडे ते अनिमिष दृष्टीनें पाहूं लागले. याप्रमाणें सप्रेम दृष्टीनें त्यांकडे बराच वेळ पाहिल्यावर आपल्या अंगावरील जुनी शालजोडी काढून तींत ते त्या मुद्रा आनंदानें बांधूं लागले !

–सिडनेनें झटलें आहे 'आधीं आपलें अंतःकरण पहावें व मग लिहावें.' जो आपल्या अंतःकरणाला समाधान देणारें लिहितो, तो अनंत कालपर्यंत जगाला समाधान देणारें लिहितो.

—स्वतःच्या पायावर उभा राहणारा मनुष्य देवांनां व मनुष्यांनां फार आवडतो.

—जीं तत्त्वें अंतःकरणानें सत्य म्हणून ग्रहण केलीं, त्यांनां वर्तनांत जय दिल्याशिवाय चित्ताला शांति मिळत नसते.

—सृष्टीच्या अपार उदारतेची अंतःकरणांत ओळख यालाच कोणी शुभाशा म्हणतात व ती अक्षय्य तारुण्याप्रमाणें उपयोगी पडत असते.

—विश्वास व प्रेम हीं ज्या ठिकाणी आहेत तेथें चिंतेचें ओझें दूर झालेंच म्हणून समजावें.

—प्रत्येक मनुष्याच्या इच्छाशक्तीपलीकडे सृष्टीचा आत्मा आहे, तो सर्वनियंता आहे. म्हणून आपण विश्वासमध्यें कोठेंहि अन्याय करणें योग्य नाहीं.

—सृष्टीचा ओघ मार्गदर्शकाप्रमाणें आहे. त्याचा शब्द नीट ऐकला तर आपला मार्ग आपणाला नीट कळतो.

—आपण ज्याला स्वर्ग म्हणतों व ज्याची आपण आकांक्षा करितों, तो स्वर्ग म्हणजे आपल्या प्रकृतीला इष्ट अशी स्थिति होय.

—प्रत्येक मनुष्याला कोणत्या तरी एकाथा बाबतींत सृष्टिदत्त हुषारी असते. ही बाब कोणती ते त्याचें त्यानें शोधून त्या बाबतींत त्यानें परिश्रम करणें उचित होय. असा तो वागला तर त्याला खचित यश येत असतें व त्याचे हातून कांहीं चांगलें कार्य अवश्य होत असतें.

बालजीवनामृत मातृपदास पोहोंचलेल्या प्रत्येक स्त्रीनें आपल्या संग्रहीं ठेवावें. प्रसंगीं अत्यंत उपयोग होतो. **जीवनामृत** त्यांनां फार जरूरीचें आहे.

विदूषकाचें साम्राज्य.

चित्रकार—हें पहा, या माझ्या चित्राबद्दल तुम्ही अगदीं स्पष्ट मत द्या.

टीकाकार—तें अगदीं नादान आहे.

चित्रकार—तुमचें मत नादान असेल कदाचित्-पण तें तुम्ही मला स्पष्टपणें सांगाच!

एका वक्तयाचे भाषणावर टीका करावी कीं न करावी, यावर वाद चालला असतां एडिटरसाहेब आपल्या साहाय्यकाला म्हणाले "आपण त्याला वाष्कळबिष्कळ कशाला म्हणा उगीच? त्याचें भाषण आपण जशाचें तसें छापूंया!"

रामराव—ओहो शामराव! हल्लीं तुम्ही आमचे स्नेही वामनराव यांच्या पेढीवर नोकरीला लागलां आहां म्हणून ऐकलें मीं.

शामराव—होय-बिलें वसूल करायला त्यांनीं मला ठेविलें आहे.

रामराव—अस्सें! तुमची शिफारस कोणीं केली त्यांच्याकडे?

शामराव—कुणीं नाहीं. त्यांनां मीं सांगितलें, कीं, एकदां रामरावाकडचें बीलहि मीं वसूल केलें आहे. झालें, तत्क्षणीं त्यांनीं मला नोकरी दिली.

पत्नी—अरे रामा-या पोपटाचा पिंजरा जरा बाहेर ने पाहूं-इकडचा शर्ट कुठं सांपडत नाहीं आहे—

"तो पगडीवाला चालला आहे पाहिलास? त्याच्याशीं व्यवहार करतांना सर्वजण भीतीनें थरथर कांपत असतात!"

"असा कोण आहे तो? मॅजिस्ट्रेट का न्यायाधीश?"

"छे रे! तो एक दंतवैद्य आहे."

"हें पहा, त्या दिवशीं तुम्हीं जो आमचा फोटोग्राफ काढलात, तो अगदीं कुचकामाचा निघाला आहे"

"काय झालें आहे त्यांत?

"काय झालें? त्यांत निघालेला माझ्या बायकोचा चेहरा तर शुद्ध माकडासारखा दिसतो आहे."

"त्याला मी काय करूं? हा विचार तुम्हीं लग्नापूर्वी करायला पाहिजे होता!"

ती—या पुस्तकांत मीं वाचलें, कीं, जिराफाची जीभ म्हणे दोन वितें लांब असते!

तो—पण त्याचा तुला हेवा नाहीं ना वाटत?

"इथल्या दंतवैद्याचा दवाखाना कुठेंसा आहे?"

"असे सरळ जाऊन नाक्यावर उजवीकडे वळा अन् ज्या घरांतून तुम्हाला किंकाळी ऐकूं येईल त्या घरांत बेलाशक शिरा."

शिक्षक—अरे धोंडू, तुझ्या बापाच्या दुकानांत गिऱ्हाईक येऊन पांच शेर साखर मागूं लागलें, अन् दुकानांत सारी तीन शेरच साखर असली, तर तुझ्या बापाला दुसरीकडून किती शेर साखर आणावी लागेल?

धोंडू—मुळींच नको मास्तर! कांट्याला आंगठा लावून बाबा तीन शेरांचीच पांच शेर साखर करून दाखवितील!

गोविंदराव—मी तुमचें अभिनंदन करतों गोपाळराव! आजचा दिवस म्हणजे तुमच्या सर्व आयुष्यांत अत्यंत सुखाचा होय!

गोपाळराव—थँक् यू—परंतु माझें लग्न आज व्हायचें नाहीं-उद्यां व्हायचें.

गोविंदराव—अन् म्हणूनच मीं तसें म्हटलें!

रुबॉइड्स—जुलाबाकरितां सर्वोत्कृष्ट गोळ्या. स्वच्छकर व स्वादिष्ट असून पोटांत मुरडा वगैरे काहीं होत नाहीं. किं. १० आणे.

कवि—आपल्या मासिकांतील 'काव्यकुंजां'त विहार करावयास मुख्य कोणती सामग्री लागते बरें?

एडिटर—पोस्टाचीं तिकिटें!

ø ø ø

सत्यनिष्ठेबद्दल पुष्कळ लोकांची जी ख्याती असते, ती केवल त्यांच्या कल्पकतेच्या अभावामुळें होय!

ø ø ø

नवखे गृहस्थ—अहाहा! किती सुंदर इमारत आहे ही!

शहरांतले गृहस्थ—मीं देखील असें झटलें असतें; परंतु परवां याच इमारतींत मला पंचवीस रुपये दंड झाला!

ø ø ø

"मी पुनः असें करणार नाहीं झणून तूं मजपाशीं कबूल केलें होतेंस ना?"

"होय, मास्तर!"

"आणि तूं असें केलेंस तर मी तुला चांगला वेतांनीं बडवून काढीन असें मीं तुला निक्षून सांगितलें होतें कीं नाहीं?"

"होय, सांगितलें होतेंत मास्तर! पण मी आपल्या वचनाप्रमाणें चाललों नाहीं, तेव्हां तुम्ही आपला शब्द खरा कराच असा मला आग्रह धरतां येत नाहीं!"

ø ø ø

एमर्सन् झणतो "तुम्ही दुसऱ्यांवर विश्वास ठेवलात, कीं, त्यांचाहि विश्वास तुमच्यावर बसेल." ज्यांच्याकडे घरवाल्याचें, दाणेवाल्याचें व दूधवाल्याचें देणें बरेंच तुंबले असेल, त्यानीं या थोर पुरुषाच्या उक्तीच्या आपल्या सावकारांवर उपयोग करून पहावा.

ø ø ø

मनुष्याचे आजार हे निसर्गाचे कर्ज वसूल करून घेण्याचे मार्ग आहेत.

ø ø ø

"केशवराव त्या अण्णासाहेबांच्या बयुताईशीं लग्न करताहेत झणे. असें त्यांनीं तिच्यांत गुण तरी कोणते पाहिले बुवा?"

"अरे, प्रेम आंधळें आहे, असें झणतात ना?"

"तर मग या मुलीच्या बाबतींत प्रेमाला मुकें अन् बहिरेंहि व्हावें लागेल, असा केशवरावांनां अनुभव येईल!"

ø ø ø

नाटककंपनीचे म्यानेजर—आपण जुन्या नाटकांत कांहीं फेरबदल करून आह्मांला नवीन सीन्स बसवून द्याल का?

नाटककर्ते—(आनंदानें) हो हो, देऊं तर काय झालें!

म्यानेजर—तर मग शाकुंतलांत एक आगगाडीचा, अन् सौभद्रांत एक 'मोटार'चा सीन घालून द्या. हल्लीं सीन्स पहायलाच लोक येत असतात.

ø ø ø

वर्तमानपत्राचे एडिटर—आह्मी लेखकांनां कांहीं मोबदला देत नसतों!

लेखक—आपल्या पत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांवरून असें दिसतें खरें! पण या संबंधानें कांहीं सुधारणा कराल तर पहा.

ø ø ø

बाप—किती पोपटासारखें बोलावेंरे बाबू! मघांपासून किती प्रश्न विचारलेस मला तूं? मी तुझ्या एवढा होतों तेव्हां माझ्या बाबांनां मी असे प्रश्न कधींच विचारीत नसें.

बाबू—बाबा! तुम्हीं त्या वेळीं आजोबांनां माझ्यासारखे प्रश्न विचारले असते तर माझ्या प्रश्नांनां आतां तुझाला नीट उत्तरें देतां आलीं असतीं.

ø ø ø

रमाबाई—कसला बाई स्वभाव आहे तिकडला कोण जाणे! मघाशीं मी तासभर बोलत होतें अन् तिकडे तुसतं जांभया देणं चाललं होतं!

सुंदराबाई—अहो, चुकतां आहां रमाबाई! तुमचें यजमान जांभया देत नसतील-ते बोलायचा प्रयत्न करीत असतील!

ø ø ø

रामराव—तुमचें लग्न अगदीं नाटकांतल्याप्रमाणें झालें झणे! तुमच्या पत्नीची अन् तुमची गांठ पडली त्याचक्षणीं झणे तुमचें तिजवर प्रेम जडलें?

नारायणराव—होय बुवा! तो दिवस मी सात्या जन्मांत कधीं विसरणार नाहीं. त्या दिवशीं माझा चष्मा मी घरीं विसरलों, हा सात्या जन्मांत मी मोठाच गाढवपणा केला!

ø ø ø

रुबॉइड्स—पेपरमिंटासारखें स्वादिष्ट असल्यामुळें लहान मुलेंसुद्धां फार हौसेनें घेतात.
एक डबी अवश्य संग्रहीं ठेवा. किं. १० आणे.

संपूर्ण गोष्ट.

औट घटकांचें राज्य!

ग्रीष्मर्तु चालू होता. मि. नारायणराव पंडितांचें सायंकाळचें भोजन (dinner) नुकतेंच आटोपलें होतें. आठ वाजून गेले होते. परंतु लंडनमध्यें अजूनहि सूर्यप्रकाशाचें अस्तित्व स्पष्टपणें दृग्गोचर होत होतें. जून महिन्यांत रात्री नऊ वाजण्यापूर्वी इंग्लंडमध्यें अंधकार पडत नाहीं.

नारायणराव पंडित हे लंडनमध्यें बेजवॉटरमध्यें राहून कायद्याचा अभ्यास करित असत. आय्. सी. एस्.-निदान बॅरिस्टर होऊन येण्याकरतां त्यांच्या चुलत्यानें त्यांना विलायतेस पाठविलें होतें. विलायतेंत आल्याबरोबरच आय्. सी. एस्. परीक्षा आपणाला झेंपणार नाहीं, असें नारायणरावांनीं आपल्या चुलत्याला स्पष्टपणेंच कळविलें होतें. पुतण्याच्या या पत्रानें नारायणरावजींच्या काकांची जरी पुरीच हिंमत खचली होती, तरी नारायणराव निदान बार-ॲट-लॉ होऊन येतील, अशी त्यांची पक्की खात्री होती. नारायणरावांनां इंग्लंडांत येऊन जवळजवळ दोन सवा दोन वर्षें झालीं होतीं, परंतु परीक्षेला लागणारीं कायद्याचीं पुस्तकें खरेदी करावयाला किंवा 'इन्स्'मध्यें जाऊन प्रोफेसरांचीं 'लेक्चर्से' ऐकावयाला त्यांना मुळीं अद्यापि फुरसतच सांपडत नव्हती! काय करतील बिचारे! मनाला मोह पाडणाऱ्या लंडनांतील नानाविध गोष्टींपुढें,-नाचगायन, नाटकें इत्यादि शेंकडों प्रसंगांपुढें-त्यांना पुस्तकांकडे लक्ष्य द्यावयाला बिलकूल वेळच मिळेना, त्याला नारायणरावजींचा तरी उपाय काय?

नारायणरावांनीं अलिकडे एक भयंकर प्रतिज्ञा केली होती. हिंदुस्थानांतून जातां आपले तिमाहीचे पैसे आले, कीं, एक दोन 'लॉ-बुक्स्' (कायद्याचीं पुस्तकें) ताबडतोब खरेदी करून ग्रीष्मर्तूच्या सुटीनंतर आरंभ होणाऱ्या टर्ममध्यें नियमितपणें 'लॉ-लेक्चर्से' ऐकावयाला जावयाचें व परीक्षेच्या अभ्यासाला जोरानें सुरवात करावयाची. फार काय, आज सर्वथ चार दिवसांत ते एकदांहि नाटकाला गेले नाहींत; इतकेंच नव्हे, तर गेल्या रविवारीं ते मिस् मॅनिंगला भेटूनहि आले होते. असो.

भोजनोत्तर सिगारेट ओढीत नारायणराव आरामखुर्चीवर स्वस्थपणें पडले होते. जवळच लँड-लेडी (पथिकाश्रमाची मालकीण) त्यांच्या खोलीतील टेबल साफसूफ करीत उभी होती.

सिगारेटच्या मधुर सुगंधानें खोली दरवळून सोडीत, परंतु दांतांच्या पकडींतून सिगारेट न सोडतां-नारायणराव लँड-लेडीला म्हणतात "मिसेस् ब्राउन्!"

"Well sir—काय महाराज?"

"मिसेस् ब्राउन्! मला दहा शिलिंग उसने देतां का?"

कमरेच्या 'एप्रॉन' वस्त्राला हात पुशीतपुशीत मिसेस् ब्राउन् क्षणाली "काय क्षणतां? दहा शिलिंग उसने देऊं? मि. पंडित! आपणाला 'नाहीं' क्षणून सांगायला मला भारी वाइट वाटतं. करूं तरी काय? माझ्यापाशीं तर एक शिलिंगदिसील नाहीं. आपल्याकडेस तीन आठवड्यांचीं बिलं तशींच पडून आहेत. या वीसपंचवीस दिवसांत एक फार्दिंगहि आपण मला दिला नाहीं, यामुळें मी किती अडचणींत दिवस काढलें आहें, तें आपणाला काय सांगूं? त्या मेल्या दूधवाल्यानं तर मला नुसतं भंडावून सोडलं आहे. मेला दररोज दाराशीं धरणं धरून बसतो-त्याला तीन चारदां फिरवून लावला-खाटकाला तर—"

नारायणराव मध्येंच हंसत म्हणाले "मिसेस् ब्राउन्!"

"काय महाराज?"

"ही सारी रडकथा माझ्यापुढें गाऊन कांहीं उपयोग होईल, अशी तुमची समजूत आहे वाटतें? हें पहा, मीं तुम्हाला अगोदरच सांगितलें आहे, कीं, येत्या आठवड्यांत काकांकडून माझे पैसे येतील. माझे किती पैसे यायचे आहेत, आहे का ठाऊक? पन्नास पौंड पन्नास! दोनचार शिलिंग नव्हेत समजलां? तुम्हाला हें खरें वाटत नसलें, तर हें पत्रच वाचा क्षणजे झालें-काकांकडून हें नुकतेंच आलें आहे मला—"

असें क्षणून खिशांतून एक लिफाफा बाहेर काढून त्यांतून एक मोठें पत्र बाहेर काढून नारायणरावांनीं तें मोठ्या गर्वानें मिसेस ब्राउन्पुढें फेंकून दिलें व तोंडांतली सिगारेट काढून ते खदखदां हंसूं लागले.

पत्र हातीं घेऊन मिसेस् ब्राउन् दिव्याजवळ गेली व तें पत्र चारदोन वेळ उलटेपालटें करून तिनें एकदोन मिनिटेंपर्यंत त्याचें सूक्ष्म निरीक्षण केलें. इकडे नारायणरावजींचे हास्य जोरांत चालू होतें. शेवटीं निराश होऊन नारायणरावांच्या हातीं पत्र देऊन ती म्हणाली "मि. पंडित! ही कोण भाषा बरं?"

ऑडमन्स कफ एलिक्झिर सर्व प्रकारच्या खोकल्यावर अचुक गुणकारी आहे. किंमत १। रु. ट. ख. ८५.

"कोण भाषा? तुझाला नाहीं ठाऊक? अहो, ही मोडी लिपी-काय समजलांत? मोडी! तुझाला नाहीं ही वाचतां येत?"

"काय मोडी भाषा? Dear me! ही कोणती भाषा मि. पंडित? आपली भाषा तर मराठी असं तुम्हीं मला सांगितलं होतं—"

नारायणराव हंसत हंसत झणतात "मिसेस् ब्राउन्! माझी भाषा मराठीच. परंतु आमच्या लिहिण्याच्या लिपीला 'मोडी' झणतात. आमची भाषा मोडी नव्हे!"

"Oh! I see! मला कसं तुमचं हें मोड—पत्र वाचतां येणार?"

"काय मोडी नाहीं वाचतां येत तुझाला?"

"नाही मि. पंडित!"

"I see! ठीक आहे-पत्रांतला एवढा हा भाग तुझाला मी भाषांतर करूनच सांगतों."

असें झणून नारायणराव पत्र हातीं घेऊन लॅंड-लेडीपाशीं गेले व दिव्याजवळ पत्र धरून, एकवार इकडेतिकडे पाहून गंभीर भावानें झणाले "हें पाहिलेंत? काका काय झणतात, "इकडे उष्मा भारी पडत आहे; बर्फ आठ आणे पौंड झाला आहे. अंगांतून सारख्या घामाच्या धारा वहात असतात. रात्रीं झोंप नाहीं." ऐकलेंत मिसेस् ब्राउन्?"

मिसेस् ब्राउन्नें संशयाच्या स्वरानें उत्तर दिलें "हो, ऐकलं तर काय झालं!"

नारायणराव गंभीरतेनें पुनः पत्राकडे दृष्टि लावून म्हणतात "याचें बरोबर भाषान्तर करून मी तुझाला सांगतों हं—I am sending you fifty pounds next week positively-येत्या आठवड्यांत तुला पन्नास पौंड पाठवितों, काळजी नसावी. पहा—आतांतरी पटतो का तुझाला माझा विश्वास? बरें तर जा मिसेस् ब्राउन्! तुमच्यापाशीं पैसे नसले तर तुमच्या यजमानांजवळून उसने घेऊन मला दहा शिलिंग आणून द्या. जा, तुझाला पैशांबद्दल कांहीं काळजी नको. येत्या आठवड्यांत एक सुंदरसा जड चेक मी तुझाला अगदीं खात्रीनें देतों—"

कांहीं वेळपर्यंत विचार करीत मिसेस् ब्राउन् स्तब्ध उभी होती. नंतर ती झणाली "आतांच्या आतांच का पैसे पाहिजेत आपणाला?"

"झणजे?"

"उद्यां सकाळीं आणून दिले तर नाहीं चालणार?"

जोरानें मस्तक हलवून नारायणराव गंभीर शब्दांनीं झणतात "The idea! हें पहा मिसेस् ब्राउन्! आज रात्रीं नवाला मिस् मॅनिंगच्या Soiree चें मला निमंत्रण आहे. ती मिस् मॅनिंगची Soiree आहे, एवढें लक्ष्यांत आणा. Evening dress (सायंकालचा वेष) चढवून इतर सामान्य लोकांप्रमाणें मी ऑग्मेंटिवसांत बसून Soireeला जाऊं होय? मला बयाद पाहिजे."

मिसेस् ब्राउन् आश्चर्यभावानें विचारते "कुठं जाणार झणालां आपण?"

"मिस् मॅनिंगच्या Soireeला. काय समजलांत? Soiree कशाला झणतात तें आहे ठाऊक?

"मीं नाहीं कधीं ऐकलं बाई!"

"Oh! 'इव्हिनिंग पार्टी' तरी ठाऊक आहे? तीच 'सोयरी'! फ्रेंच भाषेंत Evening party ला Soiree झणतात."

विस्मयानें मिसेस् ब्राउन् उद्गारली "Dear me!"

"जा जा-मिसेस् ब्राउन्—वेळतर होत आली. तुम्ही पैसे घेऊन येईपर्यंत मी पोषाक चढवून तयार होतों."

"ठीक आहे."

"अन् इकडे पहा—माझ्या या बसायच्या खोलींत थोडीशी बिस्कीटस् अन् थोडीशी व्हिस्की आणून ठेवा बरें का? Soiree च्या ठिकाणीं सुंदर स्त्रीवृंदाबरोबर प्रेमालाप करून मी अगदीं दमून इथें येईन अन् मला फार भूक लागेल. उपाशी पोटानें आपणाला कांहीं झोप येणार नाहीं, समजलां?"

"ठीक आहे. आपण सांगितलेले दोन्ही पदार्थ मी इथं आणून ठेवतें."

असें झणून मिसेस् ब्राउन् तेथून निघून गेली व नारायणरावहि

"पार्था! तुज देउनि वचनें, फसविलें पहा मुकुंदानें!"

हें सौभद्रांतलें पद गुणगुणत पोषाक चढविण्याकरतां आपल्या ड्रेसिंगरूममध्यें निघून गेले.

[२]

बरोबर नऊ वाजतां मि. नारायणराव पंडितांची क्याब धडधडत इंपीरियल इन्स्टिट्यूटसमोर येऊन उभी राहिली.

इंपीरियल इन्स्टिट्यूट ही लंडनमध्यें एक प्रचंड व प्रशस्त इमारत आहे. या इमारतीचे पुष्कळ भाग असून तींत अनेक मोठमोठे दिवाणखाने आहेत. यांपैकीं 'जहांगीर हॉल'मध्यें मिस् मॅनिंगची* Evening party (सान्ध्य-

* मिस् मॅनिंग या परोपकारशील बाई कोण होत्या, हें हिंदुस्थानांतील सुशिक्षित मंडळीलातरी चांगलें अवगत असलें पाहिजे. हिंदुस्थानांतील जे विद्यार्थी इंग्लंडमध्यें नाना विद्याकला शिकण्याकरतां जात असत, त्यांना तर या बाई केवळ मातेप्रमाणें वाटत असत. या छात्रवृंदाच्या हिताला या माननीय वृद्ध महिलेनें आपणाला सर्वस्वी वाहून घेतलें होतें, असें म्हटलें असतां बिलकूल अतिशयोक्ति होणार नाहीं. इंग्लंडसारख्या परकीय देशांत हिंदुस्थानवासी विद्यार्थ्यांना येणाऱ्या नाना प्रकारच्या संकटांत या बाई हरतऱ्हेचें साहाय्य करून त्यांतून त्यांचा उद्धार करीत असत. त्यांच्या उपदेशाचा व निर्भर्त्सनेचा विद्यार्थ्यांना पक्का प्रकारचा दरारा वाटत असे. भारतवर्षीय विद्यार्थ्यांच्या दुर्दैवानें या बाई नुकत्याच स्वर्गवासी झाल्या.

दूषित रक्तासंबंधाच्या सर्व आणि भयंकर रोगांवर क्युरेलाइन वापरा.
कोणत्याहि बाह्योपचाराची जरूर नाहीं.

मीलन-सभा) भरली होती. मधुनमधून मिस् मॅनिंगबाई अशा प्रकारच्या इव्हनिंग पार्टी भरवीत असत. लंडन शहरांत हिंदुस्थानांतून आलेल्या सर्व मंडळीला मिस् मॅनिंगबाई अशा पार्टीनां निमंत्रण करीत असत. भरत-खंडाच्या अनेक हितैषी इंग्रज स्त्रीपुरुषांनाहि या पार्टीचें निमंत्रण असे व बहुतेक निमंत्रित स्त्रीपुरुष मिस् मॅनिंगच्या या सान्ध्य-सभांनां मोठ्या आदरानें हजर रहात असत. या पार्टीत मिस् मॅनिंगबाई खाण्यापिण्याची व आमोद-प्रमोदाची सुंदर व्यवस्था ठेवीत असत. हिंदुस्थानवासी विद्यार्थ्यांचा व इतर मंडळीचा आपसांतला स्नेहसंबंध दृढ व्हावा व भारतहितैषी इंग्रज स्त्रीपुरुषांशीं त्यांचा परिचय होऊन शासित-शास्त्यांमध्यें उत्तरोत्तर अधिकाधिक प्रेमादरभाव उत्पन्न व्हावा, या पवित्र व महनीय उद्देशानें मिस् मॅनिंगबाई असे प्रसंग मुद्दाम जमवून आणित असत.

क्यामधून उतरून नारायणराव त्या प्रचंड इमारतींत शिरले व जवळच असलेल्या एका जिन्यानें वर चढले. 'जहांगीर हॉल'मधील विद्युत्प्रकाशाचा झगझगाट जिन्या-वरूनच त्यांच्या दृष्टीस पडला. सान्ध्य-संमेलनाला जम-लेल्या नर-नारीवृंदाच्या मृदु आलापांचा मंजुगुंजनध्वनिहि त्यांच्या कर्णपुटांनां आनंदवू लागला. नारायणराव जिना वर चढून 'जहांगीर हॉल'जवळ जातात, तों त्यांच्या दृष्टीला एक अपूर्व सुंदर देखावा पडला. त्या सुप्रशस्त सुंदर दिवाण-खान्याला जणूं स्वर्गीय शोभा प्राप्त झाली होती. सर्व दिवाणखाना दिव्य विद्युद्दीपांनीं जणूं काय पेटला होता ! नाना जातींच्या व भिन्नवर्णीच्या असंख्य स्त्रीपुरुषसमूहानें 'जहांगीर हॉल' नुसता फुलून गेला होता. ललनावृंदाच्या वेषाची बहुविधता व रमणीयता खरोखर नयनाभिराम होती. सर्व स्त्रीपुरुष परस्परांशीं मृदु मधु संभाषण करण्यांत दंग होऊन गेले होते. एके ठिकाणीं उज्ज्वल, अमूल्य, प्राच्यवेष धारण केलेले एक भारतवर्षीय महाराज, कित्येक इंग्रज स्त्रीपुरुषांबरोबर खेदालाप करण्यांत निमग्न होऊन गेले होते. इतरीकडे पेन्शन घेऊन आपलें कर्मक्लान्त जीवन मातृभूमींत घालविणारे एक माजी लेफ्टनंट गव्हर्नर एक व्यापारी यांशीं गृहस्थ व त्यांची पत्नी यांजबरोबर हास्यविनोद करण्यांत दंग झालेले दिसत होते. तिसरीकडे रजा घेऊन आलेले एक मुसलमान हायकोर्ट जज्ज एका पार्लमेंटच्या समासदाशीं हस्तांदोलन (Shake-hand) करीत होते. बहुतेक मंडळी उभी राहूनच हास्यालाप कथावार्ता करीत होती, व कांहीं इकडेतिकडे फिरतहि होती. मधुनमधून बहुमूल्य पुष्पमालींनें भूषित झालेलीं सुंदर दीर्घासनें (कोचें) मांडलीं होतीं. त्यांवरहि कांहीं मंडळी विराजमान झाली होती. जिकडेतिकडे आनंदीआनंद व मधुर चैतन्य दिसत असून मिस् मॅनिंगचा पवित्र उद्देश सिद्ध होण्यास या संमेलनांचा चांगलाच उपयोग होत आहे, अशीच निमंत्रित मंडळीच्या मोकळ्या वर्तनानें सर्वांची खात्री पटत होती.

'जहांगीर हॉल'मध्यें प्रवेश करतांच नारायणरावजी यजमानणीचा-मिस् मॅनिंगबाईचा—शोध करूं लागले. कांहीं वेळपर्यंत इकडेतिकडे सूक्ष्म दृष्टीनें शोध केल्यानंतर एके ठिकाणीं मिस् मॅनिंगबाई परिचित पाहुण्यांचें स्वागत करीत असल्याचें त्यांच्या दृष्टीस पडलें. तत्क्षणीं त्यांच्याजवळ जाऊन नारायणरावांनीं त्यांनां अभिवादन केलें. मिस् मॅनिंगबाईनीं एक बहुमूल्य कृष्णवर्ण वेष परिधान केला होता. त्यांचें मुखमंडल प्रशांत आणि प्रफुल्ल दिसत होतें. त्यावर पवित्र हास्यानंदाची सुंदर छटा पसरली होती. त्यांच्या शुभ्र केशगुच्छांनां विद्युत्प्रकाशामुळें अपूर्व शोभा प्राप्त झाली होती. मिस् मॅनिंगबाई खरोखर पावित्र्याची मूर्तिच दिसत होत्या.

नारायणरावांनां पहातांच मॅनिंगबाई सहास्य मुखानें म्हणाल्या "Oh ! मि. पंडित ! आलांत तुम्ही ? तुम्ही आलेले पाहून मला खरोखर फार आनंद झाला आहे."

असें म्हणून त्यांनीं नारायणरावांशीं हस्तांदोलन केलें व आणखीहि त्यांनां चारदोन कुशल प्रश्न विचारले. नंतर त्यांनीं कांहीं इंग्रज स्त्रीपुरुषांशीं त्यांचा परिचय करून दिला.

मिस् मॅनिंग व नूतन परिचित मंडळी यांच्याशीं कांहीं वेळ बोलत नारायणराव तसेच उभे होते. इतक्यांत दिवाण-खान्याच्या एका टोकाला पियानोचा गंभीर शब्द सुरू झाला. सर्वजणें सकौतुक दृष्टीनें दिवाणखान्याच्या त्या भागाकडे पाहूं लागलीं. एक इंग्रज युवती पियानोशीं आपला मधुर उच्च स्वर मिळवून सर एडविन् आर्नोल्ड यांनीं केलेलें एका संस्कृत कवितेचें भाषान्तरपद्य गाऊं लागली.

त्या युवतीचें गायन समाप्त झाल्यानंतर नारायणराव दिवाणखान्यांत इकडेतिकडे फिरूं लागले. फिरतांफिरतां एके ठिकाणीं त्यांचे मित्र विनायकराव इनामदार, एका प्रौढ इंग्रज स्त्रीशीं बोलत असलेले त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांनां पहातांच नारायणराव साहजिकपणें त्यांच्याजवळ गेले. नारायणराव जवळ येऊन उभे रहातांच विनायक-रावांनीं तत्क्षणीं त्या स्त्रीशीं त्यांचा परिचय करून दिला-"मिस्टर पंडित—मिस् टॅपल."

यावेळीं मिस् टॅपलबाई एका कोचावर बसल्या असून विनायकराव व नारायणराव त्यांच्या शेजारीं उभे होते. टॅपलबाई नारायणरावांनां म्हणाल्या "या-बसा इथें-मि. इनामदार, तुम्हीहि बसा."

टॅपलबाईंच्या विनंतीला मान देऊन ते उभयतां स्नेही त्यांच्या शेजारीं कोचावर बसले. कांहीं वेळानें नारायणरावं मिस् टॅपलला म्हणतात "आपणाला इथें येऊन किती वेळ झाला ?"

" कांहीं फार वेळ नाहीं. अर्धा एक तास झाला असेल. तुमचं नांव काय तें मला नीटसं ऐकूं आलं नाहीं-तेव्हां—"

" माझें नांव नारायण कृष्ण पंडित."

" पंडित ! पंडित ? तुम्ही डेक्कनी ब्राह्मण तर ?"

'गुडेरीन' नें आजपर्यंत हजारों बायकांचे जीव काळाचे जबड्यांतून सोडविले आहेत.
किंमत रु. २॥• ट. रु. ८ आणे.

" होय, माझ्या नांवावरून आपण माझी शांति सांगितली, तेव्हां आपल्याला माझाविषयीं बरीच माहिती आहे, असें दिसतें." असें ह्मणून नारायणराव टेंपलबाईकडे पाहून हंसूं लागले.

नारायणरावांच्या कौतुकमूल ह्मस्याकडे फारसें लक्ष्य न देतां, आपले दोन्ही हात जोडून नारायणरावांनां उद्देशून पौर्वात्य तऱ्हेचा नमस्कार करून हंसत हंसत मिस् टेंपलबाई ह्मणतात "नमस्कार मि. पंडित !"

खदखदां हंसत हंसत नारायणराव ह्मणाले "नमस्कार-नमस्कार ! आपण हें सारें शिकलां तरी कुठें ?"

तत्क्षणीं विनायकरावांनीं नारायणरावजींनां या कठिण कूटाचा उलगडा करून सांगितला. ते ह्मणाले "मिस् टेंपल् नुकत्याच हिंदुस्थानांतून प्रवास करून आल्या आहेत."

नारायणराव विस्मयप्रदर्शक स्वरानें म्हणाले "Oh, how interesting ! आपण हिंदुस्थानांत प्रवास करित होतां ? अन् आपण नुकत्याच आलांत ? वाहा ! फार छान ! आपण हिंदुस्थानांत किती दिवस होतां एकंदर ?"

"सहा महिने."

"हिंदुस्थानचा प्रवास आपणाला सुखावह झाला ना ? हा काळ आपणाला मौजेंत अन् आनंदांत गेला असेल ?"

मिस् टेंपलबाई गंभीर मुद्रेनें म्हणाल्या "मी हिंदुस्थानांत गेल्यें होतें, ती मौज करायला किंवा चैनीनं प्रवास करायला गेल्यें नव्हतें—"

"तर मग ?"

"ज्ञानसंपादनार्थ मी तिकडे गेल्यें होतें. आर्यावर्तांत पूर्वकालापासून साठून राहिलेल्या गंभीर ज्ञानसिंधूचा एक अल्प-अत्यल्प बिंदु स्वतः सेवन करावा, या हेतूनं मी हिंदुस्थानांत सहा महिने प्रवास केला."

मिस् टेंपलचें हें भाषण ऐकून व विशेषतः त्यांच्या भाषणाचा हा विलक्षण भाव पाहून नारायणरावजींनां फार कौतुक वाटलें, व मनांतल्या मनांत त्यांनां हंसूहि लोटलें. हिंदुस्थानांत केवळ सहा महिने राहून -तेंहि एके ठिकाणीं नव्हे-या बाई आर्यज्ञानभांडार कसें हस्तगत करून घेणार, याचें त्यांनां नवल वाटलें; परंतु यापैकीं कोणताहि भाव चेहेऱ्यावर दिसूं न देतां गंभीर मुद्रेनें नारायणराव ह्मणाले "खरोखर, आपल्या प्रवासाचा हा वृत्तान्त ऐकून मला फार संतोष झाला. इंग्लंडांतले काय, किंवा इतर कोणत्याहि पाश्चिमात्य देशांतले काय, जे लोक हिंदुस्थानांत प्रवास करावयास जातात, ते चैनीनें दोनचार महिने तेथें काढावे याच उद्देशानें तिकडे जात असतात. या प्रवासांत आमोद-प्रमोदापेक्षां त्यांचा दुसरा कोणताच हेतु नसतो. अर्थात् भरतखंडांतील अनेक सहस्र वर्षें साठून राहिलेल्या ज्ञान-भांडाराचा मागमूसहि त्यांनां लागत नाहीं, यांत कांहीं नवल नाहीं !"

मिस् टेंपल् आल्हादित चित्तानें ह्मणाल्या "खरंच खरंच, तुम्ही अगदीं यथार्थ बोललां. आमच्या भारतप्रवाशांचा उद्देशच निराळा असल्यामुळं त्यांनां तुमच्या गंभीरज्ञान-भांडाराचा कांहीं पत्ताहि लागत नाहीं. यामुळं आर्य-संस्कृतीच्या भलत्यासलत्या कल्पना ढोक्यांत घेऊन ते इकडे परत येतात, व या चुकीच्या कल्पनांच्या भांडवलावर व्यापार सुरू करतात. माझा भरतखंडांत जाण्याचा उद्देश अगदीं निराळा होता, हें मीं तुम्हाला सांगितलेंच आहे. त्यांतून माझ्या भाग्यानें आर्यावर्तांत गेल्यावर दोनचार महात्म्यांशीं माझा परिचय होऊन त्यांनीं मला आर्य ऋषिवर्यांनीं आर्यावर्ताला देऊन ठेवलेल्या ज्ञाननिधीची व उच्चतम संस्कृतीची थोडक्यांत, पण यथार्थ कल्पना करून दिली. हिंदुधर्माची उच्चतम ध्येयें व विशेषतः त्याची व्याख्या या महात्म्यांनीं मला विशद करून सांगितली, तीं ऐकून मला फार धन्यता वाटली."

"वचने किं दरिद्रता" या वाक्याचा सढळ हातानें उपयोग करावयाचा दृढनिश्चय करून व तितक्यांत परम धार्मिक बनून नारायणराव गंभीरतेनें ह्मणतात "खरोखरच, हिंदुधर्म हा श्रेष्ठतम धर्म आहे. हिंदुधर्म आणि संस्कृत वाङ्मय यांबद्दल आम्हांला चिरकाल अत्यंत अभिमान आणि आदरच वाटेल."

प्रफुल्लहृदयानें मिस् टेंपलनें विचारलें "तुम्हाला संस्कृत येतं ?"

"होय, माझा संस्कृत साहित्याशीं थोडाबहुत परिचय आहे."

"मीं पुष्कळ संस्कृत श्लोक ऐकले आहेत. त्यांच्या चाली किती गोड असतात ! त्यांचे सूर ज्याप्रमाणेंच अत्यंत मधुर, त्याप्रमाणेंच ते अत्यंत गंभीरहि असतात. कृपा करून आपण मला एक दोन संस्कृत श्लोक ह्मणून दाखवितां का !"

"ठीक आहे. आपल्या आज्ञेबाहेर मी नाहीं." असें ह्मणून व एकदोन वेळ घसा साफ करून नारायणरावांनीं पुढील श्लोक ह्मणावयास आरंभ केला:—

"कश्चित्कांताविरहगुरुणा स्वाधिकारप्रमत्तः
शापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येन भर्तुः ।
यक्षश्चक्रे जनकतनयास्नानपुण्योदकेषु
स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगिर्याश्रमेषु ॥"

श्लोक ह्मणून झाल्यानंतर गंभीरमुद्रेनें मिस् टेंपलकडे पहात नारायणराव स्तब्ध बसले.

आश्चर्यव्यंजक स्वरानें मिस् टेंपलबाई उद्गारल्या "वहावा ! वहावा ! फार सुंदर-फार मधुर ! मि. पंडित, हा संस्कृत श्लोक कोणत्या धर्मग्रंथांत आहे तें कृपा करून आपण मला सांगा."

आपले मित्र विनायकराव इनामदार यांच्याकडे एकवार पाहून किंचित् हास्य करून नारायणराव ह्मणाले "हा कांहीं धर्मग्रंथांतला श्लोक नाहीं—"

"तर मग ?"

पाऊस व थंडी यांचा परिणाम शरीरावर झाल्यानें होणाऱ्या वातविकारावर
कॅपटो थाम (मलम) अगदीं खात्रीचा औषध आहे. किं. ८८.

"दर्शनशास्त्राच्या एका प्रमुख ग्रंथांतला हा प्रथम श्लोक आहे."

उल्लसित चित्तानें टेंपलबाई म्हणाल्या "ठीक ठीक. एकून हा दर्शनशास्त्रांतला श्लोक आहे? या श्लोकाचा अर्थ काय बरं?"

चाललेल्या एकंदर प्रकाराबद्दल जरी नारायणरावांनां हंसूं येत होतें, तरी तें मोठ्या प्रयासानें दाबून व बळेंच गंभीरता धारण करून नारायणरावांनीं उत्तर दिलें "या श्लोकाचा अर्थ फारच कठिण आहे, अन् तो नीट समजावून सांगायला अधिकारीहि तसाच पाहिजे. या श्लोकाचें विवरण करायला दर्शनशास्त्राचीं सर्व मूलभूत तत्त्वेंच आपणाला समजावून सांगावीं लागतील. श्लोकाच्या यथार्थ अर्थ-विवरणाला दोन दिवसहि पुरायचे नाहींत; तरी यांतला भावार्थ मी आपणाला अगदीं थोडक्यांत सांगतों. आत्मा हा अविनाशी असून त्याला कोणी मारीत नाहीं आणि तो मरतहि नाहीं! आत्म्याच्या अविनाशित्वाबद्दलचे पूर्वपक्ष उत्तरपक्ष या श्लोकांत आहेत. 'नायमात्मा प्रवचनेन लभ्यः' आत्मा म्हणजे ब्रह्म कांहीं कोठें वादविवादानें प्राप्त होत नाहीं, असेंहि या श्लोकांत प्रतिपादन केलें आहे."

"या ग्रंथाचें नांव काय मि. पंडित?"

"मेघदूत."

'मेघदूत' हें नांव ऐकून मिस् टेंपल् चकित झाल्या. तत्क्षणीं आश्चर्यप्रदर्शक स्वरानें त्यांनीं विचारलें "मेघा-दयटा? By कालि-दासा?"

मिस् टेंपलच्या तोंडून हे शब्द निघतांच नारायणराव-जींचें मुखमंडल तत्क्षणीं कोमेजून गेलें! आपण बाता मारण्यांत या प्रसंगीं फारच पुढें गेल्यामुळें आपणावर आतां निःसंशय फजितीचा प्रसंग येणार, असें त्यांना वाटलें.

'संकट-प्रसंगीं कोणी कुणाचे नव्हेत,' हेंच खरें! नारायणरावांवर गुदरलेला हा कठिण प्रसंग पाहून, त्यांना संकटाशीं तोंड घावयाला एकटेंच सोडून विनायकरावांनीं हंसत हंसत हळुहळू तेथून काढता पाय घेतला.

परंतु मिस् टेंपलच्या प्रश्नाला तत्क्षणीं उत्तर न देऊनहि चालण्यासारखें नाहीं, असाहि नारायणरावांनीं विचार केला. संकटाला धैर्यानें तोंड घावयाचा दृढ निश्चय करून ते म्हणाले "होय. कालिदासाच्या मेघदूतांतलाच हा पहिला श्लोक आहे."

मिस् टेंपलचें या उत्तरानें समाधान झाल्यासारखें दिसलें. त्या किंचित् खिन्नपणें म्हणाल्या "अहाहा! खरंच, मला संस्कृत येतं तर किती मौज झाली असती! हे संस्कृत कवींचे ग्रंथ वाचून माझ्या जन्माचं सार्थक झालं असतं!"

मिस् टेंपलच्या या उद्गारांनीं नारायणरावजींनां महत्संकटांतून सुटल्यासारखें वाटलें. त्यांनीं एक सुटकेचा निःश्वास टाकला.

मिस् टेंपल् पुढें म्हणाल्या "आपण मला ही नवीन माहिती दिलीत, याबद्दल मी आपली भारी आभारी आहें. माझा आजपर्यंत असा समज होता, कीं, कालिदासाचें मेघदूत हें एक काव्य आहे."

नारायणराव उल्लसितवृत्तीनें म्हणाले "आपला समजहि कांहीं चुकीचा नव्हता मिस् टेंपल! एका दृष्टीनें मेघदूत हें काव्यहि आहे, असें म्हटलें तरी चालेल. अत्यंत उच्च दर्जाचें काव्य म्हणजे दर्शनशास्त्र, आणि सुंदर दार्शनिक तत्त्वें म्हणजे काव्य, अशी संस्कृत साहित्यशास्त्रकारांची व्याख्या आहे."

संस्कृत साहित्यशास्त्रकारांची ही काव्य व्याख्या आपल्या बगलेंतून काढून मिस् टेंपलला नारायणराव समजावून देत आहेत, तों दिवाणखान्यांत पियानोचा ध्वनि ऐकूं येऊं लागला. या वेळीं एक इंग्रज गृहस्थ मधुर कंठानें एक पद्य गाऊं लागले.

थोड्याच वेळांत हें गायन संपलें. कांहीं वेळानें नारायण-रावांनीं मिस् टेंपलला विचारलें "आपण अगदीं दमून गेल्यासारख्या दिसतां. आपणाला कांहीं पेय वगैरे आणून देऊं का?"

मिस् टेंपल् म्हणाल्या "चला-मी आपल्यावरोबर तिकडेच येतें."

"Thanks!"

नारायणराव मिस् टेंपलला घेऊन शेजारच्या एका प्रशस्त दालनांत गेले. या दालनांत मिस् मॅनिंगवाईनीं पाहुण्यांच्या खाद्यपेयादिकांची सुंदर व्यवस्था ठेविली होती. तेथें कांहीं रमणी चहा, काफी इत्यादि पेयांचें सेवन करित बसल्या होत्या. त्यांचे सहचर किंवा पतिराज त्यांच्या सेवेंत अगदीं गढून गेले होते.

मिस् टेंपलसाठीं एक खुर्ची आणून नारायणरावांनीं त्यांना बसविलें व विचारलें "आपल्याला काय आणून देऊं? चहा चालेल कीं काफी आणूं?"

मिस् टेंपल् म्हणाल्या "मला यांपैकीं कांहीं नको. चहा अन् कॉफी दोन्ही भारी उष्ण. यावेळीं कांहीं तरी थंडसं पेय मला आणून द्या."

"क्लॅरट—कप्*?"

"छे छे—बिलकूल नको. क्लॅरेटकपमध्यें मादक द्रव्य मिश्रित असतें. मी हिंदुस्थानांतून परत आल्यापासून असल्या कोणत्या पदार्थाला कधींहि स्पर्श करित नाहीं."

मिस् टेंपलचे हे उद्गार ऐकून आमच्या 'सोमनाथ' पंडितांनां मोठें आश्चर्य वाटलें. मनांतल्या मनांत हसून ते मिस् टेंपलला म्हणतात "तर मग आपणाला मी होम-मेड लेमोनेड† आणून देतों."

"Thanks!"

---

* क्लॅरेटमिश्रित एका प्रकारच्या सरबताचें नांव "claret-cup."

† मद्यरहित लेमोनेडला "Home made lemonade" म्हणतात.

प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका अशक्तास सशक्त व जवान बनवून
त्यांच्या अंगांत नवीन जोर उत्पन्न करतात. वापरून पहा!

लेमोनेडनें श्रमपरिहार होऊन शीतलता आल्यावर मिस् टेंपलला घेऊन नारायणराव पुनः हॉलमध्यें परत आले.

कांहीं वेळ इकडेतिकडे फिरल्यावर मिस् टेंपल नारायणरावांनां ह्मणाल्या "रात्र बरीच झाली आहे. आतां मी घरीं जातें. आपली आज ओळख झाली या गोष्टीची मला धन्यता वाटते. आपल्या संभाषणानें मला फार समाधान वाटलं. आपल्या देशासंबंधानें अन् संस्कृत साहित्यासंबंधीं आपण आज मला जी थोडीशी माहिती दिली, तीबद्दल मी आपली सदैव ऋणी राहीन. मधूनमधून आपण मला भेट देण्याची कृपा कराल तर मजवर आपले फार उपकार होतील. ही घ्या माझ्या नांवाची कार्ड."

मिस् टेंपलला धन्यवाद देऊन नारायणरावांनीं त्यांच्या कार्डाचा स्वीकार केला व खिशांतून आपल्या नांवाचीं एक कार्ड काढून त्यांनां दिली.

"आपण एकट्याच आलां होतां?"

"होय."

"तर मग खालीं येऊन आपणाला मी गाडींत बसवून देऊं का? आपली कांहीं हरकत नाहीं नसेल तर—"

"नको, Thanks! आपणाला उगीच श्रम पडतील."

"श्रम कसले त्यांत? आपण जर मला आपणाला ही मदत करूं द्याल तर त्यांत मी मोठा आनंद मानीन."

"Many thanks! चला तर."

मिस् टेंपलला सांवरून धरून गर्दीतून हळुहळू मार्ग काढीत नारायणराव खालीं आले. एकाचा माडोत्री वयावला हांक मारून तींत मिस् टेंपलला बसवून देऊं असा त्यांनीं बेत केला होता. खालीं उतरून ते रस्त्यावर येऊन पहातात, तों एक सुंदर प्रशस्त दोन घोड्यांची फैटण मिस् टेंपलची प्रतीक्षा करित उभी आहे, असं त्यांच्या दृष्टीस पडलें. ती उमदी फैटण पाहून नारायणरावांनां खरोखरच फार आश्चर्य वाटलें. कारण, लंडनमध्यें अशा तऱ्हेच्या फैटणी केवळ अत्यंत श्रीमंत लोकच वापरूं शकतात. वाटेल त्याला असल्या गाड्या बाळगतां येत नाहीत.

गाडींत बसतांना मिस् टेंपलनें नारायणरावांनां विचारलें "उद्यां चार वाजतां आपणाला कुठं कांहीं काम आहे का?"

"नाहीं."

"तर मग त्या वेळीं आपण माझ्या घरीं चहाला याल?"

"Thanks! अत्यंत आनंदानें मी येईन."

नारायणरावांनां Good night करून मिस् टेंपल् गाडींत बसल्या.

[३]

दुसऱ्या दिवशीं नारायणरावांनां निजून उठावयाला चांगले दहा वाजले. रात्रभर मिस् टेंपल्, मिस् मॅनिंग, मेघदूत व आर्य ऋषींचें दर्शनशास्त्र व काव्यशास्त्र यांबद्दलच त्यांनां स्वप्नें पडत होतीं.

नारायणरावांचा सकाळचा फराळ झाल्यानंतर त्यांच्या लँडलेडीनें त्यांनां हंसत हंसत विचारलें "त्या ठिकाणीं गेली रात्र आपण अगदी आनंदांत काढली ना?"

थोडी मौज करण्याच्या उद्देशानें एक दीर्घ निःश्वास टाकून नारायणराव गंभीर स्वरानें ह्मणाले "हो, आनंदांतच गेली म्हणायची; दुसरें काय? खरें म्हटलें तर तुम्हांला काय उत्तर द्यावें तेंच मला कळत नाहीं."

"ह्मणजे? आपण ह्मणतां तरी काय? अन् आतां आपण असा निःश्वास कां बरं टाकला?"

दांभिकपणानें निराश प्रेमिकाचा पूर्ण आविर्भाव करून नारायणराव ह्मणतात "तुह्मांला काय सांगूं मिसेस् ब्राउन्! माझी आतां कांहीं धडगत नाहीं पहा. मिस् मॅनिंगच्या soireeला जाऊन मीं आपणावर संकट मात्र ओढून घेतलें."

मिसेस् ब्राउन्नें आश्चर्यानें विचारलें "ह्मणजे? झालं तरी काय? आपणावर असं संकट कोणतं आलं?"

पुनः एकदां निराशेचा दीर्घ निःश्वास टाकून नारायणराव ह्मणाले "काल रात्रीं मी भगवान् मदनाच्या तडाख्यांत सांपडलों!"

नारायणरावांचें हे उद्गार ऐकून मिसेस् ब्राउन् खदखदां हंसली व ह्मणाली "वः! उत्तम उत्तम! अशी मधुर संकटं यावीं ह्मणून जो तो परमेश्वराची प्रार्थना करीत असतो. तुमची प्रणयिनी खरोखर फार सुंदर आहे का?"

"होय मिसेस् ब्राउन्! तिच्या लावण्यरूपी जहरी भाल्यानें प्रत्येकाच्या हृदयाचे शतशः तुकडे होण्याइतकी ती सुंदर आहे."

"Oh, how interesting! वा वा! फारच उत्तम! मि. पंडित! तुमच्या प्रणयाची मला सारी हकीगत सांगा आतां."

"तुह्माला कोणत्या शब्दांनीं ती हकीगत सांगूं मिसेस् ब्राउन्? मला कांहीं सुचत नाहींसें झालें आहे."

मृदु हास्य करून मिसेस् ब्राउन् ह्मणाली "अहो, असं हें ह्मायचंच! प्रथमप्रणयाच्या वेळीं जिथंतिथं असंच होतं."

बसल्या खुर्चीवर पुनः नीटनेटकें बसून व मिसेस् ब्राउन्च्या चेहेऱ्याकडे तीक्ष्ण दृष्टि लावून नारायणराव गंभीरतेनें ह्मणाले "मिसेस् ब्राउन्! मला क्षमा करा हं! तुमच्या प्रेमपाशांत कधीं कुणी पुरुष सांपडला आहे का?"

नारायणरावांच्या या प्रश्नानें मिसेस् ब्राउन्ला बराच राग आला. भृकुटिभंग करून वांकड्या नजरेनें नारायणरावांकडे पहात ती ह्मणाली "तुम्ही हें काय विचारतां मि. पंडित? कुणाच्याहि हृदयांत प्रेमाचा उद्भव होणार नाहीं इतकी का मी कुरूप आहें?"

"छे छे छे! मिसेस् ब्राउन्! माझ्या बोलण्याचा भावार्थ खरोखर तसा नव्हता. मी खरोखर सरल भावानें विचारतों आहें, त्याचा राग येऊ देऊं नका. तुम्हाला कुरूप ह्मणेल कोण?"

मिसेस् ब्राउन् किंचित् हास्य करून ह्मणाली "जर कोणी माझ्या प्रेमपाशांत सांपडलं नसतं तर माझं लग्न झालं असतं, मि. पंडित?"

'शुडेरीन' नें आजपर्यंत हजारों वायकांचे जीव काळाच्या जबड्यांतून सोडविले आहेत.
किंमत रु. २॥. ट. ख. ८ आणे.

"हो हो—हें मात्र खरें, अगदीं खरें. मिसेस् ब्राउन्! तुमचें लग्न झालेलें आहे, ही गोष्ट मी अगदीं विसरूनच गेलों होतों कीं! खरोखर, तुमच्याकडे पाहिलें कीं नाहीं मिसेस् ब्राउन्! खरंच तुम्ही विवाहित प्रौढ स्त्री असाल असें चटकन् लक्ष्यांतच येत नाहीं मुळीं!"

नारायणरावांच्या या स्तुतीनें मिसेस् ब्राउन्ची स्वारी त्यांच्यावरचा सारा राग विसरून अगदीं खूष होउन गेली! हंसतहंसत किंचित् मुरडून ती म्हणते "अगदीं खरं, तुम्ही अगदीं बरोबर सांगितलं. मला पुष्कळजणं असं म्हणतात खरं, कीं, 'तुमच्या खऱ्या वयापेक्षां तुम्ही किती तरी लहान दिसतां!' आतां तुमचीच परीक्षा पहातें—तुम्ही सांगा बरें माझं वय किती असावं तें?"

मिसेस् ब्राउन्कडे कोणीहि जरी पाहिलें तरी तिचें वय पन्नासापेक्षां कांहींतरी अधिक असावें, हें पहाणाराच्या लक्ष्यांत येण्यासारखें होतें. तरी मिसेस् ब्राउन्ला हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याच्या उद्देशानें नारायणरावांनीं तिला विचारलें "किती वर्षें? सत्तावीस—अठ्ठावीस? तिसांपेक्षां तर खात्रीनें अधिक नाहीं!"

नारायणरावांच्या या भाषणानें मिसेस् ब्राउन्चें मुखमंडल हर्षभरानें प्रफुल्लित होऊन गेलें. ती हंसत हंसत त्यांना म्हणाली "नाहीं—त्यापेक्षां थोडं अधिक आहे. बरं, आपल्या प्रणयिनीचं नांव काय बरं मि. पंडित?"

"मिस् टेंपल."

"मिस् टेंपलशीं काल आपला थोडातरी परिचय झालाच असेल. आपल्या संबंधानं तिचा कसाकाय रंग दिसला आपणाला?"

"नाहीं बुवा! तें कांहीं आपल्याला तसें नाहीं सांगतां येत! तरी तिनें आज मला आपल्या घरीं चहाला बोलावलें आहे."

मिसेस् ब्राउन् हंसतहंसत म्हणाली "ठीक ठीक! लक्षण तर चांगलं आहे. आपलं नशीब जोरावर दिसतं. I wish you a happy afternoon." असें म्हणून लॅडलेडीची स्वारी तेथून हंसतहंसत निघून गेली.

मिसेस् ब्राउन् गेल्यानंतर नारायणराव सिगारेटवर सिगारेट ओढीत बराच वेळपर्यंत स्वस्थ पडले होते. काल रात्रीपासून घडलेल्या एकंदर प्रकाराचें ते मानसिक निरीक्षण करित होते. विशेषतः मेघदूतांतला श्लोक म्हणून मिस् टेंपलला आपण त्याचा समजावून दिलेला अर्थ व त्यामुळें आपणावर ओढवलेलें संकट पुनः पुनः आठवून त्यांना फार हंसूं येई. कांहींहि असो; मिस् टेंपलशीं आपली भेट झाली ही गोष्ट फार इष्ट झाली यांत संशय नाहीं, असें त्यांनीं ठरविलें. तिच्याकडे चहाला जाण्यापूर्वी दोन तास 'ब्रिटिश म्यूझियम'मध्यें जाऊन 'मनु-स्मृति' वगैरे 'खऱ्या' धर्मग्रंथांतून दोनचार श्लोक पाठ करून नंतर तिकडे जावें; योगशास्त्रासंबंधीहि दोनचार चुटक्यांचा संग्रह करून घेऊन या दोन्ही शस्त्रांचा मिस् टेंपलवर मारा करून तिला अगदीं चकित करून टाकावें, असा त्यांनीं निश्चय केला. व त्याप्रमाणें 'ब्रिटिश म्यूझियम' मध्यें जाऊन, तेथील काम आटोपल्यावर कपाट करून नारायणराव बरोबर चार वाजतां मिस् टेंपलच्या वाड्यासमोर येऊन उतरले. मिस् टेंपलचा वाडा पोर्टलंड प्लेसमध्यें होता. या ठिकाणीं मोठमोठ्या धनाढ्य लोकांचे वाडे आहेत.

वाड्यांत प्रवेश करून नारायणराव दिवाणखान्यांत बसले. मिस् टेंपलच्या भव्य वाड्यावरून व तेथील एकंदर थाटावरून ती चांगलीच श्रीमंत असावी, अशी नारायणरावांची खात्री झाली. थोड्याच वेळांत मिस् टेंपलबाईनीं येऊन नारायणरावांनां प्राच्य पद्धतीचा नमस्कार केला.

दोनचार कुशल प्रश्न झाल्यावर समोर भिंतीवर टांगलेल्या एका तसबिरीकडे बोट दाखवून मिस् टेंपल् नारायणरावांनां म्हणाल्या "ही तसबीर आपण पाहिली का? हे माझे गुरु."

नारायणराव उठून तसबिरीजवळ गेले. त्या तसबिरींत एका भव्य, तेजःपुंज, कौपीनधारी, नेत्र मिटून योगसाधनांत निमग्न झालेल्या एका बंगाली साधूचें चित्र तैली रंगानें काढलें होतें. ती मूर्ति खरोखरीच कोणाचेंहि चित्त वेधून घेणारी होती. तसबिरीच्या खालीं इंग्रजी व देवनागरी लिपींत 'स्वामी योगानंद' अशीं अक्षरें लिहिलीं होतीं.

या तसबिरीवरून मिस् टेंपल् व नारायणराव या उभयतांमध्यें योगशास्त्रासंबंधीं गोष्टी सुरू झाल्या. खरें झटलें तर योगशास्त्रासंबंधीं नारायणरावांनींच मुद्दाम गोष्ट काढली. संभाषणांत नवीनच पाठ केलेले योगशास्त्रासंबंधाचे व इतर श्लोक झोंकून देऊन त्यांनीं मिस् टेंपलला नुसतें चकित करून सोडलें! नारायणराव हे जाडे संस्कृत पंडित असून त्यांची धर्माकडे व योगशास्त्राकडे चांगली गति असावी, असा त्यांचा समज झाला, यांत नवल नाहीं. बोलतां बोलतां नारायणरावांनीं मिस् टेंपलला विचारलें "योगशास्त्रासंबंधीं स्वामीकडून आपणाला उपदेश झाला आहे का?"

मिस् टेंपल खिन्नस्वरानें म्हणाल्या "नाहीं; योगाभ्यास करावयाचा अधिकार मला अजून आला नाहीं. 'तीन वर्षेपर्यंत नुसत्या फलशाकान्नावर राहून शुद्ध आचारव्यवहारानं दिवस काढलेस तर तुला मी योगाचा उपदेश करीन,' असं स्वामीजींनीं मला अभिवचन दिलं आहे. दररोज गंगाजल पिण्यास त्यांनीं मला सांगितलं आहे; परंतु इथं तें कसं मिळणार! इथं मी अतिशय शुद्ध अन् स्वच्छ केलेलं पाणी पिलें, अशा पाण्यानें कोणत्याहि प्रकारचा आध्यात्मिक अपकार होणार नाहीं, असा माझा समज आहे."

नारायणराव गंभीरभावानें म्हणाले "आपण म्हणतां तें खोटें नाहीं. आमच्या गंगाजलाचें माहात्म्य कांहीं विलक्षणच आहे. आपण Mark Twain चें More Tramps Abroad हें पुस्तक वाचलें आहे का?"

प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तियुक्त गुटिका अशक्तांस सशक्त व जवान बनवून
त्यांच्या अंगांत नवीन जोर उत्पन्न करतात. वापरून पहा!

"नाहीं."

"More Tramps Abroad या पुस्तकांत Mark Twain नें आपल्या हिंदुस्थानांतील प्रवासाचें सुंदर वर्णन दिलें आहे. काशी—बनारस शहरांत Mark Twain ची एका युरोपियन सिव्हिल सर्जनशी गांठ पडली होती. या सिव्हिल सर्जननें गंगाजलाच्या वैज्ञानिक परीक्षणासंबंधी Mark Twain ला जी एक गोष्ट सांगितली, ती खरोखरच अत्यंत आश्चर्यकारक आहे, यांत संशय नाहीं."

अतिशय कुतूहलप्रेरित होऊन मिस् टेंपलनें विचारलें "काय ती ?"

"Mark Twainनें लिहिलें आहे, कीं, या सिव्हिल सर्जननें एका प्रसंगीं एका पात्रांत गंगेचें पाणी व दुसऱ्या पात्रांत विहिरीचें पाणी ठेवून त्यांवर एक प्रयोग करून पाहिला. प्रत्येक पात्रांतील पाण्यांत त्यानें थोडथोडे कॉलऱ्याचे बीजजंतु टाकले. अठ्ठेचाळीस तासांनंतर दोन्ही पात्रांचें त्यानें परीक्षण केलें, तेव्हां त्याला आढळून आलें, कीं, गंगाजलांत टाकलेले सर्व बीजजंतु मरून गेले असून विहिरीच्या पाण्यांत सोडलेल्या जंतूंची मात्र सहस्रलाखों-पटीनें भयंकर वाढ झाली आहे !"

नारायणरावजींनीं सांगितलेली ही गंगाजलाची गोष्ट ऐकून मिस् टेंपलला फार आश्चर्य वाटलें. इतकेंच नव्हे, तर भरतखंडासंबंधानें त्यांच्या मनांत वसत असलेली पूज्यबुद्धि अधिकच प्रज्वलित झाली. आणखीहि दोनचार संस्कृत श्लोक व विद्वत्ताप्रचुर आध्यात्मिक गोष्टी सांगून नारायणरावजींनीं मिस् टेंपलला विस्मयानें थक्क करून सोडलें !

हळुहळू सहा वाजून गेले. नारायणराव मिस् टेंपलचा निरोप घ्यावयास उठले. मिस् टेंपलनें त्यांना विचारलें "येत्या शनिवारीं सायंकाळीं आपणाला कुठें कांहीं काम आहे का ?"

कांहीं आठवल्यासारखें करून नारायणरावांनीं उत्तर दिलें "नाहीं."

"तर मग त्या दिवशीं आपण मजकडे Dinner (भोजना)ला यावयाची कृपा कराल का ?"

"Thanks! अतिशय आनंदानें येईन."

"परंतु मी निरामिषभोजी (Vegetarian) आहें. आपण मांसभोजन करतां का ?"

"होय, खरें सांगायचें झालें झणजे मी करतों, असेंच सांगितलें पाहिजे."

"तर मग आमच्याकडच्या भोजनानें आपल्याला कष्ट होतील."

"नाहीं मिस् टेंपल ! मला त्यानें कोणत्याहि प्रकारचे कष्ट होणार नाहींत. आम्ही ब्राह्मण-निदान दक्षिणी ब्राह्मण-कधींहि मांसाशन करित नाहीं, हें आपणाला ऐकूनतरी ठाऊक असेल. इंग्लंडांत आल्यावर प्रकृतीच्या स्वास्थ्याकरितां आम्हाला इकडे मांस वगैरे खावें लागतें."

मिस् टेंपलच्या नारायणरावजींचें हें भाषण रुचलें नाहींसें दिसलें. त्या उत्तेजित स्वरानें नारायणरावांना झणतात "भ्रम-तुमचा हा निव्वळ भ्रम आहे ! मांसादि सेवन केल्याशिवाय या देशांत प्रकृति नीट रहावयाची नाहीं, ही एक चुकीची-नव्हे, जिव्हालौल्याचें चोज पुरविण्यासाठीं पुढें केलेली—कल्पना आहे. या गोष्टीचें प्रत्यंतर पहायला फार लांब जायला नको—माझेंच उदाहरण घ्या. मी हिंदुस्थानांतून परत आल्यापासून आज सहा महिने शुद्ध निरामिष भोजन करीत आहें, परंतु त्यामुळें माझी प्रकृति कधींहि बिघडली नाहीं, इतकेंच नव्हे, तर उलट ती निकोप राहिली आहे."

मिस् टेंपलच्या या भाषणाचें आपणाला अत्यंत आश्चर्य वाटलें, असें दाखवून नारायणराव म्हणाले "झणतां काय ! तर मग आजपासून मीहि मांसाशनाचा त्याग केला असें समजा. आजपासून मी पक्का Vegetarian बनलों."

नारायणरावजींची ही प्रतिज्ञा ऐकून मिस् टेंपलला अतिशय आनंद झाला. त्या झणाल्या "आपला हा निश्चय ऐकून मला फार समाधान वाटलें. ठीक आहे तर—आपण शनिवारीं सायंकाळीं सात वाजतां इथें या."

"बरें आहे— Good evening !"

" Good evening !"

[४]

हळुहळू शनिवारचा दिवस उजाडला. सायंकालहि झाला. मिस् टेंपलकडे जाण्यासाठीं सायंकालचा पोषाक करून नारायणराव तयार झाले. ते खोलींतून बाहेर पडणार, इतक्यांत नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें त्यांची लँड—लेडी तेथें आली.

नारायणरावांनां बाहेर निघालेले पाहून ती झणाली " मि. पंडित ! आज आपण कुठें दुसरीकडे dinner ला जाणार आहां वाटतं ? मला अगोदर आपण सांगितलं दिसेल नाहीं."

नारायणराव हंसून म्हणाले " मिसेस् ब्राउन् ! तुम्हांला सांगायला मी अगदींच विसरलों पहा ! माझें मन अलिकडे फारच चंचल झालें आहे. "

लँड-लेडी हंसत हंसत झणाली " मनुष्य एकदां प्रेमपाशांत सांपडलें, कीं, त्याची अशीच स्थिति व्हायची ! आज आपल्या प्रणयिनीच्या घरीं आपणाला भोजनाचें निमंत्रण आहे वाटतं ?"

" होय, मिसेस् ब्राउन् ! खरें म्हटलें झणजे तुम्ही हें मघांच ओळखायला पाहिजे होतें. तिच्याकडे मला भोजनाला जायचें नसतें तर इतक्या काळजीनें मी माझे केंस विंचरले असते का ? मिस् ब्राउन् ! अगदीं खरें सांगा हं ! आज मी या evening dressमध्यें कसा दिसतों बरें ?"

मिसेस् ब्राउन् खदखदां हंसून म्हणाली " Oh, quite stunning ! आपल्या प्रणयिनीला जर आपण आम

' गुडेरीन ' लोह व मॅग्नेनिस् या धातूंचे सत्त्वापासून बनविलें असल्यामुळें .
शरीरांत रक्ताची वृद्धि करण्यास यासारखा उपायच नाहीं.

propose करील, तर आपणाला 'नाहीं' म्हणायला तिची छातीच व्हायची नाहीं !"

"Thank you Mrs. Brown ! तुम्हाला कांहीं विचारलें तर मला सांगाल का ?"

"काय वरें ?"

"मिसेस् ब्राउन् ! 'propose' करतांना काय करायचें, कसें बोलायचें हें मला तुम्ही शिकवाल का ? आच्छा ! मिस्टर ब्राउनला तुम्ही जेव्हां 'proprose' केलेंत, तेव्हां तुम्ही काय म्हणालांत ?"

नारायणरावांच्या या धटिंगें मिसेस् ब्राउनला फार राग आल्यासारखें दिसलें. किंचित् कठोर स्वरानें ती त्यांना म्हणते "Oh Sir, Sir ! आपण काय विचारतां हें ? 'proposo' कुणीं मी का केलं ?"

किंचित् स्मित करून नारायणरावांनी विचारलें "तर मग कुणी केलें ?"

"बायका का कधीं 'propose' करतात मि. पंडित ? मिस्टर ब्राउन्नीं मला 'propose' केलं."

नारायणराव हंसून म्हणाले "Oh, I see !—मला वाटलें होतें, कीं, तुम्हीच केलें असेल प्रपोज ! बरें, प्रपोज करतांना मिस्टर ब्राउन् तरी काय म्हणाले ?"

"ती सर्व हकीगत आपणाला सांगूं म्हणतां ?"

"होय—तुमच्या या हकीगतीचा मला फार उपयोग होईल."

"बरं तर" असें म्हणून मिसेस् ब्राउन् खिडकीजवळच्या एका कोचावर बसली व आपली हकीगत सांगूं लागली. "मिस्टर ब्राउन् व मी एके दिवशीं हाइडपार्कमध्यें फिरावयास गेलों होतों. एका कोपऱ्यांतल्या झाडाखालीं दोन खुर्च्या रिकाम्या होत्या, त्यांवर आम्ही जाऊन बसलों—"

नारायणरावांनी मध्येंच विचारलें "काय म्हणतां मिसेस ब्राउन् ! हाइडपार्कमध्यें तुम्ही एकट्याच—एका तरुण पुरुषाबरोबर फिरायला गेलां होतां ? अन् Chaperon शिवाय ? तुमच्या आईबापांना ठाऊक होतें का हें ?"

मिसेस् ब्राउन् हंसतहंसत म्हणाली "नाहीं. माझ्या आईबापांना याची गंधवार्ताहि नव्हती. तीं दोघेंहि या बाबतींत फारच कडक होतीं. फार काय सांगूं ? आम्ही engaged झाल्यानंतर Chaperonशिवाय तीं मला कधींहि बाहेर जाऊं देत नसत—"

"तर मग तुम्ही त्यांच्या नकळत चोरून गेलां होतां होय ?"

मृदु हास्य करून मिसेस् ब्राउन् म्हणाली "होय—"

दोन्ही हात वर करून नारायणराव गंभीरपणानें म्हणाले "Holy Moses ! Oh, naughty Mrs. Brown ! I am shocked !"

नारायणरावांचा एकंदर आविर्भाव पाहून मिसेस् ब्राउन् कांहीं वेळपर्यंत खदखदां हंसत होती. कांहीं वेळानें ती त्यांना म्हणते "बरं तर, आपण जर इतके Shocked होतां आहां, तर मी मुळीं पुढं सांगतच नाहीं; म्हणजे झालं कीं नाहीं ?"

"छे छे—अशा रागावूं नका मिसेस् ब्राउन् ! तुमच्याशिवाय मला हें सारें कोण वरें शिकवील ?"

मिसेस् ब्राउन् नारायणरावांच्या या युक्तीनें अधिकच चढून गेली. कांहीं आढेवेढे न घेतां ती पुढें म्हणाली "गुलगुल गोष्टी बोलतां बोलतां संध्याकाळ झाला. गोष्टींच्या भरांत वेळ कसा गेला तेंदेखील आम्हाला समजलं नाहीं. शेवटीं, 'फार वेळ झाला, आई रागें भरेल,' असं म्हणून मी घरीं जाण्यासाठीं उठल्यें; तेव्हां मिस्टर ब्राउन् म्हणाले 'बस—जरा बस. तुला कांहीं गोष्ट विचारायची आहे.' मी पुनः खालीं बसल्यें. कांहीं वेळ आम्ही दोघेंहि स्तब्ध होतों. नंतर मिस्टर ब्राउन् मला म्हणाले 'मेरी ! माझ्याशीं तूं विवाह करायला तयार आहेस का ?' पहिल्या सपाट्यास मी त्यांना 'नाहीं' म्हणूनच सांगितलं. मिस्टर ब्राउन्नीं माझी पुष्कळ आर्जवं केलीं. तरी मी त्यांच्या विनंतीला राजी झाल्यें नाहीं. सरतेशेवटीं, गवतावर गुडघे टेंकून ते खालीं बसले व माझा हात धरून म्हणाले 'मेरी ! माझ्याशीं जर तूं विवाह करणार नाहींस, तर सैनिक होऊन मी विदेशांत निघून जाईन अन् तुझं स्मरण करीत करीत युद्धक्षेत्रावर देह ठेवीन !"

नारायणराव हंसू दाबून आश्चर्य-स्वरानें म्हणाले "काय म्हणतां ? आत्मघात ? अरेरे ! सर्वनाश सर्वनाश ! मग तुम्ही काय केलेंत मिसेस् ब्राउन् ?

"मीतरी दुसरंकाय करणार मि. पंडित ? झाल्यें त्यांच्या म्हणण्याला कबूल !"

नारायणराव किंचित् स्मित करून म्हणाले "ठीक केलंत ! अहाहा ! तुमच्याप्रमाणें जर माझी प्रणयिनी कोमल हृदयाची असती तर आणखी काय पाहिजे होतें ? असो, नशिबी असेल तसें होईल !"

बरोबर सात वाजतां नारायणराव मिस् टेंपलच्या वाड्यांत जाऊन दाखल झाले. मिस् टेंपलनें त्यांचें योग्य स्वागत केलें. कांहीं वेळानें उभयतांचें भोजन आटोपलें. मिस् टेंपलचें शाकान्न आमच्या नारायणरावांना कसें लागलें असेल तें त्यांचें त्यांनांच ठाऊक !

भोजनानंतर नारायणरावांच्या आयुष्यांत एकदम उलटापालट करण्यासारखी एक गोष्ट घडून आली !

भोजनसमारंभ आटोपल्यावर मिस् टेंपल व नारायणराव मिस् टेंपलच्या सुंदर, सुसज्जित दिवाणखान्यांत बसलीं होतीं. काय असेल तें असो; आज त्या वृद्ध स्त्रीचें मुखमंडल चिंतापूर्ण दिसत होतें.

कांहीं वेळानें मिस् टेंपलच्या दासीनें एका ट्रेमध्यें कॉफी आणून त्या दोघांपुढें ठेविली. कॉफी पितां पितां मिस् टेंपल नारायणरावांना म्हणाल्या "मि. पंडित ! आपणाला एक

शुद्ध रक्त हें शरीराचें जीवन होय. रक्त जर का अशुद्ध झालें, कीं, रोगाचा शिरकाव झालाच !
अशा प्रसंगीं वायकांनीं खात्रीलायक 'गुडेरीन' वापरावें.

गोष्ट मी केव्हांपासून विचारीन विचारीन म्हणतें आहें, विचारूं का?"

"विचारा, खुशाल विचारा!"

"आज कित्येक दिवसांपासून माझ्या मनाला एक चिंता लागून राहिली आहे. त्या चिंतेचा थोडासा आपणाशीं संबंध येत आहे. जर आपणाला मी कांहीं व्यक्तिगत प्रश्न विचारले, तर आपण मला क्षमा कराल?"

ब्रिटिश क्याबिनेटमधील आपण कोणीतरी बडे मुत्सद्दी आहों अशा समजानें नारायणराव मोठ्या सावधपणानें म्हणाले "जर आपले प्रश्न विशेष मानगडीचे नसतील तर मी मोठ्या आनंदानें त्यांची उत्तरें देईन."

कांहीं वेळ निस्तब्ध राहून मिस् टेंपलनें नारायणरावांना विचारलें "बोलतां बोलतां आपण पूर्वी मला सांगितलंच आहे, कीं, आपल्या आईबापांपैकीं कोणीहि जीवंत नाहीं. आपला विवाह झाला आहे का?"

"नाहीं."

"आपला येथला खर्च कोण चालवितं?"

"माझे चुलते माझा सर्व चालवितात."

"दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न आपणाला विचारायचा तो हा, कीं, जरी बॅरिस्टरच्या परीक्षेसाठी आपण इथं आला आहां, तरी कायद्याचा अभ्यास करणं आपणाला मनःपूर्वक आवडतं का?"

"आपणाला खरें सांगायचें झालें तर कायद्याचीं पुस्तकें मला डोळ्यांसमोर देखील नकोशी वाटतात."

"मिस् मॅनिंगच्या Evening party मध्यें आपली ओळख झाल्यापासून आपलं माझं जें कांहीं संभाषण झालं, त्यावरून माझी अशी पक्की खात्री झाली आहे, कीं, हिंदु धर्माकडे आपला फारच ओढा आहे."

हें ऐकून नारायणराव मनांत हंसले. हिंदुधर्माकडे जर आपला ओढा आहे असें ठरतें, तर खुद्द चार्वाकाला तरी लोकांनी अधार्मिक कां म्हणावें, अशी त्यांची खात्रीच होऊन गेली!

नारायणरावांना स्तब्ध बसलेले पाहून मिस् टेंपल म्हणाल्या "आपल्या विनययुक्त मौनावरूनच मी म्हणतें ही गोष्ट सत्य दोत आहे. हिंदुधर्मावर माझी अपरिमेय भक्ति आहे. याला पूर्वजन्मीचा संस्कार कारण म्हणा, किंवा कांहीहि म्हणा, परंतु महर्षिप्रणीत आर्यधर्म मला अत्यंत उदात्त वाटून मला तो निरतिशय पूज्य वाटतो, हें विचार सत्य आहे. या उदात्त धर्माचा यूरोपखंडांत प्रचार व्हावा अशी अनेक वर्षांपासून माझी अत्युत्कट इच्छा आहे. परमेश्वराच्या कृपेनें मजपाशीं विपुल संपत्ति आहे. आपणाशीं एका गोष्टीची आज मी प्रस्तावना करणार आहें. आर्यधर्माच्या प्रसाराच्या कामांत आपलं मला साहाय्य पाहिजे आहे. एकाद्या धर्मशील सुशिक्षित हिंदु तरुणाला आपला दत्तकपुत्र समजून त्यानें या कामीं साहाय्य द्यावें, अशी माझी आज अनेक वर्षांची मनीषा आहे. आपण या गोष्टीला कबूल आहां का?"

नारायणराव कांहीं उत्तर न देतां स्तब्ध बसले.

कांहीं वेळानें मिस् टेंपल म्हणाल्या "या प्रश्नाचं उत्तर आपणाला एकदम देतां येणार नाहीं, हें मला ठाऊक आहे. आजच मला आपणाकडून उत्तर पाहिजे आहे असं नाहीं. माझ्या बोलण्याचा नीट व पूर्ण विचार करून आपण सावकाश उत्तर द्या. जर आपण माझ्या प्रस्तावाला कबूल असाल तर दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीकडे बिलकूल लक्ष्य न देतां प्रथम आर्यधर्मशास्त्र व यूरोपियन् भाषा यांचा आपणाला मनःपूर्वक अभ्यास करावा लागेल. याप्रमाणें या दोन विषयांत आपली चांगली तयारी झाल्यावर दोन तीन वर्षांनीं आपणाला बरोबर घेऊन यूरोपखंडातील निरनिराळ्या देशांत हिंदुधर्माचा प्रसार करण्यासाठीं मी प्रवासाला निघेन."

नारायणराव गंभीरपणानें म्हणाले "नीट विचार करून कांहीं दिवसांनीं या प्रश्नाचें आपणाला मी उत्तर देईन."

मिस् टेंपल पुढें म्हणाल्या "फार उत्तम. मला कोणीहि आप्तमित्र नाहीं. माझ्या सर्व धनसंपत्तीचे माझ्या पश्चात् आपणच अधिकारी व्हाल. मी जीवन्त आहें तोंपर्यंत आपला हरएक प्रकारचा खर्च मी चालवीन. याशिवाय दर आठव्याला खासगी खर्चाला म्हणून आपणाला मी दहा गिनी देत जाईन. परंतु माझी मुख्य अट ही आहे, कीं, इतर कोणत्याहि गोष्टीकडे लक्ष्य न देतां आपणाला केवळ एका अध्ययनाकडेच सर्वस्वी लक्ष्य दिलें पाहिजे व एका शुद्धाचार ब्राह्मणाप्रमाणें आपणाला सदोदित राहिलें पाहिजे."

नारायणरावांचें मस्तक नाना प्रकारच्या कल्पनांच्या तरंगांनीं भ्रमूं लागलें. कांहीं वेळानें ते मिस् टेंपलला म्हणाले "ठीक आहे. एका आठवड्यानें आपणाला या प्रश्नाचें काय तें उत्तर देईन."

असें म्हणून मिस् टेंपलचा निरोप घेऊन नारायणराव तेथून निघून गेले.

[५]

मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या गोष्टीला आज तीन महिने होऊन गेले आहेत. नारायणराव मिस् टेंपलचे दत्तक पुत्र होऊन तिच्या सुंदर भव्य वाड्यांत रहात आहेत. हल्लीं त्यांनीं 'पंडित-टेंपल' असें संयुक्त आडनांव धारण केलें आहे.

एका दृष्टीनें पाहूं गेलें तर नारायणरावजी हल्लीं फार सुखांत आहेत, असेंच म्हटलें पाहिजे. पूर्वी त्यांना रोज पैशांची फार ओढाताण पडत असे. पैसे उसने मिळावे म्हणून याच्याशीं तोंड वेंगाड, त्याची वाकुळती कर, असे प्रसंग त्यांच्यावर पूर्वी फार येत असत. हल्लीं ती स्थिति पालटली आहे. हल्लीं त्यांचे लेहीच त्यांजपाशीं पैशासाठीं तोंड वेंगाडीत असतात. अलीकडे बॉंडस्ट्रीटशिवाय ते लंडनमध्यें दुसरीकडे कोठेंहि आपले कपडे व सूट तयार करवीत नाहींत! ऑम्निबसमध्यें फिरावयाचें तर त्यांनीं

संधिवात, छातींत दुखणें, कपाळ दुखणें वगैरेवरहि ऑडमन्स सायप्रस सालव्ह
हा उत्तम उपाय आहे. कि. १ रु.

अजिबात सोडूनच दिलें आहे. येथूनतेथून फैटण व क्वाब यांच्याशीं ते व्यवहार ठेवीत असतात. उत्कृष्ट हॅन्ड्रेनाशिवाय ते कोणत्याहि चिरूटाचा आपल्या अधराला स्पर्श होऊं देत नाहींत. आपल्या मित्रांनां बरोबर घेऊन नारायणराव जेव्हां नाटकाला जातात, तेव्हां तीन-चार गिनी भरून बॉक्स रिझर्व करित असतात.

परंतु कोणत्याहि गोष्टीला दुसरी बाजूहि असतेच. नूतन वैभवानें आमच्या नारायणरावजींनां कांहीं गोष्टींत जसें अत्यंत सुख झालें, तसें कांहीं गोष्टींत दुःखहि भोगावें लागलें. त्यांपैकीं मुख्य बाबती म्हटल्या म्हणजे अध्ययन आणि आहार! कांहीं दिवसांपूर्वी नारायणरावांनीं जेव्हां मिस् टॅपलरसमोर 'आजपासून मांसाशनाचा त्याग करून मी पक्का Vegetarian बनलों,' अशी प्रतिज्ञा केली, तेव्हां नानाविध मांस-पक्वान्नांला चटावलेल्या आपल्या जिव्हेला त्या प्रतिज्ञेचे शब्द उच्चारल्याबद्दल असा कठिण दंड-तोहि कायमचा—सहन करावा लागेल, अशी त्या विचाऱ्यांची कल्पना देखील नव्हती. निरामिष खाणें जिव्हेला आनंददायक व्हावयाला तीं तयार करण्यांत फार निपुणता लागत असते, व इंग्लिश स्वयंपाककलेंत ती तितकी नसते. मिस् टॅपलरच्या मेजावर दुग्धमिश्रित व्हाइट सॉस (White Sauce)नें माखलेले जे पदार्थ असत, त्यांपैकीं बहुतेक नारायणरावांनां जशाचे तसेच टाकून द्यावे लागत. नारायणरावजींवर आलेलें दुसरें संकट म्हटलें म्हणजे त्यांच्या आळसाला बिलकूल अवसरच नाहींसा झाला होता, हें होय! आठवड्यांतून दोन दिवस फ्रेंच भाषा व दोन दिवस जर्मन भाषा त्यांनां शिकावी लागत असे. या दोन भाषा त्यांनां शिकवण्याकरतां दोन शिक्षक नेमण्यांत आले होते. शिवाय, त्यांच्या अभ्यासावर स्वतः मिस् टॅपलरची सख्त नजर असे ती वेगळीच! आर्यधर्मशास्त्राच्या अध्ययनांत मात्र नारायणरावांच्या आळसाला बरीच फुरसत मिळे. आठवड्यांतून दोन दिवस 'ब्रिटिश म्यूझियम'मध्यें जाऊन स्वतः नारायणरावांनीं धर्मशास्त्राचा अभ्यास करावा असें मिस् टॅपलरनें ठरविलें होतें; हे दोन दिवस मात्र नारायणरावांनां आरामांत घालवावयास सांपडत असत. 'ब्रिटिश म्यूझियम' मध्यें जाऊन ते कादंबऱ्या नाटकें वगैरे वाचीत किंवा तेथें न जातां ते दुसऱ्या कोठेतरी भटकावयास जात.

मिस् टॅपलरबरोबर त्यांच्या बाड्यांत तीन महिने राहिल्यावर, पैशाची विपुलता असतांहि नारायणराव अगदीं त्रासून गेले. मिस् टॅपलरची ओळख जोपर्यंत नवीन होती तोंपर्यंत त्यांच्या संगतींत नारायणरावांनां मौज वाटे; परंतु मौज किंवा कौतुक हा रसच असा आहे, कीं, तो किंचित् जुना झाला म्हणजे त्यांतील सारा स्वाद नाहींसा होतो! रात्रीच्या भोजनानंतर मिस् टॅपलरच्या करड्या नजरेखालीं फ्रेंच व जर्मन भाषा आणि तत्त्वज्ञान यांचा अभ्यास व चर्चा करण्यांत नारायणरावांनां रात्रीचा पूर्वभाग-दहा साडेदहा वाजेपर्यंतचा वेळ कंठावा लागे; यामुळें त्यांच्या मनाला अत्यंत कष्ट होत. म्हणून हळुहळू कधीं कधीं ते नाटकाला जाऊ लागले. यामुळें मिस् टॅपलरबाई मनांतून फार रागावत खऱ्या, परंतु त्या नारायणरावांनां उघड हरकत करित नसत. परंतु खाण्याखाण व पेयापेय यांच्या भयानें त्या त्यांनां कधींहि बाहेर जेवावयास जाऊं देत नसत; घरीं जेवूनच नारायणरावांनां बाहेर जाणें भाग पडे.

लंडनशहरांत आज भारी धामधूम होती. ऐतिहासिक महत्त्वाचें जें 'गेईटी' नाटकगृह, त्याची जुनी इमारत मोडून तें नवीन बांधण्यांत आलें होतें. आज रात्रौ 'न्यू गेईटी थिएटर'चा opening ceremony (उघडण्याचा समारंभ) व्हावयाचा असून, त्यांत 'आर्किड' नामक नूतन संगीत नाटकाचा प्रथम प्रयोग व्हावयाचा होता. अशी अपूर्व संधि आमचे नारायणराव का व्यर्थ दवडणार? त्यांनीं कितीतरी दिवस अगोदर त्या प्रयोगासाठीं एक बॉक्स रिझर्व केला होता.

नाट्याभिनयाला आरंभ होण्यापूर्वी थोडा वेळ नारायणराव व त्यांचे तिघे मित्र अशा चार व्यक्ति त्यांच्या बॉक्समध्यें जाऊन स्थानापन्न झाल्या. या व्यक्तींपैकीं एक व्यक्ति आपल्या परिचयाचे विनायकराव इनामदार ही होय. बाकीच्या दोन व्यक्ति पुरुष नसून स्त्रियाच होत्या. त्यांच्या वेषांत भपका होता, परंतु पारिपाट्य (refinement) बिलकूल नव्हतें. त्यांच्या भाषणांत माधुर्य होतें-परंतु शालीनता मुळींच नव्हती. जरी त्या दोघीजणी स्त्रिया होत्या, तरी त्यांनां 'कुलस्त्रिया' म्हणावयाचें धाडस कोणालाहि होण्यासारखें नव्हतें.

तीन तासपर्यंत 'आर्किड' नाटकाचा प्रयोग चालला होता. प्रयोग सर्वतोपरी उत्कृष्ट वठला. नाटक समाप्त झाल्यानंतर आमच्या परिचयाच्या चारहि व्यक्ति नाटकगृहांतून बाहेर पडून रस्त्यावरील 'फूटपाथ'वर येऊन उभ्या राहिल्या.

नारायणराव आपल्या मित्रांनां म्हणाले "Let's go and have some supper at the Troc."

'Troc' अर्थात् Trocodero हें लंडन शहरांतील एक उच्च दर्जाचें होटेल (भोजनालय) आहे. या ट्रोकोडेरोमध्यें मित्रांसमवेत भोजन करणें हें शौकीपणाचें एक विशिष्ट चिन्ह समजलें जातें. नाटकगृहांतून बाहेर पडलेली श्रीमंत मंडळी या भोजनालयांत खाद्यपेयांचा समाचार घेऊन नंतर आपापल्या घरीं किंवा क्लबमध्यें परत जातात.

नारायणरावजींची ही लोभनीय प्रस्तावना ऐकून त्यांच्या बरोबरची एक युवती त्यांनां म्हणते "You are a dear!"

यावर दुसरी सुंदरी उद्गारली "I like their champagnes awfly!"

आजकाल जिकडे पहावें तिकडे स्त्रीवर्ग, अशक्त व निस्तेज दिसत आहे.
अशा प्रत्येक स्त्रीनें 'Guderin गुडेरीन' एकवार वापरावें.

तत्क्षणीं गाडी करून ही शौकी मंडळी ट्रोकोडेरोंत गेली. नारायणरावांनीं अगोदरपासूनच तेथें एक टेबल 'रिझर्व' करून ठेवलें होतें. तेथें जाऊन मंडळी स्थानापन्न झाली.

मूल्यवान् रौप्यपात्रांतून नानाविध खाद्य जिन्नस आले. बर्फाच्या बालदींत आकंठ पुरून ठेवलेली शांपेनची बाटली येऊन धडकली. सायंकालचा सुंदर व स्वच्छ वेष परिधान केलेली वेटर (वाढपी) मंडळी मोक्ष्यांच्या सेवेसाठीं तत्पर होती. तेथें आलेल्या महिलावृंदाच्या सुंदर वेषांच्या शोभेनें सर्व भोजनशाला देदीप्यमान झाली होती. वरतीं अदृश्य ठिकाणीं बसून वाजश्री नानाविध वाद्ययंत्रें वाजवित होते. पुरुष व रमणीवृंदाच्या अविश्रान्त संभाषणाचा गुंजनध्वनि, पुनः पुनः उसळणारें हास्य, व शांपेनादि पेयांचीं बुचें खोलण्याचा कर्कश शब्द हीं सारीं वाद्ययंत्रांच्या ध्वनींशीं मिश्रित होऊन त्या सर्व स्थानाला उत्सवमय करून सोडीत होतीं.

आमच्या परिचयाच्या चौघां व्यक्तींचा हास्यामोद व पानाहार 'झुरुनैव' चालू असतां त्या दिवाणखान्याच्या दुसऱ्या बाजूनें दोन प्रौढवयाच्या स्त्रिया आल्या. त्या दोघींपैकीं एकजण मिस् टेंपल! आमच्या परिचित मंडळीच्या दृष्टीला त्या पडल्या नाहींत.

दोघीजणी टेबलाजवळ बसल्यानंतर त्यांनीं कॉफीचे दोन प्याले आणावयास हुकूम केला. कॉफी पितां पितां त्यांचें संभाषण चालूच होतें. मिस् टेंपलनें आपल्या मैत्रिणीला विचारलें "आजच्या या कॉन्सर्टपासून आपल्या अनाथाश्रमाला किती उत्पन्न झालं बरं?"

दुसऱ्या प्रौढ स्त्रीनें उत्तर दिलें "बहुतेक जागा भरल्या होत्या. दोनशें गिनींपेक्षां जास्त उत्पन्न व्हावं असा माझा अंदाज आहे."

"सर्व मजवऱ्यांनीं फार सुंदर रीतीनं आपापलीं कामं केलीं. विशेषतः ज्यानं शॉपेयाँ (Chopoin) मधील कांहीं निवडक वाजविल्या, त्यानं तर फारच कौशल्य दाखविलं! मला तर एकंदर प्रयोग फार आवडला."

"पण आपण तर येतच नव्हतां-मीच आपणाला घेऊन आल्यें."

कॉफी पितां पितां मिस् टेंपल म्हणाल्या "आपल्या या कॉन्सर्टचं तिकीट मीं अगोदर विकत घेऊन ठेवलं होतं खरं; परंतु कॉन्सर्ट आजच व्हायचं आहे, हें फारसं माझ्या ध्यानांत राहिलं नव्हतं. आपण मजकडे आलां नसतां तर माझं येणं आज झालं नसतं."

कॉफी पिऊन झाल्यानंतर दोघीजणी उठल्या. उठतांच दिवाणखान्याच्या दुसऱ्या टोकाला मिस् टेंपलची दृष्टि एकाएकीं गेली.

कांहीं वेळपर्यंत त्याच स्थानाकडे स्थिर दृष्टीनें पहात मिस् टेंपलबाई उभ्या होत्या. शेवटी आपल्या खिशांतून आपला चष्मा बाहेर काढून त्यांनीं तो डोळ्यांना लावला. हॉलच्या दुसऱ्या टोकाला त्यांना जो कांहीं प्रकार दिसला त्याच्या योगानें मिस् टेंपलचें वार्द्धक्यरेखांकित मुखमंडल प्रलयकालच्या आकाशाप्रमाणें गंभीर झालें!

मिस् टेंपल आपल्या मैत्रिणीला म्हणाल्या "कृपा करून आपण एक मिनिटभर इथं थांबा—ही मी जाऊन येतें."

असें म्हणून हळुहळू दिवाणखान्याच्या दूरच्या टोकाला जाऊन त्या नारायणरावजींच्या अगदीं जवळ उभ्या राहिल्या. परंतु एक क्षणभरच!

मिस् टेंपलला अगदीं अनपेक्षित रीतीनें तेथें आलेल्या पहातांच आमच्या 'रावजी'ची जी स्थिति झाली, तिचें वर्णन करणें केवळ अशक्य आहे! झटकन् उभे राहून ते म्हणाले "Good evening, Miss Temple!" त्यांच्या समोर प्लेटींमधून निपिद्ध खाद्य पदार्थ भरलेले होते. जवळच फेंस आलेली सुवर्णरसाप्रमाणें चमकणारी मदिरा होती!

"Good evening. Don't let me interrupt you."—असें क्षणून मिस् टेंपल तेथून झटकन् निघून गेल्या.

* * * *

नारायणराव घरीं येऊन पहातात, तों मिस् टेंपल अगोदर येऊन निजावयास गेल्या, असें त्यांना कळलें. सारी रात्र त्यांना झोंप कशी ती आली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, फराळाच्या वेळीं नारायणरावांनां समजलें, कीं, मिस् टेंपल अजूनहि उठल्या नाहींत. त्या फार आजारी होत्या.

दोन वाजले. 'लंच'ची वेळ झाली. अद्यापि टेंपलबाई उठल्या नाहींत, असें त्यांना आढळून आलें. कोणाशीहि न बोलतां त्यांनीं 'लंच' आटोपला. लंच संपवून उठतांना, नारायणरावांच्या हातीं दासीनें एक चिठी आणून दिली. ती मिस् टेंपलनें पाठविली असून तींत पुढील मजकूर होता:—

"काल रात्रीं जो प्रकार मीं पाहिला, त्यानें माझें हृदय दग्ध झालें आहे. आजपासून आपला व माझा संबंध पूर्णपणें तुटला असें समजावें. आपलें तोंडसुद्धां पहावयाची मला इच्छा नाहीं. आजच्या आज आपण माझ्या घरांतून निघून जावें. माझ्याकरतां आपले जे तीन महिने खर्च झाले, त्याची भरपाई क्षणून या पत्रांतून आपणाला शंभर पौंडांचा एक चेक पाठविला आहे.

एडना टेंपल."

आपले जिन्नसपात्रस गोळा करून, ते आपल्यावरोबर घेऊन क्यावमधून नारायणरावजींची स्वारी पुनरपि वेजवॉटरमध्यें मिसेस् माउन्डकडे येऊन दाखल झाली!

शरीरांत नवीन रक्त उत्पन्न करण्यांत व अशुद्ध रक्त शुद्ध करण्यांत सर्व देशांतील
विद्वान् डॉक्टर 'गुडेरीन' वापरण्याची शिफारस करितात.

आमचा जातिभेद.

कांहीं महाराष्ट्रीय पुढाऱ्यांचीं मतें.

[२४]

[श्रीयुत प्रो. भास्कर रामचंद्र भातें, एम्. ए., बडोदा कॉलेज, बडोदें.]

आपल्या विनंतीप्रमाणें जातिभेदासंबंधीं माझें मत मी थोडक्यांत आपणास कळवीत आहें.

गुणकर्माच्या निराळेपणामुळें व्यक्तींचे निरानिराळे वर्ग झाले व समानशीलत्वामुळें परिस्थितीप्रमाणें ते बळावत जाऊन त्यांचे संघ बनतां बनतां त्यांस जातींचें स्वरूप आलें. ह्मणजे जातिभेदाचें निदर्शक पंक्तिभोजन व लग्नसंबंधाची मर्यादा या दोन गोष्टी त्यांस चिकटल्या. या वेळेस दळणवळण फार पसरलें नव्हतें, देशांतराचे मार्ग सुलभ झाले नव्हते, व त्यामुळें सर्व सुधारणा व सर्व प्रकारची प्रगति आपापल्या कोंडींतच घुटमुळून राहिली, व सार्वत्रिक बंधुत्वाच्या त्यास मोठी अडगळ झाली. हल्लींच्या काळीं परिस्थिति बरीच पालटली आहे. पूर्वीची कोंडी बहुतेक फुटण्याच्या तयारींत आहे. पंक्तिभोजनाची विशेष अडचण आतून तरी कोणी आतां राखीत नाहींत. लग्नसंबंधाच्या प्रदेशाचा मात्र विस्तार होईल असें दिसत नाहीं. तथापि जातिभेदापासून संगतिनियमानुसारें जे विकार व जो मनाचा अनुदारपणा जागृत राहतो तो सर्व काढून टाकण्याकरितां जातिभेद हा शब्द व त्यापासून उद्भवणारे साहजिक संकुचित मनोविकार हे जेव्हां लयास जातील तेव्हां तो सुदिनच समजला पाहिजे. हा जातिभेददोष उपटून काढण्यास मनाची संस्कृति सर्वसाधारण शिक्षणाच्या द्वारानें उत्पन्न केली पाहिजे, समाजाला शिक्षणानेंच तयार केलें पाहिजे. दुसरा कोणताहि मार्ग यशस्कर होईल, असें वाटत नाहीं.

बडोदें, २७-६-१२.

---

[२५]

[श्रीमती सौ. मथुराबाई द्रवीट, उमरावती.]

आजपर्यंत जातिभेद कसा राहिला, हें सांगणें तरी माझ्या बुद्धीच्या आटोक्याबाहेर आहे, तरी जातिभेदाच्या संवर्धनानें राष्ट्राची प्रगति खुंटली, हें स्पष्ट दिसतच आहे. ज्या ज्या विचारी व्यक्तीस जातिभेदाची तीव्रता भासत आहे, त्या त्या व्यक्ति शक्त्यनुसार ती तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु अशा प्रगतीनें जातिभेदाची पाळेंमुळें लवकर खणून निघतील अशी आशा करण्यास फारच थोडी जागा आहे. जातिभेदाचें बंड मोडण्यास धार्मिक व सामाजिक असे दुहेरी उपाय जोरानें अमलांत आले पाहिजेत. ते उपाय कसे, कोणचे व कोणत्या प्रकारें अमलांत आले पाहिजेत, हें सांगणें जरी सध्यांच्या सामाजिक पद्धतीमुळें अनिश्चित आहे, तरी स्वतंत्र विचारांच्या व्यक्तीला आपले विचार व उच्चार यांनां आचाराचें प्रत्यक्ष स्वरूप देतां येण्याइतकें समाजाचें बंधन शिथिल झालेलें आहे.

असो. आपण जातिभेदासंबंधीं जे दहा प्रश्न विचारिले आहेत, त्यांपैकीं बरेचसे प्रश्न शास्त्रीय दृष्ट्या व ऐतिहासिक दृष्ट्या फार गहन आहेत. त्यांचीं समर्पक उत्तरें देणें आज माझ्या बुद्धीच्या आटोक्याबाहेर आहे. तरी बाकीच्या प्रश्नांसंबंधीं माझीं जीं मतें आहेत तीं स्पष्टपणें कळविणें मला इष्ट वाटल्यावरून मी माझें मत देत आहें.

सध्यांच्या स्थितीकडे पहातां जातिभेद हा हिंदुधर्माचें महत्त्वाचें अंग आहेच, पण ही वस्तुस्थिति कायम राखण्यांत या देशाची हानि आहे.

जातिभेद हा सामाजिक, नैतिक, औद्योगिक व राजकीय प्रगतीच्या पदोपदीं आड येत आहे हें प्रत्येक

कामिनीया व मालती बाजारी मालाहून सर्वोत्कृष्ट, अत्यंत सुवासिक व आनंददायक.
पाव तोळा कि. रु. १॥. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

विचारी व्यक्तीला स्पष्ट भासत आहे. खांतल्याखांत राजकीय प्रगतीच्या तर तो फारच आड येत आहे. किंवहुना जातिभेद असावा कीं नसावा, हा प्रश्नच राजकीय आकांक्षा वळावत चालल्याचा परिणाम आहे.

जातिभेद कायम ठेवून जातिमत्सर नाहींसा करणें अशक्य आहे.

मुख्य मुख्य ज्ञातींतील पोटभेद मोडून नंतर मग क्रमानें मुख्य भेद मोडण्यास सुरुवात करणें हा मार्ग पुष्कळ अंशीं यशस्वी होईल; परंतु हा मार्ग कालावधीचा आहे; ज्या व्यक्तींनां त्वरित गोष्टी घडवून आणण्याची उमेद आहे, त्यांनां आचारस्वातंत्र्य अवश्य पाहिजे. ज्यांनां जितकें नैतिक धैर्य असेल तितक्या मानानें तो हा किंवा तो मार्ग स्वीकारील.

निरनिराळ्या ज्ञातींमध्यें अगर पोटभेदांमध्यें नुसता रोटीव्यवहार सुरू होऊन जातिभेद मोडणार नाहीं; जेथें रोटीव्यवहार तेथें बेटीव्यवहार झाला तर जातिभेदाचा अनिष्टपणा नाहींसा होईल. स्त्रीशिक्षणाचा प्रसार होऊन मुलींचे प्रौढविवाह सुरू झाले आहेत. निरनिराळ्या ज्ञातींतील पण समान संस्कृतीची व आचारविचारांची तरुण स्त्रीपुरुष मंडळी हा प्रश्न हळुहळू सोडवितील. शिक्षणाच्या अधिकाधिक प्रसाराबरोबर विवाहांतील "दान व प्रतिग्रह" यांची कल्पना हळुहळू मागें पडत जाईल. देशाच्या, समाजाच्या हजारों गोष्टींचा आपल्या बुद्धीनें ऊहापोह करण्याच्या सुशिक्षित मुलांमुलींनीं आपल्या जोड्याची निवड करण्याचा हक्क स्वतः अंमलांत आणण्यास हरकत दिसत नाहीं.

सध्यांचा काळच प्रगतीचा आहे. तेव्हां जातिभेद मोडण्याचा आज जरी जारीनें प्रयत्न झाला नाहीं, तरी तो हळुहळू नाहींसा होत जाणारच. परंतु एकादी गोष्ट आपोआप होऊं देण्याची वाट पहाणें हें भ्याडपाणाचें लक्षण आहे. प्रत्येक व्यक्तीनें आपलें कर्तव्य बजाविलें पाहिजे व स्वाभाविक प्रगतीला द्रुतगतित्व दिलें पाहिजे.

व्यक्तींच्या मानसिक धैर्याचा हा प्रश्न आहे. कोणाला जातींत राहून जातिबंधनें हळुहळू तोडावीं असें वाटेल, किंवा कोणी एकदम जातिबंधनांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करील. दोन्हीहि मार्ग इष्टच आहेत. सुधारणेला खेंचून पुढें नेणारीं व सुधारणेचा हात धरून संथपणें चालणारीं अशीं दोन्ही प्रकारचीं माणसें पाहिजेच आहेत; परंतु पहिल्या प्रकारच्या मनुष्यांवरील जास्त कौतुक वाटेल.

उमराबती, २९-६-१२.

---

[२६]

[श्रीयुत मोरो विश्वनाथ जोशी, बी. ए., एल् एल्. बी., उमरावती.]

१. वर्णभेदाची उत्पत्ति कशी झाली याबद्दल निश्चितपणें उत्तर देणें शक्य नाहीं; परंतु प्रथमतः ती गुणकर्मानुसारच झाली असावी, असें दिसतें. चातुर्वर्ण्य व जातिभेद आजच्या समाजस्थितींत तरी भिन्न मानलीं जातात. गुणकर्मानुसार व्यक्तीचें चातुर्वर्ण्य मानावें, कुलपरंपरेनें मानूं नये, असें माझें मत आहे.

२. जातिभेद हा हिंदु धर्माचें आवश्यक अंग होऊन बसला आहे; परंतु तसें असण्याचें कारण नाहीं.

३. ऐतिहासिक दृष्टा जातिभेदाचा समाजहितावर इष्टापेक्षां अनिष्टच परिणाम जास्त झाला आहे.

४. जातिभेद आजपर्यंत टिकला याचें मुख्य कारण मुख्यत्वेंकरून परकी देशांशी दळणवळण येतायातायेंच शेंकडों वर्षे राहिलें, हें असावें.

५. जातिभेद हल्ली ज्या तऱ्हेनें हिंदु समाजांत पाळला जात आहे, त्या तऱ्हेनें तो या देशाच्या सर्व तऱ्हेच्या प्रगतींच्या आड निःसंशय येत आहे.

६. जातिभेद कायम ठेवून जातिमत्सर नाहींसा करतां येणें जवळ जवळ अशक्य वाटतें.

७. प्रथमतः मुख्य ज्ञातींतील पोटभेद मोडून नंतर क्रमानें मुख्य भेद मोडण्यास सुरुवात करणें, हा रस्ता इष्टहेतु साध्य होण्यास अननुकूल नाहीं. हाच मार्ग स्वीकारावा असा आग्रह मात्र असूं नये. व्यक्तिशः ज्यास हा पत्करेल त्यानें तो धरावा; परंतु जातिभेद एकदम नाहींसे करणारे त्याज्य समजूं नयेत.

८. रोटीव्यवहार व बेटीव्यवहार दोन्ही सुरू करणें जातिभेदाचा अनिष्टपणा नाहींसा करण्यास जरूर

गुलशन (रजिस्टर्ड) शुभ्र व तांबड्या गुलाबापासून बनविलेलें. वास सौम्य व मधुर.
पाव तोळा कि. रु. १॥. अँग्लो इंडियन ड्रग केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

आहेत. बेटीव्यवहार करणें मात्र ज्या इतर गोष्टी अनुकूल असाव्या लागतात त्या अर्थात्च पाहिल्या पाहिजेत; परंतु त्या सर्व अनुकूल असून वधूवरांची जात एकें नाहीं, ही अडचण मात्र असूं नये.

९. जातिभेद मोडण्यास जाणून बुजून प्रयत्न केला पाहिजे; नुसत्या परिस्थितीच्या जोरानें तो कमी होईल असें दिसत नाहीं; व्यक्तिशः प्रयत्न न केल्यास जातिभेद मोडण्यास फारच कालावधि लागेल.

१०. जातींतल्या जातींत राहून हळुहळू जातिभेद मोडावा, हा एक मार्ग आहे. जातिबंधनें एकदम तोडून टाकावीं हा दुसरा. मला स्वतःला दुसरा पसंत आहे. या मार्गानें इष्टापत्ति लवकर होईल, असें मला वाटतें.

उमरावती, ३०-६-२१.

---

[२७]

[श्रीयुत रामचंद्र गणेश प्रधान, बी. ए., एल् एल्. बी., नाशीक.]

१. चातुर्वर्ण्य व जातिभेद हीं एक नाहींत. चार वर्ण हे व्यक्तींच्या गुणकर्मांवर अवलंबून आहेत; जातिभेद हे कुलपरंपरेवर अवलंबून आहेत. चार वर्णांची व्यवस्था तात्त्विक आहे; जातिभेदाप्रमाणें कृत्रिम नाहीं. कोणताहि समाज रानटी अवस्थेतून पार पडून मोडाबहुत सुसंस्कृत व संघटित organized झाला, म्हणजे त्या समाजांत चार वर्ण हे असतातच. ही चातुर्वर्ण्याची योजना केवळ हिंदुसमाजास लागू नसून मुसलमान, पार्शी, युरोपियन, चिनी, जपानी, वगैरे ज्या लोकांत जातिभेद नाहींत, त्यांनांहि लागू आहे. वर्णभेदाच्या कल्पनेची उत्पत्ति कशी झाली हें ऐतिहासिक दृष्ट्या सांगणें फार कठिण आहे. भगवद्गीतेंत "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" हें वचन आहे. त्यावरून व चातुर्वर्ण्याचें स्वरूप लक्षांत घेतां असें दिसून येतें, कीं, वर्णभेदाची उत्पत्ति तात्त्विक व नैसर्गिक आहे. समाज चांगला संघटित होऊन त्यांत वर्‍यावाईट गुणांचा व आचारांचा प्रादुर्भाव झाल्यानंतर वर्णभेदाच्या तात्त्विक कल्पनेची उत्पत्ति झाली असावी, असें मला वाटतें. तथापि या मुद्यावद्दल निश्चित असें मी कांहीं सांगूं शकत नाहीं.

चातुर्वर्ण्याची कल्पना व जातिभेदाची कल्पना या भिन्न आहेत; इतकेंच नव्हे, तर परस्परविरोधी आहेत. तथापि जातिभेदाची व्यवस्था चातुर्वर्ण्याच्या तत्त्वावरच रचलेली आहे, असें कित्येक लोक चुकीनें समजतात, व त्यामुळें जातिभेद नाहींसे करण्याच्या कामीं त्यांच्याकडून बराच अडथळा येतो. या चुकीच्या समजुतीमुळें त्यांच्या विचारांत बरीच असंबद्धता दृष्टीस पडते. अशा प्रकारचा घोटाळा होत असल्याकारणानें चातुर्वर्ण्याच्या तत्त्वावरहि फारसा जोर देणें इष्ट नाहीं, असें माझें मत आहे, व हल्लींच्या काळीं व स्थितींत त्या तत्त्वाप्रमाणें वर्णरचना करणेंहि अत्यंत कठिण आहे, व तशाप्रकारची अगदीं स्पष्ट वर्णरचना पूर्वी देखील कधीं होती किंवा नाहीं, याबद्दल मला शंका आहे.

२. जातिभेद हा हिंदुधर्माचें महत्त्वाचें आणि आवश्यक अंग नाहीं. जातिभेद नष्ट झाल्यानें हिंदुधर्म नाहींसा होणार नाहीं. जातिभेद ही केवळ कृत्रिम सामाजिक व्यवस्था आहे व त्यावर हिंदुधर्म कोणत्याहि रीतीनें अवलंबून नाहीं. इतकेंच नव्हे, तर जातिभेदामुळें हिंदुधर्माच्या उदात्त व शुद्ध तत्त्वांचा सर्व हिंदुलोकांत जितका प्रसार व्हावयास पाहिजे तितका झालेला नाहीं. "प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ॥ उपास्यानामनियम एतद्धर्मस्य लक्षणम्" ॥ ही जी रा. टिळक यांच्यासारख्या विद्वान् व हिंदुधर्माभिमानी गृहस्थांनीं हिंदुधर्माची व्याख्या केली आहे, तिच्यांत जातिभेदाचा त्यांनीं अंतर्भाव केलेला नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

३. ऐतिहासिक दृष्ट्या जातिभेदाचा समाजहितावर एकंदरींत अनिष्ट परिणाम झाला आहे. हिंदुसमाजाची आज जी कित्येक वर्षे विस्खलित स्थिति झालेली दिसून येते, त्याचें एक मोठें कारण जातिभेद होय. कोणत्याहि समाजाची पूर्ण वाढ होण्यास त्या समाजांत स्वतंत्रता, समता व बंधुता हीं तत्त्वें रुजलीं पाहिजेत. परंतु जातिभेद हे या तत्त्वांच्या कार्यास प्रतिबंधक आहेत. व्यक्तिविषयक पूर्ण वाढीस जातिभेदापासून अडथळा

आजकाल 'बालामृता'चा जिकडे तिकडे सुळसुळाट झाला आहे. अशा वेळीं मुलांना खात्रीचें हितकारक औषध म्हणजे बालजीवनामृतच होय ! अनुभव पहा.

येत असल्यामुळें व्यक्तिविषयक उन्नति खुंटलेली आहे. व त्यामुळें एकंदर राष्ट्रीय जीवनच पंगु झालेलें आहे. बालविवाह, जातिभेद इत्यादि अनिष्ट प्रकार हिंदुसमाजांत शिरूं लागल्यापासून हिंदुराष्ट्राची एकंदरे अवनति होत चालली, असें इतिहासावरून दिसून येतें.

४. जातिभेद हिंदुसमाजांत दृढमूल होऊन आजपर्यंत टिकला याचीं कारणें कायं, हा प्रश्न बराच कठिण आहे. तथापि, बहुजनसमाजाचें अज्ञान, त्यापासून उत्पन्न होणारा अंधविश्वास व वरिष्ठ मानिलेल्या जातीवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ति, राष्ट्रीय हिताविषयीं उदासीनता, शेंकडों वर्षे इतर सुधारलेल्या राष्ट्रांचा निकट संबंध नसल्यामुळें उत्पन्न झालेली कूपमंडूकवृत्ति, इत्यादि कारणांमुळें जातिभेद दृढमूल होऊन आजपर्यंत टिकला असावा. असें माझें मत आहे. अंतःकरणपूर्वक सतत प्रयत्न करून सुधारणा घडवून आणण्याची जी प्रवृत्ति पाश्चिमात्य राष्ट्रांत विशेष प्रमाणानें दिसते ती आपले लोकांत एकंदरींत कमी आहे. आपण पुराणप्रिय लोक आहोंत; सुधारणा करण्याची प्रवृत्ति आह्मांमध्यें बरीच कमी आहे. या आपल्या राष्ट्रीय दोषामुळें आपल्या समाजांत असलेल्या वाईट चालीरीती व कल्पना नाहींशा करण्याचा जोरानें व सतत प्रयत्न न करितां, आपण आहे हींच स्थिति बरी आहे असें समजून दैवावर हवाला देऊन स्वस्थ बसतों. यामुळें जातिभेदच काय, पण बालविवाहासारख्या अनिष्ट चालीहि आमच्यांतून अद्याप नष्ट होत नाहींत. दुसरी गोष्ट अशी, कीं, जातिभेदाचे अनिष्ट परिणाम ब्राह्मणजातीच्या प्रत्यक्ष अनुभवास न आल्यामुळें, व पूर्वी एकंदरींत ब्राह्मणच ज्ञानानें श्रेष्ठ असून त्यांचें सर्व समाजावर वर्चस्व अबाधित असल्यामुळें, सर्व जातींच्या हिंदुलोकांकडून जातिभेद मोडण्याचा प्रचंड प्रयत्नच आजपर्यंत झालेला नाहीं; व गौतम बुद्धासारख्या ब्राह्मणेतरांनीं जे प्रयत्न केले, त्यांना ब्राह्मणजातीकडून पाठिंबा मिळाला नाहीं. पूर्वी राष्ट्रीयत्वाची कल्पना व इतर राष्ट्रांचा निकट संबंध नसल्यामुळें, समतेच्या तत्वाचा प्रसार करून संघशक्ति उत्पन्न करण्याची आवश्यकता वरिष्ठ जातींनां वाटली नाहीं, व त्यामुळें वरिष्ठ जातींची दृष्टि सदैव आपलें वर्चस्व कायम ठेवण्याकडे असे; व ह्मणून जातिभेद मोडण्याचे कामीं त्यांच्याकडून मदत मिळण्याचें तर बाजूलाच राहिलें, उलट विरोध मात्र होत असे. सारांश, एकंदर लोकांची पुराणप्रियता, त्यांचें अज्ञान, त्यांची कूपमंडूकवृत्ति, त्यांची अन्यायाशीं झगडण्याचा प्रयत्न न करितां दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसण्याची प्रवृत्ति, राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा अभाव, आपलें वर्चस्व अबाधित चालू ठेविण्याची वरिष्ठ जातींची बुद्धि, इत्यादि कारणांमुळें जातिभेद ही व्यवस्था आजपर्यंत टिकली आहे, असें मला वाटतें.

५. जातिभेदाचें स्वरूप व त्याचें कृत्रिमत्व व अन्यायीपणा लक्षांत घेतां, जातिभेद आमच्या सामाजिक, नैतिक, औद्योगिक व राजकीय प्रगतीच्या आड येत आहे, असें ह्मणावें लागतें. जातिभेदामुळें हिंदुसमाज एकजीव झालेला नाहीं, त्याच्या ठिकाणीं यावी तशी संघशक्ति आलेली नाहीं, व जातीजातीमध्यें जितका विश्वास व जितकें प्रेम असावयास पाहिजे तितकें दिसून येत नाहीं. जातिभेदामुळें द्वेष, परोत्कर्षासहिष्णुता, आपमतलबीपणा, कनिष्ठ जातींतील निकृष्ट स्थितीबद्दल औदासीन्य, इत्यादि दुर्गुणांस उत्तेजन मिळालेलें आहे. खालच्या जातींच्या प्रगतीबद्दल वरिष्ठ जातीचे लोक फारशी कळकळ दाखवीत नसल्यामुळें, व खालच्या जातींच्या लोकांवर इतर धर्मप्रसारकांचें वजन पडून हिंदुधर्मानुयायांची संख्याच कमी होण्याची भीति आहे. जातिभेदामुळें वरिष्ठ जातींतील लोकांची औद्योगिक व्यापार चालविण्याची पात्रताच बहुतेक नष्ट झाली आहे, व ज्यांच्या हातीं उद्योगधंदे आहेत ते कनिष्ठ जातीचे व अशिक्षित असल्यामुळें त्यांच्या हातून उद्योगधंद्यांत ह्मावी तशी सुधारणा होत नाहीं. इंग्रज सरकारानें विद्यादेवीचें मंदिर सर्वांनां सारखें खुलें ठेविलें असतांहि जातिविषयक रूढ कल्पनांमुळें खालच्या जातींच्या लोकांनीं त्याचा जितका फायदा घ्यावा तितका ते घेत नाहींत. राजकीय चळवळीसहि सर्व जातींकडून मिळावी तितकी मदत मिळत नाहीं. राष्ट्रीयसभेच्या कार्यास यश आलें तर ब्राह्मणांचें सध्यांचें असलेलें वर्चस्व तसेंच कायम राहील, सबब राष्ट्रीय सभा नको, असें प्रामाणिक बुद्धीनें मानणारे आमच्यांत कांहीं लोक आहेत. ब्राह्मणेतरांच्या ठिकाणीं चांगला देशाभिमान व उज्ज्वल स्वार्थत्याग अशेल

खाल्लेलें अन्न पचविण्यांत, पोटांतील वायु तोडण्यांत 'बालजीवनामृता'चा हातखंडा आहे. वापरण्यानेंच खात्री होणार आहे.

असें कांहीं ब्राह्मणांनां वाटत नाहीं, तर उलटपक्षीं हिंदीलोकांनां स्वराज्य मिळालें तर सर्व हिंदुलोकांनां त्याचा सारख्या रीतीनें फायदा मिळेल असें कांहीं ब्राह्मणेतरांनां वाटत नाहीं, व ह्मणून हिंदुसमाजांत असावा तितका परस्पर विश्वास अद्याप दिसून येत नाहीं. हा सर्व अनिष्ट प्रकार जातिभेदाचा परिणाम होय.

६. जातिभेद कायम ठेवून जातिमत्सर नाहींसा करणें शक्य नाहीं असें मला वाटतें. जातिभेद कायम ठेवून जातिमत्सर नाहींसा करण्याची अपेक्षा करणें, ह्मणजे कारणाचें अस्तित्व कायम ठेवून त्यापासून कार्योत्पत्ति मात्र होऊं नये अशी अपेक्षा करण्यासारखेंच अयोग्य आहे. प्रत्येक जातींत असे कांहीं लोक आहेत, कीं, त्यांच्यामध्यें जातिमत्सर दिसत नाहीं, व जातिभेद अनिष्ट आहेत असें अलीकडे पुष्कळ लोकांनां वाटूं लागल्यामुळें जातिमत्सरहि कमी होत चालला आहे; परंतु या प्रश्नाचा व्यापक व सूक्ष्म रीतीनें विचार केला पाहिजे, व जातीजाती-संबंधानें अद्याप जे दुराग्रह, गैरसमजुती, इत्यादि दिसून येतात त्याहि लक्ष्यांत घेतल्या पाहिजेत. तसेंच, जातिमत्सर नेहमींच व्यक्त होतो, असें नाहीं; परंतु तो अंतःकरणांत बीजरूपानें गुप्त असल्यानें अनुकूल परिस्थिति मिळाल्याबरोबर त्याचा अनुभव आल्याशिवाय राहत नाहीं.

—९-१० हे प्रश्न जातिभेद मोडण्याकरितां कोणते उपाय योजिले पाहिजेत या मुद्यासंबंधानें आहेत, व त्यांचीं उत्तरें अनुक्रमानें निरनिराळीं न देतां एकत्र देण्यास कांहीं हरकत नाहीं. सुलभ्या परिस्थितीनें जातिभेद मोडतील, असें मला वाटत नाहीं. प्रत्येक वर्ष सतत व जोरानें प्रयत्नच केले पाहिजेत. तसेंच, सुसता रोटीव्यवहार सुरू करून जातिभेद नष्ट होतील असेंहि मला वाटत नाहीं. बेटीव्यवहारविषयक प्रतिबंधहि नाहींसे झाले पाहिजेत.

सापेक्ष रीतीनें विचार करितां, प्रथमतः पोटजाती एकत्र करून नंतर सर्व जाती एक करण्याचा मार्ग सुकर दिसतो; परंतु त्यास एक अडचण आहे. एकंदर जातींची संख्या इतकी मोठी झाली आहे, कीं, कोणती पोटजात कोणत्या मुख्य जातींत येते, हें ठरविणें नेहमींच सोपें जाईल असें नाहीं, व त्याबद्दल मतभेद होऊन तंटेबखेडे माजण्याचाहि संभव आहे. तें कांहीं असलें, तरी पोटजाती एक झाल्याशिवाय मुख्य जातीमध्यें बेटीव्यवहार मुळींच करूं नये, असें माझें मत नाहीं. पोटजाती एक करण्याच्या प्रयत्नाबरोबरच शक्य त्या प्रमाणानें मुख्य जातींतहि बेटीव्यवहार सुरू करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

परंतु ज्या अर्थी आज मुख्य जातींतील बेटीव्यवहार कायद्यानें संमत मानले जात नाहींत, त्या अर्थी असले व्यवहार कायदेशीर ठरविण्याकरितां सरकारास कायदा करण्याबद्दल जोरानें आग्रह केला पाहिजे. जोंपर्यंत मुख्य जातीजातींत लग्न करणें बेकायदेशीर आहे, तोंपर्यंत ज्यांचा हिंदुधर्मावरील विश्वास उडाला नाहीं त्यांनीं सध्यां प्रचलित असलेल्या 'सिव्हिल म्यॅरेज ॲक्टा'चा फायदा घेऊन, आह्मीं हिंदु नाहीं असें खोटेंच सांगून तशा प्रकारचीं लग्नें करूं नयेत; परंतु असलीं लग्नें कायदेशीर आहेत असें ठरवून घेण्यास सरकारास कायदेशीर चळवळ करून भाग पाडिलें पाहिजे, व ह्मणून निदान सर्व हिंदु समाजसुधारकांनीं जुटीनें अशी चळवळ चालू ठेविली पाहिजे. सारांश, मुख्य जातीजातींतील लग्नांचा बेकायदेशीरपणा नाहींसा करण्याकरितां प्रथम आपण प्रयत्न केला पाहिजे, व हा प्रयत्न सफल झाल्यानंतर पोटजाती एक करण्याच्या चळवळीबरोबर मुख्य जाती एक करण्याचीहि चळवळ जोरानें केली पाहिजे.

जातिभेद हिंदुसमाजाचे हाडीं मासीं खिळलेले असल्यामुळें ते लवकर नाहींसे होणें शक्य नाहीं. सबब उतावीळपणानें एकदम जातिबंधनें तोडून न टाकितां शक्य तितका जातिभेद मोडण्याचा सतत व अंतःकरणपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. कायद्याच्या आडकाठीमुळें व इतर कारणांमुळें मुख्य जातीजातींत फारशीं लग्नें आज होणार नाहींत, परंतु अशीं लग्नें कायदेशीर ठरे तोंपर्यंत निदान पोटजातींत बेटीव्यवहार सुरू करणें व सर्व जातींत रोटीव्यवहार सुरू करणें—या दोन सुधारणा तरी अमलांत आणण्याचा जोरानें प्रयत्न झाला पाहिजे. एकत्र भोजनें झालीं पाहिजेत, व भोजनांत जातिभेद करतां कामा नये. सोवळें ओवळें, स्पर्शास्पर्श इत्यादि विपर्यांच्या कोत्या समजुतींस अजिबात फांटा दिला पाहिजे.

वाईट सवयीमुळें दूषित झालेला मूत्राशय शुद्ध करण्यास 'कपुरलाईन'
हा एकच उपाय आहे. कि. रु. १॥.

तसेंच, शिक्षणाचा प्रसार करून व खालच्या जातींची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करून उच्च जाति व कनिष्ठ जाति यांच्यामध्यें आज दिसून येणारें महदंतर होईल तितकें कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

नाशिक, ३०-६-१२.

---

[२८]

[श्रीयुत प्रो. महादेव मल्हार जोशी, बी. ए., संस्कृत प्रोफेसर, जुनागढ कॉलेज, जुनागढ.]

आपण पाठविलेल्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें खालील ओळींत आलीं आहेत, असें वाटतें. या प्रश्नांचीं उत्तरें भूमितिरीला निश्चित व ठाम स्वरूपाचीं देणें कठिण व वेडेपणाचें आहे. दिशा दाखविणें शक्य आहे. चातुर्वर्ण्य व जातिभेद वृक्षशाखान्यायानें संबद्ध आहेत. वर्णांचे पोटभेद म्हणजे जाति. आर्य लोक चातुर्वर्ण्य घेऊनच हिंदुस्थानांत आले, अशी माझी समजूत आहे. पुढें अनंत पोटभेद झाले ते कांहीं उत्क्रान्ति-तत्त्वानें व कांहीं अज्ञानमूलक अभिमानानें झाले. चातुर्वर्ण्य हा हिंदुधर्माचा मुख्य आधारस्तंभ आहे, व तो जन्मसिद्धच धरिला पाहिजे. नाहीं तर गुण-कर्मविभागांची परीक्षा वरोवर न झाल्यानें अनवस्था होईल. जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य, जिवंत समाजांत लवचिक व नवीन हवंत योग्य फेरवदल करण्यास अनुकूल असें असतें. हल्ली आपला समाज अनेक कारणांनीं जडावस्थेस गेला आहे. त्याला पुनरुज्जीवनाची मात्रा देणें सर्वांसच अवश्य वाटतें; पण चातुर्वर्ण्य मोडून तसें करणें म्हणजे त्याचा प्राणच घेण्यासारखें आहे. अनंत पोटभेद हानिकारक आहेत; ते सारासार विचारानें व हळुहळूच जितके कमी करितां येतील तितके करावे व आपोआप होतीलहि. घाई व अंध उत्साह इतक्या नाजुक कामांत अपकारकच होत. पोटभेदांच्या एकीकरणांत प्रथम रोटीव्यवहार व मग वेटीव्यवहार हा सृष्टिक्रमच पुढाऱ्यांनीं चालवावा. जातिभेदाचे परिणाम समाजाचे बाल्यावस्थेंत फारच इष्ट झाले—जातिभेद नसता तर परशत्रूंच्या तडाक्यांत हिंदुसमाज—निदान पूर्वकालीं—नष्ट झाला असता, व हा जातिभेदाचा उपयोग समाजाच्या अगदीं अन्तर्गत रक्तांत भिनून गेल्यामुळें न कळत सर्व समाज त्यास अनुकूल आहे व असणारच. याचे अनिष्ट परिणाम समाजाच्या वृद्धावस्थेंत चांगलेच दिसून येत आहेत. त्यांस औषध झटलें म्हणजे चातुर्वर्ण्यावर 'मूलेकुठारः' हें नव्हे; तर जातिमत्सराचें विष उत्कट देशाभिमान, उत्कट स्वार्थत्याग, व उत्कट औदार्य या गुणांनीं नाहींसें करणें, हें होय. ब्राह्मणांनीं उच्च व्यवहार न करितां उगीच ऐट मारणें सोडून दिलें पाहिजे व इतर जातींनीं ब्राह्मणद्वेष सोडून दिला पाहिजे. स्वोन्नतीप्रीत्यर्थ धार्मिक चळवळ करणें हल्लींच्या स्वातंत्र्य-कालांत शक्य आहे, व योग्य आहे. धर्माच्या चळवळींत द्वेष नसतो. त्वेष व उत्साह असणें साहजिक आहे. वस्तूचा नाश करणें म्हणजे वस्तूची सुधारणा करणें नव्हे, हें तत्त्व सर्वांनींच लक्षांत ठेवून हल्लींच्या आपत्कालीं अत्यंत उदात्त मुत्सद्दीपणानें वागलें पाहिजे. आपत्कालचें बाह्यवर्तन अन्तर्गत विचारांच्या अगदीं विरुद्धहि असूं शकेल; पण तें तात्पुरतें आहे, दोषार्ह नाहीं. सारांश, धर्माकरितां करा. मग जातिभेद जावो अथवा राहो. परिणामीं दैवी संपत्तीचीं फळें मिळतील. उपहास व तिरस्कारबुद्धि हीं सर्व पक्षांस आसुरी संपत्ति देतील, व फळेंहि तशींच मिळतील. जातिभेद सर्वस्वीं मोडणारांस राजसत्ता व इतर परिस्थिति अनुकूल आहे; पण तें इष्ट आहे काय? याचें उत्तर देणें जितकें सोपें वाटतें तितकें नाहीं. समाजाचीं मूलभूत तत्त्वें 'अन्नादीनि भूतानि' या न्यायानें समजण्यास गूढ आहत, व तीं पुरीं न समजतां तात्पुरत्या फायद्याकडे पाहून हुरळून जाऊन नवी इमारत बांधण्याची शक्ति नसतां समाजाची जुनी इमारत एकदम कोसळून टाकणें सोपें आहे; शहाणपणाचें नाहीं!

जुनागढ १-७-१२.

मातृपदास पोहोंचलेल्या प्रत्येक स्त्रीनें आपल्या संग्रहीं **बालजीवनामृत** ठेवणें. अत्यंत जरूरीचें आहे. प्रसंगी त्याचा चांगला उपयोग होतो.

[२९]

[श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए., एल् एल्. बी., खामगांव, बऱ्हाड.]

१. वर्णव्यवस्थेतील शूद्र हा वर्ग मूळचा जितांचा मिळून झाला असावा. कारण, स्वतंत्र समाजांतील कोणत्याहि एका वर्गानें इतर वर्गांचें दास्य निमूटपणें शिरावर घेणें, स्वाभाविक वाटत नाहीं. बाकीच्या तीन वर्णांचा उगम गुणकर्मभेदांतच असावा. प्रत्येक वर्णास कांहीं आवश्यक कर्तव्यांवरोबर कीर्तिधनलाभादि फायदेहि असत; त्यामुळें तो आपल्या स्थितींत संतुष्ट असे. प्रथमतः या तीन वर्णांमध्यें गुणकर्मांसंबंधानें तीव्र भेद नसला पाहिजे. त्या वेळीं भक्ष्याभक्ष्यासंबंधानेंहि ब्राह्मणांमध्येंहि विधिनिषेध नव्हता. विद्या शिकण्याची सर्व वर्णांना मोकळीक होती. इतर आचारांसंबंधानेंहि तीव्र निर्बंध नव्हते. वर्णावर्णांमध्यें अनुलोम विवाह होत असत. पुढें ब्राह्मणांनीं मांसाहार टाकिला. साहजिकच त्यांचे इतर वर्णांबरोबर अन्नव्यवहार व विवाह बंद झाले. इतर वर्णांपासून अलिप्त रहाण्यांत इतर वर्णांनीं ब्राह्मणांचेंच अनुकरण केलें. वर्णावर्णांमधील आचारभेद वाढण्यास हिंदूंची अविभक्तकुटुंबपद्धति बरीच कारणीभूत झाली असावी. तिनें प्रत्येक कुटुंबास इतर कुटुंबांपासून अलग ठेवून कुटुंबाच्या व्यवसायास किंवा धंद्यास आनुवंशिक स्वरूप दिलें. आचारांमधील भिन्नता तीव्रतर होऊं लागल्यावरोबर भिन्नभिन्न वर्णांचीं रहाण्याचीं स्थानेंहि भिन्नभिन्न होऊं लागलीं. त्यामुळेंहि त्यांमधील दळणवळण कमी होऊं लागलें. यानंतर या स्थितीस धर्मनिर्बंधांनीं कायमचें स्वरूप दिलें; व गुणकर्मांवर उभारलेल्या चातुर्वर्ण्याच्या जागीं कुलपरंपरेवर उभारलेला जातिभेद अस्तित्वांत आला. तो चिरकालिक होण्यास पुनर्जन्माच्या सिद्धांताचें फार साहाय्य झालें. सर्व वर्ण पूर्वसंचितानुरूप येणाऱ्या स्थितींत संतोष मानूं लागले. इतकेंच नाहीं, तर प्रत्येक वर्णांतील विशिष्ट व्यक्तींस विशेष हक्क देण्यांत आल्यामुळें त्यांस आपल्या स्थितीचा अभिमानहि वाटावयास लागला. हिंदु धर्माचे आचारप्रधान असे नवेनवे प्रकार उत्पन्न झाल्यामुळें आचारामधील भिन्नता वाढून जातिभेद तीव्र होत गेला. याशिवाय देशभेदामुळें व ज्ञातिसंकरामुळें जातींची संख्या वाढत गेली. याप्रमाणें जातिभेदाच्या उत्पत्तीचीं व वाढीचीं धार्मिक, राजकीय व सामाजिक कारणें असावींत.

२. हिंदु धर्माच्या मूळच्या उज्ज्वल स्वरूपाच्या दृष्टीनें विचार केला, तर कुलपरंपरेवर उभारलेला जातिभेद त्या धर्माचें महत्त्वाचें अंग नाहीं. हिंदु धर्माच्या सांप्रतच्या भ्रष्ट स्वरूपाच्या दृष्टीनें विचार केल्यास मात्र त्याचें फार महत्त्व आहे.

३. ऐतिहासिक दृष्ट्या जातिभेदाचा आपल्या समाजावर अनिष्ट परिणामच झाला आहे. मराठ्यांच्या इतिहासाचा उत्तर भाग म्हणजे मराठे व ब्राह्मण या मुख्य जातींच्या किंवा देशस्थ, कोंकणस्थ, सारस्वत इत्यादि पोटजातींच्या परस्परद्वेषाचा परिपाकच होय. जातिभेदामुळें रसातळाला पोहोंचलेला समाज अजून नीटपणें वर डोकें काढीत नाहीं, यांचें सर्वांत प्रमुख कारण तोच जातिभेद होय.

४. जातिभेद दृढमूल होण्याचीं कारणें मुख्यत्वेंकरून तीन आहेत; धर्म, त्यावर उभारलेला कायदा, व भाषेंतील व आहारविहारादि आचारांतील भेद.

५. भिन्नभिन्न जाती एकमेकांपासून फटकून राहतात, व त्यामुळें त्या स्वार्थपर बनत जातात. त्यांना राष्ट्रीय हितासाठीं एकोप्यानें वागणें जड जातें. त्यांजमधील उच्चनीचभावामुळें त्यांजमध्यें नेहमीं मत्सर धुमसत रहातो. कनिष्ठ जातींतील बुद्धिमान् मनुष्यें मागें पडून वरिष्ठ जातींतील सामान्य माणसेंहि पुढें येतात. जातीजातींमध्यें धंद्यासंबंधानें स्पर्धा नसल्यामुळें गुणांचा विकास होत नाहीं, व अल्प गुणास मोठें वेतन इत्यादि मक्त्याच्या पद्धतीपासून होणारे दुष्परिणाम घडून येतात. समाजांतील भिन्नभिन्न घटकावयवांतच विषमता असल्यामुळें राजकीय बाबतींत समान हक्कांची नेटानें मागणी होत नाहीं. कोणतेंहि राष्ट्रीय कार्य सुरू झालें, कीं, त्याला बाहेरून विघ्नें येण्यापूर्वी अंतर्भेदांमुळेंच तें ढांसळून पडतें. सत्य व न्याय हीं धर्माचीं व नीतीचीं मुख्य अंगें होत. असत्यावर व अन्यायावर उभारलेल्या जातिभेदानें त्यांचा ऱ्हास व्हावा, यांत नवल नाहीं. शूद्र जवळून जाऊं लागला

चिरचिर करणारीं लहान मुलें निरोगी असावींत अशी आपली इच्छा आहेना ?
तर मग त्यांना 'बालजीवनामृत' द्या.

असतां त्याचा स्पर्श होईल या भीतीनें जो कूपमंडूक थरारून मागें सरतो, त्याला भूतदयेच्या पंखाच्या जोरावर भराऱ्या मारणाऱ्या गरुडपक्ष्याची दृष्टि कशी यावी ?

६. जातिभेद कायम ठेवून जातिमत्सर नाहींसा करण्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. हल्लींसारख्या सुधारणेच्या व समान हक्काच्या काळांत जातीजातींत कृत्रिम भेद राहिल्यास त्यांजमध्यें मत्सरहि राहणें अनिवार्य आहे.

७ जातिभेद मोडतांना आधीं पोटभेद व नंतर मुख्य जात हा क्रम ठेवण्यापेक्षां दोन्ही प्रकारच्या जातींसंबंधानें शक्य तितकी सुधारणा एकदम चालू ठेवावी हें बरें. आधीं पोटभेद मोडून नंतर मुख्य जातींतील भेद मोडणें कालावधीची गोष्ट आहे. ज्या जातींमध्यें रोटीव्यवहार रूढ असून बेटीव्यवहार नाहीं त्यांजमध्यें तो सुरू करणें, व ज्या जातींमध्यें दोहीं व्यवहार नाहीत त्यांमध्यें रोटीव्यवहार सुरू करणें, हे दोन्ही प्रकार एकदम चालू ठेवण्यास हरकत नाहीं. कांहीं जाती तर केवळ अस्पृश्य मानिलेल्या आहेत. त्यांच्याशीं जरी स्पर्शव्यवहार आरंभीं सुरू केला तरी मोठें कार्य झाल्यासारखें होईल.

८. जातिभेदाचा अनिष्टपणा पूर्णपणें नाहींसा होण्यास रोटीव्यवहाराप्रमाणें बेटीव्यवहारहि सुरू झाला पाहिजे. तसें नसतें तर कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे यांमध्यें जो हल्लीं (कमी प्रमाणावर का होईना) द्वेष दिसतो, तो दिसला नसता.

९. जातिभेद मोडण्याचा प्रयत्न केला नाहीं, तरी त्याचीं बंधनें हळुहळू शिथिल होण्यास सांप्रतची परिस्थिति बरीच अनुकूल आहे. पाश्चिमात्य विद्येचा संस्कार झाल्यामुळें जातिभेद हा हिंदु धर्माच्या उज्ज्वल स्वरूपाचें लक्षण आहे ही भावना मावळत चालली आहे; किंबहुना धर्माचे आधारच डळमळूं लागले आहेत. अस्पृश्य जातींच्या लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यास ते आपल्या स्पर्शास पात्र होतात; परंतु त्यांनीं परधर्माचा आपल्या मनास स्पर्शहि होऊं न दिल्यास ते अस्पृश्यच ठरतात, हा विरोध ढळढळीतपणें नजरेस आल्यामुळें त्या जातींची उन्नति करण्याकडे सर्व वर्गांचें लक्ष्य लागलें आहे. प्रार्थनासमाजासारख्या धर्मसंस्थांनींहि जातिभेदाचा थोडाबहुत बीमोड केला आहे. पण हा धर्मोत्पत्तीचा काळ नसल्यामुळें त्यांनां फारसें यश येणें शक्य नाहीं. विद्येकरितां परदेशीं जावें लागत असल्यामुळें जातिबंधनें साहजिकच शिथिल होत चाललीं आहेत. एकराष्ट्रीयत्वाची कल्पना उद्भवल्यापासून जातीजातींत किंचित् परस्परप्रेम वाढूं लागलें आहे. त्यांजमध्यें कायदेशीर विवाह होण्यास आडकाठी नसावी अशा अर्थाचीं विलें येण्यापर्यंतहि मजल गेली आहे. अविभक्त कुटुंबाचीं बंधनें तुटून प्रत्येक व्यक्ति अधिक स्वतंत्र बनत चालली आहे. जीवनार्थकलहांत वरिष्ठ जातींतल्या पुरुषांनां हलक्या जातींचे धंदे पत्करावे लागल्यामुळें हलक्या जातींतल्या लोकांशीं त्यांचें दळणवळण वाढल्या प्रमाणावर आहे. मुंबईसारख्या शहरांत अनेकदां हलक्या जातींच्या लोकांजवळ रहाण्याचा प्रसंग पडत. असल्यामुळें वरिष्ठ जातींच्या व्यक्तींनां त्या लोकांबद्दल सहानुभूति उत्पन्न होत आहे. मुंबईतील इराण्यांचीं दुकानें म्हणजे जातिभेदाचे कसाईखानेच होत ! ब्राह्मणांमध्यें खाण्यापिण्यासंबंधानें शैथिल्य सुरू झाल्यामुळें व चांगलें शिक्षण कनिष्ठ जातींत सौकर्यानें मिळण्याची सोय झाल्यामुळें आचारांतील व भाषेतील भेद कमी होत आहे. आचारभेद पूर्णपणें नाहींसा होण्यास मांसाहारासंबंधीं निर्बंधाचा मोठा प्रत्यवाय आहे. जोंपर्यंत आहारादि आचारासंबंधानें भेद आहे, तोंपर्यंत बेटीव्यवहार सपाट्यानें होणें सुसंभाव्य वाटत नाहीं. भिन्नाहारी कुटुंबांतहि बेटीव्यवहार शक्य असतो अशी सारस्वत ब्राह्मणांमधील प्रघातावरून आशा बाळगण्यास हरकत नाहीं.

१०. जातिबंधनें एकदम तोडून टाकण्यानें जातींची संख्या वाढेल मात्र. त्यापेक्षां जातींत राहूनच हळुहळू सुधारणा करणें अधिक सुलभ व श्रेयस्कर आहे.

खामगांव, ३-७-१२.

आपला चेहरा फिकट व निस्तेज कां दिसतो ? रोगामुळें अशक्त झालां असाल तर
प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका वापरा.

[३०]

[श्रीयुत आत्मारामशास्त्री पिंपे, करवीरनगरवृंदसभेचे अध्यक्ष, कोल्हापुर.]

१. वर्णांची उत्पत्ति, "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" या भगवद्वचीप्रमाणें परमेश्वरापासून झालेली आहे. अर्थात् ती अनादिसिद्ध आहे. 'वर्ण' हा शब्द ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार जातींसच लागू आहे. आणि 'जाति' हा शब्द यावज्जातींस लागू आहे. यावरून चातुर्वर्ण्य व जातिभेद यांत थोडें अंतर आहे असें वाटतें. 'जातिभेद' हा जरी प्रथम गुणकर्मानुरोधानें उत्पन्न झालेला आहे, तरी हल्लीं तो कुलपरंपरेच्या ठिकाणीं दृढतर रूढ झाला असल्यानें गुणकर्मानुसार त्यांत नवीन फेरफार करतां येणार नाहीं.

२. जातिभेद हा हिंदुधर्माचें महत्त्वाचें आणि आवश्यक असेंच अंग आहे. कारण—हिंदुधर्मशास्त्रांत जातिपरत्वें भिन्न आचार सांगितले आहेत. तेव्हां जातिभेद नाहींसा झाला, कीं, हिंदुधर्मच नाहींसा होणार.

३. हल्लीं समाजहितावर कांहीं अनिष्ट परिणाम झालेला दिसत आहे, हें खरें, पण तो जातिभेदापासून नसून त्यास दुसरीं कारणें आहेत. त्याचें दिग्दर्शन (६) व्या कलमांत करण्यांत येईल.

४. जातिभेद हा हिंदुसमाजांत दृढमूल होऊन आजपर्यंत टिकला, याचीं कारणें—हिंदुधर्मशास्त्र व त्यावरील लोकांचा विश्वास, आणि सामाजिक मर्यादोल्लंघनाची भीति, हीं होत.

५. जातिभेद हा थोडा सामाजिक प्रगतीच्या आड येत असेल, पण तो नैतिक, औद्योगिक व राजकीय प्रगतीस आड येण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं.

६. हल्लीं सर्व जातींमध्यें जिकडे तिकडे मत्सर वाढला आहे, हें खरें आहे. परंतु तो जातिभेदामुळें नसून लोभमूलक आहे. तसें नसतें तर जातिभेद न पाळणाऱ्या लोकांमध्यें जीं मोठमोठीं रणें माजतात त्याचें कांहीं कारण नाहीं. करितां जातिभेद कायम असूनहि प्रयत्न केल्यास जातिमत्सर नाहींसा होईल.

७. जातिमत्सरास जातिभेद कारण नाहीं, असें गृहीत असल्यानें या प्रश्नास उत्तराचें कारण नाहीं.

८. आमच्या मतें जातिभेदापासून अनिष्टपणा नाहींच, परंतु ज्यांच्या मतें तो आहे त्यांनां सुद्धां पोटजातींमध्यें मात्र शास्त्र आणि रूढि यांच्याशीं विरोध येत नसेल अशा प्रसंगीं रोटीबेटीव्यवहार करितां येईल. परंतु मुख्य मुख्य भिन्न जातींमध्यें तो शास्त्र व रूढि नसल्यानें कधींहि करितां येणार नाहीं.

९. जातिभेद मोडण्यास प्रयत्न करण्याचें बिलकूल कारण नाहीं. कारण हल्लींच्या परिस्थितीवरून तसा प्रकार लवकरच घडून येणार असल्याचीं चिन्हें दिसत आहेत.

१०. ज्यांस जातिभेद हा अनिष्ट वाटत आहे, त्यांनीं सुद्धां तो मोडणें झाल्यास आपल्या मूळच्या जातींमध्यें राहूनच हळुहळू मोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकदम जातिबंधनें तोडून टाकणें म्हणजे आपणच जातिबाह्य होणें आहे.

येणेंप्रमाणें आमचें मत आहे. हें नवीन लोकांनां पसंत पडणार नाहींच, परंतु "अन्यो निंदतु वा स्तौतु लक्ष्मीर्वसतु गच्छतु । अद्यैव मरणं वास्तु न्यायात्पथः प्रविचलंति न धीराः ॥" या न्यायानें आम्हांस जें सत्य वाटलें तें लिहिलें आहे.

कोल्हापुर, ता १०।७।१२.

शहाणे लोक कामिनीया तेलच पसंत करतात. बाटलीवर कामिनीया नांव पाहून घ्या!
कारण, कांहीं व्यापारी लोक जास्त नफ्याच्या आशेनें भलताच माल देतात!
53

विनोदी लेख.

भाषा व इतिहास.

[श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए., एल्एल्. बी.]

जों जों एकादा देश आपल्या देशापासून दूर, तों तों त्याजबद्दलची आपली कल्पना अंधुक असते. त्याचें ज्ञान आपणाला पृथ्वीच्या नकाशावरून झालेलें असल्यामुळें त्याचें इतर देशांपासून खरें अंतर किती आहे, याची आपणांला नीटशी कल्पना नसते. अमेरिका व इंग्लंड हे देश नकाशावर फारतर दोन वितींच्या अंतरावर दिसतात; त्यामुळें इंग्लंडमध्यें जाणाऱ्या प्रवाशाला पुष्कळदां अमेरिकेंतील इसमाला समक्ष निरोप सांगण्याची विनंति करण्यांत येते. चीन व जपान हे देश तर नकाशावर इतके जवळ दिसतात, कीं, त्यांपैकीं एका देशावर एक पाय ठेवितांना दुसऱ्या पायाखालीं दुसरा देश चिरडून जाईल कीं काय, अशी भीति वाटते. परदेशांबद्दल आपल्या ज्या कल्पना असतात, त्या संख्येनेंहि मर्यादित असल्यामुळें त्या कल्पनांना वास्तविक पाहिजे त्यापेक्षां पुष्कळ अधिक महत्त्व आपण देतों. काश्मीरात शाली चांगल्या होतात, एवढीच आपली त्या प्रांतासंबंधानें कल्पना असल्यामुळें त्या देशांतील झाडून सारे लोक चारहि काळ अष्टौप्रहर शालींत गुरफटलेले असे आपल्या अंतःसृष्टींत वावरत असतात. त्या शालींचा रंगहि काश्मीर देशाचा नकाशांत जो रंग असतो, तोच असला पाहिजे, असें आपणांला वाटतें. बोर्डो व ओपोर्टो हीं शहरें दारूसाठीं प्रसिद्ध आहेत, एवढेंच आपलें त्यांसंबंधानें ज्ञान असतें; त्यामुळें त्या शहरांतील सारे लोक–मग ते धर्माध्यक्ष, स्त्रिया, किंवा इतर कोणत्याहि वर्गाचे असोत–हातांत दारू घेऊन झिंगलेले व धिंगामस्ती करीत असलेले असेच आपल्या कल्पनाभूमीवर प्रवेश करितात. आपली कल्पना जॉर्जिया देशांतून साऱ्या कुरूप स्त्रियांना हद्दपार करिते, व आफ्रिका देशांत बारीक ओंठाचा इसम औषधालाहि उरूं देत नाहीं !

परदेशांतील लोकांशीं आपला जेव्हां प्रथमतःच प्रसंग पडतो, जेव्हां त्या सर्वांचे चेहरे अगदीं एकसारखे आहेत, अशी आपली समजूत होते. हे लोक एकमेकांनां तरी कसे ओळखतात, याचें आपणांला मोठें गूढ पडतें. या देशांत वाटेल त्या इसमानें वाटेल त्याच्या जिनगीवर किंवा आब्रूवर खुशाल हक्क सांगावा, आईला आपलें मूल किंवा नवऱ्याला आपली बायको मोठ्या मुष्किलीनें हुडकून काढितां येत असेल, अल्लीबाबा आणि चाळीस चोर या गोष्टींत मर्जीनानें शेजारच्या साऱ्या घरांवर एकच खूण केल्यावर ज्याप्रमाणें चोरांस अल्लीबाबाचें घर ओळखतां येईना, त्याप्रमाणें संध्याकाळीं कुटुंबांतील सगळी मंडळी घरीं परत आल्यावर आपला पिता कोण, पुत्र कोण, पति कोण, हें शोधून काढण्याकरितां बायकांनां बराच वेळ घालवावा लागत असेल, असें आपणांला वाटतें. सारे साहेबलोक केवळ सारखे गोरे दिसतात, इतकेंच नाहीं, तर स्वरूपानेंहि तुल्य वाटतात. सारे चिनी लोक पिंचळे आणि सारे शिद्दी लोक काळे दिसतात; इतकेंच नाहीं, तर त्यांचे डोळे, ओंठ वगैरे अवयवहि एकाच घाटाचे वाटतात. कृष्णपरमात्मा एकाच वेळीं सोळा सहस्र स्त्रियांच्या महालांत दिसला, ही कथा अशा परक्या देशांतीलच मूळची असली पाहिजे, असा तर्क आपण बांधूं लागतों; व अशा देशांतील माणसांची अर्धी अधिक बुद्धि एकमेकांनां ओळखण्यांतच खर्ची पडत असली पाहिजे, असें वाटून त्यांची आपणाला कींव यावयास लागते.

परदेशांतील लोकांच्या रूपाबद्दल आपला जो घोंटाळा प्रथमतः उडतो, तसाच त्यांच्या भाषेसंबंधानें उडतो. प्रथमच ऐकणारास संस्कृत भाषा अनुनासिकघटित असावीशी वाटते, आणि इंग्रजी भाषा जोडाक्षरघटित भासते. मीं प्रथमतः जेव्हां दोन कर्नाटकी गृहस्थांनां बोलतांना ऐकिलें, तेव्हां ते भांडत असावेत असा माझा तर्क झाला; पण मागाहून असें कळलें, कीं, ते अत्यंत जिवलग मित्र असून फार दिवसांनीं भेटले होते. कानडी भाषेंतील प्रेमालापाला याप्रमाणें

कामिनीया तेल सर्व सुगंधी सामानाच्या दुकानांत मिळतें. एक वाटलीस रु. १.
तीन वाटल्यांस रु. २ ८१०. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

भांडणाचें स्वरूप येतें; याच्या उलट संस्कृत भाषेंतील भांडणाला प्रेमालापाचें येतें. कानडी भाषेंतील शब्द कर्णविवरांत तांडव करीत आदळतात, तर संस्कृत भाषेंतील शब्द लास्य करीत त्यांत प्रवेश करतात. गीर्वाणभाषेचा देवगण मानिला. तर कानडी भाषेचा राक्षसगण मानिला पाहिजे. संस्कृत भाषेंतील शब्द ऐकतांना सतारीचा भास होतो, तर कानडी भाषेंतील शब्द ऐकतांना मडक्यांत खडखडणाऱ्या खड्यांचा भास होतो. एकदां तर सबंध कर्नाटकचा प्रवास मी एका मडक्याच्या दुभाषीपणावर केला! त्या मडक्यांत मी कांहीं खडे व गारागोट्या घालून ठेविल्या होत्या. कोणाहि कर्नाटकी माणसानें मला प्रश्न केला, झणजे मी तें मडकें त्याच्यापुढें धरून जोरानें हलवीत असें! त्यावरोबर खडखडखडखडखड, असा दर खेपेस एकच तारायंत्री ध्वनि निघत असे; पण त्यानें प्रत्येक पृच्छकाचें समाधान झालेलें दिसे. कांहीं लोकांचें समाधान तर हास्याच्या रूपानेंहि बाहेर पडे. शेवटी आपली भाषा इतक्या हुबेहूब रीतीनें बोलणाऱ्या यंत्रांत कायकाय चमत्कार भरले आहेत, हें पाहण्याकरितां की काय, एका गृहस्थानें सोट्यानें माझ्या दुभाष्याचीं दोन शकलें करून टाकिलीं; आणि मी जर मडक्याची आशा सोडून. धूम ठोकिली नसती, तर माझी पाठ कितीशी टणक आहे हें पहाण्याकरितां तिच्यावरहि सोट्याचा प्रयोग करण्यास त्यानें कमी केलें नसतें; आणि मडक्याप्रमाणें काठीहि (माझ्या पाठीवर) फोडिली असती. एकंदरींत तिकडचीं माणसेंहि भाषेप्रमाणें अंमळ राक्षसीच खरीं! शिवाय, पाहुणचाराची त्यांची कल्पनाहि कांहींशी विलक्षणच! असो. यानंतर लवकरच माझा प्रवास संपला. पण तेव्हांपासून मी त्या कृतघ्न लोकांच्या वाऱ्यालाहि उभा रहात नाहीं; आणि मडक्यांतले खडे कसे वाजतात, हें पहाण्याची उत्सुकता झालीच, तर भोवतालीं दोन कोसांच्या टापूंत कोणी भिडूंसकूंहि नाहीं, अशी प्रथम खात्री करून घेऊन नंतर पहात असतों.

जों जों परकीयांची तोंडओळख अधिकाधिक होत जाते, तों तों त्यांच्या चेहऱ्यांतील बारीक भेद कळूं लागतात; व जों जों त्यांची भाषा कानांवरून अधिकाधिक जाते, तों तों तिचे सारे शब्द सारखे नसून ते एकमेकांपासून ओळखण्याइतके भिन्न आहेत, हें समजूं लागतें. या पुढची पायरी झणजे एका अर्थाच्या दोन शब्दांपैकी कोणता कुठें योजावा, व एका शब्दापासून अनेक अर्थ कसे निघाले, याचें मार्मिक ज्ञान. शब्दांच्या इतिहासाबरोबर देशाचा, त्यांतील लोकांचा व त्यांच्या चालीरीतींचा इतिहासहि कळूं लागतो. अखेरीस प्रत्येक शब्द झणजे एकाद्या ऐतिहासिक सत्याचें थडगें आहे, अशी भावना होऊन त्याची चिकित्सापूर्वक छाननी व्हावयास लागते.

लहानपणीं मी भाषेंत इतिहास शोधण्याऐवजीं इतिहासांत भाषा शोधीत असें. मी इतर विषयांतल्याप्रमाणें इतिहासांतहि जरा कच्चा होतों. त्यांतील पुरुषांच्या व स्थलांच्या नांवांचा, वंशावळींचा व हकीगतींच्या सनांचा मीं कितीहि पिट्टया पाडिला, तरी शिव्यागाळी देण्यास संवकलेल्या माझ्या तोंडांत ते बेटे नीटपणें बसेनातच! 'निजामअल्ली'बद्दल 'हजामअल्ली,' 'बाजीराव' बद्दल 'पाजीराव,' 'मादण्णा' बद्दल 'ढंढेणा,' 'शाहू' बद्दल 'राहु' अशा चुका मजकडून पदोपदीं होऊं लागल्या! शहाजीस मी एकदां अकबरशहाचा बाप बनविलें व त्याजकडून खर्ड्याची लढाई लटवून त्याच्या विजयी समशेरीच्या साहाय्यानें त्या लढाईंत सिकंदर बादशहाचा फडशा उडविला! टिपुसुलतानाला तो नको नको झणत असतां चांदविबीच्या मांडीवर दत्तक देऊन तिजकडून त्याचा शनिवाराच्या वाड्यांत खून करविला; व ब्राह्मणी राज्य एका ब्राह्मणास बहाल करून त्या ब्राह्मणापासून पेशव्यांची उत्पत्ति झालेली तपशीलवार दाखविली.

सनांसंबंधानें तर माझा फारच घोंटाळा उडत असे. आजपर्यंतच्या सर्व लढाया आणि तह दशकांच्या अंतरानें झाले असते तर विद्यार्थ्यांचे नऊ दशांश श्रम वांचले असते. इतिहासप्रसिद्ध पुरुषांनीं जर शतकाच्या अखेरीस मरण्याचा परिपाठ ठेविला असता, तर ते स्वतः शतायु होऊन शिवाय कितीतरी विद्यार्थ्यांचें अकाली मरण चुकलें असतें. या बकशोर मरणास प्रसिद्ध पुरुषांची तयारी नसल्यास निदान राष्ट्रांनीं तरी विद्यार्थ्यांच्या मागचा त्रास चुकविण्याकरितां प्रत्येक दहा वर्षांनीं वयातीत झालेले प्रसिद्ध पुरुष फांशी देण्याचा नियम केला पाहिजे. या बाबतींत

केश सुंदर दिसण्यास ते रेशमासारखे मऊ, चमकणारे, नरम आणि पुष्कळ पाहिजेत.
कामिनीया तेलाचा त्यासाठीं उपयोग करा!

दशांश पद्धतीचे पुरस्कर्ते जे फ्रेंच लोक, त्यांनीं पुढाकार घेतला पाहिजे. नानाफडणीस बरोबर शतकाच्या अखेरीस मरण पावला, यावरून त्याचें आटोकाट धोरण व शहाणपण जसें दिसून येतें, तसें त्याच्या कारस्थानांवरूनहि दिसून येत नाहीं.

ऐतिहासिक नांवांबद्दल माझ्या ज्या चुका होत, त्या बहुधा त्या नांवांचा सदृश मराठी शब्दांशी घोटाळा झाल्यामुळें होत. अखेरीस भाषेचा उपयोग याप्रमाणें घोटाळा उडविण्याच्या कामीं करण्याऐवजीं तीं नांवें लक्ष्यांत ठेवण्याच्या कामीं करण्याचा मीं निश्चय केला. पानिपत येथें अनेक मोठाले संग्राम होऊन पाण्यासारखें रक्त पडलें, त्या अर्थी पानिपत हें नांव सार्थ आहे, अशी मीं आपली समजूत करून घेतली. ताल्या टोपी यानें टोपीवाल्यांशीं युद्ध केलें त्या अर्थी त्याचेंहि नांव योग्यच ठरलें पाहिजे, असें मीं मनाशीं ठरविलें. याप्रमाणें प्रत्येक नांवाचा तत्संबंधी कथेशीं स्वाभाविक अथवा ओढून ताणून संबंध जुळवून मीं तें आपल्या स्मरणांत कायमचें राहील, अशी खटपट चालविली; व ती बऱ्याच अंशांनीं सिद्धीलाहि गेली.

मी जसजसा मोठा होत चाललों, तसतशी मला स्मरणशक्तीची जरूर कमीकमी वाटावयास लागून विचारशक्तीची अधिकाधिक वाटावयास लागली. मी प्रत्येक गोष्टीचें कारण शोधावयास लागलों. आपल्या सणावारांत किती गूढ अर्थ भरलेला आहे; वैदिक मंत्र उच्चारल्यापासून कोणते फायदे होतात, पौराणिक कथांचें मूळ काय, आपल्या चालीरीति इतकीं वर्षें अविकृत स्थितींत टिकण्याइतके महत्त्वाचे लाभ त्यांपासून कोणते होतात, या गोष्टींचा मी खल करूं लागलों. या चिंतनापासून निष्पन्न झालेले सिद्धांत मी वाचकांसमोर वेळोवेळीं मांडीत आलोंच आहें. शेवटीं ही चिकित्सा येथपर्यंत गेली, कीं, शेंडी डोक्यावर कां ठेवितात, कपाळावर कां ठेवीत नाहींत, डोळे गुडघ्यावर न ठेवितां भिवयांच्या खाली ठेवण्यांत ईश्वराचा काय हेतु असावा, घर बरं कां आंठ नेण्याऐवजीं आपलीं बांधीत कां आणीत नाहीं. भितीला तुंबऱ्या लावण्याऐवजीं आपला जेव्हां प्रथमतः मी फावल्या वेळेव्हां त्या सर्वांचे चेहरे अगदीं एक- ी समा-

मुकाणूं भाषेच्या इतिहासाकडे वळविलें, व एक कोश विकत घेऊन त्यांतील प्रत्येक शब्दाची पूर्वपीठिका धुंडाळूं लागलों. अशा समाधीचा जर 'पानें वाहून तयार आहेत' अशा शब्दांनीं सौभाग्यवतीनें भंग केला, तर रागावण्याऐवजीं मी त्या वाक्यांतील प्रत्येक शब्दाच्या वंशपरंपरेचा तलास लावीत बसें. एकदां एका मुलाला स्थल पहाण्यायचें होतें. त्या वेळीं सांगून आलेल्या मुलींच्या कुळाचा शोध करण्याऐवजीं मी त्यांच्या नांवांच्या कुळांचाच शोध लावूं लागलों; आणि त्यांच्या आडनांवांचे (तीं आडनांवें बहुधा लांडगे, कोल्हे, वाघ अशांपैकींच होतींसें आठवतें !) उगम कोणते, याची शहानिशा करूं लागलों. शेवटीं, ज्या मुलीचें नांव सर्वांत अधिक अपभ्रंश पावलें होतें, तिची मीं निवड केली. आतां तिचें कुळ भ्रष्ट आहे कीं काय, हें पहाण्याऐवजीं तिचें नांव अपभ्रष्ट आहे कीं नाहीं हें पहाणें कित्येकांस तर्‍हेवाईकपणाचें वाटेल; पण पत्रिकांवरून स्थलनिश्चय करण्यापेक्षां वरील निवडणुकीचें तत्त्व फारसें अहितपरिणामी नाहीं, हें मी खात्रीनें सांगूं शकतों.

भाषाशास्त्रांत मीं जे शोध लाविले आहेत, ते इतर भाषाकोविदांनां कितपत रुचतील, हें मला सांगवत नाहीं; कारण, विद्वान् लोकांइतके मत्सरी लोक पृथ्वीच्या पाठीवर दुसरे कोणीहि सांपडणार नाहींत. वाचकांनां मजबद्दल हेवा वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. म्हणून त्यांच्या फायद्यासाठीं त्यांपैकीं प्रमुख शोध येथें सादर करीतों:—

१. प्राण्यांची उत्पत्ति वनस्पतींपासून झाली, हें आपल्या पूर्वजांनां माहीत असावें, असें 'अश्वत्थ' या शब्दावरून उघड होतें. कारण, हा शब्द वृक्षवाचक असून यांतील अंत्याक्षर काढिलें असतां त्यांतून ' अश्व ' हा प्राणिविशेषवाचक शब्द रहातो. प्रथम घोडा व कुत्रा हे दोनच प्राणी निर्माण झाले, असें 'अश्व' या शब्दावरून निघतें. कारण 'श्व' (म्हणजे कुत्रा) नाहीं तो घोडा, अर्थात् हे

कामिनीया तेल सर्व सुगंधी सामानाच्या
ीन बाटल्यांस रु. २ ८१०. अँग्लो इंडियन ड्रगेश सुंदर, काळेभोर, रेशमाप्रमाणें नरम,
च्या सौंदर्यांत वृद्धि होते.

दोनच प्राणी त्या काळीं विद्यमान होते, असा गर्भितार्थ निघतो. हा काळ म्हणजे मृगयाकाळ; व अशा काळीं हे दोन आवश्यक प्राणी निर्माण व्हावे, ही ईश्वराची मोठी कृपाच समजली पाहिजे.

२. माकडापासून मनुष्याची उत्पत्ति झाली, हेंहि तत्त्व प्राचीन काळीं माहीत असावें, हें 'वानर' या शब्दावरून स्पष्ट आहे. कारण, या शब्दांतील आद्याक्षर काढिलें, कीं, 'नर' हा शब्द अवशिष्ट रहातो. पहिलें मनुष्य माकडाप्रमाणें बांध्यानें लहान असलें पाहिजे, यास 'जानवें' व 'कुंतल' या शब्दद्वयावरून पुष्टि मिळते. 'जानवें' म्हणजे जानूपर्यंत पोहोंचणारें, अर्थात् तो जानु खुजा माणसाचा असला पाहिजे. 'कुंतल' (कु=पृथ्वी) म्हणजे केंस, हे त्या काळीं पृथ्वीतलापर्यंत लोंबत असावे. पहिलीं पहिलीं माणसें माकडांप्रमाणें नग्नहि असावींत असा तर्क 'कंबल,' 'धोतर' व 'मुकटा' या शब्दांवरून निघतो. प्रथमोक्त शब्द निघाला तेव्हां तद्व्यक्त वस्त्र फक्त कंबरेभोंवतींच गुंडाळीत असावेत; धोतर (धूतोत्तरीय) हें वस्त्रहि खांद्यावरच घेण्याचा परिपाठ असावा; आणि 'मुकटा (मुख=तोंड) तर तोंडासच गुंडाळीत असत.

३. गीर्वाण भाषा बोलणारे लोक विलायतेंतल्या सारख्या चंचल हवेंत रहाणारे असावेत, असें 'सुख' व 'दुःख' (ख=आकाश) या शब्दद्वयावरून व्यक्त होतें. आकाश निरभ्र असलें म्हणजे त्यांनां आनंद होई, आणि तें अभ्राच्छादित असलें म्हणजे त्यांनां दुःख होई.

४. अवयववाचक शब्दांवरून त्या काळच्या लोकस्थितीची थोडीशी कल्पना करितां येते. डोळ्यांचा उपयोग डाळींतले डोळ निवडण्यासाठींच बहुधा होत असावा. 'अधर' (अ+धर) या शब्दावरून रमणीचें अधरपान मिळविण्याला बल्लभाला हल्लींइतकेच श्रम पडत असावेत. 'ओष्ठ' (ओं+स्थ) या अवयवाचा उपयोग ॐकाराचा उच्चार करितांनाच होत असे, इतके ईश्वरनिष्ठ त्या वेळचे लोक होते. ॐ या अक्षरांतील अनुनासिक संस्कृत शब्दांत जरी मावळलें आहे, तरी ओंठ या मराठी शब्दांत त्याचा पुनः उदय झाला आहे. 'मस्तक' (मस्त) या शब्दावरून प्राचीन लोकांचें डोकें सोमरसादि मादक पदार्थांत नेहमीं मस्त असावेंसें दिसतें. 'हृदय' (हृ=हरण करणें+दया=करुणा) या शब्दाच्या घटकावयवांवरून त्यांनां दयामायाहि कमी असावी अशी शंका येते. 'दंड' हा शब्द 'बाहु' व 'शिक्षा' अशा दोन अर्थी असल्यामुळें पूर्वी हात तोडण्याची शिक्षा देत असत, असा अंदाज निघतो. 'मन' (मन्=विचार करणें) हें विचाराचें स्थान आहे. असें तत्कालीन मत असावें. एकाद्या बुद्धिमान् पुरुषाच्या मानेवर अवाळूं झालेलें पाहूनच हें मत निघालें असावें ! 'खांक' या शब्दाचें 'अवयवविशेष' व 'राख' असे दोन अर्थ आहेत. ज्या वेळीं लोक कार्खेत राख घालून वैराग्यवृत्तीनें रहात असत, त्या काळीं या शब्दाचा उगम झाला असावा. 'कूर्चक' (म्हणजे दाढी व कुंचला) या शब्दावरून त्या लोकांचे केंस

कामिनीया तेल प्रत्येकानें वापरून पहावें. हें तेल केंसांस इतकें नरम करून सोडतें, कीं, वे वाटेल त्या रीतीनें वळूं शकतात!

फार रांठ होते हें सिद्ध होतें. 'केश' (के= पाण्यांत, शी=शयन करणें) हा शब्द ज्या काळीं निघाला, त्या काळीं सशूची युक्ति नसल्यामुळें केंस नेहमीं ओले असत. केंसांचें पीक खुरपून काढणारा कारागीर (नापिक) अर्थात्च त्या वेळीं जन्मला नव्हता.

५. अवयववाचक शब्दांवरून निघालेल्या नामांपासूनहि तत्कालीन स्थितीबद्दल अनुमान निघतें. 'वदु' या शब्दावरून त्या काळींहि मुलांच्या डोक्यावर शेंडीची वट असे, असें सिद्ध होतें. त्या वेळची 'पगडी' (पग=पाय) प्रथम बांधवून नंतर पायांखालीं तुडवीत असावेत, किंवा पायांस ज्याप्रमाणें बोटें, त्याप्रमाणें पागोट्यास पीळ देण्याची त्या काळींहि वहिवाट असावी; 'अंगठी' अनामिकेंत न घालतां अंगठ्यांत घालीत असत, असें त्या शब्दाच्या स्वरूपावरूनच शाबीत होतें. पुरातन पुरुषांच्या टांगा इतक्या लांब व शीघ्रगति असत, कीं, त्यांवरून वाहनवाचक 'टांगा' हा शब्द निघाला आहे. हा शब्द 'जानु' व 'कुंतल' या शब्दांपेक्षां अर्वाचीन असला पाहिजे.

६. नातें किंवा संबंध दाखविणारे शब्द.—'नवरा' व 'नवरी' (न+वरी) यांनीं लग्न करण्याबद्दल नकार दर्शविला असतांहि त्याचे त्यांच्या इच्छेविरुद्ध विवाह पूर्वीहि होत असत. पूर्वी 'मेहुण' बोलवावयाचें असल्यास मेहुणामेहुणीसच आमंत्रण करीत असत. 'श्वश्रू' (श्वस् म्हणजे उद्यां+श्रु) म्हणजे सुनेनें आज एकादी विनंति केली म्हणजे ती जिला उद्यां ऐकूं जावयाची अशी व्यक्ति; किंवा 'श्वश्रू' (श्वस् म्हणजे कुत्रा+श्रू) याचा अर्थ 'जिचें बोलणें ऐकूं गेल्यास कुत्र्याप्रमाणें भासतें,' असाहि असेल. 'श्वशुर' (श्वन्+क्षुर म्हणजे कुत्र्याप्रमाणें तंगड्या झाडणारा) या जोडीदार शब्दावरून उत्तरोक्त अर्थच बरोबर असावा असें दिसतें. कोणताहि अर्थ घेतला, तरी त्या काळच्या सुना बऱ्याच मार्मिक असून त्यांनींच हे शब्द निर्मिलेले दिसतात. 'नातु' या शब्दावरून पूर्वी नातवापर्यंतच नातें मानीत असत; म्हणजे त्या काळीं मनुष्याच्या हयातींत पणतू होत नसत, अर्थात् त्या काळचीं माणसें अल्पवयी मरत, असा निष्कर्ष निघतो. जेव्हां पणतू पहाण्याचा प्रथमच योग आला, तेव्हां तो उत्सव साजरा करण्याकरितां पणत्या लावण्यांत आल्या, व त्यावरून नवीन नातेवाइकाचें नांव पडलें. या व्युत्पत्तीबद्दल कोणाला पुढें शंका वाटेल, म्हणून त्या पणत्यांच्या खापराचा अंश पणतू या शब्दाशीं जुळवून 'खापरपणतू' हा शब्द प्रचारांत आणिला. परंतु पणतवंडाचें अपत्यहि पहाण्याचा जेव्हां प्रसंग आला, तेव्हां 'खापरपणतू' हा शब्द पणतवंडापासून हिरावून घेऊन त्याच्या मुलास तो अर्पण केला. खापराहून अधिक किंमतीच्या वस्तूचें हरण होत नसल्यामुळें त्याला पणतवंडानेंहि फारशी हरकत घेतली नसावी. पूर्वीच 'छात्र' (छत्र=छत्री) गुरूवर छत्री धरीत असत.

७. प्राचीन लोकांचे व्यवसाय.—'पय' या शब्दाचे दूध व पाणी हे दोन अर्थ प्रसिद्ध

कामिनीया तेल वापरल्यानें पुरातन काळापासून चालत आलेली व अतिशय मौल्यवान् समजली गेलेली अशी केसांची सुस्थिति त्वरित प्राप्त होते.

आहेत. यावरून असें दिसतें, कीं, हा शब्द प्रचारांत आला, तेव्हां गोपांचें प्राबल्य होतें, व दुधाच्या ऐवजीं पाणी घातल्याबद्दल शिक्षा होऊं नये, ह्मणूनच या शब्दाची प्रवृत्ति पडली असावी. मृच्छकटिकांत एका गवळ्याच्या पोरानें पालकाचें राज्य काबीज केल्याबद्दल वृत्तांत आहे; त्या पोराच्या–आर्यकाच्या–कारकीर्दीतच हा शब्द निघाला असावा. मृच्छकटिकांत 'आर्द्रमहिषोदरतुल्य' अशी मेघाची महिषाच्या उदराशीं तुलना केली आहे, मेघाला एका अर्थानें 'पयोद' हें नांव आहे व महिषीलाहि दुसऱ्या अर्थानें पयोद ह्मणावयास हरकत नाहीं. याप्रमाणें ढग व म्हशी यांचा एकत्र संबंध आणून गोपराजाचे आश्रित कविहि गवळ्यांच्या लवाड्यांनां उत्तेजन देत असत. राज्ञीवाचक 'महिषी' शब्दहि याच राज्यांत सुरू झाला असावा. 'अंबर' हा शब्द 'आकाश' व 'वस्त्र' या दोन अर्थांचा वाचक आहे. या शब्दाचा प्रसार सुरू झाला तेव्हां रजकराजांची सत्ता असावी; कारण त्या काळचीं वस्त्रें निळीमुळें जरी आकाशाप्रमाणें झालीं, तरी लोकांस कुरकुर करितां येत नसे. याच सत्ताधाऱ्यांच्या कारकीर्दीत धुवट वस्त्राप्रमाणें पांढऱ्या शुभ्र रजताचा ह्मणजे रुप्याचा शोध लागला, असें दिसतें. कारण त्यापूर्वी सोनार, लोहार, तांबट हे सोन्याचे, लोखंडाचे व तांब्याचे कारागीर असत; परंतु रुपेंच माहीत नसल्यामुळें रुप्याच्या कारागिराला निराळें नांव देण्याची जरूर वाटली नव्हती. 'प्रयोजन' या शब्दाचे 'निमित्त' व 'पंगत' असे अर्थ आहेत. वरील विचारसरणीनें या शब्दाच्या उत्पत्तिकालीं ब्राह्मणांचें वर्चस्व असलें पाहिजे, असें निष्पन्न होतें. त्या काळीं ब्राह्मणांनां भोजनावांचून कांहीं उद्योग नसला तरी चालत असे. अगदीं पुरातन काळीं केंस काढण्याचा संप्रदाय नव्हता, असें जें वर अनुमान केलें आहे, त्याला 'न्हावी' (न्हाणें=आंघोळ करणें) या शब्दानें बळकटी येते. त्या काळीं न्हाव्याचा धंदा नुस्ता आंघोळ घालण्याचा असे. पूर्वी त्याच्या ताब्यांत घंगाळें, हंडे, गुंड इत्यादि मोठमोठीं पात्रें असत. पण ती सत्ता कालगतीनें मर्यादित होत होत हल्लीं त्याचा अधिकार एका लहान बादींतील पाण्यावर मात्र चालतो, वस्त्र्यांतील पाणी लाक्षणिक अर्थाचें असतें, त्या अर्थी तें हिशोबांत घेण्याची जरूर नाहीं. 'आचार्य' या शब्दापासूनच 'आचारी' हा शब्द निघाला आहे. पूर्वी वेदविद्या व पाकविद्या एकाच्याच अधिकारांत असत, व होमकुंड व चूल या दोघांवर त्याचेंच एकट्याचें स्वामित्व असे, यामुळें भात तयार झाल्याबरोबर होमकुंडांतील अग्नीस (किंवा त्यापेक्षां जठराग्निच अधिक प्रदीप्त झाला असल्यास त्याला,) ताबडतोब आहुति देतां येत असे, व चूल व वैल दोन्ही गुंतलीं असल्यास खैंपाकाचीं भांडीं होमकुंडांत ठेवितां येत, अशी दुहेरी सोय असे. हल्लीहि अनेक आचारी पाकसिद्धि करितांना मंत्र पुटपुटत तोंडांतील तमाखुरसानें पात्रांचें प्रोक्षण करीत असतात, यावरून वरील तर्कास दुजोरा येतो. हिंदु-

प्रत्येक स्त्रीस आपले केश सुंदर असण्याबद्दल अभिमान असतोच.
कामिनीया तेल वापरल्यानें केश फारच सुंदर होतात आणि वृद्धि पावतात.

स्थानांतील कांहीं भागांत आचाऱ्यास 'महाराज' या नांवानें संबोधण्याचा प्रघात आहे, तोहि पूर्वीच्या काळचाच अवशेष असावा.

८. वर्णवाचक शब्द.—'वर्ण' याचे दोन अर्थ; एक रंग व दुसरा जात.

रंगः—'रक्त' याचे 'रुधिर' व 'तांबडा' असे दोन अर्थ आहेत. 'रुधिर' हाच तांबडा पदार्थ मनुष्याच्या प्रथम दृष्टीस पडला. 'धवल' यांत 'धव' हा मूळ शब्द आहे. हल्लीप्रमाणें त्या काळींहि बायकांस नवरा गोरा असावासा वाटे, असें यावरून ह्मणावयास हरकत नाहीं. 'पीत' ह्मणजे 'पिवळें' व 'प्यालेलें' यावरून त्या काळीं एक पिंवळें पेय पिण्याचा फार प्रचार असे असें निघतें. सोमरस कदाचित् त्या रंगाचा असावा.

जातः—प्राचीन व्यापारी लोकांच्या दुकानास लागूनच वेश्यागृहें असत, असें 'वैश्य' या शब्दावरून दिसतें. शूद्र (शू+द्रु) 'शू' ह्मटल्याबरोबर पळण्याची तत्कालीन शूद्रांचीहि वहिवाट असावी.

९. किरकोळ शब्द.—दिवाळीच्या सुमारास खात्यांची तोंडमिळवणी करण्याची वहिवाट असल्यामुळें त्याच वेळीं दिवाळीं निघत असत, असें दिसतें. 'सणंग' हा शब्द कापडाचा वाचक असून सणावाराशिवाय कापड जात नसे, असें दाखवितो. 'पाटलोण' घालून लोणपाट खेळावयास लागलें असतां तो खेळ अस्ताव्यस्त होतो, व ह्मणून त्या खेळास तें वस्त्र अगदीं निरुपयोगी आहे, असें त्या शब्दावरून सूचित होतें. 'अलंकार' (अलं=पुरे) या शब्दावरून प्राचीन नवऱ्यांचीहि दागिन्यांच्या पायीं पुरेवाट होत असे असें ध्वनित होतें. आरण्यकें ज्यांनीं लिहिलीं ते अरण्यपंडित ह्मणून मानिले जात, किंवा त्यांचा उपदेश अरण्यरुदिताप्रमाणें फुकट जाई, असा त्या शब्दावरून ध्वनि निघतो. 'कागद' (काक=कावळा) यावरून पूर्वी कावळ्याच्या पिसावर खडूनें लिहीत असत, असें दिसतें. हा तर्क 'काकपद' या शब्दावरून दृढ होतो. पांढऱ्यावर काळें करण्याची विद्या अलीकडची आहे. 'सारस्वत' (सारस=सरोवरांतील मासा) यावरून मत्स्याहाराची प्रवृत्ति दिसून येते.

१०. लिंगवचनें.—'दाराः' या पुंल्लिंगी अनेकवचनी शब्दावरून असा कयास निघतो, कीं, एके काळीं एका नवऱ्याला अनेक बायका असून त्या पुरुषासारख्या धीट असत. 'मित्र' हा शब्द नपुंसकलिंगी असण्याचीं कारणें दोनः एकतर मित्रपत्नीशीं त्याची वर्तणूक अंतःपुरांतील कंचुकीप्रमाणें प्रामाणिकपणाची पाहिजे; व दुसरें असें, कीं, मित्र इमानी असला पाहिजे; परंतु 'इमानि' हें विशेषण 'इदं' या नपुंसकलिंगी सर्वनामाच्याच प्रथमेच्या अनेकवचनीं शक्य असतें. 'स्वप्न' हा शब्द संस्कृतांत मराठींतल्याप्रमाणें नपुंसकलिंगी नसून पुंल्लिंगी आहे. यावरून पूर्वीचीं स्वप्नें हल्लींप्रमाणें पिळपिळीत नसून वीररसपरिप्लुत असावींत, असा निर्णय करण्यास हरकत नाहीं.

आपली स्मरणशक्ति व काम करण्याची हिंमत शाबूद आहेना ? नसेल तर प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका वापरा व निरोगी व्हा.

संपूर्ण गोष्ट.

उद्धार.



कांही वर्षांपूर्वीची गोष्ट मी सांगत आहें. त्यावेळीं मी तरुण होतों. कमिसेरीयट खात्यांत मला त्या वेळीं नोकरी लागून फार दिवस झाले नव्हते. रजपूत इन्फन्ट्रीबरोबर त्यावेळीं आम्ही टीराच्या मोहिमेंत गेलों होतों. तो काळ मला मोठा मजेचा गेला. इन्फन्ट्रीतील बऱ्याच लोकांशीं माझा परिचय झाला होता. त्यांतील बहुतेक लोक उदार व दिलदार होते. त्यांच्याबरोबर पत्ते, गंजिफा, खेळण्यांत व गाणेंबजावणें, गप्पासप्पा, गोष्टी वगैरे आमोदप्रमोदांत मीं मौजेनें दिवस काढले. या मोहिमेमुळें माझ्या ब्राह्मणभाईच्या एकतंत्री जीवनांत एका प्रकारचें वैचित्र्य आलें होतें, यांत संशय नाहीं.

या दिवशीं अड्डयावर नेहमींच्या मंडळीपैकीं हिम्मतसिंहाशिवाय कोणीच नव्हतें. ऑफिसच्या कामामुळें दिवसभर मी बगदीं त्रासून गेलों होतों. वादनाध्यायी गीतेचा रसास्वाद घेणारी नेहमींची मंडळी अजून अड्डयावर जमा झाली नव्हती. आतां वेळ कसा काढावा? शेवटीं कंटाळून हिम्मतसिंहाला मीं विचारलें "काय बुवा हिम्मतसिंह! अद्यापि ही मंडळी कांहीं आली नाहीं. आतां हा कंटाळवाणा वेळतरी कसा काढायचा? येतोस? आपणच दोघेजण खेळूंया."

हिम्मतसिंह हंसून म्हणाला "दोघांतच काय खेळायचें आहे पंत? त्यांत कुठें मौज येते?"

"तर मग हा वेळ तरी कसा घालवायचा बुवा?"

"मी तुम्हाला एक लहानशी अनुभवाची गोष्ट सांगतों. कोण जाणे, आज सारखी तीच गोष्ट माझ्या मनांत घोळते आहे."

त्यावेळीं वारा फार मंद व गोड असा वहात होता. तंबूंच्या बाहेर जें लहानसें सपाट मैदान होतें, त्यांत ठिकठिकाणीं असंख्य डोंगरी फुलें फुलून त्यांचा मिश्र गंध चहूंकडे दरवळून राहिला होता.

हिम्मतसिंहाची प्रस्तावना ऐकून माझ्या सुस्त मनांत एका प्रकारची जागृति उत्पन्न झाली. मंडळी येईपर्यंत हिम्मतसिंहाचें काय 'रोमान्स' आहे, तें तरी ऐकावें असें मीं ठरविलें. तो काल आणि तें स्थल 'रोमन्स'ला सर्वथैव उचित अशींच होतीं. रणक्षेत्र, डोंगरी प्रदेश, सभोंवार पसरलेल्या रजपूत सैन्याची छावणी, चांदणी रात्र, चहूंकडे पसरत चाललेली शांतता! वहावा! 'रोमन्स'ला सर्व कांहीं ठीक होतें. केवळ कादंबरींत अभाव काय तो एका सुंदर राजकन्येचा!

"काय म्हणतोस हिम्मतसिंह?" मीं विचारलें.

"मंडळी येईपर्यंत मी तुम्हाला एक लहानशी गोष्ट सांगतों."

"ठीक आहे– सांग पाहूं."

हिम्मतसिंहानें माझ्यापुढें एक रौप्यपदक करून म्हटलें "यावर काय लिहिलें आहे, वाचा पाहूं पंत!"

तें पदक हातीं घेऊन स्वच्छ चंद्रप्रकाशांत मीं वाचून पाहिलें. शेवटच्या अफगाणयुद्धांत अप्रतिम पराक्रम दाखविल्याबद्दल अजितसिंह याला सरकारकडून हें पदक देण्यांत आलें होतें.

हा अजितसिंह कोण? मला वाटलें, हा अजित या हिम्मतसिंहाचाच मुलगा किंवा कोणी जवळचा नातेवाईक असावा.

मी हिम्मतसिंहाला विचारलें "तुझ्याजवळ अजितसिंहाचें हें पदक कसें आलें बुवा? या अजिताचा अन् तुझा कांहीं संबंध आहे का? तुझा तो मुलगा वाटतें?"

"नाहीं बुवा! अजित माझा मुलगा नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्याच्याशीं माझें कसलेंहि नातें नाहीं." असें म्हणून हिम्मतसिंह गंभीरपणें माझ्या चेहेऱ्याकडे बघत स्वस्थ बसला.

ऑडमन्स कफ एलिक्झार सर्व प्रकारच्या खोकल्यावर अचुक गुणकारी आहे. किंमत १। ६. ट. ख. ८५

बोलूनचालून मी ब्राह्मणभाई ! कल्पनेच्या घोड्यावर बसून आकाशांत भरारीनें फेरफटका करण्यांत मी फार हुषार ! हिंमतसिंहाच्या या भाषणानें माझ्या कल्पनेला चेतना प्राप्त झाली. एकाद्या अपूर्व रहस्यानें हिंमतसिंहाची गोष्ट थबथबलेली असावी, असें माझें मन मला सांगूं लागलें. हिमतसिंहाला मी आग्रहानें म्हटलें " सांगतर बाबा ! तुझी ती गोष्ट,-मला ती आतां अवश्य ऐकलीच पाहिजे. "

एकदा खांकरून हिंमतसिंहानें आपली गोष्ट सांगावयास प्रारंभ केला:-" ऐका तर मग पंत ! मी सांगतों आहें, ही गोष्ट पुष्कळ वर्षांपूर्वी घडली आहे. फौजेंत नोकरी धरून त्यावेळीं मला चार पांच वर्षांपेक्षां जास्त दिवस झाले नव्हते. एके दिवशीं किल्ल्यांत कांहीं सणानिमित्त मंडळी मजा करीत बसली होती. गाणेंबजावणें, नाचरंग इत्यादि आनंददायक गोष्टींत वेळ सरसर चालला होता. सर्व मंडळीबरोबर मीहि त्या आनंदांत तल्लीन होऊन गेलों होतों. इतक्यांत माझ्यासमोरच बसलेला माझा एक मित्र मला उद्देशून ओरडला "हां हिंमतसिंह ! आपला खिसा सांभाळा."

निमिषार्धांत माझ्या वज्रमुष्टीच्या पकडीत एक कोमल व छोटा हात सांपडला. तो हात कोणाचा असावा अशी तुमची कल्पना आहे पंत ? तो हात अजितसिंहाचा होता. अजित कोंवळा पोर; त्यावेळीं तो नुकताच आमच्या मित्रमंडळींत येऊं लागला होता. त्यावेळीं त्याच्या ओंठावर मिसुडीची रेघहि दिसूं लागली नव्हती. त्याच्या शरीराची काठी चांगली मजबूत व तालमीनें कमाई केलेली होती खरी, परंतु एकंदरीनें अजित कोमलच होता. असा हा अजितसिंह चोर ! भरमंडळीच्या बैठकींत माझ्या खिशांत हात घालून बेलाशक नोटांचें पुडकें लुंगावण्याच्या ऐन कृत्यांत निमम असतां पकडला गेला होता. मी त्याच्या चेहेऱ्याकडे पाहिलें. विचाऱ्याला तोंड वर करायला जागा कुठें होती ? त्यानें आपलें मस्तक लज्जेनें खालीं घातलें होतें. यावेळीं पृथ्वीमाता दुभंग होऊन आपल्या पोटांत आपणाला घेईल तर बरें, असें विचाऱ्या अजिताला त्यावेळीं होऊन गेलें होतें !

अजिताचा चेहरा काळवंडलेला पहातांच मला त्याची दया येऊन मी त्याला म्हणालों " हो हो भाई अजित ! मला याबद्दल आठवणच नव्हती बरें का ? हे तुझे घे रुपये. ठरल्याप्रमाणें तुला देण्यासाठींच मी ते इथें घेऊन आलों होतों-मी कांहीं तसा विसराळू मनुष्य नाहीं हो,—इतकी कांहीं तुला माझी परीक्षा पहाण्याचें कारण नव्हतें. मला वाटलें, की, खिशांतून कुणी चोरच नोटा काढून घेतो आहे ! या घे तुझ्या नोटा. " असें म्हणून मीं अजिताच्या हातीं माझ्या खिशांतील नोटांचें पुडकें दिलें व माझ्यासमोरच्या त्या मित्राला म्हणालों " अजितानें माझ्यापाशीं कांहीं पैसे ठेवायला दिले होते, ते आज त्याला परत पाहिजे होते, अन् ते इथें आणायचे ठरले होतें. तुमच्या आरोळीनें मी प्रथम घाबरूनच गेलों होतों, पण अजितच थेटानें आपले पैसे काढून घेत होता माझ्या खिशांतून !"

माझ्या त्या मित्राशीं अजिताचा बिलकुल परिचय नव्हता. अर्थात् त्या वेळची माझी ती संपादणी चांगलीच पचली गेली. पुनः आमचें गाणेंबजावणें सुरू झालें. पैसे घेऊन चलेंच हास्यमुद्रा करून अजित तेथून निघून गेला.

त्यानंतर तीन दिवस मला अजिताचा कोठेंहि पत्ता लागला नाहीं. त्याची पुढें हकीगत काय झाली, हें रामजण्याबद्दल मला फार उत्कंठा लागून राहिली होती. त्यानें मजकडून जे पैसे नेले होते, त्याबद्दल मला बिलकुल फिकीर नव्हती. त्यांचा परिणाम काय होईल, त्याजबद्दल माझी बालंबाल खात्री होती. परंतु अजिताचें त्या दिवशींचें विपण्ण मुखमंडल कांहीं केल्या माझ्या डोळ्यांसमोरून हालेना ! माझ्या हृदयाला त्यानें एक प्रकारचा चटका लावून सोडला होता. मला पुनः येऊन भेटावला त्याला अतिशय संकोच व लज्जा वाटत असावी हें तर उघड आहे. त्या दिवशीं त्याची अब्रू विलक्षण रीतीनें वचावली यांत शंका नव्हती. ऐन वेळीं मला इतकें विलक्षण प्रसंगावधान कोठून आलें, याबद्दल मला राहून राहून फार आश्चर्य वाटे.

[२]

मागच्या प्रसंगाला तीन दिवस होऊन गेले होते. सायंकाळीं मी आपल्या तंबूंत एकटाच बसलों होतों. त्यावेळीं माझ्या हातीं विशेष महत्त्वाचें असें कांहीं

पाऊस व थंडी यांचा परिणाम शरीरावर झाल्यानें होणाऱ्या वातविकारावर
कॅपटो धाम (मलम) अगदीं खात्रीचें औषध आहे. किं. ८८.

काम नव्हतें, म्हणून नुकतेंच माझ्या हातीं पडलेलें, जगाला जुनें, पण मला नवें असें एक वर्तमानपत्र सहज वाचीत मी आरामखुर्चीवर पडलों होतों.

इतक्यांत आमचा नोकर आंत येऊन मला सांगूं लागला. "एक बाई आपली भेट घ्यायला आली आहे. सोडूं का तिला आंत?"

"काय बाई? अन् मला भेटायला आली आहे?" आश्चर्यचकित होऊन मीं त्याला विचारलें. "चुकून तर ती या तंबूकडे आली नाहीं ना?"

"नाहीं—आपल्यालाच ती भेटायला आली आहे. आपलेंच नांव तिनें मला सांगितलें."

"ठीक—आहे, घेऊन ये तर तिला."

थोड्याच वेळांत एका स्त्रीला घेऊन तो आंत आला. ती बाई सरासरी पंचेचाळीस-शेचाळीस वर्षांची दिसत होती. रजपूतजातीचें नैसर्गिक तेज तिच्या काळवंडलेल्या मुखमंडलावरून अद्यापि पूर्णपणें लुप्त झालें नव्हतें.

मजकडे पाहून ती स्त्री खिन्न स्वरानें म्हणाली "तुमची माझी ओळख कोठून असणार? मी त्या अभागी अजिताची आई. त्या दिवशींची सगळी हकीगत त्यानेंच मला सांगितली. त्या दिवशीं तुम्हीं माझ्या पोराची अब्रू रक्षण केलीत, तुमचे हे आम्हांवर केवढे मोठे उपकार आहेत! आमच्या हातून ते कधींहि फिटायचे नाहींत. तो भगवानच तुमचें मंगल करो, या आशीर्वादाशिवाय तुझाला मी काय देऊं? एका दिवशीच्या नादीं माझा अजित लागला आहे. त्या चांडाळणीमुळें त्याचा अन् माझ्या घराचा सत्यनाश झाला आहे. त्या आक्कावाईच्या पायीं घरादाराची राखरांगोळी होऊन माझा अजित रस्त्यवरचा भिकारी बनला. त्या सटवीचा खर्च चालवायला दुसरा कांहीं उपाय त्याला दिसत नसल्यामुळं शेवटीं चोरी करण्यांपर्यंत त्याची मजल आली, तो शेवटीं चोर ठरला. त्या दिवशीं तुम्ही जर माझ्या बाबाची अब्रू वचावली नसतीत, तर आज माझी काय हो दशा झाली असती?" असें म्हणून ती स्त्री रडूं लागली.

पुत्रासाठीं त्या बाईच्या डोळ्यांतून अश्रुबिंदु पडतांना पाहून माझें हृदय अगदीं कळवळून गेलें. मी तिचें समाधान करावयाच्या उद्देशानें म्हणालों "माई! तुम्ही रडूं नका. लहानपणीं मनुष्याच्या हातून चुकून असें कांहीं घडतेंच आहे. त्याबद्दल तुम्ही इतकें मनाला लांवून घ्यायचें कांहीं कारण नाहीं. मी जाऊन तुमच्या अजिताला भेटेन—त्याला वारंवार चांगला उपदेश करीन आणि त्याला या व्यसनाच्या पाशांतून सोडविण्याचा मी मनःपूर्वक प्रयत्न करीन."

"तुमची इच्छा उदार आहे—पण ती आतां पुरी होणं शक्य नाहीं. माझा अजित कालच येथून कुठं निघून गेला. त्याचा कुठंहि शोध लागत नाहीं. हे रुपये मात्र त्यानं आपणाकडे द्यायला लिहून ठेवले होते." असं म्हणून स्फुंदस्फुंदत तिनें त्या दिवशींचें माझें नोटाचें पुडकें माझ्या हातीं दिलें.

[३]

त्यावेळीं अफगाण युद्ध चालू होतें. आमच्या पलटणीची त्या वेळीं बुदान्याला छावणी पडली होती.

एके दिवशीं सायंकाळीं एका मनुष्यानें माझ्या हातीं एक पत्र दिलें. तें पत्र अजितसिंहाचें होतें. मीं तें तत्क्षणीं वाचून पाहिलें. पत्र असें होतें:—

"आजच्या लढाईंत मी घायाळ होऊन पडलों आहें. आतां जगण्याची मला आशा नाहीं. या पत्रासोबत पाठविलेलें पदक मला नुकतेंच मिळालें असून तें आज मी आपणाकडे पाठवीत आहें. त्या दिवशीं जर आपण माझी अब्रू राखली नसती, तर या पदकाचा लाभ मला कधींहि झाला नसता. माझें हें पदक आपण नेहमीं वापरावें, अशी माझी इच्छा आहे. त्याचा आपण स्वीकार केला, असें मला कळेल तर मी सुखानें प्राण सोडीन. मरतांना मग माझी कोणतीहि इच्छा मागें रहाणार नाहीं. एके दिवशीं जो चोर म्हणून ठरत होता, तो आज खऱ्या वीराप्रमाणें समरांगणावर मरत आहे, हें केवळ आपल्या दयेचें फळ होय. भगवान् आपलें मंगल करो."

तें पदक मीं हृदयाशीं धरलें. माझ्या डोळ्यांत तत्क्षणीं अश्रुबिंदु उभे राहिले. पृथ्वीवर हळुहळू अंधकार आपला. अधिकार गाजवूं लागला होता. त्या पत्र आणणाऱ्या मनुष्यानें माझ्या डोळ्यांतले ते अश्रु पाहिले कीं काय कोण जाणे!"

प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका अशक्तांस सशक्त व जवान बनवून
त्यांच्या अंगांत नवीन जोर उत्पन्न करतात. वापरून पहा!

स्वयंपाकघरांतील गोष्टी.

उत्तम स्वयंपाकघरामध्यें उत्तम उजेड पाहिजे. तसेंच स्वयंपाकघरांतील मोरीचें पाणी जितकें दूर जाईल तितकें चांगलें. स्वयंपाक रुचकर होण्याला स्वच्छता व टापटीप यांची ज्यास्त आवश्यकता आहे. आह्मां हिंदु स्त्रियांनां स्वयंपाक करणें ही अनेक मुख्य गोष्टींपैकीं एक मुख्य गोष्ट आहे. ज्यांनां बाईब्राह्मण ठेवण्याची ऐपत असेल त्यांनीं ती ठेवावींत, परंतु घरांतील बायकांनीं स्वतः स्वयंपाकाकडे विशेष लक्ष्य दिलेंच पाहिजे.

नेहमीं इतर ठिकाणांपेक्षां स्वयंपाकघरांत ज्यास्त केर पडतो, याकरितां दिवसांतून दोनचार वेळ तरी तो काढला पाहिजे. त्याचप्रमाणें तांदुळ, भाजी वगैरे घुण्याच्या रोवळ्या, चाळणी असतात, त्या नेहमीं घासून पुसून स्वच्छ ठेवाव्या; नाहींतर त्यांतील कोपऱ्यांत ते पदार्थ अडकून कुजतात. पाण्यांतील केर लौकर दिसून येत नाहीं, याकरितां, पाण्याचीं भांडीं नेहमीं आंतून बाहेरून घासून स्वच्छ ठेवावीं. पाणी भरतांना गाळून भरून भांडीं झाकून ठेवावीं. आपण निजण्या-बसण्याच्या खोल्यांतून झाडून वगैरे स्वच्छता ठेवितों, तर आपल्या पोटांत जाणाऱ्या या पदार्थांविषयीं जितकी स्वच्छता ठेवावी तितकी थोडीच आहे.

शिजवून तयार केलेले पदार्थ टापटिपीनें वाढावे, नाहींतर मिठांत चटणी, भात वाढतांना भाजींत थोडासा पडतोच आहे! याकरितां प्रत्येक पदार्थांत थोडेंसें अंतर ठेवून एकमेकांत न जाऊं देतां थोडे थोडे प्रमाणानें वाढावे, म्हणजे ताट पाहूनच जेवणाराचें समाधान होतें.

बटाट्याचे पापड.

एकशेर बटाटे पाण्यांत शिजवून सोलून वाटावे. नंतर वाटलेल्या बटाट्यांत दीड चमचा मीठ, एक चमचा तिखट, अर्धा चमचा जिऱ्याची पूड, व शिंगाड्याचें अगर केळ्याचें पीठ, लाटतां येण्यासारखें होईपर्यंत घालून मळावें; नंतर त्याच्या सुपारीएवढ्या गोळ्या करून शिंगाड्याच्या अगर केळ्याच्या पिठावर पापड लाटून उन्हांत वाळवावे. वाढण्याच्या वेळेला भाजून अगर तुपांत तळून वाढावे. हे उपासालाहि चालतात.

आंब्यांचें श्रीखंड.

दहा मोठे हिरवे आंबे शिजवून सोलावे. नंतर त्याचा गर कल्हईच्या पातेल्यांत काढून त्यांत दोन शेर साखर, अर्धा तोळा वेलदोड्याची पूड, पावतोळा केशराची पूड घालून कल्हईच्या चमच्यानें बरोबर ढवळून वाढावयास घ्यावें. हें खाण्याला रुचकर लागतें.

मुळ्याच्या पाल्याचे काप.

पांच मुळ्यांचा पाला काढून बारीक चिरावा, व त्यांत पावशेर चण्याचें पीठ, चहाचा एक चमचा जिऱ्याची पूड, बेताचें तिखट, मीठ, अर्धा चमचा हळदीची पूड घालून भाकरीच्या पिठाइतकें घट्ट मळावें; नंतर वांग्या-प्रमाणें लांब शेंगोळे करून पातेल्यांत एकशेर पाणी घालून शिजवावें; शिजल्यानंतर शेंगोळ्याच्या विलीवर चिरून वाटोळे साधारण पातळ काप काढावे; नंतर चुलीवर तवा तापत ठाकून तळण्याला पुरें इतकें तेल ओतावें; व त्यांत चिरलेले काप तळून काढावे.

सौ. सरस्वतीबाई पराडकर, आंबेव.

[२]

बदामांची नकली बर्फी.

ही बर्फी करण्यास पावशेर बदामगर, अर्धा पाव खवा, पाऊणशेर साखर, पंधरा वेलच्या, दीड मासा केशर घ्यावी. पावशेर चण्याची डाळ भिजत घालून पाट्यावर वाटावी. बदाम भिजत घालून सोलून जाड वाटावे. नंतर दीड मोठा (टेबल) चमचा तूप चुलीवर ठेवून त्यांत वाटलेली डाळ टाकून, केशरी रंगावर येईपर्यंत परतून मोकळी करावी. साखरेंत दीड पाव पाणी

दूषित रक्तासंबंधाच्या सर्व आणि भयंकर रोगांवर क्युरेलाइन वापरा.
कोणत्याहि बाह्योपचाराची जरुर नाही.

घालून चुलीवर ठेवावी; चांगली गोळी वळेपर्यंत पाक झाला, की, त्यांत वेलचीची अर्धी पूड, केशर घालून नंतर वाटलेली डाळ, बदाम, खवा घालून सारखी घोटावी, व ताटाला तूप लावून त्यांत ओतावी, व हालवून सारखी करून वर राहिलेली वेलचीची पूड भुरभुरवावी. पाहिजे असल्यास पिस्ते, चारोळी वर टाकावी व तुकडे कापावे.

मरकती हलवा.

दीड शेर रवा, पाऊणशेर बदाम, पावशेर पिस्ते, पाऊणतोळा वेलची, तोळाभर गुलाबपाणी, अर्धाशेर तूप, एक शेर साखर, इतके जिन्नस या पदार्थाला लागतात. पाऊणशेर पाण्यांत रवा रात्री भिजत ठेवून, सकाळी पातेलीला खादीचें फडकें बांधून पाण्याचा हात घेऊन रवा श्रीखंडाप्रमाणें ढाणावा, व कल्हईच्या पातेलींत घालून पांच मिनिटें चुलीवर घोटून त्यांत साखर, सोललेले आखे बदाम घालून घोटावा, व घोटतांना थोडें थोडें तूप घालून अर्धाशेर तूप अशा तऱ्हेनें संपवावें. हलवा जाड होत आला, की, गुलाबपाणी घालावें; गोळा झाला ह्मणजे ताटाला तूप लावून जाड दोन अंगुळें थापावा. वरून पिस्ते घालावे. वाटल्यास एक मासाभर केशर घालावें.

बदामांचा हलवा.

या पदार्थाला लागणारे जिन्नस—एक शेर बदाम (४० तोळे), अर्धाशेर चुणचुणी साखर, पावशेर लोणी, पावतोळा वेलची, अर्धे जायफळ. बदाम भिजत घालून सोलून पाट्यावर थोडें थोडें दूध शिंपून बारीक वाटावे. त्यांत एक टेबल चमचा दूध व लोणी घालून चुलीवर ठेवून घोटावें; लाल होऊं देऊं नये. नंतर साखरेचा जाड पाक करून त्यांत ओतावा. तुकडा जमण्याच्या बेताचा झाला, की, वेलची जायफळाची पूड टाकून तूप लावलेल्या ताटांत ओतून सारखा एक इंच जाड थापावा, व त्याचे चौकोनी तुकडे करावे. चुलीवर फार सुकें होऊं देऊं नये, ह्मणजे वड्या चांगल्या होतात.

कुमारी सरस्वतीतनया.—बडोदें.

---

[२]

मेथ्यांची उसळ.

प्रथम जुन्या मेथ्या एक दिवस पाण्यांत भिजत घालाव्या. दुसरे दिवशीं काढून स्वच्छ बारीक कपड्यांत घालून त्याची गांठ बांधून तो खुंटीला टांगावा, व दोन दोन तासांनीं पाण्यांत बुडवून पुनः टांगून ठेवावा. दुसरे दिवशीं कपड्यांतून मोड बाहेर पडतील. तिसऱ्या किंवा चवथ्या दिवशीं उत्तम पिंवळे मोड तयार होतील. मग जितके मोड असतील त्याच्या दुप्पट बारीक कांदा चिरावा. तेलांत हिंग मोहऱ्यांची फोडणी तयार करावी. फोडणी झाल्यावर त्यांत मोड व कांदा हे टाकावे. बेतानें तिखट, मीठ, हळद व गरम मसाला टाकून वर झांकण ठेवावें. झांकणावर थोडें पाणी घालावें. शिजून तयार झाल्यावर वाढण्यास घ्यावे.

गव्हल्यांची खिचडी.

प्रथम गव्हले तुपांत वास येईपर्यंत परतावे. मग थोडें थोडें पाणी वरचेवर शिंपडून अगदीं शिजल्यावर त्याच्या बेतानें वेलदोडे, जिरें, शहाजिरें, लवंग, हिंग यांची बारीक पूड करून त्यांत घालावी. व मीठ घालून निखाऱ्यांवर वाफ येईपर्यंत ठेवावे. नंतर खोवऱ्याचा कीस घालून वाढावे.

कांद्याच्या करंज्या.

प्रथम कांदे किसून घट्ट पिळावे. कीस अर्धेल त्याच्या निम्मा खोवऱ्याचा कीस, बेतानें जिरें, खसखस, हिंग, तिखट, मीठ, कोथिंबीर, तीळ घालून एकत्र करून ठेवावे. मग कणीक व थोडें हरभऱ्याच्या डाळीचें पीठ दह्यांत घट्ट भिजवावें. नंतर सुपारीएवढी गोळ्याची पात लाटून त्यांत वरील सारण भरून कातण फिरवावी, व तेलांत तळून काढाव्या.

खारकांचें लोणचें.

दोन डझन खारकांचे तुकडे, सहा लिंबांच्या रसांत भिजत घालावे. दुसरे दिवशीं त्यांत एक टेबल चमचाभर आंब्यांच्या लोणच्याचा मसाला व तितकेंच मीठ घालून तेलांत हिंग मेथ्यांची फोडणी करून वर ओतावी, व वाढण्यास घ्यावी. हें लोणचें १५ दिवसपर्यंत बरें रहातें.

एक भगिनी—वाशीम.

'गुडेरीन' नें आजपर्यंत हजारों बायकांचे जीव काळाचे जबड्यांतून सोडविले आहेत.
किंमत रु. २॥• ट. ख. ८ आणे.

[४]

कोथाचे हातपोहे.

हे करण्यास पोहे, डाळें, चुरमुरे, कांदा, खोबरें, ओल्या मिरच्या, कोथिंबीर, लिंबू, साखर व मीठ इतके जिन्नस लागतात.

प्रथम पावशेर पोहे व तितकेंच डाळें चुरमुरे (दोन्ही मिळून) घ्यावे. खाबर खोबऱ्याची एक वाटी किसून घालावी. त्यांत दोन मध्यम कांदे बारीक चिरून टाकावे व कोथिंबीर चिरून घालावी. नंतर त्यांत चारपांच हिरव्या मिरच्या बारीक चिरून मिसळाव्या, व चहाचा सपाट चमचा मीठ व तितकीच साखर घालावी. त्यावर एक लिंबू पिळून कालवून उपयोगांत आणावें. मात्र लिंबू अगदीं खाण्याच्या वेळीं पिळावें, म्हणजे पोहे पानचट लागणार नाहींत. बाकीचे सामानहि फार आधीं न मिसळलें तर बरें.

हे पोहे फोडणीवांचून होतात, म्हणून या प्रकारास 'हातपोहे' म्हणतात. तथापि फोडणी दिल्यानें हे वाईट लागतील असें नाहीं.

फजिता.

पिकलेल्या आंब्याचा सुमारें पावशेर रस घेऊन त्यांत सुमारें अर्धा पावशेर गोडें दहीं घालावें. नंतर चहाचे चमचाभर मोहरीची पूड व दोन हिरव्या मिरच्यांचे तुकडे घेऊन ते तुकडे व मोहरी पाण्यांत कालवून हातानें ताटामध्यें फेंसावी. ती चांगली चढली म्हणजे त्या रसास लावावी. आपण एका पानावर जेवढें मीठ वाढतों, तेवढी साखर व वेताचें मीठ त्यांत घालून आवडीप्रमाणें तेलाची अथवा तुपाची हिंग मेथ्यांची फोडणी द्यावी.

कारल्यांची भाजी. (सिंधी तऱ्हेची).

कारलीं घेऊन त्यांचे कांटे विळीनें किंवा चाकूनें सोलून काटावे. नंतर कारलीं लहान असल्यास सगळीं, व मोठीं असल्यास त्यांचे अडीचतीन बोटाएवढे तुकडे करावे, आणि त्यांस मधोमध एक उभी चीर पाडावी. त्या भेगेंत मीठ भरून, बाहेरूनहि लावून. घटकाभर तें ठेवावें. कांहीं वेळानें मुठीनें पिळून त्यांतील सर्व पाणी काढून टाकावें. बरेंचसें म्हणजे भाजी होऊन उरलें तरी चालेल, पण कमी पडूं नये इतकें तेल घालून फोडणी करावी, व तीं तयार केलेलीं कारलीं फोडणींस टाकून वर कोरडें झांकण ठेवावें. चांगल्या दोनचार वाफा द्याव्या. कारलीं तांबूस रंगावर आलीं, म्हणजे त्यांत वेताचें मीठ व तिखट घालून आणखी एकादी वाफ दिली म्हणजे भाजी तयार झाली.

अशा तऱ्हेची भाजी कडू लागत नाहीं. तरी हें ध्यानांत ठेवलें पाहिजे, कीं, कारल्यांची कोणच्याहि तऱ्हेची तळलेली भाजी करणें झाल्यास तेल भरपूर घातलेंच पाहिजे.

सौ. अन्नपूर्णाबाई गोखले—कराची.

---

[५]

दह्याची भाजी.

शेरभर दूध विरजून व दुसरे दिवशीं त्याचें चांगलें आंबट दहीं झालें म्हणजे तें फडक्यावर घालून चांगला घट्ट गोळा होई तोंपर्यंत ठेवावें, व त्याचे मोठ्या आंब्याएवढाले होतील तितके गोळे करावे. नंतर एका पातेल्यांत बरेंचसें पाणी चुलीवर ठेवावें व त्यास चांगली उकळी फुटल्यावर ते गोळे आंत टाकावे व झांकण ठेवून पंधरा मिनिटें चुलीवर राहूं द्यावें. नंतर खालीं उतरून चांगलें थंड झाल्यावर त्याच्या विळीवर बारीक फोडी चिराव्या, व एक पातेलें चुलीवर ठेवून तेलाची अगर तुपाची फोडणी करून त्यांत त्या फोडी टाकाव्या. चहाचा एक चमचा मीठ व एक चमचा तिखट, थोडी हळद, चमचाभर जिऱ्याची पूड, थोडी कोथिंबीर व मोठा चमचा साखर हे सर्व जिन्नस घालून थोडी वाफ आणावी, व मग चुलीवरून खालीं उतरून वाढण्यास द्यावी. ही भाजी चांगली रुचकर लागते व तोंडास चव येते. तुपावर टाकून हळद वगैरे न टाकल्यास उपाससहि चालते.

मुरकू.

हा करण्यास अर्धा शेर तांदूळ घ्यावे व अदपाव उडदाची डाळ घेऊन दोन्ही भाजावीं. त्यांत तांदूळ थोडे भाजावे, परंतु उडदाची डाळ लाल होई तोंपर्यंत भाजावी, व मग दोन्हीं एकत्र करून बारीक दळावीं. नंतर त्यांत मोठे दोन चमचे मीठ, थोडी हळद व

'गुडेरीन' नें आजपर्यंत हजारों बायकांचे जीव काळाच्या जबड्यांतून सोडविले आहेत.
किंमत रु. २॥. ट. ख. ८ आणे.

एक चमचा जिऱ्याची पूड घालून तेलाचें थोडें मोहन घालून पाण्यांत भिजवून ठेवावें, फार सैल भिजवूं नये. चकल्याच्या भाजणीसारखें घट्ट भिजवावें. अर्ध्या तासानें तें पीठ चांगलें मळावें व लांतलें पोफळाएवढें पीठ घेऊन कडबोळ्यासाठीं वळीं वळतात, त्यापेक्षां लाचीं बारीक परंतु लांब वळी वळावी, व या वळीचे दोन भाग करून अंबाड्यावर दोन पेडांचा ज्याप्रमाणें पीळ घालतों, त्याप्रमाणें या दोन्ही तुकड्यांस पीळ घालावा. नंतर त्याचें पोकळ वेटाळें करून तें तेलांत तळावें. याप्रमाणें सर्व पिठाचें करावें. चांगला पीळ पडला म्हणजे ते दिसण्यांत फार चांगले दिसतात आणि हे चवीलाहि रुचकर लागतात. हे मधल्या वेळीं फराळास द्यावे.

चटणी.

छटाक उडदाची डाळ घेऊन ती तेलावर लाल होईं तों भाजावी व मग कोरडीच जरा भरड भरड वाटावी, व वाटीभर चिंचेचा कोळ काढून त्यांत वेतानें गूळ, व चहाचे चमचाभर मीठ, दोन चमचे तिखट, व मोठाली वांगी दोन भाजून सोलून घालावीं. नंतर सर्व एकत्र करून चिंचेच्या कोळांत कालवावें, व त्यास पळींनें फोडणी देऊन नंतर ती चटणी वाढण्यास द्यावी.

सौ. राधाबाई, शिरपुर.

[६]

अलिजाबहादुर.

हा पदार्थ करण्यास तीन मासे केशराची पूड व दोन तोळे वेलदोड्याची पूड करून घ्यावी आणि एकादी वाटी अगर लहान भांडें घेऊन खालील सर्व जिन्नस त्यानें सारखे मोजून घ्यावे. तीळ, खसखस, पिस्ते, चण्याची डाळ, शेंगांचे दाणे, बदाम, इतकें मोजून घेतल्यानंतर दाणे व बदाम गरम पाण्यांत भिजत घालावे. बाकीचे पदार्थ दुसऱ्या भांड्यांत गार पाण्यांत भिजत घालावे. तीन तासांनीं ते काढावे, बदाम व दाणे सोलून घ्यावे, बाकीचे धुऊन पाणी निथळून ते सर्व जिन्नस पाव्यावर वाटून गोळा करून ठेवावा. नंतर एक ओला नारळ खोवणीनें खवून घ्यावा व ज्या भांड्यानें वरील पदार्थ मोजले असतील त्यानेंच दीड भांडें तूप एका कल्हईच्या पातेल्यांत घालून चुलीवर ठेवावें, व वाटून ठेवलेला गोळा त्यांत टाकावा. नंतर जसें आपण वाटल्या डाळीचें बेसन भाजतों तसें भाजावें. भाजत आल्यावर त्याचे अदमासानें बारीक साखर व खोवऱ्याचा चोव घालावा, व दूध शिंपडावें. नंतर त्यांत केशराची व वेलचीची करून ठेवलेली पूड घालावी, व मंद अग्नीवर ठेवून एक दोन वाफा आल्यावर वाढण्यास द्यावा. शिऱ्यासारखा मऊ मात्र करावा.

तिखटमिठाच्या मेसूर वड्या.

या करण्यास पावशेर चण्याची डाळ ऊन पाण्यांत (जर दुसरे दिवशी कराव्याच्या तर आदले दिवशीं दुपारीं) भिजत घालावी. नंतर रात्रीं ती बारीक वाटून कल्हईच्या भांड्यांत घालून ठेवावी. दुसऱ्या दिवशी या गोळ्यांत तिखटमीठ, भाजलेल्या पापडखाराचें थोडें पाणी, चहाचे दोन चमचे हळद, पाव चमचा हिंग इतकें घालून ताटांत फेसावें. म्हणजे वड्या हलक्या व खुसखुशीत होतात. नंतर तेल लावून तें फेसलेलें पीठ मळावें. नंतर स्वच्छ फडकें घेऊन त्यावर तें पीठ वड्यासारखें थापावें, व मोदकासारखें मोदकपात्रांत चाळणीवर फडकें ठेवून उकडून घ्यावें. नंतर वड्या कापून त्या तळून काढाव्या. या वड्यांस तळल्यावर अनरशासारखीं भोकें पडतात. या खाण्यासहि रुचकर लागतात.

डाळीचे पोहे.

प्रथम दोन मुठी चण्याची डाळ घेऊन भिजत घालावी. नंतर बाजारी पोहे एकशेर घ्यावे. घरीं कांडलेले जाड असतात, ते घेऊं नयेत. बाजारी पातळ असे जे मिळतात तेच आणावे. नंतर ते खोल तव्यावर अगर उथळ कटईत तुपांत तळून काढावे. तळल्यावर ते फुलतात. नंतर एका ओल्या नारळाचा चव खरवडून ठेवावा. चुलीवर कल्हईचें पातेलें तापत ठेवून त्यांत तेल टाकावें व फोडणी करून त्यांत भिजत घातलेली डाळ स्वच्छ धुऊन फोडणीस टाकावी. व पावशेर पाणी व थोडी कोथिंबीर टाकून ती चांगली मऊ शिजवावी. मग त्यांत पोह्याचे अदमासें चिंच, गूळ, तिखट मीठ, घालून अंगावरोवर रस राहिला, की, उतरून पोहे घालावे. वर नारळ घालून सारखें ढवळून फराळास द्यावें. हे पोहे ज्यास वेळ चांगले रहात नाहींत, म्हणून फराळाचे पूर्वी एक दोन तासच करावेत.

मला सुचली ती माहिती मीं दिली आहे. आतां बाजारच्यासारखीं हुबेहुब पाव व बिस्कुटें ज्यांना करतां येत असतील, त्यांनीं त्याची माहिती दिल्यास फारच उपयोग होईल. तरी कोणी निपुण भगिनी माझी ही विनंति मान्य करितील अशी आशा आहे.

सौ. यशोदाबाई भट, गुंबद.



काव्यकुंज.



मधमाशी.

[कवि—श्रीयुत नागेश.]

अर्धस्फुट पुष्पाप्रत
गुं गुं गुं गीत गात
मधमाशी एक अशी भाग्यशालिनी
मीं पाहिली वनीं.

गाण्याचा अर्थ खोल
जाणुनि तें दिव्य फूल
मधुनि मधुनि मान जरा हालवीतसे
तें स्मितहि करितसें !

ऐसें हें मंजु गान—
पसरुनि, तें सर्व विपिन
गाण्याच्या मंजुरवें कोंदलें पुरें—
तें व्यापिलें खरें !

गेलों मी भीत भीत
त्यांजवळी लपत छपत
सावधान करुनि चित्त ऐकुं लागलों
तैं गुंग जाहलों !

" तूं माझा, मी तव रे
आत्म्यांमधिं जग सारें !
आत्म्याविण अन्य कांहिं जगिं नसे !" असें—
तें गीत हो असे !

ऐकुनि हा गूढ मंत्र
दाहि दिशांमाजि नेत्र—
फेकुनियां बघतां मग विश्ववलय तें
मज भासलें नवें !

तारांचे अमित पुञ्ज,
मेघांचे भव्य कुञ्ज,
शैलपंक्ति, निर्झरतति, सर्वही नवीं—
तीं सर्वही नवीं !

ते डोंगर, ते फत्तर,
त्या तारा, ते जलधर,
' तूं माझा, मी तव ' या करिति गायना—
त्यजुनि परभावना !

मीही मग त्या सुरांत
मिळवुनि मम सूर शांत—
तेंच दिव्य संगीत स्वैर त्यांसवें—
मी गावया सजें.

गातां तें मधुर गीत
होतों मी उन्मनींत
हाय ! एकदमच परी जीभ अडखळे—
मम देहही गळे !

'तूं माझा, मी तव' या
लागतसें मी गाया
परि 'माझा' कोण असा या जगीं असे ?
ज्या मजमुळें पिसें.

गायन हें स्वर्गीचें
हृदयच जणुं देवांचें !
त्यांनीं या मधमाशिस अर्पिलें मुदा
तें गाय ही सदा.

मी पापी अधम खचित,
मग कैसें हें सुगीत—
रसनेवरि नाचावें खैर माझिया ?
हा ! घोर समयिं या !

ढाळावे अश्रु सतत,
रोदनरव गिरिदरींत—
फेंकुनि तो गुप्तपणें, राहणें जनीं
हेंच सुख मानुनी !

संसृतिची दहनभूमि
आम्हांला गमत नामि
म्हणुनि अहीं घूकांसह करित गायनें
आनंद मानणें.

ऐसा मी व्यग्रचित्त
असतांना कढत आंत
मधमाशी ती गुं गुं गात पातली
कानास लागली !

"वेड्या ! कां रडसि असा ?
होसी कां उगिच पिसा ?"
वदुनि असें समुखांतिल दे मधू मला—
तो मींहि सेविला.

"तरुवेली, व्योमधरा,
शैलदरी आणि झरा,
आलिंगुनि चुंबुनि वा गाति गायनें,
तीं ऐक उन्मनें !"

मधमाशी वदत अशी,
आला परि कोप मजसि
पुसिलें तिज "माझें परि कोण ?" ती वदे—
"वा ! मी तुझी असें !"

प्रेमाचा मंगल हा
संयोगी समय महा !
'तूं माझा, मी तव' या दिव्य गायनीं
तो जाय कोंदुनी !

आतां ती आणिक मी
भेद कुठें हा प्रेमीं !
ऐक्याच्या बोधक या गायनें अतां
हीं भरितसों धरा !

गंगेच्या तीरिं वसुनि
आम्ही तिच्या लहरिवरुनि
'तूं माझा, मी तव' हा मंत्र भाविकां
कळवीतसों निका !

या, हो या ! सकलहि जन
गा, गा ! हें दिव्य गान
आत्मार्पण दयितांनां सर्वहि करा !
ही स्वर्ग हो धरा !!

धन्य खरी ती तूं आई !

[कवि—श्रीयुत दत्तात्रय भिमाजी रणदिवे.]

असोत कोणी मुलें कशीं
समान सगळीं मातेशीं !
विदित एक तिजशीं समता
समान सकलांवर ममता;
दूर मलीना ढकलून,
घ्यावें निर्मल उचलून,
ऐशी नीच प्रतारणा
कधीं न शिवते जिच्या मना !
कितीहि बदलो परिस्थिति
किंवा उलटो दैवगति,
जिचा न सुकतो प्रेमझरा
सुधेसही लाजविणारा !
सुज्ञ बावळीं
सशक्त दुबळीं
गोरीं काळीं
समान सगळीं प्रिय तिजशीं
असोत कोणी मुलें कशीं !
परंतु भारतभू-माते !
तूंच एक या नियमातें—
दिससि हाय ! अपवाद मला
शोधुनि बघतां धरातला !
भेद धरुनि निज संतानीं
ज्यास निंदिलें संतानीं
पवित्र जननी-प्रेमास
तूंच कलंकित केलेंस !
असंख्यशीं गोजिरवाणीं
जन्मतांच बाळें तान्हीं
अस्पृश्यत्वाच्या गतीं
ढकली जीं प्रस्तरमूर्ति !
जिच्या कन्यका पशूहुनी
असति खरोखर अभागिनी !
असेल माता अशी कुणी
तूंच-तूंच तरि हिंद ! जनीं !
निजसुततनया
जवळ घ्यावया
अश्रु पुसाया
मध्यांस पुसण्या जी जाई !
धन्य खरी ती तूं आई !

प्रेममीलन.

[कवि—श्रीयुत के. म. सोनाळकर.]

व्यावहारिक प्रेम सत्य प्रेमाची केवळ छाया आहे; सत्य प्रेम शोधायचें म्हणजे सुखदुःखाला—ममत्वाला विसरून प्रेमरूपच झालें पाहिजे.

ज्या दिव्यत्वाची छाया
मोहुनि टाकी जगता या,
त्या छायेचें
दिव्यत्वाचें
अंतर तें कविला ठावें
तुष्ट कसें त्यानें व्हावें !
हृदय तमाचें विदारुनी
पुढें पुढें सरके रजनी
दिव्य उषेच्या उच्छ्वासें
तिला लागलें जणों पिसें
पुढें धांवतां
उषा भेटतां
कवटाळी तिजला रजनी,
आत्मत्वातें विसरोनी.
सौख्याचा परि तो ठेवा
रजनीला कुठचा ठावा !
ममत्व गेलें
एक जाहले—
निशा उषेचे उच्छ्वास.
सौख्य दुःख हो आभास.
वाटे कविला त्याचपरी.
सुख दुःखाच्या बाहेरी—
त्या दिव्यत्वीं
होउनि ज्योती
ममत्व सारें विसरावें
प्रेमरूप होउनि जावें !

माझा उत्तरहिंदुस्थानांतील प्रवास.

लेखांक ४. उत्तरार्ध— मथुरावृंदावन.

—लेखक—
श्रीयुत प्रो. गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.

या लेखाच्या पूर्वार्धांत मथुरेंतील प्रेक्षणीय मार्गांचें वर्णन दिलें. दोनचार दिवस येथें येणारास व वरवर पाहणारास मथुरेची हल्लींची वस्ती, मथुरेंतील देवळें, व इतर प्रेक्षणीय स्थळें जरी अर्वाचीन दिसलीं —व तीं तशीं आहेत—तरी पण पुराणवस्तुसंशोधकांच्या दृष्टीनें मथुरेचें फारच महत्त्व आहे. कारण येथेंच किल्येक फार जुनीं जुनीं नाणीं सांपडलेलीं आहेत. येथेंच खुद्द बुद्धाच्या वेळच्या वस्तु व मूर्ति सांपडलेल्या आहेत. आणि मथुरेंत सांपडलेल्या शिलालेखांनीं व नाण्यांनीं हिंदुस्थानांतील पुरातन इतिहासांतील कांहीं कांहीं दुवे जुळवून आलेले आहेत. शिवाय काशी व गया-प्रमाणें पवित्र मथुरास्थान हिंदूलोकांप्रमाणेंच बुद्ध लोकांनांहि फार पवित्र असल्यामुळें, फार प्राचीनकाळीं आलेले दोघे चिनी प्रवासी फेहेअन व ह्युएनसंग हे दोघेहि या शहरीं येऊन बरेच दिवस येथें राहिले होते. यावरून मथुरेचें पुरातनत्व दिसून येईल. ह्मणून वाचकांनां मथुरेची व येथें प्रचलित असलेल्या कृष्ण-भक्तांची थोडीशी पूर्वपीठिका या उत्तरार्धांत देण्याचें मनांत आणिलें आहे.

मथुरा हें शहर जरी हिंदुस्थानांतल्या अत्यंत प्राचीन शहरांपैकीं नसलें, तरी त्याचा पुराणांत दुसरा नंबर लागेल, यांत शंका नाहीं. या शहराचा दुसरा एक विशेष हा आहे, कीं, हिंदुधर्माच्या लोकांनां हें जितकें पवित्र स्थान वाटतें, तितकेंच ते बुद्धधर्माच्या लोकांनांहि पवित्र वाटतें. कारण, स्वतः बुद्ध या नगरींत पुष्कळ दिवस राहिले होते, असा दाखला सांपडतो. येथें बुद्धविहार तर पुष्कळच होते. मात्र चमत्काराची गोष्ट अशी, कीं, ज्या महाभारतामध्यें श्रीकृष्ण हा एक मुख्य मुत्सद्दी व एक मुख्य उपनायक आहे, त्या महाभारतांत कृष्णाची जन्मकथा नाहीं. याचा उलगडा पुढें येणार आहेच; पण मथुरास्थापनेची कथा रामायणांत आहे. यमुनेच्या कांठीं मधुवन ह्मणून एक मोठें वन होतें व त्या वनांत मधुराक्षस राहत असे. त्यानें शंकराला प्रसन्न करून एक यशस्वी शूल मिळविला होता. त्याच्या पश्चात् तो लवण नांवाच्या मधुराक्षसाच्या मुलाच्या ताब्यांत आला. हा लवण राक्षस यमुनातीरवासी तपस्व्यांनां फार त्रास देऊं लागला, ह्मणून ते श्रीरामचन्द्राकडे अयोध्येस दाद मागण्याकरितां गेले. रामानें शत्रुघ्नास लवणाचें पारिपत्य करण्यास व तेथें राज्य स्थापन करण्यास धाडलें. त्याप्रमाणें शत्रुघ्न तेथें आला व लवणास शूलाखेरीज गांठून त्यानें त्याचा वध केला; व सर्व मधुवन तोडून टाकून यमुनेच्या कांठीं मधुपुर, मथुरा किंवा मथुरा ह्मणून शहर वसविलें. तेथेंच त्यानें राज्य स्थापन केलें व बारा वर्षांनंतर तो अयोध्येस रामास भेटावयास गेला. कालिदासानें रघुवंशांत इंदुमतीच्या स्वयंवराच्या सहाव्या अध्यायांत ज्याची राजधानी मथुरा यमुनाकांठीं आहे, असा शूरसेनाधिपति सुषेण याला स्वयंवरसभेंत राजाच्या मालिकेंत आणिलें आहे, व त्याच्या वैभवाचें व यमुनानदीच्या प्रदेशाच्या सौंदर्याचें वर्णन केलें आहे. रामायणांतील वरील गोष्टीचा व कालिदासानें दिलेल्या वरील गोष्टीचा मेळ बसत नाहीं. पण कालिदासाच्या कविवर्णनास इतकें महत्त्व देतां येत नाहीं. परंतु इतकें खास, कीं, बुद्धाच्या वेळीं हें शहर फारच भरभराटींत होतें; व त्याच्या काळापासूनच तेथें बुद्धधर्माचें प्राबल्य झालें व तें सुमारें सन ७०० पर्यंत कायम राहिलें. तिसऱ्या शकाच्या सुमारें ५०० व्या वर्षी फेहेअन हा

प्रत्येक कुटुंबांत ट्रेझोच्या वट्यांची एकतरी बाटली अवश्य पाहिजे! मस्तकशूलावर तत्काळ गुणदायक औषध ट्रेझोच्या वट्या हेच होय!

चिनी प्रवासी मथुरेस आला होता; तेथपर्यंत मथुरेस बुद्धधर्म बराच जोरांत होता. परंतु सन ४०० पासून ७०० पर्यंत त्याचा पूर्ण बीमोड झाला व मथुरा पुनः हिंदुलोकांचें पवित्र स्थान होऊं लागलें.

मथुरेतील सर्वांत जुन्या इमारती म्हणजे बुद्धधर्मीयांचा एक विहार व एक स्तूप या आहेत. या स्तूपांत बुद्धाचीं नखें होतीं. उपगुप्त या नांवाच्या मथुरेच्या राहणाऱ्या अत्यंत पूज्य अशा बुद्धभिक्षूनें हा विहार बांधला होता व त्यानेंच अशोक मौर्याला बुद्धधर्माची दीक्षा दिली होती. याप्रमाणें मौर्य राजांच्या काळीं मथुरा ही फार प्रख्यात नगरी होती असें दिसतें. बुद्धधर्माचा प्रसारकर्ता अशोक हा बहुधा इसवी शकापूर्वी २२१ च्या सुमारास निवर्तला असावा. अशोकानंतर मौर्यवंश आणखी शंभरदीडशें वर्षें चालला. परंतु बृहद्रथ मौर्याचा सेनापति पुष्पमित्र यानें मगधदेशाचें राज्य बळकाविलें. इसवी सनापूर्वी १८४ या वर्षापासून शुंग वंश राज्यपदारूढ झाला. तेव्हां मथुराप्रांत व हें शहर शुंगवंशाच्या ताब्यांत गेलें. इकडे काबूल व पंजाब येथें ग्रीक राजे राज्य करीत होते. त्यांपैकीं मिलिंद किंवा ग्रीक भाषेंत मीनांडर हा फार पराक्रमी निघाला. त्यानें बुद्धधर्माचा स्वीकार केला होता, असें दिसतें. कारण मिलिंदाचे प्रश्न या नांवाचा बुद्धधर्मांतील एक प्रख्यात ग्रंथ आहे. या मिलिंदानें हिंदुस्थानावर स्वारी करून काठेवाड व मथुराप्रांत काबीज केले व तो यमुनाकांठच्या मथुरेंत राहिला होता, असा दाखला सांपडतो. तेव्हांपासून मथुरेच्या आसपासचा मुलुख व तें शहर ग्रीक राजांच्या ताब्यांत गेलें व मथुरेस त्यांच्या वतीनें सेट्रप किंवा क्षत्रप राज्य करूं लागले. हे क्षत्रप पुढेंपुढें स्वतंत्र राजे बनले असावे. या क्षत्रपांपैकीं सोदास याची थोडीशी माहिती मिळते. हा रजुवलाचा पुत्र होता. हा इसवी सनापूर्वी ११० च्या सुमारास क्षत्रप झाला. मथुरेंत याच्या नांवाचा व याच्या काळचा एक शिलालेख सांपडलेला आहे. पुढील शंभर वर्षांसंबंधीं कांहीं माहिती मिळत नाहीं. परंतु काबूल, काश्मीर व पंजाब येथील हिंदुग्रीक राज्य नाहींसें होऊन तेथें दुसऱ्या राष्ट्राचें राज्य झालें, व त्यामध्यें कुशन घराण्यास वर्चस्व आलें. या घराण्यांतील राजांनीं प्रचंड राज्य स्थापून हिंदुस्थानाकडे आपला मोर्चा फिरविला, व उत्तरेकडील बराच भाग आपल्या ताब्यांत आणला. या घराण्यापैकीं कनिष्क राजाची दिगंत कीर्ति झाली. यानें सुमारें पंचवीसतीस वर्षें राज्य केलें. याच्या वेळचीं नाणीं मथुरेस व उत्तरहिंदुस्थानांत अतोनात सांपडलीं आहेत, व त्या नाण्यांवरून त्याच्या राज्याचा विस्तार व थाट यांची कल्पना होते. तसेंच कनिष्काची राजधानी पुरुषपुर—अर्वाचीन पेशावर—ही होती. परंतु त्यानें खुद्द पाटलीपुत्रावर हल्ला केला. याच्या पहिल्या पहिल्या नाण्यांवर ग्रीक देवता व विशेषतः सूर्य व चंद्र यांचीं चित्रें आहेत, व भाषा ग्रीक आहे. पुढील नाण्यांमध्यें ग्रीक अक्षरें मात्र आहेत. भाषा परशियन आहे. ग्रीक, हिंदु व परशियन देवतांच्या मूर्ति आहेत. शेवटच्या नाण्यांवर बुद्ध शाक्यमुनीची मूर्ति आहे. यावरून कनिष्कानें शेवटीं बुद्ध धर्म स्वीकारला होता, असें दिसतें. कनिष्कानें इसवी सन १२५ ते १५० पर्यंत राज्य केलें असावें. त्याचा मुलगा हुविष्क अगर हुष्क हा त्याच्यामागून गादीवर आला. यानें मथुरेस फार मोठ्या विहाराची स्थापना केली व त्याला आपलें नांव दिलें. याच्यानंतर वसुष्क अगर जष्क हा गादीवर आला. यालाच वासुदेव म्हणत असत. या नांवावरून या राजावर हिंदुधर्माचा पगडा बसत चालला असें दिसतें. याच्या नाण्यावर त्रिशूलधारी नंदीवर बसलेल्या शिवाचें चित्र आहे. या राजाच्या वेळचे शिलालेख प्रायः मथुरेस सांपडले आहेत. या राजानेंहि पंचवीस वर्षें राज्य केलें, असें नाण्यावरून दिसतें. मथुरेसंबंधीं विचार करतां या कुशन घराण्याच्या कारकीर्दीत मथुरा हें शहर फार भरभराटींत होतें यांत शंका नाहीं. येथें बुद्ध व जैनधर्मी व्यापारी फार होते, व यांनीं दिलेल्या देणग्यांचे शिलालेख येथें पुष्कळ सांपडले आहेत. संस्कृतांतील प्रसिद्ध ग्रंथ पंचतंत्र याच्या प्रारंभींच दक्षिणेंतील महिलरोप्य या शहरांतून आपल्या बैलगाडींत माल भरून मथुरेस जाणाऱ्या गाड्यांच्या तांड्याला जाऊन मिळणाऱ्या वर्धमानक नांवाच्या बाण्याच्या मुलाची गोष्ट आहे. मथुरेस पोंचल्यावर त्याचा एक बैल यमुनेंत नदीच्या तीराला गेला व चिखलांत बुडून मेला, अशा प्रकारचें वर्णन आहे. यावरूनहि मथुरेची व्यापाराकरितां त्यावेळीं प्रख्याति होती असें दिसतें. कनिष्क

विद्यार्थ्यांस इशारत. मस्तक भणभणूं लागलें अथवा दुखूं लागल्यावरोबर
डोक्याच्या वेण्यांचा उपयोग करा.

राजाच्या वेळचे ७१ शिलालेख सांपडले आहेत. त्यांतले खुद्द मथुरेंत ४३ सांपडले आहेत. या शिलालेखांवरून व मथुरेंत सांपडलेल्या दुसऱ्या इमारतींच्या भागांवरून, तसेंच कठडे, मूर्ति वगैरे गोष्टींवरून कुशन कारकीर्दीत व त्याच्यापुढें बरींच शतकें मथुरा शिल्पकलेकरितां प्रसिद्ध होतें, व मथुरेची शिल्पपद्धति म्हणून एक शिल्पपद्धति होती असें दिसतें. तिच्यावर ग्रीक शिल्पाचा परिणाम झाला होता. तरी पद्धति पूर्णपणें हिंदु होती. या कलेचा ऱ्हास सहाव्या शतकांत झाला.

इसवी सनाच्या ३२० च्या सुमारास पाटलीपुत्रास प्रसिद्ध गुप्तघराणें उदयास आलें. चंद्रगुप्त हा पहिला राजा झाला. त्याचा मुलगा समुद्रगुप्त हा फारच पराक्रमी निघाला, व त्यानें सर्व गंगेच्या कांठचा मुलुख आपल्या ताब्यांत आणला व दक्षिणेपर्यंत राजांनां मांडलिक केलें. या गुप्तघराण्याचें साम्राज्य बंगालच्या उपसागरापासून तों थेट सिंधूनदी व काठेवाडपर्यंत सर्व उत्तर हिंदुस्थानभर झालें. अर्थात् मथुरा व मथुराप्रांत गुप्त राजांच्या ताब्यांत आला. याच काळीं चिनी प्रवासी फेहिअन हा हिंदुस्थानांत आला होता. तो तिबेटांतून निघून काश्मीर, काबूल, कंदाहार, पंजाबमधून मध्य-हिंदुस्थानांत आला, व मथुरेत एक महिना राहिला. मथुरा व त्याच्या आसपास एकंदर बीस विहार होते, व त्यांत तीन तीन हजार बुद्ध भिक्षु राहत असत; तसेंच तेथें सहा स्तूप होते, असें त्यानें लिहून ठेविलें आहे. यावरून मथुरेस अजून बुद्धधर्माचें पुष्कळ प्राबल्य होतें असें दिसतें. परंतु इसवी सनाच्या ५०० च्या सुमारास हूण लोकांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या, व त्यांनीं गुप्तघराण्याचें साम्राज्य मोडून टाकलें. परंतु पुढें हूणांची सत्ता फार दिवस टिकली नाहीं. ठाणेश्वरच्या हर्षवर्धनानें मोठें साम्राज्य स्थापिलें, परंतु त्याच्या पश्चात् त्याचाहि नायनाट झाला, व सन ७०० पासून १०२४ पर्यंत कनोजच्या घराण्याचें साम्राज्य चालू झालें. सुमारें ७०० पासून मथुरेतून बुद्ध व जैनधर्म पार नाहींसा झाला व मथुरा हें कृष्णाच्या भक्तीचें मोठें स्थान झालें, व तेव्हांपासून तें हिंदु लोकांचें काशीप्रमाणेंच फार मोठें पवित्र स्थान बनलें; व म्हणून मुसलमानी स्वाऱ्या येऊं लागल्यापासून सोमनाथाप्रमाणें मथुरा हेंहि एक मुसलमानांचें मोठें लक्ष्यस्थान बनलें. सर्व मुसलमानी अंमलांत मथुरेची अवस्था मोठी कठिण होती. कारण, आग्रा व दिल्ली या दोन मुसलमानी राजधान्या बनल्यामुळें मथुरा या हिंदु पवित्रस्थानाची फैचीच्या दोन पातींत सांपडल्याप्रमाणें हुबेहुब स्थिति झाली.

गिझनीच्या महमदानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी १००१ मध्यें केली. त्यानें एकंदर अशा बारा स्वाऱ्या केल्या, हें इतिहासज्ञांस महशूरच आहे. त्यांपैकीं नववी स्वारी त्यानें १०१७ मध्यें केली. या स्वारींत त्यानें मथुरा शहर लुटलें व तेथलीं हिंदु देवळें उध्वस्त केलीं. या लुटीमुळें शहराची फारच नासाडी झाली. पुढें अकबराच्या काळापर्यंत या शहराची फारशी माहिती मिळत नाहीं. परंतु मुसलमानी धर्मवेड्या राजांचा हिंदुधर्माचें एक मुख्य ठिकाण म्हणून या शहरावर नेहमीं डोळा असे; यामुळें शहराची भरभराट होऊं शकली नाहीं. परंतु अकबराच्या कारकीर्दीतील सहिष्णुतेच्या धोरणानें मथुरा व वृंदावन या शहरांनां पुन्हां धार्मिक महत्त्व आलें, व या शहराची व तेथील गोसाव्यांची कीर्ति इतकी वाढली, कीं, अकबराला त्यांनां भेटण्याची इच्छा झाली, व अकबराचे डोळे बांधून त्याला वृंदावनांतील अत्यंत पवित्र अशा तुळशी वृंदावनाच्या राजीमध्यें आणिलें, व तेथील आश्चर्यकारक देखावा पाहून या स्थानाच्या पवित्रपणाबद्दल अकबराची खातरी झाली. या गोष्टीचें स्मारक म्हणून तेथील लोकांनीं बादशहाच्या परवानगीनें गोविंददेव, गोपीनाथ, युगलकिशोर व मदनमोहन या नांवानें प्रसिद्ध असणारीं देवळें बांधलीं. जरी हीं शहरें व हा प्रांत मोंगलांच्या ताब्यांत होता, तरी औरंगझेबापर्यंत या शहराला ग्रास पोंचला नाहीं. परंतु औरंगझेबाच्या कारकीर्दीत मात्र या पवित्र स्थानाचा फार छल झाला. औरंगझेबाचा थोरला मुलगा मथुरा शहरांत जन्मला, व त्यानें राज्यावरील आपला हक्क मथुरेमध्यें प्रथमतः जाहीर केला. मथुरेस एक मुसलमान अधिकारी नेमला गेला. त्यानें हल्लीं मथुरेत असलेली प्रसिद्ध मशीद बांधली. येथे जाट लोकांचें बंड झालें. औरंगझेबाला आपल्या हिंदुधर्माविरुद्ध मोहिमेस ही एक आणखी भर पडली असें वाटलें. त्यानें स्वतः मोठ्या सैन्यानिशीं मथुरेस येऊन मथुरा व वृंदावन येथील उत्तम उत्तम देवळें पाडलीं. विशेषतः त्याचा डोळा केशवदेव या फार पवित्र मानलेल्या देवळावर होता. तें देऊळ पार पाडून

ट्रेझो टॅबलेट्स—दुसऱ्या कोणत्याहि औषधानें गुण न येईल तर कसल्याहि प्रकारच्या मलाकडुसीवर या वड्या चाखून पहा!

त्याच्याच पायावर औरंगझेबानें मोठी मशीद बांधविली. औरंगझेबाचें धर्मवेड इतकें वाटलें, कीं, त्यानें मथुरा-वृंदावन हीं नांवेंच इतिहासांतून नाहींशीं करण्याचा बेत केला. व मथुरेला कागदोपत्रीं इसलामाबाद व वृंदावनास मुमीनाबाद अशीं नांवें ठेविलीं. परंतु ज्याप्रमाणें औरंगझेबाच्या पश्चात् मोंगलांचा अंमल नामशेष झाला, त्याप्रमाणें या शहराचीं हीं नांवेंहि कागदोपत्रींच राहिलीं. औरंगझेबाच्या पश्चात् जाट व मराठे यांनीं आग्यादिल्लीपर्यंतच्या मुलखावर आपलें वर्चस्व स्थापलें व त्यामुळें कांहीं दिवस मथुराप्रांत जाटांच्या ताब्यांत होता, तर कांहीं दिवस मराठ्यांच्या ताब्यांत होता. पुढें इंग्रजांचीं व मराठ्यांचीं उत्तर हिंदुस्थानांत पुष्कळ वेळां युद्धें झालीं व मथुराप्रांत १८५० मध्यें इंग्रजांच्या ताब्यांत आला. १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं मथुरेसहि या बंडाचा थोडाफार प्रादुर्भाव झाला होता. परंतु तेथल्या मुख्य शेटजीच्या घराण्याच्या राजनिष्ठेमुळें मथुरेचा बराच बचाव झाला, व मथुरा शहराला बंडाबद्दल फारसें कडक प्रायश्चित्त भोगावें लागलें नाहीं. तेव्हांपासून या शहराची सारखी भरभराट होत आहे.

आतां मथुरावृंदावनासंबंधीं एका गोष्टीचा विचार करावयाचा राहिला. मथुरावृंदावन आणि कृष्णजन्म व कृष्णलीला यांचा आपल्या पुराणाप्रमाणें फार निकट संबंध आहे, व ह्मणून मथुरा हें राधाकृष्णाच्या भक्तिपंथाचें फार मोठें पवित्र स्थान आहे. सेव्हां या पंथाचें थोडेंसें विहावलोकन करणें गैरवाजवी होणार नाहीं. माझ्या बालपणापासून कृष्णजन्माच्या व कृष्णलीलांच्या कथा मला चिरश्रुत असल्यामुळें मला मथुरावृंदावन पाहण्याची विलक्षण जिज्ञासा होती. परंतु प्रत्यक्ष मथुरेंतील पवित्र स्थानें पाहून, तसेंच त्यांचें व तेथील देवळांचें अर्वाचीनत्व पाहून, माझी फार निराशा झाली, व हल्लींचें मथुरा शहर व हल्लींची कृष्णभक्ति हीं बरींच अर्वाचीन असावीं, अशी माझी कल्पना झाली. ह्मणून यासंबंधानें मी चवकशी करूं लागलों, तों मला समजलें, कीं, माझे पूज्य गुरुवर्य डॉक्टर सर भांडारकर यांनीं वैष्णव पंथाच्या उदयाबद्दल एक ग्रंथ लिहिला असून तो जर्मनीमध्यें छापला जात आहे. त्यांत कृष्णाची कथा व कृष्णभक्ति यांची उत्पत्ति व वाढ यांचा इतिहास सांगितला आहे; ह्मणून मी डॉक्टरसाहेबांकडे जाऊन त्या ग्रंथाची एक हस्तलिखित प्रत मागून घेतली. डॉक्टरसाहेबांनीं ती मोठ्या आनंदानें मला दिली व त्यांतील माहितीचा उपयोग करण्याची परवानगी दिली, याबद्दल मी डॉक्टरसाहेबांचा फार ऋणी आहें. या पुढील मजकुरांत त्यांच्या ग्रंथांतील पुष्कळ माहितीचा उपयोग केलेला आहे; हें निराळें सांगावयास नकोच.

कृष्णचरित्राबद्दल आपण विचार करूं लागलों, ह्मणजे कितीतरी गोष्टींबद्दल शंका उत्पन्न होतात. प्रथमतः ही चमत्काराची गोष्ट वाटते, कीं, महाभारतांमध्यें जो सूत्रधार वाटतो, महाभारतांतील प्रचंड युद्धांमध्यें ज्याच्या कारस्थानाला एकप्रकारें प्रमुखस्थान दिलें आहे, त्या कृष्णाची जन्मकथा व त्याच्या बालपणच्या आयुष्याची हकीगत महाभारतांत कोठेंहि दिसत नाहीं. शांतिपर्वाच्या नारायणीय प्रकरणांत कृष्णाच्या अवताराचा व कंसवधाचा भविष्यत्काळीं होणाऱ्या गोष्टींप्रमाणें मात्र उल्लेख आहे. कृष्णजन्म व त्याचा बालपणचा गोकुळांतील वास व तेथील गोपींशीं त्याची क्रीडा, वगैरे भाग सविस्तरपणें हरिवंशांत व भागवतांत मात्र दिसून येतात. परंतु हे ग्रंथ महाभारतापेक्षां फारच अर्वाचीन आहेत. तसेंच भगवद्गीतेंतील उदात्त तत्त्वज्ञान शिकविणारा, महाभारतांतील राजकीय कारस्थानांत गुंतलेला, व केव्हां केव्हां कुटिल नीतीनें कां होईना, परंतु सत्पक्षाच्या बाजूनें भांडणारा कृष्ण, व सोळा सहस्र बायका असणारा, गोपींशीं अनिर्बंध व्यवहार करणारा, अत्यंत विलासी व विषयलंपट असा गोकुळींचा कृष्ण हे एकच असावे. याबद्दल शंका येते. थिऑसॉफिक पंथी लोकांनीं गोपींच्या व्यवहाराला कितीहि आध्यात्मिक स्वरूप दिलें असलें, तरी हा मागूनचा विचार आहे, यांत शंका नाहीं. या सर्व शंकांचें निरसन डॉक्टर सर भांडारकरांनीं काढलेल्या कल्पनेनें उत्तम तऱ्हेनें होतें. डॉक्टर भांडारकरांचें ह्मणणें असें आहे, कीं, हल्लीं जी कृष्णाच्या आयुष्याची गोष्ट हरिवंशांत व भागवतांत दिसते, ती दोन गोष्टींच्या भेसळीनें झालेली आहे. विशेषतः भगवद्गीतेचा कृष्ण व गोकुळींचा कृष्ण या दोन निरनिराळ्या व्यक्ति असाव्या. पहिलीला त्यांनीं वासुदेवकृष्ण व दुसरीला गोपालकृष्ण ह्मटलें आहे. कृष्णाला कृष्ण हें नांवहि मागाहून मिळालेलें दिसतें. मूळचें नांव वासुदेव हेंच असावें. यादवकुळांतील वृष्णिवंशांत उत्पन्न झालेले वासुदेव व बलदेव

ट्रेझो टॅबलेटस्—अर्धशिशी, मस्तकशूळ, व इतर कसल्याहि मस्तकदुखीवर रामबाण इलाज हाच आहे!

या नांवानें प्रसिद्धीस आलेले दोन क्षत्रियकुमार असावे, त्यांनीं आपल्या मामाला मारून मथुरेचें राज्य मिळविलें असावें व पुढें कालयवन या नांवाच्या म्लेंच्छ राजानें मथुरेवर स्वारी केली असावी, व ह्मणून त्यांनां मथुरा सोडून द्वारकेस जावें लागलें असावें. अशाप्रकारची ऐतिहासिक पुरुषांची मूळची गोष्ट असावी, व पुढें या पुरुषांनां देवाचे अवतार असें मानण्यांत आलें असावें, व मग वासुदेवभक्ति सुरू झाली असावी. कृष्णाच्या जन्माची कथा व त्याचा गोकुळांतील वास या गोष्टी आबालवृद्धांनां ठाऊकच आहेत. तेव्हां त्याची येथें पुनरुक्ति करण्याची गरज नाहीं. परंतु ही एक ऐतिहासिक घडलेली गोष्ट असावी, अशाबद्दल पाली भाषेंत एक गोष्ट आहे, त्यावरून दिसून येतें, व ऐकीव गोष्टीमध्यें ज्याप्रमाणें थोडाफार फरक होत जातो, तेवढाच फरक या गोष्टींत दिसून येतो. तेव्हां वासुदेवाच्या आयुष्याच्या हकीगतीची गोष्ट बरीच खुनी दिसते. पालीतील या गोष्टीला घटजातक ह्मणतात. ती गोष्ट थोडक्यांत अशी आहे:-

पूर्वी एकदां उत्तरापथ देशांत कंस प्रांतांत असितंजना नांवाचें शहर होतें. तेथें महाकंस नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला कंस आणि उपकंस या नांवाचे दोन मुलगे व देवगब्भा नांवाची एक मुलगी झाली. मुलीच्या जन्मकाळीं ब्राह्मणांनीं 'या मुलीच्या पोटीं झालेल्या पुत्रापासून कंसकुलाचा नाश होईल' असें भविष्य वर्तविलें. राजाला मुलगी प्रिय असल्यामुळें त्याच्यानें तिला मारविलें नाहीं. आपले मुलगे काय पाहिजे तें करोत असें ह्मणून तो मेला. त्याच्यानंतर कंस राज्यावर आला, व उपकंस एका प्रांताचा अधिकारी झाला. आपल्या बहिणीला ठार मारल्यास आपल्याबद्दल फार गवगवा होईल, असें जाणून त्यानें तिला अविवाहित ठेवण्याचा विचार करून तिच्याकरितां एक चाटोळा मनोरा तयार करून त्यांत तिला कोंडून ठेविलें. नंदगोपा व तिचा पति अंधकवेणू हीं देवगब्भेच्या तैनातीस होतीं. उत्तरमथुरेत महासागर या नांवाचा राजा होता. त्याला सागर व उपसागर नांवाचे दोन मुलगे होते. महासागराच्या पश्चात् सागर राज्यावर आला व उपसागर एका प्रांताचा अधिकारी झाला. उपकंस व उपसागर यांची फार मैत्री होती. उपसागरानें सागराच्या राणीमहालांत कांहीं खटपट केली, व ती उघडकीस आल्यावरून उपसागरास तेथून हाकलून देण्यांत आलें. तो उपकंसाच्या प्रांतात आला. उपकंसानें आपल्या मित्राची राजाशीं ओळख करून दिली. राजाच्या भेटीला जात असतां त्यानें तो मनोरा पाहिला, व त्याबद्दल हकीगत विचारली; आणि देवगब्भेबद्दल हकीगत कळल्यावर तिच्यावर त्याचें प्रेम जडलें. एके दिवशीं देवगब्भेनें राजाकडे जातांना उपसागरास पाहिलें व तिनें त्याच्याबद्दल नंदगोपेजवळ चवकशी केली; व हा महासागराचा मुलगा आहे असें समजल्यावर तिचेंहि त्याच्यावर प्रेम जडलें. उपसागरानें नंदगोपेजवळ देवगब्भेला भेटण्याबद्दल गोष्ट काढली, व तिनें दोघांची मनोऱ्यांत एकांतांत गांठ घालून दिली. पुढें देवगब्भेला गर्भ राहिला. ही गोष्ट कंसाच्या कानावर गेली. देवगब्भेला क्षमा करण्याचें वचन घेऊन नंदगोपेनें खरा प्रकार त्या दोघां भावांनां सांगितला. तो ऐकिल्यावर भावांनीं विचार केला, कीं, 'आपल्या बहिणीला आपल्याला मारतां येत नाहीं; हिला मुलगी झाली तर बरेंच; मुलगा झाला तर मारूं,' असें ह्मणून त्यांनीं देवगब्भेचा उपसागराशीं विवाह करून दिला. पूर्ण दिवस झाल्यावर देवगब्भा कन्यारत्न प्रसवली. त्या भावांनां आनंद झाला. मुलीचें नांव अंजना ठेवून त्यांनीं देवगब्भा व उपसागर यांनां गोवद्धमान नांवाचें खेडें राहण्यास दिलें, व तेथें तीं आनंदानें राहूं लागलीं. देवगब्भा पुन्हां गरभार राहिली, व त्याच वेळीं नंदगोपाहि गरभार राहिली. पूर्णमास झाल्यावर एके दिवशीं देवगब्भेला मुलगा व नंदगोपेला मुलगी झाली. आपल्या मुलाला आपले भाऊ मारतील या भीतीनें देवगब्भेनें गुप्तपणें आपला मुलगा नंदगोपेकडे पाठविला, व तिची मुलगी आपल्याकडे आणविली. याचा त्या भावांनां मागमूसहि लागला नाहीं. याप्रमाणें देवगब्भेस दहा मुलगे झाले, व नंदगोपेस दहा मुली झाल्या. देवगब्भेचे मुलगे अंधकवेणूच्या घरीं वाढत चालले. हे मुलगे मोठे बलवान् निपजले. त्यांच्यापैकी पहिल्या दोघांचीं नांवें वासुदेव व बलदेव अशीं होतीं. हे मुलगे मोठे झाल्यावर खेड्यांतील लोकांशी दांडगाईनें वागूं लागले, व त्यांच्या मालमत्तेची लुटालूट करूं लागले. यावद्दल कंसाकडे तकरार नेण्यांत आली. राजानें अंधकवेणूस बोलावून मुलांच्या अत्याचारावद्दल

सनःचें हाल व पैशाची खराबी करूं नका ! कोणत्याहि मस्तकशूळावर ट्रेझोच्या वड्या प्रथम वापरा, ह्मणजे दुसऱ्या औषधांची मग जरूर लागणार नाहीं.

त्याची कानउघाडणी केली. आणखी एकदोनदां तकार आल्यामुळें राजानें अंधकवेणूस मरणाची भीति घातली. अंधकवेणूनें राजाकडून अभयवचन घेऊन हे मुलगे आपले नव्हत, ते देवगम्भेचे मुलगे आहेत, असें सांगितलें. राजानें आपल्या मंत्र्यांनां विचारलें "आतां यांनां कसें धरावें ?" मंत्र्यांनीं सांगितलें "ते मोठे मल्लयोद्धे आहेत, तेव्हां शहरांत मल्लयुद्धाचा आखाडा तयार करावा व ते आले म्हणजे त्यांनां पकडून ठार करावें." राजानें त्यांच्या सांगण्याप्रमाणें शहरांतील चाणूर व मुष्टिक या दोघां मल्लयोद्ध्यांनां आपला बेत कळविला व "आजपासून सात दिवसांनीं मल्लयुद्धाचा खेळ होईल," म्हणून सर्व शहरांत ढाही फिरविली, व आपल्या राजवाड्यासमोर प्रचंड आखाडा तयार केला. लोकांच्या झुंडीच्या झुंडी पाहण्यास जमल्या. वासुदेव-बलदेवप्रभृति सर्व बंधू त्या खेळाला आले. वाटेंत त्यांनीं शहरांतील शिंप्यांपासून, माळ्यांपासून, गंध्यांपासून कपडे, सुगंधी सामान व माला हिसकावून घेऊन त्या अंगावर घालून ते आखाड्यांत येऊन सज्ज झाले. चाणूर व मुष्टिक हे मल्लयोद्धेहि आखाड्यांत आले. इतक्यांत बलदेवानें एक दोरखंड घेऊन तें चाणूराच्या कमरेभोंवतीं गुंडाळून ती दोरी घट्ट आवळून त्यानें चाणूरास पटकन् उचलून गरगर फिरविलें व त्याला जमिनीवर आपटलें व मग आखाड्याच्या बाहेर फेंकून दिलें. नंतर मुष्टिक आला. त्यालाहि बलदेवानें मुष्टिप्रहार केला. "मी मल्लयोद्धा नाहीं!" असें तो ओरडूं लागला. "मल्लयोद्धा अस अथवा नस—मला सारखेंच आहे!" असें म्हणून बलदेवानें त्यालाहि जमिनीवर आपटून त्याचा प्राण घेतला. मुष्टिक मरतां मरतां म्हणाला "मी भूत होऊन यांचा घात करीन." इतकें झाल्यावर राजा म्हणाला "या दहाजणांनां मेथून घेऊन जा." इतक्यांत वासुदेवानें त्या दोघां भावांवर एक चक्र फेकलें व त्याच्यायोगेंकरून त्यानें दोघां भावांचीं डोकीं उडविलीं.

याप्रमाणें आपल्या मामांनां मारून त्या भावांनीं तेथलें राज्य मिळविलें व आपल्या मातापितरांनां असितंजना शहरीं आणिलें. पुढें त्यानीं सर्व हिंदुस्थान जिंकण्याचा बेत केला. ते कालसेन राजाच्या अयोध्या शहरीं आले व राजाचा पराभव करून त्यांनीं तें राज्य मिळविलें. पुढें ते द्वारावतीस आले. त्या शहराच्या एका बाजूस समुद्र व दुसऱ्या बाजूस पर्वत होता व त्या शहरांत एक भूत होतें; कोणी शत्रु आल्यास तें भूत गाढवाचें रूप घेऊन ओरडत असे, आणि असें झालें म्हणजे ती द्वारावती हवेंत उडून जाऊन समुद्रांतील एका बेटावर जाई, व शत्रु परत गेल्यावर परत आपल्या जागेवर येई. यामुळें तें शहर काबीज करणें अशक्य होतें; म्हणून ते बंधु कृष्ण-दीपायनाकडे गेले. त्यानें त्यांनां त्या गाढवाला प्रसन्न करण्याची युक्ति सांगितली, व गाढवानेंहि शहराच्या चार द्वारांजवळ चार लोखंडी खांब पुरून त्यांनां चार लोखंडी नांगर सांखळ्दंडांनीं बांधाल, तर मी ओरडलों तरी शहर उडणार नाहीं, असें सांगितलें." बंधूंनीं सांगितल्या-प्रमाणें केलें व म्हणून शहर त्यांच्या ताब्यांत आलें.

क्रमाक्रमानें त्यांनीं सर्व हिंदुस्थान जिंकलें व सर्व राज्याचे दहा भाग करून त्यांनीं आपसांत वांटून घेतले. ते बहिणीला विसरले होते, परंतु शेवटच्या भावानें आपला वांटा त्या बहिणीस देऊन तो व्यापार करून आपलें पोट भरूं लागला. या सर्व भावांनां पुढें पुत्रपौत्र झाले. एकदां वासुदेवाचा पुत्र वारला. त्यामुळें त्याला अत्यंत दुःख झालें व तें आवरेना. परंतु घटपंडित म्हणून त्या भावांपैकीं जो शहाणा भाऊ होता, त्यानें अशक्य गोष्टीबद्दल शोक करणें बरें नव्हे, असें आपल्या भावाच्या मनांत बिंबवून त्याचें दुःख नाहींसें केलें.

पुष्कळ काळानंतर एकदां या भावांच्या पुत्रांनां वाटलें "कृष्णदीपायन (कृष्णद्वैपायन) यांनां दिव्य दृष्टि आहे असें म्हणतात. तर त्यांची आपण परीक्षा करूं या." तेव्हां त्यांनीं एका तरुण मुलास बायकोचा वेष देऊन त्याच्या पोटावर उशी बांधून त्याला गरभार बाई बनविलें, व कृष्णदीपायनापुढें त्याला उभें करून "ही बाई बाळंत केव्हां होईल?" म्हणून विचारलें. कृष्णदीपायनानें अन्तर्दृष्टीनें पाहिलें, कीं, दहा भावांचा नाश समीप आला आहे, व आपणहि आजच मरणार. तेव्हां तो म्हणाला "आजपासून सातवे दिवशीं या मनुष्याला एक खदीर झाडाची गांठ मूल होईल, व ती गांठ जरी तुम्हीं जाळून तिची राखरांगोळी केलीत, तरी ती वासुदेवाच्या कुळाचा नाश करील."

प्रवासाचा मित्र ! ट्रेझोच्या मस्तकशूळावरील वड्या नेहमीं जवळ बाळगाव्या,
म्हणजे जरूर पडतांच उपयोग करितां येईल.

पंथाच्या मताप्रमाणें कृष्ण हाच खरोखरी परमात्मा आहे, व या कृष्णपरमात्म्याबरोबर क्रीडा करण्यास मिळणें हाच खरा मोक्ष आहे. जे कृष्णाची भक्ति करतात त्यांनांच कृष्ण आपल्या सहवासांत व आपल्या खेळांत घेतो. ही भक्ति ईश्वरच मनुष्याच्या मनांत उत्पन्न करतो. प्रथमतः मनुष्याच्या मनांत ईश्वराविषयीं आवड उत्पन्न होते. यामुळें मनुष्य ईश्वराविषयीं ज्ञान मिळवूं लागतो. यालाच प्रेमभक्ति म्हणतात. हिची पहिली पायरी प्रेम होय; दुसरी पायरी आसक्ति होय; तिसरी पायरी व्यसन होय. या व्यसनानें मनुष्याला परमेश्वर जिकडेतिकडे दिसूं लागतो. अशी अवस्था प्राप्त झाली म्हणजे कृष्णपरमात्मा त्या भक्ताला आपल्या खेळांत निरनिराळ्या स्वरूपांत घेतो, व ही स्थिति धर्मार्थकाममोक्ष या चारही अर्थापेक्षां श्रेष्ठतर आहे. कृष्णानें गोपींशीं ज्याप्रकारें क्रीडा केली त्याच तऱ्हेची या भक्तांशीं त्याची क्रीडा होते व या क्रीडेमध्यें सामील होणें हेंच प्राण्याचें इतिकर्तव्य आहे. ही भक्ति उत्पन्न होण्यास खालील मार्ग वल्लभानें सांगितला आहे. हा मार्ग म्हणजे श्रीकृष्णाची व वल्लभाचार्यांची पूजाअर्चा करणें हा होय. मनुष्यानें प्रातःकाळीं उठावें, भागवत हें नांव उच्चारावें, व प्रातर्विधि करून देवाच्या पायाचें थोडें पाणी प्यावें, व मग पूर्वेस तोंड करून गुरूचें नांव घ्यावें; नंतर कृष्णाला नमस्कार करावा, नंतर यमुना व गोपी यांनां वंदन करावें, कृष्णानें खाल्लेल्या तांबुलाचें सेवन करावें व स्नान वगैरे करून व चंदन अंगाला लावून मग देवळाचें दार उघडून देवाच्या शय्येवरील माला वगैरे बाहेर आणून त्याची निजावयाची खोली साफ करावी. मग एक गाणें म्हणून कृष्णाला उठवावें. नंतर राधाकृष्णाला नमस्कार करून त्यानां स्नान वगैरे घालून त्यांनां नैवेद्य दाखवावा. मग पुनः कृष्णाला पाळण्यांत घालून निजवावा. नंतर दोनप्रहरचें जेवण आणावें. याप्रमाणें देवाचे सर्व विधि लहान मुलाप्रमाणें करावयाचे, हींच देवाची पूजा व भक्ति. या पंथामध्यें विषयनिरोधाचा उपदेश कमीच आहे. उलट विलासांतच मोक्ष आहे, अशा प्रकारची कल्पना या पंथाच्या उपासनाक्रमांत आहे, व आह्मी मागें मथुरेच्या वर्णनांत देवाची याचप्रमाणें पूजाअर्चा चालते, व भाविक लोक हे सर्व विधि अंधश्रद्धेनें अजूनहि करतांना दिसतात याचें वर्णन दिलेंच आहे.

वल्लभाच्याच सुमारास बंगाल्यांत चैतन्य उदयास आला. याचा जन्म १४८७ मध्यें झाला. याचा लहानपणींच विवाह झाला होता. पुढें मोठेपणीं यानें संन्यासाश्रम स्वीकारला व आपल्या पंथाचा प्रसार केला. वल्लभानें कृष्णभक्तीमध्यें विधि व बाह्य पूजा यांचें बंड माजविलें; चैतन्यानें भक्ति अंतरंग पाहिजे व ती भजनानें व कीर्तनानें उत्पन्न होते, असें प्रतिपादन केलें. दोघांचीहि मोक्षाची कल्पना सारखीच होती. परलोकांमध्यें श्रीकृष्णपरमात्म्याबरोबर खेळावयास मिळणें हाच खरा मोक्ष होय, असें दोन्ही पंथांचें मत आहे. चैतन्यपंथांत कृष्णाइतकाच किंबहुना एक कांकणभरमात्र जास्त मान राधेला आला. राधेची भक्ति करणें हेंच मोक्षाचें साधन बनलें.

वरील या पंथांच्या हकीकतीवरून गोपालकृष्णाची भक्ति ही गेल्या चारपांचशें वर्षांच्या आंतील आहे, हें स्पष्टपणें दिसून येईल. मथुरावृंदावन पाहणाराच्या हीच गोष्ट प्रथमतः मनांत येते. तेथील सर्व प्रकार फार जुने भासत नाहींत. देवळें तर अगदीं नव्यासारखीं दिसतात. मथुरावृंदावनांत या चारी प्रकारच्या वैष्णवपंथांचे पुष्कळच लोक आहेत. इतर जातींचे व सामान्य हिंदुधर्मावर भरंवसा ठेवणारेहि पुष्कळ हिंदु आहेत.

हें मथुरावृंदावनवर्णन फारच वाढलें. परंतु वाचकांनां ही हकीगत वाचून कांहींतरी करमणूक होईल, व आपल्या हिंदुधर्माच्या कित्येक पंथांचा किती लांबवर इतिहास पोंचतो हें ध्यानांत येईल, म्हणून ही हकीगत थोड्या विस्तारानें दिली आहे. या खेपेच्या माझ्या प्रवासाचें सविस्तर वर्णन देण्याचें मासिक मनोरंजनाच्या वाचकांस मीं पहिल्या लेखांत वचन दिलें होतें, त्या वचनांतून मी मुक्त झालों, याबद्दल मला एकप्रकारचा आनंद वाटत आहे. तरी मीं पाहिलेल्या सुंदर व पवित्रस्थानांची रजा घेतांना चिरपरिचित मित्राची रजा घेतांना जसें मनाला वाटतें, तशीच माझ्या मनाची आतां स्थिति झाली आहे. या पंचाध्यायीच्या पुराणश्रवणानें वाचकांनां प्रवासाची इच्छा होवो व त्यांनां हिंदुस्थानांतील पवित्र स्थानांचें दर्शन घडो, अशी इच्छा करून वाचकांची रजा घेतों.

प्रत्येक स्त्रीस आपले केश सुंदर असण्याबद्दल अभिमान असतोच.
कामिनीया तेल वापरल्यानें केश फारच सुंदर होतात आणि वृद्धि पावतात.

तें मुख !

[लेखक—श्रीयुत रेंदाळकर.]

बंगालीवरून

तें सुन्दर मुख!—त्या सुंदर मुखाचें मी कसें वर्णन करूं ? त्याची स्मृति होतांच हृदय फाटून जातें, मस्तक भ्रमूं लागतें, कर्ण बधिर होतात, नेत्रांनां कांहींहि दिसेनासें होतें आणि साऱ्या शरीरांत तडित्प्रवाह जोरानें वाहूं लागतो ! दिव्यांगनांच्या कंठांतून वाहणाऱ्या मधुर संगीतलहरींप्रमाणें, दुरून येणाऱ्या वीणाझंकाराप्रमाणें, मंद मंद चंद्रप्रकाशांत गंगेच्या हृदयांतून बाहेर पडणाऱ्या अस्फुट विरह-गायनाप्रमाणें, नूतनविकसित कुसुमांचा परिमल वाहून नेणाऱ्या निदाघकालांतील संध्याकालच्या शीतल समीरणाप्रमाणें,—पण भाषेंत तसले शब्द नाहींत, मनुष्याची कल्पनाशक्तिहि वर्णनक्षम नाहीं, माझ्या स्वप्नमय कल्पनेंत तसलें कविल नाहीं, ओळींच्या अंगीं तितकी सहृदयता नाहीं, आणि जगांत त्याला उपमास्थलच नाहीं !—तसलें सुखप्रद, शांतिसंपन्न, सौंदर्यमंडित, पवित्रतापरिपूर्ण जगांत कांहींहि कोठेंच दिसत नाहीं ! हाय हाय ! त्या मुखाचें यथार्थ वर्णन मी कसें करूं शकणार ? तें मुख,— पण आतां तें कोठून माझ्या दृष्टीस पडणार ? तें मला एकदांहि पहावयाला खरेंच का मिळणार नाहीं ? माझी दुसरी कांहींहि इच्छा नाहीं; एकवार-फक्त एकवारच तें मुख माझ्या दृष्टीस पडावें—डोळ्यांची तृप्ति होई-पर्यंत एकदां त्याला पाहीन आणि त्याला पहात असतां एकदां अश्रु ढाळीन, आणि याकरितां काय पडेल तें मूल्य मी मोळ्या खुषीनें देण्यास तयार आहें ! एकवार पहावें-तें माझ्या जीवितांतील सर्वस्व एकवारच पहावें—आणि त्याला अश्रूचीं फुलें वहावींत, ही या हतभाग्याची चिरपोषित वासना. यांत कोणाचें नुकसान नाहीं, कोणाचें अनिष्ट नाहीं, कोणाच्या सुखाचा नाश होण्याचा संभव नाहीं, कोणाचें मन दुखावण्याचें कारण नाहीं; कोणाला समजणार नाहीं, कोणी ऐकणार नाहीं.—मग तें सुंदर मुख मला एकदा दिसेल ना ?

उत्कृष्ट वस्तूला मूल्य अधिक पडतें, हें मला ठाऊक आहे. गरजेप्रमाणें तें मूल्य वाढतें, हेंहि मी जाणून आहें. या विश्वाचा जर कोणी कर्ता असेल, तर मी त्याला विचारतों, कीं, तुला काय हवें आहे ? तें मुख पुनः एकवार दाखविण्याकरितां तुला काय पाहिजे ? माझें हें जीवित अथवा त्याहून दुसरें कांहीं—पण नको; घे, जीवितच घे ! जीवितांतील सर्वस्व घे ! माझें जीवितसर्वस्व तूं घेशील काय ? मग काय, शापच वर झाला ! घे रे—घे माझें जीवित !—तुला अगदीं मनापासून आशीर्वाद देईन, धन्यवाद देईन ! माझ्या जीविताचें सर्वस्व काय आहे ?—मर्मांतिक यातना, स्मृतीला होणारे सहस्र वृश्चिकदंश, सर्व कार्यांविषयीं औदासीन्य, ईश्वराविषयीं अविश्वास, हें माझ्या जीविताचें सर्वस्व ! हें तो घेईल ? हें काय सुखाचें जीवित ? ईश्वरावर अविश्वास हें काय सुखाचें जीवित ? तुझी आशा विश्वास ठेवा;—मला आशाच नाहीं ! तुझी स्वर्गीं असा किंवा नरकांत असा, कोठें तरी रहाणार आहां;—पण मला मुळीं तें अस्तित्वच नको आहे. मी दऱ्याखोऱ्यांत विलीन होऊन जाणार. तुझी वैकुंठवासी व्हाल, माझी केवळ माती होणार. या संसारांत तुमचें जें कांहीं हरवलें असेल, तें तुम्हांला पुनः परत मिळूं शकेल; माझें जें गेलें आहे तें पुनः परत मिळण्यास गेलेलें नाहीं ! तुझी सुखी असाल अथवा दुःखी असाल, पण जगाच्यापारांतील एकजण असणार; मी आगंतुक मात्र; आज आलों, उद्यां चालता होईन. तुझी अनंत कालांचे साक्षी; मी जलबुद्बुदाप्रमाणें अल्पजीवी. आतां उत्पन्न झालों तर क्षणांत नष्ट होणार ! माझ्याजवळ एकमात्र धन होतें. पण तेंहि मला कधीं वोगास देववलें नाहीं. तें स्वर्गाकरितां देववलें नाहीं, मोक्षाकरितां देववलें नाहीं, स्मृतीचा लोप व्हावा म्हणून देववलें नाहीं, मनामध्यें जे क्षणोक्षणीं विद्युत्तरंगाप्रमाणें प्रगट होणारे दिव्य आभास त्यांनां मूर्त स्वरूप देण्याची

कामिनीया तेल सर्व सुगंधी सामानाच्या दुकानांत मिळतें. एक बाटलीस रु. १.
तीन बाटल्यांस रु. २.८१०. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई

अलौकिक कला प्राप्त होणारी असती तरीहि देववलें नसतें; फार काय, इच्छामरणी होण्याचा अपूर्व योग आला असता तरी तें मला कोणास देववलें नसतें ! तें मोबदल्याचें धन नव्हतें, तें कोणाला देण्याकरितां मीं मिळविलेंच नव्हतें ! तें होतें तेव्हां मात्र मी खरा भाग्यवान् होतों. पण दुःखाची गोष्ट, कीं, तें होतें-आतां नाहीं ! कोणाला ठाऊक कोठें गेलें तें ? या हृदयरूपी पिंजऱ्यांत मीं एक पांखरूं बाळगिलें होतें. त्याला सुख लागावें म्हणून मीं किती यत्न केले, त्यावर मीं किती प्रेम केलें ! तें किती मधुर शब्द बोलत असे ! माझ्या जीवनांतील सुखसर्वस्व तें सुंदर पांखरूं एके दिवशीं पहातां पहातां पिंजरा फोडून अकस्मात् कोठें उडून गेलें ! त्याच्याकरितां मीं त्रिखंड शोधलें, पण त्याचा कोठेंहि पत्ता लागला नाहीं. ज्या ज्या दिशेकडे दृष्टि फेकावी तिकडे शून्यच दिसतें ! त्याचा शोध लागावा म्हणून किती धर्मपुस्तकें, किती दर्शनें मीं धुंडिलीं, परंतु त्याचा कोठें मागमूसहि लागला नाहीं. मीं त्यावर केवढें प्रेम केलें, त्याविषयीं मला केवढा आदर होता, पण सर्व व्यर्थ ! सारें मिथ्या ! पूर्वी प्रेम करीत होतों, आतां करीत आहें, पुढें जोंपर्यंत जिवंत असेन तोंपर्यंत करीन; पण माझें हें प्रेम मला दाखविणें मात्र झालें नाहीं. बोलावें बोलावें म्हणून कितीतरी दिवस मनांत असून मनांतील भाव केव्हांहि प्रगट होऊं शकला नाहीं. मी तिला देववाला म्हणून समजत होतों, त्यामुळें केव्हांहि तिच्यावरील माझें प्रेम मला स्पष्ट दाखवितां आलें नाहीं. कोणाला ठाऊक तिला काय वाटतें ? म्हणून मी आपलें प्रेम उघड करण्यास समर्थ नव्हतों. तिची हृदयांत स्थापना करावी तर कदाचित् मागाहून पश्चात्ताप होईल, म्हणून ती विरहिणीच्या विरहश्वासांनीं घडलेली, शारदीय ज्योत्स्नेनें निर्माण केलेली मुरवाला माझ्या हृदयांत धारण करण्याचें साहस मला करवलें नाहीं. आतां किंवा तेव्हांहि हें मला ठाऊकच होतें, कीं, तें मुखमंडल या लोकचें नव्हे.—हें जग शोक ताप दुःख, स्वार्थपरता, अपवित्रता, आणि पाप यांनीं भरलेलें आहे. आणि तें मुख तर प्रत्येक गुणानें अनुपमेय;—तेव्हां स्वर्गातून कांहीं नष्ट धनाचें अन्वेषण करीत करीत वाट चुकून या विषम जगांत येऊन पडलें असावें ! त्या स्वर्गभ्रष्ट कल्पलतेवर, त्या देववालेवर मी अनुराग करण्यास योग्य होतों काय ? पण हाय ! या विचारानें मीं तिजवरील प्रेम केव्हांहि व्यक्त केलें नाहीं—मनांतील साध्य मनांतच राहिलें. माझें प्रेमबीज भूमींतच वाळून गेलें ! बीजास अंकुर फुटण्यापूर्वीच ती कादंबिनी कोठें नाहींशी झाली ! मन अत्यंत विषण्ण झालें. जी प्रीतीची अधिदेवता, तिच्यावर मीं प्रेम केलें नाहीं ! माझ्या जीवनाचा आधार, माझ्या जीवितरूपी मरुभूमींतील ती एकमात्र पुष्करिणी, माझ्या हृदयाकाशांत चमकणारी उज्वल शुक्राची चांदणी, माझें सर्वस्व धन आतां कोठें गेलें ? काय झालें ? मनुष्य मृत झाल्यावर त्याचें काय होतें ? माती ? तें सुख, या साऱ्या जगांत ज्याच्यासारखें कांहींहि नाहीं तें सुख-हाय ! विधात्या हें तूं काय केलेंस ? तें सुख-जगांतील सर्व सौंदर्यांतील सार असें तें हास्यसुंदर मुख-माती झालें काय ? म्हणूनच मी म्हणतों, कीं, या जगांत न्याय नाहीं, जगाला नियंता नाहीं, विधान नाहीं, विश्वप्रणेत्यास विचार नाहीं, त्याला पवित्रापवित्राचें तारतम्य नाहीं, दया नाहीं, माया नाहीं, स्नेह-ममता कांहीं नाहीं ! केवळ निष्ठुरता-नृशंसता-परदुःखप्रियता, परसुखकातरता यांवांचून जगांत कांहींच नाहीं ! पण मी काय म्हणत होतों—बोलतां बोलतां विसरूनच गेलों !

तें सुंदर मुख ! तें सुंदर मुख हृदयांत येतांच हृदय भरून येतें, हृदयांत प्रवेश करून हृदयाचें हृदयत्वच हरण करितें, दुःखाची कहाणी बोलूंच देत नाहीं,—मग त्या मुखाची पूर्ण कल्पना होईल असें मी कसें वर्णन करूं ? कविकुलगुरूची अमृतनिष्यंदिनी कविता, प्रणयाचा प्रथमोच्छ्वास, समाधिस्थ प्राणाची स्मृति, पुष्पित लतिकावृंदांनीं वनविलेल्या निबिड कुंजांतून सायंकाळीं वहाणाऱ्या मंदानिलाचा निःश्वास, बाल्यकालाची सुखस्मृति, फार दिवस विसरलेल्या सुखस्वप्नाची अकस्मात् झालेली मधुर आठवण, चंचल क्षुद्र ऊर्मिमालांनीं शोभणाऱ्या मृदुनिनादिनी जान्हवीच्या विशाल वक्षावर पौर्णिमेच्या रमणीय रजनीप्रसंगीं मृदु पवनानें विकंपन पावणारी कौमुदी, किंवा माझे पूर्वीचे सुखाचे दिवस, त्यांसारखें तें सुख होतें ! तें मोहक मुख, प्रेमतुषारांचें वर्षण करणारी ती हास्यमय दृष्टि,—भीत हरिणशावका-

---

शहाणे लोक कामिनीया वेलच पसंत करतात. वाटलीवर कामिनीया नांव पाहून घ्या! कारण, कांहीं व्यापारी लोक जास्त नफ्याच्या आशेनें भलत्याच माल देतात!

प्रमाणें विलोल आणि पीयूषनिष्यंदिनी ती दृष्टि,—ती दृष्टि मला वारंवार सुचवीत असे, कीं, मी हा जड संसार जाणत नाहीं, तुला किंवा आपली कोणालाहि जाणत नाहीं. मी या जगांतील नव्हें. कोणाकरितांहि मी येथें रहाणार नाहीं ! आणि तें हास्य-तें जड जगासहि हंसविणारें हास्य-हृदयांतील सर्व भाव स्पष्ट दाखविणारें तें हास्य, तो सुंदर वक्षःप्रदेश, आणि त्यांत रहाणारें अनंत प्रेम !—अरेरे, नको-नको ती स्मृति ! देवा, हें सारें कोणीं निर्माण केलें ? ज्याप्रमाणें लहान मूल सुंदर गुलाबाचें फूल पायाखालीं चुरडून टाकतें, त्याप्रमाणें तें मुख कोणीं नाहींसें केलें ? पण त्यामुळें किती वासना निष्फळ झाल्या, किती साध्यें अपूर्ण राहिलीं, किती तृष्णा अतृप्त राहिल्या, किती आशा नष्ट झाल्या, आणि किती समाधिगत अनुराग, अधीर प्रेमें स्मृतीच्या अंधकारगव्हरांत धडपडत पडलीं ! ज्या दिवशीं मीं प्रथम तें मुख पाहिलें, तेव्हां माझा पूर्ण विश्वास होता, कीं, या दिव्य सृष्टीला निर्माण करणारा कोणीतरी असलाच पाहिजे. अंध नियमांनीं कांहीं हें कार्य साधलेलें नाहीं. परंतु पुढें ज्या दिवशीं ती तनुलता मृत्यूच्या कराल प्रभावानें निस्तेज झाली, ती वासंतिक वल्लरी शंझावातानें विच्छिन्न झाली, तें मृदु कुसुम निदाघकालांत कोमेजून गेलें, ती स्निग्ध चंद्रकला प्रभातकालीं मलिन झाली, माझी आशालता उन्मूलित झाली, तेव्हां ती दुर्बल देहलता मीं आपल्या हृदयाशीं धरून विचार केला, कीं, या दृश्य जगांत विचार नाहीं, करुणा नाहीं, परमुखाची कामना नाहीं,—त्या दिवसापर्यंतची सर्व स्मृति या हृदयांत आहे. पुढील आयुष्यांत मात्र माझी स्मृतिच नष्ट झाली ! दुसरें कांहींहि माझ्या हृदयांत पलमात्र वास्तव्य करूं शकलें नाहीं ! देवा ! तें मुख, ती देहलता निर्माण करण्यास तुझ्यावर कोणीं जुलूम का केला होता ? बरें, निर्माण करून ती नष्ट तरी कां केलीस ? केवळ आपलें कौशल्य दाखविण्याकरितांच काय तूं त्या अलौकिक सृष्टीची रचना केली होतीस ? मजसारख्या हतभाग्यास निराशानलांत दग्ध करण्यासच का तूं तिला निर्माण करून पुनः घेऊन गेलास ? हाय ! ज्या दिवशीं मी एकटा पडलों, त्या दुर्दिनाचें मी काय वर्णन करूं ! त्या दिवशीं माझा भाग्यसूर्य अस्तंगत झाला, माझा आनंद विषाच्या कल्लोलांत नष्ट झाला, प्रलयकालच्या झंझावाताच्या भेसुर गर्जनेंत तें प्रणयसंगीत विद्युत झालें ! ज्यानें माझ्या व सर्व आशांवर अग्नीचा वर्षा केला, माझ्या हृदयाचे फाडून फाडून तुकडे केले, त्या देवतेला—त्या आकाशस्थ तारेला दारुण मेघपटलांत तिमज्जित केलें, देवा, त्या अधमास तुला कांहीं शासन करवत नाहीं काय ? पण हाय ! मी दुसऱ्यास व्यर्थ कां दोष देत आहें ? या साऱ्या लीला, दयावंत ह्मणविऱ्या देवा, तुझ्याच आहेत ! पण अरे, माझें धन मजपासून नेतांना मला एकवार विचारायाचें तरी होतेंस ? पण तें कुठलें ? मला न विचारतां, माझी अनुमतिसुद्धां न घेतां, माझें अश्रुमलिन दीन वदन न पहातां, केवळ आपलीच इच्छा तूं पूर्ण केलीस ! फार चांगलें केलेंस ! यांत तुझा तरी काय दोष ? तुला योग्य तेंच तूं केलेंस ! तूं मोठा, मी क्षुद्र; तूं अनंतशक्तिमान्, मी दुर्बळ; या दृश्य जगांतील प्रत्येक वस्तु तुझी आहे, माझें कांहींच नाहीं ! तेव्हां माझें जीवनसर्वस्व, संसारसार, आनंदनिकेतन तूं हिरावून नेलेंस, तर तें सरळच झालें ! दीन मनुष्याला छळलें नाहीं, तर मग त्यांत महत्त्व तें काय राहिलें ? दुर्बलावर जो जुलूम करीत नाहीं, त्याची शक्ति काय कामाची ? जो हीनदीन, ज्याचें कोणी नाहीं, ज्याला बोलण्यास स्थान नाहीं, उभें रहाण्यास स्थल नाहीं, प्रेम करण्यास विषय नाहीं, ज्यावर कोणी प्रेम करीत नाहीं, ज्याचा भविष्यत्काळ अंधकारपूर्ण, भूतकाल अग्निमय-पण तो अंधकारापेक्षांहि दारुण, आणि ज्याच्या वर्तमान समयांत आलोक किंवा तिमिर कांहींच नाहीं !-केवळ उज्वल अंधकारांत, केवळ तमःपूर्ण प्रकाशांत विशाल मरुभूमि पसरलेली ! त्याला जो त्रास देणार नाहीं, त्याला जो पददलित करणार नाहीं, त्याचें काय महत्त्व ? तो मग श्रेष्ठ कसला ? आणि त्याला कर्तव्य तरी काय उरलें ? सिंह अरण्यांतील दुर्बल पशु पकडून भक्षण करितो-सिंह पशुराज ! सामान्य श्रेष्ठ प्राण्याची जर ही स्थिति, तर तूं तर साऱ्या ब्रह्मांडाचा राजा; मग मला तूं अश्रु ढाळावयास लावलेंस तर त्यांत आश्चर्य तें कसलें ? जे दुर्बल, जे दीन, जे क्षुद्र, त्यांनां जर "त्राहित्राहि" करावयास

पिरपिर करणारीं लहान मुलें निरोगी असावींत अशी आपली इच्छा आहेना ?
तर मग त्यांनां 'बालजीवनामृत' द्या.

लावलें नाहीं तर तूं ईश्वर तरी कसला ? अनाथांनां पायांखालीं तुडविणें हें तर थोरांचें काम ! ज्यांनां प्रतिकार करितां येत नाहीं, त्यांच्यावर जुल्म करणें हें तर मोठ्यांचें कर्तव्य ! मला वाटतें—पण मी काय बोलत होतों ?—बोलतां बोलतां विसरूनच गेलों !

तें सुंदर मुख ! माझ्या हृदयांत सांठविलेलें अमूल्य रत्न, तें हृदय फोडून कोणीं चोरून नेलें बरें ? या संसारांत जीं कांहीं सुखें, जे आनंद, जें विलोभन तें सर्व देऊनहि मला माझें हृदय पूर्ण करूं या ! त्या रत्नाकरितां मी हवें तें देईन. ज्यावेळीं तें रत्न माझ्याजवळ होतें, तेव्हां मला हा संसार अमृतमय वाटत होता, हें जग नंदनवनासारखें वाटत होतें. —पण आज त्यापैकीं काय राहिलें आहे ? त्यावेळीं माझी दृष्टि सौंदर्याच्या सिंधूमध्यें निमज्जन पावत होती, पण आज सर्वत्र शून्य झालें आहे ! तेंच हें मंदिर, तीच ही बाल्यकालांतील क्रीडाभूमि, तेच हे बांधवजन; लीलावती जान्हवी पूर्वीप्रमाणेंच आनंदानें डोलत हंसत हंसत चालत आहे; सौंदर्यवती कामिनीप्रमाणें तिचा ललित गतिविलास आतांहि तसाच चालू आहे; तिच्या तीरावर सुंदर पांखरें पूर्वीप्रमाणेंच मंजुल कलरव करीत खेळत आहेत; वधूच्या रहस्यालापाप्रमाणें त्यांचा अव्यक्त गायन-ध्वनि आकाशतल व्यापून टाकीत आहे ! हें सर्व पूर्वीचेंच आहे; पण मीमात्र पूर्वीचा नाहीं ! माझें सर्वस्व आज नष्ट झालें आहे ! तारागणांनीं विभूषित झालेलें हें विशाल नीलांबर आज मला निबिड अंधकारानें भरलेलें दिसत आहे ! या अनंत ब्रह्मांड-गोलांत आज दावानलाच्या प्रखर ज्वाला भडकत आहेत. जिकडे दृष्टि फेंकावी तिकडे शून्यच वाटतें. मनाला स्थिरता नाहीं, सौंदर्यांत रमणीयता नाहीं, गंधांत मधुरता नाहीं,—संगीतांत मोहकारित्व नाहीं, जगांत वैचित्र्य उरलें नाहीं, मनुष्यांत देवभाव राहिला नाहीं आणि अंतरांत काय नाहीं, कोणाला ठाऊक ! काय नाहीं ? माझ्या अंतःकरणांत काय नाहीं बरें ?

तें सुंदर मुख ! आतां नाहीं;-एकदां होतें, पण आतां नाहीं ! तें प्रेमपूर्ण मुख—तें रमणीय, सुंदर, मधुर, पवित्र मुख-तें अमरपुरांतील सौंदर्यानें मंडित झालेलें स्वर्गीय मुख-त्याचें वर्णन मी कसें करूं ?-तें निरुपम सुख-सर्व आनंदांचें उद्गमस्थान-तें सुखें कोणी हरण केलें ? या सृष्टीला कोणी नियंता नाहीं, कोणी विधाता नाहीं ? जर असेल तर तो अनंतशक्तिमान् आहे; पण महानिष्ठुर, पाषाणहृदय, त्याच्या निर्दयतेला सीमा नाहीं, यांत शंका नाहीं ! त्या ईश्वराला आत्मा आहे कीं नाहीं, त्याला विचारशक्ति आहे कीं नाहीं, हें मला ठाऊक नाहीं; पण हें मात्र मी अगदीं निश्चयानें सांगतों, कीं, त्याला हृदय मात्र नाहीं ! त्याला हृदय कां नाहीं, ईश्वरास मी निष्ठुर कां-ह्मणतों तें तुह्मांला ऐकावयाचें आहे काय ?

या जगांत कांहीं सुंदर, अलौकिक, हृदयस्पृक् आहे, हें कांहीं मला ठाऊक नव्हतें. तें मला जाणवावें, त्याच्या मोहांत मला पाडावें, त्याच्याकरितां मला वेड लावावें, याबद्दल विधात्यावर कोणीं जुल्म का केला होता ? मग मला त्यानें तें कां जाणवलें ? ज्यास मी केव्हांहि जाणत नव्हतों, तें मला कां जाणविलें ? बरें जाणविलें तर तें मजजवळ राहूं कां दिलें नाहीं ? देवा, तूंच दिलेंस आणि फिरून तूंच कां हरण करून नेलेंस ? जर तुझ्या मनांत न्याययाचेंच होतें तर प्रथम दिलेंस तरी कशाला ? दिलेंस तर नेलेंस कां ? बरें, नेलेंस तर त्याचें विस्मरण कां पाडीत नाहींस ? जें मला फिरून कधींहि मिळावयाचें नाहीं, त्याच्याकरितां रडून रडून मीं माझी दृष्टि घालवावी, हीच काय तुझी इच्छा ? जें गेलें, त्याच्याविषयींचें प्रेमहि नष्ट झालें पाहिजे. मग माझें प्रेम कां नष्ट होत नाहीं ? माझ्या नेत्रांपुढून जें कायमचें नाहींसें झालें, तें माझ्या हृदयांतून कां दूर होत नाहीं ? मी त्याला विसरावें विसरावें ह्मणतों, पण मला विसरवतच नाहीं ! हाच काय जगाचा नियम ? या नियमाला कांहीं तरी नियमितपणा आहे कीं नाहीं ? हा नियम नव्हे, ही तुझी स्वैरिणी इच्छा ! तूं मनांत आणशील तर देवा ! सर्व कांहीं सरळ होईल. मी खरोखर विचारूं नये, माझें दुःख मला पुरेसें आहे, पण सहज विचारतों, कीं, या संसारांत इतकें दुःख कां ? कुसुमांत कीटक कां ? चंद्रावर कलंक कां ? पुण्याचा मार्ग कठिण कां ? नरकाच्या मार्गावर फुलें पसरलेलीं कां असावीं ? सौंदर्य कां नष्ट व्हावें ? मनुष्याच्या हृदयांत निराशा कां प्रवेश करते ? हास्याच्या मागें शोक कां असतो ?

आजकाल 'बालामृता'चा जिकडे तिकडे सुळसुळाट झाला आहे. अशा वेळीं मुलांना खात्रीचें हितकारक औषध ह्मणजे बालजीवनामृतच होय ! अनुभव पहा.

प्रणयांत विरह कां असावा ? आशेंत अविश्वास कां उद्भवतो ? मनुष्य स्वार्थपर कां होतो ? दुसऱ्याच्या दुःखाविषयीं प्रत्येकजण बेफिकीर कां असतो ? मनांत जे दुःखाचे कढ येतात, त्याचें वर्णन करण्यास भाषेंत शब्द कां नाहींत ? हृदयामध्यें जी विकारांची खळबळ होते, ती मुखांतून प्रगट कां करवत नाहीं ? स्नेहांत आशंका कां असावी ? जें ज्याला आवडतें तें त्याला कां मिळत नाहीं ? जो ज्यावर प्रेम करितो, तें त्याच्यापासून नष्ट कां होतें ? वरें, नष्ट होतें त्याच वेळीं त्याला मरण कां येत नाहीं ? हें जड जगत् कां निर्माण झालें ? या मृत्तिकेपासून बनलेल्या शरीरांत सुखदुःखसमाकुल, स्नेहवात्सल्यपरायण, सौंदर्यलोलुप व पवित्रताप्रिय असें हृदय कां उत्पन्न केलें ? म्हणूनच मी म्हणतों, कीं, जर या विश्वाचा कोणी विधाता असेल तर तो मोठा निष्ठुर आहे ! जीवमात्राचें शुभ व्हावें ही त्याला इच्छाच नाहीं ! कोणाचें कल्याण त्याला पहावतच नाहीं ! दुसऱ्याचें दुःख त्याला कळत नाहीं ! कोणाच्याहि मुखाकडे तो दृष्टि वळवीत नाहीं ! त्याचे पाय दुःखाश्रूंनीं भिजविले तरी दुःखिताचे आर्तरव तो ऐकत नाहीं–तो मोठा निर्दय आहे ! जगांतील सर्व हास्य, सर्व आनंद, सर्व सुख, आपल्या लीलेनें नाहींसें करूनच केवळ त्याला समाधान होत नाहीं, तर त्या हानीची स्मृति मनुष्याच्या हृदयांत तो जागृत ठेवितो. सर्व सुख नष्ट झालें असतां दुःखाच्या दिवसांत गतसुखाची आठवण होणें म्हणजे किती दारुण तें दुःख ! म्हणूनच मी म्हणतों, कीं, विधात्यास हृदय नाहीं ! देवा ! तूं इच्छामय आहेस. केवळ तुझ्या मनांत येईल तर सर्व संसार सुखमय होऊन जाईल. पण तें तुझ्या हातून होत नाहीं म्हणूनच मी म्हणतों, कीं, तुला हृदय नाहीं ! संसारांत सुख नाहीं काय ? असेल. सुख नाहीं असें मी म्हणत नाहीं; पण तें अतिशय अस्थिर आहे. हा संसार केवळ दुःखमय आहे काय ? तसें असेल तर कांहीं तें इतकें असह्य होणार नाहीं. पण या अंधारांत सुखप्रकाश क्षणभरच पाहून सर्वांनां आपल्या दुःखाची जाणीव दिली जाते, म्हणूनच मी म्हणतों, कीं, या विधात्यास हृदय नाहीं. हा संसार हास्याच्या किरणांनीं प्रकाशित होत असतां पुनः अश्रुजलाची वृष्टि करावी लागते; म्हणूनच मी म्हणतों, कीं, या देवास हृदय नाहीं. पण काय माझें मन वेडें झालें आहे—पुनः विसरून गेलों ! काय वरें बोलत होतों मी ?

तें सुंदर मुख ! अहाहा ! संध्यासमीरणाच्या हिल्लोलांत आंदोलन पावणाऱ्या वासन्ती लतेप्रमाणें शोभणारें तें मोहक मुख—अर्धविकसित मल्लिकाकुसुमाप्रमाणें सुंदर दिसणाऱ्या अज्ञान अशा निद्रित बालकाच्या अधरावर सुखस्वप्नानें उत्पन्न होणाऱ्या मृदुमधुर मंद हास्याच्या लीलोत्सवाप्रमाणें हृदयविलोभन करणारें तें पवित्र मुख—कोणास ठाऊक, कोणच्या उज्ज्वल भावानें खचलेलें तें स्वर्गीय मुख—त्याचें वर्णन करावें म्हणतों, पण होतच नाहीं. तें मुख, हें पहा–नव्हे—आतां कोठलें तें दिसणार ! क्षणांत दिसणारें व क्षणांत अदृश्य होणारें तें मुख या हृदयांत—या हृदयांत–आहे –तें पहा–तें पहा–क्षणांत दूर जातें—जणांत जवळ येतें–पहा–आलें–जवळ आलें–हें पहा–धरिलें–नाहीं निसटलेंच शेवटी !

हाय ! हाय ! पूर्वजन्मांतर्गत सुखस्वप्नाप्रमाणें भासमान होणारें तें सुंदर मुख कोणीं बरें निर्माण केलें असावें ? कोणत्या साधनानें निर्माण केलें असावें ? कसें निर्माण केलें असावें ? आतां माझ्या मनांत ज्या विकारांचा उदय झाला आहे, ते मला कां बोलवत नाहींत ? हृदयामध्यें जें कांहीं कसेंसेंच होतें आहे, तें मुखांतून बाहेर कां पडत नाहीं ? माझ्या मनाची कथा ऐकावयास माझ्या मनासारखा श्रोता कां मिळत नाहीं ? माझ्या मनाचें दुःख—मला काय वाटतें तें मी कोणास सांगूं ? माझ्या दुःखाची ही कहाणी शांत मनानें कोण ऐकेल ? माझ्या अश्रूंशीं कोणाचे अश्रु मिळतील ? माझें दुःख जाणण्यास मनुष्य समर्थ आहे काय ? हाय ! माझें दुःख ऐकावयासमुद्धां का कोणी नाहीं ?

हाय ! हाय ! विधात्या ! माझ्या ललाटीं तूं कसलें भयंकर हें दुःख लिहिलेंस !

आपला चेहरा फिकट व निस्तेज कां दिसतो ? रोगामुळें अशक्त झाला असाल तर
प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका वापरा.

मुलांसाठीं गोष्ट.

सवदा अंगावर आला !

[लेखक—श्रीयुत विनीत.]



आमच्या गोष्टीचे दिवस आजकालचे नव्हत. शेकडों, हजारों वर्षांपूर्वी, जेव्हां पृथ्वीवर एकादा दुःखी प्राणी आहे कीं काय, म्हणून पाहण्यास आपल्या नंदीवर बसून भवानी-शंकरांची स्वारी पृथ्वीतलावर मुद्दाम येत असे, आणि त्या दुर्दैवी प्राण्याचें दुःख नाहींसें करून त्याला सुखसागरांत पोहूं लावीत असे, त्या काळची ही गोष्ट आहे. हल्लींचें कंटकमय जग दुःखानें इतकें भरलेलें आहे, कीं, शंकर-पार्वतीला पहिल्यासारखें सहल करण्याची इच्छा झाली, तर आतां त्यांनां सुखी प्राण्याच्याच शोधार्थ निघावें लागेल! परंतु सुखी प्राण्याची गांठ घेऊन शंकरपार्वतीला काय करावयाचें आहे? अलीकडे याच कारणामुळें—अथवा इतर अनेक कारणांवरोबरच्या या एका कारणामुळें—नंदीवर बसून पृथ्वीवर संचार करण्याचा उमामहेश्वरांचा परिपाठ बंद झाला असावा, असें वाटतें. असो.

वर सांगितलेल्या पुरातन काळीं उज्जयनी-नगरांत भगवान् 'महान्‌कालेश्वर' नांवानें प्रसिद्ध असलेल्या देवालयांत एक अत्यंत सालस, वृद्ध, आंधळा, पण समाधानी ब्राह्मण, देवळाच्या महाद्वाराजवळ एक धोतर पुढें पसरून सकाळपासून प्रहरघटका—रात्रीपर्यंत बसून रहात असे. त्या बिचाऱ्याला एक बायको आणि चार लहानलहान अपत्यें होतीं. त्या सर्वांचा चरितार्थ या आंधळ्यापुढें आलेल्या-भिक्षेवर होणें शक्यच नव्हतें. त्याच्या बायकोला लोकांचीं चार कामें करून संसाराचा गाडा ढकलण्यास मदत करावी लागे. भटजींचे दोन मुलगे मुंजीस मोठे झाले होते. त्यांच्या मुंजी कशातरी एकदां झाल्या म्हणजे दोघांनांहि मधुकरी मागण्यास मोकळीक होईल, म्हणून भटजींनां आणि त्यांच्या पत्नीला मोठी आतुरता उत्पन्न झाली होती. एक मुलगी आठ वर्षांची—अर्थात् 'उपवर' झाली होती. तिला एकदां कशीतरी उजवून टाकली, म्हणजे संसाराचा भार वराच हलका होऊन आपले उरलेले दिवस सुखांत जातील, असें या नवराबायकोंच्या मनांत वारंवार येई, आणि तसें तीं बोलनहि दाखवीत. सारांश, मुलांच्या मुंजी होणें आणि मुलीचें लग्न होणें म्हणजे आपला भाग्योदय होणें असेंच त्यांनां वाटत होतें. या भाग्योदयाची वाट ईश्वरावर निष्ठा ठेवून तें कुटुंब पहात होतें.

या दृढनिष्ठेमुळेंच त्यांच्या हल्लींच्या विकट आणि खडतर संसाराचा भार त्यांनां हलका झालासा मधुनमधून वाटत असे. नाहींतर कोण त्यांची ती दशा ! भाकर आहे तर कालवण नाहीं, हांतरूण आहे तर पांघरूण

मुलांचें पोट मोठें होणें, ढाळ होणें, नेहमी पिरपिर करणें, दांत चावणें वगैरे नाहींसें करण्यास बालजीवनामृतासारखा दुसरा उपाय नाहीं !

नाहीं ! आज भटजींचा पंचा फाटला, उद्यां मुलाचें आंगडें फाटलें, परवां घरभाड्याचें सहा महिन्यांचें थकलेलें भांडें द्यावयाचें, घरांतील भांडींकुंडीं फुटलीं, उसने आणलेले पैसे मागण्यास साळुबाई आल्या,—अशा अनेक मागण्यांनीं त्यांनां जीव नकोसा होऊन जाई. अशा नानाप्रकारच्या इंगळ्यांनीं भटजींच्या बायकोस यातना होऊं लागल्या ह्मणजे त्या विचारीनें देवळांत जाऊन आपल्या पतीला आपल्या सर्व दुःखाची काहणी सांगावी, आणि त्यानें समाधानाचे चार शब्द बोलून कशीबशी तिची समजूत करावी, असा क्रम बरेच दिवस चालला होता.

भटजींनां घरीं न्यावयास त्यांची बायको दिवेलागणीच्या वेळीं दररोज देवळांत यावयाची. तिला कांहीं कारणानें बनलें नाहीं, तर मुलगी किंवा मुलें यावयाचीं, असा नित्यक्रम असे. पण एके दिवशीं प्रहरात्र उलटून जाण्याची वेळ आली, तरी घरून कोणी आलें नाहीं, ह्मणून भटजी चिंतेंत पडले. त्यांच्या मनांत नानाप्रकारच्या भयंकर कल्पना येऊं लागल्या, आणि त्यांची परमेश्वरावरील



एक वृद्ध आंधळा ब्राह्मण देवळाच्या महाद्वाराजवळ घोतर पुढें पसरून बसून रहात असे.

दिलबहार, कामिनीया, गुलशन वगैरे अतरें सुंदर कुपींत लांकडाच्या केसींत बंद केलेलीं असतात. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

अचल निष्ठाहि किंचित् डळमळूं लागली. परंतु यानंतर थोड्याच वेळांत भटजींची बायको स्फुंदतस्फुंदत त्यांच्याजवळ आली आणि तिनें मोठ्या दुःखानें घरची दैना वर्णन करण्यास सुरुवात केली. ती ह्मणाली "आज घराच्या मालकानं शिपाई पाठवून आपली चीजवस्त घराबाहेर फेंकून देऊन घरास कुलुप लाविलं. पाऊस धुवाधार चाललेला, निवाऱ्याची कुठंहि जागा नाहीं; रस्त्यावर डाळ, पीठ, धान्य, सांडून खराबी झाली. तिन्हीसांजेच्या वेळीं लोकांच्या दारीं कुठं जाऊं ह्मणून विचार पडला; अखेरीस दादाबाबा करून घरवाल्याची रात्रभर राहण्याची परवानगी कशीतरी मिळविली; उद्यां संध्याकाळच्या आंत दुसरं बिऱ्हाड पाहून हें खाली करून दिलं पाहिजे. किंवा त्याचं थकलेलं भाडं तरी चुकतं केलं पाहिजे."

हा वृत्तांत ऐकून भटजींनांहि रडें कोसळल्यावांचून राहिलें नाहीं. मी वृद्ध, आंधळा, मला कोणाचा आधार नाहीं, हा विचार आजपर्यंत त्यांच्या मनांत असंख्य वेळां आला असेल; परंतु त्याचें शल्य भटजींच्या अंतःकरणास आजपर्यंत इतकें बोंचलें नव्हतें. दारिद्र्याच्या विषाराचा झटका आजच्यासारखा त्यांनां कधींहि झोंबला नव्हता. आज त्यांचा नाइलाज झाला. त्यांची ती समाधानवृत्ति आज त्यांनां सोडून गेली, आणि परमेश्वरावरील त्यांची निष्ठा बहुतेक नाहींशी झाली. पत्नीबरोबर तेहि स्फुंदस्फुंदून रडूं लागले!

या कुटुंबाचा हा करुण विलाप ऐकण्यास देवळांत फारसें कोणी नव्हतें; आणि देवाच्या सभामंडपापासून तीं नवराबायको मुद्दाम अंमळ एकीकडे गेलीं असल्यामुळें त्यांच्याकडे विशेष कोणाचें लक्ष्यहि गेलें नाहीं. मात्र एक श्रीमान् मारवाडी गृहस्थ आपल्या उजव्या हातानें डाव्या हातांतील सलकडीं, मधूनमधून गळ्यांतील कंठी, व कानांतील मिकबाळी चापशीत, कशाचा तरी विचार करीत, आणि या कुटुंबाकडे दुरून पहात, सभामंडपाच्या एका कठड्यावर बसला होता. त्याला भटजींचें आणि त्यांच्या पत्नीचें बोलणें ऐकूं येत नव्हतें; तथापि तीं नवराबायको कशाबद्दल बोलत असतील, याची कल्पना त्याला बरोबर करितां आली. किंबहुना त्यांच्या दुःखास आपणच कारण आहों, त्यांनां आज घरांतून बाहेर काढ, असा हुकूम आज सायंकाळींच आपल्या तगादेदाराला आपण दिला, अशी त्याला आठवण झाली; पण आपण केलें यांत कांहीं वाईट केलें, असें त्याला आतांहि वाटलें नाहीं. उलट, हें ढोंगी कुटुंब आज घराबाहेर काढिलें असलें, तर उद्यांपासून त्या घराचें भाडेंतरी निर्वेध मिळूं लागेल, आणि आपल्या मागची एक ब्याद कायमची नाहींशी होईल, असेंच त्याला वाटलें. या विचारानें त्याच्या तोंडावर किंचित् हास्य चमकूं लागलें! भटजींची आणि त्याच्या कुटुंबाची दैना पाहून त्याच्या चित्ताला लवमात्र द्रव आला नाहीं. उलट, त्यांच्यावर रागावून त्यानें आपलें अंतःकरण अधिक निष्ठुर करून ठेविलें, आणि तो तसाच हंसत त्यांकडे पहात कठड्यावर बसून राहिला.

त्या दरिद्री, वृद्ध आणि आंधळ्या ब्राह्मणाचा विलाप देवालयाच्या गाभाऱ्यांत शंकरपार्वतीला

बॉटरवरीचें मेटाबोलाइज्ड कॉडलिव्हर तेल क्षयरोग व दमा यांवर बस्साद.
इतर तेलासारखी घाण येत नाहीं. टॉमसन कं. कालबादेवी, मुंबई.

मात्र उत्तम प्रकारें ऐकूं जात होता, किंवा त्यांनां दुसऱ्या एकाद्या प्रकारें तो समजत होता हें खास! कारण, त्या वृद्ध ब्राह्मणाला अनुलक्षून कांहीं संभाषण गाभाऱ्यांत चालू आहे, असा भास या लक्ष्मीपुत्राला प्रथम चांगलाच झाला. थोड्या वेळानें हें संभाषण त्याला स्पष्टपणें ऐकूं येऊं लागलें. त्याला वाटलें, कीं, कोमल मधुर आलापानें एक स्त्री कोणालातरी कांहीं प्रश्न करीत आहे, आणि तिला स्निग्ध गंभीर आवाजानें तो पुरुष उत्तर देत आहे.

"आपण ह्मणायचं, तो सच्छील, निष्ठावंत आणि सत्पात्र ब्राह्मण आहे, आणि त्यावर आज मोठाच विपरीत प्रसंग गुजरला आहे; मग त्याचं संकट निवारण करायचं कां मनावर घ्यायचं होत नाहीं?"

"अग, हें त्याचें भोक्तृत्व आहे. तें भोगल्याखेरीज त्याची सुटका होणार नाहीं; पण याहि संकटांतून तो अखेरीस मुक्त होईल. सदा सुखी कोणी नाहीं, तसाच सदा दुःखीहि कोणी नाहीं. योग्य वेळीं त्याचें दारिद्र्य जाईल आणि मग आजच्या प्रसंगाचा त्याला विषाद वाटणार नाहीं."

"योग्य वेळीं! अजून योग्य वेळ यायचीच आहे वाटतं? तें कांहीं नाहीं. या ब्राह्मणाला आज, फार तर उद्यां, पुष्कळ संपत्ति मिळून हा सुखी झाला पाहिजे. उद्यां तो लक्षाधीश झाला पाहिजे, तरच माझ्या बोलण्याला इकडून मान द्यायला झालं, असं मी ह्मणेन. नाहींतर—"

"अग! उतावीळपणानें कामें होत नाहींत. आणि संपत्तीनें सुख मिळतें, व दारिद्र्यानें दुःख होतें, हेंहि खरें नाहीं. हा ब्राह्मण उद्यां दुःखमुक्त होईल, इतकें आश्वासन तुला तूर्त पुरें आहे."

"नाहीं, माझी आपली वेडी समजूत असं कां ह्मणाना! माझं ह्मणणं असं, कीं, त्याला एक लाख रुपये उद्यांच्याउद्यां मिळाले पाहिजेत. मग सुखी व्हावं, कीं दुःखी व्हावं, हें आपलं त्याचा तो पाहील."

"घरें तर, तुझी मर्जी! गणपती! (गाभाऱ्याबाहेर गजाननाची मूर्ति होती, तेथून 'आज्ञा' असा आवाज आला.) उद्यां त्या आंधळ्या ब्राह्मणाला एक लाख रुपये मिळतील अशी तजवीज कर!"

गणपतीच्या बाजूनें 'आज्ञा' असा पुनः आवाज आला.

हा सर्व प्रकार ऐकून त्या लक्ष्मीपुत्राला मोठा अचंबा वाटला. "काय? त्या भिकारड्या भटजीला उद्यां एक लाख रुपये मिळणार! होय, प्रत्यक्ष देवानें मनांत आणिल्यावर कां नाहीं मिळायचे? पण ही गुप्त गोष्ट मला कळली असून तिच्यापासून मीं जर आपला फायदा कांहींच करून घेतला नाहीं, तर मी व्यापारी बच्चा कसला? या सबबांत आपणहि आपला चांगलाच फायदा करून घेतला पाहिजे." असा विचार करून हा मारवाडी देवदर्शन करून घरीं गेला, त्यानें घाईनें भोजन उकरलें, व तावडतोव त्या आंधळ्या वृद्ध भटजींच्या विऱ्हाडीं स्वारी एकटीच निघाली.

त्याला पाहतांच भटजींच्या कुटुंबाची आणि भटजींची तारंबळच उडाली,—पण शेटजींनीं उदार अंतःकरणानें आपण होऊनच त्यांची चिंता दूर केली.

दाढेतून कळा निघत असतील तर 'डेन्टीलाईन' कापूस भिजवून लावा. तत्काळ गुण.
अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कं, जुम्मामशीद, मुंबई.

"छे, छे ! हें काय भलतेंच ? हे शिपाई महामूर्ख असतात ! अहो, भाडें थकलें तर थकलें, त्यावांचून काय आमची चूल अडली होती ? नाहीं भटजी, तुम्ही आपले वाटेल तितके दिवस या बिऱ्हाडांत रहा. तुम्ही मागचें भाडें देऊं नका, आणि पुढेंहि तुम्ही जितके दिवस रहाल, त्याचेंहि भाडें तुम्ही देऊं नका, झालें ? अहो, पैसा मिळून जातो, त्याचें काय ? पण स्नेह मिळत नाहीं !"

याप्रमाणें शेटजींनीं त्या उभयतांवर खूप साखर पेरिली. त्या ब्राह्मणाला त्यामुळें समाधान वाटलें, आणि देवाची आपणावरील कृपा आजच सरली नाहीं, असें मनांत येऊन त्याची निष्ठा पुनः जागृत झाली.

शेटजींनीं पुनः मोठ्या कळवळ्यानें "तुमचें कसें काय चाललें आहे ?" असा प्रश्न विचारिला व ब्राह्मणानें आपली साधी हकीगत आढेवेढे न घेतां थोडक्यांत त्यांनां सांगितली.

अखेरीस शेटजी म्हणाले "भटजीमहाराज ! तुमची हकीगत ऐकून मला तुमची फार कींव येते. तुम्हाला कांहीं तरी मिळकत करून द्यावी, असें माझ्या मनांत फार येतें. पण मी पडलों व्यापारी बच्चा ! मला व्यापारांत बूड आली तर त्याचें कांहीं वाटत नाहीं; पण हातानें धर्म केला तर वाईट वाटतें. यासाठीं मी तुम्हाला एक फायद्याची युक्ति सांगतों ती ऐका. तुम्हाला आजपर्यंत एका रुपयावर कधीं कांहीं एका दिवसांत मिळालें नाहींना ?—मी तुम्हाला तुमच्या उद्यांच्या मिळकतीबद्दल दहा रुपये देतों. ते आज घ्या, आणि उद्यां सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत तुम्हांला जें कांहीं मिळेल, तें बिनतक्रार जसेंच्या तसेंच माझ्या हवालीं करा. त्याचा मालक मी—तुम्ही नाहीं. आतां झालें ? काढूं दहा रुपये ?"

भटजींनां वास्तविक ही गोष्ट तेव्हांच मान्य व्हावी; परंतु या वृद्ध आणि अंध भटजींनांहि एक प्रकारचा ताठा होता, आणि त्यांची देवावरील श्रद्धा शेटजींच्याच गोड भाषणांनीं आणि घरभाड्याच्या बिकट संकटांतून बाहेर निघाल्यानें द्विगुणित झाली होती. ते म्हणाले "शेटजी, तुम्हीं घरभाड्याची आम्हाला सूट घातली, आणि पुढेंहि भाडें देण्याची गरज नाहीं म्हणून सांगितलें, यानेंच आम्हांवर तुमचे पराकाष्ठेचे उपकार झाले आहेत. आतां आम्हांसाठीं तुम्हीं आपलें अधिक नुकसान करून घेऊं नये. माझी मिळकत काय असते, हें माझें मला चांगलें ठाऊक आहे. त्यामुळें तुमच्याशीं असा करार करायला मला लाज वाटते. तुम्हाला कांहीं धर्म करायचा असला, तर समाधानानें मला कांहीं उचलून द्या. तें मी घेईन. पण मी दरिद्री असलों, आणि उभ्या जन्मांत मला एकदम दहा रुपये दिसले नसले, तरी दहा रुपयांनां मी आपलें एका दिवसाचें देखील नशीब विकणार नाहीं ! तसें करणें हें देवावर अविश्वास दाखविण्यासारखें आहे. माझी पामराची देवाला करुणा आली असली, तर तो दहाच काय, पण दहा हजार रुपये माझ्या घरीं उद्यां पावते करील ! बरें, त्याची मर्जी नसली तर मला तुमचे दहा रुपये कितीकसे पुरणार आहेत ? अहो आकाश फाटलें तर त्याला ठिगळें कोण किती लावणार ?"

क्षयरोग व दमा यांवर वॉटरबरीचें कॉडलिव्हर तेल वस्ताद. पिण्यास स्वादिष्ट.
टॉमसन कंपनी, काळबादेवी रोड, मुंबई.

भटजींच्या या भाषणानें शेटजी तर बुचकळ्यांतच पडले. परंतु कांहीं विचार मनांत आणून ते ब्राह्मणाला ह्मणाले "ठीक आहे. तुमच्याशीं सवदा ठरवावा ह्मणून मी घरांतून बाहेर पडलों, त्यांत आतां हार खाणें हा मला वट्टा आहे. तुह्मी दहा हजार ह्मणतांना ? ठरलें तर आपलें ! मी तुह्माला उद्यां सकाळीं दहा हजार रुपये देतों. तुह्मी आपला पंचा घेऊन देवळांत नित्याप्रमाणें जावें, आणि उद्यां तेथें जें कांहीं तुह्माला मिळेल तें मला द्यावें."

शेटजी आपली थट्टा करीत आहेत, असें भटजींनां प्रथम वाटलें; परंतु ही थट्टा नव्हे, असें त्यांनीं वारंवार सांगितल्यावर भटजी ह्मणाले "एकंदां नशीब विकीत नाहीं ह्मणून ह्मटलें, मग दहा काय आणि दहा हजार काय ? नका माझा अंत पाहूं—मी नाहीं विकीत आपलें नशीब !"

शेटजींनीं कपाळावर हात मारून घेतला. कांहीं वेळानें त्या ब्राह्मणाची आणि त्याच्या बायकोची समजूत करणाच्या उद्देशानें ते ह्मणाले "तुह्माला स्वतःला पैशाची गरज नसली तरी तुह्माला देवानें चार सोन्यासारखीं लेकरें दिलीं आहेत, त्यांच्यासाठीं तरी दूरवर विचार करून बोलायचें तें बोला. द्या, वीस हजार द्या, चला आटोपा—आतां मात्र नाहीं ह्मणून तुह्मी पस्तावाल. हो, उद्यांची वेळ गेली,—नाहीं, ही बैठक मोडली, तर पुनः तुह्माला मी दहा पैसे देखील देणार नाहीं; आतां वीस हजार देतों आहें, ते द्या आणि त्यांत काय तें उमजा !"

परंतु तो ब्राह्मण शेटजींच्या या मागणीलाहि बधला नाहीं ! अखेरीस शेटजींनीं आपली रकम पाऊण लाख रुपयांपर्यंत चढविली. त्यावेळीं देखील भटजी मुखस्तंभ बसले. परंतु त्यांची बायको शेटजींनां म्हणाली "शेटजी, त्यांनां काय, ते बैरागी होऊन निःसंग बनले आहेत. पण मला संसाराची काळजी आहेना ? मी तुमचा सवदा कबूल करितें. तुह्मी उद्यां पाऊणलाख रुपये द्यावे, आणि उद्यां धोतरावर जें येईल तें सर्व आह्मीं तुह्मांस द्यावें; ठरला सवदा हा ?"

"हो, उद्यां सकाळीं सूर्योदयाच्या आधीं पाऊण लाख रुपयांचे तोडे तुमच्या घरीं आणून लावीन, मग तर झालें ? भटजींनीं नित्याप्रमाणें उद्यां देवळांत जावें आणि त्यांची सर्व मिळकत तुह्मीं मला द्यावी."

शेटजींनींहि स्वतः देवळांत येऊन भटजींजवळ वसावें, अशी सूचना भटीणबाईनीं केली, आणि आपल्या नवऱ्याला त्यांनीं कांहीं बोलूं न देतां शेटजींची अखेर रवानगी केली.

शेटजी निघून गेल्यावर भटजींनीं आपल्या बायकोला पुष्कळ दोष दिला. "शेटजी आपली थट्टा करीत होते. तूं असें हपापल्यासारखें भलतेंच कबूल करून आपलें हंसें मात्र करून घेतलेंस," असें ह्मणून त्यांनीं आपल्या बायकोचा सडकून निषेध केला. आपल्या हातून खरोखरच अपराध घडला असें वाटून ती बिचारी माउलीहि फार कष्टी झाली.

दुसरे दिवशीं उजाडलें नाहीं तोंच शेटजी आपणाबरोबर रोकड घेऊन आले. बैलाच्या छकड्यांतून थैल्यांमागें थैल्या घेऊन शेटजींचे नोकर ब्राह्मणाच्या बिऱ्हाडीं शिरले आणि त्यांनीं भितीशीं त्या थैल्या रचून

दिलबहार (रजिस्टर्ड) जाई, जुई व चमेलीच्या मिश्रणाचें अत्तर. वास अत्यंत मधुर व संतोषकारक.
पाव तो. कि. १॥. अँग्लो इंडियन केमिकल कं. जुम्मा मशीद, मुंबई.

ठेविल्या, तेव्हां मात्र भटजींचा आणि त्यांच्या सर्व कुटुंबाचा आनंद गगनांत मावेनासा झाला ! त्या सर्व कुटुंबानें थैल्यांचे बंद भराभर सोडून त्या सर्व रुपयांनीं भरल्या आहेत, अशी खात्री करून घेतल्यावर भटजी ह्मणाले "शेटजी ! आह्मी हे रुपये आतां मोजीत बसत नाहीं. ते वीस हजार असोत, कीं पाऊणलाख असोत, मी ते घेतों—आनंदानें घेतों, तुह्मी खरोखरच मोठे उदार कर्ण आहां. काल मीं तुह्माला झिडकारिलें, त्याचा राग मानूं नका हो ! मी आजच काय, पण तुह्माला वाटेल तर महिनाभर फडकें पसरून बसतों, आणि मजपुढें काय येईल तें खुशाल तुह्मी ध्या !"

झालें, सूर्योदयावरोबर भटजी आपला पंचा घेऊन, आणि बरोबर आपल्या मुलीला घेऊन, देवळांत गेले. शेटजीहि त्यांच्या मागोमाग निघाले. भटजींनीं देवदर्शन करून नित्यप्रमाणें दरवाजाशीं आपलें फडकें पसरलें, आणि आल्यागेल्यापाशीं 'आंधळ्याला धर्म !' मागावयाला मोठ्या निकरानें प्रारंभ केला.

तो दिवस कांहीं पर्वणीचा नव्हता. नित्यदर्शनाला येणारे लोक मात्र सकाळीं देवदर्शनाला येत होते. त्यांनीं त्या ब्राह्मणाला जातां येतां पै पैसा टाकला. थोडेबहुत तांदूळहि त्यांच्या धोतरावर जमले. शेंगा, बोरें, पेरु, एकादें केळें, त्यांच्यापुढें कोणीं टाकिलें.

दोन प्रहर लोटला, पण पुरते दोन आण्यांचे पैसेहि त्यांच्यापुढें जमले नाहींत ! दोन प्रहरीं घरीं न जातां तसेंच बसून राहण्याचा भटजींनीं बेत केला. शेटजींनांहि तो मान्य झाला. तिसरा प्रहर उलटला, संध्याकाळ झाली, पण शेरभर तांदूळ, कांहीं फळफळावळ आणि सुमारें तीन आण्यांचा खुर्दा, इतकीच कायती तोंपर्यंत ब्राह्मणाला मिळकत झाली ! दिवेलागणी होतांच या मिळकतीचें गांठोडें बांधून ब्राह्मणानें शेटजींच्या हवालीं केलें.

शेटजीच्या तोंडचें पाणीच पळालें ! तो डोकें हापटून घेऊन आपले केश तोडूं लागला आणि अंगावरील कपड्याच्या चिंध्या करूं लागला ! अखेरीस त्याच्या मनांत एक कल्पना आली, तीमुळें घटकाभर त्यानें आपलें मन आंवरून धरिलें. तो भटजींनां अंमळ दरडावून ह्मणाला " भटजी, आजचा दिवस मध्यरात्रीपर्यंत संपत नाहीं. तोंपर्यंत तुह्मी असेंच येथें बसलें पाहिजे. मध्यरात्र झाल्यावर तुह्मी पाहिजेतर घरीं जा; पण तोंपर्यंत मी तुह्माला येथून हालूं देणार नाहीं."

मध्यरात्रीपर्यंत बसावयाला भटजी मोठ्या आनंदानें कबूल झाले. देवळांतील गर्दी मोडल्यावर शेटजी गणपतीपुढें गेले व त्यांनीं हात जोडून अनन्यभावानें त्याची प्रार्थना केली. ते ह्मणाले " ब्राह्मणाला आज एक लाख रुपये मिळवून देण्याबद्दल काल, हे देवा ! तुला शंकराची आज्ञा झाली होती, आणि 'देतों' ह्मणून तूंहि त्यांनां वचन दिलें होतेंस, तें मीं आपल्या कानांनीं ऐकिलें, आणि तें ऐकूनच मीं हा हिय्या केला. आतां दिवे लागले, तरी ब्राह्मणाला तुझ्या कबुलायतीप्रमाणें कांहींच प्राप्ति झाली नाहीं, हें काय ? प्रभो ! त्या ब्राह्मणाला आतां तरी लवकरच एक लाख रुपये मिळवून दे ! मध्यरात्र व्हायला आतां अवकाश नाहीं."

कामिनीया बोके (रजिस्टर्ड) अतिशय टिकाळ आणि सुवासिक. पाव तोळा बाटलीस रु. १॥. अँग्लो इंडियन ड्रग व केमिकल कं. जुम्मामशीद, मुंबई.

ही प्रार्थना शेटजींनीं अगदीं परोपकार- करणें, या कला चांगल्याच अवगत झाल्या बुद्धीनें केली, आणि ती फलद्रूप झाली तर होत्या; परंतु शेटजींनीं ब्राह्मणाशीं केलेला शेटजींचा त्यांत कांहीं फायदा नाहीं, असें व्यवहार गणपतीला माहीत नव्हता, असें एकाद्या अनोळखी मनुष्याला वाटलें असतें! थोडेंच आहे!



त्यांचे हात गणपतीच्या सोंडेंत घट्ट अडकले!

त्याप्रमाणेंच गणपतीलाहि वाटावें, असा शेटजींनीं प्रार्थना आटोपून गणपतीच्या शेटजींचा हेतु होता. अनेक वर्षांच्या विशाल उदराच्या नाभिप्रांताला स्पर्श केला, व्यासंगानें त्यांनां दुवाजवी बोलणें, छपवाछपवी इतक्यांत काय झालें कोणाला ठाऊक! तें

बिचाऱ्या शेटजींनां कांहीं समजलें नाहीं, पण त्यांचे हात गणपतीच्या सोंडेंत घट्ट आंवळून धरिल्याप्रमाणें अडकले, ते कांहीकेल्या निघेनात, आणि त्यांनां रगहि अतोनात लागली !

इतक्यांत दुसरा एक चमत्कार झाला. आदल्या दिवशीं सायंकाळीं शेटजींनीं ऐकिला होता, तोच गंभीर ध्वनि आतां त्यांनां पुनः एकवार ऐकूं आला ! "गणपती ! त्या ब्राह्मणाला एक लाख रुपये पोहोंचते केलेस ?"

गजाननानें बसल्या जागींच उत्तर दिलें, " देवाधिदेवा ! पाऊणलाखाची तजवीज सकाळींच केली; बाकीच्या रकमेसाठीं हात धरून ठेविले आहेत ! "

हें भाषण ऐकून शेटजींची जी त्रेधा उडाली, ती त्यांची त्यांनांच ठाऊक ! त्यांच्या हृदयांत चमकन् चमक निघाली, सर्वांगास घाम सुटला, आणि डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागले !

" अरे हें काय ? " असें ते एकदम ओरडले, आणि आपले हात सोडवून घेऊं लागले; पण ते जास्तच जोरानें आवळले गेले!

शेवटीं गजाननमहाराज त्यांच्याशीं प्रत्यक्ष बोलूं लागले. " अरे मूढा ! देवळांत आलास आणि प्रत्यक्ष पार्वतीपरमेश्वरांचें संभाषण ऐकिलेंस, तरी तुझा स्वार्थ तुला सोडीना ना ? त्या भाषणाचे, तुझ्या देवांच्या भाषणाचे देखील टके करायला पाहूं लागलास, तेव्हां आतां भोग त्याचें फळ ! बाबा, देव कोणाला स्वतःचें देत नाहीं, आणि कोणाचें घेतहि नाहीं ! एकाचें काढावें आणि दुसऱ्याला द्यावें, हा देवाचा सनातन संप्रदाय आहे, हें तुला आपल्या दुकानदारींत आजपर्यंत कसें कळलें नाहीं ? तुझे नोकर देवळांत आले आहेत, त्यांनां मोठ्यानें हांक मार, आणि ब्राह्मणाच्या घरीं उरलेले पंचवीस हजार रुपये आतांच्या आतां पोहोंचते करा, म्हणून सांग. मीं तुझे हात धरिले आहेत, हें त्यांनां सांगशील तर खबरदार ! रकम पटली, कीं तुझे हात सुटतील ! "

शेटजी भीतीनें गर्भगळित झाले ! तथापि गणपतीस मोदकांची लालूच दाखवून हात काढून घ्यावा, असें त्यावेळींहि त्यांच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं ! 'सव्वामण गूळ खोबरें,' 'सव्वामणाचे मोदक,' 'एकवीस लाख दुर्वा ! " वगैरे अस्पष्ट नवसाचे शब्द त्यांच्या तोंडांत घुटमळूं लागले होते; पण त्यानें इष्ट परिणाम न होतां त्यांचा हात अधिकच आंवळत गेला. त्यावरून वरिष्ठांच्या देखत लांचलुचपतीची गोष्ट काढणें हें गणपतीला देखील रुचत नाहीं, हें त्यांनीं ताडिलें. अखेरीस निरुपाय होऊन त्यांनीं ब्राह्मणाला आणखी पंचवीस हजार रुपये पावते करण्यास व त्याचा तो पंचा आपल्या घरीं घेऊन जाण्यास आपल्या नोकरांनां सांगितलें.

रुपये पटतांच शेटजींचा हात सुटला, व तो दरिद्री वृद्ध ब्राह्मण एका चार प्रहरांत लक्षाधीश बनला ! पुढें शंकरपार्वतींच्या कृपाप्रसादानें त्याला दृष्टि आली, त्याचीं मुलें सद्गुणी आणि आज्ञाधारक निघालीं, त्याच्या मुलीलाहि चांगलें स्थळ मिळालें, वगैरे तपशील सांगण्याची गरज नाहीं. देव कृपा करूं लागले अर्धेमुर्धे सोडीत नाहीं, हें सर्वांस माहीत आहेच.

प्रसन्न वृत्ति.

राग आणि भय यांच्या योगानें शरीरावर अनिष्ट परिणाम होतो, याचा बहुतेकांस अनुभव आलाच असेल. वाईट मानसिक स्थितीचा शरीरावर जर वाईट परिणाम होतो, तर चांगल्या मानसिक स्थितीचा चांगला परिणाम कां होऊं नये?

त्रास देणाऱ्या गोष्टी मनांत आणून नेहमीं विवंचनेंत काळ घालविण्यापेक्षां आपण आपला काळ सत्कर्म करण्यांत घालविला व सौख्याचे विचार नेहमीं मनापुढें ठेवले, तर त्यापासून आरोग्य राखण्यास फार मदत होईल.

जगांत वाईट गोष्टी आहेत, त्याप्रमाणें चांगल्या गोष्टी आहेत. दुःख आणि कुरूपता आहे, त्याप्रमाणें सुख आणि सौंदर्य आहे. तर मग चांगल्या आणि सुखदायक गोष्टी सोडून चिंताकारक गोष्टीकडेच आपण मन कां लावावें? वाईट गोष्टी आपल्या वाट्तून दूर करण्यापुरता किंवा त्यांत सुधारणा करण्यापुरता त्यांचा विचार केला म्हणजे झालें.

चांगल्या विचारांनीं आपणांस नवीन जीवन लाभतें.

गत गोष्टींचें चिंतन करून अश्रु ढाळीत बसण्यापेक्षां आजची स्थिति काय आहे ती पाहून, त्यांची स्थिति त्यापेक्षां सुखकारक करण्याचा यत्न करणें अधिक फायदेशीर आहे.

चांगलें वाईट, इष्टानिष्ट, सुखदुःख हे सर्व मनाचे खेळ आहेत. आपल्याला आवडत नाहीं तें वाईट, आपल्या सुखाच्या आड येतें तें अनिष्ट, आपल्या परिस्थितीशीं विसदृश भासतें तें दुःख. एकाच गोष्टीपासून एकाला सुख होतें आणि दुसऱ्याला दुःख होतें. एका परिस्थितींत जी गोष्ट आपणाला सुखकारक वाटते तीच दुसऱ्या परिस्थितींत दुःखकारक वाटते. अशी स्थिति असल्यामुळें विपरीत घटनेपासून दुःख करीत बसण्यापेक्षां, जें सुख आपणाला मिळत आहे, त्यांत आनंद मानून तें वाढविण्याचा प्रयत्न करणें फायदेशीर होणार नाहीं काय? असें केल्यानें शरीरास आणि मनालाहि स्वास्थ्य मिळेल. शरीर व मन सुस्थितींत असलें तर आध्यात्मिक उन्नतीस अवसर मिळतो.

दुर्मुखलेला मनुष्य स्वतःभोवतीं दुःखाचें, दुर्दैवाचें व निराशेचें वातावरण उत्पन्न करतो. त्याच्याजवळ जाणाऱ्या लोकांच्या मनावर या रोगी वातावरणापासून अनिष्ट परिणाम होतो.

प्रसन्न वृत्तीचा, हंसतमुख मनुष्य स्वतः सशक्त, निरोगी व सुखी असतो. इतकेंच नाहीं, तर त्याच्याशीं ज्यांचा ज्यांचा संबंध येतो, त्यांना त्यांना त्याच्या प्रसन्न वृत्तीचा लाभ मिळतो.

मन प्रसन्न ठेवणें बाह्यासारखी श्रेष्ठ भक्ति नाहीं. प्रसन्न वृत्तीचा मनुष्य नेहमीं ईश्वराचे आभार मानून त्याचा गौरव करीत असतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

शब्द.

शब्दांच्या अंगीं अचाट शक्ति आहे.

शब्दानें मनुष्य उच्च पदाला पोंचतो किंवा अधोगतीस मिळतो.

शब्दानें सुख, आनंद आणि आरोग्य मिळतें, व शब्दानेंच दुःख, कष्ट आणि रोग होतात.

शब्दांपासून भीति उत्पन्न होते, मनुष्य मोहजालांत सांपडतो व बंध पावतो; त्याचप्रमाणें शब्दांपासून भीति नाहींशी होते, मोहजाल तुटून जातें व मनुष्य मुक्त होतो.

शब्दांची शक्ति इतकी प्रचंड असतां आपण त्याचा उपयोग किती निष्काळजीपणानें करतों! आपण बोलतों याचा परिणाम काय होईल याचा विचार करणारे फारच थोडे.

मनुष्य जे शब्द वापरतो त्यावरून त्याची परीक्षा केव्हांच करतां येते. कित्येक माणसें बोलण्यांत अगदीं पटपट असतात. ते भराभर बोलतील, पण त्या बोलण्यांत सार कांहींच नसतें. अशा लोकांस व्यवहारांत यश मिळणें कठिण.

दुसरे एकदम मुद्द्याच्या गोष्टीला हात घालतील. धान्याचे कण कोणते व भुसा कोणता हें त्यांना तात्काळ ओळखतां येतें. व्यवहारांत यश मिळवायचें असेल, तर मुद्दा कोणता हें ओळखून त्याच्याशीं गांठ घातली पाहिजे. शब्दजालांत गुरफटून घेण्यांत अर्थ नाहीं.

नेहमीं आपल्या दुर्दैवाच्या व दुःखाच्या भाकड कथा सांगत बसणें याच्यासारखा वेडगळपणा नाहीं. दुर्दैवाच्या गोष्टी सांगणारा आपल्या दुर्दैवास मदत करतो तो आपले हातपाय मोडून घेऊन आपल्या भोवती दुर्दैवाचें वातावरण उत्पन्न करतो.

आपणाला काम करतां येईल त्यावर शहाण्या मनुष्याची दृष्टि असते. तो नेहमीं आशेचे शब्द बोलतो! दुर्दैवाच्या स्वाधीन होऊन नेहमीं निराशेचें रडगाणें गात बसणें यासारखें दुसरें दुर्दैव नाहीं.

या विश्वांत अपार शक्ति भरलेली आहे. तीच शक्ति मुद्द्यांआड्यांत आहे. आपल्या हृदयाचें द्वार, भय, शंका, निराशा, द्वेष यांनीं बंद न करतां उघडें ठेवलें, तर ती शक्ति आपल्या हृदयांत प्रादुर्भूत होईल, व आपलें सर्व दुर्दैव नष्ट होईल.

अंकलीला.

[लेखक—श्रीयुत रंगनाथ नारायण मोहोळकर.]

ज्याप्रमाणें उद्भिज कोटींतील अनंत वनस्पतींचे अनेक गुणधर्म मनुष्यमात्रास अवगत असणें अशक्य आहे, त्याप्रमाणेंच गणितशास्त्रांतील मूल अंक व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या संख्या यांचे परस्पर गुणधर्म व चमत्कार समजणें अतर्क्य आहे. एकादे अरण्यांत अथवा एकादे डोंगरावर आपण गेलों असतां तेथील तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पतींचा आपल्यास उपयोग माहित नसल्यानें तीं सर्व झाडें आपल्यास प्रथम निरुपयोगी अशींच भासमान होतात. परंतु त्यांची उपयुक्तता आपले प्रत्ययास एकाद्यानें आणून दिली असतां त्या वनस्पतींसंबंधानें आपल्या मनांत मोठा आदर उत्पन्न होऊन आनंद होतो. त्याप्रमाणेंच गणितशास्त्रांतील संख्यांचें आहे. संख्या लहानांपासून मोठ्यांपर्यंत किती आहेत, याचें नियमन करणें तर्काबाहेर आहे. तसेंच, कोणतीहि संख्या दृष्टीसमोर घेऊन तिच्यांतील गुणाचें विवेचन करूं लागलें असतां तिजकडे कांहीं कालपर्यंत उगीच पाहात बसावें लागेल आणि अशा वेळीं त्या संख्येंतील चमत्कार दुसऱ्यानें सप्रमाण कळविले असतां अथवा स्वतः शोधक बुद्धीनें पाहिले असतां मनास आनंद व आश्चर्य हीं वाटल्यावांचून राहणार नाहींत. या गोष्टीचें अल्प प्रमाणांतर तरी वाचकांस यावें, या हेतूनें आजचे लेखांत कांहीं संख्येचे चमत्कार दाखविण्याचें योजिलें आहे.

३६ या संख्येचा चमत्कारिक गुण.

३६ ही संख्या ६ चा वर्ग आहे. परंतु हिचे घटक अंकांमध्यें म्हणजे ३ व ६ यांचे मध्यंतरीं जितके ५ चे अंक लिहावे, तितकेच तिचे मागें ४ चे अंक लिहिले असतां ती अंकरचना पुनः पुनः वर्गच होऊं लागते. हा वर्ग त्या अंकरचनेंत जितके ५ अथवा ४ चे अंक लिहिले असतील त्यापेक्षां एकानें अधिक जी ६ या अंकांची पंक्ति तिचा समजावा.

जसें—३६ या संख्येचे घटक ३ आणि ६ यांचे दरम्यान ५ हा अंक व मागें ४ हा अंक लिहिल्यास ती ४३५६ अशी अंक रचना होईल. ही वरील नियमाप्रमाणें ६६ या संख्येचा वर्ग आहे.

पुनः ३ आणि ६ यांचे दरम्यान दोन वेळ ५ व मागें दोन वेळ ४ असे अंक लिहिल्यास ती ४४३५५६ अशी रचना होईल. ही संख्या वरील नियमाप्रमाणें तीन वेळ ६ ह्मणजे ६६६ या संख्येचा वर्ग आहे.

याप्रमाणेंच पुढील वर्ग समजावे.

जसें,— $(६६६६)^2 = ४४४३५५५६$

$(६६६६६)^2 = ४४४४३५५५५६$

इत्यादि.

६३ या संख्येचा चमत्कारिक गुण.

६३ या संख्येंत ६ आणि ३ हे अंक आहेत. आतां या अंकांमध्यें जितके २ चे अंक लिहावे, तितकेच त्याचे मागें ७ चे अंक लिहिले असतां ती अंकरचना दोन विशिष्ट संख्यांचा गुणाकार होऊं लागते. या विशिष्ट संख्या ह्मणजे त्या अंकरचनेंत जितके २ अथवा ७ चे अंक लिहिले असतील त्यापेक्षां एकानें अधिक जी ७ आणि ९ यांतील प्रत्येक अंकाची अंकपंक्ति त्या प्रत्येक समजाव्या.

जसें– ६३ या संख्येचे अंक ६ आणि ३ यामध्यें मागें ७ लिहिल्यास ७६२३ अशी अंकरचना होईल. ही वरील नियमाप्रमाणें ७७ व ९९ यांचा गुणाकार होय.

तसेंच ६ आणि ३ यांचे मध्यें २२२ व मागें ७७७ लिहिल्यास ती अंकरचना ७७७६२२२३ अशी होते. ही वरील नियमाप्रमाणें ७७७७ व ९९९९ यांचा गुणाकार होय.

कोणत्याहि समानांक पंक्तीचा वर्ग करण्याची स्वल्प युक्ति.

ज्या समानांक पंक्तीचा वर्ग करणें असेल तींत जितकीं अंकस्थलें असतील तितके मूळ अंक १ पासून प्रथम चढत्या क्रमानें लिहून नंतर त्याखालीं तेच अंक पुनः एकानें उतरत्या क्रमानें १ पर्यंत लिहावे. नंतर या क्रमांतील प्रत्येक अंकास ज्या समानांक पंक्तीचा वर्ग करणें असेल त्या अंकाच्या वर्गानें गुणून

दुर्बलता, निद्रानाश, दमा, श्वास, क्षयादिक रोगांवर प्रो. जेम्सच्या
चित्तरंजन अर्क गुटिका हाच एक रामबाण उपाय आहे.

प्रत्येक गुणाकार एकाखालीं एक अशा क्रमानें परंतु एक अंक पुढें करून मांडावा व शेवटीं या सर्व गुणाकारांची बेरीज द्यावी म्हणजे ही बेरीज इच्छिलेले समानांक पंक्तीचा वर्ग होते.

जसें—कल्पना करा, कीं, आपणास ४४४ या संख्येचा वर्ग करणें आहे. आतां या संख्येंत ३ अंक-स्थळें आहेत, करितां वरील नियमाप्रमाणें,

१	× ४^2 म्ह० १६	=	१६
२	,,	=	३२
३	,,	=	४८
२	,,	=	३२
१	,,	=	१६
			१९७१३६ = (४४४)^2

तसेंच, आपणास ५५५५ या संख्येचा वर्ग करणें आहे तर—

१	× ५^2 म्ह० २५	=	२५
२	,,	=	५०
३	,,	=	७५
४	,,	=	१००
३	,,	=	७५
२	,,	=	५०
१	,,	=	२५
			३०८५८०२५ = (५५५५)^2

इत्यादि.



पृथ्वीवर महाभूतांची स्वारी.

[लेखक—श्रीयुत श्रीधर अनंत भागवत, बी. एससी.]



तात्यानाजीनें ज्या स्थितींत सिंहगड घेतला, त्याच स्थितींत तो आज आहे काय? उदयभानूशीं झगडत असतांना कबंधाच्या पायानें पवित्र झालेले धूलिकण आजतागाइत कांहींएक फरक न होतां तसेच राहिले असतील काय? आप्, तेज व वायु यांपैकीं प्रत्येकानें आपलें हत्यार चालवून मूळचा सिंहगड नामशेष करून टाकिला. हल्लीं सिंहगड नांवानें ओळखला जाणारा प्रदेश, पूर्वीच्या सिंहगडाचा नामधारी व रूपधारी आहे. जी सिंहगडाची अवस्था तीच साऱ्या पृथ्वीची!

पृथ्वीचें रूप बदलण्यास वायूची मदत होते. झंझावात वहावयास लागला म्हणजे त्याच्या तडाख्यांत सांपडणाऱ्या धूलिकणांची त्रेधा विचारूं नका! तो कधीं त्यांस पूर्वेकडून पश्चिमेकडे, तर कधीं दक्षिणेकडून उत्तरेकडे नेतो. एकादे वेळेस जमिनीसरपटच त्यांस कोसचे कोस आपल्यावरोवर ओढीत नेतो, तर कधीं आपल्या पंखांवर बसवून उंच आकाशांत गरगर फिरवीत नेऊन एकदम खालीं सोडून देतो; कधीं त्यांस उंच पर्वतावरून नजीकच असलेल्या खोल दरींत ढकलून देतो; भूपृष्ठावरून उचलून या वायूनें अनेक धूलिकाकणांस आजपर्यंत विनदिक्कत जलसमाधि दिली आहे. 'वायु' महाभूताच्या त्रासानें आजपर्यंत कोकळ जमीन किती उध्वस्त झाली असेल याचा तर पत्ताच नाहीं! परंतु 'अचल' पर्वतांचेंहि याच्यापुढें कांहीं चालत नाहीं! वायुसमुद्राच्या लाटा एकदां पर्वतावर येऊन अप्रतिहत मारा करूं लागल्या, म्हणजे दर लाटेबरोबर त्या कांहीं कण आपल्याबरोबर घेऊन जातात. दररोज थोडे थोडे कण पडत गेल्यानें कालांतरानें मोठमोठाले कडपे नाहींसे होऊन पर्वतांचें रूपांतर होतें. या क्रमांत आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवरील, कठिण किंवा नरम, उंच अथवा सखल, उजाड अगर सुपीक प्रदेश सुटला नाहीं. एकाच झंझावातानें अशी भयंकर नासाडी होते, तर मग पृथ्वीच्या आरंभापासून

प्रो. जेम्सच्या विद्युच्छक्तिवर्धक गुटिका वापरल्यानें पचनक्रिया वाढून भूक चरचरून लागते व शरीरांत उत्साह येतो. किं. २५ गो. १। रु. ४० गो. २ रु.

आजपर्यंत सुटत असलेल्या झंझावातांनीं किती नासाडी केली असेल, याची कल्पना कोण करूं शकेल? उष्णतेनें पदार्थ विस्तार पावतो व थंडीनें तो आकुंचित होतो, या पदार्थविज्ञानशास्त्राच्या नियमाला पृथ्वी अपवाद नाहीं. कडक उन्हाच्या तापानें पृथ्वी इतकी तप्त होते, कीं, पर्वतसुद्धां जास्त लांब रुंद होतात. कधीं कधीं विस्तार पावण्यानें पृथ्वीवर इतका ताण पडतो, कीं, ती जागजागीं दुभंग होते; उलटपक्षीं थंडीनें ती आकुंचित होते. सहारासारखीं प्रचंड मैदानें दिवसा अत्यंत तप्त होऊन उष्णतेचे नियम अनुसरतात, तर रात्रीं थंडीनें गारठल्यामुळें आकुंचित होतात. दिवसा उष्णतेमुळें वाढ, तर रात्रीं थंडीमुळें आकुंचन! उन्हाळ्याची उष्णता खाऊन कडकडीत व्हावें न व्हावें, तोंच पाऊस आणि थंडी यांनीं येऊन आपला अम्मल गाजवावा. अशा रीतीनें पृथ्वीचे हाल झाल्यामुळें ती विद्रूप झाल्यास नवल तें काय? हे बाहेरचे हाल पुरवले, परंतु ज्वालामुखीचा उद्रेक होऊन तो नासधूस करूं लागला म्हणजे पृथ्वीचे हाल पाहवत नाहींत!

आपल्या भावी आगमनाचे 'हुं'कार भूगर्भांतून तो देऊं लागला, म्हणजे पृथ्वी भयानें कंपित होते. असा कांहीं काळ लोटल्यानंतर पृथ्वीच्या पोटांतून पृथ्वीच्या पृष्ठावर दगड, लावारस व राख यांचा असा बेसुमार मारा होतो, कीं, खुद्द पृथ्वीसच 'दे माय धरणी ठाय' असें होऊन जातें! सर्व खंडांत असा विद्रूप झालेला प्रदेश आहे. समुद्रपृष्ठाखालींहि पाण्यास न जुमानतां अग्नीनें धुडगूस घातला आहे; विशेषतः जेथें जमीन व समुद्र याचा संयोग होतो, तेथें पृथ्वीची फारच दैना झाली आहे. देवी आल्यामुळें एकाद्या सुकुमार, सुंदर युवतीचें तोंड खप्पड व खरबुजाप्रमाणें होतें, तद्वत्च पृथ्वीचें मुख विद्रूप बनलें आहे! सारांश, या अग्निमुख महाभूतानेंहि वायूच्या बरोबरीनें, किंबहुना थोडेंसें अधिकच आपलें हत्यार चालविलें आहे.

पृथ्वीची नासाडी करण्यांत सर्व महाभूतांत अहमहमिका सुरू असल्यामुळें पाण्यानें-'आप्'महाभूतानें—आपला अम्मल अत्यंत करड्या दृष्टीनें चालविला आहे; व त्यांत खुबी अशी आहे, कीं, अग्नीचा अम्मल जाचक होतो, तर पाण्याचा सुखद वाटतो. पावसाचें पाणी आकाशांतून पडत असतांना त्यांत 'कार्बानिक असिड ग्यास' संमिश्र होतो, व हें तेजाबाचें पाणी पृथ्वीवर येऊन पोहोंचलें, म्हणजे पृथ्वीची धुळधाण करूं लागतें, व वायु आपल्या लाटेबरोबर जसा एक एक कण वाहून नेतो, त्याप्रमाणें हें 'तेजाबपाणी' प्रत्येक सरोवरोवर भूपृष्ठ खरडून नेतें. पाण्याचा प्रत्येक ओघळ, ओहोळ, नाला, नदी आपल्या प्रवाहानें व आपआपल्या परीनें भूपृष्ठाचें स्वरूप बदलतातच, परंतु सिंधुनदासारखा महानद दुथडीची कोंडी फोडून आसमंत भागांत संचार करितो, तेव्हां डेरागाजीखानसारखीं विस्तीर्ण शहरें जमीनदोस्त करून टाकतो, व त्या शहराखालीं असलेल्या जमिनीवरहि आपला नांगर फिरवून तिचे समुद्रापर्यंत धिंडवडे काढतो. समुद्रांतील पाण्यानेंहि आपल्या लाटांच्या हल्ल्यानें जमिनीचा कांठ निखळून टाकिला आहे. कधीं ज्वालामुखीच्या साहाय्यानें, तर कधीं अज्ञेय शक्तीची मदत घेऊन 'आप्' महाभूतानें पृथ्वीवर अनेक वेळां क्रांति केली आहे. भूपृष्ठाखालीं जें पाणी जातें, तेंहि पृथ्वीची पाठ फोडून कधीं भुसभुशीत जमिनींतून, तर कधीं काळ्या फत्तरांतून, तर कधीं कधीं अनेक थर जमून बनलेल्या जमिनींतून मार्ग काढीत, मार्ग नसेल तेथें प्रवाहाचा सुरुंग लावून जमीन विस्खलित करून पुढें सरकतें. पाणी खोल गेल्यानंतर तेथेंहि स्वस्थ बसत नाहीं. कधीं ज्वालामुखीस वाफेच्या रूपानें मदत करतें, तर कधीं गुप्त नदी बनून पृथ्वी पोखरून काढितें! 'आप्' महाभूतास जेव्हां इतर महाभूतांची मदत मिळते व हीं दोन्ही महाभूतें एकमेकांच्या सहायानें पृथ्वीवर जोरानें हल्ला करितात, तेव्हां तर तिची दीन स्थिति पाहावत नाहीं!

हीं महाभूतें पृथ्वीचे जसे हाल करतात, त्याप्रमाणें तिजवर प्रेमहि करितात; त्याचें शब्दचित्र आणखी एकादे वेळीं वाचकांपुढें ठेवण्याचा विचार आहे.

अंगांत ताप असो वा नसो, ऑटमन्स मलेरियस पिल्स
घेण्यास हरकत नाहीं. किंमत १ रु.

कमळाबाईची गृहव्यवस्था.

[लेखक—अ. एक भगिनी.]

आज संध्याकाळीं काय करावें तें सुचेना. मी आज महिना दीडमहिना वाचीत होतें, तें पुस्तक नुकतेंच चार दिवसांपूर्वी संपलें. नवीन वाचावयास काय घ्यावें याचा नक्की बेत अजून झाला नव्हता; रेशमाचें कुशन् आज वरेच महिने काढीत होतें, तेंही कालच संपून आमच्या छोट्याशा दिवाणखान्यांतील कोचावर जाऊन बसलें. तेव्हां आज संध्याकाळीं करण्यास विशेष कांहीं काम नव्हतें व मंडळीलाहि आज कोठें बाहेर जावयाचें असल्यामुळें फिरण्यास जावयाला मिळेल असाहि रंग दिसेना. म्हणून झटलें बरोबर जाऊन वाटेंत माझ्या मैत्रीण कमलाबाई यांच्या घरीं उतरावें, व वरेच दिवस त्या बाजूला फिरकलें नव्हतें, तें आज जाऊन घटकाभर बसून यावें. असा विचार करून घाईघाईनें तयारी करून मंडळीबरोबर निघालें. बरेच दिवस कोठें बाहेर पडलें नसलें म्हणजे कोठें जावयास निघाल्यास वृत्ति उल्हसित होते: व झणूनच आज मला बाहेर पडतांना फार बरें वाटलें.

कमळाबाईचें घर कांहीं फार लांब नव्हतें. गाडींतून उतरून मीं त्यांच्या घरापुढील फुलबागेंत पाय ठेविला, तोंच त्यांची बारा वर्षांची मुलगी मला दिसली. मुलीच्या अंगावर घनवडी काळ्या चंद्रकळेच्या खणाचा परकर व चिटाचें पोलकें होतें. दोन्ही वस्तु अगदींच हलक्या नव्हत्या, साधारण मोलवान होत्या; पण परकराचा नेफा बराच उसवला होता व पोलकें अगदीं मळकें दिसत होतें, त्यामुळें त्या कपड्यांची शोभा बरीच कमी झाली होती. ती माझ्यापुढें धांवतच गेली. पायऱ्यांजवळच असलेल्या गुलाबाच्या कुंडीकडे माझी नजर गेली. दोनचार गुलाबी रंगाचीं चांगलीं उमललेलीं फुलें झाडावर होतीं; परंतु झाडाच्या बुडाशीं व कोठें कोठें फांद्यामध्यें अडकलेले कागदाचे चिटोरे मला दिसले. घरच्या माडीवरून कोणीं फाडून टाकलेल्या एकाद्या पत्राचे हे तुकडे आहेत हें माझ्या तेव्हांच लक्ष्यांत आलें.

मी घराच्या दिवाणखान्यांत शिरतें तोंच कमळाबाई माझें स्वागत करण्यासाठीं पुढें आल्या. आमची बरेच दिवसांनीं भेट झाल्यामुळें आम्हां दोघींनांहि एकमेकींला पाहून फार बरें वाटलें. मला त्यांनीं कोचावर बसावयास सांगितलें. तो कोच अगदीं नवाच दिसला. एकदोन खुर्च्याहि नव्या व त्या कोचास शोभण्यासारख्या होत्या. थोडा वेळ बोलणें चालणें झाल्यावर समोरच्या टेबलावर असलेल्या फोटोकडे माझें लक्ष्य गेलें. तो पाहाण्यासाठीं उठून मी टेबलाजवळ गेलें व पहातें तों तो त्यांच्या सर्व कुटुंबाचा होता. फोटोच्या फ्रेमवर बराच धुरळा साठला होता, त्यामुळें फोटोची शोभा नीट दिसत नव्हती; तरी पण तो कोणीं नांवाजलेल्याच फोटोग्राफरनें काढलेला असावा असें वाटल्यावरून मीं म्हटलें, " कायहो, कमलाबाई, हा कोणाकडून काढवलात ? "

कमळाबाई झणाल्या "तो नाहीं का कॅंपमधला चांगला फोटो काढणारा? त्याचें नांव मी विसरलें. आजकाल या शहरांत उत्तम तोच आहे म्हणतात. पण त्याचे दर फारच आहेत हो! एक डझन् प्रतींची किंमत पंचवीस रुपये; पण झटलें एकदां काढून घ्यावयाचा तो चांगलाच घ्यावा. "

फोटोची धूळ हाताला लागली होती, ती मीं हळूच रुमालाला पुसली व जागेवर जाऊन बसलें. इतक्यांत दाराजवळ कोणी येऊन 'नारायणराव (कमळाबाईचे यजमान) घरांत आहेत काय?' झणून विचारूं लागले. त्यांनां कमळाबाईनीं " बसा, ते इतक्यांत येतील. " असें सांगून त्या मला हळूच झणाल्या " चला, आपण आंतच बसूं. "

संध्याकाळ बरीच झाल्यामुळें मला नीट दिसलें नाहीं, व ज्या भागांतून आम्ही चाललों होतों, तेथें टेबलेल्या कांहीं वस्तूवर माझा पाय जोरानें आपटला; तें पाहून कमळाबाईनां वाईट वाटलें. त्या झणाल्या " लागलें तर नाहीं ना फार तुझांला? काय करावें, आमची जागा पडली अडचणीची; व हल्लीं नवीन कोच व खुर्च्या

सर्व प्रकारचे तापांवर, हिवताप, हाडीज्वर, अंगात मुरलेल्या तापामुळें अंग कसकसणें
वगैरेवर ऑडमन्स मलेरियस पिल्स फारच गुणकारी आहेत !

घतल्यामुळें या खुर्च्या येथें आणून टाकाव्या लागल्या. घरांत ह्मणणें चालले होतें 'विकूनच टाकूं या. काय करावयाच्या आहेत त्या मोडक्या खुर्च्या?' पण मीं ह्मटलें असूं द्याव्या, सध्यां नाहीं तरी पुढेंमागें नीट केल्यावर उपयोगी पडतील."

मला त्यावेळीं तरी निदान वाटलें, कीं, नारायणरावांनीं त्या जुन्या सामानाची आपल्या इच्छेप्रमाणें वाट लाविली असती तर बरी; कारण, तसें झालें असतें तर आज माझा पाय बचावला असता; व तें ठेवण्यांतहि मला कांहीं विशेष अर्थ दिसला नाहीं. तें सामान इतकें मोडलें होतें, कीं, तें नीट करावयास बराच खर्च लागला असता, व इतकें करूनहि तें कामास किती दिवस आलें असतें हा प्रश्नच होता.

मला आंतल्या खोलींत गेल्यावरोवर कांहीं वेळ उभें रहावें लागलें. खोलीच्या मध्यभागीं चटई होती, तिच्यावर कांहीं कपडे अस्ताव्यस्त पडले होते; ते कमळाबाईनीं झटकून उचलून जुना कोच एका कोपऱ्यांत ठेविलेला होता, त्याच्यावर आणखी असेंच कांहीं सटरफटर सामान पडलें होतें, त्यावर ते ठेवून दिले, व चटईवर मला बसावयास सांगून, "आज पुष्कळ दिवसांनीं आलांत, थोडा चहा तरी घ्या." असें ह्मणून आंत चहा करण्यास त्या निघून गेल्या.

त्या परत येईपर्यंत वेळ काढण्याकरितां मी खोलीचें बारकाईनें निरीक्षण करूं लागलें. भिंतीला खुंटाळीं होतीं; परंतु तीं थोडींबहुत रिकामींच असून, त्यांच्यावर असावयाच्या कपड्यांचा त्या जुन्या कोचावर ढीग झाला होता. एका फडताळांत नेहमीं लागणाऱ्या औषधांच्या बाटल्या व दुसऱ्या पुष्कळ दिवसांच्या रिकाम्या बाटल्या या एकाच ठिकाणीं मिसळून ठेविल्या होत्या. फडताळाच्या कोपऱ्यांत कोळिष्टकें व बाटल्यांवर धूळ साठलेली होती. ज्या कपड्यांच्या पेट्या चांगल्या लावून ठेविल्या असतां खोली व्यवस्थित दिसली असती, त्या कशातरी वेड्यावांकड्या पडल्यामुळें खोलींत बरीच अडगळ असल्याचा भास होत होता व जागाहि जास्त अडकली होती. खिडक्यांवरूनसुद्धां जुनें मोडकेंतोडकें सामान ठेविल्यामुळें खोलींत प्रकाश व मोकळी हवा येतांचींच येत होती. एकंदरींत त्या खोलींत संध्याकाळच्या वेळीं बसल्यानें हुशारी न वाटतां उलट जीव गुदमरूनच जावा, अशी व्यवस्था दिसली.

इतक्या सर्व गोष्टी मी पहातें आहे तों नोकरानें आंत दिवा आणिला, व लागल्याच कमळाबाईहि एका हातांत चहाचा पेला व दुसऱ्या हातांत शंकरपाळ्यांनीं भरलेली वशी घेऊन आल्या व दोन्ही वस्तु माझ्यापुढें चटईवर ठेवून त्या घेण्याचा आग्रह करूं लागल्या. कमळाबाईंना चार वर्षांचा मुलगा मधुकर आपले वडील घरीं आले ह्मणून सांगावयास आंत धांवत आला, त्याचा पाय चटईच्या कडेच्या निघालेल्या काड्यांत अडकून तो पडला व रडूं लागला. त्या धक्क्यामुळें चहाचा पेलाहि लवंडला व थोडासा चहा बाहेर सांडला. मुलाचें रडणें थांबल्यावर कमळाबाईनीं चहा सांडल्याबद्दल वाईट वाटल्याचें बोलून दाखविलें.

मीं 'कांहीं हरकत नाहीं' असें सांगून राहिलेला चहा वगैरे घेतला व बराच उशीर झाला होता ह्मणून सुपारी घेऊन जावयास उठलें.

घरीं आल्यावर कळलें, कीं, मंडळी अजून परत आली नाहीं; ह्मणून आमच्या लहानच परंतु व्यवस्थित दिवाणखान्यांत मी एका खुर्चीवर बसलें. तेथला तो मंद, आनंददायक प्रकाश, लहानसहानच कां होईनात, परंतु चांगल्या स्वच्छ ठेविलेल्या शोभेच्या वस्तु पाहून मनाला उल्हास व धन्यता वाटली, व नुकत्याच पाहिलेल्या कमळाबाईच्या गृहव्यवस्थेसंबंधीं विचार मनांत येऊन त्यांचें कांहूर माजलें. आपलें घर मोठें दुमजली असो, कीं, चाळीच्या तीन खोल्यांत असो, आपलें सामान उंची असो, कीं साधें, संसारांत नेहमीं उपयोगी पडणारें असो; तें जर प्रत्येक गृहिणीनें जेथल्या तेथें नीटनेटकें व स्वच्छ ठेविलें, तर त्यामुळेंच तिच्या घरास किती शोभा येईल व तेथें रहाणारांची मनें नेहमीं किती उल्हसित रहातील, असें मला वाटलें; व अशी व्यवस्था नसली, तर घर कितीहि मोठें असलें व सामानाची कितीहि विपुलता असली, तरी तेथें रहाणारांस नेहमीं अडचण, त्रास व मनाची उद्विग्नता हीं किती सोसावीं लागतात, असे एक ना दोन विचार माझ्या मनांत आले.

इतक्यांत बाहेर मंडळीचीं पावलें वाजलीं, त्यासरशीं माझ्या विचारांचा लय होऊन मी चटकन् उठून दार उघडावयास गेलें.

[5-12]

सर्वांत जुनी व नांवाजलेली

बी. सखारामजी आणि कंपनी,

हॉउस इस्टेट ऍण्ड इन्शुअरन्स एजंटस्.

मुख्य ऑफिस, १८ हमाम स्ट्रीट, कोट, मुंबई. (टेलिफोन नं. ३९०.)

ब्रँच ऑफिस–भरुचा बिल्डिंग्ज, काळबादेवी, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई. (टेलिफोन नं. २१४४.)

आह्मी मुंबई व इतर ठिकाणीं असलेल्या उत्तम व प्रसिद्ध अशा घरांचे व मालमत्तेचे मुख्य एजंटस् आहोंत व त्यामुळें मालकांनां व गिऱ्हाइकांनां आमचे मार्फत काय फायदा झाला व होत आहे याचा खुलासा गरजूंनीं अवश्य मागवावा.

उत्तम शृंगारलेले (फर्निश्ड) अथवा बिनशृंगारलेले बंगले, घरें, मजले, ऑफिसांकरितां व पेढ्यांकरितां लहान व मोठ्या जागा, दुकानांकरितां जागा, मुंबईतील कोणत्याहि भागांमध्यें आमच्या मार्फत पाहिजे तेव्हां मिळतील.

घरें व इतर जमीनजुमले यांची खरेदी व विक्री मुंबई, माथेरान, लोनावळा, खंडाळा, महाबळेश्वर, पुणें, पंचगणी, देवळाली, दिल्ली, कराची, इत्यादि ठिकाणीं आमचे मार्फत उत्तम तऱ्हेनें होते.

हवाशीर घरांमध्यें राहिल्यानें प्रकृति उत्तम रहाते; व उत्तम प्रकृति हेंच सर्व सुखाचें साधन आहे; आणि असलीं साधनें आमच्या वतीनें सुलभ रीतीनें उपलब्ध होतात.

रिकामीं असलेलीं घरें व विक्रीची मालमत्ता यांची माहिती पत्रद्वारें मागविली असतांहि देण्यांत येते. घरांचीं भाडीं मालकांकरितां फार सवलतीनें वसूल करण्यांत येतील. लायक गहाणांवर अल्प गरजा भागविण्यापासून मोठे धंदे उभारण्यास लागतील अशा रकमा, विनबोभाट थोड्या मुदतींत, भरंवसेशीर रीतीनें व्याजीं लावून दिल्या जातात, आणि गरजूंच्या गरजा भागविल्या जातात. अनुभवानें खात्री.

विशेष माहिती पत्रद्वारें अगर समक्ष विचारिली असतां खुलासेवार देण्यांत येईल.

हिल्स्टेशन्सकडील लोकांची होत असलेली मोठी गैरसोय दूर करण्यासाठीं आह्मीं आमच्या कंपनीची शाखा पुण्यासहि स्थापन केली आहे. तरी तिचा फायदा लोक घेतील, अशी उमेद आहे.

आह्मीं **इंडिया इक्विटेबल इन्शुअरन्स् कंपनी लिमिटेडची** मुंबई इलाख्याची **चीफ एजन्सी** घेतली आहे. हेड ऑफिस—कलकत्ता. प्रॉस्पेक्टस् व इतर माहिती मागविली असतां देण्यांत येईल. हुषार व प्रामाणिक एजंटस् पाहिजेत.

पुण्याचा पत्ता:—
बी. सखारामजी आणि कंपनी,
हाऊस इस्टेट ऍण्ड इन्शुरअरन्स एजंटस्,
ईस्ट स्ट्रीट, पुणें.

प्रोप्रायटर,
वसंतराव सदाशिव घोत्रे.

2 या कंपनीशीं कोणताहि पत्रव्यवहार करतांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

वनौषधि सारसापरिला.

हा सारसापरिला कोणीहि सेवन केल्यास त्यापासून रक्तशुद्धि व रक्तवृद्धि होऊन शरीर पुष्ट व सतेज होतें. स्मरणशक्ति वाढून मेंदूला बळकटी येते, आणि शक्ति वाढते. बा. कि. रु. १।.

महाकुष्ठ व पांढरें कोड

यांवर दोन अत्युत्तम गुणदायक औषधें.

१ भारतमधुवल्ली–खाण्यासाठीं. किं. रु. १।.
२ नागवल्लीतेल–लावण्यासाठी. किं. रु. २.

मधुवल्ली सेवन केल्यानें व नागवल्ली तेल लाविल्यानें अठरा प्रकारचीं कुष्ठें खात्रीनें बरीं होतात. साधारण गुण दिसण्यास पंधरा दिवस लागतात.

[5–12] **डॉ. धाकजी भानजी सावंत,**
फणसवाडी, कोळ्याची चाळ, नं. २, मुंबई.

नवीन पुस्तक!

हिंदुस्थानांतील यात्रेच्या सर्व पवित्र क्षेत्रांची, मोठमोठ्या व्यापारी व इतिहासप्रसिद्ध शहरांची, निसर्गसुंदर देखाव्यांची आणि प्रेक्षणीय स्थळांची वगैरे बरीच उपयुक्त विश्वसनीय आणि मनोरंजक माहिती सुंदर चित्रांसहित एके ठिकाणीं देणारें **मराठींतील पहिलेंच पुस्तक.**

प. वा. श्रीयुत वी. एल्. घोरपडे यांचें

सचित्र
भारत-प्रवास-वर्णन.

आकार सध्याच्या 'मनोरंजना'एवढा. पृष्ठसंख्या २६०. आर्ट पेपरवर सुबक छापलेलीं हाफटोनचीं चित्रें ९०, **किंमत रुपये २. पोष्ट व्ही. पी. खर्च निराळा**

राधाबाई अण्णासाहेब घोरपडे,
चालक, **ए. एल्. घोरपडे,** यांची इंक फॅक्टरी.
[3–12] २२, सोमवार पेठ **पुणें.**

☞ हें पुस्तक **मनोरंजन** ऑफिसांतहि मिळूं शकेल.

[5–12] **क्लिडायन्स छापचीं**

प्रोफेसर गज्जर यांचीं
शास्त्रीय रीत्या तयार केलेलीं औषधें.

फिवर ड्राप्स (ज्वरबिंदु) सर्व प्रकारच्या तापांवर जालीम. कि. ८४

ब्लडप्युरिफाईंग सोल्युशन (रक्तशोधक) उपदंशापासून होणाऱ्या रोगांवर फारच गुणकारी ठरलेलें. कि. रु. १

टॉनिक सोल्युशन—अपचन, अग्निमांद्य, जीर्णज्वर वगैरे विकार या औषधाच्या सेवनानें नाहींसे होऊन शारीरिक व मानसिक शक्ति वृद्धिंगत होते. कि. रु. २

प्लेगसोल्युशन—प्लेगवर रामबाण. किं. ८८

जर्मिसाईड—प्लेग, कॉलरा, वगैरे जंतुजन्य रोगप्रतिबंधक. कि. ८८.

कॉलरा सोल्युशन, गजकर्णाचें मलम, दंतमंजन वगैरे संपूर्ण औषधांची यादी मागवा.

आर्यानिक फार्मसी, गिरगांव, मुंबई.

हजारों लोकांनीं अनुभवून पसंत केलेला
स्वदेशी पवित्र साखरेचा [2–3]

शक्तिवर्धक पाक.

याचे सेवनानें शौचास साफ होऊन अग्नि प्रदीप्त होतो आणि खाल्लेल्या अन्नाचें रक्त बनून शरीर पुष्ट व सतेज बनतें. शिवाय कडकी, जीर्णज्वर, अशक्तता, व्रण, कुष्ठ, भगंदर, दमा, खोकला, अरुची व सर्व प्रकारचे वातविकार वगैरे रोग दूर होऊन शक्ति चौपट वाढते. २१ दिवसांत हटकून गुण. हा पाक सर्व ऋतूंत स्त्रिया, पुरुष, व मुलें यांनां सारखाच गुणकारी आहे. कि. २१ तोळ्यांच्या डब्यास व्ही. पी. सुद्धां १ रुपया. अनुपान सोबत. तीन डब्यांस व्ही. पी. सुद्धां २॥ रु. विशेष माहिती केसरींत पहा.

मेसर्स वी. ए. आणि कंपनी,
पब्लिशर्स, बुकसेलर्स, केमिकल्स आणि फोटो एजन्ट्स,
मु. पो. नरसोबाची वाडी, सदर्न मराठा रेलवे.

योग, मेस्मेरीझम आणि विद्युन्मानसशास्त्राच्या आधारानें तयार केलेला, आणि पृथ्वीच्या चाऱ्ही खंडांत मान पावलेला, त्रिकालदर्शी

आरसा !!

फक्त एकदांन अनुभव घेऊन पहा, कीं, भूत, भविष्य आणि वर्तमान जाणणें कठीण आहे कीं कसें ? अनुभव घेईपर्यंत आपल्याला कल्पना देखील करतां येणार नाहीं, कीं, हें ज्ञान कसें होत असेल ? प्राणिमात्र जो जो विचार करतें, त्याचें चित्र आकाशांत चित्रगुप्त देव अदृश्य रीतीनें काढून घेतो, तें चित्र आणि त्याचे परिणाम, समाधी आणि मृत्युकाळाशिवाय दुसऱ्या वेळीं मनुष्य साधारण दृष्टीनें पाहूं शकत नाहीं. तसे विचार आणि त्याच्या परिणामाचा अमुक विभाग पाहूं शकण्याची अद्भुत क्रिया एका महात्म्याच्या कृपेनें साध्य झाली आहे. श्रद्धाळु मुलें, पुरुष व स्त्रिया स्वतःचे विचार आणि त्यांचे परिणाम पाहूं शकतात, आणि त्या आधारानें भूत, भविष्य आणि वर्तमान हकीकत सांगूं शकतात. शिवाय, हिस्टिरिआ व भूतग्रेतबाधा इत्यादि मानसिक रोगांकरिता हा एक चमत्कारिक उपाय आहे. या आरशानें तसे रोग निर्मूल होतात. एकदां अनुभव घेऊन पहा. देवांच्या साहाय्यतेनें काम केल्यानें एकदम रोगी खडखडीत बरा होतो, हें अद्भुत नव्हे काय ?

आपण औषधोपचारांत पैसे खर्च करतां, आणि त्यांत आपल्याला बिलकूल यश मिळत नाहीं. परंतु एकदां हा उपाय योजून पहा. भविष्य जाणण्याकरितां आपण पुष्कळ पैसे खर्च करतां, परंतु या आरशानें आपण एकदां भविष्य जाणून घ्या व खात्री करून घ्या. आपले पैसे वांचतील आणि आपल्याला लाभ होईल. आपण स्वतःच भविष्यवादी होऊं शकाल. फक्त एक आरसा विकत घ्या; आणि स्वस्तें ज्ञान संपादन करा. अशा स्वस्त्या किंमतींत असा लाभ होतो तो जाऊं देणें हें अगदीं अयोग्य आहे. हा आरसा एकदां विकत घेतल्यानंतर नेहमीं उपयोगास पडतो. गांव, परगांव, देशांतर आणि दूर असणारे मित्र सोयरेसंबंधी यांनां या आरशाच्या साहाय्यानें आपण भेटूं शकाल. अमुक काम होईल कीं कसें ? अमुक वावतींचे परिणाम काय होतील ? वगैरे जे जे आपल्या मनाचे खुलासे करणें असतील ते सगळे होऊं शकतील. विद्वानांनीं पुष्कळ सरटिफिकिटें घाडलीं आहेत व घाडीत आहेत, हेच ह्या आरशाच्या उपयुक्ततेचे पुरावे होत. हा आरसा वापरण्याचें बुक ज्या भाषेंत पाहिजे असेल त्या भाषेचें नांव स्पष्ट लिहावें.

आरशाची किंमत—रु. २-९-० आरसा साध्या कांचेचा. आणि बिल्लोर कांचेच्या मजबूत आरशाची किंमत रु. ३-८-०. पोस्टेजसहित. हिन्दुस्थानाबाहेरच्या गृहस्थांकरितां वरील किंमतीपेक्षां एक रुपया जास्त.

खास बिलोर कांचेचे मोठे आरसे किंमत रु. ५. ट. ख. १ रु.


सूचना:—सदर आरसा पसंत न पडल्यास आरसा पोहोंचल्यापासून २४ तासांच्या आंत व्ही. पी. करून परत पाठवावा, म्हणजे अनुक्रमें रु. २-०-० व रु. २-८-० परत देण्यांत येतील.

पत्रव्यवहार बालबोध लिपींत करावा.

आशाभाई वायजीभाई पटेल,
[3-12] मु. करमसद, पोस्ट आनंद, जिल्हा खेडा, प्रांत गुजराथ.

या पृष्ठावरील जाहिरातींतील कोणतीहि वस्तु मागवितांना कृपा करून मनोरंजनाचा अवश्य उल्लेख करा.

भाजेकर आणि कंपनी. [1-1]



तांदुळाच्या गिरण्यांचे इंजनियर.

ब्रूसलेन—फोर्ट—मुंबई.

मेसर्स नागेल आणि केंप कंपनी (हंबर्ग)

याच्या तांदुळाच्या गिरण्याच्या यंत्राचे

एकटे अडत्ये.

पहिल्या प्रतीचीं तेलाचीं इंजनें व दळण्याचीं यंत्रें आणविलीं जातात.

सर्व तऱ्हेच्या तांदळाच्या गिरण्या, ऑइल इंजनें व दळण्याचीं यंत्रें आमच्या वखारीत असतात.

किंमतीकरतां व विशेष माहितीकरतां पत्र पाठवा.

मेसर्स भाजेकर आणि कंपनी.
ब्रूस लेन—फोर्ट—मुंबई.

[1-12]

के. आर. फाटक यांचें

बालामृत

जीर्णज्वर, श्वास, खोकला, हातपाय बारीक असणें, अन्न न पचणें इत्यादि रोग आमच्या बालामृतानें तात्काळ बरे होतात. पिंड निरोगी, सशक्त व सतेज होतो. हें गोड असल्यामुळें मुलें हौसेनें घेतात. एका बाटलीची किं. १२ आणे. ट. ख. निराळा.

के. आर. फाटक, ठाकुरद्वार रोड, मुंबई, नं. २.

कस्तुरीच्या गोळ्या या गोळ्यांच्या सेवनानें कोणताहि बारीक ताप, तसेंच अजीर्ण, वात, सरदी, पडसें व जलदोषानें उत्पन्न होणारे सर्व रोग समूळ नाहींसे होतात. शक्तिवर्धनाचे कामीं कस्तुरीसारखें दुसरें अप्रतिम औषधच नाहीं.

[1-1] २०० गोळ्यांच्या बाटलीस किंमत फक्त ४ आणे. ६ बाटल्यांस ट. ह. माफ.

मेसर्स सी. प्रसन्न ॲण्ड कंपनी, गिरगांव—मुंबई.

मनोरंजनासंबंधीं नियम.

१. मनोरंजनाचा वर्षारंभ जुलईत आहे. वर्गणी मुंबईत आणि बाहेरगांवीं सर्वत्र सारखी ४ रुपये आहे. किरकोळ अंकाची किंमत ८ आणे.

२. नवीन वर्गणीदारांस, ते केव्हांहि वर्गणीदार झाले तरी, वर्षारंभापासूनचे सर्व अंक पाठविण्यांत येतात, व जुलै ते जूनअखेर वर्गणीचें वर्ष संपतें.

३. मनोरंजनाच्या वर्गणीदारांस या वर्षीं दोन बक्षिसपुस्तकें–एक कांहींहि किंमत न घेतां, आणि दुसरें अतिशय सवलतीनें–देण्याचें निश्चित केलें आहे. पैकीं पहिलें बक्षिस पुस्तक 'विचारविलसित' नांवाचें सुंदर नाटक असून ते सर्वांनां प्रारंभींच (पहिल्या अंकाबरोबर) देण्यांत आलें आहे. दुसरें बक्षिस पुस्तक प. वा. न्या. मू. काशीनाथ त्र्यंबक तेलंग यांचें चरित्र हें असून तें तीनचार महिन्यांनंतर प्रसिद्ध होईल. हें चरित्र अत्यंत महत्त्वाचें, सुंदर रीतीनें लिहिलेलें, आणि बरेंच मोठें असून त्याची किंमत १ रुपया आहे. मनोरंजनाच्या वर्गणीदारांस हें फक्त ४ आणे ही अल्प किंमत घेऊन सवलतीनें बक्षिसादाखल देण्यांत येईल. ज्यांनां हें नको असेल त्यांनीं तें सवलतीच्या किंमतीनेंहि घेण्याची अर्थात्च आवश्यकता नाहीं.

४. वरील दोन बक्षिसपुस्तकांशिवाय नोव्हेंबर महिन्यांत नोव्हेंबरच्या अंकाऐवजीं फार मोठा, सुंदर व सचित्र असा 'दिवाळी'चा अंक, कांहींहि किंमत घेतल्याशिवाय वर्गणीदारांकडे बुकपोस्टानें पाठविण्यांत येईल.

५. मनोरंजनाच्या वर्गणीदारांनीं आमच्याशीं पत्रव्यवहार करतांना आपला रजिस्टरनंबर अवश्य कळवावा. हा रजिस्टर नंबर प्रत्येक अंकाच्या रॅपर (वेष्टना) वर डकविलेल्या अगर लिहिलेल्या पत्त्यामध्यें वर्गणीदाराच्या नांवाच्या आरंभीं असतो.

६. मनोरंजनांत प्रसिद्धीसाठीं पाठवावयाच्या लेखांसोबत लेखकाचा संपूर्ण पत्ता आणि पुरेसें पोस्टेज असावें, ह्मणजे नापसंत अगर प्रसिद्ध करण्यास सवड नसल्यामुळें परत करावयाचे लेख ज्यांचे त्यांच्याकडे १५ दिवसांचे आंत परत पाठविण्यांत येतील. सदर्हु लेखांसोबत पत्ता व पोस्टेज नसल्यास ते निकालांत काढण्यांत येतील, मागाहून मिळूं शकणार नाहींत. मोबदल्याची अपेक्षा करणारांनीं आपली ती इच्छा प्रारंभींच स्पष्ट कळविली पाहिजे, ह्मणजे त्या बाबतींत विचार करण्यांत येईल.

मालक—मासिक मनोरंजन, गिरगांव—मुंबई.

मनोरंजनाचीं मागील वर्षांचीं पुस्तकें.

खालीं दिलेल्या, मनोरंजनाच्या मागील वर्षांच्या पुस्तकांच्या, थोडथोड्या प्रती शिल्लक आहेत. हीं पुस्तकें सर्वांनां फारच सवलतीनें, अति स्वल्प किंमतींत मिळण्याची व्यवस्था केली आहे.

मनोरंजन पुस्तक ९ वें. (पृष्ठें ४८०.)
मूळ किंमत २–८–०. सवलतीची किंमत०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १० वें. (पृष्ठें ५८४.)
मूळ किंमत२–८–० सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक ११ वें. (पृष्ठें ४००.)
मूळ किंमत२–८–०. सवलतीची किंमत०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १२ वें. (पृष्ठें ५५२.)
मूळ किंमत २–८–०. सवलतीची किंमत१–४–०.

मनोरंजन पुस्तक १३ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १४ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १४ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत१–८–०. सवलतीची किंमत ०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १५ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १६ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत १–८–०. सवलतीची किंमत०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १६ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत१–८–०. सवलतीची किंमत०–१२–०.

मनोरंजन पुस्तक १७ वें. (पूर्वार्ध.)
मूळ किंमत २–०–० सवलतीची किंमत १–८–०.

मनोरंजन पुस्तक १७ वें. (उत्तरार्ध.)
मूळ किंमत२–०–०. सवलतीची किंमत १–८–०.

दोन घटका मनोरंजन. (पृष्ठें ३९२.)
मनोरंजन वर्ष १, २ व ३ यांतील गोष्टी.
किंमत १–४–०.

दोन घटका मनोरंजन. (पृष्ठें ४००.)
मनोरंजन वर्ष ४ व ५ यांतील गोष्टी.
किंमत १–४–०.

संसाररंजन. (पृष्ठें ३१४.)
मनोरंजन वर्ष ९, १० यांतील गोष्टी.
किंमत १–०–०.

मनोरंजनचा दिवाळीचा अंक.
अंक १ ला. (पृष्ठें १९२.)
किंमत ०–१२–०.

मनोरंजनाचा दिवाळीचा अंक.
अंक २ रा. (पृष्ठें २२४.)
किंमत ०–१२–०.

मनोरंजनाचा दिल्लीदरबारचा अंक.
(पृष्ठें २८०.) किंमत १–०–०.

महाराष्ट्रमहिला, पुस्तक १ लें. (उत्तरार्ध)
पृष्ठें ३८०. किंमत १–०–०.

महाराष्ट्रमहिला, पुस्तक २ रें. (पूर्वार्ध.)
पृष्ठें २४०. किंमत०–१२–०.

विशेष सवलती.

१. वरील २१ पुस्तकांपैकीं कोणतींहि ४ पुस्तकें मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{15}{16}$ किंमतीस देण्यांत येतील.

२. वरील पुस्तकांपैकीं कोणतींहि ८ पुस्तकें मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{15}{16}$ किंमतीस देण्यांत येतील

३. वरील पुस्तकांपैकीं कोणतींहि १२ अगर जास्त मागविल्यास सवलतीच्या दराच्या $\frac{3}{4}$ किंमतीस देण्यांत येतील.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव, मुंबई.